# महाराष्ट्रीय ज्ञानकोश

283

विभाग ३ रा

## बुद्धपूर्वजग

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

## प्रस्तावनाखंड.

---

विभाग तिसरा.

## बुद्धपूर्वजग



हा ग्रंथ

श्रीधर व्यंकटेश केतकर; एम्. ए. पीएच्. डी.

यांनीं

मंडळांतील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केला.

---



१९२३

मुद्रक—हा ग्रंथ ज्ञानकोश छापखाना ८४१ सदाशिव पेठ पुणें येथें व आर्यभूषण छापखाना येथें कंपोज करून आर्यभूषण, चित्रशाळा, कलागृह व ज्ञानकोश छापखान्यांत छापला.

प्रकाशकः—महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लिमिटेड नागपूर, तर्फे श्रीधर व्यंकटेश केतकर, ८४१ सदाशिव पेठ, पुणें.

होता, वर्ण शब्दाचा जुना अर्थ आचार किंवा संप्रदाय असावा इत्यादि मतें निश्चित झालीं नसल्यामुळें संशोधकवर्गांत असलेल्या जुन्या कल्पनांची छटा मधून मधून त्यांत दिसेल. पण ती फार थोडी आहे.

प्रस्तुत भागांत वेदकालीन शब्दसृष्टि हें प्रकरण दुसऱ्या भागातच घालण्यासाठीं तयार केलें होतें. तें फारसा बदल न करतां तसेंच मुद्रित केलें आहे. या प्रकरणात वर दिलेल्या मताशीं संगति उत्पन्न करण्याकरितां फेरफार करावयाचे ते केले नाहींत. भिन्न भिन्न ग्रंथकारांचीं मतें मांडलीं आहेत. हीं मांडतांना मॅकडोनेल आणि कीथ यांच्या 'वैदिक इंडेक्स' चा बराच उपयोग केलेला आहे आणि जेव्हां वेदिक इंडेक्सनें दिलेल्या आधाराचें विशिष्ट पुस्तक हातांशीं नसेल तेव्हां वेदिक इंडेक्स-मधलें विधान असेंचें तसेंच ठेवलें आहे.

बुद्धपूर्व जगाच्या इतिहासास आरंभ केला आहे तो विश्वोत्पत्तिविषयक विचारांपासून केला आहे. जडापासून जीवाची उत्पत्ति कशी झाली हें शास्त्रज्ञांस अजून मोठें गूढ आहे. स्पेन्सरनें आपल्या विकासवादाच्या मांडणींत तेवढाच भाग वगळला आहे. विकासवादाच्या मांडणीचा तो भाग भरून काढावा म्हणून अनेक प्रयत्न झाले आहेत ते सर्वस्वी यशस्वी झाले नाहींत. तथापि ती मांडणी कशी करतां येते हें दाखविण्यासाठीं प्रो. सहस्रबुद्धे यांचा एक लेख दिला आहे. जीवोत्पत्तीपासून मनुष्य-विकासापर्यंत ज्या अनेक पायऱ्या आहेत त्याचें विवेचन येथें केलें नाहीं; तें शरीरखंडांत येईलच. मनुष्यप्राणी प्रथम कोठें विकसित झाला, त्याचें प्राथमिक स्वरूप कसें होतें हीं अजून गूढेंच आहेत. त्या विषयावर शेंकडों ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. मनुष्याचा विकास आणि आज उपलब्ध असलेले अनेक मानववंश व अनेक भाषा यांचा वंशवृक्ष पद्धतशीर तयार करतां येईल इतकी शास्त्राची प्रगति झाली नाहीं. मनुष्यभ्रमणाचा इतिहास तयार झाला नाहीं, म्हणून हा तयार करण्याचा प्रयत्न कसा चालू आहे हें दाखविण्यासाठीं या इतिहासक्षेत्रास उपयोगी पडण्यासारखी शास्त्रीय पद्धति येथें मांडली आहे. भाषाशास्त्रविषयक अभ्यासामध्यें शब्दसंग्रह व भाषांचें व्याकरण यांच्या प्राचीन इतिहासाचें अवगमन करण्यासाठीं बलाबल किती आहे हेंहि मांडलें आहे. हें विवेचन सामान्य वाचकास एतद्विषयक शास्त्रीय पद्धतींमध्यें प्रवेश करून देण्यास उपयोगीं पडेल अशी आशा आहे.

ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाचे पांचहि विभाग मिळून एक पूर्ण ग्रंथ होतो. तिसरा आणि चौथा विभाग मिळून सामाजिक व राजकीय इतिहासाची संगति मांडली आहे, आणि पांचव्या विभागांत ज्ञानाच्या वाढीचा इतिहास आहे. पहिला विभाग जगाचें अवलोकन भारतीय दृष्टीनें करीत आहे, आणि आपले अत्यंत व्यापक हितसंबंध पहात आहे. दुसरा विभाग हा तिसऱ्या व पांचव्या विभागाचा सामान्य आरंभ होय. वेद हें साहित्य राजकीय व सामाजिक इतिहासांसाठीं तिसऱ्या विभागांत उपयोजिलें, तर वैज्ञानिक इतिहासासाठीं तें अवगाहन करून त्यापासून उत्पन्न होणारें ज्ञान पांचव्या विभागांत मांडलें. वैज्ञानिक, सामाजिक आणि राजकीय इतिहासाचा प्रारंभ जे वेद त्यांच्याच अस्तित्वाचें स्पष्टीकरण अत्यंत व्यापकपणें करणें हें दुसऱ्या विभागाचें कार्य होय. वेदविषयक अभ्यासावर ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडांतील सुमारें एक हजार पृष्ठें खर्चीं पडलीं आहेत, व त्यांत जे संशोधन मांडलें आहे तें करण्यासाठीं तीस हजार रुपयांवर रकम खर्च झाली आहे.

बुद्धपूर्व जगामध्यें जैन मताची संस्थापना धरतां येईल. जैन मत महावीरापूर्वी होतें असें धरलें तर जैनांची प्राचीनता बुद्धाच्या पुष्कळच पूर्वीची होईल. बुद्धपूर्व जगाच्या इतिहासामध्यें जैन मत घ्यावयास हवें पण जैन वाङ्मय मात्र अत्यंत जुन्या बौद्ध ग्रंथांनंतरचें आहे. या संप्रदायाची अशी स्थिति असल्यामुळें हें वाङ्मय व संप्रदायाची हकीकत शेवटीं परिशिष्टांत दिली आहे. जैन वाङ्मयाचा हा इतिहास डा. विंटरनिट्झ यांच्या ग्रंथाधारें लिहिला आहे.

हा भाग तयार करतांना राजश्री य. रा. दाते; सं. बा. देशपांडे; चिं. शं. दातार; सिद्धेश्वर शास्त्री चित्राव; ल. के. वे; चिं. ग. कर्वे व मि. एच. कोहन यांची उल्लेख करण्याजोगी मदत झाली आहे.

श्रीधर व्यंकटेश केतकर.

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश–प्रस्तावनाखंड

## विभाग तिसरा–बुद्धपूर्वजग

### ग्रंथसंक्षेप

### प्रकरण १ लें.

#### इतिहासविषयक प्राचीन कल्पना

(पृ. १—९).

हिंदुस्थानेतिहासाच्या अनुषंगानें जगाचा इतिहास लिहितां येईल, कारण अत्यंत प्राचीन राष्ट्रांच्या इतिहासांशीं हिंदुस्थानचा संबंध पोंचतो. अत्यंत प्राचीन भाषा व शब्द हा इतिहासोपयोगी माल येथें आहे. शिवाय इतिहासलेखनकला भारतीयांस अगदींच कांहीं अपरिचित नव्हती; पृ. १.—लोकरंजन व तत्त्वप्रचार यांच्या प्रयत्नांत इतिहास गुरफटला गेला आहे. इतिहासग्रंथांत जें खोटें लिहिलेलें असतें त्याची कारणमीमांसा शोधून सादितिहास निराळा केला पाहिजे; पृ. २.—इतिहास लिहितांना ज्या क्रिया होत असतात त्यांचें यथार्थत्व अवगमिलें पाहिजे. पुराण म्हणजे फार जुनी माहिती; ही माहिती पुष्कळ वेळा काल्पनिक असते; कारण माहितीच्या अभावीं कल्पनाशक्तीची भर घालण्याचा सर्वत्र परिपाठ आहे. इतिहास हें शास्त्र आहे कीं नाहीं याविषयीं वाद आहे; पृ. ३.—मानवेतिहासावरून जागतिक क्रियाविषयीं सिद्धांत बसविण्याचें एक अभ्यासक्षेत्र यूरोपांत आढळतें. आपल्याकडील पुराणग्रंथकारांनां ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचें महत्त्व ठाऊक होतें; पृ. ४.— राजकीय, सांस्कृतिक व पारमार्थिक इतिहासांत इतिहासाचे नियम सांपडतात. कर्म, ज्ञान व उपासना या तिहींची समाजाला आवश्यकता असून त्यांपैकीं एखाद्याचें अधिक प्राबल्य झालें कीं दुसऱ्या प्रकारच्या विचारांचा पुरस्कर्ता निघतो; पृ ५.—याप्रमाणें भारतीयांस ऐतिहासिक भावना असतांहि संस्थानाच्या उत्कर्षाविषयीं त्यांनीं इतिहास लिहिला नाहीं याचें कारण राजकीय परिस्थितीसंबंधानें त्यांची बेफिकीर वृत्ति होय; पृ ६.—शिवाय त्यांची इतिहासदृष्टि फार व्यापक होती. " फिलॉसफी आफ हिस्टरी " या सदरांत पडण्याजोगे सिद्धांत प्रत्येक कालीं भारतीयांनीं काढलेले आहेत; पृ. ७.—साहित्याच्या अभावीं अनियंत्रित असलेली प्राचीन वेदपुराणांतली कल्पना सध्यां दुरुस्त केली पाहिजे. पुराणकारांस जगदुत्पत्तिकाल व समकालीन राष्ट्रें यांमधील दुवे जोडावयाचे होते. हिंदुस्थानचा इतिहास ऋग्मंत्रपूर्वकालापासून लिहिला पाहिजे; पृ. ८.

[ संदर्भ ग्रंथ.—हाल—दि एन्शंट हिस्टरी ऑफ दि निअर ईस्ट. राजतरंगिणी. वंशग्रंथ. गेट—हिस्टरी ऑफ आसाम. हे—आराकान पास्ट-प्रेझेंट-फ्यूचर. वेद व पुराणें. हिरोडोटस. भगवद्गीता. शंकरदिग्विजय. अर्वाचीनकोश. मॅकडोनेल ॲंड कीथ—वेदिक इंडेक्स. फ्लिंट—फिलॉसॉफि ऑफ हिस्टरी इन यूरोप. हेगेल—लेक्चर्स ऑन फिलॉसॉफि ऑफ हिस्टरी. ]



---

### प्रकरण २ रें.

#### विश्वोत्पत्तीपासून असुरराष्ट्रसंस्थापनकालापर्यंत

(पृ.९—२५).

ज्यांचे अवशेष दहा हजार वर्षांइतके जुने आहेत अशीं राष्ट्रें मुळींच नाहींत. भौतिक शास्त्रांच्या साहाय्यानें इतिहासाचा अज्ञात भाग भरून काढतां येतो. मनुष्योद्भवापूर्वीं ज्योतिष–भूस्तर–प्राणी–वनस्पतिशास्त्रविषयक क्रिया विश्वांत घडल्या व जडापासून जीवोत्पत्ति झाली; पृ. ९.—वनस्पतिकोटि व प्राणिकोटि यांमध्यें अनेक बाबतींत सादृश्य दिसून येतें. सेंद्रियसंयुक्त पदार्थ मनुष्याला तयार करितां येतात. सजीवांतील विशेष गुणधर्म निर्जीवांतहि आढळतात; पृ. १०.—उदाहरणार्थ एखादा सचेतन जीव व स्फटिक यांची गुणधर्मांत तुलना केल्यास बरेंच साम्य दिसून येतें. प्रतिस्फटिकजातित्व हें सचेतन सृष्टीचें भेददर्शक लक्षण नव्हे. संवेदनशीलता जडसृष्टींतहि आहे. उत्पत्ति, अवस्था व आयुर्मर्यादा या कृत्रिम उपायांनीं बनवितां येतात; पृ. ११.—अदृश्यशक्तीच्या योगानें होतात म्हणून मानल्या जाणाऱ्या पुष्कळशा क्रिया सामान्य सृष्टिनियमानुसार घडत असतात. याप्रमाणें सजीव व निर्जीव सृष्टींमधील भेद खरा नाहीं असें सिद्ध होत आहे; पृ. १४.—मनुष्य हा विकासाच्या शेवटल्या पायरीवरील प्राणी आहे. मनुष्यप्राणी एकवंशसंभव कीं अनेकवंशसंभव याविषयीं एकमत नाहीं. मनुष्यप्राण्याचा विकास व प्रसार यांमधील इतिहासाला भाषाशास्त्र फार उपयोगी आहे. भाषा बदलणें, सहजासहजीं होत नाहीं; पृ. १५.—मनुष्यभ्रमणाच्या इतिहासास वनस्पति व पशु यांच्या ग्राम्यीकरणाचा इतिहास, भाषा, निवासस्थान यांसारखीं अनेक प्रमाणें

घ्यावीं लागतात. शरीरलक्षणांवरून मनुष्याचें वर्गीकरण करण्यांत येतें; पृ.१७.—मानववंश हा मर्कटापासून झालेला नव्हे. पृथ्वी थंड झाल्यापासून आतांपर्यंतच्या अजमासें दहा कोटी वर्षांच्या कालांत चार युगें झालीं; त्यांचे कालावधी निरनिराळे आहेत. मानवाच्या मूलस्थानाचा निश्चित शोध लागलेला नाहीं; पृ. १९.— मानववंशविस्तारांत 'मूळवंश कोणते घ्यावे यासंबंधीं निरनिराळीं मतें आहेत. शिद्दी आफ्रिका व ओशियानिया या भागांत असून यांची संस्कृति अति हीन आहे. मंगोलियन मानववंशाचे मंगोलोतातॅर व ईंडोचायनीज असे दोन मुख्य विभाग आहेत. अमेरिकन महावंश कोणी मंगोली वंशाचा भाग तर कोणी स्वतंत्र आहे असें मानतात. काकेशियन महावंशांत सेमेटिक, हेमेटिक व आर्यन असें तीन समुच्चय धरले जातात; पृ, २०.-भाषांच्या दृष्टीनें तीन काळ पडतातः (१) मूल-आर्यन भाषाकाळ, (२) पर्शुभारतीय काल व (३) संस्कृत-अवेस्ता काल. तौलनिक व्युत्पत्तिशास्त्र व वांशिक संबंधशास्त्र हीं भाषासाहित्याचा ऐतिहासिक अभ्यास करण्यास उपयोगीं पडतात; पृ. २३.—मुख्य भाषासंघ सोळा म्हणतां येतील. शरीरलक्षणें व भाषा यांखेरीज तिसरें इतिहाससाहित्य म्हणजे संस्कृति होय. इतिहासपूर्वकालाचे संस्कृतिदृष्ट्या पुढील भाग पडतात; अश्मायुधयुग प्रथम व द्वितीय काल, आणि आयसयुग; पृ. २४.—असुरांचें राष्ट्र व इजिप्तचें राष्ट्र हीं दोन अत्यंत प्राचीन राष्ट्रें असून त्यांचें प्राचीनत्व ख्रि. पू ८००० वर्षांपर्यंत संशोधकांनीं नेलें आहे. या दोन राष्ट्रांच्या संस्कृती हिंदुस्थानी संस्कृतीच्या अगोदरच्या कीं नंतरच्या हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. म्हणून येथें प्रथम भारतीय संस्कृतीचा इतिहास घेऊन या विभागाच्या उत्तरभागांत भारतेतर राष्ट्रांचा प्राचीन इतिहास दिला आहे; पृ. २५.

[संदर्भ ग्रंथ.—कीन-एथ्नॉलॉजी. डार्विन-डिसेंट ऑफ मॅन. ज्ञानकोश-विभाग १ला. कोल—डिस्कशन्स ऑन क्लायमेट अँड कॉस्मॉलॉजी. फ्लॉवर व लिडेकर—इंट्रोडक्शन टु दि हिस्टरी ऑफ मॅमल्स. ब्लुमेनबाक—एलेमेंट्स ऑफ फिजिऑलॉजी. टिळक—आर्टिक होम इन दि वेदाज हॉवेलॅक—सायन्स ऑफ लँग्वेज. मिवर्ट—मॅन अँड एप्स. राईटमॅन अँड दि ग्लेशियल पीरियड. लॅथम—मॅन अँड हिज मायग्रेशन. डेनिकर—रेसेस ऑफ मॅन. डॅंडी—एव्होल्यूशनरी बायॉलॉजी. बोस- रेस्पॉन्स इन दि लिव्हिंग अँड नॉनलिव्हिंग. अर्गाइल—ऑर्गेनिक एव्होल्यूशन. हर्टेर—बायॉलॉजिकल अॅस्पेक्ट्स ऑफ ह्यूमन प्रॉब्लेम्स. हाल—ह्यूमन एव्होल्यूशन. पेझी—आर्यन फायलॉलॉजी. साइस—प्रिन्सिपल्स ऑफ कंपॅरिटिव्ह फायलॉलॉजी.]

## प्रकरण ३ रें.

### असुरराष्ट्रसंस्थापनेच्या नंतरच्या इतिहासार्थ वेदावलोकन

(पृ, २५—११८).

वेदविद्या विभागांत यज्ञसंस्थेचा विकास, ब्राह्मणजाति व वेदसंहितीकरणें कशीं बनलीं यांविषयीं जें विवेचन आहे त्याचें फलदर्शक सिंहावलोकन करणें पुढलि विवेचनास अवश्य आहे. मागील विभागांत मंत्रपूर्व आणि मंत्ररचनेच्या कालाचें ऐतिहासिक विवेचन समजण्यासाठीं मनोभूमिका तयार केली आहे; पृ. २५.—भारताचा इतिहास व भारतीयांचा इतिहास या दोन गोष्टी भिन्न आहेत. व आर्य आर्यन, हे शब्द समानार्थक म्हणून उपयोजितात तें बरोबर नाहीं. यूरोपियन लोकांनीं भारतीय आर्यांचा इतिहास जो कल्पिला आहे तो मुळींच चुकीचा आहे; पृ. २७.—आर्य हा शब्द वेदांत महावंशवाचक किंवा राष्ट्रवाचक नसून शिष्ट अगर यजनशील या अर्थानें आला आहे; पृ. २८.—चातुर्वर्ण्याचें मूळ हिंदुस्थानांत नसून तें मूलगृहकालीन आहे. मंत्रकालीन वर्ण हा शब्द वर्णविषयक होता पण तो ब्राह्मणादि वर्णांना लागत नव्हता; पृ. ३९.—अवेस्त्यांत वर्ण (वरेन) शब्द पंथवाचक आहे. वर्ण शब्दाचें तसेंच चार वर्गांच्या कल्पनेचें इराणी लोकांत (म्ह. पर्शुभारतीय कालांत) अस्तित्व असल्यामुळें गोऱ्यांनीं काळ्यांस जिंकून रंगभेदावर वर्णभेद निर्माण झाला ही कल्पना ग्राह्य होत नाहीं; पृ. ४३.—ऋग्वेदांत दस्यु हा शब्द देवांचे व आर्यांचे शत्रू या अर्थानें आला असून दास हा शब्दहि त्याच अर्थी उपयोजिलेला आहे. दस्यु शब्द उत्तरकालीन वाङ्मयांत येत नसून दास शब्दाचा पाच वेळ सेवक या अर्थानें उपयोग झाला आहे; ४३.—आर्य आणि दास हें परस्परांचे विरोधी आहेत ही कल्पना वेदांत तशीच अवेस्त्यातहि असल्यामुळें, त्यांचा संग्राम झाल्याचें वर्णन ऋग्वेदात आहे व हा संग्राम भारतभूमीवर झाला ही कल्पना ग्राह्य होत नाहीं. या उताऱ्यांच्या स्पष्टीकरणार्थ मूलगृहकालाकडे धाव घेतली पाहिजे. आर्य आणि दस्यु यांचा विरोध वर्णविषयक नसून यजनविषयक आहे; पृ. ५३.—सारांश, दास, आर्य, दस्यु, वर्ण इत्यादींविषयीं उल्लेख आर्यन राष्ट्रांनीं नॉन आर्यन लोकांपासून, हिंदुस्थान जिंकलें अशा इतिहासाचे सूचक मुळींच नाहींत; पृ. ५४.—ऋग्वेदांत देवांसंबंधीं आलेल्या कथा तौलनिक पुराणशास्त्राच्या साहाय्यानें कथावृद्धीच्या ज्ञातव्य इतिहासाचा भाग होत. सरमा सूक्तांतील पणींना राजारामशास्त्री भागवत फिनीशियन म्हणतात. वीस्, विश् व वीसपैती, विश्पति हे शब्द बनविल्यावर व होम व सोम म्हणजे वीर या शब्दाचा मादक रसाच्या एका झाडास असलेल्या शब्दाशीं गोंधळ उडून गेल्यावर संस्कृतापासून अवेस्तिक शाखा निराळी

...क आपा यांच्याहि अगोदर यथाक्रम निराळ्या झाल्या होत्या; पृ. ५४.—ऋग्वेदांतील असुर व देव हे मनुष्यजातीच्या विभागांचे द्योतक दिसतात; पृ. ५७.—देवविषयक व असुरविषयक कथा ऐतिहासिक असल्यास त्या गोष्टी दाशराज्ञयुद्धापूर्वी घडल्या असाव्यात. मंत्रवाङ्मयाच्या अगोदर दाशराज्ञयुद्ध झालें असलें पाहिजे. आर्यन राष्ट्रांच्या वसाहतींचा इतिहास वेदपूर्वकालीन आहे; पृ. ५८.—ऋग्वेदांतील आगमन आर्यांचें नसून यजनशीलांचें होतें. आर्यन राष्ट्रांचें काळ्यांशीं सामुच्चयिक वैर दिसत नाहीं. मंत्रकालीं झालेलें आगमन आर्यन लोकांच्या भारतीय इतिहासांत प्राचीन नसून अर्वाचीन आहे; पृ. ५९.—शक व मग या जाती वेदवक्त्या लोकांपूर्वी आल्या असाव्यात असें दिसतें; पृ. ६१.—ऋग्मंत्रवाङ्मय हें सर्वभारतीय आर्यन लोकांचें नमून कांहींशा उत्तरकालीं आलेल्या भारतीयांचें आहे, आणि ब्राह्मणें हें वाङ्मय जुनें सूतवाङ्मय व नवें मांत्रवाङ्मय यांस जोडणारें आहे. यज्ञसंस्थेचें आवरण ज्याप्रमाणें स्थानिक धर्मावर टाकलें गेलें, त्याप्रमाणें स्थानिक धर्म, इतिहास व पुराणें हींहि यज्ञसंस्थेंत शिरलीं; पृ. ६४.—ऋग्मंत्रांत जे मनुष्यांचे उल्लेख सांपडतात ते दाशराज्ञयुद्धाशीं बहुतेक जोडून घेतां येतात. ऋग्वेदांतील गोत्रमंडळांचा प्रतिपाद्य विषय दाशराज्ञयुद्ध होय; पृ. ६६.—दाशराज्ञयुद्धांतील व्यक्तींशीं ज्यां दुसऱ्या नांवांचा संबंध येतो त्यांचा हिशेब. जीं सूक्तें या व्यक्तींचा निर्देश करीत असतील तीं युद्धाशीं फार तर समकालीन पण बहुतकरून युद्धोत्तरकालीन होत; पृ. ६७.—सूक्तांची युद्धोत्तरता व तीं जाणण्यासाठीं उपयोगी पडणाऱ्या व्यक्तीः व्यक्तीचा दाशराज्ञयुद्धाशीं संबंध किंवा तिची उत्तरता दिसली म्हणजे तिचा उल्लेख करणारें सूक्त दाशराज्ञयुद्धोत्तर समजावें; पृ. ६९.—प्रत्येक ऋग्वेदसूक्ताची दाशराज्ञयुद्धाशीं पूर्वोत्तरता दाखविणारें कोष्टक; पृ. ८७.—वरील विवेचनावरून दाशराज्ञयुद्ध हें ऋग्वेदमंत्रांतील अत्यंत जुन्या मंत्रांच्या अगोदर अनेक दशकें किंवा शतकें होऊन गेलेलें दिसतें; पृ. ११६.—ऋग्मंत्रांतील इतिहासः—ऋग्मंत्र हे भरतांचें आर्यन लोकांची वसाहत असलेल्या हिंदुस्थानांत आगमन दाखवितात. जुन्या राज्यांत पुरोहितांचें वर्चस्व उत्तम प्रस्थापित झालेलें होतें. पुराणांतील व भारतांतील कुरुयुद्धपूर्व राजांचे इतिहास हे दाशराज्ञयुद्धपूर्व इतिहाससाहित्य होय. शक-मगांची वसति मंत्रकर्त्या लोकांपूर्वींची असावी मंत्रपूर्वसंस्कृति आर्यन असावी, पण ब्राह्मणी नसावी. देश्यांचा पुरोहितवर्ग मेला किंवा मांत्रांच्या पुरोहितांत लोपला, परंतु देश्यांचा सूतवर्ग टिकला; पृ. ११६.

[संदर्भग्रंथ.—या व यापुढील एकंदर वैदिक प्रकरणांचे संदर्भग्रंथ ग्रंथाच्या अखेरीस एकत्रच दिले आहेत.]

---

## प्रकरण ४ थें.

### दाशराज्ञयुद्ध अथवा भरतदिग्विजय

(पृ. ११८–१५४).

ऋग्वेदांत सर्वव्यापक प्रसंग दाशराज्ञयुद्धच होय. या युद्धावर इतकें वाङ्मय झालें त्यास त्या युद्धाचें ऐतिहासिक महत्त्व हें कारण होय; पृ. ११८.—ऋग्वेदांत भरत नांवाच्या लोकांच्या विजयांचें वर्णन असून त्यांचें तृत्सूंशीं नातें किंवा कदाचित् ऐक्य दिसून येतें. मंत्रोत्पन्न माहिती ही दुष्यन्तपुत्र भरताच्या नांवानें देशास नांव मिळालें या पुराणग्रंथांच्या विधानाविषयीं संशय उत्पन्न करते; पृ. ११९.—मंत्रोक्त इतिहासाचें पुराणें व ब्राह्मणें यांनीं विस्तरण केलें आहे; पृ. १२०.—भरतदौष्यंतीवर राष्ट्रनाम पडणें अशक्य दिसतें; पृ. १२१.—ऋग्वेदांतील ७ व्या मंडळांतील १८ वें सूक्त महत्त्वाचें असून त्यावरून असें दिसतें कीं, सुदासाचे सहायक म्हणून तृत्सु, भरत, पृथु व पर्शु हे चार समुच्चय होते. सुदासाविरुद्ध असलेल्या राजांबद्दल मतभेद आहे. सुदास हा पैजवन असून दिवोदासाचा पुत्र किंवा नातू होता. सुदासाचे प्रतिस्पर्धी बलवान् असल्याविषयीं वसिष्ठाचें मत होतें; पृ. १२१.—दुसऱ्या कांहीं ऋचांच्या मदतीनें कळतें कीं वसिष्ठ व विश्वामित्र पैजवनांच्या पौरोहित्यासाठीं स्पर्धा करीत होते आणि पृथु व पर्शु हीं सुदासाच्या मदतीस असलेलीं राष्ट्रें पूर्वेकडे चाल करून जात होतीं; पृ. १२४.—तिसऱ्या मंडळांतील ३३ व्या व ५३ व्या सूक्तावरून विपाश् आणि शुतुद्री यांचें आक्रमण भरतांकडून अश्वमेधापूर्वी झालें असें दिसून येतें; पृ. १२७.—दिवोदास किंवा सुदास हा भरत राजा असावा, भरत व तृत्सु हे एक नसावेत, आणि वसिष्ठामुळें तृत्सु व भरत यांचें एकीकरण झालें असावें; पृ. १२८.—यमुना व परुष्णी यांमधील प्रदेश तृत्सूंचा दिसतो. दाशराज्ञयुद्धापूर्वी सुदासाचा बाप किंवा आजा दिवोदास अतिथिग्व यानें पुरु, कुत्स आणि आयु यांच्या मदतीनें तूर्वयाण( पक्थ,= अफगाण ) यांच्या बरोबर जी लढाई केली तींत दिवोदासाच्या पराभव झाला, परंतु पुढें त्यानें डोंगरांतील जातींचा पुढारी शंबर याचा अनेकदां पराभव करून शिवाय तुर्वश, यदु, पर्णय, करंज व गुंगू यांच्याशीं लढाया करून त्यांनां हरविलें; पृ. १३०.—दाशराज्ञयुद्धापूर्वी सुदासाच्या कारकीर्दींत मित्रसंघानें तूर्वयाणाचा पराभव केलेला दिसतो. या पराभवानंतर तूर्वयाणानें दडपलेलीं राष्ट्रें स्वतंत्र होऊन आपसांत भाडूं लागलीं व पुरु सुदासाचे शत्रू जे यदुतुर्वश त्यांनां मिळाले; पृ. १३३.—सुदासाचा बाप दिवोदास पिजवन, आजे वध्र्यश्व आणि देववत् आणि बायको सुदेवी होती. त्यानें एक अश्वमेध यज्ञ केला होता. तो अहिंसक व त्याचे शत्रू हिंसक असा स्तोत्रकर्त्यांनीं भेद केला आहे; पृ. १३३.— दाशराज्ञयुद्धांत ज्यांचा सुदासानें पराभव केला त्यांत शिम्यु हा एक होता. नहुषाचा दाशराज्ञ द्धाशीं

संबंध दिसत नाहीं; पृ १३४.— तुर्वश हे दाशराज्ञयुद्धांतील सुदासाचे जाडे प्रतिस्पर्धी असून ते अनु व द्रुह्यु यांच्या प्रमाणें पाण्यांत बुडून न मरतां पराजय पावून यदूंसह जिवंतच सुटले. तुर्वश इंद्रपूजक होते; पृ. १३५.—तुर्वशांनीं परुष्णी ओलांडली असून ते बहुतेक पश्चिमेकडून पूर्वेकडे गेले असावे; पृ. १३९.—वृचीवान् आणि तुर्वश यांचा सृंजय राजा दैववात यानें पराभव केला असा एक उल्लेख आहे. सृंजय दैववात व अभ्यावर्तिन् चायमान हे एकच दिसतात; पृ. १३९.— तुर्वश व तुर्वीति यांचा कांहीं संबंध होता कीं काय तें सांगतां येत नाहीं. पाश्चात्य संशोधक म्हणतात त्याप्रमाणें क्रिवि नांवाचें राष्ट्र होतें सें दिसत नाहीं; पृ. १४०.— द्रुह्यूंचा यदुतुर्वशांबरोबर उल्लेख असून सुदासाविरुद्ध लढाईत त्यांच्यांतील लोक मारले गेले; पृ. १४१.— पुरु हें समाजाचें नांव असून त्यांपैकीं पुरुकुत्स व त्रसदस्यु हे राजे होते; पृ. १४१ .— पुरुकुत्स सुदासशीं समकालीन होता असें म्हणण्यास आधार नाहीं पण सुदासानें दाशराज्ञ युद्धांत पुरूंचा पराभव केला त्यामुळें पुरुकुत्स तुरुंगांत पडून तेथेंच त्याचा अंत झाला असण्याचा संभव आहे; पृ.१४३.- पुरूंनांच पुढें इक्ष्वाकू म्हणूं लागले असावे. कालांतरानें कुरु व पुरु हे लोक एक झाले; पृ १४४.— पुरु, तृत्सु, भरत व कुरु हे एकच लोक असावेत; पृ. १४७.— महाभारतांतील वंशावळीवरून यदुतुर्वशादि पंचजनांच्या पूर्वजांचें आपणांस ज्ञान होतें; पृ. १४७.— महाभारतांतील व ऋग्वेदांतील देवापि व शन्तनु हे एकच; पृ. १४८.— दाशराज्ञयुद्धांत सुदासाविरुद्ध दहांहून अधिक राजे असून त्या सर्वांचा पराभव एकाच ठिकाणीं व एकाच वेळीं झालेला दिसत नाहीं; पृ. १५०.— दाशराज्ञयुद्धाचा काल पार्गिटेरच्या मताप्रमाणें कुरुयुद्धापूर्वी २५० वर्षें असावा. हें युद्ध फार तर ५० वर्षें चाललें असेल. ऋग्वेदांतील अनेक सूक्तें अशीं दिसतात कीं त्या काळांत दिवोदास व सुदास या व्यक्ती पुराणपुरुषांच्या कोटींत जाऊन पडल्या होत्या; पृ. १५२.— पुरूरवसउर्वशी कथा व सरमापणी कथा या देखील फार जुन्या आहेत; पृ. १५३.— दासकल्पना पशुभारतीयकालीन असावी. दाशराज्ञयुद्धाचा आर्यदासविरोधाशीं कांहीं संबंध नाहीं. वर्ण हा शब्द त्या काळीं संप्रदाय या अर्थानें वापरीत; पृ. १५४.

---

## प्रकरण ५ वें.

## वेदकालांतील शब्दसृष्टि

### ( पृ. १५४-४७२ ).

प्राचीनकालच्या परिस्थितीचा इतिहास लिहिण्यास संहितान्तर्गत शब्दसृष्टि हें एक साहित्य आहे; पृ.१५४.—शब्दसंग्रहाच्या यादींची वर्गीकरणपद्धति व अनिश्चितार्थी, अनेकार्थी आणि दुर्बोधशब्द; पृ.१५४.—देवता नामक वर्गातील आदित्यनामें, उषानामें, अश्विनामें, अप्सराभिमानी देवता, मरुद्गण, रुद्र, जलदेवता, मासाधिष्ठित देव, मेघोपयोगीदेवता, वायुदेवता, वत्सराभिमानी प्रजापति, पुरुषमेधांतील देवता, व देवताविशेष; पृ. १५५.—देवताविशेषणें नामक वर्गातील अग्निविशेषणें, इंद्रविशेषणें, उषाविशेषणें, मरुद्विशेषणें, रुद्रविशेषणें, सूर्यविशेषणें व सामान्यदेवताविशेषणें; पृ.१६०.-देवयोनिनामक वर्गातील अप्सरागंधर्व वगैरे, पितर व पितरसंबंधी व पिशाच; पृ. १६८.— असुर नामक वर्गातील असुरविशेषनामें व विशेषणें; पृ १७०.—स्वर्गविषयक नामक वर्गातील स्वर्गनामें; पृ.१७३.— अजीवसृष्टीच्या पृथ्वीनामक वर्गातील पृथ्वीनामें व सृष्टचमत्कार; पृ. १७४.—ध्वानिनामक वर्गातील ध्वनिवाचक, शब्दवाचक व ध्वनिविषयक विशेषणें; पृ. १७५.—धातुनामक वर्गातील हिरण्यनामें आणि धातु व धातुसंबंधी; पृ. १७६.— जमीननामक वर्गातील जमीन व तिचे प्रकार; पृ.१७८.-उदक नामक वर्गातील उदकनामें व जलाशयसंबंधी; पृ. १७९.— उष्णता नामक वर्गातील किरणनामें, तेजोवाचक, तेजोविशेषणें, तेजस्वी ( क्रियापदें ), ज्वालानामें व जाळणें ( क्रियापदें ); पृ. १८१.—गतिनामक वर्गातील गतिवाचक नामें, गतिवाचक क्रियापदें व त्वरावाचक;पृ.१८३.-ग्रहनक्षत्रादि वर्गातील ग्रह व नक्षत्रनामें व ज्योतिषविषयक; पृ १८८.-संख्या नामक वर्गातील क्रमवाचक व संख्यावाचक; पृ. १९७.— कालनामक वर्गातील ऋतु, महिने व युगें, दिवसनामें, रात्रिनामें आणि काल व कालसंबंधी; पृ.१९९.—स्थान नामक वर्गातील स्थान, अंतिकनामें, दूरनामें, आकाशनामें, ग्रामनामें, देशविशेष, नदी सामान्यनामें, नदी विशेषनामें, पर्वतनामें, दिग्वाचक, स्थलविशेष, स्थलदर्शकविशेषणें व विभागदर्शक; पृ.२०६.-जीवसृष्टी (मानवेतर) च्या वनस्पतिनामक वर्गातील वनस्पतिविषयक;पृ.२२६.-प्राणी नामक वर्गातील अश्वनामें, अश्वसंबंधी, गोनामें, पक्षिनामें, सर्पनामें, प्राणिविशेष, प्राणिसंबंधी विशेषणें व पुरुषमेध यज्ञांतील पशु; पृ.२३५.-मानवसृष्टीच्या मनुष्यनामक वर्गातील मनुष्यनामें, मनुष्यसामान्यनामें, मानवविशेष, मानवी स्त्रिया राजेविशेष व स्तोतृनामें;पृ. २५८.—शरीरावयवनामक वर्गातील अंगुलिनामें, प्राण्यवयव, प्राणवाचक, बाहुनामें व शरीरसंबंधी; पृ. २७४.—वैद्यकनामक वर्गातील रोग व आरोग्य व औषधिनामें; पृ २८१. —अन्ननामक वर्गातील अन्ननामें, खाणें ( क्रियापदें ), खाद्यपेयविशेष, खाद्यपेय किरकोळ व धान्यनामें; पृ. २८८.— नातेंगोतें नामक वर्गातील अपत्यनामें व नातेवाईक; पृ. २९५.—अवस्थानामक वर्गातील मानवी अवस्था, कांतवाचक, ऐश्वर्यबोधक, उपभोगवाचक, धननामें, धनिकनामें, निर्णीत व अंतर्हितनामें, नाविन्यवाचक, पुराणनामें, बलनामें, बहुनामें, महन्नामें; विस्तारदर्शक विशेषणें, सत्यनामें,

…, विशेषस्थितिदर्शक विशेषणें व सामान्य स्थितिदर्शक क्रियापदें; पृ. ३०८.—मनोविकार वर्गांतील इच्छादर्शक, क्रोधनामें, रागावणें (क्रियापदें), बुद्धिनामें, मानसिकस्थितिदर्शक विशेषणें, मनोविकारविशेषणें, मनोविकारदर्शक क्रियापदें, लोभादिनामें व सुखनामें; पृ. ३१८.–उपासनावर्गांतील ऋत्विक् सामान्य व विशेषनामें, ऋत्विक्-संबंधी, यज्ञपात्रें, यज्ञविशेषनामें, यज्ञसामान्यनामें, यज्ञसाधनें, यज्ञिय परिभाषा, परिभाषा—उपसर्गाक्षरें, वेदिनामें, यज्ञसंबंधीं किरकोळ, यज्ञविषयक किरकोळ विशेषणें, यज्ञविशेषणें, यज्ञ करणारे, यज्ञिय विशिष्ट स्थलें, सोमनामें, सोमविशेषणें, सोम व सोमाभिषवसंबंधी, सामनामें, स्तुति करणें, स्तुतिनामें, स्तोमनामें, हविर्नामें व विशेषणें, यजन-पूजन करणें ( क्रियापदें ) आणि धर्मशास्त्र; पृ. ३२१.—युद्धवस्तुनामक वर्गांतील कवचनामें, धनुष्यबाण, ध्वजनामें, युद्धांतील हत्यारें, युद्धनामें, योद्धे, युद्धपराभव, युद्धविषयक किरकोळ, सैनिकांचे प्रकार व सेनाप्रकार; पृ. ३३९.—सार्वजनिक कामें नामक वर्गांतील कूपनामें, जलाशय व मार्ग; पृ. ३४०.—खेळनामक वर्गांतील खेळ व खेळसंबंधीं; पृ. ३५०.—गृहनामक वर्गांतील गृहनामें, गृहविशेष, गृहाचे अवयव, गृहांतील सामान व रज्जुनामें; पृ. ३५२.—जाती, कुलें व वंशनामक वर्गांतील जाती व कुलें, वर्णाश्रम व पैतृकनामें; पृ. ३६३.—दाननामक वर्गांतील दातृनामें, दान व दाते, दानविषयक विशेषणें, दान करणें ( क्रियापदें ), दान व दानाचे प्रकार आणि याचना करणें; पृ. ३७०.—सामाजिकनामक वर्गांतील समाजांतील कांहीं विशेष, सामाजिक किरकोळ, स्तेननामें, सामाजिक क्रियापदें व सामाजिकस्थितिबोधक विशेषणें; पृ. ३७२.—भाषा नामक वर्गांतील उपमावाचक शब्द, उपसर्ग, छंद, भाषा व भाषणसंबंधीं, वाङ्नामें, सर्वनामें, सामान्य अव्ययें, क्रियाविषयक अव्ययें, तद्धित अव्ययें, तुमर्थ अव्ययें, ल्यबन्त अव्ययें, वीप्सा अव्ययें व शब्द करणें( क्रियापदें ); पृ. ३८१.— पुण्य, पाप व प्रशस्य नामक वर्गांतील पापनामें व प्रशस्यनामें; पृ. ३९५.— गुणनामक वर्गांतील भाववाचक नामें, मानव विशेषणें, रूपनामें, वर्ण( रंग )-वाचक, संबंधदर्शक, सौंदर्यदर्शक, ऱ्हस्वनामें, विभागदर्शक व सामान्य विशेषणें; पृ. ३९६.— वस्त्रें व भूषणें नामक वर्गांतील वस्त्रें आणि भूषणें; पृ. ४०८.— शत्रु वर्गांतील शत्रुनामें व शत्रुविशेषणें; पृ. ४१२.—व्यापार व कृषि नामक वर्गांतील कृषि व मापें; पृ. ४१२.—दळणवळणनामक वर्गांतील नौकानामें, मार्गसंबंधीं, मार्ग व त्याचीं विशेषणें, रथ व रथसंबंधीं, रथावयव सारथिनामें आणि दळणवळण किरकोळ; पृ. ४१६.—वाद्यें नामक वर्गांतील वाद्यें; पृ. ४२३.–विचार नामक वर्गांतील ब्रह्मविशेषणें व वेदान्त; पृ. ४२५.–ऋषि नामक वर्गांतील ऋषिनामें, यज्ञांतील ऋत्विज, गुरुशिष्यसंबंध आणि पैतृकनामें; पृ. ४२७.— राजकीय नामक वर्गांतील अधिकारी, राजकीय व सभानामें; पृ ४५१.–अभिचार नामक वर्गांतील अभिचार, ताईत, गंडे दोरे वगैरे; पृ. ४५१.— इतर कर्में नामक वर्गांतील कर्मनामें, कर्मविशेष, इंद्रियकर्में ( क्रियापदें ), धंदेवाले, धंद्यांचीं साधनें, धंदेसूचक ( क्रियापदें ), धारणपोषण करणें ( क्रि. ), पाहणें ( क्रि. ), प्राप्तिवाचक क्रियापदें; रक्षणपालन, सेवाकरणें, विनाशवाचक, हिंसाविशेषणें, विनाशदर्शक क्रियापदें; पृ. ४५२.— वरील शब्दांच्या याद्यांवरून वेदकालीन सामाजिक परिस्थितीचें चित्र काढतां येतें. वेदविषयक विचारास चालन देऊन अभ्याससामुग्री वाचकांच्या कक्षेंत आणून देण्यासाठी सदरहू सामाजिक चित्र केवळ सिद्धान्तरूपानें मांडलें नाहीं; पृ. ४७१.

---

## प्रकरण ६ वें.

## ब्राह्मण्याचा इतिहास

( पृ. ४७२–५११ ).

ब्राह्मणजातीचा आणि तिच्या विद्येचा इतिहास हें प्राचीन संस्कृतीच्या इतिहासाचें एक मुख्य अंग आहे; पृ.४७२.—अथर्वा हें समाजांतील प्रथम वर्गाचें ब्राह्मणपूर्व नांव होतें. बृह् ( म्ह. स्तोत्र ) + मत् = ब्रह्मन् हा शब्द सोमसंस्थांच्या पूर्वी तयार झाला असावा व सोमसंस्थांपूर्वीच हा वर्ग बराचसा वंशपरंपरेनें चालू असावा; पृ. ४७३.—ऋषींच्या इतिहासांतील महत्त्वाचा भाग सूक्तकर्तृत्व होय. प्रत्येक सूक्ताचा द्रष्टा देण्याचें ओझें डोक्यावर घेतल्यामुळें, परंतु परंपरागत माहिती तर नसल्यामुळें कांहीं ठिकाणीं कांहीं तरी दडपून देण्याची बुद्धि सर्वानुक्रमणीकारांस झालेली दिसते; पृ. ४७४ —सर्वानुक्रमणीनें सूक्तद्रष्टे म्हटलेल्यांपैकीं ऋग्मंत्रांत उल्लेखिलेले लोक व ब्राह्मणोल्लिखित सूक्तकर्ते —ऐतरेय ब्राह्मणकारांची संहिता व सध्यांची शाकल संहिता एक नाहीं; पृ. ४७५ —सर्वानुक्रमणींत सूक्तद्रष्टे म्हणून उल्लेखिलेले पण मंत्रांत मागमूसहि नसलेले असे अनेक लोक आहेत त्यांची यादी; पृ. ४७५.—उत्तरकालीन ब्राह्मण जीं गोत्रनामें आपल्या पूर्वजांचीं नांवें समजतात आणि त्या पूर्वजांस ऋषी समजतात त्यांमध्यें कांहीं मंत्रकालीन ऋषी असणें अशक्य नाहीं. सूत्रोक्त गोत्र म्हणून उल्लेखिलेल्या ऋषींपैकीं ज्यांस सर्वानुक्रमणीकारांनीं मंत्रद्रष्टे म्हटलें आहे अशा व्यक्ती व त्यांपैकीं ऋग्मंत्रांत न उल्लेखिलेले लोक; पृ. ४७७.—पारमार्थिक इतिहासांत परमार्थोद्यम करणारा वर्ग कसा होत गेला याचें ज्ञान पाहिजे व त्या वर्गाचें योगक्षेम चालविणाऱ्या वर्गाचेंहि ज्ञान पाहिजे. ऋषी व त्यांना दान देणारे राजे यांची यादी; पृ. ४७७.—मंत्रकालांत वंशपरंपरेचें ब्राह्मण्य स्थापित झालें होतें. सूक्तकर्तृत्वकालीन ब्राह्मण्याचा उत्तरकालीन

ब्राह्मण्याशीं संबंध जुळविण्यास सर्वानुक्रमणी व गोत्रप्रवरावली हीं दोन साधनें आहेत. आंगिरस, कण्व, अत्रि, भृगु, कश्यप, भरद्वाज, विश्वामित्र, गोतम, वसिष्ठ व अगस्त्य यांच्या कुलांची व कुलविरहित सूक्तकारांची, सर्वानुक्रमणीसिद्ध व ऋग्मंत्रसिद्ध कुल व वंशसंबंध, सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध व ऋग्मंत्रसिद्ध वंशसंबंध आणि केवल सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध व कुलसंबंध या सदरांखालीं, सूक्तकाराच्या नांवावरील सूक्तें, त्यांपैकीं त्या सूक्तकाराचा उल्लेख असलेलें सूक्त व सूक्तकाराचें कुल व वंशसंबंध सिद्ध करण्यास साधनीभूत झालेले ऋग्मंत्र इत्यादि गोष्टींसह सविस्तर माहिती; पृ. ४७८.—गोत्र हा भूमिसंरक्षक वर्ग या अर्थानें शासनविषयक विभाग असेल, परंतु असगोत्रविवाहाची चाल इण्डोयूरोपीय काळापासून अस्तित्वांत असावी असें समजण्यास साधन जी भारतीयांतील गोत्रप्राचीनता तीच खरी दिसत नाहीं. इण्डोयूरोपीय काळांत बहिर्विवाह होत असेल तर मधल्या मांत्रसंस्कृतीच्या लोकांत तो तात्पुरता नष्ट झाला असला पाहिजे; पृ. ४९१. —गोत्रांचा वैदिक धर्मसंस्थेंत महत्त्वाचा संबंध दिसत नाहीं; पृ. ४९२.— गोत्रविशिष्ट श्रौतधर्म अर्वाचीन आहे. गोत्राप्रमाणें आप्रीसूक्तांचा उपयोग करण्याचा भेद सूत्रकालीन दिसतो; पृ. ४९३.— गोत्रांच्या बाबतींत ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांचें अनुकरण केलें, पण लौकिक गोत्र व आध्यात्मिक गोत्र असा निराळा भेद उत्पन्न करून ब्राह्मणांनीं आपलीं गोत्रें ब्राह्मणेतरांवर लादलीं; पृ. ४९४.—सूत्रकारांनीं प्रवरऋषी हे व्यक्तीचे गोत्रसंस्थापकापूर्वीचे पूर्वज बनविले आहेत—पण या विधानास वेदांत प्रमाण नाहीं. यज्ञसंस्था आज जी चार संहितांनीं युक्त अशी दिसते ती तशी तयार होण्यापूर्वी प्रवरसंस्थापक ऋषींचे संप्रदाय व दुसरे अनेक संप्रदाय चालू असलेले दिसतात; पृ. ४९४.—द्विरात्र, षड्रात्र व द्वादशाह हे क्रतू सत्रांगच होते; पृ. ४९५.-प्राचीन कालीं सामुच्चयिक सोमयाग भटकणाऱ्या टोळ्यांच्या भटकण्याच्या क्रमांत नऊ, दहा किंवा बारा महिने एकसारखे चालत असावेत व हींच त्या काळचीं सत्रें होत. ऋग्वेदांत सत्र हा शब्द एकदम, बरोबर, खरोखर अशा सामुच्चयिक यागेतर अर्थांसाठीं आला आहे; पृ. ४९७. —गोत्रप्रवरांच्या संबंधानें भिक्षुकी कारणाकरितां काल्पनिक इतिहास तयार होण्याचा संभव दिसतो. सर्व गोत्रांचा विशिष्ट आप्रीशीं संबंध जोडण्याकरितां प्रवरांची यादी तयार होणें अवश्य होतें; पृ. ४९८.— प्रवरसंस्थापक ऋषी हे सात कुलांचे पूर्वज असावे असें वाटत नाहीं. प्रवरण म्हणजे निवड व आपल्या पूर्वजांच्या नांवांचा उच्चार करण्याऐवजीं संप्रदायांतील प्रमुख आचार्यांच्या नांवांचा उच्चार करण्याच्या प्रवृत्तीशीं या गोष्टीचा संबंध आहे; पृ. ४९९.— मान्य झालेल्या व्यक्तींनींच प्रवरण करावें व तें उत्तरकालीनांनीं स्वीकारावें असा प्रयत्न झाला होता; पृ. ५००.— एकाच गोत्राची मंडळी ऋग्वेदी व यजुर्वेदीहि आहेत. गोत्रें असल्यास थोडक्यांत. कात्यायन श्रौतांच्या गोत्रांची व प्रवरांची त्यांच्या सूत्राप्रमाणें यादी; पृ. ५००.—ब्राह्मण्याच्या इतिहासांत ऋग्वेदी व यजुर्वेदी हें वर्गीकरण कार्यभिन्नत्वामुळें झालें, पण पुढें शाखा व सूत्रें निघालीं तीं पक्षभेदरूपी चळवळींमुळें निघालीं; पृ. ५०५.— आपला यज्ञविषयक संप्रदाय वाढविण्यासाठीं दुसऱ्या संप्रदायांना निषेध केल्याचीं उदाहरणें तैत्तिरीय संहिता, तैत्तिरीय ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण वगैरे ग्रंथांतून अनेक आहेत; पृ. ५०७.—विशिष्ट कर्मांचा प्रघात सुरू करण्यास ऐतिहासिक गोष्टींची जोड देण्यांत आली; पृ. ५०९.— या सर्वांच्या मुळाशीं भिक्षुकीपासून प्राप्ति एका वर्गास व्हावी व दुसऱ्यापासून जावी हेंच कारण आहे. शेंदोनशें वर्षांतच मांत्रसंस्कृतीचा पराजय होऊन देश्यांच्या देवतांची पुनःस्थापना झाली असावी. ब्राह्मण्याच्या इतिहासाचे दाशरथी रामचंद्राचा [ब्राह्मण अस्तित्वांत येण्यापूर्वीचा] काल दाशराज्ञयुद्धकाल, होते, अध्वर्यु व ब्रह्मे यांच्या स्वतंत्र हवनपरंपरा तयार होण्याचा काल, सोमसंस्था तयार होण्याचा काल, सोमसंस्थाविकासाचा काल, शाखाभेदाचा काल, सूत्रकाल व मनुस्मृतीचा काल असे निरनिराळे विकासावस्था दर्शविणारे काल पडतात; पृ. १०.—ब्राह्मणांचें इतरांपासून वियुक्तत्व व जातींत इतरांचा अप्रवेश हीं यज्ञसंस्था मोडल्याबरोबरच झालीं. शाखावार पोटजाती कुरुयुद्धकालीन असून त्या वेळेसच प्रादेशिक जाती पडण्यास प्रारंभ झाला. पृ. ५११.--बौद्धिक इतिहासांत ब्राह्मण जातीचें स्थान मोठें आहे, तरी पारमार्थिक व नैतिक इतिहासांत त्यांचें कार्य फारसें अभिमान बाळगण्याजोगें नाहीं. तथापि राष्ट्रास एकस्वरूप देण्याच्या बाबतींत त्यांनीं मोठी कामगिरी केली आहे; पृ. ५११.

[ संदर्भग्रंथ.—ज्ञानकोश विभाग २ रा. एगलिंग—शतपथ ब्राह्मण (भाषांतर). सर्वानुक्रमणी. वेदसंहिता. ब्राह्मणें. महावंसो व दीपवंसो. छान्दोग्योपनिषद. बौधायनस्मृति. धर्मसूत्रें. श्रौतसूत्रें. गृह्यसूत्रें. मनुस्मृति. सेनार्ट—ला कास्ट अन्स इंडे ( पॅरिस १८९६ ). वज्रसूची टीका. भा. इ. सं. मं—प्रथमसंमेलनवृत्त. वि. विस्तार—जानेवारी १९२०. मॅक्समुल्लर—एसेज; हिस्टरी ऑफ एन्शंट संस्कृत लिटरेचर. ग्रीनिज— ए हँडबुक ऑफ ग्रीक कॉन्स्टिटयूशनल हिस्टरी.]

---

## प्रकरण ७ वें.

## सूतसंस्कृति

### पृ. (५११–५२८).

आर्यन भाषेनें व्यापलेलें क्षेत्र आज जेवढें आहे तेवढेंच जवळजवळ दाशराज्ञयुद्धकालीं म्हणजे वेदपूर्वकालीं असावें; पृ. ५११.—राजस्थानांतील भाटांनीं आपल्या राजांकरितां

[illegible] त्याप्रमाणें प्राचीन कालीहि कवनें [illegible] असतात; पृ. ५१२.—यजुर्वेदीय संहिता व ब्राह्मणें यांचा काळ हा सूत व मांत्र संस्कृतीच्या मिलाफाचा काळ होय. स्थानिकांच्या शिव, विष्णु, वैश्रवण, कुबेर, प्रजापति वगैरे कांहीं मुख्य देवतांना प्राधान्य देऊन मंत्रांस व क्रियांस महत्त्व दिलें गेलें. गंगेच्या पूर्वेस अग्निचयनास फारसें प्राधान्य नसावें. आरण्यकीय धर्म हा देश्य संस्कृतीचें पुनरुज्जीवन व मांत्रसंस्कृतीचा विनाश दाखवितो; पृ. ५१३.—राजवंशावळी अनेक इतिहासपुराणांतून दिलेल्या आहेत. उलटपक्षीं ब्राह्मणांत गुरुशिष्यपरंपरेची महति असल्यानें त्यांच्या वंशावळींचा मागमूस लागत नाहीं. या वंशावळ्यांत व तदनुषंगिक कथांत बरीच खरी इतिहासपरंपरा आहे; पृ. ५१४.—ऋग्मंत्र हें मांत्रसंस्कृतीचें व पुराणें हें देश्य ऊर्फ सूतसंस्कृतीचें वाङ्मय आहे. मांत्रवाङ्मयांत पौराणिक राजांच्या अनुल्लेखाचें कारण मांत्रसंस्कृतीचे लोक त्या वेळीं अद्याप गंगेच्या पश्चिमेकडेच असल्यामुळें त्यांना गंगेच्या पूर्वेकडील या पौराणिक राजांची माहिती नसावी; पृ. ५१५.—अध्वर्यूनीं यज्ञसंस्थेंत इतिहासपुराणांचा समावेश करून त्यांस पांचवा वेद असें नांव दिलें. इतिहासपुराणें म्हणून एखादा ग्रंथ नव्हता; पृ. ५१६.—इतिहासपुराणांचा उल्लेख मंत्रवाङ्मयात व्रात्यस्तोम–कांडाशिवाय इतर कोठेंहि नाहीं. ब्राह्मणवाङ्मयांतील इतिहासपुराणभाग यज्ञसंस्था इतिहासपुराणाशीं संबद्ध आहे असें दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे; पृ. ५१७.—हल्लीं पौराणिक कथा सामान्यतः सत्य असें मानण्याचा प्रघात पडला असून एखादी कथा ऐतिहासिकदृष्ट्या त्याज्य म्हणणारावर तें सिद्ध करण्याचा बोजा पडतो. तथापि प्राचीन वंशावळींत मधल्या दीर्घकालांत कांहीं चुका, लोप व लबाडी होणें संभवनीय आहे; पृ. ५१८.—वंशावळ्यांत पुढच्याचें मागच्याशीं नेहमीं निश्चित नातें दिलेलें नसतें; पृ. ५१९.—कोसलवंश पूर्वेकडे असल्यानें तो हैहय, तालजंघ, शक, पह्लव, कांबोज इत्यादि टोळ्यांच्या हल्ल्यांपासून बचावून अखंड राहिलेला सांपडतो; पृ. ५२०.—कालैक्यें काढल्याशिवाय वंशावळ्यांस महत्त्व नाहीं. तीं काढतांना पैतृक नामांवरून पितापुत्राचें नातें नेहमींच निघतें असें नाहीं, कधीं कधीं एकच नांव अनेक व्यक्तींचें असतें वगैरे गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत; पृ. ५२०.—वैवस्वतमनूच्या इक्ष्वाकु पुत्रापासून सूर्य आणि विदेह वंश, नेदिष्ट पुत्रापासून विशाल घराणें व त्याची कन्या इला हिच्या पुरूरवस् पुत्रापासून इतर सर्व घराणीं निघालीं; पृ. ५२०.—पुराणांतील वंशावळ्यांचें कालैक्यदर्शक कोष्टक. मनूपासून निघालेल्या यादव, पौरव, काशी, सूर्य दिष्ट व अनु या वंशांपैकीं यादव, सूर्य व विदेह घराण्यांच्या वंशावळी बऱ्याच मोठ्या व स्मृतिपरंपरेनें बहुतेक जशाच्या तशा चालत आलेल्या आहेत. पौरव व अनु कुलांत बरींच नांवें दिसतात तरी त्यांच्या वंशावळींत मध्यंतरीं मोठमोठीं रिक्तस्थानें आहेत. काशी व दिष्ट या त्यानंतरच्या महत्त्वाच्या वंशांचा लोप दाशरथी रामाच्या सुमारास झालेला आढळतो. बाकीचे वंश कमी महत्त्वाचे असून त्यांतील कांहींचा आरंभ बराच उत्तरकालीन आहे; पृ. ५२२.—सोमवंशाचा मतिनार सूर्यवंशी प्रसेनजिताचा, यादववंशी शशबिन्दु प्रसेनजितपुत्र दुसऱ्या यौवनाश्वाचा ( किंवा युवनाश्वाचा ) व कान्यकुब्जवंशी जह्नु सूर्यवंशी पुरुकुत्साचा समकालीन होता गाधिपिता पुरुकुत्साच्या चारपांच पिढ्या मागचा होता. विश्वामित्र, त्रिशंकु, हरिश्चंद्र व जमदग्नि, हे समकालीन व शुनःशेप आणि जामदग्न्यराम हेहि समकालीन होते; पृ. ५२४.—भार्गव रामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली ही कथा रामाच्या जागीं तालजंघ हैहय घातल्यास कांहींशी सत्य होईल. काशीचा प्रतर्दन व सूर्यवंशी सगर हे समकालीन असून त्यांनीं तालजंघ हैहयांचें वर्चस्व मोडलें. दिष्टवंशी चक्रवर्ती मरुत्ताला अजमासें जामदग्न्य रामाच्या कालीं टाकतां येईल. पौरववंशी भूमन्यु सूर्यवंशीं नाभागाचा समकालीन होता, आणि भरत पहिल्या दिलीपाशीं व दुष्यन्त अंशुमानाशीं समकालीन होता पृ. ५२५.—सोमवंशी उत्तरपंचाल घराण्यांतील अजमीढाची पिढी सूर्यवंशी ऋतुपर्णाच्या किंवा त्याच्या नंतरच्या पिढीशीं जोडतां येईल. त्या घराण्यांतील सृंजय रामाचा समकालीन होता. राम आणि शत्रुघ्न यांचा यादव घराण्याशीं संबंध जोडणाऱ्या कथेंत बरेंच तथ्य सांपडतें. यादववंशी भीम रामाच्या कालीं गादीवर होता; पृ. ५२६.—पौरववंशी पहिला ऋक्ष उत्तरपंचाल घराण्यांतील दिवोदासाचा, संवरण हा सुदास किंवा सहदेव याचा आणि कुरु हा सोमक किंवा जन्तु याचा समकालीन ठरतो. नवीन चेदि व मगध घराणीं स्थापन करणारा वसु चैद्योपरिचर दुसऱ्या जनमेजय परिक्षितानंतरचा होता; पृ. ५२७.—वंशावळींच्या याद्या कौरवपांडवयुद्धापर्यंतच आहेत. इक्ष्वाकूपासून भारतीय युद्धापर्यंतचा काल १४०० वर्षांपेक्षां कमी असणार नाहीं. आमच्या मतें अजमढिापासून कांहीं राजांकडे दिवोदासाचें पूर्वजत्व स्थापित झालें असावें, पुरुकुत्स व त्रसदस्यु यांशीं समकालीन एक दिवोदास पारगिटरनें काशीवंशांत दाखविला आहे तें कालैक्य भ्रामक आहे. आणि ऋग्वेदांतील राजांमागें सूर्यचंद्रसंभवाचें लिगाड लावलें गेलें नाहीं तें देश्यांस सूतसंस्कृतीमुळें लाविलें गेलें असावें; पृ. ५२८.

[ संदर्भ ग्रं थ.—संहिता, ब्राह्मणें व उपनिषदें, महाभारत, रामायण. पारगिटर–पुराण टेक्स्ट ऑफ दि डिनॅस्टिज ऑफ दि कलि एज. नेशन्स ऑफ इंडिया ॲट दि बॅटल बिट्वीन पांडवाज ॲंड कौरवाज. वेदविद्या ( ज्ञानकोश ). अमरकोश. पुराणें. शांखायन श्रौ. सूत्र. तैत्तिरीय आरण्यक. पतंजलि-पाणिनिवरील वार्तिक व महाभाष्य. निरुक्त. ओल्डेनबर्ग–डाय रिलिजन डेस वेद. श्रोडर–इंडियन लिटरेचर ॲंड कल्चर. विंटरनिट्झ–हिस्टरी ऑफ इंडियन लिटरेचर. ]

## उत्तरभाग

## प्रकरण १ लें.

### पश्चिमेकडील प्राचीन संस्कृतींचें स्थूल विवेचन

(पृ. १–४)

उर्वरित बुद्धपूर्वकाळाच्या इतिहासाचे तीन विभाग पडतात: १ मिसरी–असुरी–बाबिलोनी–ईजिअन–चिनी–सांस्कृतिक इतिहास; २ भारतीयांच्या पूर्वजांचा इतिहास; व ३ अवगत राष्ट्रांविषयीं संशोधन. प्राचीन भारतीय संस्कृतीचें अवलोकन करितांना बाह्य जगाचेंहि संस्कृतिसंवर्धन लक्षांत आणिलें पाहिजे; पृ. १.—जेथें योग्य उष्णता व पाणी मुबलक असेल त्याच ठिकाणीं संस्कृतीची वाढ होते. ख्रि. पू. १५०० च्या पूर्वीच्या कालाचें वर्णन देण्यासाठीं इजिप्त व क्रीट, सायप्रस, बाबिलोनिया वगैरे, फिनिशिया, पालेस्टाईन, हिटाइट आणि चिनी देश विचारांत घ्यावे लागतात; पृ. २.—बाबिलोनी व मिसरी संस्कृतींचा परस्परसंबंध अनेक गोष्टींवरून व्यक्त होतो. इजिप्तची संस्कृति बाबिलोनीपासून निघाली असावी असेंच सिद्ध होतें; पृ. ३.

[संदर्भग्रंथ.—होमेल—सिव्हिलिझेशन ऑफ दि ईस्ट. सीनोबॉस—हिस्टरी ऑफ एन्शंट सिव्हिलिझेशन. फोझिएर—सिव्हिलिझेशन अँड प्रोग्रेस बोस—इव्हॉल्स ऑफ सिव्हिलिझेशन. अंडरसन—स्टोरी ऑफ दि एक्सटिंक्ट सिव्हिलिझेशन ऑफ दि ईस्ट. महाफि–प्रिमिटिव्ह सिव्हिलिझेशन्स अँड देअर फिजिकल कंडिशन्स. साईस—बाबिलोनियन लिटरेचर; रिलिजन्स ऑफ एन्शंट इजिप्त अँड बाबिलोनिया.]

---

## प्रकरण २ रें.

### मिसर अथवा इजिप्त देशाचा प्राचीन इतिहास

(पृ. ४–२१).

इजिप्तच्या अति प्राचीन इतिहासावर अलीकडे बराच प्रकाश पडला आहे. मिसरी लोकांचें चित्रकलेचें ज्ञान प्राथमिक अवस्थेंत असलेलें दिसतें; पृ. ४.—पुढें राजघराण्यांच्या सुरवातीस ही कला पूर्णावस्थेस पोंचली असावी. १२ व्या घराण्याच्या काळीं शिल्पकलेंत भव्यपणा व ठसठशीतपणा जो आला तो १८ व्या व २० व्या घराण्यांच्या काळीं लोपून जाऊन त्या जागीं भावना जागृत करणाऱ्या गोष्टी दिसूं लागल्या. या काळीं चित्रकलेची अभिवृद्धि झाली; पृ. ५ — या देशांतील प्राचीन हत्यारें व मातीचीं भांडीं संशोधिलीं आहेत पण त्यांचा काळ निश्चित करतां येत नाहीं. तथापि त्यांतील कांहीं प्रागैतिहासिक काळांतलीं आहेत हें खास; पृ. ५.—अति प्राचीन काळच्या राजकीय इतिहासाविषयीं कांहीं अनुमान करणें शक्य झालें आहे. पहिल्या राजघराण्याविषयीं माहिती कबरस्थानें व त्यांतील शिलालेख यांवरून मिळते; पृ. ८.—मिसरदेशाचें वैशिष्ट्य जे मनोरे ते बांधण्याचा क्रम "नवीन राज्य" स्थापन होईपर्यंत चालला होता. पांचव्या व सहाव्या राजघराण्यांतील राजांची हकीकत त्यांच्या स्मारकांवरून चांगली कळते; पृ. १०.—नवव्या व दहाव्या घराण्याच्या काळीं मेंफिसचें राज्य लयाला गेलें. थीबीजच्या राजांनीं अकराव्या घराण्याची स्थापना केली व राज्यविस्तारहि केला. १२ व्या घराण्यांतील राजे चांगले कार्यकर्ते व मोठे दक्ष असत; या घराण्याचा लौकिक फार मोठा आहे; पृ. ११.—यापुढें १८ व्या घराण्यापासून सुरवात होणाऱ्या नूतन युगापर्यंत इजिप्तचा इतिहास अगदीं अज्ञात राहिला आहे. हिक्सॉस राजघराणें मात्र संस्मरणीय वाटतें; पृ. १२.—अठराव्या घराण्यानें मोठें वैभव संपादन केलें; त्या काळीं मिसरदेश मोठा धनाढ्य व बलाढ्य झाला. पहिला व तिसरा टेथमॉसिस, तिसरा व चवथा ॲमेनोफिस हे प्रसिद्ध राजे होऊन गेले. हाटशेपसूत नांवाची एक अद्वितीय राजकन्या या इतिहासांत झळकत आहे; पृ. १३.—एकोणिसाव्या घराण्यांत दुसरा रामेसीस याची कारकीर्द मोठी महत्त्वाची होती. विसाव्या घराण्यांत ९ रामेसीस नांवाचे राजे होऊन गेले; या काळीं इजिप्त समृद्ध होतें पण अंतर्व्यवस्था नीट नव्हती; पृ. १६.—इ. स. पू. १२ व्या शतकांत नीलमुखामध्यें एक स्वतंत्र राजघराणें स्थापिलें गेलें. २२ वें घराणें बरेच दिवस टिकलें. २३ व्या घराण्याच्या काळीं इथियोपियांत दुसरें एक राज्य स्थापन झालें. या घराण्यांत व असुरी लोकांत युद्ध होऊन इजिप्त परतंत्र झालें; पृ. १८.—२६ व्या घराण्यांतील सामेटिकस राज्याच्या अमदानींत इजिप्तला पुन्हां चांगले दिवस आले पण त्याच्या मागें इराणी लोकांची सत्ता सुरू झाली; पृ. १९.—इ.स. पू. ४०५ मध्यें इजिप्त पुन्हां स्वतंत्र बनलें. ३० वें घराणें हें शेवटचेंच फारो घराणें असून त्यापुढें इजिप्त इराणीवर्चस्वाखालीं गेलें व यानंतर कधींहि कोणी देश्य राजा फारोच्या तक्तावर बसला नाहीं; पृ.२०.

[संदर्भग्रंथ.—बर्च–इजिप्त फ्रॉम दि अर्लिएस्ट टाईम्स टु बी. सी. ३००. रालिन्सन—एन्शंट इजिप्त. पेट्री–आर्ट्स अँड क्रॅफ्ट्स ऑफ ईजिप्त, हिस्टरी ऑफ इजिप्त. केरिन्क–एन्शंट इजिप्त अंडर दि फॅरोज्. बेलझोनी—इजिप्त अँड न्युबिया. इजिप्त एक्सप्लोरेशन फंड; आर्किआलॉजिकल रिपोर्ट. नॉर्डेन—इजिप्त, न्युबिया ॲन्ड थीबीज. कॅपर्ट–प्रिमिटिव्ह आर्ट इन इजिप्त. शार्पे–इजिप्शियन हायरोग्लिफिक्स. ब्रेस्टड—ए हिस्टरी ऑफ इजिप्त फ्रॉम दि अर्लिएस्ट टाईम्स टु दि पर्शियन कॉन्क्वेस्ट, व याच लेखकाचीं इजिप्तवरील आणखी तीन पुस्तकें. वाज–ए हिस्टरी ऑफ इजिप्त. विंक्लर—दि टेल एल अमर्ना लेटर्स. मॅस्पेरो–लाइफ इन् ॲसिरिया ॲन्ड एन्शंट इजिप्त.]

---

## प्रकरण ३ रें.

### ईजियन संस्कृति

### ( पृ. २१-२३ ).

ईजियन संस्कृतीचे अवशेष म्हणजे इमारती, नक्षीकाम, चित्रें, सामानसुमान व लेख होत; दुसरे पुरावे म्हणजे समकालीन उल्लेख व परकीयांत अवशिष्ट असा ईजियन अंश. या अवशेषांवरून तेथें स्वतंत्र राज्यें असावींत असें वाटतें. पारमार्थिक कल्पना ख्रि. पू. १५०० मधील ग्रीक विचारपद्धतीशीं जुळते; पृ. २१.—राहणी सुखाची असे. या संस्कृतीचा उगम प्रास्तरायुध युगांतला आहे व वाढ ३००० वर्षांची आहे. मृतांस सर्व सामुग्रीसह पुरीत. या लोकांत कलाकौशल्य उत्तम दिसून येतें. दुसऱ्यांशीं न जमणारे असे कांहीं विशिष्ट धर्म यांच्यांत दिसतात; पृ. २२.—क्रीट बेटांतील वसाहती इतरांपेक्षां लवकर सुधारल्या व त्यांच्यांत राजकीय, धार्मिक, सामाजिक व्यवस्था सुरू होऊन एक विशिष्ट संस्कृति बनली; पुढें रानटी लोकांच्या स्वाऱ्या होऊन ती आजिबात नष्ट झाली; पृ. २३.

[सं द र्भ ग्रं थ.—मुरे—एक्सकॅव्हेशन्स इन सायप्रस. रिजवे-अर्ली एज ऑफ ग्रीस. हॉल-दि ओल्डेस्ट सिव्हिलिझेशन्स ऑफ ग्रीस. सॉटस आणि मॅनाट-दि मिसेनियन एज. होगार्थ-ईजियन रिलिजन ( सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स ). एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका-ईजियन सिव्हिलिझेशन. मॅनाट—ईजियन डेज. ]

---

## प्रकरण ४ थें.

### असुरी बाबिलोनी संस्कृति

### ( पृ. २३-४२ ).

आशियांतील तुर्कस्तानांत ख्रि. पू. १५०० च्या सुमाराचे बरेच प्रांत मोडत. असुरांची संस्कृति बाबिलोनीच होती तरी दोहोंमध्यें थोडा फरक होता. सेमेटिक बाबिलोनी वाङ्मय मिश्र भाषांतून असे; पृ. २३.— प्राचीन बाबिलोनी वाङ्मयग्रंथ उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून गणित व ज्योतिष शास्त्रांत या लोकांची केवढी प्रगति झाली होती हें दिसून येतें. बाबिलोनियांत दगड नसल्यामुळें बांधकामें विटांचीं असत व त्यामुळें कलाकौशल्य बेताबाताचें असे; पृ. २४.— असुरिया-बाबिलोनियांत जातिभेद नव्हता, मात्र एखाद्या विशिष्ट वर्गाचें प्राबल्य असे. राहाणी सुधारलेली दिसते. बाबिलोनियन संस्कृतीचा उगम 'एरिडु' व 'निप्पुर' या दोन निकटवर्ती संस्कृतींपासून झाला असावा; पृ. २५.—कायदेपद्धतीवर प्रकाश पाडणारे ग्रंथ बरेच संशोधिले गेले असून त्यांत 'हमुरबीचें कोड' हें महत्त्वाचें आहे. या कोडावरून असें दिसतें कीं, त्या वेळीं लोकांचे तीन वर्ग असत: (१) कुटुंबांतील मुख्य मनुष्यांचा; (२) गुलाम नसलेल्या लोकांचा व (३) गुलामांचा वर्ग. राजाची सत्ता जमीनीवर नसे. देवालयें संस्थानांप्रमाणें स्वतंत्र व समृद्ध असत; पृ. २६.— मालमत्तेचा क्रयविक्रय फार कसोशीनें होई. शेतकी खुद्द मालक पाहात असे घरभाडें, मजुरी, व्याज वगैरेचे दर ठरलेले असत. व्यापार एजंटांमार्फत चाले. वैवाहिक पद्धति बायकांनां हितावह अशीच असे. घटस्फोट व दत्तक यांची परवानगी असे फौजदारी गुन्ह्यास "जशास तसें" या न्यायानें शिक्षा होई. न्यायदानाची पद्धत आधुनिक पद्धतीहून फार निराळी वाटत नाहीं; पृ. २७.— बाबिलोनियाचा प्राचीन इतिहास शिलालेख व भांड्यांवरील लेख यांवरून थोडाबहुत मिळतो. केंगी, किश व गिश्बन यांचीं राज्यें ख्रि. पू. ५ व्या शतकांत होऊन गेलीं. शिर्पूर्लाचें राज्य मोठें प्रौढ व सुसंस्कृत दिसतें; पृ. ३१.— अगडच्या राजघराण्यांत सार्गन व नरमासिन यांच्या कारकीर्दी प्राचीन पौरस्त्य इतिहासांतलि अत्यंत सुधारलेल्या होत. इरेकचें व इसिनचें अशीं दोन सेमेटिक राज्यें या काळीं होऊन गेलीं. ऊरचीं तीन राजघराणीं होऊन गेलीं; या घराण्यांत सार्वभौमसत्ता नांदत होती; पृ ३२.—बाबिलोनच्या राज्यांत आठ राजवंश आढळतात. ख्रि. पू २४५०-७२८ पर्यंत हें साम्राज्य टिकलें. या साम्राज्याच्या काळीं बाबिलोनिया मोठ्या भरभराटींत होता. असुरियनांच्या स्वाऱ्यांमुळें साम्राज्य डबघाईस आलें; पृ. ३४.— असुरियन साम्राज्याच्या प्रथमकालीं ( ख्रि. पू. १८३०-११२० ) बाबिलोनवर असुरियाचें वर्चस्व बसण्यास सुरुवात झाली. द्वितिय कालीं ( ख्रि. पू. ११२० -८८५ ) असुरियाचें साम्राज्य विस्तार पावलें. तृतीय कालीं ( ख्रि. पू. ८८५—७२२ ) बाबिलोन असुरियन प्रांत बनला, साम्राज्य चांगलच बळावलें व सुधारलें. चतुर्थ कालीं ( ख्रि. पू. ७४५-६०६ ) साम्राज्यसत्तेचा कळस होऊन शेवटीं तें बाबिलोनियनांनीं जिंकलें. याच काळांत विख्यात असुरबनिपाल होऊन गेला; पृ. ३५.— पुन्हां नवीन बाबिलोनियन साम्राज्य उदयास आलें ( ख्रि. पू. ६०६ ), पण थोड्याच वर्षांत त्याची समाप्ति होऊन बाबिलोन प्रांत इराणी सत्तेखालीं गेला; पृ ३९.— असुरिया बाबिलोनियांतील व भोंवतालच्या शहरांचा विकास तत्कालीन कल्पना येण्यासाठीं देणें अवश्य आहे; पृ ४०.

[ सं द र्भ ग्रं थ.—रिच-मेमॉइर ऑन दि रुइन्स ऑफ बाबिलोन. लेयर्ड-निनेव्हे अँड बाबिलोन साइस-रिलिजन ऑफ दि एन्शंट बाबिलोनियन्स. बॉल-रेकर्ड्स ऑफ दि पास्ट. ॲरियन-हिस्टरी ऑफ अलेक्झाडर्स एक्स्पिडिशन. स्ट्रॅबो- जिऑग्रफी. झेनोफोन-अॅनाबासिस. चेस्ने-एक्स्पिडिशन फॉर दि सर्व्हे ऑफ युफ्रेटीज अँड टायग्रीस. हेरोडोटस. प्लिनी. टॉलेमी अल्माजेस्ट. हिल्प्रेक्ट-दि बाबिलोनियन एक्स्पिडिशन. पीटर्स-निप्पुर. पिंचेस—दि बाबिलोनियन क्रॉनिकल. किंग-लेटर्स ऑफ खमुरबी. रडौ-अर्ली बाबिलोनि-

यन हिस्टरी. रॉजर्स-हिस्टरी ऑफ बाबिलोनिया अँड असिरिया. हार्पर-दि कोड ऑफ खमुरबी. रागोझिन-अॅसिरिया. जॅस्ट्रो-सिव्हिलिझेशन ऑफ बाबिलोनिया अँड अॅसिरिया. बज-अॅसिरियन टेक्स्टस. क्रुमिंग-फॉल ऑफ बाबिलोनिया.]

## प्रकरण ५ वें.

### असुरकालीन आशियांतील राष्ट्रं व संस्कृति

( पृ. ४२—६१ ).

सिरिया व पूर्व-आशियामायनर यांमधील हिटाइट राष्ट्र इ. स. पू. १६ व्या शतकापासून प्रामुख्यानें वावरूं लागलें, व शेजारच्या असुरराष्ट्राबरोबर साम्राज्यस्थापनेसाठीं झगडूं लागलें. खि. पू. ६ व्या शतकानंतर हिटाइट लोकांचा पुरा नायनाट झालेला दिसतो; पृ. ४२.—अर्वाचीन संशोधनावरून हिटाइट चांगले पराक्रमी व सुसंस्कृत दिसतात. यांचा मिसरी व असुरी लोकांशीं विशेष राजकीय संबंध होता, पण तो शत्रुत्वाचा होता. मित्रत्वाचा संबंध हिब्रू लोकांशीं असे. हिटाइट लोकांचें कलाकौशल्य अभिनव किंवा स्वतंत्र दिसत नाहीं; पृ. ४३.—मिटनि राष्ट्र प्राचीन महत्त्वाच्या राष्ट्रांपैकीं एक असून इजिप्तशीं त्याचा झगडा चाललेला दिसून येतो. खि. पू. १२ व्या शतकांत असुरियन राजांनीं हा प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडला; पृ. ४५.—पॅलेस्टाइनमध्यें प्रागैतिहासिक कालांत एक ठेंगणा मानववंश होता पण पुढें तेथें सेमेटिक लोक राहूं लागले. तेथें खि. पू. १७ व्या शतकाच्या सुमारास इजिप्तचें व खि. पू. १४ व्या शतकाच्या सुमारास बाबिलोनियाचें वर्चस्व होतें. प्राचीन पॅलेस्टाइनवर आशियामधील संस्कृतीचा इजिप्तमधील संस्कृतीपेक्षां अधिक परिणाम झाला होता; पृ. ४५.-फिनीशिया हें प्राचीन काळचें प्रसिद्ध व्यापारी राष्ट्र होय. तेथील लोक सेमेटिक वंशाचे असून त्यांनीं फिनीशियन भाषा व लिपी निर्माण केली. फिनीशिया खि. पू. १६०० पासून इजिप्शियनांच्या अमलाखालीं, खि. पू. ९७० पासून स्वतंत्र, खि. पू. ८७६ पासून असुरियनांच्या व खि. पू. ६०५ पासून उत्तर बाबिलोनियन राजांच्या अमलाखालीं राहून खि. पू. ५३८ पासून इराणच्या अमलाखालीं गेला. फिनीशियन लोक व्यापारांत प्रवीण होते पण राष्ट्र स्वतंत्र व प्रागतिक करण्यास लागणारे गुण त्यांच्या अंगीं नव्हते; पृ. ४८.—सीरियांत मानवाची वस्ती फारच प्राचीन काळापासून दिसते. खि. पू. १६०० च्या सुमारास तेथें इजिप्शियन व बाबिलोनी या संस्कृतींच्या संयोगानें एक नवीन संस्कृति जन्मास आली व फिनीशियन लोकांच्या व्यापारी चळवळीमुळें भूमध्यसमुद्राच्या पश्चिमेकडील भूभागापर्यंत ती गेली. अरब लोकांवरहि तिचे परिणाम झाले; पृ. ५२.—याशिवाय पश्चिम आशियांत लीडिया, मीडिया वगैरे लहान राष्ट्रें होतीं. पूर्वआशियांतलें या काळांतील मोठें राष्ट्र चीन होय. याच्या इतिहासास फुहि बादशहापासून ( खि. पू. २९५२-२७३८ ) सुरुवात होते. त्यापूर्वीचे लोक जंगलांत पशूप्रमाणें राहात होते अशी चिनी लोकांचीच समजूत आहे. फुहि बादशहानें अनेक सुधारणा करून चिनी लोकांनां संस्कृतीच्या पहिल्या पायरीवर आणून सोडलें. नंतरच्या दोन बादशहांनींहि बऱ्याच सुधारणा केल्याचें चीनच्या इतिहासांत आहे, पण ही हकीकत काल्पनिक दिसते; पृ. ५४.—ह्िया घराणें खि. पू. १७६६ त लयाला गेलें. नंतर चिन घराणें आलें. तेंहि त्यांतील एका बादशहाच्या दुर्गुणामुळें खि. पू. ११२२ त बुडालें; पृ. ५७.—कन्फ्यूशिअस संप्रदाय लोक समजतात त्याप्रमाणें परमार्थपर नाहीं; त्यांत व्यावहारिक नीति व राजधर्म उपदेशिला आहे. ताओ संप्रदाय लौत्झेनें स्थापन केला असें मानण्यांत येतें. "ताओ तेह किंग" हा ग्रंथ ताओ-तत्त्वांची ओळख करून देतो. शील व कर्म यांचें विवरण करणारा 'ताओ' हा एक गुण आहे व याचें महत्त्व प्रत्येकाला आहे, अशी या संप्रदायाची शिकवण असते. लौत्झेनंतर सुमारें ५०० वर्षांनीं हा पंथ अस्तित्वांत आला. पुढें त्यांत अनेक बऱ्यावाईट भरी पडून सध्यां तो हीन बनला आहे; पृ. ५८.

[संदर्भग्रंथ—एबर्स-इजिप्त. साइस-दि हिटाइट्स. पेरट आणि चिपीझ-हिस्टरी ऑफ आर्ट इन सार्डीनिया, ज्युडिया, सिरिया, अँड दि एशिया मायनर. हिल प्रेक्ट-एक्सप्लोरेशन इन बायबल लँड्स. राइट-एंपायर ऑफ दि हिटाइट्स. होगार्थ-आयोनिया अँड दि ईस्ट. साइस, होमेल आणि इतर यांचे 'प्रोसीडिंग्स, सोसायटी ऑफ बायबल आर्किऑलॉजी' मधील विविध लेख. मिस बेल-दि थाउजंड अँड वन चर्चेस. कॉंडर-हिटाइट इन्स्क्रिप्शन्स अँड अल्टाइक हायरोग्लिफ्स. गारस्टँग-दि लँड ऑफ दि हिटाइट्स. हिस्टोरियन्स हिस्ट्री ऑफ दि वर्ल्ड. ए. ब्रि. ( ताओइझम, कनफ्यूशिअस ). ए. रि. ए. ( कनफ्यूशिअन रिलिजन; कनफ्यूशिअस ). रॉलिन्सन-फिनीशिया. लेग्गे-रिलिजन्स ऑफ चायना. ]

## प्रकरण ६ वें.

### प्राचीन यूरोपीय संस्कृति

( पृ. ६१-७१ ).

ग्रीक, रोमन, ट्यूटन व स्कँडिनेव्हियन या यूरोपीय संस्कृतींचा मूळ उगम बुद्धपूर्व काळांत सांपडतो. ईजियन संस्कृतीची कल्पना होमरच्या काव्यावरून येते. होमरच्या काव्यांतील ईश्वरकल्पना निराकार दैवतपर नाहीं किंवा सर्वेश्वरी मतासारखीहि नाहीं. होमरपूर्वकालीं 'एकेका जातीचा

एकेक स्वतंत्र देव' ही कल्पना प्रथम उद्भवून नंतर तिचा विकास होत गेला; पृ. ६१.—मिनोमायसिनी लोकांत स्त्री-देवता श्रेष्ठ असे. हेलेमपूर्व लोकांत कौटुंबिक व राजकीय धर्मविधी पाळण्यांत येत; त्या वेळीं दैवतकल्पनांत नैतिक स्वरूप दृष्टीस पडे; उपासनेंत कलांचें अस्तित्व असे. देवळें, पुजारी, धर्मोपाध्याय, यज्ञ वगैरे गोष्टी आढळून येतात. होमरोत्तर कालांतल्याप्रमाणें होमरपूर्वकाळींहि पूर्वजांबद्दल उत्सव करीत व प्रायश्चित्तविधी आचरीत. या सुधारलेल्या धर्मकल्पनांबरोबरच समाजशैशवद्योतक अप्रबुद्ध कल्पनाहि या प्राचीन लोकांत होत्या; पृ. ६३.—पशुदेवता व क्रियावाचक देवता यांची उपासना असे; तसेंच सर्ववस्तुगत देवतेची कल्पनाहि दृष्टीस पडे. जादूटोणा व मनुष्यबलीसारखे प्रकारहि होत. प्रथम कालविभागांत ग्रीकांची धार्मिक कल्पना बरींच अवस्थांतरें होऊन तयार झालेली आढळते. पृ. ६६.—खि. पू. १० व्या शतकाच्या सुमारास हेलेनं लोकांत नव्या कल्पना व डायोनिसस नांवाची नवी देवता शिरतांना दिसते. या देवतेची उपासना मोठी विलक्षण व रानटी असे; पृ. ६८.—ट्युटॉनिक संस्कृति प्राचीन पाषाणयुगांत कशा प्रकारची होती तें त्या काळांतील संशोधित अवशेषांवरून दिसतें; फ्रान्सपेक्षां ती जास्त सुधारलेली नव्हती. नवपाषाणयुगांतलि मनुष्य प्रत्येक बाबींत प्रगत झालेला दिसून येतो. जर्मन किंवा ट्युटॉनिक संस्कृतीचें कांस्ययुग दक्षिण जर्मनींत खि. पू. २०००–१००० हें होतें. हेलस्टट युगाला लोखंडाच्या शोधापासून सुरुवात झाली. स्वित्सर्लंडांतील सरोगृहभूमीवरून 'ला-टेने' हें युगाला नांव पडलें; हें युग खि. पू. ४–१ शतकापर्यंत धरितात. रोमनी व राष्ट्रस्थानांतर युग यांत रोमनसंस्कृतिसंबंधदर्शक व विशेषतः चैनीचे पदार्थ दृष्टीस पडतात. मेरोविंगियन युगांतल्या (इ.स.५००–८००)रेहेग्रेबर कबरी संशोधिल्या गेल्या; पृ. ६९.— स्कॅंडिनेव्हियामध्यें पूर्वप्रास्तरयुगांत मनुष्यवस्ती नव्हती; पुढील युगांत ही संस्कृति प्रगत होत गेलेली दिसते; पृ. ७१.

[ संदर्भग्रंथ.— ए. रि. ए. ईजिअन रिलिजन; ग्रीक रिलिजन ). ए. ब्रि. ( जर्मनी; स्कॅंडिनेव्हिया ) बोट्सफर्ड–हेलेनिक सिव्हिलिझेशन. गुश्नोट–जनरल हिस्टरी ऑफ सिव्हिलिझेशन इन युरोप. फॉरेस्ट–दि डेव्हेलपमेंट ऑफ वेस्टर्न सिव्हिलिझेशन. हॅरिसन–स्टडी ऑफ ग्रीक रिलिजन व इतर ग्रीकसंबंधीं ग्रंथ. फार्नेल–एव्होल्यूशन ऑफ रिलिजन वगैरे. ]

## प्रकरण ७ वें.

### मूलगृहकालीन उर्फ इंडोयुरोपीय संस्कृति

( पृ. ७१—९२ ).

हिंदुस्थानांतील वैदिक आर्य हे बाहेरून हिंदुस्थानांत आले, ते आणि इराणी लोक व कित्येक यूरोपीय लोक मूळ एकाच वंशांतले असून ते फार प्राचीन काळीं एकत्र रहात होते वगैरे कल्पना पाश्चात्य लोकांनीं संस्कृत व अवेस्ता भाषेशीं परिचय झाल्यानंतर १९ व्या शतकांत पुढें मांडल्या; यासंबंधाचा श्रोडरचा ग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे; पृ. ७१.—श्रोडरनें संस्कृत. अवेस्ता ( झेंद ), आर्मेनियन, लॅटिन, गॉथिक, ग्रीक, जर्मन वगैरे भाषांतील प्राणी, वनस्पति, कालगणना, भक्ष्यपदार्थ, पोषाख, कौटुंबिक नाती, वगैरे बाबतींतील शब्दविषयक साम्यें दाखवून त्यांवरून या निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक पूर्वी एकत्र रहात असले पाहिजेत व एकच भाषा बोलत असले पाहिजेत असें अनुमान काढलें; पृ. ७३.—या मूळ आर्यवंशी लोकांचें एकत्र राहण्याचें ठिकाण कोणतें याबद्दल मतभेद होऊन पिक्टेट, होमेल, मॅक्समुल्लर वगैरे विद्वानांनीं मध्यआशिया लॅथॅम, बेनफी, व्हिटने, वगैरे विद्वानांनीं मध्य-यूरोप आणि बा. गं. टिळक यांनीं उत्तर ध्रुवप्रदेश, हें मूलगृह होय असें मत दिलें; पृ. ८८.—शिवाय इंडो-यूरोपीय लोकांचा एकत्रवसतिकाल खि. पू. ४००० वर्षांपूर्वीचा होय असेंहि टिळक यांनीं आपल्या 'ओरायन' ग्रंथांत प्रतिपादिलें आहे; पृ. ९०.

[ संदर्भग्रंथ.—श्रोडर–प्रीहिस्टॉरिक अँटिक्विटीज ऑफ दि आर्यन पीपल्स. ऋग्वेद. लबक—प्रीहिस्टॉरिक टाइम्स. हिरोडोटस. महाराष्ट्रीय ज्ञानकोश–'सरोगृह' शब्द. होमर–इलियड. व्हांबेरी–प्रिमिटिव्ह कुल्टुर. टोमाश्चेक—पामिर भाषा. अथर्ववेद. प्लिनि—हिस्ट. नॅच. ऐतरेय ब्राह्मण. रॉसबॅक—रोमन एथ्नॉलॉजी. बा. गं. टिळक—ओरायन व आर्टिक होम इन् दि वेदाज. ना. भ. पावगी—आर्यावर्तिक होम अँड आर्टिक कॉलनीज. ]

## प्रकरण ८ वें.

### पर्शुभारतीय संस्कृति

( पृ. ९२—११९ ).

आद्य आर्यवंशीयांनीं मूलगृह सोडल्यानंतर त्यांची एक शाखा यूरोपकडे गेली व दुसरी पूर्वेकडे वळून इराणांत राहिली. इराणांतील आर्यशाखेची संस्कृति ती पर्शुभारतीय संस्कृति होय व तीहि वेदपूर्वकालीनच होय; कारण वैदिक उर्फ भारतीय आर्य हे इराणांतून हिंदुस्थानांत शिरून नंतर पुढें त्यांनीं वेदरचना केली; पृ. ९२.—भारतीय आर्य हिंदुस्थानांत शिरण्यांपूर्वी इराणी लोकांबरोबर इराणांत एकत्र रहात होते. याला पुरावा अवेस्ता व संस्कृत या दोन भाषांतील शब्दसाम्यांचा, वेद व अवेस्ता या धर्मग्रंथांतील विषयसाम्यांचा, आणि इराणी व भारतीय यांच्यामधील आचारविषयक साम्यांचा आहे; पृ. १०१.

[संदर्भ ग्रंथः—भांडारकर स्मृतिग्रंथ-कीथचा लेख. अवेस्ता. ऋग्वेद. गायजर—सिव्हिलिझेशन ऑफ ईस्टर्न इराणियन्स. दि स्टोरी ऑफ दि नेशन्स—पर्शिया. काथवटे—पारशांचा इतिहास. कावसजी इ. कांगा—कंप्लीट डिक्शनरी ऑफ दि अवेस्ता लँग्वेज. गेल्डनेर—अवेस्ता. मिल्स—एक्स्पोझिशन ऑफ दि लोअर ऑफ अवेस्ता. कांगा—प्रॅक्टिकल ग्रामर ऑफ अवेस्ता लँग्वेज.]

## प्रकरण ९ वें.

### आर्य-असुर-संबंध

(पृ. ११९—१२३)

भारतीयांचा वेदपूर्वकालांत इराणी लोकांशीं व यूरोपीय आर्यांशीं संबंध होता, त्याप्रमाणें आर्येतर वंशी असुर व खाल्डियन लोकांशीं संबंध होता. मेसापोटेमियांत ख्रि. पू ५००० च्या सुमारास तुराणियन नांवाच्या जातीचे लोक राहिले होते; त्यांनीं विटांवर खोदून ठेविलेले लेख अलीकडे उपलब्ध झाले आहेत; त्यांच्या प्राचीनत्वामुळें त्यांना 'खाल्डियन वेद' म्हणतात; खाल्डियनसंस्कृतीच्या साहाय्यानें असुरियन लोक सुसंस्कृत बनले; पृ. ११९.—ख्रि. पू. ४ थ्या किंवा ५ व्या सहस्रकांतील खाल्डियन व आर्य संस्कृतींच्या लोकांत दळणवळण होतें ही गोष्ट या दोन वेदांतील शब्दसाम्यांवरून व कल्पनासाम्यांवरून सिद्ध होते; पृ. १२०—आशियामायनरमध्यें हिटाइट व मिटनी लोक यांच्यामधील तहाचा एक शिलालेख सांपडला असून त्यांत इंद्र, मित्रावरुण, नासत्य या भारतीय देवतांचीं नांवें आहेत; मिटनी लोकांच्या शेजारीं असीरियन किंवा असुर्यन लोक राहात होते. असीरिया हाच वेदांत अनेकवार उल्लेखिलेल्या असुरांचा प्रदेश असावा; आणि आर्य लोक मध्यआशियांत किंवा इराणांत राहात असतां आर्य व असुर यांची परस्पर धार्मिक, वाङ्मयविषयक वगैरे देवघेव झाली असावी; पृ. १२१.

[संदर्भ ग्रंथ—भांडारकर स्मृतिग्रंथ—लो. टिळकांचा लेख व डॉ. रा. गो. भांडारकर यांचा लेख. अथर्ववेद. ऐतरेय उपनिषद. पातंजलमहाभाष्य. शतपथ ब्राह्मण. बृहदारण्यकोपनिषद.]

## प्रकरण १० वें.

### उपसंहार

(पृ. १२३—१२९)

या भागांत सात आठ हजार वर्षांचा इतिहास दिला आहे. मानवाची वस्ती भूतलावर किती लक्ष वर्षें आहे तें ठरविण्याचा व मानवजातीचा वंशवृक्ष तयार करण्याचा प्रयत्न पुराणवस्तुशास्त्र, प्रस्तरावशेषशास्त्र वगैरे शास्त्रांच्या साहाय्यानें चालू आहे; पृ. १२३.—भारतीय आर्य व त्यांचे पूर्वज यांच्या इतिहासाचे मूलगृहकाल, पर्शुभारतीयकाल, व तिसरा भारतीय काल असे मुख्य कालविभाग असून तिसऱ्याचे सूतसंस्कृति व मांत्रसंस्कृति असे दोन पोटभाग पडतात. मांत्रसंस्कृतिकाल दाशराज्ञयुद्धापासून सुरू होतो व सूतसंस्कृतिकाल तत्पूर्वीचा असून त्याच्या इतिहासाचें साहित्य उपलब्ध नाहीं; पृ. १२४—ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांत व्यापक विचार बरेच आहेत, पण त्यांत पुनर्जन्म व कर्मवाद या कल्पना नाहींत. अद्वैतवाद व एकेश्वरीमत, पतिपत्नीधर्म, गृहस्थधर्म, वगैरे गोष्टी त्यांत आहेत, पण गोत्रप्रवरकल्पना त्यांत नाहीं. वैदिक वाङ्मय, ब्राह्मणजाति, व यज्ञसंस्था यांचा अन्योन्याश्रय निकट आहे. तो ज्ञानकोशाच्या 'वेदविद्या' या भागांत सविस्तर दिला आहे; पृ. १२५.—इजिप्त व असुर या लोकांचा प्राचीन इतिहास ख्रि. पू. आठ हजार वर्षांपूर्वीपासून सुरु होतो. भारतीयांचा इतिहास फार तर ख्रिस्तपूर्व तीन हजार वर्षांपर्यंत नेतां येतो. पण त्याच्याहि पूर्वी चार पांच हजार वर्षें पश्चिमेकडे या दोन संस्कृती नांदत होत्या. आर्यांचा अगदीं आद्य म्हणजे मूलगृहकाल घेतला तरी त्या वेळीं असुर्य व इजिप्त या दोन राष्ट्रांची संस्कृति चांगलीच वाढली होती असें म्हटलें पाहिजे. कारण असुरियनांचा कायदाग्रंथ (हमुरबीचें कोड) त्या वेळेसच तयार झाला होता. तसेंच या दोन संस्कृतींचे मोठमोठ्या इमारती, मनोरे, वगैरेंचे अत्यंत प्राचीन अवशेष आज उपलब्ध होतात; पृ. १२८.—सांस्कृतिक दृष्ट्या पर्शूंचें कार्य भारतीय कार्यापेक्षां कमी महत्त्वाचें व अधिक उत्तरकालीन होतें; पृ. १२९.

## परिशिष्ट.

### जैनवाङ्मय.

[पृष्ठ १२९—१३७]

बौद्ध धर्मग्रंथांत 'नीगंठ नातपुत्त' याचा वारंवार उल्लेख येतो जैन व बौद्ध धर्मांत फार साम्य असल्यामुळें जैन संप्रदाय हा बौद्ध संप्रदायाचा पोटभाग असें बराच काळ मानीत असत; पृ. १२९.—जैनसंप्रदायांत श्वेतांबर व दिगंबर असे दोन पंथ असून त्यांच्या धर्मग्रंथास 'सिद्धांत किंवा आगम' म्हणतात व ते अर्धमागधी भाषेंत आहेत; पृ. १२९ – जैन धर्मग्रंथाचें आयारंगसुत्त, सूयगदांग, ठाणांग, समवायांग, भगवतीवियाह, नायाधम्मकहाओ उवासगदसाओ, अंतगडदसाओ, अणुत्तरोवाइययसाओ, पण्हा वागरणा इम, विवागसूयम् व दिठ्ठिवाय अशीं बारा अंगें असून पुढें उपांगें आहेत; पृ. १३१.—याशिवाय छेदसूत्रें, मूलसूत्रें व इतर कित्येक महत्त्वाचे ग्रंथ आहेत, त्यांपैकीं जे दोन्ही पंथांना मान्य आहेत ते फार प्राचीन होत, हें उघड आहे; पृ.१३५.

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

## प्रस्तावनाखंड.

## विभाग तिसरा.

## बुद्धपूर्व जग.

### प्रकरण १ लें.

### इतिहासविषयक प्राचीन कल्पना.

जगाचा इतिहास लिहिण्यास सुरुवात करावयाची ती हिंदुस्थानच्या इतिहासाच्या अनुषंगानें करण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानचा इतिहास लिहावयाचा झाल्यास त्या इतिहासाशीं संलग्न असे अनेक इतिहास येतात. अत्यंत प्राचीन काळचीं राष्ट्रें म्हटलीं म्हणजे इजिप्त व असुर हीं होत. इजिप्तचा हिंदुस्थानाच्या इतिहासाशीं संबंध बराच अनिश्चित आहे. सेसोस्त्रियस नांवाच्या एका इजिप्तच्या सम्राटानें हिंदुस्थानावर स्वारी केली होती, अशी कांहीं वर्षांपूर्वी एक समजूत होती; पण ती कल्पना ज्या आधारावर रचली गेली त्या आधाराची विश्वसनीयता फारशी नसल्यामुळें ही समजूत निराधार आहे असें आज इतिहासज्ञ समजतात. असुर संस्कृतीचे खिस्तपूर्व ६००० वर्षांपूर्वीचे संस्थापक सुमेर म्हणून लोक होते. ते भारतीय द्राविड वंशांतील असावेत असें हाल (H. R. Hall. The Ancient History of the Near East) नांवाचा ग्रंथकार म्हणतो. आम्हांस याविषयीं आज हालचें मत सांगण्यापलीकडे कांहीं करतां येत नाहीं. द्राविडसुमेरकल्पना वगळतां दुसरा संबंध सेमीरामीसमार्फत लावतात. असूर्या देशाच्या सेमीरामीस राणीनें हिंदुस्थानावर स्वारी केली अशीहि एक समजूत होती. ती देखील त्यागिली गेली आहे. इराणचा बादशहा कुरुस (Cyrus) याच्या पदरीं पुष्कळ हिंदू फौजेंत होते, याबद्दल हिरोडोटसच्या वाक्याचा पुरावा आहे. इराणचा कुरुसनंतरचा एक सम्राट् दर्युस यानें हिंदुस्थानचा बराच भाग काबीज केला असावा असें दिसतें. इराणी लोकांनंतरचें महत्त्वास पावलेलें राष्ट्र ग्रीकांचें होय. त्यांचा हिंदुस्थानाशीं संबंध पूर्वीपासून जरी असला तरी शिकंदराच्या स्वारीनें दृढ झाला असें दिसतें. रोमन पातशाहीचा हिंदुस्थानाशीं प्रत्यक्ष संबंध कमी आला तरी हिंदुस्थानांतील कांहीं राजांचे वकील रोमन दरबारीं होते. यावरून व्यापारी संबंध पूर्वापार असावा असें दिसतें. बुद्धापूर्वीच्या चीन देशाशीं असलेल्या संबंधाचें संशोधन अद्याप झालें नाहीं. लाउत्सेची "ता ओ" नांवाची विचारोपासनापद्धति उपनिषन्मूलक असावी असें म्हणतात. येणेंप्रमाणें अत्यंत प्राचीन राष्ट्रांच्या इतिहासाशीं हिंदुस्थानचा संबंध सांगतां येईल आणि इजिप्ती, चिनी, आसुरी, इराणी, ग्रीक, रोमन या प्राचीन संस्कृतींचा इतिहास भारतीय इतिहासाच्या विशिष्ट कालाच्या इतिहासाच्या अनुषंगानें विवेचितां येईल, एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानचा यूरोपांतील लोकांशीं जो एकवंशसंभवसंबंध दिसतो त्यामुळें इतिहासाशीं अत्यंत निकट संबंध असलेल्या भाषाशास्त्र, तौलनिक दैवतशास्त्र इत्यादि शास्त्रांशीं ओळख देखील हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या अनुषंगानें देतां येईल.

जगाच्या इतिहासाशीं परिचय करून देण्यासाठीं हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या अनुषंगानें सुरुवात करावी हें कित्येकांस बौद्धिक औद्धत्य वाटेल. कां कीं, इतिहासाविषयीं हिंदुस्थानाची अनास्था प्रख्यात आहे. भारतीयांचा इतिहास स्पष्ट करण्यासाठीं परक्यांची मदत घ्यावयाची ही जर पद्धति आहे, तर भारतापासून प्रारंभ करून जगाची ओळख करून देण्याचा प्रयत्न आपण कसा करणार? या प्रश्नास उत्तर एवढेंच कीं, जगाच्या अत्यंत प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडणारा माल म्हणजे अत्यंत प्राचीन भाषा व शब्द हे भारतांत शिल्लक आहेत, त्यांचे निरनिराळ्या काळांतले अवशेषहि शिल्लक आहेत. फक्त या अवशेषांचा पृथ्वीच्या सूर्याभोंवतीं होणाऱ्या परिभ्रमणाच्या आंकड्यांशीं संबंध लावावयाचा, हा इतिहाससंशोधकांचा कर्तव्यभाग आहे.

शिवाय हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, इतिहास लिहिण्याची कला भारतीयांस अगदीं अपरिचित होती असें नाहीं. ज्या भावना इतिहासोत्पत्तीस व इतिहासरक्षणास कारणीभूत होतात त्या भावना भारतांत जागृत होत्या.

त्या भावनांचे परिणाम ज्या स्वरूपांत आपणांस दृष्टीस पडतात त्या परिणामांस आपण आज कदाचित् इतिहास म्हणणार नाहीं. शिलालेखांवरील राजावली व पुराणांतील कथा व कुलपरंपरा यांस आजचे लोक इतिहास म्हणणार नाहींत. तथापि ज्या भावना इतिहासग्रंथांच्या उत्पत्तीस कारण झाल्या त्या याहि कृतींच्या उत्पत्तीस कारण झाल्या. काश्मीरची राजतरंगिणी, सिंहलद्वीपांतील वंसोग्रंथ व आसाम आराकानकडील राजांचे इतिहास, यांसारखे प्रकार पाश्चात्त्य लोकांस इतिहासासारखे वाटतात; परंतु राष्ट्राच्या ज्या अनेक उलाढाली झाल्या, त्यांचें वर्णन करणारे हे वंसोग्रंथ खास नाहींत. ऋग्वेदांत ज्याप्रमाणें ब्राह्मणांस गाईचें दान करणाऱ्या राजे

लोकांच्या जंत्री सांपडतात, त्या जंत्रींस पौराणिक, काल्पनिक, भाकड-कथांची जोड दिली असतां जें स्वरूप येईल तें या वंसोग्रंथांचें आहे. पुष्कळ वेळां तर ज्या कथा हिंदुस्थानांतील कित्येक राजांच्या नांवांनीं खपत होत्या त्या सिंहलांतील कांहीं राजांच्या नांवांनीं दडपून दिल्या आहेत. आहोम राजांच्या इतिहासाचे आहोमी (आसामी) भाषेंतील ग्रंथ भाषांतरित झाले नाहींत आणि त्यामुळें त्या ग्रंथांवर विवेचन करतां येत नाहीं; परंतु पौराणिक ग्रंथांत जे दोष असतील अथवा जे दोष बखरींत आढळतात तेच दोष तेथेंहि असतील अशी आमची समजूत आहे.

इतिहास लिहिण्याची मनुष्याची प्रवृत्ति झाली तिचें कारण आपण काय केलें तें लिहून ठेवावें ही मनुष्याची इच्छा होय. या इच्छे-मुळें हिंदुस्थानांतील अनेक राजांनीं आपले विजय शिलालेखांत कोरून ठेविले. ते सर्व इतिहास होत. इतिहासावर भारतीयांची आस्था नव्हती असें नाहीं. तथापि इतिहास या स्वरूपाचें वाङ्मय भारतांत फारसें वाढलें नाहीं, हें मात्र कबूल केलें पाहिजे. याचें मुख्य कारण राष्ट्राची इतिहासविषयक अनास्था होती असें नाहीं. वेदरक्षण झालें तें वाङ्मयरक्षणाच्या हेतूमुळें झालें असें मुळींच नाहीं तर प्राचीन ऋचांचा यज्ञाकडे उपयोग करण्यांत येई, यज्ञ करण्यासाठीं तें ज्ञान शिकावें लागे, अशी परिस्थिति असल्यामुळें त्या ग्रंथांचें जतन तरी झालें. भाटांचा जो वर्ग होता त्यानें राजस्थानाच्या बऱ्याच इतिहासाचें जतन केलें; तथापि भाट हे वाङ्मयाचे कर्ते होते. काव्यें करणें हें त्यांचें कार्य असून इति-हासरक्षण करणें हें त्यांचें कार्य नव्हतें. त्यांचें कार्य लोकरंजन किंवा दात्याचें रंजन करण्याचें होतें. आपणांस या प्रवृत्तीमुळें थोडासा इतिहास उपलब्ध झाला आहे. करमणूक हा जेव्हां उद्देश असतो तेव्हां इतिहास हा चांगला काळजीपूर्वक रक्षिला जातो असें नाहीं. जीं कथानकें मनोरंजक असतात त्यांस प्राधान्य दिलें जातें. जो मोठा दिग्विजयी योद्धा असेल त्याच्या चरित्रापेक्षां ज्याच्या प्रेमविषयासंबंधानें लोकांनां अधिक मौज वाटेल त्याचेंच चरित्र रक्षिलें जातें. श्रोत्यां-वर परिणाम घडवावयाचा असतो तेव्हां साध्या वर्णनापेक्षां तिखट-मीठ लाविलेलें वर्णन लोकांस सहजच अधिक आवडणार. लोक-रंजनास जेव्हां प्राधान्य दिलें जातें तेव्हां व्यक्तीचें ऐतिहासिक महत्त्व आणि सत्य या दोन्ही तत्त्वांची रांखरांगोळी होते. बाजी-रावाच्या मोठमोठ्या लढायांपेक्षां सामान्य लोकांस त्याच्या मस्तानीचें नांव अधिक परिचित आहे. हिंदुस्थानांत इतिहासरक्षणाचे प्रयत्न आपणांस वारंवार दृष्टीस पडतात. पण ते प्रयत्न लोकरंजन-प्रयत्नांत किंवा विशिष्ट उपासनेचा किंवा तत्त्वाचा पुढाकार कर-ण्याच्या प्रयत्नांत विलीन झालेले दृष्टीस पडतात.

प्रत्येक इतिहासग्रंथामध्यें खोटें लिहिण्याची इच्छा लेखकास जास्त असते आणि पुष्कळदां खोटें लिहिण्याकरितांच इतिहास जन्मास येतात. जगाची ऐतिहासिक भावना किंवा इतिहास-महत्त्वाची जाणीव सत्य लिहिण्याच्या प्रयत्नावरून जशी दिसून येणार आहे तशीच खोटें लिहिण्याच्या प्रयत्नावरूनहि दिसून येणार आहे. जो खोटें लिहून ठेवितो तो भावी वाचकांस फसविण्याच्या उद्देशानें लिहून ठेवितो आणि त्यास इतिहासमहत्त्व असल्या-शिवाय तो खोटें लिहिण्याचे परिश्रम करील असें संभवत नाहीं. प्रत्येक इतिहासग्रंथामध्यें कांहीं तरी खोटें अगर पक्षाभिमानानें अर्धेमुर्धें खरें लिहिणें दृष्टीस पडतेंच. तर जो ग्रंथ अगोदरच काव्य आहे त्यावर वैय्यक्तिक इच्छेनें किंवा आकांक्षेनें परिणाम होऊन त्याचें स्वरूप विकृत होतें हें आपल्या रामायण महाभारतादि ग्रंथां-वरून व पुराणांवरून स्पष्ट होतें. खोट्या व लपंडावीच्या विधानां-वरून खोटेपणाचीं व लपंडावीचीं कारणें शोधिलीं असतां आजच्या संशोधकांस इतिहास अधिक खुला होतो. त्याप्रमाणेंच आपल्या देशांतील सर्व प्रकारचे ग्रंथ घेऊन आपणांस इतिहास खुला करावा लागेल.

ग्रीकांचा प्रख्यात इतिहासकार हिरोडोटस याचें स्तोम बरेंच माजविलेलें आपणांस दृष्टीस पडतें. त्यास सत्यवक्ता म्हणणारे लोक आंधळे आहेत असें वाटावयास लागतें. हिरोडोटसचा ऐतिहासिक प्रामाणिकपणा देखील वर्णिला जातो. आज आपण हिरोडोटसचा ग्रंथ वाचूं लागलों म्हणजे कर्णोपकर्णी ऐकलेल्या किती तरी गोष्टी त्यानें लिहून ठेविलेल्या दृष्टीस पडतात. शिवाय लोकरंजन हा हेतु त्याच्या ग्रंथांत प्राधान्यानें दृष्टीस पडतो. त्याच्या इतिहासांत कादंबरीवजा अनेक गोष्टी त्यानें भरल्या आहेत असें दिसून येतें. जिज्ञासूस ज्ञान देण्याच्या करामतीपेक्षां टवाळ व चावट गोष्टींचे शोकी असे जे गृहस्थ आहेत त्यांनां खूष करण्याच्या करामतींवर त्याच्या ग्रंथाची लोकप्रियता स्वली गेली असावी आणि त्यानेंहि लोकप्रिय-ताच मिळविण्यासाठीं खटपट केली असावी असें ग्रंथ वाचतांना वाटतें. असें वाटण्यास एकच कारण देतों. हिरोडोटसनें हिंदुस्थानांतील लोकांसंबंधानें ते मनुष्यभक्षक आहेत अशी आपली समजूत व्यक्त केली आहे (Herodotus III-99). त्यास सत्य जाणण्याची संधि होती, तथापि जी गोष्ट मनोरंजक आहे, तिच्यांतील सत्य शोधून तिचा मनोरंजकपणा कशास घालवावा या भावनेनें तरी त्यानें सत्य शोधलें नसावें किंवा मुद्दाम असत्य प्रसृत करण्याची त्याची इच्छा असावी असें दिसतें. हिरोडोटसचा ग्रंथ इतिहास या दृष्टीनें पुन्हां मांडणी करण्यास अवश्य असा आहे. हिरोडोटसची इतिहासविषयक कल्पना फारशी उज्ज्वल दिसत नाहीं. आणि वाङ्मय या दृष्टीनें देखील हा ग्रंथ अव्यवस्थित दिसतो. तो ऐतिहासिक टीपांनीं युक्त व थोड्या-बहुत चावट गोष्टींनीं लोकप्रिय झालेलें असें प्रवासवर्णन होय असें आम्ही म्हणूं.

इतिहास लिहितांना ज्या कांहीं क्रिया होतात त्यांकडे आपण थोडेंसें लक्ष देऊं.

(१) माहिती जमा करणें.

(२) वृत्तांचें महत्त्वमापन करणें.

(३) माहितीच्या अभावाच्या प्रसंगीं माहित असलेल्या गोष्टींवरून संयोजक कल्पना करणें.

(४) लेखनीय माहितीची व्यापकता नियमित करणें.

(५) जगाच्या किंवा राष्ट्राच्या विकासक्रमाविषयीं सिद्धांत करणें.

या क्रियांपैकीं प्रत्येक क्रिया प्राचीन वाङ्मयांत झालेली दिसते. रामायण, महाभारत व पुराणें यांत जुनी माहिती जमा करून ठेवल्याचे पुरावे वारंवार दिसतात.

इतिहास कसा लिहावा यासंबंधानें विचार नेहमीं बदलत असतात. कालची स्थिति आज समजावी हें सर्वांसच वाटतें. पण कालच्या कोणत्या गोष्टींस महत्त्व द्यावयाचें यासंबंधानें कल्पना असेल तर इतिहास लिहिण्यास दिशा मिळेल. वृत्तांच्या महत्त्वासंबंधानें प्राचीनांची जी बुद्धि असेल ती अवगमिली पाहिजे. "कार्यमहत्त्वविवेचकता" हा इतिहासकाराचा अवश्य गुण तो प्राचीनांत होता काय हें आपणांस पाहिलें पाहिजे. हा गुण त्यांत होता असें केवळ पुराणाच्या व्याख्येवरून दिसतें.

प्राचीनांची इतिहास-विषयक कल्पना आणि पुराण-विषयक कल्पना आज आपणांस जाणणें अवश्य आहे. पुराण म्हणजे फार जुना इतिहास. प्राचीन पुराणांची व्याख्या येणेंप्रमाणें आहे.

**सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।**
**वंशानुचरितं चेति पुराणं पंचलक्षणम् ॥**

पंचमहाभूतात्मक जगाची उत्पत्ति कशी झाली, मूलभूततत्त्वांपासून इतर चराचर कसें निर्माण झालें, निरनिराळे वंश कोणते झाले, त्यांच्या कामगिऱ्या काय झाल्या, कालाचे अत्यंत मोठे विभाग म्हणजे जीं मन्वन्तरें, त्या निरनिराळ्या मन्वन्तरांत कोणकोणत्या गोष्टी होऊन गेल्या, या सर्वांची माहिती पुराणांत दिली पाहिजे अशी प्राचीनांची भावना होती. अत्यंत जुन्या गोष्टींची माहिती फारशी कालानुक्रमानें सांगतां येत नाहीं आणि त्या गोष्टींतील महत्त्वाच्या गोष्टी केवळ जुन्या म्हणून विशेष कालविषयक चर्चा केल्याशिवाय उतरून घेणें व ग्रंथीं समाविष्ट करणें याशिवाय दुसरा कोणताहि पक्ष ग्रंथकारांस उरत नाहीं. असें असल्यामुळें पुष्कळशा प्राचीन कथा कालानुक्रमानें मांडणीशिवाय व कालविषयक विधान केल्याशिवाय पुराणांत ग्रथित केलेल्या दिसतात.

इतिहासाचा एक हेतु असा असतो कीं, आज लोकांना जें दिसत आहे त्याची उत्पत्ति अगर विकास सांगून तें स्पष्ट करावें. या हेतूचा इतिहास हा एक शक्य परिणाम आहे तथापि तो एकच नाहीं. या हेतूमुळें जें वाङ्मय उत्पन्न होतें तें केवळ इतिहासरूपी होत नाहीं. जेव्हां एखाद्या गोष्टीची आपणास साधार माहिती नसेल किंवा ती माहिती उपलब्ध होण्याजोगी नसेल तेव्हां पुढील प्रश्न सोडविण्यासाठीं मनुष्य कल्पना लढवूं लागतो. विश्व उत्पन्न कसें झालें ?. जाती उत्पन्न कशा झाल्या ? राष्ट्रें उत्पन्न कशीं झालीं ? इत्यादि जाडे प्रश्न एखाद्या काळच्या जाणते म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांना साहित्य असो अगर नसो सोडविणें भाग पडतें, आणि ते त्यांस उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणें कल्पना करूं लागतात. या कल्पनांचें परीक्षण न होतां शेंकडों वर्षें त्या कल्पना लोकांना पटविल्या म्हणजे त्यांवर लोकांची इतकी श्रद्धा बसूं लागते कीं, त्या कल्पनांवर विश्वास न ठेवणारा मनुष्य लोकांस नास्तिक अगर पाखंडी वाटावयास लागतो. पुष्कळ वेळां त्या कल्पनांनीं एखादा काल्पनिक इतिहासहि तयार होऊं लागतो. या तऱ्हेचा "इतिहास" आपल्या पुराणांतून व रामायणमहाभारतादि आर्ष काव्यांतून आणि त्याप्रमाणेंच वेदांतील अर्थवादांतून पुष्कळ दृष्टीस पडतो. भारतीयांस इतिहासाविषयीं अनास्था असलेले लोक म्हणून शिक्का मिळाला आहे आणि यांत तथ्यहि पुष्कळ आहे; पण याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, प्राचीनांस इतिहासजिज्ञासा होती व ज्या गोष्टीचा इतिहास ठाऊक नाहीं तो ज्ञानाचा खळगा विचार करून आणि तत्त्वज्ञान लावून भरून काढणें ही क्रिया ते करीत होते. पुष्कळदां ही क्रिया करतांना केवळ काव्यरूपी कल्पनाच उत्पन्न होत. काव्यरूपीच त्यांची कल्पना होई ही गोष्ट प्राचीन भारतीयांच्या विरुद्ध मांडतां येईल. पण याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, माहितीचा अभाव निव्वळ कल्पनेनें भरून काढणारे लोक भारतीयांतच केवळ नाहींत तर ते चोहोंकडे आहेत. प्रत्येक राष्ट्र आडामपासून किंवा त्याच्या वंशांतील एखाद्या पुरुषापासून झालें आहे अशा समजुतींनीं ग्रीकांचे, अरबांचे व मुसुलमानांचे इतिहास यथास्थित भरलेले दिसतात. बौद्ध ग्रंथकारांनीं देखील असल्या कथांचें चांगलें यथास्थित ग्रहण केलेलें दिसतें. येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं जेथें माहिती नसेल तेथें इतिहासकारानें वस्तुस्थिति कशी असावी यासंबंधानें कल्पना करणें ही क्रिया आजच्या शास्त्रीय पद्धतीनेंहि इतिहासलेखनाचें अंग आहेच. फरक हा कीं आजचा इतिहासलेखक कल्पनेस कल्पनाच म्हणून पुढें मांडील. प्राचीन पुराणकार तसें करीत नसत.

इतिहासाचें क्षेत्र काय व त्याचें इतर ज्ञानक्षेत्रापासून पृथक्करण कसें करावें हें आजहि निश्चितपणें ठरलें नाहीं. लोकांच्या इतर ज्ञानावर क्रियांच्या महत्त्वाचें ज्ञान अवलंबून असणार आणि त्यावर लेखन अवलंबून असणार. जगांत झालेल्या सर्व प्रकारच्या घडामोडी या इतिहासाचा विषय होत. इतिहास या विषयाचें स्वरूप दिवसानुदिवस अधिकाधिक विकसित होऊं लागलें आहे. इतिहास या शब्दाचा म्हणजे इति+ह+आस या शब्दसमुच्चयाचा मूळ अर्थ 'असें झालें' असा आहे. ग्रीक लोकांमध्यें हिस्टोरिया हा शब्द प्रथम जन्मास आला आणि त्याचा अर्थ शोध किंवा माहिती असा होता. ज्ञानाचें वर्गीकरण करूं इच्छिणारे लोक इतिहास हें शास्त्र आहे किंवा नाहीं याची बरीच पंचाईत करतात. ते म्हणतात कीं, इतिहास हें शास्त्रच नव्हे. कोणी म्हणतात, मनुष्य हा एक प्राणी आहे, तेव्हां मनुष्याच्या जगावरील क्रिया हा एकंदर प्राणिशास्त्राचा विषय होईल. कित्येक असें म्हणतात कीं, इतिहास हें जगांतील एकच शास्त्र होय. इतर शास्त्रें म्हणजे मनुष्यप्राण्याचें ज्ञान या सदराखालीं इतिहास या शास्त्रांत सर्व कांहीं समाविष्ट करतां येईल. कारण कोणासहि वास्तविक ज्ञान होतच नाहीं. वस्तूंचें इंद्रियगोचर स्वरूप व त्यावर रचलेलीं अनुमानें तेवढीं मनुष्यास ठाऊक आहेत. तेव्हां शास्त्रीय ज्ञान हा केवळ मनुष्येतिहासाचा भाग होय.

मनुष्याचा ऐतिहासिक घडामोडींवर विचार होऊं लागतो आणि त्याचे जगाच्या क्रमाविषयीं सिद्धांत बनूं लागतात. ही क्रिया देखील आपल्या वाङ्मयांत दृष्टीस पडते. 'फिलॉसफी ऑफ हिस्टरी'

म्हणून एक अभ्यासक्षेत्र यूरोपांत दृष्टीस पडतें त्यावर पुष्कळ ग्रंथ निर्माण झाले आहेत. त्या ग्रंथांचे विषय साधारणपणें खालील प्रकारचे दृष्टीस पडतात.

जगांतील अनेक घडामोडी पाहून त्यांतून कांहीं ईश्वरी संकेत दृष्टीस पडतो काय हें पाहावयाचें आणि त्यांतून ईश्वराचे हेतू ओळखावयाचे. समाजाचा क्रम पाहून त्यांतून ईश्वराचे हेतू व नियम ओळखून आपला ईश्वराविषयींचा भाव दृढ करावा या इच्छेनें कित्येक ग्रंथकार प्रवृत्त झाले आहेत.

कित्येक ग्रंथांतून इजिप्त, खाल्डिया, ग्रीस, रोम इत्यादि राष्ट्रांचा विकास व विनाश हें पाहून संस्कृतीची मशाल एका हातांतून दुसऱ्या हातांत अधिक प्रभावयुक्त होण्याकरितां कशी दिली इत्यादि गोष्टी लिहिल्या आहेत.

कित्येकांनीं असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, 'रिव्हिलेशन'मध्यें जीं विधानें केलीं आहेत तींच इतिहासाचें तत्त्वज्ञान होत.

समाजशास्त्रामध्यें समाजविकासात्मक जे नियम सांपडले त्यांसहि कोणी 'फिलॉसफी ऑफ हिस्टरी' असें नांव दिलें आहे.

कित्येकांनीं जगाच्या इतिहासांत दूरदूरच्या काळांस एकत्र जोडणारे कांहीं अर्थशास्त्रीय नियम सांपडतात काय यासाठीं झालेल्या शोधांच्या फलास 'फिलॉसफी ऑफ हिस्टरी' हें नांव दिलें आहे. कोलंबियाचे प्रोफेसर डॉक्टर सेलिग्मन यांनीं यास 'एकानामिक इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी' म्हणजे जगाच्या इतिहासाचें अर्थशास्त्रीय स्पष्टीकरण असें नांव दिलें आहे.

प्राचीनांचें इतिहासविषयक ज्ञान शोधावयाचें म्हणजे जगांतील क्रियांचें महत्त्व ते मोजीत होते काय, आजच्या महत्त्वाच्या गोष्टींस कारण शोधून त्या गोष्टींच्या अस्तित्वाचें स्पष्टीकरण करणें यास ते महत्त्व देत होते काय, व्यवहारनियम इतिहासावरून शिकण्याचें ते पत्करीत होते काय आणि मनुष्यक्रियाविषयक वाङ्मय त्यांस आवडत होतें काय हे प्रश्न उपस्थित होतात. या सर्व प्रश्नांस होय म्हणूनच उत्तर द्यावें लागतें. एवढें खरें कीं, इतिहासशास्त्राची जोपासना पाश्चात्त्यांमध्यें जितक्या प्रमाणानें झाली तितक्या प्रमाणानें आपल्याकडे झाली नाहीं.

आपल्याकडे इतिहासावर जें तत्त्वज्ञान तयार झालें त्यांत जे अनेक सिद्धांत मांडले गेले, आणि लेखनविषयक वृत्ति तयार झाली त्यांचें सामान्य स्वरूप येणेंप्रमाणें:—

(१) स्मृत्यर्ह काय व विस्मृत्यर्ह काय याविषयीं विचार करून इतिहासविषयक ग्रंथाची व्याख्या करणें.

(२) युग, अवतार, मन्वंतर असे महत्त्वाचे कालविभाग निर्देशिणें.

(३) मोठ्या कार्यकर्त्या पुरुषाचें अस्तित्व विशिष्ट क्रियाविकासाचे सिद्धांत सांगून स्पष्ट करणें.

(४) युद्धें राज्यक्रान्त्या यांचे युक्तायुक्त परिणाम व्यक्त करणें.

(५) मानवी क्रिया पाहून त्या क्रियांचा अंतिम हेतु काय याविषयीं विचार करणें आणि त्या हेतूंनीं क्रियांची योग्यायोग्यता ठरविणें.

(६) इतिहासविकासाचे नियम राजकीय घडामोडींतच केवळ व्यक्त होतात असें नाहीं तर वैचारिक इतिहासांत व पारमार्थिक क्रियांमध्यें व्यक्त होतात हें जाणून वैचारिक व पारमार्थिक इतिहासाचा प्रयत्न करणें.

(७) विशिष्ट राजकीय घडामोडींविषयीं औदासीन्य ठेवणें.

(८) राजवंशावली व गुरुपरंपरा यांचें रक्षण करणें.

या सर्व क्रिया व भावना पुराणग्रंथांत दिसत आहेत आणि त्या पुराणग्रंथकारांनां ऐतिहासिक तत्त्वज्ञानाची भावना तीक्ष्णपणें होती हें दाखवितात.

प्राचीनांचें इतिहासविषयक तत्त्वज्ञान पुराणाच्या व्याख्येंत अंशतः आहे. ती व्याख्या व तिचें स्पष्टीकरण मागें दिलेंच आहे. आपल्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाची एक महत्त्वाची कल्पना म्हटली म्हणजे युगकल्पना होय. गेला तो दिवस सोन्याचा या शिशुकल्पनेचेंच हें जास्त उत्तान स्वरूप होय. कृतयुगामध्यें चतुष्पाद धर्म होता, त्रेतायुगामध्यें त्रिपाद धर्म होता, द्वापारामध्यें द्विपाद धर्म होता आणि कलियुगामध्यें एकपाद धर्म रहाणार. या तऱ्हेची कल्पना आपल्याकडे पुराणांतून व धर्मशास्त्रांतून प्रसृत केली गेली.

आपल्याकडील दुसरी एक कल्पना म्हटली म्हणजे अवतारकल्पना होय. अवतारकल्पना

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

या गीतावाक्यांत स्पष्टपणें मांडली आहे. जगांत जीं मोठालीं कार्यें होत असतात, त्या कार्यांचा कर्ता म्हणून कोणीतरी पुरुष उदयास येतो अशा पुरुषास अवतारी पुरुष म्हणण्याचा प्रघात आहे. अवतारी पुरुष म्हणजे स्वर्गांतील एखादा देव नाहींसा होऊन मनुष्यरूपानें वागतो अशी प्राचीनांची समजूत होती असें दिसत नाहीं. कांकीं, धर्म आणि विदुर या दोघांस यमाचे अवतार महाभारतकारांनीं मानलें आहे आणि ते दोघेहि पृथ्वीवर असतां यमधर्महि आपल्या लोकांत होता असें धरलें आहे.

अवतारी पुरुष अधिक महत्त्वाचे किंवा परिस्थिति अधिक महत्त्वाची याविषयीं परस्परविरुद्ध भावना देखील लोकांच्या विचारांत दृष्टीस पडतात. कार्यकर्ता पुरुष अनेक प्रसंगीं असें म्हणतांना दाखविला आहे कीं, 'मी केवळ होणाऱ्या कार्याला निमित्तमात्र आहें, कार्य करणारी आणि कार्य माझ्या हातून घडविणारी शक्ति निराळीच आहे.'

इतिहासाचा विषय जगांतील राजकीय घडामोडी होत एवढेंच केवळ नाहीं तर जगांतील ज्ञान हाहि इतिहासाचा विषय होय असें प्राचीन मानीत असत आणि प्रत्येक शास्त्राचा इतिहास देण्याचा ते

प्रयत्न करीत. पुष्कळ प्रसंगीं ते शास्त्र देवानेंच दिलें असें दाखवीत. पुष्कळ शास्त्रें वेदमूलक आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न करीत.

इतिहासज्ञानामुळें जी कार्यकारणपरंपरा लक्षांत येते तिचें ज्ञान पुष्कळ प्रसंगीं जतन करून ठेवलेलें दिसतें.

इतिहासाच्या योगानें राजनीतिशास्त्र विकास पावतें. हें नीतिशास्त्र आपल्याकडे पुष्कळ विकसित झालें होतें व त्या शास्त्रावर अनेक ग्रंथकार होऊन गेले हें चाणक्याचा ग्रंथ वाचला असतां सहज लक्षांत येईल, लोकांमध्यें ऐतिहासिक भावना कितपत पसरली आहे हें कालक्रमाविषयीं कल्पना किती प्रचलित आहेत हें पाहून त्यांवरून ठरवावयाचें. अवतारकल्पना, युगकल्पना हिंदूंमध्यें सामान्य मनुष्यासहि परिचित असतात; म्हणजे सामान्यामध्येंहि ऐतिहासिक भावना आहे असें म्हणतां येईल. सामान्य वाङ्मयामध्यें देखील इतिहासमूलक सिद्धांत व भावना दृष्टीस पडतात. त्या आपणांस तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत देखील सांपडतील.

इतिहासांतील एक नेहमीं लक्ष वेधणारी गोष्ट म्हटली म्हणजे युद्ध होय. युद्धाचे निकट व दूरवर परिणाम जाणणें हा एक ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा भाग होय. हें युद्धपरिणामज्ञान भगवद्गीतेंतच उत्तम तऱ्हेनें वर्णन केलें आहे.

कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥
अधर्माभिवात् कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥
सङ्करो नरकायैव कुलघ्नानां कुलस्यच ।
पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥

अनेक युद्धें होऊन एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचा पाडाव करतें या प्रकारच्या क्रियांवर इतिहासकाराचें मत मोठ्या मार्मिकपणानें पुराणांत व्यक्त केलें गेलें आहे.

**पृथिव्युवाचः—**

कथमेष नरेन्द्राणां मोहो बुद्धिमतामपि ।
येन केन सधर्माणोप्यातिविश्वस्तचेतसः ॥
पूर्वमात्मजयं कृत्वा जेतुमिच्छन्ति मंत्रिणः ।
ततो भृत्यांश्च पौरांश्च जिगीषंते तथा रिपून् ॥
क्रमेणानेन जेष्यामो वयं पृथ्वीं ससागराम् ।
इत्यासक्तधियो मृत्युं न पश्यंत्याविदूरगम् ॥
समुद्रावरणं याति भूमंडलमथो वशम् ।
कियदात्मजयस्यैतन्मुक्तिरात्मजये फलम् ॥
उत्सृज्य पूर्वजा याता यां नादाय गतः पिता ।
तां मामतीव मूढत्वाज्जेतुमिच्छन्ति पार्थिवाः ॥
मत्कृते पितृपुत्राणां भ्रातॄणां चापि विग्रहः ।
जायतेत्यंतमोहेन ममत्वादृतचेतसाम् ॥
पृथ्वी ममेयं सकला ममैषा
मदन्वयस्यापि च शाश्वतीयम् ।
यो यो मृतेऽन्यत्र बभूव राजा
कुबुद्धिरासीदिति तस्य तस्य ॥
दृष्ट्वा ममत्वादृतचित्तमेकं
विहाय मां मृत्युवशं व्रजन्तम् ।
तस्यानुयस्तस्य कथं ममत्वं
हृद्यास्पदं मत्प्रभवं करोति ॥
पृथ्वी ममैषाऽऽशु परित्यजैनां
वदंति ये दूतमुखैस्स्वशत्रून् ।
नराधिपास्तेषु ममातिहासः
पुनश्च मूढेषु दयाऽभ्युपैति ॥

विष्णुपुराण अं. ४. अ. २४, श्लोक १२८–१३६.

**पृथ्वी म्हणालीः–**

सल्लागार, नोकर, जनता आणि शत्रु हीं सर्व क्रमानें जिंकतां जिंकतां शेवटीं सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीचें अधिराज्य आपण मिळवूं अशा आसक्तीनें, समीप ठाकलेल्या मृत्यूकडेहि दुर्लक्ष करण्याची भुरळ, निग्रहावस्था पार झालेल्या परंतु मृत्यूला सहज वश आणि फाजील आत्मविश्वास धरणाऱ्या मोठ्या ज्ञानी राजांना देखील कशी पडते? मोक्ष हें अंतिम साध्य जर आत्मनिग्रहानें हातीं लागणारें आहे तर, विस्तृत सागराची आणि भूगोलाची मालकी मिळविण्यासारख्या क्षणिक हव्यासापायीं, तें साध्य हातचें गमवावें काय?

ह्यांच्या आजेपणज्यांनीं मला बरोबर नेली नाहीं, ह्यांच्या बापानेंहि मला येथेंच ठेविली, असें आहे तरी माझ्यावर पूर्ण ताबा चालविण्याची इच्छा वेडगळपणानें अद्याप बाळगितातच. मीपणाच्या भरीं भरून, माझ्यावर मालकी गाजविण्यासाठीं, बापलेकांचे आणि भावाभावांचे खटके उडतात.

एक राजा दिवंगत झाला आणि त्याच्या गादीवर दुसरा आला कीं तो प्रत्येकजण आपल्याशीं बढाई मारीत असतो कीं, ही पृथ्वी माझ्या मालकीची आहे आणि ती चिरकाल माझ्या वंशजाकडे नांदेल.

माझ्यावर मालकी गाजविणारा एक राजा इहलोक सोडून कसा जातो, त्याच्या जागीं येणाराची मृताबद्दलची आपलेपणाची भावना नाहींशी होऊन माझ्याबद्दलचा अभिलाष त्याला कसा सुटतो, 'पृथ्वीवर माझी मालकी आहे, तूं तिच्यावरील हक्क सोड' असें दूतांकडून शत्रूंना कसें निवेदन करण्यांत येतें, हें पाहून मला हंसूं येतें आणि मूर्खपणाबद्दल त्यांची कींव वाटते.

इतिहासाचे नियम केवळ राजकीय इतिहासांतच सांपडतात असें नाहीं तर सांस्कृतिक इतिहासांतहि दृष्टीस पडतात. तसेंच पारमार्थिक विचारांचें प्राबल्य कोणत्या वेळेस कसें झालें, तें कोणत्या नियमांनीं बांधलें गेलें आहे या विषयावर देखील विचार व्यक्त झाले आहेत. ज्ञान, कर्म आणि उपासना या तिहींची समाजाला आवश्यकता आहे आणि त्यांपैकीं एखाद्याचें अधिक प्राबल्य झालें म्हणजे समतोलपणा कायम ठेवण्यासाठीं दुसऱ्या प्रकारच्या विचाराचा पुरस्कर्ता तयार होतो या तऱ्हेचे विचार अनेक ग्रंथकारांनीं व्यक्त केले आहेत. उदाहरणार्थ माधवाचार्य म्हणतात.

शृणु सौम्य वचः श्रेयो जगदुद्धारगोचरम् ।
काण्डत्रयात्मके वेदे प्रोद्भूते स्याद्विजोन्नतिः ॥

तद्रक्षणे रक्षितं स्यात्सकलं जगतीतलम् ।
तदधीनत्वतो वर्णाश्रमधर्मततेस्ततः ॥
इदानीमिदमुद्धार्यमितिशश्वत्तिमतः पुरा ।
मम गूढाशयविदौ विष्णुशेषौ समीपगौ ॥
मध्यमं काण्डमुद्धर्तुमनुज्ञातौ मयैव तौ ।
अवतीर्यांशतो भूमौ संकर्षणपतञ्जली ।
मुनी भूत्वा मुदोपास्तियोगकाण्डकृतौ स्थितौ ।
अग्रिमं ज्ञानकाण्डं तूद्धरिष्यामीति देवताः ॥

(शंकरदिग्विजय १,४८–५२.)

या वरील वाक्यांचें विस्तृत स्पष्टीकरण कै० रघुनाथशास्त्री गोडबोले यांनीं येणेंप्रमाणें केलें आहे.

"बौद्धमत वैदिक धर्माच्या जरी मागचें आहे, तरी तें लपून छपून बरेंच प्राचीन असल्याचें वाल्मीकिरामायणावरून दिसून येतें. त्या मतांतील लोकांच्या मनांतून अहिंसाधर्ममिषानें यज्ञ बंद पाडावेत असें तेव्हांपासून असतांहि, त्या काळचे राजे व ऋषी यांच्यापुढें त्यांचा कांहीं उपाय चालेना. त्यामुळें तो ग्रह, ही संधि केव्हां येईल तिची मार्गप्रतीक्षा करीत असतां, गेल्या द्वापरयुगाच्या अंतीं भारती युद्धांत प्रायः सर्व राजे नाश पावले, तसेच ऋषीहि अदृश्य झाले, असें पाहतांच चार्वाकाच्या व क्षपणकाच्या रूपानें प्रगट झाला. आणि त्यानें ईश्वर नाहीं, परलोक नाहीं इत्यादि प्रकारचें नास्तिक शास्त्र प्रवृत्त करून, लोकांस यज्ञकर्मापासून परावृत्त केलें असें वृत्त त्यांच्याच ग्रंथांवरून दिसून येतें.

ही नास्तिक मताच्या आघाडीची चार्वाकक्षपणकरूप जोडी, युधिष्ठिरशकाच्या सहाशें साठाव्या वर्षाच्या सुमारास प्रगट झाल्यावर, मागून बुद्ध व अर्हत् क्रमानेंच उत्पन्न झाले. त्यांनीं जरी त्यांच्या मताचें खंडन केल्याचें व ईश्वर आणि परलोक आहेत असें मानल्याचें जैन ग्रंथांवरून दिसतें, तरी वेद हे पौरुष होत हा जो त्यांचा सिद्धांत, तो त्यांनीं जीवापलीकडचा समजून, अहिंसाधर्ममिषानें कर्मकांड बंद पाडलें. तें इतकें कीं, तो शब्द थोडक्याच काळांत कानांनीं मात्र ऐकावा, अशी दशा त्यास येऊन पोंचली. अर्थात् ज्ञानकांडहि त्याच पंथास लागून राहिलें होतें.

याप्रमाणें कर्म आणि ज्ञान या दोहोंचा ऱ्हास करून, बौद्ध व जैन आपला तृतीय पंथ विस्तृत करीत सर्व भरतखंडांत सुमारें दीड हजार वर्षेंपर्यंत एकसारखी धुमश्चक्री उडवीत असतां, त्याच संधींत वैदिक लोक मध्यम कांडास (उपासनाकांडास) अनुसरले. परंतु तें मध्यमकांड आगमोक्त व श्रुतिविरुद्ध असल्यामुळें, एकंदरींत सर्व गोंधळच होऊन गेला असें पाहून, स्वामी कार्तिक, ब्रह्मदेव, आणि इंद्र, हे तिघे ईश्वराज्ञेनें प्रथम पृथ्वीवर पुढें आले व त्यांनीं कुमारिलभट्ट, मंडनमिश्र व सुधन्वा या नांवांनीं अवतीर्ण होऊन, तशीच कर्मकांडाची पूर्ववत् स्थापना करून, बौद्ध व जैन यांचा अगदीं धुवा धुवा उडवून दिला.

असें जरी झालें, तरी कर्मकांड ज्ञानांगत्वानें चालावें हें योग्य असतां, तें प्राधान्यानेंच चालू झालें, व वेदविरुद्ध अनेक उपासना प्रवृत्त झालेल्याहि तशाच राहिल्या असें पाहून, स्वतः ईश्वर शंकराचार्य या नांवानें पृथिवीवर आला, व त्यानें शैव, शाक्त, वैष्णव, गाणपत्य आणि सौर इत्यादिकांचीं आगमोक्त मतें खंडित करून व मंडनमिश्राचीहि खोड जिरवून, श्रुतिप्रतिपाद्य कर्म, उपासना व ज्ञान, यांची यथायुक्त स्थापना केली व आपलें मत शुद्धाद्वैत अशा नांवानें सर्वत्र चालू केलें.*"

एवंच भारतीयांस ऐतिहासिक भावना होती ती विजयांचा उल्लेख करणें, राजवंशावली रक्षण करणें, जगाच्या क्रमाविषयीं नियम बांधणें, अनेक समूहांच्या युद्धादि क्रिया यांचे परिणाम जाणणें, राजनीतिव्यवहाराचे नियम प्राप्त करून घेणें या प्रकारच्या प्रयत्नांत दृश्य होते. ज्यांनीं गुरुपरंपरा कायम राखल्या, निरनिराळ्या काळचे ग्रंथ दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रापेक्षां अधिक जतन करून ठेवले आणि ग्रंथांमध्यें जे फेरफार होत, जे आवृत्तिकार निघत त्यांचा इतिहास फार काळजीनें जतन केला, त्या लोकांनीं संस्थानाच्या उत्कर्षापकर्षाच्या इतिहासाविषयीं अत्यंत उदासीन रहावें याचें कारण काय असावें? हें औदासीन्यकारण समजण्यास ज्या काळांत भारतीयांचें इतिहासपुराणरूपी वाङ्मय तयार झालें त्या काळच्या सामाजिक व बौद्धिक परिस्थितीचीं कांहीं अंगें लक्षांत घेतलीं पाहिजेत. सामाजिक व राजकीय परिस्थितिच अशी होती कीं, राज्यांच्या उलाढालीविषयीं सामान्य लोकांस तशीच तत्त्ववेत्त्यांस अनास्था असावी. कोणता राजा आला आणि कोणता राजा गेला याचें महत्त्वच प्राचीनांस फारसें नसावें. मेगास्थिनिस साक्षी देतो कीं, शेतकरी, भोंवतालीं जरी राज्यक्रान्ति होत असली तरी आपलें शेत संथपणें नांगरीत होते आणि कदाचित् चौकशी केली तरी कुतूहलवृत्तीनें करीत कीं, लढाई कोणाची व कशाबद्दल चालली आहे. ज्याप्रमाणें एखाद्याचें दुकान मोडून दुसऱ्या कोणाचें दुकान आलें ही क्रिया झाल्यामुळें सामान्य जनांत फारशी खळबळ होत नाहीं, त्याप्रमाणेंच बंदोबस्त ठेवण्याचा धंदा जी पेढी करते त्या पेढीची मालकी या घराण्यांतून त्या घराण्यांत गेली तर त्याचें महत्त्व तें काय? एखाद्या पेढीवाल्यानें आपल्या शाखा पन्नास ठिकाणीं उघडल्या आणि अधिक ठिकाणांचा बाजार काबीज केला तर त्याचें एखाद्या कवीस जेवढें महत्त्व तितकेंच बंदोबस्त ठेवण्याचा धंदा करणाऱ्या पेढीचा व्याप वाढला असतां त्यास महत्त्व. आजच्या यूरोपीय लोकांस प्राचीन काळीं दोन राजघराण्यांमधील भांडणाबद्दल सबंध राष्ट्रानें लढावयास उठावें हा प्राचीनांच्या रानटीपणाचा मासला वाटत नाहीं काय? एक संस्कृति स्थिर झाली आणि राष्ट्राचें महत्त्व सार्वराष्ट्रीय संस्कृतीच्या विकासामुळें कमी झालें म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील लढाया देखील अधिक निरर्थक होणार नाहींत काय? अर्वाचीन जगास प्राचीन भारतीयांच्या राष्ट्रविषयक अनास्थेविषयीं नीट समज पडण्यासाठीं सर्व जग एका संस्कृतीनें व्यापिलें आहे आणि जवळ जवळ सारख्याच व्यवहारनियमांनीं बद्ध आहे अशा परिस्थितीची कल्पना करावी लागेल. ही कल्पना त्यांस आली म्हणजे राष्ट्राच्या उत्कर्षापकर्षाविषयीं अनास्था

* अर्वाचीन कोश–प्रस्तावना.

कशी उत्पन्न होणें शक्य आहे आणि त्यामुळें संस्थानांचे इतिहास लिहीत बसणें ही किती कमी महत्त्वाची गोष्ट होते याची कल्पना येईल.

आतां व्यापारी मनु आला आहे, आणि त्यामुळें जीं व्यापारी घराणीं मोठाले व्याप करितात त्यांचे इतिहास तयार होऊं लागले आहेत. अमेरिकेंतील मोठमोठ्या व्यापारी घराण्यांनीं आपले पैसे कसे जमविले हें सांगणारे इतिहास दृष्टीस पडत आहेत. तसेंच मोठमोठ्या कंपन्यांचेहि इतिहास तयार होत आहेत.

राज्याच्या उलाढालींविषयीं लोकांची व लेखकांची अनास्था असण्याचें सामाजिक कारण वर सांगितलें. सामाजिक कारण हें या अनास्थेस एकच कारण होतें असें नाहीं. तर बौद्धिक कारण देखील होतें तें येणें प्रमाणें.

जेव्हां इतिहासज्ञान तयार होतें तेव्हां तत्त्ववेत्ता त्यापासून जगद्विवर्ताचे नियम काढूं लागतो, आणि आपल्या माहितीची मांडणी या नियमानुरूप करतो. अशा तऱ्हेची मांडणी इतिहास, पुराणकारांनीं केली आहे.

जेव्हां ज्ञानाचें एकीकरण करण्याचा प्रयत्न होऊं लागतो, तेव्हां बरेंचसें ज्ञान थोडक्यांत कसें आणावें हा विचार उत्पन्न होऊं लागतो. रक्षणीय काय ? बारीकसारीक भानगडींचीं बाडें अगर तत्त्वें ? या दोहोंत तत्त्वें रक्षणीय हें कोणीहि कबूल करील. तत्त्वें म्हणजे कोणतीं ? तर कार्यव्यवहाराचे नियम. ते जतन करण्यासाठीं प्राचीनांनीं आस्था थोडी थोडकी दाखविली नाहीं. जगांत जेव्हां एखादें राष्ट्र उत्कर्षापकर्ष पावतें आणि त्यांत जे उत्कर्षापकर्षाचे नियम दिसून येतात तेच इतर राष्ट्रांच्या उत्कर्षापकर्षांतहि दिसतात, आणि त्यामुळें ज्ञानेच्छूस एकाच संस्कृतींतील अनेक राष्ट्रांच्या भनागडींचें ज्ञान खरोखर अनवश्यक आहे. असो.

प्राचीन काळच्या इतिहासकारांना ज्या गोष्टी रक्षणीय वाटल्या त्या व त्यांत त्यांनीं जी ऐतिहासिक दृष्टी दाखविली ती येणेंप्रमाणें.

प्राचीनांच्या दृष्टींनीं इतिहासामध्यें ज्या एका मोठ्या गोष्टीचें स्पष्टीकरण केलें पाहिजे अशी मोठी गोष्ट "सर्ग" म्हणजे विश्वाची उत्पत्ति मानली आहे.

त्यांच्या दृष्टीनें इतिहासविषय अशी दुसरी मोठी गोष्ट म्हटली म्हणजे मानवांचे मोठे वंश आणि त्यांचीं कार्यें होत.

आणखी त्यांच्या दृष्टीनें मोठी इतिहासविषय अशी गोष्ट म्हटली म्हणजे कालाचे मोठमोठे विभाग पाडणें होय. हे विभाग असे असावे कीं, एकंदर सर्वच समाजव्यवस्था अगर जगद्व्यवस्था जेव्हां पालटेल तेव्हां तो महत्त्वाचा भाग समजावा. या दृष्टीनें या कालाचा स्थित्यंतरवाचक शब्द त्यांनीं मन्वंतर हा योजला आणि तो एक महत्त्वाचा इतिहासविषय धरला.

या सर्व कल्पना खऱ्या ऐतिहासिक भावनेस अनुसरून नाहींत असें कोण म्हणेल ? इतिहासाची पुराणकारांच्या दृष्टीइतकी व्यापक कल्पना आज आपण करूं लागलों आणि इतिहास लिहिला तर त्या इतिहासाचें बाह्य स्वरूप आजच्या पाश्चात्त्य इतिहासाच्या पुस्तकापेक्षां इतकें भिन्न होईल कीं, तो तत्त्वज्ञानाचा किंवा वेदांताचा ग्रंथ आहे असेंच लोकांस वाटेल.

पुराणांतून ज्या इतिहासविषयक कल्पना आपणांस दृष्टीस पडतात, त्या साधारणपणें अधिक प्रगत काळच्या आहेत. पुराणकर्त्यांनीं अनेक राष्ट्रांचे उदय व अस्त पाहिले होते आणि त्यांस पृथ्वीच्या विस्तीर्णपणाची कांहीं कल्पना होती. पुराणांतून दधिसमुद्र मधाचे समुद्र इत्यादि कल्पना आहेत, त्यांवरून पुराणकारांचा हेतु बाष्कळ लिहिण्याचा होता असें खास म्हणतां येत नाहीं. ग्रीक इतिहासकारांनीं घोड्याच्या तोंडाचे लोक, सोनें जमा करणाऱ्या मुंग्या इत्यादि भाकडकथा लिहून ठेवल्या नाहींत काय ? ज्याप्रमाणें धर्मराजास सोनें आणून देणाऱ्या महाभारतोक्त पिपीलिका नांवाच्या राष्ट्राचें सोनें जमा करणाऱ्या मुंग्यांमध्यें ग्रीकांनीं पर्यवसान केलें त्याप्रमाणें बाहेर देशाच्या माहितीसंबंधानें तिखटमीठ लावलेल्या कथा पुराणकारांच्याहि कानीं आल्या नसतील काय ? आल्या असल्यास त्यांनीं ग्रंथांत निर्देश केला तर ते प्राचीन ग्रीक भूगोलवेत्त्यांपेक्षां अधिक प्रमादास्पद खास होत नाहींत.

वरील विवेचन भारतीयांस इतिहासभावनेचा अभाव होता या कल्पनेची असत्यता दर्शवील व हेंहि दाखवील कीं, त्यांची ऐतिहासिक भावना अधिक व्यापक व कमी सूक्ष्म होती. व्यापक भावनेनें जें वाङ्मय तयार झालें त्याच्या बरोबर कांहीं सूक्ष्म भावनेनें तयार झालेलें वाङ्मय वाढलें नसेलच असें म्हणवत नाहीं. पण तें असलें तरी नष्ट झालें असावें असें दिसतें. इतिहास या शास्त्राकडे भारतीयांचें लक्ष्य कितपत होतें, कालक्रमविषयक म्हणजे "फिलॉसफी ऑफ हिस्टरी" या सदरांत घालतां येतील असे सिद्धांत त्यांजपाशीं होते किंवा नव्हते याविषयीं माहिती कालानुक्रमानें देण्यास अवकाश नाहीं. तथापि, हें सांगतां येतें कीं, प्रत्येक काळांत असे ग्रंथ निर्माण झाले आहेत कीं, जे ग्रंथकारांमध्यें पूर्वकथांचें सिंहावलोकन करावयाची बुद्धि, आणि त्या कथांपासून निघणारे जगत्क्रमविषयक सिद्धांत आणि त्या सिद्धांतांवरून जगाचा हेतु याविषयीं विचार नेहेमीं चालू असे असें दाखवितात. व्यक्ति ज्या क्रिया करते त्या क्रिया कांहीं विशिष्ट सृष्टिविकासनियमांनीं बद्ध असतात आणि मोठ्या म्हणजे अवतारी मनुष्याकडून होणाऱ्या प्रत्येक क्रियेला अंतिम हेतु असतो. या तऱ्हेचा विचार ज्या लोकांत फार दृढपणें आहे त्या लोकांस इतिहासभावना नाहीं असें कसें म्हणतां येईल ?

खराखुरा इतिहास मिळविण्याचा प्रयत्न करणें ही क्रिया फार दूरची आहे. असा कोणताहि काळ नाहीं कीं ज्या काळांतील "इतिहासकारांनीं," ज्याची माहिती नाहीं त्याची माहिती वस्तुस्थिति कशी असावी यासंबंधानें कल्पना करून घातली नाहीं. संशोधन करतांना तरी अगोदर काय असावें यासंबंधानें कल्पना करून साहित्य जुळवावें लागतें आणि साहित्यानुसार ती कल्पना तपासावी

लागते. प्राचीनांनीं इतिहास कसा असावा यासंबंधानें आपली कल्पना लिहिली त्या क्रियेंत आणि आजच्या संशोधकाच्या क्रियेंत मुख्य फरक हाच कीं, त्याची कल्पना साहित्याभावानें अनियंत्रित होती यामुळें आपणांस प्राचीन लोकांस इतिहासभावना नव्हती असें वाटतें. अधिकाधिक साहित्यानें पूर्वीच्या कल्पना दुरुस्त करण्याचा प्रयत्न नेहेमींच होत असतो व झाला पाहिजे. हीच वृत्ति पुराणग्रंथ वापरतांनाहि ठेवावी. प्राचीनांच्या ग्रंथांत देखील कांहीं ग्रंथांत ऐतिहासिक भावना कमी, कांहींत अधिक असा प्रकार आहेच. वेदांत आपणांस ऐतिहासिक भावना फारच थोडी दिसते. वेदामध्यें जगाच्या विवर्ताविषयीं विचार सांपडतात. पण वंशाविषयक ज्ञानाची व्यवस्थित मांडणी करण्याची भावना त्यांत दिसत नाहीं. आणि कोणत्या तरी ऐतिहासिक किंवा विवर्तविषयक तत्त्वाची इतर गोष्टींशीं जुळणी करण्याची खटपट त्यांत केली नसल्यामुळें आपल्या हातीं खराखुरा कच्चा माल आलेला आहे. तो माल आजच्या इतिहासकारास अधिक उपयुक्त आहे. सृष्टि उत्पन्न कशी झाली, निरनिराळे वंश किंवा मनुष्यप्राणी यांची उत्पत्ति कशी झाली यांविषयीं धाडशी विचार वेदांत दृष्टीस पडतात. पण युगें, मन्वंतरें यांच्या कल्पना वेदांत दिसत नाहींत. पुराणें आणि वेद यांतील विचारांमध्यें थोडीशी सरूपता आहे, पण पुराणांतील विचार अधिक व्यापक आहेत. वेदांमध्यें सृष्टीची, ताऱ्यांची, मानवजातीची, पशुपक्ष्यांची उत्पत्ति कशी झाली याविषयींचें त्यांचें मत सांपडतें.

येथें पुराणांतील कथा देण्यांत तात्पर्य नाहीं, कारण कथा द्यावयाच्या म्हणजे एकमेकांशीं विरोध असलेलीं कथानकें पुढें मांडावयाचीं. या कथानकांमध्यें कांहीं अंश मात्र थोडासा लक्षांत घेण्याजोगा आहे. तो अंश म्हटला म्हणजे संस्कृतीचा विकास झाला यासंबंधीं पुराणकारांनीं आपलीं व्यक्त केलेलीं मतें होत. आज अर्वाचीन समाजशास्त्रज्ञ ज्या प्रकारची संस्कृतिविकासविषयक विचारमालिका पुढें आणितात त्या प्रकारची विचारमालिका पुढें आणण्याची हुक्की पुराणग्रंथांच्या लेखकांसहि येत होती असें विष्णुपुराणावरून दिसतें. मानवी मनोविकारहीन समाजस्थितींत शासनसंस्थेचा अभाव हें मत अठराव्या, एकोणिसाव्या शतकांतील मोठ्या यूरोपीय तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांत सांपडतें. त्याअर्थीं पुराणकारांच्या कल्पना जर जंगली म्हणावयाच्या तर असल्या प्रकारच्या कल्पना अठराव्या, एकोणिसाव्या शतकांतहि यूरोपांत प्रचलित होत्या ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. पुराणग्रंथकारांना भोंवतालचीं राष्ट्रें व मोठमोठीं घराणीं यांचा इतिहास आणि जगदुत्पत्तीचा काल यांच्यामध्यें असलेलें खिंडार भरून काढण्याची प्रबल इच्छा असावी असें दिसतें. आणि त्यांच्या काळीं जी दंतकथात्मक माहिती उपलब्ध असेल ती त्यांनीं कसेंबसें हें खिंडार भरून काढण्याकरितां लावली असावी. ज्या काळांत वरील प्रकारचा मजकूर लिहिला गेला त्या काळांत एखादा अर्वाचीन चिकित्सक बुद्धीचा लेखक असता तर तो एवढेंच करिता कीं, सध्यांचे प्रचलित वंश अमुक आहेत असें लिहिता, प्राचीन वंशाविषयींचा माल अमुक अमुक आहे म्हणून मांडता व अत्यंत प्राचीन काल आणि त्या मनुष्याचा काल यांमधील खिंडार भरून काढतां येत नाहीं म्हणून म्हणता आणि त्या मधल्या कालाविषयीं ज्या कांहीं दंतकथात्मक वंशावळ्या उपलब्ध असतील त्या पुढें मांडता आणि कदाचित् त्या जोडण्याचाहि प्रयत्न करिता. फरक एवढाच झाला असता कीं 'असें असेल ना,' 'अशी कल्पना होते,' 'आम्ही हें सुचवितों' आणि 'विरुद्ध पुरावा सांपडेपर्यंत आम्ही अमुक अमुक गृहीत धरतों' अशा वाक्यांची रेती वंशरूपी विटा जोडणाऱ्या कल्पनांच्या चुन्यांत मिसळता, आणि आपण अत्यन्त सावध लेखक म्हणून म्हणवून घेता.

इतिहासविषयक लेखांत नेहमीं एक लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, चिकित्सक बुद्धि ही इतिहासकाराच्या कल्पनेस नियंत्रक आहे हें खरें; परंतु चिकित्सक बुद्धि इतिहासज्ञान देऊं शकत नाहीं. इतिहासकारास दुवे जोडावयाचे असतात आणि संबंध शोधावयाचे असतात. चिकित्सकाचें 'नेदं नेदं' करून चालतें आणि त्यास नेदं याचेंच उपबृंहण करणारा लेख सजवितां येतो; परंतु संगति लावणें, सांधे जोडणें, काय झालें असेल याच्याबद्दल कल्पना करणें आणि मांडणें हीं कामें इतिहासकारास करावीं लागतात. म्हणजे इतिहास लिहितांना कल्पनेसच पुढें ढकलावें लागतें, आणि त्याच्या कल्पनेनें तो जो सांधा जोडील तो सांधा चिकित्सकाच्या बुद्धीनें तपासावा लागतो. असो.

पुराणांतील सर्व वंशावळी निरुपयोगी आहेत काय ? नाहींत, असें अलीकडे थोडें मत होऊं लागलें आहे. त्या मताचें संयोजक फल आम्ही पुढें देऊं. पुराणांचें व प्राचीनांच्या इतिहासवाङ्मयाचें महत्त्व आम्ही फार मोठें समजतों. वेदांच्या पूर्वींच्या कालापासूनचा इतिहास पुराणवाङ्मयांत लपला आहे असें आमचें मत आहे. वेद हे सर्वांत प्राचीन भारतीय ग्रंथ आहेत हें खरें, परंतु सर्वस्वीं प्राचीन माहितीचे संग्राहक ते खास नाहींत. ऋग्वेदांतील बरींचशीं सूक्तें दाशराज्ञयुद्धाशीं समकालीन किंवा नंतरचीं आहेत. दाशराज्ञयुद्धामध्यें पुरु, यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु इत्यादि राष्ट्रें आपलें स्वतंत्र अस्तित्व दाखवितात. हें युद्ध ज्या वेळेस इकडे होत असेल त्या वेळेस बहुतेक हिंदुस्थान रिकामा नसून अगोदरच व्यापलेला असावा आणि तो बहुतकरून आर्यन् महावंशाच्या राष्ट्रांनीं व्यापला असावा असें दिसतें. ऋग्वेदांत आर्यन् लोकांनीं हिंदुस्थान व्यापिल्याचा इतिहास खास नाहीं. आर्यन् महावंशाची भरतखंडांतील वसाहत ही ऋग्मंत्रपूर्वकालीन आहे. दिवोदास व सुदास यांस परुष्णीतीरापर्यंत जो प्रदेश आक्रमावा लागला तो पूर्वी सपुरोहित वसलेल्या राष्ट्रांशीं निकराची मारपीट करीत आक्रमावा लागला. त्या काळांत हिंदुस्थानांत अनेक राष्ट्रें होतीं व तीं आपली पूर्वपीठिका बरीच जतन करून ठेवीत होतीं. आणि त्यांचें वाङ्मय जरी तयार नसलें तरी पूर्व कालच्या आठवणींचें रक्षण तीं करीत होतीं. म्हणजे हिंदुस्थानचा इतिहास लिहावयाचा म्हणजे ऋग्मंत्रपूर्व कालापासून प्रारंभ करावयाचा ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. वेदपूर्वकालाचा इतिहास विश्वोत्पत्तीपासून इतिहास सांगण्याचा बाणा बाळगणाऱ्या पुराणवाङ्मयांत लपला आहे काय हें आपणांस पाहिलें पाहिजे.

एवंच भारतीय इतिहास आपणांस फार प्राचीन काळापासून उपलब्ध आहे आणि भारतीयांनीं त्यास लागणारें साहित्यहि जपून ठेवलें आहे अशी आपली खात्री होते. आतां आपलें यापुढील कार्य हें आहे कीं, अत्यंत प्राचीन काळापासून सुरुवात करून आजच्या कालापर्यंत इतिहाससूत्र ओढीत आणावयाचें. हें करण्यासाठीं आपणांस कोणत्या गोष्टींचें साहाय्य मिळेल हें पाहिलें पाहिजे.

जगाच्या इतिहासाचे आपण प्रथमतः दोन भाग करूं. (१) बुद्धपूर्वकाल. (२) बुद्धोत्तरकाल.

या विभागांचें महत्त्व असें आहे कीं, सर्व जगाचा बुद्धापूर्वींचा इतिहास अंधुक स्थितींत आहे. बुद्धोत्तर इतिहास बराच निश्चित आहे. सर्व जगाशीं ज्या गोष्टीचा अत्यंत प्राचीन काळीं संबंध आला अशी संस्था म्हणजे बौद्धसंप्रदाय होय. बुद्धपूर्वकाल म्हणजे विस्कळित मनुष्यसमुच्चयांचा काल, बुद्धोत्तरकाल म्हणजे परस्परांशीं संबद्ध मनुष्यसमुच्चयांचा काल.

बुद्धपूर्वकालामध्यें देखील विशिष्ट संस्कृतीस प्रारंभ होण्यापूर्वीचा आणि विशिष्ट संस्कृति उच्च प्रकारें सुरू झाल्याचा असे दोन भाग पडतील. असुरराष्ट्रस्थापनेपूर्वी कोणतीहि विशिष्ट संस्कृति संवर्धित झाली होती असं आजपर्यंतच्या माहितीवरून म्हणतां येत नाहीं. यासाठीं प्रथम विश्वोत्पत्तिकालापासून असुरराष्ट्रसंस्थापनेच्या कालाचा इतिहास कितपत जुळवितां येतो हें पाहूं.

---

# प्रकरण २ रें.

## विश्वोत्पत्तीपासून असुरराष्ट्रसंस्थापनकालापर्यन्त.

(अनादिकाल—ख्रि. पू. ८०००.)

**मानवेतिहासाच्या मर्यादा व साधनें.**– इतिहासाचा विषय मनुष्यप्राण्याच्या जगावरील एकंदर हालचालींचें ज्ञान होय. प्रत्येक देशांत इतिहासज्ञानाची सुरुवात मनुष्यानें आपल्या कालांतील गोष्टी लिहून किंवा इतरांस सांगून रक्षण करून ठेवल्यानें होते. पैतृक परंपरा लेखाच्या द्वारें नेहमींच उपलब्ध होतात असें नाहीं. जगांतील अनेक राष्ट्रांपैकीं फारच थोड्या राष्ट्रांची स्वकालीन इतिहास लिहून ठेवण्याइतकी प्रगति झाली होती. प्रत्यक्ष इतिहासलेख लिहिले गेले नसले तरी इतिहासोपयोगी ग्रंथ प्रत्येक संस्कृतींत आढळतात. प्रत्येक लोकांचीं काव्यें व स्तोत्रें त्यांच्या इतिहासाचीं साधनें आहेत. काव्यांखेरीज इतर अवशेष देखील इतिहासदायक असतात.

अर्वाचीन इतिहाससंशोधक, वाङ्मयरूपी व वस्तुरूपी अवशेष किंवा अव्याहत चालू असलेल्या परंपरा व रीतिभाती यांवरून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करतो.

या प्रकारचें साहित्य देखील फारच थोड्या कालाचा आणि फारच थोड्या राष्ट्रांचा इतिहास देऊं शकतें. ज्या राष्ट्रांचे लेख किंवा इतर प्राचीन काळचे वस्तुस्वरूपी अवशेष उरले आहेत अशीं राष्ट्रें फारच थोडीं. ज्यांचे कोणत्या तरी प्रकारचे अवशेष दहा हजार वर्षांइतके जुने शिल्लक आहेत अशीं राष्ट्रें अगर संस्कृति आज आपणांस ठाऊक नाहींत. चार हजार वर्षांइतके जुने ज्यांचे अवशेष शिल्लक आहेत अशीं राष्ट्रें अगर संस्कृति हातांच्या बोटांवर मोजतां येतील इतक्याच आहेत.

अनेक राष्ट्रें व जाती याविषयीं माहिती आपणांस गेल्या शतकांतच प्राप्त झाली आहे.

इतिहासलेखनाची सामान्य पद्धति अशी आहे कीं, जितक्या प्राचीन काळाची आपणांस माहिती आहे तितक्या प्राचीन काळापासून सुरुवात करून आजच्या काळापर्यंत कथासूत्र ओढीत आणावयाचें. ही पद्धति नेहमीं शक्य असते असें नाहीं. कारण जितका काळ जुना तितका तो अधिक अस्पष्ट असतो. आणि तो अस्पष्ट असल्यामुळें उत्तरकालीं कथासूत्रास सुरुवात करून जितकें पाठीमागें जातां येईल तितकें जावें या प्रकारची पद्धति अमलांत आणावी लागते. इसवी सनाच्या प्रारंभींचा काल घेतला तरी आपणांस त्या वेळच्या फारच थोडक्या राष्ट्रांची माहिती आहे. सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील आफ्रिकेच्या भागाची आणि अमेरिका व सैबिरिया या प्रदेशांतील राष्ट्रांची दोन हजार वर्षांपूर्वींची माहिती आपणांस कांहींच नाहीं असें म्हटल्यास चालेल. मनुष्य प्राण्याचा जगभर विस्तार या कालाच्या पूर्वी कित्येक शतकें झाला होता याविषयीं आज कोणास शंका नाहीं.

मनुष्यप्राण्याची वसती किती वर्षें होती याविषयीं आज आपली कल्पना पुष्कळ विस्तृत झाली आहे. लाखों वर्षें मनुष्यप्राणी जगावर आहे असें शास्त्रज्ञांचें आज मत झालें आहे. या लाखों वर्षांचा इतिहास कसा लिहावयाचा हें मोठें कोडें आहे. भूस्तरशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, भाषाशास्त्र इत्यादि शास्त्रांच्या साहाय्यानें ही मधली खळगी भरण्याचा प्रयत्न होत आहे. या प्रयत्नाचें फल येथें देण्यास अवकाश नाहीं; पण या शास्त्रांचा मनुष्येतिहासाशीं संबंध कसा काय पोंचतो हें दाखविलें म्हणजे इतिहासशास्त्राची व त्या शास्त्राच्या संवर्धनार्थ असलेल्या साहित्याची आपणांस कल्पना येईल.

**विश्वांतील मानवोत्पत्तिपूर्व क्रिया व त्यांचा कालक्रम.**– प्रथमतः शास्त्रज्ञांमध्यें जें इतिहासविषयक तत्त्वज्ञान प्रचलित आहे त्याचा उल्लेख केला पाहिजे.

**जड द्रव्य, सौरसमुच्चय आणि पृथ्वी.**– पृथ्वीवर मनुष्य प्राणी उत्पन्न होण्यापूर्वीं देखील पृथ्वीचा इतिहास मोठा आहे. पृथ्वी उत्पन्न झाली कशी, ती आकाशांत परिभ्रमण करूं लागण्यापूर्वीं ज्या साहित्याचें पर्यवसान पृथ्वी या विकासांत झालें तें साहित्य उर्फ जड माल कोणत्या स्थितींत होता, पृथ्वी आणि इतर ग्रह हे सौरसमुच्चयांतून बाहेर पडले काय, या तऱ्हेचे प्रश्न विचारांचा विषय झाले आहेत. पृथ्वी आणि इतर ग्रह हे जर सौरसमुच्चयांतून बाहेर पडले असले तर सौरसमुच्चय दुसऱ्या कोणत्या तरी ताऱ्यापासून उत्पन्न झाला नसेल काय? असला तर हे तारकापुंज तयार होण्यापूर्वीं त्यांची

काय स्थिति होती ? याविषयींचा अभ्यास ज्योतिःशास्त्र आणि तद्विषयक पदार्थविज्ञानशास्त्रादि शास्त्रें यांमध्यें समाविष्ट होतो. विश्वांतील सर्व जड वस्तूंची म्हणजे कोट्यवधि खस्थ ज्योतींची उत्पत्ति कशी झाली, त्यांचा लय कसा काय होईल इत्यादि गोष्टींचा शास्त्रीय विचार हा विश्वोत्पत्तिशास्त्रविषयक अगर ज्योतिःशास्त्रविषयक होईल.

कांहीं जड सृष्टींतून तारकायुक्त सृष्टि उत्पन्न झाली असो अगर नसो पण जे अनेक तारे अगर ग्रह आकाशांत दिसतात त्यांचा एकमेकांशीं संबंध काय तो पहाणें, तारे किती आहेत त्यांची मोजदाद करणें हा तारकाविकासकालाच्या पुढच्या कालाचा अभ्यास होय. हा ज्योतिःशास्त्राचा भाग होय.

या अभ्यासापुढचा अभ्यास म्हटला म्हणजे एखाद्या खस्थ गोलाचा विशेष अभ्यास करणें. या अभ्यासामध्यें पृथ्वीच्या घटनेचा आणि इतिहासाचा अभ्यास येतो. यासच भूस्तरशास्त्र उर्फ जिऑलजी म्हणतात.

या अभ्यासांमध्यें आपणांस असें दिसून येतें कीं, आज आपण पृथ्वीच्या जड वस्तूचाच अभ्यास करतांना आपणांस प्राचीन चैतन्याचाहि अभ्यास याबरोबरच करावा लागतो. पृथ्वीच्या तळाच्या खालीं अनेक लुप्त चैतन्यांचें अगर हयात चैतन्यांच्या पूर्वरूपांचें अस्तित्व आढळून येतें. त्यांच्या योगानें आपणांस प्राण्यांचा आणि वनस्पतींचा इतिहास लिहितां येतो. वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र खस्थ गोलावरील सचेतन सृष्टीचे अभ्यास होत.

मनुष्योद्भवापूर्वी ज्या क्रिया झाल्या आणि ज्या ज्योतिःशास्त्र, भूस्तरशास्त्र, प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांचा विषय आहेत, त्या क्रिया आणि त्यांचा इतिहास एका नियमांत आणण्याचा प्रयत्न झाला आहे त्या नियमास विकासवाद म्हणतात.

**विकासवाद.**—विकासवाद उर्फ एव्होल्युशन म्हणून जो सिद्धांत पुढें मांडण्यांत येतो त्यांतील मुख्य कल्पना येणेंप्रमाणें आहे. अत्यंत प्राचीन काळीं द्रवरूप जडद्रव्य आकाशांत परिभ्रमण करीत होतें द्रव्यावर गतीचा परिणाम होऊन तारकासमुच्चयरूपी विश्व उत्पन्न झालें. त्या तारकांपैकीं प्रत्येक तारका अत्यंत उष्ण म्हणजे चैतन्याच्या संभवास अगर जीवनास अशक्य अशा स्थितींत होती आणि ती अंशेंकरून द्रवरूप आणि अंशेंकरून जडरूप स्थितींत होती. पृथ्वी अशाच प्रकारची खस्थ ज्योति आहे. तींत कालांतरानें उष्णता कमी झाली आणि चैतन्य उत्पन्न झालें. तें चैतन्य प्रथम अत्यंत सूक्ष्म जीवस्वरूपी होतें. पुढें त्याचाच विकास होऊन म्हणजे दोन सूक्ष्मांपासून जरासे मोठे पण सूक्ष्म जीव उत्पन्न झाले. त्याच क्रियेनें आणखी मोठाले जीव (वनस्पतिरूपी अगर प्राणिरूपी) उत्पन्न झाले.

**जडापासून जीवोत्पत्ति.**—जडापासून जीवोत्पत्ति कशी झाली याविषयीं विकासवाद्यांकडून समाधानकारक विवेचन झालें आहे असें मानण्यांत येत नाहीं. तथापि मधली सांखळी कांहीं अंशीं लागली आहे असेंहि कित्येक समजतात. या विषयावर प्रो. द. लं. सहस्रबुद्धे ( शेतकी कॉलेज पुणें ) लिहून पाठवितातः—

सजीव सृष्टि आणि निर्जीव सृष्टि यांचा परस्पर संबंध कोणत्या प्रकारचा आहे हा प्रश्न तत्त्ववेत्ते आणि भौतिकशास्त्रज्ञ यांच्या मनांत मनुष्यप्राणी रानटी स्थिति सोडून देऊन सुधारणेच्या मार्गास लागला तेव्हांपासून सारखा घोळत आहे. अलीकडील शास्त्रीय भाषेंत सांगावयाचें म्हणजे हा विषय रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र यांच्यामधील सरहद्दीवरचा आहे. एक काळ असा होता कीं; त्या वेळीं वनस्पतिकोटि आणि प्राणिकोटि यांचाहि परस्पर कांहीं एक संबंध नाहीं असें मत प्रचलित होतें. परंतु अलीकडील पन्नास वर्षांत जीवशास्त्रज्ञांना असें सिद्ध करून दाखवितां आलें आहे कीं, या दोन कोटींमध्यें अनेक बाबतींत सादृश्य आहे. त्यामुळें आतां आपणांस असें खात्रीपूर्वक म्हणतां येतें कीं, प्राण्यांमध्यें इंद्रियद्वारा ज्या ज्या प्रतिक्रिया होत असतात त्या सर्व वनस्पतींमध्यें होऊं शकतात. उदाहरणार्थ, थंडीच्या योगानें वनस्पती गारठून जाऊन बधिर होतात, आल्कोहोल वगैरे मादक पदार्थांनीं त्यांना कैफ चढतो, दूषित हवेमुळें त्या गुदमरून जातात, अतिश्रमानें त्यांना थकवा येतो, ज्ञानशक्तिहारक औषधींनीं त्यांना गुंगी येते आणि विषाची बाधा झाल्यास मरण येतें. थोडक्यांत डॉ. सर जगदीशचंद्र बोस या हिंदी शास्त्रज्ञाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "क्षोभशीलतेचे ( Irritability ) जे जे प्रकार प्राणिकोटीमध्यें दिसून येतात त्यांपैकीं वनस्पतींमध्यें आढळून येत नाहीं असा बहुधा एकहि नाहीं."

असाहि एक काळ होता कीं, त्या वेळीं सेंद्रिय संयुक्त पदार्थ व निरिंद्रिय संयुक्त पदार्थ ( Organic and inorganic compounds ) हेहि परस्पर अत्यंत भिन्न असतात असें मानीत असत. त्या वेळीं अशी समजूत असे कीं, वरील पदार्थांपैकीं निरिंद्रिय संयुक्त पदार्थच कायते रासायनिक प्रयोगशाळेमध्यें तयार करतां येतात; आणि सेंद्रिय संयुक्त पदार्थ हे वनस्पतींच्या किंवा प्राण्यांच्या शरीरामध्येंच कायते विशेष प्रकारच्या चैतन्यशक्तीमुळें ( Vital force ) उत्पन्न होऊं शकतात, परंतु हा वाटत असलेला फरकहि आतां पूर्णपणें दूर झालेला आहे हेंहि आपणांस माहीत झालेलें आहे.

सजीव सृष्टि व निर्जीव सृष्टि यांमधील फरकांची जाणीव आज हजारों वर्षें मानवजातीला आहे. परंतु अलीकडे ज्या वेळीं प्राणिकोटि व वनस्पतिकोटि यांचा बराच निकट संबंध आहे असें, आणि सेंद्रिय संयुक्त पदार्थ तयार करण्यास कसल्याहि प्रकारच्या अदृश्य चैतन्यशक्तीची जरूरी लागत नाहीं असें सिद्ध करण्यांत आलें त्या वेळीं, जीवशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ यांच्या संयुक्त प्रयत्नांनीं आणि सुधारत जात असलेल्या प्रयोगसाधनांच्या साहाय्यानें सजीव व निर्जीव सृष्टि यांमध्यें भासत असलेली भेदरूपी मोठी थोरली भिंतहि नाहींशी होईल, असें साहजिकच वाटूं लागलें; आणि चालू सालापर्यंतचे शोध लक्षांत घेतां ही भिंत सर्वस्वी नाहींशी झालेली नसली तरी बऱ्याच ठिकाणीं पाडण्यांत आलेली आहे असें दिसून येतें.

नागेली नामक सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ म्हणतो, "ज्या अर्थी या भौतिक सृष्टीमध्यें सर्व वस्तूंचा परस्पर कार्यकारणसंबंध दिसून येतो, व ज्या अर्थी सर्व भौतिक व्यापार ठराविक सृष्टिनियमानुसार चाललेले आहेत, त्या अर्थी निरिंद्रिय द्रव्यांपासून उत्पन्न झालेले व शेवटीं त्याच निरिंद्रिय द्रव्यांमध्यें मिळून जाणारे सावयवी जीवहि निरिंद्रिय संयुक्त पदार्थांपासून मूळ उत्पन्न झालेले असले पाहिजेत असें मानल्याशिवाय विकासविषयक सिद्धान्त पूर्णपणानें सिद्ध झाला असें म्हणतां येणार नाहीं."

**सजीवांतील विशेष गुणधर्म निर्जीवांतहि आढळतातः—** सजीव वस्तूमध्यें जे विशिष्ट भेदभावदर्शक गुणधर्म दिसून येतात ते येणेंप्रमाणें: (१) बाह्य कारणाशिवाय अन्तर्गत कारणांनीं उत्पन्न होणारी गति,

( २ ) अन्तर्भागांतून होणारी वाढ, ( ३ ) क्षोभशीलता किंवा संवेदनाशीलता, ( ४ ) श्वासोच्छ्वासक्रिया, आणि ( ५ ) अपत्योत्पादन.

अगदीं साधे सचेतन जीव हे एकपेशीमय असतात. अशा पेशी उर्फ गोलकामध्यें ( १ ) मूलवटक ( nucleus ) ( २ ) जीवनरस आणि ( ३ ) गोलकवेष्टन असे तीन निरनिराळे भाग असतात. परंतु ज्या एकपेशीमय जीवामध्यें इतके तीन निरनिराळे भाग असतात तो जीवकोटींतील अगदीं आद्यस्वरूपी जीव होय असें म्हणतां येत नाहीं. विकासतत्त्वानुसार पाहिलें तर, असा एकपेशीमय जीवहि त्याहून अधिक साध्या स्वरूपाच्या जीवापासून उत्पन्न झालेला असला पाहिजे, असें म्हणावें लागतें. आणि अशा प्रकारचे अवयवरहित व विशिष्ट रचनारहित जीव जिवंत स्थितींत हल्लींहि आढळतात, असें कित्येक जीवशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. उदाहरणार्थ, मोनेरा (Monera) किंवा क्रोमॅसिया (Chromacea) हे जीव म्हणजे ओल्या खडकावर पसरलेलीं श्लेष्ममय पदार्थां- ( gelly ) प्रमाणें दिसणारीं आवरणें ( coatings ) होत; आणि उच्च प्रतीच्या सूक्ष्मदर्शकयंत्रांतून पाहिल्यास हे जीव जीवनरसाचे बनलेले लहान लहान निळ्या-हिरव्या रंगाचे सूक्ष्म गोलपिंड असतात असें आढळून येतें. मोनेरा आणि ज्यांच्यामध्यें योगवाही क्रिया ( Catalysis ) दिसून येते अशा निरिंद्रिय वस्तू यांच्यामध्यें जो एकच फरक दिसून येतो तो फक्त कर्बग्रहण ( Carbon assimilation ) संबंधाचा होय. परंतु मोनेरा व उच्च दर्जाचा सेंद्रिय जीव यांच्यामध्यें प्रत्येक बाबतींत, मोनेरा व निरिंद्रिय स्फटिक यांच्यामधील फरकापेक्षां अधिक मोठा फरक असतो. गोलकांतील मूलाधारभूत द्रव्य म्हणजे जो जीवनरस त्याच्यामध्यें C कार्बन, H हायड्रोजन, O आक्सिजन, N नायट्रोजन, P फॉस्फरस, S सल्फर इत्यादि, इतकीं मूलद्रव्यें असतात; म्हणजे निरिंद्रिय सृष्टीमध्यें नाहीं असें एकहि अधिक मूलद्रव्य या जीवनरसामध्यें नसतें.

**सचेतन जीव व स्फटिक यांची तुलनाः—** आतां सचेतन एकपेशीमय जीव याच्यामधील सजीवत्व म्हणून समजले जाणारे विशेष गुणधर्म स्फटिकासारख्या निर्जीव वस्तूमध्यें असतात किंवा नाहीं हें दोघांची तुलना करून पाहूं. सेंद्रिय निरिंद्रियांची अशी तुलना सर्व बाबतींत करतां येण्यासारखी नसली तरी स्फटिक हा निरिंद्रिय पदार्थांपैकीं एक अत्यंत पूर्णत्वास पोहोंचलेला पदार्थ असल्यामुळें ही तुलना महत्त्वाची आहे. सजीव गोलकांतले महत्त्वाचे गुणधर्म येणेंप्रमाणें असतातः ( १ ) त्यांचा आरंभ सजातीय जीवापासूनच होतो. ( २ ) त्यांना विशिष्ट आकार असून तो कमी अधिक वाटोळा असतो व सरळ सपाट पृष्ठभाग असा नसतो, ( ३ ) अनेक पदार्थांच्या मिश्रणांतून स्वतःला योग्य असें अन्न निवडून घेण्याची त्यांच्या अंगीं शक्ति असते, ( ४ ) त्यांना वाढ असते, ( ५ ) त्यांचें नवें द्रव्य स्वतःमध्यें घेऊन जुनें टाकून देण्याचें कार्य चालू असतें, ( ६ ) त्यांना गति व संवेदनाशीलता असते, ( ७ ) अपत्योत्पादन म्हणजे स्वतःसारखे दुसरे जीव त्यांना निर्माण करतां येतात, ( ८ ) पुष्कळ उष्णता लावल्यानें शक्ति नष्ट होते असे बीजकण ते बनवितात, व हें सर्व गुणधर्म लहानमोठ्या प्रमाणांत स्फटिकामध्येंहि दिसून येतात.

| सजीव सृष्टि | स्फटिक |
|---|---|
| १ मुलारंभकारक बिंदु असतो. उदा०—गोलक, जीवनरस वगैरे. | १ एका लहान स्फटिक बिंदूपासून दुसरे तसेच अनेक तयार होतात. |
| २ आकारः वाटोळा. | २ आकारः वाटोळा. उ.—पाण्याच्या किंवा तेलाच्या बिंदूसारखा. |

स्फटिकाचा बाह्य भाग सरळ पृष्ठभागांचाच बनलेला असतो, परंतु नसलाच बाह्य आकार डायटम ( diatoms ) व राडिओलॉरिअ ( Radiolaria ) यांच्या गारगोटीसारख्या कवचांच्या सांगाड्यांनाहि असतो. जीवनरसापासून तयार झालेले सेंद्रिय सचेतन जीव आणि निरिंद्रिय स्फटिक यांच्यामध्यें सजीव स्फटिक ( biocrystals ) म्हणून जात आहे. ती जीवनरस आणि निर्जीव द्रव्य यांच्या संयुक्त क्रियेनें विशिष्ट आकार येऊन बनलेली असते; उदा० स्पंज, पोंवळीं इत्यादि पदार्थ बनविणाऱ्या प्राण्यांनीं तयार केलेलीं गारेचीं व खडूचीं वेष्टनें, तसेंच बर्फाच्या स्फटिकांचाहि परस्पर विशेष व्यवस्थितपणें संयोग होऊन त्यांना झाडासारखे व फुलासारखे आकार येतात.

| सजीव सृष्टि | स्फटिक |
|---|---|
| ३ पोषक पदार्थांची निवड करणें. | ३ एकाच जातीच्या द्रव्यापासून जेव्हां स्फटिक बनलेला असतो. तेव्हां एकाच जातीचे परमाणू एकत्र आकर्षण केले जाऊन तो स्फटिक तयार होतो. परंतु जेव्हां अ, व ब अशा दोन निरनिराळ्या जातीचे क्षार पाण्यामध्यें जितके विरघळणें शक्य आहे तितके टाकून ते विरघळल्यावर त्यांत अ द्रव्याचा स्फटिक टाकला तर मूळच्या मिश्रणापैकीं अ द्रव्याचेच स्फटिक बनतात. यावरून अ क्षाराच्या स्फटिकाची सजातीय द्रव्य ओढून घेण्याची शक्ति दिसून येते. निरनिराळ्या प्रकारचीं द्रव्यें तळाशीं बसून निरनिराळे स्फटिक बनतात यावरून हेंच सिद्ध होतें. याच क्रियेला स्फटिकाची निवड करण्याची शक्ति असें म्हणतां येईल. |
| ४ बाहेरील द्रव्य शरीराच्या आंत घेऊन स्वतःची वाढ करण्याची शक्ति असते. | ४ मूळ पदार्थाला बाहेरून सजातीय द्रव्य जोडलें जाऊन वाढ होते. |

हा जो फरक आहे त्याचें स्पष्टीकरण करणें सोपें आहे. तें असें कीं, या दोहोंची मूळ रचनाच निराळी असते. परंतु हा फरक अनुल्लंघनीय नसतो. या दोन जातींमध्यें मधल्या दर्जाचे पदार्थ असतात. कांहीं द्रव्यांचे कोलाईड ( Colloid ) स्थितींतले प्रतिस्फटिकाचे सूक्ष्म गोल पिंड क्षाराच्या द्रवामध्यें विरघळून न जातील अशा रीतीनें टांगून ठेवल्यास त्यांना बाहेरून कण जोडले जाऊन त्यांची वाढ होते,

| सजीव सृष्टि | स्फटिक |
|---|---|
| ५ नवें द्रव्य शरीरांत घेऊन जुनें बाहेर टाकून देणें. | ५ एका क्षाराचे स्फटिक त्याच क्षाराच्या द्रवामध्यें टाकल्यास ही क्रिया होते. उदा०—मोर्चूदाचा एकादा स्फटिक वजन करून मोर्चूदाच्या संपृक्त द्रावामध्यें टाकल्यास त्याचें वजन कमजास्त न होतां आकार मात्र बदलतो. याचें कारण त्याच्यामधील कण द्रवांत मिसळत असतात व द्रवांतील स्फटिकाला येऊन मिळत असतात. |

६ गति व संवेदना असते.

६ योग्य साधन मिळाल्यास स्फटिकाच्या अणूंना गति येते. परमाणू ठराविक नियमांनुसार ठराविक दिशेनें हालचाल करतात व एकत्र होतात असें ठरतें. यावरून त्यांना संवेदना होतात असें ठरतें; नाहींतर सजातीय परमाणू एकत्र ओढले जाणार नाहींत. स्फटिक बनण्याची क्रिया चालू असतां इतर सर्व रासायनिक क्रियांप्रमाणें, कांहीं हालचाल झालेली दिसून येते; आणि त्या हालचालींना संवेदनाशीलतेशिवाय दुसरें कांहींच कारण सांगतां येत नाहीं. या संवेदनाशीलतेच्या प्रश्नाबद्दल पुढें स्वतंत्र विवेचन करूं.

७ अपत्योत्पादन; गोलकांचें पृथक्करण होऊन, किंवा शरीराचे विभाग होऊन व्यक्तींची संख्यावृद्धि होते.

अत्यंत साध्या स्थितींत एका व्यक्तीची प्रमाणाबाहेर वाढ होऊन दुसरी व्यक्ति निर्माण होते.

७ अत्यंत क्षारयुक्त (Super-Satatured) द्रवामध्यें प्रत्येक स्फटिकाच्या अणूची ठराविक मर्यादेपर्यंत वाढ होते, व ही मर्यादा त्या अणूच्या रासायनिक घटनेवर अवलंबून असते. या मर्यादेपर्यंत वाढ पोहोंचली म्हणजे मूळ स्फटिकावर दुसरे अनेक बारीक बारीक स्फटिककण दिसूं लागतात. ग्लोबरसॉल्टच्या (Sodium Sulphate) क्षारयुक्त द्रवामध्यें अशी क्रिया होते असें आस्टवॉल्डनें सप्रयोग दाखविलें आहे.

८ बीजकण तयार होणें व ते उष्णता लावल्यानें जीवनशक्तिहीन होणें.

८ याचप्रमाणें ग्लोबरसॉल्टच्या स्फटिककणांतील पाण्याची वाफ झाल्यावर त्यांची कोरडी पूड होते, पण स्फटिक बनविण्याची त्यांची शक्ति नष्ट होत नाहीं. अशी कोरडी पूड पाण्यामध्यें टाकल्यास नवे पाणीदार स्फटिक तयार होतात; परंतु याच पुडीच्या कणांना पुष्कळ उष्णता दिली तर मात्र ही त्यांची शक्ति नाहींशी होते.

**अनुस्फटिक व प्रतिस्फटिक स्थितिः—** सचेतन पदार्थांतील मुख्य आधारभूत द्रव्य प्रतिस्फटिक जातीचें (Colloidal) म्हणजे स्फटिकाकारविहीन किंवा तत्समुच्चयविहीन असतें; आणि म्हणून सचेतन आणि अचेतन पदार्थांमधील मुख्य फरक हाच होय असें कोणी म्हणेल. त्याला उत्तर असें कीं, हें वर्गीकरणाहि आतां उरत नाहीं; कारण सामान्यतः अनुस्फटिक जातीचे असणारे अनेक पदार्थ प्रतिस्फटिक जातीचे बनवितां आलेले आहेत; उदाहरणार्थ, (१) $BaSo_4$, (२) $BaCo_3$, (३) $CaSo_4$, (४) NaCl वगैरे. अंड्यामधील पांढरा भागाहि जो प्रतिस्फटिक जातीचा असतो तो अनुस्फटिक जातीचा बनवून दाखविलेला आहे.

इतकेंच नव्हे तर एकच पदार्थ या दोन्हीहि स्थितींत असलेला सांपडूं शकतो. आल्बुमेन हा पदार्थ प्रतिस्फटिक स्थितींत बहुधा असतो, पण त्याचेच पुष्कळशा वनस्पतिगोलकांमध्यें (aleuron-grains) षट्कोणाकृति स्फटिक बनलेले आढळतात. उलट पक्षीं, सिलिका हा पदार्थ अनुस्फटिक जातीचा बहुधा असतो, पण त्याचाच सरसासारखा प्रतिस्फटिक जातीचा पदार्थ बनतो. म्हणून प्रतिस्फटिकजातित्व हें सचेतन सृष्टीचें भेददर्शक लक्षण आहे असें म्हणतां येत नाहीं.

पृथ्वीची रचना प्रथमपासून कशी होत गेली याचा इतिहास पाहतां असें वाटतें कीं, ती वायुमय स्थितींतून पुढें गेल्यावर पृथ्वीवरील पदार्थांना प्रतिस्फटिक जातीचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. अशा जातीच्या पदार्थांचे उत्तम कण अनिश्चित स्थितींत राहिले आणि त्यांच्यावर स्फटिककण तयार झाले. असाच प्रकार हल्लींहि चालू असतो; आणि प्रथम प्रतिस्फटिक जातीचे पदार्थ भराभर बनत असतात व नंतर त्यांपासून अनुस्फटिक जातीचें द्रव्य तयार होत असतें. मागील अनंत काळामध्यें पृथ्वीवरील पदार्थांमध्यें अत्यंत सावकाशपणें कसा विकास होत गेला, त्याचें थोडक्यांत स्वरूप वरील क्रियेंत पाहावयास मिळतें. उदा०—विकाससिद्धान्ताप्रमाणें कोणतीहि जीवजाति ज्या निरनिराळ्या अवस्थांमधून जाऊन निर्माण झालेली असते (Phylogeny) त्याच सर्व अवस्थांमधून तज्जातीय प्राणी गर्भावस्थेच्या थोडक्या काळांत जात असतो (Ontogeny). यावरून अनुस्फटिक जातींच्या व प्रतिस्फटिक जातींच्या पदार्थांची उत्पत्ति मूळ एकाच प्रकारच्या द्रव्यापासून झालेली आहे असें सिद्ध होतें. निरिंद्रिय पदार्थांमध्यें सिलिकॉन हें मुख्य द्रव्य असतें आणि सेंद्रिय पदार्थांमध्यें कार्बन हें मुख्य द्रव्य असतें. हीं दोन्ही द्रव्यें चतुर्धाशक्तिक असतात आणि तीं पुष्कळ निरनिराळ्या प्रकारच्या स्वरूपांत आढळतात.

**संवेदनशीलताः—** आतां या संवेदनशीलतेसंबंधाचा विचार करूं. ही देखील सेंद्रियांत व निरिंद्रियांत आहे. व दोहोंमधीलहि तिचें अस्तित्व सदृश उपायांनीं कमीजास्त करतां येतें. सचेतन जीवांना कोणतेंहि उत्तेजक (Stimulus) दिल्यास त्यांच्यामध्यें एक प्रकारचें चलन उत्पन्न होतें आणि हें चलन विद्युद्यंत्रांच्या साहाय्यानें दाखवितां येतें. प्रत्येक शरीरभागाची चलनशीलता इंद्रियविषयक व्यापारावर अवलंबून असते. शरीरभागा-(Tissue) मध्यें संवादिनी क्रिया करण्याचें (Responsive action) जें सामर्थ्य असतें तें ज्ञानशक्तिहारक द्रव्यांच्या परिणामामुळें तात्पुरतें आणि विषारी द्रव्यामुळें कायमचें नष्ट करतां येतें. येणेंप्रमाणें एखादा शरीरभाग असंवादी बनला म्हणजे तो मृत झाला असें म्हणतात. निरिंद्रिय सृष्टीमधील जस्ताच्या तारेवर सोडियम कार्बोनेट (Sodium Carbonate) याचा उत्तेजक परिणाम होत असतो; पोटॅशिअम ब्रोमाईड (Potassium Bromide) याचा ज्ञानशक्तिहारक असा परिणाम होतो आणि ऑक्सॅलिक ॲसिडचा बऱ्याच वेळानंतर विषासारखा परिणाम होतो.

यावरून असें दिसून येईल कीं वनस्पती व प्राणी यांच्या शरीरभागावर होतो तशाच प्रकारचा विद्युन्मय संवादी परिणाम उत्तेजक द्रव्यांच्या साहाय्यानें, शिथिलतात्मक परिणाम ज्ञानशक्तिहारक द्रव्यांनीं आणि पूर्ण नाशकारक परिणाम दुसऱ्या कांहीं विषसम द्रव्यांनीं सर्व प्रकारच्या धातूंवर घडून येत असतो. यावरून सचेतन-

१ बेरिअम सल्फेट (Barium Sulphate)

२ बेरिअम कार्बोनेट (Barium Carbonate)

३ कॅल्शिअम सल्फेट (Calcium Sulphate)

४ सोडिअम क्लोराइड (Sodium Chloride)

सृष्टि व जड सृष्टि यांच्यामध्यें संवेदनाशीलतेच्या बाबतींत पूर्ण साम्य आहे असें दिसून येईल.

सर जगदीशचंद्र बोस हे म्हणतातः—"धातु, वनस्पती आणि प्राणी यांच्यावर ज्या सर्व प्रकारच्या संवादिनी क्रिया होत असतात त्यांमध्यें कोठेंहि फरक दिसून येत नाहीं. म्हणून संवादिनी क्रिया होतात त्या अदृश्य शक्तीच्या साहाय्यामुळें होतात असें मानण्याची मुळींच आवश्यकता नाहीं किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे सजीव सृष्टि असो किंवा निर्जीव असो, सर्वांतील मूलद्रव्य एकच प्रकारचें आहे."

दुसरा लोएब (Loeb) नांवाचा शास्त्रज्ञ म्हणतो–" आपण सर्व मनुष्यप्राणी हेहि रासायनिक द्रव्यांचीं बनलेलीं यंत्रें आहोंत. आपण हालचाल करतों याचें कारण असें कीं, आपल्या शरीरांतल्या मध्यवर्ती मज्जातंतुरचनेमध्यें चालू असलेल्या क्रिया आपणास हालचाल करण्यास भागच पाडतात. इतकेंच काय पण मनुष्यप्राणी आत्मयज्ञ करण्यास तयार होतो तो सुद्धां कित्येक रासायनिक फेरबदल शरीरांत घडून आल्यामुळें होतो असें सिद्ध करून दाखवितां येईल असें वाटतें. कित्येक उत्तेजकांमुळें अन्तरोत्सर्ग इतक्या मोठ्या प्रमाणावर होऊं लागतो कीं, आपण त्यांचे गुलाम बनून जातों. या सर्वांवरून असें दिसून येतें कीं, ज्याला आपण अदृश्य चैतन्यशक्ति म्हणून म्हणतों ती, वीज, उष्णता किंवा प्रकाश यांच्यासारखीच एक शक्ति आहे."

**निःशुक्रजोत्पत्ति.**—कृत्रिम उपायांनीं निःशुक्रजोत्पत्ति (Partheno-genesis) करण्याचे प्रयोग मोठे मनोरंजक व महत्त्वाचे असतात; व त्यांवरून ज्या गोष्टी केवळ अदृश्य शक्तीमुळें घडून येतात असें वाटण्याचा संभव असतो त्या साध्या रासायनिक क्रियांनींच होत असतात असें सहज सिद्ध करून दाखवितां येतें. सीअर्चिन किंवा स्टारफिश किंवा आनेलिड (एक प्रकारचा जलचर प्राणी) याच्या अंड्यामध्यें शुक्रबिंदूचा प्रवेश झाला कीं, तात्काल परिणाम असा होतो कीं, अंड्याभोंवतालचें वेष्टन म्हणून ज्याला म्हणतात तें तयार होण्यास सुरवात होते. लोएबनें असें शोधून काढलें कीं, हें गर्भावेष्टन गर्भवियुक्त अंड्यामध्यें कित्येक आसिडांच्या विशेषतः सेंद्रिय मॉनॅबेसिक ॲसिडांच्या साहाय्यानें उत्पन्न करतां येतें. कर्बवायूनेंहि ही क्रिया घडवून आणतां येते, शिवाय असें आढळून आलें आहे कीं, उच्च प्रकारचें आम्ल (ज्याच्या अणूचें वजन जास्त असतें तें) जास्त परिणामकारक असतें. खुद्द शुक्रजंतु तरी अंड्यामध्यें उच्च प्रतीचें आम्ल घालण्याचेंच काम करून त्या योगानें गर्भावेष्टन निर्माण होऊं लागण्यास कारण होत असावा. शारीरिक रसायनांमध्यें कांहीं क्रिया होऊन त्यामुळें गर्भावेष्टन तयार होऊं लागतें व त्यामुळें अंड्यांतील प्राण्याची वाढ होऊं लागते. इतर प्राण्यांच्या अंड्यांमध्यें अशाच प्रकारचा फरक होऊं लागण्यास वरील आम्लादि साधनामध्यें थोडाफार फेरबदल करावा लागतो. परंतु जरूर तेवढी काळजी घेतल्यास सर्व जातींच्या प्राण्यांच्या अंड्यांमध्यें शुक्राच्या साहाय्यावांचूनहि गर्भाची वाढ करून दाखवितां येणें शक्य आहे. आणि अशा कृत्रिम उपायांनीं जन्मास आलेल्या प्राण्यांपैकीं निम्याहून अधिक अंड्यांमध्यें शुक्राच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या प्राण्यांप्रमाणेंच सर्व बाबतींत असतात, व हे कृत्रिम प्राणी नैसर्गिक प्राण्याइतका काल जगूंहि शकतात.

हे कृत्रिम उपायांनीं उत्पन्न केलेले प्राणी नैसर्गिक प्राण्यांप्रमाणें शारीरिक वाढ पावून प्रौढावस्थेस पोहोंचतात काय? असा प्रश्नहि कोणी करतील. त्याला उत्तर असें कीं, डीलेज नामक शास्त्रज्ञास सीअर्चिन जातीचे प्राणी कृत्रिम उपायांनीं निर्माण करून त्यांची प्रौढ दशेपर्यंत वाढ झालेली दाखविण्याच्या प्रयोगांत यश आलेलें आहे. प्रो. लोएब यांना अशाच कृत्रिम साधनांनीं सात पूर्ण वाढ झालेले व चांगले निरोगी बेडूक तयार करतां आलेले आहेत. हे निपितृक तथापि पूर्ण वाढ पावलेले बेडूक "अंड्यांना फक्त एका टांचणीनें भोंक पाडून उत्पन्न करतां आले होते." अशा तऱ्हेची कृत्रिम उत्पत्ति पुढें शरीरांतील उष्णता हवेंतील उष्णतेवर अवलंबून नसणाऱ्या प्राण्यांमध्येंहि करणें शक्य होईल असें वाटतें.

शिवाय केवळ अशाच कृत्रिम रासायनिक उपायांनीं एका अंड्यापासून जुळे प्राणीहि उत्पन्न करतां येणें शक्य आहे.

**बाल्यावस्था व प्रौढावस्थाः**— मनुष्यप्राण्यामध्यें बाल्यावस्था व प्रौढावस्था यामध्यें ठळक फरकच नसतो; परंतु कित्येक जातींच्या कीटकांमध्यें व जलस्थलचर प्राण्यांमध्यें हा फरक त्यांच्या शरीराच्या आकारामध्यें एकदम फेरबदल होऊन लक्षांत येतो. अंडें फुटून जें बेडकाचें पिलूं बाहेर येतें त्याला पाय नसतात. पण एक लांब शेंपूटच त्याऐवजीं असतें. परंतु पुढें कांहीं काळानें त्याला पाय फुटूं लागतात आणि शेंपूट नाहींशी होत जाते; तोंडाचा व डोक्याचा आकारहि बदलतो आणि असे फरक होऊन प्रौढ बेडूक तयार होतो. गुडरनॅशनें असा शोध लावला कीं, बेडूक प्रौढदशेप्रत पोहोंचतांना हा जो फरक होतो तशा प्रकारची वाढ कंठग्रंथी (Thyroid gland) वर अवलंबून असते; सबब बेडकांच्या पिल्लांमध्यें शरीराची प्रौढावस्थादर्शक वाढ होण्यास त्या पिल्लांना कोणत्या तरी प्राण्याची कंठग्रंथी खाऊं घातली म्हणजे त्यांना आपल्या इच्छेनुसार प्रौढावस्था प्राप्त करून देतां येते. उलटपक्षीं त्यांच्या शरीरांतील ही कंठग्रंथी लहानपणींच काढून टाकल्यास हीं पिलें आकार मोठा झाला तरी कायमचीं बाल्यावस्थेंतच राहतात. कंठग्रंथीमार्फत होणारी क्रिया आयोडाईन नामक निरिंद्रिय पदार्थानें घडवून आणतां येते. यावरून असें दिसतें कीं, सदरहु शारीरिक फरक आयोडाईन या पदार्थाचा कांहीं संचय शरीरांत झाल्यानें होत असावा.

**आयुर्मर्यादाः**—प्राण्याची जिवंत राहण्याची क्रियाहि शरीरांतील रासायनिक प्रतिक्रियांच्या परंपरेवर अवलंबून असते. कित्येक वेळीं असा प्रश्न विचारण्यांत येतो कीं, रोग व अपघात हे पूर्णपणें टाळून कोणा प्राण्याला अमर्याद आयुष्याचा उपभोग घेतां येणें शक्य आहे काय? अशा प्रकारचा प्रयोग मनुष्यप्राण्यावर करणें अशक्य आहे. परंतु बॉगडॅनो या रशियन शास्त्रज्ञानें कीटकांवर प्रयोग करून हा प्रश्न सोडविला आहे. त्यानें असें सिद्ध केलें आहे कीं 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्,' म्हणजे कोणालाहि मृत्यु टाळतां येणें शक्य नाहीं; फक्त आयुर्मर्यादा वाढविणें किंवा कमी करणें ही गोष्ट स्वतःच्या आधीन असते. कोणतीहि रासायनिक क्रिया होण्यास सामान्यतः लागणारा काळ उष्णतामान १०° नीं कमी केल्यास दुप्पट किंवा तिप्पटहि अधिक लागतो. आणि जगण्याची क्रिया हीहि एक रासायनिक क्रियाच असल्यामुळें तिलाहि वरील नियम लागला पाहिजे. जंतुविरहित केलेल्या (Asceptic) माशांवर अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यांत आले, त्यांत असें आढळून आलें कीं, उष्णतामान तेंच होतें तेव्हां सर्व माशा साधारणपणें सारख्याच वयोमर्यादेनंतर मरण पावल्या; परंतु उष्णतामानांत फरक करतांच वयोमानांत पुढीलप्रमाणें फरक पडलाः—

| उष्णतामान सेंटिग्रेड | माशांचें अण्डोत्पत्तीपासून मृत्यूपर्यंतचें सरासरी वयोमान दिवस |
|---|---|
| ३०° | २१.१५ |
| २५° | ३८. ५ |
| २०° | ५४. ३ |
| १५° | १२३. ९ |
| १०° | १७७. ५ |

या आंकड्यांवरून असें दिसतें कीं, रासायनिक प्रतिक्रियांच्या गतीवर उष्णतामानाचा ज्या प्रकारचा परिणाम होतो तशा प्रकारचाच उष्णतामानाचा परिणाम माशांच्या वयोमर्यादेवरहि होतो. दुर्दैवानें, आपलीं मानवशरीरें बरेंच कमी उष्णतामान झाल्यास जगूंच शकत नाहींत, हें खरें. तथापि अशा कमी उष्णतामानांतहि जगणें मनुष्यास शक्य झालें तरी तें आपलें जीवित आपणांस फार कंटाळवाणें व नीरस होईल; कारण बहुधा तशा स्थितींत सुख आणि दुःख, आनंद आणि विषाद एतद्विषयक संवेदना फारच कमी अंशानें होऊं लागतील. जंतुविरहित माश्यांवर केलेल्या प्रयोगांनीं ही कल्पना साधार असल्याचें ठरलें कीं, जीविताची वयोमर्यादा शरीरांत चालू असलेल्या रासायमिक प्रतिक्रिया पूर्ण होण्यास लागणाऱ्या काळाइतकी असते. या रासायनिक क्रिया म्हणजेच शरीरामध्यें अपायकारक द्रव्यांचा सांठा होणें, किंवा शरीराची तारुण्यावस्था असण्यास लागणाऱ्या शरीरधातूंचाच हळूहळू नाश होणें, असा अर्थ असेल तर जिवंत राहण्याची जी क्रिया चालू असते तिचेच वार्धक्यविषयक दौर्बल्य व अखेरचा मृत्यु हे नैसर्गिक परिणाम होत, हें आपणांस सहज समजण्यासारखें आहे. तात्पर्य, जीवित म्हणजे दुसरें कांहींएक नसून रासायनिक प्रतिक्रियांची एक परंपरा होय; आणि सजीव सृष्टि ज्या भौतिक व रासायनिक शक्तींनीं नियंत्रित केलेली आहे, त्याच शक्तींनीं निर्जीव सृष्टिहि बद्ध आहे.

**केवल सांनिध्यविकारी बाह्य व अन्तस्थ पदार्थ** (Catalytic Agents व Enzomes):— येवढ्याशा लहान गोलकामध्यें अनेक अत्यंत गुंतागुंतीच्या व दीर्घकाल टिकणाऱ्या रासायनिक क्रिया चालू असतात हें पाहिलें म्हणजे खरोखर मोठें आश्चर्य वाटतें. गोलकांतील जीवनरस व त्याचीं कार्यें यांचें अत्यंत काळजीपूर्वक परीक्षण चालू आहे व त्यावरून आतांपर्यंत आपणांस येवढें समजून आलें आहे कीं, ज्या पुष्कळशा क्रिया अदृश्य शक्तीच्या योगानें होतात अशी पूर्वीं समजूत होती त्या बहुतेक अगदीं सामान्य सृष्टिनियमानुसार वास्तविक घडत असतात असें सिद्ध करतां येतें. कित्येक द्रव्यें अशीं आहेत कीं, त्यांच्यांतील रासायनिक आकर्षणानें होणाऱ्या परिणामाशिवाय त्यांच्यांत अशी एक शक्ति असते कीं, त्यांच्या केवळ सांनिध्यामुळें शेजारच्या इतर पदार्थांमध्यें परस्पर संयोगीकरण किंवा पृथक्करणाची क्रिया होते; आणि तीं द्रव्यें स्वतः अबाधित राहतात. उदाहरणार्थ, सल्फ्युरिक ॲसिड स्वतःमध्यें कांहींएक फरक न होऊं देतां स्टार्चची साखर बनवूं शकतें. अशा प्रकारचीं कार्यें करणारीं दुसरीं अनेक द्रव्यें आहेत. त्यांना सांनिध्यविकारी पदार्थ (Catalytic Agents) म्हणतात. अशा द्रव्यांचा अत्यंत अल्प अंशसुद्धां दुसऱ्या पदार्थाच्या मोठ्या सांठ्यामध्यें फरक घडवून आणूं शकतो. आणि हेच गोलकामधील सांनिध्यविकारी पदार्थ (Catalytic Agents or Enzomes), जे पुष्कळसे फरक अदृश्य चैतन्य शक्ति घडवून आणते अशी समजूत होती, ते फरक घडवून आणीत असतात.

**सहजोत्पत्ति** (Spontaneous generation):— नाईल नदीच्या गाळापासून उंदीराची स्वाभाविक उत्पत्ति किंवा गाईच्या शेणापासून विंचवांची किंवा मृत शरीरापासून कृमींची उत्पत्ति यासंबंधाच्या जुन्या कल्पना सर्व चुकीच्या असल्याचें पाश्चर व त्याच शास्त्रीय क्षेत्रांत संशोधनकार्य करणारे तदुत्तरकालीन विद्वान् यांनीं आपल्या सुप्रसिद्ध प्रयोगांनीं दाखविलेंच आहे. परंतु या प्रयोगांचा, अगदीं मूळारंभीं निर्जीव सृष्टीतून सजीव सृष्टि कशी उत्पन्न झाली, या प्रश्नाशीं कांहीं संबंध नाहीं. डॉ. एच्. सी. बॅस्टियन् यानें स्वतः केलेल्या अनेक प्रयोगांचें वर्णन प्रसिद्ध केलें असून त्यांत तो असें म्हणतो कीं, निर्जीव पदार्थापासून अत्यंत साध्या प्रकारचे सचेतन जीव प्रत्यक्ष उत्पन्न करतां आले. हे प्रयोग अगदीं बिनचूक-निर्दोष होते किंवा नाहीं याबद्दल खात्री नसली तरी इतर तदनुषंगिक पुराव्यावरून हेकेल व नागेली यांच्यासारखे मोठाले विद्वान् जें सांगतात तें आपण मान्य करणें जरूर आहे. या विद्वानांचें म्हणणें असें कीं, आद्यजीवोत्पत्ति (Archebiosis) ही क्रिया पुष्कळ वेळां पुनःपुनः होत राहिली असली पाहिजे.

(Protein व Plasura gramiles):— परंतु या आद्यजीवोत्पत्तीची पूर्व तयारी म्हणून एक पायरी अशी असली पाहिजे कीं, त्यावेळीं नायट्रोजनस कार्बनाचे संयुक्त पदार्थ बरेचसे उत्पन्न झाले असावे. त्यांच्यापासून प्रथम प्रोटीन नामक द्रव्य उत्पन्न झालें. नंतर या प्रोटीनचे अणू त्यांच्यांतील अनिश्चित स्वरूपाच्या रासायनिक आकर्षणामुळें विवक्षित प्रकारें एकत्र होऊन त्यापासून एका प्रकारच्या जीवनरसाच्या सूक्ष्म कणांची उत्पत्ति झाली असावी; आणि या कणांपासून अगदीं साध्या स्वरूपाचे आद्य जीव निर्माण झाले असतील. हीच मोनेरा जातीची सजीव सृष्टि होय.

**एक महत्त्वाचा प्रश्न.**—सजीव व निर्जीव सृष्टीमध्यें एक मोठा फरक असून तो शिरो टॅशिरो या शास्त्रज्ञानें आपल्या 'जीवाचें रासायनिक लक्षण' या नांवाच्या पुस्तकांत पुढें मांडला आहे. त्या पुस्तकांत ग्रंथकार म्हणतो, 'जिवंत राहण्याची जी प्रतिक्रिया चालू असते तिच्याबरोबर सर्वत्र कांळीं व प्रत्येक ठिकाणीं एक रासायनिक स्थित्यन्तर घडून येत असतें. प्राणी, वनस्पति, वाळलेलीं बीजें, मज्जातंतु वगैरे सजीव सृष्टीला कोणत्याहि रीतीनें उत्तेजित केल्यास या सजीव पदार्थांमधून कर्ब वायु एकदम बाहेर पडतो व हेंच सजीवतेचें रासायनिक लक्षण होय.

या प्रकारचें रासायनिक स्थित्यन्तर निर्जीव सृष्टीमध्यें कोठें चालू असल्याचें दाखविण्यांत आलें नाहीं. परंतु यासंबंधानें सुद्धां लवकरच ग्राह्य असें स्पष्टीकरण पुढें आल्यावांचून राहणार नाहीं, अशी आशा वाटते. जोंपर्यंत भौतिक व रासायनिक शास्त्राच्या नियमांनीं या गोष्टीचा उलगडा झाला नाहीं तोंपर्यंत हें कोडें सुटलें नाहीं असेंच वाटत राहील; तथापि एकदां यासंबंधांतलें अज्ञानपटल दूर केलें गेलें, म्हणजे मग मात्र इतकें साधें कोडें आपणांस सोडविता आलें नाहीं, याबद्दल आपणाला आश्चर्य वाटेल.

असो; याप्रमाणें सजीव व निर्जीव सृष्टीमधील भेदरूपी भिंत नाहींशी करण्याचे प्रयत्न चालू असून त्यांना आतांपर्यंत बरेंचसें यशहि आलेलें आहे. तथापि अद्याप हा प्रश्न पूर्णपणें सुटण्यास वाटेंत पुष्कळ अडचणी आहेत. शिवाय निर्जीवांतूनच सजीव सृष्टि उत्पन्न झाली व ती सर्व एकजातीय म्हणजे समान गुणधर्मांनींच युक्त आहे, असें सिद्ध झालें तरी पुढें 'आत्मा' म्हणजे काय आहे, हा अत्यंत अवघड प्रश्न शिल्लक राहतोच. सजीव व निर्जीव यामध्यें फार मोठा फरक आहे असें सकृद्दर्शनीं आपणांस वाटतें; पण वास्तविक अत्यंत साध्या स्वरूपाचा जीव व मनुष्यप्राणी यामध्येंच अत्यन्त मोठें अंतर आहे. म्हणून जीवशास्त्रांतील विकासतत्त्वानुसार साध्या एकपेशीमय कीटकापासून पुढें अनंत प्राणिजाती निर्माण होत होत अखेर मनुष्यजातींतील न्यूटन, नेपोलियन, किंवा व्यास, विश्वामित्र झाले म्हणजे अत्यंत क्षुद्र कृमिकीटक व न्यूटननेपोलियनसारखे महापुरुष हे एकाच जातीचे जीव होत, असें कबूल करणें ज्यांना जड वाटत नाहीं, त्यांना तरी स्फटिकापासून साधा सेंद्रिय जीव उत्पन्न झालेला आहे असें मानण्यास अवघड जाण्याचें कारण नाहीं. निर्जीव व सजीव यामध्यें दिसत असलेला फरक दूर होण्याच्या मार्गाला लागलेला आहे आणि तो यथावकाश खास दूर होणार; आणि आजपर्यंत ज्यांना आपण अद्भुत किंवा कल्पित गोष्टी म्हणून मानीत होतों त्या सृष्टिनियमानु-

सारच घडत आहेत, व सजीव आणि निर्जीव अशा एकंदर सर्व सृष्टींतील मूलभूत द्रव्य एकच आहे. आणि सर्वत्र विविधता दिसत असली तरी विश्वांतील सर्व पदार्थ मूळ एकजातीयच आहेत, असें सिद्ध होणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत.

प्रोफेसर सहस्रबुद्धे यांच्या वरील लेखाचा मथितार्थ असा कीं ज्या अर्थी सजीवाचें जीवत्व दाखविणारे गुणधर्म निर्जीवांतहि आढळतात, आणि ज्या अर्थी जे जीव शुक्रक्षेपामुळें उत्पन्न होतात त्यांची उत्पत्ति कृत्रिम उपायांनीं करतां येते आणि ज्या अर्थी बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य या अवस्था म्हणजे केवळ रासायनिक क्रियांची परंपरा आहेत, आणि ज्या अर्थी प्रस्तुत रासायनिक क्रिया कृत्रिम उपायांनीं लौकर घडवून आणतां येतात किंवा त्या थांबवितां येतात त्या अर्थी जड आणि सचेतन यामध्यें अनुल्लंघनीय विरोध नाहीं.

**जीवोत्पत्तीपासून मानवविकासापर्यंत.**– चैतन्याचा अभ्यास म्हणजे जीवशास्त्र उर्फ बायालजी होय. या शास्त्राचे प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र इ. प्रकारचे विभाग करण्यांत येतात.

प्राणिशास्त्री अशा तऱ्हेनें प्राण्यांची मांडणी करूं शकतात कीं, एका प्राण्यापासून दुसरा प्राणी अगदीं थोडा फरकलेला, दुसऱ्यापेक्षां तिसरा थोडा फरकलेला. याप्रमाणें प्राणिकोटींत एकतऱ्हेची सोपानपरंपरा आहे, हें सिद्ध होईल. म्हणजे आजचे अनेक अतिविकसित प्राणी–उदाहरणार्थ मनुष्य, हत्ती, साप, देवमासा या सर्वांचें मूळ एकच होतें आणि त्या मूळापासून पावलेले हे निरनिराळे विकास आहेत.

प्राणिशास्त्रामध्यें सूक्ष्मापासून जे अनेक निरनिराळे सावयव विकास दिसतात त्यांच्या व सूक्ष्मांच्या मधल्या पायऱ्या कांहीं प्रचलित सृष्टींत आहेत आणि कांहीं गत सृष्टींत सांपडतात. भूस्तरशास्त्रांतर्गत प्राणिशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र येथें कामास येतें.

विकासवादामध्यें जी कृति नेहमीं होत असते म्हणून गृहित धरलें आहे ती कृति म्हटली म्हणजे सदृशापासून विसदृश जगाची उत्पत्ति आणि निरवयव स्थितीपासून सावयव स्थितीची उत्पत्ति. या प्रकारची क्रिया जीवद्रव्यावर होऊन एकमेकांपासून भिन्न आणि सावयव असे अधिकाधिक प्राणी निर्माण होत गेले. याच क्रियेनें मनुष्यप्राणी विकास पावला असावा, असें समजतात. विकासवादाला जे मुख्य आधार समजले जातात ते येणेंप्रमाणेः–

(१) भूस्तरशास्त्रांतील आधार– पृथ्वीच्या निरनिराळ्या काळाच्या दर्शक अशा थरांमध्यें निरनिराळ्या विकासाचे प्राणी सांपडतात. अगदीं प्राचीन थरांमध्यें अगदीं कमी विकसित प्राणी व वनस्पती सांपडतात. अधिक अर्वाचीन थरांमध्यें अधिक विकसित प्राणी सांपडतात. वगैरे.

(२) प्राणिशास्त्रांतील आधार– अस्तित्वांत असलेल्या प्राण्यांमध्यें कमी विकसितापासून अधिक विकसित अशी प्राण्यांची परंपरा लावतां येते.

(३) गर्भशास्त्रांतील आधार– मनुष्याच्या गर्भामध्यें जो विकास दृष्टीस पडतो तो त्याच्या पूर्वीच्या पायऱ्या दर्शवितो. शास्त्रज्ञांची अशी समजूत आहे कीं, अधिक विकसित अशा प्राण्यांच्या भ्रूणोत्तर बनावटीमध्यें तो प्राणी ज्या पूर्वरूपांतून विकसित होत गेला त्या पूर्वरूपाच्या पायऱ्या दृष्टीस पडतात. म्हणजे मनुष्य आणि कुत्रा यांचे गर्भ अतिशय पूर्वावस्थेंत सारखेच असतात, आणि एकाला क्रमानें कुत्रेपणा येतो आणि दुसऱ्यास क्रमानें मनुष्यपणा येतो.

येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, विकासवादाच्या सिद्ध्यर्थ गर्भशास्त्रांतील पुरावा म्हणून जो मांडण्यांत येतो तो ज्या समजुतीच्या आधारावर मांडण्यांत येतो त्या समजुतीवर शास्त्रज्ञांचा पूर्वीइतका विश्वास राहिला नाहीं.

**मनुष्यप्राण्याचा इतिहास.**– हा द्यावयाचा म्हणजे ज्या पूर्वीच्या परंपरांतून मनुष्योत्पत्ति झाली त्या परंपरा द्यावयाच्या आणि त्याच परंपरेचे इतर विकास द्यावयाचे. हे देणें म्हणजे प्राणिशास्त्र देणें होय, आणि हा विकास फार पूर्वीपासून द्यावयाचा म्हणजे वनस्पतिशास्त्रहि देणें होय.

मनुष्यप्राणी हा एका मानवकल्प पशूपासून निर्माण झाला कीं, त्याच्या भिन्न जाती मानवकल्प अनेक पशूंपासून निर्माण झाल्या याविषयीं आज एकमत नाहीं. या एकमताभावाचीं कारणें केवळ बौद्धिक नाहींत. तर राजकीय व सामाजिकहि आहेत. ज्या देशामध्यें वर्णद्वेष अधिक आहे त्या देशामध्यें अनेकवंशसंभवाची कल्पना अधिक जोरानें दिसते. अनेकवंशसंभवाची शक्यता म्हणून जी उल्लेखिली आहे ती येणेंप्रमाणेः– कुत्रा हा श्वानकल्प एकच प्राण्यापासून झाला नसून दोन निरनिराळ्या प्राण्यांचें गृहीकरण होऊन आज कुत्र्यांच्या जाती बनल्या आहेत असें कित्येक समजतात. कांहीं कुत्रें लांडग्यांच्या गृहीकरणानें झाले तर कांहीं खोकडांच्या गृहीकरणानें झालें. मनुष्याचें तसेंच झालें नसेल कशावरून? सफेद अदमी जरा अधिक विकसलेल्या वानरापासून झाला असेल आणि काला अदमी त्याहूनहि कनिष्ठ अशा मर्कटापासून झाला असेल असें कित्येकांचें मत आहे. मनुष्यप्राण्याचा विकास कोठें तरी एके ठिकाणीं (एकवंशसंभवमत खरें धरून चालल्यास) होऊन त्याचा प्रसार चोहोंकडे झाला आणि त्यानें अनेक संस्कृती निर्माण केल्या. या दीर्घ काळाचा इतिहास कसा जमवावयाचा? आज आम्हांस तो सर्व इतिहास देणें शक्य नाहीं. तो जमविण्यास शरीरलक्षणें, भाषा, भौगोलिक स्थान, चालीरीती इत्यादि प्रकारचीं साधनें आहेत. तीं फार काळजीपूर्वक वापरलीं मात्र पाहिजेत. त्या साधनांनीं इतिहास कसा जमविला जात आहे हें मात्र येथें दाखविलें जाईल.

**इतिहाससाधनांचें महत्त्वमापन.**– वर सांगितलेल्या कालाचा इतिहास जमविण्यास जीं आतांपर्यंत साधनें उपलब्ध आहेत त्या साधनांमध्यें भाषाशास्त्र अधिक महत्त्वाच्या अधिक पायऱ्या सांगेल अशी आमची समजूत आहे. शरीरलक्षणें कांहीं पुरावे देईल आणि अत्यंत प्राचीन काळापर्यंत देखील संशोधकास नेईल तथापि मनु-

घ्याचीं परिभ्रमणें आणि विविधकालचे त्याचे समुच्चय यांवर प्रकाश पाडण्यास शरीरलक्षणशास्त्र असमर्थ आहे. पण या शास्त्राचाहि उपयोग आहे. आजच्या पुराव्यावरून इतिहास लिहावयास कोणत्या गोष्टी अधिक कालपर्यंत टिकतात आणि कोणत्या गोष्टी कमी कालपर्यंत टिकतात हें पाहिलें पाहिजे, आणि त्यावरून कोणत्या पुराव्यास महत्त्व द्यावयाचें हें ठरविलें पाहिजे. आम्ही भाषाशास्त्रास फार महत्त्व देतों. तें देण्याचीं कारणें येणेंप्रमाणें:—

(१) निरनिराळ्या भाषांच्या रूपांत साहित्य फार विपुल आहे. आज सुमारें पांचशेंपेक्षां अधिक भाषा बोलल्या जात आहेत.

(२) लोकांची भाषा अजीबाद बदलणें ही गोष्ट फार कठिण जाते. पोषाख बदलतील, खाण्याचे पदार्थ आणि वेळा बदलतील, शासनसंस्था बदलतील, निवासस्थान बदलेल पण भाषा बदलणें म्हणजे अन्य भाषास्वीकार होणें त्याहून कठिण जाईल. कांहीं लहान सहान भाषा बोलणाऱ्या लोकांचा सदृश भाषा बोलणाऱ्या व अधिक महत्त्वाच्या लोकांशीं संबंध आला म्हणजे दुर्बलांच्या भाषेचा सहज लोप होतो. परंतु विसदृशांशीं संबंध आला म्हणजे भाषेचा लोप एकाएकीं होत नाहीं हें अनेक राष्ट्रांच्या इतिहासावरून दिसतें. राजकीय वर्चस्वामुळें केवळ भाषा बदलल्या असें दिसून येत नाहीं. भाषेची वाढ खुंटली असेल पण भाषा नष्ट होत नाहीं. कदाचित् एखादी भाषा बोलणारे लोक ज्या स्थानावर असतील त्या स्थानावर अन्य भाषा बोलणारे लोक येऊन त्यांचें संख्याधिक्य झालें तर स्थानिकांची भाषा नष्ट होईल; परंतु आपणांस वांशिक इतिहास लिहितांना अधिक-संख्याक लोकांकडे लक्ष द्यावें लागतें आणि त्या स्थानीं असलेल्या लोकांचें पितृत्व शोधावयाचें असेल तर भाषेच्या साहाय्यानें संख्याधिक्य असलेल्या लोकांचेंच पितृत्व आपणास शोधून मिळणार, व एखाद्या स्थानावरून ओळखल्या जाणाऱ्या लोकांच्या इतिहासार्थ तेंच आपणांस इष्ट आहे. निग्रोंची भाषा अमेरिकेंत बदलली म्हणून भाषा लवकर बदलते असें म्हणतां येणार नाहीं. निग्रोंची भाषा ज्या परिस्थितींत बदलली ती परिस्थितीच विलक्षण होती. निग्रो अगोदर निरनिराळ्या ठिकाणांपासून विकत घेतले होते त्यामुळें त्यांच्या भाषा मुळांतच एक नव्हत्या, आणि त्यांच्यामध्यें विवाहसंस्था गोऱ्यांनीं टिकूं दिली नाहीं. मग गृहसंस्था कशी टिकेल ? वाटेल तो निग्रो वाटेल त्यास विकावयाचा आणि गुलामांची पैदास मालकास हवी असेल त्याप्रमाणें करण्यासाठीं वाटेल तो पुरुष व वाटेल ती स्त्री यांचा संयोग घडवावयाचा या प्रकारच्या परिस्थितींत कोणतीहि भाषा टिकणें अशक्य आहे. जेथें लोकांचें समुच्चयरूपानें अस्तित्व आहे तेथें ते अल्पसंख्याक असूनहि त्यांची भाषा टिकते हें यूरोपांतील जिप्सी, पेनसिल्व्हॅनियांतील डच आणि लुइझियानांतील फ्रेंच आणि विस्कान्सिनच्या पूर्वभागांतील जर्मन लोकांच्या उदाहरणावरून दिसून येईल. तामिळ देशांत शेंकडों वर्षें राहिलेल्या आणि कोणत्याहि बाह्य बाबतींत तामिळ लोकांपासून अभिन्न दिसणाऱ्या सौराष्ट्रांची स्थिति पाहिली तर आपणांस असें दिसून येईल कीं, त्यांची भाषा जर निराळी नसती तर त्यांस आपण भिन्न आहों याची आठवणच राहिली नसती. यहुदी लोक व पारशी लोक यांची भाषा गेली हें प्रमाण पुष्कळदां पुढें आणण्यांत येतें, पण त्यांची कथा निराळी आहे. एक तर आज ज्यू म्हणून जे लोक म्हणवून घेतात त्या सर्वांची एक हिब्रू भाषा कधींच नव्हती, त्यांच्या भाषा भिन्न भिन्न होत्या, आणि त्यामुळें ग्रांथिक भाषा तेवढी शिल्लक राहिली. पारशांची गोष्ट अशी झाली कीं, ते जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांची भाषा आणि त्यांच्या पैतृक ग्रंथांची भाषा एक नव्हती, एवढेंच नव्हे तर पैतृक ग्रंथांच्याच भाषा अनेक होत्या, आणि त्यांनीं इराण ज्या कालीं सोडला त्यानंतर इराणचीच भाषा रूपांतर पावली आणि ते इकडे आले त्यावेळेस त्यांची संख्या फारच थोडी होती. त्यामुळें त्यांस स्थानिक भाषेचा स्वीकार करावा लागला. शिवाय त्यांच्या आगमनाला आज बाराशें वर्षें झालीं हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाय हेंहि लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, ते शुद्ध गुजराथी बोलत नसून गुजराथीचा एक अपभ्रंश बोलतात. त्यांना अजून 'ळ' उच्चारतां येत नाहीं. जेव्हां एखादे लोक आपली भाषा रक्षण करण्यास समर्थ असत नाहींत तथापि ते जुटीनें राहिलेले असतात, तेव्हां त्यांची भाषा स्थानिक न होतां पैतृक व स्थानिक यांच्यामधील कोणतातरी अपभ्रंश असतो. जिप्सींनीं आपली भाषा जिवंत ठेविली आणि पारशांनीं मरूं दिली या वरवर दिसणाऱ्या स्थितीचें अधिक खोल अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं पारशांस जिप्सींपेक्षां परदेशवास जास्त घडला. पारशांचा संबंध शहरांत जास्त आला आणि त्यामुळें त्यांचें सामाजिक पृथक्त्व कमी राहिलें. आणि जिप्सींच्या भाषेचा जिप्सीपणा रक्षण होणें आणि पारशांच्या भाषेचा पारशीपणा जाणें यांमध्यें फार मोठें अंतर नाहीं, म्हणजे स्वभाषारक्षणाच्या कामामध्यें जिप्सी पारशांपेक्षां फारसे अधिक यशस्वी झाले नाहींत. जिप्सींनीं आपल्या भाषेची वाक्यरचना अगदीं बदलून टाकून इंग्रजी भाषारचना घेतली आहे हें पहिल्या भागांत (पृ. २४९) दिलेल्या त्यांच्या भाषेंतील उताऱ्यावरून लक्षांत येईल. जेव्हां आपण आपल्याच भाषेंत अनेक परके शब्द घुसडूं लागतों तेव्हां आपल्या भाषेचा आपलेपणा वाक्यरचनेवरूनच सिद्ध होतो. आज आपण जेव्हां प्रचलित मराठी ऊर्फ घाणेरडें मराठी बोलतों तेव्हां आपण आपली वाक्यरचना व इंग्रजी शब्द यांचें मिश्रण वापरतों. उदाहरणार्थ, 'डिफेंडेंटनें अफिडाविट फाइल केलें नाहीं' अशा तऱ्हेची भाषा आपणांस कोर्टांत नेहमीं ऐकूं येते. तिला आपण मराठीच म्हणूं. 'पटेल हॅज नॉट मेड पक्का बंदोबस्त' हें इंग्रजी वाक्य आहे. या दृष्टीनें पाहतां जिप्सींची भाषा स्थानिकच आहे म्हणजे जिप्सींनीं स्थानिक भाषा घेऊन आपले शब्द पुष्कळ वापरले असें होईल. पारशांनीं यापेक्षां अधिक कांहीं निराळें केलें नाहीं. नवागतांची भाषा स्थानिक भाषेचें अपभ्रष्ट स्वरूप होतें, पण जातिभिन्नत्वानें भिन्न राहते; याला आणखी उदाहरण म्हटलें म्हणजे जर्मनीमधील व रशियांतील ज्यूंचें होय. यांची भाषा यिडिश आहे. ही भाषा जर्मन असून हिब्रू लिपींत लिहिली जाते आणि तींत हिब्रू शब्द पुष्कळ असतात. हिंदीचें हिंदुस्थानी हें जसें अपभ्रष्ट स्वरूप त्याप्रमाणें जर्मन भाषेचें यिडिश हें अपभ्रष्ट स्वरूप होय. माळव्यांत भिल्ली

आणि कोरकू म्हणून ज्या भाषा आहेत आणि यवतमाळकडे जी गोंडी सांपडते त्या माळवी व मराठी भाषांचीं अपभ्रष्ट स्वरूपें होत. जेव्हां दोन भिन्न भाषांचा संनिकर्ष होतो तेव्हां बलवान भाषेची रचना कायम राहते आणि दुर्बल राष्ट्र ती रचना घेतें व शब्द तेवढे आपले ठेवतें असें दिसतें.

(३) भाषाशास्त्राच्या अभ्यासानें मनुष्यसमुच्चयांचें साहचर्य, वियोग आणि भ्रमणें यांचा पत्ता लागतो. एखादी भाषा त्या भाषेशीं विसदृश अशा भाषांनीं व्यापिलेल्या प्रदेशांत दिसली तर ती तेथें नवीन आली असावी आणि त्या भाषेच्या नात्यागोत्याच्या भाषा जेथें असतील तेथून ती किंवा तिचें पूर्वरूप गेलें असावें अशी कल्पना होते. भाषेच्या शब्दसंग्रहाच्या अभ्यासानें ती भाषा बोलणाऱ्यांच्या संस्कृतीची व्यापकता समजते.

**मनुष्यभ्रमणाचा इतिहास.**— मानवकल्प प्राण्यापासून मानवविकास झाल्यानंतर मनुष्याचा जो इतिहास आपणांस दृष्टीस पडतो तो रचतांना ज्या गोष्टी आपणांस पहावयाच्या त्यांमध्यें मनुष्यभ्रमणाचा इतिहास ही एक होय. हा इतिहास पहातांना आपणांस एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. आजची पृथ्वीवरील जमीन आणि पाणी यांची विभागणी आजच्यासारखीच कित्येक हजार किंवा लाख वर्षांपूर्वी नव्हती. भ्रमणाचा इतिहास शोधतांना जीं प्रमाणें संशोधक घेतात त्यांमध्यें वनस्पति व पशु यांच्या गृहीकरणाचा इतिहास, भाषा, निवासस्थान यांसारख्या अनेक गोष्टींचा अन्तर्भाव होतो.

भाषेचा इतिहास आणि मानववंशाचा इतिहास हे सारखेच काय? एक भाषा जेव्हां अनेक लोकांमध्यें पसरते तेव्हां ते लोक त्या भाषेचेच होते असें धरावयाचें काय? वंश आणि भाषा यांचा संबंध जर ऐक्याचा नसेल तर भाषांच्या तत्त्वावर इतिहासाचे भाग पाडावयाचे यांत अर्थ काय? असे प्रश्न उत्पन्न होतात. यासाठीं भाषा आणि लोकसमुच्चय यांतील संबंध स्पष्ट केला पाहिजे.

एक भाषा जगांतील दुसऱ्या लोकांवर लादली जाते आणि या क्रियेनें भाषांचा प्रसार होतो याला उदाहरणें पुष्कळ आहेत. आज अमेरिकेंतील निरनिराळ्या भाषा बोलणारांचे वंशज इंग्रजीच बोलतात. आज ज्यांच्या पूर्वजांची भाषा इंग्रजी भाषेहून निराळी होती अशा लोकांचेंच अमेरिकेंत संख्याधिक्य सांपडेल. तथापि अमेरिकेंत सध्यां जशी परिस्थिति आहे तशी जगांत पूर्वी कधीं होती किंवा नाहीं याची शंका आहे. (१) आज पोट भरण्याचें साधन जमिनीशिवाय अन्य प्रकारचें पुष्कळ असतें, नवीन येणाऱ्या मनुष्यांनीं जुटीनें प्रदेश जिंकून जुटीनें राहणें अवश्य होत नाहीं. नवीन येणारीं माणसें मजूर म्हणून इकडेतिकडे पसरतात. (२) आजच्या शासनसंस्था मजबूत असल्यामुळें नवीनांस स्वारी करणें आणि जमीन काबीज करणें शक्य नाहीं (३) सार्वत्रिक शिक्षणपद्धतीमुळें नवागतास स्थानिक जनतेमध्यें विलीन होणें व महत्त्वास पोंचणें शक्य होतें. या प्रकारच्या परिस्थितीमुळें पैतृकभाषात्याग जितका आज सुलभ व सुखावह होतो तितका पूर्वी होत नसे. पूर्वींच्या काळांत एका जातीनें दुसरीची भाषा घेणें ही क्रिया आज अमेरिकेंत जितकी जलद होते तितकी जलद होत नसावी हें उघड आहे.

**(१) प्राणी व वनस्पती यांच्या गृहीकरणाच्या इतिहासाचें महत्त्व.**—गृहीकरण झालेल्या वनस्पतींचा व पशूंच्या प्रसाराचा इतिहास मानवेतिहासार्थ महत्त्वाचा आहे. पुष्कळदां आपणांस असें दिसून येतें कीं एखादी वनस्पति ज्या ठिकाणीं पिकविली जाते त्या ठिकाणची ती मूळची नसून कोठून तरी बाहेरून आलेली असावी. ती जर स्थानिक असेल तर आपणांस तीच वनस्पति वन्य स्वरूपांत त्या ठिकाणावरच दिसेल एवढेंच नव्हे तर तें वन्य स्वरूप ज्या इतर वन्य वनस्पतींशीं संबद्ध असेल त्या वन्य वनस्पतींची समृद्धि आपणांस आसपास सांपडेल; म्हणजे आंबा हें जर फळ हिंदुस्थानांतीलच असेल तर आंब्याच्या रानवट जातीहि आपणांस येथेंच सांपडतील आणि आंबा ज्या वनस्पतिवर्गांत मोडतो त्या वर्गांतील इतर वनस्पती देखील वन्य अगर गृह्य स्थितींत आपणांस या देशांतच सांपडल्या पाहिजेत. तसेंच गाय हिंदुस्थानांतील जर स्थानिक असेल तर गोसदृश दुसरे प्राणी आपणांस येथें सांपडले पाहिजेत किंवा गाईचें वन्य स्वरूप आपणांस येथें दृष्टीस पडलें पाहिजे. तसें स्वरूप दिसलें नाहीं तर तेवढ्यानेंच गाय येथील स्थानिक नाहीं असें मात्र सिद्ध होत नाहीं. कां कीं, ज्या पशूचें गृहीकरण अशक्य होईल तो पशु संहारून टाकावयाचा हाहि मानवस्वभाव आहे. तथापि गोसदृश वन्य स्वरूप जर दुसरीकडे कोठें सांपडत असेल तर त्याचें तेथें अस्तित्व गाईच्या स्थानिकत्वास विरोध करील. गृहीकरणाचा इतिहास हा मनुष्याच्या भ्रमणावर थोडा बहुत प्रकाश पाडील.

**(२) भाषेच्या भौगोलिक स्थानाचें इतिहासमहत्त्व.**— मनुष्यभ्रमण अजमावण्याची दुसरी पद्धति येणेंप्रमाणें. उदाहरणार्थ आफ्रिका खंड घ्या. आफ्रिका खंडामध्यें केप् टाऊनपासून सहाराच्या वाळवंटापर्यंत गेलें असतां आपणांस निरनिराळ्या भाषांचे पट्टे आढळतात. आफ्रिकेच्या दक्षिणभागाकडून मनुष्यभ्रमण झालें अशी कल्पना करतां येत नाहीं. कारण दक्षिणेकडे विस्तीर्ण समुद्र आहे. मानवी प्राण्याचा संचार उत्तरेकडून दक्षिणेकडेच झाला असावा असें दिसतें. असें असतां स्वाभाविक कल्पना अशी होते कीं जे लोक अगदीं दक्षिणेकडे आहेत त्यांचें आगमन अगोदर झालें व जे उत्तरेकडे आहेत त्यांचें आगमन नंतर झालें. तसेंच एखादे विशिष्ट लोक भोंवतालच्या लोकांच्या संस्कृतीहून निराळे आणि भाषेनेंहि भिन्न व दुर्गम स्थळीं असले तर अशी स्वाभाविक कल्पना होते कीं दुर्गम जागीं असलेले लोक आसपासच्या सखल प्रदेशांतील लोकांपेक्षां त्या प्रदेशांत अगोदर आले असावेत, आणि त्या प्रदेशांत आलेल्या नवीन लोकांनीं त्यांस सखल प्रदेशांतून हांकून दिल्यामुळें त्यांस दुर्गम जागीं जावें लागलें असावें.

**जातीचें सामाजिक स्थान व त्याचें ऐतिहासिक महत्त्व.**— जेव्हां एखादा मोठा प्रदेश दोन निरनिराळ्या जातींनीं

व्यापिला असेल आणि त्या दोन जातींपैकीं एक जात सामाजिक उच्चपदावर असेल तेव्हां अशी कल्पना करतां येईल कीं जेतृवर्ग उत्तरकालीन होय.

या प्रकारच्या विचारपद्धतीनें मानवी प्राण्याच्या संचारांचा इतिहास लिहितां येण्याजोगा आहे; परंतु या प्रकारचा इतिहास लिहिण्याचा अचाट परिश्रम अद्यापि कोणीं केला नाहीं. भूस्तरशास्त्रामध्यें देखील पृथ्वीचा साकल्यानें इतिहास अजून लिहिला गेला नाहीं. पुष्कळ ठिकाणचे भूस्तर अभ्यासिले गेले आहेत पण सर्व जगाच्या भूपृष्ठाचें साकल्यानें ऐतिहासिक वर्णन देणारा शास्त्रज्ञ अजून निघाला नाहीं. त्या प्रकारचा प्रयत्न मनुष्यप्राण्याच्या इतिहासास अत्यन्त अवश्य आहे. त्याशिवाय मनुष्यप्राण्याचे निरनिराळ्या थरांत सांपडणारे अवशेष आणि सध्यांचें विस्तरण यांची संगति लागणार नाहीं व यासाठीं मनुष्याच्या या मधल्या लाखों वर्षांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यास आज आरंभ झाला आहे असें देखील म्हणतां येत नाहीं. प्राचीन मनुष्येतिहासाचें साहित्य येणेंप्रमाणें.

(१) पृथ्वीच्या अनेक थरांत सांपडणाऱ्या मनुष्यांचे अवशेष, आणि त्यांची निरनिराळ्या काळच्या मनुष्यकल्प प्राण्यांशीं तुलना.

(२) भाषासाहित्य आणि त्यावरून निघणारे मनुष्यभ्रमणविषयक सिद्धांत.

(३) मनुष्याच्या प्रयत्नामुळें भोंवतालच्या पाशवी आणि वानस्पत्य सृष्टीवर झालेले परिणाम.

(४) मनुष्याचें आनुवंशिक स्वरूप.

यांपैकीं पहिलें साहित्य म्हणजे मनुष्यप्राण्याचे अवशेष हें वस्तुविरहित क्वचित् सांपडतें. त्यांच्याभोवतीं कांहीं हत्यारें, ग्राम्य पशूंचे अवशेष वगैरे सांपडतात. आणि त्यांवरून कांहीं माहिती उपलब्ध होते.

भाषेचें साहित्य दोन तऱ्हांनीं उपयोगी पडतें. एक तर अनेक भाषांच्या सादृश्यविसादृश्यावरून व विकासावरून मनुष्यांचीं नातींगोतीं समजतात, आणि त्या भाषेंतील शब्दसंग्रहावरून संस्कृतीविषयीं अंजमास करतां येतो.

मनुष्याचें आनुवंशिक स्वरूप त्याचा इतिहास ठरविण्यासाठीं कितीसें उपयोगांत आणावयाचें हा एक प्रश्न आहे.

शरीरलक्षणांवरून मनुष्यांचें वर्गीकरण पुष्कळदां करण्यांत येतें. हें वर्गीकरण तपासतांना नेहमीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं वर्गीकरण हें ध्येय नसून मनुष्याच्या वांशिक इतिहासाचें तें केवळ साधन आहे. शरीरलक्षणांचा जे लोक अभ्यास करतात त्यांची आपल्या साहित्याचा गौरव करून भाषाशास्त्रास कमी महत्त्व द्यावें अशी बुद्धि होते. भाषाशास्त्रज्ञांची शरीरलक्षणांस महत्त्व कमी देण्याची बुद्धि होते. परंतु मानवेतिहासशास्त्रास दोहोंचीहि जरूर आहे.

मानवशास्त्रज्ञांमध्यें शरीरलक्षणशास्त्रज्ञांचें आणि भाषाशास्त्रज्ञांचें एकमेकांशीं तंटा करण्याचें काम नाहीं. इतिहास लिहितांना शरीराच्या ठेवणीपेक्षां भाषांनीं केलेली लोकव्याप्ति हीच जास्त उपयोगी होईल. भाषेनें विशेष लोकसमुच्चय व्यापावा याला कारणें दोन असणार. एक तर वांशिक कारण आणि दुसरें राजकीय कारण. भाषा दोन क्रियांचा बोध करील. ती विशिष्ट प्रदेशांतील लोक एका वंशांतील होते असें म्हणेल किंवा एका राज्यछत्राखालीं होते असें दाखवील. म्हणजे ती वांशिक समुच्चय किंवा राजकीय समुच्चय पण कोणता तरी निश्चित समुच्चय दाखवील. तो समुच्चय कोणत्या काळाचा हें ठरविणें हें पुढील काम आहे. शरीरलक्षणें वांशिक समुच्चय फार तर दाखवितील, किंवा एकस्थानमूलकता म्हणजे एकपरिस्थितिपरिणाम दाखवितील.

इतिहासाचा मुख्य प्रश्न हा आहे कीं, कोणत्या काळांत आणि कोणत्या स्थळांत शरीरलक्षणदृष्टसमुच्चय बसवितां येतो हें पहाणें. भाषेच्या दृष्टीनें जे समुच्चय दिसतात त्यांचें देखील कालस्थलनियमन करणें अवश्य आहे. शरीरलक्षणें राजकीय समुच्चयाचीं द्योतक नाहींत. या इतक्या गोष्टी पक्क्या लक्षांत ठेवल्या म्हणजे वंशविषयक इतिहासामधील गोंधळ बराचसा कमी होईल.

**विविध शरीरलक्षणें व भाषा यांची संगति.**– वंशनिर्णयार्थ आपणांस असें पाहिलें पाहिजे कीं, विशिष्ट भाषांचा आणि विशिष्ट शरीरलक्षणांचा संबंध जुळवितां येतो काय? हा संबंध जुळविण्यासाठीं मनुष्याचें शरीरलक्षणांवरून वर्गीकरण अवश्य होतें; व शरीरलक्षणांनीं वर्गीकरण करतांना विशिष्ट लक्षणांची चिराचिरता पहावी लागते. तीं पाहून शरीरलक्षणशास्त्राची रचना करावी आणि भाषा आणि शरीरलक्षणें यांचें ऐक्य कोठें कोठें दिसतें तें पहावें. शरीरलक्षणांचा इतिहास लिहितांना अर्थात् प्रारंभ मनुष्याच्या मानवकल्प पूर्वजापासून केला पाहिजे. शरीरलक्षणांच्या साहाय्यानें कांहीं इतिहास मिळवितां येईल आणि कांहीं भाषासाहित्याच्या साहाय्यानें मिळेल, आणि कांहीं ठिकाणीं या दोहोंची संगतिहि दिसून येईल.

मानवेतिहासार्थ प्रयत्न करणारे जे अनेक ग्रंथकार आहेत त्यांमध्यें बरेच मतभेद आहेत. आम्ही येथें प्राचीन मानवेतिहासविषयक कीनचीं+ मतें देतों. कीनचें भारतीय रक्ताच्या घटनेसंबंधानें मत मागें (विभाग १ पृष्ठ ८१ पहा) दिलेंच आहे. भौतिक शोधांवरून शास्त्रज्ञांनीं बनविलेल्या प्राणिवर्गाच्या आणि त्यांतल्यात्यांत सस्तन प्राण्यांच्या सोपानपरंपरेंत मनुष्यप्राण्याचें स्थान कोणतें आहे व विशिष्ट रीतीनें मर्कटादि मानवकल्प प्राण्यांशीं मनुष्याचें नातें काय आहे हें ठरविणें हें भौतिक मानवशास्त्राचें अभ्यासक्षेत्र गणलें जातें. मानवशास्त्रांत मनुष्याचें प्राचीनत्व, मूलवंश, निरनिराळे मानववंश ओळखण्याचीं चिन्हें, त्यांचें मिश्रण, भाषेची उत्पत्ति, भिन्न भाषांचा विकास, भाषांवरून मानववंश ओळखणें, बाह्य परिस्थितीचा मानववंशावर व त्यांच्या विकासावर होणारा परिणाम, कुटुंब, गोत्र, जमात, राष्ट्र इत्यादिकांच्या घटनेचा इतिहास इत्यादि विषय येतात.

+ Ethnology by A. H. Keane.

**मानववंश**:—मानववंश हा शब्द डार्विनच्या§ मताप्रमाणें मानवसदृश प्राण्यांची एका पोटजात ( Variety ) यास अनुलक्षून वापरला आहे.

**मानवाचें प्राणिपरंपरेंत स्थान**.—प्राणिशास्त्रांतील वर्गीकरणाप्रमाणें मनुष्य हा सस्तन प्राण्यांच्या वर्गांत असून व्यक्त अशा शब्दोच्चारणामुळें तो इतर प्राण्यांहून भिन्न झाला आहे. मनुष्य हा विचारशक्ति व स्पष्ट शब्दोच्चारणाची शक्ति यांहीं युक्त असा प्राणी आहे.

**मानवाचा विकास**.— मनुष्य हा मानवसदृश मर्कटापासून विकास होऊन उत्पन्न झालेला नाहीं तर एका पूर्वजापासून मनुष्य व मानवसदृश मर्कट हे दोन्हीहि उत्पन्न झाले असावे.

**मानवाच्या मेंदूची वाढ**.—मर्कटाशीं तुलना करितां मनुष्याचा मेंदु १:३ या प्रमाणांत असतो. पूर्वी कवटीच्या आकारावर मेंदूची व त्यामुळें मानसिक शक्तीची इयत्ता ठरवीत असत, परंतु कवटी मोठी असणें हें शरीराच्या वृद्धीचें अंग असल्यामुळें त्यामध्यें व मानसिक उन्नतीमध्यें कोणत्याहि रीतीचा संबंध नाहीं. कवटीच्या ऐवजीं मेंदूचें व विशेषतः मेंदूंतील पांढऱ्या पदार्थाच्या आवर्तांचें परीक्षण करणें जास्त आवश्यक आहे. अलीकडे तर कित्येक शास्त्रज्ञ असें म्हणूं लागले आहेत कीं, मेंदूचा मनाशीं संबंध नसून मनाचें स्थान कुंडलिनी आहे.

**मानवाचें प्राचीनत्व व भूस्तरशास्त्रविषयक सिद्धांत**.— भूस्तरशास्त्रवेत्ते पृथ्वी थंड झाल्यापासून आतांपर्यंतचा काल १०कोटी वर्षें मानतात, पदार्थविज्ञानशास्त्रानुयायी ज्योतिःशास्त्रज्ञ २ कोटी वर्षें मानतात. दोहोंतील मध्यम मान धरल्यास ५ कोटी येतील. यांतील चार युगांचा परस्पर सापेक्षकाल, प्रथमयुग शें. ७९; द्वितीय युग शें. १४; तृतीय युग शें. ६ व चतुर्थ युग शें. १ असा येतो.

तृतीय युगांत मगर, कांसवें व हल्लींचे बहुतेक सस्तन प्राणी होते. प्रथम गिबनसारखे मर्कट होते, नंतर ड्रायोपिथिकस मर्कट होते व त्यानंतर मानवसदृश मर्कट विकास पावले व त्यांपासून आद्य मनुष्य पुढील युगांत विकास पावला. या युगांत आयर्लंड व अमेरिका जोडलेलीं होतीं. या युगाचा कालावधि ३० लक्ष वर्षांचा आहे.

चतुर्थ युगांत जमीन व पाणी हीं हल्लींच्या ठिकाणींच होतीं. उत्तरगोलार्धांत दोन तीन हिमयुगें अनुभूत होऊन त्या हिमयुगांच्या दरम्यान उष्ण असे हिमयुगांतरकाल (मध्यकाल) होते. या हिमयुगांच्या अनुषंगानें अनेक ठिकाणीं जमीन उन्नत होऊन नवीन प्रदेश उत्पन्न झाले.

या कालांत पुरातन अश्मयुगांतील मनुष्य सर्व प्रदेशांवर पसरलेला होता. त्याची कलांमध्यें थोडीशी प्रगति झाली होती.

नंतर हिम नाहींसे होऊन नूतन अश्मयुगांतील मनुष्य दृगोचर होतो व तो बराच सुधारलेला दिसतो. पूर्व गोलार्धांत त्याची प्रगति विशेष होऊन तो कांस्य, लोह, ताम्र या धातूंचीं कामें करूं लागला. या युगाचा कालावधि ६ लक्ष वर्षांचा आहे.

यानंतरचा आधुनिक काल असून याचा अवधि शास्त्रज्ञ १० हजार वर्षांचा धरतात.

**हिमयुग**.— हिमयुगापूर्वीं मनुष्यसदृश प्राणी ड्रायोपिथिकस वगैरे तृतीय युगाच्या मध्यास दृष्टीस पडतात. त्याच वेळीं मनुष्याचा पूर्वज अधिष्ठित केला पाहिजे. हिमकाल हा डॉ. क्रोलच्या मतानें गणिताधारानें २½ लक्ष किंवा १० लक्ष वर्षांपूर्वी सुरू झाला असला पाहिजे पैकीं २½ लक्ष हा काल ग्राह्य दिसत नाहीं, व हिमकालापूर्वी मनुष्याचें अस्तित्व दृष्टीस पडतें. यावरून दोन हिमयुगें व मध्यंतरीं हिमयुगांतर उष्णकाल मानावा लागतो. याखेरीज इंग्लंडमधील शीत व उष्णकटिबंधांतील प्राण्यांचें समकालीन अस्तित्व अतर्क्य होतें. उष्ण प्रदेशांतील प्राणी स्थलांतर करितात अशीहि कल्पना मांडली गेली आहे तथापि या कल्पनेपेक्षां दोन हिमकालांमध्यें एक उष्ण हिमांतरकाल होता ही कल्पना जास्त सयुक्तिक आहे. तसेंच नदीकांठचे पुरलेले अवशेष कोणत्या कालचे हें ठरवितांना वरील मातीच्या थराप्रमाणेंच खालील नदीच्या खोलीचाहि विचार केला पाहिजे.

**आद्यमानव**.— बहुतेक शास्त्रज्ञ दोन हिमयुगांतील उष्णकालांत कमींत कमी ५ लक्ष वर्षांपूर्वी मानव होता असें धरतात, व तृतीय युगांत मानवसदृशमर्कटापेक्षां जास्त विकास झाला नव्हता असें म्हणतात.

**मानव व मर्कट**.— मनुष्याचें मानवसदृश मर्कटाशीं पुढील बाबतींत साम्य आहे. ( १ ) शरीराची सामान्य रचना ( २ ) पुच्छाचा अभाव ( ३ ) हात व पाय यांचीं स्पष्ट दिसणारीं अवयवाचीं चिन्हें ( ४ ) दांतांची रचना ( ५ ) कानाचीं पाळें ( ६ ) मेंदूची रचना ( ७ ) हायॉइड नांवाचें हाड ( ८ ) सदृश यकृत व कीकस. पुढील बाबतींत भेद दिसतो. ( १ ) मानवसदृश मर्कटांचा मेंदू लहान असतो व मेंदूची पेटी लहान असते ( २ ) मनुष्याच्या पाठीचा कणा डोकें वर राहण्याकरितां विशिष्ट तऱ्हेचा केलेला असतो ( ३ ) मनुष्याचे पाय हाताच्या मानानें लांब असतात ( ४ ) पायाचा अंगठा मनुष्यामध्यें लांब असतो. ( ५ ) मनुष्याचें नाक स्पष्ट वर आलेलें व उन्नत असतें. ( ६ ) मनुष्याचे दांत सारखे जुळलेले असतात व सुळे स्पष्ट व निराळे असतात. ( ७ ) मनुष्याची हनवटी स्पष्ट दिसते ( ८ ) मनुष्याच्या सर्व अंगावर केश नसतात ( ९ ) मनुष्याचा आवाज स्पष्ट असून शब्दोच्चारण भाषा उत्पन्न होईल असें असतें.

**मानवाचें मूलस्थान व प्रसार**:— मागें मनुष्य एक प्राण्यापासून झाला अगर दोन प्राण्यांपासून झाला यावर मतभेद आहे असें सांगितलें. कीन एकच मानवकल्प प्राण्यापासून मनुष्य विकासला असें समजतो. त्याच्या मतानें तृतीय युगांतील मानवाचा पूर्वज एकच होता तेव्हां त्याचें मूलस्थानहि एकच असलें पाहिजे. त्या वेळीं आफ्रिका व न्यूझीलंड हीं एकमेकांस जोडलेलीं होतीं, यूरोप व आफ्रिका हीं भूमध्यसमुद्रामध्यें जमीन असल्यामुळें जोडलेलीं होतीं. अमेरिका व आशिया यांमध्येंहि संबंध होता यामुळें तत्कालीन मानवाचें परिभ्रमण सर्व खंडामध्यें होणें शक्य होतें. कान्नफाज हा

§ Descent of Man, by Charles Darwin.

वरील इंडो-आफ्रिकन खंड मानीत नाहीं व मानवाचें मूलस्थान मध्य-आशियांतील पठार मानतो; पण त्या ठिकाणाहून मानवाचा सर्व खंडांत प्रवास होणें डॉ. कीनला असंभवनीय दिसतें.

**मानव, लिमर व मर्कटः**– मानवसदृश मर्कट व मानव यांमधील दुवा अद्यापि सांपडला नाहीं. हा कदाचित् लुप्त झालेल्या खंडांत असेल. मादागास्करमध्यें कांहीं लिमर अद्यापि सांपडतात व त्यासभोंवतालच्या देशांत त्यांचे पूर्वज आढळतात. मानवसदृश मर्कटहि येथेंच सांपडतात व शिद्दीवंशाचे दोन पोटविभागहि येथेंच सांपडतात. तेव्हां मानवाचें मूलस्थान याच खंडांत मानलें पाहिजे, असें कीनचें म्हणणें आहे; परंतु याविषयीं सर्व शास्त्रज्ञांचें एकमत नाहीं (पृ. ४३ विभाग पहिला पहा.) मानवाचा पूर्वज उष्णकटिबंधांत राहणारा, झाडांमध्यें वसति करणारा व केंस अंगावर असलेला असा होता व हेंच वर्णन लिमर यास लागू पडतें. शिद्द्याचा कृष्णवर्ण नैसर्गिक नसून हवामानामुळें प्राप्त झालेला अतएव कृत्रिम असावा; कारण कांहीं शिद्दी काळे नसून पिंवळे असतात, आस्ट्रेलियनांचीं मुलें जन्मतः पिंवळ्या व पिंगट वर्णाचीं असतात, तिबेटी लोकांचे केंस प्रथम पिंगट व नंतर काळे होतात.

## मानववंशाचा विस्तार आणि विशिष्टीकरण.—

मानवाचें मूलस्थान कोणत्या तरी सध्यां दिसणाऱ्या भूभागावर किंवा लुप्त खंडांत असून तेथून तो सर्व खंडांत गेला व तेथील हवामानाप्रमाणें त्यांत फरक पडून चतुर्थ युगांत भिन्न वर्णांचे पूर्वज तयार होऊन हल्लींचे मूलवंश निर्माण झाले, म्हणजे मानवसदृश मर्कटापासून विकास पावलेल्या तृतीय युगांतील एकाच नमुन्यापासून विकास पावून चतुर्थ युगांतील अनेक भिन्न वंशांचे पूर्वज तयार झाले हा विचार सर्वमान्य आहे. फ्लावर व लिडेकर यांच्या मतानेंहि प्राथमिक मनुष्य सर्व एक असून सारखेच होते व भिन्न प्रदेशांत गेल्यामुळें त्यांत फरक पडत गेले. मात्र हे शास्त्रज्ञ तीन मानववंश मानून अमेरिकन लोकांस मांगोलियन वंशांत घालतात. पण मांगोलियन व अमेरिकन यांत बरेंच भिन्नत्व आहे. एकंदरींत लिने याचें कॉकेशियन, मांगोलियन, इथिओपियन अथवा शिद्दी, व अमेरिकन् असे चार वर्ग एका मूलवंशापासून उत्पन्न झाले हें मत कीन यास ग्राह्य दिसतें. बर्निअरनें प्रथम मूलवंशाचे चार वर्ग केले (१) श्वेत यूरोपीय (२) कृष्णवर्ण शिद्दी (३) पीतवर्ण आशियांतील मनुष्य व (४) लॅप. ब्लूमनबाक यानें पांच वर्ग केले (१) कॉकेशिअन (२) मांगोलियन (३) इथिओपिअन (४) अमेरिकन व (५) मलें. क्यूव्हिएनें तीनच वंश मानिले. देस्मूलँ यानें दोनच वर्ग केले व देमूले यानें सोळा वंश कल्पिले. यानंतरहि निरनिराळ्या शास्त्रज्ञांनीं निरनिराळीं अनुमानें काढलीं व भाषाशास्त्रज्ञांनीं तौलनिक अभ्यासानें ह्या प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. पुढें प्रिचर्ड व वकन यांनीं मस्तकमापनशास्त्राच्या आधारानें तौलनिक अभ्यास करून मानववंशशास्त्राचा पाया घातला. या शास्त्रांतील शोध लावण्यांत ब्रोका, क्वात्रफाज, टापीनार्ड, हक्सले वगैरे अनेक शास्त्रज्ञ पुढें आले. यांनीं केलेलीं निरनिराळीं वर्गीकरणें प्रसिद्ध आहेत. तीं करण्यांत त्यांनीं कातडीचा वर्ण, केंसांची रचना व कवटीचा आकार या गुणांस विशेष प्राधान्य दिलें आहे. या तऱ्हेनें वर्गीकरण करून (१) शिद्दी (२) मांगोलियन (३) अमेरिकन (४) कॉकेशियन असे चार मानववंश मानले आहेत त्यांचें वर्णन पुढें दिलें आहे.

**१. शिद्दी अथवा इथिओपियन.**–हा वंश मूलस्थानापासून जवळच आफ्रिकेंत व ऑस्ट्रेलियामॅलेशियाकडे गेला. ह्याचे प्रथम आफ्रिकेंतील व इंडो-ओशियानियांतील असे दोन वर्ग झाले. यापैकीं दुसरा नेग्रिटो नांवाचा असून तो प्राथमिक नमुन्याशीं जास्त लगत व ठेंगणा आहे. हे नूतन अश्मयुगाच्या किंचित् पूर्वी यूरोपमध्यें गेले. यांच्या पोटजाती म्हटल्या म्हणजे कांगो नदीच्या दक्षिणेस बटवा, बुशमन, हटेंटाट, बंटू, डॅमेरा, कोराना, ग्रिका, गोनाका इत्यादि होत. यांमध्यें थोडाफार फरक असतो. क्वात्रफाज यानें नेग्रिटोव्याप्त प्रदेशांत हिंदुस्थानाचा समावेश केला आहे; पण द्राविड लोक हे नेग्रिटोंची पोटजात होऊं शकत नाहींत. याविषयीं प्रो. बोल म्हणतात "माझ्या कित्येक वर्षांच्या प्रवासांत मद्रासचा उत्तरभाग, बंगाल व मध्यप्रांत यांमध्यें नेग्रिटो जातीच्या नमुन्याचा मनुष्य मीं कोठेंहि पाहिला नाहीं. कुरळ्या केंसांच्या व्यक्ती क्वचित् आढळतात. परंतु यावरून सर जार्ज कॅंबेलप्रमाणें हा नमुना नेग्रिटोचा अवशेष आहे असें म्हणण्यास मी तयार नाहीं." इंग्लंडचा वायव्य भाग, स्कॉटलंडचा पश्चिमभाग व आयर्लंडचा पूर्वभाग यांत नेग्रिटोंची वस्ती होती असें कांहीं इंग्रज मानवशास्त्रज्ञ म्हणतात.

यावरून इंडो ओशियानिक नेग्रिटो ही शब्दयोजना गाळून टाकून ओशियानिक नेग्रिटो असें म्हटलें पाहिजे. यांचा मूळचा पिंवळा रंग जाऊन काळा किंवा गहिरा तपकिरी रंग आलेला आहे. हल्लीं हे अंदमान, मलय द्वीपकल्प, फिलिपाइन बेटें व न्यू गिनी या प्रदेशांत सांपडतात. मलय द्वीपकल्पांतील नेग्रिटोंमध्यें मर्कटसदृशत्व सर्वांत अधिक दिसतें.

आफ्रिकेंतील शिद्द्यांपेक्षां ओशियानियांतील शिद्दी जास्त ठेंगणे असतात, त्यांचें नाक मोठें असतें व मुद्रा सौम्य असते. या दोन शाखांत पूर्वेकडील शाखा जास्त बुद्धिवान् आहे, व स्वतःच सुधारणा करून घेण्यास पात्र आहे; पण शिद्दी ही जात परकीय मिश्रणाशिवाय सुधारणें अशक्य आहे असें कीनचें मत आहे पण त्यास श्वेतवर्ण कॉकेशन व कृष्णवर्ण शिद्दी यांचें मिश्रण होऊन उत्तम प्रजा उत्पन्न होईल किंवा नाहीं याविषयीं शंका आहे.

यांची आजपर्यंत सुधारणेमध्यें फारच अल्प प्रगति झाली आहे. अमेरिकेंतहि उपाहारगृहांतील नोकराच्या वरच्या पायरीवर हे फारसे गेलेले नाहींत.

शिद्दींचे भाषेच्या तत्त्वावर सुदानी व बांटू असे दोन विभाग करितात. सुदान हें शिद्दी वंशाचें मूलस्थान मानतात व येथें पूर्ण



अरब (सेमेटिक).



चिनी ( मांगोलियन ).



माओरी ( पोलिनेशियन ).



निग्रिलो ( आफ्रिकन ).




अमेरिकन् इंडियन्.




उत्तर आस्ट्रेलियन.

२० व्या पृष्ठासमोर.




वेदकालीन आर्यावर्त.



उत्तर हिंदुस्थानांतील द्रविडागमनपूर्व लोकांच्या स्मारकशिला.



हिमालयांतील प्राक्कालीन अनार्य लोकांच्या घराचे नमुने

शिद्दीवंशाचा नमुना आढळतो. परंतु सुदानमध्यें मिश्र जातीहि आढळतात त्याः तुकूलअर, सोनरे, सुदानी, हौसा, बोर्नू, बघिरमी, साबा, बासे, वारिआ, शांगाला इत्यादि होत.

सुदानच्या दक्षिणेस वंटूचा प्रदेश आहे. येथेंहि कांहीं शुद्ध शिद्दी जमाती आहेत. मिश्रवंटूमध्यें झुलु–काफीर ही जात विशेष प्रागतिक दिसते. परकीयांच्या स्वाऱ्यांमुळें यांत बरेंच मिश्रण झालें आहे.

ओशियानियांतील शिद्दी लोकांतहि प्राचीन कालीं दळणवळण-सौकर्यामुळें आफ्रिकेपेक्षांहि जास्त संमिश्रण झालें आहे.

नेग्रिटोशिवाय इतर ओशियानियांतील शिद्दींचे दोन वर्ग करतां येतील. एक ओशियानियांतील लहान बेटांत राहणारे व दुसरे टॅसमानियांत राहणारे मिश्र शिद्दी. पहिल्या वर्गास पाप्युअन म्हणतात. हा नमुना बऱ्याच बाबतींत आफ्रिकन शिद्द्यांशीं जुळतो पण कांहीं बाबतींत भिन्न आहे. यांची मूळ भाषा मलायी–पॉलिनेशिअन ही असून यांच्या पोटजातींत इच्या शाखा प्रचलित आहेत. याशिवाय मादागास्करमधील मलायी–मलागासी, पूर्वद्वीपसमूहांतील मलायी, मॅलेनेशियांतील शिद्दी यांच्या भाषाहि हिच्याच शाखा आहेत. ही भाषा कॉकेशिअन वंशापैकीं पॉलिनेशिअन लोकांनीं या लोकांवर नूतन अश्मयुगांत इकडे येऊन लादली असें मत आहे.

ऑस्ट्रेलियांत दोन नमुने मानावे लागतात. यांचा मूलवंश शिद्दी असावा. येथील शिद्दी सामान्यतः इतर शिद्द्यांप्रमाणेंच आहेत. आस्ट्रेलियांत न्यूगिनी व मॅलेसिया यांमधून पाप्युअन आले असें रे. मॅथ्यू यानें सिद्ध केलें आहे. नंतर येथून ते टॅसमानियांत गेले. यांत कांहीं हिंदुस्थानांतून आलेल्या द्राविडांचेंहि मिश्रण झालें आहे. तसेंच मॅले लोकांचेंहि मिश्रण झालें असलें पाहिजे. द्राविड हे काकेशिअन वंशाचे मानले पाहिजेत. टॅसमानिअन लोकांची संस्कृति यूरोपीय पुरातन अश्मयुगीन संस्कृतीच्या बरोबरीची आहे. हे 'अश्मयुगाचे जिवंत नमुने आहेत' असें प्रो. टायलर म्हणतो.

**मंगोलियन मानववंश.**– या वंशाचें मूलस्थान मध्य आशिया हें होय. इंडोआफ्रिकन खंड अस्तित्वांत होतें त्या काळीं हिमालयाची अधिकतम उंची २०००० फूट होती. तिबेट जलमय होतें त्यामुळें मध्य आशियांत तृतीय युगांत मनुष्यास येणें सुलभ होतें. कात्रफाजच्या मतें मांगोलियन मनुष्य शिद्द्यापेक्षांहि मूलपूर्वजाच्या जास्त जवळ आहे. मर्कटसदृशत्वाचीं चिन्हें शिद्द्यामध्यें कवटीचा आकार, पुढें आलेला जबडा, आजानुबाहू व पायाची अतिशय पातळ पोटरी हीं आहेत. यावरून तो वंश प्रथम विकास पावला असें निश्चितपणें मानतां येईल किंवा नाहीं याबद्दल संशय आहे. म्हणूनच भिन्नवंशाची स्वतंत्र रीतीनें समकालीन उत्पत्ति मानणें सयुक्तिक आहे, कारण प्रत्येक वंशांत मूळ पूर्वजाचे कांहीं विशिष्ट गुण असतातच. मांगोलियन वंशाचें पृथक्त्व, कातडीचा पिंवळा वर्ण, रुंद व चपटे चेहऱ्याचे अवयव, पुढच्या बाजूस वर आलेलें गालाचें व लहान गालाचें हाड, लहान व मध्यम लांबीचें नाक, मध्यमप्रक्षेपण असलेला जबडा, रुंद डोकें, भ्रूतोरणिका व भ्रूमध्यकूर्च अपूर्ण वाढलेला, खोल गेलेले व बदामाच्या आकृतीचे डोळे, डोळ्याच्या आंतील कोपऱ्यावरील घडी व बाहेरची बाजू उठावून दिसणारी या गोष्टींत आहे.

अमेरिकन शाखा विभक्त झाल्यानंतर मूल मांगोलियन वंश सर्व आशियाभर पसरून नंतर मॅलेशियांत गेला व नूतन अश्मयुगांत त्यानें यूरोपांत प्रवेश केला. कॉकेशन वंशहि याच वंशाप्रमाणें दूरवर पसरल्यामुळें त्याचें अनेक ठिकाणीं मिश्रण झालें आहे. या मिश्रणाचीं उदाहरणें मलेशियांतील इंडोनेशियन, मेसापोटेमियांतील अक्कड, हिंदुस्थानांतील कांहीं द्राविड, फिन व तुर्क हीं आहेत. अशा मिश्र जातींचें वर्गीकरण जो अंश जास्त प्रमाणांत असेल त्यावरून अगर भाषेच्या साहाय्यानें करावें लागतें.

या वंशाचे दोन मुख्य विभाग मांगोलोतार्तर व इंडोचायनीज असे आहेत. या वंशाविषयीं ऐतिहासिक माहिती अक्कड लोकांच्या बाबिलोनियन साम्राज्यापासून मिळूं लागते.

मंगोलो–तार्तर या शब्दापेक्षां मंगोलोतुर्क हा शब्द अधिक सार्थ आहे. याच अर्थी उरल अलताइक हा शब्द कांहीं शास्त्रज्ञ वापरतात. चेंगिझखान यानें तार्तार व मोंगल लोकांस एकत्र करून त्यांचें एक राष्ट्र बनविलें व पुढें त्यांनीं १४५३ मध्यें कान्स्टँटिनोपल घेऊन तुर्की साम्राज्य स्थापन केलें.

फिनिश.– हे लोक मांगोलियन आहेत कीं कॉकेशियन आहेत याबद्दल वाद आहे. यूरोपांतील फिन लोकांचें कॉकेशियन लोकांशीं बरेंच मिश्रण झालें आहे पण त्यांची भाषा उरल अलताइक भाषेची शाखा असल्यामुळें ते मंगोलवंशाचेच असले पाहिजेत. सायबेरीयांतील लोक व सामोयिड यांत सर्व चिन्हें मांगोलियन वंशाचीं आहेत. उग्रियन, व्होगल व ओस्तिॲक यांचे कांहीं गुणधर्म भिन्न आहेत. लॅप व बाल्टिक फिनिश जातींत इतर जातींच्या मिश्रणानें कांहीं फरक झाले आहेत.

ॲव्हर, मग्यार व बुल्गार.– ॲव्हर, मग्यार व बुल्गार या तीन फिनोतार्तार जाती असून त्यांत फार फेरबदल झाले आहेत. ॲव्हर हे कॉकेशनशीं तादात्म्य पावले. मग्यार लोकांनीं आपली फिनो तुर्की भाषा कायम राखली पण त्यांची चेहरेपटी बदलली. बुल्गार लोकांनीं स्लाव्ह भाषा स्वीकारली पण त्यांत कांहीं फिनो–तुर्की गुणधर्म शिल्लक आहेत.

ओस्मानली तुर्क या जातींतहि मंगोलियन गुणधर्म मिश्रणामुळें बरेच नष्ट झाले आहेत; परंतु त्यांची भाषा उरल–अलताइक भाषेची शाखा आहे. ते सायबेरियांतील अमूर नदीपासून बॉस्परसपर्यंत पसरले आहेत.

कोरिओ–जपानी ही शाखा फार प्राचीन काळीं मूलवंशापासून निराळी झाली. भाषेच्या दृष्टीनें हे मंगोलियन वंशाचेच आहेत. कोरियन लोकांत श्वेत व पीत वर्णांचें मिश्रण आहे आणि जपानी

लोकांत श्वेत, पीत व कपिश वर्णांचें मिश्रण आहे. त्यांच्या भाषा उरल-अलताइक भाषेच्याच शाखा असून फिनोउग्रियनशीं सदृश आहेत.

**अमेरिकन महावंश.**– हा मांगोलियन वंशाचाच एक भाग आहे असें कित्येक धरतात आणि कित्येक संशोधक यास स्वतंत्र अस्तित्व देतात. त्यांच्या विस्ताराशीं आपणांस सध्यां कर्तव्य नाहीं.

**काकेशियन महावंश.**– शरीराच्या ठेवणींतील सादृश्यावरूनच काकेशिअन महावंश म्हणून एक वंश गृहीत धरला आहे. यामध्यें सेमेटिक, आर्यन व हॅमोटिक असे तीन भाषासमुच्चय धरले आहेत. द्राविडांस शरीरलक्षणांवरून कीन काकेशियनमध्यें घालतो आणि भाषाशास्त्रज्ञ त्यांस दूरचे समजतात. शरीरलक्षणांवरून वर्गीकरण करून नातीं जोडणें आणि भाषांवरून नातीं जोडणें या दोन्ही क्रिया अर्वाचीन संशोधन करतांना दिसतात.

कीनचें असें मत आहे कीं कॉकेशियन मनुष्य प्रथम भूमध्यसमुद्रांत जमीन होती तेथें विकास पावला व तेथून तो नील नदीचें खोरें व पश्चिम आशियांत गेला. तसाच तो स्पेन व पश्चिम युरोपकडे गेला. या स्थानांतरास अनेक सहस्रकें लागलीं; तोंपर्यंत त्याची सुधारणा चालूच होती. बास्क, केल्ट, गॉल, पिक्ट हे आयबेरियन लोकांपैकींच असून हे सर्व कॉकेशियन आहेत असें प्रो. ऱ्हाइस व ग्रे या शास्त्रज्ञांचें मत आहे.

यांत गोरा व काळासांवळा हे दोन मुख्य वर्ण असून कपिश अथवा तपकिरी रंगाचेहि कांहीं लोक आहेत. हॅमिटिक, सेमिटिक व द्राविड हे याच वंशांत मोडतात. यांचे मुख्य गुणधर्मः कातडीचा रंग बहुतेक श्वेतवर्णावर, क्वचित् कृष्णवर्ण; केंस सफेत, पिंगट, भुरके व काळे; मऊ, सरळ किंवा थोडेसे कुरळे; दाढी विपुल, कवटीची लांबी मध्यम; लहान व अरुंद चेहरा व मध्यभागीं उन्नतत्व; नेत्रपुट मध्यम आकाराचें; नाक लांब व तरतरीत; जबडा पुढें न आलेला; दांत लहान.

हॅमिटिक.— या लोकांतील बेजा, अफार, अगोस, सोमाली, गाला, मसाई हे सर्व लोक काकेशियन वंशाचे आहेत. यांत शिद्दीवंशाचें मिश्रण दिसून येतें पण मुख्यत्वें हा नमुना कॉकेशियन पद्धतीचा आहे. अबिसिनिआंत सेमिटिक, हॅमिटिक व शिद्दी या सर्वांचें अतिशय मिश्रण झालें आहे. हॅमिटिक लोक व अरब, यहुदी इ० सेमिटिक लोक यांमध्यें वंशसाम्य आहे असें आधुनिक शोधाअंतीं सिद्ध झालें आहे. हॅमिटिक लोक आशियांतून आफ्रिकेंत गेले कीं सेमिटिक आफ्रिकेंतून आशियांत आले याविषयीं मतभेद आहे. पण सेमिटिक आफ्रिकेमधून आले असावे व त्यांपैकीं कांहीं विशेषतः अरब पुन्हा आफ्रिकेंत गेले व कांहीं इराण, हिंदुस्थान, मॅलेशिया, मध्य आशिया येथपर्यंत गेले.

सेमिटिक.— यांचे पांच मुख्य भाग आहेत. ( १ ) मेसापोटेमियांतील असुर राष्ट्रें. ( २ ) सीरिया पॅलेस्टाइन येथील अरमियन. ( ३ ) हिब्रू, फिनीशियन व कार्थेजियन. यांस कॅनेनाइट म्हणत. ( ४ ) अरब. ( ५ ) अरबस्तान व अबिसिनिया यांमधील हिमराइट; यांपैकीं बहुतेक लुप्त झाले आहेत. यांची चेहेरेपट्टी सुबक असून, तोंड गोल, नाक सरळ, लहान व टोंक असलेली हनुवटी, सरळ कपाळ, काळे बदामाच्या आकाराचे डोळे, नरम व काळेभोर केंस, पूर्ण वाढ होणारी दाढी वगैरे काकेशियन मानववंशाचे सर्व गुण यांच्यांत स्पष्ट दिसतात. यांतील सुंदर व्यक्तींचें सौंदर्य यूरोपीयांशीं तुल्य असतें. या जातीच्या लोकांतूनच यहुदी, ख्रिस्ती व महंमदी हे संप्रदाय निघाले. यांच्या भाषा स्थैर्य व चिरकालिकता यांत प्रसिद्ध आहेत.

आर्यन्.— ही युरेशिया नांवाच्या खंडांत कोठेंतरी रहात होती हें निःसंशय आहे. पण आर्यन् भाषा बोलणारे सर्व आजचे लोक एकच मानववंशांतले होते असें मानणें अशास्त्र आहे. आर्यन् लोक सर्वत्र पसरल्यामुळें त्यांत अनेक वंशांचें मिश्रण झालें. आर्यन्‌पासून भिन्न अशा अनेक कॉकेशियन जाती आर्यन् भाषा बोलतात. टयूटन, केल्ट, आर्मेनियन, अफगाण हे सर्व आर्यन् भाषा बोलतात पण ते आर्यन् नाहींत असें कीनचें मत आहे. व त्याच्या मतें ' मॅक्समुल्लर ' इत्यादि ग्रंथकारांच्यामुळें प्रसिद्धीस आलेली 'आर्यन् उपपत्ति' आधुनिक शोधांच्या दृष्टीनें त्याज्य ठरते.

मू ल स्था न.— याचप्रमाणें आर्यन् लोकांचें मूलस्थान शोधण्याचाहि प्रयत्न विफल आहे असें ठरतें. आज जरी आर्यन् लोकांनीं अनेक संस्कृतींवर आपली छाप बसविलेली दिसते तरी एका कालीं तेहि संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेंत होते, व पशुपालन हें त्यांचें उदरनिर्वाहाचें साधन असून त्यांस शेतकीची विशेष माहिती नव्हती, तांबें एवढीच धातु ज्ञात होती व कांहीं अडाणी चालीहि त्यांच्यांत होत्या. फ्रेंच मानवशास्त्रज्ञ, व रोट, व्हॅान उनझीन इत्यादि लोकांच्या मतें त्यांचें मूलस्थान आशियांत असलें पाहिजे. लो. टिळकांच्या मतें ते एका वेळीं उत्तरध्रुव प्रदेशावर असावे.

प रि भ्र म ण.— यांच्या पशुपालवृत्तीस विस्तृत क्षेत्राची जरूर असल्यामुळें कांहीं जमाती डॅन्यूब नदीकडे, कांहीं स्वित्सर्लंडमध्यें, कांहीं इराण, युफ्रेटिस नदी वगैरेकडे गेल्या. आर्यन् लोकांचीं परिभ्रमणें सुरू होण्यापूर्वी उत्तरआफ्रिकेंतील लोक स्कँडिनेव्हियापर्यंत पोंचले होते, यूरोपांतहि आर्यन् जाण्यापूर्वी भिन्न लोक होते. फ्रान्समधील ओव्हर्न व सॅव्हॉय प्रांतांतील लोक व हिंदुकुश पर्वताजवळील गालचा हे आर्यविभिन्न वंशाचे आहेत.

व र्ण.— मूळ आर्य श्वेतवर्ण असावेत. श्वेतवर्ण व लांब डोक्याच्या सर्व लोकांमध्यें आर्यन् भाषा व आर्यन् संस्था प्रचलित आहेत, व या गोष्टी इतर लोकांत आढळत नाहींत हें प्रो. ला पूज यांनीं सिद्ध केलें आहे. प्राचीन इराणी, हिंदू, ग्रीक, जर्मन, रोमन लोकांचे लॅटिन, एट्रुस्कन इत्यादि घटक हे सर्व लांब डोक्याचे व उजळ रंगाचे आहेत. इस्थोनिअन, लिव्होनियन, फिन, बास्क, आयबेरियन हे दुसऱ्या वर्गांत येतात.

आर्यन् लोकांचें इतर लोकांशीं मिश्रण नूतन अश्मयुगाच्याहि पूर्वी सुरू झालें. आजहि असें मिश्रण चालू आहे.

आर्यन् भाषांत विभक्तिप्रत्ययांनीं रूपें वदलण्याची क्रिया पूर्णतेस पोंचली आहे. कॉकेशस पर्वताजवळ अद्यापि कांहीं मूलभूत भाषा आढळतात व तेथील कांहीं लोक कृष्णवर्णाचे पण सुंदर दिसतात, व कांहीं कुरूप आहेत. यावरून येथील मूळचे श्वेतवर्ण आर्यन् इतरांशीं मिश्रणानें भ्रष्ट झाले असावे.

द्राविड.—दक्षिण हिंदुस्थानांत द्राविड लोक आहेत. त्यांत तेलगू, तामिळ, कानडी, मल्याळी, कोडगू, राजमहाली, ओराओन व गोंड हे येतात. हे लोक आर्यन् लोकांच्या पूर्वी हिंदुस्थानांत होते व त्यांच्याहि पूर्वी हिंदुस्थानांत निग्रिटो होते. यूरोपांतील मग्यार ज्याप्रमाणें आर्यन् लोकांशीं संघट्टानें सामिल झाले आहेत, त्याप्रमाणें द्राविडांचें हिंदुस्थानांतील आर्यन् लोकांशीं तादात्म्य झालें आहे. कांहींच्या मतें द्राविड हे मांगोलियन वंशाचे असून वायव्येकडून हिंदुस्थानांत आले व ब्राहुइ ही त्यांच्यापैकीं एक दूर राहिलेली जात आहे. परंतु द्राविड व मांगोलियन यांत साम्य दिसत नाहीं.

निलगिरीमधील तोड व जपानांतील ऐनु हे विपुलकेशत्वामुळें कॉकेशियन वंशांतीलच मानतात.

मनुष्याच्या विकासानंतरच्या काळाचे विभाग पाडण्याचें साहस अजून कोणी केलें नाहींसें दिसतें. भाषाविकासावरून विभाग पाडावयाचे झाल्यास सर्व भाषांचा अगोदर इतिहास जुळवावा लागेल आणि त्यांतहि कालक्रम शोधावा लागेल.

आर्यन् महावंशाच्या भाषांचा जितका सूक्ष्म अभ्यास झाला आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि भाषांचा झाला नाहीं.

आज भाषांच्या दृष्टीनें जर भेद पाडावयाचे झाले तर

( १ ) मूल आर्यन्‌भाषेचा काल—उद्भवकाळापासून इंडोयूरोपीय पोटभाषा व पर्शुभारतीय पोटभाषा यांच्या उद्भवकालापर्यंत.

( २ ) पर्शुभारतीय काल.

( ३ ) संस्कृत व अवेस्ता यांचा काल.

असे काल पाडल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आर्यन् भाषा व दुसरी कोणती तरी भाषा यांच्या पूर्वीच्या काळाकडे जाण्यास अजून कोणी धजलें नाहीं.

आर्यन् भाषेचा काल तरी कोणता असावा ? कांहींनीं दहा हजार वर्षांपूर्वीचा असें स्थूल अनुमान केलें आहे. हेंच अनुमान लो. टिळकांनीं आपल्या आर्यांचें मूलस्थान ( Arctic Home in the Vedas ) या पुस्तकांत स्वीकारलें आहे.

असुरसंस्कृतीच्या प्रारंभाचा काळ ९।१० हजार वर्षांपूर्वी असा धरतात.

भाषाशास्त्राच्या साहाय्यानें जर कोणी पूर्वीच्या काळाकडे जाण्याचा प्रयत्न केला तर तो त्या साहित्यानें इ. स. ८००० च्या पूर्वीच्या कालांत जाईल. कां कीं असुरसंस्कृतीच्या काळीं भिन्न भाषा बऱ्याच विकासित होत्या. असुर भाषेचें आणि संस्कृत भाषेचें रूप त्या काळीं कसें असावें याची आपणांस कल्पना होते आणि असुर भाषा आणि वेदभाषा यांचें पृथक्त्व आपणांस दिसतेंच.

भाषारूपी साहित्याचा ऐतिहासिक अभ्यास कसा करावयाचा यासंबंधानें बरींच भिन्न मतें आहेत आणि निरनिराळ्या तऱ्हेनें खटपटी झालेल्या आहेत. पहिल्या प्रथम जी खटपट झाली ती केवळ निरनिराळ्या भाषेंतील शब्द घेऊन त्यांचें एकमेकांशीं सादृश्य अगर विसादृश्य पहावयाचें या पद्धतीनें झाली. पुढें लवकरच या पद्धतींतील दोष अभ्यासकांच्या लक्षांत आले. दोन निरनिराळ्या भाषांतील शब्द वरवर सारखे दिसतील, परंतु प्रत्येक शब्दाचें पृथक्करण करून पृथक्कृत झालेल्या अंगांचा अर्थ पाहिला व त्या दोन्ही भाषांतील मूल घटकांची तुलना करून पाहिली म्हणजे कांहींच सादृश्य दिसून येणार नाहीं असे प्रकार पुष्कळ दृष्टीस पडतील, व त्यामुळें आणि एका भाषेमध्यें दुसऱ्या भाषेंतील शब्द राष्ट्रांच्या आलेल्या संबंधामुळें जाणें शक्य असल्यामुळें शब्दसादृश्याचें महत्त्व दोन भाषांच्या मधील एकवंशसंबंध या दृष्टीनें कमी झालें. हॉवेलॅकनें+ या तौलनिक व्युत्पत्तिशास्त्राची सपाटून थट्टा उडविली आहे आणि या शब्दसादृश्याचें महत्त्व फारच कमी धरलें आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं, शब्दापेक्षां भाषेची अन्तर्घटना अधिक महत्त्वाची आहे. परके शब्द एखाद्या भाषेंत येतील आणि जातील परंतु भाषेची अन्तर्रचना बरीचशी कायम राहते.

ज्या अभ्यासकांनीं भाषांच्या अन्तर्रचनेकडे लक्ष दिलें आहे त्यांनीं एक तत्त्व पाहून भाषांची जुळणी केली आहे, तें तत्त्व म्हटलें म्हणजे सर्व भाषा एका काळीं समासयुक्त होत्या म्हणजे जे संबंध आणि अर्थ आज आपण प्रत्ययांनीं अगर शब्दयोगी अव्ययांनीं दाखवितों ते सर्व पूर्वी निरनिराळ्या शब्दांच्या समासांनीं व्यक्त होत असत, परंतु त्यांपैकीं कांहीं शब्द पुढें प्रत्ययरूप झाले. हा जो फरक पडला त्या फरकास महत्त्व देऊन त्या फरकाच्या कमीजास्त प्रमाणानें भाषांची परंपरा आणि भाषांमधील भागिनीसंबंध त्यांनीं व्यक्त केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, एखाद्या भाषेंत नवीन शब्द येणें ही क्रिया लवकर होते, परंतु शब्दाचे प्रत्यय होण्याची क्रिया अधिक उशीरां होते; यामुळें भाषाभ्रष्टतेच्या पायऱ्या शब्दांचे प्रत्यय होणें या क्रियेनें मोजल्या पाहिजेत. या तऱ्हेचें मत व्यक्त करणाऱ्या लोकांनीं भाषांच्या अभ्यासाचें आणि त्यांत होणाऱ्या फेरफारांचें महत्त्वाचें तत्त्व पुढें मांडलें यांत शंका नाहीं. तथापि तौलनिक व्युत्पत्तिशास्त्रास ऐतिहासिक दृष्टीनें त्यांनीं जें इतकें कमी महत्त्व दिलें तितकें कमी महत्त्व देणें चुकीचें होईल. त्यांनीं आपली स्वतःची पद्धति वापरतांना अगदीं कमी महत्त्व दिलें असें मात्र नाहीं. कारण सामासिक भाषा, शब्दयोगी भाषा आणि प्रत्ययी भाषा उर्फ आदेशी भाषा एवढेंच

+ Science of Language by Hovelacque London: 1877.

वर्गीकरण करून ते भाषाशास्त्रज्ञ थांबले नाहींत. त्यांनीं पुन्हां आर्यन् भाषावंश, सेमिटिक भाषावंश असे निरनिराळे भाषावंश प्रत्ययी भाषांमध्यें पाडलेच आहेत. हे भाषावंश त्यांनीं कसे पाडले? शब्दसमुच्चयावरूनच पाडले आहेत असें दिसतें. सर्वच भाषा ज्या एका काळीं सामासिक स्वरूपाच्या होत्या त्या काळीं जर आजचें भाषाशास्त्र जन्मलें असतें तर त्यांस भाषांचें वर्गीकरण करतांच आलें नसतें काय? सर्व भाषा एकच आहेत असें त्यांनीं म्हटलें असतें काय? शब्दादेशसंमुख जो अपभ्रंश होतो त्या अपभ्रंशाच्या प्रमाणावरून भाषांचें वर्गीकरण करणें ही एकच किंवा मुख्य भाषा-वर्गीकरणाची म्हणजे त्यांचे वांशिक संबंध दर्शविण्याची कसोटी होती असें म्हणणें चुकीचें होईल. ज्या वेळेस सर्व भाषा सामासिक स्थितींत असतील अशा वेळेस भाषांतील शब्दसंग्रहावरूनच त्यांचें वर्गीकरण करावें लागेल. असो.

कोणत्या फरकाचें महत्त्व किती व अमुक भाषा कोणत्या वर्गांत घालावी याविषयीं जो विचार करावयाचा तो विचार करतांना शब्दसमुच्चय व अपभ्रंशप्रमाण हीं दोन्हीं तत्त्वें लाविलीं पाहिजेत आणि त्यावरून वांशिक संबंध शोधिले पाहिजेत. सिंहली भाषे-संबंधानें जो संशोधकांचा घोंटाळा झालेला आहे त्याचें कारण, आपणांस काय पहावयाचें आहे इकडे दृष्टि न ठेवतां अपभ्रंशप्रमा-णास महत्त्व देऊन भाषेचें वर्गीकरण करण्याचा मोह पडल्यामुळें सिंहली भाषेचें आर्यन् भाषांपासून पृथक्त्व स्थापन करण्याचा मोह पुष्कळांस पडला होता. त्या मोहामुळें जी गडबड उडाली ती गडबड आम्ही मागें ( विभाग पहिला पृ. १३९ ) दिली आहे. हॉवेलॅकनें सिंहली भाषेस शब्दयोगी भाषांत टाकून आर्यन् भाषांपासून तीस वियुक्त केलें आहे.

शब्दसमुच्चय व अपभ्रंशाचें प्रमाण हीं दोन्हीं प्रमाणें धरून भाषांचे वांशिक संबंध शोधले पाहिजेत. कधीं कधीं असें दिसून येईल कीं एका वंशांतील एक भाषा शब्दयोगी भाषांत मोडेल व दुसरी भाषा प्रत्ययी अगर सामासिक भाषांत मोडेल. असो.

आतां आपणांस जे अनेक भाषासमुच्चय दृष्टीस पडतात त्यांच्याकडे लक्ष देऊं आणि त्यांच्या साहाय्यानें मनुष्यजातीचा इतिहास कोठपर्यंत मिळतो तें पाहूं. आपणांस जे मोठाले भाषा-वंश दृष्टीस पडतात ते येणेंप्रमाणें.

( १ ) आर्यन् भाषासंघः यांमध्यें भारतीय, इराणी, यवनी, इटालिक, केल्टिक, स्लॅव्होनिक, लेटिक इत्यादि उपसंघ पडतात. आणि याशिवाय एट्रुस्कन, डेशियन, अल्बेनियन इत्यादि भाषा कोणत्या वर्गांत घालावयाच्या तें अजून अस्पष्ट आहेच.

( २ ) द्राविडी भाषासंघः यामध्यें हिंदुस्थानांतील तामिळ तेलगु इत्यादि दाक्षिणात्य भाषा, ब्राहुइ भाषा यांचा समावेश होतो.

( ३ ) सेमिटिक भाषासंघः यांत तीन उपसंघ दृष्टीस पडतात. ते अरामिओ–असुरियन, खनानी आणि अरबी होत.

( ४ ) हॅमिटिक भाषासंघः यांत इजिप्शिअन, लिबियन आणि इथिओपियन भाषा येतात.

( ५ ) अमेरिकन भाषासंघः अमेरिकेंतील इंडियन लोकांमध्यें शेंदीडशें भाषा दृष्टीस पडतात परंतु त्या सर्वांचें मूळ एकच आहे असें मानण्यांत येतें.

( ६ ) आफ्रिकन भाषासंघः आफ्रिकेंतील निग्रोमध्यें अनेक भाषा दृष्टीस पडतात. त्यांच्या भाषांचें पद्धतशीर भाषाशास्त्र अजून चांगलेंसें तयार झालें नाहीं. त्यांचे भाषासंघ येणें प्रमाणेंः ( १ ) हॉटॅंटॉट ( २ ) बुशमन ( ३ ) बोलोफ ( ४ ) मन्डे ( ५ ) फेलुप ( ६ ) सोनराइ ( ७ ) हौसा ( ८ ) बोर्नु ( ९ ) कुह ( १० ) एवे किंवा इफे ( ११ ) बन्टु ( १२ ) फुलु ( १३ ) न्युबियन.

( ७ ) नेग्रिटो
( ८ ) आस्ट्रेलियन
( ९ ) पाप्युअन
( १० ) मलायो पॅालिनेशियन
( ११ ) जपानी
( १२ ) कोरियन
( १२ ) बास्क
( १३ ) फिनोतार्तरि उर्फ उरल अल्ताइक
( १४ ) उत्तरध्रुव भाषासंघ
( १५ ) कॉकेशस भाषासंघ

( १६ ) सामासिक भाषासंघः चिनी, अनामी, सयामी, ब्रह्मी, तिबेटी.

हे निरनिराळे भाषासंघ मनुष्यप्राणी चोहोंकडे पसरल्यानंतरच विकसित झालेले असणार तथापि कालानुक्रमानें पहातां यांपैकीं कांहीं संघ बरेच उत्तर कालीं पृथक् झाले असतील आणि कांहीं बऱ्याच जुन्या काळीं पृथक् झाले असतील.

काल व भाषासंघ यांस जोडणारें एक तत्त्व सर्वसंमत आहे तें हें कीं, जेव्हां दोन भाषा दिसतात आणि त्या एका विशिष्ट वंशांत त्यांच्या सादृश्यावरून घालतां येतात तेव्हां एक काल्पनिक संघ आपण तयार करतों व तो समाविष्ट भाषांपेक्षां एका प्राचीन भाषेचा द्योतक समजतों. असे अनेक संघ एकांत एक घालतां आले तर त्यांचें अस्तित्व कालाचे भाग पाडण्यास योग्य मर्यादा आहेत.

या तऱ्हेच्या विधानास एका दृष्टीनें थोडेंसें मर्यादित केलें पाहिजे.

भाषा प्रथमतः मोठा प्रदेश व्यापीत नाहीं. ती थोडका प्रदेश व्यापिते. एखादी भाषा त्या भाषेच्या आसपास जो प्रदेश असेल त्या प्रदेशांतील भाषा सदृश असल्यास आपलें वर्चस्व स्थापन करते. कालांतरानें त्या सर्व प्रदेशांतील भाषा एकवटते.

या क्रियेमुळें आपणांस भाषाविस्ताराचें खरें साहित्य उपलब्ध होत नाहीं. आपणांस एखादी भाषा शिष्टत्व पावून इतरांवर ताबा गाजवीत आहे अशा स्थितींत सांपडते आणि तिच्या आसमंतांतील

भाषा पोटभाषांच्या स्वरूपांत दृष्टीस पडतात. ही क्रिया लक्षांत घेऊन भाषांकडून प्रदेशव्याप्ति कितपत झाली याविषयींची आपली कल्पना नियमित केली पाहिजे.

शरीरलक्षणांशिवाय व भाषांशिवाय तिसरें इतिहाससाहित्य म्हटलें म्हणजे संस्कृति होय. संस्कृति म्हणजे जातिराष्ट्रादि संघाच्या सामुच्चयिक जीवितक्रमाचें साकल्य. संस्कृतीचा दर्जा आर्थिक, वैज्ञानिक आणि वाङ्मयविषयक विकासानें मोजला जातो. भूपृष्ठाच्या प्रत्येक भागामध्यें जेथें जेथें मनुष्याच्या अत्यन्त प्राचीन वस्तीचा पत्ता लागला आहे तेथें मनुष्य दगडाचीं हत्यारें वापरतांना दिसत आहे. म्हणजे मनुष्याचा प्रसार चोहोंकडे झाला तो मनुष्य प्राणी अश्मायुध संस्कृतींत किंवा तिच्या पूर्वींच्या संस्कृतींत असतां झाला हें उघड आहे. याच्यापुढील जो सांस्कृतिक इतिहास आहे तो प्रत्येक स्थानाचा स्वतंत्र आहे. म्हणजे ज्या काळीं मनुष्य चोहोंकडे पसरला त्या काळाच्या पुढें जें आपणांस सातत्य पहावयाचें तें भाषाविकासाचें, संस्कृतिविकासाचें आणि कदाचित् शरीरलक्षणविकासाचें होय. आपणांस जो संबंध जोडावयाचा तो शरीरलक्षणविकास व इतर संस्कृति या दोहोंचा. अश्मायुधकालोत्तर संस्कृतीचा इतिहास लिहितांना म्हणजे महावंशांच्या उपवंशांचा इतिहास लिहितांना जे भाग पडतील त्या वेळेस प्रत्येक काळची संस्कृति नोंदली पाहिजे. ती नोंदतांना प्रत्येक राष्ट्र कितपत प्रगत झालें होतें याचा हिशोब घेण्यासाठीं त्या त्या ठिकाणची भौतिक स्थिति पहावी लागेल आणि संस्कृतीच्या वैशिष्ट्याचें स्पष्टीकरण करावें लागेल. जेव्हां आपण विशिष्ट समुच्चयाकडे लक्ष देऊं तेव्हां त्या समुच्चयाच्या संस्कृतिवैशिष्ट्याविषयीं व विशिष्ट संस्कृतींतील विकासाच्या अनुक्रमाविषयीं लिहितां येईल. सामान्य क्रिया जी चोहोंकडे दिसते ती ही कीं, प्रथम ओबडधोबड दगडी हत्यारांचा काळ येतो. मग अधिक घडणीच्या हत्यारांचा काल येतो व शेवटीं धातूंच्या उपयोगाचा काल येतो. धातुपूर्व संस्कृति म्हणजे प्रागैतिहासिक संस्कृति नव्हे. इजिप्तच्या ऐतिहासिक संस्कृतींत देखील धातु अगदीं पहिल्या प्रथम येत नाहींत. अश्मायुध स्थितींत असतां देखील राजांची कारकीर्द व तींत घडलेल्या गोष्टी यांची आठवण ठेवण्याचा प्रयत्न करण्याइतकी भावना तत्कालीन मनुष्यामध्यें वाढली होती. इजिप्तची संस्कृति आणि असुरांची संस्कृति या दोन प्राचीन संस्कृती होत. यांचा प्रारंभ कांहीं अंशीं अश्मायुध स्थितींत व कांहीं अंशीं तदुत्तर संस्कृतीच्या कालांत असा दिसतो.

मानवशास्त्रज्ञांनीं इतिहासपूर्वकालाचे संस्कृतिदृष्ट्या विभाग पाडले आहेत ते येणेंप्रमाणें:—

अश्मायुध युग प्रथम काल.— ओबडधोबड दगडी हत्यारें किंवा आउत मनुष्य प्राणी वापरीत होता तो काल.

अश्मायुध युग द्वितीय काल.— या कालांत दगडाचींच पण अंग घोटीवकी व कांहीं सूक्ष्म हत्यारें मनुष्य वापरीत होता.

आयस युग.— लोखंडी हत्यारांचा काल. पुष्कळ राष्ट्रांमध्यें अश्मायुध युगाच्या द्वितीय कालानंतर आणि आयस युगाच्या आरंभापूर्वी कांस्यकाल किंवा ताम्रकाल येतो.

सर्वच संस्कृतींचा विकास एकसारखा होत नाहीं. शिवाय सर्व संस्कृतींत हीं युगें एककालीन नाहींत. म्हणजे एका राष्ट्रांत ज्या कालीं अश्मायुधयुग असेल तेव्हां दुसऱ्या राष्ट्रांत आयसयुग असेल.

संस्कृतीच्या इतिहासकालाचे हे विभाग पुष्कळसे सोयीसाठीं पाडलेले आहेत. जगद्विकासाच्या आणि मनुष्यप्रसाराच्या कोणत्याहि क्रिया किंवा पायऱ्या यांचे निदर्शक हे भाग मुळींच नाहींत. शास्त्रज्ञ स्थानिक साहित्य घेऊन कसाबसा अभ्यासास सुरुवात करतो, त्या ज्ञानस्थितींतील हे विभाग आहेत. या अभ्यासानें बराचसा मनुष्येतिहास अवगत झाल्यानंतर पाडलेले हे कालविभाग नाहींत.

असुरांची संस्कृति व इजिप्तची संस्कृति या दोन संस्कृती हिंदुस्थानी संस्कृतीच्या अगोदरच्या आहेत कीं नंतरच्या आहेत हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. आपण भारतीय संस्कृतीकडेसच प्रथम वळूं. आणि भारतीय संस्कृतीचा आणि इजिप्त इत्यादि जुन्या संस्कृतींचा आपल्या संस्कृतीशीं संबंध कसा काय येतो तें नंतर पाहूं.

---

## प्रकरण ३ रें

## असुरराष्ट्रसंस्थापनेच्या नंतरच्या इतिहासार्थ वेदावलोकन.

अत्यंत प्राचीन काळचीं राष्ट्रें दोन आहेत; एक असुरांचें व दुसरें इजिप्तचें; असें संशोधकांचें आजचें मत आहे. ख्रिस्तपूर्व ८००० वर्षांपर्यंत या दोन्ही राष्ट्रांचें प्राचीनत्व नेलें आहे. या राष्ट्रांच्या कालाच्या आणि यानंतरच्या बुद्धपूर्व कालाच्या इतिहासासाठीं जीं महत्त्वाचीं साधनें आहेत त्यांत भारतीयांचे वेद हें एक महत्त्वाचें साधन आहे असें म्हटल्यास त्यास कोणीहि आक्षेप घेणार नाहीं. या कालाचा इतिहास वेदांच्या साहाय्यानें लिहिण्यासाठीं अनेक पंडितांनीं परिश्रम केले आहेत. संस्कृत भाषेचा पूर्वेतिहास पहावयाचा आणि त्या भाषेची इतर सदृश भाषांशीं तुलना करून सामान्य संस्था शोधावयाच्या ही पद्धति वापरून बराचसा अत्यंत प्राचीन इतिहास संशोधकांनीं उपलब्ध करून दिला आहे. त्या इतिहासाचें संयोजक फल आम्हीं पुढें देऊं. प्रथमतः ज्या साहित्याच्या परीक्षणानें इतिहास शोधावयाचा त्या साहित्याचें परीक्षण झालें पाहिजे. वैदिक वाङ्मय तयार झालें तें बराच उत्तरकालीन इतिहास दाखवितें तथापि त्या वाङ्मयांत व्यक्त झालेली भाषा आणि विकास पावलेल्या कल्पना यांचीं पूर्वरूपें हीं मंत्रकालाचें पूर्वरूप दाखवितात.

**सिंहावलोकन.**- वेदविद्या या विभागांत वेदांवर विवेचन पुष्कळ केलेलें आहे. त्यांत वेदकालाचा इतिहास लिहावयाचा म्हणजे समाजाच्या अनेक अंगांच्या स्थित्यंतरांचा आणि विकासांचा इतिहास लिहावयास पाहिजे आणि त्या अंगांच्या अनेक विकासांचा अन्योन्याश्रय दाखविला पाहिजे म्हणून सांगितलें. इतिहासविषयांपैकीं ज्या कांहीं गोष्टींचा बराच इतिहास त्यांत येऊन गेला आहे अशा गोष्टी म्हटल्या म्हणजे ( १ ) यज्ञसंस्था ( २ ) वैदिक वाङ्मय ( ३ ) ब्राह्मणजाति ( ४ ) देवता ह्या होत. या सर्वांचा अन्योन्याश्रयहि दाखविला आहे. या अंगांचा इतिहास तरी संपूर्ण दिला आहे असें नाहीं तर त्या अंगांचा अन्योन्याश्रय समजून वेद स्पष्ट होण्यास मदत व्हावी इतकाच दिला आहे. पद्धतवार इतिहास देण्यास पूर्व तयारी म्हणून त्या भागाचें महत्त्व आहे. ज्या अंगांचा इतिहास वेदविद्या या भागांत फारसा आला नाहीं अशीं अंगें म्हटलीं म्हणजे ( १ ) राजकीय खळबळी ( २ ) कुलें, जाति, गोत्रें, संप्रदाय ( ३ ) गृहस्थधर्म ( ४ ) आर्यन् लोकांचा व वैदिक संस्कृतीचा प्रसार ( ५ ) भाषा ( ६ ) व्यापक विचार आणि तत्त्वज्ञान हीं होत.

मागें जें ऐतिहासिक विवेचन आलें आहे त्याचें स्थूल स्वरूप म्हटलें म्हणजे मंत्ररचनेच्या नंतरच्या कालांत यज्ञसंस्था कशी वाढत गेली आणि त्याबरोबर ब्राह्मणजाति आणि वेदांचीं संहितीकरणें हीं कशीं बनलीं यांचें स्पष्टीकरण हें होय. या विवेचनाचें फलदर्शक सिंहावलोकन केलें असतां पुढील विवेचन समजण्यास सोपें जाईल म्हणून तें येथें करीत आहों.

आज आपणांस वेद ज्या स्थितींत दिसतात ती स्थिति ( म्हणजे वेदांचें तृतीय संहितीकरण ) कुरुयुद्धाच्या सुमारास उत्पन्न झाली असावी.

ऋचांचें संहितीकरण करून ऋग्वेद तयार करण्याची क्रिया सोमयागविकासाशीं संबद्ध आहे. जेव्हां लहानसहान याग नाहींसे होऊन मोठे याग करण्याची वेळ आली तेव्हां मोठे याग करण्यासाठीं हौत्रमंत्र गोळा करण्याची क्रिया जोरानें सुरू झाली. तेव्हां ऋग्वेद तयार होऊं लागला.

यज्ञामध्यें आजचें यज्ञस्वरूप उत्पन्न होण्यापूर्वी अध्वर्यु, होता व ब्रह्मा यांच्या क्रियांचें वैशिष्ट्य स्थापन झालें नव्हतें. ऋग्मंत्र तयार होऊं लागले त्याच वेळेस कांहीं अंशीं यज्ञक्रिया, सामुच्चयिक झाली होती पण ऋत्विजांचें विशिष्टीकरण फारसें झालें नव्हतें. हें विशिष्टीकरण फार हळू हळू झालें. मंत्रांचें परीक्षण केलें असतां असें दिसून येईल कीं अध्वर्यू हौत्रमंत्र म्हणत आहेत व होते हवनाची क्रिया करीत आहेत.

ऋग्वेदामध्यें जो सोमयाग दिसत आहे तो आजच्याप्रमाणें किंवा चारी वेदांच्या अन्योन्याश्रयानें होणारा आणि ब्राह्मणग्रंथावरून व्यक्त होणाऱ्या सोमयागाप्रमाणें पशुयुक्त दिसत नाहीं, तर दैनिक सोमसेवेक अग्निहोत्राच्या स्वरूपाचा दिसतो.

या वाढलेल्या सोमसंस्थांचें विकासस्थान सतलज नदीच्या पूर्वेकडील भाग दिसतो.

ब्राह्मण जाति ही भिन्न कर्मांचे ऋत्विज या रूपानें प्रथम अस्तित्वांत आलेली दिसते आणि हे ऋत्विजांचे संघ पुढें भिन्न जातिस्वरूप पावलेले दिसतात. म्हणजे एक ब्राह्मणजाति विभागली गेली असें झालें नाहीं. प्रथम ऋत्विजांचे वर्ग विभागले गेले आणि त्या विभागांपैकीं बरेच विभाग जातिरूप पावले.

दैवतेतिहासामध्यें देवतांचें जें स्वरूप ऋग्मंत्रांच्या साहाय्यानें वर्णन केलें आहे तें यज्ञविकासकालाचें नाहीं. तर ज्या कालांत ऋत्विजांचें विशिष्टीकरण पूर्ण झालें नव्हतें व यज्ञसंस्था ही देखील फारशी गुंतागुंतीची नव्हती अशा कालांतील आहे.

ऋत्विजांचे संघ बनत चालले ते बनतांना अनेक संप्रदाय अगोदर बनत होते. त्या संप्रदायांपैकीं कांहीं संप्रदाय मृत झाले आणि कांहीं टिकले. जे टिकले त्यांनीं यज्ञसंस्थेस आपल्या इच्छेप्रमाणें स्वरूप दिलें.

कृष्ण यजुर्वेद आणि अथर्व वेद यांची तुलना करून या दोहोंस सामान्य वाङ्मय कोणतें यांचें कोष्टक दिलें आहे. तथापि त्या कोष्टकावरून कोणतेहि निर्णय काढले नाहींत. तें काम भावी संशोधकांवर सोंपविलें आहे.

यज्ञ करण्याचा धंदा करणारे लोक म्हणजे ऋत्विज यांमधील अनेक स्पर्धा दुसऱ्या विभागांत दाखविल्या आहेत. भरतांनीं ज्या काळांत कुरुक्षेत्रापर्यंतचा प्रदेश काबीज केला त्या वेळच्या वसिष्ठ-विश्वामित्रांच्या भांडणाची कथा त्यांत आली नाहीं तर भरतांची स्थापना कुरुक्षेत्रांत झाल्यानंतर प्राचीन अल्प यज्ञांचे मोठे यज्ञ कसे बनत गेले आणि ते बनल्यानंतर त्यांत कसे पक्ष उत्पन्न झाले याचेंच विवेचन त्यांत आहे. प्रथम उत्तरकालीन स्थिति स्पष्टीकरणासाठीं घेतली आहे. म्हणजे शाखांप्रमाणें भिन्न झालेला ऋग्वेद, शाखांप्रमाणें भिन्न झालेले यजुर्वेद व सामवेद आणि या त्रयींवाल्यांमध्यें आपलें बस्तान कायमचें बसविण्यांत यश पावल्यानंतर आवृत्ति पावलेला अथर्व वेद अशा तऱ्हेची परिस्थिति आणि तिचीं कारणें आणि ती परिस्थिति यज्ञसंस्थेच्या ज्या स्थितींत उत्पन्न झाली ती यज्ञसंस्थेची स्थिति वर्णन करून पूर्वीच्या कालाकडे अवलोकन केलें आहे. ऋत्विजांचा व यज्ञसंस्थेचा मंत्रपूर्व इतिहास दिला गेला नाहीं. प्राचीन संप्रदायांचा इतिहास आला नाहीं. जें विवेचन केलें तें फार त्रोटक झालें आहे. सबंध धर्मेतिहास यांत आला नाहीं, ब्राह्मणजातीचा इतिहास संगतवार आला नाहीं. धर्मेतिहास, वाङ्मयेतिहास आणि सामाजिक इतिहास संगतवार लिहिण्यासाठीं स्थूल कल्पना देऊन ठेवल्या आहेत आणि इतिहास लिहितांना ज्या गोष्टी सिद्ध कराव्या लागतील किंवा ज्या गोष्टींची माहिती देण्यासाठीं विषयांतर करावें लागेल अशाहि गोष्टी त्यांत वर्णिल्या आहेत. वैदिक वाङ्मयाचा ऐतिहासिक उपयोग करण्यापूर्वी वैदिक धर्माचें आणि वैदिक

वाङ्मयाचें जें स्थूल ज्ञान लागतें तें देऊन मंत्रपूर्व आणि मंत्ररचनेच्या कालांचें ऐतिहासिक विवेचन समजण्यासाठीं जी मनोभूमिका तयार करावयाची ती वेदविद्या या भागांत उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत विभागांत वैदिक ग्रंथांच्या साहाय्यानें जो इतिहास दिला आहे त्यास परिशिष्ट म्हणून तो ग्रंथ वारंवार पहावा लागेल.

ऋषींचीं गीतें आणि त्यांचे विषय जे देवस्तोत्रें त्यांकडून आतां अधिक ऐहिक विषयाकडे वळूं. आणि मनुष्य वर्गाच्या दुसऱ्या हालचाली काय दिसतात त्या पाहूं.

ऋग्वेदाचें थोडेसें निरीक्षण झालें तरी त्यांतील मानवी घडामोडी कोणासहि दिसल्यावांचून रहाणार नाहींत. या हालचालींचें स्थान एकंदर जगद्विकासांत देणें हें ऋग्मूलक इतिहासार्थ प्रयत्नाचें पहिलें कार्य होय.

जगद्विकासांतर्गत मानवेतिहास म्हणजे पृथ्वीवरील मनुष्यकल्प प्राण्यापासून मनुष्याच्या हालचालीचा एकंदर इतिहास होय. मागच्या प्रकरणांत सांगितलें आहे कीं मनुष्यप्राणी मानवकल्प प्राण्यापासून विकसित होऊन त्याचा चोहोंकडे विस्तार झाला असें भौतिकशास्त्रज्ञांचें मत आहे. त्याचा विकास कोठें झाला याविषयीं आज एकमत नाहीं. मनुष्यप्राण्याच्या मानवपूर्वस्थितीपासून एकंदर मनुष्येतिहासांतील बऱ्याच अर्वाचीन काळापर्यंत म्हणजे ज्या काळांत अत्यंत प्राचीन राष्ट्रें दृष्टीस पडतात, त्या काळापर्यंतचा इतिहास अजून तयार व्हावयाचाच आहे. या दीर्घ कालांत कोणत्या परंपरेनें इतिहासविकास झाला असावा या संबंधाची कल्पना मागें ( १ ला विभाग पृ० ७८ ) दिली आहे.

भारतेतिहासांत प्रास्तरकालीन व आयस पूर्वयुगांतील मनुष्याच्या अस्तित्वाबद्दल पुरावे सांपडले आहेत. ते पुढें योग्य स्थलीं दिले आहेत. हिंदुस्थानांत एकंदर किती मानववंशांचें अस्तित्व आहे, याबद्दल विवेचन पहिल्या विभागांत ( पृष्ठ ८१ पहा ) केलेंच आहे.

**भारतेतिहास व भारतीयेतिहास.**—भारताचा इतिहास आणि भारतीयांचा इतिहास या दोन गोष्टी भिन्न आहेत. भारतांत जे लोक आले असतील त्यांची भारतांतील चळवळ तेवढी द्यावयाची हा भारतेतिहास होय. भारतीयांचा इतिहास द्यावयाचा म्हटला म्हणजे कोणत्या विशिष्ट लोकांस 'भारतीय' हें नांव द्यावयाचें हें प्रथम ठरवावें लागेल आणि त्यांचा इतिहास —मग ते भारतांत असतांना असोत किंवा भारताबाहेर असोत— द्यावा लागेल. भारतांत जे अनेक मानववंश दृष्टीस पडतात त्यांपैकीं एकास भारतीय म्हणावयाचें व दुसऱ्यास म्हणावयाचें नाहीं हा हट्टवाद होईल. तथापि केवळ सोय म्हणून भारतीय हा शब्द मुसलमानांच्या आगमनापूर्वीच्या लोकांस लावून भारतीयेतिहास मुसलमानी इतिहासापासून निराळा करतां येईल. ज्यांस भारतीय म्हणतां येईल त्यांतहि आर्यन् आणि द्राविड असे दोन महावंश अनेक भाषाशास्त्रज्ञ महत्त्वाचे मानतात. आणि "आर्यन्" लोकांच्या आगमनापासून भारतीयांचा इतिहास ज्ञात आहे असें समजतात. वेदांत ज्या लोकांचें कार्य दिसून येतें आणि वेदभाषा ही ज्या लोकांची भाषा होती त्या लोकांचा हिंदुस्थानांत येण्यापूर्वींचा इतिहास द्यावयाचा हा 'आर्यन्' इतिहासाचा भाग होय. हा इतिहास निरनिराळ्या राष्ट्रांतील उत्तरकालीन अवशेषांच्या तौलनिक अभ्यासानें तयार करण्यांत आला आहे. त्या अभ्यासाकडे वेदभाषी अथवा मांत्र ( वेदभाषा व मंत्रवाङ्मय हीं ज्या लोकांचीं होतीं ते ) लोकांच्या हिंदुस्थानांतील कार्याकडे अगोदर लक्ष देऊन मग गेलें पाहिजे.

**आर्यन् व त्यांचा काल्पनिक इतिहास.**—वेदभाषी हा शब्द आर्य या शब्दाचा उपयोग न करण्यासाठीं वापरला आहे. कां कीं, आर्य शब्दाचा उपयोग करण्यांत लेखकांनीं फार घोंटाळे केले आहेत. प्रथमतः प्रश्न उत्पन्न होतो कीं, आपण इतिहास लिहितों हा कोणाचा ? आर्यांचा ? आर्य म्हणजे कोण ? आज वाटेल त्या जातीनें हें नांव स्वतःस लावून घ्यावें ही स्थिति आहे. लेखकानें किंवा वक्त्यानें स्वतःस अप्रिय अशा वर्गास हें भूषणास्पद नांव लावावयाचें नाकारावें ही जातिविषयक स्वच्छंदी लेखकांची वृत्ति आहे. तर निर्विकल्प मनानें वेदांत उल्लेखिलेले आर्य म्हणजे कोण हें ठरविलें पाहिजे. पाश्चात्त्य शास्त्रज्ञ "आर्य" शब्द "आर्यन्" या रूपानें वापरतात आणि "आर्यन्" या शब्दाचा उपयोग ज्या लोकांच्या भाषेचें संस्कृत भाषेशीं मुलीचें, नातीचें किंवा बहिणीच्या नातीचें नातें असतें त्या लोकांस लावतात. आर्य शब्दावर फिदा होऊन यूरोपीयांनीं तो शब्द स्वतःस लावून घेतला आणि यामुळें त्या शब्दास अनेक अर्थांतरें उत्पन्न झालीं. तीं लक्षांत न घेतल्यामुळें गैरसावध पाश्चात्त्य व भारतीय लेखकांची आर्य या संस्कृत शब्दाचें आर्यन् हें केवळ रूपांतर आहे अशी समजूत झाली. व वैदिक 'आर्य' शब्दाचें ते 'आर्यन्' किंवा इंग्रजी 'आर्यन्' शब्दाचें ते 'आर्य' असें भाषांतर करूं लागले. ती समजूत चुकीची आहे. 'आर्यन्' असें भाषांतर करणें हें आर्य या शब्दाच्या भारतीय उपयोगापासून दूर जाणें आहे. तथापि वेदांतील आर्य या शब्दांत यूरोपीय यांच्या "आर्यन्" या शब्दाचा अर्थ घुसविण्याचा प्रयत्न होत आहे.

यूरोपीय लेखकांनीं कल्पनापरंपरा उत्पन्न करून दिली आहे ती अशी. अत्यंत प्राचीन म्हणजे मंत्रांच्या कालीं कांहीं लोक हिंदुस्थानांत आले ते गोरे होते, आपणांस ते आर्य म्हणवीत, ज्यांशीं ते लढले ते लोक काळे होते, त्यांस ते दस्यु म्हणत. त्या दस्यूंपासून आर्यांनीं देश जिंकला. या तऱ्हेची इतिहास कसा असावा या संबंधाची मनोरम कल्पना तयार करून पाश्चात्त्य संशोधकांनीं इतिहास बराच सोपा केला आहे. आणि "आर्यांनीं" "पराभूत केलेल्या" "मूळच्या" म्हणजे "द्राविडी" लोकांस दस्यु इत्यादि विशेषणें लावलीं जात असावीं अशी कल्पना काढली गेली आहे. कातडीच्या रंगामुळें द्वेषबुद्धि अत्यंत स्वाभाविक आहे, इत्यादि सिद्धांत काढणाऱ्या आणि वर्णद्वेषाचें समर्थन करूं पाहणाऱ्या लोकांना वेदांचा अर्थ करतांना अर्थ

करणारांनीं जी पदरची कल्पनाशक्ति खर्च केली तिचा बराच उपयोग झाला आहे. आणि काळ्या वर्णामुळें हिंदुस्थानांतील लोकांची गोऱ्या लोकांपुढें जी मानखंडना होते, त्या खंडनेमुळें आपल्या जेतृत्वाला आधार जर कोठें सांपडेल तर पहावा आणि आपण जेत्यांतच नव्हे तर गोऱ्यांतहि मोडूं असा आधार सांपडला तर बरा या भावनेनें, हिंदुस्थानांतील सुशिक्षितांनीं आपले पूर्वज "आर्य" (म्हणजे आर्यन्) होते, यूरोपियन लोकांशीं संबद्ध जे लोक ते आर्य, आणि त्यांनीं देश्य काळ्या लोकांनां जिकलें आणि दस्यू, म्हणजे तेच काळे लोक, इत्यादि कल्पनांचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें.

यूरोपीय कल्पना अशी कीं, (१) वैदिक वाङ्मय ज्यांनीं उत्पन्न केलें ते सर्व लोक एका विशिष्ट मानववंशाचे होते. (२) त्यांना "आर्य" हें नांव सामुच्चयिक होतें. तें जातिवाचक नांव होतें आणि (३) दस्यु म्हणून जे लोक होते ते निराळ्या जातीचे होते. (४) ते काळे होते. (५) त्या काळ्यांच्या आणि गोऱ्या "आर्य" लोकांच्या संनिकर्षानें "जातिभेद" उत्पन्न झाला. (६) वर्ण आणि जाति म्हणजे एकच. (७) वर्ण याचा मूळचा अर्थ रंग. (८) रंगांत फरक हेंच जातिभेदाचें म्हणजे (प्रचलित कल्पनांप्रमाणें) चातुर्वर्ण्याचें मूळ. या कल्पना फार पसरल्या आहेत. या कल्पना कितपत बरोबर आहेत याचा तपास करण्याची शुद्धि पाश्चात्त्य किंवा भारतीय संशोधकवर्गास मुळींच नाहीं. यूरोपीय आणि भारतीय ब्राह्मणांचा वर्ग या दोघांचीहि वरील कल्पना खुशामत करतात. मग त्यांवर हल्ला तरी कोण आणि कशाला करतो. अशा तऱ्हेची मनोरचना सत्यशोधनाच्या मार्गांत बरेंच विघ्न करीत आहे. आर्य हें नांव भारतीय लोकांतील श्रेष्ठांनीं पूर्वीपासून वापरलेलें. पण तें "संशोधकां"च्या तावडींत वंशनाम झालें. संस्कृत भाषेशीं संबद्ध अशा भाषा बोलणारांचें हें सामान्य वंशनाम होतें अशीहि कल्पना करून तें वंशनाम निरनिराळ्या यूरोपीय राष्ट्रांच्या कोणत्या कोणत्या नांवांत, अगर शब्दांत अद्याप टिकलें आहे, याचाहि पत्ता यूरोपीयांनीं लावला आहे. आर्य हें वंशनाम होतें हें आमच्या मतें अजून सिद्ध होत नाहीं. आर्य आणि दस्यु म्हटलेले लोक भिन्न मानव वंशांतले होते आणि ज्यांशीं आर्य लढले ते सर्व "दस्यू" म्हटले जात होते, या दोन कल्पनाच आम्ही ग्रहण करावयास तयार नाहीं. ऋग्वेदांत फार लढाया दिसत नाहींत. ज्या कांहीं दिसतात त्यांपैकीं कांहीं देवांच्या व उरलेल्यापैकीं बहुतेक दाशराज्ञ युद्धाशीं संबद्ध दिसतात. दाशराज्ञ युद्धांतील स्वारी करणाऱ्यांस प्रतिकार करणारा पक्ष केवळ दस्यू होता असें दिसत नाहीं. ऋग्वेदांत ज्या लोकांची चळवळ व्यक्त होते ते लोक "आर्य" या वंशबोधक सामान्य नामानें आपणां स्वतःस उल्लेखीत असत हेंच आम्ही नाकबूल करतों. आर्य, दस्यु, वर्ण या तीन गोष्टींसंबंधानें आणि वेदांतील लढायांचा या तीन कल्पनांशीं संबंध काय होता या संबंधानें सत्य काय होतें हें वैदिक पुराव्यावरून काढणें ही वेदमूलक इतिहासाची पहिली पायरी होय. आर्य हें नांव यजनशील वर्गाचें व तसेंच "शिष्ट" या अर्थाचें म्हणजे वर्गवाचकच होतें असें आमचें मत झालें आहे. आर्य हें वेदकालीन निरनिराळ्या राष्ट्रांचें सामान्य नाम कितपत होतें याचा विचार पुढें केलाच आहे.

एक विचार प्रथम स्थिर केला पाहिजे तो हा कीं, समाजांतील विशिष्ट वर्गवाचक जें नांव असेल तें राष्ट्रवाचक नांव नव्हे. आपणांस आतां हें पाहिलें पाहिजे कीं, "आर्य" किंवा "अर्य" हा शब्द जातिवाचक आहे कीं वर्गवाचक आहे. याच्या विषयीं कांहीं एक संशय राहूं नये म्हणून हे शब्द ऋग्वेद संहितेमध्यें जेथें जेथें आले आहेत, त्या सर्व ऋचा त्यांच्या अर्थासह पुढें दिल्या आहेत. आर्यस्वरूपनिश्चयाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कां कीं, प्राचीन इतिहासाचा पाया हाच आहे. आणि यासाठीं आर्य शब्दाचा आणि तशाच अर्थानें येणाऱ्या अर्य शब्दाचा प्रत्येक उपयोग वाचकानें तपासावा अशी आमची शिफारस आहे.

वेदांत अर्य व आर्य असे दोन शब्द आहेत. कांहीं ठिकाणीं अर्य व आर्य हे दोन्ही शब्द एकाच अर्थानें आहेत तथापि बऱ्याच ठिकाणीं नाहींत. लोकनिश्चयार्थ आर्य शब्दाचें सूक्ष्म निरीक्षण करते प्रसंगीं अर्य शब्दाचेंहि निरीक्षण केलें पाहिजे. आपणांस लोकनिश्चय करावयाचा तो हा कीं वेदांत अर्य व आर्य या शब्दांचे अर्थ काय होते. आर्य हा शब्द किंवा अर्य हा शब्द शिष्टजनवाचक होता काय? अथवा यजनशील वर्गाचा द्योतक होता काय? कीं तो वंशवाचक होता. या शब्दाच्या स्पष्टीकरणासाठीं जे उतारे पुढें दिले आहेत त्या उताऱ्यांवरून असें दिसून येईल कीं, पुष्कळ ठिकाणीं ऋचांचा अर्थ स्पष्ट होत नाहीं; तथापि त्या ऋचांचा अर्थ जितका स्पष्ट होतो तितका अर्य किंवा आर्य हा शब्द गुणवाचक आहे अगर वंशवाचक आहे याचा निश्चय करण्यास अपुरा नाहीं.

मांत्र अथवा वेदभाषी, आर्यन् व आर्य या तीन शब्दांचा संबंध आम्हीं येणेंप्रमाणें दर्शवितों. आर्यन् हा मानववंशविषयक आणि आजचा शब्द होय. कांहीं इराणी व यूरोपीय व कांहीं भारतीय ज्या वंशांत भाषासंबंधामुळें मोडतात तो समुच्चय आर्यन् या नांवानें संबोधिला जातो. शक, मग वगैरे देखील आर्यन्मध्यें मोडतील. आर्य म्हणजे शिष्ट अगर यजनशील या अर्थानें वेदांत वापरला आहे. दास, दस्यु हे याचे विरोधवाचक शब्द होत. हा जातिबोधक शब्द नव्हे. वेदभाषी हा शब्द आर्यन्वंशांतील एका विभागाचा द्योतक आहे. हिंदुस्थानामध्यें वेद आणणाऱ्या लोकांच्यापूर्वीं जे लोक होते, ते आर्यन् असतील पण ते मांत्र अथवा वेदभाषी नाहींत.

आर्य आणि दस्यु यांचा सामुच्चयिक कलह वेदांत वर्णिला आहे अशी जी जुनी लोकांनीं प्रचलित केलेली समजूत आहे तिचा विचार प्रथम झाला पाहिजे. आपणास वरील आर्यविषयक प्रश्न सोडविण्यासाठीं तीन प्रश्न विचारले पाहिजेत,

(१) आर्य किंवा अर्य शब्द महावंशवाचक किंवा राष्ट्रवाचक किंवा राष्ट्रसमुच्चयवाचक आहेत काय?

( २ ) त्यांचा आणि दस्यूंचा सामुच्चयिक कलह वेदांत आहे काय ?

( ३ ) आर्यविषयक उतारे एकत्र केले तर त्यांची इतिहास-सूचक संगति लागते काय ?

हे तीन प्रश्न मनांत धरून आपण मंत्रराशींचें अवलोकन केलें तर वरील तीनहि प्रश्नांस नकारार्थी उत्तराखेरीज दुसरें उत्तर देतां येत नाहीं.

**दस्यु नांवानें ओळखल्या जाणाऱ्या लोकांनीं हिंदुस्थान वसला होता त्यांस आर्यन् लोकांनीं जिंकल्याची कथा वेदांत आहे म्हणून पूर्वीच्या लेखकांनीं दिलेली माहिती चुकीची आहे.**

आर्यन् म्हणून ज्या महावंशास आज लोक संबोधितात तो शब्द आर्य शब्दाचें रूपांतर आहे दुसरें कांहीं नाहीं, आणि संशोधकांनीं संस्कृत ग्रंथांतून वापरलेला आर्य शब्द वापरतांना त्याचें आर्यन् हें रूप केलें एवढेंच, तसें करण्यानें अर्थांतर झालें नाहीं, अशी बरीचशी प्रचलित समजूत आहे, पण ती चुकीची आहे. यूरोपीय संशोधकांनां आर्य हा शब्द वैदिक ग्रंथांत पाहिला तो दास आणि दस्यु यांच्याशीं विरोधवाचक दिसला आणि मंत्रवाङ्मयाचें क्षेत्र पंजाब पाहिलें, तेव्हां आर्य ही कोणती तरी एक नवीन जात होती व ज्या अर्थी ती पंजाबांत आहे त्या अर्थी ती देशप्रवेश करीत होती अशी त्यांची कल्पना झाली. संस्कृत भाषेशीं व वेदभाषेशीं इतर राष्ट्रांचा संबंध दिसला तेव्हां त्या सर्व राष्ट्रांसहि आर्य म्हणजे आर्यन् हें नांव लावण्यांत आलें. हेंच सामुच्चयिक नांव पसंत होण्याचें कारण हें कीं, वेदांतील आर्य हें त्यांस जातिवाचक नांव वाटलें आणि वेद ज्याअर्थी सर्वांत जुना ग्रंथ त्याअर्थी त्यांत उल्लेखिलेल्या लोकांचें आर्य हें नांव सामुच्चयिक जुनें नांव असावें अशी समजूत झाली. पुढें भाषाशास्त्र जसें वाढूं लागलें तेव्हां संस्कृत भाषेशीं संबंध दृष्टीस पडणाऱ्या सर्व भाषांस हें नांव मिळालें आणि आर्यन् हें एक महावंशवाचक नांव तयार झालें. त्याचा परिणाम असा झाला कीं, वेदांतील किंवा इतर संस्कृत ग्रंथांतील आर्य या शब्दासहि वंशवाचक म्हणजे जातिवाचक अर्थ गैरसावध लेखकांनीं चिकटविला. यासाठीं आर्यन् नांवाची एक जाति देशप्रवेश करीत आहे असा पुरावा मंत्रांत आहे या कल्पनेचेंच आपण परीक्षण करूं.

**"आर्य" शब्दाचा अर्थनिश्चय.-** पुढील ऋग्वेदांतील अर्य, आर्य व तत्साधित शब्दांविषयींच्या उताऱ्यांवरून स्पष्ट होईल, कीं अर्य किंवा आर्य या दोन्ही शब्दांनीं महावंशवाचक ( म्हणजे रेस Race हा अर्थ देणारा ) एकहि उतारा वेदांत नाहीं. अर्थ सायणानुसार दिला आहे व इतर पंडितांचा अर्थाविषयीं मतभेद असल्यास तोहि दिला आहे.

प्रथमतः अर्य शब्द घेतला आहे आणि त्याचा वाक्यांत अर्थ जाड्या अक्षरांनीं दिला आहे.

अर्य हा शब्द आर्यवाचक अनेक ठिकाणीं नसून केवळ अरि शब्दाचें अनेकवचन म्हणून आला आहे. तथापि वाचकांच्या प्रत्यक्ष अवलोकनासाठीं म्हणून तसेहि उतारे दिले आहेत.

**निसर्वसेन इषुधीरसक्त समर्यो गा अजति यस्य वष्टि**
[ ऋ. १. ३३, ३. ]

सकल सेनायुक्त **श्रेष्ठ** ( इंद्र ) भाता पाठीवर चढवितो. ज्याला गाई देण्याची इच्छा करतो त्याच्या घरीं चांगल्या रीतीनें गाई आणतो.

[ अर्य = पालयिता (पंडित) ].

**वनेम पूर्वीरर्यो मनीषा अग्निः सुशोको विश्वान्यश्याः**
( ऋ. १. ७०, १ )

(आम्हीं) स्तोत्रानें पुष्कळ **शत्रूंना** संहारून टाकूं. सुप्रकाश अग्नि सर्व कर्में व्यापो.

**दधन्नृतं धनयन्नस्य धीतिमादिदर्यो दिधिष्वो विभृत्राः।**
( ऋ. १. ७१. ३. )

आङ्गिरस खऱ्या ( अग्नी )ला स्थापिते झाले, आणि अग्नीसंबंधीं पूजाअर्चा धन समजूं लागले. **श्रेष्ठ** अग्निहोत्र धारण करणारे अग्नीला भजूं लागले.

**सनेम वाजं समिथेष्वर्यो भागं देवेषु श्रवसे दधानाः।**
( ऋ. १. ७३, ५ ).

आम्हांला संग्रामांत **शत्रूंचें** धन मिळो; मग यश मिळावें म्हणून आम्ही देवांना हविर्भाग देत जाऊं.

[ अर्यः = अरि म्हणजे शत्रु. याचें अनेकवचन ( ग्रिफिथ, सायण व पंडित. ) ]

**यो अर्यो मर्तभोजनं पराददाति दाशुषे।**
**इन्द्रो अस्मभ्यं शिक्षतु. ... ...॥**
( ऋ. १. ८१, ६ ).

जो **प्रभु** ( इंद्र ) हविर्दात्या उपासकाला उपर्युक्त अन्नादि पदार्थ देतो, ते पदार्थ तो इंद्र आम्हांला देवो.

[ अर्यः = प्रभु ( इंद्र ) पंडित ].

**अन्तर्हिख्यो जनानामर्यो वेदो अदाशुषाम्।**
( ऋ. १. ८१, ९ ).

हवि न अर्पण करणाऱ्या लोकांच्या घरीं असलेलें धन तुला **प्रभूला** माहीत आहे.

[ अर्यः = सर्वेषां स्वामिः ( प्रभु = इंद्र ) पंडित ]

**पैद्वो वाजी सदमिद्धव्यो अर्यः।**
( ऋ. १. ११६, ६ ).

पेद्व नामक उपासकाच्या अश्वाची नेहमीं धांवा करण्यासारखी ( बोलावण्यासारखी ) **योग्यता** आहे.-( पंडित )

[ अर्यः = शत्रूणां प्रेरयिता (सायण) ]

**युवं श्वेतं पेदव इन्द्रजूतमहिहनमश्विना दत्तमश्वम्।**
**जोहूत्रमर्यो अभिभूतिमुग्रं सहस्रसां वृषणं वीड्वङ्गम्।**
( ऋ. १. ११८, ९ ).

हे अश्वी हो, तुम्ही पेदूला शुभ्रवर्णाचा, इंद्रानें पाठविलेला **शत्रूंना** मारणारा, मोठ्यानें खिंकाळणारा, सामर्थ्यवान सहस्रावधि धन देणारा तरुण बळकट घोडा देते झालेत.

[ अर्यः = अरेः शत्रोः अभिभूतिम् ( ग्रिफिथ, सायण व पंडित ) ]

**आनो भज मघवन् गोष्वर्यो** ( ऋ. १. १२१, १५ ).

हे **स्वामी** ( धनपती इंद्रा ), तूं आम्हांला गाई मिळवून दे.

[ अर्यः = स्वामी ( सायण ); अर्यः = धनपतिः ( पंडित ) अर्यः = शत्रु f०० ( ग्रिफिथ ) ]

**अर्यो गिरः सद्य आजग्मुषी रोस्राश्चाकन्तूभयेष्वस्मे** ( ऋ. १. १२२, १४ ).

हे दैदीप्यमान ( देव ) आम्हीं **भाविकपणानें केलेल्या** स्तुती आम्हां उभयतांवर कृपा करून मान्य करोत.

[ अर्यः = अरीः देवान्प्रति गन्त्रीः = भाविका ( पंडित ), अर्यः = अरणीयो विशेषां देवानां संघः जग्मुषीः । सायण ]

**अध यदेषां पृथुबुध्नास एतास्तीर्थे नार्यः पौंस्यानि तस्थुः ।** ( ऋ. १. १६९, ६ ).

ज्याप्रमाणें युद्धभूमीवर **शत्रूंचीं** सैन्यें उभीं असतात त्याप्रमाणें हे स्थूलजघन हरीण उभे आहेत.

[ अर्यः = अरेः शत्रोः ( सायण ) अर्यः = रणोद्युक्तस्य स्वामिनः ( पंडित, ग्रिफिथ ) ]

**तावामद्यतावपरं हुवेमोच्छन्त्यामुषसि वन्हिरुक्थैः ।**
**नासत्या कुहचित् सन्तावर्यो दिवो नपाता सुदास्तराय॥** ( ऋ. १. १८४, १ ).

हे नासत्य हो ( अश्वीहो ), तुम्हां सुपुत्रांनां, तुम्ही कोठेंहि असला तरी, उषःकाळ होतांच हवींनीं व स्तोत्रांनीं भक्तिपूर्वक **यजमानासाठीं** आवाहन करूं. आज आह्वान करूं व उद्यां करूं.

[ अर्यः = स्तोत्रशील ( पंडित ). अर्यः = ईरयिता ( सायण ) ]

**भूरिचिदर्यः सुदास्तरायेषा मदन्त इषयेम देवाः ।** ( ऋ. १. १८५, ९ ).

देव, हीं स्तोते आम्हीं अन्नयुक्त असें **यजमानाला** पुष्कळ धन इच्छितों.

**विश्वा इदर्यो अभिदिप्स्वो मृधो बृहस्पतिर्विववर्हा रथाँइव** ( ऋ. २. २३, १३ ).

स्वामी बृहस्पति, आमचा पराभव करणाऱ्या; उपद्रव करणाऱ्या व हिंसक अशा **शत्रूंना** रथाप्रमाणें तोडतो. ( अनुपासक पंडित ).

**बृहस्पते अतियदर्यो अर्हाद्द्युमद्विभाति । तद् ... धेहि ...** ( ऋ. २. २३, १५ )

हे बृहस्पते, **श्रेष्ठ** मनुष्य जें योग्य मानील जें तेजोयुक्त असेल, तें दे.

**अपां नपादसुर्यस्य मह्नाविश्वान्यर्यो भुवना जजान** ( ऋ. २. ३५, २ ).

**स्वामी** अग्नि बलसामर्थ्यानें सर्व जग उत्पन्न करता झाला.

**आ याहि पूर्वीरति चर्षणीराँ अर्य आशिष उप नो हरिभ्याम् ।** ( ऋ. ३. ४३, २ ).

( हे इंद्र ) पुरातन लोकांना सोडून ये. ( आणि आमचा ) **स्वामी** तूं आमच्या प्रार्थना घोड्यासह येऊन स्वीकार.

[ अर्यः गमन करणाऱ्या ( पंडित ). ]

**अनन्ते अन्तः परिवीत आगाच्छुचिः शुक्रो अर्यो रोरुचानः ।** ( ऋ. ४. १, ७ ).

शुद्ध, तेजस्वी, देदीप्यमान ( आणि ) अनन्त अन्तरिक्षांत ( स्वतेजानें ) वेष्टिलेला **प्रभु** ( अग्नि ) येवो.

**अतस्त्वं दृश्याँ अग्न एतान्पड्भिः पश्येरद्भुताँ अर्य एवैः ।** ( ऋ. ४. २, १२ ).

म्हणून हे अग्ने ( यज्ञाचा ) स्वामी तूं अद्भुत व रम्य अशा देवांना पायांनीं ( ज्वालांनीं ) पाहतोस.

**आ यूथेव क्षुमति पश्वो अख्यद्देवानां यज्जनिमान्त्युग्र ।**
**मर्तानां चिदुर्वशीरकृप्रन्वृधे चिदर्य उपरस्यायोः ॥** ( ऋ. ४. २.१८ ).

हे प्रबल अग्ने शब्द करणाऱ्या पशूंच्या कळपांत पशु पाहिल्याप्रमाणें मेघ पाहिले म्हणजे मनुष्याच्या कामना पूर्ण होतात, आणि **अर्य (स्वामी)** पेरलेल्या धान्याच्या आणि भृत्यांच्या संरक्षणाविषयीं समर्थ होतो.

[ अर्य = गमनशील ( पंडित ). ]

**स ते जानाति सुमतिं यविष्ठ य ईवते ब्रह्मणे गातुमैरत् ।**
**विश्वान्यस्मै सुदिनानि रायो द्युम्नान्यर्यो विदुरो अभि द्यौत् ॥** ( ऋ. ४. ४, ६ ).

हे सदा तरुणा अग्ने, जो गमन करणाऱ्या स्तोत्याप्रीत्यर्थ स्तोत्रें म्हणतो. त्यावर तुझा अनुग्रह होतो. **ईश्वर** असणारा तूं स्तोत्र करणाऱ्या यजमानाला सर्व उत्तम संपत्ति, वैभव व चांगले दिवस दे.

यास्कानें अर्य शब्दाचा ईश्वर असा अर्थ केला आहे. निघण्टु-मध्यें तसेंच आहे. सायणाचार्य बहुतेक ठिकाणीं स्वामि व क्वचित् स्थलीं शत्रु असा अर्थ करितात. रा. पंडित बहुतेक शत्रु व कांहीं ठिकाणीं स्वामी असा अर्थ करितात. गमन करणारे चालून जाणारे किंवा येणारे असाहि अर्थ आहे.

**एभि र्नृभिरिन्द्र त्वायुभिष्ट्वा मघवद्भि र्मघवन् विश्व आजौ ।**
**द्यावो न द्युम्नैरभि सन्तो अर्यः क्षपो मदेम शरदश्च पूर्वीः ॥** ( ऋ. ४. १६, १९ ).

हे इंद्र, सर्व संग्रामांत, धनवान् अशा तुझ्या भक्तावरोबर सुप्रदेशाप्रमाणें प्रकाशणारे आम्ही **शत्रूंचा** पराभव करण्याकरितां पुष्कळ रात्रीं व पुष्कळ वर्षें तुला स्तवूं.

**इमं यज्ञं त्वमस्माकमिन्द्र पुरो दधत्सनिष्यसि क्रतुं नः ।**
**श्वघ्नीव वज्रिन्त्सनये धनानां त्वया वयमर्य आजिं जयेम ॥** ( ऋ. ४. २०, ३ ).

हे **अर्य (स्वामी)** इन्द्रा, तूं आमचा पुरस्कर्ता होऊन आमचा यज्ञ सेवन कर. हे वज्रधरा, धनलाभाकरितां पारध्याप्रमाणें युद्ध जिंकूं असें क.

**यदा समर्यं व्यचेदृघावा दीर्घं यदाजिमभ्यख्यदर्यः ।**
**अचिक्रदद्वृषणं पत्न्यच्छा दुरोण आ निशितं सोमसुद्भिः ।** ( ऋ. ४. २४, ८ ).

ज्या वेळीं शत्रूंना मारणारा इन्द्र रणांत जातो, ज्या वेळीं **स्वामी** इन्द्र पुष्कळ युद्ध करितो, त्या वेळीं सोम पिऊन तर्र झालेल्या इन्द्रास त्याची पत्नी हांका मारते.

**आ नः स्तुत उप वाजेभिरूती इन्द्र याहि हरिभिर्मन्दसानः।**
**तिरश्चिदर्यः सवना पुरुण्याङ्गूषेभिर्गृणानः सत्यराधाः।**
(ऋ. ४. २९, १).

हे इन्द्रा, आनंदी, **स्वामी**, गायलेला, व सत्यधन असा तूं, अन्नासह पूर्ण अशा आमच्या यज्ञांत संरक्षणाकरितां घोड्यासह ये.

**उत वाजिनं पुरुनिष्षिध्वानं दधिक्रामु ददथुर्विश्वकृष्टिम्।**
**ऋजिप्यं श्येनं प्रुषितप्सुमाशुं चर्कृत्यमर्यो नृपतिं न शूरम्॥**
(ऋ. ४. ३८, २).

आणि बलवान्, पुष्कळ शत्रूंचा पराभव करणाऱ्या दधिक्रा देवाला सकल लोक ज्याची आज्ञा मानतात, सरळ व स्तुत्य गमन करणारा दीप्तरूपी **शत्रूंचा** नाश करणाऱ्या शूर राजाप्रमाणें असणाऱ्या देवाला द्यावापृथिवी धारण करितात.

**विहि होत्रा अवीता विपो न रायो अर्यः।**
**वाय वा चन्द्रेण रथेन याहि सुतस्य पीतये॥**
(ऋ. ४. ४८, १).

जसा एखादा शत्रूंना कांपविणारा **अर्य** संपत्ति (उपभोगितो) त्याप्रमाणें तूं अभक्षित आहुति भक्षण कर. तूं आल्हादकारक रथानें सोमरस पिण्यासाठीं ये.

**बृहस्पत इन्द्र वर्धतं नः स चा सा वां सुमतिर्भूत्वस्मे।**
**अविष्टं धियो जिगृतं पुरंधीर्जजस्तमर्यो वनुषामरातीः।**
(ऋ. ४. ५०, ११).

हे बृहस्पते, हे इन्द्रा, तुम्ही आमची अभिवृद्धि करा. तुमची अनुग्रह बुद्धि आमचेवर होवो. कर्में रक्षा, आमची स्तुति ग्रहण करा, आमचे **शत्रू (अर्य)** नष्ट करा.

[ अर्य = देवहीन ( विशेषण ) पंडित ]

**तुविग्रीवो वृषभो वावृधानो शत्र्वर्यः समजाति वेदः।**
(ऋ. ५. २, १२).

बहुज्वालायुक्त, (इच्छा) पूर्ण करणारा व वाढणारा अग्नि **शत्रूंचें (अर्यः)** धन सहज प्राप्त करून देतो.

**या इत्था मघवन्ननु जोषं वक्षो अभिप्रार्यः सक्षि जनान्।**
(ऋ. ५. ३३, २).

हे इन्द्रा, जीं स्तोत्रें तूं प्रेमपूर्वक म्हणतोस तीं म्हणून आमच्या **शत्रूला** पराभूत कर.

**प्रार्य स्तुषे तुविमघस्य दानम्**
(ऋ. ५. ३३, ६).

मी श्रेष्ठ व धनवानाच्या दानाची स्तुति करितों.

**सहस्रा मे च्यवतानो ददान आनूकमर्यो वपुषेनार्चत्।**
(ऋ. ५. ३३, ९).

मला अपरिमित **धन** देणाऱ्या च्यवतानानें शरीरावर घालण्याचे अलंकार दिले.

**सहस्रसामाग्निवेशिं गृणीषे शत्रिमग्न उपमां केतुमर्यः।**
(ऋ. ५. ३४. ९).

हे अग्ने **अर्य** असा मी अपरिमित **धन** देणारा अग्निवेशसुत शत्रीला स्तवितों.

**तं नाकमर्यो अगृभीतशोचिषं रुशत्पिप्पलं मरुतो वि धूनुथ।**
(ऋ. ५. ५४, १२).

हे मरुतांनों **गमन करणारे** तुम्ही ह्या आदित्याला (आणि) शुभ्रवर्ण तेजस्वी उदकाला हलवा (म्हणजे तें खालीं पडेल).

**नाना ह्य १ ग्नेवसे स्पर्धन्ते रायो अर्यः।**
**तुर्वन्तो दस्युमायवो व्रतैः सीक्षन्तो अव्रतम्।**
(ऋ. ६. १४, ३).

अग्ने, **शत्रूंची** संपत्ति तुझ्या स्तोत्याच्या रक्षणाकरितां अनेक प्रकारें स्पर्धा करिते. दस्यूंचा क्षय करणारे व व्रतांनीं व्रतविरोधी लोक पराभूत करण्याची इच्छा करणारे स्तोते लोक आहेत.

**स त्वं दक्षस्यावृको वृधो भूरर्यः परस्यान्तरस्य तरुषः।**
(ऋ. ६. १५, ३).

अग्ने, त्रास न देणारा तूं अनुष्ठानसमर्थ लोकांस उत्कर्षयुक्त करतोस आणि दूरच्या आणि जवळच्या **शत्रूंपासून** रक्षण करणारा होतोस.

**तरन्तो अर्यो अरातीर्वन्वन्तो अर्यो अरातीः।**
(ऋ. ६. १६, २७).

गमन करणाऱ्या **शत्रुसेना** उलंघून जाणारे व गमन करणाऱ्या शत्रूसेनांचे हिंसा करणारे होतात.

**द्यौ र्नय इन्द्राभिभूमार्य स्तस्थौ।**
(ऋ. ६. २०, १).

द्यौ ज्याप्रमाणें भूतमात्राचें आक्रमण करितो, त्याप्रमाणें इंद्र संग्रामांत **शत्रूंचें** अतिक्रमण करील.

**मित्रोनो अत्र वरुणश्च पूषार्यो वशस्य पर्येतास्ति।**
(ऋ. ६. २४, ५),

मित्र, वरुण, पूषा आणि **प्रेरक** सूर्य हे देव, हे इन्द्रा आमच्या इच्छित फलाला पूर्ण करणारे होवोत.

**अधस्मा ते चर्षणयो यदेजानिन्द्र त्रातोत भवा वरूता।**
**अस्माकासो ये नृतमासो अर्य इन्द्रसूरयो दधिरे पुरो नः॥**
(ऋ. ६. २५, ७).

आणि हे **श्रेष्ठ (अर्य)** इन्द्रा, तुझे लोक ज्यावेळीं (भीतीनें) कंपित होतात त्यावेळीं तूं त्यांचा त्राता हो, आणि परामर्श घेणारा हो. तुझ्याकडे येणाऱ्या आमच्या लोकांचा व स्तोत्र करणारांचा संरक्षण करणारा हो.

**स तु श्रुधि श्रुत्या यो दुवोयुर्द्यौर्न भूमाभिरायो अर्यः।**
(ऋ. ६. ३६, ५).

हे इन्द्रा मजेदार स्तोत्रें ऐक आमची सेवा इच्छिणारा **शत्रूंचें** धन अभिभूत करतोस, तो तूं आमचीं स्तोत्रें ऐक.

**तत्सुनो विश्वे अर्य आ सदा गृणन्ति कारवः।**
(ऋ. ६. ४५, ३३).

(त्या बृबुला) आमचे सर्व स्तुति (प्रेरित) करणारे **अर्य** गातात,

**मानस्तारीन्मघवन्रायो अर्यः ।**

( ऋ. ६. ४७, ९ ).

हे इन्द्र, दुसरा कोणीहि धनाचा **स्वामी** आमचीं धनें नाहींशीं न करो.

**आमायूषन्नुपद्रवशंसिष न्नुते अपि कर्ण आघृणे**
**अघा अर्यो अरातयः ।**

( ऋ. ६. ४८, १६ ).

हे पूषन्, माझ्या रक्षणाकरितां धांव. हे प्रकाश देणाऱ्या, हिंसक आणि **चालून येणाऱ्या शत्रूंना** पीडा दे. मी तुझ्या कानाजवळ प्रशंसा करितों.

**अभिचष्टे सूरो अर्य एवान् ।**

( ऋ. ६. ५१, २ ).

**स्वामी** ( होऊन ) सर्व इच्छा प्रकाशित करतो.

**इन्द्राग्नी तपन्ति माघा अर्यो अरातयः ।**
**अपद्वेषांस्याकृतं युयुतं सूर्यादधि ॥**

( ऋ. ६. ५९, ८ ).

हे इन्द्राग्नी हो, हिंसक आणि **चालून येणाऱ्या** शत्रु ( सेना ) पीडा देतात. त्यांना नाहींसे करा. शत्रूंना ( मारून टाक ) सूर्यापासून वेगळे कर.

**इन्धे राजा समर्यो नमोभिः ।**

( ऋ. ७. ८, १ )

तेजस्वी, ( आमचा ) **स्वामी** अग्नि स्तुति करून प्रज्वलित केला जातो.

**स शर्धदर्यो विषुणस्य जन्तोः ।**

( ऋ. ७. २१, ५ ).

स्वामी इन्द्र भयंकर प्राण्यांच्या ( हिंसेविषयीं ) उत्सुक होवो.

**वन्वन्तु स्मा तेवसा समीके भीतिमर्यो वनुषां शवांसि ।**

( ऋ. ७. २१, ९ ).

हे इन्द्र, तुझ्या कृपेनें युद्धांत **शत्रूंशीं** स्वारी आणि हिंसकांचीं बलें यांचा स्तोते नाश करितात.

• **मानो निदे च वक्तवेर्यो रन्धी रराव्णे**

( ऋ. ७. ३१, ५. )

हे **स्वामी (अर्यः)** ! आम्हाला निंदकाच्या, मर्मभेदी भाषण करणाऱ्याच्या व अनुदाराच्या स्वाधीन करूं नकोस.

**उत न एषु नृषु श्रवोधुः प्रराये यन्तु शर्धन्तो अर्यः ।**

( ऋ. ७. ३४, १८ )

( आमच्या ) ह्या लोकांत देवांना अन्न दिलें जावो. धनाकरितां हपापलेले आमचे **शत्रू** नष्ट होवोत.

**ते चिद्धि पूर्वीरभिसन्ति शासा विश्वाँ अर्य उपरताति वन्वन् ।**
**इन्द्रो विभ्वाँ ऋभुक्षावाजो अर्यः शत्रोर्मिथत्या कृणवन्वि नृम्णम् ।**

( ऋ. ७. ४८ ३ ).

ते देव पुष्कळ ( आमच्या शत्रूंना ) आयुधानें पराभूत करितात. आणि त्यांनीं आयुधानें युद्धांत **शत्रूला** पराभूत केलें. शत्रूंवर गमन करणारे विभ्वन्, ऋभुक्षा, वाज हे देव शत्रूचें बल हिंसेनें नाहींसें करोत.

**अधस्मानो मरुतो रुद्रियासस्त्रातारोभूत पृतनास्वर्यः ।**

( ऋ ७. ५६, २२ ).

• आतां हे रुद्रपुत्र मरुतहो, युद्धांत **शत्रु**सेनेपासून आमचें रक्षण करा.

**सीक्षन्त मन्युं मघवानो अर्य उरु क्षयाय चक्रिरे सुधातु ।**

( ऋ. ७. ६०, ११ ).

**स्तोत्याचीं** स्तोत्रें उदार देव ऐकतात. व त्याला राहण्याकरितां स्थान करितात.

**मित्रस्तन्नो वरुणो देवो अर्यः प्रसाधिष्ठेभिः पथिभिर्नयन्तु**

( ऋ. ७. ६४, ३ ).

मित्र, वरुण आणि **अर्यमा** हे तीन देव ( योग्यासाठीं ) साधक मार्गानें प्राप्त होवोत.

**तिरो अर्यो हवनानि श्रुतं नः ।**

( ऋ. ७. ६८, २. )

( आमच्या ) **शत्रूंशीं** बोलावणीं टाकून आमचीं बोलावणीं ऐका.

**इन्द्रावरुणावभ्यातपन्ति माघान्यर्यो वनुषामरातयः**

( ऋ. ७. ८३, ५ )

हे इन्द्रावरुणहो, **शत्रूंचीं** शस्त्रें मला त्रास देतात. आणि हिंसकांपैकीं ( जे ) शत्रु ( ते ) त्रास देतात.

**अचेतयदचितो देवो अर्यः ।**

( ऋ. ७. ८६, ७ )

**स्वामी** आम्हां अज्ञानांस ज्ञान देवो.

**आदेवासो नितोशनासो अर्यः ।**
**घ्नन्तो वृत्राणि सूरिभिः ष्याम ।**

( ऋ. ७. ९२, ४ ).

जे देवयुक्त ( म्हणूनच ) **शत्रूला** मारणारे त्या स्तोत्याकडून शत्रूला मारणारे आम्ही होऊं या.

**प्रतत्ते अद्य शिपिविष्ट नामार्यः शंसामि वयुनानि विद्वान् ।**

( ऋ. ७. १००, ५ ),

हे प्रकाशण्याप्त, **श्रेष्ठ** व ज्ञातव्य जाणणारा मीं आज तुझी अत्यन्त स्तुति करितों.

**वितर्तूर्यन्ते मघवन् विपश्चितोऽर्यो विपो जनानाम्**

( ऋ. ८. १, ४. ).

हे मघवन्, तुझे स्तोते **चाल करून जाणारे ( अर्यः )** व शत्रूंना कांपवणारे होतसाते त्यांच्यावर अनेक संकटें आणतात.

**अदान्मे पौरुकुत्स्यः पञ्चाशतं त्रसदस्युर्वधूनाम् ।**
**मंहिष्ठो अर्यः सत्पतिः ।**

( ऋ. ८. १९, ३६ ).

मोठा उदार, **स्वामी** किंवा **अभिगम्य,** स्तोत्यांचा त्राता अशा पुरुकुत्सपुत्र त्रसदस्यूनें मला पन्नास दासी दिल्या.

**दृह्ळाचिदर्यः प्रमृशाभ्याभर न ते दामान आदभे**

( ऋ. ८. २१, १६ ).

हे इन्द्र, आमचा **स्वामी** असणारा तूं आम्हाला स्थिर संपत्ति दे. आम्हाला थोर कर. ( कारण ) तुझीं दानें कोणीहि काढून घेऊं शकत नाहीं.

अर्यो गयं मंहमानं विदाशुषे
(ऋ. ८. २४, २२).

**श्रेष्ठ** इन्द्र हविर्भाग देणारांनां मोठें गृह ( देतो ).

आयाह्यर्य आपरिस्वाहा सोमस्य पीतये ।
(ऋ. ८. ३४, १०).

**ईश्वर** असणारा तूं सर्व बाजूंनीं ये. तुला पिण्याकरितां सोम अर्पण करितों.

न्यरातीररावणां विश्वा अर्यो अरातीरितो युच्छन्तु
(ऋ. ८. ३९, २).

हे अग्ने, हविर्भाग देणाऱ्यांच्या शत्रूंस नाहींसे कर. सर्व (अर्यः) **शत्रू** नाहींसे होवोत.

अलर्ति दक्ष उत मन्युरिन्दो मा नो अर्यो अनुकामं परादाः
(ऋ. ८. ४८, ८).

हे इन्दो, ( आमचा ) बलाढ्य शत्रु जावो. क्रोध नाहींसा होवो. आणि अशा **शत्रूस** आमच्या इच्छेप्रमाणें नाहींसें कर.

येन वंसाम पृतनासु शर्धतस्तरन्तो अर्य आदिशः ।
(ऋ. ८. ४९, १२).

ज्याच्या योगानें संग्रामामध्यें शस्त्रें फेंकणाऱ्या **शत्रूंनां** आम्ही जिंकतों.

विपोर्यो मानस्य स क्षयः ।
(ऋ. ८. ५२, ७).

तो श्रेष्ठ इन्द्र **स्तोत्याच्या** मानाचें स्थान आहे.

विश्वाँ अर्यो विपश्चितो तिख्यस्तूयमागहि ।
अस्मे धेहि श्रवो बृहत्
(ऋ. ८. ५४, ९).

( हे इन्द्र ) **स्वामी** तूं सर्व स्तोत्यांकडे पहा. त्याकरितां तूं जलदीनें ये व आम्हांला यश दे.

तिरश्चिदर्यः सवना वसो गहि शविष्ठ श्रुधिमे हवम् ।
(ऋ. ८. ५५, १२).

शत्रूंच्या यज्ञाचा तिरस्कार करून हे **अर्य** इन्द्र ये. आणि हे बलवन् मीं केलेली स्तुति ऐक.

आपवमान नो भरार्यो अदाशुषो गयम् । कृधि प्रजावतीरिषः॥
(ऋ. ९. २३, ३).

हे पवमान, सोम न देणाऱ्यांचें **शत्रूंचें** धन आम्हाला दे व आम्हांस प्रजा व अन्नयुक्त कर.

एना विश्वान्यर्य आद्युम्नानि मानुषाणाम् ।
सिषासन्तो वनामहे ।
(ऋ. ९. ६१, ११).

ह्या सोमानें मनुष्याचीं सर्व अन्नें, **चालून जाणारे** आणि उपभोगणारे आम्ही उपभोगूं.

अर्यो नशन्त सनिषन्त नो धियः ।
(ऋ. ९. ७९, १).

**शत्रू** नष्ट होवोत. आणि आमचीं कर्मं आमचे आवडते देव उपभोगोत.

[ अर्यः = नास्तिक-ग्रिफीथ. ]

अर्यो विशां गातुरेति प्रयदानड् दिवो अन्तान्
कविरभ्रं दीद्यानः ।
(ऋ. १०. २०, ४).

यजमानांचा **गमनशील** तेजस्वी व मेधावी अग्नि ज्या वेळीं वर जातो, त्यावेळीं तो आकाश व्यापितो.

गावो यवं प्रयुता अर्यो अक्षन्ता अपश्यं सह गोपाश्चरन्तीः ।
हवा इदर्यो अभितः समायन् कियदासु स्वपतिश्छन्दयाते॥
(ऋ. १०. २७. ८).

**धार्मिक** लोकांनीं दिलेले यव ह्या गाई खात आहेत आणि त्या गोपालांच्या भोंवतालीं जमल्या आहेत हें मी पहात आहें. ते **धार्मिक लोक** त्या गाईंना आपल्याकडे हांक मारितात पण ते त्यांच्यापासून कसली अपेक्षा करीत आहेत ?

[ १ अर्य = स्वामी ( सायणाचार्य ) २ वरील अर्थ ग्रिफीथ. ]

सिषक्त्यर्यः प्र युगा जनानां सद्यः शिश्ना प्रमिनानो नवीयान्
(ऋ. १०. २७, १९).

तात्काल राक्षसवृन्दाला मारणारा, व तरुण असा **स्वामी** इन्द्र लोकांचे यज्ञांत येतो.

अक्षैर्मा दीव्यः कृषिमित्कृषस्व वित्ते रमस्व बहु मन्यमानः ।
तत्र गावः कितव तत्र जाया तन्मे विचष्टे सवितायमर्यः॥
(ऋ. १०. ३४, १३).

हे कितव, तूं जुगार खेळूं नकोस. शेतकीच कर. पैशाला जप. शेतकी केल्यानें पत्नी, गाई, बैल सर्व कांहीं मिळतें. असें सर्व **प्रेरक** ईश्वरानें मला सांगितलें आहे.

अस्तेव सु प्रतरं लायमस्यन् भूषन्निव प्रभरा स्तोममस्मै ।
वाचा विप्रास्तरत वाचमर्यो नि रामय जरितः सोम इन्द्रं ॥
(ऋ. १०. ४२, १.)

ज्याप्रमाणें धनुर्धारी आपला बाण दूर सोडतो त्याप्रमाणें याला स्तोम भूषवून अर्पण कर; अहो विप्र ! तुम्ही आपल्या स्तुतीनें **शत्रूंचें** ( अर्यः ) तोंड बंद करा; हे जरित ! माझ्या सोमयागांत तूं इन्द्राला रमव.

अभीष्वऽर्यः पौंस्यैर्भवेम ।
(ऋ. १०. ५९, ३).

आम्ही **शत्रूला** सामर्थ्यानें पराभूत करूं, असें कर.

विदद्धयऽर्यो अभिभूति पौंस्यं ।
(ऋ. १०. ७६, २).

शत्रूंना पराभूत करणारें बल **यजमान** मिळवितो.

विहि सोतोरसृक्षत नेन्द्रं देवममंसत ।
यत्रा मदद्वृषाकपिरर्यः पुष्टेषु मत्सखा विश्वस्मा-
दिन्द्र उत्तरः ॥
(ऋ. १०, ८६, १.)

सोमयागाकरितां पाठविलेले स्तोते जेथें इन्द्राला देव मानीतनासे झाले; पण त्या ठिकाणीं **स्वामी** ( अर्यः ) वृषाकपि माझा सखा सोमपानानें तृप्त झाला. तरी सुद्धां इन्द्र सर्व जगांत श्रेष्ठ आहे.

किमयं त्वां वृषाकपिश्चकार हरितो मृगः ।
यस्मा इरस्यसी दुन्वर्यो वा पुष्टिमद् वसु विश्वस्मा-
दिन्द्र उत्तरः ॥
(ऋ. १०, ८६, ३.)

हरित वर्णाचा मृग जो वृषाकपि त्यानें तुझें काय केलें आहे ? कीं तूं त्याला **उदार** ( अर्यः ) होऊन पोषयुक्त धन देतोस. इन्द्र सर्व जगांत श्रेष्ठ आहे.

**वियः पृष्टेव जनिमान्यर्य इन्द्रश्चिकाय न सखायमीषे ।**
( ऋ. १०. ८९, ३ ).

यज्ञांत उत्पन्न झालेलीं पृष्ठस्तोत्रें म्हटलीं म्हणजे इन्द्र **शत्रूंचा** नाश करितो. त्याला मित्राची जरूर लागत नाहीं.

[ अर्यः = श्रेष्ठः ग्रिफिथ. ]
**व्यर्य इन्द्र तनुहि श्रवांसि**
( ऋ. १०. ११६, ६ )

हे इन्द **स्वामी** तूं आम्हांला अन्न दे.

**विषुविश्वा अरातयोर्यो नशन्त नो धियः ।**
( ऋ. १०. १३३, ३. )

सर्व **चाल करून येणाऱ्या** (अर्यः) आमच्या शत्रूंना मारून टाक व आमचीं कर्में प्रवृत्त कर.

**अर्यो वा गिरो अभ्यर्च विद्वान् ऋषीणां विप्रः सुमतिं चकानः।**
( ऋ. १०. १४८, ३ ).

मंत्रद्रष्ट्या ऋषींचा अनुग्रह इच्छिणारा ज्ञाता व **स्वामी** अशा इन्द्रा स्तोत्याची स्तुति ऐकून सत्कार कर.

**संसमिद्युवसे वृषन्नग्ने विश्वान्यर्य आ ।**
( ऋ. १०. १९१, १. )

हे शूर अग्ने ! **स्वामी** ( अर्यः ) ! तूं सर्व भूतजात वस्तू एकत्र जमवितोस.

वरील ८८ उताऱ्यांचें थोडेसें पृथकरण करूं. अर्य याचे आपणांस जे अनेक अर्थ दिसतात, ते येणेंप्रमाणें:—अर्य याचा एक अर्थ शिष्ट, स्वामी किंवा श्रेष्ठ असा उच्च भावदर्शक आहे. अर्यः हा शब्द जेथें इन्द्र किंवा अग्नि यांचें विशेषण असेल तेथें तो शब्द अर्थात् गुणवाचक श्रेष्ठ, शिष्ट, प्रभु, स्वामी अशा अर्थींच होय. या अर्थाचे व्यंजक उतारे येणेंप्रमाणें:—

१. ३३, ३; १.८१,६; १.८१,९; १.१२१, १५ (सा. पं). १.१२२,१४; १.१८४,१; २.२३,१३; २.२३,१५; २.३५,२; ३.४३,२; ४.१,७; ४.२,१२; ४.४,६; ४.२०,३; ४.२४,८; ४.२९,१; ४.३८,२; ४.४८,१; ५.३३,६; ५.३३,९; ५.३४, ९; ६.२४,५; ६.२५,७; ६.४७,९; ७.८,१; ७.२१,५; ७.३१,५; ७.८६,७; ७.१००,५; ८.१९,३६; ८.२१,१६; ८.२४,२२; ८.३४,१०; ८.५५,१२; १०.२०,४; १०.२७,८; १०.२७,१९; १०.३४,१३; १०.८६.१ व ३; १०.१९१,१ १०.११६,६; १०.१४८,३;

अर्यः हें अरि शब्दाचें अनेकवचन जेव्हां असेल तेव्हां तो उतारा विचारास अग्राह्य होय. तथापि आम्हीं ते सर्व उतारे अशाकरितां घेतले आहेत कीं, कांहीं ठिकाणीं दुसरा अर्थ निघणें शक्य आहे. शत्रुवाचक अर्यः शब्द वापरणारे उतारे येणेंप्रमाणें :

१.७०,१; १.७३,५; १.११८,९; १.१२१, १५ ( ग्रि. ); १.१६९,६; ४.१६,१९; ५.३३,२; ६.१४,३; ६.१५,३; ६.२०,१; ६.३६,५; ७.२१,९; ७.३४,१८; ७.४८,३; ७.५६,२२; ७.६८,२; ७.९२,४; ८.४८,८; ८.४९,१२; ९.२३,३; ९.७९,१; १०.४२,१; १०.५९,३; १०.७६,२; १०.८९,३;

मालक, वैश्य, नागरिक अशा अर्थीं शब्दाचा उपयोग अनेक ठिकाणीं आला आहे. जेथें वक्ता स्वतःच्या वर्गासंबंधानें बोलत आहे, तथापि जेथें कोणत्याहि विशिष्ट विधानानें त्याचें वर्गस्वरूप निश्चित होत नाहीं. व जेथें टीकाकारांनीं स्तोता असा त्याचा अर्थ लावून काम भागविलें आहे असेहि उतारे आहेत ते ४.२,१८; ४.२०,३.

जेथें शत्रुवाचक अर्यः शब्दाचा उपयोग झाला आहे. तथापि शत्रुवाचक दुसरा शब्द आहे असेहि उतारे आहेत. ४. ५०, ११; ६. १६, २७; ६. ४८, १६; ७. ८३, ५; ८. ३९, २.

गमन करणारे, चालून येणारे हाहि एक अर्थ आहे. कांहीं ठिकाणीं (उ. ९. ६१, ११) एकाच शब्दसमुच्चयाचे भिन्न अर्थ व्यक्त झाले आहेत. रायः अर्य ( अर्यो रायः ) या ठिकाणीं दोन अर्थ केलेले आहेत. धनांचा स्वामी किंवा शत्रूचें धन उ. ६. ४७, ९;

अर्य हें पुष्कळदां इंद्र वगैरेंचें विशेषण केलें आहे. जेथें शत्रूचा असाहि अर्थ केला आहे त्या ऋचांत देखील तो शब्द शत्रूचा अशा अर्थी न लावतां इन्द्राचें विशेषण या अर्थी लावण्यासारखा असतो. अर्यमा असाहि एक ( ७. ६४, ३ ) अर्थ आहे.

वरील उताऱ्यांवरून असें दिसून येईल कीं, अर्य या शब्दाचे वेदकालीन लोकांच्या वंशनिश्चयास अगर राष्ट्रनिश्चयास पोषक असे उतारे नाहींतच.

आतां अर्य या शब्दाचीं दुसरीं रूपें घेऊं

**योदह्रो ३ अनमयद्वधस्नैर्योअर्यपत्नीरुषसश्चकार ।**
**सनिरुध्यानहुषो यह्वो अग्निर्विशश्चक्रेबलिहृतःसहोभिः॥**
( ऋग्वेदः ७. ६, ५ ).

ज्या अग्नीनें आयुधांनीं आसुरी विद्येचा मोड केला व उषांस **सूर्यपत्नी** केलें त्यानें बलानें प्रजांचा निरोध करून नहुषाच्या हस्तगत केल्या.

**वृषान क्रुद्धः पतयद्रजस्वा यो अर्यपत्नी रकृणोदिमा अपः ।**
( ऋग्वेद १०. ४३, ८; अथर्व २०. १७, ८ )

तो क्रुद्ध वृषभाप्रमाणें लोकांत जोरानें गेला आणि हें पावसाचें पाणी त्यानें **(जगाचा) स्वामी (इंद्र)** त्याच्या ताब्यांत आणलें.

**वहन्तुत्वा रथेष्ठामाहर यो रथयुजः ।**
**तिरश्चिदर्य सवनानि वृत्रहन्नन्येषां या शतक्रतो ॥**
( ऋ. ८. ३३, १४ ).

हे शतक्रतो ! वृत्रहंत्या ! रथांत बसलेल्या तुला **ईश्वराला** ( अर्य ), रथाला जोडलेले घोडे इतरांच्या सवनांना बाजूला सारून, आमच्या सवनांकडे आणोत.

तिरश्चिदर्यया परि वर्तिर्यातमदाभ्यामाध्वी मम श्रुतंहवम् ॥
(ऋ. ५. ७५, ७).

आहिंसकानों ! अहो **स्वामीहो** ( अर्यया ), दूर देशाहून आमच्या यज्ञगृहाला या; मधुविद्या जाणणारांनो ! माझें आह्वान ऐका !

कृष्णादुदस्थादर्या २ विहायाश्चिकित्सन्ती मानुषाय क्षयाय ॥
(ऋ. १. १२३, १).

ही **पूजनीय** ( अर्या ) व महान् उषा मनुष्यांच्या वसतीला प्रकाश यावा म्हणून अंधारातून उगवत आहे.

ताहि देवानामसुरा तावर्यातानः क्षितीः करत मूर्जयन्तीः ॥
(ऋ. ७. ६५, २).

ते ( दोघे ) देवांमध्यें बलिष्ठ आहेत; ते **ईश्वर** ( अर्या ) आमची जमीन प्रजा वगैरे उर्जितावस्थेस आणोत.

अस्य स्तोमे मघोनः सख्ये वृद्धशोचिषः ।
विश्वा यस्मिन्तुविष्वणि समर्ये शुष्ममादधुः ॥
(ऋ. ५. १६, ३.).

सर्व कांहीं या धनवान् व ज्याचें तेज वाढत आहे अशा ( अग्नी ) च्या स्तोमावर व सख्यावर अवलंबून आहे; सर्व ऋत्विज या बहुभावी **स्वामी** ( अर्ये ) च्या ठिकाणीं बल घालतात.

यस्यायं विश्व आर्यो दासः शेवधिपा अरिः ।
तिरश्चिदर्ये रुशमे पवीरावि तुभ्येत्सो अज्यते रयिः ॥
(ऋ. ८. ५१, ९).

हे सर्व आर्य व दास ज्याचे आहेत तो उत्तम धनेश्वर होय. हे **धर्मिष्ट** (अर्ये) रुशम पवीरवा ! तुला तें धन प्राप्त झालेलें आहे.

सन्ति ह्य १ र्य आशिष इन्द्र आयुर्जनानाम्
(ऋग्वेद ८. ५४. ७)

**श्रेष्ठ व्यक्तीवर** ( अर्ये ) आमच्या आशा अवलंबून आहेत लोकांचें जीवित इंद्राच्या ठिकाणीं आहे. ( ग्रिफिथप्रमाणें अर्येचा अर्थ घेतला आहे. )

अर्यपत्नी या शब्दाचा सूर्यपत्नी असा अर्थ (७. ६. ५) होतो. पण दुसऱ्या १०. ४३, ८ मध्यें अर्य याचा अर्थ स्वामी असा व पत्नी याचा अर्थ स्वाधीन असा केला गेला आहे. ८. ३३, १४ मध्यें ईश्वर आणि ५. ७५, ७; ५. १६, ३; मध्यें स्वामी असा अर्थ आहे. १. १२३, १ मध्यें अर्या हें विशेषण पूजनीय किंवा मानाई इ० अर्थानें उषेस लावलें आहे. ७. ६५, २; ८. ५१, ९; ८. ५४, ७. मध्यें श्रेष्ठ असाच अर्थ आहे.

आतां आर्य शब्दाकडे वळूं. येथें ऐतिहासिक महत्त्वाचे कांहीं उतारे दृष्टीस पडतात.

इन्द्रो विश्वस्यदमिता विभीषणो यथावशं नयति दासमार्यः
(ऋ. ५. ३४, ६).

विश्वाचें दमन करणारा भयजनक **स्वामी** ( आर्यः ) जो इंद्र तो इच्छेस येइल त्याप्रमाणें दासांनां वश करतो. ( सायणाचार्य ). ( ज्याप्रमाणें आर्य दास लोकांनां इच्छेप्रमाणें वाकवितो त्याप्रमाणें इंद्र—असा ग्रिफिथ अर्थ करतो. )

योनो दास आर्यो वा पुरुष्टुतादेव इंद्र युधये चिकेतति ।
अस्माभिष्टे सुषहाः सन्तु शत्रवस्त्वया वयं तान्वनुयाम संगमे ।
(ऋग्वेद. १०. ३८. ३.).

हे बहुस्तुत इंद्रा ! जे दास किंवा आर्य अधार्मिक लोक आमच्याशीं युद्ध करतील, ते आमचे शत्रू तुझ्या प्रसादानें जिंकण्यास सुलभ होवोत. तुझ्या साहाय्यानें युद्धांत त्यांना आम्ही मारूं.

विसूर्यो मध्ये अमुचद्रथं दिवोविदद्दासाय प्रतिमानमार्यः ।
(ऋ. १०. १३८, ३.)

द्युलोकाच्या मध्यें सूर्यानें रथ सोडला; वृत्रादि दासाला प्रतिकृति–तोड आर्याला ( **इंद्राला** ) लाभली. ( सायण ). ( ग्रिफिथच्या मतें इंद्र ही प्रतिकृति दासाशीं झगडण्याकरिता आर्याला लाभली )

स जातूभर्मा श्रद्दधान ओजः पुरो विभिन्दन्नचरद्विदासीः ।
विद्वान् वज्रिन् दस्यवे हेतिम् अस्यार्यम् सहो वर्धया
द्युम्नम् इंद्र ॥
(ऋ. १०. १०३. ३).

इंद्र आपलें वज्र घेऊन व स्वपराक्रमावर भिस्त ठेवून दासांचीं पुरें ( दस्यूंची ) नाश करीत चालला. "हे इंद्रा, दस्यूंवर आपलें आयुध सोड; व आर्यांचें ( **विद्वान् स्तोत्यांचें** ) बल व कीर्ति वाढव."

इंद्रः समत्सु यजमानमार्यं प्रावद्विश्वेषु शतमूति राजिषु
स्वर्मीह्ळेष्वाजिषु ।
मनवे शासदव्रतान्त्वचं कृष्णामरन्धयत् ।
दक्षन्न विश्वं ततृषाणमोषति न्यर्शसानमोषति ॥
(ऋ. १. १३०. ८)

इंद्र युद्धांमध्यें यजमान आर्यांचें ( **आर्य उपासकांचें** ) रक्षण करतो; समरांगणांत तो शेंकडो प्रकारांनीं त्यांचें रक्षण करतो व अत्यंत उत्तम सुख ( लूट ) त्या समरांगणावर मिळत असतें. कर्महीन लोकांचें शासन करून काळ्या कातडीच्या लोकांनां तो आर्यांच्या अधिकाराखालीं इंद्र आणता झाला. सर्व हिंसक शत्रूंनां जाळून खाक करता झाला.

आ यो विवाय सचथाय दैव्य इंद्राय विष्णुः सुकृते सुकृत्तरः ।
वेधा अजिन्वत् त्रिषधस्थ आर्यमृतस्य भागे यजमानमा-
भजत् ॥
(ऋ. १. १५६. ५)

दैव्य व महासुकृती जो विष्णु तो सुकृती इंद्राला सहाय करण्यासाठीं येतो. तो त्रैलोक्यस्थ प्रभु विष्णु आर्य यजमानाला सुखी करो, व यज्ञाच्या भागयाचा उपभोक्ता करो.

ससानात्यां उत सूर्यं ससानेंद्रः ससान पुरुभोजसं गाम्
हिरण्ययमुत भोगं ससान हत्वी दस्यून्प्रार्यं वर्णमावत् ॥
(ऋ. ३. ३४. ९ अथर्व० २०. ११. ९)

इंद्रानें ( आर्यांना ) अश्व, सूर्य व गाई दिल्या; व सुवर्णमय संपत्ति दिली. त्यानें दस्यूंनां मारून **आर्य वर्णाच्या** लोकांचें रक्षण केलें.

**इंद्रं वर्धन्तो अप्तुरः कृण्वन्तो विश्वमार्यम् ।**
**अपघ्नन्तो अराव्णः ॥**

(ऋ. ९. ६३, ५),

इंद्राचें बल वाढविणारा, उदकाचा वर्षाव करणारा व सर्व **शुभ** गोष्टी करणारा, नास्तिकांचा (अराव्णो दातॄन्) नाश करणारा सोम पवमान इ०

**वयो न वृक्षं सुपलाशमासदन्त्सोमास इंद्रं मन्दिनः चमूषदः ।**
**प्रैषामनीकं शवसा दविद्युतत् विदत्स्वर्मनवे ज्योतिः आर्यम् ॥**

(ऋ. १०. ४३, ४. अथर्व २०. १७, ४,).

ज्याप्रमाणें सुंदर पालवी असलेल्या वृक्षावर पक्षी बसतात त्याप्रमाणें इंद्राकडे भांड्यांतला सोमरस जात असतो. सोमरसाचा पृष्ठभाग चकाकत आहे. हा इंद्र आपल्यामधील **प्रेरक** तेज मानवांना देवो.

आर्यं = प्रेर्यं ( Aryas ) light ).

**अहमत्कं कवये शिश्नथं हथैरहं कुत्समावमाभिरूतिभिः ।**
**अहं शुष्णस्य श्नथिता वधर्यमं न यो रर आर्यं नाम दस्यवे ॥**

(ऋ. १०. ४९, ३).

मी कवी (ऋषी) करितां अत्काला घातक प्रहारांनीं मारिलें. तसेंच मी मदत करून कुत्साचें चांगलें संरक्षण केलें. शुष्णाचा वध करणारा मी त्याच्या वधाकरतां माझें वज्राचा उपयोग करतों. मी **आर्यांचें** नांव दस्यूंना (शत्रूंना) दिलें नाहीं.

**यस्ते मन्यो विधद् वज्रसायक सह ओजः पुष्यति विश्वमानुषक्**
**साह्याम दासमार्यं त्वया युजा (वयं) सहस्कृतेन सहसा**
**सहस्वता ॥**

(ऋ. १०. ८३, १. अथर्व. ४. ३२, १.)

जो कोणी हे मन्यू, तुझी आराधाना करतो, त्यास तूं सर्वजेती शक्ति देतोस; तुझ्या साहाय्यानें आम्ही **आर्य** व दस्यु या दोघाहि आमच्या शत्रूंना जिंकूं. (हा मन्यु! सूक्तकार आर्यांना आपले शत्रु म्हणतो.)

**अयमेमि विचाकशद् विचिन्वन् दासमार्यम् ॥**

(ऋ. १०. ८६, १९; अथर्व २०. १२६. १९.).

मी (इंद्र) यजमानांना पाहून आर्य माझे मित्र व दास शत्रु असा फरक लक्षांत घेऊन **मित्रांकडे** (आर्य लोकांकडे) (साहाय्यार्थ) जातो.

**आर्येनयतसधमा आर्यस्य गव्या तृत्सुभ्यो अजगन्युधानॄन् ।**

(ऋ. ७, १८, ७,)

सधमानें (इंद्रानें) **कर्मशील लोकांच्या** (आर्यस्य) गाई तृत्सूपासून परत आणल्या व युद्धांत शत्रूंना ठार मारलें (सायण).

**उपोभुजातमार्यस्य वर्धनमग्निं नक्षन्त नो गिरः ।**

(ऋ, ८. १०३, १,)

**उत्तम वर्णांचा** (आर्यस्य) वर्धयिता जो सुजात् अग्नि त्याप्रत आमच्या स्तुती पोंचतात (सायण); (ग्रिफिथ 'आर्यस्य' म्हणजे 'आर्यांचा' असा अर्थ घेतो)

**दासस्यवा मघवन्नार्यस्यवा सनुतर्यवयावधम् ।**

(ऋ, १०, १०२, ३.

हे मघवन्! दासाचें किंवा आर्याचें (**चाल क न येणाराचें**) वज्र नाहींसें करून टाक.

**उतत्या सद्य आर्या सरयोरिन्द्र पारतः ।**
**अर्णाचित्ररथावधीः ॥**

(ऋ. ४, ३०, १८.)

हे इंद्रा! **आर्य** (आर्यत्वाभिमानी) असे जे अर्ण आणि चित्ररथ यांना तूं सरयूच्या पैलतीरीं मारलेंस.

**त्वं ताँ इन्द्रोभयाँ अमित्रान्दासावृत्राण्यार्या च शूर ।**
**वधीर्वनेव सुधितेभिरत्कैरा पृत्सुदर्षि नृणांनृतम ॥**

(ऋ. ६. ३३, ३.)

हे इंद्र! तूं **आर्य** आणि दास या दोघां अवरोध करणाऱ्या शत्रूंनां मारून टाकलेंस; हे शूर नेत्या! संग्रामांत आपल्या आयुधांनीं तूं वनाप्रमाणें शत्रूंना छाटून टाकतोस.

**हतो वृत्राण्यार्या हतो दासानि सत्पती ।**
**हतो विश्वा अपद्विषः ॥**

(ऋ. ६. ६०, ६.)

हे सत्पालक इंद्राग्नी आम्हांला उपरोध करणाऱ्या **आर्यांना** व तसेंच दासांना मारतात; ते आमच्या सर्व शत्रूंचा नाश करतात.

१ आर्याणि वृत्राणि आर्य शत्रु (ग्रिफिथ)
२ आर्या वृत्राणि आर्यैः कर्मानुष्ठातृभिः कृतानि उपद्रव जातानि (सायण)

**एते धामान्यार्या शुक्रा ऋतस्य धारया ।**
**वाजं गोमन्तमक्षरन् ॥**

(ऋ. ९. ६३, १४.)

सोमयज्ञ केला म्हणजे **आर्ययजमानांच्या** घरीं गाईबैल इत्यादि धन पाण्याच्या धारेप्रमाणें वाहूं लागतें.

आर्य = श्रेष्ठ यजमान (सायण).

**सूर्यं दिवि रोहयन्तः सुदानव आर्या व्रता विसृजन्तो**
**अधिक्षमि ।**

(ऋ. १०. ६५, ११)

आकाशांत सूर्याला स्थापन करणारे व पृथ्वीवर सर्व **श्रेष्ठ** व्रतांचा प्रसार करणारे च उदार देवांना आम्ही धन मागतों.

**समज्र्या पर्वत्यावसूनि दासा वृत्राण्यार्या जिगेथ ।**

(ऋ. १०. ६९. ६).

हे अग्ने गमनशील अजय लोकांकडून पर्वतीय धनें जिकलीस आणि बलवान् दासांनीं केलेले उपद्रव नाहींसे केलेस.

**आसंयतमिन्द्रणः स्वस्ति शत्रुतूर्याय बृहतीममृध्राम् ।**
**यया दासान्यार्याणि वृत्रा करो वज्रिन्त्सुतुका नाहुषाणि ॥**

(ऋ. ६. २२, १०. अथर्व. २०. ३६, १०.)

हे इंद्र! तूं आम्हांला शत्रुनाशाकरितां पुष्कळ व न संपणारी अशी शाश्वत संपत्ति दे; कीं ज्या योगानें दास **आर्य** होतील व मनुष्य संबंधीं शत्रु चांगले मारले जातील.

**दासा च वृत्रा हतमार्याणि च सुदासमिन्द्रावरुणावसावतम् ।**

(ऋ. ७. ८३, १).

त्याच्या दास आणि **आर्य** शत्रूंना मारून इंद्रावरुणांनीं सुदासाचें रक्षण केलें.

य ऋक्षादंहसो मुचयो वार्यात्सप्तसिन्धुषु।
वधर्दासस्य तुविनृम्ण नीनमः॥
(ऋ. ८. २४, २७.)

जो नष्ट राक्षसापासून व सप्तसिंधूच्याकांठीं राहणाऱ्या **आर्यां**पासून सोडविती अशा शूर संपत्तिमान इंद्रा ! दासाचीं आयुधें नमीव.

विजानीह्यार्यान्ये च दस्यवो बर्हिष्मते रन्धया
शासदव्रतान्।
(ऋ. १. ५१, ८.)

हे इंद्रा ! तुझे **अनुव्रते** ( आर्य ) यांना नीट ओळख; जे दस्यू (शत्रू) आहेत त्यांनाहि ओळख. जे कर्मविरोधी आहेत त्यांना यज्ञयुक्त यजमानांच्या स्वाधीन कर.

मूर्धा दिवो नाभिरग्निः पृथिव्या अथाभवदरती रोदस्योः।
तं त्वा देवासोऽजनयन्त देवं वैश्वानर ज्योतिरिद् आर्याय॥
(ऋ. १. ५९. २.)

अग्नि हा द्युलोकाचें मूर्ध ( डोकें ) व पृथ्वीची नाभि आहे. तो द्यावा पृथ्वीचा स्वामी आहे. अशा त्या अग्निदेवतेला **आर्य**लोकांसाठीं देव निर्माण करिते झाले.

यवं वृकेणाश्विना वपन्तेषं दुहंता मनुषाय दस्रा।
अभि दस्युं बकुरेणा धमन्तोरु ज्योतिश्चक्रथुः आर्याय॥
(ऋ. १. ११७. २१)

नांगरांच्या योगानें धान्य पेरणारे, अद्भुत चमत्कार करणारे, मनुष्याकरतां अन्न उत्पन्न करणारे व ( अनार्य ) दस्यूवर बकुर नांवाच्या शस्त्रानें प्रहार करणारे अश्वी **आर्यलोकां**करतां विस्तीर्ण प्रकाश निर्माण करिते झाले.

आर्य=आर्य लोक

धिष्वा शवः शूर येन वृत्रमवाभिनद्दानुं मौर्णवाभम्।
आपावृणो ज्योतिरार्याय नि सव्यतः सादि दस्युरिंद्रः॥
(ऋ. २. ११. १८)

हे शूर इंद्रा, ज्या बळानें तूं वृत्राला व और्णवाभाला मारून टाकलेस तें बळ धारण कर. तूं **आर्य लोकांसाठीं** प्रकाश पाडलास, आणि डाव्या बाजूला दस्यू मरून पडला.

अहं भूमिमददां आर्यायाहं वृष्टिं दाशुषे मर्त्याय।
अहमपो अनयं वावशाना मम देवासो अनु केतमायन्॥
(ऋ. ४. २६.२)

मी **आर्याला** भूमी दिली, हवी अर्पण करणाऱ्या मर्त्याला ( पर्जन्य ) वृष्टी दिली, तसेंच ( खळखळ ) शब्द करणारें उदक आणता झालों, व माझ्याप्रमाणेंच देवांनीं ( आशीर्वाद ) अनुग्रह करावा.

त्वं ह नु त्यददमायो दस्यूँरेकः कृष्टीरवनोः आर्याय।
(ऋ. ६. १८. ३),

हे इंद्रा, तूंच कर्महीन दस्यूंना वठणीस आणलेंस; व **आर्यांना** पुत्रदासादि ( कृष्टीः ) दिलेस.

आभिः स्पृधो मिथतीर रिषण्यन्नमित्रस्य व्यथया मन्युमिंद्र।
आभिर्विश्वा अभियुजो विषूचीः आर्याय विशोवतारी र्दासीः॥
(ऋ. ६. २५. २).

आम्ही केलेल्या स्तुतीमुळें तूं आमच्याबरोबर लढणाऱ्यांना मारून टाक; आमच्या शत्रूंचा कोप नाहींसा करून टाक; आणि आर्यलोकांकरतां सर्वभर पसरलेल्या दास नांवाच्या सर्व टोळ्यांचा नाश कर.

त्वे असूर्यं१ वसवो न्यृण्वन् क्रतुंहि ते मित्रमहो जुषन्त।
त्वं दस्यूँ रोकसो अग्न आज उरु ज्योतिर्जनयन् आर्याय॥
(ऋ. ७. ५. ६).

मित्राप्रमाणें तेजस्वी असलेल्या हे अग्ने, वसूंनीं तुझ्या ठिकाणीं असुरांचें बळ ठेविलें आहे; कारण तुझ्या कृत्यांबद्दल त्यांना प्रेम वाटतें. तूं दस्यूंना त्यांच्या घरांतून हांकून दिलेंस, व आर्यलोकांकरतां चांगला प्रकार उत्पन्न केलास.

सनेम येत ऊतिभिस्तरन्तो विश्वाः स्पृध आर्येण दस्यून्।
(ऋ. २. ११. १९).

जे तुझ्या साहाय्येंकरून **आर्यभावानें** सर्व शत्रूंना व दस्यूंना जिंकतील असे पुरुष आम्हाला दे—( सायण ).

आतां अथर्ववेदांतील उतारे परीक्षणाकरितां घेऊं. कांहीं अथर्ववेदांतील उतारे ऋग्वेदांतीलच पुनरुक्त आहेत ते वर येऊन गेले आहेत त्यांचीं केवळ स्थानें येथें निर्दिष्ट करितों. अर्थ पूर्वी दिले आहेत.

ऋ. ७. ३१, ५. अथर्व २०. १८, ५.
ऋ. ८. १, ४. अथर्व २०. ८५, ४.
ऋ. १०. ४२, १. अथर्व २०. ८९, १
ऋ. १०. ८६, १. अथर्व. २०. १२६, १.
ऋ. १०. ८६, ३. अथर्व २०. १२६, ३.
ऋ. १०. १३३, ३. अथर्व २०. ९५, ४.
ऋ. १०. १९१. १. अथर्व ६. ६३, ४.

तां मे सहस्राक्षो देवो दक्षिणे हस्त आ दधत्।
तयाहं सर्वं पश्यामि यश्च शूद्र उतार्यः॥
(अथर्व. ४. २०. ४.).

हे सहस्राक्षानें ( इंद्रानें ) माझ्या दक्षिण हस्तामध्यें दिलेल्या मणिरूप लते तुला मी धारण केल्यामुळें द्रष्टव्य अशा ज्या शूद्रादिहीन जाति त्यांना व विद्वान् ब्राह्मणाला (आर्यः) पहात आहे. तात्पर्यः ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व तद्व्यतिरिक्त शूद्रादि जाति ह्या सर्वांना वश करून त्यांनीं केलेले जादूटोणे त्यांचा मी तुझ्या सामर्थ्यानें नाश करूं शकतों.

सत्यमहं गभीरः काव्येन सत्यं जातेनास्मि जातवेदाः।
न मे दासो नार्यो महित्वा व्रतं मीमाय यदहं धरिष्ये
(अथर्व. ५. ११

मी खरोखर शहाणपणानें [illegible] आहे [illegible] सृष्ट वस्तु जाणतों. मी बालून दिलेलीं [illegible] **आर्यानें** स्वतःच्या मोठेपणानें मोडतां [illegible]

चतुर्वीरं बध्यत आञ्जनं ते [illegible]
ध्रुवस्तिष्ठासि सवितेव चार्य [illegible]

हे रक्षाफलकामपुरुषा, चारीहि दिशांमध्यें आपला प्रभाव दाखविणारी ही अंजनमणिरूप औषधी तुझ्या हातामध्यें बांधतों. तिच्या सामर्थ्यामुळें चारीहि दिशा तुला निर्भय होतील, आणि अशारीतीनें स्वामी ( आर्यः ) झालेल्या व सूर्याप्रमाणें तेजस्वी भासणाऱ्या तुला सर्व प्रजा उपायनें ( खंडणी, देणगी, कर वगैरे ) आणून देतील.

उदग्रभं परिपाणाद् यातुधानं किमीदिनम्।
तेनाहं सर्वं पश्यामुत शूद्रमुतार्यम्॥
( अथर्व. ४. २०, ८. ).

हे ओषधे, तुझ्या सामर्थ्यानें मी संचार करणाऱ्या राक्षसांनाहि वशीकृत करूं शकतों व राक्षसांच्या सहाय्यानें शूद्रादि जाति व **ब्राह्मणादि** (आर्य) जाति ह्या सर्वांना वश करितों.

अयमेमि विचाकशद् विचिन्वन् दासमार्यम्।
( अथर्व. २०. १२६, १९ )

**यजमानाकडे** पहाणारा, व यजमानाचा नाश करणारा शत्रु, यांना नाहींसें करणारा मी यज्ञाप्रत येतों.

यदेन्द्रिशो वृणते दस्ममार्या अग्निं होतारं मध धीर जायत॥
( अथर्व. १८. १, २१ )

ज्यावेळीं **चालून जाणारे लोक** हवनीय व तेजस्वी अग्नीला प्रार्थितात त्यावेळीं याग करितात.

प्रियं मा दर्भ कृणु ब्रह्मराजन्याभ्यां शूद्राय चार्याय च।
यस्मै च कामयामहे सर्वस्मै च विपश्यत॥
( अथर्व. १९. ३२, ८ ).

हे दर्भा मी तुला धारण केलें असल्यामुळें ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्रजात, **आर्यलोक** व अनुलोम प्रतिलोम जाति ह्या मजवर प्रेम करतील असें तूं कर.

प्रियं मा कृणुदेवेषु प्रियं राजसु मा कृणु।
प्रियं सर्वस्य पश्यत उत शूद्र उतार्ये॥
( अथर्व १९. ६२, १ ).

देवांमध्यें मला प्रिय असा कर, राजांमध्यें प्रिय कर; जो मला पाहील त्याला, शूद्राला आणि आर्याला मी प्रिय होईन असें कर ( ग्रिफिथ ).

को अर्य बहुलिमा इषूनि।
( अथर्व २०. १३०, १ ).

दुधाचे साठे कोणीं हरण केलें ? ( ग्रिफिथ ),

वरील उताऱ्यांत कांहीं महत्वाचीं विधानें दिसून येतात.

( १ ) आर्य या शब्दाचा विरुद्ध न्यास दस्यु, दास आणि शूद्र या तीन शब्दांशीं केला आहे.

( २ ) आर्य व दस्यु या दोघांचा प्रसंगीं विरुद्धन्यास जरी ... अनेक प्रसंगीं आर्य व दस्यु अगर दास यांचें ... म्हणून दिलेलें आहे. म्हणजे वक्ता आर्यां ... तो.

... प्रसंगीं आर्यांशीं स्नेह दाखविला आहे. ... ला. आर्यांना भूमि दिली. त्यानें ... याची याचना केली आहे.

( ४ ) अर्ण आणि चित्ररथ या दोन राष्ट्रांचा उल्लेख आर्य या शब्दानें केलेला आहे.

( ५ ) दस्यु हें विशेषण राक्षस किंवा असुर ( वृत्रादि ) म्हणजे जे केवळ कल्पनेचे विषय होते अशांनांहि लाविलेलें आहे.

( ६ ) दासांना आर्य होणें शक्य होतें. जें आर्यत्वकारक धन होतें तें पारमार्थिक असावें किंवा भौतिकहि असेल.

याप्रकारच्या विधानांवरून आर्य हा राष्ट्रसमुच्चय या स्वरूपाचा समुच्चय होता काय हा प्रश्न आपणांस सोडवावयाचा आहे. हा सोडविण्यासाठीं हें लक्षांत ठेवावें कीं,

( १ ) आर्य आणि दस्यु या शब्दांचा पारमार्थिक अर्थ असलेले उतारे उपयोगी नाहींत.

( २ ) आर्य या शब्दाचा समाजांतील शिष्टवर्ग हा अर्थ देणारे उतारेहि उपयोगी नाहींत.

( ३ ) जेथें आर्यांस वर्ण म्हटलें असेल व जेथें वर्ण या शब्दाचा वर्गवाचक अर्थ असण्याची शक्यता असेल अशा प्रकारचे उल्लेख उपयोगी नाहींत.

( ४ ) दस्यु शत्रूंचा संहार या प्रकारच्या विधानामध्यें रूपकाची भाषा असतां कामा नये.

या वरील कसोट्या लावल्या म्हणजे एकहि उतारा आर्य हा शब्द निःसंशय वंशवाचक होता असें दाखवीत नाहीं. तथापि दस्यू यांचें वर्णन आणि आर्य आणि दस्यू यांची प्रसंगीं तुलना व प्रसंगीं दोघांसहि एका माळेंत घालून शत्रू लेखणें ही गोष्ट आर्य आणि दस्यु हे वर्ग बरेचसे आनुवंशिक कारणानें भिन्नयजनी असावेत असें दिसतें.

दस्यूंचें भौतिक विशेष वर्णन केलें आहे, आणि तें वर्णन "आर्यन्" म्हणून समजल्या जाणाऱ्या स्वरूपाहून भिन्न आहे, त्यावरून दोन भिन्न स्वरूपाच्या लोकांचें अस्तित्व वेदवाक्यांत दिसतें. आर्य आणि दस्यू हा भेद मात्र यजनविषयक होय. दस्यूंमध्यें देश्य काळ्या जातीचें प्रामुल्य असावें. पण दस्यु आणि देश्य जाति यांचें एकत्व नाहीं. मंत्र म्हणणाऱ्या लोकांचे शत्रु आर्य म्हणजे यजनशील आणि यजनहीन असे दोघेहि होते. दस्यु हा शब्द भारतीय नसून पर्शुभारतीय आहे, म्हणजे काळ्या लोकांशीं संबंध येण्यापूर्वीचा आहे, आणि म्हणून दस्यु या शब्दाचा जातिविषयक किंवा वंशविषयक अर्थ रूढ नसून पारमार्थिक अर्थ रूढ असतां वेदवक्त्या जनतेचा प्रवेश भारतांत झाला असावा.


दासांनां आर्य होतां येणें ज्या अर्थी शक्य होतें (ऋ.६.२२,१०) आणि ज्या अर्थी रक्त बदलत नाहीं त्या अर्थी आर्य आणि दास हे शब्द रक्तवाचक नसून यजनवाचक किंवा समाजस्थानवाचक असले पाहिजेत.

आर्य हा राष्ट्रसमुच्चय असणें शक्य आहे अशी शंका उत्पन्न करून देणारा एकच उतारा आहे, आणि तो म्हटला म्हणजे अर्ण

आणि चित्ररथ या दोन समुच्चयांस जेथें आर्य म्हटलें आहे तो होय. तथापि या उताऱ्याचें महत्त्व कमी करणाऱ्या दोन गोष्टी आहेत. एक तर त्या उताऱ्याची भाषा अस्पष्ट आहे आणि दुसरी ते समुच्चय राष्ट्र होते अगर दुसऱ्या प्रकारचे समुच्चय होते हें स्पष्ट नाहीं.

आर्यनिश्चय म्हणजे प्राचीन इतिहासांतील लोकनिश्चय नव्हे. आर्य म्हणजे विशिष्ट प्रकारानें यजन करणारे लोक एवढेंच. आर्यन् म्हणजे ते लोक नव्हत. बरेचसे आर्यन् लोक देशांत असूनहि ते आर्य म्हणजे समयजनधर्मी किंवा वक्त्याच्या दृष्टीनें शिष्ट नसतील. आर्यन्पैकीं कांहीं आर्य म्हणजे विशिष्ट यजनाचे लोक असतील, व आर्यांत आर्यन् नसलेलेहि लोक असतील. देशांत ज्या हालचाली दिसून येतात त्या हालचालींमध्यें आर्यहि आहेत व दासहि आहेत. काळेहि आहेत व गोरेहि आहेत. हे दोन्ही प्रकारचे लोक इतिहासाचे विषय आहेत.

वेदांमध्यें ज्या हालचाली दिसून येतात त्या हालचालींमध्यें जी मुख्य गोष्ट मांडली जाते ती गोष्ट म्हटली म्हणजे आर्यन् लोकांचें देशांत झालेलें आगमन होय. हें आगमन मांडणारांनीं आर्यन् व आर्य या शब्दांचें समीकरण केलें आहे त्यामुळें विशिष्ट आगमनविषयक विधान मूलतःच अग्राह्य आहे. ज्या लोकांनीं वेद आणिले ते लोक किंवा त्या लोकांपैकीं कांहीं लोक आपणांस अर्य किंवा आर्य म्हणवीत असत. तथापि जे लोक मंत्रांत दिसणाऱ्या प्रवासाच्या कालीं येथें होते ते आर्यन् नव्हते हें कशावरून? असें शक्य नाहीं काय कीं आर्यन् लोकांचा प्रसार देशांत बराच झाला असून त्यांचीं राज्येंहि चोहोंकडे स्थापिलीं गेलीं आहेत. अशा कालीं सवाङ्मय आर्यन् व इतर मिळून होणारा विशिष्ट यजनी "आर्य" वर्ग आला, आणि त्यांचें वाङ्मय ऋग्मंत्र होत. आर्य आणि दस्यू यांचा संबंध खालील आकृतींत स्पष्ट केला आहे.




अ आ इ ई = वेदकालीन लोक

अ क ख ई = आर्य

क आ इ ख = दस्यु

च छ ख ई + ज झ इ ख = आर्यन्

अ क छ च + क आ झ ज = आर्यन् नव्हत

बाहेरच्या आर्य लोकांनीं देशांतले लोक येऊन जिंकले ते लोक काळे होते आणि ऋग्वेदांत आर्योनीं हिंदुस्थान प्रथम जिंकला त्या काळाचे अवशेष आहेत इत्यादि कल्पना ज्या पुराव्यावरून उत्पन्न झाल्या त्या पुराव्यामध्यें वर्ण शब्दाचा पुरावा आणतात. त्या मताचे स्थापक म्हणतात कीं वर्ण या शब्दाचा अर्थ ज्याअर्थीं रंग असा आहे आणि ज्या अर्थीं चार समाजवर्गांना वर्ण असें म्हणतात त्या अर्थीं हे समाजवर्ग कातडीच्या रंगावरून पडले. आणि हे पडण्याचें कारण जेते गोरे होते आणि जिंकलेले काळे होते.

हें सोपें स्पष्टीकरण ग्राह्य करण्यास ज्या अडचणी उत्पन्न होतात त्या येणेंप्रमाणें:—

(१) गोरे आणि काळे हेच जर वर्ग असते तर हें म्हणणें प्राप्त ठरतें पण वर्ग चार आहेत. चार वर्गांचे चार रंग होते असें दिसत नाहीं.

(२) हे चार वर्ग केवळ भारतीय नसून पर्शुभारतीय कालांतील असावेत असें दिसतें. कां कीं या प्रकारच्या चार वर्गांचें अस्तित्व अवेस्त्यांत दिसतें.

या तऱ्हेच्या अडचणी उत्पन्न होत असल्यामुळें वर्ण शब्दाच्या अर्थाविषयीं तसेंच चार वर्गांच्या इतिहासाविषयीं सत्य जाणण्यासाठीं अधिक सूक्ष्म अवलोकनाची जरूरी आहे. तरी आपण वर्ण शब्दाचा उल्लेख असणारीं ऋग्वेदांतील स्थलें तपासून पाहूं.

**त्वें अग्ने सुमतिं भिक्षमाणादिविश्रवो दधिरे यज्ञियासः।**
**नक्ताच चक्रुरुषसा विरूपे कृष्णं च वर्ण मरुणं च संधुः॥**
(हा उल्लेख सामाजिक नाहीं म्हणून निरुपयोगी.). १. ७३, ७

हे अग्नि पूजार्ह देव अनुग्रहाची प्रार्थना करून द्युलोकीं तुझी उपासना करिते झाले. आणि **असमान वर्ण रात्र** आणि उषा यांस उत्पन्न करून कृष्णवर्ण आणि श्वेतवर्ण यांस एकत्र स्थापिते झाले.

**पुनः पुनर्जायमाना पुराणीसमानं वर्णमभिशुंभमाना।**
**श्वघ्नीव कृत्नुर्विजआमिनानामर्तस्य देवी जरयन्त्यायुः॥**
(वरील कारणामुळें निरुपयोगी) १. ९२ १०.

पुनः पुनः जन्मास येणारी, पुरातन असूनहि **एकाच रूपानें शोभणारी देवी.** धूर्त नागविणाऱ्या द्यूतकाराप्रमाणें मर्त्यांचें आयुष्य हळूहळू हरण करणारी होय.

**नक्तोषासा वर्णमामेम्याने धापयेते शिशुमेकं समीची।**
**द्यावाक्षामारुक्मो अन्तर्विभाति देवा अग्निं धारयंद्र-**
**विणादाम्॥**
(निरुपयोगी). १. ९६, ५

**रूपें बदलणाऱ्या उषा** आणि रात्र एकत्र होऊन एकुलत्या बाळास स्तनपान देतात. देदीप्यमान् अग्नि द्युलोक आणि भूलोक यांमध्यें सर्वत्र प्रकाशतो. अग्नीला देव द्रव्यदाता करिते झाले.

**ओत्येनर इंद्रमूतयेग्नूं चित्तान् त्सद्यो अध्वनो जगम्यात्।**
**देवासोमन्युं दासस्यश्चमन्तेन आवक्षन्त्सुविताय वर्णम्॥**
(उपयोगी, वर्णवाचक असल्यामुळें) १. १०४, २

जे जे उपासक लोक रक्षणासाठीं इन्द्राकडेस येतात, त्यांस तीं तत्क्षणींच मार्गी लावो. देव दासाचा क्रोध नाहींसा करोत. आणि ते कल्याणाकरितां आमच्या वर्णाच्या लोकांस घेऊन येवोत.

**रुशद्वत्सारुशती श्वेत्यागादारैग्कृष्णासदनान्यस्याः।**
**समान बंधू अमृते अनूची द्यावावर्णं चरत आमिनाने॥**
( निरुपयोगी ) १. ११३, २

जिचें वासरूं देदीप्यमान आहे अशी सुंदर श्वेतवर्णाची ही आली पहा. हिनें स्थानें कृष्णवर्णाची मोकळी करीत आहे पहा.

**अगस्त्यः खनमानः खनित्रैः प्रजामपत्यंबलमिच्छमानः।**
**उभौवर्णावृषिरुग्रः पुपोष सत्यादेवेष्वाशिषोजगाम॥**
( उपयोगी ) १. १७९, ६

महाबलि अगस्त्य ऋषि, प्रजा, अपत्य आणि बळ यांची इच्छा करून खनित्रानें खणता झाला व **दोन्ही वर्णांचा** उत्कर्ष करता झाला. तो देवांपासून यथार्थ आशिर्वादांप्रत पावला.

**त्वमग्नेसुभृत उत्तमं वयस्तवस्पार्हेवर्ण आसंदृशि श्रियः।**
**त्वं वाजः प्रतरणोबृहन्नसि त्वं रयिर्बहुलो विश्वतस्पृथुः।**
( निपरुयोगी ) २. १, १२

हे अग्नि, तूं सुपुष्ट होत्साता उत्तम अन्न आहेस. तुझ्या **रमणीय** मनोरम रूपाच्या ठिकाणीं ऐश्वर्यें आहेत. तूं उत्तम रक्षण करणारा महाअश्व आहेस. तूं मोठी आणि चोहींकडून विशाल संपत्ति आहेस.

**विश्रयन्तामुर्विया हूयमानाद्वारोदेवीः सुप्रायणानमोभिः।**
**व्यचस्वतीर्विप्रयन्तामजुर्या वर्णं पुनाना यशसं सुवीरम्॥**
( निरुपयोगी ) २. ३, ५

ज्यांच्या मधून जावयाला चांगला मार्ग आहे अशा ज्या द्वारोदेवी त्या स्तोत्रांनीं बोलाविल्या असतां रुंद उघडोत. ज्या लांबरुंद, ज्या अक्षय, ज्या यशोयुक्त चांगल्या वीरांनीं युक्त असें वैभव देणाऱ्या त्या द्वारोदेवी उघडोत.

**आयन्मे अभ्वंवनदः पनन्तोशिग्भ्योनामिमीत वर्णम्।**
**सचित्रेणचिकितेरंसुभासाजुजुर्वांयोमुहुरायुवाभूत्॥**
( निरुपयोगी ) २. ४, ५.

जेव्हां माझे स्तोते याचें महत्त्व वर्णन करतात तेव्हां तो आपल्या **प्रभेचा** त्या उत्सुक जनांप्रत आविर्भाव करतो. तो सुंदर दीप्तीनें रमणीय रीतीनें प्रकाशतो. जो म्हातारा होऊन पुनः पुनः तरुण होतो.

**ता अस्यवर्णमायुवोनेष्टुः सचन्तधेनवः।**
**कुविनिसृभ्य आवरंस्वसारोया इदंययुः।**
( निरुपयोगी ) २. ५, ५.

ज्या चपळ आणि धेनूसारख्या बहिणी पुष्कळ वेळ तिर्घांपेक्षां चांगल्या रीतीनें ह्याप्रत जातात त्या या नेष्ट्याच्या **कांतीला** भुलून राहतात.

**येनेमाविश्वाच्यवनाकृतानियोदासंवर्णमधरंगुहाकः।**
**श्वघ्नीवयोजिगीवाँल्लक्षमाददर्यः पुष्टानिसजनास इन्द्रः॥**
( उपयोगी ) २. १२, ४.

ज्यानें हीं अस्थिर भुवनें निर्माण केलीं जो दास **वर्णाला** निर्दाळून टाकता झाला जो विजयी द्यूतकाराप्रमाणें शत्रूचीं लक्ष धनें घेता झाला. तो हे जन हो, इन्द्र असें समजा.

**तेक्षोणीभिररुणेभिर्नाञ्जिभीरुद्राऋतस्य सदनेषुवावृधुः।**
**निमेघमाना अत्येनपाजसासुश्चन्द्रंवर्णंदधिरेसुपेशसम्॥**
( निरुपयोगी ) २. ३४, १३.

ते रुद्राचे पुत्र वाद्यांच्या योगानें आणि आरक्त अलंकारांच्या योगानें सत्याच्या स्थानीं चढत असतात. सततगामी सामर्थ्यानें व्याप्त असे जे मरुत् ते आल्हादकारक आणि सुंदर **कांति** धारण करितात.

**इन्द्रस्तुजोबर्हणा आविवेशनृवद्दधानोनर्यापुरूणि।**
**अचेतयद्धियइमाजरित्रे प्रेमं वर्णमतिरच्छुक्रमासाम्॥**
( संशयास्पद ) ३. ३४, ५.

इन्द्र प्रबळ शत्रुसेनांमध्यें शिरला आणि मनुष्याप्रमाणें पुष्कळ धनें घेतां झाला तो स्तोत्याकारणें ह्या उषा प्रकाशविता झाला, यांचा शुक्र **वर्ण** वाढविता झाला.

**कदा नोदेवीरमृतस्य पत्नीः सूरोवर्णेनततनन्नुषासः॥**
( निरुपयोगी ) ४. ५, १३.

संग्रामावर ज्या प्रमाणें घोडे येतात त्याप्रमाणें प्रकाशयुक्त व सूर्यसंबंधी, अमृतसूर्याच्या पत्नी अशा उषा केव्हां आपला **प्रकाश** पसरतील ?

**यस्य वर्णमधुश्चुतं हरिहिन्वन्त्यद्रिभिः।**
**इन्दुमिन्द्राय पीतये॥**
( निरुपयोगी ) ९. ६५, ८.

हा मधुर हरितवर्ण आणि **रंगयुक्त** ( शत्रुनिवारणसमर्थकरणारा—सायण ) सोमवल्लीपासून दगडांनीं इन्द्रास पिण्याकरितां काढितात.

**मर्क्षिहेवशूषएतिरोरुवदसूर्यं वर्णं निरिणीते अस्यतम्।**
( संशयित ) ९. ७१, २.

जोरानें, शब्द करीत, तो हिंसकाप्रमाणें जातो; तो स्वतःपासून **असुर वर्णाचा** त्याग करतो.

**त्वेषं रूपं कृणुतेवर्णो अस्य स यत्राशयत्समृतासेधतिस्निधः।**
( निरुपयोगी ) ९. ७१, ८

त्याचें **रूप वर्ण करितें** ( कांति धारण करतें ) जेव्हां तो संग्रामांत येतो तेव्हां शत्रूंचा नाश करतो.

**परियर्णभरमाणोरुशन्तं गव्युर्नो अर्षपरिसोमसिक्तः।**
( निरुपयोगी ) ९. ९७, १५.

**प्रभायुक्त** असा आमच्याकडे ये. गाळलेला तूं गाईची इच्छा करणाराकडे (ये).

**गोभिष्टे वर्णमभिवासयामसि॥**
( निरुपयोगी ) ९. १०४, ४.

तूं जो **वर्ण** धारण करतोस तो आम्हीं दुग्धादिकांनीं आवृत करतों.

**शुचिं ते वर्णमधिगोषुदीधरम्॥**
( निरुपयोगी ) ९. १०५, ४.

आम्हीं तुझा शुचि वर्ण दुधानें मिश्रित करतों.

**शुभ्रंकैतेर्युभिरग्निर्वितिष्ठन्नुशद्भिर्वर्णैरभिराममस्थात् ॥**
( निरुपयोगी ) १०. ३, ३.

अग्नीनें आपलें स्वच्छ **तेज** पसरून रात्रीला श्वेत वस्त्रांनीं झांकली आहे.

**क्षेमं कृण्वानाजनयोनासिन्धवस्ता अस्य वर्णं शुचयोभरिभ्राति॥**
( निरुपयोगी ) १०, १२४, ७.

स्त्रियांप्रमाणें क्षेम करणाऱ्या जलांनीं त्याचा ( अग्नीचा ) शुभ्र**वर्ण** धारण केला आहे.

वरील २२ उल्लेखांपैकीं फक्त पांच उल्लेख विचार करण्याजोगे आहेत, बाकीचे सतरा उल्लेख केवळ दैवतें किंवा निर्जीव वस्तु यांच्या वर्णनाचे आहेत. ते उल्लेख रूपवाचक किंवा प्रभावाचक किंवा कांतिवाचक आहेत. ते सामाजिक इतिहासास उपयोगी किंवा तसल्या शब्दांचीं विशेषणें आहेत हें खरें, पण त्यापासून ऐतिहासिक सत्य कांहीं निघत नाहीं. वर्ण म्हणजे कांति, अगर रूप अगर रंग हा अर्थ उषा, अग्नि, सोम इत्यादि देवतांचें रूप दाखविणारा असल्यामुळें त्यापासून सामाजिक बोध कांहीं एक होत नाहीं. या विधानास आक्षेपक असा प्रश्न उत्पन्न करतील कीं इतर ठिकाणीं जर शब्द रंगवाचक आहे तर दस्यु किंवा दास यास लावला असतां तो रंगवाचक कां समजूं नये ? आणि दास किंवा दस्यु यांचें वर्गविशिष्टत्व रंगामुळें उत्पन्न झालें असें कां धरूं नये. पूर्वीच्या संशोधकांना या तऱ्हेचाच विचार उत्पन्न होऊन त्यांनीं वर्ण ही वर्गकल्पना रंगाच्या भेदामुळेंच उत्पन्न झाली असा सिद्धांत काढला. यासाठीं जे चार पांच उतारे मनुष्यविषयक आहेत त्यांचा म्हणजे उतारा अंक ४, ६, ११, १३, १६ यांचा विचार केला पाहिजे. या उताऱ्यांपैकीं उतारा अं. १३ ( ऋ. ३. ३४, ५ ) हा संशयित आहे. उताऱ्यांत तो शुक्रवर्ण वाढविता झाला असें विधान आहे. या विधानाचे दोन अर्थ उत्पन्न होऊं शकतील. एक तर उषा प्रकाशविता झाला, त्यामुळें शुक्र वर्ण वाढला किंवा दुसरा स्तोता गोरा असल्यामुळें त्या गोऱ्याच्या सदृश रंगाचे लोक वाढले. दुसरा अर्थ ओढून ताणून आणावा लागेल असें कोणासहि वाटेल, कारण, शुक्र वर्णाची वृद्धि हा परिणाम आहे आणि उषाप्रकाश हें कारण आहे. उषाप्रकाशाचा परिणाम रात्र जाऊन दिवस उत्पन्न होणें हा जितका स्वाभाविक आहे तितका स्तोत्याचे स्नेही गोरे लोक वाढणें हा नाहीं. येणेंप्रमाणें उतारा अंक १३ याची वाट लागते. आतां उतारा अंक १६ ( ऋ. ९. ७१, २ ) घेऊं. येथें असुर्यवर्णाचा त्याग करतो असें लिहिलें आहे. याचा अर्थ लावण्यासाठीं तो उतारा सूक्तांतील इतर विधानासह लक्षिला पाहिजे. हें सूक्त सोमपवमानांतील आहे. आणि असुर्यवर्णास झुगारून देतो हें चंद्राशीं ...वकल्पनेनें सायुज्य पावलेल्या सोमाचें वर्णन आहे. वर्ण हा ... तेथें रूपवाचक आहे तथापि तो मनुष्यवर्णवाचक नसून ...धःकारवाचक आहे हें ऋचेच्या उत्तरार्धावरून व्यक्त होईल. त्या काळ्या वर्णाला असुर्यवर्ण म्हणजे सूर्यविहीन रंग असें म्हटलें आहे. तो आपलें काळें आवरण टाकून देऊन तेजोयुक्त आवरण धारण करितो असें उत्तरार्धांत विधान आहे. हें राज्यक्रान्तिविषयक किंवा आर्यन् लोकांच्या जयाविषयींचें विधान नाहीं. तें केवळ आकाशांत सूर्याच्या आक्रमणाचें रूपक आहे हें दिसेल. या सोळाव्या अवतरणावरून चामडीच्या रंगावरून चार वर्ण म्हणजे वर्ग उत्पन्न झाले इत्यादि कल्पना काढतां येणार नाहीं.

उतारा अंक ६ हा अगस्त्यलोपामुद्रा यांच्या आख्यानांतील आहे. हें सूक्त आख्यान असो, अगर नाटकाचा अंश असो, त्याशीं आपणांस कर्तव्य नाहीं. हा उतारा जेव्हां हौत्रमंत्र म्हणून वापरला जातो, तेव्हां या आख्यानास गूढार्थ दिला जातो. अगस्त्य म्हणजे सोम आणि लोपामुद्रा म्हणजे प्रार्थनामंत्र. त्या प्रार्थनामंत्रांच्या योगानें सोमाचें सवन होतें. जसें अगस्त्याचें लोपामुद्रेनें प्रार्थनामंत्रांनीं वशीकरण केलें. प्रस्तुत ऋचेंत लोपामुद्रासंभोगाचें वर्णन आहे. अगस्त्यानें संभोग कां केला तर प्रजा, अपत्य, बल यांची प्राप्ति व्हावी म्हणून आणि त्यामुळें परिणाम असा झाला कीं दोन वर्णांचा उत्कर्ष झाला. यांत वर्ण हा शब्द वर्गवाचक उघड दिसत आहे, परंतु यावरून एखादा वर्ण काळा होता व एखादा पांढरा होता असें मुळींच दिसत नाहीं. जर कोणत्या तरी वर्णाचा उत्कर्ष यानें साध्य झाला असेल तर तो ब्राह्मणक्षत्रियांचा होय असें वृत्तिकार समजतात. वर्ण याचा अर्थ येथें वर्ग म्हणून निश्चित झाला आहे, त्यामुळें ज्या कालांत वर्ण याचें रंगापासून वर्गापर्यंत संक्रमण झालें आहे, अशा कालाचा हा उतारा नव्हे. आणि हा शब्द काळ्या गोऱ्याच्या भेदास लावलेला नसून ब्राह्मणक्षत्रियभेदास लावलेला आहे; त्यावरून हा काळ्यागोऱ्यांच्या शत्रुत्वाचा वाचक उतारा नव्हेच.

आतां ४ व ११ हे उतारे राहिले, त्यांच्याकडे वळूं. दोन्ही उतारे इन्द्राच्या स्तुतीचे आहेत म्हणजे इन्द्र विरुद्ध दास यांचे द्योतक आहेत. दास व इन्द्र यांच्या युद्धाची कथा ही आर्यन् जातीच्या या देशांतील प्रवेशाची कथा नव्हे. इन्द्रानें काळोख नष्ट केला, पाणी मोकळें केलें अशा कथा ज्या आहेत त्या आर्यन् लोकांच्या या देशांतील प्रवेशाच्या काळाच्या नसून बऱ्याच पूर्वकालीन आहेत हें सिद्ध करणारा पुरावा म्हणजे या प्रकारच्या कथेसारख्या कथांचें अनेक इन्डोयुरोपीय राष्ट्रांत अस्तित्व पुष्कळ असल्यामुळें या उताऱ्याची मदत देशांतील मूळचे लोक नंतर येणाऱ्या गोऱ्या लोकांनीं जिंकले इत्यादि कल्पना काढण्यास मुळींच उपयोगी पडणार नाहीं. दास किंवा दस्यु हा एक वर्ग आहे, तो अधार्मिक आहे, त्यांचा नाश झाला पाहिजे इत्यादि कल्पना घेऊन मांत्र संस्कृतीचे लोक देशांत आले, आणि त्याच वेळेस वर्ण हा शब्द वर्गवाचक कसा झाला होता या गोष्टी वरील उताऱ्यावरून सिद्ध होतात. वर्ण हा शब्द वर्गवाचक कसा झाला हें पहावयाचें असल्यास आपणांस वेदपूर्व भाषांकडे जावयास लागेल. वेदपूर्व भाषा तर आपणांस कोणतीहि ठाऊक नाहीं. यासाठीं आपणांस तौलनिक भाषाशास्त्राची मदत घ्यावी लागते. तसेंच तौलनिक समाजशास्त्रहि कामास येईल. चातुर्वर्ण्य ज्या अर्थी अवेस्तांत आहे त्याअर्थी चातुर्वर्ण्याचें मूळ

हिंदुस्थानांत शोधूं पहाणें आणि त्याकरितां वेदांतील एखाद्या शब्दाची मदत घेणें हीच चूक होते. चातुर्वर्ण्य या वस्तूचें मूळ रूप पर्शुभारतीयच केवळ नाहीं तर चातुर्वर्ण्याचें प्राचीन ग्रीकांत अस्तित्व असल्यामुळें मूलगृहकालीन म्हणावें लागतें.*

ही संस्था पारशांचे, भारतीयांचे, आणि यूरोपीयांचे पूर्वज यांत सामान्य असावी असें म्हणण्याचें कारण ती प्राचीन ग्रीकांत होती.

ग्रीनिज म्हणतो:—

"अटिका देशांत "चार ट्राईब्जस्" होत्या असें वारंवार वर्णन आढळतें. क्लीस्थेनीच्या काळांत या चार वर्गांचीं नांवें गेलेऑंटिस, होपलेटिस, एजिकोरिस आणि आर्गेडिस अशीं चालत आलीं होतीं. हे चार वर्ग राष्ट्राच्या राजकीय व धार्मिक संस्थांच्या मुळाशीं होते. परंतु अटिकामध्यें हींच नांवें प्रथमपासून चालत आलीं नव्हतीं. या नांवांच्या पूर्वीं असलेल्या नांवांच्या निदान तीन निरनिराळ्या याद्या सांपडतात. परंतु या याद्या निरुपयोगी आहेत. कारण त्या बखरकारांनीं बनविलेल्या आहेत. त्या पुरुषमूलक किंवा स्थानमूलक नांवांच्या संकीर्णस्वरूपाच्या आहेत. शेवटची यादी ग्रीक नागरिकांच्या आयुष्यक्रमावरून पडलेल्या नांवांची दिसते. होपलेटिस हे योद्धे होते, एजिकोरिस हे पशुपाल होते, आणि आर्गेडिस हे कारागीर होते. परंतु गेलेऑंटीस हे कोण होते याविषयीं विद्वान् लेखकांत मतभेद आहे. स्ट्राबो म्हणतो ते पुरोहित होते. प्लुटार्कच्या मतें ते शेतावरील मजूर होते. यांपैकीं पहिलें ( स्ट्राबोचें मत ) खरें असणें शक्य नाहीं. कारण अटिकामध्यें पुरोहितांची जात ( Caste ) केव्हांच नव्हती. हीं दोन्ही मतें म्हणजे केवळ तर्कच आहेत.

शिवाय हीं नांवें लोकांच्या वर्गांचीं वाचक घेणें कठीणच आहे. कारण सोलनच्या वेळीं त्या सर्वांस सारख्याच दर्जाचे लेखीत व प्रत्येक समुच्चयांतून सारखेच सभासद मंत्रिसभेंत घेत. दुसरें एक थीसस यानें केलेलें वर्गीकरण उपलब्ध आहे. त्यानें यूपेट्रिडि, गिओमोरि आणि लेनीउर्गी अशीं त्या वर्गांचीं नांवें दिलीं आहेत. परंतु हे वर्ग वरील वर्गांशीं समक्षेत्री नव्हते. कारण युरिपेट्रिडि वर्गांत वरील चारहि समुच्चयांचे लोक आढळून येत."

ग्रीनिज पुढें म्हणतो कीं, आयोनियन लोकांचें धर्मशास्त्र या चार वर्गांच्या कल्पनांनीं निगडित झालें आहे.

एवंच हे चार वर्ग आपणांस ग्रीकांत फार जुनी व धर्मशास्त्रांच्या मुळाशीं असलेली पण हे चार वर्ग म्हणजे काय, कोठून आले इत्यादि संशय उत्पन्न करणारी संस्था म्हणून सांपडतात.

या पुराव्यावरून चार वर्ग फार जुने आहेत. त्यांचें मूळ ऋग्वेदांत सांपडणार नाहीं आणि पांढरा आणि काळा असे दोन वर्ग हिंदुस्थानांत पडून हिंदुस्थानांतच उत्तरकालीं दोहोंचे चार झाले ही कल्पना ग्राह्य करतां येणार नाहीं हें सिद्ध होतें.

हे चार वर्ग जर फार जुने आहेत, तर आतां प्रश्न एवढाच उत्पन्न होतो कीं, या चार वर्गांस "वर्ण" हा शब्द केव्हां लावूं लागले व कां लावूं लागले.

वर्ण या शब्दाचा नेहमींचा ऋग्वेदांतील अर्थ म्हणजे रंग हाच आहे. वर्ण म्हणजे वर्ग या अर्थानें हा शब्द ऋग्वेदांत फारच थोड्या ठिकाणीं येतो.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्गांचा उल्लेख (१०.९०) ऋग्वेदांत आला आहे. तथापि यांपैकीं कोणत्याहि वर्गाचा उल्लेख वर्ण म्हणून आला नाहीं. ब्राह्मणादि चार वर्गांच्या क्रियांचा आणखी एक प्रच्छन्न उल्लेख आहे. त्यांत प्रत्येक वर्गाचें नांव दिलेलें नाहीं वर्ण शब्द वापरला नाहीं. फक्त क्रिया दर्शविली आहे. तो उल्लेख देतों.

**क्षत्राय त्वं श्रवसे त्वं महीया इष्टये त्वमर्थमिव त्वमित्यै।**
**विसदृशा जीविताभिप्रचक्ष उषा अजीगर्भुवनानि विश्वा ॥**
(१, ११३, ६).

कोणी अधिकारार्थ ( क्षत्राय ) कोणी कीर्तीसाठीं ( श्रवसे ) कोणी मोठ्या द्रव्यासाठीं ( महीया इष्टये ) आणि कोणी कामाकडे जावें ( अर्थ इत्यै ) म्हणून याप्रमाणें विसदृश जीवनोपाय पहाण्यासाठीं उषेनें सकल भुवनास जागृत केलें आहे.

"दोन वर्णांच्या वृद्धीसाठीं अगस्त्यानें लोपामुद्राग्रहण केलें" असा एकच उल्लेख कदाचित् ब्राह्मणादि वर्णांस अनुलक्षून असावा असें म्हणतां येईल, पण तेंहि स्थान अनिश्चित आहे, कां कीं आर्य आणि दास या दोन्ही समुच्चयांस तो लावतां येईल. एवढ्यावरून असें म्हणतां येईल कीं ब्राह्मणादि वर्गांस वर्ण हें नांव मंत्रकालीं मिळालेंच नव्हतें. वर्ण हा शब्द वर्गविषयक होता पण तो ब्राह्मणादि वर्णांना लागत नव्हता.

दास व आर्य हे दोन वर्ण म्हणून उल्लेखिलेले आहेत. म्हणजे त्या वेळेस समाजांत दोन तऱ्हेचीं वर्गीकरणें होतीं. एक ब्राह्मणादि वर्गीकरण आणि दुसरें वर्णवर्गीकरण. ब्राह्मणादि वर्गीकरण कर्मविशिष्ट आहे. पण आर्य आणि दास हें वर्गीकरण कर्मविशिष्ट नसावें, हें वर्गीकरण ज्या तत्त्वावर झालें असेल त्या तत्त्वावर वर्ण नांवाचा वर्ग रचला गेला असावा. आपणांपुढें जो प्रश्न आहे तो हा कीं, आर्य आणि दास यांमध्यें जो भेद दिसतो तो रंगावरून उत्पन्न झाला कीं दुसऱ्या कशावरून उत्पन्न झाला ? रंगावरून उत्पन्न झाला ही कल्पना मोहक दिसते पण ती जितकी मोहक आहे आणि सहज उत्पन्न होते तितकी ती अधिक भ्रामक आहे.

आर्यांचा काळ्यांशीं संनिकर्ष झाल्यानें जर वर्णकल्पना उत्पन्न झाली असेल तर त्या वर्ण शब्दाचा अभाव आपणांस पर्शुभारतीय कालांत दिसला पाहिजे, व पर्शुभारतीय कालांत जर अभाव असेल

---

* पर्शुभारतीय संस्था म्हणण्यास कारण त्यांचा उल्लेख पारशांच्या पवित्र ग्रंथांत आहे. + काइष्ठ् पिष्त्राइष्ठ्? आथ्रव, रथएष्ठाओ, वास्त्र्योफ्श्युयस् इ इति; ( पिष्त्राईष्ठ् कोण? अथर्वे, रथाष्ठि, शेतकरी आणि कारागीर ( यस्न १९, १७, ).

तर तो अवेस्त्यांतहि असणें स्वाभाविक आहे. पण प्रत्यय याच्या उलट आहे.

आपणास एवढेंच पहावयाचें कीं वर्गास वर्ण शब्द कसा लागला यासाठीं आपणांस वर्णसदृश शब्द अवेस्त्यांत पाहिले पाहिजेत व वर्ण शब्दाच्या इतिहासाविषयीं विचार केला पाहिजे. अवेस्त्यांत वर्ण शब्दाचा सदृश शब्द 'वरेन' हा आहे व तो निरनिराळ्या चार अर्थांनीं उपयोगांत आणलेला दिसतो. ते अर्थ असे (१) धार्मिक मत, पंथ, संप्रदाय (२) इच्छा, निवड (३) आवरण, उदाहरणार्थ पृथ्वीचें आवरण म्हणजे हिरवळ वगैरे (४) कास्पियन समुद्राच्या नैॠत्येस माझंदरान व दमावंद पर्वताच्या जवळचा डोंगराळ प्रदेश. परंपरेप्रमाणें हा प्रदेश म्हणजेच पतष्खवार्गर अथवा दैलम होय व याचेंच अर्वाचीन नांव गिलान असून येथें फरिदुन बादशहाचा जन्म झाला.

ह्या अनेक अर्थांपैकीं एक अर्थ धार्मिक मत, पंथ अगर संप्रदाय हा आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. या अर्थावरून दोन कल्पना उत्पन्न होतात. उपाध्ये, राजन्यवर्ग, सामान्यजन इत्यादि वर्ग निरनिराळ्या संप्रदायांचे म्हणजे निरनिराळीं कार्यें करणारे असा होऊन नंतर वर्ग असा होणें शक्य आहे. वरेन शब्दाचे रीतभात किंवा संप्रदाय या अर्थांचे वाचक कांहीं उतारे घेऊं.

अह्या जओषेंग (जंआषेंत्) उशातिश् वरेनेंग् (वेरनेंग्त्) हच इते थ्वह्मी खताओ अपेमेम् नना अंघत् (यस्न ४८. ४)

त्यांची समृद्धि, त्यांची **रीतभात** प्रजाधर्मास अनुसरून असते व नाना रीतीनें, (हे अहुर मज्द्) त्यांत तुझें शहाणपण दिसून येतें.

अत्चा अह्माइ वरेनाइ मज्दा निदातेम् अषेम् सुइव्याइ त्कएषाइ राषयेंग्हे द्रुख्श् यस्न ४९. ३

जगांतील लोकांचें कल्याण होण्यासाठीं हे अहुरमज्द् तूं **मार्ग** घालून दिला आहेस व नुकसान करण्यासाठीं व वाइट मार्ग दाखविण्यासाठीं द्रुजाची योजना केली आहेस.

अका वरना द्रेग्वाओ हिजवा आवेरेतो

यस्न ४५. १.

दुष्ट मनुष्य स्वतःच्या गैर **वर्तणुकीनें** व आपल्या वाइट वाचेमुळें आड मार्गाला जातो.

नोइत् ना मनाओ, नोइत् सेंघा, नोइत् खरतो,

नएदा वरना, नोइत उख्धा, नएदा श्यओथ्ना, नोइत् दएनाओ, नोइत् उरवानो हचइंते.

यस्न ४५. २

ना आपले विचार, ना आपलें शिक्षण, ना आपलें शहाणपण, ना आपली **रीतभात**, ना आपली वाचा, ना आपल्या इच्छा, न आपलें अन्तःकरण, ना आपले जीव, एकमेकांशीं मिळते असतात.

तर वर्ण या शब्दाचा वेदकालांत जेव्हां तो समुच्चयास लावीत तेव्हां काय अर्थ असावा, याला उत्तर एवढेंच कीं दास या वर्गाचें जें स्वरूप वेदांत असेल त्या स्वरूपाचा बोधक असावा. दास या वर्गाचें जर स्थित्यंतर झालें असेल तर वर्ण या शब्दाचेंहि त्याबरोबर अर्थांतर होईल. लोक दासाला वर्ण शब्द लावीत असतील. दासांची स्थिति जशी पालटत चालली असेल तसा हळूहळू क्रमानें वर्ण शब्दाचा अर्थहि बदलत चालला असेल. दासांच्या स्थितींतील अंतर किंवा दोन अर्थांनें दास शब्दाचा उपयोग आपणांस ऋग्मंत्रांतच दिसत आहे. पण वर्ण शब्दाचें मात्र अर्थांतर ऋग्मंत्रांत स्पष्ट होत नाहीं. तें ऋग्मंत्रोत्तरकालीं झालें असावें.

एवढ्या विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं काळ्या लोकांस गोऱ्यांनीं जिंकलें आणि त्यावरून वर्ण शब्दास रंग अर्थ जाऊन वर्ग अर्थ उत्पन्न झाला ही कल्पना ग्राह्य होत नाहीं. दास वर्गाची स्थित्यंतरें आपणांस तपासलीं पाहिजेत. तीं तपासलीं असतां वर्ण या शब्दाचा इराणी लोकांत रीतभात किंवा संप्रदाय असा जो अर्थ होता तसाच वैदिक आर्यांत होता काय, तसा असल्यास कोणत्या क्रमानें रीतभात हा अर्थ जाऊन विशिष्ट कर्म करणारा वर्ग असा अर्थ उत्पन्न झाला, हें स्पष्ट होईल.

वर्ण शब्दाचें तसेंच चार वर्गांच्या कल्पनेचें इराणी लोकांत अस्तित्व असल्यामुळें म्हणजे पर्शुभारतीय काळांत अस्तित्व असण्याची जबर शक्यता असल्यामुळें गोऱ्यांनीं काळ्यांस जिंकून रंगभेदावर वर्गभेद निर्माण झाला ही कल्पना ग्राह्य होत नाहीं. आणि ही कल्पनाच जर ग्राह्य होत नाहीं तर वर्ण शब्दाचा पुरावा देशांत वंशमहत्त्वक्रांति झाली असें सिद्ध करण्यास कसा उपयोगी पडणार ?

आतां दासकल्पनेकडे वळूं. दास शब्दाच्या इतिहासांत हिंदुस्थानांतील काळ्यांचा येणाऱ्या गोऱ्यांनीं केलेला पराजय सांपडतो काय तें पाहूं.

ऋग्वेदांत समानार्थी व सदृश उच्चाराचे दास आणि दस्यु असे दोन शब्द आढळतात.

या दोन शब्दांपैकीं दस्यु हा शब्द उत्तरकालीन वाङ्मयांत येत नाहीं.

दास हा शब्द उत्तरकालीन वाङ्मयांत गुलाम अगर नोकर या निश्चित अर्थानें येतो. हा अर्थ ऋग्वेदांतहि दिसतो, तथापि या अर्थाच्या ऋचा फार थोड्या आहेत. दास याचा शत्रु असाहि अर्थ ऋग्वेदांत आहेच. हे दोन अर्थ ज्याअर्थीं ऋग्वेदांत दिसतात त्याअर्थीं दोन कल्पनांची शक्यता आहे. एक कल्पना म्हटली म्हणजे वेदभाषी अगर मात्र संस्कृतीच लोक देशांत येण्यापूर्वीं हे दोन अर्थ तयार झाले असावेत. दुसरी कल्पना अशी कीं एका काळच्या शत्रूचें गुलामांत स्थित्यंतर मंत्रकालांतच होऊन शब्दाचें अर्थद्वैत झालें असावें.

या विषयावर प्रत्यक्ष ऋचांच्या अवलोकनानें काय प्रकाश पडतो तें पाहूं. दस्यु आणि दास हे दोन शब्द एकत्र दिसत आहेत व ते कांहीं अंशीं एकाच अर्थाचे आहेत. प्रथम दस्यु शब्द घेऊं आणि दस्युकल्पना काय होती तिची ग्रंथाधारें मांडणी करूं आणि त्या कल्पनेची आर्थिक 'दास'कल्पनेशीं तुलना करूं.

वधीर्हि दस्युं धनिनं घनेन एकश्चरन्नुपशाकेभिरिन्द्र ।
(१. ३३, ४).

कारण कीं हे इन्द्रा, तूं आपल्या शक्तिमान साहाय्यकर्त्यांसह (मरुतांसह) चाल करून जाऊन धनसंपन्न दस्यूला (वृत्राला–सायण) एकटाच मारिता झालास.

त्वमेता न्रुदतो जक्षतश्चायोधयोरजस इन्द्रपारे ।
अवादहोदिव आदस्युमुच्चा प्रसुन्वतः स्तुवतः शंसमावः ॥
(१. ३३, ७).

हे इन्द्रा, हे (वृत्राचे अनुचर) रडत असतांना आणि हांसत असतांना तूं त्याजबरोबर लढून त्यांस अंतरिक्षाच्या पलीकडेस हांकून देता झालास. (असुर वृत्राला) दस्यूला चालून स्वर्गांतून खालीं ढकलून देता झालास. तुला सोम अर्पण करणारा स्तवणारा त्याचें स्तोत्र राखून उंच ठिकाणीं ठेवलेंस.

परियदिंद्ररोदसी उभे अबुभोजीर्महिना विश्वतः सीम् ।
अमन्यमानाँअभिमन्यमानैर्निर्ब्रह्मभिरधमोदस्युमिन्द्र ॥
(१. ३३, ९).

हे इन्द्रा जेव्हां तूं आपल्या माहात्म्यानें द्यावापृथिवी सर्व बाजूंनीं वेष्टिता झालास, हे इन्द्रा भजणाऱ्या स्तोत्यांच्या योगानें न भजणाऱ्यांस तूं मारून टाकलेंस आणि दस्यूस (वृत्रास–सायण) फुंकून टाकलेंस.

अग्निनातुर्वशंयदुं परावतउग्रादेवं हवामहे ।
अग्निर्नयं नववास्त्वंबृहद्रथं तुर्वीतिं दस्यवेसहः ॥
(१. ३६, १८).

अग्नीच्या द्वारें आम्ही तुर्वशाला, यदूला, उग्रदेवाला दूर प्रदेशाहून बोलावितों. दस्युहननाकरितां (राक्षसांस मारण्याकरितां–पंडित) अग्नि नववास्त्व, बृहद्रथ, तुर्वीति यांजला येथें आणो.

त्वं मायाभिरपमायिनो धमः स्वधाभिर्ये अधिशुप्तावजुह्वत ।
त्वं पिप्रोर्नृमणः प्रारुजः पुरः प्रऋजिश्वानंदस्युहत्येष्वाविथ ॥
(१. ५१, ५).

तूं कपटी जनांस कपटांच्या योगानें फुंकून फेंकून दिलेंस. कारण ते हविरन्नांनीं आपल्याच तोंडांत हवन करीत. हे नराहितचिंतका, तूंच पिप्रूचीं नगरें भंगिलींस आणि दस्यु–(अनार्य–पंडित) मारणाच्या प्रसंगीं ऋजिश्व्याला संरक्षिलेंस.

त्वं कुत्सं शुष्णहत्येष्वाविथारन्धयोतिथिग्वायशंबरम् ।
महान्तंचिदर्बुदंनिक्रमीः पदासनादेवदस्युहत्यायजज्ञिषे ॥
(१. ५१, ६).

तूंच शुष्णमारणाच्या प्रसंगीं कुत्साला रक्षिलेंस, शंबराला अतिथिग्वाच्या हस्तगत केलेंस, अर्बुद मोठा असूनाहि त्याला पायाखालीं तुडविलेंस, दस्यूंचा (शत्रूंचा) नाश करण्यास्तव तूं प्राचीन काळापासून जन्मला आहेस.

विजानी ह्यार्यान्येचदस्यवोबर्हिष्मतेरन्धयाशासदव्रतान् ।
शाकीभवयजमानस्य चोदिताविश्वेत्तातेसधमादेषुचाकन ॥
(१. ५१, ८)

आर्य कोण आणि दस्यु कोण हें तूं ओळख, कर्महीनांना (दस्यूंस) यज्ञकर्त्यांच्या स्वाधीन कर, यज्ञकर्त्यांचा नायक हो. तुझे सर्व पराक्रम मला यज्ञांत गावयास आवडतात.

एभिर्द्युभिः सुमना एभिरिन्दुभिर्निरुन्धानो अमतिं गोभिरश्विना
इन्द्रेणदस्युंदरयन्त इन्दुभिर्युतद्वेषसः समिषारभेमहि ॥
(१. ५३, ४).

या देदीप्यमान सोमरसांनीं तूं प्रसन्न होऊन गुरांच्या व घोड्यांच्या योगानें दारिद्र्य नष्ट कर. इन्द्रानें सोमरसांचें साहाय्य मिळवून दस्यूंस मारून आम्हांला निःशत्रु केलें.

प्रनूमहित्वंवृषभस्यवोचं यं पूरवो वृत्रहणं सचन्ते ।
वैश्वानरोदस्युमग्निर्जघन्वाँ अधूनोत्काष्ठा अवशंबरंभेत् ॥
१. ५९ ६

ज्या वृत्रहंत्याला मनुष्यें सेवितात त्या महाशूराचें महाभाग्य मला त्वरित गाऊं दे. वैश्वानर अग्नि दस्यूला मारून उदकें वर्षविता झाला. शंबर उच्छेदून खालीं टाकता झाला.

त्वं हत्यदिन्द्रचोदीः सखावृत्रंयद्वज्रिन्वृषकर्मन्नुभ्नाः ।
यद्धशूरवृषमणः पराचैर्विदस्यूँर्योनावकृतोवृथाषाट् ॥
(१. ६३ ४).

हे इन्द्रा, वज्रधरा, शूरकर्मा, शूरमनस्का तूं सखा होऊन वृत्राचा नाश करिता झालास. तूं जो युद्धांत सहज यश मिळविणारा युद्धांत दस्यूंस तोडून हांकून लाविता झालास; तें सर्व तूंच म्हणून करता झालास.

तमुत्वावृत्रहन्तमंयोदस्यूरवधूनुषे ।
द्युम्नैरभिप्रणोनुमः ॥
(१. ७८, ४).

तूं जो दस्यूंना विध्वंसून टाकतोस त्या तुला अतिपराक्रमी अग्नीला पुनः पुनः स्तवितों.

सवज्रभृद्दस्युहाभीमउग्रः सहस्रचेताः शतनीथऋभ्वा ।
चम्रीषोनशवसा पाञ्चजन्योमरुत्वान्नोभवत्विन्द्रऊती ॥
(१. १००, १२).

तो वज्रधारी, दस्युहंता, भयंकर, महाप्रतापी, सहस्रप्रज्ञ, शतोपाय महान् होय, सोमाप्रमाणें बळांच्या योगेंकरून पंचजनांचा धनी होय. तो मरुतांसहित इन्द्र आमचा संरक्षिता होवो.

दस्यूञ्छिम्यूँश्चपुरुहूतएवैर्हत्वापृथिव्यांशर्वानिबर्हीत् ।
सनत्क्षेत्रंसखिभिः श्वित्न्येभिः सनत्सूर्यंसदनपः सुवज्रः ॥
(१. १००, १८).

पुरुहूत इन्द्रानें दस्यूंना व शिम्यूंना यांच्या (मरुतांच्या) साहाय्यानें पृथ्वीवर मारून वज्रानें भेदून टाकलें. त्यानें आपल्या तेजःपुंज मित्रांच्या साहाय्यानें क्षेत्र घेतलें, सूर्य हरण केला. सुंदर वज्र धारण करणाऱ्या इन्द्रानें उदकें हरण केलीं.

सजातूभर्माश्रद्दधान ओजः पुरोविभिन्दन्नचरद्विदासीः।
विद्वान्वज्रिन्दस्यवेहेतिमस्यार्यं सहोवर्धयाद्युम्नमिन्द्र ॥
(१. १०३, ३).

प्रजांचें पालन करणारा तो (इन्द्र) पराक्रम करण्याच्या इच्छेनें दस्यूंचीं नगरें फोडून टाकिता झाला व त्यांजवरून चालला. हे वज्रधरा मर्मस्थल जाणणारा असा तूं दस्यूंच्या अंगावर शस्त्र टाक. हे इन्द्रा आर्य लोकांचें बळ व यश वाढीव.

तदूचुषेमानुषेमायुगानिकीर्तेन्यं मघवानामबिभ्रत् ।
उपप्रयन्दस्युहत्यायवज्रीयद्धसूनुः श्रवसेनामदधे ॥
(१. १०३, ४).

अति प्रबळ इन्द्र हातांत वज्र घेऊन दस्यूंना मारण्यासाठीं चाल करून जाऊन जें नांव धारण करिता झाला तेंच प्रख्यात नांव मघवा या मानवी काळांत दीन उपासकांसाठीं धारण करीत असतो.

यो विश्वस्य जगतः प्राणतस्पतिर्यो ब्रह्मणे प्रथमोगा अविन्दत्।
इन्द्रोयोदस्यूँरधराँ अवातिरन्मरुत्वन्तं सख्यायहवामहे ॥
(१. १०१, ५).

जो सर्व जंगम प्राण्यांचा स्वामी, जो स्तोत्यांकरितां प्रथम गाई शोधून काढता झाला. जो इन्द्र दस्यूंला रसातळास मिळवून संहारिता झाला त्या मरुद्युक्त इन्द्राला आम्ही मैत्रीसाठीं बोलावितों.

ऋषिं नरावंहसः पाञ्चजन्यमृबीसादत्रिंमुञ्चथोगणेन।
मिनन्तादस्योरशिवस्यमाया अनुपूर्वं वृषणा चोदयन्ता ॥.
(१. ११७, ३).

हे शूर अश्वी देवहो, पांच प्रकारच्या जनांनां प्रिय अशा अत्रीला तुम्ही तुषाग्नीपासून पुत्रपौत्रांसह मुक्त केलें आणि एकामागून एक अशा येणाऱ्या दस्यूच्या अशिव मायेचें निवारण केलें.

यवं वृकेणाश्विनावपन्तेषंदुहन्तामनुषायदस्रा ।
अभि दस्युंबकुरेणाधमन्तोरुज्योतिश्चक्रथुरार्याय ।
(१. ११७, २१).

हे अश्वीहो, मनुष्यांच्या करितां तुम्ही नांगराच्या योगानें जमीनींत धान्य पेरिलें आणि अन्न उत्पन्न केलें. तसेंच दस्यूंच्या वर वज्रप्रहार करून आर्यांच्या साठीं उत्तम प्रकाश उत्पन्न केला.

धिष्वाशवः शूरयेनवृत्रमवाभिनद्दानुमौर्णवाभम्।
अपावृणोर्ज्योतिरार्यायनिसव्यतः सादिदस्युरिन्द्र ॥
(२. ११, १८).

हे इंद्रा ज्या बलाच्या योगानें वृत्राला मारलेंस आणि और्णवाभ असुराचा वध केलास तें बल धारण कर. आर्यांच्यासाठीं तूं उजेड पाडिलास तेंव्हां दस्यु डाव्या बाजूस पडला.

सनेमयेत ऊतिभिस्तरन्तो विश्वाः स्पृध आर्येणदस्यून्।
अस्मभ्यंतत्त्वाष्ट्रंविश्वरूपमरंधयः साख्यस्यत्रिताय ॥
(२. ११, १९.).

इंद्रा, तुझ्या कृपेनें शत्रूंचा आणि दस्यूंचा नाश करणाऱ्या लोकांचा आम्हांला लाभ होवो. विश्वरूप त्वाष्ट्राचें त्रिताशीं सख्य होण्यासाठीं जसें त्याला तूं आपल्या शासनाखालीं आणलेंस तसेंच त्या विश्वरूपाला आमच्या शासनाखालीं आण.

यः शश्वतोमह्येनोदधानानमन्यमानाञ्छर्वाजघान ।
यः शर्धतेनानुददातिशृध्यांयोदस्योर्हन्तासजनास इन्द्रः॥
(२. १२, १०).

हे जन हो, मोठमोठालीं पापें करणाऱ्यांना आणि इंद्राची उपासना न करणाऱ्यांनां वज्रानें मारणारा, बलवान् असल्याबद्दल गर्व वाहणाऱ्यांनां बल न देणारा आणि दस्यूचा वध करणारा असा जो असेल त्यालाच तुम्ही इंद्र समजा.

शतंवायस्य दशसाकमाद्य एकस्य श्रुष्टौयद्धचोदमाविथ ।
अरज्जौदस्यून्त्समुनब्दभीतयेसुप्राव्यो अभवः सास्युक्थ्यः॥
(२. १३. ९).

तुला कोणी हांक मारिली असतां आपल्या रथास हजार घोडे जुंपून गेलास, तसेंच कारागृहांत दस्यूपासून दभीतीचें रक्षण केलेंस असा तूं अत्यंत स्तुत्य आहेस.

स्वप्नेनाभ्युप्याचुमुरिंधुनिंच जघन्थ दस्युंप्रदभीतिमावः ।
रंभीचिदत्रविविदे हिरण्यं सोमस्यतामदइन्द्रश्चकार ॥
(२. १५, ९)

इंद्रा, तूं चुमुरि आणि धुनि या दस्यूंना निद्रावश असतां मारिलेंस आणि दभीतीचें रक्षण केलेंस आणि त्यामुळें दस्यूंचें धन दभीतीला मिळालें. सोमपानानें मदयुक्त झाल्यामुळें हीं सर्व कामें तूं केलीस.

तस्मैतवस्यमनुदायिसत्रेन्द्रायदेवेभिरर्णसातौ ।
प्रतियदस्यवज्रंबाह्वोर्धुर्हत्वीदस्यून्पुर आयसीर्नितारीत्॥
(२. २०, ८).

नेहमीं इंद्राचें बल देवांच्या बलाहून अधिक असतें. (स्तोत्यांनीं) जेंव्हा इंद्रास खांद्यावर वज्र घ्यावयास लाविलें तेंव्हां त्यानें दस्यूंनां मारिलें आणि त्यांच्या लोखंडी नगरांचा विध्वंस केला.

कृणोत धूमं वृषणं सखायोस्रेधंत इतन वाजमच्छ ।
अयमग्निः पृतनाषाट् सुवीरो येन देवासो असहंत दस्यून्॥
(३. २९, ९).

मित्रहो, धूमवान् असा अग्नि उत्पन्न करा. बलवान् असतील तेच मंथनरूप युद्धाला चला. हा अग्नि शत्रूंच्या सैन्याला जिंकणारा आहे. याच्याच योगानें देवांनीं दस्यूंना जिंकिलें.

महो महानि पनयन्त्यस्येन्द्रस्य कर्म सुकृता पुरूणि ।
वृजनेन वृजिनान्त्सं पिपेष मायाभिर्दस्यूँरभिभूत्योजाः ॥
(३. ३४, ६).

या इंद्राचीं मोठमोठीं पराक्रमरूप चरित्रें उपासक नेहमीं स्तवीत असतात. त्या इंद्रानें पापाचरण करणाऱ्यांचा बलानें नाश केला, आणि मायेच्या योगानें दस्यूंचा संहार केला.

ससानात्याँउत सूर्यं ससानेन्द्रः ससान पुरुभोजसंगां ।
हिरण्ययमुत भोगं ससान हत्वी दस्यून् प्रार्यं वर्णमावत् ॥
(३. ३४, ९).

त्या इंद्रानें उपासकांना घोडे दिले, प्रकाश दिला, पुष्कळांचें पोषण करणारी गाय दिली; तसेंच धन आणि भोग्य वस्तू दिल्या. त्या इंद्रानें दस्यूंना मारून आर्यांचें रक्षण केलें.

यं नु नकिः पृतनासु स्वराजं द्विता तरति नृतमं हरिष्ठां ।
इनतमः सत्वभिर्यो ह शूषैः पृथुज्रया अमिनादायुर्दस्योः ॥
(३. ४९, २).

अत्यंत शोभायमान्, शूर व घोड्यावर बसलेला अशा इंद्राचा संग्रामांत पराभव करणारा दुसरा कोणी नाहीं. मरुतांच्या योगानें शक्तिमान् होणाऱ्या वेगवान् इंद्रानें दस्यूंचे प्राण हरण केले.

अच्छा कविं नृमणो गा अभिष्टौ स्वर्षाता मघवन् नाधमानं
ऊतिभिस्तमिषणो द्युम्नहूतौ नि मायावानब्रह्मा दस्युरर्त ॥
(४. १६, ९).

हे मघवा सूर्यप्रकाशार्थ होणाऱ्या युद्धांत मदतीची याचना करणाऱ्या गायकाच्या मदतीसाठीं ये. आणि आमंत्रणांत त्यास साहाय्य कर. प्रार्थनाहीन जादूगार दस्यु त्यास बुडव.

आ दस्युघ्ना मनसा याह्यस्तं भुवत्ते कुत्सः सख्ये निकामः ।
स्वे योनौ नि षदतं सरूपा विवां चिकित्सदृतचिद्ध नारी॥
( ४. १६, १० ).

दस्यूंचा घात करणाऱ्या इंद्रा, तुझ्या स्नेहाची इच्छा करणाऱ्या कुत्साच्या घरीं जाऊन तूं आणि कुत्स एका ठिकाणीं बसला. त्या वेळीं दोघे सारखेच दिसल्यामुळें तुझ्या स्त्रीला तुला ओळखतां आलें नाहीं.

कुत्साय शुष्णमशुषं नि बर्हीः प्रपित्वे अह्नः कुयवं सहस्रा ।
सद्यो दस्यून्प्र मृण कुत्स्येन प्र सूरश्चक्रं वृहतादभीके ॥
( ४. १६, १२ ).

हे इंद्रा, तूं कुत्सासाठीं शुष्णाला मारिलेंस आणि हजारों लोकांच्यासह कुयव राक्षसास प्रातःकालीं मारिलेंस व त्याच वेळीं वज्रानें दस्यूंचा वध केलास. तसेंच तूं सूर्याचें रथचक्र मोडिलेंस.

अहन्निन्द्रो अदहदग्निरिन्दो पुरा दस्यून्मध्यंदिनादभीके ।
दुर्गे दुरोणे क्रत्वा न यातां पुरू सहस्रा शर्वा नि बर्हीत् ॥
( ४. २८, ३ ).

हे सोम, इंद्र आणि अग्नि यांनीं वाटसरू लोकांना ज्याप्रमाणें वाटेंत गांठून लुटारू लोक लुटतात त्याप्रमाणें प्रातःकालीं दस्यूंचा सर्व सैन्यांसह संहार केला.

विश्वस्मात्सीमधमाँ इन्द्र दस्यून्विशो दासीरकृणोर-प्रशस्ताः ।
अबाधेथाममृणतं नि शत्रूनविन्देथामपचितिं वधत्रैः ॥
( ४. २८, ४ ).

हे इन्द्रा, तूं दस्यूंना अत्यंत हलके ( गुणहीन ) ठरविलेंस आणि दासी लोकांना ( दासी विशांस ) गर्ह्य ठरविलेंस. हे इंद्र आणि सोम हो तुम्हीं शत्रूंचा नाश केलात आणि शत्रूंच्या प्रहारापासून भक्तांचा बचाव केलात.

उतो हि वां दात्रा सन्ति पूर्वा या पूरुभ्यस्त्रसदस्युर्नितोशे ।
क्षेत्रासां ददथुरुर्वरासां घनं दस्युभ्यो अभिभूतिमुग्रं ॥
( ४. ३८, ४ ).

हे द्यावापृथिवी हो, घोडे, भूमि आणि पुत्रपौत्रादि संतति अशा प्रकारची संपत्ति याचकांना दान देणाऱ्या त्रसदस्यूला तुम्हाजवळूनच मिळाली आहे. तसेंच दस्यूंचा वध करण्यासाठीं वज्रहि तुम्हींच त्याला दिलें.

वधेन दस्युं प्र हि चातयस्व वयः कृण्वानस्तन्वे३ स्वायै ।
पिपर्षि यत्सहसस्पुत्र देवान्त्सो अग्ने पाहि नृतम वाजे अस्मान् ।
( ५. ४, ६ ).

हे अग्ने, आयुधानें दस्यूंचा वध कर. पुत्ररूप अशा हविर्दात्यासाठीं अन्न उत्पन्न करून देवांना तृप्त करणाऱ्या अग्ने संग्रामामध्यें आमचें रक्षण कर.

आदग्ने अपृणतोऽत्रिः सासह्याद्दस्यूनिषः सासह्यान्नॄन् ॥
( ५. ७, १० ).

हे अग्ने जे दस्यू दानें देत नाहींत त्यांचा अत्रि पराभव करो आणि जे अन्नदान देत नाहींत त्यांनां जिंको.

अग्निर्जातो अरोचत घ्नन्दस्यूञ्ज्योतिषा तमः ।
अविन्दद्गा अपः स्वः ॥
( ५. १४, ४ ).

अग्नि उत्पन्न होतांच दस्यूंचा नाश करिता झाला व आपल्या तेजानें अंधकार नाहींसा करिता झाला. तसेंच उदकें आणि सूर्य यांना जाणिता झाला.

प्रान्यच्चक्रमवृहः सूर्यस्य कुत्सायान्यद्वरिवो यातवेऽकः ।
अनासो दस्यूँरमृणो वधेन नि दुर्योण आवृणङ्मृध्रवाचः ॥
( ५. २९, १० ).

इन्द्रा तूं सूर्याच्या रथाचें दुसरें चाक (रथापासून) वेगळें केलेंस आणि कुत्साला धन मिळवून दिलेंस. तसेंच नाक नसलेल्या दस्यूंचा शस्त्रानें वध केलास आणि युद्धांत मृध्रवाचांचा नाश केलास.

स्त्रियो हि दास आयुधानि चक्रे किं मा करन्नबला अस्य सेनाः ।
अन्तर्ह्यख्यदुभे अस्य धेने अथोप प्रैद्युधये दस्युमिन्द्रः ॥
( ५. ३०, ९ ).

दासानें ( युद्धामध्यें ) स्त्रिया पुढें केल्या असतां 'हें अबला रूप सैन्य मला काय करणार ?' असें इंद्र म्हणाला. नंतर त्यानें त्यांपैकीं दोन स्त्रिया अंतर्गृहांत ठेवल्या आणि तो दस्यूबरोबर युद्ध करावयास गेला.

वृष्णे यत्ते वृषणो अर्कमर्चानिन्द्र ग्रावाणो अदितिः सजोषाः ।
अनश्वासो ये पवयो रथा इन्द्रेषिता अभ्यवर्तन्त दस्यून् ॥
( ५. ३१, ५ ).

हे इंद्र, ज्या वेळीं रथरहित, अश्वरहित व तुझ्या प्रेरणेनें गमन करणारे वीर्यवान् मरुत् दस्यूंचा वध करितात, आणि तुजसाठीं स्तोत्र करितात त्या वेळीं ( सोम कुटण्याचे ) दगड जुळले जातात.

तदिन्नु ते करणं दस्म विप्राहिं यद्घ्नन्नोजो अत्रामिमीथाः ।
शुष्णस्य चित्परि माया अगृभ्णाः प्रपित्वं यन्नप दस्यूँरसेधः ॥
( ५. ३१, ७ ).

हे दर्शनीय आणि सुबुद्ध इंद्रा, वृत्रासुराला मारून तूं आपला जो पराक्रम या जगांत प्रकट केलास तो केवळ अपूर्व होय. वृत्रासुराचा वध करणें हा असाधारण पराक्रम तुझाच आहे. तूं शुष्णाच्या परिमाया हिसकाऊन घेतल्यास आणि रणांगणावर जाऊन दस्यूंना चोप दिलास.

पातं नो रुद्रा पायुभिरुत त्रायेथां सुत्रात्रा ।
तुर्याम दस्यून्तनूभिः ॥
( ५. ७०, ३ ).

हे रुद्रहो, रक्षणाला उपयुक्त अशा आयुधांनीं तुम्ही आमचें संरक्षण करा आणि शुभकारक अशा पालन साधनांनीं तुम्ही आमचें पालन करा. तुमच्या कृपेनें दस्यूंना डोळा चुकवून आम्ही आपल्या मुलाबाळांसह पार निघून जाऊं.

नाना ह्यग्नेऽवसे स्पर्धन्ते रायो अर्यः ।
तूर्वन्तो दस्युमायवो व्रतैः सीक्षन्तो अव्रतम् ॥
( ६. १४, ३ ).

हे अग्ने, शत्रूंचें लुटून आणलेलें सारें धन जतन करण्याचें कामीं तुझ्या स्तवन करणाऱ्यांमध्यें मोठी चढाओढ लागते, तुझें स्तवन करणारे ऋषी आपल्यावर हल्ला करणाऱ्या दस्यूंना मारतात आणि तुझ्या यागरूप व्रताशीं विरोध करणाऱ्या अव्रत अशा लोकांचा तुझ्यासाठीं केलेल्या यागरूपी व्रताच्या योगानें नाश करण्याची ते इच्छा धारण करतात.

तमुत्वा पाथ्यो वृषा समीधे दस्युहन्तमं ।
धनंजयं रणेरणे ॥
( ६. १६. १५ ).

प्रत्येक रणसंग्रामामध्यें शत्रुभूत अशा दस्यूंचा नाश करून त्यांचें सर्व धन जिंकणाऱ्या तुज अग्नीला पाथ्योवृषा नामक कोणा एका ऋषीनें इंधनें घालून प्रदीप्त केला.

त्वं हनु त्यदद्मायो दस्यूँ रेकः कृष्टी रवनोरार्याय ।
अस्ति स्विन्नुवीर्यं तत्त इंद्र न स्विदस्ति तदृतुथा विवोच ॥
( ६. १८, ३ ).

हे इंद्रा दस्यूंना तूं तेव्हांच दमवून टाकलेंस आणि आर्याला प्रजा प्राप्त करून दिल्यास; पण हें तुझें त्या वेळचें सामर्थ्य हल्लीं तुझ्या अंगीं आहे किंवा नाहीं हें स्पष्ट करून सांग.

यद्वा दिवि पार्ये सुष्विमिन्द्र वृत्रहत्येवसिशूर सातौ ।
यद्वा दक्षस्य बिभ्युषो अबिभ्यदरंधयः शर्धत इंद्र दस्यून् ॥
( ६. २३, २ ).

हे इंद्रा, शूर अशा योद्धयांसह जेव्हां तूं द्युलोकाच्या ठिकाणीं शत्रूशीं लढण्यासाठीं जातोस तेव्हां तूं उत्कृष्ट रीतीनें सोमकुटणाऱ्याचें रक्षण करितोस. यज्ञकुशल, परंतु शत्रूंना भ्यालेला जो असेल याला तूं निर्भय होत्साता अभय देतोस आणि रणांगणावर तुझ्याशीं भिडणाऱ्या दस्यूंचा नाश करून टाकतोस.

नवीळवे नमते ने स्थिराय न शर्धते दस्युजूताय स्तवान् ।
अज्रा इन्द्रस्य गिरयश्चिदृष्वा गंभीरे चिद्भवति गाधमस्मै ॥
( ६. २४, ८ ).

हा इंद्र आमच्याकडून एकदां का स्तविला गेला म्हणजे तो धिप्पाड शरीराच्या मनुष्याला नमला जात नाहीं, युद्धामध्यें धैर्य धरून स्थिरपणें लढणाराला तो जिंकला जात नाहीं, कर्मरहित अशा दस्यूंनीं भुरळ घातलेल्या पुरुषाला तो जुमानीत नाहीं, फार तर काय पण दुर्गम असे मोठमोठाले पर्वत ह्या इंद्राला सहज भिरकाऊन देतां येतात. प्रक्षुब्ध अशा ठिकाणींहि गंभीरपणा हा इंद्राचा विषय होऊन बसतो.

एवेदिन्द्रः सुहव ऋष्वो अस्तूती अनूती हिरिशिप्रः सत्वा ।
एवाहि जातो असमात्योजाः पुरूच वृत्रा हनति नि दस्यून् ॥
( ६. २९, ६ ).

महान् अशा प्रकारचा तो इंद्र आम्हांला सुखानें बोलावतां येईल असा होवो. बाकी पिवळसर हनुवटीचा तो इंद्र आला किंवा न आला तरीसुद्धां त्याचें स्तोत्र करणारांला तो धनप्राप्ति करून देण्याला कारणीभूत होतो. आतां हा प्रादुर्भूत झालेला इंद्र, अमानुष अशा प्रकारच्या बळानें सम्पन्न होवो आणि अनेक वृत्रांना मारून दुष्ट अशा दस्यूंचाहि तो नाश करो.

त्वं शतान्यव शंबरस्य पुरो जघन्थाप्रतीनि दस्योः ।
अशिक्षो यत्र शच्या शचीवो दिवोदासाय सुन्वते सुतक्रे
भरद्वाजाय गृणते वसूनि ॥
( ६. ३१, ४ ).

हे इन्द्रा, तुझ्यावर चाल करून येणारा जो शंबर नामक दस्यु, त्याचीं तूं शंभर नगरें फोडून जमीनदोस्त केलींस. हे प्रज्ञावन्त इंद्रा, कुटलेल्या सोमाला विकला जाणारा तूं सोमाभिषव करणाऱ्या दिवोदासाला जेव्हां मोठ्या हिकमतीनें धन मिळवून दिलेंस त्याचवेळीं स्तवनकर्त्या मज भरद्वाजासहि तूं पुष्कळ धन दिलेंस.

कुवित्सस्य प्रहिव्रजं गोमन्तं दस्युहा गमत् ।
शचीभिरपनोवरत् ॥
( ६. ४५, २४ ).

शत्रूंचा नाश करणारा तो इंद्र कुवित्सनामक एका माणसाच्या पुष्कळ गाईंनीं भरलेल्या गोठ्यांत जर शिरतो तर तो आमच्या कर्मांनीं संतुष्ट होऊन आम्हांला त्या कुवित्साच्या गोठ्यांतल्या गाई दाखवो.

त्वे असुर्यं वसवो न्यण्वन्क्रतुंहिते मित्रमहोजुषन्त ।
त्वं दस्यूँरोकसो अग्न आजः उरुज्योतिर्जनयन्नार्याय ॥
( ७. ५, ६ ).

हे मित्रपूजक अग्ने, वस्ती करून राहणाऱ्या देवांनीं आपलें सारें बळ तुझ्या ठिकाणीं ठेवलें आणि तुला आवडत्या अशा यज्ञकर्मांचें त्यांनीं सेवन केलें. कां कीं आर्याला तूं अधिक तेजस्वी करतोस आणि दस्यूंना त्यांच्या ठिकाणांतून हांकून लावतोस.

न्यक्रतून् ग्रथिनो मृध्रवाचः पणीँ रश्रद्धा अवृधाँ अयज्ञान् ।
प्रप्र तान्दस्यूँरग्निर्विवाय पूर्वश्चकारा पराँ अयज्यून् ॥
( ७. ६, ३ ).

अयाजक हिंसाप्रचुर अशा वाणीनें बडबड करणारे पणी, यज्ञकर्माविषयीं श्रद्धा नसलेले, स्तोत्रें गाऊन अग्नीची कीर्ति न वाढविणारे, यज्ञकर्म न करितां वृथाच कालक्षेप करणारे असे जे पणि नामक दस्यू, त्यांना अग्निदेव पूर्णपणें हांकून लावतो. इतकेंच नाहीं तर सर्व देवांत अग्नि हा प्रमुख होत्साता अयाजक अशा दुसऱ्या कित्येक लोकांनांहि रसातळीं दडपून टाकतो.

त्वं नृभिर्नृमणो देववीतौ भूरीणि वृत्रा हर्यश्व हंसि ।
त्वं नि दस्युं चुमुरिं धुनिंचास्वापयो दभीतये सुहंतु ॥
( ७. १९, ४ ).

हे इन्द्रा यज्ञनेत्या ऋत्विजांनीं तूं स्तवनीय आहेस. जय मिळविण्याची इच्छा करणारे देव ज्या ठिकाणीं जातात अशा रणसंग्रामामध्यें मरुतांच्या सहवर्तमान जाऊन तूं पुष्कळ शत्रूंना ठार मारलेंस, पीतवर्ण अशा अश्वांनीं सज्ज केलेल्या रथांत बसून हे इंद्रा, तूं दभीति नामक राजर्षीसाठीं चुमुरि व धुनि या दोन दस्यूंनां आपल्या वज्राच्या प्रहारानें मारून टाकलेंस.

निशुष्ण इन्द्र धर्णसिर्वज्रं जघन्थ दस्यवि ।
वृषाह्युग्र शृण्विषे ॥
( ८. ६, १४ ).

हे इंद्रा, आपणांवर चाल करून येणाऱ्या शुष्ण नामक दस्यूला तूं आपल्या हातांत धारण केलेल्या वज्राचा प्रहार करून मारून टाकलास. हे बलिष्ठा, तूं भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारा आहेस असें ऐकतो तर आम्हांला अपेक्षित असें धन तूं आम्हांला दे.

मायाभिरुत्सिसृप्सत इन्द्रद्यामा रुरुक्षतः ।
अव दस्यूँ रधूनुथाः ॥
( ८. १४, १४ ).

हे इंद्रा, तूं आपल्या मायिक चमत्कारांच्या योगानें सर्वत्र प्रसार पावून द्युलोकांवर आरोहण केलेंस आणि आपल्यावर चालून येणाऱ्या दस्यूंना खालीं तोंड करून भिरकावून दिलेंस.

**यो अग्निः सप्तमानुषः श्रितो विश्वेषु सिंधुषु।**
**तमागन्म त्रिपस्त्यं मन्धातुर्दस्युहन्तममग्निं यज्ञेषु पूर्व्यं नभंतामन्यके समे॥**
(८. ३९, ८).

सात ऋत्विजांनीं संपन्न असा जो अग्नि सर्व नद्यांच्या ठिकाणीं आश्रय करून रहात असतो व ज्यानें मंधात्याच्या शत्रूंना मारून टाकिलें, त्या यज्ञमुख्य अशा अग्नीला स्तविण्यासाठीं आम्ही येथें आलों आहों. तर तो अग्नि दुराग्राहि सर्व शत्रूंना निर्दलून टाको.

**रथिरासो हरयो येते अस्रिध ओजो वातस्य पिप्रति।**
**येभिर्नि दस्युं मनुषो निघोषयो येभिःस्वः परीयसे।**
(८. ५०, ८.)

जे घोडे तुझा रथ ओढतात, जे कोणास त्रास देत नाहींत, ते वाऱ्याच्या वेगासहि मागें टाकतात. त्यांच्यासह तूं मानवशत्रूंस ( मनुषःदस्युं ) गप्प करतोस, व त्यांच्यामुळें तूं सर्वत्र फिरतोस.

**पार्षद्वाणः प्रस्कण्वं समसादयच्छयानं जिव्रिमुद्धितं।**
**सहस्राण्यसिषासद्गवामृषिस्त्वोतो दस्यवे वृकः।**
(८. ५१, २).

पृषद्वाणाचा पुत्र प्रस्कण्वाचा यजमान होता. प्रस्कण्व हा असहाय व दुर्बल होता. तुझ्या साहाय्यानें दस्यवेवृक ऋषीनें एक हजार गायी मिळविल्या.

**दश मह्यं पौतक्रतः सहस्रा दस्यवेवृकः।**
**नित्याद्रायो अमंहत.**
(८. ५६, २).

पुतक्रताचा पुत्र दस्यवेवृक यानें मला स्वतःच्या धनांतून दहाहजार गायी दिल्या.

**अन्यव्रतममानुषमयज्वानमदेवयुं।**
**अव स्वः सखा दुधुवीत पर्वतः सुघ्नाय दस्युं पर्वतः।**
(८. ७०, ११).

अव्रत, अमानुष ( इन्द्रयाजिनाम् अप्रियम् ), अयज्वा, देव न मानणारा अशा मनुष्यास पर्वत, तुझा सखा, स्वर्गांतून खाली टाकून देतो. अशा दस्यूला पर्वत मृत्यूकडे टाकतो.

**त्वं हि शश्वतीनामिन्द्र दर्ता पुरामसि।**
**हन्ता दस्योर्मनोर्वृधः पतिर्दिवः।**
(८. ९८, ६).

कारण तूं शत्रूंच्या अनेक पुरांचा नाश करणारा आहेस. तूं दस्यूचा मारक, मनुष्याचा संवर्धक व स्वर्गाचा पति आहेस.

**सुवितस्य मनामहेति सेतुं दुराव्यं।**
**साह्वांसो दस्युमव्रतं।**
(९. ४१, २).

अव्रत दस्यूचा नाश करून दुःखाचा सेतू सोडून आनंदाच्या सेतूचा विचार करूं.

**कृतानीदस्य कर्त्वा चेतन्ते दस्युतर्हणा।**
**ऋणा च धृष्णुश्चयते।**
(९. ४७, २).

त्याचें कार्य झालें. दस्युनाश स्पष्ट झाला आहे आणि तो आपलें ऋण धैर्यानें अवलक्षितो.

**इंद्रो नर्यो महा कर्माणि चक्रिर्हन्ता वृत्राणामसि सोमपूर्भित्**
**पैद्वो न हि त्वमहिनाम्नां हन्ता विश्वस्यासि सोमदस्योः**
(९. ८८, ४).

हे सोमा तूं पुरांचा भेद करणारा आहेस. ज्या इंद्रानें मोठीं कामें केलीं त्या इंद्राप्रमाणें तूं वृत्राचा हंता आहेस. ज्याप्रमाणें पैद्वानें सर्व नाश केला त्याप्रमाणें तूं सर्व दस्यूंचा नाशक आहेस.

**तन्नुसत्यं पवमानस्यास्तु यत्र विश्वे कारवः सन्नसंत।**
**ज्योतिर्यदह्ने अकृणोदुलोकं प्रावन्मनुं दस्यवेकरभीकम्॥**
(९. ९२, ५).

तर पवमानासंबंधीं हें सत्य असो कीं जेथें सर्व कवि जमतात त्यानें दिवसाचा उजेड व जागा आम्हांस दिली, मनूला मदत केली, व दस्यूला पराभविलें.

**अकर्मा दस्युरभिनो अमन्तुरन्यव्रतो अमानुषः।**
**त्वं तस्यामित्रहन् वधर्दासस्यदम्भय॥**
(१०. २२, ८).

अकर्मा, अव्रत, आणि अमानुष दस्यु आमच्या भोंवतीं आहे. हे अमित्रघ्ना त्या दासाचें शस्त्र फसव.

**दस्युहनं पूर्भिदमिन्द्रसत्यमस्मभ्यं चित्रं वृषणं रयिंदाः॥**
(१०. ४७, ४).

इंन्द्रा दस्युहननाचें आणि पुरनाशाचें सत्य आम्हांस चित्र आहे. आम्हांस संपत्ति दे.

**अहं दस्युभ्यः परिनृम्णमाददे गोत्राशिक्षन् दधीचे मातरिश्वने॥**
(१०. ४८, २).

मी ( इंद्र ) दस्यूंचें सैन्य पराभविलें आणि दधीचीस आणि मातरिश्वास गोठे दिले.

**अहमत्कं कवयेशिश्नथं हथैरहं कुत्समावमाभिरूतिभिः।**
**अहंशुष्णस्य श्नथिता वधर्यमन्नयोररआर्यन्नाम दस्यवे॥**
(१०. ४९, ३).

मीं अत्कास कवीसाठीं ठोक्यांनीं मारलें. मी आपल्या मदतीनें कुत्साचें रक्षण केलें. मी शुष्णाचा मारता. मी मृत्यूचा बाण धरणारा मी दस्यु शत्रूस आर्यांचें नांव जाऊं दिलें नाहीं.

**पीत्वी सोमस्य दिव आवृधानः शूरो निर्युधाधमद्दस्यून्॥**
(१०. ५५, ८).

तो शूर सोम पिऊन आकाशांतून दस्यूस आपल्या आयुधांनीं घालवून देतो.

**आभिर्हिमाया उपदस्यु मागान्मिहः प्रतम्रा अवपत्तमांसि॥**
(१०. ७३, ५).

आपल्या सर्व कपटसाधनासह इंद्र दस्यूजवळ ( मारण्याच्या इच्छेनें ) आला. अवर्षणानें नाहींशी झालेली वृष्टि त्यानें दिली. आणि अंधार नाहींसा केला.

**अभीहि मन्यो तवस स्तवीयान्तपसायुजाविजहि शत्रून्।**
**अमित्रहा वृत्रहा दस्युहाच विश्वाव सून्याभरात्वंनः॥**
(१०. ८३, ३).

बलवानाहून बलवान् अशा मन्युदेवा आमच्याकडे ये. तपाच्या साहाय्यानें शत्रूंना जिंक. अमित्र, वृत्र व दस्यु यांचा घात करणाऱ्या इंद्रा आम्हांला सर्व प्रकारची संपत्ति प्राप्त करून दे.

**अयन्ते अस्म्युपमेह्यर्वाङ् प्रतीचीनः सहुरे विश्वधायः।**
**मन्योवज्रिन्नभिमामावृत्स्वहनाव दस्यूँरुत बोध्यापेः॥**
(१०.८३, ६).

अत्यंत सहनशील व विश्वाला धारण करणाऱ्या इंद्रा हे सर्व लोक तुझेच आहेत तर त्यांच्यासाठीं माघारा फीर. वज्रधारी इंद्रा दस्यूंना मारण्यासाठीं व बंधुजनांना जागे करण्यासाठीं परत ये.

**समस्मिञ्जायमान आसतग्नाउतेमवर्धन्नद्यः १ स्वगूर्ताः।**
**महेयत्त्वापुरूरवो रणायावर्धयन्दस्युहत्यायदेवाः॥**
(१०.९५, ७).

(हे पुरूरवस्), तुझा जन्म झाल्यावरोबर देवांनीं मोठ्या संग्रामाकरितां व दस्यूंना मारण्याकरितां तुझ्या सामर्थ्याची वाढ केली.

**सनृतमो नहुषोस्मत्सुजातः पुरो भिनदर्हन्दस्युहत्ये॥**
(१०.९९, ७).

तो सुजात नरश्रेष्ठ नहुषाचीं पुरें दस्युहत्याप्रसंगीं आमच्या साठीं भिन्न करता झाला.

**उपयत्सीददिन्दुं शरीरैः श्येनो यो पाष्टिर्हन्ति दस्यून्॥**
(१०.९९, ८).

श्येनसदृश इंद्र जेव्हां सोमबिंदूंत आपल्या लोहमय अंगानीं गमन करतो तेव्हां तो दस्यूंना मारतो.

**वज्रं यश्चक्रे सुहनाय दस्यवे॥**
(१०.१०५, ७).

दस्यूला मारण्याकरितां जो वज्र तयार करतो.

**आवोयद्दस्युहत्ये कुत्सपुत्रं प्रावो यद्दस्युहत्ये कुत्सवत्सम्॥**
(१०.१०५, ११).

तूं कुत्सपुत्रास दस्युहत्येसाठीं मदत केलीस. तूं कुत्सपुत्रास दस्युहत्येसाठीं मदत केलीस.

**अमित्रहा वृत्रहा दस्युहंतमं ज्योतिर्जज्ञे असुरहा सपत्नहा॥**
(१०.१७०, २).

वृत्रास, असुरास, शत्रूस ठार मारणारा दस्यूचें हनन करणाऱ्या ज्योतीस जाणता झाला.

पूर्वगत विवेचनावरून काय निघतें तें पाहूं.

(१) दस्यूला धनिन् म्हटलें आहे.

(२) दस्यूला इंद्र मारतो.

(३) दस्यूंना जाळून इंद्रानें स्वर्गांतून खालीं टाकलें.

(४) दस्युहननासाठीं, यदु, तुर्वश, उग्रदेव, नववास्त्व बृहद्रथ आणि तुर्वीति यांस अग्नि आणो म्हणून कवि प्रार्थना करतो.

(५) दस्यूला मारून ऋजिश्व्याचें रक्षण केलें. ऋजिश्व्याचें ज्या दस्यूपासून रक्षण केलें त्याचें नांव पिप्रु होतें.

(६) शुष्ण, शंबर आणि अर्बुद यांस मारल्याचें सांगून कवि तूं दस्यु मारण्याकरतां जन्मला आहेस असा निर्णय काढतो.

(७) आर्य आणि दस्यु यांतील फरक ओळखण्यासाठीं स्तोता इंद्रास सांगतो आणि हा फरक ओळखून यजन न करणारांस करणारांच्या हवालीं करावयास सांगतो.

(८) दस्युनाश इंद्रानें सोमरसाच्या साहाय्यानें केला.

(९) दस्यूला व शंबराला मारून उदकें वर्षविण्याची क्रिया अग्नीनें केली.

(१०) दस्यु व शिम्यु यांचा एकत्र उल्लेख करून त्यांस पुरुहूत इंद्रानें मारलें असें म्हटलें आहे.

(११) दस्यूंचीं नगरें भेदून इंद्र त्यांवरून चालला.

(१२) दस्यूंच्या आंगावर शस्त्रें टाकून आर्यांचें बल वाढविण्यासाठीं इंद्रप्रार्थना.

(१३) दस्युहननाचा परिणाम मघवा हें नांव इंद्रास देण्यांत झाला आहे.

(१४) गाई शोधून काढणें व दस्यूंस मारणें या दोन क्रियांचा एकत्र उल्लेख.

(१५) दस्यू मायावी आहे त्याच्या अशिव मायेचा प्रतिकार अश्वीनीं केला.

(१६) दस्यूला मारण्याचा परिणाम आर्यांकरितां प्रकाशोत्पत्ति हा दाखविला आहे.

(१७) शत्रूंचा आणि दस्यूंचा नाश करणारी प्रजा स्तोता इंद्रास मागतो.

(१८) दस्यूपासून दभीतीचें रक्षण केलेंस.

(१९) चुमुरि आणि धुनि यांस दस्यु म्हटलें आहे. ते निद्रिस्त असतां त्यांस इंद्रानें मारलें.

(२०) दस्यूंचीं नगरें आयस म्हणजे लोखंडी होतीं.

(२१) दस्यूंना देवांनीं जिंकलें.

(२२) देवांनीं दस्यूंस जिंकलें तें यज्ञ करून जिंकलें.

(२३) इंद्रानें दस्यूंस जिंकलें तें मायेनें जिंकलें.

(२४) दस्यु ससैन्य होते.

(२५) दस्यूंस दासीर्विशः असें म्हटलें आहे.

(२६) दस्यू दान देत नाहींत.

(२७) दस्यूंचा पराभव अग्नि करो असें स्तोता म्हणतो.

(२८) दस्यूंना अनास आणि मृध्रवाचः म्हटलें आहे. त्या दस्यूंना मारण्याचें श्रेय इंद्रास दिलें आहे. कोणत्याहि मानवाला दिलें नाहीं.

(२९) मरुत् दस्यूंचा वध करतात.

(३०) रुद्राच्या कृपेनें दस्यूंचा डोळा चुकवून आम्हीं मुलाबाळांसह निघून जाऊं म्हणून स्तोता म्हणतो.

(३१) व्रतांनीं अव्रतांना पराभविण्याची क्रिया व दस्यूंना मारण्याची क्रिया गाता एकत्र उल्लेखितो.

(३२) दस्यु मनुष्यांस भुरळ घालतो परंतु इंद्रस्तवनामुळें दस्यूनें भुरळ घातलेल्या मनुष्यास जुमानीत नाहीं.

(३३) शंवर दस्यु आहे. त्याचीं शंभर नगरें इंद्र जमीनदोस्त करतो.

(३४) पणींस दस्यु म्हटलें आहे आणि त्यांस, अक्रतु, मृध्रवाच, अश्रद्ध, अवृध (अग्नि न वाढविणारे) अयज्ञ म्हटलें आहे.

(३५) इंद्ररथाच्या गतीचा परिणाम मनुष्य दस्यूंस गप्प करण्याकडे होतो.

(३६) दस्यवेवृक नांवाचा एक यजक होता.

(३७) दस्यूला पर्वत मृत्यूकडे टाकतो.

(३८) दस्यु अव्रत होता.

(३९) पैद्वानें ज्याप्रमाणें सर्पनाश केला त्याप्रमाणें इंद्रानें दस्युनाश केला.

(४०) सोमानें दस्यूला पराभविलें.

(४१) दस्युपराभव याचा व दिवसाचा प्रकाश व जागा लोकांस देणें व मनूचें संरक्षण करणें यांचा सहोल्लेखसंबंध आहे.

(४२) दस्यु अकर्मा, अव्रत, आणि अमानुष आहे. तो दास आहे.

(४३) इंद्राचें दस्यूशीं अभिगमन अवर्षणनाशाशीं आणि अंधकारनाशाशीं संबद्ध आहे.

(४४) इंद्रास अमित्रहा, दस्युहा व वृत्रहा असें म्हटलें आहे.

(४५) दस्यूंनां मारणें व बंधुजन जागे होणें या क्रियांचा अन्योन्याश्रय स्तोता सांगतो.

(४६) दस्यूला मारण्यासाठीं देवांनीं पुरूरव्याचें सामर्थ्य वाढविलें असें उर्वशीच्या तोंडीं वाक्य सूक्तकार घालतो.

(४७) नहुषांचीं पुरें दस्युहत्याप्रसंगीं इंद्रानें भिन्न केलीं.

(४८) कुत्सपुत्रास इंद्रानें दस्युहत्येसाठीं मदत केली.

या उल्लेखांत दस्युस्वरूप येणेंप्रमाणें दिसतें.

पिप्रु, शुष्ण, शंबर, अर्बुद, चुमुरि, धुनि यांस दस्यु म्हटलें आहे. पणींसहि दस्यु म्हटलें आहे. शिम्यु, नहुष, आणि वृत्र हे देखील दस्यूंमध्यें मोडत असावेत.

दस्यूंस मायावी, धनिन्, अनास, मृध्रवाच, अक्रतु, अश्रद्ध, अवृध, अयज्ञ, अकर्मा, अमानुष, दास अशीं विशेषणें लावलीं आहेत. ते दान देत नाहींत. मनुष्यांस भुरळ घालतात.

दस्यूंचीं नगरें होतीं. तीं शंभर होतीं. तीं आयस म्हणजे लोखंडी किंवा काळीं होतीं. ते ससैन्य होते.

दस्यु मारण्याचें श्रेय इंद्रास मुख्यत्वेंकरून दिलें आहे. प्रसंगीं अग्नीस, इंद्रास, अश्वींस, सोमास, मरुतांस व पर्वतास दिलें आहे. मानवीजनापैकींहि अनेकांचा दस्युहत्येशीं संबंध आणला आहे. अशांमध्यें पुरूरवस, यदु, तुर्वश, उग्रदेव, नववास्त्व, बृहद्रथ, तुर्वीति, ऋजिश्वा, दभीति, कुत्सपुत्र, अत्रि, हे मोडतात. या उल्लेखांपैकीं कांहीं उल्लेख देवांचे शत्रु दस्यु यांच्या नाशाचे वाचक आहेत आणि कांहीं सामान्य शत्रुवाचक आहेत. कांहींनीं दस्यूंचा नाश यज्ञ करूनच केलेला आहे.

दस्युहननाचा परिणाम, उदकें मोकळीं होणें, गाई शोधून काढणें, प्रकाशोत्पत्ति, पृथ्वी मोकळी होणें म्हणजे जागा मिळणें, लोक जागे होणें इत्यादि वर्णिले आहेत.

दस्यूंस दासीर्विशः असें म्हटलें आहे.

दस्यूंचें सामुच्चयिक शत्रुत्व दोघांशीं दाखविलें आहे. एक देवांशीं आणि दुसरें आर्यांशीं.

आतां दासविषयक उल्लेखांत काय सांपडतें तें पाहूं.

हे उषे, यशानें भरलेली सुवीरांनीं युक्त व अनेक दासांनीं परिपूर्ण (दासप्रवर्गं रयिं) अशी संपत्ति मला लाभो.

(१. ९२, ८).

प्रजांचें पालन करणारा तो इंद्र पराक्रम करण्याच्या इच्छेनें दस्यूंचीं नगरें (दासीः पुरः) फोडून टाकिता झाला, वज्रधरा इंद्रा मर्मस्थळ जाणणारा असा तूं दस्यूंच्या नगरावर अस्त्र टाक आणि हे इंद्रा आर्य लोकांचें बल आणि यश वाढीव.

(१. १०३, ३).

जे जे उपासक लोक रक्षणासाठीं इंद्राकडे येतात त्यांस तो तत्क्षणीं चांगल्या मार्गी लावो. देव दस्यूंचा क्रोध नाहींसा करोत आणि आमचें कल्याण व्हावें म्हणून आमच्या वर्णाच्या (दासांचा) लोकांना घेवून येवोत.

(१. १०४, २).

मला जरी दासांनीं बांधून नद्यांमध्यें टाकिलें आहे तरी त्या नद्या मला बुडूं न देवोत. त्रैतनानें जरी माझ्या शिरावर आघात केला आहे तरी तो दास आपलेंच उर आणि बाहू कापून घेवो.

(१. १५८, ५).

हे इंद्रा युद्धांत कवीनें तुझा स्तव केला. तूं असुराला (दासाय) भूमीचें उसें देता झालास. मघवा तिन्हीं लोकांना दानानें मनोरम करिता झाला व समरांगणामध्यें कुयवाचाला जमीनदोस्त करिता झाला.

(१. १७४, ७).

हे शूर इंद्रा, ज्याला अहीनें वेष्टून टाकिलें होतें त्या महान् विपुल उदकाला तूं खालीं वर्षिता झालास. स्तोत्रांनीं बलवान् झालेला असा तूं आपणास अमर मानणाऱ्या (अमर्त्यं मन्यमानं दासं) दासाला सुद्धां मारून खालीं पाडिता झालास.

(२. ११, २).

आम्ही तुझें सुंदर बल आतां वाढवीत आहों. सुंदर वज्र तुझ्या खांद्यावर ठेवीत आहों. आम्हांकडून बल धारण केलें गेलेला सुंदर असा तूं तेजःपुंज अशा वज्राच्या योगानें आम्हांसाठीं दास लोकांचा (दासीर्विशः) पाडाव कर.

(२. ११, ४).

ज्यानें हीं सर्व अस्थिर भुवनें निर्माण केलीं, जो दास वर्णांना

निर्दोळिता झाला, जो विजयी द्यूतकाराप्रमाणें शत्रूंचीं एकलक्ष धनें घेता झाला तो, हे जनहो इंद्र समजा.

(२. १२, ४).

तो देदीप्यमान, प्रख्यात आणि अत्यंत पराक्रमी इंद्र मनुष्याला साहाय्य करण्यासाठीं सिद्ध असो. विजयी आणि बलवान् इंद्र, नाशक दासाचें शिर ( अर्शसानस्य दासस्य शिरः ) भूमीवर पाडो.

(२. २०, ६).

तो वृत्रघ्न आणि पुरभंजक इंद्र काळ्या जातीच्या लोकांची ( कृष्णयोनीर्दासीः ) दाणादाण करिता झाला. तो आर्यजनाकरितां पृथिवी आणि उदकें निर्माण करिता झाला. तो यजन करणाऱ्या जनांचें स्तोत्र सदैव वाढवो.

(२. २०, ७).

शत्रूंचीं नगरें फोडणारा, संपत्ति प्राप्त करून देणारा आणि शत्रूंचा नाश करणारा इंद्र आपल्या तेजाच्या योगानें दासाला ( दासं अतिरत् ) जिंकितो. स्तोत्रांच्या योगानें ज्याला प्रेरणा होते, जो विशाल विग्रह, महा दानशाली असा इंद्र द्यु आणि पृथिवी या उभय लोकांना भरून टाकिता झाला.

(३. ३४, १).

हे मघवन्, ज्या तुला व्यंसानें हनवटीवर मारिलें परंतु खालीं पडल्यानंतर देखील तूं उठून उभा राहिलास आणि दासाचें शिर तूं वध करून कुडलेंस तो तूं माझा आहेस.

(४. १८, ९).

दस्यूविषयींच्या उल्लेखांत ही ऋचा आलीच आहे.

(४. २८, ४).

कुलितर पुत्र जो शंबर दास, त्यास तूं मोठ्या पर्वतावरून खालीं टाकून दिलेंस.

(४. ३० १४.).

वर्चि नामक दासाचे पंचाधिक शतसहस्र अनुयायी तूं चाकाच्या धावेप्रमाणें चिरडून मारिलेस.

(४. ३०, १५).

दभीतिसाठीं इंद्रानें तीस हजार दास आपल्या मायेनें व हथानीं ( हनन साधनानें ) निजविले.

(४. ३०, २१).

हे इंद्रा, सोमानें मोदमान झालेल्या तूं दासीपुराजवळ जाऊन त्यास विध्वंसिलें त्या तुझें शौर्य आम्ही गातों.

(४. ३२, १०).

येथें मनुष्यहितासाठीं तूं दास नमुचि याचें डोकें तोडतोस.

(५. ३०, ७).

नमुचि दासाचें डोकें घुसळून तूं मला सहकारी सखा केलेंस.

(५. ३०, ८).

दस्युविषयक उताऱ्यांत उल्लेख दिलाच आहे.

(५. ३०, ९).

( हे इंद्रा, ) सूर्यासाठीं त्याच्याच स्थानीं ( आकाशांत ) तूं वर्षाव करून संग्रामांत दासाचा नाश केलास

(५. ३३, ४).

इंद्र विश्वाचा दमिता आहे, तो कसा तर ज्याप्रमाणें भयजनक आर्य आपल्या ताब्यांतील दासास नेतो तसा.

(५. ३४, ६).

ज्याप्रमाणें श्येन मदकारक देठ ( सोमाचा ) तोडतो, त्याप्रमाणें नमुचि दासाचें शिर तोडणारा इंद्र.

(६. २०, ६).

सात शारदी पुरें तूं फोडिलींस, पुरुकुत्साला मदत केलीस आणि दासांचा नाश केलास.

(६. २०, १०).

जिनें ( ज्या संपन्नतेनें ) दासांना आर्य केलेंस, दुष्ट मनुष्यांना चांगलें मनुष्य केलेंस ती स्वस्ति ( संपन्नता ) हे वज्री, तूं आम्हाला शत्रुनाशाला दे.

(६. २२, १०).

आर्यांसाठीं हे इंद्रा आमच्या स्तुतीच्या योगानें आमच्या विरुद्ध लढतात त्यांचा पराभव कर, आमच्या अमित्रांचा क्रोध कमी कर आणि आमच्या शत्रूंची चोहोंकडे दाणादाण कर आणि दासांच्या विशांना खालीं पाड.

(६. २५, २).

हे शूरा, ज्या वेळेस तूं शतसहस्र शत्रूंस अवदारिलेंस. त्या वेळेस तूं आमची स्तुति खरी केलीस. तूं दास शंबराला मारिलेंस.

(६. २६, ५).

हे शूरा, नरांत नरश्रेष्ठा, दोघां शत्रूंस वृत्रां दासांस व आर्यांस तूं आपल्या आयुधांनीं युद्धांत वधिलेंस.

(६. ३३, ३).

दररोज आपल्या सद्मापासून त्या काळ्यांस त्यानें हांकलून दिलें. त्या वर्षित्यानें वर्ची शंबर इत्यादि दासांस जलसंचयापाशीं मारून टाकलें.

(६. ४७, २१).

हे सत्पतींनों, आर्यांनीं ( जलें ) झांकणाऱ्यास मारलें, दासांना मारलें, सर्व द्वेष्ट्यांस मारलें.

(६. ६०, ६).

तूं इंद्रा शरीरानें तुझी सेवा करणाऱ्या कुत्सास मदत केलीस, आर्जुनेयास मदत करतांना तूं कुयवास आणि दास शुष्णास तावडींत आणलेंस.

(७. १९, २).

सुदासाच्या दास आणि आर्य शत्रूंस इंद्रा तूं मारलेंस.

(७. ८३, १).

इच्छा पुरविणाऱ्या वरुणा तुला मी दासाप्रमाणें सेवीन.

(७. ८६, ७).

सूर्य, उषा, आणि अग्नि, प्रदेश व लोक यांस उत्पन्न करून यज्ञासाठीं तुम्हीं ऐसपैस स्थली निर्माणिली आहे. तुम्हीं आपल्या युद्धांत वृषशिप्र दासाच्या मायेला मारलें आहे.

(७. ९९, ४).

दासांचीं पुरें भक्षण करीत अमर्त्य अश्वीनों दुरून या.

(८.५, ३१).

सप्तसिंधूवरील आर्यांस दुःखापासून कोण मुक्त करील (हे इंद्रा) दासाचें वधकारक (हत्यार) नमव.

(८.२४, २७).

त्या बलवान् इंद्रानें, सृबिंद, अनर्शनि, पिप्रु व अहीशुव या दासांनां मारलें.

(८.३२, २).

लतांचीं जाळीं कापून टाक, दासाचें ओज नष्ट कर, (त्यांचीं) संभृत वसु वाटून टाक. आम्हीं इंद्रास भजतों.

(८.४०, ६).

सर्व आर्य आणि दास त्याचे अंकित आहेत. रुशमपवीरु जवळ हें धन आणलें आहे.

(८.५१, ९).

मला शंभर गर्दभ, शंभर मेंढरें आणि शंभर दास आणि शिवाय माळा (दिलेस).

(८.५६, ३).

इंद्रा जे तुझी निंदा करतात त्यांचें धन तूं हरतोस. जे तुझें यजन करतात त्यांस खूष करतोस. तूं आमचें रक्षण कर आणि दासाला आपल्या घातक शस्त्रांनीं मारतोस.

(८.७०, १०).

दस्यूविषयक विवेचनांत ही ऋचा आली आहे.

(१०.२२, ८).

घोड्यांनां यज्ञांनीं जें धन प्राप्त झालें त्याच्या योगानें इंद्र मघवा आणि वृत्रहा झाला. ऋभु, ऋभुक्षा, वाज या धनांचा तो पति आहे. दासाचें मी नांव देखील मारून टाकतों.

(१०.२३, २).

हे बहुस्तुता (इंद्रा) दास असो अगर आर्य असो ते अदेव असल्यास ते आम्हांस दुःसह (पराभवास शक्य) व्हावेत. आम्ही त्यांस संग्रामांत मारतों.

(१०.३८, ३).

वृत्रहा ज्याप्रमाणें वृत्र दासास मारतो त्याप्रमाणें मी मोठ्या रथाच्या नववास्त्वाला मारलें.

(१०.४९.६).

जेव्हां मनुष्याचें सवन मला बोलावितें तेव्हां मी शस्त्रांनीं कापण्यास योग्य अशा दासाला मारतों.

(१०.४९.७).

हे इंद्रा तूं देवांनां मदत करून दासांचें ओज नाहींसें केलेंस त्या वेळीं तूं प्रजेचें रक्षण केलेंस.

(१०.५४, १).

यदु आणि तुर्व यांनीं दोन सेवाक्षम असे दास गाईसह दिले.

(१०.६२, १०.).

तूं यज्ञविघातक नमुचीला मारलेंस. ऋषीकरतां दासाची माया नाहींशी केलीस.

(१०.७३, ७).

तुझ्या बलवान साहाय्यानें आम्हीं आर्य आणि दास यांस जिंकूं.

(१०.८३, १).

मी सर्वांना पहात व दास व आर्य यांना पृथक्करीत जातों.

(१०.८६, १९).

त्यानें अनेक शब्द करणाऱ्या सहा डोळ्यांच्या आणि तीन शिरांच्या दासाला नमविलें.

(१०.९९, ६).

जे आम्हांस मारणारे आमचा द्रोह करतात (अभिदासतः) त्यांमध्यें आपलें वज्र टाक. दास व आर्य शत्रूंचीं शस्त्रें नाहींशीं कर.

(१०.१०२, ३)

आपल्या बलानें वाढणारा असा तो ओजोयुक्त दासाच्या ठिकाणीं शत्रूप्रमाणें भय उत्पन्न करतो.

(१०.१२०, २)

सूर्यानें आकाशाच्या मध्यभागीं आपला रथ सोडला, जेव्हां आर्यानें इंद्रानें दासाशीं युद्ध केलें. ऋजिश्वासह इंद्रानें पिप्रूचे किल्ले नष्ट केले व असुराला जिंकलें.

(१०.१३८, ३)

वरील उताऱ्यांत दासविषयक विधानें येणेंप्रमाणें दिसतात.

(१) दास हा शब्द गुलाम अथवा सेवक या अर्थानें ५ वेळ आला आहे.

(२) दासांचीं पुरें इंद्रानें फोडलीं.

(३) दासांचा क्रोध देवांनीं नाहींसा करावा अशी प्रार्थना करण्याइतकें दासाचें महत्त्व होतें.

(४) दीर्घतमा, त्रैतनास व त्यास नदींत टाकणाऱ्यांस दास म्हणतो.

(५) कुयवाचा पराभव आणि दासपराभव यांचें एका ऋचेंत वर्णन.

(६) दास आपणांस अमर्त्य समजत होता.

(७) अहिवध, उदकमुक्तता यांची दासनाशाशीं सहोक्ति.

(८) दासांस वर्ण म्हटलें आहे.

(९) दासांस अर्शसान म्हणजे नाशक म्हटलें आहे.

(१०) दासांनां कृष्णयोनी म्हटलें आहे.

(११) काळ्या दासांनां मारणाऱ्या इंद्राला वृत्रघ्न आणि पुरभंजक आणि आर्यांनां पृथ्वी आणि उदकें देणारा म्हटलें आहे.

(१२) कुलितर पुत्र शंबर यास दास म्हटलें आहे.

(१३) वर्चि नामक दासाचे १ लक्ष ६ हजार अनुयायी होते. [illegible] अनुयायी इंद्रानें मारले.

(१४) ते [illegible] तीस हजार दास मारले.

(१५) दभीतीसाठीं इंद्रा[illegible] इंद्रानें मारलें.

(१६) नमुचीस दास म्हटलें आहे. त्या[illegible]

(१७) दासांनीं स्त्रियांचें सैन्य इंद्रापुढें केलें. तें सैन्य [illegible] काय करणार असें इंद्र म्हणाला आणि त्यांतील दोन स्त्रियांस त्यानें आपल्या अंतर्गृहांत ठेवलें.

(१८) इंद्रानें सूर्यासाठीं दासाचा नाश केला.

( १९ ) दासांचा नाश करणें पुरुकुत्सास मदत करणें आणि सात शारदी पुरें फोडणें यांची सहोक्ति.

( २० ) स्तोता ज्या संपत्तीनें दास आर्य होतो ती संपत्ति मागतो.

( २१ ) आर्य व दास या दोघांस इंद्रानें युद्धांत मारलें.

( २२ ) वर्ची व शंबर या दासांस मारणाऱ्या इंद्रास वर्षिता म्हटलें आहे. त्यांचा वध जलसंचयाजवळ केला असें म्हटलें आहे व काळ्यांस दूर हाकललें या क्रियेचा उल्लेख केला आहे.

( २३ ) दास, जलें झांकणारे व इतर द्वेष्टे यांचा एकत्र उल्लेख करून त्यांस आर्यांनीं मारलें असा उल्लेख केला आहे.

( २४ ) शुष्ण, सृबिंद, अनर्शनि, पिप्रु आणि अहीशु यांस दास म्हटलें आहे.

( २५ ) दासांविरुद्ध इंद्रानें कुत्स व आर्जुनेय यांस मदत केली.

( २६ ) दास व आर्य यांचें सहशत्रुत्व ( १ ) सुदासाशीं ( २ ) इतर वक्त्यांशीं आहे.

( २७ ) वृषशिप्रास दास म्हटलें आहे.

( २८ ) वृषशिप्र दासाची माया वर्णिली आहे.

( २९ ) दासपुरांचा नाश अग्नी करतात.

( ३० ) दासांपाशीं भरलेली वसु होती.

( ३१ ) दास व आर्य हे दोघेहि एकाचे अंकित असा उल्लेख.

( ३२ ) दासाविरुद्ध देवांनां इंद्र मदत करतो.

( ३३ ) दास व आर्य यांतील भेद इंद्र ओळखतो म्हणून विधान.

( ३४ ) अनेक शब्द करणारा, सहा डोळ्यांचा व तीन शिरांचा असें इंद्रशत्रु दासाचें वर्णन.

दास या शब्दाचा सेवक या अर्थानें ५ वेळ उपयोग झाला आहे. अधिक वेळ नाहीं.

दास आणि दस्यु यांचें एकमेकांशीं ऐक्य पुढील विधानावरून दिसतें ( १ ) ज्यांस दास म्हटलें आहे व दस्युहि म्हटलें आहे अशा व्यक्ति १ शंबर २ शुष्ण ३ वृत्र ४ पिप्रु. ( २ ) दोघांचींहि पुरें इंद्रानें अगर इतर देवांनीं फोडलीं. ( ३ ) दोघांनांहि मारण्याचा परिणाम उदकमोचन व प्रकाशोत्पत्ति असा दाखविला आहे. ( ४ ) दोहोंचाहि कांहीं प्रसंगीं विशिष्ट व्यक्ति व कांहीं प्रसंगीं समुदाय अशा अर्थानें उपयोग केला आहे. ( ५ ) दोहोंचेहि शत्रु मुख्यतः इंद्र व अमुख्यतः इतर देव, विशेषें करून अग्नि. ( ६ ) दोघेहि मायावी होते. ( ७ ) दभीतीचें रक्षण त्यांपासून केलें असें दोघांविषयीं उल्लेख आहेत.

**दासविषयक स्वतंत्र मजकूर.**—दीर्घतम्यानें आपल्या शत्रूंस दास म्हटलें आहे. सुदासाच्या व इतर कांहींच्या शत्रूंस केवळ दास म्हटलें नाहीं, तर आर्य आणि दास असे दोन्ही प्रकारचे शत्रू वर्णिले आहेत.

म्हणजे अर्थात तेथें दास शब्द शत्रुवाचक नाहीं. दासांनां कृष्णयोनि म्हटलें आहे.

दासाला वर्ण म्हटलें आहे; दस्यूंस तसें म्हणणारा उल्लेख नाहीं.

दासविषयक उल्लेखांत अहिनाशाचे उल्लेख आहेत तसे दस्युविषयक उल्लेखांत नाहींत. दासाच्या अव्रतत्वाविषयीं बोभाटा फारसा आढळत नाहीं. दासाचें विशिष्ट स्वरूप वर्णिलें आहे, तें तीन डोकीं व सहा डोळे असें आहे, व तो मोठ्यानें शब्द करणारा आहे.

दस्यु म्हणून ज्यांचा उल्लेख नाहीं पण दास म्हणून ज्यांचा उल्लेख आहे असे वर्चि, नमुचि, वृषशिप्र, सृबिंद, अनर्शनि, अहीशुव हे होत.

दासाचे शत्रु पुरुकुत्स, कुत्स, व आर्जुनेय म्हणून वर्णिले आहेत. दासांशीं संबद्ध क्रियापद "दास्" असेंच आहे व तें नाशार्थक आहे.

दासांचें सैन्य स्त्रिया म्हणून उल्लेखिलें आहे. कांहीं विशिष्ट संपत्तीच्या अस्तित्वामुळें दास आर्य होऊं शके असें वर्णन आहे.

या तुलनेपासून काय निर्णय निघतात तें पाहूं. हे निर्णय काढण्यापूर्वी कांहीं सहायक गोष्टींचा निर्देश केला पाहिजे.

**दासविषयक ऐतिहासिक सत्य.**—दासविषयक ऐतिहासिक सत्य काढावयाचें म्हणजे वेदपूर्वकालीन दास व दस्यु शब्दांची व त्या शब्दांनीं ज्ञेय होणाऱ्या कल्पनांची स्थिति अवगमिली पाहिजे. तशीच या शब्दांची उत्तरकालीन स्थिति लक्षांत घेतली पाहिजे. वैदिक साहित्य पूर्वकालीन आणि उत्तरकालीन स्थितीशीं तुलिलें पाहिजे.

उत्तरकालीन स्थिति थोडक्यांत वर्णितां येते. पूर्वकालीन स्थिति शोधण्यासाठीं तौलनिक पद्धतींत शिरावें लागतें.

दास हा शब्द उत्तरकालीन वाङ्मयांत शत्रुवाचक नाहीं. दस्यु हा शब्द तर लुप्तच झाला आहे.

अवेस्तामध्यें दास शब्दाशीं सदृश शब्द पहावयाचे म्हणजे अवेस्ताभाषेंत सचा ह होतो हें लक्षांत घेतलें पाहिजे.

तेथें दास शब्दाशीं सदृश शब्द येणेंप्रमाणें आहेतः—

( १ ) दह्, क्रियापद याचे अर्थ नाश करणें किंवा दंश करणें असे आहेत.

( २ ) दहक, म्हणजे दंश करणारा.

( ३ ) दहके म्हणजे ( वाईटाचा ) नाश करणारा.

( ४ ) दहाक—दंश करणारा साप. याशिवाय पार्शी लोकांच्या पौराणिक परंपरेंत अहि दहकाची गोष्ट आली आहे ती अशीः अहिदहक हा एक अनार्य शत्रु होता. त्यानें जमशीद राजाचें सिंहासन बळकावलें व आपल्या संपत्तीच्या मदानें तो आपणांस देव मानूं लागला. त्याचें स्वरूपवर्णन तीन तोंडांचा, तीन डोक्यांचा, सहा डोळ्यांचा, असत्यभाषी मायावी बलाढ्य राक्षस असें आहे. त्यास द्रुज म्हटलें आहे. शहानाम्यांत त्याचें वर्णन त्याच्या खांद्यांचें शैतानानें ( अहारिमन् ) चुंबन घेऊन तेथें दोन सर्प उत्पन्न केले असें आहे.

या गोष्टीवरून आपणास ज्या कांहीं गोष्टी स्पष्ट होतात त्या येणें प्रमाणेंः

(१) दासाचें अस्तित्व पर्शुभारतीय कालीं देखील असलें पाहिजे, त्याशिवाय दोन्ही राष्ट्रांच्या प्राचीन कथांत थोड्या फरकानें दासकल्पना नसती.

(२) दास हा सर्पस्वरूपी आहे ही कथा फार प्राचीन असावी. हिब्रूंच्या ग्रंथांत देखील शैतान सर्पस्वरूपी आहे त्या अर्थीहि ही कल्पना हिब्रूंच्या प्राचीन इतिहासकल्पना ज्या काळांत तयार झाल्या त्याच्याहि पूर्वीची असावी.

(३) हा दास तीन डोक्यांचा, सहा डोळ्यांचा मायावी आहे हें वर्णन वैदिक वाङ्मयांत तसेंच अवेस्त्यांत सामान्य आहे. वैदिक वाङ्मयांत हा उल्लेख दासांसंबंधीं एकदांच आला आहे. त्या अर्थी वैदिक ग्रंथ तयार होत गेले त्यावेळेस ही कल्पना मरत चाललेली असावी. पण या कल्पनेचें अस्तित्व इराणांत अधिक काळपर्यंत जिवंत राहिलें.

(४) दंश करणें आणि दाह करणें याच्या मुळांशीं एकच क्रियापद पर्शुभारतीय काळांत असावें.

दास शब्दाच्या इतिहासाविषयीं पूर्वगत पुराव्यावरून जे आपणांस निर्णय काढतां येतात ते येणें प्रमाणें:—आर्य आणि दास हे परस्परांचे विरोधी आहेत ही कल्पना वेदांत तशीच अवेस्त्यांतहि असल्यामुळें यांचा संग्राम झाल्याचें वर्णन ऋग्वेदांत आहे व हा संग्राम भारतभूमीवर झाला ही कल्पना ग्राह्य होत नाहीं, तर वाईट आचरण करणारे दुष्ट शत्रु ते दास, चांगलें आचरण करणारे ते आर्य ही कल्पना घेऊनच मंत्रवक्ते हिंदुस्थानांत आले. आर्य व दास यांच्या युद्धाचे जे उतारे आहेत त्यांपैकीं बरेचसे उतारे इंद्राच्या पराक्रमाच्या वर्णनपर असल्यामुळें त्या उताऱ्यांचें स्पष्टीकरण करण्यासाठीं भारतीय इतिहासाकडे धांव न घेतां लो० टिळकांनीं ज्याप्रमाणें मूलगृहकालाकडे धांव घेतली तिकडे घेतली पाहिजे.

आर्य आणि दास यांचा विरोध म्हणजे काळ्यांचें गोऱ्यांनीं केलेलें हनन असा अर्थ सर्वत्र लावतां येणार नाहीं हें लो० टिळकांनीं 'आर्टिक होम इन दि वेदाज' या ग्रंथांत दाखविलेंच आहे. आर्य आणि दस्यु यांचा विरोध यजनविषयक आहे. जे यजन करतात ते आर्य आणि जे यजन करीत नाहींत ते दस्यु, अशी कल्पना ऋग्वेदांत सर्वत्र आढळते. तथापि दास म्हणजे शत्रु असा अर्थ दासाविषयीं मात्र आढळतो. भारतीय मंत्रवक्त्यांत दास व दस्यु यांमध्यें कांहीं कल्पना सामान्य आहेत आणि कांहीं भिन्न आहेत यांचें कारण मंत्रवक्त्यांच्या पूर्वजांच्या काळांत पाहिलें पाहिजे. इराणी लोकांत दस्यु हा शब्द फार स्पष्ट रीतीनें आला नाहीं, किंवा आर्य आणि दस्यु यांचा विरोधहि दाखविला नाहीं. दस्यु किंवा दह्यु असे शब्द आले आहेत. पण ते भिन्नदेशीय अशा अर्थानें आले आहेत.

ज्या आर्यांचा दासांशीं विरोध झाला ते लोक देशांत येत होते हें वरील उताऱ्यांत आलेल्या उल्लेखांवरून मुळींच सिद्ध होत नाहीं. ते पंजाबात होते एवढेंच दिसतें. मंत्रवक्ते लोक देशांत होते त्या वेळेस त्यांस लोक विरोध करीत, तेव्हां त्यांनीं जर त्यांस दास म्हटलें तर तेथें तो शब्द शत्रुवाचकच होईल. परंतु जेव्हां कोणी आर्य आणि दास यांचा दोघांचाहि शत्रूंमध्यें उल्लेख करितो तेव्हां दास हा शब्द केवळ शत्रुवाचक आहे असें होत नाहीं. शत्रूंतील दोन वर्गांमध्यें कांहीं तरी फरक वक्ता करीत आहे असें स्पष्ट होतें. हा फरक आचारवाचक आहे कीं, वर्णवाचक आहे कीं, वंशवाचक आहे हें उपलब्ध पुराव्यावरून स्पष्ट होत नाहीं. असें शक्य आहे कीं, निराळ्या राष्ट्राचे लोक ज्याअर्थीं निराळ्या आचारांचे असतात त्याअर्थीं दास हे निराळ्या राष्ट्राचे व निराळ्या आचारांनीं युक्त असे असतील. दास काळे आहेत असा उल्लेख एकच आहे. पण तो उल्लेख इंद्राच्या शौर्यासंबंधानें असल्यामुळें म्हणजे काळोखाच्या नाशाविषयींच्या उल्लेखाचा असल्यामुळें काळी जात व पांढरी जात यांच्या लढाईचा इतिहास त्यांतून निघत नाहीं. जेथें दास आर्य होण्याची शक्यता आहे (६. २२, १०) तेथें वंशविषयक अर्थ दास शब्दांतून काढण्यापेक्षां यजनविषयक काढणें अधिक योग्य होईल.

थोडक्यात सांगावयाचें म्हटल्यास दास, आर्य, दस्युवर्ण इत्यादि विषयीं उल्लेख आर्येन् राष्ट्रांनीं नान आर्येन् लोकांपासून हिंदुस्थान जिंकलें अशा इतिहासाचे सूचक मुळींच नाहींत.

**"आर्यां" पासून प्रारंभ करून इतिहासाची अशक्यता असतां इतिहासार्थ अन्यत्र दृष्टि.**—आर्य शब्द किंवा आर्य नांवाशीं संबद्ध असलेले उल्लेख यांवरून कोणत्याहि राजकीय हालचालीवर प्रकाश पडत नाहीं. तेव्हां राजकीय हालचालींसाठीं अन्यत्र पाहिलें पाहिजे. देशांत ज्या हालचाली ऋग्वेदांत दिसतात त्यांचा आपण आढावा घेऊं.

(१) सुदास व त्याविरुद्ध दहा राजे.

(२) पुरूरवस आणि त्याविरुद्ध असलेले लोक.

(३) सरमा व पणी इत्यादिसंबंधानें कथा.

(४) देव व त्यांविरुद्ध असलेले लोक.

या चार कथानकांखेरीज दुसरीं कथानकें ऋग्वेदांत नाहींत म्हटलें तरी चालेल.

देव मग ते इंद्रादि आदित्य असोत किंवा दुसरे कोणी असोत त्यांच्या संबंधाच्या ज्या कथा आहेत त्या वैदिक काळांतील प्राचीन कथा होत. आज आपण जसें प्राचीन कथांस पौराणिक कथा समजतों आणि त्यांचें बीज आपण गूढ समजतों तसेंच वृत्रादि असुर आणि इंद्रादि देव यांचें बीज वेदकालीन लोक गूढ समजत असावेत. त्यासंबंधानें आलेल्या कथा भारतीय इतिहासाचा भाग नाहींत. त्या तौलनिक पुराणशास्त्राच्या साहाय्यानें कथावृद्धिच्या ज्ञातव्य इतिहासाचा भाग होत.

उरलेले दोन कथाभाग म्हटले म्हणजे सरमा पणी यांचा संबंध आणि पौरुरवसेतिहास हे होत. याविषयीं विवेचन आपणांस आढळतें. पुरूरवस् ही व्यक्ति ऋग्मंत्रकालांतून इतकी जुनी

मानली जात होती कीं, स्वर्गांतल्या अप्सरा व देव यांच्याशीं त्यांचा संबंध सूक्तकारानें वर्णिला आहे. त्या वेळेस तें प्राचीन इतिहासगूढ आख्यान म्हणून समजलें जात होतें. सरमा व पणी यांसंबंधानें तें आख्यान म्हणून आपणांस म्हणतां येईल. त्या आख्यानाचा विषय कोणत्या काळाचा असावा याविषयीं प्रश्न आहे. या दोन आख्यानांसंबंधानें विचार करणारा महत्त्वाचा संशोधक म्हणजे रा. राजाराम रामकृष्ण भागवत हा होय. या संशोधकाचें विविधज्ञानविस्तारांतील "वेदार्थयत्नकारांचें स्मारक" (पुस्तक २६–२८ वें) म्हणून पांडित्यपूर्ण लेख आपणांस उपलब्ध आहेत.

सरमासूक्त व पुरूरव्याचें सूक्त यांत दिसणारा कथाभाग यांचा व दिवोदाससुदासांच्या दाशराज्ञयुद्धाचा पौर्वापर्य संबंध निश्चित नाहीं.

दाशराज्ञयुद्धाचा मात्र इतिहासाशीं संबंध विशेष तऱ्हेनें यावयास पाहिजे. त्यापूर्वी सरमासूक्ताविषयीं झालेलें संशोधन लक्षांत घेऊं. त्या सूक्तांत ऐतिहासिक सत्य काय असावें याविषयीं राजारामशास्त्र्यांचें मत देतों. त्यांच्या मताप्रमाणें देव नांवाचें एक राष्ट्र होतें, त्यांच्या पणीशीं लढाया होत होत्या वगैरे. राजारामशास्त्री यांची कल्पना जितकी कांटेतोल पद्धतीनें पुढें तपासली जावयास पाहिजे तितकी गेली नाहीं. त्यांच्या मतानें सरमासूक्तांत जो इतिहास आला आहे तो मात्र लोकांची हिंदुस्थानांत वसाहत होण्यापूर्वी जी परिस्थिति होती त्या परिस्थितीचा द्योतक असून तो कथारूपानें समाजांत राहिला असावा. राजारामशास्त्री यांच्या कल्पनेविषयीं आम्ही आपलें मत सध्यां कांहींच देत नाहीं. त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ देऊन मोकळे होतों.*

पणींच्या राष्ट्रांविषयीं आणि वैदिकांच्या इतर राष्ट्रांशीं आलेल्या संबंधांविषयीं विधानें आणि इंद्राचें त्या बाबतींत कार्य याविषयीं भागवती विधानें आम्ही मांडलेल्या इतिहासाशीं संगति जुळविण्याचा प्रयत्न न करितां येथें मांडतों.

स मा सू क्त. (१०. १०८, ११) देव व त्यांचे शत्रू यांमधील भांडणाचें कारण.

देवांचा स्त्रीरक्षक सरमा व त्यांचे शत्रू पणी यांमधील झालेलें हें भाषण आहे. आठव्या ऋचेंतील शेवटच्या ओळींत पणींचा उल्लेख करते वेळीं तृतीय पुरुषाचा उपयोग केला आहे; म्हणून या सूक्तकर्त्याचें नांव माहीत नाहीं.

प णीं चें रा ष्ट्र–इन्द्रानें पणींच्या राज्यांत सरमेला पाठविली; परंतु तथें जाण्यासाठीं तिला रसा या नांवाची एक मोठी नदी ओलांडावी लागली. पणी हे व्यापारी लोक असून, त्यांच्या बाजाराच्या ठिकाणीं मोठमोठ्या देवघेवी होत असत. देवांच्या गाई पणींनीं चोरल्यामुळें देवांनां त्यांच्यावर स्वाऱ्या कराव्या लागल्या. स्वारींत ग्रावण, अयास्य व अंगीरस जातींपैकीं नवग्व हे लोक होते. हे सर्व ऋषी होते. नवग्व व सरमा यांना दहा दिवसपर्यंत (महिनेपर्यंत) डोंगराळ प्रदेशांतून जावें लागलें (५. ४५, ७). हे सर्व विप्र असून सोम (बृहस्पति) हा त्यांचा सेनापति होता. या सूक्तावरून पणींच्या राष्ट्रीयत्वाची कांहींच कल्पना येत नाहीं, असें भागवत कबूल करतात पण विस्तारांत पणींस तेच भागवत फिनिशिअन म्हणतात !! बृबु हें नांव आर्यन् नाहीं परंतु एका वणिकाचें वंकु हें नांव आर्यन् आहे. एका ऋचेंत सूक्तकर्ता आपल्याला पणि असें म्हणतो (५. ६१, ८).

"इं द्रा चें ऐ ति हा सि क अ स्ति त्व" प्राचीन काळीं इन्द्र व राजन् (राजा) हे शब्द एकाच अर्थाचे होते. म्हणून महेन्द्र याचा अर्थ मोठा राजा असा होता. यावरून अनेक इन्द्र असले पाहिजेत असें दिसतें. इद्–इन्द् राज्य करणें हा धात्वर्थ आहे. सुमन्तु नांवाच्या इन्द्रानें चुमुरि, धुनि, पिप्रु, शंबर व शुष्ण यांना ठार मारिलें (६. १८, ८). द्वारपाल रंभिन् यास लांच देऊन, चुमुरि व धुनि यांना मारण्यांत आलें (२. १५, ९). ऋजिश्वन् याच्या मदतीनें, पिप्रु या नांवाच्या असुराचा पाडाव झाला (५. २९, ११) व शूर अयास्यानें असुरांचा बराच नाश केला (१०. १३८, ३४). उशिज जातींतील ऋजिश्वा यानें वृषभाच्या मदतीनें पिप्रूच्या छावणीची नासाडी केली (१०. ९९, ११); डोंगरांत लपून बसलेल्या शंबरास इंद्रानें पकडलें (२. १२, ११); व त्याचीं नव्याण्णव शहरें धुळीस मिळविलीं (२. १९, ६). या स्वारींत विष्णु हि प्रमुख होता (७. ९९, ५). मनुष् जातीच्या कल्याणासाठीं, पृथ्वीवरील शतर्चस् नांवाच्या देशांत विष्णु तीन वेळां गेला (७. १००, ४). आपण शिपिविष्ट आहों असें एकदां त्यानें सांगितलें; तो व इन्द्र यांनीं वृषशिप्राच्या (दासाच्या) सर्व युक्ती निष्फळ करून टाकिल्या (७. ९९, ४). चुमुरि व धुनि यांप्रमाणें शुष्ण हाहि एक दस्यु होता (८. ६, १४); दास व दस्यु निरनिराळे होते. दास हें एका जातीचें नांव असून, इन्द्राचा शत्रु नमुचि हा याच जातीपैकीं होता. कुत्साच्या हितासाठीं इन्द्रानें यास मारिलें (४. १६, १२). संस्कृतांतील दस्यूलाच अवेस्तामध्यें दह्यु म्हणतात. याचा अर्थ जिल्हा असा होतो. दह्युपैति, दह्युपत याचा अर्थ जिल्ह्याचा अधिकारी असा होतो. पुराणांतील लुटारु हा शब्द दह्युपैतिस, दस्युपतिस यांतील लुटालुट किंवा नासधूस याला जो शब्द आहे त्याच्याशीं जोडतां येईल. अवेस्तिक दह्यु याला संस्कृतांत देश म्हणतात. मराठींतील देसाई (देश–स्वामी) व देशमूख (देश-मुख्य) यांनां अवेस्तामध्यें दह्युपैति, दह्युपत असें म्हणतात; जिल्ह्याच्या विभागांनां झन्तु व जिल्हापतीस झन्तुपैति असें म्हणतात. संस्कृतांतील जनपद यासच पुढें देश असें म्हणूं लागले. अवेस्तिक वीस् (खेडेगांव) यास संस्कृतांत विश असें म्हणतात; व वीस्पैति (खेड्याचा मुख्य) याला वेदांत विश्पति असें नांव आहे (१. ३१, ११). विश् याचा अर्थ खेडेगांवांतील शेतकरी लोक असाहि होतो. जुन्या संस्कृतांत विश् याचा अर्थ 'अन्न

*Key to interprete the Veda by R. R. Bhagwat Bombay 1907.

देणें ' असा असून परिविश याचा अर्थ अन्न पुरविणारा असा होता. अवेस्तांतील न्मान ( घर ) याला संस्कृतांत, कुल व गृह असें म्हणतात; न्मानपैति याला कुलपति व गृहपति अशीं नांवें आहेत; हल्लीं कुल याचा अर्थ कुटुंब असा होतो. वीस्, विश् ( खेडेगांव, खेडवळ ) व वीसूपैति, विश्पति हे शब्द बनविल्यावर व व होम, सोम म्हणजे वीर या शब्दाचा ज्याचा रस मादक आहे अशा एका लहान झाडास जो शब्द होता त्याच्याशीं गोंधळ उडून गेल्यावर, संस्कृतापासून आर्यांची अवेस्तिक शाखा निराळी झाली. लॅटिन भाषा याच्या अगोदर वेगळी झाली व ग्रीक भाषा तर याहिपेक्षां अगोदर निराळी झाली. लॅटिन ' विकु ' व ग्रीक 'फोइको' यांचा अर्थ पूर्वी वीस्, विश् असाच होता. अनेक वीसांचा ( खेडेगांव ) एक झंतु ( जिल्ह्याचा भाग ) व पुष्कळ झंतूंचा दह्यु बनतो. राजकीय प्रगतीसाठीं देशविस्ताराची फार आवश्यकता वाटल्यामुळें, दह्यु, दस्यु हे देव व त्यांचे इन्द्र यांजबरोबर लढले; परंतु दस्यु व असुर हे फार प्रबल असल्यामुळें, देवांचें कांहींएक चाललें नाहीं; म्हणून आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या लोकांचीहि देवांस मदत घ्यावी लागली. अवेस्तिक आर्यांची राजकीय प्रगति झाल्यावर दस्यूसंबंधीं ऋचा रचिल्या असल्या पाहिजेत हें यावरून सिद्ध होतें. " सर्व बाजूंनीं मला पर्शूंचा त्रास होत आहे" ( १. १५. ८ ). "याद्वांपासून, तिरिंदरांत मीं शंभर जनावरें व पर्शु-प्रांतांत एक हजार जनावरें घेतलीं " ( ८. ६, ४६ ); पृथु व पर्शु पुढें चालले " ( ७. ८३, १ ). दुसऱ्या एका इन्द्रानें "योनीचा मुलगा गिरी किंवा योन ( पृथु ) याचा नाश केला " ( ८. ४५, ३० ). या सूक्तांतील पर्शियन व पार्थियन यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. वैदिक सूक्तांचे कर्ते दास व आर्य यांनां इन्द्राचे शत्रु समजत असत ( ६. २२, १० ). अवेस्तिक 'अइर्य' व वैदिक 'आर्य, अर्य' हे शब्द 'अयरा' देणें यापासून निघालेले आहेत. या शब्दांचा अर्थ 'ज्याला दान मिळालें आहे असा मनुष्य' असा होता. अरि किंवा अराति ( ८. ११, ३ ) म्हणजे दान करणारा याचें रूपांतर अ रि-अ राति, दान न करणारा असें होऊन, नंतर त्याचा अर्थ शत्रु ( दान करण्याकडे ज्याची प्रवृत्ति नाहीं असा ) असा झाला. इन्द्रानें लोखंडी वज्र ( १. ८०, ८ ) आपल्या उजव्या हातांत घेतलें; "ज्यानें शंभर यज्ञ केले होते अशा एका इंद्राची आई ( शवसी ) अहीशुवाबद्दलची हकीगत सांगत आहे" ( ८. ७७, २ ). या इन्द्राचें नांव ऋबीषम असें होतें; यानें हिंवाळ्यांत अर्बुदास जेरीस आणिलें ( ८. ३२, २६ ). जजुष याचा अर्थ 'सामर्थ्य' असा आहे; म्हणून 'जज्ञान' याचा अर्थ 'सामर्थ्यवान् होऊन' असा होईल. अभि क्रतु याचा अर्थ अभिमुखं युध्यमान ( -कडे तोंड करून लढणारा ) असा करतात ( ३. ३४, १० ). क्रतु ( लढणारा ) याचा अर्थ सशक्त असा होतो ( ५. ३५, १ ). हा शब्द व ग्रीक 'क्रातो' ( शक्ति ) हे एकच आहेत. हे शब्द 'कृ' ठार मारणें या शब्दापासून निघालेले आहेत. 'कृ' ठार मारणें हा शब्द गृह्यसूत्रांत आलेला आहे; व विशेषतः मधुपर्कविधींत आलेला आहे. शर म्हणजे बाण हा शब्द 'शृ' लढणें किंवा नाश करणें यापासून निघाला आहे. क्र्यादि धातु, 'शृ' ऱ्हस्व केला म्हणजे ही गोष्ट कळून येईल. एका इन्द्राला हिन्वाचा पुत्र असें म्हटलें आहे ( ८. ४०, ९ ). "जेव्हां धनिष्ठा आईनें शूर इन्द्राला आश्रय दिला, तेव्हां मरुतांनीं त्याला भरभराटीस आणिलें ( १०. ७३, १ ). ऋग्वेदांतील प्रथम मंडलांतील, एकोणतिसाव्या सूक्तांत शिप्रिन् नांवाच्या एका इन्द्राचा उल्लेख केला आहे. तो श्रीमंत असल्यामुळें त्यानें आपल्या नोकरीस कांहीं प्रसिद्ध लुटारू ठेवून, एका गर्दभावर रात्रीं हल्ला केला. त्याच्या कांहीं लोकांस लांच देऊन वश करून घेऊन बाकींच्या लोकांची इन्द्रानें कत्तल केली. गर्दभ व त्याची एक बायको हीं दोघें त्या कत्तलींत सांपडलीं; परंतु त्याची दुसरी एक बायको पळून गेली. अरे इन्द्रा, तुझ्या आईला कोणीं वैधव्य आणिलें? गुप्तपणें हिंडत असतांना, तुला मारण्याचा कोणीं प्रयत्न केला? पाय धरून जेव्हां तूं आपल्या बापास ठार मारिलेंस, तेव्हां कोणत्या देवानें तुझें सांत्वन केलें " ( ४. १८, १२ )? "मजपाशीं अन्न नसल्यामुळं, मीं कुत्र्याचीं आंतडीं शिजविलीं; देवांपैकीं कोणीहि माझें सांत्वन केलें नाहीं. माझ्या बायकोनें माझी काळजी घेतली नाहीं; नंतर श्येनानें माझ्यासाठीं मधु आणिला ( ४. १८, १३ ).

अ ने क इं द्र.—पाकस्थामा या नांवाचा दुसरा एक इन्द्र होता; त्याच्या पित्याचें कुरुयाण असें होतें ( ८. ३, २१ ). हा इन्द्र व त्याचे विश्वामु मरुत् हे फार उदार होते. " तूं सोमरस प्याला आहेस; तेव्हां हे इन्द्रा, तूं आतां आपल्या घराकडे जा; तुझ्या घरांत तुझी आवडती भार्या असून मधुर गीत चाललें आहे " ( ३. ५३, ६ ). ' इन्द्र ' याचा अर्थ प्राचीन काळीं " देवांचा राजा " असा होता. देवांच्या प्रत्येक जातीस एक एक इन्द्र होता. हे इन्द्र आपापसांत लढत असत. पणि, असुर, रक्षस् ( १. १३३, ५ ). यातु किंवा यातुधान. ( ७. १०४, २१ ). यांशिवाय सनक ( १. ३३, ४ ); शिम्यु ( १. १००, १८ ); ककिट ( ३. ५३, १४ ); बिन नाकाचे दस्यु ( ५. २९, १० ); चपट्या नाकाचे मोंगोलियन, दास, आर्य, नहुष ( ६. २२, १० ); शरद् ( ६. २०, १० ); वृचीवत् ( ६. २१, ६ ); अनु, द्रुह्यु, तूर्वसु, ( ७, १८, १४-१५ ); किमीदिन ( ७, १०४, २३ ); वन्दन ( ७. २१, ५ ); महिष ( ८. १२. ८ ); बेकनाट, व कामकति वगैरे लोक इन्द्रांचे द्वेष्टे होते. अव्रत्रन् म्हणजे लढले; वृत्र हा येथें धातु समजला आहे ( ४. २४, ४ ). कदाचित असेंहि असेल कीं, इन्द्र हे देवांचे शत्रु असून, मरुतांच्या मदतीनें त्यांनीं पूर्वेकडे देवांवर आपलें वर्चस्व ठेविलें असेल. परंतु ऐतिहासिक कालापूर्वीच्या ग्रीस देशांत, इंद्रांचें कांहीं एक चाललें नसेल. त्यावेळीं तेथें थिओई लोकांनीं अंद्रे लोकांवर अशा प्रकारें राज्य केलें कीं अन्द्रे लोकांचा फार ऱ्हास झाला; व अन्द्रे म्हणजे थिओ लोकांपेक्षां कमी दर्जाचे सामान्य लोक असा समज झाला. इकडे, पूर्वेकडे 'इन्द्र' हा शब्द ऱ्हास न पावतां त्याचा संबंध उच्च दर्जा किंवा वर्ग याच्याशीं कायम आहे. वैदिक वाङ्मयांत मरुत् हे इंद्राचे फार विश्वसनीय मित्र असें म्हटलें आहे. परंतु ग्रीसच्या पौराणिक कथेंत मरुतांच्या जोडीच्या दुसऱ्या व्यक्ती नाहींत.

**"देव", पूर्वदेव, मूरदेव, शिश्नदेव, पंचजन, शूर-देव, यातुधान, विश्वदेव, समुद्र, कोटिः**—दिव्, देव्, देव ( यव-याव, यु, यो, यौ, या-य ) हीं रूपें वैदिक असून दय्व् हें वैदिक कालापूर्वीचें आहे. थिओ, झेउ हीं ग्रीक, देउ हें लॅटिन व दएव हें अवेस्तिक रूप आहे. सरमासूक्तांत दैव्य किंवा दैव असा शब्द आलेला आहे; त्याचा अर्थ साधारणपणें देव किंवा देवांसंबंधीं असा आहे. दय्व् याचा मूळचा अर्थ देणगीचा मालक म्हणजे धनी व दास याचा अर्थ देणारा म्हणजे गुलाम असा असूं शकेल काय ? "असुरांचा आम्हां देवांकडून पराभव होवो" ( १०. १३, ४ ). या वाक्यावरून असें वाटतें कीं, वरील वाक्य उच्चारणारा देवांपैकींच होता. यावरून असुर या शब्दाप्रमाणें, देव हा शब्द मनुष्यजातीच्या विभागाचा दर्शक आहे. अग्नीच्या मदतीमुळें दस्यूंचें देवांपुढें कांहींएक चाललें नाहीं ( ३. २९, ९ ). दस्यु हे मनुष्य प्राणी होते असें त्यांचें वर्णन आहे; देवांनीं त्यांचा पराभव केला, यावरून देवाहि मनुष्य असावे असें वाटतें. हे देव अग्निपूजक होते. दस्यूंशीं लढण्यासाठीं मनुमनु जातीचा पुरूरवस् याची देवांनीं मदत मागितली ( १०. ९५,८). ज्या अर्थी देवांनीं पुरूरवस् याची मदत घेतली त्याअर्थी तेहि मनुष्यच असले पाहिजेत. पंचजनाः हें नांव मनुष्यजातीला दिलेलें आहे. व्रात ( टोळी ), संद्द ( रूप, रंग ), मानुष् ( मनुष्य ) वगैरे शब्द वेदामध्यें आढळतात. मनुष्यप्राण्याच्या देशाला दिव् असें म्हणत; व पंचजनाः यावद्दल पंचदेवाः असेंहि म्हणत असत ( १०. ५५, ३ ). पंचजनाः याचा अर्थ एके काळीं 'सर्व मनुष्यजात' असा समजला जाई. मनुष्यजातीचे एकंदर पांच विभाग होते. देवांच्या तीन जाती संहितेमध्यें येतात. खरे देव या तीन जातींबरोबर एकसारखे लढत असत. अशा एकंदर देवांच्या चार जाती झाल्या; शूरदेव या नांवाची एक पांचवी जात होती; त्यांचा एक स्वतंत्र इन्द्र होता ( ८. ७०, १५ ). हे खऱ्या देवांशीं मिसळून गेले. देवांच्या पहिल्या जातीस मूरदेव असें म्हणत. "हे इन्द्रा, यातुधान लोकांचे गळे कापून तूं त्यांना मारून टाक; मूर-देव मरून जावोत" ( ७. १०४, २४ ). मूरदेव व यातुधान हे मनुष्यप्राणी होते असें या वर्णनावरून समजतें. यातुधान हे मनुष्याचें व घोड्याचें मांस खात असत ( १०. ८७, १६ ). मूर-देवांना जाळून टाकण्यास अग्नीस सांगितलेलें आहे ( १०. ८७, १४ ). उर्वशीनें पुरूरवस् याला मूर असें म्हटलें आहे ( १०. ९५, १३ ). मूरदेवांपैकींच मनु-मनु जात असावी असें समजून या जातीचा आपल्याशीं कांहीं संबंध नाहीं असें देवांस वाटलें असेल. अथवा या वेळीं मूर-देव हा शब्द बराच प्रचारांत आला असावा. देवांच्या दुसऱ्या जातीस शिश्नदेव असें म्हणत. "शतद्दुर शहर लुटून त्यानें शिश्नदेवांचा पराभव केला" ( १०. ९९, ३ ). तिसऱ्या जातीस पूर्व-देव असें नांव होतें. पूर्व-देवाः म्हणजे असुराः ( ७. २१, ७ ) असें प्रसिद्ध टीकाकाराचेंहि मत आहे. अमरकोशामध्येंहि पूर्वदेव व असुर हे शब्द एकाच अर्थाचे आहेत असें म्हटलें आहे. पूर्वदेव म्हणजे श्रेष्ठ देव किंवा पूर्वेकडील देव. पहिला अर्थ घेतला तर, असुरांपासून देव वेगळे निघाले असें म्हणावें लागतें. दुसरा अर्थ घेतला तर असुरांच्या देशाच्या पश्चिमेकडे देवांचा देश असावा असें मानणें भाग आहे. ज्या ऋचेंत पश्चिमेकडील शत्रू जाळून टाकण्याबद्दल ( ३. १८, १ ) अग्नीची प्रार्थना केली आहे, ती ऋचा एका पूर्वेकडील देवानें लिहिली आहे. पूर्वदेव व प्रत्यक् देव हे एकच भाषा बोलत होते किंवा काय हा एक प्रश्न उपस्थित होतो. एका ब्राह्मण ग्रंथावरून पतंजलीचें असें मत झालें आहे कीं असुरांची भाषा देवांच्या भाषेपासून निघालेली असावी. अवेस्तिक लोकांत प्रसिद्ध असलेले वेरेनियन् देव हें नांव कदाचित् पाश्चात्त्य देवांचें असेल, किंवा त्यांचा पोटभाग असेल, अगर वेरेनियन् देव हे देवांच्या इतर तीन जातींपैकीं असतील. वरेण्य होतृ ( १. २६, २ ) हे वरेण्य देवांचे होतृ असावेत. दुसऱ्या होतृचें नांव पूर्व्य म्हणजे पूर्वेकडील किंवा जुना ( १. २६, ५ ) असें होतें. वैदिक वाङ्मयांत देवांच्या दोन होतृंना 'आप्री' सूक्तांत जागा दिलेली आहे. विश्वदेव म्हणजे सर्व देव अगर फक्त पश्चिमेकडील देव ? वैदिक वाङ्मयांत वसु, रुद्र व आदित्य असे देवांचे तीन विभाग केलेले आहेत ( ७. १०, ४ ); व प्रत्येक भागांत अनुक्रमें, ८, १० व १२ अशा पोटजाती ( कोटी ) आहेत. मराठी 'कुळी' हा शब्द व संस्कृतांतील 'कोटी' हा शब्द हे दोन्ही एकच आहेत. बृहस्पति हा बत्तीसाव्या जातींतला असून, इन्द्र व त्याचे मरुत् हे तेतीसाव्या जातींतील होते ( ८. ९६, ७ ). या भागांत व पोटभागांत फक्त अस्सल देवांचा समावेश होई. पूर्वदेव किंवा असुर यांचा समावेश यांत होत नसे. देवांच्या देशास दिव् असें नांव होतें. "हे इन्द्र, कोणत्या तरी मिषानें देवांच्या देशांत जाऊं इच्छिणाऱ्या दस्यूंचा तूं पाडाव केलास" ( ८. १४, १४ ). दस्यू हे मानव असून दिव् प्रांतांत जाण्याची त्यांची इच्छा होती, यावरून तो देश देव व त्यांचे इन्द्र यांचा होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिव्चे तीन प्रांत केलेले होते; दिव् जवळच 'भूमि' देश होता त्याचेहि तीन भाग होते. पृथ्वीच्या तीन विभागांपैकीं, एकाचें प्राचीन नांव भूमि असें होतें. हे पृथ्वीचे तीन विभाग व तीन दिव् मिळून सहा प्रदिश होतात. या सहा प्रदिशांच्या सहा उर्वी होतात. उर्वी हें नांव ऋग्वेद संहितेंतहि आढळतें ( ६. ४७, ३ ). उर्वीबद्दल कधीं कधीं विष्टि हेंहि नांव आढळतें ( २. १३, १० ). अथर्व संहितेंत दैवी म्हणजे देवांच्या असा अर्थ दिसतो. परंतु अलिकडच्या वाङ्मयांत पृथ्वी, भूमि व उर्वी हे शब्द एकाच अर्थाचे समजले जाऊन त्यांचा अर्थ पृथ्वी असा आहे. दिव्च्या तीन विभागांना दीर्घप्रसद्मन्, रोचन, व समुद्र अशीं नांवें आहेत ( ८. १०, १ ). दुसऱ्या एका ठिकाणीं दीर्घप्रसद्मन् यास प्रस्रवण, व रोचन यास स्वर्णर ( ८. ६५, २ ) अशीं नांवें आहेत. समुद्र हा देश सुंदर स्त्रियांविषयीं प्रसिद्ध होता ( ९. ७८, ३ ). एक अंगिरस (अध्रिगु) स्वर्णरास कंपायमान करित असतां, इन्द्रानें त्यास ठार मारिलें ( ८. १२, २ ) व समुद्राचेंहि संरक्षण केलें. स्वर्णर, स्याम, स्यावक

आणि क्रूप (८. ३, १२) या सर्वांचें इन्द्रानें रक्षण केलें. रुश-माचा ऋणंचय या नांवाच्या राजाचाहि उल्लेख केला आहे (५. ३०, १४). कार्पण व क्रूप हे एकच असावेत. अरब व तुर्क लोकांपासून आशिया मायनरास रौम हें नांव मिळालें. रोम हें शहर वरील ठिकाणांपासून फारच दूर आहे. म्हणून आठव्या मंडलांतील चौथ्या सूक्तांत असलेलें रुम हें अगदीं निराळें आहे. या रुमदेशांतील कांहीं लोक आल्वा लोंगा येथें जाऊन राहिले असावे; व त्यांच्या वंशजांनीं तैवर जवळ वसाहत केली असावी व या नवीन वसाहतीस रुम-रोम हें नांव मिळालें असेल. वेन आर्तीतील नाक (९. ८५, १०-११) हें दिव् मधील एका पर्वताचें नांव असावें (८. १०३, २). प्रस्रवण, रोचन, समुद्र व नाक हीं नांवें संहितेंत कोठें कोठें आढळतात; व तीं दिवूचे विभाग दर्शवितात, 'त्रिदश' म्हणजे देव व 'त्रिदिव' म्हणजे त्यांचा देश हीं नांवें या अर्थानें आढळतात. त्रिदश म्हणजे तीस हा ठोकळ आंकडा एकतीस देवांचा वाचक आहे. एक प्रांत आठ वसूंनीं, दुसरा अकरा रुद्रांनीं व बाकीचा बारा आदित्यांनीं व्यापून टाकिला असावा. कदाचित् प्रत्येक प्रांतांत अकरा जाती रहात असाव्या. कारण 'त्रिभिः एकादशैः' (८. ३५, ३) असें म्हटलें आहे.

रसा या नदीस पायउतार होत नसे; व म्हणूनच पणींना आश्चर्य वाटत असे. रसा हें नांव नद्यांच्या सूक्तांत आलें आहे (१०. ७५, ६). रसेच्या एका बाजूला विष्टप (९. ४१, ६) किंवा विष्ट्य् (८. ३४, १३). या नांवाचा देश होता. त्रिविष्टप व त्रिदिव हीं नांवें एकाच अर्थाचीं असून, विष्टप हें दिव् याचें दुसरें नांव असावें. अर्बुदाचा एक (८. ३२, ३) विष्टप व ब्रध्नाचा दुसरा विष्टप असल्यामुळें, विष्टप व दिव् यांचा गोंधळ उडून गेला. हे देश जवळ जवळ असावेत. रसा, अंशुमती व सरस्वति या निरनिराळ्या नद्या असाव्या. देव व पणी यांच्या देशांच्या मध्यें रसा ही नदी आहे. अंशुमतीच्या एका बाजूला (८. ९६, १३-१६) काळे लोक रहात असत. व सरस्वतीच्या दोन्ही बाजूला पुरु लोक रहात असत (७. ९६, २). एलाम किंवा इराणचें तद्देशीय नांव अंशन् असें होतें. जिच्या कांठीं सुस हें राजधानीचें शहर होतें त्याच नदीचें नांव अंशुमती होतें, किंवा एलामची पूर्व सीमा असलेली तैग्रिस नदी हिचें नांव अंशुमती होतें, हें अनिश्चित आहे. रसा व सिंधु या निरनिराळ्या नद्या होत्या (४. ४३, ६).

या सूक्तावरून असें सिद्ध होतें कीं, पणि हे देवांशीं लढत असत. फोनी किंवा पुनी या शब्दापासून पणि हा शब्द निघाला असावा. फोनी किंवा पुनी हे खलाशी व व्यापारी असून दूरच्या प्रदेशांतहि ते व्यापार करीत असत. संस्कृतांत पण् या धातूचा अर्थ व्यापार करणें असा आहे. त्यांच्याच एका नाण्याचें नांव 'पण' असें होतें. वणिग्-वणिक् हें पणिस्-पणिशूचें रूपांतर नसून 'पणि' चें रूपांतर आहे. बंकु (५. ४५, ६) नांवाच्या वणिकाला पुरीष प्रांत (४. २१, ३) मिळाला. सर्व पणींशीं इन्द्राचें वैमनस्य होतें असें नाहीं. कांहीं पणि त्याच्यासाठीं सोम तयार करित असत, व कांहीं त्याला खंडणी देत असत; अशा लोकांशीं तो सलोख्यानें वागे; परंतु बाकीच्यांशीं त्याचें फार वांकडे होतें (४.२५, ७). बृबु या नांवाच्या एका पणीची औदार्याबद्दल स्तुती केलेली आहे (६. ४५, ३१-३३). दुसरा एक पणि ऋषि होता (५. ६१, ८) आपापल्या गर्भाशयांत समान ओझें (३. १, ६) वहाणाऱ्या अशा सात सुंदर स्त्रियांशीं साम्य असणाऱ्या अशा सात वाणी आहेत. वाणी हा शब्द, प्रार्थना, सूक्त (१. ७,१) या अर्थानेंहि वापरला आहे. उत्तरकालीन वैदिक वाङ्मयांत पणि हा शब्द कृपण यां अर्थानें आलेला आहे (६. ५३, ३).

सोम, ग्रावाण व ऋषी हे विप्र होते. ग्रावण हें योद्ध्यांचें नांव होतें. त्यांच्या टोळ्या फोडणें हें दगडासारखें कठीण असेल, किंवा शत्रूंवर दगडांचा मारा करण्यासाठीं हे लोक आपल्याबरोबर यंत्रें नेत असतील, म्हणून ग्रावण हें नांव त्यांस पडलें असावें. हे काळ्या जातीचे लोक असावे असें ग्रावणसूक्तांत (१०. ९४) सांगितलें आहे. यंव, दिव प्रांतांतील आखर लोकांपैकीं हे लोक असून हे इन्द्राचे संरक्षक होते व यांच्या पराक्रमामुळें इन्द्राची भरभराट झाली. "ग्रावण व अदिति यांना इंद्रानें (५.३१, ५) दस्यूंशीं सामना करण्यासाठीं पाठविलें होतें; हे अश्व रथ वगैरे कांहीं एक न घेतां पायींच गेले."

अंगिरस हे दिवस्पुत्राः (४. २, १५) म्हणजे दिव् चीं मुलें किंवा देवपुत्रा ऋषयः म्हणजे ऋषिदेवांचीं मुलें म्हणून प्रसिद्ध आहेत (१०. ६२, ४). मानवांनीं 'नाभा' च्या मध्यस्थीनें अंगिरसांशीं मैत्री करण्याचा प्रयत्न केला. विरूप हीं अंगिरसांचा एक पोटभाग होता व या पोटभागांतील नवग्व व दशग्व हे फार प्रसिद्ध होते."

**भागवतशोधित इतिहासाचें पौर्वापर्यः**-देवविषयक असुरविषयक कथा ऐतिहासिक असल्यास त्या गोष्टी दाशराज्ञ युद्धापूर्वी घडल्या असाव्यात.

इंद्राचीं युद्धें आम्हीं सध्यां इतिहासाचा विषय धरीत नाहीं. ज्या ज्या युद्धांत दुसरे कोणी देव गुंतले असतील आणि माणसें अस्पष्ट असतील तीहि आम्हीं इतिहासविषय धरीत नाहीं.

दाशराज्ञ युद्ध असें आहे कीं त्यांतील मानवी क्रिया अस्पष्ट नाहींत. जे मानव लढत त्यांना लढतांना जरी देवांनीं मदत केल्याचा उल्लेख असेल तरी तेवढ्या उल्लेखानें त्या क्रियेचें ऐतिहासिकत्व नष्ट होतें असें नाहीं. इंद्राच्या लढाया व देवांनीं ज्यांत भाग घेतला आहे अशा सरमासूक्तांत दृष्ट होणाऱ्या लढाया यांचेंहि आम्ही ऐतिहासिकत्व अस्पष्ट समजतों. दाशराज्ञ युद्ध मात्र पूर्ण ऐतिहासिक विषय धरतों.

दाशराज्ञ युद्ध हा मंत्रकालांतील जर अत्यंत अर्वाचीन विषय असेल, तर दाशराज्ञ युद्धापूर्वी बरींच वर्षें मात्र संस्कृतीच्या लोकांचें आगमन झालें असें होईल. पण वस्तुतः तशी गोष्ट

नाहीं. मंत्रवाङ्मयाच्या अगोदर दाशराज्ञ युद्ध झालें असलें पाहिजे असें आम्ही समजतों.

मंत्रदृष्ट कालाचे आम्ही भाग येथें प्रमाणें पाडतों.

मंत्रपूर्व युग — **पहिला विभाग** ज्या कालांत मंत्रांत उल्लेखिलेल्या इंद्रवृत्रादि पौराणिक कथा तयार झाल्या असतील तो काल. **दुसरा विभाग.** ज्याकालांत अर्ध्यामुर्ध्या ऐतिहासिक व अर्ध्यामुर्ध्या पौराणिक उदाहरणार्थ पुरुरवस् उर्वशी यांच्या कथा उत्पन्न झाल्या असतील असा काळ. **तिसरा विभाग** दाशराज्ञ युद्धाचा काल.

या तीन युगविभागांपैकीं पहिला विभाग मूलगृहकालीन होता असें शक्य आहे. लोकमान्यांचा 'उत्तर ध्रुव प्रदेशीं आर्यन् लोकांचें मूलस्थान' हा ग्रंथ मंत्रपूर्वयुगाच्या पहिल्या विभागाविषयीं विवेचन करतो.

आर्यदासविरोध कल्पना ही याच युगांतील होय.

हे तीन काल मंत्र लोकांच्या पूर्वजांचे होत. मंत्र लोकांचें देशांत आगमन झालें त्याचा, मंत्रवाङ्मयाचा आणि दाशराज्ञ युद्धाचा परस्परसंबंध लक्षांत घेतला पाहिजे. पुढें आम्हीं असें दाखवितों कीं, दाशराज्ञ युद्ध हें मंत्ररचनापूर्व आहे. तसेच ऋग्मंत्र कोणत्याहि तऱ्हेनें देशांत आर्य म्हणवून घेणाऱ्या लोकांचें आगमन दाखवीत नाहींत, एवढेंच नव्हे तर मानवी राजकीय घडामोडी दाखविण्यांत आर्य शब्दाचे उल्लेख मुळींच उपयोगी नाहींत हें आम्हीं मागें दाखविलेंच आहे. आर्यन् नांवाच्या लोकांचें, किंवा ज्यांस आर्यन् म्हणतां येईल अशा लोकांचें आगमन ऋग्मंत्र दाखवितात असें आम्हीं मुळीच कबूल करीत नाहीं आणि हें मत प्रतिपादन करणाऱ्या विद्वद्वर्गास तें तुम्ही सिद्ध करा असें आव्हान करतों.

भरत नांवाच्या एका टोळीचें किंवा दिवोदास सुदास यांच्या अनुचरांचें मात्र आगमन आम्ही मानतों.

आर्यन् लोकांची हिंदुस्थानांत पहिली वसाहत ज्याकाळीं झाली त्या काळाचे लेख आपणापाशीं नाहींत तर आर्यन् वसाहतीचा हजारों वर्षांचा एकच काल धरला तर त्या दीर्घ कालाच्या अंतिम भागांत दाशराज्ञयुद्धानें व्यक्त होणारी भरतांची हिंदुस्थानांत स्वारी झालेली असावी. भरतांच्या स्वारीचा काल तोच मंत्रकाल होय एवढेंच नव्हे तर त्या स्वारीच्या नंतर कांहीं बऱ्याच वर्षांनीं आजपर्यंत टिकलेले मंत्र तयार झाले. भरतांनीं ज्या वेळेस स्वारी केली तेव्हां देश चांगला वसलेला होता. अर्थात आर्यन् राष्ट्रांच्या वसाहतीचा इतिहास हा वेदपूर्वकालीन आहे. मंत्रकालापूर्वी १००० वर्षें तरी देशांत एक विशिष्ट संस्कृति स्थिर झाली असावी. वेद म्हणजे आर्यन् महावंशानें हिंदुस्थान वसविला त्या काळाचें वाङ्मय मुळींच नाहीं.

आम्ही येथें जें मत व्यक्त करीत आहोंत तें आज संशोधक वर्गांत रूढ नाहीं. इतिहासविषयक प्रचलित कल्पना आमच्या मतांपासून भिन्न आहेत.

प्रचलित कल्पनांचें खंडण अनेक ठिकाणीं करणें प्राप्त होतें व तें केलेंहि आहे. उदाहरणार्थ, आर्यन् महावंशाचा इतिहास म्हणजे वेदांत आर्य या शब्दानें बोधिल्या जाणाऱ्या वर्गाचा इतिहास नव्हे, ही गोष्ट मागें दाखविली आहेच. तसेंच आर्यन् राष्ट्रांच्या भारतांतील इतिहासास वेदांतर्गत इतिहासापासून प्रारंभ झाला अशी जी प्रचलित समजूत आहे ती चुकीची आहे असेंहि दाखविण्यांत आलें आहे. आर्यन् राष्ट्रांचें देशांत आगमन वेद दर्शवितात अशी प्रचलित समजूत आहे. त्या समजुतीचें अयथार्थत्वहि पुढें वर्णिलें जाईल.

**ऋग्मंत्रांत दिसणारा समाज.**– हा सविस्तरपणें विवेचिण्याचें येथें प्रयोजन नाहीं. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं ऋग्मंत्रांत स्पष्टपणें इतिहास असा दिला नसून स्तोत्रांत जीं विधानें उपलब्ध होत आहेत त्यांतून इतिहास गोळा करावयाचा आहे. या विधानांत देशप्रवेशाचा बिलकुल उल्लेख नाहीं. आर्यन् लोकांच्या देशप्रवेशाविषयीं ऋग्वेदावरून जी कल्पना करण्यांत आली ती एवढ्याच वरून कीं बहुतेक उल्लेख पंजाबकडचे सांपडतात आणि गंगेच्या पूर्वेकडील उल्लेख थोडे सांपडतात.

यांत उल्लेखिलेल्या दस्यूंच्या आर्यांशीं असलेल्या विरोधोक्तीवरून आणि अनास, असें एके ठिकाणीं दस्यूंचें वर्णन आहे त्यावरून आर्य व दस्यू या निरनिराळ्या जाती आहेत आणि ऋग्वेदांत आर्यप्रवेश वर्णिला आहे अशी कल्पना प्रचलित झाली. तथापि वस्तुस्थिति निराळी आहे. आर्य आणि दस्यू हीं दोन निरनिराळीं राष्ट्रें अगर जाती आहेत असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं, आणि आर्य आणि दस्यू यांचे सामुच्चयिक शत्रुत्व मुळींच वर्णिलें नाहीं, वगैरे विवेचन मागें सविस्तर केलेंच आहे.

ऋग्वेदांत जे युध्यमान पक्ष दिसतात त्यांत,

( १ ) इंद्र व तद्विरुद्ध वर्ग,

( २ ) दाशराज्ञ युद्धांतील परस्परविरुद्ध वर्ग,

यांपैकीं पहिल्या वर्गांत मोडणाऱ्या विरुद्धता वगळल्या पाहिजेत. त्यांचें स्पष्टीकरण हा सामान्य इतिहासाचा विषय नसून पौराणिक कथा तयार कशा होतात या संशोधनक्षेत्राचा विषय आहे. त्याचें विवेचन दुसऱ्या विभागांतील दैवतेतिहासांत केलेंच आहे. ऋग्वेदांत अनेक युध्यमान पक्ष दृष्टीस पडतात त्यांचा दाशराज्ञ युद्धांतील व्यक्तींशीं म्हणजे दाशराज्ञ युद्धाशीं म्हणजे पैजवनांच्या गांधारापासून यमुनेपर्यंत झालेल्या चालीशीं संबंध दिसून येतो.

ऋग्वेदांतील आगमन कोणाचें? "आर्यांचें" म्हणजे सभ्य लोकांचें कीं यजनशीलांचें? आर्यांचें आगमन झालें असें म्हणणारा वर्ग आर्य या शब्दाचा तो अर्थ घेतच नाहीं. तो वर्ग "आर्य" या शब्दाला भाषाशास्त्रज्ञांनीं लावलेला अर्थ म्हणजे ग्रीक, लाटिन या भाषांशीं नातें असलेली भाषा बोलणारांची जात असा घेतो आणि त्यांचें आगमन म्हणजे संस्कृत भाषेचें कोणतें तरी प्रकृतिस्वरूप बोलणारांचें आगमन असें समजतो आणि तें ऋग्वेदांत वर्णिलें आहे अशी कल्पना करतो. विशेषसा पुरावा न देतां लेखक अशी कल्पना करतात कीं, मंत्रांत

जें स्थानांतर दिसतें तोच "आर्यन्" लोकांचा हिंदुस्थानांत प्रथम प्रवेश होय. या तऱ्हेचें स्पष्ट विधान कोणीं केलेलें नाहीं पण गृहीत धरलेलें आहे. वरील प्रकारच्या गृहीत मतास पुरावा नाहीं एवढ्यावरच तें मत टाकून देतां येईल; तथापि हें मत धरून बसणारांचा संघ मोठा आहे म्हणून त्या मतास अधिक सन्मानानें वागविलें पाहिजे म्हणजे तें उलट प्रमाणें देऊन खोडलें पाहिजे.

"वेद" हे आर्यांच्या आगमनाचे ग्रंथ लोकांस वाटतात याचें कारण त्या ग्रंथांत वर्णन केलेल्या क्रियांची रंगभूमि पंजाब ही आहे. आमचें मत असें आहे कीं, वेदोक्त क्रियास्थान पंजाब आहे तरी ऋग्वेद हे आर्यन् भाषा बोलणाऱ्यांच्या प्रथम देशप्रवेशाचे ग्रंथ नाहींत. त्यांत उल्लखिलेलीं राष्ट्रें पंजाबांत वसलेलीं दिसतात एवढ्यावरूनच ऋग्मंत्र हे आर्यन् महावंशाच्या आगमनाचें दर्शक वाङ्मय आहे असें म्हणावें काय? तेवढीच कसोटी लावावयाची असेल तर आज पंजाबांतील गाणीं गोळा करावींत म्हणजे त्यांतील जाती देखील पंजाबांत दिसतील. म्हणजे त्यावरून तें विशिष्ट जातीचें देशप्रवेशवाङ्मय कसें म्हणतां येईल?

संस्कृत भाषा किंवा ती ज्या भाषांपासून झाली तिच्या प्रकृतिरूपी भाषा यांतील वाङ्मयाचें अत्यंत जुन्या काळचे अवशेष ऋग्मंत्र होत. यावरून अशी कल्पना झाली कीं आर्यन् भाषा बोलणारांचें हें प्रवेशवाङ्मय होय आणि यजुर्वेदादि वाङ्मय त्याच लोकांच्या उत्तरकालीन क्रियांचें द्योतक होय.

म्हणजे वाङ्मयाची वाढ व आर्यन् भाषा बोलणाराकडून देश व्यापला जाणें या गोष्टी अन्योन्याश्रयी धरल्या जातात. भूमि व्यापण्याची क्रिया अगोदर होणें आणि वाङ्मयवाला वर्ग तेथें मागाहून जाणें या क्रियेची शक्यता लोक विसरतात.

वाङ्मयविस्तार लोकविस्ताराच्या आश्रयानें झाला असेल ही कल्पना स्वाभाविक आहे; पण अधिक विचार केला असतां या कल्पनेंत काहीं चुका असण्याचा संभव आहे असें दिसून येतें. आर्यन् महावंशाचें प्रथम आगमन ऋग्वेदांत वर्णिलें आहे असें समजणाऱ्यांनीं नवीन वसाहतीच्या क्रियेचें स्वरूप लक्षांत घेतलें होतें कीं नव्हतें असा संशय उत्पन्न होतो.

प्राचीन कालीं झालेलें व मंत्रांत उल्लेखिलेलें आर्य लोकांचें आगमन हें पहिलेंच काय हा प्रश्न प्रथम विचारणीय आहे. तें पहिलें खास नाहीं असें वाटतें. वेदामध्यें ज्यांचा उल्लेख येतो ते सर्व लोक एकच होते काय? पुढें सरकूं पहाणाऱ्यास प्रतिकार करणारे नॉन् आर्यन् होते काय? ते तसे असावे असें दिसत नाहीं. पुढें सरकूं पहाणाऱ्या लोकांच्या शत्रूंमध्यें कांहीं सदृश जातींचे आणि कांहीं विसदृश जातींचे असे दोन्ही प्रकारचे लोक असणें शक्य आहे, एवढेंच नव्हे तर युद्ध सदृशांशींच झालें असावें असें मनुष्यभ्रमणाच्या अत्यंत सामान्य पद्धतींवरून म्हणावें लागेल. अमेरिकेंतील वसाहतीच्या इतिहासांत गोऱ्यांचीं आणि तांबड्यांची युद्धें आहेत एवढेंच नव्हे तर निरनिराळ्या गोऱ्या राष्ट्रांची परस्परांतील युद्धें आहेत. ऋग्वेदांत उल्लेखिलेल्या राष्ट्रांपैकीं अर्वाचिन भाषाशास्त्रज्ञांनीं वापरलेल्या "आर्यन्" नांवानें संबोधिलेलीं राष्ट्रें कोणतीं यांविषयीं विचार पाहिजे.

आर्यन् म्हणून म्हटलेल्या एकाच लोकसमूहाचें एकच वेळेस आगमन होऊन त्यांनीं देश जिंकला किंवा वसविला ही गोष्ट शक्य च नाहीं. बोलन घाटांतून किंवा खैबर घाटांतून एकदम कितीसे लोक येणार? जे येतील त्यांना भक्ष्य मिळविण्यास तात्पुरती तरी वसाहत करावी लागणार. जीं माणसें येणार तीं प्रथम जवळचाच प्रदेश व्यापणार आणि एकदां एखादा प्रदेश व्यापिला म्हणजे त्या प्रदेशापासून स्वच्छेनें लोक इतरत्र भ्रमण कशाकरितां करतील. नवीन येणार त्यांस व्यापिलेल्या प्रदेशांतून रस्ता काढून दूर गेलें पाहिजे किंवा जुनीच वसाहत हिसकावून घेऊन जुन्या वसाहतवाल्यांस दूर ढकललें पाहिजे, म्हणजे नवीनांचें भांडण युद्ध किंवा मारामारी व्हावयाची ती प्रथम जुन्या स्वजनांशींच होणार. दस्यु, राक्षस, दास, इत्यादि शब्द शत्रुत्ववाचक असले तर ते द्राविडी किंवा दुसरी भिन्नवंशीय भाषा बोलणाऱ्या विशिष्ट लोकांसच लावले कशावरून? देशांतील काळ्या लोकांना जिंकून त्यांस शूद्र बनविलें या विधानाच्या मुळाशीं समजूत दिसते ती अशी कीं मंत्रकालीं उत्तर हिंदुस्थान काळ्या लोकांनीं वसलें होतें आणि लक्षावधि किंवा कोट्यावधि गोरे आर्य आले आणि त्या सर्वांनीं शिस्तवार इतक्या लोकांशीं युद्ध करून अर्धा लक्ष चौरस मैल जमीन व्यापून टाकली. ही कल्पना हिंदुस्थानचा लहानसा दोनचार फुटांचा नकाशा हातांत असला म्हणजे सोपी दिसते पण त्या क्रियेचें यथार्थ स्वरूप लक्षांत आणूं लागलें म्हणजे त्या विधानाची असत्यता भासूं लागते. यासाठीं आर्यन् लोकांनीं द्राविड लोकांस हांकून हिंदुस्थान काबीज केलें त्याचा इतिहास वेदांत वर्णिला आहे असल्या तऱ्हेचीं इतिहास सोपा करणारीं विधानें जितकीं दूर टाकतां येतील तितकीं दूर झुगारून दिलीं पाहिजेत, आणि संशोधनामध्यें प्रत्यक्ष युद्धें काय झालीं, प्रत्यक्ष संघ कोणकोणते दिसतात, याविषयीं शांतपणें संशोधन केलें पाहिजे. ज्या आर्यन् लोकांनीं वेदमंत्र आणले त्या आर्यन् लोकांनीं काळ्या द्राविड लोकांना जिंकून हिंदुस्थान काबिज केलें हें विधान आपण प्रथमच शिशुसंशोधकाच्या मनोहर कल्पनासृष्टींतलें आणि केवळ अजिबात खोटें असें धरून चालूं आणि इतिहासाचें सूत्र सांपडण्यास काय काय गोष्टी उपलब्ध होतात हें पाहूं.

पूर्वींच्या ग्रंथकारांचें आर्यदस्युयुद्धविषयक मत आणि आमचें मत यांतील भेद आम्ही येणेंप्रमाणें दर्शवितों.

| पूर्वींचें मत. | आमचें आजचें मत. |
| --- | --- |
| (१) आर्य हें जातिवाचक किंवा महावंश वाचक नांव होतें. | (१) आर्य हें शिष्टवर्गवाचक व यजनशीलजनवाचक नांव होतें. |
| (२) हिंदुस्थानांत वेदभाषी (आर्यन्) लोक आले | (२) हिंदुस्थानांत भरतांचें आगमन किंवा स्थानांतर |

| | |
|---|---|
| त्यांचें आगमन वेद दाखवितात. | तेवढें ऋग्मंत्रांतील उल्लेखांवरून स्पष्ट होतें. आर्यन् लोकांचें आगमन वेदांवरून स्पष्ट होत नाहीं. भरत लोक तेवढेच आर्यन् होत असें मुळींच दिसत नाहीं. |
| (३) आर्यन् आले त्यावेळीं देशांतील काळ्या लोकांबरोबर त्यांचें युद्ध झालें. | (३) भरत हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांना देशांत प्रवेश सर्व प्रकारच्या लोकांशीं लढाया करीत करावा लागला. |
| (४) आर्यन् राष्ट्राचे सामान्य शत्रु देशांतील मूळचे लोक होते ते काळे होते. म्हणजे आर्यन् लोकांचें हें आगमन पहिलेंच होय. | (४) आर्यन् राष्ट्रांचें काळ्यांशीं सामुच्चयिक वैर दिसत नाहीं. आर्यन् लोकांचें सामान्य शत्रुमूलक ऐक्य असल्याचें कोठें दिसत नाहीं. देशांत आर्यन् लोक प्रथमच येत होते व त्यांच्या अगोदर काळे लोक देशांत होते अशाबद्दल पुरावा नाहीं. |
| (५) दस्यु याचा अर्थ देशांतील मूळचे लोक. | (५) दस्यु म्हणजे जे यजनशील नव्हत ते. दस्यु हा शब्द फार तर शत्रुत्ववाचक असावा. तो शब्द पर्शुभारतीय असल्यामुळें त्यानें भारतीय विशिष्ट जात दर्शविली जात नाहीं. एके ठिकाणीं कांहीं चपट्या नाकाच्या लोकांस दस्यु म्हटलें आहे, ते आर्यांचे शत्रू होते असें नाहीं. |
| | (६) दस्यूंशीं युद्धप्रसंग वर्णिला नाहीं. दिवोदास व सुदास यांचे अनेक राष्ट्रांशीं युद्धप्रसंग ऋग्वेदांत वर्णिले आहेत. जीं राष्ट्रें सुदास व दिवोदास यांच्या विरुद्ध लढलीं (उ० यदु, तुर्वश, पुरु इ०) तीं दिवोदासापेक्षां भिन्न वंशाचीं किंवा भिन्न धर्माचीं होतीं असें समजण्यास मुळींच पुरावा नाहीं. |

आमचा पूर्वींच्या लेखकांशीं असलेला दुसरा मतभेद असा आहे कीं मंत्रकालीं झालेलें आगमन आर्यन् लोकांच्या भारतीय इतिहासांत प्राचीन नसून अर्वाचीन आहे.

ऋत्विक्कर्मवैशिष्ट्ययुक्त अगर ब्राह्मणयुक्त समाज ही समाजाची उत्तरकालीन स्थिति होय. यज्ञविकासाबरोबर ऋत्विक्कर्म भिन्न झालें. ऋत्विक्कर्मांचें भिन्नत्व म्हणजे विशिष्टीकरण स्थापन झाल्यानंतर ब्राह्मणांची वेदशाखाभिन्नतात्मक जात तयार झाली. मंत्रभागांतच ऋत्विक्कर्मांचें वरेंच विशिष्टीकरण व यज्ञविकास हीं दिसत आहेत. यज्ञसंस्था तयार होण्याच्या पूर्वी ब्राह्मणांची जात तयार झाली नव्हती. आणि त्यामुळें ब्राह्मणजातीविरहित तथापि आर्यन् भाषेनें व्यापलेला, असा जर कांहीं प्रदेश असेल तर, तो यज्ञसंस्था संवर्धनापूर्वीचा आर्यन् लोकांचा प्रसार दर्शवितो. उत्तरेकडील ब्राह्मणांत अत्यंत पौर्व ब्राह्मण म्हणजे सारस्वत होत. तथापि संस्कृत भाषेशीं संबद्ध अशा आर्यन् भाषेनें व्यापिलेला देश सरस्वतीच्या पूर्वेकडे पुष्कळ आहे. सिंहलद्वीपाची कथा पंजाबप्रमाणेंच आहे. हा प्रदेश भाषेनें आर्यन् आहे. पण येथें ब्राह्मणांची वसति नाहीं. आणि या परिस्थितीचें कारण आर्यन् राष्ट्रांकडून ब्राह्मणजातिविकासापूर्वी द्वीपाची वसाहत होणें असावें असें मागें सांगितलेंच आहे (विभाग १ पृ. १४३). मंत्रकाल आणि ब्राह्मणजातिविकासकाल हा एकमेकांपासून फारसा दूर नसावा. मांत्रसंस्कृतीची ब्राह्मणसमाजयुक्त संस्कृति ही अत्यंत निकटची पायरी असल्यामुळें ब्राह्मणहीन समाज हा मांत्र संस्कृतीचा भाग नसला पाहिजे.

या प्रकारच्या विवेचनांत प्रवेश करतांना प्रथम ग्रंथांत उल्लेखिलेल्या राष्ट्रांपैकीं प्राचीन राष्ट्र कोणतें आणि अर्वाचीन राष्ट्र कोणतें हें ठरविण्याच्या पद्धतीविषयीं विचार व्यक्त केले पाहिजेत.

**ग्रंथोल्लेखप्राचीनत्व व लोकप्राचीनत्व.**— येथें एक गोष्ट अशी मांडली पाहिजे कीं ज्या लोकांचा उत्तरकालीन वाङ्मयांत उल्लेख येतो ते लोक उत्तरकालीन होत, हा जो समज आहे तो चुकीचा आहे. नवीन राष्ट्रांनीं हिंदुस्थानांतील पूर्व भागांत वसाहत करणें शक्य दिसत नाहीं. आमच्या मतें जे लोक अधिक पूर्वेकडे दिसतात ते अधिक प्राचीन वसाहत करणारे होत. ऋग्वेदांत उल्लेखिलेलीं राष्ट्रें नंतर आलेलीं असावींत व आलीं तीं सवाङ्मय असावींत. त्या सवाङ्मय आर्यन् लोकांबरोबर आलेल्या लोकांतून निघालेल्या वाङ्मयोत्पादक ब्राह्मणांचा फैलाव जसजसा अधिकाधिक होत चालला तसतसा पूर्वेकडील व दक्षिणेकडील राष्ट्रांचा वाङ्मयांत उल्लेख येऊं लागला असावा, म्हणजे ऋग्मंत्रदृष्ट राष्ट्रें प्राचीन राष्ट्रांतील प्राचीन नसून अर्वाचीन आहेत. ज्यांस भाषेनें आर्यन् म्हणतां येईल अशा लोकांचा फैलाव चोहोंकडे झाल्यानंतर बऱ्याचशा उत्तरकालीं ऋग्मंत्र म्हणणारांचे पूर्वज आर्यन् आले असावेत आणि त्यांच्यांतील सवाङ्मयवर्गाचाच प्रसारक्रम ऋग्वेदांतील व यजुर्वेदांतील स्थानोल्लेख दाखवितात, अशी एक शक्यता आम्ही येथें मांडीत आहों. शेंकडों राष्ट्रांनीं एकदम येण्याची अशक्यता, त्या अशक्यतेमुळें देश्य कृष्ण आणि आगंतुक गौर यांच्या युद्धाची अशक्यता यांवरच ऋग्मंत्रदृष्ट राष्ट्रांचें अर्वाचीनत्व अवलंबून नाहीं. ऋग्मंत्रपूर्व राष्ट्रांचें अस्तित्व श्रौतधर्माच्या इतिहासासारख्या दुसऱ्या अनेक

सांस्कृतिक प्रमाणांनीं सिद्ध होतें. ज्यास आपण श्रौतधर्म म्हणतों त्याच्या उद्भवापूर्वी बहुतेक हिंदुस्थान व्यापलें गेलें होतें असें दिसतें.

संस्कृतीच्या प्रसाराच्या इतिहासामध्यें ज्या एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्णय केला पाहिजे ती ही कीं, श्रौत व स्मार्त धर्मांचा विकास ज्या काळांत झाला त्या काळानंतर म्हणजे श्रौतस्मार्तधर्म बरोबर घेऊनच आर्यन् लोक चोहोंकडे पसरले कीं तो विकास होण्यापूर्वीच पसरले. विकास झाल्यानंतर चोहोंकडे पसरले तर चोहोंकडे श्रौतधर्म अगर त्याचीं उत्तर स्वरूपेंच प्राचीन ग्रंथांतून दिसलीं पाहिजेत तीं तशीं दिसत नाहींत. ज्या वेळेस श्रौतस्मार्त धर्म विकसित झाले नव्हते, आणि ज्या वेळेस ब्राह्मण ही जात ( किंवा बऱ्याच आनुवंशिक परंपरेनें चालू रहाणारा वर्ग ) तयार झाली नव्हती, परंतु आर्यांच्या म्हणजे वेदभाषेशीं सादृश्य असणाऱ्या भाषा बोलणाऱ्यांच्या वसाहती मात्र चोहोंकडे झाल्या होत्या असा एखादा काल आपल्या देशांतील निरनिराळ्या प्रांतांच्या इतिहासांत होता काय ? असल्यास तो काल किती विस्तृत होता, त्यावेळची लौकिक परिस्थिति काय होती आणि किती प्रदेशभर श्रौतस्मार्तधर्म व ब्राह्मण यांच्याशिवाय असलेल्या आर्यांचा प्रसार झाला होता? हें आपणांस पहावें लागेल.

असा काल होता असा आम्ही आमचें विधान खंडन होईपर्यंत पूर्वपक्ष करितों आणि विधानाच्या साहाय्यार्थ खालील प्रमाणें देतों.

पहिलें प्रमाण.— पंजाब, बंगाल आणि सिंहलद्वीप येथें देश्य ब्राह्मणांचें अस्तित्व नाहीं. तथापि तेथील भाषा मात्र आर्यन् आहे.

दुसरें प्रमाण.—वेद बरोबर आणणारे आर्य इतर लोक आपणांपेक्षां भिन्न भाषेचे आहेत असा त्यांच्यावर आरोप न करितां ते अस्पष्ट उच्चार करणारे आहेत असा आरोप त्यांजवर करीत; आणि म्लेच्छ याचा अर्थ अस्पष्ट उच्चार करणारा असाच ते मनांत आणीत.

शूद्रवर्गाच्या समोर वेदाक्षराचा उच्चार करण्याची ज्या दिवसांत मनाई उत्पन्न झाली त्या दिवसांत शूद्रांची भाषा द्राविडी भाषांसारखी फारशी भिन्न नसावी.

तिसरें प्रमाण.— श्रौतस्मार्तधर्मांचा विकास संहितीकरणापूर्वी म्हणजे भारतीय युद्धाच्या पूर्वी पूर्णत्वानें झालेला दिसत नाहीं आणि लोकविस्तार मात्र बराच झालेला दिसतो आणि श्रौतधर्मांच्या विकासाचा क्रम दाखविणारें वाङ्मय जे मंत्र आणि ब्राह्मणें त्यामध्येंच अनेक लोक चोहोंकडे पसरल्याची स्थिति दृष्टीस पडते. शिवाय भारतीयुद्धामध्यें ज्या ज्या ठिकाणच्या राजांचें अंग दाखविलें आहे ते ते राजे सर्व देशभर पसरले होते असेंहि त्यांत दाखविलें आहे. ज्या राष्ट्रांचा संबंध भारतीयुद्धांत आणला आहे अशांची संख्या साडेतीनशेंपासून चारशेंपर्यंत महाभारतांत आहे. रामायण व महाभारत यांतील व्यक्तींच्या ठायीं श्रौतस्मार्तधर्मांच्या पूर्वीच्या किंवा भिन्न परंपरेच्या धर्मांचा आरोप केला आहे. उदाहरणार्थ सीतेस संध्यावंदनार्थ बसविलें आहे. खुद्द यजूंच्या काळाकडे पाहिलें तर स्त्रियांचें यज्ञोपवीत हिसकावून घेऊन इष्टीच्या वेळेपुरता त्यांच्या कमरेला यज्ञोपवीताऐवजीं योक्त्र नांवाचा मोळाचा दोर बांधून इष्टी संपल्याबरोबर तो पुन्हा हिसकावून घेण्यांत आला आहे. आणि श्रौतगृह्यकर्मांत यजमानाच्या यज्ञास सहाय्य करण्याखेरिज कोणताहि धर्माधिकार उर्फ कुलंगडीं स्त्रियांच्या गळ्यांत बांधलेलीं दिसत नाहींत.

श्रौतधर्मांच्या विकासापूर्वी जर चोहोंकडे आर्यन् राष्ट्रांच्या वसाहती दिसतात तर प्रश्न असा उपस्थित होतो कीं श्रौतधर्मपूर्व ऋग्वेदीय मंत्रधर्म असतां प्रसार चोहोंकडे झाला कीं त्या पूर्वीच झाला. आमचें मत हा प्रसार मंत्रधर्मोद्भवापूर्वी झाला असें आहे. ऋग्वेदांतील क्रियांशीं यजुर्वेदोक्त श्रौतधर्माचें निकट नातें मागल्या विभागांत ऋग्वेदाचें पृथक्करण करून दाखविलेंच आहे. यजुर्वेदधर्म तयार होण्यापूर्वी म्हणजे ऋग्मंत्रधर्माचा प्रचार असतां जर लोकांचा प्रसार चोहोंकडे झाला असता तर पूर्वकालीन धर्माचें स्वरूप सर्वत्र दृष्टीस पडतें. पण दिसतें काय तर ब्राह्मणांच्या बाबतींत अध्वर्युप्रधान धर्म आणि इतरांच्या बाबतींत पुराण धर्म. या तऱ्हेची परिस्थिति प्रसारकाळ ऋग्मंत्रपूर्व होता असें दर्शविते.

भाषाशास्त्राचा अभ्यास अधिक झाल्यास वरील विधानास साधक असा पुरावा आणखीहि सांपडणें शक्य आहे असें वाटतें. ग्रिअर्सननें भाषांच्या अभ्यासावरून तीन निरनिराळे मनुष्यांचे प्रवाह आर्यन् भाषांच्याच वसतिक्षेत्रांत दाखविले आहेत. बंगाली, मराठी, सिंधी व पंजाबी या बाह्य परिकरांतील भाषांस हिंदी, राजस्थानी, इत्यादि भाषांनीं कोंपऱ्यांत ढकललेलें दाखविलें आहे. रा. राजवाडे यांचें असें मत आहे कीं महाराष्ट्री ही भाषा वैदिक भाषेपासून निर्माण झाली नसून वैदिक व महाराष्ट्री या दोन्ही एकाच इन्डोयूरोपीय भाषेचीं अपत्यें आहेत. या तऱ्हेचें मत अधिक ग्राह्य होऊं लागलें आहे. निदान एवढें म्हणतां येईल कीं मंत्रवक्त्या लोकांपूर्वी आर्यन् लोक येथें नव्हते या समजास वरील मत ग्राह्य झाल्यास बराच धक्का पोंचणार आहे.

मंत्रवक्त्या लोकांपूर्वी भिन्न लोक आपल्या देशांत होते हें सिद्ध करण्यास थोडासा पुरावा येथेंच देतां येईल. शक व मग या जाती वेदवक्त्या लोकांपूर्वी आल्या असाव्यात असें दिसतें. शक नांवाचें राष्ट्र किंवा जाति ही बरीच उत्तरकालीं हिंदुस्तानांत आली असा व्हिन्सेंट स्मिथनें आधारास घेतलेल्या ग्रंथकारांचा समज आहे. शकांचें आगमन ज्या उत्तरकालीं झालें असें संशोधक लिहितात त्या कालीं कांहीं शक हिंदुस्थानांत आले असतील तथापि तें आगमन पहिलेंच नव्हे. इसवी शकापूर्वी सात आठशें वर्षें शकांचें आगमन झालें होतें ही गोष्ट गौतम आपणास शाक्य म्हणवितो येवढ्यावरूनच सिद्ध होईल. शाक्य म्हणजे ज्यांचा शक हा अभिजन म्हणजे मूळदेश आहे असे लोक. गौतमबुद्ध आपले अनेक पिढ्यांचे पूर्वज हिंदुस्थानांत होते अशी आपली समजूत व्यक्त करतो. त्यास आपले पूर्वज परक्या देशांतून आले अशी कल्पना देखील असल्याचें दिसत नाहीं ( कस्सपसुत्त पहा ).

गौतम बुद्धाचा वंश शक होता ही गोष्ट लक्षांत घेतां शकांचें भारतांत प्राचीनत्व सहज दृष्टीस पडतें. शकांच्या बरोबर त्यांचे उपा-

ध्याय 'मग' आले असावेत, 'मग' हे देखील शकस्थानांतून आले ही समजूत भविष्योत्तरपुराणामध्यें रेखाटलेली दिसते. मगध देशाचें नांव पूर्वी 'कीकट' होतें परंतु पुढें मगध हें पडलें. मगास धारण करणारा देश तो 'मगध' या तऱ्हेची व्युत्पत्ति पतंजलीनें दिली आहे तथापि, मग याचा अर्थ मल अथवा पाप असा लाविला आहे. शकांचे उपाध्ये मग, त्यांचा देश तो मगध अशी व्युत्पत्ति राजवाडे आपल्या लोकशिक्षणांतील 'मगध' लेखांत व्यक्त करितात. 'मगध' हे नांव जितकें जुनें तितकें शकमगांचें अस्तित्व जुनें असें धरलें तर मगांचें अस्तित्व तैत्तिरीय संहितेंत वापरलेला मंत्र ज्या काळांत रचला गेला असेल त्याच्या पूर्वी कित्येक शतकें जाऊन पडतें. तेथें पुरुषमेधांत मागधाचा बली वर्णिला आहे. 'मागध' हें लोकवाचक नांव उत्पन्न व्हावयास 'मगध' देशाचें नांव बरेंच अधिक जुनें धरिलें पाहिजे. आणि मगध हें नांव पडण्याच्या अगोदर शेंकडों वर्षे मगांची वस्ती तेथें पाहिजे. कुरुयुद्धकालीन वैशंपायन व याज्ञवल्क्य यांनीं जुनाट म्हणून घेतलेला मंत्र ज्या काळांत रचला गेला असेल त्या काळीं 'मग' हे देशांत पूर्णपणें मुरले जाऊन देशास 'मगध' हें नांव पडून त्यावरून इतर तत्रस्थांस 'मागध' म्हणण्याचा काळ येऊन ठेपला होता. याशिवाय, आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं पुरुषमेध ही संस्था केवळ प्राचीन आणि जवळ जवळ विस्मृत अशी त्याच वेळेस झाली होती आणि, ती देखील इतकी कीं तैत्तिरीयांस किंवा शुक्लांस तद्विषयक इतिकर्तव्यता ठाऊक नव्हत्या, यावरून मगांचें प्राचीनत्व यजुःप्राधान्य काळापूर्वी किती शतकें असावें बरें ?

ऋग्वेदांत मगांचा उल्लेख एका मंत्रांत आला आहे आणि तो कीकट देशाशीं संबद्ध असाच आला आहे. तेथें या "मगंदाचें धन आम्हाला दे" अशी प्रार्थना इंद्रास केली आहे 'मगंद' याचा पुष्कळ द्राविडी प्राणायाम करून, 'व्याजखोर' असा अर्थ सायणाचार्य करतात आणि, तोच अर्थ गतानुगतिक पद्धतीनें शंकर पांडुरंगांनीं घेतला आहे. येथें मगंद याचा अर्थ स्पष्ट आहे. मगास पैसे देणारे म्हणजे त्यांचे अनुयायी ते 'मगंद' ही 'मगध' शब्द कीकट देशास लागण्याची पूर्वपीठिका समजावी.

मगांचें अस्तित्व त्या प्राचीन काळीं जर सिद्ध होत आहे, तर प्रश्न उपस्थित होतो तो हा कीं इंद्रानुयायी लोक कीकटांत अगोदर आले कीं मगंद अगोदर आले? सूक्तकार मगंदांचें त्या स्थानीं अस्तित्व गृहीत धरतो यावरून मंत्रसमुच्चयकर्त्यांचे पूर्वज देशांत अगोदर येऊन शकमगादि लोक नंतर आले असा सिद्धांत कसा बांधणार ?

ज्या ऋग्वेदमंत्रांत भरतांचा केवळ प्रवेश दृष्टीस पडतो त्याच मंत्रांत मगंदांचें पूर्वीच अस्तित्व गृहीत धरलें गेलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं श्रौतधर्माच्या संस्थापकांचे पूर्वज देशांत येण्या-पूर्वीच 'मगंद' येथें येऊन वसले होते.

अत्यंत प्राचीन इतिहास तयार करावयाचा झाला तर तो निरनिराळ्या राष्ट्रजातींच्या संबंधाचे उल्लेख गोळा करून तयार केला पाहिजे, आणि त्यांच्या हालचाली नोंदल्या पाहिजेत. दाशराज्ञयुद्धाचें वर्णन करितांना या गोष्टींकडे लक्ष दिलें जाईल. प्रस्तुतचें विवेचन एवढेंच दाखवील कीं आर्य लोक तेच आर्यन् हें म्हणणें बरोबर नाहीं. आर्यन् महावंशाचा प्रथम प्रवेश ऋग्वेदांत वर्णिला आहे, आणि त्यांनीं काळ्या लोकांना जिंकलें हें म्हणण्यास आधार नाहीं.

**ऋग्मंत्रवाङ्मय हें सर्व भारतीय आर्यन् लोकांचें नसून कांहींशा उत्तर कालीं आलेल्या भारतीयांचें वाङ्मय आहे. आणि ब्राह्मणें हें वाङ्मय जुनें सूतवाङ्मय व नवें मांत्रवाङ्मय यांस जोडणारें आहे.**-हें विधान चांगलें लक्षांत ठेवून त्याचें स्पष्टीकरण ऐकावें.

श्रौतवाङ्मयांतर्गत मंत्र आणि ब्राह्मण यांचा किंवा मंत्र आणि इतिहासपुराणें यांचा परस्परसंबंध आम्हीं येणेंप्रमाणें व्यक्त करितोः मंत्रवाङ्मय हें एका विशिष्ट कालीं पश्चिमेकडून पूर्वेकडे प्रवेश करणाऱ्या आर्यन् लोकांचें होतें. हा प्रवेश दाशराज्ञयुद्धाच्या आसपासच्या काळांतील होय जें मंत्रवाङ्मय तयार झालें त्यांतील बहुतेक दाशराज्ञ युद्धकालीं किंवा तदुत्तरकालीं आहे. दाशराज्ञ युद्धाच्या वेळेस उत्तर हिंदुस्थान बहुतेक आर्यन् महावंशांतील परंतु मंत्रकालापूर्वी अनेक शतकें आलेल्या लोकांनीं वसला होता. हे वेदपूर्व आर्यन् कोणच्या काळांत आले, त्यांच्या वसाहती कशा झाल्या यांचा पत्ता प्राकृत भाषाशास्त्र अतिशय वाढल्यास कदाचित् लागल्यास लागेल पण आज तें अज्ञातच आहे, आणि त्याची माहिती देणारें वाङ्मय अस्तित्वांतच नाहीं. त्या लोकांची भाषा वेदभाषेहून फारशी भिन्न नसावी पण त्यांची संस्कृति मंत्रांत दिसणाऱ्या संस्कृतीपासून बरीचशी भिन्न झालेली असावी. त्यांच्या संस्कृतींत यज्ञसंस्था बरीचशी बुडालेलीच असावी. म्हणजे जी यज्ञसंस्था यजूंच्या पूर्वी ऋग्मंत्रांत केवळ प्राथमिक स्वरूपांत दृष्टीस पडते तिच्याहि पेक्षां अगोदरचें एखादें स्वरूप घेऊन ते लोक हिंदुस्थानांत आले असावे, आणि ती विकसित न होतां मृत झाली असावी. मंत्र आणणारे आर्यन् त्यांच्या संस्कृतीस आपण मंत्रसंस्कृति म्हणूं, आणि त्या वेळेस जे लोक देश्य होते परंतु आर्यन् होते त्यांच्या संस्कृतीस देश्य आर्यन् संस्कृति म्हणूं. या देश्य आर्यन् संस्कृतीचें वाङ्मय तत्कालीन स्वरूपांत आज जरी उपलब्ध नाहीं तरी तें कसें असावें याविषयींची थोडीसी कल्पना आपणांस करतां येईल. त्यांच्यामध्यें इतिहासपुराणें उर्फ सूतवाङ्मय बरेंचसें वाढलेलें

* सूर्योपासना मगांनीं बऱ्याच उत्तर कालीं आणली या तऱ्हेची विधानें पाश्चात्यांनीं केलीं आहेत आणि तींच डॉ० भांडारकरांनीं गृहीत धरलीं आहेत. वेदांची ज्यास माहिती आहे आणि, अनेक दैवतांच्या मुळाशीं सूर्य आहे हें हजारों वर्षे वेदांचा अर्थ लावणारे आपल्या देशांत कंठरवानें सांगत असतांना तें विधान खोडण्याचा यत्किंचित् प्रयत्न न करितां सूर्योपासनेच्या प्रचाराचें श्रेय उत्तरकालीन कोणातरी आलेल्या लोकांस डॉ० भाण्डारकरांनीं कसें दिलें याचें आश्चर्य वाटतें. सूर्योपासना एकतर नवीन आली नसावी किंवा 'मग' हे देशांत इतके अगोदर उत्पन्न झाले असावेत कीं, वैदिक संस्कृतीच्या घटनेंतच त्यांचा अंश असावा असा निर्णय स्वाभाविकपणेंच उत्पन्न होत नाहीं काय ?

असावें. त्यांच्यामध्यें व्यापक विचारांचा म्हणजे जे विचार उत्तरकालीन ऋग्मंत्रांत किंवा आरण्यक व उपनिषदांतून दृष्टीस पडतात त्या प्रकारचे विचार त्यांत वाढले असावे आणि बौद्ध व जैन ग्रंथांतून ज्यांचा प्रारंभ वेदांत सांपडत नाहीं अशा ज्या अनेक गोष्टी दिसतात त्या देखील देश्य आर्यन् संस्कृतींत असाव्या. देश्य आर्यन् संस्कृतींत ब्राह्मणांची जात नसावी आणि जो अथर्वणांचा वर्ग त्यांच्याबरोबर पूर्वकालींच आला असेल तो वर्ग मंत्रसंस्कृतींतील अथर्व्याप्रमाणें फारसा विकसित न होतां निदान पूर्वेकडील लोकांत भाट, गारपगारी यासारख्या कनिष्ठ वर्गाच्या स्वरूपाचा झाला असावा किंवा सर्वसामान्य लोकांत मिसळून गेला असावा. देश्य आर्यन् समाज कदाचित् क्षत्रियप्रधान असतील.

देश्य आर्यन् संस्कृति म्हणून जी वर्णन केली ती मंत्रसंस्कृतीपासून अगदींच भिन्न झाली नसावी. भाषासादृश्याशिवाय देश्यसंस्कृति व मंत्रसंस्कृति यांत सारखेच शोभणारे कांहीं लोकसमुदायहि असतील. एकामागून एक अशीं अनेक आर्यन् लोकांचीं आगमनें आपण कल्पिलीं तर हें अत्यन्त स्वाभाविक आहे कीं अधिक उत्तरकालीन लोकांमध्यें मंत्रसंस्कृतीच्या सदृश अशी संस्कृति असावी.

वर सांगितल्याप्रमाणें दोन भिन्न संस्कृति कल्पिण्यास प्रमाणें काय?

( १ ) असें मानण्याचें पहिलें कारण हें कीं कथापुराणादि वाङ्मयांतून जो आपणांस इतिहास सांपडतो त्यांत पुष्कळ जुनी माहिती जतन करण्याचा यत्न उघड दिसत आहे, आणि हा सर्व इतिहास दाशराज्ञ युद्धाच्या बराच पूर्वीचा असला पाहिजे.

( २ ) ऋग्वेदामध्येंच पुढें सरकरणारीं राष्ट्रें अगोदरचा देश सुमारें वीस राष्ट्रांनीं व्यापलेलाच असून त्यांतून कष्टानें मार्ग काढीत आहेत असें दाखविलें आहे.

( ३ ) ब्राह्मणजातीच्या उद्भवापूर्वी देशभर जो आर्यन् लोकांचा विस्तार झाला तो त्या विस्तार पावलेल्या लोकांच्या संस्कृतीचें उत्तरकालीन म्हणजे ऋग्मंत्रदृष्टसंस्कृतीपासून भिन्नत्व दर्शवितो.

( ४ ) वेदांमध्यें गार्हस्थ्य पूर्णपणें प्रथापित झालेलें दिसतें आणि अर्वाचीन काळच्या गार्हस्थ्यापासून भिन्न प्रकारचें गार्हस्थ्य किंवा कुटुंबस्वरूप इतिहासपुराणांतून दृष्टीस पडतें.

( ५ ) जैनांमध्यें रामकथा आहे पण ती निराळी आहे. बौद्धांची रामकथा निराळी आहे. म्हणजे ही सर्व अत्यंत जुन्या कथेचीं पर्यवसानें होत.

( ६ ) जैनांच्या संप्रदायाची एकंदर कल्पना अशी आहे कीं वर्धमान महावीरानें नवीन विचारसंप्रदाय स्थापन केला नसून पूर्वीच्याच विचारास वळण दिलें. त्याच्या अगोदरचा त्यांचा तीर्थंकर ऋषभ याचा भागवतानें गौरवपर उल्लेख केला असल्यामुळें कदाचित् ऋषभ हा एक जुना पण विशिष्ट पंथातलाच नसून सर्वांनांच मान्य असा पुरुष असणें शक्य आहे. म्हणजे सर्वसामान्य संस्कृतीपैकींच यज्ञधर्मानें अस्पृष्ट अशा प्राचीन संस्कृतीची परंपरा आपण राखीत आहों आणि वाढवीत आहों अशी जी जैनांची भावना आहे ती केवळ लुकीची नसावी. वैदिक लोकांच्या आगमनापूर्वी आणि त्यांचा यज्ञधर्म तयार होण्यापूर्वी भारतांत जी संस्कृति होती तिचे, यज्ञधर्मानें अलिप्त असे जे लोक असतील ते जैन होत असें म्हणतां येणार नाहीं; पण त्यांची परंपरा वैदिक परंपरेइतकी किंबहुना तीहूनहि जुनी ठरण्याचा संभव आहे.

जैनांच्या ग्रंथांतील एकंदर अंगें पहातां असें दिसतें कीं कांहीं विचार औपनिषद् विचाराशीं जुळतात. त्यांच्या दृष्टीनें रामकथा कृष्णकथा हा इतिहासच आहे. त्यांच्या संप्रदायांतील कांहीं भाग नकलेच्या स्वरूपाचा आहे. म्हणजे तुमच्याकडे एक नारायण तर आमच्याकडे सात नारायण, तुमच्याकडे एक सूर्य तर आमच्याकडे इतके जास्त सूर्य. त्यांच्या ग्रांथिक प्रयत्नांत कांहीं लोकांस जैन ठरविण्यासाठीं ( उदाहरणार्थ कलिदासादि कवींस ) झालेल्या खटपटींचा परिणाम दिसून येतो. परंतु विद्याधरांचा भाग असा दिसतो कीं जो जैनांत राहिला आणि ब्राह्मणी संस्कृतीच्या ग्रंथांत महत्त्व पावला नाहीं. या तऱ्हेचा भाग कांहीं तरी पूर्वकालीन परंपरा ब्राह्मणी ग्रंथांत घेतली व कांहीं घ्यावयाची राहिली असा तरी एक सिद्धांत काढावयास लावील किंवा ब्राह्मणीधर्मयुक्त समाजांतून फुटून बाहेर पडलेल्यांनीं विद्याधर वर्ग आपल्या डोक्यांतून निर्माण केला असें होईल. या तऱ्हेची कल्पना करण्यास विद्याधर वर्गाचा ब्राह्मणी ग्रंथांत पूर्ण अनुल्लेख पाहिजे पण तो तसा दिसत नाहीं.

## नव्याचें जुन्यावर आवरण घालण्याची पद्धति.—

मांत्र संस्कृतीचा देश्य आर्यन् संस्कृतीशीं जेव्हां प्रसंग आला त्या वेळीं अनेक क्रिया झालेल्या दिसतात.

मंत्रसंस्कृतींतील यज्ञसंस्था जेव्हां कमी कमी होऊं लागली तेव्हां सार्वजनिक वर्गण्यांवर किंवा राजाश्रयावर मोठाले यज्ञ करणारा वर्ग तयार झाला आणि त्यामुळें त्रयी हें वाङ्मय तयार झालें आणि ऋत्विजांमध्यें विशिष्टीकरण होऊन अनेक वेदांचे ब्राह्मण ग्रंथ तयार झाले. हे बरेच पांडित्ययुक्त होते असें दिसतें. अगोदरच्या आर्यन् राष्ट्रांमधील क्रिया नाहींशा झाल्या तशी यांची स्थिति झाली नाहीं. यांनीं लोकांतील क्रिया नाहींशा होत आहेत असें पाहून आपल्या क्रिया पुष्कळ वाढविल्या. नवीन आलेले लोक क्रिया सोडीत होते आणि स्थानिक राष्ट्रांच्या क्रिया सुटल्याच होत्या. स्थानिक राष्ट्रांनां यज्ञसंस्थेंत सामील व्हावयाचें म्हणजे केवळ प्रेक्षकांचें काम करावयाचें. तथापि त्यांनां आपल्याकडे ओढण्यासाठीं ऋत्विजांनीं आणखी एक क्रिया केली. स्थानिक लोकांचा इतिहास क्रियांच्या प्रसंगांशीं घुसडून दिला. पुष्कळ जुन्या यज्ञांचे उल्लेख म्हणून जे ब्राह्मण ग्रंथांत दिले आहेत ते पूर्वेकडील राजे लोकांच्या पूर्वजांसंबंधीं आहेत. उदाहरणार्थ हरिश्चंद्राचा संबंध शुनःशेपाच्या आख्यानाशीं जोडून दिला.

कांहीं तरी यज्ञक्रिया आपले पूर्वज करीत होते ही भावना देश्य आर्यन् राष्ट्रांस असावीच आणि अथर्व्यांचे देश्य वंशज क्रियाहीन झाले ही गोष्टहि त्यांस अवगत असावी आणि त्यामुळें आपल्याच वाडवडिलांचा धर्म सांगणारे हे अध्वर्युप्रधान ऋत्विज होत अशी जाणीवहि देश्य आर्यन् लोकांत उत्पन्न करून

देण्यास मंत्रसंस्कृतीच्या ब्राह्मणांस अडचण पडली नसावी असें दिसतें.

धर्म या शब्दाचा अर्थ ऋग्वेदांत भिन्न आहे आणि महाभारतांत भिन्न आहे. धर्म याचा ऋग्वेदांत अर्थ क्रिया अगर कर्म असा आहे, तर महाभारतांत संरक्षणविषयक ज्ञान असा आहे. अशा अर्थभिन्नतेचें कारण एक तर मंत्रकालीनच अर्थभिन्नता असावी अगर मांत्रसंस्कृतीच्या अगोदरच्या संस्कृतींत धर्म शब्दाचा अर्थ भिन्न असावा.

सूतवाङ्मय ब्राह्मणांनीं यज्ञसंस्थेचें महत्त्व कमी होऊन इतिहासपुराणें यांचें महत्त्व स्थापन झाल्यानंतर हातीं घेतलें असावें. ब्राह्मणांच्या हातांत तें आलें तेव्हां त्यावर परिणाम हा झाला कीं ऋषींची महती या वाङ्मयांत शिरली.

पुराणोक्त दैवतें वैदिक दैवतांचें उत्तरकालीन पर्यवसान खास नाहींत. शिव आणि विष्णु यांस जें अग्रस्थान दिसतें, तें दुसरी एखादी उपसंस्कृति अगर राष्ट्र प्रधान झालें असें दर्शवितें. वैदिक वाङ्मयाचें पौराणिक वाङ्मय जर पर्यवसान असतें तर इंद्र पौराणिक वाङ्मयांत खालच्या प्रतीचा एक देव म्हणून शिल्लक न रहातां त्याचें विष्णुस्वरूपांत अगर शिवस्वरूपांत पर्यवसान होतें, तसें झालें मात्र नाहीं. यजुःकालीन प्रजापतीस देखील हलक्या प्रकारचें स्थान मिळालें. यज्ञसंस्थेचें आवरण ज्याप्रमाणें स्थानिक धर्मावर टाकलें गेलें त्याप्रमाणें स्थानिक धर्म, इतिहास व पुराणें हीं यज्ञसंस्थेंत शिरलीं हें दाखविणारे उतारे अनेक आहेत. त्यांतील कांहीं येथें देतों.

अश्वमेध यज्ञांत होत्यानें यजमानास दहा दिवस प्रत्यहीं निरनिराळें आख्यान सांगावयाचें असतें. आणि ते दहा दिवस झाले म्हणजे तेंच पूर्वीचें प्रतिदिवशीं सांगितलेलें आख्यान पूर्ववत् पुन्हां दहा दिवस सांगावयाचें याप्रमाणें वर्षभर कार्यक्रम चालू ठेवावयाचा. याला 'पारिप्लवाख्यान' असें नांव आहे.

(१) प्रथम दिवशीं मनुवैवस्वत राजा व मनुष्य ही त्याची प्रजा, ती ही मानुषप्रजा येथें आहे, असें म्हणून होत्यानें मनुष्यांच्याकडे बोट दाखवावयाचें. या दिवशीं ऋग्वेद हा वेद आहे तो हा, असें म्हणून ऋग्वेदांतील एक सूक्त पठण करावें.

(२) दुसऱ्या दिवशीं यम वैवस्वत हा राजा व पितर ही त्याची प्रजा. ते हे पितर येथें आहेत, असें म्हणून वृद्धांचा निर्देश करावयाचा. आजचा वेद यजुर्वेद असून तो हा, असें म्हणून यजुर्वेदांतील अनुवाक पठण करणें.

(३) तिसऱ्या दिवशीं वरुण आदित्य हा राजा व गंधर्व ही त्याची प्रजा, ती ही प्रजा येथें आहे, असें म्हणून तरुणांच्याकडे बोट दाखविणें. आजचा वेद आथर्वण आहे व तो हा असें म्हणून अथर्व वेदांतील ओषधिप्रतिपादक मंत्र पठण करावा.

(४) चवथ्या दिवशीं सोमवैष्णव राजा व अप्सरस् ही त्याची प्रजा, व ती येथें आहे म्हणून सुंदर स्त्रियांचा निर्देश करणें. आजचा वेद आंगिरस वेद आहे व तो हा, असें म्हणून अभिचारप्रतिपादक मंत्र पठण करावे.

(५) पांचव्या दिवशीं अर्बुदकाद्रवेय राजा व सर्प ही त्याची प्रजा; आणि ती ही येथें आहे, म्हणून सर्पविद्या जाणणाऱ्यांचा निर्देश करणें, आजचा विषविद्या वेद आहे, असें म्हणून विषविद्येंतील मंत्र पठण करावे.

(६) सहाव्या दिवशीं कुबेर वैश्रवण राजा व राक्षस ही त्याची प्रजा; आणि ती ही येथें आहे म्हणून पापाचरण करणाऱ्यांचा निर्देश करावा. आजचा पिशाचवेद आहे व तो हा, असें म्हणून पिशाचसंबंधीं मंत्र पठण करावे.

(७) सातव्या दिवशीं असुरधान्वन् राजा व असुर ही त्याची प्रजा, आणि ती ही येथें आहे म्हणून वार्धुषिक अथवा व्याजखोर लोकांचा निर्देश करावा. आजचा असुरविद्या वेद व तो हा असें म्हणून असुरमाया प्रकार करून दाखविणें.

(८) आठव्या दिवशीं मत्स्य सांमद राजा व जलचर त्याची प्रजा व ती ही आहे, असें म्हणून कोळ्यांचा (जातीचा) निर्देश करावा. आजचा पुराणविद्या हा वेद व तो हा, असें म्हणून पुराण पठण करावें.

(९) नवव्या दिवशीं तार्क्ष्य वैपश्चित् राजा व पक्षी ही त्याची प्रजा, आणि ती ही येथें आहे म्हणून पक्षी आणि नैष्ठिक ब्रह्मचारी यांचा निर्देश करावा. आजचा वेद इतिहास व तो हा, असें म्हणून इतिहासपठण करावें.

(१०) दहाव्या दिवशीं धर्म इंद्र राजा व देव ही त्याची प्रजा आणि ती येथें आहे म्हणून प्रतिग्रह न करणाऱ्या विद्वान् व तरुण ब्राह्मणांचा निर्देश करावा. आजचा सामवेद व तो हा असें म्हणून सामगायन करावें.

वरीलप्रमाणेंच आणखी शांखायन श्रौतसूत्र अध्याय १६ खंड २ व शतपथ ब्राह्मण १३. ३. १, १ येथें हि उल्लेख आढळतो.

मैत्रायणीय संहितेंत उत्तरकालीन महादेव, गणपति इत्यादि देवतांचा उल्लेख पुढें दिलेल्याप्रमाणें आढळतो.

(१) देवानांच ऋषीणांचासुराणांच पूर्वजं ।
महादेवं सहस्राक्षं शिवमावाहयाम्यहं ॥

(२) तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि ।
तन्नो रुद्रः प्रचोदयात्

(३) तत् गांगौच्याय विद्महे गिरिसुताय धीमहि ।
तन्नो गौरी प्रचोदयात् ।

(४) तत् कुमाराय विद्महे कार्तिकेयाय धीमहि ।
तन्नः स्कंदः प्रचोदयात् ।

(५) तत् कराटाय विद्महे हस्तिमुखाय धीमहि ।
तन्नो दंती प्रचोदयात् ।

(६) तत् चतुर्मुखाय विद्महे पद्मासनाय धीमहि ।
तन्नो ब्रह्मा प्रचोदयात् ।

(७) तत् केशवाय विद्महे नारायणाय धीमहि ।
तन्नो विष्णुः प्रचोदयात् ।
(८) तत् भास्कराय विद्महे प्रभाकराय धीमहि ।
तन्नो भानुः प्रचोदयात् ।
(९) तत् सोमराजाय विद्महे महाराजाय धीमहि ।
तन्नश्चंद्रः प्रचोदयात् ।
(१०) तत् ज्वलनाय विद्महे वैश्वानराय धीमहि ।
तन्नो वन्हिः प्रचोदयात् ।
(११) तत्यजपाय विद्महे महाजपाय धीमहि ।
तन्नो ध्यानः प्रचोदयात् ।
(१२) तत् परमात्माय विद्महे वैनतेयाय धीमहि ।
तन्नः सृष्टीः प्रचोदयात् ।
(मै. सं. २. ९, १.)

अशाच प्रकारचे आणखी उल्लेख तैत्तिरीय आरण्यक प्रपाठक १० अनुवाक १ व परिशिष्ट अनुवाक १ मध्यें आहेत.

मागें झालेल्या विवेचनाचें आतां सिंहावलोकन करूं.

आर्यन् आणि आर्य या कल्पना भिन्न आहेत. आर्य हा शब्द वंशवाचक नाहीं. हा दोन अर्थांनीं वापरला आहे; एक अर्थ सद्वर्ग आणि दुसरा अर्थ यजनशील.

'दस्यु' ही शिवी जुनी आहे. कां कीं, अवेस्तांत ती रूपांतरानें सांपडते. कांहीं दस्यू चपट्या नाकाचे असतील* पण चपट्या नाकाच्या लोकांस दस्यू म्हणत असत असें मात्र नाहीं. 'चपट्या नाकाचा' हें वर्णन द्राविडांनां तर लागू पडतच नाहीं. कारण द्राविडांमध्यें चपट्या नाकाचे लोक कमी. ते बंगालकडे म्हणजे मंगोलियन वंशांतले असणार. तेव्हां, ज्या काळ्या द्राविडी लोकांनां गोऱ्या आर्यन् लोकांनीं जिंकलें त्यांस ते प्रथम दस्यू व मग पुढें दास म्हणत ही कल्पना निराधार आहे.

आर्य आणि दास असें शत्रुसमुदायाचें वर्णन स्तोता पुष्कळदां करतांना आढळतो, म्हणजे दोन लढणाऱ्या पक्षांपैकीं एक आपल्या विरुद्ध असलेल्या पक्षांत स्वतंत्र आणि त्यांचे अंकित असलेले असे दोन प्रकारचे लोक आहेत ही जाणीव दाखवितो.

आर्यन् लोकांची व्याप्ति फार व चोहोंकडे होती, ती होतांना एका मोठ्या आर्यन् सम्राटानें येऊन सर्व हिंदुस्थान काबीज केला, आणि जमीन जिंकून ती आर्यन् लोकांस दिली आणि त्या लोकांची शिस्तवार वसाहत चोहोंकडे करविली अशी धाडशी व खोटी कल्पना केल्याखेरीज एका बाजूनें आर्यन् आणि दुसऱ्या बाजूनें देशांतील काळे लोक लढत होते आणि देश्यांस गोऱ्यांनीं जिंकलें असें इतिहासाचें स्पष्टीकरण ग्राह्य होणार नाहीं. जर क्रमाक्रमानें आर्यन् लोकांचीं आगमनें होत असतील तर नवीन येणारांची प्रथम जुन्या आर्यन् लोकांशींच गांठ पडणार. या तऱ्हेनेंच क्रिया झाली असून त्या क्रियेचा एक उत्तरकालीन अंश वेदोल्लिखित दाशराज्ञ युद्ध होय, आणि बहुतेक मंत्ररचना त्यानंतरची होय.

**ऋग्वेदमंत्र व दाशराज्ञ युद्ध यांचा संबंध. आर्यन् आणि नॉनआर्यन् यांमध्यें हें युद्ध नव्हतें.**—ऋग्वेदांत ज्या लढाया दिसत आहेत त्यांपैकीं बहुतेक दाशराज्ञ युद्ध या युद्धांतर्गत किंवा त्यांशीं संबद्ध दिसतात. हें युद्ध आर्य आणि अनार्य यांत खास नव्हतें.

यदुतुर्वश यांचे व पैजवनांचे आचारधर्म सारखे दिसतात. खुद्द ऋग्मंत्रांत आलेलीं राष्ट्रें पाहिलीं असतां आपणांस बहुतेक पंजाबांतीलच राष्ट्रें दिसतात. आणि धर्मभिन्नत्वाचे प्रकार फारच थोडे दिसतात. जे कांहीं दिसतात ते येणेंप्रमाणें:

(१) यजनशील व अयजनशील.

(२) वक्तव्यानें निंदा केलेले उपासनासंप्रदाय (शिश्नदेवांसारखे).

(३) मगंद.

(४) अग्न्युपासकांचेच आचारभिन्नत्वामुळें नवग्व दशग्वां सारखे किंवा निरनिराळ्या गोत्रांसारखे संप्रदाय.

यापलीकडे आपणांस धर्मभिन्नत्वाचा प्रकार दिसत नाहीं; आणि दाशराज्ञयुद्ध हें तर केवळ यजनशील व अयजनशील यांच्या मधलें मुळींच नाहीं.

ऋग्वेदसंहितेमध्यें जीं सूक्तें घातलीं आहेत त्या सूक्तांच्या पौर्वापर्यकालासंबंधानें आतां थोडासा विचार करूं. आणि दाशराज्ञ युद्धाशीं ऋग्वेद वाङ्मयाचा संबंध कितपत पोंचतो हें पाहूं.

यांत आपणांस जी एक गोष्ट पहावयाची ती ही कीं, ऋग्वेदांतील बहुतेक भाग एका विशिष्ट कालाचें वाङ्मय आहे, कीं अनेक कालांचें वाङ्मय आहे.

असें दिसतें कीं, ऋग्वेद संहितेंतील बहुतेक व्यक्तिविषयक ऐतिहासिक उल्लेख एकच काल दर्शवितात, तथापि सर्वच सूक्तें ऐतिहासिक उल्लेखांनीं भरलीं नाहींत. कित्येक सूक्तें केवळ स्तावक आणि याचक आहेत. कित्येक देववर्णनात्मक असून त्यांचे पराक्रम गात आहेत. जे मनुष्यांचे उल्लेख मंत्रांत सांपडतात ते दाशराज्ञ युद्धाशीं बहुतेक जोडून घेतां येतात.

**मंत्रांतर्गत पूर्वापरता.**—ऋग्वेदांत संहितेचे घटक येणेंप्रमाणें:

(१) दाशराज्ञ युद्धाशीं संबंध असलेल्या व्यक्तींचा व त्या व्यक्तींशीं संबंध असलेल्या इतर व्यक्तींचा उल्लेख करणारीं सूक्तें.

---

* अनास याचा अर्थ चपट्या नाकाचा असा न करतां अनुनासिकयुक्त उच्चार न करणारा असाहि संभवतो. हिंदुस्थानांत बऱ्याच शब्दांचा उच्चार कांहीं जाती सानुनासिक करतात, तर कांहीं निरनुनासिक करतात. या दृष्टीनें भारतीय भाषाशास्त्राचें व मानववंशशास्त्राचें संकलित अध्ययन व्हावयास पाहिजे.

हीं सूक्तें सर्व गोत्रमंडळांत आहेत; आणि पहिल्या व दहाव्या मंडळांत देखील आहेत. हीं गोत्रमंडळें दाशराज्ञ युद्धाबरोबर प्रवेश झालेल्या लोकांचें व त्या काळच्या पुरोहितांचें जुनें वाङ्मय होय. ते पुरोहित भारतीयांचे किंवा पंजाबांतील जुन्या राष्ट्रांचे असावेत.

(२) आठवें आणि नववें या मंडळांत सामवेदांत येणाऱ्या बहुतेक ऋचा आहेत. ज्या वेळेस औद्गात्राचा समावेश यज्ञांत झाला त्या वेळेस होत्यांनीं आपल्याबरोबर सामकांस घेतलें. त्यामुळें हें वाङ्मय दोन वेदांत शिरलें.

म्हणजे गोत्रवाङ्मय सोमयागप्रयोजनप्रसंगीं गोत्रांबाहेरील सर्व सामान्य ऋचांशीं संयुक्त होऊन संहितास्वरूप पावलें. तें संयुक्त होण्याचें कारण तें सर्वसामान्य वाङ्मय असून उद्गात्यांनीं त्यास महत्त्व दिलें हें असावें.

पहिल्या व दहाव्या मंडळांतील बहुतेक ऋचा अर्वाचीन आहेत; पण त्यांत प्राचीन कथाभाग कांहीं अंशीं आला आहे. पहिल्या भागांतहि कांहीं सूक्तें दाशराज्ञ युद्धाची आठवण देणारीं आहेत. आणि दहावें मंडळ अथर्व्यांशीं समेट ज्या काळांत झाला आणि अथर्वण विद्येचा समावेश ज्या काळांत ऋग्वेद्यांनीं करून घेतला त्या काळाचें आहे.

म्हणजे ऋग्वेदांतील गोत्रमंडळांचा प्रतिपाद्य विषय दाशराज्ञ युद्ध होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ऋग्वेदांत दाशराज्ञ युद्धाचे धागे कसे काय पसरले आहेत हें समजण्यासाठीं ऋग्वेदोक्त व्यक्तींचा दाशराज्ञ युद्धाशीं संबंध देतों.

**दाशराज्ञ युद्धांतील उल्लेखांचा अन्योन्याश्रय.**— ऋग्वेदांत अनेक व्यक्तींचीं व कुलांचीं नांवें येत आहेत; त्यांपैकीं सुदास, त्याचे मित्र व शत्रू यांशीं दुसऱ्या अनेक नांवांचा संबंध येतो. अशा संबद्ध व्यक्तींचा आतां हिशेब घेऊं.

युद्धांत पडलेल्या व्यक्ती अगर राष्ट्रें म्हटलीं म्हणजे (१) शिम्यु, (२) तुर्वश, (३) द्रुह्यु, (४) पुरु, (५) अनु, (६) यदु, (७) मत्स्य, (८) पक्थ, (९) भलानस, (१०) अलिन, (११) विषाणिन्, (१२) अज, (१३) शिव, (१४) शिग्रु, (१५) यक्षु, (१६) भरत–तृत्सु, (१७) पृथु, (१८) पर्शु, (१९) दोन वैकर्ण, (२०) गुंगु (२१) भेद इत्यादि होत. या राष्ट्रांचा संबंध त्यांच्या पुरोहितांशीं येतो, पुरोहितांचा संबंध त्यांच्या कुलांशीं येतो, आणि पुरोहितकुलांचा संबंध त्यांच्या इतर यजमानांशीं येतो. निरनिराळ्या व्यक्तींचे आणि राष्ट्रांचे संबंध कसे काय पसरले आहेत तें पुढें दाखविलें आहे.†

(१) **शिम्यु**.— नहुष (शिम्यूशीं संबंध); नहुषसंबंध– नाहुष, मशर्शार (नहुषांचा राजा) व नहुष्य ययाति. कांहीं ऋचांवरून 'मनोः' पुत्री 'इळा' आणि 'नहुष' यांचा संबंध व्यक्त होतो.

† जेथें संबंध किंवा अनिश्चित संबंध असें म्हटलें आहे तेथें सहोच्चारित किंवा मदतगार असा अर्थ समजावा.

(२) **तुर्वशः**—वृचीवंत–वरशिख–पार्थव (तुर्वशांचा आणि या तिघांचा अतिनिकट संबंध आहे. कदाचित् तुर्वश आणि हे एकच असतील.), यांचा जेता अभ्यावर्तिन् चायमान. वर्चिन् (वृचीवंताशीं संबंध), दभिति, बृहद्रथ, नर्य, एतश (तुर्वशसहोल्लिखित); दभितिसंबंधः—चुमुरि–धुनि (दभितीकरितां इंद्रानें मारलेले दोन राक्षस); अर्ण, चित्ररथ (यांचा तुर्वशानें वध केला असें कांहींचें म्हणणें आहे), क्रिवि (ही जात तुर्वशांच्या मिश्रणानें झाली) व उग्रदेव (तुर्वशसम बलवान्).

(३) **द्रुह्युः**— भृगु (द्रुह्यूंचे उपाध्याय), इट (भृगुपुत्र), गृत्समद, भृगवाण (भृगुवंशज); गृत्समदसंबंधः—शुनहोत्र (गृत्समदवंशज), नार्मर (गृत्समदोल्लिखित), च्यवन (भृगु-आङ्गिरस), च्यवतान मारुताश्व (च्यवनाशीं संबंध), जुजुराष (च्यवनसंबंधी— शन्तनूच्या कथेशीं साम्य), शर्यात (भृगु आङ्गिरस), शार्यात (शर्यातवंशज), पुरुहन्मन्, बृहद्दिव व नाभाक (आङ्गिरस).

(४) **कवष**–कुरुङ्ग (कवषाशीं संबंध).

(५) **पुरु**—पुरुकुत्स (पुरूंचा राजा), पुरुकुत्सानी (पुरुकुत्साची बायको), दुर्गह (पुरुकुत्साचा बाप), इक्ष्वाकु (पुरुकुत्साचें कुल), त्रसदस्यु (पुरुकुत्सपुत्र), हिरणिन् किंवा हिरणि (पुरुकुत्सपुत्र), पौरुकुत्स-पौरुकुत्स्य-पौरुकुत्सी (त्रसदस्यूचीं पैतृक नांवें), गैरिक्षित (त्रसदस्यूचें पैतृक नांव), कुरुश्रवण त्रासदस्यव (त्रसदस्युपुत्र), मित्रातिथि (कुरुश्रवणपितृवर्गांतील), तृक्षि त्रासदस्यव (त्रसदस्युवंशज), उपमश्रवस् (कुरुश्रवणत्रासदस्यवपुत्र), त्र्यरुण-त्रैवृष्ण-त्रसदस्यु (पर्यायनामें), वृष (त्र्यरुणाचा उपाध्याय), अश्वमेध (त्र्यरुण–त्रैवृष्ण–त्रसदस्यूशीं अनिश्चित संबंध), आश्वमेध, पूतक्रतु (अश्वमेधाशीं अनिश्चितसंबंध), रथवीति दार्भ्य, पुरूरवस्, पुरुमीळ्ह (पुरुवंशज), वैददश्वि (पुरुमीळ्हाचें पैतृक नांव), तरंत (पुरुमीळ्हबंधु), दार्भ्य (पुरुमीळ्हाशीं संबंध असलेल्या अत्रीच्या नातवाला मुलगी देणारा).

कुरु–(कुरुश्रवण हा नांवावरून कुरुवंशांतील असावा), कौरव, देवापि आर्ष्टिषेण, शंतनु, कृत्वन्, ऋष्टिषेण, औलान, कैव्य (कुरुवंशज), ओगण (देवापि शन्तनु सहोच्चारित), आर्ष्टिषेण, शांड (पुरुवंशज), पुरुमित्र (पुरुवंशज किंवा पुरूंचा मित्र), कमद्यु (बहुतेक पुरुमित्राची मुलगी), शुन्ध्यु (कमद्यूचें दुसरें नांव), विमद (कमद्यूचा नवरा), ध्वन्य (त्रसदस्युसहोच्चारित), पृश्निगु, शुचंति (पुरुकुत्ससहोच्चारित).

(६) **अनु**—आनव (अनुवंशज), पाकस्थामन् कौरयायण (अनुवंशज), कौरयाण (अनुवंशज).

(७) **भेद**—सुदासशत्रु. याच्याशीं संबंध असलेल्या दुसऱ्या कोणी व्यक्ती आढळून येत नाहींत.

(८) **शंबर**—कौलितर (शंबराचें पैतृक नांव), वंगृद (शंबरसहोच्चारित).

(९) **वैकर्ण** (१०) **वैकर्ण.**—यांच्या संबंधानें फारशी माहिती मिळत नाहीं.

(११) **यदु.**—प्रथिन्, तिरिंदर, आसंगप्लायोगी, परमज्या (यदुवंशज), तिरिंदर संबंधः– पर्शु (तिरिंदर आणि पर्शु एकच, मनूशींहि कदाचित् संबंध असेल).

(१२) **मत्स्य.**—इतर फारशी माहिती मिळत नाहीं.

(१३) **पक्थ.**—बभ्रु (सहोच्चारित), नमुचि (सहोच्चारित), बभ्रूसंबंध–ऋणंचय (बभ्रूचा यजमान).

**(१४) भलानस्, (१५) अलिन, (१६) विषाणिन्, (१७) अज, (१८) शिव, (१९) शिग्रु, (२०) यक्षु.**—हे सर्व सुदासशत्रू. यांचा संबंध दाशराज्ञ युद्धांतील व्यक्तींशिवाय इतर कोणाशीं फारसा दिसून येत नाहीं.

**सुदास.**– वसिष्ठ, विश्वामित्र (सुदासाचे उपाध्याय), वसिष्ठसंबंधः–अगस्ति, अगस्त्य (वसिष्ठ बंधु), शतयातु (कदाचित् वसिष्ठपुत्र) जरूथ, शिश्नदेव, पराशर, वामदेव (वसिष्ठाशीं संबंध), अगस्त्य संबंध.— मान (अगस्त्याचा पिता), मान्य (मानपुत्र), मान्दार्य मान्य (कदाचित् मानवंशज), खेल (अगस्त्याचा यजमान), विश्पला (खेलाची बायको), तृणस्कंद (अगस्त्याशीं अनिश्चित संबंधी); वामदेव संबंध–बृहदुक्थ, आजमीळ्ह (वामदेव पुत्र).

विश्वामित्र संबंधः— जान्हव (विश्वामित्राचें पैतृकनांव), गाथिन् (विश्वामित्राचा बाप), कुशिक (विश्वामित्राचा कुलपुरुष); मधुछंदस्, शुनःशेप, गाथिन (विश्वामित्रपुत्र); शुनःशेप संबंध.— अयास्य आंगिरस् (शुनःशेपाच्या वधविषयक यज्ञांत उद्गात्याचें काम करणारा); जमदग्नि (विश्वामित्राचा मित्र), गयःप्लात (जमदग्नीशीं अनिश्चित संबंध), मगंद (विश्वामित्रोल्लिखित).

कण्व–यदुतुर्वशांचे पुरोहित. अंगिरस् (कण्वाचा आजा). कण्वसंबंध.— काण्व, प्रस्कण्व, प्रगाथ, पर्वत, नृषद् संबंध– नार्षद (नृषदपुत्र), दशशिप्र, उपस्तुत, वृष्टिहव्य (उपस्तुतचापिता), वृषन् (उपस्तुत सहोच्चारित), मेधातिथि, विभिंदु, सोभरि, सुदेव, संवर्त, श्रुतकक्ष, शिंजार, शरभ, प्रियमेध, नीपातिथि, वैयश्व, पृषध्र, श्रुष्टिगु, तिरश्ची, कौरयाण, दस्यवेवृक, नार्य, पार्षद्वाण, मातरिश्वन्, शर शौरदेव्य, श्रुतर्वन् आर्क्ष, नृमेधस् शकपूत (नृमेधपुत्र), शीस्त, गोशर्य, तुग्र, दशव्रज, अंशु, स्यूमरश्मि, सुविंद, एकद्यु, विश्वमनस्, पृदाकुसानु, काण्वायन, नभाक, त्रिशोक (हे सर्व कण्वकुलोत्पन्न असावेत); निंदिताश्व (कण्वांचा आश्रयदाता).

अंगिरस् संबंधः–गोतम, दध्यञ्च्, अथर्वण, व्यश्व, विरूप, कृष्ण, हिरण्यस्तूप, अर्चत् (हिरण्यस्तूपपुत्र), सप्तगु (हे आंगिरस असावेत); व्यश्व संबंध–सुषामन्, वसुरोचिष्, हरयाण (व्यश्वाला दानें देणारे); वत्स (कण्वपुत्र), सप्तवध्रि, पूतक्रता, शृंगवृष, श्यावक, कृप (श्यावकसहोच्चारित); अध्रिगु, कलि, (हे सर्व कण्वोल्लिखित आहेत.).

पाशद्युम्नवायत, वीतहव्य वैशंत; चेदी (सुदाससमकालीन), चेदी-संबंध.–कशु; युध्यामधि, याद्व, देवक, मान्यमान, चायमान (सुदासचे शत्रू), चायमान संबंध–वरशीख (कदाचित् चायमानाचा शत्रु); तृत्सु (सुदासाशीं प्रजा नात्यानें असणाऱ्या लोकांचें घराणें); प्रतृद (तृत्सूचें दुसरें नांव); पृथु (सुदास सहायक);

सुदास वंशज–इंद्रोत (सुदासपुत्र), आतिथिग्व (इंद्रोतचें पैतृक नांव), पुरुमाय्य (कदाचित् सुदासपुत्र), ऋक्ष (इन्द्रोतसहोच्चारित).

भरत (सुदास, तृत्सु, विश्वामित्र वगैरेंचें कुल). दीर्घतमस्, मामतेय (भरतांचा उपाध्याय); कक्षीवान् (दीर्घतमस्पुत्र), पज्र (कक्षीवानाचें घराणें), ममता (दीर्घतमस्ची आई), मामतेय (दीर्घतमसूचें मातृक नांव), त्रैतन (दीर्घतमस्चा शत्रु).

कक्षीवान संबंध.—औशिज (कक्षीवानाचें मातृक नांव), वृचया (कक्षीवानाची बायको), घोषा (कक्षीवानाची मुलगी), स्वनय, भावयव्य, भाव्य (कक्षीवानाचे पुरस्कर्ते); प्रियरथ, श्रुतरथ (कक्षीवानाचे आश्रयदाते); भावयव्य संबंध.— रोमशा (भावयव्याची बायको); औशिज संबंध.— ऋजिश्वन् (औशिज), वैदथिन् (ऋजिश्वनूचें पैतृक नांव); पिप्रु (ऋजिश्वन्‌करितां पराभव केलेला); आयवस (याच्या तीन मुलांनीं कक्षीवानास पीडा केली); मशर्शार (याच्या तीन मुलांनीं कक्षीवानास पीडा केली); वृषणश्व (कक्षीवानसहोल्लिखित); वृषणश्व संबंध.– मेना (वृषणश्वदुहिता); वाय्य, शर, आर्चत्क, दीर्घश्रवस्, भुज्यु, तौग्र्य, रथप्रोष्ठ, पृथुश्रवस्, कानीत, वश, तरुक्ष, विष्णापु, (कक्षीवानोल्लिखित), विष्णापु संबंध.–विश्वक (विष्णापूचा मुलगा), वध्रिमती, पुरंधि, हिरण्यहस्तश्याव, द्योतन, शयु, पेदु, (कक्षीवानोल्लिखित); गन्धारि (कक्षीवानाशीं अनिश्चितसंबंध); तकवान, (कक्षीवानवंशज), अत्रि (कक्षीवान्, कण्व, आणि गोतम यांच्याशीं अनिश्चितसंबंध); (पुरूंचे पुरोहित). अत्रि संबंध–अर्चनानस (आत्रिपुत्र), पुरुवसु, पुरुहू, गोपवन, सप्रि, मायिन्, विश्ववार, सुनीथ, सत्यश्रवस्, शौचद्रथ, आग्निवेशि शत्रि, सदापृण, सत्यश्रवस् वाय्य, गविष्ठिर, आत्रेय, यजत, अवत्सार, मनस्, क्षत्र (अत्रिवंशज).

भरतसंबंध.–देवश्रवस्, देवव्रत्, जह्नु (भरतकुलोत्पन्न).

दिवोदास अतिथिग्व (सुदासपिता, कांहीं लोकांच्या मतानें (सुदासपूर्वज). भरद्वाज (दिवोदासपुरोहित); पायु, राजि, सुमिळ्ह, साप्य, पेरुक, पुरुणीथशातवनेय (भरद्वाजकुलोत्पन्न), पारावत, बृबु, बृसय, प्रतर्दन (भरद्वाजाशीं अनिश्चितसंबंध); तुजि, तर्य, पुरय, श्रुतवित्, राम, दशद्यु, वेन, मायव (भरद्वाजोल्लिखित), वेनसंबंध– पार्थ्य, आप्नवुम (वेनाशीं अनिश्चितसंबंध); भरद्वाजसंबंध–पुरुपंथा (भरद्वाजाचा आश्रयदाता).

दिवोदाससंबंध.–प्रस्तोक, सार्जय ( दिवोदासाचीं दुसरीं नांवें ); सृंजय ( दिवोदासाशीं निकट संबंध ); श्वैक्न ( सृंजयाशीं संबंध ). गुंगु ( अतिथिग्वमित्र ). तूर्वयाण ( अतिथिग्वशत्रु ). आयु, कुत्स, श्वैत्रेय ( कुत्सपुत्र ). उशनस् काव्य, आर्जुनेय, श्रुतर्य ( अतिथिग्व-सहोचारित ).

वध्र्यश्व, देवव्रत, पिजवन ( सुदासाचे पूर्वज ); पैजवन, दैवद्यात, दैवोदासि ( सुदासाचीं पैतृकनांवें ); सहदेव ( सुदासाचा साहाय्यक ).

सहदेवसंबंध.– भयमान, ऋज्राश्व, अम्बरीष ( सहदेव बंधु ); अम्बरीषसंबंध.– सुराधस्, ( अम्बरीषसहोचारित ); सोमक साहदेव्य ( सहदेवपुत्र ); नारद ( सहदेवगुरु ); वध्र्यश्वसंबंध.– सुमित्र, वाध्र्यश्व.

वर उल्लेख केलेल्या व्यक्तींपैकीं सुदासाशीं समकालीन व्यक्ती कोणत्या आणि सुदासानंतरच्या व्यक्ती कोणत्या हें समजणें शक्य आहे.

दाशराज्ञ युद्धांत कोणत्या व्यक्तींचा संबंध आला याचें ज्ञान उपयोगाचें आहे. त्या व्यक्तींशीं आणखी कोणाचा संबंध आला हें कळलें म्हणजे दाशराज्ञ युद्धाशीं समकालीन अशा व्यक्तींची यादी मिळेल.

जीं सूक्तें या व्यक्तींचा निर्देश करीत असतील तीं युद्धाशीं फार तर समकालीन, पण बहुतकरून युद्धोत्तरकालीन होत. या दृष्टीनें युद्धोत्तर वाङ्मय आपणांस काढतां येतें.

पुढील कोष्टकावरून असें कळून येईल कीं, बहुतेक ऋग्वेद दाशराज्ञ युद्धानंतरचा होय असें सिद्ध करतां येतें.

पुराणांतील राजांच्या पिढ्यांची यादी तपासली असतां, आपणांस असें दिसेल कीं, सुदास हा भारती युद्धाच्या कित्येक पिढ्या अगोदर आणि दाशरथी रामाच्या नंतर झाला होता. म्हणजे वैदिक वाङ्मय अधिकत्व श्रीरामचंद्रानंतरचें होय.

**सूक्तांची युद्धोत्तरता आणि ती जाणण्यासाठीं उपयोगीं पडणाऱ्या व्यक्ती.**–ऋग्वेदमंत्रांचा दाशराज्ञ युद्धाशीं संबंध जाणण्यासाठीं ज्या ज्या व्यक्तींच्या उल्लेखांच्या साहाय्यानें तो संबंध आपण तपासणार त्या व्यक्तींकडे लक्ष दिलें पाहिजे. व्यक्तींचा दाशराज्ञ युद्धाशीं संबंध दिसून आला म्हणजे त्या व्यक्तींचा, ज्या सूक्तांत त्यांचा उल्लेख आला आहे त्या सूक्तांचें दाशराज्ञ युद्धाशीं पूर्वापरत्व काढण्याच्या कामीं उपयोग होईल. ह्या व्यक्ती, त्यांची दाशराज्ञ युद्धाशीं पूर्वोत्तरता, आणि त्यावरून सूक्तांच्या पूर्वोत्तरतेवर पडणारा प्रकाश येणेंप्रमाणें आहे.

अंशुः—( ८. ५, २६ ). तुग्र, प्रियमेध, उपस्तुत, शिंजार यांच्यासह उल्लेख. काल अनिश्चित तथापि अंशूचा उल्लेख सूक्तकाल निश्चयास अनवद्य. तुग्राच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तरकालीन. तुग्र पहा.

अक्षः—( ८. ४६, २७ ). सायणमताप्रमाणें व्यक्ति. नहुषसमकालीन. पृथुश्रवस् याच्या दानस्तुतींत उल्लेख. नहुषसमकालीन असल्यामुळें सुदासोत्तर. अक्षाबरोबर अरट्वाचा उल्लेख आहे.

अगस्त्यः—( ७. ३३, १० ). वसिष्ठ आणि अगस्त्य मित्रावरुणाचे मुलगे. वसिष्ठाचा सुदासाशीं पौरोहित्यसंबंध. तेव्हां अगस्त्याचा उल्लेख असलेलीं ( १. ११७; १७०; १७९; १८०; १८४; ७. ३३; ८. ५; १०. ६० ). सूक्तें उत्तरकालीनच.

अग्रुः—( ४. ३०, १६ ). कुमारीपुत्र. सूक्तांत यदुतुर्वशांचा उल्लेख असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन. व्यक्तींचा प्रत्यक्ष संबंध नाहीं.

अघाश्वः—( १. ११६, ६ ). हा पैद्व होता. पेदुसंबंध पहा. दिवोदासाच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तरकालीन.

अजासः—( ७. १८, १९ ). सुदासशत्रू. दाशराज्ञ युद्धांत शरण आल्यावर यांनीं इंद्राला अश्वशिरांचा बलि अर्पण केला. सूक्त उत्तरकालीन.

अतिथिग्वः—दिवोदासाचें नांव. याचा उल्लेख असलेलीं ( १. ५१; ५३; ११२; १२३; २. १४; ४. २६; ६. १८; २६; ४७; ७. १९; ८. ५३; १०. ४८ ) सूक्तें उत्तर.

अत्कः—( १०. ४९, ५ ). अत्क व कुत्स यांचें इंद्रानें रक्षण केलें; अत्क कुत्ससमकालीन असावा. सायण अत्क ही व्यक्ति मानीत नाहीं. कुत्सोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

अत्रिः—( ५. ८६, १ ). प्रियमेध, कण्व, गोतम, कक्षीवान यांच्यासह उल्लेख. पांचवें मंडल आत्रेय असून त्यांतील सूक्तद्रष्टे अत्रिकुलोत्पन्न आहेत. प्रत्यक्ष अत्रीच्या नांवावर असलेल्या सूक्तांत ( ५. ८६ ) तो त्रिताचा उल्लेख करतो. त्रित पहा. अत्रीचा उल्लेख असणारीं सूक्तें ( १. ४५; ११८; १३९; १८३; ५. ४१; ८. ५; १०. १४३; १५० ) उत्तरकालीन.

अध्रिगुः—( १. ११२, २ ). भुज्यूसह उल्लेख. अश्वींनीं भुज्यूचें व अध्रिगूचें रक्षण केलें. अध्रिगु भुज्युसमकालीन असावा. भुज्यु पहा. अध्रिगूचा आणखीं उल्लेख दशग्वासह ( ८. १२, २ ) या सूक्तांत आहे.

अनुः—( ७. १८, १४ ). सुदासशत्रु. इंद्रानें सुदासाकरितां अनु, द्रुह्यु यांचा वध केला. अनूचा आणखी उल्लेख असलेलें सूक्त ( ८. १० ) उत्तर.

अपालाः–( ८. ९१, ७ ). अनुक्रमणीप्रमाणें अत्रिकन्या. अत्रि पहा.

अप्रवानः–( ८. १०२, ४ ), और्व भृगूसह उल्लेख. सूक्तद्रष्टा प्रयोग म्हणतो, ' और्वभृगु, अप्नवान याप्रमाणें मी अग्नीला बोलावतों. ' अप्नवान भृगुसमकालीन असावा. भृगु पहा. अप्नवान याचा आणखी उल्लेख ( ४. ७, १ ) या ठिकाणीं आहे.

अभ्यावर्ती चायमानः— ( ६. २७, ८ ). पृथूंचा राजा. याला पार्थव म्हटलें आहे. पृथु हे सुदाससहकारी होते. अभ्यावर्ती चायमान दाशराज्ञ युद्धांत मारला गेला ( ७, १८, ८ ).

अंबरीषः--( १. १००, १७ ). वृषागिरपुत्र. ऋज्राश्व, सहदेव, भयमान व सुराधस् हे वृषागिरपुत्र होते. ऋज्राश्व व वार्षागिर पहा.

अयास्यः--( १०. १३८, ४ ). कुत्स, ऋजिश्वन् यांचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख. अयास्याचा आणखी उल्लेख ( १. ६२; ८. ६२; ९. ४४; १०. ६७; १०. ८ ). या सूक्तांत आहे. परंतु तो व्यक्तिवाचक नाहीं. याचा उल्लेख जुन्या मंडळांतून येत नसल्यामुळें हा फारच उत्तरकालीन असावा.

अरट्वः--( ८. ४६, २७ ). अक्षाबरोबर उल्लेख. अक्ष पहा.

अर्चनानसः--( ५. ६४, ७ ). अनुक्रमणीप्रमाणें अत्रिपुत्र; व रथवीति दार्भ्य याचा पुरोहित. दार्भ्य पहा.

अर्जुनः--( १. १२२, ५ ). कुत्स पिता. कुत्साला आर्जुनेय म्हटलें आहे. अर्जुनाचा उल्लेख कुत्सामार्फतच आला आहे. सूक्त उत्तरकालीन.

अर्णः--( ४. १९, ६ ). इंद्रानें तुर्वशाकरितां सरयू नदीवर अर्णाचा पराभव केला. सूक्त उत्तरकालीन.

अलिनासः--( ७. १८, ७ ). सुदासशत्रू. सूक्त सुदासोल्लेखामुळें उत्तरकालीन.

अवत्सारः--( ५. ४४, १० ). क्षत्र, मनस्, एवावद, यजत सधि, अवत्सार यांचा एकत्र उल्लेख. कदाचित् समकालीन असावे. सूक्ताचा द्रष्टा अवत्सारच असून तो ऋचा १२ मध्यें सदापृण, बाहुवृक्त, श्रुतवित्, तर्य यांचा उल्लेख करतो; व ऋचा १३ मध्यें सुतंभराला आपला यागनिर्वाहक समजतो. यावरून सुतंभरहि याचा समकालीन असावा. सुतंभरसंबंध पहा. सूक्त उत्तरकालीन.

अवस्युः--( ५. ३१, १० ). 'सर्व स्तोत्यांनीं इंद्राची स्तुति करावी' असें अवस्यु इच्छितो. या सूक्ताचा द्रष्टा अवस्यु आहे. ८ व्या ऋचेंत 'इंद्रानें यदुतुर्वशांनां तरून नेलें व कुत्साला राखिलें' असा उल्लेख करतो. अवस्यूचा आणखीं उल्लेख ( ५.७५ ) या सूक्तांत आहे. दोन्ही सूक्तें उत्तरकालीन.

अश्वथः--( ६. ४७, २४ ). पायूचा आश्रयदाता. अश्वथ प्रस्तोकाचेंच नांव. प्रस्तोक पहा. सूक्त उत्तरकालीन.

अश्वमेधः--( ५. २७, ४-५-६ ). त्र्यरुण दानस्तुतींत उल्लेख. अनुक्रमणीप्रमाणें भरतपुत्र. अश्वमेध, त्रसदस्यु, त्र्यरुण, त्रैवृष्ण, हीं एकाच व्यक्तीचीं नांवें असावीं. सूक्त उत्तरकालीन.

अभ्यः--( ८. २४, २५ ) कुत्साचें रक्षण करण्याविषयीं अभ्य इंद्रास प्रार्थितो. अनुक्रमणीप्रमाणें अभ्य, वैयश्व, विश्वमनस् हीं एकाच व्यक्तीचीं नांवें आहेत. अभ्याचा आणखी उल्लेख ( १. ११२ ) या सूक्तांत आहे. दोन्ही सूक्तें उत्तरकालीन.

असमातिः--( १०. ६०, २ ). हा इक्ष्वाकु कुलांतील असावा. याच सूक्तांत इक्ष्वाकूचा उल्लेख आहे. सूक्ताचे द्रष्टे गोपायन कुलांतील बंधु, सुबंधु, विप्रबंधु व श्रुतबंधु हे असून अनुक्रमणीप्रमाणें ते अगस्त्याचे भाचे होत. याच सूक्ताच्या ६ व्या ऋचेंत सूक्तद्रष्टा 'आम्हांस धन देण्यासाठीं तूं रथाला घोडे जोडून ये' अशी राजाची प्रार्थना करतो. अगस्त्यसंबंधामुळें सूक्त उत्तरकालीन.

अह्नवाय्यः--( ८. ४५, २७ ). यदुतुर्वशशत्रु. इंद्रानें यदुतुर्वशांकरितां अह्नवाय्यास मारिलें.

आजमीळ्हासः--( ४. ४४, ६ ) येथें उल्लेख असून अजमीळ्ह व पुरुमीळ्ह हे या सूक्ताचे द्रष्टे आहेत. पुरुमीळ्ह पुरुवंशज असावा. पुरुमीळ्ह पहा. सूक्तद्रष्टा पुरुमीळ्ह असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन.

आतिथिग्वः--अतिथिग्ववंशज याचा उल्लेख असलेलें सूक्त ( ८. ६८ ) उत्तर.

आयवसः--( १. १२२, १५ ). नहुषांचा राजा मशर्शार यांच्यासह उल्लेख. सूक्तद्रष्टा कक्षीवान म्हणतो; 'मशर्शार आणि आयवस यांचे मुलगे मला त्रास देतात.' सूक्तद्रष्टा कक्षीवान असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन.

आयुः--( १. ५३, १० ). इंद्रानें सुश्रवस नामक राजाकरितां कुत्स, अतिथिग्व, आयु, यांचा पराभव केला. आयूचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( ६. १८; ८. ५३ ) उत्तरकालीम.

आर्चत्कः--( १. ११६, २२ ). याचें नांव शर. अश्वी देवांनीं याला पाण्यांतून वर काढिलें. प्रत्यक्ष संबंध नाहीं. सूक्तद्रष्टा कक्षीवान. सूक्त उत्तरकालीन.

आर्ष्टिषेणः--( १०. ९८, ६ ). ऋष्टिषेणपुत्र. देवापि व शंतनु यांचें पैतृक नांव. देवापि व शंतनु हे भरत कुलांतील असावे. देवापि पहा.

आश्वघ्नः--( १०. ६१, २१ ). सायणमताप्रमाणें नाभानेदिष्ठाचेंच नांव. या सूक्ताचा द्रष्टा नाभानेदिष्ठ असून सूक्ताच्या १५ व्या ऋचेंत तो कक्षीवानाचा उल्लेख करतो. तेव्हां आश्वघ्न, नाभानेदिष्ठ कक्षीवानसमकालीन असावा.

आश्वमेधः--( ८. ६८, १६ ). आतिथिग्व, इंद्रोत यांच्यासह एकाच दानस्तुतींत उल्लेख. प्रियमेधाचा आश्रयदाता. सूक्त उत्तरकालीन.

आसंगप्लायोगिः--( ८. १, ३१ ). मेधातिथीचा आश्रयदाता. याच सूक्ताच्या ३१ व्या ऋचेंत याला 'याद्वः पशुः म्ह० यदूंतील श्रेष्ठ असें म्हटलें आहे. यावरून हा यदूंचा राजा असावा. सूक्त उत्तरकालीन.

आस्त्रबुध्नः--( १०. १७१, ३ ). इंद्रानें आस्त्रबुध्नाकरितां वेन्याला ( वेनाला ) मोकळें केलें. पृथु हा वेनाचा मुलगा. पृथुसंबंध पहा. वेन्याच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

इक्ष्वाकुः--( १०. ६४, ४ ). इक्ष्वाकु भरतकुलांतील होता. असमाति पहा. सूक्त उत्तर.

इलिबिशः—( १. ३३, १२ ). एक असुर. प्रत्यक्ष संबंध नाहीं. कुत्सोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

इटः—( १०. १७१, १ ). अनुक्रमणीप्रमाणें भृगुपुत्र या सूक्ताचा हाच द्रष्टा असून ३ ऱ्या ऋचेंत आस्त्रबुध्न, वेन्य, यांचा उल्लेख करतो. यावरून वेन्यसमकालीन असावा. वेन्योल्लेखामुळें सूक्त उत्तर.

इंद्रोतः—( ८. ६८, १७ ). अतिथिग्ववंशज. सूक्त उत्तर.

उक्षण्यायनः—(८. २५, २२). विश्वमनस्‌चा आश्रयदाता. विश्वमनस् पहा. सूक्त उत्तर.

उग्रदेवः—( १. ३६, १८ ). दूर असलेल्या यदु, तुर्वश व उग्रदेव यांनां अग्नीसह बोलावतों असें सूक्तद्रष्टा कण्व म्हणतो. यदुतुर्वशोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

उपमश्रवसः—( १०. ३३, ७ ). कुरुश्रवणपुत्र. याच सूक्तांत याला त्रासदस्यव असेंहि म्हटलें आहे. यावरून हा त्रसदस्युवंशज असावा. सूक्तांत पर्शूंचा उल्लेख असल्यामुळें सूक्त उत्तर.

उरणः—( २. १४, ४ ). इंद्रशत्रु. एक असुर. आतिथिग्वाच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

उरुःकक्षः—( ६. ४५, ३१ ). गांग्य लोकांचा राजा. ( 'गांग्यांचा जसा उरुःकक्ष मुख्य होता तसा बृबु पणींचा मुख्य झाला ). यदूंच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

उशना-काव्यः—( ५. २९, ९ ). उशनस्‌काव्य याच्या स्तुतीनें इंद्र कुत्साच्या घरीं आला. उशनस् कुत्साचा पुरोहित असावा. उशनस्‌चा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५१; ८३; १२१; १३०; ४. १६; २६; ५. २९; ३१; ३४; ६. २०; ८. ७; २३; ९. ८७; ९७; १०. २२; ४० ). उत्तरकालीन.

उशिजः—( १. १३१, ५ ). सायणांनीं या ठिकाणीं उशिज हें नाम मानिलें नाहीं. परंतु कक्षीवानाला व ऋजिश्वन्‌ला औशिज म्हटलें आहे. कदाचित् हा उशिज, कक्षीवान व ऋजिश्वा यांचा पिता असावा.

उशीनराणीः—( १०. ५९, १० ). उशीनराची स्त्री. प्रत्यक्ष संबंध नाहीं. अगस्त्य, इक्ष्वाकु यांच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

ऊर्जव्यः—( ५. ४१, २० ). प्रत्यक्ष संबंध नाहीं. कण्वोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

ऋक्षसूनु-आर्क्षः—( ८. ६८, १५ ). प्रियमेधाचा आश्रयदाता. आतिथिग्व-इंद्रोत व आर्क्ष-ऋक्षसूनु यांजकडून दान मिळाल्याचें प्रियमेध उल्लेखितो. आर्क्षाचा आणखी उल्लेख ( ८. ७४ ) या सूक्तांत आहे. सूक्त उत्तर.

ऋजिश्वनः—( ६. २०, ७ ). विदथिनपुत्र. ऋजिश्वन् याला वैदथिन् असें म्हटलें आहे. ऋजिश्व्याला 'औशिज ऋजिश्वा' असें म्हटलें आहे. व कक्षीवानालाहि औशिज म्हटलें आहे. तेव्हां औशिज ऋजिश्वा व वैदथिन-ऋजिश्वन् हे एकच असावे असें वाटतें; व त्याप्रमाणें ऋजिश्वन् व कक्षीवान हे भाऊ होतात. इंद्रानें ऋजिश्व्याकरितां पिप्रूस मारिलें. ऋजिश्वन्‌चा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १.५३; १०१; ४. १६; ५.२९; ८. ४९; १०. ९९; १३८. ) उत्तर.

ऋजूनसः—( ८. ५२, २ ). प्रत्यक्ष संबंध नाहीं. आयूच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

ऋज्राश्वः—( १. १००, १७ ). वृषागिरपुत्र. अंबरीष, सहदेव, भयमान, सुराधस् यांच्या सह उल्लेख. ऋज्राश्व 'नहुषांच्या प्रजेसह युद्धास येणारा' असें इंद्राला म्हणतो. ऋज्राश्व नहुषसंबंधी असावा. नहुष व मशर्शार पहा. सूक्त उत्तर. आणखी उल्लेख ( १. ११६; ११७ ).

ऋणंचयः—( ५. ३०, १२ ). रुम, रुशम यांचा राजा. कण्व रुमरुशमांचे पुरोहित होते. कण्वांनीं रुमरुशमांकडून इंद्राला बोलाविलें ( ८. ४, २ ). कण्व पहा. सूक्त उत्तर. आणखी उल्लेख ( १. ११६; ११७ ).

ऋतस्तुभः—( १. ११२, २० ). भुज्यु व ऋतस्तुभ यांचें इंद्रानें रक्षण केलें. भुज्यु व ऋतस्तुभ समकालीन असावे. भुज्यूच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

एकद्यूः—( ८. ८०, १० ). अनुक्रमणीप्रमाणें नोधसपुत्र. नोधससंबंध पहा. नोधससंबंधामुळें एकद्यूचा उल्लेख असलेलें सूक्त उत्तर.

एतशः—( ८. १, ११ ). इंद्रानें कुत्सासह एतशाचें रक्षण केलें. कुत्ससंबंध पहा. एतशाचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५४; ६१; १२१; १६८; २. १९; ४. १७; ३१; ५. २९; ३१; ६. १५; ८. १; ५० ). उत्तरकालीन.

एवावदः—( ५. ४४, १० ). अवत्सारसहोल्लिखित. अवत्सार पहा. पक्थांच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

ओगणासः—( १०. ८९, १५ ). अनुक्रमणीप्रमाणें विश्वामित्रपुत्र रेणु याच्या सूक्तांत उल्लेख. रेणु म्हणतो, 'मला त्रास देणारे ओगण अंधारांत जावोत.' ओगण विश्वामित्रपुत्रसमकालीन असावे. सूक्त उत्तर.

औचथ्यः—( १. १५८, १; ४ ). उचथपुत्र; दीर्घतमस्‌चें दुसरें नांव. त्याच सूक्तांत ( १५८, ६ ) मामतेयाचा उल्लेख आहे. मामतेयाबरोबर ( ८. ९, १० ) मध्यें कक्षीवान्, व्यश्व पृथी, वैन्य यांचा उल्लेख येतो. कक्षीवान्, व्यश्व दीर्घतमस् व वैन्य-पृथी यांनीं अश्वींची स्तुति केली, यावरून ते समकालीन असावे.

और्णवाभः—( २. ११, १८ ). याशिवाय याचा उल्लेख ( ८. ३२; ७७ ) या स्थळीं असून शेवटच्या स्थळीं कण्वकुलोत्पन्न कुरुसुति याच्या सूक्तांत उल्लेख आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

और्वः—( ८. १०२, ४ ). उरूंचा वंशज. याचा भृगु, अप्नवान, त्यांच्या सह आणि सुदासशत्रू द्रुह्यु व भृगु ( ७. १८, ६ ) यांच्या सह उल्लेख येतो. और्वभृगु हें भृगूचें नांव असावें. भृगुसंबंध पहा. और्वभृगु तुर्वशसंबंधी असावे.

औशानः—( १०. ९८, ११ ). हें शंतनूचें नांव होतें असें मॅकडोनलचें मत आहे. शंतनु भरत होता व त्याचा आर्ष्टिषेण-देवापीबरोबर ( १०. ९८, १; ३; ७ ) उल्लेख आहे.

औशिजः—( १. १८, १ ). ऋजिश्वनूचें दुसरें नांव असून कक्षीवान् यालाहि उपर्युक्त स्थलीं तेंच नांव दिलें आहे. कक्षीवानाचा आश्रयदाता भाव्य हा असून त्याचा कक्षीवानासह ( १. १२६ ) उल्लेख आहे. भाव्य ( भावयव्य ) हा भरत होता; व कक्षीवानाच्या ( १.-११९ ) सूक्तांत दिवोदासाचा उल्लेख आहे. औशिजाचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. १८; ११९; १२२; ४. २१; ५. ४१; ६. ४; १०. ९९ ) उत्तरकालीन.

ककुहः—( ८. ६, ४८ ). याचा याद्वाबरोबर उल्लेख आहे. सूक्त उत्तरकालीन. ककुहानें जिंकिलेले याद्व ( लोक ) स्तोत्यास दिले. हा याद्वांचा शत्रु असावा.

कक्षीवान्:–( १. १८, १ ). याच्या सूक्तांत दिवोदासाचा उल्लेख येतो यावरून हा दिवोदासोत्तरकालीन ठरतो. यांचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५१; ११२; ११६; ११७; १२६; ४. २६; ८. ९; ९. ७४; १०. २५; ६१; १४३ ). कक्षीवान् यास दुसरें नांव ऋजिश्वन् असें होतें. याला औशिज असेंहि म्हटलें आहे. औशिज पहा. कक्षीवान् १. ११६ ते १२६ या सूक्तांचा द्रष्टा आहे.

कण्वः– कण्वाचा व्यक्तिवाचक नांवापेक्षां कुलवाचक नांव म्हणून अधिक उल्लेख येतो. यदुतुर्वश व कण्व यांचा एकत्र उल्लेख अनेक स्थळीं येतो. कण्व यदुतुर्वशांचे पुरोहित असावे. कारण 'यदु व तुर्वश हे तुझ्या प्रसादानें सुखी असलेले मीं पहावे' अशी कण्वकुलोत्पन्न देवातिथि इंद्राची प्रार्थना करतो. यावरून कण्वाचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. १४; ३६; ३७; ३९; ४४; ४५; ४६; ४७; ४८; ४९; ११२; ११७; १३९; ८. २; ३; ४; ५; ६; ७; ८; ९; ३२; ३३; ३४; ४९; १०. ३१; १५० ) व ज्या सूक्तांचे कण्व द्रष्टे आहेत अशीं ( १. ३६ ते ४३ ) सूक्तें उत्तरकालीन.

कद्रुवः–( ८. ४५, २६ ). यदुतुर्वशांचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं. यदुतुर्वशोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

कमद्यूः–( १०. ६५, १२ ). भुज्यूबरोबर एकाच ऋचेंत उल्लेख. कमद्यू ही विमदाची बायको होती अश्वीदेवांनीं भुज्यूचें रक्षण केलें व विमदास कमद्यू दिली. भुज्यूचा उल्लेख असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन, प्रत्यक्ष संबंध नाहीं.

करंजः–( १. ५३, ८ ). असुर; इंद्रशत्रु; यदु, तुर्वश, कुत्स, आयु, वगैरेंचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख असल्यामुळें सूक्त उत्तर. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

कर्कंधुः–( १. ११२, ६ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख येतो. प्रत्यक्ष कोणाशीं संबंध नाहीं. सूक्त उत्तर.

कलिः–( १. ११२, १५ ). उत्तरकालीन सूक्तांत अश्वीदेवांनीं रक्षण केल्याचा उल्लेख प्रत्यक्ष संबंध नाहीं.

कवषः–अनु द्रुह्यु यांचा सहचर. श्रुत, कवष, वृद्ध, अनु, द्रुह्यु यांनां इंद्रानें पाण्यांत बुडविलें. ( ७. १८, १२ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख.

कविः–उशनस् याच्या बापाचें नांव. उशनस् पहा.

कशुः–( ८. ५, ३७ ). अगस्त्य याचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख. चेदीचा पुत्र. कण्वकुलांतील ब्रह्मातिथि ( सूक्तद्रष्टा ) कशूनें दान दिल्याचें वर्णितो. कण्व पहा.

कशोजुः–( १. ११२, १४ ). दिवोदासाचें विशेषण. सदरहू सूक्त उत्तरकालीन आहे.

कश्यपः–( ९. ११३, ११४ ). या सूक्तांचा द्रष्टा व ( ९. ११४, २ ) यांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

कानीतः–( ८. ४६, २४ ). याचेंच नांव पृथुश्रवस्, याचा उल्लेख, नहुषाचा उल्लेख असलेल्या उत्तरकालीन सूक्तांत आहे. कानीत हा अश्व्य याचा आश्रयदाता. अश्व्य पहा.

काव्यः– उशनसूचें नांव. उशना पहा.

कीकटः–( ३. ५३, १४ ). सुदासानें विश्वामित्रासह कीकट देशावर स्वारी केली. सुदासाचा उल्लेख असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन.

कुणारुः–( ३. ३०, ८ ). विश्वामित्राच्या सूक्तांत उल्लेख आहे. प्रत्यक्ष उल्लेख नाहीं. सूक्तद्रष्टा विश्वामित्र असल्यामुळें सूक्त उत्तर.

कुत्सः–अतिथिग्व, कुत्स व आयु यांचा तूर्वयाणानें पराभव केला म्हणून कुत्साचा उल्लेख असलेलीं ( १. ३३; ५१; ५३; ६३; १०६; ११२; १२१; १७४; १७५; २. १४; १९; ४. १६; २६; ३०; ५. २९; ३१; ६. १८; २०; २६; ३१; ७. १९; २५; ८. १; २४; ५३; १०. २९; ३८; ४०; ४९; ९९; १३८ ) सूक्तें व ज्या सूक्तांचा कुत्स द्रष्टा आहे तीं ( १. ९४ ते ९८; १०१ ते १०४; १०६ ते ११५ ) व ९. ९७ या सूक्तांतील ऋचा उत्तरकालीन.

कुयवः–( २. १९, ६ ). कुत्साकरितां इंद्रानें कुयवाला मारिलें. कुत्साबरोबर उल्लेख असल्यामुळें कुयवाचा उल्लेख करणारीं सूक्तें ( १. १०३; १०४; २. १९; ४. १६; ६. ३१; ७. १९ ) उत्तर.

कुरुंगः–( ८. ४, १९ ). तुर्वशाबरोबर उल्लेख आला आहे. सूक्तद्रष्टा देवातिथि म्हणतो, 'सर्व तुर्वशांमध्यें श्रेष्ठ असें दान कुरुंगानें मला दिलें. यावरून कुरुंग हा तुर्वशांचा राजा असावा. सूक्त उत्तर.

कुरुश्रवणः–( १०. ३३, ४ ). त्र [illegible] चा मुलगा. यालाचा पौरुकुत्स ( ५. ३३, ८ ); पौरुकुत्सि ( ७. १९, ३ ), पौरु-

कुत्स ( ८. १९, ३६ ) असें म्हटलें आहे. सुदास ( १. ६३, ७ ) व दिवोदास ( १. १३०, ७ ) हे पुरुकुलांतील होते. व पुरुकुत्स ह्याहि पुरुकुलांतील होता. कुत्सश्रवणाचा आणखी उल्लेख ( १०. ३२, ९ ) मध्यें आहे. पुरुकुत्स व त्रसदस्यु पहा.

कुशिकः—सुदासपुरोहित विश्वामित्र याच्या पित्याचें व कुलाचें नांव. कुशिकाचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( ३. २६; २९; ३०; ३३; ४२; ५३ ) उत्तरकालीन.

कृपः—( ८. ४, २ ). सायणमतानें एक राजा. इंद्रानें रुम रुशम, श्यावक व कृप यांचें रक्षण केलें. रुम रुशम पहा. सूक्त उत्तर.

कृशियः—( १. ११६, २३; ११७, ७ ) या कक्षीवानाच्या सूक्तांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

कौरयाणः—( ८. ३, २१ ). कुरयाणपुत्र. याचेंच नांव पाकस्थामन्. मेधातिथि ( काण्व ) याचा आश्रयदाता. रुम रुशमांच्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

कौलितरः—( ४. ३०, १४ ). शंबराचें दुसरें नांव. शंबर सुदासशत्रु होता. शंबरोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

क्रिविः—( ८. २२, १२ ). प्रत्यक्ष संबंध नाहीं. क्रिवींचा आणखी उल्लेख ( ८. २०; ५१; ८७; ९. ९ ) येथें आहे. पक्थोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

क्षत्रश्रीः—( ६. २६, ८ ). प्रातर्दनीचें दुसरें नांव. भरद्वाजाचा आश्रयदाता. या सूक्ताचा द्रष्टा भरद्वाज क्षत्रश्रीपासून धन मिळाल्याचें उल्लेखितो. प्रातर्दनि प्रतृदवंशज असावा. प्रतृद तृत्सू होते. सुदासोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

खेलः—( १. ११६, १५ ). वसिष्ठबंधु अगस्त्य याचा आश्रयदाता. दिवोदासोल्लेखामुळें सूक्त उत्तरकालीन.

गयप्लातः—( १०. ६३, १७ ). प्लतिपुत्र. या सूक्ताचा हा व द्रष्टा असून 'नहुषपुत्र ययाति याच्या यज्ञाला जाणारे देव मला धन देवोत' असा सूक्तांत उल्लेख करतो. यावरून गयप्लात हा नहुषसमकालीन असावा. नहुषांचा पराभव करून इंद्रानें यदुतुर्वशांना मदत केली ( १०. ४९, ८ ). गयाचा आणखी उल्लेख ( १०. ६४ ) या सूक्तांत आहे.

गविष्ठिरः—( १०. १५०, ५ ) या सूक्ताचा द्रष्टा मृळीक म्हणतो, 'भरद्वाज, अत्रि, त्रसदस्यु, गविष्ठिर यांसह अग्नि माझें रक्षण करो.' यावरून गविष्ठिर त्रसदस्युसमकालीन असावा. गविष्ठिराचा आणखी उल्लेख असलेलें ( ५. १ ) सूक्त उत्तरकालीन.

गांग्यः—( ६. ४५, ३१ ). उरुःकक्ष याचेंच नांव. उरुःकक्ष पहा.

गुंगुः—( १०. ४८, ८ ). एका जातीच्या लोकांचें नांव. आतिथिग्वशत्रु. इंद्रानें या लोकांपासून अतिथिग्वाचें रक्षण केलें व पर्णय आणि करंज यांना मारिलें. पर्णय व करंज हे गुंगूंचे राजे असावे. सूक्त उत्तरकालीन.



गृत्समदः—( २. १९, ८ ). यानें केलेल्या इंद्रस्तुतींत दिवोदासाचा उल्लेख आहे. दुसऱ्या मंडलास गार्त्समदमंडल असें म्हणतात. त्या मंडलांतील सूक्तांचे द्रष्टे गृत्समदकुलांतील होते. प्रत्यक्ष गृत्समदाचा उल्लेख ( २. ४; १९; ३९; ४१ ) या सूक्तांत आहे.

गैरिक्षितः—( ५. ३३; ८ ). त्रसदस्यूचें पैतृकनाम. सूक्त उत्तरकालीन.

गोतमः—( ४. ४, ११ ). गोतम द्रष्टा असलेल्या सूक्तांत तो उशनस् याचा उल्लेख करतो ( १. ८३ ). उशनस् कुत्सपुरोहित होता. गोतमाचा उल्लेख असलेलीं ( १. ६०–६३; ७७–७९; ८५;८८; ९२; ११६; १८३;४. ४;३२; ८. ८८ ) सूक्तें व तो द्रष्टा असलेलीं सूक्तें ( १. ७४–९३ ) उत्तरकालीन.

गोपवनः—( ८. ७४, ११ ). आर्क्ष-श्रुतर्वन् यापासून दान घेणारा. आर्क्ष—ऋक्षपुत्र व आतिथिग्व इंद्रोत हे आपल्याला दान देत असल्याचें प्रियमेध उल्लेखितो ( ८. ६८, १५ ). सूक्त उत्तर.

गोशर्यः—( ८. ४९, १० ). 'पक्थ, कण्व, त्रसदस्यु व गोशर्य यांचें रक्षण केलें त्याप्रमाणेंच माझें रक्षण कर' असें सूक्तद्रष्टा प्रियमेध म्हणतो. यावरून गोशर्य हा कण्व, पक्थ, त्रसदस्यु यांचा समकालीन असावा. गोशर्याचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( ८. ८; ५० ) उत्तरकालीन.

गौरिवीतिः—( ५. २९, ११ ). अनुक्रमणीप्रमाणें वसिष्ठ किंवा शाक्ति याचा मुलगा. या सूक्ताचा द्रष्टा हाच असून तो 'वैदथिन् याचें रक्षण करून त्याचा सोम प्राशन केलास' असें इंद्राला म्हणतो. वैदथिन्समकालीन असावा. सूक्त उत्तरकालीन.

घोषः—( १. १२०, ५ ) सर्वानुक्रमणीप्रमाणें कक्षीवान्पुत्री घोषा हिचा मुलगा. याचा पित्रिय कक्षीवानाचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख येतो. कक्षीवान् पहा.

घोषाः—( १. ११७ ). कक्षीवान्कन्या ( सर्वानुक्रमणीप्रमाणें ). कक्षीवान्, पेदु, वगैरेंचा उल्लेख असणाऱ्या सूक्तांत उल्लेख आहे. कक्षीवान् पहा.

चायमानः—( ६. २७, ८ ). याचेंच नांव अभ्यावर्तिन्. अभ्यावर्तिन् पहा. आणखी उल्लेख ( ७. १८ ).

चित्रः—( ८. २१, १८ ). सर्वानुक्रमणीप्रमाणें ( ८. १९; ३३ ) या सूक्तांचा द्रष्टा असलेल्या सोभरीच्या ऋचेंत उल्लेख. सोभरीचा आश्रयदाता. सोभरीच्या सूक्तांत पक्थ, त्रसदस्यु, तृक्षि इत्यादि अनेक व्यक्तींचा उल्लेख असल्यामुळें उत्तरकालीन. सोभरि पहा.

चित्ररथः—( ४. ३०, १८ ). तुर्वशशत्रु. तुर्वशांकरितां इंद्रानें याचा सरयूनदीवर पराभव केला. सूक्त उत्तरकालीन.

चुमुरिः-( ७. १९, १४ ). इंद्रानें दभीतीकरितां धुनि आणि चुमुरि यांनां मारल्याचा उल्लेख आहे व दभीतीबरोबर तुर्वीतीचें रक्षण केल्याचा उल्लेख ( १. ११२, २३ ) आहे. तुर्वीति हा लुडविगमतानें यदुतुर्वशांचा राजा होता. यावरून चुमुरीचा उल्लेख असणारीं सूक्तें ( २. १५; ६. १८; २०; २६; ७. १९; १०. ११३ ) उत्तरकालीन.

चैद्यः-( ८. ५, ३७ ). कशूचें पैतृक नांव. कशु पहा.

च्यवन-च्यवानः-( १०. ६१, १ ). अश्वींचा उपासक व पक्थांचा राजा तूर्वयाण याचा विरोधी. याचा आणखी ( १. ११६; ११७; ११८; ५. ७५; ७. ६८; ७१; १०. ५९; ६१ ) या ठिकाणीं उल्लेख असल्यामुळें सूक्तें उत्तरकालीन.

च्यवतानः-( ५. ३३, ९ ). च्यवतान, ध्वन्य, मारुताश्व, पुरुकुत्स हे संवरणाचे आश्रयदाते होते. एकाच व्यक्तीचे आश्रयदाते असल्यामुळें ते पुरुकुत्ससमकालीन असावे. सूक्त उत्तरकालीन.

जमदग्निः—( ३. ५३, १५). यानें विश्वामित्राला 'ससर्परी' नामक वाणी दिली. जमदग्नीचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( ३. ६२; ७. ९६; ८. १०१; ९. ६२; ६५; ९७; १०. १६७ ) उत्तरकालीन. शिवाय ( ९. ६५; ६७; १०. ११० ) हीं जमदग्नि द्रष्टा असलेलीं सूक्तें उत्तरकालीन.

जरूथः—( ७. ९, ६ ). वसिष्ठानें अग्नि प्रदीप्त केला आणि अग्नीनें जरूथ यास मारिलें. जरूथ वसिष्ठसमकालीन असावा. जरूथाचा उल्लेख करणारीं सूक्तें ( ७. १; ९; १०. ८० ) उत्तरकालीन.

जन्हावीः—( १. ११६, १९; ३. ५८ ). जन्हुसंबंधी प्रजा. उल्लेख उत्तरकालीन सूक्तांत आहे. ग्रिफिथ मताप्रमाणें कुशिकाच्या वंशास 'जन्हावी' म्हटलें आहे. जन्हु कुशिकांचा पूर्वज असावा.

जातूष्ठिरः—( २. १३, ११ ). सुदास-दिवोदासकालीन पुष्कळशा व्यक्तींचा उल्लेख आला असल्यामुळें उत्तरकालीन ठरलेल्या सूक्तांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

जाहुषः—( ७. ७१, ५ ). पक्थांचा राजा तूर्वयाण याच्या विरुद्ध असलेल्या च्यवनाबरोबर याचा उल्लेख आहे. शिवाय उत्तरकालीन ठरलेल्या ( १. ११६ ) या सूक्तांत उल्लेख आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

तकवानः—( १. १२०, ६ ). कक्षीवान्पुत्र तकु याचा पुत्र ( मॅकडोनल् ). उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. कक्षीवान्संबंध पहा.

तरंतः—( ५. ६१, १० ). तरंत व पुरुमीळ्ह हे विददश्विपुत्र होते. हे पुरुवंशज असावेत. तरंत हा श्यावाश्वाचा आश्रयदाता होता, व श्यावाश्वानें त्रसदस्यूकरितां इंद्राची स्तुति केल्याचा ( ८. ३६; ७ ) उल्लेख आहे. तरंताचा उल्लेख असलेलें सूक्त ( ५. ६१ ) उत्तर.

तरुक्षः—( ८. ४६, ३२ ). वश-अश्व्य याचा आश्रयदाता. वश-अश्व्य हा तरक्षापासून धन मिळाल्याचें वर्णितो. अश्व्य पहा.

तर्यः-क्रिवीसह उल्लेख. क्रिवि पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

तान्वः-( १०. ९३, १५ ). पृथूंच्या राजाबरोबर तान्वाचा उल्लेख. अनुक्रमणींत याला पृथुपुत्र म्हटलें आहे. पृथुपर्शवांचा दाशराज्ञ युद्धाशीं संबंध असल्यामुळें तान्वाचा उल्लेख असणारीं सूक्तें ( ३. ३१; १०. ९३ ) उत्तरकालीन.

तिरिंदिरः-( ८. ६, ४६ ). याद्व व पर्शु यांच्यासह उल्लेख. सूक्तद्रष्टा वत्स म्हणतो, ' पर्शु पुत्र ( अथवा कुलोत्पन्न ) तिरिंदिर यानें याद्वांचें धन मला दिलें. सूक्त उत्तर.

तुग्रः-( १०. ४९, ४ ). इंद्रानें कुत्साकरितां तुग्राला मारिलें. कुत्सासह उल्लेख असल्यामुळें तुग्राचा उल्लेख असणारीं सूक्तें ( १. ११६; ११७; ६. २०; २६; १०. ४९ ) उत्तरकालीन. कुत्ससंबंध पहा.

तुर्वशः-यदूंसह उल्लेख. सुदासशत्रु. तुर्वशाचा उल्लेख असणारीं सूक्तें ( १. ३६; ४७; ५४; १०८; १७४; ४. ३०; ६. २० २७; ४५; ७. १८; १९; ८. ४; ७; ९. १०; ९. ६१; १०. ४९ ) उत्तरकालीन.

तुर्वीतिः-( १. ५४, ६ ). यदुतुर्वशांबरोबर उल्लेख असल्यामुळें उत्तरकालीन. याचा आणखी उल्लेख असणारीं सूक्तें ( १. ३६; ६१; ११२; २. १३; ४. १९ ) उत्तरकालीन. हा तुर्वशांचा राजा असावा ( लुड्विग ).

तूतुजिः-( ६. २०, ८ ) इंद्रानें द्योतननामक राजाकरितां तुग्र, तूतुजि, वेतसु, दशोणि यांचा पराभव केला. तुग्रसहोल्लिखित असल्यामुळें तूतुजि याचा उल्लेख असणारें सूक्त उत्तरकालीन. मॅकडोनलच्या मतानें तुजि आणि तूतुजि ही एकच व्यक्ति. तेव्हां तुजींचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( ६. २६; १०. ४९ ) उत्तरकालीन.

तूर्वयाणः-(१. ५३, १०). अतिथिग्व, आयु व कुत्स यांचा शत्रु. तूर्वयाण हा पक्थांचा राजा होता. याचा उल्लेख असलेलें सूक्त उत्तरकालीन.

तृक्षिः-( ६. २२, ७ ). त्रसदस्युपुत्र. याचा उल्लेख असणारीं सूक्तें ( ८. २२; ६. ४६ ) उत्तरकालीन.

तृणस्कंदः-( १. १७२, ३ ). सर्वानुक्रमणीप्रमाणें अगस्त्याच्या सूक्तांत उल्लेख. सायणमताप्रमाणें अगस्तीचेंच विशेषण. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

तृत्सुः-सुदासाचे साहाय्यकर्ते व वसिष्ठाचे अनुयायी. तृत्सूंचा उल्लेख करणारीं सूक्तें ( ७. १८; ३३; ८३ ) उत्तरकालीन.

त्रसदस्युः-( ७. १९, ३ ). पुरुकुत्सवंशज व पुरूंचा राजा असावा. याला पुरु म्हटलें आहे. याचा उल्लेख असणारीं सूक्तें ( १. ११२; ४. ३८; ४२; ५. २७; ३३; ७. १९; ८. ८;

१९; ३६; ४९; १०. १५० ). उत्तरकालीन. शिवाय त्रसदस्यु द्रष्टा असलेलें ( ९. ११० ) हें सूक्त उत्तरकालीन.

त्रासदस्यवः-त्रसदस्युवंशज, तृक्षि व कुरुश्रवण यांचें हें नांव आहे. याचा उल्लेख ( ८. १९;२२; १०. ३३ ) या ठिकाणीं येतो. हीं सूक्तें उत्तरकालीन.

त्रित-आप्त्यः-याचा उल्लेख अनेक स्थळीं आहे. अनुक्रमणी-प्रमाणें त्रित हा ( १०. ४ ) या सूक्ताचा द्रष्टा असून 'मरुदेशांतील पाणपोईप्रमाणें तूं पुरूंना धनानें तोषविणारा आहेस' असें अग्नीला म्हणतो.

त्रिशोकः-हा द्रष्टा असलेल्या सूक्तांत ( ८. ४५, ३० ) यदुतुर्वशांचा उल्लेख करतो. त्रिशोक काण्व होता, व कण्व यदूंचे पुरोहित होते. याचा उल्लेख ( १. ११२; १०. २९ ).

त्रैतनः-( १. १५८, ५ ). तौग्र्य, दीर्घतमस् यांचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख. हा दीर्घतमस्‌चा दास व कदाचित् त्रितांचा संबंधी असावा.

त्रैवृष्णः-( ५. २७, १ ). त्रसदस्यूचें नांव.

त्र्यरुणः-( ५. २७, १ ). त्रसदस्यूचें नांव.

दध्यङ्-( १. ११६, १२ ). अथवा दध्यनिच्. हा आथर्वण होता. वरील उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. याचा आणखी उल्लेख ( १. ८०; १३९; ४. १६; ९. १०८ ) या सूक्तांत आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

दभीतिः- याचा तुर्वशांसह अनेक स्थळीं उल्लेख येतो. दभीति व तुर्वीति संबंध. चुमुरि पहा. याचा उल्लेख करणारीं पुढील सूक्तें ( १. ११२; २. १३; १५; ४. ३०; ४१; ६. २०; २६; ७. १९; १०. ११३ ) उत्तरकालीन.

दशग्वः-(५. २९, १२ ). हे आंगिरस होते. यांचा कुत्स, एतश, उशना या व्यक्तींचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख आहे. दशग्वांचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ६२; २. ३४; ३. ३९; ४. ५१; ५. २९; ८. १; १२ ). प्रत्यक्ष संबंध नाहीं.

दशद्युः-( १. ३३,१४ ). याचा या ठिकाणीं ' तुग्रासह युद्ध करणाऱ्या दशद्यूचें व तुग्राचें इंद्रानें रक्षण केलें' असा उल्लेख आहे. आणखी उल्लेख (६.२६) या सूक्तांत आहे. तुग्रसमकालीन असावा.

दशव्रजः-( ८. ४९, १० ). पक्थ, त्रसदस्यू यांच्यासह कण्व, त्रसदस्यु, पक्थ, यांचें अश्वीनीं रक्षण केलें असा उल्लेख. याचा उल्लेख करणारें सूक्त ( ८. ५० ) उत्तर.

दशोणिः-( ६. २०, ८ ). तूतुजि, तुग्रसहोल्लिखित. तुग्र अथवा तूतुजि पहा. दशोणीचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( ८. ५२; १०. ९६ ) उत्तरकालीन.

दस्यवेवृकः-( ८. ५६, २ ). दस्यूंचा पराभव करणारा एक राजा, व पृषध्राचा आश्रयदाता. मॅक्डोनलमतानें पूतक्रतूचा मुलगा. याच्या बायकोचें नांव पूतक्रता. याचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( ८. ५१; ५५ ) उत्तर.

दार्भ्यः-दर्भीचा मुलगा. दर्भीचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. याचेंच दुसरें नांव रथवीति. अनुक्रमणी व बृहद्देवतेप्रमाणें रथवीति यानें अर्चनानस् पुत्र श्यावाश्वाला आपली मुलगी दिली होती (५. ६१; १७ ). श्यावाश्वसंबंधाकरितां तरंत पहा.

दिवोदासः-सुदासपिता, अतिथिग्वपुत्र अथवा अतिथिग्वाचेंच नांव. याचा उल्लेख असलेलीं सर्व सूक्तें ( १. ११२; ११६; ११९; १३०; २. १९; ४. २६; ३०; ६. १६; २६; ३१; ४३; ४७; ६१; ७. १८; ९. ६१ ) उत्तरकालीन.

दीर्घतमसः-कक्षीवान्पिता. कक्षीवान् पहा. दीर्घतमस्‌चा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. १५८; ८. ९ ) हीं उत्तर-कालीन.

दीर्घश्रवसः-( १. ११२, ११ ). कक्षीवानासह उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

दुर्गहः-( ४. ४२, ८ ). पुरुकुत्सपूर्वज. सायणमताप्रमाणें पुरुकुत्साचा पिता. दुर्गहाचा ( ८. ६५ ) मध्यें आणखी उल्लेख आहे. सदर सूक्त उत्तरकालीन.

दुर्मित्रः-( १०. १०५, ११ ). याला कुत्सपुत्र म्हटलें आहे. दुर्मित्राचा उल्लेख असलेलें सूक्त उत्तरकालीन. कुत्स पहा.

दुःशासुः-( १०.३३, १ ). कुरुश्रवणाचा शत्रु. लुडविगमतानें पर्शु असावा. कुरुश्रवणाचा पुरोहित कवष याचा उल्लेख करतो. सूक्त उत्तर.

दुःशीमः-याचा पृथवान, वेन, यांच्या सह व तान्वाचा उल्लेख असलेल्या ( १०. ९३, १४ ) सूक्तांत उल्लेख आहे. 'दुःशीम, राम, पृथवान, वेन, यांच्या पुढें मीं स्तोत्र पठण केलें' असें सूक्तद्रष्टा तान्व म्हणतो. तान्व पहा. सूक्त उत्तरकालीन.

दृभीकः-( २. १४, ३ ). कुत्स, अतिथिग्व, आयु वगैरेंचा उल्लेख असलेल्या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

देवक-मान्यमानः-( ७. १८, २० ). तृत्सूंचा शत्रु व शंबर मित्र, लुडविगमतानें कदाचित् शंबराचेंच नांव असावें.

देववतः-सुदासपितामह. याचा उल्लेख ( ७. १८, २२; ८. ३१, १५ ) असलेलीं सूक्तें उत्तरकालीन.

देववातः-( ३.२३, २ ). हा भारत (भरतकुलांतील) होता. विश्वामित्र व सुदास यांच्या कुलास भरत म्हटलें आहे. देववात कदाचित् विश्वामित्रसमकालीन असावा.

देवश्रवसः-हाहि भरतकुलांतील होता. देववाताबरोबर ( ३. २३ ) उल्लेख. देववात पहा.

देवापिः-( १०. ९८, ६ ). ऋष्टिषेणाचा पुत्र व शंतनूचा पुरोहित. शंतनु भरतकुलांतील होता. शंतनूचा उल्लेख या सूक्तामध्यें असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन. शंतनु व देवापि हे सुदासोत्तर-कालांतील असावे.

दैववातः—देववाताचा मुलगा. अथवा सृंजयाचें दुसरें नांव. देववाताचा वंशज. दैववाताकरितां इंद्रानें वृचीवंताचा राजा तुर्वश याचा पराभव केला ( ६. २७, ७ ). दैववाताचा उल्लेख असणारीं सूक्तें ( ३. २३; ४. १५; ६. २७ ) उत्तरकालीन. सायण व झिमर यांच्या मताप्रमाणें दैववात हें अभ्यावर्तीचेंच नांव असावें.

दैवोदासिः—( ८. १०३, २ ). दिवोदासवंशज अथवा सुदासाचें नांव. सूक्त उत्तरकालीन.

द्योतनः—( ६. २०, ८ ). तुग्र, तूतुजि, यांचा विरोधी, तूतुजि पहा.

द्रुह्युः—दाशराज्ञ युद्धांतील सुदासशत्रु. द्रुह्यूचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. १०८; ६. ४६; ७. १८; ८. १० ) उत्तर.

धुनिः—चुमुरीबरोबर उल्लेख. चुमुरि पहा.

ध्वन्यः—त्रसदस्यु, ध्वन्य व मारुताश्व हे संवरणाचे आश्रयदाते होते ( ५. ३३, ).

ध्वसंतिः—इंद्रशत्रु. ( १. ११२ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. याच्या बरोबर पुरुषंतीचा उल्लेख असून ते दोघे ( सर्वानुक्रमणीप्रमाणें ) कश्यप कुलांतील अवत्सार याचे आश्रयदाते होते. सूक्तद्रष्टा अवत्सार हा ध्वसंति व पुरुषंति यांच्यापासून धन मिळाल्याचा उल्लेख करितो ( ९. ५८, ३ ).

ध्वस्रः—( ९, ५८, ३ ). याचा ( १. ११२ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लिखित असलेल्या पुरुषंतीबरोबर उल्लेख असल्यामुळें हें सूक्त उत्तरकालीन. मॅकडोनलमतानें ध्वसंति व ध्वस्र ही एकच व्यक्ति असावी. ध्वसंति पहा.

नभाकः—( ८. ४०, ४ ). या नाभाकाच्या सूक्तांत उल्लेख. हा कण्वकुलांतील होता. याच्या वंशांतील अथवा याचाच मुलगा असलेला नाभाक ज्या सूक्ताचा द्रष्टा आहे अशा सूक्तांत आयूचा उल्लेख (८. ३९, १०) आहे. 'तूं आयूला धन देतोस, असें नाभाक अग्नीला म्हणतो. नाभाक आयूचा समकालीन असावा. आयूचा संबंध पूर्वी दृष्ट आहेच.

नाभाकः—नभाक पहा. ( ८. ४१ ) या सूक्ताचा द्रष्टा.

नमी-साप्यः—( ६. २०, ६ ). कुत्स, तूतुजि, तुग्र यांचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख. नमीचा आणखी उल्लेख ( १०. ४८ ) या सूक्तांत आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

नमुचिः—( १. ५३, ७ ). इंद्रशत्रु. अतिथिग्व, यदु, तुर्वश, यांचा उल्लेख असणाऱ्या सूक्तांत उल्लेख. नमुचीचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( २. १४; ६. २०; ७. १९; ८. १४; १०. ७३ ) उत्तरकालीन. प्रत्यक्ष संबंध नाहीं. मॅकडोनल म्हणतो 'नमीसाठीं इंद्रानें नमुचीला मारिलें' ( १. ५३, ७ ).

नर्यः—( १. ५४, ६ ). तुर्वशसहोल्लिखित. इंद्रानें नर्य, यदु, तुर्वश यांचें रक्षण केलें. याचा आणखी उल्लेख ( १. ११२ ) या उत्तरकालीन सूक्तांत आहे.

नवग्वः—हे आंगिरस होते. यांचा दशग्वांशीं संबंध फार येतो. दशग्व पहा. नवग्वांचा उल्लेख ( १. ३३; ६२; ३. ३९; ४. ५१; ५. २९; ४५; ६. ६; २२; ९. १०८; १०. १४; ६१; ६२; ८५; १०८ ) या सूक्तांतून आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

नववास्त्वः—( १. ३६, १८ ) यदु, तुर्वश यांच्याबरोबर उल्लेख. तुर्वीति, नववास्त्व व बृहद्रथ यांना अग्नि मजकडे आणो, असें सूक्तद्रष्टा कण्व म्हणतो. याचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( ६. २०; १०. ४९ ) उत्तर.

नहुषः—( १०. ६३, १ ). याला ययातीचा पिता असें म्हटलें आहे. लुडविगमतानें नहुष म्हणजे लोक असून ते यदु-तुर्वशांचे विरोधी असावे ( १०. ४९, ८ ). मशर्शार हा नहुषांचा राजा होता. ( १. १२२; ५. १२; ६. २२; २६; ४६; ७. ६; ९५; ८. ६; ८; ४६; १०. ४९; ८०; ९९ ) हीं सूक्तें नहुषोल्लेखामुळें उत्तरकालीन.

नाभानेदिष्ठः—( १०. ६१, १८ ). पक्थ, तूर्वयाण यांच्या उल्लेखामुळें हें सूक्त उत्तरकालीन ठरलें आहे. वरील सूक्ताचा हा द्रष्टा असल्यामुळें वरील व्यक्तींच्या उत्तरकालीन ठरतो.

नामरः—( २. १३, ८ ). तुर्वीति, वय्य, दभीति यांच्या उल्लेखामुळें हें सूक्त उत्तरकालीन ठरलें आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

नार्यः—कुत्साचा उल्लेख असलेल्या ( ८. २४, २९ ) या सूक्तांत उल्लेख. सूक्तद्रष्टा वैयश्व याचा आश्रयदाता. अश्व्य पहा.

नार्षदः—कण्वाचें नांव. कण्वाला नृषदपुत्र असें म्हटलें आहे ( १०. ३१, ११ ). नार्षद-कण्व याचा उल्लेख ( १. ११७ ) या उत्तरकालीन सूक्तांत आहे. कण्वसंबंध पहा.

निंदिताश्वः—कुत्स, एतश, याद्व परमज्या इत्यादिकांच्या उल्लेखामुळें उत्तरकालीन ठरलेल्या ( ८. १, ३० ) या सूक्तांत उल्लेख. मेध्यातिथीचा आश्रयदाता. या मेध्यातिथीचा आसंग हाहि आश्रयदाता होता. ( आसंग पहा. ) प्रपथिन्, परमज्या हे यदुवंशज असावेत. यांच्याबरोबर याद्वांचा उल्लेख येतो.

नीपातिथिः—पक्थ व त्रसदस्यु यांचा उल्लेख असलेल्या ( ८. ४९, ९ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. सूक्तद्रष्टा प्रस्कण्व म्हणतो 'इंद्रा, तूं त्रसदस्यु, पक्थ व नीपातिथि यांनां धन देता झालास तसा मला धन दे.' ( ८. ५१ ) याहि सूक्तांत याच्या बरोबर पुष्टिगु, श्रुष्टिगु, प्रस्कण्व इत्यादिकांचा उल्लेख येतो. यावरून पुष्टिगु श्रुष्टिगु नीपातिथि, त्रसदस्यु व पक्थ हे समकालीन असावे.

नृमेधः—( १०. ८०, ३ ). जरूथासह उल्लेख. अग्नीनें जरूथास मारिलें व नृमेधास संतति प्राप्त करून दिली. कदाचित् जरूथ व नृमेध समकालीन असावे. जरूथ पहा.

नृषदः—(१०.३१,११). नार्षद-कण्व याचा पिता. नार्षद पहा.

नोधस्—नोधाः—(१.१२४,४). कक्षीवानाबरोबर उल्लेख आहे. याचा गोतमाशीं निकट संबंध येतो. याला सर्वानुक्रमणी गोतमाचा

पुत्र अथवा वंशज म्हणते. हा द्रष्टा असलेलीं सूक्तें ( १. ५८; ६४ ) हीं उत्तरकालीन. हा द्रष्टा असलेल्या एका सूक्तांत तो सुदासाचा 'इंद्रानें अंद्व नामक असुराचें धन सुदासाला दिलें' असा उल्लेख करतो ( १. ६३, ७ ). यावरून हा सुदासोत्तरकालीन असल्याचें ठरतें.

पक्थः–तूर्वयाणाची प्रजा व सुदासाचे शत्रू. यांचा उल्लेख असलेलीं ( ७. १८; ८. २२ ) सूक्तें उत्तरकालीन. यांच्या बरोबर भलानस, विषाणिन्, शिवासः, यांचा उल्लेख येतो. हेहि सुदासशत्रू असावे.

पज्रः–हें आंगिरसाचें कुलनाम आहे. कक्षीवानाला ( १. ११६; ११७; १२०; १२२ ) या सूक्तांत 'पज्रिय' म्हटलें आहे. पज्रांचा बहुवचनीं उल्लेख ( १. ११७ ) या सूक्तांत आहे. कक्षीवान् पहा.

पठर्वाः–याचा ( १. ११२ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

पड्गृभिः–( १०. ४९, ५ ). इंद्रानें श्रुतर्वनकरितां पड्गृभीचा पराभव केला असा या सूक्तांत उल्लेख आहे. या सूक्तांत आयु व कुत्स यांचा उल्लेख असल्यामुळें सूक्त उत्तरकालीन.

पणिः–( ४. ५१, ३ ). सूक्तद्रष्टा वामदेव म्हणतो, ' अत्यंत गूढ अशा अंधारांत पणि जाऊन पडोतः' पणि हे इंद्रशत्रू असून त्यांनीं लपवून ठेविलेल्या गाई अथवा उदकें सोडविण्यासाठीं आंगिरसांनीं इंद्राची प्रार्थना केली आहे. सायण यास्काला अनुसरून कोठें कोठें पणीचा वणिक् (वाणिज्य करणारे) असा अर्थ करतात. पणींचा ऋग्वेदांत अनेक स्थळीं उल्लेख आहे.

परमज्याः–आयु, कुत्स, याद्व इत्यादिकांचा उल्लेख असलेल्या ( ८. १ ) या सूक्तांत उल्लेख. लुडविगमतानें हा कदाचित् यदुवंशापैकीं मोठा मनुष्य असावा. निंदिताश्व पहा.

परावृजः–( २. १३, १२ ). सायणमतानें एक ऋषि. हा पाण्यांत बुडाला असतां अश्वींनीं याला वर काढिलें. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

पराशरः–सुदासपुरोहित वसिष्ठ याचा मुलगा. ( ७. १८ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. ( ७. १०४ ) याहि सूक्तांत अत्रीबरोबर उल्लेख.

पर्णयः–( १०. ४८, ८ ). इंद्रानें अतिथिग्वाकरितां पर्णयाचा वध केला. पर्णयाचा आणखी उल्लेख ( १. ५३ ) येथें आहे. अतिथिग्वोल्लेखामुळें सूक्त उत्तरकालीन.

पर्शुः–पृथु, पर्शु, हे भरतांचे साहाय्यकारी. ( ७. ८३ १ ), या सूक्तांत सुदासासह उल्लेख.

पाकस्थामनः–कौरयाण पहा.

पायुः–( ६. ४०–२४ ). हा भरद्वाजकुलांतील होता. याचा आश्रयदाता अश्वथ ( दिवोदास ) हा होता. अश्वथ पहा. सर्वानुक्रमणीप्रमाणें पायु द्रष्टा असलेलें ( ६. ७५ ) सूक्त उत्तरकालीन. अनुक्रमणींत याला भरद्वाजपुत्र म्हटलें आहे.

पारावतः–सायणमतानें पलीकडील ( दूरचे ) लोक. सरस्वती नदीला ' पारावतघ्नी ' असें म्हटलें आहे ( ६. ६१ ). कदाचित् हे लोक सरस्वती नदीच्या कांठचे असावे. यांचा उल्लेख ( ५. ५२; ८. ३४; १०० ) या सूक्तांत आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

पार्थवः–अभ्यावर्तिन् पहा.

पार्थ्यः–तान्व पहा.

पार्षद्वाणः–प्रस्कण्वाचा आश्रयदाता. पुष्टिगूच्या ( ८. ५१ ) या सूक्तांत उल्लेख. प्रस्कण्व, पुष्टिगु पहा.

पाशद्युम्न-वायतः–( ७. ३३, २ ). याच्या यज्ञास इंद्र गेला असतां वसिष्ठानें त्याला सुदासाच्या यज्ञामध्यें आणिलें. सूक्त उत्तरकालीन.

पिठीनसः–दभीति, चुमुरि यांचा उल्लेख असलेल्या सूक्तांत ( ६. २६, ६ ) उल्लेख. इंद्रानें पिठीनस नामक राजाला रजि नामक स्त्री दिली. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

पिप्रुः–वैदथिन्–ऋजिश्व्याकरितां इंद्रानें पिप्रूला मारिलें. ऋजिश्वन् पहा. पिप्रूचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५१; १०१; १०३; २. १४; ४. १६; ५. २९; ६. १८; २०; ८. ३२; १०. ९९; १३८ ) उत्तरकालीन. पिप्रूचा शंबरासह उल्लेख येतो. शुष्ण, पिप्रु व कुयव यांचा वध करतेवेळीं इंद्रानें शंबराचीं नगरें विध्वंसिलीं.

पुरयः–( ६. ६३; ९ ). भरद्वाजाचा आश्रयदाता. या सूक्ताचा द्रष्टा भरद्वाज याला पुरय घोडे देतो. भरद्वाजाबरोबर दिवोदासाचा उल्लेख ( ६. १६, ५ ) आहे. दिवोदासाचा भरद्वाज पुरोहित होता.

पुरुकुत्सः–हा पुरुवंशांतील असावा. याचा सुदासासह उल्लेख आहे ( १. ६३, ७ ). हा त्रसदस्यूचा मुलगा होता. त्रसदस्यु पहा. पुरुकुत्साचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ११२; १७४; ६. २० ) उत्तर.

पुरुकुत्सानीः–पुरुकुत्सस्त्री. पुरुकुत्स पहा. पुरुकुत्सानीचा उल्लेख असलेलें सूक्त ( ४. ४२, ९ ) उत्तर.

पुरुणीथः–( १. ५९, ७ ) शतवनीपुत्र व भरद्वाजांचा आश्रयदाता. ( १. ५९, ७ ) भरद्वाज सुदासपुरोहित होता.

पुरुपंथाः–( ६. ६३, १० ). भरद्वाजाचा आश्रयदाता पुरुपंथा भरद्वाजाला धन देत होता. भरद्वाज सुदासपुरोहित होते.

पुरुमायः–( ८. ६३, १० ). इंद्रोत, आतिथिग्व इत्यादिकांचा उल्लेख असलेल्या ( ८. ६८, १० ) सूक्तांत उल्लेख आहे. कदाचित् हा त्यांचा संबंधी व पुरुवंशज असावा.

पुरुमित्रः–( १. ११७ ). याचा या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख आहे. हा विमदपत्नी 'कमद्यू' हिचा पिता. याचा आणखी उल्लेख ( १०. ३९ ) या सूक्तांत आहे. हा कदाचित पुरुवंशज असावा.

पुरुमीळ्हः–तरंत, दार्भ्य यांचा उल्लेख असलेल्या सूक्तांत ( ५. ६१, ९ ) उल्लेख. दार्भ्य पहा. पुरुमीळ्हाचा आणखी उल्लेख

असलेलीं सूक्तें ( १. १५१; १८३; ८. ७१ ) उत्तरकालीन. हा पुरुकुलांतील असावा.

पुरुषंतिः—ध्वसंतीसह उल्लेख. ध्वसंति पहा.

पुरूरवस्ः—हा पुरुवंशांतील असावा. याचा उल्लेख ( १. ३१; १०. ९५ ) या सूक्तांत आहे. 'अग्नीनें पुरूरव्यावर अनुग्रह केला' असें सूक्तद्रष्टा हिरण्यस्तूप म्हणतो. उर्वशीपुरूरवासंवाद प्रसिद्ध आहे.

पुष्टिगुः—याचा (८. ५१) नीपातिथि, मेध्यातिथि, यांच्यासह उल्लेख. नीपातिथि पहा.

पूतक्रताः—( ८. ६८; १७ ) अतिथिग्व, इंद्रोत, आश्वमेध, पूतक्रता हीं सर्व एकाच व्यक्तीचीं नांवें असावीं. किंवा ते सर्व समकालीन असावे.

पूरुः—हें कुलनाम असून दिवोदास व सुदास हे याच कुलांतील होत. सुदासास (१.६३,७) व दिवोदासास (१.१३०,७) 'पूरवे' म्हटलें आहे. यांचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५९;१३१; १७४; ४. २१; ३८; ६. २०; ७. ५; १९; ९६; ८. ६४ ) उत्तर.

पृक्षयामन्ः—( १. १२२, ७ ). हा पज्र कुलांतील असावा अथवा सायणमताप्रमाणें कक्षीवानाचेंच नांव. श्रुतरथ व प्रियरथ हे कक्षीवानाचे आश्रयदाते होते. कक्षीवानसंबंध पहा. सूक्त उत्तरकालीन.

पृथवानः—( १०. ९३,१४ ),दुःशीम याच्या बरोबर उल्लेख. तान्व व दुःशीम पहा.

पृथुः—( ७. ८३, १ ). एका जातीचे लोक. पर्शूशीं संबंध. पर्शु पहा.

पृथुश्रवसः—कानीताचें दुसरें नांव. कानीत पहा. दिवोदासाच्या उल्लेखामुळें उत्तरकालीन ठरलेल्या ( १. ११६ ) या व ( ८. ४६ ) या सूक्तांत उल्लेख.

पृदाकुसानुः—( ८. १७, १५ ). अत्रिकुलांतील इरिंबिठ नामक सूक्तकाराच्या सूक्तांत उल्लेख. लुडविगच्या मतें हा एका यज्ञसांप्रदायाचा प्रवर्तक होता. याचा दाशराज्ञयुद्धांतील व्यक्तींशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं.

पृश्निगुः—पुरुकुत्स याच्यासह ( १. ११२ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

पृषध्रः—( ८. ५२, २ ). आयु, दशोणि यांच्यासह उल्लेख. सूक्तद्रष्टा आयु म्हणतो 'इंद्रा तूं दशोणीसह सोमपानानें मदयुक्त झालास तसा पृषध्रासह हो.' पृषध्र दशोणीसमकालीन असावा. दशोणि पहा.

पेदुः—याचा ( १. ११६; ११७ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख असून ( १. ११८; ११९; १०. ३९ ) या सूक्तांत उल्लेख आहे. अश्वीदेवांनीं पेदूला घोडा दिल्याबद्दल कक्षीवान् उल्लेख करतो. कदाचित् पेदु कक्षीवान्समकालीन असावा.

पेरुकः—( ६. ६३, ९ ). पुरय व पुरुपंथा यांच्यासह उल्लेख. भरद्वाजाचा आश्रयदाता. भरद्वाज पेरुकापासून धन मिळाल्याचें उल्लेखितो.

पैजवनः—सुदासाचें पैतृक नांव. याचा ( ७. १८ ) या सूक्तांत उल्लेख आहे.

पौतक्रतः—पूतक्रतपुत्र. पृषध्र द्रष्टा असलेल्या ( ८. ५६ ) सूक्तांत उल्लेख. पृषध्राचा आश्रयदाता. पृषध्रसंबंध पहा.

पौरः—( ८. ३, १२ ). पुरुवंशज. आयु व रुशम; यांच्यासह उल्लेख. मेध्यातिथि म्हणतो, 'ज्या रक्षणसामर्थ्यानें रुम, रुशम व पौर यांचें रक्षण केलेंस त्या सामर्थ्यानें माझें रक्षण कर.'

पौरुकुत्स्यः—पुरुकुत्साचा वंशज अथवा पुत्र. पुरुकुत्स पहा. पौरुकुत्सि हें याचेंच नांव. याचा ( ५. ३३; ७. १९; ८. १९ ) या ठिकाणीं उल्लेख आहे. सूक्तें उत्तरकालीन.

प्रतृदः—हें तृत्सूंचेंच दुसरें नांव आहे. यांचा वसिष्ठ पुरोहित होता ( ७. ३३ ). सूक्त उत्तर.

प्रपथिन्ः—निंदिताश्व पहा.

प्रमगंदः—( ३. ५३, १४ ). कीकटांचा राजा. सुदासशत्रु. सूक्त उत्तर.

प्रस्कण्वः—कण्वकुलांतील होते. प्रस्कण्व व कण्व यांचा यदुतुर्वशांशीं बराच संबंध येतो. प्रस्कण्व व कण्व हे यदुतुर्वशांचे पुरोहित असावे. प्रस्कण्वाचा उल्लेख असलेलीं ( १. ४४; ४५; ८. ३;५१;५४ ). सूक्तें व प्रस्कण्व ज्या सूक्तांचा द्रष्टा आहे अशीं सूक्तें ( १. ४४; ५०; व ९. ९५ ) उत्तरकालीन. सर्वानुक्रमणी याला 'कण्वपुत्र' म्हणते.

प्रस्तोकः—संजय व प्रस्तोक हीं दिवोदासाचींच नांवें आहेत. याला संजयपुत्र असें हि म्हटलें आहे ( ६. ४७, २२ ).

प्रातर्दनिः—प्रतर्दनपुत्र. क्षत्रश्रीचें दुसरें नांव. क्षत्रश्री पहा.

प्रियमेधः—हा कण्व कुलांतील होता. याचा अत्रीबरोबर उल्लेख येतो. अत्रींचा संबंध पहा. प्रियमेध हें कुलनाम असावें. कारण बऱ्याच ठिकाणीं 'प्रियमेधासः' असें रूप आढळतें. प्रियमेध द्रष्टा असलेल्या सूक्तांत ( ८. ६८; ६९ ) अतिथिग्व व इंद्रोत यांचा उल्लेख येतो. हे प्रियमेधाचे आश्रयदाते होते. प्रियमेधाचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ४५; १३९; ८. २; ३; ४; ५; ६; ८; ६९; १०. ७३ ) व प्रियमेध द्रष्टा असलेलीं सूक्तें (८. ६८; ८७; ९. २८ ) उत्तर.

प्रियरथः—ग्रिफिथमतानें कक्षीवानाचा आश्रयदाता. कक्षीवान् कण्वकुलांतील होता. कक्षीवान् पहा. प्रियरथाचा उल्लेख असलेलें सूक्त ( १. १२२ ) उत्तरकालीन आहे. सायण प्रियरथ व श्रुतरथ हीं कक्षीवानाचीं विशेषणें समजतात.

बभ्रुः—रुम रुशम यांचा राजा ऋणंचय हा बभ्रूचा आश्रयदाता होता. ऋणंचय पहा. बभ्रूचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( २. ३३; ५. ३०; ७. ४४; ८. २२; २९; ९. ९८ ) उत्तरकालीन.

बल्बूथः-( ८. ४६, ३२ ). अश्वपुत्र वश याचा आश्रयदाता. या वशाचा कानीत नामक आश्रयदाता असून त्याचा ( १. ११६ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख येतो. बल्बूथाचा उल्लेख असलेलें सूक्त उत्तरकालीन. अश्व्य पहा.

बाहुवृक्तः-क्रिवि, तर्य यांसह उल्लेख. तर्य पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

बृबुः-पणींचा राजा अथवा पणींचा सुतार, व भरद्वाजाचा आश्रयदाता. ( ६. ४५. ) या सूक्तांत बृबूचा उल्लेख आहे. भरद्वाज भरतांचा पुरोहित होता.

बृसयः-याला सरस्वती नदीच्या कांठीं इंद्रानें मारिलें. याच नदीवर वध्र्यश्वाला दिवोदास मिळाला. याचा दिवोदासाचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख ( ६. ६१, ३ ) असून दुसऱ्या एका सूक्तांत बृसयाला त्वष्टा-वृत्रपिता म्हटलें आहे ( १. ९३, ४ ). प्रत्यक्ष संबंध नाहीं.

बृहदुक्थः-( १०. ५४; ६ ) या सूक्तांत याचा उल्लेख आहे. याला सर्वानुक्रमणींत वामदेवाचा पुत्र अथवा गोत्रज म्हटलें आहे. वामदेव हा मंडल ४ चा द्रष्टा असून त्याचा कुत्स, पिप्रु, ऋजिश्वन् यांचा उल्लेख ( ४. १६, १८ ) असलेल्या सूक्तांत उल्लेख येतो. वामदेवाच्या ४ थ्या मंडलांत अतिथिग्व, दिवोदास, त्रसदस्यु, यदु, तुर्वश, इत्यादिकांचा उल्लेख असल्यामुळें वामदेव वरील व्यक्तींच्या नंतरचा अथवा समकालीन तरी असावा. बृहदुक्थाचा उल्लेख असलेलीं सूक्तें उत्तर.

बृहद्रथः- ( १. ३६, १८ ). यदु, तुर्वश यांच्यासह उल्लेख. नववास्त्व पहा. बृहद्रथाचा आणखी उल्लेख ( १०. ४९ ).

भजेरथः-( १०. ६०, २ ) मध्यें अगस्त्य, असमाति, इक्ष्वाकु यांच्यासह उल्लेख. सायणमताप्रमाणें असमातीचा शत्रु अथवा पूर्वज ( १०. ६०, ५ ). सूक्तद्रष्टा बंधु आपणास अगस्त्य याचा दौहित्र म्हणवितो. व धनप्राप्तीसाठीं असमातीला बोलावितो. असमाति हा अगस्त्याचा व बंधु वगैरेंचा आश्रयदाता होता. अगस्त्य पहा.

भयमानः-कक्षीवानाच्या (१. १००) सूक्तांत अंबरीष, सहदेव सुराधस् यांच्यासह उल्लेख. ऋज्राश्व, वार्षागिर पहा.

भरतः-हें सुदास, दिवोदास, तृत्सु, व विश्वामित्राचे वंशज त्यांचें कुलनाम होतें. भरत नांवाची कोणी व्यक्ति होती, व त्या व्यक्तीच्या वंशजांना 'भारत' म्हणत असत. सायणांनीं काहीं ठिकाणीं 'भरत' याचा 'हवि अर्पण करणारा' असा अर्थ केलेला आढळतो. भरतांचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( २. ३६; ३. ३३; ५३; ५.५४; ६. १६; ७. ८; ३३ ) उत्तरकालीन असावीं.

भरद्वाजः-( १. ११६, १८ ). दिवोदासाचा पुरोहित. भरद्वाजाचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५९; ११२; ६. १०; १५; १६; १७; २३; ३१; ३५; ४८ ) उत्तरकालीन होत. सहाव्या मंडलाचा द्रष्टा भरद्वाज असून त्या मंडलांतील खुद्द त्याच्याच नांवावर असलेलीं ( १५; ३१-३६; ४४; ५२ ) यांखेरीज सर्व सूक्तें उत्तरकालीन. भारद्वाज हें कुलनामहि असावें. कारण त्याचा बहुवचनीं उल्लेख ( ६. २५; ४७; ५० ) या सूक्तांतून येतो.

भलानसः-सुदासशत्रु. पक्थ पहा.

भारद्वाजः-( ६. ५१, १२ ) भरद्वाजाचे वंशज.

भार्वेरः-सायणमताप्रमाणें इंद्रविशेषण. परंतु लुडविग म्हणतो कीं हें औशिजाचें नांव असावें (४. २१, ७). औशिजसंबंध पहा.

भाव्य-भावयव्यः-कक्षीवानाचा आश्रयदाता. ( १. १२६ ) या उत्तरकालीन सूक्तांत उल्लेख. कक्षीवान् पहा.

भुज्युः-तुग्रपुत्र. तुग्राचा संबंध स्पष्ट आहे. तुग्र पहा. भुज्यूचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ११२; ११६; ११७; ११९; ४. २७; ६. ६२; ७. ६८; ६९; ८. २२; ४६; १०. ४०; ६५; ९५; १४३ ) उत्तरकालीन.

भूतांशः-( १०. १०६, ११ ). सर्वानुक्रमणी याला कश्यपपुत्र म्हणते. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

भृगवाणः-कक्षीवान् द्रष्टा असलेल्या ( १.१२० ) व ( ४. ७ ) या सूक्तांत उल्लेख असल्यामुळें तीं उत्तरकालीन. कदाचित् कक्षीवानाचेंच हें नांव असावें. कारण तो आपणास ( याच ठिकाणीं ) पज्रिय म्हणवितो. कक्षीवानाला कांहीं स्थलीं पज्रिय म्हटलें आहे. कक्षीवान् पहा.

भृगुः-( ८. ३, ९ ). भृगूचा या सूक्तांत प्रस्कण्वाबरोबर उल्लेख आहे. प्रस्कण्व पहा. भृगूचा आणखी उल्लेख ( १. ६० ) या सूक्तांत आहे. कदाचित् भृगु प्रस्कण्वकालीन असावे. भृगु हें कुलनाम हि होतें. भृगूंचा बहुवचनीं उल्लेख ( ३. २; ५; ८. ३५ ) या ठिकाणीं येतो.

भेदः-इंद्रानें सुदासाकरितां भेदास मारिलें (७. १८, १९ ). भेदाचा आणखी उल्लेख असलेलीं सूक्तें ( ७. ३३; ८३ ) उत्तर.

भोजाः-( ३. ५३; ७ ). 'भोज' नामक लोक. सुदासाचे अनुचर. सुदासानुचर भोज हे मला अश्वमेधामध्यें मदत करोत असें विश्वामित्र म्हणतो.

मत्स्यासः-( ७. १८, ६ ). 'मत्स्य' नामक लोक. हे तुर्वशाचे शत्रु होते. तुर्वशानें मत्स्य लोकांना आपल्या अनुशासनाखालीं आणिलें.

मनसः-( ५. ४४, ६ ). एवावद, अवत्सार क्रिवि यांच्यासह उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

मन्धातृः-( ८. ४०, १२ ). अनुक्रमणीप्रमाणें युवनाश्व पुत्र. सूक्तद्रष्टा नाभाक म्हणतो, मंधाता, अंगिरस् व [माझा] पिता नभाक यांच्याप्रमाणें स्तुति करणाऱ्या माझें इंद्राग्नींनीं रक्षण केलें. नभाकसंबंध संशयित आहे. कक्षीवानाच्या ( १. ११२, १३ ) सूक्तांत 'क्षेतामध्यें मंधात्याचें अश्वीदेवांनीं रक्षण केल्याचा' उल्लेख आहे. यावरून मंधाता कक्षीवानाचा पूर्वकालीन परंतु फार दूरचा नसावा.

मशर्शारः–( १. १२२, १५ ). लुडविगमताप्रमाणें नहुषांचा राजा व सुदासशत्रु. कक्षीवानाच्या सूक्तांत उल्लेख. कक्षीवान् म्हणतो 'आयूचे तीन मुलगे व मशर्शाराचे चार मुलगे मला त्रास देतात.' कक्षीवान् पहा.

मानः–अगस्त्याचें दुसरें नांव ( ७. ३३, १३ ). अगस्त्य पहा.

मान्दार्यः–मान्याचें दुसरें नांव. मान्दार्य-मान्य यांचा उल्लेख ( १. १६५ ) या ठिकाणीं असून शिवाय ( १. १६६; १६७; १६८ ). या सूक्तांतून आहे. मान व अगस्त्य पहा.

मामतेयः–दीर्घतमस्चें दुसरें नांव. दीर्घतमस् याच्या आईचें नांव ममता असें होतें व सर्वानुक्रमणीप्रमाणें दीर्घतमस्च्या पित्याचें नांव 'उचथ्य' असें होतें. मामतेयाचा उल्लेख ( १. १४७; १५२; १५८ ) या सूक्तांमध्यें आहे.

मायु-मायवः–( १०. ९३, १५ ). तान्व, पार्थ्य यांच्यासह उल्लेख. तान्व पहा.

मारुताश्वः–( ५. ३३, १० ). संवरणाचा आश्रयदाता. ध्वन्य पहा.

मित्रातिथिः–( १०. ३३, ७ ). उपमश्रवस्चा पिता. उपमश्रवस् पहा.

मुद्गलः–( १०. १०२, ६ ). याच्या गाई शत्रूंनीं नेल्या असतां यानें शत्रूंनां जिंकून त्या परत आणिल्या. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

मुद्गलानीः–( १०. १०२, ५ ). मुद्गलाची बायको. हिनें लढाईत मुद्गलाचें सारथ्य केलें. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

मृगयः–( १०. ४९, ५ ). इंद्रानें आर्क्ष–श्रुतर्वणाकरितां मृगयाला मारिलें. श्रुतर्वण–आर्क्ष पहा.

मृळीकः–याला सर्वानुक्रमणी वसिष्ठपुत्र म्हणते ( १०. १५० ) या सूक्ताचा द्रष्टा. या सूक्तांतील सर्व ऋचांमध्यें याचा उल्लेख आहे. ५व्या ऋचेमध्यें तो 'अत्रि, भरद्वाज, गविष्ठिर, कण्व, त्रसदस्यु, यांच्यासह संग्रामांत आमचें रक्षण कर' अशी अग्नीची प्रार्थना करतो. तो वरील व्यक्तींचा समकालीन असावा.

मेधः–( ८. ५०, १० ). याचा कण्व, दीर्घनीथ, गोशर्य, यांच्यासह उल्लेख. कण्वसमकालीन असावा.

मेध्यः–पृषध्र, दशोणि, दशशिप्र, यांच्यासह उल्लेख ( ८. ५२, २ ). अनुक्रमणीप्रमाणें हा ( ८. ५३; ५४; ५७; ५८ ) या सूक्तांचा द्रष्टा असून, ( ८. ५३, २ ) मध्यें कुत्स, आयु अतिथिग्व यांचा उल्लेख करतो. यावरून तो वरील व्यक्तींच्या उत्तरकालांतील असावा.

मेधातिथिः–मेध्यातिथिः–अनुक्रमणीमध्यें याला काण्व–कण्वपुत्र अथवा कण्वकुलोत्पन्न म्हटलें आहे. ( ८. २, ४० ) मध्यें तो आपणास 'काण्वमेध्यातिथि' म्हणवितो. तो आसंगाचा पुरोहित असावा. ( ८. १, ३० ) मध्यें आसंगाजवळून धन मिळाल्याबद्दल तो आसंगाची स्तुति करतो. मेधातिथींचा ( १. ३६; ३७; ८. १; २; ८; ३३; ४९; ५१; ९. ४३ ) या सूक्तांत उल्लेख आहे.

मेनाः–( १. ५१, १३ ). 'इंद्र वृषणश्व्याची मेना झाला' असा उल्लेख आहे. याशिवाय प्रत्यक्ष संबंध नाहीं.

यक्षु–यक्षवः–सुदासशत्रु. अजस् पहा.

यजतः–अवत्सार एवावद यांच्यासह ( ८. ३२ ) या सूक्तांत उल्लेख. प्रत्यक्ष संबंध नाहीं. अवत्सार, क्रिवि पहा.

यदुः–सुदासशत्रु. यदुतुर्वशांनां अतिथिग्वाच्या ताब्यांत देण्याबद्दल वसिष्ठ इंद्राची प्रार्थना करतो ( ७. १९, ८ ). इंद्रानें यदुतुर्वश व शंबर यांनां सुदासाच्या ताब्यांत दिलें ( ९. ६१, २ ). यदुतुर्वश हे प्रथम सुदासाचे शत्रू असून नंतर मित्र झाले असावे. कारण शत्रूंनीं दूर टाकिलेल्या यदुतुर्वशांनां जवळ आणिलें ( ६. ४५, १ ); यदु तुर्वशांनां अभिषेकार्ह केलें ( ४. ३०, १७ ); तरून नेलें ( ६. २०, १२ ); अशा तऱ्हेचे उल्लेख आढळतात. यदूच्या वंशजांनां याद्व असें म्हटल्याचें आढळतें. यदूचा उल्लेख ( १. ३६; ५४; १०८; १७२; १७४; ४. ३०; ५. ३१; ६. ४५; ८. ४; ७; ९; १०; ४५; ९. ६१; १०. ४९; ६२ ) असलेलीं सूक्तें उत्तरकालीन.

याद्वः–यदूचें कुलनाम. याद्वांचा उल्लेख ( ७. १९; ८. १; ६ या सूक्तांतून येतो.

युध्यामधिः–( ७. १८, २४ ). सुदासशत्रु. इंद्रानें सुदासाकरितां युध्यामधीचा वध केला.

रजिः–( ६. २६, ६ ). पिठीनसाची स्त्री. दभीति, चुमुरि यांच्यासह उल्लेख. इंद्रानें दभीतीकरितां चुमुरीला मारिलें आणि पिठीनस याला रजि नामक स्त्री दिली. याशिवाय प्रत्यक्ष संबंध नाहीं.

रथप्रोष्ठः–( १०. ६०, ५ ). असमाति व रथप्रोष्ठ यांचा एकत्र उल्लेख आहे. अनुक्रमणीप्रमाणें असमाति हा अगस्त्याचा दौहित्र जो बंधु त्याचा आश्रयदाता. भजेरथ व असमाति पहा. रथप्रोष्ठ व असमाति हीं एकाच व्यक्तीचीं नांवें असावीं.

रथवीति-दार्भ्यः–श्यावाश्वाचा आश्रयदाता व बृहद्देवतेप्रमाणें श्यावाश्वाचा श्वशुर. श्यावाश्वाला रथवीति-दार्भ्य यानें आपली मुलगी दिली. पुरुमीळ्ह व तरंत हे विदथिन्चे मुलगे असून ते श्यावाश्वाचे आश्रयदाते होते. यांनीं श्यावाश्वाला दान दिल्याचा उल्लेख ( ५. ६१ ) मध्यें आहे. यावरून तरंत, पुरुमीळ्ह, दार्भ्य-रथवीति व श्यावाश्व हे समकालीन असावे. पुरुमीळ्ह, तरंत हे पुरुवंशांतील असावे.

रहूगणः–हें गोतमाचें कुलनाम आहे. ( १. ७८, ५ ) या ठिकाणीं सूक्त-द्रष्टा गोतम 'आम्ही रहूगण अग्नीसाठीं मधुर स्तोत्रें पठण करतों' असा उल्लेख करतो. गोतमोल्लेखामुळें सूक्त उत्तर.

रामः–( १०. ९३, १४ ). पृथवान, दुःशीम व वेन यांच्यासह उल्लेख. सूक्तद्रष्टा तान्व आपणास मिळालेल्या दानाचें पृथवान, दुःशीम, वेन व राम यांच्या पुढें वर्णन करतो. तान्व व दुःशीम पहा.

रुधिक्राः–( २. १४, ५ ). पिप्रुसमकालीन एक असुर. स्वश्न व पिप्रु पहा.

रुमः-या लोकांचा ऋणंचय राजा होता. ऋणंचय पहा.

रुशतीः-( १. ११७, ८). अश्वी देवांनीं श्याव नामक ऋषीला रुशती नामक भार्या दिली. श्याव आणि रुशती यांचा याशिवाय अन्यत्र उल्लेख नाहीं व प्रत्यक्ष संबंध नाहीं. सायणमतानें श्याव व श्यावाश्व ही एकच व्यक्ति असावी.

रुशमः-रुम पहा.

रेभः-शत्रूंनीं याला दहा दिवस कूपांत टाकिलें होतें. अश्वींनीं त्याला वर काढिलें. (१. ११२; ११६; ११७; ११८; ११९; १०. ३९ ). या सूक्तांतून रेभाचा उल्लेख असून सर्वत्र याच अर्थानें आहे. रेभाचा कण्वासह उल्लेख ' रेभाला कूपांतून वर काढिलें व कण्वाचें बधिरत्व नाहींसें केलें ' असा आला आहे. कदाचित् रेभ कण्वसमकालीन असावा. सूक्तें उत्तर.

रोमशाः-कक्षीवानाचा आश्रयदाता भाव्य-भावयव्य याची स्त्री. ( १. १२६ ) या ठिकाणीं उल्लेख. कक्षीवान् व भाव्य पहा.

लक्ष्मण्यः-( ५. ३३, १० ). याचेंच दुसरें नांव ध्वन्य. पुरुकुत्सपुत्र त्रसदस्यु, लक्ष्मण्य, मारुताश्व हे संवरणाचे आश्रयदाते होते. त्रसदस्यु पुरुकुत्सपुत्र होता व पुरुकुत्स पुरुवंशज होता.

लोपामुद्राः-( १. १७९, ४ ). वसिष्ठबंधु अगस्त्य याची स्त्री.

वंगृदः-( १. ५३, ८ ). अतिथिग्वशत्रु. इंद्रानें अतिथिग्वासाठीं वंगृदाचा शिरच्छेद केला.

वत्सः-अनुक्रमणींत याला कण्वपुत्र म्हटलें आहे व ( ८. ८, ८ ) येथें तो कण्वपुत्र असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. ( ८. ६ ) या सूक्ताचा हा द्रष्टा असून यांत वत्साचा उल्लेख आहे व त्यामध्यें तो तिरिंदिराजवळून धन मिळाल्याचें वर्णितो. तिरिंदिर पहा. वत्साचा उल्लेख या शिवाय ( ८. ९ ) या सूक्तांत आहे.

वध्रिमतीः-अश्वीदेवांनीं हिरण्यहस्त नामक पुत्र वध्रिमतीला दिल्याबद्दल सूक्तद्रष्टा कक्षीवान् उल्लेख करतो ( १. ११६; ११७; ६. ६२; १०. ३९; ६५ ). याशिवाय प्रत्यक्ष संबंध नाहीं.

वध्र्यश्वः-( ६. ६१, १ ). दिवोदासपिता. सरस्वती नदीनें वध्र्यश्वाला दिवोदास पुत्र दिला. वध्र्यश्वाचा आणखी उल्लेख ( १०.६९ ) या सूक्तांत आहे.

वन्दनः-( १०. ३९, ८ ) कलि, विश्पला, यांच्या बरोबर उल्लेख. अश्वी देवांनीं कूपांत पडलेल्या वंदनास वर काढिलें व अगस्त्याचा आश्रयदाता खेल याच्या पत्नीचा युद्धांत पाय तुटला असतां लोखंडी पाय बसवून दिला. कदाचित् वंदन खेल-विश्पला यांचा समकालीन असावा. याशिवाय प्रत्यक्ष संबंध नाहीं. वन्दनाचा वरीलप्रमाणेंच आणखी उल्लेख ( १. ११२; ११६; ११७; ११८; ११९ ) या सूक्तांतून आहे.

वम्रः-( १. ११२, १५ ). अश्वी देवांनीं याचें रक्षण केल्याबद्दल उल्लेख. वम्र हा ( १०. ९९ ) या सूक्ताचा द्रष्टा असून ५ व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे; व ऋचा ९ मध्यें तो इंद्रानें कुत्साकरितां शुष्णाचा वध केल्याबद्दल उल्लेख करतो. कदाचित् कुत्ससमकालीन असावा.

वय्यः-तुर्वीतिसह उल्लेख. इंद्रानें तुर्वीति व वय्य यांना तरून नेलें ( २. १३, १२; ४. १९, ६ ). तुर्वीति पहा.

वरशिखः-इंद्रानें अभ्यावर्तिन्-चायमानाकरितां वरशिखाच्या मुलांना मारिलें ( ६. २७, ५ ). अभ्यावर्तिन्-चायमान हा दाशराज्ञयुद्धांत मारला गेला. अभ्यावर्तिन् पहा.

वरोसुषामनः-विश्वमनस्चा आश्रयदाता. विश्वमनस् हा ( ८. २३-२६ ) या सूक्तांचा द्रष्टा असून यांपैकीं एका सूक्तांत तो वरोसुषामन् याला धन प्राप्त होण्यासाठीं अग्नीची प्रार्थना करतो ( २३, २८ ). विश्वमनस् व वैय्यश्व हे एकच. अश्व्य पहा. वरोसुषामन्चा (८. २३; २४; २६ ) या सूक्तांतून उल्लेख आहे.

वर्चिनः-( ७. ९९, ५ ). दिवोदास शत्रुशंबर याचा सहकारी. इंद्रानें शंबराचीं नगरें विध्वंसिलीं व वर्चिनास मारिलें असा उपर्युक्त ऋचेंत उल्लेख आहे व तसाच उल्लेख आणखी ( २. १४; ४.३०; ६. ४७ ) या ठिकाणींहि आहे. शंबर पहा.

वव्रिः-अनुक्रमणीप्रमाणें ( ५. १९,१ ) या सूक्ताचा द्रष्टा व अत्रिपुत्र. प्रत्यक्षसंबंध नाहीं. अत्रि पहा.

वशः-अश्व्याचें नांव. अश्व्य पहा.

वसिष्ठः-मित्रावरुणपुत्र, अगस्त्यबंधु व भरतकुलोत्पन्न सुदासादिकांचा पुरोहित. सातव्या मंडलास वासिष्ठमंडल म्हणतात. यांतील सर्व सूक्तांचा द्रष्टा वसिष्ठच आहे. वसिष्ठांचा एकवचनीं व बहुवचनीं उल्लेख सातव्या मंडलांत ( ७. १; ७; ९; १२; १८; २२; २३; २६; ३३; ३७; ३९; ४२; ५९; ७०; ७३; ७६; ७७; ८०; ८६; ८८; ९०; ९५; ९६ ) इतक्या सूक्तांतून आहे. याशिवाय वासिष्ठाचा उल्लेख (१. ११२; २. ९; १०. १५; ६५; ६६; ९५; १२२; १५०; १८१ ) या सूक्तांमध्यें आहे.

वसुरुचः-( ९. ११०, ६ ). सायणमतानें एक व्यक्ति. सूक्तद्रष्टे त्र्यरुण व त्रसदस्यु, हे आहेत. सूक्तांत दुसऱ्या कोणाचा उल्लेख नाहीं. प्रत्यक्ष कोणाशीं संबंध नाहीं.

वसुरोचिषः-( ८. ३४, १६ ). ग्रिफिथच्या मतानें गायकांचा आश्रयदाता. याचा उल्लेख फक्त एकदांच आला आहे. सायण याचा व्यक्तिवाचक अर्थ घेत नाहींत. याचा कोणाशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं.

वसूयुः-(५. २५, २६) या सूक्तांचा द्रष्टा. उपर्युक्त सूक्त २५ यांतील ९ व्या ऋचेंत ' वसूयवः ' असा बहुवचनीं उल्लेख. कदाचित् विशेषनाम असावें. वरील दोन्ही सूक्तांत आणखी कोणाचा उल्लेख अथवा संबंध दृष्ट नाहीं.

वातरशनाः-( १०. १३६, २ ) या ठिकाणीं वातरशन नामक मुनींचा उल्लेख आहे. अनुक्रमणीप्रमाणें जूति, वातजूति, विप्रजूति व वृषाणक हे या सूक्ताचे द्रष्टे असून अनुक्रमणी त्यांना

वातरशनऋषी म्हणते. ऋग्वेदांत जूति इत्यादिकांचा उल्लेख नाहीं. वरील सूक्तांत आणखी कोणाचा उल्लेख नाहीं.

वामदेवः–चवथ्या मंडलास वामदेव मंडल असें म्हणतात व त्यांतील ४२–४४ सूक्तांशिवाय बाकीच्या सर्व सूक्तांचा द्रष्टा वामदेव आहे. वामदेवाचा उल्लेख फक्त (४. १६, १८) याठिकाणीं आहे. परंतु तो कोणा व्यक्तीशीं संबंध दाखविणारा नाहीं. अनुक्रमणीप्रमाणें वामदेव हा मंडल ४ चा द्रष्टा मानिल्यास या मंडलांतील बहुतेक सर्व सूक्तांत सुदास, दिवोदास, संजय, अतिथिग्व, कुत्स इत्यादि उत्तरकालीन व्यक्तींचा उल्लेख आहे व ४२–४४ या सूक्तांचे द्रष्टे हिं त्र्यरुण व त्रसदस्यु हे आहेत. तेव्हां वामदेव ही व्यक्ति सुदास-समकालीन असून चवथें मंडल दाशराज्ञयुद्धोत्तर मानण्यास हरकत नाहीं.

वायतः–वयत पुत्र. पाशद्युम्न याचें दुसरें नांव. पाशद्युम्न पहा.

वाय्यः–(५. ७९, १). वय्यपुत्र. याचेंच नांव सत्यश्रवस. वय्य पहा.

वार्षागिरः–(१. १००, १७). ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान, व सुराधस् यांनां वार्षागिर–वृषागिरपुत्र म्हटलें आहे. उपर्युल्लिखित सूक्ताचे हे द्रष्टे आहेत. यांपैकीं ऋज्राश्वाचा नहुष लोकांशीं संबंध होता. नहुष व ऋज्राश्व पहा. वरील मंडळीपैकीं सहदेवाचा पुत्र साहदेव्यसोमक हा वामदेवाचा आश्रयदाता होता. वामदेव (४. १५) या सूक्तांत सोमकसाहदेव्याजवळून धन मिळाल्याचें उल्लेखितो. यावरून ऋज्राश्व अंबरीषादि वृषागिरपुत्र वामदेवाच्या बऱ्याच जवळच्या काळांतील असावे.

विमदः–याला आश्विनांनीं पुरुमित्राची कन्या बायको करून दिली असा उल्लेख (१. ११७, २०; व १०. ३९, ७) या ठिकाणीं आहे. ऋचेंत 'पुरुमित्रस्य योषां' असा उल्लेख असतांना सायणांनीं त्याचा 'कन्या' असा अर्थ दिला आहे. पुरुमित्र हा पुरुवंशांतील असावा असें एक मत आहे, त्याप्रमाणें विमद हा पुरुमित्र जामात म्हणजे पुरूंचा संबंधी ठरतो. विमदाचा आणखी उल्लेख (१. ५१; ११२; ११६; ८. ९, १५; १०. २०; २३; ६५) या सूक्तांतून आहे.

विशिशिप्रः–(५. ४५, ६). सूक्तद्रष्टा सदापृण हा मनूनें विशिशिप्र यास जिंकल्याचा उल्लेख करतो. याशिवाय कोणाशीं संबंध नाहीं. याच ऋचेमध्यें वाणिज्य करणाऱ्या कक्षीवानासाठीं पाऊस पाडल्याचा उल्लेख आहे. परंतु त्याचा विशिशिप्राशीं संबंध नाहीं.

विश्पलाः–(१. ११६, १५). अगस्त्याचा (अनुक्रमणीप्रमाणें) आश्रयदाता खेल याची पत्नी. युद्धामध्यें हिचा पाय तुटला असतां अश्वींनीं लोखंडी पाय बसवून दिला. विश्पलेचा आणखी उल्लेख (१. ११२; ११७; ११८; १०. ३९) या सूक्तांत आहे.

विश्वकः–कृष्णाचा मुलगा. याला कृष्णिय म्हटलें आहे. अश्वींनीं याला विष्णापु नांवाचा मुलगा दिल्याचा उल्लेख आहे. प्रत्यक्ष-संबंध नाहीं. विश्वकाचा उल्लेख (१. ११६; ११७; १०. ६५) या सूक्तांतून आहे.

विश्वमनसः–हा अश्व्य–वश याचा पुत्र. सायणमतानें याचेंच नांव वैय्यश्व. याचा उल्लेख (८. २३; २४) या सूक्तांतून असून (८. २३-२५) या सूक्तांचा तो द्रष्टा आहे. अश्व्य-संबंध पहा.

विश्ववारः–यजत, सदापृण, मायिन् यांच्यासह उल्लेख (८. २२). प्रत्यक्ष संबंध नाहीं.

विश्वसामनः–(५. २२, १). अनुक्रमणीप्रमाणें अत्रिपुत्र अथवा अत्रिकुलोत्पन्न. तो आपणास स्वतःस अग्नीची पूजा करण्यास आज्ञा करतो. हा वरील सूक्ताचा द्रष्टा आहे. अत्रिसंबंध पहा.

विश्वामित्रः–सुदासपुरोहित व वसिष्ठाचा शत्रु. तिसऱ्या मंडळाचे द्रष्टे विश्वमित्र व त्याच्या कुलांतील ऋषी आहेत. प्रत्यक्ष विश्वामित्र याच्या नांवावर बरींच सूक्तें आहेत. विश्वामित्रानें सुदासाकडून यज्ञ करविल्याचा (३. ५३, ९) व त्याच्या यज्ञाकरितां (अश्वमेधाकरितां) घोडा सोडल्याचा (३. ५३, ११) उल्लेख आहे. विश्वामित्राच्या कुलास 'कुशिक' असें नांव होतें. (३. ३३, ५) येथें तो आपणास 'कुशिकस्य सूनुः' म्हणवितो. विश्वामित्र कुलाचा 'विश्वामित्राः' या बहुवचनी पदानेंहि उल्लेख केला आहे (३. ५३, १३; १०. ८९, १७). विश्वामित्राचा प्रत्यक्ष उल्लेख (३. ५३) या सूक्तांत आहे.

विषाणिनः–(७. १८, ७). एकाजातीच्या लोकांचें नांव. सुदासाचे शत्रू असावे.

विष्णापुः–विश्वकाचा मुलगा. विश्वक पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

वीतहव्यः–(६. १५, २-३). भरद्वाजकुलज. अथवा भरद्वाजाचेंच नांव असावें. वीतहव्य (६. १५) या सूक्ताचा द्रष्टा आहे. भरद्वाज पहा.

वृकद्वरसः–(२. ३०, ४). इंद्रशत्रु. लुडविगमतानें शंडीकांचा राजा.

वृचयाः–(१. ५१, १३). कक्षीवानाची स्त्री. अश्वी देवांनीं कक्षीवानाला वृचया नामक स्त्री दिली. कक्षीवानसंबंध पहा.

वृचीवंतः–(६. २७, ४-५). इंद्रानें वृचीवंताचा पराभव करून त्याला दैववात–अभ्यावर्ति याच्या ताब्यांत दिलें. वरशिख पहा. वृचीवंत हा तुर्वशांचा राजा असावा.

वृषगणः–(९. ९७, ८). या नांवाचे ऋषी. पूर्वोक्त ऋचेचे द्रष्टे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

वृषणश्वः–(१. ५१, १३). इंद्र, वृषणश्व्याची मेना नामक कन्या झाला. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

वृष्टिहव्यः–(१०. ११५, ९). वृष्टिहव्य नामक ऋषीचे पुत्र उपस्तुत हे अग्नीची स्तुति करितात, असा उल्लेख. उपर्युक्त सूक्ताचा द्रष्टा उपस्तुत आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

वेतसुः—द्योतन व कुत्स यांचा विरोधी. द्योतन, तूतुजि पहा. इंद्रानें तुग्र, स्मदिभ व वेतसु यांचा कुत्साकरितां पराभव केला ( १०. ४९, ४ ), वेतसूचा उल्लेख ( ४. ५८; ६. २०; २६; १०. ४९ ) या ठिकाणीं आहे.

वेनः—पृथी अथवा पृथु याचा पिता. पृथु याला वैन्य—वेनपुत्र म्हटलें आहे, दुःशीम , पृथवान, राम पहा.

वेशः—( १०. ४९, ५ ). आयूचा विरोधी. इंद्रानें आयूकरितां वेश नामक असुरास वांकविलें. आयुसंबंध पहा.

वैकर्णः—( ७. १८, ११ ). एका जातीचे लोक. सुदासशत्रू. सुदासानें वैकर्ण नामक एकवीस राजांचा पराभव केला.

वैदथिनः—विदथिनूचा मुलगा. ऋजिश्वनूचें दुसरें नांव. लुडविग मतानें औशिज–ऋजिश्वा व वैदथिन्–ऋजिश्वन् हे एकच होत. कक्षीवानासहि ' औशिज कक्षीवान् ' म्हटलें आहे ( १. १८. १ ). यावरून कक्षीवान् व ऋजिश्वन् हे भाऊभाऊ असून उशिजेचे पुत्र असावे. ऋजिश्वन्, पिप्रु व शंबर यांचे संबंध पहा. वैदथिनूचा उल्लेख ( ४. १६; ५. २९ ) येथें आहे.

वैददश्विः—( ५. ६१, १० ). अनुक्रमणीप्रमाणें तरंत व पुरुमीळ्ह हे विददश्वीचे मुलगे. या दोघांनां वैददश्वि म्हटलें आहे. हे श्यावाश्वाचे आश्रयदाते होते. तरंत व पुरुमीळ्ह पहा.

वैन्यः—( ८. ९, १० ) वेनपुत्र. वेन पहा. पृथी अथवा पृथु हा वेनपुत्र होता. या पृथूचेंच नांव वैन्य.

वैय्यश्वः—( ८. २३, २४ ). व्यश्वपुत्र विश्वमनस् याचेंच दुसरें नांव. याचा ( ८. २४, २३ ) या ठिकाणीं आणखी उल्लेख आहे. विश्वमनस् पहा.

वैशंतः—( ७. ३३, २ ). सायण याचा मनुष्यवाचक अर्थ करीत नाहींत. लुडविगमतानें वेशन्त हेंहि याचेंच नांव असावें व हा पृथुपर्शूंचा पुरोहित असावा. मॅकडोनल मतानें हा राजा असून याच्या यज्ञास गेलेल्या इंद्राला वसिष्ठानें सुदासाकडे आणिलें. ग्रिफिथ म्हणतो 'वैशंत नामक नदी असून त्या नदीवरून पाशद्युम्नाच्या यज्ञास गेलेल्या इंद्राला वसिष्ठानें सुदासाकडे आणिलें.'

व्यश्वः-वैयश्व अथवा विश्वमनस् याचा पिता. व्यश्वाचा उल्लेख ( ८. २३, २३; २४ ९. ६५, ७ ) या ठिकाणीं आहे. विश्वमनस् पहा.

व्यंसः—( २. १४, ५ ). सायण याचा 'अंसरहित' असा अर्थ करतो. ग्रिफिथमतानें हा इंद्रशत्रु असून इंद्रानें पिप्रु व शुष्ण यांच्या बरोबर व्यंसाचा वध केला. पिप्रु, शंबर पहा.

शकपूतः—( १०. १३२, ५ ) या सूक्ताचा हा द्रष्टा असून अनुक्रमणीप्रमाणें नृमेधपुत्र आहे. या सूक्ताच्या शेवटच्या ऋचेंत तो 'नृमेधाप्रमाणें माझें रक्षण करा' अशी मित्रावरुणांची प्रार्थना करतो. नृमेध व जरूथ पहा.

शंडीकः—( २. ३०, ८ ). सरस्वती नदीतीरावर राहणारे लोक. लुडविग मतानें या शंडीक लोकांचा वृकद्वरस् हा राजा होता. सूक्तद्रष्टा गृत्समद म्हणतो 'इंद्रानें सरस्वती नदीतीरावरील शंडीकांच्या मुख्याला मारिलें. कदाचित् शंडीक गृत्समदाच्या जवळच्या कालांतील असावे.

शतयातुः—( ७. १८, २१ ). वसिष्ठाचा मुलगा शक्ति याचें हें नांव असें कांहींचें मत आहे. व कांहींच्या मतानें पराशर व शतयातु हीं वसिष्ठाचींच नांवें असावीं. उपर्युक्त ऋचेंत पराशर शतयातु व वसिष्ठ यांचा एकत्र उल्लेख आहे. सायणमतानें पराशर व शतयातु हीं वसिष्ठाचीं विशेषणें आहेत.

शंतनुः—( १०. ९८, १ ). देवापीचा भाऊ. यानें आपला भाऊ देवापि याला यज्ञामध्यें ( पर्जन्य पडण्यासाठीं ) आर्त्विज्य दिलें होतें. देवापि पहा.

शंबरः—( ४. २६, ३. ). दिवोदास शत्रु. दिवोदासाकरितां इंद्रानें शंबरास मारिलें. शंबराचा उल्लेख असलेलीं सूक्तें ( १. ५१; ५४; ५९; १०१; १०३; १३०; २. १२; १४; १९; ४. २६; ३०; ६. १८; २६; ३१; ४३; ४७; ७. १८; ९९; ९. ६१ ) उत्तर.

शयुः—याला अश्वीनीं दुभती गाय दिल्याचा उल्लेख ( १. ११२; ११६; ११७; ११८; ११९; ६. ६२; ७. ६८; १०. ३९ ) अशा अनेक स्थळीं आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

शर-आर्चत्कः—आर्चत्काचें नांव. आर्चत्क पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

शरभः—( ८. १००, ६ ). इंद्रानें शरभाला धन दिल्याबद्दल सूक्तद्रष्टा भृगुपुत्र नेम उल्लेख करतो. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

शविष्ठः—सायणमतानें श्रुतर्वण आर्क्ष्य याचें विशेषण. लुडविग मतानें एक मनुष्य. सूक्तद्रष्टा गोपवन म्हणतो 'अश्वी देव ज्याप्रमाणें तुग्राला वाहून नेतात त्याप्रमाणें शविष्ठाचे चार घोडे मला वाहून नेतात ( ८. ७४, १४ ). या गोपवनाचा आर्क्ष-श्रुतर्वण हाहि आश्रयदाता होता ( ८. ७४, १३ ) आणि आर्क्ष व इंद्रोत हे प्रियमेधाचे आश्रयदाते होते. ऋक्षसूनु, गोपवन व प्रियमेध पहा. शविष्ठ ही व्यक्ति मानिल्यास ती तुग्रानंतरची ठरते.

शशीयसी—( ५. ६१, ६ ). अनुक्रमणीप्रमाणें तरंताची स्त्री. तरंत व पुरुमीळ्ह पहा.

शश्वती—( ८. १, ३४ ). आसंगाची स्त्री. आसंग पहा.

शांडः—( ६. ६३, ९ ). भरद्वाजाचा आश्रयदाता. भरद्वाज शांडाजवळून रथ व घोडे दान मिळाल्याचें वर्णितो. भरद्वाजसंबंध पहा.

शातवनेयः—( १. ५९, ७ ). पुरुणीथ व भरद्वाज यांच्यासह उल्लेख. ' भरद्वाजानें ज्या अग्नीला हवि अर्पिला त्या अग्नीची शातवनेय व पुरुणीथ स्तुति करतात.' कदाचित् शातवनेय व पुरुणीथ ही

एकच व्यक्ति असून त्या व्यक्तीचा भरद्वाज आश्रयदाता असावा. पुरुणीथ पहा.

शार्यातः-( १. ५९, १२ ) मध्यें सूक्तद्रष्टा आंगिरसपुत्र सव्य म्हणतो ' इंद्रा तूं आमच्या येथें सोमपान करतोस त्याचप्रमाणें शार्याताच्या येथेंहि कर. यावरून शार्यात व सूक्तद्रष्टा हे समकालीन असावे. हा सूक्तकार याच सूक्तांतील ६ व्या ऋचेंत इंद्रानें अतिथिग्वाकरितां शंबरास मारल्याचा उल्लेख करीत असल्यामुळें सूक्तकार अतिथिग्वानंतरचा ठरतो. ( ३. ५१, ७ ) येथें सूक्तद्रष्टा विश्वामित्र ' शार्याताच्या येथें सोम प्यालास तसा आमच्या येथें सोम पी ' असें म्हणतो. शार्यात विश्वामित्र समकालीन.

शिग्रुः-सुदासशत्रु. अज, यक्षु, आणि शिग्रु यांनीं( युद्धांत शरण आल्यानंतर ) इंद्रास अश्वशिरांचा बलिअर्पण केला ( ७. १८, १९).

शिंजारः-( ८. ५, २५ ). सूक्तद्रष्टा कण्वकुलोत्पन्न ब्रह्मातिथि म्हणतो ' अश्वीहो कण्व, प्रियमेध, उपस्तुत, अत्रि आणि शिंजार यांचें रक्षण केलें त्याप्रमाणें माझें रक्षण करा. ' सूक्तद्रष्ट्याचा चेदि कशु हा आश्रयदाता होता. कण्व व अत्रिसंबंध पहा.

शिम्युः-( ७. १८, ५ ). सुदासशत्रु. सुदासाकरितां इंद्रानें शिम्यूस मारिलें.

शिरिंबिठः-(१०. १५५, १). हा या सूक्ताचा द्रष्टा आहे. तो अलक्ष्मीला दूर घालवूं इच्छितो. अनुक्रमणी याला भरद्वाजपुत्र म्हणते. याशिवाय अधिक संबंध नाहीं.

शिवासः-( ७. १८, ७ ). सुदासशत्रु. पक्थ, भलानस्, विषाणिन्, अलिनास् व शिवास् हे सुदासशत्रू होते असा पूर्वोक्त ऋचेंत उल्लेख आहे.

शीष्टः-( ८. ५३, ४ ). ग्रिफिथमतानें एका जातीचे लोक. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

शुनःशेपः-अनुक्रमणीप्रमाणें विश्वामित्रपुत्र व ( १. २४-३० ) या सूक्तांचा द्रष्टा. वरील सूक्तांपैकीं सूक्त २४ यांतील १२ व १३ या ऋचांमध्यें शुनःशेपाचा उल्लेख आहे. यूपाला बांधलेला शुनःशेप मुक्त होण्यासाठीं वरुणाची प्रार्थना करतो. अशाच अर्थाचा आणखी उल्लेख( ५. २, ७ ) याठिकाणीं आहे. अनुक्रमणीप्रमाणें तो विश्वामित्रपुत्र आहे. याशिवाय दुसरा संबंध नाहीं.

शुष्णः-( २. १९, ६ ). इंद्रानें आपलें सारथ्य करणाऱ्या कुत्साकरितां शुष्णाचा वध केला आणि दिवोदासाकरितां शंबराचीं नगरें विध्वंसिलीं. शुष्णाचा आणखी उल्लेख ( १. ११; ३३; ५१; ५६; ६३; १०१; १०३; १२१; १७५; २. १४; १९; ३. ३१; ४. १६; ३०; ५. २९; ३१; ३२; ६. १८; २०; २६; ३१; ७. १९; ८. १; ६; ४०; ५१; ९६; १०. २२; ४९; ९९; १११ ) या सूक्तांमधून आहे.

शृंगवृषः-( ८. १७, १३ ). सायणमतानें एका ऋषीचें नांव. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

शौचद्रथः-( ५. ७९, २ ). वाय्य-सत्यश्रवस याच्या बरोबर उल्लेख. सूक्तद्रष्टा वाय्य म्हणतो. 'उषे, ज्याप्रमाणें सुनीथ-शौचद्रथास प्रकाश दिलास त्याप्रमाणें मला प्रकाश दे' शौचद्रथ वाय्य याचा समकालीन असावा. वाय्य व वय्य पहा.

शौरदेव्यः-( ८. ७०, १५ ). ग्रिफिथमतानें एक व्यक्ति. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

श्यावः-( १. ११७, २४ ). असुरांनीं छिन्नविच्छिन्न केलेल्या श्यावाला अश्वींनीं पूर्ववत् केलें. श्यावाला अश्वींनीं रुशती नामक स्त्री दिल्याचा उल्लेख ( १. ११७, ८ ) येथें आहे. सायणमतानें श्याव व श्यावाश्व हे एकच आहेत. सायणांनीं ( ५. ६१, ९ ) येथें श्याव याचा श्यावाश्व असा अर्थ केला आहे. या सूक्ताचा द्रष्टा श्यावाश्व असून तो तरंत, पुरुमीळ्ह यांच्यापासून दान मिळाल्याचें या सूक्तांत वर्णितो. सूक्त ( १०. ६५, १२ ) मध्यें वध्रिमती नामक स्त्रीला अश्वीदेवांनीं श्याव नामक पुत्र दिला असा उल्लेख असून सायणांनीं तेथें श्याव हें हिरण्यहस्त याचें विशेषण केलें आहे, आणि अश्वींनीं वध्रिमतीला हिरण्यहस्त नामक पुत्र दिला असाहि स्पष्ट उल्लेख आहे. यावरून सायणमतानें श्याव, श्यावाश्व आणि हिरण्यहस्त हे एकच होत. श्यावाश्व हा तरंत व पुरुमीळ्ह यांचा पुरोहित होता. ( ८. १९, ३७ ) येथें श्यावाचा उल्लेख असून त्याचा सायणांनीं 'शामवर्ण' असा अर्थ केला आहे. मॅक्डोनलमतानें हा कोणी सुवास्तु नदीकांठीं राहणारा मनुष्य असावा.

श्यावकः-( ८. ४, २ ). रुम, रुशम यांच्याबरोबर उल्लेख. सूक्तद्रष्टा कण्वकुलोत्पन्न देवातिथि म्हणतो; 'इंद्रा, रुशम, श्याव आणि कृप यांच्या येथें सोमपानानें हर्षित होतोस त्याप्रमाणें ( हर्षयुक्त होण्यास ) आमचीं स्तोत्रें तुला आणोत.' रुम, रुशम, पहा. श्यावकाचा आणखी उल्लेख ( ८. ३ ) या सूक्तांत आहे.

श्यावाश्वः-तरंत, पुरुमीळ्ह, यांचा पुरोहित. अथवा यांच्यापासून दान घेणारा. याला तरंतानें आपली कन्या दिली. अनुक्रमणीप्रमाणें तो अर्चनानस्चा मुलगा होता. श्यावाश्वाचा उल्लेख ( ५. ५२; ८१; ८. ३५; ३६ ३७; ३८ ). या सूक्तांतून असून ( ५. ५२-६१ व ८. ३५-३८ ) या सूक्तांचा तो द्रष्टा आहे. तरंत पुरुमीळ्ह पहा.

श्रुतकक्षः-( ८. ९२, २५ ). हा अश्व व गाई यांच्या प्राप्तीसाठीं इंद्राची स्तुति करतो. या सूक्ताचा हा द्रष्टा आहे. अनुक्रमणी याला 'आंगिरसकुलोत्पन्न' म्हणते. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

श्रुतरथः-( १. १२२, ७ ). कक्षीवानाचा आश्रयदाता. कक्षीवान व प्रियरथ पहा.

श्रुतर्यः-( १. ११२, ९ ). नर्य, कुत्स यांच्यासह उल्लेख. अश्वींनीं श्रुतर्य, नर्य, कुत्स यांचें रक्षण केलें. नर्य संबंध पहा. प्रत्यक्ष संबंध अनिश्चित.

श्रुतर्वणः–आर्क्ष. याचेंच नांव ऋक्षसूनु (८. ७४, ४; १३). ऋक्षसूनु पहा. श्रुतर्वनाचा आणखी उल्लेख (१०. ४९, ५) या ठिकाणीं आहे.

श्रुतवित्:–(५. ४४, १२). सदापृण, बाहुवृक्त, तर्य, यजत, इत्यादिकांबरोबर उल्लेख आहे. याच सूक्ताच्या १० व्या ऋचेंत यजतावरोबर अवत्साराचा उल्लेख आहे. सूक्तद्रष्टा अवत्सारच आहे. प्रत्यक्ष संबंध कोणाचाच नाहीं. अवत्सार पहा.

श्रुष्टिगुः–(८. ५१, १). पुष्टिगु यासह उल्लेख. या सूक्ताचा द्रष्टा श्रुष्टिगु म्हणतो, "इंद्रा तूं सांवरण मनु, नीपातिथि, मेध्यातिथि, पुष्टिगु, श्रुष्टिगु यांच्यासह सोम प्यालास." नीपातिथिसंबंध पहा.

श्वैत्रेयः–(१. ३३, १४). इंद्रानें युद्धांत कुत्साचें आणि दशद्यूचें रक्षण केलें व श्वैत्रेयास उठविलें. लुडविग याला 'कुत्साचा मुलगा' असें म्हणतो, व कांहींच्या मतानें श्वैत्रेय हे भुज्यूचेंच नांव असावें. श्वैत्रेयाचा आणखी उल्लेख (५. १९, ३) येथें आहे.

संवरणः–लक्ष्मण्याचा पुरोहित. लक्ष्मण्य पहा.

सत्यश्रवसः–वाय्य याचें दुसरें नांव. वाय्य पहा.

सदापृणः–श्रुतवित् पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सध्रिः–एवावद व यजत पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सप्तगुः–आंगिरसकुलज. (१०. ४७) या सूक्ताचा द्रष्टा. या सूक्ताच्या शेवटच्या ऋचेंत याचा उल्लेख असून तो आपणास आंगिरस म्हणवितो. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सप्तवध्रिः–(५. ७८, ६). याला याच्या भावानें पेटींत कोंडून ठेवलें असतां तेथून सुटण्याबद्दल तो अश्वींची स्तुति करतो. 'अत्रीला जसें सोडविलें तसें मला सोडवा' असें तो म्हणतो. यावरून तो अत्रीच्या नंतरचा असावा. हा (५. ७८; ८. ७३; १०. ३९;) या सूक्तांचा द्रष्टा असून या सूक्तांत याचा वरील अर्थानेंच उल्लेख आहे.

ससः–(५. २१, ४) या सूक्ताचा हा द्रष्टा आहे. अनुक्रमणीप्रमाणें हा अत्रिकुलोत्पन्न आहे. याशिवाय प्रत्यक्ष संबंध नाहीं. विश्वसामन्च्या उल्लेखामुळें सूक्त उत्तर.

सहदेवः–ऋज्राश्व, भयमान, सुराधस् व अंबरीष यांच्यासह उल्लेख. वृषागिरपुत्र. वार्षागिर पहा.

सांवरणः– अथवा सावर्णि (८. ५१, १). याला अनुक्रमणी मनुपुत्र म्हणते. सावर्णीचा उल्लेख (१०. ६२) या सूक्तांत आहे. दाशराज्ञ युद्धांतील व्यक्तीशीं संबंध नाहीं.

साप्यः–नमीचें दुसरें नांव. नमी पहा. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सार्ञ्जयः–(६. ४७, २५). संजयपुत्र. सायणमतानें प्रस्तोकाचें नांव. प्रस्तोक हें दिवोदासाचे नांव. प्रस्तोक पहा.

सुतंभरः–हा (५. ११–१४) या सूक्तांचा द्रष्टा आहे. या सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. (५. १३, ६) या ठिकाणीं हा परिचर्या करणारे नहुषपुत्र येवोत' असा उल्लेख करतो. (५. ४४) येथें सुतंभराचा उल्लेख आहे. या सूक्ताचा द्रष्टा अवत्सार हा सुतंभराला यागनिर्वाहक व दाता म्हणतो. यावरून सुतंभर, नहुष व अवत्सार हे समकालीन असावे.

सुदक्षः–(८. ९२, ४). श्रुतकक्ष नामक सूक्तद्रष्ट्याच्या सूक्तांत उल्लेख. श्रुतकक्ष म्हणतो, 'सुदक्षाच्या येथें इंद्र सोम प्याला' प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सुदासः–दाशराज्ञ युद्धांतील मुख्य. सुदासाचा उल्लेख (१. ४७ ६३; ११२; ३. ५३; ५. ५३; ७. १८; १९; २०; २५; ३२; ३३; ५३; ६०; ६४; ८३;) या सूक्तांत आहे.

सुदीतिः–(८. ७१, १४;). पुरुमीळ्ह समकालीन. सुदीति आपणास उत्तम गृह मिळण्याबद्दल याचना करण्यास पुरुमीळ्हास सांगतो. पुरुमीळ्ह पहा.

सुदेवः–(८. ५, ६). 'सुदेवाकरितां गाईच्या गोठ्यांत उदकसेचन करा' अशी सूक्तद्रष्टा अश्वींची प्रार्थना करतो. सूक्तद्रष्टा ब्रह्मातिथि असून तो याच सूक्तांत चैद्य–कशु याच्या जवळून धन मिळाल्याचें वर्णितो. सायणानीं सुदेव शब्द हविर्दात्याचें विशेषण म्हणून घेतला आहे. परंतु लुडविग तें विशेषनाम मानितो. कशु व कण्व पहा.

सुपित्र्यः–लुडविगमताप्रमाणें एक मनुष्य व सायणमताप्रमाणें अग्नीचें विशेषण. बृहद्दिव नामक सूक्तद्रष्ट्याच्या सूक्तांत उल्लेख (१०. ११५, ६) आहे. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सुमित्रः–(१०. १०५, ११). या सूक्ताचा द्रष्टाहि सुमित्रच आहे. तो आपणास कुत्सपुत्र म्हणवितो. कुत्स पहा.

सुमीळ्हः–(६. ६३, ९). भरद्वाजाचा आश्रयदाता. सुमीळ्हापासून शंभर गाई मिळाल्याचें भरद्वाज वर्णितो. भरद्वाज संबंध पहा.

सुराधसः–(१.१००,१७). ऋज्राश्वासह उल्लेख. ऋज्राश्व पहा.

सुश्रवस्:–(१. ५३, ९). ज्याच्या विरुद्ध युद्धास वीस राजे उभे होते अशा साहाय्यरहित सुश्रवस्चें इंद्रानें रक्षण केल्याचें सूक्तद्रष्टा सव्य उल्लेखितो. कदाचित् हा दाशराज्ञांपैकीं असावा.

सुषामनः–वरोसुषामन् पहा.

सृंजयः–तुर्वशशत्रु. इंद्रानें तुर्वशाला सृंजयाच्या ताब्यांत दिलें (६. २७, ७). याचेंच दैववात हें नांव आहे (४. १५, ४). सृंजय हें नांव एका जातीच्या लोकांचें होतें असें मॅकडोनलचें मत आहे.

सृबिंदः–(८. ३२, २). सूक्तद्रष्टा मेधातिथि इंद्रानें सृबिंद व पिप्रु यांचा वध केल्याचें उल्लेखितो. कदाचित् पिप्रु आणि सृबिंद समकालीन असावे. पिप्रुसंबंध पहा.

सोभरिः–सर्वानुक्रमणीप्रमाणें (८. १९-२२व८. १०३) या सूक्तांचा द्रष्टा आहे. वरील सूक्तांपैकीं सूक्त २१ शिवाय सर्व सूक्तांत याचा उल्लेख आहे. अनुक्रमणी याला काण्व (कण्वकुलोत्पन्न) म्हणते. (८. १९, ३६) येथें तो आपणास त्रसदस्यूपासून पन्नास वधू मिळाल्याचें उल्लेखितो. शिवाय ऋचा (२२;) मध्यें तो पक्थ्याचा व (१०३, २) मध्यें दैवोदासीचा उल्लेख करितो. त्रसदस्यु व दैवोदासि पहा. सोभरि हें कुलनाम असावें. (८. १९, ३२; २०;) या ठिकाणीं सोभरीचा बहुवचनीं उल्लेख आलेला आहे. सोभरीचा आणखी उल्लेख (८. ५) या सूक्तांत आहे.

सोमक—साहदेव्यः—सहदेवपुत्र. वामदेवाचा आश्रयदाता. सूक्तद्रष्टा वामदेव सोमकापासून आपणास घोडे मिळाल्याचें वर्णितो (४. १५, ८). याच सूक्तांत सूक्तद्रष्टा दैववात-संजय याच्या अग्नीचें वर्णन करतो (४. १५;). लुडविगमतानें सोमक सृंजय लोकांचा राजा होता. वामदेव व सृंजय पहा.

स्मदिभः—(१०. ४९, ४). इंद्रानें तुग्र आणि स्मदिभ यांनां कुत्साच्या ताब्यांत दिलें. कुत्स पहा.

स्यूमरश्मिः—(१. ११२, १६). अश्वीदेवांनीं कळ्काच्या बाणांनीं स्यूमरश्मीचें रक्षण केलें. प्रत्यक्ष संबंध नाहीं.

स्वनद्रथः—(८. १, ३२). सायणमताप्रमाणें मेधातिथीचा आश्रयदाता. आसंग याचें विशेषण; व लुडविगमतानें आसंगाचा मुलगा. आसंगप्लायोगि पहा.

स्वनयः—भाव्य याचें नांव (१. १२६,३). भाव्य पहा.

स्वश्नः—इंद्रानें स्वश्न, शुष्ण, पिप्रु, नमुचि व रुधिक्रा यांचा वध केला (२. १४). वरील व्यक्ती कदाचित् पिप्रुसमकालीन असाव्या. पिप्रु पहा.

हरयाणः—(८. २५, २२). सूक्तद्रष्टा विश्वमनस् हा उक्षण्यायन, हरयाण व वरोसुषामन् यांजपासून दान मिळाल्याचें वर्णितो. सायण उक्षण्यायन व हरयाण हीं वरोसुषामन्चीं विशेषणें मानतो.

हिरण्यस्तूपः—(१०. १४९, ५). सर्वानुक्रमणीप्रमाणें आंगिरसपुत्र व अर्चत् नामक सूक्तद्रष्ट्याचा पिता. सूक्तद्रष्टा अर्चत् म्हणतो 'आंगिरस हिरण्यस्तूपाप्रमाणें अन्नप्राप्तीसाठीं मी सवित्याची स्तुति करतों. हिरण्यस्तूप हा (१. ३१-३५) या सूक्तांचा द्रष्टा असून (३३, १४) येथें इंद्रानें कुत्साचें रक्षण केल्याचें तो उल्लेखितो. कुत्स पहा.

हिरण्यहस्तः—(१. ११६, १३). अश्वीदेवांनीं वध्रिमतीला हिरण्यहस्त नामक पुत्र दिला. प्रत्यक्ष संबंध नाहीं. वध्रिमती पहा.

वरील विवेचनावरून पुढें दिलेल्या व्यक्तींचा संबंध निश्चितपणें दाशराज्ञ युद्धाशीं जोडतां येतो. बाकीच्या व्यक्तींचा देखील संबंध दिसतो पण तो तितका निश्चित नाहीं.

ज्ञातसंबंधः—अक्ष, अगस्त्य, अजास, अतिथिग्व, अत्क, अत्रि, अनु, अपाला, अभ्यावर्तिन् चायमान, अरट्व, अर्चनानस्, अर्जुन, अर्ण, अलिनास, अवत्सार, अवस्यु, अश्वथ, अश्वमेध, अश्व्य, असमाति, अह्ववाय्य, आतिथिग्व, आयु, आर्ष्टिषेण, आश्वमेध, आसंग प्लायोगि, आस्त्रबुध्न, इक्ष्वाकु, इंद्रोत, उग्रदेव, उपमश्रवस्, उशना काव्य, उशिज, ऋक्षसूनुः आर्क्ष, ऋजिश्वन्, ऋणंचय, एतश, और्व, औशान, औशिज, ककुह, कक्षीवान्, कण्व, कवष, कवि, कशोजु, कानीत, काव्य, कीकट, कुत्स, कुयव, कुरुंग, कुरुश्रवण, कुशिक, कृप, कौलितर, क्षत्रश्री, खेल, गयप्लात, गविष्टिर, गुंगु, गृत्समद, गैरिक्षित, गोशर्य, गौरिवीति, घोष, घोषा, चायमान, चित्र, चित्ररथ, च्यवन, च्यवान, च्यवतान, जमदग्नि, जरूथ, जह्नावी, तक्रवान, तरुक्ष, तान्व, तिरिंदिर, तुग्र, तुर्वश, तुर्वीति, तूतुजि, तूर्वयाण, तृक्षि, तृत्सु, त्रसदस्यु, त्रासदस्यव, त्रिशोक, त्रैवृष्ण, त्र्यरुण, दशद्यु, दशव्रज, दिवोदास, दीर्घतमस्, दुर्गह, दुर्मित्र, दुःशासु, दभीक, देववत, देववात, देवश्रवस्, देवापि, दैववात, दैवोदासि, द्योतन, द्रुह्यु, ध्वन्य, नभाक, नर्य, नववास्त्व, नहुष, नाभाक, नाभानेदिष्ठ, नीपातिथि, नृमेध, नोधस्, पक्थ, पज्र, पराशर, पर्णय, पर्शु, पायु, पार्थव, पार्थ्य, पार्षद्वाण, पाशद्युम्न वायत, पुरय, पुरुकुत्स, पुरुकुत्सानी, पुरुणीथ, पुरुपंथा, पुरूरवस्, पूतक्रता, पूरु, पृक्षयामन्, पृथु, पृथुश्रवस्, पृषध्र, पेरुक, पैजवन, पौतक्रत, पौर, पौरुकुत्स्य, प्रतृद, प्रमगंद, प्रस्कण्व, प्रस्तोक, प्रातर्दनि, प्रियमेध, प्रियरथ, बभ्रु, बल्बूथ, बृबु, बृहदुक्थ, बृहद्रथ, भरत, भरद्वाज, भलानस्, भारद्वाज, भार्वर, भुज्यु, भृगवाण, भेद, भोज, मशर्शार, मान, मान्य, मामतेय, मायव, मायु, मारुताश्व, मित्रातिथि, मृगय, मृळीक, मेध्य, मेधातिथि, मेध्यातिथि, यक्षु, यदु, याद्व, युध्यामधि, रथप्रोष्ठ, रहूगण, राम, रुम, रुशती, रुशम, रोमशा, लक्ष्मण्य, लोपामुद्रा, वंगृद, वध्र्यश्व, वम्र, वय्य, वरशिख, वर्चिन्, वश, वसिष्ठ, वामदेव, वायत, वाय्य, विश्पला, विश्वमनस्, विश्वामित्र, विषाणिन्, वीतहव्य, वृचया, वृचीवंत, वेतसु, वेन, वेश, वैकर्ण, वैदथिन्, वैन्य, वैयश्व, वैशंत, व्यश्व, शकपूत, शंडीक, शतयातु, शंतनु, शंबर, शविष्ठ, शश्वती, शांड, शातवनेय, शार्यात, शिम्यु, शिम्यु, शिवास, शुनःशेप, शुष्ण, शौचद्रथ, श्यावक, श्रुतरथ, श्रुतर्वण, श्रुष्टिगु, श्वैत्रेय, संवरण, सत्यश्रवस्, साञ्जय, सुतंभर, सुदास, सुमित्र, सुमीळ्ह, संजय, सोभरि, सोमक, स्मदिभ, स्वनद्रथ, हिरण्यस्तूप.

आतांपर्यंत झालेलें व्यक्तिविषयक विवेचन हें प्रत्येक सूक्ताच्या पूर्वोत्तरतेविषयीं पुराव्याच्या तपासणीकरितां होय. व्यक्तीचा दाशराज्ञ युद्धाशीं संबंध किंवा तिची उत्तरता दिसली म्हणजे तिचा उल्लेख करणारें सूक्त दाशराज्ञयुद्धोत्तर समजावें. हा सूक्तास उत्तरकालीन ठरविण्याचा एक पुरावा झाला. दुसऱ्या प्रकारचा पुरावा म्हटला म्हणजे जर एखादें सूक्त अमुक एक ग्रंथकाराचें म्हणून सर्वानुक्रमणीनें मानलें असलें तर त्यावरूनहि कांहीं कांहीं प्रसंगीं सूक्ताच्या उत्तरकालीनत्वासंबंधानें निर्णय काढतां येईल. पुष्कळदां सर्वानुक्रमणीकारानें मंत्रद्रष्ट्याच्या नांवावर एखादें सूक्त घातलें आहे, तें त्याचें नांव त्या सूक्तांत सांपडलें एवढ्यावरच घातलें आहे. तें नांव मंत्रद्रष्ट्याचें नसेल असा आक्षेप सर्वानुक्रमणीच्या निर्णयावर घेतां येईल; पण आंत ज्याचें नांव आलें आहे त्या व्यक्तीशीं सूक्ताचें उत्तरत्व स्पष्टच आहे.

सर्वानुक्रमणीची कुलसंबंधविषयक माहिती ज्या मानानें ग्राह्य असेल त्या मानानें आमचे निर्णय ग्राह्य होतील. मधुच्छन्द हा विश्वामित्राचा पुत्र होता किंवा नव्हता, तो पहिल्या दहा सूक्तांचा कर्ता होता किंवा नव्हता, याविषयीं सर्वानुक्रमणीनें दिलेली माहिती जर ग्राह्य धरली तर आपणांस तीं सूक्तें दाशराज्ञ युद्धानंतर झालीं असें म्हटलेंच पाहिजे. सध्यां आम्ही आमच्या प्रकृत विवेचनापुरती ती माहिती ग्राह्य धरून ऋग्वेदांतील प्रत्येक सूक्ताची पूर्वोत्तरता पाहणार आहोंत. सर्वानुक्रमणीची व्यक्तींच्या लौकिक इतिहासासंबंधीं विश्वसनीयता पुढें तपासूं.

## प्रत्येक ऋग्वेदसूक्ताची दाशराज्ञयुद्धाशीं पूर्वोत्तरता दाखविणारें कोष्टक.

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | | | **मंडल पहिलें.** | |
| १–१०. | मधुच्छंद. | विश्वामित्रपुत्र. | | उत्तर. |
| ११. | जेतृ. | मधुच्छंदपुत्र. | शुष्ण ११, ७. | उत्तर. |
| १२–२३. | मेधातिथि. | कण्वपुत्र. | कण्व १४, २; ५. कक्षीवान, औशिज १८, १. | उत्तर. |
| २४–३०. | शुनःशेप. | विश्वामित्रपुत्र. | शुनःशेप २४, १२; १३. | उत्तर. |
| ३१–३५. | हिरण्यस्तूप. | आंगिरस. | पुरूरवस् ३१, ४. आयु, नहुष. ३१, ११. ययाति ३१, १७. शुष्ण ३३, १२. कुत्स, श्वैत्रेय, दशद्यु ३३, १४. तुग्र्य ३३, १५. शंयु ३४, ६. | उत्तर. |
| ३६–४३. | कण्व. | घोरपुत्र. | वृष ३६, १०. उपस्तुत ३६, १०; १७. कण्व ३६, ८; १०; ११. मेध्यातिथि ३६, १०; ११; १७. उग्रदेव, यदु, तुर्वश ३६, १८. नववास्त्व, तुर्वीति, बृहद्रथ ३६, १८. शंयु ४३, ४. | उत्तर. |
| ४४–५०. | प्रस्कण्व. | कण्वपुत्र. | प्रस्कण्व ४४, ६. कण्वासः ४४, ८. विरूप, अत्रि, अंगिरस्वत् प्रियमेध ४५, ३. प्रस्कण्व ४५, ३ सुदास ४७, ६. | उत्तर. |
| ५१–५७. | सव्य. | आंगिरस. | विमद, अत्रि, वावसान ५१, ३. शंबरशत्रु, अतिथिग्व ५१, ६. वम्र ५१, ९. उशनाकाव्य, शुष्ण ५१, ११. शार्यात ५१, १२. कक्षीवान्, वृचया, वृषणश्व, मेना ५१, १३. पज्र ५१, १४. नमुचि ५३, ७. करंज, पर्णय, वंगृद, ऋजिश्वन् ५३, ८. सुश्रवस् व वंसिशत्रु ५३, ९. अतिथिग्व ५३, १०. तूर्वयाण, कुत्स, आयु ५३, १०. शुष्ण, ५४, ५. तुर्वश, यदु, वय्य, तुर्वीति, एतश, नर्य ५४, ६. शुष्ण ५६, ३. | उत्तर. |
| ५८–६४. | नोधस्. | गोतमपुत्र. | शातवनेय, पुरुणीथ, भरद्वाजेषु ५९, ७. भृगु ६०, १. गोतम ६०, ५. तुर्वीति ६१, ११. नोधस् ६१, १४. एतश ६१, १५. गोतमासः ६१, १६. आंगिरस्वत् ६२, १; २; ३; ५. नवग्व, दशग्व, ६२, ४. गोतम, नोधा ६२, १३. पुरुकुत्स, सुदास ६३, ७. पूरु ६३, ७. गोतम ६३, ९. नोधा ६४, १. | उत्तर. |
| ६५–७३. | पराशर. | शक्तिपुत्र. | अंगिरसः ७१, २. | उत्तर. |
| ७४–९३. | गोतम. | रहूगणपुत्र. | अंगिरः ७४, ५. अंगिरस्तम ७५, २. गोतम ७७, ५. ७८, १. ७९, १०. ८८, ५. रहूगण ७८, ५. अथर्वा, मनु, दध्यङ् ८०, १६. अंगिराः, अथर्वा, उशनाकाव्य ८३, ४-५. दधीचि ८४, १३. शर्यणावत् ८४, १४. गयस्फान ९१, १२. बृसय ९३, ४. | उत्तर. |
| ९४–९८. | कुत्स. | आंगिरसपुत्र. | भरत ९६, ३. | उत्तर. |
| ९९. | कश्यप. | मरीचिपुत्र. | | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १००. | ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान, सुराधस्. | वृषागिरपुत्र. | नाहुषीषु विक्षु १००, १६. ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान, सुराधस्, वार्षागिर १००, १७. शिम्यु, श्विन्न, १००, १८. | उत्तर. |
| १०१–१०४. | कुत्स. | आंगिरसपुत्र. | कृष्णगर्भे, ऋजिश्वन् १०१, १. व्यंस, शंबर, शुष्ण, पिप्रु १०१, २. शुष्ण, पिप्रु, कुयव, वृत्र, शंबर १०३, ८. कुयव, शिफा, १०४, ३. अंजसी, कुलिशी १०४, ४. | उत्तर. |
| १०५. | त्रित अथवा कुत्स. | त्रित आप्त्य. आंगिरसपुत्र. | पर्शव, शिश्न १०५, ८. त्रित १०५, ९. | उत्तर. |
| १०६–११५. | कुत्स. | आंगिरसपुत्र. | कुत्स १०६, ६. यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु, पुरु, १०८, ८. सौधन्वनासः ऋभवः ११०, ४. त्रिमंतु ११२, ४. रेभ, कण्व, वंदन ११२, ५. अंतक, भुज्यु ११२, ६. कर्कंधु, वय्य ११२, ६. पुरुकुत्स, शुचंति, पृश्निगु ११२, ७. पराव्रज ११२, ८. वसिष्ठ, श्रुतर्य, नर्य, कुत्स ११२, ९. विश्पला, अश्व्य, वश ११२, १०. कक्षीवान् औशिज, दीर्घश्रवा ११२, ११. रसा, त्रिशोक ११२, १२. मंधाता, भरद्वाज, ११२, १३. अतिथिग्व, दिवोदास, कशोजु त्रसदस्यु ११२, १४. वम्र, उपस्तुत्, कलि, व्यश्व, पृथि ११२, १५. अत्रि, मनु, स्यूमरश्मि ११२, १६. पठर्वा, शर्यात ११२, १७. अंगिरः, मनु ११२, १८. विमद, सुदास, सुदेव्य ११२, १९. भुज्यु, अध्रिगु, ऋतस्तुभा ११२, २०. कृशानु ११२, २१. आर्जुनेय-कुत्स, तुर्वीति, दभीति, ध्वसंति, पुरुषंति ११२, २३. मनु ११४, २. वंकु ११४, ४. | उत्तर. |
| ११६–१२६. | कक्षीवान. | दीर्घतमस्पुत्र. | विमद ११६, १. तुग्र, भुज्यु ११६, ३. भुज्यु ११६, ४; ५. पैद्व ११६, ६. पज्रिय-कक्षीवान् ११६, ७. अत्रि ११६, ८. गोतम ११६, ९. च्यवान ११६, १०. वंदन ११६, ११. आथर्वण दध्यङ् ११६, १२. वध्रिमती, हिरण्यहस्त ११६, १३. खेल, विपला ११६, १५. ऋज्राश्व ११६, १६. दिवोदास, भरद्वाज ११६, १८. जन्हावी ११६, १९. जाहुष ११६, २०. पृथुश्रवस्-वश ११६, २१. शयु, आर्चत्क, शर ११६, २२. कृष्णिय, विश्वक ११६, २३. रेभ ११६, २४. ११७, ४. वंदन ११७, ५. पज्रिय-कक्षीवान् ११७, ६. कृष्णिय, विश्वक, घोषा ११७, ७. श्याव, रुशती, कण्व, नार्षद ११७, ८. पेदु ११७, ९. पज्रासः ११७, १०. अगस्त्य, विश्पला ११७, ११. शयु ११७, १२. च्यवान ११७, १३. तुग्र, भुज्यु ११७, १४. तौग्र्य ११७, १५. ऋज्राश्व ११७, १७; १८. पुरंधि ११७, १९. शयु, पुरुमित्र, विमद ११७, २०. आथर्वण-दधीच ११७, २२. हिरण्य हस्त, श्यावाश्व, वध्रिमती ११७, २४. ऋज्राश्वः ११७, २५. रेभ, वंदन, तौग्र्य च्यवान ११८, ६. अत्रि ११८, ७. शयु, विश्पला ११८, ८. पेदु ११८, ९. ऊर्जानी ११९, २. भुज्यु, दिवोदास ११९ ४. रेभ, अत्रि, वंदन, शयु ११९, ६. वंदन ११९, ७. औशिज, दधीच ११९, ९. पेदु ११९, १०. भृगवाण, घोषा, पज्रिय १२०, ५. इषयु, १२०, ५. तकवान १२०, ६. अंगिरसाम् १२१, १; ३. शुष्ण, कुत्स १२१, ९, काव्य, उशना, १२१, १२. अर्जुन, औशिज, घोषा १२२, ५. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | | | ५. श्रुतरथ, प्रियरथ १२२, ७. मशर्शार, आयवस १२२, १५. भाव्य १२६, १. कक्षीवान् १२६, २; ३; ४. स्वनय १२६, ३. नोधस् १२४, ४. पज्र १२६, ४; ५. गंधारी १२६, ७. | |
| १२७–१३९. | परुच्छेप, | दिवोदासपुत्र. | भृगु १२७, ७. उशिजा १२८, १. दिवोदास, अतिथिग्व १३०,७. पुरु, शंबर १३०, ७. मनु १३०, ८. उशना, कवि १३०, ९. दिवोदास १३०, १०. पूरवः १३१, ४. उशिजः १३१, ५. अंगिरोभ्यः १३२, ४. आयु १३५, २. अंगिरोभ्यः १३९, ७ दध्यङ्. प्रियमेधः, कण्व, अत्रि, मनु, अंगिरा १३९,९. | उत्तर. |
| १४०–१६४. | दीर्घतमस्. | उचथ्यपुत्र. | भृगु १४३, ४. उचथ्य १४३, ६. मामतेय १४७, ३. नार्मिणीं पुरं १४९, ३. पुरुमीळ्ह १५१, २. पणि १५१, ९. मामतेय १५२, ६. औचथ्य १५८, १;४. तौग्र्य, पज्र १५८, ३. त्रैतन १५८, ५. दर्घितमा-मामतेय १५८, ६. सौधन्वनाः १६१, २. | उत्तर. |
| १६५–१९१. | अगस्त्य. | मित्रावरुण-पुत्र. | मान्दार्य मान्य १६५, १५. १६७, ११. १६८, १०. अगस्त्य १७०, ३. मानासः ( मानपुत्राः ) १७१, ५. तृणस्कंद १७२, ३. पुरुकुत्स १७४, २. तूर्वयाण १७४, ३. कुत्स १७४, ५. कुयवाच १७४, ७. धुनि, तुर्वश, यदु १७४, ९. कुत्स १७५, ४. मान्य १७७, ५. लोपामुद्रा १७९, ४. अगस्त्य १७९, ६. अत्रि १८०, ४. तौग्र्य १८०, ५. पणि १८०, ७. अगस्त्य १८०, ८. विश्पला. १८२, १. पणि १८२, ३. तौग्रय १८२, ५; ७. मानासः १८२, ८. पुरुमीळ्ह, अगस्त्य, गोतम, अत्रि १८३, ५. मान्य १८४, ४. मान १८४, ५. त्रित १८७, १. मानस्यसूनुः, पज्राः १९०, ५. | उत्तर. |
| | | | **मंडल दुसरें.** | |
| १–३. | गृत्समद. | आंगिरस कुलांतील शुनहोत्रपुत्र व भृगुकुलांतील शुनकपुत्र. | पंचकृष्टि २, १०. | उत्तर. |
| ४–७. | सोमाहुति. | भार्गव, भृगुपुत्र | भृगवः ४, २. भारत-अग्नि ७, १; ५. | उत्तर. |
| ८–२६. | गृत्समद. | शुनहोत्रपुत्र, | अत्रि ८,५. मनु १०, ६. मन्यमानं-दासं ११, २. दासीः ११, ४. अहि ११, ५. दानु, और्णवाभ, दस्यु ११, १८. दस्यु, त्रित ११, १९. दास १२, ४. दस्यु १२, १०. शंबर १२, ११. रौहिण १२, १२. नार्मर, सहवसु, पृक्ष १३, ८. दस्यु, दभीति १३, ९. तुर्वीति, वय्य १३, १२. परावृज १३, १२. दभीक १४, ३. उरण, अर्बुद १४, ४. स्वश्न, शुष्ण, व्यंस, पिप्रु नमुचि, रुधिका १४, ५. शंबर, वर्चि १४, ६. कुत्स, आयु, अतिथिग्व १४, ७. दभीति १५, ४. धुनि १५, ५. परावृज १५, ७. धुनि, चुमुरि, दस्यु, दभीति १५, ९. क्रिवि १७, ६. एतश १९, ५. शुष्ण, कुयव, कुत्स, दिवोदास १९, ६. शंबर १९, ६. गृत्समदाः १९, ८. दास २०, ६. कृष्णयोनीर्दासीः २०, ७. दस्यु | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | | | २०, ८. क्रिवि २२, २. अंगिरः २३, १८. शंबराणि २४, २. पणि २४, ६. | |
| २७-३०. | कूर्म किंवा गृत्समद. | | सरस्वती, शंडिक ३०, ८. | उत्तर. |
| ३१-४३. | गृत्समद. | | आयवः ३१, ७. मनु ३३, १३. त्रित ३४, १०. दशग्व ३४, १२. गृत्समदासः ३९, ८. गृत्समदाः ४१, १८. सामगाः ४३, १. | उत्तर. |
| | | | **मंडल तिसरें.** | |
| १-१२. | विश्वामित्र. | कुशिकपुत्र. | विश्वामित्रेभिः १, २१. भृगूणां, उशिज २, ४. भृगुभ्यः ५, १०. | उत्तर. |
| १३-१४. | ऋषभ. | विश्वामित्रपुत्र. | | उत्तर. |
| १५-१६. | उत्कील. | कतपुत्र. | | उत्तर. |
| १७-१८. | कत. | विश्वामित्रपुत्र. | विश्वामित्रेषु १८, ४. | उत्तर. |
| १९-२१. | गाथिन. | | | उत्तर. |
| २२. | कौशिक. | गाथी. | | उत्तर. |
| २३. | देवश्रवा, देववात. | भरतपुत्र. | देवश्रवस् देववात ( व्यक्ति किंवा अग्नि ) २३, २. दृषद्वती, आपया, सरस्वत्यां २३, ४. | उत्तर. |
| २४. | विश्वामित्र. | गाथीपुत्र. | | उत्तर. |
| २५. | विश्वामित्र. | गाथीपुत्र. | | उत्तर. |
| २६. | विश्वामित्र. ब्रह्मर्षि. | | कुशिकासः २६, १. कुशिकेभिः २६, ३. | उत्तर. |
| २७-३०. | विश्वामित्र. | | दस्यु २९, ९. कुशिकासः २९, १५. कुशिकासः ३०, २०. | उत्तर. |
| ३१. | कुशिक. | इषीरथपुत्र. | सरमा ३१, ६, अंगिराः ३१, ७. शुष्ण ३१, ८. अंगिरस्वत् ३१, १९. | उत्तर. |
| ३२-३५, | विश्वामित्र. | | विपाट्छुतुद्री ३३, १. कुशिकस्यसूनुः ३३, ५. भरताः ३३, ११; १२. हत्वीदस्यून्-प्रार्यवर्णमावत् ३४, ९. वल. ३४, १०. | उत्तर. |
| ३६-३७. | विश्वामित्र. | | वृत्र. ३६, ८. | उत्तर. |
| ३८. | विश्वामित्र किं-वा विश्वामित्र- | | | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | गोत्र प्रजापति. किंवा वाचः-पुत्र प्रजापति. | | | |
| ३९–५३. | विश्वामित्र. | | नवग्व, दशग्व ३९, ५. कुशिकासः ४२, ९. शार्यते ४७, ४. दस्यु ४९, २. कुशिकासः ५०, ४. शार्यात ५१, ७. विश्वामित्र ५३, ७. अंगिरसः ५३, ७. सुदास ५३, ९; ११. कुशिकेभिः ५३, ९; १०; ११. विश्वामित्र ५३, ९; १२; १३. कीकट ५३, १४. नैचाशाख ५३, १४. प्रमगंद ५३, १४. जमदग्नि ५३, १५. पलस्तिजमदग्नि ५३, १६. भरतस्यपुत्राः ५३, २४. | उत्तर. |
| ५४–५६. | प्रजापति. | विश्वामित्रपुत्र अथवा वाक्-पुत्र. | | उत्तर. |
| ५७–६१. | विश्वामित्र. | | जन्हाव्यां ५८, ६. आयुषु ५९, ९. सौधन्वनाः( सुधन्वन् नामा अंगिरसःपुत्राः सायण ) ६०, १; ३; ५. | उत्तर. |
| ६२. | विश्वामित्र. कदाचित् शेवटच्या ३ ऋचांचा जमदग्नि ऋषि. | | जमदग्नि ६२, १८. | उत्तर. |
| | | | **मंडल चवथें.** | |
| १–४१. | वामदेव. | | अंगिरसः २, १५. उर्वशी २, १८. अंगिरसः ३, ११. अंगिरः ३, १५. गोतम ४, ११. मामतेय ४, १३. अप्नवान, भृगु ७, १. भृगवाण ७, ४. विवस्वत् ७, ४. अंगिरः ९, ७. सृंजय, दैववात १५, ४. कुमारसाहदेव्य १५, ७; ९. सोमक १५, ९. सरमा, अंगिरोभिः १६, ८, दस्यु १६, ९. कुत्स १६, १०; ११. दस्यु, शुष्ण, कुयव, कुत्स १६, १२. पिप्रु, मृगय, ऋजिश्वन् वैदथिन् १६, १३. वामदेव १६, १८. भृगु १६, २०. एतश १७, १४. असिक्न्यां १७, १५. कुषवा १८, ८. दास १८, ९. तुर्वीति, वय्य १९, ६. अग्रु १९, ९. औशिज २१, ६; ७. परुष्णी २२, २. भारत २५, ४. मनु, कक्षीवान्, कुत्सआर्जुनेय, उशनाकवि २६, १. दिवोदास, अतिथिग्व, शंबर २६, ३. मनु २६, ३; ४. भुज्य २७, ४. दस्यु २८, ३; ४. कुत्स ३०, ४. एतश ३०, ६. सिंधु ३०, १२. शुष्ण ३०, १३. कौलितर ३०, १४. शंबर, दास ३०, १४. वर्चिन, दास ३०, १५. अग्रु ३०, १६. यदु, तुर्वश ३०, १७. अर्ण, चित्ररथ, सरयु ३०, १८. दिवोदास ३०, २०. दभीति ३०, २१. दासानां ३०, २१. दासीः ३२, १०. गोतम ३२, ९–१२. सौधन्वनाः ३५, १; ८. त्रसदस्यु, दस्यु ३८, १. आंगिरसस्य ४०, १. दभीति ४१, ४. | उत्तर. |
| ४२. | त्रसदस्यु. | पुरुकुत्स पुत्र. | दौर्गह, त्रसदस्यु, अर्धदेव. ४२, ८. त्रसदस्यु ४२, ९. पुरुकुत्सानी, अर्धदेव ४२, ९. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ४३-४४, | पुरुमीळ्ह, अजमीळ्ह. | सुहोत्रपुत्र. | आजमीळ्हासः ४४, ६. | उत्तर. |
| ४५-५८. | वामदेव. | | बल ५०, ५. नवग्व, दशग्व, अंगिरे ५१, ४. पणि ५८, ४, | उत्तर. |
| | | | **मंडल पांचवें.** | |
| १. | बुध, गविष्ठिर. | आत्रेय. | गविष्ठिर १, १२. | उत्तर. |
| २. | कुमार किंवा वृष. | अत्रिकुमार. | कुमार २, १-२. अत्रि २, ६. शुनःशेप २, ७. | उत्तर. |
| ३-६. | वसुश्रुत. | आत्रेय. | | उत्तर. |
| ७-८. | इष. | आत्रेय. | अत्रिवत् ७, ८. अत्रि, दस्यु, इष ७, १०. अंगिरः ८, ४. | उत्तर. |
| ९-१०. | गय. | आत्रेय. | त्रित ९, ५. अंगिरः १०, ७. | उत्तर. |
| ११-१४. | सुतंभर. | आत्रेय. | अंगिरः ११, ६. नहुषस्यशेषः १२, ६. | उत्तर. |
| १५. | धरुण. | आंगिरस. | अत्रि १५, ५. | उत्तर. |
| १६-१७. | पूरु. | आत्रेय. | पूरुः १७, १. | उत्तर. |
| १८. | द्वित. | आत्रेय. | द्वित १८, २. | उत्तर. |
| १९. | वव्रि. | आत्रेय. | वव्रि १९, १. श्वैत्रेय, वृहदुक्थ १९, ३. | उत्तर. |
| २०. | प्रयस्वत्. | अत्रीणां. | | उत्तर. |
| २१. | सस. | आत्रेय. | अंगिरः, मनु २१, १. सस २१, ४. | उत्तर. |
| २२. | विश्वसामन्. | आत्रेय. | अत्रिवत् २२, १. विश्वसामन् २२, १. अत्रयः २२, ४. | उत्तर. |
| २३. | द्युम्न. | | द्युम्न २३, १. | उत्तर. |
| २४. | बंधु, सुबंधु, श्रुतबंधु, विप्रबंधु. | गोपायनाचे किंवा लोपायनाचे पुत्र. | | उत्तर. |
| २५-२६. | वसूयु. | आत्रेय. | वसूयवः २५, ९. | उत्तर. |
| २७. | त्र्यरुण, त्रसदस्यु, अश्वमेध किंवा अत्रि. | पुरुकुत्सपुत्र अथवा भरतपुत्र. | त्रैवृष्ण २७, १. त्र्यरुण २७, १. त्र्यरुण २७, २. त्र्यरुण, त्रसदस्यु २७, ३. अश्वमेध २७, ४; ५; ६. | उत्तर. |
| २८. | विश्ववारा. | आत्रेयी. | विश्ववारा २८, १. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व की उत्तर. |
|---|---|---|---|---|
| २९. | गौरिवीति. | शक्तिपुत्र अथवा गोत्रोत्पन्न. | मृग २९, ४. एतश २९, ५. कुत्स, उशना, शुष्ण २९, ९. कुत्स २९, १०. गौरिवीति, वैदथिन्, पिप्रु, ऋजिश्वन् २९ ११. नवग्व, दशग्व २९, १२. | उत्तर. |
| ३०. | बभ्रु. | | नमुचि ३०, ७; ८. बभ्रु ३०, ११; १४. ऋणंचय ३०, १२. रुशम ३० १५. | उत्तर. |
| ३१. | अवस्यु. | आत्रेय. | मेना ३१, २. अनवः [ ? ] ३१, ४. शुष्ण ३१, ७. यदु, तुर्वश. ३१, ८. कुत्स, उशना ३१, ८. अहि, दस्यु ३१, ७. कुत्स ३१, ९. अवस्यु ३१, १०. एतश ३१, ११. | उत्तर. |
| ३२. | गातु. | आत्रेय. | अहि ३२, २. शुष्ण ३२, ४. गातु ३२, १०. | उत्तर. |
| ३३–३४. | संवरण | प्रजापतिपुत्र. | दास ३३, ४. पौरुकुत्स्य, त्रसदस्यु, हिरणिन्, गैरिक्षित ३३, ८. मारुताश्व, विदथ, च्यवतान ३३, ९. ध्वन्य, लक्ष्मण्य, संवरण ३३, १०. उशना ३४, २. आग्निवेशि शत्रि ३४, ९. | उत्तर. |
| ३५–३६. | प्रभूवसु. | आंगिरोगोत्र. | पुरूवसु ३६, ३. श्रुतरथ ३६, ६. | उत्तर. |
| ३७–४०. | अत्रि. | | अत्रयः ३९, ५. अत्रि ४०, ६; ७; ९. स्वर्भानु ४०, ९. | उत्तर. |
| ४१–४२. | भौम. | आत्रेय. | कण्वहोता, त्रित ४१, ४. औशिज ४१, ५. आप्त्य ४१, ९. त्रित ४१, १०. ऊर्जव्य ४१, २०. वृत्र ४२, ५. | उत्तर. |
| ४३. | अत्रि. | | आयव ४३, १४. | उत्तर. |
| ४४. | अवत्सार. | कश्यपगोत्री. | क्रिवि ४४, ४. क्षत्र, मनस्, एवावद, यजत ४४, १०. सध्रि, अवत्सार ४४, १०. विश्ववारं, यजत, मायी ४४, ११. सदापृण, यजत, बाहुवृक्त, श्रुतवित्, तर्य ४४, १२. सुतंभर ४४, १३. | उत्तर. |
| ४५. | सदापृण. | आत्रेय. | वणिक्, दीर्घश्रवस्, कक्षीवान, मनु, विशिशिप्र ४५, ६: नवग्वाः, अंगिरसः, सरमा ४५, ८. नवग्वाः ४५, ११. | उत्तर. |
| ४६. | प्रतिक्षत्र. | आत्रेय. | | उत्तर. |
| ४७. | प्रतिरथ. | आत्रेय. | | उत्तर. |
| ४८. | प्रतिभानु. | आत्रेय. | | उत्तर. |
| ४९. | प्रतिप्रभ. | आत्रेय. | | उत्तर. |
| ५०–५१. | स्वस्ति. | आत्रेय. | अत्रि ५१, ८–१०. | उत्तर, |
| ५२–६१. | श्यावाश्व. | आत्रेय. | श्यावाश्व ५२, १. पारावत ५२, ११. यमुनायां ५२, १७. सुदासे [?] ५३, २. रसा, अनितभा, कुभा, क्रुमु, सरयु, पुरीषिणि, सिंधु ५३, ९. रातहव्य ५३, १२. त्रित ५४, २. भरत (श्यावाश्व–सायण) ५४, १४. श्यावाश्व ६१, ५. शशीयसी ६१, ६. पणि ६१, | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व की उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | | | ८. श्याव, पुरुमीळ्ह ६१, ९. वैददश्वि, तरंत ६१, १०. दार्भ्य ६१, १७. रथवीति ६१, १८-१९. गोमती ६१, १९. | |
| ६२. | श्रुतवित्. | आत्रेय. | | उत्तर. |
| ६३-६४. | अर्चनानस्. | आत्रेय. | अर्चनानस् ६४, ७. | उत्तर. |
| ६५-६६. | रातहव्य. | आत्रेय. | रातहव्य ६६, ३. | उत्तर. |
| ६७-६८. | यजत. | आत्रेय. | सुनीथ, उरुचक्रि ६७, ४. अत्रि ६७, ५. | उत्तर. |
| ६९-७०. | उरुचक्रि. | आत्रेय. | इरावती, सिंधु ६९, २. | उत्तर. |
| ७१-७२. | बाहुवृक्त. | आत्रेय. | अत्रि ७२, १. | उत्तर. |
| ७३-७४. | पौर. | आत्रेय. | नाहुषायुगा ७३, ३. अत्रि ७३, ६-७. अत्रि ७४, १. पौर ७४, ४. च्यवान ७४, ५. वम्रि, अत्क ७४, ५. | उत्तर. |
| ७५. | अवस्यु. | आत्रेय. | च्यवान ७५, ५. अवस्यु ७५, ८. | उत्तर. |
| ७६. | भौम. | आत्रेय. | | उत्तर. |
| ७७. | अत्रि. | | | उत्तर. |
| ७८. | सप्तवध्रि. | आत्रेय. | अत्रि ७८, ४. सप्तवध्रि ७८, ५-६. | उत्तर. |
| ७९-८०. | सत्यश्रवस्. | आत्रेय, वय्य पुत्र. | सत्यश्रवस् ७९, १-२-३, सुनीथ, शौचद्रथ ७९, २. | उत्तर. |
| ८१-८२. | श्यावाश्व. | आत्रेय. | श्यावाश्व ८१, ५. | उत्तर. |
| ८३-८४. | भौम. | आत्रेय. | | उत्तर. |
| ८५-८६. | अत्रि. | | त्रित ८६, १. | उत्तर. |
| ८७. | एवयामरुत्. | आत्रेय. | एवयामरुत् ८७, १-९. | उत्तर. |
| | | | **मंडल सहावें.** | |
| १-१४. | भरद्वाज. | | अंगिरः २, १०. औशिज ४, ६. नवग्व ६, ३. ममता १०, १. भरद्वाजेषु १०, ६. अंगिरसां, रेभ ११, ३. पणि १३, ३. | उत्तर. |
| १५. | वीतहव्य. | आंगिरस. | वीतहव्य, भृगवः १५, २. वीतहव्य, भरद्वाज १५, ३. एतश १५, ५. अथर्वन् १५, १७. | उत्तर. |
| १६-३०. | भरद्वाज. | | भरत ( दौःषंति-सायण ) १६, ४. दिवोदास, भरद्वाज १६, ५. मनु १६, ९. अंगिरः १६, ११. अथर्वा १६, १३. दध्यङ्, | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्वं कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | | | आथर्वण १६, १४. पाथ्य, वृष १६, १५. भारत, ( अग्निः ) दिवोदास १६, १९. अत्रिणं ( राक्षसादिकं ) १६, २८. भरद्वाज १६, ३३. भारत १६, ४५. अंगिरस्वान् १७, ६. भरद्वाज १७, १४. दस्यु १८,३. अंगिरोभिः १८,५. चुमुरि, धुनि, पिप्रु, शंबर, शुष्ण १८, ८. कुत्स, आयु, अतिथिग्व, तूर्वयाण १८, १३. दशोणि २०, ४. कुत्स, शुष्ण २०, ५. दास, नमुचि, साप्य, नमी २०, ६. पिप्रु, ऋजिश्वा २०, ७. वेतसु, दशोणि, तूतुजि, तुग्र, इभ, द्योतन २०, ८. पुरु, पुरुकुत्स २०, १०. उशना, काव्य, नववास्त्व २०, ११. धुनि, तुर्वश, यदु २०, १२. नाहुष २२, १०. भरद्वाज २३, १०. भरद्वाज २५, ९. कुत्स, शुष्ण २६, ३. अतिथिग्व, अमर्मन् २६, ३. तुग्र, वेतसु, वृषभ, दशद्यु २६, ४. दास, शंबर, दिवोदास २६. ५. दभीति, चुमुरि, रजि, पिठीनस् २६, ६. नहुष २६, ७. प्रातर्दनि, क्षत्रश्री २६. ८. वरशिखस्यशेषः २७, ४; ५. अभ्यावर्तिन्चायमान २७, ५. वृचीवत, हरियूपीया, यव्यावति २७, ५. सृंजय, तुर्वश, वृचीवत, दैववात २७, ७. अभ्यावर्तीचायमान, पार्थव २७, ८. दस्यु २९, ६. | |
| ३१-३२. | सुहोत्र. | भारद्वाज. | कुत्स, शुष्ण, कुयव ३१, ३. दिवोदास, शंबर, भरद्वाज, दस्यु ३१, ४. | उत्तर. |
| ३३-३४. | शुनहोत्र. | | पणि ३३, २. दास, वृत्र ३३, ३. | उत्तर. |
| ३५-३६. | नर. | भारद्वाज. | भरद्वाज ३५, ४. आंगिरसाम् ३५, ५. | उत्तर. |
| ३७-४३. | भरद्वाज. | | वल ३९, २. शंबर, दिवोदास ४३, १. | उत्तर. |
| ४४-४६. | शंयु. | बृहस्पतिपुत्र. | तुर्वश, यदु ४५, १. बृबु ( पणींचामुख्य ) ४५, ३१. उरुःकक्ष, गांग्य ४५, ३१. बृबु ४५, ३३. नाहुषीषु ४६, ७. तृक्षु, पुरु, द्रुह्यु ४६, ८. | उत्तर. |
| ४७. | गर्ग. | भरद्वाजपुत्र. | शंबर ४७, २. दास, शंबर, वर्चिन् ४७, २१, प्रस्तोक, दिवोदास, अतिथिग्व, शंबर ४७, २२. दिवोदास ४७, २३. अथर्वा, अश्वथ, पायु ४७, २४. भरद्वाज, साञ्जय ४७, २५. | उत्तर. |
| ४८. | शंयु. | बृहस्पतिपुत्र. | भरद्वाज ४८, ७; १३. | उत्तर. |
| ४९-५२. | ऋजिश्वन्. | भरद्वाजपुत्र. | अंगिरस्वत् ४९, ११. मनु ४९, १३. अत्रि ५०, १०. सरस्वति ५०, १२. भरद्वाजाः ५०, १५. भरद्वाज ५१, १२. पणि ५१, १४. सरस्वति ५२, ६. | उत्तर. |
| ५३-६१. | भरद्वाज. | | पणि ५३, ३-५. दास ६०,६. दिवोदास वध्र्यश्व, सरस्वति ६१, १. बिसख ( हंस ) ६१, २. पारावतघ्नी, सरस्वति. ६१, २. बृसय ६१, ३. | उत्तर. |
| ६२. | भरद्वाज. | बृहस्पतिपुत्र. | भुज्यु, तुग्रस्यसूनुः ६२, ६. वध्रिमती, शयु ६२, ७. आनव ६२, ९. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व की उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ६३–७४. | भरद्वाज. | | पुरय, सुमीळ्ह, पेरुक, शाण्ड ६३, ९. पुरुपंथा, भरद्वाज ६३, १०. आंगिरसः ६५, ५. भरद्वाज ६५, ६. आंगिरसः ७३, १. | उत्तर. |
| ७५. | पायु. | भारद्वाज. | | उत्तर. |
| | | | **मंडल सातवें.** | |
| १–३१. | वसिष्ठ. | मित्रावरुणपुत्र. | जरूथ १, ७. भारती [?] २, ८. पूरवे ५, ३. दस्यु ५, ६. नहुष ६, ५. वसिष्ठाः ७,७. ८, ७. भरत, पूरु ८, ४. जरूथ, वसिष्ठ ९, ६. उशिज १०, २. वसिष्ठ १२, ३; १८, ४. सुदास, शिम्यु, सिंधु, उचथ १८, ५. मत्स्यासः , भृगु, द्रुह्यु १८, ६. पक्थ, भलानस्, अलिनास, विषाणिन्, शिवास. तृत्सु, १८, ७. परुष्णी, चायमानकवि १८, ८. परुष्णी, सुदास १८, ९. वैकर्ण १८, ११. श्रुत, कवष, द्रुह्यु, अनु १८, १२. आनव, तृत्सु, पुरु १८, १३. अनु, द्रुह्यु १८, १४. तृत्सु, सुदास १८, १५. मन्यु १८, १६. सुदास १८, १७. भेद १८, १८. यमुना, तृत्सु, भेद, अजासः, शिग्रु, यक्षु १८, १९. देवक, मान्यमान, शंबर १८, २०. पराशर, शतयातु, वसिष्ठ १८, २१. देववत, सुदास, पैजवन १८, २२. पैजवन, सुदास १८, २३. युध्यामधि १८, २४. दिवोदास, सुदास, पैजवन १८, २५. कुत्स, शुष्ण, कुयव, आर्जुनेय १९, २. सुदास, पौरुकुत्सि, त्रसदस्यु, पूरु १९, ३. दस्यु, चुमुरि, धुनि, दभीति १९, ४. नमुचि १९, ५. सुदास १९, ६. तुर्वश, याद्व, अतिथिग्व १९, ८. सुदास २०, २. शिश्नदेव २१, ५. वसिष्ठ २२, ३; २३, १. वसिष्ठासः २३, ६. सुदास २५, ३. कुत्साः २५, ५. वसिष्ठ २६, ५. | उत्तर. |
| ३२. | वसिष्ठ. किंवा शक्ति. | वसिष्ठपुत्र. | | उत्तर. |
| ३३. | ऋ १-९ वसिष्ठ. ऋ. १०-१४ वसिष्ठपुत्र. | | वसिष्ठाः ३३, १, पाशद्युम्न, वायत, वैशंत, वसिष्ठ ३३, २. भेद, सिंधु, दाशराज्ञ, सुदास, वसिष्ठ ३३, ३. वसिष्ठ, दाशराज्ञ, तृत्सु ३३, ४–५. भरत, तृत्सु, वसिष्ठ ३३, ६. वसिष्ठ ३३, ७–९. अप्सरसः ३३, ९. | उत्तर. |
| | | | अगस्त्य, वसिष्ठ ३३, १०. वसिष्ठ, उर्वशी ३३, ११. अप्सरसः ३३, १२. मान, वसिष्ठ ३३, १३. प्रतृद, वसिष्ठ ३३, १४. | उत्तर. |
| ३४–१०० | वसिष्ठ. | मित्रावरुणपुत्र. | सरस्वति ३६, ६. वसिष्ठाः ३७, ४. वसिष्ठ ३९,७;४०, ७. अंगिरसः ४२, १. वसिष्ठ ४२, ६. आंगिरोभिः ४४, ४. भरत ४६, १. आंगिरसः ५२, २. सुदास ५३, ३. धुनि ५६, ८. वसिष्ठ ५९, ३. सुदास ६०,८–९. सुदास ६४, ३. अत्रि ६८, ५. च्यवान ६८, ६. भुज्यु ६८, ७. शयु, वृक ६८, ८. भुज्यु ६९, ७. च्यवान, पेदु, अत्रि, जाहुष ७१, ५. वसिष्ठ ७३, ३. अंगिरस्तमा ७५, १. वसिष्ठाः ७६, ६–७. ७७, ६. अंगिरस्तमा ७९, ३. वसिष्ठ ८०, १. पृथु, पर्शु, सुदास, दास ८३, १. सुदास, तृत्सु ८३, ४. सुदास, तृत्सु, राजभिर्दशभिः ८३, ६. दशराजानः, सुदास ८३, ७. दाशराज्ञ, सुदास, तृत्सु ८३, ८. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्वं कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | | | वसिष्ठ ८६, ५. दास ८६, ७. वसिष्ठ ८८, १; ४. वसिष्ठाः ९०, ७. ९१, ७. सरस्वति, नाहुष ९५, २. सरस्वति ९५, ४. वसिष्ठ, सरस्वति ९५, ६. ९६, १. पूरवः ९६, २. जमदग्नि, वसिष्ठ ९६, ३. वृषशिप्र, दास. ९९, ४. शंबर वर्चिन् ९९, ५. | उत्तर. |
| १०१–१०२. | कुमार. किंवा वसिष्ठ. | अग्निपुत्र. | | उत्तर. |
| १०३–१०४. | वसिष्ठ. | | अत्रिणः १०४, १. पराशर १०४, २१. मूरदेवं १०४, २४. | उत्तर. |
| | | | **मंडल आठवें.** | |
| १. | प्रगाथ, मेध्यातिथि, आसंग, शश्वती. | कण्वपुत्र. | काण्व १, ८. एतश, वंकू, कुत्स, आर्जुनेय, गंधर्व १, ११. शुष्ण १, २८. मेध्यातिथि, निंदिताश्व, प्रपथी, परमज्या १, ३०. याद्व १, ३१. आसंग १, ३२. प्लायोगि, आसंग १, ३३. शश्वती १, ३४. | उत्तर. |
| २. | मेध्यातिथि. प्रियमेध. | कण्वपुत्र. | कण्व २, १६; २२. प्रियमेध २, ३७. कण्वासः २, ३८. मेध्यातिथि, कण्व २, ४०. विभिंदु २, ४१. | उत्तर. |
| ३. | मेध्यातिथि. | काण्व. | भृगु, प्रस्कण्व ३, ९. पौर, रुशम, श्यावक, कृप ३, १२. कण्व, भृगु, आयु, प्रियमेध ३, १६. अर्बुद, मृगय ३, १९. पाकस्थामा कौरयाण ३, २१. पाकस्थामा ३, २२; २४. तुग्र्य ३, २३. | उत्तर. |
| ४. | देवातिथि. | काण्व. | अनु, तुर्वश ४, १. रुम, रुशम, श्यावक, कृप, कण्वासः ४, २. कण्व ४, ३. यदु, तुर्वश ४, ७. पज्र ४, १७. कुरुंग, तुर्वश ४, १९. प्रियमेध, काण्व ४, २०. | उत्तर. |
| ५. | ब्रह्मातिथि. | काण्व. | कण्वासः ५, ४. तौग्र्य ५, २२. कण्व ५, २३. कण्व, प्रियमेध, अत्रि, शिंजार ५, २५. अगस्त्य, सोभरि ५, २६. दासीः ५, ३१. चैद्य, कशु ५, ३७. दाशराज्ञः, चैद्य ५, ३८. चेदयः ५, ३९. | उत्तर. |
| ६. | वत्स. | काण्व. | वत्स ५, १. कण्व ६, ३; ८; ११. शुष्ण ६, १४. भृगु ६, १८. कण्व ६, २१. नाहुष ६, २४. कण्व ६, ३१; ३४. शर्यणावत् ६, ३९. कण्व ६, ४३. प्रियमेध ६, ४५. तिरिंदिर, पर्शु, याद्व ६, ४६. पज्र, साम्र ६, ४७. याद्व, ककुह ६, ४८. | उत्तर. |
| ७. | पुनर्वत्स. | काण्व. | तुर्वश, यदु, कण्व ७, १८, काण्व ८, १९. त्रित ७, २४. उशना ७, २६. सुषोमा, शर्यणावत्, आर्जीक ७, २९. कण्वासः ७, ३२. | उत्तर. |
| ८. | सध्वंस. | काण्व. | नहुष ८, ३. कण्व ८, ३; ४; ८. वत्स ८, ८; ११; १५. काव्य, कवि ८, ११. प्रियमेध ८, १८. वत्स ८, १९. कण्व, मेधातिथि, वश, दशव्रज, गोशर्य, शयु ८, २०. त्रसदस्यु ८, २१. | उत्तर. |
| ९. | शशकर्ण. | काण्व. | वत्स ६, १. काण्व ९, ३; ९. अथर्वा ९, ७. कक्षीवान्, व्यश्व, दीर्घतमा, पृथी, वैन्य ९, १०. तुर्वश, यदु, कण्व ९, १४. विमद, वत्स ९, १५. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १०. | प्रगाथ. | कण्वपुत्र. | मनु, काण्व १०, २. अनु, द्रुह्यु, यदु, तुर्वश १०, ५. | उत्तर. |
| ११. | वत्स. | कण्वपुत्र. | वत्स ११, ७. | उत्तर. |
| १२. | पर्वत. | काण्व. | दशग्व, अध्रिगु १२, २. त्रित, आप्त्य १२, १६. | उत्तर. |
| १३. | नारद. | काण्व. | | |
| १४–१५. | गोषूक्ति. अश्वसूक्ति. | काण्वायन. | अंगिरोभ्यः, वल १४, ८. नमुचि १४, १३.. आयु, मनु १५, ५. | उत्तर. |
| १६–१८. | इरिंबिठ. | काण्व. | शृंगवृष, कुंडपाय्य १७, १३. पृदाकुसानु १७, १५. | उत्तर. |
| १९–२२. | सोभरि. | काण्व. | सोभरि १९, २. मनु १९, २४. त्रसदस्यु १९, ३२. पौरुकुत्स्य, त्रसदस्यु १९, ३६. सोभरि २०, २; ८; १९. क्रिवि २०, २४. असिक्नी २०, २५. चित्र २१, १; १७; १८. सरस्वति २१, १७; १८. सोभरि २२, २. मनु २२, ६. त्रासदस्यव, तृक्षि २२, ७. पक्थ, अध्रिगु, बभ्रु २२, १०. क्रिवि २२, १२. सोभरि २२, १५. | उत्तर. |
| २३–२५. | विश्वमनस्. | व्यश्वपुत्र. | अंगिरस्तमं२३,१०. व्यश्व २३, १६; २३. उशनाकाव्य, मनु २३, १७. वैय्यश्व २३, २४. विश्वमनस् २४, ७. अभ्व्य २४, १४. व्यश्व २४, २२; २८. वैय्यश्व २४, २३. कुत्स २४, २५. दास २४, २७. वरोसुषामन् २४, २८. व्यश्व २४, २९. नार्य २४, २९. गोमती, बल २४, ३०. उक्षण्यायन, सुषामन् २५, २२. | उत्तर. |
| २६. | व्यश्व किंवा. वैयश्व. | आंगिरस. | वरोसुषामन् २६, २. व्यश्व २६, ९. पणि २६, १०. वैय्यश्व २६, ११. श्वेतयावरी २६, १८. | उत्तर. |
| २७–२८. | वैवस्वतमनु. | | मनुष्वत् २७, ७. मनु २७, १४. | उत्तर. |
| २९. | वैवस्वतमनु. किंवा कश्यप. | मरीचिपुत्र. | | उत्तर. |
| ३०–३१. | मनुवैवस्वत. | | मनु ३०, २. मानव ३०, ३. | उत्तर. |
| ३२–३३. | मेधातिथि. | काण्व. | कण्व ३२, १. सृबिंद, अनर्शनि, पिप्रु, दास, अहीशु ३२, २. और्णवाभ, अहीशु ३२, २६. प्रियमेध ३२, ३०. कण्व ३३, ३. मेध्यातिथि ३३, ४. | उत्तर. |
| ३४. | नीपातिथि. | काण्व. | कण्व ३४, १; ४. मनु ३४, ८. | उत्तर. |
| ३५–३८. | श्यावाश्व. | आत्रेय. | भृगु ३५, ३. अंगिरस्वंतौ ३५, १४. अत्रि, श्यावाश्व ३५, १९; २१. अत्रि ३६, ६; ७. श्यावाश्व, त्रसदस्यु ३६, ७. ३७, ७. श्यावाश्व, अत्रि ३८, ८. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ३९–४१. | नाभाक. | काण्व, नभाक पुत्र. | मंधातृ ३९, ८. आयु ३९, १०. नभाक ४०, ४; ५. शुष्ण ४०, १०–११. मंधातृ, अंगिरस्वत् ४०, १२. नाभाक ४१, २. | उत्तर. |
| ४२. | अर्चनानस् किंवा नाभाक | आत्रेय काण्व. | अत्रि ४२, ५. | उत्तर. |
| ४३–४४. | विरूप. | आंगिरस. | भृगु, मनु, अंगिरस्वत् ४३, १३. अंगिरस्तम ४३, २७, ४४, ८. | उत्तर. |
| ४५. | त्रिशोक. | काण्व. | कद्रु ४५, २६. यदु, तुर्वश, अह्नवाय्य ४५, २७. त्रिशोक ४५, ३०. | उत्तर. |
| ४६. | वश. | अश्वपुत्र. | वश, अश्व, पृथुश्रवस्, कानीत ४६, २१. पृथुश्रवस् ४६, २४. कानीत ४६, २४. अरट्व, अक्ष, नहुष, सुकृत्वन् ४६, २७. दास, बल्बूथ ४६, ३२. अश्व, वश ४६, ३३, | उत्तर. |
| ४७. | त्रित. | आप्त्य. | त्रित, आप्त्य ४७, १३-१५. द्वित, त्रित ४७, १६. आप्त्य ४७, १७. | उत्तर. |
| ४८. | प्रगाथ. | काण्व. | | उत्तर. |
| | | | ( येथून पुढील वालखिल्य नामक अकरा सूक्तें दहाव्या मंडळाच्या शेवटीं दिलीं आहेत. सूक्तांक पूर्वींचेच पुढें चालू. ) | |
| ४९–५०. | भर्ग. | प्रगाथपुत्र. | अंगिरः ४९, २. | उत्तर. |
| ५१–५४. | प्रगाथ. | काण्व. | अंगिरोभ्यः ५२, ३. पणि ५३, २. पुरु ५३, १०. शर्यणावत् ५३, ११. सुषोमा, आर्जीक ५३, ११. | उत्तर. |
| ५५. | कलि. | प्रगाथपुत्र. | कलयः ५५, १५. | उत्तर. |
| ५६. | मत्स्य. किंवा मान्य. | संमद पुत्र. मित्रावरुण-पुत्र. | | उत्तर. |
| ५७–५८. | प्रियमेध. | आंगिरस. | पुरुमाय्य ५७, १०. इंद्रोत, आश्वमेध, ऋक्षसूनु ५७, १५. आतिथिग्व, आश्वमेध, आर्क्ष ५७, १६. आतिथिग्व, इंद्रोत ५७, १७. पूतक्रतु ५७, १७. प्रियमेधासः ५८, ८; १८. | उत्तर. |
| ५९. | पुरुहन्मन्. | | पुरुहन्मन् ५९, २. पर्वत, दस्यु ५९, ११. शर ५९, १३. शौरदेव्य ५९, १५. | उत्तर. |
| ६०. | सुदीति, पुरुमीळ्ह. अथवा दोहोंपैकीं एक. | | पुरुमीळ्ह, सुदीति ६०, १४. | उत्तर. |
| ६१. | हर्यत. | प्रगाथपुत्र. | | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ६२. | गोपवन. किंवा सप्तवध्रि. | आत्रेय. | अत्रि ६२, ३; ७; ८. सप्तवध्रि ६२, ९. | उत्तर. |
| ६३. | गोपवन. | आत्रेय. | आनव, आर्क्ष, श्रुतर्वा ६३, ४. गोपवन, अंगिरः ६३, ११. आर्क्ष, श्रुतर्वा ६३, १३. तुग्र्य ६३, १४. परुष्णी ६३, १५. | उत्तर. |
| ६४. | विरूप. | आंगिरस. | अंगिरः ६४, ५. विरूप ६४, ६. पणि ६४, ७. | उत्तर. |
| ६५–६७. | कुरुसुति. | काण्व. | और्णवाभ, अहीशु ६६, २. एमुष ६६, १०. | उत्तर. |
| ६८. | कृत्नु. | भार्गव. | कृत्नु ६८, १. | उत्तर. |
| ६९. | एकद्यू. | नौधस्पुत्र. | एकद्यू ६९, १०. | उत्तर. |
| ७०–७२. | कुसीदिन. | कण्वपुत्र. | | उत्तर. |
| ७३. | उशना. | कविपुत्र. | अंगिरः ७३, ४. | उत्तर. |
| ७४. | कृष्ण. | आंगिरस. | कृष्ण ७४, ३; ४. | उत्तर. |
| ७५. | विश्वक. | कृष्णपुत्र. | विश्वक ७५, १–३. विमना ७५, २. विष्णापू ७५, ३. | उत्तर. |
| ७६. | द्युम्नीक किंवा प्रियमेध. | वासिष्ठ आंगिरस. | द्युम्न, क्रिवि ७६, १. प्रियमेध ७६, ३. | उत्तर. |
| ७७. | नोधा. | गोतमपुत्र | गोतम ७७, ४. | उत्तर. |
| –७९. | नृमेध, पुरुमेध. | आंगिरस. | | उत्तर. |
| ८०. | अपाला. | अत्रिकन्या. | अपाला ८०, ७. | उत्तर. |
| ८१. | श्रुतकक्ष किंवा सुकक्ष. | आंगिरस. | श्रुतकक्ष ८१, २५. | उत्तर. |
| ८२. | सुकक्ष. | आंगिरस. | परुष्णी ८२, १३. | उत्तर. |
| ८३. | बिंदु किंवा पूतदक्ष. | आंगिरस. | पूतदक्ष (?) ८३, १०. | उत्तर. |
| ८४. | तिरश्ची | आंगिरस. | | उत्तर. |
| ८५. | तिरश्ची किंवा द्युतान. | आंगिरस मरुतपुत्र. | कृष्ण ८५, १३; १४. अंशुमती ८५, १३–१५. शुष्ण ८५, १७. दासपत्नी, सिंधु ८५, १८. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ८६. | रेभ. | काश्यप. | पणि ८६, २. | उत्तर. |
| ८७-८८. | नृमेध. | आंगिरस. | दस्यु ८७, ६. | उत्तर. |
| ८९. | नेम. | भृगुगोत्री. | नेम ८९, ३. पारावत, शरभ ८९, ६. | उत्तर. |
| ९०. | जमदग्नि. | भृगुगोत्री. | जमदग्नि ९०, ८. | उत्तर. |
| ९१ | प्रयोग, किंवा अग्निबार्हस्पत्य किंवा अग्नि-गृहपति, किंवा अग्नि-यविष्ठ. | भृगुगोत्री. सहसस्पुत्र. | गृहपति ९१, १. और्वभृगु अप्नवान ९१, ४. अंगिरः ९१, १७. | उत्तर. |
| ९२. | सोभरि. | काण्व. | दैवोदास ९२, २. सोभरि ९२, १४. | उत्तर. |
| | | | **मंडल नववें.** | |
| १. | मधुच्छंद. | विश्वामित्रपुत्र. | | उत्तर. |
| २. | मेधातिथि. | काण्व. | | उत्तर. |
| ३. | शुनःशेप. | अजीगर्तपुत्र. | | उत्तर. |
| ४. | हिरण्यस्तूप. | आंगिरस. | | उत्तर. |
| ५-२४. | आसित किंवा देवल. | काश्यप. | अथर्वन् ११, २. आयवः १५, ७. आयुषु. १६, ८. पणि २२, ७. आयवः २३, २; ४. | उत्तर. |
| २५. | दृळ्हच्युत. | अगस्त्यपुत्र. | | उत्तर. |
| २६. | इध्मवाह. | दृळ्हच्युतपुत्र. | | उत्तर. |
| २७. | नृमेध. | आंगिरस. | | उत्तर. |
| २८. | प्रियमेध. | काण्व. | | उत्तर. |
| २९. | नृमेध. | आंगिरस. | | उत्तर. |
| ३०. | बिंदु. | आंगिरस. | | उत्तर. |
| ३१. | रहूगण. | गोतमपुत्र. | | उत्तर. |
| ३२. | श्यावाश्व. | आत्रेय. | त्रित ३२, २. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ३३–३४. | त्रित. | आत्य. | त्रित ३४, ४. | उत्तर. |
| ३५–३६. | प्रभूवसु. | आंगिरस. | प्रभूवसु ३५, ६. | उत्तर. |
| ३७–३८. | रहूगण. | गोतमपुत्र. | त्रित ३७, ४. ३८, २. | उत्तर. |
| ३९–४०. | बृहन्मति. | आंगिरस. | बृहन्मति ३९, १. | उत्तर. |
| ४१–४३. | मेध्यातिथि. | काण्व. | मेध्यातिथि ४३, ३ | उत्तर. |
| ४४–४६. | अयास्य. | आंगिरस. | अयास्य ४४, १. | उत्तर. |
| ४७–४९. | कवि. | भृगुपुत्र. | | उत्तर. |
| ५०–५२. | उचथ्य. | आंगिरस. | | उत्तर- |
| ५३–६०. | अवत्सार. | काश्यप. | ध्वस्र, पुरुषंति ५८, ३. | उत्तर. |
| ६१. | अमहीयु. | आंगिरस. | शंबर, दिवोदास, तुर्वश, यदु ६१, २. | उत्तर. |
| ६२. | जमदग्नि. | भार्गव. | अंगिरोभ्यः ६२, ९. जमदग्नि ६२, २४. | उत्तर. |
| ६३. | निध्रुवि. | काश्यप. | | |
| ६४. | कश्यप. | मरीचिपुत्र. | | |
| ६५. | भृगु<br>किंवा जमदग्नि. | वरुणपुत्र.<br>भार्गव. | व्यश्व ६५, ७. शर्यणावत ६५, २२. आर्जीक, कृत्वन् ६५, २३. पस्त्य, पंचजन ६५, २३. जमदग्नि ६५, २५. | उत्तर.<br>उत्तर. |
| ६६. | शतं वैखानसः | विखानसपुत्र. | | |
| ६७. | ऋ. | | | उत्तर. |
| | १-३. भरद्वाज. | बार्हस्पत्य. | | |
| | ४-६. कश्यप. | मरीचिपुत्र. | | |
| | ७-९. रहूगण. | गोतमपुत्र. | | |
| | १०-१२. भौम. | आत्रेय. | | |
| | ३१-१५ विश्वामित्र. | गाथीपुत्र. | | |
| | १६-१८. जमदग्नि. | भार्गव. | | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | १९-२१. वसिष्ठ. | मित्रावरुणपुत्र. | | |
| | २२-३२पवित्र. किंवा वसिष्ठ. | आंगिरस. मित्रावरुणपुत्र. | | |
| ६८. | वत्सप्री. | भलंदनपुत्र. | | उत्तर. |
| ६९. | हिरण्यस्तूप. | आंगिरस | | उत्तर. |
| ७०. | रेणु. | विश्वामित्रपुत्र. | | उत्तर. |
| ७१. | ऋषभ. | विश्वामित्रपुत्र. | | उत्तर. |
| ७२. | हरिमंत. | आंगिरस. | | उत्तर. |
| ७३. | पवित्र. | आंगिरस | | उत्तर. |
| ७४. | कक्षीवान्. | दीर्घतमस्पुत्र. | कक्षीवते ७४, ८, | उत्तर. |
| ७५-७९. | कवि. | भार्गव. | | उत्तर. |
| ८०-८२. | वसु | भारद्वाज. | | उत्तर. |
| ८३. | पवित्र | आंगिरस. | | उत्तर. |
| ८४. | प्रजापति | वाचःपुत्र. | | |
| ८५. | वेन. | भृगुगोत्री. | | उत्तर. |
| ८६. | ऋ. १-१०. आकृष्ट, माष. | आत्रेय. | | उत्तर, |
| | ११-२०. सिकता, निवावरी. | आत्रेय. | | |
| | २१-३० पृश्नय, अज. | आत्रेय. | अंगिरः ८६, २३. | |
| | ३१-४०. वरील सर्व. ( सहा. ) | आत्रेय. | | |
| | ४१-४५. भौम. | आत्रेय. | | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व की उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | ४६-४८. गृत्समद. | | अत्रि ८६, ४८. | उत्तर. |
| ८७-८९. | उशना. | काव्य. | उशनाकाव्य ८७, ३. नहुष्याणि ८८, २. पेदु. ८९, ४. | उत्तर. |
| ९०. | वसिष्ठ. | मैत्रावरुणि. | | उत्तर. |
| ९१-९२. | कश्यप. | मरीचिपुत्र. | नहुष्य ९१, २. मनु, दस्यु ९२, ५. | उत्तर. |
| ९३. | नोधस्. | गोतमपुत्र. | | उत्तर, |
| ९४. | कण्व. | आंगिरस. | | उत्तर. |
| ९५. | प्रस्कण्व. | कण्वपुत्र. | | उत्तर. |
| ९६. | प्रतर्दन. | दिवोदासपुत्र. | मनु ९६, १२. | उत्तर. |
| ९७. | ऋ १-३. वसिष्ठ. | मैत्रावरुणि. | उशनाकाव्य ९७, ७. जमदग्नि ९७, ५१. | उत्तर. |
| | ४-६. इन्द्रप्रमति. | | | |
| | ७-९. वृषगण. | | | |
| | १०-१२. मन्यु. | | | |
| | १३-१५. उपमन्यु. | | | |
| | १६-१८. व्याघ्रपाद. | वसिष्ठगोत्री. | | |
| | १९-२१. शक्ति. | | | |
| | २२-२४. कर्णश्रुत. | | | |
| | २५-२७. मृळीक. | | | |
| | २८-३०. वसुक्र. | | | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| | ३१-४४. पराशर. | शक्तिपुत्र. | | उत्तर. |
| | ४५-५८. वत्स. | आंगिरस. | | उत्तर. |
| ९८. | अंबरीष. ऋजिश्वन्. | वृषागिरपुत्र. भरद्वाजपुत्र. | | उत्तर. |
| ९९–१००. | रेभ व सूनु. | कश्यपगोत्री. | | उत्तर. |
| १०१. | ऋ.अंधीगु १-३. | श्यावाश्वपुत्र. | भृगवः १०१, १३. | उत्तर |
| | ४-६. ययाति. | नहुषपुत्र. | | |
| | ७-९. नहुष. | मनोःपुत्र. | | |
| | १०-१२. मनु | संवरणपुत्र. | | |
| | १३-१६. विश्वामित्र किंवा प्रजापति. | वाच्यःपुत्र. | | |
| १०२. | त्रित. | आप्त्य. | त्रित १०२, २; ३. | उत्तर. |
| १०३. | द्वित. | आप्त्य. | | उत्तर. |
| ००४. | पर्वत, नारद किंवा शिखंडिनी. | काण्व. कश्यपाच्या दोन मुली. | | उत्तर. |
| १०५. | पर्वत, नारद. | काण्व. | अत्रिणं १०५, ६. | उत्तर. |
| १०६. | १-३. अग्नि. | चक्षोःपुत्र. | | |
| | ४-५. चक्षु. | मनुपुत्र. | | |
| | ६-९. मनु. | अप्सुनाम्नःपुत्रः | | |
| | १०-१४.अग्नि. | चाक्षुष. | | |
| १०७. | भरद्वाजादि-सप्तर्षि. | | अंगिरस १०७, ६ | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १०८. | १-२. ऋ. गौरिवीति. | शक्तिपुत्र. | नवग्व, दध्यङ् १०८, ४. | उत्तर. |
| | ३. शक्ति. | वसिष्ठपुत्र. | | |
| | ४-५. ऊरु. | आंगिरस. | | |
| | ६-७ ऋजिश्वन. | भारद्वाज. | | |
| | ८-९. ऊर्ध्वसद्मन. | आंगिरस. | | |
| | १०-११. कृतयशस्. | आंगिरस. | | |
| | १२-१३. ऋणंचय. | | | |
| | १४-१६. शक्ति. | वासिष्ठपुत्र. | | |
| १०९. | धिष्ण्योपेताग्नयः | ईश्वरपुत्राः. | | |
| ११०. | त्र्यरुण, त्रसदस्यु. | | वसुरुच् ११०, ६. | उत्तर. |
| १११. | अनानत. | परुच्छेपपुत्र. | | उत्तर. |
| ११२. | शिशु. | आंगिरस. | | उत्तर. |
| ११३-११४. | कश्यप. | मरीचिपुत्र. | शर्यणावत ११३, १. आर्जीक ११३, २. वैवस्वत ११३, ८. कश्यप ११४; २. | |
| | | | **मंडल दहावें.** | |
| १-७. | त्रित. | आप्त्य. | पूरवे ४, १. सूराः ४, ४. | उत्तर. |
| ८. | त्रिशिरस्. | त्वष्टृपुत्र. | त्रित ८, ७. आप्त्य, त्रिशीर्षाण, त्रित, त्वाष्ट्र ८, ८. त्वाष्ट्र, विश्वरूप ८, ९. | |
| ९. | सिंधुद्वीप. त्रिशिरस्. | अंबरीषपुत्र. त्वष्टृपुत्र. | | उत्तर. |
| १०. | यम, यमी. | विवस्वतपुत्र, पुत्री. | त्वष्टा, विश्वरूप १०, ५. यमी, यम १०, ९. | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्वें कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ११–१२. | हविर्धान. | अंगपुत्र. | मनु ११, ३. | |
| १३. | विवस्वत्. | अदितिपुत्र. | | |
| १४. | यम. | विवस्वत्पुत्र. | वैवस्वतयम १४, १. अंगिरोभिः १४, ३; ४. मातली, कव्य १४, ३. ऋक्वन्, बृहस्पति १४, ३. विरूप १४, ५. अंगिरसः, नवग्व, अथर्वाण, भृगु १४, ६. | |
| १५. | शंख. | यमपुत्र. | | |
| १६. | दमन. | यमपुत्र. | | |
| १७. | देवश्रवस्. | यमपुत्र. | यम, विवस्वत्, त्वष्टा १७, १. सरण्यू, सवर्णा १७, २. | उत्तर. |
| १८. | संकुसुक. | यमपुत्र. | | |
| १९. | माथित.<br>भृगु.<br>च्यवन. | यमपुत्र.<br>वरुणपुत्र.<br>भार्गव. | | उत्तर. |
| २०–२६. | विमद<br>किंवा<br>विमद. | प्रजापति-पुत्र.<br><br>वसुक्रपुत्र | विमद, २०, १०. अथर्वन् २१, ५. शुष्ण २२, ७; ११; १४. दस्यु, दास. २२, ८. दास २३, २. विमदाः २३, ६. विमद २,३७. विमद २४, ४. कक्षीवान् २५, १०. शुच, शुचा २६, ६. | उत्तर. |
| २७. | वसुक्र. | इंद्रपुत्र. | कपिल २७, १६. प्रमर २७, २०. | उत्तर. |
| २८. | वसुक्रपत्नी. | इंद्रस्नुषा. | | उत्तर. |
| २९. | वसुक्र. | इंद्रपुत्र. | कुत्स, त्रिशोक २९, २. | उत्तर. |
| ३०–३३. | कवष. | इलूषपुत्र. | कण्व, नृषद, श्याव ३१, ११. कुरुश्रवण, कलश ३२, ९. दुःशासु ३३, १. पर्शवः ३३, २. कुरुश्रवण, त्रासदस्यव ३३, ४. उपमश्रवस ३३, ६. मित्रातिथि, उपमश्रवस ३३, ७. | उत्तर. |
| ३४. | कवष<br>किंवा ऊक्ष. | इलूषपुत्र. | मौजवत सोम ३४, १. | उत्तर. |
| ३५–३६. | लुश. | धनाकपुत्र. | शर्यणावतः ३५, २. | |
| ३७. | अभितपस्. | सूर्यपुत्र. | | |
| ३८. | मुष्कवान् इंद्र<br>किंवा लुश. | धनाकपुत्र. | दास ३८, ३. कुत्स ३८, ५. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ३९-४०. | घोषा. | कक्षीवान् कन्या. | च्यवान, तौग्र्य ३९, ४. विमद, शुंध्यु, पुरुमित्र, वध्रिमती ३९, ७. कौल, वंदन, विश्पला ३९, ८. रेभ, अत्रि, सप्तवध्रि ३९, ९. पेदु ३९, १०. शयु ३९, १३. भृगु ३९, १४. घोषा ४०, ५. कुत्स ४०, ६. भुज्यु, वश, शिंजार ४०, ७. कृश, शयु ४०, ८. | उत्तर. |
| ४१. | सुहस्त्य. | घोषायाःपुत्रः. | | उत्तर. |
| ४२-४४. | कृष्ण. | आंगिरस. | केपयः ४४, ६. | उत्तर. |
| ४५-४६. | वत्सप्री | भलंदनपुत्र. | उशिज, भृगवः ४६, २. वैभूवस ४६, ३. मूर, अमूर ४६, ४. त्रित ४६, ६. भृगु, मनु ४६; ९. | उत्तर. |
| ४७. | सप्तगु. | आंगिरस. | दस्युह्रा ४७, ४. सप्तगु, आंगिरस ४७, ६. | उत्तर. |
| ४८-५०. | इंद्र. | | अथर्वण. त्रित, दधीच, दस्यु ४८, २. पूरवः ४८, ५. गुंगु, अतिथिग्व, पर्णय, करंज, वृत्र ४८, ८. नमी साप्य ४८, ९. कवि, कुत्स, शुष्ण, दस्यु, अत्क ४९, ३. वेतस, तुग्र, कुत्स तुजि ४९, ४. मृगय, श्रुतर्वन, वेश, आयु, सव्य, पड्गृभि ९४, ५. नववास्त्व, बृहद्रथ, दास ४९, ६. दास ४९, ७. नहुषोनहुष्टर, तुर्वश, यदु ४९, ८. | उत्तर. |
| ५१-५३. | सौचीक अग्नि. | | मनु ५१, ५. | |
| ५४-५६. | बृहदुक्थ. | वामदेवपुत्र. | बृहदुक्थ ५४, ६. दस्यु ५५, ८. बृहदुक्थ ५६, ७. | उत्तर. |
| ५७-६०. | बंधु, सुबंधु, श्रुतबंधु, विप्रबंधु. | गोपायनपुत्र. | सुबंधु ५९, ८. उशीनराणि ( वनस्पति ) ५९, १०. असमाति, भजेरथ ६०, २. इक्ष्वाकु ६०, ४. असमाति,, रथप्रोष्ठ ६०, ५. अगस्त्य, पणि ६०, ६. सुबंधु ६०, ७. | उत्तर. |
| ६१-६२. | नाभानेदिष्ठ. | मनुपुत्र. | पक्थ ६१, १. तूर्वयाण, च्यवान ६१, २. नवग्व ६१, १०. शुष्ण, नार्षद ६१, १३. कक्षीवान् ६१, १६. नाभानेदिष्ठ ६१, १८. आश्वघ्न ६१, २१. सरण्यु ६१, २३; २४. आंगिरस ६२, १. वल ६२, २. नाभा ६२, ४. नवग्व, दशग्व, आंगिरस ६२, ६. मनु ६२, ८. सावर्ण्य ६२, ९. यदु, तुर्वश ६२. १०. सावर्णि ६२, ११. | उत्तर. |
| ६३-६४. | गय. | प्लतिपुत्र. | नहुष्यस्य ( ययातेः-सा. ) ६३, १. मनु ६३, ७. प्लतेः सूनुः ( गय ) ६३, १७. सरस्वति, सरयु, सिंधु ६४, ९. गय ६४, १६. प्लतेःसूनु गय, ६४, १७. | उत्तर.<br>उत्तर. |
| ६५-६६. | वसुकर्ण. | वसुक्रपुत्र. | वृत्र ६५, २. भुज्यु, श्याव, वध्रिमती, कमद्यु, विमद, विष्णापु, विश्वक ६५, १२. सरस्वती ६५, १३. वसिष्ठ ६५, १५. वसिष्ठ ६६, १४; १५. | उत्तर. |
| ६७-६८. | अयास्य. | आंगिरस. | अयास्य ६७, १. अंगिरसः ६७, २. पणि, वल ६७, ६. आंगिरसः ६८, २. वल ६८, ५; ६; ९. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ६९–७०. | सुमित्र. | वध्र्यश्वपुत्र. | वध्र्यश्व ६९, १; २; ४. मनु ६९, ३. वध्र्यश्व ६९, ५; ९. दास, वृत्र, आर्य ६९, ६. वध्र्यश्व ६९, १०; ११; १२. अंगिरसां ७०, ९. | उत्तर. |
| ७१. | बृहस्पति | आंगिरस. | | उत्तर. |
| ७२. | बृहस्पति-अथवा अदिति. | लोकपुत्र किंवा आंगिरस. दक्षपुत्री. | अदिति, दक्ष ७२, ४; ५. | उत्तर. |
| ७३–७४. | गौरिवीति | शक्तिपुत्र. | नमुचि, मनु, दस्यु, दास, ७३, ७. प्रियमेधाः ७३, ११. | उत्तर. |
| ७५. | सिंधुक्षित्. | प्रियमेधपुत्र. | गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्रि, परुष्णि, असिक्नी, मरुद्वृधा, वितस्ता, आर्जीकीया, सुषोमा, ७५, ५. तृष्टामा, सुसर्तु, रसा, श्वेती, सिंधु, कुभा, गोमती, क्रुमु, मेहत्नु, सिंधु ७५, ६. | उत्तर. |
| ७६. | जरत्कर्ण. | इरावतपुत्र. (सर्पजाति.) | मनु ७६, ३. | |
| ७७–७८. | स्यूमरश्मि. | भृगुगोत्रज. | अंगिरसः ७८, ५. | उत्तर. |
| ७९. | अग्नि अथवा साग्नि. | सौचीकगुण अथवा वैश्वानरगुण. वाजंभरपुत्र. | | |
| ८०. | वैश्वानर अग्नि. | सौचकिगुण. | जरत्कर्ण, अत्रि, नृमेध, जरूथ ८०, ३. नहुष ८०, ६. | उत्तर. |
| ८१–८२. | विश्वकर्मन्. | भुवनपुत्र. | | |
| ८३–८४. | मन्यु. | तपसःपुत्रः. | दस्युहा ८३, ३. दस्यून् ८३, ६. | उत्तर. |
| ८५. | सूर्या. | सवितृसुता. | विश्वावसु ८५, २१. | |
| ८६. | इंद्र, इंद्राणी, वृषाकपि. | | दास, आर्य ८६, १९. पर्शु, मानवी ८६, २३. | उत्तर. |
| ८७. | पायु. | भारद्वाज. | मूरदेवान् ८७, २. अथर्ववत् ८७, १२. रेभ ८७, १२; १३. मूरदेवान् ८७, १४. | उत्तर. |
| ८८. | मूर्धन्वान्. | आंगिरस अथवा वामदेवपुत्र. | | उत्तर. |
| ८९. | रेणु. | विश्वामित्रपुत्र. | ओगण ८९, १५. विश्वामित्र ८९, १७. | उत्तर. |
| ९०. | नारायण. | | | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व की उत्तर. |
|---|---|---|---|---|
| ९१. | अरुण. | वीतहव्यपुत्र. | | |
| ९२. | शार्यात. | मनोःपुत्रः. | अथर्वा, भृगु ९२, १०. अंगिराः ९२, १५. | उत्तर. |
| ९३. | तान्व. | पृथोःपुत्रः. | दुःशीम, पृथवान, वेन, राम ९३, १४. तान्व, पार्थ्य, मायु ९३, १५. | उत्तर |
| ९४. | अर्बुद. | कद्रुपुत्र ( सर्पजाति ). | | |
| ९५. | पुरूरवा, उर्वशी. | इलपुत्र. | पुरूरवा ९५, २; ५; ७; ११; १५. दासीः ९५, ५. उर्वशी ९५, १०; १७. वासिष्ठ ९५, १७. ऐल ९५, १८. | उत्तर. |
| ९६. | बरु किंवा सर्वहरि. | आंगिरस, इंद्रपुत्र. | | |
| ९७. | भिषक्, | अथर्वणपुत्र. | भिषक् ९७, ६. | उत्तर. |
| ९८. | देवापि. | ऋष्टिषेणपुत्र. | देवापि ९८, २; ४. शंतनु ९८, ३. आर्ष्टिषेण, देवापि ९८. ५; ६; ८. देवापि, शंतनु ९८, ७. औलान ९८, ११. | उत्तर. |
| ९९. | वम्र. | वैखानस. | शिश्नदेवान् ९९, ३. वम्र ९९, ५. त्रित ९९, ६. नहुष ९९, ७. दस्यु ९९, ८. कुत्स, शुष्ण, कवि, अत्क ९९, ९. औशिज, ऋजिश्वा पिप्रु ९९, ११. वम्रक ९९, १२. | उत्तर. |
| १००. | दुवस्यु. | वंदनपुत्र. | | उत्तर. |
| १०१. | बुध. | सोमपुत्र. | निष्टिग्र्यःपुत्र १०१, १२. | |
| १०२. | मुद्गल. | भर्म्यश्वपुत्र. | मुद्गलानी १०२, २. दास १०२, ३. मुद्गल १०२, ५. मुद्गलानी १०२, ६. मुद्गल १०२, ९. | |
| १०३. | अप्रतिरथ. | इंद्रपुत्र. | | उत्तर. |
| १०४. | अष्टक. | विश्वामित्रपुत्र. | | |
| १०५. | दुर्मित्र किंवा सुमित्र. | कुत्सपुत्र. | दस्यवे १०५, ७. सुमित्र, दुर्मित्र, कुत्सपुत्रं १०५, ११. | उत्तर. |
| १०६. | भूतांश. | कश्यपपुत्र. | भूतांश १०६, ११. | |
| १०७. | दिव्य किंवा दक्षिणा. | आंगिरस. प्रजापति-दुहिता. | | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्वे कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १०८. | पणि व सरमा. | | सरमा १०८, १; ३; ५; ७; ९. पणि १०८, २; ४; ६; ८; १०; ११. अयास्य, आंगिरस, नवग्व १०८, ८. | |
| १०९. | जुहू. ऊर्ध्वनाभा. जमदग्निपुत्र. | ब्रह्मवादिनी. ब्रह्मपुत्र. भार्गव. | | उत्तर. |
| ११०. | राम (परशुराम-सा.) | जमदग्नि पुत्र. | मेना १११, ३. अंगिरोभिः १११, ४. शुष्ण १११, ५. | उत्तर. |
| १११. | अष्टादंष्ट्र. | वैरूप. | | उत्तर. |
| ११२. | नभःप्रभेदन. | विरूपगोत्र. | | उत्तर. |
| ११३. | शतप्रभेदन. | वैरूप. | धुनि, चुमुरि, दभीति ११३, ९. | उत्तर. |
| ११४. | सध्रि किंवा घर्म. | वैरूप. तपसःपुत्र. | | उत्तर. |
| ११५. | उपस्तुत. | वृष्टिहव्य पुत्र. | वृष्टिहव्यस्यपुत्राः ११५, ९. उपस्तुतासः ११५, ९. | |
| ११६. | अग्नियुत किंवा अग्नियूप. | स्थूलपुत्र. | | |
| ११७. | भिक्षु. | आंगिरस. | | उत्तर. |
| ११८. | उरुक्षय. | अमहीयु गोत्री. | | |
| ११९. | इंद्र. | वलरूपी. | | |
| १२०. | बृहद्दिव. | अथर्वणपुत्र. | दास १२०, २. अथर्वा, बृहद्दिव १२०, ९. | उत्तर. |
| १२१. | हिरण्यगर्भ. | प्रजापतिपुत्र. | | |
| १२२. | चित्रमहस्. | वसिष्ठपुत्र. | भृगु १२२, ५. वसिष्ठाः १२२. ८. | उत्तर. |
| १२३. | वेन. | भार्गव. | | उत्तर. |
| १२४. | अग्नि. | | | |
| १२५. | वाक्. | अंभृणदुहिता. | | |
| १२६. | कुल्मलबर्हिष किंवा अंहोमुच्. | शिलूष पुत्र. वामदेव पुत्र | | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १२७. | कुशिक अथवा रात्री. | सोभरि पुत्र भारद्वाज सुता. | | |
| १२८. | विहव्य. | आंगिरस | | |
| १२९. | परमेष्ठी प्रजापति. | | | |
| १३०. | यज्ञ. | प्रजापति पुत्र. | | |
| १३१. | सुकीर्ति. | कक्षीवान् पुत्र. | | उत्तर. |
| १३२. | शकपूत. | नृमेध पुत्र. | शकपूत १३२, ५. नृमेध १३२, ७. | उत्तर. |
| १३३. | सुदास. | पिजवनपुत्र. | | उत्तर. |
| १३४. | मंधातृ. ऋ. ७. गोधा. | युवनाश्वपुत्र. ब्रह्मवादिनी. | | उत्तर. |
| १३५. | कुमार. | यमगोत्री. | | |
| १३६. | जूति, वातजूति विप्रजूति, वृषाणक, करिक्रत, एतश, ऋष्यशृंग. | वातरशन पुत्रा. | वातरशनाः १३६, २. | |
| १३७. | भरद्वाजादि-सप्तर्षि. | | | उत्तर. |
| १३८. | अंग. | उरुपुत्र. | कुत्स १३८, १. ऋजिश्वा, दास १३८, ३. अयास्य १३८, ४. | उत्तर. |
| १३९. | विश्वावसु. | गंधर्व. | विश्वावसु, गंधर्व १३९, ४; ५. | |
| १४०. | अग्नि पावक. | | | |
| १४१. | अग्नि तापस. | | | |
| १४२. | जरितृ, द्रोण, सरीसृक्क, स्तंबमित्र. | शार्ङ्ग. (पक्षि जातीय. | | |
| १४३. | अत्रि. | सांख्यपुत्र. | अत्रि, कक्षीवान् १४३, १. आत्रि १४३, २; ३. भुज्यु १४३, ५. | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १४४. | सुपर्ण. किंवा ऊर्ध्व-कृशन. | तार्क्ष्यपुत्र. यमगोत्री. | ऊर्ध्वकृशन १४४, २. सुपर्ण १४४, ४. | उत्तर. |
| १४५. | इंद्राणी. | | | उत्तर. |
| १४६. | देवमुनि. | इरंम्द पुत्र. | | |
| १४७. | सुवेदस्. | शिरीषपुत्र. | | |
| १४८. | पृथु. | वेनपुत्र. | दासी १४८, २. पृथु, वेन्य १४८, ५. | उत्तर. |
| १४९. | अर्चत्. | हिरण्यस्तूपपुत्र. | हिरण्यस्तूप, आंगिरसः, अर्चत् १४९, ५. | उत्तर. |
| १५०. | मृळीक. | वसिष्ठपुत्र. | अत्रि, भरद्वाज, गविष्ठिर, कण्व, त्रसदस्यु, वासिष्ठ, मृळीक १५०, ५. | उत्तर. |
| १५१. | श्रद्धा. | कामगोत्रजा. | | |
| १५२. | शास. | भारद्वाज. | शास १५२, १. | उत्तर. |
| १५३. | इंद्रमातरः | देवानां स्वसृभूताः. | | |
| १५४. | यमी. | विवस्वतो-दुहिता. | | |
| १५५. | शिरिंबिठ. | भरद्वाजपुत्र. | शिरिंबिठ १५५, १. | उत्तर. |
| १५६. | केतु. | अग्निपुत्र. | | |
| १५७. | भुवन किंवा साधन. | आप्त्यपुत्र. भुवनपुत्र. | | उत्तर. |
| १५८. | चक्षु. | सूर्यपुत्र. | | |
| १५९. | शची. | पुलोमतनया. | | |
| १६०. | पूरण. | विश्वामित्रपुत्र. | | उत्तर. |
| १६१. | यक्ष्मनाशन. | प्रजापतिपुत्र. | | |
| १६२. | रक्षोहा. | ब्रह्मपुत्र. | | |
| १६३. | विवृहा. | कश्यपगोत्री. | | |
| १६४. | प्रचेतस. | आंगिरस. | प्रचेता, आंगिरसः १६४, ४. | उत्तर. |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार संबंध. | उल्लिखित व्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १६५. | कपोत. | निर्ऋतिपुत्र. | | |
| १६६. | शक्कर किंवा ऋषभ. | वैराज. | ऋषभ १६६, १. | |
| १६७. | विश्वामित्र व जमदग्नि. | | विश्वामित्र, जमदग्नि १६७, ४. | उत्तर. |
| १६८. | अनिल. | वातगोत्री. | | उत्तर. |
| १६९. | शबर. | कक्षीवत् गोत्री. | अंगिरसः १६९, २. | |
| १७०. | विभ्राट्. | सूर्यपुत्र. | | |
| १७१. | इट. | भृगुपुत्र. | इट १७१, १. आस्त्रबुध्न, वेन्य १७१, ३. | उत्तर. |
| १७२. | संवर्त. | आंगिरस. | | उत्तर. |
| १७३. | ध्रुव. | आंगिरस. | | उत्तर. |
| १७४. | अभीवर्त. | आंगिरस. | | |
| १७५. | ऊर्ध्वग्रावा. | अर्बुद (सर्प) ऋषेःपुत्र. | | |
| १७६. | सूनु. | ऋषभपुत्र. | | उत्तर. |
| १७७. | पतंग. | प्रजापतिपुत्र. | | |
| १७८. | अरिष्टनेमि. | तार्क्ष्यपुत्र. | अरिष्टनेमि, तार्क्ष्य १७८, १. | उत्तर. |
| १७९. | ऋ. १. शिबि. २. प्रतर्दन. ३. वसुमना. | उशीनरपुत्र. काशीराजा. रोहिदश्वपुत्र. | | उत्तर. |
| १८०. | जय. | इंद्रपुत्र. | | |
| १८१. | प्रथ. सप्रथ. घर्म. | वासिष्ठ. भारद्वाज. सूर्यपुत्र. | प्रथ, सप्रथ, वसिष्ठ १८१, १. भरद्वाज १८१, २. घर्म १८१, ३. | उत्तर. |
| १८२. | तपुर्मूर्धा. | बृहस्पतिपुत्र. | तपुर्मूर्धा १८२, ३. | |
| १८३. | प्रजावान्. | प्रजापतिपुत्र. | | |
| १८४. | त्वष्टा, विष्णु. | प्रजापतिपुत्र. | | |

| सूक्त. | सूक्तकार. | सूक्तकार-संबंध. | उल्लिखितव्यक्ती. | पूर्व कीं उत्तर. |
|---|---|---|---|---|
| १८५. | सत्यधृति. | वरुणपुत्र. | | |
| १८६. | उल | वातगोत्री. | | |
| १८७. | वत्स. | अग्निपुत्र. | | उत्तर. |
| १८८. | श्येन. | अग्निपुत्र. | | |
| १८९. | सार्पराज्ञी. | | | |
| १९०. | अघमर्षण. | मधुच्छंदपुत्र. | | उत्तर. |
| १९१. | संवनन. | | | |
| | | | **आठव्या मंडळांतील वालखिल्य सूक्तें.** | |
| १. | प्रस्कण्व. | कण्व कुलोत्पन्न. | कण्व १, ५. मेध्यातिथि १, ९. नीपातिथि १, ९. कण्व, पक्थ, त्रसदस्यु, गोशर्य, ऋजिश्वन्, दशव्रज १, १०. | उत्तर. |
| २. | पुष्टिगु. | | पौर २, ५. दस्यु २, ८.एतश, कृत्व्य, दशव्रज, वश २, ९. कण्व, मेध, दीर्घनीथ गोशर्य २, १०. | उत्तर. |
| ३. | श्रुष्टिगु. | | मनु सांवरण, नीपातिथि, मेध्यातिथि, पुष्टिगु, श्रुष्टिगु ३, १. पार्षद्वाण, प्रस्कण्व ३, २. क्रिवि, शुष्ण ३, ८. दास ३, ९. रुशाम ३, ९. | उत्तर. |
| ४. | आयु. | | मनुविवस्वान्, त्रित, आयु ४, १.पृषध्र, मेध्य, ऋजूनस्, स्यूमरश्मि, दशोणि, दशशिप्र ४, २. कण्ववत् ४, ८. | उत्तर. |
| ५-६. | मेध्य. | | आयु, कुत्स, अतिथिग्व ५, २. शाष्ट ५, ४. पौर ६, १. कृश, संवर्त ६, २. प्रस्कण्व ६, ८. | उत्तर. |
| ७. | कृश. | | काण्वायन ७, ४. | उत्तर. |
| ८. | पृषध्र. | | दस्यवेवृक ८, १. पौतक्रत ८, २. दास ८, ३. पूतक्रता ८, ४. | उत्तर. |
| ९-१०. | मेध्य. | | | उत्तर. |
| ११. | सुपर्ण. | | | उत्तर. |

मागें दिलेल्या माहितीवरून ज्यांचा संबंध दाशराज्ञ युद्धाशीं प्रत्यक्ष दाखवितां येतो त्यांचीं नांवें पूर्वी दिलींच आहेत. पुढें दिलेल्या व्यक्तींपैकीं कांहींचा संबंध लागत असला तरी तो तितका स्पष्ट नसल्यामुळें व कांहींचा अनिश्चित असल्यामुळें त्यांचीं नांवें वेगळीं दिलीं आहेत.

अज्ञात संबंधः—अंशु, अग्रु, अघाश्व, अध्रिगु, अप्नवान, अंबरीष, अयास्य, आजमीळ्हासः, आयवस, आर्चत्क, आश्वघ्न, इलीबिश, इट, उक्षण्यायन, उरण, उरुःकक्ष, उशीनराणी, ऊर्जव्य, ऋजूनस्, ऋज्राश्व, ऋतस्तुभ, एकद्यू, एवावद, ओगणास, औचथ्य और्णवाभ, कद्रुव, कमद्यू, करंज कर्कंधु, कलि, कशु, कश्यप, कुणारु, कृष्णिय, कौरयाण, क्रिवि, गांग्य, गोतम, गोपवन, चुमुरि, चैद्य, जातूष्ठिर, जाहुष, तरंत, तर्य, तृणस्कंद, त्रित, त्रैतन, दध्यङ्, दभीति, दशग्व, दशोणि, दस्यवेवृक, दार्भ्य, दीर्घश्रवस्, दुःशीम, देवक–मान्यमान, धुनि, ध्वसंति, ध्वस्र, नमुचि, नवग्व, नार्मर, नार्य, नार्षद, निंदिताश्व,

नृषद, पर्ठर्वा, पड्गृभि, पणि, परमज्या, परावृज, पाकस्थामन्, पारावत, पिठीनस, पिप्रु, पुरुमाय, पुरुमित्र, पुरुमीळ्ह, पुरुशंति, पुष्टिगु, पृथवान, पृदाकुसानु, पृश्निगु, पेदु, प्रपथिन्, बाहुवृक्त, बृसय, भयमान, भृगु, मनस्, मन्धातृ, मुद्गल, मुद्गलानी, मेध, मेना, यजत, रथवीति, रुधिक्रा, रेभ, वत्स, वध्रिमति, वन्दन, वरोसुषामन्, वम्रि, वसुरुच्, वसुरोचिष्, वसूयु, वातरशना, वार्षागिर, विमद, विशिशिप्र, विश्वक, विश्ववार, विश्वसामन्, विष्णापु, वृकद्वरस्, वृषगण, वृषणश्व, वृष्टिहव्य, वैददश्वि, व्यंस, शयु, शर, शरभ, शशीयसी, शिंजार, शिरिंबिठ, शीष्ट, शृंगवृष, शौरदेव्य, श्याव, श्यावाक, श्रुतकक्ष, श्रुतर्य, श्रुतवित, सदापृण, सध्रि, सप्तगु, सप्तवध्रि, सस, सहदेव, सांवरण, साप्य, सुदक्ष, सुदीति, सुदेव, सुपित्र्य, सुराधस्, सुश्रवस्, सुषामन्, सृबिंद; स्यूमरश्मि, स्वनय, स्वश्न, हरयाण.

वरील विवेचनांत एक गोष्ट गृहीत धरली आहे आणि ती ही कीं सर्वानुक्रमणी हा ग्रंथ प्रामाणिक होय. सर्वानुक्रमणीच्या विश्वसनीयतेची तपासणी झाली पाहिजे. ती तपासणी व्हावयाची म्हणजे ज्या सूक्तकाराच्या नांवावर विशिष्ट सूक्त पडलें असेल तें त्यानेंच केलें आहे किंवा काय हें ठरविणें.

आतांपर्यंत दिलेल्या विवेचनावरून दाशराज्ञ युद्ध हें ऋग्वेदमंत्रांतील अत्यंत जुन्या मंत्रांच्या अगोदर अनेक दशकें किंवा शतकें होऊन गेलें असावें अशी आमची खात्री झाली आहे. जें सूक्त आम्हांस दाशराज्ञ युद्धानंतरचें ठरवितां आलें नाहीं तें युद्धापूर्वीचें आहे असेंहि सिद्ध होत नाहीं. आम्ही आमच्या स्वतःची खात्री पटवून घेण्याकरितां जो शोध केला तो येथें मांडला आहे, आणि दाशराज्ञ युद्धापूर्वीची एक ओळ तरी ऋग्वेदांत आहे किंवा नाहीं असा संशय आम्ही व्यक्त करतों.

दाशराज्ञ युद्ध हें हिंदुस्थानच्या इतिहासांतील बरेंच उत्तरकालीन वृत्त होय. म्हणजे वेद हें हिंदुस्थानच्या इतिहासांतील बऱ्याच उत्तरकालचें वाङ्मय आहे.

**ऋग्वेदमंत्रांतील इतिहास.**- ऋग्वेदाच्या मंत्रांत जो इतिहास आहे तो अगदीं पहिल्या आर्यन् वसाहतीचा नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. याविषयींचीं प्रमाणें थोडक्यांत पुढें दिल्याप्रमाणें आहेतः

१ भरतांचें हिंदुस्थानांत आगमनः—दाशराज्ञ युद्ध असें राजकीय स्वरूप दाखवितें कीं, सुदास व दिवोदास हे पूर्वी वसलेल्या मुलखांत प्रवेश करीत आहेत आणि यदुतुर्वशासारख्या जुन्या बलवान् राजांशीं युद्ध करीत आहेत. दिवोदास, सुदास येतात ते पृथुपर्शूसारख्या परक्या लोकांचें साहाय्य घेऊन येत आहेत. अर्थात् ज्या राज्यांशीं ते युद्ध करीत आहेत तीं राज्यें पूर्वी अनेक वर्षे स्थापित झालीं असलीं पाहिजेत.

२ मंत्रपूर्वकालीन पुरोहितांचें वर्चस्वः—जुन्या राज्यांमध्यें पुरोहित संस्था इतक्या उत्तम तऱ्हेनें प्रस्थापित झाली होती कीं, त्यांची सत्ता राज्यक्रांतीस उपयोगी पडे. पुरोहितासारख्या राज्यांतील बऱ्या मनुष्याचें साहाय्य घेऊन राज्य काबीज करण्याची शक्यता अशा काळांत संभवते कीं, जेव्हां राज्य प्रस्थापित होऊन बराच काळ लोटला असतो व राजाच्या सैनिकधुरीणत्वामुळें उत्पन्न होणारें सर्वाधिकारीत्व थोडेंसें तरी दुर्बल झालेलें असतें. जेथें प्रदेश बराच वसला आहे व थोडी बहुत तरी शांतता नांदूं लागली आहे, तेथेंच पुरोहितास प्रजेवर वजन वाढवून आपलें बस्तान चांगलें बसवितां येतें. अशीच परिस्थिति मंत्रपूर्व दाशराज्ञयुद्ध दाखवितें.

३ वेद दाशराज्ञ युद्धपूर्व स्थितीचे द्योतक नाहींतः—संपूर्ण वेद दाशराज्ञयुद्धोत्तर असल्यामुळें ते दाशराज्ञयुद्धकालीन स्थितीचेहि द्योतक नाहींत. अर्थात् ते तत्पूर्व यदुतुर्वशांच्या स्थापनेच्या कालाचे द्योतक कोठून असणार ? यदुतुर्वशांनीं देखील पूर्वेकडील राजांस पंजाबांतून ढकलून आपली सत्ता प्रस्थापित केली असली पाहिजे.

यदुतुर्वश हे बोलून चालून पश्चिमेकडील राजे होते. अधिक पूर्वेकडील राजे हिंदुस्थानांत यांच्याहि पूर्वी आले असले पाहिजेत.

ते ज्या काळांत हिंदुस्थानांत आले तो इतिहास ऋग्मंत्रांत येणें मुळींच शक्य नाहीं.

४ आर्यनांचें हिंदुस्थानांतील वास्तव्य भरतपूर्वकालीन आहेः-मंत्रांत भरतांच्या देखील प्रवेशाचें चित्र स्पष्ट नाहीं. तें उत्तरकालीन आठवणी गोळा करून रचावयाचें आहे. भरतांच्या प्रवेशाच्या अगोदर देश किती वसला होता आणि तो कोणत्या प्रकारच्या लोकांनीं वसला होता म्हणजे ते लोक आर्यन् होते किंवा नव्हते हा पुढचा प्रश्न आहे. याला उत्तर असें आहे कीं, भरत येण्याच्या पूर्वी आर्यन् महावंशांत मोडतील अशा जातींचें वास्तव्य देशांत झालेलें होतें. कदाचित् पूर्व बंगाल व महाराष्ट्र वगळून आज आर्यन् भाषा बोलणारा जेवढा प्रदेश आहे तेवढा बहुतेक आर्यन् जातींनींच व्यापला होता. केवळ हिंदुस्थानांतील प्रदेशच नव्हे तर लंकेसारखा प्रदेश देखील त्या काळीं आर्यन् लोकांच्या वंशांनीं वसला असावा, या कल्पनेच्या शक्यतेस साधक पुरावा पुढील परिच्छेदांत दिला आहे.

५ दाशराज्ञयुध्दपूर्व इतिहास लिहिण्यास साहित्यः—वेद जर आपणास दाशराज्ञयुद्धपूर्व कालापर्यंत पोंचवीत नाहींत, तर आपणांपुढें असा प्रश्न उपस्थित होतो कीं या दाशराज्ञयुद्धपूर्वकालाचा इतिहास लिहिण्यास आपणांपाशीं कांहीं साहित्य आहे किंवा नाहीं. आमच्या मतें साहित्य आहे, आणि तें साहित्य म्हटलें म्हणजे पुराणांतील व भारतांतील कुरुयुद्धपूर्व राजांचे इतिहास होत. सुदासाचा संबंध पुराणांतील वंशावळ्यांप्रमाणें बऱ्याच उत्तरकालाशीं पोंचतो. पुराणांच्या मताप्रमाणें दाशरथी राम व नल राजा, हे सुदासाच्या बरेंच अगोदरचे राजे होत. त्या वेळची राजमालिका व कथा घेतल्या तर बहुतेक हिंदुस्थान शासनसंस्थांनीं युक्त व बरेंच सुधारलेलें असें दिसतें. भीमक हा विदर्भाचा राजा होता; म्हणजे सध्यांचा महाराष्ट्र उर्फ प्राचीन काळचें दंडकारण्य हीं वगळलीं तर उरलेला भाग वसलेला होता असें दिसून येईल. रामानें लंका जिंकली ती चांगली

वसलेली व संपन्न होती असें दिसतें. जैन रामायण किंवा कन्नड रामायण हीं रामकथेच्यां मुख्य भागांनां विरोध करीत नाहींत.

६ शकमगांची वसति मंत्रकर्त्या लोकां पूर्वींची असावी:— भरत येण्यापूर्वी देशांतील वसती अगदीं एकाच स्वरूपाची असेल असें नाहीं तर शक आणि मग या जातीहि भारतांत मंत्रकर्त्या लोकांच्या, म्हणजे ज्यांनां आर्यन् म्हणण्याचा प्रचार आहे त्या लोकांच्या अगोदर येऊन राहिल्या असाव्यात. ही गोष्ट कीकटांत प्रवेश करूं पाहणाऱ्या आणि इंद्राचा द्वेष करणाऱ्या मगंदास लुटण्याची मसलत करणाऱ्या विश्वामित्राच्या सूक्तावरून लक्षांत येईल.कीकटास पुढें मगध म्हणूं लागले. मगध शब्दाची व्युत्पत्ति पतंजलि ' मगांस धारण करतो तो मगध ' अशी करितो. ' मग ' याचा अर्थ पतंजलि बरेंच पांडित्य करून पाप असा जो काढतो तो अनवश्यक ठरवून मागी ऊर्फ मग लोक असा केला पाहिजे असें राजवाडे सांगतात. 'मग 'इंद्रास दैत्यांत घालतात हें स्पष्टच आहे; आणि त्यामुळें मगंद म्हणजे मगानुयायी इंद्रास पायस देत नाहींत म्हणून विश्वामित्राची तक्रारहि बरोबरच आहे. तैत्तिरीय संहितेच्या कालीं मागध म्हणजे मगधांतील लोक हें नांव निश्चित झालें होतें. मगधांतील लोकांस जर मागध हें नांव निश्चित झालें होतें तर मगध शब्द त्याहून जुना असला पाहिजे; आणि देशाला मगध नांव पडण्यापूर्वी मगांची वसती तेथें बरींच वर्षें अगोदर झाली असली पाहिजे.

७ प्राचीन मगांचें वसतिस्थान:—आम्हांला असें मात्र वाटतें कीं, आज जेथें मगध ऊर्फ कीकट आहे तेथेंच प्राचीन कीकटांची किंवा मगांची वसती नसावी; तर ती बरीच पश्चिमेकडे असावी. कां कीं, ऋग्वेदांत सरस्वतीच्या पूर्वेकडील प्रदेशाचे किंवा नद्यांचे उल्लेख फारसे आढळत नाहींत. कीकट आणि त्यांच्या देशांतील मगंद या दोघांनांहि पुढें पूर्वेकडे कोणींतरी ढकललें असावें.

मगंद हे कोण असावेत ? हे शाक्य असावेत असें वाटतें. शकांचे उपाध्ये मग असत ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. गौतम हा आपणास शाक्य म्हणवी, कीकटांत जन्मलेला म्हणून म्हणवी, त्याला आपल्या अनेक पिढ्यांचा इतिहास ठाऊक होता असें तो दाखवी, तथापि आपण परक्या देशांतून आलों असूं अशी त्यास कल्पनाहि दिसत नाहीं. यावरून आणि नवीन आलेल्या टोळीस एकदम देशाच्या पूर्वेकडील कोंपऱ्यांत शिरकाव करून राज्य स्थाप[illegible]शक्यतेमुळें शकमगांचें आगमन मंत्रपूर्वकालांत घातल्याशिवाय [illegible]तर नाहीं.

८ मंत्रपूर्व संस्कृति.— मंत्रपूर्व संस्कृति आर्यन् असावी पण ब्राह्मणी नसावी. याला प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे भाषेनें आर्यन् परंतु ब्राह्मणजातिविहीन अशा समाजाचें अस्तित्व होय. मंत्रकालीन आर्यन् लोकांनींच जर पुढें हिंदुस्थान वसविला असता तर त्या लोकांचा जेथें जेथें प्रसार झाला तेथें तेथें तो सब्राह्मण झाला असता; एवढेंच नव्हे तर त्यांचे ब्राह्मण कोणत्या तरी विशिष्ट वेदाचे आहेत अशा स्थितींत झाला असता. ब्राह्मणांच्या जातीची अशी स्थिति आहे कीं, औद्गात्रहौत्रादि क्रियानुरूप विशिष्टिकरण झाल्यानंतर ऋत्विक्संघांच्या त्या त्या जाती बनल्या. म्हणजे अगोदर ब्राह्मणजात पृथक् बनली आणि तिचे पुढें वेदाप्रमाणें तुकडे पडले असें नसून, अगोदर समुच्चयांचें शिक्षणामुळें विशिष्टीकरण झालें आणि ते विशिष्टीभूत झालेले संघ जातिरूप पावले. अशी परिस्थिति असल्यामुळें जेथें जेथें मांत्र संस्कृतीचे लोक गेले असते तेथें तेथें ते सब्राह्मण गेले असते. एवढेंच नव्हे, तर ते ज्या ब्राह्मणांबरोबर गेले असते ते ब्राह्मण विशिष्ट वेदाचे किंवा शाखेचे असते.

९ भारतीय संस्कृतीचा ब्राह्मणहीन भाग:—आर्यन् भाषेचा परंतु ब्राह्मणहीन असा भाग थोडा थोडका नाहीं. सबंध सिंहलद्वीपांतील सिंहलीसमाज अशा तऱ्हेचा आहे. सिंहलद्वीपामध्यें भारतीयांचें गमन अर्वाचीन शोधक समजतात त्याप्रमाणें ख्रिस्तपूर्व सातव्या शतकांत झालें असतें, तर तें परदेशगमन खास सब्राह्मण झालें असतें. एवढेंच नव्हे तर तेथें एखादें विशिष्ट श्रौतसूत्रहि उत्पन्न झालें असतें. बौद्धांनीं सिंहलांतील ब्राह्मणसंप्रदाय नष्ट केला असेल हें संभवत नाहीं. कां कीं, एक तर बौद्ध तेथें बरेच उशिरां म्हणजे ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत गेले. बौद्धांचा कटाक्ष ब्राह्मणजात नष्ट करण्याकडे नसून ब्राह्मणांपेक्षां आम्ही क्षत्रिय उच्च असें मत ते प्रस्थापित करीत असत व क्षत्रियब्राह्मणवैश्यशूद्र अशी चातुर्वर्ण्याची ते मांडणी करीत. नीतिनिगंडुवामध्यें गोवीय आपणांमध्यें ब्राह्मणरक्त असल्यामुळें आपण इतरांपेक्षां उच्च असें दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु हा प्रयत्न धर्मशास्त्राचें तेथें गमन झाल्यानंतरचा आहे हें उघड आहे. जर तो अर्वाचीन नसता व केवळ बौद्धगमनकालीन असता, तर त्यांनीं ब्राह्मणांशीं हातजमाई करण्याऐवजीं आपलें क्षत्रियवंशसंभवत्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला असता; आणि गोवीय ज्याअर्थीं जमिनीचे मालक आहेत त्याअर्थीं तो पचूनहि जाता.

यावरून असा काळ उघड दिसतो कीं जेव्हां आर्यन् टोळ्या सिंधुपूर्वेकडील प्रदेश व द्वीपें व्यापीत होत्या परंतु तेव्हां त्यांमध्यें ब्राह्मणजातीचें अस्तित्व नव्हतें.

१० प्राचीनतर आर्यन संस्कृतीचें पुरातनत्व:—मंत्रसंस्कृति अथवा ज्या लोकांचा भारतप्रवेश ऋग्वेदांत चित्रित झाला आहे त्या लोकांची संस्कृति अगोदर अस्तित्वांत असलेल्या आर्यन् संस्कृतीहून थोडीशी तरी निराळी होती हें वरील विवेचनावरून सिद्ध होईल. या अगोदरच्या संस्कृतीला प्राचीनतर आर्यन् संस्कृति हें नांव देणें युक्त होईल. प्रश्न असा उपस्थित होतो कीं, या संस्कृतीचें अस्तित्व किती जुनें असावें ? सर्व देश व्यापला जाण्यास कमींत कमी एक हजार वर्षांचा काळ लोटला पाहिजे. आणि वैदिक आर्यन् म्हणजे भरत म्हणजे मांत्र संस्कृतीचे लोक जेव्हां आले तेव्हां जर देश पूर्णपणें प्राचीनतर आर्यन् संस्कृतीच्या लोकांनीं व्यापला गेला असता तर ती प्राचीनतर आर्यन् संस्कृति कमींत कमी हजार वर्षांची जुनी असावी.

११ जुनी संस्कृति आर्यन् कशावरून:— ही जुनी संस्कृति आर्यन् असावी असें म्हणण्यास आधार हा कीं यदुतुर्वशांसारख्या जुन्या पाश्चिम राष्ट्रांचा जो उल्लेख आपणांस आढळतो तो उल्लेख अभियुक्त आढळतो. वसिष्ठविश्वामित्र हे जुन्यांचेच पुरोहित कांहीं

काल होते. शिवाय नवीनांच्या संस्था जुन्यांशीं ज्या मिसळून गेल्या त्या त्यांत सादृश्य असल्याखेरीज मिसळून गेल्या नाहींत. भरतांच्या टोळीबरोबर फारच थोडक्या लोकांचें आगमन झालें असावें. त्यांनीं जुन्यांच्या भाषा मारून टाकणें अर्थात् शक्य नव्हतें. त्या भाषा देखील सदृश असल्या पाहिजेत.

१२ प्राचीनतर आर्यन् संस्कृतींतील लोकांचा आयुष्यक्रमः—प्राचीनेतर आर्यन् संस्कृति जर ब्राह्मणविहीन पण आर्यन् असेल तर त्या जनतेचा आयुष्यक्रम कसा काय होता हा पुढें प्रश्न स्वाभाविकच उत्पन्न होतो. ते लोक संस्कृतिविहीन असणें शक्य नाहीं. कां कीं, ज्या लोकांची सर्व देश व्यापण्याइतकी व्यापकता वाढली त्यांच्यामध्यें कांहींतरी नीतिनियम उत्पन्न झाले असलेच पाहिजेत. ज्या देशामध्यें त्यांनीं हजारएक वर्षे वसती केली व जमीन नांगरली, जेथें त्यांचीं राजकुळें स्थापित झालीं व पौरोहित्यहि स्थापन झालें त्या देशामध्यें वाङ्मयविषयक किंवा विज्ञानविषयक किंवा मनोरंजनात्मक संस्कृति तयार झाली नसेल असें नाहीं. ती तशी संस्कृति तयार झाली असावी असें धरल्यास त्या संस्कृतीचे अवशेष कोठें आहेत? आमच्या मतें दोन अवशेष दिसतात, एक अवशेष म्हणजे प्रत्यक्ष मंत्रांतीलच उल्लेख; आणि दुसरा अवशेष म्हटला म्हणजे इतिहासपुराणांतील प्राचीन कथा. ऋग्वेदांत मांत्रसंस्कृतीच्या लोकांचे धर्म जसे दिसतात तसे स्थानिकांचेहि दिसतात. दोन्ही लोक यजन करणारे दिसतात. परंतु प्राचीनांचें यजन फारच अल्प स्वरूपाचें होतें. यज्ञाचा विकास होण्यापूर्वीची अग्न्युपासनेची पद्धति दोहोंस सामान्य असावी; आणि ती अथर्व्यांच्या क्रियांसारखी, म्हणजे गृह्यासारखी परंतु मंत्रहीन असावी. त्या समाजांत म्हणजे जेथें ऋत्विग्विद्येचा विकास झाला नव्हता तेथें अत्यंत स्वाभाविक ईश्वराची किंवा देवतांची किंवा भुतांची किंवा रोगांची किंवा सृष्टींतील अस्पष्ट शक्तींची उपासना असावी. उपासना करणारा धंदेवाईक वर्ग असावा किंवा नसावा याविषयीं खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. ऋषित्व, पुरोहितत्व, गायकत्व किंवा मांत्रिकत्व हीं सामान्यांपासून पृथक् झालीं असतीलच असें सांगतां येत नाहीं. सामान्यांपासून पौरोहित्याचें पृथक्त्व दोन तऱ्हांनीं संभवतें. एक तर पुरोहितवर्गाची जात बनणें किंवा दुसऱ्याच कोणीतरी परकीय जातीनें येऊन लोकांचें पौरोहित्य मिळविणें. मगांनीं ज्याप्रमाणें पारशांचें पौरोहित्य मिळविलें त्याप्रमाणें शकांचेंहि मिळविलें व तो शकमगयुक्त समाज हिंदुस्थानांत आल्यामुळें कांहीं समाज पृथक्पौरोहित्यमय असेल, परंतु सर्व समाज तसा असेल असें वाटत नाहीं. मगंदांबाहेरील इतर लोकांच्या पारमार्थिक गरजा पुरविणारा वर्ग त्या लोकांतलाच असेल, आणि तो वर्ग पुढें एक तर नव्या येणाऱ्या लोकांच्या पुरोहितवर्गाशीं तादात्म्य पावला असावा किंवा सामान्य जनतेंत मिसळून गेला असावा.

१३ प्राचीन देश्य पुरोहितांचे प्रतिनिधीः— श्रौतस्मार्त धर्माखेरीज पारमार्थिक गरजा पुरविणारे लोक देशांत सध्यां आहेत ते प्राचीन देश्य पुरोहितांचे प्रतिनिधी म्हणून धरण्यास कांहीं हरकत नाहीं. असले वर्ग पुष्कळ आहेत. गारुडी, भुतें काढणारे, मंत्रांनीं साप विंचू यांचें विष उतरविणारे, मोहिनीमंत्र वापरणारे, मूठ मारणें वगैरे सारखे जादूटोणे करणारे, गारपगारी म्हणजे गारांपासून रक्षण करणारे हे सर्व लोक आजच्या समाजांत दिसतात; आणि हे सर्व मंत्रहीन अथर्वणांचे प्रतिनिधी होत. अथर्वणांच्या क्रिया प्राचीन दिसतात पण अथर्ववेदांतील मंत्र अर्वाचीन दिसतात. कांहीं क्रिया या दोन्ही देश्य व मांत्र लोकांचें एकीकरण जेव्हां होऊं लागलें तेव्हां झालेल्या दिसतात. एकतर दोघांचा मिलाफ होऊन एकानें दुसऱ्याची विद्या कांहीं काळ स्वीकारावी, किंवा एकानें दुसऱ्याची विद्या मारून टाकण्याचा प्रयत्न करावा. आजची अथर्ववेदांतील विद्या ही देश्यांची असावीच असें नाहीं. कदाचित् त्यांची असेल, कदाचित् दोन्ही लोकांचें एकीकरण होऊन बनलेली असेल. केवळ जादुटोण्याला वेदस्वरूप मिळालें हें देश्यांच्या व परकीयांच्या स्पर्धेमुळें नव्हे; तर त्रैविद्य व अथर्व यांच्या स्पर्धेमुळें होय. तथापि राक्षसवेद, सर्पवेद, इतिहासवेद, पुराणवेद इत्यादिकांस जें यज्ञसंस्थेंत स्थान मिळालें तें देश्यांशीं हातजमाई करण्याच्या प्रयत्नामुळें मिळालें असावें असें दिसतें. कां कीं, त्यांपैकीं बऱ्याचशा गोष्टींस मांत्र संस्कृतींत मुळींच आधार नाहीं. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, अथर्वणस्वरूप पौरोहित्याच्या देश्य संस्कृतींतील भागांपैकीं मांत्रांच्या आगमनानंतरचा भाग अस्पष्ट आहे; पण इतिहासपुराणांचा मात्र नाहीं. म्हणजे देश्यांचा पुरोहितवर्ग मेला किंवा मांत्रांच्या पुरोहितांत लोपला; परंतु देश्यांचा सूतांचा वर्ग टिकला, आणि त्यांनीं आपली संस्कृति इतकी कायम ठेवली कीं तिच्यावर मांत्र संस्कृतींतील लोकांची थोडीबहुत पुटें चढलीं तरी मांत्रसंस्कृतीच्या लोकांनां ती विद्या घेऊन संवर्धनच करावी लागली.

## प्रकरण ४ थें.

## दाशराज्ञ युद्ध अथवा भरतदिग्विजय.

**ऋग्वेदांत सर्वव्यापक प्रसंग दाशराज्ञयुद्धच होय.**— ऋग्वेदांतील अनेक सूक्तांत अनेक कथांचे व प्राचीन इतिहासाचे अंश आले आहेत. त्या सूक्तोक्त उल्लेखांनीं परिचित होणाऱ्या व्यक्तींचा परस्परांशीं संबंध व्यक्त करून दाखविण्यास आपणांस विवेचनासाठीं असा एक [illegible] पाहिजे कीं, त्याशीं सर्व व्यक्तींचा संबंध कसा तरी [illegible] येईल व त्या व्यक्तींचा अन्योन्याश्रय स्पष्ट करतां येईल. व्यक्तींच्या अगर राष्ट्रांच्या विशेष कृत्यांची एखाद्या प्रसंगाच्या अनुरोधानें आपणांस ओळख होईल तर पाहिजे. ऋग्वेदांतील अनेक व्यक्तींचा संबंध प्रासंगिक रीत्या जुळविणें झाल्यास तो हेतु साधण्यासाठीं जो एकच प्रसंग सांपडतो तो "दाशराज्ञ युद्ध" हा होय, हें मागील प्रकरणांत सविस्तर दाखविलेंच आहे. ह्या प्रसंगाशिवाय अनेक व्यक्तींचा समावेश करणारा व सर्व मंडळांशीं संबंधित असलेला असा दुसरा महत्त्वाचा व व्यापक असा प्रसंग ऋग्वेदांत नाहीं. वेदोल्लिखित घडामोडींत दाशराज्ञ युद्धाचें स्थान सर्वांत श्रेष्ठ दर्जाचें आहे तें ह्याच दृष्टीनें होय.

**या युद्धाचें वाङ्मयीन आणि ऐतिहासिक महत्त्व**:- या युद्धावर इतकें वाङ्मय निर्माण झालें व तें ऋग्वेदांत अंतर्भूत झालें यास त्या युद्धाचें ऐतिहासिक महत्त्व हेंच कारण होय. या युद्धांत गाजलेले क्षत्रिय पुराणांनीं वर्णिले नाहींत. पण या युद्धाशीं प्रसिद्ध ऋषींचा संबंध आला आहे. राजे म्हणून युद्धाशीं संबंध असलेल्या व्यक्तीहि अनेक असून त्यांचा उल्लेख बहुतेक मंडळांत येतो.

कोणत्या तरी व्यक्तीच्या संबंधानें दाशराज्ञ युद्धाचा उल्लेख सर्वच मंडळांत आला आहे. तथापि सातवें मंडळ व त्यांतहि कांहीं सूक्तें हीं युद्धाचें विशेष वर्णन करणारीं आहेत. ऋग्वेदसूक्तांतील इतिहास काढून घेण्यासाठीं प्रस्तुत युद्धांत भाग घेणाऱ्या व्यक्ती ज्या स्थळीं निर्दिष्ट असतील तीं स्थळें जमविलीं पाहिजेत, आणि त्यांत उल्लेखिलेल्या व्यक्तींशीं संबंध दाखविणारे इतर उल्लेखहि एकत्रित केले पाहिजेत. दाशराज्ञ युद्धाच्या सन्निकर्षानें अनेक कथा, पुरुष व स्थित्यंतरें यांवर कालस्थलसंबंधात्मक प्रकाश पडणार आहे.

पार्गिटेर असें दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे कीं, पुरोहितांनीं किंवा ऋषींनीं वेदासारख्या ब्राह्मणी वाङ्मयांत ज्यांचें स्तोम गायिलें ते राजे क्षत्रिय वाङ्मयांत उल्लेखिलेले नाहींत किंवा महत्त्वानें वर्णिलेले नाहींत; आणि रामायण महाभारतासारख्या क्षत्रिय वाङ्मयांतून महत्त्व पावलेल्या राजांचा गौरव वेदांत नाहीं. हें विधान कदाचित् सत्य असेल; तथापि यांतून पार्गिटेर असा जो ध्वनि काढतो कीं, ब्राह्मणी वाङ्मयांतून ज्यांचें वर्णन झालें त्यांचें राजकीय महत्त्व नाहीं, तो मात्र बरोबर नाहीं. दाशराज्ञ युद्धासंबंधानें पुढें जें विवेचन येईल त्यावरून असें दिसून येईल कीं, वरील पार्गिटेरच्या समजुतीला आधार नाहीं. फिलिपशिकंदराप्रमाणें दिवोदास व सुदास यांची जोडी दिग्विजयी होती. धृतराष्ट्र व धर्मराज ज्यांस प्राचीन म्हणत असतील, अशा कालीं तिनें अनेक राष्ट्रें पराभूत करीत गांधारापासून कुरुक्षेत्रापर्यंत ज्या लढाया मारल्या व जे शत्रू पादाव केले त्यांचा उल्लेख ऋग्वेदांत अक्षर शब्दांनीं आला आहे. हिंदुस्थानास "भारतवर्ष" हें नांव ज्या परिस्थितींत प्राप्त झालें त्या परिस्थितीचा प्रारंभ जर कोठें सांपडेल, तर तो या ब्राह्मणी वाङ्मयांतच सांपडेल. प्राचीन इतिहासाच्या दृष्टीनें, ज्या लोकांनीं इतर लोकांस जिंकून सर्व देशास आपलें नांव दिलें त्या लोकांच्या वर्णनापेक्षां भारतीय राष्ट्राच्या इतिहासकथनास दुसरा महत्त्वाचा प्रसंग कोणता? देशनामस्पष्टीकरणाचें महत्त्व जाणण्याइतकी इतिहासबुद्धि प्राचीनांत होती. पौराणिकांनीं 'भारतवर्ष' या नांवाचा ऐतिहासिक उलगडा करण्याचा प्रयत्न करून या विषयाच्या महत्त्वाची ओळख दाखविली आहे.

**हिंदुस्थान हा भारत कोणामुळें.**—हिंदुस्थानास 'भारतवर्ष' कां म्हणतात? आपण कोणत्या भरतावरून आपणांस भारतीय म्हणवितों, याची जिज्ञासा आपणांस स्वाभाविक आहे. पुराणग्रंथमूलक असा समज आहे कीं, दुष्यंत व शकुंतला यांचा पुत्र जो भरत तो या देशाचा सार्वभौम राजा झाला आणि त्यावरून देशास 'भारतवर्ष' नांव पडलें. या भरताचा संबंध महाभारतानें कुरुकुलाशीं वर्णिला आहे, आणि कुरूंच्या घराण्यांतील यादवींच्या काव्यास महाभारत व यादवीस भारतीयुद्ध असें नांव आज प्रचलित आहे. ऋग्वेदांत भरत नांवाचे लोक वर्णिलेले दिसतात. त्यांचें तृत्सूंशीं नातें किंवा कदाचित् ऐक्य दिसून येतें. त्यांच्या विजयांचें वर्णनहि वेदांत आहे. मंत्रोत्पन्न माहिती दुष्यन्तपुत्र भरताच्या नांवानें देशास नांव मिळालें या पुराणग्रंथांच्या विधानाविषयीं संशय उत्पन्न करते. इतिहास कोणाचा हा प्रश्न आपण उत्पन्न केला त्या वेळेस असें लिहिलें आहे कीं, ज्या जातींचें किंवा राष्ट्रांचें हिंदुस्थानांत अस्तित्व किंवा प्रामुख्य असेल त्यांचा इतिहास आपणांस लिहिला पाहिजे. आर्य हा शब्द यजनविषयक असल्यामुळें, केवळ आर्यांचा म्हणजे विशिष्ट तऱ्हेनें यजन करणाऱ्यांचा इतिहास आपणांस द्यावयाचा नाहीं. आपणांस देशांत जीं राष्ट्रें ज्ञात होतात त्यांची मोजदाद घेतली पाहिजे आणि त्या क्रियेपासून इतिहासास सुरवात केली पाहिजे. ही मोजदाद घ्यावयाची ती दाशराज्ञ युद्धाच्या अनुषंगानें घेऊन जीं राष्ट्रें वगळलीं जातील त्यांचा मागाहून इतिहास घेतला पाहिजे. प्राचीन कालीं चळवळ करणारीं बरींच राष्ट्रें दाशराज्ञ युद्धामध्यें सामील झालीं आहेत. पुरु, कुरु, भरत यांचें पौराणिकांनीं वंशैक्य धरलें आहे, तें तसें आहे म्हणून वेद साक्ष देतात काय याचाहि इतिहासार्थ वेदांकडे लक्ष देणाऱ्यानें विचार केला पाहिजे.

भरत हें ऋग्मंत्र व तदनंतरच्या वैदिक वाङ्मयांत फार महत्त्वाचें असें एका लोकांचें नांव आहे. ऋग्वेदसंहितेंत सुदास आणि तृत्सु लोकांबरोबर यांच्या नांवाचा उल्लेख तिसऱ्या आणि सातव्या मंडळांत वारंवार येतो; आणि साहाव्या मंडळांत त्यांचा संबंध दिवोदासाबरोबर दिसून येतो (ऋ. ६. १६, ४–५). एका ठिकाणीं (ऋ. ७. ८, ४) भरत लोक तृत्सूंप्रमाणें पुरूंचे शत्रू आहेत असें म्हटलें आहे.

**भरतस्वरूपस्पष्टीकरणार्थ प्रयत्न.**—भरतांचें स्वरूप जाणण्यासाठीं लुडविग, गेल्डनेर, मॅकडोनेल, झिमर, हिलेब्रांट इत्यादि पाश्चात्य संशोधकांनीं या विषयावर जें थोडेंसें संशोधन केलें त्याचा मथितार्थ खोल पाण्यांत प्रवेश करण्यापूर्वीं देतों. लुडविग् भरत आणि तृत्सू हे एकच असें म्हणतो. ओल्डेनबर्ग म्हणतो कीं, तृत्सू हे भरतांचे वंशस्तुतिपाठक जे वसिष्ठ त्यांपैकीं होत. गेल्डनर म्हणतो कीं, तृत्सु हें भरतांचें राजघराणें असावें. तृत्सू आणि भरत हे शत्रू आहेत असें जें झिमरचें मत आहे तें मत भूगोलदृष्ट्यासुद्धां बरोबर नाहीं, असें मॅकडोनेल म्हणतो. याला तो असा आधार देतो कीं, झिमरच्या मताप्रमाणें तृत्सू लोक परुष्णी नदीच्या (रावीच्या) पूर्वेला रहात असत व त्यावरून भरत हे तृत्सू लोकांवर पश्चिमेकडून हल्ला करीत असले पाहिजेत; परंतु ऋग्वेदांत तर 'देवश्रवस्' व 'देववात' हे भरत राजे सरस्वती, आपया व दृषद्वती यांच्या लगत म्हणजे हिंदुस्थानांतील पवित्र प्रदेश जो मध्यदेश तेथें रहात असत असें दाखविलें आहे. हिलेब्रँटचें असें मत आहे कीं तृत्सू हे या प्रदेशांतील अगोदरचे लोक असावेत आणि सुदास व भरत हे मागाहून आले असावेत, आणि तृत्सू व भरत यांचा संबंध जडून

दोहोंची मिळून पुढें एकच जात झाली असावी. हें लोकमिश्रण दुसऱ्या एका गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ गृहीत धरलें पाहिजे असें तो म्हणतो; त्याच्या मतें अशा प्रकारचा संबंध असणें अगदीं अवश्य आहे. कारण, दिवोदासाचा संबंध भरद्वाज वंशाशीं येत असतां त्याचा मुलगा अगर नातू सुदास (पैजवन) याचा संबंध वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्याशीं येतो, याचें स्पष्टीकरण या तऱ्हेचा फरक झाला होता असें गृहीत धरल्याशिवाय होणार नाहीं. अर्थात् पैजवनांचे पहिले पुरोहित भारद्वाज असावे आणि नंतरचे पुरोहित दोन राष्ट्रांचा संयोग झाल्यामुळें विश्वामित्र व वसिष्ठ हे झाले असावेत. हिलेब्रँटचें मत आम्हांस बरेंचसें ग्राह्य दिसतें. कदाचित् असेंहि असेल कीं, राजकारणास ज्याचें पौरोहित्य अनुकूल होईल त्यास पुरोहित करावयाचें आणि गरज पडल्यास किंवा संपल्यास काढून टाकावयाचें ही तर पैजवनांची नीति असावी. असो.

तृत्सूंचे पुरोहित वसिष्ठ होते, आणि तृत्सूंचें भरतांशीं ऐक्य होतें आणि भरतांचें पौरोहित्य वसिष्ठाकडे होतें या दोन्ही गोष्टी अन्योन्याश्रयी दिसतात. वसिष्ठ तृत्सूंचे व भरतांचे पुरोहित झाले पण कालांतरानें मागें पडलेल्या विश्वामित्र घराण्यानें आपली भिक्षुकी परत मिळविली असें ब्राह्मणग्रंथांवरून दिसतें. भरतांचें आणि वसिष्ठांचें शत्रुत्व स्थापन झालें. रामायणांत व भारतांत वसिष्ठांस भिक्षुकीसाठीं कुरूंतून कोसलाकडे घालविलें आहे.

**मंत्रोक्त इतिहासाचें पुराणें आणि ब्राह्मणें यांनीं केलेलें विस्तरण.**—वैदिक वाङ्मय आणि आर्ष काव्यग्रंथ यांच्यामध्यें एक राजकुलविषयक किंवा मानववंशविषयक स्थित्यंतर दृष्टीस पडतें. ऋग्वेदामध्यें दाशराज्ञ युद्धामुळें सरस्वती नदीच्या आसमंतांत पुरुयदुतुर्वशादि दहा राष्ट्रांचा अगर राजांचा पराभव होऊन भरतांची तेथें स्थापना झालीसें दिसतें, तर महाभारतांत कुरूंचें राज्य प्राचीन कालीं प्रस्थापित झालेली गोष्ट याच स्वरूपांत तेथें दिसत असून त्या कुरूंनांच भरत आणि त्यांच्या कुलालाच पुरुकुल हें नांव दिलेलें दिसतें. ऋग्वेदामध्यें क्रिवी, कुरू, पुरू, भरत व तृत्सू हे स्वतंत्र लोक दिसत असून या लोकांचा एकमेकांशीं संबंध फारच थोडा दिसतो. कांहीं तर एकमेकांचे शत्रू दिसतात. दाशराज्ञ युद्धामध्यें यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु आणि पुरू यांचें सख्य असून तृत्सुभरतांबरोबर ते लढत आहेत. दाशराज्ञ युद्धामध्यें कुरुपुरुभरतांचें ऐक्य नाहीं एवढेंच नाहीं, तर कुरूंचा पत्ताच नाहीं. जे पुरु भरतांचे शत्रू होते त्या पुरूंनां भरतांच्या पितृत्वाचा मान कांहीं वैदिक आधारावर भारतांत दिला गेला आहे, आणि पुढील सरस्वतीतीरीं राज्य करणाऱ्यांस कुरु हें नांव प्राप्त झालें आहे. ज्याप्रमाणें भरतांचें व तृत्सूंचें ऐक्य झालें आणि तें वसिष्ठामुळें झालें, त्याप्रमाणें कुरूंचें व क्रिविपांचालांचें ऐक्य कवषामुळें झालें नसेलना अशी इतिहाससूचक कल्पना उत्पन्न होते. कवष हा पश्चिमेकडील सप्तर्षीपैकीं एक म्हणून त्याचें प्राचीनत्व व महत्त्व महाभारतांतील मोक्षधर्मपर्वांत सांगितलें आहे. कुरूंचें, भरतांचें व पुरूंचें ऐक्य महाभारतांत दाखविलें आहे आणि भरतांचें व तृत्सूंचें ऐक्य ऋग्वेदांत वर्णिलें आहे. तृत्सू आणि भरत यांचें पुरूंशीं ऐक्य झालें व भरतांचें यदु, तुर्वश, द्रुह्यू आणि अनु यांच्याशीं वैर किंवा भिन्नत्व कायम राहिलें, हें ऋग्वेद व महाभारत यांची तुलना स्पष्ट करिते. भरतांनां आपलें व आपल्याशीं मिळून गेलेल्या लोकांचें श्रेष्ठत्व स्थापून आपल्याशीं न मिळालेल्या लोकांनां हलकेपणा द्यावयाचा होता. यामुळेंच ययातिपुत्रकथा उत्पन्न झाली नसेलना असा संशय येतो. पुरूंशीं संबंध जुळल्यानें नवीन आलेल्या भरतांस प्राचीनत्व मिळालें. भरतांचा व पुरूंचा संबंध असणेंहि शक्य आहे. कां कीं, दिवोदास व सुदास या दोघांसहि पुरु म्हटलें आहे. सायणांनीं अर्थ करतांना मात्र पूरूंचा कामना पुरविणारा इत्यादि प्रकारचा अर्थ केला आहे. उत्तरकालीन वैदिक वाङ्मयांतहि भरतांचें नांव विशेष गाजलेलें आढळतें. शतपथ ब्राह्मणांत भरत दौष्यन्ति नांवाच्या एका राजाचा उल्लेख येतो. यानें अश्वमेध केला. त्याचप्रमाणें शतानीक सात्राजित या नांवाच्या दुसऱ्या एका भरत राजानेंहि तोच यज्ञ केला. ऐतरेय ब्राह्मणांत भरत दौष्यन्तीला दीर्घतमस् मामतेय हा राजमुकुट घालीत आहे असें वर्णन येतें. हेंच उत्तरकालीन विधान पौराणिक कथाप्रसारास कारण झालें असावें, किंवा पौराणिक कथांशीं श्रौतसंस्थांचा आगंतुक संबंध जोडण्याचा हा प्रयत्न असावा. शतानीक यास सोमशुष्मन् वाजरत्नायन (हें उपाध्यायाचें नांव फार अलीकडचें आहे) यानें अभिषेक केला. हे भरत राजे कोठें रहात असतील याविषयीं उत्तरकालीन लोकांची समजूत, त्यांनीं काशी लोकांवर जय मिळविले व यमुनातटीं आणि गंगातटीं यज्ञ केले म्हणून जे उल्लेख आहेत त्यांवरून अगदीं उघड होतें असें मॅकडोनेल म्हणतो. पण यांतहि आम्हांस हेतुपूर्वक फिरवाफिरवीचा संशय येतो. त्याचप्रमाणें राजे लोकांच्या नामावलींत निरनिराळ्या ठिकाणीं आलेल्या पांचालाः, कुरुपांचालाः, भरताः इत्यादि भिन्न शब्दांवरून त्यांचा रहावयाचा देश स्पष्ट होतो. भारतांत तर सर्वत्र कुरुदेशाचा राजवंश हा भरतवंशच होय असें आढळतें. यावरून ओल्डेनबर्ग याचें म्हणणें असें आहे कीं, ब्राह्मणकालीं भरत लोक कुरुपांचाल लोकांत मिसळत होते. हें खरें असेल असें वाटतें. कां कीं ब्राह्मणेंच श्रौतधर्म आणि इतिहासज्ञान या परंपरांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. किंवा ब्राह्मणांच्या पौरोहित्यास उपयोगीं पडेल असा "इतिहास" तयार करीत आहेत असें दिसतें.

भरतांचे यज्ञसमारंभ पंचविंश ब्राह्मण, ऐतरेय ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण आणि तैत्तिरीय आरण्यक यांतून सारखे उल्लेखिले गेले आहेत. ऋग्वेदांतहि अग्निभरताच्या नांवाचा उल्लेख आला आहे. आप्री सूक्तांत भारती देवीचा उल्लेख येतो. ही भरतांच्या कुलाचें संरक्षण करणारी 'कुलदेवता' आहे. हिचा सरस्वती नदीशीं जो ऋग्वेद ऋचेंत संबंध दाखविला आहे, त्यावरून भरत लोकांचा सरस्वतीशीं संबंध असावा अशा विचारास जागा मिळते. पुन्हां शतपथ ब्राह्मणांत अग्नीला 'ब्राह्मण भारत' म्हणजे 'भरतांचा उपाध्याय' म्हणून म्हटलें आहे; व त्याला मनुष्वत्, भरतवत् (म्ह० भरताप्रमाणें, मनूप्रमाणें) बलिग्रहण करण्यास बोलाविलें आहे.

एखादद्दुसऱ्या ऋचेंत सुदास अथवा दिवोदास आणि पुरुकुत्स अथवा त्रसदस्यु हे मित्र होते असें दाखविलें आहे.

ओल्डेनबर्गच्या सूचनेप्रमाणें ह्यावरून कुरूंशीं पुरु व भरत यांची एकी असावीसें दिसतें.

एका भरताचा उल्लेख ऋग्वेदाच्या पांचव्या मंडळांत (५४,१४) येतो. परंतु तो कोण हें मात्र निश्चित सांगतां येत नाहीं.

**भरतदौष्यंतीवरून राष्ट्रनामाची अशक्यता:**— दाशराज्ञ युद्धामध्यें जे भरत दृष्टीस पडतात त्यांचा भरत दौष्यन्तीशीं संबंध होता अगर नव्हता हा प्रश्न आहे. होता असें धरल्यास राष्ट्रसंस्थापक भरत हा राष्ट्राचें नांव उत्पन्न व्हावयाच्या पूर्वीच झाला असला पाहिजे. तसें धरल्यास दौष्यन्ति भरताची यज्ञभूमि कुरुक्षेत्र ही न राहतां ती कोठें तरी हिंदुस्थानापलीकडे आहे असें म्हणावें लागेल. कारण भरत राजा दिवोदास हा गांधारापासून दिग्विजय करीत आला होता. अर्थात् भरत कुलास नांव देणारा भरत दिवोदासापूर्वीचा असला पाहिजे व तो गांधार अथवा त्या पलीकडील प्रदेशांत रहात असला पाहिजे. कदाचित् असेंहि शक्य असेल कीं, ज्याप्रमाणें राष्ट्रांची उत्पत्ति एका पुरुषापासून करण्याचा मोह फेरिस्तासारख्यांसहि पडतो त्याप्रमाणेंच मंत्रकालीन "इतिहासकारां"स पडला असावा. तसा तो पडला असल्यास त्यांनीं भरत राष्ट्राची उत्पत्ति करण्याकरितां भरत राजा निर्माण करावा यांत नवल नाहीं. किंवा असेंहि असेल कीं, या प्रदेशास भारतवर्ष असें नांव अगोदरच पडत चाललें असून कुरूंमध्यें उत्पन्न झालेल्या दिग्विजयी राजपुत्राशीं उत्तरकालीनांनीं राष्ट्रनामाचा संबंध जोडला असावा. या प्रकारच्या कृतीनें देश्य व भरत यांचें एकीकरण होण्यास मदत झाली असावी.

राष्ट्रसंस्थापक भरताचें मूळस्वरूप व पराक्रम आपणांस ऋग्मंत्रांतच शोधिले पाहिजेत. ऋग्मंत्रांत भरत लोक आहेत पण दुष्यंत शकुंतला नाहीं किंवा दौष्यंति भरतहि नाहीं. यावरून ऋग्मंत्ररचनाकारांस भरत, दुष्यंत, शकुंतला हीं ठाऊक नसावीं असा संशय येतो. ठाऊक नसण्याचें कारण या व्यक्तींची मंत्ररचनोत्तरता किंवा काल्पनिक अस्तित्व किंवा अन्यप्रदेशता असावी, या तिहींपैकीं कोणतें तरी एखादें कारण असलें पाहिजे. मंत्ररचनोत्तरता असणें शक्य नाहीं. कां कीं, मंत्ररचना पारिक्षित जनमेजयाच्या कालापर्यंत होत होती आणि संहितांत तें वाङ्मय शिरलें होतें. अन्यप्रदेशता किंवा काल्पनिक अस्तित्व या दोहोंपैकीं कोणतीहि गोष्ट खरी असली तरी त्यांत पुरोहिती करामत दिसून येते. असो.

दाशराज्ञ युद्धाचा संबंध ज्याप्रमाणें अत्यन्त प्राचीन राजकीय घडामोडींशीं येतो त्याप्रमाणें तो भरद्वाज, वसिष्ठ व विश्वामित्र या तीन मंत्रद्रष्ट्या कुलांशीं येतो.

भरतांचा पूर्वेकडे जो प्रसार दाखविला आहे तो प्रसार अडथळ्याशिवाय झालेला नाहीं एवढेंच नव्हे तर कांहीं प्रसंगीं भरतांस मारहि मिळाला आहे. पक्थांचा म्हणजे अफगाणांचा राजा तूर्वयाण यानें दिवोदास, आयु व कुत्स यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केल्याचे उल्लेख आहेत. आयु हा पुरूरवसाचा पुत्र असेल तर दाशराज्ञ युद्धापासून ऋग्वेदमंत्राचा विषय झालेलें पुरूरवसुउर्वशीचें जोडपें फार दूरचें नसावें. दाशराज्ञ युद्धापासून ऋग्वेदांत उल्लेखिलेले अनेक राजे फार दूर असलेले दिसत नाहींत. ऋग्वेदांतील सूक्तें हीं आपणांस त्यांच्या व्याकरणरूपांच्या वाहुल्यानें जितकीं जुनीं वाटतात तितकीं नसावींत. दाशराज्ञ युद्धानंतरच मधुच्छंदादि ऋषींचीं सूक्तें येणार. ऋग्वेदांतील बहुतेक वाङ्मय दाशराज्ञ युद्धापासून कुरुयुद्धापर्यंतचें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. दाशराज्ञ युद्धांत प्रवेश करण्यासाठीं एक सूक्त विषयपरिचयासाठीं प्रथम देतों. तें अत्यन्त महत्त्वाचें आहे व तें सातव्या मंडळांतील अठरावें आहे.



### सातवें मंडल १८ वें सूक्त

**त्वे ह यत्पितरश्चिन्न इंद्र विश्वा वामा जरितारो असन्वन् ।**
**त्वे गावः सुदुघास्त्वे ह्यश्वा स्त्वं वसु देवयते वनिष्ठः ॥ १ ॥**

हे इंद्रा, आमच्या वाडवडिलांनीं देखील तुझीं स्तोत्रें गाऊन ज्याअर्थीं सर्व प्रकारची उत्तम संपत्ति मिळविली, (त्या अर्थीं आम्हीं देखील धनप्राप्तीच्या इच्छेनें तुझें स्तवन करतों. कारण) तुजजवळ उत्तम दुधाच्या गाई व चांगले घोडे (आहेत). तूं यज्ञ करणाऱ्या लोकांनां धन देणारा (आहेस).

**राजेव हि जनिभिः क्षेष्येवाव द्युभिरभि विदुष्कविः सन् ।**
**पिशा गिरो मघवन्गोभिरश्वैस्त्वायतः शिशीहि राये अस्मान् ॥ २ ॥**

हे इंद्रा राजा ज्याप्रमाणें आपल्या स्त्रियांसह (सुखानें) रहातो (त्याप्रमाणें) तूं देखील द्युतींनीं युक्त असतोस. हे धनसंपन्ना, तूं ज्ञानसंपन्न असल्यामुळें तुझी स्तुति करणाऱ्या आम्हांस सुवर्ण, गाई, घोडे, वाहनें दे व तुझ्या ठिकाणीं दृढ प्रेम असलेल्या आम्हांस संपत्ती करतां सुसंस्कृत कर.

**इमा उत्वा पस्पृधानासो अत्र मन्द्रा गिरो देवयंतीरुपस्थुः ।**
**अर्वाची ते पथ्या राय एतु स्याम ते सुमताविंद्र शर्मन् ॥ ३ ॥**

हे इंद्रा ह्या यज्ञांत (एकमेकींमध्यें) अहमहमिका करणाऱ्या अशा (ह्या आमच्या) आनंदित करणाऱ्या स्तुती तुजप्रत येवोत. तुझ्या संपत्तीचा मार्ग आम्हाकडे (मोकळा) असो; तसेंच तुझ्या स्तोत्रांत गढलेल्या आम्हांस सुख प्राप्त होवो.

**धेनुं न त्वा सूयवसे दुदुक्षन्नुप ब्रह्माणि ससृजे वसिष्ठः ।**
**त्वामिन्मे गोपतिं विश्व आहा न इन्द्रः सुमतिं गन्त्वच्छ ॥ ४**

हे इंद्रा तृणानें परिपूर्ण (असलेल्या) गोठयांत असणाऱ्या गाई प्रमाणें उत्तम हवींनीं युक्त असलेल्या यज्ञगृहांत (राहणारा जो तूं त्या तुझ्यापासून आपल्या) मनोरथाची पूर्णता करून घेऊं इच्छिणारा मी वसिष्ठ स्तोत्रें म्हणतों (कीं ज्यायोगानें) माझा परिवार तुलाच गोपति म्हणतो, इंद्रानें आमच्या स्तोत्रानें आगमन करावें.

**आर्णांसि चित्पप्रथाना सुदास इंद्रो गाधान्यकृणोत्सुपारा ।**
**शर्धंतं शिम्युमुचथस्य नव्यः शापं सिंधूनामकृणोदशस्तीः ॥ ५ ॥**

* "पुस्तु" (अफगाणांची भाषा) हा शब्द पक्थ शब्दाचा अपभ्रंश आहे.

स्तवलेला इंद्र यानें पाणी खोल असतांना देखील तरून जाण्यास योग्य असें सुदास राजाकरितां केलें, व त्यानें शिम्यूला नद्यांच्या पुरांनां शाप द्यावयास लावलें.

**पुरोळा इत्तुर्वशो यक्षुरासीद्राये मत्स्यासो निशिता अपीव।**
**श्रुष्टिं चक्रुर्भृगवो द्रुह्यवश्च सखा सखायमतरद्विषूचोः ॥ ६ ॥**

१ यज्ञकुशल असा व दानें देणारा असा तुर्वश नांवाचा राजा होता, त्यानें मत्स्य देशावर स्वाऱ्या केल्या व त्यामुळें भृगूंनीं व द्रुह्यूंनीं तुर्वशाचें प्रिय केलें व त्या वेळीं तुर्वशाच्या मित्रभूत इंद्रानें मित्रास ( तुर्वश ) संकटांतून तारलें.:—सायण

२ चालून जाणारा आणि यज्ञकुशल असा तुर्वश राजा होता त्यानें धनेच्छेनें सुदासावर स्वारी केली. मत्स्यासारखे परतंत्र असूनहि भृगु व द्रुह्यु तात्काल मदत करते झाले. सुदास आणि तुर्वश यांमध्यें मित्रइंद्र सुदासाला द्रुह्यूंसह तारिता झाला.:–सायण

३ तुर्वश यज्ञकुशल व दानशील होता. त्यानें मत्स्यांना ( लोकांना ) त्रास दिला. भृगु आणि द्रुह्यूंनीं तुर्वशाला मदत केली. दोघांमध्यें तुर्वशसखा इंद्र यानें तुर्वशाचें रक्षण केलें.:—सायण

**आ पक्थासो भलानसो भनंतालिनासो विषाणिनः शिवासः।**
**आयोनयत्सधमा आर्यस्य गव्या तृत्सुभ्यो अजगन्युधा नॄन् ॥७॥**

पक्थ, भलानस, अलिनास, शिवास, विषाणिन् हे बरोबर आले. ( सायणानें प्रत्येक राष्ट्रनामाचा गुणवाचक अर्थ केला आहे, तो येणेंप्रमाणें:–हवि शिजविणारे, गोड बोलणारे, तप करून हि पोरकट असणारे, खाजविण्याकरितां ( कृष्ण ) विषाण हातांत घेतलेले, ( व ) लोककल्याण करणारे इंद्राला स्तविते झाले.,) जो सोममदयुक्त ( इन्द्र ) आर्यांच्या गाई तृत्सूकरितां ( हरण करून ) आणता झाला व युद्धानें शत्रूंना ठार करिता झाला.

**दुराध्यो३ अदितिं स्रेवयन्तोऽचेतसो विजगृभ्रे परुष्णीम्।**
**मन्हा विव्यक्पृथिवीं पत्यमानः पशुष्कविरशयच्चायमानः ॥ ८ ॥**

दुष्ट, मूर्ख, ( सुदासाचे शत्रु ) परुष्णीच्या काठावर राहणारे ( परुष्णी ) नदीचें तीर फोडते झाले. ( इन्द्रप्रसादलब्ध ) सामर्थ्यानें तें जल पृथिवीभर पसरलें. ( परंतु सुदासचा शत्रु ) चायमान कवि ( यज्ञांतल्या ) पशूप्रमाणें मेला.

**ईयुरर्थं नन्यर्थं परुष्णीमाशुश्च नेदभिपित्वं जगाम।**
**सुदास इंद्रः सुतुकाँ अमित्रा नरंधयन्मानुषे वध्रिवाचः ॥ ९ ॥**

परुष्णी नदी पूर्वस्थलीं वाहूं लागली. भलत्या ठिकाणीं तिचें पाणी वाहीनासें झालें. ( राजा सुदासचा ) घोडा हि प्राप्तव्य स्थलीं गेला. इन्द्रानें सुदासाकरितां व्यर्थ बडबडे व पुत्रयुक्त अशा शत्रूंना ताब्यांत आणलें.

**ईयुर्गावो न यवसादगोपा यथाकृतमभिमित्रं चितासः।**
**पृश्निगावः पृश्निनिप्रेषितासः श्रुष्टिं चक्रुर्नियुतो रंतयश्च ॥ १० ॥**

कुरण सोडून, कळपांतून न चालणाऱ्या गायींप्रमाणें प्रसंगानुसार एखाद्या मित्राच्या गळ्याला मिठी मारून ते ( न बुडलेले पळपुटे ) गेले. पृश्नीनें खालीं धाडून दिलेले व चित्रविचित्र घोडे हांकणारे ( मरुत ) यांनीं श्रवण करून योद्धे आणि सरंजाम चढविलेले घोडे दिले.

**एकं च यो विंशतिं च श्रवस्या वैकर्णयोर्जनान्राजा न्यस्तः।**
**दस्मो न सद्मन्निशिशाति बर्हिः शूरः सर्गमकृणोदिंद्र एषाम् ॥ ११ ॥**

जो अन्नेच्छेनें ( परुष्णीच्या तीरावरील ) दोन वैकर्ण देशामधील एक आणि वीस लोकांना मारतो तो सुंदर सुदास यज्ञगृहांत दर्भ ज्याप्रमाणें तोडतात त्याप्रमाणें शत्रूंनां तोडतो. शूर इन्द्र मरुतांची उत्पत्ति ( त्या युद्धांकारितां ) करिता झाला.

**अध श्रुतं कवषं वृद्धमप्स्वनु द्रुह्युं निवृणग्वज्रबाहुः।**
**वृणाना अत्र सख्याय सख्यं त्वायन्तो ये अमदन्ननु त्वा ॥ १२ ॥**

नंतर वज्रबाहु इन्द्रानें श्रुत, कवष, वृद्ध आणि द्रुह्यु यांनां क्रमानें पाण्यांत बुडविलें. या वेळीं तुझ्या सख्याची इच्छा करणारे जे तुला स्तविते झाले त्यांच्याशीं तूं सख्य केलेंस.

**वि सद्यो विश्वा दृंहितान्येषामिंद्रः पुरः सहसा सप्त दर्दः।**
**व्यानवस्य तृत्सवे गयं भाग्जेष्म पूरुं विदथे मृध्रवाचम् ॥१३॥**

इंद्रानें आपल्या विजयी बलानें, त्यांचीं सर्व बळकट स्थानें आणि सात किल्ले एकदम नाश करून टाकले. अनूच्या मुलाची संपत्ति त्यानें तृत्सूला दिली. यज्ञांत आम्ही तिरस्कृत पूरूला जिंकूं.

**नि गव्यवो नवो द्रुह्यवश्च षष्टिः शता सुषुपुः षट् सहस्रा।**
**षष्टिर्वीरासो अधि षड् दुवोयु विश्वेदिन्द्रस्य वीर्या कृतानि ॥ १४ ॥**

लुटीच्या शोधांत असणारे, साठ शंभर, सहा हजार आणि सहासष्ट जास्त, असे अनव आणि द्रुह्युवीर निजले आहेत ( मारले गेले ). इंद्राचे हे सर्व अचाट पराक्रम धार्मिकांकरितां होते.

**इन्द्रेणैते तृत्सवो वेविषाणा आपो न सृष्टा अधवन्त नीचीः।**
**दुर्मित्रासः प्रकलविन्मिमाना जहुर्विश्वानि भोजना सुदासे ॥ १५ ॥**

इन्द्राशीं युद्ध करूं लागलेले हे मूर्ख व दुष्ट तृत्सु लोक सखल प्रदेशीं वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें धावूं लागले. नंतर त्रस्त झालेल्या तृत्सूंनीं सर्व धन सुदासाला दिलें.:—सायण

मोकळें असणारें पाणी खालीं वेगानें येत, त्याप्रमाणें हे तृत्सू इंद्राच्या काळजीच्या देखरेखीखालीं जोरानें चाल करून गेले. अगदीं बारकाईनें संपत्ति मोजणारे असून देखील शत्रूंनीं आपली सर्व संपत्ति सुदासाला देऊन टाकली.:—ग्रिफिथ

**अर्धं वीरस्य शृतपामनिंद्रं परा शर्धन्तं नुनुदे अभि क्षाम्।**
**इन्द्रो मन्युं मन्युम्यो मिमाय भेजे पथो वर्तनिं पत्यमानः ॥ १६ ॥**

इन्द्रानें जगांत वीरांनां मारणारे, पक्व पदार्थ पिणारे व इन्द्राचा द्वेष करणारे अशांचा फडशा पाडला. आणि क्रुद्ध शत्रूंचा क्रोध नाहींसा केला. व सुदासाच्या शत्रूंना पळवाट काढावयास लावलें.

**आध्रेण चित्तद्वेकं चकार सिंह्यं चित्पेत्वेना जघान।**
**अव स्रक्तीर्वेश्यावृश्चदिंद्रः प्रायच्छद्विश्वा भोजना सुदासे ॥ १७ ॥**

अशक्तांकडून देखील हा अतुलनीय पराक्रम त्यानें करविला. बकऱ्याकडून देखील त्यानें सिंहाला मारविलें. त्यानें यूपाचे कोन सुईनें मोडले. याप्रमाणें इंद्रानें सुदासाला सर्व संपत्ति दिली.

**शश्वन्तो हि शत्रवो रारधुष्टे भेदस्य चिच्छर्धतो विन्द रन्धिम् ।**
**मर्ताएँनः स्तुवतो यः कृणोति तिग्मं तस्मिन्नि जहि वज्र-**
**मिन्द्र ॥ १८ ॥**

तुझे सर्व शत्रु तुला शरण आले आहेत. उग्र अशा भेदाला सुद्धां तूं आपल्या अंकित केलें आहेस. हे इंद्रा, तुझी स्तुति गाणाऱ्यांना जे पीडा करतात त्यांच्यावर ( भेदावर ) तुझें तीक्ष्ण वज्र फेंक.

भेद = ( १ ) सुदासाचा शत्रु ( २ ) नास्तिक–सायण.

**आवदिन्द्रं यमुना तृत्सवश्च प्रात्र भेदं सर्वताता मुषायत् ।**
**अजासश्च शिग्रवो यक्षवश्च बलिं शीर्षाणि जभ्रु**
**रश्व्यानि ॥ १९ ॥**

या युद्धांत भेदाला (सुदासानें) नागविलें म्हणून यमुना नदी आणि तृत्सुलोक यांनीं त्याला संतुष्ट केलें, आणि अजास् शिग्रु, यक्षु यांनीं घोडयांचीं डोकीं नजर केलीं.

**न त इन्द्र सुमतयो न रायः संचक्षे पूर्वा उषसो न नूत्नाः ।**
**देवकं चिन्मान्यमानं जघन्थाव त्मना बृहतः शंबरं**
**भेत् ॥ २० ॥**

हे इंद्रा, तुझी संपत्ति आणि कृपा अतिरस्करणीय व प्राचीन आणि नूतन उषांप्रमाणें आहे. मन्यमानाचा मुलगा देवक याला तूं मारलेंस आणि उंच पर्वतावरून शंबराला उडवून दिलेंस.

**प्र ये गृहादममदुस्त्वाया पराशरः शतयातुर्वसिष्ठः ।**
**न ते भोजस्य सख्यं मृषन्ताधा सूरिभ्यः सुदिना व्युच्छान्**
**॥ २१ ॥**

जे पराशर, शतयातु, वसिष्ठ ( हे ) ऋषी तुझ्या इच्छेनें घरोघर तुझी स्तुति कारितात. ते पालक अशा तुझ्या स्तोत्राला किंवा मित्रभावाला कधींहि विसरत नाहींत. म्हणून त्या स्तोत्यांनां चांगले दिवस प्राप्त होतात.

**द्वे नप्तुर्देववतः शते गोर्द्वा रथा वधूमन्ता सुदासः**
**अर्हन्नग्ने पैजवनस्य दानं होतेव सद्म पर्येमि रेभन् ॥ २२ ॥**

हे अग्ने, देवताच्या वंशाकडून दोनशें गाई, सुदासाकडून घोडयांसहित दोन रथ अशा तऱ्हेची पैजवनाची देणगी मिळून पुरोहिताप्रमाणें स्तुति गात मी वेदीभोंवती प्रदक्षिणा करतो.

**चत्वारो मा पैजवनस्य दानाः स्मद्दिष्टयः कृशनिनो निरेके ।**
**ऋज्रासो मा पृथिविष्ठाः सुदासस्तोकं तोकाय श्रवसे वहन्ति**
**॥ २३ ॥**

पिजवनपुत्र सुदासाचे सुलक्षणी, सुवर्णालंकारयुक्त, दुःस्थितीं असतांनाहि सरलगामी, पृथिवीवर उभे असलेले ( दान दिलेले ) चार घोडे मला मुलाला ( वसिष्ठाला ) मुलासाठीं अन्नाकरितां किंवा पोराबाळांच्या यशाकरितां वाहून नेतात.

**यस्य श्रवो रोदसी अंतरुर्वी शीर्ष्णेशीर्ष्णे विबभाजा विभक्ता ।**
**सप्तेदिन्द्रं न स्रवतो गृणान्ति नि युध्यामधिमशिशादभीके**
**॥ २४ ॥**

ज्याचें यश विस्तीर्ण द्यावापृथिवींत ( पसरलेलें ) आहे. जो दाता सर्व श्रेष्ठ श्रेष्ठ माणसांना धन देता झाला त्या ( सुदासा ) ला सर्व लोक इंद्राप्रमाणें स्तवितात. आणि नद्यांच्या तीरीं युध्यामधि नांवाच्या त्याच्या शत्रूला ठार मारते झाले.

**इमं नरो मरुतः सश्चतानु दिवोदासं न पितरं सुदासः ।**
**अविष्टना पैजवनस्य केतं दूणाशं क्षत्रमजरं दुवोयु ॥ २५ ॥**

हे मार्गदर्शक मरुत् हो, या सुदासाला त्याचा बाप दिवोदास त्याप्रमाणें सेवा. आणि परिचरणेच्छु पैजवन–सुदास याचें घर रक्षा. आणखी सुदासाचें सामर्थ्य अविनाशी आणि अशिथिल असो.

### यासूक्तापासून तेवीस इतिहासविषय निघतात.–

प्रस्तुत सूक्तांतील वक्ता वसिष्ठ आहे व इन्द्रस्तुतीचा फलभोक्ता सुदास राजा आहे. तृत्सूंचा आणि सुदासाचा संबंध या सूक्तांत स्पष्ट होत नाहीं. या सूक्तामध्यें बऱ्याच राष्ट्रांचे व लोकांचे उल्लेख आले आहेत आणि यामुळें हें सूक्त इतिहासविषयक प्रश्नांचें सूचक म्हणून प्रथम मांडण्यांत येत आहे. यांत परिचित होणारीं नांवें व त्यासंबंधीं विधानें येणेंप्रमाणें.

( १ ). सुदास राजा यासाठीं इन्द्रानें नदीचें पाणी तरून जाण्यास योग्य असें केलें. इन्द्रानें सुदासा करितां व्यर्थ बडबडे व पुत्रयुक्त ( सुतुकाः व वध्रिवाचः ) अशा शत्रूंनां ताब्यांत आणलें. सुदासाला शत्रूंनीं आपली संपत्ति दिली. सुदास हा पैजवन होता. त्यानें सूक्तगायकास घोडे दिले. सुदासाचा बाप दिवोदास होता. सुदासाचे प्रतिस्पर्धी बलवान् होते असें वसिष्ठाचें मत होतें असें बकऱ्याकडून सिंहाला मारविलें या रूपकावरून दिसतें.

( २ ). शिम्यु–नद्यांच्या पुरांनां हा शाप देतो.

( ३ ). तुर्वश–हा यज्ञकुशल व दानें देणारा होता. मत्स्य देशावर यानें स्वाऱ्या केल्या. भृगू आणि द्रुह्यु यांनीं तुर्वशाचें प्रिय केलें. मित्रभूत इन्द्रानें तुर्वशास संकटांतून तारलें.

( ४ ). भृगू–तुर्वश पहा.

( ५ ). द्रुह्यु–तुर्वश पहा. यांनां इन्द्रानें पाण्यांत बुडविलें. धार्मिकांकरितां द्रुह्यूंस व अनूंस ससैन्य इन्द्रानें मारिलें.

( ६ ). तृत्सु–यांच्या करितां इन्द्रानें आर्यांच्या गाई हरण केल्या. अनूच्या मुलांची संपत्ति इन्द्रानें तृत्सूंनां दिली. हे इन्द्राच्या काळजीच्या देखरेखीखालीं जोरानें चाल करून गेले.

( ७ ). वैकर्ण ( दोन ) येथील लोकांचा अभिभव ( कदाचित् सुदासाकडून ) उल्लेखिला गेला आहे.

( ८, ९, १० ). श्रुत, कवष, वृद्ध यांस द्रुह्यूंसह इन्द्रानें पाण्यांत बुडविलें.

( ११ ). चायमान–कवि पशूप्रमाणें मेला.

( १२ ). पुरु–यज्ञांत आम्हीं पुरूला जिंकूं असें वसिष्ठ म्हणतो.

( १३ ). देवक–मन्यमानाचा मुलगा देवक याला इन्द्रानें मारिलें.

( १४ ). शंबर–यास इन्द्रानें मारिलें.

( १५ ). युध्यामधि—ऋचेतील गाइलेल्या राजाचा शत्रु.

( १६, १७ ) पराशर शतयातु—हे ऋषी व वसिष्ठ इंद्राची स्तुति घरोघर करितात.

( १८ ). वसिष्ठ–देववाताच्या वंशजाकडून २०० गाई व सुदासाकडून घोड्यासहित दोन रथ अशी देणगी मिळवितो.

( १९ ). देववात–वसिष्ठ पहा.

( २० ). भेद–भेदाला ( सुदासानें ) नागविलें म्हणून यमुना नदी आणि तृत्सू यांनीं इन्द्रास संतुष्ट केलें.

( २१ ) अजास ⎫ यानीं घोड्यांचीं डोकीं नजर केलीं ( सुदासाला
( २२ ). शिग्रु ⎬ खंडणी म्हणून किंवा इन्द्राला बलि म्हणून ).
( २३ ). यक्षु ⎭

येणें प्रमाणें येथें तेवीस व्यक्ति व समूह मिळून इतिहास-विषय उत्पन्न होतात. या सूक्तांवर दुसऱ्या कांहीं सूक्तांनीं प्रकाश पडल्यास पाहूं. यांत उल्लेखिलेल्या अनेक लोकांचा ऐतिहासिक संबंध काय होता तो आपणांस ज्ञातव्य आहे. अनेक ठिकाणच्या उल्लेखांवरून ज्या व्यक्तींचीं नांवें आपणांस कळतात त्यांचा प्रथम हिशोब घेऊं व नंतर विवेचनाकडे वळूं. प्रथमतः सुदास राजाबरोबर ज्यांचा प्रत्यक्ष उल्लेख येतो असे लोक घेऊं आणि नंतर त्या लोकांबरोबर आणखी कोणाचा उल्लेख येतो तिकडे वळूं. सुदासाचे सहायक म्हणून आपणांस चार समुच्चय दिसतात ते ( १ ) तृत्सु ( २ ) भरत (३) पृथु (४) पर्शु हे होत. सुदास विरुद्ध जे राजे होते त्यांचीं नांवें कांहीं लोकांच्या मतें खालीलप्रमाणें आहेत.

या विषयीं विवेचन मॅकडोनेलनें केलें आहे.

( १ ) शिम्यु ( २ ) तुर्वश ( ३ ) द्रुह्यु ( ४ ) कवष ( ५ ) पुरु ( ६ ) अनु–आनव ( ७ ) भेद ( ८ ) शंबर ( ९ ) वैकर्ण ( १० ) दुसरा वैकर्ण ( ११ ) यदु ( १२ ) मत्स्य ( १३ ) पक्थ ( १४ ) भलानस् ( १५ ) अलिन ( १६ ) विषाणिन् ( १७ ) अज ( १८ ) शिव ( १९ ) शिग्रु ( २० ) यक्षु.

पहिल्या दहा नांवांपेक्षां दुसऱ्या दहा नांवांबद्दल विशेष मतभेद आहे. त्यांत विशेषतः खालील पांच व्यक्तीबद्दल विशेषच मतभेद आहे. ( १ ) मत्स्य (२) पक्थ ( ३ ) भलानस् ( ४ ) अलिन ( ५ ) विषाणिन्.

हीं नांवें राजांचीं किंवा लोकांचीं नाहींत तर मत्स्य खेरीज चार हि नांवें ऋत्विजांचीं आहेत असें सायणाचार्यांचें म्हणणें आहे.

याशिवाय सुदासाचे कांहीं शत्रू शिल्लक राहतातच. त्यांचीं नांवें:—

( १ ) युध्यामधि. ( २ ) याद्व. ( ३ ) देवक–मान्यमान. ( ४ ) चायमान कवि. ( ५ ) सुतुक. ( ६ ) उचथ. ( ७ ) श्रुत. ( ८ ) वृद्ध. ( ९ ) मन्यु. ( १० ) पृथु.

या एकंदर शत्रूंच्या याद्यांवरून सुदासाचे दहा शत्रु कोण होते व त्यांचे अनुयायी कोण होते हें निवडणें कठीण आहे. व ते दहाच होते असें निश्चयानें म्हणवत नाहीं. वरील याद्यांपैकीं श्रुत, वृद्ध व मन्यु* हे खरोखरच कोणी विद्यमान शत्रु होते कीं ते विशेषणभूत शब्द आहेत याबद्दल मतभेद आहे.

शत्रु व मित्र याशिवाय महत्त्वाच्या दुसऱ्या व्यक्ती म्हटल्या म्हणजे पुरोहित व त्यांचीं कुलें होत. पुरोहित हे केवळ यजन करणारे नसून जयापजयाबद्दल जबाबदार असे लोक होते आणि त्यामुळें त्यांचें स्वरूप जितकें पारमार्थिक होतें त्याहून राजकीय अधिक होतें यासाठीं त्या पुरोहित कुलांकडे हि लक्ष देऊं. ऋग्वेदामध्यें कांहींच्या उपाध्यायांची माहिती आपणांस मिळते. ते उपाध्याय व त्यांचीं कुलें हीं वेदकालीन, प्रसिद्ध घराणीं असून जवळजवळ ऋग्वेदांत उल्लेखिलेल्या सर्व व्यक्तींचा व कुलांचा त्यांच्याशीं परंपरेनें संबंध पोंचतो, तो खालीलप्रमाणें

| राजा किंवा कुल | उपाध्याय |
|---|---|
| ( १ ) द्रुह्यू | ( १ ) भृगु<br>( दुसऱ्या मंडळाचा कर्ता गृत्समद हा भृगुवंशांतील होता. )<br>( और्व, अप्रवाण, भृगवाण हीं नांवें भृगूंचींच असावीत. )<br>( अङ्गिरसाचा निकट संबंध ) |
| ( २ ) पुरु | ( २ ) अत्रि<br>( पांचव्या मंडळाचा कर्ता ) |
| ( अ ) कुरुश्रवण | कवष |
| ( ३ ) सुदास् | ( १ ) वसिष्ठ ( सातवें मंडळ )<br>( २ ) विश्वामित्र ( तिसरें मंडळ )<br>जमदग्नि व कण्व यांच्याशीं निकट संबंध<br>( ३ ) भरद्वाज ( सहावें मंडळ ) |
| ( ४ ) भरत ( तृत्सु ) | दीर्घतमस् मामतेय |
| ( ५ ) तुर्वश<br>( ६ ) यदु | कण्व |

आतां प्रत्येक उल्लेखिताचा परामर्श घेऊं. हा घेतांना आपलें लक्ष स्वाभाविकपणें दिग्विजयी सुदासाकडे प्रथम जातें.

**सुदास**—सुदासाविषयीं संहिता काय म्हणते तें पाहूं.

**सुदासे दस्रा वसु बिभ्रता रथे पृक्षो वहतमश्विना ।**
**रयिं समुद्रादुत वा दिवस्पर्यस्मे धत्तं पुरुस्पृहं ॥**
( १. ४७, ६ ).

हे अश्वी देव हो, तुम्हीं सुदासाकरितां धनधान्यादि संपत्ति रथांत भरून आणली. आमच्यासाठीं द्युलोकांतून अथवा समुद्रावरून स्पृहणीय असें धन घेऊन या.

* गीताभाष्य पान ५३५. यांत अग्निहोत्री शंकरराव राजवाडे यांनीं मन्यूस व्यक्ति केलें आहे असें दिसतें.

**त्वं हत्यदिंद्र सप्त युध्यन् पुरो वज्रिन् पुरुकुत्साय दर्दः ।**
**बर्हिर्न यत्सुदासे वृथा वर्गंहो राजन् वरिवः पूरवे कः ॥**
( १. ६३, ७ ).

हे इंद्रा, युद्ध करणाऱ्या पुरुकुत्साकरितां शत्रूंच्या सात नगरांचें तूं विदारण केलेंस; सुदासाच्या शत्रूला बर्हीप्रमाणें कापून टाकलेंस आणि पुरूचें दारिद्र्य नाहींसें केलेंस.

**याभिः पत्नीर्विमदाय न्यूहथुराघवा याभिररुणीरशिक्षतं ।**
**याभिः सुदास ऊहथुः सुदेव्यं ताभिरूषु ऊतिभिरश्विनागतम् ॥**
( १. ११२, १९ ).

हे अश्वी देव हो, ज्या स्तोत्रांच्या योगानें तुम्हीं विमदाला बायको आणून दिली अथवा अरुणवर्णी गाई दिल्या. तसेंच ज्यांच्या योगानें तुम्ही सुदासाला सुदेवी आणून दिली त्या स्तुतीसह येथें या. ( सुदेव्यं ह्याचा अर्थ सायण उत्तम धन असा करितात. )

**महाँ ऋषिर्देवजा देवजूतोऽस्तभ्नात्सिंधुमर्णवं नृचक्षाः ।**
**विश्वामित्रो यदवहत्सुदासमप्रियायत कुशिकेभिरिन्द्रः ॥**
( ३. ५३, ९ )

देवजात, देवप्रेरित मनुष्यनायक महान् ऋषि ( विश्वामित्र ) जलागाध नदीला थांबविता झाला. जेव्हां सुदासाकडून विश्वामित्र यज्ञ करविता झाला तेव्हां इन्द्र कुशिकांना प्रिय झाला.

**उपप्रेत कुशिकाश्चेतयध्वमश्वं राये प्रमुञ्चता सुदासः ।**
**राजा वृत्रं जङ्घनत्प्रागपागुदगथा यजाते वर आ पृथिव्याः ॥**
( ३. ५३, ११ ).

कुशिकांनों, तुम्हीं चला. सावधान व्हा. सुदासाचा अश्व धनासाठीं सोडा. राजा ( इंद्र ) पूर्वेस, पश्चिमेस आणि उत्तरेस शत्रूला मारून टाकील, नंतर सुदास पृथिवीच्या श्रेष्ठ स्थलीं यज्ञ करो.

**एतान् रथेषु तस्थुषः कः शुश्राव कथा ययुः ।**
**कस्मै सस्रुः सुदासे अन्वापय इळाभिर्वृष्टयः सह ॥**
( ५. ५३, २ ).

या रथावर बसलेल्यांचें कोण ऐकेल, कसे जातील, कोणत्या सुदासाला ( चांगले दान देणाराला ) अन्नयुक्त व आप्तभूत वृष्टी प्राप्त होतील.

**शतं ते शिप्रिन्नूतयः सुदासे सहस्रं शंसा उत रातिरस्तु ।**
**जहि वधर्वनुषो मर्त्यस्यास्मे द्युम्नमधि रत्नं च धेहि ॥**
( ७. २५, ३ ).

उष्णिष् धारण करणाऱ्या इंद्रा, तुजकडून शंभर प्रकारांनीं माझें संरक्षण होवो. माझ्या सुदासाच्या हजारों कामना पूर्ण होवोत. तसेंच हिंसा करणाऱ्या माणसाचें हिंसक शस्त्र तूं नाहींसें कर आम्हांला उत्तम प्रकारचें अन्न व रत्नें दे.

**उतो हि वां रत्नधेयानि संति पुरूणि द्यावापृथिवी सुदासे ।**
**अस्मे धत्तं यदसदस्कृधोयु यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥**
( ७. ५३, ३ ).

आणखी हे द्यावापृथिवी हो, तुमच्याजवळ सुदासाकरितां ( सुदासास देण्यास योग्य ) असें पुष्कळ धन आहे. त्यांत जें पुष्कळ धन असेल ते आम्हांस द्या. तुम्हीं आमचें नेहमीं पालन

**यद्गोपा वददितिः शर्म भद्रं मित्रो यच्छंति वरुणः सुदासे ।**
**तस्मिन्नातोकं तनयं दधाना मा कर्म देवहेळनं तुरासः ॥**
( ७. ६०, ८ ).

अदिति, मित्र व वरुण हे देव सुरक्षित व कल्याणकारक असें घर सुदासाला ( दानशील अशा मला ) देतात. आणि बलयुक्त पुत्र धारण करणारे आम्हीं हे त्वरा करणारे हो (आम्हीं) देवाची अवकृपा करून घेणार नाहीं.

**अव वेदिं होत्राभिर्यजेत रिपः काश्चिद्वरुण ध्रुतः सः ।**
**परि द्वेषोभिरर्यमा वृणक्तूरुं सुदासे वृषणा उ लोकं ॥**
( ७. ६०, ९ ).

हे देवहो, स्तुति करीत शत्रु यज्ञ करो. म्हणजे वरुणहिंसित तो पापी होईल. अर्यमा देव आम्हांला शत्रुरहित करो. हे कामपूरक हो, शोभनदानाला ( सुदासे ) आम्हांला मोठा लोक द्या.

**मित्रस्तन्नो वरुणो देवो अर्यः प्रसाधिष्ठेभिः पथिभिर्नयन्तु ।**
**ब्रवद्यथान आदरिः सुदास इषा मदेम सह देवगोपाः ॥**
( ७. ६४, ३ ).

मित्र, वरुण, व अर्यमा हे देव आम्हांस इष्ट तें साधक मार्गांनीं प्राप्त करोत. आणि आम्हांला आणि सुदासाला अर्यमा ज्याप्रमाणें बोलला त्याप्रमाणें करो आणि देवसंरक्षित आम्ही पुत्रादिकांसहित आनन्दित होऊं या.

वसिष्ठ इंद्राची स्तुति करीत आहे.

**युवां नरा पश्यमानास आप्यं प्राचा गव्यंतः पृथुपर्शवो ययुः ।**
**दासा च वृत्रा हतमार्याणि च सुदासमिंद्रावरुणावसावतम् ॥**
( ७. ८३, १ ).

सायणी अर्थ—हे मित्रावरुण हो, तुमच्याशीं ' बंधुभावनेनें वागणारे ' ( आप्यं ) गाईची इच्छा करणारे ( यजनकर्ते यजमान ) हातांत मोठाले परशु ( अश्वाच्या बरगड्या ) घेऊन प्राची दिशेकडे जातात, ( इंद्रावरुण हो, ) तुम्हीं दास, वृत्र तसेच आर्यांचा नाश करून सुदासाचें रक्षण केलेंत.

टीपः—सुदासाच्या शत्रूंमध्यें दास, वृत्र, आणि आर्य यांचा उल्लेख केला आहे. पृथुपर्शवः पृथु ( पार्थियन ) व पर्शु ( पर्शियन ) हीं राष्ट्रें युद्धांत होतीं असाहि अर्थ होईल. तीं कोणच्या बाजूनें लढलीं हें स्पष्ट होत नाहीं.

**इंद्रावरुणावधनाभिरप्रति भेदं वन्वंता प्रसुदासमावतं ।**
**ब्रह्माण्येषां शृणुतं हवीमनि सत्यातृत्सूनामभवत्पुरोहितिः ॥**
( ७. ८३, ४ ).

ज्याचा शस्त्रानें वध होणें कठीण अशा भेदाला मारणारे इंद्रावरुण हो, तुम्हीं सुदासाचें रक्षण केलें. लढाईच्या प्रसंगीं तृत्सूंनीं तुमची स्तुति केलेली तुम्हीं ऐकलीत त्यामुळें तृत्सूंच्या येथील माझें पौरोहित्य खरें ठरलें.

टीपः—( १ ). वक्ता तृत्सूंचा पुरोहित आहे.

( २ ). पुरोहितत्व कायम राखण्यासाठीं त्याच्यामार्फत ईश्वरी साहाय्य मिळतें किंवा नाहीं याची परिक्षा. ( ३ ) सुदास व तृत्सु एक किंवा परस्पर सहायक होते.

**युवां हवन्त उभयास आजिष्विंद्रं च वस्वो वरुणं च सातये ।**
**यत्र राजभिर्दशभिर्निबाधितं प्रसुदासमावतं तृत्सुभिः सह ॥**
(७. ८३, ६).

हे इंद्र आणि वरुणहो, युद्धांत दोनहि पक्षाच्या लोकांनीं धन मिळविण्याच्या इरायानें तुम्हांला हांक मारली. त्यावेळीं जेव्हां दाशराज्ञांनीं त्यावर हल्ला करुन त्याला खालीं चेपलें होतें तेव्हां तृत्सूंलोकांसमवेत असलेल्या सुदासाला तुम्हीं मदत केलींत.

ज्या युद्धांत दहा राजांनीं चेपलेल्या तृत्सूसह सुदासला तुम्हीं रक्षिलेंत ( त्याच युद्धांत ) धन स्वीकारण्याकरितां ते दोघेही इन्द्र, आणि वरुण यांना बोलाविते झाले.:—सायण

**दशराजानः समिता अयज्यवः सुदासमिंद्रावरुणा न युयुधुः ।**
**सत्या नृणामद्मसदामुपस्तुतिर्देवा एषामभवन्देवहूतिषु ॥**
(७. ८३, ७).

हे इंद्रावरुण हो, यजन न करणारे व युद्धास एकत्र जुळून आलेले दहा राजे ( तुमच्या अनुग्रहामुळें एकट्या असलेल्या ) सुदासाचा पराभव करूं शकले नाहींत. हवि अर्पण करणाऱ्या व यज्ञनेत्या ऋत्विजांनीं केलेली स्तुति सफल झाली आणि त्याच्या यज्ञाला सर्व देव आले.

टीपः—दहा राजे हवि अर्पण करणारे नव्हते काय असा संशय उत्पन्न होतो.

**दाशराज्ञे परियत्ताय विश्वतः सुदास इंद्रावरुणा वशिक्षतम् ।**
**श्वित्यंचो यत्रनमसा कपर्दिनो धियाधीवन्तो असपन्त तृत्सवः ।**
(७. ८३, ८).

हे इंद्रावरुण हो, जेव्हां दाशराज्ञांनीं त्याला सभोंवार वेढलें तेव्हां तुम्ही सुदासाला मदत केलीत. त्या ठिकाणीं शुभ्रवस्त्रधारी, जटाधारी ( वेण्या घातलेले ), गानपटू असे जे तृत्सु, त्यांनीं नमन आणि स्तवन या योगें तुमची पूजा केली.

टीप— श्वित्यंचः, कपर्दिनः, धीवन्तः अशीं तीन विशेषणें तृत्सूंना दिलीं आहेत.

**एवेन्नु कं सिंधुमेभिस्ततारेवेन्नु कं भेदमेभिर्जघान ।**
**एवेन्नु कं दाशराज्ञे सुदासंप्रावदिंद्रो ब्रह्मणा वो वसिष्ठाः ॥**
(७. ३३, ३)

हे वसिष्ठहो, तुमच्या स्तोत्रानें जसा इन्द्र यांच्या ( सह ) सिन्धु तरून गेला, जसा यांच्याकडून भेदाचा वध केला तसेंच दहाराजांच्या युद्धांत सुदासाला संरक्षिलें नाहीं का ?

**दण्डा इवेद्गो अजनास आसन्परिच्छिन्ना भरता अर्भकासः ।**
**अभवच्च पुरएता वसिष्ठ आदित्तृत्सूनां विशो अप्रथन्त ॥**
(७. ३३, ६).

गोप्रेरक दंड ज्याप्रमाणें ( पर्णविरहित ) असतात त्याप्रमाणें भरत अरक्षित असे होते. नंतर वसिष्ठ त्यांचा नायक झाला; तेव्हां तृत्सूंचीं कुळें जिकडे तिकडे पसरलीं.

**वरील ऋचांतील सुदासाविषयीं व इतर माहिती**—या ऋचांच्या समुच्चयावर आतां थोडेसें भाष्य करूं. प्रथम दिलेल्या सूक्तांत आपणांस विविध व्यक्तींविषयीं आणि लोकांविषयीं जी माहिती मिळाली त्या माहितींत या वरील ऋचांनीं काय फरक पडतो तें पाहूं. यांपैकीं कांहीं ऋचांमध्यें उदाहरणार्थ ७. २५, ३; ७. ५३, ३; ७. ६०, ८–९; यांमध्यें सुदासाचा अर्थ चांगलें दान देणारा असा आहे. याशिवाय या ऋचांत कांहीं विधानें अधिक नजरेस येतात.

( १ ) पुरुकुत्स आणि सुदास यांच्या सामान्य शत्रूंचा नाश इंद्रानें केला आणि त्यामुळें पुरू श्रीमंत झाले.

( २ ) अश्वींनीं सुदासाला सुदेवी नांवाची बायको मिळवून दिली.

( ३ ) सुदासाकडून विश्वामित्रानें अश्वमेध करविला.

( ४ ) सुदासाला पूर्वेस पश्चिमेस व उत्तरेस जय मिळवावयाचा होता. आणि नंतर यज्ञ करावयाचा होता.

( ५ ) ६. ६१ या सूक्ताच्या गात्यानें दिवोदासाच्या जन्माचें श्रेय सरस्वतीस दिलें आहे.

( ६ ) गाता पर्णींच्या नाशाचें श्रेय सरस्वतीस देतो.

( ७ ) दास, वृत्र तसेंच आर्य यांचा नाश करून सुदासाचें रक्षण इंद्रावरुणांनीं केलें.

( ८ ) पृथु आणि पर्शु हे प्राचीकडे जातात.

( ९ ) लढाईच्या प्रसंगीं तृत्सूंची स्तुति इंद्रावरुणांनीं ऐकली त्यामुळें वसिष्ठाचें तृत्सूंच्या घरचें पौरोहित्य खरें ठरलें.

( १० ) इंद्रावरुणांनां दोन्ही पक्षांनीं ( दहाराजे व सुदास ) यांनीं हांक मारली पण देवींनीं तृत्सूसमवेत असलेल्या सुदासालाच मदत केली.

( ११ ) तृत्सु यांचें वर्णन श्वित्यंचः ( शुभ्रवेषधारी किंवा निर्मल ) कपर्दिनः ( जटाधारी ) धीवंतः ( बुद्धिवान, स्तोत्रपटु ) अशीं तीन विशेषणें देऊन केलें आहे.

( १२ ) भरत पूर्वीं थोडे होते. वसिष्ठ त्यांचा नायक झाल्यामुळें तृत्सूंचीं कुळें जिकडे तिकडे पसरलीं. या अधिक माहितीमुळें कांहीं प्रश्न उपस्थित होतात. एक प्रश्न असा कीं मागच्या सूक्तांत जर पुरु हे सुदासाच्या शत्रूंमध्ये घातले आहेत तर पुरुकुत्स आणि सुदास यांच्या सामान्य शत्रूंचा नाश केल्यामुळें पुरु श्रीमंत कसे होतील ? सुदास हाहि पुरुच होता काय ? याचें उत्तर असें देतां येईल कीं एकदां पुरु व दिवोदास हे मित्र होते आणि त्या काळांत दिवोदास पुरुकुत्स आणि आयु यांचा पराभव तूर्वयाण ( पक्थ ) यानें केला असें दार्खविणाऱ्या कांहीं ऋचा आहेत. त्या पराभवाच्यानंतर म्हणजे सुदासाच्या कारकीर्दीत या त्रयीनें आपल्या सामान्य शत्रूचा मोड केला असा उल्लेख हा दिसतो.

मागच्या सूक्तांत सुदासाचा पुरोहित वसिष्ठ म्हणून दिला आहे. येथें विश्वामित्र सुदासाकडून अश्वमेध करवीत आहे व सुदासाला दिग्विजयी प्रेरणा करीत आहे. वसिष्ठ आणि विश्वामित्र हे दोघेहि ऋषी पैजवनाच्या पौरोहित्यासाठीं स्पर्धा करतांना आपणांस वेदांत दृष्टीस पडतात.

येथें आपणांस एक प्रश्न उत्पन्न करणारें एक सूक्त दृष्टीस पडतें. सरस्वतीच्या प्रसादानें वध्यश्वाला दिवोदास हा पुत्र झाला असें विधान आहे. या विधानावरून दिवोदास गांधाराकडून पूर्वेकडे दिग्विजय करीत येत होता या कल्पनेस बाध उत्पन्न होतो काय हा प्रश्न आहे. आमच्या मतें बाध येत नाहीं. कां कीं दिवोदास हा मुलगा सरस्वतीनें दिला म्हणजे सरस्वती नदीच्या कांठीं दिवोदासाचा जन्म झाला असें नाहीं तर उत्तरकालीन कवींनीं दिवोदासाच्या जन्माचें श्रेय त्यांच्या तत्कालीन देवतेस सरस्वती नदीस दिलें आहे एवढेंच यावरून निघतें.

पृथु आणि पर्शु हीं दोन राष्ट्रें सुदासाच्या मदतीस होतीं आणि तीं पूर्वेकडे जात आहेत असा उल्लेख आहे, तो सुदासाच्या स्वारीची दिशा स्पष्ट करतो.

भरतांचें नांव वर आलें आहे. ते पूर्वी थोडे होते आणि त्यांचा नायक वसिष्ठ झाल्यानंतर त्यांचीं कुलें चोहोंकडे पसरलीं असा उल्लेख आहे. एवढ्या उल्लेखावरून भरत, तृत्सु, वसिष्ठ आणि सुदास यांचा संबंध स्पष्ट होत नाहीं. तो होण्यासाठीं आणखी संशोधन केलें पाहिजे.

भरत व तृत्सुः—विवेचनसौकर्यासाठीं भरत व तृत्सूंविषयींचे उतारे येथें घेऊं. तृत्सूंचा ऋग्वेदांत उल्लेख फक्त सातव्या मंडळांत आठ वेळा आलेला आहे. ( ७. १८, ७; १३; १५; १९; ३३, ५; ६; ८३, ४; ६; ८. ) त्यांपैकीं पहिल्या चार ऋचा पूर्वी येऊन गेल्याच आहेत व पुढील चार विवेचन करतांना पुढें घेतल्या आहेत. येथें भरतांविषयीं उल्लेख देतों. त्यांत प्रथम भरतांनीं विपाट्-शुतुद्रि या नद्यांच्या संगमामधून मार्ग आक्रमण केल्याची कथा गाणारें तिसऱ्या मंडळांतील तेहेतिसावें सूक्त प्रथम घेऊं.

विश्वामित्र आणि नद्याः—

**प्र पर्वतानामुशती उपस्थादश्वेइव विषिते हासमाने ।**
**गावेव शुभ्रे मातरा रिहाणे विपाट्छुतुद्री पयसा जवेते ॥ १ ॥**

दोन घोड्या तबेल्यांतून सुटून एकमेकींशीं चढाओढ करून चालाव्या त्याप्रमाणें चालणाऱ्या दोन गाईप्रमाणें शोभणाऱ्या, दोन गाई माता असाव्या आणि त्या जिव्हेनें वत्सांना चारण्यासाठीं त्वरेनें धांवत असाव्या त्याप्रमाणें धांवणाऱ्या, विपाश व शुतुद्री या नद्या पर्वतांच्या मांडीवरून निघून समुद्राला जाण्याच्या इच्छेनें आपल्या जलासह त्वरेनें जात आहेत.

**इन्द्रेषिते प्रसवं भिक्षमाणे अच्छा समुद्रं रथ्येव याथः ।**
**समाराणे ऊर्मिभिः पिन्वमाने अन्या वामन्यामप्येति शुभ्रे ॥ २ ॥**

हे नद्यांनो ! इन्द्राच्या अनुज्ञेची भिक्षा मागणाऱ्या व त्यानें अनुज्ञा देऊन पाठविलेल्या तुम्ही सरळ समुद्राकडे जात आहां; दोन गाडीवाले आपल्या ठरीव ठिकाणीं जावें त्याप्रमाणें तुम्हीं जात आहां. तुमच्यांपैकीं प्रत्येक दुसरीशीं मिळून जात आहे. तुम्ही शोभायुक्त आहां.

**अच्छा सिंधुं मातृतमामयासं विपाशमुर्वीं सुभगामगन्म ।**
**वत्समिव मातरा संरिहाणे समानं योनिमनु संचरन्ती ॥ ३ ॥**

( वत्साला ) चारणाऱ्या दोन आया वत्साप्रत ज्याप्रमाणें जातात त्याप्रमाणें एकच मूळ ठिकाण—समुद्र—याकडे वाहत-जाणाऱ्या, मातृसम वाहणारी शुतुद्रि आणि मोठी भाग्यशाली अशी विपाश् या दोन नद्या यांप्रत मी आलों आहें.

**एना वयं पयसा पिन्वमाना अनु योनिं देवकृतं चरन्तीः ।**
**न वर्तवे प्रसवः सर्गतक्तः किंयुर्विप्रो नद्यो जोहवीति ॥ ४ ॥**

पाण्यानें भरलेल्या आम्हीं देवानें निर्माण केलेल्या समुद्राकडे जात आहोंत. उत्पत्तिस्थानाकडे जाण्याकरितां आरंभलेला हा उद्योग परत फिरण्याकरितां नाहीं ( मग ) काय इच्छा करणारा हा ब्राह्मण आम्हा नद्यांना बोलावितो आहे.

**रमध्वं मे वचसे सोम्याय ऋतावरीरुप मुहूर्तमेवैः ।**
**प्र सिन्धुमच्छा बृहती मनीषावस्युरह्वे कुशिकस्य सूनुः ॥ ५ ॥**

हे नद्यांनो, माझ्या शांत भाषणानें तुम्ही मुहूर्तभर गमन थांबवावें. अर्थपूर्ण स्तुतीनें स्वतःचें संरक्षण करण्याची इच्छा करणारा कुशिक पुत्र विश्वामित्र ( हे शुतुद्रि ) बोलावतो आहे.

**इन्द्रो अस्माँ अरदद्वज्रबाहुरपाहन्वृत्रं परिधिं नदीनाम् ।**
**देवोऽनयत्सविता सुपाणिस्तस्य वयं प्रसवे याम उर्वीः ॥ ६ ॥**

वज्रधारी इन्द्रानें आमच्या ( प्रवाह जाण्याच्या ) खांचा खण-ल्या. आमचे प्रवाह अडवणाऱ्या वृत्राला त्यानें मारिलें. सुंदर हस्ताच्या सवितृ देवानें आम्हांला नेलें ( म्हणजे वाट दाखविली ); आणि त्यानें पाठविल्यामुळें विस्तृत होऊन आम्ही वाहतों.

**प्रवाच्यं शश्वधा वीर्यं तदिन्द्रस्य कर्म यदहिं विवृश्चत् ।**
**वि वज्रेण परिषदो जघानायन्नापोऽयनमिच्छमानाः ॥ ७ ॥**

अहीचे तुकडे तुकडे करून टाकण्याचें जें शूर कृत्य इन्द्रानें केलें त्या कृत्याची स्तुति नेहमीं केली पाहिजे. अडवणूक करणाऱ्यांचा त्यानें चुराडा केला आणि ( नंतर ) पुढील मार्ग आक्रमण करण्यास उत्सुक झालेल्या नद्या पुढें वाहिल्या.

**एतद्वचो जरितर्मापि मृष्ठा आ यत्ते घोषानुत्तरा युगानि ।**
**उक्थेषु कारो प्रति नो जुषस्व मा नो नि कः पुरुषत्रा नमस्ते ॥ ८ ॥**

हे गायका ! पुढील पिढ्या ज्याचा पुनरुच्चार करितील असा हा तुझा शब्द कधींहि विसरूं नकोस. हे कवे ! तुझ्या मनांत आमचे विषयीं असलेला प्रेमयुक्त प्रेमळपणा सूक्तें गाऊन दाखीव. मनुष्यामध्यें आम्हांस कमीपणा आणूं नकोस. तुझा जयजयकार असो !

**ओ षु स्वसारः कारवे शृणोत ययौ वो दूरादनसा रथेन ।**
**नि षू नमध्वं भवता सुपारा अधोअक्षाः सिन्धवः स्रोत्याभिः ॥ ९ ॥**

हे भगिनी हो, माझें स्तोत्र लक्षपूर्वक ऐका. मी गाडी आणि रथ यांनीं तुम्हाकडे फार दूरून आलों आहें. प्रवाहानें कण्याच्या खालपर्यंत जा व सहज तरून जातां येईल अशा व्हा.

**आ ते कारो शृणवामा वचांसि ययाथ दूरादनसा रथेन ।**
**निते नंसै पीप्यानेव योषा मर्यायेव कन्या शश्वचै ते ॥ १० ॥**

हे स्तोत्रकर्त्या ( विश्वामित्रा ) ज्या अर्थी तूं गाडी आणि रथ यानें दूरवर आला आहेस त्याअर्थीं तुझीं बोलणीं आम्हीं ऐकतों. आणि बाळाला पाजणाऱ्या आईप्रमाणें किंवा कन्या बापापुढें किंवा भावापुढें नमते त्याप्रमाणें आम्हीं नम्र ( उथळ ) होतों.

**यदङ्ग त्वा भरताः सन्तरेयुर्गव्यन्ग्राम इषित इन्द्रजूतः ।**
**अर्षादह प्रसवः सर्गतक्त आवो वृणे सुमतिं यज्ञियानाम् ॥ ११ ॥**

ज्याअर्थीं तुम्हीं तुमच्या मधून पार जाण्याची अनुज्ञा दिली त्याअर्थीं भरत तुमच्या एकीभूत समूहामधून पार निघून जातील. तुमचीं उदकें ओलांडून जाऊं इच्छिणारा भरतांचा संघ तुमच्याकडून अनुज्ञा मिळाल्यानें आणि इंद्राकडून प्रेरित झाल्यामुळें तुमच्या मधून पार निघून जाईल. त्यांचा गमन प्रवृत्तीचा उद्योग पूर्वींच तुमच्याकडून अनुज्ञात झालेला आहे. मी मात्र तुम्हां यज्ञार्ह नद्यांचीं सुंदर स्तोत्रें गात रहाण्याचेंच पत्करितों.

**अतारिषुर्भरता गव्यवः समभक्त विप्रः सुमतिं नदीनाम् ।**
**प्रपिन्वध्वमिषयन्तीः सुराधा आवक्षणाः पृणध्वं यात शीभम् ॥ १२ ॥**

गाईची इच्छा करणारे ते भरत त्या नद्यांच्या पार निघून गेले. विप्र विश्वामित्र त्या नद्यांची सुंदर स्तुति करीत राहिला. अन्न उत्पन्न करणाऱ्या व उत्तम धनानें युक्त अशा तुम्हीं कालव्यांनां आनंदित करा. त्यांनां चोहोंकडून भरून टाका व आपली वाट त्वरेनें चालत रहा.

**उद्व ऊर्मिः शम्या हन्त्वापो योक्त्राणि मुञ्चत ।**
**माडुष्कृतौ व्यनसा घ्नौ शूनमारताम् ॥ १३ ॥**

हे नद्यांनो ! तुमची लाट शिवळीवर ( जोखडावर ) आपटूं दे; तुम्हीं दोरखंडांनां स्पर्श करूं नका. निरुपद्रवी व पापरहित अशी बैलांची जोडी कधींही नाश न पावो. सुदासविषयक उतारे पूर्वी दिलेच आहेत. त्यांखेरीज कांहीं महत्त्वाचे उतारे आणखी येथें देतों.

**हंसा इव कृणुथ श्लोकमद्रिभिर्मदन्तो गीर्भिरध्वरे सुते सचा।**
**देवेभिर्विप्रा ऋषयो नृचक्षसो वि पिबध्वं कुशिकाः सोम्यं मधु॥**
( ३. ५३, १० ).

हे बुद्धिमान् मंत्रद्रष्टे हो, हे कर्मद्रष्टे कुशिक श्रेष्ठ हो, यज्ञांत दगडांनीं सोम काढला असतां हंसाप्रमाणें मोहक वाणीनें स्तोत्रें करा. आणि देवासह मधुर सोममय रस प्या.:—सायण

( सोमलता ज्या दगडांमध्यें दाबून पिळतात ) त्या दाबण्याच्या दगडांनीं पिळलेला सोमरस यज्ञामध्यें पिळतांना म्हटलेल्या सूक्तांनीं आनंदित होणारे तुम्हीं, हंसाप्रमाणें एक स्तुतीचें गाणें तयार करा. हे गवयांनो, मनुष्यावर दृष्टि ठेवणारे कुशिक ऋषि हो ! देवांसह स्वादिष्ट सोमरस प्या.:—ग्रिफिथ

**य इमे रोदसी उभे अहमिन्द्रमतुष्टवम् ।**
**विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम् ॥**
( ३. ५३, १२. )

ज्या मी द्यावापृथिवीमध्यें राहणाऱ्या इंद्राला संतुष्ट केलें आहे त्या या विश्वामित्राचें स्तोत्र भरत कुळांतील जनांचें रक्षण करील.:—सायण

हीं पृथ्वी व स्वर्ग ह्यांचें संरक्षण करण्यास जो इंद्र त्याची मीं स्तुति केली आहे. विश्वामित्राचें हें सूक्त किंवा ही प्रार्थना भरतांची जात (कुल) रक्षिते—(म्हणजे रक्षण करील).:—ग्रिफिथ

**इम इन्द्र भरतस्य पुत्रा अपपित्वं चिकितुर्न प्रपित्वम् ।**
**हिन्वन्त्यश्वमरणं न नित्यं ज्यावाजं परि णयन्त्याजौ ॥**
( ३. ५३. २४. )

हे इंद्रा ! हे भरताचे पुत्र ताटातुटीची किंवा निकट संबंधाची पर्वा करीत नाहींत ( जाणत नाहींत ). आपला स्वतःचा घोडा जणूं काय दुसऱ्याचा आहे असें समजून धनुष्याच्या दोरीप्रमाणें चपळ असणाऱ्या त्याला लढाईस नेतात.

**त्वामीळे अध द्विता भरतो वाजिभिः शुनम् ।**
**ईजे यज्ञेषु यज्ञियम् ॥** ( ६. १६. ४ ).

हे अग्ने भरतानें सुखाच्या इच्छेनें यज्ञामध्यें यज्ञार्ह अशा तुला हवी अर्पण करून स्तुति केली असतां तूं त्याला दोन प्रकारचें ( इष्ट प्राप्ति आणि अनिष्ट नाश ) सुख प्राप्त करून दिलेंस.

**प्रप्रायमग्निर्भरतस्य शृण्वे वि यत्सूर्यो न रोचते बृहद्भाः ।**
**अभि यः पूरुं पृतनासु तस्थौ द्युतानो दैव्यो अतिथिः शुशोच॥**
( ७. ८, ४ )

या भरतांचा अग्नि फार कीर्तिमान् आहे. हा सूर्याप्रमाणें मोठ्या दीप्तीनें प्रकाशतो. ज्यानें युद्धांत पूरूचा पराभव केला तो स्वर्गीय अतिथि परिपूर्ण तेजानें प्रकाशला आहे.

तिसऱ्या मंडळांतील तेतीसावें सूक्त वर दिलें आहे, तें त्याच मंडळांतील त्रेपन्नाव्या सूक्ताबरोबर वाचलें पाहिजे व यासाठीं त्रेपन्नाव्या सूक्तांतील महत्त्वाचे उल्लेख वर दिलेच आहेत. तेहेतिसाव्या सूक्तांत भरतांस विपाश् आणि शुतुद्री उल्लंघिण्यासाठीं विश्वामित्रानें केलेली नद्यांची स्तुति आहे. त्रेपन्नाव्या सूक्तांत विश्वामित्राच्या स्तोत्रानें स्तंभन झाल्याचें वर्णन नवव्या ऋचेंत आहे. याच सूक्ताच्या अकराव्या ऋचेंत अश्वमेधांतील घोडा सोडण्याबद्दल ऋत्विजांना सूचना आहे. हे दोन्ही उल्लेख सुदाससंबंधीं उल्लेखांत आले आहेत. यावरून विपाश् आणि शुतुद्रीं यांचें आक्रमण भरतांकडून अश्वमेधापूर्वी झालें असें दिसून येतें.

**सुदास तृत्सु होता काय:**—सुदासाविषयींचा एक मोठा प्रश्न म्हटला म्हणजे सुदास हा तृत्सु होता काय ? हा होय. या प्रश्नाच्या स्पष्टीकरणाकडे आतां आपण वळूं.

तृत्सूंविषयीं आपणांस अनेक विधानें दृष्टीस पडतात. तीं येणें प्रमाणें.

( १ ) इंद्रानें अनवांचें धन तृत्सूला दिलें.
( ७. १८, १३ ).

( २ ) यमुना नदी व तृत्सु यांनीं इंद्राचें रक्षण केलें.
( ७. १८, १९ ).

( ३ ) इन्द्राशीं युद्ध करीत असतां तृत्सु पळाले व पळतांना धन सुदासाला दिलें. किंवा इंद्रासह ते चाल करून गेले.
( ७. १८, १५ ).

( ४ ) आर्यांचे गोसंघ तृत्सूंपासून हरण केले आणि युद्धांत त्यांनां ठार मारलें.

( ७. १८, ७ ).

( ५ ) स्तुति करणाऱ्या वसिष्ठाचें स्तोत्र इंद्रानें ऐकलें आणि तृत्सूंचा देश विस्तीर्ण केला. ( पाऊस पाडला ).

( ७. ३३, ५ ).

( ६ ) बैलांनां मारण्याची काठी ज्याप्रमाणें अल्प पर्णयुक्त असते त्याप्रमाणें हे भरत अल्प होते. नंतर जेव्हां तृत्सूंचा पुरोहित वसिष्ठ झाला तेव्हां तृत्सूंचे लोक खूपच वाढले.

( ७. ३३, ६ ).

( ७ ) हे इन्द्रावरुणानों, घातुक शस्त्रानें समोर न येणाऱ्या भेदाला मारणारे तुम्हीं सुदासाचें काळजीपूर्वक रक्षण करा. माझे यजमान तृत्सु यांची युद्धांतील ( बोलावणीं ) स्तोत्रें ऐकलींत यावरून माझें तृत्सूंचें पौरोहित्य सफल झालें,

( ७. ८३, ४ ).

( ८ ) दाशराज्ञ युद्धांत तृत्सूंसह सुदासाला रक्षिलें.

( ७. ८३, ६ )

( ९ ) धीवन्तो असपन्त तृत्सवः

( ७. ८३, ८ )

तृत्सूंनीं स्तुति केली ( तेथें सुदासाला रक्षिलें ). सुदास तृत्सु होता कीं नाहीं ?—सुदास व तृत्सु भिन्न या म्हणण्यास ७. १८, १५ हें स्थल आधार म्हणून देतां येईल. या ठिकाणीं 'इन्द्राशीं युद्ध खेळतांना तृत्सु पळाले व त्यांचें धन सुदासाला मिळालें असें म्हटलें आहे. यावरून सुदास व तृत्सु भिन्न तर होतातच परंतु त्यांचें शत्रुत्वाहि व्यक्त होतें. यावरून असा प्रश्न उपस्थित होतो कीं असा एखादा काळ नसेलना कीं ज्या काळांत तृत्सु व सुदास हे एकमेकांविरुद्ध होते व पुढें ते एक झाले असावेत. दुसरें एक स्थळ संशयास्पद आहे. ७. ८३, ६ येथें 'तृत्सुभिः सह प्रसुदासमावतं' तृत्सूंसह सुदासाला रक्षिलें असें स्पष्ट म्हटलें आहे. यावरूनहि तृत्सु व सुदास हे एक होते असें जसें निघतें तसेंच ते एक नव्हते असेंहि निघूं शकतें. याच मंत्रांतील 'उभयासः' हें पद सुदास व तृत्सु त्यांच्या भिन्नतेचें प्रतिपादक म्हणून महत्त्वाचें आहे. वरील विधानाप्रमाणेंच दुसरें विधान ७. ८३, ८ या ऋचेंत आहे.

हे इंद्रावरुणानों ! दहा राजांच्या युद्धांत चहूंकडून वेष्टिलेल्या सुदासाला ज्या ठिकाणीं निर्मलव्रति, जटाधारी बुद्धिमान अशा तृत्सूंनीं तुमचीं हविरन्नानें व स्तोत्रांनीं स्तुति केली त्या ठिकाणीं रक्षण केलें.

हें वसिष्ठमंडळ आहे. त्यामुळें व वसिष्ठाचा ज्या ज्या लोकांशीं संबंध त्यांचा त्यांचा उल्लेख एखाद्या माहितगार माणसाप्रमाणें यांत येणें स्वाभाविक आहे. या मंडळांतील विधानावरून सुदास आणि तृत्सु यांचें भिन्नत्व जरी दिसून येतें तथापि सुदास आणि तृत्सु यांचा निकट संबंध होता, हें नाकबूल करितां येणार नाहीं. त्यांचा अत्यंत निकट संबंध होता याची चिकित्सा करतांना त्या दोहोंत मित्रभाव होता अगर शास्यशासक भावहि होता हें ठरविलें पाहिजे, आणि भरत व तृत्सु यांचा संबंध शोधिला पाहिजे.

या विवेचनामध्यें शिरतांना विवेचनास पोषक पण प्रथम अप्रस्तुत दिसणाऱ्या एका प्रश्नाकडे वळलें पाहिजे. तो प्रश्न म्हटला म्हणजे आर्य या शब्दाचा कांहीं ऋचांतील उपयोग होय. तृत्सु आणि आर्य यांच्या संबंधाविषयीं प्रश्न उत्पन्न करणारी एक ऋचा आहे. 'आर्यस्य गव्या तृत्सुभ्यो अजगन्युधानॄन्' ( ७. १८, ७ ). अन्वयः— सधमाः आर्यस्य गव्या तृत्सुभ्यः अभयत् युधा नॄन् अजगत् 'आर्यांच्या गाई तृत्सूंपासून सोडविल्या आणि त्यांनां ठार मारलें.' यावरून आर्य आणि तृत्सु परस्पर विरुद्ध होते असें दिसतें.

आर्य हा मानववंश समजून त्या मानववंशामध्यें वसिष्ठशिष्य तृत्सूंचा अंतर्भाव होत नाहीं म्हणून घाबरा झालेला ग्रिफिथ तृत्सूंनां आर्य समजतो व वरील स्थलीं गव्या शब्दाचा मित्र असा अर्थ करितो. विल्सनला हें ग्रिफिथचें म्हणणें मान्य नाहीं. तथापि तृत्सु आर्यन या सोंवळ्या वर्तुळांतून बाहेर पडण्याचें भय मुळींच नाहीं. सदर उल्लेखाचा अर्थ एवढाच कीं ज्यांच्या गाई होत्या तो वर्ग यजन करणारा होता. वरील वाक्यांत आर्यन् नान्-आर्यन् यांचें सामुच्चयिक युद्ध नसून "भक्तांची पाठ राखलीस देवा" अशा अर्थाचें विधान आहे.

पूर्वीं भरत थोडे होते पण वसिष्ठास पौरोहित्य मिळाल्यामुळें तृत्सु चोंहोंकडे पसरले असें विधान करणारी एक ऋचा मागें दिली आहे. आतांपर्यंत घेतलेल्या उताऱ्यांत आपणास खालील गोष्टी स्पष्ट दिसतात.

भरतांचे एका काळीं उपाध्ये विश्वामित्र.
भरतांचे दुसऱ्या काळीं उपाध्ये वसिष्ठ.
तृत्सूंचे एका काळीं उपाध्ये वसिष्ठ.
तृत्सूंचे एका काळीं शत्रु सुदास.
तृत्सूंचे दुसऱ्या काळीं मित्र सुदास.
सुदासाचे एका काळी पुरोहित वसिष्ठ.
सुदासाचे दुसऱ्या काळीं ( अश्वमेध कालीं ) पुरोहित विश्वामित्र.
सुदासाच्या पूर्वजांचे पुरोहित भारद्वाज.
सुदासाचे मित्र पृथु आणि परशु.
सुदासाचे तृत्सु एका काळीं शत्रु.
सुदासाचे तृत्सु दुसऱ्या काळीं मित्र.
तृत्सूंचे मित्र भरत; एकाकाळीं शत्रु.
सुदास हा भरत होता.

तृत्सूंचा व विश्वामित्राचा संबंध कोठेंच वर्णिला नाहीं. त्यावरून भरत व तृत्सु हे एक नसावेत. दिवोदास किंवा सुदास हा भरत राजा असावा. त्याच्या कुलाचा एका काळीं भारद्वाजाशीं संबंध असेल परंतु दाशराज्ञयुद्धाच्या थोड्या पूर्वीच्या काळांत सुदास पुरोहित विश्वामित्र होते यांत शंका नाहीं. वसिष्ठप्रमुख तृत्सु आणि विश्वामित्रसुदासप्रमुख भरत यांचें वैर झालें असावें. पुढील युद्धामध्यें केव्हां तरी तृत्सूंचा पराजय झाला असावा ( ७. १८, १५ ) आणि केव्हां तरी जय झाला असावा ( ७, ३३, ६ ).

(७. १८, १५ व ७. ३३, ६) या दोन ऋचा परस्पर विरुद्ध अर्थ देणाऱ्या आहेत. समजा, या दोन्हीं ऋचा नसत्याच तर काय झालें असतें? या ऋचांच्या अभावीं फार तर तृत्सु व भरत यांचे कांहीं काल शत्रुत्व होतें ही गोष्ट सिद्ध व्हावयास कठिण जाईल. पण ते तेवढयानें भरत व तृत्सु यांचे परस्पर भिन्नत्व खोटें ठरत नाहीं. तृत्सु व भरत यांमध्यें सख्य वसिष्ठामुळें * किंवा वसिष्ठाच्या देववशीकरणशक्तीवर विश्वास भरतांमध्येंहि उत्पन्न झाल्यामुळें झालें असावें व वसिष्ठामुळें तृत्सूंचें व भरतांचें एकीकरण झालें असावें.

तृत्सु आणि तृत्सूंचा देश किंवा प्रान्त कोठें असावा त्या स्थलासंबंधीं विचार, आतां करूं. त्यांच्या देशाचा नक्की निर्देश करण्यास मुख्य दोनच साधनें उपलब्ध आहेत. एक ‘ आवदिन्द्रं यमुना तृत्सवश्च’ या उल्लेखावरून आणि दाशराज्ञ युद्धाचे वसिष्ठ सूक्त ७. १८ मध्यें वर्णिलेलें स्थल परुष्णी असल्यामुळें यांच्यामधील प्रदेश तृत्सूंचा असावा अशी कल्पना होते. तृत्सूंना ‘प्रतृद’ असेंहि म्हटलें आहे. ‘ आवो गच्छाति प्रतृदो वसिष्ठः ’ ७. ३३, १४ या स्थळीं ‘ प्रतृद ’ शद्बाचा ‘ तृत्सु ’ अशा अर्थी उपयोग केला असून वसिष्ठांच्या सूक्तामध्यें आणखीहि अनुमानिक माहिती मिळेल.

सुदासाची ऐतिहासिक कामगिरी समजून घेण्यासाठीं त्याच्या पूर्वजांची कामगिरी समजून घेतली पाहिजे. जें काम बाप सुरू करतो तेंच मुलास पुढें चालवावें लागतें. राजास जे शत्रु किंवा मित्र बाप उत्पन्न करून ठेवील तेच मुलास पत्करावे लागतात. यासाठीं प्रथम दिवोदास ( हा सुदासाचा बाप अगर आजा असावा) याचें कार्य लक्षांत घेऊं. दिवोदास, अतिथिग्व यासंबंधीं संहितेंत पुढील उल्लेख आढळतात.

**त्वं कुत्सं शुष्णहत्येष्वाविथारंन्धयोतिथिग्वाय शम्बरम्**
**महान्तं चिदर्बुदं निक्रमीः पदा सनादेव दस्यु हत्याय जज्ञिषे ॥**
( १. ५१, ६ ).

शुष्णाचा जेव्हां वध करण्यांत आला त्या वेळेस कुत्साचें तूं रक्षण केलेंस; अतिथिग्वाला भक्षणार्थ शंबर दिलास. शक्तिमान् अर्बुदालाहि तूं पायाखालीं तुडविलेंस. दस्यूंचा वध करण्याकरितां तूं पुरातन कालीं जन्मास आलास.

**त्वं करञ्जमुत पर्णयं वधीस्तेजिष्ठयातिथिग्वस्य वर्तनी ।**
**त्वं शता वंगृदस्याभिनत्पुरोनानुदः परिषूता ऋजिश्वना ॥**
( १. ५३, ८ )

करंज व पर्णय यांचा तूं अतिथिग्वाच्या अत्यंत वैभवशाली फेऱ्यांत वध केला आहेस. ऋजिश्वनानें वेढा घातला त्या वेळेस शरण न जाणाऱ्या वंगृदाच्या शंभर किल्ल्यांचा नाश केला आहेस.

**त्वमाविथ सुश्रवसं तवोतिभिस्तव त्रामभिरिन्द्र तूर्वयाणम् ।**
**त्वमस्मै कुत्समतिथिग्वमायुं महेराज्ञे यूने अरन्धयः ॥**
( १, ५३, १०. )

हे इन्द्रा ! तूं मदत करून सुश्रवसाचें रक्षण केलें आहेस, आणि तुझ्या मदतीनें तूर्वयाणाचें ( रक्षण केलें आहेस. ) कुत्स, अतिथिग्व, आयु ह्यांना ह्या तरुण व बल्वान् राजाचें अंकित केलेंस.

**याभिर्महामतिथिग्वं कशोजुवं दिवोदासं शंबरहत्य आवतम्।**
**याभिः पूर्भिद्ये त्रसदस्युमावतंताभिरूषु ऊतिभिरश्विनागतम्॥**
( १.११२, १४ )

हे अश्वीहो ! तुम्हीं मोठा अतिथिग्व दिवोदास व कशोजु ह्यांचें शंबराचा वध करून त्रसदस्यूचे किल्ल्यांचा चुराडा करून ज्या साधनांनीं पालन केलेंत, तीं साधनें घेऊन तुम्हीं येथें आमचेकडे या.

**यदयातं दिवोदासाय वर्तिर्भरद्वाजायाश्विना हयन्ता ।**
**रेवदुवाह सचनो रथो वां वृषभश्च शिंशुमारश्च युक्ता ॥**
( १. ११६, १८ ).

हे अश्वीहो ! तुम्ही दिवोदासाच्या घरीं आलांत, भरद्वाजाप्रत त्वरेनें आलात–ते वेळीं तुमचे बरोबर आलेला रथ उत्तम धन घेऊन आला, त्याला एक शिंशुमार व एक बैल एकत्र जोडले होते.

**युवं भुज्युं भुरमाणं विभिर्गतं स्वयुक्तिभिर्निवहन्ता पितृभ्य आ ।**
**यासिष्टं वर्तिर्वृषणा विजेन्यं दिवोदासाय महि चेति वामवः॥**
( १. ११९, ४ ).

भुज्यु पाण्याच्या पुरांत धडपड करीत असतां तुम्ही त्याजकडे आलात; उडणाऱ्या व स्वतःच जोडलेल्या पक्ष्यांकडून तुम्हीं त्याला त्याचे वडिलाजवळ नेलें. हे बलवान् हो ! तुम्हीं दूर असलेल्या घराप्रत गेलांत; आणि दिवोदासाला तुम्हीं दिलेली मोठी मदत प्रसिद्ध आहे.—ग्रिफिथ.

**भिनत्पुरो नवतिमिंद्र पूरवे दिवोदासाय महिदाशुषे नृतो वज्रेण दाशुषे नृतो ।**
**अतिथिग्वाय शम्बरं गिरेरुग्रो अवाभरत् ।**
**महो धनानि दयमान ओजसा विश्वा धनान्योजसा ॥**
( १, १३०, ७ ).

तुझ्या कृपेंतला दास कामना पुरविणारा ( पुरु ) जो दिवोदास त्याकरितां–तुझ्या भक्ताकरितां–हे इन्द्रा ! हे नृत्यकर्त्या ! तूं आपल्या वज्रानें नव्वद किल्ल्यांचा चुराडा केलास. त्या बलवानानें अतिथिग्वाकरितां शंबराला पर्वतावरून खालीं आणलें व आपल्या बलानें महाधन वाटलें; आणि आपल्या बलानें सर्व धन देऊन टाकलें.

**स नो नव्येभिर्वृषकर्मन्नुक्थैः पुरां दर्तः पायुभिः पाहि शग्मैः ।**
**दिवोदासेभिरिन्द्रस्तवानो वावृधीथा अहोभिरिव द्यौः ॥**
( १. १३०, १० )

हे पराक्रमी ( इन्द्रा ) ! हे किल्ले फोडणाऱ्या आमच्या नूतन सूक्तांनीं गाइलेला तूं बळकट करणाऱ्या मदतीनें आमचें रक्षण कर. हे इन्द्रा ! दिवोदासाच्या वंशजांनीं स्तविलेला तूं, द्यु जसा दिवसानीं मोठा होत जातो तसा तूं वैभवांत वृद्धिंगत हो.

**अध्वर्यवो यः शतमासहस्रं भूम्या उपस्थेवपज्जघन्वान् ।**
**कुत्सस्यायोरतिथिग्वस्य वीरान्न्यावृणग्भरता सोममस्मै ॥**
( २. १४, ७ )

ज्यानें एक लक्ष ( लोकांचा ) वध केला व त्यांना खालीं पृथ्वीच्या वक्षस्थलावर फेंकून दिलें; ज्यानें अतिथिग्व, कुत्स व आयु यांच्या वीरांनां† मारलें त्याला हे अध्वर्यो ! सोम आणा.

**सरन्धयत्सदिवः सारथये शुष्णमशुषं कुयवं कुत्साय ।**
**दिवोदासाय नवतिं च नवेन्द्रः पुरो व्यैरच्छम्बरस्य ॥**
( २. १९, ६ ).

† वीर याचा अर्थ सायणानीं अभिगन्तृ = शत्रु असा केला आहे.

एकदां त्यानें आपल्या कुत्स सारथ्याला अधाशी व पिकें भक्षण करणारा शुष्ण देऊन टाकला; आणि इन्द्रानें दिवोदासासाठीं शंबराचे नव्याण्णव किल्ले पाडून टाकले.

**अहं पुरो मन्दसानो व्यैरं नवसाकन्नवतीः शम्बरस्य ।**
**शततमं वेश्यं सर्वताता दिवोदासमतिथिग्वंयदावम् ॥**
( ४. २६, ३ ).

सोमाच्या उन्मत्त आनंदांत मी शंबराचे नव्याण्णव किल्ले एकत्र पाडून टाकले; आणि दिवोदास अतिथिग्वाला सहाय्य करतांना शंबराचें वसतिस्थान पूर्णपणें ( मोडून टाकलें. ).

**शतमश्मन्मयीनां पुरामिन्द्रो व्यास्यत् ।**
**दिवोदासाय दाशुषे ॥**
( ४. ३०, २०, ).

हवि देणाऱ्या दिवोदासाकरितां इन्द्रानें दगडांचे शंभर किल्ले उलथून टाकले.

**त्वमिमा वार्या पुरु दिवोदासाय सुन्वते ।**
**भरद्वाजाय दाशुषे ॥**
( ६. १६, ५ ).

पुढें ओतणाऱ्या दिवोदासाला–पारितोषिकें ( किंवा देणग्या ) देणाऱ्या भरद्वाजाला–तूं हे पुष्कळ वर दिलेस.

**प्रतत्ते अद्या करणं कृतं भूत्कुत्सं यदायुमतिथिग्वमस्मै ।**
**पुरू सहस्रा निशिशा अभिक्षामुत्तूर्वयाणं धृषता निनेथ ॥**
( ६. १८, १३ ).

तूं आज केलेलें कृत्य प्रसिद्ध आहे. ( आज ) तूं त्याच्या करितां इतर पुष्कळ हजारोंसह कुत्स, आयु व अतिथिग्व यांनां नमविलेंस; आणि तूर्वयाणाला धैर्यानें मुक्त केलेंस.

**त्वं कविं चोदयोर्कसातौ त्वं कुत्साय शुष्णं दाशुषे वर्क ।**
**त्वं शिरो अमर्मणः पराहन्नतिथिग्वाय शंस्यं करिष्यन् ॥**
( ६. २६, ३ ).

सूर्यप्रकाश जिंकण्यास तूं त्या ऋषीला भाग पाडलेंस; सुशील कुत्सासाठीं शुष्णाचा नाश केलास, अभेद्य राक्षसाचें डोकें तूं कापलेंस त्या वेळेस अतिथिग्वाची स्तुति तूं जिंकलीस.– ग्रिफिथ

**त्वं तदुक्थमिन्द्र बर्हणा कः प्रयच्छता सहस्रा शूर दर्षि ।**
**अवागेर्दासं शम्बरं हन्प्रावो दिवोदासं चित्राभिरूती ॥**
( ६. २६, ५ ).

हे वीरा ! तूं ज्या वेळेस लढणाऱ्या एक लक्ष शत्रूंचा वध केलास त्या वेळेस तूं स्तुतीचें फल दिलेंस. पर्वतावरच्या दासशंबराचा तूं वध केलास आणि चमत्कारिक साधनांनीं दिवोदासाला मदत केलीस.

**त्वं शतान्यव शम्बरस्य पुरो जघन्थाप्रतीनि दस्योः ।**
**अशिक्षो यत्र शच्या शचीवो दिवोदासाय सुन्वते सुतक्रे**
**भरद्वाजाय गृणते वसूनि ॥**
( ६. ३१, ४. ).

दस्युशंबराचे शंभर अभेद्य किल्ले तूं त्या वेळेस जमीनदोस्त केलेस, ज्या वेळेस हे बलवान् ! हवि देणाऱ्या दिवोदासाला तूं बलानें मदत केलीस आणि हे सोम विकत घेणाऱ्या ! तुझी स्तुति करणाऱ्या भरद्वाजाला श्रीमान् केलेंस.

**यस्य त्यच्छम्बरं मदे दिवोदासाय रन्धयः ।**
**अयं स सोम इन्द्र ते सुतः पिब ॥**
( ६. ४३, १ ).

ज्याच्या उन्मत्त आनंदांत तूं एकदां शंबराला दिवोदासाचें भक्ष्य केलेंस तो हा सोम तुझ्यासाठीं दाबून काढला आहे. हे इन्द्रा, पी.

**प्रस्तोक इन्नु राधसस्त इन्द्र दश कोशयीर्दश वाजिनोदात् ।**
**दिवोदासादतिथिग्वस्य राधः शाम्बरं वसु प्रत्यग्रभीष्म ॥**
( ६. ४७, २२ ).

इन्द्रानें त्या धनांतून प्रस्तोकाला दहा कोश ( म्हणजे द्रव्यनिधि ) व दहा जोमदार घोडे दिले आहेत. दिवोदासापासून आम्हांला शंबराचें धन–अतिथिग्वानें दिलेली देणगी–मिळाली आहे.

**दशाश्वान्दश कोशान्दश वस्त्राधिभोजना ।**
**दशो हिरण्यपिण्डान्दिवोदासादसानिषम् ॥**
( ६. ४७, २३ ).

दहा घोडे, दहा द्रव्यनिधीच्या पेट्या आणि त्यांच्या भरीला दहा वस्त्रांची आणखी एक देणगी हीं व सोन्याच्या दहा लगडी दिवोदासाच्या हातांतून मला मिळाल्या आहेत.

**इयमददाद्रभसमृणच्युतं दिवोदासं वध्र्यश्वाय दाशुषे ।**
**या शश्वन्तमाचखादावसं पणिं ता ते दात्राणि तविषा**
**सरस्वति ॥**
( ६. ६१, १ ).

केवल आत्महित पाहणारे, दान न देणारे अशा पणींनां जिनें खाऊन टाकलें आणि यज्ञ करणाऱ्या वध्र्यश्वाला ऋणमोचक दिवोदास नांवाचा पुत्र दिला ती ( ही सरस्वती होय ). हे सरस्वती, तुझें हें दान फार मोठें आहे.

**इमं नरो मरुतः सश्चतानु दिवोदासं न पितरं सुदासः ।**
**अविष्टना पैजवनस्य केतं दूणाशं क्षत्रमजरं दुवोयु ॥**
( ७. १८, २५ ).

सुदासाचा पिता दिवोदास याची ज्याप्रमाणें तुम्हीं सेवा केली तशी हे शूर मरुत हो ! तुम्ही त्याची–सुदासाची सेवा करा. अनुग्रह करून पैजवनाच्या इच्छेला पाठिंबा द्या. त्याच्या टिकणाऱ्या व बळकट प्रदेशाचें विश्वासानें रक्षण करा.

**प्रियास इत्ते मघवन्नभिष्टौ नरो मदेम शरणे सखायः ।**
**नितुर्वशं नियाद्वं शिशीह्यतिथिग्वाय शंस्यं करिष्यन् ॥**
( ७. १९, ८ ).

हे मघवन् ! ज्या मित्रांवर तूं प्रेम करतोस ते आम्ही अतिथिग्वाची इच्छा पूर्ण करण्यास व तुर्वश व यदु यांचा गर्व हरण्यास खुषी असे–तुझ्या संरक्षणाखालीं तुझ्या सन्निध आनंदांत असो.

**य आयुं कुत्समतिथिग्वमर्दयो वावृधानो दिवे दिवे ।**
**तं त्वा वयं हर्यश्वं शतक्रतुं वाजयन्तो हवामहे ॥**
( ८. ५३, २ ).

उत्कर्ष पावणाऱ्या ज्यानें आयु, कुत्स आणि अतिथिग्व यांचा फडशा पाडला त्या नीलाश्व इन्द्राला हविर्युक्त आम्ही दररोज बोलावितों.

पुरः सद्य इत्थाधिये दिवोदासाय शम्बरम् ।
अध त्यं तुर्वशं यदुम् ॥
( ९. ६१, २ ).

सत्वशील दिवोदासाकरितां जलदीनें किल्ले व शंबर यांचा चुराडा केला; नंतर यदु आणि तो तुर्वश ( यांचा चुराडा केला ).

अहं रन्धुभ्यो अतिथिग्वमिष्करमिषं न वृत्रतुरं विक्षु धारयम् ।
यत्पर्णयघ्न उत वा करञ्जहे प्राहं महे वृत्रहत्ये अशुश्रवि ॥
( १०. ४८, ८ ).

ज्या वेळेस शत्रूला ठार मारणाऱ्या मोठ्या लढाईत–जींत करंज पडला व पर्णय पडला तींत–मीं वैभव संपादन केलें, त्या वेळेस गुङ्गूंच्या विरुद्ध मी आतिथिग्वाला शक्तिमान् केलें आणि सामर्थ्य जिंकणाऱ्या वृत्राप्रमाणें त्याला मीं लोकांच्या मध्यें ठेविलें.

वरील उताऱ्यांत खालील ऐतिहासिक महत्त्वाचीं स्थलें येतात.

( १ ) कुत्सानें शुष्णास मारिलें.

( २ ) अतिथिग्वानें शंबरास मारिलें.

( ३ ) करंज आणि पर्णय यांचा अतिथिग्वाच्या फेऱ्यांत नाश झाला.

( ४ ) ऋजिश्वानें वेढा देऊन वंगृदाचीं शंभर पुरें विध्वंसिलीं.

( ५ ) जी ऋचा तूर्वयाणाच्या रक्षणाबद्दल इंद्रास गाते तीच सुश्रव्याच्या रक्षणाबद्दल कुत्स, अतिथिग्व आणि आयु हे एका तरुण राजाचे अंकित झाल्याबद्दल इंद्राची स्तुति करते.

( ६ ) शंबरास मारण्यानें दिवोदासाप्रमाणें कशोजूचेंहि पालन झालें व किल्ल्याच्या नाशानें त्रसदस्यूचें रक्षण झालें.

( ७ ) भरद्वाजाप्रत अश्वींच्या आगमनाचा परिणाम दिवोदासाच्या घरीं अश्वी येण्यांत होतो.

( ८ ) जो गाण्याचा पक्ष दिवोदासाच्या तर्फेचा होता तो भुज्यूंच्या सोडवणुकीबद्दल अश्वींची स्तुति करतो.

( ९ ) दिवोदासांनीं भरद्वाजाला धन दिलें.

( १० ) तूर्वयाणाकडून अतिथिग्वादि त्रयीच्या पराभवाबद्दल इंद्राची स्तुति भरद्वाजांकडून होत आहे.

( ११ ) दिवोदासानें शंबराची संपत्ति भारद्वाजांस दिली.

( १२ ) सरस्वतीनें वध्र्यश्वाला दिवोदास दिला व पणींनां खाल्लें अशी भरद्वाज स्तुति करतात.

( १३ ) तुर्वश व यदु यांचा गर्व हरण झाल्यानें अतिथिग्वाची इच्छा पूर्ण होते.

( १४ ) अतिथिग्वाला गुंगूंच्या विरुद्ध इंद्रानें शक्तिमान् केलें. ही गोष्ट करंज व पर्णय यांच्या दिवोदासाकडून पराभवाच्या प्रसंगीं झाली.

आतां या विधानांची परस्परसंगति कितपत लागते तें पाहूं.

दिवोदास, आयु व कुत्स हा मित्रसंघ दिसतो. यांचा तूर्वयाणानें पराभव केला. उलट एकदां या मित्रसंघानें तूर्वयाणाचा पराजय केला असावा. दिवोदास यानें शंबर, पर्णय, करंज व गुंगू लोक यांचा पराजय केला.दिवोदासानें शंबरास मारून कशोजूचें रक्षण केलें. दिवोदासानें तुर्वश व यदु यांचा गर्व हरण केला' कुत्सानें शुष्णाचा पराजय केला.

त्रसदस्यु व दिवोदास यांचा एका ऋचेंत उल्लेख आहे. पण त्यावरून त्यांचें समकालीनत्व सिद्ध होत नाहीं. दोन भिन्नकालीन क्रियांचें श्रेय उत्तरकालीन गायकांनीं देवतेस दिलें आहे. तसेंच पणी व वध्र्यश्व यांचाहि विरोध सिद्ध होत नाहीं. भुज्यु व दिवोदास यांचेंहि समकालीनत्व सिद्ध होत नाहीं.

ऋजिश्वानें वेढा देऊन वंगृदाचीं शंभर पुरें विध्वंसिलीं, यावरून कल्पनेचे बरेच वळसे दिल्याशिवाय वंगृदाचें व शंबराचें ऐक्य व ऋजिश्वाचें व अतिथिग्वाचें ऐक्य सिद्ध होत नाहीं.

भारद्वाजांनीं दिवोदासाच्या घरची दक्षिणा खाऊन तूर्वयाणाकडून अतिथिग्वादि त्रयीचा पराभव झाला याबद्दल इन्द्राची स्तुति करावी हें जरा चमत्कारिक दिसतें. असेंहि शक्य आहे कीं, ज्याप्रमाणें विश्वामित्र आणि वसिष्ठ हे कामापुरते गुरुवर्य पैजवनानें निर्माण केले त्याप्रमाणेंच भारद्वाजहि तात्पुरते पुरोहित असावेत. कां कीं, पैजवन जर पुरूंपैकीं असतील तर त्यांचे उपाध्याय अत्रि ठरतात. असें शक्य आहे कीं, राजे व उपाध्याय हे बरोबर हिंडत नसावेत आणि स्थानिक उपाध्यायांचा स्वीकार हा तत्कालीन राजनीतीचा एक भाग असावा.

एवंच दिवोदासाविषयीं आपणांस माहिती येणेंप्रमाणें देता येईल.

दिवोदासअतिथिग्व यांसंबंधीं अनेक उल्लेखांवरून अगदीं प्राचीन वैदिक युगांत दिवोदासअतिथिग्व याचें प्रामुख्य दिसून येतें. तो वध्र्यश्वाचा ( ऋ. ६. ६१, १ ) मुलगा व भरत लोकांमधील प्रसिद्ध राजा सुदास ह्याचा बाप किंवा आजा होता. दिवोदास हा भरत ( ऋ. ६. १६, ४; ५; १९ ) होता व तुर्वश व यदु ( ऋ. ७. १९, ८; ९. ६१, २ ) ह्या लोकांचा वैरी होता. हेंच धन त्यानें आपला मुलगा सुदास यास पैतृक धन म्हणून देऊन ठेविलें. असो. त्याचा मुख्य शत्रु शंबर दास हा होय. हा डोंगरांत राहणाऱ्या लोकांचा मुख्य असून त्याचा पराभव अनेकदां दिवोदासानें केलेला आहे.दिवोदास हा आपल्या बापाप्रमाणें अग्नीचा मोठा उपासक होता. कारण ऋग्वेदामध्यें अग्नीला दिवोदासाच्या नांवानें संबोधिलें आहे. उलटपक्षीं त्याचा आयु व कुत्स यांच्या बरोबर इंद्राच्या मदतीनें तूर्वयाणानें पराजय केला असें वर्णन आलेलें आहे ( ६. १८, १३ वगैरे. ).

एकदां ( ६. ६१, १ व पुढील ) असा उल्लेख आला आहे कीं, दिवोदासाचें पणी, पारावत व बृसय यांच्याशीं युद्ध झालें. त्यावरून हिलेब्रँटनें असें अनुमान काढलें आहे कीं, तो अरकोशियामधल्या ज्या जाती होत्या त्यांच्याशीं लढण्यांत गुंतला होता; व ज्या अर्थी दिवोदास ह्याचा अर्थ स्वर्गातला दास असा होतो त्या अर्थी तो स्वतःच दास असावा हें अनुमान असंभवनीय दिसतें. कारण ज्या सरस्वती नदीवर दिवोदास व अरकोशियामधील जाती यांमध्यें युद्ध झालें ती व अरकोशियामधल्या हरक्विटी ही नदी एक असणें

शक्य नाहीं. अर्थात् ही सरस्वती नदी मागाहून प्रसिद्ध झालेली सरस्वती नदीच असली पाहिजे, ही गोष्ट एकदां कबूल केली म्हणजे पंचविंश ( ९. ४, ११ ) ब्राह्मणांत यमुना नदीजवळ पूर्वेकडे पारावत होते असा जो उल्लेख आलेला आहे त्याला बाध येतो. बर्गेनचें असें मत आहे कीं, दिवोदास व अतिथिग्व ह्या दोन निराळ्या व्यक्ती होत्या पण ज्या अर्थी ह्या दोन निरनिराळ्या माणसांचीं कृत्यें अगदीं तंतोतंत सारखींच आहेत त्या अर्थी ह्या दोन व्यक्ती निरनिराळ्या मानणें युक्त दिसत नाहीं.

दिवोदासानें ज्या लढाया मारल्या त्या अर्थात् दाशराज्ञयुद्धापूर्वीच्या होत्या. सिंहावलोकनासाठीं त्या लढाया पुन्हां देतों.

( १ ) तूर्वयाणाबरोबर मित्रसंघाची पहिली लढाई.
( २ ) शंबराबरोबर लढाया.
( ३ ) तुर्वश व यदु यांबरोबर लढाई.
( ४ ) पर्णय व करंज यांबरोबर लढाई.
( ५ ) गुंगूलोकांबरोबर लढाई.

ऋजिश्वाची वंगृदाबरोबर लढाई केव्हां झाली व तिचा दिवोदासाशीं संबंध काय होता हे स्पष्ट होत नाहीं. भुज्यू कोणत्या लढाईंत होते हें कळत नाहीं.

दाशराज्ञयुद्धापूर्वी मित्रसंघानें आणखी एक युद्ध करून तूर्वयाणाचा पराभव केलेला दिसतो. हा पराभव सुदासाच्या कारकीर्दींत झाला. या पराभवामुळें तूर्वयाणानें दडपलेलीं राष्ट्रें स्वतंत्र होऊन पुढें भांडूं लागलीं असावींत; आणि त्यांत सुदास इतरांवर वर्चस्व स्थापण्यास जेव्हां उद्युक्त झाला तेव्हां त्याच्या विरुद्ध असलेल्या यदुतुर्वशांस पुरुहि मिळाले असावेत असें दिसतें.

सुदास, दिवोदास व पिजवनः–सुदासाला "चत्वारो मा पैजवनस्य दाना..............सुदासे" ( ७. १८, २३ ). येथें " पैजवनस्य सुदासः " असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें त्याच सूक्तांत ( ' दिवोदासं न पितरं सुदासः ' ) सुदासाचा पिता दिवोदास त्याला ज्याप्रमाणें सेवीत होतां त्याप्रमाणें या सुदासाला सेवा असें म्हटलें असून पैजवन सुदासाचें घर राखा असें ' अविघ्ना पैजवनस्य केतम् ' (७. १८, २५) या त्या पुढीलच वाक्यानें दर्शित केलें आहे.

याशिवाय आणखी एका स्थळीं ' द्वे नप्तु दैववतः शते गोः...... सुदासः । अर्हन्नग्ने पैजवनस्य ' येथें ' देववतो नप्तुः पैजवनस्य सुदासः ' असा स्पष्ट उल्लेख आहे.

सुदासाचा बाप, आजा व पत्नी.– वरील विवेचनावरून सुदास हा दिवोदासाचा पुत्र होता व पैजवन होता इतकें स्पष्ट होतें. पिजवन हा शब्द ऋग्वेदांत येत नाहीं. निरुक्तकारांनीं पिंजवन हा सुदासाचा बाप म्हणजे दिवोदास असें म्हटलें आहे. पण त्यास खात्रीलायक पुरावा नाहीं. पैजवन हें कुलनाम असणें शक्य आहे.

सुदासाच्या बायकोचें नांव उल्लेखिलें गेलें आहे असा संशय येतो. तें नांव सुदेवी होय. ती त्याला अश्वींनीं दिली. 'याभिः सुदासः ऊहथुः सुदेव्यम् ' या ठिकाणीं सायणांनीं ' सुदेव्यं ' याचा अर्थ ' प्रशस्तं धनं ' असा केला आहे. परंतु ' सुदेव्यं ' हें ' सुदेवी ' असें पाणिनीच्या व्याकरणाप्रमाणें करतां येतें (पा. सू. ६. १, १०६;१०७ ),

' इयमददाद्रभसमृणच्युतं दिवोदासं वध्र्यश्वाय '–' इयं ( सरस्वती ) दिवोदासं वध्र्यश्वाय अददात् '–ही वध्र्यश्वाला दिवोदास देती झाली, या भरद्वाजाच्या म्हणण्यावरून दिवोदास हा वध्र्यश्वाचा मुलगा ठरतो.

याच्या उलट एके स्थलीं 'नप्तुः देववतः–..........सुदासः। अर्हन्नग्ने पैजवनस्य' । या ठिकाणीं देववताचा नातू सुदास ( पैजवन ) असें म्हटलें आहे.

यावरून सुदास याचा पिता दिवोदास पिजवन असें ठरतें. परंतु दिवोदास पिजवनाचा बाप देववत् कीं वध्र्यश्व याचें उत्तर स्पष्टपणें देतां येणार नाहीं. या ठिकाणीं वध्र्यश्व आणि देववत् भिन्न दिसतात. या दोघांस सुदासामार्फत न जोडतां स्वतंत्रपणें जोडणारा उल्लेख नाहीं. देववत् हें वध्र्यश्वाचें विशेषणहि असणें शक्य आहे, किंवा सुदास हा देववताचा दौहित्र असणें शक्य आहे. भरद्वाजमंडळांत-म्हणजे सहाव्या मंडळांत–भरद्वाज दिवोदासाची वाखाणणी करितो. त्याच मंडळांत ' वध्र्यश्वा 'ला दिवोदास सरस्वतीनें दिल्याचा उल्लेख आहे व ' देववताचा नातू ' अशा प्रकारचा सुदासाविषयीं उल्लेख वसिष्ठ मंडळांत–म्हणजे सातव्या मंडळांत–आहे. ' देववताचा नातू ' असें म्हणण्यांत वसिष्ठांचा कांहीं हेतु तर नसेलना?

सुदासाचा अश्वमेधः– सुदासानें एक घोडा सोडल्याचा उल्लेख आहे. ' उप प्रेत कुशिकाश्चेतयध्वमश्वंराये प्रमुञ्चता सुदासः '– ' हे कुशिकांनो ! चला. सावध व्हा. पैसे मिळविण्याकरितां सुदासाचा अश्व सोडा असें विश्वामित्राच्या तिसऱ्या मंडळांत म्हटलें आहे ( ३. ५३, ११ ). त्याच सूक्तांत विश्वामित्रानें सुदासाकडून यज्ञ करविला [ " विश्वामित्रो यदवहत्सुदासम् " ( ३. ५३, ९ ) ] असाहि उल्लेख आला आहे. ' आशुश्च नेदभिपित्वे जगाम ' ( ७. १८, ९ ) या स्थळावरून, सुदासानें अश्वमेधाचा घोडा सोडला होता आणि अश्वाला कोणीं तरी अटकाव केला, परंतु इन्द्राच्या मदतीनें तो त्याला मिळाला असें निघतें. ऐतरेय ब्राह्मणांत 'वसिष्ठाच्या पौरोहित्याखालीं सुदासानें अश्वमेध यज्ञ केला ' असा उल्लेख आहे, अशी शंका घेण्यास जागा आहे. तथापि त्या उल्लेखाचें स्वरूप लक्षांत घेतल्यास शंका दुर्बल ठरते. ऐतरेय ब्राह्मणांत ' वसिष्ठःसुदासं पैजवनमभिषिषेच ...... पृथिवीं जयन्..........अश्वेन मेध्येनेजे ' असा उल्लेख आला आहे. असें असावें कीं, अश्वमेध वसिष्ठाच्या हातून न होतां केवळ साम्राज्याभिषेक वसिष्ठाच्या हातून झाला असावा.

सुदास आणि हिंसक लोकः–सुदास हा विशेष प्रकारें सुधारलेला, थोर व अहिंसक आणि सुदासाचे शत्रू हिंसक असा भेद स्तोत्रकर्त्या वसिष्ठांनीं कांहीं ठिकाणीं दर्शित केला आहे.

' जहि वधर्वनुषो मर्त्यस्य ' म्हणजे हिंसक लोकांचें हत्यार नाहींसें कर असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. 'वनुष्' चा अर्थ हिंसक

असल्याचीं निरुक्तांत व सायणाचार्यांच्या भाष्यांत अनेक ठिकाणीं उदाहरणें आलीं आहेत. यावरून 'वनुष् ह्मणजे ' हिंसक ' म्हणून कोणी प्रसिद्ध लोक असावेत. व तादितर लोक आपणांस अहिंसक असें ह्मणवीत असावेत.

सुदासाचे शत्रुः– आतां सुदासाच्या शत्रूंकडे वळूं.

शिम्युः–सुदासाच्या विरुद्ध लढणाऱ्या दहा राजांत शिम्यु हा एक होता. शिम्यु हें एक प्रकारच्या लोकांचें किंवा राजाचें नांव असून दाशराज्ञ युद्धांत सुदासानें यांचा पराभव केला (७. १८, ५). दस्यूबरोबर याचा उल्लेख दाखविण्यांत आला आहे त्यावरून हा दस्यु असावा असें विधान झिमरनें केलें असावें. शिम्यूंस त्यांचे विरोधी दस्यू म्हणत यावरून दस्यु म्हणून एक जात होती आणि शिम्यु तिचा एक पोटभेद होता असें म्हणणें हा मात्र कल्पनेचा बाजार आहे, हें आर्य आणि दस्यु यांविषयींच्या विवेचनावरून लक्षांत येईल.

कांहीं ऋचांवरून असें स्पष्ट दिसतें कीं शिम्यु आणि नहुष् यांचा कांहीं तरी संबंध असावा. याशिवाय भरत, वार्षागिर, कक्षीवत यांच्याशींहि त्याचा कांहीं तरी संबंध असावा हें खालील ऋचा दाखवितात.

( शिम्युसहोक्त अगरसंबंधी व्यक्तीः– नहुष, आयु, मनु, इला, आश्वघ्न ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान व सुराधस्. )

**न यस्य देवा देवता न मर्ता आपश्चन शवसो अन्तमापुः।**
**स प्ररिक्वा त्वक्षसा क्ष्मो दिवश्च मरुत्वान्नो भवत्विन्द्र ऊती ॥**
(ऋ. १. १००, १५).

ज्याच्या बळाचा अंत द्युलोकामध्यें देवांस ( लागलेला ) नाहीं, मर्त्य मनुष्यांस ( लागलेला ) नाहीं व उदकालाहि लागलेला नाहीं, तो ( इंद्र आपल्या ) तेजानें पृथिवी व द्युलोक यांस व्यापून टाकणारा ( होय ). ( तो ) मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षिता होवो.

**रोहिच्छ्यावा सुमदंशुर्ललामीर्द्युक्षा राय ऋज्राश्वस्य ।**
**वृषण्वन्तं बिभ्रती धूर्षु रथं मन्द्रा चिकेत नाहुषीषु विक्षु ॥**
(ऋ. १०. १००, १६).

आरक्त वर्णाची (आणि) श्याम वर्णाची, अंगानें भरलेली, कपाळावर अलंकार असलेली ( आणि ) स्वर्गी वास करणारी इंद्राची आनंददायक ( अश्वमालिका ) इंद्राला रथांत घालून तो रथ धुरांस आपल्या माना देऊन ऋज्राश्वाला संपत्ति ( देण्यासाठीं ) ओढून आणीत असतांना नाहुषांस ( लोकांस ) दृष्टीं पडत असते.

**एतत्यत्त इन्द्र वृष्ण उक्थं वार्षागिरा अभि गृणन्ति राधः ।**
**ऋज्राश्वः प्रष्टिभिरम्बरीषः सहदेवो भयमानः सुराधाः ॥**
(ऋ. १. १००. १७).

तर हे इंद्रा, हें तुझें स्तोत्र, वृषागिराचे पुत्र ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान ( आणि ) सुराध आणि त्यांचें सख्ये तुज समर्थाप्रत गाऊन तुला हवि अर्पण करीत आहेत.

**दस्यूञ्छिम्यूंश्च पुरुहूत एवैर्हत्वा पृथिव्यां शर्वा नि बर्हीत् ।**
**सनत्क्षेत्रं सखिभिः श्वित्न्येभिः सनत्सूर्यं सनदपः सुवज्रः ॥**
(ऋ. १, १००, १८).

बहुभक्त ( इंद्रानें ) दस्यू शिम्यूंना चपलगामी मरुतांच्या साहाय्यानें पृथिवीवर मारून वज्रानें भेदून टाकिलें. त्या आपल्या तेजःपुंज मित्रांच्या साहाय्यानें क्षेत्र घेतलें, सूर्य हरण करून घेतला सुंदर वज्र धारण करणाऱ्या ( इंद्रा ) नें उदकें हरण केलीं.

शिम्यूंना वरील ऋचांत दस्यू म्हटलें आहे. व इंद्रविरुद्ध केलें आहे. तेव्हां शिम्यूंस जो कवि अनुकूल नाहीं अशाचें हें सूक्त आहे. या सूक्तांत १८ व्या ऋचेंत, नहुषांशीं, शिम्यूंशीं व भरतांशीं लुडविग ह्मणतो त्याप्रमाणें दोस्ती दिसत नाहीं. येथेंच काय पण सबंध वेदांत शिम्यूंविषयीं फारच थोडी माहिती आपणास मिळते.

या सूक्तांत ऋज्राश्वाला संपत्ति देण्यासाठीं इंद्ररथ ओढिला जात आहे ही गोष्ट नहुषांच्या दृष्टीस पडत असते म्हणून विधान आहे. याचा अर्थ काय तें कळत नाहीं. वरील विधानावरून जर नहुषांस ती संपत्ति पाहून दुःख होतें असा ध्वनि निघत असेल तर ती कल्पनाच आहे. तेवढ्यावरून नाहुषांस ऋज्राश्वाचे शत्रू करावे, व सूक्तांत शिम्यूंना दस्यू ह्मटलें आहे ह्मणून शिम्यूंसहि ऋज्राश्वाचे शत्रू बनवावे ही कल्पनेची फार मोठी उडी होय. शिम्यु व नहुष यांची दोस्ती जडविणें ही तर त्याहूनहि उद्दाम उडी आहे. यांच्या दोस्तींत शिम्यूचे शत्रू भरत कसे आणले हें कळत नाहीं.

वार्षागिराचा इतरांशीं संबंध कांहीं कळत नाहीं.

नहुषः– आतां आपण नहुषांसंबंधीं उतारे घेऊं आणि काय माहिती मिळते तें पाहूं.

**त्वामग्ने प्रथममायुमायवे देवा अकृण्वन्नहुषस्य विश्पतिम् ।**
**इळामकृण्वन्मनुषस्य शासनीं पितुर्यत्पुत्रो ममकस्य जायते ॥**
(१. ३१, ११).

हे अग्ने, देव तुला प्रथम आयूकरितां नहुषाचा मनुष्यरूपधारी सेनापति करते झाले. नंतर मनुष्यांना ( धर्म ) शिक्षण देणारी मनूची इळा नांवाची कन्या निर्माण केली नंतर आमच्या पित्याचा पुत्र झालास.– सायण

हे अग्ने देवांनीं तुला सचेतन मानवांत पहिलाच असा जो नहुष त्याच्या घराण्याचा मुख्य केलें. इळेला मानवी प्रजेची उपदेशिका केली व त्या वेळींच आमच्या वंशाच्या जनकास एक पुत्र झाला.– ग्रिफिथ

**चत्वारो मा मशर्शारस्य शिश्वस्त्रयो राज्ञ आयवसस्य जिष्णोः ।**
**रथो वां मित्रावरुणा दीर्घाप्साः स्यूमगभस्तिः सूरो नाद्यौत् ॥**
(१. १२२, १५).

मशर्शाराचे चार व जयशाली आयवस राजाचे तीन पुत्र मला छळतात. हे मित्रावरुण हो तुमचा अति विस्तृत व सुखकरदीप्ति असा रथ सूर्याप्रमाणें प्रकाशो ( आमच्या शत्रूंना भयजनक होवो ).

**यस्ते अग्ने नमसा यज्ञमीट्ट ऋतं स पात्यरुषस्य वृष्णः ।**
**तस्य क्षयः पृथुरासाधुरेतु प्रसर्स्राणस्य नहुषस्य शेषः ॥**
(५. १२, ६).

हे अग्ने, यज्ञयोग्य अशा तुला स्तुतीसह हवि अर्पण करतों, दीप्तिमान् व सर्व कामना पूर्ण करणाऱ्या अशा तुझीं ( स्तुतिरूप ) स्तोत्रें रक्षण करतों, त्या नहुषाचें घर विस्तीर्ण होवो आणि त्याची संतति वाढो.

**आ संयतमिंद्रणः स्वस्तिं शत्रुतूर्याय बृहतीममृध्रं ।**
**यया दासान्यार्याणि वृत्रा करो वज्रिन् सुतुका नाहुषाणि ॥**
( ६. २२, १० ).

हे इंद्र, ज्या संपत्तीच्या योगानें वृत्रादि जे आमचे शत्रू त्यांचा आम्ही नाश करूं आणि दास व नहुष ( नहुष–मनुष्यजात-सायण ) यांनां चांगल्या मार्गाला लावूं तसेंच सारखा ज्ञरा वहात असल्यामुळें जी नाश न पावणारी व क्षेमकारक अशी आहे ती संपत्ति तूं आम्हांला दे.

हे इंद्रा, शत्रूला जिंकण्यासाठीं आम्हांस मोठी व अक्षय अशी शाश्वत समृद्धि दे. त्या योगानें आर्य आणि दास यांचें वैर वृद्धिंगत कर आणि नहुषाचे बाहु बलिष्ठ होऊं दे.–ग्रिफिथ

**यदिंद्र नाहुषीष्वाँओजो नृम्णं च कृष्टिषु ।**
**यद्वा पंचक्षितीनां द्युम्नमाभर सत्रा विश्वानि पौंस्याँ ॥**
( ६. ४६, ७ ).

हे इंद्र, नहुषजातीचें सर्व शौर्य आणि धन तसेंच पंचजनांचें सर्व शौर्यासह असलेलें तेज आम्हांला दे.

इंद्रा, नहुषांच्या जातींत आढळणारी सर्व शक्ति व पराक्रम आणि पंचजन अनुभवीत असलेली दिव्य कीर्ति आणि सर्व पौरुष व प्रभाव एकदम घेऊन ये.–ग्रिफिथ

**उतत्यदाश्वश्व्यं यदिन्द्र नाहुषीष्वा ।**
**अग्रे विक्षु प्रदीदयत ॥**
( ८. ६, २४ ),

हे इंद्रा. नहुषराजाच्या प्रजेमध्यें जें अश्वसंघात्मक सामर्थ्य दिलें तेंच आम्हांस दे.

आणि हे इंद्रा, प्राचीन काळीं नहुषांच्या जातीमध्यें जी वेगवान् अश्वांची संपत्ति चमकत होती ती सर्व संपत्ति आम्हांला दे.–ग्रिफिथ

**आयातं नहुषस्पर्यान्तरिक्षात्सुवृक्तिभिः ।**
**पिबाथो अश्विनामधु कण्वानां सवने सुतम् ॥**
( ८. ८, ३ ).

हे अश्विनांनों, नाहुष लोकांतून, दोषविहीन अशा स्तोत्रांनीं आकर्षिले गेलेले जे तुम्ही ते येथें या. त्याच प्रमाणें अन्तरिक्षांतून इकडे येऊन कण्वगोत्रीय जे आम्ही त्या आमच्या सवनामध्यें पिळलेला मधुर सोमरस प्राशन करा.– सायण

**योमह्यंमंचिदुत्मना मन्दाचित्रं दावने ।**
**अरट्वे अक्षे नहुषे सुकृत्वनि सुकृत्तराय सुक्रतुः ॥**
( ८. ४६,२७ ).

जो तूं ( पृथुश्रवा ) हें पुढें असणारें गवाश्वादिक धन मला दान देण्याकरितां स्वबुद्धीनेंच मान्य करता झालास, शोभनकर्मा तो तूं ( मला दान देणें ) या पुण्य कर्माकरितां अरट्व, अक्ष, नहुष, सुकृत्वन् ( यांनां हुकूम करता झालास ).– सायण

किंवा अरट्वादि राजांपैकींच सुकृत्तर हेंहि एक नांव घेतां येणें शक्य आहे.

वैभवशाली नहुषासह भक्रम रथांत ओढून नेल्या जाणाऱ्या ह्या वैभवशाली व स्वतः उदार असणाराचें मन मला पारितोषिकें देण्याकडे तूं वळविता झालास. हा नहुष मनुष्य जितका विद्वान् असूं शकेल तितका विद्वान् आहे पण मनुष्यापेक्षांहि अधिक पुण्यवान् आहे.–ग्रिफिथ

**स ईं रथो न भूरिषाळयोजि महः पुरूणि सातये वसूनि ।**
**आदीं विश्वा नहुष्याणि जाता स्वर्षाता वन उर्ध्वानवन्त ॥**
( ९. ८८, २ ).

आम्हांला विपुल संपत्ति देण्याकरितां रथाप्रमाणें बहुत भार सहन करणाऱ्या सोमाची योजना केली जाते. योगानंतर आम्हांला विरोधी असणारीं सर्व माणसें संग्रामांत उन्मुख जावोत ( म्हणजे नष्ट होवोत ).–सायण

हे शक्तिमान् ( इंद्रा ) ! विपुल संपत्ति मिळविण्याकरितां एखाद्या ऐसपैस रथामध्यें सोम जोडला आहे. नंतर नहुनीं संग्रामांत मिळे. ग्रिफिथ

संग्रामांत मिळविलेल्या विजयांचा उत्सव त्यांनीं यज्ञांत केला. [ वरील ऋचेच्या दुसऱ्या चरणाचा आपणांस यत्किंचितहि अर्थ समजत नाहीं अशी ग्रिफिथनें आपल्या पुस्तकांत प्रांजलपणें कबुली दिली आहे. ]

**वीती जनस्य दिव्यस्य कव्यैरधि सुवानो नहुष्येभिरिन्दुः ।**
**प्रयोनृभिरमृतोमर्त्येभिर्मर्मृजानो विभिर्गोभिरद्भिः ॥**
( ९. ९१, २ ).

सज्जनांनीं स्तुति केलेला, नहुष्यांनीं पिळलेला व मरणाधीन मानवांनीं बैलांच्या पवित्र चर्मांच्या ( सोमरस पिळण्यास तयार केलेल्या यंत्राच्या ) योगानें व पवित्र उदकांच्या योगानें पिळलेला अमर असा सोमरस, स्वर्गस्थ देवांनीं भक्षण करावा म्हणून यज्ञाप्रत जातो. –सायण

बकरीं, गाई व उदकें ह्यांच्या साहाय्यानें मरणाधीन मनुष्यांनीं सुंदर व अमर केलेले व हुशार नहुष्यांनीं पिळलेले सोमरसाचे थेंब स्वर्गनिवासी लोकांचें भक्ष्य होतात.–ग्रिफिथ

**अहं सप्त हा नहुषो नहुष्टरः प्राश्रावयं शवसा तुर्वशं यदुम् ।**
**अहन्य न्यं सहसा सहस्करं नवव्राधतो नवतिंच वक्षयम् ॥**
( १०. ४९, ८ ).

इंद्र म्हणतोः– नमुची वगैरे सात दैत्यांचा मीं संहार केला आहे तसेंच शत्रूंचाहि शत्रु असणारा जो मी त्यानें स्वसामर्थ्यानें तुर्वश व यदु ह्या दोघांनां ( शत्रु संबंधीं गाईच्या प्रदानानें )प्रसिद्धीस आणिलें. त्याचप्रमाणें माझ्या एका स्तोत्रकर्त्याला अत्यंत बलिष्ठ असा केला, आणि शत्रूच्या भरभराटीस चढणाऱ्या नव्याण्णव पुरांचा नायनाट ( विध्वंस ) केला.

मी नहुषापेक्षां बलिष्ठ आहे; मीं सातांनां मारलें. मीं बलानें यदु व तुर्वश यांनां अर्जितावस्थेस आणलें. मीं दुसऱ्या एकाला

खालीं आणिलें व वलानें मीं बलिष्ट नव्याण्णवांची सत्ता वाढू दिली.-ग्रिफिथ

**सद्वृह्णे मनुष ऊर्ध्वसान आसाविषदर्शसानाय शरुम्।**
**सनृतमो नहुषोस्मत्सुजातः पुरोभिनदर्हन्दस्युहत्ये ॥**
(१०.९९, ७).

तो इंद्र शत्रूकडून मारला जाणारा जो आपला मानवी स्वभक्त त्याला शौर्यादि साधनसम्पत्ति देऊन व शत्रुहिंसक आयुधें देऊन शत्रूंचा फडशा पाडतो. त्याचप्रमाणें मनुष्यांचा नेता व पूज्य असणारा तो इंद्र आमच्या करितां प्रादुर्भूत होऊन संग्रामामध्यें शत्रूंच्या शरीराचा भेद करतो ( शत्रूंचा संहार करतो ).

तो स्वतः उच्चत्व पावला आणि त्यानें कपटी व बलात्कार करणाऱ्या शत्रूवर बाण सोडला. बलिष्ठ दीप्तिमान् व वीर्यवान् अशा त्यानें जेव्हां दस्यूंनां मारलें तेव्हा आमच्या करितां नहुषाचें किल्ले फोडले.-ग्रिफिथ

वर उद्धृत केलेल्या उताऱ्यांवरून जे मुद्दे सुचतात ते येणेंप्रमाणें:-
( १ ) आयूकरितां नहुषांचा सेनापति अग्नीला केलें-ह्मणजे नहुषाच्या पराक्रमानें अग्नीचा कांहीं फायदा व्हावयाचा होता असा ध्वनि काढावा कीं आयूला ठोक देण्याकरितां नहुषाचा सेनापति अग्नि बनला असें समजावें, हा प्रश्न १. १३१, ११ मध्यें उत्पन्न होतो.

( २ ) दास व नहुष यांनां चांगल्या मार्गाला लावूं, या उल्लेखाचाहि अर्थ समजत नाहीं.

( ३ ) नहुष जातीचें सर्व शौर्य आणि धन तसेंच पंचजनांचें शौर्य कवीनें आपल्या लोकांकरितां मागितलें आहे.

( ४ ) नहुष राजाचें सामर्थ्य अश्वसंघात्मक होतें असें दिसतें.

( ५ ) अश्वींनां नहुषांकडून बोलावून घेतलें आहे. म्हणजे ८. ८,३ चाहि कर्ता नहुषांच्या विरुद्ध आहे.

( ६ ) ८. ४६, २७ चे दोन अर्थ सायणांनीं इतके भिन्न दिले आहेत कीं त्यांवरून कांहीं एक निर्णय काढतां येत नाहीं.

( ७ ) ९. ८८, २ या ऋचेवरून कांहीं एक बोध होत नाहीं.

( ८ ) १०. ४९, ८ मध्यें इंद्र ' मी नहुषापेक्षां बलिष्ठ आहें ' असें म्हणतो त्यावरून आणि पूर्वीच्या नहुषांचे बल याचणाऱ्या उल्लेखावरून नहुषांचें बल स्पष्ट होत आहे.

( ९ ) १०. ९९, ७ मध्यें दस्यूंनां मारणें व नहुषांचें किल्ले फोडणें या दोन्ही इन्द्राच्या क्रिया दाखविल्या आहेत. त्यावरून गाता नहुषांस दस्यूंप्रमाणें लेखीत होता असें दिसतें.

( १० ) १०. ६३, १ मध्यें ' ययातेर्येनहुष्यस्य बर्हिषि देवा आसते ते अधिब्रुवन्तु नः ' । येथें ययातीला नहुष्य म्हटलें आहे.

नहुष.- वरील उल्लेखावरून असें दिसतें कीं नहुष हें राष्ट्र बलवान् असावें. त्या लोकांपाशीं घोडे असावेत, पण त्यांचा व शिम्यूंचा कांहीं एक संबंध नसावा. दाशराज्ञयुद्धामध्यें त्यांचा कांहीं एक संबंध लावतां येत नाहीं. पुढें महाभारतांत नहुषास इन्द्रपद देवविलें आहे, आणि शचीकरितां नहुष हा धडपडतो आहे असें हि दाखविलें आहे. या कथेला उगम उत्पन्न होईल अशा कांहीं कथेचें अस्तित्व ऋचा दाखवितात. नहुषांनां दस्यू म्हटलें आहे.

महाभारतांत नहुषास आयूचा पुत्र म्हटलें आहे, परंतु त्याला वेदांत आधार सांपडत नाहीं. मशर्शाराचे चार व आयवसाचे तीन पुत्र मला पीडा देतात, असा उल्लेख १. १२२, १५ मध्यें आहे. पण त्यावरून तो नहुषाचा उल्लेख आहे असें वाटत नाहीं. आयवस व मशर्शार हे वार्षागिरांचे राजे होते असा संबंध लुडविग् लावूं पहात आहे, तो आम्हांस मान्य करतां येत नाहीं.

तुर्वश.- आतां तुर्वशांकडे वळूं. हे बडे जाडे प्रतिस्पर्धी दिसतात. आपल्या पद्धतीप्रमाणें परिचयार्थ तुर्वशा संबंधाच्या कांहीं ऋचा अगोदर घेऊं.

**अग्निना तुर्वशं यदुं परावत उग्रादेवं हवामहे ।**
**अग्निर्नयन्नववास्त्वं बृहद्रथं तुर्वीतिं दस्यवे सहः ॥**
(१. ३६, १८ ).

अग्नीच्या द्वारें तुर्वशाला, यदूला व उग्रादेवाला दूर प्रदेशाहून बोलावितो. राक्षसाविरुद्ध सारथि अग्नी नववास्त्व, बृहद्रथ ( व ) तुर्वीति यांजला येथें आणो.

**त्वमाविथ नर्यं तुर्वशं यदुं त्वं तुर्वीतिं वय्यं शतक्रतो ।**
**त्वं रथमेतशं कृत्व्ये धने त्वं पुरो नवतिं दम्भयो नव ॥**
(१. ५४, ६ ),

हे शतप्रज्ञ इन्द्रा तूं नर्याला, तुर्वशाला, यदूला, तुर्वीतीला व वय्याला रक्षिलेंस. नव्याण्णव नगरें विध्वंसिलींस.

**त्वं धुनिरिन्द्र धुनिमतिर्ऋणोरपः सीरा न स्रवन्तीः ।**
**प्रयत्समुद्रमति शूरपर्षि पारया तुर्वशं यदुं स्वस्ति ॥**
(१. १७४, ९ ).

हे इंद्रा ! तूं ( शत्रूंनां ) कांपविणारा आहेस; धुनि नामक असुरानें अडविलेलें पाणी तूं जोरानें वाहणाऱ्या नद्यांप्रमाणें खालीं सोडून दिलेंस. जेव्हां तूं हे शूरा ! समुद्राचें अतिक्रमण करशील तेव्हां यदु आणि तुर्वश यांनां सुखरूपपणें पार पाड.

**अयं यः सृंजये पुरो दैववाते समिध्यते ।**
**द्युमाँ अमित्रदम्भनः ॥**
(४. १५, ४ ).

जो हा प्रसिद्ध अग्नि देववातपुत्र सृंजय सोमयाजीच्या यागासाठीं पूर्वदिशेस असणाऱ्या उत्तरवेदीवर पेटविला आहे, तो शत्रुहिंसक अग्नि दीप्तिमान् झालेला आहे.

**उत त्या तुर्वशा यदू अस्नातारा शचीपतिः ।**
**इन्द्रो विद्वाँ अपारयत् ॥**

शचीपति इंद्रानें स्नानरहित अशा यदुतुर्वशांनां पार तरून नेलें.

(४. ३०, १७ ).

**त्वमपो यदवे तुर्वशायारमयः सुदुघाः पार इंद्र ।**
**उग्रमयातमवहो ह कुत्सं संहयद्वामुशनारंत देवाः ।**
(५. ३१, ८ ).

हे इंद्र पाण्याच्या (नदीच्या) तीरावर तूं यदु आणि तुर्वश यांनां रमविलेंस. नंतर तूं आणि कुत्स उग्र अशा शुष्णाकडे जाऊन त्याला मारलेंस, आणि नंतर तूं कुत्साला आपल्या घरीं पोंचविलेंस. त्या वेळीं तुझी आणि उशना व देव यांचीं भेट झाली.

इंद्रा, तूं लांबच्या तीरावर यदु आणि तुर्वश यांच्या करितां जोरानें वाहणारें पाणी थांबविलेंस. तुम्हीं दोघांनीं (इंद्र आणि कुत्स यांनीं) उग्र अशा (राक्षसा-शुष्णा) वर चाल केली, कुत्साला (घरीं) नेलेंत; त्या वेळीं देव आणि उशना तुझ्याकडे एकाच वेळीं आले-ग्रिफिथ.

**त्वं धुनिरिन्द्र धुनिमतीॠणोरपः सीरा न स्रवन्तीः ।**
**प्रयत्समुद्रमति शूर पर्षि पारया तुर्वशं यदुं स्वस्ति ॥**
(६. २०, १२).

शत्रूंनां कंपित करणाऱ्या इंद्रा, धुनिनामक असुरानें अडवून ठेविलेलीं उदकें तूं नद्याप्रमाणें वहावयास लावलींस; आणि ज्या वेळीं तूं समुद्रांतून (पाण्यांतून) पलीकडे गेलास तेव्हां तूं आपल्या बरोबर यदु व तुर्वश यांनांहि नेलेंस.

**त्वामीळे अधद्विता भरतो वाजिभिः शुनम् ।**
**ईजे यज्ञेषु यज्ञियम् ॥**
(६. १६, ४).

हे अग्ने भरत नामक राजानें सुखाच्या इच्छेनें यज्ञामध्यें यज्ञार्ह अशा तुला हवी अर्पण करून स्तुति केली असतां तूं त्याला दोन प्रकारचें (इष्टप्राप्त्यनिष्टपरिहाररूप) सुख प्राप्त करून दिलेंस.

**त्वमिमा वार्या पुरु दिवोदासाय सुन्वते ।**
**भरद्वाजाय दाशुषे ॥**
(६. १६, ५).

हे अग्ने दिवोदासाला, हवी अर्पण करणाऱ्या भरद्वाजाला तूं पुष्कळ वर देतोस.

**वधीदिन्द्रो वरशिखस्य शेषोऽभ्यावर्तिने चायमानाय शिक्षन् ।**
**वृचीवतो यद्धरियूपीयायां हन्पूर्वे अर्धे भियसापरो दर्त ॥**
(६. २७, ५).

अभ्यावर्ती चायमानाकरितां इन्द्रानें वरशिखाचें बीज नष्ट केलें. "हरियूपीया" येथें त्यानें वृचीवतांच्या अघाडीच्या सैन्याचा नाश केला व मागच्या रांगेंतील सैन्य भीतियुक्त होत्सातें पळून गेलें.

**यस्य गावावरुषा सूयवस्यू अंतरूषु चरतो रेरिहाणा ॥**
**स सृंजयाय तुर्वशं परादाद्वृचीवतो दैववाताय शिक्षन् ॥**
(६. २७, ७).

ज्या इंद्राचे घोडे उत्तम प्रकारच्या गवताची इच्छा करणारे, अत्यंत शोभिवंत व आपलें तोंड आपल्या अंगावर घासणारे आहेत अशा इंद्रानें तुर्वशाला संजयाच्या ताब्यांत दिलें व वृचीवंतासाठीं दैववाताला शिक्षा केली.

**य आनयत् परावतः सुनीती तुर्वशं यदुं**
**इंद्रः स नो युवा सखा ॥**
(४. ४५, १).

ज्या इंद्रानें आमच्या पासून दूर असलेले यदु आणि तुर्वश यांनां परत आणलें तो इंद्र आमचा सखा होवो.

**प्रियास इत्ते मघवन्नभिष्टौ नरो मदेम शरणे सखायः ।**
**नि तुर्वशं नि याद्वं शिशीह्यतिथिग्वाय शंस्यं करिष्यन् ॥**
(७. १९, ८).

हे इंद्रा तुला प्रिय असणारे आणि तुझी स्तुति करणारे आणि मित्रभूत आम्ही घरींच आनंदित आहों, तथापि आमचा राजा अतिथिग्व याचें कल्याण करणारा तूं तुर्वश आणि याद्व यांनां नाहींसें कर.

**यदिन्द्र प्रागपागुदङ्न्यग्वा हूयसे नृभिः**
**सिमा पुरू नृषूतो अस्यानवेसि प्रशर्ध तुर्वशे ॥**
(८. ४, १).

हे इंद्रा, पूर्व, पश्चिम, उत्तर, खालीं, वर इत्यादि कोणत्याहि दिशाकडे असलेल्या राजांनीं स्तोत्रांनीं तुझें आव्हान केलें असलें तरी तूं आनु नामक राजाकडे येतोस, हे पराभिभवी, तुर्वशाकडेहि तूं प्रेरित केला जातोस.-सायण

इंद्रा जरी तुला लोक पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे, दक्षिणेकडे आणि उत्तरेकडे बोलावतात, तरी तूं, लोक येण्याविषयीं ज्याला आग्रह करतात अशा शूर वीरा, मुख्यत्वेंकरून आनव आणि तुर्वश यांच्याकडे असतोस. -ग्रिफिथ

**मा भेम मा श्रमिष्मोग्रस्य सख्ये तव ॥**
**महत्ते वृष्णो अभिचक्ष्यं कृतं पश्येम तुर्वशं यदुम् ॥**
(८. ४, ७).

हे इंद्रा, बलवान् अशा तुझ्या मैत्रीची प्राप्ति झाल्यावर आम्हांला भीति राहणार नाहीं, श्रम होणार नाहींत; सर्व काम पूर्ण करणाऱ्या तुझीं मोठमोठीं कृत्यें स्तवनीय आहेत. कारण, तुर्वश नामक व यदुनामक राजांनां तुझ्या प्रसादानें अत्यंत सुखी झालेले आम्ही पहातच आहोंत.-सायण.

हे बलवन्ता, तूं आमचा मित्र असल्यावर आम्हीं भिणार नाहीं. किंवा आम्हांला श्रम वाटणार नाहींत. आम्ही तुर्वश आणि यदु यांनां पाहूं. हे शूरा, तुझीं मोठालीं कृत्यें प्रशंसलींच पाहिजेत.-ग्रिफिथ

**स्थूरं राधः शताश्वं कुरुङ्गस्य दिविष्टिषु ।**
**राज्ञस्त्वेषस्य सुभगस्य रातिषु तुर्वशेष्वमन्महि ॥**
(८. ४, १९).

कुरुङ्ग राजाच्या यज्ञांत दानें देत असतां तुर्वश लोकांत खूप श्रेष्ठ (असें) शताश्व दान मीं मिळविलें.

**येनाव तुर्वशं यदुं येन कण्वं धनस्पृतम् ।**
**राये सुतस्य धीमहि ॥**
(८. ७, १८).

ज्या तुम्हीं आपल्या सामर्थ्यानें तुर्वश व यदु नामक राजांचें संरक्षण केलेंत; किंवा धनेच्छु अशा कण्व ऋषीचें संरक्षण केलेंत, त्या तुम्हीं आमच्या संपत्तीचें रक्षण करावें म्हणून, हे मरुत हो, आम्ही तुमचें सुंदर ध्यान करतों.-सायण

ज्या योगानें तुम्हीं यदु, तुर्वश आणि ज्याला लूट मिळाली आहे असा कण्व यांनां मदत केलीत त्या तुमच्या (शक्तीचें) आम्ही धनाकरितां ध्यान करतों.-ग्रिफिथ

**आ नूनं यातमश्विनेमा हव्यानि वां हिता।**
**इमे सोमासो अधि तुर्वशे यदाविमे कण्वेषु वामथ ॥**
(८. ९, ४१).

हे अश्विनीदेव हो इकडे या कारण, हीं पुढें असलेलीं हविर्द्रव्यें तुमच्या करितांच तयार आहेत. त्याचप्रमाणें तुर्वश व यदु यांच्या जवळ असलेले सोम हे तुमचेच असून तुम्हींच ते आम्हां कण्वांप्रत दिले आहेत.– सायण

हे अश्विनांनो, आतां इकडे या. येथें तुमच्या करितां हवी तयार ठेविले आहेत. हीं सोमपेयें कण्वाच्या पुत्रांमध्यें तुम्हाला अर्पण केलीं आहेत.–ग्रिफिथ

**यदद्याश्विना वपाग्यत्प्राकस्थो वाजिनीवसू।**
**यद्द्रुह्यव्यनवि तुर्वशे यदौ हुवेवामथ मागतम् ॥**
(८. १०, ५).

हे अश्विनी हो, जर तुम्ही पश्चिमेस असाल, हे अन्नधनयुक्त हो जर तुम्ही पूर्वदिशेस असाल, द्रुह्यु, अनु, तुर्वश आणि यदु यांमध्यें जर तुम्ही असाल, तर मी तुम्हांस बोलावितों.

**सत्यं तत्तुर्वशे यदौ विदानो अह्नवाय्यम्।**
**व्यानट् तुर्वणे शमि।**
(८. ४५, २७)

तुर्वश आणि यदु यांचीं सत्यकर्में जाणणाऱ्या त्वां संग्रामांत अन्हवाय्याला नाहींसें केलेंस.

**पुरः सद्य इत्थाधिये दिवोदासाय शम्बरम्।**
**अध त्यं तुर्वशं यदुम्।**
(९. ६१, २).

(सोमरसपानानें मत्त झालेल्या इंद्रानें) त्याच दिवशीं शत्रूंचे किल्ले मोडले. सत्कर्माचरण करणाऱ्या दिवोदासासाठीं शम्बराला व नंतर तुर्वश राजाला व यदु राजाला (वश केलें).–सायण

(इन्द्रानें) त्वरेनें किल्ले व शंबर यांचा चुराडा केला; तदनंतर धर्मशील दिवोदासासाठीं यदूचा व तुर्वशाचा चुराडा केला.–ग्रिफिथ

**अहं सप्तहा नहुषो नहुष्टरः प्राश्रावयं शवसा तुर्वशं यदुम्।**
**अहं न्यं न्यं सहसा सहस्करं नव व्राधतो नवतिं च वक्षयम्॥**
(१०. ४९, ८).

या ऋचेच्या अर्थासाठीं (हाच विभाग पृष्ठ १३५) नहुषविषयक विवेचन पहा.

आतांपर्यंत जे उतारे दिले आहेत त्यांवरून काय दृष्टीस पडतें तें पाहूं.

(१) कवि, कण्व, तुर्वश, यदु व उग्रादेव यांस अग्नीमार्फत बोलावीत आहे व नववास्त्व, बृहद्रथ, तुर्वीति यांस दस्यूंसह नेण्यास अग्नीस सांगतो.

(२) कवि, नर्य, तुर्वश, यदु, तुर्वीति व वय्य यांचें रक्षण केल्याबद्दल, रथ आणि एतश यांचें रक्षण केल्याबद्दल व नव्याण्णव नगरें पाडण्याबद्दल इन्द्राची स्तुति करीत आहे.

(३) कवि इन्द्रानें धुनीस मारून पाणी नद्यांप्रमाणें खालीं सोडल्याबद्दल त्याची स्तुति करतो, तुर्वश व यदु यांस समुद्रपार नेण्यास विनंति करतो.

(४) तुर्वश व यदु यांनां शचीपति इन्द्रानें पुराच्या पार नेलें.

(५) इन्द्रानें तुर्वश व यदु यांच्या करितां पाणी थांबविलें. इन्द्र व कुत्स यांनीं उग्र (राक्षस) याजवर चाल केली. त्या वेळीं उशना व देव बरोबर इन्द्राकडे आले.

(६) इन्द्रानें तुर्वशास सृंजयाच्या ताब्यांत दिलें व दैववाता-करितां वृचीवानास शिक्षा केली.

(७.) तुर्वश पुरोडाश यानें भृगु व द्रुह्यु यांवर स्वारी करून धन मिळविलें. (७. १८, ६).

(८) कवि आतिथिग्वाकरितां तुर्वश व याद्व यांचा नाश कर-ण्यासाठीं इन्द्राची प्रार्थना करतो.

(९) इन्द्र पूर्व, पश्चिम व उत्तर, या दिशांतील राजांकडे न जातां अनु व तुर्वश यांच्याकडे येतो असें स्तोता म्हणतो.

(१०) कण्वांस तुर्वशांकडून सोम मिळतो.

(११) अन्हवाय्यास इंद्रानें तुर्वश व यदु यांच्यासाठीं नाहींसें केलें.

(१२) तुर्वश, यदु यांनां इंद्रानें दिवोदासाच्या स्वाधीन केलें.

(१३) कुरुंगाच्या यज्ञांत कवीनें तुर्वशांत (श्रेष्ठ असें) शताश्व हें मोठें दान मिळविलें.

(१४) अभ्यावर्तिन् चायमानाकरितां इन्द्रानें वरशिखाचें बीज नष्ट केलें. हरियूपिया येथें वृचीवानाच्या सैन्याचा नाश केला.

वरील विधानांवरून येणेंप्रमाणें अनुमानें निघतातः–

(१) यदुतुर्वशांची मोठी गट्टी दिसते.

(२) उग्रादेव, तुर्वीति व नर्य हे यदुतुर्वशांचे कांहीं वेळ मित्र होते.

(३) तुर्वीति हा एकदां मित्र व एकदां शत्रू दिसतो.

(४) तुर्वशांचे निरनिराळ्या काळांत. (१) नववास्त्व, (२) बृहद्रथ, (३) तुर्वीति, (४) दस्यु, (५) धुनि व (६) संजय असे निरनिराळे शत्रू दिसतात.

(५) यांचे पुरोहित कण्व हे होत. सोम तुर्वशांकडून कण्वास मिळाला.

(६) कुरुंग हा कोणी तुर्वश असावा.

परंतु हापकिन्स हा कोणताही पुरावा न देतां तुर्वश हे यदु लोकांच्या राजाचें नांव आहे असें म्हणतो. अनेक प्रमाणांनीं तुर्वश आणि यदु हे लोक भिन्न होते असें सिद्ध होतें. ' तुर्वशा यदू ' (४. ३०, १७) व ' यदुस्तुर्वश्च ' (१०. ६२, १०) असा किंवा यदु, पुरु, अनु, द्रुह्यु व तुर्वश या पांच जातींचा ऋग्वेदांत जो उल्लेख आहे त्यावरून यदु आणि तुर्वश हे भिन्न होते हें उघड होतें. त्याचप्रमाणें, 'तुर्वश' हें नांव पडण्याचें कारण म्हणून ' लढा-ईंतून त्वरित पळून जाणारे ते तुर्वश ' अशी व्युत्पत्ति हापकिन्सनें दिली आहे तीहि हास्यास्पद आहे.

तुर्वशांचा मुख्य पराक्रम.– तुर्वशांचा विशेष पराक्रम म्हणजे दाशराज्ञ युद्धांत सामील होणें हा आहे. त्या युद्धांत जे अनेक लोक सामील झाले होते त्यांत तुर्वश व यदु हे बरेच प्रमुख होते. व त्यांच्यावर इंद्राची कृपाहि होती. तथापि त्या युद्धांत तुर्वशांचा पराभवच झाला. ते 'अनु आणि द्रुह्यु' यांच्या प्रमाणें पाण्यांत बुडून न मरतां इन्द्रकृपेनें सुटले. इंद्रानें हि 'सुदास' याची दहा राजांच्या तडाख्यांतून विजयपूर्वक सुटका केली, तर 'तुर्वश' आणि 'यदु' यांची पराजयपूर्वक सुटका केली. इन्द्रानें दोघांवरहि कृपाच केली असें सूक्तकारांनीं दाखविलें आहे. कांहीं स्थलांवरून असेंहि म्हणतां येईल कीं, 'तुर्वश' आणि 'यदु' यांच्यावर इन्द्राची अवकृपा असे. इन्द्राचें स्तवन करणें झाल्यास त्या स्तुतींत 'हे इंद्रा तूं 'तुर्वश' व 'यदु' यांचें संरक्षण केलेंस' असें अनेक कवींनीं म्हटलें आहे. तुर्वश इन्द्रपूजक होते असे ऋग्वेदांत उल्लेख आहेत. तुर्वश आणि यदु राजांनीं सरयू नदीच्या तीरीं अर्ण आणि चित्ररथ राजांनां मारिलें असें ग्रिफिथचें म्हणणें आहे. परंतु तें बरेंच संशयग्रस्त असून त्याला चांगलासा आधार नाहीं. अर्ण आणि चित्ररथ यांचीहि माहिती अन्यत्र नाहीं. चित्ररथ राजा व सरयू नदी यांच्या संबंधावरून तुर्वश, पंचाल वगैरेंचा स्थलनिर्णय करण्यास फारच उत्तम साधन आहे.

तुर्वश आणि यदु यांचें सुदासचा पिता दिवोदास याच्याशींहि वैर होतें असें एका स्थलावरून दिसतें. तेथें खालील प्रमाणें उल्लेख आहे.

**पुरः सद्य इत्थाधिये दिवोदासाय शम्बरम् ।**
**अध त्यं तुर्वशं यदुम् ।**

(९. ६१; २).

अर्थः–इन्द्रानें त्याच दिवशीं शत्रूंचे किल्ले मोडले. सत्कर्माचरण करणाऱ्या दिवोदासासाठीं शम्बराला, तुर्वश राजाला व यदु राजाला वश केलें.

वृचीवान् आणि तुर्वश एक नव्हते.–वृचीवान् आणि तुर्वश हे एक होते असें म्हणण्यासहि पुरेसा निश्चयात्मक पुरावा नाहीं व ते एक नव्हते असें म्हणण्यासहि सबळ पुरावा नाहीं; दोघेहि वेगळे होते, परंतु एकाच मित्रसंघांत दाखल होते, असें मानल्यास कोणताच विवादप्रश्न उपस्थित होत नाहीं, असें मॅकडोनेलचें म्हणणें आहे. व दोघे एकच होते असें झिमरचें म्हणणें आहे.

परंतु ते दोघेहि भिन्न होते असें निश्चित म्हणतां येतें. एकाच ऋचेंतील उल्लेखानें ही गोष्ट सिद्ध होते. ती ऋचा खालील प्रमाणें आहेः–

**स सृंजयाय तुर्वशं परादाद्वृचीवतो दैववाताय शिक्षन् ।**

(६. २७, ७).

अर्थः–इन्द्रानें सृंजयाला तुर्वश दिले आणि दैववाताकरितां वृचीवानाचें हित केलें.

यावरून दैववात व सृंजय यांच्या विरुद्ध युद्ध करण्याकरितां तुर्वश उभा राहिला होता आणि वृचीवान् त्याच्या मदतीकरितां आला होता.

यव्यावती व हरियूपीया या नदीच्या तीरीं वरशिखाच्या मुलाला मारलें, अभ्यावर्तिन्–चायमानाचें हित केलें आणि वृचीवानाला नष्ट केलें असा उल्लेख आला आहे (६. २७, ५).

या एकंदर हकीकतीवरून तुर्वश आणि वृचीवान, हे एक नव्हते हें प्रामुख्यानें सिद्ध होतें.

उत्तरकालीन ग्रंथांतहि यांचा उल्लेख आहे. हे पांचालांत मिळून गेले असें पांचाल व तुर्वश यांचा जो निकट संबंध दाखविण्यांत येतो त्यावरून दिसतें.

तुर्वशांचें राहण्याचें ठिकाण व त्यांनीं सुदास याजवर कोणच्या बाजूनें चाल केली हें बरेंच अनिश्चित आहे. तथापि त्यांनीं परुष्णी नदी ओलांडिली होती यांत संशय नाहीं. बहुतेक ते पश्चिमेकडून पूर्वेकडे गेले असावेत हें संभवनीय दिसतें.

तुर्वशांचा आणि वृचीवानांचा संबंध असा दाखविला गेला आहे कीं, वृचीवान आणि तुर्वश यांचा सृंजय राजा दैववात यानें पराभव केला. येथेंच चायमानाच्या विजयाचाहि उल्लेख आहे.

**वधीदिंद्रो वरशिखस्य शेषोऽभ्यावर्तिने चायमानाय शिक्षन् ।**
**वृचीवतो यद्धरियूपीयायां हन् पूर्वे अर्धे भियसापरो दर्त् ॥**

(६. २७, ५).

अभ्यावर्तिन् चायमानाकरितां इन्द्रानें वरशिखाचें बीज नष्ट केलें. "हरियूपिया" येथें वृचीवानांच्या आघाडीच्या सैन्याचा नाश केला; व मागच्या रांगांतलें सैन्य भीतियुक्त होत्सातें पळून गेलें. कांहीं लोकांचें म्हणणें वरशिख हा वृचीवानाच्या कुलांतील होता. ही गोष्ट कांहीं लोकांनां संमत नाहीं. तथापि ते दोघे भिन्न असून त्या दोघांचा मित्रसंबंध किंवा शास्यशासक संबंध असावा, यांतील बहुतेक दुसराच संबंध असणें निश्चित दिसतें.

पार्थव अभ्यावर्तिन् चायमान हा पार्थियन होता कायः– वराशिख आणि वृचीवान् यांचा अभ्यावर्तिन् चायमानाकरितां इन्द्रानें पराभव केला. अभ्यावर्तिन् चायमान हा पार्थव होता. पार्थव आणि पार्थियन हे एकच होत असें शब्दसाम्यावरून कांहींचें म्हणणें आहे. पार्थियन (पर्शियन) या शद्बावरून इराणशीं या शद्बांचा व शद्बावरून व्यक्तींचा संबंध जोडतां येतो. याला यव्यावती व हरियूपीया या नद्यांच्या उल्लेखांचा आधार देतां येण्यासारखा आहे. यावरून अभ्यावर्तिन् चायमान हा हिंदुस्थानच्या पश्चिमेस इराणांत रहात होता. तो अरकोसिया (Arachosia) मध्यें रहात होता असें हिलेब्रँटचें म्हणणें आहे; पण हें हिलेब्रँटचें स्थलनिर्णायक विधान स्वीकारतां येत नाहीं.

पार्थवांच्या औदार्याची भरद्वाजांनीं फारच सुंदर स्तुति केली आहे. ती येणें प्रमाणेंः–

**अभ्यावर्ती चायमानो ददाति दूणाशेयं दक्षिणा पार्थवानाम् ।**

(६. २७, ८).

अर्थः–अभ्यावर्तिन् चायमान वीस गाईबैलांच्या जोड्या मला देतो. ही त्या पार्थवाची दक्षिणा कोणालाहि नाहींशी करतां येणार नाहीं (ही कीर्ति पृथ्वीच्या अन्तापर्यंत टिकेल).

संजय, दैववात आणि अभ्यावर्तिन् चायमान हे एक होत असें सायणाचें म्हणणें बरोबर दिसतें. हे वेगळे असावेत असें झिमरचें म्हणणें आहे. पार्थव आणि पार्थियन यांचा संबंध नसावा असें म्हणणारे लोक आहेत.

तुर्वश आणि तुर्वीतिः—तुर्वश आणि तुर्वीति यांचा कांहीं संबंध होता कीं काय हें सांगतां येत नाहीं. एके ठिकाणीं तुर्वश, यदु, उग्रादेव, बृहद्रथ, व तुर्वीति यांचा उल्लेख आला आहे तो असाः—

अग्नीकडून यदु, तुर्वश व उग्रादेव यांनां मी बोलावितों. नायक अग्नि, नववास्त्व, बृहद्रथ व तुर्वीति यांनां शत्रुहननाला मदत म्हणून आणो (१. ३६, १८).

' तुर्वीति हा इन्द्रकृपेंतला होता. त्याकरितां एकदां इन्द्रानें पाणी उथळ केलें ' असें दुसऱ्या एका ठिकाणीं वर्णन आलें आहे

(१. ६१, ११).

अश्वीदेवांची त्याच्यावर कृपा असे

(१. ११२, २३).

तुर्वीति बरोबर दभीति हेंहि नांव अश्वीदेवांच्या कृपेंतल्या व्यक्तीचें म्हणून आलें आहे. दभीतीनें इन्द्राकरितां सोमवल्लीचा रस काढून दिला, त्याचें कारण दभीतीचे शत्रू धुनि आणि चुमुरि यांनां इन्द्रानें मारलें (६. २६, ६).

यांचा उल्लेख शंबर, पिप्रु व शुष्ण यांच्या बरोबर येतो. चुमुरि हें नांव नॉन आर्यन् लोकांचें द्योतक आहे असें एक लेखक म्हणतो. यांचे किल्ले इन्द्रानें फोडले. दभीतीकरितां ३०००० दास ठार मारले होते (४. ३०, २१) व दस्यूंनां दोऱ्यांनीं बांधून टाकलें होतें

(२. १३, ९).

**क्रिविः**—'क्रिवि' हीं वेदकालीन एक जात असावी असें पुष्कळांचें म्हणणें आहे. त्याला शतपथ ब्राह्मणांत (१३. ५, ४, ७) आधार आहे. क्रैव्य पांचाल राजानें परिवक्रा नदीवर अश्वमेध केला अशी कथा तेथें आहे. हा शब्द ऋग्वेदांत अनेक वेळां आला असून सायणाचार्यांनीं पुष्कळ वेळां त्या शब्दाचा अर्थ विहीर असा घेतला आहे (८. २०, २४ आणि ८. २२, १२). हे क्रिवीसंबंधाचे उल्लेख पाश्चात्त्य संशोधकांनीं लोकांविषयीं आहेत असें धरलें आहे. क्रिवि हा शब्द जेथें विशिष्ट लोक या अर्थानें लागू पडत नाहीं ते उल्लेख येणें प्रमाणें.

आ व इन्द्रं क्रिविं यथा वाजयन्तः शतक्रतुम् ।
मंहिष्ठं सिञ्च इन्दुभिः ॥

(१. ३०, १).

बलप्राप्तीच्या इच्छेनें आम्ही अत्यंत उदार व हजारों शक्तींचा स्वामी जो इंद्र त्यास विहीर जशी पाण्यानें भरतात तसें सोमरसाच्या बिंदूनीं भरून तृप्त करून टाकतों.

**यूयं न उग्रा मरुतः सुचेतुनारिष्टग्रामाः सुमतिं पिपर्तन ।**
**यत्रा वो दिद्युद्रदति क्रिविर्दती रिणाति पश्वः सुधितेव बर्हणा॥**

(१. १६६, ६).

ज्यांच्या संघाला कोणी उपद्रव करूं शकत नाहीं अशा उग्र मरुतांनों, संतुष्ट चित्तानें आमची चांगली इच्छा पुरी करा. (ती अशा वेळीं कीं,) ज्या वेळीं तुमच्या क्रिवी (= विकाळ किंवा क्षेपणशील) दांताचें अस्त्र (मेघांनां) कांपतें व चांगल्या नेम धरलेल्या शस्त्राप्रमाणें पशूंना मारतें.

**यास्मा अरं बाहुभ्यां यं पिताकृणोद्विश्वस्मादा जनुषो वेदसस्परि।**
**येना पृथिव्यां नि क्रिविं शयध्यै वज्रेण हत्व्यवृणक्तुविष्वणिः॥**

(२. १७, ६).

सर्व प्रकारच्या मौल्यवान् धनापासून पित्यानें निर्माण केलेलें व त्याच्या बाहूंनां आवरण्याजोगें हें वज्र आहे. या मोठ्यानें ओरडणाऱ्या वज्रानें त्यानें क्रिवीला खालीं पाडलें आणि मरेपावेतों मारून जमिनीवर टाकून दिलें.

**अध त्विषीमाँ अभ्योजसा क्रिविं युधा भवदा रोदसी**
**अपृणदस्य मज्मना प्र वावृधे ।**
**अधत्तान्यं जठरे प्रेमरिच्यत सैनं सश्चद्देवो देवं सत्यमिन्द्रं**
**सत्य इन्दुः ॥**

(२. २२, २).

यानंतर दीप्तिमान् इंद्रानें बलाच्या योगें क्रिवीला युद्धांत जिंकलें. (आपल्या तेजानें) द्यावापृथिवी व्यापून टाकिली. याच्या (सोमाच्या) बलानें वाढला. (सोमाचे दोन विभाग करून) एक आपल्या पोटांत घातला व दुसरा देवांनां दिला. तो दैदीप्यमान् आणि सत्य इंदु (सोम) या दैदीप्यमान् आणि सत्य इंद्राला व्यापून टाको.

**प्र व एते सुयुजो यामन्निष्टये नीचीरमुष्मै यम्य ऋतावृधः ।**
**सुयंतुभिः सर्वशासैरभिशुभिः क्रिविर्नामानि प्रवणे मुषायति॥**

(५. ४४, ४).

हीं एकमेकांत मिसळून असणारीं किरणें खालीं येतात, भक्तांच्याकरितां आदित्य त्या किरणांच्या योगानें उतरत्या उदकांचे प्रवाह वाहवितो. (या मंत्रांत सायणांनीं 'क्रिवि' शब्दाचा 'कर्ता' असा अर्थ केला आहे.)

चांगल्या रीतीनें जुंपलेले असे हे यज्ञविधींत मदत करण्याकरितां तुजकडे येतात. आवळेजावळे असे ते (भाऊ) त्याच्याकरितां (अग्नी करितां) यज्ञास मदत करण्यासाठीं येतात. लगामांनीं ते सहज वाट दाखविले जातात; ते सर्वांवर अम्मल चालवितात. (उंच अंतरावरून) खोल पडल्यावर समुद्र यांचीं नांवें लपवितो (म्हणजे तें पाणी समुद्रांत गडप होतें):—ग्रिफिथ

**याभिः सिन्धुमवथ याभिस्तूर्वथ याभिर्दशस्यथा क्रिविम् ।**
**मयो नो भूतोतिभिर्मयोभुवः शिवाभिरसचद्विषः ॥**

(८. २०, २४).

मरुतहो! तुमची सेवा न करणाऱ्यांचा द्वेष करणारे व सुखदायक असे तुम्ही ज्या साधनांनीं विजयी होतां, सिंधूचें उत्तम रक्षण करतां व जरूर त्या वेळेस क्रिवीला मदत करितां त्या साधनांनीं आम्हांला तुम्ही सुखी करा.:—ग्रिफिथ

**ताभिरायातं वृषणोप मे हवं विश्वप्सुं विश्ववार्यं।**
**इषा मंहिष्ठा पुरुभूतमा नरा याभिः क्रिविं वावृधुस्ताभिरागतम् ॥**

(८.२२, १२).

हे अश्वीनों, सर्व सुखें देणारें व निरनिराळ्या स्वरूपांत असणारें असें मीं तुम्हांस बोलवणें केलें म्हणजे ह्या (सूक्तां) तून तुम्ही या. क्रिवीला अतिशय धान्य देणारे तुम्ही (मीं म्हटलेल्या सूक्तांतून) या.

**प्र यो ननक्षे अभ्योजसा क्रिविं वधैः शुष्णं निघोषयन् ।**
**यदेदस्तंभी त्प्रथयन्नमूंदिव मादिज्जनिष्ट पार्थिवः ॥**

(८,५१,८).

ज्यानें आपल्या बलानें क्रिवीचा पाडाव केला, व आपल्या आयुधानें शुष्णाला ठार मारिलें त्यानें थोडयाच अंतरावर असलेल्या आकाशाला आधार दिला त्या वेळेस प्रथम प्रार्थिव जन्मास आला.

**द्युम्नी वां स्तोमो अश्विना क्रिविर्नसेक आगतम् ।**
**मध्वः सुतस्य स दिवि प्रियो नरा पातं गौराविवेरिणे ॥**

(८.८७, १).

हे अश्वीनों तुमची स्तुति सुंदर आहे. प्रवाह भरण्याकरितां झऱ्याप्रमाणें या. हे स्वर्गाच्या स्वामींनों, दोन रानटी बैल ज्याप्रमाणें एखाद्या तळ्याचें पाणी पितात त्याप्रमाणें (पिळला जाणारा) गोड (सोम) रस तुम्ही प्या. तो तुम्हांला आवडतो.

**अभि वह्निरमर्त्यः सप्त पश्यति वावहिः ।**
**क्रिविर्देवीरतर्पयत् ॥**

(९.९, ६).

जो यज्ञ पार पाडणारा व अत्यन्त तृप्तिजनक सोम रस सात नद्यांनां जाऊन मिळतो तो कूपरूपानें (क्रिविः) असणारा नद्यांना तृप्त करतो.

**क्रिवि आणि कुरु.**—वर दिलेल्या पुराव्यावरून क्रिवि नांवाचें एक राष्ट्र होतें अशी आमची खात्री होत नाहीं. क्रिवींचा संबंध कुरूंशीं जोडण्यांत येतो पण कुरूंसंबंधानें फारच थोडी माहिती आपणांस वैदिक वाङ्मयांत उपलब्ध होते. कुरु, कौरव, आणि कौरम असे तीन प्रकारचे शब्द वैदिक वाङ्मयांत आढळतात. कुरूंची प्रसिद्धि मंत्रभागापेक्षां ब्राम्हणभागांत अधिक आहे.

**द्रुह्यु.**—आतां द्रुह्यूंकडे वळूं. द्रुह्यु हा शब्द एकवचनीं व अनेक वचनीं मिळून सहा वेळ (१. १०८ ८; ६. ४६, ८; ७. १८, ६; १२; १४; ८. १०, ५; या ठिकाणीं) आला आहे. यांपैकीं ७. १८ मधील तीन उल्लेख असणाऱ्या ऋचा मागें दिल्याच आहेत. त्याशिवाय ज्या तीन ऋचा आहेत त्या येणेंप्रमाणें.

**यदिन्द्राग्नी यदुषु तुर्वशेषु यद्द्रुह्युष्वनुषु पूरुषु स्थः ।**

(१.१०८, ८).

हे इंद्राग्नीहो, जरी तुम्हीं यदु किंवा तुर्वश, द्रुह्यु, अनु (किंवा) पुरु यांच्या येथें असाल (तरी या).

**यद्वा तृक्षौ मघवन् द्रुह्यावाजने यत्पूरौ कच्च वृष्ण्यं ।**
**अस्मभ्यं तद्रिरीहि स नृषाह्येऽमित्रान् पृत्सु तुर्वणे ॥**

(६.४६, ८).

हे धनवान, (इंद्रा) तृक्षि, द्रुह्यु आणि पूरु यांच्याजवळ असलेलें सर्व बल युद्धांत शत्रूंचा नाश करण्यासाठीं आम्हाला दे.

**यद्वामश्विनावपाक् यत् प्राक्स्थो वाजिनीवसू !**
**यद्द्रुह्यव्यनवि तुर्वशे यदौ हुवे वामथ मागतं ॥**

(८.१०, ५).

हे अन्नवान् अश्वीहो, तुम्ही पश्चिमेकडे, पूर्वेकडे अथवा द्रुह्यु, अनु, तुर्वश, यदु यांच्या येथें असला तरी मी तुम्हाला बोलावीत आहे. माझ्याकडे या.

यांमध्यें द्रुह्यूविषयीं खालील माहिती मिळतेः—

(१) यदुतुर्वशांबरोबर उल्लेख.

(२) इन्द्राग्नींचें त्यांच्याकडे अस्तित्व.

(३) सुदासाच्या विरुद्ध लढाईंत त्यांच्यांतील लोक मारले गेले.

(४) श्रुत, कवष व वृद्ध यांबरोबर ते मारले गेले.

(५) ते सामर्थ्यवान् असून त्यांचें शौर्य गायकानें देवापाशीं याचिलें आहे.

(६) अश्वींचें द्रुह्यू व त्यांचे सहकारी यांच्या घरीं अस्तित्व.

यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु व पुरु या सर्व प्रसिद्ध वैदिक जाती होत्या. हे पांच ययातीचे पुत्र असून त्याला ते त्याची वृद्धावस्था घेऊन आपलें तारुण्य देण्यास तयार न झाल्यामुळें ययातीनें त्यांना राज्य न देतां तुम्हीं हलक्या जातीचे व्हाल वगैरे शाप दिला, ही कथा जातींच्या उत्पत्तीच्या स्पष्टीकरणार्थ पौराणिक प्रयत्न या दृष्टीनें लावतां येईल.

**पुरु.**— आतां पुरुविषयीं काय माहिती मिळते ती पाहूं.

**प्रनू महित्वं वृषभस्य वोचं यं पूरवो वृत्रहणं सचन्ते ।**
**वैश्वानरो दस्युमग्निर्जघन्वाँ अधूनोत्काष्ठा अव शंबरंभेत् ॥**

(१.५९, ६).

मेघहन्त्या ज्या वैश्वानराला पुरुलोक सेवितात त्याचें माहात्म्य मी तुम्हांला सांगतों. त्या वैश्वानर अग्नीनें दस्यूंनां मारलें. सर्व दिशा हलविल्या (पाऊस पाडला) आणि मेघ फोडीला.

**त्वं हत्यदिन्द्र सप्त युध्यन् पुरो वज्रिन् पुरुकुत्साय दर्दः ।**
**बर्हिर्नयत् सुदासे वृथा वर्गंहो राजन् वरिवः पूरवे कः ॥**

(१.६३, ७).

हे वज्रयुक्त इंद्रा तूं पुरुकुत्साकारितां युद्ध करून सात किल्ल्यांचा नाश करतोस. तृणाप्रमाणें सहज तूं सुदासाकरितां त्याच्या (शत्रूंना) तोडलेस, हे राजा, पुरूंस लूट मिळवून दिलीस.

**भिनत्पुरो नवतिमिन्द्र पूरवे दिवोदासाय महिदाशुषे नृतो वज्रेण दाशुषे नृतो ।**
**अतिथिग्वाय शम्बरं गिरेरुग्रो अवाभरत ।**
**महोधनानि दयमान ओजसा विश्वाधनान्योजसा ॥**

(१.१३०, ७).

हे इंद्रा! हे नृत्य करणाऱ्या! आपला भक्त व कृपेंतला चाकर जो पुरु-दिवोदास-त्याच्यासाठीं तूं आपल्या वज्रानें नव्वद किल्ल्यांचा चुराडा केलास. अतिथिग्वासाठीं त्या बलाढ्य (इंद्रानें)

शंबराला पर्वतावरून खालीं लोटून दिलें; त्यानें आपल्या बलानें मोठ्या धनराशीची वांटणी केली.

**विदुष्टे अस्य वीर्यस्य पूरवः पुरो यदिन्द्र शारदीरवातिरः सासहानो अवातिरः ।**
**शासस्तमिन्द्र मर्त्यमयज्युं शवसस्पते ।**
**महीममुष्णाः पृथिवीमिमा अपो मन्दसान इमा अपः ॥**
(१. १३१, ४).

हे इंद्रा, तूं शरदाचीं नगरें (मेघमंडलें) मोठा जय मिळवून भंगिलीस. हा जो तुझा पराक्रम, तो पुरु जाणून आहेत. हे बलोपेता इंद्रा, तूं यज्ञ न करणाऱ्या मनुष्याला शासन करून ही विस्तीर्ण पृथ्वी व हीं उदकें हर्षयुक्त होऊन काढून घेता झालास. (म्ह० वृत्राला मारून त्यापासून विस्तीर्ण पृथ्वी व मेघोदकें हिरावून घेतलींस.)

**दनो विश इन्द्र मृध्रवाचः सप्तयत्पुरः शर्म शारदीर्दर्त ।**
**ऋणोरपो अनवद्यार्णा यूने वृत्रं पुरुकुत्साय रन्धीः ॥**
(१. १७४, २).

ज्या टोळ्या (जाती) उद्दामपणानें बोलल्या त्यांचें आश्रयस्थान जे सात शरद किल्ले त्या किल्यांचा चुराडा करून तूं त्या टोळ्यांनां दमन केलेंस. हे निर्दोषी (इन्द्रा), लाटांच्या पाण्याला तूं पूर आणलास व त्याच्या शत्रूला तरुण पुरुकुत्साच्या ताब्यांत (नाशार्थ) दिलेंस.

**एवा वस्व इन्द्रः सत्यः सम्राड्ढन्ता वृत्रं वरिवः पूरवे कः ।**
**पुरुष्टुत क्रत्वा नः शग्धि रायो भक्षीय तेऽवसो दैव्यस्य ॥**
(४. २१, १०).

या प्रकारें स्तविलेला सत्यशाली धनाचा पति व वृत्राचा हन्ता इन्द्र पुरूला धन देतो. अनेक यजमानांकडून स्तवनकर्मांनें स्तविल्या जाणाऱ्या हे इन्द्रा! तूं आम्हांला धन दे. तुझ्याकडून मिळणारें दैवी अन्न मीं सेवन करावें.

**महश्चर्कर्म्यर्वतः क्रतुप्रा दधिक्राव्णः पुरुवारस्य वृष्णः ।**
**यं पूरुभ्यो दीदिवांसं नाग्निं ददथुर्मित्रावरुणा ततुरिम् ॥ २ ॥**
(४. ३९, २).

कर्मांचा पूरक मी त्या महान्, वेगवान् दानशील व बहुतांनां वरणीय अशा दधिक्रावा देवाचें स्तवन करतों. हे मित्रावरुण हो! या तारक दधिक्राव्याला तुम्ही दीप्तिमान् अग्नीप्रमाणें पुरुंच्या कल्याण्यासाठीं धारण करतां.—सायण

**आ यज्ञैर्देव मर्त्य इत्था तव्यांसमूतये ।**
**अग्निं कृते स्वध्वरे पूरुरीळीतावसे ॥**
(५. १७, १).

स्वतःच्या तेजानें दीप्तिमान् असणाऱ्या ज्या अग्नीला मनुष्यें हविर्भाग अर्पण करतात त्या अग्नीची पुरु स्वतः करीत असलेल्या यज्ञांत स्वसंरक्षणासाठीं स्तुति करतो.

**सनेम तेऽवसा नव्य इंद्र प्र पूरवः स्तवंत एना यज्ञैः ।**
**सप्त यत्पुरः शर्म शारदीर्दर्द्धन्दासीः पुरुकुत्साय शिक्षन् ॥**
(६. २०, १०).

हे इंद्रा, तुझ्या नूतन अनुग्रहानें आमचा फायदा होवो, अशी तुझी स्तुति पुरु यज्ञ करून करतात. 'दासांचें' वसतिस्थान जे सात किल्ले ते तूं मोडून टाकलेस, व त्यांच्या (म्हणजे) दासांच्या जाती तूं ठार मारून टाकल्यास व पुरुकुत्साला तूं मदत केली आहेस.

**त्वद् भिया विश आयन्नसिक्नीरसमना जहतीर्भोजनानि ।**
**वैश्वानर पूरवे शोशुचानः पुरो यदग्ने दरयन्नदीदेः ॥**
(७. ५. ३).

जेव्हां हे वैश्वानर अग्ने, पुरु करितां प्रकाशून तूं त्याचे किल्ले पेटवलेस आणि भग्न केलेस, तेव्हां तुझ्या भीतीनें दूरवर पसरलेल्या कृष्णवर्ण जाती आपली संपत्ति टाकून देऊन पुढें धांवल्या.

**प्रप्रायमग्निर्भरतस्य शृण्वे वि यत्सूर्यो न रोचते बृहद्भाः ।**
**अभि यः पूरुं पृतनासु तस्थौ द्युतानो दैव्यो अतिथिः शुशोच ।**
(७. ८, ४).

हा भरतांच्या मालकीचा अग्नि फार कीर्तिमान् आहे; हा सूर्याप्रमाणें मोठ्या दीप्तीनें प्रकाशतो. ज्यानें युद्धांत पुरूचा पराभव केला तो स्वर्गीय अतिथि परिपूर्ण तेजानें प्रकाशला आहे.

**त्वं धृष्णो धृषता वीतहव्यं प्रावो विश्वाभिरूतिभिः सुदासम् ।**
**प्र पौरुकुत्सिं त्रसदस्युमावः क्षेत्रसाता वृत्रहत्येषु पूरुम् ॥**
(७. १९, ३.).

हे धीरा, तूं आपली सर्व मदत देऊन, ज्याचा हवि स्वीकारलास त्या सुदासाला, देश जिंकण्याच्या आणि शत्रूंनां मारण्याच्या कामीं पुरूला आणि पुरुकुत्साचा मुलगा जो त्रसदस्यु त्याला मोठ्या धिटाईनें राखिलें आहेस.

**उभे यत्ते महिना शुभ्रे अंधसी अधिक्षियन्ति पूरवः ।**
**सानो बोध्यवित्री मरुत्सखा चोदराधो मघोनाम् ॥**
(७. ९६, २).

हे रूपवती, जर पुरु आपल्या सामर्थ्याच्या समृद्धींत तुझ्या दोनहि गवताळ किनाऱ्यावर वास करतात, तर हे मरुत्सखे, आमच्यावर कृपादृष्टि ठेव. आमच्या वरिष्ठांच्या धनाला चालना दे.

**प्र ते यक्षि प्र त इयर्मि मन्म भुवो यथा वन्द्यो नो हवेषु ।**
**धन्वन्निव प्रपा असि त्वमग्न इयक्षवे पूरवे प्रत्नराजन् ॥**
(१०. ४, १).

हे अग्ने! मी तुला हवि देतों, माझ्या मनांत आलेली स्तुति मी उच्चारितों. कारण, हे वन्द्य! देवांनां आव्हान करतांना तूं नेहमीं सन्निध असतोस. हे पुराण राजन्! निरुदक प्रदेशामध्यें ज्याप्रमाणें पाणपोई त्याप्रमाणें तूं पुरूस (किंवा हवींच्या योगानें देवांनां संतुष्ट करणाऱ्या मनुष्यांनां) पाणपोई सारखा (म्हणजे सुख देणारा) आहेस.—सायण

**कुरुश्रवणमावृणि राजानं त्रासदस्यवम् ।**
**मंहिष्ठं वाघतामृषिः ॥**
(१०. ३३, ४).

विपुल धन देणारा त्रसदस्यूचा मुलगा जो कुरुश्रवण (ऋत्विजांनीं केलेली स्तुति ऐकणारा) नामक राजा त्याच्याजवळ मी ऋषि, ऋत्विजांनां देण्याच्या धनाविषयीं प्रार्थना करतों.—सायण.

**अहमिन्द्रो न पराजिग्य इद्धनं न मृत्यवेवतस्थे कदाचन।**
**सोममिन्मा सुन्वतो याचतावसु नमे पूरवः सख्ये रिषाथन॥**
(१०. ४८, ५).

इंद्र म्हणतोः–मी सर्व धनाचा स्वामी आहे. माझ्या द्रव्याचें हरण कोणीहि करूं शकत नाहीं. तसेंच माझ्या भक्तांवर मृत्यूचा तावा चालूं शकत नाहीं. (अर्थात् माझ्यावर चालत नाहीं, हें सांगावयास नकोच) हे सोम कुटणारे यजमानांनों तुम्हांला अपेक्षित असणाऱ्या द्रव्याची तुम्हीं मजजवळच मागणी करा. हे लोक हो (पूरवः) माझें सख्य सोडूं नका.–सायण.

मी इंद्र आहे; कोणी कधींहि माझें द्रव्य घेऊं शकत नाहीं. मी कधींहि मृत्यूच्या अंकित होत नाहीं. सोम पिऊन माझ्या जवळच संपत्ति मागा, हे पुरूंनो, माझे स्नेही असतांना तुम्हाला कोणतीहि पीडा सहन करावी लागणार नाहीं.–ग्रिफिथ.

१. ६३, ७ मधील सुदासास मदत करणाऱ्या पुरुकुत्साचा उल्लेख दाशराज्ञयुद्धविषयक नसून, तूर्वयाणाविरुद्ध असलेल्या मित्रसंघाच्या विजयाबद्दलचा असावा. १. १७४, २; ५. २०, १० व ७. ५, ३ मधील पुरुकुत्साविषयींचा उल्लेख वरील लढाई-विषयींच असावा असें वाटतें. ७. ८, ४ मध्यें भरत व पुरु यांचें वैमनस्य दृष्टीस पडतें. ७. १९, ३ वरून त्रसदस्यु हा पुरुकुत्साचा मुलगा अगर वंशज होता असें दिसतें. १०. ३३, ४ मध्यें कुरुश्रवण हा त्रसदस्यूचा वंशज असल्याविषयीं उल्लेख आहे.

**पुरूंचे शत्रुमित्र व त्यांच्या लढाया:** – सायणाचार्यांच्या भाष्यांत पुरु शद्बाचा मनुष्य असा अर्थ पुष्कळ वेळां आला आहे. यास्कानें जातिवाचक सर्व शद्ब मनुष्यवाचक म्हणून स्वीकारले आहेत, त्याचा हा परिणाम असावा. यास्कानें हे शद्ब जातिवाचक न लिहितां मनुष्यवाचक का लिहिले हा एक विचारणीय प्रश्न आहे.

हे अनुद्रुह्यु वगैरे बरोबर एकदां आले असून तृत्सूंचे शत्रु म्हणून त्यांचा उल्लेख येतो आणि तेथें त्यांना बडबडे–मृध्रवाचः–असें म्हटलें आहे. पुरु आणि सुदास यांच्यामध्यें पुरुकुत्साच्या कालांत स्नेहसंबंध व ऐक्य उत्पन्न झालें असावें. कां कीं, सुदासाकरितां शत्रूस मारिलें आणि पुरूंस धन प्राप्त करून दिलेंस असा उल्लेख. १. ६३, ७ मध्यें आहे.

दुसऱ्या ठिकाणीं (७. ८, ४) भरतांच्या अग्नीनें त्याचा पराभव केला असें म्हटलें आहे. सुदास हा भरत होता, याबद्दल मतैक्य आहे. आणि पुरूंवर मिळालेल्या विजयाप्रीत्यर्थच मोठा उत्सव चालू होता असें सदर ऋचेंत केलेल्या अग्नीच्या स्तुतीवरून दिसतें.

उलट पुरूंचा जय झाला, असें वर्णन करणाऱ्या अनेक ऋचा आपणांस उपलब्ध होतात (१. १३१, ४; १. १७४, २; ४. २१, १०; ६. २०, १०). कांहीं स्थळीं पुरूंच्या सामर्थ्यांचा इतका महिमा गाइला आहे कीं इतर भक्तांनीं पुरूंच्या सामर्थ्यासारखें सामर्थ्य देवतांपाशीं मागितलें आहे.

(यत्पूरौ कच्च वृण्यम्। अस्मभ्यं तद्रिरिहि
६. ४६, ८.).

हे पुरूंचे जय ज्या लोकांवर होत असत ते काळ्या रंगाचे होते एतद्विषयक उल्लेख खालील प्रमाणें आहेः–

**त्वद् भिया विश आयन्नसिक्नी रसमनाजहतीर्भोजनानि।**
**वैश्वानर पूरवे शोशुचानः पुरो यदग्ने दरयन्नदीदेः॥**
(७. ५, ३).

जेव्हां हे वैश्वानर अग्ने, पुरूकरितां प्रकाशून तूं त्यांचे किल्ले पेटविलेस आणि भग्न केलेस तेव्हां तुझ्या भीतीनें दूर पळालेले काळे लोक संपत्ति टाकून पुढें धांवले.

यावरून काळ्या लोकांविरुद्ध लढणारा पुरु हा गौरवर्ण असावा. हे काळे लोक बहुधा हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशी असावेत असें कांहींचें मत आहे! हे दाशराज्ञ युद्धांतील सुदासाचे प्रतिस्पर्धी होते असें दिसतें.

पुरूंपैकीं मोठमोठे राजे पुरुकुत्स, त्रसदस्यु वगैरे होत. यांचाच पुरु ह्या नांवानें उल्लेख येणें संभवनीय आहे. पुरु हें व्यक्तीचें नांव नसावें. तें एका जातीचें किंवा समाजाचें नांव असून संस्कृत वाङ्मयांतील नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्या जातींतील किंवा समाजांतील मुख्याचें किंवा मुख्य व्यक्तीचें तें नांव बनलें असावें. त्याप्रमाणें दोनहि प्रकारानें या शद्बाचा उल्लेख आला आहे. यांचें राहण्याचें ठिकाण सरस्वतीच्या कांठीं होतें असे स्पष्ट उल्लेख आहेत. (७. ९६, २).

दाशराज्ञ युद्धांत सुदासाविरुद्ध लढणाऱ्या राजमालिकेंत 'पुरु' हें नांव झळकतें. परंतु त्या व्यक्तीचें विशेष नांव कळणें आवश्यक आहे. याकरितां त्या वंशांतील ऋग्वेदांत उपलब्ध होणाऱ्या राजांचा इतिहास क्रमानें पहाणें आपणांस अवश्य आहे.

**पुरुकुत्स**–तो सुदाससमकालिन होता काय? पुरु वंशापैकीं पुरुकुत्स याचा उल्लेख ऋग्वेदांत अनेक वेळां आला आहे. तो दासांचा जेता आणि इन्द्राची कृपा संपादन केलेला राजा होता.
(६. २०, १०).

**याभिः शुचन्तिं धनसां सुषंसदं तप्तं धर्ममोम्यावन्तमत्रये।**
**याभिः पृश्निगुं पुरुकुत्समावतं ताभिरूषुऊतिभिरश्विनागतम्॥**
(१. ११२, ७).

हे अश्वी हो, ज्या प्रसादांनीं धनाढ्य शुचंतीला तुम्हीं चांगलें घर दिलेंत; आणि अत्रीचा प्रखर अग्नि शांत केलात, त्याचप्रमाणें ज्या प्रसादांनीं पृश्निगूचें व पुरुकुत्साचें रक्षण केलेंत त्या प्रसादांनीं युक्त हे अश्वी हो, तुम्ही येथें अवश्य या.–सायण.

**त्वं ह त्यदिन्द्र सप्त युध्यन्पुरो वज्रिन्पुरुकुत्साय दर्दः।**
**बर्हिर्नयत्सुदासे वृथा वर्गंहो राजन्वरिवः पूरवे कः।** (१.६३,७)

हे वज्रधारी इंद्रा, त्वां पुरुकुत्सनामक ऋषीकरितां शत्रूंच्या सप्त नगरींचा पुरा नाश केलास. तसेंच, सुदास राजाकरितां तूं अंहुसंज्ञक दैत्याचा नाश करून अनायासानें त्याच्यापासून द्रव्य हरण केलेंस. हे स्वामिन् इंद्रा, तुझ्यावांचून लवाजक सुदासाला समृद्ध कोण बरें करणार? (अर्थात् तूंच).—सायण.

दनो विश इन्द्र मृध्रवाचः सप्त यत्पुरः शर्म शारदीर्दर्त ।
ऋणोरपो अनवद्यार्णा यूने वृत्रं पुरुकुत्साय रन्धीः ॥
(१. १७४, २).

हे इन्द्रा, ज्या वेळीं तूं शत्रूंचीं सात नगरें विध्वंसिलींस त्या वेळीं ( शत्रुसैन्यांतील ) बडबड्या लोकांची बडबड बंद केलीस; आणि हे दोषरहित इन्द्रा, तूं चपल अशा उदकांना खालीं सोडिलेंस व वृत्राला पुरुकुत्साच्या ताब्यांत दिलेंस.

पुरुकुत्स सुदासशीं समकालीन होता असें लुडविग व हिलेब्रँट म्हणतात परंतु या म्हणण्यास आधार नाहीं. ते आधार म्हणून जी ऋचा स्वीकारतात त्या ऋचेंत फक्त पुरुकुत्स आणि सुदास यांचा उल्लेख आला आहे; परंतु त्या उल्लेखावरून पुरुकुत्स आणि सुदास हे समकालीन होते असें म्हणतां येणार नाहीं. कारण, एखाद्या स्तुतिपर मन्त्रांत अनेक भक्तांचें उल्लेख आले म्हणून ते समकालीन ठरविणें अयोग्य आहे असें कांहींचें मत आहे.

एका ऋचेंत तो अश्विनांच्या कृपेनें यशस्वी झाला असें म्हटलें आहे ( १. ११२, ७ ). त्याच ऋचेंत 'शुचंतीला घर दिलेंत, अत्रीचा प्रखर अग्नि शांत केलात व पृश्निगूंचें संरक्षण केलें हे उल्लेख आले आहेत.

पुरुकुत्साची पत्नी, पुत्र, पिता व कुल.–पुरुकुत्साच्या मुलाचें त्रसदस्यु असें नांव होतें. पुरुकुत्साची पुरुकुत्सानी बायको होती. याबद्दल फारच स्पष्ट उल्लेख आहे. तो असाः–

अस्माकमत्र पितरस्त आसन्त्सप्त ऋषयो दौर्गहे बध्यमाने ॥
त आयजन्त त्रसदस्युमस्या इन्द्रं न वृत्रतुरमर्धदेवम् ॥
(४. ४२, ८).

दुर्गहाचा पुत्र बद्ध झाल्यावर ते सप्तर्षी आमचे पितर झाले. ते तिला इन्द्रासारखा शत्रुजेता आणि अर्धदेव त्रसदस्यु देते झाले.

पुरुकुत्सानी हि वामदाशद्धव्येभिरिन्द्रावरुणा नमोभिः ।
अथा राजानं त्रसदस्युमस्या वृत्रहणं ददथुरर्धदेवम् ॥
(४. ४२, ९).

कारण, हे इन्द्रावरुणहो, पुरुकुत्साची बायको तुम्हांला हविर्द्रव्य आणि नमस्कार यांनीं प्रसन्न करती झाली. नंतर शत्रुघ्न आणि अर्धदेव असा त्रसदस्यु राजा तिला दिला.

या दोनहि ऋचा अत्यन्त महत्त्वाच्या आहेत. या ऋचांतील पुरुकुत्सानी व दौर्गह या शब्दांवरून आपणांस त्रसदस्यूची आई, बाप व आजा यांसंबंधीं माहिती मिळते.

पुरुकुत्साचा सुदासाकडून दाशराज्ञयुद्धांत पराभव व त्याचा तुरुंगवासः–पुरुकुत्स तुरुंगांत असतां राजा पाहिजे म्हणून सप्तर्षींच्या कृपेनें इन्द्रावरुणांना प्रसन्न करून घेऊन 'त्रसदस्यु' हा पुत्र पुरुकुत्सपत्नीनें जन्मास आणला. ही हकीकत सायणाचार्यांनीं पूर्वग्रंथाधारपूर्वक भाष्यांत दिली आहे. ती हकीकत अशीः–

पुरुकुत्सस्य महिषी दौर्गहे बन्धनस्थिते ।
पत्यावराजकं दृष्ट्वा राष्ट्रं पुत्रस्य लिप्सया ॥
यदृच्छया समायातान् सप्तर्षीन् पर्यपूजयत् ।
तेच प्रीताः पुनः प्रोचुर्यजेन्द्रावरुणौ भृशम् ॥
साचेन्द्रावरुणाविष्ट्वा त्रसदस्युमजीजनत् ॥

( ऋ. ४. ४२, ८ वरील भाष्यांत सायणांनीं दिलेला बृहद्देवतेंतील उतारा ).

उत्तरकालीन वाङ्मयांत पुत्रप्राप्तीकरितां अश्वमेध केल्याचीं वर्णनें आहेत. त्याप्रमाणें पुरुकुत्सानें बायको मिळविण्याकरितां अश्वमेध केल्याचें उदाहरण आहे असें शतपथ ब्राह्मणांतील दुजोऱ्यावरून म्हणावयास जागा आहे. 'दौर्गह' शब्दाचा' दुर्गहपुत्र' असा अर्थ न घेतां त्याचा घोडा असा घ्यावा. याला शतपथ ब्राह्मणांतील 'दौर्गह' या शब्दाच्या हकीगतीनें ( १३. ५, ४, ५ ) जोड मिळते. परंतु हें निश्चित नाहीं.

असो; पुरुकुत्सानीवर पुरुकुत्स तुरुंगांत पडल्यामुळें संकट आलें असें निश्चित धरलें तरी पुरुकुत्साला कोणीं तुरुंगांत टाकलें हा प्रश्न राहतोच.

सुदासानें दाशराज्ञयुद्धांत पुरूंचा पराभव केला त्यामुळें पुरुकुत्स तुरुंगांत पडून तेथेंच त्याचा अंत होण्याचा संभव आहे. त्या प्रसंगामुळेंच पुरुकुत्सानीनें त्रसदस्यूला मिळवून तें संकट निवारण केलेलें दिसतें.

पुरु व इक्ष्वाकु एकच कायः–शतपथ ब्राह्मणांत पुरुकुत्साला ऐक्ष्वाक असें म्हटलें आहे. इक्ष्वाकु हें नांव फक्त एकदांच ऋग्वेदांत आलें आहे. तथापि त्या शब्दावरून राजा असा अर्थबोध होतो. ज्याचें नांव असमाति–सूक्तांत आहे त्याला इक्ष्वाकुवंशीय असें समजतात. अथर्ववेदांत हि इक्ष्वाकूचा फक्त एकदांच उल्लेख आला आहे. परंतु तेथेंहि मूळपुरुष कीं वंशज ही शंका पुनः कायम राहतेच. पुरुकुत्स हा ऐक्ष्वाक होता असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे. यावरून त्रसदस्यु हा इक्ष्वाकु होता ही गोष्ट प्रचारांत आली आहे. यावरून पुरूंनाच पुढें इक्ष्वाकू म्हणूं लागले असें होतें. झिमर म्हणतो कीं, त्यांची वस्ति उत्तर सिन्धूकडे असावी परंतु याबद्दल निश्चित सांगतां येत नाहीं. त्यांची पूर्वेकडे वस्ति असण्याचा विशेष संभव आहे. इक्ष्वाकू यांचा अयोध्येशीं संबंध पुढें आला.

पुरुकुत्साला 'दौर्गह' असें म्हटलें आहे. तसेंच त्रसदस्यूला 'गैरिक्षित' असें म्हटलें आहे. दुर्गह आणि गिरिक्षित् यांबद्दल कांहीं विशेष माहिती नाहीं.

पौरुकुत्स्य त्रसदस्युः—त्रसदस्यूचा पौरुकुत्सि ( ७. १९. ३ ) व पौरुकुत्स्य ( ५. ३३, ८; ८. १९, ३६ ) ह्या नांवांनीं उल्लेख आला आहे. दिवोदासाचें आणि पुरुलोकांचें वैर होतें. सुदासाशीं पुरुलोकांचें वैर होतें हें दाशराज्ञयुद्धावरून आपणांस दिसतें. तथापि ती लढाई पुरुकुत्साच्या वेळींच समाप्त झाली होती. त्रसदस्यूशीं त्या लढाईचा कांहीं एक संबंध नाहीं.

त्रसदस्युला 'हिरणिन्' नांवाचा एक मुलगा होता असें लुडविगचें म्हणणें आहे. परंतु ती ऋचा लुडविगला समजलेली नाहीं. कारण, 'हिरणिन्' हें धनवान् अशा अर्थाचें विशेषण आहे. ( ६. ६३, ९; ५. ५३, ८ ).

कालान्तरानें कुरु आणि पुरु हे दोनहि लोक एक झाले, याचें उदाहरण त्रसदस्युपुत्र कुरुश्रवण हें मानितां येईल. कुरु-

श्रवण आणि तृक्षि ( ८. २२, ७ ) या दोघांनाहि 'त्रासदस्यव' असें म्हटलेलें आहे. द्रुह्यु व पुरु लोकांबरोबरहि एके ठिकाणीं ( ६. ४६, ८ ) तृक्षीचा उल्लेख आला आहे. 'तार्क्ष्य,' हा घोडा तृक्षीचा होता कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. विरुद्ध पुरावा दिसे तोंपर्यंत हे दोघे भाऊ होते असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

कुरु लोकांचें राहण्याचें ठिकाण मध्यदेश होय. पुरुलोक सरस्वतीच्या कांठीं राहात होते असा उल्लेख येतो, ती सरस्वतीहि मध्यदेशांतलीच होय हेंहि ह्या कुरुपुरूंच्या संबंधावरून ध्यानांत येतें.

' त्र्यरुण त्रैवृष्ण ' यालाहि 'त्रसदस्यु ' असें म्हणत असत असें ब्राह्मणग्रंथांवरून म्हणतां येतें. सायणाचार्य ही गोष्ट स्वीकारीत नाहींत. ( ५. २७, १–३ ).

ऋग्वेदांत त्रसदस्यु, त्र्यरुण, त्रैवृष्ण, व अश्वमेध ( ५. २७, ४–६ ) हीं सर्व एकाच व्यक्तीचीं नांवें दिसतात. 'त्रैवृष्णस्त्रसदस्युश्च अश्वमेध इति त्रयः' असें बृहद्देवतेच्या पांचव्या अध्यायांतील १२ व्या श्लोकांत म्हटलें आहे. या ठिकाणीं उल्लेखिलेला अश्वमेध आणि ऋग्वेदाच्या आठव्या मंडळांत येणारा अश्वमेध यांचा पैतृक संबंध होता कीं काय हें सांगण्यास आश्वमेध शब्दाच्या व्युत्पत्तीशिवाय दुसरा आधार नाहीं. आश्वमेधाचें नांव पूतक्रतु असावें असें स्पष्ट दिसतें ( ८. ६८, १७ ).

ऋग्वेदेतर अनेक ग्रंथांत प्राचीन कालांतला प्रसिद्ध यज्ञ करणारा म्हणून त्रसदस्यु पौरुकुत्स्य* याचा पर आटणार, वीतहव्य श्रायस व कक्षीवंत औशिज यांबरोबर उल्लेख आलेला आहे ( तै. सं. ५. ६, ५, ३ काठ. सं. २२. ३ ).

* हा राजा आपला पुरोहित वृशजान ह्याला बरोबर घेऊन रथांत बसला असतां पुरोहित त्याचा रथ फार जोरानें चालवूं लागला, व त्यामुळें त्याजकडून एका ब्राह्मणाच्या मुलाची हत्या घडली. राजा पुरोहिताला म्हणाला, ' तूं रथ हांकीत असतां मुलगा मेला त्यापक्षीं तूं हत्या केलीस' परंतु पुरोहित राजाला म्हणाला, 'रथ तुझा आहे त्यापक्षीं त्वां हत्या केलीस' याप्रमाणें दोघेजण आपसांत भांडत भांडत इक्ष्वाकु राजाला विचारावयास गेले. इक्ष्वाकु राजानें सांगितलें कीं, वृशजान रथ हांकीत होता त्यापक्षीं हत्या करणारा तोच होय. नंतर वृशजानानें वार्शसाम या नांवाचें स्तोत्र म्हणून मुलाला पुन्हां जिवंत केलें, तरी इक्ष्वाकु राजानें पक्षपात करून वृशजानालाच दोषी ठरविलें. या कारणास्तव इक्ष्वाकु राजाच्या घरांतून अग्नि नाहींसा झाला व घरांत स्वयंपाक वगैरे होणें बंद झालें. तेव्हां विचाराअन्तीं राजाला समजलें कीं वृशजानाला आपण दोषी ठरविल्यामुळें अग्नि निघून गेला आहे. नंतर राजा वृशजानाजवळ गेला व वृशजानानें पूर्ववत् वार्शसाम सूक्त म्हणून अग्नीचें तेज परत आणल्यामुळें राजाच्या येथील स्वयंपाक वगैरे सर्व व्यवहार पूर्ववत् सुरू झाले [ ऋ. ५. २, १; वरील भाष्यांत सायणांनीं उद्धृत केलेला शाट्यायन ब्राह्मणोक्त इतिहास ].

बृहद्देवता (५. १४) व ताण्ड्य ब्राह्मण यांमध्यें ही कथा थोड्याफार फेरानें दिली आहे. सायणाचार्यांनीं शाट्यायन ब्राह्मणांतील उतारा घेतला आहे परंतु या कथेचा ऋग्वेदांत संबंध जोडणें अशक्य आहे.



उपमश्रवस् ( १०. ३३, ४, ६–७ ).— सायणाचार्य उपमश्रवस् यास मित्रातिथीचा व कुरुश्रवण यास त्रसदस्यूचा पुत्र मानतात. मूळ ऋग्वेदांतील ऋचांत ' कुरुश्रवणं त्रासदस्यवम् ' व ' उपमश्रवः नपात् मित्रातिथेः ' असे उल्लेख आले आहेत. ग्रिफिथ हा नपात् शब्दाचा अर्थ सायणाचार्यांप्रमाणेंच पुत्र असा करतो; परंतु त्रासदस्यव कुरुश्रवण म्हणजे त्रसदस्यूचा नातू कुरुश्रवण असें देतो. मॅकडोनल ह्या नपात् याचा नातू असा अर्थ करून मित्रातिथीचा पुत्र कुरुश्रवण व कुरुश्रवणाचा पुत्र उपमश्रवस् असें नातें जोडतो. बृहद्देवतेप्रमाणें ( ७. ३५, ३६ ) कवष–ऐलूष हा आजोबा मित्रातिथीच्या मृत्यूबद्दल उपमश्रवस् याचें सान्त्वन करीत आहे. ह्या कथेस कांहीं आधार आहे, पण गेल्डनर म्हणतो कीं कवष ऐलूष हा उपमश्रवस् याजकडून वाईट रीतीनें वागविला गेला व त्याला विहिरींत फेंकण्यांत आलें. तेथें त्यानें दयेकरितां पदर पसरला आहे. परंतु या कथेस कांहींच आधार नाहीं.

कवषच त्याचा कुरुश्रवणाशीं संबंध.— पुरुराजा कुरुश्रवण याचा कवषाशीं कांहीं संबंध होता काय हें पाहिलें पाहिजे. दाशराज्ञ युद्धांत इन्द्रानें द्रुह्यूंबरोबर ज्यांना जिंकलें त्यांपैकीं एक कवष आहे. त्याचेंच ' श्रुत ' हें विशेषण असावें असें ग्रिफिथ वगैरेंचें म्हणणें आहे. सायणहि ऋग्वेदांतल्या एका ऋचेवरील भाष्यांत ' श्रुत ' हें स्वतंत्र व्यक्तीचें नांव आहे असें मानितात.

' अध श्रुतं कवषं ' ( ७. १८, १५ ). ही ती ऋचा होय. सदरील फक्त एकाच ठिकाणीं कवषाचा प्रत्यक्ष निर्देश आला आहे. ' कवष ' यानें केलीं म्हणून ऋग्वेदांत प्रसिद्ध असलेलीं दहाव्या मंडळांतील ३१, ३२ व ३३ हीं तीन सूक्तें आहेत. ३१ व्या सूक्ताच्या शेवटची ऋचा अशी आहे:–

**उत कण्वं नृषदः पुत्रमाहुरुत श्यावो धनमादत्तवाजी ।**
**प्रकृष्णाय रुशदपिन्वतोधर्ऋतमत्र नकिरस्मा अपीपेत् ।**

आणि कण्वाला नृषदाचा पुत्र असें म्हणतात. अन्नयुक्त काळ्या कण्वास ( हि ) धन मिळालें. या नार्षद कण्वालाहि ( अग्नीकडून ) तेजस्वी रूप मिळालें. कण्वाच्या यज्ञाची वृद्धि अग्निशिवाय कोणींहि केली नाहीं.

बत्तिसाव्या सूक्तांतल्या शेवटल्या ऋचेवरून सूक्तकर्ता ( कवष ) हा कुरुश्रवणाचा उपाध्याय होता असें दिसतें. ती ऋचा अशी:–

**एतानि भद्रा कलश क्रियाम**
**कुरुश्रवण ददतो मघानि ॥**
**दान इद्वो मघवानः सो अस्त्वयं च सोमो हृदि यं बिभर्मि ॥**

( १०. ३२, ९ ).

हे संपन्ना कुरुश्रवणा, धन देणाऱ्या तुझ्याकरितां आम्ही हीं कल्याणकारक कर्में करीत आहोंत. हे स्तोतेहो, तो इन्द्र तुम्हांला दाता होवो. हा सोम ज्याला मी हृदयांत धारण करतों तो तुम्हांला दाता होवो.

विरुद्ध पुराव्याच्या अभावीं वरील मंत्रावरून 'कवष' हा कुरुश्रवणाचा प्रतिनिधिभूत उपाध्याय होता असें दिसतें.

तेहेतिसाव्या सूक्तावरूनहि आपणांस कुरुश्रवण आणि कवष यांचा संबंध दृढ करतां येतो. तेथें खालीलप्रमाणें उल्लेख आला आहे.

कुरुश्रवणमावृणि राजानं त्रासदस्यवम् ।
मंहिष्ठं वाघतामृषिः ॥
(१०. ३३, ४).

त्रसदस्यु पुत्र, राजा कुरुश्रवण याजजवळ ऋत्विजांकरितां मी पैसे मागतों.

कुरुश्रवणावरील आपत्ति.— १ कुरुश्रवण याला मोठी दुःस्थिति प्राप्त झाली होती असें तेहेतिसाव्या सूक्ताच्या प्रारंभींच्या ऋचांवरून दिसतें. त्या ऋचा अशाः—

सं मा तपन्त्यभितः सपत्नीरिव पर्शवः ।
नि बाधते अमतिर्नग्नता जसुर्वे र्न वेवीयते मतिः ॥
मूषो न शिश्ना व्यदन्ति माध्यः स्तोतारं ते शतक्रतो ।
सकृत्सुनो मघवन्निंद्र मृळयाधा पितेवनो भव ॥
(१०. ३३, २; ३;).

'माझ्या बरगड्या सवतीप्रमाणें (शत्रूंप्रमाणें) मला चहूंकडून त्रास देत आहेत. दारिद्र्यामुळें येणारी दुर्बुद्धि, वस्त्राभाव आणि क्षीणता मला त्रास देते. पक्ष्याप्रमाणें शत्रूच्या भयानें माझें चित्त कंपायमान झालें आहे. हे इंद्रा, उंदीर ज्याप्रमाणें दोरे तोडतात त्याप्रमाणें मानसिक व्यथा मला सारख्या तोडतात. हे इंद्र आम्हांला सुख दे. पित्याप्रमाणें आमचें रक्षण करणारा हो.'

वरील सायणी अर्थांत पर्शवः याचा अर्थ बरगड्या असा केला आहे. परंतु परशु लोक मला चोहोंबाजूंनीं त्रास देत आहेत असा अर्थ आम्ही जास्त सयुक्तिक समजतों.

यावरून कवषाचा यजमान कुरुश्रवण याला निकृष्टावस्था प्राप्त झाली होती असें दिसतें. दाशराज्ञयुद्धांतील कवष आणि सूक्तकार कवष हे एकच होते कीं काय, हें ठरविणें कठिण आहे. झिमरचें म्हणणें पुढें दिलें आहे त्यावरून कुरु-क्रिवींशीं कवषाचा संबंध जोडतां येत असल्यास पहावा.

कुरुश्रवण व कुरु यांचा संबंधः—कुरुश्रवण या नांवांतील कुरु शब्दावरून कुरुश्रवणाचा व कुरूंचा कांहीं संबंध असावा असें म्हणण्यास जागा आहे. ऋग्वेदांत कुरु वंशाचा उल्लेख नाहीं. एवढेंच नव्हे, तर 'कुरु' हें आज्ञार्थी क्रियापदहि फक्त दोनदांच आलें आहे व तेंहि दहाव्याच मंडळांत होय (१०. १९, २; १० १४५, २).

कुरु वंशाचें स्मरण करून देणारे किंवा कुरूंशीं संबंध दाखविणारे असे शब्द ऋग्वेदांत फक्त दोनच आहेत. एक कुरुङ्ग आणि दुसरा कुरुश्रवण.

कुरुङ्ग शब्दाचा उल्लेख खालील प्रमाणें आला आहेः—

स्थूरं राधः शताश्वं कुरुङ्गस्य दिविष्टिषु ।
राज्ञस्त्वेषस्य सुभगस्य रातिषु तुर्वशेष्वमन्महि ॥
(८. ४, १९).

'त्या तेजस्वी आणि श्रेष्ठ अशा कुरुङ्ग राजाच्या यज्ञांत लोकांत ('तुर्वशेषु) जें श्रेष्ठ धन शंभर घोडे तें आम्हीं मानलें.

या मंत्राच्या व्याख्याप्रसंगीं यास्काचार्यांनें कुरुङ्ग शब्दाबद्दल, 'कुरुङ्गो राजा बभूव कुरुगमनाद्वा कुलगमनाद्वा कुरुः कृन्ततेः।' असा उल्लेख केला आहे. कुरुङ्ग नांवाचा राजा होता. कुरूंचा वंशज होता म्हणून किंवा शत्रुकुलांनां जिंकण्याकरितां जात असे म्हणून त्यास कुरुङ्ग असें म्हणत असावें. (कुरून् गच्छति) किंवा 'शत्रूंनां छेदितो तो कुरु' अशीहि कुरु शब्दाची व्युत्पत्ति देतां येते. यावरून कुरु वंशाची माहिती किती अपुरी आहे हें वाचकांस कळून येईल.

सूक्तकार कवष व दाशराज्ञयुद्धांत पडलेला कवष एकच काय.—निरुक्तकार यास्कांनांहि त्याबद्दल निश्चय नाहीं हें त्यांच्या दुहेरी लिहिण्यावरून दिसतें. तथापि कुरुश्रवण येथील "कुरु" शब्द पुरुकुत्स येथील "पुरु" शब्दाप्रमाणें कुरु वंशाचा बोधक होण्याचा संभव आहे. असो. 'कवष' हा 'वैकर्ण' नांवाच्या संयुक्तजातींचा पुरोहित होता. त्या जातींत कुरु व क्रिवि लोकांचा समावेश होत असून कवष हा त्यांचा वकील होता असें कांहींचें म्हणणें आहे.

कवष हा पांच जातींचा उपाध्याय होता व कुरुश्रवणाच्या मुलानें त्याला वाईट रीतीनें वागविलें म्हणून त्यानें दहाव्या मंडळांतील तेहेतिसावें सूक्त आपल्या राजाच्या क्रोधशमनार्थ केलें. ह्या सर्व मतांची अनुमानावर विशेष भिस्त असल्यामुळें पुरावा या नात्यानें त्यांचा उपयोग बेताचाच आहे. कांहीं गोष्टी तर विचारार्हहि नाहींत.

कवष हा राजा होता व तो सुप्रसिद्ध होता असें, तो दाशराज्ञ युद्धांत होता व त्याला 'श्रुत' हें विशेषण लावतां येण्यासारखें आहे यावरून म्हणतां येईल.

कवष ऐलूषाची कथा कौषीतकी व ऐतरेय ब्राह्मणांत दिली आहे. तो कवष आणि हा कवष एकच असणें शक्य आहे (ज्ञानकोश विभाग २, पृष्ठ ३३७ पहा).

कवष सूक्तकार आणि दाशराज्ञ युद्धांत पडलेला कवष यांचें ऐक्य धरण्यास अडचण अशी आहे कीं, सुदासाशीं समकालीन राजा, पुरुकुत्स होता. त्या पुरुकुत्साचा मुलगा त्रसदस्यु. कुरुश्रवण हा त्रसदस्यूचा वंशज, तर कवष कुरुश्रवणाचा स्तुतिकर्ता कसा बनूं शकेल? असो.

द्रुह्यु, अनु, पुरु, यदु व तुर्वश यांसंबंधीं विशेष जिज्ञासा वाटण्याचें कारणः—दाशराज्ञयुद्धांत गुंतलेले द्रुह्यु, अनु, पुरु, यदु आणि तुर्वश, यांविषयीं दोन निरनिराळ्या कारणांनीं जिज्ञासा उत्पन्न होते. एक कारण म्हटलें म्हणजे पुरूंचें भरतांशीं इतर ग्रंथांत

वर्णिलेलें ऐक्य आणि दुसरें कारण या पांचांचा महाभारतांत एकत्र झालेला उल्लेख होय. या उल्लेखामध्यें या पांचांच्या संघांतून पुरूंस इतर चारांहून निराळें केलें आहे व दुसऱ्या अनेकांबरोबर त्यांचें ऐक्य दाखविलें आहे.

**पुरु, तृत्सु, भरत व कुरु, हे एकच लोक असावेत**:—पुरु, तृत्सु, भरत व कुरु हे सर्व वंश एक झाले असा ध्वनि ऋग्वेदांतून व इतर ग्रंथांतून निघतो. पण असेंहि झालें असेल कीं, हे सर्व वंश एकाच महावंशाच्या शाखा असतील. तृत्सु व पुरु एक असावेत. कां कीं, दिवोदासाला पुरु म्हटलें आहे; आणि दिवोदासाचा मुलगा सुदास याला भरत म्हटलें आहे. तेव्हां भरत आणि पुरु हे मूळचे एकच असावेत. दिवोदास हा जर तृत्सु असला तर पुरु आणि तृत्सु त्यामुळें एक ठरतील. दिवोदास हा तृत्सु असावा यास प्रमाण हें कीं, एक तर त्याचा मुलगा हा तृत्सु होता अगर भरत होता, आणि तृत्सु आणि भरत भिन्न होते कीं, एक होते हें सांगण्यास कठिण पडतें. वसिष्ठ तृत्सूंचा पुरोहित म्हणवितो व भरतांचाहि पुरोहित म्हणवितो. याशिवाय दिवोदासाच्या एका वंशजास प्रतर्दन म्हटलें आहे. आणि तृत्सूंस प्रतृद् असें वारंवार म्हटलें आहे. पण तेवढ्यावरूनच सिद्धि होईल असें नाहीं. जेता जिंकलेल्या प्रदेशाचें नांव किंवा पदव्या आपल्या मुलाबाळांस देतो हें प्रिन्स ऑफ वेल्स यासारख्या अत्यंत परिचित उदाहरणावरून लक्षांत येईल.

कुरु आणि पुरु हे एक होते असें म्हणण्यास आधार कुरुश्रवण हा होय. याला त्रासदस्यव असें म्हटलें आहे. त्रसदस्यु हा पुरुकुलांतील असून पुरुकुत्साचा वंशज होता.

वरील विवेचनावरून पुरु, कुरु, भरत, आणि तृत्सु हे एकच लोक असावेत असें वाटतें. उत्तरकालीं नांवाची पालट झाली नसावी असें म्हणण्यास कारण दिवोदास अतिथिग्वास पुरु म्हटलें आहे, सुदासाच्या वंशजास जर पुरु म्हटलें असतें तर उत्तरकालीं भरत आपणांस पुरु म्हणवून घेऊं लागले असावे असें दिसेल.

**दाशराज्ञ युद्धविषयक ऋग्वेदांतील कथासूत्र**:—शिवाय हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं जेव्हां तूर्वयाणाबरोबर लढाई झाली तेव्हां आयु ( पुरुरवस् याचा मुलगा ) कुत्स ( पुरु ), दिवोदास ( पुरु ) हे एक होते. म्हणजे ही पुरु व तूर्वयाण यांची लढाई होय. तूर्वयाण हे कदाचित् तुर्वश असणेंहि शक्य आहे. असें असल्यास स्पर्धा करणारीं दोन राष्ट्रें तुर्वश व पुरु हीं ठरतात.

पुरूंस तूर्वयाणांनीं अगोदर जिंकलें. कालांतरानें पुरु राष्ट्रसंघांतील एक राष्ट्र सुदासाच्या नेतृत्वाखालीं पुढें येऊन स्वातंत्र्य स्थापितें झालें, आणि तुर्वशादि राष्ट्रांस जिंकितें झालें.

या भांडणांत इतर पुरूंपैकीं कांहींनीं कांहीं प्रसंगीं सुदासास साहाय्य केलें तर कांहींनीं कांहीं प्रसंगीं विरोध केला, असें कथासूत्र आपणांस दिसून येतें.


**अन्वादि राष्ट्रपंचकासंबंधीं महाभारतांतील उल्लेखः**— आतां भारतीय कथेकडे वळून महाभारतांत अनु, द्रुह्यु, यदु, तुर्वश, व पुरु या राष्ट्रपंचकाबद्दल काय उल्लेख आले आहेत तें पाहूं. महाभारतांत अदिति आणि कश्यप यांची उत्पत्ति सांगून पुढें असें लिहिलें आहेः—

अदित्यां कश्यपाद्विवस्वान् ।
विवस्वतो मनुः ।
मनोरिला इलायाः पुरुरवाः ।
पुरुरवस आयुः ।
आयुषो नहुषः ।
नहुषस्य ययातिः ।
ययातेर्द्वे भार्ये बभूवतुः ।
उशनसो दुहिता देवयानी वृषपर्वणश्च दुहिता शर्मिष्ठा नाम ॥

आदिपर्व, ( ९३. ४, ५ ).

तत्र अनुवंशो यथा ।
यदुं च तुर्वसुं चैव देवयानी व्यजायत ।
द्रुह्युं चानुं च पूरुं च शर्मिष्ठा वार्षपर्वणी ॥

**यदुतुर्वशांचा वंशः**—. महाभारतांत एवढाच उल्लेख आहे. यापेक्षां तेथें जास्त माहिती नाहीं. यदु, द्रुह्यु वगैरे जे लोक ऋग्वेदांत सर्वपरिचित आहेत, त्यांचा हा उल्लेख असावा असें दिसतें. यांचा संबंध दाखविणारी वंशावळ पुढें दिल्याप्रमाणें मांडतां येईल.




या वंशावळींत पांडवांपर्यंत सर्व वंश क्रमानें दिला आहे. महाभारतांतील ह्या वंशावळीवरून यदुतुर्वशादि पंचजनांच्या पूर्वजांचें आपणांस ज्ञान होतें. प्रश्न एवढाच आहे कीं, भारतान्तर्गत यदुतुर्वश वगैरेंचा व वैदिक यदु तुर्वश वगैरेंचा संबंध काय ? ते एक कीं भिन्न ! ते एकच असें आपण समजलों तर काय हरकत आहे ! या प्रश्नांचा आपण विचार करूं. प्रथम आपणास आपत्ति दिसते ती ही कीं महाभारतांत

ययातीचा वृत्तान्त सविस्तर आला आहे व पुरूरवस्, मनु वगैरेंची हकीगतहि आली आहे; परंतु त्यांचेच जे अत्यंत पुढले वंशधारक 'यदु-तुर्वश' वगैरे त्यांचा महाभारतांत पत्ताहि नाहीं. सध्यां आपण या प्राचीन वाङ्मयाचा कालानुक्रम जो स्वीकारतों त्याशीं हें अत्यंत विसदृश असें दिसतें. आपल्या विचाराची अशी दिशा असले कीं वेद हे सर्व ब्राह्मण, पुराणें वगैरेपेक्षां प्राचीन. वेदांत[1] ज्या गोष्टींचा समावेश होईल त्या गोष्टी वेदपूर्वकालीन; आणि भारतांतील भारतपूर्वकालीन व वेदोत्तरकालीन. या कल्पनेस वरील वंशावळीवरून स्पष्ट बाध येतो. कारण, वरील वंशावळींतील बहुतेक व्यक्तींचा ऋग्वेदांत स्पष्ट उल्लेख आहे. देवयानी आणि शर्मिष्ठा यांचा मात्र तेथें उल्लेख नाहीं असें म्हणावें लागतें.

वैदिक व्यक्तींत आणि त्याच नांवांच्या भारतकालीन व्यक्तींत कांहीं भेद असेल असें म्हणण्यास पुरावा नाहीं.

**वैदिक इतिहास लावण्याच्या कामीं भारतोक्त इतिहासाची मदत.**—' यावरून आपणांस थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं भारतांत तत्कालीन हकीकतीपेक्षां अतिप्राचीन अशाहि कांहीं गोष्टींचा प्रसंगानें समावेश झाला आहे. वैदिक इतिहासाचें पर्यालोचन करते प्रसंगीं आपणांस त्या भारतोल्लिखित वेदपूर्वकालीन गोष्टी सविस्तर ध्यानांत घेऊन वैदिक व्यक्तींवर भारतोक्त इतिहासानें जास्त काय प्रकाश पडतो हें ध्यानांत घेतलें पाहिजे. त्या दृष्टीनें या ठिकाणीं आपणांस यदुतुर्वशांची व त्यांच्या द्रुह्यु, अनु व पुरु ह्या बंधूंची बरीच स्पष्ट माहिती मिळते व त्यांचा उल्लेख साहचर्यानें कां येतो याचाहि निर्णय करतां येतो.

**पुरुवंश.**—आतां आपण ह्या पुरुवंशाच्या प्राचीन वंशावळींत वेद आणि भारत यांचा दुवा आपणांस कोठें जोडतां येतो तें पाहूं.

त्याकरितां महाभारतांत आलेली ह्या कुलाची समग्र वंशावळ आपण डोळ्यांपुढें ठेवली पाहिजे. यदुतुर्वशापर्यंत वंशावलि पूर्वीं दिली आहेच. ययातिपुत्र तुर्वश, द्रुह्यु व अनु यांचा उल्लेख महाभारतांत केवळ नाममात्रानेंच आला आहे व यदूपासून यादव वंशाची उत्पत्ति झाली असल्या मोघम माहितीपेक्षां यदुविषयींहि आपणांस फारच थोडें ठाऊक आहे. पुरूंचा वंश मात्र महाभारतांत विस्तारें करून वर्णिलेला आहे. त्याची वंशावलि येणेंप्रमाणें:—

*पुरु
|
जनमेजय
|
प्राचिन्वान्
|
संयाति
|
अहंयाति
|
सार्वभौम
|
जयत्सेन
|
अवाचीन
|
अरिह
|
महाभौम
|
अनुतानायी
|
अक्रोधन
|
देवातिथि
|
ऋच
|
ऋक्ष
|
अन्त्यनार
|
त्रसु सारस्वत
|
इलील ( अनुवंश )
|
दुष्यन्त वगैरे पांच
|
जनमेजय
|
*भरत
|
भूमन्यु
|
सुहोत्र
|
हस्ती(हस्तीनापुर स्थापयिता)
|
विकुंठन
|
*अजमीढ
|
*संवरण
|
कुरु ( कुरुवंश )
|
विदूरथ
|
अनश्वन्
|
परिक्षित्
|
भीमसेन
|
परिश्रवस्–प्रतीप §

परिश्रवस्–प्रतीप यांचे पुत्र: *देवापि, *शन्तनु, बाल्हीक

*शन्तनु
|
देवव्रत ( भीष्म )

**शन्तनु व ऋग्वेद.**—सदर वंशावली पाहतां असें दिसून येतें कीं भीष्माचा बाप जो शन्तनु त्याचाच उल्लेख ऋग्वेदांत असावा असें म्हणण्यास कथासाम्याचा आधार आहे. भारतान्तर्गत शन्तनु आणि वैदिक शन्तनु यांत काय साम्य आहे तें आपण पाहूं. पहिलें स्पष्ट साम्य म्हणजे देवापि आणि शन्तनु या दोन व्यक्ति महाभारतांत जशा बन्धू म्हणून आल्या आहेत त्याचप्रमाणें त्यांची ऋग्वेदांतही एकत्र नांवें आलीं आहेत. ते भाऊ होते असें मानण्यास खुद्द ऋग्वेदांत सामीप्योच्चारणाशिवाय कांहीं अधिक पुरावा नाहीं.

[1] अर्थात् यासंबंधांत यास्क व सायण हे प्रमाण आहेत. तथापि प्रथम ऋचांमधून काय काढतां येतें तें पाहिलें पाहिजे. पहिलें नामसाम्य वर आलेंच आहे. आतां थोडें चरित्रसाम्य दाख-

*ही खूण ज्यांवर आहे त्यांचा ऋग्वेदांत उल्लेख आहे. § मुंबईप्रतींत परिश्रव्याच्याजागीं प्रतिश्रवा असून परिश्रव्यास प्रतीप व प्रतीपास देवापि आदिकरून तीन पुत्र होते असें म्हटलें आहे. (आदिपर्व, अध्याय ९५, श्लोक ३८९७ पहा.)

विता येईल. महाभारतांत देवापीनें बालपणींच विरक्ति स्वीकारली आहे व ऋग्वेदांतहि तो पुरोहितरूपानें आला आहे. त्याला पोषक असा दुसरा पुरावा म्हणजे तपश्चर्येनें देवापि ब्राह्मण झाला असें शल्यपर्वांत ( अ. ४० मध्यें ) आलें आहे व आर्ष्टिषेणाचाहि तेथेंच उल्लेख आला आहे हेंहि महत्त्वाचें साम्य म्हणून स्वीकारण्यास हरकत नाहीं.

शन्तनु व यास्क.—आतां यास्कांनीं ( २. ११ ) दिलेली हकीगत हीहि देवापि व शन्तनु यांस जोडणारा पुरावा म्हणून किंवा वैदिक उल्लेखापासून पौराणिक कथेपर्यंत जें कथारूपांतर झालें त्याच्या पायऱ्या म्हणून आपणांस घेतां येईल. यास्काचार्यांनीं दिलेली माहिती पुढें दिल्याप्रमाणें आहे.

**" देवापिश्चार्ष्टिषेणः शन्तनुश्च कौरव्यौ भ्रातरौ बभूवतुः । स शन्तनुः कनीयानभिषेचयांश्चक्रे देवापिस्तपः प्रतिपेदे । ततः शन्तनो राज्ये द्वादश वर्षाणि देवो न ववर्ष । तमूचुर्ब्राह्मणास्त्वया चरितो ज्येष्ठं भ्रातरमन्तरित्याभिषेचितं तस्मात्ते देवो न वर्षति । स शन्तनुर्देवापिं शिशिक्ष राज्येन । तमुवाच देवापिः पुरोहितस्ते ऽसानि याजयानि च त्वेति ।**

अर्थः—आर्ष्टिषेणदेवापि आणि शन्तनु हे कुरुवंशांतील दोघे भाऊ होते. धाकट्या शन्तनूला राज्याभिषेक झाला. देवापि तपाला गेला. त्यामुळें शन्तनूच्या राज्यावर बारा वर्षें अवर्षण पडलें. ब्राह्मण म्हणूं लागले कीं थोरल्या भावास सोडून तुला राज्याभिषेक झाला म्हणून असें झालें. देवापीला शन्तनूनें राज्य दिलें. देवापि म्हणाला मी पुरोहित होतों आणि तुझ्याकडून यज्ञ करवितों.

ऋग्वेदान्तर्गत व भारतान्तर्गत इतिहासाची सांखळी.—निरुक्तांतील ह्या वृत्तान्तांतून पुढें दिल्याप्रमाणें चार मुद्दे निघतात.

( १ ) देवापि व शन्तनु हे दोघे भाऊ होते.

( २ ) देवापि विरक्त होता.

( ३ ) म्हणून धाकटा शन्तनु गादीवर बसला;

( ४ ) व त्यामुळें पातक घडून अवर्षण पडलें. ह्यावरून यास्कांनाहि महाभारतांतील प्रसिद्ध देवापि व शन्तनु आणि ऋग्वेदांतील देवापि व शन्तनु हे एकच आहेत ही गोष्ट अभिमत होतीसें दिसतें. यास्कांचें म्हणणें बरोबर आहे असें गृहीत धरल्यास —व तसें गृहीत धरावें लागतें—या कथेच्या योगानें आपणांस ऋग्वेदान्तर्गत व महाभारतान्तर्गत इतिहासाची सांखळी जोडतां येते.

विरुद्ध पुरावाः—उपर्युक्त सांखळी जोडण्यास विरुद्ध पुरावा काय आहे त्याचा आतां आपण विचार करूं. सदरहु सांखळीवर घेतां येण्यासारखे आक्षेप म्हटले म्हणजे

( १ ) ऋग्वेदांत भाऊ असा स्पष्ट उल्लेख नाहीं.

( २ ) वेदांत आर्ष्टिषेण हें पैतृक नांव आहे; त्याचा भारताशीं मेळ बसत नाहीं.

( ३ ) भाऊ उपाध्याय कसा.

यांचीं उत्तरें थोडक्यांत खालील प्रमाणें देतां येतील.

( १ ) भाऊ म्हणून उल्लेख नाहीं; तथापि, निरुक्तावरून आपणांस तसें घेतां येईल.

( २ ) वेदांत व निरुक्तांत देवापि व शन्तनु यांस 'आर्ष्टिषेण' असें म्हटलें आहे व भारतांत परिश्रवस् प्रतीप हें शन्तनूच्या पित्याचें नांव आहे. वंशावळींत पूर्वी कोणाचेंहि ऋष्टिषेण हें नांव नाहीं. यावरून हें नांव कांहीं तरी विशेष कारणानें पडलें असावें, पैतृक नांव नसावें. निरुक्तकारांसहि या बाबतींत संशय असावा. त्यांनीं ' ऋष्टिषेणस्य पुत्र इषितसेनस्येति वा ' असें म्हटलें आहे व सेना शब्दाचें विवरण 'सेश्वरा समान गति र्वा ' असें केलें आहे त्यावरून असें दिसतें कीं परिश्रव्यास जसें ' प्रतीप ' हें एक नांव होतें त्याप्रमाणेंच ऋष्टिषेण असें हि दुसरें टोपणनांव असावें. ' परिश्रव्याच्या पित्याचें भीमसेन असें नांव आहे, त्यावरून या गोष्टीस कांहीं विरोध येत नाहीं. येथें एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, आर्ष्टिषेण हें फक्त देवापीलाच विशेषण लावलें आहे, शन्तनूस लावलें नाहीं.

( ३ ) स्वतःच्या घरच्या गोष्टी स्वतःच कराव्यात व सध्यांहि स्वगृहांतील ऋत्विज करण्याची सशास्त्र चाल आहे. अर्थात् भाऊ पुरोहित म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

महाभारतांतील वंशावळी वगैरे वस्तुस्थितीशीं धरून पूर्वापर विरोधरहित आहेत कीं नाहींत याबद्दल विचार तूर्त एका बाजूस ठेवून ' सिद्धस्य गतिश्चिन्तनीया ' या न्यायानें व्यवहार करण्याचें ठरवावें असें वाटतें; व त्या तऱ्हेनेंच आतांपर्यंत विचार केला आहे.

यावरून राष्ट्रपंचकाचा इतिहास आपणास भारताशीं जोडतां येतो असें कांहीं अंशीं म्हणावयास हरकत नाहीं. आणखीहि कांहीं हकीकत महाभारतांत ( १. ७७ ) पहावयास सांपडते. परंतु ती सध्यां आपणांस महत्त्वाची नसल्यामुळें तिच्याबद्दल उहापोह करण्याचें कारण नाहीं.

ऋग्वेद व ययातीचा शापः— तुर्वश हा ययातिपुत्र होता व त्याच्या अभिषेकाविषयीं ययातीचा कांहीं शाप ( १. ८४ ) होता. ह्या सर्व गोष्टी सायणाचार्यांना कबूल होत्या असें सायणभाष्यावरून दिसतें.

**उत त्या तुर्वशायदू अस्नातारा शचीपतिः । इन्द्रो विद्वाँ अपारयत । ( ४. ३०, १७ ).**

अर्थः—सायणांप्रमाणें—तसेंच ययातिशापानें अनभिषिक्त राहिलेल्या त्या प्रसिद्ध तुर्वश व यदु राजांना कर्मांचा पालक जो इन्द्र त्यानें सर्व गोष्टी जाणून अभिषेकार्ह केलें.

यावरून ऋग्वेद व महाभारत यांची सांगड कशी घातली गेली होती हें समजतें.

वैदिक साहित्याच्या द्वारें महाभारतोक्त इतिहासाची तपासणी.— महाभारतांतील उल्लेखांची तपासणी वैदिक साहित्याच्या द्वारें करावयाची झाल्यास खालीलप्रमाणें शेरे मारतां येतील.

भारतकारांनीं सर्वांत प्राचीन असा राजा पुरूरवा केला आहे. हा देखील मनु व इला यांचा वंशज म्हणून दिला आहे. याला शतपथ ब्राह्मणांत ( ११. ५, १ ) ऐल हें विशेषण लावलें आहे एवढाच आधार आहे. आयु हा त्याचा मुलगा होता यास वेदांत आधार नाहीं. आयूचा मुलगा नहुष या विधानालाहि वेदांत आधार नाहीं. नहुषाचा मुलगा ययाति यास वेदांत आधार आहे. ययातीचे पांच राष्ट्रसंस्थापक मुलगे ही कल्पनाच आहे. यदुतुर्वशांचें अस्तित्व वैदिक आधारावरून ययातीच्या पूर्वींहि घालतां येईल.

ययातीच्या नंतर भरतदौष्यन्तीपर्यंत जे राजे झाले म्हणून महाभारत म्हणतें त्यांपैकीं वेदांत कोणाचाच उल्लेख नाहीं. दौष्यन्ती भरतांचा उल्लेख ब्राह्मणांत येतो. अजमीढ, संवरण देवापि, शंतनु व धार्तराष्ट्र हे पुढचे राजे म्हणून वर्णिलेले व राजपुत्र म्हणून वेदांत उल्लेखिले आहेत; पण त्यांचा असा संबंध जोडलेला नाहीं. त्यांच्या दोन निराळ्या कथांमध्यें घोटाळा असावा.

ऋग्वेदांतील सूक्तावरून देवापि हा, ज्याला औलान हें नांव होतें त्या शंतनूकरितां यज्ञ करीत होता असें निश्चित दिसतें; पण हे दोघे भाऊ होते असें त्यावरून दिसत नाहीं व देवापि हा ब्राह्मण नव्हता तर क्षत्रिय होता ही गोष्ट ऋग्वेदांवरून सिद्ध होत नाहीं. सायण जो अर्थ करतो त्याला आधार त्यानें निरुक्ताचा घेतलेला आहे. त्याचें असें मत आहे कीं, देवापि हा क्षत्रिय होता पण बृहस्पतीच्या कृपेनें त्याला पुरोहिताचें काम करतां आलें. ऋग्वेदांतील सूक्तावरून, क्षत्रियानें पुरोहिताचें काम करणें हें नेहमींच्या प्रचाराविरुद्ध होतें ही गोष्ट स्पष्ट दिसते.

कौरवांचा उल्लेख अगदींच नाहीं असें नाहीं. वैदिक वाङ्मयांत शांखायन सूत्राच्या कांहीं हस्तलिखितांत ( १२. १४, १ ) व अथर्ववेदांत ( २०. १२७, १ ) ज्याला कौरम म्हटलें आहे त्याचेंच कौरव हें दुसरें रूप आहे. आणि हा रुशम यांच्या मध्यें मोठा दाता होता असें दानस्तुतींत लिहिलें आहे. कुरूंचा क्रिवींशीं जसा संबंध जोडण्यांत येतो त्याप्रमाणें 'कृत्वन्' नांवाचें एक राष्ट्र होतें असें समजून त्याशींहि जोडण्यांत आला आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं कृत्वन् हा शब्द अनेक वचनांत आर्जीक आणि पांच लोक यांच्या बरोबर लिहिला आहे. पिशेल म्हणतो कीं त्याचा अर्थ लोक असा आहे; आणि सायण म्हणतो कीं कृत्वन् हें एका देशाचें नांव आहे. ह्या दृष्टीनें हें नांव कुरु अथवा क्रिवि यांच्याशीं संबंध दाखवील. तथापि हिलेब्रँट म्हणतो कीं, हें आर्जीक ह्यांचें विशेषण आहे आणि त्यांच्या प्रतिपक्षानें त्यांना तें जादूगार अशा अर्थानें लाविलें आहे. ह्या त्याच्या मताला दुजोरा म्हणून, तो असा पुरावा देतो कीं, काश्मिरी लोकांनां आसपासचे राजे इतक्या तिरस्कारानें लेखीत असत कीं त्यांच्याशीं कोणत्याहि तऱ्हेचा मित्रसंबंध ते ठेवीत नसत आणि त्यांचें नांव त्यांनीं कि-लि-टो ( Ki. li. to ) अथवा कृत्यः असें ठेविलें होतें*. ( तो म्हणतो कीं, जुन्या काळीं काश्मिरांत ज्या आर्जीकांनीं वस्ती केली त्यांची आणि नंतरचे वास करणारे त्यांचे वंशज ह्यांचीहि तीच अपकीर्ति होती. )

उपर्युक्त कृत्वन्संबंधीं ऋग्वेदांत पुढें दिल्याप्रमाणें उल्लेख आला आहे:—

**य आर्जिकेषु कृत्वसु ये मध्येपस्त्यानाम्। ये वा जनेषु पञ्चसु**
( ९, ६५, २३ )

आर्जीक देशांतील लोक, कृत्वन् देशांतील लोक, सरस्वत्यादि नद्यांच्या समीप असणाऱ्या देशांतील लोक आणि निषाद व चातुर्वर्ण्यांतील म्हणजे हा पांच जातींतलि लोक जे सोमरस पिळतात ( ते सोमरस आमच्यावर आकाशांतून पर्जन्यवृष्टि करवोत )—सायण.

आर्जीक लोकांत, उद्योगी माणसांत, मनुष्यांच्या घरांत किंवा पांच जातींच्या लोकांत ( पिळले जाणारे सोमबिन्दू आमच्यावर आकाशांतून पर्जन्यवृष्टि करोत )—ग्रिफिथ.

**अनुः**—आतां आपण दाशराज्ञ युद्धांतील सुदासाच्या इतर मुख्य शत्रूंकडे वळूं. मागें दिलेल्या ७. १८ या सूक्तांतील उल्लेखांशिवाय ऋग्वेदांत अनूंविषयीं जे उल्लेख सांपडतात ते येणेंप्रमाणें:

**अनवस्ते रथमश्वाय तक्षन् त्वष्टा वज्रं पुरुहूत द्युमंतं।**
**ब्रह्माण इन्द्रं महयन्तो अर्कैरवर्धयन्नहये हन्तवा उ॥**
( ५. ३१, ४ )

हे इन्द्रा तुझा रथ आनूंनीं तासून तयार केला. त्वष्टा तुझें वज्र दीप्तिमान् करतां झाला. आणि इन्द्राला स्तवणारे थोर ऋषी ( अङ्गिरस ) किंवा मरुत अहीला मारण्याकरितां स्तोत्रांनीं तुला उत्साहयुक्त करते झाले—सायण.

**यदिन्द्र प्रागपागुदङ् न्यग्वा हूयसे नृभिः।**
**सिमा पुरू नृषूतो अस्यानवेसि प्रशर्ध तुर्वशे।**
( ८. ४. १ ).

हे इन्द्रा, सर्व दिशांनीं स्तोत्यांकडून तूं बोलावला जातोस. तथापि हे श्रेष्ठा, हे पराभव करणाऱ्या, स्तोत्यांकडून आनवांविषयीं विशेष प्रेरणा केला जातोस—सायण.

**यई राजानावृतुथा विदधद्रजसो मित्रो वरुणश्चिकेतत्।**
**गम्भीराय रक्षसे हेतिमस्य द्रोघाय चिद्वचस आनवाय॥**
( ६. ६२. ९ )

जो मनुष्य सर्व लोकांचे राजे असणारे जे ( दोन ) अश्विनीकुमार त्यांची प्रत्येक ऋतूंत सेवा करतो, त्याला मित्रावरुण देव जाणतात. त्यामुळें हा सेवा करणारा महाबलवान् असणाऱ्या राक्षसावर शस्त्र फेंकतो. द्वेषमूलक अनूंच्या भाषणाचा नाश करतो—सायण.

या उल्लेखांत जी काय माहिती मिळत असेल ती वाचकांनीं घ्यावी. ऋग्वेदांतील एका सूक्तांत ( ८. ३ ) उदार धनिक म्हणून ह्यांचें वर्णन आलेलें आहे. लुडविग. ( ऋग्वेदाचें भाषांतर ३. १६० ) म्हणतो कीं 'अनु' हा त्याच नांवाच्या लोकांचा राजा असावा; पण ह्याबद्दलचें कारण तो सांगत नाहीं.

---

* Cunningham, Ancient Geography of India, 93, of Roth, St. Petersburg Dictionary S. V.

**भेद.**–भेदाविषयीं जी माहिती मागें येऊन गेली तींत भरणा म्हणून एक टीप देतों. याचा ऋग्वेदांत क्वचित् उल्लेख आहे, पण अथर्ववेदांत त्याचें नांव येतें. त्याचा शेवट फार वाईट झाला. कारण, इन्द्रानें त्याजजवळ गाय (वशा) मागितली असतां त्यानें ती दिली नाहीं. रोठ म्हणतो§ कीं आधींचा भेद व यांत कांहीं संबंध नाहीं. परंतु ही गोष्ट संशयास्पद आहे. वस्तुतः हीच गोष्ट जास्त संभवनीय दिसते कीं, याचा पराभव झाल्यामुळें दुष्ट मनुष्याच्या दुर्गतीचें हा उदाहरण मात्र झाला. शिवाय, ह्याचें धर्मलंडपणाचें वर्तन जें एवढें गाजलें आहे त्याचें कारण म्हटलें म्हणजे अनार्य अज व शिग्रु यांची कड घेऊन त्यांचें नेतृत्व यानें पत्करिलें हें होय.

आतां अज व शिग्रु हे अनार्य वन्यदैवतपूजक होते किंवा नाहीं यावद्दल निश्चित कांहींच माहिती नाहीं परंतु भेदाचा व त्यांचा संबंध आला होता.

**शंबरः**–ऋग्वेदामध्यें इंद्राच्या शत्रूचें हें नांव आलेलें आहे ( १. ५१, ६; ५४, ४; ५९, ६; १०१, २; १०३, ८; ११२, १४; १३०, ७; २. १२, ११; १४, ६; १९, ६; ४. २६, ३; ३०, १४; ६. १८, ८; २६, ५; ३१, ४; ४३, १; ४७, २; २१. ७. १८, २०; ९९, ५, ). त्याचें नांव शुष्ण, पिप्रु व वर्चिन् ह्यांच्या बरोबर आलेलें असून एके ठिकाणीं त्याला कुलितराचा मुलगा दास असें म्हटलेलें आहे ( ६. २६, ५. ). दुसऱ्या एका ठिकाणीं आपण देवक ( जवळ जवळ देवाप्रमाणें ) झालों असें त्याला वाटल्याचा उल्लेख आलेला आहे (ऋ. ७. १८, २०). त्याची ९० (ऋ. १. १३०, ७), ९९ (ऋ. २. १९, ६, ), किंवा १०० ( ऋ. २. १४, ६ ) नगरें होतीं असें वर्णन आहे. हा शंबर शब्दच नपुंसकलिंगी अनेक वचनी शंबराचे किल्ले अशा अर्थानें वापरला आहे ( ऋ. २. २४, २ ). त्याचा मुख्य शत्रु दिवोदास अतिथिग्व होय. कारण, ह्यानेंच इंद्राच्या मदतीनें त्याचा पराभव केला ( ऋ. १. ५१, ६; १३०, ७; २. १९, ६; ४. २६, ३ इत्यादि ). शंबर हा कोणी खरा पुरुष होऊन गेला कीं नाहीं ह्यावद्दल शंकाच आहे. हिलेब्रँटचें असें ठाम मत आहे कीं शंबर हा दिवोदासाच्या शत्रुवर्गांतील एक राजा होता. शंबराचा कोणत्या मंडळांत किती वेळ उल्लेख आला आहे याचा हिशेब करून त्यावरून तो असा निर्णय काढतो कीं, दिवोदासाच्या वेळच्या ऋग्वेदीय सूक्तांमध्यें तो खराखुरा शत्रु म्हणून समजलेला आहे; पण मागाहून झालेल्या ऋग्वाङ्मयांत उदाहरणार्थ, सातव्या मंडळांत त्याला राक्षस बनविलें आहे * कारण, त्या वेळीं वैदिक काळचे आर्यन् लोक अरेकोशिया देश सोडून हिंदुस्थानांत आले होते. ही विचारसरणी जरी सोडून दिली, तरी हिंदुस्थानांतल्या डोंगरांत राहणाऱ्या लोकांचा हा नायक असून सुदासाचा शत्रु असावा हें शक्य आहे.

**वैकर्ण.**–हा शब्द ऋग्वेदामध्यें एकदां ( ७. १८, ११ ) दाशराज्ञाच्या वर्णनांत आलेला आहे व ह्या ठिकाणीं असें वर्णन आहे कीं, सुदासानें राजांच्या एकवीस जनांचा किंवा दोन वैकर्णांच्या लोकांचा पराभव केला. झिमरची अशी कल्पना आहे कीं हे लोक कुरु व क्रिवी मिळून झालेले संयुक्त लोक असावे.* ही कल्पना मॅकडोनेलच्या मतें बरीच संभाव्य दिसते. महाभारतामध्यें ( ६. २१०५ ) विकर्ण हें एक प्रकारच्या लोकांचें नांव म्हणून आलेलें आहे व एका कोशकाराच्या मतें हे विकर्ण लोक काश्मिरांत रहात असत.‡ महाभारतांतील सदरहू उल्लेख बहुधा, काश्मिरांत पूर्वी कुरु लोकांची खरोखरच वसाहत असेल तिच्या आठवणीचा दर्शक दिसतो.

**दाशराज्ञ युद्धांतील सुदासाचे आणखी शत्रू.**–दाशराज्ञ युद्धांत ज्यांचा समावेश झाला असावा असें कांहींचें म्हणणें आहे असे सुदासाचे आणखी शत्रू म्हटले म्हणजे ( १ ) यदु, ( २ ) मत्स्य, ( ३ ) पक्थ, ( ४ ) भलानस, ( ५ ) अलिन, ( ६ ) विषाणिन्, ( ७ ) अज, ( ८ ) शिव, ( ९ ) शिग्रु, व ( १० ) यक्षु हे होत.

यांपैकीं यदु हे महत्त्वाचे आहेत. त्यांचें बरेंचसें वर्णन तुर्वशांबरोबर पूर्वी येऊन गेलेंच आहे. दाशराज्ञ युद्धाला जें नांव मिळालें आहे तें सुदासानें दहा राजांविरुद्ध लढून जय मिळविला या गोष्टीवरून मिळालें असावें असा समज आहे, परंतु दाशराज्ञ यांतील दश हा शब्द केवळ दहा हीच संख्या दर्शविण्याकरितां योजिलेला असेल असें दिसत नाहीं. कारण, सुदासाबरोबर ज्यांचें युद्ध झाल्याचें वर्णन आपणांस ऋग्वेदांतील ऋचांत आढळतें त्यांची संख्या दहापेक्षां अधिक दिसते व त्या सर्वांचा पराभव एकाच ठिकाणी व एकाच वेळीं झालेला दिसत नाहीं. यदुतुर्वशांचा देश व भेदाचें राज्य यांत बरेंच अंतर दिसतें व एक प्रदेश या स्वारीचा आरंभ दाखवितो तर दुसरा त्या स्वारीचा शेवट दाखवितो. यावरून दहा ही संख्या केवळ एक ठोकळ आंकडा म्हणून दिलेला असावा. तसेंच, यदु, तुर्वश, अनु व द्रुह्यु हीं ज्याप्रमाणें बलिष्ठ व सुधारलेलीं राष्ट्रें दिसतात व इन्द्र, अश्विनौ इत्यादि देवतांची उपासना करतांना आढळतात, त्याप्रमाणें पक्थ, भलानस, विषाणिन्, अलीनस् व

§ St. Petersburg Dictionary सामवेद 13.

* शंबरासंबंधीं उल्लेख पहिल्या मंडळांत सात वेळां, दुसऱ्यांत चार वेळां, चौथ्यांत दोनदां, सहाव्यांत सहादां व सातव्यांत दोनदां आले आहेत. ह्या उल्लेखांवरून पाहिलें असतां इतर ठिकाणांपेक्षां सहाव्या मंडळांत खरेपणा अधिक दिसतो. दुसऱ्या व सातव्या मंडळांतील उल्लेख काल्पनिक आहेत.

§ ऋ. १. १३०, ७; ४. ३०, १४, ६. २६, ५; तुलनार्थ लुडविग, ऋग्वेदाचें भाषांतर ३, १७७; मॅकडोनेल 'वेदिक मायथॉलॉजि' पृ. १६१; ओल्डेनबर्ग, Zeitschrift der Deutschen Morgenlandischen Gesellschaft, 42, 210; गेल्डनर, Rigweda, Glossar, 178 पहा.

* Zimmer, Altindisches Leben, 103.

‡ St. Petersburg Dictionary, S. V. Hopkins ( Journal of the American Oriental Society, 15, 261 et seq. ) यास 'वैकर्णौ' शब्दानें दोन वैकर्ण राजे उल्लेखिलेले वाटतात.

शिव यांच्या उपासनाविषयासंबंधानें निश्चित माहिती मिळत नाहीं. त्यांची एक जूट असावी एवढें मात्र दिसतें. कदाचित् त्यांनीं एकत्र होऊन सुदासास विरोध केला असावा. त्याप्रमाणेंच भेद व त्याचे अनुचर, यक्षु, शिग्रु व अज यांच्या संस्कृतीसंबंधानें निश्चित माहिती सांपडत नाहीं.

निरनिराळ्या काळीं सुदासाविरुद्ध असलेल्या ह्या लोकां संबंधानें उतारे येणें प्रमाणें:-

**आ पक्थासो भलानसो भनंतालिनासो विषाणिनः शिवासः ।**
**आयोनयत्सधमा आर्यस्य गव्या तृत्सुभ्यो अजगन्युधानॄन् ॥**
(७. १८, ७).

हवि शिजविणारे, भद्रमुख, तप करून देखील न श्रमलेले, हातांत खाजविण्याकरितां विषाण घेतलेले, ( जगताचें ) कल्याण करणारे व सोम पिऊन झिंगलेले असे जे लोक होते त्यांनीं आर्यांच्या गाईचे कपळ तृत्सूपासून युद्धांत सोडविले व त्यांनां ठार केलें-सायण.

पक्थ, भलानस, अलिन, शिव, विषाणिन् हे बरोबर आले. तथापि लूट आणि वीर यांच्या आवडीनें आर्यांचा सखा तृत्सूंचा नायक होण्याकरितां आला-ग्रिफिथ.

**याभिः पक्थमवथो याभिरध्रिगुं याभिर्बभ्रुं विजोषसम् ।**
**ताभि र्नोमक्षूतूयमश्विनागतं भिषज्यतं यदातुरम् ॥**
(८. २२, १०).

हे अश्विदेव हो, राजा पक्थ, अध्रिगु आणि विशेष रीतीनें प्रसन्न करणारा बभ्रु यांचें ज्या स्तोत्रामुळें संरक्षण केलेंत त्याच स्तुतीनें रक्षणार्थ या ( व ) रोगयुक्तांनां औषध द्या-सायण.

( हे आश्विनानों ! ) तुम्हीं पक्थ, अध्रिगू आणि सोबत्यांपासून अलग झालेल्या बभ्रूला ज्या साधनांनीं मदत केली तीं साधनें घेऊन तुम्ही येथें वेगानें व त्वकर या व जें कांहीं रोगग्रस्त झालें असेल तें बरें करा-ग्रिफिथ.

**इदमित्था रौद्रं गूर्तवचा ब्रह्मक्रत्वा शच्या मंत राजौ ।**
**क्राणायदस्य पितरा मंहनेष्ठाः पर्षत्पक्थे अहन्ना सप्तहोतॄन् ॥**
( १०. ६१; १).

स्तोत्रकर्ता नाभानेदिष्ठ रुद्रस्तुत्यात्मक स्तोत्र अंगिरसांच्या सत्रामध्यें ( पित्याच्या सांगण्यावरून ) द्रव्यलालसा धरून पठन करता झाला. अशारीतीनें द्रव्यप्राप्त्यर्थ आईबापांनीं व बांधवांनीं करून दिलेल्या त्या स्तोत्रानें ( स्तोत्रसाह्यानें ) सहाव्या दिवशीं ( यज्ञ समाप्तीच्या दिवशीं ) अंगिरसांच्या सत्रामध्यें येऊन होता, प्रशास्ता, ब्राह्मणाच्छंसी इत्यादि सप्त होत्यांनां संतुष्ट करून यज्ञ पार पाडला-सायण.

जेव्हां अतिशय उदार अशा देवानें ( इंद्रानें ) पक्थाकरितां त्याचें आईबाप संरक्षिले आणि सात होत्यांवर हल्ला केला तेव्हां स्वागतवक्त्यानें ( तूर्वयाणानें ) लढाईच्या धुमश्चक्रींत, अश्विनांनां वैळविण्याकरितां हें स्तोत्र मोठ्यानें गाइलें-ग्रिफिथ.

**आवदिन्द्रं यमुना तृत्सवश्च प्रात्र भेदं सर्वताता मुषायत् ।**
**अजासश्च शिग्रवो यक्षवश्च बलिं शीर्षाणि जभ्रुरश्व्यानि॥**
( ७. १८. १९ ).

ह्या युद्धांत भेदाला ( सुदासानें ) नागविलें म्हणून यमुना नदी आणि तृत्सु लोक यांनीं त्याला संतुष्ट केलें. आणि अज, शिग्रु व यक्षु यांनीं घोड्यांचीं डोकीं नजर केलीं-सायण.

यमुना आणि तृत्सु यांनीं इंद्राला मदत केली. तेथें त्यानें भेदाची सर्व संपत्ति घेऊन त्यास नागविलें. अज, शिग्रु व यक्षु यांनीं खंडणी म्हणून त्यास घोड्यांचीं मुंडकीं नजर केलीं—ग्रिफिथ.

दाशराज्ञ युद्धाचा कालनिश्चयः-आतां आपण दाशराज्ञ युद्धाचा कालनिश्चय आपणांस करतां येतो काय हें पाहूं.

पहिला प्रश्न हें युद्ध किती कालपर्यंत चाललें असावें.? दिवोदासापासून सुदासापर्यंत चार पांच राजे मध्यें येऊन गेले असावेत असें पुराणांतील वंशावळीवरून पारगिटेर म्हणतो. या विधानास वेदांत आधार नाहीं. दिवोदास हा सुदासाचा बाप्च असावा असा पुरावा पुष्कळ सांपडतो. हें युद्ध म्हणजे फार तर पन्नास वर्षें चाललें असावें.

या युद्धाशीं संबंध ज्यांचा येतो त्या पुरुषांच्या उल्लेखांच्या ऋचा वेदांत पुष्कळ आहेत. युद्धाचा काल ठरवितां आला तर वेदांतल्या बऱ्याचशा ऋचांचा काल ठरवितां येईल.

सुदासाचा महाभारतांत पत्ता नाहीं. दिवोदास तीन दिसतात. एक वध्र्यश्वाचा मुलगा. त्याच्याशीं वेदांतील दिवोदासाची तुलना करतां येईल, पण हरिवंशपुराणकारांनीं ज्या राजमालिकेंत व ज्या स्थलीं दिवोदासास बसविलें आहे तेथें तो असणें शक्य नाहीं. शिवाय याच्या विजयाचा अगर लढायांचा पौराणिक ग्रंथांत पत्ताच नाहीं.

धार्तराष्ट्रांचा उल्लेख कठसंहितेंत येतो, व पारिक्षित जनमेजयाचा उल्लेख अथर्ववेदांत येतो. पण हे दोन्ही काळ भाषादृष्टीनें व यजनधर्मविकासाच्या दृष्टीनें दूरचे आहे. सुदासाला पौराणिकांनीं आणि त्यांचा अनुयायी पारगिटेर यानें भारती युद्धाच्या अगोदर १३।१४ पिढ्या एवढेंच दूर ठेविलें आहे. म्हणजे दाशराज्ञयुद्धाचा काल त्या मताप्रमाणें कुरुयुद्धापूर्वी २५० वर्षें असावा.

पौराणिकांची कल्पनासृष्टिः-पूर्वगत विवेचनावरून प्राचीन कथा साहित्य घेऊन पौराणिकांनीं त्यावरून कल्पना कशी काय लढविली हें मात्र आपल्या चांगलें ध्यानांत येतें.

मनु हा पुराणपुरुष मंत्रांतच वर्णिला आहे; पण त्यास पौराणिकांनीं एकाद्या किंवा अनेक राजघराण्यांचा पूर्वज करून टाकलें आहे.

पुरूरवस् ( = पौराणिक पुरूरवस् ) आपणांस ऐल म्हणवीत असे. याज्ञिकांच्या संप्रदायांत इडा, उर्फ इळा, उर्फ इला ही देवता झाली. तिला मनूची मुलगीच म्हटलें आहे. पौराणिकांनीं इळेस खरोखरीची राजकन्याच बनविली आणि पुरूरव्यास तिचा मुलगा करून टाकलें.

पुरूरवा हा खराखुरा राजा असावा कीं ही व्यक्ति कल्पनां समुच्चयानें तयार झाली असावी हें सांगतां येत नाहीं. जो राजा

स्वर्गातील एका अप्सरेचा नवरा झाला तो प्राचीनच असला पाहिजे. तूर्वयाणाविरुद्ध पुरुकुत्स आणि दिवोदास यांच्या तर्फेनें लढणारा आयु याचा आणि पुरूरव्याचा पौराणिकांनीं संबंध जोडून दिला. अर्थात् यामुळें या आयूस बरीच प्राचीनता आली. पांच राष्ट्रें ययातीपासून निर्माण करण्याच्या खटपटींत पौराणिकांनीं, वृषपर्वा आणि त्याचा गुरु शुक्र यांच्या मुलींचें भांडण, त्यांचा पुढें ययातीशीं विवाह, इत्यादि कथा मूळ गोष्टीस जोडल्या. दौष्यंति भरत याच्या जन्माला दुष्यंतशकुंतलेची कथा जोडण्यांत आली. वगैरे अनेक कल्पनेचे प्रकार आपणांस पुराणांत दिसून येतात.

दौष्यंति भरत हा वेदाप्रमाणें बराच उत्तरकालीन पुरुष दिसतो. पण पुराणकालांत तो प्राचीन पुरुष आहे. त्याच्या पूर्वी अनेक वर्षे दिवोदास–सुदास झाले असावेत असें धरल्यास, म्हणजे आयूशीं समकालीन दिवोदास सुदास धरल्यास–आपणांस कुरुयुद्धापूर्वी दीड एक हजार वर्षे मागें जावें लागेल. दाशराज्ञयुद्धाच्या कालनिश्चयाचा प्रश्न इतका असमाधानकारक स्थितींत आहे.

**वेदकालीन सांस्कृतिक स्थितीबद्दल पुरावा.**–वेदकालाची एकंदर सांस्कृतिक स्थिति कशी होती यावर पुरावा दोन प्रकारचा आहे. एक पुरावा म्हटला म्हणजे वेदांतील शब्द व वेदांतील उल्लेख आणि दुसरा पुरावा म्हटला म्हणजे महाभारतादि ग्रंथांतील प्राचीन इतिहास. याशिवाय तिसरा पुरावा आजच्या स्थितींत उपलब्ध नाहीं. पुराणवस्तुसंशोधनशास्त्राची मजल त्या कालापर्यंत पोंचली नाहीं.

मानववंशशास्त्र इतकें मुग्धावस्थेंत आहे कीं, भाषांचा संबंध शरीरस्वरूपाशीं निश्चितपणें लावतां येण्याइतकें तें वाढलें नाहीं. म्हणजे आजच्या लोकांच्या स्वरूपावरून प्राचीन काळाच्या इतिहासाशीं नातें जोडण्याची आज शक्यता नाहीं.

**दाशराज्ञ युद्धासंबंधीं जमलेली माहिती.**–दाशराज्ञयुद्धाचा येथपर्यंत जो उहापोह झाला त्यावरून एकंदर निष्पत्ति काय झाली हें आतां पाहूं.

जमलेल्या माहितीचे दोन विभाग करतां येतील. एक विभाग म्हटला म्हणजे दाशराज्ञयुद्धाचें ऐतिहासिक वृत्त–म्हणजे जें झालें असेल तें शोधून काढणें; आणि दुसरा विभाग म्हटला म्हणजे त्याचा ऋग्वाङ्मयाशीं संबंध.

**दाशराज्ञ युद्धाचें ऐतिहासिक वृत्त.**–वृत्त आपणांस येणेंप्रमाणें दिसतें. दिवोदास व सुदास हा एक पक्ष ज्यांत आहे असें युद्ध झालें होतें. तें युद्ध बरेंच वर्षे टिकलें असावें. तें युद्ध ज्या पक्षांबरोबर झालें ते पक्ष निरनिराळ्या काळांत निरनिराळे असतील. एका वेळेस तूर्वयाण तर दुसऱ्या वेळेस यदुतुर्वश. हें युद्ध करतांना दिवोदास-सुदासांनीं स्थानिक उपाध्याय किंवा पुरोहित आपल्याकडचे करून स्थानिक राजांचें उन्मूलन करावें अशी नीति आचरली असावी. ज्या वेळेस सुदास व दिवोदास आले त्या वेळेस ते आपणांस भरत म्हणवून घेत असतील किंवा नाहीं याविषयीं जरी खात्रीलायक विधान करतां येत नाहीं, तरी विश्वामित्र वसिष्ठांचा जेव्हां संबंध आला तेव्हां ते आपणांस भरत म्हणवून घेत होते हें खास.

ज्या वेळेस या पितापुत्रांची स्वारी हिंदुस्थानांत झाली त्या वेळेस पंजाबांत अग्न्युपासना असावी; पण ती गंगेच्या पूर्वेकडे होती किंवा नव्हती याविषयीं खात्रीलायक विधान करतां येत नाहीं.

सुदासाच्या शत्रूंचें म्हणजे स्थानिक राष्ट्रांचें व त्यांच्या चरित्रांचें पृथकरण करतां आपणांस अनेक कुलें प्रस्थापित झालेलीं दिसतात. पुरु, यदु, तुर्वश व अनु यांचें बस्तान चांगलेंच बसलेलें दिसतें. महाभारतांत वर्णन केलेलीं कुलें गंगेच्या पूर्वेकडे होतीं. त्यांची माहिती आर्चिक कवींस किंवा ग्रंथकारांस पुढें झाली असावी. यास अपवाद फक्त कीकटांचा होय. कीकट इन्द्राकरितां पायस देत नाहींत म्हणून विश्वामित्राची टीका केवळ कीकटांपुरतीच असावी, किंवा अनेक लोकांसंबंधानें सुद्धां तें विधान करतां आलें असतें, यासंबंधानें स्पष्ट आर्चिक उल्लेख नाहींत.

**दाशराज्ञ युद्धाचा ऋग्वाङ्मयाशीं संबंध.**–दाशराज्ञ युद्धाचा एकंदर ऋग्वाङ्मयाशीं संबंध येणेंप्रमाणें व्यक्त करतां येईल.

ऋग्वेदांत असें कोणतेंहि सूक्त नाहीं किंवा वृत्त नाहीं, कीं जें दाशराज्ञयुद्धापूर्वी निश्चयानें ठरवितां येईल.

ऋग्वेदांतील अनेक सूक्तें अशीं दिसतात कीं, ज्या सूक्तांच्या काळांत दाशराज्ञयुद्धकथा ही फार प्राचीन समजली गेली होती; आणि दिवोदास व सुदास या व्यक्ती ऐतिहासिक व्यक्तींच्या कोटींतून निघून पुराणपुरुषांच्या कोटींत जाऊन पडल्या होत्या. जेव्हां दिवोदासाकरितां किंवा सुदासाकरितां वृत्रादिकांचा संहार वर्णिला जातो, तेव्हां दिवोदास ही ऐतिहासिक व्यक्ति न राहतां पौराणिक व्यक्ति झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुदास व दिवोदास यांशीं समकालीन असें वाङ्मय फारच थोडें आहे. ऋग्वेदाचा बराचसा भाग ते होऊन गेल्यावर दोनचारशें वर्षांनंतर झाला असावा.

**पुरूरवस्उर्वशीकथा व सरमापणीकथा.**– दाशराज्ञयुद्धाबरोबर जोडावयाच्या दुसऱ्या कथा म्हटल्या म्हणजे, पुरूरवस्उर्वशी कथा व सरमापणीकथा या होत.

यांविषयीं आपणांस एवढेंच म्हणतां येईल कीं, या कथा देखील फार जुन्या आहेत; आणि यांच्या दाशराज्ञयुद्धविषयक पौर्वापर्यावर ऋग्वेद स्वतंत्र रीतीनें प्रकाश पाडूं शकत नाहीं. जर गंधर्वांच्या चळवळीचें स्थान अफगाणिस्थान असेल, आयु हा पुरूरवस् व उर्वशी यांचा मुलगा हें पौराणिक विधान खरें असेल आणि दिवोदासाचा मित्र आणि तूर्वयाणाचा शत्रु आयु तोच पुरूरव्याचा मुलगा असेल, तर असें म्हणतां येईल कीं दाशराज्ञयुद्धाच्या आरंभापूर्वीच्या पांचपन्नास वर्षांपूर्वी पुरूरवा होऊन गेला असावा.

देवराष्ट्र आणि असुरराष्ट्र यांचा इतिहास देऊं पहाणारे संशोधक राजारामशास्त्री यांनीं असुर म्हणजे बाबिलोनियांतील लोक

आणि पणी म्हणजे फिनीशियन लोक अशी २० वर्षांपूर्वी कल्पना प्रगट केली. आजचें इतिहासज्ञान त्या कल्पनेच्या फारसें पुढें गेलें नाहीं.

आ र्य, द स्यु, दा स व दा श रा ज्ञ यु द्ध वि ष य क उ ल्ले ख.– ऋग्वेदांतील आर्य, दस्यु, दास या सर्वांचा व दाशराज्ञयुद्धविषयक उल्लेखांचा परामर्श घेतां, असें दिसतें कीं,

( १ ) दासकल्पना ही पर्शुभारतीयकालीन असावी. दास हा अहि आहे; दस्यु हा अहि आहे; तो पाणी अडवितो; वगैरे उल्लेख ज्या काळांत वृत्रकथा तयार झाली त्या काळचे सूचक आहेत. त्यांचा हिंदुस्थानांतील आर्यांच्या काल्पनिक स्वारीशीं संबंध नाहीं.

( २ ) दाशराज्ञयुद्ध ऋग्वेदांतील बहुतेक भागाच्या पूर्वी कित्येक शतकें झालें असावें. त्या युद्धाचा आर्यदासविरोधाशीं संबंध कांहीं नाहीं. दाशराज्ञयुद्धाच्या अगोदर कित्येक शतकें किंवा सहस्रकें हिंदुस्थान आर्यन् भाषा बोलणाऱ्यांकडून व्यापला गेला असावा. म्हणजे हिंदुस्थानांतील आर्यन् लोकांच्या इतिहासांतील ऋग्मंत्र हा बराच उत्तरकालीन भाग होय.

( ३ ) देशांत मंत्रकाळांत चार वर्ग होतेच. परंतु त्यांनां वर्ण हें नांव प्राप्त झालें नव्हतें. वर्ण हा शब्द आर्य आणि दास यांतील भेद, म्हणजे संप्रदाय या अर्थानें वापरीत असत.

## प्रकरण ५ वें.

### वेदकालांतील शब्दसृष्टि.

श्री ह्मण वर्गां चा इ ति हा स दे ण्या च्या री तीः—दाशराज्ञ युद्ध ही मंत्रकाल सुरू होण्यापूर्वीची एक महत्त्वाची गोष्ट झाली हें पूर्वीच्या प्रकरणांत सविस्तरपणें स्पष्ट केलेंच आहे. ऋग्वेदांत ज्या व्यक्ती आणि जे उल्लेख सांपडतात त्यांचा दाशराज्ञ युद्धाशीं संबंध जोडतांना बराच परामर्श घेण्यांत आला आहे. इतकीं पुष्कळ नांवें आपणांस उपलब्ध झालीं त्यावरून युद्ध कोणांत झालें, युद्धस्वरूप कसें होतें, त्या काळचीं निरनिराळीं राष्ट्रें कोणतीं होतीं आणि त्या राष्ट्रांच्या चलनवलनांसंबंधानें आपणांस काय माहिती मिळते इत्यादि हकीकत देण्यांत आली आहे. हा साधारणतः क्षत्रिय वर्गांचा इतिहास झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्राह्मण वर्गांचा इतिहास द्यावयाचा म्हणजे दोन तऱ्हांनीं देतां येईल. प्राचीन धर्मांचा इतिहास देणें म्हणजे ब्राह्मण्याचा इतिहास देणें होय. तो बहुतेक दुसऱ्या विभागांत येऊन गेलाच आहे. यज्ञसंस्थेबाहेरच्या पारमार्थिक खटपटी आणि विचार सामान्य हवनापासून सूत्रांत दृष्ट होणाऱ्या श्रौतस्मार्त धर्मांचा म्हणजे सप्तसंस्थांचा विकास हाहि दुसऱ्या विभागांत सविस्तर वर्णन केलेला आहे. हा ब्राह्मण्याचा इतिहास झाला. तथापि ब्राह्मण म्हणजे केवळ माणसें धरून त्यांचा इतिहास देणें म्हणजे कुलें, गोत्रें यांचा इतिहास देणें होय. पुढें आपणांस हें दाखवितां येईल कीं बराचसा इतिहास मंत्रकालीन नसून, फार तर ब्राह्मणकालीन पण बहुतकरून सूत्रकालीन आहे. तिकडे वळण्यापूर्वी संहितावाङ्मयाचा निरोप घेतला पाहिजे. संहिता वाङ्मयाकडे मधूनमधून वक्री अवलोकन करावें लागणारच. तथापि त्याचा इतिहासार्थ जितका उपयोग करतां येईल तितका स्थूलपणें करून घ्यावा आणि विशिष्ट संस्थेचा अगर ज्ञानाचा इतिहास देतांना मधूनमधून संहितेकडे दृष्टि वळवावी. या प्रकारची मांडणीची पद्धति सोइस्कर पडते म्हणून ती अमलांत आणीत आहों.

श ब्द सं ग्र हा चें म ह त्त्व.–प्राचीन कालच्या परिस्थितीचा इतिहास जितका साकल्यानें लिहितां येईल तितका लिहावा असें आपण मनांत आणलें आणि साहित्य शोधूं लागलों म्हणजे एक मोठें साहित्य पुढें दृष्टीस पडतें. तें साहित्य म्हटलें म्हणजे संहितांतर्गत शब्दसृष्टि होय. या साहित्याचा पराकाष्ठेचा उपयोग करून घेतल्याशिवाय पुढच्या कालाकडे वळणें म्हणजे प्रामाणिक पांडित्य नव्हे. तसें करणें म्हणजे कठिण अभ्यास टाकून देऊन सहजोपलब्ध आणि अपर्याप्त अशा साहित्याच्या साहाय्यानें गप्पा मारणें झालें. तसल्या प्रकारच्या मोहांत न पडतां जे शक्य झालें तें परिश्रम करून त्यांचें फल वाचकांपुढें ठेवलें आहे. प्रत्येक वेदांतील शब्दांचें विषयानुसार वर्गीकरण केलें आहे. हे शब्द तत्कालीन किंवा तत्पूर्व संस्कृतिवर बराच प्रकाश पाडतात. निरनिराळ्या संहिता निरनिराळ्या काळीं झाल्या असल्या कारणानें प्रत्येक संहितेंतील शब्द निरनिराळे मांडले आहेत. या शब्दांनीं जागा पुष्कळ अडविली आहे ही गोष्ट खरी, पण हे शब्द सर्व भावी भारतीय ऐतिहासिक संशोधनाचा पाया असल्यामुळें त्यास लागणारी जागा आम्ही निर्भयपणानें देत आहों.

शब्दसंग्रहाची यादी देण्यापूर्वी वर्गीकरण पद्धतीचें स्वरूप थोडक्यांत सांगितलें पाहिजे. प्रथम अनिश्चितार्थी व अनेकार्थी शब्दांची विल्हेवाट लावून उरलेल्या शब्दांचें वर्गीकरण केलें आहे. प्रत्येक वेदांतले शब्द निरनिराळे मांडले आहेत. प्रथम देवता सृष्टि घेतली आहे, मग अजीवसृष्टि, नंतर जीवसृष्टि आणि मग मानवी सृष्टि घेतली आहे.

दैवतसृष्टीमध्यें देवतानामें; देवताविशेषणें, देवयोनि, असुर व स्वर्गविषयक शब्दांचा अंतर्भाव केला आहे.

अजीवसृष्टीमध्यें पृथ्वी; ध्वनि; धातु; जमीन; उदक; उष्णता; गति; ग्रहनक्षत्रादि; संख्या, काल आणि स्थान इत्यादिवाचक शब्द घेतले आहेत.

जीवसृष्टीं( मानवेतर )त वनस्पति; प्राणी, यांचा समावेश केला आहे.

मानवसृष्टीमध्यें मनुष्य; शरीरावयव; वैद्यक; अन्न; नातेंगोतें; अवस्था; मनोविकार; उपासना; युद्ध; सार्वजनिक कामें; खेळ; गृह; जाति कुळें व वंश; दान; सामाजिक; भाषा; पुण्य, पाप व प्रशस्य; गुण; वस्त्रें भूषणें; शत्रु; व्यापार व कृषि; दळणवळण; वाद्यें; ऋषि; राजकीय; अभिचार; इतरकर्में इत्यादि विषयांतील शब्दांचा समावेश केला आहे.

निरनिराळ्या शब्दांवर अर्थबोधात्मक आणि इतिहाससूचक टीपाहि दिल्या आहेत. त्यांत भिन्नमतें घातलीं आहेत.

### अनिश्चितार्थी शब्द [ ऋ. ]

आकीम्
आकृतम्
आहिकम्
नकिः
नकीम्
नुकम्
माकिः
सुकम्
हिकम्

या शब्दांविषयीं निरुक्तकार ' नवोत्तराणि पदानि सर्वपद समाम्नानाय ' असें भाष्य करून स्वस्थ बसतात. भाष्यकारांच्या स्पष्टीकरणाचा अर्थहि निश्चितपणें सांगणें कठिण आहे. उपर्युक्त वचनाचा अर्थ असा करतां येईल कीं, उत्तर पद निरर्थक आहे. नुकंचा ' नु ' हाच अर्थ करावा. त्याचप्रमाणें पादपूरणार्थ वापरलेल्या शब्दाप्रमाणें ( चवैतुहि प्रमाणें ) माकिः याचाहि मा एवढाच अर्थ घ्यावा. ( १. १४७, ५; ८. ५६, ११ ) यांत येणाऱ्या ' माकिः ' शब्दाचा सायणांनीं ' मा ' असाच अर्थ केला आहे. कदाचित् पदपाठकारांच्या दोषामुळें या शब्दांचें अस्तित्व उत्पन्न झालें असावें.

### अनेकार्थी. [ ऋ. ]

यांतील अनेक शब्द अर्थानुसार अन्य सदराखालीं वर्णिले आहेत. त्यामुळें या शब्दावरील आवश्यक टीपा अन्यत्र सांपडतील.

अक्षर(उदक, महत्, प्रणव, वर्ण, क्षयरहित,ब्रह्म)
अग्रु ( अंगुली, नदी, काचिन् स्त्री )
अज
अजिर
अज्य
अथरी ( भाल्याचें टोंक, हत्ती, स्त्री)
अथर्वन्
अद्रि ( पर्वत, मेघ, वज्र )
भना ( घाणरूप बल, अनेतृक, शकटयुक्त )
अम्व
अमत्र ( पात्र )
अमृत(अमरत्व,अन्न, उदक, सोम )
अय ( लोह, सुवर्ण)
अर्क
आत( देवता, आप, उदक )
आत्मन् ( आनंद- स्वरूप, प्राण )
आयन
आह ( कवि, लज्जारहित )
इभ
इळा.
उपमाति ( दान, उपमान)
उशनक् ( दहन्, क्रियापद )
उशिज्
ऊधस्( कांस, घोडा, मेघ, बैल )
ऊर्ज ( उदक, बल, अन्न)
ऋत ( यत, उदक, स्तोत्र, अन्न )
ऋभु ( सूर्यरस्मि, ऋषि, होतृविशेष)
ओकस्( गृह, स्थान, सेव्य )
कृश ( क्षीण, अल्प, दुर्ब )
कृशानु ( अग्नि, सोमपाल )
कोश ( कोशवद्वेष्टित- रथ, मध्यदेश, मेघ )
क्षामन्, (पृथ्वी,तम्, पाप )
गो ( गाय, किरण, उदक, पशु )
घोष ( ग्राम, गाय, स्तुति, ध्वनि )
द्वितृ
धरुण( उदक, यज्ञ )
धुनि (परुष्णी नदी, असुर, कंप )
धेना ( धेनु, स्तुति)
नद् ( स्तोता, उत्पादक, हस्त- पादादिछिन्न वृषभ)
नेवद ( ज्ञाता )
नहुष (राजा, मनुष्य, वंधक )
नामन् ( नाम, उदक, अन्न )
नाहुषी ( नहुष प्रजा)
निर्ऋति ( देवता, भूमि, दुःख )
निर्णिज्(पुष्टस्वशरीर, रूप, पवित्र )
पर्वत ( गिरि, मेघ, दगड, यजमान )
पुरुत्र ( बहुप्रदेश, अव्यय, बहुधा )
पृक्ष ( अन्न, ऋत्विज)
प्रतीक (रूप,अवयव, प्रमुख )
प्रधि(चाकांतील अरे, धांव, बुद्धि )
प्रपित्व ( प्राप्त, पूर्वाह्ण, युद्ध, सन्निहित )
प्रयस (अन्न, प्रवाह, सुख )
प्रवण ( अंतरिक्ष, निम्न, भूतल )
प्रसित्ति ( बंधन, जाळें, सेना )
मना ( स्तोत्र, बुद्धि, मननीया )
मंतु ( मननीय,मन्य- माने, सर्ववेत्ता )
याम ( गति, गमन- साधन, रथ )
यामन् ( संग्राम, रथ, गति )
योषणा ( स्तुति, देवता )
रस ( षड्रस, सोम, व्यय )
वर्ष्मन् ( उन्नतरूप- स्थल )
वाण(वार,वाल, सर्वै- वैरणीय )
विष्टि ( तेज )
वृजन ( लोक, शत्रु, प्राणी, बल )
सप्तर्षि
सानुक
सुजूर्णि ( तेजस्वी, उर्वशी, सखी )
स्वसर ( मार्ग, गृह, सूर्य, गोटा, धान्य, दिवस, निवासस्थान )
स्वाहा ( स्वाहाकारेण युक्त, स्वाहाकृत, अग्निविशेष )
हरित ( दिशा, नदी, सूर्याश्व )

### दुर्बोध शब्द [ अ. वे. ]

आक्ष्लिली
अषाळ्ह
इनु
कुभि
कुरूटिनी
कुस
कुसिन्ध
कृष्णद्र
कोशबिल
जरितरोधाम
तरस
तृष्टामा
तोता
त्सारि
दग्धाग्नि
धाणिका
नमुर
पथ
परिशास ( हरणाच्या पांढऱ्या कातड्यांवर पाडलेलें भोंक )
मणत्सख
ललामगु
वज्रायनसाध्य
सप्तगृध्र
संबाधतन्द्र्य

या शब्दांचा अर्थ बरोबर लागत नाहीं याचें कारण पदपाठ चुकीचा असणें हें हि असेल. बरेचसे शब्द विसाव्या कांडांतील आहेत, त्या कांडांतील कांहीं सूक्तांचा पदपाठ नाहीं.

## दैवतसृष्टि.

### देवतानामें.

#### आदित्यनामें [ ऋ० ]

गो
तुग्र
नभस्
नाक
पृश्नि
विष्टप
स्वर

#### उषानामें [ ऋ० ]

अपिजुवा ( प्रेरणा- करणाऱ्या उषा ) किंवा रात्री )
अरुषी
अर्जुनी
अहना
ओदती
चित्रामघा
दाक्षिणा
द्योतना
पूर्वाह्ण ( प्रातःकाल )
प्रबुध् ( '' )
बह्वन्ना
भास्वती
वाजिनी
वाजिनिवती
विरोक
विभावरी
शुभ्रयामा
श्वेत्या
सुभ्रावरी
सूनरी
सूनृता
सूनृतावती
सूनृतावरी

## अग्निदूतनामें [ तै० सं० ]

| | | |
|---|---|---|
| अरिष्टनेमि ( सेनाधिकारी ) | रथगृत्स ( सैनिक-विशेष ) | वाममोष ( सत्याभिमानीदेव ) |
| तार्क्ष्य ( ” ) | रथप्रोत ( सेनाधिकारी ) | समरथ ( सेनाधिकारी ) |
| नपात् ( उदकनाश करणारा देव ) | रथस्वन ( ” ) | सुषेण ( ” ) |
| | रथेचित्र ( ” ) | सेनजित् ( ” ) |
| | रथोजस् ( सेनाधिकारी ) | |

## अप्सराभिमानी देवता. [ तै० सं० ]

| | | |
|---|---|---|
| आधि | ओषधि | मरीचि |
| आप | दाक्षिणा | विद्युत् |
| ऋक्साम | नक्षत्र | |

## मरुद्गण [ तै० सं० ].

| | | |
|---|---|---|
| अत्यंहृ | एतादृश | मित |
| असुर्वन् | गण | यज्ञवाहस् |
| अन्य | चित्रज्योति | विधर्तृ |
| अन्यमित्र | ज्योतिष्मन् | विधारय |
| अन्यादृश | दूरेआमित्र | विश् |
| ईदृक्ष | दैवि | शुक्रज्योति |
| ईदृश | द्युतान | सत्य |
| उरुक्षय | धरुण | सत्याजित् |
| ऊति | धर्तृ | सत्यज्योति |
| ऊर्ध्वनभस् | ध्रुव | सदृक्ष |
| ऋत | प्रक्रीडिन् | सभर |
| ऋतजित् | प्रघास्य | समित |
| ऋतप | प्रतिदृश | सुषेण |
| एतन | प्रतिसदृश | सेनाजित् |
| एतादृक्ष | मरुत्त | |

## रुद्र [ तै० सं० ]

| | | |
|---|---|---|
| …ुस्पत्य | इषुकृत् | ऐलबृद |
| …तरवचारिन् | इषुधिमत् | कवाचिन् |
| …पगल्भ | इषुमत् | कृत्तिवासस् |
| …पगुरमाण | ईकृत् | क्षमाचर |
| …भज्जक | ईध्रिय | क्षयद्वीर |
| …मविचातन | उक्षान्न | क्षेम्य |
| …मीवहृ | उग्र | खल्य |
| …रक्षोहत | उच्चैर्घोष | गृत्स |
| …वततधन्वन् | उज्जिहान | गृत्सपति |
| …सिमत् | उत्तरण | गृहपति |
| …निर्हत | उपवीतिन् | गृहमेधिन् |
| …यच्छत् | उरुक्रम | गेह्य |
| …राद्घोष | उर्वर्य | गोघ्न |
| …व्याधिनी | उलप्य | गोष्ठ्य |
| …हनन्य | ऊर्म्य | जघन्य |
| …हृतिभाग | ऊर्व्य | तीक्ष्णेषु |
| त्र्यंबक | वृहद्वत् | शीभ्य |
| दुंदुभ्य | भुवन्ति | श्रुतसेन |
| दूरेवध | मयस्कर | श्रेष्ठतम |
| धन्वाविन् | मीढुष् | संविद्योत |
| नभ | मीढुष्टम | संगृहीतृ |
| नाद्य | रथपति | सत्यप्रसव |
| नियुत्वत् | रेष्मिय | सन्धान |
| निवेष्प्य | रौद्र | सभापति |
| निव्याधिन् | वाणिज | समिध्यमान |
| निषंगिन् | वात्य | सहस्राक्ष |
| नलिग्रीव | वारिवस्कृत | साहन्त्य |
| नीललोहित | वास्तुप | सिकत्य |
| परिचर | विचिन्वन् | सुरस्य |
| पांसव्य | विप्लवमान | सूद्य |
| पिनाकहस्त | विवृत्त | सोभ्य |
| पुलस्ति | विव्याधिन् | सोमपृष्ठ |
| पूरुषघ्न | व्युप्तकेश | स्थपति |
| प्रकृन्त | व्रातपाति | स्वयमभिगूर्त |
| प्रखिदत् | शंतमय | स्वायुध |
| प्रबुद्ध | शर्व | हविर्भाग |
| प्रबुध्यमान | शष्प्य | हिरण्यबाहु |
| प्रमृश | शितिकण्ठ | हृदय्य |
| फेन्य | शिपिविष्ट | ह्रस्व |
| बिल्मिन् | | |

## जलदेवता [ वा० सं० ]

| | | |
|---|---|---|
| अर्णव | तिष्ठंती | सरिर |
| आप | धार्य | सूद्य |
| उदक | वार् | स्यन्तमान |
| कूप्य | समुद्र | स्रवन्ती |

## मासाधिष्ठित देव [ वा० सं. ]

| | | |
|---|---|---|
| अंहसस्पति | तपस्य | माधव |
| इषा | नभस् | शुक्र |
| ऊर्जा | नभस्य | सहस् |
| तपस् | मधु | सहस्य |

## मेघोपयोगी देवता [ वा० सं० ]

| | | |
|---|---|---|
| अभ्र | धूम | वात |
| अववर्षत् | नीहर | विद्योतमान |
| अवस्फूर्जत् | प्रुष्णत् | शीकायत् |
| उग्रवर्षत् | प्रुष्व | शीघ्रंवर्षत् |
| उद्गृहीत | मेघ | स्तनयत् |
| उद्गृह्णत् | वर्षत् | ह्रादुनि |

## वायुदेवता [ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अंगिरस्वत्-पितृमत् यमधर्म | आदित्यवत् इंद्र | विश्वदेव्यावत्-बृहस्पति |
| अनाधृष्य | ऋभुमत् विभुमत्-वाजवत् | सरिर |
| अभिमातिघ्न | प्रतिधृष्य | सवितृ |
| अवस्यु | वसुमत् रुद्रवत्-इंद्र | |
| अशिमिद् | | |

## वत्सराभिमानी प्रजापति [ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अधिपति | आपि | मुग्ध |
| अन्त्य | क्रतु | वसु |
| अहन् | निर्नांशिन् | स्वापि |
| अहर्पति | भुवनस्यपति | स्वाहापिज |
| आन्त्यायन | भौवन | |

## पुरुषमेधांतील देवता [ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्षराज | क्रोश | पृथिवी |
| आग्नि | क्षत्र | प्रकमोघ |
| अतिक्रुष्ट | क्षुध् | प्रकाम |
| अथर्व (दक्षिणाग्नि) | क्षेम | प्रजापति |
| अथर्वन् | गन्धर्वाप्सरस् | प्रज्ञान |
| अधर्म | गति | प्रतिश्रुत्का |
| अनन्त | गुहा | प्रभा |
| अन्त | गेह | प्रमद |
| अन्तक | घोष | प्रमुद् |
| अन्तरिक्ष | चन्द्रमस् | प्रमुक् |
| अन्यतोरण्य | जव | प्रिय |
| अभूति | तपस् | वल |
| अय | तमस् | बीवत्सा |
| अरान्धि | तर्धि | ब्रध्नविष्टप |
| अरिष्टि | तुला | ब्र |
| अम | तेज | भद्र |
| अवक्रातिवध | त्रेत | भा |
| अवरस्पर | दिष्ट | भूति |
| अवार | दुष्कृत | भूमन् |
| अहन् | देवलोक | मनुष्यलोक |
| आक्रय | द्यु | मन्यु |
| आध्यक्ष | द्वापर | मरुत् |
| आनन्द | द्वार | मर्यादा |
| आर्ती | धर्म | महस् |
| आशिक्षा | धैर्य | माया |
| आस्कंद | नक्षत्र | मृत्यु |
| इदावत्सर | नड्वल | मेध |
| इद्वत्सर | नदी | मेधा |
| इयर्ता | नरिष्ठा | यम |
| इर | नर्म | यातुधान |
| उत्कल निकल | नारक | यादस् |
| उत्साद | निर्ऋति | योग |
| उपशिक्षा | निष्कृति | रात्रि |
| उपस्थावर | नृत्त | वत्सर |
| ऋक्षीका | परिवत्सर | वन |
| ऋति | पर्वत | वपुष् |
| ऋभु | पवित्र | वर्ण |
| औपद्रष्ट्र्य | पश्चाद्दोष | वर्षिष्ठनाक |
| कर्मन् | पाप्मन् | वर्षिष्ठायनक |
| काम | पार | वायु |
| कीलाल | पिशाच | विविक्ति |
| कृत | पुरुषव्याध | विशाम |
| क्रोध | पुष्टि | विश्वभूत |
| वीर्य | श्रेयस् | साध्य |
| वैरहत्य | संज्ञान | सानु |
| वैशन्त | संवत्सर | सूर्य |
| व्यृद्धि | संशर | स्वन |
| शब्द | सगर ( अग्नि ) | स्वप्न |
| शरव्या | सान्धि | स्वर्गलोक |
| शील | सरस् | हस |
| शुभ | सर्पदेवजन | हसकारिमानन्द |
| शोक | सर्वलोक | हेति |

## देवता विशेष [ ऋ० ]

| | | |
|---|---|---|
| अंश | इन्द्राकुत्स | ग्राहि |
| अकूपार | इन्द्राग्नी | गुंगू |
| अक्ष | इन्द्राणी | चंन्द्रमस् |
| अग्नायी | इन्द्रापर्वत | चमू |
| आग्नि | इन्द्रापूषन् | चरण्यु |
| अग्नीपर्जन्य | इन्द्राबृहस्पती | जातवेद |
| अग्नीषोम | इन्द्राब्रह्मणस्पती | ज्या |
| अघ्न्या | इन्द्रामरुत् | तनूनपात् |
| आङ्गिरस | इन्द्रावरुण | तार्क्ष्य |
| अजएकपात् | इन्द्राविष्णु | त्रातृ |
| अर्थव | इन्द्रासोम | त्र्यंबक |
| अथर्वाण | इषु | त्वष्टृ |
| अदिति | इषुधि | त्वाष्ट्र |
| अनुमति | इळा | दक्ष |
| अपान्नपात् | उर्वशी | दक्षिणा |
| अप्वन् | उलूखल | दधिक्रावन् |
| अप्सरस् | उलूखलमुसल | दध्यङ् |
| अभीषु | उषस् | दान |
| अरण्यानी | उषासानक्ता | दानु |
| अरपति | ऊर्जानी | दुन्दुभि |
| अरुष् | ऊर्जाहुती | देव |
| अर्धदेव | ऋत | देवजन |
| अर्यमा | ऋतक्ष | देवपत्नी |
| अश्वाजनी | ऋतु | देवीद्वार |
| आश्विन् | ऋभु | दैव्यहोतृ |
| अश्विनी | ऋभुक्ष | द्यावा |
| असु | ओषधि | द्यावाक्षामा |
| असुनीति | क | द्यावापृथिवी |
| अहन | कृत्या | द्यावाभूमी |
| अहि | कृशानु | द्रविणोद |
| आहिर्बुध्न्य | केशिन् | द्रुघण |
| आदितेयम् | कंद्नु | धनु |
| आदित्य | क्रन्दसी | धेनु |
| आदित्या | क्षेत्रस्यपति | नक्तोषस् |
| आप | गन्धर्व | नराशंस |
| आर्त्नी | गान्धर्वी | नासत्य |
| इन्दु | गौ | निर्ऋत्य |
| इन्द्र | गौरी | निष्ट्रिग्री |
| इन्द्रनासत्य | ग्ना | पक्ष्य |
| इन्द्रपत्नी | ग्नावन् | पतङ्ग |
| इन्द्रवायू | ग्नास्पति | पाणि |

पथ्य
पर्जन्य
पर्वत
पितु
पितृ
पिशाचि
पुरंधी
पुरुष
पुरूरवस्
पूषन्
पृथिवी
पृथिवीद्यावा
पृश्नि
प्रजापति
बर्हिष्
बृहद्दिवा
बृहस्पति
ब्रह्मणस्पति
ब्राह्मण
भग
भानु
भारती
भृगु
मण्डूक
मनस्
मनु
मन्यु
मरुत
मर्क
मातरिश्वन्
मार्तण्ड
मित्र
मित्रावरुण
मृत्यु
यम
यमी
यातुधान
यूप
रक्षस्

रंभिणी
राका
राज्
रात्री
रुद्र
रुद्रिय
रोदसी
वनस्पति
वरुण
वरुणानी
वर्मन्
वसर्हा
वसु
वसुपति
वाचस्
वाज
वाजिन्
वात
वातापर्जन्य
वायु
वास्तोष्पति
विधातृ
विपाट्छुतुद्री
विभावरी
विभ्वन्
विवस्वान्
विश्वकर्मन्
विश्वानर
विश्वेदेव
विष्णु
वृषभ
वृषाकपायि
वृषाकपि
वेधस्
वेन
वैवस्वत
वैश्वानर
व्रा

शर्यु
शकुनि
शाक
शची
शचीपति
शमीनहुषी
शुनासीर
श्येन
श्रद्धा
सपत्नी
समिध्
समुद्र
सरण्यू
सरमा
सरस्वती
सरस्वान्
सलिल
सविता
ससर्परी
साध्या
सिचि
सिनीवालि
सुपर्ण
सुम्नेआपि
सुषारथि
सूर
सूर्य
सूर्या
सूर्याचन्द्रमस्
सूर्यामास्
सूर्यावसू
सोम
सोमापूषण
सोमारुद्र
सौम्य
स्वस्ति
स्वाहाकृति
हिरण्यगर्भ

' या तेनोच्यते सा देवता ' या न्यायानें वरील संग्रह आहे. ही व्याख्या प्राचीन व सर्वसंमत आहे.

[ तै० सं० ]

यज्ञामध्यें लागणारे अनेक यज्ञसंभार, यज्ञीयपशु, यूपादि उपकरणें करावयासाठीं तोडावयाचे वृक्ष वगैरे वस्तूंची त्या त्या प्रसंगीं देवता समजून पूजा करावयाची असते. स्वाहा शब्द ज्यांच्या पुढें लावला जातो त्यांचाहि देवता म्हणून संग्रह करावयास पाहिजे ( तै. सं. कां. ७ पहा ). परंतु विशेष देवतांखेरीज बाकी देवतांचा संग्रह येथें केला नाहीं. मरुत, गंधर्व, अप्सरा, पितर, रुद्र, छंदस्, अप्सराभिमानी देवता, अग्नीचे दिशाधिपति दूत, यांचीं सदरें स्वतंत्र केलीं आहेत. ज्यांच्या शेवटीं ' स्वाहा, नमः ' आहे अशांचा संग्रह करावयाचें म्हटल्यास स्थिरचर सर्व वस्तूंचा संग्रह करावयास पाहिजे या साठीं तसें केलें नाहीं.

अंहस्पति
अकूपार
अग्नाविष्णू
अग्नि
अग्नीषोम
अग्नीवरुण
अंगिरस्
अथर्वन्
अदिति
अनुमति
अनुराधा
अप्सरा
अंबा
अंबालिक
अंबिका
अरमति
अर्यमन्
अश्विन
आद्का ( प्राणाभिमानी देवता )
आदित्य
इडा
इन्द्रघोष
इन्द्रापौष्ण
इन्द्राबृहस्पती
इन्द्रावरुण
ईश
उर्वशी
उषा
उषासानक्ता
ऋतु
ऋभु
ऐन्द्रवायव
औदुंबरी
कद्रु
कश्यप ( सूर्य )
कुहू
कृत्तिका
क्षय
क्षेत्रपति
ग्ना
घर्म
घृणि
घोर
चन्द्रमस्
चात्वाल
चित्रा
जातवेद

तनूनपात्
तिष्य
त्र्यं
त्वष्टृ
दक्ष
दक्षक्रतु
दधिक्र
दधिक्रावन्
दस्र
दूर्वा
देवीद्वार
द्यावापृथिवी
द्युतान ( मरुत् )
द्रविणोदस्
धातृ
धुर्
धेना ( बृहस्पतीची स्त्री )
नक्तोषासः
नर
निमिष
निर्ऋति
परमेष्ठिन्
पर्जन्य
पवमान
पुरुहूत
पुरूरवस्
पूतभृत्
पूषन्
पृथिवी
प्रचेतस्
प्रजापति
प्राची
प्रोष्ठपदा
बृहस्पति
ब्रह्मणस्पति
ब्रह्मन्
भग
भर्ग
भानु
भारती
भृगु
माथिन्
मरीचि
मरुत्
मरुत्वतीय
महानाम्नी
मारुती

मित्र
मित्रावरुण
मृत्य
मेध्य
मेनका
मैत्रावार्हस्पत्य
यम
यमी
राका
रुद्र
रेवति
रोहिणी
लक्ष्मी
लेक
वरुण
वसतीवरी
वसु
वाच्
वायू
वास्तोष्पति
विद्युत्
विधातृ
विवस्वत्
विश्वकर्मन्
विष्णु
वृषाकपि
शुक्र
शुनासीर
सगर ( वायु )
सद
समुद्र ( वायु )
सरस्वती
सलिल
सलेक ( आदित्यलोक )
सवितृ
सिनीवालि
सूर्य
सूर्यपत्नी
सूर्याग्नी
सूर्याचन्द्रमस्
सोम
सोमापूषन्
सोमारुद्र
सोमेन्द्र
स्वधा
स्वस्ति
हविर्धान

[ अथर्व सं. ]

अंश
अंशू
अकूपार
अक्ष
अग्नायी
अग्नाविष्णु
अग्नीषोम
अंगिरस्
अचल ( यमदूत )
अज
अजएकपात्
अथर्वन्
अदिति
अनडुह्
अनवद्राण
अनुमति
अन्तक
अप
अपांनपात्
अप्य
अप्व
अप्सरस्
अरणी
अराति
अरायी ( पापदेवता )
अरुन्धती
अर्क
अर्काश्वमेध
अर्जुनि
अर्बुद
अर्बुदि
अर्यमन्
अश्विन्
अश्विनी
असंसूक्तगिल ( रुद्रगण )
असुनीति ( प्राणहर्त्रीदेवता )
अस्वप्न
अहि
अहिर्बुध्न्य
आञ्जन
आदित्य
आप्
आबयु
आर्तव
आर्द्रा
आलिगी
आशा
आशापाल
आश्लेषा
आसा ( शा )(रौषिन्)
आहवनीय
इतरजन
इन्दु
इन्द्र
इन्द्रपत्नी
इन्द्रपुत्र
इन्द्रवायु
इन्द्राग्नी
इन्द्राणी
इन्द्रापूषन्
इन्द्रावरुण
इन्द्रासोम
इरावति
इला
ईशान
ईश्वर
उक्षान्न
उच्छोचन (यमदूत)
उदुंनल ( यमदूत )
उपद्बा
उपोह
उर्वशी
उलूखल
उलूखलमुसल
उषा
उषासानक्ता
ऊर्जा
ऋतावरी
ऋतु
ऋतुमति
ऋभु
एकवाद्या
एकाष्टका
ऐरावत
ऐलबकार ( मरुद्गण )
ऐलवकार ( मरुद्गण )
ओषधि
औक्षगन्धि
क
कल्याणी
कुक्षिल
कुबेर
कुम्भमुष्क
कुहू
कृत्तिका
कृत्या
केशवा
केशिन्
क्रव्याद्
खालत्य
गायत्री
गार्हपत्य
गुल्गुलु
गो
गोपायत्
ग्रह
ग्रा
ग्रावन्
ग्राहि
ग्रीष्म
ग्लौ
घर्म
घृताची
चण्ड
चन्द्र
चन्द्रमस्
चित्रा
जंगिड
जरा
जागृवि
जातवेद
जिघत्स्व
जूर्णि
तक्मन्
तक्षक
तनूनपात्
तरणि
तर्दपति ( उंदरांचा स्वामि )
ताबुव
तिरश्चिराजि
तुण्डिक
तैमात
तौविलिक
त्रायमाण
त्रितआप्त्य
त्रिसन्धि ( वज्राभिमानी देव )
त्वष्टृ
दाक्षिणा
दाधिक्रावन्
दशवृक्ष
दस्र
दिति
दिव्
देवत्या
देवपत्नी
देवमणि
देवासुर
देष्ट्री
द्यावापृथिवी
द्यावाभूमि
द्यु
द्रविणोदस्
द्विमूर्धन्
धरुण
धातृ
धिषण
धृतपति
धृतराष्ट्र
धृष्णु
नक्षत्र
नदी
नराशंस
नलदी
नवगत् ( उषा )
निर्ऋति
निर्जरायन
निलिंप
निष्ट्रिग्र
निःसाल
न्यर्बुद
पतंग
पथ्या
पर्जन्य ( वृष्ट्यभिमानीदेव )
पर्जन्यपत्नी
पर्णमणि
पर्वत
पवमान
पशुपति ( रुद्र )
पाप्मन्
पालित्य
पितृ
पिशाच
पीला
पुनर्वसु
पुरुष
पुष्टपति
पूषक
पूषन्
पृथिवी
पृदाकु
पृश्नि
पृश्निपर्णी
प्रचेतस्
प्रजापति
प्रतिबोध
प्रतिविध्यत्
प्रशोचन ( यमदूत )
प्रस्व
प्राची
फल्गुनि
बलास
बार्हत्साम
बृहस्पति
बोध
ब्रह्म
ब्रह्मचारी
ब्रह्मणस्पति
ब्रह्मन्
भग
भरुजि
भव
भवारुद्र
भवाशर्व
भारती
भूत
भूतपति
भूम
भेषज
मगुन्दि
मंगलिक
मणि
मण्डूक
मधुला
मन्यु
मरुत्
महादेव
महायम
महास्य ( रुद्रगण )
मही
मातरिश्वन्
माया
मास
मिति
मित्र
मित्रावरुण
मृगशिरस्
मृत्यु
मेखला
म्रोक
यज्ञ
यजमान
यजुष्
यक्ष
यम ( पितृणामधिपति )
यमी
यातुधान
यामिनी
रवि
राका
रात्रि
राहु
रुद्र
रेवती
रोहिणी
रोहित
लक्ष्मी
वघापति ( पतंगांचा स्वामी )
वनस्पति
वन्हि
वराह
वरुण
वरुणानी
वशान्न
वसु
वाचस्पति
वाज
वाणी
वात
वातापर्जन्य
वायु
वास्तोष्पति
विधातृ
विभावरि
विलिगी
विवस्वत्
विश्वदेव
विश्वजित्
विश्वकर्मन्
विश्ववसु
विश्वानर
विष्णु
विस्कंध
वृश्चिक
वृषभ
वृषाकपायि
वृषाकपि
वेधस्
वेन ( सूर्य )
वैयाघ्र
वैराज
वैवस्वत
वैश्रवण
वैश्वानर
शक्र
शंख
शची
शचीपति

- शबल ( यमस्य मार्गरक्षकः श्वा)
- शर्मी
- शंभू
- शर्व
- शांति
- शालुड
- शितिंग
- शितिपदी
- शिमिद
- शीतिकावति
- शुन
- शुनासीर
- शेरभ
- शेरभक
- श्याम ( यमस्य मार्गरक्षकः श्वा)
- श्रद्धा
- श्वन् ( रुद्रगण )
- श्वित्र
- संवत्सर
- संवसव
- संचित
- संदेश्य (जरद्गती)
- सप्तर्षि
- सम
- समुद्र
- समूह
- संपातिन् ( यमदूत)
- सरमा
- सरस्वति
- सर्प
- सवितृ
- सांधिय
- सावित्री
- सिनीवालि
- सिलाची
- सुमणि
- सूनृता
- सूर्य
- सूर्यपत्नी
- सूर्या
- सूर्याचंद्रमस्
- सूर्यामास
- सोम
- सोमपृष्ठ
- सोमारुद्र
- स्वधा
- स्वप्न
- हायन
- हारियोजन
- हिरण्यगर्भ
- होत्र

[ वा० सं ]

- अवभृथ
- निचुंपुण
- श्री (लक्ष्मी, आदित्यपत्नी)

## अग्निविशेषणं [ ऋग्वेद ]

- अगृभीतशोचिष्
- अग्निवत्
- अजातशत्रु
- अथर्यु
- अदब्धव्रतप्रमति ( अप्रतिहत-कृपा )
- अद्रोघवाच्
- अनष्टवेदस् ( अनष्टधन )
- अनिध्म
- अनूतुप
- अन्तकद्रुह
- अन्नवृध
- अपम्लुक्त ( चरन् )
- अपाकचक्षस्
- अप्रमृष्य (अधृष्य)
- अप्सुज (अंतरिक्षज)
- अप्सुषद्
- अबुध्र
- अभिद्यु
- अभिशस्तिचातन
- अभिश्री ( अभिश्र-यणीय )
- अमित्रदंभन
- अयोदंष्ट्र
- अरण
- अरिष्टगातु (अहिंसित गति)
- अरुषस्तूप ( अक्रोधरहित, रोचमान )
- अर्चद्धूम
- अर्चिन्
- अर्चिमत्
- अर्चिवत्
- अशीर्षन्
- अश्वबुध्न (अमेस्तनू)
- आघृणिवसु ( दीप्तिधन )
- आतनि ( कर्मपूरक )
- आयजिष्ठ ( यष्टृतम )
- आशुशुक्षणि
- आस्त्रबुध्न
- आहुतिवृध्
- इधन्वन्
- इधान
- इधास
- इद्धाग्नि
- इध्यमान
- इन्धान
- इष्टनि
- उक्षान्न
- उषर्बुध
- ऊर्जसनि
- ऊर्जाद
- ऊर्जोनपात्
- ऊर्णावत्
- ऊर्ध्वशोचिष्
- ऋजुगाथ
- ऋजुयमान
- ऋतजात
- ऋतजातसत्य
- ऋतधीति
- ऋतपेशस्
- ऋतप्रजात
- ऋतप्रवीत ( सत्यवे-ष्टित )
- ऋतवन्
- ऋतसद
- कल्मलीकिन् ( ज्वलन् )
- कविक्रतु
- कविप्रशस्त
- कविवृध ( स्तोत्रवृ-द्धिकर )
- कीज ( अद्भुत )
- कुपय ( गोपनीय )
- कुलायिन्
- कूचिदर्थिन्
- कृपनील
- कृष्णजंहस्
- कृष्णपवि
- कृष्णवर्तनि ( कृष्ण-मार्ग )
- कृष्णव्यथि
- कृष्णसीत
- केशी
- क्रव्यवाहन
- क्रव्याद
- क्रिविर्दतिन्
- गभस्तिपूत
- गिरावृध
- ग्रभणवत्
- घृणि ( दीप्ति )
- घृणिवत्
- घृतकेश
- घृतपृष्ठ
- घृतप्रतीक
- घृतप्रसत्त
- घृतयोनि
- घृतवत्
- घृतस्नुत्
- घृ
- चतुरक्ष ( चतुर्नेत्र )
- चतुःशृंग
- चरिष्णुधूम
- चायु ( देवयजक )
- चारुप्रतीक
- चित्रक्षत्र
- चित्रभ्रजति
- चित्रभानु
- चित्रमहस्
- चित्रयामन्
- चित्रशोचिष्
- जनिद्
- जरद्विष्
- जराबोध
- जातुभर्मन्
- जीवपीतसर्ग (अन्नद)
- जुह्वास्य
- तनूकृत् ( शरीर-रक्षक )
- तपुर्जंभ (ज्वालादंष्ट्र)
- तिग्मजंभ
- तिग्ममूर्धन्
- तिग्मशोचिष्
- तुभ्यवृध्
- त्रययाय्य
- त्रिधातुशृंग
- त्रिपस्त्य
- दक्षपति
- ददृशानपवि
- दशप्रमति
- दस्युघ्न
- दाव
- दीर्घायुशोचिष्
- दुर्य ( गृहेभव
- दूरेशोध
- देवजूत
- देवपुत्र
- देवबंधु
- देवयावन्
- देववत्
- देववाहन
- देवेद्ध
- दोषावस्त ( रात्रि-प्रकाशक )
- द्युम
- द्युम्नवर्धन
- द्युम्नश्रवस्
- द्रविणस्यु
- द्रुषद्
- द्विजन्मन्
- द्विबर्हस्
- द्रुवन्न ( काष्ठभक्षक )
- धूम
- धूमगन्धि
- धूमिन्
- धृषद्वर्ण ( धर्ष-स्वरूप )
- नेमावृध
- नित्यहोतृ
- निशितिन् (प्रज्वलनहेतुभूत )
- नृषत्
- पस्त्यसद्
- पावक
- पावकशोचिष्
- पितुवर्धन
- पुराजस्
- पुरीष्य
- पुरुदंसस्
- पुरुप्रिय
- पुरुप्रैष
- पुरुवार
- पुरुवारपुष्टि
- पुरुस्तुत
- पुर्वणीक
- पुष्टिवर्धन
- पूर्णगभस्ति
- पृष्ठबंधु
- प्रजज्ञिवत्
- प्रतिजूतिवर्पस्
- प्रसाधन
- प्राचाजिह्व
- प्राचीनरश्मि
- प्रातर्जित
- प्रातर्यावन्
- प्रातर्युज
- प्रार्पण
- बर्हिसद्
- वाल्हित्
- बृहद्भानु
- बृहद्रेणु
- बृहन्मति
- भद्रकृत्
- भात्वक्षस ( प्रखर-तेजस् )
- भानुमत्
- भासाकेतु
- भूरिजन्मन्
- भूरिपोषिन्
- भूरिषाह
- भ्राजज्जन्मन्
- भ्राजत्
- मधुहस्त्य
- मम्रुषी ( अगारभावं आपन्ना )
- मरुद्वृध
- महयमान
- महितम
- माहरत्न
- मातस्
- मित्रमहस्
- मुहुर्गिर्
- मृक्तवाहस्
- मेधाकार
- यक्ष
- यक्ष्य
- यजियत्
- यजिष्ठ
- यंतुर ( यज्ञरूप रथनेता )
- यमसान
- यशस्तम
- युयुषत्
- रघुपत्मजंहस्
- रण्वसंदृश ( रमणीय )
- रुक्क
- रुशदूर्मि (दीप्तज्वाल)
- रोहिदश्व
- वक्षणेस्थ ( अग्निस्थ )
- वनेज
- वनेराट्
- वनेषाट्
- वन्हि ( हविषांवोढा )
- वशान्न
- वषट्कृत
- वाध्र्यश्व
- विप्रजूत
- विभावसु

विभुतराति
विश्रुष्टि
विश्वप्सु
विश्वभरस्
वीतवार
वीरपस्त्य
वीळुजंभ ( दृढदंत )
वृष्ण्यवत्
वेदिषद्
वैवस्वत
व्रतनी
व्रतप
शकमय
शर्मसद्
शाचिपूजन
शास्य
शितिपाद्
शितिपृष्ठ
शिवाभिमर्शन
शीरशोचिष्
शुचिजिह्व
शुचिप्रतीक
शुचिवर्ण
शुचिव्रत
शुचिषद्
शुभंयावन्
शुभ्रयावन्
शोचिष्केष
शोचिष्मत
श्यावाश्वस्तुत
श्रवयत्साखिन्
श्रवस्यु
श्रेवाजित
श्रेणिदत्
श्रेष्ठशोचिष्
संचिकित्वत्
सत्यगिर्वाहस्
सत्यतर
सत्ययज
सत्यशवस्
सदावृध

सदास
सदासह
सन्नबर्हिष्
सन्नमखस्
सद्योजुव
सद्यार्थ
सप्तजाति
सप्तजिह्व
सप्ततंतु
सप्तथ
सप्तथिन्
सप्तनामन्
सप्तपुत्र
सप्तबुध्न
सप्तमातृ
सप्तमानुष्
सप्तरश्मि
सप्तशीर्षन्
सप्तास्य
सप्तिवत्
समिधान
समिद्ध
समिद्धाग्नि
समिध्यमान
समुद्रवाहस्
समे
सर्वधस्
सर्वधातम
सर्वहुत
सहजानुष
सहसःसूनु
सहसावन्
सहस्कृत
सहस्रंभर
सहस्रशृंग
सहस्रशोक
सहस्रस्तरी ( हविरूप आच्छादन )
सहस्राक्ष ( असंख्य ज्वाल)
सहोवृध

साधदिष्टि ( साधितयज्ञ )
सुगभास्ति
सुद्राविण
सुत्रातिचक्षस्
सुब्रह्मन् ( सुस्तुति )
सुमहस्
सुमृळीक
सुयज
सुरेतस्
सुवृध
सुशर्मन्
सुसमिद्ध
सुसूमन्
सुस्वरु
सुहवीतुनामन्
स्पन्द्र
स्मद्रातिसाच्
स्वधावत्
स्वनीक (सुतेजस्क)
स्वयंज
स्वयंभू
स्वविद्युत्
स्वादन
स्वादुक्षद्मन्
स्वाहुत
हविरद्
हविर्वाट्
हविष्प
हविष्पति
हव्य
हस्कर्तृ
हिरण्यकर्म
हिरण्यकेश
हिरण्यकेशिन्
हिरण्यजित्
हिरण्याजिह्व
हिरण्यत्वच्
हिरण्यपक्ष
हिरण्यपावन्

[ तै. सं. ]

अग्धाद
आग्निआग्नि
अजस्र ( निरंतर )
अदब्धव्रतप्रमति
अन्नसद्वन्(जठराग्नि)
अन्वाहार्यपचन
अपाकचक्षस्(सर्वज्ञ)
अप्रमृष्य
अप्सुयोनि
अरेपस्
अर्वाग्वसु

अशीततनु
अषाढ
अस्वप्नज ( अग्नीचे किरण )
अहुत
आग्नेय
आजामि (अग्नीच्या ज्वालांचें विशेषण)
आयुर्दा
आयुर्धा
आयुष्पा

आयुष्मत्
इडावत्
इद्ध
उख्य
उत्तमश्लोक
उदार
उदित
उद्भित् ( अग्निसंबोधन )
उद्वायेत्
उपजिह्विका ( अग्नीची ज्वाला)
उरुशंस
ऋतधामन्
ऋत्विय
ऋषिष्टुत
कुलगोप
क्रव्याद
क्षत्रभृत्
खादिहस्त
गृध्रसद्
घृतनिर्णिज्
घृतप्रतीक
घृतयोनि
घृतश्री
घृताहवन
चित्रश्रवस्तम
तनूनप्त्र
तिग्मजंभ
तिग्महेति
तिग्मायध
तुविष्मणस्
तेजोदा
तेजोवित्
त्रिणामन्
त्रिषधस्थ
दस्युहंतम
दिविस्पृश्
दूरेहेति
देवदूत
देवनिधि
देववाता
देववीतम
देवेद्ध
द्व्रन्न
धनंजय
धूमगन्धि
ध्रजीमत्
ध्राजि ( शीघ्रगति )
नानास्वप
नामधा
निर्दिष्टभाग
निर्मन्थ्य
नृषद्
पत्नीवत्
पथिन्
पर्जन्यक्रंद
पावक
पुनर्नव
पुरीषायतन
पुरुप्रिय
पुर्वणीक
पुष्टिमत्
पृतनासह ( परकीय सेनाभिभवक्षम )
प्रतक ( प्रकृष्ट गमनविषयक )
प्रतीकवत्
प्रयुज
प्राणद
प्रार्पण
प्रियस्तोत्र
प्रेद्ध
प्रोक्षित
बृहदुक्थ
वृहद्भानु
ब्रह्मज्योति
भगवत्तम
भद्रशोच
भागिन् (गार्हपत्याग्नीचें विशेषण )
भारत
भार्य
भुरण्यु
भूरिरेतस्
मान्विद्ध
मित्रामहस्
यजिष्ठ
यष्ट
यह्रो
युवन्
रक्षोहन्
रजाशय
रत्नधातम
रथगृत्स
रथप्रोत
रेतोधस्
रोचिष्णू
रोहितैत
रोहिदश्व
वद्मन्
वयस्कृत्
वयोधस्
वाजसृत्
वारुण
विश्वचक्षस्
विश्वचर्षणि
विश्वदर्शित
विश्वदाव
विश्वभोजस्
विश्ववात
विश्वव्यचस्
वैश्वकर्मन्
वैश्वदेव
वैश्वानर
वोढु

व्रतपति
व्रतपा
व्रतभृत्
शर्यह
शुक्रवर्चस्
शुचिजिह्व
शुचिव्रततम
शुचिषत्
शुचिस्
शृतंकर्तृ
शोचिष्केश
श्येनसद्
संयद्वसु
सतनु
सतेजस्
सत्यतात
सत्यधर्मन्
सत्ययज
सत्यराधस्
सत्यायुस्
सत्यौजस्
सपत्नदंभन
समसनाद्
समारूढ
समिधान
समिद्ध
समुद्रयोनि
समुद्रवासम्
सम्भृतयज्ञ
समेद्धा
सर्पिरासुती
सव्रत
सहसिन्
सहस्रधार
साप्त ( सामिधासप्तक )
सायतन
सुयज्
सुराभि
सुवर्ष ( अग्नीच्या डोक्याचें विशेषण)
सुविदत्र
सुशुक्वनि
स्वप
स्वयंभू
स्वाधी(स्वायत्तचित्त)
हराशय
हविर्भाग
हव्यवाह्
हव्यवाहन
हव्यसूद
हिरण्यकेश (धूम दि-

| | | |
|---|---|---|
| शेषण ) | हिरण्यपक्ष | होत्रविद् |
| हिरण्यज्योतिष् | हिरण्यबाहव | होत्रीय. |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्रव्याद | त्रिनामन् | विकसुक |
| अम्न | दक्षिणाग्नि | विश्वकृत् |
| अग्निजिव्ह | [3]दाव | विश्वंभर |
| अग्नितेजस् | दास्वत् | विश्वशंभू |
| अग्निदूत | द्योतनि | विश्वहन् |
| अद्रोघावितृ | द्रविणोदस् | विश्वाद |
| अनष्टपशु | धूमशिख | वृत्रहंतम |
| अनिराहित | नि | वेद्य |
| अन्तर्दाव | निर्ऋति | व्रतपति |
| अमीवचातन | निर्दाह | शकधूम |
| आत्मदूषि | निस्वर | शकमय |
| आमाद | पावक | शकल्योषिन् |
| आयुर्द | पित्त | शातिन |
| आहुतिवृध | पृतनाषाद् ( विजय देणारा ) | शान्त |
| इहक्रमु | प्रतिदहन् | शुक्रपृष्ठ |
| उक्षान्न | प्रेप्सत् | शुक्रशोचिष् |
| उदपूर् | ब्रह्मोद्ध | सस्फान |
| उपवन्द्य | भूरिपाणि | संकुसुक |
| कृष्णवर्तनि | भ्रातृव्यक्षयण | सत्यौजस् |
| खन | भ्रातृव्यचातन | सपत्नचातन |
| खनि | मधूप | सप्तास्य |
| घृतवृद्ध | मनाहन् | समेद्ध |
| घृताहुति | म्रोक | सर्वांगु |
| चिताग्नि | यातुहन् | सहस्रवर्चस् |
| जनयोपन | रक्षोहन् | सहस्रवीर्य |
| जरिमन् | रिप्रवाह | सहस्रशृंग |
| जीवितयोपन | वर्चोधस् | सुदेव |
| ज्योतिरनीक | वसुदान | सुपुनत् |
| तनुदूषि | वसुल | सुवह्नि |
| तनूवशिन् | वह्नि | सोमपृष्ठ |
| तपुरग्र | वातपू | हव्य |
| तिग्मशृंग | | हव्यसूद |
| तिग्महेति | | |

[ संहितेतर ]

[4]विष्फुलिंग.

वा [1]ध्र्य श्व.– 'वध्र्यश्वासंबंधी.' ऋग्वेदांतील एका सूक्तांत हें अग्नीचें विशेषण आहे.

स [3]प्त मा नु ष.– ऋग्वेदांत एके ठिकाणीं अग्नीचें विशेषण म्हणून व 'सात जातींचा' अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे, हॉपकिन्सचें असें मत आहे कीं या शब्दांत ऋग्वेदाच्या सात गोत्रमंडलांचा उल्लेख आहे. पण हें मत स्वीकारण्यापेक्षां सप्तमानुष म्हणजे वैश्वानर असें जें रोठचें मत आहे तें बरोबर दिसतें. सप्तर्षींनीं उपासना केलेला, सात होते असलेला, सात समिधांनीं हवन केलेला इत्यादि अग्नीसंबंधीं उल्लेख पुष्कळ आहेत आणि 'सप्तहोतार स्तमिदोळते' ( ८. ४९, १६ ) असा उल्लेख आहे यावरून 'सप्तमानुष' म्हणजे अग्निच होय.

दा [3]व.–अरण्यांतला अग्नि या अर्थानें हा शब्द अथर्ववेद व शतपथ ब्राह्मण या ग्रंथांत आला आहे. अग्नी वसंत ऋतूंत नहमीं उत्पन्न होतात असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे. सीगच्या मतें ऋग्वेदांतील एका सूक्तांत ( १०. १४२ ) अरण्यांतल्या अग्नीचें वर्णन आलेलें आहे ( परंतु हें मत इतर पाश्चात्त्य पंडितांनां मान्य नाहीं ). असा अग्नि लागल्यास त्यापासून लोकांना उपद्रव होऊं नये म्हणून वनरक्षक 'दावप' ठेविलेले असत.

वि [4]ष्फु लिं ग.– उपनिषद् ग्रंथांत 'अग्नीची ठिणगी' या अर्थानें हा शब्द आला आहे.

## इन्द्रविशेषणें. [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अर्चत्र्य ( पूजनीय ) | एकवीर | तुराषाट् |
| अवक्रक्षिन् | कण्वतम | तुविकूर्मि ( प्रभूतकर्मा ) |
| अवयातहेळ ( अपगतक्रोध ) | करंजह | तुविकूर्मितम |
| अविहर्यतक्रतु | कवसख ( कुत्सितपुरुष सहायक) | तुविग्रि ( बहुस्तुत ) |
| अशनिमत् | कविच्छद् ( स्तोतॄणांफलदाता ) | तुविमघ ( प्रभूतधनवान् ) |
| अश्वयोग ( इंद्रकृपा ) | कीरिचोदन ( स्तोत्रप्रेरक | तुविम्रक्षस् (संस्नेहनकर्ता ) |
| असमात्योजस(अनुपमं बलं यस्य ) | कृष्टिप्र | तुविशग्मन् |
| असुरघ्न | क्रतुमत् | तुविस्वनि ( महाघोषक ) |
| अहंसन | खिद्व ( शत्रूणांखेदयिता ) | तृपलप्रभर्मन् ( ग्रावादिभिःप्रहारी ) |
| अहिघ्न | गवेषण | त्रिककुप् (त्रिषु लोकेषु श्रेष्ठः ) |
| अहिहत्य | गातुयन् | त्वेषनृम्ण |
| अहिहन् | गाथश्रवस् | दंसनावत् |
| अहेर्यातृ | गायत्रवेपस् | दधृष्वाणि ( धर्षक ) |
| आखण्डल | गिर्वाहस् | दस्युह |
| आजितुर | गोत्रभिद् | दानाप्रस् |
| आज्ञातृ | गोदत्र | दानौकस् |
| आपांतमन्यु | गोदर ( पर्वतभेदक ) | दीदिवि ( रक्षक ) |
| आमुरि | गोपाजिह्व ( मा बिभीत इति वाक् यस्य ) | दीर्घायु |
| आरित | गोषणोनपात् | दुश्च्यवन |
| आरुज | गोषुयुध | दुरिषुद्वर |
| इन्द्रतम | गोहन् ( मेघोदकभेदक ) | धनजित् |
| इन्द्रसारथि | घृतश्री | धामसाच् |
| ईशानकृत् | चक्रमासज् | धियसान (अध्यायन्) |
| उक्थवर्धन | चन्द्रबुध्न | नर्यापस |
| उक्थवाहस् | चोदप्रवृद्ध ( स्तुतिप्रवृद्ध ) | नियन्तृ |
| उपानस ( रथारूढ ) | छन्दु | निवर |
| उर्वराजित् | जनभक्ष | निष्षाह |
| उशमान ( कामयमान ) | जनंसह | नृजित् |
| उस्रयामन् ( वृषभगन्ता ) | जीवधन्य | नृषूत |
| ऊर्ध्वसान | तरद्वेषस् | पनीयस् ( अत्यंत स्तुत्य ) |
| ऋघावन् ( शत्रुहिंसक ) | तरुत्र ( शत्रूपासून रक्षण करणारा) | पाप |
| ऋचीषम | तुग्र ( शत्रुहिंसक ) | पर्णयघ्न |
| ऋजुक्रतु ( ऋजुकर्मा) | | प्रवीरवत |
| ऋणकाति | | पस्त्विष् |
| ऋभुक्षण | | पिशंगराति ( चित्रदान ) |
| ऋभुष्ठिर | | |
| ऋष्वौजस् ( दर्शनीयबल ) | | |

पुराषाट्
पुरुदत्र ( वहुधन )
पुरुनामन्
पुरुनिष्षिध ( शत्रु-हिंसक )
पुरुमाय
पुरुमेध
पुरुवसु
पुरुहूत
पुरोभू
पुरोयुध्
पूर्भित्तम
पूर्वज
प्रत्वक्षाण ( तनूकुर्वन् )
प्रभंगिन् ( प्रभंजनशील )
प्रभुवसु
प्रवीर
प्रवेपनी
प्रशर्ध
प्रहावान् ( मनुष्यशास्ता )
प्राचामन्यु
प्राशुषाट् ( शत्रूणां पराभाविता )
बाभ्रि
बृहद्रेणु ( युद्धानें धूळ उडविणारा)
ब्रह्मजूत
ब्रह्मवाह
भावयु
भिंदु
भूरिकर्मन्
भूरिगु
भूरिदात्र
भूर्योजस्
मंहिष्ठराति
मघवन्
मदयत्सख
मद्र्यद्रिक ( मदभिमुख )
मधुप
मनोवात
महावध
महावसु
महावीर.
महाव्रात
माघोन
मातलिन्
यज्ञवृध
रणकृत्

रथीतर
रदवसु
रध्रचोदन
रभोद ( बलदाता )
रयिषाह्
रिरिचान
लोककृत्नु
वज्रदक्षिण
वज्रभृत्
वज्रवाह
वज्रहस्त
वज्रिन्
वन्दनेष्ठ
वपोदर
वलरुज् ( मेघभेदक )
वसुजुव ( धनद )
वस्ता
वातरंहस्
वार्त्रहत्य
विचर्षणि
त्रित्वक्षस्
विदद्वसु
विन्दमान
विश्वकर्मन्
विश्वगूर्त ( कार्यप्रवृत्त )
विश्वजित्
विश्वतुर
विश्वतोधी
विश्वभू
विश्वमनस्
विश्वमिन्व
वृत्रखाद
वृत्रघ्न
वृथाषाह्
वृधीक
वृषकर्मन्
वृषजूति ( वर्षगमन )
वृषन्तम
वृषन्मन्
वृषपर्वन् ( प्रबलांग )
वृषभ
वृषायमाण
वेदिष्ठ
शचिष्ठ ( अतिप्राज्ञ )
शचीपति
शचीवत्
शतक्रतु

शतमन्यु
शतक्रत्व
शतमूति
शम्बरहत्य
शवसिन्
शिप्रिन्
श्लोकिन् ( स्तुत्य )
संसृष्टजित् ( संघजेतृ )
सचथ
सतीनमन्यु ( उदकवर्षणयुक्त )
सतीनसत्वन्
सत्ययोनि
सत्यसत्वन् ( अबाधितभट )
सत्राकर
सत्रादावन्
सत्राहन्
सधमस्
सधमाद
सनश्रुत् ( पुरातन प्रसिद्ध )
सपत्नघ्नी
सबल
सर्वसेन
ससहान
सहासावन्
सहस्रचेतस्
सहस्राप्सस्
सहस्रोति ( सहस्ररक्षण )
सहोद
सुतेरण
सुदक्षिण
सुदात्रन्
सेन्य
सेहान ( पराभवन् )
सोमवृद्ध
स्तुषेय्य (स्तोतव्य)
स्तोमवर्धन
स्यूमगृभ्
स्वधापति
स्वभिष्टिद्युम्न
स्वभूत्योजस्
स्वोजस्
हरि
हरिकेश
हरिजात (हरितवर्ण)
हरिप
हरिप्रिय ( पीतवर्ण अश्वप्रिय )

हरिंभर
हरियोग
हरियोजन

हरिवत्
हरिशिप्र
हरिश्मशारु

हरिश्रिय
हरिमन्युसायक
हर्यश्व

[ तै. सं. ]

अंहोमुच्
अक्रवारिन्
अद्रिव
अमिन
अश्वजित्
आदित्यवत्
आनुजावर
उक्थायु (स्तुतीच्छु)
ऊर्ध्वधन्वन्
गय
गोजित्
गोत्रभिद्

गोविद्
घर्मवत्
चोदितृ
दुश्च्यवन
धनजित्
नृवत्
नृषद्
नृषह्य
नृषाति
बलविज्ञ
भूमन्
युक्तग्रावन्

रक्षोहा
वज्री
विश्वगूर्त
विश्वहा
संसृष्टजित्
सदासह
सधमाद
समुद्रव्यचस्
सहसावत्
सुमृडीक ( सुखकर)
सुत्रामन् (सुष्टु त्राता)
सूरी

[ अथर्व ]

अकामकर्शन
आक्षितोति
अगोरुध
अतूर्त
अद्रिवत्
अनवब्रव
अभिभूत
अभिष्टि
अशस्तिहन्
असुरघ्न
आखण्डल
आङ्गूष
आप्य
आभग
आयुष्कृत
इदद्वसु
इन्द्राद
इन्द्रयोग
ईशानकृत्
उक्थवर्धन
उक्थवाह
उग्रबाहु
उद्भिद्
उरुगाय
ऋचीषम
ऋजुक्रतु
ऋभ्वस्
एकवीर
ऐन्द्र
क्षोभण
गूर्तश्रवस्
गोजित
गोद
ग्रामजित्

चर्कृत्य
चर्षणिधृत्
चर्षणिप्र
चर्षणिसह
तदिदर्थ
तुराषाह्
तुर्वणि
तुविकूर्मि
त्वेषनृम्ण
त्वेषसंदृश्
दयमान
दानकाम
दुश्च्यवन
द्रोणसाच
द्युक्ष
द्युमत्तम
धनजित्
धनंजय
धियावसु
धृष्णु
धृष्ण्वोजस्
नक्षद्दाभ
नर्यापस्
न्योकस्
पर्वतेस्थ
पाकसुत्वन
पुंरदर
पुरुवसु
पुरुहूत
पुरोगव
पुरोरथ
पूर्भिद्
प्रत्वक्षस्
प्रभुवसु
प्रियधामन्

बलविज्ञ
भूरिदात्र
मघवन्
मरुत्वत्
मरुत्सख
मिथूदृश
यशस्विन्
रथेस्थ
रदवसु
रयिस्थान
लोककृत्नु
वज्रबाहु
वज्रहस्त
वज्रिन्
वर्षन्तति
वासव
विप्र
विरप्शिन्
विश्वगूर्त
विश्वचर्षणि
वृत्रहन्
वृष्ण
शर्धवत्
शतक्रतु
शतमन्यु
शतवीर्य
शाकिन्
शाचिगु
शाचिपूजन
शिप्रिन्
शुष्मिन्तम
शृंगवृषोनपात्
श्रुतमघ
संसृष्टजित्
सगण

सत्यराधस्
सत्यशुष्म
सत्राची
सत्राजित
सत्रासह
सदावृत्र
सदासह
समथ
सहस्रशोक
सहस्राक्ष
सुत्रावन्
सुमृडीक
सुशिप्र
सोमकाम
सोमपावन्
स्वस्तिद
स्वधाव
हरिकेश
हरिजात
हरिप्रिय
हरिंभर
हरिव
हरिवत्
हरिशिप्र
हरिश्रि

वृत्रघ्न.—संहिता ग्रंथांतून इन्द्रविशेषण म्हणून येणारा हा शब्द ऐतरेय ब्राह्मणाच्या एका लेखांत आलेला आहे. ह्या ठिकाणीं गाथेमध्यें भरताचें महात्म्य वर्णन करण्याचे प्रसंगीं असें वर्णन आलें आहे कीं, त्या भरतानें यमुना व गंगा ह्या दोन नद्यांवरील घोडे बांधून टाकले. वृत्रघ्ने ह्याचा अर्थ सायणाचार्य वृत्रघ्न नांवाचें ठिकाण असा करतात, रोठ ह्याचा अर्थ वृत्राला मारणाऱ्याकरितां (इंद्राकरितां) असा करतो; व वृत्रघ्ने ही चतुर्थी समजतो, व हेंच मत ग्राह्य दिसतें.

## उषा विशेषणें [ ऋग्वेद ]

अंगिरस्तमा
अद्रिसानु
अनुयच्छमाना
अन्तिवामा ( धनयुक्ता )
अमिनती ( अहिंसन्ती )
अरेपसा ( पवित्रा )
अश्वसूनृता
अश्वावती
अह्नांनेत्री
आभरद्वसु
ऋतस्ययोषा
ऋतेजा
ऋषिस्तुता
कुहयाकृत्
गवांजनित्री
गवांनेत्री
गोमती
चिकित्संती
चेकिताना
जयन्ती
जरयन्ती
ज्योतिर्वसाना
दिवोदुहितृ
देवानांचक्षुस्
द्योतना
नेत्री
पुनर्भू
पुरुतमा
पूर्वा
पृक्षप्रयज्
प्रजानती
प्रतिचक्ष्या ( दर्शनीया )
प्रथमा
प्रदीध्याना
प्रबोधयन्ती
प्रभुंजती
प्रमिनती
प्ररिक्वन्
प्रसुवन्ती
बाधमाना
बृहती
बोधयन्ती
भगस्यस्वसृ
भास्वती
मघोनी ( धनयुक्ता )
मर्त्यत्रा
महीयमाना
मातृमृष्टेव ( आईनें न्हाउ घातलेल्या मुलाप्रमाणें )
यशस्वती ( अन्नवती )
यावयद्द्वेषा
युवति
रण्वसंदृश्
रेवती
वरुणस्यजामि
वह्नि
वाजिनीवती
विभाती
विरोकिन्
विश्वतुरा
विश्वपेशस्
विश्ववारा
विश्वसुविद्
विषुरूपा
व्यक्ता
व्युच्छन्ती ( प्रकाशमाना )
शश्वत्तमा
शाशदाना
शुचिभ्राजा
श्रवस्यु
श्वितीची
संस्मयमाना
सनुत्री ( दात्री )
समना
सिषासन्ती
सुजाता
सुदिना
सुदृशीकसंदृक् ( रमणीया )
सुभगा
सुम्नावरी
सुसंकाशा
सुसंपिष्ट ( उपेचा रथ )
सुहवा
सूनृतानांनेत्री
सौभगं आवहन्ती
हन्ताइव
हिरण्यवर्णा

## पूषन् विशेषणें [ ऋग्वेद ]

अजाश्व ( छागवाहन )
अनष्टपशु
अनष्टवेदस्
आघृणि
इंद्रस्यसखा
करंभाद्
करंभिन्
करूळातिन् ( कृत्तदंत )
जनश्रि
पुष्टिंभर
पूषण
पूषण्वन्
पूषन्
पूषर्यो
ब्रह्मचोदनी ( अन्नप्रेरकपूषन् )
मनुर्हित
मातुर्दिधिषु
यावयत्सख
विमुचोनपात्
विमोचन
विश्वसौभग
सरिन् ( नायक )
स्वसुर्जार
हस्तगृह्य
हिरण्यवाशीमत्तम ( सुवर्णायुधयुक्त )

## मरुद्विशेषणें [ ऋग्वेद ]

अगृभीतशोचिष् (अगृहीततेजस्क)
अमितपू
अनस्तशुष्म
अनर्वन्
अनवभ्रराजस्
अरिष्टग्राम ( अहिंसितगण )
अरुणाश्व
अलातृण
अश्मदिद्यु
अहंयु
अहतप्सु
आभूषेण्य
आश्वश्व
इन्द्रज्येष्ठ
इन्द्रप्रसूत
इष्मिन् ( गतियुक्त अन्नयुक्त )
उदन्यु
उदोजस्
ऋष्टि
ऋष्टिमत्
ऋष्टिविद्युत् ( आयुधांनीं शोभणारे)
एवयावन्
ओजस्वत्
कधप्रिय ( स्तुतिसन्तुष्ट )
कशा
केत
केतसाप्
खादिहस्त ( कटकहस्त )
गणश्री
गोबन्धु
गोमातृ
घर्मस्तुभ
घर्मस्वेद ( यज्ञगंता )
घृतप्रुष्
घृष्वि
घृष्विराधस्
घोरवर्पस्
चित्रवाज
तुविमन्यु ( बहुबुद्धि )
तुविराधस् ( प्रभूत धन )
तुविस्वन
तृषुच्यवस् ( क्षिप्रगमन )
त्वेषद्युम्न
त्वेषयाम ( दीप्तगमन )
दिविक्षय
धनस
धन्वन्
धारावर
धुनिव्रत ( मेघचालनव्रत )
धूति
ध्रुवच्युत्
नमयिष्णु
निदोदुर्धर्तु ( निंदकदुर्धर )
पयोवृध
परिज्री
पर्वतच्युत्
पिशान
पुरुद्रप्सस्
पूषराति
पृश्निमातृ
पृष्ठयज्वन्
प्रस्थावन्
बृहदुक्ष
भन्ददिष्टि
भीम
भुवनच्यव
भ्राजदृष्टि
महासेन
माघोन
मिथोवद्यप ( राक्षसांपासून गाईचें रक्षण करणारा )
रथेशुभ
रुक्मवक्षस्
वरुणप्रशिष्ट ( वरुणानुमोदित )
वाणधमत्
वातात्विष्
वाशी
वाशीमत्
विद्युद्धस्त
विद्युन्महस्
विमहस्
विश्वभानु
वृक्तबर्हिष्
वृद्धसेन
वृषखादि
वृषप्सु
वृषप्रयावन्
वृषव्रात
शर्ध
शुष्मिन्
सगण
सत्यशवस् (सत्यबल)
सत्यश्रुत् (सत्यकीर्ति)
सद्यऊति
सप्सर ( समानरूप )
सुखादि
सुपिश ( श्वेत बिंदूंनीं अलंकृत )

सुमद्गण
सुमाय
सुमारुत
स्तनयदम
स्थारश्मन्
स्रज्

स्वधितिवत् ( वज्रसदृश आयुध स्वधिति, तद्युक्त)
स्त्रभानु
स्वरितृ ( शब्द करणारा )

स्वेदाञ्जि
हिरण्यय ( सुवर्णालंकार युक्त )
हिरण्यवाशी ( सुवर्णकुठारयुक्त )
ह्रादुनिव्रत

वृषखादिः—ऋग्वेदामध्यें हें मरुतांचें विशेषण आलेलें आहे. ह्याचा अर्थ अनिश्चित आहे. बोलेनसनचें असें मत होतें कीं, ह्या शब्दावरून कानांमध्यें कुंडलें घालण्याची चाल व्यक्त होते. मॅक्समुल्लर म्हणतो कीं ह्याचा अर्थ मजबूत आंगठ्या असा आहे, व ह्या शब्दाची तुलना मागाहून प्रचारांत आलेल्या कड्याशीं तो करतो.

### रुद्रविशेषणें [ ऋग्वेद ]

उपहत्नु
ऋदूदर
कपर्दिन्
कल्मलीकिन्
क्षयद्वीर ( ऐश्वर्योपेतमरुद्गणपुत्राणांपिता )
क्षिप्रेषु
गर्तसद्

गाथपति ( स्तवनपाति )
जलाष
जलाषभेषज ( सुखरूपौषधोपेत )
त्वेष
निष्क
बभ्रु
भिषक्तम

भेषज
मेधपति ( स्तुतिपति )
वज्रबाहु
विश्वरूप
सुशिप्र
स्थिरधन्वन्
हवनश्रुत्
हिरण्यत्वक्

### सूर्यविशेषणें [ ऋग्वेद ]

अदृष्टहन्
अद्रिज
अनभीशु
अनवद्य
अनिमिष
अनृतद्विष्
अन्तरिक्षसद्
अब्ज
अरिष्ट
अश्वाजिन
अस्वप्नज
अहन्य
आदित्य
उक्ष
ऋतज
ऋतनि
ऋतसद्
ऋतावन्
क्षत्रिय
गभीर
गोज
चित्रदृशीक
त्रिवर्तु
दिवोरुक्म
दीर्घधी

दूरेअर्थ
दुरोणयु
दुरोणसद्
देवजात
द्युभक्त
द्वादशाकृति
धरुण ( सूर्यमंडळ )
धारपूत
धृतव्रत
निर्णिज्
नृषद्
पञ्चपाद
पतंग
पन्यतम
पुरीषिन्
पुरुस्थ
पृथुपाणि
भगभक्त ( धनयुक्त)
भूर्यक्ष
मित्र
यतरश्मि
यतुन
यातयज्जन
युयुवि ( पृथक्कर्ता )
वरसद्

विश्वचक्षस्
विश्वजिन्वन् (मित्रावरुण )
विश्वदर्शिन्
विश्वधायस् ( सूर्य, इन्द्र)
विश्वभ्राज्
विश्वानर
वीळुहरस् ( प्रभूततेजस्वी )
वेदिषद्
व्योमसद्
शुचि
शुचिषद्
संवर्ग
सच्चक्षाण
सत्यसव
सविमन्
सहस्रमघ
सूर्म्य
सूर्य ( सूर्यलोक )
सूर्यरश्मि
स्वाधी
हरिकेश

हरिस्थ
हिरण्यपाणि

हिरण्यय
हिरण्याविद्

हिरण्यसंदृश्
हिरण्यहस्त

### सामान्य देवताविशेषणें [ ऋग्वेद ]

अकवारि
अकृत्तरुच्
अग्निमिंध
अग्निजिव्ह
अग्निहोतृ
अग्रेप
अजुर्य
अच्छिन्नपत्र
अद्रुह्
अद्विषेण्य ( अग्नि, पितर् )
अधिक्षित
अनपच्युत
अनाभिद्रुह
अनानत ( मरुत्, अग्नि वगैरे)
अनूधस् ( द्यावापृथिवी )
अप्रमूर ( अमूढ )
अभिश्री ( आभित्रयणीयवायु )
आभिस्तुत
अमर्त्य
अमित्रहन् ( सोम, अग्नि )
अमृतबंधु
अमृत्यु ( अग्नि, धेनु )
अमृध्र
अंबितमा ( सरस्वती )
अरथ ( मरुत्, आप )
अरिगूर्त ( वरुण )
अरिष्टनेमि ( अहिंसितायुधो तार्क्ष्यः )
अरिष्टभर्मन्
अरुणप्सु ( वरुण, उषा )
अवसाना ( वस्त्ररहितविद्युत् )
असुतृप ( यमदूतवि. )
अस्वप्नज ( अनिद्र, आदित्य, किरण )
आच्छद्विधान

आदेदिशान
आप्रुषायन् (सिंचन्, सूर्य )
आरेअघ
आशुपत्वन् ( जलदगामी श्येन )
आशृण्वत
इतऊति ( अग्नि, इंद्र )
इद्ध
इंद्रस्वत् ( ऋभुगण )
इरावत ( यमदूत वि. )
इळावत्
इषुध्यु
इष्वी
इहेहमातरा
ईळय
ईशान
उक्थशुष्म
उग्रबाहु ( इंद्र, मरुत्)
उदुंबल(यमदूत वि-)
उपमातिवनि ( शत्रूणांहंता )
उभयाविन् ( इंद्र, अग्नि )
उरुक्रम ( लांबलांब पावलें टाकणारा )
उरुगाय
उरुचाक्रि
उरुशंस
उरूची ( वाच् )
उरुणस्(यमदूतवि.)
उर्वरासा ( इंद्र, दधिक्रा )
ऊर्जयत् ( अपांनपात् )
ऋजुयत्
ऋजुय ( ऋभु )
ऋंजसान
ऋतज्ञ
ऋतव ( वरुण )
ऋतायिनी ( सत्ययुक्त )
ऋतावरी
ऋतावृध

ऋदूदर ( सोम, इंद्र )
ऋभुमंत् ( प्रजावान् इंद्र )
एवया ( रक्षणायगंता=विष्णु)
एहिमायस् ( कपटरहितविश्वेदेव )
कथप्रिय ( स्तुतिप्रियउषा,मारुत्)
कोण ( कुत्सितशब्दकारी )
कृच्छ्रेश्रित
कृष्टिप्र ( इच्छापूरक )
क्रतुवित्
क्रन्ददिष्टि ( शब्दित गमनवायु )
क्षत्रश्री ( वरुण )
क्षुमती (दधिकावन्, उषा )
क्षेत्रासा ( दधिक्रा )
गभीरवेपस् ( सूर्य )
गयस्फान ( सोम, वास्तोष्पति )
गातुवित् ( इंद्र, सोम )
गाथान्नी ( इंद्र, बृहस्पति.)
गिर्वण
गूर्तवसु ( हातांत द्रव्य घेऊन उभी असलेली द्युदेवता)
गोकाम
गोजात
घर्म्येष्ठ
घृतपदी (दीप्तपदोपेताभारती )
घृतपृच् ( घृतसंपृक्ते द्यावापृथिव्यौ )
घृतश्री ( द्यावापृथिवी )
घृतासुती
चाक्रि ( इंद्र, वरुण )
चक्षदान
चक्षुष्मत् ( मृत्यु )
चतुरंग
चर्षणीसह ( वरुण )

चाक्ष्म (ब्रह्मणस्पति)
चित्तगर्भा.
चित्रराधस्
चित्रश्रवस्तम(अग्नि, सोम.)
चित्रायु
चित्रोति ( अश्व )
जनयोपन्
जनिवत्
ज्यायस
ज्योतिर्जरायु (मेघगर्भ=वेन )
ततुरि ( इंद्र, वरुण)
तत्सिन
तुरण्यषद् ( दधिक्रावा )
तुर्वणि
तुविग्रीव
तुविष्मत्(इंद्र, बृहस्पति.)
त्रिबर्हिष्
त्रिमातृ
त्रिषधस्थ
त्वष्टृमत्
त्वेषसंदृश्
दक्ष ( ऋभू )
दस्युहंतम
दंस्र ( उपक्षयेंकारिन् )
दाधृवि ( धरित्री )
दिविक्षित ( सूर्याचंद्रमस् )
दीर्घाधिय
दुष्टरीतु ( अग्नि, इंद्र )
देव
देवजामि
देवता
देवताति
दैवत्र
देवपुत्र
देवयत्
देवयाति
देवाची ( देवान्पूजयतीकृपा )
देवोदेव.
धारयत्कवी ( द्यावापृथिव्यौ )
धृतदक्ष ( मित्रावरुणौ )
धृतव्रत ( वरुण )
धृष्णु ( इंद्र, अग्नि, सोम )
धृष्णुषेण ( इंद्र, वरुण. )
ध्रुवक्षेम
नाधसी
निमेघमान ( इंद्र, मरुत् )
नियुत्वत् (इंद्र,मरुत्)
नीलपृष्ठ ( अग्नि, बृहस्पति )
नृमनस् ( इंद्र, आदित्य )
नृशंस
नृसाचः
पत्रहेषिन्( इंद्राग्नी)
पनिष्ठ ( स्तुत्यतम )
परिक्षित्
पीवस्वती (आपोदेवता)
पुरंदमन्(अग्नि,इंद्र)
पुरुकृत
पुरुधप्रतीक
पुरोयावन् (अग्निसोम )
पूतक्रता
पूर्वपा ( वायु )
पूर्वयावन्
पृथुष्टुका ( पृथुजघना=सिनीवाली)
प्रजापति (वरुण)
प्रतरितृ ( वर्धयितृ )
प्रथमभाज्
प्रयस्वत् ( अन्नवत्)
प्रसवितृ
प्रियरथ
प्रियव्रत
बहुसूवरी ( बहुप्रजाजनयित्री–सिनीवाली)
बृहच्छ्रवस्
बृहती
बृहद्दिव (अग्नि,ऋभु)
बृहद्रयि ( वायु )
भूरिपाश
भूर्णि ( नेता )
मधुदुहं ( द्यावापृथिवी )
मनस्वत्
मनोजवस् (अश्वी, इंद्र, मरुत् )
मंतुम (इंद्र, पूषन्)
मन्दान ( इंद्राग्नी )
मन्युमी (इंद्र, बृहस्पति)
मरुत्वत्
मरुत्वन्ती
महिनावत् ( इंद्र,विश्वेदेव )
मित्रपति
यक्षभृत् ( हविरादिकं दधानः )
यक्षिन् ( यजनीय वरुण )
यजत ( पूजनीय=इंद्र, आदित्य )
यजत्र ( यजनीय )
यज्ञकेतु
यज्ञनिष्कृत्
यज्ञबंधु
यज्ञवनस्( वरुण )
यज्ञसाध (अग्नि,इंद्र)
येचक्षस् ( मित्रावरुण )
रथप्र ( अग्नि,वायु )
रथयावान
रेतोधस् ( सोम, पर्जन्य )
रेवती
लोककृत् (इंद्र,सोम)
वरूत्री ( उपद्रवानां वारायित्री.)
वसु ( कल्याणकारी )
वस्य ( सोम, इंद्र )
वामजात
विचारिणी ( पृथ्वी )
विभूतद्युम्न ( इंद्र, विष्णु )
विविक्कन् ( विवेकवान् अग्नि, इंद्र )
विश्वकृष्टि ( वैश्वानर, मरुत् )
विश्वदर्शन ( अग्निवरुण )
विश्वदेव्य
विश्वसौभग ( अश्वी पूषन् )
विषुवृत्
वीळुद्वेषस् ( ब्रह्मणस्पति )
वृषभर ( वृष्टिहर )
वृष्टिद्यु
शतनीथं ( अग्नि, इंद्र )
शतपत्र ( बहुविधवाहनः बृहस्पतिः )
शत्रुहन् ( शचीपुत्राः )
शन्तम ( सुखकर )
शम्भु
शुक्रपूतप ( शुक्रपूत सोम वायु. )
शेवृध
श्रुतरथ
श्लोकयंत्र
श्वितीची ( प्रकाशमान् )
श्वेत
सकेत ( तेजस्क )
सचथ
सजानान
सतोमहत्
सत्य
सत्यतर
सत्यताति
सत्यधर्मन् ( सूर्य, प्रजापति )
सत्यमन्मन्
सत्यराधस्
सत्यशुष्म ( अग्नि, इंद्र )
सत्रासह ( बहूनां पराभविता )
सनद्वाज
सपर्येण्य
सप्तहोतृ ( अग्नि,-आदित्य )
समाराण ( नदी )
समुद्रज्येष्ठ (आप्)
सहवन् ( अग्नि, इंद्र
सहसामन्
सहस्तम
सहस्तोम
सहस्रचक्षस् ( वरुण, सोम )
सहस्रजित्
सहस्रणीथ ( सोम, इंद्र. )
सहस्ररेतस् ( अग्नि, सोम )
सहस्रसातम (अग्नि, इंद्र )
सहस्राक्ष ( अग्नि, हवि, इंद्र )
सहुरि ( मन्यु, भुज्यु, सूर्य, )
सह्व
साधुकर्मन्
सिषासनि.
सुकर्मन् ( वाज )
सुजिव्ह
सुदानु
सुबर्हिष् ( अग्नि, मरुत् )
सुमित्र्य
सुशंस ( अग्नि, वरुण )
सुष्टुत
सुष्वयंती
सुप्रदानु
स्मद्रातिषाच् ( यजमानप्रियकारी.)
स्वतवस् ( स्वायत्तबल )
स्वधावरी
स्वध्ववत्
स्वप ( सुकर्म )
स्वप्ननंशन
हरिवर्पस् ( इंद्र, पृथ्वी )
हव्यसूद

[ तै. सं. ]

अक्रूरंकार
अग्निजिव्हा ( विश्वेदेवावि )
अग्निमुख
अग्नीषोम
अमेपु ( आप )
अङ्गार
अपापकाशिनी
अपूतपा
अप्राशित्रि ( पूषन् विशेषण )
अर्क्य
अवर्षुक
आगोमुग् ( अश्वि वि० )
उपरिषद्
उपश्रोतृ ( वायु विशेषण )
उरुगाय
उरुशंस
ऋतज्ञ
ऋतप्रजात ( बृहस्पति )
ऋष्व
ओम ( विश्वेदेव विशेषण )
क्रतुमत्
क्षय ( देव वि. )
क्षुरपवि
गातुविद्
घृतनिर्णिज्
घृतपावान
घृताहवन
चित्पति
चित्रविहित (देवता वि. )
चित्रायु ( सरस्वति वि )
चित्रावसु ( रात्रि )
चित्रोति
त्रिपती
दक्षवृध् ( दक्षान्कर्मकुशलान्वर्धयति द. धू. दक्षप्रजापति )
दिग्वती
दुहृणायु
दूरेदृश् ( सूर्यरूप सोमाचें विशेषण )
देव
देवजूति ( आदित्य, लेक, सलेक, सुलेक्ष, केत, सकेत, सुकेत, विवस्वत् आदिति, देवजूति. )
देवताती
देवपुत्र ( द्यावापुत्रविशेषण )
देवलक्ष्म ( देव चिन्ह )
देवविश्
देवश्री
देवश्रु ( देवनापित )
देवस्
देवसेन

देवी
धरुण
धर्मपति ( वरुण, विशेषण )
धर्मसू
नरान्धिष्
नानारुप
निम्राभ ( सूर्य-विशेषण )
निर्ऋतिगृहीत
निर्मीथ
निर्वरुण
नूतन ( नवे यम-दूत )
नवतसख ( ऋत्वि-ग्रूपमनुष्यैर्युक्ता देवाः )
पश्चातसद
पुनर्मघ ( बृहस्पति विशेषण )
प्रतर
प्रसूवरी ( महा-नाम्नी विशे-षण )
प्रस्तरेष्ठ विश्वेदेव
प्रातर्युज ( अश्विनी विशेषण )
प्रातःसवनभाग् ( सवितृ वि. )
बलदा ( प्रजापति विशेषण )
बहुसुवरी ( बहूनां यज्ञानां सवित्री =सिनीवाली )
बृहज्ज्योतिष्
बृहद्वयस्
बृहस्पतिनेत्रा
ब्रह्मण्वत्
ब्रह्मवत्
भङ्गुरावत्
भागिनी ( भाग-ग्रहण करणारी देवता )
भास्वति
भुवद्वत ( आदित्य विशेषण )
भुवनपति ( अग्नि-भ्राता )
भूरिदावत्तर(इन्द्राग्नी विशेषण )
मखघ्न ( अग्नि, रुद्र व इंद्र )
मतिविद्
मनुष्यचर ( अश्वि-नी वि. )
मरीचिप
महादेव
महामनस्
मित्रामह
मृत्युबंधु ( यम-दूत )
मेध्य.
यजिष्ट.
यज्ञपति
यज्ञमुष्(यज्ञविघातक देव )
यज्ञहन् (यज्ञ विघा-तक देव विशे.)
यमनेत्र
वर्ष्टृ ( पर्जन्य विशे-षण )
वाजयन्तृ
वाममोष.
विचर्षणि ( सोम, अग्नि )
वीव्रक्त
विश्वकर्मन्
विश्वदर्शत्
विश्वदैवी ( अदि-ति वि.)
विश्वधायस् ( मात-रिश्वन् वि. )
विश्ववार्
विश्वशंभु
विश्वायुष् ( गायत्री विशेषण )
वीतिहोत्र ( अग्नि, देव. )
वैश्वव्यचस् ( प्रजा-पति विशेषण )
शुक्रप.
शुचिप
शुद्धाजुव्
श्रुत
संस्रावभाग
सक्तु
सत्यवाच्
सत्यसव ( सूर्य वि-शेषण
सम्भृतयज्ञ
सर्ववीर
सर्वायुष् ( गायत्रीवि-शषण )
सवनभाज्
सश्छंदस् ( मंत्राभि-मानी देवता )
सहुरी.
सुपाणि ( सिनीवाली विशेषण
सुपाव
सुप्रायण
सुमंगल
सुमेधस् ( सवितृ विशेषण )
सुषेण
सूर
सूर्मी
सेनजित्
सोमप
सोमभृत् ( विष्णु)
सोमवत्
सौम्य
सौरी
स्वधावन् ( प्रजाप-तीचें विशेषण )
स्वपत्
स्वरित्र
स्वस्त्ययनी
स्वा
हरिकेश
हिरण्यगर्भ ( क)
हिरण्याजिह्व ( सूर्य )
हिरण्यपाणी (सविता)
हुताद

[ अथर्ववेद. ]

अंहोमुच्
अकृत्तरुक् ( मन्यु )
अपस्यु
अभिश्नावा ( द्यावा-पृथिवी )
अभिसाच
अमर्त्य
अवस्यु
अवस्वन्
अवि ( शेळी )
अश्वक्षम
अष्टपुत्र
अष्टयोनि
अस्मत्साखिन्
आक्ताक्ष
आघृणि ( पूषन्वि-शेषण )
आत्मद
आनशान
आयुष्पत्नी
आर्द्रदानु
आर्द्रपवि
इन्द्रपुत्रा ( एका-ष्टका )
उग्र
उग्रधन्वन्
उग्रबाहु
उग्रायुध
उतुद
उपरिस्पृश
उरुवक्षस्
उरुवी
उरुव्यचा ( वाग्दे-वता )
उशती
ऋतव
ऋतवृध्
ऋतस्य ( सूर्य वि.)
एकरूप
ओत ( इंद्राग्नी )
कल्याणी
कविक्रतु ( सवि-तृ वि. )
काबेरक
काम
कृशानु ( कृशप्रकाश सूर्य )
केशिनी ( रुद्रसेना विशेषण )
घोषिणी ( रुद्रसेना विशेषण )
चतुरक्षी ( देवशुनि विशेषण )
जार ( आदित्य विशेषण )
जेता
तनूप
तपज
तिग्मतेज
तिग्मायुध
तिग्मेषु
तोषमान ( वाग्वा-दित्य )
त्रायमाणा
त्रिषधस्थ
त्वद्योनि
त्वप्रतिसूर्य
दस्युहन्
दिवाकर
दिव्य
देवकृत
देवगोप
देवगोपा
देवजूतम्
देवबंधु
देवमनुष्य
देववीति
दैवजनि ( दैवतो-त्पत्तिस्थान )
दैवी
दोह
द्यावापृथिवीवन्
द्विबर्हज्म
धास्यु
धृतव्रत ( इंद्राव-रुण )
नष्टवीर्य ( वरुण विशेषण )
नाकपाळ
निमीवन्ती
नृचक्षस्
पतंग ( सूर्य. वि० )
पथिकृत्
पप्रि
परमेष्ठिणी
पवमान
पुत्रकाम्या
पुरंधि
पुरुदंसस्(अश्वि.वि.)
पुरुशाक
पूतदक्ष
पूर्तिकाम
पृश्निमातृ ( मरुद्वि.)
पृषातकी
प्रचर्षणी ( इंद्राग्नी )
प्रजनवत्
प्रणेत
प्रतिमोहयन्ती ( पा-पदे वि.)
प्ररुह
प्राघर्मसद्वत् ( बृह-स्पति )
प्रियमाण
बलद [illegible]
महागण
मायी ( वरुण )
मारुत ( मरुद्वि. )
मित्रराजन्
मृतभ्रज ( वरुणवि.)
यज्ञकाम
यज्ञवाहस्
यत्काम
यातुजंभन
रत्नधा ( सूर्यवि. )
रातहव्य
राष्ट्री
रुक्मवक्षस् ( मरु-द्विशेषणें )
लोककृत्
वरुण्य
वसुधातर
वारुण ( वरुणपा-शवि. )
वावशान ( मधुक-शावि. )
विजानत्
विजावत्
विथु ( सूर्यवि. )
विदगण ( अंगिरा-देवांचें वि. )
विदित ( मरुद्वि. )
विदेय
विदेव
विद्मनायस्
विमान
विराज
विश्वजित्
विश्ववार
विश्वसृज्
विश्वायु
वैराज
व्र ( वरुण )
शततर्ह
शतयोनि ( सूर्य )
शतहस्त
शम्भु ( क्षे. प. वि.)
शा[illegible]जन ( इंद्र )
[illegible] रुद्र-
[illegible]

शोचिष्केश ( सूर्य )
संगमनी
सचित्त
सजोषस्
संजग्मान
सत्यसंध
सत्यसव
*सत्रसद्
सधस्थ
सपत्नदंभन
सप्तनामन्
संभुंजति ( रुद्रसेना )
सर्ववीर
सर्वासिन
सवेदस्
सहस्रचक्षस्
सहस्रदक्षिण ( पूषा )
सहस्रस्तुक
सहस्राक्षरम्
सहीय.
सातहन् ( लाभप्रतिबंधक )
सुकर्मन्
सुपक्ष
सुप्रकेत ( बृहस्पति )
सुप्रणीति
सुबाहु ( सिनीवाली )
सुषूमा ( सुयेनि )
सुहवा ( देवपत्नी )
सुहुत
सूर्म्य ( सूर्य-संबंधी )
सोमपुत्रा
सौपर्ण ( सूर्यवि. )
स्वधाप्राणा ( पर्जन्यपत्नी )
स्वप्ननंशन
स्वयंभू
स्वयुक्
स्वाह्य
हविरद
हव्यवाह
हिरण्यकेशी
हिरण्यपक्षस्
हिरण्यपाणि
हिरण्यवक्षस्
हिरण्यहस्त
हीडित
हुतभाग

[ वाजसनेयी संहिता ]

मंथिप.

[ संहितावाह्य ]

[1]व्राजबाहु.

[1]व्राजबाहुः–कौषितकी ब्राह्मणामध्यें ( २. ८ ) मृत्यूचे वेढणारे हस्त अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. व्राज ह्याचा अर्थ व्रज ह्या शब्दाप्रमाणें गोठा असूं शकेल. विष्ठा व्राजिन् हा शब्द पहा.

## देवयोनि

### अप्सरा, गंधर्व वगैरे [ ऋग्वेद ]

उर्वशी
गन्धर्व
बार्हत् ( स्वानभ्राजादि )
वायुकेश
श्रेणि
सुजूर्णि
सुम्ने आपि
[1]हृदेचक्षु

[ तै. सं. ]

अग्नि
अधिपति
अङ्घारिन्
अनुम्लोचन्ती ( अप्सरा )
अप्सरस्
आयु ( अप्सरा )
उर्वशी
ऊर्ज
काम
क्र[illegible]
पुंजिकस्थला
पूर्वचित्ति ( अप्सरा )
प्रम्लोचंती ( अप्सरा )
बम्भारि
बेकुरि ( भद्रकृत् गंधर्वनाम )
भीरु ( अप्सरा )
भुज्यु
भूः ( अप्सरा )
भ्राज
मत्र ( मन )
[illegible]दा ( अप्सरा )
[illegible]
वह्नि ( अप्सरा )
वात
विश्वसामन्
विश्वाची ( अप्सरा )
शोचयंती ( अनेकअप्सरा )
सहजन्या
साध्य
सुषुम्न ( सुंदर मुख )
सुहस्त
सूर्य (
सूर्यरश्मि ( गंधर्व विशेषण )
तवा ( अप्सरा )
[illegible]ान
[illegible]

[ अथर्ववेद ]

अनुम्रोक
अनुसर्प
अप्सरापति
अमर्त्य
अवकाद ( शेवाळें-खाणारा )
असुतृप
आकिरन्ती
आनान्दिनी
आरेभाण
उग्रंपश्य
उभ्दिन्दती
[2]औक्षगान्धि
गन्धर्वर्तु
गन्धर्वाप्सरस्
गंधर्वी
गुग्गुल
ग्लहेकृतानि कृण्वाना
चित्ररथ
दिविचर
देवजन
देवजामि
नक्षत्रिया
नलदी
[3]पीला
पुण्यगन्धि
पुण्यजन
[4]प्रमन्दनी
प्रमोदिनी
म्रोक
राथजितेयी
राष्ट्रभृत्
विचिन्वती
शफारुज
[5]शेरभ
शेरभक
[6]शेवृध
शेवृधक
श्वन्वती ( कुत्रे घेऊन हिंडणारी अप्सरा )
संवसव
संजयन्ती
सर्प
साधुदेविनी
साध्य
सीषती ( अप्सरा )
स्त्रीभाग
हविरद्

[ वाज, सं. ]

[7]किंपुरुष

[ संहितेतर ]

शकुन्तला ( अप्सरा )

[1]हृदेचक्षुः–ऋग्वेदामध्यें एका ठिकाणीं आलेल्या या शब्दाचा अर्थ जॅक्सनचे मतानें ' भुताचें कोलीत ' असा आहे.

[2]औक्षगन्धिः–( बैलाच्या चरबीचा वास असलेली ) अथर्ववेदांत हें एका अप्सरेचें नांव आहे असें मॅकडोनेल म्हणतो. आणखी दुसरीं नांवें आहेत त्यांपैकीं गुग्गुलु आणि नलदी हीं स्पष्ट वनस्पतींचीं नांवें आहेत. ह्मणून हेंहि नांव एकाद्या सुवासिक वनस्पतीचें द्योतक असावें असा तर्क आहे. त्याच संहितेंत ' औक्ष ' याचा ' बैलाची चरबी ' असा अर्थ दिला आहे.

[3]पीलाः–अथर्ववेदांत एका अप्सरेचें हें नांव आलेलें आहे असें मॅकडोनेल म्हणतो. त्याच ऋचेंत आलेल्या नलदी व गुग्गुल या दोन शब्दांप्रमाणें हें हि एखाद्या वनस्पतीचें नांव असावें.

[4]प्रमन्दनीः–अथर्ववेदांत हें एका अप्सरेचें नांव आलें आहे. आधीं याचा अर्थ बहुधा कोणती तरी एखादी ' सुगंधी वल्ली ' असा असावा. कौशिकसूत्रांत याचा हाच अर्थ असावा असें वाटतें.

[5]शेरभ, शेरभकः–अथर्ववेदांत सापाचें किंवा राक्षसाचें हें नांवें आलेलें आहे.

[6]शेवृध, शेवृधकः–अथर्ववेदांत सर्प किंवा राक्षस या अर्थी हीं नांवें आलीं आहेत.

[7]किंपुरुषः–शब्दशः 'कोणत्या प्रकारचा मनुष्य;' हा शब्द ब्राह्मणांत वानर म्हणजे नकली मनुष्य या अर्थी आला आहे. वाजसनेयी संहितेंत हि बहुधा हाच अर्थ असावा. रॉथ म्हणतो हा शब्द तुच्छ किंवा तिरस्करणीय मनुष्य या अर्थी उपयोगांत आला असावा. मॅक्समुल्लर ' रानटी ' असा अर्थ करतो.

...तला–शतपथ ब्राह्मणांत नाडपित् येथें भरताला जन्म [दे]णाऱ्या अप्सरेचें हें नांव आलेलें आहे. वेबरच्या मतानें नाडपित् हा शब्द नाडपिति असा असावा व तो शकुंतलेचें विशेषण असावा.

## पितर व पितरसंबंधी [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1]अग्निदग्ध | कव्य | पितृतम |
| अग्निष्वात्त | दक्षपितृ | पितृवत् |
| अंगिरस् | दशग्व | पितृवित्त |
| अंगिरस्वत् | दशग्विन् | पितृषद् |
| अथर्वन् | देववंद्य | पित्र्य |
| अनग्निदग्ध | नाराशंस | पित्र्यवती |
| ऊम | पज्र | भृगु |
| ऋक्क | पितुकृत्तर | साध्य |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निष्वात्त | चित्रसेन | सतोवीर |
| अमृध्र | पितर | सुदेव |
| इषुबल | बर्हिषद् | सोमप्रतीक |
| उरु | ब्राह्मण | सोम्य |
| ऊम | वयोधस् | स्वभानु |
| कुलेश्रित् | व्रातसाहस् | स्वादुषंसद |
| गभीर | शक्तिवत् | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्नितप्त | पितृ | वधूदर्श ( वधूला पाहणारे ) |
| अग्निदग्ध | पितृमत् | |
| अनग्निदग्ध | पितृसदन | सनीड |
| उक्थशस | पूर्वज | स्वंग |
| कव्यवाहन | पृथिविसद् | |
| घर्मसद् | बर्हिषद् | हविरद |
| दिविषद् | रातिषाच् | हविष्य. |

[1]अग्निदग्ध — हें नांव ( अग्निना दग्ध ) चितेमध्यें जाळून जीं मृत शरीरें भस्म होत होतीं त्यांनां लावलें जात असे. प्रेतांची जी दोन प्रकारची व्यवस्था लावतात त्यांपैकीं ही एक आणि दुसरी पुरणें ( अनग्निदग्ध–अग्नीनें न जळलेलें )ही होय. प्रेतांची व्यवस्था करण्याच्या आणखी दोन पद्धती अथर्ववेदांत सांगितल्या आहेत एक फेंकून देणें ( परोप्ताः ) आणि दुसरी प्रेतांनां उघड्या जागेंत ठेवणें ( उद्धिताः ). ह्या शब्दांचा बरोबर खात्रीलायक अर्थ सांगतां येत नाहीं. झिमर म्हणतो कीं इराणी लोकांत पशूंनां खाण्याकरितां म्हणून प्रेत फेंकून देण्याची जी चाल आहे तिचें, आणि पहिल्या शब्दाचें साम्य आहे आणि दुसरा शब्द निराश्रित म्हातारे ( ऋ. ८. ५१, २ ) जेव्हां निष्काळजीपणानें वागविले जातात त्यांनां लागू पडतो. व्हिट्ने म्हणतो कीं दुसरा शब्द कसल्यातरी उंच चबुतऱ्यावर मृत शरीर ठेवतात त्याला लागू पडतो. असें स्पष्ट दिसतें कीं मृत मनुष्यास त्याच्या कपड्यांसह त्याच्या हातांत धनुष्य देऊन पुरीत असत, आणि बहुतकरून रानटी लोकांत बायकोला नवऱ्याबरोबर जाळावयाची जी चाल आहे तीदेखील त्या वेळीं अमलांत होती असें वाटतें. परंतु वैदिक कालांत ह्या दोन्ही चालींत बरीच सुधारणा झाली आहे. मृताचा मुलगा मृताच्या हातांतून धनुष्य काढून घेतो आणि मृताच्या पत्नीला मृतापासून मृताचा भाऊ अथवा त्याचे आप्त यांनीं दूर न्यावयाची चाल वैदिक कालीं असल्याचें आढळतें. मृत मनुष्य व जिवंत माणसें यांनां वेगळें करण्याकरितां त्यांच्यामध्यें एक दगड ठेवीत असत. अथर्ववेदांत ( १८.२,२५) प्रेतें ठेवण्याच्या पेटीचा संबंध आलेला आहे. दोन्ही संहितेंत मातीचें घर ( भूमिगृह )असा उल्लेख केलेला आढळतो. ओल्डेनबर्गच्या मताप्रमाणें मृतांस जाळल्यानंतर त्यांचीं हाडें राहतात तीं पुरावयाचीं म्हणून पुरणें हा शब्द योजिला आहे परंतु हा अर्थ धरून पुरणें आणि जाळणें यांतील फरक नाहींसा करणें अयोग्य आणि अशक्य आहे कारण जाळणें आणि पुरणें हीं दोन्हीं कामें एकाच वेळीं ग्रीस देशांत पुष्कळ वर्षेपर्यंत होत होतीं. तथापि प्रेताला अग्नि देणें ही चाल देखील सर्वसाधारण होती व ती पुढें वाढत गेली. कारण परलोक मिळविण्याकरितां प्रेताला दही लेपून, कपडे घालून आणि भूषणें चढवून जाळण्याची जी चाल होती ती चुकीची होती असें छांदोग्य उपनिषदांत वर्णन आहे आणि वाजसनेयी संहितेंत जे प्रेतसंस्काराचे मंत्र दिले आहेत त्यांत फक्त दहनाचाच विचार केला आहे. येथें पुरणें यासंबंधीं जे मंत्र आहेत त्यांत फक्त श्मशानांत राख पुरण्याबद्दलचाच उल्लेख केलेला आढळतो. ऋग्वेदांत जें प्रेतसंस्कारविषयक सूक्त आहे त्यावरून आपणांस असें आढळतें कीं प्रेताला चरबींत ठेवीत असत आणि प्रेताला परलोकाचा रस्ता दाखविण्याकरितां प्रेताबरोबर एक बकरा जाळीत असत. प्रेताला परलोकीं जातांना बसून जाण्याकरितां त्याच्या बरोबर एक बैल जाळीत असत असा अथर्व वेदांत ( १२. ३, ४८ ) उल्लेख आहे. जरी मृताचे डोळे सूर्याकडे जातात, श्वास वायूकडे जातो अशी कल्पना होती तरी मृत मनुष्य पुन्हा सर्व अवयवांसह जिवंत होतो असाहि समज असल्याबद्दल शतपथ ब्राह्मणांत ( ४. ६, १, १ ) उल्लेख आहे. प्रेतानें पुन्हा पृथ्वीवर येऊं नये म्हणून त्याला जाळण्यापूर्वी अथवा मूठमाती देण्यापूर्वी त्याच्या पायाला फासा किंवा बिडी अडकवीत असल्याबद्दल अथर्ववेदांत ( ५. १९. १४ ) उल्लेख आहे.

## पिशाच [ ऋग्वेद ]

पिशाचि

[ तै. सं. ]

[1]पिशाच

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अघरुद | बंधक ) | अपाकेष्ठ ( पाकशालस्थ ) |
| अघविष | आलिक्लव | |
| अचिन् | अषाढु | उदुंबर |
| अनागोहत्या (कृत्या) | अष्टापदी | उरुण्ड |
| अनागम | असमृद्धि ( कृत्या ) | एकवादी |
| अयाशु | आंगिरसी ( कृत्या ) | ककुभ |
| अराटकी | आण्डाद | करूमा |
| अराय ( दानप्रति- | आतोदिन् | कुकुन्ध |

| | | |
|---|---|---|
| कुकूरभ | दुर्णाम्नी | रुपित |
| कुक्षिल | द्विजिह्वा | लीशाथा |
| कुचर | ध्वास्य | लोहितास्य |
| कुणप | धूमाक्षी | वल्ग |
| कुनखि | धृष्णु | वलगिन् |
| कुपायकु | नस्वती | विकेश्य |
| कुंभमुष्क | निर्दहनी | विग्रीवस |
| कुल्मल | निःसाला | व्यैलब (चमत्कारिक आवाज करणारा.) |
| कुसूल | पंचपाद | |
| कूल्बजमावृता | पश्चात्प्रपद | |
| कृत्या | पुरःपार्ष्णि | शकधूमज |
| कृधुकर्णी (डोळे व कान बंद करणारी) | पुरोमुख | शकंभरस्य मुष्टिहन् |
| | पृषातकी | शकुल |
| | प्रहासिन् | शपथेय्य |
| कृपणा | फलिग | शाल |
| कृष्णा | बस्तवासिन् | शीर्षण्वती (कृत्या) |
| केशव | वस्ताभिवासिन् | शूद्रकृता (कृत्या) |
| क्रन्दा | ब्रह्मभिःकृता (कृत्या) | सदान्वस् |
| क्लीबाइव प्रनृत्यन्त | [२]मकक | सदान्वाक्षयण |
| खर्ववासिनी | [३]मगुधी | सुलाभिक |
| खलज | मगुन्धी | स्तंबे ये कुर्वते (ज्योतिस्) |
| गर्दभनादिन् | मट्मट | |
| ग्राहि | मूलि | स्रिम |
| तिरीटिन् | यातुधान | स्त्रीकृता |
| तौविलिका | रक्षस्विनी | स्वयंकृत |
| दुर्गन्धि | राजकृता | हस्ते शृंगाणि बिभ्रत् |

[१]पिशाचः—ऋग्वेदांत हा शब्द पिशाचि या रूपांत एकदा (१. १३३, ५) आला आहे. अथर्ववेद व तदुत्तर ग्रंथांत उल्लेखिलेल्या राक्षसांपैकीं एका जातीचें हें नांव आलेलें आहे. तैत्तिरीय संहितेंत त्याचा संबंध राक्षस व असुर यांच्याशीं लावला आहे व ते देव, मनुष्यें व पितर यांच्या विरुद्ध असत असें म्हटलें आहे. अथर्ववेदांत त्यांना कच्चें मांस खाणारे म्हणजे क्रव्याद असें म्हटलें आहे व याच व्युत्पत्तिशास्त्रदृष्टीनें पिशाच शब्द झाला असावा. ग्रिअर्सन म्हणतो त्याप्रमाणें पिशाच लोक मानवांचे शत्रू असून ते हिंदुस्थानाच्या वायव्य सरहद्दीवर राहणाऱ्या लोकांप्रमाणें असावेत. कारण हे सरहद्दीवरील लोक बरेच दिवसपर्यंत कच्चें मांस खाणारे (कदाचित् हे नरमांसभक्षक नसतील परंतु यज्ञाच्या वेळीं नरमांस भक्षण करणारे असूं शकतील) म्हणून प्रसिद्ध होते. पण ही विचारसरणी चुकीची दिसते. हे पिशाचलोक म्हणजे काल्पनिक मनुष्योपजीवी भुतें असावींत. जेव्हां ते मनुष्यजाति म्हणून उल्लेखिले जातात तेव्हां त्यांना मुद्दाम तिरस्कारानें पिशाच हें नांव दिलेलें असतें. मागाहूनच्या वैदिक कालांत पिशाचवेद किंवा पिशाचविद्या म्हणून प्रसिद्ध आहे.

[२]मककः—अथर्ववेदांत हा शब्द एकदांच आला आहे व तो कोणत्या तरी अज्ञात प्राण्याचा वाचक आहे. कदाचित् विशेषणार्थीहि असूं शकेल व त्याचा अर्थ बें बें करणें असा असावा.

[३]मगुधीः—दुष्परिणामास हांकून लावणें या अर्थी अथर्ववेदांतील एका ऋचेंत हा शब्द आला आहे, तेथें या नांवाच्या साथीचा उल्लेख केला आहे. या ऋचेच्या प्रभावानें मगुधी कन्यांना गाडा आणि घर यांपासून हांकून लावतां येतें. आतां मगुधी हा कोणी प्राणी, जंतु अथवा ही राक्षसी हें निश्चित सांगतां येत नाहीं.

## असुर

### असुर विशेषनामें व विशेषणें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अंहुर | कृष्णगर्भ | [१०]मृगय |
| अदेव | क्षपावत् | मृध |
| अदेवत्रात | कोकयातु | यज्ञसह |
| अनर्शनि | गृध्रयातु | रक्षस् |
| अनाम् | ग्राथिन् | रक्षस्त्व |
| आनिन | [२]चुमुरि | रक्षास्विन् |
| अनिन्द्र | जनभक्ष | रक्षोयुज् |
| अनुत्तमन्यु | जंभक | रुधिक्रा |
| अपि | [३]जरूथ | [११]रौहिण |
| अप्रज | जलाष | [१] वंगृद |
| अबुध्य | जसुरि | [१३]वर्चिन् |
| अयज्ञ | जातूस्थिर | वल |
| अयज्यु | जीवगृभ | वित्तजानि |
| अयज्वन् | तप्त | वीरयु |
| अररु | तमोगा | वृकद्वरस् |
| अर्क | तमोवृध | वृकयु |
| अर्बुद | तस्तभ्वान | वृक्य |
| अशुष | तापयिष्णु | वृचीवत् (वरशिखपुत्र) |
| अश्न | तृणस्कंद | |
| अश्व | त्रिमूर्धन् | वृत्र |
| असुतृप | त्रिशीर्षन् | वृत्रतर |
| असुर | दभीक | वृत्रपुत्र |
| असुर्य | दानव | [१४]वेतसु |
| आहिगोप | दानु (असुर माता) | [१५]वेश |
| अहिभानु | दानुमत् | वैरूप |
| अहिमन्यु | दासी | व्यंस |
| अहिमाय | [४]दुर्णामन् | व्रन्दिन् |
| अहिशुष्म | दुर्बुद्धि | व्रय |
| आतुजी | दुर्विदत्र | [१६]शंबर |
| आसुर | दुवोयु | शाद |
| इन्द्रशत्रु | [५]दभीक | शुशुलूकयातु |
| इलीबिश | देवनिद् | शुष्ण |
| उरण | देवशत्रु | शृतप |
| उलूकयातु | [६]धुनि | श्वयातु |
| ऋक्ष | नमुचि | षळक्ष |
| एमुश | नववास्त्व | सत्यधृत |
| और्णवाभ | नार्मर | सत्राषाह |
| करंज | निर्ऋति | सत्राहन् |
| (अ) कवारी | पट्गृभि | |
| | [७]पणि | सनक |
| कुयव | | |
| कुयवाच् | पपुरी | सलवृक |
| कुवित्स | [८]पर्णय | सहवसु |
| कुषवा (स्त्री) | [९]पिप्रु | सुपर्णयातु |
| कृधुकर्ण | पिब्दना | [१७]सृविंद |
| कृष्ण | पृशन्य | [१८]स्वर्भानु |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अदेवयजन | दस्यु | यज्ञतुर |
| अदेवी | ध्वस्मन् | रक्षस् |
| अनुपनुत्त | नमुचि | राक्षस |
| अररु | फलिग | शंबर |
| असुर | भंगुरावत | सुरापान |
| एतदु | [१९]मर्क | सुवर्भानु |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अदेव | जंभयत् | पीयक |
| अनंगुर | जालाश | पुरःपार्ष्णि |
| अप्रचंकश | जूर्णि ( असुरी ) | पुरोमुख |
| अयासु | तंगल्व | मट्मट् |
| अरुंड | तन्वंग | मरीमृश |
| अर्जुनी ( राक्षसी ) | [२१]तिरीट | मुनिकेश |
| असुर | तुण्डिक | रक्षस् |
| अस्त्रैण | तुण्डेल | रघुजिष्ठ्य |
| आसुर | [२२]तौविलिका | [२३]राहु |
| आसुरी | दासु | रौहिण |
| उदुंबल | दुनामन् | वंगृद |
| उद्धर्षिन् | दृषीक | वल |
| [२०]ऋक्षीका | देवपीयु | वव्रिवस् |
| करंज | द्रुहुः | विग्रीव |
| काबव | द्रोघवाच् | वृत्र |
| कालकंज | द्रोहकारी | शकधूमज |
| किमीदिन् | द्वयास्य | शंबर |
| कुंभमुष्क | द्विमूर्धन् | शालुड |
| कुंभीक | धुनि | शुष्ण |
| कुयव | नमक | श्यावदत् |
| कुसूल | नमुचि | श्वकिष्किन् |
| कृष्ण | पंचपाद | संहनु |
| केशी | पणि | ससूनु |
| खलज | पण्डग | सहमूर |
| घोरचक्षस् | पर्णय | सुनामन् |
| चतुरक्ष | पर्यस्ताक्ष | स्तंबज |
| चुमुरि | पविनस् | हविर्मथि |
| छायक | पिशुन | |

[ वा. सं ]

[२४]जंभक

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [२५]देवमलिम्लुच | [२७]विभिन्दुक | [२८]सनक |
| [२६]पार्थश्रवस् | | |

[१]करंजः—ऋग्वेदांत इंद्राचा शत्रु या अर्थानें दोन वेळ आला आहे. परंतु हा मनुष्य कीं राक्षस होता हें सांगतां येत नाहीं. सूत्रग्रंथांत हा शब्द एका झाडाचा दर्शक म्हणून आला आहे

[२]चुमुरिः—हें दभीतीच्या शत्रूचें नांव आहे. याचें व याचा मित्र धुनि अशा दोघांचीं नावें ऋग्वेदांत इन्द्रानें त्यांचा पराभव केला म्हणून आलीं आहेत, इतर ठिकाणीं या जोडीचा शंबर, पिप्रु आणि शुष्ण या तीन नांवांबरोबर ( इंद्रानें त्यांचा पराभव करून त्यांचे किल्ले नष्ट केले म्हणून ) उल्लेख आला आहे. हे लोक खरीं माणसें आहेत किंवा दानव आहेत हें ठरविणें अशक्य आहे. पण मनुष्याबद्दलच हीं नावें असावीं अशाबद्दल एकच अनुकूल पुरावा आहे तो हा कीं चुमुरि हें रूप अनार्य मनुष्यांच्या नांवाचें द्योतक आहे.

[३]जरूथः—ऋग्वेदामध्यें हा शब्द तीन वेळ आला आहे व त्याचा अर्थ 'अग्नीनें पराभूत केलेला एक राक्षस' असा आहे. लुडविग्ला व ग्रिफिथला हें मत ग्राह्य आहे. हा एक शत्रु असून तो लढाईत मेलेला आहे. या लढाईत ऋग्वेदाच्या सातव्या मंडलाचा कर्ता वसिष्ठ हा पुरोहित होता.

[४]दुर्णामन्:— 'ज्याचें नांव वाईट झालेलें आहे' असा याचा अर्थ असून ऋग्वेदांत व अथर्व वेदांत रोग उत्पन्न करणाऱ्या एका राक्षसाचें किंवा एका रोगाचें हें नांव आहे. निरुक्ताप्रमाणें याचा अर्थ किडा असा असावा व हा अर्थ किडे अनेक रोग उत्पन्न करतात अशी जी समजूत आहे तिला धरूनच आहे. सुश्रुतादि वैद्यक ग्रंथांत दुर्णामनूचा मूळव्याध असा अर्थ आहे.

[५]दभीकः—हें नांव एका माणसाचें किंवा राक्षसाचें असून त्याला इन्द्रानें ठार मारलें अशी हकीकत ऋग्वेदांत आली आहे.

[६]धुनिः—इंद्राच्या शत्रूचें हें नांव आहे. याचें नांव चुमुरिबरोबर ऋग्वेदांत आलें आहे. हे दोघे दभीतीच्या उलट होते असें दिसतें. एतद्देशीय मूळ लोकांच्या मुख्याचें बहुतेक हें नांव असावें.

[७]पणिः—ऋग्वेदांत देवास हवि न देणारा व ब्राह्मणास दक्षिणा न देणारा पण श्रीमंत मनुष्य असा या शब्दाचा अर्थ आहे. अशा तऱ्हेचा मनुष्य मंत्रकर्त्या ऋषींनां प्रिय होणें कधींहि शक्य नव्हतें म्हणून देवांनां पणी लोकांवर हल्ला करण्यासाठीं विनंति केल्याचा व त्यांची कत्तल होऊन पराभव झाल्याचाहि उल्लेख आलेला आहे. पणि हा यज्ञ करणाऱ्यांच्या उलट, पक्का कवडीचुंबक व द्वेष करण्यास योग्य अशा अर्थानें त्याला वृक म्हटलें आहे. कांहीं ठिकाणीं पणी हे काल्पनिक पुरुष दिसतात. हे राक्षस असून यांनीं आकाशांतील पाणी व गाई यांना अडवून ठेविलें म्हणून इन्द्राकडून सरमा त्यांच्याकडे गेली अशी कथा ऋग्वेदांत आहे. पणींमध्यें बृबु हा श्रेष्ठ होता.

[८]पर्णयः—ऋग्वेदांत दोन ठिकाणीं हें नांव आलें असून तें लुडविग म्हणतो त्याप्रमाणें एकाद्या वीर पुरुषाचें किंवा इन्द्रानें पराभव केलेल्या राक्षसाचें असावें.

[९]पिप्रुः—ऋग्वेदांत इन्द्राच्या शत्रूचें हें नांव आलेलें आहे. ऋजिश्वनाकरितां इंद्रानें याचा वारंवार पराजय केलेला आहे. याच्या ताब्यांत बरेच किल्ले होते व हा असुर असून दास होता. याचा संबंध नेहमीं काळ्या लोकांशीं असल्यामुळें याची प्रजा काळी होती असें याचें वर्णन आलें आहे. रॉथ म्हणतो त्याप्रमाणें ( पिप्रूला असुर हें नांव असल्यामुळें रॉथला असें म्हणण्यास आधार आहे ) हा राक्षस होता किंवा लुडविग, ओल्डेनबर्ग व हिलेब्रँट म्हणतात त्याप्रमाणें मानवी शत्रु होता हें

निश्चयानें सांगतां येणें शक्य नाहीं. पॄ या धातूपासून हा शब्द आला असल्यामुळें याचा अर्थ प्रतिरोध करणारा असा होऊं शकेल.

[१०]मृ ग यः—ऋग्वेदांत अनेक उताऱ्यांत याचा उल्लेख आला आहे. व त्याचा इन्द्रानें पराभव केला असेंहि त्यांत म्हटलें आहे. तो मनुष्यद्रोही होता हें लुडविगचें मत चुकीचें आहे. तो मृगाप्रमाणें राक्षस होता हें मात्र खरें.

[११]रौ हि णः—याचें नांव ऋग्वेद व अथर्ववेद यांमध्यें इन्द्राचा शत्रु दानव म्हणून आलें आहे. हिलेब्रँटच्या मतें या शब्दावरून रोहिणी नक्षत्राचा बोध होतो. पण असें मानण्यास चांगलासा आधार नाहीं.

[१२]वं गृ दः—ऋग्वेदांत मानवशत्रु किंवा राक्षस याचें हें नांव आहे.

[१३]व र्चि नः—ऋग्वेदांत इन्द्राच्या शत्रूचें हें नांव आलेलें आहे. या शत्रूला दास असें म्हटलें आहे व त्याचें नांव शंबराबरोबर आलेलें आहे म्हणून त्याला जरी असुर म्हटलें आहे तरी तो या पृथ्वीवरील शत्रु असावा असें वाटतें. याचा वृत्रीवंताशींहि संबंध असावा.

[१४]वे त सुः— ऋग्वेदांत दोन ठिकाणीं एकवचनीं व एके ठिकाणीं अनेकवचनीं हा शब्द एका माणसाचें नांव म्हणून आला आहे. याचा इन्द्रानें एकदा पराभव केला असें म्हटलें आहे पण तो राक्षस होता असें मानण्यास कारण नाहीं. झिमरच्या मतें वेतसु ही एक जात होती व दशद्यु हा या जातींतीलच एक मनुष्य होता व त्यांनीं तुग्रांचा पराभव केला. परंतु हें उल्लेख असलेल्या ऋचा इतक्या दुर्बोध आहेत कीं त्यावरून कांहींएक अर्थ निश्चित होत नाहीं.

[१५]वे शः—ऋग्वेदांत दोन अर्थीं हें विशेषनाम आलें आहे. हें जर खरें असेल तर हें विशेषनाम राक्षसाचें आहे किंवा दुसऱ्या कोणाचें आहे हें सांगणें कठीण आहे.

[१६]शं ब रः—ऋग्वेदांत इन्द्राच्या शत्रूचें हें नांव आलेलें आहे. याच्या बरोबर शुष्ण, पिप्रु, वर्चिन् ही नांवें आलीं आहेत. शंबराला एका ठिकाणीं कुलितराचा मुलगा दास असें म्हटलें आहे. दुसऱ्या एका स्थलीं आपण देवक (जवळ जवळ देवाप्रमाणें) झालों असें त्याला वाटल्याचा उल्लेख आहे. त्याचीं ९०, ९९ किंवा १००नगरें होतीं असें वर्णन आहे. हा शंबर शब्दच नपुंसकलिंगी अनेकवचनीं शंबराचे किल्ले अशा अर्थानें वापरला आहे. याचा मुख्य शत्रु आतिथिग्व दिवोदास हा होय, कारण या दिवोदासानें इन्द्राच्या मदतीनें शंबराचा पराभव केला. शंबर हा कोणी खरा पुरुष होऊन गेला कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. हिलेब्रँटचें असें मत आहे कीं, दिवोदासाचा शत्रु म्हणून हा एक सरदार होता. त्याची मदार शंबराच्या नांवाच्या आंकड्यावर आहे आणि तो म्हणतो कीं, दिवोदासाचे वेळीं ऋग्वेदीय सूक्तांत तो खराखुरा शत्रु मानला आहे. पण मागाहून झालेल्या सूक्तांमध्यें उदाहरणार्थ सातव्या मंडलांत त्याला राक्षस बनवलें आहे. कारण वैदिक काळचे लोक अरेकोशिया देश सोडून हिंदुस्थानांत आले होते ही विचारसरणी जरी सोडून दिली तरी हिंदुस्थानांतल्या डोंगरांत राहणाऱ्या लोकांचा हा नायक असून शत्रु असावा हें शक्य आहे.

[१७]सृ विं दः—ऋग्वेदामध्यें इन्द्राच्या शत्रूचें हें नांव आलेलें आहे. याचा अर्थ खराखुरा शत्रु असा असावा, कारण त्याची संस्कृत व्युत्पत्ति उपलब्ध नाहीं.

[१८]स्व र्भा नुः—ऋग्वेद व मागाहून झालेल्या ग्रंथांत सूर्याला ग्रासणाऱ्या राक्षसाचें म्हणून हें नांव आलेलें आहे.

[१९]म र्कः— तैत्तिरीय, वाजसनेयी, मैत्रायणी वगैरे संहिता ग्रंथांत शण्डाप्रमाणेंच असुरांचा हा पुरोहित होता असें वर्णन आलें आहे. मर्काचा उल्लेख ब्राह्मण ग्रंथांतूनहि आला आहे. हिलेब्रँट व हापकिन्स यांचें म्हणणें मर्क हा शब्द बहुधा इराणियन वळणावर असावा. तसेंच ऋग्वेद व इतरत्र आलेल्या गृध्र आणि मर्क या शब्दांत पूर्ण ऐक्य असावें असेंहि हिलेब्रँटचें मत आहे. याला महीधरानें (वा. सं. ७. १६ वरील टीका) शुक्रपुत्र म्हटलें आहे. परंतु त्याला सबळ पुरावा नाहीं.

[२०]ऋ क्षी काः— अथर्ववेद, वाजसनेयी संहिता आणि शतपथ ब्राह्मण यांत हा शब्द आला असून त्याचा अर्थ राक्षस असा आहे. तथापि हरिस्वामी शतपथ ब्राह्मणावरील टीकेंत ऋक्ष या शब्दाशीं याचा संबंध जोडून त्याचा अर्थ अस्वल असा करतो.

[२१]ति री टिन्ः— अथर्ववेदांत हा शब्द आला आहे व तो एका राक्षसाला लाविलेल्या तिरीटिन् या विशेषणापासून बनला आहे. झिमर, व्हिटने वगैरे पंडित व एतद्देशीय कोशकार यांच्या मतें याचा अर्थ मुकुटानें शोभलेला अथवा शिरोभूषण असा आहे.

[२२]तौ वि लि काः— अथर्ववेदांत हा शब्द आला असून त्याचा अर्थ अनिश्चित आहे. रॉथच्या मतें याचा अर्थ पशुविशेष असा असावा. झिमर व व्हिटने यांच्या मतें हें एक लहान झाड असावें. सायणाचार्यांच्यामतें याचा अर्थ रोगोत्पादक राक्षस असा असावा. ब्लूमफील्ड यानें याचा अर्थ संदिग्ध ठेवला आहे.

[२३]रा हुः— सूर्याला ग्रासणारा एक राक्षस. अथर्ववेदांत याचा उल्लेख आला आहे. पाठ जरा अनिश्चित आहे परंतु तेथें तो उल्लेख राहूस उद्देशूनच आला आहे.

[२४]जं भ कः— हें एका राक्षसाचें नांव असून तो व जंभ रोग उत्पन्न करणारा हे दोघे एकच, याचा वाजसनेयी संहिता व शांखायन आरण्यक या ग्रंथांतून उल्लेख आलेला आहे.

[२५]दे व म लि म्लु चः— 'देवांचा चोर' हा शब्द रहस्याचें विशेषण आहे. पंचविंशब्राह्मणांत मुनिमरणनामक स्थलीं वैखानस नांवाच्या पवित्र ब्राह्मणाला त्यानें ठार मारिलें असा उल्लेख आलेला आहे. तो राक्षस होता असें उघड दिसतें. पण तो मनुष्यहि कदाचित् असावा.

[26]पार्थश्रवसः– 'पृथुश्रवस् चा वंशज' जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत एका राक्षसाचें म्हणून हें नांव आलें आहे.

[27]विभिंदुकः– पंचविंशब्राह्मणांत एका राक्षसाचें किंवा माणसाचें म्हणून हें नांव आलें आहे. याच नांवाच्या माणसापासून मेधातिथीनें गाई हांकून नेल्या अशी कथा आहे. हॉपकिन्सच्या मतें हा शब्द मेधातिथीचें पितृप्राप्त नांव वैभिंदुक असें असावें.

[28]सनकः– जैमिनीय ब्राह्मणांत उल्लेखिलेल्या विभिंदुकीयांच्या यज्ञामध्यें भाग घेणाऱ्या दोन काप्यांपैकीं (यांपैकीं एक नवक होता) एकाचें हें नांव आहे. लुडविगच्यामतें ऋग्वेदांतील (१.३३,५) एका ठिकाणीं या सनकांचा अयाज्ञिक म्हणून उल्लेख आला आहे. पण त्याबद्दल बराच संशय आहे.

## स्वर्गविषयक

### स्वर्गनामें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| आमेन्य (दोहों- | त्रिविष्टि | पृश्नि |
| कडून मोज- | [1]दिव् | लोक |
| ण्यास योग्य; | दिवावसु (द्यु) | विष्टप् |
| अंतरिक्ष वि.) | दिवोजस् | साप्य |
| गो | द्यवि | [3]स्वर् |
| जीवलोक | | |
| तुम्र (आदित्य) | द्यु | स्वर्णर (सूर्यलोक) |
| त्रिदिव | नभस् | स्वर्पति |
| त्रिनाक | [2]नाक | स्वर्मीढ्ळ |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| दिव् | नभस् | लोक |
| द्यवि | नाक | सुवर्ग |
| द्यु | पृश्नि | स्वर् |

[अथर्व]

[4]पीलुमती

[1]दिव्ः– याचा अर्थ आकाश असा आहे. सर्व विश्वाची विभागणी करून त्याचे पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग किंवा दिव असे तीन भाग ऋग्वेदांत कल्पिले आहेत. किंवा विकल्पानें द्यावापृथिवी (स्वर्ग व मृत्युलोक) म्हणजे सर्व विश्व अशीहि वांटणी केलेली आढळते. कारण अंतरिक्षाचा अंतर्भाव आकाशांत झालेला आहे. विद्युत्, पवन व पर्जन्य यांचा संबंध अंतरिक्षाशीं येतो, व सूर्यचंद्रांचें परिभ्रमण वगैरे चमत्कार आकाशांत समाविष्ट होतात. अथर्ववेद व वाजसनेयी संहिता यांमध्यें आकाशाची कमान (नाक) पृथ्वि, अंतरिक्ष व दिव या तिन्हीं नंतर व 'स्वः' 'ज्योतिः' च्या पूर्वी चवथा भाग म्हणून धरली आहे. या विश्वाची तीन तऱ्हेची विभागणी पृथ्वी, वायू व आकाश हीं जीं तीन महातत्त्वें आहेत त्यांत प्रतिबिंबित झाली आहे. उदाहरणार्थ सर्वांत श्रेष्ठ (उत्तम) मध्यम (उत्तर) व सर्वांत कमी प्रतीचा (पार्थ) अशी स्वर्गाची वांटणी ऋग्वेदांत (५. ६०, ६; ४. २६, ६; ६. ४०, ५.) केलेली आढळते. अथर्ववेदांत तीन तऱ्हेचें स्वर्ग आहेत. उदन्वती, पीलुमती (यांचा अर्थ अनिश्चित आहे) व प्रद्यौस् (या ठिकाणीं पितर राहतात). स्वर्गाला वारंवार व्योमन् व रोचन (तेजः पुंज आकाश) अशीं नांवें दिलेलीं आहेत. उत्तम स्वर्ग व दृश्य स्वर्ग यांना विभागणाऱ्या आकाशाला 'नाक' या शब्दाशिवाय 'सानु' विष्टप, पृष्ठ, नाकपृष्ठ, किंवा नाकसानु हीं नांवें ऋग्वेदांत आलेलीं आहेत. कधीं तीन आकाशांचा (रजस्) व कधीं दोहोंचाहि उल्लेख आला आहे. परंतु ही विभागणी कृत्रिम वाटते. एके ठिकाणीं 'षड्रजांसि' असा उल्लेख आला आहे व त्याचा अर्थ स्वर्ग व पृथ्वी मिळून असा आहे. आकाशाला नेहमींचें नांव अंतरिक्ष असें आहे. पृथ्वीचे जे तीन प्रकार कल्पिले आहेत ते सुद्धां कृत्रिम आहेत. व या तिघांचें मूळ ज्याप्रमाणें पितरौ हा शब्द आई व बाप दर्शवितो त्याप्रमाणें सर्व विश्वाचे तीन विभाग दर्शविण्याकरितां पृथिवीचा जो अनेकवचनीं प्रयोग करण्यांत येतो त्या प्रयोगांत बहुतकरून असावें. पृथिवीला क्षा, ग्मा अशीं नांवें आहेत व तिला मही, पृथिवी, उर्वी, उत्तमा अशीं विशेषणेंहि आहेत. त्याचप्रमाणें 'इदं'–हें जग, अशा अर्थानें स्वर्गाशीं नेहमीं तुलना केलेली आढळते. पृथ्वीच्या आकाराची तुलना ऋग्वेदांत चक्राशीं केलेली आहे व ती वाटोळी आहे असें शतपथ ब्राह्मणांत स्पष्ट म्हटलें आहे. पृथ्वी व स्वर्ग जर एकत्र जोडलीं तर तीं दोन पेले (चम्पा) एकावर एक ठेवल्याप्रमाणें दिसतील अशी कल्पना ऋग्वेदांत आढळते. ऐतरेय आरण्यकांत (३.१,२) पृथ्वी व स्वर्ग हीं अर्ध्या अंड्याप्रमाणें आहेत असें म्हटलें आहे. स्वर्गापासून पृथ्वीचें अंतर किती आहे हें दाखविण्यासाठीं अथर्ववेदांत 'सूर्यपक्ष्याला पृथ्वीपासून स्वर्गाला जाण्यास एक हजार दिवस लागतात असा उल्लेख आहे. ऐतरेय ब्राह्मणांत (२. १७) 'एका घोड्याला एक हजार दिवस लागतील, असें म्हटलें असून पंचविंशब्राह्मणांत (१६.८,६) 'एकीवर एक अशा हजार गाई उभ्या केल्या असतां जितकी उंची होईल, तितकें अंतर पृथ्वी व स्वर्ग यांमध्यें आहे' असा उल्लेख आहे. झिमरच्या मतें वैदिक ऋषींना 'पृथ्वीच्यावर आकाशाचा एकच भाग आहे व पृथ्वीच्या खालीं एकच भाग आहे' अशी कल्पना होती. पण झिमरची दुसरी जी कल्पना आहे तिजबद्दल बळकट पुरावा नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत (३.४४) असें तत्त्व प्रतिपादन केलें आहे कीं सूर्य आपलें प्रकाशमय अंग रात्रीं फक्त उलट बाजूला फिरवितो व त्यामुळें त्याचा प्रकाश चंद्र व तारे यांच्यावर पडतो व हें करीत असतांना तो आपला पूर्वेकडील भाग पुनः आक्रमीत असतो. ऋग्वेदांतहि (१.११५,५) हेंच मत प्रतिपादिलें आहे. वैदिक वाङ्मयांत पृथ्वीची भूगोलदृष्ट्या विभागणी केलेली नाहीं. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत 'पृथ्वीचा मध्यबिंदु प्लक्षप्राश्रवणाच्या उत्तरेस आहे व आकाशाचें केंद्र म्हणजे सप्तर्षि (ऋक्ष) नक्षत्र होय' असा उल्लेख आहे.

[2]नाक.–ऋग्वेदांत व मागाहून झालेल्या अथर्ववेद, वाजसनेयी संहिता वगैरे ग्रंथांत ज्याला नभोमंडल असें म्हणतां येईल अशा अर्थानें हा शब्द आला आहे. हा शब्द नेहमीं 'उत्तम' अथवा

'तृतीय' या शब्दावरोबर येतो. यावरून असें अनुमान निघतें कीं ज्याप्रमाणें दिव्, पृथिवी व अंतरिक्ष अशी विभागणी आहे त्याचप्रमाणें स्वर्गाचीही तीन विभागांत वांटणी केलेली आहे. नाक हें आकाशाच्या रोचनावर व तिसऱ्या पृष्ठावर आहे. इतर ठिकाणीं पृथ्वी, अंतरिक्ष, आकाश, नाक, स्वर्, ज्योतिस् असा क्रम आलेला आहे. ब्राह्मण ग्रंथांत (पं. विं. ब्रा. १०. १, १८) नाक यांचें 'न + अक = जेथें दु.ख नाहीं तें स्थान' असें स्पष्टीकरण केलें आहे. कारण अशी कल्पना आहे कीं तेथें जे लोक जातात त्यांनां तेथें दुःखाचा त्रास पोंचत नाहीं.

[3]स्वर्.—ऋग्वेद व मागाहून झालेल्या ग्रंथांत सूर्य व प्रकाशमय स्वर्ग असा याचा अर्थ आहे.

[4]पीलुमती.—अथर्ववेदांत उदन्वती व प्रद्यौः यांच्यामधील स्वर्ग या अर्थानें हा शब्द आला आहे. याचा अर्थ ज्यांत 'पीलु (परमाणु) भरपूर आहेत' असा आहे.

# अजीव सृष्टि.

## पृथ्वी.

### पृथ्वी नामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अदिति | गातु | भूम |
| अवनि | गो | भूमि |
| इळा | गोत्रा | मधुवृध |
| उरुक्षिति | ग्मन् | मही |
| उर्वी | जगत् | रिप् |
| ककुत् | ज्म | रुप् |
| कूचक्र | ज्मा | रेणु |
| क्षमा | दिति | रेक्णस्वती |
| क्षा | द्विबर्हज्मा | [3]लोक |
| क्षामन् | निर्ऋति | वर्धयन्ती |
| | | वि |
| क्षामा | पथ्या | शतर्चस्. |
| क्षिति | पवस्ता | समना |
| क्षोणी | पूषन् | सूपायना |
| क्ष्मा | पृथिवी | हरिधायस् |
| गव्यूति | [1]पृथ्वी | ह्लादिकावती |
| | [2]भू | |

### [ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्रइत्वरी | ऊर्मी | वसुधानी |
| अज्मन् | परिज्मन् | विजमाना |
| अनृक्षरा | पुरूवी | विधरणी |
| आसितज्ञ | पृथिवी | विधु |
| इडा | प्रतिशीवरी | विश्वगर्भा |
| इन्द्रऋषभा | भू | विश्वभरा |
| उर्वरा | भूरिधायस् | विभ्वरी |
| उर्वी | भूरिधारा | वैश्वानरबिभ्रती |
| क्षमा | महिव्रत | वैष्टप |
| क्षिति | मातरिश्वरी | शुभ् |
| क्षोणी | मेदिनी | सृष्टि |
| धृतस्नू | रसा | हविर्धाम |
| जगत् | रोदसी | हिरण्यवक्षा |
| जगतोनिवेशन | वरणवती | ह्लादिका |

[1]पृथिवीः—रुंद पसरलेली भूमि अशा अर्थानें ऋग्वेद व तदनंतरच्या ग्रंथांत हा शब्द आला आहे. पुष्कळ वेळां ही देवता मानण्यांत येते. कित्येक वेळां ही एकटीच देवता मानली जाते व कित्येक वेळां द्यावापृथिवी अशी संयुक्त मानली जाते. नेहमीं तीन लोकांचा उल्लेख येतो परंतु आपण राहतों ती पृथ्वी सर्वांत श्रेष्ठ होय असें वर्णन येतें. पृथ्वीच्या सभोंवार समुद्राचा कंबरपट्टा आहे असें ऐतरेय ब्राह्मणांत (८. २०) म्हटलें आहे. निरुक्ताप्रमाणें (९. ३१) विश्व अनेक जगतांचें बनलेलें आहे व प्रत्येक जगांत एक एक पृथिवी आहे. शतपथ ब्राह्मणांत पृथ्वीला प्रथमसृष्टि असें म्हटलें आहे, व तिच्या संपत्तीचा उल्लेख केला आहे. शांखायन आरण्यकांत पृथिवीला 'वसुमती=संपत्तीनें परिपूर्ण' असें म्हटलें आहे.

[2]भू अथवा भूमिः—हा जमीन या अर्थानें नेहमीं येणारा शब्द आहे. ऋग्वेद व तदनंतरच्या ग्रंथांत हा वारंवार येतो व तो पृथ्वी या अर्थानें असतो. देवानें आर्यांस दिलेल्या जमीनीबद्दल व देणगीदाखल दिलेल्या जमीनीबद्दल हा शब्द उपयोगांत आणला आहे.

[3]लोकः—ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत याचा अर्थ जग असा आहे. अथर्ववेद व ब्राह्मणग्रंथ यांत तीन लोकांचा उल्लेख आला आहे. अयं लोकः (हें जग), आणि याच्या उलट असौ लोकः (पलीकडीलजग=स्वर्ग) असे शब्द पुष्कळ वेळां आलेले आहेत. लोक हा शब्द कधीं कधीं स्वर्ग या अर्थी आलेला आहे. कित्येक ठिकाणीं अनेक तऱ्हेचे स्वर्ग वर्णिले आहेत. रॉथच्या मताप्रमाणें ऋ. १०. १४, ९ या स्थलीं तरी लोक याचा जागा असा अर्थ असावा. त्याला पोषक अशीं स्थळें पुढील १०. ९३, ६; २. ३०, ६; ३. २, ९ आहेत.

### सृष्टचमत्कार [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अनूप (वृष्टिप्ररेक) | तमस् | प्रकाश |
| | तम्रा (वृष्टि) | [3]प्रबुध् (सूर्योदय) |
| अन्ध | धरुणह्वर (धारानिरोधक तम) | भूरिधार |
| अन्धस् | | [4]मर्क |
| अभिवृष्ट | [2]ध्राजि | मिह (धुकें) |
| अभ्रवर्ष | ध्वांत | [5]वात |
| आभ्रिया (विद्युल्लता) | नभस्वती | वृष्टि |
| | निहाका (झंझावात) | सुधारा |
| आपय (वृष्टि) | | |
| इळावती | नीहार (धुकें) | स्वविद्युत् |
| [1]उल्का | पतंग (उल्का) | स्ववृष्टि |
| गूढ्वी (तमस्) | परिज्मा | ह्रादुनि (गारा) |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अत्यासारिणी (अतिवृष्टि) | उल्का | [6]ध्वान्त |
| | तमस् | निह (धुकें) |
| अन्तःशर (फुटलेल्या वज्राचे कण) | दक्षिणाद्वात | निहार |
| | धारा | नीहार |
| उत्तराद्वात | धूम | पश्चाद्वात |

| | | |
|---|---|---|
| पापवात ( अपान- | महि | वायुमुच्यता ( वृ- |
| वायु ) | रजस् | ष्टि ) |
| [7]पुरोवात | वात | सन्धुवान |
| [8]प्रचलाका | वातंनाम | [11]सलिलवात |
| [9]प्रतिश्रुत्का | वातपान | सवात्य |
| प्रवात | वाताग्र | हरि |
| [10]प्रासच | वायु | हिम |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अभ्र | केतु | विद्युत् |
| अभ्रज | तमस् | विषुवृत् |
| अभ्रिय | तृण | वरिध् |
| अश्मन् ( उल्का ) | धूम | वृष्टि |
| इन्द्रधनुस् | धूमकेतु | शर्करा |
| उत्पात | पवन | सिकता |
| उल्का | लोहितक्षीर | सेक |
| ओषधि | वर्ष ( वृष्टि ) | हिरण्यनेमि (विद्युत्) |

[ संहितेतर ]

[12]महाभूत ( पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश )

[1]उल्का.–ऋग्वेद कालापासून हा शब्द तुटणारा तारा या अर्थानें योजितात. ब्राह्मण ग्रंथांत विस्तव, जळतें लांकूड, या अर्थी याचा उपयोग केला आहे. अथर्ववेदांत उल्कुषी हें जें क्वचित् उपयोगांत आणिलेलें रूप आहे तेंहि वरील अर्थाचेंच आहे.

[2]ध्राजि.–ऋग्वेदांत व मागाहून झालेल्या ग्रंथांत वाऱ्याचा जोर असा याचा अर्थ आहे. हिंदुस्थानांत अरण्यें उद्ध्वस्त करणारे जे जोराचे वारे वाहतात त्या वाऱ्यांचा बोध या शब्दानें होतो. कांहीं ठिकाणीं सामान्य गति असा व बहुतेक ठिकाणीं वाऱ्याचा वेग असा अर्थ आहे. परंतु 'वातस्य ध्राजिरसि' असा उल्लेख केलेला आहे यावरून ध्राजि शब्दाचा सोसाटा असा अर्थ असावा असें दिसतें.

[3]प्रबुध्.–हा शब्द ऋग्वेदांत एका ठिकाणीं आढळतो. हा निम्रुचि ( सूर्याच्या अस्तकालीं ) याच्या उलट असून सप्तमी विभक्तींत उपयोगांत आणिला आहे. याचा सूर्योदयीं असा अर्थ आहे.

[4]मर्क.–ऋग्वेदांत एके ठिकाणीं हा शब्द आढळतो. तेथें त्याचा ( सूरोमर्कः ) सूर्यग्रहण असा अर्थ रॉथ करतो. सायणाचार्यांच्या मतें याचा 'शुद्ध करणें' असा अर्थ आहे. एके ठिकाणीं मर्क याचा राक्षसवाचक अर्थ आहे.

[5]वात.–ऋग्वेद व मागाहून झालेल्या ग्रंथांत याचा वारा असा अर्थ आहे. तैत्तिरीय संहितेंत पांच प्रकारच्या वाऱ्यांचा उल्लेख आला आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं झिमरच्या मतें ईशान्येकडील वारा असा याचा अर्थ आहे.

[6]ध्वांत.–यजुर्वेदांत व पुढील ग्रंथांत हें एका वाऱ्याचें नांव आहे 'ध्वांतं वाताग्रं' असें तैत्तिरीय संहितेंत वचन असून 'ध्वनियुक्त' असा सायणाचार्य त्याचा अर्थ करतात.

[7]पुरोवात.–'पूर्वेकडील वायु' याचा उल्लेख तैत्तिरीय संहिता व ब्राह्मणग्रंथ यांत आहे. गेल्डनरच्या मतानें याचा अर्थ पर्जन्यापूर्वीचा वायु असा आहे व तो बरोबर दिसतो.

[8]प्रचलाका.–तैत्तिरीय संहितेंत व काठक संहितेंत याचा अर्थ मेघस्फोट असा असावा असें वाटतें.

[9]प्रतिश्रुत्का.–( प्रतिध्वनि ) यावरून यजुर्वेद संहितेच्या काळासारख्या जुन्या काळीं देखील या निसर्ग चमत्काराला नांव दिलेलें आढळतें व कौषितकी ब्राह्मणांत हि आढळतें.

[10]प्रासच.–तैत्तिरीय संहितेंत याचा अर्थ मेघस्फोट असा होतो परंतु तैत्तिरीय ब्राह्मणांत प्रासचः या विशेषणाचा तुफानी पावसानें पडलेलें पाणी असा अर्थ होतो.

[11]सलिलवात.–यजुर्वेद संहितेंत विशेषण या अर्थानें व 'पाण्यापासून येणाऱ्या वातानें उपकार केलेला' अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. हा शब्द बहुतवरून समुद्राकडून येणाऱ्या नैर्ऋत्य दिशेकडील पावसाळी वाऱ्यास लावलेला असावा.

[12]महाभूत.–निरुक्तांत व ऐतरेय उपनिषदांत याचा अर्थ महाभूतें, महातत्त्वें ( पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ) असा आहे.

**ध्वनिवाचक** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अजमायु ( शेळी- | जंजती | रव |
| प्रमाणें शब्द | जस्वन | रवथ ( गर्जयितृ ) |
| करणारा मण्डूक) | तनयित्नु | रुवण्यु |
| अभिक्रन्दन् | तन्यत् | वक्करी |
| अभिस्तन ( सिंह- | तन्यु | वग्वनु |
| नाद ) | तुविग्र | वातस्वन |
| अभिस्वर | तुविरव | वावशान |
| अहीरिस्वनि | दुर्मायु | वाश्र |
| अलल ( आनंद- | धमनि | विगद |
| दायक ) | ध्मात | विरप्श |
| आघोषयत् | नदनु | विरव |
| आपिब्दमान | नदयत् | स्तनयन्ती |
| उपब्द ( आभिषव | नाद | स्तनयित्नु |
| शब्द ) | नानदत् | स्वन |
| कामकाति ( काम- | निघोषयत् | स्वब्दि |
| परशब्द ) | निविविध्वत् | स्वारि |
| क्रन्दन् | निस्वर | स्वान |
| क्रोशन् | पर्जन्यक्रन्द्य | हासमान |
| क्षु | प्रस्वनित | हेषक्रतु ( सिंहा- |
| घर्मस्वरस् | मन्द्र | प्रमाणें गर्जना |
| घोष | महिस्वनी | करणारा ) |
| जंजणाभवन् | मायु | हेषत् |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्रन्द | घोष | वातस्वन |
| अभिक्रन्द | तनयित्नु | वाश्र |
| आक्रोश | नानदत् | स्तनयित्नु |
| उपाद्धिमत् | पर्जन्यक्रंद्य | |
| कामकाति | मंद्र | स्तनयन्निव |
| क्रंदन् | रव | स्वन |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अलुलय ( वीर- | ऊर्ध्वमायु | क्रंदीवत् ( संभोगार्थ |
| घोषाचें अनु- | काहाबाह | आव्हानं ) |
| करण ) | कूजत् | क्षुमत् |

| | | |
|---|---|---|
| गर्गर | आक्रदत् | गोरवत् |
| दविध्वत् | मायु | वाश्रा |
| ध्वनि | रव | विरव |
| नदनु | रुत | सूनृतावत् |
| मद्घोष | | |

### शब्दवाचक [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अतिवाद | ध्वान्त | संक्रन्दन |
| अवक्रन्द | मस्मसा | संक्रोश |
| आहल | रव | स्तन |
| उच्चार | वातस्वन | स्वन |
| घनाघन | वाश्रा | स्वरण |
| घोष | शक्कार | |

### ध्वनिविषयक विशेषणें [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| उक्त | प्रब्रुवाण | सुहव |
| उक्थिन् | प्रवद | स्तनयत् |
| उच्चैर्घोष | मन्दिष्ठ | स्फूर्जती |
| दुष्टनु | रपत् | स्वरयत् |
| धमत् | रराण | हिङ्कृरिकृती |
| धीत | रासमाना | हुत |
| नानदत् | रिफती | हूत |
| निरभण | रुदती | |

ध्वनिवाचक शब्दांचें निरीक्षण केलें असतां असें दिसून येतें कीं भौतिक ध्वनि, पशुध्वनि आणि मनुष्यध्वनि या सर्व प्रकारच्या ध्वनींचे बोधक शब्द वेदांत आहेत. मनुष्यध्वनिवाचक शब्दांमध्यें निरनिराळे मनोविकार ज्या ध्वनींपासून व्यक्त होतात त्यांस स्वतंत्र शब्द आहेत. निरनिराळे विचार आणि भावना व्यक्त करण्याच्या प्रयोजनामुळें वेदभाषा बरीच प्रगल्भ झाली होती यास विशिष्ट ध्वनींच्या व्यंजनेसाठीं विशिष्ट शब्दांचें अस्तित्व हें प्रमाण आहे. यांत सामवेद उर्फ संगीतशास्त्र यांतील संज्ञांचा बोधक अशा मंद्र शब्दाखेरीज दुसरा शब्द सांपडत नाहीं. आणि मंद्र हा शब्द देखील संज्ञापद पावला होता याला प्रमाण नाहीं. यावरून असें दिसतें कीं वेदमंत्रकालीं गाणीं असावींत, चाली असाव्यात पण त्यांस शास्त्रीय व्यवस्था देण्याचा प्रयत्न झाला नसावा.

## धातु.

### हिरण्यनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अमृत | दत्र | लोह |
| [१]अयस् | पेशन | सुरुक्म |
| कनक | पेशस् | सुहिरण्य |
| कांचन | भर्मन् | हरित |
| कृशान | मरुत | [३]हिरण्य |
| [२]चन्द्र | रुक्म | हेमन् |
| जातरूप | | |

### [ तै. सं. ].

| | | |
|---|---|---|
| सुहिरण्य | हिरण्य | हेमन् |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| वर्चस्य | हरित | हिरण्य |
| सवर्ण | | |

### [ संहितेतर ]

जातरूप

### इतर धातु व धातुसंबंधीं [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्र | आयस् | सप्तधातु |
| अयस् | गिरिक्षित् | सुधातु |
| असिसास् | रजस् | |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अयस् | [५]रजस् | श्याम |
| त्रपु | [६]लोह | सीस |
| [४]रजत | | |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अयस् | रजत | लोहित |
| [७]त्रपु | लोहन् ( लोह ) | सीस |
| यातुचातन | | |

### [ मै. सं. ]

लोहितायस्

### [ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| कार्षायस् | कृष्णायस् | लोहितायस् |

[१]अयस्.—हा शब्द ऋग्वेदाप्रमाणें एकटाच उपयोगांत आणला तर तो कोणत्या धातूचा बोधक आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. या शब्दावरून लोखंडापेक्षां ब्राँझ धातूचाच बोध होतो असें जें झिमरचें मत आहे तें बरोबर आहे असें वाटतें. अग्नीला 'अयोदंष्ट्र' 'अयसूचे दांत असलेला' असें त्याच्या ज्वालांच्या रंगावरून आणि मित्र व वरुण यांच्या गाडीला ' अयण, ' 'अयसूचे खांब असणारी, ' असें अस्तमानच्या वेळच्या रंगावरून म्हटलें आहे, त्यावरून झिमरच्या मताला पुष्टि मिळते. शिवाय वाजसनेयी संहितेंत सहा धातूंच्या यादींत याचीहि गणना आहे. हिरण्य ( सोनें ), अयस्, श्याम, लोह, सीस ( शिसें ), त्रपु ( कथील ). येथें श्याम ( काळे ) व लोह ( तांबडे ) म्हणजे अनुक्रमें लोखंड व तांबें असा अर्थ दिसतो. म्हणून अयस् म्हणजे ब्राँझ असावें. अथर्ववेद आणि मैत्रायणी संहिता वगैरे ग्रंथांत अयसूचे दोन प्रकार येतात. एक श्याम ( लोखंड ) आणि दुसरा लोहित ( तांबें अथवा ब्राँझ ). शतपथ ब्राह्मणांत अयस् आणि लोहायस् यांत फरक आहे असें दाखविलें आहे. हे भिन्न धातू एगलिंगच्या मतें लोखंड आणि तांबें व श्रोडरच्या मतें तांबें आणि ब्राँझ हे असावेत. अथर्ववेदांतील एका उताऱ्यावरून लोखंड हाच अर्थ असावा असें वाटतें. बहुतकरून ऋग्वेदकालीं बाणाचें टोंक अयसूचें असें असा उल्लेख येतो. येथें अयसूचा लोखंड असा अर्थ असेल, तथापि तांबें आणि त्यापेक्षांहि ब्राँझ हा अर्थ अधिक संयुक्तिक दिसतो. लोखंडाला श्याम अयस् किंवा नुसतें श्याम असें म्हणतात व तांब्याला लोहायस अथवा लोहितायस् असें म्हणतात. धातूचा रस करणें यासंबंधीं उल्लेख वारंवार आढळतो. जर धातू चांगलीं आटविली ( बहुध्मातं ) तर सोन्याप्रमाणें दिसते म्हणून ती ब्राँझ असावी असा शतपथ ब्राम्हणावरून अर्थ निघतो. वाजसनेयी संहितेंत अयसूची भट्टी

आणि अयस्चे प्याले यांचाहि उल्लेख आहे. ऋ. १. १६३, ९ या ठिकाणीं अयस्चा अर्थ सायणांनीं लोखंड असा स्पष्ट केला आहे व दुसरा होणेंहि शक्य नाहीं. ६. ३, ५. येथें 'अयसोन धारा' याचा 'परश्वादेर्धारा' असा अर्थ सायण करतात यावरून अयस् म्हणजे निवळ लोखंडच असावें असें दिसत नाहीं. कारण परशु वगैरे शस्त्रें पोलादाचीं किंवा ब्राँझचीं करीत असले पाहिजेत. श्याम, अयस् व लोहित अयस् असे दोन भेद आहेत. कुदळ वगैरे श्याम रंगाच्या अयस्ची करीत व लोहित अयस् हें ताम्र, असें सायण भाष्यांत म्हटलें आहे. यावरून लोहित म्हणजेच ब्राँझ धातु असावा. शतपथब्राह्मणांत लोहायस् हें अयस्पासून वेगळें आहे असें म्हटलें आहे. लोहायस् म्हणजे तांबें किंवा ब्राँझ असूं शकेल. ऋग्वेदांत 'अयोमुख इषु' असा उल्लेख आहे. म्हणजे बाणाच्या टोंकाला लोखंड लावीत असत असें दिसतें. अथर्ववेदांत श्याम हें विशेषण आहे. यावरून श्याम हें लोखंड असा अर्थ स्पष्ट होत नाहीं. अयस् म्हणजे खाणींतील धातु. अयस्ताप म्हणजे लोखंडाची भट्टी लावणारे लोहार.

[२]चंद्र.– ऋग्वेदांत चंद्र याचा सोनें सुवर्ण असा अर्थ आहे. अथर्ववेदांतील (१२. २, ५३) चंद्र याचा अर्थ ग्रिफिथ चकचकीत असा घेतो. तैत्तिरीय संहितेवरील भाष्यांत चंद्राचा कोठें हिरण्य व कोठें (आकाशांतील) आल्हादकारक असा अर्थ केला आहे. वाजसनेयी संहितेवरील भाष्यकार 'चंद्रं सुवर्णमस्यास्तीति चंद्री' 'ज्याच्या जवळ सोनें आहे तो' असा करतात.

[३]हिरण्य.–ऋग्वेद व मागाहूनच्या ग्रंथांत याचा अर्थ सोनें असा आहे. वैदिक काळच्या लोकांनीं सोन्याला अतिशय महत्त्व दिलें होतें. ही धातु नदीच्या पात्रांत सांपडत असे. सिंधू नदीला सुवर्णयुक्ता व सुवर्णजलयुक्ता अशीं नांवें ऋग्वेदांत दिलेलीं आहेत. पृथ्वीपासून सोनें काढण्याची तऱ्हा व सोनें शुद्ध करण्याची तऱ्हा लोकांस माहीत होती हें ऋग्वेद व तैत्तिरीय संहितेवरून दिसतें. वैदिक गायकांनां सोनें ही स्पृहणीय वस्तु वाटे. व गाई आणि अश्व यांच्याबरोबर सोन्याच्या राशि (हिरण्यानि) उदार धनिक देत असत असा उल्लेख आहे. सोन्याचा उपयोग गळ्यांतील व छातीवरील दागिने, बिगबाळ्या व भांडीं करण्याकडे होत असे असा तैत्तिरीय संहितेंत उल्लेख आहे. सोन्याचा नेहमीं देवाशीं संबंध दाखाविलेला आहे. हिरण्य याचा अनेकवचनीं सोन्याचे दागिने असा अर्थ होतो. सोन्याच्या वजनाचा ज्या अर्थी उल्लेख आहे त्या अर्थी त्या कालीं लोकांनां सोन्याचीं नाणीं ठाऊक होतीं हें स्पष्ट होतें. अष्टाप्रुट् या वजनाचा तैत्तिरीय संहितेंत उल्लेख आला आहे व शतमान म्हणजे शंभर कृष्णल या सोन्याच्या वजनाचाहि त्याच ग्रंथांत उल्लेख आहे. अनेक ठिकाणीं हिरण्य व हिरण्यानि याचा अर्थ सोन्याचीं नाणीं असा होऊं शकतो. सोन्याला हरित (पिवळ्या रंगाचे) व कधीं कधीं रजत (पांढऱ्या वर्णावर) अशीं विशेषणें लावलीं आहेत. रजत् यावरून रुप्याचाहि कदाचित् बोध होत असावा. अशुद्ध धातूपासून रस गाळून हें सोनें लोक काढीत असत. हिंदुस्थानाला सुवर्णभूमि हें नांव यथार्थ होतें असें मेगॅस्थेनीस म्हणतो. ऋ. ६. ६१, ७ 'हिरण्यवर्तनिः सरस्वति' याचा 'जिचा सुवर्णासारखा रथ आहे अशी सरस्वति' असा सायण अर्थ करतात. १. ११७, ५ याठिकाणीं सोनें पृथ्वींतून काढीत असत असा स्पष्ट उल्लेख नाहीं. 'पुरलेलें सोनें वर काढल्याप्रमाणें' इतकाच शब्दार्थ होतो. 'मातींत गाडला गेलेला दागिना वर काढतात त्याप्रमाणें' ही उपमा सामान्य आहे. अथर्ववेदांत पृथ्वीला हिरण्यवक्षा असें विशेषण आहे. पृथ्वीच्या पोटांत सोनें आहे म्हणून तिला हें विशेषण लावलें असावें असें वाटतें. लोखंडापासून सोनें काढतात असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे.

[४]रजत.—तैत्तिरिय संहितेंत हिरण्याबरोबर रुपें या अर्थी हा शब्द आलेला आहे. चांदीचे दागिने (रुक्म) भांडीं (पात्र) व नाणीं (निष्क) यांचाहि उल्लेख येतो. अथर्ववेदांत व इतरत्र याचा रुपें या अर्थी नामाप्रमाणें उपयोग केलेला आहे.

[५]रजस्.—यजुर्वेद संहितेंत रजताप्रमाणें रुपें या अर्थी हा शब्द आला आहे. हा शब्द ऋग्वेदांतहि याच अर्थानें आला आहे असें झिमरचें मत आहे परंतु तें संशयित आहे.

[६]लोह.—याचा मूळचा अर्थ तांबडा. पुढें तांबें हा अर्थ दाखविण्याकरितां याचा उपयोग आलेला आहे. कदाचित् ब्राँझ ही धातुहि अभिप्रेत असेल. श्यामशब्दापासून निराळा अशा अर्थानें हा शब्द वाजसनेयी व तैत्तिरीय संहितेंत आला आहे. ब्राह्मण ग्रंथांतहि हा शब्द अनेकदां आला आहे.

[७]त्रपु.—अथर्ववेद व तदनंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ कथिल असा आहे. याचा विशेषधर्म म्हणजे याचा रस करतां येतो. रॉथच्यामतें हा शब्द त्रप् 'लाजणें' या धातूपासून निघालेला आहे. वर जो त्याचा विशिष्ट धर्म सांगितला त्याचा उल्लेख अथर्ववेदांत आहे.

[८]लोहित.–विशेषण म्हणून हा शब्द अनेकदां आलेला असून त्याचा अर्थ तांबडा असा आहे व अथर्ववेदांत नपुंसकलिंगी हा शब्द आलेला असून त्याचा तांबें असा अर्थ आहे. विशेषनाम या अर्थी आपस्तंब श्रौत सूत्रांत उल्लेख आलेला आहे.

[९]श्याम.–हा शब्द अयस् या शब्दाबरोबर आला म्हणजे अथर्ववेदांत त्याचा लोखंड असा अर्थ केला जातो. नुसत्या श्याम शब्दाचाहि अथर्ववेद व मागाहूनचे ग्रंथ यांत हाच अर्थ स्वीकारला आहे.

[१०]सीस.–'शिसें' हा शब्द प्रथम अथर्ववेदांत आला असून त्याचा उपयोग ताईताकडे होतो असें म्हटलें आहे. पुढील ग्रंथांत हा शब्द नेहमीं येतो. कोष्टी या शिशाचा वजनासारखा उपयोग करतो असें वाजसनेयी संहितेंत (१९. ८०) व इतरत्र उल्लेखिलेलें आहे.

[११]हरित.–अथर्ववेदांतील कांहीं उल्लेखांत याचा सोनें असा अर्थ केलेला आढळतो.

[१२]लोहितायस्.–लोह या शब्दाचा हा पर्याय असून तांबडी धातु, तांबें, या अर्थी मैत्रायणी व काठक संहितेंत हा शब्द येतो

[१३]जातरूप.–'मूळचें सौंदर्य असलेला' असा याचा अर्थ असून हा शब्द सोनें या अर्थानें तैत्तिरीय ब्राह्मण व सूत्रग्रंथ यांतून आलेला आढळतो.

[१४]लोहायस.– शतपथ ब्राह्मणांत तांबडी धातू अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे व तो अयस् व सोनें ह्यापासून निराळा असें म्हटलेलें आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत कार्ष्णायस (लोखंड) याच्याशीं लोहायस शब्दाची तुलना आलेली आहे व तैं. ब्राह्मणांत कृष्णायस (लोखंड) ह्याच्याशीं तुलना केलेली आहे. तांबें असाहि अर्थ शक्य आहे.

[१५]सुवर्ण.– 'चांगल्या रंगाचा'. हें सोन्याचें विशेषण असे. पण पुढें सोनें अशा अर्थानें नामाप्रमाणें उपयोगांत येऊं लागलें.

[१६]कार्ष्णायस.– ('काळी धातु') उपनिषदांतील शब्द. त्याचा अर्थ 'लोखंड' असाच असावा.

[१७]कृष्णायस.– (काळी धातु) याचा उल्लेख छांदोग्यउपनिषदांत लोखंड या अर्थानें आला आहे.

## जमीन

### जमीन व तिचे प्रकार [ ऋग्वेद ].

| | | |
|---|---|---|
| [१]उर्वरा | द्वीप | मातरिभ्वरी |
| कृषि | धन्वन् | [४]मृद् |
| [२]क्षेत्र | निम्र | संदिह (वल्मीकवपा) |
| खात | निर्ऋति | [५]सीता |
| [३]खिल्य | प्रधन्या | सुक्षेत्रा |
| तंत्र | फर्वर | सुक्षेत्रिया |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| उदपुर | धरित्री | रोदसी |
| उपयाम | ध्रुव | [८]वपा (वारुळ) |
| उर्वरा | पांसु | [९]वल्क |
| उर्वी | पृथ्वी | [१०]शर्करा (रेती) |
| [६]ऊष | [७]प्रदर | सिकता |
| ऋक्षा | रसा | स्वधिचरणा |
| देवयजनी | | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| उर्वरा | धन्वन् | भूमि |
| ऊर्णम्रदा | [११]ध्रुव | शर्करा |
| ऋक्षाक | [१२]पांसु | सिकता |
| कीलालोध्नी | | |

[१]उर्वरा:– उर्वरा या शब्दाचा आणि क्षेत्र या शब्दाचा ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत नांगरट जमीन असा अर्थ आहे. सुपीक जमीनीचा (अप्नस्वती) त्याचप्रमाणें पडीत जमीनीचा (आर्तना) हि उल्लेख ऋग्वेदांत आहे. कालव्यांच्या योगानें लागवड करीत असत असा स्पष्ट उल्लेख ऋग्वेद (७. ४९, २) आणि अथर्ववेद (१. ६, ४) यांत केलेला आहे आणि खताच्या उपयोगासंबंधाचाहि (अथर्व. ३. १४, ३) उल्लेख आहे. क्षेत्रें बरोबर मोजीत असत असें ऋग्वेदावरून दिसतें. ही गोष्ट प्रत्येक मनुष्य नांगरण्याकरितां जमीनीचा मालक असे असें दर्शवितें. ऋग्वेदांतील एका ऋचेवरून (८.९१,५) या कल्पनेला पुष्टि मिळते. या ऋचेंत अपाला हिनें आपल्या बापाचें डोकें आणि त्याचें शेत यांचा एकत्र उल्लेख केला आहे. जसें डोकें तसेंच शेत ही खाजगी मालमत्ता असे असा या उल्लेखांतून अर्थ निघतो. यावरून उर्वरासा, उर्वराजित, क्षेत्रासा (क्षेत्रें जिंकणारे) अशीं विशेषणें झालेलीं आहेत. उर्वरापति हें प्रथम मनुष्याचें विशेषण असून नंतर तें ईश्वराला लावलें असावें. क्षेत्रें आणि मुलें यांचा उल्लेख एकाच भावनेनें केलेला आढळतो. तसेंच शेतांचा जय-जिंकणें (क्षेत्राणिसंजि) असाहि उल्लेख आढळतो. पिशेलचा तर्क असा आहे कीं नांगरलेल्या जमीनीसभोंवतीं गवताचा बांध असावा (खिल, खिल्य ह्या शब्दाचा अर्थ बांध असा असावा). आणि बहुतकरून ती बांधाची जमीन समाईक असावी असें वाटतें. एखाद्या समाजाच्या सर्व लोकांच्या समाईक मालकीची मालमत्ता किंवा अशा तऱ्हेची लागवड पूर्वी असल्याबद्दलचा उल्लेख वैदिक वाङ्मयांत आलेला नाहीं. जमीन खाजगी वैयक्तिक मालकीची असे हीच गोष्ट नंतरच्या वाङ्मयांत दिसतें. छांदोग्य उपनिषदाप्रमाणें वैयक्तिक संपत्तीमध्यें शेतें आणि घरें यांचाही समावेश होत असे (आयतनानि). ग्रीक पुराव्यावरून देखील वैयक्तिक मालकी असे असेंच सिद्ध होतें. वैयक्तिक मालकी कोणच्या तऱ्हेची असे हें मात्र स्पष्ट समजत नाहीं. अविभक्त कुटुंबांतील मुख्य पुरुष आणि इतर मंडळी यांचा कायद्याच्या दृष्टीनें कोणचा संबंध असे हें कोठेंहि स्पष्ट केलेलें नाहीं. या संबंधाचें कांहीं अनुमान मात्र बांधतां येतें (पितृ शब्द पहा). पुष्कळ वेळां एखादें कुटुंब जमीन वगैरेंचा वांटणी न करितां अविभक्तच रहात असे. स्थावर मिळकतीचा वारसा कोणी घ्यावा याबद्दलचे नियम गौतम, बौधायन व आपस्तंब या धर्मसूत्रांत सांपडतात; तत्पूर्वी सांपडत नाहींत. शतपथ ब्राह्मणांत (१३. ६, २, १८) उपाध्यायांना जमीन दक्षिणा म्हणून देत असा उल्लेख आहे; परंतु या दानाचा निषेध केला आहे. यावरून त्या वेळींहि जमीन ही वस्तू सहज देऊन टाकण्यासारखी मानली जात नसे असें दिसतें. तैत्तिरीय संहितेंत (३, १, ९ ४,) मनूनें आपला पुत्र नाभानेदिष्ठ याला स्थावर मालमत्तेच्या वांटणींतून वगळलें तेव्हां त्या मुलाला जमिनीऐवजीं गुरें मिळालीं ही गोष्ट महत्त्वाची आहे. गुरें ही पूर्वी धनाच्या ठिकाणीं होतीं. भारतांतहि संपत्तीचा पाया पूर्वी गुरेंच होतीं, जमीन नव्हती हें स्पष्ट आहे. आयर्लंड, इटली, ग्रीस वगैरे देशांतहि हीच स्थिति होती. गुरें हीं व्यक्तींना खाजगी रितीनें वापरतां येत, व अशा प्रकारें तीं वापरलीं जात. जमीन मात्र कोणाहि व्यक्तीनें आपल्या मर्जीप्रमाणें कोणालाहि द्यावी अशी वहिवाट नव्हती; कुटुंबाचें किंवा जातीचें (समाजाचें) मत तरी निदान जमिनीच्या व्यवस्थेच्या बाबतींत घ्यावें लागे, असें दिसतें; परंतु ग्रंथांत या बाबतींत स्पष्ट वचनें नाहींत त्यामुळें भारतीय व इतर समाजांच्या तुलनेवरच या संबंधांतील अनुमान बांधावें लागतें.

[२]क्षेत्र.–'शेत.' ऋग्वेदावरून हा शब्द निरनिराळीं आणि काळजीनें मोजलेलीं शेतें असत असें दर्शवितो, तरी कांहीं ठिकाणीं

सामान्य नांगरलेली किंवा लागवड केलेली जमीन असा अर्थ आहे. अथर्ववेदांत आणि नंतरहि वरील दोन्ही अर्थ आले आहेत. ज्याप्रमाणें वास्तोष्पति प्रत्येक घरावर देखरेख करतो त्याप्रमाणें क्षेत्रस्यपति ( शेताचा ईश्वर ) ही प्रत्येक शेतावर देखरेख करणारी देवता आहे असा अर्थ घेतां येईल. या पुराव्यावरून वैदिक काळांत व्यक्तींचीं निरनिराळीं शेतें असण्याची वहिवाट होती असें अनुमान करणें बरोबर होईल.

[3]खिल, खिल्य.–एकच अर्थाचे दोन्ही शब्द आहेत. रॉथच्या मताप्रमाणें याचा अर्थ लागवड केलेल्या दोन जमिनींमधील पडित जमीन; परंतु ऋग्वेदांतील उताऱ्यांत–ईश्वर भक्ताला अभिन्न खिल्यावर ठेवितो–( अभिन्ने खिल्येनिदधाति देवयुम् ) हा अर्थ लागू पडत नाहीं असें तोच स्वतः कबूल करतो, आणि म्हणून 'अखिल्येभिन्ने' 'पडित, पट्ट्या नसलेली जमीन' असा पाठ तो कल्पितो. पिशेल म्हणतो कीं, खिल याचा अर्थ लोकांच्या ढोरांना चरण्यास राखलेली व ज्या मध्यें लागवड नसलेलीं अशीं मोठीं शेतें असा असावा. तथापि ओल्डेनबर्ग म्हणतो कीं लागवड केलेल्या शेतांमध्यें जी जमीन असते ती खिल असावी. रॉथच्या मतें ही खिल जमीन पडित असते परंतु ओल्डनबर्गचें तसें मत नाहीं. वैदिककाळांत लहान लहान निरनिराळीं शेतें असत या गोष्टींशीं ओल्डेनबर्गचें मत जुळतें.

[4]सीता.–ऋग्वेद व मागून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें तास ( नांगरट ) अशा अर्थीनें हा शब्द आलेला आहे.

[5]मृद.–नंतरच्या संहितेंत आणि ब्राह्मणांत 'माती' या अर्थी. ब्राह्मणांत याचा मातीचा गोळा हा अर्थ सुद्धां निघतो. मैत्रायणी उपनिषदांत कुंभार या अर्थी मृत्पात्र आणि मृण्मय यांचाहि उल्लेख आलेला आहे. आणि थडग्याला मातीचें घर म्हटलें आहे.

[6]ऊष.–नंतर लिहिल्या गेलेल्या संहितेवरून आणि ब्राह्मणांवरून गुरांना योग्य अशी खारी जमीन असा ह्या शब्दाचा अर्थ आहे.

[7]प्रदर.–याचा अर्थ मागाहूनच्या संहिता व ब्राह्मणें यांत 'भेग' 'भूभंग' असा होतो.

[8]वपा.–मागाहून झालेल्या संहिता व ब्राह्मणें ग्रंथांत ह्याचा अर्थ वारूळ असा आहे.

[9]वल्क.–मागाहून झालेल्या संहिता व ब्राह्मण ग्रंथात वारूळ या अर्थीनें हा शब्द आलेला आहे.

[10]शर्करा.–स्त्रीलिंगी अनेकवचनी असा हा शब्द मागाहून झालेल्या संहिता ग्रंथांत व ब्राह्मण ग्रंथांत आला असून त्याचा अर्थ रेंव किंवा वाळू असा आहे. अथर्व वेदांत शर्करा या शब्दाचा क्षुद्र पाषाणविशेष असा भाष्यकारानें अर्थ केला आहे.

[11]ध्रुव.–हें विशेषण दिव्=दिशा हिला लावलेलें असून या शब्दाचा अर्थ मनुष्याच्या पायाखालची जमीन असा हि आहे.

[12]पांसु.–अथर्ववेद व मागाहूनचे ग्रंथ ह्यांमध्यें धूळ किंवा वाळू अशा अर्थीनें अनेकवचनी प्रयोगांत हा शब्द सांपडतो. अद्भुत ब्राह्मणांत पुढें येणाऱ्या अरिष्टांची सूचना देणारीं जीं चिन्हें दिलेलीं आहेत त्यांत पांसुवर्ष म्हणजे धुळीचा किंवा वाळूचा पाऊस याचा उल्लेख आला आहे. अशा प्रकारचा वाळूचा पाऊस हिंदुस्थानांत पुष्कळदां पडतो.

## उदक

### उदकनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्षर | गंभरं | बृबूक |
| अक्षित | गंभीर | भविष्यत् |
| अद्रिमातृ ( मेघो- | गर | भुवन |
| दक ) | गर्भ | भूत |
| अनास्थान | गहन | भेषज |
| अन्न | गाध | मधु |
| अप् | गिरिव्रज | मह |
| अप्य | गो | महव् |
| अभ्र | घृत | महस् |
| अमृत | जजस्त | यशस् |
| अंबि | जझती | यहस् |
| अंबु | जन्मन् | यादु |
| अंभस् | जल | यादुरी ( उदक- |
| अररिंद | जलाष | युक्त ) |
| अर्ण | जामि | योनि |
| अर्णस | तुग्र्या | रयि |
| असुर्य | तूय | रस |
| अहिः | [1]तूणाश | रेतस् |
| आप | तृप्ति | वंक्षु |
| आयुध | तेजस् | वन |
| आवयस् | तोय | वपुस् |
| इद | द्रव | वाताप्य |
| इन्दु | धरुण | [2]वार् |
| ईम् | ध्वस्मन्वत् | वारि |
| उग्रपुत्र | नभनु | विवस्व |
| उद | नभस् | विष |
| उदक | नामन् | व्योमन् |
| उदन् | नितिक्त | शंबर |
| ऋत | नीर | शवस् |
| ऋतस्ययोनि | पयस् | [3]शाप |
| ओजस् | पवित्र | शिव |
| कत्पय ( वाईट- | पिप्पल | शुक्र |
| पाणी ) | पीयूष | शुभ |
| कशस् | पुरीष ( पाण्याची | संवत्सरीण |
| काष्ठ | वाफ ) | सत् |
| कृपीट | पूर | सतीन |
| क्षत्र | पूर्ण | सत्य |
| क्षद्मन् | प्रभृत | सदन |
| क्षपस् | प्रयस् | सद्मन् |
| क्षीर | बर्बुर | [4]सरस् |
| क्षोदस् | बर्हिस् | सर्ग |
| गभीर | बुस | सर्गतक्त |

| | | |
|---|---|---|
| सर्पिस् | सुख | स्वर् |
| सर्व | सुरा | स्वतीक |
| सलिल | सूदयित्नु | हर |
| सहस् | स्तिया | हविस् |
| सिरा | स्रोतस् | हेमन् |
| सुक्षेमन् | स्वधा | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अन्न् | पयस् | वार् |
| अग्रेगु | परिवहन्ती | वाश |
| अग्रेपु | पृश्निगर्भ | विश्वप्स्नि |
| अप् | प्रचेतस् | विश्वभृत् |
| अमृत | मधुपृच् | सतीक |
| अंभस् | यमेष्ठ | सरिर |
| अर्ण | यवमती ( यवमिश्र उदक ) | सर्णीक |
| आधाव | | सलिल |
| उदक | यह्वी | सूर्यत्वचस् |
| उद्रिण | राधोगूर्त ( अन्न शिजविण्या जोगें जल ) | सूर्यवर्चस् |
| ओद्मन् | | स्रोतस्य |
| केत | | स्वसिच |
| घृतपु | रेशि | हारुक ( अग्निहरण करणारें जल ) |
| घृतश्चुत् | वव्र | |
| जनभृत् | वहत् | हिरण्यवर्ण |
| द्रीप्य | वहन्ती | हव्य |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अत् | वरुणतेजस् | शतपवित्र |
| अप् | वातजूत | शुक्र |
| उद् | वार् | स्नपनी |
| उदक | वास्तेयी | स्थूर |
| ऋतावरी | विचेतस् | हस्तावनेजन |
| कुवण | शक्करी | हिरण्यवर्ण |
| गुह्य | | |

[1]तूर्णाश.–ऋग्वेदांत त्याचा अर्थ पर्वतांतील प्रवाह असा आहेसें वाटतें.

[2]वार्.–ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांत 'पाणी' ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे. कांहीं ठिकाणीं 'सांचलेलें पाणी' 'तळें' असाहि ह्याचा अर्थ होतो.

[3]शाप.–ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांत ह्याचा अर्थ पाण्याच्या प्रवाहाबरोबर वहात आलेली वस्तु म्हणजे बहुतकरून पाण्याचा 'शाप' असा आहे. ऋ. १०. २८, ४ या ठिकाणीं सायण शाप याचा अर्थ उदक असा करतात.

[4]सरस्.–ऋग्वेद, मागाहून झालेले संहिताग्रंथ व ब्राह्मणग्रंथ ह्यांमध्यें सरोवर अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

## जलाशयसंबंधी [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपोदक | उच्चाबुध्न (कूपवि०) | उदन्वती ( नदी ) |
| अर्णव | उदधि | उदप्रुत् |
| अवत ( झरा ) | उदनिमत् (पर्जन्य) | उपकक्षस् ( डबकें ) |
| आर्द्र ( समुद्रावशोषण ) | उदनी (पर्जन्यधारा) | ऊर्मि |
| | उदन् | कबंधिन् (उदकवान) |
| खनित्रिम ( काल्व्यांतील पाणी ) | बर्जह ( पाण्याचें उगमस्थान ) | शीपाल ( शेवाळ ) |
| चतुःसमुद्र | मज्जान | समुद्र |
| द्रप्स ( थेंब ) | मध्वर्णस् ( मधुरोदकानदी ) | समुद्रिय |
| द्विधार ( जल ) | | सरस् |
| धन्वर्णस् ( नदी वि. ) | मांश्चत्व ( पीतसरोवर ) | सिंधुपति |
| धारा | | सीलमावती |
| नाव्य ( नावेनें तरण्यास योग्य ) | यव्हती ( महती आपः ) | सुगाध |
| न्ययन ( डोह ) | रीति ( प्रवाह ) | सुषेचन ( शोभन जलसेकोपेत ) |
| पयोवस् | विश्वधेना ( विश्वपोषक ) | स्यंदमान ( प्रस्रवणयुक्त ) |
| पयस्वत् | | स्रवितवे ( प्रस्रवणाय ) |
| पार | वैशंत ( पल्वल ) | |
| पुरीषिन् | शर्यणावत् ( सरससंबंधीं ) | स्रोत्या ( स्रवणशीला आपः ) |
| प्रवपत् | | |
| फेन | शवसिन् | ह्रद |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अर्णव | पल्वल्या | सूद्या |
| अवट्या | पृष्व्या | सैन्धव |
| अवर्ष्या | वर्ष्या | सैन्धवी |
| ऊर्मि | विकर्या | स्थावरा |
| ऊर्व | वैशन्ती | स्यंदमाना |
| कूप्या | समुद्र | स्रोत्या |
| कुल्या | समुद्रिया | ह्रद्या |
| नदी | सरस्या | ह्रादुनि |
| नादेयी | सरित् | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अद्रिदुग्ध | फेन ) | शीपाल ( शेवाल ) |
| अनभ्रि | द्रप्स | संस्राव |
| अनूर्मि | धरुण | समुद्र |
| अपगा | धारा | समुद्रिय |
| अर्णव | नद्य | सरस् |
| असिक्नी | प्रस्रवण | सरा |
| आस्तेयी | फेन | सरित् |
| उदधि | मधुकूल ( सरोवरांतील उदक ) | सिंधुपत्नी |
| उदनि | | सिंधुराज्ञी |
| उदप्रुत् | यव्या | सिंधुसत्य |
| उदप्लुत् | रसा | सुनाथ |
| उद्र | रोधचक्रा | सुप्रपान |
| ऊर्मि | वक्षणा | स्तोक |
| गर्गर ( भोंवरा ) | वीचि | स्रा |
| घोषिणी | वेशन्ती ( डबकें ) | स्रोत्या |
| जालाष ( गोमूत्र- | शीतव्हद | ह्रद |

## मेघनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| * अद्रि | अन्तरिक्षप्रुत् | * अभ्र |
| अंतरिक्ष | अन्तरिक्षसत् | अर्णोवृत |
| अन्तरिक्षप्र | अब्दि | * अश्व × |

* ही खूण असलेले शब्द पर्वत या अर्थाचेहि वाचक आहेत.

× ही खूण असलेल्या शब्दांचा निगम अन्वेषणीय आहे असें देवराज यज्वा यानें निरुक्तावरील निर्वचन नामक टीकेंत लिहिलें आहे.

| | | |
|---|---|---|
| * अश्मन् | जिम्हवार | * बलाहक |
| * असुर | जीमूत | भूम्य |
| * अहि | दिविज | * [3]मेघ |
| आरंगर (सशब्द- | दिवियोनि | * रैवत × |
| घन ) | दिव्य | * रौहिण |
| उत्स | * दृति | वर्धयन्ती |
| उदमेघ | दृषत् | वनधीति |
| उदवाह | द्युगत् | * वराह × |
| * उपर × | द्रप्सिन् | * वल |
| * उपल | [2]धनु | * वलिशान × |
| ऊधस् | धन्वच्युत् | विद्युत् |
| * ओदन | नभ | विभुक्रतु |
| कबंध | नभोज | * वृत्र |
| * [1]कोश | नभोजु | * वृषन्धि × |
| * गिरि | नभस्मय | वृषप्रभर्मन् |
| * गोत्र | नीचीनबार | वृष्टिमत् |
| * ग्रावन् | नीलपृष्ठ | व्योमसत् |
| घन | पर्जन्यरेतस् | * व्रज |
| घृतदुह् | * पर्वत | * शंबर × |
| * चमस् | * पुरुभोजस् × | [4]शिरिंबिठ |
| * चरु × | * फलिग | [5]स्तनयित्नु |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अद्रि | दृति | वृत्र |
| अभ्र | फलिग | वृष्टिमत् |
| उदवाह | मेघ | व्योम |
| घन | वल | व्रज |
| जीमूत | विद्युत् | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| उदवाह | जीमूत | सत्रासह |
| घनाघन | सत्रादावन् | स्तनयित्नु |

[1]कोश.–ऋग्वेदांत रथाचा मुख्य भाग, बहुतकरून हा भाग आंसाला बांधलेला असावा. परंतु तो फारसा मजबूत नसावा कारण असें म्हटलें आहे कीं पूषन्च्या रथाचा कोश पडत नाहीं. कोश बांधण्याकरितां जे दोर घेत असत त्यांचा उल्लेख 'अक्षा–नह' ह्यांत आला आहे. लक्षणे ( अलंकार ) नें हा शब्द सर्वच रथ दाखवितो असें मॅकडोनल म्हणतो. ऋ. १. ८७, २ या ठिकाणीं कोश या शब्दाचा अर्थ सायणाच्या मताप्रमाणें 'मेघ' असा होतो.

[2]धनु.–' भाटी ' वाळवंट हा शब्द ऋग्वेदांत अनेक वेळां पण आकाशांतल्या ढगासंबंधानें अलंकारिक भाषेंत फक्त एकदांच आलेला आहे. अथर्ववेदांत धनु हा शब्द आलेला आहे व त्याचा अर्थ रक्तस्राव बंद करण्याकरितां उपयोगी पडणारें वाळूचें पोतें असा दिसतो.

[3]मेघ.–हा शब्द ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथांत ढग या अर्थानें आला आहे.

[4]शिरिंबिठ.–ऋग्वेदामध्यें एका लेखांत हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ एका माणसाचें नांव असा असावा. अनुक्रमणी-मध्यें ज्या सूक्तांत हें नांव आलेलें आहे तें सूक्त या नांवाच्या माणसानें रचिलें असें म्हटलेलें आहे. यास्क याचा अर्थ ढग असा करितो.

[5]स्तनयित्नु.–एकवचनी व अनेकवचनीं. ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत याचा घनगर्जना असा अर्थ आहे.

## ऊ ष्ण ता.

### किरणनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्षिति (सूर्यरश्मि) | [1]तेजस् | वसु |
| अभीषु* | दीधिति | शव |
| असिर | द्योतन | सप्तर्षि |
| उस्र | भानु | साध्य |
| किरण* | मयूख | सुवर्ण |
| खेदि* | [2]मरीचिप | स्वयुग्वन् ( स्वयं-युक्त ) |
| गभस्ति० | [3]रश्मि* | |
| गो*० | वन | स्वर्दृश |

[1]तेजस्.–श्रोडरच्या मतें ऋग्वेदांत याचा विशिष्ट अर्थ कुऱ्हाड असा आहे, पण सर्व ठिकाणीं देवाचें वज्र असा अर्थ ठीक जुळतो. ऋ. ६. १५, १९ या ठिकाणीं तेजस् या शब्दाचा 'तेजोयुक्तता' असा सायणांनीं अर्थ केला आहे व तो ग्रिफिथलाहि मान्य आहे.

[2]मरीचिप.–वेबरच्या मतें याचा अर्थ तेजःपरमाणु किंवा चकाकणारे अणुरेणु असा आहे. मरीचींचा त्याच्यामतें प्रकाश-किरणाच्या उलटहि अर्थ आहे. हा अर्थ ऋग्वेदांत आधींच्या उताऱ्यांतून चांगला लागू पडतो. परंतु प्रकाशकिरण हा अर्थ उप-निषदांत अगदी स्पष्टपणें आढळतो. अर्थात् तेथें जुना अर्थहि कांहीं ठिकाणीं अभिप्रेत आहे.

[3]रश्मि.–ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथांत सूर्याचे किरण या अर्थानें हा शब्द आला आहे.

### तेजोवाचक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अगृभीतशोचिस् | आघृणिवसु | तिग्मभृष्टि |
| ( अगृहीत ते- | उदन्यज | तित्विषाण |
| जस्क ) | ऊर्ण | तेजस् |
| अभिभ्राजस् | ऊर्ध्वशोचिष् | तेजिष्ठा |
| अग्निरूप | ओजिष्ठ | त्वक्षस् |
| अग्निश्री | ओजीय | त्विट् |
| अजिरशोचिष् | ओष | त्वेषथ |
| अतिरोचमान | चकमान | दविद्युतती |
| अद्युत् ( द्योतमाना- | चकान | दस्मवर्चस् |
| रात्रि ) | छाया | दिवित्मत् |
| अनूनवर्चस् | ज्योतिस् | दिवोरुच् |
| अभीद्ध | ज्योतिष्कृत् | दीदियुष् |
| अरुषस्तूप | ज्योतिष्मत् | दीद्यत् |
| असमात्योजस् | तपिष्ठा | दीद्यान |
| आघृणि | तिग्म | दीधिति |

*हीं खूण असलेलीं नांवें घोड्याच्या लगामाचींहि आहेत.

०ही खूण असलेले शब्द वेदांत आहेत कीं नाहींत याबद्दल देवराज यज्वा ह्यांनीं संशय प्रदर्शित केला आहे.

दीध्या
दुरोकशोचि
द्युक्ष
द्योतनि
धामन्
धामघस्
धृषित
धृष्ण्वोजस्
नाभ् (नभबाधक-दीप्ति)
निक्त
निशिशान
पुरुचन्द्र
पुरुरुच्
प्रतीक
प्रदीध्याना
प्रमहस्
प्रस्फुरत्
बाकुर (भासमान)
भर्ग
भस्मन्
भास
भानु
भाम
भामिन्
भास्वती
भूर्योजस्
भ्राज्
महन्
महस्
महस्वत्
माहिन
राजत्
रुच्
रुत्वान
रुशत्
रोका
रोचन
रोचमान
रोचिष्
रोरुवान
वयुन (तमनिवारक)
वरस्
वर्चस्
वसना (आच्छादक तेज)
वाश
वासर
विघृत
विदिद्युतान
विद्युन्महस्
विभान
विभानु
विभाव
विभ्राजत्
विभ्राट्
विभ्राष्टि
विरोचमान
विरोचयत्
विवस्वत्
वीत
वीततम
वृद्धमहस्
वृद्धशोचिष्
वेन्य
शिक्वस्
शुक्रशोचिष्
शुचत्
शुचयत्
शुचियत्
शुचिबन्धु
शुशुक्वन्
शुशुचान
शुशुजान
शोक
शोचिष्
शोचिष्केश
संराज
संदृश
संदृष्टि
सरजत्
सरश्मि
सुकाम
सुमेक
सुरुच्
सुवर्चस्
सुशुक्वन्
सुशोक
स्वरण
स्वरोचिष्
स्वर्क
हरस्
हस्कार

[ तै. सं. ]

तपिष्ठ
तेजस्
त्विष्
त्वेष
दीधिति
द्यु
पिलिप्पिला
भस्म
भास्
भ्रज्
मह
शिक्वन्
शोक
शोचि
सर्वमिन्

[ अथर्ववेद ]

अतेजस्
अन्नतेजस्
अभिद्यु
अभिभा
अभिशोच
अर्चिष्
एकशीर्षन्
एनी
ओजस्
ओज्मन्
किरण
ज्योतिष्
तेजस्
तेजस्वत्
तेजिष्ठा
त्विषि
त्वेष
दिद्यु
द्युराजि
धामन्
पटर
भाऋजीक
मनस्तेजस्
महस्
रोच
रोचन
वर्चस्
वसुरुचि
वाततेजस्
वायुतेजस्
विभ्राजन्
विभ्राष्टि
विमहस्
शीरशोचिष्
शोक
शोशुचत्
समानवर्चस्
सुतेजस्
सुरुच्
सुवर्चस्
सूर्यत्वच्
स्वभानु
हतवर्चस्
हिरण्यज्योतिष्
हिरण्यतेजस्

## तेजोविशेषणें [ अथर्ववेद ]

अभितपन्
अभिशोचयिष्णु
आतपन्तं
इद्ध
उच्छोचयत्
ओजायमान
ओजीय
घृणि
ज्योतिष्मत्
तपन्
तपिष्ठ
तप्त
तापयत्
तित्विषाण
त्विषिमत्
दिव्
द्युक्षस्
द्युत
द्युत्त
द्युमत्
द्यौःसंशित
प्रतिचाकश
प्रभ्राजमान
भूरिऽओजस्
महस्वत्
रक्षत्
वितपत्
विद्योतमान
शुच्
संतापयत्
स्वरोचिष्

## (तेजस्वी) क्रियापदें [ अथर्ववेद ]

अचाकशम्
अतिऽभाति
अतिऽरोचते
अदिद्युतत्
अधोक्
अनुऽनिर्दह
अनुऽअतप्यन्त
अभिऽदीपयन्
अभिऽशोचति
अभिऽसंतपति
आऽतपन्ति
आऽभास्ति
आऽरोचयन्
उपऽतप्यामहे
ऐन्ध्द
जिघर्मि
ज्योतय
तपुः
तित्विषे
तीतपासि
द्यतु
द्योतताम्
भासि
मर्याः
राजतु
राजयाते
राजासि
राजसे
रारजीति
रीरिषस्
रुचिषीय
रुरुचुस्
रुरुपस्
रेचि
रेजन्ते
विभाससि
विरोचते
शुशुग्धि
शुशुचीत
शोचतु
शोभयामसि
शोभसे
शोशुचत्

## ज्वालानामें [ ऋग्वेद ]

अर्चिष्
कल्मलीक
कल्मलीकिन्
क्षाति
घृणि
जंजणाभवन्
जमत
तपस्
तेजस्
भ्रम
मल्मलाभवन्
वक्ष्य
विदथ्या
शोचिष्
शृंग
हरस्
हृणि

## जाळणें (क्रियापदें) [ ऋग्वेद ]

छन्यते
ज्योतते
दीदयति
द्युमत्
द्योतते
भन्दते
भ्राजते
भ्राशते
भ्राश्यति
मन्दते
रोचते
शोचति

[ तै. सं. ]

अज्वलत्
अरोचत्
अशोचत्
आतपतः
इधीमहि
इध्यते
ईमे
एन्ध
चाकशीहि
दविद्युतत्
दहति
दिद्युतुः
धक्ष्यति
पणेत
पनयन्त

| | | |
|---|---|---|
| भाति | रोचत् | शुक्र् |
| भासन् | विद्योतिष्यते | शूशुचः |
| राजयति | विरोचते | समिधे |
| रेजयेत् | वीडयस्व | समिध्यसे |
| रेजत् | | |

## ग ति

### गतिवाचक नामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अभिव्लंग | क्रीळ | प्रनीति |
| अवयान | चरित्र | प्रयाण |
| आगति | चेतन | प्रयामन् |
| आतनि | चोद | प्रेषित |
| आयु | जव | यत् |
| आरंभण | तकि | रघु |
| इति | तरस् | रोहण |
| ईरी | तुर्वणि | विक्रमण |
| उदयत् | दीयन् | विगाम |
| उपेति | ध्राजि | व्ययन |
| एति | न्यंचन | व्रजन |
| ओज्मन् | परायण | श्वसथ |
| कुंड्ऋणाची ( कुटिलगति ) | परिज्मन् | सर्माय |
| | प्रतीति | साद |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| गत | प्रयाण | रभस् |
| गति | प्रसूति ( भृत्यादि प्रेरणसामर्थ्य ) | शीघ्र |
| जव | | सि |
| प्रयति | मनोजवस् | स्वगा |

### गतिवाचक क्रियापदें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अकः | अतृंदन | अयते |
| अकानिर्ष | अन्येषि | अयुथुः |
| अक्तः | अधमः | अयोयवीत् |
| अक्त | अधिस्कन् | अरायि |
| अक्रमीं | अनज | अलर्षि |
| अक्षरत् | अनयं | अवति |
| अगन् | अनविष्ट | अवनयः |
| अग्मन् | अनावन् | अवर्तं |
| अंग्ध्वे | अनुग्मन् | अवीः |
| अच | अनूनोत् | अवीरयेथां |
| अचोदयः | अन्वर्तिता | अवेनन्तं |
| अज | अपद्रन् | अश्वैत् |
| अजगन् | अपात् | असश्चन्त |
| अजगंतन | अप्येति | असन् |
| अज्यते | अभित्सरांति | असि |
| अंजते | अभिस्वरांति | अस्तोढ्वं |
| अतति | अभिहर्यति | अस्वार्ष्ट |
| अतरः | अभीपतः | आक्ररः |
| अतिपादयः | अभ्यारं | आगनीगन्ति |
| अतिपिप्रति | अभ्रं | आचक्रि |
| अतियाथः | अमात् | आचक्रे |
| अतिरः | अयंस्त | आध्वं |

| | | |
|---|---|---|
| आनजे | ऋच्छति | जवेते |
| आनीत | ऋच्छन्तु | जसति |
| आनुषक् | ऋच्यन्ते | जिगाति |
| आनृचे | ऋणन्ति | जिन्वति |
| आपप्राथ | ऋणोति | जीहिपः |
| आयन् | ऋष्वाति | जुगुर्याः |
| आर | ऋष्वथः | जुघुक्षतः |
| आर्त | ऋतयतः | जेहते |
| आर्यति | ऋधत | ज्रयति |
| आर्यन्ति | ऋहते | तकति |
| आवरत् | एजति | तना |
| आवर्जते | एति | तयते |
| आवर्तयन्ति | ऐरत | तरुते |
| आविविद्रिरे | ओहसे | तवीति |
| आश | औच्छः | तारिषत् |
| आसु | औनत् | तुजेते |
| इटतः | कष्टाति | तुतुर्यात् |
| इत | कवते | तुरतः |
| इथः | कसति | तुरीयति |
| इन्वति | कालयाति | तूर्वतं |
| इनक्षसि | क्षियाति | त्सरति |
| इनोषि | क्षुंपति | दध्यति |
| इन्विरे | क्षेति | दभ्नोति |
| इयक्षति | क्षेपयत् | दुद्रवत् |
| इयक्षसि | क्षोदति | दोधवीति |
| इयर्ति | गन्ति | द्रमति |
| इयर्मि | गमति | द्रवति |
| इये | गमत् | द्राति |
| इरज्यत | गमेयं | द्रूळति |
| इरधन्त | गवते | धनयन्त |
| इषणत् | गाति | धन्वाति |
| इषति | गाय | धमति |
| इषयेमि | गासिषत् | धवध्वे |
| इष्कृणुध्वं | गाहेमहि | धारयथः |
| इष्णासि | ग्मन्त | धावतं |
| इहि | चकर्थ | धूनुते |
| ईंखते | चक्रदः | ध्रजति |
| ईंखय | चक्रन् | ध्राति |
| ईयुः | चंक्रमत | ध्वंसति |
| ईर्ते | चचरा | नक्षति |
| ईर्ध्वं | चतति | नभंतां |
| ईर्ष्वं | चनस्यतं | नवते |
| ईवते | चर्कर्मि | नसते |
| ईषति | चारीत् | निन्येरुः |
| उद्यते | चियन्तु | निजूर्वति |
| उनत्ति | चोदयासे | निदधत् |
| उपेषे | च्यवते | निन्यथुः |
| उप्यते | च्यवयन् | निपद्यते |
| उरुष्यति | जगायात् | निरेतु |
| उहीत | जंगन्ति | निवर्तत् |
| ऊवुः | जमति | नीथा |
| ऊहथुः | जवति | नुत्थाः |

नुदत
नुनुद्रे
नृषत
नेथ
न्यृषंति
पचत
पद्यते
पवंते
पशुम्
पस्पर्शत्
पाथः
पारिषत्
पिस्यति
पुनःसर
पूर्धि
पेल्यति
प्रवते
प्रासि
प्लवते
प्साति
फणति
बिस्यति
भुरण्यति
भ्रमति
मर्दति
मार्ष्टि
मिनाति
मिमिक्ष
मिस्यति
मुमुचे
म्यक्षति
यतति
यतते
यन्तु
यवय
याट्
यात्
यानान्
यामः
यासिसीष्ठाः
युच्छसि
युध्यति
युनक्षि
युयवत्
युयुत्रे
युयोति
युवसे

युवासे
यूयाः
यूर्तिरे
योपयामसि
योषति
योषिष्ठि
रंहिः
रजति
रथर्यति
रपत्
रमध्वं
ररंभ
रश्यति
रिणाति
रीयते
रेजति
रेषत्
रोळ्हे
रोह
लजति
ल्यंताम्
लोटते
लोठते
वं
वंचति
वपन्ति
वयति
वरत्
वर्ति
वर्ध
वर्त्ततति
वर्षयथः
ववाता
वव्रयामहे
वव्राज
वसुयात्
वहन्
वातु
विंचंति
विथुर्यति
विद्रे
विपेततुः
वियोषत्
विव्याच
विषिष्टि
वीविजः

वुरीत
वृह
वेति
वेनति
वेमि
वेविजे
व्यत
व्यूषुः
शमाये
शवति
शुश्रव
श्चोतति
श्रमत्
श्रुवत्
श्वंचयः
श्वेतन
ष्वःकति
संवव्रत्वत्
सक्षीमहि
सचते
संजूर्वसि
सन्नयः
समीके
सर्पे
सश्चीते
सव्यतः
सिचामहे
सिसर्ति
सीयंते
सूदय
सेधति
सेपुः
सोतन
स्कंदति
स्तरीः
स्पृश
स्यन्दते
स्यमति
स्रंसते
स्रव
स्वर
हनति
हन्ति
हर
हाः
हिन

[ तै. सं. ]

अकः
अकरम्
अक्रंस्त
अक्रामत्

अक्लृप्तम्
अगच्छत्
अगु
अगृभ्णन्

अग्मत
अचति
अचारिषम्
अचुच्यवुः

अज
अजुहवु
अतन्वत
अतरि
अतिक्रोति
अतिपादयति
अतियजते
अतिरम्
अतिरिच्यते
अतिसर्पति
अतिहरेत्
अतीयात्
अतूर्त
अत्यशिष्यत
अद्रवत्
अन्तरेति
अन्वैताम्
अपतत्
अपद्यत
अपवाति
अपुनत
अपुवायते
अपुवायेत्
अपेति
अप्रवत
अमन्महि
अमन्यत्
अमुच्यत
अमृध्राः
अमृशत्
अयजत
अयन्
अरः
अरक्षन्
अरुहम्
अर्च
अर्धयैत
अर्पय
अवकल्पत
अवगच्छेत्
अवपद्यते
अवर्तत
अवर्षयन्
अवव्रन्
अवारयत
अवार्छति
अविचाचलिः
अव्रथाः
अवेनत्
अवेपन्त
अवैति
अवैर्यत

अवैष्यन्
अवोक्षति
अशीर्यन्त
असर्जि
असर्पत्
असीदत्
असृजत्
अस्रीविः
अहरत
अह्वयाण
अह्वे
आगत
आगमन्
आगमिष्ठाः
आजगन्थ
आजग्म
आजत्
आञ्जत
आदिशः
आध्वम्
आनंज
आपयिता
आममत्
आयजे
आयन्
आरत्
आरोहम्
आर्तोः
इच्छ
इत
इष्य
इहि
ईमहे
ईरते
ईर्ते
ईळयन्ते
उच्छति
उत्क्रंस्यत
उत्क्रामते
उत्तिष्ठत
उत्पतिष्यन्
उत्पिपीते
उत्सृजति
उदचति
उदजयन्
उदवमीत्
उदानीयते
उदारिथ
उदाह्रियते
उदेति
उदेष्यते
उदैत्

उदगृह्णते
उद्ग्रहीष्यते
उद्यते
उद्वासयेत्
उनत्ति
उन्नयते
उपगायेत्
उपचरति
उपधीयन्ते
उपप्रयाति
उपमुञ्चते
उपयन्ति
उपयाति
उपसद्यन्ते
उपहव्रम्
उपहूते
उपह्वयेत
उपागाम्
उपादधात्
उपाप्नोति
उपायन्
उपावर्यन्ति
उपावरोह
उपावर्तत
उपावर्तेत
उपाववर्ति
उपावसृजति
उपावस्यति
उपावहरेत्
उपावारोहन्
उपेति
उपेयात्
उपैत्
उपैति
उपैष्यामि
उपोक्तः
उपोप्ते
उशते
ऋच्छति
ऋजीते
ऋणधत्
ऋणयात्
एति
एनत्
एयाताम्
ऐप्सन्
ऐरयेथाम्
क्षरंति
गच्छ
गनीगन्ति
गन्म

गमन्तु
चारीत्
चिकिद्धि
चिकीषते
चीयते
चृतेत
चेतति
चेति
चेष्यसे
चोदय
च्यवते
च्यव्ध्वम्
च्यावयति
ततन्थ
तन्मसि
तरेम
तर्पयत
तस्थौ
दुद्रवत्
दोद्राव
द्रव
धनायति
धन्वति
धय
धावति
धूनुते
धुवेत्
धूः
धूर्व
ध्रजतः
ध्वरति
नथ
निचेरुः
निपत्स्यते
निरवासाययत्
निरुहेत्
नीनिम
नुद
नेदन्ति
नेनीयते
पत
पचते
परिव्ययति
पर्यवयति
पर्यविशन्
पर्याचिकीर्षन्
पवति
पादयति
पूयति
पूरय
पृण
पेपिशाने

प्यायताम्
प्रचरंति
प्रजायते
प्रणिनाथ
प्रतनोषि
प्रयन्ति
प्रथस्व
प्रमीयते
प्रयाति
प्रयुङ्क्ते
प्रयोक्तासे
प्रयौति
प्रवते
प्रवल्गति
प्रवर्तयेयुः
प्रवसेत्
प्रविशेः
प्रवीयन्ते
प्रयुञ्ज्यात्
प्रवृणते
प्रवेपेरन्
प्रसर्पति
प्रस्कन्देत्
प्रहरति
प्रुष्णते
प्रेतिवान्ति
प्रेप्सन्तः
प्रेरते
प्रोथ
प्रोषिष्यते
प्लवन्ते
प्लावयति
भाजयत
भावयति
भुवत्
भूत्
मर्जयन्त
मुञ्च
मुमुग्धि
यज
याचति
याहि
युयवन्
युयात्
युवसे
येमिरे
योषत्
यौमि
राधयेत्
रेरिहत्
रेवत्
लिशते

वाति
वापयति
वायति
वाव
वावनत्
वासयतम्
वाहि
विकरोति
वितत्निरे
वितेनिरे
विधीयते
विपतति
वीति
व्ययति
व्यवसाययति
व्यस्यन्
व्यानयति
शिङ्क्ते
शुम्भस्व
शेरे
श्चोतान्ति
श्याम
संयन्ति
संयौति
संस्थापयति
सक्षीमहि
सङ्गथे
सचेय
सञ्चरे
सञ्जनयान्ति
सदेम
सन्तरति
सन्तवीत्वत्
समकृण्वन्
समभवत्
समाश्लेषयेत्
समिन्धते
समियुः
समृच्छते
समैरयेताम्
सम्पादयेत्
सम्मीलते
सर्पति
सावते
साध
सारयावहै
साविषत्
सासह्याम
सीषधाति
सुलमि(प्रवेशयामि)
सेदिम

स्थाः
स्तुवान्ति

संसयति
स्यत्

स्रवान्ति
हिणोति

[ अथर्ववेद ]

अक्रमत
अखनत्
अगत
अचिक्रदत्
अचीचरत्
अजत्
अजीगमत्
अजीहिडत्
अंजन्तु
अतारीत्
अतिक्रामन्ति
अतिर
अतिसर्पति
अतिसृजेत्
अतीतर
अतृणत्
अलत
अत्यायन्ति
अधिक्षियन्ति
अधूनुथाः
अनयीत्
अनागमिष्यतः
अनुकिरामि
अनुक्षरन्ति
अनुतन्वान्ति
अनुधावति
अनुनक्षन्ति
अनुपरियन्ति
अनुप्रेयतुः
अनुवपते
अनुव्यवर्तयन्त
अनुसंरभेयाम्
अनुसंक्राम
अनुसंदिशामि
अन्ति
अन्ववरत्
अन्वर्तिता
अन्वातत्तान
अन्वारभेथाम्
अन्वारोहामि
अन्वावर्ते
अभिधावामि
अभिपर्यावर्तन्ते
अमुच्याः
अलजेः
असरन्
असाविषुः
अहरत्

आरत
आरुरुहुः
आवातु
आहरन्ति
ईजिरे
ईलय
उद्धरन्
उद्वेपयति
उपप्रतारय
उपप्रयन्ति
उपर्षन्ति
उपसंयन्तु
उपाय.सि
ऊदुः
ऊवुः
ऋञ्जते
ऋतयन्त
ऋदन्तु
एजथुः
एषि
एत्
ऐरत
करः
क्रमताम्
क्षरत्
गिर्वाहसे
गुः
चकर्तिथ
चकर्श
चर
चातयामहे
चेततु
चेष्टतः
चोदामि
च्यवयति
जजार
जहीत
तन्यतुः
तन्वते
तिर
तुञ्जते
तुदतु
तूर्य
त्सरति
दुरस्यतः
द्रवतु
निचल्नुः

निजूर्वन्
नुद
धूनोति
पयते
पादय
पिप्पति
पुरुषन्ते
प्रतिनुदन्
प्रहाम्
प्लवस्व
प्सातु
मुञ्च
मुमुक्तम्
मुमुचः
युवसे
यूयाः
रिहन्ति
रीयते
रुह
लयन्ताम्
लीयते
वर्तताम्
वव्रमहे
वहसे
वाजयामसि
वान्तु
विधते
विधूपायत
विनुदायति
विवेश
विव्यचत्
विश्रयाति
विहरति
वीयन्ते
वृंजन्तु
वेति
वेपते
व्यचन्ति
व्यवर्तयत्
शीर्यन्ते
संचरन्ति
सन्नयति
समाहर
समीरिरे
सस्तुषीः
सिञ्च
सृपः

स्रवान्ति
हर्यतस्थ
हर्यनं

## गतिवाचक विशेषणें [ ऋग्वेद ]

अग्रेग
अचोदस्
अजिर
अजुर्य
अज्यमान
अंजान
अतमान
अतसाय्या
अतिक्रम
अतिनेनीयमान
अतिव्रजत्
अतिस्कद
अधिनीयमान
अनिमान
अनिविशमान
अनिवृत
अनुपाक्षित
अनुयत
अनुवेनत्
अनूच
अनूती
अपाजन्
अपरीत
अपरिनिष्ट
अपरिहूत
अपसेधन्
अपियत्
अपिवातयन्
अपिवृत
अप्रमृष्य
अप्रयुत्वन्
अभिवीत
अभिव्रजत्
अभिश्वस्
अभिसात
अभिसृष्ट
अभिस्वर
अभिहुत्
अयमान
अयामन्
अयास
अर्षन्
अवक्रामत्
अवाक्षिपत्
अवधून्वन्
अवपतन्ती
अवयति
अवयातृ
अवरुद्ध
अवरोहन्
अवव्ययन्
अवसातृ
अवसृष्ट
अवस्रस्
अविचाचलि
अविद्रिया
अविष्ट
अविहुत
अवीत
अह्रण
अह्रणीयमान
आकृति
आगत
आचक्राण
आचरन्ती
आततन्वन्
आधीत
आनह्यमान
आनीत
आय
आयोयुवन्
आरण
आलब्ध
आवर्तन
आवर्वृतती
आशु
आशुहेमन्
आसिंचंती
इत्था
इनक्षत
इन्वन्
इयान
इरज्यंतृ
इरज्यु
इरस्यु
इषिर
इष्कर्तृ
इष्कृत
इष्मिन्
ईंखित
ईजान
ईयमान
ईयिवांस
ईयुषि
ईरयत्
ईरयंती
ईर्मान्त
उच्चरत
उज्जिहान
उत्तभित
उत्तिष्ठत
उत्थित
उत्पतत्
उत्सिसृप्सत
उदंच
उदवत्
उदीति
उदीरयन्ती
उदीराण्
उदीषिज
उद्यत
उद्भरत्
उद्वित
उन्नीत
उन्नीयमान
उपक्षित
उपक्षियत्
उपजग्मुष्
उपतिष्ठमान
उपनिपद्यमान
उपनीत
उपप्रक्ष
उपप्रयत्
उपप्लुत
उरुव्रज
उह्यमान
ऋज्यत
ऋज्वंच्
ऋंजती
ऋष्वन्
ऋन्धन्
एत
एतु
एतृ
एमुषी
एव
एवयावरी ( अश्वगंतृ )
ओहसनि ( अभिगच्छन् )
कद्रीची ( कगच्छंति )
क्रक्षमाण
क्षयन्ती
क्षरत्
क्षियत्
क्षेष्यत्
गच्छत्
गाहमान
गु ( गंता )
ग्मंत
ग्रथित
चतत्
चयमान
चरण
चरणीयमान
चरत
चरितु
चरिष्णु
चर्चूर्यमाण
चलाचल
चित
चितयत्
चितान
चिन्वती
चेकितान
चेतन्ती
चेत्तृ
चेत्थ
चेरु
चोद
चोदयन्ती
चोदित
च्यवान ( गच्छन् )
जगन्वत्
जगुरि
जगृभ्वन्
जग्मि
जग्मुष
जनत्
जनन्ती
जविनी
जह्राण ( प्रवृद्ध )
जिग्युष्
जूजुवान ( गच्छत् )
जूत
जूर्य
जूर्यन्ती
जोगुवान ( स्तुवन् )
तक्त
ततन्वन्
तन्वत्
तन्वान
तर्तुराण ( त्वरमाण )
तुंजान
तुरा
तूर्वत्
त्वायत्
द्रवत्
द्रवर ( वेगवान् )
दासत्
धनुत्री ( गमनयुक्त )
धमत्
धवीयत
धावत्
धावमान
धावयत्
धूत
धूर्वत्
ध्रजत् ( गच्छत् )
ध्रजीमत् ( शीघ्रगतियुक्त )
नक्षत्
नयत्
नयन्ती
नयमान
निक्रमण
निगुत
निपात
निमृजत्
नियथिन्
निवहत्
निष्पतन्ती
नीत
न्यृष्ट
पचन
पतन
पतन्ती
पतयिष्णु
पतर
पतरु
पत्मन् ( इतस्ततः उत्पतत् )
पत्यमान
प्रतिवस्
परायत्
परायती
पर्युह्यमान
परिवृज्
पिन्वमान
पृथुग्मन्
प्रचक्राण
प्रजव
प्रतूर्ति
प्रतूर्वत्
प्रत्यंच
प्रयता
प्रवत्
प्रवहत्
प्रसर्स्राण
प्रस्फुरत
प्रेतृ
मितद्रु ( मितगमन )
मृगयस्
यत
यतमान
यती
यात
यातयमान
याती
यातृ
यात्
यादमान ( आगच्छन् )
योपयत् ( परिवर्जयत् )
रंहमाण
रंहि
रंह्या
रघुयत्
रघुया
रभस्
रभसान
रभस्वत्
रभिष्ठ
रभ्यस्
ररहाण
ररिवान्
+रित ( गंत्री )
रुह
रुहाण
रेजमान ( कंपमान )
वयत्
वयिष्यत
वरेयु
वहिष्ठ
वाहिष्ठ
विचरन्ती ( अहोरात्रि )

---

+ येथें सायणांनीं ' परितः ' असा अर्थ घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| विजावन् | संचरण्ये | सिध्र |
| विधावत् | संचृत | ×सिषत् |
| विनुद | संजग्मान | सुग |
| विपत्मन् ( विविध- | संजग्माना | सुजात |
| गमन ) | सत्राची | सुप्रयंस् |
| विप्रयत् | संयोपयत | सुप्रयावन् |
| विभृत ( धृत ) | संवर्तयत् | सुप्राव्य |
| विसर्मन् ( विसरण | संस्तिर | सुप्रायण |
| शील ) | संस्रवस् | सुप्रैतृ |
| विसृजत् | सभरस् | सुवृत्त |
| विसृत | सयावरी | सृजान |
| विसृष्ट | सरतु | सृज |
| विस्फुरन्ती | सरण्यत | स्कन्न |
| विस्यत् ( क्षिपत् ) | सरिष्यतु | स्तरी |
| विह्रुत | सरीमन् | स्पन्दन |
| वृणान | सरीसृप | स्वंच |
| व्यति | ससृजान | स्वयावन् |
| व्युच्छन्ती | ससृमाण | स्वयु |
| व्रजन्ती | ससृवस् | स्वसृत् |
| श्वसतु | सस्थावान् | हयत् |
| संगृभीत | सस्रा | हर्यत |
| सचमान | सादयत् | हर्यमाण |
| संचरन्ती | साधमत् | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंह्रूरण | आह्रुत | क्रियमाण |
| अनाधृष् | ईर्मन् | कुंडृणाची ( कुटिल- |
| अनास्राव | उच्चरत् | गति ) |
| अनिमान | उज्जिहान | गव्यन् |
| अनुजिघ्र | उत्तिरन् | गाहमान |
| अनुप्रयाण | उत्पतत् | गोगति |
| अपक्रांत | उत्पतिष्यन् | जात |
| अभिजंजभान | उत्पिपान | तरस्विन् |
| अभिदुन्वन् | उत्सित | तवस्तर |
| अभिश्रुत् | उदीराण | तवीयत् |
| अभिष्ठित | उद्धित | तीर्यती |
| अस्यन् | उद्यत | त्वाद्रिक् |
| अस्रवंती | उद्यमान | त्वायत् |
| अह्णीयमान | उद्वीत | त्वोत |
| आकिरन्ती | उद्वेपमान | त्सरन् |
| आक्रमण | उन्नयन्ती | दद्राण |
| आक्रंस्यमान | उन्मृजान | दुस्तरा |
| आपतत् | उपनयमान | दुहाना |
| आयता | उपपृंचती | दुह्यमाना |
| आयन् | उपस्तरण | दृंहत् |
| आरूढ | उपायत | दृंहस्थिर |
| आवर्ततत् | उपावृत | द्रुत |
| आवेशयत् | उपाहृत | धावत् |
| आसुपत्व | उह्यमान | धावन्ती |
| आशुमत् | एत्सेमान | धूत |
| आश्रावयत् | एह | धृषाण |
| आस्यन्दमान | कर्तृ | धृषित |

× येथें सायणांनीं ' शिषसत् ' असा शब्द स्वीकारला आहे.

| | | |
|---|---|---|
| निक्रमण | प्रहरत् | वितर |
| निरूहन् | प्रहित | व्यसर्प |
| निर्यांचन् | प्रहृत | व्यस्यन् |
| निसेचन | प्रेषित | व्यावृत्त |
| नीत | प्रोढ | श्नपयन् |
| नोदन | भेजान | संयुत |
| परस्फान | येमान | संकर्षन्ती |
| परायत | येषत् | संगत |
| परियत् | योपयत् | संचरत् |
| परावत् | रघुपत्व | सत् |
| परिवर्तमान | रभस्वत् | संतन्वती |
| परिवृत् | रभोद | संदेश्य |
| प्रक्रामत् | रिहाण | समेत |
| प्रचोदयंतृ | वन्वान | संप्रयती |
| प्रतन्वती | वर्षत् | सरीसृप |
| प्रतरीता | विक्रुत् | सुवान |
| प्रतिरत् | विकृत्यमाना | सृप्र |
| प्रत्यक् | विक्रम | स्यन्दमान |
| प्रयत् | विक्रमण | स्रुत |
| प्रयस्तृ | विक्रान्ता | हरत् |
| प्रयस्यन्ती | विक्रेदायसी | हर्यमाण |
| प्रव | विगत | हार्य |
| प्रवत | विचक्रमाण | ह्रुत |
| प्रसर्स्राण | विचित्त | |

## त्वरावाचक [ ऋग्वेद ].

| | | |
|---|---|---|
| अजिर | तुज्यमान | भुरण्यु |
| अज्र | तूतुजान | मक्षुंगम ( शीघ्र- |
| अंजसा | तूतुजि | गामी ) |
| आशु | तूतुमन् | वातरंहस् |
| उरुज्रय | तूय | शीभ |
| ओष | तूर्णि | शु |
| क्षिप्र | तृपल | शूघन |
| जूर | तृषु | शूर्त |
| जूर्णि | द्युगत् | श्वात्र |
| तराणि | द्रवत् | श्रुष्टि |
| ताजत् | नु (अव्यय) | श्रौष्टि ( शीघ्रगति ) |
| तुज | प्राशु | सर्ग |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंज | ध्राज्या | वातरंहस् |
| उद्युग | प्रत्यभिचरण | वेग |
| अव | रंहयः | शीभः |
| ध्राजि | | |

गतिवाचक शब्दांमध्यें आपणांस गतीचे अनेक प्रकार निरनिराळ्या पृथक् शब्दांनीं व्यक्त केलेले दिसतात. सामान्यतः जाणें, येणें, बसणें, उठणें, वर जाणें, खालीं जाणें वगैरे क्रिया दाखविण्यास अनेक शब्द आहेतच पण शीघ्रगति, कुटिलगति, मंदगति, वगैरे गतीचे प्रकारवाचक व वाढणें, वाटोळे फिरणें, सरपटत चालणें, स्पन्दन पावणें, मनोवेगानें जाणें, व जोरानें जाणें वगैरे अनेक प्रकारच्या गती आपणांस निरनिराळ्या शब्दांनीं व्यक्त केलेल्या आढळतात. यावरून वैदिक समाजांतहि विविध

क्रिया चालू होत्या याचे ते शब्द बोधक आहेत. विशिष्ट गतिवाचक शब्द घेऊन त्यास उपसर्ग लावून अनेक क्रिया व्यक्त करण्यास भाषेस समर्थ करण्याची युक्ति वेदपूर्वकालीन-निदान वेदकालीन-लोकांस परिचित असावी. केवल गमनार्थी शब्द देखील पुष्कळ दिसतात. गम, या, इ, चर्, तक्, इष्, क्रम्, व्रज, क्षर्, सर्, स्वर, ऋच्छ्, ऋ, चत् इत्यादि. वैदिक कालापासून अर्वाचीन कालाकडे दृष्टी फेंकली असतां असें दिसतें कीं भाषेमध्यें एका क्रियेस अनेक शब्द न ठेवतां एकच शब्द ठेवावा असा संस्कार होत आहे. सामान्य गतिवाचक शब्द अनेक असतील. त्यांपैकीं कांहीं विशिष्ट गतीचे बोधक होतात आणि कांहीं अनुपयोगामुळें नष्ट होत जातात. शिवाय एकाच शब्दास उपसर्ग लावून अनेक अर्थ उत्पन्न करण्याची प्रवृत्ति वाढतांना दिसते.

## ग्रहनक्षत्रादि.

### ग्रह व नक्षत्रनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1]अघा ( मघा ) | चंद्रमस् | [6]विधु |
| [2]अर्जुनी ( फल्गुनी ) | [3]तिष्य ( पुष्य ) | शुक्र |
| अश्वयुज् | [4]नक्षत्र | श्वन् |
| अश्विनी | पुनर्वसु | [7]सूर्य |
| ऋक्ष | रोहिणी | सप्तर्षि |
| गो | [5]वने | स्तृ |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अनूराधा | चुपुणीका | रेवती |
| अपभरणी | तिष्य ( पुष्य ) | रोहिणी ( ज्येष्ठा ) |
| अभ्रयन्ती | दुला ( कृत्तिका ) | वर्षयन्ती |
| अम्बा ( कृत्तिकेपैकीं तारा ) | नक्षत्र | विचृत् ( मूळ ) |
| | नितत्नि ( कृत्तिका ) | विशाखा |
| अश्वयुज् | पुनर्वसू | शतभिषज् ( शततारका ) |
| अषाढा (उत्तराषाढा) | प्रोष्ठपदा ( उत्तराभाद्रपदा ) | श्रविष्ठा ( धनिष्ठा ) |
| आदित्य | | |
| आर्द्रा | फल्गुनी | श्रोणा ( श्रवण ) |
| आश्रेषा | मघा | सप्तर्षि ( तारे ) |
| कृत्तिका | मृगशीर्ष | स्वाति |
| चित्रा | मेघयन्ती | हस्त |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अनुराधा | कृत्तिका | पुष्य |
| अनुसूर्य | चंड ( ग्रह ) | पूर्वाफल्गुनी |
| अभिजित् | [10]चंद्र | पूर्वाषाढा |
| अश्वयुज् | चित्रा | प्राहादि |
| आर्द्रा | ज्येष्ठघ्नी | प्रोष्ठपदा |
| आश्लेषा | ज्येष्ठा | भरणी |
| इन्द्रर्षभ | ज्योतिरग्र | भानु |
| उत्तरा | तारका | मघा |
| उल्कुषीमान ( धूमकेतु ) | [11]दिव्यशुन | मूळ |
| | धिषण ( ग्रह ) | मृगशिरस् |
| [8]ऋक्षीका | [12]धूमकेतु | रेवती |
| ऋक्ष | नक्षत्र | रोहिणी |
| [9]कालकंज | नक्षत्रज | विचृत् |
| विधु | शुक्र | सुनक्षत्र |
| विशाखा | श्रवण | स्वाति |
| शकधूम | धनिष्ठा | हस्त |
| शतभिषज् | [13]सप्तसूर्या | |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| अरुंधती | [17]ग्रह | [19]ध्रुव |
| [14]अर्यम्णः पन्था | [18]देवनक्षत्र | [20]मृग |
| [15]इषुत्रिकांडा | धनिष्ठा | [21]सूर्यनक्षत्र |
| [16]केतु ( धूमकेतु ) | | |

### ज्योतिषविषयक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अहर्विद | ध्रुव | पितृयान |
| त्रिचक्र | नवग्व | षळर |
| दशग्व | नानारथ | सप्तचक्र |
| द्वादशाकृति ( बारा महिने ) | पंचपाद | सप्तरश्मि |
| | पंचार ( संवत्सर ) | सप्ताश्व |
| द्वादशार | पर्व ( पक्ष ) | सप्ति |

[1]अघा.- ऋग्वेदांत पाणिग्रहणासंबंधीं जें सूक्त आहे त्यांत असें वर्णिलें आहे कीं अघामध्यें गाईंचा वध केला जातो व लग्न अर्जुनीमध्यें होतें. अथर्ववेदांत अघाबद्दल मघा हा शब्द उपयोगांत आणिला आहे. ऋग्वेदांतील मूळ शब्द मघा हाच असावा व तो मुद्दाम बदलून अघा केला असावा असें तर नसेलना ? वध करण्यास अयोग्य ( अघ्न्या ) ज्यांना म्हणतात अशा गाईंचा वध हा विरोध आणि या वधाचा व पाप ( अघ ) यांचा संबंध स्पष्ट करण्याचा वरील पाठभेदाचा उद्देश असावा.

[2]अर्जुनी.—ऋग्वेदाप्रमाणें हें एका नक्षत्राचें नांव आहे. अथर्ववेदांत याला फल्गुनी असें म्हटलं आहे. ज्याप्रमाणें मघा शब्दाबद्दल अघा शब्द लिहिला आहे त्याप्रमाणेंच या शब्दांत मुद्दाम फरक झाला असावा. हा शब्द पाणिग्रहण करण्याप्रीत्यर्थ जीं सूक्तें आहेत त्यांत अघा शब्दाबरोबर आला आहे.

[3]तिष्य.—हा शब्द ऋग्वेदांत एका ताऱ्याचें नांव या अर्थानें दोनदां आला आहे. सायणाचार्यांच्या मतें याचा अर्थ सूर्य असा आहे. हा निःसंशय अवेस्ता ग्रंथांतल्या तिश्त्र्य या शब्दाशीं समानार्थी आहे. पुढें पुढें याला पुष्य नक्षत्र म्हणूं लागले.

[4]नक्षत्र.–या शब्दाचें मूळ काय व तो कसा बनत गेला याबद्दल खात्रीलायक माहिती उपलब्ध नाहीं. प्राचीन पंडितांत याच्या मूळ अर्थाबद्दल बराच मतभेद आहे. शतपथ ब्राह्मणांत या शब्दाचे न व क्षत्र असे दोन भाग पाडून त्याचा अर्थ एका गोष्टीनें स्पष्ट केला आहे. निरुक्त व तैत्तिरीय ब्राह्मण या ग्रंथांत हा शब्द नक्ष् म्हणजे मिळविणें या धातूपासून बनला आहे असें प्रतिपादन केलें आहे. ऑफ्रेक्ट वगैरेंच्या मतें हा शब्द नक्त–त्र ( रात्रीचा रक्षणकर्ता ) या शब्दापासून बनलेला आहे. अलीकडील कांहीं पंडितांच्या मतानें नक्–क्षत्र ( रात्रीवर राज्य करणारा ) हेंच या नक्षत्र शब्दाचें मूळ असावें. या शब्दाचा सामान्य अर्थ तारा असा दिसतो.

**ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ यांमध्यें 'तारे' अशा अर्थानें आलेलीं नक्षत्रें.**–ऋग्वेदांत ज्या ठिकाणीं नक्षत्र हा शब्द आला आहे त्या ठिकाणीं तारा हा अर्थ नव्याणव हिश्शानीं जमतो. मागाहून झालेल्या संहिता ग्रंथांत हाच अर्थ घ्यावा लागतो. सूर्य व नक्षत्रें यांचा कधीं कधीं एकत्र उल्लेख आलेला आहे. कधीं सूर्य, चंद्र व नक्षत्रें, कधीं चंद्र व नक्षत्रें आणि कधीं नुसतीं नक्षत्रें असे उल्लेख आले आहेत. पण या सर्व ठिकाणीं नक्षत्र याचा अर्थ चंद्रमार्गस्थ सत्तावीस नक्षत्रांपैकीं एक असा घेण्याची बिलकुल अवश्यकता नाहीं असें मॅकडोनेल म्हणतो. उलटपक्षीं मागाहून जो नक्षत्र याचा अर्थ आलेला आहे तो ऋग्वेदामध्यें तीन नक्षत्रांनां लागू पडतो. तथापि तिष्य याचा उल्लेख नक्षत्रपुंज या अर्थानें आलेला नाहीं. अघाः ( अनेक वचनी ) व अर्जुनी ( द्विवचनी ) यांच्या संबंधानें गोष्ट निराळी आहे. ज्यांना पुढें मघाः व फल्गुनी अशा संज्ञा मिळाल्या तेच हे पुंज असावेत असें वाटतें. हीं नावें ऋग्वेदांत मुद्दाम बदललेलीं आहेत. ज्या सूक्तांत हीं नांवें आलीं आहेत व ज्यांत सूर्याच्या लग्नाचें वर्णन आलेलें आहे तें सूक्त असलेलें दहावें मंडल फार जुनें नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. लुडविग व झिमर यांच्या मतें ऋग्वेदांत सत्तावीस नक्षत्रें आहेत अशाबद्दल उल्लेख आलेले आहेत. पण ही गोष्ट अगदीं अशक्य आहे. दुसऱ्या एका सूक्तांत रेवती व पुनर्वसू ( श्रीमंत व पुनः संपत्ति आणून देणारी ) अशीं जीं विशेषणें आलीं आहेत यांचा संबंधहि नक्षत्रांशीं दिसत नाहीं.

**नक्षत्रें ( पुंजार्थी–ग्रहरूप तारकापुंज या अर्थी ) सत्तावीस.**–मागाहून झालेल्या संहिताग्रंथांत नक्षत्र व चंद्र यांचा संबंध लग्नाच्या संबंधाप्रमाणें मानला आहे. उदाहरणार्थ तैत्तिरीय व कठ संहितेंत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं सोमाचें लग्न प्रजापतीच्या दुहितांबरोबर झालें पण तो फक्त रोहिणीबरोबरच रहात असे. पुढें इतर नक्षत्रपुंज रागावल्यामुळें त्याला सर्वांबरोबर सारखें राहावें लागलें. वेबरनें यावरून असें अनुमान काढलें आहे कीं नक्षत्रें हीं सारख्याच विस्ताराचीं आहेत. परंतु अशा रीतीनें संहिता ग्रंथांचा अर्थ करणें मॅकडोनेल मान्य न करितां एवढेंच म्हणतो कीं हीं नक्षत्रें जवळ जवळ सारखीं आहेत. दोनहि संहितांमध्यें आलेल्या गोष्टींत नक्षत्रें सत्तावीसच होतीं असें म्हटलेलें नाहीं. तैत्तिरीय संहितेंत तेहेतीस ही संख्या आहे, व कठ संहितेंत मुळीं संख्याच दिलेली नाहीं. पण तैत्तिरीय संहिता व इतर ग्रंथ यांत जी यादी आलेली आहे तीवरून नक्षत्रांची संख्या सत्तावीस असावी असें वाटतें. नक्षत्रांची संख्या अठ्ठावीस होती असें फार थोड्या ठिकाणीं म्हटलें आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत अभिजित् हें नवीनच आलेलें आहे. तरी पण मागाहून झालेल्या ग्रंथांत (मैत्रायणी संहितेंत व अथर्ववेदाच्या यादींत ) या अभिजिताचा स्वीकार केलेला आहे. कदाचित् असेंहि असण्याचा संभव आहे कीं पहिली नक्षत्रांची संख्या अठ्ठावीस असावी. पण अभिजित हें फार अंधुक असल्यामुळें म्हणा किंवा तें फार उत्तरेस असल्यामुळें म्हणा गळलें गेलें अथवा सत्तावीस ही संख्या ( ३ × ३ × ३ ) जादूच्या गूढ संख्येपैकीं असावी. चीन व आरबी लोकांत नक्षत्रांची संख्या अठ्ठावीस आहे पण वेबर असें म्हणतो कीं हिंदुस्थानांत नक्षत्रांची २७ ही मानलेली संख्या प्राचीनतर असावी. या सत्तावीस संख्येचा अर्थ आपण जर एक गोष्ट लक्षांत ठेवली तर आपणास ताबडतोब समजेल. ती ही कीं नियतकालिक ( ग्रहांच्या प्रदक्षिणाविषयक ) महिना हा सत्तावीस किंवा अठ्ठावीस दिवसांचा, बहुतकरून सत्तावीस दिवसांचा असतो. हा सत्तावीस दिवसांचा महिना लाट्यायन व निदान या सूत्रांना मान्य आहे व त्या सूत्रांच्या मतें एका वर्षाचे दिवस १२ × २७ म्हणजे ३२४ होतात व एक अधिक मास धरिला तर ३५१ होतात. निदान सूत्रांत ३६० दिवसांचें सौर ( सावन ) किंवा व्यावहारिक वर्ष यामध्यें नक्षत्र गणना सुरू करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण त्या सूत्राच्या मतें सूर्य प्रत्येक नक्षत्रांत $१३\frac{१}{३}$ ( $१३\frac{१}{३}$ × २७ ) दिवस असतो. पण वैदिक कालगणनेंत २७ किंवा २८ या संख्येस बिलकूल महत्त्व नाहीं.

**नक्षत्रांचीं नांवें.**–ऋग्वेदांत आलेल्या दोन नांवाखेरीज अथर्व- अथर्ववेदामध्यें अगोदरच्या ज्येष्ठघ्नी ( मागाहून ज्याला जेष्ठा हें नांव पडलें ) व विचृतौ ( ज्यांचा निकट संबंध आहे असें म्हटलें आहे ), त्याच प्रमाणें रेवती ( अनेक वचनी ) व कृत्तिका यांचीं नांवें आलीं आहेत. ' अग्न्याधान ' या समारंभाला योग्य काल अशा संबंधानें काठकसंहिता, मैत्रायणी संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यांमध्यें कृत्तिका, रोहिणी, फल्गुनी, हस्त हीं नांवें आलीं आहेत. तैत्तिरीय ब्राह्मणांत पुनर्वसू हें नवीन नांव आलेलें आहे व अधिक खुलाशांत पूर्वाफल्गुनी वगळून त्याच्या बद्दल उत्तराफल्गुनीचा उल्लेख केलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत मृगशीर्ष व चित्रा यांचा उल्लेख आला आहे. उलटपक्षीं पुनराधानाला अनुकूल म्हणून पुनर्वसू नक्षत्र सर्व ग्रंथांनाच मान्य आहे. हें अग्नीचें पुनराधान पहिल्या अग्नीच्या योगानें यज्ञ करणाऱ्याचा मुख्य उद्देश ( त्याची भरभराट) ज्या वेळीं साध्य होत नाहीं अशा वेळीं करावयाचें असतें. काठकसंहितेच्या मतें अनूराधा हेंहि नक्षत्र पुनराधानास योग्य आहे. अग्निचयन समारंभाच्या वेळीं ज्या विटा मांडावयाच्या असतात त्यांत नक्षत्रांइतक्याहि कांहीं असतात. या विटांची संख्या ७५६ असते व ही संख्या २७ मुख्य नक्षत्रें व २७ गौण नक्षत्रें यांच्या गुणाकारा इतकी ( हा गुणाकार ७२९ असा न समजतां ७२० समजावयाचा ) समजावयाची व या ७२० संख्येंत अधिक महिन्याचे ३६ दिवस मिळवावयाचे म्हणजे एकंदर संख्या ७५६ होते. हें जें विटांचें संख्यावर्णन ( शतपथ १०.५,४,५ ) आलेलें आहे त्यावरून निश्चित अशी कांहींच माहिती मिळत नाहीं. पण या समारंभासंबंधानें यजुर्वेद संहितांमध्यें २७ नक्षत्रें आलेलीं आहेत व त्यांच्या याद्या सविस्तर खालीं दिल्या प्रमाणें आहेत.

तै. सं.

| | | |
|---|---|---|
| कृत्तिका ( स्त्री. अने. व. ) | रोहिणी | आर्द्रा. |
| | मृगशीर्ष ( नपुंसक). | पुनर्वसू ( द्विव. ) |

| | | |
|---|---|---|
| तिष्य. | चित्रा | शतभिषज् |
| आश्रेषा ( स्त्री. बहु- | स्वाती | प्रोष्ठपदाः ( पु. |
| व. ) | विशाखे ( स्त्री. द्वि.) | अने. ) |
| मघाः ( स्त्री. बहु- | अनूराधाः | प्रोष्ठपदाः ( पु. |
| व. ) | रोहिणी | अने. ) |
| फल्गुनी ( स्त्री.द्विव. ) | विचृतौ | रेवती |
| फल्गुनी ( स्त्री. | अषाढाः (स्त्री. बहु. ) | अश्वयुजौ ( द्विव. ) |
| द्विव. ) | श्रोणा | अपभरणीः (स्त्री. |
| हस्त | श्रविष्ठाः ( अने. व. ) | बहु. ) |

मै. सं.

| | | |
|---|---|---|
| कृत्तिकाः | फल्गुनीः (बहु व. ) | अभिजित् |
| रोहिणी | हस्त | श्रोणा |
| इन्वगा | चित्रा | श्रविष्ठाः |
| बाहु | निष्टय ( नपुं. ) | शतभिषज् |
| पुनर्वसु ( एकव. ) | विशाख ( नपुं. | प्रोष्टपदाः |
| तिष्य | एकव. ) | प्रोष्टपदाः |
| आश्लेषा ( बहुव. ) | अनूराधा | रेवती |
| मघाः | ज्येष्ठा | |
| फल्गुनीः ( अने. | मूलाः ( नपुं. ) | अश्वयुजौ |
| व. ) | अषाढाः | भरणीः |

का. सं.

| | | |
|---|---|---|
| कृत्तिकाः | फल्गुनीः ( उत्तरा ) | अषाढाः |
| रोहिणी | हस्तौ ( द्विव. ) | अश्वत्थ |
| इन्वका | चित्रा | श्रविष्ठाः |
| बाहु | निष्ट्या | शताभिषज् |
| पुनर्वसु | विशाखा | प्रोष्ठपदाः |
| तिष्य | अनूराधाः ( पु. | उत्तरेप्रोष्ठपदाः |
| आश्लेषाः | अने. ) | रेवती |
| मघाः | ज्येष्ठा | अश्वयुजौ |
| फल्गुनीः | मूल | अपभरणीः |

तैत्तिरीय ब्राह्मणांत जी नक्षत्रांची यादी आली आहे ती संहिता ग्रंथांत आलेल्या यादीशीं सामान्यतः जुळते. ती यादी अशी.-कृत्तिकाः रोहिणी,इन्वकाः,बाहू(द्वि.) तिष्य,आश्लेषाः,मघाः,पूर्वेफल्गुनी, उत्तरेफल्गुनी,हस्त,चित्रा,निष्ट्या, विशाखे, अनूराधाः, रोहिणी, मूलबर्हणी, पूर्वा अषाढाः,उत्तरा अषाढाः श्रोणा, श्रविष्ठाः,शतभिषज् पूर्वेप्रोष्ठपदाः, उत्तरेप्रोष्ठपदाः, रेवती, अश्वयुजौ, अपभरणीः इ. मागाहून झालेल्या ग्रंथांतील या यादींत २८ संख्या आलेली आहे व १४ संख्येनंतर पूर्णिमाहि आलेली आहे व सौरमासाशीं (३०दिवसांच्या)चांद्र (नक्षत्र) मासाचें साम्य आणण्याकरितां २८ संख्येनंतर अमावास्याहि घातलेली आहे. या मागाहून दिलेल्या यादींतील नांवें संहिताग्रंथांत दिलेल्या यादींतील नांवांशीं पुढें दिलेले अपवाद खेरीजकरून जुळतात. कृत्तिका नक्षत्राचे सात तारे. त्यांचीं नांवें अंबा, दुला, नितत्नी, अभ्रयंती, मेघयंती, वर्षयंती व चुपुणीका अशीं आहेत. हीं नांवें तैत्तिरीय व काठक संहितांमध्यें सुद्धां आलेलीं आहेत. मृगशीर्ष व इन्वका यांचाहि उल्लेख आलेला आहे. नंतर आर्द्रा, पुनर्वसु, तिष्य, आश्रेषाः, मघाः, ( या शिवाय अनघाः, अगदाः व अरुंधतीः ) यांचाहि उल्लेख आलेला आहे. फल्गुन्यः ( पण इतरत्र फल्गुन्यौ ) हस्त, चित्रा, निष्ट्या, विशाखे, अनूराधाः, ज्येष्ठा, मूल, अषाढाः, अभिजित्, श्रोणा, श्रविष्ठाः, शतभिषज्, प्रोष्ठपदाः, प्रोष्ठपदाः, रेवती,अश्वयुजौ,भरण्यः अपभरणी सुद्धां. अभिजित् हें नांव ब्राह्मणग्रंथाच्या पूर्व भागांतहि आलेलें आहे पण तें कदाचित् प्रक्षिप्त असावें. वेबरचा असा मुद्दा आहे कीं यादींत अभिजित् हें नांव अनवश्यक आहे कारण ब्राह्मणग्रंथांत याचा उल्लेख २८ वें नक्षत्र म्हणून आलेला आहे. पण हा मुद्दा बराच लंगडा पडतो कारण मैत्रायणी संहितेंतील ( २. १३, २. ) यादींत अभिजित् धरून २८ नक्षत्रांचीं नांवें आलेलीं आहेत व अगदीं शेवटीं निराळें ब्राह्मण या नांवाचें एक नक्षत्र आलेलें आहे ( ही गोष्ट वेबर यास कदाचित् माहीत नसावी ). तैत्तिरीय ब्राह्मणांत (१. ५, २, ७) नक्षत्रांचे दोन गट केले आहेत. एक गट देवनक्षत्रांचा, त्यांत १ ल्या पासून १४ व्यापर्यंत नक्षत्रें आलेलीं आहेत. दुसऱ्या गटांत १५ व्यापासून २७ व्यापर्यंत नक्षत्रें आलेलीं आहेत व त्यांत अभिजित् नक्षत्र वगळलें आहे. या दुसऱ्या गटाचें नांव यमनक्षत्रें असें आहे. ही नक्षत्रांची विभागणी त्या ग्रंथांतील तिसऱ्या भागांत दिलेल्या विभागणीशीं जुळते. या ठिकाणीं पौर्णिमेचा व अमावास्येचा दिवस हे नक्षत्राबरोबर दिलेले आहेत. या ब्राह्मण ग्रंथांत पाहिल्या,पौर्णिमेच्या दिवसांना सदृश असलेल्या, नक्षत्रांना दक्षिण असें मानिलें आहे व अमावास्येच्या दिवसांना सदृश असलेल्या नक्षत्रांना उत्तर असें मानिलें आहे. पण अशा तऱ्हेच्या कल्पनेचा वस्तुस्थितीशीं कांहीं संबंध नाहीं. अथर्व वेदाच्यां १९ व्या कांडांत एक नक्षत्रांची यादी आलेली आहे. त्या यादींत अभिजिताचेंहि नांव आहे. यांत आलेलीं नांवें अशीं.- कृत्तिका, रोहिणी, मृगशिरस्, आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य, आश्लेषा, मघाः, पूर्वा फल्गुन्यौ, हस्त, चित्रा, स्वाति, ( पुल्लिंगी ) विशाखे, अनुराधा, ज्येष्ठा, मूला, पूर्वा अषाढाः, उत्तरा अषाढाः, अभिजित्, श्रवण, श्रविष्ठाः, शतभिषज्, द्वयाप्रोष्ठपदा, रेवती, अश्वयुजौ, भरण्यः.

नक्षत्रांचीं स्थानें.-हीं नक्षत्रें आकाशांत कोणकोणत्या स्थानीं स्थित आहेत याबद्दल वैदिक वाङ्मयांत निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. पण मागाहून झालेल्या ज्योतिष ग्रंथांत या नक्षत्रांच्या स्थानांचें बरोबर वर्णन आलेलें आहे व पूर्वीच्या ग्रंथांत जी माहिती आलेली आहे तिच्याशीं ही पुढील ग्रंथांत आलेली माहिती बरीच जुळते. तरीपण वेबरला याबद्दल बरीच शंका आहे. पुढें जी माहिती दिली आहे तिला सूर्यसिद्धांतावर दिलेल्या व्हिटनेच्या टीपांचा आधार आहे.

( १ ) कृत्तिका.- या नक्षत्रपुंजांत आलेल्या सात ताऱ्यांचीं नांवें यजुर्वेदांत आलेलीं आहेतच व त्या नांवांत अभ्रयंती ( ढग उत्पन्न करणारी ) मेघयंती ( मेघाच्छादित करणारी ) वर्षयंती (पाऊस पाडणारी) अशीं नांवें आलीं आहेत. कृत्तिका या शब्दाचा अर्थ कदाचित् जाळें ( कृत्-सूत काढणें या शब्दापासून ) असा असावा.

(२) रोहिणी.-याचा अर्थ तांबूस रंगाचें असा आहे. हें नक्षत्र कोणतें हें ओळखण्यास ऐतरेय ब्राह्मणांतील (३. ३३) प्रजापतीची

कथा उपयोगी पडते. या कथेंत असें वर्णन आलें आहे कीं प्रजापति कामासक्त होऊन आपल्या मुलीचा पाठलाग करूं लागला असतां मृगव्याधानें त्रिकांड बाणानें त्याला मारलें. प्रजापति म्हणजे निःसंशय मृगपुंज होय. मृगशिरः हें मृगपुंजाच्या डोक्यावर असलेल्या लहानशा पुंजास नांव दिलेलें आहे.

( ३ ) मृगशीर्ष किंवा मृगशिरस्.– यालाच इन्वका किंवा इन्वगा म्हटलें आहे. अथर्ववेदाच्या शांतिकल्पामध्यें यांना अंधका म्हटलें आहे व त्यांचें हें नांव पडण्याचें कारण त्या अंधुक दिसतात हें आहे.

( ४ ) आर्द्रा.–या शब्दाचा मूळ अर्थ ओला किंवा दमट असा आहे पण ज्याअर्थी शांखायन गृह्यसूत्रांत व नक्षत्रकल्पांत अनेकवचनी आर्द्राः असें नांव आलेलें आहे व तैत्तिरीय ब्राह्मणांत द्विवचनी बाहू असें नांव आलें आहे त्यावरून या नक्षत्रपुंजांत दोन किंवा दोहोंहून अधिक तारे असावेत असें दिसतें. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं या आर्द्रा नक्षत्राला सदृश असलेल्या चिनी सिऔ मध्यें सात तेजःपुंज तारे आहेत व हे तारे म्हणजे मृगपुंजाचे खांदे, मेखला व गुडघे होत.

( ५ ) पुनर्वसू ( जे पुनः संपत्ति देतात ते ).–या नांवावरून दोन ताऱ्यांचा बोध होतो. या नांवाचा निःसंशय अश्विनांच्या परोपकारी स्वभावाशीं संबंध आहे व यांचें त्यांच्याशीं साम्य आहे.

( ६ ) तिष्य किंवा पुष्य.– हा एक अंधुक गट आहे. हा शब्द एकवचनी वापरला आहे हें आश्चर्यकारक आहे. कारण प्रथमतः पुष्य या शब्दानें एका ताऱ्याचा बोध होत असावा असें म्हणावें तर या गटांत एकहि नक्षत्र स्पष्ट दिसणारें नाहीं.

( ७ ) आश्रेषाः किंवा आश्लेषा.– कांहीं ग्रंथांत हे शब्द आश्रेषा किंवा आश्लेषा असेहि आलेले आहेत. या शब्दांचा अर्थ आलिंगन देणारा असा आहे व हे शब्द तद्दर्शित तारकापुंजाला पूर्णपणें जुळतात.

( ८ ) मघा ( महादान ).– या शब्दाच्या बदलीं 'अनघा' पापरहित असाहि पर्याय शब्द आहे. या अनघा शब्दावरून या ताऱ्यांच्या पावित्र्याची कल्पना होते.

( ९. १० ) फल्गुनी फल्गुन्यौ, फल्गू, फल्गुनीः, फल्गुन्य.– हा नक्षत्रपुंज ताऱ्यांच्या दोन पुंजांचा बनलेला आहे व त्या पुंजांनां पूर्वे व उत्तरे अशीं नांवें आहेत. वेबरच्या मतें या शब्दाचा अर्थ ऋग्वेदांत आलेल्या अर्जुनी या ताऱ्याच्या पर्यायवाचक शब्दाप्रमाणें शुभ्रवर्ण तारकापुंज असा आहे.

( ११ ) हस्त.–हा हाताच्या पांच बोटांप्रमाणें पांच प्रमुख ताऱ्यांनीं बनलेला आहे. गेल्डनेरच्या मतें ऋग्वेदांत (१. १०५,१०) ज्या पांच बैलांचा उल्लेख आलेला आहे तो हा पांच तारे मिळून झालेला तारकागण होय.

( १२ ) चित्रा (चकचकीत).– हा तारा खरोखर सुंदर आहे. तैत्तिरिय ब्राह्मणांत इंद्राच्या कथेमध्यें याचा उल्लेख आला आहे व त्याचप्रमाणें शतपथ ब्राह्मणांत (२. १, २, १३) 'दिव्य श्वानौ' दोन स्वर्गीय कुत्रे यांच्या कथेंत आला आहे असें मॅकडोनेल म्हणतो. पण मूळांत 'दिव्यश्वानौ'चा उल्लेख नाहीं.

( १३ ) स्वाति किंवा निष्ट्या.– हें नक्षत्र उत्तरेस आहे अशाबद्दल शांतिकल्पांत उल्लेख आला आहे व त्यांत असें म्हटलें आहे कीं हें नेहमीं उत्तरेस जात असतें ( नित्यं उत्तर मार्गगम् ). तैत्तिरिय ब्राह्मणांत (१. ५, २ ) प्रजापतीवर एक कल्पना बसविली आहे. तींत चित्रा हें प्रजापतीचें डोकें, हस्त हा त्याचा हात, विशाखे या त्याच्या मांड्या, अनूराधा उभें राहण्याची जागा व निष्ट्या हें त्यांचें हृदय अशी ही कल्पना आहे. पण निष्ट्या हें ३० अंश दूर असल्यामुळें या रूपकांतील मजा नाहींशी झालेली आहे. निष्ट्याच्या जागीं चित्रा नक्षत्र जर कल्पिलें तर हें प्रजापतीचें रूपक चांगलें खुलेल. पण वेबरनें असा जरी मुद्दा पुढें आणलेला आहे तरी निष्ट्या हा कन्या राशींतील एक तारा आहे असें व्हिटनेस वाटत नाहीं. कारण तो असें म्हणतो कीं निष्ट्या (बहिष्कृत) या शब्दावरून असें दिसतें कीं हें नक्षत्र वादविषयीभूत इतर नक्षत्रांपासून दूर असावें.

( १४ ) विशाखे.—या तारकाद्वयालाच अमरकोशांत मागाहून राधा असें नांव दिलें आहे व हें थोडेंसें आश्चर्यच आहे कीं अथर्ववेदामध्यें 'राधे विशाखे' (विशाखे अभ्युदय करणाऱ्या आहेत) असे शब्द यावेत. परंतु राधा हा जो शब्द आहे तो मागाहून घुसडला असावा असें दिसतें. कारण यानंतरच्या नक्षत्राचें नांव अनूराधा असें आहे व त्याचा अर्थ 'राधेच्या मागाहून येणारें' असा चुकीनें केला गेल्यामुळें विशाखे नक्षत्राला राधा नांव दिलें गेलें असावें.

( १५ ) अनूराधाः किंवा अनूराधा.– (प्रसन्न किंवा अनुग्रह करणारी ) हे वृश्चिक राशींतील तारे आहेत.

( १६ ) रोहिणी–ताम्रवर्णी, ज्येष्ठघ्नी ( सर्वांत वडील असेल त्यास मारणारी ) किंवा ज्येष्ठा ( सर्वांत मोठी ). हे वृश्चिक राशींतील तारे आहेत.

( १७ ) विचृतौ ( मुक्त करणारे ) म्हणजे मूल व मूलबर्हणी ( उपटून टाकणारा ). हेहि वृश्चिकांतील तारे आहेत.

( १८, १९ ) अषाढा.— ( न जिंकलेलें ). यांत दोन भेद आहेत; पूर्वाः व उत्तराः. कदाचित् या सर्व तारकापुंजांत चतुष्कोणाकार चारच तारे प्रारंभीं समाविष्ट केले असावेत.

( २० ) अभिजित्.— हा एक तेजःपुंज असा नक्षत्रपुंज असून तो उत्तर ध्रुवाकडे ६० अक्षांशावर आहे. पण या नक्षत्रपुंजाचें हें स्थान तत्सदृश आरबी व चिनी नक्षत्रगणाच्या स्थानाशीं मुळींच जुळत नाहीं. यावरून ओल्डेनबर्ग यानें असें अनुमान काढिलें आहे कीं हा पुंज नक्षत्रमालिकेंत मागाहून घुसडलेला असावा.

पण हा नक्षत्रगण मैत्रायणी संहितेसारख्या (२. १३, २०) प्राचीन ग्रंथांत सुद्धां आलेला आहे ही गोष्ट त्यानें लक्षांत घेतली नाहीं व त्यामुळें त्याचें अनुमान आपोआपच लंगडें पडतें. तैत्तिरीय ब्राह्मणांत ( १. ५, २, ३ ) आभिजिताचें असें वर्णन आलें आहे कीं अभिजित् अषाढांचे वर व श्रोणाचे खालीं आहे. यावरून वेबरनें असें अनुमान काढिलें आहे कीं त्याचें आकाशांतील स्थान वैदिक कालीं आरवी मनाझिल व चिनी सिऔ यांच्या ठिकाणाशीं जुळतें असावें. पण व्हिटनेनें असें सिद्ध केलें आहे कीं वर व खालीं हे शब्द खरोखर अभिजिताच्या यादींतील स्थलाला उद्देशून आहेत, म्हणजे ' अषाढांच्या नंतर व श्रोणाच्या अगोदर अभिजित् आहे ' अशा अर्थानें आलेले आहेत.

( २१ ) श्रोणा ( लंगडा ) किंवा श्रवण ( कान ).–वेबरनें अगदीं निष्कारण असा एक तर्क बसविला आहे कीं श्रवण या नांवावरून दोन कान व त्यामध्यें एक डोकें असा अर्थ होतो. हें नक्षत्र मनाझिल व सिऔ यांच्याशीं अगदीं विसदृश आहे व तें केवळ हिंदी कल्पनेनें निर्माण केलेलें आहे.

( २२ ) श्रविष्ठाः ( अतिशय प्रसिद्ध ) किंवा धनिष्ठाः (अतिशय श्रीमंत ).–हा नक्षत्रपुंज हिऱ्याच्या आकारासारखा आहे. श्रोणा किंवा श्रवण या नक्षत्राप्रमाणेंच हें नक्षत्राहि मनाझिल व सिऔ यांच्याशीं विसदृश आहे.

( २३ ) शतभिषज् किंवा शतभिष.–याचा अर्थ 'शंभर वैद्य असलेला' असा आहे. याच्या भोंवतीं बरेच तारे असल्यामुळें याला संख्येच्या अजमासानें शतभिषज् असें नांव दिलेलें आहे.

( २४, २५ ) प्रोष्ठपदा.–( स्त्रीलिंगी अनेकवचनीं ). याचा अर्थ 'घडवंचीचे पाय' किंवा ( शांतिकल्पांत आलेल्या ) भद्र पदाः म्हणजे शुभपाय असा आहे. हे दोन नक्षत्रपुंज असून पूर्वे व उत्तरे अशीं त्यांचीं नांवें आहेत.

( २६ ) रेवती.–याचा अर्थ श्रीमंत असा आहे व याच्या योगानें बऱ्याच ताऱ्यांचा ( सुमारें ३२ ) निर्देश केला जातो.

( २७ ) अश्वयुजौ.–घोड्यावर सरंजाम घालणारे दोन असामी असा याचा अर्थ आहे. आश्विन्यौ व अश्विनी अशीं यांचीं मागाहून प्रचारांत आलेलीं नांवें आहेत.

( २८ ) अपभरणीः, भरणीः, किंवा भरण्यः– ( वाहक ) हीं नांवें मेष राशींतील उत्तरेकडे असलेल्या त्रिकोण करणाऱ्या ताऱ्यांना दिलेलीं आहेत.

नक्षत्रें व महिने.–ब्राह्मणग्रंथांत नक्षत्रांचीं नांवें तिथी दर्शविण्याच्या कामीं उपयोगांत आणिलीं जात असत.हीं क्रिया दोन तऱ्हेनें केली जाई. नक्षत्राचें मूळचें नांव जर स्त्रीलिंगी नसेल तर तें स्त्रीलिंगी करून त्याचा पूर्णमासाशीं समास केला जाई. उदाहरणार्थ, तिष्यापूर्णमास म्हणजे तिष्य नक्षत्रांतील पौर्णिमा. पण नेहमींचा प्रकार म्हणजे नक्षत्राच्या नांवाचें विशेषण बनवून त्याचा पूर्णमासी शब्दाबराबर उपयोग करावयाचा किंवा अमावास्या शब्दावरोबर करावयाचा (उदाहरणार्थ फल्गुनी पूर्णमासी) किंवा सूत्रांतील प्रमाणें नक्षत्र नामापासून साधलेल्या विशेषणाचाच पौर्णिमा दर्शविण्याकडे उपयोग करावयाचा. नक्षत्राच्या नांवापासून तयार झालेलें नांव महिन्याला दिलें गेलें. पण या प्रकारच्या नांवाचे फक्त फाल्गुन, चैत्र, वैशाख, तैष्य व माघ एवढेच महिने ब्राह्मण ग्रंथांत आलेले आहेत. पूर्ण नांवांची यादी पुढें सांपडते ती अशी आहे–फाल्गुन, चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, प्रौष्ठपद, अश्वयुज्, कार्तिक, मार्गशीर्ष, तैष्य व माघ. खरें पाहिलें असतां हे चांद्रमास असले पाहिजेत. पण चांद्रवर्षाचा उपयोग फार थोडा करीत असत. तैत्तिरीय ब्राह्मण कालापासूनच लोकांमध्यें चांद्रमासाचा द्वादशमासी सौरवर्षाच्या ३० दिवसांच्या महिन्यांशीं मेळ घालण्याकडे कल होता.

नक्षत्र व कालविज्ञान.–(१) सध्याच्या महिन्यांच्या नांवांवरून हीं नांवें पद्धतशीर रीतीनें प्रचारांत केव्हां आलीं तो काल ठरविण्याचा प्रयत्न कांहीं लोकांकडून झालेला आहे. सर वुइल्यम जोन्स याला ही कल्पना आली. बेंटलेनें श्रावण म्हणजे उदगयनारंभ काल होय अशी कल्पना करून महिन्यांचीं नांवें ख्रिस्ती शकापूर्वी ११८१ वर्षांच्या पूर्वी प्रचारांत आलेलीं नसावींत असा तर्क बांधिला. पण त्याची मूळ कल्पना साधार नव्हती. वेबरचें असें मत होतें कीं अशा तऱ्हेनें कालगणना करणें शक्य आहे पण व्हिटनेनें खात्रीलायक रीतीनें असें सिद्ध केलें आहे कीं, हीं गोष्ट, म्हणजे महिन्यांच्या नांवावरून त्यांचा उपयोग, केव्हां करूं लागले या कालाचा निर्णय करणें अगदीं अशक्य कोटींतील आहे. थिबोचेंहि असेंच मत आहे. महिन्यांचीं बाराच नांवें ठरलीं याचें कारण ब्राह्मण ग्रंथांत व्यक्त झालेली लोकांची कसेंतरी करून चांद्र व सौर मासांचा मेळ घालण्याची इच्छा होय. पण सत्तावीस नक्षत्रांतून पौर्णिमेच्या रात्रीशीं संबद्ध असलेल्या बारा नक्षत्रांच्या निवडीला कालदृष्ट्या बिलकुल महत्त्व नाहीं. कारण पौर्णिमा फक्त बारा नक्षत्रांतच पडत असे व इतर नक्षत्रांत येत नसे असें बिलकुल नाहीं. सत्तावीस नक्षत्रांपैकीं प्रत्येक नक्षत्रांत पौर्णिमा कांहीं एका ठराविक क्रमानें पुनःपुन्हां येत असते.

(२) नक्षत्रांच्या ज्या याद्या संहिताग्रंथांतून आलेल्या आहेत त्या सर्वांचा आरंभ कृत्तिका नक्षत्रापासूनच झालेला आहे. तेव्हां फार तर एवढें म्हणतां येईल कीं कृत्तिकेलाच अग्रपूजेचा मान देण्यास कांहीं विशेष कारण असलें पाहिजे. पण मागाहून जी नक्षत्रांची यादी झालेली आहे तींत अश्विनी हें नक्षत्र सर्व नक्षत्रांच्या शिरोभागीं आलेलें आहे. याचें कारण असें होते कीं ही यादी जेव्हां तयार झाली तेव्हां म्हणजे इ. स. च्या ६ व्या शतकांत वसंत संपात रेवती व अश्विनी यांच्याजवळ ( ज्याला झीटापिशियम म्हणतात त्या ताऱ्याजवळ ) होत असे. यावरून वेबरनें असें मत बनविलें कीं कृत्तिकाहि अशाच कारणाकरितां नक्षत्राच्या अग्रभागीं ठेविली गेली असली पाहिजे व ही कृत्तिकागत वसंत संपाताची वेळ ख्रिस्ती शकापूर्वी तीन हजार वर्षें ही असावी असें गणितानें ठरविलें आहे. मुख्य हरकत म्हणजे नक्षत्राशीं चंद्राचा संबंध नसून फक्त सूर्याचाच

संबंध आहे अशी तेव्हांची कल्पना होती हें गृहीत धरावें लागतें ही होय. थीबो व ओल्डेनबर्ग हे दोघेहि वसंतसंपाताचा कृत्तिकेशीं संबंध जोडण्याच्या अगदीं विरुद्ध आहेत. याकोबीनें असा एक मुद्दा पुढें आणला आहे कीं, ऋग्वेदांत (७. १०३; १०.८५) वर्षाकालाचा आरंभ व उदगयन हे नवीन वर्षाचा आरंभ व जुन्या वर्षाचा शेवट दर्शवितात व नवीन वर्षाचा आरंभ फल्गुनी नक्षत्रांत उदगयनाच्या वेळीं होत असे. शिवाय तैत्तिरीय ब्राह्मण ग्रंथांतील देवनक्षत्रें व यमनक्षत्रें यांतील भेद हा सूर्य व नक्षत्रें यांचा संबंध होता या प्रकारच्या आपल्या मतास पोषक आहे असें त्याचें म्हणणें आहे. पण हें मत फारसें ग्राह्य दिसत नाहीं. ज्या ऋग्वेदांतील वचनांचा याकोबीनें हवाला दिला आहे त्या वचनांचा याकोबी म्हणतो त्याप्रमाणें अर्थ होत नाहीं असें मॅकडोनेल म्हणतो व त्याला कारण देतो कीं, तसा अर्थ होण्यास द्वादश याचा बारा भाग म्हणजे एक वर्ष असा सर्वसंमत अर्थ न घेतां बारावा महिना असा अर्थ घ्यावा लागेल. शिवाय नक्षत्रांचा संबंध सूर्याशीं लावून नक्षत्रांच्या विभागणीचा समाधानकारक उलगडा करतां येत नाहीं. कृत्तिका नक्षत्र अग्रभागीं ठेवण्याचें कारण त्या वेळीं वसंतसंपात होता हें जरी कबूल केलें तरी व्हिटने व थीबो यांच्या मतें माघांत दक्षिणायन होतें असें विधान करणाऱ्या वेदांगज्योतिषावरून येणारा जो काल तोच कृत्तिका नक्षत्राला नक्षत्रमालेच्या आरंभीं घालण्याचा काल असावा. कृत्तिकेंत वसंतसंपाताची कल्पना चुकीनें केलेली असावी असें त्यांचें मत आहे.

( ३ ) माघामध्यें दक्षिणायन सुरू होतें या म्हणण्याला ब्राह्मणग्रंथाचा आधार आहे. कारण कौषीतकि ब्राह्मणांत ( १९. ३ ) हें दक्षिणायन माघांतील अमावास्येस सुरू होतें असें स्पष्ट म्हटलें आहे ( माघस्यामावास्यायां ). आतां हा दक्षिणायनाचा आरंभ टीकाकार म्हणतात त्याप्रमाणें तैष्याच्या पौर्णिमेनंतर सुरू होणाऱ्या पूर्णिमांत महिन्याच्या मध्यंतरीं असलेल्या अमावास्येला असो किंवा अमांत महिना धरून माघांतल्या पौर्णिमेच्या अगोदरच्या अमावास्येस ( हें अधिक शक्य आहे ) असो हा मुद्दा फारसा महत्त्वाचा नाहीं. परंतु माघांत दक्षिणायन होतें एवढ्या माहितीवरून खालीं दिलेल्या तऱ्हेनें वरील नक्षत्रकाल ठरविणें शक्य आहे. एके काळीं रेवतीच्या शेवटच्या भागांत हा वसंतसंपाताचा बिंदु होता असें मानिलें तर विषुवचलनाचें गणित करून ज्या दक्षिणायनप्रसंगीं अयनबिंदु श्रविष्ठांत असे त्या माघांतील दक्षिणायनाशीं जुळणारी अशी वसंतसंपाताची स्थिति कोणत्या वेळीं होत असे हें आपणांस ठरवितां येतें. केवळ शास्त्रीय उपपत्तीच्या दृष्टीनें विचार केला तर हा वसंतसंपात भरणीच्या तृतीय चरणांतच येतो. कारण हा तृतीय चरण श्रविष्ठा नक्षत्रापासून सहा नक्षत्रें व तीन चरण इतक्या अंतरावर आहे. हा तृतीय चरण व अश्विनीचा आरंभ यांतील अंतर एक नक्षत्र व तीन चरण इतकें म्हणजे २३° २०′ इतकें आहे ( २७ नक्षत्रें म्हणजे ३६०° ). इसवी सन ४९९ हें वर्ष सुरवातीचा काल म्हणजे रेवतींत वसंत असल्याचा काल धरून ( हाच वराहमिहिराचा निश्चित काल होय ) जोन्स यानें माघांतल्या दक्षिणायनाशीं जुळता असलेला वसंतसंपात इसवी सनापूर्वी ११८१ सालीं येतो असें ठरविलें ( हें अर्थात् एका अयनांशाबरोबर ७२ वर्षे असें प्रमाण धरून ठरविलें). प्रॅट यानें अयनांशाचें हेंच प्रमाण धरून व ज्योतिषविषयक सिद्धांतांत निश्चित केलेली मघा नक्षत्रांतील योगताऱ्याची स्थिति आधारभूत धरून ठरविलेला काल वरीलप्रमाणेंच आहे. डेविस व कोलब्रूक यांनीं चित्रांतील योगतारा (या ताऱ्याची स्थिति निश्चित नसून निरनिराळ्या ग्रंथांत तीन अंशांपर्यंतचा फरक आहे ) आधारभूत धरून गणित केलें व या गणितानें इसवी सनापूर्वी १३९१ हा काल आला. परंतु ख्रिस्तपूर्व बारावें शतक हें वेदांगज्योतिषग्रंथांमधील वेधाचा काल म्हणून जरी बऱ्याच जणांना मान्य झालें आहे तरी या गणिताला किती महत्त्व द्यावें याबद्दल शंकाच आहे. व्हिटनेनें हें दाखविलें आहे कीं पूर्वींच्या नक्षत्रांचीं स्थानें व मागाहून ठरविलेल्या प्रत्येकीं १३°⅓ प्रदेश व्यापणाऱ्या नक्षत्रांचीं स्थानें आकाशांत एकच आहेत असें म्हणतां येणार नाहीं. पूर्वीं नक्षत्रांची निवड झाली ती आकाशाचे सारखे विभाग करण्यासाठीं नसून चंद्राशीं ज्यांचा संयोग होतो तेच नक्षत्रसमूह निवडले गेले. आणि मागाहून या नक्षत्रांचे सारखे विभाग करण्याचा जो प्रयत्न झाला त्याचा असा परिणाम झाला कीं मागाहूनच्या नक्षत्रसमूहांत मुख्य धरलेले तारे त्यांच्या पूर्वींच्या नक्षत्रांतून अजीबात काढले गेले. शिवाय असेंहि म्हणतां येत नाहीं कीं उत्तरकालीन व्यवस्थेंत रेवतीनक्षत्राच्या पूर्वमर्यादेवर असणारा तारा पूर्वींच्या व्यवस्थेंतहि तेथेंच होता. कदाचित् त्या नक्षत्रपुंजांत पूर्वीं तो तारा मुळींच नसेल. कारण जुन्या रेवतीशीं जुळणाऱ्या चिनी व अरबी नक्षत्रपुंजांपासून तो फारच दूर आहे. तसेंच सुरवातीचा काल अनिश्चित म्हणजे इसवी सन ४९९, इ. स. ५८२, इ. स. ५६० किंवा इ. स. ४९१ या चार प्रकारचा मानला जातो. शिवाय ही गोष्टहि लक्षांत ठेवली पाहिजे कीं संपातबिंदूची जागा केवळ निरीक्षणानें ठरवितां येण्यासारखी नाहीं व वैदिक काळच्या हिंदू ज्योतिष्यांचें निरीक्षण फारसें बरोबर होतें असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण वर्षाचे दिवसहि त्यांनीं बिनचूक ठरविलेले नसून वेदांगज्योतिषांत सुद्धां हे दिवस मोघम ३६० धरले आहेत, व सूर्यसिद्धांतकर्त्याला सुद्धां संपातचलनाची माहिती होती असें दिसत नाहीं. या सर्व कारणांनीं अजमासें एक हजार वर्षांची चूक होण्याचा संभव आहे. ती चूक लक्षांत घेतां कौषीतकिब्राह्मणांत दिलेल्या माहितीवरून एवढेंच अनुमान निघतें कीं त्यांत ग्रथित केलेलें निरीक्षण इ. स. च्या पूर्वीं कांहीं शतकें असावें. हें अनुमान ब्राह्मणग्रंथांच्या संभाव्य कालाशीं ( इ. स. पूर्वीं ८००–६०० ) जुळतें.

( ४ ) दुसरें एक कालगणनाविषयक अनुमान आहे. फाल्गुन हा महिना वर्षारंभीं गणला जाई असें 'फाल्गुनाची पौर्णिमा हें वर्षाचें मुख आहे' असें जें अनेक स्थलीं वर्णन आहे त्यावरून ह्मणतां येतें. याकोबीचें वरील गोष्टीवरून असें मत आहे कीं त्या कालीं वर्षाची

गणना दक्षिणायनापासून होत असावी. फाल्गुनांत दक्षिणायन ही स्थिति सुमारें चार हजार वर्षांपूर्वी येऊं शकते. ऑल्डेनबर्ग व थीबो यांचें असें मत आहे कीं वर्षारंभ फाल्गुन महिन्यापासून व्हावा असें ठरण्याचें कारण फाल्गुन महिना वसंत ऋतूचा आरंभीचा महिना होता हें होय. फाल्गुन व वसंत ऋतूचा आरंभ हे एकत्र असतात याबद्दल स्पष्ट पुरावा मिळतो ही गोष्ट वरील मताला पोषक आहे. आपणांला कौषीतकिब्राह्मणांत ही गोष्ट दिसून आली आहे कीं माघांतील अमावास्या दक्षिणायनांत पडत होती. यावरून फाल्गुनी पौर्णिमा दक्षिणायनानंतर दीड महिन्यानें किंवा फेब्रुआरी महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत पडते. म्हणजे पूर्वी माघदक्षिणायनाचा ठरविलेला जो काल तोच फाल्गुनवर्षारंभाचा काल असें दिसतें. हा काल शकापूर्वी सुमारें ८०० वर्षे होय हें वर सांगितलेंच आहे. रोमन पंचांगाच्या 'व्हेरिस इनिशियमच्या' फेब्रुआरी ७ तारखेशीं हा काल जुळतो. वर्षाचे चार चार महिन्यांचे तीन भाग स्वाभाविकपणें पडतात व या स्वाभाविक विभागणीशीं वरील कल्पना जुळते. कारण वर्षाऋतु जून सात किंवा दहा तारखेस सुरू होऊन अक्टोबर सात किंवा दहा तारखेपर्यंत संपतो. म्हणजे चार महिने वर्षाऋतु असतो व पावसाळ्याच्या आरंभापासून त्रिविभागात्मक वर्षाच्या दुसऱ्या विभागाला आरंभ होतो ही गोष्ट निःसंशय आहे. उलटपक्षीं लोकमान्य टिळक असें म्हणतात कीं तैत्तिरीय संहिताकालीं (ख्रि. श. पूर्वी २३५०) दक्षिणायन माघी पौर्णिमेला होई व पूर्वीच्या कालीं (ख्रि. श. पूर्वी ४०००–२५०० व ख्रि. श. पूर्वी ६०००-४००० वर्षांच्या कालांत) तें (अनुक्रमें) फाल्गुनी व चैत्री पौर्णिमेस होत असे.

(५) तैत्तिरीय संहिता व पंचविंश ब्राह्मण यांमध्यें फाल्गुन महिन्यांतील पौर्णिमा हा वर्षारंभाचा काल होय असें ज्या ठिकाणीं म्हटलें आहे तेथेंच चैत्रांतील पौर्णिमेलाहि विकल्पानें वर्षारंभ धरतात असें म्हटलें आहे. हा चैत्र महिना निवडण्याचें हेंहि कारण असेल कीं वर्षारंभाचा दिवस वसंतऋतूंत असावा. याकोबी म्हणतो कीं ज्या वेळीं दक्षिणायन चैत्रांत सुरू होत असे त्या वेळचा हा अवशेष आहे; परंतु हें याकोबीचें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. दुसरा एक विकल्प एकाष्टका हा होय. या एकाष्टकेचा अर्थ टीकाकारांच्या मतानें माघांतील पौर्णिमेनंतरची अष्टमी होय. हा काल जुन्या वर्षाच्या चन्द्रक्षय होत जाणाऱ्या मासार्धाचा शेवटला चतुर्थभाग असल्यामुळें वर्षाचा अंतसूचक मानला गेला असावा. चवथा विकल्प म्हणजे पौर्णिमेच्या चार दिवस अगोदरचा दिवस होय. ही पौर्णिमा म्हणजे आपस्तंब सूत्रांत उल्लेखिलेल्या आलेखनाच्या मताप्रमाणें चैत्री पौर्णिमा होय. आश्मरथ्य, लौगाक्षि, मीमांसक व लोक. टिळक म्हणतात त्याप्रमाणें माघी पौर्णिमा नव्हे.

(६) दुसरे कांहीं लोक गृह्यसूत्रांनां अनुसरून असें म्हणतात कीं वर्षारंभ मार्गशीर्ष महिन्यांत होत असे व ही गोष्ट मार्गशीर्षालाच आग्रहायण (वर्षाच्या आरंभासंबंधींचें) असें म्हणत असत यावरून सिद्ध होते. याकोबी व टिळक म्हणतात कीं यावरून फल्गुनीमधल्या दक्षिणायनाशीं जुळणारा मृगशीर्षांतल्या शरत्संपाताचा बोध होतो; पण थीबोनें असें सिद्ध केलें आहे कीं ज्याप्रमाणें फाल्गुनाच्या ऐवजीं चैत्र महिन्यांत वसंत ऋतूचा प्रारंभ कांहींनीं कल्पिला त्याप्रमाणें वर्षारंभापासून वर्षारंभ कल्पून या आरंभाचा महिना मार्गशीर्ष धरला गेला.

(७) याकोबीनें बुह्लरच्या मदतीनें वेदांच्या अभ्यासाकरितां गृह्यसूत्रांत जे काल दिले आहेत त्यावरून एक मुद्दा काढला आहे. वेदांचा अभ्यास उत्तरायणाच्या वेळीं असणाऱ्या पावसाळ्यांत होत असे हें गृहीत धरून याकोबी असा सिद्धांत करतो कीं कांहीं संहिताग्रंथांत भाद्रपद महिना हा वेदाभ्यासास सुरुवात करण्यास योग्य आहे असें जें म्हटलें आहे त्याचें कारण एके कालीं प्रोष्ठपदा (भाद्रपदांचें अगोदरचें नांव) उत्तरायणांत येत असत हें होय. ज्या वेळीं दक्षिणायन हें फाल्गुनांत सुरू होत असे त्या वेळीं प्रोष्ठपदांत उत्तरायण येई. पण व्हिटनेनें हें सिद्ध केलें आहे कीं हें अनुमान सर्वस्वीं चुकीचें आहे. विद्या शिकणें व पावसाळा यांचा आवश्यक असा कांहीं संबंध आहे असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. हा संबंध कल्पावयाचा तर श्रावण महिन्याचा संबंध श्रवण म्हणजे कान याच्याशीं आहे म्हणून तो अभ्यासासाठीं पसंत केला जाणें योग्य होईल. अयनगति लक्षांत घेतां भाद्रपद महिनाच अभ्यासाला आरंभक म्हणून ठरविण्याचें कारण भाद्रपद महिना व पावसाळा एकाच वेळीं येणें ही स्थिति खरोखर नाहींशी झाल्यावर पूर्वी एके कालीं ही स्थिति होती म्हणून ती परंपरा राखण्यासाठीं भाद्रपद महिनाच अभ्यासासाठीं ठेवणें ही समजूत होय असें दिसतें.

**नक्षत्रांचें मूळ.**—हिंदुस्थानांतील लोकांनां नक्षत्रांचें ज्ञान कसें झालें याबद्दल प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. ऋग्वेदाच्या पूर्व भागांत हीं नक्षत्रें तारे म्हणून आलेलीं आहेत. ऋग्वेदसंहितेच्या मागाहून झालेल्या भागांत यांपैकीं तिहींचींच नांवें आलीं आहेत. यजुर्वेद व अथर्ववेद यांमध्यें मात्र संपूर्ण नक्षत्रांचीं नांवें आलीं आहेत. वैदिक कालच्या आर्य लोकांनां ज्योतिषविषयक इतर गोष्टींची माहिती फार थोडी होती. यामुळें चंद्रगृहभूत सत्तावीस नक्षत्रांचा शोध या वैदिक ऋषींनां लागला असल्यास ती गोष्ट पाश्चात्त्यांस थोडीशी आश्चर्य करण्यासारखी वाटते. परंतु हीं नक्षत्रें ठरविणें फार सोपें आहे. ज्या ताऱ्यांची किंवा तारकसमूहाची चंद्राशीं युति होते तो तारा किंवा तारकसमूह निवडून काढला म्हणजे झालें. अशी स्थिति असल्यानें स्वतःच्या बुद्धीनें वैदिक ऋषींनीं नक्षत्रें शोधून काढणें अशक्य आहे असें म्हणणें पुराव्याच्या अभावीं अयोग्य होईल. पण अरबस्थान व चीन यांमध्यें अठ्ठावीस नक्षत्रांची अथवा नक्षत्रपुंजांची 'मनाझिल् ॲन्ड सिउ' या नांवाचीं नक्षत्रचक्रें होतीं ही गोष्ट मनांत आणली म्हणजे हा नक्षत्रज्ञानाचा प्रश्न भानगडीचा होऊन बसतो. 'मनाझिल्' चा उपयोग अरबी

भाषेंत सुसंगतपणें केला जातो. या नक्षत्रांवरून अरबी लोकांचें पंचांग तयार केलें जातें व या नक्षत्रांचीं ठिकाणें त्या लोकांनीं जीं निश्चित केलीं आहेत तीं चंद्र राशिचक्रांतील नक्षत्रांचीं स्थानें जशीं असावींत तशीं आहेत. तेव्हां हिंदुस्थानांतील आर्य लोकांनीं अरबी लोकांपासून हें नक्षत्रज्ञान घेतलें अशी कल्पना करतां येईल. पण ही कल्पना बरोबर होणार नाहीं. कारण, ' मनाझिल् ' च्या अस्तित्वाचा पुरावा नक्षत्रांच्या अस्तित्वाच्या पुराव्याहून बराच मागाहूनचा आहे. जुन्या करारांतील ' मझ्झराथ ' किंवा ' मझ्झलाथ हें कदाचित् चांद्र नक्षत्रचक्र असूं शकेल हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. जगेम म्हणतो कीं अरबी नक्षत्रज्ञान हिंदुस्थानांतील लोकांपासूनच अरबी लोकांनीं घेतलें. पण ही गोष्ट मुळींच शक्य नाहीं. बिओ नांवाचा एक चिनी पंडित होऊन गेला. त्यानें १८३९ सालापासून १८६१ पर्यंत कांहीं लेख लिहून त्यांत असें सिद्ध केलें आहे कीं आर्यलोकांनीं नक्षत्रें चिनी लोकांच्या ' सिउ ' वरून घेतलीं. हीं चिनी नक्षत्रें बिओच्या मतानें मूळचीं चांद्रनक्षत्रेंच नव्हतीं त्याचें असें मत होतें कीं, हीं नक्षत्रें म्हणजे विषुववृत्तावरील तारे होत; व अर्वाचीन ज्योतिषांतल्याप्रमाणें हे तारे यांच्या भोंवतींच्या ताऱ्यांची तुलना करण्याचें साधन म्हणून असत. अशा प्रकारचे चोवीस तारे इ. स. पूर्वी २३५७ च्या सुमारास विषुववृत्ताजवळ असल्यामुळें व या चोवीस ताऱ्यांचे विषुवांश व ज्या ताऱ्यांनीं चिनी ज्योतिष्याचें लक्ष वेधून घेतलें त्या कांहीं सदोदित दिसणाऱ्या ध्रुवाभोंवतींच्या नक्षत्रांचे विषुवांश सारखेच होते म्हणून निवडले गेले. पुढें इ. स. पूर्वी ११०० सालीं त्या काळचे विषुवदिन व अयनादिन ओळखण्यासाठीं चार नवीन ताऱ्यांची भरती करण्यांत आली. त्याचें असें मत होतें कीं ही ताऱ्यांची यादी कृत्तिका ( मा ओ ) नक्षत्रापासून सुरू झाली. कारण हेंच नक्षत्र ख्रिस्ती शकापूर्वी २३५७ सालीं मेषविषुवाच्या वेळीं होतें. वेबरनें एका विस्तृत निबंधांत या मुद्यावर टीका करून असें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे कीं, ' सिउ ' बद्दलचा चिनी वाङ्मयाचा पुरावा अलीकडचा आहे. तो ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या पूर्वींचाहि नाहीं. हें वेबरचें शेवटचें म्हणणें कदाचित् बरोबर नसेल, पण बिओच्या प्रमेयाविरुद्ध जे मुद्दे आहेत तेच मुद्दे व्हिटनेनें पुन्हां जोरानें मांडले असून तो असें म्हणतो कीं, ' सि ओ ' हे मुळांत चांद्र नक्षत्रांपासून निघाले नाहींत असें जें बिओ म्हणतो तें निराधार होय. हें म्हणणें हिंदी ज्योतिषज्ञान चिनी लोकांकडून आलें हें मत जोरानें प्रतिपादन करणाऱ्या ' लिओपोल्ड डी सॅासुरे ' ला सुद्धां मान्य आहे. पण त्याचें ' हिंदी ज्योतिषांतील चांद्र नक्षत्रें चिनांतून आलीं ' हें मत व त्यासंबंधाचे मुद्दे ओल्डेनबर्गनें खोडून काढले आहेत. त्यानें असें सिद्ध केलें आहे कीं, नक्षत्रमालेचा आरंभ ' मा ओ ' म्हणजे कृत्तिका नक्षत्रापासून नाहीं. आतां शेवटीं एकच मुद्दा राहिला तो हा कीं या तिहींचा म्हणजे नक्षत्रें, मनाझिल् व सिउ यांचा उगम बाबिलोनियामध्यें असेल. होमेलनें अलीकडील शोधावरून असें सिद्ध केलें आहे कीं, कृत्तिकादि चोवीस नक्षत्रांचें चांद्रनक्षत्रचक्र बाबिलोनियामध्यें मानीत होते. पण थीबोनें जे शोध केले आहेत त्यांवरून त्याचें असें मत झालें आहे कीं, हा होमेलचा शोध चुकीचा आहे. उलटपक्षीं वेबर, व्हिटने, झिमर व ओल्डेनबर्ग या सर्वांचें असें मत आहे कीं, बाबिलोनियांत चांद्र नक्षत्रचक्राचा उगम आहे. हेंच मत तूर्त ग्राह्य धरलें पाहिजे. कारण बाबिलोनियन संस्कृतीची छाप वैदिक वाङ्मयांत सर्वत्र दिसून येते. उदाहरणार्थ, महापुराची कथा बाबिलोनियन कथेवरून घेतली आहे, व ' वेदांतील ' आदित्य व ' मना ' हे शब्द देखील त्या वाङ्मयावरूनच घेतले असावेत असें मानण्यास आधार आहे.

[5]विधु.—वैदिक कालानंतरच्या ग्रंथांतल्या वाङ्मयाप्रमाणें ऋग्वेदांत ( १०.५५,५ ) एका ठिकाणीं याचा चंद्र असा अर्थ आला आहे. व त्या ठिकाणीं अनेकांमध्यें एकटा हिंडणारा असें त्याला म्हटलें आहे.

[6]वेन.—ऋग्वेदामध्यें ( १०. १२३ ) लो. टिळकांच्या मतें याचा अर्थ शुक्रग्रह असा असावा. पण हा अर्थ मॅकडोनेलच्या मतें चुकीचा आहे. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं टिळकांचें मत आपलें मत न देतां उद्धृत केलें आहे ( ज्योतिर्विलास ).

[7]सूर्य.—वैदिक कथांमध्यें व धर्मामध्यें सूर्याचें बरेंच महत्त्व वर्णिलें आहे. हें महत्त्व हिंदुस्थानांतील निसर्गस्थितींत सूर्याचें जें महत्त्व आहे त्याला अनुरूप असेंच आहे. ऋग्वेदामध्यें सूर्याचें वर्णन तो परोपकारी आहे असें आलेलें आहे, व हिमालयाच्या थंड भागांतून जे आर्यलोक आले त्यांना सूर्य असा वाटणें ह्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. त्याच्या उष्णतेबद्दल ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांत त्याचप्रमाणें अथर्ववेद व ब्राह्मण ग्रंथांत वारंवार उल्लेख आलेले आहेत. ऋग्वेदांतील एका कथेंत इंद्रानें सूर्याचा पूर्ण पराजय करून त्याचें चक्र हरण केलें असें वर्णन आलेलें आहे. विजेच्या पावसानें सूर्याला जो प्रतिबंध होतो त्याला उद्देशून हें वर्णन असावें. ऐतरेय ब्राह्मणांत एक साधीभोळी कल्पना आलेली आहे. ती अशी कीं, सूर्याच्या एकाच बाजूला प्रकाश आहे व तो जातो त्याच रस्त्यानें पश्चिमेकडून पूर्वेकडे परत येतो, पण असें करतांना तो आपली दुसरी बाजू पृथ्वीकडे करतो व त्यामुळें आकाशांतल्या ताऱ्यांना रात्रीं तेजःपुंज करितो. ऋग्वेदामध्यें सूर्य खालीं पडत नाहीं म्हणून आश्चर्य प्रकट केलें आहे. ऋग्वेदामध्यें ग्रहणाबद्दल अनेक उल्लेख आलेले आहेत. एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, स्वर्भानु-राक्षस हा सूर्याला अंधकारानें ग्रासून टाकतो व अत्रि सूर्याचा प्रकाश परत त्याला आणून देतो. दुसऱ्या एका ठिकाणीं हेंच अद्भुत अत्रीच्या कुटुंबांतल्या मंडळींनीं केलें असें म्हटलें आहे. अथर्ववेदामध्यें राहूचा सूर्याशीं असलेल्या संबंधाचा प्रथमच उल्लेख आलेला आहे. इंद्रानें सूर्याचा पराजय केला अशी जी कथा आहे तिचा उलगडा ग्रहणाच्या गोष्टीनें करतां येईल. दुसऱ्या दोन ठिकाणींहि असा उलगडा होणें शक्य आहे. लुडविगनें असें प्रतिपादिलें आहे कीं, ऋग्वेदाच्या वेळीं सूर्याचें चंद्रा-

करून जें पिधान होतें त्यामुळें ग्रहण होतें ही गोष्ट ठाऊक होती. त्याचप्रमाणें सूर्य पृथ्वीभोंवतीं फिरतो ही गोष्टहि त्यांत नमूद केलेली आहे. इतकेंच नव्हे तर, तो असेंहि प्रतिपादन करतो कीं, खिस्तीशकापूर्वी १०२९ सालीं जें ग्रहण झालें त्याचाच उल्लेख ऋग्वेदामध्यें आलेला आहे. हीं सर्व मतें व्हिटनेनें खोडून काढलेलीं आहेत. सूर्य हा कालकर्ता असून त्याच्या गतीनें ३६० दिवसांचें वर्ष ठरतें. वैदिक वाङ्मयांत हेंच सौरवर्ष (संवत्सर) व्यवहारांत प्रमाण गणलें आहे. या सौरवर्षाचे दोन भाग कल्पिले आहेत. एक उत्तरायण व दुसरें दक्षिणायन. ज्या वेळीं सूर्य उत्तरेकडे जावयास निघतो तें उत्तरायण व तो उत्तरायणांतून दक्षिणेकडे जावयास निघतो तें दक्षिणायन असें मानीत असत याबद्दल शंका नाहीं. कारण तसा उल्लेख स्पष्ट भाषेंत कौषीतकि ब्राह्मणांत आलेला आहे.

[८]ऋक्षीका.—हा शब्द अथर्ववेदांतील अप्रसिद्ध अशा एका स्थलीं आलेला आहे. त्याचा अर्थ मुळींच लागत नाहीं. वेबर म्हणतो कीं, त्याचा अर्थ 'आकाशगंगा' असा असावा. परंतु या त्याच्या मताला कांहींच आधार नाहीं. व्हिटनेला तर याचा अर्थ लागण्याची मुळींच आशा वाटत नाहीं.

[९]काल–काञ्ज.—अथर्ववेदांत (६. ८०, २) कालकाञ्ज हे आकाशांत असतात असें लिहिलें आहे. रॉथ आणि झिमर हे दोघेहि म्हणतात कीं 'कोणतातरी तारकापुंज' असा याचा अर्थ असावा. परंतु इंद्राच्या पराक्रमांपैकीं कालकाञ्ज यांचा पराभव हा एक आहे. म्हणून अथर्ववेदांतील ऋचेच्या वरील भाषांतरावर कोठपर्यंत भरंवसा ठेवावा हें कळत नाहीं. व्हिटने म्हणतो कीं मृगशीर्षाचे तीन तारे व ब्लूमफील्ड म्हणतो कीं आकाशगंगा किंवा तारका असा याचा अर्थ आहे.

[१०]चंद्र, चंद्र–मस्.—चंद्र (निशापति) या अर्थी चंद्रमस् हें नांव ऋग्वेदांत व इतरत्र आढळतें. चंद्र हें नांव मात्र अथर्ववेदांत प्रथम आलें आहे. हीं दोन्ही चंद्राचीं नांवें आहेत. दुसरें ऋग्वेदांत व इतरत्र उपयोगांत आलें आहे, परंतु पहिलें पहिल्यानें या अर्थी अथर्ववेदानें उपयोगांत आणिलें आहे. वैदिक वाङ्मयांत, चंद्र सोमासारखा वाढत जातो व कमी होत जातो असाच फक्त उल्लेख आहे. चंद्रामध्यें सारखा फरक होत असतो, सूर्य व चंद्र हे आळीपाळीनें काम करितात, आणि सोम या नात्यानें चंद्राचें सूर्याशीं लग्न झालें आहे असें ऋग्वेदांत वर्णन आहे. तो अमावास्येला मुळींच दिसत नाहीं आणि त्याचा जन्म सूर्यप्रकाशामुळें आहे. अथर्ववेदांत राक्षस चंद्राला ग्रहण लावतात असें वर्णन आहे (ग्रहाश्चांद्रमासाः). चंद्रकलाविशिष्ट महिना हें कालाचें माप आहे.

[११]दिव्य शुन–दिव्य श्वा.– अथर्ववेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आलेला आहे. त्याचा मूळचा अर्थ 'स्वर्गीय कुत्रा' असा असून या शब्दामुळें लुब्धक नांवाच्या ताऱ्याचा बोध होतो. पण ब्लूमफील्डचें असें मत आहे कीं, मैत्रायणी संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यांमध्यें ज्या दोन स्वर्गीय कुत्र्यांचा उल्लेख आलेला आहे ते कुत्रे म्हणजे सूर्य व चंद्र हे होत. व अथर्ववेदामध्यें दिव्यश्वा म्हणजे सूर्य हा अर्थ असावा.

[१२]धूमकेतु.– अथर्ववेदामध्यें हें (धूर हें ज्याचें निशाण आहे) मृत्यूचें विशेषण म्हणून आलेलें आहे. झिमरच्या मतें हा धूमकेतूच असावा, पण व्हिटने म्हणतो कीं हें वरेंच असंभवनीय आहे. लॅनमनचें म्हणणें कीं, या शब्दाचा चितेवरील अग्नीचा धूर असा अर्थ होतो. हा अर्थ बराच शक्य आहे.

*शकधूम.—अथर्ववेदाच्या एका सूक्तांत हा शब्द आलेला आहे. नक्षत्राचा राजा म्हणून ह्याची त्या ठिकाणीं स्तुति आलेली आहे. त्या शब्दाचा अर्थ जळणाऱ्या शेणीचा धूर किंवा गोवरीचा वर जाणारा धूर असा असावा. वेबर म्हणतो त्याप्रमाणें एखादे वेळीं हवा कशी असे याचा त्यावरून बोध होत असे. ब्लूमफील्डचें असें मत आहे कीं, ह्या शब्दाचा अर्थ धुरावरून हवेचें ज्योतिष वर्तविणारा असा करावा. पण ह्या अर्थाला व्हिटनेची हरकत आहे, व त्याला कारणहि आहे. रॉथ म्हणतो त्याप्रमाणें हा शब्द एखादा नक्षत्रगण, किंवा कदाचित् आकाशगंगा असा असणें अगदींच असंभवनीय नाहीं.

[१३]सप्त सूर्याः—यांचा उल्लेख अथर्व आणि काठक संहितेमध्यें आलेला असून तैत्तिरीय संहितेमध्यें यांचीं नांवें आरोगभ्राज पटर, पतंग, स्वर्णर, ज्योतिष्मत् व विभास अशीं आहेत. पण हीं नांवें उत्तरकालीन वाङमयांत सुद्धां फार विरळा आलेलीं आहेत. एके काळीं वेबरचें मत असें होतें कीं, या शब्दसमुच्चयानें सात ग्रहांचा बोध होत असावा. पण मागाहून ही कल्पना त्यानें सोडून दिली. कदाचित् ऋग्वेदांत (१.१०५,९) सात किरण असा उल्लेख आला आहे तोच या शब्दाच्या अर्थ असावा.

[१४]अर्यम्णः पन्था.—'अर्यमनचा मार्ग' हा शब्द तैत्तिरीय व इतर ब्राह्मणांत आलेला आहे. वेबरच्या मताप्रमाणें त्याचा अर्थ 'आकाशगंगा' आणि हिलेब्रान्टप्रमाणें 'क्रांतिवृत्त' असा आहे.

[१५]इषुत्रिकाण्डा (तारकापुंज).— बहुतकरून ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें मृगपुंज याचा हा द्योतक असावा. याचा उल्लेख मृग, मृगव्याध आणि रोहिणी यांच्या बरोबर केलेला आहे.

[१६]केतु.—मागाहूनच्या अद्भुत ब्राह्मणांत 'तुटणारा तारा' अथवा 'धूमकेतु' असा अर्थ आहे असें वेबर म्हणतो.

[१७]ग्रह.—(धरणें, पकडणें). हा शब्द शतपथ ब्राह्मणांत सूर्याला योजिला आहे; परंतु तेथें हा शब्द मागाहूनचा अर्थ जो ग्रह त्या अर्थी योजिला नसून जादूसारखा परिणाम करणारी शक्ति अशा अर्थी योजिला असावा. मैत्रायणी उपनिषदासारख्या उत्तरकालीन वाङ्मयांत हा शब्द ग्रह या अर्थी प्रथम योजिलेला सांपडतो. वैदिक आर्य लोकांना ग्रहपरिचय होता किंवा नाहीं हें समजत नाहीं. ओल्डेनबर्ग म्हणतो कीं सात आदित्य हेच त्या वेळचे

ग्रह होते; हे सात आदित्य म्हणजे सूर्य, चंद्र आणि पांच ग्रह होत. परंतु हें मत जरी अगदींच असंभवनीय नाहीं, तरी पण याला पुरावा मिळत नाहीं; हिलेब्रँट, पिशेल, व्हॉन श्रोडर, मॅकडोनेल आणि ब्लूमफील्ड आणि दुसरे कित्येकजण हें मत मुळींच ग्राह्य मानीत नाहींत. हिलेब्रँट म्हणतो कीं ऋग्वेदांत जे पांच अध्वर्यू सांगितले आहेत तेच ग्रह होत; परंतु हा फक्त तर्कच आहे. ऋग्वेदांत जे पांच बैल (उक्षाणः) तेच ग्रह असावेत असें मानलें आहे; परंतु हेंहि वरच्याइतकेंच संशयास्पद आहे. निरुक्तावरील टीकेंत दुर्ग म्हणतो कीं, भूमिज याचा अर्थ मंगळ हा ग्रह होय. वेदांत ग्रहांचा उल्लेख असल्याबद्दल संशय असणारा थीबो म्हणतो कीं त्यांत उल्लेखिलेला बृहस्पति म्हणजेच गुरु हा ग्रह होय. तैत्तिरीय संहितेंत बृहस्पतीला तिष्याचा कारभारी मानिला आहे. तथापि वरील मत (म्हणजे 'बृहस्पति हाच गुरुग्रह असावा' हें मत) चुकीचें दिसतें. तैत्तिरीय आरण्यकांत जे सप्तसूर्य आले आहेत त्यांत कदाचित् ग्रहांचा उल्लेख अभिप्रेत असेल. ऋग्वेदांत ज्योतिस् (१०, ५५, ३) आणि अश्वमेधांतील घोड्याच्या बरगड्या (१. १६२, १८) यांच्या संबंधानें जी ३४ संख्या योजिली आहे तिच्या द्वारा ऋग्वेदांतील २७ नक्षत्रें आणि सूर्य, चंद्र व पांच ग्रह ही ३४ मंडळी दाखविण्याचा हेतु असावा असें लुडविग म्हणतो. परंतु हा अर्थ करण्यांत मूळाची फार ओढाताण होते.

[१८]देवनक्षत्रः— 'देवांचे नक्षत्रपुंज हें नांव तैत्तिरीय ब्राह्मणांत पहिल्या चौदा नक्षत्रांस दिलेलें आहे. हीं सर्व दक्षिणेस आहेत. व बाकीच्यांस यमनक्षत्रें असें नांव आहे व तीं उत्तरेस आहेत.

[१९]ध्रुव.—सूत्रांमध्यें ध्रुव शब्द ताऱ्याबद्दल आला असून विवाहसंस्कारांत अढळत्वाची खूण म्हणून वधूला हा तारा दाखवितात असा उल्लेख आहे. त्याच्या मागून झालेल्या मैत्रायणी उपनिषदांत, ध्रुवाच्या गती (ध्रुवस्य प्रचलनम्) संबंधानें उल्लेख आहे. पण याचा अभिप्राय ध्रुवताऱ्याची प्रत्यक्ष अवलोकन केलेली गति असा घेतां येत नाहीं, तर कॉवेल म्हणतो त्याप्रमाणें, जगाच्या नाशासारखी एखादी अद्भुत गोष्ट दर्शविण्याचा तेथें अभिप्राय असावा. ध्रुवाच्या गतीवरून याकोबीनें काल ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण काय तर ज्या ताऱ्याला अचल असा ध्रुव तारा म्हणतां आलें असतें तसा तारा खि. श. पूर्वी तीन हजार वर्षांच्या सुमारास होता. पण अशा तऱ्हेनें ताऱ्याच्या नांवावरून कालनिर्णय करण्याची रीति अशास्त्रीय व निरुपयोगी आहे.

[२०]मृग.— सायणाच्या टीकेप्रमाणें याचा 'मृगशिरस् नांवाचा नक्षत्रसमूह' असा अर्थ ऐतरेय ब्राह्मणांत निघतो. परंतु वरील ठिकाणीं 'मृग' शब्दांत सर्व मृगपुंजाचा अन्तर्भाव होतो. म्हणजे या शब्दानें निवळ मृगपुंजाचें शिरच दाखविलें जातें असें नव्हे, तर त्याच्या खांद्यावरच्या 'आल्फा' (α) या ताऱ्याचा आणि डाव्या खांद्यावरच्या 'गॅमा' (γ) या ताऱ्याचाहि मृगांत समावेश होतो असें वाटतें. हा दुसरा अर्थ अधिक संभवनीय आहे. टिळकांच्या मतें मृग अथवा मृगशिरस् हा एक निराळाच समूह आहे व त्याच्यांत, त्याच्या मृगपुंजाच्या पट्टयाचा आणि गुडघ्यांतील दोन तारे व डाव्या खांद्यावरील एक तारा यांचा अंतर्भाव होतो. मृग अथवा मृगशिरस्, मधून बाण गेलेल्या हरणाच्या डोक्यासारखा आहे अशी टिळकांची कल्पना आहे.

[२१]सूर्येनक्षत्र.—शतपथ ब्राह्मणांत, एके ठिकाणीं हा शब्द आलेला असून याचा अर्थ सायणाचार्यांच्या मतानें सूर्याप्रमाणें प्रकाश देणारें नक्षत्र असा आहे. पण सदरील शतपथ ब्राह्मणांतील वाक्याचा खरा अर्थ कण्वप्रतीवरून असा दिसतो कीं, यज्ञ करणाऱ्यानें नक्षत्रांची पर्वा न करतां सूर्य हेंच नक्षत्र समजून चालावें.

## संख्या.

### क्रमवाचक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अष्टम | [१]द्वादश | पंचम |
| एकएक | द्वितीय | प्रथम |
| तुरीय | नवम | श्रेणी |
| तृतीय | पंक्ति | षोळ्हा |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अष्टम | दशम | वितृतीय |
| अष्टाविंश | द्वादश | शततम |
| एकविंश | द्वितीय | षष्ठ |
| एकादश | पंच | षष्ठि |
| तुरीय | पंचम | षोडश |
| तृतीय | प्रथम | सप्तम |

### संख्यावाचक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अमित | त्रिपंचाशत् | पंचदश |
| अशीति | त्रिशत | पंचाशत् |
| अष्ट | त्रिसप्तति | पुरु ( बहु ) |
| एक | दश | लक्ष ( संख्या ) |
| एकक | दशति | विंशति |
| एकशत | दशभुजि ( दशगुणित ) | शत |
| एकादश | | शताग्विन् ( शतगुणित ) |
| चतस्र | द्वक | |
| चतुर्दश | द्वयी | शातिनी |
| चतुःशत | द्वयु | षट्त्रिंशत् |
| चतुःसहस्र | द्वादश | षड्विधान ( षड्विध ) |
| चतुस्त्रिंशत् | द्वि | |
| चत्वारिंशत् | नव | षष् |
| तिस्र | नवति | षष्ठि |
| त्रयस्त्रिंशत् | नियुत | सप्त |
| त्रिंशत् | पंक्ति | सप्तति |
| त्रिक | पंच | सहस्र |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अयुत | अष्टन् | अष्टाचत्वारिंशत् |
| अर्बुद | अष्टम | अष्टाचत्वारिंशदक्षरा |

| | | |
|---|---|---|
| अष्टादशन् | दशन् | पञ्चदश |
| अष्टाविंशति | द्वात्रिंशत् | पञ्चनवति |
| उभय | द्वादशन् | पञ्चम |
| एकत्रिंशत् | द्वादशी | पञ्चविंशँ |
| एकविंश | द्वाविंश | पञ्चाशत् |
| एकादशन् | द्वि | पाङ्क्त |
| एकादशिनी | द्वितीय | प्रथम |
| एकादशी | द्विसाहस्र | प्रयुत |
| एकैक | नव | सप्तन् |
| चतुः | नवचत्वारिंशत् | सप्तति |
| तिस्र | नवति | सप्तदशन् |
| तिस्रतिस्र | नवदशन् | सप्तम |
| त्रयास्त्रिंशत् | नवम | सप्तमी |
| त्रिंशत् | नवविंशति | सप्तविंशति |
| त्रि | नवषष्ठि | साविंश |
| त्रिणवत्रयस्त्रिंशत् | नवाशीति | सहस्र |
| त्रिषाहस्र | न्यर्बुद | साहस्र |
| त्रिसप्त | पञ्चन् | साहस्रवत् |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अशीति | चत्वारि | पङ्क्ति |
| अष्ट | चत्वारिंशत् | पञ्चदश |
| अष्टि | तिस्र | परःसहस्र |
| एक | त्रय | पृथक्सहस्र |
| एकशत | त्रयस्त्रिंशत् | लक्ष |
| एकैका | त्रिपञ्चाशी | विंशति |
| एकोनविंशति | त्रिसप्त | शत |
| चतस्र | दौव ( द्वौ ) | षष् |
| चतुरुत्तर | द्वि | सप्तति |
| चतुष्टय | नवति | सहस्र |

[ वा. सं. ]

दशन्[3]

[1]द्वादश.—बारांचा समुदाय म्हणून हा शब्द ऋग्वेदामध्यें वर्षाला लाविलेला आहे.

[2]पंक्ति.—मूळ या शब्दाचा अर्थ पांचाचा समुदाय असा असून ऋग्वेदापासून याचा अर्थ ओळ असा आहे. तैत्तिरीय आरण्यकांत विशिष्ट विधीनें पावन होणाऱ्या पितरांच्या विशिष्ट संख्येपर्यंत परंपरेस हा शब्द लाविलेला आढळतो.

[3]दशन्.—' दहा' हा शब्द वैदिक काळाच्या आर्य लोकांचा व एकंदरींत सर्व आर्य लोकांचा संख्यावाचनपद्धतीचा मूळ पाया होता. पण हिंदुस्थानांतल्या आर्य लोकांचा हा विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे कीं, फार प्राचीन काळापासून या लोकांनां अतिशय मोठमोठे आंकडे ठाऊक होते. पण इतर देशांच्या आर्य लोकांनां हजारपर्यंतच संख्यावाचन करतां येत असे. वाजसनेयि संहितेमध्यें एक ( १ ); दश ( १० ); शत ( १०० ); सहस्र ( १००० ); अयुत ( १०००० ); नियुत (१००००० ); प्रयुत (१००००००); अर्बुद ( १००००००० ); न्यर्बुद ( १०००००००० ); समुद्र ( १००००००००० ); मध्य (१०००००००००० ); अंत ( १००००००००००० ); परार्ध ( १०००००००००००० ); अशी संख्यांची यादी दिलेली आहे. काठकसंहितेमध्यें हीच यादी सांपडते; पण नियुत व प्रयुत यांचीं स्थानें बदललेलीं आहेत व न्यर्बुदानंतर बद्व ही संख्या मध्येंच आल्याकारणानें समुद्राची किंमत एका शून्यानें वाढली म्हणजे १०००००००००० झाली. तैत्तिरीय संहितेमध्यें वाजसनेयि संहितेंत दिलेल्या यादीप्रमाणेंच दोनदां तीच यादी आलेली आहे. मैत्रायणी संहितेमध्यें अयुत प्रयुत, नंतर पुनः अयुत, नंतर अर्बुद, न्यर्बुद, समुद्र, मध्य, अंत, परार्ध असा क्रम आहे. पंचविंश ब्राह्मणांत वाजसनेयि संहितेंत दिलेली याद न्यर्बुदापर्यंत आलेली आहे व नंतर निखर्वक, बद्व, अक्षित व शेवटीं गो= १०००००००००००० अशी आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणामध्यें निखर्वक याच्या ऐवजीं निखर्व, बद्व याच्याबद्दल पद्म व शेवटीं 'आक्षितिर् व्योमांतः ' आलेलें आहे. शांखायन श्रौतसूत्रामध्यें न्यर्बुदानंतर निखर्वाद, समुद्र, सलिल, अंत्य व अनंत ( १०००००००००००००० ) असा क्रम आहे. संख्येचा क्रम जरी इतक्या दूरवर गेला असला तरी अयुताच्या पलीकडे या संख्याक्रमास फारसें महत्त्व नाहीं. बद्व हा शब्द फक्त ऐतरेय ब्राह्मणांत आलेला आहे, पण तेथें तरी त्याला संख्यात्मक निश्चितार्थ नाहीं; व पुढें पुढें या पुढच्या संख्यांत घोंटाळा आहे. पंचविंश ब्राह्मणांत एक मौजेची गणितश्रेढी सांपडते. या ठिकाणीं यज्ञामधल्या दानांची याद दिलेली आहे व तिजमध्यें प्रत्येक पुढची संख्या मागच्या संख्येची दुप्पट आहे. पहिली सुरवातीची संख्या द्वादश-मानम् ( हिरण्यम् ) म्हणजे १२ च्या किंमतीचें यांतील आहे; पुढें २४, ४८, ९६, १९२, ३८४, ७६८, १५३६, ३०७२ व नंतर 'द्वे अष्टाविंशतिशत माने ' म्हणजे २×१२८×२४ ( येथें १२ हें एकच मान नाहीं तर २४ मानाची संख्या हें मान आहे ) = ६१४४ ही संख्या व त्यापुढें १२२८८, २४५७६, ४९१५२, ९८३०४, १९६६०८ व ३९३२१६ या संख्या आहेत. मोठमोठ्या आंकड्यांबरोबर शतपथ ब्राह्मणांत दिलेली काळाची तात्त्विक व सूक्ष्म विभागणी तुलना करण्यासारखी आहे. या ब्राह्मणांत एका दिवसाचे १५ मुहूर्त कल्पिले आहेत. एक मुहूर्त म्हणजे १५ क्षिप्र; १ क्षिप्र म्हणजे १५ एतर्हीं; १ एतर्हि म्हणजे १५ इदानी व १ इदानि म्हणजे १५ प्राण अशी दिवसाची विभागणी केलेली आहे. शांखायनश्रौतसूत्रामध्यें दिवसाची दशांश पद्धतीनें वांटणी केलेली आहे. एक दिवस म्हणजे १५ मुहूर्त, एक मुहूर्त म्हणजे १० निमेष व एक निमेष म्हणजे १० ध्वंसी होत. वैदिक वाङ्मयांत कांहीं थोडे अपूर्णांकहि आलेले आहेत. अर्ध, पाद, शफ व कला या $\frac{१}{२}$, $\frac{१}{४}$, $\frac{१}{८}$, $\frac{१}{१६}$ असें दर्शवितात. पण यांपैकीं $\frac{१}{२}$ व $\frac{१}{४}$ या नेहमींच्या प्रचारांतल्या आहेत. तृतीय याचा अर्थ एकतृतीयांश असा होतो. ऋग्वेदामध्यें इंद्र व विष्णु यांनीं १००० या संख्येला तीन या संख्येनें भागलें असा उल्लेख

आहे. पण तें कशा रीतीनें हें समजत नाहीं. त्रिपाद् म्हणजे $\frac{3}{4}$ असा अर्थ आहे.

## काल

[ कालविषयक उल्लेख म्हणजे वेदकालीन ज्योतिर्विषयक ज्ञान आणि कांहीं अंशीं निरनिराळ्या ऋतूंतील क्रियांचें ज्ञान. त्या दृष्टीनें प्रस्तुत शब्द महत्त्वाचा आहे. ]

### ऋतु, महिने व युगें [ ऋग्वेद ]

[1]ऋतु
ऋभु
ग्रीष्म
त्रिराजस्य ( ग्रीष्म, वर्षा, हेमंत)
त्र्यनीक ( ग्रीष्म, वर्षा, शरद् )
त्र्युधस् ( वसंत, शरद् , हेमंत )
नानासूर्य ( नाना-विधैः सूर्यैरधिष्ठिता ऋतवः )
प्रावृष्
युग
वसंत
शरद्
हिम
[2]हेमन्त

### [ तै. सं. ]

अंहसस्पति(अधिकमास )
अयावस् ( ग्रीष्म)
आस्कंद ( कलियुग )
इष ( आश्विन )
ऊमस् ( शरद् )
ऊर्ज ( कार्त्तिक )
ऋतु
एनस् ( वर्षाऋतु )
कृत ( कृतयुग )
ग्रीष्म
तप ( माघ )
तपस्य ( फाल्गुन )
त्रेता ( युग )
द्वापर ( युग )
नभ ( श्रावण )
नभस्य ( भाद्रपद )
पापसम
पूर्णमास
प्राणायन ( वसंत )
फल्गुनी पूर्णमास ( फाल्गुन )
मधु ( चैत्र )
माधव ( वैशाख )
यावस् ( वसंत )
वर्षा
वसन्त
शरद्
शुक्र ( ज्येष्ठ )
शुचि ( आषाढ )
शैशिर
संसर्प
सगर
सब्द
सह ( मार्गशीर्ष )
सहस्य ( पौष )
हेमन्
हेमना
हेमन्त

### [ अथर्व वेद ]

अषाढ
[3]आर्तव
ग्रैष्म
नैदाघ
वसन्त
वासन्तिक
वैश्वकर्मण
शतंहिम
शतशारद
शतंहिम
शरद्
शारद
शिशिर
शैशिर
हिम
हेमन्त

### दिवसनामें [ ऋग्वेद ]

अहन्
[4]अहर्दिव
अहर्दृश्
अहोरात्र
कल्प
घृण
घ्रंस
तिरोअहन्
दिन
दिव
दिवा
दिवातर
दिवेदिवे
द्यविद्यवि
द्युम्
पक्थ
पुरुदिन
भानु
वस्तु
वासर
स्वसर

### रात्रिनामें [ ऋग्वेद ]

अक्तु
अख्यत्य ( प्रकाशरहित )
असिक्नी
ऊधस्
ऊर्म्या
ऋच्यमाने ( अहोरात्र )
कृष्णयामा
कृष्णी ( कृष्णवर्णा )
क्षपा
घृताची
तमस्
तमस्वती
तमिस्रा
[5]दोषा
[6]नक्ता
नम्या
निम्रुच् ( अस्तसमय )
पयस्
पयस्वती
[7]परितक्म्या
प्रदोष
मोकी
यम्या
रजस्
रात्रि
राम्या
वज्रिनी
वस्त्री
शर्वरी
शिरिणा
शोको
श्यावी
हिमा

### काल व कालसंबंधीं [ ऋग्वेद ]

अनूवी (उषारात्रि)
अनेहस् ( काल )
अपरो ( सर्वकाल )
अपिशर्वर ( मध्यरात्र )
अप्रपित्व ( सायंकाल )
अमा ( तिथि )
आमेम्याने ( अहोरात्रे )
आयति ( दीर्घकाल )
इन्द्रद्विष्टा ( रात्रि )
उषसोव्युष्टि ( उदयकाल )
कला
[8]काल
चंद्रमस् ( अमावास्या व पौर्णिमा)
[9]त्रियुग
दशमास्य
दीर्घ
धाता
नित्य
निमिष
निम्रुच् ( सायंकाल )
पंचयाम
परिवत्सर
पर्वन् ( पौर्णिमा, अमा )
[10]पितृयाण
पूर्वाह्ण
[11]प्रपित्व
प्रातर्
प्रावृषीण
मध्यंदिन
[12]मास
[13]मुहूर्त
यामन्
[14]युग
राका
[15]वर्ष
वस्तु
वृषभ
शतयामन्
शतशारद
शतहिम
संवत्स ( संवत्सर )
[16]सवत्सर
संवत्सरीण ( संवत्सरेभवं पयः )
[17]संगव ( प्रातःकालोत्तर काल )
सप्तचक्र
सप्तरश्मि
सप्ताश्व
साति
सहस्रयामन्
[18]सिनीवालि
सुयामन्
[19]हिम ( संवत्सर )
हिम्य
ह्यस्

### [ तै. सं. ]

अग्निकेतु
अद्याश्वस् ( अद्य, श्वः )
अपरपक्ष
अपराह्ण
अब्द
अमावास्या
अयन
अर्धमास
अष्टमी
अहन्
अहोरात्र
आकल
आस्कंद ( कलियुग)
इदावत्सर
इदुवत्सर
उत्तरेद्यु
उदयन
उदित
उषासानक्ता
ग्रीष्म
[20]चातुर्मास्य
चित्रापूर्णमास
छंदस्वती
जारी ( जीर्णरात्र )
तिरोअह्निय
तिष्या पूर्णमास
तीर्थ ( दुःखोत्तरणकाल )
दर्श
दोषा
दोषावस्त
नक्त
नक्तोषसा
निमिष
परिवत्सर
परुस्
पर्व
पूर्णमास
पूर्वपक्ष
प्रत्ना ( उषःकाल )
प्रातस्
प्रातस्तन
मध्यन्दिन

मध्यरात्र
राका
रात्र
वत्सर
वार्षिक
वार्षी
विधान्या ( तिथि )
व्यष्टका ( कृष्ण
प्रतिपदा )
शुक्रऋषभा
संवत्सर
संवत्सरसाति
संवत्सरस्वदित
सयस्
समा ( वर्ष )
समानप्रभृति ( समा-
नोदर्क )
समानमूर्ध्नि
सायं
सायंप्रातः
साह्न
सुदिन
सुमेक

[ अथर्व वेद ]

अतिशर्वर
अनिमेष
अनेह
अपर्तु
अमा
अमावास्या
अर्धमास
असुतपा ( रात्रि )
अहन्
अहर्द्यु
अहोरात्र
आयती
आयन
इदावत्सर
उदयन
ऋत्विय
एकज (अधिकमास)
एकमूर्धन्
एकर्तु
[२१]एकाष्टका(अष्टमी)
कल्प
काल
क्षपा
क्षामन्
चतुर्थी
त्रिंशदरा
त्रैहायण
[२२]दर्श
दशपक्ष
[२३]दशमी
दोषा
दोहा
द्यु ( दिवस )
द्वादशाकृति
द्वादशार
नक्त
पंचार
परिवत्सर
परिवत्सरीण
[२४]पौर्णमासी
प्रदिश्
प्रोष्ठपदा
भद्राह
भूतभव्य
मास् ( मास )
मास
[२५]याम
रजनी
वर्ष
वार्षिक
वार्षिकी
विश्वशारद्
व्युष्टि
व्रत्या ( व्रताहे
रात्रि )
शतयामन्
शतहायन्
षट्पक्ष
षडर
संवत्सर
संगव
समय
समवती ( रात्रि )
[२६]समा ( वर्ष )
सहस्राह्व्य
सायकप्रनुत्त
सायंभव
सुकल्प
सुदिन
सूषा
[२७]हायन
हायनी
हैमन

[ संहितेतर ]

[२८]तिथि
निदाघ ( उन्हाळा)
पंचदशी ( १५ वा दिवस )
मध्यवर्ष ( पावसाळ्याचा मध्य )
मालिम्लुच ( अधिकमास )
महारात्र ( उत्तररात्र )
महाह्न ( दुपार )
मात्रा ( ऱ्हस्वस्वरोच्चारणकाल )
यव्य ( मास )
रथाह्व्य ( रथानें होणारा एक दिवसाचा प्रवास )

वेदकालांत कालगणना पद्धतशीर झाली होती किंवा नव्हती हा प्रश्न आहे. अधिकमासाचा उल्लेख कालगणनेचा विकास पुष्कळ दाखवितो. ऋग्वेदकालीन ऋतुविषयक कल्पना स्पष्ट नाहींत.

[१]ऋतु.–ऋग्वेदकालानंतर ह्या शब्दाचा बराच वेळ उल्लेख आलेला आहे, परंतु त्यांचीं नांवें दिलेलीं नाहींत. ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत वसन्त, ग्रीष्म आणि शरद् अशीं नांवें आहेत. ऋग्वेद कालांत प्रावृष् (पावसाळा) आणि हिंवाळा ( हिमा, हेमन्त ) माहीत होते. वर्षाचे सर्वसाधारण विभाग ( ऋग्वेदांत नसलेले ) पांच असावेतः वसन्त, ग्रीष्म, वर्षा, शरद् व हेमन्त–शिशिर. कारणपरत्वें वर्षा–शरद् एक विभाग कल्पून हे पांच ऋतू दुसऱ्या प्रकारानें विभागीत. कधीं कधीं हेमन्त आणि शिशिर असे दोन ऋतू धरून सहा ऋतू आहेत असें मानीत. तणेंकरून वर्षाचे दोन महिन्याचे सहा ऋतू होत असत. एका ठिकाणीं सात ऋतू आहेत असें मानलें आहे. अशा ठिकाणीं कदाचित् अधिक महिना एक ऋतु मानीत असावेत असें वेबर आणि झिमर ह्यांचें मत आहे; अथवा रॉथच्या सूचनेप्रमाणें सात या आंकड्याची आवड जास्त, म्हणून सात ऋतू मानीत असावे. कधीं कधीं ऋतु हा शब्द महिन्याकरितांहि योजीत. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें शेवटचा ऋतु हेमन्त हा होय. जसजसे वैदिक आर्यन् पूर्वेकडे येत गेले तसतशी तीनपासून पांच ऋतूंची वाढ झाली असें झिमरचें म्हणणें आहे. ही वाढ ऋग्वेदांतील नाहीं; परंतु नंतर ज्या संहिता लिहिल्या गेल्या त्यांच्या वेळची आहे. वर्षाचे दोन विभाग उन्हाळा आणि हिंवाळा यांचा पत्ता ऋग्वेदांत सांपडत नाहीं. त्यांतील दोन शब्द, हिमा आणि समा हे वर्षाचे साधारण संकेत शब्द आहेत, आणि तेथील शरद् हा शब्द वरील दोन्हींपेक्षां वर्षाचें साधारण नांव आहे; कारण तो शेतकऱ्याचा अतिशय महत्त्वाचा जो हंगामाचा काळ तो दर्शवितो. [illegible]दातील एका उताऱ्यांत [illegible]व असे जे दोन भाग केले आहेत ते फक्त [illegible]चारिक [illegible]सून कोणत्याहि तऱ्हेनें जुन्या परंपरेचे द्योतक होऊं शकत नाहींत.

[२]हेमंत.–'हिंवाळा' हा शब्द एकदांच ऋग्वेदामध्यें आलेला आहे. पण मागाहून झालेल्या ग्रंथांत तो वारंवार येतो. झिमरनें ऋग्वेदामध्येंच हवामान बदलत गेल्याचे कसकसे दाखले आहेत, हें दाखविण्याची खटपट केली आहे. तो म्हणतो कीं, कांहीं सूक्तांमध्यें हिंवाळ्याचा बिलकुल उल्लेख नाहीं, पण पावसाळ्याचें बरेंच वर्णन आहे. ह्यावरून ज्या सूक्तांत हिमाच्छादित पर्वताचें वर्णन आहे तीं व हीं सूक्तें निरनिराळ्या स्थलीं व कालीं लिहिलीं गेलीं असलीं पाहिजेत असें सिद्ध होतें. पण ह्याच मुद्द्यावर ऋग्वेदांतील सूक्तें निरनिराळ्या ठिकाणीं रचलीं गेलीं असें मानणें चुकीचें होईल. ऋग्वेदांतील बहुतेक सूक्तें 'मध्यदेशांत' रचलीं गेलीं ह्याबद्दल शंका नाहीं. तेव्हां शीत व हिम ह्यांविषयीं जे उल्लेख आलेले आहेत ते स्थानिक भेद सुचवितात एवढेंच म्हणतां येईल. पण पुढें तीन ऋतूंचे चार ऋतू झाले ही गोष्ट निराळी; त्यावरून आर्य लोकांच्या प्रगतीची मनास खात्री पडते.

शतपथ ब्राह्मणांत ( १. ५, ४, ५)हिंवाळ्याचें असें वर्णन आलें आहे कीं, त्या वेळीं झाडेंझुडें वाळतात, पानें गळून पडतात, पक्षी फार उंच न उडतां वारंवार घरट्याकडे येतात.

[३]आर्तव.–आर्तव म्हणजे एकापेक्षां जास्त ऋतू असणारा वर्षाचा भाग. परंतु झिमरनें सुचविल्याप्रमाणें हा शब्द 'अर्धवर्ष' दर्शवीत नाहीं. कारण हा शब्द नेहमीं अनेकवचनीं असतो; द्विवचनीं नसतो. अथर्ववेदांत ह्याची जागा ऋतु आणि वर्ष

( हायन ) ह्यांच्यामध्यें आहे. परंतु तो समाहारांत देखील आढळतो. जसें: 'ऋतु, आर्तव, मास, वर्ष (अथर्व ३. १०, १०); 'पंधरवडा, मास, आर्तव, ऋतु' ( अथर्व ११. ७, २० ); किंवा 'ऋतु, आर्तव, महिना, पंधरवडा, अहोरात्र, दिवस' (अथर्व १६. ८, १८ ). वाजसनेयि संहितेंत ( २२. २८ ) मास, ऋतु आर्तव, वर्ष असा अनुक्रम आहे अथवा अथर्व वेदांत फक्त ऋतूबरोबरहि हा शब्द आढळतो.

[4]अहन्.–' दिवस. ' दुसऱ्या राष्ट्रांप्रमाणें भरतभूमींत देखील प्राधान्येंकरून जरी नाहीं तरी दिवस आणि रात्र हे दोन शब्द वेळ दाखविण्याकरितां उपयोगांत आणीत असत ( ऋ. ४. १६, २६; ८. १९, ३ ). रात्रीला कृष्ण आणि दिवसाला अर्जुन असें त्यांतील फरक दर्शविण्याकरितां म्हणत. ' रात्र आणि दिवस ' हे अहोरात्र या शब्दांत आढळतात. दिवसाचे निरनिराळ्या तऱ्हेनें भाग करीत. अथर्ववेदांत उद्यन् सूर्यः, संगव, मध्यंदिन, अपराह्ण आणि अस्तंयन् असे विभाग आहेत. तैत्तिरीय ब्राह्मणांतहि ( १. ५, ३, १ ) तोच क्रम आहे. परंतु पहिल्या आणि शेवटल्या शब्दाबद्दल अनुक्रमें प्रातर् आणि सायाह्न हे शब्द आहेत. त्याच्याहीपेक्षां लहान जी यादी आहे तींत फक्त प्रातर्, संगव आणि सायम् असेच भाग आहेत. मैत्रायणी संहितेंतील (४. २, ११ ) क्रम उषस्, संगव, मध्यंदिन आणि अपराह्ण असा आहे. प्रभाताला झिमरच्या मताप्रमाणें अपिशर्वर हें नांव आहे संगवच्या पूर्वी ज्या वेळीं गायींनां दूध काढण्याच्या आधीं चारा वगैरे घालतात आणि पक्षी वगैरे किलकिल करतात त्या वेळेला 'स्वसर' असें म्हणत. त्या वेळेला झिमरच्या मतें 'प्रपित्व' असेंहि म्हणत. परंतु गेल्डनेर म्हणतो कीं, त्या काळाला मध्याह्नानंतरचा काळ असें म्हणतां येईल; आणि त्याला अपिशर्वर हेंहि नांव आहे–कारण त्याचा अर्थ 'येणाऱ्या रात्रीच्या मर्यादेजवळ' म्हणजे 'सूर्य मावळावयास जातो तेव्हां' असा आहे. दुसऱ्या बाजूनें विचार केला असतां अभिपित्व हें संध्याकाळचें नांव आहे; कारण, त्या वेळेला सर्व स्थिरता असते. सकाळ आणि संध्याकाळ यांनां सूर्योदय ( उदिता सूर्यस्य ) अथवा सूर्यास्त ( निम्रुच् ) हेहि शब्द होते. मध्यदिवसाला मध्यम् अह्नाम्, मध्ये, अथवा मध्यं–दिन म्हणत. संगव म्हणजे सकाळ ( प्रातर् ) आणि दुपार ( मध्यंदिन ) ह्यांच्या मधील काळ. वेळेचे दिवसापेक्षां लहान भाग दिलेले फारसे आढळत नाहींत. तथापि शतपथ ब्राह्मणांत ( १२. ३, २, ५ ) रात्र आणि दिवस मिळून ३० मुहूर्त होतात असा उल्लेख असून १ मुहूर्त = १५ क्षिप्र; १ क्षिप्र = १५ एतर्हि; १ एतर्हि = १५ इदानी; १ इदानि = १५ प्राण; १ प्राण = १ निमेष असें कोष्टक दिलें आहे. शांखायन आरण्यकांतील क्रम 'ध्वंसयो, निमेषाः, काष्ठाः, कलाः, क्षणा, मुहूर्ता, अहोरात्राः' असा आहे. झिमरच्या मतें ऋग्वेदांतील एका वचनांत ( १. १२३, ८ ) दिवसाचे व त्याचप्रमाणें रात्रीचे ३० भाग केले आहेत, आणि त्यांची तो बाबिलोनमधील दिवसरात्रीच्या ६० भागांशीं तुलना करतो. परंतु ३० योजनें हा शब्द फार संदिग्ध आहे. बर्गेन म्हणतो कीं, तो एक कोणतीहि विचारमाला तयार करण्याचा पाया आहे. या अनुक्रमांत अहोरात्राणि, नंतर अर्धमास, मास, ऋतु आणि संवत्सर हे कालाचे मोठे भाग आहेत.

[5]दोषा.–' संध्याकाळ. ' हा शब्द ऋग्वेद कालापासून पुढें झालेल्या ग्रंथांत ' उषा ' या शब्दाच्या उलट अर्थी आलेला आहे. छांदोग्योपनिषदामध्यें ह्या शब्दाची प्रातर् ह्या शब्दाशीं तुलना केलेली आहे.

[6]नक्ता.–' रात्र. ' हा शब्द ऋग्वेदांत वारंवार व मागाहून झालेल्या ग्रंथांत कधीं कधीं सामान्यतः नक्तम् ह्या क्रियाविशेषणाच्या रूपांत आलेला आहे.

[7]परितक्म्या.–ऋग्वेदामध्यें अनेक ठिकाणीं रात्र असा ह्याचा अर्थ आहे. सीजच्या मतानें याचा एका ठिकाणीं (१. ११६, १५) तरी शर्यतीचा निकाल लागण्याचें ठिकाण म्हणजे प्रपित्वाच्या अर्थासारखा अर्थ आहे. पण ह्याबद्दल फार शंका आहे.

[8]काल.–हा वेळवाचक सर्व साधारण शब्द ऋग्वेदांतील दहाव्या मंडळांत एकदां आला आहे. अथर्ववेदांत हा शब्द 'नशीब, दैव' ह्या अर्थीं आला आहे. ब्राह्मणांत ऋतु ह्या शब्दाच्या ठिकाणीं काल हा शब्द पुष्कळ वेळां उपयोगांत आणिलेला आढळतो. वेळेच्या व्यापक भाग म्हणजे 'भूत,' वर्तमान ( भवत् ) आणि भविष्यत् हे होत व दुसरे इतर भाग म्हणजे अहन्, मास, संवत्सर हे आहेत.

[9]त्रियुग.–हा शब्द नपुंसकलिंगी असून ऋग्वेदामध्यें आलेला आहे, व तेथें असें म्हटलें आहे कीं, ओषधी ह्या देवांच्या अगोदर तीन युगें निर्माण झाल्या ( देवेभ्यः त्रियुगं पुरा ). निरुक्तावरील भाष्यकाराचें असें मत आहे कीं, युग शब्दाचा अर्थ पुढें झालेल्या हिंदु कालगणनशास्त्राप्रमाणें ज्याला युग म्हणत असत तें युग असा होय; व एकंदर वाक्याचा असा अर्थ कीं, ओषधी पहिल्या युगांत निर्माण झाल्या. शतपथ ब्राह्मणांत ( ७. २, ४, २६ ) त्रियुग ह्याचा अर्थ तीन ऋतू असा घेतला आहे. हे तीन ऋतू म्हणजे वसंत, शरद् व वर्षा हे होत. या ग्रंथांत पुरा व त्रियुगं हे शब्द निराळे घेऊन, 'पूर्वी तीन ऋतूंमध्यें' असा 'त्रियुगं पुरा'चा अर्थ केला आहे. तीन युगें हा सामान्य अर्थच येथें पुरेसा आहे. अशा ठिकाणीं 'तीन' हा शब्द लोकांत प्रचलित असलेल्या दंतकथेमध्यें नेहमीं सांपडतो. लाटचायन श्रौतसूत्रांत याचा अर्थ त्रिवर्ष असा एका ठिकाणीं केला आहे.

[10]पितृयाण.–हा शब्द ऋग्वेद व मागाहूनचे ग्रंथ ह्यांमध्यें आलेला आहे. लो. टिळकां[illegible]चें असें मत आहे कीं, देवयान ह्याचा मेळ सूर्याच्या उत्तरायणा[illegible] व पि[illegible] ह्याचा संबंध सूर्याच्या दक्षिणायनाशीं आहे [illegible] ब्राह्मणांत वसंत, ग्रीष्म व वर्षा ऋतु ह्यांचा संबंध देवां[illegible]लावलेला आहे; व बाकीच्या ऋतूंचा संबंध पितरांशीं लावलेला आहे. त्यावरून ते असें अनुमान करतात कीं, देवयानास सुरुवात मेषविषुवांत होत असे व पितृयाणास

तुलाविषुवांत होत असे. ह्या गोष्टीचा ते तैत्तिरीय ब्राह्मणांतल्या देव व यम या नक्षत्रांमधल्या भेदाशीं संबंध लावतात.

[11] प्रपित्व.—कालाचें नांव या अर्थानें ऋग्वेदांत हा शब्द बरेच वेळां आलेला आहे. एका वचनांत ( ८. १, २९ ) पूर्वापर संदर्भावरून याचा अर्थ अगदीं स्पष्ट झाला आहे. सूर्योदयीं ( सूर उदिते ), मध्याह्नीं ( मध्यंदिने दिवः ) आणि संध्यासमयीं प्रपित्व कालीं ( अपिशर्वरे ) दुसऱ्या एका वचनांत ( ७. ४१, ४ ) 'दिवसाच्या शेवटीं, बराच दिवस गेल्यानंतर' असा अर्थ बरा दिसतो. शिवाय 'अभिपित्वे अह्नः' 'दिवसाच्या शेवटीं,' यावरून सुद्धां संध्याकाळ हाच अर्थ निघतो. गेल्डनेरप्रमाणें याचा अर्थ 'आणीबाणीचा प्रसंग,' 'निर्णयकारक प्रसंग' असा आहे. अर्थात् हा प्रसंग लढाईंतील किंवा शर्यतींतील असून त्यावरून साहजिकच 'दिवसाचा शेवट' हा त्याचा अर्थ ठरतो.

[12] मास.—याचा अर्थ 'महिना' असा आहे. ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत हा शब्द अनेक वेळां येतो. महिन्यांतले विशेष दिवस ( किंवा जास्त सयुक्तिक म्हणावयाचे म्हणजे 'रात्री' ) म्हणजे 'अमावास्या' ( घरीं राहण्याची रात्र ) व पूर्णचंद्राची 'पौर्णमासी' हे होत. अथर्ववेदाच्या दोन सूक्तांत या दोन दिवसांचें वर्णन अनुक्रमें आलें आहे. चंद्राच्या निरनिराळ्या अवस्थेंतील दिवसांनां देवता मानल्याचें सिनीवालि—अमावास्येच्या आधींचा दिवस, कुहु अथवा गुंगु—अमावास्येचा दिवस, अनुमति—पौर्णिमेच्या आधींचा दिवस व राका—पौर्णिमेचा दिवस या चार नांवांत दिसून येतें. राका याचा अर्थ मॅकडोनेल यांनें अमावास्या असा दिला आहे तो चूक आहे. पौर्णिमा आणि अमावास्या या दिवसांचें महत्त्व दर्श-पूर्णमासौ या अनुक्रमें त्या त्या दिवशीं केल्या जाणाऱ्या यागांमध्यें दिसून येतें. प्रत्येक महिन्यांत एकाष्टका म्हणजे वद्य अष्टमी महत्त्वाची मानीत असत. पंचविंश ब्राह्मणामध्यें ( १०. ३, ११ ) वर्षांत पौर्णिमा आणि अमावास्या यांच्यामध्यें अशा बारा एकाष्टका असतात असें म्हटलें आहे. यजुर्वेदांत आणि इतरत्र एकाष्टकेचें विशेष महत्त्व गणिलें आहे. कित्येकांच्या मतें ही महत्त्वाची अष्टमी माघ वद्य अष्टमी होय. हा दिवस म्हणजे वर्षाचा शेवट अगर नूतन वर्षारंभ होय. कौषीतकि ब्राह्मणांत ( १९. २३ ) जरी माघांतल्या अमावास्येला दक्षिणायनान्त होतो असें म्हटलें आहे, तरी कदाचित् हा दक्षिणायनान्त माघी पौर्णिमेच्या आधींच्या अमावास्येस होत असेल; माघ पौर्णिमेच्या नंतरच्या अमावास्येस होणार नाहीं. वर्षारंभानंतरची पहिली अष्टका म्हणून या एकाष्टकेला महत्त्व प्राप्त झालें असें मानण्यास हरकत नाहीं. पौषांतल्या पौर्णिमेनंतर[illegible]या प्रतिपदेपासून माघ सुरू होतो असें जें भाष्य[illegible]रांचें मत [illegible]र यास मान्य आहे. परंतु कोणताहि महिना अमावास्येनंतर [illegible]ऊन पुढील अमावास्येच्या आधल्या दिवशीं संपतो असा अर्थ [illegible] अधिक सोपें आहे. बौधायन श्रौतसूत्रांमधील कित्येक उतारे (२. १२; ३. १; २६.१८; ३०.३), आणि कौषीतकि ब्राह्मण (१.३), शतपथ ब्राह्मण (९.१, १,७) हीं सर्व स्थलें पौर्णिमा ही महिन्याच्या मध्यें असून अमावस्या ही महिन्याच्या आरंभीं अगर शेवटीं आहे असें दाखवितात. हॉपकिन्सच्या मतें कौषीतकि ब्राह्मण (५.१) व शतपथ ब्राह्मण (६. २, २, १८) महिन्याला पौर्णिमेपासून सुरुवात होते असें दाखवितात. हें मत ग्राह्य धरलें तर माघांतल्या दक्षिणायनान्ताच्या एक आठवडा आधीं म्हणजे माघ वद्य अष्टमीस अष्टका येईल. अमावास्येच्या पुढील दिवसापासून अमावास्येपर्यंत—ज्याला अमांत असें म्हणतात–, अगर पौर्णिमेच्या पुढील दिवसापासून पौर्णिमेपर्यंत–ज्याला पौर्णिमांत म्हणतात—महिना गणला जात असे याविषयीं खात्रीलायक आधार नाहीं. दुसरी पद्धत उत्तर हिंदुस्थानांत उचलली गेली, व पहिली दक्षिणेंत रूढ झाली. याकोबी म्हणतो कीं, फाल्गुनपौर्णिमेपासून वर्षारंभ होत असे; आणि ज्या नक्षत्राशीं पौर्णिमेच्या चंद्राचा संयोग झाला असेल त्या नांवानें महिना ओळखला जात असे. ओल्डेनबर्गच्या मतें अमावास्या हा पौर्णिमेपेक्षां बराच जास्त निश्चित विभागदर्शक काल आहे. ग्रीक, रोमन आणि यहुदी वर्षें अमावास्येलाच सुरू होतात; आणि ह्यास वैदिक पुरावा म्हणजे महिन्याची शुक्ल आणि कृष्ण ही विभागणी पूर्व आणि अपर पक्ष या नांवांनीं संबोधिली जात असे हा होय. वेदांत पौर्णिमान्त पद्धति होती असें मानणें जरी शक्य असलें तरी तें अनवश्यक आहे असें थीबोचें मत आहे.

वेबर म्हणतो कीं, भाष्यकारांच्या म्हणण्याप्रमाणें पौर्णिमांत महिन्याचा उल्लेख कौषीतकि ब्राह्मणांत येतो. परंतु त्या उताऱ्यावर भर देणें, किंवा अमांत पद्धत वेदांस अक्षरशः मान्य होती असें मानणें चूक होईल. परंतु हें संभवनीय आहे कीं, महिनारंभ अमावास्येपासून मानला जात असे व पौर्णिमा महिन्यामध्यें येत असे. प्रत्येक महिन्याचे तीस दिवस धरीत ही गोष्ट कित्येक उताऱ्यांवरून सिद्ध झाली आहे. ह्या महिन्याचा उल्लेख प्राचीनतम ग्रंथांतून प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीत्या दिसून येतो. हा ब्राह्मणांतला सर्वमान्य महिना आहे आणि हा वैदिक काळीं मान्य झालेला महिना होता असें कबूल केलें पाहिजे. ब्राह्मण वाङ्मयांत दुसऱ्या कोणत्याहि महिन्याचा उल्लेख केलेला नाहीं. सूत्रांमध्यें फक्त निरनिराळ्या महिन्यांचा उल्लेख केलेला आहे. सामवेदावरील लाट्यायन श्रौत सूत्रांमध्यें ( ४. ८ ) पुढील गोष्टींचा उल्लेख केलेला आढळतोः ( १ ) प्रत्येकीं २७ दिवस असे बारा महिने म्ह० ३२४ दिवस मिळून एक वर्ष. ( २ ) ३५१ दिवसांचें वर्ष—म्हणजे २७ दिवसांचे बारा महिने आणि २७ दिवसांचा एक ( अधिक ) महिना. ( ३ ) ३५४ दिवसांचें वर्ष–म्हणजे ३० दिवसांचे सहा महिने आणि २९ दिवसांचे सहा महिने, किंवा दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे चांद्र वर्ष. ( ४ ) ३६० दिवसांचें वर्ष म्हणजे सावन वर्ष. ( ५ ) ३७८ दिवसांचें वर्ष. थीबोनें स्पष्ट दाखविलें आहे कीं, हें ( ३७८ दिवसांचें ) वर्ष तिसऱ्या वर्षी येत असे. सौर आणि सावन वर्षांमध्यें जुळतें घेण्यासाठीं १८ दिवसांची

तिसऱ्या वर्षीं भर टाकण्यांत येत असे. सामसूत्रांमध्यें ३६६ दिवसांच्या वर्षाचा उल्लेख नाहीं. ह्याची माहिती पहिल्यानें ज्योतिषांत आणि गर्गसंहितेंत आली आहे. वैदिक कालांत ३५४ दिवसांचें वर्ष होतें किंवा नाहीं याची खात्रीलायक माहिती नाहीं. झिमरच्या मतें गर्भावस्थेचा काल केव्हां केव्हां दहा महिने (ऋ. ५. ७८, ७-९; अथर्व १. ११, ६; काठक सं. २८. ६; शत. ब्रा. ४. ५, २, ४ इ.) व केव्हां केव्हां एक वर्षाचाहि (पंच. ब्रा. १०. १, ९; का. सं. ३३. ८; शतपथ. ६. १, ३, ८; ऐ. ब्रा. ४. २२) उल्लेखिलेला असतो, ह्यावरून ह्याची सिद्धता होते. परंतु हा महिना म्हणजे २७ दिवसांचा नियतकालिक महिना होय. कारण वर्ष (३० दिवसांचा महिना व १२ महिन्यांचें वर्ष असें) घेतलें तर हा काल फार मोठा होतो. हें वेबरचें म्हणणें कदाचित् बरोबरहि असूं शकेल. दुसरे पक्षीं दहाव्या महिन्यांत जन्म होतो असें गृहीत धरलें तर दहा महिन्यांचा काल गर्भधारणेच्या कालाशीं जुळतो. म्हणून तीस दिवसांचा महिना हा अर्थ येथें होऊं शकेल.

प्रत्येक महिना तीस दिवसांचा; व अशा बारा महिन्यांचें मिळून एक वर्ष हें मत शास्त्रीय रीत्या बरोबर नसल्यामुळें झिमरचें असें ठाम मत आहे कीं, एक अधिक महिना धरावा लागतो हें जाणूनच ही वर्षयोजना उपयोगांत आणली जात होती, आणि हें वर्ष पांच वर्षांच्या युगाचा अगर चक्राचा एक भाग बनलें.

ही पद्धति ज्योतिषांवरून चांगली कळते. प्रत्येकीं २९$\frac{16}{31}$ दिवसांच्या ६२ महिन्यांचें मिळून एक युग बनतें; म्हणजे, १८३० दिवस मिळून एक युग होतें. यांत एक मध्यें आणि एक शेवटीं असे दोन महिने मिळवावयाचे असतात. अथवा ३० दिवसांच्या ६१ महिन्यांचें, अथवा ३०$\frac{1}{2}$ दिवसांच्या ६० महिन्यांचें हें युग बनतें. ३६६ दिवसांचें सौर वर्ष हें स्पष्टपणें यांतील वर्षमान होय. हें वर्ष वास्तविक वर्षापेक्षां थोडें मोठें असल्या कारणानें ही पद्धति निर्दोष म्हणतां येणार नाहीं. ब्राह्मणकालामध्यें ही पद्धति रूढ होती असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण, त्या वेळेस खऱ्या वर्षाच्या कालाविषयीं नक्की निर्णय झालेला दिसत नाहीं. ऋग्वेदामधून झिमरनें दाखविलेल्या उल्लेखांत (१. १६४, १४; ३. ५५, १८) फारसें तथ्य नाहीं असें मॅकडोनेल म्हणतो व पंचविंश ब्राह्मणामधून (१७. १३, १७) त्यानें पंचक युगाविषयीं दाखविलेला उल्लेख फक्त टीकेंत असून मूळांत आढळत नाहीं. फार तर असें म्हणतां येईल कीं, अधिक महिने घालण्याकरितां सोयीचा काल म्हणजे पांच वर्षे होय असें मानण्याची प्रवृत्ति होती, व तिचीच प्रगति ज्योतिषांत झाली. परंतु ३६६ दिवसांचें वर्ष त्या वेळेस माहीत होतें असें मात्र आपणांस म्हणतां येणार नाहीं असें मॅकडोनेल म्हणतो. दुसरे पक्षीं ३६० दिवसांचें चांद्र वर्ष खऱ्या वर्षाशीं मिळतें घेण्याचा प्रयत्न त्या वेळेस झाला होता यांत कांहीं शंका नाहीं. ह्या वर्षालाच लाटयायन श्रौतसूत्रानें (४. ८) सौर वर्ष लेखिलें आहे, व सूर्य प्रत्येक नक्षत्रांतून १३$\frac{1}{3}$ दिवसांत परिक्रमण करतो असें म्हटलें आहे. चांद्र वर्ष आणि वास्तविक सौर वर्ष यांचा मेळ घालण्यासाठीं दर तिसऱ्या वर्षीं १८ दिवस जास्त घालण्याचा क्रम स्वीकारलेला आहे. महिन्याचा काल निश्चित करण्याविषयींच्या अडचणींचें प्रतिपादन ऋग्वेदांत व नंतरच्या सर्व वाङ्मयांत आढळतें. महिन्याचा काल कोठें ३० दिवस (अथर्व १३. ३, ८), कोठें ३५ दिवस (शतपथ १०. ५, ४,५) व कोठें ३६ दिवस (शतपथ ९. १, १, ४३) दिला आहे. शेवटची संख्या सहा वर्षांनीं धरावयाच्या अधिक महिन्याचा काल दाखवीत असेल, परंतु तसें म्हणण्यास आपणांजवळ विशेष पुरावा नाहीं. १२ अगर १३ महिन्यांचें वर्ष होतें ह्याबद्दल यजुर्वेदावरील सर्व संहिता व ब्राह्मणग्रंथ यांत उल्लेख सांपडतो. महिन्यांचीं नांवें फारशीं प्राचीन नाहींत ही गोष्ट मात्र जास्त आश्चर्यकारक दिसते. *अभिचयनाचें वर्णन* देतांना यजुर्वेदांत या महिन्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. हीं नांवें खालीलप्रमाणें आहेतः (१) मधु, (२) माधव (मधुमास, वासन्तिकावृतू), (३) शुक्र, (४) शुचि (ग्रीष्मकाळ, ग्रीष्मावृतू), (५) नभ (नभः), (६) नभस्य (पावसाळ्यांतील महिने, वार्षिकावृतू), (७) इष, (८) ऊर्ज (शारदावृतू), (९) सह (सहस्), (१०) सहस्य (हिंवाळ्यांतील महिने, हैमन्तिकावृतू), (११) तप (तपस्) व (१२). तपस्य (थंड महिने, शैशिरावृतू). सोमयाग व अश्वमेध यांमध्येंहि मुख्यतः अशाच महिन्यांच्या याद्या दिलेल्या आहेत. इतरत्रहि कांहीं निराळ्याच नांवांच्या याद्या सांपडतात (तै. सं. १. ७, ९, १). प्रचलित असलेल्या नांवांशीं हीं नांवें मुळींच जुळत नाहींत. पुरोहितांनीं महिन्यांनां नांवें देण्याचा कांहीं तरी केलेला प्रयत्न, यापेक्षां जास्त महत्त्व या याद्यांस देतां येईल कीं नाहीं ह्याबद्दल शंकाच आहे. वेबरनें असें दाखविलें आहे कीं, मधु आणि माधव हीं वसंत कालाचीं नांवें म्हणून आढळतात आणि यांचा तैत्तिरीय आरण्यकांत उल्लेख केलेला आढळतो. परंतु दुसरीं नांवें प्रचारांत असल्याबद्दल विशेष पुरावा सांपडत नाहीं.

कांहीं याद्यांत अधिक महिन्याचाहि उल्लेख केलेला आढळतो. वाजसनेयि संहितेंत अंहसस्पति असें त्यास म्हटलें आहे, आणि तैत्तिरीय व मैत्रायणी संहितेंत 'संसर्प' असें नांव त्यास दिलें आहे. काठक संहितेंत 'मलिम्लुच' हें नांव आढळतें, आणि एका यादींत संसर्प व मलिम्लुच या दोनहि नांवांचा उल्लेख केलेला आढळतो. अथर्ववेदानें त्या महिन्याच्या स्थानाच्या अनिश्चिततेमुळें त्याला 'सनिश्रस्' हें नांव दिलें आहे. महिन्यांनां नांवें देण्याची दुसरी पद्धति नक्षत्रांवरून आहे. ती प्रचलित होण्यास सुरुवात झाली होती, परंतु पुराणांत आणि नंतर ती सरसास रूढ झालेली दिसते. माघ आणि तप एकच असें ज्योतिष म्हणतें. कारण असा अर्थ केला म्हणजेच मधु आणि चैत्र एकच असें निघतें; आणि चित्रा नक्षत्रांत पूर्ण चंद्र असतांना वर्षारंभ होतो, फाल्गुनांत होत नाहीं ह्या ब्राह्मणांत प्रदर्शित केलेल्या मताशीं हें तंतोतंत जुळतें. फाल्गुनानंतर येणारा चैत्र महिना हा वसंत कालाचा आरंभ होय हें वेबरचें मत अर्थातच चूक होय. कारण संपाताच्या चलनामुळें फाल्गुन

वसंत ऋतूचा वास्तविक पहिला महिना झाला, आणि चैत्र मागील ऋतूचा शेवटचा महिना झाला. वर्षाचे सहा ऋतू मानणें ही अशास्त्रीय पद्धत आहे. चैत्र किंवा फाल्गुन यांपैकीं कोणताहि वसंत कालाचा आरंभ मानण्यास विशेष हरकत असण्याचें कांहींहि कारण दिसत नाहीं. शतपथ ब्राह्मणांत महिन्याचा आरंभ शुक्ल पक्षापासून धरलेला असून शुक्ल आणि कृष्ण पक्षांकरितां यव आणि अयव हीं नांवें आढळतात. एग्लिंगच्या मताप्रमाणें ह्या शब्दांची उत्पत्ति यु म्हणजे दूर करणें ( वाईट ग्रहांनां दूर करणें ) या धातूपासून असावी. पर्व हा शब्द महिन्याचा अर्ध या अर्थी योजिलेला दिसतो; व त्याचा उल्लेख ऋग्वेदांत केलेला आढळतो. पहिला पक्ष म्हणजे शुद्ध पक्ष. ह्यास पूर्व पक्ष म्हणतात आणि दुसऱ्यास अपर पक्ष म्हणतात. ह्या दोघांसहि अर्धमास म्हणतात.

[13] मुहूर्त.—मुहूर्त म्हणजे दिवसाचा १/३० भाग ( ४८ मिनिटांचा तास ) असा तैत्तिरीय ब्राह्मणांत ( ३. १०, १,१ ) उल्लेख आहे. ऋग्वेदांत क्षण या अर्थी हा शब्द आहे.

[14] युग.—ऋग्वेदांत पिढी या अर्थी हा शब्द आलेला आहे. एका ठिकाणीं दीर्घतम्याबद्दल योजिलेल्या दशम युगाचा अर्थ आयुष्याचें दहावें दशक असा मॅकडोनेल करतो. लोकमान्य टिळक दहावा महिना असा अर्थ करतात, व दीर्घतमा याचा अर्थ दहा महिन्यांच्या रात्रीनंतर उगवणारा सूर्य असा देतात. पंचवार्षिक युगाचा उल्लेख प्राचीन संहितेंत आढळत नाहीं. सेंट पीटर्सबर्ग कोशांत आलेलें आणि झिमरनें दिलेलें पंचविंश ब्राह्मणांतलें अवतरण त्या ग्रंथावरील टीकेंत एखाद्या अर्वाचीन ग्रंथांतून घेतलेला उतारा आहे. अथर्ववेदांत क्रमानें शत वर्षे, अयुत ( १०००० ? वर्षे ), आणि नंतर दोन, तीन व चार युगें असा उल्लेख केलेला आहे. यावरून युग अयुतापेक्षां जास्त असावें असें दिसतें, परंतु याबद्दल खात्री नाहीं. झिमरनें ऋग्वेदांतून एक उतारा ( ८. १०१, ४ ) दिलेला आहे, परंतु तेथें चतुर्युगांबद्दलचा उल्लेख खास नाहीं. तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें कालाचे विभाग फार मोठे ( उ० एक लाख वर्षांचा एक ) कल्पिलेले आढळतात. कलि, द्वापर, त्रेता आणि कृत या चार युगांचा खात्रीलायक निर्देश वेदकालीन वाङ्मयांत नाहीं. तथापि हे शब्द अक्षांच्या दानांनां लावलेले आढळतात. ऐतरेय ब्राह्मणांत हीं नांवें येतात, परंतु त्यांचा युग या अर्थी उपयोग केलेला दिसत नाहीं. हौगच्या मतें याचा फाशांचें दान असाच अर्थ असावा; व हा अर्थ वेबर, रॉथ, विल्सन, मॅक्समुल्लर आणि म्यूर यांनीं शक्य मानिला आहे. रॉथचें असें म्हणणें आहे कीं, हा मंत्र प्रक्षिप्त आहे. परंतु हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हा उतारा ऐतरेय ब्राह्मणांतल्या जवळ जवळ शेवटल्या भागांतील आहे. पुष्य, द्वापर, खार्वा आणि कृत हीं चार युगें नंतरच्या षड्विंश ब्राह्मणांत, आणि द्वापर हें गोपथ ब्राह्मणांत उल्लिखित असलेलें आढळतें.

[15] वर्ष.—याचा मूळचा अर्थ पाऊस, पण नंतर पावसाळा, व नंतर वर्ष असे अर्थ होत आले आहेत.

[16] संवत्सर.—हा शब्द ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत वारंवार आलेला आहे. एका वर्षाचे ३६० दिवस असतात व त्या वर्षांत १२ महिने असतात असें संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांचें एकमत आहे. हें वर्ष म्हणजे चांद्रवर्ष होय व या वर्षामध्यें सहा दिवस अधिक येतात. सौरवर्ष या अर्थी हा शब्द फक्त सामवेदाच्या निदानसूत्रांत आलेला आहे. त्यांत असें विधान आलेलें आहे कीं, सूर्य सत्तावीस नक्षत्रांपैकीं प्रत्येक नक्षत्रांत १३ १/९ दिवस घालवितो. चांद्रवर्ष व सौरवर्ष ( मग तें नाक्षत्र वर्ष असो किंवा सांपातिक सौरवर्ष असो) यांचा मेळ बसणें शक्य नसल्यामुळें या दोन वर्षांचा मेळ घालण्याचे प्रयत्न निःसंशय झाले होते. ब्राह्मणकालांत सुद्धां अधिक मास धरून हा मेळ घालण्याचा प्रयत्न चांगलासा सफल झाला नव्हता. दर सहा किंवा पांच वर्षांनीं एक अधिक मास धरण्याबद्दल उल्लेख सांपडतात, पण हे अधिक मास लोक पाळीतच याबद्दल निश्चित पुरावा नाहीं. झिमरच्या मतें याबद्दल पुरावा वर्षांच्या ज्या याद्या आहेत त्यांवरून उपलब्ध झालेला आहे. त्या याद्या पांच आहेत व त्या अशा: संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, इद्वत्सर व वत्सर; किंवा संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, इदुवत्सर, वत्सर; किंवा संवत्सर, इदावत्सर, इदुवत्सर, इद्वत्सर, वत्सर; किंवा संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, अनुवत्सर, उद्वत्सर; किंवा संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, अनुवत्सर, इद्वत्सर; पण ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं इतर कांहीं ग्रंथांतून या वर्षांच्या नांवांत फरक आहे इतकेंच नव्हे, तर पंचविंश ब्राह्मण ( १७. १३, १७ ) व तैत्तिरीय ब्राह्मण ( १. ४, १०, १ ) यांत चार; अथर्ववेदांत ( ६. ५५, ३ ) तीन; त्याच ग्रंथांत ( ८. ८, २३ ) व तैत्तिरीय आरण्यकांत ( १०. ८० ) दोन; आणि वाजसनेयि संहितेंत ( ३०. १५ ) सहा; अशा तऱ्हेच्या संवत्सरनामांच्या याद्या आहेत. परंतु या नांवांचा अधिक मासगणनेच्या पद्धतीशीं कोठेंहि संबंध असल्याचा उल्लेख नाहीं. तेव्हां वरील वर्षांच्या नांवांच्या यादीवरून एवढेंच अनुमान निघतें कीं साध्या वत्सर शब्दाचीं जुन्या संवत्सर व परिवत्सर या शब्दांवर आधारलेलीं पर्यायनामें यज्ञपुरोहितांनीं उपयोगांत आणिलीं होतीं. हीं जीं नवीन नांवें शोधून काढिलीं त्यांचें मूळ पंचविंश ब्राह्मणांतल्यासारख्या उल्लेखांत सांपडतें. या ब्राह्मण ग्रंथांत निरनिराळ्या चातुर्मास्य यागांचें निरनिराळ्या वर्षांशीं साम्य दाखविलेलें आहे. झिमर जेव्हां 'द्वैवार्षिक मालेंत प्रत्येक वर्षांत ३५४ दिवस अशीं लागोपाठ दोन वर्षे असतात व दर दुसऱ्या वर्षी एक अधिक मास असतो' असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो तेव्हां त्याचें समर्थन करणें फारच कठिण जातें. कारण ३५४ दिवसांचें एक वर्ष अशी स्थिति सूत्रकालाच्या अगोदर मुळींच नव्हती. झिमरचें असेंहि म्हणणें आहे कीं जे बारा दिवस ऋभू अगोह्याच्या घरीं निजले होते असा ऋग्वेदांत ( ४. ३३, ७ ) उल्लेख आहे ते १२ दिवस अधिक म्हणून धरण्यांत आले होते. तो असेंहि म्हणतो कीं हे बारा दिवस ३६६ दिवसांच्या सौर

वर्षाशीं ३५४ दिवसांच्या चांद्रवर्षाचें समीकरण करण्याकरितां दक्षिणायनान्ताच्या वेळीं मिळवीत असत, व ज्या अर्थी प्राक्कालीन जर्मनीमध्यें 'द्वादशरात्रींनां' लोक पूज्य मानीत त्या अर्थी ही अधिकमासगणनापद्धति इंडो जर्मानिक कालांतील आहे. परंतु हें मत सर्वस्वीं चुकीचें आहे. कारण हे बारा दिवस म्हणजे संवत्सराची प्रतिमा होय ('संवत्सरस्य प्रतिमा' कठ सं. अथर्ववेद वगैरे). म्हणजे बारा दिवस द्वादशमासांचे दर्शक होत. या बारा दिवसांचा कालगणनेशीं बिलकुल संबंध नाहीं' असें मॅकडोनेल म्हणतो. पांच वर्षांच्या फेऱ्यांत संवत्सर हेंच पांचवें वर्ष यावें अशा तऱ्हेनें शामशास्त्री यांच्या मतानें बौधायन श्रौतसूत्रामध्यें (२. १२; ३. १; २६. १८) कांहीं गोष्टींचा काल दाखविला आहे. त्यांत कांहीं तरी कालगणनेचा व्यवस्थित प्रयत्न असावा असें त्यांचें मत आहे.

[17] संगव.–चरणाऱ्या गायी दूध काढण्यासाठीं जेव्हां हांकून नेतात ती वेळ असा याचा अर्थ आहे. दिवसाची जी वांटणी केली आहे तींत ज्याला 'तूर्वाह' म्हणतात तो हा भाग होय. हा शब्द ऋग्वेदांत व इतर संहितांतहि आढळतो.

[18] सिनीवालि.–हा शब्द ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत वरचेवर आला आहे. याचा 'अमावास्या व तदाधिष्ठित देवता' असा अर्थ आहे. लोकांमध्यें त्या कालीं अशी कल्पना होती कीं ही देवता म्हणजे धनधान्याची समृद्धि व सुपीकता यांची देवता आहे. कारण, चंद्र व वनस्पति यांचा निकट संबंध आहे. दृष्टचंद्रा (म्हणजे ज्या अमावास्येस अल्प काल चंद्रदर्शन होईल–जी चतुर्दशीयुक्त आहे–त्या) अमावास्येचें नांव सिनीवालि आहे; व नष्टचंद्रा (ज्या अमावास्येस चंद्र मुळींच दिसणार नाहीं–जी प्रतिपदेनें युक्त आहे–त्या) अमावास्येला कुहू असें म्हणतात. अशी सिनीवालि व कुहू यांची व्याख्या आहे.

[19] हिम.–याचा अर्थ थंडी–थंड हवा–असा असून ऋग्वेदांत वारंवार व तदुत्तर ग्रंथांत कमी येणारा असा हा शब्द आहे. हा शब्द तैत्तिरीय ब्राह्मणांत बर्फ या अर्थानें पुल्लिंगी आला असून षड्विंश ब्राह्मणांत नपुंसकलिंगी आला आहे.

[20] चातुर्मास्य.––या शब्दाचा अर्थ 'चार महिन्यांचा' असा आहे व हा शब्द एक याग अशा अर्थानें तैत्तिरीय संहितेंत वापरलेला आहे. हा याग ज्या चार चार महिन्यांच्या तीन ऋतूंत वैदिक वर्ष विभागलेलें असे त्या ऋतूंच्या आरंभीं होत असे. याग प्रत्येक ऋतूच्या आरंभीं सुरू होत याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे; वैश्वेदेव फाल्गुनी पौर्णिमेला, दुसरें वरुणप्रघास पर्व आषाढी पौर्णिमेला व तिसरें साकमेध पर्व कार्तिकी पौर्णिमेला होत असे. या तिथींनां जर हीं यज्ञकर्में झालीं नाहींत तर चैत्री पौर्णिमेला, श्रावणी पौर्णिमेला व आग्रहायणी (मार्गशीर्षी) पौर्णिमेला हे याग करण्यास सवलत होती. एवढेंच नव्हे तर वैशाखी, भाद्रपदी व पौषी पौर्णिमेला सुद्धां हे याग केल्यास चालत असत. या वैकल्पिक तिथी ब्राह्मणग्रंथांत प्रशस्त मानलेल्या नाहींत, पण ज्या अर्थी तैत्तिरीय संहिता व पंचविंश ब्राह्मण या दोन्ही ग्रंथांत फाल्गुनी पौर्णिमेऐवजीं चैत्री पौर्णिमा विकल्पानें संमत मानलेली आहे व तेथूनच वर्षारंभ गणला आहे, त्या अर्थी या सर्व वैकल्पिक तिथी पूर्वी संमत असाव्या हें उघड आहे. याकोबीच्या मतानें फल्गुनी नक्षत्रांत असलेल्या पूर्ण चंद्रापासून वर्षारंभ उत्तरायणा अर्थी समजला जात असे–व असा समजला जाई अशाबद्दल पुरावाहि आहे–त्या अर्थी एकदां चंद्र फल्गुनी नक्षत्राजवळ असतांना दक्षिणायनान्त होत असे व तेव्हांपासून वर्षारंभ धरीत. या कालीं उदगयनान्त सूर्य फल्गुनी नक्षत्राजवळ असे तेव्हां होत असे. ही व्यवस्था ऋग्वेदकालामध्यें असावी व तशी ती ख्रिस्ती शकापूर्वीच्या चवथ्या सहस्रकामध्यें होती. ही कल्पना जर खरी धरली तर याकोबी म्हणतो कीं, वर सांगितलेल्या वैकल्पिक तिथी ज्या कालीं चैत्री किंवा वैशाखी पौर्णिमेस दक्षिणायनान्त होत असे त्या वेळच्या बोधक असाव्या. पण ओल्डेनबर्ग व थीबो यांचें असें मत आहे कीं– व तेंच मत ग्राह्य आहे– फाल्गुनी पौर्णिमा व वसंत ऋतूचा आरंभ हीं एकच होतीं ही गोष्ट सर्वांस मान्य आहे, व ही गोष्ट जर खरी मानली तर याकोबीचें म्हणणें आपोआपच चुकीचें ठरतें. शिवाय माघ महिन्याची अमावास्या ही दक्षिणायनान्ताची तिथि म्हणून जें कौषीतकि ब्राह्मणांत विधान आहे व ज्यावर ज्योतिष गणित आधारलेलें आहे त्यांतील तिथीशीं वरील तिथि ही सुसंगतच आहे. फाल्गुनांतील पौर्णिमा दक्षिणायनान्ताच्यानंतर दीड महिन्यानें येत असावी व हीच तिथि म्हणजे फेब्रुवारींतील पहिल्या आठवड्यांतला दिवस हाच थीबोच्या मतानें हिंदुस्थानांत ख्रि. पू. ८०० वर्षांपूर्वी नवीन ऋतूचा आरंभदर्शक असावा. पण आपण ही सुद्धां गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, वर सांगितलेली तिथि कृत्रिमरीत्या गृहीत धरावी लागत असावी; कारण वैदिक कालांत संबंध वर्षाचे तीन ऋतू मानलेले होते व प्रत्येक ऋतु चार महिन्यांचा गणला जात असे. पण वस्तुस्थिति पाहिली तर हिंदुस्थानांतल्या वर्षामध्यें तीन सारखे ऋतू नसतात. तेव्हां कांहीं लोकांनीं वसंत ऋतूंतील करावयाचा वैश्वेदेव याग जर तो ऋतु पूर्ण प्रगट होईपर्यंत करण्याचें लांबविलें तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच होणार नाहीं, व याप्रमाणें इतरहि वैकल्पिक तिथींची संगति लावतां येईल.

[21] एकाष्टका.–अष्टका म्हणजे वद्य अष्टमी असें अथर्व वेदावरून स्पष्ट सिद्ध होतें. एकाष्टका कोणती तरी अष्टमी दर्शवीत नसून एक विवक्षित अष्टमी दर्शवीत असावी. अथर्व वेदांतील एका सूक्तांत एकाष्टकेचेंच वर्णन आहे; आणि त्यावरील भाष्यांत सायण म्हणतो कीं ही एकाष्टका म्हणजे माघ महिन्यांतील वद्य अष्टमी. तैत्तिरीय संहितेंत असें सांगितलें आहे कीं एकाष्टका हा वर्षभर चालणारा यज्ञ करण्याकरितां दीक्षा घेण्याचा दिवस आहे (७. ४, ८, १).

[22] दर्श (दिसणें).–याचा अर्थ, पूर्णमासाच्या दिवसाच्या उलट अमावास्येचा दिवस असा होतो. हा शब्द नेहमीं 'दर्शपूर्णमासौ' असा द्वंद्व समासांत येतो, व हे दिवस व्रताला मोठे मह-

त्राचे गणलेले आहेत. या द्वंद्व समासांत दर्श शब्दाला जें अग्रस्थान दिलेलें आहे तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण त्यावरून पूर्वी महिन्याचा आरंभ अमावास्येच्या दुसऱ्या दिवसापासून होऊन शेवट अमावास्येस होई-पौर्णिमेस नव्हे-ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध जरी झाली नाहीं तरी उघडपणें सुचविली जाते.

२३ द श मी.-अथर्ववेद व पंचविंश ब्राह्मण ह्यांमध्यें ९० व्या वर्षापासून १०० व्या वर्षापर्यंतचा जो अवधी त्याला हें नांव दिलेलें आहे. यालाच ऋग्वेदामध्यें 'दशम युग' (आयुष्याची दहावी अवस्था) असें नांव दिलें आहे. वैदिक काळांतल्या आर्य लोकांमध्यें चिरायुत्व हें फारसें अपरिचित नव्हतें; कारण शंभर पावसाळे काढण्याबद्दल (शरदः शतम्) ऋषींनीं अनेक वेळां आपली इच्छा प्रकट केलेली आहे. दीर्घतमा १०० वर्षें जगल्याबद्दल व महिदास ऐतरेय ११६ वर्षें जिवन्त राहिल्याबद्दल उल्लेख आलेला आहे. ओनेसिक्रिटोस यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, त्या काळचे लोक कधीं कधीं १३० वर्षेंपर्यंत जगत असत. हें म्हणणें व जातकांत १२० वर्षें जिवन्त राहण्याबद्दल प्रकट केलेली इच्छा हीं जुळतात. कदाचित् १३० वर्षें ही अतिशयोक्ति असेल. परंतु हिंदुस्थानांत हल्लीं जें अल्पायुष्य दिसून येतें त्याचें कारण ऋग्वेदकालीं ज्याचें नांवहि ठाऊक नव्हतें त्या तापाचा हळू हळू सांचलेला परिणाम होय.

२४ पौ र्ण मा सी.-'पूर्णचंद्र असलेली रात्र' अथर्ववेदांत हिला पवित्र मानून हिचा मोठा उत्सव केला आहे. तदनंतरच्या ग्रंथांमधूनमुद्धां हिचा वारंवार उल्लेख आला आहे. गोभिल सूत्रांत (१.५, ७) चंद्र व सूर्य यांमध्यें या दिवशीं सर्वांत जास्त अंतर (विकर्ष) असतें, असें म्हटलें आहे.

२५ या म.-अनेकवचनी. अथर्व वेदांत एका ठिकाणीं रॉथच्या मताप्रमाणें याचा अर्थ ज्यामध्यें सूर्य (भग) फिरतो ते ग्रह, असा होतो. परंतु ब्लूमफील्ड आणि व्हिट्ने हे दोघेहि याचा अर्थ 'रात्रीचे प्रहर' हाच करितात.

२६ स मा.-याचा मूळ अर्थ उन्हाळा असा असावा, व तो अर्थ अथर्व वेदामध्यें कांहीं ठिकाणीं आहेसा दिसतो. त्यावरूनच याचा अर्थ ऋतु असा क्वचित् होतो, पण तो फारसा प्रचारांत नाहीं. विशेष प्रचारांतला अर्थ म्हणजे वर्ष असा आहे. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें (६. २, १, २५) एके ठिकाणीं वाजसनेयि संहितेमध्यें (२७. १) महिना असा अर्थ घेतलेला आहे; पण या अर्थाबद्दल संशय आहे.

२७ हा य न.-समासांत हा शब्द आला असतां याचा अर्थ वर्ष असा होतो. काठक संहिता (१९. ५) व शतपथ ब्राह्मण (५. ३, ३, ६) यांमध्यें याचा अर्थ तांबड्या तांदुळाची जात असा आहे. हा शब्द विशेषणार्थी उपयोगांत आणला म्हणजे याचा अर्थ दर वर्षी होणारा किंवा वर्षभर टिकणारा असा होतो व अशा अर्थानें हा शब्द अथर्व वेदामध्यें तापाला लावलेला आहे (१९. ३९, १०).

२८ ति थि.-चांद्र दिनाचें नांव, म्हणजे सत्तावीस दिवसांहून किंचित् जास्त असलेल्या चांद्रमासाचा ३०वा भाग. हा शब्द उत्तरकालीन सूत्रग्रंथांत आलेला आहे; पण ब्राह्मणग्रंथांत तो पूर्ण अज्ञात आहे. कारण ब्राह्मणांत ज्या दिवसाचा उल्लेख आहे तो नैसर्गिक सावन दिवस होय.

## स्थान

[ स्थान नामें आणि त्यांवरील टीपा प्राचीनांच्या राजकीय परिस्थितीच्या व शासनसंस्थेच्या अभ्यासास उपयुक्त आहेत. त्या जाणण्यासाठीं ग्राम, पुर इत्यादि शब्दांवरील टीपा वाचाव्यात. प्रत्येक देशावरील टीपा अर्थात् अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्याप्रमाणें नद्यांवरील टीपा महत्त्वाच्या आहेत. हा शब्दसमुच्चय वेदकालीन भूगोलविद्येचा ज्ञापक आहे. ]

### अंतिकनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंत | अवर | उपस् |
| अन्तमान | अस्तमीक | उपाक |
| अन्तिक | आक | तळित |
| अंवर | आस | तुर्वश |
| अर्वाक | उपम | निकाम |
| अर्वावत | | |

### दूरनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| आके | परावत | दूरेउपब्द |
| आरे | प्रपित्व | विजेन्य ( दूरेवर्तमान ) |
| पराके | दूर | |
| पराचैः | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| आन्तिक | आरात् | दूर |
| अवर | आरे | विश्वतः |
| अवस्तात् | उपउप | विश्वम् |
| अवार | उपस्थ | |

### आकाश नामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अध्वन् | ख | रोचन |
| अध्वर | घृतस्ययोनि | विधर्मन् |
| अन्तरिक्ष | द्यु | विधार |
| अन्तरिक्ष्य | धन्वन् | विभु |
| अप् | नभस् | विमान |
| अपाद | नाक | वियत् |
| अबुध्न | पुष्कर | व्योमन् |
| अंबर | पृथिवी | सगर |
| आकाश | बर्हिस् | समुद्र |
| उदक | बीरीट | सानु |
| उपरिबुध्न | भू | स्वयंभु. |
| उपह्वर | रजस् | स्वयंभू |
| उरुलोक ( अन्तरिक्ष ) | | हिरण्यनेमि |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अन्तरिक्ष | आन्तरिक्ष | गोप |

| | | |
|---|---|---|
| दिव | नभस् | व्योमन् |
| द्यु | वियत् | स्वध्यक्ष |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अभिवर्ग | दूरेअन्त | पुष्कल |
| आन्तरिक्ष | द्यु | वातगोप |
| ख | नभस् | वियत् |
| खद्रूर | नियाम | वीध्र |
| तृंत | पीलुमती | |

### ग्रामनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अदेवी | ग्राम्य | [4]व्रजन |
| अश्मन्मय | [2]नार्मिणी | शाम्बर |
| आयसी | [3]पुर् | शारदी |
| [1]ग्राम | महाग्राम | शूरग्राम |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अश्मन्मय | ग्राम्य | महापुर् |
| ग्राम | पुर् | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपराजिता ( ब्रह्मदेवाचें नगर ) | ग्रामघोषी | पुर् |
| | जीवपुर | वारणावती |
| अश्मन्मय | देवपुर | वासतेय. |
| अश्मन्वती | | |

### देशविशेष [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| उदव्रज | गांग्य | वेतसु |
| [5]कीकट | गुंगु | सरस्वतीवत् |
| कृत्वन् | दुर्ग | सारस्वत |
| क्रिवि | यक्षु | सिन्धु |
| [6]गन्धारि | रुशम | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंग | बल्हिक | रुम |
| अन्तदेश | [7]मगध | रुशत् |
| गन्धार | मघ | रुशम |
| धन्व | मागध | विक्षर |
| पट्टर | मूजवत् | सोन्तदेश |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [8]उशीनर | [14]दक्षिणापथ | [20]मद्र |
| [9]कुरुक्षेत्र | [15]देश | [21]मध्यदेश |
| [10]कोसल | [16]नीच्य | [22]मरु |
| [11]खांडव | [17]पंचनद | [23]मष्णार |
| गन्धार | [18]परीणह् | [24]वंग |
| [12]जनपद | [19]परिसारक | [25]विदर्भ |
| [13]तूर्घ्न | मगध | [26]विदेह. |

### द्यावापृथिवीनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अदिति | अंभसी | उर्वी |
| अपरा | अहि | ओणी |
| क्षोणी | नभसी | रजसी |
| गभीरा | पवस्त | रोदसी |
| गंभीरा | पार्श्व | सदसी |
| घृतवती | पुरन्धि | सद्मनी |
| चमू | पृथ्वी | सुजन्मनी |
| दूरेअन्ता | बहुला | स्वधा |
| धिषणा | मही | |

### नदी सामान्यनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अकवारी | †नाव्या | वधू |
| अग्रुव | पयस्वती | वरी |
| अजिरा | पारावतघ्नी | वाणी |
| अर्णा | पार्वती | शूघना |
| अवनि | भास्वती | श्वेतयावरी |
| इरावती | मतुथा | सरस्वती |
| उर्वी | महेनदि | सरित् |
| ऊर्जस्वती | मातृ | सस्रुत |
| ऋतावरी | यव्या | सिन्धु |
| एनी | यह्वी | सिरा |
| कुल्या | योयुवती | सीरा |
| क्षुभा | रघ्वी | सुपारा |
| खादोअर्णाः | रुजाना | स्रुत्वरी |
| तरस्वती | रेवती | स्रवन्ती |
| धुनि | रोधचक्रा | स्रुति |
| धोती | रोधस्वती | स्रोत्या |
| *नदी | रोहित् | हरस्वती |
| नदीतमा | ‡वक्षणा | हरित |
| नदीवृत् | वक्षणी | हिरण्यवर्णा |
| नभनु | | |

### नदी विशेषनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंशुमती | [33]गंगा | वीरपत्नी |
| अंजसी | [34]गोमती | [47]शिफा |
| अनितभा | [35]तृष्टामा | [48]शुतुद्री |
| अपित् ( कोरडी-नदी ) | [36]दृषद्वती | श्वेतयावरी |
| | देष्ट्री | श्वेत्या |
| अश्मन्वती | [37]परुष्णी | [49]सप्तसिंधवः |
| [27]असिक्नी | [38]पुरीषिणी | [50]सरयु |
| [28]आपया | [39]मरुद्वृधा | [51]सरस्वती |
| [29]आर्जीकीया | [40]मेहत्नू | [52]सिन्धु |
| उद्री | [41]यमुना | [53]सीलमावती |
| [30]ऊर्णावती | [42]यव्यावती | [54]सुवास्तु |
| [31]कुभा | [43]रसा | [55]सुषोमा |
| कुलिशी | [44]वितस्ता | [56]सुसर्तु |
| [32]क्रुमु | [45]विपाश् | [57]हरियूपीया. |
| क्षिप्रा | [46]विबाली | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंशुमती | परुष्णी | [59]शीपाला |
| असिक्नी | [58]वरणावती | सिन्धु |

संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| उरुञ्जिरा | [60]कारोती | [61]कौसित |

[62]महार्णव [63]सदानीरा [64]सुदामन्

[1]ग्राम.– ऋग्वेद व तदुत्तर वाङ्मयांत ह्या शब्द आला असून ह्याचा मूळ अर्थ 'खेडें', 'गांव' असा असावा. वैदिक आर्य लोक वहुतेक खेड्यांतच रहात असावेत, आणि हीं खेडीं सर्व देशभर पसरलीं असून कांहीं लांव व कांहीं जवळ असून तीं मोठमोठ्या रस्त्यांनीं जोडलीं होतीं. नेहमीं गांवांत व अरण्यांत, आणि खेड्यांतील झाडांत व प्राण्यांत आणि अरण्यांतील जंगली झाडांत व जंगली प्राण्यांत (ग्राम्य व अरण्य) फरक दाखविलेला आढळतो. गांवांत गुरेंढोरें, घोडे आणि दुसरे माणसाळलेले प्राणी, त्याचप्रमाणें मनुष्यें रहात. तेथें धान्यसंचयहि असे. संध्याकाळीं जंगलांतून ढोरें परत गांवांत येत. साधारणपणें गांवें मोकळींच असत, पण कधीं कधीं आंतल्या वाजूला किल्ला (पुर्) बांधीत असत. गांवांत पृथक् पृथक् घरें असून प्रत्येक घराला कांहीं तरी आवार असावें असें वाटतें. परंतु वैदिक वाङ्मयांत ह्यावद्दल कांहीं सविस्तर हकीकत नाहीं. मोठमोठीं गांवेंहि (महाग्रामाः) असत. गांवांतील लोकांचा एकमेकांशीं कसा संबंध असे हें विनचूक सांगणें मोठें कठिण आहे. पुष्कळ ठिकाणीं हा शब्द 'मनुष्यसंघ' अशा साधित अर्थानें आला आहे. बहुतकरून हा अर्थ त्या शब्दांच्या 'खेड्यांतील मंडळी' ह्या अर्थाच्या उपयोगापासून निघाला असावा; कारण शतपथ ब्राह्मणांत शर्यात मानव हा आपल्या गांवासह (ग्रामेण) हिंडत असे असें म्हटलें आहे. झिमर म्हणतो कीं ऋग्वेदांत भरताचे लोक (जन) यांनां एका ठिकाणीं गाई शोधणारे लोक (गव्यन् ग्रामः) असें म्हटलें आहे, त्यावरून वरील विवक्षित अर्थ निघत नाहीं. त्याच्या मतें ग्राम शब्दाचा कुटुंब आणि राष्ट्र ज़ात (विश्) ह्यांच्यामधील अर्थ आहे. तथापि ग्राम याचा वरोवर अर्थ करावयाचा म्हणजे हल्लीं पुष्कळदां स्थिति दिसते त्याप्रमाणें एकाच राष्ट्रजातीच्या पुष्कळशा कुटुंबांचा जमाव असा करतां येईल.

वैदिक वाङ्मय खेड्यांतील सामाजिक अंतर्व्यवस्थेसंबंधानें कांहींच सांगत नाहीं. खेड्यांतील सर्व लोक मिळून समाईक मालकीनें जमिनीची लागवड करीत असतील असें वाटत नाहीं. जो थोडासा पुरावा उपलब्ध आहे त्यावरून प्रत्येक मनुष्य किंवा कुटुंब निराळी शेती करीत असावें. परंतु कायद्यानें नसली तरी त्या वेळीं ही शेती प्रत्यक्ष वैयक्तिक नसून कौटुंबिक असावी. 'ग्रामकाम' हा संहितांमध्यें आढळणारा शब्द राजा आपल्या प्रीतींतील लोकांनां, खेड्यांतील जमाबंदीसंबंधाचे राजकीय हक्क देत असे असें दर्शवितो. नंतर सर्व जमिनींचा मालक राजा आहे ही कल्पना उदयास आली, आणि याच कल्पनेवरोवर राजा ज्या लोकांनां असे हक्क देई त्यांनां जमीनदार–जमिनीचा मालक–असें म्हणण्याची चाल पडत गेली. परंतु वैदिक वाङ्मयांत ह्या मतांनां आधार म्हणजे फक्त ग्रामकाम हा शब्द होय. आणि हा शब्द ज्याप्रमाणें टयुटानिक तुल्य शब्द दर्शवितात त्याप्रमाणें प्रत्यक्ष जमिनीच्या देणगी पेक्षां राजचिन्हांची किंवा राजकीय हक्कांचीच देणगी दिली जात असावी असें दर्शवितो, अशा देणग्यांमुळें प्रत्यक्ष शेताची लागवड करणारे लोक दुसऱ्याचीं कुळें बनत. परंतु प्राचीन काळीं अशीं उदाहरणें फारशीं दिसत नाहींत. प्राचीन काळीं गांव म्हणजे कायदेशीर किंवा राजकीय बावतींत एक मूलमान होतें असें म्हणतां येत नाहीं. गांवांत प्रत्यक्ष शेती करणाऱ्यांशिवाय इतर कामें करणारे रथकार, तक्षन् (सुतार), कर्मार (लोहार) वगैरे दुसरे लोक असत. परंतु ते ग्रामसंघाचे घटक असत असें मात्र नाहीं. शिवाय स्वतः लागवड न करणारे परंतु राजाची देणगी म्हणून किंवा परंपरागत वतन म्हणून ह्या खेड्यांत कांहींतरी हितसंबंध असणारे क्षत्रिय आणि ब्राह्मणहि असत. मात्र वरील सर्व लोक राजाच्या ताब्यांत असत, आणि त्यांनीं राजाला खंडणी म्हणून अन्न किंवा नोकरी किंवा अशासारखें कांहींतरी द्यावें लागत असे. परंतु राजानें जर राजघराण्यांतील कोणाला तरी आपले हक्क दिले असतील तर मात्र राजाला हा कर देण्याची जरूरी नसे. अथर्व वेदामध्यें गांवाच्या उत्पन्नांतील राजाच्या भागाचा उल्लेख आहे. ऋग्वेद व तदुत्तर संहिता आणि ब्राह्मणें ह्यांत गांवांतील मुख्याला किंवा नेत्याला ग्रामणी असें म्हटलें आहे. ह्या नांवाचा वरोवर अर्थ संशयास्पद आहे. झिमरप्रमाणें ग्रामणीकडे फक्त लष्करी काम असे, आणि खरोखरच त्याचा सेनानी ह्याच्याशीं कित्येक ठिकाणीं संबंध दाखविलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत तो सूत ह्याच्या खालच्या दर्जाचा असून तो राजपरिवारांतील रत्नांपैकीं एक रत्न आहे. ही जागा वैश्यांस अतिशय मोठेपणाची वाटत असे आणि ती ज्याला मिळेल तो अभ्युदयाच्या शिखरावर चढला असें समजत असत. राजाशीं हा जो ग्रामणीचा संबंध आहे त्यावरून असें वाटतें कीं हा मनुष्य सर्वानुमतें निवडला जात नसून राजाच त्याची नेमणूक करीत असावा. परंतु ह्या जागेवर कधीं पिढीजाद, कधीं नेमलेला तर कधीं निवडलेला मनुष्य असावा असें वाटतें. यावद्दल खात्रीलायक पुरावा मिळत नाहीं. ह्या शब्दाच्या एकवचनी उपयोगावरून जराशी अडचण उत्पन्न होते. बहुतकरून राजधानींतील किंवा राजग्रामांतील ग्रामणीला मोठा मान मिळत असून त्याचें वजनहि बरेंच असावें असें वाटतें. एकंदर राज्यांत अर्थात् बरेच ग्रामणी असले पाहिजेत, परंतु त्यांपैकीं राजपरिवारांत फक्त एकच असावा.

ऐतरेय ब्राह्मणांत (३. ४४) 'पूर्वेकडील ग्रामसमूह बहुजनांनीं परिपूर्ण असतात; पश्चिमेकडील अरण्यवत् असतात' असें वर्णन आहे. छांदोग्य उपनिषदांत (८. ६, २) 'महापथ दोन ग्रामांनां जातात,' असा उल्लेख आहे. बऱ्याच संहितांमधून ग्राम्य पशू असा उल्लेख आढळतो.

अथर्ववेदांत (३. ३१, ३)-- ग्राम्य पशू अरण्यपशूंपासून वेगळे झाले आहेत असें म्हटलें आहे. तैत्तिरीय संहिता (७. २, २, १) या ठिकाणीं सात प्रकारचे ग्राम्य पशू व सात प्रकारचे अरण्यपशू सांगितले आहेत.

तै० सं. (५. २, ५, ५; ७. ३, ४, १) येथें 'सप्त ग्राम्या ओषधयः सप्त आरण्याः।' असें वर्णन आहे.

बृहदारण्यकोपनिषदांत ( ६. ३, १३ ) दहा प्रकारचीं धान्यें गांवांत असतात म्हणून म्हटलें आहे, तांदूळ, यव, तीळ, उडीद, मसुरा, गहूं, हुलगे इ० दिलेल्या सर्व ठिकाणीं ग्राम म्हणजे लोकसंघ असाच अर्थ आहे. ग्रामकाम म्हणजे गांवाचा अधिकार अशा अर्थी तै. संहितेंत व मैत्रायणी संहितेंत हा शब्द आलेला आहे. *ग्रामणी* याचा अर्थ गांवांतलि पुढारी, किंवा अधिकारी ( पाटील ); पुढें श्रेष्ठ असा अर्थ आला ( श. ब्रा. ३. ४, १, ७ ) सूताच्या खालचा अधिकारी याला ग्रामणी असें म्हणत असत.

[२]ना र्मि णी.–ऋग्वेदांत 'पुर्' म्हणजे किल्ला याचें हें विशेषण म्हणून आलेलें आहे. या शब्दावरून हें एका किल्ल्याचें विशेषनाम तरी असलें पाहिजे किंवा 'नर्मिन् अथवा नर्मिण् नांवाच्या एका राजाचा' अशा अर्थानें तरी असावें.

[३]पु र्.—हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें वारंवार आलेला असून त्याचा अर्थ तट, बळकट किल्ला किंवा मायेचें ठिकाण असा आहे. हे तट कांहीं प्रसंगीं बऱ्याच मोठ्या आकाराचे असले पाहिजेत. कारण एका तटाला पृथ्वी व उर्वी ( रुंद ) अशीं विशेषणें दिलेलीं आहेत. इतर ठिकाणीं 'अश्मन्मयी' म्हणजे दगडाचा बांधलेला किल्ला असें म्हटलेलें आहे. कधीं कधीं हीं माऱ्याचीं ठिकाणें आयसी म्हणजे लोखंडाचीं केलेलीं असत ( ऋ. १, ५८, ८ ). पण हे शब्द लाक्षणिक दिसतात. गोमती ( गाईनीं युक्त ) किल्ल्याचा उल्लेख अथर्व. ८. ६, २३ मध्यें आलेला आहे व त्यावरून ह्या किल्ल्याचा उपयोग गाई ठेवण्याकडे होत असावा हें उघड दिसतें. शारदी ( पावसाळ्यांतले ) किल्ले दास लोकांच्या ताब्यांत असलेले म्हणून उल्लेख आलेला आहे. शंभर भिंती ( शतभुजी ) असलेल्या किल्ल्यांचाहि उल्लेख ( ऋ. १ १६६, ८, ७. १५, १४ ) आलेला आहे. यूरोपमधील मध्ययुगांतील सरदार लोक जसे आपल्या तटबंदीच्या किल्ल्यांत कायमचे राहत असत तसे वैदिक काळीं लोक ह्या किल्ल्यांत राहत असत असें मानणें चुकीचें होईल. हे किल्ले म्हणजे हल्ला आला असतां बचावाच्या जागा होत. ह्या किल्ल्यांना टणक मातीचे तट, मेढेकोट व खंदक असत. पिशेल व गेल्डनर ह्यांचें उलट असें म्हणणें आहे कीं पूर्वी मिग्यास्थिनीझनें व पाली ग्रंथकारांनीं वर्णन केल्याप्रमाणें पाटलिपुत्र शहरासारखीं मेढेकोट व पुढें खंदक ह्यांनीं युक्त शहरें असत. हें शक्य आहे. पण याला स्पष्ट पुरावा नाहीं. शिवाय नगर हा शब्द बराच नंतर प्रचारांत आला ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. वैदिक काळीं शहरांतील राहणी विशेष प्रचारांत येऊन प्रगत झाली होती असें दिसत नाहीं. महाभारतांत नगर, ग्राम, घोष हे शब्द आलेले आहेत. वैदिक वाङ्मयांत ग्राम ह्याच्या पलीकडे लोकांची फारशी मजल गेली नव्हती. ह्या ग्रामाचीं निरनिराळीं रूपें पुढें प्रचारांत आलीं असतील एवढेंच. संहिता व ब्राह्मण ग्रंथ ह्यांत किल्ल्यांच्या वेढ्यांचा उल्लेख आलेला आहे, ऋग्वेदांत म्हटल्याप्रमाणें या हल्ल्यांत अग्नीचा उपयोग होत असे.

[४]वृ ज न.– रॉथच्या मतानें ऋग्वेदामध्यें कित्येक ठिकाणीं ह्याचा अर्थ वसाहत, खेडेगाव ( जर्मन लोकांचें मार्क ) व त्याचे रहिवाशी असा होतो. झिमरला हें मत ग्राह्य असून त्याच्या मतानें वृजनामध्यें सुरक्षित जागा ( क्षितिध्रुवा ) असा अर्थ अन्तर्भूत होतो. ही क्षितिध्रुवा म्हणजे एखादें ग्रामवासी अगर युद्धाकरितां एकीकृत झालेलें कुल ज्या जागेंत सुरक्षिततेकरितां रहात असे ती जागा होय. गेल्डनर उलटपक्षीं वृजन ह्याचा जाळें असा शब्दशः अर्थ घेतो; व ह्या मूळार्थापासून पुढील अर्थ तो बसवितो. पण परंपरागत आलेलें मतच जास्त स्वाभाविक आहे.

[५]की क ट.–प्रमगन्द ह्याच्या नेतृत्वाखालीं आणि इन्द्रभक्ताविरुद्ध असलेले असे हे लोक ऋग्वेदांत एके ठिकाणीं उल्लेखिलेले आहेत. यास्क म्हणतो कीं, हें एका देशाचें नांव होतें, आणि नंतर कीकट देशाला मगध म्हणूं लागले. म्हणून झिमर म्हणतो कीं, कीकट हे अनार्य लोक असून मगध देशांत रहात असत. वेबर म्हणतो कीं, हे लोक मगध देशांत वस्ती करून होते, परंतु ते आर्यच होते. परंतु इतर आर्यन् जाती आणि हे ह्यांच्यांत फरक होता. कारण ते नास्तिक मताचे असून बौद्ध धर्माचें मगध हें धर्मपीठ होतें. परंतु ही साम्यता संशयास्पद आहे; आणि ओल्डेनबर्ग आणि हिलेब्रँट ह्यांनाहि खात्री नाहीं. राजवाडे कीकटांस कैकाडी समजतात आणि चांदोरकर तें म्हणणें ग्राह्य समजतात. आमच्या मतें आर्य आणि अनार्य यांविषयींच्या उल्लेखांवरून आजकालच्या संशोधकांनीं त्यांस आर्यन् किंवा नॉनआर्यन् ठरविण्याच्या केलेल्या प्रयत्नास कवडीचीहि किंमत नाहीं.

[६]ग न्धा रि.–ऋग्वेद आणि अथर्ववेद यांत गन्धारि नांवानें उल्लेखिलेल्या लोकांचें गन्धार हें मागाहूनचें नांव आहे. छांदोग्य उपनिषदांत गन्धार हे दूरचे म्हणून उल्लेखिलेले आहेत.

[७]म ग ध.– ह्या लोकांचा वैदिक वाङ्मयांत वारंवार उल्लेख येतो. परंतु त्यांच्याबद्दल सर्वत्र तिरस्कार दाखविलेला आढळतो. हा शब्द जरी ऋग्वेदांत प्रत्यक्ष आढळत नाहीं, तरी तो अथर्ववेदांत सांपडतो. त्या ठिकाणीं गन्धारी व मूजवंत या उत्तरेकडील व अंग व मगध या पूर्वेकडील लोकांत ताप जावो अशी इच्छा प्रकट केली आहे. शिवाय यजुर्वेद संहितेंत पुरुषमेधप्रसंगीं दिलेल्या बळींच्या यादींत मागध किंवा मगधदेशीय मनुष्य याचा समावेश केला असून, अतिकुष्ट 'मोठा आवाज' (?) याला तो अर्पण केला आहे. शिवाय अथर्ववेदांतील व्रात्यस्तोमांत मागध हा व्रात्याचा मित्र मंत्र, हास्य, व चारी दिशांस दुमदुमविणारी गर्जना होता असें म्हटलें आहे. श्रौतसूत्रांत असा उल्लेख आहे कीं एखाद्या व्रात्याला जेव्हां आर्यमंडळांत घेत तेव्हां एखाद्या वाईट मागध ब्राह्मणास ( ब्रह्मबन्धु मगधदेशीय ) त्या व्रात्याचा विशिष्ट पोषाख देत असत. परंतु ही गोष्ट पंचविंशब्राह्मणांत आढळत नाहीं. उलट कधीं कधीं तेथें चांगले नांवलौकिक झालेले ब्राह्मण रहात असत असें दिसतें. कारण कौषीतकि आरण्यकांत मध्यम, प्रातिबोधीपुत्र हे 'मगधवासी' 'मगधदेशांत राहणारे' म्हणून दिलें आहे. ओल्डेनबर्ग याच्या मतें हें अपवादात्मक दिसतें.

बौधायन व इतर सूत्रें, आणि तसेंच बहुधा ऐतरेय आरण्यक यांत मगधाचा एक राष्ट्र म्हणून उल्लेख आला आहे. तेव्हां यावरून झिमरचें, यजुर्वेद व अथर्ववेद यांतील मागध हें मगधदेशीय मनुष्य नसून वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यांपासून झालेल्या मिश्र संततीचें वाचक असावें हें म्हणणें अप्रयोजक दिसतें. ही जातीची कल्पना एकंदरींत शंकास्पद तर आहेच, पण निदान मागधासारख्या जातिवाचक नांवाविषयीं स्पष्टीकरण देतांना तरी मुळींच विचारांत घेण्यालायक नाहीं. मागध हा पुढील काळांत भाट म्हणून समजला जात असे, यांत कांहीं विशेष नाहीं. कारण हा देश गाणाऱ्या लोकांचें मूलस्थान होता हें उघड होतें, व या देशांतील भाट दूरदूरच्या पश्चिम देशीं जातहि असत. याच वर्गाला नंतरच्या ग्रंथांत जात म्हणून संबोधूं लागले; व नंतर यांच्या मिश्र उत्पत्तीची कल्पना निघाली.

कीकट आणि मगध मूळचे एकच असल्यामुळें, ऋग्वेदांत दिसून येणाऱ्या मगध लोकांविषयींच्या तिरस्काराचें कारण बहुधा मगधांनीं ब्राह्मणी संस्कृतीचा लवकर स्वीकार केला नसावा या गोष्टींत असावें, असें ओल्डेनबर्गचें म्हणणें आहे व तें अगदीं शतपथ ब्राह्मणाला धरून आहे. कारण कोसल व विदेह हे सुद्धां बरेच दिवसपर्यंत पूर्णपणें ब्राह्मणी संस्कृतींत आले नव्हते; मग मगधाची तर गोष्ट राहोच. या स्थितीस वेबरच्या मतें आणखी दोन गोष्टी कारण झाल्या असल्या पाहिजेत. एक मूळ रहिवाशांचें रक्त व दुसरी बौद्ध संप्रदायाचा उदय. हें दुसरें कारण यजुर्वेद किंवा अथर्ववेद यांना लागू पडत नाहीं; परंतु त्या ऐवजीं जर ओल्डेनबर्गच्या मताप्रमाणें अर्धवट ब्राह्मणी संस्कृति हें कारण घातलें तर या म्हणण्याला कांहीं तरी महत्त्व देतां येईल. यांपैकीं पहिलें कारणच जरी ओल्डेनबर्गला संशयास्पद वाटतें तरी तें मॅकडोनेल यास पूर्णपणें सयुक्तिक दिसतें. पार्गिटेर तर असेंहि म्हणण्यास धजतो कीं, मगधांत आर्यन् लोकांवर पूर्वेकडील समुद्रांतून कांहीं लोकांनीं स्वारी केली, व त्याच लोकांत हे मिसळून गेले. या म्हणण्याला जरी वेदांत आधार नाहीं तरी तें मॅकडोनेलच्या मतें कांहींसें युक्तिसिद्ध आहे. कारण तो म्हणतो कीं, जसजसे पूर्वेकडे आर्यन् लोक जास्त जास्त शिरत चालले, तसतसें त्यांचें वर्चस्व मूळच्या रानटी जातींवर कमी कमी पडल्याचें आढळून येतें. आधुनिक मानववंशशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें असतां असें स्पष्ट सिद्ध होतें कीं, जसजसें पूर्वेकडे जावें तसतसें आर्यन् जातींशीं सादृश्य फार कमी कमी होत जातें; व त्यामुळें याबद्दल पार्गिटेरचें म्हणणें बरोबर असावेंसें वाटूं लागतें. परंतु असल्या प्रकारचा पुरावा हिंदुस्थानांतील मिश्र जातीविषयीं बोलतांना विशेष महत्त्वाचा नाहीं.

राजवाडे मगांना धारण करणारे ते मगध असा पतंजलीच्या आधारें मगध शब्द व्युत्पादितात. पण 'मग' म्हणजे पाप असें पतंजलीचें मत न स्वीकारतां 'मग' म्हणजे इराणी लोकांचे उपाध्याय-मगी नांवानें प्रसिद्ध असलेले लोक, असा घेऊन राजवाडे यांची मगध शब्दांची व्युत्पत्ति आम्हांस ग्राह्य आहे. आम्ही मगांचें अस्तित्व हिंदुस्थानांत ऋग्वेदकालीं होतें आणि तें वैदिक लोक येण्यापूर्वींपासून असावें असें म्हणतों. असें म्हणण्याचें कारण आम्ही सविस्तर पूर्वीं दिलेंच आहे.

[८]उ शी न र— ऐतरेय ब्राह्मणांत (८. १४) कुरुपंचाल, वश आणि उशीनर असे मध्यदेशांत एके ठिकाणीं रहात असत असें म्हटलें आहे. कौषीतकि उपनिषदांत देखील (४, १) उशीनर, कुरुपंचाल आणि वश हे एके ठिकाणीं रहात असत असा उल्लेख आहे. परंतु गोपथ ब्राह्मणांत (२. ९) उशीनर व वश हे उत्तरेकडचे होते असा उल्लेख आहे. ऋग्वेदांत एके ठिकाणीं (१०.५९,१०.) राणी उशीनराणी हिच्या संबंधांत उशीनर ह्यांचा उल्लेख आहे. सायणांनीं उशीनराणी याचा अर्थ एक ओषधि असा केला आहे. कदाचित् ती त्या देशांत होणारी ओषधि असेल. झिमर म्हणतो कीं हे लोक पहिल्यानें वायव्येकडच्या बाजूला रहात असत. त्याच्या मताला आधार म्हणजे ऋग्वेदांतील अनुक्रमणींत शिवि औशीनर याला एका ऋचेचा द्रष्टा मानला आहे. आणि हे शिवी सिंधु आणि चिनाब ह्या नद्यांमध्यें राहात असत असें अलेक्झांडर याचे अनुयायी म्हणत हा होय. पण हा पुरावा निर्णायक आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण, महाभारतकालीं शिवी हे कुरुक्षेत्राच्या उत्तर दिशेला रहात असत; आणि वैदिक काळीं उशीनर हे मध्यदेशाहूनहि आणखी पश्चिमेकडे रहात असत असें गृहीत धरण्यास कांहींच पुरावा नाहीं.

[९]कु रु क्षे त्र-(कुरु ह्यांची जमीन) हें एक अति पवित्र स्थान मानिलें आहे. यांतून दृषद्वती, सरस्वती व आपया ह्या नद्या वहात असत. तेथेंच शर्यणावत् नांवाचें सरोवर–शतपथ ब्राह्मणांतील अन्यतःप्लक्षा–होतें. पिशेलच्या मताप्रमाणें ऋग्वेदांत कांहीं ठिकाणीं आलेला पस्त्या नांवाचा ओढाहि कुरुक्षेत्रांतच होता. तैत्तिरीय आरण्यकांतील कुरुक्षेत्राची मर्यादा दक्षिणेस खाण्डव, उत्तरेस तूर्घ्न आणि पश्चिमेस परीणह अशी आहे. साधारणपणें सध्यांच्या सरहिन्द प्रान्ताचीहि तीच मर्यादा आहे.

[१०]को स ल.— प्राचीन वैदिक वाङ्मयांत हें लोकांचें नांव म्हणून आलेलें नाहीं. आर्यसंस्कृतीच्या प्रसाराची शतपथ ब्राह्मणांत (१. ४, १, १.) जी कथा आहे तींत विदेघ माथव ह्याची प्रजा कोसल विदेह, हे कुरु-पंचाल ह्यांच्या मागाहून ब्राह्मण संस्कृतीखालीं आले असा उल्लेख आहे. आणि ह्याच ठिकाणीं सदानीरा ही दोन देशांची—कोसल व विदेह यांची—मर्यादा आहे असें वर्णिलें आहे. शतपथ ब्राह्मणांतच दुसऱ्या एका ठिकाणीं (१३. ५, ४, ४.) कौसल्य अथवा कोसल राजा पर आटणार हैरण्यनाभ ह्यानें एक अश्वमेध केला असें लिहिलें आहे. शांखायन श्रौतसूत्रावरून (१६. २९, ५.) काशी आणि विदेह यांचा संबंध असावा असें दिसतें. वेबर म्हणतो कीं, विदेहाचा होता (पुरोहित) अश्वल याचा वंशज बहुतकरून आश्वलायन हा असावा व त्याला प्रश्नोपनिषदांत कोसल असें म्हटलें आहे. उत्तर आणि दक्षिण कोसल असा भेद वैदिक आणि बौद्ध वाङ्मयांत आढळत नाहीं.

कोसल हा देश गंगेच्या ईशान्येला असावा आणि तो सध्यांचा अयोध्या प्रांतच असावा असें वाटतें. कोसल देश हा

ऋग्मंत्ररचनेपूर्वींच वसला गेला असून वेदोत्पादकांच्या परिचयाचा तो नंतर झाला असावा आणि दाशरथीराम हा ब्राह्मण जातीच्या विकासापूर्वींच—कदाचित् दाशराज्ञ युद्धा पूर्वींच-होऊन गेला असावा असें आमचें मत आहे.

[11]खाण्डव.— तैत्तिरीय आरण्यकांत ( ५. १, १. ) कुरुक्षेत्राची ही एक मर्यादा आहे. महाभारतांतील खाण्डव वन आणि हें एकच आहे हें निर्विवाद आहे. पंचविंश ब्राह्मण आणि शाटयायनक यांतहि हें नांव आहे.

[12]जनपद.— हा शब्द ब्राह्मण ग्रंथांत आलेला असून तेथें त्याचा अर्थ राजाच्या उलट लोक, व भूमि किंवा राज्य हे दोन्ही आहेत. जानपद या विशेषणानें राजाची प्रजा हा अर्थ सुद्धां ध्वनित होतो. ऐ. ब्रा. ८. १४. येथें सायणाचार्य जनपद म्हणजे ग्राम असा अर्थ करितात. हौगच्या भाषांतरांत 'लोक' ( राजे नव्हत, ) असा अर्थ दिला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत ( २. ३, ९, ९. ) जनपद म्हणजे जनपदवासी असा अर्थ भाष्यांत घेतला आहे. छांदोग्य ( ५. ११, ५. ) व बृहदारण्यक ( २. ९, १८. ) या उपनिषदांत जनपद याचा देश असा अर्थ आहे.

[13]तूर्घ्न.— तैत्तिरीय आरण्यकांत ( ५. १. ) कुरुक्षेत्राच्या उत्तरेकडील भाग म्हणून त्याचा उल्लेख आलेला आहे. पण हा नक्की कोणत्या ठिकाणीं होता हें निश्चित नाहीं. हा देश होता कीं नाहीं याबद्दलच मुळीं शंका आहे.

[14]दक्षिणापथ.—( दक्षिणेकडील मार्ग ). ह्याचा अर्थ दक्षिण देश असा असून हा शब्द मराठींत ज्याला आपण सध्या 'दख्खन' असें म्हणतों त्या महाराष्ट्रास लागू आहे. हा शब्द सुराष्ट्र शब्दाबरोबर बौधायन धर्मसूत्रकालापासून महाराष्ट्रास लावलेला सांपडतो. अशा तऱ्हेचा दुसरा शब्दसमूह म्हटला म्हणजे 'दक्षिणापदा' हा होय. हा शब्द ऋग्वेदामध्यें आलेला असून ज्या ठिकाणीं हद्दपार केलेला मनुष्य ( परावृज् ) हद्दपार केला असतां जातो त्या जागेला लावलेला आढळतो. तेव्हां ह्याचा अर्थ इतकाच कीं, आर्यावर्तापलीकडला दक्षिणेकडील मुलुख. ह्या आर्यावर्ताची दक्षिणेकडील सीमा कौषीतकि उपनिषत्कालापर्यंत सुद्धां विंध्याद्रि पर्वत हीच गणली जात असे. दक्षिणापदा अशीं पदें पदपाठकार स्वीकारीत नाहींत; व सायणाचार्य यांचा अर्थहि निराळा करतात. परंतु ही हद्दपार केलेल्या लोकांनां पाठविण्याची जागा होती ही गोष्ट स्पष्ट आहे यांत शंका नाहीं. रामायणांतील रामाचें उदाहरणहि ह्या दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

[15]देश— हा शब्द उपनिषदांच्या व सूत्रग्रंथांच्या कालापर्यंत प्रचारांत आलेला नव्हता; तो फक्त एकदांच ऐतरेय ब्राह्मणाच्या शेवटल्या भागांत व वाजसनेयि संहितेच्या ( ३५.११ ) एका विशेष वादाविषयभूत मंत्रांत आलेला आहे. ह्या मंत्रांत सरस्वतीला मिळणाऱ्या पांच नद्या आहेत असा उल्लेख आलेला आहे. ह्या मंत्रावरून सरस्वती ही नदी म्हणजे सिंधूच होय असें जें मत कांहीं लोक प्रतिपादन करतात तें पूर्णपणें चुकीचें ठरतें. कारण या मंत्रांत 'देश' हा जो शब्द आलेला आहे त्यावरून असें दिसतें कीं, ह्या मंत्राच्या द्रष्ट्याच्या मतानें सरस्वती नदी मध्यदेशांतच होती व यजुर्वेदांतील भूगोलविषयक पुरावाहि हेंच सिद्ध करतो.

भूमीचा एक लहान भाग आणि मोठा भाग अशा दोन अर्थीं हा शब्द असून त्या दोनहि तऱ्हांनीं त्याचा उपयोग आहे. 'देशीय' या ठिकाणीं प्रान्त अशा अर्थाचा हा शब्द आहे. परंतु हें सर्व 'देश' शब्दावर रचलेलें पांडित्य आहे. पांच नद्या कोणत्या हें निश्चित होत नाहीं. उवटानें आपल्या भाष्यांत पांच नद्यांचीं नांवें दिलीं आहेत. पण तीं नांवें निश्चित ठरावयाचीं आहेत. सिंधु आणि सरस्वती ह्या भिन्न आहेत असें ठरणें योग्य होय आणि ऋग्वेदांतील नदीसूक्तावरूनहि सिंधु आणि सरस्वती भिन्न आहेत असें सिद्ध होतें.

[16]नीच्यः— (खालीं राहणारे.) हें पश्चिमेकडील कांहीं राष्ट्रांचें नांव आहे. ऐतरेय ब्राह्मणांतील ( ८. १४. ) ह्या नीच्यांच्या उल्लेखावरून ते मध्यदेशांतील लोकाहून निराळे होते असें दिसतें. हे नीच्य लोक म्हणजे सिंधु नदी व पंजाब ह्या प्रांतांतले लोक होत.

[17]पंचनदः—पांच नद्या असलेला. हें पंजाबचें नांव महाभारतकालापर्यंत कोठें आलेलें नाहीं. अलीकडील शोध पंजाब हें ऋग्वेदाचें घर ( म्हणजे ऋग्वेदाचा जन्म पंजाबांत झाला ) म्हणून त्याचें महत्त्व फार ही गोष्ट खोटी ठरवूं पहात आहेत. हॉपकिन्स, पिशेल, व गेल्डनर ह्या विद्वान् लोकांनीं निरनिराळे मुद्दे मांडून असें सिद्ध केलें आहे कीं, ऋग्वेद —निदान त्याचा बराचसा भाग—पूर्वेकडे म्हणजे मध्यदेशांत लिहिला गेला. हिलेब्रँटच्या मतानें ऋग्वेदाचा कांहीं भाग पंजाब किंवा ॲराकोशिया यांत, व बाकीचा भाग मध्यदेशांत लिहिला गेला. आम्हांस ऋग्वेद पंजाबांत रचला गेला हें म्हणणें चुकलें आहे असें वाटत नाहीं.

[18]परीणहः—अथर्व वेदामध्यें ( १९,४८,१ ) या शब्दाचा पेटी किंवा अशा तऱ्हेची एखादी वस्तु असा अर्थ आहे. पंचविंश ब्राह्मण, तैत्तिरीय आरण्यक व सूत्रग्रंथ ह्यांमध्यें आलेल्या व कुरुक्षेत्रांत असलेल्या एका स्थलाचें हें नांव आहे. अथर्व वेदाच्या पदपाठकारानें 'परिणहि' असें पद स्वीकारलें असून त्याचा गृह असा अर्थ घेतला आहे व त्याला आधार म्हणून तै. ब्रा. ३, २,४,७ हें स्थल दिलें आहे. 'परिणः' हें पद पडूं शकत नाहीं. तैत्तिरीय आरण्यकांत ह्या देशवाचक शब्द आहे असें उघड दिसतें. तो स्थलवाचक मानला तरी हरकत नाहीं; परंतु तें संशयास्पद आहे. लाट्यायन सूत्रांत 'परीणं नाम स्थली' असें स्पष्ट म्हटलें आहे. शांखायन सूत्रांत 'परिणहि' असेंच आहे.

[१९] परिसारकः--हें ऐतरेय ब्राह्मण (२,१९) यांत आलेल्या एका गोष्टीवरून सरस्वतीमुळें बनलेल्या एका बेटाचें नांव आहे असें निश्चित होतें.

[२०] मद्रः--या लोकांचा उल्लेख बृहदारण्यक या उपनिषदांत केला गेला आहे. काप्य पतंचल हा त्या वेळीं त्यांच्यांत रहात होता. त्यांच्या 'औदीच्य मद्र' या शाखेचें नांव दुसरीकडे वैदिक वाङ्मयांतहि आलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत ( ८.१४,३ ) हे हिमालयाच्या पलीकडे (परेण हिमवन्तम्) व उत्तर कुरूंच्या जवळपास (म्हणजे झिमरच्या मताप्रमाणें बहुधा काश्मीरांत) राहणारे म्हणून उल्लेखिले आहेत. उपनिषदांत आलेले मद्र लोक कुरूंच्या प्रमाणें बहुधा मध्यदेशांत-कुरुक्षेत्रांत रहात असावेत, असें मॅकडोनेलला वाटतें.

[२१] मध्यदेश--(मधला देश.) मानवधर्मशास्त्राप्रमाणें उत्तरेस हिमालय, दक्षिणेस विन्ध्य, पश्चिमेस विनशन आणि पूर्वेस प्रयाग (अलाहाबाद) असलेला हा प्रदेश (म्हणजे जेथें सरस्वती अरण्यांत गुप्त होते आणि गंगायमुनांचा संगम होतो तेथपर्यंत पूर्वसीमा असलेला प्रदेश) होय. त्याच ग्रंथांत ब्रह्मर्षि देशांत कुरुक्षेत्र, मत्स्यदेश, पंचाल देश व शूरसेनक देश यांचा व ब्रह्मावर्तांत सरस्वती व दृषद्वती यांमधील अत्यंत पवित्र भूमीचा समावेश होतो म्हणून दिलें आहे. बौधायन धर्मसूत्रांत आर्यावर्त हा प्रदेश विनशनाच्या पूर्वेस, कालक वनाच्या पश्चिमेस (कालक वन = काळें जंगल अथवा हरिद्वारजवळचें कनखल), हिमालयाच्या दक्षिणेस व पारियात्र अथवा पारिपात्र पर्वताच्या उत्तरेस आहे असें दिलें आहे. शिवाय त्याच ग्रंथांत आणखी असेंहि म्हटलें आहे कीं कांहींच्या मताप्रमाणें हा प्रदेश यमुना व गंगा या नद्यांमधील होय; परंतु भाल्लवींच्या मताप्रमाणें ती सीमा नदी (बहुधा सरस्वती) व सूर्य जेथें उगवतो तो प्रदेश यांच्यामधील आहे. मानवधर्मसूत्र व वसिष्ठ धर्मसूत्र यांच्या अन्वयें आर्यावर्त हा देश विंध्य आणि हिमालय यांच्यामधील होय असें दिसतें, या दोन मर्यादा कौषीतकि उपनिषदांत आलेल्या आहेत. मध्यदेश हा शब्द वैदिक नाहीं; परंतु ऐतरेय ब्राह्मणांत ( ८,१४, ३ ) या करितां 'मध्यमा प्रतिष्ठा दिश्' (मधला स्थापित देश-मधला पक्का कायमचा देश) असा प्रयोग केला आहे. या प्रदेशांत कुरु, पंचाल, वश व उशीनर हे लोक राहतात म्हणून दिलें आहे. यांपैकीं वश व उशीनर मागाहून अगदीं बेपत्ता झाले. मध्यदेश हा कुरु पंचालांचा देश होता व याच देशांत ब्राह्मणें व उत्तरकालीन संहितामंत्र रचिले गेले. संहितीकरणेंहि येथेंच झालीं असावींत. ह्याच्या पूर्वेस कोसल-विदेह असून पश्चिमेस ओसाड प्रदेश होता. शतपथ ब्राह्मण आणि ऐतरेय ब्राह्मण यांत पश्चिमेकडील जातींचा निषेधपूर्वक उल्लेख आला आहे. शिवाय कोसल व विदेह यांचें ब्राह्मणत्वाच्याखालीं येणें याबद्दलची कथाहि शतपथ ब्राह्मणांत दिलेली आहे.

बुह्लर असें म्हणतो कीं, पारियात्र पर्वत हा विंध्याद्रीचा एक भाग आहे व मध्यदेशाची पश्चिम मर्यादा प्रथम आदर्श पर्वत ही असावी. कारण शतपथ ब्राह्मणाच्या एका पाठांत व कृष्ण पंडिताच्या टीकेंत 'प्रागादर्शनात्' असा पाठ असून 'अदर्शनात्' असा नाहीं. पाणिनीवरील महाभाष्यांत 'प्रागादर्शनात्' असें आहे. ऱ्हीस डेव्हिड्स व मॅक्समुल्लर वगैरेंनीं आर्य द्राविडयुद्धाच्या कल्पनेवर किंदा होऊन अशी एक विचित्र कल्पना पुढें मांडली आहे कीं, आर्यन् लोकांची एक टोळी चित्रळ व गिलजितच्या बाजूनें मध्यदेशांत आली. त्यांच्या बरोबर स्त्रिया नसल्यामुळें त्यांनीं द्रविडस्त्रियांशीं लग्नें केलीं; व त्यापासून आर्यद्रविड जात उत्पन्न झाली. या कल्पनेस वैदिक वाङ्मयांत आधार सांपडणें अशक्य आहे. वैदिक वाङ्मयांत वैदिक लोक कोणत्या मार्गानें आले याचा उल्लेख नाहीं असें म्हणणें वेडगळपणाचें आहे. वरील कल्पना पुढें निघालेल्या पोटभाषांवरून बसविलेली आहे. ही कल्पना कोणत्याहि काळाला जुळेल अशी नाहीं.

[२२] मरु.—(अनेकवचनीं) तैत्तिरीय आरण्यकांत हा कुरुक्षेत्राचा उत्कर म्हणून आला आहे. उत्कर म्हणजे वेदी खणल्यावर ती माती टाकण्याची जागा किंवा उकिरडा. कुरुक्षेत्र हा प्रदेश जर यज्ञांतील वेदी कल्पिली तर मरुदेश हा त्या वेदीचा उत्कर होईल. मारवाडास मरुदेश हें नांव उत्तरकालीन संस्कृत ग्रंथांत स्पष्ट दिलेलें आहे.

[२३] मष्णार.—हें एका जागेचें नांव आहे. ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें कुरु राजाला येथें जय मिळाला.

[२४] वंग.—हें बंगालप्रांताचें नांव आहे, पण पूर्वकालीन वैदिक ग्रंथांत तें सांपडत नाहीं. ऐतरेय आरण्यकांत 'वंगावगधाः' असा शब्द आला आहे. तो बहुधा वंग-मगधाः या शब्दाचा अपपाठ असावा. वंग-मगधाः म्हणजे शेजारशेजारचे वंग व मागध लोक. बौधायन धर्मसूत्रांमध्यें हा शब्द आलेला आहे. ऐ. आ. वरील भाष्यांत सायणाचार्य वंग व अवगध हीं वृक्षांचीं नांवें आहेत असें म्हणतात.

[२५] विदर्भ.—पूर्वकालीन वैदिक वाङ्मयांत फक्त जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतच हें एका जागेचें नांव म्हणून आलेलें आहे. ह्या ठिकाणीं येथील माचलजातीचे कुत्रे वाघास ठार मारीत असा उल्लेख आलेला आहे. विदर्भ हाच वऱ्हाड प्रांत असावा असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे.

[२६] विदेह.--हें एका लोकांचें नांव असून ब्राह्मण कालाच्या अगोदर तें कोठें आलेलें नाहीं. शतपथ ब्राह्मणांत विदेघ माथवाची जी कथा दिलेली आहे तिजवरून विदेहांत संस्कृति आली ती पश्चिमेकडील ब्राह्मण लोकांनीं आणली व विदेहाच्या पूर्वीच कोसल देश ब्राह्मण संस्कृतिमय झालेला होता असा जो जनप्रवाद आहे तो खरा असल्याचें दिसतें. विदेहांतल्या लोकांनां पुढें जी प्रसिद्धि मिळाली तिचें कारण त्यांचा राजा जनक ह्याची संस्कृति होय. बृहदारण्यक उपनिषदांत हा जनक राजा ब्रह्मविद्येचा प्रमुख पुरस्कर्ता होता असें म्हटलेलें आहे. कौषीतकि उपनिषदामध्यें विदेहांचा संबंध काशीच्या लोकांशीं आलेला आहे. ऐतरेय ब्राह्मणांत

निरनिराळ्या लोकांची जी यादी आलेली आहे तीमध्यें विदेह लोकांचें नांव वगळलेलें आहे. कारण कोसल व काशी लोकांबरोबर त्यांचा प्राच्य ( पूर्वेकडील ) लोकांमध्येंच अंतर्भाव होत असे. शांखायन श्रौतसूत्रामध्यें असें म्हटलें आहे कीं, काशि, कोसल व विदेह ह्या तीन राष्ट्रांपैकीं प्रत्येक राष्ट्राला एक ‘ जल जातुकर्ण्य ’ नांवाचा पुरोहित होता, व त्याच ग्रंथांत दुसऱ्या एका ठिकाणीं विदेह लोकांचा राजा ‘ पर-आट्णार’ व कोसल लोकांचा राजा हिरण्यनाभ ह्यांच्या निकट संबंधाचें स्पष्टीकरण केलेलें आहे. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें परआट्णार हा हिरण्यनाभाचा वंशज असून कोसल देशाचा राजा होता. पंचविंश ब्राह्मणांत उल्लेखिलेला नमीसाप्य नांवाचा दुसरा एक विदेहाचा राजा होऊन गेला. यजुर्वेद संहितेमध्यें ‘ विदेहाच्या गायी ’ असा उल्लेख आलेला आहे. पण तैत्तिरीय संहितेवरील टीकाकार असें म्हणतो कीं, वैदेही हें नुसतें विशेषण आहे व त्याचा अर्थ सुंदर शरीर असलेली ( विशिष्ट देहसंबंधिनी ) असा आहे. बौधायन श्रौतसूत्रामध्यें ब्राह्मणी संस्कृतीच्या लोकांत विदेह लोकांचें नांव आलेलें आहे. कोसल व विदेह या देशांची मर्यादा सदानीरा म्हणजे अर्वाचीन गंडकी ( ग्रीक भूगोल वेत्ते हिला कोंडोचेटीझ असें म्हणत असत ) ही नदी होती. ही नदी नेपाळमधून निघून पाटण्याच्या समोर गंगा नदीस मिळते. विदेह देश म्हणजे हल्लींचा जवळ जवळ तिरहुत देश होय.

*नदी.— ऋग्वेदामध्यें व मागाहून झालेल्या ग्रंथांत याचा अर्थ पाण्याचा प्रवाह असा आहे. नदीच्या पात्रांत ज्या उथळ जागा (गाध) असतात त्यांचा, त्याचप्रमाणें नदीच्या पलीकडील तीराचा ( पाराचा ) व नदींतील घोड्यांच्या स्नानाचा असे उल्लेख आलेले आहेत. नद्यांचा पर्वतांशीं निकट संबंध दाखविलेला आढळून येतो. नदीपति ही पदवी समुद्राला किंवा त्याच्या पाण्याला एकदां दिलेली आहे. ‘ यथा सिन्धुर्नदीनां ’ हें अथर्ववेदा ( १४., १, ४३ ) मधील वाक्य समुद्राच्या ‘ सरित्पति ’ या नांवाच्या ज्ञानाची ग्वाही देत आहे.

+नाव्या.— ऋग्वेदामध्यें अनेक वेळां व मागाहून झालेल्या वाङ्मयांत होडीनें ओलांडण्यास योग्य अशी नदी या अर्थीं हा शब्द आलेला आहे ( पा. सू. ४.४, ९१ पहा ). तार्य अशा अर्थींच फक्त हें नाव्य असें रूप होतें.

‡वक्षणा.— हा शब्द स्त्रीलिंगी व अनेकवचनी असून ऋग्वेदाच्या एका ऋचेंत ‘ नदीचें पात्र’ असा ह्याचा अर्थ आहे. ‘वक्षणा· म्ह० कुल्या ’ ( कालवा ) असा अर्थ सायणाचार्य वगैरे करितात. निघंटुकारानें मात्र नदी नामांत याचा पाठ केला आहे.

[२७] असिक्नी.—‘ काळी ’ हें ऋग्वेदांत एका नदीचें नांव आहे. हिला नंतर चंद्रभागा म्हणूं लागले आणि ग्रीक लोक तिला अॅकेसिनीझ म्हणत असत. आतां पंजाबांत जी चिनाब म्हणून नदी आहे ती हीच होय.

[२८] आपया.— दृषद्वती आणि सरस्वती ह्यांच्यामध्यें या नदीच्या नांवाचा ऋग्वेदांत फक्त एकदांच उल्लेख आहे. लुडविगच्या मनाचा कल ही नदी आणि आपगा म्हणजे गंगा ह्या एकच होत असें म्हणण्याकडे आहे; परंतु झिमर म्हणतो कीं ती सरस्वती नदीची ठाणेश्वरावरून वाहणारी शाखा अथवा पश्चिमेकडील आधुनिक इंद्रमती असावी, व पिशेल म्हणतो कीं कुरुक्षेत्रावरून वाहणारी महाभारतांतील आपया नदी ती हीच असावी. येथें पुढें दिल्याप्रमाणें एक विशेष कल्पना करणें शक्य व युक्त आहे. कीं सध्यां सरस्वती गुप्त म्हणजे जलरहित आहे असें म्हणतात त्याचप्रमाणें ऋग्वेदकालींहि मानण्याची पद्धति असावी असें अनुमान काढण्यास या पदाचा विशेष आधार आहे. ह्या ठिकाणीं तीन नद्या घेण्यास समुच्चयार्थक असें कांहींहि नाहीं, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ‘आपया’ या ऐवजीं ‘अपया’ असा पाठ असल्यास बरा, व तोच मूळ असावा असें धरून वरील अनुमान आहे. महाभारत वगैरेमध्यें सुद्धां अशा चुकीनेंच उल्लेख असावा.

[२९] आर्जीक, आर्जीकीय (पु.), आर्जीकीया (स्त्री.).— बहुतकरून दोन्ही पुल्लिंगी शब्द राष्ट्र किंवा लोक दर्शवितात आणि स्त्रीलिंगी शब्द त्या देशांतील नदी दर्शवितो. हिलेब्रँट म्हणतो कीं, हा देश काश्मीर प्रांतांत किंवा काश्मीरजवळ असावा. कारण अभिसारीझ याचा भाऊ आर्सेसीझ, ह्यानें आपलें नांव आपल्या लोकांच्या नांवावरून धारण केलें आणि अभिसार काश्मीरच्या जवळ आहे असें अॅरिअन म्हणतो. पिशेल आर्जीक हा देश आहे हें कबूल करतो, परंतु तो देश कोणता हें सांगतां येत नाहीं असें तो म्हणतो. परंतु रॉथ अथवा झिमर ह्यांपैकीं कोणीच तें विशेषनाम आहे असें कबूल करीत नाहीं. उलटपक्षीं सर्व ग्रंथकार आर्जीकीया हें नदीचें नांव आहे असें कबूल करतात. रॉथ हा फक्त एकाच उताऱ्यांत वरील म्हणणें कबूल करतो, परंतु इतर ठिकाणीं तो शब्द सोमरसाच्या भांड्यांनां लागू पडतो असें म्हणतो; परंतु तो शब्द सर्व उताऱ्यांमध्यें एकाच अर्थी आलेला आहे असें गृहीत धरणें जरूर आहे. झिमरच्या मतें या नांवाची नदीच नाहीं; आणि पिशेलच्या मतें या नांवाची नदी आहे पण ती ठरवितां येत नाहीं. हिलेब्रँट म्हणतो कीं ती उत्तरसिंधु अथवा वितस्ता ( झेलम ) अथवा दुसरी एखादी नदी असावी. ब्रासमन हा यास्कावरून ती नदी विपाश् ( बिआस ) हीच होय असें प्रतिपादन करतो. परंतु नदीस्तुतिपरसूक्तांतील ह्या नदीच्या नांवाच्या स्थानावरून हें अशक्य वाटतें. ब्रुन्होफर म्हणतो कीं ही नदी म्हणजे अर्घेनाव नदीला येऊन मिळणारी अर्घेसन नदी आहे.

[३०] ऊर्णावती.— ऋग्वेदांत ज्या सूक्तांत नद्यांची स्तुति आहे त्यांत लुडविगला सिन्धुला येऊन मिळणाऱ्या ऊर्णावती नामक नदीचा उल्लेख आलेला आढळतो; परंतु ही गोष्ट मॅकडोनेल यास चुकीची वाटते. रॉथ म्हणतो कीं या शब्दाचा अर्थ ‘लोंकरीचा’ असा आहे, उलटपक्षीं झिमर हा लुडविगचा अर्थ कबूल करतो. कारण तो म्हणतो कीं, त्यामुळें सर्व सूक्ताच्या अन्वयांत

घोंटाळा होतो. पिशेल म्हणतो कीं तें सिंधुनदीचें विशेषण असून त्याचा अर्थ 'जेथें मेंढया पुष्कळ आहेत' असा असावा.

[31] कुभा.— ह्या नदीचें नांव दोन वेळ ऋग्वेदांत आलें असून अर्वाचीन काबुलनदी आणि ही ह्या एकच आहेत. सायणाचार्यांनीं प्रथमस्थळीं ( ५. ५३, ९ ) हा शब्द विशेषणात्मक धरला असून दुसऱ्या स्थळीं ( १०. ७५, ६ ) मात्र त्याचा नदी असा अर्थ स्वीकारला आहे.

[32] क्रुमु.— हें एका ओढयाचें नांव ऋग्वेदांतील पांचव्या मंडलांत एकदां आणि शेवटल्या मंडलांत एकदां नदीस्तुतींत आलें आहे. सिन्धु नदीला पश्चिमेकडून मिळणारी अर्वाचीन कुरम नदी आणि ही नदी एकच ह्यांत मुळींच संशय नाहीं. सायणाचार्यांनीं ऋ० ५.५३, ९ येथें 'क्रुमु' हें समुद्र या पदाचें विशेषण घेतलें आहे. परंतु तेथें तें नदीचें नांव घेतलें असतां जुळतें. ऋ० १०.७५, ६ येथेंहि सायणाचार्यांनीं क्रुमु हें गोमतीचें विशेषणच केलें आहे 'क्रुमुं गोमतीम्'.

[33] गंगा.— ऋग्वेदांतील नदीस्तुतींत हें आधुनिक गंगा नदीचें नांव एकदांच आलें आहे. उरुःकक्ष ह्याचें विशेषण गांग्य ह्यांतहि या नदीचा उल्लेख आहे. दुसऱ्या संहितांमध्यें ह्या नदीचें नांव कोठेंहि आढळत नाहीं. परंतु शतपथ ब्राम्हणांत ( १३. ५, ४, ११ ) हें नांव आलें आहे. तेथें गंगा आणि यमुना या नद्यांच्या कांठीं भरत दौःषन्ति ह्यानें मिळविलेले विजय उल्लेखिलेले आहेत, आणि तैत्तिरीय आरण्यकांतील मंत्रांत ( २. २० ) गंगा यमुना ह्या नद्यांमध्यें ( येथेंच उपर्युक्त मंत्र रचला गेला असला पाहिजे ) राहाणाऱ्या लोकांचा मोठा सन्मानपूर्वक उल्लेख केलेला आहे. गंगा आणि आपया या नद्यांचें जें लुडविग यानें अभिन्नत्व दर्शविलें आहे तें बरोबर नाहीं. कक्षाचें विशेषण जें 'गांग्य' असें आलें आहे तेथें त्याचा 'गंगायाः जातः' असा सरळ अर्थ दिसतो व 'गंगा नदी' प्राचीन आर्यांनां माहीत होती हें स्पष्ट होतें.

[34] गोमती.—( गाई असणारी. ) ऋग्वेदाच्या दहाव्या मण्डलांत नदीस्तुत ( १०. ७५, ६. ) ही एक नदी आहे. त्या ऋचेवरून ही सिन्धुनदीस मिळणारी नदी असली पाहिजे, आणि सिन्धूला पश्चिमेकडून मिळणारी नदी जी गोमल तीच ही असावी ह्याबद्दल संशय रहात नाहीं. ऋग्वेदांत दुसऱ्या एका ठिकाणीं ( ८. २४, ३०. ) गोमती शब्दांतील स्वरोच्चारावरून ही नदीच असली पाहिजे असें वाटतें. गेल्डनर म्हणतो कीं वरील दोन उताऱ्यांत गोमती अथवा अधिक बरोबर बोलावयाचें म्हणजे तिच्या चार शाखा ( व म्हणून अनेक वचनी उपयोग )च उल्लिखित आहेत. ह्यावरून ती नदी कुरुक्षेत्रांत– म्ह० वैदिक सुधारणेच्या मध्यबिंदू पाशीं–होती असें दिसतें. सिन्धु आणि तिला मिळणाऱ्या या नद्या हा सिद्धान्त स्वीकारला म्हणजे सायणभाष्यांत हिमवान् पर्वताचा संबंध या नद्यांकडे–निदान गोमती नदीकडे– जोडण्यांत आला आहे तो बरोबर नाहीं असें म्हणावें लागतें.

[35] तृष्टामा.— ऋग्वेदामध्यें नदीस्तुतींत ही एक नदी म्हणून हिचा उल्लेख आलेला आहे. पण ही नदी कोणती हें ओळखण्यास साधन नाहीं. ही सिंधूला मिळणारी नदी होती ही गोष्ट तेथें उघड होत आहे, परंतु हिचें स्थान निश्चित होत नाहीं.

[36] दृषद्वती.— 'दगडांनीं भरलेली' अशा अर्थाचें हें एका नदीचें नांव असून ही नदी कांहीं वेळ सरस्वती नदीला समांतर वहात जाऊन शेवटीं तिला मिळते. हिचें नांव ऋग्वेदामध्यें सरस्वती व आपया ह्यांच्या बरोबर भरत राजांचें कार्यक्षेत्र म्हणून आलेलें आहे. पंचविंश ब्राह्मण व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें दृषद्वती व सरस्वती ह्या नद्यांजवळ मोठे यज्ञ झाले असा उल्लेख आलेला आहे. या दोन नद्या ही मध्यदेशाची पश्चिम मर्यादा होती असें मनुस्मृति २. १७ येथें उल्लेखिलें आहे असें मॅकडोनेल म्हणतो. परंतु सदरहु ठिकाणीं वस्तुतः या दोन नद्यांमधील प्रदेशास ब्रह्मावर्त म्हणत एवढें म्हटलेलें आहे. ब्रह्मावर्त हा मध्यदेशाचा केवळ एक भाग होता.

[37] परुष्णी.– हें एका नदीचें नांव असून तें नदीस्तुतींत व दहा राजांवर सुदासनें जो जय संपादिला त्याबद्दलच्या सूक्तांत आलें आहे. ह्या नदीचें पाणी चढून पळणारे राजे बुडून मेले आणि त्यामुळें सुदासला कायमचा जय मिळाला, म्हणून ह्या नदीचें नांव त्या सूक्तांत आलेलें आहे. ह्या ठिकाणीं व ऋग्वेदांतील आठव्या मंडलांत एका ठिकाणीं (येथें या नदीला 'महेनदि' असें म्हटलेलें आहे.) आलेलें हें नांव, मागाहून जिला रावी 'इरावती (रावी)' असें नांव मिळालें असें यास्क म्हणतो तिचेंच असावें. पिशेलच्या मतानें ऋग्वेदामध्यें आणखी दोन ठिकाणीं (४. २२, २; ५. ५२, ९.) या नदीचा उल्लेख आलेला आहे. त्या ठिकाणीं लोंकरी (ऊर्णा)चा संबंध परुष्णी शब्दाशीं जोडलेला आहे. मॅक्समुल्लर व ओल्डेनबर्ग यांनांहि पिशेलचें म्हणणें मान्य आहे पण ज्या ठिकाणीं हा संबंध निर्दिष्ट केलेला आहे त्या वचनांचा निश्चित अर्थ काय आहे याबद्दल त्यांच्यांत मतभेद आहे. पिशेल म्हणतो कीं, परुष्णी हें नांव बारीक बारीक केलेल्या लोंकरीच्या भुग्या ( परुस् ) पासून बनलेलें आहे; निरुक्तांत म्हटलें आहे त्याप्रमाणें नदीच्या वळणापासून किंवा रॉथ म्हणतो त्याप्रमाणें नदींतल्या बेटापासून तें बनलेलें नाहीं. सुदासविजयविषयक सूक्तांत परुष्णी व यमुना ह्यांचा एकत्र उल्लेख आला आहे त्यावरून हॉपकिन्सनें असा तर्क केला आहे कीं, त्या सूक्तांतील आलेलें यमुना हें परुष्णीचेंच दुसरें नांव आहे व गेल्डनर असें म्हणतो कीं, परुष्णी ही यमुनेस येऊन मिळणारी एक नदी असावी. पण हे दोन्ही तर्क अनावश्यक व असंभाव्य आहेत. हें सूक्त संक्षिप्त आहे व यांत सुदासच्या दोन विजयांचें वर्णन आलें असावें असें मानण्यास हरकत नाहीं. अथर्ववेदामध्यें परुष्णीबद्दल संशयास्पद उल्लेख आलेला आहे ( ६. १२, ३ ).

[38] पुरीषिणी.— ऋग्वेदांत एका सूक्तांत हें नांव आलें असून, तें एखाद्या नदीचें नांव असावें; किंवा बहुधा त्याचा जलमय किंवा पूर आलेली किंवा पाण्यानें झिजलेले दगड

घेऊन जाणारी नदी असा अर्थ असून तें सरयूचें विशेषण असावें' सायणाचार्य त्याचा उदकवती असाच अर्थ करतात. यास्कानेंहि उदक नामांमध्यें 'पुरीष' शब्दाचा पाठ केला असून (यास्क २, २२.) पुरीष हें उदकवाचक 'नूक' पदाचें विशेषणहि घेतलें आहे. अर्वाचीन संस्कृतमध्यें 'पुरीष' व 'पुरीषिणी' या शब्दांचे अर्थ अगदींच भिन्न झाले आहेत.

[39] मरुद्वृधा.— हें एक नदीचें नांव ऋग्वेदांत नदीस्तुतीमध्यें आलें आहे. त्याच ठिकाणीं असिक्नी व वितस्ता यांचा उल्लेख आला आहे. रॉथच्या मतें या दोन नद्या मिळून एक झालेल्या प्रवाहाला पुढें परुष्णीला मिळेपर्यंत मरुद्वृधा हें नांव आहे. झिमर याच मताचा आहे. पण लुडविगच्या मतें असिक्नी व वितस्ता यांचा एक झालेला प्रवाह परुष्णीला मिळाल्यानंतर परुष्णीचेंच पुढें मरुद्वृधा हें नांव पडतें. परंतु हें मत बरोबर वाटत नाहीं. 'असिक्नी' ही मरुद्वृधेची अवयवभूत व वितस्ता आणि सोमा या आर्जीकीया नदीच्या शाखाभूत होत असें सायणाचार्यांचें मत आहे.

[40] मेहत्नू.— ऋग्वेदांतील नदीस्तुतींतल्या एका नदीचें नांव. क्रुमु आणि गोमती या नद्यांच्या अगोदर सिंधु नदीला मिळणारी नदी. कदाचित् ती क्रुमु नदीला मिळणारी नदी असण्याचाहि संभव आहे.

[41] यमुना.—हें जुळी मुलगी या अर्थाचें नांव त्या नदीस ती गंगानदीच्या बाजूनें बरोबर वहात जात होती म्हणून पडलें. हिचा ऋग्वेदांत तीनदां उल्लेख आलेला आहे. आणि उत्तरकालीन वाङ्मयांतहि बरेच वेळां आलेला आहे. ऋग्वेदाप्रमाणें तृत्सु आणि सुदास यांनीं यमुनेवर त्यांच्या शत्रूंविरुद्ध एक लढाई जिंकली होती. येथें यमुना हें परुष्णी (रावी) नदीचेंच एक नांव आहे हें हॉपकिन्सचें मत खरें मानण्यास कांहीं आधार नाहीं असें मॅकडोनेल म्हणतो. अथर्ववेदांत यामुन आञ्जनाचा त्रैककुद आञ्जनाबरोबर उपयुक्त म्हणून उल्लेख केलेला आहे. ऐतरेय आणि शतपथ ब्राह्मणांत भरत यमुनेवर यशस्वी झाल्याबद्दल उल्लेख आहे. इतर ब्राह्मणांतहि या नदीचा उल्लेख आहे. मंत्र पाठांत साल्व लोक तिच्या कांठीं रहात होते म्हणून म्हटलें आहे. सायणमतानें 'अजास', 'शिग्रु' आणि 'यक्षु हे देश यमुनेच्या कांठीं असावयास पाहिजेत. तिला 'त्रिककुद पर्वतासंबंधीं' आणि 'यामुन' असेंहि म्हणतात.

[42] यव्यावती.—या शब्दाचा ऋग्वेदांत आणि पंचविंश ब्राह्मणांत नदीचें नांव म्हणून उल्लेख आहे. हिलेब्रँटच्या मतें ती नदी इराणांत आहे; पण त्याच्या मतास आधार नाहीं. यव्यावती व हरियूपीया या एकच असाव्यात असें सायणाचार्यांतें मत आहे. ती इराणापेक्षां हिंदुस्थानांतच असणें जास्त संभवतें.

[43] रसा.— वैदिक प्रदेशाच्या वायव्येस असलेल्या नदीचें नांव म्हणून या शब्दाचा ऋग्वेदाच्या तीन मंत्रांत उल्लेख आलेला आहे. इतरत्र त्याचा पृथ्वीच्या शेवटास असणारी काल्पनिक नदी या अर्थानें उल्लेख येतो. ही पृथ्वीला व त्याचप्रमाणें अन्तराळाला आवेष्टून आहे अशी समजूत आहे. सरस्वतीप्रमाणेंच हिच्या संबंधांतहि ही मूळची खरोखरीची नदी असावी असें मानणें सयुक्तिक होईल. कदाचित् ही मूळची अॅरॅक्सीझ किंवा जक्झार्टीझ असावी. कारण रसाचें अवेस्ती रूप 'रङ्हा' वेंदिदादमध्यें आढळतें. हा शब्द मूळ 'रस' म्हणजे 'पाण्याची चव' यावरूनच आलेला असावा आणि म्हणून सरस्वतीप्रमाणें तो कोणत्याहि नदीला लावतां येईल. ही कुभा, क्रुमु, सिंधु आणि सरयु या नद्यांबरोबर अवर्षणामुळें कोरडी पडली असा उल्लेख आहे (५. ५३, ९). ऋ० १. ११२, १२ येथेंहि (कोरडी पडलेली) नदी पाण्यानें भरून टाकली असाच उल्लेख आहे. ऋ. १०. ७५,६ येथें 'हे सिन्धु, गतियुक्त तूं कुभेसहित गोमती आणि मेहत्नूसहित क्रुमू यांच्याप्रत जाण्याकरितां प्रथम तृष्टामा, सुसर्तु, रसा व श्वेती यांच्यासह जातेस,' असें म्हटलें आहे. सायणाचार्य क्रुमु ही नदीच मानीत नाहींत. वेदार्थयत्नकार या नदीस तृष्टामा, प्रथम मिळाल्यानंतर ही सुसर्तु, रसा आणि श्वेती या नद्यांस मिळते आणि मग कुभा, गोमती, क्रुमु व मेहत्नू या नद्यांस बरोबर घेऊन चालते असें म्हणतात. यांपैकीं कुभा (काबुल) व क्रुमु (कुरम) या नद्या सध्यांच्या नकाशांत उपलब्ध होतात. गोमती (सिन्धूला मिळणारी) उपलब्ध नाहीं. बाकीच्या कोणत्याहि सध्यां निश्चित किंवा नामसादृश्य प्राप्त नाहींत. ऋ. ५. ५३, ९. येथें रसा, अनितभा, कुभा, क्रुमु, सरयु व पुरीषिणी या नद्यांचा उल्लेख आहे. सायणाचार्य अनितभा, क्रुमु व पुरीषिणी या नद्या आहेत असें मानीत नाहींत, परंतु महाभारतांत या नद्या मानल्या आहेत. ५. ४१, १५. येथें 'रसा' म्हणजे 'पृथ्वी' असा अर्थ आहे तो अर्वाचीन संस्कृतशीं जुळता आहे. ऋ. ९. ४१, ६ येथें रसा ही नदी किंवा रस असा अर्थ सायण घेतो. ऋ. ४. ४३, ६ व ८. ७२, १३ येथें रसा याचा पाणी असा अर्थ आहे; परंतु हें पद प्रत्येक नदीला लावतां येत नसून ही एक विशेष नदी असावी यांत बिलकुल संशय नाहीं. तथापि पुढल्या ग्रंथांत (भारत वगैरेंत) हें नांव आलेलें नसावें.

[44] वितस्ता:—पंजाबांतल्या पांच नद्यांपैकीं सर्वांत पश्चिमेकडील ही नदी असून हिचा उल्लेख ऋग्वेदांत नदीस्तुतींत आलेला आहे. अलेक्झांडरच्या इतिहासकारांनीं जिला हायडॅस्पीझ असें नांव दिलें होतें तीच ही नदी होय, व हिलाच टॉलेमी हा बिडॅस्पीझ असें अधिक शुद्ध नांव देतो. मुसुलमानी इतिहासकार हिला बिहत् किंवा विहत् असें म्हणत असत. या नांवाची स्मृति हल्लीं काश्मिरी वेथ् ह्या नांवांत अजूनहि हयात आहे. ज्या पांच नद्यांमुळें पंजाबला पंचांबु हें नांव मिळालें त्या पांच नद्याः १ सिंधु, २ वितस्ता (झेलम), ३ इरावती, ४ चंद्रभागा (चिनाब) व ५ विपाशा (बियास) या असाव्यात. शुतुद्रि (सतलज) हेंहि प्रसिद्ध नद्यांपैकींच एक नांव आहे. ह्या पांच किंवा सहाहि नद्या सध्यां पंजाबमध्यें आहेत. सध्यां झेलम व चिनाब यांचा संगम झाल्याचें दिसतें. व वियत् ही नदी अगदींच वेगळी दाख-

विली जाते, आधुनिक सिंधूइतका प्राचीन मोठा नसावा. आरंभींचें नांव कांहीं तरी वेगळें असून पुढें त्याच प्रवाहास सिंधु असें नांव पडलें असावें.

[४५]विपाश्.--म्ह. पाशरहित. ऋग्वेदामध्यें दोन वेळां उल्लेखिलेल्या एका नदीचें हें नांव आहे. याच नदीला ग्रीक लोक हिफासिस, हिपानिस किंवा विपासिस म्हणत व हल्लींच्या काळीं पंजाबांत हिला बिआसनदी असें म्हणतात. ऋग्वेदेतर वैदिक वाङ्मयांत तर हिचा कोठेंहि उल्लेख नाहीं. यावरून वैदिक काळच्या आर्य लोकांना या नदीचें फारसें महत्त्व वाटत नव्हतें ही गोष्ट सिद्ध होते असें मॅकडोनेल म्हणतो. या नदीला पूर्वी उरुंजिरा असें म्हणत असत. ह्या गोष्टीची नोंद निरुक्तांत अजून आहे. गोपथ ब्राह्मणांत असें म्हटलेलें आहे कीं, या नदीच्या मध्यभागीं वसिष्ठशिला होती. पाणिनीनें या नदीचा उल्लेख केलेला आहे, व याच नदीला वैदिक वाङ्मयानंतरच्या वाङ्मयांत विपाशा असें नांव मिळालें आहे. प्राचीन कालापेक्षां या नदीचा ओघ आतां बराच बदलेला आहे. ऋ. ३. ३३, १ या ठिकाणीं या नदीचा उल्लेख आहे. तेथें शुतुद्रि आणि विपाश् यांच्या संगमावर विश्वामित्र आला असून तो नदीशीं संवाद करतो आहे व त्या नद्यांचा पुढें सिंधु नदीशीं संगम झाला आहे असें वर्णन आहे. निरुक्त आणि पदपाठकार ( ऋग्वेद ) यांचा मतभेद येथें लक्षांत ठेवण्यासारखा आहे. विश्वामित्र विपाश् व शुतुद्रीच्या संगमावर आला व वाट देण्यास त्यांची प्रार्थना करूं लागला ( नि. २०, २४ ). विपाश् आणि आर्जीकिया या नद्या एकच आहेत असें यास्क म्हणतो.

[४६] विबाली.--ऋग्वेदामध्यें एकदांच हा शब्द आलेला आहे व त्याचा तेथें एका अप्रसिद्ध ओढ्याचें नांव असा अर्थ असावा असें मॅकडोनेल म्हणतो. परंतु हें मत सायणाचार्य व वेदार्थयत्नकार वगैरेंच्या मतास जुळत नाहीं.

[४७] शिफा.--ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आलेला आहे. सायण ह्याचा अर्थ एका नदीचें नांव असा करितात व तो पूर्णपणें संभवनीय आहे.

[४८]शुतुद्रि.--ऋग्वेदांत हा शब्द, दोनदां आलेला असून या शब्दावरून पंजाबमधल्या अगदीं पूर्वेकडील भागांत असलेल्या नदीचा बोध होतो. या नदीला हल्लींच्या कालांत सतलज म्हणतात, व टॉलेमी व ॲरियन यांच्या काळांत झरॅड्रॉस असें म्हणत असत. वैदिक कालाच्या नंतरच्या कालांत या नदीचें नांव बदलून तिला शतद्रु ( शंभर मार्गांनीं वाहणारी ) असें नांव मिळालें. ऐतिहासिक कालांतहि या सतलज नदीचा मार्ग अनेकदां बदललेला आहे. विपाश् व शुतुद्रि यांचा संगम झाला तेथें विश्वामित्र आला होता व तेथें त्यानें नदीसूक्त केलें असें निरुक्तांत सांगितलें आहे ( ९. २६. ). शुतुद्रि आणि सरस्वती यांचा कांहीं तरी संबंध असला पाहिजे. शुतुद्रि ( सतलज ) ही पूर्वी कच्छच्या आखातास मिळत असे पण पुढें ती सिन्धूस मिळूं लागली असें दिसतें. कदाचित् कच्छच्या अखातास मिळणाऱ्या भागास ' सरस्वति ' व सिन्धूस मिळणाऱ्या भागास ' शुतुद्रि ' ( सतलज ) असें म्हणूं लागले असावेत.

[४९]सप्तसिंधवः--म्ह० सात नद्या. हा शब्द एकदांच ऋग्वेदामध्यें एका विशिष्ट देशाचें नांव म्हणून आलेला आहे. इतरत्र मात्र तो सात नद्या अशाच अर्थानें आलेला आहे. मॅक्समुलरच्या मतानें त्या, पंजाबमधल्या पांच नद्या, सिंधु व सरस्वती अशा या सात नद्या असाव्यात. इतर लोकांच्या मतानें सरस्वतीच्या ऐवजीं कुभा घ्यावी किंवा कदाचित् आक्सस नदी ही या सात नद्यांत असावी. झिमरच्या मतानें या नद्या आमक्याच होत हें ठरविणें निष्फळ आहे, व हेंच मत मॅकडोनेल यास ग्राह्य दिसतें. सात हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें लेखकांचा फार आवडता आहे. सायणाचार्यांच्या मताप्रमाणें गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्री, परुष्णी, असिक्नी आणि वितस्ता या त्या सात नद्या होत. ह्या सात नद्या ' इमं मे गंगे यमुने ( १०. ७५, ५. ) या ऋचे प्रमाणें घेतल्या आहेत, परंतु सिंधूला मिळणाऱ्याहि सात नद्या असूं शकतील. कांहीं सरस्वतीऐवजीं कुभा घेतात. ' सप्तसिंधु शब्दाचा विचार करतांना एक गोष्ट केव्हांहि विसरून चालणार नाहीं व ती ही कीं सध्या जो पंजाब शब्दानें ओळखला जाणारा प्रान्त आहे. त्यांत सातच मोठमोठाल्या नद्या आहेत. म्हणूनच पंजाबला पूर्वी सप्तसिंधु म्हणत असावेत.

[५०]सरयुः--ऋग्वेदामध्यें तिनदां हा शब्द नदीचें नांव म्हणून आलेला आहे. सरयु नदी ओलांडून तुर्वश व यदुलोक यांनीं चित्ररथ व अर्ण यांचा पराजय केला असें वर्णन आलेलें आहे. एके ठिकाणीं सरयु हा शब्द सिंधु व सरस्वती या शब्दांबरोबर आलेला आहे, व दुसऱ्या एका ठिकाणीं रसा, अनितभा व कुभा या नांवांबरोबर तो आलेला आहे. वैदिक कालानंतरच्या वाङ्मयांत सरयू व क्वचित् प्रसंगीं सरयु हें नांव अयोध्या प्रांतांतील जिला हल्लीं सर्जु म्हणतात तिचेबद्दल आलें आहे. झिमर म्हणतो कीं हीच सर्जु नदी सर्व वैदिक वाङ्मयांत आलेली सरयु समजली पाहिजे. ऋग्वेदांतील ज्या एका ऋचेवरून ( ५.५३,९ ) सरयु ही पंजाबांतील नदी होती असें प्रतिपादण्यांत येतें तींत नैर्ऋत्य व ईशान्य हे पावसाळी वारे अभिप्रेत आहेत असें तो म्हणतो. हॉपकिन्सचें असें मत आहे कीं, ही नदी पश्चिमेकडे असावी व लुडविग म्हणतो कीं, ती व क्रुमु ( क्रुमु ) या दोन्ही एकच आहेत. व्हिव्हिएन डी सेंट मार्टिनच्या मतें ही नदी व शुतुद्री व विपाश् ( सतलज व बिआस ) ह्या नद्या मिळून झालेली नदी या बहुधा एक असाव्यात. सरयु किंवा सर्जु म्हणजे सुप्रसिद्ध शरयु नदी होय. ही अयोध्येवरून पुढें गंगेस मिळते. परंतु सरयु ही नदी पंजाबच्या बाजूस असावी हेंच जास्त संभवनीय आहे. कारण ऋग्वेदांत पंजाबाशिवाय इतर भागांतील नद्यांचा उल्लेख नाहीं म्हटलें तरी चालेल. शिवाय त्या नदीचा उल्लेख ज्या स्थलीं आला आहे त्यावरूनहि सामीप्यानें उच्चारलेल्या

नद्यांच्या आसपासच ती कोठें तरी असली पाहिजे. झेंद ग्रंथांतहि एक हरयू नदी आलेली आहे, व ती आणि ही एकच असावी. 'स'चा ह होणें ही गोष्ट प्रसिद्धच असून पूर्वपरिचित नांवें ठेवण्याची पद्धति मनुष्यस्वभावसिद्ध आहे.

५१ सरस्वती.— ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें हें एका नदीचें नांव म्हणून आलेलें आहे. उत्तरकालीन संहिताग्रंथांत कित्येक ठिकाणीं ही नदी म्हणजे सध्यां पत्याळा संस्थानच्या वाळवंटामध्यें जी अदृश्य होते ती सरस्वती नदीच होय हें निश्चित आहे. रॉथचें सुद्धां असें मत आहे कीं ऋग्वेदामध्यें कांहीं ठिकाणीं ( ३. २३, ४ ) हीच नदी अभिप्रेत असावी. दृषद्वती व ही नदी या ब्रह्मावर्ताची पश्चिममर्यादा झाल्या होत्या. ही नदी वैदिक काळीं फार पवित्र मानली जात होती. या नदीतीरावर केलेले यज्ञ फार महत्त्वाचे व पावित्र्ययुक्त असत असें सूत्रांतहि म्हटलेलें आहे. परंतु ऋग्वेदांतील दुसऱ्या अनेक सूक्तांत ( उ. १, ८९,३. ) व उत्तरकालीन ग्रंथांतहि ( उ० अथर्व ४. ४, ६; तै. सं. १. ८, १३, ३ बृहदारण्यकोपनिषद् ६. ३, ८ ) ही नदी म्हणजे सिंधूच होय असें रॉथचें म्हणणें आहे. असा अर्थ सरस्वतीचा घेतला तरच या सरस्वतीला नदीतमा ( सर्व नदींत श्रेष्ठ ) असें नांव कां दिलें गेलें, ती समुद्राला मिळते असें कां म्हटलें आहे व ही नदी मोठी असून हिच्या तीरावर अनेक राजे व पांच प्रकारचे लोक कसे वसाहत करून राहिले होते याचा खुलासा होतो असें त्याचें म्हणणें आहे. हें मत झिमर व इतर लोक यांनां संमत आहे. उलटपक्षीं लॅसेन व मॅक्समुल्लर यांचें असें मत आहे कीं, वैदिककाळची सरस्वती नदी व मागाहून प्रसिद्धीस आलेली सरस्वती नदी या एकच होत. मॅक्समुल्लरच्या मतें वैदिककाळीं सरस्वती ही सतलज नदीप्रमाणें मोठी नदी होती; व ती सिंधुनदीला मिळाल्यानंतर किंवा एकाकीच समुद्राला मिळाली असेल. मॅक्समुल्लरच्या मतें ही नदी एके काळीं ब्रह्मावर्ताची पश्चिमेकडील अंतिम मर्यादा असून तिचा एखाद्या भक्कम किल्ल्याप्रमाणें संरक्षणाच्या कामीं उपयोग होऊं शकला असता. कारण, तो म्हणतो कीं वैदिक काळीं हिचा प्रवाह सतलज इतकाच मोठा असून ती स्वतंत्रपणें किंवा सतलजशीं संयोग पावून समुद्राला मिळत होती; व अशा रीतीनें ती पंजाब प्रांत व बाकीचा हिंदुस्थान यांमधील सरहद्द झाली होती. सरस्वती नदीच्या आकारांत किंवा मार्गांत पुढें कांहीं विशेष फरक पडला असल्याचा खात्रीलायक पुरावा उपलब्ध नाहीं; पण या नदीच्या आकारांत फरक पडला नसेल असें म्हणणें धाडसाचें आहे. तथापि वैदिक काळची सरस्वती व तदुत्तरकालीन सरस्वती या एकच आहेत असें मानण्यास सबळ पुरावा आहे. या नदीचें स्वरूप दैवी आहे असें वर्णन जेथें ती पांच प्रकारच्या लोकांनां आधारभूत आहे असें म्हटलें आहे त्याच सूक्तांत आहे; व हें वर्णन पुढें जो तिला पवित्रपणा आला त्या वर्णनाशीं तंतोतंत जुळतें. शिवाय त्याच सूक्तांत पारावतांचा उल्लेख आलेला आहे. पंचविंश ब्राह्मणांत आलेल्या उत्तरकालीन पुराव्यावरून हे पारावत लोक पूर्वेकडे रहात असत असें सिद्ध होतें; व सरस्वती जर सिंधु नदी मानली तर हा पूर्वेकडील देश या पारावतांच्या मूळच्या राहण्याच्या ठिकाणापासून फार दूर होतो. शिवाय सरस्वती नदीवर रहात असलेले पुरु ( पूरु ) लोक हे फार दूर अशा पश्चिमेकडील मुलुखांत राहात होते असें मानणें जरा कठिणच आहे. त्याचप्रमाणें ज्या अर्थीं पश्चिमेकडील पांच जाती या कुरुक्षेत्रांतील भरतांच्या शेजारी होत्या त्या अर्थीं त्या सरस्वतीवर रहात होत्या असें मानावयास कांहीं हरकत येत नाहीं, व मग सरस्वती नदी या उपर्युक्त अर्थानें पंजाबची मर्यादा होती हें उघडच होतें. पुन्हां एके ठिकाणीं 'सप्तसिंधु' असा जो उल्लेख आलेला आहे त्यावरून एका जिल्ह्याचा बोध होतो. या सप्तसिंधू म्हणजे पंजाबांतल्या पांच नद्या, सिंधु व कुभा ( काबूलनदी ) अशा सात नद्या नव्हेत, तर पंजाबांतल्या पांच नद्या, सिंधु व सरस्वती अशा सात नद्या होत. सरस्वती नदी समुद्राला मिळते असें कां म्हटलें आहे हें सांगणें अवघड नाहीं. एकतर वैदिक ऋषींनीं या नदीच्या समुद्राजवळील मुखापाशीं कधीं गमन केलें नसेल, किंवा ही नदी सिंध प्रांतांतल्या वालुकामय प्रदेशांत पूर्णपणें किंवा हिचा बराचसा भाग शिरला असेल; आणि ती वालुकामय प्रदेशांत लुप्त झाली आहे हा शोध ब्राह्मणकालांतच लागला असेल. आतां वाजसनेयि संहितेंत असें म्हटलें आहे कीं, पांच नद्या सरस्वती नदीला मिळतात. पण हा लेख एकतर मागाहून लिहिलेला असून ( देश शब्दावरून ही गोष्ट सिद्ध होते ) या नद्या पंजाबमधल्या आहेत कीं काय हें समजत नाहीं; व दुसरें असें कीं, या लेखाला दुसऱ्या कोणत्याहि संहिताग्रंथांतल्या तत्सदृश लेखाचा आधार नाहीं किंवा तो प्राचीन काळांतला लेख आहे असेंहि मानतां येत नाहीं. तो जर उत्तरकालीन असेल तर तो मागाहून प्रसिद्धीस आलेल्या सरस्वती नदीसंबंधानें असावा. हिलेब्रँटला एकंदरींत सरस्वतीबद्दलची ही विचारसरणी पसंत आहे. पण त्याचें असेंहि मत आहे कीं, या नदीवरून जिला पुढें वैतरणी नदी असें लोक म्हणूं लागले त्या पौराणिक नदीचा, व त्याचप्रमाणें ॲराकोशियामधील अर्घेदव नदीचा बोध होतो. हें मत कबूल करावयाचें म्हणजे ऋग्वेदाच्या सातव्या मंडलाच्या उलट, ऋग्वेदांतल्या सहाव्या मंडलांतील गोष्टी इराणी देशांत घडल्या ही हिलेब्रँटची उपपत्ति स्वीकारावी लागेल. पण हें उपर्युक्त मत व हिलेब्रँटची उपपत्ति हीं दोन्हीहि अग्राह्यच आहेत. ब्रूनहोफर एके काळीं हिलेब्रँटच्या मताचा होता. पण पुढें सहाव्या मंडलांतील गोष्टी ऑक्सस नदीवर घडल्या असाव्या असें त्याचें मत झालें. पण हें तर अगदींच चुकीचें आहे. सरस्वती व सात नद्या यांचा संबंध जरा संदिग्ध आहे. ऋग्वेद ८. ५४, ४ मध्यें सरस्वती आणि सात नद्या यांची वेगवेगळी प्रार्थना केलेली आहे. व ऋ. ६. ६१, १०; १२ मध्यें हिला सात बहिणी असलेली ( सप्तस्वसा ) असें म्हटलें आहे. ऋ. ७. ३६, ६ मध्यें तिला सातवी असें म्हटलें असल्यामुळें तेथें ती सातांपैकीं एक होते. पूर्वीचे लेख जर अगदीं बरोबर मानले तर सप्तस्वसा शब्दावरून ती सरस्वती सात नद्यांहून निराळी होती असें सिद्ध होतें व मग सिंधु, कुभा

व पंजाबांतल्या पांच नद्या अशा सात नद्या मानाव्या लागतात. पण या ' सप्तस्वसा ' चा अर्थ सात बहिणींपैकीं एक असाहि चुकीनें करतां येईल.

वरील बहुतेक ऋग्वेदांतील स्थळें यांत सरस्वती शब्दाचा देवता असा अर्थ आहे. व इतर वेदांतील उतारे यांतहि निश्चित ' सरस्वती देवता ' असाच अर्थ आहे. ऋग्वेद ८. ५४, ४ येथें सरस्वती व सप्तसिंधु असे वेगवेगळे उल्लेख आले आहेत. यावरून सप्तसिंधु हें विशेषनाम आहे असें सिद्ध होतें.

[५२]सिंधु.–ऋग्वेद व अथर्ववेद यांमध्यें याचा अर्थ नुसता ओढा किंवा नदी असा असून सर्वांत श्रेष्ठ नदी सिंधु असाहि अर्थ या शब्दाचा आहे. हा शब्द सिंधुनदी अशा अर्थानें संहिताग्रंथानंतर क्वचितच येतो. व जेव्हां येतो तेव्हां त्याचा अर्थ अंतर असा आहे. सिंधुनदीकाठचे घोडे ( सैंधव ) प्रसिद्ध होते.

[५३]सीलमावती.—ऋग्वेदामध्यें ( १०. ७५, ८ ) ल्युडविगचे मतानें एका नदीचें हें नांव आहे. पण हें अगदीं अशक्य दिसतें. सायणाचे मतानें याचा अर्थ ' अंबाडीयुक्त ' असा आहे. ज्या दोरीसारख्या वल्लीनें नांगर बांधला जातो, ती वनस्पति पुष्कळ जीमध्यें आहे, असें सिंधूचें वर्णन आहे असें सायणाचें मत आहे. सीलमावती ( सीलमा = वल्ली ) हें सिंधूचें विशेषण असावें. सायणानीं निश्चित अर्थ केला नाहीं. सायणाच्या मतानें ज्या दोरीनें नांगर बांधला जातो ती दोरी किंवा वनस्पति असा अर्थ होईल.

[५४]सुवास्तु.—ऋग्वेदामध्यें हें एका नदीचें नांव आलेलें आहे. ही नदी म्हणजे ॲरियनची सोएस्टॉस होय हें स्पष्ट आहे व हिलाच स्वात् हें नांव असून ती कुभा (काबूल नदी) नदीला मिळणारी नदी आहे. ही कुभा नदी सुद्धां सिन्धु नदीला मिळणारी उपनदी आहे.

[५५]सुषोमा.—ऋग्वेदामध्यें ( १०. ७५, ५ ) नदीस्तुतींत एका नदीचें हें नांव आहे. इतर दोन ठिकाणीं हें विशेषनाम आहेसें दिसतें. एकदां पुल्लिंगी रूप असलेलें लोकांचें नांव व एकदां स्त्रिलिंगी नदीचें नांव आहे. रॉथच्या मतें हें एका सोमपात्राचें विशेषण आहे. ही नदी कोणती हें निश्चित नाहीं, पण मेगॅस्थिनीसच्या वेळची सोॲनॉस किंवा अर्वाचीन सुवान् नदी ही असावी असें कांहींचें मत आहे. सायणाचार्यांचे मतानें हें विशेषण आहे. ऋ. ८. ६४, ११ येथें ही नदी आर्जीकीय नांवाच्या देशांत आहे असें म्हटलें आहे. सुषोम आणि आर्जीक यांचा संबंध स्पष्ट आहेच परंतु सुषोम शब्द पुल्लिंगी आहे ( ऋ. ८. ७, २९ ).

[५६]सुसर्तु.–ऋग्वेदामध्यें नदीस्तुतीमध्यें एका नदीचें हें नांव आलेलें आहे. ही सिंधुनदीला मिळणारी उपनदी होती याबद्दल संशय नाहीं, पण ही कोणती उपनदी हें समजत नाहीं.

[५७]हरियूपीया.–ऋग्वेदामध्यें एका सूक्तामध्यें वृचीवंतांचा अभ्यावर्तिन् चायमानाकडून झालेल्या पराभवाचा प्रसंग म्हणून वर्णिलेला आहे. याचा अर्थ एकादें ठिकाण किंवा नदी असाहि होईल, कारण, पुष्कळ लढाया नद्यांच्या तीरांवर झालेल्या दिसतात. लुड्विगच्या मतानें यव्यावती नदीवरील शहराचें हें नांव असावें व सायण आपल्या भाष्यांतहि असेंच म्हणतात. हिलेब्रँट म्हणतो कीं, ही इर्याब नदी कुरुम् ( क्रुमु नदी ) नदीला मिळणारी आहे; पण हें शक्य दिसत नाहीं. सायणाचार्य ' हरियूपीया ' – ' नगरी किंवा नदी ' असें म्हणतात.

[५८]वरणावती.–अथर्ववेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आला आहे. रॉथ म्हणतो त्याप्रमाणें हें नांव एका नदीचें असावें व लुड्विगच्या मतें ही नदी गंगा असावी. सायणाचार्याप्रमाणें ब्लूमफील्डला ही वल्ली असावी असें जरी वाटतें तरी नदीचें हें नांव असणें संभवनीय आहे हेंहि त्याला वाटतें. सायणाचार्याप्रमाणें नदी हा अर्थच विशेष संभवतो. वाराणशी शब्द वरणावतीपासून झाला असावा असें अनुमान करण्यास जागा आहे.

[५९]शीपाला.–हा शब्द अथर्ववेदामध्यें एकदां आलेला आहे व त्याचा अर्थ शीपालयुक्त तळें किंवा शीपाल नांवाची नदी किंवा सरोवर असा आहे. ' शेवाळयुक्त ' असें सायणाचार्य विशेषण मानितात.

[६०]कारोती.–शतपथ ब्राह्मणांत ( ९. ५, २, १५, ) तुरःकावषेय यानें ज्या ठिकाणीं, किंवा नदीच्या काठीं, अग्निकुंड– म्हणजे अग्निहोत्राचें परम पवित्र स्थान–तयार केलें ती जागा किंवा ती नदी.

[६१]कौसित.–मैत्रायणी संहितेंत ( २. १, ११ ) कुसितायि निशाचराच्या संबंधांत हें एका सरोवराचें नांव आलें आहे. काठक संहितेंत ( १०. ५ ) याबद्दल कौसिद असा उल्लेख आहे. ' कुसितायी, कौसित, कुसितायिन् ' हे हि शब्द तेथें आले आहेत. पाणिनी सूत्र (४.१. ३७.) येथेंहि 'कुसित' 'कुसती' हे शब्द आले आहेत.

[६२]महार्णव–मोठा समुद्र हा समासघटित शब्द–मागाहूनच्या मैत्रायणी उपनिषदा ( १.४ ) पूर्वी आलेला आढळत नाहीं. मैत्रायणी उपनिषदांत मात्र " महार्णवाचें कोरडें होणें " हा एक मोठा चमत्कार म्हणून गणिला आहे.

[६३]सदानीरा.–' सदाजलयुक्त असलेली ' हें एका नदीचें नांव असून शतपथ ब्राह्मणाचे मतानें कोसल व विदेह या दोन देशांमधील ही मर्यादा होती. एतद्देशीय हिंदू कोशकारांचे मतानें ही नदी म्हणजे करतोया होय; पण ही नदी बरीच पूर्वेकडे आहे. वेबरच्या मतानें ही नदी म्हणजे गंडकी होय; व हें मत बहुतकरून बरोबर असावें. कारण जरी महाभारतांत ( २. ७९४ ) या नद्या निरनिराळ्या आहेत असें म्हटलें आहे तरी याला कांहीं परंपरेचा किंवा दंतकथेचा आधार आहे असें दिसत नाहीं. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें उत्तरगिरीपासून ( हिमालय ) वहात येणारी व तिला तरून पूर्वी लोक गेले नव्हते, पण पुढें जाऊं लागले असा उल्लेख आहे. हीच जर 'करतोया' असेल तर तिला उल्लंघिलें असतां पुराणांत प्रायश्चित्त वर्णित आहे. शतपथ ब्राह्मणांत तें स्थल शुद्ध मानूं लागले. असें असतां पुराणांतील प्रायश्चित्त कायमच आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें

आहे. ' करतोया सदानीरा बाहुदा सैतवाहिनी ' निघण्टुः; असा सायणाचार्यांनें उध्दृत केलेला निघण्टु आहे. परंतु अंग देशाच्या मर्यादा म्हणून सदानीरा व करतोया या दोन वेगळ्या नद्या भारतांत वर्णित आहेत व सध्याहि तशाच त्या दोन नद्या उपलब्ध आहेत असें रा. वैद्य म्हणतात. गण्डकी आणि सदानीरा एकच असावी हें विचारणीय आहे. तथापि सध्या या वेगळ्या आहेत व भारतांत वेगळ्या वर्णित आहेत.

### पर्वतनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अद्रि | [2]पर्वत | मूजवत् ( ज्या पर्वतावर उत्तम सोम उगवतो तो पर्वत) |
| [1]गिरि | पर्शान | वव्र |
| गुहा | वल | हिमवत् |
| गोत्र | बृहद्गिरि | |
| ग्रावन् | भृष्टि ( पर्वत शिखर) | |

[ ते. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अद्रि | पर्वत | हिमवत् |
| गिरि | मूजवत् | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अद्रि | पर्वत | प्रकुपित ( पर्वत-विशेषण ) |
| गिरि | पर्वतीय | विषगिरि |
| गोत्र | पुरुभोजस् ( बहूपभोग्यपर्वत ) | सुवर्णसुवन |
| [3]त्रिककुद् | | [5]हिमवत् |
| [4]नग | | |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| क्रौंच | नग | महामेरु |
| गिरि | [6]नावप्रभ्रंशन | [8]मैनाक |
| त्रिककुद् | [7]मनोरवसर्पण | शिखर |
| त्रिककुभ् | | |

### दिग्वाचक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अधर ( दक्षिण ) | उपरा | [10]प्रदिश् ( दक्षिणादिश् ) |
| अपाक्त ( प्रतीची ) | ककुभ् | प्राची |
| अपाची ( प्रतीची ) | काष्ठा | प्रांच् |
| अर्वाक | [9]दिश् | व्योमन् |
| आता | नीची ( अवाङ्मुखी ) | सवत् |
| आशा | न्यच् ( नीचीदिशा ) | हरित |
| उत्तर | प्रतीची | हर्यश्वप्रसूत |
| उदक्त | | |
| उदीच्य | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अधिपत्नी | ऊर्ध्वा | प्राची |
| अपाक | ओजस्विनी | वशिनी |
| अवस्थावा | दक्षिणा | विदिश् |
| अवाङ् | दिक् | समीची ( पूर्वदिशा ) |
| अवाची | प्रतीच् | सहसाम्नी |
| अवान्तरादिशा | प्रतीची | सहस्वती |
| उत्तरा | प्रत्यङ् | सुप्रतीची |
| उदीची | प्रदिश् | सुप्राङ् |
| उपस्था | प्राङ् | सुप्राची |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| आशासांसित | दिश् | प्राची |
| उत्तरा | नभस्वती | वातपत्नी (वातः पतिर्यस्याः— वारदिशा ) |
| उदच् | प्रतांच् | सुवृजना ( सुष्टुदिभक्ता दिक्) |
| उदीच् | प्रतीची | |
| उदीची | प्रतीचीन | |
| कुकुभ | प्राक् | |
| काष्ठा | | |

### स्थलविशेष [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अधिष्ठान | [14]द्वीप | महावैलस्थ(स्मशान) |
| [11]अरण्य | [15]धन्वन् ( उदकरहित प्रदेश ) | मक्षिणी ( शुद्धस्थल) |
| अवमार्जन ( अश्वाचें स्थान ) | धामन् ( स्थान ) | [22] रंध्र |
| ऊसान ( स्मशान ) | निधान | रेकु ( रिक्तपद ) |
| आचरण ( संचारण स्थल ) | निपाद ( निम्नोन्नत प्रदेश ) | रोधस् ( तीर ) |
| आरण्य | निवत ( दरी ) | [23] वन |
| उद्वत ( उन्नतप्रदेश ) | [16]निवेशन | वर्ष्मन् |
| उपरिष्ट | निवेशनी | विवर्तन ( अश्वलुंटन स्थल ) |
| उपह्वर | पतिलोक | विष्रप |
| उरूज | पथ्या ( सोदकदेश ) | वैलस्थान ( स्मशान) |
| कूल | पद | [24] शर्यणावत् |
| कृंतत्र ( अरण्य ) | परावत् ( दूरदेश ) | श्वभ्र ( खळगा ) |
| [12]क्षिति | [17] पस्त्यावत् | [25] समुद्र |
| क्षेत्र | [18]पार | सानु ( शिखर ) |
| क्षोद | [19] पृशन (युद्धस्थल) | [26] सिच् |
| गुहा | प्रवण ( निम्नप्रदेश ) | [27] सूद |
| [13]गोष्ठ | [20] प्रवत् | स्थान |
| दान ( क्षेत्र ) | [21] प्रवात् | स्नु ( शिखर ) |
| | प्रव्राज | [28] ह्रद |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्ष्णा ( कोपरा ) | आस्थान | [31] महापुर |
| अजिर ( अंगण ) | [30] कांपील | [32] मृगारवर |
| अन्त | गर्त | योनि |
| अपद ( निरालंब-अंतरिक्ष ) | गह्वर | वन |
| अप्रतिष्ठान | गिरि | वेहुक ( लाभशीलोवासः ) |
| अयोनि | गुहा | समोकस |
| अरण्य | जघनार्ध | सानु |
| आखरेस्थ ( वनस्पतिस्थ मृग ) | तीर्थ्य | सुशिल्प |
| आजि ( रणभूमि ) | देवपुर | स्थल |
| [29] आयतन | धामन् | स्थलि |
| आस्ताव ( यज्ञियस्थल ) | निपाद ( निम्नदेश ) | स्थान |
| | प्रदर ( पोकळभूमि ) | स्थावर. |
| | प्रवण | |
| | प्रावण | |

[ अथर्व वेद ]

| | | |
|---|---|---|
| अवस्पद | अन्योक | अभीक |
| अधिस्थान | अपद | अरण्य |
| अन्तिक | अपोदक | आखर |
| अन्यक्षेत्र | अभिह्वार. | आधार |

| | | |
|---|---|---|
| आरण्य | छाया | यथास्थामन् |
| आस्थान | दूरेगव्यूति ( गोसंचारस्थल ) | यमुना |
| उत्कूल | | रघुस्पद |
| उपब्द | धामन् | वस्तिविल |
| उर्व | धुर्य | वाम |
| ओक | [33]पद | वार |
| ओक्य | परायन | व्युष्टि |
| काट ( खड्डा ) | पांसुर | शर्यणावति |
| खात | पार्थिव | [36]श्मशान |
| गह्वर | पार्श्व | समंक |
| गिरिभ्रज | पृष्ठ | सव्य |
| गिरिस्थ | [34]प्रदिव | सानु |
| गोष्ठ (जनावरांची-पाणी पिण्याची जागा ) | बिल | सिकतावती |
| | [35]मर्यादा | सुसद |
| | यज्ञपदी | हैमवती |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [37]आश्रम | [42]नाडपित | महापथ |
| [38]आसंदीवंत | [43]नैतंधव | [50]मुनिमरण |
| ऊष ( खारी जमीन ) | [44]नैमिश् | [51]रैकपर्ण |
| | नैमिषीय | [52]रोहितककूल |
| कर्षू ( खांच ) | [45]परिचक्रा | विदिश |
| कारपचव ( यमुना-कांठचें स्थल ) | [46]परिष्यंद | [53]विनशन |
| | प्रवात | [54]वेतसवन्त |
| [39]त्रिपुर | [47]प्राश्रवणा | [55]संगविनी |
| [40]दीर्घारण्य | [48]प्लक्षप्राश्रवण | [56]संधि |
| [41]नगर | [49]बद्वन् | [57]सार्चीगुण |

## स्थलदर्शक विशेषणें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अकृषीवला ( अरण्यानि ) | अवरोधन | दुर्यव ( दूरेभव ) |
| | आंजनगन्धि ( अरण्यानि ) | निधान ( स्थान ) |
| अगोह्य ( पर्वत ) | | निवन ( प्रवण ) |
| आलिहित | आरण्य | पर्वतवृध् ( सोम ) |
| अद्रिबर्हं | आरोधन | पर्वतेस्थ |
| अधीगर्त्य | ऊर्जस्वती | पर्वत्य |
| अनपवृत् | ऊर्ध्वसानु | बहुन्ना ( अरण्यानि ) |
| अनुदक | गिरिज | |
| अनुद्र | गिरिस्थ | |
| अन्तिदेव | चतुर्भृष्टि ( चतुष्कोण ) | भुज्मन् |
| अपाक | | रोचनेस्थ |
| अर्भक ( कुत्सित ) | तदोकस् | स्वश्वा |

## विभागदर्शक [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| आर्धिन् | पराके | पूर्वार्ध |
| उत्तर | परार्ध | भाग |
| उत्तरार्ध | पूर्व | मध्य |
| दक्षिण | पूर्वतरा | सव्य |
| दक्षिणार्ध | | |

[1]गिरी.—'पर्वत' अथवा 'उंची' ऋग्वेदांत हा शब्द बराच वेळ आला आहे. टेंकडीवरील झाडांच्या उल्लेखामुळें त्याला वृक्षकेशाः असें म्हटलें आहे. तसेंच डोंगरापासून नद्या निघून समुद्राला मिळतात असा उल्लेख आहे. या शब्दाचा पर्वत या विशेषणार्थी शब्दाशीं संबंध असलेला दिसून येतो. पर्वत हें गिरि शब्दाचें विशेषण आहे. हे दोन्ही शब्द मेघवाचक आहेत ही गोष्टहि येथें ध्यानांत ठेवली पाहिजे. सायणाचार्यांनीं ऋग्वेद ६. ६६, ११ येथें भाष्यांत गिरि शब्दाचा मेघ असा अर्थ केला आहे. ऋग्वेदांत डोंगरांतील पाणी व अथर्ववेदांत वर्फाच्छादित पर्वत यांचा उल्लेख आहे. पर्वतांचीं खरीं नांवें मूजवन्त, त्रिककुद्, हिमवंत हीं क्वचितच सांपडतात. तैत्तिरीय आरण्यकांत क्रौंच, महामेरु, मैनाग हीं पर्वतांचीं नांवें आलीं आहेत. नावप्रभ्रंश हें नांवहि आढळतें पण तें विशेषनाम आहे असें म्हणतां येणार नाहीं.

[2]पर्वत.—ऋग्वेद व अथर्ववेद यांत ह्या शब्दाचा संयोग नेहमीं गिरि या शब्दाशीं होत असून त्याचा अर्थ पर्वत किंवा टेंकडी असा आहे. ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत लहान डोंगरांत वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याच्या संबंधांत वरील अर्थी हा शब्द रूढ आहे. पर्वतांनां पंख असल्याबद्दलच्या कथेचा उल्लेख वाजसनेयि संहितेंत ( ३६. ९ ) आहे. कौषीतकि उपनिषदांत दक्षिण व उत्तर पर्वत ह्यांचा उल्लेख आलेला आहे; व हे पर्वत म्हणजे विन्ध्य व हिमालय पर्वत होत ह्यांत संशय नाहीं. अथर्ववेदामध्यें ओषधी व सुगंधी पदार्थ ( अंजन ) हे पर्वतांवर सांपडतात असें व ऋग्वेदामध्यें पर्वतावर खनिज पदार्थ सांपडतात असें म्हटलेलें आहे. अथर्व. ९. १, १८, या ठिकाणीं पर्वत व गिरि यांत कांहीं भेद असावा असें दिसतें. अथर्व. १२. १, ११ हेंहि स्थल पाहण्यासारखें आहे. पर्वत आणि पाणी यांचा उल्लेख एकत्र आला आहे. परंतु त्यावरून लहान आणि मोठा असा भेद दिसून येत नाहीं. त्यांच्या हलण्याविषयीं मात्र कांहीं ठिकाणीं ( ऋ. १. ३९, ५ ) उल्लेख आहे आणि त्या ठिकाणीं ह्या बहुतेक टेंकड्या असाव्या असा तर्क करणें विशेष युक्त आहे. सायणाचार्यांनीं ऋग्वेद भाष्यांत पर्वतांनां सपक्ष म्हटलें आहे ( ऋ. २. १२, २; १७, ५ ). ऋ. १. ५२, २. येथें पर्वतावरून नद्या वहात याविषयीं आधार दृष्टीस पडतात. कांहीं ठिकाणीं ( ऋ. १. ५५, १; १९, १; ९; ) पर्वत शब्दाचा अर्थ अगदींच भिन्न घेतात. यास्काचीहि ( १. २० ) तशा अर्थास संमति आहे. कांहीं ( ऋ ७. ३६, ११ वगैरे ) स्थलीं पर्वत आणि अप् यांचा संबंध एकत्र आला आहे; म्हणून त्यांचा संबंध होता वगैरे अनुमान निघतें. परंतु त्यांत विशेष तात्पर्य नाहीं.

ऋग्वेदांतील ४. ५४, ५ हें स्थल या अनुमानास बरेंच चांगलें आहे यांत संशय नाहीं; तथापि तें अनुमानच आहे.

[3]त्रिककुद् किंवा [3]त्रिककुभ्.-ह्याचा अर्थ 'तीन शिखरें असलेला' असा असून तो शब्द अथर्ववेद व पुढील ग्रंथ यांत हिमालयांतील एका पर्वताचें ( हल्लींच्या त्रिकूटाचें ) नांव म्हणून आलेला आहे. ह्यापासूनच अंजन ( उपशम करणारें मलम ) आलें; व ह्याबद्दल दंतकथा अशी आहे कीं, हें वृत्राच्या डोळ्यापासून उत्पन्न झालें.

[४]नग.–( न हलणारा पर्वत. ) हा शब्द अथर्ववेदाच्या (१९. ८, १ ) मागाहूनच्या कांडांत आलेला असून नंतर सूत्रग्रंथांतहि आलेला आहे. पुढल्या संस्कृतामध्यें वृक्षालाहि हा शब्द लावलेला आहे.

[५]हिमवत्.–' बर्फमय ' अशा अर्थानें पर्वतांनां लावलेला हा शब्द अथर्ववेदांत, आलेला आहे. या वेदांत ऋग्वेदांत व मागाहूनच्या ग्रंथांत नाम म्हणून हा शब्द आलेला आहे. हा शब्द ज्याला हल्लीं आपण हिमालय म्हणतों त्यालाच अजमासानें लावला होता हें कबूल करणें भाग आहे. तरी पण सुलेमानसारख्या हिमालय पर्वताच्या श्रेणींत असलेल्या, पण हिमालय नांव नसलेल्या पर्वतांनांहि हा शब्द लावलेला असेल.

[६]नाव प्रभ्रंशन.–याचा नाव घसरणें, असा व्हिटने व रॉथ ह्यांच्या अथर्ववेदाच्या प्रतींत अर्थ घेतला आहे. व वेबर व इतर लोक ह्यांनीं ह्या नांवाचा शतपथ ब्राह्मणांत ( १. ८, १, ६ ) उल्लेखिलेल्या महाप्रलयाचे वेळीं ज्या डोंगराजवळ मनूची नाव प्रलयाचे जलांत तरंगून राहिली त्या उत्तरेकडील ( मनोः अवसर्पण ह्या नांवाच्या ) डोंगराशीं संबंध लावलेला आहे. पण ब्लूमफील्ड व व्हिट्ने हे दोघेहि म्हणतात कीं हा अर्थ अगदीं अशक्य आहे; व हें मत मॅक्डोनेलनेंहि स्वीकारलें आहे. ह्या शब्दाचीं न–अव–प्रभ्रंशन अशीं पदें भाष्यकारांनीं पाडलीं आहेत. ह्या शब्दाचा जहाजाचें अवतरण असा इतरत्र कोठेंहि अर्थ होत नाहीं. नौ हा शब्द नाव ह्या रूपानें समासांत पहिला अवयव म्हणून कधींहि येत नाहीं व प्रभ्रंशन ' घसरणें ' हा शब्द नावेच्या निसटण्याला कधींहि लावलेला नाहीं.

[७]मनोरवसर्पण.— हें शतपथ ब्राह्मणांत ज्या पर्वताला मनूचें जहाज लागलें त्या पर्वताचें नांव आहे. पुराणांत याला ' नौबंधन ' हें नांव दिलें आहे. याचा नावप्रभ्रंशन असा उल्लेख अथर्ववेदांत केला आहे.

[८]मैनाक.–मेनकेचा वंशज. तैत्तिरीय आरण्यकांत हिमालयांतील एका पर्वताचें हे नांव आहे मैनाग असाहि एक पाठ आहे. सुदर्शन व क्रौंच याबरोबर याचा उल्लेख आला आहे.

[९]दिश्.– ह्या शब्दाचा अर्थ दिशा असा असून तो ऋग्वेदामध्यें व पुढें झालेल्या ग्रंथांतहि "आकाशाचा चतुर्थ भाग" या अर्थानें वारंवार आलेला आहे. सामान्यतः पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण अशा चार दिशांचा उल्लेख येतो. पण कधीं कधीं या दिशांत अधिक दिशांची भर पडून एकंदर संख्या १० पर्यंत गेलेली आहे. पांच दिशांत पहिल्या चार धरून ऊर्ध्वा या दिशेचा अंतर्भाव होतो; सहामध्यें ऊर्ध्वा, व अवाची; सातांमध्यें ऊर्ध्वा, ज्यावर मनुष्य उभा राहतो ती जमीन म्हणजे ध्रुवा व या दोहोंमधलें अंतरिक्ष म्हणजे व्यध्वा या येतात; आठांमध्यें आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य ह्या चार दिशा येतात; नवांमध्यें या मधल्या दिशा व ऊर्ध्वा दिशा; व दहांमध्यें ऊर्ध्वा, अवाची या येतात. कधीं कधीं पांच ही संख्या ध्रुवा ही दिशा धरून दाखवितात; सहा संख्या ध्रुवा व ऊर्ध्वा या मिळून करतात; व बृहती ही कधीं कधीं ऊर्ध्वा हिच्या बदली येते. ऋ. १०.४२,११ येथें मध्यतः असा उल्लेख आहे. वाजसनेयि सं. २२. २४ येथें 'अर्वाची' असा पाठ आहे. वस्तुतः अर्वाची हाच शब्द दिग्वाचक आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्यें पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या दिशांचा उल्लेख करून शिवाय अवाची दिशेचा उल्लेख केला आहे. एकंदरींत तैत्तिरीय आरण्यक, शतपथ ब्राह्मण वगैरे सर्व ग्रंथांत सहा दिशांपेक्षां जास्त उल्लेख नाहीं. परंतु अथर्ववेदांत मात्र प्राची, दक्षिणा, प्रतीची, उदीची, ध्रुवा ( पृथिवी ), व्यध्वा ( अन्तरिक्ष ), आणि ऊर्ध्वा ( द्युलोक ) असा सात दिशांचा स्पष्ट उल्लेख आहे. तो ४. ४०, १ येथपासून क्रमानें पहावा. तै. सं. ७.१,५ येथें वरील दिशांचा उल्लेख आहे. चार दिशा, चार उपदिशा व ऊर्ध्वा अशा नऊ दिशा शांखायन श्रौतसूत्रांत आहेत. अथर्व वेदांतील पहिल्या दोन उताऱ्यांत दिशेसंबंधीं 'पञ्च' या संख्येपेक्षां कांहीं विशेष उल्लेख नाहीं. परंतु तिसऱ्या उताऱ्यांत मात्र प्राची, दक्षिणा, प्रतीची, उदीची, ध्रुवा, ऊर्ध्वा ( अथर्व. १५.१४,१:१७ ) असे दिशासंबंधीं उल्लेख आले आहेत. वाजसनेयि संहितेंतहि 'पञ्च दिशः' असाच उल्लेख आहे.

[१०]प्रदिश्.–हा दिश्प्रमाणें सामान्यतः आकाशाचा चौथा भाग किंवा दिशा या अर्थानें उपयोगांत आलेला शब्द आहे. कोठें कोठें ४, ५, ६ आणि ७ अशी दिशांची संख्या सांगितली आहे. कांहीं वचनांत हा शब्द ' मधला विभाग ' याच अर्थानें उपयोगांत आला असून, हा अर्थ अधिक स्पष्टपणें ' अवांतर दिश् ' या शब्दानें निर्दिष्ट केला आहे. इतर ठिकाणीं ' चतस्र ' असा उल्लेख असून ऋ. ९. ८६, २९ येथें मात्र पञ्च प्रदिश असा उल्लेख आहे.

[११]अरण्य.–या शब्दाचा अर्थ गांवाच्या बाहेरची पडित जमीन असा असून नेहमींच जंगल असा त्याचा अर्थ असूं शकत नाहीं. ही जमीन घराजवळील जमीन, वाडी, परसूं वगैरे आणि शेतीची जमीन, (कृषि) यापासून पृथक् दाखविली आहे. आणि मनुष्यापासून ती दूर ( तिरः ) असते असेंहि दर्शविलें आहे. ही जागा म्हणजे चोरांचें वसतिस्थान होय. हींत आणि ग्राम यांत भेद दाखविला आहे. ऋग्वेदांतील एका स्तुतिपर सूक्तांत वनदेवतेच्या ( अरण्यानी ) वनाचें वर्णन केलें आहे. वनामध्यें मृतांनीं सूटमाती देण्याकरितां नेतात आणि भिक्षु अथवा संन्यासी वनांत वास करितात असें वर्णन छांदोग्यउपनिषदांत ( ८. ५, ३ ) आहे. जंगलांत वणवे नेहमीं लागतात असेंहि ऋग्वेदांत वर्णन आहे (१. ६५, ४; २. १४,२).

[१२]क्षिति.–ऋग्वेदांत हा शब्द ' वसतिस्थान ' वाचक आला आहे. आणि विशेषतः 'क्षितिर्ध्रुवा' ( सुरक्षित वसतिस्थान ) या शब्दाचा उल्लेख आला आहे, व संदर्भावरून तो किल्ल्याप्रमाणें मानलें जाणारें वृजन अथवा ग्राम या अर्थी दिसतो. यावरून

'एकाद्या वसाहतींत कायम राहणारे लोक' असा याचा अर्थ पुढें होऊं लागला. व तो विशेषतः 'पंचक्षितयः' या शब्दांत दिसतो.

[13]गोष्ठ.-'गोठाणें' याचा अर्थ गोठा असा नसून 'गायी चरण्याची जागा' असा आहे असें गेल्डनेर ऐतरेय ब्राह्मण (३. १८, १४,) व वाजसनेयि संहितेंतील (३, २१) महीधराच्या भाष्यावरून म्हणतो. ऋग्वेदांत बऱ्याच ठिकाणीं हा शब्द आला असून तेथें तो वरील अर्थानेच चांगला लागू पडतो, व अथर्व वेदांतील एका ऋचेचें भाषांतरहि चांगलें जुळतें. शिवाय दुसरीकडेहि हाच अर्थ मानिला आहे.

[14]द्वीप.—(बेट) हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांत आलेला आहे. पण ज्या बेटांचा येथें उल्लेख आलेला आहे तीं बेटें सिंधु किंवा गंगा या दोन नद्यांच्या पात्रांतील बेटांपेक्षां निराळीं होतीं असें मानण्याचें कारण नाहीं. मेरुपर्वताभोंवतीं चार, सात किंवा तेरा द्वीपांची पृथ्वी आहे हें जें भूगोलविषयक पौराणिक ज्ञान तें वैदिककालीं लोकांस परिचित नव्हतें.

धन्वन्.—'ओसाड अरण्य' हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत आला आहे. अरण्यांत तहानेनें मृत्यु येणें ही गोष्ट (ऐतरेय ब्राह्मणांतील २. १९ उताऱ्यावरून) तत्कालीन लोकांनां चांगली परिचित होती असें दिसतें. व अशा ओसाड अरण्यांत पाण्याचा एखादा झरा (प्रपा) असणें किती महत्त्वाचें आहे याची लोकांनां कल्पना होती. ऋग्वेदांत सिंधु व शुतुद्रि यांच्या पूर्वेकडील अरण्याचा बहुतेक उल्लेख असावा. ऋ. ५. ५३,६ येथें 'धन्वना-गच्छता उदकेन' असा सायणाचार्य अर्थ करितात. अर्वाचीन संस्कृतांत 'प्रपा' याचा पाणपोई असा अर्थ करितात.

[16]निवेशन.- (घर) हा शब्द ऋग्वेद व सूत्रग्रंथ यांत आलेला आहे. सूत्रग्रंथांत या शब्दाची तुलना कधीं गृह या शब्दाशीं 'जनावरांचें विश्रांतिस्थान' म्हणून केलेली असते.

[17]पस्त्यावत्.-ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द सुषोम, शर्यणावत् व आर्जिक ह्यांचेबरोबर सप्तम्यन्त आलेला आहे. ह्याचा अर्थ पिशेल म्हणतो त्याप्रमाणें स्थल असा असला पाहिजे. हें स्थल म्हणजे इतर ठिकाणीं सोमाचें घर असा ज्याचा उल्लेख आलेला आहे. त्यामध्यें 'पस्त्यानाम्' म्हणजे नदीच्या मध्यभागीं असलेल्या स्थलास जुळतें असें कोठें तरी असलें पाहिजे. पिशेल म्हणतो कीं, पत्याळा हें तें स्थल असावें. तरी पण पत्याळा व पस्त्यावत ह्या नामसादृश्यावर तो फारसा जोर देत नाहीं. पत्याळच्या उत्तरेस बरेच डोंगर आहेत व त्यांवर सोमवल्ली उगवत असेल. रॉथच्या मतानें ह्या शब्दाचा अर्थ 'ज्यामुळें सोमवल्ली दाबली जाते असें यंत्र' असा असावा.

[18]पार.-'पृ' या शब्दापासून हा शब्द झाला असून याचा अर्थ नदी किंवा ओढा यांच्या पलीकडील तीर असा असावा व याच अर्थानें हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेल्या ग्रंथांत आला आहे. ऋ. १०. १५५, ३ या ठिकाणीं 'समुद्रामध्यें किंवा समुद्राच्या तीरावर तरंगते' असा याचा अर्थ असावयास पाहिजे. ऐतरेय ब्राह्मणांत 'शेवटचा दिवस' या अर्थानें हा शब्द आला आहे.

[19]पृशन.-लुड्विगच्या मतें हें एका रणक्षेत्राचें नांव आहे, याचा उल्लेख ऋग्वेदाच्या एका मंत्रांत आला आहे. सायणाचार्य याचा 'बाहुयुद्ध' असा अर्थ करतात.

[20]प्रवत्.-'उंची' हा शब्द निवत् म्हणजे खोली-दरी याच्या उलट अर्थाचा आहे. ऋग्वेद व इतर ग्रंथांत हा अनेक स्थळीं आढळतो.

[21]प्रवात.-'वाऱ्याची जागा' हवाशीर जागा. हा शब्द ऋग्वेदांत जेथें विभीतक (बेहडा) नांवाचीं कठिण कवचीचीं फळें होत असत, व जीं अक्ष म्हणून (फांसे) खेळण्यास घेत असत त्या जागेचें नांव म्हणून आलेला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत नासक्या (जीर्ण) वस्तू टाकण्याची जागा अशा अर्थी ह्या शब्दाचा उल्लेख आला आहे. सायणाचार्य मात्र प्रवात देश म्हणजे प्रवण देश असा अर्थ करितात. यास्कहि तसाच करतो. प्रवण देशांवर सपाटयाचे वारे सरळ तऱ्हेनें वहात नाहींत.

[22]रन्ध्र.- ऋग्वेदांत 'उक्ष्णोरन्ध्र' हा समास एका जागेचें नांव म्हणून आलेला आहे. परंतु हा अर्थ संशयास्पद आहे. पंचविंश ब्राह्मणांत (१३.९,१३) उक्ष्ण हें मनुष्याचें नांव आहे.

[23]वन.- ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत ह्या शब्दाचा अर्थ अरण्य असा आहे. आतां अरण्य म्हणजे वृक्षयुक्त स्थळ एवढेंच नव्हे तर निर्जन, ओसाड देश असा अर्थ घेतला पाहिजे. सोमयागाचे वेळीं उपयोगांत आणलेलें 'लांकडी पात्र (चमस)' असाहि त्याचा अर्थ होतो. एके ठिकाणीं 'रथाचा एक भाग' असाहि अर्थ ह्या शब्दाचा कदाचित् होऊं शकेल. ऋग्वेदांत क्वचित् स्थलीं वन शब्द बहुवचनीं आला आहे व त्याचा अर्थ अरण्य असा सायणाचार्यांनीं केला आहे. वैदिक कालीं वन शब्द पाणीवाचक नव्हता असें कांहीं लोक अनुमान काढतात. परंतु निरुक्त ५. १६ या स्थलावरून तें चुकीचें आहे असें दिसतें. अर्वाचीन संस्कृतमध्यें वन शब्द जल या अर्थानें प्रचारांत आहे. ऋ. १. ५५, ४ या ठिकाणीं सायणाचार्य वन शब्दाचा 'अरण्य' असा अर्थ करतात. परंतु ऋ. २. १४, ९ येथें मात्र लांकडाचा पेला असा वैकल्पिक अर्थ त्यांनीं सुचविला आहे.

[24]शर्यणावत्.- ऋग्वेदामध्यें अनेक ठिकाणीं हा शब्द आलेला असून ह्या शब्दावरून एका स्थलाचा बोध होतो असें सायणाचार्यांचें मत आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणें 'शर्यणाः' हें कुरुक्षेत्रांतील एका देशविभागाचें नांव आहे व कुरुक्षेत्राच्या मागच्या बाजूस ह्या शर्यणाजवळ शर्यणावत् हें सरोवर आहे. सायणाचार्यांच्या लेखांत इतरत्र दिसून न येणारी सुसंगति येथें दिसून येत असल्या

मुळें हेंहि एखाद्या स्थलाचें नांव असावें. शिवाय कुरुक्षेत्रामध्यें 'अन्यतः प्लक्ष' हें सरोवर होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. रॉथच्या मतें दोन ठिकाणीं ह्याचा अर्थ सरोवर असा आहे. अगदीं शब्दशः अर्थ म्हटला म्हणजे 'वेताचें जाळें असलेलें पाणी' असा आहे. झिमरला हा अर्थ संमत आहे. उलटपक्षीं पिशेलला सायणाचें मतच पसंत आहे. हिलेब्रँटला सुद्धां हें स्थलाचें नांव असावें असें वाटतें. पण हें स्थल म्हणजे पांच जाती जेथें रहात होत्या तें असावें असें त्याला वाटतें व हें हिलेब्रँटचें मत अगदींच सायणांच्या मताविरुद्ध नाहीं. कारण पुरु लोकांचा द्रुह्यु लोकांशीं असलेला संबंध प्रसिद्ध आहे. अथवा तो म्हणतो त्याप्रमाणें हें सरोवर म्हणजे काश्मिरांतलें अलीकडील वूलर सरोवर हें असावें. पण हें संभवनीय दिसत नाहीं. शर्यणावत् ही मागाहून प्रसिद्धीस आलेली पूर्वेकडील सरस्वती नदी होय हें जें लुडविग्चें म्हणणें, तें तर अगदींच असंभाव्य दिसतें. बर्गेनच्या मतें हें नांव सोम तयार करण्याऱ्या दैवी माणसाचें आहे. ऋ. ८. ५३, ११ हें स्थल 'शर्यणावत्' सरोवर नक्की कोणच्या स्थलीं होतें याचा निश्चय करण्यास फारच चांगलें आहे. आर्जीकीय देशांत (कुरुक्षेत्रांत) सुषोमा नदीच्या काठीं शर्यणावत् सरोवर आहे. आर्जीकीया नदी आणि विपाट् नदी एकच असें यास्काचें मत मागें गेलेंच आहे. आर्जीकीय देश नदीच्या भोंवतालचा प्रदेश होय असें अनुमान निघतें. कुरुक्षेत्र जर निश्चित असेल (तें निश्चित आहे) तर कुरुक्षेत्राच्या पश्चिमेस हें शर्यणावत् सरोवर असावयास पाहिजे.

[२५]समुद्र.-(सम्-उद्.) ह्याचा यौगिकार्थ 'जलांचें मीलन' असा आहे. नंतर समुद्र असा अर्थ होऊन हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ यांमध्यें वारंवार आलेला आहे. या शब्दाचें हेंच महत्त्व आहे कीं, त्यावरून वैदिक काळच्या लोकांनां समुद्र ही चीज काय आहे हें ठाऊक होतें असें सिद्ध होतें. ही कल्पना व्हिव्हियन डी सेंट मार्टिन ह्यास संमत नाहीं. पण मॅक्समुल्लर व लासेन यांनां कबूल आहे; एवढेंच नव्हे तर समुद्राविषयीं आर्य लोकांचें ज्ञान शक्य तेवढें कमी करणाऱ्या झिमरनेंहि ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं व मागाहूनच्या ग्रंथांत हें ज्ञान वैदिक काळच्या लोकांनां होतें असें कबूल केलें आहे. झिमर म्हणतो कीं, आर्यन् लोकांनां समुद्राच्या भरतीं ओहोटीची माहिती नव्हती; सिंधु नदीच्या मुखांचा वैदिक वाङ्मयांत बिलकूल उल्लेख नाहीं. ऋग्वेदामध्यें मासे ही खाण्याची वस्तु आहे ही गोष्ट नमूद केलेली नाहीं. पण समुद्र या शब्दाचा उपयोग अनेक ठिकाणीं लक्षणेनें आलेला आहे. उदाहरणार्थ, दोन महासागरांचा; खालच्या व वरच्या महासागरांचा वगैरे. तो इतर लेखांत असेंहि म्हणतो कीं, ज्या ठिकाणीं पंजाबांतल्या इतर नद्या सिंधूला मिळतात त्या ठिकाणापासून वाहणाऱ्या सिंधु नदीलाच समुद्र हें नांव दिलेलें आहे. पण हें झिमरचें म्हणणें कबूल करणें म्हणजे ज्या आर्यन् लोकांनां सिंधु नदी माहीत होती अशा आर्यन् लोकांचें समुद्रासंबंधीं ज्ञान जाणून बुजून कमी करण्यासारखें आहे. समुद्रांतील संचयाबद्दल म्हणजे मोतीं वगैरेंबद्दल व समुद्रापासून होणार फायदे ह्याबद्दल उल्लेख आलेले आहेत. भुज्यूच्या गोष्टीवरून त्या लोकांनां समुद्रपर्यटनाची कल्पना होती असेंहि अनुमान निघतें. ऋ. १. ११६, ५-७; येथें समुद्र असें पदहि दोनदां आलें आहे. शंभर वल्हीं वगैरेंचे उल्लेख समुद्रासंबंधीं ज्ञानाच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत. ऋ. १. ७१; ७ येथें समुद्राला मिळणाऱ्या सात नद्या असा बोध होतो. सायणाचार्यांप्रमाणें १०. ७५, ५ यांतील सात नद्या घेतल्या तर त्या समुद्राला मिळत नाहींत. म्हणजे पंजाबांतील सात नद्यांखेरीज समुद्रास मिळणाऱ्या सात नद्या आर्य लोकांनां माहीत होत्या कीं काय? वरील स्थलीं 'यह्वीः सप्त स्रवतः समुद्रं न' हे शब्द मात्र अगदीं स्पष्ट आहेत. सायणाचार्यांखेरीज म्हणजे वेदार्थयत्नकार यांच्या मतें या ठिकाणीं 'मेघोदक' असा अर्थ आहे. ग्रिफिथ व मॅक्समुल्लर यांचीं मतेंहि सायणाचार्यांप्रमाणेंच आहेत. सिंधूला मिळणाऱ्या पांच आणि सरस्वती व सिंधु, असा सात नद्यांचा हिशोब सायणाचार्य, ग्रिफिथ व मॅक्समुल्लर हे देतात. ऋ. १०. ५८, ५ या ऋचेंत 'अर्णव' व 'समुद्र' अशीं दोनहि पदें आलीं आहेत. सायणाचार्यांनीं अर्णव म्हणजे जलयुक्त समुद्र, मेघ किंवा समुद्र असा अर्थ केला आहे. यास्कांनीं अंतरिक्ष नामांत समुद्र शब्दाचा पाठ केला आहे, व त्या अर्थाचीं दोन उदाहरणेंहि निरुक्तांत आलीं आहेत (नि. ११. ४१; १०. ३२;). दैवतकाण्डांत 'आदित्य' अशा अर्थानेंहि हा शब्द दिला आहे (नि. १२. ३२). मागाहून झालेल्या संहिताग्रंथांत समुद्र हा शब्द वारंवार सागर या अर्थानें आलेला आहे.

[२६]सिच्.-ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं (१०. ९५, ७) हा शब्द द्विवचनीं आलेला आहे. त्याचा अर्थ क्षितिज असा आहे (याचा शब्दशः अर्थ स्वर्ग व मृत्यु या मर्यादा असा आहे). सायणाचार्य 'सिचौ म्हणजे द्यावापृथिवी' असें म्हणतात.

[२७]सूद.-सेंटपीटर्सबर्ग कोशांत याचा अर्थ 'विहीर व शुष्क झालेल्या तळ्यांतील माती' असा दिलेला आहे. पिशेल यानें असें सिद्ध केलें आहे कीं ज्याच्या योगानें अथवा जें घातल्याच्या योगानें सोमरस पिण्यास योग्य होतो तें म्हणजे गरम दूध असा याचा अर्थ होतो व हाच सर्व वैदिक वाङ्मयांत लागू पडतो. एजालिंग या शब्दाचा विहीर असा अर्थ करतो व ग्रासमन 'मधुर पेय' असा करतो.

[२८]ह्रद.-ऋग्वेद व मागाहूनच्या वाङ्मयांत सरोवर किंवा तळें या अर्थानें हा शब्द आला आहे असें मॅकडोनेल म्हणतो. पण सरोवर किंवा तळें हा अर्थ बरोबर नाहीं; डोह असा करावयास पाहिजे. 'कुल्या इव ह्रदं' असा जो ऋग्वेदांत उल्लेख आला आहे त्यावरून कालव्यांचा चांगलाच बोध होतो.

[२९]आयतन.-हा शब्द तैत्तिरीय संहितेंत स्थान किंवा पवित्र जागा या अर्थानें आला आहे. छांदोग्य उपनिषद् (७. २४, २)

ग्रंथांत याचा ' पवित्र जागा ' तीर्थ ' असा मर्यादित अर्थ केला आहे.

[३०] काम्पील.— यजुर्वेद संहितेमध्यें एका ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, काम्पील-वासिनी हें विशेषण एका स्त्रीला दिलें आहे. कदाचित् अश्वमेधामध्यें मारलेल्या घोड्याजवळ ज्या पट्टराणीनें निजावयाचें असतें, ती ही असावी. त्या उताऱ्याचा बरोबर अर्थ लागत नाहीं. परंतु वेबर आणि झिमर हे दोघेहि म्हणतात कीं, उत्तरकालीन वाङ्मयांतील मध्यदेशांतील पंचाल ह्यांची राजधानी जी काम्पील्य तिलाच काम्पील असें म्हणत असावे. 'काम्पील-वासिनी' या सामासिक शब्दांत काम्पील म्हणजे वस्त्रविशेष असें सायणाचार्य म्हणतात.

[३१] महापुर.— यजुर्वेद संहितेंत आणि ब्राह्मण ग्रंथांत याचा अर्थ मोठा किल्ला असा आहे. बहुधां पुर आणि महापुर यांत जर कांहीं अंतर असेल तर तें आकारांत आहे. पुर म्हणजे नगर व महापुर म्हणजे मोठें शहर असाहि अर्थ घेतां येईल.

[३२] मृगाखर.— तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण ३. ९, १७, ३ या ग्रंथांत ' हिंस्र पशूंची गुहा' असा या शब्दाचा अर्थ दर्शविला आहे.

[३३] पद्.— अथर्ववेदांत व शतपथ ब्राह्मणांत (९. ३, २, ३) दिशा असा याचा अर्थ आहे. हा अर्थ 'चतुष्पाद प्राण्यांचा एक पाय म्हणजे एक चतुर्थांश या अर्थावरून' आला असावा.

[३४] प्रदिव.— तिसरा व सर्वांत श्रेष्ठ असा जो स्वर्गलोक त्या स्वर्गाच्या अर्थानें अथर्ववेदांत हा शब्द आला आहे. याच ठिकाणीं पितर रहात असतात. कौषीतकी ब्राह्मणांत सप्तलोकामध्यें याला पांचवें स्थान दिलें आहे.

[३५] मर्यादा.— कोसल आणि विदेह या देशांमधील मर्यादेला उद्देशून हा शब्द शतपथ ब्राह्मणांत आला असून बहुधां हा अलंकारिक रीतीनें वापरलेला शब्द आहे. अथर्व वेदांत (६. ८१, २) सायणांनीं या शब्दाचा जाया असा अर्थ केला आहे.

[३६] श्मशान.— ज्या ठिकाणीं मृत माणसांचीं हाडें पुरून ठेवली जातात ती जागा असा याचा अर्थ आहे. अथर्ववेद व पुढील ग्रंथांत हा शब्द आला आहे. शतपथ ब्राह्मणांत ( १३, ८, १, १ ) असें म्हटलें आहे कीं जो अग्निचित् ( अग्निचयन केलेला अग्निहोत्री ) असेल त्याच्याकरितां ( मरणोत्तर ) जो चिती करावयाचा तो लोष्ठचिति गांवाच्या बाहेर आग्नेयी दिशेस करीत असून तो वेदीच्या आकाराचा व उत्तरेच्या बाजूस उतरता असा करीत असत. प्राच्य लोक आपला चिति वर्तुलाकार करीत असत.

[३७] आश्रम.— ' निवासस्थान. ' हा शब्द बुद्धकालाच्या पूर्वीचें असें ज्याला खात्रीनें म्हणतां येईल अशा कोणत्याहि उपनिषदांत नाहीं. भारतीयांच्या आयुष्यांतील एक अवस्था अशा अर्थी याचा श्वेताश्वतर उपनिषदांत प्रथमच उपयोग केलेला आढळतो. छांदोग्य उपनिषदांतील एका वचनांत ब्रह्मचारी आणि गृहस्थ या दोन आश्रमांचा उल्लेख आहे आणि गृहस्थाला अध्ययनाचें फल म्हणून प्रजोत्पादन , योगसाधन, अहिंसा, यज्ञ, मोक्षसाधन हीं मिळतात असें सांगितलें आहे. दुसऱ्या स्थळीं तीन आश्रमांचा उल्लेख आहे परंतु अनुक्रमानें नाहीं. ब्रह्मचाऱ्यानें गृहस्थाश्रमी अथवा यति व्हावें अथवा जन्मभर गुरूच्या घरीं वास करावा; त्याचप्रमाणें यतीचें मरण अरण्यांत आणि यज्ञग्रामांत व्हावें असा निर्देश आहे. ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी व यति या तिघांमधील भेद दाखविण्याकरितां जो ब्रह्माला चिकटून राहतो तो उत्तम ( ब्रह्मसंस्थ ) असें म्हटलें आहे. बृहदारण्यक उपनिषदांत आत्मवेत्त्याची योग्यता अधीत, यज्ञकर्ता आणि दाता, अथवा यति ह्यांच्यापेक्षां जास्त मानली आहे; आणि दुसऱ्या स्थलीं यज्ञकर्ता, दाता, आणि यति अथवा योगी यांच्यांत भेद दाखविला आहे. हें श्रेष्ठपद आणि आश्रमांतील भेद यामुळें एक चौथा आश्रम निघाला. कारण, गृहस्थाला वानप्रस्थाश्रम स्वीकारावा लागतो एवढेंच नाहीं, तर संन्यासिन् ( भिक्षु, परिव्राजक ) हा आश्रमहि स्वीकारावा लागतो. पहिला ब्रह्मचर्य आश्रम हा अद्यापहि अवश्यक म्हणून सांगितला जातो. परंतु तो आश्रम जन्मभर स्वीकारला जात नाहीं. कारण पहिल्याप्रमाणें आतां तसें राहतां येणें शक्य नाहीं.

[३८] आसन्दीवन्त्.— जनमेजयाच्या अश्वमेधांतील घोडा ज्या राजधानींत बांधला होता त्या जनमेजयाच्या राजधानीचें हें नांव आहे. दोघेहि प्रमाणभुत ग्रंथकार याच्या सत्यतेबद्दल गाथांचा उल्लेख करतात; परंतु तो विधि कोणच्या उपाध्यायानें पार पाडला याजबद्दल द्विधा मत आहे; शतपथ ब्राह्मणांत तो इन्द्रोत दैवाप शौनक होता असें आहे व ऐतरेय ब्राह्मणांत तो तुरःकावषेय होता असें म्हटलें आहे.

[३९] त्रिपुर.—याचा अर्थ 'सभोंवार तीन तट असलेला किल्ला' असा असून त्याचा उल्लेख संरक्षण करण्याचें ठिकाण अशा अर्थी ऐ. ब्राह्मण या ग्रंथांत आलेला आहे. पण ज्या ठिकाणीं हा शब्द आलेला आहे ती ब्राह्मणांतील आख्यायिका असल्यामुळें सभोंवतीं वर्तुलाकार भिंती असलेले किल्ले पूर्वी होते अशाबद्दल पुरावा म्हणून हे लेख कितपत विश्वसनीय मानितां येतील हें सांगणें कठिण आहे. ऐतरेय ब्राह्मण. २. ११ या ठिकाणीं त्रिपुर याचा अर्थ ' तीन वेष्टणें ' असा दिला आहे. तैत्तिरीय संहिता ६. २. ३ या ठिकाणीं ' तिस्रः पुरः' असें पद आहे व त्याचा अर्थ तीन शहरें किंवा तीन किल्ले असा सायणाचार्यांनीं केला आहे.

[४०] दीर्घारण्य.— ऐतरेय व शतपथ ब्राह्मणांत हा शब्द हिंदुस्थानांतील विस्तीर्ण जंगलांस ' विस्तृत अरण्य ' या अर्थानें लावला असल्याचें आढळतें. ऐतरेय ब्राह्मणांत असें म्हटलें आहे

कीं, पूर्वेकडे गांवें पुष्कळ असून जवळ जवळ आहेत व पश्चिमेकडे ओसाड अरण्य आहे.

[४१]नगर.– वैदिक वाङ्मयांत या शब्दावरून साधलेला नगरिन हा शब्द विशेषनाम म्हणून आला आहे. पण तैत्तिरीय आरण्यकांत ( १. ११, १८ ) नगर हा शब्द शहर या अर्थानें आला आहे व पुढील ग्रंथांतहि याच अर्थानें आला आहे.

[४२]नाडपित्.– शतपथ ब्राह्मणांत भरताची जन्मभूमि या अर्थानें हा शब्द आला आहे. याचा अर्थ नाद–पिती म्हणजे भरताची आई असाहि समजला तरी चालेल. पण हें जरा अनिश्चित आहे.

[४३]नैतंधव.– पंचविंश ब्राह्मण व सूत्रग्रंथ यांत सरस्वती नदीवरील एक स्थल म्हणून याचा उल्लेख आलेला आहे.

[४४]नैमिश–नैमिषीय.– नैमिषारण्यांत राहणाऱ्या लोकांना हें नांव दिलेलें आहे. काठकसंहिता व ब्राह्मणग्रंथ यांत " नैमिषारण्यांत राहणारे लोक विशेष पवित्र होते " असें म्हटलें आहे. महाभारतांत हि " हें काव्य नैमिषारण्यांतील ऋषींनां सांगितलें " असें म्हटलें आहे.

[४५]परिचक्रा.– शतपथ ब्राह्मणांत पंचाल शहराचें हें नांव असून वेबरच्या मतें हें कांपील शहराजवळचें एकचक्रा ( ज्याला मागाहून हें नांव मिळालें तेंच ) शहर असावें. याचा परिवक्रा असाहि पाठ आहे.

[४६]परिष्यंद.– ( भोंवतालीं वाहणाऱ्या पाण्यासह ) शतपथ ब्राह्मणांत दोन ठिकाणीं ( ९. २, १, १९; १, १४ ) नदींतील बेट किंवा वाळुकामय प्रदेश ( भाटी ) असा या शब्दाचा अर्थ आहे.

[४७]प्राश्रवण.–प्लक्षप्राश्रवण नामक स्थलांचा एक भाग. हें अवत्साराच्या बाबतींत उपयोगांत आणलेलें, कौषीतकि ब्राह्मणांतलें, ( प्रश्रवणाचा वंशज या अर्थाचें ) पितृवंशिक नांव आहे.

[४८]प्लक्षप्राश्रवण.–हें एका विवक्षित जागेचें नांव आहे. ही जागा सरस्वती नदी गुप्त झालेल्या जागेपासून ४४ दिवसांच्या अंतरावर आहे. पंचविंश ब्राह्मण व जैमिनीय उपनिषत् ब्राह्मण यांत याचा उल्लेख आलेला आहे. उत्तरकालीन ग्रंथांत भूमध्य हाच काय तो प्लक्षप्राश्रवणाच्या उत्तरेस प्रदेश आहे असें म्हटलें आहे. ऋग्वेदसूत्रांत ह्या प्रदेशाला प्लाक्षप्रश्रवण असें म्हटलें असून यावरून तें स्थळ सरस्वतीचें उगमस्थान असावें असें दिसतें; तिचें पुनर्दर्शन स्थान नव्हे; उगम स्थानासंबंधींच हा उल्लेख असावा असें दिसतें.

[४९]बद्वन्.–पंचविंश ब्राह्मणांतील एका वचनांत याचा अर्थ 'बांध–बांधाचा रस्ता' असा आहे. हा सामान्य रस्त्याहून बराच पक्का असतो असें म्हणतात.



[५०]मुनिमरण.–मुनीचें मरण. पंचविंश ब्राह्मणाप्रमाणें ( १४, ७ ) वैखानस मारले गेले ती जागा.

[५१]रैक्वपर्ण.–हा शब्द अनेकवचनीं व पुल्लिंगी असून छांदोग्य उपनिषदांत महावृष देशांतील एका गांवाचें नांव म्हणून आलेला आहे असें झिमरचें मत आहे.

[५२]रोहितक–कूल.–पंचविंश ब्राह्मणांत हें एका ठिकाणाचें नांव आहे; व ह्याच ठिकाणच्या नांवावरून एका सामाचें ( मंत्राचें ) नांव पडलेलें आहे. 'रोहितकुलीय' हें त्या सामाचें नांव आहे.

[५३]विनशन.–'अदृश्य होणें' ज्या ठिकाणीं सरस्वती नदी वाळूमध्यें अदृश्य झाली त्या जागेचें हें नांव असून हें पंचविंश ब्राह्मण व जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण यांत आलें आहे. हें पंजाबांतील पत्याळ जिल्ह्यांत आहे. सध्यां कच्छाच्या आखातास मिळणारी एक सरस्वती नदी आहे. त्रिवेणीसंगमांतील सरस्वती गुप्त आहे. विनशन म्हणून मानली जाणारी सरस्वती नदी सिंधूस मिळते असें पाश्चात्त्य पंडितांचें मत आहे व सतलज ( शुतुद्रि ) हीच सरस्वती होय असेंहि कांहीं पंडित म्हणतात. सरस्वतीविषयीं सामान्य दिग्दर्शन पुढीलप्रमाणें करतां येईल. ( १ ) सरस्वती.–कच्छाच्या आखातास मिळणारी; ( २ ) त्रिवेणीसंगमांत गंगेस मिळणारी; ( ३ ) विनशन रूपानें सिंधूस मिळणारी; ( ४ ) जिला हल्लीं सतलज म्हणतात ती; ( ५ ) ऋग्वेद ७. ५, १२ येथें उल्लेख असलेली.

[५४]वेतसवंत.–(वेत भरपूर असलेलें ) पंचविंश ब्राह्मणांत एका स्थलाचें हें नांव आलें आहे. वेबर म्हणतो त्याप्रमाणें 'एकयावन् गांदम' या स्थळाचें हें नांव नव्हे.

[५५]संगविनी.–ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द आलेला आहे व त्यांत असें म्हटलें आहे कीं, भरतांचीं जनावरें संध्याकाळीं गोष्ठांत ( कुरणांत ) येत पण मध्यान्हाचे वेळीं संगविनीला येत. ह्यावरून संगविनी म्हणजे निवाऱ्याची जागा होय; व ह्या ठिकाणीं मध्याह्नकाळीं गायींची धार काढीत असत असें दिसतें.

[५६]संधि.–ह्याचा अर्थ शतपथ ब्राह्मणांत ज्या ठिकाणीं पृथ्वी व स्वर्ग संलग्न होतात तें ठिकाण म्हणजे क्षितिज असा आहे. प्रकाश व अंधार ह्यांचें मीलन म्हणजे संध्याकाळ असा दुसराहि ह्या शब्दाचा अर्थ आहे.

[५७]साचीगुण.–ह्याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत आलेल्या एका मंत्रांत भरताच्या मुलुखांतलें एक ठिकाण म्हणून आलेला आहे. ल्युमनच्या मतें हें इंद्राचें विशेषण आहे. परंतु त्याच्या मनांत शाचीगु हा शब्द अभिप्रेत असावा व त्यावरून त्यानें वरील अर्थ केला असावा.

## जीवसृष्टि ( मानवेतर ).

कोणत्या प्राण्यांचें आणि वनस्पतींचें ज्ञान वेदकालीन लोकांस व्यावहारिक रीत्या झालें होतें हें जाणणें म्हणजे प्राचीनकालचें प्राणि-

शास्त्र आणि वनस्पतिशास्त्र जाणणें होय. पशूंचें निर्दालन व गृह्मीकरण हीं संस्कृतीचा विकास दाखवितात, त्याचप्रमाणें नित्योपयोगी वनस्पतींचें उत्पादन आणि आरण्य वनस्पतींच्या नैमित्तिक उपयोगाचें ज्ञान हींहि संस्कृतीचा विकास दाखवितात. या दृष्टीनें जीवसृष्टिविषयक वैदिक शब्दांची यादी महत्त्वाची आहे.

पुढें दिलेल्या वनस्पतींच्या यादीवरून आपणांस तत्कालीन वनस्पतिविषयक ज्ञानाबद्दल बरेंचसें अनुमान करतां येतें. उत्तानपर्ण, अश्वपर्णा, इत्यादि वनस्पतींच्या नांवांवरून ऋग्वेदकालीं झाडांना नांवें देण्याची एक पद्धति म्हणजे त्यांच्या पानांच्या आकारावरून असे. अपुष्पा, अफला, पुष्पवती, फलिनी, सुफला इत्यादि गुणांवरूनहि वनस्पतींचें नामकरण केलेलें दिसतें. घास हा शब्द गवत या अर्थी ऋग्वेदकालींहि रूढ होता. बुध्न, वल्शा, शाखा, पर्ण, पर्वन् इत्यादि झाडांच्या अवयवांचे वाचक शब्दहि आढळतात. अथर्ववेदामध्यें वनस्पतींचीं नांवें व प्रकार ऋग्वेदापेक्षां अधिक आढळतात व त्यांतील कांहीं नांवें आजहि प्रचलित असलेलीं दृष्टीस पडतात. तसेंच बरींच नांवें वनस्पतींच्या गुणांवरून ठेवलेलीं आढळतात.

### [ वनस्पति ]

#### वनस्पतिविषयक [ ऋग्वेद ]

अपलाश
अपुष्पा
अफला
अरट्व ( गाड्याच्या आसाचें लाकूड ( झिमर ).
अवपतन्ती
अविष
अश्वत्थ
अश्वपर्णा
अश्वावती
इष्कृति
उत्तानपद
उत्तानपर्ण
उदारथिः
उदोजस्
उलप
ऊर्जयन्ती
[१]ओषधि
काकंबीर
[२]काश
[३]किंशुक
[४]कियांबु
[५]कुशर
[६]क्षुंप
[७]खदिर
गष्पित
गोभाज
[८]घास

जरत्‌विष
[९]तरु
तृण
[१०]दर्भ
दशशाखा
[११]दूर्वा
द्रुषद
[१२]नद
नित्यस्तोत्र
निष्षिध्वरी
[१३]पर्ण
[१४]पर्वन्
[१५]पवमान
[१६]पाकदूर्वा
पारयिष्णु.
पिप्यंती
[१७]पिप्पल
[१८]पुण्डरीक
[१९]पुष्कर
पुष्पवती
पुष्पिणी
[२०]प्रसू
प्रसूवरी
फल
फलिनी
बुध्न
बृहस्पतिप्रसूता
[२१]भेषज्
[२२]मुंज

[२३]यवस
लिबुज
[२४]वनस्पति
वया
[२५]वल्शा
[२६]विभीदक
[२७]वीरुध्
वृक्क
[२८]वृक्ष
वृधसाना
[२९]वेतस
[३०]व्रतति
शतवल्श
शतविचक्षणा
[३१]शर
[३२]शल्मलि
[३३]शाखा
शाद
शिंशपा ( शिसु )
शीतिका
शीपाल ( शेवाल )
सनिष्यन्ती
[३४]सस
सहस्रवल्श
सहस्वती
सुद्रु.
सुपलाश
सुपिप्पल
सुफला

[३५]सैर्य
[३६]सोम
सोमराज्ञी

सोमावती
[३७]स्पंदन
[३८]स्वधिति

हरिद्रु
[३९]ह्वरस्

#### [ तै. सं. ]

अपर्ण
अपशव्य
अप्सुज
अफला
अश्वत्थ
अश्वावती
[४०]इक्षु
इषीकर
उदुंबर
उदोजस
ऊर्जयन्ती
ओषधि
औदुंबर
[४१]करीर
[४२]काष्मर्य (शिवणी)
[४३]कूर्च
[४४]कुल ( बोरीची साल )
खदिर
खर्जूर
खादिर
[४५]गवीधुका ( गवत )
दर्भ
दारु

दूर्वा
[४६]निर्यास ( चीक, डिंक )
नैयग्रोध
पर्ण
पलाश
[४७]पिंजूल
[४८]पुंजील
पुष्करपर्ण
पुष्पावती
पुष्पिणी
पूतुद्रु
प्रक्ष
प्रियंगु
प्लक्ष ( नांदुरखी )
[४९]वल्वज
बहुपर्ण
बहुशाख
[५०]बिल्व
बुध्न
बृहस्पतिप्रसूत
भेषज
मधूक
मूल

वनस्पति
[५१]विकंकत (वेकळी)
वीरुध्
वेतस
वेतसशाखा
वैभीदक
शमी
शर
शल्मलि
सतूला ( शर नामक दर्भाचा तुरा )
सहस्रवल्श
[५२]सुगंधितेजन
सुपिप्पल
सुभेषज
सूपस्थ
सोमराज्ञी
सोमवती
[५३]स्तंब
स्थविमत् ( दर्भाचें मूळ )
स्वयमवपन्ना ( वाऱ्यानें गळून पडलेली वृक्षाची फांदी )

#### [ अथर्ववेद ]

अघद्विषा ( दूर्वा-विशेषण )
[५४]अजशृंगी
अद्रा ( आखा )
अनंगुरि ( देंठाचें विशेषण )
अपस्कंभ ( पोफळी)
अपांरस ( कवठीचें झाड )
[५५]अपामार्ग ( अघाडा )
अफला
अभिवृष्ट
अभ्रिखाता
[५६]अमूला
[५७]अराटिका
[५८]अरुंधती
[५९]अर्क
[६०]अलसाला
[६१]अलाबु
[६२]अवका

[६३]अश्वत्थ
[६४]आण्डीक ( कमल-कंद )
[६५]आल
[६६]इट
[६७]इषीका
उत्तरद्रि
उत्तानपर्ण
उदकात्मन्
[६८]उदुंबर
उन्मुंचती
उपध्मानी ( वाईट वास येणारी वनस्पति )
उर्वरि ( ओषधिगत-तन्तु )
ऊर्ध्वस्वप्न
एकशुंग
कपित्थका
किंशुक
[६९]कुमुद

[७०]कूदी
कृत्या दूषणी
केशर्दृहणी
क्यांबु
क्षुंप ( छत्राक )
खदिर
[७१]जीवन्त
जीवला
तरुता
तलाश ( पलाश )
[७२]ताजद्भंग( एरंड )
तिल्पिंज
तीक्ष्णशृंगी
तृण
तृष्टवंदन ( बांडगुळ)
तृष्टिका ( कुत्सिता )
तेजन ( वेळू )
[७३]त्रायमाण
दण्डन्
दर्भ
दूर्वा

देवजात ( दर्भ-विशेषण )
देववर्मन् ( दर्भ-विशेषण )
दोह
धनकाम्या
[७४]धव
नघारिषा ( पाठा )
नड ( तृण )
नराची ( विषारी-वनस्पति )
[७५]नलद
[७६]नीलागलसाला ( पिकाला त्रास देणारें गवत )
[७७]न्यग्रोध
[७८]न्यस्तिका ( शंख-पुष्पिका )
पयस्वती
[७९]परुत् ( पळस, वेत )
पर्ण ( पलाश )
पर्णधि ( विषपत्र-युक्त वृक्ष )
पलाद ( तृण )
पलाश
[८०]पाटा
पीला ( वृक्ष विशेषण )
[८१]पीलु
पीलुमती
पुनर्नवा ( वनस्पति )
पुष्पवती
पुष्पिणी
[८२]पूतिरज्जु ( दुर्गंध-वनस्पति )
[८३]पूतुद्रु
[८४]पृश्निपर्णी
प्रतान ( शाखा )
प्रतीचीनफल ( अघाडा )
प्ररुह
प्राणाह ( तृण )
प्रियव्रता.

[८५]प्लक्ष
फलवती
फलिनी
बिल्व
बिस ( कमलनाल )
बृहत्पलाश
[८६]भंग ( भांग )
भूरिमूल ( दर्भ )
[८७]मदुघ
मधुजाता
मधुमती
मधुयुक्ता
मधुला
मशकजंभनी
महत्कांड
महावृक्ष
मुलाली (कमलकंद)
मूलबर्हणी
यव
यह्वी ( रोपा )
[८८]रजनी
लाक्षा
लिबुजा
लेष्मच्छिन्न ( तृण-विशेषण )
वधक ( वेत )
वनस्पतीनांप्रथमज ( कवठ )
वरणा
[८९]वानस्पत्य
वारणा
विकेश (शमीचा मद)
विभिन्दन ( अपामार्ग )
विभिन्दन्ती (अपामार्ग )
विवरुणा
विश्वतरु
[९०]विषाणका
विषातकी
[९१]विहल्ह (सर्षप)
वीरुध्
विरुधांराज्यानि

वीळु
वृक्ष
वृन्त
वेणु
वैकंकत ( वेकळी )
व्यल्कशा ( दूर्वा )
शतकाण्ड (दूर्वा)
शतवल्शा
शतवार
शतविचक्षणा
शतशाखा
शपथयावनी
[९२]शफक(कमलकंद)
[९३]शमी
शाण्डदूर्वा (बृहद्दूर्वा)
शालूक ( कमल-कंद )
शिंशपा ( शिश्वी)
शिलांजला
शेपहर्षिणी
शेवल
श्रुष्टि
सपुष्पला
संपूषा
संमातृ
[९४]सह
सहदेवी
सहमान
सहस्रचक्षु
सहस्रधामन्
सहस्रपर्ण
सहस्रमूल
सारवती
सारा
[९५]सिलांजला(धान्यामध्यें उगवणारें तृण )
सुपलाश
सुपिप्पला
सुफला
सुवीर
सोमस्यभ्रातृ ( कवठ )

[ वाजसनेयि सं. ]

[९६]कर्कंधु
तोक्म(नवप्ररूढयव)
शतविचक्षण
[९७]शष्प्य ( नवप्ररूढ व्रीहि )

[ मैत्रायणी व कठ सं. ]

[९८]अश्ववार
[९९]आदार
[१००]कुमुक
कुश
[१०१]क्रमुक
तिल्वक
[१०२]पीतुदारु
[१०३]रोहितक
[१०४]वृष

[ संहितेतर ]

अध्याण्डा
[१०५]अन्यतःप्लक्षा
[१०६]अमला
[१०७]अश्मगंधा
आमलक
[१०८]आश्ववाल
[१०९]उशना
एरंड
[११०]कुश
चिप्लक्षा
[१११]तार्ष्टाघ
[११२]तिल्विलक
[११३]त्रिप्लक्ष
द्रुम
[११४]नैचुदार
[११५]पलाश
[११६]प्रप्रोथ
[११७]फलवती
[११८]बिंब
भूमिपाश
महावृक्ष
राजपति
वंशला
वकला
वीरण
वीरिण
रज्जुदारु
सर्षप
सेकपर्ण
स्फूर्जक
हरिद्रु

[१]ओषधी.– वैदिक वाङ्मयांत उद्भिज्जजगत् याचे साधारणपणें दोन भाग केलेले आहेत. एक ओषधि अथवा वीरुध् ' वनस्पति ' आणि दुसरा, वन अथवा वृक्ष ' झाडें.' ओषधि हा शब्द वीरुध् ह्या शब्दाशीं विरोध दाखविण्याकरितां योजिला आहे आणि त्याचा अर्थ रोगघ्न शक्ति असलेली अथवा मनुष्याला उपयोगी, असा कोणताहि गुण असणारी वनस्पति असा आहे; आणि वीरुध् हा सर्वसाधारण शब्द झाडेंझुडपें यांनां लावतात. परंतु कधीं कधीं जेव्हां वीरुध् हा शब्द ओषधीजवळ असतो, तेव्हां रोगघ्न गुण नसणारीं रोपें असा त्याचा अर्थ असतो. रोपामध्यें कोणकोणते गुण असतात, त्याची सूचि उत्तरकालीन संहितांमध्यें दिली आहे. तीं अशीः– मूल, तूल, काण्ड, वल्श, पुष्प आणि फळ. याशिवाय झाडांचे आणखी अवयव स्कन्ध, शाखा व पर्ण हे असतात. अथर्ववेदांत स्पष्ट नाहींत तरी विस्तृत असे वनस्पतीचे भाग केले आहेत. पसरणारी ( प्रस्तृणतीः ), झुडपाळ ( स्तम्बिनी ), देंठ व वेष्टन एकच असणारी ( एकशुंगा ), वेली ( प्रतन्वतीः ), पुष्कळ देंठ असलेली ( अंशुमती ), काण्डें असलेली ( काण्डिनी ), आणि पसरणाऱ्या शाखा असलेली ( विशाखाः ). ऋग्वेदांतहि वनस्पतींचीं नांवें फलिनीः, पुष्पवतीः आणि प्रसूवरीः अशा तऱ्हेचीं दिसतात.

[२]काश.– हा शब्द ऋग्वेदांत एका ठिकाणीं चटया वगैरे करण्याकरितां एक प्रकारचें गवत या अर्थी उपयोगांत आणलेला आहे, परंतु शुद्ध असा पाठ कोणता आहे हें मात्र रॉथला समजत नाहीं. तैत्तिरीय आरण्यकांतहि हाच अर्थ आहे.

[३]किंशुक.– ऋग्वेदांतील विवाहविषयक सूक्तांत या झाडाचें नांव आलें आहे. याच्या पल्लवांनीं विवाहस्थल सुशोभित करीत असत. किंशुक याचा अर्थ पळस असाच मानितात.

[४]कियाम्बु.– हें एका पाण्यांतील रोपाचें नांव असून, ऋग्वेदांतील एका प्रेतसंस्कारविषयक ऋचेंत असें म्हटलें आहे कीं, हीं रोपें प्रेत जाळलें असेल त्या ठिकाणीं उगवतात. रूढ व्युत्पत्तीप्रमाणे या शब्दाचा अर्थ ' कांहीं पाणी असलेलें ' असा आहे.

[५]कु-शरः– ऋग्वेदांत एका ठिकाणीं शर आणि दुसऱ्या गवताच्या जाती, सर्पांनां लपून राहण्याला योग्य स्थानें असतात असें लिहिलें आहे.

[6]क्षुम्प.– ऋग्वेदांत 'क्षुडुप' या अर्थी एके ठिकाणीं हा शब्द आला आहे. हें झाड आणि अहिछत्रक (कुत्र्याचें छत्र, आळंबी) एकच आहेत असें लिहिलें आहे.

[7]खदिर.– म्हणजे खैर. ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत एका कठिण लांकडाच्या झाडाचें नांव म्हणून हा शब्द आला आहे. अश्वत्थ वृक्षाचें रोप या झाडावर आपोआप उगवत असे आणि त्याच्यापासून अरुन्धती नांवाची लता उत्पन्न होत असे असें अथर्ववेदांत वर्णन आहे. या लांकडाच्या कठिणपणामुळें स्रुवा अथवा दर्वी इत्यादि यज्ञिय पात्रें याचींच करीत असत. त्याच ठिकाणीं ती दर्वी गायत्रीच्या रसापासून तयार करीत असत असें म्हटलें आहे. त्याच्या गाभ्यापासून कात तयार करीत असल्याबद्दल वैदिक वाङ्मयांत आधार सांपडत नाहीं. या गाभ्याचा (सार) ताईत करण्याकडे उपयोग करीत.

[8]घास.–ऋग्वेदांत हा शब्द अश्वमेधीय अश्वाला देण्याचें गवत म्हणून आला आहे. अथर्ववेदांत आणि तदुत्तर ग्रंथांत देखील याचा गवत असा अर्थ आहे.

[9]तरु.– या शब्दाचा नेहमींचा संस्कृत भाषेंतला अर्थ झाड असा आहे. पण तो वैदिक ग्रंथांत आढळून येत नाहीं. फक्त ऋग्वेदांत एका ठिकाणीं हा शब्द आला आहे व सायणाचार्यांनीं त्याचा अर्थ झाड असा केलेला आहे; व तसा तो होतोहि. पण 'तरुभिः' या रूपाचा अर्थ निराळाच करावा लागतो.

[10]दर्भ.–ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांत हा शब्द गवताचें नांव म्हणून आला आहे. अथर्ववेदामध्यें याचा उपयोग 'मन्युशमन' म्हणून, व केंस कापले जाणें किंवा छाती बडविली जाणें यांवर तोडगा म्हणून सांगितला आहे. याला भूरिमूल (फार मुळें असलेला), सहस्र पर्ण (हजार पानें असलेला) व शतकंद (शंभर कांदे असलेला) अशीं नांवें दिलीं आहेत.

[11]दूर्वा.–हा शब्द ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत वारंवार आलेला आहे. हें गवत ओलसर जागेंत वाढत असे. ऋग्वेदांत एके ठिकाणीं एक उपमा आलेली आहे व तीवरून तिचे तंतु तिच्या कांड्याप्रमाणें आडवेच येतात असा अर्थ निघतो.

[12]नद.–सरोवरांत वाढणारा वेत या अर्थानें हा शब्द ऋग्वेदामध्यें आलेला आहे व अथर्ववेदांत वार्षिक म्हणजे वर्षाकाळीं होणारा या अर्थी आला आहे. स्त्रिया या वेतांच्या चटया तयार करीत असा उल्लेख अथर्ववेद ६, १३८, ५ येथें आला आहे. याचा उल्लेख इतरत्रहि वारंवार आलेला आहे.

[13]पर्ण.–हें नांव पलाश याला दिलेलें सांपडतें. हा शब्द ऋग्वेदामध्यें अश्वत्थ या शब्दाबरोबर आलेला आहे व अथर्ववेदांत अश्वत्थ व न्यग्रोध या शब्दांबरोबरहि आलेला आहे. अथर्ववेदांत असें म्हटलें आहे कीं, हीं दोन्ही झाडें अभिचारकर्मामध्यें यज्ञपात्रांतल्या अन्नावर घालण्याच्या झांकणाच्या उपयोगी आहेत. या पर्णवृक्षाचा पळीसारख्या (जुहू) किंवा स्तंभासारख्या अगर स्रुव्यासारख्या (ल्हान पळीसारख्या) यज्ञांतल्या वस्तू तयार करण्याचे कामीं उपयोग होतो असेंहि म्हटलें आहे. हा वृक्ष उत्पन्न होण्याचें कारण तैत्तिरीय संहितेंत असें दिलें आहे कीं, गायत्री सोम आणीत असतां, तिचें एक पीस गळून पडलें व त्यापासून हा वृक्ष निर्माण झाला. या वृक्षाचा इतरत्रहि उल्लेख आलेला आहे. याच्या सालीचाहि (पर्णवल्क) उल्लेख आढळतो.

[14]पर्वन्.–या शब्दाचा अर्थ वेताच्या गांठी, वनस्पति अगर झाड यांचा सांधा किंवा पेर, अथवा शरीराचा अवयव असा आहे. शिवाय याचा अर्थ विशिष्ट काल–विशेषतः अमावास्या व पौर्णिमा यांचे वेळीं महिन्यांचे जे विभाग पडतात तो असाहि आहे. गेल्डनरच्या मतें सामवेदांतील स्तोत्राचा एक भाग असा या शब्दाचा अर्थ आहे.

[15]पवमान.–गाळण्यांतून गाळून शुद्ध होणाऱ्या सोमरसाला हें नांव वारंवार लावलेलें ऋग्वेदांत आढळतें. पुढील ग्रंथांत कांहीं ठिकाणीं याचा अर्थ (शुद्ध करणारा) वायु असा आहे.

[16]पाकदूर्वा–ऋग्वेदांतील एका ऋचेंत कियांबु व व्यल्कश ह्या शब्दांबरोबर हा शब्द आलेला आहे. ज्या ठिकाणीं मृत शरीर दग्ध करण्यांत येतें त्या ठिकाणीं जीं झाडें किंवा ज्या वनस्पती वाढविल्या जात, त्यांपैकीं ही एक होय. हा मंत्र तैत्तिरीय आरण्यकांत क्यांबु या पाठानें पुनः आलेला आहे. अथर्ववेदामध्यें हा शब्द शांडदूर्वा असा आलेला आहे. पाकदूर्वा हा शब्द सायणाचार्य म्हणतात त्याप्रमाणें परिपक्व दूर्वा असा असावा. शांड दूर्वा याचा अर्थ भाष्यकारानें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळा केला आहे. उदाहरणार्थ अंडाकृति मुळ्या असलेलें एक प्रकारचें धान्य (येथें शांड असा शब्द न समजतां सांड असा समजला पाहिजे) किंवा लांब पेरें असलेलें एकप्रकारचें धान्य (बृहद्दूर्वा) असेंहि याला नांव आहे. उलट पक्षीं तैत्तिरीय आरण्यकांत टीकाकार या पाकदूर्वा शब्दाचा अर्थ एक प्रकारचें लहान जातीचें तृणधान्य असा करितो.

[17]पिप्पल.–ऋग्वेदामध्यें दोन ठिकाणीं हा शब्द गूढार्थानें आलेला आहे. पण दोन्हींपैकीं एकाहि ठिकाणीं पिंपळाच्या झाडाचें फळ असा याचा अर्थ होत नाहीं. बृहदारण्यकोपनिषदामध्यें याचा ल्हान फळ असा सामान्य अर्थ घेण्याची कांहीं आवश्यकता नाहीं; पिंपळाच्या झाडाचें फळ या विशिष्ट अर्थानें संदर्भ चांगला जुळतो; व हाच अर्थ शतपथ ब्राह्मणांतहि अभिप्रेत आहे. अथर्ववेदामध्यें पिप्पली हें स्त्रीलिंगी रूप आलेलें असून अरुंधतीप्रमाणें जखमांवर इलाज म्हणून तिच्या फळाचा उल्लेख आलेला आहे.

[18]पुंडरीक.–ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें कमलाचें केसर असा या शब्दाचा अर्थ आहे. पंचविंश ब्राह्मणांत (१८. ९, ६) नक्षत्रांच्या प्रकाशानें कमलाचा जन्म होतो असें म्हटलें असून अथर्ववेदांमध्यें (१०. ८, ४३) कमळाची मनुष्याच्या अंतःकरणाशीं तुलना केलेली आहे.

[१९]पुष्कर.–ऋग्वेदांत आणि तदुत्तर ग्रंथांत याचा अर्थ नील कमल असा आहे. अथर्ववेदांत याच्या गोड परिमलाचा उल्लेख येतो. हें कमल तळ्यांत उगवत असे; व म्हणूनच तळ्यांस पुष्करिणी ( कमळें असलेलें ) असें नांव पडलें. पुष्करस्त्रज या आश्विनांच्या नांवावरून हें फूल शरीरावर अलंकाराप्रमाणें ते धारण करीत असत असें दिसतें. पळीच्या गोल तोंडाला त्याच्या कमळासारख्या आकारावरून पुष्कर म्हणत असावेत असा तर्क होतो. वरील अर्थानें याचा उपयोग ऋग्वेदांत किंवा ऐतरेय ब्राह्मणांत निःसंशय केलेला आहे. निरुक्ताप्रमाणें पुष्कराचा अर्थ 'पाणी' असा असून हा अर्थ शतपथ ब्राह्मणांतहि आढळतो.

[२०]प्रसू.– ऋग्वेद व तदनंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ गवताचे किंवा यज्ञाच्या वेळच्या वनस्पतीचे ( सोमाचे ) कोंब असा आहे.

[२१]भेषज्.– 'इलाज,' 'रोगावर उपचार करणारी वस्तु' या अर्थानें हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांत नेहमीं येतो. हा शब्द अलंकारिक रीतीनें सुद्धां कोठें कोठें उपयोगांत आणला आहे. वनस्पति, पाणी आणि मंत्रतंत्र यांची औषधांमध्यें गणना केली आहे. अथर्ववेदांतील बहुतेक सर्व वैद्यकी म्हणजे अनुकरणमूलक अगर सादृश्यमूलक अभिचार आहे, उदाहरणार्थ, काविळीचा पिवळेपणा पक्ष्यांच्या पिंवळट वर्णांत जावो अशी एके ठिकाणीं प्रार्थना केली आहे. आणखी एके ठिकाणीं तर बेडकाकडून ताप घालविण्याविषयीं मंत्र आहे. कारण जलवासी बेडूक हा स्वभावतःच अग्निशामक असल्यामुळें त्याला ज्वरस्ताप सहज शमवितां येईल असें अग्नि व जल यांतील विरोधावरून समजण्यांत आलें असावें.

[२२]मुंज.– या शब्दाचा अर्थ एक प्रकारचें तृण असा आहे. मुंज या तृणाची वाढ झपाट्यानें होते व त्याची उंची सरासरी दहा फूट असते. विषारी प्राण्यांच्या विसाव्याच्या जागा या अर्थानें याचा उल्लेख ऋग्वेदांत इतर तृणांबरोबर आलेला आहे. त्याच वेदांत मुंजतृण हें शुद्ध करण्याचें अर्थातच सोमरस गाळण्याचें साधन आहे असें म्हटलें आहे. इतर संहिता आणि ब्राह्मण या ग्रंथांतहि या तृणाचा उल्लेख आलेला आहे. हें तृण पोकळ ( सुषिर ) असून त्याचा उपयोग एखादें उच्च सिंहासन ( आसन्दी ) विणण्याकडे करीत असत असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे.

[२३]यवस्.– जनावरांकडून खाल्लें जाणारें आणि आरण्याग्नीनें जळून जाणारें एक प्रकारचें तृण. वरील अर्थी ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत हा शब्द आला आहे.

[२४]वनस्पति.– 'अरण्यांतला राजा.' याचा मूळचा अर्थ वृक्ष असा असून, खांब, यूप किंवा काठी हा जो त्या शब्दाचा अर्थ आहे तो नंतरचा आहे, रथाच्या एका भागाला किंवा सर्व रथाला हा शब्द कांहीं ठिकाणीं लाविलेला आहे. लांकडी उखळ ( वा. सं. ९. १२ ) व लांकडी ताईत ( अथ. ६. ८५, १ ) असाहि या शब्दाचा अर्थ असून, सर्वांत श्रेष्ठ सोमवल्ली असा अर्थ कांहीं ठिकाणीं ( ऋ. १. ९१, ५ ) गर्भित आहे.

[२५]वल्शा.–याचा अर्थ फांदी असा असून, हा शब्द बहुतकरून शतवल्शा ( शंभर फांद्या असलेला ), सहस्रवल्शा ( हजार फांद्या असलेला ), अशा अर्थानें ऋग्वेदांत येतो; व तो समासांत येतो. अलंकारिक भाषेंत हा शब्द संततीला लावलेला आहे.

[२६]विभीतक–विभीदक.–यांपैकीं दुसरा शब्द हें जुनें रूप असून मोठा वृक्ष असा त्याचा अर्थ आहे. या झाडाच्या सकवच फळाचा उपयोग द्यूतांत होत असे. या झाडाच्या लांकडाचा उपयोग यज्ञांतला अग्नि प्रज्वलित करण्याकडे होत असे ( तै. सं. २. १, ५, ८ ).

[२७]वीरुध्.–ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ यांमध्यें याचा अर्थ वनस्पति असा आहे. ओषधि या शब्दाशीं तुलना केली तर वीरुध ही इतर वनस्पतींची वाचक आहे. परंतु केव्हां केव्हां या शब्दाचा अर्थ ओषधि असाच असतो.

[२८]वृक्ष.–ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें झाड या सामान्य अर्थी हा शब्द आलेला आहे. अथर्ववेदामध्यें ( १८. २. २५ ) याचा अर्थ वृक्ष पोखरून केलेली शव ठेवण्याची पेटी असा आहे. रक्त विमोचन करणाऱ्या झाडांच्या दुश्चिन्हांचा उल्लेख षड्विंश ब्राह्मणांत आला आहे.

[२९]वेतस्.—ऋग्वेदामध्यें व तदुत्तर ग्रंथांत एका पाणझाडाचें किंवा तशाच प्रकारच्या एका वेताचें हें नांव आहे. त्याला सोनेरी ( हिरण्मय ) व अप्सुज ( पाण्यांत जन्मलेलें ) अशीं दोन नांवें आहेत.

[३०]व्रतति.—ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत याचा अर्थ सरपटणारी वनस्पति असा आहे.

[३१]शर.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें हें एक प्रकारच्या वेताचें नांव आहे. बाण करण्याकडे होणारा या वेताचा उपयोग आणि त्याचा वांकण्याचा धर्म अशा दोहोंचा उल्लेख अथर्ववेदांत स्पष्टपणें आलेला आहे.

[३२]शल्मलि.—हें एका 'रेशमी कापडाच्या' (लॅ०–सल्मालिया-मलबारिका ) झाडाचें नांव आहे. याचें फळ विषारी आहे असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. पण ज्या गाडीमधून नवऱ्या मुलीची मिरवणूक निघत असे ती गाडी या वृक्षाच्या लांकडाची बनवीत असत. हें झाड सर्व वृक्षांत उंच आहे असें याचें वर्णन आलेलें आहे.

[३३]शाखा.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें झाडाची शाखा असा या शब्दाचा अर्थ आहे. शाखा या अर्थानें 'वया' हा शब्द ऋग्वेदामध्यें अधिक वेळां आलेला आहे.

[३४]सस.– ऋग्वेदामध्यें याचा अर्थ वनस्पति किंवा तृण असा आहे. हा शब्द सोमवल्ली व बर्हि यांना लावलेला आहे.

[३५]सैर्य.– कीटकांनीं पीडिलेल्या एक प्रकारच्या गवताचें नांव म्हणून हा शब्द ऋग्वेदामध्यें आलेला आहे.

[36] सोम.– ही एक प्रसिद्ध वल्ली असून तिच्यापासून वैदिक कालीं सोमरस काढीत असत. या सोमरसाचें इतकें महत्त्व आहे कीं, ऋग्वेदाचें एक सबंध मंडळ व इतर मंडलांतील सहा सूक्तें या सोमवल्लीवर लिहिलीं आहेत. तथापि या सोमवल्लीबद्दल प्रत्यक्ष माहिती फारच थोडी उपलब्ध आहे. या वल्लीच्या फांद्या पिंगट ( बभ्रु ), तांबड्या वर्णाच्या ( अरुण ) किंवा पिवळट ( हरित ) अशा आहेत. हिलेब्रँट म्हणतो त्याप्रमाणें नैचाशाख हें विशेषण जर सोमवल्लीला लावलें तर त्या वल्लीच्या फांद्या खालीं लोंबतात असें म्हटलें पाहिजे. या वल्लीच्या अंकुराला 'अंशु' असें नांव आहे व सर्व वल्लीला 'अंधस्' हें नांव असून त्याचा अर्थ रस असाहि होतो. पर्वन् म्हणजे त्या वल्लीचें पेर होय. 'क्षिप्' ( बोट ) हें अंकुरांनां नांव आहे. यावरून हे अंकुर बोटांप्रमाणें असावेत असें दिसतें. क्षणा व वाण हे शब्दहि अंकुरालाच लावीत असत. याचे देंठ वाटोळे नसून त्यास शिरा असत यावद्दल थोडासा पुरावा आहे. ही वल्ली डोंगरांवर होत असे मूजवत् पर्वताची या सोमवल्लीबद्दल विशेष ख्याति होती. या सर्व उल्लेखांवरून ही वल्ली कोणती हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कांहीं लोकांच्या मतानें हिला लॅटिनमध्यें सारकोस्तेमा व्हिमिनेल किंवा अस्क्लेपिअस ॲसिडा असें म्हणतां येईल. हिला पहिलें नांवच अधिक शोभेल असें रॉथचें मत आहे. वॅट्च्या मतानें अफगाणिस्तानांतील द्राक्षाची वेल म्हणजेच सोमवल्ली होय. राईसच्या मतानें ऊंस हीच सोमवल्ली असावी. मॅक्समुल्लर व राजेंद्रलाल मित्र यांच्या मतानें बीअर नांवाच्या दारूमध्यें हा रस टाकला जाई असें आहे. म्हणजे, ज्याला इंग्रजींत हॉप् म्हणतां येईल त्याचाच सोमवल्ली हा एक प्रकार असावा. द्राक्षांची वेली किंवा इंग्रजी हॉप् या दोन्हीहि सोमवल्ली नव्हत असें हिलेब्रँट म्हणतो. तेव्हां ही वल्ली आतां नक्की ओळखणें एकंदरींत दुरापास्तच आहे. ही वल्ली कुटण्यापूर्वी ती विकत घेत असत असें यजुर्वेद संहितेंत म्हटलें आहे. हिलेब्रँटचे मतानें ही वल्ली ऋग्वेदकालीं सुद्धां लोकांकडून विकत घेतली जात असे असें आहे. ही डोंगरावर वाढत असे व ती सामान्य माणसांनां दुष्प्राप्य असे. कदाचित् एखाद्या विशिष्ट जातीच्या लोकांच्या किंवा राजाच्या ताब्यांत ही वल्ली असावी व हे लोक म्हणजे कीकट असावेत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, हा ( सोमवल्ली विकत घेण्याचा ) विधि करणें म्हणजे गंधर्वांपासून सोमवल्ली मिळवणें होय व ही जी वल्ली मिळवावयाची क्रिया, तिचें यज्ञरूपानें अनुकरण करणें होय; आणि हेंच अनुकरण नाटकाच्या अनेक मूळांपैकीं एक आहे (?) खरी वल्ली मिळण्याची अडचण असल्यामुळें ( कारण ती फार दूर डोंगरांवर असे ) त्या वल्लीच्या बदलीं इतर वल्लींचा उपयोग करावा असें ब्राह्मण ग्रंथांत म्हटलेलें आहे. ही वल्ली प्रथम दगडांनीं किंवा उखळांत कुटून ( उखळाच्या उल्लेख फक्त ऋग्वेदांतच आढळतो ) मग तिचा रस काढीत असत. दगडांनीं कुटण्याची चाल ऋग्वेदकालीं नेहमींची म्हणून वर्णिलेली आहे. या दगडांनां ग्रावन् किंवा अद्रि अशीं नांवें होतीं. व ते दगड हातांत धरीत. ही वल्ली जवळ जवळ ठेवलेल्या दोन अधिषवण फलकांवर ठेवीत; व मागाहून प्रचारांत आलेल्या विधीप्रमाणें खालीं एक खळगा खणीत व त्यावर फळ्या ठेवून त्यावर कुटीत. त्यामुळें ती कुटतांनां कुटावयाचे वेळीं मोठा आवाज निघे व त्याचा हेतु आसपासच्या राक्षसांची पीडा होऊं नये हा असे. ही वल्ली चर्मावर व वेदीवर ठेवीत. सध्याच्या प्रयोगांत ही वल्ली वेदीवर ठेवीत नाहींत. या वेदीला कांहीं ठिकाणीं धिषणा असें नांव दिलें आहे. कधीं कधीं दगडाच्या ऐवजीं उखळ व मुसळ यांचा उपयोग करीत. ही चाल इराणी लोकांकडून घेतली असून ऋग्वेदोत्तर काळांत प्रचारांत नव्हती. देवाला ज्या भांड्यांतून सोम अर्पण करीत त्याला चमू हें नांव असे. ज्या भांड्यांतून पुरोहित सोमरस पीत त्यांनां कला व चमस अशीं नांवें होतीं. कधीं कधीं चमू म्हणजे उखळ व मुसळ असाहि अर्थ होई. सोमपात्राला चमू म्हणण्याचें कारण कदाचित् त्याचा उखळाप्रमाणें आकार होता हें असावें. ज्या चर्मावर सोमवल्लीच्या कांड्या ठेवीत त्याला त्वच् किंवा गोचर्म असें नांव आहे. कोश, रुधस्य, द्रु, वन व द्रोण हीं सर्व सोमपात्रांचीं नांवें आहेत व स्रुचा याचा अर्थ लांकडी पळी असा आहे. या वल्लींतून जास्ती रस बाहेर यावा म्हणून तिजवर पाणी शिंपीत असत. ऋग्वेदकालीं ही सोमवल्ली कोणत्या प्रकारानें दाबून तिचा रस कसा काढीत याविषयीं सविस्तर माहिती उपलब्ध नाहीं. गाळण्यांतून ( पवित्र ) गाळून तो रस शुद्ध करीत असत. या सर्व रसांत इतर रसांची भेसळ न करतां तो इंद्राला व वायूला अर्पण करीत. पण कण्व लोकांनीं हा प्रघात टाकून दिला होता. या रसाची बभ्रु, हरित्, अरुण, सुगंधि अशीं सामान्यपणें वर्णनें आलेलीं आहेत. सोमरसामध्यें दूध ( गवाशिर ), दहि (दध्याशिर) व धान्य (यवाशिर) यांचें मिश्रण करीत. या मिश्रणाचें वर्णन लक्षणेनें अत्क ( चिलखत ), वस्त्र किंवा वासस्, अभिश्री, रूप, श्री, रस, प्रेयस् ( विपुल ) व कदाचित् नभस्, सुगंध या शब्दांनीं उल्लेखिलेलें आहे. तीव्र या विशेषणावरून हें मिश्रण झाल्यावर जो तिखट वास येई त्याचा बोध होतो. रस काढून घेतलेल्या सोमवल्लीच्या काटक्यांनां ऋजीष असें म्हणत. ऋग्वेदांतील कांहीं स्थलांवरून असा भास होतो, कीं, सोमरसांत मध मिसळीत असत. कदाचित् "कोशं मधुश्चुतं" (ज्यापासून मध गळतो आहे असें भांडें) याचा दोहोंचें मिश्रण करण्याकरितां उपयोग होत असे. या सोमरसांत सुरा मिसळीत कीं नाहीं याबद्दल निश्चित सांगतां येत नाहीं. दिवसांतून तीन वेळ सोमाचा रस काढीत. अवेस्तामध्यें दोन वेळ रस काढण्याची चाल होती असें दिसतें. सायंकालीं ऋभूंकरितां, मध्यान्हीं इन्द्राकरितां व सकाळीं अग्नीकरितां सोमसवन करीत. पण इतर देवतांनांहि या प्रसंगीं सोमाच्या आहुती देत. सोमरस पिणारे व तो न पिणारे यांच्यांतील सूक्ष्म भेद संहितां ग्रंथांत दाखविले आहेत. ज्या ठिकाणीं सोमवल्लीचा खप होत असे तीं ठिकाणें म्हणजे आर्जीक, पस्त्यावत्, शर्यणावत्, सुषोमा, पंचजनांचा देश वगैरे होत. सोमरसपान केल्यावर अंगांत जी तरतरी येई तिचे उल्लेख अनेक वेळां आलेले आहेत. दुसऱ्या एखाद्या उन्मादक पेयाप्रमाणें सोमरस लोकप्रिय होता कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे, याच्या

लोकप्रियतेबद्दल जो पुरावा आहे तो थोडा असून खात्रीलायक नाहीं. मै. सं. ४. ७, ४ मध्यें निव्वळ सोमरसाबद्दल नापसंती व्यक्त केली आहे. खऱ्या सोमवल्लीच्या अभावीं इतर वल्लीचा उपयोग केल्यामुळें इतर रसांचें मिश्रण करावें असें कण्व आग्रहानें सांगतात असें जें हिलेब्रँट म्हणतो तें त्याचें म्हणणें यथार्थ असावें. श. ब्रा. ४. १, ३, ६ येथील वर्णनावरून वैद्यक पुस्तकांत या वल्लीला वाईट वास येतो असें जें म्हटलें आहे तें खरें ठरतें. पण वैदिक काळची सोमवल्ली व या वैद्यक ग्रंथांत उल्लेखिलेली वल्ली या निरनिराळ्या असूं शकतील. हा वाईट वास येण्याचें कारण सोमवल्लीच्या ऐवजीं दुसरी वल्ली उपयोगांत आणली गेली असेल अगर खरी सोमवल्ली लांबून आणल्यामुळें जुनी होऊन कुजली जात असेल, हें असावें. ऋ. ८. १८, ३०; ३३, १४; ६६, १२; व विशेषतः ७. ३३, २ या ठिकाणीं असें वर्णन आलें आहे कीं, वसिष्ठ लोकांनीं पाशद्युम्न वायताच्या सोमयज्ञांतून इंद्राला सुदासाकडे नेलें. अवेस्तिक कालांत तिचें तसेंच महत्त्व वर्णिलें आहे. पण या सोमपानानें उपाध्यायांनाहि तसेंच सुख मिळतें असेंहि म्हटलें आहे (ऋ. ६. ४१. १३; ८. २, १२; १०. १६७. ३). या पानामुळें रोग उत्पन्न होतो याबद्दल अनेक उल्लेख आहेत (मै. सं. २. २. १३ इत्यादि). इंद्राप्रमाणें सोमरस ओकून टाकल्यानें जें पाप उत्पन्न होई त्याची निष्कृति करण्याकरितां सौत्रामणी नामक एका यागाची योजना होती (तै. सं. २ ३, २; ५, ६ श. ब्रा. ५. ५, ४, ९; १२ ७, १, ११). या यागाचें नांव अथर्व. ७. ३, २ मध्यें अगोदरच आलें आहे; व हा यागहि निःसंशय जुना आहे. या वनस्पतीचें सध्याचें परंपरागत रूप ठरलें आहे त्याला ही गोष्ट अनुकूल आहे. कारण मॅक्समुल्लरनें उध्दृत केलेल्या वैद्यकी गुणासंबंधीं उल्लेखांत ओकारी येण्याचा धर्म उल्लेखित आहे.

[३७]स्पंदन.– ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं एक प्रकारचा वृक्ष असा याचा अर्थ आहे. रॉथचे मतानें हा शब्द स्यंदन असा असून तो रथ या अर्थानें असावा.

[३८]स्वधिति.– सें पी. कोशाप्रमाणें या शब्दाचा अर्थ ऋग्वेदामध्यें कांहीं ठिकाणीं 'कठिण लांकडाचें मोठें झाड' असा आहे. हा अर्थ शक्य दिसतो.

[३९]ह्वरस्.– रॉथचे मताप्रमाणें ऋग्वेदामध्यें तीन ठिकाणीं सोमाच्या गाळणीचा भाग असा या शब्दाचा अर्थ आहे व तो संभवनीय आहे. पण गेल्डनेरच्या मताप्रमाणें याचा अर्थ अंडथळा असा आहे.

[४०]इक्षु.– पहिल्या प्रथम तैत्तिरीय संहितेंत आणि अथर्ववेद व उत्तर संहिता यांत हा शब्द ऊंस या अर्थीं योजिला आहे. तो आपोआप अथवा मशागत करून उगवत होता हें तेथील संदर्भावरून कळत नाहीं.

[४१]करीर.– पर्णहीन झुडपाचें किंवा त्याच्या फळाचें हें नांव पहिल्यानेंच तैत्तिरीय संहितेंत आलें आहे.

[४२]कार्ष्मर्य.– तैत्तिरीय संहिता, मैत्रायणी संहिता, आणि शतपथ ब्राह्मण यांत नेहमीं एका झाडाचें हें नांव आलेलें आहे.

[४३]कूर्च.– तैत्तिरीय संहिता आणि नंतरच्या ग्रंथांत आसनाकरितां एक गवताची मुष्टि (जुडी) या अर्थीं हा शब्द उपयोगांत आला आहे. शतपथ ब्राह्मणांत एका ठिकाणीं सुवर्णकूर्चहि आला आहे. यावरूनच मराठींत कुंचली असा शब्द आला असावा.

[४४]कुल.– कुवल अथवा बदरीफळ, आणि कुल हें एकच असून दूध विरजण्याकडे याचा उपयोग करीत असें तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे.

[४५]गवीधुका, गवेधुका.– गवताच्या जातीचें नांव. गावीधुक आणि गवेधुक हीं विशेषणरूपेंहि आहेत. तें तांदुळाबरोबर (गवीधुका–यवागू) अथवा जवाबरोबर (गवेधुकासक्तवः) कांजी करण्याकरितां शिजवीत असत.

[४६]निर्यास.–याचा झाडांचा चीक असा अर्थ आहे. तैत्तिरीय संहितेंत (२. १, ५, ४) याच्या रक्तवर्णावरून हें निषिद्ध अन्न मानलेलें आहे.

[४७]पिंजूल.–तृणांकुर किंवा विशेषतः दर्भ याच्या जुडया असा याचा अर्थ आहे. हा शब्द तैत्तिरिय संहिता व ब्राह्मण या ग्रंथांत सांपडतो.

[४८]पुंजील.–तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यामध्यें गवताची लहान पेंढी या अर्थानें व पिंजूलाचा पर्याय म्हणून हा शब्द आलेला आहे.

[४९]बल्बज.–हें एक प्रकारच्या गवताचें नांव आहे. याचा अथर्ववेदांत उल्लेख येतो. हें गुराढोरांच्या मलमूत्रापासून उत्पन्न होतें असें यजुर्वेदसंहितेंत म्हटलें आहे. याचा बर्हिस् सारखा किंवा जळण म्हणून उपयोग करीत असें आढळतें. ऋग्वेदांत दानस्तुतींत याच्या टोपल्या किंवा इतर वस्तू तयार होत असा उल्लेख आढळतो.

[५०]बिल्व.–हें एका प्रकारच्या कठीण फळाच्या झाडाचें (बेल) नांव आहे. याचा निर्देश ब्राह्मणांत आणि अथर्ववेदांत केला आहे. तेथें अत्यंत महत्त्वाच्या फळाचा उल्लेख येतो. तैत्तिरीय संहितेंत व ब्राह्मण ग्रंथांत यज्ञांत दिल्या जाणाऱ्या बलीस बांधण्याकरितां कधीं कधीं बिल्व वृक्षाचा स्तंभ (यूप) करीत असत असें म्हटलें आहे. शांखायन आरण्यकांत बिल्व वृक्षाच्या ताइताच्या स्तुतीपर मंत्र आहे.

[५१]विकंकत.––उत्तरकालीन संहिता ग्रंथांत व ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द एका झाडाचें नांव म्हणून आलेला आहे. कांहीं विशिष्ट यागांत अग्नि प्रदीप्त करण्याकडे या लांकडाचा उपयोग करीत असत.

[५२]सुगंधितेजन.––उत्तरकालीन संहिता व ब्राह्मण ग्रंथांत एक प्रकारचें सुगंधि गवत असा याचा अर्थ आहे. अरणींतून

उत्पन्न केलेला अग्नि वेदीवर ठेवतांनां तो पेटण्यासाठीं याचा उपयोग करीत असत.

[५३] स्तंब.—अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यांमध्यें गवताचा किंवा कोठल्याहि तऱ्हेचा झुपका अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[५४] अजशृंगी.—( बकऱ्याचें शिंग ) याची भाष्यकारांनीं विषाणिन् याबरोबर तुलना केली आहे. याची अथर्ववेदांत राक्षसघ्न अशी ख्याति आहे. याचें दुसरें नांव अराटकी हें आहे. वेबर असें सुचवितो कीं हा शब्द ' प्रोसोपिस् स्पिसि जिरा ' किंवा ' मिमोसा ॲक्रोमा ' या अर्थी असावा.

[५५] अपामार्ग.— आभिचारामध्यें औषधाकडे मुख्यत्वेंकरून क्षेत्रिय रोगाला या झाडाचा वारंवार उपयोग करितात. अथर्ववेदांत त्याचें " परत येणारें " असें वर्णन आहे असें रॉथ आणि झिमर यांचें मत आहे. कारण त्याचे कांटे उलटे असतात ( व्हिट्नेचेंहि हेंच मत आहे. ) अथवा योजकाच्या अंगावरच परत तो मंत्र या औषधीच्या योगानें फिरतो म्हणून हा अर्थ असावा असें ब्लूमफील्डचें मत आहे. या वनस्पतीचे कांटे उलटे असतात म्हणूनच ती मंत्र उलटविण्याकरितां उपयोगांत आणीत असत असें दिसतें.

[५६] अमूला.—( मूल रहित. ) बाणांनां विषारी करण्याकरितां या झाडाचा उपयोग करीत असत असें अथर्ववेद म्हणतो. तथापि ' जंगम मालमत्ता ' असा अर्थ ब्लूमफील्ड करतो.

[५७] अराटकी.—अथर्ववेदांत या झाडाचें एकदांच वर्णन आलें आहे. आणि बहुतकरून अजशृंगी आणि हें झाड एकच असावें, असें वाटतें.

[५८] अरुन्धती.— अथर्ववेदांत पुष्कळशा मंत्रांत घाव किंवा आघात बरें करणारें, ताप घालविणारें आणि गाईंनां दूध उत्पन्न करणारें असें या झाडाचें वर्णन आहे. ही वनस्पति बहुधा प्लक्ष, अश्वत्थ, न्यग्रोध, आणि पर्ण अशा झाडांच्या आश्रयानें राहात असते. हिचा रंग सोनेरी आणि देंठ केसाळ ( हिरण्यवर्णालोमश वक्षणाच ) असे. हिला सिलाची देखील म्हणत आणि लाक्षा बहुतकरून हीपासून तयार होत असली पाहिजे.

[५९] अर्क.— अथर्ववेदांतील एका मंत्रांत अर्क हें एका झाडाचें नांव आहे असें आढळतें. आधुनिक संस्कृतांत हा शब्द मराठींतील रुइ या अर्थानें येतो.

[६०] अलसाला.— अथर्ववेदांतील एका मंत्रांत हा शब्द धान्यलता अशा अर्थी योजिला आहे.

[६१] अलाबु.— दूधभोपळा. अथर्ववेदांत त्याचा भांड्यासारखा उपयोग करीत असत असा उल्लेख आहे.

[६२] अवका.— अथर्ववेद आणि तदुत्तर संहिता आणि ब्राह्मणें यांत हें एक पाण्यांतलें झाड आहे असा उल्लेख आहे. गन्धर्व याचा उपयोग खाण्याकडे करीत. त्याचें नंतरचें नांव शैवल असून तें आणि शीपाल हीं एकच होत.

[६३] अश्वत्थः—भरतखंडांतील झाडांपैकीं मोठें झाड. याला पिंपळ म्हणतात. ऋग्वेदांत ( १. १३५, ८; १०. ९७, ५ ) या झाडापासून जहाजें करितात असा उल्लेख आहे, ( ही नुसती कल्पना आहे. मूळांत तसा स्पष्ट उल्लेख नाहीं. ) आणि तदनंतरच्या ग्रंथांत त्या झाडाचा वारंवार उल्लेख आलेला आहे. हीं लांकडें एकमेकांवर घासून विस्तव काढीत असत; त्यांत वरचें लांकूड पिंपळाचें आणि खालचें शमीचें असे. क्वचित् स्थलीं हीं झाडें दुसऱ्या झाडांच्या—मुख्यत्वेंकरून खदिराच्या—फांद्यांवर वाढतात. आणि त्या झाडांचा नाश करितात; म्हणून त्यांना ' नाश करणारा ' ( वैबाध ) असें म्हणतात. याचीं फळें गोड असून पक्षी त्यांचें भक्षण करितात. या झाडांखालीं ईश्वर वास करितो अशी समजूत आहे. हा वृक्ष आणि न्यग्रोध यांना ' शिखण्डिन् ' असें म्हणतात.

[६४] आण्डीक.—अथर्ववेदांत हा शब्द भक्षणीय वनस्पति म्हणून आलेला आहे. फलें अथवा पानें अंडाकृति किंवा कमळाच्या आकारासारखीं असतात.

[६५] आल.—अथर्ववेदांत या शब्दाचा अर्थ 'गवत' असावा. सायणांच्या मताप्रमाणें सस्यवल्ली असा अर्थ असणाऱ्या अलसाला, सिलांजाला व नीलागलसाला या तीन शब्दांचा हा अवयव आहे. व्हिट्ने म्हणतो कीं या शब्दांनां एकादा विवाक्षित अर्थ देतां येत नाहीं.

[६६] इट.—अथर्ववेदांत हा शब्द दोन वेळां आलेला आहे. पहिल्या उताऱ्यांत याचा अर्थ वर्षामध्यें नाश पावणारा लव्हाळा आणि दुसऱ्यांत घरांचें गवताचें काम, असा केला आहे.

[६७] इषीका.—' गवताचें किंवा बोरूचें काण्ड. ' अथर्ववेद आणि त्यानंतरचे ग्रंथ यांत ' अशक्तपणा, नाशिवंतपणा, ठिसूळपणा ' या अर्थी हा शब्द वारंवार योजिला आहे. शांखायन आरण्यकांत गाईच्या गोठ्याच्या अर्गलेला जी खीळ असते त्या अर्थी हा योजिला आहे ( अगलेषीके ). शतपथ ब्राह्मणांत ' इषीकांनीं भरलेलें शूर्प ' असा उल्लेख आहे.

[६८] उदुम्बर.— ऋग्वेदांत जरी हें नांव नाहीं तथापि अथर्ववेद आणि त्यानंतर हें नांव आढळतें. कोणच्याहि धर्मविधींत याच्या समिधांचा उपयोग करीत असत. यूप आणि दर्वी याचीच करीत असत आणि उदुंबराच्या ताईतांचा देखील उल्लेख आहे. त्याचें लांकूड — दुसऱ्या अश्वत्थ, न्यग्रोध, आणि प्लक्ष वगैरेप्रमाणें — यज्ञामध्यें उपयोग करण्याला योग्य आहे असें मानीत असत. ऐतरेय ब्राह्मणांत त्याचीं फळें गोड असल्याकारणानें त्या फळांनां 'मधु' म्हटलें आहे. यास वर्षांतून तीन वेळां पाड लागतो असाहि उल्लेख आहे. पंचविंश ब्राह्मणांत उदुम्बरच्या जंगलांचाहि निर्देश आहे.

[69]कुमुद.– अथर्ववेदांत एका ठिकाणीं दुसऱ्या कित्येक पाणरोपामध्यें या रोपाचेंहि नांव आहे. हें रोप म्हणजे पांढरें कमळच असलें पाहिजे आणि हें नांव वेदोत्तर संस्कृतांत विशेष आढळतें.

[70]कूदी.– कांहीं प्रतींत कूटी असा पाठ आढळतो. अथर्ववेद आणि कौशिक सूत्रांत याची डाहाळी, ( जीवानें पुन्हा शरीरांत प्रवेश करूं नये म्हणून ) शवाला बांधीत, असें विधान आहे. भाष्यकार, बदरी आणि हें झाड एकच आहे असें म्हणतो.

[71]जीवन्त.–अथर्ववेदामध्यें एका मंत्रांत याचा अर्थ एखादी वनस्पति असा असावा असें वाटतें. जीवन्त याच्याबद्दल जीवल असा शोध जो व्हिटने व रॉथ यांनीं घातलेला आहे, तो असमर्थनीय वाटतो.

[72]ताजद्भंग.–( सहज मोडलेलें ) हा शब्द अथर्ववेदामध्यें एखाद्या वृक्षाचें किंवा वनस्पतीचें नांव म्हणून आलेला आहे. कौशिक सूत्रामध्यें हा समास असा गणला आहे व त्या सूत्रावरील भाष्यकाराचे मतें हा एरंड वृक्ष असावा. व्हिटनेच्या मतें हे शब्द निराळे आहेत व त्यांचा अर्थ 'भांगेप्रमाणें ते चटकन ( ताजत् ) मोडोत' असा तो आपल्या पुस्तकांतील उताऱ्यांत देतो.

[73]त्रायमाण.–अथर्ववेदामध्यें एका अपरिचित झाडाचें हें नांव आहे. हा शब्द बहुतकरून नुसतें विशेषण असावें व रक्षण करणारा हा त्याचा अर्थ आहे. पण हा अर्थ स्वरामुळें स्वीकारतां येत नाहीं.

[74]धव.–अथर्ववेदामध्यें प्लक्ष, अश्वत्थ व खादिर या झाडांच्या नांवाबरोबर उल्लेखिलेलें हें एका वृक्षाचें नांव आहे. धव म्हणजे मनुष्य हें नांव निरुक्ताचे अगोदर आलेलें नाहीं. विधवा या शब्दामुळेंच धव या शब्दाला अस्तित्व आहे. विधवा या शब्दाची व्युत्पत्ति नवऱ्याविरहित अशी चुकीची (?) केलेली आहे.

[75]नलद.–'जटामांसी नांवाची सुगंधी वनस्पति' असा याचा अर्थ असून हा शब्द अथर्ववेद, ऐतरेय, व शांखायन आरण्यकांत आलेला आहे ( या आरण्यकांत असेंहि म्हटलें आहे कीं, हिचा उपयोग माळेकरितां होतो ). सूत्रग्रंथांतहि हा शब्द आलेला आहे. अथर्ववेदामध्यें नलदी हा स्त्रीलिंगी शब्द आलेला आहे व तो अप्सरांबद्दल आलेला आहे.

[76]नीलागलसाला.– अथर्ववेदाच्या पैप्पलाद संहितेमध्यें नीलाकलसाला हा पाठ असून भाष्यकाराचे मताप्रमाणें अथर्ववेदामध्यें धान्यलता अशा अर्थानें हा शब्द आलेला असावा.

[77]न्यग्रोध.– 'खालीं खालीं वाढणारें झाड.' हें आपल्या फांद्या जमीनींत रोवून नवीन बुंधे बनविण्याबद्दल प्रसिद्ध आहे. ऋग्वेदामध्यें जरी या वृक्षाचें नांव आलेलें नाहीं तरी पिशेलनें एका सूक्तावरून ( त्यांत न्यग्रोधाचीं सर्व लक्षणें आलीं आहेत ) सिद्ध केल्याप्रमाणें हा वृक्ष त्या कालीं लोकांस ठाऊक असला पाहिजे. या वृक्षाचा उल्लेख अथर्ववेद व मागाहूनचें वाङ्मय यांत आलेला आहे. यज्ञांतील पात्रें याच्याच लांकडाचीं बनविलेलीं असत; हल्लींच्याप्रमाणें पूर्वीं सुद्धां या झाडाचें महत्व फार असावें. याच्याच जातींतील अश्वत्थ वृक्षाचा उल्लेख अथर्ववेदांत अगोदरच आलेला आहे.

[78]न्यस्तिका.– अथर्ववेदामध्यें एक प्रकारची वनस्पति असा याचा अर्थ आहे. भाष्यकार या वनस्पतीला शंखपुष्पिका असेंहि म्हणतात.

[79]परुष्.– अथर्ववेदामध्यें ( ८. ८, ४ ) याचा अर्थ वेत व शांखायन श्रौतसूत्रा ( १९. २२, २० ) मध्यें बाण असा आहे.

[80]पाटा.– अथर्ववेदामध्यें व कौशिक सूत्रांत हें नांव आलेलें आहे. भाष्यकाराचे मतानें ही वनस्पति व मागाहून प्रसिद्धीस आलेली पाठा वनस्पति दोन्ही एकच होत. या वनस्पतीचा पूर्वीं ओषधि म्हणून बराच उपयोग होत असे. व रॉथचे मतानें हल्लींहि तसा उपयोग होतो. हा शब्द पाठा असाच समजणें इष्ट आहे.

[81]पीलु.– कबुतरें ज्या झाडाच्या फळावर उपजीविका करतात त्या झाडाचें हें नांव अथर्ववेदामध्यें आलेलें आहे ( कदाचित् हें अक्रोडाचें झाड असावें ).

[82]पूतिरज्जू.– रॉथच्या मताप्रमाणें हें अथर्ववेदांत एका अप्रसिद्ध वल्लीच्या जातीचें नांव आलें आहे. कौशिक सूत्रांत याचा "सडकी, कुजकी दोरी" या अर्थानें उपयोग केला आहे. परंतु याचा अर्थ साप असा असावा असें लुडविग् सुचवितो.

[83]पूतुद्रु.– अथर्ववेदांत व यजुर्वेद संहितेंत हें देवदाराचें दुसरें नांव आहे. कौशिकसूत्रांत याचें पूर्णरूप पूतुदारु असें आहे.

[84]पृश्निपर्णी.–( ठिपके असलेलें चित्रविचित्र पान ) हें एका वल्लीचें नांव अथर्ववेदाच्या एका ऋचेंत आलें आहे. कण्व नांवाच्या गर्भपात करणाऱ्या दुष्ट लोकांपासून संरक्षण करण्याच्या कामीं ही वल्ली उपयोगी पडे. ही शतपथब्राह्मणांत सुद्धां आली, आहे. सेंटपीटर्सबर्गच्या कोशांत 'हर्मिओनिटिस कार्डिफोलिआ' म्हणून तिला म्हटलें आहे. परंतु रॉथ आपल्या पुढील लेखांत असें म्हणतो कीं जिला लक्ष्मणा म्हणतात तीच ही वल्ली होय; आणि इचा उपयोग वांझपणा दूर करण्याकडे होत असे. एका भाष्यकाराच्या मतानें, ( त्यानें कात्यायन श्रौतसूत्रांत म्हटल्याप्रमाणें ) 'ग्लिसाइन डेबिलिस' असें म्हणण्याचाच येथें उद्देश असावा.

[85]प्लक्ष.– हें वीचिपर्णयुक्त उंबराच्या जातीच्या एका झाडाचें नांव आहे. हें सुंदर आणि उंच झाड असून याला पांढरी लहान फळें येतात. याचा उल्लेख अथर्ववेद आणि तैत्तिरीय संहिता यांतून न्यग्रोध आणि पर्ण यांच्याबरोबर आलेला आहे. व्युत्पत्तिदृष्ट्या

याचें प्रक्ष असें रूपांतर तैत्तिरीय संहितेंत आलें आहे. याचा ब्राह्मग ग्रंथांतहि उल्लेख येतो.

[८६]भंग.– 'भांग' याचा उल्लेख अथर्ववेदांत येतो. ऋग्वेदांत (९. ६१, १३) हें सोमाचें विशेषण म्हणून आलें आहे. व त्याठिकाणीं त्याचा बहुधा अर्थ 'मादक' असा आहे. व तोच अर्थ आतां भांगेचा विशेष म्हणून समजतात.

[८७]मदुघ.– मधुवेल हें एका मधुर – गोड – अशा एका वेलीचें नांव अथर्ववेदांत आलें आहे. याच्या रूपाबद्दल बराच संशय आहे. कारण पुष्कळ जुन्या हस्तलिखितांतून मधुघ हा शब्द आला आहे.

[८८]रजनी.– हा शब्द अथर्ववेदाच्या एका उताऱ्यांत सांपडतो; तेथें त्याचा अर्थ एक प्रकारचें रोपडें असा आहे. बहुधा हा अर्थ त्याच्या धात्वर्थापासून निघाला आहे (रंज् = रंजविणें). हें रोपडें कोणतें हें नक्की ठरवितां येत नाहीं.

[८९]वानस्पत्य.– अथर्ववेदांत एक दोन ठिकाणीं हा शब्द पुल्लिंगी, लहान वृक्ष अशा अर्थी आलेला आहे. इतर ठिकाणीं नपुंसकलिंगी याचा अर्थ वृक्ष (वनस्पतीचें) फळ असा होतो.

[९०]विषाणका.– अथर्ववेदामध्यें एका वनस्पतीचें हें नांव आहे. ब्लूमफील्डचे मतें या शब्दाचा अर्थ नुसतें शिंग असा आहे. वातीकार नांवाच्या रोगावर इलाज म्हणून याचा उपयोग होतो. या रोगाचें निश्चित स्वरूप समजत नाहीं. झिमरचें मत असें आहे कीं, क्षतांमुळें हा रोग उत्पन्न होतो व झिमर या शब्दाशीं अ–वात (इजा न झालेला) या ऋग्वेदांतील विशेषणाची तुलना करतो. पण ब्लूमफील्डचें असें मत आहे कीं, शरीरांतल्या वातामुळें हा रोग उत्पन्न होतो.

[९१]विहल्ह.– अथर्ववेदामध्यें एका वनस्पतीचें हें नांव आहे. विहल्ल व विहल्ह असे याच शब्दाचे दुसरे पर्याय आहेत.

[९२]शफक.– अथर्ववेदामध्यें एका वनस्पतीचें हें नांव आलेलें आहे. हें नांव आपस्तंब श्रौतसूत्रांतहि आलेलें आहे व त्या ठिकाणीं त्याचा अर्थ खाण्यालायक फळ किंवा पाण्यांत वाढणारी वनस्पति असा आहे. कदाचित् हें पाण्यांत वाढणारें एखादें फळ असेल. याला शफक नांव पडण्याचें कारण त्याच्या पानांचा आकार खुरा (शफा) प्रमाणें असतो.

[९३]शमी.– अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यामध्यें एका वृक्षाचें हें नांव आलेलें आहे. अथर्ववेदामध्यें केंसाला अपायकारक, मद उत्पन्न करणारे व रुंद पानाचें असें याचें वर्णन आलेलें आहे. हे गुण ज्याला इंग्रजींत 'प्रोसोपिस् स्पिसिजिरा' किंवा 'मिमोसा सुमा' म्हणतात त्यांत दिसून येत नाहींत. शमीच्या लाकडांपासून यज्ञांतला अग्नि उत्पन्न करण्याकरितां ज्या अरणीचा उपयोग होत असे त्या अरणीच्या खालचा भाग शमीचा बनवीत व वरचा भाग अश्वत्थाच्या लांकडापासून तयार करीत. या शमीच्या फळाला शमीधान्य असें नांव आहे.

[९४]सह.– अथर्ववेदामध्यें रॉथचे मतानें हें एका वनस्पतीचें नांव आहे. पण ब्लूमफील्डच्या मतानें हा शब्द नुसतें विशेषण असून त्याचा अर्थ प्रबल असा आहे.

[९५]सिलांजाला.– भाष्यकाराच्या मतानें हा शब्द शलांजाला असा असून अथर्ववेदांत त्याचा एक वनस्पति (कदाचित् 'ग्रेन-क्रीपर') असा आहे. कौशिकसूत्रांत हा शब्द शिलांजाला असा आहे.

[९६]कर्कन्धु.– वाजसनेयि संहितेंत हा शब्द बोरीचें झाड आणि फळें यांनां लाविलेला आहे. बोराचा रंग लाल (रोहित) असतो. कुवल आणि बदर म्हणजे फळें असाहि अर्थ मानला जातो.

[९७]शष्प.– वाजसनेयि संहिता व ब्राह्मण ग्रंथ यामध्यें नवें किंवा अंकुर फुटलेलें गवत असा याचा अर्थ आहे.

[९८]अश्ववार, अश्ववाल.– पहिला शब्द मैत्रायणीसंहितेंत आणि दुसरा शब्द काठक व कपिष्ठल संहितेंत आणि शतपथ ब्राह्मणांत, एक जातीचा बोरू या अर्थी योजिला आहे.

[९९]आदार.– सोमाच्याबद्दल या झाडाचा उपयोग करीत असत असा कठसंहितेंत (२४. ३) उल्लेख आहे. पूतिका आणि हें झाड एकच असें शतपथ ब्राह्मण (४. ५, १०, ४) म्हणतें.

[१००]कुवल.– यजुर्वेदसंहिता आणि ब्राह्मण यामध्यें हें बोराचें नांव आहे. हें कर्कन्धु आणि बदर यांचेबरोबर वारंवार येतें.

[१०१]क्रमुक.– काठकसंहिता आणि शतपथ ब्राह्मण यांत याचा अर्थ जळाऊ लांकडाच्या एका जातीचें नांव असा आहे.

[१०२]पीतुदारु.– काठकसंहितेमध्यें व मागाहूनच्या ग्रंथांत हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ कांहींच्या मतें देवदारु व इतरांचे मतें खदिर किंवा उदुंबर वृक्ष असा आहे.

[१०३]रोहितक.– मैत्रायणीसंहितेंत एका वृक्षाचें नांव म्हणून रोहीतक या बदललेल्या पाठानें हा शब्द आला आहे.

[१०४]वृष.– कठसंहितेमध्यें एक प्रकारची वनस्पति असा या शब्दाचा अर्थ दिलेला आहे. पुढें 'जेंडारुस्सा व्हॅलॉरिस' याला हेंच नांव दिलें असेल. मैत्रायणीसंहितेमध्यें वृश असा शब्द आला आहे व बोथलिंग त्याचा अर्थ एक लहान जनावर असा करतो. हा अर्थ अगदीं शक्य आहे.

[१०५]अन्यतःप्लक्षा.– (एकाच बाजूला फडफडणाऱ्या पानांचीं उंबराचीं झाडें) शतपथ ब्राह्मणांत हें कुरुक्षेत्रांतील एका सरोवराचें नांव आहे. त्याचा उल्लेख पुरूरवा आणि उर्वशी यांच्या गोष्टींत केलेला आहे. सिरमोरमध्यें कोठेंतरी तें असावें असें पिशेल म्हणतो.

[१०६]अमला.– हें बहुतकरून आंवळ्याचें झाड असावें. याला आमलक अथवा आमलका असेंहि म्हणतात. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत (१. ३८, ६) याचा उल्लेख आहे.

[१०७]अश्मगंधा.— शतपथ ब्राह्मणांत या झाडाचा उल्लेख आहे. अश्वगंधा व हें झाड बहुधा एकच आहे.

[१०८]आश्ववाल.— शतपथ ब्राह्मणांत ( ३. ४, १, १७; ६, ३, १० ) हें विशेषण ( अश्वपुच्छतृणकृत ) प्रस्तर याच्याकडे लाविलें आहे, यावरून अश्ववाल तृणाचें अस्तित्व सिद्ध होतें.

[१०९]उशना.— ज्या झाडापासून सोमरस काढीत असत त्या झाडाचें हें नांव आहे असें शतपथ ब्राह्मणांत ( ३. ४, ३, १३; ४. २, ५, १५ ) लिहिलें आहे.

[११०]कुश.— 'पवित्र गवत.' दर्भ या अर्थानें हा शब्द शतपथ ब्राह्मणांत येतो. सें. पी. कोशांत याचा अर्थ फक्त गवत असा केला आहे.

[१११]तार्ष्टाघ.— हा वृक्षविशेष आहे म्हणून कौशिक सूत्रांत याचा उल्लेख केलेला आहे. या शब्दापासून बनलेलें तार्ष्टाघी हें विशेषण अथर्ववेदामध्यें आलेलें आहे. वेबरच्या मतें सर्षप, मराठींत मोहरीचें झाड, असा याचा अर्थ होतो.

[११२]तिल्वक.— हा शब्द शतपथ ब्राह्मणामध्यें एका झाडाचें नांव म्हणून आलेला आहे. या झाडाजवळ समाधि बांधणें हें अशुभ मानलेलें आहे. या शब्दापासून बनलेलें तैल्वक हें विशेषण मैत्रायणी संहितेंत आहे, व षड्विंश ब्राह्मणांत यूपाचें वर्णन करण्याकडे याचा उपयोग केलेला आहे.

[११३]त्रिप्लक्ष.— पुल्लिंगी अनेकवचनीं. या शब्दाचा अर्थ तीन उंबराचीं झाडें' असा आहे. पंचविंश ब्राह्मणाप्रमाणें हा शब्द ज्या ठिकाणीं यमुनेजवळ दृषद्वती अदृश्य झाली त्या जागेचें नांव आहे.

[११४]नैचुदार.— 'निचुदार लांकडाचें बनविलेलें' अशा अर्थानें पंचविंश ब्राह्मणांत हा शब्द आलेला आहे. हा निचुदार वृक्ष कसा होता हें समजत नाहीं.

[११५]पलाश.— पर्ण शब्दाप्रमाणें याचा अर्थ ब्राह्मणग्रंथांत पान असा आहे. या नांवाचा एक वृक्ष सुद्धां असून याचें पहिलें नांव पर्ण असें आहे.

[११६]प्रप्रोथ.— पंचविंश ब्राह्मणांत ( ८. ४, १, ) हें सोमाच्या ऐवजीं उपयोगांत आणावयाच्या एका वल्लीचें नांव आहे.

[११७]फलवती.— षड्विंश ब्राह्मणांत हा शब्द आला आहे. फलयुक्त, फलांनीं लादलेली असा याचा अर्थ आहे. हें एका वेलीचें नांव आहे. भाष्यकारांच्या मतें ही प्रियंगूच होय.

[११८]बिंब.— हा शब्द जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत आढळतो ( ३. ५, ६ ). हें एका झाडाचें नांव आहे.

## प्राणी.

खालील प्राणिवाचक शब्दांकडे पाहिलें असतां अश्व व गो यांस असलेलीं अनेक नांवें व अश्वसंबद्ध अनेक पारिभाषिक व इतर शब्द यांवरून त्या कालीं या दोन पशूंचें महत्त्व किती होतें याची कल्पना होतें. पक्ष्यांच्या नांवांमध्यें आज आपणास परिचित अशींहि कांहीं नांवें आढळतात. पक्ष्यांनां नांवें त्यांचे रंग, शब्द व गीतें वगैरे गुणांवरून पडत असत असें दिसतें. सर्पांनां तैत्तिरीय संहितेंत जीं अनेक नांवें आढळतात त्यावरून त्या कालींहि या मानवशत्रूचें महत्त्व तत्कालीन लोकांस पटलें होतें असें दिसतें. चतुरक्ष हें यमाच्या कुत्र्याचें नांव पर्शुभारतीय कालाची आठवण करून देतें. महाहस्तिन् या शब्दावरून एखाद्याला गजेन्द्राची किंवा दुसऱ्या एखाद्या मॅमथची आठवण होण्यास जागा आहे! आज सामान्यतः परिचित असणारे प्राणी त्या कालींहि ज्ञात होते असें दिसतें. मुष्काबर्ह या शब्दावरून अथर्ववेदकालीं बैल बडवीत असत हें स्पष्ट होतें. व्याघ्र हा शब्द ऋग्वेदांत आढळत नसून अथर्ववेदांत आढळतो यावरून भरतखंडांतील वसाहतीच्या कालासंबंधींचे व वेदांच्या पौर्वापर्यासंबंधीं अनुमान काढण्यास एक जागा मिळते. तसेंच प्राण्यांसंबंधीं जीं विशेषणें आढळतात त्यावरून प्राण्यांच्या गुणांविषयींचें तत्कालीन ज्ञान नजरेस येतें.

### अश्वनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्र | दधिक्र | रोहित् |
| अत्य | दधिक्रावन् | वह्नि |
| अरुष | दिवक्षस् | [१०]वाजिन् |
| अर्वन् | देवयुक्त | वाहस् |
| अव्यथि | दौर्गह | वाहिष्ठ |
| अश्व | धौतरि ( वडवा ) | वृषण्वती ( वडवा ) |
| अश्वा | नर | श्यावन् |
| अश्विया | पतंग | श्यावी |
| [२]आजि ( शर्यातीची घोडी ) | पतंगर | श्येन |
| आशु | [५]परस्वत | सदश्व |
| आश्वश्वतम | पैद्व | [११]सप्ति |
| [३]एत | [६]प्रष्टि ( रथास जुंपलेला तिसरा घोडा ) | सुपर्ण |
| एतग्व | ब्रध्न | सुराश्वस् |
| एतश | मंश्चतु | सूर्याश्वित् |
| औच्चैश्रवस् | मांश्चत्व | [१२]स्यूमगृभ् |
| जन्य | [७]मर्य | स्वभीशु |
| जीराश्व | [८]मेना | स्वश्व |
| तक्र | योग | हंस |
| तक्रन् | रेणुककाट | हय |
| तपुःप | [९]रोहित ( तांबडा घोडा ) | हरि |
| [४]तार्क्ष्य | | हिरण्यपर्ण |
| | | ह्वार्य |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अर्वत् | देवबंध | नृमनस् |
| अश्व | देववात | नृवाहस् |
| उदद्राव | निरष्ट | पतंग |
| उपरत | निराधार्म ( लगाम रहित ) | पोष्य |
| देवजात | | प्रगर्धिन् |

प्राजापत्य ( प्रजापतीनें उत्पन्न केलेला )
प्राणधृक्
मम
मितद्रव

यश
रथवाहन
लाजी
वडवा ( घोडी )
वाजजित्
वाजिन्

वाहस्
वीतपृष्ठ
शाची
स्वस्ति
स्वर्क
स्वास्तिगव्यूति

[ अथर्ववेद ]

अर्वती
अर्वन्
अश्व
अश्वतर
अश्वतरी
अश्व्य
आशु

नियुत्वत् ( वायुवाहक अश्व )
पृष्टि
पैद्व
मयूररोम
रथवाहन
रेणुककाट

वाजिन्
विपथवाहन
वियुज् ( घोडी )
सप्ति
सुराशु
हरि

## अश्वसंबंधी [ ऋग्वेद ]

अगिरौकस्
अगृभीतशोचिष्
अनवव्ययन्
अपस्य
[13]अभीशु
अर्वश
अश्वचंद्र
अश्वपेशस्
अश्वयत्
अश्ववत्
अश्वसातम
अश्वाजनि
अष्ट्रन् ( चाबूक )
इषुकृत्
ऋतयुक्
ऋधद्रय
कशा
किरण ( लगाम )
क्षिपणि ( चाबूक )
खेदा ( लगाम )
[14]गभस्ति
गो ( लगाम )
दुर्धर
द्रवच्चक्र
द्रवत्पाणि
द्रवदश्व
द्रोण्यश्व
धनुतर

नेषत्तम ( सुखनेता )
[15]पड्बीश ( पायबंद )
पीवोश्व
पृत्रदश्व
प्रोथत्
प्रसक्षिण ( प्रसहनशील )
ब्रह्मयुज्
भृम
मक्षुयु ( वेगवान् )
मथ्र
[16]मधुकश
मुषितप्सु
युयुजानसप्ती
रघु
रघुज
रघुद्रु
रघुपत्वन्
रथवाहन
रथस्पृश्
रश्मि ( लगाम )
वचोयुज् ( वचनमात्रेणैव युज्यमानः)
वध्री

वाजसृत् ( संग्रामयायी )
वारवत् ( पुच्छयुक्त)
विपक्षस्
वीतपृष्ठ
वीरवाह
वीळुपत्मन्
शुनपृष्ठ ( सुखपृष्ठ )
शूकृत ( शब्दकरणारी घोडी )
शूरण
सपर्यु ( हरिद्वर्णअश्व )
सहवाह
सुष्टुवाह
स्यन्न
स्वभीशु ( चांगला लगाम)
स्वयुक्ति ( आपोआप जोडले जाणारे घोडे. )
स्वश्व्य
स्तौल (स्थूल घोडी)
स्मदभीशु
हिरिश्मश्रु
हिरीमश
हेम्यावत्

[ तै. सं. ]

अंतराधान ( तोंडांत दिलेला लगाम )
अवमार्जन (खरारा )
अश्वकुणप

आधान ( लगाम )
नासिकवत्
निक्रमण
निधान

वाजिनीवत् ( चाबूकविशेषण )
सन्दान ( लगाम )
हिरण्यशृंग

[ अथर्ववेद ]

अश्वाभिधानी
अष्ट्र ( प्रतोद किंवा लगाम )
आजनि ( चाबूक )
आशु
कशा
नियुत्

पड्वीश ( पायबंद )
प्रष्टि ( दोन घोड्यांच्या पुढें जोडलेला घोडा )
बलवत्
मधुकशा

रशना
रश्मि
राजाश्व
वर्तक ( प्रणयी अश्व )
विभव
हिरण्यत्वच्

[ संहितेतर ]

[17]प्रतोद

[1] अश्व.–ऋग्वेदापासून वैदिक वाङ्मयांत हा शब्द ‘ घोडा ’ या अर्थी नेहमीं योजिलेला आढळतो. घोड्याला आणखी दुसरीं पुष्कळ नांवें आहेतः—अत्य–धांवणारा; अर्वत्–जलद; वाजिन्–ओढण्यामध्यें मजवूत; सप्ति–पळणारा; आणि हय–वेगवान्; घोडीला अश्वा, अत्या, अर्वती, वडवा, इत्यादि बरींच नांवें आहेत. निरनिराळ्या रंगाचे घोडे निरनिराळ्या नांवानीं संबोधिताताः–करडा (हरित, हरि), तांबूस ( अरुण, अरुष, पिशंग, रोहित ), तपकिरी ( श्याव ), पांढरा ( श्वेत ) इत्यादि. पांढऱ्या घोड्याला काळे कान असले म्हणजे तो फार किंमतवान असतो असें अथर्ववेदांत वर्णन आहे. घोड्यांची किंमत फार असूनहि ते कमी होते असें नाहीं. कारण दानस्तुतींत ४०० घोडे दिल्याचें वर्णन आहे. कारणप्रसंगीं त्यांच्यावर सोन्यामोत्यांचे दागिने चढवीत असत. रथ ओढण्याकडे घोड्याच उपयोगांत आणीत असत. कारण त्या चपल व खात्रीच्या असत. त्यांचा गाड्या ओढण्याकडेहि उपयोग करीत असत पण तो क्वचितच. युद्धांत घोड्यावर बसत असत किंवा नाहीं याचा जरी उल्लेख नाहीं तरी दुसऱ्या कारणाकरितां घोड्यांचा उपयोग होत असे. घोड्यांनां पागेंत बांधून चारा पाणी देत असत; त्यांनां बाहेरहि चरावयाला सोडीत असत. परंतु त्यावेळेला त्यांचे पायांनां खोडा घालीत असत. शर्यतीनंतर त्यांनां पाणी पाजीत असत. त्यांच्या मोतद्दारांनां अश्वपाल, अश्वप, अश्वपति, म्हणत असत. घोडे केव्हां केव्हां खची करीत ( वध्रि ). या शिवाय लगाम ( रश्मयः ), काढणी ( अश्वाभिधानी ), चाबूक (अश्वाजनि), यांचा उल्लेख आहे. सिंधुनदीकांठचे आणि सरस्वतीच्याकाठचे घोडे फार मौल्यवान् असत.

[2] आजि.–शर्यतींतील चपल घोड्यांनां (वाजिन्, अत्य) धुवून भूषणें चढवीत असत. पिशेल म्हणतो कीं एका शर्यतींतील घोडीचें नांव विश्पला असें होतें. तिचा मोडका पाय शर्यतींत अश्विन् यांनीं पुन्हां जोडला होता. परंतु विश्पला हें स्त्रीचें नांव असावें. ऋग्वेदांत जें मुद्गल सूक्त आहे त्यांत अश्वरथ शर्यतीची एक गमतीची गोष्ट आहे. परंतु गेल्डनेरनें दिलेली ही कथा चुकीची आहे असें ब्लूमफील्ड म्हणतो. पिशेल यानें या शर्यती यज्ञादिकांत होत असत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्याचा पुरावा अपूर्ण आहे असें मॅक्डोनेल्ड म्हणतो. तथापि राजसूय यज्ञाचे वेळीं व वाजपेय क्रतूंत शर्यती होत असत.

[3]एत.–अनेक वचनीं ( एताः ). मरुत् यांचे घोडे असा या शब्दाचा अर्थ होतो. ते शीघ्रगामी हरिणांच्या जातीचे असावे. त्यांचा उल्लेख ऋग्वेदांत पुष्कळ वेळां आला असून त्यांची कातडी मरुत् आपल्या खांद्यावर घेत असत असेंहि म्हटलें आहे. त्यांनां एकदां पृथुबुध्र हें विशेषण ऋग्वेदांत लाविलेलें आहे, आणि त्या शब्दाचे निरनिराळे अर्थ केले आहेत. उदा० 'रुंद-खुराचे,' 'रुंद-छातीचे,' 'रुंद-पृष्ठभाग असलेले.' यावरून ते हरिण असतील हें संभवत नाहीं.

[4]तार्क्ष्य.–दैवी अश्व–कदाचित् अश्वरूपी सूर्य या अर्थानें–हा शब्द ऋग्वेदांत आलेला आहे. पण फॉय म्हणतो कीं, त्रसदस्यूचा वंशज तृक्षी हा ऋग्वेदांत व पुढेंहि प्रसिद्ध आहे व तृक्षीपासूनच 'तस्य इदं' अशा प्रकारें हा तद्धित शब्द झालेला आहे. तेव्हां तार्क्ष्य म्हणजे तृक्षीचा घोडा असा अर्थ असावा. परंतु हा अर्थ बरोबर आहे असें निश्चितपणें मानतां येत नाहीं.

[5]परस्वत्.–याचा अर्थ मोठें रानटी जनावर असा असून रॉथच्या मतें रानांतलें गाढव असा याचा अर्थ आहे. ऋग्वेदामध्यें वृषाकपि सूक्तांत, अथर्ववेदांत दोनदां व यजुर्वेद संहितेमध्यें अश्वमेधाचे वेळीं बली दिले जाणाऱ्यांचे यादींत याचें नांव आलें आहे. या सर्व ठिकाणीं रानांतलें गाढव हा अर्थ चांगला जुळतो. कौषीतकि उपनिषदांत परश्वा ( न् ) याचा अर्थ ( भाष्यकाराचे मतानें याचा अर्थ साप असा आहे ) काय असावा याविषयीं बराच संशय आहे. हा परश्वा व परस्वत् यांचा परस्पर संबंध कदाचित् कांहीं नसेल. बुल्हरच्या मतें यांचा संबंध पाली भाषेंतल्या पलासाद ( गेंडा ) या शब्दाशीं असूं शकेल.

[6]प्रष्टि.–याचा प्रष्ट्याप्रमाणेंच 'पार्श्वाश्व' असा अर्थ आहे. जुंपलेल्या घोड्यांच्या बाजूनें धांवणारा घोडा एवढाच नुसता याचा अर्थ नसून, घोड्यांच्या पुढें, घोड्यांचा नायक म्हणून जुंपलेला घोडा असाहि त्याचा अर्थ आहे. कारण ऋग्वेदांत पृष्टीला उल्लेखून हा शब्द आला असतां त्याचा अर्थ वर दिल्याप्रमाणें असावा असें वाटतें. या ठिकाणीं प्रष्टि हा शब्द मरुतांच्या अश्वांनां वाहणारे ( वहति रोहितः ) अशा अर्थानें लागू पडतो. एका अथर्ववेदाच्या संदिग्ध वचनांत प्रष्टीचा 'पंचवाही' पांचांनीं ओढलें जाणारें, अशा अर्थानें उल्लेख आला आहे. परंतु याचा नीट अर्थ काय हें समजणें फार कठिण आहे. प्रष्टि हा इतरत्रहि बरेंच वेळा येतो. एका वचनांत 'धुर्यौ' आणि 'प्रष्ट्यौ' हे शब्द एकत्र आलेले आहेत. धुरीला जोडलेल्या घोड्यांच्या दोन्ही बाजूस हे दोन घोडे बांधीत असत असें दिसतें. प्रष्टिमंत, प्रष्टिवाहन्, प्रष्टिवाहिन् हीं सर्व विशेषणें 'रथाचीं' आहेत; व त्यांचा अर्थ जुंपलेल्या अश्वांच्या पुढें किंवा बाजूला जुंपलेल्या घोड्यांनीं ओढला जाणारा रथ असा आहे.

[7]मर्य.—ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं हा शब्द आला असून त्याचा अर्थ खच्ची न केलेला घोडा, वळू असा आहे. याचें एके ठिकाणीं 'पस्त्यावत्' 'तबेल्यांत ठेवलेला घोडा' असें वर्णन आलें आहे–म्हणजे फार काळजीपूर्वक पोसलेला, बाहेर चरावयास न सोडलेला, असा घोडा.

[8]मेना.—ऋग्वेदांतील कांहीं मंत्रांत या शब्दाचा स्त्री हा अर्थ आहे. घोडी किंवा गाय या अर्थी कांहीं ठिकाणीं या शब्दाचा उपयोग केला आहे.

[9]रोहित.—ऋग्वेदाच्या कांहीं ऋचांत तांबडी घोडी व पुढील ग्रंथांत तांबडी हरिणी असा सेंटपीटर्सबर्ग कोशाप्रमाणें या शब्दाचा अर्थ आहे.

[10]वाजिन्.—ऋग्वेदामध्यें अनेक ठिकाणीं याचा अर्थ घोडा असा आहे. कारण त्याचे अंगीं चापल्य व बल हीं दोन्हीं असतात. लुडविग म्हणतो त्याप्रमाणें एके ठिकाणीं बृहदुक्थाच्या मुलाचें हें विशेषनाम आहे. पण हा अर्थ ओढाताणीचा दिसतो.

[11]सप्ति.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें याचा अर्थ चपळ घोडा असा आहे.

[12]स्यूमगृभ्.—ऋग्वेदामध्यें ( ६. ३६, २ ) हा शब्द घोड्याला लाविलेला असून लगाम तोडून पळून जाण्यास उत्सुक झाल्यामुळें आपल्या दातांनीं लगाम चावणारा घोडा असा याचा अर्थ आहे.

[13]अभीशु.–रथाच्या घोड्याचा लगाम दर्शविण्याकरितां हा शब्द वैदिक काळांत ( ऋग्वेदांत ) प्रचारांत असे. बहुधा दोन, चार किंवा पांच घोडे रथाला लावीत असत म्हणून अनेकवचनीं शब्द वापरला असावा ( दशाभीशु ).

[14]गभस्ति.–ऋग्वेदांतील देवांच्या वाहनाचें स्यूम-गभस्ति ( दांड्यासारखे लगाम ) या विशेषणांत रथाच्या धुरांड्या असा या शब्दाचा अर्थ आहे असें रॉथ म्हणतो. तैत्तिरीय ब्राह्मणांत हा अनेकवचनांत स्वतंत्र शब्द आहे. तथापि अर्थबोध बरोबर होत नाहीं. रॉथ म्हणतो कीं, स्यूमगभस्ति म्हणजे एक प्रकारचा दुहेरी लगाम. ऋ. ७. ७१, ३ या ठिकाणीं गभस्ति याचा अर्थ लगाम असा सायणभाष्यांत दिला आहे. 'स्यूमगभस्तिम् = सुखरश्मिं स्यूतरश्मिं वा' सायण. ऋ. १. १२२, १५ येथें गभस्ति याचा अर्थ सायण दीप्ति म्हणजे तेज असा देतो. तैत्तिरीय ब्राह्मणांत 'गभस्ति' हा शब्द गभस्तयः असा अनेक वचनांत आला आहे व त्याचा तेथें तेजवान् ( दीप्तिमत ) असा अर्थ आहे.

[15]पड्बीश.—घोड्याच्या पायांतला पायबंद असा या शब्दाचा अर्थ पांच ठिकाणीं—ऋग्वेदामध्यें दोन ठिकाणीं व बृहदारण्यक, छांदोग्य उपनिषद् व शांखायन आरण्यक यांत—आलेला आहे. इतर ठिकाणीं त्याचा उपयोग लक्षणेनें आलेला आहे. रॉथचे मतानें याचा शब्दशः अर्थ पाय बांधणें असा आहे. पद्- = पाय व बीश हें पद वाजसनेयि संहितेंत वीश् असें लिहिलें असून लॅटिन् भाषेंतल्या व्हिन्सिरे–बांधणें या शब्दाशीं सदृश आहे, पाय बांधून ठेवणें असा अर्थ करणें चुकीचें होईल असें पिशेल

म्हणतो. कारण, ज्या खुंटीला सिंधू नदीवरील उमद्या घोड्याचा पाय बांधला होता ती खुंटीच तो उपटीत होता असा विलक्षण अर्थ उपनिषदामध्यें करावा लागेल. तेव्हां पायाला खोडा घालणें हा या शब्दाचा अर्थ असावा असें तो सुचवितो.

[१६] मधुकशा, मधोःकशा.--ज्या योगानें आश्विन् यज्ञाला मधुरपणा, गोडी आणीत अशा अश्विनांच्या ‘ मधाच्या चाबकाचें, हें एक नांव आहे. रॉथ मोठ्या कल्पनेनें म्हणतो कीं, माथ्याच्या कल्पनेवरून ही कल्पना सुचली असावी.

[१७] प्रतोद.--पंचविंशब्राह्मण आणि अथर्ववेद यांत याचा अर्थ व्रात्यांचा ‘ अंकुश ’ असा केला आहे. व्रात्य म्हणजे मूळचा राहिवाशी, ब्राह्मणविरहितआर्य-ब्राह्मणाखेरीज इतर आर्य. लाट्यायन श्रौत्रसूत्र ८. ६, ७ या ठिकाणीं प्रतोद शब्द आहे व ‘प्रतुद्यतेऽनेनेति प्रतोदः’ म्हणजे चाबूक असा अर्थ त्या ठिकाणीं आहे. शां. श्रौतसूत्र १३. ७२, ३ या ठिकाणीं सप्रतोदः असा शब्द आहे. सप्रतोद म्हणजे सह प्रतोदेन. या ठिकाणीं प्रतोद याचा अर्थ चाबूक असाच आहे. अथर्ववेद १५. २, ७ या ठिकाणींहि प्रतोद शब्दाचा अर्थ चाबूक असा आहे. व्रात्य म्हणजे कोण याविषयीं सायणाचार्य अथर्ववेदाच्या १५ व्या कांडाच्या भाष्यारंभाचे वेळीं ‘व्रात्यो नाम उपनयनादिसंस्कारहीनः पुरुषः। सोऽर्थाद् यज्ञादिवेदविहिताः क्रियाः कर्तुं नाधिकारी। न स व्यवहारयोग्यश्च।’ असें म्हणतात.

### गोनामें [ ऋग्वेद ]

अघ्न्या ( गोऱ्हा )
अदिति
अदुग्धा ( धार न काढलेली )
अनड्वाह
अमा ( अपक्वा )
अरिधायस्
[१] अष्टकर्णी
अष्टापदी ( गर्भिणी )
अही
इळा
उक्षन्
उरुधारा
उष्टार
[२] उस्रा
उस्रिक ( दुर्बल वृषभ )
उस्रिय
ऋषभ
कीनाश
क्षामन्
गार्ष्टेय ( सकृत् प्रसूताधेन्वोरपत्यं )
[३] गृष्टि ( सकृत्प्रसूता धेनु )
[४] गो
[५] गौर
जगती
त्र्यवि ( वत्स )
दंसुपत्नी
[७] दुघा
[८] धेना
[९] धेनु
निर्मज ( विशेष शुद्ध अशी गाय )
पुष्टिगु
[१०] पृषती
प्रस्नाती ( पान्हा आलेली )
प्रायोग ( बैल )
बष्कय ( एक संवत्सराचा गोऱ्हा )
[११] मर्यक
मही
मा
रप्शदूध
रोहिणी
[१२] वत्स
वन
[१३] वशा ( वंध्या )
वहि
[१४] वह्नि
[१५] वाह् ( वाहनशील वृषभ )
वासरी ( बहुक्षीरा )
विश्वदोहस्
वृजनी
वृष
वृषप्रयावन्
[१६] वृषभ
शक्वरी
श्रुष्टिगु
श्वित्न ( श्वेतवर्णगोयूथ )
श्वैतरी ( श्वततरोधेनु )
सबर्धुक् (पयोदोग्ध्री)
संमातृ
संशिश्वरी ( बद्धपयस्का )
सुदुह
सुहुताद
[१७] सूददोहस्
सूभव
स्तनभुज् ( वत्सान् पाययन्ती )
स्तरी
स्मदूध्नी
हिङ्कृण्वती

[ तै. सं. ]

अघ्निया
आमा
उक्षन्
उभयतः शीर्ष्णी (प्रसूतिस्थितींतील गाय )
उस्रा
कूटा ( शिंगें मोडलेली )
गर्गर(डुरकणारे बैल)
गो
जरती
[१८] तुर्यवाट्
तुर्यौही
[१९] त्रिवत्स
त्रिवत्सा
त्वष्टीमती ( सोमविक्रयिणी गाय)
[२०] दित्यवाट्
दित्यौही
धेनु
[२१] निरष्ट
पंचावि
पर्यारिणी ( प्रसावकालापूर्वी प्रसूत होणारी)
[२३] पष्ठवाट्
पीवस्वती
बभ्रुकर्णी
भौमी
[२४] महानिरष्ट
मूर्खा
लक्ष्मणा
वत्स
वत्सतर
वत्सतरी
वहिनी (ओझें वाहणारी )
विश्रुति
वेहत् ( गर्भपात झालेली )
श्वेतवत्सा
श्वेता
सवात्य ( जुळीं वासरें )
सुदुघा
सुरेता ( सोमक्रय करते वेळीं द्यावयाची गाय )
सूतवशा ( एक वेळ प्रसूत होऊन वांझ झालेली )
सोमक्रयणी
सौरी

[ अथर्ववेद ]

अघ्नी
अधेनु ( धेनुविरहित वत्स )
अनडुह्
अनुपूर्ववत्सा
अपर्तु
अभिशाच्
उक्षन्
उच्चैर्घोषा
उरुज्री
उरुधारा
उस्रा
एकवृष
करीषिणी
कर्की
कामदुघा
क्षीरिणी
गविष्ट
गृष्टि
गो
गोघ्रा
घृताची
चतुश्रोत्रा
चतुर्हेनु
जीवा
तीक्ष्णशृंग ( बैल )
दशवृष ( दहाबैल )
दुरदभ्ना
दुराधर्षा
द्विजिह्वा
नववृष
नित्यवत्सा
पुरोडाशवत्सा
पृष्टी
पोषयिष्णु
बष्कय
ब्रह्मगवी
भ्रातृव्यघ्नी
महर्षभ
महानघ्नी
महावृष
महीलुका
मूलबर्हणी
मृतवत्सा
यमिनी
रमति
वशा
वशाभोग
वापि
वाश्यमाना
वासिता
विलिप्ती
वेहत् ( गर्भघातिनी )
व्यद्वरी ( दुष्टमार्गवती )
शतापाष्ठा ( केसाळगाय )
शतोदना ( वन्ध्या गाय )
षड्वृष
समोषधी
संशिश्वरी
साध्वर्या ( अतिथि तर्पका गौः )
सुदुघा
सूतवशा
स्वन्दी
स्वाशु ( जलद चालणारे बैल )
हिङ्कृण्वती

[१] अष्टकर्णी.—ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत हा शब्द आहे आणि हें विशेषनाम असावें असें रॉथ म्हणतो. ग्रासमन म्हणतो कीं, याचा अर्थ मनुष्य असा न करितां गाय असा करावा आणि हा

अर्थ सयुक्तिक दिसतो. गायीचेंच असें वर्णन कां असावें याचें कारण कांहीं बरोबर कळत नाहीं. परंतु रॅाथ म्हणतो कीं, याचा अर्थ ' छिद्रित कानाची गाय ' असा असावा आणि अशीं विशेषणें पाणिनीच्या सूत्रांतहि ( ५ ३,१५ ) आढळतात ( भिन्नकर्णी, छिन्नकर्णी ). मैत्रायणी संहितेंत ( ४. २, ९ ) विष्टयकर्ण्याः, कर्करिकर्ण्याः, दात्रकर्ण्याः, स्थूणाकर्ण्याः, छिद्रकर्ण्याः; हीं जीं विशेषणें आलीं आहेत त्यावरून ' आठाच्या आंकड्यासारख्या चिन्हांकित कानाची ' असा जो अर्थ ग्रासमन करतो तो बऱ्याच अंशीं विशद असा आहे. ' चिन्हांकित कानाची ' हा जो साधा अर्थ आहे त्यालादेखील मैत्रायणी संहितेंतील त्याच उताऱ्यांत अक्ष हें जें क्रियापद आहे त्याचा आधार आहे. अथर्ववेदांत ही खूण मिथुनाची आहे; पुष्कळ उत्पत्ति व्हावी म्हणून ही बहुधा मांत्रिक खूण असावी. कानाला खुणा करणें ही सर्वसाधारण चाल होती. दोन वेळा अथर्ववेदांत त्याचा उल्लेख आहे. त्या खुणेला 'लक्ष्मन्' असें म्हणत आणि ती तांब्याच्या सुरीनें ( लोहित ) केलेली असे. बाणाचें टोक अथवा लोखंड याचा उपयोग करूं नये पण इक्षुकाण्ड अथवा तांबें याचा उपयोग करावा असें मैत्रायणी संहितेंत वर्णन आहे.

उस्र, उस्रा, उस्रिक, उस्रिय.--ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथ यांमध्यें हे शब्द पुष्कळ वेळां आलेले आहेत व त्यांचा अर्थ 'बैल' किंवा ' गाय ' असा होतो. परंतु नेहमीं त्यांचा संबंध प्रभाताबरोबर जोडलेला असतो. कांहीं उताऱ्यावरून अर्थबोधहि बरोबर होत नाहीं.

[3]गृष्टि.--याचा अर्थ ' एकदांच व्यालेली गाय ' असा आहे. ऋग्वेद, अथर्ववेद व मागाहूनचें सूत्रवाङ्मय यांमध्यें हा शब्द आला आहे.

[4]गो.--'बैल' अथवा 'गाय'. हे वैदिक आर्यांच्या संपत्तीचे घटक असून ऋग्वेदानंतर याचा उल्लेख बराच वेळ आला आहे. दूध ( क्षीर ) ताजें पीत असत, किंवा तूप, दहीं अथवा सोम यांमध्यें मिसळीत असत, अथवा त्यांत तांदूळ शिजवीत असत ( क्षीरौदन ). सकाळीं ( प्रातर्-दोह ), दुपारीं ( संगव ) आणि संध्याकाळीं ( सायं-दोह ) अशा तीन वेळां गायींचें दूध काढीत असत. त्याच वेळेला म्हणजे दिवसांतून तीन वेळां (प्रातः, संगव, सायम् ) गायी चरावयास सोडीत असत असें तैत्तिरीय ब्राह्मणांत म्हटलें आहे. पहिल्या दोहनाच्या वेळीं पुष्कळ दूध मिळे आणि दुसऱ्या दोन वेळेला थोडें मिळे. ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें भरताच्या गायींचे कळप संध्याकाळीं गोठ्यांत आणि दुपारीं 'संगविनी'मध्यें असत असें दिसतें. सायणाचार्यांचें स्पष्टीकरण असें आहे कीं, दूध देणाऱ्या गायी रात्रीं गोठ्यांत असत आणि बाकीच्या उघड्या मैदानांत असत; परंतु दुपारीं उन्हाचे वेळीं दोन्ही एकाच ठिकाणीं गोठाणावर असत. गायी जेव्हां कुरणांत चरत असतात त्या वेळेला स्वसर असें म्हणतात. त्या जेव्हां बाहेर जात तेव्हां त्यांचीं वांसरें त्यांच्या बरोबर सोडीत नसत; त्यांना संगवेळीं आणि कधीं कधीं संध्याकाळीं त्यांच्या जवळ सोडीत असत. गायी चरावयास गेल्या म्हणजे त्यांची काळजी घेण्याकरितां एक गोप, ( गोपाल ) हातांत पराणी घेऊन त्यांच्याबरोबर हिंडत असे; परंतु त्यांचें हरवणें, खड्ड्यांत पडणें, हातपाय मोडणें, चोरीला जाणें यासारखे सर्व त्रास त्यांच्या मागें असत ( ऋ. १. १२. ) मालकी दर्शविण्याकरितां गायींच्या कानावर खुणा करीत असत ( ऋ. ६. २८, ३ ). दानस्तुतींतील अतिशयोक्तीचा भाग जरी वगळला तरी त्यावरून गुरांचे मोठमोठे कळप असत असें दिसतें. गायींची भरभराट व्हावी म्हणून ( ऋ. १.८, ३ ) ईश्वरापाशीं जें वारंवार मागणें केलें आहे आणि गोरूप संपत्ति वाढावी म्हणून ज्या प्रार्थना केलेल्या आहेत त्यांवरून गायींचें महत्त्व किती होतें हें दिसून येईल. म्हणूनच गायी करितां स्वाऱ्या ( गविष्टि ) झालेल्या प्रसिद्धच आहेत. ऋग्वेदांत भरतांच्या मुख्याला '.गव्यन् ग्रामः ' असें म्हटलें आहे; आणि गो-पाय ( गायी राखणें ) या पासूनच ऋग्वेदकाळांत गुप् - राखणें हा धातु निघाला आहे. वैदिक काळांतील कवी गायींच्या हंबरण्याशीं आपल्या कवनांची तुलना करीत व अप्सरांचें गायींशीं साम्य कल्पीत. वैदिक काळांतील गुरें निरनिराळ्या रंगाचीं (रोहित, शुक्र, पृश्नि, कृष्ण.) असत. झिमर म्हणतो कीं, ऋग्वेदांत एका ठिकाणीं ( १. ८७, १ ) गायींच्या तोंडावर एकप्रकारचा झगझगीतपणा असतो असें लिहिलें आहे परंतु तें अनिश्चित आहे. गाड्या ओढणें आणि नांगराला जुंपणें हीं साधारण दोन कामें बैलांचीं असत. हे बैल बहुधा बडवलेले असत. गायींना गाडी ओढण्याचें काम नेहमीं करावें लागत नसे पण कधीं कधीं त्यांना गाडीला जुंपीतहि असत. गायींचें आणि बैलांचें मांस कधीं कधीं खाल्लें जाई. गुरें हीं प्रत्येकाच्या मालकीची वस्तु असे; आणि तें एक चलनी नाण्याचें प्रमाण मानून सर्व वस्तूंची किंमत त्याच्यावरून ठरविली जात असे. साधारणपणें गो हा शब्द गायींपासून मिळणारे पदार्थ दर्शविण्याकरितांहि उपयोगांत आणीत. हा शब्द नेहमीं दूध व क्वचित्प्रसंगीं गोमांस असाहि अर्थ दर्शवितो. पुष्कळ ठिकाणीं या शब्दाचा उपयोग ' निरनिराळ्या कारणाकरितां उपयोगांत आणलेलें कमावलेलें कातडें' अशा अर्थानें करितात. उदाहणार्थ धनुर्ज्या, गोफण, रथाचा भाग बांधण्याकरितां वादी, लगाम, चाबकाची पट्टी या ठिकाणीं साधारणपणें गो शब्दाचा अर्थहि तोच आहे.

[5]गौर.--ऋग्वेद व नंतर गवय या शब्दाबरोबर एक बैलाच्या जातीचें नांव म्हणून हा शब्द आला आहे. वाजसनेयि संहितेंत जंगली ( आरण्यक ) गौर आहेत त्याअर्थी माणसाळलेले देखील गौर असले पाहिजेत. स्त्रीवाचक गौरी शब्द देखील आहे व गौरमृगी हा सामासिक शब्दहि आढळतो.

[6]त्र्यवि.--ऋग्वेद व मागाहून झालेल्या संहिता यांमध्यें या शब्दाचा अर्थ अठरा महिन्यांचें वासरूं असा आहे.

[7]दुघा.--या शब्दाचा अर्थ दूध देणारी असा असून संहितामधील कांहीं मंत्रांत त्याचा अर्थ गाय असा आहे.

[8]धेना.--या शब्दाचा अर्थ दुभती गाय असा आहे. अनेकवचनीं या शब्दाचा अर्थ दुधाचे घोट असा होईल. दोन ठिकाणीं

रॉथ याचा अर्थ ' घोडी ' असा करतो; व दुसरें एके ठिकाणीं ' वायूच्या रथाचे घोडे' असा करतो. उलटपक्षीं, बेनफे एके ठिकाणी सायण व निरुक्तावरील दुर्गाचार्यांची टीका यांनां अनुसरून याचा अर्थ ओठ असा करतो. गेल्डनेरचे मतें या शब्दाचे अर्थ ' ओठ, ' ' वाणी, ' ' गाय,' 'आडवता,' व 'ओढा' किंवा ' प्रवाह ' असे होतात.

[9] धेनु.–दुभती गाय या अर्थानें हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ यामध्यें आलेला आहे. हा शब्द अनेक वेळां आलेला असून तिच्या दूध देण्यासंबंधानें तो विशेष येतो. तिची बैलाशींहि (वृषभ, पुमांस्, अनड्वह्) तुलना केलेली आहे. या शब्दाचा अनेकवचनीं अर्थ दुधाचे घोट असा आहे. या शब्दापासून बनलेला शब्द म्हणजे धेनुका हा होय व त्याचा अर्थ नुसता ' स्त्री,' असा आहे.

[10] पृषती.–कांहीं ठिकाणीं याचा अर्थ ' ठिपके असलेली गाय' असा आढळतो. परंतु हा शब्द सामान्यतः मरुतांच्या समूहाला लावलेला आढळतो व अशा वेळीं त्याचा अर्थ संशयात्मक असतो. भाष्यकारांच्या मताप्रमाणें त्याचा नेहमींचा अर्थ ठिपके असलेले हरिण असा आहे. परंतु महीधराचा अनुवाद करून रॉथ म्हणतो कीं, या शब्दाचा अर्थ 'ठिपके असलेली घोडी ' असा करणें जास्त श्रेयस्कर आहे. आतां ही गोष्ट खरी कीं, मरुतांनां नेहमीं पृषदश्व असें म्हणतात व त्याचा अर्थ ' ठिपके असलेले घोडे ' असा करणें जास्त सरळ दिसतें. पुढील वाङ्मयांत आलेला अर्थ म्हटला म्हणजे ' ठिपके असलेली मृगी ' हा होय. हाच अर्थ ग्रासमनलाहि पसंत पडला आहे.

[11] मर्यक.—हा शब्द ऋग्वेदांत येतो. याचा अर्थ गायींपासून दूर केलेला सांड असा असावा.

[12] वत्स.––ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत वासरूं अशा अर्थानें हा शब्द वारंवार आलेला आहे. गायींनां पान्हा फुटावा म्हणून वासरांचा उपयोग करण्याबद्दल व गायींनां कांहीं ठराविक वेळीं वासरापासून वेगळें करण्याबद्दलचा उल्लेख वैदिक वाङ्मयांत आलेला आहे.

[13] वशा.—ऋग्वेदांत व मागाहून झालेल्या ग्रंथांत या शब्दाचा अर्थ गाय असा आहे. भाष्यकारांच्या मतें याचा अर्थ वांझ गाय असा आहे. पण हा अर्थ कांहीं ठिकाणींच आढळतो.

[14] वन्हि.—याचा अर्थ ओझीं वाहणारा प्राणी असा आहे. उदाहरणार्थ, घोडा, बकरा किंवा बैल.

[15] वाह.––ऋग्वेदामध्यें ( ४. ५७, ४-८ ) व अथर्ववेदामध्यें ( ६. १०२, १ ) याचा अर्थ नांगर ओढणारा असा आहे.

[16] वृषभ.—ऋग्वेदामध्यें याचा अर्थ बैल असा आहे. पण बहुतकरून अलंकारिक अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[17] सूददोहस्.—सूद देणारें म्हणजे पिशेलच्या मतें सोमरस पिण्यास योग्य करणारें जें दूध तें देणारी व रॉथच्या मतें विहिरीप्रमाणें दूध देणारी, अशा अर्थानें हा शब्द ऋग्वेदांत आलेला आहे.

[18] तुर्यवाट् (पु.) तुर्यवाही (स्त्री.).—ऋग्वेदोत्तर संहितांमध्यें ' चार वर्षांचा बैल ' किंवा ' गाय ' अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[19] त्रिवत्स व त्रिवत्सा—' तीन वर्षांचा. ' हा शब्दसमूह ऋग्वेदोत्तर संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत गुरांनां लावलेला आहे. तीन वर्षांचा बैल तो ' त्रिवत्स ' व तितक्याच वयाची गाय ती ' त्रिवत्सा,' असें वर्णन तैत्तिरीय संहितेंत ( ४. ७, २०. ) आलें आहे.

[20] दित्यवाट् (पु.) दित्यौहि (स्त्री)––या शब्दाचा अर्थ ' दोन वर्षांचा बैल किंवा गाय ' असा असून ऋग्वेदोत्तर संहिता ग्रंथांत व ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द आलेला आहे.

[21] निरष्ट.—' खच्ची केलेला ' असा या शब्दाचा अर्थ असून ऋग्वेदोत्तर संहिता ग्रंथांत हा शब्द बैलांनां व शतपथ ब्राह्मणांत घोड्यांनां लावलेला आहे.

[22] पंचावि.––वाजसनेयि व तैत्तिरीय संहितेमध्यें हा शब्द अनेकदां आला असून त्याचा अर्थ पांच कोंकरांच्या आयुष्यकालाइतका, म्हणजे ३० महिन्यांच्या वयाचा असा आहे. अडीच वर्षांचा बैल तो ' पंचावि ' आणि तितक्याच वयाची गाय ती ' पंचावी ' होय.

[23] पष्ठवाह्.–– यजुर्वेद संहितांमध्यें हा शब्द आलेला असून याचा अर्थ ( भाष्यकारांच्या मतें चार वर्षांचा ) बैल असा आहे. चार वर्षांचा हा अर्थ संशयास्पद दिसतो; कारण पष्ठौहि ( म्हणजे गाय) हा वारंवार येणारा शब्द आहे, व या ठिकाणीं या शब्दाबरोबर प्रथमगर्भा असाहि शब्द आलेला आहे. यावरून चार वर्षांचा हा अर्थ अगदीं चुकीचा ठरतो असें मॅकडोनेल म्हणतो.

[24] महानिरष्ट.—' खच्ची केलेला मोठा बैल. ' सूताच्या घरीं झालेल्या राजसूय यज्ञामध्यें दक्षिणा म्हणून याचा उल्लेख यजुर्वेदसंहिता ( १. ८, ९, १ ) व काठक संहिता १५. ४. ९, मै. सं. २. ६. ५ यांत आला आहे.

## पक्षिनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1] अद्यसद् | गर्भदि ( मादी ) | मक्षिका |
| आरंगर ( मधमाशी ) | [5] गृध्र | [10] मयूरी |
| ईर्मा ( श्येन ) | [6] चक्रवाक | [11] रोपणाका ( हरिद्रुर्णपक्षिणी ) |
| [2] उलूक | [7] चाष | वयस् |
| ऋजिप्य ( श्येन ) | [8] चिच्चिक | वर्ति |
| [3] कपोत | [9] तकन् | [12] वर्तिका ( लावीपक्षीण ) |
| किकिदीवि ( गण्या ) | तक्वी | [13] वायस् |
| [4] कोक | पक्षिन् | वि |
| क्षुद्र | पतंग | विज् |
| ङ्किका | पतत्रिन् | विष्फुलिंगका ( पाकोळी ) |
| खर्गला ( उलूकी ) | पर्णवी | |
| गरुत्मत् | मक्ष ( माशी ) | |
| | मक्षा ( „ ) | |

१४शकुन (कपिंजल)
१५शकुनि
शकुन्त
शकुंति
शकुंतिक
शकुंतिका
१६शुक
× शुशुलूक (लहान घुवड)
१७श्येन
सरट्
सारघा
सिलीकमध्यम
१८सुपर्ण
१९हंस
२०हारिद्रव (पिवळा पक्षी)
हिरण्यवि

[ तै. सं ]

अन्यवाप
अलज
आती (चाषपक्षी)
उलूक
ऊल
कंक
कपिंजल (कवडा)
कपोत (होलगड)
कलविंक (चिमणी)
किकिदीवि (तित्तिर)
कीर्शी (कुंभारीण माशी)
कुटरु (कोंबडा)
कुषीतक (समुद्रकाक)
कुलीयक
कृकवाक (रानकोंबडा)
२१क्रौंच (करकोचा)
गरुत्मन्
गृध्र
गोलत्तिका (ताजवानामक पक्षी)
चक्रवाक
२२तित्तिरि
दर्विदा (सुतार पक्षी)
दात्यौह (पाणकोंबडा)
दार्वाघाट (सुतार पक्षी)
धूंक्ष्णा (पांढरी कावळी)
पक्षिन्
पांत्र
पिक (कोकिल)
पिप्यका
पुष्करसाद (भ्रमर)
पैंगराज (लाल डोळ्याचा भारद्वाज पक्षी)
प्लव
बलाका (बगळी)
मद्गु (पाणकावळा)
मधुकृत् (मधमाशी)
मयु (रानमोर)
मयूर
मान्धीलव (पाणकोंबडा)
लोपा (स्मशानांत राहणारा पक्षी)
वयस्
वर्तिका (चिमणी)
२३विदीगय
शका
शकुन
शकुनि (कावळा)
शकुंतिका
शारि (तांबडी साळुंकी)
शार्ग (रानचिमणी)
२४शितिकक्षि (पांढऱ्या पोटाचें गिधाड)
शुक
श्येन
२५सघन
सुपर्ण
सृजया (नीलवर्ण माशी)
सृमर (चमर)
हंस
हंससाचि (पांढरा हंस)
हलीक्ष्ण (हिरवी किंवा काळी चिमणी)

[ अथर्व वेद ]

अयोमुख
अलिक्लव (डोमकावळा)
कपोत
कुकदाश्व (सरडा)
कृष्णशकुनि (कावळा)
क्रव्याद्
गृध्र
घरट
छिन्नपक्ष (कपोत)
जाष्कमद
तार्क्ष्य
ध्वांक्ष (कावळा)
पक्षिणी
पक्षिन्
पतंग
पतत्रिन्
पथिष्ठ
परिपद
भृंग
मक्ष
मक्षिका
२६मशक
यह्वी
२७रघट
रोपणाक (काष्ठशुक)
२८वयस्
बत्रिवासस् (चक्रवाक)
वि
विकंकतीमुख
शकुनि
शकुंत
२९शरभ (टोळ)
श्येन
सुपर्ण
सूचीमुख
हारिद्रव (हरिद्वर्णपक्षी)

[ संहितेतर ]

३० कोकिल
सरघ
सरघा
३१ मटची

[1] अन्नसद.–हा शब्द (शब्दशः अर्थ "भोजनाला बसणारे.") ऋग्वेदांत "मेजवानीचा पाहुणा" अशा अर्थी वारंवार उपयोगांत आणिलेला दिसतो. परंतु गेल्डनेर या शब्दाचा अर्थ "माशी" असा करतो. कारण ती अन्नावर बसते.

[2] उलूक.–ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथांत हा शब्द दिवाभीताकडे योजितात. हा पक्षी त्याच्या ओरडण्याविषयीं प्रसिद्ध आहे. आणि त्याचें ओरडणें म्हणजे कांहीं अशुभाचें द्योतक असावें असें समजतात. अश्वमेधसमयीं दिवाभीतें जंगली झाडांना अर्पण करीत असत. कारण त्यांची वस्ती तेथेंच असे.

[3] कपोत.–बहुतकरून हें 'पारवा' या पक्ष्याचें नांव ऋग्वेद आणि नंतर आलेलें आहे. कांहीं कांहीं उताऱ्यांत निर्ऋति (अपघात, अशुभ) याचा दूत उलूक याचेंहि हेंच नांव असावें असें वाटतें. 'अशुभसूचक पक्षि' असा जो पारव्यावर आरोप आहे तो बहुतकरून प्राचीन समजुतीच्या आधारानें असावा. आणि भरतभूमी पलीकडेहि अशीच समजूत आहे.

[4] कोक.–ऋग्वेद आणि अथर्ववेद या ग्रंथावरून याचा अर्थ कोकिळ असा आहे. तीन ठिकाणीं हा शब्द आला असून त्याचा अर्थ सायणमताप्रमाणें चक्रवाक असा आहे. अथर्ववेदांतील शब्दाचें भाषांतर विनाशक अन्योपजिवी प्राणी असें रॉथ करितो.

[5] गृध्र.–'गिधाड,' 'गिधार' ऋग्वेद व नंतर हा शब्द आला आहे. त्याची शीघ्र गति आणि खराब मांस खाण्याची प्रीति हीं प्रामुख्यानें वर्णिलीं आहेत. साधारणपणें हा शब्द कोणत्याहि हिंस्र पक्ष्याला लावतात आणि गृध्रांमध्यें श्येन (गरुड) हा वरिष्ठ समजला जातो.

[6] चक्रवाक.–बहुतकरून आवाजावरून पडलेलें हें बदकाचें नांव असावें. हिंदींत त्याला चक्वा आणि इंग्रजींत ब्राह्मणी डक् असें म्हणतात. हें नांव ऋग्वेदांत आणि यजुर्वेदांतील अश्वमेधीय बळींच्या यादींत आलें आहे. हें नांव अथर्ववेदांत वैवाहिक प्रेमाचें व विश्वासाचें द्योतक आहे. तसेंच रोमन व ग्रीक वाङ्मयांत त्याचें हेंच स्वरूप दाखविलें आहे.

[7] चाष.–याचा अर्थ निळ्या रंगाचा काष्ठकूट पक्षी असा आहे. याचा उल्लेख ऋग्वेदामध्यें व त्याच प्रमाणें यजुर्वेदामध्यें अश्वमेध यज्ञाचे वेळीं जे प्राणी बलिदानास विहित म्हणून सांगितले आहेत त्यांमध्यें आहे.

[8] चिचिका.–चिचिका हा शब्द ऋग्वेदांतल्या एका ऋचेमध्यें आलेला आहे व त्याचा उल्लेख वृषारव या तितक्याच अप्रसिद्ध शब्दाबरोबर केलेला आहे. हे शब्द पक्षि शब्दाचे बोधक आहेत. या चिचिका शब्दाची दारिल यानें कौशिक सूत्रावर केलेल्या टीकेंत उल्लेख केलेल्या 'चिट्‌ट' शब्दाशीं तुलना करतां येईल.

[९] त क्व न्.–'तक्ववी' या दोन शब्दांचा अर्थ ऋग्वेदामध्यें 'जलद उडणारा पक्षी' असा आहे. सायणमतानें तक्वन्चा अर्थ जोरानें व जलद चालणारा तरतरीत घोडा असा आहे.

[१०] म यू र.–' मोर ' हा शब्द सामासिक शब्दांत ऋग्वेदांत येतो. येथें त्याचा अर्थ इंद्राचे घोडे ( मयूररोमन् म्हणजे मोराच्या पिसाप्रमाणें केस असलेले) किंवा मयूर शेप्य = मोराच्या शेपटीसारख्या असलेले ) असा आहे. यजुर्वेद संहितेंतील अश्वमेध प्रसंगींच्या दिलेल्या बळीच्या यादींत मोरांचाहि समावेश झाला आहे. लांडोरी ( ' मयूरी' ) चा अथर्ववेद व ऋग्वेद यांतून उल्लेख केला आहे व तोहि तिचा विषावर कांहीं उतार म्हणून केला आहे. मोरांच्या पिसांबद्दल सांप्रतकाळींहि कांहीं लोकांत एक प्रकारचा दिटकारा दिसतो.

[११] रो प णा का.–ऋग्वेदामध्यें व अथर्ववेदामध्यें एका पक्ष्याचें हें नांव आहे. तेथें याचा सारिका असा अर्थ असावा. पण कौशिक सूत्रावरील टीकाकार केशव याचें असें मत आहे कीं या शब्दाचा अर्थ एका प्रकारचें लांकूड असा असावा.

[१२] व र्ति का.–ऋग्वेदामध्यें लांडग्याच्या पंजांतून हिला आश्विनांनीं सोडविली असा उल्लेख आलेला आहे. यजुर्वेदामध्यें अश्वमेधाचे वेळीं बलि दिले जाणाऱ्या प्राण्यांचे यादींत हिचें नांव आलेलें आहे.

[१३] वा य स.–ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें मोठा पक्षी अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. ' कावळा ' असा या शब्दाचा अर्थ फक्त षड्विंश ब्राह्मणांत आलेला आहे.

[१४] श कु न.—' पक्षी. ' हा शब्द ऋग्वेदामध्यें व तदुत्तर ग्रंथांत वारंवार आलेला आहे. याचा नेहमींचा अर्थ मोठा पक्षी किंवा शुभाशुभ सूचक पक्षी असा आहे. झिमर, या शब्दाची ग्रसि मधल्या शुभाशुभ दर्शविणाऱ्या पक्ष्याशीं तुलना करतो.

[१५] श कु नि.—हा शब्द शकुन पक्ष्याप्रमाणेंच आलेला आहे. पण या शब्दावरून भविष्यज्ञानाचा विशेष स्पष्ट बोध होतो. हा पक्षी श्येन किंवा सुपर्ण यांच्याहून लहान होता. तो खुणा सांगत असे व अशुभाची वार्ता अगोदर सांगे. ज्या ठिकाणीं याचा उल्लेख अश्वमेध यज्ञाचे वेळीं बलि दिले जाणाऱ्या प्राण्यांच्या यादींत येतो त्या वेळीं या शब्दानें निराळ्या जातीच्या पक्ष्याचा उल्लेख केला असला पाहिजे. पुढें पुढें त्याला बहिरीससाणा म्हणूं लागले. पण दग्धकाक ( डोमकावळा ) असाहि याचा अर्थ असूं शकेल. तैत्तिरीय संहितेवरील भाष्यकाराच्या मतें कावळा असा याचा अर्थ आहे. इतरत्र हा शब्द अनेकदां आलेला आहे.

[१६] शु क.—' राघु. ' हा शब्द ऋग्वेदामध्यें आलेला आहे व त्यांत अशी इच्छा प्रकट केलेली आहे कीं, काविळीचा पिवळेपणा हा शुक व रोपणाका यांच्याकडे जावा. यजुर्वेद संहितेमध्यें अश्वमेधाचे वेळीं बलि दिले जाणाऱ्यांच्या यादींत या पक्ष्याचें नांव आलेलें आहे. हा पीतवर्ण असतो व त्याला मनुष्यासारखी वाणी असते असें वर्णन तैत्तिरीय व मैत्रायणी संहितेंत आलेलें आहे असें कांहीं पाश्चात्य पंडितांचें मत आहे. ब्लूमफील्डचे मतानें अथर्ववेदांतल्या शारिशाका या अस्पष्टार्थी शब्दाच्या शाका या शब्दार्थाबद्दल शुक हाच शुद्ध पाठ बरा दिसतो.

× शु शु लू क.—ऋग्वेदांत शुशुलूकयातु या समासांत हा शब्द आलेला आहे व तो एका राक्षसाच्या नांवाचा दर्शक आहे. सायणाच्या मतानें या शब्दाचा अर्थ लहान घुबड असा आहे. मैत्रायणी संहितेंत अश्वमेधाचे वेळीं बलि दिले जाणाऱ्यांच्या यादींत 'शुशुलूका' या स्त्रिलिंगी रूपांत हें नांव आलेलें आहे.

[१७] श्ये न.—ऋग्वेदामध्यें हें एका प्रबल हिंस्र पक्ष्याचें नांव आलेलें आहे. बहुतकरून हा पक्षी म्हणजे गरुडपक्षी असावा. वैदिक कालानंतरच्या वाङ्मयांत याचा अर्थ बहिरीससाणा किंवा त्याच्या सारखा एखादा पक्षी असा असावा. हा सर्व पक्ष्यांत अतिशय जलद चालतो व त्यामुळें लहान पक्ष्यांस भीतिदायक असतो; याच्या अंगांत शक्ति अतिशय असते. त्यामुळें तो पक्ष्यांच्या समुदायालासुद्धां भारी होतो; त्याचा पहारा मनुष्यावरहि असतो ( नृचक्षस् ); अशा प्रकारचे उल्लेख ऋग्वेदांत आहेत. यावरून तो आकाशांत उंचावरून जातो हें अनुमान निघतें. तो स्वर्गांतून सोम आणतो असाहि उल्लेख आहे.

[१८] सु प र्ण.—' चांगले पंख असलेला '. हें एका हिंस्रपक्ष्याचें नांव आहे व तें नांव गरुडपक्षी किंवा गिधाड याचें असून ऋग्वेदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथांत आलेलें आहे. ज्या ठिकाणीं 'मृताचें मांस खाणारा' असा अर्थ अभिप्रेत आहे त्या ठिकाणीं या शब्दाचा गिधाड असा अर्थ घेतला पाहिजे. जैमिनीय ब्राह्मणामध्यें क्रौंचपक्ष्याप्रमाणें नीरक्षीरविवेक करणाऱ्या गरुडपक्ष्याचा उल्लेख आला आहे. ऋग्वेदामध्यें सुपर्णाला श्येनाचा पुत्र म्हटलें असून दुसऱ्या एका ठिकाणीं हे निराळे आहेत असें म्हटलें आहे. यावरून झिमरला असें वाटलें कीं, बहिरीससाणा असा याचा अर्थ असावा. अथर्ववेदामध्यें या सुपर्णाच्या ओरडण्याचा उल्लेख आलेला आहे व तो डोंगरांत रहातो असेंहि याचें वर्णन आलें आहे.

[१९] हं स.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यामध्यें हा शब्द आलेला आहे. हे पक्षी नीलपृष्ठ आहेत, ते जमावानें राहतात, पाण्यांत पोहोंतात, मोठा आवाज काढतात व रात्रीं जागृत असतात असें त्यांचें वर्णन आलेलें आहे. हंस पक्ष्याला सोम नीर विवेक ( पुढें नीर क्षीर विवेक अशी त्याची ख्याती झाली ) आहे असें यजुर्वेदांत म्हटलें आहे. अश्वमेधाचे वेळीं तो बली दिले जाणाऱ्यांपैकीं एक आहे असेंहि त्याच्याबद्दल म्हटलें आहे.

[२०] हा रि द्र व.—ऋग्वेदामध्यें पिवळ्या रंगाचा अशा अर्थी एका पक्षाचें हें नांव आलें असून हा पक्षी म्हणजे पिवळा जलखंजन पक्षी असावा. गेल्डनेर या पक्ष्याची ग्रीक लोकांतल्या χαραδριος या पक्षाशीं तुलना करतो.

[२१] कुञ्च, क्रौञ्च—' चोंच व पाय लांब असलेला व आंखूड शेंपटीचा पक्षी ', अथवा ' पाणलावा ' याच्या दर्शक हीं निर-

निराळीं रूपें आहेत. दूध आणि पाणी एकत्र केलें असतां पाण्यापासून दूध निराळें काढावयाचें हा जो मागाहून हंसाचा म्हणून प्रसिद्ध गुण, तो गुण पूर्वी वरील पक्ष्याचे अंगीं असे, असें म्हणत.

[२२]तित्तिर किंवा तित्तिरी—ज्याला मराठींत कवडा म्हणतात त्याचें हें नांव असून तें मागाहून झालेल्या संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांमध्यें आलेलें आहे. या पक्षाचें तित्तिर नांव त्याच्या ध्वनीवरून पडलेलें आहे, या पक्ष्याचें बहुतरून ( निरनिराळ्या रंगाचे पंख असलेला ) असें वर्णन आलेलें आहे. या पक्ष्यालाच दुसरें नांव कपिंजल व कलाविंक असें अहे.

[२३]विदीगय.--तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यांमध्यें हा शब्द एका प्राण्याचें नांव म्हणून आलेला आहे. तै. सं. वरील भाष्यांत याचा अर्थ कुक्कुटविशेष म्हणजे एक प्रकारचा कोंबडा असा केलेला आहे, व तै. ब्राह्मणावरील टीकेंत त्याचा अर्थ पांढरा बक ( श्वेत बकः ) असा दिलेला आहे.

[२४]शितिकक्षि.--तैत्तिरीय संहितेमध्यें सायण याचा अर्थ शुभ्र पोटाचा ( पांढरोदर ) गृध्र असा करितात. हा शब्द नुसतें विशेषणहि असूं शकेल.

[२५]सघन.--हें एका पक्ष्याचें नांव आहे. कदाचित् गरुडपक्षी किंवा गृध्र असावा. हा शब्द तैत्तिरीय संहिता व तै. ब्राह्मण यांमध्यें आलेला आहे.

[२६]मशक.-‘चावणारी माशी’ अथवा ‘चिलट.’ अथर्ववेदांत याला तृप्रदंशिन् ( म्हणजे फार लवकर चावणारी ) असें म्हटलें आहे. या माशीला एक जहरी नांगी असते व ती या नांगीचा उपयोग बहुधा हत्तीवर करते. या प्राण्याचा उल्लेख इतरत्रहि आढळतो.

[२७]रघट.-अथर्ववेदांत पैप्पलाद शाखीय संहितेंत रघटः हा पाठ आहे. रॉथच्या मताप्रमाणें रघव हा पाठ बरोबर आहे. ब्लूमफील्डनें या शब्दाचा अर्थ श्येन असा केला असून त्याला रॉथचा तर्क मान्य आहे. लुड्विग मधमाशी हा अर्थ सुचवितो. परंतु पक्षी हा अर्थ बरोबर असावा असें वाटतें.

[२८]वयस्.-अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यांत पक्षी या अर्थी सामान्य नाम म्हणून हा शब्द आला आहे. वरील ग्रंथांतच जनावरें व माणसें यांचें वय अशा अर्थानेंहि या शब्दाचा उपयोग केला आहे.

[२९]शरभ.-या शब्दाचा अर्थ टोळ असा असून अथर्ववदाच्या पैप्पलाद शाखीय संहितेंत शरभ हा पाठ आहे. हा पाठ घेतला म्हणजे अर्थहि चांगला होतो असें व्हिटनेचें मत आहे.

[३०]कोकिल.—हा शब्द आर्षकाव्यें व तदनंतरचे ग्रंथ यांमध्यें बरेच वेळां आलेला आहे. वैदिक काळांत काठक अनुक्रमणींतील एका राजपुत्राच्या नांवावरून तो निघाला असावा.

[३१]मटची.—हा शब्द छांदोग्योपनिषदांत आला आहे व तेथें कुरूंवर मटचींनीं गर्दी उडविली असा उल्लेख केला आहे. शंकराचार्य याचा अर्थ ‘ वज्र ’ ( अशनयः ) असा करतात. आनंदतीर्थ आपल्या टीकेंत याच ठिकाणीं पाषाणवृष्टयः ( म्हणजे गारांचा वर्षाव ) असा दुसरा पाठ देतात; शब्दकल्पद्रुम याचें मत सुद्धां आनंदतीर्थाप्रमाणेंच आहे; व त्यांत मटची म्हणजे एक लाल पक्षी ( रक्त वर्ण, क्षुद्र पक्षि विशेषः—पाठ—पक्षी असा ) अर्थ दिला आहे. या शब्दाचा ‘टोळ’ असा अर्थ असावा असें जेकब म्हणतो.

सर्पनामें [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अजगर | कसर्णीर | लोहिताहि |
| अदंकशूक | कुंभीनस | श्वित्र |
| असित | तिरश्चराजी | सर्प |
| अहि | दंदशूक | स्वज |
| कल्माषग्रीव | पृदाकु | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| आभ्रिज | कल्माषग्रीव | पृदाकु |
| अघाश्व | [२]कसर्णील | पृश्नि |
| अजगर | कुंभमुष्क | बभ्रु |
| आधिचंक्रम | कैरात ( किरात | ब्राह्मण |
| अनचरंतिका | देशीयसर्प ) | भृमल |
| अपोदक | खर्विका] | रज्जु |
| अप्रचंकश | चतुर्दंष्ट्र | रथर्वी |
| अरंघुष | जूर्णि | रदित ( सर्पदंशन ) |
| अर्बुदि | तस्तुव | विलिगी |
| अलीक | ताबुव | वृक्षसर्पी |
| अशीर्षन् | [३]तिरश्चिराजिन् | वैशालेय ( सर्प- |
| असिक्नी | तृष्टदंस्मन् | पुत्र ) |
| असित | तृष्टधूम | शर्कोट |
| असृङ्मुख | तैमात | |
| अहि | दत्वातिन् | श्यावदत् |
| आलिगि | दद्रुषिन् | श्वित्र |
| आशीविष | दशशीर्षन् | सर्प |
| उद्भास | दशास्य | सत्रासाह |
| उपतृण्य | दशोनसि ( सर्पिणी ) | स्तामान |
| उरुगला | नष्टविष | |
| [१]कंकपर्वन् | पर्यस्ताक्ष | [४]स्वज |
| करिक्रत | पण्डग | स्वभ्यस् |

[१]कंकपर्वन्.-अथर्ववेदांत हा शब्द सर्पाला लावलेला आहे. कदाचित् याचा ‘ विंचू ’ असाहि अर्थ असेल. पैप्पलाद संहितेंत याचा निराळाच पाठ आहे. कदाचित् तो पाठ अशुद्ध असावा.

[२]कसर्णील.-अथर्ववेदांत हें एका सर्पाचें नांव आहे. त्याचें दुसरें रूप कसर्णीर हें असून, तैत्तिरीय संहितेंत मंत्रद्रष्टा कसर्णीर काद्रवेय असा त्यावर मनुष्यधर्मांचा आरोप केला आहे.

[३]तिरश्चराजि, तिरश्चिराजि, तिरश्चीनराजि,-हे सर्व शब्द सापाच्या नांवाचें ( अक्षरशः अर्थ=आडवे पाय असलेले )

वाचक आहेत, व हे तिन्ही शब्द ऋग्वेदोत्तर संहिता ग्रंथांत आलेले आहेत.

[४] स्वज.–अथर्ववेद व ऋग्वेदोत्तर संहिता ग्रंथ यांमध्यें याचा अर्थ साप असा आहे. टीकाकारांच्या मतानें स्व–ज, स्वतःपासून जन्मलेला, असा याचा विग्रह आहे. रॉथ, वेबर व झिमर यांचें मत हा शब्द स्वज् 'वेष्टणें' या धातूपासून झाला असावा असें आहे. मैत्रायणी संहितेमध्यें ( ३. ९, ३ ) हरिण सर्पाला मारतो असें म्हटलें आहे.

प्राणिविशेष [ ऋग्वेद ]

अजकाव
[१]अजा
[२]अथरी
[३]अदष्ट
[४]अनलुत्
[५]अवि
आविका
अश्वतर
अश्विय ( अश्वसमूह )
[६]अहि
[७]आखु
आण्ड
आरोक ( पशु )
[८]इभ
इयत्तिक ( नकुल )
उक्षा
[९]उपजिह्विका ( मुंगी )
[१०]उरा ( मेषी )
[११]उष्ट्र
उष्टार
[१२]ऋक्ष
[१३]ऋश्य
ऋषम
कंकत ( विषारी प्राणी )
कपना
[१४]कपि
[१५]कशीका ( सूतवत्सा नकुली )
किलासी ( हरिणी )
कीनाश
[१६]कुषुंभक ( नकुल )
[१७]क्रोष्टु
क्षुर ( दीर्घनखयुक्त प्राणी )
[१८]क्ष्विंका

खर्गला
[१९]गर्दभ
गर्भधि
[२०]गवय
गृध्र
गौर
गौरी
श्वतुरक्ष ( यमाचे कुत्रे )
छाग
तरसंती ( तरसत् नामक मृगाची स्त्री )
[२१]त्सरु ( सर्प )
दिवक्षस् ( धेनु )
धेष्ठा
धौतरी ( वडवा )
निकाहा ( घोरपड )
[२२]पदि
[२३]पिपील
पिंश
[२४]पुनःसर
पूषर्या ( वृषभ )
पृदाकुसानु ( सर्प )
[२५]पेत्व
प्रकंकत
प्रवर्तमानक (नकुल)
[२६]प्लुषी
बष्की
बस्त
बिसख ( हंस )
[२७]भुज्य,
भोग
[२८]मण्डूक
मण्डूकी
मत्स्य
महाहास्तिन्
[२९]महिष
मूष
[३०]मग

[३१]मृगहास्तिन्
[३१]मेष
रपृशद्धस् ( धेनु )
रासभ
[३२]लोध
[३३]लोपाश
वंसग ( वृषम )
[३४]वम्रक
[३५]वम्री ( मुंगी, वाळंवी )
[३६]वराह
वराहयु
[३७]वारण
[३८]वृक
[३९]वृश्चिक
[४०]वृषारव
[४१]शश
[४२]शिंशुमार ( सुसर )
श्वन्
श्वापद
[४३]श्वान
सतीनकंकत ( विरोळा )
सरट्
सरीसृप
सर्प
सारघा
[४]सारमेय
[४५]सालावृक ( लांडगा )
[४६] सिंह
सिंह्य ( सिंह )
[४७] सूकर
सूचीक
स्वभीशु
हरि
[४८] हरिण
हरिणी
हस्तिन्

[ तै. सं. ]

अज
अजा
अवाशृंग
अवि
इभ
उद्वार ( लांब शेपटीचा पशु )
उभयादत्
उलूक
उष्ट्र
[५०] कत्कट
[५१] कश्यप
[५२] कुलीकय
[५३] कूर्म
[५४]कृमि ( शेपकिडा )
गवाश्व
गो
[५५] गोधा
गोमृग
चराचर
छगल (छागार्भक)
छाग ( बोकड )

जंतु
[५६] जष
दंदशूक
दित्यवाह् ( एडका )
निष्पद ( उवा )
नीलशीर्षा
पशु
पादूर
पान्त्र
पिप्पका( पक्षीविशेष)
पृषदी
फल्गु ( लवणवर्णपशु )
बलाका
बस्त
मत्स्य
[५७]मुष्कर
मृग
मेध
मेषी
रासभ

लक्ष
वम्र ( वाळवी )
[५८] वृशदंश (मांजर)
[५९] शयांदक
शरभ
शवर्त
शार्ग
शार्दूल
शितिवार ( पांढऱ्या शेंपटीचा पशु )
शिपि
शुंठ
सरीसृप(सरपटणारा)
सालावृकै (लांडगा)
सालावृकी
सृमर
सौपर्णेय
स्थूरगुद्
हय
हरिणि
हलीक्ष्ण(हरितचटक)

[ अथर्ववदे ]

अघायु
अज
अजबभ्रु
अजा
अर्जुन ( कृमि )
अईजात
अलाडु
अलाण्डु
अल्पशयु
अवरस्कन
अवान्त्य
[६०]अश्वतर
आखु
आवि
[६१]आशुंग ( मृगविशेष )
[६२]उपक्वश
उपजीका ( वाळवी )
उल( हिंस्रप्राणिवि. )
उलूक
उष्ट्र
ऋक्षग्रीव
ऋक्षीका
ऋश
एकशफ
एजदेजत्
एजत्क

कपि
कभ्रु
कर्वर ( मासा )
कर्शफ
कश्यप
कष्कष ( कीटक )
काबव ( कर्बुरवर्ण प्राणी )
कीट
कीलालोध्नी
कुथ ( अश्व )
कुय
कुरीरिन्
कुरूरु ( सरपटणारे प्राणी )
कुर्कुर
कुषुंभ ( विषधारक प्राण्यवयव )
कूर्म
कृकवाक ( डोंबकावळा )
केविका ( शेळी )
कोकयातु
क्रिमि
क्रोष्ट्र
क्षुल्लक
खण्वखा ( मंडूककी )

खर्गला ( उलूकी )
खैमखा ( मंडूककी )
गरुत्मन्
गर्दभ
गर्दभी
गृध्रयातु
गो
गोधा
गौर
चक्रवाक
चतुष्पाद
[६४]जगत्
जतु ( वटवाघूळ )
जंभ्य ( धान्य नाशक कीटक )
जरायुज
जष ( जलचरप्राणी )
तदुरि ( मंडूकी )
तर्द
तर्दपति
तादुरि ( मंडूकी )
तायादर
तायोदर
तार्क्ष्य
तूपर ( शृंगरहित प्राणी )

द्विपन्
धेनु
धेनुका
नकुल
परस्वत
पशु
पारावत
पार्ष्टेय ( कृमि )
पिपील ( विषारी मुंगी )
[६५]पिपीलिका
[६६]पुरीकय ( जलचर प्राणी )
पुल्वघ
पृष्टिवाह् (.अश्व )
पेत्व ( मेष )
पैद्व
प्रवाहण
बस्ताभिवासित
भरुजि
भृंग
भृंगा
मण्डूकि
मत्स्य
महर्षभ
महास्य ( सारमेय विशेषण )
मुष्काबर्ह ( बडवलेला बैल )
मृग
येवाष
रजस ( मासा )

रथर्वी
रिश्य
रोहित
वघा
वत्स
वराह
वारण
वारणी
वाह
विपक्षस्
विशाफ
वृक
वृष
वृषभ
[६७]न्यद्वर ( कुरतडणारा प्राणी )
[६८]व्याघ्र
शकुल
[६९]शरभ
शरारु ( खोडकर प्राणी )
[७०]शर्कोट
शलुन
शवर्त ( कृमि )
शश
[७१]शशयु ( हिंस्रप्राणी )
[७२]शारिशाक (क्षणांत हजारों उत्पन्न होणारे प्राणी )
शिंशुमार ( सुसर )
शितिकक्ष

शितिपाद
शितिबाहु ( कृमि )
शिपवित्नुक ( कृमि )
[७३]शिशुक
शीर्षण्य ( कृमि )
शुनी
शुशुक
श्लोणा (लंगडी गाय)
श्वन्
श्वपद्
श्ववर्त
श्वापद
सप्तशीर्ष्णी
[७४]समंक
सालावृक
सिंह
सिंह प्रतीक
सुमृग
सुव्रय ( बलीवर्द )
सूकर
सैंधव
स्तेग ( बेडुक )
हंस
हरि
हरिक्किका
हरिण
हारिणी
हरित्
[७५]हृडु
हस्तिन्
हस्तिनी

आमाद ( क्रिंकावि. )
ईर्मांत
[९९]उभयादत
ऋदूप ( बाहु )
गो
गोदुह
गोमद्य
गोवपुष्
गोसाखि
गोसत्तम
चतुष्पद
चतुर्युज
चर्मन्
जरायु
तिर्यच्
तुरीप
त्रिककुद्
[१००]त्वच्
दत्वत
दोहस्
द्विपाद

निशृंभ ( छागविशेषण )
नृवाहस् ( अश्वविशे. )
पक्षिणी
पद्वत्
पशव्य
[१०१]पशु
पशुतृप
पशुमती ( प्रजा )
पृशनायु
प्रकंकत
प्रजा
प्रतिर
मेष्य
यूथ
रिहती
रेरिहाण
रोमण्वत्
वांवशती
वाहिष्ठ
वृजन

वृषारव
[१०२]शकृत्
शफ
शरास
शाचिगु
शृंगिन्
श्वयातु
श्वापद
सधेनव
सबर्दुघ
सिलीकमध्यम
सुगव्य
सुचेतु
सुवेदना
सुस्थामन्
सृक
स्त्रापि
हिरण्यवी
हिरण्यशृंग
हिंस्र
हेषस्(शब्द करणारा)

[ तै. सं. ]

अंगिन्
अदन्तक
अधिलोधकर्ण
अन्यतःशितिबाहु
अन्यतःशितिरंध्र
अन्यतोदत्
अन्यवाप
अपक्रामुक
अप्सुयोनि
अशीर्षक
अशृंग
अष्टाशफ
अष्ठीवत्
असप्तशफा
आत्तरेतस्
उपवी
उभयतएनी
उभयादत्
एकदेवत्य
गर्भिणी
ग्रीवबद्ध
गौरललाम
तिग्मशृंग
त्रिककुद्
द्विरूपा
द्विरेतस्

धूम्र
धूम्रललाम
नानामनस्
निपक्षति
निर्मार्गुक
निवक्षस्
पशव्यतम
पाजस्य
पुरस्तात्प्रवण
पुष्पकर्ण
पृश्निसक्थ
पृषोदर
बभ्रुललाम
बम्बाविश्ववयस्
बिलधावनं
मणिवाल
मह्ला
मेदोरूप
मेध्य
मैत्र
रोहितललाम
रोहितांजि
ललाम
लप्सुदिन
वध्य
वायुदेवत्य

विकर्णी
वीड्वंग
वैष्णावरुणी
शितिककुद्
शितिकक्षी
शितिपद्
शितिपाद्
शितिपृष्ठ
शितिबाहु
शितिभसत्
शितिभ्रु
शितिरंध्र
शित्पुट
शित्यंऽस
शित्योष्ठ
शिल्प
शुण्ठ
शुद्धवाल
श्वेतग्रीव
श्वेताक्ष
संज्ञप्यमान
समन्तशितिबाहु
समन्तशितिरन्ध्र
सर्वहुत
सुसंदृश
स्थूलपृषती

[ वा. सं. ]

धरुण
[७६]शल्यक

[ कठ व मैत्रायणी सं. ]

[७७]ककुठ
कुभ्र

क्षिप्रश्येन
[७८]खड्ग

[७९]धेनुष्टरी

[ संहितेतर ]

[८०]आशीविष
[८१]इंद्रगोप
[८] एडक
[८३]खर
[८४]गज
[८५]गोमायु
[८६]चिल्वटी

[८७]झाष
[८८]दक्षिणापृष्टि
[८९]दुर्वराह
[९०]नाग
[९१]निवान्यवत्सा
[९२]पूर्वा

[९४]प्रयोग्य
[३९]मंथावल
[९५]वाहन
[९६]शफ
[९७]शाकल
[९८]स्नावन्य

## प्राणिसंबंधी व विशेषणें [ ऋग्वेद ]

अजमायु
आजिव
अतप्ततनू

अदत्
अदामान
अनवद्यरूप

अनाशु
अपिप्राणिन्
अबधिर

[ अथर्ववेद ]

अघशंस
अदुग्धा
अधिगव

| | | |
|---|---|---|
| अश्रु | जन्तु | बधूमत् |
| अहिघ्नय | जन्म | वराहयु |
| एकमूर्घ्नी | त्रिककुद् | वर्ष्मन् |
| कबंध | त्रिशीर्षन् | विरिष्टि |
| कुल्मल | देहिन् | व्यध्वर |
| कृष्णकर्ण | दोह | व्याघ्रजंभन |
| क्षुरपवि | पशव्य | शतदन् |
| गव्य | पुच्छधी | शाप |
| गोपोष | भूत | शीर्षभिद |
| गोशपथक | मूर्ण | स्थिरधामन् |
| गोशफ | यूथ | हिंस्र |
| जगत् | रेतोधस् | |

[1]अज, अजा.--ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथ यांत या शब्दाचा उपयोग बकऱ्याचें व्यावहारिक नांव या अर्थी केलेला सांपडतो. बकऱ्या आणि मेंढ्या ( अजावयः ) हे शब्द नेहमीं एकदमच सांपडतात. बकरी एका वेळेला दोन किंवा तीन कोंकरें प्रसवते असा तैत्तिरीय संहितेंत ( ६. ५, १०, १ ) उल्लेख आहे. आणि तिच्या दुधाचाहि त्याच संहितेंत वारंवार उल्लेख आलेला आहे. अंत्येष्टीचे जे विधी दिले आहेत त्यांत बकरा हा पूषन् याचा बदली किंवा निदर्शक म्हणून त्याला प्राधान्य दिलें आहे. गुराखी आणि मेंढपाळ यांच्या धंद्याप्रमाणें केवळ बकरी पाळणें हा एक स्वतंत्र धंदा असे असा वाजसनेयि संहितेंत ( ३.११ ) उल्लेख आहे. ऋग्वेदांतील अंत्येष्टीसंबंधीं मंत्रांत बकरा हा पूषनचा प्रतिनिधि म्हणून प्रेताबरोबर जाळीत असल्याचा उल्लेख नाहीं. )

[2]अथरी.--हा शब्द फक्त ऋग्वेदांत आढळतो. त्याचा अर्थ अनिश्चित आहे. रॉथ व इतर कांहीं पंडित 'भाल्याचें टोंक' असा त्याचा अर्थ करतात. परंतु पिशेलच्या मतें त्याचा अर्थ 'हत्ती' असा आहे.

[3]अदृष्ट.--ऋग्वेद आणि अथर्ववेद यांत हा शब्द एक प्रकारचे कीटक किंवा कीटकांची एक जात दाखविण्याकडे योजिला आहे. सूर्याला देखील अदृष्टहन् असें म्हटलें आहे; आणि तो अर्थ स्पष्ट करण्याकरितां 'दृष्ट' हा शब्द दिला आहे. एका उताऱ्यांत दृष्ट आणि अदृष्ट हे शब्द कृमी यांनां लाविले आहेत. आणि याचें कारण असें कीं प्रत्येक रोगाला कृमी असत अशी समजूत होती व जे कृमी सूक्ष्म दृष्टीनें दिसणारे त्यांनां दृष्ट व न दिसणारे त्यांनां अदृष्ट म्हणत.

[4]अनड्वाह्.--(शब्दशः--गाडी ओढणारा) गाड्या ओढण्याला जे बैल जुंपतात त्यांचें हें व्यावहारिक नांव आहे. हे बैल बहुतकरून बडवलेले असतात. तरी पण ते नेहमीं तसे असतातच असें नाहीं. गाडी ओढण्याकडे क्वचित् गायींचाहि उपयोग होत असे.

[5]अवि.--( मेंढी ) ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथ यांत अज यांच्याबरोबर मेंढ्यांचाहि वारंवार उल्लेख आहे. त्यांचा मोठा शत्रु लांडगा हा होय; म्हणून मेंढपाळ त्यांची फार काळजी घेत असत. शत्रूकडून मेंढ्या आणि गायी जिंकून आणीत असत. सोमरस गाळण्याकरितां जीं गाळणीं करीत असत तीं मेंढ्यांच्या लोंकरीचीं असत असा उल्लेख पुष्कळ वेळां केलेला आढळतो ( अविमेषी, अव्य, अव्यय ). ज्या अर्थी ऋज्राश्व यानें शंभर मेंढे मारले, आणि दानस्तुतींत शंभर मेंढ्या देणगी दाखल दिल्या असें वर्णन आढळतें त्या अर्थी त्याकाळीं मेंढ्यांचे मोठमोठे कळप असले पाहिजेत असें वाटतें ( मेष, वृष्टि ). मेंढा कधीं कधीं खच्ची करीत असत ( पेत्व ). मेंढ्यांचा मुख्य उपयोग म्हटला म्हणजे त्यांची लोंकर; म्हणूनच 'उर्णावती' ( लोंकरयुक्त ) हा शब्द मेंढ्यांचा द्योतक आहे. वाजसनेयि संहितेंत ( १३,५० ). मेंढ्याला ( तो आपल्या लोंकरीनें मनुष्यांचें शीत निवारण करतो म्हणून ) मनुष्यें व इतर प्राणी यांचें संरक्षक प्रावरण आहे असें म्हटलें आहे. मेंढ्यांच्या लोंकरीचें कपडे पूषन् तयार करतो असें एक ऋग्वेदांत ( १०.२६,६ ) वचन आहे. मेंढ्या बहुधां कुरणांतच असत; परंतु त्यांनां मेंढवाड्यांत ठेवीत असल्याबद्दलचें एक संदिग्ध वचन ऋग्वेदांत ( १.१२६,७ ) आलें आहे. गन्धार मेंढ्या लोंकरीकरितां प्रसिद्ध आहेत. पुष्कळसे मेंढ्यांचे कळप ( परुस् ) तीरावर असल्यामुळें त्या नदीस परुष्णी हें नांव मिळालें असें पिशेल म्हणतो.

[6]अहि.--ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथ यांत सर्प या अर्थी हा शब्द योजिला आहे. सर्पाचा कात टाकण्याबद्दलचाहि उल्लेख आला आहे ( ऋ. ९. ८६,४४ ). सर्पाच्या चमत्कारिक चालीवरून त्याला दत्वतीरज्जुः असें नामाभिधान मिळालें आहे. सर्पाचा विषारी दंश आणि जमिनींवर सरपटत जात असतांनां हिंवाळ्यांतील त्याची सुप्ति यांचाहि उल्लेख केला आहे. चोर-प्रतिबंधक तोडगा म्हणून सर्पाच्या कातीचा उपयोग करीत असत (अथर्व १. २७). सर्पापासून रक्षण करण्याकरितां आणि त्याचा नाश करण्याकरितां अश्विन् यांनीं पेदूला पैद्व नांवाचा घोडा दिला होता असा ऋग्वेदांत उल्लेख आहे. नकुल हा त्याचा कट्टा शत्रु असून विषघ्न झाडाच्या उपयोगामुळें त्याला विषाची मुळींच भीति नाहीं. मनुष्य त्याला काठीनें किंवा त्याचें डोकें ठेंचून मारतो. सर्पाच्या पुष्कळ जाति दिल्या आहेतः--अघाश्व, अजगर, असित, कंकपर्वन्, करिक्रत, कल्माषग्रीव, कसर्णील, कुम्भीनस, तिरश्चराजि, तैमात, दर्वि, दशोनसि, पुष्करसाद, पृदाकु, लोहिताहि, शर्कोट, श्वित्र, सर्प इत्यादि.

[7]आखु--या शब्दाचा बरोबर अर्थ सांगतां येत नाहीं. त्याचा अर्थ 'चिचुंद्रि' असा असावा असें झिमर म्हणतो, तर त्याचा अर्थ 'उंदीर' आहे असें रॉथचें मत आहे. ऋग्वेद व उत्तरकालीन संहिता यांतहि या शब्दाचा उल्लेख आहे. पिशेल म्हणतो कीं, या शब्दाचा चोर हा लाक्षणिक अर्थ आहे; परंतु हिलेब्रँटला हें मत पसंत नाहीं.

[8]इभ.--हा शब्द संदिग्ध अर्थाचा आहे. तो फक्त संहिता आणि मुख्यत्वेंकरून ऋग्वेद यांतच आढळतो. रॉथ आणि लुडविग् यांच्या मतें या शब्दाचा अर्थ 'आश्रित' असा होतो; आणि

झिमर म्हणतो कीं, या शब्दांत फक्त आश्रित आणि सेवक यांचाच नव्हे, तर राजवंश आणि मोठमोठ्या घराण्यांतील कनिष्ठ शाखेचे तरुण मनुष्य यांचाहि समावेश होतो. पिशेल आणि गेल्डनर यांच्या मतानें त्याचा अर्थ 'हत्ती' असा आहे. या मताला भाष्यकार सायण आणि महीधर यांचाहि पाठिंबा आहे. निरुक्त देखील या शब्दाचा अर्थ 'हत्ती' असाच आहे असें प्रतिपादन करतें. मेगॅस्थेनीस आणि नीआर्कस हे असे सांगत कीं, हत्ती बाळगण्याचा अधिकार फक्त राजासच असे; आणि म्हणूनच तत्साधित इभ्य या शब्दाचा अर्थ 'श्रीमंत' असा असावा.

[९]उपजिव्हिका, उपजीका, उपदीका.—हे सर्व शब्द एकाच अर्थाचे असून ते एका जातीच्या मुंगीचें द्योतक आहेत. अथर्ववेदाप्रमाणें व्याधिप्रतिबंधक गुण ज्या पाण्यांत असतात त्या पाण्यापर्यंत जमिनींत शिरण्याची शक्ति या मुंग्यांना असते; आणि म्हणूनच कोणत्याहि विषाला उतारा म्हणून या मुंग्याचा उपयोग करीत असत. त्या रोगप्रतिबंधक असतात ही जी समजूत आहे ती बहुधा त्यांच्या वारुळाच्या मातीच्या गुणावरून, व त्यांत जें पाणी असतें त्यावरून निघाली असावी.

[१०]उरा.—मेंढया या अर्थी हा शब्द ऋग्वेदांत योजिला आहे. याचा दोन ठिकाणीं उल्लेख आलेला असून त्यांच्यापैकीं एका उल्लेखांत लांडग्यापासून मेंढयांनां भीति असते असें म्हटलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. उरामथि 'अज मारणें' हें लांडग्याचें विशेषण ऋग्वेदांत एकदांच आलेलें आहे; आणि हे दोनहि उल्लेख संहितेच्या एकाच मंडळांत (आठव्या) आलेले आहेत. ही गोष्ट, उरा या शब्दाची उत्पत्ति एखाद्या स्थानिक पोट भाषेमध्यें झालेली असावी असें दर्शवितें.

[११]उष्ट्रि, उष्ट्र.—हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे असावेत. यांपैकीं पहिला क्वचितच उपयोगांत येतो. रॉ आणि आफ्रेबर म्हणतात कीं, ऋग्वेद आणि ब्राह्मणें यांत त्यांचा अर्थ 'वशिंड असलेला पोळ' किंवा 'म्हैस' असा असावा; परंतु रॉथ म्हणतो कीं, वाजसनेयि संहितेंत हा अर्थ थोडा संशयास्पद दिसतो, तेथें या शब्दाचा उंट हा अर्थ असावा; व हापकिन्सनें हाच अर्थ ग्राह्य धरला आहे. हा प्राणी ओझें ओढण्याचें कामीं (चार चार मिळून) उपयोगांत आणीत असत. ऐतरेय ब्राह्मणांत उष्ट्र व गो यांचा एकाच ठिकाणीं उल्लेख असल्यामुळें उंट व बैल हे निरनिराळे प्राणी होते असें ठरतें.

[१२]ऋक्ष.—या शब्दाचा अर्थ 'अस्वल' असा आहे. ऋग्वेदांत फक्त एकच वेळ आणि तदनंतर हा शब्द क्वचितच आढळतो. कारण, वेदकालीन आर्य लोक ज्या देशांत रहात असत तेथें अस्वलें दुर्मिळ असत. सप्त ऋषि या नांवाचा जो तारकापुंज आहे त्याला 'सात अस्वल' हें नांव दिलें आहे. अस्वल हा शब्द अनेक वचनांत फारसा आलेला नाहीं.

[१३]ऋश्य.—या रूपांत हा शब्द ऋग्वेद आणि तदनंतरचें वाङ्मय यांत येतो. अथर्ववेदांत ऋश्य व मैत्रायणी संहितेंत ऋष्य असा हा शब्द आढळतो, पण ऋश्य हेंच रूप बरोबर दिसतें. या शब्दाचा अर्थ काळवीट असा आहे आणि त्याचें स्त्रीलिंग रोहित असें आहे. हरिण सामान्यतः खाड्यांत (ऋश्यद) पकडीत असत. काळवीटाची प्रजोत्पादनक्षमता प्रसिद्ध आहे (आर्श्यशृण्य).

[१४]कपि.—वृषाकपि याच्यासमोर इंद्र आणि इंद्राणी यांच्या संवादांत वृषाकपि 'नर-वानर' अशा संबंधांत हा शब्द एकदां आलेला आहे. वानराचा रंग पिंगट असतो असें तेथें लिहिलें आहे. वानर केंसाळ असून, तो कुत्र्याचा शत्रु आहे असें अथर्ववेदांत म्हटलें आहे. माकडें माणसाळवीत असत असें 'वृषाकपि' सूक्तांतील स्थलावरून आणि तैत्तिरीय संहितेंतील वनवासी मयु याच्या उल्लेखावरून दिसतें

[१५]कशीका.—या प्राण्याचें नांव ऋग्वेदांत एकदां आलें असून भाष्यकार सायण त्याचा अर्थ 'वीजल' असा करितो. फिकच्या मतें केसाळ मांजर व गेल्डनेरच्या मतें नकुली असा याचा अर्थ आहे.

[१६]कुषुंम्भक.—ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत हा विषारी प्राणी होता असें लिहिलें असून, अथर्ववेदांत कुषुम्भक म्हणजे विषाची पिशवी असें म्हटलें आहे. हा प्राणी 'मुंगुस' (नकुल) होय असें सायणाचार्य म्हणतात.

[१७]क्रोष्टृ.—(कोल्हा) शब्दशः याचा अर्थ 'हेल' 'गळा काढून रडणारा' असा आहे. कोल्हा किंवा खोंडक हे रानडुकराप्रमाणें स्वभावतःच भित्रे असतात असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. हा प्राणी शवभक्षक आहे असें अथर्ववेदांत म्हटलें आहे. वाजसनेयि संहितेंत देखील हा शब्द आला असून भाष्यकार शृगाल असें दुसरें नांव देतो.

[१८]ह्विंका.—हिंस्र पक्षी या अर्थानें हा शब्द ऋग्वेदांत एकदां आला आहे. तैत्तिरीय संहितेंतील अश्वमेधीय बळींच्या यादींतहि हा शब्द उल्लेखिला आहे, व तेथें त्याचा अर्थ भाष्यकारांनीं रक्तमुखी वानरी' असा केला आहे.

[१९]गर्दभ.—गाढव. हा घोड्यापेक्षां कमी दर्जाचा असतो असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. तैत्तिरीय संहितेंत देखील तो घोड्याच्या खालच्या दर्जाचा प्राणी आहे, परंतु तो सर्व प्राण्यांत भार वाहण्यांत (भार-भारितम) श्रेष्ठ आहे असें म्हटलें आहे. त्याच ग्रंथांत गर्दभाचा घोडीबरोबर व तसेंच गाढवीबरोबर संयोग होतो म्हणून, त्याला द्विरेतस् 'दुप्पट बीज असणारा' असें म्हटलें आहे. गाढवीच्या पिलाचा ठेंगणेपणा, आणि त्याची बहुभक्षण शक्ति, या दोहींचाहि (तै. सं. ५. १, ५, ५.) उल्लेख केला आहे. त्याच्या अप्रिय ओरडण्याचा उल्लेख अथर्ववेदांत (८. ६, १०.) केला आहे; आणि गाढवाच्या याच गुणामुळें ऋग्वेदांत हें नांव निंदापूर्वक एका गवयाला लाविलें आहे. एका गवयाला शंभर गर्दभ देणगी दिल्याबद्दल वालखिल्य सूक्तांत उल्लेख आहे. खेंचर (अश्वतर) हें गाढव आणि घोडी यांच्यापासून उत्पन्न होतें आणि म्हणून घोडीला द्विरेतस् 'दोन बीजें धारण करणारी' असें म्हटलें

आहे. गाढवाला रासभ असें एक दुसरेंहि नांव आहे. बृहदारण्यक उपनिषद् आणि अथर्ववेद यांत गर्दभी हें नांव आलें आहे.

[२०]गवय.—एका जातीच्या बैलाचें नांव म्हणून हा शब्द ऋग्वेदापासून आला आहे. वाजसनेयि संहितेंत गौर आणि महिष यांच्याबरोबर याचाहि उल्लेख आहे; आणि तेथें जंगली गवयाचा देखील उल्लेख केला आहे.

[२१]त्सरु.—एखाद्या सरपटणाऱ्या प्राण्याचें नांव या अर्थी हा शब्द ऋग्वेदांत आला आहे. उत्तरकालीन ग्रंथांत चमसाची मूठ या अर्थानें हा शब्द आला आहे. अथर्ववेदांत व मागाहून झालेल्या संहिता ग्रंथांत याच अर्थानें हा शब्द नांगराचें (लांगलाचें) वर्णन करतांनां आलेला आहे.

[२२]पदि.—ऋग्वेदामध्यें एकदां हा शब्द आला असून सें. पी. कोशांत म्हटल्याप्रमाणें याचा अर्थ एक प्रकारचा प्राणी असा आहे. यास्काचे मतें याचा अर्थ हलणारा प्राणी असा आहे. पण दुर्गाचार्य याचा अर्थ पक्षी असा घेतो. या लेखाचा संबंध जाळ्यामध्यें (? मुक्षिजा पदि) पकडण्याकडे असूं शकेल.

[२३]पिपील.—या शब्दाचा अर्थ मुंगी असा असून मृतांच्या शरीराचें मांस खाणाऱ्या त्या असतात असें ऋग्वेदांत (१०. १६,६) म्हटलें आहे.

[२४]पुनःसर.—एका भुंकणाऱ्या कुत्र्याचें नांव म्हणून हा शब्द ऋग्वेदांत आला आहे. हा कुत्रा चोराला पाहून भुंकतो असें म्हटलें आहे. या शब्दावरून कुत्रा भुंकतांनां इकडे तिकडे धावत असतो ही जी त्याची संवय तिचा बोध होतो. अथर्ववेदांमध्यें हा शब्द अपामार्ग या वनस्पतीला लाविला आहे; व तेथें त्याचा अर्थ उलट बीज (उलट कांटे ?) असणारी वनस्पति असा आहे.

[२५]पेत्व.—हा शब्द अथर्ववेदांत दोनदां आला आहे. पहिल्या उताऱ्यांत याच्या वाजाचा (बलाचा) उल्लेख आलेला आहे; व त्याचा अर्थ 'सामर्थ्य', 'चपलता' असा आहे. परंतु सरळ अर्थ पाहतां पुरुष हाच अर्थ जास्त योग्य दिसतो. कारण, जननसामर्थ्याचा अभाव नाहींसा करण्यासाठीं असलेल्या मंत्रांत हाच अर्थ योग्य दिसतो. दुसऱ्या ठिकाणीं पेत्वाचा उल्लेख तो घोड्याला जिंकीत असतांनां आला आहे. असल्याच प्रकारचा चमत्कारिक उल्लेख ऋग्वेदांत आला असून तेथें तो सिंहिणीला वश करीत आहे असें लिहिलें आहे. या प्राण्याचा उल्लेख यजुर्वेद संहितेंत अश्वमेध प्रसंगीं बळींच्या यादींतहि आला असून, इतरत्रहि मधून मधून आला आहे. याचा अर्थ एडका असा असावा; या शब्दाचा तैत्तिरीय संहितेंच्या टीकाकारांनीं दुसरा अर्थ दिलेला आहे. परंतु या अर्थासंबंधीं निर्णयात्मक असा कांहीं पुरावा नाहीं. शिवाय, अथर्ववेदांतील 'वाज' शब्द असलेल्या उताऱ्यांतील अर्थाशीं एडका हाच अर्थ नीट जुळता आहे. हॉपकिन्स याचा अर्थ बकरा असा करतो; परंतु असा अर्थ करण्याचें काय कारण असावें तें नीट समजत नाहीं. याचा पित्व किंवा पिद् याशीं काय संबंध आहे, हें अगदीं अनिश्चयात्मक आहे.

[२६]प्लुषि.—हें एका उपद्रवदायक कीटकाचें नांव ऋग्वेदांत आलें आहे. याचा उल्लेख बृहदारण्यक उपनिषदांतहि आला असून यजुर्वेद संहितेंतील अश्वमेधप्रसंगीं द्यावयाच्या बळींच्या यादींत याचा समावेश केला आहे. कदाचित् मुंग्यांचा हा एक प्रकार असावा.

[२७]भुज्यु.—सेंट पीटर्सबर्गच्या कोशांत याचा अर्थ 'साप' असा दिला आहे. हा शब्द ऋग्वेदांत दोन ठिकाणीं येतो. वाजसनेयि संहितेंतहि हा शब्द आढळतो. परंतु त्या ठिकाणीं या शब्दाचा अर्थ काय असावा हें सांगतां येत नाहीं.

[२८]मंडूक.—हें एक बेडकाचें नांव ऋग्वेद व तदनंतरचे ग्रंथ यांत आलें आहे. याचें मंडूकी हें स्त्रीलिंगी रूप सुद्धां ऋग्वेदांत आलें आहे. ऋग्वेदाच्या या प्रसिद्ध ऋचेंत बेडकांची ब्राह्मणाशीं तुलना केली आहे. कारण, पर्जन्यकालाच्या सुरवातीस बेडूक जागत होऊन ड्राव ड्राव करावयास सुरवात करतात. ही ब्राह्मणांची चेष्टा केली आहे असें मॅक्समुल्लर म्हणतो. मॅक्समुल्लर प्रमाणेंच गेल्डनर म्हणतो कीं, ही चेष्टा वसिष्ठ ऋषींनीं आपले प्रतिस्पर्धी जे विश्वामित्र ऋषि त्यांची केली आहे. परंतु सर्व बाजूंनीं विचार करितां पर्जन्यचारुता—पर्जन्यरमणीयता—हा अर्थ करणारांचें मत जास्त सयुक्तिक दिसतें. बेडूक पाण्यांत रहात असल्यामुळें त्यांच्या अंगांत थंडपणाचा गुण जास्त आहे अशी समजूत आहे मृत मनुष्याचें दहन झाल्यावर तेथें बेडकास बोलाविण्यांत येतें (ऋ. १०.१६, १४). हेतु हा कीं, तो बेडूक त्या प्रेतास शांति देईल. त्याचप्रमाणें अथर्ववेदांत बेडकाला तापाचा दाह शांत करण्याकरितां बोलाविलें आहे.

[२९]महिष.—मजबूत. हा शब्द मृग शब्दाबरोबर अगर त्या शब्दाशिवायहि येतो, मृग म्हणजे रानटी पशु; आणि ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांत याचा रेडा असा अर्थ होतो. 'महिषी' हा शब्द मागाहूनच्या संहिता ग्रंथांत येतो.

[३०]मृग.—ऋग्वेदांत आणि तदनंतरच्या ग्रंथांत रानटी पशु या अर्थी हा शब्द येतो. याला कधीं कधीं भीम (भयंकर) हेंहि विशेषण लावितात. इतरत्र म्हशीला महिष (बलवान्) हें विशेषण लाविलेलें आढळतें; व तेंच पुढें म्हैस वाचक नांव झालें. हरिण जातीच्या जनावराचा बोधक म्हणून बहुधा हा शब्द योजितात. इतरत्र उताऱ्यांत रॉथच्या मतें पक्षी असाहि अर्थ होतो.

[३१]मृगहस्तिन.—हात असलेलें जनावर. हा शब्द ऋग्वेदांत हत्ती या अर्थी दोन वेळ समासांत योजिला आहे. यावरून वैदिक काळांतील लोकांनां हत्ती प्रथमच माहित झाला होता याचा तो पुरावा होय असें रॉथ म्हणतो. वैदिक काळच्या लोकांनां हत्ती हा नवीन परिचित प्राणी होता. या मताला पिशेलनें विरोध केलेला

आहे. कारण मृगमहिष आणि मृगसूकर ( अथर्व १२. १, ४८ ) हे शब्द अनुक्रमें म्हैस आणि डुकर या अर्थी योजिलेले आढळतात. परंतु महिष या शब्दानें रॉथच्या मताला दुजोरा येतो. आणि ऋग्वेदांत सूकर असा नुसताच शब्द आढळतो, व मृगसूकर हा अथर्ववेदांत एकाच मंत्रांत वराह शब्दाशीं विरोध दाखविण्याकरितां योजिलेला आढळतो. पुढें हस्ती हें विशेषण हत्ती या जनावराचें नांव बनलें. ऋग्वेदांत हत्तीला मृगवारण ( भयंकर प्राणी ) असेंहि म्हटलेंं आहे. वारण हें विशेषण पुढें हत्तीचेंच नांव बनलें. पाळलेल्या हत्तिणींच्या साहाय्यानें हत्तींनां पकडीत असत असें ऋग्वेदांत वर्णन आलेलें आहे हें पिशेलचें मत चुकीचें आहे.

[31] मेष.— हा शब्द ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथ यांत गेंडा, मेषी, बकरी या अर्थी योजिलेला आढळतो. तसेंच दोन्हीहि शब्द लोंकर या अर्थी योजिलेले आढळतात. विशेषतः त्याचा उपयोग सोमशुद्धीसाठीं केलेला आढळतो. वाजसनेयि संहितेंत रानटी गेंड्याचा उल्लेख आलेला आहे.

[32] लोध.— ऋग्वेदांतील एका दुर्बोध ऋचेमध्यें हा शब्द आलेला आहे. त्याचा अर्थ रॉथच्या मतें एखादा रक्तवर्ण प्राणी असा आहे, तर ओल्डेनबर्गच्या मतें तांबड्या रंगाचा बकरा असा आहे.

[33] लोपाश.—कोल्हा या प्राण्याचें नांव म्हणून हा शब्द बहुधा ऋग्वेदांत आलेला आहे. यजुर्वेद संहितेमध्यें अश्वमेधाचे वेळीं बळी दिले जाणाऱ्या पशूंच्या यादींत या लोपाशाचा उल्लेख आहे.

[34] वम्र व वम्री.—ऋग्वेदांत व तदुत्तरकालीन ग्रंथांत मुंगळा व मुंगी यांचीं नांवें म्हणून हे दोन्ही शब्द आले आहेत. यांचा वाळवी असाहि अर्थ क्वचित् असतो.

[35] वम्रक.—ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आलेला असून त्या ठिकाणीं त्याचा अर्थ मुंगी असा असावा असें रॉथचें मत आहे. पण पिशेलचें मत भिन्न आहे. तो म्हणतो कीं, हा शब्द विशेषनाम असावा व कदाचित तो वम्र या अर्थी असावा; आणि त्याचा अर्थ मुंग्यांनीं खाण्याच्या यातनेपासून ज्याची सुटका झाली, अशा एका कुमारिकेचा मुलगा असा असावा. सायणाचें हेंच मत आहे.

[36] वराह.—हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ यांमध्यें आलेला आहे. 'स्वर्गातला वराह' असें रुद्राचें वर्णन आलें आहे. वराहाची शिकार करतांनां कुत्र्यांचा उपयोग करण्याच्या चालीचा उल्लेख एकदां ( ऋ. १०. २६, ४ ) आलेला आहे. त्याच शब्दाचा पर्याय 'वराहु' हा शब्द देवादिकाविषयीं अलंकारिक रीतीनें बोलण्याशिवाय कोठेंहि आलेला नाहीं.

[37] वारण.—ऋग्वेदांत दोन ठिकाणीं; रॉथ यानें हा शब्द मृगाचें विशेषण आहे असें गृहीत धरून त्यानें जंगली जनावर असा त्याचा अर्थ केला आहे. परंतु ग्रंथांतरीं स्वीकारलेला हत्ती हा नेहमींचा अर्थच येथेंहि घेतला पाहिजे असें दिसतें. अथर्ववेदामध्यें वारणी हा स्त्रीलिंगी शब्द 'हत्तीण' या अर्थानेंच आलेला आहे.

[38] वृक.— ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत देखील हा शब्द वारंवार येतो. मेंढ्या, बकरीं, वासरें व मनुष्यें यांचाहि हा शत्रु होता. याचा रंग तांबडा ( अरुण ) आहे असें म्हटलेलें आहे. ऋग्वेदामध्यें वृकी या शब्दाचाहि वारंवार उल्लेख आलेला आहे.

[39] वृश्चिक.—ऋग्वेद आणि अथर्ववेद यांमध्यें याचा अर्थ विंचू असा आहे. याच्या विषाबद्दल सर्पाच्या विषाप्रमाणें लोकांनां भय वाटत असे. हा हिंवाळ्यांत पृथ्वीवर निचेतन पडतो असें वर्णन ( अ. वेद १२. १, ४६ ) आहे.

[40] वृषारव.—'बैलाप्रमाणें ओरडणारा' असा या शब्दाचा अर्थ आहे. ऋग्वेदामध्यें हें एका प्राण्याचें नांव आहे. शतपथ ब्राह्मणांत हा शब्द द्विवचनीं आहे व त्याचा अर्थ ठोकणी किंवा टिपरी असा आहे.

[41] शश.—'ससा' हा शब्द ऋग्वेदामध्यें एकदां आलेला आहे, व त्यांतच या शशानें एक दांत किंवा वस्तरा गिळल्याचा उल्लेख आलेला आहे. मागाहून झालेल्या ग्रंथांतहि या प्राण्याचा प्रसंगानें उल्लेख आलेला आहे.

[42] शिंशुमार, शिशुमार.—जलचर प्राण्याचें नांव म्हणून हा शब्द ऋग्वेद व तदुत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें आला आहे. हा प्राणी म्हणजे एक तर मकर असावा किंवा गाधा मासा असावा.

[43] श्वान.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें याचा अर्थ कुत्रा असा आहे व याचें स्त्रीलिंगी रूप शुनी असें आहे. कुत्रा हा माणसाळलेला प्राणी असे व तो चोर किंवा इतर बाहेरचे लोक यांपासून घराचें संरक्षण करी. वराहाची शिकार करतांना त्याचा उपयोग होत असे; पण सिंहापुढें त्याचा टिकाव लागत नसे. वालखिल्य सूक्तांमध्यें दानस्तुतींत शंभर कुत्र्यांच्या देणगीचा उल्लेख आला आहे. इतर ठिकाणीं या कुत्र्याविषयीं असा उल्लेख आलेला आहे कीं, तो गलिच्छ असल्यामुळें यज्ञांतल्या बळीला अयोग्य आहे, व यज्ञमंडपांतून त्याला हांकून देण्यांत येत असे. कुत्र्याचें मांस अगदीं निर्वाणीचे वेळीं खावयाचें असे. मेजवानीचे वेळीं जनावर कापून त्याचें मांस खाल्ल्यावर जीं हाडें उरत तीं कुत्र्यास चघळण्यास दिलीं जात असत. ( अथर्व ६. ३७, ३ ). ऋग्वेदांत एका दंतकथेमध्यें गायींचा शोध करणाऱ्या इमानी कुत्रीचा म्हणजे सरमेचा उल्लेख आलेला आहे. रुद्राला यजुर्वेदामध्यें श्वपति असें म्हटलेलें असून त्याच संहितेंत पुरुषमेधाचे वेळीं बलिदानास योग्य अशा प्राण्यांच्या यादींत श्वानाचा ( कुत्र्याचा रक्षक ) उल्लेख आलेला आहे. कांहीं ग्रंथांत चतुरक्ष ( चार डोळ्यांच्या ) कुत्र्यांचा उल्लेख आलेला आहे तो काल्पनिक आहे हें उघड आहे.

[44] सारमेय.—'सरमेचा वंशज.' एका पौराणिक कथेंतल्या इंद्राच्या कुत्र्याचें हें नांव असून ऋग्वेदामध्यें पृथ्वीवरील कुत्र्याला व यमाच्या कुत्र्यालाहि हें नांव दिलेलें आहे.

[४५]सालावृक.—ऋग्वेदामध्यें हा शब्द दोनदां आला असून याचा अर्थ तरस किंवा रानकुत्रा असा आहे. इंद्रानें यतींचा नाश केल्याविषयींची कथा तैत्तिरीय संहितेंत आली असून त्या कथेंत हाच अर्थ बरोबर जुळतो. त्या कथेंत असें म्हटलें आहे कीं, इंद्रानें या यतींनां सालावृकांच्या तोंडांत दिलें. याच सालावृक शब्दाचा सालावृकेय हा दुसरा पाठ आहे; व त्याचा अर्थ सालावृकाचा वंशज असा आहे. या शब्दाचें स्त्रीलिंगी रूप सालावृकी असें असून त्याचा उल्लेख तै. सं. तेंत आला आहे.

[४६]सिंह.—ऋग्वेदांत व तदुत्तरग्रंथांत याचा अर्थ सिंह असा आहे. सिंहाच्या गर्जनेचा ( नद् ) नेहमीं उल्लेख आलेला आहे; व या गर्जनेला स्तनाथ असें नांव आहे. हा नेहमीं भटकत असतो ( कुचर ), डोंगरांत राहतो ( गिरिस्थ ); व हा ठार मारणारा भयंकर वनपशु आहे ( मृगो भीम उपहत्नुः ). याची व रुद्राची तुलना केली आहे. पाण्यांत शिरणाऱ्या अग्नीची जेव्हां सिंहाशीं तुलना केलेली असते तेव्हां पाणी पिण्याच्या जागेमध्यें जनावरांवर उडी घालण्याच्या सिंहाच्या संवयीचा उल्लेख केला असावा. कोल्ह्यानें सिंहाचा पराभव करावा हें चमत्कारिक आहे असेंहि वर्णन आलेलें आहे. मनुष्यांनां सुद्धां त्याची भयंकर भीति वाटल्यामुळें ते त्याला पिंजऱ्यांत ठेवीत. त्याला पकडण्याकरितां लोक दबा धरून बसत व शिकारी लोक त्याची शिकार करीत अशींहि वर्णनें आलेलीं आहेत. कुत्र्यांनां सिंहाचें भय वाटे. सिंहीण ही सुद्धां तिच्या शौर्याबद्दल प्रसिद्ध आहे. सुदासाच्या शत्रूविरुद्ध त्याला जी इंद्रानें मदत केली तिची तुलना मेंढ्यानें ( पेत्व ) सिंहिणीच्या केलेल्या पराभवाशीं केली आहे. मनुष्यावर हल्ला करतांनां सिंहीण आपले जबडे उघडते याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत आलेला आहे. यजुर्वेद संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत सिंहिणीचा उल्लेख आलेला आहे.

[४७]सूकर.—हा शब्द ध्वन्यनुकारी असावा असें दिसतें. पण हा शब्द फार प्राचीन असून तो इंडो-यूरोपीय कालांतील असावा.लॅटिन भाषेतल्या[सुक्युलस]लहान डुकर या शब्दाशीं सदृश असून व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्याहि याचा अर्थ बदलला आहे. हा शब्द ऋग्वेदांत व तदुत्तरग्रंथांत आलेला आहे. मृग या शब्दाबरोबर हा शब्द अथर्ववेदांतहि आलेला आहे; आणि हे दोन्ही शब्द मिळून त्यांचा अर्थ रानडुकर असा होतो.

[४८]हरिण.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें याचा अर्थ एक प्रकारचा काळवीट असा आहे. हा फार जलद चालणारा व भय उत्पन्न करणारा म्हणून प्रसिद्ध आहे. याच्या शिंगाचा मंतरलेल्या तोडग्याप्रमाणें उपयोग होतो. याला यव खाण्याचा फार नाद आहे. मैत्रायणी संहितेमध्यें तो स्वज म्हणजे सर्पांनां ठार मारतो असें याचें वर्णन आलेलें आहे. या शब्दाचें स्त्रीलिंगी रूप हरिणी असें आहे.

[४९]हस्तिन्.—हात असलेला असा याचा मूळचा अर्थ असून मृग म्हणजे जनावर या शब्दानें युक्त हस्ति अशा अर्थानें हा शब्द ऋग्वेद, अथर्ववेद आणि यजुर्वेद यांमध्यें आलेला आहे. पुढें पुढें नुसत्या हस्तिन् या विशेषणाचाच हत्ती असा अर्थ होऊं लागला. या प्राण्याची त्याच्या सामर्थ्याबद्दल व जननशक्तीबद्दल प्रसिद्धि होती. या जनावराचा उल्लेख मुखानें जिन्नस उचलणाऱ्या प्राण्यांच्या उलट माणूस व माकड या हातानें उचलणाऱ्या प्राण्यावरोवर आलेला आहे. हस्तिप या शब्दावरून तो माणसाळलेला प्राणी होता हें स्पष्ट आहे.असे माणसाळलेले हत्ती दुसरे हत्ती पकडण्याच्या कामीं उपयोगी पडत. पण या हत्तींचा लढाईचे कामीं उपयोग होत असल्याबद्दलचा उल्लेख नाहीं. तरी पण क्तेसियस व मेगॅस्थिनीस यांनीं हे हत्ती त्यांच्या वेळीं उपयोगांत आणले जात असें म्हटलें आहे. हत्तींनां डांसांपासून उपद्रव होई असें अथर्ववेदांत म्हटलें आहे.

[५०]कक्कट.—हा शब्द यजुर्वेद संहितेंत ' खेंकडा ' याचा दर्शक असून कर्कट याचें हें प्राकृत रूप आहे; व उत्तर वाङ्मयांत कर्कट हा सर्वसाधारण शब्द आहे. तथापि रॉथ म्हणतो कीं, त्याचा अर्थ पक्षी असा आहे. आणि ककर याच्याशीं त्याचें साम्य आहे.

[५१]कश्यप—अथर्ववेद आणि तदुत्तर ग्रंथ यामध्यें हा शब्द वारंवार येतो व त्याचा अर्थ ' कूर्म, कच्छप ' असा आहे.

[५२]कुलीकय.—हें रूप तैत्तिरीय संहितेंत एका प्राण्याच्या नांवाचें आहे; आणि महीधर यानें आपल्या टीकेंत स्पष्टीकरण दिलें आहे त्यावरून हें एका माशाचें नांव असावें असें दिसतें. याचें वाजसनेयि संहितेंतील नांव कुलीपय आणि अथर्ववेदांतील कुलीकय असें असून, या नांवाचा परिचय नसल्यामुळें बोलतां बोलतां कदाचित् अपभ्रंश झाले असावे.

[५३]कूर्म.—याचा अर्थ कांसव. उत्तरकालीन संहिता आणि ब्राह्मण यांत हा शब्द पुष्कळ वेळां आला असून त्याच्या स्वाभाविक धर्माबद्दल कांहींच लिहिलेलें नाहीं.

[५४]कृमि.—' कीटक. ' ऋग्वेदोत्तर संहिता आणि अथर्ववेद यांत कीटकांचा बराच उल्लेख आला आहे.ते विषारी असतात; पर्वत, वनें, पाणी, झाडें व मनुष्यदेहांत देखील ते असतात. मनुष्य आणि प्राणी यांच्या रोगाचीं कारणें हे कृमी होत अशी सार्वत्रिक समजूत असे. अथर्ववेदांत या कृमींनां प्रतिबंधक उपाय म्हणून तीन सूक्तें आहेत. पहिलें सूक्त सर्वसाधारण आहे. दुसरें गुरांमधील कृमींचा नाश करण्याचे उपाय शिकवितें; आणि तिसरें मुलांनां कीटकांपासून कसें बरें करावें हें सांगतें. मनुष्यामध्यें कीटकांची राहण्याची जागा म्हणजे डोकें आणि बरगड्या आणि नंतर तेथून डोळे, नाक आणि दांत. त्यांचा रंग काळसर पिंगट असून, शरीराचा पुढचा भाग पांढरा, काळे कान आणि तीन डोकीं असतात. त्यांचीं विशिष्ट नांवें बरींच आहेत:—अलाण्डु, एजत्क, कषूकण, कीट, कुरूरु, नीलंगु, येवाष, वघ्र, वृक्षसर्पी शलुन, शवर्त, शिपविलुक व स्तेग.

[५५]गोधा.—या शब्दाचा अर्थ लुडविग आणि वेबर यांच्या मताप्रमाणें ' मगर ' असा असावा; कदाचित् रॉथ आणि झिमर म्हणतो त्याप्रमाणें मोठा सरडा किंवा पाल.असाहि असावा. अथर्ववेदांतहि बहुतकरून याचा अर्थ प्राणीच असावा.

५६ जष.—जष हें नांव एका जलचराचें किंवा माशाचें म्हणून अथर्ववेद व तैत्तिरीय संहिता यांमध्यें आलेलें आहे. तै. संहितेवरील भाष्यांत जष म्हणजे मकर हा प्राणी असावा असें म्हटलें आहे. हा शब्द गोपथ ब्राह्मणांतहि आलेला आहे.

५७ मुश्कर.—रॉथच्या मताप्रमाणें लहान जनावर किंवा कीटक या अर्थी हा शब्द अथर्ववेदांतल्या एका उताऱ्यांत आला आहे; परंतु हा उतारा अशुद्ध आहे असें त्याचें मत आहे. पैप्पलाद संहितेंत पुष्करम् हा पाठ बरोबर आहे असें ब्लूमफील्ड म्हणतो. तै. संहितेंत मुश्कर याचा अर्थ अश्वमेधांतील पशु असा आहे.

५८ वृषदंश.—या शब्दाचा अर्थ बळकट दांतांचा असा आहे. यजुर्वेद संहितेमध्यें एका मांजराचें नांव म्हणून हा शब्द आला असून याचा उल्लेख अश्वमेध यज्ञाच्या वेळीं बळी दिल्या जाणारांच्या यादींत आहे. पंचविंश ब्राह्मणांतहि याचें नांव आहे. या ब्राह्मणांत याच्या शिकेचा उल्लेख आहे. यावरून हें मांजर माणसाळलेलें होतें असें सिद्ध होतें. गेल्डनेर म्हणतो कीं, अथर्ववेदांतील एका सूक्तांत विचित्र विशेषणांनीं ज्याला संबोधिलें आहे तो प्राणी बहुतेक घरांतलि मांजर असावा. त्या विशेषणांपैकीं एक विशेषण म्हणजे वृषदती हें आहे. पण व्हिट्नें गेल्डनरच्या या मताविरुद्ध आहे.

५९ शयण्डक.—तैत्तिरीय संहितेमध्यें हें एका प्राण्याचें नांव आहे; पण मैत्रायणी व वाजसनेयि संहिता यांत हें नांव शयंदक असें लिहिलेलें आहे. रॉथचे मतानें याचा अर्थ एक प्रकारचा पक्षी असा असावा; पण तैत्तिरीय संहितेवरील टीकाकार याचा अर्थ कृकलास म्हणजे सरडा असा करतो.

६० अश्वतर, अश्वतरी.—हीं खेंचराचीं पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी अनुक्रमें नांवें आहेत. अथर्ववेद आणि तदुत्तर ग्रंथ यांत या प्राण्यांचा बराच वेळ उल्लेख केलेला आहे. यांची उत्पत्ति कमी असे म्हणून यांनां घोड्यापेक्षां कमी दर्जाचे मानीत असत. परंतु खेंचरांच्या गाड्या सर्वसाधारण प्रचारांत होत्या.

६१ आशुंग.—अथर्ववेदाप्रमाणें कोणतातरी प्राणी असावा. याचीं विशेषणें ‘ तरुण, ’ ‘ बालक ’ ( शिशुक ) हीं आहेत. यावरून रॉथ म्हणतो कीं त्याचा अर्थ एक पक्षी ( जलद उडणारा ), अथवा ‘ आपल्या आईकडे जाणारें शिंगरूं ’ असाहि असावा. सायण त्या विशेषणाचा अर्थ शुशुक म्हणजे प्राणी असा करिता. ब्लूमफील्ड या दोन शब्दांचें भाषांतर ‘ जलद शिंगरूं ’ ‘ आशुंग ’ ‘ शिशुक ’ असें करितो.

६२ उपक्कस.—अथर्ववेदांत याचा बीजाला उपद्रव देणारा प्राणी असा उल्लेख आहे. तथापि सायण तो शब्द अनेकवचनी विशेषण ( अपक्कसः = अदग्धाः ) असा घेतो, परंतु पैप्पलादशाखीय संहितेंत उपक्कसः असेंच आहे.

६३ कुरीरिन्.—(‘ कुरीर असलेला ’). हा अथर्ववेदांतील एका संदिग्ध अथवा द्व्यर्थी उताऱ्यांत असून त्याचा एक तर ‘ शेंडी असलेला प्राणी,’—कदाचित् झिमरच्याप्रमाणें ‘मोर’—असें नाम अथवा अज ‘ बकरा ’ याचें विशेषण, अशा अर्थी त्या शब्दाचा ‘ शृंगी ’ असा अर्थ होईल. परंतु दुसऱ्या अर्थांत शब्दाचा अलंकारिकरीत्या उपयोग असावा असें मानणें सयुक्तिक दिसतें. पंचविंश ब्राह्मणांत ओपश हा शब्द गुरांचीं शिंगें या अर्थी उपयोगांत आणिला आहे, यावरून कुरीर म्हणजे ‘ शिंग ’ हें जें गेल्डनेरचें मत आहे, त्याचा स्वीकार करणें जरूर दिसत नाहीं.

६४ जगत्.—( हालणारा, चल ) हा शब्द कधीं कधीं अथर्ववेदामध्यें व पुढील ग्रंथांत पाळलेल्या जनावरांस ( जीं श्वापदें रानटीं नव्हेत त्यानां ) लावलेला आहे. कधीं कधीं जगत् या शब्दानें गाईखेरीज इतर सर्व पाळलेल्या जनावरांचा बोध होत असे.

६५ पिपीलिका.—अथर्ववेद व मागाहूनच्या ग्रंथांत याचा मुंगी असा अर्थ आहे. या शब्दावरून मुंगीची लहान जात असा जो मागाहूनच्या कोशांत अर्थ दिला आहे तो खरा नाहीं. मात्र यावरून मुंगीच्या लहान आकाराचा बोध होतो व तो अल्पार्थवाचक पिपीलिका या शब्दावरून व्यक्त होतो. हें रूप छांदोग्य उपनिषदांत आलें आहे.

६६ पुरीकय.—अथर्ववेदामध्यें एका जलचर प्राण्याचें हें नांव आलें आहे. व हें नांव म्हणजे मैत्रायणी संहितेमध्यें आलेल्या पुलीकयाचें, वाजसनेयि संहितेमध्यें आलेल्या कुलीपयाचें व तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें आलेल्या कुलीकयाचें अन्यरूप आहे. हा कोणता प्राणी होता हें समजत नाहीं.

६७ व्यद्वर.—‘ भोंक पाडणारा. ’ अथर्ववेदामध्यें एका ठिकाणीं हें एका किड्याचें नांव आलेलें आहे. या ठिकाणीं व्यध्वर असा पाठ असावा असें कांहीं पंडितांचें मत आहे. व्हिट्नेचें असें मत आहे कीं या शब्दाचा संबंध वि-अध्वन याच्याशीं असून व्यधू ‘ भोंक पाडणें ’ याच्याशीं नसावा. हिरण्यकेशी गृह्यसूत्रामध्यें हा शब्द मशकाबरोबर आलेला आहे. त्याचप्रमाणें तो अथर्ववेदाच्या दुसऱ्या एका स्थलींहि आला असावा व येथें शंकर पंडित व व्हिट्ने यांच्या मतें हा शब्द व्यद्वर असाच असावा.

६८ व्याघ्र.—हा शब्द ऋग्वेदांत कधीं आलेला नाहीं पण अथर्ववेदांत वारंवार आलेला आहे, त्याचप्रमाणें सिंह हा शब्दहि आलेला आहे. यावरून रास्त असें अनुमान काढतां येईल कीं, ज्या वेळीं वैदिककालचे आर्य लोक बंगाल प्रांताजवळ येऊन आंत शिरले त्या वेळीं अथर्ववेद लिहिला गेला असावा. मागाहून झालेल्या ग्रंथांत व्याघ्र हा शब्द अगदीं प्रचारांतला झाला. तैत्तिरीय संहितेंत निजलेल्या वाघाला डवचून जागें केल्यावर उत्पन्न होणाऱ्या भयाचा उल्लेख आलेला आहे. या जनावराच्या जीवनाशक स्वभावाचाहि वारंवार उल्लेख आलेला आहे. त्याचप्रमाणें तो पुरुआद म्हणजे मनुष्यभक्षक असल्याचेंहि वर्णन आलेलें आहे.

सिंहाप्रमाणें वाघहि शक्तिमान् गणला गेलेला आहे. कारण राजसूय यज्ञाचे वेळीं राजाला वाघाचें सामर्थ्य यावें म्हणून त्याच्या चर्मावर पाय ठेवावा लागतो.

[६९] श र भ.—अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यांत एका रानटी जनावराचें हें नांव आलेलें आहे. उत्तरकालीन काव्य-ग्रंथांत हा एक काल्पनिक आठ पायांचा, हिमाच्छादित डोंगरांत रहाणारा आणि सिंह व हत्ती यांचा शत्रु असलेला पशु आहे. महीधर टीकाकार याच्या मतानें वाजसनेयि संहितेमध्यें या शब्दाचा हाच अर्थ आहे; पण तो असा अर्थ करण्याचें कारण देत नाहीं. हा प्राणी बकऱ्याप्रमाणें असतो असेंहि एके ठिकाणीं म्हटलें आहे. कदाचित्, हा प्राणी एक प्रकारचा हरिण असावा असें वाटतें.

[७०] श र्को ट.—अथर्ववेदामध्यें एका प्राण्याचें हें नांव आलेलें आहे. हें नांव रॉथ व झिमरचे मतानें सापाचें आहे व ग्रिल, हेनरी व ब्लूमफील्ड यांच्या मतानें विंचवाचें असावें.

[७१] श श यु.—'सशाचा पाठलाग करणारा.' अथर्व वेदामध्यें एका प्राण्याचें ( मृगाचें ) हें विशेषण आहे. झिमर म्हणतो कीं, या शब्दाचा अर्थ वाघ असा असावा पण हें शक्य दिसत नाहीं. रॉथचे मतानें एखादा हिंस्र पशु असा याचा अर्थ असावा. व्हिटने, भाष्यकाराच्या मतास अनुसरून या शब्दाचा अर्थ 'लपून बसणारा' असा करितो.

[७२] शा रि शा का.—अथर्ववेदामध्यें एके ठिकाणीं हा संदिग्ध अर्थाचा शब्द आलेला आहे. वेबरच्या मतें याचा अर्थ शारि पक्ष्याची विष्ठा असा आहे. ग्रिलच्या मतें याचा अर्थ 'छपविलेला कावळा' हा आहे. रॉथ 'सारिः = शालिः शक इव' अशी दुरुस्ती सुचवून त्याचा अर्थ 'खत घातलेल्या साळीप्रमाणें' असा करितो. ब्लूमफील्ड 'शारिःशुकेव' हा पाठ स्वीकारून त्याचा अर्थ सारिका व शुकासारिखा असा करतो.

[७३] शि शू क.—अथर्ववेदामध्यें हें विशेषण आलेलें असून त्याचा अर्थ 'तरुण' असा आहे. पण ब्लूमफील्ड असें म्हणतो कीं, याचा अर्थ घोड्याचें शिंगरूं असा आहे. सायण म्हणतो कीं, हा शब्द शुशुक असा आहे व त्याचा अर्थ शुशुक नांवाचें रानटी जनावर असा आहे.

[७४] स मं क.—अथर्ववेदामध्यें दोन ठिकाणीं संदिग्ध अर्थाचा हा शब्द आलेला आहे. ब्लूमफील्ड, याचा अर्थ एके ठिकाणीं आंकडा असा करितो व दुसरे ठिकाणीं धान्याचा नाश करणारा किडा असा करितो.

[७५] ऱ्हू डु.—अथर्ववेदामध्यें तक्मन् (ज्वर) याला हा शब्द लावलेला असून याचा अर्थ अस्पष्ट आहे. हा शब्द ऱ्हुड, ऱ्हूडु, रूडु वगैरे तऱ्हेनें लिहिलेला आढळतो. पैप्पलाद संहितेंत हुडु असा शब्द आला असून त्याचा अर्थ एडका किंवा मेंढा असा आहे. हेनरीचे असें अनुमान आहे कीं, हा शब्द हरूडु (प्रोटोसेमिट्रिक) सोनें, (असुरियन हुरकू व हिब्रू हरूक) ह्या शब्दांशीं सदृश आहे. याच्या उलट हेल्व म्हणतो कीं ग्रीक भाषेंतल्या हिरवट पिंवळा या अर्थाच्या शब्दाशीं याचें साम्य आहे. पण या दोन्ही कल्पना असंभाव्य आहेत. वेबरच्या मतानें याचा अर्थ 'पायांत येणारा गोळा' असा असावा.

[७६] श ल्य क.—वाजसनेयि संहिता व उत्तरकालीन ग्रंथ यामध्यें या शब्दाचा अर्थ साळ असा आहे. ऐतरेय ब्राह्मण ३. २६, ३ या ठिकाणीं जो शल्यक शब्द आहे त्याचा अर्थ तेथें साळ किंवा सायाळ असाच आहे. हा विशिष्ट प्राणी कशा प्रकारचा असतो याचें वर्णन सायणानें आपल्या भाष्यांत पुढीलप्रमाणें दिलें आहे. 'यस्य मृगस्य पुच्छसमीपे बहवो रोम विशेषाः प्रादेशपरिमितास्तीक्ष्णाग्रा लोहमया उत्पद्यन्ते स शल्यकः'

[७७] क कु ठ.—मैत्रायणी संहितेंत हा शब्द आला असून त्याचा अर्थ एक प्रकारचा प्राणी असा असावा. बोथलिंग याच्या मताप्रमाणें तो प्राणी आणि कक्कट हे एकच आहेत.

[७८] ख ड् ग.—मैत्रायणी संहितेंत हें एका प्राण्याचें नांव आहे आणि वाजसनेयि संहितेंत खंग आणि खड्ग असे पाठ आहेत. बहुतकरून गेंडा असा याचा अर्थ असावा. शांखायन श्रौतसूत्रांत गेंड्याच्या कातड्याचा उपयोग रथाच्या आच्छादनाकडे करीत असत असा उल्लेख आहे.

[७९] धे नु ष्ट री.—काठकसंहितेमध्यें व मैत्रायणी संहितेमध्यें [ ३. ५, ४ ] जी दूध देईनाशी झाली आहे अशी गाय असा याचा अर्थ आहे.

[८०] आ शी वि ष.—ऐतरेय ब्राह्मणांत फक्त एकदांच याचा उल्लेख आलेला आहे आणि त्याचा अर्थ रॉथच्या मताप्रमाणें एका जातीचा सर्प असा आहे. बहुतकरून 'आशीमध्यें विष असणारा' असा असावा.

[८१] इं द्र गो प.—[ इंद्र रक्षित ] 'पुल्लिंगी.' हें नांव बृहदारण्यक उपनिषदांत [ २. ३, ६ ] किरमिजी रंग ज्याचा करितात तो कृमि या अर्थानें आलें आहे.

[८२] ए ड क.—शतपथ आणि जैमिनीय ब्राह्मणांत याचा नाठाळ एडका असा अर्थ आहे.

[८३] ख र.—'गर्दभ.' ऐतरेय आरण्यकांत एका गर्दभाच्या टोळीचा उल्लेख आहे. यज्ञपात्रें ज्या ओव्यावर ठेवीत असत त्याचा आकार लंबकर्णाच्या आकारासारखा असल्यामुळें शतपथ ब्राह्मणांत त्या ओव्याला हा शब्द आला असेल.

[८४] ग ज.—आर्ष काव्यें आणि उत्तरकालीन संस्कृत काव्यग्रंथ यांत न आलेला हा हत्तीबद्दल शब्द उत्तरकालीन ब्राह्मणांत सांपडतो.

[८५] गो–मा यु.—'गायीसारखें हंबरणें'. उत्तरकालीन अद्भुत ब्राह्मणापर्यंत हें 'खोंकड, कोल्हा' याचें नांव आलेलें नाहीं.

[८६] चि ल्व टी.—हें एका अप्रसिद्ध जनावराचें नांव गोपथ ब्राह्मणांत आलेले आहे. हा कोणता प्राणी हें समजत नाहीं.

[87]झ ष.— शतपथ ब्राह्मणांत सांगितलेल्या मनूच्या कथेंत हा शब्द आलेला आहे, व त्या ठिकाणीं त्याचा अर्थ ‘महामत्स्य’ असा भाष्यकाराच्या मतानें आहे. एगलिंगच्या मतानें सशृंग मत्स्य हा अर्थ असावा; कारण तैत्तिरीय संहितेंत त्याला गाईचें स्वरूप दिलेलें आहे. व याच कल्पनेवरून जुन्या दंतकथेच्या पुढें बनलेल्या रूपांत सशृंग मत्स्याची कल्पना आली असावी असें तो म्हणतो.

[88]द क्षि णा पृ ष्टि.—याचा अर्थ उजवे बाजूकडील घोडा असा आहे. शतपथ ब्राह्मणांत आलेल्या दोन उल्लेखांवरून असें दिसतें कीं, एके काळीं रथाला चार घोडे जुंपीत असत: पैकीं उजव्या व डाव्या बाजूला एक एक घोडा असे मध्यें असत व एक एक बाजूला पण जूंला न जुंपलेले दोन मोकळे घोडे, असे ठेवण्याची चाल होती.

[89]दु र्व रा ह.—याचा अर्थ बहुतकरून रानटी डुकर असा आहे. शतपथ ब्राह्मण व जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण यांमध्यें या शब्दाचा उल्लेख आलेला आहे.

[90]ना ग.–शतपथ ब्राह्मणांत महानाग या रूपांत हा शब्द आला आहे व तेथें त्याचा अर्थ मोठा हत्ती किंवा मोठा सर्प असा आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्यें व ऐतरेय ब्राह्मणांत आलेल्या उताऱ्यांत हत्ती असा अर्थ स्पष्ट दिसतो. सूत्र ग्रंथांत प्राचीन काल्पनिक नाग याचा उल्लेख अगोदरच आलेला आहे.

[91]नि वा न्य व त्सा व नि वा न्या.—शतपथ ब्राह्मणांत हे शब्द आलेले असून त्यांचा अर्थ जिचें पाहिलें वासरूं मेलेलें आहे व या मृत वासराच्या बदली ठेवलेल्या दुसऱ्या वासरावर जिचें प्रेम बसावयाचें आहे अशी गाय, असा आहे. निवान्यवत्साप्रमाणेंच अभिवान्यवत्स, अभिवान्या, वान्या व अपिवान्यवत्सा असे इतर शब्द आहेत.

[92]पू र्वा.—हा शब्द घोड्यांनां (अश्वांस) लावलेला आहे. त्याचा उपयोग तैत्तिरिय ब्राह्मण व नंतरचे ग्रंथ यांत केलेला आढळतो. त्याचा ‘नेता’ म्हणून पुढें जुंपलेला घोडा, किंवा नुसता पाहिल्याच वेळेस रथ ओढणारा घोडा असा अर्थ तैत्तिरीय ब्राह्मणांत भाष्यकार घेतात.

[93]प्र यो ग्य.—छांदोग्य उपनिषदांत (८.१२,३) याचा अर्थ ‘गाडीला जुंपलेला प्राणी’ ‘वाहतुकीचें जनावर’ असा आहे

[94]मं था व ल.—ऐतरेय ब्राह्मणांत हें एका प्राण्याचें नांव आलें आहे. सेंटपीटर्सबर्ग कोशाप्रमाणें हें एका सर्पाचें नांव आहे. सायणमतानें हें खालीं डोकें वर पाय करून झाडास लोंबणाऱ्या अशा एका प्राण्याचें बहुधा वटवाघुळाचें नांव आहे.

[95]वा ह नं.—(नपुंसकलिंगी). ब्राह्मण ग्रंथांत याचा अर्थ ओझें वाहणारें जनावर व कधीं कधीं गाडी असा आहे.

[96]श फ.—ब्राह्मण ग्रंथांत हें एका लांकडी हत्याराचें (द्विवचनी) नांव आलें आहे. हें चिमटयाप्रमाणें चुलीवर भांडें उतरण्यास सोयीचें असतें. याला शफ हें नांव पडण्याचें कारण तें गाईच्या पसरलेल्या खुराप्रमाणें दिसतें.

[97]शा क ल.—ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द आला असून याचा अर्थ सेंटपीटर्सबर्ग कोशांत शाकल्याची विद्या असा दिलेला आहे. पण बोथलिंगचा अर्थ–एक प्रकारचा सर्प–हाच बरोबर दिसतो.

[98]स्ना व न्य.— हा शब्द अनेकवचनी आलेला असून तैत्तिरीय आरण्यकांत (७,२३,१) घोड्याच्या शरीराचे विशिष्ट भाग असा याचा अर्थ आहे.

[99]उ भ या द त्.—‘दोन्ही जबड्यांमध्यें छेदक दांत असलेला.’ हा शब्द घोडा, गाढव इत्यादि पाळीव जनावरांनां, बकरे मेंढे आणि इतर जनावरें यांमध्यें फरक दाखविण्याकरितां योजिला आहे. हा फरक ऋग्वेदांतील उत्तरकालीन सूक्तांत आणि बरेच वेळां उत्तरकालीन संहिता व ब्राह्मणें यांतहि केला आहे. तैत्तिरीय संहितेंत एका ठिकाणीं मनुष्य आणि घोडा यांची बरोबरी केली आहे. उभयादत् या शब्दाच्या विरुद्ध अन्यतोदत् ‘एकाच बाजूस दांत असलेला’ हा शब्द गुरेंढोरें यांनां लावितात. यांनां आठ दांत असतात आणि ते फक्त खालच्या जबड्यांतच असतात. अथर्ववेदांत गर्दभाला उभयाद असें म्हटलें आहे. तथापि अथर्ववेदांतील एका वचनांत हा शब्द एडका याचें विशेषण म्हणून योजिला आहे. परंतु ज्याप्रमाणें ऋग्वेदांत एडका एका सिंहिणीला मारतो या चमत्काराचा उल्लेख आहे त्याप्रमाणेंच हा शब्द येथें एका चमत्कारिक अर्थानें उपयोगांत आणिला आहे. ब्लूमफील्ड म्हणतो कीं, अथर्ववेदांत दुसऱ्या एका ठिकाणीं याचा घोडा असा अर्थ आहे. तैत्तिरीय आणि वाजसनेयि संहितेंत ‘एकशफ’ आणि ‘क्षुद्र’ अशा जनावरांच्या जाती किंवा भाग केले आहेत. ग्रीक आणि लॅटिन शब्दांवरून झिमर असें दर्शविण्याचा प्रयत्न करतो कीं, इंडोयूरोपीय यज्ञपशूंच्या पांच जातींचे दोन वर्ग असत. एक मनुष्य व घोडा आणि दुसरा बकरे, मेंढे आणि दुसरीं जनावरें. परंतु ही क्लृप्ति अयोग्य आहे.

[100]त्व च्.—कातडें किंवा जनावराचें चामडें असा या शब्दाचा अर्थ आहे. विशेषतः ऋग्वेदामध्यें चामडें अशा अर्थानें या शब्दाचा उपयोग केलेला आहे व सोमरस काढतांना या चामड्याचा उपयोग होत असे असें म्हटलें आहे. सोमवल्ली दाबावयाच्या फलकांवर (अधिषवण फलक) पसरलेल्या कातड्यावर दगडांनीं कुटीत असत (या फलकांचा उल्लेख ऋग्वेदांत केलेला नाहीं), अथवा जरी खलबत्त्याचा उपयोग होत असला तरी सोमरसाचे थेंब धरण्याकरितां त्या खलबत्त्याच्या खालीं–पिशेल म्हणतो त्याप्रमाणें वर नव्हे—कातडें ठेवण्याचा प्रघात होता. सोमवल्लीचा रस काढून घेतल्यावर मागें जी साल किंवा सालपट राहतें त्यासहि त्वचा म्हणण्याचा परिपाठ आहे. अलंकारिक रीत्या ‘कृष्णत्वच्’ हा शब्दसमूह हिंदुस्थानावर चाल करून येणाऱ्या आर्य लोकांच्या शत्रूंनां म्हणजे मूळच्या अनार्य लोकांनां लावीत असत.

[१०१]प शु.—या शब्दाचा सामान्यपणें प्राणी हा अर्थ असून त्यांत मनुष्याचाहि अंतर्भाव होतो. यज्ञाचे वेळीं उपयोगी पडणाऱ्या पांच जनावरांचा नेहमीं निर्देश होत असतो. अश्व, धेनु, अज, मेष आणि नर अशीं हीं पांच नांवें आहेत. अशा प्रकारच्या सात पाळीव जनावरांचा उल्लेख अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यांमध्यें आलेला आहे. सात ही संख्या धरण्याचे कारण व्हिटने म्हणतो त्याप्रमाणें ती संख्या पवित्र व गूढ मानीत असत हें असावें. वर सांगितलेलीं पांच जनावरें आणि गर्दभ व उष्ट्र मिळून सात होतात हें भाष्यकाराचें स्पष्टीकरण कांहीं पंडितांस मान्य नाहीं. जनावरांनां उभयादत् व अन्यतोदत् अशींहि नांवें दिलेलीं आढळतात. जनावरांचें वर्गीकरण हस्तादामाः ( हातानें जिन्नस उचलणारे ) उदाहरणार्थ, मनुष्य, हत्ती व मर्कट आणि मुखादानाः ( मुखानें जिन्नस उचलणारे ) असेंहि केलेलें सांपडतें. द्विपाद व चतुष्पाद असें दुसरें एक वर्गीकरण केलेलें आहे. मनुष्य हा द्विपाद प्राणी असून तो पशूपेक्षां श्रेष्ठ गणला गेला आहे. तो 'शतायुः' असून पशूंचा राजा आहे. इतर पशूंशिवाय त्याला वाचा आहे. ऐतरेय आरण्यकांत वनस्पतिवर्ग, पशुवर्ग व मनुष्यवर्ग यांमध्यें असलेला बुद्धीच्या बाबतींत सविस्तर भेद दाखविला आहे. मनुष्यविरहित प्राण्यांची ऋग्वेदामध्यें तीन प्रकारची विभागणी केलेली आहे. हवेंतील ( वायव्य ), जंगलांतील ( आरण्य ) आणि गांवांतील ( ग्राम्य ) पाळीव प्राणी. ग्राम्य व आरण्य अशी पशूंची केलेली विभागणी सर्वत्र आहे. यजुर्वेदसंहितेमध्यें 'एकशफ', 'क्षुद्र' व 'आरण्य' असें वर्गीकरण आलेलें असून त्यांपैकीं एकशफ आणि क्षुद्र हे माणसाळलेले प्राणी असत. अश्व व गर्दभ हे एकशफ प्राणी असून क्षुद्र प्राणी म्हणजे अज, मेष व वृषभ हे होत. दोन जातींच्या प्राण्यांतला हा फरक उभयदंत व अन्यतोदंत या फरकाप्रमाणें आहे. झिमरच्या मतानें अथर्ववेदांत एकेठिकाणीं आरण्य प्राण्यांमध्यें पांच वर्ग केले आहेत. ( १ ) अरण्यांत राहणारे हिंस्र पशू (मृगा भीमा वने हिताः); ( २ ) हंस, सुपर्ण, शकुन वगैरे पंख असलेले प्राणी; (३) जलचर प्राणी, शिंशुमार व अजगर; ( ४ ) मासे, पुरीकय, जष व मत्स्य आणि ( ५ ) कृमिकीटक यांनां राजसाः असें म्हटलेलें आहे. ही विभागणी खुबीनें केलेली आहे पण ती संभाव्य कोटींतील दिसत नाहीं. ब्लूमफील्डनें व व्हिटनेनें ही विभागणी त्याज्य ठरविली आहे.

[१०२]श कृ त, श क न.—ऋग्वेदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथांत याचा अर्थ विष्ठा असा आलेला आहे. खताची किंमत पूर्वीपासूनच लोकांनां कळलेली होती हें यावरून स्पष्ट दिसून येतें. वाळलेल्या शेणाचा उपयोग किंवा हवा कशी असेल हें सुचविणाऱ्या जळणाऱ्या शेणाचा उपयोग याबद्दल शकधूम या शब्दानें स्पष्ट कल्पना येते.

### अश्वमेध यज्ञांतील पशू [ तै सं. ]

| | | |
|---|---|---|
| अज | गौर[पांढरा हरिण] | फल्गु |
| [१]अजगर | चतुरक्ष | बलाका |
| अजा | छगल [छागाभेक] | बलाय |
| अधोराम | छाग | बस्त |
| [२]अन्यवाप | जन्तु | मकर |
| अलज | जष (मगर) | मक्षिका |
| अवाशृंग | [१५]जहका(बिळांतील | मण्डूक |
| अवि | कोल्हा) | मद्गु |
| असित (कृष्णसर्प) | तरक्षु [ एक वाघ] | [२३]मन्यु |
| आखु | तिरश्चराजी [ सर्प ] | [२४]मर्कट |
| [३]आति ( हरिणी ) | तुर्यवाट् | मशक |
| इभ | तुर्यौही | महानिरष्ट |
| [४]उंद्र (पाण मांजर) | दर्विद [सुतारपक्षी] | [२५]मान्थालव |
| उद्वार | दात्यौह | मुष्कर |
| उभयतोदत् | दार्व | मृग |
| उलूक | दित्यवाट् | मेष |
| उष्ट्र | दित्यौहि | मेषी |
| ऋश्य | धूंक्ष्णा | मत्स्य |
| एणी | धूम्र [उंट] | रासभ |
| [५]ककर | [१६]नकुल | रुरू [रोही] |
| कर्कट ( खेकडा ) | नक्र (मगर) | रोहित् |
| कल्माषग्रीव | नीलंग (साप) | लक्ष |
| कश(हरिण विशेष) | नीलशाङ्गी[वानरी | लोपा [ श्मशान |
| कश्यप ( कूर्म ) | न्यंकु (हरिण) | शकुन ] |
| कसर्णीर | परस्वत [रेडा] | लोपाश( कोल्हा) |
| [६]कालका( सरडा ) | पशु | लोहिताहि [सर्प] |
| कुटरु | पष्ठवाह | वडबा [घोडी] |
| [७]कुंड्रणाची (घूस) | पाद्गर | वम्र [वाळवी] |
| [८]कुंभीनस | पांत्र (उंदीर) | [२६]वाध्रीणस् |
| [९]कुलीकय( मासा) | पिक | वाहस् (फुरसें) |
| [१०]कुलुंग | [१७]पित्व [व्याघ्र] | वृक |
| [११]कृकवाकु | पिप्पका ( पक्षि- | वृषदंश [ मांजर ] |
| [१२]कृकलास(सरडा) | विशेषण ) | व्याघ्र |
| कृमि ( शेणकिडा ) | पुरस्तात्प्रस्रवण | शक |
| कृष्ण ( कुत्र्याचें | [१८]पुरुषमृग | शयण्डक |
| विशेषण ) | [१९]पुष्करसाद | शरभ |
| [१३]क्रथि | [२०]पृदाकु (अजगर) | शवर्त |
| क्ष्विंका | [२१]पृषत्(हरिण) | शश [ससा] |
| गर्दभ | पृषती | [२७]शारि |
| गवय | पृष् | शार्ग [ आरण्य- |
| गवाश्व | पृष्व | चटक ] |
| गोधा | [२२]पैंगराज | शार्दूल |
| [१४]गोमृग | प्राशृंग | शिंशुमार [मगर] |
| गौ | प्लव [पाकोळी] | शितिवार |

शित्पुट
शुण्ठा
श्वन्
श्वावित्
श्वित्र
सरीसृप
सालावृकी
सिंह

सूकर
[28]सृजय
सृजा [सर्प]
सृमर (गवा)
सौपर्णेय
[29]सौरी
स्तेग( किडा )
स्वज ( आपोआप

उत्पन्न होणारा सर्प )
हय
हरिण
हरिणी
हलीक्ष्ण ( हरित चटक )
हस्तिन्

[वा. सं.]

ककर
कौलीक
गोषादी
[30]घृणीवंत

[31]धुंक्षा
पारावत ( कबूतर
पारुष्ण

[32]भृंगा
लव
सीचापू

## पुरुषमेध यज्ञांतील पशु [सं. वा.]

अकितव
अग्न्येध
अजपाल
अजिनसंध
अतिकुल्व
अतिकृश
अतिकृष्ण
अतिदीर्घ
अतिलोमश
अतिशुक्ल
अतिष्कद्वरी
अतिस्थूल
अतिन्हस्व
अतित्वरी
अधिकल्पिन
[33]अनुक्षत्तृ
अनुचर
अनुरुध
अन्ध
अपगल्भ
अप्रातिपद
अभिक्रोश
अभिक्रोशक [भाट]
[34]अभिप्रश्निन्
अभिषेक्तृ
अभिसर्तृ
अयस्ताप
[35]अयोगु
अर्तन
अवतोका

अविजाता
अविपाल
अश्वप
अश्वसाद
असु
आंजनीकारी
आंडबराघात
आदिनवदर्श
आनन्द
इषुकार
उन्मत्त
उपदा
उपपत्ति
उपमन्थितृ
उपसद्
उपसेक्तृ
[36]एदिधिषुःपति
एषस्कारी
[37]कंटकीकारी
कर्मार
कल्पिन
[38]कारि
कितव
किंपुरुष
[39]किरात
किर्मिर
किलास
कुकूनन
कुक्कुट
कुब्ज

कुमारीपुत्र
कुरु पिशंगिला
कुलीका
कृष्णपिंगाक्ष
[40]कैवर्त
कोश
कोशकारी
[41]कौलाल
[42]क्रोश
क्लीब
क्षत्र
खलित
गणक
गृहप
गोघात
गोपाल
गोमांसयाचक
गोव्यच्छ
ग्रामण्य
ग्लाविन्
[43]चरक
चरकाचार्य
चर्मम्न
चाण्डाल
जनवादिन्
जंभक
जागर्ण
जार
ज्याकार
तक्षाण

तलव
तस्कर
तूणवध्म
त्रिष्ठिन्
दावप
दावाहार
दाश
दुर्मद
धनुष्कार
धरुण
धैवर
[44]नक्षत्रदर्श
निसर
नैषाद
परिवित्त
परिविविदान
परिवेष्टु
परिष्कंद
[45]पर्णक
पर्यायिणी
पलिक्नी
[46]पाणिघ्न
पिलिप्पिला
पिशंगिला
पिशुन
[47]पीठसर्पिन्
पविन
पुंश्चली
पुंश्चलू
[48]पुरुषहस्तिन्
[49]पौंशितृ
पौंजिष्ठ
[50]पौल्कस
प्रकरितृ
प्रच्छिद

प्रश्नीववाक
प्रश्निन्
प्रियवादिन्
बधिर
बहुवादिन्
[51]बिदलकारी
[52]बैंदे
ब्राह्मण
भष
भगदुह्
भिषज्
भीमल
मन्थावल
मय
मागध
मानस्कृत
[53]मार्गार
मूक
मृगयु
[54]मैनाल
यमस् [ जुळ्यांना जन्म देणारी ]
योक्तृ
रजयितृ [रंगारी]
रज्जुसर्ज [ दोऱ्या वळणारा ]
रथकार
राजन्य
रेभ
वंशनर्तिन [वेळूवर नाचणारा]
वनप[अरण्यरक्षक]
वप[पेरणी करणारा
वाणिज
वामन

वासःपल्पली(धोबी
विकंकर
विजर्जरा
वित्तध
विमोक्तृ [ अश्व सोडणारा ]
वीणावाद
वीरहण
वैन्द
वैश्य
[55]व्यच
व्रात्य
व्रेश्य
शंखध्म
शल्यक
शाबल्या
शुक्र
शूद्र
शैलूष
शौष्कल
श्वावित्
[56]सभाचर
सभास्थाणु
सिध्मल
सुराकार
सूत
सैलग [लुटारू]
स्तेनहृदय
स्त्रीसख
स्मरकारी
स्नाम
स्वपन
स्वविन्
हर्यक्ष
हस्तिप
हिरण्यकार

[1]अजगर.- (अजभक्षक). हें नांव अथर्ववेद आणि यजुर्वेदसंहितांमध्यें अश्वमेधांत बळी दिल्या जाणाऱ्या प्राण्यांच्या यादींत आहे. दुसऱ्या ग्रंथांत त्याला वाहस् असें म्हटलेलें आढळतें. पंचविंश ब्राह्मणांत सर्पाच्या सत्राचें वर्णन आहे, तेथें याला मनुष्य असें म्हटलें आहे.

[2]अन्यवाप.-( "दुसऱ्याकरितां पेरणें" ). दुसऱ्या पक्ष्यांच्या घरट्यांत आपलीं अंडीं ठेवण्याच्या संवयीमुळें कोकिल पक्ष्याला हा शब्द योजितात. तैत्तिरीय संहितेंत अश्वमेधाच्या पशूंमध्यें हा शब्द आला आहे.

[3]आ ति.-पाण्यांतील पक्षी. पुरूरवस् आणि उर्वशी यांची जी दंतकथा आहे, तींतील अप्सरा आति म्हणजे बहुतकरून राजहंसाप्रमाणें पुरूरव्यास वाटल्या. अश्वमेधांत जी प्राण्यांची यादी आहे तींत या पक्ष्याचाहि उल्लेख आहे. आणि तेथें टीकाकार महीधर त्याचा अर्थ नंतर ज्यांनां आडी म्हणतात ते पक्षी, असा करितो, आणि सायण एक उनारा देऊन म्हणतो कीं त्याचा अर्थ चाष असा होतो.

[4]उद्र.- यजुर्वेद संहितेंत अश्वमेधीय प्राण्यांच्या यादींत याचें नांव आहे. याचा अर्थ महीधर खेंकडा असा देतो व सायण पाणमांजर असा देतो.

[5]क क र.- यजुर्वेदाच्या कठ, मैत्रायणी व वाजसनेयि संहिता, यांत अश्वमेधीय बळींचे यादींत हें नांव आहे. टीकाकार महीधर याच्या भाष्यावरून हा एक पक्षी असावा असें वाटतें.

[6]का ल का.—अश्वमेधीय बळींचे यादींत एक पक्षी अथवा सरडा, अशा अर्थानें उल्लेख आहे.

[7]कु ण्ड् ऋ णा ची ( घूस ).—अश्वमेधीय बळींचे यादींत या अज्ञात स्वभावाच्या प्राण्याचें नांव आलें आहे. याचा ऋग्वेदांत एका ठिकाणीं उल्लेख असून त्याचा पक्षी असा अर्थ असावा. सायण ऋग्वेदभाष्यामध्यें 'वांकड्या तिकड्या गतीचा (कुटिलगति) असें त्याचें भाषांतर करितो व तैत्तिरीय संहितेवरील टीकेंत गृह--गोधिका असा अर्थ करतो.

[8]कु म्भी न स.—('घट-नासी'). अश्वमेधीय बळींच्या यादींत या प्राण्याचा उल्लेख आहे. बहुतकरून, नंतरच्या वाङ्मयाप्रमाणें, एक प्रकारचा सर्प असाहि याचा अर्थ असावा.

[9]कु ली का, कु ली क य.—अश्वमेधीय बळींच्या यादींत हें एका पक्ष्याचें नांव आहे. मैत्रायणी संहितेंत याचें पुलीका असें रूप आढळतें.

[10]कु लुं ग.-अश्वमेधीय बळींच्या यादींत याचा उल्लेख आहे. हें एका पशूचें बहुतकरून काळवीटाचें नांव आहे.

[11]कृ क वा कु.—अथर्ववेदांत बकऱ्या, मेंढ्या आणि इतर माणसाळलेले प्राणी यांच्या बरोबर हें कोंबड्याचें नांव आलें आहे. म्हणून तोहि प्राणी माणसाळलेला असावा. अश्वमेधीय बळींच्या यादींत तो सवितृ याला अर्पण केला आहे व यास्काचार्यांनींहि तसेंच स्पष्टीकरण केलें आहे. भाष्यकार महीधर ताम्र-चूड, 'लाल शेंडीचा' असें स्पष्टीकरण करतो. अर्थातच तो ध्वन्यनुकरण शब्द ('कृक = ओरडणारा) आहे.

[12]कृ क ला स.—अश्वमेधीय बळींच्या यादींत आणि नंतरच्या वाङ्मयांत 'सरडा' या अर्थी हा शब्द आलेला आहे. ब्राह्मणांत कृकलासी म्हणजे सरडी असा पाठ आहे.

[13]क यि.—अश्वमेधीय बळींचे यादींत, हें एका जातीच्या पक्ष्याचें नांव आहे. मैत्रायणी संहितेंतील पाठ कुवय असा आहे. सायणाच्या मतें पशु असा याचा अर्थ आहे.

[14]गोमृ ग.—अश्वमेधीय बळींचे यादींत याचा एका बैलाची जात म्हणून उल्लेख आहे. तैत्तिरीय संहितेंत तो जंगली असावा असें दर्शित होतें. यावरून तो अर्धवट माणसाळलेला असावा किंवा प्रथम जंगली असून नंतर त्याला माणसाळवीत असत. या प्राण्याच्या नांवाशीं ऋग्वेदांतील जंगली मृगमहिषाची तुलना होण्यासारखी आहे.

[15]ज ह का.—या शब्दाचा अर्थ केंसाळ मांजर असा आहे; व याचा अश्वमेधीय बळीमध्यें उल्लेख आहे. सायणाचार्यांच्या मतें याचा अर्थ बिळांत राहणारा कोल्हा असा आहे.

[16]न कु ल.— 'मुंगूस' अथर्ववेदामध्यें सर्पाचे दोन तुकडे करून पुनः जोडणारा असें याचें वर्णन आलेलें आहे. सर्पदंशावर असणाऱ्या उपायांचें त्याला ज्ञान आहे ही गोष्ट उल्लेखिलेली आहे. अश्वमेधीय बळींचे यादींत याचें नांव आलेलें आहे.

[17]पि त्व किं वा पि द्व. — यजुर्वेद संहितेमध्यें अश्वमेधीय बळींचे यादींत एका प्राण्याचें हें नांव आलेलें आहे. तैत्तिरीय संहितेवरील टीकेंत टीकाकाराच्या मतानें या शब्दाचा अर्थ सिंह असा आहे. कदाचित् पित्व व पेत्व हे दोन्ही शब्द एकच असूं शकतील.

[18]पु रु ष मृ ग .—मानवी रानटी पशु. यजुर्वेदांत अश्वमेधीय बळींच्या यादींत याचा उल्लेख होतो. झिमरच्या मताप्रमाणें तो वानर असावा. आणि तेंच मत शक्य दिसतें. त्याच्याच मताप्रमाणें अथर्ववेदांतील दोन उताऱ्यांत पुरुष हा शब्द वानर आणि त्याचा आवाज ( मायु ) यांनां उद्देशून उपयोगांत आणलेला आहे; परंतु हा अर्थ बरोबर दिसत नाहीं. शिवाय ब्लूमफील्डनें हा अर्थ घेतलाहि नाहीं. व्हिटनेच्या मतें या शब्दाचा अर्थ मनुष्याच्या आवाजाला नीटपणें लागू पडत नाहीं.

[19]पु ष्क र सा द.— ( कमळावर बसणारा ). अश्वमेधीय बळींच्या यादींत हें एका प्राण्याचें नांव आढळतें. हा प्राणी साप असणें शक्य दिसत नाहीं. परंतु रॉथच्या मताप्रमाणें हा एकतर पक्षी असावा, अथवा तैत्तिरीय संहितेवरील भाष्यकारांच्या मताप्रमाणें भृंग असावा.

[20]पृ दा कु.— अथर्ववेदांत हें एका नागाचें नांव आहे. याचा अश्वमेधीय बळींच्या यादींत उल्लेख येतो. याचें चामडें विशेषतः फार महत्त्वाचें होतें असें अथर्ववेदांत म्हटलें आहे.

[21]पृ ष त् .— अश्वमेधीय बळींच्या यादींत या प्राण्याचा नामनिर्देश झाला आहे. याचा अर्थ ठिपके ठिपके असलेला हरिण असा आहे.

[22]पै ङ्ग रा ज .— अश्वमेधीय बळींच्या यादींत हें एक नांव सांपडतें. हें पक्ष्याचें नांव आहे यांत शंकाच नाहीं. परंतु कोणत्या पक्ष्याचें, हें मात्र निश्चयात्मक सांगतां येणार नाहीं. हा तांबड्या डोळ्याचा भारद्वाज पक्षी असावा असें सायण म्हणतात.

[२३]म न्यु .— अश्वमेधप्रसंगीं दिलेल्या बळींच्या यादींत याचा उल्लेख येतो. तैत्तिरीय संहितेवरील टीकाकार याचा अर्थ वानर ( किं पुरुष ) अथवा जंगली मोर ( अरण्य मयूर ). असा करितात. पहिला अर्थ वाजसनेयि संहितेंतील मनुष्य याच्याबद्दल या अर्थी केलेल्या मन्यु या शब्दाच्या उपयोगावरून बराच साधार वाटतो. कारण मनुष्याच्या बदलीं किंवा ऐवजीं वानरच असला पाहिजे. हा अर्थ दुसऱ्या ठिकाणच्या उताऱ्यांतूनहि चांगला लागूं पडतो.

[२४]म र्क ट.—अश्वमेधांतील बळींच्या यादींत याची गणना केली आहे. याचा अर्थ ‘ माकड ’ ‘ वानर ’ असा आहे. याच संहितेंत याचें मनुष्य आणि हत्ती यांच्यांत वर्गीकरण केलें आहे. कारण मनुष्याप्रमाणेंच हाहि आपल्या हातांनीं वस्तू उचलून घेतो, पशुप्रमाणें तोंडानें घेत नाहीं ( हस्तादान व मुखादान ). दुसरीकडेहि याचा अनेक वेळां उल्लेख येतो.

[२५]मा न्था ल व, मा न्थी ल व.—यजुर्वेदसंहितांत अश्वमेध प्रसंगींच्या बळींचीं हीं नांवें आलीं आहेत. हे प्राणी कोण होते हें समजत नाहीं. महीधराच्या मतें ते ‘ एक प्रकारचे उंदीर ’होते. सायणाचार्यांनां ते पाणकोंबडे [जलकुक्कुट] असावेत असें वाटतें.

[२६]वा र्ध्रा ण स, वा र्ध्री न स.—अश्वमेधांत बळी दिले जाणाऱ्या पशूंच्या यादींत आलेले एका पशूचें नांवे आहे. सायण म्हणतात त्याप्रमाणें याचा अर्थ गेंडा असा असावा. बोथलिंगच्या मतें पांढरा बकरा किंवा बगळा असे अर्थ होतात.

[२७]शा रि.–अश्वमेधाचे वेळीं बळी दिले जाणाऱ्यांचे यादींत हें नांव आहे. ज्या अर्थी या प्राण्याला मनुष्याची वाणी आहे असें म्हटलेलें आहे, त्या अर्थी हा एक प्रकारचा पक्षी आहे. कदाचित् पुढें ज्याला सारिका म्हणजे मैना म्हणूं लागले तोच हा असावा असें झिमर म्हणतो व हें स्पष्ट दिसतें.

[२८]सृ ज य.—अश्वमेधाचे वेळीं बळी दिले जाणाऱ्यांपैकीं एकाचें हें नांव आहे. हा कोण होता हें समजत नाहीं. वाजसनेयि संहितेवरील महीधराच्या टीकेंत याला एक प्रकारचा पक्षी म्हटलेलें आहे. तैत्तिरीय संहितेवरील भाष्यांत सायण सृजया असा शब्द घेऊन त्याचे अर्थ ‘ काळी माशी, ’ ... शुभ्र सर्प अथवा काळा महिष असे देतात.

... मेधाचे वेळीं उल्लेखिलेल्या एका पशूचें हें ... टलेलें आहे. पण ही चूक आहे. ... असा याचा अर्थ आहे ...

[३१]धुं क्षा.—वाजसनेयि संहितेंतील अश्वमेधीय बळींच्या यादींत एक पक्षी या अर्थी हें नांव आलें आहे.

[३२]भृं गा.—वाजसनेयि संहिता व अथर्ववेद यांमध्यें हा आकारानें मोठा असून काळ्या रंगाचा असतो असा उल्लेख आहे. अश्वमेधीय बळींच्या यादींत याची गणना केली आहे.

[३३]अ नु क्ष त्तृ.—पुरुषमेधाच्या वेळीं बळी दिल्या जाणाऱ्यांच्या यादींत हा शब्द असून महीधराप्रमाणें त्याचा अर्थ द्वारपालाचा सेवक असा आहे, आणि सायणाप्रमाणें त्याचा अर्थ सारथि असा आहे. वाजसनेयि संहितेंत ( ३०.११ ) ‘ अनुक्षत्तृ’चा अर्थ ‘ सारथ्याला अनुसरणारा ’ असा केला आहे. तैत्तिरीय ब्राह्मण ( ३०.४,९,१ ) येथें ‘ सारथ्याचा अनुचर ’ असा सायणानें अर्थ केला आहे. वाजसनेयि संहिता ( ३०. १३ ) या ठिकाणीं महीधरानें ‘ प्रतिहार सेवक ’ असा अर्थ घेतला आहे, तर वा. सं. ३०.११ येथें तो सारथ्यनुसारी असा त्याचा अर्थ करतो.

[३४]अ भि प्र श्नि न्.—हा शब्द प्रश्निन् आणि प्रश्नविवाक यांच्यामध्यें तैत्तिरीय ब्राह्मण आणि वाजसनेयि संहिता यांत पुरुषमेधांतलि बळींच्या यादींत आढळतो. त्यावरून फक्त ‘ शोधक मनुष्याचाच बोध होतो ’ असें सायण व महीधर हे टीकाकार म्हणतात. परंतु या शब्दाशीं कांहीं तरी कायद्याचा संबंध असला पाहिजे. बहुधा वादी आणि न्यायाधीश यांच्या विरुद्ध प्रतिवादी असा अर्थ घेण्याला कांहीं हरकत नाहीं.

[३५]अ यो गू.—हा अनिश्चित अर्थाचा शब्द वाजसनेयि संहितेंत जी बळी दिले जाणाऱ्यांची यादी आहे तींत आहे. याचा अर्थ आधुनिक ‘आयोगव ’ प्रमाणेंच मिश्र जातींतील मनुष्य (वैश्य बायको आणि शूद्र नवरा यांच्यापासून उत्पन्न झालेला) असा असावा. वेबर याचा अर्थ ‘व्यभिचारिणी स्त्री असा करतो. झिमर म्हणतो कीं, जी स्वैरिणी हा याचा संभव आहे अशी भ्रातृहीन कन्या असा या शब्दाचा अर्थ असावा.

[३६]ए दि धि षु प ति.— हा शब्द वाजसनेय संहितेंत आला असून त्याचा अर्थ ‘ मोठ्या बहिणीच्या अगोदर लग्न झालेल्या लहान बहिणीचा नवरा’असा आहे असें टीकाकार महीधर म्हणतो. हा अर्थ बरोबर आहे असें जरी मानलें तरी या शब्दाचें रूप संशयास्पद आहे; कारण डेलब्रुक म्हणतो कीं हा शब्द अपभ्रष्ट असावा.

[३७]कं ण्ट की का री.-‘कांट्याचें काम करणारे’ पुरुष मेधांतील हा एक बळी आहे असें वाजसनेयि संहितेंत म्हटलें आहे. हे लोक कांट्यांचा चटया विणण्याकडे किंवा उशा ... उपयोग करीत असत असें दिस...

[३८]का रि.— वाजसनेयि ...

...ळीचें नांव असन ते...

पी.कोशांत असें म्हटलें आहे कीं, या शब्दाचा अर्थ ' हर्ष-भरित ' मनुष्य असा आहे ( कारण तो शब्द कृ = स्तुति करणें यापासून निघाला आहे ).

[39]कि रा त.—वाजसनेयिसंहितेप्रमाणें किरात हे दरींत ( गुहांत ) रहात असत; आणि पर्वताच्या दरडीवर किराताची मुलगी ( कैरातिका ) औषधी खणीत आहे अशा अथर्ववेदांतील उल्लेखावरून किरात हे लोक गिरिकंदरांत रहात असत असें दिसतें. तदनंतर किरात हे लोक पूर्वनेपाळांत वस्ती करूं लागले, पण हें नांव कोणत्याहि डोंगरी लोकांनां, निःसंशय मूळ रहिवाशांनां लावीत असत, आणि मानवधर्मशास्त्र कमी योग्यतेच्या क्षत्रियांनां हा शब्द लावतें.

[40]क व र्त, कै व र्त.—वाजसनेयि संहिता आणि तैत्तिरीय ब्राह्मण यांमध्यें पुरुषमेधांतील बळींच्या यादींत हीं दोन नांवें ' कोळी ' किंवा ' धीवर ' या अर्थी आलीं आहेत.

[41]कौ ला ल.—वाजसनेयि संहितेवरील टीकाकार महीधर प्रमाणें पिढीजाद कुंभार ( कुलालपुत्र ) असा या शब्दाचा अर्थ आहे. दुसऱ्या संहितेमध्यें कुलाल असा शब्द आहे.

[42]कोश.—पुरुषमेधांत कोशकारी हें एका स्त्रीवाचक बळीचें नांव आहे व त्यावरून कोश या शब्दाचा अर्थ निश्चित होत नाहीं कदाचित ( तरवारीचें ) ' म्यान ' असा असावा.

[43]च र क.—बृहदारण्यक उपनिषदांत या शब्दाचा अर्थ फिरता ब्रम्हचारी असा आहे. मुख्यत्वेंकरून कृष्णयजुर्वेदपंथाचे अनुयायी यांचा शतपथब्राह्मणांत नापसंतीनें उल्लेख केला आहे. वाजसनेयिसंहितेंत पुरुषमेधीय बळींमध्यें चरकाचा उल्लेख असून त्यांत अशुभ कृत्याला त्याचें अर्पण करणें या विधीबद्दल वाद होता असें स्पष्टपणें सूचित होतें.

[44]न क्ष त्र द र्श.—'नक्षत्रांकडे निरखून पाहणारा म्हणजे पत्रिका पाहून भविष्य सांगणारा ज्योतिषी' असा या शब्दाचा अर्थ आहे. यजुर्वेदामध्यें पुरुषमेधाचे वेळी बळी दिले जाणाऱ्यांचे यादींत हा आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत एक उल्लेख आलेला आहे त्यावरून असें दिसतें कीं, या ब्राह्मण ग्रंथाच्या मतानें अग्निहोत्राच्या अग्नीस सिद्ध करण्यास कोणत्या नक्षत्राच्या मुहूर्तावर सुरवात करावी हें पाहण्याची जरूर नाहीं. कारण या ग्रंथाचें मत सूर्यालाच नक्षत्र समजून कोणत्याहि दिवशीं याग सुरू करणें चांगलें असें आहे.

[45]प र्ण क.—हें एका माणसाचें नांव असून तें वाजसनेयि संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यामध्यें पुरुषमेधाचे वेळीं [illegible] जाणाऱ्यांचे यादींत आलें आहे. महीधराच्या [illegible]वरून [illegible]ा बोध होतो. हा भिल्ल [illegible]वा. कारण निषादांचेंहि [illegible] पर्णकाचा अर्थ [illegible]

आहे. वेबर याचा अर्थ पिसें धारण करणारा मनुष्य असा करतो. हा अर्थ खुबीचा आहे खरा पण त्याबद्दल नक्की कांहीं सांगतां येत नाहीं.

[46]पा णि घ्न.—यजुर्वेदसंहितेमध्यें पुरुषमेधाचे वेळीं बळी दिले जाणाऱ्यांचे यादींत याचें नांव आलेलें आहे. गोंगाट करून शेतांतून पक्षी हांकणारा मनुष्य असा या शब्दाचा अर्थ असावा किंवा नृत्याच्या वेळीं 'ताल धरणारा' असाहि अर्थ असण्याचा संभव आहे.

[47]पी ठ स र्पि न्.—सूत्रग्रंथाच्या पूर्वी समासरहित असा हा शब्द येत नाहीं. पण वाजसनेयि संहितेमध्यें(३०.२१)आणि तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें ( ३.४,१७,१ ) पुरुषमेधाचे वेळीं बळी दिले जाणाऱ्यांचे यादींत एका प्राण्याचेंहि नांव पीठसर्पिन् ( लहानशा गाडींत हिंडणारा ) या समासांत आणलें आहे.

[48]पु रु ष ह स्ति न्.—हात असलेला मनुष्य. यजुर्वेदांतील अश्वमेधाच्या बळींच्या यादींत हा शब्द सांपडतो. याचा अर्थ वानर हाच असला पाहिजे.

[49]पे शि तृ.—यजुर्वेदांतील पुरुषमेधप्रसंगीं दिले जाणाऱ्या बळींच्या यादींत हें एका बळीचें नांव आहे. याचा अर्थ अगदीं अनिश्चित आहे. वेबर व सें. पी. कोश यांचें मतानें याचा अर्थ 'तुकडे करणारा', 'नक्षी करणारा' असा आहे. परंतु सायणाचे मतानें 'एकदां वैर नष्ट केलें असतां जो पुनः तें जागवून काढतो तो' असा याचा अर्थ आहे.

[50]पौ ल्क स.—यजुर्वेदांतील पुरुषमेधप्रसंगीं बळी दिले जाणाऱ्यांपैकीं हें एकाचें नांव आहे. या शब्दाचा उल्लेख चांडाळाबरोबर बृहदारण्यकोपनिषदामध्यें येतो. तेथें याचा अर्थ खालच्या दर्जाची नीच जात असा आहे. मैत्रायणी संहितेंत पुल्कक आणि पुल्कक अशीं वेगवेगळीं रूपें आहेत व तीं पुष्कळशीं अगदीं सारखीं आहेत. या पुल्कस शब्दाचेंच पौल्कस हें रूप असून त्याचा उद्देश जाति दाखविण्यासाठींच बहुतेक असावा असें दिसतें. स्मृतींप्रमाणें पुल्कस हा क्षत्रिय झालेल्या निषादाचा किंवा शूद्राचा मुलगा आहे. परंतु हा सर्व तर्काचा बाजार दिसतो. पौल्कस ही एक काम करणारी जात असावीः अथवा फिकच्या समजुतीप्रमाणें ही एक हिंस्र पशूंवर उपजीविका करणारी जात होती व तिच्याकडूनच कधीं कधीं मजूर लोकांचें काम करून घेत असत.

[51]बि द ल का री.—बांस चिरणारी बुरडीण [illegible] तील पुरुषमेधप्रसंगीं बळी दिलेल्यांच्या [illegible] आहे. एगलिंग याचा अर्थ [illegible] करतो.

[52]बै[illegible]

[५३] मा र्गा र.—यजुर्वेदांतील पुरुषमेधप्रसंगींच्या बळींच्या यादींत हा शब्द आढळतो. याचा अर्थ 'पारधी' किंवा 'कोळी' असा असावा. कारण हें पितृवंशिक नांव मृगारी 'वन्य पशु मारणारा' यापासून झालेलें आहे.

[५४] मै ना ल.—यजुर्वेदांतील पुरुषमेधाचे वेळीं बळी देण्यांत यणाऱ्या प्राण्यांच्या यादींत हें नांव आलेलें आहे. सायण आणि महीधर यांच्या मताप्रमाणें मीन म्हणजे मासा या शब्दापासून निघालेल्या या शब्दाचा कोळी हा अर्थ स्पष्ट निघतो.

[५५] व्य च.—हा शब्द गोव्यच या रूपांत आलेला आहे. याचा अर्थ अनिश्चित आहे. सायणाचार्यांच्या मतें या गोव्यच समासाचा अर्थ गायी हांकणारा असा आहे. कदाचित् सें. पी. कोश म्हणतो त्याप्रमाणें याचा अर्थ गायींस पीडा देणारा असाहि असूं शकेल. वेबरच्या मतें याचा अर्थ गायीचें मांस काढून विकणारा असा आहे. एगलिंग म्हणतो कीं, याचा अर्थ गायींचे जवळ जाणारा असा होईल.

[५६] स भा च र.—यजुर्वेदामध्यें पुरुषमेधाचे वेळीं बली दिले जाणाऱ्यांपैकीं एकाचें हें नांव आहे. सें. पी. कोशाच्या मतानें हें विशेषण असून तें 'सभाग' सभेला जाणारा अशा अर्थाचें आहे. ज्या अर्थी तो बलि धर्म या देवतेला अर्पिलेला आहे त्याअर्थी या शब्दाचा अर्थ सभेचा एक सभासद असा असावा. कदाचित् तो खटल्यांचा निकाल करणाऱ्या न्यायाधिशांपैकींहि एक असावा. आतां सभेंतील सर्वच लोक न्याय करीत किंवा कांहीं निवडक लोक न्याय देण्याकरितां न्यायासनावर बसत हें सांगणें कठिण आहे. सभाचराच्या विशिष्ट अर्थावरून कांहीं निवडक लोकच न्याय देत असत असें मानणें बरें. वा. सं. ३०.६ ' येथें धर्माय सभाचरम् ।' असा पाठ आहे व 'सभायां चरतीति तं' असें भाष्यांत सभाचराचें विवेचन दिलें आहे आणि 'सभायां नित्यं चरन्तं धर्मस्य प्रवक्तारम् ।' असा भाष्यांत अर्थ दिला आहे. यावरून सभाचराचा अर्थ 'धर्माचें प्रवचन करणारा सभासद' असा दिसतो.

## मानवसृष्टि.

मानवसृष्टीमध्यें येणाऱ्या विषयांची यादी पूर्वी या प्रकरणाच्या आरंभीं दिलीच आहे. यांतील टीपा म्हणजे मानवजातिविषयक सर्व प्रकारच्या हालचालींची माहिती होय. ही माहिती वेदकालीन सामाजिक स्थिति व व्यवहार यांचें ज्ञान होण्यास अतिशय उपयुक्त असें साधन होईल.

### मनुष्यनामें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अनु | जगत् | तस्थिवान् |
| आयु | [१]जन | तुर्वश |
| कृष्टि | जनित्व | द्रुह्यु |
| क्षिति | जनुषि | धव |
| चर्षणि | जन्तु | नहुष |
| नृ | भुवन | यदु |
| नृतम | भूत | लोक |
| पंचजन | मनुष्य | विवस्वत् |
| [२]पुंस् | मर्त | विश् |
| पुरुष | मृर्त्य | व्रात |
| पूरु | [३]मर्य | शिक्षानर |
| पूरुष | मानुष | हरि |
| पृतना | | |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| जन | पुरुष | मर्त्य |
| नृ | मनुष् | मर्य |
| नृतम | मनुष्य | लोक |
| पुंस | मर्त | सर्व (पुत्र भृत्यादि) |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| कृष्टि | मानुषी | लोग |
| जग | लोक | विचर्षणि |
| पुंस | लौकया (लोकसंबंधिनी प्रजा) | विश् |
| पुरुष | | सर्वजन्मन् (जग) |
| मानुष | | |

[संहितेतर]

[६]प्राणभृत्

ज न.—जन या शब्दाचा मनुष्यव्यक्ति हा अर्थ असून हा शब्द समुदायवाचकहि आहे. ऋग्वेदामध्यें व पुढील ग्रंथांत अनेक लोकांचा समुदाय किंवा जात अशा अर्थानें हा आलेला आहे. उदाहरणार्थ 'पंचजनाः' किंवा 'पंच जनासः.' हा शब्द पांच जाती अशा अर्थानें वारंवार आलेला आहे. ऋग्वेदामध्यें एका ऋचेंत यदुवंशांतले लोक (यादव जन) व यदु (यादवाः) हे समानार्थी शब्द आले आहेत. तसेंच राजा म्हणजे 'जनस्य गोपाः' म्हणजे लोकांचा रक्षिता असें म्हटलें असून राजा व जन यांचे वारंवार उल्लेख आलेले आहेत. भारतजन असाहि शब्द ऋग्वेदांत आलेला आहे. हॉपकिन्सचें असें म्हणणें कीं, भारतजन या शब्दसमुच्चयांत जन म्हणजे ग्राम–लोक नव्हे–असा अर्थ होतो. पण हें खरें मानण्यास सबळ पुरावा नाहीं.त्या वेळीं लोकांची कशी विभागणी झालेली होती हें निश्चितपणें सांगणें कठिण आहे. ऋग्वेदांत असलेल्या एका स्थलावरून झिमर असें सिद्ध करूं पाहतो कीं, लोकांची विभागणी प्रथम विश् नंतर ग्राम किंवा वृजन (अविभक्त कुटुंबें किंवा कुळें किंवा ग्रामसंस्था) व नंतर एकेक कुटुंब अशा तऱ्हेची होती. त्याचें असें मत आहे कीं, या चार जाती ऋग्वेदांतल्या वर उल्लेखिलेल्या स्थळीं जन, विश्, जन्मन् व पुत्राः या शब्दांनीं सूचित आहेत व प्रत्येक ग्रामसंस्था ही पूर्वी नात्यावर स्थापित झालेली होती. पण लोकांची ही विभागणी किती विश्वस-

नीय धरावी हा एक प्रश्नच आहे. जन हा अनेक विश् मिळून झालेला असे ही गोष्ट बरीच संभवनीय आहे. या मतास ऋग्वेदांतील दुसऱ्या एका स्थलाचा आधार आहे. त्या स्थलीं विश् म्हणजे लढवय्ये लोकांचें पथक होतें असें उल्लेखिलें आहे. होमरच्या वेळीं व पूर्वीच्या जर्मन लोकांचे काळीं नात्याच्या आधारावर लष्कराची रचना करीत, त्याप्रमाणेंच वेदकालींहि व्यवस्था होती असें वरील गोष्टीवरून म्हणतां येतें.पण अनेक ग्राम मिळून एक विश् होई हें म्हणणें निश्चयानें खरें म्हणतां येत नाहीं. खुद्द झिमरचेंच असें मत आहे कीं, ग्राम किंवा वृजन या शब्दांत असा कांहीं अर्थ नाहीं कीं, ते एकत्र केले असतां एक विश् होईल. कारण ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ सशस्त्र लोक इतकाच होतो. खेडगांवांतील लोक या अर्थी 'व्रा' 'व्राज' हे शब्द आहेत असें झिमर म्हणतो. पण व्रा शब्दाच्या स्थलीं अर्थनिश्चय होत नाहीं व दुसऱ्या स्थलीं लढाईचा बिलकुल संबंध नाहीं. तेव्हां वैदिक काळांत ग्राम, विश् व कुल किंवा गोत्र यांचे संबंध काय होते हें अनिश्चितच आहे. शिवाय ग्राम व विश् यांचे निश्चित अर्थ न कळल्यामुळें तर जास्तच घोंटाळा झालेला आहे. विश् याचा अर्थ जर स्थलविभाग असा घेतला तर ग्राम म्हणजे जिल्ह्याचा भाग असें मानतां येईल. पण विश् म्हणजे विशिष्ट नात्याचे लोक असा अर्थ घेतला तर एका 'ग्रामा'मध्यें निरनिराळीं 'विश्' चीं कुटुंबें असूं शकतील, किंवा एक ग्राम म्हणजे एक विश् असूं शकेल, किंवा एका विशचा भागहि असूं शकेल. तें कसेंहि असो, मूळ जी वैदिक काळांत व्यवस्था होती तीमध्यें पुढें राजकीय दृष्टीपेक्षां ब्राह्मण वर्णाला महत्त्व देण्याची जी दृष्टि उत्पन्न झाली तिजमुळें बरेच फेरबदल झाले असले पाहिजेत एवढें खरें. लोकांचे निरनिराळे दोन वर्ग कुल किंवा गोत्र या तत्त्वावर ठरले जात. एका कुलामध्यें एकच कुटुंब असे व तें एकाच घरांत रहात असे, व त्या घरांत सर्व भाऊ अविभक्त पद्धतीनें किंवा सर्व मुलें आपल्या पित्याच्या आश्रयाखालीं रहात असत. गोत्रांत ज्यांचा एकच मूळ पुरुष मानिला जाई ते सर्व लोक समाविष्ट होत असत. गोत्र, विश् व जन या शब्दांची लॅटिन भाषेंतल्या जेन्स, कुरिआ व ट्राइबस या शब्दांशीं व ग्रीक भाषेंतल्या तत्सदृश शब्दांशी तुलना करतां येईल. या तीन जाती पारशी लोकांतहि विश्, झंतु व दक्यु या नांवांवरून दिसतात. विश् या फारशी लोकांमधील जातीवरून असेंहि सिद्ध होतें कीं, हिंदुस्थानांत विश् ही जी जन याची विभागणी होती तीमध्यें स्थलापेक्षां रक्तावरूनच नातें ठरलें जात असे व हीच स्थिति टॅसिटसनें लिहिलेल्या जर्मानिया ग्रंथांत जी राज्यपद्धति वर्णिली आहे तींत दिसून येते. कोणत्या तरी रूपांत असलेली कुलव्यवस्था ही 'जन' याचा तिसरा घटकावयव होती असें ऋग्वेदांतील एका स्थलावरून दिसतें. कारण त्या ठिकाणीं गृहाची तुलना जन व विश् यांच्याशीं केलेली आहे. ऋग्वेदांत दुसऱ्या एक स्थलीं ( ७. ८२, १ ) कुलांतला यज्ञ ( अध्वर ) याची जन–यज्ञ किंवा विश–यज्ञ यांशीं तुलना केली आहे. झिमर म्हणतो कीं, या ठिकाणीं एका गांवाची दुसऱ्या मोठ्या भागांशीं तुलना केलेली आहे. परंतु हा अर्थ चुकीचा दिसतो. हिंदुस्थानांतल्या वैदिक भारतीय लोकांच्या आचारांसंबंधीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, राजाला अग्निहोत्र ठेवतां येत होतें. हें अग्निहोत्र सबंध जातीचें अग्निहोत्र समजत असावेत. परंतु राजा किंवा एखादी व्यक्ति यांच्या अग्निहोत्राखेरीज मधल्या गोत्रादि समूहाचें अग्निहोत्र असल्याचा पुरावा मिळत नाहीं. त्या वेळचे राज्यांतले प्रमुख समाजघटक गोत्र व जन हेच होत. विश् हा तिसरा स्वतंत्र घटक नसून पुढें ज्याला गोत्र म्हणूं लागले तोच जुन्या ग्रंथांत विश् या शब्दानें सूचित होत असावा. वर जी आम्ही विचारसरणी स्वीकारली ती योग्य आहे असें ब्राह्मणकालांत जी समाजरचना होती तिचा विचार केल्यावर आपणांस वाटेल. जन ही कल्पना अजूनहि आहे व ती सर्वत्र गृहीत आहे. पण विश् हे जनाचे विभाग आतां नाहींत. हल्लीं निरनिराळे वर्ण हे जनाचे विभाग आहेत व हल्लीं वर्णांच्या ज्या अनेक पोटजाती झालेल्या आहेत त्यांनां अंशतः मूळ आधार पूर्वीच्या गोत्रांचा आहे.

[2] पुं स्––.ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें याचा पुरुष असा अर्थ आलेला आहे. पति या शब्दावरून जसा लग्नाचा बोध होतो व नृ व नर या शब्दांवरून जसा शौर्याचा बोध होतो तसा पुंस् या शब्दावरून लग्नाचा किंवा शौर्याचा बोध होत नाहीं. व्याकरणांत याचा अर्थ पुल्लिंग असा आहे.

[3] पु रु ष.—हा ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांमध्यें 'मनुष्य' या अर्थानें योजलेला सामान्य शब्द आहे. मनुष्य हा अथर्ववेदाप्रमाणें पांच तत्त्वांचा बनलेला आहे व ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें सहा तत्त्वांचा बनलेला आहे. कांहींच्या मतें हा सोळा, वीस, एकवीस, चोवीस अथवा पंचवीस तत्त्वांचा बनलेला आहे.परंतु ही कमी अधिक मोजदाद काल्पनिक आहे. मनुष्य हा श्रेष्ठ प्राणी आहे, परंतु तो तत्त्वतः सामान्य प्राणीच आहे. मनुष्याची उंची कात्यायन श्रौतसूत्रांत चार अरत्नी दिली आहे ( दोन पद = अरत्नि; बारा अंगुलें = पद ); आणि 'पुरुष' ही संज्ञा सुद्धां पूर्वीच्या ग्रंथांतून 'उंचीचें माप' याच अर्थानें उपयोगांत आणलेली दिसते. 'पुरुष' याचा उपयोग मनुष्याचें आयुर्मान–पिढी या अर्थानें केलेला आहे. तसेंच डोळ्यांतलि बाहुली आणि व्याकरणशास्त्रांत क्रियेचा कर्ता पुरुष या अर्थानें वरील शब्दाचा उपयोग होतो.

[4] पू रु ष.—पुष्कळ वचनांतून याचा अर्थ हलक्या दर्जाचा 'चाकर माणूस' अथवा परावलंबी असा होतो. असाच अर्थ इंग्रजी 'मॅन' या शब्दाचाहि होतो.

[5] म र्य.—याचा ऋग्वेदांत मनुष्य असा अर्थ आहे; विशेषतः तरुण पुरुष किंवा प्रेमीजन असाच त्याचा पुष्कळ वेळा अर्थ घेतला आहे. हा नेहमीं युवतीसह उल्लेखिला असतो

[6] प्राणभृत्.—याचा अर्थ जिवंत प्राणी ‘मनुष्य’ असा बृहदारण्यकोपनिषदांत आहे आणि शतपथ ब्राह्मणांतहि हाच अर्थ आहे. ‘प्राणि’ या शब्दाचाहि हाच र्थ आहे.

### मनुष्यसामान्यनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1] ऊर्जव्य | [3] पस्त्यावत् | [5] मेध्य |
| [2] द्विपाद् | [4] पायु | [6] रक्षितृ |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [7] जनता | [10] भागदुघ् | [12] मनुष्यविश् |
| [8] पुरोधा | [11] भ्रूणहन् | [13] यायाव |
| [9] ब्रह्मवादिन् | | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| [14] चाक्षुष | [16] ब्रम्हज्य | [18] श्रोत्रिय |
| [15] तायादर | [17] रथजूति | |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [19] मंहिष्ठ | [20] महाब्राह्मण | [21] महाशाल |

[1] ऊर्जव्य.—हा शब्द फक्त एक वेळच ऋग्वेदांत आला असून त्याचा अर्थ एका यज्ञ करणाऱ्याचें नांव असा आहे असें लुडविग म्हणतो. तथापि रॉथ म्हणतो कीं, त्याचा अर्थ ‘बलवान् सशक्त’ असा विशेषणात्मक आहे; आणि हें भाषांतर सयुक्तिक दिसतें.

[2] द्विपाद.—‘दोन पायाचा’ या शब्दावरून ऋग्वेद कालापासून पुढें झालेल्या ग्रंथांत चतुष्पादाच्या उलट अशा अर्थाचा म्हणजे मनुष्याचा बोध होतो.

[3] पस्त्यावंत.—पदपाठामध्यें पस्त्यावंत असा शब्द असून तो ऋग्वेदामध्यें अनेक ठिकाणीं आलेला आहे. त्यापैकीं दोन ठिकाणीं श्रीमंत गृहस्थ असा त्याचा अर्थ होतो; व आणखी दोन ठिकाणीं घर असा अर्थ स्पष्ट दिसतो.

[4].पायु.—रक्षक या अर्थानें हा शब्द ऋग्वेदामध्यें कित्येक वेळा आलेला आहे.

[5].मेध्य.—प्राचीन याज्ञिक. हें मनुष्याचें नांव ऋग्वेदाच्या एका ऋचेंत आलेलें आहे. शांखायनश्रौतसूत्रामध्यें याला प्रस्कण्वाचा उपकार कर्ता पृषध्र मेध्य मातरिश्वन् असें म्हटलें आहे.

[6] रक्षितृ.—रक्षण करणारा, पालक या अर्थी हा शब्द ऋग्वेदांत व तदुत्तरग्रंथात आलेला आहे.

[7] जनता.—हा शब्द तैत्तिरीय संहिता व तदुत्तर संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत वारंवार येतो. त्याचा अर्थ एका ज्ञातीचे लोक किंवा धार्मिक मंडळी असा होतो.

[8] पुरोधा.—याचा अर्थ पुरोहिताचें पद असा आहे. पुरोहित म्हणजे ‘घरगुती भटजी’ अथर्ववेद व तदनंतरचे ग्रंथ यांत आलेल्या या शब्दाच्या उल्लेखांवरून हें स्थान अथवा पद पूर्णपणें सर्वमान्य व उपयुक्त होतें असें दिसतें. ऐतरेय ब्रा. ७.३१ व ८.२४ येथें हा शब्द स्त्रीलिंगी वापरला असून ८.२७ मध्यें त्याचा पुल्लिंगत्वानें निर्देश केला आहे.पुरोहित शब्दाचे अर्थ पुढील प्रमाणें होतातः (१) पुरोहित म्हणजे धर्मकृत्यें करणारा प्रतिनिधि (२) पुरोहित राजांच्या व सरदारांच्या घरीं अथवा शहराबाहेर वनांत रहात असत. (३) पुरोहितावाचून देव हवन स्वीकारीत नाहींत असा समज असे (४) प्रार्थना करून राजाचें रक्षण करणें व युद्धांत जय मिळवून देणें हें पुरोहिताचें काम होतें.

[9] ब्रह्मवादिन्.—( ब्रह्माचें विवरण करणारा ). याचा अर्थ तै. संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत वेदान्ती असा होतो. ब्रह्मविद् ( शुद्ध स्वरूप जाणणारा ) याचाहि तोच अर्थ होतो तै. संहितेंत या शब्दाचा उल्लेख केलेल्या सर्व ठिकाणीं यज्ञ प्रकरण चालू असल्यानें तेथें भाष्यकारांनीं ‘ब्रह्मविदाः = वेदार्थविचारकाः’ असा अर्थ केला आहे, व तो बरोबर दिसतो. तै. आरण्यक व. छां. उप. यांमध्येंहि ‘ब्रह्मवादिन् = वेदान्ती’ असा अर्थ नसून ‘वेदार्थविचारक’ एवढाच अर्थ प्रतीत होतो.

[10] भागदुह्.—‘भाग देणारा,’ ‘वाटणारा.’ यजुर्वेद संहितेंत व ब्राह्मण ग्रंथ यांमध्यें राजाच्या एका रत्ना(रत्निन्)चें हें नांव आलेलें आहे. याच्याकडे काय काम होतें हें नीट समजत नाहीं. सायण कांहीं ठिकाणीं याचा अर्थ गोळा करणारा व शिल्पी असा करतो.याप्रमाणें तो या माणसाला वसुली कामगार असें समजतो.(वा.सं.३०,१३)मैत्रायणी संहितेंत ‘रत्निन्’चा अनुक्रम असा दिला आहेः—ब्रह्मन्,राजन्, महिषी, परिवृक्ती, सेनानी, संग्रहिष्ट, क्षतृ, सूत, वैश्यग्रामणी, भागदुह्, तक्षरथकारौ, अक्षावाप आणि गोविकर्त. प्रजेपासून राजाचा भाग वसूल करणारा कामगार असा याचा अर्थ आहे ( तै. ब्रा. १. ४, ८. १ ). शिल्पी असा अर्थ कोठेंहि आढळत नाहीं.

[11] भ्रूणहन्.—गर्भघाती, गर्भहन्ता. भ्रूणहत्या ‘गर्भघात’ या शब्दांचा अर्थ एका गुन्ह्याचा वाचक असून त्या गुन्ह्यांचा अत्यंत निषेध तैत्तिरीय, कठ इत्यादि संहितांतून वारंवार केलेला आहे. हा अत्यंत भयंकर प्रकारचा गुन्हा असून त्याचें पातक कशानेंहि धुवून निघत नाहीं असें तेथें स्पष्ट म्हटलें आहे. उत्तरकालीन वाङ्मयांतहि या गुन्ह्याचा निर्देश करतांनां नापसंती दर्शविली जाते. याच एका गोष्टीवरून बापांनां मुली नकोशा असल्या तर ते त्यांनां मरूं देत असत, ही गोष्ट असत्य व चुकीची आहे हें उघड दिसतें. अथर्व. ६ ११२, ६ ). तेव्हां भ्रूणहत्या म्हणजे गर्भाची किंवा अशा माणसाची हत्या होय. त्रयी विद्येचें ( तीन वेदांचें ) ज्ञान असणारा ब्राह्मण तो भ्रूण असें तै. आ. २. ७, ३ येथें म्हटलें आहे.

[१२] म नु ष्य वि श्, म नु ष्य वि श आणि म नु ष्य वि शा.— या शब्दाचा अर्थ मनुष्य जात मानव असा तैतिरीय संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत दिला आहे.

[१३] या या व र.—यायावर याचा राहण्याचें ठिकाण नक्की ठरलें नसलेला असा अर्थ यजुर्वेद संहितेंत दिला आहे.

[१४] चा क्षु ष.— हा शब्द फक्त अथर्ववेदामध्यें एकदां आलेला आहे. सें. पी. कोशावरून असें दिसतें कीं, हा शब्द पित्याच्या नांवावरून बनलेलें नांव असावें. व्हिट- नेच्या मते हा शब्द चक्षुः या शब्दाचें विशेषण आहे.

[१५] ता या द रः— तयादराचा असा या शब्दाचा अर्थ अथर्व वेदांत आहे.

[१६] ब्र ह्म ज्य.—ब्रह्मज्य म्हणजे ब्राह्मणांचा छळ कर- णारा व ब्रह्मज्येय म्हणजे ब्राम्हणांचा छल. हे दोन शब्द अथर्ववेदांत पुष्कळ वेळां येतात; व त्यांचा अर्थ अत्यंत नीच अपराध असा होतो. या अपराधाची शिक्षा अपराधी मनुष्याच्या नाशांत होते.

[१७] र थ जू ति.— अथर्ववेदांत ( १९. ४४, ३ ) हा शब्द विशेषणांत आलेला आहे. विशेषण व नाम या दोन्ही अर्थानें हा शब्द येतो. रथांत बसून वेगानें रथ नेणारा असा त्याचा अर्थ आहे.

[१८] श्रो त्रि य.— अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथ यामध्यें याचा अर्थ वेदविद्येंत प्रवीण, धर्मज्ञानी असा दिलेला आहे.

[१९] मं जि ष्ठा.— अधिक, जास्त वेडा हा शब्द ऐतरेय (३. २, ४ ] आणि शांखायन [ ८. ७] आरण्यक या ग्रंथां तून आला आहे.

[२०] म हा ब्रा ह्म ण.—'मोठा ब्राह्मण' हा शब्द बृहदारण्यक उपनिषदांत आला आहे ( २. १, १९, २२ ). आणि त्याचा अर्थ फारच वजनदार, महत्वाचा ब्राह्मण असा आहे.

[२१] म हा शा ल.— ( मोठे घर असलेला ), मोठ्या घराचा स्वामी. हें विशेषण छांदोग्य उपनिषदांत अश्वपतीच्या तालमींत तयार झालेल्या ब्राह्मणांस लावीत असत ( ५. ११, १ ). अर्थात हें त्यांचें महत्व वाढविण्यासाठींच आहे.

## मानवविशेष [ ऋग्वेद ]

ऋग्वेदांतील मानवविशेष, राजे, मानवी स्त्रिया यांच्या संबंधी माहिती पूर्वी दाशराज्ञयुद्ध या प्रकरणांत येऊन गेली असल्यामुळें त्याशब्दांवर येथें टीपा दिल्या नाहींत.

| | | |
|---|---|---|
| अंशु | आश्वघ्न | उशीज |
| अघाश्व | अस्त्रबुध्न | ऋजिश्वन् |
| अध्रिगु | उक्षण्यायन | ऋक्ष |
| अयस्थूण | उग्रदेव | ऋभु |
| अर्य | उपमन्यु | एवार |
| अलाय्य | उरुःकक्ष | कण्वसखा |
| अन्हवाय्य | उरुक्षय | कद्रु |
| कर्कंधु | पठर्वन् | शचीवत् |
| कशीजु | परमज्या | शण्डीक |
| कीनार | परावृज | शात्रि |
| कीनाश | पवीरु | शयु |
| कुचर | पार्षद्वाण | शविष्ठ |
| कुंडपाय्य | पिठीनस | शाकिन् |
| कृप | पियारु | शातवनेय |
| कृश | पुरुमित्र | शार्यात |
| कृशानु | पृक्ष | शिग्रु |
| गांगय | पृथुयामन् | शुचंति |
| गुंगु | पृदाकुसानु | शुचा |
| गोशर्य | पृषध्र | शुचिजन्मा |
| चिकितान | पेदु | शृंगवृष |
| जातूष्ठिर | प्रपाथिन् | श्याव |
| तरुक्ष | प्रमगंद | श्यावक |
| तान्व | फर्वर ( पेरणारा ) | श्याव्य |
| त्रैतन[दास,चाकर | ब्रह्मण्य | श्रुतर्य |
| दशग्व | बल्बूथ | श्रुष्टिगु |
| दशव्रज | बृबु | श्वैत्रेय |
| दशोण्य | बृसय | सप्तगु |
| दासवेश | भृगवाण | साप्त |
| दुःशीम | मख | साप्य |
| देवक-मान्यमान | मान्यमान | सुदेव |
| द्विबंधु | मायु | सुनीथ |
| ध्वसंति: | यंतृ | सुबंधु |
| नमीसाप्य | वरशिख | सुमेध |
| नर्य | वसुरोचिष् | सुषामन् |
| नववास्त्व | कानबंधु | सौबश्व्य |
| नहुष्टर | वायत | स्मदिभ |
| नार्य | वार्षागिर | स्यूमरश्मि |
| नाहुष | वृषणश्व | स्वर्णर |
| निंदिताश्व | वृषन् | हरयाण |
| नैचाशाख | वेत | हिरण्यहस्त |
| पड्गृभि | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| एकत | द्वित | बार्हस्पत्य |
| [१]तुर्मिंज औपोदिति | नाभानेदिष्ठ-मानव | [५]शर्यु |
| त्रित | [४]प्रवर | शुनःशेप |
| [२]दंड औपर | प्रावाहणि बबर. | सावर्सेनि |
| | मनु | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अघाश्व | आप्त्य | ऋजिश्वन् |
| अतिथिग्व | आयु | एतश |
| अथर्वन् | आर्जुनेय | काण्व |

| | | |
|---|---|---|
| कुवित्स | वण्ड | वसुनीति |
| कुशिक | [१०] बार्हत्सामा, | वामदेव |
| कौरम | भेद | विमद |
| क्षय | मनु | वैन्य |
| [६] तक्षक | मानव | वैशालेय |
| तुग्र्यवृध | मेधातिथि | व्यश्व |
| दशग्व | राजाश्व | [११] शांबु |
| [७] धृतराष्ट्र | राम | श्याव |
| [८] पुरुदम | रेभ | श्यावाश्व |
| [९] प्रतीपप्रतिसुत्वन | वध्र्यश्व | संजय |

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| पद्दश | पीवोन्न | रयिवृध |

( संहितेतर )

| | | |
|---|---|---|
| पद्दंश | [१५] शतद्युम्न | [२१] श्यापर्णसायकायन |
| आग्निवेश्य | [१६] शाकटायन | |
| [१२] क्रौष्टुकी | [१७] शाकपूणि | श्यामपर्ण |
| गंधर्वायण बालेय | [१८] शाकायानिन् | श्वाजनि |
| [१३] यक्ष | [१९] शालवत्य | सत्यादिवान्ह |
| [१४] वैजान | [२०] शैलिन् | |

[१] तु मि ज औ पो दि ति.—तैत्तिरीय संहितेमध्यें (१.७,२,१) सत्राचे वेळीं होता (पुरोहित) व सुश्रवस् बरोबर वादविवाद करण्यांत गुंतलेल्या एका माणसाचें हें नांव आहे.

[२] दं ड औ प र.—उपराचा वंशज. याचा उल्लेख तैत्तिरीय संहिता (६.२,९,४) व मैत्रायणी संहिता (३.९,७) या ग्रंथांत कोणतेंसें व्रत केल्यामुळें आला आहे.

[३] ना भा ने दि ष्ठ मा न व.—ऋग्वेदोत्तर संहिता व ब्राम्हण ग्रंथ यामध्यें याचा बाप मनु यानें आपल्या मिळकतीची वांटणी केली तेव्हां या नाभानेदिष्ठाला प्रथम वांटणींत अर्जीबात वगळलें पण वडिलांच्या सल्ल्यावरून त्याला आंगिरसाकडून जेव्हां गायी मिळाल्या तेव्हां त्याचें समाधान झालें. शांखायन श्रौतसूत्रांत हें जें अद्भुत कृत्य आंगिरसांनीं केलें त्याची तुलना सूक्तांत आपल्या आश्रयदात्यांची महती गाणाऱ्या इतर द्रष्ट्यांच्या अद्भुत कृत्यांशीं केलेली असून या आंगिरसांच्या अद्भुत कृत्यानें ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतील बासष्टावें सूक्त निर्माण झालें असेंहि म्हटलें आहे. नाभानेदिष्ठाच्या सूक्तांचा उल्लेख ब्राह्मण ग्रंथांत वारंवार आलेला आहे. पण हा या सूक्ताचा कर्ता आहे या पलीकडे दुसरी कांहीं एक माहिती त्या सूक्तांत मिळत नाहीं. संहिताग्रंथांत एके ठिकाणीं तो कवि होता असें म्हटलें आहे. पण हा लेखच जरा संदिग्ध दिसतो. व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या नाभानेदिष्ठ याचा अवेस्तामधील नबानझ्दिष्ट याच्याशीं संबंध असावा व त्यावरून पओइरियो-ट्कएषच। फ्रवशी व नबानझ्दिष्टचा फ्रवशी यांचाहि संबंध असावा असें वाटतें. लॅरेनच्या मतानें या कथेंत इराणी व आर्य लोक यांची जी फारकत झाली तिचा उल्लेख असावा. पण असा उल्लेख असणें अगदीं अशक्य आहे असें रॉथचें ठाम मत आहे त्याच्या मतें नाभानेदिष्ठ याचा अर्थ 'जवळचा नातलग' इतकाच होतो. वेबरनेंहि असें सिद्ध केलें आहे कीं, या शब्दावरून कोणी कोणापासून शब्द घेतले हें समजणें अशक्य आहे; पण अवेस्तामध्यें 'जवळचा नातलग' हा मूळचा अर्थ कायम राहिला आहे. ऋग्वेदामध्यें हा शब्द विशेषनामच होऊन बसला.

[४] प्र व र.—होमाचे प्रसंगीं आपलें काम करण्यास्तव अग्नीला केलेलें पाचारण असा वास्तविक याचा अर्थ होतो. परंतु तै. संहितेंत अग्नीला पुरोहितांच्या पूर्वजांच्या नांवानें बोलावीत असत असा उल्लेख आहे. पण तेथें प्रवर शब्दाचा अर्थ दिला नाहीं,'आर्षेयं वृणीते' असेच शब्द आहेत. प्रवराचा अर्थ 'पूर्वजांची मालिका' असा पुष्कळांनीं केला आहे तो आम्हास मुळींच संमत नाहीं. या विषयीं सविस्तर विवेचन पुढें येईलच.

[५] ब ब र प्रा वा ह णी.—प्रवाहणाचा वंशज. तै. संहितेंत एका मनुष्याचें हें नांव आहे. आपण मोठा वक्ता व्हावें असें याच्या मनांत होतें; व त्याला भाषासौंदर्यशक्ति, साहित्यज्ञान व वक्तृत्वकला पंचविंश नामक यज्ञामुळें मिळाली.

[६] त क्ष क वै शा ले य.—(विशाला हिचा वंशज). अथर्ववेदामध्यें विराज याचा मुलगा म्हणून याचा उल्लेख आहे. पंचविंश ब्राह्मणांतहि सर्पसत्रांतील एक ब्राह्मणाच्छंसी नामक पुरोहित असा याचा उल्लेख आहे.

[७] धृ त रा ष्ट्र.—'ज्याचें राष्ट्र भक्कम पायावर बसलेलें आहे' असा याचा अर्थ आहे. अथर्ववेद व पंचविंश ब्राह्मण यामध्यें ऐरावत हें पितृप्राप्त नांव असलेल्या एका सर्परूपी राक्षसाचें हें नांव आहे.

[८] पु रु द म.—अथर्ववेदामध्यें हा शब्द अनेकवचनीं आलेला असून हें स्तोत्याचें नांव आहे असें लुडविगचें मत आहे. पण रॉथ व व्हिटने याचा अर्थ पुष्कळ घरांचा स्वामी असा करितात.

[९] प्र ती प प्रा ति स त्व न, अ थ वा प्रा ति सु त्व न.—हें एका मनुष्याचें नांव अथर्ववेदांत आलेलें आहे. झिमरची कल्पकता खालील तुलनेंत फारच वाखाणण्यासारखी आहे. अथर्ववेदांत परिक्षित हा कुरूंचा राजा असा उल्लेख आला आहे आणि महाभारतांतील वंशावळीप्रमाणें त्याचा नातू प्रतिश्रवस् व पणतू प्रतीप हा होता. त्याच्याशीं प्रातिसुत्वन (बहुधा प्राकृत रूप प्रतिश्रुत्वन) याचें विशेष साम्य आहे परंतु हें साम्य मुळींच खरें मानतां येत नाहीं. अथवा ही वंशावळि कदाचित् अथर्ववेदांतूनसुद्धां घेतली असावी. कदाचित् याबद्दल स्वतंत्र दंतकथासुद्धा प्रचलित असावी. बोथलिंक याला प्रतिसत्वमम् ( सत्वनांच्या अगदीं विरुद्ध दिशेस' ), असें रूप देतो आणि हें कदाचित् बरोबरहि असूं शकेल.

[१०] बा र्ह त्सा मा.—हा शब्द नियमाविरुद्ध झालेला आहे. याचा अर्थ बृहत्सामन्ची कन्या असा आहे. अथर्व

दांतील एका ऋचेंत हिच्या नांवाचा उल्लेख सुलभ गर्भधारणेविषयीं आला आहे.

[११] शां बु.—अथर्ववेदांतल्या एका लेखांत आंगिरसांबरोबर हा शब्द अनेकवचनीं आलेला आहे; व हें नांव प्राचीन गुरूंच्या घराण्याचें आहे. शांबव्याचें एक गृह्यसूत्र हल्लीं प्रचारांत आहे. यांनां अंगिरसां अपत्यभूतेभ्य असें म्हटलें आहे.

[१२] क्रोष्टुकि.–'क्रोष्टुकवंशज. निरुक्त, बृहद्देवता आणि छंदस् यांत हा एक वैय्याकरणी व अथर्ववेदाच्या परिशिष्टांत एक ज्योतिषी होता असें लिहिलें आहे.

[१३] य क्ष.—मनुष्याचें नांव. गिरिक्षिताचे वंशज जे यक्ष त्यांचा काठक संहितेंत उल्लेख आलेला आहे.

[१४] वै जा न.—'विजनाचा वंशज. सायणाचें मतें पंचविंश ब्राह्मणांत वृषाचें हें पितृप्राप्त नांव आहे. वेबरनें म्हटल्याप्रमाणें खरा पाठ वैजान असा आहे.

[१५] श त द्यु म्न.—तैत्तिरीय ब्राह्मणांत म्हटल्याप्रमाणें ( १. ५,२,१ ) यज्ञाला अगदीं योग्य वेळ कोणती हें ज्ञान असल्यामुळें मत्स्य नांवाच्या पुरोहितानें ज्याला यज्ञेषु याच्या बरोबर भरभराटीच्या स्थितींत आणून सोडलें त्या माणसाचें हें नांव आहे.

[१६] शा क टा य न.—निरुक्त त्याचप्रमाणें प्रातिशाख्य आणि मागाहून झालेले ग्रंथ यामध्यें ज्याचा उल्लेख आलेला आहे त्या व्याकरणकाराचें हें पितृप्राप्त नांव आहे.

[१७] शा क–पू णि.—' शकपूणाचा वंशज' वारंवार उल्लेखिलेल्या व्याकरणकाराचें हें नांव निरुक्तामध्यें आलेलें आहे.

[१८] शा का य नि न्.—शतपथ ब्राह्मणांत (१.४,५,१) अनेकवचनीं या शब्दाचा अर्थ शाकायनाचे अनुयायी असा आहे.

[१९] शा ला व त्य.—'शालावताचा वंशज.' छांदोग्य उपनिषदामध्यें ( १.८,१ ) शिलकाचें व जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत ( १.३,८,४ ) गलूनस आर्क्षाकायनाचें हें पितृप्राप्त नांव आहे.

शै लि न, शै लि नि.—' शिलिनाचा वंशज.' शतपथ ब्राह्मणांत जित्वन्चें हें पितृप्राप्त नांव आहे. याची शैलन शब्दाशीं तुलना करण्यास कांहीं हरकत नाहीं.

श्या प र्ण सा य का य न.—हें एका माणसाचें नांव असून शतपथ ब्राह्मणांत म्हटल्याप्रमाणें यज्ञचिती मांडण्याचे वेळीं ज्या पांचांचा बलि दिला गेला त्यांपैकीं हा एक मनुष्य आहे. त्याच ग्रंथांत हा गृहस्थ यज्ञवेदि बांधणारा होय असें म्हटलेलें आहे. त्याचा शल्वाशीं कांहीं तरी संबंध असला पाहिजे. याच्या गोत्रांतील लोकांचें वर्णन ऐतरेय ब्राह्मणांत आलेलें आहे. तें असें कीं, हे श्यापर्ण स्वतःची छाप पाडणारे उपाध्याय असून जरी त्यांनां विश्वंतर राजानें आपल्या यज्ञांतून बहिष्कृत केलें होतें तरी त्यांचा पुढारी मार्गवेयानें त्या राजाचें मन वळवून त्यांनां पुरोहिताचें काम देवविलें. कोठल्या तरी रीतीनें श्यापर्णांचा संबंध कुंती लोकांनीं केलेल्या पंचालांच्या पराजयाशीं येतो.

## मानवी स्त्रिया

सामान्य व विशेष [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्रु [विशेष] | पज्रा | वनिता |
| अपाला [विशेष] | पतिजुष्टा | वह्येशया [वाहनेशया] |
| अथरी | पतिवती | विथुरा |
| अनुदेयी [पाठराखणी] | पीप्याना [स्तनपान कराविणारी] | विदुषी |
| अपातघ्नी | पुण्यगंधा | विद्रला |
| अबला | [१] पुरंधि | विधवा |
| अभिपश्यंती | पुरुकुत्सानी | विन्दती |
| असश्चता | पुरुषा | विवाचनी |
| आश्रृण्वती | पूतक्रता | विश्पत्नी |
| उपलप्रक्षिणी | प्रजानती | विश्पला [विशेष] |
| उपसिध्मिनाणा [किंचित् हास्य करणारी] | प्रफर्वी [वृहन्नितंबा] | विश्वाची |
| उरुसा | प्रभुंजती | विसितस्तुका [विगलितकेशा] |
| उर्वशी [विशेष] | प्रसू | वीरपत्नी |
| उशिजा ,, | प्रोष्ठेशया | वीरवती |
| एकद्यू ,, | बधिरा | वीरसू |
| कमद्यू ,, | ब्रह्मजाया | वीरिणी |
| कल्याणी | भद्रा | वृचया |
| काममूता [काममूर्छिता] | मतता [विशेष] | वृषपत्नी |
| क्षत्रिया | महिषी | शिथिरा |
| गर्तारुज् [पोटगीसाठीं भांडणारी] | मानवी | शिशुमती |
| गर्भरसा | मानुषी | शुंध्यु |
| घोषा [विशेष] | मुद्गलानी | शूरपत्नी |
| जनि [जाया] | मेना [विशेष] | सती |
| जमदग्निदत्ता | योषा | सरण्यु [विशेष] |
| जहु | योषणा | ससती |
| जारयायि | योषित् | साध्वी |
| जारिणी | राजि [विशेष] | सिन्चती |
| तरुणी | रथियन्ती | सिरी |
| तल्पशीवरी | रंभिनी | सुदेवी [विशेष] |
| दासपत्नी | रहसू [गुप्त स्थलीं प्रसूत होणारी] | सुप्रजावती |
| दिधिषा | रोमशा [विशेष] | स्त्री |
| न्योचनी [दासी] | लोपामुद्रा ,, | स्ववृक्ति |
| | [२] वध्रिमती ,, | [३] हस्रा |
| | वधू | |

[ तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अप्रोदेता | अंबालिका ( ” ) | गर्दी ( भुकेलेली कन्या) |
| अंबा ( राजपत्नी) | अंबिका ( ” ) | |

[तै. सं]

| | | |
|---|---|---|
| गर्भध | परार्चि [पराङ्मुख झालेली] | योषा |
| तुंजाना [बोलणारी कन्या] | परिवृक्ति [राजाची नावडती स्त्री] | राज्ञी |
| तुन्ना [पीडित कन्या] | पेरु [पानेच्छु कन्या] | रामा |
| दासपत्नी | मलवद्वासा [रजस्वला] | सर्पिर्ग्रीवी |
| धाणिका [गर्भधारणयोग्या] | महिषी [पट्टराणी] | सुकपर्दा [बुचडा असलेली] |
| पत्नी [पतिसहित असलेली] | | सुकुरीरा |
| | | स्वौपशा |
| | | स्त्री |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंसद्री | धीरा | योषा |
| अघोरचक्षु | धेनुका [पुत्रयुक्ता] | योषित् |
| अदुर्मंगली | नारी | रिश्यपदी [दुर्लक्षणी] |
| अदेवृघ्नी | निष्ठकरी [चवचाल दासी] | वधू |
| अपतिघ्नी | न्योचनी [दासी] | वह्यशीवरी |
| अपशुघ्नी | पापया | विधमा [विकृतशब्दकारिणी] |
| अपाला [विशेष] | पुंश्चली | वेहत् [गर्भघातिनी] |
| अभ्रातृघ्नी | पुण्यगंधि [गंधयुक्ता] | व्यस्तकेशा [बंधुयोषित्] |
| आर्द्रहस्ता [दासी] | प्रफर्वी [प्रथम वयस्का] | शतवाही |
| उशिजा | प्रमदा | शूरपत्नी |
| ऋतप्रजाता | प्रसू | संपत्नी |
| कुलपा | प्रियवादिनी | संप्रिया |
| कृतद्विषा | प्रोष्ठेशया | सरण्यु [विशेष] |
| गर्भधि | ब्रह्मजाया | सुभसत्तरा |
| गृहपत्नी | भस्मा [कुमारी] | स्त्री |
| घोषबुद्धा [अवाजानें जागी होणारी] | महिषी | स्वपन्ती |
| तल्पेशया | यशस्वती | |
| दुर्भगा | योषणा | |
| दोषनिश्रिष् | | |

[ वा. सं. ]

[4] सुभद्रिका

[ ककाठ सं. ]

[5] मनावी

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [6] अहल्यामैत्रेयी | [9] मांडवी | [12] वावाता |
| [7] आटिका | [10] मैत्रेयी | [13] सुकन्या |
| [8] जबाला | [11] वाचक्नवी | [14] सुदेवला |

[1] पुरंधि.—ऋग्वेदामध्यें अश्विनांचीं आश्रित असलेल्या एका स्त्रीचें बहुतकरून हें नांव असावें. अश्विनांनीं हिला एक हिरण्यहस्त नांवाचा पुत्र दिला. पुरंधि हें विशेष नाम नसून तें 'वध्रिमती' चें विशेषण आहे. 'वध्रिमती' ही राजाची बायको होती. परंतु तिचा नवरा नपुंसक होता.

[2] वध्रिमती.—'षंढ नवरा असलेली स्त्री.' हा शब्द ऋग्वेदामध्यें एका स्त्रीचें नांव म्हणून आलेला आहे. या बाईच्या नवऱ्याला पुरुषत्व अश्विनांच्या कृपेमुळें आलें व तिला तिच्या नवऱ्यापासून हिरण्यहस्त हा मुलगा झाला. हा शब्द एकंदरींत वर्णनात्मक असावा.

[3] हस्रा.—'हसणारी बायको.' पिशेलच्या मतानें ऋग्वेदामध्यें या शब्दाचा अर्थ वारयोषित् असा आहे.

[4] सुभद्रिका.—वाजसनेयि संहितेमध्यें अश्वमेधप्रकरणांत हा शब्द आला आहे. वेबरच्या मतें हें कांपील नांवाच्या राजाच्या बायकोचें नांव आहे; पण महीधराच्या मतानें अनेक जार असलेली स्त्री किंवा वारयोषित् असा या शब्दाचा अर्थ आहे व हा अर्थ रॉथलाहि मान्य आहे. तैत्तिरीय व काठक संहिता यामध्यें ज्या अर्थी सुभद्रिका हा शब्द नसून सुभगे हें संबोधनार्थी रूप आलेलें आहे त्या अर्थी या शब्दाच्या अर्थाबद्दल संशयच आहे.

[5] मनावी.—'मनूची बायको' काठक संहिता व शतपथ ब्राह्मण यांत या नांवाचा उल्लेख येतो.

[6] अहल्या मैत्रेयी.—'अहल्यायै जार' या इंद्राच्या विशेषणावरून पुष्कळ ब्राह्मण ग्रंथांत जी गोष्ट एका स्त्री विषयीं आली आहे त्या स्त्रीचें हें काल्पनिक नांव आहे.

[7] आटिकी.—छांदोग्य उपनिषदांत (१. १०, १) उषस्ति याच्या बायकोचें हें नांव आहे.

[8] जबाला.—छांदोग्य उपनिषदामध्यें (४. ४, १–४) जारजपुत्र सत्यकाम याच्या आईचें जबाला हें नांव आहे.

[9] मांडवी.—मंडूच्या वंशांतील स्त्री. बृहदारण्यक उपनिषदांत एका गुरूच्या नांवांमध्यें हा शब्द आढळतो (६. ४, ३०). वात्सी-मांडवी पुत्र हें त्याचें नांव आहे. हें नांव काण्व बृहदारण्यकांत नाहीं. माध्यंदिनामध्यें असावें.

[10] मैत्रेयी.—बृहदारण्यक उपनिषदाप्रमाणें (२. ४, १; ४. ५, १) हें याज्ञवल्क्याच्या दोन बायकांपैकीं एकीचें नांव आहे.

[11] वाचक्नवी.—'वचक्नूचा वंशज' हें पैतृक नांव असून एका स्त्रीचें आहे; व हेंच गार्गीचें पैतृक नांव होय. ही स्त्री बृहदारण्यक उपनिषदामध्यें ब्रह्माची शिष्या म्हणून प्रसिद्ध आहे.

[12] वावाता.—ऐतरेय ब्राह्मणांत महिषीच्या खालोखाल राजाच्या आवडत्या बायकोचें हें नांव आलेलें आहे.

[13] सुकन्या.—शतपथ ब्राह्मणाच्या मताप्रमाणें च्यवनाशीं लग्न लावणाऱ्या शर्याताच्या मुलीचें हें नांव आहे.

[14] सुदेवला.—बौधायन श्रौतसूत्रामध्यें (२०. १२) ऋतुपर्णाची स्त्री या नात्यानें हें नांव आलें आहे.

## राजोविशेष [ ऋग्वेद ]

अक्ष
अतिथिग्व
अभ्यावर्तिन्-चाय-मान
अंबरीष
अरट्व
अर्ण चित्ररथ
अश्वथ
अश्वदावन्
असमाति
आग्निवेशि
आयवस
आयु
आर्क्ष
आर्चत्क
आर्ष्टिषेण
आश्वघ्न
आश्वमेध
आसंग
इक्ष्वाकु
इंद्रोत
इष्टरश्मि
इष्टाश्व
उपमश्रवस्
ऊर्जव्य
ऋक्ष
ऋजिश्वन्
ऋज्राश्व
ऋणंचय
एकराज्य ( विशेषण )
ऐल
कशु
कानीत
कुरुंग
कुरुश्रवण
कृप
कौरयाण
क्षत्रश्री
क्षपावान्
खेल
गिरिक्षित
चित्र
चित्ररथ
चैद्य
च्यवतान
जाहुष
तिरिंदिर
तुग्र
तुजि
तुर्वश
तुर्वीति
तूतुजि
तूर्वयाण
तृक्षि
तृणस्कंद
तौग्र्य
त्रसदस्यु
त्रासदस्यव
त्रैवृष्ण
त्र्यरुण
दशद्यु
दस्यवेवृक
दार्भ्य
दिवोदास
दीर्घनीथ
दीर्घश्रवस्
दुर्गह
देववात
देवश्रवस्
देवापि
दौर्गह
द्योतन
ध्वन्य
ध्वस्र
नार्मर
नाहुष
निंदिताश्व
पक्थ
पज्रिय
पाकस्थामन्
पारावत
पार्थव
पार्थिव
पार्थ्य
पाशद्युम्न
पुरुकुत्स
पुरुणीथ
पुरुपंथा
पुरुमाय
पुरुमित्र
पुरुमीह्ळ
पुरुषंति
पुरूरवस्
पृश्निगु
पेदु
पैजवन
पैद्व
पौतक्रत
पौर
पौरुकुत्सि
प्रतर्दन
प्रमर
प्रस्तोक
प्रातर्दनि
प्रियरथ
प्लायोगि
बृहद्रथ
भजेरथ
भयमान
भाव्य
भुज्यु
मनुस्
मशर्शार
मित्रातिथि
ययाति
याद्व
युध्यामधि
रजि
रथप्रोष्ठ
रथवीति
राजपुत्र [विशेषण]
राम
रुम
लक्ष्मण्य
वार्षागिर
विदथ
विभिंदु
विश्पलावसू
वृकद्वरस्
वृषणश्व
वेतसु
वैदथिन्
वैददश्वि
वैशंत
शकपूत
शाण्ड
शौरदेव्य
श्रुतरथ
श्रुतर्वन्
श्वैत्रेय
सांवरण
साञ्जेय
साहदेव्य
सुकृत्वन्
सुदास
सुराधस्
सुश्रवस्
सृंजय
सोमक
स्वनय
ह्रिराणिन्

[ तै. सं. ]

[१] उदंकशौल्बायन
[२] केशी दार्भ्य
ऋतुजिज्जानकि
[३] परआट्णार
पूरु
पौरुकुत्स
भरत
[४] भालंदन
वेन
शार्यात
श्याव
सगर
सत्राजित्
सात्यकामि
जय
सौदास

[अथर्ववेद]

अतिथिग्व
आनु
आयु
इक्ष्वाकु
कौर
तुर्वश
तुर्वीति
तूर्वयाण
त्रसदस्यु
[५] परिक्षित्
पृथी
पौरुकुत्सि
मान्धातृ
याद्व
वैयश्व
श्यावक
सुदास
सुश्रवस्
हर्यश्व

[ काठकसंहिता ]

[६] दिवोदास भैमसेनि

[संहितेतर]

[७] अंगवैरोचन
[८] अजातशत्रु
[९] अत्यरातिजानंतपि
[१०] अपाच्य
[११] अभिप्रतारिन्-[काक्षसेनि]
[१२] अमित्रतपन शैब्य
अरिंदम सनश्रुत
[१३] अश्वपति
[१४] असमाति रथप्रोष्ठ
[१५] आंबाष्ठ्य
आर्क्ष
[१६] इंद्रद्युम्न भाल्लवेय
[१७] इंद्रोत देवापि, शौनक
[१८] उग्रसेन
[१९] उच्चैश्रवस् कौपयेय
[२०] ऋतुपर्ण
[२१] ऋषभ
[२२] एकादशाक्ष-मानुतंतव्य
[२३] ऐक्ष्वाक
[२४] औग्रसैन्य
[२५] औपतस्विनि
[२६] कामप्रि
[२७] काशि
केकेय
[२८] कोक
[२९] कौसल्य
[३०] गान्धार
[३१] जनक
[३२] जनमेजय
[३३] जानक
[३४] जैत्रायणसहोजित्
[३५] जैवल-जैवलि
[३६] दक्षपार्वति
[३७] दुर्मुख
[३८] दुष्टरीतु
[३९] देवकीपुत्र
[४०] देवराजन्
[४१] दैवाप
[४२] दैवावृध
[४३] दैवोदासि
[४४] दौष्यंति
[४५] द्वैतवन
[४६] धानंजय
धृतराष्ट्र-

| | | |
|---|---|---|
| वैचित्रवीर्य | ६४ मरुत्त अविक्षित | सात्राजित् |
| ४८ ध्वसन् | कामप्रि | शफाल |
| ४९ नग्नजित् | ६५ मान्धातृ, यौव- | शांतनु |
| ५० नडनैषध | नाश्व | ७५ शिबि |
| ५१ नाग्नजित् | ६६ मार्गवेय | ७६ शुनःकर्ण |
| ५२ नैषधि | ६७ मुंजसामश्रवस् | शुष्मिन् |
| ५३ पांचाल | मुद्गल, मुद्गलानी | ७७ शैब्य |
| ५४ पारिक्षित | ६८ युधांश्रौष्टि औग्र | ७८ शोण सात्रासाह |
| ५५ प्रतीदर्शश्वैक्न | सैन्य | श्रुतसेन |
| ५६ बल्हिकप्रातिपीय | योगन्धारि | ७९ मनश्रुत, अरि- |
| ५७ भगीरथ ऐक्ष्वाक | ६९ रथप्रोत दार्भ्य | दम |
| ५८ भंगाश्विन् | ७० रोहित | ८० सुत्वन् कैरिषि |
| ५९ भयदआसमात्य | ७१ वाराकि | भार्गायण |
| ६० भाल्किह | ७२ विदेघ | ८१ सुप्लन् (सार्जय) |
| ६१ भीमसेन | ७३ वृद्धद्युम्न अभिप्र- | सौद्युम्नि |
| ६२ भीमवैदर्भ | तारिन् | सौषद्मन् |
| भैमसेन | वैदर्भ | स्वर्जित् नग्नजित् |
| भैमसेनि | वैदर्भि | ८२ हरिश्चंद्र वैधस- |
| ६३ भौवन | वैन्य | ऐक्ष्वाक |
| मनुष्यराज, मनुष्य | वैधस् | ८ हिरण्यनाभ |
| राजन् | ७४ शतानीक, | ८४ रण्यनाभ |

[1] उदन्कशौल्बायन.—प्राण आणि ब्रह्म एकच आहेत असे याचे विचार असल्याबद्दल बृहदारण्यक उपनिषदांत (४. १, ३.] वर्णन आलें आहे. तो विदेह देशाच्या जनकराजाचा समकालीन असावा असें वाटतें. तैत्तिरीय संहितेंत [ ७. ५, ४, २ ] सत्रांतील दशरात्रक्रतु हाच मुख्य भाग आहे असें त्याचें मत होतें असा उल्लेख आहे. उदंक हें नांव आहे व शौल्बायन हें पैतृक नांव आहे.

[2] केशिन् दार्भ्य अथवा दाल्भ्य.—'दर्भाचा वंशज'. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें तो राजा होता व जैमीनीय उपनिषद्ब्राह्मणाप्रमाणें तो उच्चैःश्रवस् याच्या बहिणीचा मुलगा होता. पांचाल हे त्याचे प्रजाजन होते, म्हणून केशिन् ही त्यांचीच एक शाखा असावी, आणि त्यांचे तीन वर्ग (त्र्यनीक) होते असें म्हणतात. धार्मिक दिक्षेचे बाबतींत त्याचें षाण्डीक याच्याशीं पटत नव्हतें अशी एक कथा मैत्रायणी संहितेंत आहे; हीच गोष्ट शतपथ ब्राह्मणांत दुसऱ्या शब्दांत दिली आहे व मैत्रायणी आणि तैत्तिरीय संहिता यावरून केशिन् हा सात्यकामि याचा समकालीन होता असें वाटतें. पंचविंश ब्राह्मणाप्रमाणें एक साम अथवा एक गीताचा हा द्रष्टा आहे असें दिसतें; व हें गीत याला सुवर्ण पक्ष्यानें कसें शिकविलें याचा कौषीतकि ब्राह्मणांत उल्लेख आहे. जुनें वाङ्मय दार्भ्य हा ऋषि आहे असें मानितें. आणि म्हणून शतपथ ब्राह्मणावरील टीकेंत तो राजा असल्याबद्दलचा व त्याच्या प्रजेचा जो उल्लेख आला आहे तो कल्पित नाम मानावा याबद्दल शंका उत्पन्न होते. कारण, तो ऋषि असावा हाच अर्थ चांगला लागू पडतो. शिवाय जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणावरहि जास्त भरंवसा ठेवतां येत नाहीं. काठक संहितेंत केशिन् लोक असा जो उल्लेख आहे तो राज्यपद दर्शवितो असें उत्तरकालीन ग्रंथकार (जै. उ. ब्रा.) गृहीत धरून चालतात. परंतु तें अयोग्य आहे.

[3] परआट्णार.—ऋग्वेदोत्तर संहिताग्रंथ व ब्राह्मण ग्रंथ यामध्यें एक विशिष्ट यज्ञ करून पुत्र मिळविणाऱ्या पूर्वींच्या महान् राजांपैकीं हा एक होय असा उल्लेख आहे. शतपथ ब्राह्मणांत हैरण्यनाभ व शांखायन श्रौतसूत्रांत 'परआट्णार वैदेह' अशीं नांवें दिलेलीं आहेत. त्यावरून कोसल व विदेह यांचा निकट संबंध असल्याचें सिद्ध होतें. त्याच सूत्रांत उल्लेखिलेल्या यज्ञगाथेंत हिरण्यनाभ कौसल्य याचा उल्लेख 'परा' संबंधानें आलेला आहे. 'पर' हें विशेष नाम असून 'आट्णार' हें पैतृक नांव आहे. हा ऋषि आहे असें सायणाचार्य म्हणतात.

[4] भालंदन.—भलंदनाचा वंशज. पंचविंश ब्राह्मण आणि काठक व तैत्तिरीय संहिता यांत आलेल्या वत्सप्रीचें हे पैतृक नांव आहे. हा ऋग्वेदांतील एका सूक्ताचा द्रष्टा आहे.

[5] परिक्षित.—अथर्ववेदामध्यें एका राजाचें हें नांव आलेलें आहे. याच्या म्हणजे कुरूंच्या राज्यांत सुबत्ता व शांतता यांचें साम्राज्य होतें. ज्या ऋचांतून याचें गुणवर्णन आलेलें आहे, त्या ऋचांनां मागाहून 'पारिक्षित्यः' असें नांव पडलें. अग्नि मनुष्यांत राहतो म्हणून ब्राह्मण ग्रंथांत त्याला परिक्षित असें नांव दिलेलें आहे. याच कारणास्तव या नांवाचा मानवी राजा झालाच नाहीं असें रॉथ व ब्लूमफील्ड यांचें जें मत तें कदाचित बरोबर असूं शकेल. पण निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. झिमर व ओल्डेनबर्ग हे दोघेहि हा राजा होता हें कबूल करतात व या गोष्टीला आधार म्हणजे उत्तरकालीन वैदिक ग्रंथांत जनमेजय राजा पारिक्षित हे पैतृक नांव धारण करतो ही गोष्ट होय. हें जर खरें असेल तर परिक्षित मागाहून झाला असावा. कारण, ज्या अथर्ववेदाच्या लेखांत त्याचें नांव आलेलें आहे तो खात्रीनें मागाहून लिहिला गेला असावा. इतर कोणत्याहि संहिता ग्रंथांत हा शब्द आलेला नाहीं. महाभारतामध्यें या परिक्षिताला प्रतिश्रवस् याचा आजा व प्रतीपाचा पणजा असें म्हटलें आहे व झिमर अथर्ववेदांतल्या दुसऱ्या एका मागाहूनच्या लेखांत आलेल्या प्रातिसुत्वन् व प्रतीप यांच्याशीं यांची तुलना करतो व हें त्याचें करणें बरोबर दिसतें. पण देवापि व शंतनु यांचा प्रतीपाशीं संबंध जुळविणें शक्य नाहीं.

[6] दिवोदास भैमसेनी.—भीमसेनाचा वंशज. हा शब्द काठक संहितेमध्यें आरुणीचा समकालीन म्हणून आलेला आहे.

[९] अं ग वै रो च न.— ऐतरेय ब्राह्मणांत अभिषिक्त राजांच्या यादींत याचा उल्लेख आहे. याचा उदमय आत्रेय या नांवाचा पुरोहित होता.

[८] अ जा त श त्रु.—हा काशीचा राजा काश्य असून बालाकी नामक एका अभिमानी ब्राह्मणाला आत्मविद्येचें मूलतत्व शिकवीत असे असें बृहदारण्यक व कौषीतकि उपनिषदांत वर्णन आहे. बौद्धधर्मीय पुस्तकांतील अजातशत्रु आणि हा एकच असें मानतां येत नाहीं.

[९] अ त्य रा ति जा नं त पि.—हा राजा नसतांना वासिष्ठ सात्यहव्यानें याजकडून राजसूय यज्ञ करविला व त्यामुळें तो सर्व पृथ्वी जिंकण्यास समर्थ झाला. वासिष्ठ सात्यहव्यानें जेव्हां पौरोहित्याची आठवण देऊन त्याबद्दल बक्षीस मागितलें तेव्हां उत्तरकुरूंनां जिंकल्यावर सर्व पृथ्वीचें राज्य आपणास देऊन मी आपला सेनापति होईन असें त्यानें राजानें उत्तर दिलें. यावर अत्यराति म्हणाला तूं मला फसविलेंस. कारण उत्तरकुरूनां जिंकणें मनुष्याच्या स्वाधीन नाहीं. नंतर सात्यहव्यानें आपल्या तपःसामर्थ्यानें अत्यरातीचें सामर्थ्य काढून घेऊन त्याला हतबल केलें आणि शिबि राजाचा मुलगा अमित्रतपन शुष्मिन् याजकडून त्याचा वध केला ( ऐ. ब्रा. ८. २३ ).

[१०] अ पा च्य.—नीच्य आणि अपाच्य हीं पश्चिम दिशेच्या लोकांचीं नांवें आहेत असा ऐतरेय ब्राह्मणांत उल्लेख आहे.

[११] अ भि प्र ता रि न् का क्ष से नि.—जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण, छांदोग्य उपनिषद् व पंचविंश ब्राह्मण यांत हा तत्वज्ञान विवादांत निमग्न असे असा उल्लेख आहे हा कुरुवंशांतील एक राजपुत्र होता व तो जिवंत असतांच त्याच्या मुलांनीं त्याची मालमत्ता वाटून घेतली असा जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत उल्लेख आहे.

[१२] अ मि त्र त प न शु ष्मि न् शै ब्य.—शिबीचा मुलगा. यानें अत्यराति जानंतपिचा वध केल्याचा ऐतरेय ब्राह्मणांत उल्लेख आहे. अमित्रतपन हें शत्रुतापन या अर्थी विशेषण आहे.

[१३] अ श्व प ति.—हा केकय देशाचा राजा असून यानें प्राचीनसाल यास व दुसऱ्या कांहीं ब्राह्मणांनां शिक्षण दिल्याबद्दल छांदोग्य उपनिषद् व शतपथ ब्राह्मण या ग्रंथांत उल्लेख आहे.

[१४] अ स मा ति रा थ प्रो ष्ठ.—जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत रथप्रोष्ठ कुलांतील इक्ष्वाकु राजा असमाति आणि त्याचे उपाध्याय गौपायन यांच्या भांडणाची गोष्ट आढळते. ही आख्यायिका ऋग्वेदांतील एका उल्लेखावरून आली असावी. परंतु तेथें असमाति हें फक्त विशेषण आहे. नंतरची गोष्ट अशी आहे कीं, किरात आणि आकुलि या दोन असुरांनीं कुलोपाध्यायास सोडून देण्याबद्दल राजाचें मन वळविलें आणि त्यांच्यापैकीं सुबंधूचा वध करावला. परंतु त्याच्या भावांनीं त्याला ऋग्वेदांतील १०. ६० या सूक्ताच्या जपानें जिवंत केलें असा पंचविंश ब्राह्मण व बृहद्देवता या ग्रंथांत उल्लेख आहे.

[१५] आं ब ष्ठ्य.—ऐतरेय ब्राह्मणांत या राजाच्या राजसूय यज्ञांत नारद पुरोहित होता असा उल्लेख आहे. सेंट पीटर्स बर्ग कोशाच्या भाषांतराप्रमाणें हें 'आंबष्ठ यांचा राजा' असें स्थानिक नांव असावें. नंतर 'आंबष्ठ' म्हणजे ब्राह्मण जातीचा पुरुष आणि वैश्य जातीची स्त्री यांच्या पासून होणारी संतति असा अर्थ रूढ झाला.

[१६] इं द्र द्यु म्न भा ल्ल वे य वै या घ्र प द्य.—अग्निवैश्वानराचे धर्म काय आहेत या बाबतींत इतर पुरोहितांबरोबर याचें मतैक्य होत नसे. याला अश्वपति कैकेय यानें विद्या शिकविली होती. शतपथ ब्राह्मणांत याचा भाल्लवेय या नांवानें धार्मिक विधींत बऱ्याच वेळा उल्लेख आला आहे.

[१७] इं द्रो त दै वा प शौ न क.—यानें जनमेजयाच्या अश्वमेध यज्ञांत पौरोहित्य केल्याबद्दल शतपथ ब्राह्मणांत उल्लेख आहे. ऐतरेय ब्राह्मणांत जनमेजयाचा पुरोहित तुरःकावषेय हा होता असा उल्लेख आहे. जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत हा श्रुत याचा शिष्य होता असा उल्लेख असून वंश ब्राह्मणांतहि याचा उल्लेख आला आहे. ऋग्वेदांतलि देवापिचा व याचा कांहीं संबंध नाहीं.

[१८] उ ग्र से न.—शतपथ ब्राह्मण आणि गाथा यामध्यें हा भीमसेन, श्रुतसेन व जनमेजय यांचा भाऊ असल्याबद्दल उल्लेख आहे आणि अश्वमेध यज्ञ केल्यामुळें याची पापापासून मुक्तता झाल्याचाहि उल्लेख आहे.

[१९] उ चैः श्र व स कौ प ये य.—हा कुरूंचा राजा आणि केशिन् याचा मामा असल्याबद्दल जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत उल्लेख आहे. उपमश्रवस् हा कुरुश्रवणाचा मुलगा होता आणि हीं नावें सारखीं दिसतात म्हणून याचा कुरूंशीं संबंध असावा असें दिसतें.

[२०] ऋ तु प र्ण.—बौधायन श्रौतसूत्रांतील ब्राह्मण ग्रंथासारख्या एका उताऱ्यावरून हा भंगाश्विन् याचा मुलगा आणि 'शफाल' चा राजा असावा असें वाटतें. आपस्तंब श्रौतसूत्रांत 'ऋतुपर्णं कयोवधि भंग्याश्विनौ' असा उल्लेख आहे.

[२१] ऋ ष भ.—हा याज्ञतुर याचा आनुवंशिक व श्विक्नसचा राजा असून अश्वमेध करणारापैकीं एक होता असा शतपथ ब्राह्मणांत उल्लेख आला आहे. शतपथ ब्राह्मणांत गौरिवीति याच्या नांवावर जी गाथा आहे तिचा हाच बहुतेक जनक असावा असा त्या ग्रंथांत उल्लेख आहे.

[२२] ए का द श ा क्ष मा नु तं त व्य.—सूर्योदयाबरोबर होम करणाऱ्या ( उदित होमीं ) राजाचें हें नांव आहे असा ऐतरेय ब्राह्मणांत उल्लेख आहे. हा नगरिन् जानश्रुतेय याच्या समकालीं होता.

[२३] ऐ क्ष्वा क.—इक्ष्वाकूचा वंशज. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें पुरुकुत्स यानें हें आनुवंशिक नांव धारण केलें होतें. दुसरा ऐक्ष्वाक वार्ष्णि हा असून तो अध्यापक होता असा जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत उल्लेख आहे. राजा हरिश्चंद्र हा वैधस

ऐक्ष्वाक असल्याचा ऐतरेय ब्राम्हणांत व त्र्यरुण हा ऐक्ष्वाक असल्याचा पंचविंश ब्राम्हणांत उल्लेख आहे.

[२४] औ ग्र से न्य.—ऐतरेय ब्राह्मणांत राजा युधांश्रौष्टि याचें हें पैतृक नांव आहे.

[२५] औ प त स्वि नि.—शतपथ ब्राम्हणामध्यें राम याचें हें पैतृक नांव आहे.

[२६] काम प्रि.—ऐतरेय ब्राह्मणांत मरुत्त याचें हें पैतृक नांव आहे. सैंट पीटर्स बर्ग कोशांत असें सुचविलें आहे कीं तो पाठ 'काम प्रे' 'इच्छा पूर्ण करणारा' असा पाहिजे. सायणाचार्य काम प्रि हें मरुत्त याचें विशेषण आहे असें भाष्यांत म्हणतात.

[२७] काशि, काश्य.—काशि (अनेकवचनांत) म्हणजे काशीचे लोक आणि काश्य म्हणजे काशीचा राजा. धृतराष्ट्र हा शतानीक सात्राजिताकडून पराभूत झाला आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, पुन्हां ब्राह्मणांचें वर्चस्व होईपर्यंत काशी लोकांनीं यज्ञ करावयाचें बंद ठेविलें असें शतपथ ब्राह्मणांत (१३.५,४,९) म्हटलें आहे. सात्राजित हा भरत होता. अजातशत्रु हा काशीचा राजा होता असाहि उल्लेख आढळतो आणि उद्दालक याचा समकालीन भद्रसेन अजातशत्रव हाहि काशीचा राजा होता. काशि आणि विदेह हे जवळचे नातेवाईक होत. कारण भूगोलदृष्ट्या त्यांची जागा किंवा स्थान यांचा विचार केल्यास तसें होणें स्वाभाविक होतें. कौषीतकि उपनिषदांत 'काशि—विदेह' हें सामासिक नांव आलें आहे. बृहदारण्यकोपनिषदांत गार्गी म्हणते कीं अजातशत्रु हा काशि किंवा विदेहचा राजा असावा. शांखायन सूत्रांत काशि कोसल आणि विदेह यांचा एकच पुरोहित होता असा उल्लेख आहे. बौधायन श्रौत सूत्रांत काशि आणि विदेह हे अगदीं नजीक आहेत असें म्हटलें आहे. वेबर म्हणतो कीं काशि आणि विदेह हे दोन्ही मिळून उशीनर होतात आणि हें नांव वैदिक वाङ्मयांत फारच क्वचित आलें आहे. ज्याप्रमाणें कोसल आणि विदेह यांचा निकट संबंध होता त्याप्रमाणें गोपथ ब्राह्मणांत काशि आणि कोसल हे काशि—कौसल्य या सामासिक नांवांत गोविले आहेत. काशि हें नांव जरी जुनें नसलें तरी तें शहर मात्र जुनें आहे. कारण अथर्ववेदांतील वरणावती नदीचा वाराणशी (काशी) शी संबंध असावा. हें स्पष्टच आहे कीं, जर काशि—कोसल आणि विदेह हे एक होते तर त्यांचा कुरुपंचालांशीं काहींतरी वैरभाव संबंध असावा. या दोन मोठ्या राष्ट्रांत त्यावेळीं राजकीय वैरभाव व त्याचप्रमाणें संस्कृतीमध्यें थोड्याफार प्रमाणांत भिन्नता होती हें अनुमान योग्य दिसतें. कोसल आणि विदेह या राष्ट्रांतील आर्य-सुधारणेच्या प्रगतीच्या स्थितीबद्दल शतपथ ब्राह्मणांत या वेळची स्पष्ट दंतकथा सांपडते आणि ती ब्राह्मण संस्कृतीचें खरें केंद्रस्थान कुरुपंचाल देश होता याबद्दल एक आधार आहे. भूगोलदृष्ट्या स्थलावरून विचार केला असतां कोसल व विदेह हे कुरुपंचालांच्या अगोदरचे रहिवासी होते, तरी ब्राह्मण संस्कृति त्यांनां कुरुपंचालांच्या कडूनच मिळाली. पश्चिमेपेक्षां पूर्वभाग जरा कमी संस्कृत होता हें संभवतें; आणि तो भाग ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वाच्या कमी आधीन होण्याचें कारण बुद्धाची चळवळ प्राच्यांत होती व बुद्धग्रंथ तत्क्षत्रिय वरच्या पायरीचे होते असा उल्लेख आहे. मगधदेशांतील लोक कमी धार्मिक होते म्हणून त्यांनां वैरभावानें वागाविलें जात असे. ही गोष्ट वरील विधानास पुष्टि देते, आणि ती वाजसनेयि संहितेंत आहेहि. कोसल, विदेह आणि काशि या खरोखर मागाहून माहित झालेल्या कुरु पंचालांच्याच शाखा असाव्या हें संभवतें; आणि त्यांच्यातील अंतर व मूळच्या रहिवाश्यावर ढिला ताबा यामुळें त्यांनीं आपली ब्राह्मणसंस्कृति गमाविली. शतपथ ब्राह्मणांतील आर्यांच्या देशांतरासंबंधीं दंतकथेचा शब्दशः भाषांतरानें वरील प्रमेयास जरी दुजोरा मिळाला तरी तें प्रमेय तितकें जोरदार नाहीं.

[२८] कौ क.—हा सत्रासह नामक पंचाल राजाचा पुत्र होता असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे.

[२९] कौ स ल्य.—कोसल पुत्र. शतपथ ब्राह्मणांत पर आट्-नार याचें आणि शांखायन श्रौतसूत्रांत हिरण्यनाभ याचें हें नांव आहे. प्रश्नोपनिषदांत आश्वलायनाला (कोसलदेशचा म्हणून) कौसल्य आणि गोपथ ब्राह्मणांत 'काशि' याला 'काशीचे लोक' (काशि-कौसल्याः) असें म्हटलें आहे. प्रश्नोपनिषद् १.१ या ठिकाणीं याचें नांव आश्वलायन असावें असें दिसतें परंतु ६.१ या ठिकाणावरून हिरण्यनाभ कौसल्य हा राजपुत्रहि असावा असें दिसतें. पहिला राजपुत्र असावा किंवा नाहीं, याबद्दल शंका आहे.

[३०] गा न्धा र.—नग्नजित् नांवाचा एक गान्धार राजा ऐतरेय ब्राह्मणांत आहे. शतपथ ब्राह्मणांत याचा किंवा दुसरा स्वर्जिन्नाग्नजित याचा नग्नजित् असा उल्लेख आहे.

[३१] ज न क.—विदेहाचा राजा. याचा उल्लेख शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यकोपनिषद, जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण व कौषीतकि उपनिषद् या ग्रंथांत प्रामुख्यानें आलेला आहे. हा जनक राजा याज्ञवल्क्य वाजसनेय व श्वेतकेतु आरुणेय यांचा व इतर ऋषींचा समकालीन होता. अजातशत्रु याच्या अमदानींत या जनक राजाची त्याच्या औदार्याबद्दल व मोक्षाचा पाया जें ब्रह्मज्ञान तें काय आहे यासंबंधीं वाद-विवाद करण्याबद्दल फार प्रसिद्धि आहे. या जनक राजाचें कुरुपंचाल देशांतील ब्राह्मणांशी निकट दळणवळण होतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कारण त्यावरून एक अशी गोष्ट सिद्ध होते कीं उपनिषदांतर्गत तात्विक ज्ञानाचें माहेरघर कुरुपंचाल देशच होता; पूर्वेकडील देश नव्हता. शतपथ ब्राह्मणांत असा एक उल्लेख आलेला आहे कीं तो ब्रह्मपदास गेला. याचा अर्थ इतकाच कीं त्याची क्षत्रिय ही जात न बदलता तो ज्ञानानें ब्राह्मणत्व संपादिता झाला. जनकाच्या नांवाचा उल्लेख पुढील ग्रंथांतहि आलेला आहे.

तैत्तिरीय ब्राह्मणांत याला पुराणकालीन महापुरुषाचें महत्त्व आलेलें आहे. शांखायन श्रौतसूत्रांत त्याच्या नांवावर सप्तरात्र नांवाच्या एका क्रतूचा उल्लेख आलेला आहे. ज्या अर्थी जनक राजा अजातशत्रूच्या समकाली होता आणि हा अजातशत्रु व पालीग्रंथांतील अजातशत्तु या दोन्ही एकच व्यक्ती होत असें मानिलें तर जनक राजा ख्रिस्त शकापूर्वी ६०० वर्षें अगोदर होऊन गेला असें मानणें चुकीचें होणार नाहीं. पण या विचारसरणींत एक चूक होते ती अशी कीं, अजातशत्रु हा काशीचा राजा होता व अजातशत्तु हा मगध देशाचा राजा होता व त्याचा संबंध काशीशीं फक्त कोसलाधिपति पसेनादि याच्या मुलीशीं लग्न लाविल्यामुळें आला. शिवाय दुसरी एक अशी अडचण उपस्थित होते कीं हे दोन्ही अजातशत्रू एकच मानले तर बुद्ध धर्माचा उदयकाल उपनिषदांतील तत्त्वज्ञानाशीं समकालीन होऊं लागेल. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं उपनिषदें अलीकडील असलीं तरी बुद्धजन्माच्या अगोदर खास लिहिलीं गेलीं. दुसरें असें कीं बिंबिसार किंवा प्रसेनजित (पसेनदि) हे जे राजे होऊन गेले व ज्यांची महति बौद्धग्रंथांत वर्णिली आहे त्यांचा वैदिक ग्रंथांत मागमूसहि नाहीं. कांहीं लोकांच्या मतें विदेहाचा जनक राजा हाच सीतेचा बाप होता. परंतु हें मत सुद्धां सर्वस्वी खरें मानतां येत नाहीं. सूत्रग्रंथांमध्यें जनकाचें असें वर्णन आहे कीं तो एक प्राचीन राजा होऊन गेला व तो अशा वेळीं कीं लग्नाच्या स्त्रीला पुढें जो मान मिळूं लागला तो त्यावेळीं कमी मिळत असे.

[३२]ज न मे ज य.—'मनुष्यास प्रवृत्त करणारा' असा या शब्दाचा अर्थ आहे. हें नांव एका राजाचें असून ब्राह्मण कालांत तो राजा पारिक्षित या नांवानें प्रसिद्ध होता. शतपथ ब्राह्मणांत या राजाबद्दल अशी माहिती आली आहे कीं, या राजाजवळ पुष्कळ अश्व होते व ते श्रांत झाले म्हणजे त्यांनां मधुर पेय देऊन तो ताजेतवाने करीत असे. शिवाय तो अश्वमेध यज्ञ करीत असे. याच्या राजधानीचें नांव शतपथ व ऐतरेय ब्राह्मण या ग्रंथांत उध्दृत केलेल्या गाथेप्रमाणें आसंदीवत हें होतें. त्याचे बंधू उग्रसेन, भीमसेन व श्रुतसेन यांनीं अश्वमेध यज्ञ करून आपल्या पापांचें क्षालन करून घेतलें अशी कथा आली आहे. ज्या पुरोहितानें या जनमेजयाकरितां अश्वमेध यज्ञ केला त्याचें नांव इंद्रोत दैवापि शौनक असें होतें. परंतु ऐतरेयब्राह्मणाप्रमाणें तें नांव तुरःकावषेय असें होतें. या ब्राह्मणग्रंथांत अशी एक कथा आली आहे कीं, या राजानें एका यज्ञाच्या वेळीं कश्यपांनां न बोलावतां भूतवीरांकडून यज्ञ करविला. परंतु नंतर असितमृगांच्या आग्रहावरून पुन्हां त्यानें कश्यपांनाच बोलाविलें. जनमेजय हा कुरु राजा होता. गोपथब्राह्मणांत त्याच्याबद्दल तो एक प्राचीन काळचा मोठा पुरुष होता अशा अर्थानें एक हास्यास्पद गोष्ट आली आहे.

[३३]जा न क.—( जनकाचा वंशज. ) हा शब्द वडिलांच्या नांवावरून आलेला असून ऐतरेय ब्राह्मणांत क्रतुविदाचें नांव म्हणून आलेला आहे. तैत्तिरीय संहितेंत क्रतुवित् जानकि हें नांव आलें आहे. जानक हें बृहदारण्यकोपनिषदाप्रमाणें अयस्थूण याचें पितृप्राप्त नांव म्हणून आलेलें आहे. पण या उपनिषदांत जानक हा जानकि या शब्दाचा निःसंशय अपपाठ आहे.

[३४] जै त्रा य ण स हो जि त.—काठकसंहितेंत राजसूय यज्ञ करणाऱ्या राजाचें हें नांव आहे श्राडरच्या मतें हें विशेष नाम आहे व त्यानें स्वमतपुष्ट्यर्थ जैत्र याचा वंशज जैत्रायणि ( पाणिनीनें केलेल्या गणकादि ) या रूपांत उल्लेख केला आहे. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, कापिष्ठल संहितेच्या तत्सदृश लेखांत हा पाठ निराळा आहे व तेथें हा शब्द विशेषनामार्थी वापरला आहे असें दिसत नाहीं. कारण तेथें वर्ण्यविषय इंद्र हा असावा. हाच पाठ एकंदरींत बरोबर असावा; कारण सर्व ऋचा सर्वसामान्य असून प्रत्येक अश्वमेध करणाऱ्या राजाला लागू पडणारी आहे.

[३५] जै व ल किंवा जै व लि.—हा शब्द बृहदारण्यक व छांदोग्य उपनिषदांत प्रवाहणाचें पितृप्राप्त नाम म्हणून आला आहे. जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत जैवालि म्हणून जो राजा आला आहे तो हाच होय.

[३६] द क्ष पा र्व ति.—( पर्वताचा वंशज ) शतपथब्राह्मणांत कोणतेंसें एक व्रत केल्याबद्दल याच्या नांवाचा उल्लेख आला आहे. हें व्रत त्याचे वंशज दाक्षायण हे पुढें चालवीत असत. कारण त्यामुळें ब्राह्मण-कालापर्यंत त्यांनां राजाचा मान मिळत होता. या दक्षाचें नांव कौषीतकि ब्राह्मणांतहि आलेलें आहे.

[३७] दु र्मु ख.—' कुरूप चेहरा असलेला ' असा याचा अर्थ असून हें नांव ऐतरेयब्राह्मणांत एका पांचालाचें (पंचाल देशच्या राजाचें ) आहे. या पांचाल राजानें सर्व जग जिंकून टाकल्याबद्दल व त्याचा पुरोहित बृहदुक्थ नांवाचा असल्याबद्दल ऐ. ब्राह्मणांत उल्लेख आहे.

[३८] दु ष्ट री तु.—'ज्याचा पराभव करणें अवघड आहे असा '. हें सृंजय नामक लोकांच्या राजाचें नांव आहे. याच्या वंशांत दहा पिढ्यांपर्यंत असलेल्या राज्यावरून तो च्युत झाला. पण शतपथ ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें बाल्हिक प्रातिपीय याच्या प्रतिकारास न जुमानतां चक्रास्थपतीनें पुन्हां त्याच्या गादीवर त्याची स्थापना केली.

[३९] दे व की पु त्र.—देवकीचा मुलगा कृष्ण. हें नांव छांदोग्योपनिषदांत आलें आहे. महाभारतांत असें म्हटलें आहे कीं, कृष्णाची आई देवकी इचा बाप देवक या नांवाचा होता. रॉथचें असें मत आहे कीं, देवक हा गंधर्वांचा राजा असावा व अशाच अर्थी महाभारतांत त्याचा उल्लेख आहे (?).

[४०] दे व रा ज न्.—याचा उघड अर्थ ब्राह्मणवंशांतला राजा असा आहे. हा शब्द पंचविंशब्राह्मणांत 'देवराजाचें साम' या समुच्चयांत आला आहे.

[४१] दै वा प.—'देवापीचा वंशज' हें नांव जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण व शतपथ ब्राह्मण यांत इंद्रोताचें पैतृक नांव म्हणून आलें आहे. या देवापीचा व ऋग्वेदांतील देवापीचा कांहीं संबंध नाहीं.

[४२] दै वा वृ ध.—'देवावृधाचा वंशज' ऐतरेयब्राह्मणांत हें बभ्रूचें पैतृक नांव आलेलें आहे.

[४३] दै वो दा सि.—'दिवोदासाचा वंशज' हें कौषीतकि ब्राह्मण व उपनिषद् यांमध्यें प्रतर्दनाचें नांव म्हणून आलें आहे. हा दिवोदास म्हणजे ऋग्वेदांतील प्रसिद्ध दिवोदासच कीं काय समजत नाहीं.

दौः षं ति.—'दुःषंताचा वंशज' हें ऐतरेय व शतपथ-ब्राह्मणांत भरताचें पैतृक नांव म्हणून आलें आहे.

[४५] द्वै त व न.—'द्वितवनाचा वंश' शतपथ ब्राह्मणांत उल्लेखिलेल्या अश्वमेधाचा कर्ता व मत्स्य देशाचा राजा जो ध्वसन् त्याचें हें पैतृक नांव आहे.

[४६] धा नं ज य.—धनंजयाचा वंशज. वंशब्राह्मणाप्रमाणें अंशु याचें पैतृक नांव आहे.

[४७] धृ त रा ष्ट्र वै चि त्र वी र्य.—'विचित्रवीर्याचा वंशज' काठकसंहितेंत हें नांव एका ठिकाणीं आलें आहे. पण हा लेख अत्यंत दुर्बोध आहे. हा कुरुपंचाल देशाचा राजा नसून त्या देशांपासून कांहीं अंतरावर रहात असावा. हा धृतराष्ट्र आणि ज्याचा पराभव अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगीं शतानीक सात्राजितानें केला तो काशीचा राजा व शतपथ-ब्राह्मणांत उल्लेखिलेला धृतराष्ट्र हे सर्व एकच होत असें न मानण्यास कांहीं सबळ कारणें नाहींत असें मॅकडोनेल म्हणतो. सत्राजित हा भरत होता यावरून कुरुपांचाल हा धृतराष्ट्र नसावा असा त्यास संशय येतो. काठकसंहितेंत धृतराष्ट्राचा बकदाल्भ्यें यांशीं वादविवाद झाल्याचा उल्लेख आहे ही गोष्ट खरी; पण शतपथब्राह्मणांत उल्लेखिलेला धृतराष्ट्र राजा हा पंचाल होता असें जरी गृहीत धरलें तरी प्रथम उल्लेखिलेला धृतराष्ट्र कुरु होता, किंवा या तथ्यावरून कुरु व पंचाल यांमध्यें पूर्वीपासून वैर होतें अशा प्रकारची अनुमानें करणें चुकीचें होइल अशी त्याची विचारसरणी आहे. आतां महाभारतांत शंतनु, विचित्रवीर्य व धृतराष्ट्र यांचे संबंध दाखविले आहेत. पण हे संबंध पूर्वकालीन मोठ्या विभूतींसंबधानें जो घोटाळा केलेला असतो त्यामुळें येतात असें त्याचें म्हणणें आहे. परंतु महाभारतांतील परंपराहि अधिक जुनी असण्याचा संभव आहे.

[४८] ध्व स न्-द्वै त व न.—'द्वितवनाचा वंशज' शतपथब्राह्मणांत सरस्वती नदीचे कांठीं यज्ञ करणाऱ्या मत्स्य लोकांच्या राजाचें हें नांव आहे.

[४९] न ग्न जि त्.—हा गान्धार देशाचा राजा असून ऐतरेय ब्राह्मणांत पर्वत, व नारद यांनीं याला राज्याभिषेक केला अशी कथा आली आहे. शतपथ ब्राह्मणांत या राजाचें नांव स्वर्जित् याच्या पुत्राबरोबर आलें आहे व त्यांच ग्रंथांत या दोघांपैकीं एकानें दिलेल्या एका धार्मिक विधीची बरीच थट्टा केली आहे.

[५०] न ड नै ष ध.—शतपथब्राह्मणांत याचा उल्लेख आला आहे. हा मानवी राजा असावा व त्यानें जे विजय संपादिले त्यामुळें त्यांची यमाशीं तुलना केली असावी. याच ब्राह्मणग्रंथांत याला दक्षिणेकडील यज्ञांतील अग्नि असें म्हटल्यावरून हा बहुतकरून दक्षिण दिशेचा राजा जसा यम हा मानिला आहे त्याप्रमाणें हाहि दक्षिणेकडील राजा असावा. नड आणि दमयंतीपति नल हे एकच असावेत.

[५१] ना ग्न जि त्.—'नग्नजिताचा वंशज.' शतपथ ब्राह्मणांत स्वर्जिताचें हें पैतृक नांव आहे.

[५२] नै षि ध.—शतपथब्राह्मणांत हें नांव आलें आहे व तें दक्षिणेकडील राजाचें विशेषण म्हणून आलें आहे. याच नांवाचें पुढें प्रचारांत आलेलें नैषध हें रूप होय व तें सें. पी. कोशालाहि मान्य आहे. नड आणि नल हे एकच होत. कारण 'डलयोरभेदः' असा नियमहि आहे. कदाचित याला निषध देशाचा राजा म्हणून नैषिध म्हटलें असावें. कदाचित् नैषिध हेंच रूप बरोबर असावें.

[५३] पां चा ल.—या शब्दाचा अर्थ पंचाल लोकांचा राजा असा आहे. ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द दुर्मुखाला लाविलेला आहे व शतपथ ब्राह्मणांत शोणास लाविलेला आहे. जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांतहि हा शब्द आलेला आहे.

[५४] पा रि क्षि त.—परिक्षिताचा वंशज. ऐतरेय व शतपथ ब्राह्मणांत जनमेजयाचें पैतृक नांव म्हणून हा शब्द आलेला आहे. हे पारिक्षितीय, शतपथब्राह्मणांत व शांखायन श्रौतसूत्रांत अश्वमेधयज्ञकर्ते म्हणून आलेले आहेत. त्यांत जी गाथा आहे तींत जनमेजयाचे उग्रसेन, श्रुतसेन व भीमसेन या नांवाचे भाऊ होते व त्यांनां पारिक्षित हें नांव देत असल्याचा उल्लेख आहे. बृहदारण्यकोपनिषदांत ते कोठें गेले याबद्दल बरीच तात्विक चर्चा केलेली आहे. या उपनिषद्कालाच्या अगोदरच हें घराणें नामशेष झालें होतें असें स्पष्ट दिसतें. हें घराणें जें उच्च पदवीला पोंचलें होतें त्याबरोबरच कांहींतरी विशेष जनप्रवाद होता व त्याची निष्कृति ब्राह्मणांच्या मतानें त्यांनीं अश्वमेध करून व उपाध्यायास मुबलक दक्षिणा देऊन केली असावी हेंहि स्पष्ट आहे. वेबर म्हणतो या कथेंतच महाभारतांत वर्णिलेल्या कथेचें बीज असावें. अथर्ववेदांत आलेल्या परिक्षितासंबंधींच्या मंत्रांनांच पुढें 'पारिक्षित्यः' हें नांव दिलें असावें.

[५५] प्र ती द र्श श्वै क्न.—याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत आला आहे. याचा उल्लेख दाक्षायणाबरोबर यज्ञांत हवन करतांनां व सुप्लन् साञ्जय याला शिकवितांनां आढळतो.

नंतर हाच सहदेव साञ्जर्जय झाला असावा. दुसऱ्या एका उताऱ्यांत याला सुक्नन् साञ्जर्जय याच्या संबंधांत आणिलें आहे. एगलिंगच्या मताप्रमाणें याला श्विक्रांचा राजा ठरविलें पाहिजे. तो इभावताचा वंशज होता. एका प्रतीदर्शाचा उल्लेख जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत आढळतो.

५६ **बाल्हिक प्रातिपीय.**—हें नांव शतपथ ब्राह्मणांत एका कुरु राजाचें म्हणून आलें आहे. सृंजयाचा दुष्टरीतु पौंस्यायन हा पुन्हा राजा होऊ नये म्हणून यानें बराच अडथळा आणला. परंतु त्यांत त्याला अपयश आलें. व पौंस्थायन हा 'रेवोत्तरस् पाट व चाक्रस्थपति' याच्या मदतीनें आपल्या पूर्वजांच्या गादीवर बसला. प्रतिपीय हें विशेषण जरा चमत्कारिकच आहे. जर याचा संबंध प्रतीपाशीं लावावयाचा असेल ( याचाच तो इतिहास ग्रंथांत ( भारतांत ) मुलगा आहे.) तर हें रूप चमत्कारिक (चूक या अर्थी) आहे. झिमर याचें 'प्रातीपीय' असें रूप करतो. महाभारतांत हा बाल्हिक या रूपांत आहे व त्याला देवापि आणि शंतनु यांचा भाऊ बनविलें आहे व प्रतीपाचा मुलगा असेंहि म्हटलें आहे. या कथेवरून यांच्या कालाचा निर्णय करणें फार कठिण आहे कारण वास्तविक देवापि हा ऋष्टिषेणाचा मुलगा असून एक ऋषि होता व शंतनु हा कुरूंचा राजा असून त्याच्या वंशाचा पत्ता लागत नाहीं. परंतु तो बहुधा प्रतीपाचा मुलगा असावा. प्रतीप हा वेदांत परिक्षिताच्याहि मागाहून आला आहे व तो परिक्षित तर त्याचा पणतू आहे. बहुधा बल्हीक हा प्रतीपाचा वंशज असावा. त्यानें बाल्हिक हें नांव कां धारण केलें हें सांगणें कठिण आहे. कारण त्याबद्दल कांहीं पुरावा सांपडत नाहीं. परंतु बाल्हिक हें देशाचें नांव असून त्यावरून 'तात्स्थ्यात्तत्त्वं' या न्यायानें हें नांव पडण्याचा संभव आहे.

५७ **भगीरथ ऐक्ष्वाक**—इक्ष्वाकुवंशज. हें गांव जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत एका राजाचें म्हणून आलें आहे. हा कुरुपांचालाबरोबर मित्रत्वानें वागत होता ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. यावरून इक्ष्वाकू हे कुरुपांचाल लोकांबरोबर मित्रत्वानें संबद्ध होते असें ठरतें व ते बुद्ध ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या पूर्वेकडील नव्हते.

५८ **भंगाश्विन.**—बौधायन श्रौतसूत्रांत ऋतुपर्णाच्या बापाचें हें नांव आलेलें आहे. महाभारतांत याला भांगासुरि असें नांव दिलें आहे. ऋतुपर्णकयोवाधि हेंच भंग्यश्विनौ होत असा उल्लेख आपस्तंब श्रौतसूत्रांत आला आहे.

५९ **भयद आसमात्य.**—असमातीचा वंशज. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत हें एका राजाचें नांव आहे. ओरटेल याच्या मतानें हें नांव 'अभयद' असें असावें. परंतु हें शक्य दिसत नाहीं. कारण 'भयद' हें नांव पुराणांत आलें आहे.

६० **बाष्किह.**—बष्किहाचा वंशज. पंचविंशब्राह्मणांत हें शुनःस्कर्णाचें पैतृक नांव म्हणून आलें आहे. बौधायन श्रौतसूत्रांत याला शिबीचा वंशज म्हटलें आहे.

६१ **भीमसेन.**—जनमेजय पारिक्षित याच्या भावाचें हें नांव शतपथ ब्राह्मणांत आलें आहे. शौनकांनीं भीमसेनाकडून यज्ञ करविल्याचा शांखायन श्रौतसूत्रांत उल्लेख आहे.

६२ **भीम वैदर्भ.**—विदर्भाचा राजा. सोमरसाच्या ऐवजी दुसरा पदार्थ घेण्याबद्दल याला पर्वत आणि नारद यांच्यापासून गुरुपरंपरागत माहिती मिळाली होती. असा ऐतरेय ब्राह्मणांत उल्लेख आहे. सायणाचार्य या ठिकाणीं भीम आणि वैदर्भ हे भिन्न आहेत असें म्हणतात.

६३ **भौवन.**—भुवनाचा वंशज. हें निरुक्त,ऐतरेय व शतपथ ब्राह्मण यांत ऐतिहासिक पैतृक नांव आलें आहे.

६४ **मरुत्त आविक्षित.**—कामप्रीचा मुलगा हें एका राजाचें नांव आहे. ऐतरेय ब्राम्हणांत याला संवर्ताकडून राज्याभिषेक झाल्याचा उल्लेख आहे. शतपथ ब्राम्हणांतील या राजाच्या चरित्रावरून याला 'आयोगव' म्हणत असत असें दिसतें.

६५ **मान्धातृ यौवनाश्व.**—युवनाश्वाचा वंशज.गोपथ ब्राह्मणांत एक राजा म्हणून याचा उल्लेख आला आहे. कबन्ध आथर्वणाचा शिष्य विचारिन् याचा हा शिष्य होता.

६६ **मार्गवेय.**— हें राम याचें पैतृक नांव ऐतरेय ब्राह्मणांत आलें आहे व तेथें त्याला श्यापर्ण म्हटलें आहे. कदाचित हा मृगवु नामक स्त्रीचा मुलगा असून श्यापर्ण हें त्याचें कुलनाम असावें.

६७ **मुंज सामश्रवस.**—हें एखाद्या मनुष्याचें अथवा राजाचें नांव असावें. जैमिनीय उपनिषद् ब्राम्हणांत व षड्विंश ब्राह्मण यांमध्यें याचा उल्लेख आहे

६८ **युधांश्रौष्टि-औग्रसैन्य.**—उग्रसेनाचा वंशज. पर्वत आणि नारद यांनीं राज्याभिषेक केलेल्या ऐतरेय ब्राम्हणांतील एका राजाचें हें नांव आहे.

६९ **रथप्रोत-दार्भ्यः**—दर्भाचा वंशज. मैत्रायणी संहितेंत राजा या अर्थानें आणि विशेषतः गुरू या नात्यानें याचा उल्लेख आला आहे.

७० **रोहितः**—ऐतरेय ब्राम्हण व शांखायन श्रौतसूत्र यांत वर्णिलेल्या शुनःशेपाच्या प्रसिद्ध गोष्टींत हरिचंद्राच्या मुलाचें हें नांव आलें आहे.

७१ **वारकि.**—वारकाचा वंशज, जैमिनीय उपनिषद् ब्राम्हणांत कंसाचें पितृप्राप्त नांव म्हणून याचा उल्लेख आहे.

७२ **विदेघ.**—शतपथ ब्राम्हणात माथव नांवाच्या एका मनुष्याचें हें नांव आहे. मागाहून ज्यांनां विदेह लोक म्हणूं लागले त्या विदेह देशाच्या राजाला हें नांव दिलें होतें. असें मानणें गैरशिस्त होणार नाहीं.

७३ **वृद्धद्युम्न-अभिप्रतारिन्.**—हें ऐतरेय ब्राम्हणांत एका राजाचें ( राजन्याचें ) नांव आलें आहे. व त्यांत त्याचा उपाध्याय शुचिवृक्ष गौपलायन याची स्तुति आली आहे. शांखायन श्रौतसूत्रांत असा उल्लेख आहे कीं वृद्धद्युम्न अभिप्रतारिन् यानें 'त्रिष्टोमक्षमक्षत्रधृति' नांवाचा यज्ञ केला.

त्रिष्टोम म्हणजे स्तुतिरूप मंत्रांचा (सामांचा) तीन तीन वेळां आवृत्ति करणें. अशा प्रकारचा राजानें केलेला हा ' त्रिष्टोम-क्षत्रधृति ' यज्ञ एका पुरोहितास पसंत पडला नाहीं. त्याच्या मतानें राजानें फक्त क्षत्रधृति यज्ञच करावा; त्रिष्टोम करूं नये असें होतें. आणि या पातकामुळेंच या संग्रामांत कुरूंचें कुरुक्षेत्रांतून उच्चाटण होईल असा शाप दिला, आणि त्याचप्रमाणें पुढें घडून आलें ( वरील स्थलीं या ठिकाणीं शाप देणाऱ्या पुरोहिताच्या नांवाचा उल्लेख नाहीं व भविष्याचाहि संबंध नाहीं).

[७४]शतानीक-सात्राजित.—ऐतरेय व शतपथ ब्राह्मणांत काशीचा राजा धृतराष्ट्र याचा पराभव करून त्याच्या अश्वमेध यज्ञांतील घोडा घेऊन जाणाऱ्या एका राजाचें हें नांव आहे. हा निःसंशय भरत होता. याचा अथर्ववेदांतहि उल्लेख आलेला आहे. व तेथें दाक्षायणासंबंधानें ' दाक्षायण ब्राह्मणानें ज्याप्रमाणें शतानीकाला बांधिलें त्याप्रमाणें आम्हीं तुला सुवर्णानें बांधितों' असा उल्लेख आहे.

[७५]शिबि.—हा उशीनराचा मुलगा होता. हा इंद्राचा आश्रित असल्याबद्दल बौधायन श्रौतसूत्रांत उल्लेख आहे. इंद्रानें ' वर्षिष्ठीय ' नामक भूप्रदेशावर यज्ञ करून परचक्रापासून याची मुक्तता केली.

[७६]शुनःकर्ण.—बौधायन श्रौतसूत्रांत हें एका राजाचें नांव आलें आहे. हा शिबि किंवा बष्किह याचा मुलगा होय. यानें सर्वस्वार नांवाचें एक कर्म आचरून रोगाशिवाय मृत्यु संपादिला अशी कथा पंचवींश ब्राह्मणांत आली आहे.

[७७]शैब्य.—शिबीचा वंशज. ऐतरेय ब्राह्मणांत ' अमित्रतपन शुष्मिन् ' नामक राजाचें हें नांव आहे. प्रश्नोपनिषदांत सत्यकाम जाबालाचें हें पैतृक नांव आहे.

[७८]शोणसात्रासाह.—हा पंचाल देशाचा राजा असून याचें नांव शतपथ ब्राह्मणांत आलें आहे. यानें अश्वमेध यज्ञ केला त्या वेळीं तुर्वश देखील आले होते, असें त्याच ब्राह्मणांत म्हटलें आहे.

[७९]सनश्रुत अरिंदम.—ऐतरेय ब्राह्मणांत एका महाराजाचें हें नांव आलें आहे. सनश्रुत व अरिंदम हे गुरुशिष्य अथवा कदाचित् एकच व्यक्ति असावी असें सायणाचार्य भाष्यांत म्हणतात.

[८०]सुत्वन-कैरिशि-भार्गायण.—ऐतरेय ब्राह्मणांत हें एका राजाचें नांव असून याला मैत्रेय कौषारव यानें मंत्र शिकविल्यामुळें यानें पांच राजे ठार मारून महत्पद प्राप्त करून घेतलें.

[८१]सुत्पन-सार्ञ्जय.— प्रतीदर्शानें ज्याला दाक्षायण यज्ञ शिकविला त्या सृंजय लोकाच्या राजाचें हें नांव शतपथ ब्राह्मणांत आलें आहे. या यज्ञांत याला यश मिळालें म्हणून यानें सहदेव हें नांव धारण केलें.

[८२]हरिश्चंद्र-वैधस-ऐक्ष्वाक.—एका कथेंतील राजाचें नांव. यानें अविवेकानें आपला रोहित नामक मुलगा वरुण राजास बलि देण्याचें कबूल केलें, या संक्षिप्त गोष्टीवरून ऐतरेय ब्राह्मण व शांखायन श्रौतसूत्रांत शुनःशेपाची विस्तृत गोष्ट आली आहे.

[८३]हिरण्यनाभ.—हें कोसल देशच्या राजाचें नांव आहे. यानें अश्वमेध केल्याचा शांखायन श्रौतसूत्रांत उल्लेख आहे. याचा प्रश्नोपनिषदांत उल्लेख आला असून परआट्णाराशींहि त्याचा संबंध असावा.

[८४]हैरण्यनाभ.—हिरण्यनाभाचा वंशज. शतपथ ब्राह्मणांतील एका गाथेंत कोसल राजा परआट्णार याचें पैतृक नांव म्हणून याचा उल्लेख आहे.

## स्तोतृनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अर्किन् | धियंधस् | रभ्र |
| आभु | धियायु | रुद्र |
| आसाव | धीरण | रेभ |
| उक्थशंसिन् | धीवत् | वक्मराजसत्य |
| ऋक्वाण | नग्न | वनद |
| [१]कारु | नद | विनद |
| कीरि | नाद | विनंगृस |
| कीस्त | नामन् | [३]विप्र |
| कुमन्यु | निवचन | विवक्वत् |
| कृपण्यु | पनितृ | वृषस्तुप् |
| क्रवण | पृच् | वेधस् |
| गातु | ब्रह्मा | शशमान |
| गायत्रिन् | भंदिष्ठ | [४]सूरि |
| गीर | मनान | स्तवान |
| गृणत् | मनायु | स्तामु |
| गो | मंद्र | स्तुप् |
| छंदस् | मेधिर | [५]स्तोतृ |
| छंदस्तुभ | येमान | होतृ |
| [२]जरितृ | रण्यवाच् | |

### अथर्ववेद

| | | |
|---|---|---|
| अर्क | जरितृ | रेभ |
| कीरि | देवयु | |

[१]कारु ( कवि ).—कारु हा शब्द बहुतेक ऋग्वेदांतच आहे. कारु हा वैद्यासारखा धंदेवाला (भिषज्) असे अशाबद्दल आधार आहे. कवी हे श्रीमंत व्यापाऱ्यांची स्तुति करीत असत तरी ते राजे लोकांच्या आश्रितांमध्येंच मुख्यत्वेंकरून रहात असत. उपाध्याय आणि कारु यांच्यांत विशेष संबंध कांहींच नव्हता. उपाध्याय हा जरी बहुधा कवि असे तरी कविता करणें उपाध्यायमंडळाकडेच असे असें नाहीं अश्वमधाचे वेळीं स्तुतिपाठकांपैकीं एक गाणारा राजन्य असला पाहिजे आणि दुसरा ब्राह्मण असून त्यानें ( स्वतःला विहित असलेलें )स्वकवन म्हटलें पाहिजे असें शतपथ ब्राह्मणांत स्पष्ट लिहिलें आहे. पुष्कळ ठिकाणीं ऋग्वेद अनुक्रमणी ऋग्वेदांतलि

ऋचांचें कर्तृत्व राजांकडे देते; आणि ज्या पद्धतीनें किंवा रीतीनें शूद्रक मृच्छकटिकाचा कर्ता झाला आहे, अथवा हर्ष रत्नावलीचा झाला आहे, आणि कोठें कोठें ब्राह्मणांचे गुरु राजेहि आहेत तीच रीत अनुक्रमणींत चालू असली तरी हिंदी अब्राह्मण कवी होते यांत कांहींच आश्चर्य वाटत नाहीं.

[2]जरितृ.—सीगच्या मतानें ऋग्वेदाच्या एका सूक्तांत जरितृचा उल्लेख शार्ङ्गापैकीं एक म्हणून आलेला आहे; व त्याची हें सूक्त व महाभारतांतील कथा यांची सांगड घालण्याची खटपट आहे. महाभारतांत अशी कथा आहे कीं, मंदपाल ऋषीनें शार्ङ्ग पक्षिणीशीं–कटकाशीं–लग्न लाविलें व इच्यापासून त्याला चार मुलें झालीं. हीं मुलें जेव्हां त्यानें टाकून दिलीं व अरण्यांत अग्नीनें भस्म होऊन जाण्याचा जेव्हां त्या मुलांनां प्रसंग आला तेव्हां त्यांनीं ऋग्वेदांत दिलेल्या (१०. १४२) स्तोत्रानें अग्नीची स्तुति केली. हा अर्थ बराच संशयास्पद आहे पण तो सायणाचार्यांस संमत आहे.

[3]विप्र.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें विप्= कांपणें या धातूपासून हा शब्द निघालेला असून त्याचा अर्थ प्रेरणा झालेला गवई असा आहे. उत्तरकालीन ग्रंथांत याचा अर्थ विशेषतः विद्वान् ब्राह्मण असा आहे. महाभारतांत याचा अर्थ नुसता ब्राह्मण असा आहे.

[4]सूरि.—ऋग्वेदामध्यें हा शब्द यज्ञ करणारा मनुष्य या अर्थी नेहमींच उपयोगांत आणला आहे व यालाच पुढें यजमान म्हणजे यज्ञ करणाऱ्या उपाध्यायाला दाक्षिणा देऊन त्या यज्ञाचें पुण्य संपादन करणारा असा गृहस्थ म्हणूं लागले. सूरि याचें नांव मघवन् बरोबर योद्धा या नात्यानें आलेलें आहे व त्याचा सबंध उपध्यायाचा आश्रयदाता किंवा मित्र म्हणून वर्णिलेला आहे.

[5]स्तोतृ.—ऋग्वदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथांत स्तुति करणारा असा याचा अर्थ आहे. मघवन् किंवा सूरि या आश्रयदात्यांच्या नांवासंबंधानें हा शब्द वारंवार आलेला आहे. कांहीं ठिकाणीं याचा अर्थ 'स्तोतृभ्यः–ऋत्विग्भ्यः' 'स्तोता-यजमान' असाहि घेतलेला आहे.

## शरीरावयव

### अंगुलिनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्रिय | क्षिप् | धुर् |
| अग्रुव | क्षिपा | योक्त्र |
| अण्वी | गभस्ति | रशना |
| अथरी | जामि | विप |
| अथर्यु | दशयंत्र | व्रिश |
| अभीशु | दशांगुल | शर्या |
| अवनि | दशोणि | शाखा |
| ओणि | दीधिति | सनाभि |
| कक्ष्या | धीति | सस्त्रुत |
| सुगभस्ति | स्वंगुरि | हरित् |
| सुहस्त्य | स्वसृ | |

### प्राण्यवयव [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंस | कपृथ | नृबाहु |
| अंस्य | कवंध | पक्ष |
| अंक | कर | पद् (पाद) |
| अंकस | कर्ण | पतत्र (पंख) |
| अक्ष ( इंद्रिय ) | कशप्लव ( घोटा ) | पद (पाद) |
| अंग | काकुद ( जिव्हा ) | [8]परुस् |
| [1] अजिन | काशि ( मुष्टि ) | [9]पर्ण |
| अनस्थ | किकिर | पर्व |
| अनास ( आस्य-रहित ) | कीकस (अस्थि) | [10]पर्शु |
| | कुक्षि (उदर) | पाद |
| अनूक्य ( अस्थि-संधि ) | गात्र | पायु |
| | गुद | पार्श्व |
| अपिकक्ष | गुहा ( हृदय ) | पार्ष्णि |
| अर्धगर्भ | ग्रीवा | पुत्रकृथ (योनि) |
| अश्रु | चक्षुस् | पृथुजघन |
| अष्ठीवत् | चतुःशृंग | पृथुप्रगान |
| अस्थन्वत् | [2] चर्मन् | प्रपद |
| आत्मन् ( शरीर ) | चित्त | [11]प्राण |
| आधि (शरीर) | छुबुक | प्लाशि [प्लीहा] |
| आन ( आनन ) | जघन | बाहु |
| आन्त्र | जंघा | बाहुच्युत |
| आमा(अपक्क कांस) | जठर | बाहुजूत |
| आस्न | जठल | बाहुता |
| आस्य | जत्रु (ग्रीवा) | बाहुवृक्त |
| उदर | जंभ ( उदर, मुख) | बाहुशर्धिन् |
| उपस्थ | [3] जरायु | बृहच्छरीर |
| उभयाहस्त्य | जानु | भसद (कटिप्रदेश) |
| उरस् | जिव्हा | भूरिरेतस् |
| उरुयुग | तनू | भूरिशृंग |
| उरूणस ( दीर्घ नासिकायुक्त) | तनूरुच् | भ्रू |
| | तनूशुभ्र | मतस्न ( वृक्क) |
| उल्ब | त्रिक | मनस् |
| उष्णिह (स्नायु) | वच् | मन्द्रजिह्व |
| ऊधस् (कांस) | [4]दंष्ट्रा | मर्य |
| ऊरु | [5]दन्त | मस्तिष्क |
| ऋजुमुष्क | दशयोक्त्र | महावटूरिन् (वेष्टन केलेला पाय) |
| ऋजुहस्त | [6]धमनि | |
| ऋदूदर | [7] नख | मुख |
| ओष्ठ | नस् (नासिका) | मुष्क [पुरुषेंद्रिय] |
| कनीनिका (डोळ्यांतील बाहुली) | नाभ (नाभि) | मुष्कभार |
| | नासिका | मूर्धन् |
| कपत (शिश्न) | नीचावयस् | मूल (पाद) |

मेदस्
मेहन [पुरुषेंद्रिय]
यक्न
यश (इंद्रिय)
योनि
रोम
लोमन्
वक्षस्
वंक्री (वरगड्या)
वपुस्
वयुन (योनिस्थान)
वर्ष्मन्
वीड्वंग
वीरकाक्षि
वीळुपत्मन्
वृकद्वरस्
वृष्ण (छिन्नसंधि)
वैतस (पुरुषेंद्रिय)
[12]शफ
शफच्युत
शरीर
[13]शिप्रा
[14]शिप्रिणिन्
शिरस्
शीर्षण्य
शुप्त (मुख)
[15]शृंग
शेप (पुरुषेंद्रिय)
[16]श्मश्रु
श्रोणि
श्रोत्र
सक्थि
सर्वांग
सव्य
सूर्ष्यंती (योनि विशेषण)
सृक्न् (ओष्ठ)
स्तन
स्फिग्य(कटिप्रदेश)
स्रक्व (ओष्ठ)
स्वेद
हनु
हरिशिप्र
हस्त
हस्त्य
हृत्

[ तै. सं. ]

अंस
अंक
अंग
अंगापरु
अंगुलि
अच्छला (शफसंलग्न मांसखंड)
अंजि
अनुवृक(बरगड्यांतील मांस)
अन्तःपार्श्व
अपप्राण
अवान्तरशफ
अस्थि
अस्ना
आण्ड
आत्मन्
आनत (ग्रीवा प्रदेश)
इक्षु (पापण्यावरील केश)
उदाजि (शिश्न)
उदर
उपपक्ष
उपस्थ
उरस्
उल्ब
ऊरु
ऋक्ष(सलोम भाग)
ओष्ठ
क्रोड (कंठ)
क्लोम
खाद
गर्भ
गवीन्य [गोजननेंन्द्रिय]
गात्र
गुद
गृद
गृध्र[कांख]
ग्रीवा
चक्षुस्
जघन
जंघ
जठर
जत्रु
जानु
तकरी
तनिम्र
तनू
दंष्ट्र
दत्
दन्त
दन्ह
दोस्
नख
नस
नाडी
नाभि
नासिका
निर्जात्मक (केशरहित-मस्तक)
पक्वगंध
पक्ष
पक्षति
पक्ष्म
पतत्र
पद
पराकोश
परापातुक (गर्भाचें विशेषण)
परु
पायु
पार्श्व
पार्ष्णि
पुच्छ
पुरितत्
प्रकाश
प्रतीक
प्रपद
प्रपादुक (गर्भ विशेषण)
प्रशाद (मांस-विशेषण)
प्रशास
प्लीह्ना
बत्स्व (दंतमूलस्थ मांस)
बाहु
भसद्
भ्रू
मतस्न
मनस्
मन्या (मानेचा कांटा)
मर्म
मस्तिष्क
मुख
मुष्क
मूर्धन्
मृत (त्वचा)
यकृत्
योनि
रेतस्
लक्ष्म
ललाट
वंक्री
वाल
वालधान
शकुनिसाद (पृष्ठदेश)
शफ
शरीर
शिखंड (अधस्तन-मांस)
शिखा
शिंगीनीकोश्य
शिती
शिप्र
शिरस्
शीर्षकपाल
शृंग
शेप
श्मश्रु
श्रवस्
श्रुत्कर्ण
सक्थी
सर्दिगृदि
सौद
स्कन्ध
स्तन
स्नावन्य (स्नायुमूल)
स्थूलहृदय
स्नावन्
स्नु
स्वगा
स्वंग
स्वंगु
हृत्
हस्त
हस्त्या
हृदय
हृत्

[ अथर्ववेद ]

अंस
अक्षि
अंग
अंगुलि
अंजिव (गर्भद्वार)
अण्वी
अत्र
अधरहनु
अनस्थ
अनूक(पृष्ठ वंशस्थ मांस)
अपाष्ठ (विषयुक्त शृंग)
अष्टाचक्र
अष्ठीवत्
अस्थि
आण्डय
आन्त्र
आसन (मुख)
आशय (गर्भाशय)
इन्द्रिय
उत्तरहनु
उदर
उपजिह्विका
उपस्थ
उरस्
उरु
उरुयुग्
उरूणस्
उष्णिह्
ऊधन्
ऊरु
ऋच्छर
ओणि
ओष्ठ
ककाटिका
ककुद (ग्रीवापर भाग)
कपाल
कपृत्
कफोड
कमल (गर्भद्वार)
कर
कर्ण
कला
काकुद्
काय
कीकस
कुक्षि
कुष्ठिका
कुसिन्ध
कृकाट (मान)
[17]केश
केशश्मश्रु
क्रीड
क्लोम
ख
गभस्ति
गवीनी(मूत्रसाधनी पार्श्वस्थनाडी)
गात्र
गार्दभ (शेप)
गुद
गुल्फ
गुहा (हृदय)
गुह्य
गोवपुष्
ग्रीवा
ग्रैव्या (ग्रीवासुभवा नाडी)
ग्लहा
घास (शरीर)
[18]चक्षुस्

चर्मन्
चाक्षुस्
चेतस्
छुबुक
जघन
जंघा
जठर
जंभ (दंत विशेषण)
जरायु
जानु
जिव्हा
जिव्हामूल
तनु
ताम्रधूम्र
त्रिंशदंग
त्रिसन्धि
त्वच्
दंष्ट्र
दत्
दशोणि
दोष
दोषणी
दोषण्य
धनु (मूत्राशय)
धमनि
नख
नस्
नाडी
नाडीका
नाभि
नासिका
नीलनख
नेत्र
पक्ष
पक्षस्
पंचाङ्गुरि
पतत्र
पद्
पर्शान [ पार्श्वास्थि-प्रदेश ]
[१९]पर्शु [बरगडी]
पसस्

पाणि
[२०]पाद
पायु
पार्ष्णि
पुच्छ
पुरितत्
पुरोगवी [ जिव्हा-विशेषण]
पृथुजघन
पृथुशिरस्
पृथुस्तु
पृथुस्तुका
पृष्टी (पार्श्वास्थि)
पेशनी
पौरुषेय
प्रपद
प्रजनन
प्लाशय
प्लीहन्
बर्जह्य [बरगड्या]
बाहु
भसद्
भ्रंशदलोममति
मज्जा
मतस्न [बरगड्या]
मन्या (गलस्योर्ध्व भागेस्थिता धमनी)
मर्म
मस्तिष्क
मुख
मुष्क
मुष्टि
मूर्धन्
मेढ्र
योनि
रजतनाभि
रामायणी [नाडी विशेषण]
रोमश
ललाट

लोमन्
वनिष्टु (आंतडें)
विजामन् [ गुह्य-प्रदेश ]
विरोहित (शेप)
[२१]विषाण
वृष्ण्यवत् (शेप)
व्यंस
शफ
शरणि (धमनी)
शरीर
शिरस्
शिश्न
शीर्ष
शीर्षकपाल
शुष्कास्य
शृंग
शेप
श्मश्रु
श्रोणिप्रतोदिन् [कटिप्रदेश]
श्रोत्र
सक्थि
सन्ध
संहनु
सर्वांग
सहकण्ठिका
सहस्रपृष्ठ [सहस्रावयव]
सुहस्त
सृकन्
स्कंध
स्नाव (शिरा)
स्वंगुरि
हरिशिप्र
हरिश्मशारु
हलीक्ष्ण
हस्त
हार्दि
हिरा
हृत्
हृदय

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [२१] उदान | [२२] जांबिल | ललामगु [ शिश्न ] |

[ संहितेतर ]

| | |
|---|---|
| [२३] पाद | [२४] हिता |

### प्राणवाचक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| असु | पंचहोतृ | व्यान |
| जीव | प्राण | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अपान | उदानव्यान | वाल् [प्राण] |
| असु | प्राण | व्यान |
| [२५]उदान | प्राणापान | शीर्षण्य [प्राण-विशेषण] |
| उदानय | प्राणापानोदान | |
| | प्राणिन् | समानव्यान |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अपान | निसस्तु [गर्भ] | प्रमनस् |
| असव | प्रजन्व [गर्भाशय] | प्राण |
| जीव | | व्यानोदान |
| जीवित | | |

### बाहुनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अप्नवान | दोस् | भुरिज |
| अभीशु | दोषण्य | मधुपाणि |
| आयति | पृथुपाणि | वक्षणेस्थ |
| करस्न | बाहु | विनंगृस |
| क्षिपती | भद्रहस्त | वीळुपाणि |
| क्षिपस्ति | भरित्र | वृषपाणि |
| गभस्ति | भुज | शक्करिन् |
| च्यवान | | |

### शरीरसंबंधीं [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अश्लील | गर्भ | मूत्र |
| असृज् | गर्भरस | रेतस् |
| उल्ब | पूति | रेष्मन् |
| ऊवध्य [उदरगत शकृत्] | मल | वृष्णि |

[ संहितेतर ]

हिता [ रक्तवाहिनी ]

[१]अ जि न.— मृग आणि अज ह्या दोन्ही प्राण्यांच्या कातड्याला हा शब्द लावितात कातड्याचा उपयोग कपड्याकडे होत असे हें शतपथ ब्राह्मणांत जें "चर्माच्छादित" (अजिनवासिन्) असें विशेषण आहे. त्यावरून, आणि वाजसनेयि संहितेंत चामडें सांधणें व कमाविणें हे धंदे करणाऱ्यांचा जो उल्लेख आहे त्यावरून सिद्ध होतें. मरुत् हे देखील मृगचर्म वापरीत असत असें दिसतें, आणि ऋग्वेदकालीन मुनी देखील अजिनें उपयोगांत आणीत असत.

[२]च र्मन्.—चर्मन् ह्याचा अर्थ चामडें असा असून ह्या अर्थानें याचा ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत उल्लेख आला आहे. गोचर्माचा उपयोग धनुष्याची दोरी गोफण व लगाम करण्याकडे होत असे. विशेषतः या चर्माचा उपयोग दगडांनीं ज्या फलकांवर सोमवल्ली कुटली जात असे त्या फलकांवर टाकण्याकरितां होत असे. कदाचित् पिशव्या करण्याकडेहि या चर्माचा उपयोग होत असावा. चर्मण्य हा शब्द ऐतरेयब्राह्मणांत 'कमावलेल्या कातड्याचा जिन्नस' या अर्थानें आलेला आहे. या कलेची सविस्तर हकीकत उपलब्ध नाहीं. पण शतपथब्राह्मणांत खुंट्यांनीं [ शंकुभिः ] चामडें ताणण्याचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें ऋग्वेदामध्यें कातडें ओलें करण्याचा उल्लेख सांपडतो. चामडें कमावण्याची कला ऋग्वेदकालांत सुद्धां लोकांना ठाऊक होती. कारण त्या ग्रंथांत चर्माणि ( कमावलेलीं कातडीं ) हा शब्द आलेला आहे.

[३]ज रा यु.—'सापाची कात' या अर्थी हा शब्द अथर्ववेदांत एकदां आला आहे. ऋग्वेदांत याचा अर्थ सामान्यतः 'गर्भाच्या बाहेरील वेष्टण' असा आहे. गर्भाच्या अंतर्वेष्टणास उल्व ( उल्ब ) असें म्हणतात. सजीव प्राण्यांचे वर्ग कधीं कधीं त्यांच्या उत्पत्तीवरून करतात. छांदोग्योपनिषदामध्यें त्यांचे अंडज, जीवज व उद्भिज्ज असे वर्ग केलेले आहेत. ऐतरेय आरण्यकामध्यें हें वर्गीकरण चार प्रकारचें आहे. तें असें अंडज, जारज किंवा जरायुज ( हा शब्द अथर्ववेदामध्यें आला आहे व बोथलिंकनें हा येथें उगीच घुसडला आहे ), उद्भिज्ज व स्वेदज [ म्हणजे कीटकवर्ग ]. जरायु शब्दाचा वैदिक अर्थ वैद्यशास्त्रसंमत आहे. प्राण्यांचे वर्गहि जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज असेच केले आहेत.

[४]दं ष्ट्रा.—याचा अर्थ दांतांपैकीं एक सुळका असा असून ऋग्वेदापासूनच्या सर्व ग्रंथांत हा शब्द वारंवार आला आहे.

[५]द न्त्, दं त.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत याचा दांत या अर्थी वारंवार उपयोग आलेला आहे. दंतधावन हा विशेषतः यज्ञाची दीक्षा घेण्याच्या वेळचा विधि होता. याप्रमाणें दांत घासल्यानंतर स्नान करणें, श्मश्रु करणें व नखें काढणें ह्या गोष्टी होत. अथर्वसंहितेंतील एका सूक्तांत मुलाच्या पहिल्या दोन दांतांच्या प्रगट होण्याबद्दल स्तुति आहे. तथापि या सूक्ताचा निश्चित अर्थ काय हें सांगणेंहि कठिण आहे. ऐतरेय ब्राम्हणांत मुलाचे पहिले दांत पडत असल्याबद्दलचा उल्लेख आहे. ऋग्वेदांत ह्या दंत शब्दाचा अर्थ हत्तीचा सुळा असा आलेला आहे. पूर्वी दंतविद्या प्रचारांत होती कीं नाहीं ह्याबद्दल वानवाच आहे. ऐतरेय अरण्यकांत 'हिरण्यदन् (सोन्याचे दांत असलेला) असा एक शब्द एका माणसाचें नांव म्हणून आलेला आहे व तो सार्थ असावा. कारण सोन्यानें दांत मढावणें ही गोष्ट रोममध्यें 'बारा शिलालिखित' कायदे झाले तेव्हां ठाऊक होती हें निश्चित आहे.

[६]ध म नि.—'वेत'. ऋग्वेदांत एके ठिकाणीं व निरुक्तांतील एका उताऱ्यांत ह्याचा अर्थ नळी असा आलेला आहे. अथर्ववेदामध्यें याचा अर्थ शुद्ध रक्तवाहिनी असा, किंवा पक्वाशयांतला मार्ग असा आहे. हा शब्द हिरा ह्या शब्दाबरोबर कांहीं ठिकाणीं आलेला आहे.

[७]न ख.—ऋग्वेद व अथर्ववेद यांत ह्याचा अर्थ माणसाच्या हातांपायांची नखें किंवा वाघासारख्या क्रूर पशूचा जबडा असा आहे. वैदिक काळीं आर्यलोक आपलीं नखें नेहमीं काढीत असत. विशेषतः दन्तधावन व नखनिकृंतन हीं कृत्यें पवित्र प्रसंगीं होत असत असें तैत्तिरीय संहिता वगैरे ग्रंथांतून आढळतें.

[८]प रु स्.—ह्याचा पहिला ऋग्वेदांतील अर्थ अवयव किंवा शरीराचा भाग असा असून पुढील ग्रंथांत लक्षणेनें यज्ञाचे किंवा कालाचे भाग ह्यांना हा शब्द लावलेला आहे.

[९]प र्ण.—ऋग्वेदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथांत पक्ष्याचे पंख असा ह्याचा अर्थ आहे. ऋग्वेदांत दहाव्या मंडळांत एका ठिकाणीं ह्याचा अर्थ बाणाचीं पिसें असा आहे, व पुढें झाडांचीं पानें असा होऊं लागला.

[१०]प र्शु.—ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आलेला असून निरुक्तामध्यें ह्याचा अर्थ हौदाच्या ( कूप ) बाजू असा दिलेला आहे. पण बरगडी हा ऋग्वेदांतील अर्थ सुद्धां बरा जुळतो. या नांवाचें एक राष्ट्रहि होतें.

[११]प्रा ण.—हा बराच व्यापक पण अनिश्चित अर्थाचा शब्द ऋग्वेदांत व तदनंतरच्या ग्रंथातून वारंवार उपयोगांत आणलेला आहे. आरण्यकांतून व उपनिषदांतून जगाच्या ऐक्याचें सर्वसाधारण चिन्ह या अर्थानें हा शब्द उपयोगांत आणला आहे. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान या पांच प्राणवायूपैकीं एक या संकुचित अर्थानें प्राण उपयोगांत आणलेला आहे. परंतु पुष्कळ वेळा प्राण व व्यान, प्राण व अपान किंवा प्राण व उदान ह्या दोन वायूंचा उल्लेख येतो. कांहीं ठिकाणीं तीन वायू-प्राण, व्यान, अपान;प्राण, व्यान,उदान; किंवा प्राण,उदान, समान, यांचा उल्लेख आहे. कांहीं ठिकाणीं प्राण, अपान, व्यान व समान, अथवा प्राण, अपान, उदान व व्यान, असा वायुचतुष्टयाचा उल्लेख आहे. शिवाय प्राण हा शब्द ज्ञानेंद्रियें या अर्थी योजिलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत हीं ज्ञानेंद्रियें सहा आहेत असें म्हटलें आहे. बहुधा डोळे, कान, नाकपुड्या, हीं तीं असावीत. परंतु पुष्कळ ठिकाणीं शिराच्या भागांत सात ज्ञानेंद्रियें आहेत असें म्हटलें असून तोंडाचा त्यांत समावेश केला आहे. केव्हां केव्हां तीं नऊ आहेत असें म्हटलें असून खालच्या भागांतील दोन इंद्रियांनीं हा हिशोब पुरा केला आहे.शतपथ व जैमिनीय ब्राह्मणांत हीं दहा आहेत असें म्हटलें आहे. काठक उपनिषदांत हीं अकरा मानलीं असून काठक

संहितेंत ही संख्या बारा आहेत, व यांत दोन स्तनांचा समावेश केला आहे. सातानंतर कोणत्या अवयवांचा समावेश करावयाचा याचा कांहीं नियम नाहीं. मैत्रायणी संहितेंत दहावा अवयव नाभी आहे. जेव्हां अकरांचा निर्देश करतात तेव्हां ब्रह्मरंध्राचा समावेश करतात. बृहदारण्यक उपनिषदाप्रमाणें सातवें रसेंद्रिय व आठवें वागिंद्रिय हीं होत. परंतु सामान्यतः हीं दोन्ही मिळून एकच इंद्रिय धरतात; व मग आठ व नऊ हीं स्तनद्वय किंवा मलोत्सर्जक इंद्रियें म्हणून मानतात. प्राणाचा कधीं कधीं सामान्यपणें नुसता श्वासवायु असा अर्थ होतो, व कित्येक वेळां तो अपानाच्या विरुद्ध म्हणून उद्दिष्ट असतो. परंतु या शब्दाचा ( अपान ) स्पष्ट अर्थ उच्छ्वास म्हणजे बाहेर सोडलेला वायु हा आहे. तो ' आंत घेतलेला वायु ' असा अर्थ जो सेंटपीटर्सबर्गच्या कोशांत दिला आहे तसा मात्र नाहीं. हा अर्थ पीटर्सबर्गकोशांत घेण्याचें कारण अपान शब्दाचा अप म्हणजे दूर यावरून उच्छ्वास असा अर्थ कोशकारास वाटला असेल. एतद्देशीय भाष्यकारांनीं पहिलाच अर्थ घेतला आहे, आणि दुसऱ्या पुराव्यावरून सुद्धां हाच अर्थ सिद्ध होत असल्यानें बोथलिंक यानें सुद्धां हा अर्थच कबूल केला आहे. प्राणवायूचें क्षेत्र डोक्यापासून हृदयापर्यंत आहे. तो बुद्धि, हृदय, इंद्रियें व मन यांना धारण करणारा म्हणजे त्यांस प्रेरक असें वर्णन आहे. बाहेरील वायु आंत घेणें, अन्न आंत नेणें वगैरे कामें प्राणवायूचीं आहेत. वेदांत ज्ञानेंद्रियें असा जो प्राणाचा अर्थ केला आहे तो त्या ज्ञानेंद्रियास प्रेरक अशा साहचर्यानेंच असावा. पीटर्सबर्गकोशात जो 'वायु आंत नेणें असा अर्थ दिला आहे तोच वैद्यशास्त्रसंमत आहे, पण तो प्राण नसून तें एक प्राणवायूचें कार्य आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्राणवायु व इंद्रियें यांचें साहचर्य किंवा प्रेर्यप्रेरकत्वसंबंध असल्यानें एकमेकाचे शब्द अभिन्न अर्थानें वापरलें असावें. प्राणादि पाच वायू कार्यभेदानें व शरीरांतील स्थानभेदानें निरनिराळे मानले आहेत.

[12] शफ—शफ म्हणजे खूर. याचा अर्थ एक अष्टमांश भाग असा होतो, कारण गाईचें खूर विभागलेले असतात. उदाहरणार्थ चतुष्पाद प्राण्याचा पाय ( पद ) म्हणजे एक चतुर्थांश भाग असा अर्थ आहे. त्याचप्रमाणें शफ याचा अर्थ आहे. हा अर्थ ऋग्वेदापासून प्रचारांत आहे, व ऋग्वेदांतहि तो वारंवार आला आहे.

[13] शरीर—हा शब्द वैदिक वाङ्मयांत वारंवार आलेला आहे. वैदिक काळच्या आर्यांचें लक्ष प्रथमपासून शारीर शास्त्राकडे होतें असें दिसतें. उदाहरणार्थ अथर्ववेदांतील एका सूक्तांत शरीराच्या निरनिराळ्या भागांचीं नांवें बरींच शुद्ध व व्यवस्थित रीतीनें आलीं आहेत. ह्या सूक्तांत टांचा ( पार्ष्णी ), मांस, छिद्रें, पायाचे चौडे ( उच्लकौ ), गुल्फ, अंगुलि, पादास्थि अस्थिवत् ( गुढघ्याची वाटी ) जंघा, जानूंचे संधी, नंतर जानूंच्या वर असलेला व ज्याला चार बाजू आहेत असा वाकणारा कबंध(श्रोणी व ऊरू हे ह्या कबंधाचे आधारस्तंभ आहेत), नंतर छातींतलें हाड (उरस्) ग्रीवा, स्तन, खवाट्याचीं हाडें, मानेचीं हाडें, स्कंधौ, माकड हाड (पृष्टीः), अंस, बाहू, मस्तकांतील सात छिद्रें, (सप्त खानि शीर्षाणि ) कान, नासिका, डोळे, मुख, हनु, जिव्हा, मस्तिष्क (मेंदू), ललाट, तोंडाचें हाड,(ककातिका) कपाल व हनूची चिवा इत्यादि. हीं जीं अथर्ववेदामध्यें शरीरांच्या भागांच्या नांवाची यादी आलेली आहे ती यादी व चरकसुश्रुतामध्यें आलेली यादी यांमध्यें बरेंच साम्य आहे. ह्या दुसऱ्या यादीमुळें हॉर्नलेनें शरीराच्या कांहीं भागांना जीं नांवें दिलेलीं आहेत तीं निश्चित होतात. कफोदौ (ह्याचें निरनिराळ्या हस्तलिखित प्रतींत निरनिराळे पाठ आहेत ) ह्याचा अर्थ व्हिटनेच्या मतें अक्षक असा आहे पण सेंटपीटर्सबर्गकोशांत कोपर असा दिलेला आहे. स्कंध ह्याचा नेहमींचा अनेकवचनीं अर्थ मानेचीं हाडें किंवा बरोबर शब्द हवा असेल तर ग्रैविक मणी असा आहे. हाच अर्थ उष्णिहा या अनेकवचनी शब्दानें सांगितला जातो. पृष्टीचा अर्थ बरगडी असा नव्हे, ( कारण त्याला पर्शु हा शब्द आहे ) तर कशेरुका बाहु म्हणजे कशेरुका किंवा मणक्यांचीं हाडें असा आहे. पृष्ठवंश नलिकेच्या भागांत सतरा मणक्याचीं हाडें व चौतीस कशेरुका बाहू आहेत. मणक्यांच्या हाडांना कीकसा हें अनेकवचनीं नांव आहे; व ह्या कीकसेमध्यें कधीं कधीं पाठीच्या कण्याचा वरचा भाग अंतर्भूत होतो तर कधीं कधीं पृष्ठवंशाचा उरोभाग ह्याचाहि समावेश होतो. अणूक ह्याचा अर्थ पृष्ठवंश किंवा अधिक बारकाईनें बोलावयाचें असेल तर कटिमणि किंवा पृष्ठवंशाचा उरोभाग असा होतो. शतपथ ब्राह्मणांत असें म्हटलें आहे कीं, कटिमणीमध्यें ( उदरांत ) वीस कशेरुका बाहू असतात व पृष्ठवंशाच्या उरोभागांत बत्तीस असतात, मिळून एकंदर मणक्यांचीं सव्वीस हाडें आहेत. पण हल्लीं जी शारीरशास्त्राची माहिती उपलब्ध आहे तीवरून हीं संख्या जरी एकच असली तरी हाडांची वाटणी निराळ्या प्रकारची आहे. पृष्ठवंशाला करूकर हें नांवहि दिलेलें आहे, व हें नांव नेहमीं अनेकवचनीं असतें, व त्याचा अर्थ कशेरुका ( बाहू ) असा आहे; त्याला प्रतिशब्द कुंताप हा आहे. ग्रीवा हा शब्द अनेकवचनीं असला म्हणजे मानेचीं हाडें असा त्याचा अर्थ होतो. हीं मानेचीं हाडें शतपथ ब्राह्मणांत सात दिलेलीं आहेत. पण नेहमीं ह्याचा साधा अर्थ श्वासनलिका किंवा जास्त बिनचूक अर्थ म्हणजे कातड्याखालचीं मृदु अस्थींचीं वेष्टणें हा होय. जत्रु हा शब्द अनेकवचनीं आला म्हणजे त्याचा अर्थ ग्रैविक मृदु अस्थि किंवा बरगडींतील मृदु अस्थि असा आहे. शतपथ ब्राह्मणांत यांची संख्या आठ आहे. भंसस् याचा अर्थ जघनास्थि असा घेणें बरें. कुल्ले किंवा गुदप्रदेश असा अर्थ जो व्हिटने घेतो तो बरोबर नव्हे. हा शब्द अथर्ववेदांत तीनदां आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत हाडांची संख्या ३६० दिलेली आहे.

मस्तक व कबंध ह्यांतल्या हाडांची संख्या दुसऱ्या एका ठिकाणीं खालीं दिल्याप्रमाणें आहे. मस्तक तीन प्रकारचें आहे. व त्यांत त्वच्, अस्थि व मस्तिष्क (मेंदू) हे आहेत. मानेंत पंधरा हाडें आहेत. चवदा करूकर व पंधरावें वीर्य हें मध्यवर्ती हाड आहे. वक्षस्थळांत सतरा हाडें आहेत; सोळा जत्रु व सतरावें उरस् म्हणजे छातींतलें हाड. पृष्ठवंशाचीं कुक्षिसंबंधीं हाडें एकवीस आहेत, वीस कुंताप व एकवीसावें उदर हें होय. कदंबाच्या दोन बाजूंनां सत्तावीस हाडें आहेत, सव्वीस पर्शु व दोन बाजूंनां एक. अणूकामध्यें तेहतीस हाडें आहेत, बत्तीस कशेरुका बाहू व तेहेतिसावें पृष्ठवंशाचा उरोभाग. यजुःसंहितेमध्यें केवळ सांपळ्याचींच नव्हें तर शरीराच्या भागांचींहि अनेक नांवें आलेलीं आहेत. ह्या भागांत लोमन्, त्वच्, मांस, अस्थि, मज्जन् यकृत्, क्लोमन् (फुफ्फुस), मतस्ने (मूत्राशय), पित्त, आंत्र (आंतडीं) गुदः, प्लीहा, नाभि, उदर, वनिष्ठु (मलाशय), योनि, प्लाशि, शेप (शिश्न), मुख, शिरस्, जिव्हा, आसन् (तोंड,) पायु, (पश्चाद्भाग), वाला, चक्षु, पक्ष्मंउत (भ्रुकुटी), नस् (नाक), व्यान (श्वास), नस्य (नाकांतला केस), कान, भ्रू, आत्मन् (शरीर किंवा कबंध), उपस्थ (मांड्या किंवा जननेंद्रिय), श्मश्रु (दाढीचे केस), डोक्याचे केस. दुसरी एक यादी आलेली आहे; तींत नांवें अशीं आहेत:- शिरस्, मुख, केश, श्मश्रु, प्राण, चक्षु, श्रोत्र, जिव्हा, वाच्, मनस्, अंगुलि, अंग अवयव, बाहु, हस्त, कर्ण, आत्मन्, उरस्, पृष्ठी, उदर, अंस, ग्रीवा, श्रोणी, ऊरु, अरत्नि (कोपर), जानु, नाभि, पायु, भसत् (गुदद्वार), अंड, पसस्, जंघा, पद, लोमन्, त्वच्, मांस, अस्थि, मज्जन. तिसरी एक यादी आली आहे तींत वनिष्ठु, पुरीतत्, हस्कोश, लोमन्, त्वच्, लोहित-रक्त, मेदस्, मांस, स्नाव-स्नायु, शिर, अस्थि-मज्जन्, रेतस्, पायु, पार्श्व्य,इ. शब्द आहेत. यजुर्वेद संहितामध्यें घोड्याच्या शरीरांतील हाडांचीं नांवें आलेलीं आहेत. ऐतरेय आरण्यकामध्यें मनुष्याच्या शरीराचे १०१ भाग कल्पिले आहेत. एक एक भागांत २५ अवयव आहेत व कदंबांत १०१हा भाग आहेत. वरच्या दोन भागांत पांच चार संधि असलेलीं बोटें आहेत. दोन कक्षसी (अर्थ संदिग्ध), दोस् (बाहु), अक्ष व अंसफल आहेत. खालच्या दोन भागांत पांच चार संधि असलेली पायाचीं बोटें, मांडी, तंगडी इ. भाग आहेत असें सायण भाष्यावरून दिसतें. शांखायन आरण्यकामध्यें डोक्यांतील तीन हाडें, मानेंतील तीन पर्व, अक्ष, बोटांतले तीन सांधे, व एकवीस अणूक अशीं नांवें आलेलीं आहेत. मैत्रायणी संहितेंत शरीराचे मुख्य भाग चार (प्राण, चक्षु, श्रोत्र व वाच् असे) सांगितले आहेत. पण इतर बरेच फेरफार होऊन एकूण संख्या बारा झाली आहे. तैत्तिरीय उपनिषदामध्यें एक यादी आलेली आहे. तींत चर्मन्, मांस, स्नावन्, अस्थि व मज्जन् अशीं नांवें आहेत. ऐतरेय ब्राम्हणांत लोमन्, त्वच्, अस्थि, मज्जन् व ऐतरेय आरण्यकांत मज्जन्, स्नाव, व अस्थि अशीं नांवें एकत्र आहेत. शरीरासंबंधीं इतर नांवें कंकुष (कदाचित् कानाचा भाग), योनि, कक्ष (कांख), दंत, नख, प्रपद व हलीक्ष्ण (पित्त) अशीं आहेत. अथर्ववेदांत जीं प्रत्यंगें (लहान अवयव) वर्णिलीं आहेत त्यांत व चरकानें वर्णन केलेल्या-प्रत्यंगांत थोडें अंतर आहे. चरकांत यांची संख्या छपन्न आहे. अथर्ववेदांत पायांच्या घोट्याचा वाचक उच्लक असा शब्द आहे व त्यास चरकांत प्रपद असें म्हटलें आहे. तसेंच अस्थिवत् शब्दाच्या ऐवजीं जानु शब्दच वैद्यकांत वापरला आहे. गुडघ्याच्या वाटीस जान्वस्थि असेंच म्हटलें आहे. कबंध नांवाचा निराळा अवयव मानला नाहीं. बाकी सर्व अवयव त्या त्या नांवानेंच वैद्यशास्त्रकारांनीं वर्णिले आहेत. कफोदौ हें नांव वैद्यशास्त्रांत नाहीं. यामुळें या शब्दाचा अर्थ काय हें सांगतां येत नाहीं. स्कंध शब्दाचा अर्थ ग्रैविक मणि असा जो आहे तो वैद्यशास्त्रसंमत नाहीं. याचा अर्थ बाहु व मान या मधला भाग म्हणजे खांदा हा होय.

कशेरुका हा शब्दहि वैद्यकांत नाहीं. वैद्यकांत कशेरुकास पृष्ठास्थि असेंच म्हणतात व हीं चरकाच्या मतानें पस्तीस आहेत. पृष्टि कोठपासून कोठपर्यंत धरावयाची ह्याबद्दल या दोन ग्रंथांत मतभेद असल्यामुळें हाडें कमीजास्त होतात. तें कांहीं असलें तरी मणक्यास कशेरुका हें निराळें नांव वेदांत आहे व वैद्यकांत नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. प्रत्येक मणक्यास दोन बाजूंनां जीं टोकें असतात त्यास कशेरुका बाहु असें म्हणतात; हेंहि मणक्याचें वर्णन वैद्यकापेक्षां जास्त सूक्ष्म व यथार्थ आहे. अणूक हा शब्द वैद्यकांत नाहीं, व कीकसा हाहि नाहीं. हाडांस उद्देशून वेदांत जे निरनिराळे शब्द आहेत, त्यांपैकीं बरेच शब्द वैद्यकांत नाहींत. कुंतापन, करूकर हे शब्दहि वैद्यकांत नाहींत. ग्रीवेंत म्हणजे मानेंत नऊ हाडें आहेत असें सुश्रुतांत लिहिलें आहे व चरकांत तीं दोन मानलीं आहेत. वैद्यकांत ग्रीवा शब्दाचा अर्थ मान म्हणजे पाठीकडील भाग असा आहे, व पुढील भागास कंठनाडी असा शब्द आहे. कंठनाडींत चार हाडें आहेत असें वर्णिलें आहे. या सर्व वर्णनावरून ग्रीवा या शब्दाचा अर्थ मान असाच युक्त दिसतो. श्वासनलिका किंवा कातड्याखालचीं मृदु हाडें असा अर्थ नसावा. कारण सुश्रुत व वेद यांमध्यें या ठिकाणच्या हाडांत साम्य आहे. जत्रु हा शब्दहि निश्चयार्थ नाहीं. सुश्रुतानें हा शब्द शरीरसंस्थानांत वापरलाच नाहीं. चरकानें जत्रूचीं हाडें दोन आहेत असें सांगितलें आहे. हीं हाडें म्हणजे छातीच्या आरंभाला जीं दोन मोठीं हाडें वर आलेलीं दिसतात, व जीं बाहूपाशीं बांधलेलीं आहेत, तीं होत. सुश्रुतानें यांसच अक्षक असें नांव दिलें आहे.

भषस् हा शब्द वैद्यकांत नाहीं. चरकांत शतपथांतील संख्येइतकी म्हणजे तीनशें साठ हाडांची संख्या दिली आहे. सुश्रुतांत तीं तीनशेंच सांगितलीं आहेत. चरक व

शतपथ ब्राह्मण यांची संख्या जरी जुळती आहे, तरी दोहोंचा तपशील जुळत नाहीं. मानेंतील पंधरा हाडें व वक्षस्थलांत सतरा, ही संख्या दोहोंत एकच आहे.

यजुर्वेदसंहितेंत जीं शरीराच्या भागांचीं नांवें आलीं आहेत तीं सर्व वैद्यकांत आहेत. वेदांतील हाडांसंबंधीं व शरीरावयवांसंबंधीं आलेलीं कित्येक नांवें वैद्यकांत नाहींत; उदाहरणार्थ कंकुष, हलीक्ष्ण, अणूक, कबंध, पुरीतत, वनिष्ठु, भसत्, क्लाशि, इत्यादि. मानेवर मन्या नांवाच्या दोन शिरा आहेत. त्यांमध्यें कफाचा संचय झाला असतां मन्यास्तंभ नांवाचा रोग होतो असें सुश्रुतांत लिहिलें आहे. अथर्ववेदांत मन्या नांवाचा जो रोग वर्णिला आहे तो हाच असावा. संस्कृतांत दोन सामासिक पदें विशेषनामवाचक आलीं असतां कोणचें तरी एक उच्चारून संबंध दोहोंशी आण तात, जसें सत्यभामा याच्या ऐवजीं केवल भामा म्हणतात. तसेंच मन्यास्तंभ या ऐवजीं नुसतें मन्या लिहिणें संभवतें. गंडमाळा हा रोग स्वतंत्र असल्यामुळें मन्या हें नांव त्या रोगास लावणें बरोबर दिसत नाहीं.

१४ शिप्रा.— या शब्दाचा अर्थ संदिग्ध आहे. ह्याचा अर्थ अनेक ठिकाणीं 'गाल' असा आहे. इतर ठिकाणीं ह्याचा अर्थ शिरस्त्राणाचे गालावर येणारे भाग किंवा लगाम असा आहे. अयःशिप्रा (हा शब्द अश्विनांना लावलेला आहे) मध्यें त्याचप्रमाणें हिरण्यशिप्र, हरिशिप्र व हिरिशिप्र ह्या शब्दसमूहांत ह्या शिप्र शब्दाचा अर्थ, लोखंडाचें, सोन्याचें किंवा पितळेचें शिरस्त्राण असा असावा. त्याचप्रमाणें शिप्रिन् ह्याचा अर्थ शिरस्त्राण वापरणारा असा होईल.

१५ शृंग.— ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें कोणत्याहि जनावराचें शिंग असा याचा अर्थ आहे. अथर्ववेदांत बाणाच्या टोंकालाहि श्रृंग असें म्हटलें आहे.

१६ श्मश्रु.— ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें याचा अर्थ दाढी व मिशा म्हणजे केश ह्याच्या उलट असा आहे. पूर्वीच्या काळीं हजामत करणें ही गोष्ट माहीत होती. तैत्तिरीय संहितेप्रमाणें दाढी धारण करणें हें पुरुषत्वाचें चिन्ह होतें. मेगॅस्थनीज म्हणतो कीं हिंदु लोक आपली दाढी मरेपर्यंत नीट निगा करून राखीत असत. हें म्हणणें खरें दिसतें.

१७ केश.— डोक्याचे केश या अर्थी ब्राह्मणांत ह्याचा वारंवार उल्लेख आलेला आहे. वेदकालीन आर्यलोक आपल्या केशांची विशेष काळजी घेत असत असें दिसतें. अथर्ववेदांतील बऱ्याचशा ऋचा केशांची पूर्ण वाढ कोणत्या तऱ्हेनें होईल ह्या विषयाचें प्रतिपादन करितात. कापणें किंवा श्मश्रु करणें (वप्) ह्याचाहि उल्लेख बरेच वेळा आलेला आहे. मनुष्याला लांब केश असणें हें दुर्बलतेचें द्योतक आहे.

१८ चक्षुस्.— चक्षुस् म्हणजे डोळा. अथर्ववेदामध्यें घोर चक्षुस् चा उल्लेख असल्यामुळें त्यांवर उपाय म्हणून मंत्र दिले आहेत. त्रिककुद् पर्वतावरील मलम आणि जंगिड वनस्पति हेंहि त्यावर उपाय सांगितले आहेत. विवाहविधींत पत्नीला अशुभदृष्टिबाधा होऊं नये म्हणून प्रार्थना आहे (अघोर चक्षुस्). ब्राह्मणांत डोळ्याच्या रचनेचा त्याचे शुक्ल कृष्ण भाग, आणि बुबुळ (कनीनका) असा उल्लेख आला आहे. डोळ्यांच्या अलजि ह्या नांवाच्या रोगाचाहि उल्लेख आहे. चक्षुस् शब्दाबद्दल वरील सर्व माहिती वैद्यशास्त्रसंमत आहे. यमुनानदींत सांपडणारें अंजन नेत्रक्षोभ घालवितें. हें अंजन म्हणजे ज्यास हल्लीं सुर्मा म्हणतात तेंच होय, यास वैद्यकांत स्रोतोंजन म्हणतात.

१९ पर्शु.— अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें याचा अर्थ बरगडी असा आहे.

२० पाद.— अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें पशु, पक्षी किंवा इतर प्राणी ह्यांचा पाय अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

२१ विषाण.— अथर्ववेद व त्यानंतरचे ग्रंथ ह्यांमध्यें ह्याचा अर्थ जनावरचें शिंग असा आहे.

२२ जांबिल.— (गुडघ्याची खळगी) हा शब्द मैत्रायणी संहितेंत एकदां आला आहे. जांबील अशा रूपानें हा शब्द काठक व वाजसनेयि संहितामध्यें आला आहे. वाजसनेयि संहितेवरील टीकेंत महीधराचार्य ह्याचा अर्थ ढोपराची वाटी असा घेतो, व त्याचें असें म्हणणें आहे कीं हा ढोपराची वाटी असा अर्थ घेण्याचें कारण तो जांबिल जांबीर म्हणजे महाळुंग फळासारखा दिसतो. हा शब्द वैद्यकांत नाहीं.

२३ पाद.— ब्राह्मण ग्रंथांत चतुर्थ चरण ह्या अर्थानें हा शब्द नेहमीं आढळतो. हा अर्थ, चतुष्पाद प्राण्याच्या चार पायांपैकीं एक म्हणजे एक चतुर्थांश ह्या लक्षणेनें झाला आहे.

२४ हिता.— ब्राह्मण ग्रंथांत कोठल्याशा अशुद्ध रक्तवहिनी (धमनी) चें हें नांव आहे.

२५ उदान.— याचा उल्लेख वाजसनेयि संहितेंत असून पंच प्राणां पैकीं पांचव्याचें हें नांव आहे. कधीं कधीं तो दुसरा म्हणजे प्राणाच्या नंतर आणि व्यान आणि समान यांच्या पूर्वी असा असतो. कधीं कधीं तो प्राण याच्या विरुद्ध व प्राण व अपान यांच्या पूर्वी असतो. उदान ह्यांत उत् म्हणजे ऊर्ध्व व आन् म्हणजे वर येणें, असा शब्दार्थ आहे. ज्यावेळीं श्वास बाहेर सोडला जातो त्यावेळीं जें वायूचें ऊर्ध्व गमन होतें, तें एक उदानाचें कार्य मानतात. शिवाय बोलणें बल,वर्ण, स्मरणशक्ति, या गोष्टीहि उदान वायूच्या योगानें होतात. हा नाभीपासून कंठापर्यंत असतो. ह्याचें मुख्य स्थान छाती आहे. शतपथ ब्राह्मणांत हा वायु अन्नपचन करतो अशी कल्पना आढळते व ती उपनिषदांतहि आहे. परंतु तो मरणसमयीं कंठाच्या बाहेर येऊन जीवाला घेऊन जातो अशीहि कल्पना आहे.

## वैद्यक

### रोग व आरोग्य [ऋग्वेद]

अक्षत
अगद
अजका
[1]अज्ञातयक्ष्मन्
अनमीव
अनूक्य (यक्ष्म)
अप्वन्
अम
अमीवचातन
अमीवत्
अरिष्टि
[2]आशिपद (शिपद = शिबें)
[3]आशिमिद
आरुज्
[4]ग्राहि
[5]जीवगृभ
दुर्णामन् (अर्शरोग)
नवज्वार
पृशन्य
पृष्ट्यामयी
भिषज्
भेषज्
भेषजी
[6]यक्ष्मन्
[7]राजयक्ष्मन्
रुत
[8]वन्दन
वव्रि (ज्वर)
विवव्रि
विषूची
[9]सुराम
स्राम
[10]हरिमन् (कावीळ)
[11]हृद्रोग

[तै. सं.]

अपमार (अपस्मार)
आधि
आव्य
उदावर्त
उभयतःसंश्वा (दोन्ही कुशींतील कळ)
किकिदीवि (खोकला)
क्लैव्य
क्षुत्
ग्राहुक
[12]जायेन्य
[13]दुष्कर्मन्
निहाका
पापयक्ष्मन्
पित्त
भेषज्
राजयक्ष्मन्
रोग
लूता
[14]वरुणगृहीत
शीतरु
श्येन
श्वैत्र (पित्तजन्य रोग)
सिध्म (शिबें, सुरमा,)
सुभेषज्
स्रिध

[अथर्ववेद]

[15]अक्षत
अंग
अंगज्वर
अंगभेद
अज्ञातयक्ष्म
अनामन्
[16]अपचित् (गंडमाळा)
[17]अप्वा
अबल
अभिव्याधिन्
अभिशोक
अभिशोचन
अभीवत्
अयक्ष्मकरणी
अराय (कुष्ट)
अरुस्स्राण (व्रणमुख)
[18]अलजि
अलिंश
अश्लोण
असूतिका
असृक्पावान
अस्थिज
अस्थिस्रंस
अह्वरित
अहि
आधि
आल
[19]आशरीक
आश्रेष
आस
[20]आस्राव (मूत्रातिसार)
उदरदार (अतिसार)
उपकक्ष्य (गंडमाळा, वि.)
ऋक्षग्रीव
ऐलब (चक्षुरोग)
कण्व
काणा
[21]कास
कासा
कासिका
[22]किलास (कुष्ट)
[23]कीदिमल
कुष्ठ
कुष्ठिका
कूटा
कृत्ति (गर्भपीडक रोग)
कोक
कोटा
क्लीब
क्लोम्न
[24]क्षत
क्षय
क्षव
क्षुत्
क्षुधामार
[25]क्षेत्रिय
गर्भाद
गर्भादकण्व
[26]गलुंत (सांध्यांतील गांठी)
गुष्पित
[27]ग्राह्
[28]ग्रैव्य
[29]ग्लौ
[30]जम्भ
जायान्य (संभोगजन्य क्षयरोग)
[31]तक्मन्
तक्म
तनूज
[32]तृतीयक (तिजारा ताप)
तृष्णामार
तौदी
दशशल
दुराध्य
दुर्णामन्
[33]दूषीका
नाष्ट्र
[34]निराल
पंचशल
परुस्रंस
पलालानुपलाल
पलीजक
[35]पामन्
[36]पृष्ट्यामय
प्रमीलिन
[37]प्रमोत
बण्डा
बभ्रु
बभ्रुकर्ण
[38]बलास
भरूजि
[39]मन्या
मलिम्लुच
यक्ष्म
राजयक्ष्मा
रुज
रूर
[40]रोग
रोपणा
वत्सप
वव्रिवासस्
वातीकार
वातीकृत
वातीकृतनाशिनी
वालज
[41]विक्लिन्दु
[42]विद्रध
[43]विल्पोहित
[44]विशर
विशरीक
विषाणका
[45]विसल्पक
[46]विस्कंधदूषण
विस्रस
व्याध्य
व्राण
शर्कु (गर्भिणीपीडक रोग)
शिथिर
शिमिदा
[47]शीर्षक्ति
[48]शीर्षामय
शोक
श्लोणा
[49]संस्कंध
सद्मदि
सुनामन्
सुस्रस (गंडमाळा)
[50]स्कंध्या
स्फाति
[51]हृदयामय

[वा. सं.]

[52]अर्शस् (मूलव्याधि)
[53]उपचित्
[54]पाकारु (पिकलेलें गळू)
[55]ह्लिद्याकर्ण
[56]विषूचिका
[57]विष्टाव्राजिन्
[58]व्याधि
[59]श्लोण्य
[60]श्वयथ
[61]श्वित्र

[1]अ ज्ञा त य क्ष्म न्.—ऋग्वेद, अथर्ववेद आणि काठक संहिता यामध्यें याला ‘अज्ञात रोग’ असें म्हटलें आहे. राजयक्ष्म्याचें वर्णन करतांना याचा उल्लेख आला आहे. ग्रोमनचें असें मत आहे कीं, एकाच आजाराचे हे दोन प्रकार आहेत, एक अतिवृद्धि आणि दुसरा एकांग क्षय. ऋग्वेदांत जो मंत्र आहे तो दोन्ही प्रकारच्या रोगांनां दूर करण्याक-

रितां उपयोगी पडतो. अथर्ववेदांतील बलास याचें या रोगाशीं साम्य आहे असें ग्रोमन दर्शवितो. झिमर म्हणतो कीं, हें अनुमान बरोबर नाहीं. ज्याचें पुढें क्षयांत रूपांतर होतें असा जीर्णज्वर म्हणजे हा रोग असावा.

[२] (अ) शि प द.—अशिपद या नकारार्थी रूपांत हा शद्ब ऋग्वेदांत अशिमिद शद्बाबरोबर आलेला आहे. शिपद व शिमिद हे दोन्ही शद्ब एखाद्या अज्ञात रोगांचीं नांवें असावींत.

[३](अ) शि मि द.—ऋग्वेदांत अशिमिद या समासांत हा आलेला असून त्याचा अर्थ रोग असा असावा. अथर्ववेद व शतपथ ब्राह्मण यांमध्यें शिमिदा हें स्त्रीलिंगी रूप आलें असून त्याचा अर्थ एका राक्षसिणीचें नांव असा आहे.

[४]ग्रा हि.—ऋग्वेद व अथर्ववेद यांत ही एक व्याधींची निशाचरी आहे. निद्रा (स्वप्न) हा तिचा मुलगा होय.

[५]जी व गृ भ.—(जिवंतपणीं धरणारा). रॉथच्या मतें हा शद्ब प्रजेच्या जीविताचें रक्षण करणारा या अर्थानें ऋग्वेदांत आलेला आहे. परंतु हा अर्थ जरी त्याच सूक्तांतील पुढील ऋचेंत आलेल्या 'मध्यमशी' (मध्यस्थ) शद्बावरून शक्य असला तरी हा अर्थ घेण्याची आवश्यकता नाहीं व तो संभाव्यहि नाहीं. ऋ. १०.९७,११ या ठिकाणीं जीवगृभ याचा जीवांनां धरणारा, मारणारा असाच अर्थ होतो.

[६]य क्ष्म न्.–सामान्यत: शरीराला कृश करणारा रोग या अर्थी हा शद्ब ऋग्वेदांत आणि अथर्ववेदांत आलेला आहे. वाजसनेयि संहितेंत शंभर प्रकारच्या यक्ष्मांचा उल्लेख केला गेला आहे आणि काठकसंहितेंत अयक्ष्म म्हणजे रोगविरहित असा अर्थ दिलेला आहे. यजुर्वेदसंहितेंत यक्ष्माच्या उत्पत्तीविषयीं माहिती दिलेली आहे. यक्ष्म तीन प्रकारचे सांगितले आहेत:–राजयक्ष्म, पापयक्ष्म, आणि जायेन्य. दुसऱ्या प्रकारचा यक्ष्म अप्रसिद्ध असून त्याचा अर्थ फक्त भयंकर रोग असा होतो. वैद्यकांत यक्ष्म या शद्बाचा अर्थ रोग असा आहे.

[७]रा ज य क्ष्म न्.—राजरोग असा या शद्बाचा अर्थ असून ऋग्वेदांत आणि पुढें पुष्कळ ठिकाणीं याचा उल्लेख आलेला आहे. झिमरनें हा रोग म्हणजे क्षयच होय असें म्हटलें आहे. या रोगाचें जें पुढें निदान झालें आहे त्यावरून हें मत बरोबर आहे असें दिसतें. याचा अर्थ उपदंश असा असावा असें ब्लूमफील्ड सुचवितो. परंतु हें संभवनीय दिसत नाहीं. वैद्यकांत या रोगास राजयक्ष्म असेंच म्हणतात. हा सर्व रोगांचा राजा आहे म्हणून त्यास राजयक्ष्मा हें नांव दिलें आहे.

[८]वं द न.—एका रोगाचें नांव म्हणुन हा शद्ब ऋग्वेदांत आला आहे. सर्व शरीरांवर उठणारे फोड म्हणजे हा रोग असावा. ऋग्वेदामध्यें आश्विनांच्या आश्रितांचेंहि हें नांव आहे. हा शद्ब प्रचलित वैद्यकांत नाहीं.

[९]सु रा म.—अतिशय सुरापानानें उत्पन्न होणाऱ्या रोगाचें हें नांव ऋग्वेदामध्यें आलेलें आहे. नमुचीच्या कथेंत इंद्राला हा रोग झाला होता असें म्हटलें आहे. पुढील ग्रंथांत सुराम हें विशेषण सोमाला 'आनंददायक' अशा अर्थानें लावलेलें आहे. हा विकार वैद्यकांत नाहीं.

[१०]ह रि म न्.—ऋग्वेद व अथर्ववेद यांमध्यें हा एक रोग आहे असें म्हटलें असून पिंवळेपणा (कावीळ) असा त्याचा अर्थ आहे.

[११]हृ द्रो ग व हृ द्यो त.—'काळजाचा विकार.' याचा उल्लेख ऋग्वेद व अथर्ववेद यांमध्यें अनुक्रमें आला आहे. झिमरच्या मतानें अथर्ववेदामध्यें आलेला हा रोग व हृदयामद रोग हे दोन्ही एकच आहेत. ऋग्वेदामध्यें हें संभवत नाहीं. पाश्चात्य वैद्यक ग्रंथांत याला ॲंजिना पेक्टोरिस असें नांव दिलें आहे. हृद्रोग म्हणजे हृदय विकृत झाल्यामुळें होणारा विकार. याचें वर्णन वैद्यकांत आलें आहे.

[१२]जा या न्य, जा ये न्य.—अथर्ववेद व तैत्तिरीय संहिता यांमध्यें उल्लेखिलेल्या रोगांची जायान्य व जायेन्य हीं नांवें आहेत. अथर्ववेदांत एके ठिकाणीं हरिमा (कावीळ) व गात्रांतील दु:खें (अंगभेदो विसल्पक:) यांच्याबरोबर या रोगाचा उल्लेख आलेला आहे. झिमरच्या मतें या वेदना म्हणजे त्या रोगाचीं लक्षणें होत व यक्ष्मा रोग [फुप्फुसाचा रोग] आणि हा रोग यांमध्यें बरेंच साम्य आहे. ब्लूमफील्डचें तर असें मत आहे कीं, हा रोग म्हणजे उपदंश होय. कारण याचीं लक्षणें व कौषीतकी सूत्रामध्यें जो कर्मविधि दिलेला आहे त्यांत सांगितलेलीं लक्षणें हीं सारखीं जुळतात. रॉथच्या मतें हा रोग म्हणजे संधिविकार होय. हा अनिश्चित आहे असें व्हिटनें म्हणतो. जायान्य या नांवावरून व बरोबरच्या लक्षणांवरून वैद्यकशास्त्राच्या मतें या रोगाचें निश्चित नांव देतां येत नाहीं. अति स्त्रीगमन करण्यानें क्षय होण्याचा जास्त संभव आहे. तेव्हां कदाचित् हा क्षयरोग असूं शकेल. ब्लूमफील्डचें मत मात्र बरोबर नाहीं. कारण उपदंश हा रोग [स्त्री पासून होणारा] पूर्वी इकडील लोकांत नव्हता व तो जुन्या वैद्यक ग्रंथांतहि नाहीं.

[१३]दु ष्क र्म न्.—त्वग्रोगानें पीडिलेला असा याचा अर्थ असून हा शब्द तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांमध्यें आलेला आहे. या शब्दानें बहुधा कुष्ठरोगाचा बोध होत असावा. याच रोगाला दुसरें नेहमींचें नांव किलास असें आहे. किलास म्हणजे पांढरें किंवा तांबूस कोड. हा पापरोग आहे असें वाग्भटादि वैद्यक ग्रंथांतहि म्हटलें आहे.

[१४]व रु ण गृ ही त.—'वरुणानें पछाडलेला.' 'जलोदरानें पीडित झालेल्या माणसाचें वर्णन करतांना अनेक ठिकाणीं हा शब्द आलेला आहे. पापाबद्दल शिक्षा म्हणून हा रोग वरुणानें पाठविलेला आहे. वरुण ही पाण्याची देवता आहे

व जलोदरांत पाणीच सांठतें. या संबंधावरून वरुणगृहीत हें नांव जलोदर या रोगाला सयुक्तिक दिसतें.

[१५] अक्षत अथवा अक्षित.—जायान्यासंबंधीं अथर्ववेदांत जें वचन आहे त्यांत अक्षित आणि सुक्षत या नांवाच्या जखमेवर उपाय सांगितला आहे. कौशिक सूत्रांत अक्षत आणि सुक्षत व सायणाप्रमाणें अक्षित आणि सुक्षित असे शब्द आहेत. ब्लूमफील्ड या शब्दांचे अर्थ ‘ कापण्यानें न झालेलें’ आणि ‘कापल्यामुळें झालेलें’ असे करतो. पहिल्यानें यानें ‘ हावर ’ अथवा ‘ गळूं ’ असा अर्थ केला. जायान्याचे हे दोन प्रकार आहेत असें व्हिट्ने म्हणतो. सायणाप्रमाणेंच लुडविग अक्षित असा अर्थ करतो व ‘पक्षेंपर्णी न मुरलेलें ’ असें त्याचें स्पष्टीकरण करतो. यामध्यें क्षय या रोगाचा अंतर्भाव होतो असें झिमरचें म्हणणें आहे. जायान्याचे हे जर प्रकार असतील तर व जायान्य म्हणजे क्षय असा अर्थ असेल तर अक्षत म्हणजे दोषसंचयानें झालेला क्षय व सुक्षत म्हणजे फुप्फुसाला जखम होऊन झालेला क्षय असा अर्थ योग्य होईल. क्षतक्षय म्हणून हल्लीं एक रोग मानीत असतात.

[१६] अपचित्.—अथर्ववेदांत पुष्कळ वेळां हा शब्द उपयोगांत आणलेला आहे. रॉथ, झिमर आणि दुसरे ग्रंथकार असें म्हणतात कीं, याचा अर्थ एक किडा असा असून त्याच्या दंशानें जागा सुजते. परंतु ब्लूमफील्ड म्हणतो कीं, हा शब्द एका रोगाचें नांव आहे व तो रोग म्हणजे गंडमाळा होय, असें केशव आणि सायण यांच्या भाष्यांवरून व उत्तरकालीन जो ‘ अपचि ’ व्याधि आहे त्याशीं तुलना करून तो सिद्ध करून दाखवितो.

[१७] अप्वा—‘ कोठ्यासंबंधीं. ’ हा रोग बहुधा आमांश असावा, असें झिमर म्हणतो. कारण शत्रूंच्या सैन्याला त्रास व्हावा म्हणून याला आव्हान करीत असत. वेबर म्हणतो कीं, भीतीमुळें उत्पन्न होणारा हा हगवणीचा रोग असावा, आणि असें वर्णन महाभारतादि पुराणांत बहुत करून असतें. या मताला ब्लूमफील्ड व बहुधा यास्क यांचा दुजोरा आहे. अप् ( पाणी ) याचा अतिसार रोगाशीं संबंध आहे म्हणून याला अप्वा हें नांव दिलें असावें. वाईट किंवा पुष्कळ पाणी प्याल्यानें अतिसार होतो हें सर्वमान्य आहे.

[१८] अलजि.—अथर्ववेदामध्यें हें एका व्याधीचें नांव आहे. नंतरचा ‘ अलजी ’ हा शब्द नेत्ररोगाचा द्योतक असून, नेत्रबाह्यपटल आणि बाहुलीचा पडदा यांच्या सांध्यांतून पाणी वगैरे वाहणें असा त्याचा अर्थ आहे. वैद्यकांत या रोगाचें वर्णन आहे. नाकाच्या बाजूकडील डोळ्याच्या कोपऱ्यास जी सूज येते तीस अलजि असें म्हणतात.

[१९] आशरीक.—अथर्व वेदांत जंगिड झाडाचें महत्त्व ज्या सूक्तांत वर्णिलें आहे त्यांत हा एक व्याधि आहे असा उल्लेख आहे. ताप येण्याच्या वेळीं अंग दुखतें त्याला हा शब्द योजितात असें झिमरचें मत आहे. व्हिट्ने सुचवितो कीं, हा शब्द फक्त विशेषणच आहे. याचा अर्थ काय आहे हें त्याला नीटसें समजलें नाहीं.

[२०] आस्राव.—हा एक रोग आहे असें अथर्ववेदावरून दिसतें; पण तो कोणत्या प्रकारचा असतो हें कळत नाहीं. एका ठिकाणीं भाष्यकार याचा अर्थ मूत्रातिसार असा करतात; पण लानमनच्या मताप्रमाणें मधुमेह असा त्याचा अर्थ आहे. ब्लूमफील्ड म्हणतो कीं, हा रोग हगवण होय. पण ज्या अर्थीं अरुस्राण हा उपाय सांगितला आहे त्या अर्थीं ‘ जखमांतून पू वाहणें ’ हा तो रोग असला पाहिजे असें झिमरचें मत आहे. व्हिट्नें फक्त ‘ पू ’ असा अर्थ करतो व ब्लूमफील्डच्या मताविषयीं शंका प्रदर्शित करतो. त्याचा अर्थ ‘ आजार, सरदी ’ असा असावा असें लुडविग म्हणतो. प्रस्राव या शब्दाचा लघवी असा अर्थ असून, त्याशीं आस्राव हा शब्द बरेंच साम्य दाखवीत असल्यामुळें आस्राव म्हणजे लघवीचा रोग हा अर्थ बरोबर दिसतो. पण निश्चित असें मत मात्र कांहीं देतां येत नाहीं.

[२१] कास, कास, कासा, कासिका.—हीं चारहि एकाच शब्दाचीं रूपें ‘ खोकला ’ या अर्थीं अथर्ववेदांत आलीं आहेत. हा खोकला डोकें दुखण्याबरोबर येऊन, तो पुढें येणाऱ्या तापाचें ( तक्मन् ) चिन्ह दाखवितो. हा स्वतंत्र असाहि रोग आहे. वैद्यकांत कास नांवानेंच या रोगाचें वर्णन आहे.

[२२] किलास.—अथर्ववेद आणि वाजसनेयि संहिता यांमध्यें ‘ श्वेतकुष्ठ, ’ या रोगाचें हें नांव आहे. पहिल्यानें तो रोग करडा ( पलित ) व नंतर पांढरे ठिपके या रूपानें शरीरावर दिसतो. हॉग यानें ऐ. ब्राह्मणांतील अलस या शब्दाचा अर्थहि तोच केला आहे. परंतु हा अर्थ खात्रीलायक नाहीं. ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत किलासी या स्त्रीलिंगी रूपाचा अर्थ मॅक्समुल्लरनें ‘ ठिपके असलेली हरिणी ’ असा केला आहे. वैद्यकांत याचें वर्णन असून किलास या नांवानेंच त्याचा उल्लेख आहे.

[२३] कीमिल.—हा अथर्ववेदाच्या पैप्पलाद शाखेंत, बोथलिंगच्या म्हणण्याप्रमाणें एक व्याधिवाचक शब्द आहे. हा व्याधिवाचक शब्द वैद्यकांत नाहीं.

[२४] क्षत.—झिमर म्हणतो कीं, अथर्ववेदांतील हा मुख्य व्याधि होय; परंतु हा शब्द फक्त विशेषणच असावा असें वाटतें. शस्त्रानें अगर बाह्य अपघातानें झालेली जखम असा याचा अर्थ आहे.

[२५] क्षेत्रिय.—अथर्व वेदांत हा एक व्याधि आहे. याच्या उपशमासाठीं तीन ऋचा लिहिल्या गेल्या आहेत. काठक संहिता आणि तैत्तिरीय ब्राह्मण यांतहि तो आला आहे. अथर्ववेदावरील टीकाकार म्हणतात कीं, हा आनुवंशिक रोग आहे. त्याची व्युत्पत्ति म्हणजे बहुत करून ‘ शेतांत जन्मलेला ’ किंवा ‘इंद्रिय रोग’ अशी असावी. हा नक्की रोग कोणता आहे हें सांगता येत नाहीं. वेबर म्हणतो कीं अथर्व

वेदामध्यें ज्या ऋचा आहेत त्यांचा मुख्य उद्देश शेतांना होणारा उपद्रव नाहींसा व्हावा हा होय; परंतु हें शक्य वाटत नाहीं. ब्लूमफील्ड म्हणतो कीं, तो रोग म्हणजे ‘ गंडमाला, अथवा ‘गरमी’, ‘परमा’ होय. याच्यावर उपाय म्हणून जे सांगितले आहेत त्यांवरून त्या रोगाचीं चिन्हें काय असतात हें मुळींच समजत नाहीं.

२६ गलुन्त.—हा शब्द अथर्ववेदांत एकदांच ‘ फुगणें ’ सुजणें, ’ या अर्थी येतो. परंतु व्हिटने ‘ मान, गळा ’ असें त्याचें स्पष्टीकरण करतो. याचाहि अर्थबोध बरोबर होत नाहीं.

२७ ग्राह.—हें एका रोगाचें नांव शतपथ ब्राह्मणांत आलें आहे. अथर्ववेदांत अर्धांगवायु असा त्याचा अर्थ आहे.

२८ ग्रैव्य.—मानेवरील वाळूक किंवा बेंड असा याचा अर्थ अथर्ववेदांत दिला आहे.

२९ ग्लौ.—अथर्ववेद आणि ऐतरेय ब्राह्मण यांत हें एका व्याधीचें चिन्ह आहे. ‘ गळूं, उठाणूं ’ असा बहुधा त्याचा अर्थ असावा असें ब्लूमफील्ड म्हणतो. वाजसनेयि संहितेवरून याचा अर्थ बरोबर लागत नाहीं; कदाचित् तो यज्ञिय पशूचा कोणता तरी भाग असावा. हा शब्द वैद्यकांत नाहीं.

३० जंभ.—एक रोग किंवा सर्वांत अत्यंत वाईट रोगाचें नांव म्हणून हा शब्द अथर्ववेदामध्यें आलेला आहे. जंगिड या झाडाच्या योगानें हा रोग नाहींसा होतो असें एका ठिकाणीं म्हटलें आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं संहनुः (दोन्हीं जबडे एकत्र आणणारा) असें त्याचें वर्णन आलें आहे. कौशिक सूत्रावरून वेबर असें म्हणतो कीं, दांत येणें हें जें मुलांचें दुखणें आहे तें हें असावें. ब्लूमफील्डच्या मतें बालग्रह किंवा आंचके येणें हा तो रोग असावा. हा रोग म्हणजे धनुर्वात होय असें कॅलँडचें मत आहे. व्हिटने म्हणतो कीं हा रोग म्हणजे आंकडी किंवा दांतखीळ होय. जृंभा म्हणजे जांभई. जांभई आल्याबरोबर केव्हां केव्हां तोंड तसेंच उघडें रहातें किंवा एकदम मिटतें; उघडें राहिलें तर मिटत नाहीं व मिटलें तर उघडत नाहीं. यास वैद्यकांत ‘ हनुस्रांस ’ असें म्हणतात. हनुवटीच्या मुळाशीं वायु कुपित झाल्यानें हा रोग होतो. जंभ रोगहि हाच असावा. ‘ जबडे एकत्रै आणणारा ’ हें विशेषणहि यास चांगलें लागू पडतें.

३१ तक्मन्.—हा एक प्रकारचा रोग असून याचा उल्लेख अथर्ववेदामध्यें वारंवार येतो. तदुत्तर ग्रंथांत मात्र तो याच नांवानें प्रसिद्ध नाहीं. अथर्ववेदांत या रोगावर पांच सूक्तें आहेत; व इतर ठिकाणींहि या रोगाबद्दल उल्लेख आलेले आहेत. हा रोग म्हणजे ‘ताप’ असावा असें वेबरचें मत आहे. तापाचीं सर्व लक्षणें या रोगाच्या लक्षणाशीं जुळतात असें ग्रोहमननें सिद्ध केलें आहे. थंडीचे व ऊष्णाचे आळीपाळीनें रोग्यास येणारे झटके, तापामुळें कावीळ झाल्यावर येणारा पिंवळा रंग व त्याची विशिष्ट ठराविक मुदत वगैरेबद्दलचे उल्लेख ठिकठिकाणीं आलेले आहेत. या तापाचे निरनिराळे प्रकार दाखविणारे शब्द म्हणजे ‘ अन्येद्युः, उभयद्युः, तृतीयक, वि–तृतीय व सदं–दि हे होत. या शब्दांचे निश्चित अर्थ ठरविणें फार मुष्किलीचें आहे. पहिल्या शब्दाचा अर्थ दैनिक ताप (हिंव) असा आहे व याबद्दल एकमत आहे. तरी पण अन्ये हा शब्द ‘ दुसऱ्या दिवशीं ’ अशा अर्थी असल्यानें दैनिक असा अर्थ कसा होतो हें गूढच आहे. ‘ उभयद्युः , याचा अर्थ दर दोन दिवसांनीं येणारा ताप असा आहे. सायणाचार्यांच्या मतें ‘ उभयद्युः ’चा अर्थ तिजारी (तिसऱ्या दिवशीं येणारा) ताप असा आहे. पण तृतीयक याचा अर्थ तिजारी ताप असा असला पाहिजे. झिमरच्या मतें तृतीयक ताप म्हणजे ज्या तापांत तिसऱ्यांदा पाळी आल्यावर रोगाचा जोर होतो व मग रोग असाध्य होतो तो ताप होय. ग्रोहमनच्या मतें वि–तृतीयक म्हणजे असा ताप कीं, जो दक्षिणेकडील देशांत नेहमीं असतो व जो दररोज येणारा असून ज्याचा जोर एक दिवसाआड होत असतो. ब्लूमफील्डच्या मतें तर वि–तृतीयक व उभयद्युः हे एकच ताप होत. सदं–दि हा ताप पुढें ज्याला ‘ सतत ज्वर ’ म्हणूं लागले तोच असावा. या आजारांत एकदां ताप आला म्हणजे तो पुनः येण्याचे पूर्वी कांहीं दिवस ताप बिलकुल असत नाहीं. हा ताप निरनिराळ्या ऋतूंत येत असे. शरदृतूंत शरद,उन्हाळ्यांत ग्रैष्म, व पावसाळ्यांत वार्षिक अशा त्याला संज्ञा असत. हा ताप विशेषतः शरत्कालीं येत असे, म्हणूनच त्याला विश्वशारद म्हणजे दर शरदृतूंत येणारा असें नांव मिळालें आहे. अग्नि जलांत शिरला म्हणजे हा रोग उत्पन्न होत असे. यावरून वेबरनें असें अनुमान काढलें आहे कीं, उष्णतेनंतर जी थंडी पडत असते किंवा दलदलीच्या प्रदेशावर उष्णतेचा जो परिणाम होत असे त्याचा परिणाम म्हणजे ही रोगोत्पत्ति होय. ग्रोहमनच्या मतें अग्नि जलांत शिरला म्हणजे रोग उत्पन्न होतो,याचा अर्थ असा कीं, पावसाळ्यांत ज्या वेळीं विजेच्या रूपानें अग्नि पावसाबरोबर पृथ्वीवर अवतरतो त्या वेळीं हा रोग उत्पन्न होतो. झिमरला हें मत ग्राह्य असून त्यानें असें म्हटलें आहे कीं, हिमालयाजवळ ज्याला हल्लीं तराई असें म्हणतात त्या भागांत हा रोग दिसून येतो. त्याच्या मतें वन्य म्हणजे अरण्यांत होणारा असाच अर्थ अथर्ववेदांत सांपडणाऱ्या वन्य शब्दाचा केला पाहिजे. कारण हिमालय पर्वताच्या पश्चिम भागांत असणाऱ्या मूजवंत व महावृष या दोन जातींच्या लोकांत हा रोग आढळून येतो, असा उल्लेख आहे. सांचलेल्या पाण्यांतील ‘ॲनोफीलस नांवाच्या डांसांपासून(ते चावल्यावर) हा ताप उत्पन्न होतो अशाबद्दल कोठेंहि उल्लेख नाहीं. पूर्वकालीन वैद्यशास्त्रास या रोगाची उत्पत्ति माहीत होती अशाबद्दलचा शोध त्या शास्त्रावर विनाकारण लादण्यांत आलेला आहे. या रोगाचीं लक्षणें किंवा यापासून होणारे इतर उपद्रव जे सांगितले आहेत त्यांमध्यें पामन् ( खरूज ), शीर्षशोक ( कपाळदुखी ), कासिका ( कफ ) बलास ( क्षय

किंवा एक प्रकारची खरूज ), हे रोग सांगितले आहेत. तक्मन् या रोगाचा उल्लेख अथर्ववेदापासून होतो, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कदाचित् वैदिक काळांतील आर्यलोक हिंदुस्थानांत जेव्हां प्रथम आले तेव्हां त्यांनां हा रोग ठाऊकहि नसेल. कदाचित् त्यांनां त्या रोगाची माहिती उडत उडत आलेली अशी ठाऊक असली तरी तो रोग स्थानिक होऊन लोकांनां भयप्रद होण्यास बऱ्याच पिढ्या लागल्या असतील. या रोगावर कोणते उपाय लोकांस उपयोगी पडत हें निश्चयानें कांहीं सांगतां येत नाहीं. कारण, अथर्ववेदामध्यें मंत्रतंत्र व कुष्ठ यांचाच फक्त उल्लेख आहे. पण यांचा जरी पुढें बरेच दिवस लोक उपयोग करीत होते तरी हे रामबाण उपाय खास नव्हत. अथर्ववेदाचे काळांतसुद्धां या तापानें बरेच बळी घेतले असले पाहिजेत. कारण त्याशिवाय या रोगाचा एवढ्या प्रामुख्यानें उल्लेख होता ना. या रोगाचें वर्णन हिंवतापाशीं जुळतें. अन्येद्युः याचा अर्थ दररोज येणारा ताप असाच वाग्भटांत दिला आहे.

[32] तृतीयक.—तिजारी ताप या अर्थी अथर्ववेदामध्यें हा शब्द आलेला आहे.

[33] दूषीका—'डोळ्याचा श्लेष्मा' असा याचा अर्थ असून अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथ यांत रोगाचें नांव म्हणून हा शब्द आलेला आहे.

[34] निराल.—अथर्ववेदामध्यें एकदां हा शब्द आला असून तो एका रोगाचें नांव आहे असें सायणाचार्यांचें मत आहे. ब्लूमफील्ड पदपाठाच्या मदतीनें हे दोन शब्द घेतो. त्यांपैकीं निर हा संक्षिप्त आज्ञार्थी असून आल हा संबोधनार्थी आहे. व त्याचा अर्थ एक प्रकारचें रान असा आहे. व्हिटने यानें प्रथम आल हें क्रियावाचक नाम समजून शेवटीं असें ठरविलें कीं, निराल हा एक शब्द असून त्याचा अर्थ अनिश्चित आहे. हा शब्द वैद्यकांत नाहीं.

[35] पामन्.—अथर्ववेदामध्यें हें एका त्वग्रोगाचें नांव असून त्या शब्दापासून पामन हें तद्धित विशेषण आहे. व त्याचा अर्थ त्वग्रोगानें पीडिलेला असा आहे. उत्तरकालीन संहिता व ब्राह्मण ग्रंथ यांत हें विशेषण आढळून येतें. ताप आल्यानंतर हा रोग होतो असें ज्या अर्थी म्हटलें आहे. त्या अर्थी पुरळ किंवा खरूज ( ताप येऊन गेल्यावरची ) असा याचा अर्थ असावा. पामा नांवाचा रोग निदानांत वर्णिलेला आहे. हा खरजेसारखाच एक विकार आहे. या रोगांत येणाऱ्या पुळ्या कंबरेवर व हातांवर दाट अशा येतात.

[36] पृष्ठ्यामय.—बाजूस किंवा बरगड्यांतलि दुःख असा या शब्दाचा अर्थ अथर्ववेदांत दिलेला आहे. निदान तेथें तरी तापाला लागून होणारें दुःख असा याचा अर्थ वाटतो. उसण हा एक पृष्ठ्यामय आहे.केव्हां केव्हां हा विकार होतो.

[37] प्रमोत.—हें एका रोगाचें नांव आहे असें सं. पी. कोशांत म्हटलें आहे. हा शब्द अथर्ववेदांत आला आहे. झिमरच्या मतें हा शब्द विशेषण असून याचा अर्थ 'मुका' असा आहे. हें मत ब्लूमफील्ड व व्हिटने यांनीं भीतभीत मान्य केलें आहे. हा रोगवाचक शब्द वैद्यकांत नाहीं व दुसराहि योग्य अर्थ कोणता आहे हें माहीत नाहीं.

[38] बलास— अथर्ववेद आणि तदुत्तर ग्रंथांत या रोगाचें नांव पुष्कळ वेळां आलेलें आहे. महीधर आणि सायण याचा अर्थ क्षय असा करितात.झिमरहि याच मताचा आहे. कारण हा एक यक्ष्म्याचा प्रकार आहे असा उल्लेख येतो. यामुळें [ अस्थिस्रंस आणि परुस्स्रंस ] हाडें आणि सांधे मोकळे होतात. हा रोग उत्पन्न होण्याचें कारण प्रेम, त्वेष किंवा हृदय [ ? ] होय. पुढील हिंदु वैद्यकांत क्षयाच्या बद्दल हें वर्णन आढळतें. बलास हा नेहमीं तक्मन् या शब्दाबरोबर आढळतो हेंहि योग्यच आहे. कारण तक्मन् हा क्षयाच्या वर्णनाचा एक राक्षस आहे. ग्रोहमनच्या मतानें त्याचा सूज किंवा दुःख असा अर्थ असावा. ब्लूमफील्डच्या मतें याचा अर्थ संशयित आहे. लुडविग याचा जलोदर असा अर्थ करतो. या रोगावर त्रिककुद् व जंगिड या वनस्पतींचें अंजन औषध म्हणून दिलें आहे. वैद्यकांत बलास याचा कफ असा अर्थ आहे.क्षयांत कफाचेंच प्राधान्य असतें आणि त्यांत दुष्ट कफ फार पडतो यावरून आणि इतर वर्णनावरून हा रोग म्हणजे ज्यास कफक्षय म्हणतात असा क्षय रोगाचाच एक प्रकार असावा. क्षयरोगाच्या सुरुवातीस एक प्रकारचा ताप येऊं लागतो त्यास वैद्यकांत वातबलासकज्वर असें म्हणतात. यावरूनहि बलासक हें नांव क्षय रोगासंबंधीं प्राचीन असून लोकरूढ आहे असें वाटतें. कारण रोगांचीं नांवें जीं पूर्वीपासून रूढ होतीं तींच चरकानें वापरलीं आहेत. लुडविग याचा जलोदर असा अर्थ करतो. त्यास आधार काय हें समजत नाहीं. सुजेच्या विकारानें हाडें दूर होतात असें जें त्या विकाराचें लक्षण दिलें आहे तें क्षय रोगांत जास्त संभवतें.

[39] मन्या.—( मानेचा कांटा, अनेकवचनी ). अथर्ववेदांतील एका रोगविषयक ऋचेंत हा शब्द आला आहे. हा रोग म्हणजे बहुधा गंडमाळेमुळें मानेवर आलेली सूज होय. वाइज या शब्दाची मन्सकूंडर म्हणजे मानेवरचीं गळवें या रोगाशीं तुलना करतो. हा मन्सकूंडर शब्द मन्या व स्कंध्या ( खांद्याचें आणि मानेवरचें दुःख ) या दोन्ही ( पहिल्या आणि तिसऱ्या अथर्वण ऋचांतून आलेल्या ) शब्दांसारखा दिसतो.

[40] रोग.—अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यांत रोग या शब्दाचा आजार असा अर्थ दिला आहे.

[41] विक्लिदु.—एका रोगाचें नांव म्हणून हा शब्द अथर्ववेदांत आलेला आहे. ब्लूमफील्डच्या मतानें याचा अर्थ मोतीबिंदु असा आहे. हा शब्द वैद्यकांत नाहीं.

[42] विद्रध.—सपूयक्षत नांवाच्या एका रोगाचें हें नांव अथर्ववेदामध्यें आलेलें आहे. झिमरच्या मतें यक्ष्मा या रो-

गाचें हें लक्षण आहे. याच रोगाला पुढें विद्रधि असें लोक म्हणूं लागले. लुडविग या शब्दाची व ऋग्वेदामधल्या अस्पष्ट विद्रध शब्दाची तुलना करतो, पण ऋग्वेदांतील विद्रध शब्दाचा नक्की अर्थ काय आहे हेंच समजत नाहीं. वैद्यकांत विद्रधि नांवाचा रोग वर्णिला आहे तोच हा रोग असावा.

[४३]वि लो हि त.—हें एका रोगाचें नांव अथर्ववेदांत आलें आहे. ब्लूमफील्डच्या मतें नाकांतून रक्त वहाणें ही ती पीडा असावी. हेनरी याचा अर्थ रक्त नासणें असा करतो. व्हिट्नेच्या मतें रक्तक्षय ( ॲनिमिया ) असा त्याचा अर्थ आहे. वैद्यकांत ज्यास पंडुरोग म्हणतात तोच हा विलोहित रोग होय. कारण, याच रोगांत रक्त कमी होतें ( ' ततोल्परक्त मेदस्को'—वाग्भट, पंडुरोग निदान ). ब्लूमफील्डचें मत बरोबर नाहीं. कारण, नाकांतून रक्त वाहूं लागलें म्हणजे तो रक्त वाढल्याचा रोग समजतात. रक्ताचें पृथक्करण हा अर्थ कसा होतो हेंच समजत नाहीं; ही शब्दयोजना चमत्कारिक आहे.

[४४]वि श र.—हा शब्द अथर्ववेदांत आढळतो. हा एखाद्या रोगाचा निदर्शक असावा. रॉथ म्हणतो कीं, हें एका राक्षसाचें नांव असावें, पण झिमर म्हणतो कीं, ताप ( तक्मन् ) आला असतां अंगाचें जें ठणकणें त्यास विशर असें म्हणत असतील; आणि या तर्कास ' विशरीक ' व दुसऱ्या एका स्थळीं आलेल्या ' बलास ' ह्या शब्दानें पुष्टि मिळते. हा शब्द वैद्यकांत नाहीं.

[४५]विसल्प, विसल्पक.—हा शब्द अथर्ववेदांत सांपडतो. विसल्पक असा पाठ वैदिक लोक घेतात तेव्हां तोच अधिक युक्त असें वेदार्थयत्नकार शं. पां. पंडित यांचें मत आहे. शल्य म्हणजे बाण, कांटा, वगैरे जर शरीरांत घुसला तर त्यामुळें अथवा तो निघाल्यावर जशा प्रकारच्या वेदना होतात तशा वेदना असा याचा अर्थ होईल. ताप आल्यावर मज्जातंतूंना जी व्यथा होते, तिच्या अर्थींहि ह्याचा उपयोग केला असल्याचा संभव आहे.

[४६]वि ष्कं ध.—एका रोगाचें नांव म्हणून हा शब्द अथर्ववेदांत आढळतो. ह्यावर इलाज म्हणून शिशाचा ताईत, अंबाडी, जंगिड नांवाची वनस्पति अथवा एक प्रकारच्या मलमाचा उपयोग करावा असें तेथें म्हटलें आहे. एका सूक्तांत आलेल्या ' कार्षक ' व ' विषक ' ह्या नांवांच्या वनस्पतींचा या रोगावर उपयोग होत असावा. वेबर म्हणतो कीं विष्कंध म्हणजे संधिवात. कारण यामुळें स्कंध वेगवेगळे होतात ( वि+स्कंध ). ब्लूमफील्डच्या मतानें ऋग्वेदांतील ' व्यंस ' व ' विग्रीव ह्याप्रमाणें 'विष्कंध ' हाहि एक राक्षस असावा. वैद्यकशास्त्राप्रमाणें ह्या शब्दाचा कांहीं अर्थ लागत नाहीं.

[४७]शी र्ष क्ति.—अथर्वांत डोकेंदुखीला हा शब्द योजिला आहे. हा वैद्यकांत नाहीं.

[४८]शीर्षामय.—याचा अर्थ डोक्याचा रोग. याचा उल्लेख अथर्ववेदांत आहे.

[४९]स्कं ध.—विष्कंध ह्या शब्दाबरोबरच हा एक रोगदर्शक शब्द आला आहे. ह्याचा अर्थ ' खांदे एकत्र असलेला. ' व्हिटनेच्या मतानें विष्कंधाचा प्रतिकार करणाऱ्या औषधाचें हें नांव असावें. हा शब्द वैद्यकांत आढळत नाहीं.

[५०]स्कंध्या.—हें स्त्रीलिंगी अनेकवचनी रूप अथर्वांत आढळतें. खांद्याच्या रोगाचें किंवा कसल्या तरी गळवाचें हें नांव असावें. असा रोग वैद्यकांत नाहीं.

[५१]हृ द या म य.—' काळजाचा ' रोग. हा शब्द अथर्वामध्यें ' यक्ष्मा ' व ' बलास ' ह्यांच्या संबंधानें आलेला आहे. झिमरच्या मतें हा क्षय होय. तो वैद्यक संहितेंत दिलेल्या मतानुसार म्हणतो कीं, ह्या रोगास जीं कारणें आहेत, त्यांत प्रेम हें एक असावें.

[५२]अ र्श स्.—वाजसनेयि संहितेंतील क्षय व दुसरें क्षुल्लक रोग यांच्या यादींत या रोगाचेंहि नांव आहे. उत्तरकालीन वैद्यकवाङ्मयांत त्याचा अर्थ ' मूळव्याध ' असा करितात.

[५३]उ प चि त्.—वाजसनेयि संहितेंत हा शब्द एका रोगाचा निदर्शक म्हणून आढळतो. रॉथ याचा अर्थ सूज असा करतो, व तो शक्य आहे. उपचय म्हणजे सूज असा वैद्यकदृष्ट्या अर्थ होतो. ब्लूमफील्ड उपचित् व अपचित् एकच असें म्हणतो.

[५४]पा का रु.—हा एक रोग विषूचिका व अर्शस् ह्यांच्या बरोबरच वाजसनेयि संहितेंत उल्लेखिला आहे. ह्या रोगाचें विशिष्ट स्वरूप जरी माहीत नाहीं, तरी शब्दाच्या व्युत्पत्तीवरून याचा अर्थ पक्व झालेला व्रण असा होईल.

[५५]ह्लि हा क र्ण.—वाजसनेयि संहितेंत गुराढोरांच्या मागें विशेषणात्मक रूपानें हा शब्द योजिला आहे. ह्लिहेच्या आकाराचा गुरांच्या कानांवर दिलेला ठसा असाहि याचा अर्थ संभवेल. पण वाजसनेयि संहितेंत महीधराचार्य याचा एक कर्णरोग असा अर्थ देतात. ह्लिहाकर्ण हा रोग वैद्यकांत नाहीं. पाळिरोग असें एक कर्णरोगांत सदर आहे व त्याचा अर्थ कर्णपाळीचा रोग असा आहे. कर्णपाळी म्हणजे कानाची वरची सर्व बाजू.

[५६]वि षू चि का.—वाजसनेयि संहितेंत हा शब्द आढळतो. सोमपानातिरेकामुळें होणारा हा रोग होय. याचा आमांश किंवा वाईजच्या मताप्रमाणें पटकी असाहि अर्थ होईल. उघड शब्दार्थ ' दोनहि दिशांनीं मलविसर्जन ' असा आहे. चरकामध्यें हा अजीर्णाचा रोग होय असें लिहिलें आहे. ह्यांत सुया टोंचल्याप्रमाणें सर्वांगास वेदना होतात, म्हणून यास विषूचिका म्हणतात.

[५७]वि ष्टा व्रा जि न्.–शतपथ ब्राह्मणांतील या शब्दाचा अर्थ संशयित आहे. सायणाचार्य याचा अर्थ ' एके ठिकाणीं राहणारा' असा करितात. या अर्थाप्रमाणें पाहतां सेंट पीटर्सबर्ग-कोश व बोथलिंगचा कोश यांच्यांत दिलेला ज्याचा

कळप स्थिर आहे तो' हा अर्थहि बरोबर म्हणतां येईल. परंतु शतपथ ब्राह्मणाच्या कण्वशाखीय प्रतींत एके ठिकाणीं त्याचा रोग या अर्थानें उपयोग केला आहे असें एगलिंग म्हणतो. त्याचप्रमाणें विष्ठाव्राजिन् याचा अर्थ आमांशानें व्यथित असाहि होईल.

[५८]व्याधि.—व्याधि म्हणजे रोग. वैद्यक वाङ्मयांत अनेक वेळां हा शब्द आलेला आहे. निरनिराळ्या रोगांनां निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. वैद्यक संहितांमध्यें अनेक शारीरिक व्यंगांचीं नांवें आढळतात. वाजसनेयि संहितेंतील पुरुषमेधांत बळी दिल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या यादींत वामन किंवा कुब्ज, खल्वाटि (टकल्या), अन्ध, बधिर, मूक, पीवन् (लठ्ठ मनुष्य), सिद्मला किंवा कलास (पण्डुरोगी), हर्यक्ष (पीतवर्ण डोळ्यांचा), पिंगाक्ष (पिंगट डोळ्यांचा), पीठसर्पिन् (लुला), श्राम (लंगडा), जागरण (निद्राहीन मनुष्य), स्वपन (निद्रारोग असलेला), अति दीर्घ (उंच सडपातळ मनुष्य), अति ऱ्हस्व (फार ठेंगू) अति स्थूल किंवा अत्यलस, अतिकृश, अतिशुक्ल, अतिकृष्ण, अतिखल्व (अतिशय टक्कल पडलेला), अतिलोमश (फार केस असलेला), अशीं नांवें आलेलीं आहेत. मैत्रायणी संहितेंत, ज्याचीं नखें वाईट आहेत, किंवा ज्याचे दांत पिंगट आहेत, अशा माणसाचा दिधिषूःपतीसारख्या पापी लोकांच्या नांवाबरोबर उल्लेख आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत शुक्ल (पांढऱ्या ठिपक्यांचा) टक्कल पडलेला, पुढें दांत आलेला व तांबूस पिंगट नेत्रांचा मनुष्य असें एका माणसाचें वर्णन आलेलें आहे. झिमरची अशी एक कल्पना आहे कीं वाजसनेयि संहितेमध्यें आलेल्या किर्मिर ह्या शब्दावरून दोनजातींच्या लोकांच्या मिश्रणाचा बोध होतो. ही मोठी मजेदार पण निवळ कल्पनाच असून किर्मिर शब्दाचा कृ धातूशीं आलेला संबंध हा त्या कल्पनेस आधार आहे. वाजसनेयि संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण ह्यांमध्यें बायकांनां अनेक विशेषणें दिलेलीं आहेत; त्यांतील कांहीं रोगदर्शक आहेत. अथर्वसंहितेमध्यें स्त्रीलिंगी विशेषणें ऋष्यपदी (काळविटासारखे पाय असलेली) वृषदती, वगैरेसारखीं जीं आढळतात तीं शारीरिक व्यंगदर्शकच असावींत. शारीर व्यंगासंबंधीं सर्व वैद्यक नांवें वैदिक ग्रंथांत आहेत.

[५९]श्लोण्य—तैत्तिरीय ब्राह्मण ग्रंथांत ह्याचा अर्थ त्वग्रोग असा असून (टीकाकारांच्या मतानें) लंगडेपणा असा आहे.

[६०]श्वयथ.—शतपथ ब्राह्मणांत ह्याचा अर्थ फुगणें असा आहे. कदाचित् हा, बौधायन श्रौतसूत्रांत म्हटल्याप्रमाणें विदेहामध्यें असलेला शोयथु नांवाचा रोग असावा. या रोगांत सूज वगैरे येत असेल. कारण श्वयथु हा शब्द वैद्यकांत असून त्याचा सूज असा अर्थ आहे.

[६१]श्वित्र—पंचविंश ब्राह्मणांत (१५,११,११) जलो-
[?] पीडित अशा अर्थी विशेषणाप्रमाणें ह्या शब्दाचा उपयोग केलेला आहे. वैद्यक शास्त्राप्रमाणें ह्या शब्दाचा अर्थ श्वेत कुष्ठ (पांढरें कोड) असा आहे.

**औषधिनामें** [अथर्ववेद]

अंशुमती
अघशंसदुःशंस
अतिविद्धभेषजी
अनावयु (सर्षपकाण्ड)
अभ्यंजन
अमीवचातन्ती
असिक्नि
अह्वि
[१]आबयु
आयुर्दद
आस्रावभेषज (रक्तस्रावनिवर्तक)
इषुमती
उत्तिर
औक्ष [लिपद्रव्य]
कंकपर्व
काण्डिनी
कनक्नक [विषनाम]
करंभ (विष किंवा काढा)
कान्दाविष
किलासनाशन
किलासभेषज
[२]कुष्ठ

केशवर्धनी
[३]क्षिप्रभेषजी
[४]चीपुद्रु
[५]जलाषभेषज
तीक्ष्णशृंगी
दुर्नामचातन
नद्यमार (क्षयावरील औषध)
नद्यारिष
नद्याय (कुष्ठ)
नानावीर्या
[६]नितत्नि
निष्कृति
पिंग
पिप्पली
पुरुषजीवनी
पूतद्रु
प्रांजन (लेप)
[७]बज
बलासनाशनी
बृहस्पतिप्रसूता
भेषज
मदावती (मादक वेल)
मूल
रथक्रीत
रोगनाशन

लोमशवक्षणा
वरूथ
[९]विलिष्टभेषज
विवरुणा
विश्वभेषज
विषदूषण
विषदूषणी
शतभिषज्
शतवार
शांवु
संवननी
सत्यजित
सरूपंकरणी
सस्तुव
सहस्रनाम्नी
सहस्रपर्णी
सहस्रार्घ
सिलाची (मोडलेलें हाड नीट बसविणारी)
सिसासु
सुभेषज्
स्तंबिनी
स्परणी [लाख]
हरितभेषज्
हृद्योतभेषज

[संहितेतर]

ओषधि
[१०]भैषज्य

[१]आबयु.—अथर्ववेदांत हें एका झाडाचे नांव आहे. कदाचित् हें मोहरीचेंहि झाड असेल परंतु हा अर्थ खात्रीलायक नाहीं.

[२]कुष्ठ.—अथर्ववेदांतील एका प्रमुख रोपाचें (वनस्पतीचें) हे नांव आहे. पर्वतावर, सोमवल्लीबरोबर, जेथें गरुड पक्षी आपलीं घरटीं करून राहतात अशा हिमालयाच्या उंच शिखरावर ह्या वनस्पतीची वाढ होत असे आणि तेथून पूर्वेकडे मनुष्यांच्या उपयोगाकरितां आणली जा[...] असें म्हणतात कीं, ही वनस्पती प्रथ[...] अश्वत्थ वृक्षाच्या खालीं, जेथें[...] आणि तेथून ती सुवर्णनौ[...] नद्य-मार आणि नद्या-रि[...]

तीमध्यें अतिशय उपयोगी वनस्पति होती असें वाटतें. आणि तिला जीवल आणि जीवला ( चैतन्य पदार्थ ) यांचा मुलगा असें म्हटलें आहे. ही वनस्पति डोकें दुखणें ( शीर्षामय ), नेत्ररोग, शारीरिक दुःख, व मुख्यत्वेंकरून ताप ( म्हणून तक्म-नाशन म्हणतात ), आणि यक्ष्म ( क्षयरोग ) ह्या रोगांवर उपाय आहे. ह्या वनस्पतीच्या सामान्य गुणधर्मांवरून हिला विश्व-भेषज् असें नांव दिलें आहे. अंजन आणि जटामांसी ( नलद ) या वर्गांत हिला घालतात यावरून हिचे सौगंधिक गुण माहीत असावेत असें दिसतें

[3] क्षि प्त.—' जखम ' ( गोळीनें झालेली ), अथवा ' दुखापत ' ( पडल्यानें झालेली ). अथर्ववेदांत याच्यावर उपाय ह्मणून पिप्पली हेंहि लिहिलें आहे. क्षिप्त याचा अर्थ आचके असा असावा. कारण क्षिप् धातूचा अर्थ पसरणें असा असून वैद्यकांत विक्षेप वगैरेचा अर्थ आचके असा करितात. पिप्पली हें औषध यांवर सांगितलें आहे यावरून या विधानास पुष्टि येते. कारण याच विकारावर पिंपळी वेदांत व वैद्यकांत पुष्कळ ठिकाणीं सांगितली आहे. जखमेवर पिप्पलीचा उपयोग कोठेंहि नाहीं.

[4] ची पु द्रु.— ह्या नांवावरून अथर्ववेदामध्यें उल्लेखिलेल्या व दुःख बरें करणाऱ्या औषधीवस्तूचा बोध होतो. सायणाचार्यांच्या मतें चीपुद्रु हा शब्द असून तो एका झाडाचा बोधक आहे. सायणाचार्यांच्या ह्या अर्थाला दुसरा एक असा पुरावा आहे कीं, कौशिक सूत्रांत ह्या सूक्ताचा धार्मिक कृत्याचे वेळीं उपयोग करतांना पलाश लाकडाचे तुकडे वापरल्याचा उल्लेख आहे. व्हिटनेच्या मतें ह्या शब्दाचें रूप चिपुद्रु असें असावें.

[5] ज ला ष भे ष ज.— ज्याला जलाष हेंच औषध किंवा उपाय आहे असा. ऋग्वेद व अथर्ववेद यांमध्यें रुद्राला हें नांव दिलेलें आहे. जलाष हा शब्द अथर्ववेदामध्यें एका स्तोत्रांत आलेला आहे व त्या जलाषाचा उपयोग गळूं बरें करण्यास होतो असें म्हटलेलें आहे. ह्या अथर्ववेदांतल्या लेखावरचा टीकाकार व त्याचप्रमाणें कौशिक सूत्र ह्यांच्या मतें जलाष ह्याचा अर्थ मूत्र असा असून तोच अर्थ बरा दिसतो. पण गेल्डनेरच्या मतें मूत्ररूपानें पावसाचें पाणी हा अर्थ गर्भित असावा. निघंटूच्या मतें जलाष व उदक हे समानार्थी शब्द होत. जलाष हा शब्द वैद्यकांत नाहीं व विषारावर प्रामुख्यानें पाणी या औषधाचा उपयोगहि केलेला नाहीं.

[6] नि त त्नि.—हा शब्द अथर्ववेदामध्यें आलेला असून [illegible]कदां टक्कल पडलें असतां पुन्हां केंस वाढविणाऱ्या एका [illegible]चें हें नांव आहे. ही वनस्पति कोणती आहे हें [illegible]हीं.

[illegible]रसांवर उपयोगांत आणावयाच्या [illegible]हें एक नांव आहे. याचा अर्थ [illegible]खादा प्रकार असा असावा.

[8] भे ष ज.—हा अनेकवचनी उपयोगांत आणलेला शब्द अथर्ववेदांत आणि सूत्रांत आला आहे. व त्याचा अर्थ अथर्ववेदांतील ऋचांत ( जेवढें सांगितलें आहे तेवढें ) बरें करण्याचें सामर्थ्य असा आहे. वैद्यकांतहि भेषज शब्दाचा अर्थ अथर्ववेदाप्रमाणेंच आहे.

[9] वि लि ष्ट भे ष ज.—अथर्ववेदामध्यें ( पैप्पलाद ) सांधा उखळला असल्यास किंवा कोठें मुरगळलें असल्यास हा इलाज सांगितलेला आहे. ह्याचाहि निश्चित अर्थ समजत नाहीं.

[10] भै ष ज्य.—भेषजाप्रमाणें याचा शतपथब्राह्मण आणि निरुक्त यांत ' औषध ' किंवा ' बरा करणारा इलाज ' असा अर्थ होतो.

## अन्न

### अन्ननामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अन्धस् | क्षु | राधस् |
| अन्न | चन | वयस् |
| अदत्र | त्रिवयस् | वर्चस |
| अभिवयस् | धासि | वाज |
| अर्क | नमस् | वाजप्रमहस् |
| अवस् | नेम | वाजिन |
| अशृथित | नेमन् | शवस् |
| अश्वराधस् | पयस् | शुरुध |
| असक्रा (न संप- | पितु | श्रवस् |
| णारें) | पुरुक्षु | श्रवस्य |
| आयुस् | पुरुवाजस् | सस |
| इरा | पृक्ष | सिन |
| इष | पृक्षुध् | सुत |
| इळा | प्रयस् | सुपृक्ष |
| ऊर्ज | प्रश्रवस् | सूनृता |
| ओमान | ब्रह्मन् | स्वधा |
| कीलाल | मर्तभोजन | हविष्य |
| कृति | यशस् | हितप्रयस् |
| क्षद्मन् | रस | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अन्धस् | लोकांतून | मघ |
| अन्न | दिलेलें दान) | राधस् |
| अश्विय | पुरुक्षु | वयस् |
| इतःप्रदान (इह- | प्रसव | वाजस् |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अन्ध | आसुति (द्रवीभूत | युक्त) |
| अन्न | अन्न) | दग्धान्न |
| अन्नभाग | इष | पृक्ष |
| अम | गोपुरोगव (गो- | प्रयस्[illegible] |

| | | |
|---|---|---|
| राध | वाजरत्न | सुवीर्य |
| वशान्न | विश्वान्न | सुशृत |
| वाज | सुराधस् | हितप्रयस् |

**खाणें** (क्रियापदें) [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अदत् | ग्रसितां | भर्वति |
| अवशामहे | ग्ध | वेति |
| अविष्यन | जल्गुलः | वेवेष्टि |
| अश्नन् | जुषेथां | श्नन्नन् |
| आदं | बप्सति | संपिबते |
| आवयति | बब्धां | सिस्वदत् |
| ओचिषे | बभस्ति | स्वादते |
| खादति | भक्षत् | व्हरति |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अत्त | खायन्ते | पिपृताम् |
| अत्ति | पक्ष्यन्ति | पिप्रयत् |
| अदः | पच्यस्व | पिब |
| अद्धि | पपौ | भुनजाध्वै |
| अधते | पान्ति | वेः |
| अनशन् | पापयिष्ठ | व्यात्तम् |
| अशीयत | पाहि | व्यात्सीः |
| अश्नाति | पिन्व | व्यानशुः |
| अश्यां | पिपते | समवाद्यन्त |
| आनशुः | पिपर्तु | स्वात्तं |
| खादति | पिपासेत् | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अतीतृपः | अपाययत् | पपौ |
| अतृष्याः | अश्नीयात् | प्राशी |
| अदन्ति | अश्नुवे | भक्षत |
| अद्मि | आनशु | सम् आनशे |
| अनश्नवः | आशत | सम्पिब |
| आनुऽआनशे | ग्रसते | |

**खाद्यपेय विशेष** [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अन्तःपेय (दारूचें घर) | करंभ (दधिमिश्र-सक्तुपिंड) | घृतान्न |
| अपूप | क्रविष् (कच्चें मांस) | [7] चरु |
| आशिर (दही, दूध) | क्रव्य | जामर्य (दुग्ध) |
| आमिष (मांस) | क्षीरपाक (ओदन) | [8] त्र्याशिर |
| [2] उर्वारुक (कांकडी) | गवाशिर | दध्याशिर |
| उस्रिभेषज् (गोमिश्रान्न) | गोऋजीक | [9] दधि |
| [3] ओदन | घासि (तृणादिक) | दुग्ध |
| | [6] घृत | द्रवन्न |
| | | [10] धाना |
| | | निर्चुंपुण |
| | | निर्णिज् (क्षीर) |

| | | |
|---|---|---|
| [11] पक्ति | [19] फल | [24] रसाशिर |
| [12] पक्व | मदिर (मदकर अन्न) | रसिन् |
| [13] पचत | मदिरा | वृषभान्न |
| [14] पयस् | [20] मधु | शृतपाक (पक्व) |
| परिश | [21] मन्थ | समाशिर |
| परिपान | [22] मांस | सक्तु |
| [15] पान्त | मेदस् | [25] सर्पिस् |
| [16] पितु | मेध (यज्ञार्ह) | सुतपेय |
| [17] पीयूष | यव | [26] सुरा |
| पुरोडाश | [23] यवाशिर | सूद (सोमांत घालण्याचें) |
| पृषदाज्य | यूषन् | सौश्रवस् |
| [18] प्रतिधा | | |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अपूप | घास (चंदी) | फल |
| अवस (पाथेय) | घृत | भोजन |
| आरण्य (मधु) | दधि | मस्तु |
| उर्वारुक | नवनीत | शृतपाक (मांस) |
| करंभ | निष्पक | शृतातंक्य (दधि) |
| क्रविष | पक्व | स्वादी (सुरा) |
| खर्जूर | पूर्वपेय | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| आकृष्टपच् | [28] कीलाल | दधिवान् |
| अग्निमत् (ओदन) | क्रवि | दध्याशिर |
| | क्रोड (खाद्य) | दुग्ध |
| अतिघ्न्य (ओदन) | क्षीर | द्रप्सवत् |
| अनुग्रास | क्षीरवान् | धाना |
| अनुपसेचन (मसाल्याशिवाय असलेला चरु) | खाद | धास्यु |
| | [29] गर | धीति (पान) |
| | गवाशिर | पंचापूप |
| | घास | [33] पंचौदनं |
| अपूपनाभि | घृत | पयस् |
| अपूपवान् | घृतवत् | पयस्फाति |
| अवपान | चरु | परिवेश |
| आज्य | चित्रराधस् | [34] परिसृत |
| आम | जीवन | पाक |
| आमिक्षा | तलीघ (अस्थिगत मांस) | पाथ |
| आशिर | | पान |
| उदारथि (मन्थ) | [30] तिर्य | [35] पिशित |
| उर्वारुक | तिल | पवि:पाक |
| उर्वारु (कांकडी) | तिलमिश्र | पीयूष |
| ओदन | तिलवत्स | पूर्वपेय |
| [27] कनक्रक (विष) | [31] तैल | पूल्य |
| | [32] तौल | पेष्ट्र (पिष्टमय खाद्य) |
| काण्डविष | दधि | |

| | | |
|---|---|---|
| [७] प्रतिदुह् | मांस | [४०] व्रत |
| प्राणदवान् | माध्वी | शतौदन |
| फल | माषाज्य | [४१] शालूक |
| ब्रह्मओदन | यवाशिर | सक्तु |
| मद्य | रस | सर्पिष् |
| मधु | रसवान् | सारघ (मधु) |
| मधुधारा | [३८] लवण | सुधा |
| मधु | लोकजित् | सुरा |
| मधुपृच् | विघस | सुरोदक |
| मधुभाग | विपक्व | सोमपेय |
| मधू | [३९] विष्टारिन् | |

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [४२] उपवाक | बोर) | [४४] मासर |
| कर्कन्धु (बोर) | [४३] बदर | [४५] लाजि |
| कुवल (कोवळें | | |

[ मैत्रायणी सं. ]

लाज

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [४७] कृसर | [५१] पिष्ट | [५४] मद्य |
| [४८] क्षीरौदन | [५] फाण्ट | [५५] मांसौदन |
| [४९] तिरश्चीनवंश | | |
| [५०] पान | [५३] वल्कस | [५६] वृक्य |

## खाद्यपेय किरकोळ [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अद्मान (अद्य-मान) | घृतवत् | पीति |
| | चनिष्ट | पीवोन्न |
| अन्नवान् | चम्रीष | पूर्वपाय्य |
| अयक्ष्म (आरोग्य-कारक खाद्य) | जग्ध (भक्षित) | भोज |
| | जग्मसान | मधुमत् |
| [१] अवखाद (निंद्य-खाद्य) | जुजुषाण | मधुला |
| | जुषमाण | मधुश्चुत् |
| अश्रात (अपक्व) | जुषाण | तेमन |
| असामि (असा-धारण) | जुष्ट | यशस्तर |
| | जुष्टतम | वामजात |
| आदन | जोष्या | विपिपान |
| आम | तदभ | विपवत् |
| आशित | दक्षसाधन | वीती |
| उक्षान्न | द्विजन्मन् | वृषखादि |
| उस्रिया | धनभक्ष | वृषगान |
| कीलालप | पच्त्य | शृतगा |
| गूर्त (गिळलेलें खाद्य) | पपिवस् | शृतपाक |
| | पाग्रन | श्रात |
| घस | पिण्ड | सवम्य |
| सपीति | सुराधस् | स्वादुक्षद्मन् |
| सयावन् | स्वादिष्ट | स्वाद्मन् |
| सर्पिरासुती | स्वादीय | |
| सुजुष्ट | स्वादु | स्वार्द्वा |

[१] अपूप.—हा शब्द ऋग्वेदांत आणि तदुत्तर ग्रंथांत पोळीला-मग ती तूप मिश्रित असो, तांदुळाची असो किंवा यवाची असो—सर्व साधारणपणें उपयोगांत आणिला आहे. छांदोग्य उपनिषदांत अर्थामध्यें थोडासा फरक केला आहे. मॅक्स मुल्लर ' मधमाशांचें पोळें ' बोथलिंग " मधशिल्या " आणि झिंटल ' पोळी ' असा अर्थ करितात.

[२] उर्वारुक.—उर्वारु (स्त्रीलिंगी), उर्वारुक (नपुसकलिंगी), ' कांकडी .' ह्या दोन शब्दांपैकीं पहिला शब्द वेलाचा दर्शक आणि दुसरा फळवाचक परंतु दोनहि शब्द क्वचितच उपयोगांत असतात. बहुतेक सर्व उताऱ्यांवरून असें अनुमान निघतें कीं, जेव्हां फळ पक्व होतें त्यावेळेस वेलाचा देंठ जरा ठिसूळ होतो. पंचविंश ब्राह्मणांत फळालाच उर्वारु असें म्हटलें आहे.

[३] ओदन.—सामान्य अन्न या अर्थी हा शब्द वापरलेला आढळतो. हा शब्द बहुतकरून दुधामध्यें शिजविलेल्या धान्यास लावतात (क्षीरपाकम् ओदनम्). याच्या निरनिराळ्या प्रकारांचा उल्लेख आहे; उ० क्षीरौदन, दध्यौदन, मुद्गौदन, तिलौदन, उदौदन, मांसौदन घृतौदन इत्यादि.

[४] क्रव्य.—कच्चें मांस मनुष्य खात, असें वैदिक वाङ्मयांत कोठेंच नाहीं. राक्षस फक्त त्याचें भक्षण करीत, आणि अग्नीला क्रव्याद ' कच्चें मांस खाणारा' असें म्हणत, कारण तो शवांचा फडशा पाडी. ऋग्वेदांत ज्या मनुष्याला दुष्काळामुळें कुत्र्याचें मांस खावें लागल्याचा, उल्लेख आहे त्यानें देखील तें शिजविलें होतें.

[५] क्षीर.—याचा ऋग्वेदांत उल्लेख असून त्याला गो (दूध) अथवा पयस् देखील म्हणतात. हा वैदिक आर्यलोकांचा अतिशय उपयोगाचा गृहव्यवस्थेंतील पदार्थ होय. ते धारो[illegible] दूध ( पक्व ) सेवन करीत असत अथवा ओदन 'दुध[illegible] शिजविलेला पदार्थ ' [ क्षीरपाकम् ओदनम् ] तयार करी[illegible] त्याचें सोमांनहि मिश्रण करीत ( अभिश्री, आशिर ), त्याच्[illegible] पासून तूप [ घृत ] तयार करीत. दूध विरजण्याकरि[illegible] दुसऱ्या कित्येक वनस्पतीबरोबर पूतीका आणि क्ल वनस्[illegible] तीहि उपयोगांत आणीत. दह्याचा उपयोग अन्नासार[illegible] करीत असत. आणि ऋग्वेदांत एका ठिकाणीं चक्षयाचा[illegible] उल्लेख आला आहे. अजक्षीर ह्याचाहि उल्लेख आला आहे.

[६] घृत.—हा नेहमींच्या आणि यज्ञाच्या वेळीं उपयो[illegible] असलेलें अर्वाचीन तूप याचा वाचक शब्द ऋग्वेदांत आ[illegible] तदुत्तर आलेला आहे. ऐतरेय ब्राह्मणावरील सायण भाष्य[illegible] घृत म्हणजे घट्टतूप [ घनी-भूत ] आणि सर्पिस् म्हणजे पात[illegible] तूप असा फरक दाखविला आहे. अग्नींत तूप टाकीत, त्य[illegible] मुळें अग्नीला घृतप्रतीक, घृतपृष्ठ, घृतप्रसत्त आणि घृतश्री अ[illegible]

म्हणत. घृताला शुध्द करण्याकरितां पाण्याचा उपयोग करीत म्हणून पाण्याला घृतपू असें म्हणत. ऐतरेय ब्राह्मणांत आज्य, घृत, आयुत आणि नवनीत हें क्रमशः देव मनुष्य पितर आणि गर्भ यांना देत.

[७] चरु.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथांत या शब्दाचा प्रथम 'कढई' अथवा 'भांडें' असा अर्थ आहे. त्याला झांकण [ अपिधान ] असून विस्तवावर टांगून ठेवण्याकरितां त्याला आंकडे ( अंक ) असत. तें भांडें लोखंडाचें किंवा कांस्य धातूचें (अयस्मय) केलेलें असे. लाक्षणिक अर्थानें कधीं कधीं त्या भांड्यांत जें अन्न शिजवीत असत तें अन्न दर्शविण्याकरितांहि हा शब्द योजीत.

[८] त्र्याशिर.—तीन मिश्रणांनीं युक्त असा ह्याचा अर्थ असून हें सोमाचें विशेषण ऋग्वेदामध्यें आलेलें आहे. सायणाचार्यांच्या मतें हीं तीन मिश्रणें म्हणजे दहीं, सक्तु व दूध हीं होत. अधिक बिनचूक रीतीनें सांगावयाचें तर हें त्र्याशिर म्हणजे दूध [गवाशिर] सातु (यवाशिर) व दहीं (दध्याशिर) हे तीन पदार्थ सोम रसांत मिसळण्याची चाल होती.

[९] दधि.—'नासकें दूध ' अशा अर्थानें हा शब्द वारंवार ऋग्वेदामध्यें व पुढील ग्रंथांत आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत घृत, दधि, मस्तु (दह्याचें पाणी) व आमीक्षा (दहीं) असे शब्द क्रमानें आलेले आहेत. दधि ह्याचा अर्थ अनेकदां दहीं असाहि आहे, व तें सोमरसांत मिसळीत असत.

[१०] धाना.—हा शब्द नेहमीं अनेक वचनीं आलेला आहे व ऋग्वेदांत व उत्तरकालीन ग्रंथांत धान्याचे दाणे अशा अर्थानें ह्या शब्दाचा अनेकदां उल्लेख आलेला आहे. हे दाणे कधीं कधीं भाजून (भ्रज्ज) सोमरसांत मिसळीत.

[११] पक्ति.—संहितामध्यें याचा अर्थ शिजविलेला पदार्थ (एका प्रकारची पोळी) असा आहे. जो अन्न शिजवतो त्याला पक्तृ असें म्हटलेलें आहे.

[१२] पक्व.—शिजविलेलें दूध किंवा अन्न अशा अर्थी सामान्यनाम ह्मणून हा शब्द आलेला आहे. भाजलेल्या विटा असाहि ह्याचा अर्थ होतो.

[१३] पचन.—पक्ति प्रमाणें ह्याहि शब्दाचा अर्थ ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यामध्यें शिजविलेलें अन्न असा आहे.

[१४] पयस्.—या शब्दाचा अर्थ ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यामध्यें गायीचें दूध असा आहे. अधिक व्यापक अर्थ ह्मणजे वनस्पतींत सांपडणारा रस (ज्याचे योगानें झाडें झुडें वाढतात तो) असा आहे. एका ठिकाणीं स्वर्गांतलें पाणी असा ह्याचा अर्थ आहे. शतपथ ब्राह्मणांत कांहीं वेळ दुधावर राहण्याच्या व्रताचा उल्लेख आलेला आहे.

[१५] पान्त.—ऋग्वेदामध्यें अनेक वेळां हा शब्द आलेला असून त्याचा उघड अर्थ पिण्याचा पदार्थ असा आहे. पण गेल्डनेर म्हणतो कीं एके ठिकाणीं पान्त हें एका राजाचें नांवच आहे.

[१६] पितु.—ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यामध्यें ह्या शब्दाचा अर्थ पुष्टिकारक अन्न किंवा पेय असा आहे.

[१७] पीयूष.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें गाय प्रसवल्यावर तिचें जें पहिलें दूध निघतें त्याला हा शब्द लाविलेला आहे. सामान्यपणें सोमरसालाहि हा शब्द लावितात.

[१८] प्रतिधा.—याचा अर्थ अवर्षण किंवा आकर्षण (घोट) असा दिसतो. ऋग्वेदाच्या एका वचनांत इंद्र एका प्रतिधेसरशीं तीस सरोवरांचें पाणी प्याला असें आलें आहे.

[१९] फल.—याचा सामान्यतः अर्थ फळ, विशेषतः झाडाचें फळ असा असून ऋग्वेद आणि तदनंतरच्या वाङ्मयांत याचा उल्लेख येतो.

[२०] मधु.—याचा अर्थ कोणतीहि खाण्याची गोड वस्तु व ऋग्वेदांत बहुधा एक प्रकारचें पेय (मध व पाणी यापासून केलेली जालीम दारू) असा होतो. मध व पाणी मिश्रित दारू असाहि होतो. कांहीं ठिकाणीं ' सोम ' किंवा 'दूध ' अथवा ' मध ' हा या शब्दाचा निश्चित अर्थ आहे. परंतु ' मध ' ह्याच अर्थी हा शब्द वेदानंतरच्या वाङ्मयांत विशेष येतो. परंतु या मद्याच्या उपयोगाविरुद्ध निषेध प्रदर्शित केलेला दिसतो.

[२१] मन्थ.—याचा अर्थ ऋग्वेद व तदनंतरच्या ग्रंथांत एक प्रकारचें पेय असा आहे. हें एक द्रव पदार्थ व इतर कांहीं घट्ट पदार्थ यांच्या संमिश्रणानें करितात. बहुधा हें सक्तु व दूध यांचेंहि असतें. ह्या प्रकारचीं सर्व संमिश्रित पेयें शांखायन आरण्यकांत आलीं आहेत.

[२२] मांस.—वेदांत मांस खाणें अगदीं सामान्य असावें असें दिसतें. त्यांत कोठेंहि 'अहिंसेचा' उल्लेख येत नाहीं. धार्मिक विधिप्रसंगीं मांसाच्या आहुती देव खावोत असें म्हणतात. शिवाय ब्राह्मण तो पदार्थ स्वतः खात असत. आणि पाहुण्यांच्या पाहुणचाराप्रीत्यर्थ एक 'मोठा बैल' ( महोक्ष ) किंवा बोकड ( महोज ) मारावा असें स्पष्ट म्हटलेलें आहे. शिवाय आतिथिग्व याचा अर्थ अतिथिसत्कारार्थ गोहनन करणें ह्राच असावा. महर्षि याज्ञवल्क्य हा दुभत्या गायींचें किंवा बैलाचें ( धेन्वनडुह ) अस्सल मांस खात असे. यज्ञांत अगस्त्यांनीं १०० बैल मारले म्हणून त्यांच्या नांवाचा गौरव केला आहे. लग्नप्रसंगीं खाण्याप्रीत्यर्थ म्हणून बैलांना मारीत असत. उलटपक्षीं ऋग्वेदांत गाईला हळू हळू पावित्र्य येत चाललें होतें असें बऱ्याच उताऱ्यांवरून दिसून येतें. कारण तिला अघ्न्या असें पुष्कळ ठिकाणीं म्हटलें आहे. परंतु एवढ्यावरून मांसभक्षण मना होतें असें समजतां येत नाहीं. पौराणिक गोष्टींचा विचार बाजूला सारला असतां ( म्हणजे गौ हीच पृथ्वी किंवा अदिति. ही गायींसंबंधीं—पृथ्वि किंवा अदिति अशी—कल्पना सर्वथैव ब्राह्मणांनीं आपल्या बुद्धिबलानें निर्माण केली असें म्हणतां येत नाहीं. याला दुसरींहि कांहीं कारणें असावींत.) आपणांस असें आढळून येईल कीं, खाण्याव्यतिरिक्त गाईचे

दुसरे पुष्कळ महत्त्वाचे उपयोग होते, व त्यामुळें तिला पावित्र्य येणें अगदीं रास्त होतें व गाईच्याहि पावित्र्याचा उगम पाहूं गेलें असतां आपणांला तो शोधण्यासाठीं इंडो-इराणियन, आर्यन् लोक ( म्हणजे हिंदुस्थानांतील आर्यन् व इराणांतील आर्यन् हे जेव्हां एकेठिकाणीं रहात असत तेव्हां ) यांच्या कालाकडे धांव घेतली पाहिजे इतका तो जुना आहे. शिवाय प्रेतदहनप्रसंगीं तर गोमांस अवश्य लागत असे; कारण तेव्हां प्रेत मांसानें आच्छादण्याचा (अनुस्तरणी) प्रघात( परिपाठ )होता. वेदकालीन दूंचें अन्न निदान यज्ञप्रसंगींच्या बळींच्या यादीवरून तरी का असावें हें सहज ताडतां येतें. कारण जें मनुष्य खाई तें तो देवास अर्पण करी;-म्हणजे बोकड, मेंढया, बैल यांचें मांस खाण्यांत येत असे. अश्वमेध यज्ञ मात्र घोड्याचें मांस भक्षण करीत असत याचें द्योतक समजतां येत नाहीं. तरी पण कदाचित ते अश्वभक्षकहि असतील.; कारण निरनिराळ्या काळीं आणि निरनिराळ्या देशांत प्रचलित असलेल्या अश्वमांसभक्षणाच्या चालीकडे आपणांस अगदींच कानाडोळा करून चालतां यावयाचें नाहीं. ओल्डेनबर्ग या ठिकाणीं असा युक्तिवाद लढवितो कीं, अश्वमेध करण्याच्या योगानें कांहीं मांत्रिक सामर्थ्य, त्याचप्रमाणें घोड्याची गति आणि स्फुरण देव आणि त्याचे याजक-भक्त यांनां प्राप्त होत असावे. या मांसाशनास कोणत्याहि प्रकारचा सार्वत्रिक निषेध केला होता असें वाटत नाहीं. कधीं कधीं मांसाहाराचा निषेध आहे. उदाहरणार्थ, जेव्हां एखादा एखादें व्रत करीत असेल तर किंवा जेव्हां मांस त्याज्य मानलें असलें तर. कारण अथर्ववेदांत एका ठिकाणीं मांसाला सुरेच्या दावणींत बांधलें आहे व तेथें त्याला मादक दारूप्रमाणें वाईट मानलें आहे. ऋग्वेदांत गोहनन अघाच्या वेळीं होतें असें दिलें आहे. ( हा अघा शब्द मघाचें बुध्या केलेलें रूपांतर आहे. ) आणि ज्या वेळीं केवळ गायींचे बळी देत असत त्या प्रसंगींहि मृत्यु आणि अंधार यांच्या स्वाभाविक सहवासामुळेंच ही गोष्ट होत असावी. शिवाय ब्राह्मण जो या लोकीं दुसऱ्यास खातो, त्याला दुसऱ्या लोकांत खातात असें तत्त्व आलें आहे. पण येवढ्यावरूनच कांहीं मांस खाण्यास धार्मिक अथवा नैतिक अमान्यता आहे असें म्हणतां येणार नाहीं. आतां ही गोष्ट खरी कीं, वरील मतहि यांत दृग्गोचर होतें व ब्राह्मणग्रंथांत विशदपण दिसणाऱ्या 'सर्व जग हें एक आहे' "अखिलमिदमुब्रह्म" या तत्त्वाशीं वरील मत बरेंच जुळतें आहे. परंतु अहिंसा तत्त्व उत्पन्न होण्यास पुनर्जन्माचें तत्त्व कारण झालें आणि पुनर्जन्माच्या तत्त्वाचा जन्म ब्राह्मणांच्या मागाहून झालेला आहे.

य वा शि र.—हा शब्द ऋग्वेदांत सोमाचें विशेषण म्हणून वापरला आहे. या धान्यामिश्रित असाहि अर्थ आहे.

[२४] र सा शि र.—हा शब्द ऋग्वेदांत सोमाचें विशेषण, या अर्थी आहे. दुग्धमिश्रित अशा अर्थानेंहि येतो.

[२५] स र्पि स्.—याचा अर्थ वितळलेलें लोणी असा आहे. मग लोणी द्रवस्थितींत असो किंवा घन स्थितींत असो. सेंट पीटर्सबर्गकोशाचे मतानें सर्पिः व घृत यांत फारसा फरक नाहीं. ऐतरेयब्राह्मणावरील भाष्यांतील सायणाचा 'सर्पिस् हें द्रव स्थितींत असतें व घृत हें घन स्थितींत असतें' हा भेद रॉथला मान्य नाहीं. हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेल्या ग्रंथांत वारंवार आलेला आहे.

[२६] सु रा.—उन्मादक अशा पेयाचें हें नांव आहे. हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर वैदिक वाङ्मयांत नेहमीं येतो. कांहीं ठिकाणीं या पेयाचा निषेध केलेला आहे. अथर्ववेदामध्यें मांसभक्षण, द्यूत या महापातकांबरोबर याची गणना केलेली आहे व द्यूताबरोबर वारंवार याचा उल्लेख आलेला आहे. सोम याच्या उलट सुरा ही नित्य पिण्यापैकीं एक पेय गणली गेली होती. सभेंतल्या लोकांचें हें एक पेय होतें व त्यामुळें नेहमीं भांडणें होत. ही सुरा कशा प्रकारची होती हें सांगणें कठिण आहे. एगलिंग म्हणतो त्याप्रमाणें ही सुरा धान्य किंवा वनस्पति कुजवून बनलेली असे किंवा व्हिटने म्हणतो त्याप्रमाणें एक प्रकारच्या सातपासून तयार केलेली ही दारू किंवा 'एल' दारूसारखी ही दारू असावी. गेल्डनेरच्या मतानें ही ब्रँडीसारखी असावी. ह्या सुरेचा उल्लेख मधुबरोबर कधीं कधीं येतो. ही चामड्यांत ठेवीत असत व ही निरनिराळे लोक पीत. ( विभाग २ पृष्ठ १२१ पहा. )

[२७] क न क्र क.—हा शब्द अथर्ववेदांत आहे. ह्याचा अर्थ एक तर विष असा असावा, किंवा अथर्वांतीलच काण्डविष नांवाच्या एका विषाच्या जातीचें तें विष असावें. पिवळ्या धोतऱ्याला कनक असें नांव आहे व तो विषारीहि आहे. कनक्रक म्हणजे पिवळ्या धोतऱ्याचें विष असण्याचा संभव आहे.

[८] की ला ल.—'मधुर पेय.' हा शब्द अथर्व व इतर संहितांत आहे; पण ऋग्वेदांत मात्र नाहीं. ज्या अर्थी सुराकार ( सुरा करणारा )हा पुरुषमेधांतील बळींच्या यादींत कीलाल ह्याला अर्पण केला आहे त्या अर्थी सुरेच्या सारखेंच तें कांहीं तरी पेय असलें पाहिजे. बहुतकरून झिमरच्या म्हणण्याप्रमाणें ही एक प्रकारची दारू असावी.

[९] ग र.—म्हणजे विष. अथर्ववेदांत 'गरगीर्ण' ( विष दिलेला ) या समासांत गर हा शब्द आहे. शतपथब्राह्मणामध्यें त्याचा अर्थ पातळ पदार्थ असा आहे. गर म्हणजे कोणतेंहि जालिम विष मंद करून तयार करितात तें किंवा कृत्रिम विष होय.

[३०] ति र्य, ति रि य.—अथर्ववेदामध्यें करंभाचें ( पेज ) नांव म्हणून हा शब्द आलेला आहे. हा शब्द बहुतेक तिल्य ( तिळापासून झालेलें ) ह्याचा समानार्थवाचक असावा असें रॉथ व व्हिटने यांचें मत आहे. पण तिरिय ह्याचा

अर्थ रॉथच्या मतें एक प्रकारचा तांदूळ असा आहे. हा तिरिय शब्द राजनिघंटूमध्यें आलेला आहे.

[३१] तै ल.—( तिळाचें तेल ) हा शब्द अथर्ववेदांत आला आहे व त्या ठिकाणीं हें तेल घटामध्यें ठेविलें असल्याचा उल्लेख आहे. शांखायन आरण्यकामध्यें तैलाभ्यंग करण्याबद्दल उल्लेख आलेला आहे.

[३२] तौ ल.—हा पाठ अथर्ववेदाच्या मूळांत आहे. हें रूप कसें झालें व ह्याचा अर्थ काय हें निश्चित समजणें शक्य नसल्यामुळें हा तौल शब्द म्हणजे तैलच असावेसें वाटतें.

[३३] प चौ द न.—अथर्ववेदामध्यें हें विशेषण आलेलें आहे. पांच प्रकारच्या तांदुळांचें शिजवून अन्न करण्याचा उल्लेख त्याच संहितेंत आलेला आहे.

[३४] प रि सृ त.—अथर्ववेदांत प्रथमच उल्लेखिलेल्या एका पेयाचें हें नांव असून तें सुरा व सोम यांपेक्षां निराळें असून शिवाय मादक असें होतें. महीधराचार्यांच्या मतानें हें पेय फुलांपासून करीत असत. झिमर म्हणतो कीं, हें कौटुंबिक पेय होतें व हें खरेंहि वाटतें; कारण अथर्ववेदामध्यें हें घरगुती पेय होतें असें दोनदां म्हटलें आहे. हिलेब्रँटचे मतें हें पेय व सुरा यांत फारसा फरक नाहीं.

[३५] पि शि त.—अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें कच्चें मांस अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. अथर्ववेदांत एके ठिकाणीं याचा अर्थ लहान तुकडा असा आहे. पण पीटर्सबर्गकोशांत असें सुचविलें आहे कीं, पिशित हा शब्द पिषित म्हणजे पिष्ट ( कुटलेले कण ) याबद्दल आलेला असावा.

[३६] पू ल्य अ० पू ल्प.—याचा अर्थ अथर्ववेदांत भाजलेलें धान्य ( लाजा ), लाह्या असा असावा.

[३७] प्र ति दु ह्.—ह्याचा विशेष अर्थ ताजें दूध असा आहे. पुढील संहिता व ब्राह्मण यांतून धारोष्ण दूध हा याचा अर्थ आढळतो.

[३८] ल व ण.—मीठ या अर्थानें हा शब्द ऋग्वेदांत मुळींच आलेला नाहीं. अथर्ववेदामध्यें फक्त एकदांच आलेला आहे. उत्तरकालीन ब्राह्मणग्रंथांत हा आलेला आहे व तो अत्यंत किमतीचा आहे असें म्हटलें आहे. आर्य लोक प्रथम जेथें आले तीं ठिकाणें जर पंजाब व सिंधु नदीची थडी अशीं मानलीं—व तेथें तर मिठाच्या खाणी आहेत—तर मिठाचा उल्लेख पूर्वीच्या ग्रंथांत बिलकूल कसा नाहीं याचें आश्चर्य वाटतें. तेव्हां प्रथम आलेल्या आर्यांचें वसतिस्थान कुरुक्षेत्र मानलें तर तें कांहीं निखालस चूक होईल असें वाटत नाहीं. तथापि अशीहि कल्पना करणें शक्य आहे कीं, मिठासारख्या नित्याच्या वस्तूचा उल्लेख ज्या ठिकाणीं ती फार उपलब्ध आहे त्या ठिकाणीं ग्रंथांत नाहीं झाला तर त्यांत फारसें नवल नाहीं. साधारण अशीच रीति दिसून येते कीं, जेथें जी वस्तु दुष्प्राप्य असते त्या ठिकाणीं तिचें महत्व पराकाष्ठेचें असून तिचा नामनिर्देश होत असतो.

[३९] वि ष्टा रि न्.—अथर्ववेदांत ओदनाच्या एका विशिष्ट प्रकाराचा या नांवावरून बोध होतो.

[४०] व्र त.—उत्तरकालीन संहिताग्रंथांत व ब्राह्मणग्रंथांत एखाद्या व्रत अथवा तप आचरणाऱ्या माणसानें इतर कांहीं खावयाचें नसल्यानें वापरावयाचें दूध असा याचा विशिष्ट अर्थ आहे.

[४१] शा लू क.—अथर्ववेदामध्यें याचा अर्थ कमळाचीं (खाण्याचीं) फळें असा आहे.

[४२] उ प वा क.—वाजसनेयि संहितेंत व ब्राह्मणांत एक प्रकारचें धान्य असें याचें वर्णन आहे. नंतर त्याचा अर्थ इंद्रयव असा करितात.— टीकाकार महीधर सर्वसाधारण यव असाच अर्थ करितो. वाजसनेयि संहितेप्रमाणें करंभामधील मुख्य अंश किंवा भाग. उपवाककणांचा (सक्तवः) उल्लेख शतपथांत आहे.

[४३] ब द र.—कुवल आणि कर्कंधूप्रमाणें हा एक बोरांचा प्रकार आहे. याचा यजुःसंहिता व ब्राह्मण यांमध्यें संबंध आलेला आहे.

[४४] मा स र.—वाजसनेयिसंहितेंत मादक पेय या अर्थी या शब्दाचा उल्लेख केला आहे. कात्यायन श्रौतसूत्रामध्यें हें तयार करण्याच्या रीतीचें वर्णन आलें आहे. हें पेय तांदूळ व तृण भाजून ते जव व श्यामक यांत मिसळून तयार करीत असत असें दिसतें.

[४५] ला जि.—वाजसनेयि संहितेमध्यें ( २३.८ ) व तैत्तिरीय ब्राह्मणांत हा अनिश्चित अर्थाचा शब्द आढळतो. सायणाचार्यांच्या मतें ही लाजिनची संबोधनविभक्ति आहे. ( लाजिन = तव्यावर भाजलेलें धान्य). महीधराचार्यांच्या मतें ह्याचा अर्थ तव्यावर भाजलेल्या धान्याची राख असा आहे.

[४६] ला ज.—वाजसनेयिसंहिता व ब्राह्मणग्रंथ यांत हा शब्द पुल्लिंगी अनेकवचनी व तव्यावर भाजलेलें धान्य (लाह्या) या अर्थानें आला आहे.

[४७] कृ स र.—तांदूळ आणि तीळ यांच्या मिश्रणानें केलेलें अन्न अशा अर्थानें हा शब्द पंचविंशब्राह्मण व सूत्रग्रंथांत आलेला आढळतो.

[४८] क्षी रौ द न.—दुधांत शिजविलेला भात असा याचा अर्थ असून हा शब्द शतपथ ब्राह्मणांत आढळतो.

[४९] ति र श्ची न वं श.—(आडवी दांडी) हा शब्द छांदोग्योपनिषदांत मधाचें पोळें हा अर्थ सुचवितो.

[५०] पा न.—शतपथब्राह्मण व उपनिषद्ग्रंथांत एक प्रकारचें पेय या अर्थानें हा शब्द आला आहे.

[५१] ति ष्ट.—हा शब्द नपुंसकलिंगी असून ब्राह्मणग्रंथांत पीठ किंवा अन्न अशा अर्थानें आलेला आहे व अथर्ववेदांत कुटलेले माष या अर्थानें आलेला आहे.

[५२] फा ण्ट.—याचा अर्थ शतपथब्राह्मणांत लोणी घुसळतांना त्याचे प्रथम तयार होणारे परमाणू किंवा विस्कळित झालेलें [ शितडलेलें ] लोणी असा आहे.

[५]बल्कस.—शतपथ ब्राह्मणांत याचा अर्थ फसफसणाऱ्या स्थितींत असलेलें अशुद्ध द्रव्य असा आहे. याचा खरा अर्थ कदाचित् पाचुद्रा, साय, गाळ असा किंवा कोंडा, भुसा असा जो धान्यांतील टाकाऊ भाग तोहि असावा.

[५४]मद्य.—मादक दारू. हा शब्द छांदोग्योपनिषदापर्यंत कोठेंहि आढळत नाहीं. तेथें मात्र 'मद्यपी' मद्य पिणारा या शब्दांत प्रथम आढळतो.

[५५]मांसौदन.—हा एक मांसमिश्रित भाताचा प्रकार असून या पक्वान्नाचा शतपथ ब्राह्मणांत उल्लेख आढळतो.

[५३]वृक्ष्य.—शतपथ ब्राह्मणांत झाडाचें फळ या अर्थानें हा शब्द आला आहे.

## धान्यनामें [ ग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| धान्य | [२] बीज | [३] यव |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अकर्ण ( न फुटलेलें धान्य ) | षण ) | महाव्रीहि |
| अणु | [१] जर्तिल ( रान तीळ ) | [३] मुद्ग |
| [५] आम्ब | जीवन ( धान्य विशेषण ) | यवस् |
| अशु | तण्डुल | व्रीहि यवस् |
| कर्ण ( तंदुल विशे- ) | [१०] तिल | [१५] व्रीहि |
| कृष्ण ( साळीचें भात ) | धान्य | [१६] श्यामाक ( सावे ) |
| [६] खल्व | [११] तीवार | सक्तु |
| [७] गर्मुत | पक्तृ ( धान्य विशेषण ) | समर्धुक ( धान्य विशेषण ) |
| गवीधुक | प्रियंगु | सस्य |
| [८] गोधूम | बीज | सूयवस् |
| नाशि ( धान्य विशे- | [१] मसुर | स्थविष्ठ ( तंण्डुल विशेषण ) |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| उलप | ( धान्यवि. ) | व्रीहियव |
| कण | बज ( मोहरी ) | शाम्याक ( धान्य वि. ) |
| [१] तण्डुल | [१८] बिस | |
| तसर | माष | [२०] शालि |
| तुष | मिश्रधान्य | श्यामाक ( सावें ) |
| धान्य | [१९] मुलालिन् | [२१] सस्य |
| पटप | यव | सुयवस् |
| पूतिधानी | यवस् | स्वरस |
| फलीकरण | व्रीहि | |

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| उपवाक | ( यव ) | |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| कुल्माष | नाम्ब | [६२] मसूस्य |
| खलकुल | क्रामुक | |

धान्य.—हा शब्द नपुंसकलिंगी असून तो 'धाना' शब्दापासून झालेला आहे. ह्याचा अर्थ मराठींत प्रसिद्धच आहे. हा शब्द ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांत आलेला आहे. बृहदारण्यकोपनिषदांत दहा प्रकारचीं (जमीन नांगरून काढलेलीं ) धान्यें ( ग्राम्याणि ) आहेत. ते दहा प्रकार म्हणजे तांदूळ, यव ( व्रीहियवाः ) तिल, उडीद, ( तिलमाषाः ), अणु, प्रियंगव, मका ( गोधूमाः ), मसुर ( मसुराः ), खल्व व खलकुल असे होत. ऐतरेय व शतपथ ब्राह्मण ह्यांत घोड्याला धान्याद म्हणजे धान्य खाणारा असें म्हटलें आहे. ऋग्वेदामध्ये माणसांना धान्य करणारे ( धान्यकृत ) असें म्हटलें आहे.

[२]बीज.—याचा अर्थ बीं. ऋग्वेदांत आणि तदुत्तर ग्रंथांत पेरणीचा पुष्कळ वेळां उल्लेख येतो. हा शब्द अलंकारिक रीतीनें उपनिषद् ग्रंथांतून उपयोगांत आणिला आहे. तेथें जन्माप्रमाणें झालेल्या जातींनां हा शब्द लावला आहे. छांदोग्योपनिषदाप्रमाणें ह्या जाती तीन आहेत, पण ऐतरेय अरण्यकाप्रमाणें चार आहेत. पहिल्या यादींत अण्डज, जीवज आणि उद्भिज्ज असे तीन प्रकार आहेत, व दुसऱ्याप्रमाणें स्वेदज हा आणखी चौथा प्रकार आहे. स्वेदज म्हणजे हवेंतील उष्ण ओलाव्यामुळें उत्पन्न झालेले. यांत कीटक, माशा इत्यादिकांचा समावेश होतो.

[३]यव.— ऋग्वेदांत कोणतेंहि धान्य या अर्थी हा शब्द आढळतो. अथर्वांत आणि नंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ जव किंवा सातू हा आहे. जवाचा हंगाम वसंतानंतर उन्हाळ्यांत येतो.

[४]अणु.—वाजसनेयि संहिता आणि बृहदारण्यकोपनिषद ह्यावरून हें एका धान्याचें नांव असावें असें दिसतें.

[५]आम्ब.—तैत्तिरीय आणि काठक संहितांत व शतपथ ब्राम्हणांत ज्याला नाम्ब म्हणतात त्या धान्याचें हें नांव आहे.

[६]खल्व.—एक जातीचें धान्य किंवा द्विदल जातीचें रोप. वेबरच्या मताप्रमाणें बहुतकरून वाजसनेयि संहितेंतील सर्व प्रकारच्या धान्याच्या यादींत याचाहि निर्देश आहे. आणि 'दृषद' च्या योगानें त्याची डाळ करितात असा उल्लेख अथर्वांत आहे. बृहदारण्यकोपनिषदांतहि हा शब्द आला आहे. आणि श्रीशंकराचार्य त्याचें निष्पाव असें स्पष्टीकरण देतात.

[७]गर्मुत.—तैत्तिरीय संहितेंतील एक प्रकारच्या रानवाटाण्याचें नांव. काठक संहितेंत गार्मुत म्हणजे 'वाटाण्याचा केलेला ' हें विशेषण आहे.

[८]गोधूम.—गोधूम म्हणजे गहूं. यजुःसंहिता व ब्राह्मण ह्यांत अनेक स्थळीं हा शब्द आला असून ह्याची व्रीहि व यव यांपासून भिन्नता दर्शविली आहे. ह्या धान्यापासून 'सक्तुः' देखील करीत असत. शतपथ ब्राम्हणांत हा शब्द एकवचनीं आला आहे.

[९] जर्तिल.—ह्याचा अर्थ रानतीळ असा असून हे तीळ यज्ञाच्या वेळीं हवनास अयोग्य म्हणून तैत्तिरीय संहितेंत सांगितलें आहे. शतपथांत हे तीळ खाल्ले असतां शरीराची वाढ होण्यासारखे गुण त्यामध्यें आहेत असें म्हटलें आहे.

[१०] तिल.—अथर्ववेदांत व तदुत्तर ग्रंथांत ह्याचा अर्थ तिल किंवा तिळाचें झाड ( ज्याच्या पासून चांगलें तेल निघतें असें )असा आहे. ह्याचा उडीदाबरोबर नेहमीं उल्लेख केला जातो. तैत्तिरीय संहितेमध्यें हीं दोन्हीं धान्यें हेमंत व शिशिर या ऋतूंत होतात असें म्हटलें आहे. तिळाच्या झाडाचीं चिपाडें जळणाच्या उपयोगीं येत व तिळाचा अन्नाकरितां ( तिलौदन ) उपयोग होई.

[११] नीवार.—अरण्यांतला तांदूळ. हा शब्द यजुर्वेदांत व ब्राह्मणग्रंथांत आलेला आहे.

[१२] मसूर.—द्विदल धान्य. हा शब्द तैत्तिरीय संहिता, वाजसनेयि संहिता व बृहदारण्यकोपनिषदांत आला आहे.

[१३] माष.—म्हणजे उडीद. हें नांव तैत्तिरीय संहिता व तदुत्तर ग्रंथ यांतून आलें आहे. हें धान्य हल्लीं सुद्धां प्रसिद्धच आहे. अथर्वांत त्याची डाळ कांडल्याचा उल्लेख आहे. हेमंतांत म्हणजे हिवाळ्यांत ह्याचें बीज पक्व होई. श्रौतकर्मप्रसंगीं यज्ञार्थ नररुंड २९ माषाला विकत घेत असत. या शब्दाचा अर्थ धातूचें वजन असा कांहीं वाटत नाहीं. परंतु असा अर्थ नंतरच्या ग्रंथांत सापडतो. यजुःसंहितेंत माष त्याज्य मानलेला आढळतो.

[१४] मुद्ग.—म्हणजे मूग. हें नांव तैत्तिरीयसंहितेंत भाज्यांच्या यादींत आढळतें. शांखायन आरण्यकांत आणि सूत्रांत द्विदलासहित तांदुळाच्या रस्स्याचा उल्लेख केलेला आढळतो.

[१५] व्रीहि.—म्हणजे तांदूळ. हा शब्द ऋग्वेदांत कधींहि आला नाहीं, पण अथर्व वगैरे उत्तरवाङ्मयांत वारंवार आढळतो. तांदूळ हिंदुस्थानच्या आग्नेय भागांत प्रथम उत्पन्न होत असावेत, म्हणून ऋग्वेदांत त्याचा उल्लेख आलेला नाहीं. तैत्तिरीय संहितेमध्यें पांढरा व काळा तांदूळ यांची तुलना केली आहे, व ह्या संहितेंत काळा, लवकर होणारा (आशु) व मोठा तांदूळ ( महाव्रीहि ) असें वर्णन आलें आहे. कदाचित हा लवकर वाढणारा तांदूळ म्हणजे पुढें ज्याला वार्षिक (साठ दिवसांत तयार होणारा असें नांव मिळालें ) तो असावा. व्रीहि व यव यांची जोडी संहिता ग्रंथांत आढळते.

[१६] श्यामाक.—म्हणजे सांवा. हा शब्द उत्तरकालीन संहिता व ब्राम्हणांत आलेला आहे. ह्या धान्याच्या हलकेपणाबद्दल अथर्वांत उल्लेख आलेला आहे. कारण त्यांत असें म्हटलें आहे कीं, ' तें बीं वाऱ्यानें सहज उडून जाई. हें कबूतरांचें अन्न आहे असाहि उल्लेख तेथें आला आहे. छांदोग्य उपनिषदांत श्यामाक व त्याचें बीं ( तंदुल ) ह्यांचा उल्लेख आलेला आहे, व त्याचा अर्थ मॅक्समुल्लर ' केनरी बी ' असा करितो.

[१७] तण्डुल.—अथर्ववेद वगैरे पुढील वाङ्मयांत याचा उल्लेख आढळतो. ऋग्वेदांत तण्डुलाचा उल्लेख नाहीं व ऋग्वेदकालांत तान्दुळाची लागवड होत असल्याचाहि उल्लेख नाहीं. तैत्तिरीय संहितेंत कर्ण ( फुटलेला ) तांदूळ व अकर्ण ( न फुटलेला ) तान्दुळाचा उल्लेख आहे.

[१८] बिस.—अथर्ववेदकालीं कमलांतील अत्यंत कोमल तंतूंचा लज्जतदार पदार्थ म्हणून उपयोग करीत असत. याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मण व ऐतरेय आरण्यक यांमध्यें आहे.

[१९] मुलालिन्.—अथर्ववेदांत उल्लेखिलेल्या खावयाच्या कमळाच्या एका भागाचें हें एक नांव आहे.

[२०] शालि.-पुढील वाङ्मयांत याचा अर्थ तान्दूळ असा झाला. परंतु रॉथची अशी कल्पना आहे कीं अथर्ववेदांतील ' शारिशाकाः' शब्दांतील ' शारि ' याला तुल्य असा हा शब्द आहे. सायणाचार्यांच्या मतानें ' शारिशाका ' हें एका प्राण्याचें नांव आहे. तेव्हां त्यांतील शारि हें पद वेगळें काढून त्याच शालि असा अर्थ करणें ठीक नव्हे.

[२१] सस्य.— अथर्ववेद व तदुत्तर ग्रंथांत याचा सर्वमान्य अर्थ धान्य असाच आहे. अवेस्तामधील ' हह्य ' शब्दाप्रमाणें हा शब्द आहे.

[२२] कुल्माष.— छांदोग्य उपनिषदांत हा शब्द अनेकवचनीं असून टीकाकारांनीं त्याचा अर्थ ' कुत्सिता माषाः' ( थाणेरडे वाटाणे ); असा केला आहे. बोथलिंग यानें आपल्या कोशांत हाच अर्थ दिला आहे. लिटल हा नि [illegible]रून याचा अर्थ अंबट कांजी असा देतो.

[२३] खलकुल.—हा शब्द बृहदारण्यकोपनिषदांत आला असून सायणांनीं ' कुलत्थ ' एक प्रकारचें कडधान्य असें त्याचें स्पष्टीकरण केलें आहे.

[२४] नाम्ब.—शतपथ ब्राह्मणांत उल्लेख असलेल्या एका धान्याच्या जातीचें हें नांव आहे. तैत्तिरीय व काठक संहितेंत आंब असें रूप आढळतें.

[२५] प्लाशुक.—हा शब्द शतपथ ब्राह्मणांत व्रीहि ( तांदूळ) याचें विशेषण म्हणून आला आहे. व तेथें त्याचा अर्थ लवकर उगवणारा असा आहे.

[२६] मसूस्य.—हा शब्द तैत्तिरीय ब्राह्मणांत येतो. टीकाकारांच्या मतानें हें एका उत्तरदेशीय धान्याचें नांव आहे.

## मातें गोतें.

### अपत्यनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपत्य | [१] तनय | तोक |
| अप्नस् | तंतु | तोक्मन् |
| अर्भक | तनूकृथ | [५] नपात् |
| गय | [२] तान्व | पुत्र |
| जा | तुक | प्रजा |
| तक | तूच् | [६] प्रणपात् |

| | | |
|---|---|---|
| बीज | [७] वीर | [९] सूनु |
| भ्रूण | [८] शेषस् | स्तक |
| यहु | सुतुक | |
| | [ अथर्ववेद ] | |
| अनपत्य | ·पीडित कन्या) | पुत्र |
| आमुष्यायण | तोक | पुत्रक |
| कन्यला | तौदी (कन्या) | पौत्र |
| कन्या | दुहितृ | प्रनप |
| तनूज | नपात् | सुत |
| हुन्ना | नप्ति | सूनु |
| (दारिद्र्य | नप्तृ | |
| | नातें गोतें [ ऋग्वेद ] | |
| अग्रज | द्विजानि | [४१] वर |
| अन्योदर्य | द्विबन्धु | विजामातृ |
| अबन्धु | [२५] नना | [४२] विधवा |
| अम्ब | [२६] ननान्द | वीर ( पुत्र ) |
| अर्भक | नप्त | वीरतम |
| अर्भग | नप्तृ | वीरतर |
| आजानी | [२७] नद् | [४३] श्वशुर |
| आपि | [२८] नारी | [४४] श्वश्रू |
| [१०] कना | [२९] पति पत्नी | [४५] सखि |
| कनीनका | [३०] पितापुत्र | [४६] सजात |
| कन्या | [३१] पितृ | सनितृ ( भगिनी- |
| [११] जनि (जाया) | [३२] पुत्र | भर्तृ ) |
| [१२] जनितृ | [३३] बन्धु | [४७] सपत्नी |
| जनित्री | बन्ध्वेष ( बन्धूला | [४८] सबन्धु |
| जनिधा | शोधणारा ) | सयुज् ( सखा ) |
| [१३] जन्मन् | बन्धुपृच्छ ( बन्धू- | सयोनि |
| [१४] जन्य | ला विचार- | सखि |
| [१५] जामातृ | णारा ) | सप्तस्वसृ |
| [१६] जामि | बन्धुमत् | समान बन्धु |
| [१७] जाया | [३४] भर्तृ | साप्त |
| [१८] जास्पति | [३५] भ्रातृ | सुपत्नी |
| [१९] ज्ञाति | [३६] मातृ | [४९] सुपित्र्य |
| [२०] ज्येष्ठ | मातृ पितृ | सुबन्धु |
| [२१] तत | मातृतमा | सुमज्जानि |
| तनय | [३७] मित्र | सुसखि |
| तनया | मृत्युबन्धु ( मृत्यो- | [५०] सूः |
| तनस् | र्बन्धुभूतः ) | स्त्री |
| तनु | [३८] यम ( जुळें ) | [५१] स्नुषा |
| त्रिबन्धु | [३९] योषन् | [५२] स्याल |
| [२२] दंपति | योषना | स्वपत्य |
| [२३] दुहितृ | योषा | [५३] स्वसृ |
| [२४] देवर | योषित् | स्वापि ( जवळचा- |
| देवृ | [४०] वधू | नातेवाइक) |

| | | |
|---|---|---|
| | [ तै. सं. ] | |
| आप्त | [५४] पितामह | सखिन् |
| जनितृ | पितृ | सख्य |
| जामि | पुत्र | सगर्भ |
| ज्येष्ठबन्धु | पैतृमत्य | सन्तति |
| ततामह | पौत्र | सयोनि |
| तोक | प्रजा | सहजाति |
| दुर्मित्र | [५५] प्रपितामह | सूनु |
| दुहितृ | बन्धु | सूनुमत् |
| नपात्क | भ्रातृ | स्याल (मेहुणा) |
| नप्तृ | भ्रातृव्य | स्वज |
| पत्नी | भ्रातृव्युवत् | स्वसृ |
| पश्चादन्ववसायनी | मिथुन (युग्म) | [५६] स्वस्रीय |
| ( पुढाऱ्याच्या | वधू | (बहिणीचा |
| तंत्रानें चालणारी | विजामातृ | मुलगा) |
| प्रजा) | शिशु | |
| | [अथर्ववेद] | |
| अंबा | बालक) | मातृबन्धु |
| असबन्धु | ननांद | मातृभत् |
| जय | पति | मित्रमह |
| जनितव्य | पत्नी | मेदी (स्नेही) |
| जनिता | पितापुत्र | विबन्धु |
| जनित्री | पितामह | श्वशुर |
| जनी | पितृ | श्वश्रू |
| जा (नातें) | पितृबन्धु | सजात |
| जात्री (आई) | पुत्रिणी | सतोक |
| जामि | पोष्या | सनाभि |
| जाया | [५७] पौत्र | सपत्नी |
| ततामह (आजा) | पौत्राद्य (मुलें) | सबन्धु |
| तन (अपत्य) | प्रततामह | सलक्ष्मत् |
| दधिष्णु | (पणजा) | सुपत्नी |
| दायाद | प्रपितामह | सुस्नुषा |
| देवर | बन्धु | सूतिका |
| वध | [५८] भ्रातृव्य | स्नुषा |
| धारू (स्तनपान | मनुष्यज | स्वसृ |
| करणारें | मातृ | हस्तग्राभ |
| | [ संहितेतर ] | |
| [५९] गृह्य | [६३] नप्त्री | र्या |
| [६०] ज्येष्ठिनेय | [६४] पितापुत्रीय | मातुर्भ्रातृ |
| [६१] तात | [६५] पुत्रिका | मातुल. ( मामा ) |
| [६२] दार | [६६] भगिनी | |

[१] त न य.— हा शब्द ऋक्संहितेंत मुलेंबाळें किंवा वंशज अशा अर्थानें आलेला आहे, व त्याच ग्रंथांत कांहीं ठिकाणीं तोक शब्दाबरोबर त्याचें विशेषण म्हणून आला

आहे. तोक म्हणजे पुत्र, मुलें व तनय म्हणजे पौत्र किंवा नातू असा अर्थ घेण्याचें कांहींएक कारण नाहीं.

[२]ता न्व.— ऋग्वेदाच्या एका संदिग्ध लेखांत ह्या शब्दाचा अर्थ औरस किंवा धर्मपत्नीजात मुलगा ( जो मुलगा आपला वारसा–ऋक्थ–आपल्या बहिणीस देत नाहीं तो) असा आहे. निश्चित अर्थ या लेखांतून काढणें शक्य नसलें तरी येवढें म्हणतां येईल कीं पूर्वी बापाच्या मिळकतीवर मुलीचा हक्क नव्हता. एखादी मुलगी जर अविवाहित राहिली तर तिच्या भावानें तिच्या हयातींत तिची पोटापाण्याची व्यवस्था केली पाहिजे. पण ती स्वतंत्रपणें हक्क सांगून संपत्तीचा वाटा घेऊं शकत नसे.

[३]तु च् .— ऋग्वेदांत हा शब्द प्रसंगानें आला आहे, व त्याचा अर्थ मुलें असा आहे. तसाच तुज् हा शब्द ह्याच अर्थानें जास्त वेळां आलेला आहे.

[४]तो क.— तोक ह्याचा अर्थ मुलें किंवा वंशज असा ऋग्वेदांत व इतरत्र आलेला आहे. हा शब्द तनय शब्दाशीं वारंवार जोडलेला असतो.

[५]न पा त्.—वैदिक वाङ्मयांत ह्याचा अर्थ वंशज व संहिता ग्रंथांत नातू असा आहे. ब्राम्हणांत ह्याचा अर्थ वंशज असा नसून नातू किंवा पणतू असाहि आहे (पुत्रान्, पौत्रान्, नप्तृन्). अथर्ववेदांत व नंतरच्या ग्रंथांत पौत्र या शब्दानें नातू असा अर्थ व्यक्त होतो. ऋग्वेदांत सुद्धां पणतू ह्या शब्दाकरितां प्रणपात् व नातू ह्या शब्दाकरितां नपात् असे शब्द आहेत. नप्ती हा स्त्रीलिंगी शब्द फक्त संहिताग्रंथांतच येतो व त्याचा अर्थ मुलगी असा होतो. वेदांत हा जो शब्दप्रयोग आलेला आहे त्यावरून मूळ शब्दाचा कसा प्रयोग होत होता ह्याची कल्पना होत नाहीं.

[६]प्र ण पा त्.—याचा ऋग्वेदांत पणतू असा अर्थ आहे.

[७]वी र.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यामध्यें शक्तिमान व शूर मनुष्य या अर्थी हा शब्द आलेला आहे. एकवचनीं सामुदायिक अर्थानें ह्या शब्दावरून पुरुष, अपत्य असा बोध होतो. हा मुलगा वैदिक काळच्या लोकांनां मोठा स्पृहणीय वाटे. पंचविंश ब्राह्मणांत एका राजाच्या आठ वीरांचा उल्लेख आला आहे व ते राज्याचे आधारस्तंभ असल्याचें वर्णन आहे.

[८]शे ष स्.—ऋग्वेदांत ह्याचा अपत्य असा अर्थ आला आहे.

[९]सू नु.—ऋग्वदे व तदुत्तर सर्व ग्रंथांत हा शब्द पुत्र ह्या अर्थानें नेहमीं येतो. ह्याचा व्युत्पत्त्यर्थ जन्माला आलेला असा आहे व नंतर ' उत्पन्न केलेला ' असा झाला. पण सूनु ह्याचा उपयोग ऋग्वेदामध्यें बापाच्या संबंधानें बऱ्याच वेळा व आईच्या संबंधानें फारच क्वचित आलेला आहे. उदाहरणार्थ बाप हा पुत्राला ( सूनुला ) सूपायन म्हणजे सहज जवळ जाण्याजोगा, असें वर्णन आलेलें आहे. दुसऱ्या एका लेखांत पृथ्वीला आई या अर्थानें सूपायन हा शब्द वापरलेला आहे. व त्याठिकाणीं मुलगा या अर्थानें पुत्र हा शब्द आलेला आहे. ह्यावरून आईची सत्ता किती होती ह्या बद्दल काहींच अनुमान काढतां येणार नाहीं.

[१०]क ना, क न्या—ह्या दोन्ही शब्दांपैकीं पहिला क्वचित ऋग्वेदांत, परंतु दुसरा ऋग्वेदानंतर सर्वसाधारण उपयोगांत आलेला आहे. याचा अर्थ ' कुमारी ' अथवा ' तरुण स्त्री ' असा आहे. कनीनका ह्या शब्दाचाहि अर्थ तसाच होतो किंवा डोळ्यांतील बुबुळ हा होतो हें सांगतां येत नाहीं. परंतु कनीनका किंवा कनीनिका ह्यांचा अर्थ बुबुळ असा उत्तरकालीन संहिता व ब्राम्हण ह्यांत मात्र निश्चित झाला आहे.

[११]ज नि, ज नी—ह्या शब्दाचा अर्थ लग्नाची बायको असा आहे. सामान्यतः स्त्री या अर्थाबद्दल शंका आहे. कारण उषेला जेव्हां सुजनी असें म्हटलें आहे तेव्हां भार्या हा अर्थच विवक्षित असला पाहिजे. त्याचप्रमाणें डेलब्रुकनें दुसरा एक ऋग्वेदांतला उतारा घेतला आहे त्यांत ' पुत्रकृथेन जनयः ' असा उल्लेख आहे. या ठिकाणीं पुत्रजन्माचा संबंध असल्यामुळें जनयः याचा अर्थ बायको असाच घेतला पाहिजे. ज्याअर्थी हे शब्द अनेकवचनी येतात त्या अर्थी त्यांचा अर्थ कदाचित् लग्नाच्या बायका असा नसून उपस्त्रिया असाहि असूं शकेल अशी शंका कांहीं पाश्चात्य पण्डित काढतात. पण मॅक्डोनेल असें म्हणतो कीं, हा अर्थ संभवत नाहीं, कारण ऋग्वेदांत ' पत्युर्जनित्वम ' ( नवऱ्याची बायको होणें ), व ' जनयो न पत्नीः ' (गृहस्वामिनी स्त्रियाप्रमाणें), वगैरे लग्नाचा संबंध दाखविणारीं पुष्कळ वाक्यें आलेलीं आहेत. यम व यमी यांच्या संवादांत फक्त जनी हा एकवचनी शब्द आलेला आहे.

[१२]ज नि तृ व ज नि त्री.—हे शब्द नेहमींचे आहेत. ते ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत बाप(उत्पादक)व आई (प्रसविणारी ) ह्याबद्दल आलेले आहेत.

[१३]ज न्म न.—ह्या शब्दांत ऋग्वेदामध्यें दोन ठिकाणीं नातेवाईक लोक हा अर्थ असावा. दुसऱ्या स्थलीं नातेवाईक हा अर्थ समुच्चयानें घ्यावा लागतो.

[१४]ज न्य.—ऋग्वेदांत व अथर्ववेदांत ह्या शब्दाचा ' करवला ' हा विशिष्ट अर्थ आहे.

[१५]जा मा तृ.-जावई या अर्थी हा शब्द ऋग्वेदांत फार थोडे वेळां आला आहे. ऋग्वेदांत विजामातृ असा एक शब्द आला आहे- व त्याचा अर्थ अप्रिय जावई म्हणजे एक तर बायको करितां पुरेशी रकम न देणारा किंवा इतर दोष अंगीं असल्यामुळें बायकोबद्दल ज्याला पैसे भरावे लागतात तो असा होतो. ऋग्वेदांत जावई व सासरा ह्यांचे संबंध असल्याचा उल्लेख आलेले आहेत.

[१६]जा मि.—ह्या शब्दाचा मूळचा अर्थ एक रक्ताचा किंवा सपिंड असा असून अनेक वेळा स्वसृ—बहीण अशा अर्थानेंहि आला आहे. पहिल्या अर्थानें अथर्वांत एके ठिकाणीं

हा शब्द आला आहे. ' उदाहणार्थ 'अभ्रातर इव जामयः '. ऐतरेय ब्राह्मणांत एक वाद चालला असतां हा शब्द आलेला आहे. हा वाद एका व्रतांत राका ( भगिनी ) व देवपत्नी ह्यामध्यें कोणाला प्रथम हवि द्यावा त्याबद्दल आहे. एका पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, बहिण ही बायकोपेक्षां अधिक पसंत करणें बरें ( जाम्यै वै पूर्व पेयम् ) कारण बहीण भाऊ हे एका रक्ताचे असतात व बायको ही ' अन्यतोदार्या ' असल्यामुळें ती आपल्या नवऱ्याशीं एकरक्त होऊं शकत नाहीं. नपुंसकलिंगी जामि ह्या शब्दाचा अर्थ नातें असा आहे, व तो ऋग्वेदांत आला आहे.

[१७] जा या.—ह्या शब्दाचा अर्थ लग्नाची बायको असा आहे. पत्नी व जाया ह्या शब्दांत असा फरक आहे कीं जाया म्हटली म्हणजे ती नवऱ्याच्या प्रेमाचा विषय असते; कारण पुढें वंश चालविण्यास ती कारणीभूत होते, असा अर्थ पत्नी या शब्दावरून होत नाहीं. जाया हा शब्द एखाद्या ब्राह्मणाच्या किंवा द्यूतकाराच्या बायकोस ऋग्वेदांत लाविला आहे व ह्या शब्दाला पति हा शब्दहि वारंवार जोडलेला ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत आढळून येतो. दुसरा एक भेद पत्नी व जाया ह्या दोन शब्दांत असा आहे कीं ज्या वेळीं बायको यज्ञामध्यें सहधर्मचारिणी असते त्या वेळीं तिला पत्नी म्हटलेलें आहे. ती जेव्हां तशी नसते तेव्हां तिला जाया म्हणतात. एवढें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं ह्या दोन शब्दांतील भेद सापेक्ष आहे.कारण एका ग्रंथांत मनूच्या बायकोला जाया तर दुसऱ्या ग्रंथांत पत्नी असें म्हटलें आहे. पुढें पुढें जाया ह्या शब्दाच्या ऐवजी दारा हा शब्द आला आहे.

[१८] जा स्प ति.—ऋग्वेदांत ' कुटुंबाचा मुख्य ' अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. ह्या शब्दापासून झालेला भाववाचक शब्द 'जास्पत्य' ( मुलावरील आधिपत्य ) हा सुद्धां ऋग्वेदांत आला आहे.

[१९] ज्ञा ति.—(पुल्लिंगी) ह्याचा मूळ अर्थ ' परिचय ' असा होता असें दिसतें. पण ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत या शब्दाचा अर्थ नातेवाइक असा होऊं लागला. विशेषतः बापाच्या बाजूनें एका रक्ताचा संबंध असलेला असा अर्थ—जरी हाच अर्थ प्रत्येक ठिकाणीं अभिप्रेत नव्हता तरी—प्रचारांत येऊं लागला. हाच अर्थ विशेष लोकप्रसिद्ध होण्याचें कारण वैदिक समाजांतली मूळपुरुषानुबद्ध कुटुंबपद्धति हें होय.

[२०] ज्ये ष्ठ.—ह्याचा नेहमींचा अर्थ ' सर्वांत मोठा ' असा आहे; व विशिष्ट अर्थ ऋग्वेदामध्यें ' सर्वांत थोरला भाऊ ' असा आहे. ह्याचा दुसरा एक अर्थ ' सर्वांत वडील मुलगा ' असा आहे. हा अर्थ वरील अर्थाचाच दुसरा प्रकार आहे.

[२१] त त.—ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत बापाकरितां म्हणून हें लाडकें नांव आलेलें आहे.

[२२] दं-प ति.—ऋग्वेदांत ' गृहाचा मालक ' अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. पण बहुतकरून हा शब्द द्विवचनी आला असून त्याचा अर्थ गृहस्वामी व गृहस्वामिनी असा आहे. ह्यावरून पूर्वीच्या स्त्रियांच्या दर्जाची कल्पना येते.

[२३] दु हि तृ.—ऋग्वेदापासूनच्या ग्रंथांत मुलगी या अर्थी हा शब्द आहे. हा शब्द ' दुह् ' म्हणजे दूध काढणें या शब्दापासून आलेला आहे, व याचा अर्थ मुलास खाऊ घालून वाढविणारी असा आहे. याचा पूर्वीच्या काळीं दूध काढण्याचें काम करणारी कुटुंबांतील एक स्त्री किंवा ' कासरू ' असा अर्थ कोणी करतात तो चुकीचा आहे.

[२४] दे व र-दे वृ.—हा शब्द वैदिक वाङ्मयांत क्वचितच येतो व त्याचा अर्थ दीर असा आहे. ह्याचा समावेश नणंदांमध्यें केला आहे,अर्थात् ज्यांवर भावजयीचा अधिकार चालतो अशा ह्या नणंदा होत. आणखी असें आहे कीं, भावजयीनें तिचा नवरा हयात असतांनां त्या दिराशीं प्रेमानें व मित्रत्वानें वागलें पाहिजे. तिचा नवरा मेला तर तिच्याशीं दिरानें रममाण होऊन आपल्या भावाकरितां तिच्या पोटीं पुत्र उत्पन्न करावयाचा असतो. देवृ शब्दास सदृश असा बायकोच्या भावास निराळा शब्द आलेला नाहीं.

[२५] न ना.—आईबद्दल हें नांव आलेलें आहे. त्याचप्रमाणें तत हें बापाबद्दल आलेलें आहे. हे दोन्ही शब्द ऋग्वेदाच्या एका ऋचेंत आढळून येतात, व या ऋचेंत कवीच्या आईबापांचे धंदे वर्णिले आहेत.

[२६] न नां दृ.—ऋग्वेदांत हा शब्द एकदांच आला आहे. सायणाचार्यांच्या मतें ह्याचा अर्थ ' भावजयीचा ताबा असलेली नणंद ' असा आहे व हाच खरा दिसतो. कारण ऐतरेय ब्राह्मणांत अविवाहित व आपल्या भावाच्या येथें राहिलेल्या स्त्रीचें अशाच प्रकारचें वर्णन आलें आहे.

[२७] न द्.—ऋग्वेदांत एका ठिकाणीं आलेल्या ' नद्भ्यः ' या पदांत मूळ शब्द नद् हा आहे असें रॉथ व ग्रासमन यांचें मत आहे. व नद् याचें नद्भ्यः हें चतुर्थीचें रूप आहे. सीजच्या मतानें याचा बहिणीचीं मुलें असा अर्थ होतो. परंतु या चतुर्थ्यंत पदाचा ' नातवांना ' असा अर्थ करणें बरें.

[२८] ना री.—' स्त्री. ' ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत हा शब्द वारंवार आलेला आहे. ऋग्वेदांत याचा लग्नाची बायको असा अर्थ आहे. कारण अनेक ठिकाणीं हा शब्द लग्नाचे संबंध व्यक्त करण्यासाठींच आला आहे. उत्तरकालीन वैदिक वाङ्मयांत हा शब्द फारसा आलेला नाहीं पण कधीं कधीं याच अर्थानें आलेला आहे. डेलब्रुक म्हणतो कीं, या शब्दावरून वैवाहिक संबंध दाखविले जात नसून नर व नारी मिळून बनणाऱ्या मनुष्यजातीपैकीं स्त्री जात असा या शब्दाचा अर्थ आहे.

[२९] प ति प त्नी.—सेंटपीटर्सबर्ग कोशांत या शब्दाचा प्रथम यजमान व यजमानीण असा अर्थ होता व नंतर, नवरा व बायको असा झाला असें विवेचन केलें आहे. स्त्रीपुरुषसंबंध वैदिककालीं कसे होते हें आपण पाहूं.

वा ल वि वा ह.—पूर्वी वैदिक कालांत पुरुष व स्त्री पूर्णपणें वयांत आल्यावरच त्यांची लग्नें होत असत. या गोष्टीस पुरावा म्हणजे वैदिक ग्रंथांत अविवाहित स्त्रियाबद्दलचे आलेले अनेक उल्लेख होत. या अविवाहित स्त्रिया बापाच्या घरीं वाढत असत. आणि लग्न होऊन चांगला नवरा मिळावा यासाठीं स्वतःस नटवीत असत. त्याच प्रमाणें पुरुषांनीं व स्त्रियांनीं एकमेकांनां आपणावर प्रेम करण्यास भाग पाडण्याकरितां अथर्ववेदामधल्या मंत्राचा ( एका कथेंत उपयोगांत आणिलेल्या तोडग्याचा ) उपयोग करण्याची चाल होती. खुद्द ऋग्वेदांतच एका प्रियकरानें आपल्या प्रेमविषयक स्त्रीची भेट घेण्याचे वेळीं तिच्या घरच्या सर्व मंडळीस निद्रावश करण्याकरितां मंत्रप्रयोग केला असल्याचा उल्लेख आहे. बालवधूंच्या विवाहाचा उल्लेख प्रथम सूत्रग्रंथांत आलेला आहे. तरीपण रजोदर्शन होण्याच्या अगोदर किती मुलींचा विवाह होत असे हें सूत्रग्रंथावरून नक्की ठरवितां येणें कठिण आहे. लग्नाचे जे विधी आहेत त्यांवरून सुद्धां लग्न म्हणजे स्मृतिग्रंथाप्रमाणें बाहुलाबाहुलीचें लग्न नव्हे तर खरें खुरें लग्न होय. कारण लग्नांतील मुख्य विधि म्हणजे वधूला तिच्या नवऱ्याच्या घरीं नेऊन पोचवावयाची व तेथें त्या दोघा वधूवरांनीं एक शय्या करावयाची हा होय.

ल ग्न सं बं धीं बं ध नें.—पूर्वी कोणत्या अटीवर विवाह होत असत हें निश्चित सांगणें कठिण आहे. यम व यमी यांचा ऋग्वेदांत जो संवाद आलेला आहे त्यावरून बहीण व भाऊ यांच्यामध्यें विवाह होत नसत हें स्पष्ट दिसतें. पूर्वी बहीणभावांत लग्नें होत असून पुढें ही चाल बंद पडली असें जें वेबरचें मत तें सर्वस्वी चुकीचें आहे. गोभिल सूत्रांत आईच्या व बापाच्या सोळा पिढ्यांत एकमेकांशीं विवाह करणें निषिद्ध मानलें आहे. पण शतपथ ब्राह्मणांत तिसऱ्या किंवा चवथ्या पिढींत लग्न लावण्याची परवानगी दिली आहे. तिसरी पिढी हरिस्वामिन्च्या मतानें कण्वसंमत व चवथी सौराष्ट्रसंमत होय. दाक्षिणात्य लोकांत मामाच्या मुलीशीं किंवा आतेच्या मुलाशी लग्न लावण्याची चाल होती. त्या वेळीं वरील गोभिलसूत्रांतील निषेध विशेष मानिला जात नसे असें दिसतें. तरी पण विषमगोत्रविवाह बरेच होत असत. त्याचप्रमाणें जात ही लग्नाचे बाबतींत विशेष गणली जात नसे. कारण धर्मसूत्रामध्येंच अन्यवर्णविवाह संमत मानिले आहेत. उदाहरणार्थ ब्राह्मणाला खालील वर्णांपैकी कोणत्याहि वर्णांतील स्त्रीशीं विवाह करण्याची मुभा होती. त्याचप्रमाणें क्षत्रियानें आपल्या जातींतील अथवा खालच्या वर्णांतील स्त्री विवाहास पसंत करावी आणि वैश्यानेंहि वैश्य व शूद्र या जातींतील स्त्री विवाहास पसंत करावी अशी मोकळीक होती. ही अनुलोम विवाहपद्धति होय. याच्या उलट खालील जातींतील पुरुषानें वरच्या जातींतील स्त्रीशीं लग्न करणें ही प्रतिलोम पद्धति मात्र प्रचारांत नव्हती. पुढें पुढें वरच्या वर्णांनां शूद्र स्त्री पूर्णपणें विवाहास अयोग्य मानली जाऊं लागली. असे मिश्रविवाह महाभारतांत पुष्कळ झालेले आढळतात. बृहद्देवतेंत ते सामान्य नियम म्हणून गणले आहेत. थोरल्या भावाचें किंवा बहिणीचें लग्न झाल्याशिवाय धाकट्या भावाचें अथवा बहिणीचें लग्न होणें शिष्टसंमत गणलें जात नव्हतें. उत्तरकालीन संहिता व ब्राह्मणग्रंथांत अशा शिष्टासंमत विवाहितांचीं नांवें आलेलीं आहेत व असे लोक पापाचे वाटेकरी होतात असें म्हटलें आहे. अशा विवाहितांचीं नांवें म्हणजे 'परिविविदान' किंवा 'अग्रेदधुः ( धाकटा असून थोरल्या भावाच्या अगोदर लग्न करणारा ), 'दिधिषु' ( थोरल्या बहिणीचें लग्न होण्यापूर्वी तिच्या धाकट्या बहिणीशीं लग्न लावणारा ) आणि 'दिधिषुःपति '( धाकट्या बहिणीचें आधीं लग्न होऊन अविवाहित राहिलेल्या अशा थोरल्या बहिणीशीं लग्न लावणारा). वर निर्दिष्ट केलेल्या संहिता व ब्राह्मण ग्रंथांत प्रथम जन्मास येईल त्यानेंच प्रथम लग्न केलें पाहिजे असें स्पष्ट म्हटलें नाहीं; तरी पण वर जीं नांवें आलीं आहेत त्यावरून अशा तऱ्हेनें नियम मोडून विवाह होत असत हें सिद्ध होतें.

वि ध वा वि वा ह.—विधवेच्या विवाहाला शास्त्राची आडचण नसे. विधवेला दुसरें लग्न करावयाचें असेल तर मृतपतीपासून संतति नसली म्हणजे तिनें आपल्या दिराशीं किंवा पतीच्या अगदीं जवळच्या नातलगाशीं लग्न लावावें व तें संतति उत्पन्नकरण्यासाठींच लावावें. हाच विधवाविवाहप्रचाराचा पाया होय. निदान ऋग्वेदांत तरी और्ध्वदेहिक सूक्तांत ( १०. १८, ८ ) अशा अर्थाचा संदिग्ध उल्लेख आढळतो. हिलेब्रँट आणि डेलब्रुक यांच्या मतानें या सूक्ताचा असा अर्थ करणें बरें नव्हे. या सूक्ताचा पुरुषमेध यज्ञाशीं संबंध आहे असें त्यांचें मत आहे. परंतु ही केवळ निराधार कल्पनाच होय. आम्ही जो अर्थ दिला आहे त्याला मात्र आश्वलायन गृह्यसूत्राचा आधार मिळतो. शिवाय ऋग्वेदांत दुसऱ्या एका ठिकाणीं ( १०. ४०, २ ) एखाद्या विधवा स्त्रीचा दिराशीं विवाह होत असावा ( ज्याला पुढें नियोगविवाहपद्धति म्हणूं लागले ) असें स्पष्ट दिसतें. ही नियोगपद्धति ज्या वेळीं विधवेला पहिल्या नवऱ्यापासून एकहि मूल झालें नसेल अशाच वेळीं प्रचारांत येत असे. या पद्धतीला पुनर्विवाहपद्धति असें नांव देतां येईल कीं नाहीं याबद्दल शंका आहे. कारण पुनर्विवाह करणारा दीर हा अगोदरच विवाहित असे. अथर्ववेदांत एका मंत्राचा उल्लेख आला आहे तो मंत्र जपला असतां स्त्रीच्या ( जर तिनें दुसरा पति कल्पिला असेल तर त्या) दुसऱ्या पतीची परलोकीं गांठ पडते. डेलब्रुक म्हणतो त्याप्रमाणें ज्या स्त्रीचा पहिला नवरा जिवंत असून षंढ अथवा पतित आहे अशा स्त्रीलाच हा मंत्र लागू पडतो. तरी पण एक गोष्ट निश्चित आहे कीं, मागाहून झालेल्या धर्मसूत्रग्रंथांत सामान्य विधवाविवाहाला शास्त्राची संमति मिळाली. पिशेल म्हणतो कीं एखाद्या स्त्रीचा नवरा

नष्ट झाला किंवा त्याचा पत्ता नसला तर तिनें खुशाल दुसरें लग्न करावें अशाबद्दल ऋग्वेदांत संमति असल्याचा पुरावा आहे ( हीं केवळ कल्पनेची भरारी आहे. मूळ मंत्रांत, सायणभाष्यांत अथवा ग्रिफिथच्या भाषांतरांत वरील कल्पनेचा मुळींच उल्लेख नाहीं).'

ब हु भा र्या त्व.—वैदिककालीन आर्यलोकांना अनेक बायका करण्याची परवानगी होती ही गोष्ट ऋग्वेदांतील अनेक उल्लेखांवरून ( १. ६२. ११; ७, १ वगैरे ) सिद्ध होते. मैत्रायणी संहितेंतील उल्लेखावरून मनूला दहा बायका होत्या असें ठरतें. शतपथ ब्राह्मणांत बहुभार्यात्व पद्धतीचें एका मजेदार कथेनें स्पष्टीकरण केलें आहे. शिवाय राजाला चार भार्या असत. पहिली महिषी, दुसरी परिवृक्ती, तिसरी वावाता आणि चवथी पालागली. शतपथ ब्राह्मणाप्रमाणें महिषी ही प्रथम वरलेली असल्यामुळें पट्टराणी होत असे. परिवृक्तीचा अर्थ टाकून दिलेली असा आहे. वेबर व पिशेल हे म्हणतात कीं, हिला टाकून देण्याचें कारण हिच्या पोटीं संतान झालेलें नसे. वावाता म्हणजे राजाची विशेष आवडती बायको होय. आणि पालागली म्हणजे वेबरच्या मतें राजपुरुषांपैकीं जो शेवटला पुरुष असेल त्याची मुलगी होय. हीं नांवें थोडीं चमत्कारिक दिसतात व त्यांचा अर्थहि फारसा सुसंगत नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, जिला प्रथम वरली तीच खरी लग्नाची बायको असे व तिलाच पत्नीचे सर्व हक्क असत. या मताला डेलब्रुकनें जोर दिलेल्या मुद्याचा पाठिंबा आहे. तो मुद्दा असा कीं यज्ञामध्यें पत्नी शब्द एकवचनी वापरला आहे व जेथें जेथें अनेकवचनी हा शब्द वापरला आहे तेथें तेथें कांहीं पौराणिक कारण देण्यांत आलें आहे. झिमर असें प्रतिपादन करतो कीं बहुभार्यात्व ऋग्वेदामध्यें नाहींसें होत चाललें होतें व एकभार्यात्वाची चाल सुरू होत होती. वेबरचें याच्या उलट असें मत आहे कीं प्रथम एकभार्यात्वाची चाल सुरु होती व बहुभार्यात्वाची चाल मागाहून सूरू झाली.

ब हु भ र्तृ त्व.—वैदिक काळीं बहुभर्तृत्व नव्हतें. वैदिक ग्रंथांत असा एकहि आधार नाहीं कीं त्यावरून ही चाल सरसहा प्रचारांत होती असें सिद्ध होईल. फारतर एवढें म्हणतां येईल कीं ऋग्वेद व अथर्ववेद यामध्यें प्रसंगानुसार कांहीं मंत्र असे आले आहेत कीं ज्यांत एकाच भार्येसंबंधानें अनेक नवऱ्यांचा उल्लेख आलेला आहे. परंतु ऋग्वेदांत १०. ८५, ३७; ३८ या ठिकाणीं जो बहुवचनी उल्लेख आहे तो त्याच सूक्तांतील ४० व्या मंत्रांत सोम, गंधर्व, अग्नि व मनुष्य असे जे चार पती उल्लेखिले आहेत त्यांना अनुलक्षून असावा. या पतींपैकीं तीन देवगणांतील असून एकच मनुष्य आहे. अशा अर्थाच्या शब्दांचा वेगवेगळ्या ठिकाणीं काय अर्थ होतो हे सांगणें कठिण आहे. वेबरच्या मताप्रमाणें भर्तारः हा बहुवचनी प्रयोग बहुमानार्थी आहे असें जरी मानलें नाहीं तरी डेल्ब्रुक हा या अनेकवचनी प्रयोगाचें दंतकथात्मक वर्णन अथवा पौराणिक स्पष्टीकरण देतो ते ग्राह्य मानण्यास बिलकुल हरकत नाहीं. शतपथ ब्राह्मणांतील एका लेखांत हें अनेकवचन व्यापक अर्थानें आलें आहे.

वै वा हि क संबंध.—बहुभार्यात्व जरी वैदिक कालीं प्रचारांत होतें तरी वेबर म्हणतो त्या प्रमाणें वैवाहिक संबंध सैल होते असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक पतीला आपल्य भार्येशां इमानानें वागावें लागत असे. पण हें एकपत्नीव्रत नीतिविषयक कल्पनामुळेंच लोक पाळीत असत किंवा काय हें सांगतां येत नाहीं. यज्ञप्रसंगीं स्त्रीसंगत्यागासंबंधानें व परस्त्रीशीं बिलकुल संबंध ठेवूं नये अशा संबंधानें अनेक स्थलीं स्पष्ट विधान केलें आहे, याचा एवढाच अर्थ होतो कीं यज्ञ चालू नसतांना परस्त्रीगमन केलें असतां क्षम्य होतें. यज्ञकर्त्यानें व्रती असतांना स्त्रीगमन करूं नये असा उल्लेख आहे. यावरून व्रती नसतांना परस्त्रीगमन क्षम्य होतें असा अर्थ निघत नाहीं; पण स्त्री या शब्दांत मुलगी, दासी व स्वतःची बायको यांचा समावेश होत असल्यामुळें सामान्यपणें समाजांत परस्त्रीगमनाकडे कानाडोळा केला जात असे असें म्हणणें चुकीचें होईल. चातुर्मास्य यागांत वरुणप्रघास नांवाचें एक पर्व (कर्म) आहे त्यांत यागकर्त्या यजमानाच्या बायकोला 'तुझा जार कोण' असा प्रश्न विचारला जाई. परंतु डेब्रुलक म्हणतो त्याप्रमाणें हें व्रत दुसऱ्या एका व्रताचा भाग असून त्याचा उपयोग यज्ञकर्त्याच्या स्त्रीचें अपवित्र आचरणरूप पाप नाहींसें करण्याकरितां होता; यज्ञकर्त्यानें आपल्या बायकोस विचारावयाचा तो प्रश्न नव्हता. शतपथब्राह्मणांत याज्ञवल्क्यानें असें मत प्रतिपादिलें आहे कीं आपली स्त्री पतिव्रता आहे कीं भ्रष्ट आहे याबद्दल कोणी पर्वा करीत नाहीं. याचा अर्थ असा कीं जे यज्ञ करणारे असतात त्यांची बायको त्यांच्यापासून दूर असली तरी ते लोक त्याची पर्वा करीत नाहींत कारण देवांच्या बायका देखील विशिष्ट व्रतं किंवा यज्ञप्रसंगीं देवापासून दूर राहतात. वैदिककालीं एकपत्नीव्रताला बराच मान असे, यावरून उच्च प्रतीच्या नैतिक कल्पना त्या लोकांत रूढ होत्या असें सिद्ध होतें. उलटपक्षीं इंडो-जर्मन लोकांमध्यें व्यभिचारीपुरुष एखाद्या स्त्रीशीं व्यभिचार कर्म करतांना पकडला गेला तर त्याला बेलाशक ठार मारावें असा सर्वप्रसिद्ध नियम होता तसा वैदिक काळच्या लोकांत होता असें दिसत नाहीं. तरी पण मागाहून झालेल्या धर्मशास्त्रग्रंथांत असा नियम आढळतो. वैदिककालीं स्त्रीपुरुषविषयक नीतिमत्ता विशेष उच्च दर्जाची नव्हती अशाबद्दल हवा तेवढा पुरावा वैदिक वाङ्मयांत सापडूं शकेल.

ए का स्त्री व र स र्व लो कां ची स त्ता.—जारासंबंधीं प्रेम व अशा प्रकारचे प्रेम करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या प्रेमापासून झालेल्या संततीचा त्याग याबद्दल ऋग्वेदांत पुष्कळ उल्लेख आलेले आहेत. हे उल्लेख विशेषतः परावृज या नांवानें निर्दिष्टिलेल्या इन्द्राच्या आश्रितासंबंधानें आहेत. वाजसनेयि संहितेंत 'कुमारीपुत्र' असा शब्द आलेला आहे. असा जो कोणी

अविवाहित स्त्रीपासून झालेला मुलगा असेल त्याला मातृप्राप्त नांव द्यावयाचें अशी चाल होती असें उपनिषद् ग्रंथांवरून वाटतें. बृहदारण्यकोपनिषदांत ज्या गुरूंच्या याद्या ( वंश ) आल्या आहेत त्यांमध्यें मातृप्राप्त नांवें येण्याचें कारण ह्याच प्रचार असावा असें वाटतें. वाजसनेयि संहितेत शूद्र व आर्य ( स्त्री व पुरुष दोन्ही वर्ग ) यांचे अशास्त्रीय संबंध घडल्याचे उल्लेख आढळतात. व पुरुषमेधांत बलि दिल्या जाणाऱ्यांच्या यादींत अतीत्वरी (वारयोषित्) व अतिष्कद्वरी ( भ्रूणहत्या-करणारी ) अशा स्त्रियांची नांवें आलीं आहेत व रजयित्री स्त्री ही विषयोपभोगालाच वाहिलेली असे असें म्हटलें आहे. पिशेल व गेल्डनेर यांच्या मतें अनेक पुरुषांची एका स्त्रीवर सत्ता असे अशाबद्दल ऋग्वेदांत पुष्कळ उल्लेख आहेत व विशेषतः उषा देवी ही अशाच प्रकारची स्त्री होती असें ते म्हणतात ( उषा ही दैनंदिन कालांतील एक अवस्था आहे व तिच्या संबंधीं असलेलें वर्णन रूपकात्मक आहे ). निदान एवढें तरी खरें आहे कीं ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं उल्लेखि-लेली नृतू (नाचणारी स्त्री) ही जिच्यावर सर्व पुरुषांची सत्ता होती अशी स्त्री होती. स्त्रिया 'समना' ( भेटण्याची जागा ) कडे जात असत असें म्हटलें आहे तेव्हां त्या स्त्रिया अशाच प्रकारच्या असल्या पाहिजेत. अनीतिमार्गाचें पूर्णपणें अव-लंबन करणाऱ्या स्त्रीपुरुषांचीं अनेक उदाहरणें ऋग्वेदांत आलीं आहेत. बाप व कन्या यांच्यामधील संबंध प्रजा-पतीच्या कथेंत दाखविला आहे व त्यासंबंधानें स्पष्टपणें निषेध प्रगट केला आहे. अशा प्रकारचे अयोग्य संबंध समाजांत घडत असत असा उल्लेख अथर्ववेदांतहि आलेला आहे. ज्यांचे आईबाप किंवा भाऊ नष्ट झाले आहेत अशा मुलींच्या हातून अनीतीच्या मार्गानें उदरनिर्वाह केला जाण्याचा बराच संभव असे.

**लग्नाचे प्रकार.**—वैदिककालीं जी समाजस्थिति होती तिवरून असें दिसतें कीं स्त्री असो किंवा पुरुष असो दोघां-नांहि विवाहसमयीं आपला जन्माचा सोबती निवडण्याची मुभा होती. निदान वयांत आलेला मुलगा किंवा मुलगी यांच्या विवाहाच्या भानगडींत आईबाप पडत नसत. तरी-पण बहुधा आईबाप वधूवरांचा विवाह जुळवून आणीत असत. ज्यांचें लग्न व्हावयाचें त्यांचें आपआपसांत ठरल्या-वर एका मध्यस्थाच्या मार्फत—बहुतेक हा वर असावा—हें लग्न जमत असे. त्या वेळच्या समाजांत कन्याविक्रय थोड्या प्रमाणांत असे ( ह्या मताच्या पुराव्यासाठीं तै. सं. व तै. ब्रा. यांतील उल्लेख मॅकडोनेलनें दिले आहेत परंतु मूळांत तसा अर्थ संभवत नाहीं ). पण अशा प्रकारच्या कन्याविक्र-याबद्दल समाज आपली नापसंति व्यक्त करीत असे व असले जावई असत ते बहुधा चिक्कू असत. उलटपक्षीं ज्या वेळीं मुलीमध्यें कांहीं व्यंग असेल अशा वेळीं मुलीच्या बापाकडून वराला हुंडा दिला जात असे. प्रसंगानु-सार मुलींनां पळवून आणून त्यांचें पाणिग्रहण करण्याची चाल होती. पण असले प्रकार म्हणजे वीरांची अद्भुत कृत्यें म्हणून घडत असत. उदाहरणार्थ ऋग्वेदांतील कथेंत विम-दान पुरुमित्राच्या इच्छेविरुद्ध त्याच्या कन्येचें हरण केल्याचा उल्लेख आहे पण या विमदाच्या कृत्याला पुरुमित्राच्या कन्येची संमति होती असेंहि वर्णन आहे. मागाहून झालेले धर्मग्रंथ व महाभारत या ग्रंथांमध्यें विवाहाचे निरनिराळे प्रकार सविस्तर वर्णिले आहेत. परंतु हे सर्व प्रकार पुढील तीन वर्गांत समाविष्ट करतां येतील. ( १ ) उभयतः वधू-वरांच्या संमतीनें झालेले ते प्राजापत्य, ( २ ) वधूची किंमत देऊन केलेले आसुर. ( ३ ) आर्ष ( म्हणजे ऋषींसंबंधीं ब्राह्म किंवा दैव ( ४ ) व ज्यांत वधूचें हरण करून लग्न केलें जातें ते क्षात्र किंवा राक्षस होत. या सर्व प्रकारांचा उल्लेख वैदिक वाङ्मयांत सांपडतो. याशिवाय जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील च्यवनाची गोष्ट किंवा बृहद्देवतेंतील श्यावाश्वाची गोष्ट यावरून कोणीं एखाद्यानें कांहीं विशेष गोष्ट केल्यास अथवा दुसऱ्या एखाद्या हेतूस्तव ( कामगिरीचा मोबदला म्हणून ) आपली मुलगी बक्षिस देण्याची चाल होती.

**लग्नसमारंभ.**—लग्नप्रसंगीं जे समारंभ होत असत. ते समारंभ आणि इंडो-जर्मन व इतर लोकांतील समा रंभ यांत फारच साम्य असे. हे समारंभ फार मोठे असून त्यामुळें वधूवरांचें ऐक्य कायम होत असून सुफलदायी होत असे. या समारंभाला प्रथम सुरुवात वधूच्या घरीं होई व तिच्या घरीं वर, त्याचे नातेवाईक व स्नेही सोबती मोठ्या थाटानें जात व तेथें गेल्यावर वधूच्या नातेवाईकांची व त्यांची भेट होई. या जमलेल्या वऱ्हाडी मंडळींनां मेजवानी देण्या-साठीं गायी मारल्या जात. वरानें वधूला एका दगडावर ( अथवा बोहल्यावरील सहाणेवर )नेल्यावर तिचें पाणिग्रहण करून घरांतील जो मुख्य अग्नि ( गृह्याग्नि ) त्याच्या भोंवतीं वर वधूच्या हातास धरून प्रदक्षिणा करतो. हा विधि झाल्याशिवाय लग्न पुरें झालें असें समजत नाहींत आणि म्हणून या विधीला 'हस्तग्राभ' (पाणिग्रहण) असें नांव दिलें आहे. हे विधी आटोपल्यावर वर आपल्या विवाहित स्त्रीस मोठ्या थाटानें रथांत मिरवणूक काढून आपल्या घरीं घेऊन जातो व हा समारंभ चालू असतां कांहीं मंत्र पठण केले जातात. घरीं गेल्यावर त्याच रात्रीं वधुवरांची एकशय्या होत असते.

**स्त्रीची मिळकत व तिचा दर्जा.**—लग्नानंतर कायद्याच्या दृष्टीनें नवराबायकोंचे परस्परसंबंध कसे होते याबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाहीं. वधूच्या पित्याकडून वरास जी वर-दक्षिणा किंवा हुंडा मिळे त्यावर व वधूची जी इतर कांहीं मिळकत असे तीवरसुद्धां तिच्या नवऱ्याचाच हक्क असे असें मानण्यास हरकत नाहीं. महाभारतांत सुद्धां स्त्रीधनाचा हक्क हळू हळू कबूल होऊं लागला होता ज्याप्रमाणें एखादा धनी आपल्या गुलामाचा पूर्ण मालक असे त्याप्रमाणेंच नव-ऱ्याचा आपल्या बायकोवर ताबा असे असें मानणें चुकीचें होईल. तरीपण अठराव्या शतकामध्यें इंग्लंडांत नवऱ्यास

-बायकोला शिक्षा करण्याचा जो अधिकार असे तेवढा अधि-कार वैदिक काळच्या लोकांनां आपल्या स्त्रीवर गाजवितां येत असे. त्यांचें कौटुंबिक ध्येय उच्च दर्जाचें होतें व तें प्रत्यक्ष अमलांत आणिलें जात असे हीहि गोष्ट आपणांस नाकारितां येणार नाहीं. शिवाय आपल्या नवऱ्याच्या घरीं आल्यावर स्त्रीला महत्त्व प्राप्त होई, तिचा अधिकार तिच्या सासऱ्यावर, दिरावर व तिच्या नवऱ्याच्या अविवाहित बहि-णीवर चालत असे. कदाचित् वरील वर्णन कुटुंबांतील थोरल्या बायकोस लागू पडण्यासारखें असेल. आईबाप वृद्ध झाल्यावर घरांतील कर्तृत्व सर्वांत थोरल्या मुलाकडे जाई व अर्थातच त्याच्या बायकोस घरधनिणीचें महत्त्व प्राप्त होई. कारण अवि-भक्त कुटुंबांत तिच्या इतर दिरांचें व नणंदांचें लग्न झालेलें नसे. तरी पण ज्या वेळीं सासरा धडधाकट असून कुटुंबां-तील कर्ता पुरुष गणला जाई त्यावेळीं त्याला सर्वजण मान देत असत व थोरला मुलगा त्याचेच अमलाखालीं रहात असे, असें जें इतरत्र वर्णन आलें आहे तें विसंगत दिसत नाहीं. जर थोरल्या मुलानें वेगळें घर करून निराळा संसार थाटला असेल तर त्यालाहि असाच मान मिळत असे. शिवाय पत्नी यज्ञप्रसंगीं सहधर्मचारिणी अशी मानिली जाई, व म्हणूनच तिला ब्राह्मणग्रंथांतून 'पत्नी' हें अन्वर्थक नांव दिलें आहे. याच ग्रंथांत जाया या शब्दाचा फक्त लग्नाची बायको इतकाच अर्थ दिला आहे. यज्ञकर्मांतलि वाटेकरीण असा याचा अर्थ होत नाहीं. या बाबतींत तिची योग्यता कमी कमी होत चालला होती. उदाहरणार्थ शतपथ ब्राह्म-णांत एका व्रताचा (हविःकरणाराचा) उल्लेख आहे त्यांत तें कर्म करण्यास प्रथम पत्नीस बोलवित असत. परंतु नंतर उपाध्यायासच त्या कर्मासाठीं बोलवूं लागले. त्याच ब्राह्मण ग्रंथांत स्त्रियांचा दर्जा कमी होत चालला होता अशाबद्दल इतर पुरावा सांपडतो. हा दर्जा कमी होण्याचें कारण बहुत-करून व्रताच्या प्रसंगीं अग्रमानाच्या महत्त्वाची वाढती जाणीव हें असाव. मैत्रायणी संहितेंत सुद्धां स्त्रियांनां द्यूत व मद्य यांच्या वर्गांत ढकललें असून हीं तीनहि महा-पातकें गणलीं आहेत, तसेंच स्त्रीला 'अनृतं' असें म्हटलें असून तिचा संबंध निर्ऋति म्हणजे आपत्ति इच्यांशीं जोडला आहे. तैत्तिरीय संहितेंत स्त्रीला एखाद्या वाईट मनुष्याहून कमी गणलें असून काठक संहितेंत तर 'स्त्री आपल्या नव-ऱ्याशीं गोड गोड गोष्टी करून त्याजपासून आपणांस पाहिजे त्या वस्तू मागून घेते' असें तिचें उपरोधिक वर्णन केलेलें आहे उलटपक्षीं स्त्रियांची स्तुति केलेलीहि पुष्कळ ग्रंथांतून आढळते. स्त्रीला नवऱ्याची अर्धांगी म्हटलें असून तिच्या-मुळेंच नवऱ्याला पूर्णत्व प्राप्त होतें असेंहि म्हटलें आहे. ऋग्वेदांत स्त्रियांच्यावर जी टीका आलेली आहे तिजबरोबर त्यांच्या सद्गुणांचेंहि वर्णन आलेलें आहे. तरी पण आपण जर ब्राह्मणग्रंथ काळजीपूर्वक वाचले तर आपणांस एवढें कळून येईल कीं स्त्रियांचा दर्जा पुरुषापेक्षां हळू हळू कमी होत चालला होता. कारण त्यांत असा एक नियम आढळतो कीं स्त्रियांनीं पुरुषांच्या (आपल्या नवऱ्याच्या) मागाहून जेवावें. एखादेवेळीं नवरा रागानें बायकोस शिव्या देत असे; व नवऱ्याला उलट उत्तर न देणाऱ्या (अप्रतिवादिनी) स्त्रीची स्तुतिहि केलेली आहे. स्त्रियांनां राजकारणांत पड-ण्याची परवानगी नव्हती. सभेला पुरुषच जात; स्त्रिया जात नसत अशाबद्दल मैत्रायणी संहितेंत स्पष्ट उल्लेख आहे. उलट-पक्षीं शिक्षणप्रसार जसजसा जास्त होऊं लागला तसतशी स्त्रियांची शिक्षणविषयक गोष्टींत प्रगति होऊं लागली. उदा-हरणार्थ याज्ञवल्क्याच्या दोन स्त्रियाच घ्या. यांपैकीं एकीनें तत्त्वज्ञानविषयांत बरीच प्रगति करून घेतली होती. उपनि-षद्ग्रंथांत बऱ्याच स्त्रियांचा गुरु म्हणून उल्लेख आला आहे. परंतु या विवाहित होत्या कीं नाहीं हें निश्चित सांगतां येत नाहीं. पण स्त्रीचा जो विवाह व्हावयाचा त्याचा मुख्य हेतु म्हटला म्हणजे प्रजोत्पादन हा होय. या हेतूचा उल्लेख ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांतून वारंवार केलेला आढळतो. संततीबद्दल इच्छा असणें हें ज्या समाजांत बापाच्या बाजूनें नातें ओळखिलें जात होतें त्या समाजांस अगदीं स्वाभा-विक आहे. या इच्छेचें रूपांतर शेवटीं असें झालें कीं पुत्रा-नेंच बापाचें सर्व और्ध्वदेहिक कर्म करावें व बापाचा वंश पुढें चालू ठेवावा. औरस संतति नसल्यास दत्तक घेण्याची परवानगी होती. परंतु ही चाल ऋग्वेदकालीं संमत नसावी. कारण एखाद्या स्त्रीचा नवरा मृत झाला किंवा हयात असून त्याला संतति नसेल तर त्याच्या भावानें त्याच्या बायकोशीं संबध ठेवून संतति उत्पन्न करावी अशा प्रकारची नियोग-विवाहपद्धति ऋग्वेदकालीं रूढ होती असें वाटतें. अपुत्रता व संपत्तिविरहितता (अवीरता व अमति) या अवस्था सारख्याच गणल्या जात व त्यांपासून रक्षण करावें (ही स्थिति नसावी) म्हणून अग्नीची प्रार्थना केलेली आहे. एखा-द्याला मुलगी झाली तर त्याबद्दल कोणी कौतुक करीत नसे परंतु मुलगा होण्याबद्दल अथर्ववेदांतील एका सूक्तांत देवाची प्रार्थना केली आहे अाणि मुलगी झाल्याबद्दल दुःख प्रगट केलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत एक गाथा आलेली आहे तींत पुत्र हा परलोकांतील प्रकाश [ज्योतिर्हपुत्रः परमे व्योमन्] असून मुलगी हा संकट (कृपण ह दुहिता) होय असें म्हटलें आहे. पण वैदिककाळी मुलाच संगोपनच करीत नसत असें जें मागाहून झालेल्या संहिता ग्रंथावरून झिमर व डेलब्रुक यांनीं अनुमान काढलें आहे तें सर्वस्वी चुकीचें असून त्याचा बोथ-लिंगनेंहि निषेध केला आहे.

मुलांचा आयुष्यक्रम.—मुलांचें संगोपन करण्याचें काम आईवर सोपविलें जात असे. परंतु प्राचीन वाङ्मया-वरून लहानपणीं मुलांचें आयुष्य कसें जात असें हें सांगतां येत नाहीं. गर्भावस्थेचा काल दहा [चांद्र] मास गणला जाई. मूल जन्मल्याबरोबर प्रथम त्याला तूप व मध देत असत व नंतर स्तनपान करवीत असत. जन्म

झाल्याबरोबर आठव्या दिवशीं मुलास न्हाऊ घातलें जाई. दंतोद्गम होणें हा एक महत्त्वाचा प्रसंग गणला जात असून त्याचें वर्णन अथर्ववेदांतील एका सूक्तांत आलें आहे. मुलांना बोलावयास शिकवीत असत अशाबद्दलहि तैत्तिरीय संहितेंत उल्लेख असून त्याचा काल मुलाच्या पहिल्या वर्षाच्या शेवटीं सांगितला आहे. ऐतरेय आरण्यकांत 'मुलाचे पहिले तत व तात हे शब्द दद शब्दाप्रमाणें होत' असें म्हटलें आहे. या शब्दावरून बापाला त्यावेळीं जास्त महत्त्व होतें असें दिसतें. मुलाचें नामकरण हा एक महत्त्वाचा समारंभ गणला जाई. अथर्ववेदामध्यें तरुण मनुष्याच्या प्रथमश्मश्रुकरणाच्या ( समावर्तनाच्या ) समारंभाचें वर्णन आलेलें आहे.

सती.—पति निधन पावल्यावर त्याची स्त्री आपखुषीनें अथवा नातलगांनीं आग्रह केल्यावरून आपणास जाळून घेत असे, याला पूर्वी सती जाणें असें म्हणत. ही चाल अस्तित्वांत होती याबद्दल अथर्ववेदांत उल्लेख आहे परंतु ऋग्वेदांत ही चाल नसून उलट विधवेनें आपल्या दिराशीं विवाह करावा असें मं. १० सू. १८ वरून अनुमान निघतें. ही सतीची चाल विशेषतः क्षत्रिय लोकांत असलेली आढळते. ही गोष्ट जो कोणी इंडोजर्मन लोकांचा इतिहास वाचील त्याला कळून येणार आहे. इतर वर्गांत विधवा स्त्रियांनीं नवऱ्याच्या पश्चात् जिवंत राहणें हेंच अधिक इष्ट होतें. विधवाविवाहाची चाल कांहीं धर्मग्रंथांत निषिद्ध मानलेली असली तरी ऋग्वेदांत तिचा कांहींसा भास होत आहे. यावरून ऋग्वेदकालीं ती रूढ होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

३०पितापुत्र.—'बापलेक.' हा समास वैदिक वाङ्मयांत फारच थोडा वेळ(अथर्ववेद, व शतपथब्राह्मणांत)आला आहे.

३१पितृ.—ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत हा शब्द येणारा असून त्याचा अर्थ बाप असा आहे. पण बाप म्हणजे जन्म देणारा हाच अर्थ सर्वत्र नसून मुलाचें रक्षण करणारा असाहि याचा कोठें कोठें अर्थ होतो व व्युत्पत्तिदृष्ट्या तोच अधिक जुळतो. ऋग्वेदांत जेथें जेथें बाप हा शब्द आला आहे तेथें तेथें तो चांगला व प्रेमळ आहे असें वर्णन आहे. उदाहरणार्थ अग्नीला पिता म्हटलें असून इंद्र बापाहूनहि अधिक प्रिय आहे असें म्हटलें आहे. बाप मुलाला हातीं धरून आपल्या मांडीवर बसवितो व मुलगा बापाचें लक्ष आपणाकडे लागावें म्हणून त्याच्या अंगावरील वस्त्र ओढीत आहे असें ( ऋ. ३.५३,२ ) वर्णन आलें आहे. मूल मोठें झाल्यावर तें संकटकालीं बापाच्या मदतीवर अवलंबून राहतें व बापाचें आनंदानें स्वागत करतें असेंहि वर्णन आलें आहे. बापाचा मुलावर ताबा किती असे व तो किती कालपर्यंत असे हें सांगणें कठिण आहे. ऋग्वेदांत द्यूत खेळल्याबद्दल बाप मुलाला शिक्षा करतो व ऋज्राश्वाला त्याच्या बापानें अंध केलें अशा कथा आलेल्या आहेत. वरील दुसऱ्या कथेवरून रोमन लोकांत ज्याला 'पॅट्रिआ पोटेस्टस्' बापाचें मुलावरील पूर्ण स्वामित्व म्हणत तें वैदिक कालीं पूर्णावस्थेंत होतें असें झिमरचें म्हणणें आहे. पण या अर्धवट दंतकथात्मक व तुटक अशा गोष्टींवर कितपत विश्वास ठेवावा हा प्रश्नच आहे. तथापि बापाचें मुलावरील स्वामित्व बरेंच असावें हें शक्य दिसतें. कारण रोमन लोकांत असलेल्या 'पॅट्रिआपोटेस्टस्' बद्दलच्या पूर्वपक्षाला आपणांपाशीं दुसराच पुरावा आहे. मुलाच्या अथवा मुलीच्या लग्नाच्या बाबतींत बापाला कायदेशीर रीतीनें ढवळाढवळ करतां येत असे. याबद्दल जर पुरावा आपणांजवळ नसेल तर त्यावरून असें म्हणतां येईल कीं, ही गोष्ट त्यावेळीं अशक्य कोटींतील नव्हती. मुलगा वयांत आल्यावर तो बापाबरोबर राहून संसार करी व त्याची बायको गृहस्वामिनी होई किंवा मुलगा निराळेंच बिऱ्हाड करून राही हें सांगतां येत नाहीं. बहुतकरून दोन्ही चाली अमलांत असाव्या. तसेंच लग्न झाल्यावर किंवा लग्न न झालें तरी मुलाला अलग जमीन तोडून दिली जाई अथवा बाप मृत झाल्यावर त्याला जमिनीचा भाग मिळे हेंहि सांगणें अशक्य आहे. परंतु कांहीं झालें तरी मुलगा वयांत आल्यावर वा बापाचा ताबा सुटल्यावर बापाची सत्ता मुलावर असणें शक्य नाहीं; कारण तो वृद्ध झाल्यावर मुलेंच त्याच्या मिळकतीची वांटणी करून घेत किंवा त्याला करून द्यावी लागत असे व सुनेच्या कदरेखालीं त्याला रहावें लागत असे. वृद्ध झाल्यावर बापाला टाकून दिल्याचींहि स्पष्ट उदाहरणें आहेत. परंतु वैदिककालीं हिंदुस्थानांत ही चाल फारशी प्रचारांत होती असें मानणें गैरशिस्त होईल. सामान्य नियम म्हटला म्हणजे मुलगा बापाच्या पूर्णपणें आज्ञेंत असे. मागाहून झालेल्या सूत्रग्रंथांत मुलानें बापाशीं कसें वागावें याबद्दल सविस्तर वर्णन दिलें आहे. मुलानें बापाचें उच्छिष्ट खावें असें त्यांत सांगितलें आहे. उलटपक्षीं बापानें मुलाशीं प्रेमानें वागावें असेंहि म्हटलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत शुनःशेपाची जी गोष्ट आली आहे तीवरून बापाची मुलाबद्दल निर्दयपणाची वागणूक लोकांना कशी नापसंत होती हें सिद्ध होतें. उपनिषदामध्यें बापापासून मुलाची वंशपरंपरा दैविक आहे असें म्हटलें आहे. मुलाचें चुंबन घेणें हें नेहमींच्या परिपाठांतील असून परिणत वयांत सुद्धां तें प्रेमाचें द्योतक गणलें जाई. औरस संततीच्या अभावीं दत्तक घेण्याची चाल असे. ही दत्तकाची चाल कधीं कधीं औरस संतति असतांनांहि असे. पण अशा वेळीं दत्तक घेतला जाणारा मुलगा विशिष्टगुणसंपन्न असाच असे. उदाहरणार्थ विश्वामित्रानें दत्तक घेतलेला शुनःशेप होय. एका जातींतील मुलगा दुसऱ्या जातींतील मनुष्यास दत्तक घेतां येत असे कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. कारण वेबर म्हणतो त्याप्रमाणें हा ब्राह्मणाच्या मुलाला दत्तक घेणारा विश्वामित्र

स्वतः क्षत्रियच होता किंवा काय हेंहि निश्चयात्मक ठरत नाहीं. दत्तक घेण्याची चाल लोकांनां विशेष आवडत नसे. ही चाल क्वचितच अमलांत येई; कारण ऋग्वेदांत ७.४,७ येथें या चालीचा निषेध केला आहे. एखाद्या मनुष्याला मुलगा नसून मुलगी असेल व तिला मुलगा होईल तर तो मुलगा तिच्या बापाला दत्तक घेतां येत असे. एकंदरींत या चालीचा उल्लेख यास्कानें केलेला अर्थ स्वीकारला तर ऋग्वेदांतील एका दुर्बोध मंत्रांत (३.३१,१) असावा असें वाटतें. शिवाय एखाद्या भ्रातृविरहित कुमारिकेस पति मिळण्याची अडचण पडे. याचें कारण तिच्या बापाचा तिला पुत्रिका करण्याचा हेतु असावा हें असेल. पुत्रिका म्हणजे तिचा वंश तिच्या बापाच्या वंशांतच रहावा या इच्छेनें दिलेली मुलगी. प्रत्येक कुटुंबांत आईपेक्षां बापालाच जास्त मान असे. याच्या उलट डेलब्रुकच्या मतानें कांहीं कुटुंबांत आईलाच जास्त मान असे. सर्व कुटुंब जमिनीची वहिवाट करणारी संस्था होती असें दिसत नाहीं. बेडन पॉवेल यानें असें सिद्ध केलें आहे कीं, हिंदुस्थानांतील ग्रामसंस्था ही कधींहि जमीनदारी संस्था नव्हती. पण त्याचें असें म्हणणें आहे कीं, ज्या अर्थी पित्याची कुटुंबावरील पूर्ण सत्ता ही मागाहून सुरू झाली व अशी सत्ता असण्याची पद्धति हिंदुस्थानांत नव्हती त्या अर्थी ग्रामसंस्थेऐवजीं एक कुटुंब हेंच जमीनदार असे. हापकिन्स आपल्या ग्रंथांत असें प्रतिपादन करतो कीं, पूर्वी हिंदुस्थानांतील जमिनीवर वैयक्तिक व अविभक्तकौटुंबिक अशी दोन्ही प्रकारची सत्ता एकवटलेली होती. या दोहोंपैकीं अविभक्तकौटुंबिकसत्ता ही अगोदरची असून पुढें ती हळू हळू नष्ट होत चालली होती. आणखी तो म्हणतो, कधींहि रद्द न होणारा असा मुलाला एक हक्क होता. बाप जर वंशपरंपरागत जमीन विकूं लागला तर मुलगा त्या हक्कानें बापास प्रतिबंध करी. कारण जी जमीन समायिक स्वामित्वाखालीं असे ती विकण्यास सर्व ग्रामाची परवानगी लागत असे. पोलाक व मेटलंड यांनीं आपल्या इंग्रजी कायद्याचा इतिहास या पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें आपण हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, पूर्वी मुलाचा हक्क होता यावरून समायिक सत्ता किंवा कौटुंबिक सत्ता पूर्वी जमिनीवरहि होती असें मानण्याचें कारण नाहीं. तर प्रथम बिनवारशी मिळकतीवर हक्क सांगण्याची पद्धत होती व तीपासूनच समायिक किंवा कौटुंबिक सत्ता सुरू झाली असावी. इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांत पूर्वीच्या ग्रंथांत समवाईक कुटुंबपद्धति असल्याबद्दल उल्लेख नाहीं. जॉलि आपल्या उपनिषद्‌ग्रंथ या पुस्तकांत म्हणतो कीं, प्राचीन व अर्वाचीन कालीं कुटुंबांतील कर्त्या पुरुषाचा मुलें मोठीं झालीं तरी एकमुखी ताबा असे अशाबद्दल स्पष्ट पुरावे मिळतात. हीच स्थिति पूर्वीच्या इंग्लिश व रोमन लोकांच्या कायद्याच्या ग्रंथांत सांपडते. ग्रीसमध्यें सुद्धां बापाची कुटुंबावर व जमिनीवर पूर्ण सत्ता होती. पितरौ याचा अर्थ आईबाप असाच दोहोंकडे आहे.

[32]पुत्र.—सूनु व पुत्र ह्याचा अर्थ ऋग्वेदापासूनच्या सर्व ग्रंथांत स्वतःचा मुलगा असा आहे. ह्या शब्दाचा मूळचा अर्थ लहान किंवा असाच कांहीं होतो. पुत्रक हा शब्द स्वतःच्या मुलालाच नव्हे तर आपणाहून लहान माणसालाहि प्रेमानें हाक मारण्याचा आहे. पुत्र व्हावा म्हणून प्रकट केलेल्या इच्छेचा उल्लेख वारंवार आलेला आहे.

[33]बंधु.—याचा अर्थ 'नातें' असा आहे. धनवाचकहि अर्थ होतो. सामान्यनाम असतां 'नातेवाईक' असा अर्थ होतो. हा शब्द ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत आढळतो.

[34]भर्तृ.—याचा अर्थ 'वहाणारा,' याशिवाय आश्रयदाता, स्वामी, असा सुद्धां अर्थ जुन्या वाङ्मयांत आहे. परंतु याचा कोठें एखाद्या ठिकाणीं 'भर्ता' (नवरा) या अर्थी उपयोग होतो किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं त्याचा अर्थ 'नवरा' असा असावासें वाटतें, पण डेलब्रुकच्या म्हणण्याप्रमाणें—व तें बरोबरहि दिसतें—त्याचा अर्थ (बाप) असा असला पाहिजे; कारण 'आई' ऐवजीं हा शब्द कांहीं ठिकाणीं योजिला आहे.

[35]भ्रातृ.- ऋग्वेदकालीं व नंतरहि ही बंधुवाचक संज्ञा आहे. हा शब्द कित्येक वेळां नातेवाईक किंवा परम मित्र यांसहि लावतात. परंतु भ्रातृ शब्दानें संबोधिलेले पुरुष ह्या देवता असून परस्परांच्या, किंवा त्यांच्या भक्तांच्या, बंधुरूप आहेत. ह्याप्रमाणें पूर्वीच्या वाङ्मयांत ह्या शब्दाचा मूळचा अर्थ लोपला नव्हता. याची व्युत्पत्ति भृ = भरणें ह्या धातूपासून झाली असावी हें बरोबर दिसतें. याचा अर्थ असा कीं, भाऊ आपल्या बहिणीला आश्रय देत असे. वैदिक ग्रंथांत हाच अर्थ असला पाहिजे ही गोष्ट बाप वारल्यानंतर तिचा सर्व भार भावावर पडत असे, व 'भाऊ वारला तर बहिणीचें दुर्दैव ओढवतें' इत्यादि वाक्यावरून सिद्ध होते. नातेवाइकांचा दर्जा छांदोग्य उपनिषदांत दाखविला आहे. त्यांत आधीं 'बाप' मग 'आई' नंतर भाऊ, मागाहून बहीण, असें दिलें आहे. भावाभावांतलें भांडण प्रसंगविशेषीं उल्लेखिलें आहे.

[36]मातृ.—ऋग्वेदापासून हा आई या अर्थाचा शब्द नेहमीं प्रचारांत आहे. ध्वन्यनुकारी 'मा' या शब्दापासून हें रूप बहुधा सिद्ध झालें असलें पाहिजे. हा शब्द अम्बा आणि नना यांच्या प्रमाणेंच आहे, नवराबायकोंची व मातृपुत्रांचीं नातीं पति ह्या शब्दाच्या सदरांत दिलीं आहेत. आतां येथें एवढेंच सांगावयाचें कीं, सूत्रांत आईविषयीं दाखवावयाच्या आदराविषयीं बराच उल्लेख केला आहे. तसेंच ज्या कार्यांतून तिचा संबंध येतो त्याच्याविषयींहि पुष्कळ माहिती दिली आहे. आईलासुद्धां आपल्या मुलाच्या भवितव्यतेबद्दल काळजी असते असें ऐतरेय ब्राह्मणांतील दत्तविधानाप्रीत्यर्थ विकलेल्या शुनःशेपाच्या कथेवरून उघड होतें. घरात

आईचा दर्जा बापाच्या खालोखाल होता. कधीं कधीं ' आई बाप ' या अर्थी ' मातरा ' हा शब्द ' पितरा, ' ' मातरा पितरा, ' आणि मातापितरः ह्याप्रमाणें उपयोगांत आणीत.

[३७]मित्र.—ऋग्वेदांत आणि नंतरच्या वाङ्मयांत मित्र ह्या अर्थी हा शब्द आला आहे. तैत्तिरीय संहितेच्या मतें स्त्री ही पुरुषाचा मित्र आहे, आणि शतपथांत मित्राचें महत्त्व विशेष वर्णिलें आहे. व मित्रद्रोहाची निंदा केली आहे.

[३८]यम.—यम म्हणजे 'जुळें.' अशा तऱ्हेच्या जन्माचा वेदकालीन वाङ्मयांत फार वेळां निर्देश केलेला आहे. यमौ, मिथुनौ या शब्दांनीं निरनिराळ्या जातींचीं जुळीं दर्शविलीं जातात. जुळीं हीं भयंकर आणि वाईट चिन्हदर्शक असतात अशी नीग्रो आणि इतर जातींमध्यें समजूत असल्याचे पुरावे आहेत. व जुळीं नशीबवान मानलीं जात असत याविषयींहि पुरावे आहेत.

योषन्.—योषना, योषा, योषित्, हे सर्व शब्द तरुणीचे दर्शक आहेत. याचा विवाहप्रसंगीं मिळणारी वधू असाहि अर्थ आहे. ब्राह्मणांतल्या वृषन् शब्दाशीं ह्या शब्दाचा विरोध आहे; सर्वसाधारण स्त्रीवाचक परंतु बायको, मुलगी किंवा कुमारी या अर्थी सुद्धां हा शब्द वापरलेला आढळतो.

[४०]वधू.—ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत स्त्री या अर्थी हा शब्द वारंवार आलेला आहे. डेलब्रुकच्या मतें ह्या शब्दाचा अर्थ विवाहित स्त्री, सौभाग्याकांक्षिणी स्त्री, किंवा लग्नाच्या वेळची वधू असा होतो. ह्या शब्दाचा उगम वह् या धातूपासून झालेला आहे. वह् = वाहून नेणें ह्या धातूपासून असाच दुसरा शब्द म्हणजे ' वहतु '–लग्नाची मिरवणूक–हा होय. पुढें ह्याचा अर्थ 'जिला घरीं नेली जात आहे ती' असा होऊं लागला. झिमरच्या मतानें हें स्पष्टीकरण बरोबर नाहीं. त्याच्या मतें वधू हा शब्द 'लग्न करणें' ह्या अर्थाच्या धातूपासून बनला आहे. ऋग्वेदांत एकेठिकाणीं आलेल्या वधू शब्दाचा अर्थ रॉथ स्त्री म्हणजे स्त्री जात असा घेतो. पण झिमरचें मत असें आहे कीं, त्याचा अर्थ दासी असा असावा. वधू ह्या शब्दाचा उपयोगच जर पाहिला तर हे दोन्ही अर्थ जरा प्रचाराविरुद्ध दिसतात. कारण या शब्दाचे अर्थ वरच्याप्रमाणें कोठेंहि लागू पडत नाहींत. एका ठिकाणीं त्रसदस्यु पौरुकुत्स्य ह्यानें एका गायकाला पन्नास वधू दिल्याचा उल्लेख आलेला आहे. ह्यावरून हा गायक विशेष प्रकारचा बहुभार्यांक असावा असें फार तर सिद्ध होईल. पण ह्या आमच्या विचारसरणीला एका गोष्टीचा अडथळा आहे. तो असा कीं, ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांमध्यें वधूमंत हा शब्द विशेषणार्थी रथ, अश्व, व उष्ट्र या शब्दांनां लावलेला आहे. झिमरच्या मतें येथें रथांतल्या व घोड्यावरल्या दासींविषयीं उल्लेख असावा; व ह्या मताला बृहद्देवतेचा आधार आहे. रॉथचें असें म्हणणें कीं ह्या ठिकाणीं अवर्षणकालीं योग्य अशा घोड्यांचा किंवा रेड्यांचा उल्लेख आहे; हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. वधूचा अर्थ जर स्त्री जात असा असेल तर वधूमंत म्हणजे ' घोड्या किंवा म्हशी ह्यांसह ' हा अर्थ सयुक्तिक दिसतो.

[४१]वर.—ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत ' लग्न करणारा ' अशा अर्थी हा शब्द आला आहे.

[४२]विधवा.—ह्या शब्दाचा अर्थ 'जिचा नवरा मेला आहे अशी स्त्री असा आहे. ह्या शब्दाचा मूळ अर्थ ' अनाथ झालेली' असा आहे, व हा शब्द विध् ह्या धातूपासून आलेला आहे. ऋग्वेदामध्यें समजण्यास कठिण अशा एका ऋचेंत विधव ( पुल्लिंगी ) असा शब्द असावा असें रॉथचें अनुमान आहे. ह्या ठिकाणीं मूळामध्यें 'विधंतम् विधवाम्' असा स्पष्टपणें लिंगदोषदर्शक शब्दप्रयोग आलेला आहे. रॉथ म्हणतो कीं, वृत्ताचे सोयीकरितां विधवम् ह्याबद्दल विधवाम् असें पद केलेलें आहे व विधवम् ह्याचा अर्थ यज्ञ करणारा विधुर असा त्यानें केलेला आहे. लुडविग्नें अर्थ करतांनां विधंताम् हें स्त्रीलिंगी रूप घेतलेलें आहे. व डेलब्रुक ह्या दोन्ही शब्दांचा ' पूजा करणारा ' व ' विधवा स्त्री ' असा अर्थ करितो. कदाचित् विधवा व विधुर असा अर्थ घेणेंहि सोयीचें होईल, पण ह्या ठिकाणीं कोणत्या कथेला उद्देशून हे शब्द आलेले आहेत हें समजत नाहीं. कारण हे शब्द ज्या ठिकाणीं आलेले आहेत त्या ठिकाणीं अश्विनांच्या नांवावर असलेल्या कोणत्या तरी अद्भुत कृत्याचा उल्लेख आलेला आहे; व त्या ठिकाणीं घोषा (भर्तृविरहित) ह्या स्त्रीचा जो उल्लेख साहजिक झालेला आहे तो असंभाव्य वाटतो. कारण त्याच सूक्तांत अश्विनांनीं तिच्या संबंधीं केलेल्या अद्भुत कृत्याचें वर्णन थोड्याच मंत्रांपूर्वी एका मंत्रांत आलें आहे. वैदिक वाङ्मयांत विधवा हा शब्द फारसा आला नाहीं.

श्वशुर.—ऋग्वेदापासूनच्या ग्रंथांत बायकोचा सासरा असा याचा अर्थ आहे, पण सूत्रकालापासून नवऱ्याचा सासरा असाहि ह्याचा अर्थ होऊं लागला. सुनेनें सामान्यतः आपला सासरा कुटुंबाचा कर्ता पुरुष असतांनां व तो वयानें मोठा असल्यानें त्याला मान देणें जरूर असे. जेव्हां सासऱ्याला वार्धक्य येई तेव्हा हीच सून घरधनीण होऊन सासरा व सासू ह्यांवर हुकमत चालवी. हा शब्द अनेकवचनीं असला म्हणजे ह्याचा अर्थ सासूसासरे असा होतो.

श्वश्रू.—नवरा व बायको ह्या दोघांच्याहि सासूचा ह्या शब्दानें बोध होतो. आपला नवरा वार्धक्यामुळें कुटुंबाचा भार वाहण्यास असमर्थ झाल्यावर ही सासू व तिचा नवरा हे दोघेहि सुनेच्या हाताखालीं रहात. पण एऱ्हवीं त्यांनां त्यांचा योग्य मान मिळे. ऋग्वेदांत एक असा उल्लेख आहे कीं, एक द्यूतकार आपण द्यूत खेळल्यामुळें आपल्यावर आपल्या सासूची खप्पा मर्जी झाली, व हें संकट व आपणावर ओढवलें असे चिंतायुक्त उद्गार काढीत आहे.

[४५]सखि.— म्हणजे मित्र. ऋग्वेदापासूनच्या ग्रंथांत प्रत्यक्ष व अलंकारिक अर्थानें हा शब्द नेहमीं येतो.

[४६]स जा त.—'एकत्र जन्मलेला.' हा शब्द ऋग्वेदामध्यें एकदां व नंतरच्या ग्रंथांत वारंवार आलेला असून त्याचा अर्थ नातेवाईक असा असला पाहिजे. अधिक विस्तृत अर्थ म्हणजे समानदर्जाचा मनुष्य असा आहे. पण हे दोन अर्थ इतके सूक्ष्म आहेत कीं दोन्ही जवळ जवळ एकच झाले आहेत. राजाचे सजात म्हणजे राजपुत्र होत; लष्करी माणसाचे सजात म्हणजे क्षत्रिय होत; सामान्य माणसाचे सजात म्हणजे वैश्य होत. पण पुढें प्रचारांत आलेल्या सजाति (एकाच जातीचा मनुष्य)शब्दाप्रमाणें सजात शब्दांत जातीचा उल्लेख नाहीं. सजातांचे तंटे चांगलेच प्रसिद्ध असत.

[४७]स प त्नी.—ऋग्वेदामध्यें सवत या अर्थानें हा शब्द आलेला आहे. पहिल्या व शेवटच्या मंडळांत मत्सर करणारी सवत असा अर्थ आहे. पण वैदिक काळानंतरच्या वाङ्मयांत प्रतिस्पर्धी ह्याला प्रतिशब्द म्हणून हा शब्द आला आहे.

[४८]स बं धु.—'एकाच रक्ताचा' या अर्थी हा शब्द आहे. ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्ये 'नातें असलेला' असा अर्थ आहे.

[४९]सु पि त्र्य.—ऋग्वेदामध्यें एकदां हा शब्द आलेला असून हा बहुतकरून विशेषण (बापाचे गुण पुढें चालू ठेवणारा) या अर्थी असावा. लुडविगच्या मतें हें एका माणसाचें नांव आहे. पण असें कां मानावें ह्याचें कारण तो सांगत नाहीं.

[५०]स्त्री.—हा सामान्यतः स्त्रीवाचक शब्द गद्यांत व पद्यांत नेहमीं येतो. नारी ह्या शब्दाला हाच अर्थ आहे, पण पुढलि पद्यग्रंथांत हा नाहींसा होतो. 'ग्ना' शब्द फक्त देवांच्या बायकांनां लाविलेला आहे. योषित् व तत्सदृश शब्द उपवर झालल्या तरुण स्त्रियांस लावितात. ऋग्वेदांत पुमान् ह्याच्या उलट स्त्री शब्द आहे: व वृषन् ह्याच्या उलट हा एकदांच आलेला आहे. अथर्ववेदाच्या कालापासून स्त्री ह्या शब्दाचा अर्थ पति ह्या शब्दाच्या उलट विवाहित स्त्री असा होऊं लागला. सूत्रग्रंथांत सुद्धां स्त्री हा जाया शब्दाहून भिन्न अर्थानें वापरला आहे. वैदिककालीं स्त्रीच्या आयुष्यांतला बराच मोठा भाग तिचें लग्न व नवऱ्याशीं असलेले इतर संबंध, यांत जात असे. वैदिककालीं स्त्रियांनां पडदा बिलकुल नव्हता, पण महाभारतकालाच्या उत्तरार्धांत तो पूर्णपणें सुरू झाला. वैदिक कालीं कुमारी आपल्या बापाच्या घरीं वाढत असे. खेडेगांवांतील तरुण पुरुषाशीं तिला मोकळेपणानें बोलतां चालतां येत असे व ती घरांतल्या कामाकाजांत लक्ष्य घाली. तिला शिक्षण घेतां येत असे, निदान कांहीं बायकातरी शिकलेल्या असत; कारण उपनिषद् ग्रंथांत स्त्रियांनीं तत्त्वज्ञानासंबंधाच्या वादविवादांत बराच महत्त्वाचा भाग घेतल्याचें नमूद आहे. शिवाय पुरुषांपेक्षां स्त्रियांनां योग्य अशा नर्तनादी कला यांनां शिकविल्या जात. समाजांत कायद्याच्या दृष्टीनें मुलीचा दर्जा काय होता ह्या विषयीं फार थोडे व अपुरे उल्लेख आहेत. ऋग्वेदावरून असें दिसतें कीं, बाप नसल्यास त्याच्या ठिकाणीं भावाला समजून बहीण त्याच्या पासून मदतीची अपेक्षा करी. भ्रातृविरहित कुमारीवर संकटें ओढवण्याची फार भीति असे. तरी पण अशा निराश्रित कुमारीला उपद्रव देणाऱ्यास भयंकर पाप सांगितलें आहे. स्त्रियांनां, मग त्या विवाहित असोत वा नसोत, वडिलार्जित मिळकतीवर हक्क सांगतां येत नसे, व कायद्याच्या दृष्टीनें त्या कधींहि स्वतंत्र नव्हत्या. लग्नापूर्वी त्या आपल्या बापावर अगर भावावर अवलंबून रहात; व लग्नानंतर त्या नवऱ्यावर अवलंबून रहात. वैधव्यावस्थेंत त्यांचे आप्त त्यांच्या नवऱ्याची मिळकत घेत व त्यांनां संभाळण्याचें काम करीत केव्हां केव्हां अविवाहित स्त्रिया –उदाहरणार्थ वारांगना- जें द्रव्य मिळवीत, त्यावरहि त्यांचे बाप किंवा भाऊ हक्क सांगत.

[५१]स्नु षा.—ह्याचा अर्थ सून असा असून ही सून सासू व सासरा या दोघांचीहि होती. सासूची सून ह्या अर्थानें ऋग्वेदामध्यें हा शब्द सु–स्नुषा ह्या समासांत आला आहे, व तो वृषाकपायीला लावलेला आहे. सासऱ्याची सून ह्या अर्थी हा शब्द अनेक ठिकाणीं आलेला असून सुनेच्या सासऱ्याविषयींच्या आदराचा उल्लेखहि आहे. हा आदर अशा प्रकारचा आहे कीं, तो सुरेसारख्या पदार्थांच्या सेवनप्रसंगीं कमी होतो.

[५२]स्या ल.—ऋग्वेदामध्यें फक्त एके ठिकाणीं हा शब्द आलेला असून ह्याचा अर्थ बायकोचा भाऊ म्हणजे मेहुणा असा आहे. हा मेहुणा आपल्या बहिणीचें रक्षण करण्यास, तिला चांगला नवरा पाहून देण्यास तत्पर असा मानला जातो.

[५३]स्व सृ.—ऋग्वेदापासूनच्या ग्रंथांत बहीण ह्या अर्थी हा शब्द आलेला आहे. ज्याप्रमाणें भ्रातृ शब्द त्या प्रमाणेंच स्वसृ हा शब्द बहिणीशिवाय इतरांनांहि लावतां येईल; उदाहरणार्थ ऋग्वेदामध्येंच ऋतु व हातांचीं बोटें ह्यांची बहिणी म्हणून तुलना केलेली आहे, व रात्रीला उषेची बहीण म्हटलें असून ती उषेहून मोठी म्हणून उषेकरितां आपण आपली जागा सोडीत आहे असें वर्णन आलेलें आहे. पणी लोक सरमेस आपली बहीण समजण्यास तयार होते. पण अशा तऱ्हेचा ह्या शब्दाचा उपयोग–भ्रातृ शब्दाचा आहे त्यापेक्षां अधिक—सामान्यतः मनुष्यांविषयीं करीत नाहींत. बहीणभावांचें नातें हें अगदीं जवळचें असे. पिता मृत अथवा अशक्त असल्यास बहीण आपल्या भावावर आणि भावजयीवर अवलंबून राही असें ऋग्वेद व ऐतरेय ब्राह्मणावरून दिसतें.

[५४]पि ता म ह.—ततामहसारखा ह्याचा अर्थ तैत्तिरीय संहितेपासून पुढील ग्रंथांत बापाचा बाप म्हणजे विशेष अर्थानें बाप असा आहे. पणजा ह्याला प्रपितामह व प्रततामह हे शब्द आहेत. आईचा बाप व आजा ह्यांनां वैदिक भाषेंत निराळे शब्द नाहींत ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट

आहे. पुढील वाङ्मयांत मातामह ह्यासारखे जे शब्द आलेले आहेत ते अनुकरणानें बनलेले आहेत. डेल्ब्रुक म्हणतो कीं, ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं 'महे पित्रे' असा जो शब्द आलेला आहे त्याचा अर्थ आजा असा असावा, व हा अर्थ पुढें नपात् म्हणजे नातू असा जो शब्द आला आहे त्याला जुळणारा आहे. पण एकंदर सर्वच लेखाचा अर्थ संदिग्ध आहे. वैदिक ग्रंथावरून आजोबाचा दर्जा कुटुंबांत काय होता हें सांगणें कठिण आहे. महाभारतांत म्हटल्याप्रमाणें बापासारखाच आजाला मान मिळे ह्यांत शंका नाहीं. कुटुंबाचा भार सहन करण्यास असमर्थ झाल्यावर एखादा आजा आपल्या थोरल्या मुलाबरोबर रहात असे, किंवा तो कुटुंबाचा कर्ता पुरुषहि रहात असे. वैदिक वाङ्मयांत पितामही म्हणजे आजी हा शब्द आलेला नाहीं.

[५५]प्र पि ता म ह.—प्रपितामह म्हणजे पणजा. हा शब्द तैत्तिरीय संहितेंत व ब्राह्मणांत आलेला आहे.

[५६]स्व स्री य.—तैत्तिरीय संहितेमध्यें विश्वरूपाच्या पूर्वजाचें वर्णन करतांना बहिणीचा मुलगा अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[५७]पौ त्र.—पौत्र म्हणजे मुलाचा मुलगा. अथर्ववेद व पुढील ग्रंथ यांतून हा शब्द नातू या अर्थानें सारखा उपयोगांत आणिलेला आहे. जेव्हां ह्याचा नप्तृ या शब्दाहून वेगळा अर्थ असतो तेव्हां हा शब्द पणतू या अर्थानें योजिलेला असतो.

[५८]भ्रा तृ व्य.—हा शब्द अथर्ववेदाच्या एका उताऱ्यांत आला आहे. तेथें तो भाऊ आणि बहीण यांनां लावण्यांत आल्यामुळें तो कांहीं तरी नात्याचा दर्शक दिसतो. याचा अर्थ बहुधा बापाच्या भावाचा मुलगा म्हणजे चुलतभाऊ असा असावा. ह्या अर्थावरून इतरत्र संहिता, अथर्ववेद व ब्राह्मण यांतून वारंवार 'प्रतिस्पर्धी' किंवा 'शत्रू' असा जो दुसरा अर्थ ह्या शब्दाचा केला आहे त्याचा उलगडा होतो. कारण अविभक्त कुटुंबांत चुलत भावाचें नातें शत्रुत्वाचें होण्यास साहजीकच कारणें असतात. मूळचा अर्थ कदाचित् 'पुतण्या' असाच असेल. कारण व्युत्पत्तिदृष्ट्या 'भावाचा मुलगा' असाच अर्थ निष्पन्न होतो. परंतु ह्यावरून या शब्दाच्या मागाहून आलेल्या अर्थाचा नीट उलगडा होत नाहीं. काठक संहितेंत चुलतभावाला खोटें सांगण्याबद्दल सांगितलें आहे; व भ्रातृव्याला 'द्वेष करणारा, (द्विषन्) 'दुष्ट' (अप्रिय), अशीं विशेषणें संहिता व ब्राह्मण ग्रंथांत लाविलेलीं आहेत. अथर्ववेदांत 'प्रतिस्पर्धी' ह्यास हाकून लावण्याकरितां किंवा त्याचा नाश करण्याकरितां बरेच मंत्र दिले आहेत.

[५९]गृ ह्य.—शतपथाप्रमाणें 'घरांतील किंवा कुटुंबांतील सर्व मंडळी' असा या शब्दाचा अर्थ आहे.

[६०]ज्ये ष्ठि ने य.—जेष्ठा ह्या शब्दाबरोबर हा शब्द आला असला ह्मणजे बापाच्या 'पहिल्या बायकोचा मुलगा' असा याचा अर्थ होतो व अशा अर्थानें ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द आलेला आहे.

[६१]ता त.—बापानें मुलास हांक मारावयाचें हें लाडकें नांव आहे. हा शब्द ब्राह्मणग्रंथांत आलेला आहे व तो फक्त संबोधनार्थी आहे; पण चुकीमुळें ह्या शब्दाचा व तत ह्याचा घोटाळा होऊन बाप ह्या अर्थानें ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द आलेला आहे.

[६२]दा र.—'बायको' ह्या अर्थी हा शब्द सूत्रग्रंथांत, बहुतरून पुल्लिंगी अनेकवचनी, व बृहदारण्यकोपनिषदांत एकदां एकवचनीं, आला आहे.

[६३]न प्त्री.—हें नपातचें स्त्रीलिंगी रूप सामवेद आरण्यकांत आढळतें.

[६४]पि ता पु त्री य.—म्हणजे 'बापलेकासंबंधीं' हा शब्द संप्रदानासंबंधानें आलेला आहे. ह्याचा अर्थ, आसन्नमरणावस्थेंत बाप ज्यावेळीं आपल्या मुलास आपली शारीरिक व मानसिक शक्ति अर्पण करितो तो विधि असा आहे. हा विधि कौषीतकी उपनिषदांत वर्णन केला आहे.

[६५]पु त्रि का.—उत्तरकालीन वाङ्मयांत पुत्रविरहित मनुष्याची मुलगी असा ह्या शब्दाचा अर्थ आलेला आहे. ही मुलगी तिचा बाप अशा अटीवर लग्नाच्या वेळीं वरास अर्पण करितो कीं, तिला जो मुलगा होईल त्यानें त्याचें और्ध्वदेहिक व श्राद्धें वगैरे केलीं पाहिजेत; व तो मुलगाहि त्याचाच पुत्र मानला गेला पाहिजे. ही स्थिति व हें नांव यास्काला कबूल असून निरुक्तामध्यें, ह्याचा ऋग्वेदांत उगम आहे, असें म्हटलें आहे. पण ऋग्वेदांतील उल्लेखामध्यें अशा तऱ्हेचा स्पष्टार्थ निघत नाहीं व त्या उल्लेखावरून ही चाल ऋग्वेदकालीं होती असेंहि सिद्ध होत नाहीं.

[६६]भ गि नी.—याचा शब्दशः अर्थ भाग्यवती, चांगल्या भाग्याची असा आहे; कारण तिला भाऊ असणें हें एक भाग्यच आहे असें निरुक्तांत (३. ६) म्हटलें आहे.

[६७]भा र्या.—पुढील ग्रंथांत सामान्यतः 'बायको' या अर्थानें आलेला हा शब्द याच अर्थी संहितांतून आढळत नाहीं. पीटर्सबर्ग कोशाप्रमाणें हा शब्द प्रथम ऐतरेय ब्राह्मणांत आढळतो. डेल्ब्रुकच्या मतें हा शब्द तेथें फक्त घरांत राहणाऱ्या मंडळीचा वाचक आहे. परंतु शतपथ ब्राह्मणांत याज्ञवल्क्याच्या दोन्ही बायकांनां हा शब्द लावला आहे.

[६८]मा तु र्भ्रा तृ.—हा एक चमत्कारिक रीतीनें झालेला समास आहे. मैत्रायणी संहितेंत हा एकदां येतो व तेथें याचा अर्थ 'मामा' असा आहे. यालाच सूत्रांत 'मातुल' म्हटलें आहे. याप्रमाणें मामासंबंधीं वेदकालीन माहिती फार थोडी सांपडते. इतिहास-कालापर्यंत तरी काका आणि मामा यांचें तुलनात्मक महत्व पाहतां मामाचें महत्त्व अधिक असल्याचा पुरावा आढळत नाहीं. यावरून प्राचीन आर्यांची समाजव्यवस्था पितृसत्ताक होती ही गोष्ट धडधडीत दिसून येते.

## [ अवस्था ]

### मानवी अवस्था [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अकुमार | जिह्मशी | वत्स |
| अजर | जीर | वपत् |
| अर्भ ( अर्भक ) | जुजुर्वत् ( वृद्ध ) | वपावत् |
| अवसान ( मृत्यु ) | जजुरुष् | वयस्कृत् |
| आशिन ( वृद्ध ) | ज्येष्ठ | वयोजुव |
| ऋभुमद्वयस् | ज्येष्ठतम | वयोध |
| ( कौशल्ययुक्त | ज्येष्ठताति | वयोधेय |
| तारुण्य ) | ज्यैष्ठ्य | वयोवृध |
| कुमार | तन्द्रयु | वियुत |
| कुमारक | तरुण | विस्रस् |
| गतासु | तवीयस(बलवान् ) | वृध |
| गर्भिणी | पतित्वन् ( यौवन) | वृद्ध |
| चरम | [१] पलित | वृद्धवयस् |
| चेतु | पवित्र | शिशु |
| जरतु | प्रेति | शून ( दारिद्र्य ) |
| जरा | भूरि | सनाजुर |
| जागरूक | मृत | सुषुप्वान् |
| जाग्रत् | मृत्यु | स्थविर |
| जाग्रत्स्वप्न | युवति | स्वप्न |
| जान | युवन् | स्वप्न |
| जिव्री ( वृद्ध ) | युवश | हेळ ( क्रोध ) |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| आर्त (अभि-विनाश) | जरितृ (जरण-शील) | मृत्यु |
| आसीन | जरिमाण | विकस्ति (विशेष-नाश) |
| इतासु | तिष्ठत् | शीकित (वृष्टि-क्लिन्न) |
| क्षुधा | त्र्यविस् | सिक्तरेतस् |
| जन्म | निर्देव (देवभक्ति-रहित) | स्वपत् |
| जरा | | |
| जरायु | | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अजरा | कुमार | जरामृत्यु |
| अजुर्य | कुमारी | जरित (वयोवृद्ध) |
| अतन्द्रा | कृश | जागृवि |
| अर्भ | कौमार | जाग्रत् |
| अर्भक | क्षितायु (क्षपि-तायु) | जाग्रत्दुष्वप्न्य |
| असुनीत | | तन्द्री |
| अस्वप्न | गतासु | त्र्यायुष |
| आयुष्य | गर्भ | दीन |
| आयुस् | जन्म | निधन |
| उपांशु | जरती | परेत |
| | जरस् | पर्यस्ताक्ष |
| पलित | युवन् | शव |
| प्रथमज | यौवन | शिशु |
| प्रसव | वर्षिष्ठ (वृद्ध) | स्थविर |
| प्रस्नपिता | वर्षीयस् | स्वप्न |
| प्रेत | विश्रस् (वृद्धपणा) | स्वप्नेदुष्वप्न्य |
| बाल | | हेड (क्रोध) |
| मृत | | |

[ सांहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [४]प्रत्यक्षदर्शन | [६]प्रेत | [८]स्थविर |
| [५]पूर्ववयस् | [७]बाल | |

### कांतिवाचक [ क्रियापदें ] ( ऋग्वेद )

| | | |
|---|---|---|
| अतक्त | चकमानः | रिरिचूरे |
| अतापि | चाकनत् | रुचयत |
| अतित्विषंत | चाकशीमि | रुरुचंत |
| अत्विषुः | छन्त्सत् | रुशत् |
| अद्यौत् | जषते | रेचि |
| अभार्षि | जुषते | रेजन्ते |
| अभ्राट् | तित्विषे | रोचते |
| अरेजन्त | द्यौत् | वनोते |
| अवचाकशत् | धम | ववक्षे |
| अशुचत् | धर्णसि | |
| आचके | धामहे | वश्मि |
| आदीध्ये | धासथः | वष्टि |
| आमरीता | प्रचाकशत् | वांछति |
| आयुषक् | भर्षत् | विधक्ष्यन् |
| इनधते | भेम | वेति |
| उशिक् | भ्राजते | वेनति |
| उश्मसि | मन्यते | वेषि |
| कनाति | राजत | वेसति |
| कानिषत् | राट् | शोच |
| क्षयन् | राष्टि | हर्यति |

### ऐश्वर्यबोधक [ ऋग्वदं ]

| | | |
|---|---|---|
| इरज | पत्यते | राजति |
| क्षयति | | |

### उपभोगवाचक [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| गौपत्य | भुज | योगक्षेम |
| जानराज्य | भोग | सुगन्धि |
| पोष | मधव्य | |

[१] पलित.—पलित म्हणजे पांढऱ्या केसाचा. हा शब्द ऋग्वेदापासूनच्या ग्रंथांत वारंवार आढळून येतो. मनुष्य पलित झाला म्हणजे तो वृद्ध झाला म्हणून समजावें. जमदग्नीच्या कांहीं वंशजाप्रमाणें जे लोक वृद्ध होत नाहींत त्यांना पलित हा शब्द लाविलेला नाहीं. पण ऐतरेय ब्राह्मणांत एका ठिकाणी

भरद्वाजाचें वर्णन तो वृद्धावस्थेंत कृश व पलित झाला असें आलेलें आहे. शतपथ ब्राह्मणांत एका ठिकाणीं डोक्याचे केस प्रथम पांढरे होतात असें वर्णन असून दुसऱ्या ठिकाणीं हातांवरील केस पांढरे झाल्याचा उल्लेख आहे.

[2]मृत्यु.---ऋग्वेदांत वारंवार याविषयीं उल्लेख आलेला आहे; आणि नंतर भीतिदायक स्थिति अशा अर्थी हा शब्द योजिला आहे. मृत्यूचे प्रकार १०१ आहेत; पैकीं वृद्ध होऊन मरणें हें स्वाभाविक आहे; बाकीचे शंभर प्रकार टाळतां येण्यासारखे आहेत. वृद्ध होण्याच्या अगोदर ( पुरा जरसः ) मरण येणें म्हणजे अकालीं (पुरा आयुषः ) मरणें होय. आयुष्याची सर्वसाधारण मर्यादा शंभर वर्षें असल्याचे वैदिक वाङ्मयांत उल्लेख आहेत. शारीरिक शक्ति गेल्यामुळें वृद्धपणांत होणाऱ्या हालांचीहि स्पष्ट कल्पना दाखविली गेली आहे. अश्विनांच्या अद्भुत कृत्यांपैकीं वृद्ध च्यवनास तारुण्य परत देणें व कलीस पुन्हा तारुण्य देणें हीं होत. अथर्ववेदांत मृत्यु टाळण्याबद्दल आणि आयुष्य वाढविण्याच्या प्रकाराबद्दल पुष्कळ मंत्र आहेत. मृतशरीराची विल्हेवाट लावण्याच्या दोन तऱ्हा होत्या.एक पुरणें व दुसरी दहन करणें. वैदिक काळांत दोन्हीहि तऱ्हा ग्रीक देशांतल्या प्रमाणें प्रचलित होत्या. परंतु पुरण्याच्या पद्धतीविषयीं विशेष पसंती दर्शविली जात नव्हती. दग्ध केलेल्या अगर अदग्ध अशा मृतांचीं हाडें पुरून त्यावर छऱ्या ( श्मशान ) बांधीत. या छऱ्या कशा तऱ्हेच्या असाव्या या बद्दल शतपथ ब्राम्हणांत बरेंच विवेचन आहे. मृतमनुष्याला जळणाऱ्या होडींत घालून ती होडी समुद्रांत सोडण्याच्या उत्तर देशांत प्रचलित असलेल्या चालीचा थोडा किंवा मुळीसुद्धां वैदिक वाङ्मयांत उल्लेख नाहीं. नावेचा निर्देश जो आहे तो मृत्यूनंतर भोगाव्या लागणाऱ्या आपत्तीचें सूचक आहे. पुरण्याच्या पद्धतीविषयीं नाहीं. मॅकडोनेलनें दिलेल्या स्थलीं सायणमतें तें यूचें रूपक आहे मृत्यूसंबंधी नाहीं. वेदकालीन आर्य लोकांस मृत्यूनंतरचें जीवित म्हणजे या जगांतील आयुष्याची पुनरावृत्तीच होय असें वाटत असे. मनुष्य मृत्यूनंतर सर्वदेहासहित ( सर्वतनुः सांगाः ) स्वर्गांत जातो व पृथ्वीवरचीं सर्व सुखें भोगतो अशी त्यांची समजूत असे. ऋग्वेदांत वाईट कृत्य करणारांचे मृत्यूनंतर हाल होतलि असा संदिग्ध निर्देश आहे. परंतु अथर्ववेदांत आणि शतपथ ब्राह्मणांत मात्र शिक्षेदाखल नरकाची कल्पना आली आहे. त्या ग्रंथांतच असें म्हटलें आहे कीं या जन्मांतील सत्कृत्यें अगर दुष्कृत्यें मृत्यूनंतर स्वर्गप्राप्तीस अगर नरकवासास कारण होतात. रॉथ म्हणतो त्याप्रमाणें दुष्टांचा शेवट म्हणजे त्यांचा पूर्ण नाश असा निर्देश ऋग्वेदांत नाहीं. वैदिक काळीं नीतिमत्तेच्या कल्पना निश्चित नसल्यानें त्यामध्यें परलोकीं मिळणाऱ्या शासनाचा विशेषसा उल्लेख नसणें स्वाभाविक आहे.

[3] स्वप्न.—ऋग्वेदांत व उत्तरकालीन ग्रंथांत ह्याचा उल्लेख आलेला आहे. दुष्ट स्वप्नाचाहि उल्लेख आहे. ऐतरेय आरण्यकामध्यें स्वप्नें व त्यांचे अर्थ आणि प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या गोष्टी( प्रत्यक्ष दर्शनानि ) ह्यांची यादी आलेली आहे.

[4] प्रत्यक्ष दर्शन.—ह्याचा अर्थ 'स्वतःच्या डोळ्यांनीं पहाणें.शिवाय हा शब्द स्वप्न(ऐतरेय ब्रा.)शब्दाच्या विरुद्ध अशा अर्थी आहे. ऋग्वेदाच्या आरण्यकाचा एक भाग असल्या स्वप्नासंबंधी आहे.

[5] पूर्व वयस्.—म्हणजे 'आयुष्याचे पहिले दिवस'; 'आयुष्याचा पहिला काल.' हा शब्द ब्राह्मणांत तारुण्य या अर्थानें योजिला आहे.

[6] प्रेत.—प्रेत म्हणजे गेलेला. याचा मृत मनुष्य असा अर्थ शतपथ ब्राह्मणांत आलेला आहे.; परंतु पिशाच अर्थानें याचा उल्लेख केलेला आरण्यकांत आढळतो.

[7] बाल.—म्हणजे मुलगा. याचा उपनिषदांत लहान मूल असा अर्थ आहे. नंतरच्या वाङ्मयांत बालपण १६ वर्षांपर्यंत गणलें आहे.

[8] स्थविर.—याचा शब्दार्थ वयानें मोठा असा आहे. अनेक माणसांनां विशेषण या अर्थीहि हा शब्द लाविला आहे. 'स्थविर शाकल्य' ह्याचा उल्लेख ऐतरेय आरण्यक व शांखायन आरण्यक ह्यामध्यें, व स्थविर जातूकर्ण्याचा उल्लेख कौषितकी ब्राह्मणामध्यें आलेला आहे.

**धननामें [ ऋग्वेद ]**

| | | |
|---|---|---|
| आनवाय | निधि | लक्ष्मी |
| अपत्यसाच् | निरेक | वरिवस् |
| अप्रक्षित | नृम्ण | वरूथ्य |
| अश्वबुध्य | पशुमत् | वसव्य |
| अश्व्य | पितृवित्त (वडिलार्जित धन) | [1]वसु |
| इन्द्रिय | | वसुताति |
| ऊर्ज | प्रयिषु | वसुत्वन् |
| कृत (लूट) | बंधु | [3]वस्न |
| क्षत्र | ब्रह्मन् | वस्य |
| गय | भग | वाज |
| जनश्री | भोजन | वाम |
| तन | [3]मघ | वार्य |
| त्वावसु | मदेरघु | [7]वित्त |
| दत्र | मीढ्ळु | विभूति |
| दानु | मेधा | विश्वपुष् |
| [1]दाय | यशस् | विश्वप्स्न्य |
| दासप्रवर्ग | रत्न | विश्वायुपोषस् |
| दिविष्ट | रयि | वृत्त |
| द्रविण | रय्य | वृत्र |
| द्युम्न | राति | वेदस् |
| [2]धन | राधस् | वैरदेय |
| धनु | राय | शचीवसू |
| नम्र | [4]रिक्थ | शतमघ |
| निखात (पुरलेलें धन) | रेक्णस् | शतद्रसु |
| | रै | शुल्क |

| | | |
|---|---|---|
| श्रवस् | श्रात्र्य | सुवीर |
| श्री | सनि | स्पार्ह |
| श्रुत्य | सन्तरुत्र | स्व |
| श्वात्र | सहस्रपोष | स्वर्थ |
| श्वात्रभाज् | सहस्रवर्चस | हिरण्यवत् |
| श्वात्री | सुच्छार्दस्तम | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| दाय | पुरुस्पृह | रयिव |
| द्युम्न | भरत | राय |
| द्रविण | महाधन | श्री |
| धन | रयि | संपत्ति |
| धनार्ध | रयिपति | सवर्चस् |
| नृम्ण | रयिमत् | सहस्रपोष |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अभिश्री | पतयालु (अलक्ष्मी | रै |
| अरणि (अलक्ष्मी) | पुनर्मघ | लक्ष्मी |
| अर्थ | पुष्टिमत् | वसव्य |
| अहिरण्यु | भूति | वसु |
| गोपोष ( गोधन ) | मघ | वार्य |
| चेतनी | मत् | वीरवत् |
| द्युम्न | रत्न | श्री |
| द्रविण | राद्धि | सुभूति |
| धन | राय | सुवर्ण |
| नृम्ण | रिष्ट | स्ववसु |

### धनिकनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अश्वमघ | मंहयद्रयि | रेवान् |
| उपवसु | मघवत् | वयस्वान् |
| ऋधद्वार | महिमघ | वरिवोवित्तर |
| कृतद्वसु | महिरत्न | वसुधिति |
| चित्रमघ | मानुषप्रधन | वसुपति |
| तुविदेष्ण | मेहनावान् | वसुमत् |
| द्युम्नवत् | रत्नधेय | वसुनि |
| द्युम्नी | रयिन्तम | वसुवित् |
| द्रविणस्वान् | रयिपति | वहीयस् |
| द्रविणोवित् | रयिमत् | विदद्वसु |
| धनिन् | रयियन् | विभुवसु |
| पिशंगराति ( वि-चित्रधनयुक्त ) | रयिवन् | विभुतद्युम्न |
| | रयिवित् | वृषण्वसु |
| पुरुनृम्ण | रयिवृध | श्रुतमघ |
| पुरुवसु | रयिषाह् | संऋध |
| प्रभुवसु | रायस्काम | सवेदस् |
| बृहद्रयि | रेक्णस्वती | सुद्रविण |
| भगवत् | रेवत् | सधन |

| | | |
|---|---|---|
| सुवृजनास (शोभन धनयुक्त ) | सुप्रभोजस | स्ववसु |
| सुस्तु | स्पार्हराधस् | स्ववान् |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अश्ववत् | रेवत् | वाजिनीवसू |
| आयद्वसु | वसुद | श्रुतमघ |
| गोमत् | वसुमत् | सहस्रप्रधन |
| प्रभुवसु | वसुवत् | संयद्वसु |
| बृहद्रयि | वसुवित् | सुंगु |
| महाधन | वस्योभूय | स्ववत् |
| रत्नधा | वाजिनीवत् | हिरण्यपाणी |
| रत्नधेय | | |

### निर्णीत व अंतर्हित नामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपिच्यम् | प्रतीच्यम् | सस्वः |
| निण्यम् | सनुतः | हिरुक् |

### नावीन्यवाचक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपूर्व्य | नविष्टि | नौव्य |
| इदा ( अव्यय ) | नविष्ठ | नूतन |
| इदानीम् ( ,, ) | नवीय | नूत्न |
| नव | नवोनव | पुनर्नव |
| नवमान | नव्य | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| नविष्ठ | नव्य | नूतन |
| नवीयस | नव्यसी | पुनर्नव |
| नवोनव | | |

### पुराणनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अन्हय | पूर्व्यस्तुति | वया |
| पुराण | प्रत्न | सनया |
| पुराणी | प्रदिवस् | सना |
| पूर्व्य | प्रवयस् | सनेमि ( अव्यय ) |

[ तै. सं. ]

| | |
|---|---|
| प्रत्न | प्रदिव |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| पुराण | पुराणी | प्रत्न |

### बलनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अम | जनाषाह् (पराभव करणारें बल ) | तविषी |
| ओजस् | | त्वक्षस् |
| ऊर्ज | च्यौत्न | दक्षस् |
| कियेध | तरस | द्रविण |
| क्षत्र | तवस् | धर्णसि |
| क्षात्रिय | तवागा | नृम्ण |

| | | |
|---|---|---|
| पाजस् | वाज | शुष्ण |
| प्रयस् | वीळु | शुष्म |
| पौंस्य | वृक | शूष |
| वल | वृजन | शूषन् |
| बाध | वृष्ण्य | शूष्य |
| मज्मन् | शंबर | सहस्य |
| मेळि | शर्धस् | संतवीत्वत् |
| यहस् | शवस् | स्पद्र |
| वध | शाक्मन् | स्वधा |
| वर्ग | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| ऊर्ज | वल | शाक्कर |
| ओजस् | वीर्य | शुष्मन् |
| ओज्मन् | शक्ति | सधि |
| तवस् | शर्ध | सहस् |
| पाजस् | शवस् | सुयम |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| ऊर्ज | पाजस्य | शुष्म |
| क्षत्र | वल | शूष |
| तवस् | वीर | सत्वन् |
| तविप | वीर्य | सहोवत् |
| निण्य | शुष्ण | स्वोजस् |
| पाजस् | | |

**बहुनामें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| उरु | पुरु | शत |
| कुवित् | भूरि | शश्वत् |
| तुवि | विश्व | सलिल |
| परीणस् | व्यानशि | सहस्र |

**महन्नामें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अकव | तवस | महिमन् |
| अद्भुत | तविष | महिषस् |
| अभ्य | पुरु | माहिन |
| अंभृण | पुरुभूतम | यह्व |
| आप्यायमान (वर्धमान ) | बंहिष्ठ | रभस |
| | बर्हिषत् | वरिमा |
| उक्षन् | बृहत् | वरीय |
| उक्षित | ब्रध्न | ववक्षित |
| उत्तम | मह | विरप्शी |
| ऋभु | महत् | विवक्षस् |
| ऋभुक्षिन् | महि | विहायस् |
| ऋष्व | महित्व | व्यचस्वती |
| ककुह | महित्वन | व्राधत् |
| गभीर | महिनः | समहृत् |
| घृष्वि | महिमनस् | |

**विस्तारदर्शक विशेषणें** [ ऋग्वेद ]

अखर्व
अनन्त
अथत्तरा ( व्याप्ततरा )
अत्र ( परिमाणरहित )
अक्त
आभु ( व्याप्तवत् )
आतत
आपिप्यान
आपूर्ण
आपृणन्
आप्रान (विस्तृत)
आष्ट्री ( व्याप्त )
इनक्षन् ( व्याप्रवत् )
उदित
उदिनक्षन्
उपस्तिर ( पसरलेलें)
ऊरु ( विस्तीर्ण )
ऋष्व
गुरु
ज्यायसी
तत
दिवक्षस
द्राघीय
द्राघ्मन्
नभन्य
न्यष्ट
परिज्मन्
परिव्याप्त
पुरुजात
पुरुतम
पुरुत्मन्
प्रथिष्ठ
प्रभ्वी
बहु
बहुल
बह्वी
बृहत्
भूयसी
माहिन
रोदसिप्र
वरिमत्
विपान
विभु
विमाहि
विषुवत्
विष्वद्र्यक्
वृधस्नु
वृद्धायु
वेषन्
व्यानशि
संविव्यान
स्वावत
स्वासु

**सत्यनामें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अद्धा | नीथा | सत्य |
| इत्था | बट् | सत्रा |
| ऋत | श्रत् | |

**सामान्यस्थितिदर्शक** [ ऋग्वेद ]

अकवनिष्ठ
अम्र
अच्युत
अजवस्
अजस्र
अन्त
अन्तर
अदभ्र
अद्यु (प्रकाशरहित )
अद्वयात्
अधराचीन
अधराच्
अनप्त
अनामि
अनायत्
अनारंभण
अनिबद्ध
अनुदित
अनुद्र (उदकराहित )
अनुस्थ
अपम
अपश्रित ( विवृतद्वार )
अपाचीन
अपोर्णुवत्
अप्रभूति ( अप्रयत्न )
आभिन्न
आभिवृत
आभिहित ( बद्ध )
अमृत
अरति
अरध्र
अरस
अराधस्
अवम
अवर ( अधः )
अर्वाक ( आभिमुख )
असंमृष्ट
आधीषमाण
आसीन
उत्तान
उत्ताना
उद्ग्राभ
उब्ध
उभयंकर
उर्व
ऊर्ध्व
गण ( संघ )
गण्या ( पूजनीया)
चख्वांस
ज्येष्ठ

| | | |
|---|---|---|
| तद्वश | प्रथम | वेषिष्ठ |
| तिर्यच् | प्रमर | वेपी |
| तीक्ष्ण | प्रमाद | शशयान |
| दग्ध | प्रमिय | शुचि |
| दीर्घ | प्रयोग | शुशुवस् |
| दुराधर्ष | प्रवृद्ध | शृंगय (आवास-भूत) |
| दुराध्य | प्रश्न | श्रथय् |
| दुर्गृभिश्वन् | प्रेद्ध | संवृत्त |
| दुवन्यसत् | प्रेष्ठ | संग |
| दुर्वेतृ | लुषी | संगत |
| दूरक ( दूर ) | बन्ध | संगृभीत |
| द्रवित्नु | बभ्रुधू | संगृभ्ण |
| धन्या | बलविज्ञाय | संग्रथित |
| ध्रुति ( स्थिरा ) | लवित्तमा | सत्त |
| ध्रुव | बीभत्सु | सदनसद् |
| ध्रुवि | बृहत् | सदानु |
| नानाक(नानावि। | ब्रध्न | सदावृध् |
| निण्य | भीम | सदृशी |
| निषीदत् | भेद | सन्तस्थान |
| निसात्ति | मंहिष्ठ | सन्धि |
| निसद | मदिष्ठ | सन्नद्ध |
| नीचा | मन्दयु | सन्नममान |
| पतिष्ठ | मध्यम | समान |
| परमा | मर्यादा | समुद्रव्यचस् |
| पराति | मल | संपिष्ट |
| परिभूतम | मित | संपृक्त |
| परिषद्य | मृध्र | संपृचान |
| परिस्था | म्लात | सस्नि |
| परीणस् | यविष्ठ्य | सहमूर |
| पवस्त | युक्त | साकंज |
| पिपृक्ष्येण्य | येष्ठा | साकमुक्ष |
| पीवरी | रन्ध्र | साकंवृध |
| पीवस् | रुक्ष | सार्थयुज |
| पुर्वापुषू | रीमत् | सुजिन्ह |
| पृत्सुतुः | वर्षिष्ठ | सुप्रायणतम |
| पृथुज्रय | वश | सुसमुब्ध |
| पृथुपक्षस् | वसाव्या | सूप्रकरस्न |
| पोष | वस्तु | स्कभित |
| पौरुषेयी | वस्यस् | स्तभुयमान |
| प्रचेतस् | वातोपधूत | स्तुभ्वन् |
| प्रतद्वसु | विधुर (हीन) | स्थातृ |
| प्रतिरूप | विभुमत् | स्थिर |
| प्रतिस्था | विषुवत् | स्थूर |
| प्रतीप | विष्ट | स्नात |
| प्रत्यार्धि | वृत्त | |

| | | |
|---|---|---|
| स्नु | हिरण्यवर्ण | ह्वार |
| स्वर्चिषू | | |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अग्र | आभू | नाशुका |
| अंजि | ईदृश | निकषमाण |
| अणु | उग्र | निर्बाधान |
| अनिष्ट | उच्चा | निशिताया |
| अत्यग्र | उत्तान | निषण्ण |
| अधम | उल्बण | निपत्त |
| अधर | ऊनातिरिक्त | नीति |
| अधरलक्ष्मन् | ऊर्ध्व | न्यक्त |
| अपचिति | ऋजु | न्यूना |
| अप्रतिरथत्व | ऋषभ | पराचीन |
| अर्वाचीन | एकोन्नत | परिष्ठ |
| अल्प | ओजिष्ठ | परीणस् |
| अवक्षाण | ओषिष्ठदावन् | पूर्ति |
| अवबाढ | ओह | पूर्वापर |
| अवम | क्रय | प्रतिष्ठ |
| अवरुद्ध | क्रीत | प्रतीप |
| अवस्युत | क्षुद्रपृषती | प्रबाहुज |
| अवात | खर्व | प्रबोधन |
| अवान्तर | गात्रभाज् | प्रवर |
| अवास्तु | गाध | प्रसिद्ध |
| अव्यवच्छिन्न | गिरिष्ठ | प्रसूत |
| अशान्त | गुण | बहु |
| अशिथिलभाव | घोरा | बहुल |
| अश्लोणा | चिर | ब्रव्ही |
| असंयत | छिद्र | बार्हत् |
| असꣳशिता | तिग्म | बाह्य |
| असꣳस्थित | तेजस्य | ब्रध्न |
| असꣳसृष्ट | त्र्युन्नत | भ्रेष |
| असंतृण्ण | दक्षिणावृत | मꣳहिष्ठ |
| असन्दित | दन्धि | मध्यम |
| असन्न | दरिद्र | मध्यमस्थ |
| असभ | दीर्घा | मल |
| असँप्रक्षाप्य | दृढ | महन् |
| असंप्रक्त | दोह | मिथुन |
| असंभिन्दत | द्वंद्व | वातावत् |
| असंभेद | द्विगुण | विपृच् |
| असंमृष्ट | धूति | विप्रिय |
| अस्थूरि | धूर्ति | विभ |
| अस्थेयस् | धूम्रिमत् | विभावन् |
| आतत | धौत | विभु |
| आद्य | ध्रुवतम | विभुव |
| आनन्द | नष्ट | विभूमनस् |

विमहस्
विष्टंभ
वेपन
व्यतास
व्यस्त
शयान
शश्वत्
शिथिल
शुच्
संवृत

संग
संगम
सदृश
सधस्थ
सनातन
सन्तत
सपशु
सभा
समान
समान्या

समावत्
समावद्वीर्य
समृद्ध
सयत्व
सर्वत्व
साक्षात्
स्थिर
स्राम
स्वपत्
स्वप्न

[ अथर्ववेद ]

अंहुभेद्य
अकाम
अकेतव
अखर्व
अघकृत्
अजस्र
अजुर
अजुर्य
अजुव
अजैश्रवस्
अणीयस्क,
अणु
अतन्द्र
अतिस्थावत्
अत्यर्धर्च
अत्याशि
अदुष्कृत
अदभुत
अधम
अधर
अधराक
अधितिष्ठत्
अधीर
अनम्र
अनत्युद्य
अनन्त
अनपेण
अनर्व
अनवद्य
अनवद्राण
अनवधर्ष्य
अनाकृत
अनाग

अनाजानत्
अनातुर
अनाथ
अनामयित्नु
अनाशस्त
अनाशुर
अनुकूल
अनुतम
अनुदित
अनुपदस्वत्
अनुपूर्व
अनुमन्यमान
अनुनेय
अनुश्लोक
अनुवृज्
अनून
अनृण
अन्वाल्य
अपचित्
अपध्वंस
अपति
अपपाप
अपपुष
अपलित
अपाष्ठवत्
अपित्व
अप्रतिष्कृत्
अप्राण
अप्रायु
अभिछाय
अभितप्त
अभिपित्व
अभिरूप

अभिवृत
अभिश्रिष
अभिष्णिक
अभीवर्त
अमदत्
अमन्यमान
अमित
अरस
अर्ध
अर्वावत्
अर्त्री
अवम
अविचाचल
अश्रान्त
अश्लोण
असंयत्त
असत्व
असन
असंबाध
असमृद्ध
अस्त
अस्रैण
अस्व
आकूत
आखर
आजनाभ्यंजन
आपीन
आमित्री
आर्द्र
आवर्तन
आशिस्
आसक्ति
आहार्य

इच्छक
उच्छित
उच्छेय
उत्तर
उत्तरवत्
उत्तानशीवरी
उत्पन्न
उत्पारण
उदहार
उदीचीन
उद्धुत
उद्ध
उद्भ्वी
उद्वह
उन्मोचनप्रमोचन
उपनाह ( जुडगें )
उपमित
उपरिष्ट
उपसद्य
उपसींद
उपस्पृश्
उभयंकर
उभयाविन्
उभा
उरुव्यचस्
उषद्
उष्ण
ऊन
ऊर्ध्व
ऊष्माण
एकाकिन्
एजत्क
ओत
ओप्यमान
कनिष्ठ
काम
कामज्येष्ठ
काममूत
काम्य
कार
कार्ष्ण
कृत्रिम
कृश
क्रंद
क्रुद्ध

क्रूर
क्षुद्र
क्षुधामार
क्षेम्य
गभीर
गुरुभृत्
चण्ड
चर
चित्ताकूत
चित्र
छाया
जर्हृषाण
जामिकृत्
जिर्वि
जिह्म
जीर्ण
जीवत्
जैत्र
तति
तृष्णा
दभ्र
दीर्घायु
दुवस्यु
दुराह
दुरोह
दुर्हार्द
दुव
दुष्टि
दूरक
दृंहण
द्रुग्ध
धनकाम्य
धितवान
धीर
धीरतर
ध्रुवय
ध्रुवा
नग्ना
नन्द
नमस्य
नभ्य
नव
नाथकाम
नानान
नामबिभ्रती
निण्य

निद्रा
निमिष्ट
निम्न
निर्मूत
निष्कृति
न्युष्ट
पक्वक
पतिवेदन
पपिवत्
पपुष्
पर
परामृष्ट
परिज
परितप्त
परिवर्ग्य
परिष्ट
परिस्था
परु
पुरुष
पर्यायिक
पांक्त
पीवर
पीवरी
पुनःसर
पुरःसर
पुरु
पुरुषाद
पुष्टि
पुष्टिकाम
पृथु
पृथुज्मन्
पोष
पोपयिष्णु
प्रतरण
प्रतिकाम
प्रतिकूल
प्रतिचक्षण
प्रतिधा
प्रतिनन्दन
प्रतिभृत्
प्रतिस्था
प्रतिहरण
प्रतिष्ठ
प्रत्रास
प्रपित्व
प्रभु

प्रभृति
प्रभ्वी
प्रमात
प्रमीलिन
प्रलयन
प्रविशिवस्
प्रशस्त
प्रशिष्
प्रशिष्ट
प्रसृदतोग्र
प्राति
प्रार्थ
प्रावृत
प्रिय
बन्धपाश
मद्र
भूमन
मनोमुह
मनोयुज्
मनोह
मप्मर्ष्
मह
महत्
महिमा
मिश्र
मूर
मृतमनस्
मोघ
म्रोक
यत्
यौवन
रन्ध्र
रमति
रिप
रिप्र
रोद
रोदत्
रोपण
लक्ष्म
लघीयसी
लघु
वक्र
वचस्य
वनेनती
वन्दमान
वपस्कम

वर
वरि
वरिष्ठ
वरीवस्
वरीवर्जयत्
वरेण्य
वर्धमान
वर्षवृद्ध
वर्ध्र
वल्गु
ववृध्वस्
वश
वशतम
वस्त्र
वस्य
वस्वी
वह
वाजिनी
वासन्त
वित्तकाम्य
विमित
विविद्ध
विशस्त
विषुरूप
विषुवत्
विष्टम्भ
विष्टी
विसक्त
विसर्ग
विस्रा
विस्रस
विहव्य
वीडु
वीत
वृद्ध
व्यक्त
व्याप्ति
व्युष्
व्यृद्धि
शिव
शोक
श्रथित
श्नुष्टि
श्रम
श्रवस्यु
श्रेय

श्लक्ष्णा
संयति
संविदान
संशिष
संस्कृत
सक्ता
सक्षत्
संकल्प
संकृति
संगति
सचेतस्
सजात
सजित्वन्
सजुस्
सजोषस्
सती
सत्वनायन्
सदान्वचातन
सबाध
सम
समक्त
समग्र
समद
समन
समत्
समर्ण
समान
समानजन्मन्
समाप्य
समाहित
सम्मनस्
सर्वताति
सस्नि
सहशेय्य
सहीयसी
सांधु
सीमान
सक्रतु
सुतुका
सुपक्व
सुपुष्टि
सुप्रणीत
सुप्रपाणा
सुप्राव्या
सुप्रिया
सुरभोजस्

सुवृक्ति
सुवृत
सुषिर
सुसम्नत
सुसंमृद्ध
सुस्थाम
सुहार्द
सूपसर्पण
सोमनस्

स्तनस्यु
स्तीन
स्थात्र
स्थिर
स्फाति
स्वपस्
स्वपतम
स्वभ्यस

स्वरंकृत
स्वाक्त
स्वाभूः
स्वाशिष्
स्वासस्थ
स्विति
ह्रुत
ह्वार

## विशेषस्थितिदर्शक विशेषणें [तै. सं.]

अक्त
अक्तु
अगतश्री
अगोअर्थ
अतिखाता
अद्रिदुग्ध
अधस्पद
अध्वरवती
अन्त
अन्तर
अन्ति
अन्नाद्य
अन्यदेवत्या
अपचिततम
अपचितिमत्
अपरशुवृक्ण
अपशीर्षा
अपस्यवती
अपस्यु
अप्रजस्य
अप्रतिभृष्टशवस्
अप्रतिवृद्ध
अप्रतीक्ष
अप्रदाह
अप्रयाव
अप्रापाद
अप्सुषत्
अरत्न
अरिक्त
अरेणु
अलामका
अलोहित
अवगमयितृ
अवपतन्ती
अवाका

अविदुष्टरास्
अशिथिलंभाव
आतुर
आत्त
आत्मस्परण
आनुषक्
आप्यायमान
उत्तम
उत्तरतोभिप्रया-यानि
उत्थित
उदाकृत्या
उदित
उद्वत्
उपरास
उपरिस्पृश्
उपस्तिर
उरु
उरुद्रप्स
उशिक
ऊर्जा
ऋषिकृत्
गभीर
गंभीर
गोपति
घृतानुषिक्ता
घृत्य
चिश्वा
ताजक
तीव्र
त्रेधा
दीन
दुवस्य
दुच्छुन
दुर्मर्मन्

दूषिका
दृषद्
देवपशु
नन्दथुः
नम्रमान
नमस्विन्
निकारिन्
निदानवत्
नियुत
निर्ऋतिगृहीत
निर्या
निर्यास
निषीदत्
नेदिष्ठ
न्यर्थ
न्याय
पद्वत्
पपुरि
पयस्वत्
पर
परस्प
परिगृह्यवती
परिमोष
परिलिखित
परिश्रित
परिषद्य
परिष्वजाना
परिषिंचत्
परि
पर्याप्लाव
पलित
पाक्या
पावीरवी
पतिय
पीवस्

| | | |
|---|---|---|
| पुरोवातसनि | विघन | सहवीर |
| पूर्णतर | विपा | सहस्रतमी |
| प्रतिस्पश | विभ्राष्टि | सहस्रंभर |
| प्रफर्व्य | विराप्शित् | सहस्रसंमित |
| प्ररिक्त | विशल्य | सहस्रसा |
| प्रहरे | विष्ठा | सहस्रसातम |
| प्रशासा | विस्तार | सहस्रियं |
| प्रति | व्यचस्वती | सहोद |
| प्रेमन् | व्युष्टि | सादव |
| प्रेयस् | व्रत्य | सिक्त |
| बह्वीर | शंयु | सिलिकमध्यमास |
| बहुदोसि | शश्वत्तु | सुधाय |
| भावुक | शन्तनुत्व | सुप्त |
| भुवनच्यवान | शयिन | सुप्रणीत |
| मज्जत् | शर्वत | सुप्रतीक |
| मदुदयन | शुक्रज्योति | सुभगा |
| मन्युसव | शुद्ध | सुभोजस् |
| मन्युपरोप्त | शुष्काग्र | सुमनस् |
| मर्त्यकृत | शृत | सुमित्र |
| महत् | शृतंकृत्य | सुमेक |
| महि | संयत् | सुरूप |
| मिन्दा | संयद्वसु | सुश्लोक |
| मेडि | संवसन् | सुवृक्ति |
| यातयामा | संवेविष | सुश्लोक |
| योजना | सश्रवस् | सुषारथि |
| रजतनाभि | सदेव | सूनरी |
| रंति | संपृच | स्तनयित्नुसनि |
| रायस्पोषदावन् | संप्रिय | स्वयमवपन्नार्य |
| रोचनस्थ | संरंथ | साध्वी |
| वमसद | सवितृप्रसूत | हर्म्येष्ठ |
| वन्दारु | सहयशस् | हस्तादान |
| वामभाज् | सहरक्षस् | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अक्त | उद्वृत | दग्ध |
| अभिदग्ध | उदन्वती | ददत् |
| आत्मपराजित | छिन्न | दरयत् |
| आय | जुहुराण | दवीय |
| आपित्व | ज्येष्ठ | दृष्ट |
| आपीत | तक्षती | दीर्घ |
| आपूर्ण | तत | दुर्णश |
| आवृत | तरुण | दृढ |
| आसीन | तावती | दृह्य |
| उत्तमा | तीक्ष्णतर | देवकृत |
| उत्तान | तीक्ष्णीयस् | देवयत् |
| उल्बित | तीव्र | ध्वक्ता |

| | | |
|---|---|---|
| पच्यमान | मृदु | सबल |
| पराचीन | मृध | सम |
| प्रक्षीण | वन्ध्य | संपरिवृता |
| प्रतीचीन | वर्धत् | संमिश्ल |
| प्रतीप | ववृधत् | सरूप |
| प्रतिन | वसुमत् | सुपार |
| प्रनुत्त | विचृत | सुभ्यक्त |
| प्रनृत्यत् | विच्छिन्न | स्थूर |
| प्रपश्यत् | शुष्क | स्नात |
| प्रपीन | संवेश्य | स्पन्दन |
| पृष्व | संस्कृत | स्पन्द्र |
| बलवत्तम | सचेतस् | स्पातिमत्तमा |
| भर्गस्वती | संग्रहणी | स्वप |
| भूमन् | सन्न | स्वित्र |
| मिथुन | सन्नद्ध | हिमवत् |

## सामान्य स्थिति दर्शक (क्रियापदे) [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अकल्पः | अभिमृशे | आनश्याम् |
| अक्षिणाः | अभुक् | आभूषन्त |
| अगृभ्णत | अमन्दत | आमगात् |
| अगृभीष्म | अमीमदन्त | आरुजन्तः |
| अघुक्षत् | अमृणः | अरेहिल |
| अच्छायः | अमेहयन् | आरोहयन्ति |
| अजनिष्ट | अयातम् | आश्रवयन्ति |
| अजीजनन | अयुक्षाताम् | आह्वाव : |
| अज्यते | अयोजि | ईट्टे |
| अतितस्थौ | अरपः | ईशे |
| अतितपे | अराणिषुः | उपतिष्ठन्त |
| अतृण्णुवन्तं | अरुजम् | उवास |
| अदाभ्यानि | अरुहः | उदिम |
| अदिष्ट | अरूक्षितम् | ऊर्जयन्ति |
| अनम्नत | अर्हामसि | एधि |
| अनाधृष्याः | अवपत् | ऐक्षेताम् |
| अनिन्दिषुः | अवर्धन्त | औक्षीः |
| अनुचक्रदे | अवस्रन् | कर्त |
| अपश्याम | अवारेयथाम् | क्रुत |
| अपस्पृण्वते | अविधत् | क्षितः |
| अपस्फुरं | अवृहः | गूहन्ति |
| अपह्नुवे | अवेपयः | चास्कम्भ |
| अपाङ् | अभिशिश्रेत् | चिकित्रिरे |
| अपारयत् | असनाथ | चीक्लृपाति |
| अपिन्वं | असरः | चोदः |
| अपीपम | असश्चत | च्योष्ठाः |
| अपीप्यं | असावीत् | जग्राभ्रे |
| अभवः | अस्ति | जनये |
| अभिप्रमन्द्र | असीदः | जन्यः |

जरस्व
जागृहि
जायते
जिह्नीळिरे
जीजनत्
तंमयेथे
ततान
त[illegible]प
तत्ने
तन्द्रंन
तस्तम्भ
तिर
तिल्विलायध्वम्
तिष्ठ
तिष्ठिपत्
तृम्पसि
दामना
दि[illegible]पन्त
दुक्षः
दुह्ने
दृ[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]प
[illegible]नुन
[illegible]
[illegible]
[illegible]
निधारयः
निनमे
निनिक्त
निनिदुः
निर्बह्व
निबोधिषत्
नि[illegible]मिम्युः
निम्रुचः
नियुवैते
निरेके
निविशन्ते
निससत्थ
नीनमः
नीळयासे
नैष्ट
पनयन्ति
पर्षे

पस्पशे
पूंचते
पिपर्षि
पिपीळे
प्यायस्वं
प्रतिभूषेम
प्रतिरन्
प्रतिहर्यते
प्रथते
प्रयुच्छतः
प्रुष
बप्सत्
बब्धे
बबृहि
बिभाय
बुबोधः
भव
भ्रीणन्ति
मज्जन्ति
मन्येथाम्
ममन्द
ममद्धः
ममाते
मरते
मर्धिष्ट
मर्मर्तु
म[illegible]य
महीयै
मीमयत्
मुमुरत्
मुरीय
मोषीः
म्यक्ष
म्रद
म्रियसे
यम
ययन्थ
युंजे
युयोजते
रन्ध
रन्त
रप्शते
रम्बते
रुणध्मि
रुदन्ति

रुध्यसे
रुहत्
रुहावं
वन्दिषीमहि
वन्ध
वरीवर्ति
ववक्षुः
ववर्त
ववर्ध
ववर्ह
ववसे
ववार
ववृर्क्त
ववृजुः
ववृतत्
ववृत्याः
ववृध्रे
ववृषे
वव्ने
वसति
वाजयामसि
वासयिष्यसे
वाहि
विदन्
विधेम
विध्य
विनिक्षे
विपृक्तत्
विबभ्रते
विभासि
विविक्ते
विविप्रे
विवेष्टि
विषुणक्
वीळित
वृङ्क्त
वृणक्
वृधि
वोह्ळ्ह
व्यूर्णोते
शर्धत्
शिक्रसे
शिक्ष
शेक
श्रम्नाः

श्रिषत्
संसि
संसृजि
संगथे
श्रेपन्
सदाम
सचावामहै
समिपणक्
सम्पृंक्त
सव्य
सश्रुः
ससतः

ससत्थ
सस्व
सादय
सीसधाम
सुवे
सीस
सृज
सेद
सेध
सोसवीति
स्कभ्नाति
स्कम्भुः

स्तन्
स्तभायन्
स्तम्भीत्
स्मयेते
स्यन्ति
स्या
स्रसेम
स्वजाते
स्वद
स्वप
स्वातत
ह्नुणाति

[ तै. सं. ]

अंक्ताम्
अजहुः
अ[illegible]ष्ट
अदीक्षिष्ट
अधीयन्त
अधृष्णुवत्
अपाकरोति
अपाकृन्तन्
अपावपत्
अपणाः
अप्रथत
अप्राः
अलेलायत्
अवप्रयन्
अवमृशेत्
अवधैयन्
अवहृत्
अवृंजत
अवृणत
अवारुन्धत
अवेशयन्
असत्
असथ
असदत्
असानि
असिचत्
असूषुदन्त
अस्कन्नम्
अस्कान्
अस्तभायत्
अस्थात्

अस्थापयन्
अस्थिरन्
अस्पृशत्
अस्वदयत्
आक्षिषुः
आततन्थ
आतान
आतृण्णम्
आनिषुः
आनुषक्
आजेत्
इषुध्यसि
उक्षत्
उद्यते
उभ्रियते
उपचरंति
उपचिन्वन्ति
उ[illegible]जीवन्ति
उपवपेत्
उपसादयेत्
उपसीदन्ति
उपस्तृणन्ति
उपागहि
उपावहरत्
उपासीदत
उपेतन
ओष
औक्षीः
औ[illegible]छत्
औब्जत्
औम्भन्

क्रीडय
खनति
खिदति
गृभाय
धारयति
छम्बट्कुर्वंति
[illegible]ढि
द्यति
द्येत
नह्यति
नह्ये
निकृन्तते
निलायति
निवपति
निवर्तनत
निष्टतक्षुः
नीरोहः
नृत्यन्ति
पर्यानह्यति
पवस्व
पस्पृशे
पु[illegible]म
पुष्यति
प्रलिखते
बध्नाति
[illegible]धते
भज
भ्र[illegible]शे
मिमाति
मिमिक्षतम्
मिमिक्षिरे

| | | |
|---|---|---|
| मुंच | व्यनिषजेत् | सादयेत्, |
| मुष्णताम् | व्यवसर्पति | सादे |
| म्रदयति | व्यस्थात् | साधयतः |
| यावेष्ठ | व्याचष्टे | सावीः |
| राध्नुवन्ति | व्याधारयति | सुवन्ताम् |
| लिखति | व्यानट् | सुनामि |
| लुप्येत | व्यावर्तत | सुषुवे |
| लेखीः | व्यावृतम् | सूयते |
| वनामहे | शये | स्पृणुते |
| वपति | शृन्थति | स्तम्भान |
| विगृण्हाति | श्रथत् | स्तृणंति |
| वितस्थिरे | श्रुवन्तु | स्तोभन्ति |
| विधविष्यते | सप्सृजेत् | स्थापयति |
| विनिक्षे | सनवः | स्नाति |
| वेदिषत् | सनवथ | स्पर्शयति |
| वेशयति | सरस्वः | स्म |
| वेष्टयत् | स्कभ्नीत | स्यस्व स्या |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंक्तम् | आभूषति | दाताम् |
| अकृन्तम् | आरेभांत | दुधूर्षति |
| अजैत् | आसते | दुन्वन्ति |
| अजैष्म | आसिंचन्ति | दृंह |
| अतर्पयत | उच्छेत् | नद् |
| अतसि | उन्दते | नश्य |
| अतिविथ्यन्ति | उन्दंन्तु | निक्ष्व |
| अदृंहत् | उपसन्नमन्तु | निलयते |
| अभिश्रित | उपस्पृगन्ति | नेनिग्धि |
| अनति | उब्ज | नेमे |
| अनमन् | उम्भत् | न्यङ् |
| अनुप्राविशथाः | उवास | पपृक्षे |
| अनुबध्नन्ति | कर्त्स्यामि | पपृच्याम् |
| अनुमदन्ति | कृन्त | पिपृत |
| अनुष्टु | क्षदामहे | पिप्रतः |
| अनुसंप्रययाहि | गद | पीवासि |
| अनुव्यचलन् | गरत् | पूषेम |
| अनुआगन्ता | गेष्म | पृणीत |
| अपिंशत् | ग्लपयन्त | प्रष्णुते |
| अपृक्थाः | छादयामि | बध्यते |
| अममिः | छित्थाः | भृम |
| असदन् | जागरत् | मदवस्यते |
| असिंचन् | तितिक्षुः | महीयते |
| आपिथ | तिष्ठे | मारयति |
| आपृणासि | तिस्तिरे | मुरीय |
| आप्याययन्ति | तुजयाद्भिः | मृणत् |
| आबबन्ध | तृणेढु | मूलयाति |

| | | |
|---|---|---|
| मेरे | विक्लिन्दुः | शत्स्यान्ति |
| म्रियते | विजृम्भते | शातय |
| यक्ष्व | विध्यामि | शृण |
| रमसि | विन्धे | श्वथयन्त |
| रमसे | विभजासि | षीदति |
| रम्बते | विभिनत्ति | समंक्त |
| रुणद्धि | वियुनक्ति | समुत्पतन्तु |
| रुरोह | विवक्ति | साक्षीय |
| रोपति | विवासत | साढः |
| लिम्पामि | वृङ्क्ष्व | सीदन्तु |
| वन्दामहे | वृंग्धि | स्तृणीत |
| वरीवर्ति | वृज्यते | स्तृषीय |
| ववृधस्व | वृतः | स्वजे |
| वसन्तु | वृश्चन्ति | सेवते |
| वस्ते | व्याकरोमि | हृयंतम |
| वापयामासि | व्यापिथ | |

दा य.—ऋग्वेदांत हा शब्द पारितोषिक-आणि तेंहि श्रमाबद्दल—या अर्थानें आलेला आहे व पुढील ग्रंथांत वडिलांनीं संपादन केलेला आणि त्यांच्या हयातींत अगर पश्चात् मुलांमध्यें विभागली जाणारी दौलत अशा अर्थानें आढळतो. ही दौलत कुटुंबांतील सर्व मंडळींची आहे ही कल्पना ऋग्वेदांत कोठेंहि मान्य नाहीं. या दौलतीवर फक्त कुटुंबांतील कर्त्या माणसाची सत्ता असे. व कर्तें माणूस बहुतकरून बाप असे. इतरांचा या दौलतीवर फक्त नैतिक हक्क असे. हा नैतिक हक्क बाप एखादे वेळीं बाजूला ठेऊं शके पण मुलें जर बलवान् असतील तर तीं दौलतीचा भाग देण्यास बापास भाग पाडीत. उदाहरणार्थ, तैत्तिरीयसंहितेंत असें लिहिलें आहे कीं, मनूनें आपली दौलत मुलांत वांटली. पण त्यानें नाभानेदिष्टाला वगळलें तरी पण मागाहून मनूनें आंगिरसांनां कसें तुष्ट करावें व गायी मिळवाव्या हें शिकविलें. यावरून एक होतें कीं, जी दौलत त्यानें वांटली ती जंगम होती, स्थावर नव्हती. ऐतरेयब्राह्मणांत असें आहे कीं, मनूच्या हयातींत त्याच्या पुत्रांनीं दौलतीची वांटणी केली व आपल्या वृद्ध पित्याला नाभानेदिष्टाच्या ताब्यांत दिलें. जैमिनीयब्राह्मणांत एक गोष्ट अशी आली आहे कीं, चार पुत्रांनीं आपला वृद्ध बाप अभिप्रतारिन् हा जिवंत असतांना वडिलोपार्जित दौलतीची वांटणी केली. दाय ही कुटुंबांतील सर्व मुलांनीं वांटून घेण्याची दौलत असा अर्थ लवकरच रूढ झाला असेल; पण बापाची अप्रतिहत सत्ता जी कुटुंबावर लवकरच सुरू झाली—हें शुनःशेपाच्या गोष्टीवरून सिद्ध होतें—ती सत्ता, व मुलें दौलतीच्या वांटणीचा हक्क मिळविण्याच्या आधींहि बापाबरोबरच दौलतीचीं कायदेशीर वारस असत, या दोन गोष्टी विसंगत दिसतात. कदाचित् जमिनीची वांटणी होत नसावी. पण जीं गुरेंढोरें व इतर जंगम दौलत यांची वांटणी होऊं लागली तशी जमि-

नीची वांटणीहि होण्याचा प्रघात पडत चालला व हा प्रघात वाढण्याचें कारण लागवडीस आणतां येणाऱ्या जमिनीचें क्षेत्र अकुंचित होऊं लागलें हें होय. आतां दौलतीची वांटणी कोणत्या पद्धतीवर होत होती तें पाहूं. तैत्तिरीयसंहितेवरून असें स्पष्ट दिसतें कीं, वडील मुलास जास्त पसंत केलें जाई. कदाचित् ही चाल बापाच्या मृत्यूनंतरची असेल. बापाचे हयातींत वडील मुलापेक्षां दुसऱ्या एखाद्यालाहि जास्त वांटा मिळे असें पंचविंशब्राह्मणांतील एका उल्लेखावरून दिसतें. शतपथब्राह्मण व निरुक्त ह्यांवरून असें वाटतें कीं, बायकांनां वांटणी किंवा वडिलार्जित दौलत यांपैकीं एकीवरहि हक्क नव्हता. त्यांचे भाऊ त्यांनां पोटास देत, नाहीं असें नाहीं. पण त्यांचे बंधू जर हयात नसले तर त्यांनां वेश्यावृत्तीनें राहण्याची पाळी येई. सूत्रग्रंथांत वडिलार्जित मिळकतीसंबंधानें सविस्तर नियम दिलेले आहेत. वडिलार्जित मिळकतीच्या वारसदाराला दायाद व ती ज्याला मिळे त्याला आद् अशा संज्ञा होत्या.

[2] धन.—धन म्हणजे बक्षीस. हा शब्द ऋग्वेदांत अनेकदां, बहुतेक लढाईच्या लुटीपेक्षां शर्यतीचें बक्षीस या अर्थानें जास्त आला आहे. द्यूताच्या वेळीं लावलेला पण असाहि ह्याचा अर्थ आहे. कांहीं ठिकाणीं खुद्द द्यूतांतील चुरस असाहि अर्थ अभिप्रेत आहे. सामान्यतः याचा अर्थ संपत्ति किंवा देणगी असा आहे. परंतु कधीं कधीं बक्षिसाच्या कल्पनेपेक्षां द्रव्याच्या कल्पनेवरून लढाईंतली लूट असाहि ह्याचा अर्थ होतो.

[3] मघ.—या शब्दाचा वैदिक अर्थ उदार देणगी व मघवान् म्हणजे उदार दाता, ब्राह्मणाला विपुल द्रव्य देणारा असा आहे. आतां मघवान् या शब्दांत यापेक्षां अधिक अर्थ अभिप्रेत होता किंवा काय व वैदिक कालच्या लोकांत त्याचा कांहीं विशेष दर्जा होता कीं काय हा प्रश्न शंकास्पद आहे. मघ म्हणजे उदार देणगी असाच अर्थ वैदिककालीं होता असें वाटतें. कारण यास्कानीं ह्याचा धन हाच अर्थ केला आहे. सायणाचार्यहि तसाच करितात. वाजसनेयिसंहितेंत मघ म्हणजे महनीय असा अर्थ केला आहे. मघति म्हणजे धनप्राप्ति असा अर्थ सायणाचार्य मानतात. मघ शब्दाच्या अर्थाबद्दल मतभेद आहे आणि तो चुकीचा आहे. मघ म्हणजे धनच होय.

[4] वसुरिक्थ.—ऋग्वेदांत आणि नंतर वंशपरंपरागत मालमत्ता या अर्थी हा शब्द आहे.

[5] ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत यां शब्दाचा अर्थ संपत्ति किंवा मालमत्ता असा आहे.

[6] वस्न.—ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत । शब्द आलेला असून ह्याचा अर्थ एखाद्या वस्तूबद्दल पैशाच्या रूपानें दिलेली किंमत, एखाद्या वस्तूची अंगची किंमत किंवा विकत घेण्याची वस्तु असा आहे.

[7] वित्त.-ऋग्वेदांत व उत्तरकालीन ग्रंथांत ह्या शब्दाचा अर्थ संपत्ति, स्वतःच्या मालकीच्या वस्तु असा आलेला आहे.

तैत्तिरीय उपनिषदामध्यें पृथ्वीला वित्तस्य पूर्णा ( संपत्तीनें भरलेली ) असें विशेषण दिलें आहे. तैत्तिरीयब्राह्मणापासून माणसाचें मोठेंपण पैशावर अवलंबून आहे हें तत्त्व प्रतिपादिलेलें दिसून येतें. ऋषी ज्या गोष्टी त्याज्य मानतात त्यापैकीं विशेषणा ही एक आहे असें बृहदारण्यकोपनिषदांत म्हटलेलें आहे.

## [ मनोविकार. ]

### इच्छार्थक [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अनमीव | मान) | देवयती |
| अनक्षु | .कल्पयत् | देवयु |
| अभिदप्सु | काम | मनीषिन् |
| अवस्यु | कायमान | रथयु |
| अविष्या ( इच्छा ) | किंयु ( किमिच्छन् ) | गि.हाण |
| इच्छत् | केत ( इच्छा ) | वचस्या |
| इच्छमान | चकान | वश |
| इत्थाधी | चिकितुषी | वसुया |
| इषण | चिकित्व | वसुयु |
| इषण्यत् | चिकित्विन् | वेधस्या |
| इषयत् | चिकित्सन्ती | समर्यत |
| इषयु | चित | समिष |
| इषित् | चित्त | सिवासु ( इच्छु ) |
| इष्यत् | छन्द्य | सुश्रवस्या |
| इंषमाण | जिगीषु | सुश्रतुया ( शोभन-कर्मेच्छा ) |
| उशत् ( इच्छु ) | जिज्यासत् ( वयोहानिमिच्छत् ) | स्वग्नि |
| ऋतयत् | दिच्छु ( दानेच्छु ) | स्वपस्या ( शोभन-कर्मेच्छा ) |
| ऋतयन्ती | दिदृक्षु | स्वाशिष् |
| ऋतया | दिष्ट | |
| औशान ( कामय- | | |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अतिमुक्ति (मोक्ष) | आविद | प्रतिष्ठाकाम |
| अपरिमोष ( वस्तु चोरीस न जावी ही इच्छा ) | गोपीथ | ब्रह्मवर्चसकाम |
| | ग्रामकाम | यत्कामः |
| | तेजस्काम | यशस्काम |
| अयज्ञवेशस् ( यज्ञनाश न व्हावा ही इच्छा ) | दानकाम | राष्ट्रकाम |
| | दोवकाम | वार्यकाम |
| अस्कन्द ( पदार्थ न सांडण्याविषयीं इच्छा ) | देहकामा | व्यावृत्काम |
| | पुत्रकामा | सनिकाम |
| | पशुकाम | सुमयकाम |
| आप्ति ( फलप्र्-पेच्छा ) | पुष्टिकाम | स्वगाकृति |
| | प्रजाकाम | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| आशास | उपालिप्स्यमान | बीभत्सु |
| इच्छत् | दित्सत् | यत्काम |
| इच्छमान | दिप्सु | लीशीथि |
| ईप्सित | देवकाम | सुक्षेत्रिय |
| उत्सिसृप्सत् | प्रप्सन्ती | सुगातु |

**क्रोधनामें [ ऋग्वेद ]**

| | | |
|---|---|---|
| *एहस् | देवहेळन | *हरस् |
| *घृणि | *भाम | *हृणि |
| जूर्णि | मन्यु | हेळ |
| *तपुस् | व्यथि | ह्वरस् |
| *त्यजस् | | |

* हे शब्द निरुक्तांतील आहेत.

**रागावणें [क्रियापदें] [ऋग्वेद]**

| | | |
|---|---|---|
| *कम्पते | *भ्रीणाति | *वनुष्यति |
| *दोधति | *भ्रेषति | *हृणीयते |
| *भामते | *रेळते | हेळते |
| *भोजत् | | |

* हे शब्द निरुक्तांतील आहेत.

**बुद्धिनामें [ऋग्वेद]**

| | | |
|---|---|---|
| अभिख्या | चेतस् | मेधा |
| असु | घोषी | वयुन |
| आकूति | धिषणा | विदत्रा |
| केतस् | धी | शची |
| केतु | धीति | सुचेतुन |
| गोषाणि | मनीषा | सुजन्मनी |
| चित्त | माया | सुमति |

**मानसिक स्थितिदर्शक विशेषणें [ ऋग्वेद ]**

| | | |
|---|---|---|
| अदृप्त | अभीरु | ऋजीय |
| अद्भुत | अभीर्व | ऋजु |
| अद्वेष | अभ्रातृव्य | करण ( कुशल ) |
| अधम | अमहीयमान | कुमन्यु ( ताहाने-लेला ) |
| अधर | अरप (पापरहित) | |
| अनुष्ठु | अर्हत् | कृच्छ्र |
| अपधा | अवहित | क्रुद्ध |
| अपभर्तृ | अस्मेहिति | जिह्म |
| अपानती | अहंपूर्व | तपस् |
| अभ्युष् | आगधित | तप्त |
| अभयंकर | आमरस | तृदिलं |
| अभयतम | आध्र | तृप्रच्युत |
| अभिप्रिष | ऊरु | तृष्यावत् |

| | | |
|---|---|---|
| तृष्वी | पितृश्रवण | शिवतम |
| तृहूळा | पुपुष्वत | शिश्नथ |
| तोशा | प्रयक्षन् | श्रम |
| त्सारी | प्रावेप | श्रेष्ठ |
| दमून | प्रीणान | सदन्य |
| दयमान | प्रीत | समीचीन |
| दुर्ध्य | प्रेण | समीच्य |
| दुर्मन्तु | प्रेणि | सवयस् |
| धृष्णु | बाहूवोजस् | सवास |
| ध्रुवस् | भीमयु | सात |
| नम्र | भीरु | सुमीत |
| निष्कृत | मुग्ध | सौम्य |
| निगूहूल | लोध ( लोभी ) | स्पर्धमान |
| निद्रा | वन्दित | स्पृहयाय्य |
| निर्मीया | विकट | हार्दि |
| निसस्तु | विष्टंभ | हासमान |
| निस्तुर | वृषमन | हृषित |
| नेदिष्ठ | शम ( शान्त ) | ल्हादिका |
| परम | शम्भविष्ठ | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अन्नाद | परोक्ष | विवृत |
| अविद्र | पापीयस् | वज्राक्षित |
| आरमण | प्रवृत | सर |
| क्रुद्ध | प्रसव ( प्रेरणा ) | सांविद्या |
| क्षोधुक (भुकेलेला) | प्रिय | सानसि |
| घातुक | बलिहृत् | सुमति |
| जरदष्टि | मनोग्रहण | सुमनस् |
| द्वेष | मुद | हृदिस्पृश् |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अपराद्ध | प्रकल्पयत् | विद्वान |
| अभितर्पयन्ती | प्रतिबुद्ध ( विशे. ) | शुच् ( शोक ) |
| अमन्युता | प्रतिबुध्यमान | शोचिष्णु |
| असंज्ञ | प्रमोदिनी (विशे.) | श्रम |
| आनन्दिनी ( विशे | प्राजानत | सम्मनसु |
| उन्मदित | प्राश्नति | सुप्स ( झोंप ) |
| कृप | प्रीत | सुमनस् |
| तर्पयत | प्रेण्य | सुमनस्यमान |
| दून ( दुःखी ) | प्रेयसी | सुविद्रस |
| द्विषत् | प्रैणान | स्तुवान |
| दौष्वन्य | मूढ | स्वप्न |
| नाथित ( प्रार्थित) | याचमान | स्वविद् |
| नाधमान | वावशती | हेड |
| पुनर्मघ ( लोभी ) | विचिन्वती | हृद्योत |

## मनोविकार विशेष [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अभय | दुच्छु ( दुष्ट हेतु ) | मनन |
| अन ( प्रीति ) | दुर्मति | मनस् |
| क्रुद्ध | धीर्या ( भीत ) | मन्यू |
| क्रोश | नान्ध ( आनन्द ) | मादन |
| क्षुध् | प्रतिलोभयन्ती | मुद |
| क्षुध्यत् | ब्रह्मद्विट् | विनय |
| क्षेमकाम | भय | शर्म |
| क्षोभण | भियस् ( भीति ) | संस्मयमान |
| गंभीर | भी | संकल्प |
| घृणा | भीषा | स्वाव |
| तृष्णा | भ्रम | हर्षुमत |
| दक्षस् ( मानसिक | भ्रामित ( क्रुद्ध ) | हस |
| शक्ति ) | मद | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अपकाम | धी | मोद |
| आकूति | धृति | शुच् |
| आर्ति | भय | श्रद्धा |
| आशिष | भीम | संज्ञान |
| उन्मादक | भ्रम | सौमनस् |
| गतमनस् | मति | सौश्रवस |
| चित्त | मद | सौहार्य |
| द्रुह् | मनीषा | हार्द |
| द्विष् | मेधा | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्षकाम | आकूति ( संकल्प ) | एनस् |
| अनुप्रेम | आनन्द | काम |
| अभिद्रोह | आशा | कृपा |
| अभिमोदमुद | ईर्ष्या | क्रोध |
| क्षेम | द्वेष्यं | मेधा |
| गवेषण | धनकाम | मोद |
| गन्ध | धिषणा | रुचि |
| जनिकाम ( जाया- | धी | रोद |
| काम | निमन्यू | शोचत |
| जामिशंस ( बांधव | पतिकामा | सत्यसवा |
| पीडारूप | पुत्रकामा | सन्नति |
| पातक ) | प्रतिकाम्य | सुचित्रा |
| तनूबल | प्रतिक्रोश | सुमति |
| तपुष् (तापकारी) | प्रमति | सुमेधस् |
| दुर्हार्मन्तु | प्रमाद | स्मर |
| दुर्हार्द (दुष्ट हृदय) | प्रमुद | हस् |
| देवकिल्बिष | भय | हसामुद |
| द्रोघ | मति | हिरण्यजित |
| द्वेष | मुंद्र | |

## मनोविकार दर्शक क्रियापदें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक | अक्रक्षत् | अजानन् |
| अक्रीपिष्ट | अगायत् | अतर्पयः |
| अक्ळिन् | अंगहन | अतिमन्ये |
| अघ्रुक | दुवस्येत् | मांदयासे |
| अप्यूहे | दुन्हे | मानवस्यते |
| अबभ्रम् | धिष्व | मार्ज्मि |
| अरन्त | धृष्णुहि | मुमोद |
| अर्हिरे | नन्दन्ति | मुह्यन्तु |
| अशपत | निन्दात | मृगयन्ते |
| अस्प | निरण्यथः | मृजन्ति |
| आचिकेतत् | पिप्रयः | मृण |
| आदधर्षद्धि | प्रजते | मेहन्ति |
| आरुजासि | प्राणिति | येमे |
| आर्पिता | भर्यतां | रथर्यसि |
| इंगयति | भयते | रमते |
| ईष्टे | मत्स्व | रराथे |
| उश्मसि | मदेम | रराध् |
| कामयासे | मनायतः | रीरमत् |
| कोपयथ | मनिष्ये | रेरिह्यते |
| क्रदः | मनुतां | रोषति |
| क्षमध्वं | मन्दन्तु | ववाशिरे |
| गर्हसे | मन्दामहे | वशन्ति |
| गोपयन्ति | मन्वते | वष्टि |
| चकनन्त | ममत्तु | वाञ्छन्तु |
| चच्छन्द | ममाद | वावशन्त |
| चाक्लुप्रे | ममृजुः | शेषे |
| जीव | ममृड्युः | श्मसि |
| ज्ञायन्ते | मर्धन्ति | ऋतूयसे |
| तर्पय | मर्षिष्ठाः | ह्रासते |
| तितिक्षते | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अजायत | अवित्ताम् | बुध्यन्ते |
| अजिगीषन् | आक्खिदते | बोधतु |
| अजिज्ञपत् | चिकित्सत | मनुते |
| अज्ञत | चिकित्सु | मन्म |
| अदर्शम | ददर्श | वेद |
| अपश्यत् | देवयते | वेदन् |
| अबोधि | प्रज्ञायते | संज्ञपयन्ति |
| अवपश्यन् | परिपश्यन्ति | समजानत |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अकल्पयथः | अतित्रसन् | अनुध्या |
| अकृपयत् | अतृपम् | अनुशेरते |
| अक्षुध्याः | अन्विच्छन् | अभिदुद्रोह |

अभुत्सत
अमन्महि
अमन्वत
अमीमदम्
अमीमांसन्त
अरातियात
ऊह्
ऊहामि
ऋषति
ऐच्छन्
ऐच्छाम्
ओषतम्
ओहेत्
और्णोत्
आहत्
कोपयत्
चनिस्कदत्
जागरासि
जानत्
जीवाति
तर्तुर्यन्ते
तर्पयथः
तायते
त्रायध्वम्
त्रायन्ताम्
दमिता
दयसे
दीध्युः
दूषयत
द्विषते
द्विष्टः
द्विष्मः
निप्रिययते
निमिच्छासि
परिममृचुः
प्रमोदन्ते
बर्बृहि
बिभीताः
बुध्यस्व
भयताम्
भेत्
मर्जयन्त
मादय
मीयन्ते
मुह्यत
मृथाः
यभ
रक्षसे
वान्छन्तु
विबबाधे
विबाधते
विवदेत्
विवेद
वेतु
वेत्थ
वेद
श्रद्धाति
संज्ञापयामि
संविध्म
समोहे
साधन्
स्पृहयन्ति
स्वपंतु
हर्षध्वम्
ह्रासिष्ठम्

**मेधाविनामें [ऋग्वेद]**

अद्धाति
आकेनिप
उशिज्
ऋभु
ओहब्रह्मन्
कण्व
कवि
कवितम
कीस्त
केनिपान
गृत्स
धीर
नवेदस्
पदवी
भद्रवाच्
भद्रवादिन्
मति
मतुथम्
मनश्चित्
मनीषिन्
मेधिर
मन्धातृ
वाघत
विप्र
विधातृ
विप
विपन्यु
विपश्चित्
विप्र
विप्रतम
विप्रवाहस्
विप्रवीर
वेधस्
वेन

**सुखनामें [ऋग्वेद]**

ओम्या
कं
क्षेम
जलाश
पुण्य
प्रमुद
भद्र
भेषज
मय
मार्डीक
मोद
शम्
शग्म
शतर
शन्ताति
शर्मन्
शातपन्त
शिम्बात
शिव
शिवतम
शुन
शुभ
शूष
शेव
शेवृध
श्रुष्टि
श्रेयस्
सुख
सुखतम
सुगम्य
सुदिन
सुभग
सुभद्र
सुमत
सुमन्तु
सुमय
सुम्न
सुम्नयन्
सुशमन्
सुसुम्न
स्यूमक
स्योन
स्वस्ति

**[ तै. सं. ]**

भद्र
मय
शम्
शर्म
श्रेयस्
सुगम्
सुम्न
स्वस्ति

**[ अथर्ववेद ]**

अपभूति
क्षेम
जलाष
मय
शम्
शेव
सुकृत्
सुख
सुवित
सुशर्मन्

## उपासना

**ऋत्विक् सामान्य व विशेषनामें [ ऋग्वेद ]**

अग्नित्
अग्निध्
[1]अध्वर्यु ( ऋत्विक् विशेष )
अयस्
आग्नीध्र (ऋ. वि.)
उद्गातृ (ऋ. विशेष)
[2]ऋत्विज्
कण्वहोतृ
कुरु
[3]कवण
जूर्णि
देवश्रु
धारवाक
नेतृ
[4]नेष्टृ (ऋ. विशेष)
पुरएतृ
पुरोग
पुरोहिति
[5]पोतृ (ऋ. विशेष)
[6]प्रशास्तृ (ऋ. वि.)
[7]ब्रह्मन् (ऋ. विशेष)
[8]ब्रह्मपुत्र (ऋ. वि.)
भारत
मरुत
यतस्रुच्
वाघत्
वृक्तबर्हिस्
ब्रह्म
शंस्तृ
[9]शमितृ
सबाध
सभृति
सामग
सुतेकर
सुहोतृ
हव्यदाति
[10]होतृ (ऋ. वि.)

**[ तै. सं. ]**

अग्निमिन्ध
अग्नीत्
अग्नीध्
अच्छावाक ( वि. )
अध्वर्यु (वि.)
अष्टृ
आग्नीध्र
आच्छेतृ
आस्थातृ
उद्गातृ (वि.)
उन्नेतृ (वि.)
उपगातृ (वि.)
उपद्रष्टृ (वि.)
उपहृत
ऋत्विज्
गाथिन्
ग्रावग्राभ (उद्गातृ)
देवावी (देवप्रिय)
नेष्टृ (वि.)
नेष्टापोतृ
पोत्र (वि.)
[11]प्रतिप्रस्थातृ (वि.)
[12]प्रतिहर्तृ (वि.)
प्रशास्तृ (वि.)
[13]प्रस्तोतृ (वि.)
प्रस्तोतृप्रतिहर्तृ
ब्रह्मवर्चस्
भार्गव
वावत्
शमितृ (वि.)
शिम
सतानूनप्त्रिन् (शपथकरणारे)

| | | |
|---|---|---|
| सद्दभक्ष (एकत्र सोमरस पिणारे) | सुहोतृ | स्वध्वर्यु |
| | सोतृ | होतृ |
| सुशमी | स्तोतृ | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अध्वर्यु (वि.) | बृहद्दर्की | सुमेधस् |
| आग्नीध्र (वि.) | ब्रह्मन् (वि.) | सूर |
| ऋत्विज् | यतस्रुच् | सूरि |
| गातुवित् | वाघत् | हिरण्यपावन् |
| चमसाध्वर्यू | विप्र | होतृ |

ऋत्विक्संबंधीं [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अध्वराश्रि | पुरोहित | रास्पिन (यज्ञपात्र धारण करणारा) |
| अध्वरेस्थ | पोत्र (पोतृकर्म) | |
| आध्वर्यव | प्रशात्र[प्रशास्तृकर्म | वक्मराजसत्य |
| आर्त्विज्य | यजमान | वषट्कृत |
| उक्थभृत् | यज्वन् | विशस्तृ |
| उक्थशंसिन् | यज्यु | व्रतचारिन् |
| ऋक्वन् | यज्ञधीर | सामभृत् |
| कवण | यज्ञनी | सूरि |
| गाथिन् | यज्ञवत् | स्तुभ |
| जातविद्य | यज्ञवाहस् | होत्र |
| दक्षिणावत् | यष्टृ | होत्रविद् |
| धृतदक्ष | यूपवाहस् | होत्रिय |
| नित्यहोतृ | यूपव्रस्क | |

[1] अध्वर्यु.—ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत जे पांच अध्वर्यू सांगितले आहेत ते खरोखरी आचार्य नसून यज्ञभूमीच्या ठिकाणीं जसे धर्मोपदेशक फिरतात त्याप्रमाणें ह्या पांच फिरणाऱ्या तारका आहेत असें हिलेब्रँटचें मत आहे.

[2] ऋत्विज्.—यज्ञाच्या वेळीं जे निरनिराळ्या प्रकारचे आचार्य असतात त्या सर्वांना साधारण असा हा शब्द आहे. हें निर्विवाद आहे कीं सर्व आचार्य ब्राह्मण होते. यज्ञाच्या वेळीं निरनिराळ्या विधींनां जे आचार्य लागत असत त्यांची ठरीव संख्या (ऋग्वेदावरून) सात असे असें दिसतें. कारण ऋग्वेदांतील एका जुन्या यादींत त्यांचीं नांवें दिलीं आहेत; तीं होतृ, पोतृ, नेष्टृ, अग्नीध, प्रशास्तृ, अध्वर्यु, ब्रह्मा आणि शिवाय यजमान हीं होत. सात ही संख्या ऋग्वेदांत जो सप्त होतृ हा शब्दसमुच्चय वारंवार येतो त्याचा अर्थ विशद करिते आणि तिचा संबंध बहुधा काल्पनिक ‘सप्तर्षयः ह्यां. च्यांशीं जोडलेला असावा.आणि इराणांतील ह्याच्या आठ ह्या संख्येशी तिची तुलना सयुक्तिक होईल. सात आचार्यांपैकीं मुख्य होतृ. त्याचें काम मंत्र म्हणणें आणि पूर्वी तो मंत्रांची रचनाहि करणारा असे. अध्वर्यु हा मंत्रनिर्दिष्ट तांत्रिक काम करी, आणि काम करतांना प्रार्थनामंत्र आणि अशुभ निवारणार्थ प्रार्थनापठण करीत असे. त्याचा मुख्य मदतनीस अग्नीध् हा असे आणि हे दोघेजण इतर कोणाच्याहि साहाय्याशिवाय बारीक सारीक होम करीत असत. प्रशास्तृ उपवक्तृ, अथवा त्याचें दुसरें नांव मैत्रावरुण हे दोघे फक्त मोठमोठ्या यज्ञांत होत्याला कांहीं सूचना करकरण्यांत गुंतलेले असत आणि त्यांच्याकडे सामाजिक प्रार्थनेचें काम सोंपविलेलें असे पोतृ, नेष्टृ आणि ब्रह्मा हे सोमयज्ञाच्या विधीला लागत असत. ब्रह्मा ह्याला ब्राह्मणाच्छंसिन् असें दुसरें नांव पूर्वीच्या विधींवर देखरेख करणाऱ्या आचार्यांहून हा निराळा असें दर्शविण्याकरितां दिलें होतें. ब्राह्मणाच्छंसी हा ब्रम्ह्याच्या हाताखालचा स्वतंत्र ऋत्विज आहे. ऋग्वेदांत जे इतर आचार्य उल्लेखिले आहेत ते सामगायन करणारे उद्गातृ व त्याच्या हाताखालचा प्रस्तोतृ हे होत आणि प्रतिहर्तृ या दुसऱ्या साहाय्यकाचें जरी वर्णन नाहीं तथापि त्या वेळेला तो माहीत होता. त्याच्या कामावरून असें वाटतें कीं, ही यज्ञाची किंवा विधीची उत्तर पायरी होय आणि ही पायरी म्हणजे एकपक्षीं यज्ञसंबंधीं आव्हानाच्या महत्प्रयासानें केलेल्या मालिकांची वाढ आणि दुसरेपक्षीं सोमवल्लीला उद्देशून गाइलेलीं लांब लांब गीतें. अच्छावाक, ग्रावस्तुत्, उन्नेतृ आणि सुब्रह्मण्य असे दुसरे आचार्य ब्राह्मणांतील सुधारलेल्या श्रौत विधींत आहेत; आणि अशा रीतीनें सर्व संख्या सोळा होते. विधींच्या दृष्टीनें या संख्येचे चार गट केले आहेत, ते असेः (१) होता, मैत्रावरुण, आच्छावाक आणि ग्रावस्तुत्;(२) उद्गातृ, प्रस्तोतृ, प्रतिहर्तृ व सुब्रम्हण्य; (३) अध्वर्यु, प्रतिप्रस्थातृ नेष्टृ व उन्नेतृ; (४) ब्रह्मा, ब्राह्मणाच्छंसिन्, आग्नीध्र आणि पोतृ. या आचार्यांशिवाय एक पुरोहित म्हणून असे आणि त्याचें काम म्हणजे राजाला धार्मिक बाबतींत उपदेश करावयाचा. गेल्डनेर म्हणतो कीं, जेव्हां पुरोहित यज्ञांत काम करीत असे तेव्हां तो ब्रह्मा या आचार्याचें काम करी. म्हणजे त्यानें सर्व विधींवर देखरेख ठेवावयाची असा नियम असे. या त्याच्या म्हणण्याला आधार म्हणजे ऋग्वेदांतील आणि तदनंतरच्या वाङ्मयांतील बरेचसे उतारे ( कीं, ज्यांत ब्रह्मा आणि पुरोहित हे एकच होत असे ) दिले आहेत: तथापि सयुक्तिक दृष्टीनें ओल्डेन्बर्ग म्हणतो कीं, जुन्या काळीं अशी गोष्ट नव्हती. त्या वेळेला पुरोहिताचें काम म्हणजे गीतें गाणाराचें होत्याचें काम होतें. ऋग्वेदकाळाला विधींची देखरेख करणारा ब्रह्मा हा माहीत नव्हता. त्यानंतर ब्रह्मा या ऋत्विजाची जागा निर्माण झाली. ब्रह्मा अध्वर्यु, व होता यांनां स्वतंत्र ऋत्विक्पद केव्हां प्राप्त झालें याबद्दल विभाग दोन यांत सविस्तर विवेचन आलें आहे. आणि याचें काम म्हणजे यापूर्वी पुरोहित जें करीत असे तेंच;आणि हा पुरोहित इष्टि वगैरेंनीं व मंत्रतंत्रांनीं राजाचें आणि राक्षसांपासून यज्ञाचें रक्षण करण्यांत वाकबगार असे. मनुष्यांचा मुख्य पुरोहित जो अग्नि हा देखील होतृ आहे ही गोष्ट आणि वरील विधान यांची एकवाक्यता आहे आणि आप्री सूक्तांतील दोन दैवीहोतृ ह्यांनां ईश्वरी पुरोहित असें

म्हणत. दुसऱ्यापक्षीं ऐतरेय ब्राह्मणांत असा कडक नियम आहे कीं, क्षत्रियाजवळ ब्राह्मण पुरोहित असला पाहिजे; आणि तैत्तिरीय संहितेंत वशिष्ठकुलाला ब्रह्मा या पुरोहिताच्या जागेचा खास मान असे. कदाचित् यज्ञसंबंधीं विधींत होतृ याचीं कामें ब्रम्ह्याकडे देणारे हेच पहिले पुरोहित असावेत याचें हें चिन्ह किंवा द्योतक असावें. पुष्कळ वेळां यज्ञ एका विवक्षित मनुष्याकरितां करीत असत. सत्रें किंवा लांबविलेले याज्ञिक विधी त्यांत भाग घेणाऱ्या सर्व आचार्यांच्या फायद्याकरितां करीत असत. परंतु त्यांच्यामध्यें जे दीक्षित म्हणजे दीक्षा घेतलेले असत त्यांनांच फक्त त्याचा फायदा मिळत असे. राष्ट्राकरितां म्हणून यज्ञ होतच नसत. राजाकरितां म्हणून जो यज्ञ करण्यांत येत असे तो प्रजेच्या कल्याणाकरितांहि असे हें जरी खरें आहे; तथापि कल्याणार्थ म्हणून जी प्रार्थना करीत तिच्यांत फक्त राजा आणि आचार्य यांचींच नांवें असत. केव्हां केव्हां त्यांत अप्रत्यक्ष रीतीनें प्रजेचीं गुरेंढोरें व शेती यांची भरभराट व्हावी असाहि उल्लेख असे.

क व ण.—हा शब्द ऋग्वेदांत एकदांच आला असून लुडविग्च्या मताप्रमाणें तो होतृ या उपाध्यायाचें किंवा यष्ट्याचें नांव असा अर्थ दर्शवितो. रॉथ म्हणतो कीं, हा शब्द विशेषण असा अर्थ दर्शवितो. पहिल्यानें त्याचा अर्थ दिला नाहीं आणि नंतर भित्रा, नामर्द असा अर्थ दिला आहे. सायणाचार्य म्हणतात कीं, त्याचा अर्थ 'पूजा करीत' असा आहे. ओल्डेनबर्ग म्हणतो कीं, याचा अर्थ निश्चित नाहीं. परंतु 'बलीचें हनन करणारा' असा अर्थ असूं शकेल.

[४] ने ष्टृ, नेष्टा.—ऋग्वेदांत व तदनंतरच्या ग्रंथांत सोमयज्ञाचे वेळीं हजर असलेल्या उपाध्यायांपैकीं एकाचें हें नांव आहे. यजमानपत्नीच्या कर्माशीं याचा जास्त संबंध येतो.

[५] पो तृ.—हें एका ऋत्विजाचें नांव आहे. यज्ञकर्मांत असणाऱ्या उपाध्यायांपैकीं हा एक ऋत्विज म्हणून याचें नांव ऋग्वेदांत आलें आहे व त्याचा ब्राह्मणांतून वारंवार उल्लेख येतो. परंतु ओल्डेनबर्गच्या मतें पुढील वाङ्मयांत 'पोतृ' हा कांहीं महत्त्वाचा ऋत्विज समजला जात नव्हता. तो केवळ नाममात्र जिवन्त राहिला होता. नुसत्या व्युत्पत्तीवरूनच ठरवावयाचें असतें तर पू = शुद्ध करणें या धातूपासून हा शब्द झाला असल्यामुळें असें वाटतें कीं, सोमपवनाच्या [ शुद्ध करण्याच्या ] वेळीं याचा सोमाचीं स्तोत्रें गाण्याकडे उपयोग करीत असावेत. पोत्र याचा पोत्याचें पद आणि सोमाचें भांडें असा दुहेरी अर्थ होतो. ऋग्वेदांत सर्व ठिकाणीं 'पोता पावयिता' असा अर्थ केला आहे व तोच योग्य दिसतो.

[६] प्र शा स्तृ.—हें नांव यज्ञाच्या वेळच्या एका याज्ञिकाचें नांव आहे. लहानसहान यज्ञांत हा कांहीं भाग घेत नाहीं. परंतु हा सोमयज्ञ व पशुयज्ञ यांत भाग घेतांनां आढळतो. स्तुतिपाठाच्या ऋचा गातेवेळीं दुसऱ्यांत हा एकटाच व पहिल्यांत होत्याचा मुख्य मदतनीस म्हणून सूक्तें म्हणण्याचें काम करतो. ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांतून हा आपल्या नांवानेंच उल्लेखिला गेला आहे. याला सुद्धां ऋग्वेदांत उपवक्ता म्हटलें आहे व या शब्दाची उत्पत्ति प्रशास्त्याप्रमाणें [ प्रैष ] आज्ञा करणें, दुसऱ्या पुरोहितावर हुकूम सोडणें या अर्थांत आहे. त्याचें दुसरें नांव मैत्रावरुण असें होतें. कारण त्यानें केलेली स्तुति मुख्यतः मित्र आणि वरुण यांनांच उद्देशून म्हटली जात असे. मित्र आणि व वरुण हे शब्द ऋग्वेदांतहि आढळतात. ओल्डेनबर्गच्या मताप्रमाणें आप्री सूक्तांतील दोन स्वर्गीय होते हे स्वर्गांतील 'होतृ व प्रशास्तृ' या अर्थी आलेले प्रतिशब्द होत.

[७] ब्र ह्म न्.—हा शब्द ऋत्विज या अर्थी ऋग्वेदाच्या बऱ्याच ऋचांतून व तदनंतरच्या वाङ्मयांतून नेहमीं आढळतो. ऋग्वेदाच्या बऱ्याच ऋचांतून तो देवांचीं स्तुतिस्तोत्रें गात आहे असा उल्लेख आला आहे. इतरत्र उपाध्याय हें नांव त्याला सार्थ आहे. एक दोनच नव्हे, तर अनेक ठिकाणीं उपाध्यायपणा हा एक धंदा होता असें स्पष्ट म्हटलें आहे. त्याचप्रमाणें कित्येक ठिकाणीं या शब्दाला एक विशिष्ट अर्थहि आहेच व तो अर्थ म्हणजे 'उपाध्यायमंडळाचा एक घटक' हा होय. परंतु यज्ञकर्मांत भाग घेणारा उपाध्याय या विशिष्ट अर्थी हा शब्द कोठें कोठें घ्यावयाचा याबद्दल मात्र बराच मोठा प्रश्न आहे. हा शब्द या अर्थी उपयोगांत आला आहे याबद्दल खरी ग्वाही मूर व रॉथ यांनीं असल्या प्रकारचीं स्थलें शोधून काढून दिली आहे. गेल्डनर यास मात्र हा अर्थ बऱ्याच ठिकाणीं घेतांनां फार शंका वाटते. त्याचें म्हणणें असें आहे कीं, पुरोहित हा साधारणतः ब्राह्मण [ संकुचित अर्थांत मात्र ] असे. ओल्डेनबर्गच्या मताप्रमाणें यापैकीं बहुतेक सर्व ठिकाणीं ब्रह्मन् = उपाध्यायच. [ पुरोहित हा तत्वतः याज्ञिक चालविणारा सामान्य उपाध्यायांपैकीं बहुधा नसे.] यज्ञांत काम करीत असे व तें बहुधा होत्याचेंच असें. हें पौरोहित्य पुढें ब्रह्म्याकडे आलें. हा फरक घडून येण्याचें कारण त्याच्या मताप्रमाणें ऋचांचें महत्त्व उत्तरोत्तर कमी होत गेलें व यज्ञकर्मांत सर्व व्यवस्था पाहणाऱ्या उपाध्यायावर जास्त जास्त बोजा पडूं लागला व तो आपल्या मांत्रिक शक्तीनें चुकांची दुरुस्ती करूं लागला हें होय. पुढील वाङ्मयांत हे दोन्ही अर्थ अगदीं परिचित असे झाले आहेत.

[८] ब्र ह्म पु त्र.—'उपाध्यायाचा मुलगा' या अर्थानें कांहीं थोड्या ऋचांतून हा शब्द उपयोगांत आणला आहे. सायणाचार्यांच्या भाष्यांत ब्रह्मपुत्र या पदाचा 'ब्राह्मणाच्छंसी' या अर्थी उपयोग केलेला आहे. याचें काम म्हणजे शस्त्रपठण हें होय. सायणमतानें उपाध्यायाचा मुलगा या अर्थानें हा शब्द आलेला नाहीं.

[९] शमितृ.—ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें 'पशूची हत्या करणारा' व कधीं कधीं 'पाकसिद्धी करणारा' असा ह्या शब्दाचा अर्थ आलेला आहे.

[१०] होतृ.—वैदिक यज्ञांतला अतिशय महत्त्वाचा व जुना उपाध्याय म्हणजे होतृ होय; आणि अवेस्ता मधल्या उपाध्यायाप्रमाणें झओतरच्या तोडीचा तो आहे. औफ्रेबाभ ह्मणतात त्याप्रमाणें हा शब्द हू म्हणजे यज्ञ करणें, आव्हान करणें, या धातूपासून साधला आहे. ह्यावरून असा एक काळ होता कीं ज्या वेळीं होतृ हा याजक आणि गायक, दुन्हीं होता.पण खुद्द ऋग्वेदांतच होतृ याचीं कामें ठरलीं होतीं.त्याचें मुख्य काम म्हणजे शस्त्राचें पठण होय. तो जुन्या काळीं राजाचा पुरोहितहि होता पण पुढें हें काम अध्वर्यूकडे गेलें.

[११] प्रतिप्रस्थातृ.–ऋग्वेदोत्तर संहितेंतांतून व ब्राह्मणांतून हें एका ऋत्विजाचें नांव आलें आहे.हा अध्वर्यूच्या हाताखालीं काम करीत असतो. याचा ऋग्वेदांत उल्लेख येत नाहीं. परंतु ऋक्संहितेंत एकदां अध्वर्यू( दोन अध्वर्यू )असा उलेख आला आहे. कदाचित् याचा अर्थ पुढील ग्रंथांतून आल्याप्रमाणें अध्वर्यु आणि प्रतिप्रस्थातृ असा असावा. ओल्डेनबर्गच्या मतें येथें अध्वर्यु आणि अग्निच उद्दिश्य असावेत. व त्याचा हा तर्क कांहींसा साधार आहे.

[१२] प्रतिहर्तृ.—प्रतिहर्तृ हें नांव उद्गात्याच्या एका मदतनिसाचें असून सोळा पुरोहितांचे यादींत सांपडतें. हें ऋग्वेदोत्तर संहिता व ब्राह्मण यांत आढळतें.

[१३] प्रस्तोतृ.—हा उद्गात्याचा मदतीस असे. ह्याचें काम प्रस्ताव म्हणणें, किंवा 'सामन्' छंदांची प्रस्तावना गाणें हें होतें. ऋग्वेदांत याचा नामनिर्देश नाहीं. ही निव्वळ आकस्मिक गोष्ट असावी. कारण याचें प्रस्तोषत् असें रूप ऋग्वेदांत स्पष्ट आलें आहे. ऋग्वेदानंतरच्या वाङ्मयांत याचें नांव तर अगदीं वारंवार येतें. प्रस्तोत्याचें प्रशास्तृ हें आधींचें नांव आहे असें लुडविग् चुकीनें म्हणतो.

### यज्ञपात्रें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंक (आंकडा) | कोश (द्रोणकलश) | द्रु (लांकडीपात्र) |
| अभिप्रमुर (जुहूचें विशेषण) | ग्रह | द्रोण |
| | घृताची (स्रुक्) | नीक्षण (काटा, पळी) |
| [१]अमत्र | घृतासुती | |
| अवत (द्रोणकलश) | [३]चमस | पोत्र |
| आसेचन | [४]चमू (चमस) | प्रयस्त |
| आहाव(द्रोणकलश) | चषाल | प्रशास्त्र |
| [२]उखा | [५]जुहू | [९]महाकुल |
| उलूखल | तरु (ग्रह = पात्रविशेष) | मांस्पचनी (उखा) |
| ऊष्मण्यापिधान (वाफ येण्यासाठीं झांकण) | | रातिनी (जुहूविशेषण) |
| | [६]दर्वि (पळी) | |
| | देवद्रीची (स्रुच्) | [७]शुक्र |
| शुनहोत्र (पात्रविशेष) | सूना (सूरी) | [१२]स्रुव |
| | [११]स्रुच् | हारियोजन |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निहोत्रहवणी | उपांशु | पूर्णपात्र |
| अतिग्राह्य | उलूखल | प्राशित्र |
| अन्तर्याम | ऊष्मणि (झांकण) | प्रोक्षणी |
| अन्तर्यामपात्र | कपाल | मन्थिन् |
| अमत्र | करम्भपात्र | मन्थिपात्र |
| आग्रयण | ग्रह | मुसल |
| आज्यग्रह | जुहू | मेदस्वत् (इडापात्र वि.) |
| आदित्यग्रह | दधिग्रह | |
| आर्तपात्र | दर्वी | यज्ञायुध |
| आश्वथ्य (पिंपळाच्या लांकडाचें पात्र) | द्रोण | शुक्र |
| | द्रोणकलश | शुक्रपात्र |
| | व | शुक्रामन्थिन् |
| उखा | ध्रुवा | शूर्प |
| उदकुम्भ | नीक्षण | सवितृपात्र |
| उदपात्र | पत्नेजनी | स्थाली |
| उपभृत् | पात्नीवत | स्फ्य |
| उपवेष | पात्र | हारियोजन |
| उपशय | पूतभृत् | हिरण्यपात्र |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अमत्र | तिर्यकबिल (पात्र वि.) | प्रोक्षणी |
| आयवन | | भुजिष्य |
| उखा | तुष | मुसल |
| उपभृत | दर्वी | विङ्गह (मांस पाचक) |
| उलूखल | द्रोणकलश | |
| कंस | ध्रुवा | शूर्प |
| कुंभी | नेक्षण | स्थाली |
| | नीललोहित | स्फ्य |
| चमस | पंचबिल | स्रुक् |
| जुहू | पवित्र | स्रुव |

[१] अमत्र.—गाळलेला सोमरस ज्या भांड्यांत ओतीत व ज्यांतून देवतेला भाग देत असत तें भांडें.

[२] उखा.—ऋग्वेदापासून पुढें याचा अर्थ पाकनिष्पत्तीचें ( विशेषतः यज्ञसंबंधीं ) भांडें असा आहे. हें मातीचें बनविलेलें असे.

[३] चमस.—चमस म्हणजे पेयपात्र. यज्ञाच्या वेळीं सोम ठेवण्यास याचा उपयोग करीत. ऋग्वेदापासून पुढें याचा उल्लेख बरेच वेळां आला आहे. तें लांकडाचें असल्यामुळें त्याला द्रु असें म्हणत. तें उदुम्बरलांकडाचें करीत असत असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे.

[४] चमू.–ऋग्वेदांतील हा शब्द जरासा अनिश्चित अर्थाचा असून त्याचा संबंध सोम तयार करण्याकडे दाखविला आहे. झिमर म्हणतो कीं, द्विवचनांत उपयोग केला म्हणजे त्याचा अर्थ ज्या दोन फळ्यांत सोम दाबतात त्या दाबून झाल्यावर सोमाचा रस ज्या भांड्यांत ओततात तें भांडें असा जो रॅाथचा अर्थ आहे तो साधारण बरोबर आहे. अनेकवचनी हा शब्द येतो त्या वेळीं असाच अर्थ होतो असें हिलेब्रँटचें म्हणणें आहे. कारण तो मागाहूनच्या विधींतील ग्रहपात्रें ह्यांच्याशीं जुळता आहे; आणि कधीं कधीं ह्याच अर्थी तो एक वचनींहि उपयोगांत आणितात. कांहीं ठिकाणीं तो म्हणतो कीं ह्याचा अर्थ उखळ, ज्यांत सोम कांडतात तो खल हा अर्थ बरोबर असेल. कारण इण्डो–इराणि–यांची सोम काढण्याची हीच रीत होती. शतपथ ब्राह्मणांत साधित शब्द या रूपांत हा शब्द आला असून तेथें त्याचा अर्थ प्रेतें ठेवण्याकरितां दगडांचें किंवा विटांचें केलेलें स्थान असा आहे.

[५] जुहू.—हा शब्द ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत जिभेच्या आकाराची पळी–जिच्यांतून देवास तूप दिलें जात असे— अशा अर्थानें आला आहे.

[६] दर्वि अथवा दर्वी.—ह्याचा खरा अर्थ पळी असा असून ह्याच अर्थी ऋग्वेदांत व पुढेंहि हा शब्द आला आहे. परंतु अथर्ववेदामध्यें ह्याचा 'सापाची फणा' अशा अर्थी उपयोग आलेला आहे. झिमरच्या मतें ह्याचा अर्थ साप असा आहे.

[७] द्रु.—ह्याचा अर्थ लांकडाचें बनविलेलें भांडें, विशेषतः सोमयज्ञाचे वेळीं उपयोगांत आणिलेलें भांडें, व कदाचित् हिलेब्रँटच्या म्हणण्याप्रमाणें चाळणींतून ओततांना ज्यांत सोमरस धरतां येईल असें भांडें असा आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत ह्या शब्दाचा अर्थ लांकूड असा आहे.

[८] द्रोण.—ऋग्वेदांत लांकडी द्रोण अशा अर्थानें व विशेषतः अनेकवचनीं हा शब्द आला असतांना सोमरस धरून ठेवण्याकरितां केलेलीं भांडीं असा त्याचा अर्थ आहे. सोमरस सांठवून ठेवण्याकरितां जें मोठें लांकडी भांडें असे, त्याला द्रोणकलश असें नांव असे. कधीं कधीं द्रोणाच्या आकाराची वेदीहि केलेली असे.

[९] महाकुल—म्हणजे मोठ्या कुलांत जन्मलेला. हें पेल्याचें (चमस) नाव ऋग्वेदांत आलें आहे. या शब्दाच्या अलंकारिक उपयोगावरून कांहीं कुलांचें श्रेष्ठत्व ऋग्वेदकाळीं मान्य झालें होतें असें दिसतें.

[१०] शुक्र.—कै. लोकमान्य टिळकांच्या मताप्रमाणें ऋग्वेदांत दोन ठिकाणीं ह्याचा अर्थ ग्रह असा आहे. मॅकडोनेलच्या मतें हा अर्थ अगदीं असंभाव्य आहे [ तैत्तिरीय संहितेपासून पुढे या शब्दाचा सोमाचें पात्र या अर्थी उपयोग होऊं लागला ].

[११] स्रुव.—स्रुच् मोठी म्हणजे लांकडी पळी ( हिचा उपयोग अग्नींत तूप ओतण्याकडे असे. ) असा अर्थ ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें आहे. हिचा दांडा एक कांख –हात-लांब असून माथळा हाताच्या पंजा एवढा व पळींतून धार पडण्याचें ठिकाण चोंचीच्या आकाराचें असे.

[१२] स्रुव. –स्रुच् ह्याच्या उलट स्थालींतून मोठ्या पळीकडे ( जुहू ) नेण्याकरितां उपयोगी पडणारी लहान पळी असा सूत्रग्रंथांत अर्थ आलेला आहे. उलटपक्षीं ऋग्वेदामध्यें सोमद्रव्य देण्याकरितां हिचा उपयोग होत असे.

## यज्ञविशेषनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अतिरात्र | त्रिकद्रुक | प्रातःसव |
| अनुयाज | परिवत्सर | ब्रम्हसव |
| इष्टापूर्त | पश्विष्टि | माध्यंदिनसवन |
| इष्टि | पितृयज्ञ | सूक्तवाक |
| कुण्डपाय्य | प्रयाज | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निष्टुत् | घर्म (याग वि.) | नवरात्र |
| अग्निष्टोम | चतुर्विंशतिरात्र | पंचदशरात्र |
| अग्निसव | चातुर्मास्य | पंचरात्र |
| अग्निहोत्र ( याग- | (याग वि.) | पुनराधेय |
| वि. ) | छंदोम | (यागवि.) |
| अग्न्याधेय ( याग- | ज्योतिष्टोम | पष्ठ्य |
| वि. ) | त्रयोदशरात्र | बहिष्पवमान |
| अतिरात्र | त्रिरात्र | (कर्मवि.) |
| अर्काश्वमेध | त्रिवृत (कर्म वि.) | ब्रह्मसव |
| अविवाक्य | त्रैधातवीय | [१] राजसूय |
| अश्वमेध | (यागवि.) | वरुणप्रघास |
| अष्टरात्र | त्र्यतिरात्र | [२] वांजपेय |
| अहीन | त्र्यह | विश्वजित् |
| आयुष्टोम | दर्शपूर्णमास | षट्त्रिंशद्रात्र |
| उपयज् | (यागवि.) | सत्र |
| उपसद् ( याग- | दशपेय | सप्तदशरात्र |
| वि. ) | दशरात्र | सप्तरात्र |
| उभयतोज्योतिष | दाक्षायणयज्ञ | सर्वतोमुख |
| एकरात्र | दीर्घसत्र | सर्वपृष्ठ |
| एकोनपंचाशत् | द्वादशरात्र | [३] सर्ववेदस् |
| गोष्टोम | द्विरात्र | सौत्रामणि |

[ अथर्ववेद. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निष्टोम | अतिरात्र | उपसदा (यागवि.) |
| अग्निहोत्र | अभिजित् | एकरात्र |
| (कर्मवि.) | अर्क | कुण्डपाय्य |
| अग्न्याधेय | अश्वमेध | चतूरात्र |
| (कर्मवि.) | उक्थ्य | चातुर्मास्य |

| | | |
|---|---|---|
| त्रिकद्रुक | प्रक्रीः | सत्र |
| दाक्षायण | प्रातःसवन (कर्मवि.) | सत्रसद |
| द्वादशाह | राजसूय | सद्यस्क्री |
| द्विरात्र | वाजपेय | सप्तरात्र |
| पंचरात्र | विश्वजित् | सान्हातिरात्र |
| पशुबन्ध (यागवि.) | [4]विषूवंत | सौत्रामणि (यागवि.) |
| पितृयज्ञ (यागवि.) | शतयाज | स्थालीपाक (यागवि.) |
| पौर्णमास (यागवि.) | षडह | |
| | षड्रात्र | |
| | षोडशी | |

[ संहितेतर ]

| | |
|---|---|
| [5]बृहस्पतिसव | [6]सर्वचरु |

## यज्ञसामान्यनामें [ ऋग्वेद. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निधान | देवहूति | विभाग |
| अदक्षिण (सत्र) | नमोवाक | विमान |
| अधिषवणी | नार्य | विष्णु |
| अध्वर | नृषदन | विह्व |
| अनुष्टुभ | पंक्तिराधस् | वेन |
| अभिह्विति | परीमाणि | शेवार |
| इन्दु | पूर्वहूति | संहोत्र |
| इष्टि | प्रजापति | समन |
| उदृचि (यज्ञ-समाप्ति) | प्रभर्मन् | समृत |
| ऊधन् | प्रातःसव | सव |
| ऋत | बर्हिष | सवन |
| ऋतयु | बर्हिष्य | सत्र |
| ऋतयुज् | ब्रह्मन् | सहस्रदक्षिण |
| क्षेत्र | भर | साति |
| गृहमेधीय | भार्मन् | सुमख |
| [7]घर्म | भुर्वणि | सुयज्ञ |
| जीराध्वर | मख | स्तीर्णबर्हिष् |
| त्रेतिनी | मात्रा | स्वध्वर |
| दिविष्टि | मियेध | स्वाहाकृति |
| दिविस्पृश् | [8]मेध | स्विष्ट |
| दीर्घप्रयुज्य | मेधसाति | हविष्कृति |
| दीर्घप्रसद्मन् | यजथ | हव्यजुष्टि |
| देवकर्मन् | यजस् | हव्यदाति |
| देवताति | यज्ञ | होत्र |
| देवत्रा | यामहूतम | होमन् |
| देववीति | विदथ | |
| | विधर्मन् | |

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अध्वर | क्रतु | मेधस् |
| इष्टि | मख | यज्ञ |
| यज्ञक्रतु | सव | हव |

[ अथर्ववेद. ]

| | | |
|---|---|---|
| अध्वर | देव | यज्व |
| काव्य | पूर्वहूत | स्विष्टि |
| क्रतु | मख | हव |

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| चतुःशृंग | नृपाय्य | विप्रराज्य |

## यज्ञसाधनें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्निधान | त्वच् | [11]यूप |
| अरणी | दर्भ | योग (यज्ञशकट) |
| आज्य | पवित्र | सद् (यागगृह) |
| आप्नान (तीर्थदेश) | परिधि | [12]समित् (ध्) |
| इध्म | पशु | सूना (छेद) |
| ऊधस् (सोमाभिषवण चर्म) | पशुसाधनी | [13]स्वरु (लांकडी सुरी) |
| ऋण (हविर्द्रव्य) | प्रजनन (दर्भपिंजूल) | हविर्धान (शकट, गाडा) |
| चर्मन् | [9]प्रस्तर | |
| | [10]बर्हिस् | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अजलोमन् | एकयूप (यूपवि.) | दर्भपुंजील (दर्भांचे शेंडे) |
| [14]अधिषवण | एधस् | दर्भस्तंब |
| [15]अग्नि | ऐक्षवी (रज्जुविशेषण) | दूर्वेष्टका |
| अर्कपर्ण | औदुंबरी (उंबराची मेढ) | द्वादशोद्यम (शिंकें) |
| अर्मकपाल (खापराचा तुकडा) | कर्ण (कुटलेले तांदूळ) | धनुष |
| अश्वयूप | [16]कृष्णाजिन | नवनीत |
| अश्ववाल | क्षुर (वस्तरा) | परशु |
| अश्वशक | गुग्गुलु | परिधि |
| अश्वाजनि (घोड्याचा चाबूक) | ग्रावन् (वरवंटे) | पशु |
| अश्वाभिधानी (रज्जुवि.) | चषाल ( यूपाच्या टोंकात बसविण्याचें चक्र) | पवित्र |
| अष्टाप्रुद् (आठ ठिपके असलेलें सोन्याचें नाणें) | दक्षिणा | पांसुर |
| इध्म | दण्ड (यज्ञदीक्षा घेतल्यावर यजमानानें हातांत धारण करावयाची काठी) | प्रस्तर |
| ऊष (क्षारमृत्तिका) | दर्भ | बर्हिस् |
| ऋजीष (सोमाचा चोथा) | | बल्वजा (तृणवि.) |
| | | बाण ( ,, ) |
| | | मुंज ( ,, ) |
| | | मृद् |
| | | मेखला (दोरी) |
| | | मौंज (तृणवि.) |
| | | यूपशकल |
| | | योक्त्र |

रशना
वल्मीकवपा
विघन
विश्वजनस्यछाया
शकल
शर्करा (चुनखडी)
शलाका
सन्नहन
समित् [..]
[17]हविर्धान
स्वधिति
हिरण्यशल्क

[ अथर्ववेद ]

आमीक्षा
कुश
गुल्गुलु (गुग्गुळ)
दर्भ
नैर्बाध्य (हवि)
बर्हिष्
भुजिष्य
भूरिमूल (दर्भ)
मुंज
मुद्गल
मुसल
यूप
योक्त्र
वर्षाज्य (पर्जन्य धारारूप आज्य)
शम्या
स्वरु
हवि

[ वाजसनेयि सं. ]

अम्भृण (शतछिद्र पात्र)
आसन्दी
कारोतर
कुंभी
राजासन्दी
वायव्य (पात्रवि.)
सत (वैतसपात्र)
सुराधानी (सुरापात्र)

[ संहितेतर ]

[18]धवित्र
[19]परिशास
[20]मेक्षण
[21]वेष्क

## यज्ञियपरिभाषा [ ऋग्वेद ]

[22]आहाव
दक्षिणा
[23]निविद्ध
पावमानी
प्रतिगर
[24]यजुष्
वषट्कृति
शंस (शंसन)
श्रौषट्
स्वधा
स्वाहा
स्वाहाकृत्

[ तै. सं. ]

असंज्ञान
अछम्बट्कार
अतिमोक्षणी (होमसंज्ञा)
अन्वाहार्य (चरुविशेषण)
आपोनप्त्रीय
अवभृथ
आघार
आज्यभाग
आधान
आप्री
आवह (आव्हान)
आत्रश्नन
आहवनीय
आहुति
इदंमधु
उक्थ्य
उक्थशंस्
उत्तरबर्हिस्
[25]उपवीत
उपस्तीर्ण
उपहव
उपयतोवैश्वानर
ऋच्
ऋग्मिय
एकाष्टक
गार्हपत्य
ग्रान्थि
चित्रवती
तप्तव्रत
दर्विहोम
दशर्च (मन्त्र वि.)
दशहोत्र
दीक्षा
दीक्षितवाद
देवभाग
देवयजन
देवयज्या
धारा
नमउक्ति
नमोवाक
नवती
निविद
पत्नीसंयाज
पथिकृत
पर्यग्नि
पर्यग्निकृत्
पुंस्वती
पुरस्तात्स्वाहाकृति
[26]पुरोनुवाक्या
[27]पुरोरुक्
प्रयाज
प्रयाजवत्
प्रयाजानुयाज
प्राचीनावीत
प्रातरनुवाक्
प्रातःसवन
प्रायण
प्रेष
प्रैष्य
बट्
बुध्नवती
बृहस्पतिवतो
ब्रम्हवाद्य
मनोता
यजमानभाग
यजुस्
यज्ञमुख
यमगाथा
[30]याज्या
याज्यानुवाक्या
रेभी
वट्
वाजवती
वात्सप्र
वात्सबन्ध
वात्सबन्धवित्
वैश्वदेव
वैश्वानरी
वैष्णव्य
व्याहृति
संस्कृति
संस्राव
समिद्वती
समिष्टयुजुस्
सर्पराज्ञी (ऋचा-वि)
सवनमुख
सामिधेनी (ऋचा वि.)
सूक्तवाच्
स्तबयजुस्
स्तुतशस्त्र
स्तुतस्तोम
स्तोक
स्तोत्रीय
स्तोम
स्तोमत्रयस्त्रिंश
स्तोमपृष्ठ
स्तोमभाग
स्थेमन्
स्वगाकृर्त
स्वगाकार
स्वधा
स्वधाकार
स्वाहा
स्वाहाकृत्
स्विष्टकृत्
हवन
होम
हौषा

[ अथर्ववेद ]

अध्रिगु
अनुवाक
अनुयाज
आर्त्विज्य
आप्रिय
आहुति
उपहूत
दीक्षित
दीक्षा
द्रप्स
नाराशंसी
परिस्तरण
प्रतिहार
प्रयाज
प्राचीनोपवीत
यज्ञवचस्
वषट्कार
वषट्कृत
सूक्तवाक
स्तोम
स्रुकार
स्वधा
स्वधाकार
स्वाहाकार
हिंकार
होम

[ वा. सं. ]

आश्रावय
धाय्या
निवित्
प्रत्ना
यज
ययजामहे

## परिभाषा, उपसर्गाक्षरे [ सामवेद ]

उपसर्गांची व्याख्या सूत्रकार व भाष्यकार पुढील प्रमाणें करितातः—अन्यत्रोपल[illegible]नि मंत्राक्षराणि अन्यत्र निविश्यंते (सायण). एत[illegible]शब्देनोच्यते (आश्व. सू. ६.३).

दिवोन
नव्यम्न
प्रवह्न

वेदिनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| इळा | धरीमणि | निधानी |
| तल्पिल | नाभा | वेदि |
| दोहना | नार्मिणी | शया |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| इळा | नाभि | वेदि |
| धिषणा | | |

[1] राजसूय.—तैत्तिरीय संहितेंत, अथर्ववेदांत आणि नंतरच्या वाङ्मयांत ज्यांत अभिषेक केला जातो अशा एका यज्ञाचें नांव आहे. सूत्रामध्यें या विधीचें बरेंच लांबलचक वर्णन दिलें आहे. परंतु त्याचें मुख्य स्वरूप ब्राह्मणामध्यें रेखाटलेलें आहे आणि त्या विधीच्या प्रसंगीं म्हणावयाचे मंत्र यजुर्वेदांच्या संहितेंत दिले आहेत. सामान्य विधीशिवाय या यज्ञाच्या प्रसंगीं लौकिक विधीहि करीत अशाविषयीं उल्लेख सांपडतात. उदाहरणार्थ राजाला त्याच्या दर्जाचीं वस्त्रें घालीत, आणि राजसत्तेचीं धनुष्यबाण हीं जीं चिन्हें तीं त्याच्या हातीं देत; नंतर त्याला अभिषेक करीत, नंतर तो एखाद्या नातेवाईकाच्या लटक्याच गाई हरण करी, किंवा एखाद्या राजन्याशीं लटुपटीचें युद्ध करी. नंतर तो फांसे खेळे, व तेथें तो हरत असे. आपण सर्व जगाचे मालक आहोंत हें दाखविण्याकरितां तो आकाशाच्या सर्व दिशांकडे जाई, व व्याघ्राचें बळ आणि पुढारीपणा दाखविण्याकरितां तो व्याघ्रचर्मावर उभा राही. ऐतरेय ब्राह्मणांत अभिषिक्त राजांची यादी दिलेली आहे. तेथें इंद्राच्या अभिषेकाला महाभिषेक म्हटलें आहे. शतपथ ब्राह्मणांत आणि शांखायन श्रौतसूत्रांत अश्वमेध करणाऱ्यांची यादी दिलेली आहे तिच्याशीं ही जुळते.

[2] वाजपेय.—तैत्तिरीय संहितेत याचा उल्लेख असून शतपथ ब्राह्मण व पुढें झालेल्या ग्रंथांत ब्राह्मण आणि क्षत्रिय यांनींच करण्याच्या यज्ञाचें हें नांव आहे. ह्याच ब्राह्मण ग्रंथात असें म्हटलें आहे कीं, हा यज्ञ राजसूय यज्ञापेक्षां श्रेष्ठ आहे. पण इतर सर्व ग्रंथ एक मतानें असें म्हणतात कीं, हा वाजपेय यज्ञ करणारा जर ब्राह्मण असेल तर हा यज्ञ बृहस्पतिसव यज्ञाच्या अगोदरचा ( म्हणजे कमी महत्त्वाचा ) यज्ञ आहे. यज्ञ करणारा जर क्षत्रिय असेल तर तो राजसूय यज्ञाच्या अगोदर करावयाचा यज्ञ आहे, व खुद्द शतपथ ब्राह्मणग्रंथाला हें कबूल आहे कीं, बृहस्पतिसव व वाजपेय यज्ञ हे एकच आहेत या यज्ञांतील मुख्य भाग म्हणजे रथाची शर्यत होय व ह्यां[illegible] करणाराला यश प्राप्त होतें. शांखायन श्रौतसूत्रावरु[illegible]सतें कीं, हा यज्ञ [illegible]ेय यज्ञाची [illegible]रण्यापर्यंत [illegible] थोडी जागा आपणांजवळ आहे. आर्य लोकांत रथाची शर्यत लावण्याची मूळची चाल होती. तिचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति म्हणजे हा यज्ञ होय व हा यज्ञ केला म्हणजे तो करणाऱ्याला त्या यज्ञाच्या प्रभावानें यश मिळतें. वास्तविक पहातां वाजपेय हा एखाद्या ब्राह्मणास अगर. क्षत्रियास पुरोहितत्वाचा अगर राजपदाचा अभिषेक होण्यापूर्वी त्यानें करावयाचा यज्ञ, असें जें एगलिंग म्हणतो तें खरें दिसतें. कुरुवाजपेय हा यज्ञ त्यावेळीं विशेष प्रसिद्धीस आलेला होता

[3] सर्ववेदस्.—तैत्तिरीय संहिता व ब्राह्मणग्रंथ ह्यांमध्यें ‘ज्यामध्यें यजमान आपलें सर्वस्व उपाध्यायांना देतो तो यज्ञ’ किंवा ‘एखाद्या माणसाची सर्व मिळकत’ असे याचे दोन अर्थ आलेले आहेत.

[4] विषूवत्.—अथर्ववेद व तदुत्तरचे ग्रंथ ह्यांमध्यें वर्षभर टिकणाऱ्या सत्रांतला मध्यमदिन असा याचा अर्थ आहे. कै. लोकमान्य टिळकांच्या मतानें विषूवाना शब्दशः अर्थ ‘ज्या दिवशीं रात्र व दिवस सारखे असतात तो दिवस म्हणजे विषुव दिन होय, व हाच खरा अर्थ आहे. पण हें मत अद्यापि ग्राह्य ठरलें नाहीं. विषूवान हा शब्द अथर्ववेदामध्यें एका घराच्या वर्णनांत आलेला आहे. ह्याचा अर्थ छपराचा दांडा किंवा आढें असा दिसतो.

बृहस्पतिसव —हें एका यज्ञाचें नांव आहे. तैत्तिरीय उपनिषदाप्रमाणें जो उपाध्याय पुरोहित होऊं इच्छितो तो तें पद या यज्ञानें मिळवितो. आश्वलायन श्रौतसूत्राप्रमाणें राजा राजसूय यज्ञ करीत असतां उपाध्यायानें वाजपेयानंतर हा यज्ञ करावयाचा असतो. शतपथ ब्राह्मणांत, उलटपक्षीं, बृहस्पतिसव व वाजपेय हे एकच असें म्हटलें आहे. परंतु हें साम्य खास पुरातन नव्हे.

[6] सर्वचरु.—ऐतरेय ब्राह्मणांत एका ठिकाणीं हा शब्द आलेला आहे. तो कौषीतकी ब्राह्मणांतहि असून त्या ठिकाणीं देव सर्वचरौ नांवाचा यज्ञ करीत आहेत असा उल्लेख आलेला आहे. पीटर्सबर्गकोशाप्रमाणें हें एका मनुष्याचें नांव असावें. हें एखाद्या स्थळाचें नांव असेल किंवा विशेषण सुद्धां असण्याचा संभव आहे. ऐतरेय ब्राह्मणांत सायणमतानें सर्वचरु हें एका स्थलाचें नांव आहे

[7] घर्म.—अश्विनांना देण्याकरितां दूध ज्या भांड्यांत तापवितात तें भांडें असा अर्थ ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत आहे. ह्या शब्दाचा ह्यावरून गरम दूध किंवा दुसरें कांहीं तरी तापविलेलें पेय असा अर्थ होतो. प्रयोग शास्त्राप्रमाणें हें एका विधीचें नांव आहे (वेदविद्या पृ. १२४व ३९८पहा).

[8] मेध.—ऋग्वेदाच्या वालखिल्य ऋचेंत हा शब्द आलेला आहे परंतु अर्थ संदिग्ध आहे. पीटर्सबर्गकोशाप्रमाणें हें एका याज्ञिकाचें नांव आहे. यज्ञालाहि सामान्यतः मेध असें म्हटलें आहे

प्र स्त र.—ऋग्वेदांत व तदनंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ 'यज्ञप्रसंगीं बसण्याकरितां गवताचें विणलेलें आसन' असा आहे.

१० ब र्हि स्.—हा शब्द ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथांत वारंवार आला आहे. याचा अर्थ गवताचा बिछाना, चटई (अथवा नुसते दर्भ) असा आहे. जेथें देवांना आव्हान होई त्या ठिकाणीं ही अंथरीत असत.

११ यू प.—ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ यज्ञस्तंभ असा आहे. यालाच यज्ञांतील बळी दिल्या जाणाऱ्या पशूला बांधीत असत. ऋग्वेदाप्रमाणें (१. ५१, १४) घराच्या खांबालाहि हें नांव होतें.

१२ स मि ध्.—ऋग्वेद व तदुत्तरचे झालेले ग्रंथ ह्यांमध्यें विस्तव पेटविण्याकरितां इंधन असा ह्या शब्दाचा अर्थ आहे. गेल्डनरच्या मतानें एका ठिकाणीं, ह्या शब्दावरून पुढें प्रसिद्धीस आलेल्या अग्निध नांवाच्या ऋत्विजाचा बोध होतो.

१३ स्व रु.—ऋग्वेद व तदनंतरचे ग्रंथ ह्यांत ह्याचा अर्थ खांब किंवा अगदीं बरोबर अर्थ म्हणजे यज्ञस्तंभाची किंवा यूपाची ढलपी असा आहे.

१४ अ धि ष व ण.—सोम दाबण्याकरितां ज्या दोन फळ्या उपयोगांत आणितात त्यांच्या अर्थी ह्या दोन अधिषवणांचा उपयोग केलेला आहे असें रॉथ आणि झिमर म्हणतात. तथापि हिलेब्रँट त्या विधीवरून म्हणतो कीं, त्या फळ्या एकावर एक ठेविल्या नसून एका मागे एक अशा ठेविलेल्या असत व त्यांच्यावर दगडानें सोम कुटीत. ही मीमांसा त्याचा शब्दशः अर्थ केल्यास बरोबर आहे असें सिद्ध होतें. आणि त्याचा अर्थ विशेषण धरून जरी केला तरी बरोबर जमतो. परंतु दक्षिणेंत सोमाच्या कांड्या पाहिल्यानें कातड्यावर ठेवितात आणि त्यांवर दोन फळ्यांपैकीं एक टेवून दगडानें ठेंचतात. नंतर त्या कांड्या बाहेर काढून पहिल्या फळीवर ठेऊन त्यावर दुसरी फळी ठेवितात अशी रीति हॉगनें पाहिली आहे.

१५ अ भ्रि.—अभ्रि म्हणजे खनित्र. वेदांमध्यें वारंवार येणारा हा शब्द आहे. शतपथ ब्राह्मणांत त्याचे निरनिराळे प्रकार आणि पदार्थ सांगितले आहेत. हें बांस, उदुम्बर किंवा विकंकत यांच्या लांकडाचें करितात. तें एक हात लांब असतें. तें पोकळ असून त्याच्या एका किंवा दोन्ही बाजूस तीक्ष्ण धार असते. ह्यावरून असें दिसून येईल कीं, याची कडेची आणि वरची बाजू कोणत्या तरी धातूची केलेली असते. अभ्रि म्हणजे कुदळीसारखें खणण्याचें साधन.

१६ कृ ष्णा जि न.—काळविटाचें (कृष्ण) कातडें असा याचा अर्थ आहे. त्याच्या धार्मिक बाबतींतील उपयोगावरून त्याचा उल्लेख मागाहूनच्या संहिता व ब्राह्मण यांत बऱ्याच वेळां आला आहे.

१७ ह वि र्धा न.—'हवि ठेवण्याचें स्थल' ह्याचा मूळचा अर्थ ज्यावर सोमवल्ली दाबून रस काढण्याकरितां नेली जात असे ती गाडी. नंतर ज्या ठिकाणीं सोमरसाचे चषक ठेवले जात ती जागा (हविर्धानमंडप) अशा अर्थानें हा शब्द प्रचारांत आला.

१८ ध वि त्र.—शतपथब्राह्मणांत आणि तैत्तिरीय आरण्यकांत याचा अर्थ 'यज्ञकुंडांतला अग्नि प्रफुल्ल करण्याकरितां कच्च्या किंवा कमावलेल्या कातड्याचा पंखा' असा आहे.

१९ प रि शा स.-अग्निकुंडांतून यज्ञांतली कढई काढण्याकरितां उपयोगी पडणारें चिमट्याच्या आकाराचें हत्यार असा याचा अर्थ आहे.

२० मे क्ष ण.—हविःपदार्थ ढवळण्याकरितां ब्राह्मणांत निर्देश केलेल्या लांकडाच्या कलथ्याचें नांव.

२१ वे ष्क.—शतपथब्राह्मण मध्यें यज्ञिय पशु गळा दाबून मारण्याकरितां केलेला गळफास अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

२२ द क्षि णा.—हा शब्द ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत आलेला असून त्याचा अर्थ यज्ञाच्या वेळीं उपाध्यायांनीं दिलेलें दान असा आहे. हें दान म्हणजे बहुप्रसवा धेनु. ऋग्वेदात दानस्तुतींत या शब्दाचें फारच महत्व वर्णिलेलें आहे व हें महत्व ब्राह्मणग्रंथात तर जास्तीच वाढत चाललें. एक गोष्ट अशी लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, हा जो दानांच्या वरतुंचा उल्लेख केलेला आहे त्यांत गाई, घोडे, बैल, उंट, दागिने व यासारख्या जंगम मालाशिवाय जमिनीसारख्या स्थावर मिळकतीचा बिलकूल नामनिर्देश नाहीं. शतपथब्राह्मणांत दक्षिणा म्हणून जमिनीचा उल्लेख केलेला आहे. पण अशा दानास ब्राह्मणग्रंथांची मुळींच संमति नाहीं. कारण सगोत्रजांच्या संमतीशिवाय जमीन दुसऱ्यास द्यावयाची नाहीं असा प्रचार सुरू झाला असावा.

२३ नि वि द्.—देवांच्या सन्मानार्थ असलेल्या प्रार्थनाग्रंथांमध्यें असलेली आमंत्रित देवतेची थोडक्यात प्रार्थना म्हणजे निविद् होय. ब्राह्मणग्रंथात शस्त्रामध्यें घातलेलें म्हणून या निविदाचा वारंवार उल्लेख आलेला आहे. ऋग्वेदांत जीं खिल सूक्तें आहेत त्यामध्येंहि बरेच निविद आहेत. पण असे संक्षिप्त सूत्ररूपाचे निविद् मात्र ऋग्वेदांत होते की नाहीं याबद्दल शंकाच आहे. तरी पण ऋग्वेदसंहितामध्यें निविद् शब्द वारंवार आला आहे. पण ब्राह्मणग्रंथातल्याप्रमाणें विशिष्ट अर्थानें नव्हे. मागाहून झालेल्या संहिताग्रंथांत हा विशिष्ट अर्थच रूढ झाला आहे.

२४ पा व मा नी.—ऋग्वेदामध्यें नवव्या मंडळांत सोमपवमानासंबंधींच्या (स्वतःला शुद्ध करणाऱ्या) ऋचा असा याचा अर्थ आहे. हे नाव अथर्ववेदांत, मागाहूनच्या ग्रंथात व कदाचित ऋग्वेदांतील एका सूक्तांत आलेलें आहे.

२५ य जु ष्.—वेदकालीन वाङ्मयांत ऋक् आणि सामन् यांच्याहून हा निराळा दाखविला आहे. यजुष् हा यज्ञाच्या

वेळेस म्हणावयाचा मंत्र आहे. याला गद्याचें किंवा पद्याचें रूप असूं शकेल.

[२६] उ प वी त.—यज्ञाच्या वेळीं डाव्या खांद्यावर ब्राह्मणांनीं घालावयाचें जानवें. त्याचा तैत्तिरीय संहितेंत व ब्राह्मणांत उल्लेख आलेला आहे. कै. लो. टिळकांचें म्हणणें असें आहे कीं, हें मूळचें जानवें नसून वस्त्र किंवा मृगचर्म होतें. हें म्हणणें संभवनीय आहे.

[२७] पु रो नु वा क्या.—'यागारंभीं म्हणावयाचा मंत्र'. ही पारिभाषिक संज्ञा आहे. पुरोनुवाक्येनें परमेश्वरास हवन स्वीकारण्यास निमंत्रण करावयाचें असतें. यानंतर याज्या होते व ती बलिदानाबरोबरच होते. अशा प्रकारचीं अभिमंत्रणें फार क्वचित् प्रसंगीं ऋग्वेदांत आढळतात असें ओल्डेनबर्गचें म्हणणें आहे.तीं पुढील वाङ्मयांत आढळतात. प्रत्यक्ष पुरोनुवाक्या हा शब्द नंतरच्या संहितांत व ब्राह्मणांत आढळतो.

[२८] पु रो रु क्.—ही पारिभाषिक संज्ञा कांहीं विशिष्ट निविद् मंत्रांची आहे. सकाळीं शस्त्रें किंवा त्यांचा कांहीं भाग म्हणण्यापूर्वी आज्य व प्रउग शस्त्रपठनप्रसंगीं प्रातःकालच्या सोमहवनाच्या वेळेस हे मंत्र म्हणत असत. मागाहूनच्या संहिता व ब्राह्मण यांतून पुरोरुक् आढळून येतात.

[२९] प्रा ची ना वी त.—आर्य लोक उजव्या खांद्यावरून डाव्या हाताखालीं अशातऱ्हेनें जानवें धारण करीत असत हइ उघड दिसतें. कारण प्राचीनावीतिन् हें नांव असें जानवें धारण करणाऱ्यास मिळे. परंतु लो. टिळकांच्या मतें हा शब्द जानव्यास उद्देशून नसून उपरण्यास उद्देशून आहे. तैत्तिरीय संहितेंत निवीत, प्राचीनावीत व उपवीत असे तीन शब्द आलेले आहेत. सायणाचार्यांच्या मतें हे शब्द जानवें किंवा वस्त्र कोणच्या वेळेस कसें घ्यावयाचें हें सुचवितात. सायणाचार्य म्हणतात—यत्रोभावपि बाहू न्यग्भूतौ संतौ ब्रह्मसूत्रेण वस्त्रेण वा वीयते संवृत्तावाच्छादितौ क्रियेते तन्नीवितम् । प्राचीनो दक्षिणो बाहुराधीयतेऽधस्तात्क्रियते यत्र तत्प्राचीनावीतम् ।

[३०] प्रै ष्य.—हा उपासनेसंबंधीं शब्द आहे व त्याचा अर्थ 'आह्वान', बोलावणें, सूचना, असा आहे. हा शब्द ब्राह्मण आणि संहिता यांमध्यें वारंवार आढळतो.

[३१] या ज्या.—यज्ञाचेवेळेस म्हणावयाचे मंत्र. संहितेंत आणि ब्राह्मणांत या शब्दाचा उल्लेख आहे.

[३२] आ ष्ट्री.—ऋग्वेदांत याचा अर्थ अग्निकुंड असा केला आहे. अशुभसूचक पक्षी या कुंडावर बसूं नयेत म्हणून त्यांची प्रार्थना करण्यांत येते.

[३३] च षा ल.—चषाल या शब्दाचा अर्थ यज्ञस्तंभावरील लांकडी अथवा लोखंडी कडें असा आहे व हा शब्द ऋग्वेदापासून पुढें झालेल्या ग्रंथांत अशा अर्थानें वापरला आहे. शतपथब्राह्मणांत एका ठिकाणीं चषाल गोधूमांनीं ( पिष्टानें ) तयार करावा असें सांगितलें आहे.

## यज्ञसंबंधीं किरकोळ [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्रतु | दाश्वध्वर | यजत |
| अद्दप्तक्रतु | दिविजय | यज्ञन्य |
| अद्भुतक्रतु | दुरोष | यज्ञप्रिय |
| अनवभ्रराधस् | देवयज्या | यज्ञमन्मन् |
| अभ्यर्धयज्वन् | द्रप्स | यतस्रुक् |
| अमितक्रतु | धुनिमत् | वरेण्यक्रतु |
| अयज्ञसाच् | नाराशंशी | वृषमन्यु |
| अवभृथ | नृवत्साखि | शतक्रतु |
| अवाट् | पव | शतमूति |
| अश्मन् | [१]पूर्त | श्रद्धामनस् |
| अस्तृतयज्वन् | पृष्ठयज्वन् | संवसन् |
| आयजिष्ठ | [२]बलि | संभृतक्रतु |
| आष्ट्री | ब्रह्मकार | [३]संहोत्र |
| आहुति | ब्रह्मी | साधदिष्टि |
| इष्टयामन् | ब्राह्मण | सामन् |
| ऋजुक्रतु | मखस्यन् | सोमधान |
| गृहमेध | मखस्यु | [४]स्तूप |
| जारयन्मख | मर्यश्री | सध्वर |
| तायमान | यक्षभृत् | हविरथ |
| दक्षिणावाट् | यक्षिन् | होतृसदन |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अग्नेयानी | उलूखलबुध्न | देवायुव |
| अन्यतोवैश्वानर | (यूप वि.) | द्रुसद |
| अपबर्हिष् | ऊर्णाम्रदस् | (पात्रवि.) |
| अप्रयाज | (दर्भवि.) | द्विपात्र (पात्रवि.) |
| अप्रस्रंस | ऊर्णावत् | धारा |
| अवयजन | (वेदिवि.) | ध्रुवाक्षिति |
| अविमत् | ऋतजित् | ध्रुवयोनि |
| आग्रयणाग्र | ऋतावृध | नखनिर्भिन्न |
| आत्मदक्षिण | घृतपदी | (हविर्वि.) |
| आत्मनिष्क्रमण | घृतसद | नवाश्रि (यूपवि.) |
| आसद् | घृतासुती | नारी (अग्निवि.) |
| उक्थशांसिन् | चतुस्रक्त (पात्रवि.) | निष्कृताहाव |
| उक्थामद | तिग्मतेजस् | (यज्ञस्थलविशे- |
| उत्तम | तेजोदा | षण) |
| उद्राव | त्र्यंग (हविःपदार्थ | परिवी |
| उपयामगृहीत | वि.) | पर्णमयी |
| (ग्रहवि.) | दाक्षिण्य | (पात्रवि.) |
| उपरसास्मित | दशर्षभ | परिश्रवस् |
| उपरिष्टात्स्वाहा- | देवहूतम | (पात्रवि.) |
| कृति) | (शकटवि.) | पार्वतेयी |

पुरस्ताद्भाग
पुरोडाशिनी (इष्टिवि.)
पुष्टि
पृथिविसद् (ग्रहवि.)
प्राणग्रह (ग्रहनाम)
प्रायणीय (चरुवि.)
बृहद्ग्रावन्
ब्रह्मचोदन (सोमवाहक-बलीवर्दविशेषण)
ब्रह्मिष्ठ
मेदस्वत् (इडाविशेषण)
यजमानदेवत्य (ग्रहवि.)
यज्ञवास्तु (यज्ञभूमिवि.)
यज्ञवेशस् (यज्ञनाश)
यज्ञशमल(अयज्ञ)
यमी (वोदोव.)

युवति(आहुतिवि.)
यूपत्व
विश्वज्योतिस्
विश्वराज्
वैणवा ( अभ्रिवि.)
व्याममात्री ( ,, )
शमीमयी ( समिध् वि. )
शरमय ( बर्हिवि.)
शर्करत्व
शुक्रवत्
शुक्राग्र
श्रुतसद (ग्रहवि.)
सत्राभिजित्
सदावृध
सपत्नसह
सपत्नहन्
सम्भार
समिध्
सशुक्त ( यज्ञवि. )
सहस्रदाक्षिण (यज्ञ-वि. ]
सहस्रभृष्टि (स्फ्य वि. ]
सहस्रवीर्य
सहूति

सिंही [ वेदिवि. ]
सुगोप[यजमानवि]
सुशमी
सुशर्म [ ग्रहवि. ]
सूत्रीय [ व्रतवि. )
सूपावसाना (इडा वि. )
सोमवामी [ सोम-ओकणारा )
स्तूप
स्वगाकृत (यूपवि.)
स्वयंदिव [बर्हिवि.]
स्वयमातृण्ण
स्वयंकृत
स्वस्त्ययीन [ यज्ञ-प्राप्ति )
स्वाग्रयण
हविरद्य [ हविर्भक्षण]
हव्यदाति [हविदान ]
हिंकर्तृ
हिरण्यमूर्ध्नि
होतृ
होत्रीय

सदोहविर्धान
सत्रममानं
सुकर्मन्
सुशंस

सुस्त्रि ( चांगला सोम कुटणारा)
सुहुत
स्वध्वर
हविस्

हव्य
होतृसदन
होत्र
होत्राविद्
होत्रिय

### यज्ञविषयक किरकोळ विशेषणें [ ऋग्वेद ]

अदुर्मुख ( यजमान )
अभिष्टिकृत्
अमविष्णु
आनजान
आशिर ( यज्ञफल)
इष्कृताहाव
इष्टा
उरुक्षय ( यजमान )
ऋतसाप
ऋतस्पृश्
ऋतेजा
क्रतुप्र
क्रतुवित्
गर्भ
गृभीततताति
घर्मसद्
घृतपृच्
जीवयाज

त्रितन्तु
त्रिबर्हिष्
ददुष् (यज्ञकरणारा )
दाश्वध्वर ( दत्तहविष्क)
दीर्घश्रुत
द्रोण्य ( यूपार्हपशु )
पुरुप्रैष
पुरुमेध
पुरूची
पूतबन्धनी
मियेध ( यजमान )
मेध्य
विमान (कर्मसाधन )
शुक्रपूतव
सचथ
सहप्रभ

( यज्ञसाधन-ज्ञानसहित )
सहस्तोम
सहस्रवीर
सहस्रसाव
सुचक्षस्
सुबार्हिष्
सुयज्ञ
सुहव
स्तीर्णबर्हिष्
स्तोमवाहस्
हवनस्यद
हवीमन्
हव्य
हव्यसूद
हस्तगृह्य
हस्तच्युत्
होतृमत्
होतृवूर्य
होत्रवाह

### [ अथर्ववेद ]

अभिधान
अतिसर ( यज्ञ पार पाडण्यासाठीं केलेले प्रयत्न )
अधिषवण
आभिष्टि
अभिघारित
अवय ( यागवि.
आर्द्रपवित्र,
आसुति
आहृतयज्ञक्रतु ...
इन्द्रजूत
ऋतस्पृश्
घर्मदुघ
चतुर्होतृ

जीवबार्हिस् (यागवि. )
तौल ( हविर्वि. )
दुरिष्टि
देवयजन
दैव
धीरण
निधन
पंचौदन
परिवेष्टृ
पाकबलि
पात्रहस्त ( यजमान वि. )
पृथुबुध्न ( ग्रावा )
पौर्णमासी ( यागवि.]
प्रदक्षिणित्

प्रमन्दनी
प्रयक्षु
बर्हिष्मत्
मधुमत्तम
मेध्य
यातुधानक्षयण
वर्षाज्य
वायव्य
विदथ्य
वृक्तबर्हिस्
व्रत
शतधार (तुपाच्या नदीचें विशेषण )
शतपवित्र
संस्राव्य
संहोत्र

### यज्ञविशेषणें [ तै. सं.]

अग्निष्टोमप्रायण
अछंदोम
अध्वरकल्प
अरिष्ट
अयजुष्क
असत्र
असाम
अपिशर्वर
उत्सन्नयज्ञ
गोसनि
त्र्यावृत्
देवचक्र
देवसत्र
द्विव्रत

धनसाति
परःसामान
पाकयज्ञ
प्रयत्
मत्प्रायण
महाव्रतवत्
यज्ञपरुस्
यज्ञमुख
शतरुद्रीय
समेध
सरस्वान्
सर्ववेदस्
सर्वस्तोम
सलोम

सहसूक्तवाच्
सहूति
साशीर्क
सुक्रतु
सुहवस्
सेन्द्र
स्वध्वर
स्वादीय
स्वादु
स्वाहुत
स्विष्ट
स्विष्टि

[1] पूर्त अथवा पूर्ति.-हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांमध्यें आढळतो. याचा अर्थ उपाध्यायास त्याच्या कामा-

बद्दल दिलेलें बक्षीस असा आहे. ऋग्वेदांत (६ १६,१८) या ठिकाणीं आलेला पूर्त शब्द सायणाचार्यांच्या मतें विशेषण असा आहे व त्याचा अर्थ 'पुरून उरणारें अतएव व्यापक' असा ते घेतात ऋग्वेदांत [६.१३,६] या ठिकाणीं आलेल्या पूर्ति शब्दाचा अर्थ सायण भाष्यांत 'परिपूर्णः' असा दिला आहे. व ऋग्वेद १०.१०७,३ या ठिकाणीं सायणभाष्यांत पूर्ति याचा अर्थ पालनी किंवा पूरयित्री असा केला आहे

[२] बलि.–हा शब्द ऋग्वेदांत अनेक वेळां येतो त्याचप्रमाणें पुढील ग्रंथांतहि तो वारंवार येतो. त्याचा अर्थ यज्ञातील हवन ' किंवा ' राजाला कर देणें असा होतो. झिमरच्या मतें दोन्ही प्रसंगांचें समर्पण आपखुषीचें असे. तो ह्याच्याशीं टॅसिटसच्या ग्रंथांत आलेल्या अशाच जर्मन प्रकाराची तुलना करितो. त्या प्रसंगीं त्या जातींचे राजे बक्षीस म्हणून दिलेल्या वस्तू स्वीकारीत असत परंतु हा कांहीं नेहमींचा कर नसे. परंतु अशा मताला कोणत्याच प्रकारचा आधार नाहीं. राजाचे विशेष हक्क उत्पन्न व्हावयाला प्रथम लोकांचीं स्वसंतोषाचीं कृत्यें कारण झालीं असलीं पाहिजेत यांत शंकाच नाहीं. परंतु वेदांत उल्लेखिलेले लोक जेते असल्यामुळें ते ह्या स्थितींत असतील असें संभवत नाहीं. वेदकालीन आर्यांचें आपल्या देशाविषयींचें धोरण समर्पणाच्या बाबतींत स्वसंतोषाच्या देणग्यांशीं व तसेंच काभारांशीं अगदीं जुळतें होतें. परजातींच्या बाबतींत मात्र बलि याचा अर्थ करभार असा ऋग्वेदांतहि केला पाहिजे असें झिमरहि कबूल करितो.

[३] संहोत्र.—हा शब्द ऋग्वेदांत एकदांच आला असून गेल्डनेरच्या मतानें तेथें त्याचा अर्थ शाखा किंवा संप्रदाय असा आहे. उदाहरणार्थ विधीच्या शिष्यांचा संप्रदाय.

[४] स्तूप.–ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यामध्यें याचा अर्थ डाक्याच्या अगदीं वरचा भाग दाखविणारी शेंडीची गांठ असा आहे.

### यज्ञकरणारे [तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अर्दुमख | त्वद्विवाचन | पुष्टिपति |
| अध्वरकृत् | दम्पति | प्रयज्यु |
| अपशु | दर्शपूर्णमासयाजी | प्रयस्वत् |
| अपात्मन | दीक्षापति | बहुयाजी |
| अब्राह्मणोक्त | दीक्षित | ब्रह्मकृत् |
| अरिष्ट | देवदूत | यजनीय |
| अर्चितृ | देवभक्त | यज्ञपति |
| अव्रत्य | देवयू | यज्ञविभ्रष्ट |
| उक्थपात्र | धृतव्रत | यज्वन् |
| उपयज् | नेमाधित | यष्टृ |
| क्षुत्सम्बाध | पविरी (यजमान पत्नी वि.) | वामजात |
| गृहमेधिन् | | श्रद्धामनस् |
| चित्राति | पुरु | संवत्सरसत् |
| सत्रिन् | सुगार्हपत्य | सोमपीथ |
| समानदक्ष | सुगृहपति | सोमयाजी |
| सर्शीर्ष | सुपत्नी | स्वरण |
| सहजानि | सुमुखस्यमान | हविर्धानी |
| सहस्रजानि | सुम्नयु (यजमान-वि.) | हविष्कृत् |
| सहस्रयाजी | | |
| सात्मन् | सुव्रत | |

### यज्ञिय विशिष्टस्थलें [तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अंतर्वेदि | गर्तमत् | यजमानायतन |
| अन्तःसद | चात्वाल | वेदि |
| अरण | दक्षिणसद | वेदिसम्मित |
| आग्नीध्रीय | दीक्षितविमित | वेद्यन्त |
| आवपन | नाभि | सद |
| उत्तरवेदि | प्राचीनवंश | सोदक |
| उत्तरसद | बहिःपरिधि | स्तीर्णबर्हिस् |
| उपरव | बहिर्वेदि | स्वयंकृत |
| ऊवध्य | मार्जालीय | हविर्धान |

### सोमनामें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अंशु | तुरःपेय | ब्रह्मन् |
| अन्धस् | दुग्ध | मद |
| अन्न | द्रप्स | मधु |
| अमृत | नियव | रस |
| आशीर्वन् | पर्वतावृध | वनस्पति |
| इन्दु | पितु | वेना (सोमपत्नी) |
| गिरिष्ठ | पीयूष | सोम |
| चमस | पूर्वपाय्य | |

### सोमविशेषणें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अगृभीत | इष्टयामा (इष्टगगमन) | गोन्योघ |
| अग्रवीति | | गोरभस् |
| अग्रेग | उत्तमाय्य | गोश्रीत |
| अचोदस् | उपस्तुत् | गोषा (गवांसोता) |
| अत्यूर्मि | उरुष्य | चमूषत् |
| अद्रिदुग्ध | ऋतद्युम्न | चम्रीष |
| अनभिशस्तृ | ऋदूदर | चित्रबर्हिस् |
| अभिगीत | ऋषिषाह् | जम्भसुत |
| अभिशस्तिप | ऋषिसान | जीवत् |
| अभ्युन्दत | क्षयद्वीर | जीवबन्ध |
| अवपान | क्षैत | तीव्रसुत |
| अश्वत्थ | गयसाधन | तृष्णु |
| आपान | गवाशिर | तृप्तांशु |
| आपीत (पीतवर्ण | गोऋजीक | त्रिपृष्ठ |
| इन्द्रपीत | गोजित् | त्र्याशिर |
| इन्द्रमादन | गोजीरा | त्र्युदाय |

दध्याशिर
दुःसह
देवजात
देवपान
देवमादन
देवावी
देवाव्य
द्रवयित्नु
धनंजय
धीजव
धीजवन
धीजु
निचुम्पुण
नृमादन
नृम्णवर्धन
नैगुत
पयोवृध
पवमान
पावक
पूर्वसु
प्रियसास्
प्रियस्तोत्र
बहुलान्त
भरेषुजा
भूरिचक्षस्
भूरिधायस्
मतवस्
मत्सर ( मदकर)
मदच्युत्
मदिन्तम
मदिष्ठा
मद्य ( मदकर )
मद्वन्
मधुमत्

मन्द्राजनी
मर्ज
मर्मृजान
महिव्रत
यज्ञश्री
युवायु
रक्षोहन्
रजस्तुर
रथसंग
रस
रसाय्य
रसाशिर
रसिन्
रुरुक्षणि
वनक्रक्ष
वयाकिन
वराह
वरिवोधातम
ववर्जुषी
वाजगन्ध्य
वातापि
विभूवसु
विश्वचक्षस्
विश्वजित्
विश्ववित्
वृषच्युत
वृषव्रत
वृषसव
शतचक्र
शतधन्य ( शत- क्रीत )
शतवाजस् ( बहु- बल )
शतविचक्षण

शरुमत्
शुचिबन्धु
शुचिव्रत
श्रद्दधान
संवृक्तधृष्णु
सत्यकर्मन्
सत्यमुग्र
सनद्रयि
सभासाह
समद
समद्वन्
समन्यु
समाशिर
सहस्रधार
सहस्रनीति
सहस्रौजस्
सहस्रभर्णस्
सहस्रभृष्टि
सामन्य
सुत
सुतपेय
सुत्वन्
सुष्वाण
सुसुत
सुहव
सोमसाम्
स्वाभु
हर
हरिश्चंद्र
हरित्वत्
हिरिश्री
हियान
हृत्स्वस्
हृदंसनि

## सोम वसोमाभिषव संबंधीं [ ऋग्वेद ]

अण्व (सोम गाळा वयाच्या वस्त्राचीं भोकें)
अक्षयाध्रुक्
अद्रिज
अद्रिसुत
अपच्यमान
असुत
असुन्वत्

उत्खिच्छत्
[1]उपर
उलूखलसुत
ऋजीषिन्
गोपीथ
[2]द्रप्स
धानावत्
[3]धिषणा
परसुत

परिसुत
[4]पवित्र
पाकसुत्व
पूर्वपेय
बहुपाय्य
युक्तग्रावन्
वयुनवित्
[6]विप्
श्येनजूत

श्येनभृत्
साव
सुत
सुतक्त
सुतप
सुतपावन्
सुतसोम
[1]सुतेगृभ
सुन्वन

सुसुपान
स्तोतृ
सोमकाय
सोमगोप
सोमपरिबाध
सोमपर्व
सोमपातम
सोमपावत्
सोमपृष्ठ

सोमरभस्तर
सोमराज्ञी
सोमावती
सोमशिता
सोमसुत्
सोमसुति
सोमसुत्वन्
सोमान
सोमिन्

### [ तै. सं. ]

अंशु
अम्ब
आपान्तमन्यु
इष्टयजुस्
उद्वयस्
क्षीरश्री
गभस्तिपूत
गयस्फान
तीव्रसोम
देवपान
नराशंस
नराशंसपीत
पवमान
पितृपीत
पुष्टिवर्धन
[6]पूतीका

प्रयस्
प्राणप
प्रियस्तोत्र
बृहस्पतिसुत
मधुश्चुत्
विश्वरूप
विश्ववानि
विधर्मन्
वीडु
शरुमत्
शस्तोक्थ
शुक्र
शूष
संसुत
सम्भृतसोम
सरस्

सहसोम
साशिर
सुत
सुषुत
सूत
सोम
सौम्य
सोमचक्षस्
सोमप
सोमपीतम
स्तुतस्तोम
स्वायुस
स्वाहाकृत
हरिवस्

### [ अथर्ववेद ]

अंशु
अभिवयस्
ऋजीष
ऋजीषिन्
गोपीथ
चमूषद
द्रु
नृषूत
नृमादन
पीति
पूर्वपीति
बर्हिस्थ
मदवत्

मदोदवि
मदिन्तम
मधुजिह्वस्
मुदिन्तर
यज्ञश्री
वाचमींखय
व्र
शुरुध्
सक्षणि
सहस्रधार
सुतवत्
सूत
सोतु

सोमज
सोमजुष्ट
सोमतेजस्
सोमधान
सोमप
सोमपीथ
सोमपुत्र
सोमयोग
सोमवत्
सोमवर्चस्
सोमश्रेष्ठ
सोमिन्
सौम्य

### [ संहितेतर ]

राँजपति

[1]उ प र.—हा शब्द पिशेलच्या मताप्रमाणें साधारणपणें दगड या अर्थी आहे. परंतु याचा अर्थ सोमरस काढण्याच्या वेळीं सोम ज्याच्यावर ठेवून रस काढतात तो दगड असा आहे. हा शब्द क्वचित उपयोगांत आला आहे. ऋग्वेदांत तीन वेळां आणि अथर्ववेदांत एक वेळ येतो.

[2]द्र प्स.—ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत 'थेंब' या अर्थानें व सायणाचार्यांच्या मताप्रमाणें स्तोक म्हणजे लहान थेंब ह्याच्या उलट मोठे थेंब अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. म्हणूनच दधि–द्रप्स हे शब्द वारंवार आले आहेत. ऋग्वेदांत ह्या शब्दाचा नेहमींचा अर्थ सोमरसाचे घट्ट थेंब किंवा प्रत्यक्ष सोमरस असा आहे. दोन उताऱ्यांत रॉथ याचा अर्थ निशाण असा करितो व तो ओल्डेनबर्गनेंहि स्वीकारला आहे. गेल्डनेरच्या मतें याचा अर्थ धूळ असा असावा. पण हें संभवनीय दिसत नाहीं. मॅक्समुल्लर ह्या शब्दाचा अर्थ एके ठिकाणीं पावसाचा थेंब असा करितो.

[3]धि ष णा.—पीटर्सबर्ग कोशाप्रमाणें ह्या शब्दाचा अर्थ सोमरस तयार करतांनां उपयोगांत आणलेलें भांडें ह्मणजे कटोरी किंवा लांबट पात्र असा व लक्षणेनें प्रत्यक्ष सोमरस असाहि आहे. हा शब्द द्विवचनी आला तर लक्षणेनें याचा अर्थ स्वर्ग व मृत्युलोक असा होतो. हिलेब्रँटच्या मतानें ह्या शब्दाचे एकवचनीं पृथ्वी, द्विवचनी स्वर्ग व पृथ्वी, व अनेकवचनी स्वर्ग, अंतरिक्ष व पृथ्वी, असे अर्थ होतात. कांहीं ठिकाणीं धिषणा ह्याचा अर्थ वेदी असा केला आहे, पण याबद्दल शंका आहे. पण एवढी गोष्ट खरी कीं, वाजसनेयि व तैत्तिरीय संहिता ह्यांमध्यें ज्या दोन फळयांमध्यें सोमवल्ली दावली जात असे त्या फळ्या ( अधिषवणफलकें ) असा अर्थ केलेला आहे. पिशेलच्या मतें धिषणा ह्याचा अर्थ अदिति किंवा पृथिवी प्रमाणें लक्ष्मी असा आहे.

[4]प वि त्र.—ऋग्वेद व मागाहूनचे ग्रंथ यांमध्यें सोमरस शुद्ध करण्याकरितां उपयोगी पडणारी चाळणी असा आहे. सोमरस शुद्ध करण्याचा हा एकच प्रकार ऋग्वेदकालीं लोकांस खात्रीनें ठाऊक होता. हें पवित्र मेंढ्यांच्या लोकरीचें बनविलेलें असे असें स्पष्ट दिसते. पण ही लोंकर विणलेली असे किंवा हिच्या घड्या करून त्यापासून पवित्र बनविलें जाई हें नक्की सांगतां येत नाहीं. कारण जे शब्द आलेले आहेत ते अगदीं संदिग्ध आहेत तरी पण झिमरचें असें मत आहे कीं, 'व्हरांसि' ह्या शब्दावरून लोंकरीच्या घड्या करूनच हें पवित्र बनविलें जाई.

[5]वि प्.—रॉथच्या मतानें ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं ह्याचा अर्थ सोम गाळण्याच्या भांड्याचा तळ ज्या काठ्यांनीं तयार केला जाई व ज्यांवर ताणावयाचें कापड ताणलें जाई त्या काठ्या असा आहे. पण हें स्पष्टीकरण फारच संशयात्मक आहे.

[6]पू ती का.—सोमवल्लीच्या ऐवजीं उपयोगांत आणावयाच्या एका वेलीचें नेहमीं येणारें नांव. तैत्तिरीय संहितेंत असें म्हटलें आहे कीं, इचा दही विरजण्याच्या कामांत उपयोग होतो. हिचा किंवा पर्णवल्क याचा एकमेकांच्या ऐवजीं उपयोग होतो.

[7]रा ज प ति.—राजपति म्हणजे राजांचा ईश. हें सोमाचें नांव म्हणून शतपथ ब्राह्मणांत आहे. हा शब्द इतरत्र राजाच्या सार्वभौम सत्तेबद्दल योजिलेला नाहीं.

## सामनामें [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निष्टोमसाम | निधन | वामदेव्य |
| अच्छावाकसाम | निधनवत् | वारवन्तीय |
| अनुश्लोक | पार्थुरश्म | वैराज |
| अभीवर्त | पृष्ठ | वैरूप |
| इलान्दन | प्रजापतेर्हृदय | शाक्वररैवत |
| उत्क्रोद | बृहत् | श्रायन्तीय |
| उद्गीथ | बृहद्रथन्तर | श्लोक |
| ऋक्षम | ब्रह्मसाम | संकृति |
| ऋक्साम | भद्र | सामन् |
| ऐड | रथन्तर | सौभर |
| क्रतु | राजन | स्वार |
| गायत्र | राथन्तर | |
| गायत्रवर्तनि | रैवत | |

## स्तुति करणें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अस्वाः | गृणन्तं | वल्गूयति |
| कल्पयाति | जारिषुः | शंसत् |
| किर | जीरयः | स्तवते |
| गरन् | जुरते | स्तुवन् |
| चयते | धीयायते | स्तोभत |
| गातुयन्ति | नमस्यत | हुतत् |
| गाये | मृळयत | पय |
| गुरस्व | रुव | |
| गृधय | रेभत् | |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अहेडन् | नेनुमंः | स्तवै |
| आकरोति | प्रशंसति | स्वर |
| ईडे | मृड | हवन्त |
| उपामन्ययन्त | रेभन् | हवे |
| गुरेत | शंसत | हिंकरोति |
| गृणते | सपर्यत | हये |
| ग्रोषि | सपेम | |

## स्तुतिनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंकुश | योगात्स्तुति | अनुष्टुति |
| (प्रेरकत्वगुण- | रुच्यते) | अनुष्टुभ |

| | | |
|---|---|---|
| अभिशस्ति: | गायत्र | परिवत्सरीण |
| अभिष्टि | गिर् | पर्य्युष्टुति |
| अमंद्र | गूर्ति | प्रशस्ति |
| अर्क | गृभ | प्रेषा |
| अर्कशोक | घोष | बृहदुक्थ |
| अविद्रि | चर्कृति | ब्रह्म |
| असुनीति | चेतस् | ब्रह्मकृति |
| उक्थ | जरिमा | मक्षुजवस्तमा |
| उक्थार्क | देवत्त | मति |
| उचथ | द्युम्नहूति | मनीषा |
| उपस्तुति | घनर्च | [4]मन्त्र |
| उपस्पृश | धिषणा | मन्मन् |
| ऊर्व्यूति | [1]धी | मन्मश |
| ऊति | [2]धीति | महयाय्य |
| ऋषिक्र् | नभस् | रण्य |
| ऋक्वन् | नमउक्ति | रत्निनी |
| आहस् | नमस् | वक्षण |
| कारु | नमस्य | वचस् |
| कारुधा | निविद् | [5]स्तुति |
| क्रन्द | [3]नीथ | [6]स्तोम |
| गाथा | पन्यसं | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अर्क | पणि | [10]सूक्त |
| अशस्ति | ब्रह्मन् | स्तव |
| अस्तुति | [8]शतरुद्रीय | [11]स्तोत्र |
| [7]नाराशंसी | [9]शस्त्र | |
| परिस्तुति | सुशस्ति | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| उक्थ्या | धी | सुष्टुति |
| उद्गीथ | पूर्व्यस्तुति | स्वर्क |
| गिर | प्रशस्ति | हृत्स्वाम |
| दुस्तुति | शस्ति | |
| देवजामि | सुधस्तुति | |

**स्तोमनामें** [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अष्टचत्वारिंश | चतुष्टोम | धर्तृ |
| अष्टादश | चतुस्त्रिंश | नवदश |
| आशु | तपस् | नाक |
| उच्चावच | त्रयोविंश | पंचदश: |
| एकत्रिंश | त्रिणव | पंचदशवर्तनि |
| एकविंश | त्रिणवत्रयस्त्रिंश | पंचविंश |
| ओजस् | त्रिवृत् | प्रतिष्ठा |
| गर्भ | द्वाविंश | प्रतूर्ति |
| चतुश्चत्वारिंश | धरुण | ब्रध्नस्य |
| भान्त | विवर्त | षोडश |
| योनि | व्योम | सप्तदश |
| वर्चस् | षट्त्रिंश | सविंश |

[1] धी.—धी म्हणजे विचार. ऋग्वेदामध्यें बरेच वेळा गायकाची प्रार्थना अथवा स्तुतिसूक्त असा अर्थ दर्शविण्याकरितां हा शब्द आलेला आहे. एक कवि आपण एक अशी प्रार्थना विणतो असें स्वतःविषयीं म्हणतो व दुसरा एक कवि आपल्या प्राचीन व पूर्वजकृत सूक्ताचा उल्लेख करतो व त्या सूक्ताचा उपयोग व्हावा म्हणून त्यावर मखलाशी करतो.

[2] धीति.—ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं याचा अर्थ धी प्रमाणें जवळ जवळ प्रार्थना किंवा स्तुतिसूक्त असा आलेला आहे.

[3] नीथ.--हा नपुंसकलिंगी शब्द असून ह्याचा अर्थ गाण्याची तऱ्हा व नंतर स्तुति सूक्त असा आहे. नीथा हें स्त्रीलिंगी रूप ऋग्वेदांत आलेलें असून त्याचा अर्थ शकल किंवा कसब असा आहे.

[4] मंत्र.—[मन् म्हणजे विचार करणें या धातूपासून] याचा ऋग्वेदांत व उत्तरकालीन ग्रंथांत असा अर्थ आहे कीं ऋचा ही गाणाराच्या कल्पक अथवा त्पादक विचाराचा परिणाम होय. ब्राह्मण ग्रंथांतून याचा अर्थ गद्यांत किंवा पद्यांत ऋषींचे उद्गार असा आहे. यांत नुसत्या काव्य भागाचाच समावेश केला नसून अगदीं जुनाट अशा लेखनपद्धतीनें युक्त अशा गद्य भागाचाहि समावेश केला आहे.

[5] स्तुति.—ऋग्वेद व तदुत्तर झालेले ग्रंथ ह्यामध्यें 'स्तुतिपर गाणें' अशा अर्थानें हा शब्द आहे.

[6] स्तोम.—ऋग्वेदामध्यें स्तुतियुक्त गाणें अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. उत्तरकालीन ग्रंथांत ज्या स्वरूपांत स्तोत्रें गाइलीं जातात तें स्वरूप असा ह्याचा विशिष्ट अर्थ झाला.

[7] नाराशंसी.—[ नर-स्तुतीपर मंत्र ] हा शब्द ऋग्वेदापासूनच आलेला आहे व मागाहून झालेल्या वाङ्मयांत गाथाहून निराळा आहे असें अनेक ठिकाणच्या उल्लेखावरून दिसतें. काठक संहितेमध्यें हे जरी निराळे शब्द आले आहेत असें म्हटलें आहे, तरी हे दोन्हीं शब्द अगदीं खोटे आहेत. (अनृतं) असें म्हटलें आहे. हे शब्द निराळे असणें हें शक्य नाहीं. कारण तैत्तिरीय ब्राह्मणांत 'नाराशंसी गाथा' असे शब्द आलेले आहेत. हे गाथा श्लोक कसे होते हें शांखायन श्रौतसूत्रावरून दिसून येईल.कारण जे पुरुषमेधाच्या वेळचे नाराशंसी श्लोक सांगितलेले आहेत तेच श्लोक महाभारताचे मूलभूत गणतां येतील. नाराशंसी शब्द कांहीं ठिकाणीं अथर्ववेदांतील तीन श्लोकानांच लाविलेला आहे. पण हा सकुंचित अर्थ ऋग्वेदांत स्वीकारण्याचें कारण नाहीं असें जें ओल्डेनबर्ग म्हणतो तें रास्त दिसतें.

तैत्तिरीय संहीतेंत सुद्धां हा संकुचित अर्थ निश्चित नाहीं, व वृहद्देवतेंत तर ह्या शब्दाला सामान्य अर्थच आहे.

[8] शतरुद्रिय अथवा शतरुद्रीय.—शतरुद्रासंबंधीं असलेलें सूक्त. हें यजुर्वेदांतील एका भागाचें नांव आहे. ह्यांत रुद्र देवतेची शंभर प्रकारांनीं त्याचे अनेक गुण वर्णन करून स्तुति केलेली आहे.

[9] शस्त्र.—उद्गात्याच्या स्तोत्राच्या नंतर होत्याच्या पाठ म्हणण्याला हा विशिष्ट शब्द लावलेला आहे. देवतेला सकाळीं दिल्या जाणाऱ्या उपायनाचे वेळीं जीं शस्त्रें म्हणावयाचीं त्यांनां आज्य व प्रउग असें म्हणतात. दुपारच्या वेळीं म्हणावयाच्या शस्त्रांस मरुत्वतीय व निष्केवल्य असें आणि संध्याकाळच्या वेळीं म्हणावयाच्या शस्त्रांनां वैश्वदेव व आग्नि मारुत अशीं नांवें आलेलीं आहेत.

[10] सूक्त.—[चांगलें बोललेलें] उत्तरकालीन संहिता ग्रंथ व ब्राह्मण ग्रंथ ह्यांमध्यें शस्त्राचा भाग म्हणून सूक्त ह्या अर्थी हा शब्द आलेला आहे. ऋग्वेदामध्यें अनेक ठिकाणीं याचा सूक्त हाच अर्थ अभिप्रेत आहे.

[11] स्तोत्र.—याज्येप्रमाणें शस्त्र ह्याचा अर्थ होता, व त्याचे मदतगार यांनीं गावयाचे मंत्र असा होतो, त्याचप्रमाणें स्तोत्र याचा अर्थ उद्गाता व ऋत्विज ह्यांचीं गाणीं असा आहे. ह्या शब्दाचा विशिष्ट अर्थ मागाहून झालेले संहिता व ब्राह्मण ग्रंथ ह्यांमध्यें आलेला आहे.

## हविर्नामें व विशेषणें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अन्न | घृतवत् | निर्मितादेवता) |
| [1] अभिश्री | घृतश्चुत | बलि |
| अरण | देवजुष्ट | मेदस् |
| [2] आशिर | नाम | [7] यूषन् |
| करम्भ | [5] पुरोडाश | [8] हविस् |
| कव्य | [6] पृषदाज्य | हव्य |
| [4] गवाशिर | प्रतिमा ( हविः प्रतियोगित्वेन | |
| घृत | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अग्निहोत्रोच्छेषण | उदवसानीय | त्रिककपाल |
| अजक्षीर | एककपाल | दधि |
| अप्य ( अप्सुभव-हवि ) | क्रूर ( यवागू ) | दशकपाल |
| | क्षीर | दुग्ध |
| अमेदस्क | गवीधुक् ( यवागू ) | देववीति |
| अष्टाकपाल | गव्य | द्वादशकपाल |
| आज्य | गार्मुत ( रानमूग ) | द्विकपाल |
| आम | गावीधुक | धाना |
| [9] आमीक्षा | घर्म | नवकपाल |
| उच्छेषण | चतुःशराव | नवनीत |
| उदयनीय | जर्तिलयवागू | निष्कास |
| नैर्ऋत ( हविर्विशेषण ) | श्रीकृतंद्रव्यं ) | सत्यशुष्म ( आज्य वि. ) |
| | [14] मस्तु | |
| नैवार | मिश्र | सत्यायुस् |
| पंचकपाल | मृड ( सुखसाधन-हविर्द्रव्य ) | सप्तकपाल |
| [11] पयस्या | | समवत्त |
| [12] परिवाप | मेदस् | सर्पिष् |
| पुनर्हविस् | यवमय | सर्वदेवत्य |
| पुरोडाश | [15] यवागू | साधु |
| पृषदाज्य | वाजिन | सान्नाय्य |
| प्रैयंगव | वारुण्य | सुगव्य |
| ब्रह्मौदन | वैश्वानर ( हविर्वि. ) | सुहुत |
| भक्षंकृत | | सोम |
| मेद्वत्य ( हविर्वि. ) | | सोमग्रह |
| | शुक्र | स्वयंमथित |
| मधुमिश्र | शुक्रशोचिस् | स्वयंमूर्त |
| मन्थ (क्षीरे यव-पिष्टंप्रक्षिप्यामि- | [17] सक्तु | हविष्य |
| | सक्तुश्री | हविस् |

[ अथर्ववेद ]

[18] पृषातक

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| नंमंहु | परिवाप | मासर |

## यजन पूजन करणें, क्रियापदें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अघुक्षन् | उन्दन् | पपृक्षाः |
| अध्वारियासि | कृपण्यति | पवस्व |
| अपस्यात् | कृपायति | पुनीतन |
| अपुनन् | गायति | पुनीहि |
| अपूपोत् | गूर्धयति | पूजयति |
| अपृच्यन्त | गृणाति | पृच्छति |
| अभिशस्ते | जरते | भनति |
| अर्चति | छदयते | भन्दते |
| अश्नते | छन्दति | मंहय |
| असुन्वताम् | जुहोतन | मखस्यते |
| अह्वावि | जोहवीति | मदति |
| अहुवे | जोहुवन्त | मन्दते |
| अहूषत | दिधृत | मन्द्रयते |
| अह्वे | धमति | मन्यते |
| आदुहुः | नदति | मर्चयति |
| आनृचुः | नौति | महयति |
| आनृधे | पचत | मुक्षत |
| आभुवम् | पणते | यक्ष्व |
| आयेजे | पणायति | यज |
| आर्चत् | पनस्यति | येजे |
| इध्यसे | पनायते | यौति |

| | | |
|---|---|---|
| रजयति | शंसति | स्तौति |
| रंजयति | शशमानः | स्वरति |
| रसति | सपति | हर्मि |
| रिहति | सपन्त | हर्षसे |
| रेभति | सपर्य | हवा |
| रौति | समीधे | हवामहे |
| ववन्द | सिषक्तु | होम |
| वल्गूयति | सुनोतन | ह्वयते |
| वाजयति | सुस्रोत् | |
| वेनति | स्तोभति | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अजुहवुः | उन्दन्तु | पृच्छति |
| अधुक्षन् | गायाति | यक्षत् |
| अपुनन् | गृणन्ति | यजति |
| अभजत | जरते | यजे |
| अभिशस्तः | जुहोतन | समिद्धे |
| अर्च | जोहवीमि | सिषक्तु |
| अर्चति | नमस्याम | सुनुयात् |
| अश्नन्ति | नमन्ताम् | हर्षय |
| अहुत्वा | पच्यन्ते | हवा |
| अह्वे | पणेत | हवामहे |
| आदुहत् | पनायत | होष्यामि |
| आभुवः | पवस्व | ह्वयते |
| आयजे | पुनीते | |
| इध्यस्व | पुने | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अर्च | कमन्तु | विन्दते |
| आदिदेशति | भजामि | विममे |
| आर्चन् | मामहे | सपर्य |
| आहराणि | यजामि | समीके |
| उपासते | याचिताम् | |

[१] अभिश्री.—( मिसळ, मिश्रण ). देवतांनां सोमरस अर्पण करण्यापूर्वी त्यांत जें दूध घालीत असत त्याला हा शब्द योजीत असावेत.

[२] आशिर. — (मिश्रण ) मुख्यत्वेंकरून देवांनां अर्पण करण्यापूर्वी दुधामध्यें सोमरस मिसळीत असत त्या मिश्रणाचें हें संबोधक आहे. ऋग्वेदांत व तदनंतरच्या ग्रंथांत ह्या अर्थी योजिलेला हा शब्द पुष्कळ वेळा येतो. फक्त दुधाचाच ह्या कार्याकडे उपयोग करीत होते असें नाहीं. सोमाचें 'तीन पदार्थ मिसळलेला' असें दुसऱ्या विशेषणांनीं स्पष्टीकरण केलें आहे. जसें गवाशिर, दध्याशिर आणि यवाशिर.

[३] करम्भ.—ऋग्वेदापासून पुढें ह्याचा अर्थ 'कोंडा न काढलेल्या, साधारण भाजलेल्या आणि मळलेल्या यवाची लापशी असा आहे. क्षेत्र देवता जी पूषन् तिचें हें यज्ञांतलें आवडतें हविष्यान्न होतें. जव (उपवाक) अथवा तीळ (तिर्य) ह्यांचाहि करंभ करीत असत.

[४] गवाशिर.—( दुधांत मिसळलेला ) हें सोमाचें विशेषण ऋग्वेदांत आहे.

[५] पुरोडाश्.—ऋग्वेदांत व नंतर यज्ञप्रसंगीं देवतांनां अर्पण करण्यासाठीं उपयोगांत आणलेल्या एका प्रकारच्या भाजलेल्या पिठाच्या गोळ्याचें हें नांव आहे.

[६] पृषदाज्य.—( ठिपडलेलें तूप ); म्हणजे दह्यांत मिसळलेलें तूप ( आज्य ) असा याचा ऋग्वेदांत व तदनंतरच्या ग्रंथांत अर्थ होतो.

[७] यूषन्.—हा शब्द ऋक् आणि यजुःसंहितेंत अश्वमेधाच्या वर्णनांत आला आहे. मेध्य पशूच्या मांसापासून तयार केलेल्या पेया ( रस्सा ) बद्दल हा शब्द वापरीत आणि त्याचा अन्नासारखा उपयोग करीत. तें ठेवण्यास भांडीं म्हणून 'पात्र' आणि 'आसेचन' यांचा उपयोग केलेला आहे. तैत्तिरीय संहितेंत सांपडणारें दुसरें रूप 'यूस्' आहे.

[८] हविष्.—देवांनां दिलेल्या नैवेद्याला हें नांव आहे, मग हा नैवेद्य धान्याचा,सोमाचा,दुधाचा किंवा तुपाचा असो, ऋग्वेदांपासून पुढील ग्रंथांत हा शब्द प्रचारांत आहे.

[९] आमीक्षा.—घट्ट दह्याचें अन्न. हा शब्द ऋग्वेदांत नाहीं, परंतु पुढील संहिता, ब्राह्मण वगैरेमध्यें आढळतो आणि तैत्तिरीय अरण्यकांत हा शब्द वैश्य संबंधांत आहे.

[१०] नवनीत.—(ताजें लोणी ) नंतरच्या संहिता व ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द वारंवार आलेला आहे. ऐतरेय ब्राह्मणाच्या मतानें हें गर्भाला माखावयास उपयोगी पडणारें लोणी. देवांनां आज्य, मनुष्यांना घृत, व पितरांनां आयुत असा उपयोग केला आहे. इतरत्र हा शब्द घृत व सर्पिस् यांच्या विरोधी अर्थानें आला आहे.

[११] पयस्या.—उत्तरकालीन संहिता ग्रंथ व ब्राह्मण ग्रंथ ह्यांमध्यें दही अशा अर्थानें हा शब्द आला आहे. हें दही ताजें किंवा तापविलेलें दूध व ताक वगैरे यांचें मिश्रण होऊन झालेलें विरजण होय असेंहि त्यांत म्हटलें आहे.

[१२] परिवाप.—उत्तरकालीन संहिता व ब्राह्मणग्रंथांत ह्याचा अर्थ भाजलेले तांदूळ–म्हणजे पोहे असा अथवा भाताच्या लाह्या असा अर्थ आहे.

[१३] ब्रह्मौदन.—यज्ञप्रसंगीं यज्ञांत भाग घेतलेल्या ऋत्विजांकरितां शिजविलेला भात ह्या अर्थानें हा शब्द ऋग्वेदोत्तर संहिता व ब्राह्मण ह्यांमध्यें आला आहे.

[१४] मस्तु.—यजुःसंहितेंत व ब्राह्मणांत याचा अर्थ आंबट दही [अथवा लोणी] असा आहे.

[१५] यवागू.—यवागू म्हणजे जवाची पेज. इतर धान्यांची सौम्य लापशी या अर्थी सुद्धां हा शब्द सांपडतो.

[१६]वा जि न.—उत्तरकालीन संहिता व ब्राह्मण ग्रंथांत ह्याचा अर्थ ताजें गरम दूध व नासलेलें दूध ह्यांचें मिश्रण असा आहे.

[१७]स क्तु.—उत्तरकालिन संहिता व ब्राह्मण ग्रंथ ह्यांमध्यें भरभरीत पिठाचे किंवा सत्तूचें अन्न असा ह्या शब्दाचा अर्थ आहे. ऋग्वेदांत ज्यां ठिकाणीं एकदांच हा शब्द आला आहे. त्या ठिकाणी 'तितौ'नें पाखडण्यापूर्वीचें धान्य असा या शब्दाचा अर्थ असावा. 'तितौ' ह्याचा अर्थ चाळणी असा धरला तर सक्तु ह्याचा अर्थ भरभरीत रवा असा होऊं शकेल.

[१८]पृ षा त क.—हें पृषदाज्याप्रमाणें एका मिश्रणाचें नांव आहे. जुन्या गृह्यसंग्रहाप्रमाणें तें दही, मध आणि आज्य ह्यांचें मिश्रण असे. याचा अथर्ववेदाच्या एका जुन्या वचनांत व सूत्रांत उल्लेख आला आहे.

## धर्मशास्त्र [ ऋग्वेद ]

अनुदेयी ( पाठराखणारी)
अभिगूर्ति ( संकल्प )
अभिज्ञ ( गुडघे टेकून उपासना करणें )
अमृत ( अमरत्व)
कटुक ( वधूवस्त्र)
देवांकेल्बिष्
देवहिति ( देवांचे कायदे )
नम्र
नमोयेमान ( नमस्कारूप आराधना )
निर्ऋति
पशुतृपन्नतायुम् ( चोरीचें प्रायश्चित्त म्हणून पशूला तृप्त करणें )
पूर्ति
प्रयुति
बलि
मन्त्रश्रुत्य (मन्त्रानें करावयाचें कर्म )
वाधूय
वासोद
शामुल्य
शाशद
श्रद्धा
श्रवयत्पति
संहोत्र (सम्प्रदाय,
सपित्व
स्तूप ( शेंडीची गाठ)
स्वर्जेष ( स्वर्गप्राप्तिकारक युद्ध )

[ तै. सं. ]

इष्टापूर्ति
चोदना ( विहित-कर्म )
तपस्
धर्म
निर्ऋतिलोक( परलोक )
प्रायश्चित्ति ( प्रायश्चित्त )
ब्रह्मचर्य
[१] ब्रह्महत्या
[२] वीरहत्या
संशित ( ब्राह्मण्य-विशेषण )
सत्यानृत
सुजघन (व्रतनाम)

[ अथर्ववेद ]

अघ
अपव्रत
अष्टका ( कर्मविशेष )
आह्रुता ( ब्रह्मचाऱ्याचीमेखला )
इष्टापूर्त ( श्रौत-स्मार्त कर्म )
उच्छिष्ट
उपसद ( कर्मविशेष )
एकव्रात्य
एकाष्टका
एनस्य
किल्बिष
चरण ( अनुष्ठान )
त्र्यायुष
[३]दिव्य
दीक्षा
धर्म
नमस्कार
नानाधर्मन्
नीविभार्य
पदयोपन ( मृत्यूचा रस्ता पुसण्यासाठीं मृताबरोबर दिलेलें वस्त्र )
परापूर् ( पिण्डदाता )
परिवित्त ( वडील भावापूर्वी आपलेच लग्न करणारा )
[४]पुंसवन
पुण्य
पुत्रिम
पूर्त
प्रायश्चित्ति
बलिहर ( बलिहरण करणारा )
ब्रह्मचर्य
ब्रह्मज्य
ब्राह्मणवर्चस्
मधुपर्क
मन्युशमन ( कर्मवि. )
मातृकृत ( पाप )
विधर्मन्
विमन्युक
विवाह
विव्रत ( विरुद्ध-कर्म )
विष्टारी (कर्मवि.)
शल्मल ( पातक )

[ संहितेतर ]

[५]गोदान
[६] पिण्ड
[७]प्रायश्चित्त
[८]स्नातक

[१] ब्र ह्म ह त्या.—ब्रह्महत्या म्हणजे ब्राह्मणाचा वध. यजुः संहितेंतून व ब्राह्मणग्रंथांतून हा अत्यंत गर्हणीय असा अपराध आहे असें म्हटलें आहे. असा वध करणाऱ्यास ब्रह्महन् असें म्हणतात.

[२]वी र ह त्या.—तैत्तिरीय आरण्यकांत उल्लेखिलेल्या गुन्ह्यांपैकीं हा एक गुन्हा आहे. जुन्या संहिताग्रंथांत वीरहन् ( मनुष्याला मारणारा ) ह्या शब्दाचा वारंवार उल्लेख आलेला आहे.

[३]दि व्य.—हा शब्द अथर्ववेद व मागाहून झालेल्या वाङ्मयांत (पंचविंश ब्राह्मण )आलेला आहे. पण वैदिक वाङ्मयांत दीव्य करण्याच्या चालीचे कित्येक उल्लेख आलेले आहेत. अथर्ववेदामध्यें अग्नीचें दिव्य केल्याबद्दल उल्लेख आहे असें स्लॅगिंटवेट, वेबर, लुडविग, झिमर इत्यादि लोकांचें मत आहे. पण तसा उल्लेख नाहीं असें ग्रिल, ब्लूमफील्ड व व्हिटने ह्यांचें मत आहे. पण पंचविंश ब्राह्मणांत ह्या अग्नीच्या दिव्याचा उल्लेख आलेला आहे; आणि तो तेजोमय परशूसह दिव्याचा उल्लेख ( ते दिव्य चोरीच्या आरोपाच्या बाबतींत केल्याबद्दल ) आला आहे. गेल्डनेरचें असें मत आहे कीं, हा दिव्याचा प्रचार ऋग्वेदांत सुद्धां आलेला आहे. पण हें बरेंच असंभाव्य दिसतें. लुडविग व ग्रिफिथ यांच्या मतानें दीर्घतमाला अग्नीचें व जलाचें दीव्य करावें लागलें असा ऋग्वेदांत उल्लेख आलेला आहे. पण ह्या म्हणण्याला अधार बिलकुल नाहीं. वेबरच्या मतें तुला करण्याच्या दिव्याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत आलेला आहे.

[४]पुं स व न.—अथर्ववेदांत एका सूक्तामध्यें हा शब्द आला असून ह्याचा अर्थ ' पुरुषोत्पादक ' संस्कार असा आहे. हें सूक्त मुलगा होण्याकरितां केलेल्या संस्कारामागून

ह्मणावयाचें असतें. व ह्याच कामाकरितां ह्या सूक्ताचा कर्मामध्यें उपयोग केलेला आहे.

[5]गो दा न.—शतपथाप्रमाणें ह्याचा अर्थ मिशाचे कल्ले असा दिसतो. तेथें अभिषेक केला जाणारा पुरुष प्रथम आपला उजवा व नंतर डावा कल्ला काढून टाकतो. पुढील ग्रंथांत गोदानविधि अथवा श्मश्रु करविणें हें लग्नाच्या आधीं व मनुष्य वयांत आला ह्मणजे मुख्य कर्तव्य असे; परंतु अथर्ववेदांत हा विधि जरी आहे तरी त्याचें गोदान असें नांव तेथें नाहीं.

[6]पिं ड.—हे पिंड अमावास्येच्या दिवशीं अपराण्हकाळीं पितरांस अर्पण केले जात. हा शब्द निरुक्तांत व सूत्रांत अनेकदां आलेला आहे.

[7]प्रायश्चित, प्रायश्चित्ति.—याचा अर्थ तप, प्रायश्चित, परिमार्जन असा असून, नंतरच्या संहिता व ब्राह्मणांत हा नेहमीं येतो. प्रत्येक नैतिक धार्मिक बारिक सारिक विधीला सुद्धां कांहीं प्रायश्चित सांगितलेलें आहे. सामविधान ब्राम्हणांत प्रायश्चित्तांची संपूर्ण यादी दिली आहे.

स्ना त क.—शतपथ ब्राम्हणांत व सूत्रग्रंथांत गुरूच्या हाताखालीं शिक्षणक्रम पुरा केल्यावर त्याची खूण म्हणून ज्यानें स्नान केलें आहे अशा विद्यार्थ्यास हा शब्द लाविला आहे.

## युद्धवस्तु

### कवचनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंसत्र (खांद्याचें | अयःशीर्षन् | [3]द्रापि (चिलखत, |
| रक्षण करणारें) | अयोहनु | झगा) |
| अंसत्रकोश | [2]खादि | बिल्म (शिरस्राण) |
| [1]अत्क | (हस्तत्राण) | [4]वर्मन् |
| अयोदंष्ट्र | खृगल | |
| अयःशिप्र | (तनुत्राण) | |

वरील शब्द कांहीं विशेष अर्थाचा बोध करणारे असावेत असें समजून येथें घेतले आहेत. टीकाकारांच्या मते यांतील कांहीं देवतांचीं विशेषणें असून त्यांनीं लाक्षणिक अर्थानें तीं घेतलीं आहेत.

[1]अ त्क.—ऋग्वेदांतील दोन उताऱ्यांवरून रॉथ, ग्रासमन व लुडविग हे हा शब्द विशेषनाम आहे असें समजतात. परंतु झिमर हा ह्या उताऱ्यांत योध्याचें चिलखत असा अर्थ करितो. पिशेल म्हणतो दोनहि ठिकाणीं त्याचा कुन्हाड हाच अर्थ आहे.

[2]खा दि.—ऋग्वेदांत हा शब्द फार वेळ आढळतो. सायणभाष्यांत याचा बाहुसंरक्षण ( खादिः = हस्तत्राणः ) असा अर्थ आहे. मॅकडोनेलच्या मतानें याचा बाहुसंरक्षण, बाहुभूषण, आंगठी, पैंजण असा अर्थ होतो.

[3]द्रा पि.—ऋग्वेद व पुढील ग्रंथांत येणाऱ्या या शब्दाचा मॅकडोनेलच्या मतें झगा असा अर्थ आहे. सायणाचार्य याचा कवच ( चिलखत ) असा अर्थ करितात. परंतु दोहोंपैकीं निश्चित अर्थ कोणता हें सांगतां येत नाहीं.

[4]व र्म न्.—ऋग्वेद व मागाहूनचे ग्रंथ यांत चिखलत अशा अर्थानें हा शब्द आला आहे. हें चिलखत कोणत्या वस्तूचें करीत असत हें अनिश्चित आहे. स्यूत या शब्दाबद्दल अनेक वेळां उल्लेख आला आहे. त्यावरून हिरोडॉटसनें म्हटल्याप्रमाणें तागाच्या कापडाचीं बनविलेलीं चिलखतें लोक वापरीत असत असें वाटतें. पण पुढें अयस्, लोह, किंवा रजत यांच्या चिलखताचाहि उल्लेख आहे. परंतु त्यावर विश्वास किती ठेवावा हा प्रश्न आहे. तथापि तीं लोखंडाचीं किंवा लोखंडानें आच्छादिलेल्या कातड्याचीं असावीत असें वाटतें.

### धनुष्यबाण [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1]आर्त्नी | [6]धन्वन् | वृष |
| (धनुष्याचीं | [7]पिंगा | शतब्रध्न |
| टोंकें) | [8]बाण | शर |
| [2]इषु | [9]बुन्द (बाण) | [10]शरव्य |
| कक्ष (तीर) | ब्रह्मसंशित (,,) | [11]शर्य (बाण) |
| कर्णयोनि (बाण) | रुरुशीर्ष्णिन् | शल्य |
| क्षेप्नु (धनुष्य) | (शिरोहन्तृ | [12]शारि (बाण) |
| [3]ज्या | इषु) | [13]सायक |
| [4]ज्याका | लाय | सहस्रपर्ण |
| दिद्यु (बाण) | विशिख | साधु (बाण) |
| [5]धनुस् | विषुद्रुह (शर) | |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| आर्त्नी | निषंगि (णे) | शर |
| इषु | ज्या | शरव्य |
| इषुधि | ज्याका | शल्य |
| इष्वग्र | बाण | विशिख |
| तिसृधन्वन् | युध् (बाण) | |
| धनुस् | युवन् | |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अनुस्फुर (शर) | ऋभु | विशव |
| [14]अपाष्ठ (बाणाचें | ज्या | व्योष |
| टोंक) | धन्वन् | शतशल्य |
| आधीपर्ण (बाण) | [15]पर्णधि | शरव्य |
| आर्त्नी | पिनाक | शरु |
| (धनुष्प्रान्त) | प्राचीनपक्ष | सरु |
| इषुधि | बाण | सायक |
| इष्वास | लाय | हरिमन्युसायक |

[1]आ र्त्नी.—आर्त्नी म्हणजे धनुष्याच्या ज्या टोंकाला ज्या ( दोरी ) बांधलेली असते तें टोंक. नेहमींच ज्या ( दोरी ) दोनहि टोकांना अडकविलेली नसते. परंतु बाण मारण्याच्या वेळीं ती दुसऱ्या टोंकाला ताणून अडकवितात. उत्तर संहिता आणि ब्राह्मणग्रंथ यांत जी विष्णूच्या निध-

नाची दंतकथा आहे तिच्यावरून असें वाटतें कीं, त्याला जें मरण आलें तें 'ज्या' तुटल्यामुळें दोनहि टोकें एकदम उसळून त्याचे डोक्यांत बसून डोकें फुटल्यामुळें आलें.

[२] इ षु.—ऋग्वेद आणि तदुत्तर ग्रंथांत हा शब्द बाण या अर्थी योजिलेला आहे. दुसरीं नांवें शर्य, शारी, बाण हीं आहेत. ऋग्वेदांतील एका स्तोत्रांत ज्यांत शस्त्रांची यादी आहे त्यांत दोन प्रकारचे बाण असतात असा उल्लेख आहे. एक विषारी ( आलाक्ता ) असून त्याला शिंगाचें शीर्ष ( रुरुशीर्ष्णी ) असतें. आणि दुसरा तांब्याच्या, पंचधातूच्या किंवा लोखंडाच्या फळाचा असतो. विषारी ( दिग्ध ) बाणांचा अथर्ववेदांतहि उल्लेख आहे. बाणांनां पिसें लावीत असत. अथर्ववेदांत शल्य, पर्णधि, शृंग, कुल्मल, अपस्कभ आणि अपाष्ठ अशी बाणाच्या निरनिराळ्या भागांच्या नांवांची यादी आली आहे. ऐतरेय ब्राह्मणांत बाणाच्या भागांचीं नांवें अनीक, शल्य, तेजन आणि पर्ण अशीं आहेत; शल्य म्हणजे बाणाचा वरचा ( अनीकाला लागूनच खालीं असलेला ) व तेजन म्हणजे खालचा ( पर्णाला लागूनच वर असलेला ) भाग होय; कारण हे एका सबंध बाणाचें अनुक्रमानें वर्णन आहे. त्याचप्रमाणें अथर्ववेदांत कामाच्या बाणाचें, पिसें, ( काठी ) शल्य, व कुल्मल घट्ट बांधण्याची जागा असलेला, असें वर्णन आहे. बाण, कानापर्यंत दोरी ओढून सोडीत असत आणि म्हणूनच कान ही त्याची जन्मभूमि होय असें वर्णन ऋग्वेदांत आलें आहे. इषूची लांबी पांच विती म्हणजे तीन फूट असे. निव्वळ इषु करण्याचा धंदा अस्तित्वांत होता असें इषुकृत् व इषुकार ह्या शब्दांवरून मॅकडोनेलचें मत आहे. ऋग्वेद १. १८४. ३ मध्यें 'इषुकृत्' शब्द आलेला आहे. तेथें त्याचा अर्थ बाणकरणारा असा निघत नाहीं. त्याचा अर्थ बाणीकृत, बाणवत्-शीघ्रकृत् असा 'वेदार्थयत्न' ग्रंथांत दिला आहे. सायणाचार्य आपल्या भाष्यांत तोच अर्थ देतात.

[३] ज्या.—ह्या शब्दाचा नेहमींचा अर्थ, ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथात, धनुष्याची दोरी असा आहे. धनुष्याकरितां दोऱ्या करणें हा एके काळीं विशिष्ट धंदाच होता. यजुर्वेदामध्यें पुरुषमेधाचे वेळीं जे बली देण्यास योग्य गणले जात असत त्यांपैकीं ज्या-कार ( धनुष्याच्या दोऱ्या करणारा ) हाहि आहे. ही दोरी बैलाच्या कातड्याची बनविली जात असे असें मॅकडोनेल म्हणतो, पण सायणभाष्याप्रमाणें बैलाच्या कातड्याची असा स्पष्ट उल्लेख तेथें नाहीं. दोरी नेहमींच ताणलेली नसे. तर ज्या वेळीं धनुष्याचा उपयोग होत असे तेव्हांच ती ताणून बांधली जाई. अथर्ववेदांत धनुष्याच्या दोरीच्या आवाजाचा ( ज्या—घोष ) उल्लेख आलेला आहे.

[४] ज्या का.—ह्याचा 'धनुष्याची दोरी' असा तिरस्कार दर्शक अर्थानें ऋग्वेदांत उल्लेख आहे. हा शब्द नेहमींच्या साध्या अर्थानें अथर्ववेदांत आला आहे असें मॅकडोनेल म्हणतो. पण सायणभाष्याप्रमाणें अथर्ववेदांत देखील तिरस्कारदर्शी अर्थानें हा शब्द आला आहे. अथर्ववेद १. २, २ यावरील भाष्यांत सायणाचार्य ज्याका याचा अर्थ 'अज्ञात ज्या' असा केला तरी चालेल असें म्हणतात.

[५] ध नु स्.—हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांत वारंवार आलेला आहे. हें धनुष्य वैदिक काळच्या लोकांचें मुख्य शस्त्र होतें. एखाद्या माणसाचें शेवटलें और्ध्वदेहिक कृत्य होत असे त्या वेळीं त्याच्या उजव्या हातांतून धनुष्य काढून घेत असत. हें धनुष्य एक बळकट लांकूड वांकवून बनविलेलें असे. धनुष्याची दोन टोकें जोडणारी 'ज्या' गाईच्या कातड्याची असे. दोरी बांधल्यावर धनुष्याच्या दोन्ही टोकांनां आर्त्नी असें म्हणत. प्रत्यक्ष उपयोगांत जेव्हां हें धनुष्य नसे तेव्हां त्याची ज्या दुसऱ्या टोकांशीं बांधलेली नसे परंतु बाण सोडण्याच्या वेळीं ती दुसऱ्या टोकास ताणून बांधीत. वाजसनेयि संहितेंत धनुष्याचा उपयोग करण्याच्या वेळच्या एका पुढील एक क्रिया सविस्तर दिल्या आहेत, उदाहरणार्थ धनुष्यावर गुण चढविणें (आतन्) बाण लावणें ( प्रतिधा ), धनुष्य वाकविणें ( आयम् ) आणि बाण सोडणें ( अस् ). दोरी आकर्ण म्हणजे कानापर्यंत ओढल्यावर बाण सोडीत म्हणून त्याला कर्णयोनि, (कर्ण हेंच ज्याचें उगमस्थान आहे,) असें म्हटलें आहे.

[६] ध न्व न्.—धन्वन् म्हणजे धनुष्य. हा शब्द ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत वारंवार आलेला आहे. तो इषुधन्वा, आज्यधन्वा, अधिज्यधन्वा ह्या समासांतहि आलेला आहे.

[७] *पिं गा.*—ऋग्वेदांत एका ठिकाणीं हा शब्द आला असून सायणाचार्यांनीं व पीटर्सबर्गकोशकारानें याचा अर्थ धनुष्याचा गुण ( दोरी ) असा केला आहे. हिलेब्रँटच्या मतानें तें एक प्रकारचें वाद्य आहे.

[८] बा ण.—ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ तीर किंवा शर असा आहे.

[९] बुं द.—ऋग्वेदांतील कांहीं उताऱ्यांत याचा बाण या अर्थानें उपयोग केला आहे.

[१०] श र व्या.—हा शब्द ऋग्वेदांत व मागाहून झालेल्या ग्रंथांत आहे. मॅकडोनेल याचा 'बाणाचा टप्पा' असा अर्थ करितो. ऋग्वेद ६. ७५. १६ व १०. ८७, १३ या ठिकाणीं ह्या शब्दाचा अर्थ बाण असा आहे. 'बाणाचा टप्पा' असा घेण्याचें कारण नाहीं. अथर्ववेद १. १९. १. या ठिकाणीं या शब्दाचा अर्थ बाण असा सायणाचार्यांनीं दिला आहे; पण त्यांनींच पुढें अथर्व १. १९, ३ या ठिकाणीं शरव्या शब्दाचा अर्थ 'हिंसा करणाऱ्या आयुधांचा समुदाय' असा सामान्यपणें दिला आहे. तैत्तिरीय संहितेंत असलेल्या शरव्या शब्दाचा अर्थ 'बाणाचा भाता' असा सायणाचार्यांनीं दिला आहे.

[११] श र्य किं वा श र्या.—ऋग्वेदांत ह्यांचा अर्थ बाण असा असावा पण कदाचित् शर्य व शर्या यांचा अर्थ सोम

गाळतांना उपयोगांत आणिलेल्या डाहाळ्यांच्या टोपल्या असा असावा. पण हे शब्द असलेल्या उताऱ्याचा अर्थ अनिश्चित आहे.

[12] शा रि.—ऋग्वेदांत एका ठिकाणीं हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ सायणभाष्याप्रमाणें बाण असा आहे. मॅकडोनेलची या अर्थाबद्दल खात्री नाहीं.

[13] सा य क.—ऋग्वेदामध्यें याचा बाण असा अर्थ आहे.

[14] अ पा ष्ठ.—बाणाचें टोंक ह्या अर्थी हा शब्द अथर्ववेदांत दोन वेळा योजिला आहे.

[15] प र्ण धि.—अथर्ववेदांत हा शब्द 'ज्याला पिसें घट्ट लावलेलीं असतात असा बाणाचा भाग' अशा अर्थानें आला आहे असें मॅकडोनेल म्हणतो. ग्रिफिथ पर्णधि याचा अर्थ 'पिसें असलेलें टोंक' असा करितो. परंतु सायणाचार्यांनीं 'पर्णधि' चा अर्थ 'इषुकांड' किंवा 'विषारी पानांचें झाड' असा केला आहे.

## ध्वजनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्र | केतु | बृहत्केतु |
| कृतध्वज | [1]ध्वज | सहस्रत्केतु |
| | | सुत्केतु |

[1] ध्वज.—ऋग्वेदांत लढाईत वापरलेल्या निशाणाच्या अर्थानें हा शब्द दोनदां आलेला आहे. ज्या दोन ठिकाणीं हा शब्द आलेला आहे त्या दोन्ही ठिकाणीं 'योद्धे निशाणांवरहि बाण सोडून तीं पाडण्याचा ( शत्रुसैन्यांत गडबड उडावी म्हणून) प्रयत्न करीत असत' असा उल्लेख आलेला आहे. ही वैदिक काळच्या लढण्याची विशिष्ट तऱ्हा लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ऋग्वेद १०.१०३,११ या ठिकाणीं येणाऱ्या ध्वजेषु या शब्दासंबंधीं सायण:भाष्यांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे. 'अस्माकं सम्बन्धिनेष्वेव परसेनां संप्राप्तेषु ध्वजेषु ध्वजवत्सु सैनिकेषु इंद्रो रक्षिता भवतु' इ. ग्रिफिथ ध्वज याचा अर्थ निशाण असाच देतो.

## युद्धांतील हत्यारें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंकुश | [5]कुलिश | तुज्या |
| अग्नितप्त | [6]कृति | [8]तोद |
| अयोपाष्टि (वाघ-नख) | [7]क्षुर | त्रिरश्रि |
| | चतुरश्रि | दृत्नु |
| अशनि (वज्र) | घन | [9]दात्र |
| अश्महन्मन् | जसु | [10]दिद्यु |
| [1]असि | तग्नी | [11]द्रुघण (सोटा) |
| अस्त्र | तपुर्वध | [12]धारा |
| [2]आयुध | तर्हण | निधा |
| [3]आरा | तिगित (तीक्ष्ण-शस्त्र) | निशित |
| [4]इषुधि | | [13]पर |
| ऋष्टि (भाला) | तिग्महेति ( ,, ) | पर्फरीक |
| पवि | वधत्र | सहस्रभृष्टि |
| पाश | वधस्न | सायक |
| फारि | [15]वाशी | सृण्य (कोयता) |
| [14]भुरिज | वृषान्धि | [17]स्रक्ति (भाला) |
| भृमि | शाक्ति (भाला) | हथ |
| मुष्टि | [16]शरु ( ,, ) | [18]हस्तघ्न |
| रण्य | शित | हेति |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| असि | [21]पवीरव | सृक (वज्र) |
| आयुध | पाश | स्वधिति |
| [19]तिसृधन्वा | पिनाक | स्वायुध |
| निर्ऋतिपाश | प्रहेति | हस्तघ्न |
| [20]निषंगधि | वज्र | हृदयाविध |
| परशु | वार्त्रघ्न | हेति |
| पर्यारि | वितष्ट (धार लावलेलें शस्त्र) | ह्रादुनि |
| पर्शु | | |
| पवि | शस्त्र | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंक (अयोमय-कंटक) | [वेणुदण्ड] | बाहूवंक |
| | कसि | मनोजु (वज्र) |
| अंकुश | कामशल्य | मेनि ( ,, ) |
| अक्षुजाल | काशि | मेन्य ( ,, ) |
| [22]अपस्कंभ | कुलिश | वज्र |
| अमोक्य | कूट | वधत्र |
| अश्मन् | चतुर्भृष्टि | वत्स्य (वासक) |
| असि | जसु | शतभृष्टि |
| अस्त्र | [24]जाल | शम्ब |
| [23]आजनि | देवहेति | शरु |
| आधिपर्ण | धृष्णु | शांशप (शफाकृति आयुध) |
| आयुध | परशु | |
| इषु | [25]पर्शु | सृक |
| इषुका | पवि | सृणि (अंकुश) |
| उरुग्राह | [26]पिनाक | हिरण्यद्राप |
| ऋष्टि | प्रत्यंचा | हेते |
| एकतेजना | | |

[ वा. सं. ]

[27]प्रसिति

[1] अ सि.—यज्ञाच्या वेळीं ज्या सुरीचा उपयोग करतात तिला हा शब्द नेहमीं लावतात. परंतु कधीं कधीं लढाईतील सुरी असाहि या शब्दाचा उपयोग होतो. ज्याला कमरपट्टा ( वाल ) अडकविलेला आहे अशा म्यानाचाहि ( वव्रि ) उल्लेख केला आहे. असिधारा या शब्दाचा अर्थहि म्यान असा होतो.

[२] आ यु ध.—आयुध म्हणजे शस्त्र. व्यापक अर्थानें क्षत्रियाच्या युद्धसामुग्रीचाहि यांत अंतर्भाव होतो. ऐतरेय ब्राह्मणांत ही युद्धसामुग्री अश्वरथ, इषुधन्व व कवच अशी एकत्रित दिली आहे. ऋग्वेदांत लिहिल्याप्रमाणें वेदकालीन योद्ध्याला जरूर असलेल्या इषु व धन्वन्, त्यांचा शस्त्र या अर्थानें आलेल्या आयुध शब्दांत अंतर्भाव होत असला पाहिजे. ऋग्वेदांतील युद्धसूक्तावरूनहि हेंच मत सिद्ध होतें. कारण त्यांत योद्ध्याचें वर्णन धनुष्यबाण घेऊन रथारूढ झालेला, अंगांत चिलखत घातलेला, धनुष्याची दोरी घासूं नये म्हणून डाव्या हातावर हस्तघ्न (हाताचें संरक्षण) असलेला असें केलें आहे. उरस्त्राण हें धातूच्या एका तुकड्याचें केलेलें नसून पुष्कळसे तुकडे एकत्रित ( स्यूत ) करून तयार केलेलें असें. तें धातूच्या तुकड्याचें किंवा बहुतेक धातूनें मढविलेल्या कसल्यातरी कडकडीत पदार्थाचें बनविलेलें असावें. योद्धे शिरस्त्राणहि ( शिप्रा ) वापरीत असत. ढाल वापरण्याबद्दल अगर पादत्राणाच्या उपयोगाबद्दल कोठेंहि उल्लेख सांपडत नाहीं. शस्त्रें उपयोगांत आणण्याच्या कौशल्याबद्दल ऋग्वेदांत उल्लेख आहे. गोफणगुंड्यांचा ( अद्रि, अशनि ) उपयोग नेहमीं करीत कीं काय याबद्दल निश्चय नाहीं. अंकुश हें दैवी अस्त्र समजलें जात असून कुऱ्हाड ( स्वधिति, वाशी, परशु ) हीं देखील मानवी द्वंद्वांत आढळून येत नाहींत. लढाईत शस्त्रांचा सामान्य उपयोग अगर वज्राचा उपयोग होत नसे.

[३] आ रा.—ऋग्वेदांत 'पूषन्' चें शस्त्र असा या शब्दाचा अर्थ आहे. परंतु उत्तरकालीन वाङ्मयांत 'आर' 'टोपण' असा झाला आहे. 'पूषन्' च्या मेंढपाळासारख्या राहणीवरून या शस्त्राचा कातड्याला भोकें पाडण्याकरितां उपयोग केला जात असावा.

[४] इ षु धि.—इषुधि म्हणजे बाणाचा भाता. ऋग्वेद व तदुत्तरकालीन ग्रंथांत हा शब्द प्रचारांत आहे. दोन भाते घेण्याची जी अलीकडील पद्धति होती तिचा वैदिक वाङ्मयांत उल्लेख केलेला सांपडत नाहीं. ऋग्वेद १.१८४,३ या ठिकाणीं असलेल्या 'इषुकृत्' शब्दाचा अर्थ पिशेल म्हणतो त्याप्रमाणें भाता असा मुळींच होत नाहीं. तेथें त्याचा अर्थ 'बाणवत् शीघ्रीकृत्, असा आहे व असाच अर्थ वेदार्थयत्न ग्रंथांत व सायणभाष्यांत दिलेला आहे.

[५] कु लि श.—कुलिश म्हणजे कुऱ्हाड. ऋग्वेदांत याचा उपयोग रथ करण्याकडे व युद्धांत करीत असत असा उल्लेख आहे आणि अथर्ववेदांत यानें झाडें तोडीत असत असें म्हटलें आहे.

[६] कृ ति.—ऋग्वेदांत ज्या ठिकाणीं, मरुत् यांच्याजवळ कृति होत्या असें वर्णन आहे. त्यावरून झिमर म्हणतो कीं, या शब्दाचा अर्थ लढाईंतील खंजीर हा होय. परंतु कृति हें आयुध मनुष्याकरितां होतें याबद्दल कांहीं आधार नाहीं.

[७] क्षु र.—हा शब्द ऋग्वेदांत तीन वेळ आला आहे. पहिल्या ठिकाणीं याचा अर्थ पान, पातें असा आहे. दुसऱ्या ठिकाणींहि हाच अर्थ योग्य दिसतो. कारण, तेथें सशानें क्षुर गिळलें असें म्हटलें आहे. तिसऱ्या ठिकाणीं धार लावण्याच्या धोंड्यावर वस्तरा लावल्याचा किंवा पाजळल्याचा उल्लेख आहे ( भुरिजोः या द्विवचनी शब्दाचा अर्थ पिशेलच्या मताप्रमाणें हल्लींच्या चक्कीसारख्या ज्या यंत्राच्या दोन बाजूंमध्यें तो दगड फिरत असतो त्या दोन बाजू असा आहे ). म्यूर आणि रॉथ हे याचा कात्रीची धार असा अर्थ करितात. परंतु हा अर्थ दुसऱ्या एका ठिकाणीं अथर्ववेदांत दिसत नाहीं. कारण तेथें ओंठावर जशी जीभ फिरते तसें क्षुर भुरिजांवर ( भुरिजोः ) फिरत असते असें म्हटलें आहे. अथर्ववेदांत वस्तरा असा स्पष्ट अर्थ आहे. कारण त्याचा हजामत करण्याकडे उपयोग होई असा उल्लेख आहे. दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं दोन्ही अर्थ लागूं पडतात. यजुर्वेदांत 'क्षुरो भृज्वान्' असा शब्दसमुच्चय आला आहे. ब्लूमफील्डच्या मतानें त्याचा अर्थ 'वस्तरा व चटपटणें' असा आहे. क्षुरधारा किंवा क्षुरस्य धारा म्हणजे वस्तऱ्याची धार. उपनिषदांत क्षुरधार = [वस्तऱ्याची डबी अगर पेटी ] हा शब्द आला आहे.

[८] तो द.—ऋग्वेदांत एकदां याचा अर्थ पराणी, टोंचणी असा आलेला असून नेहमींचा याचा अर्थ टोंचणारा असा आहे. गेल्डनेरच्या मतें एकेठिकाणीं याचा अर्थ शिक्षा देण्यास योग्य असा दंड करणारा [ दण्डधर = राजा] असा आहे.

[९] दा त्र.—[ कापणारा ]. याचा अर्थ कोयता असा ऋग्वेदांत आला आहे. मैत्रायणी संहितेंत दात्रकर्ण्य = [ज्यांच्या कानावर कोयत्यासारख्या खुणा आहेत अशा] धेनू असा उल्लेख आलेला आहे.यानंतर फक्त सूत्रें, व महाकाव्यें या उत्तरकालीन वाङ्मयांतच हा शब्द आढळतो.

[१०] दिद्यु, दिद्युत्.—ऋग्वेदांत या दोनहि शब्दांचा अर्थ दैवी किंवा मानवी अस्त्र किंवा बाण असा आहे.

[११] द्रु घ ण.—हा शब्द ऋग्वेदांतील मुद्गलसूक्तांत व अथर्ववेदांत आलेला आहे. यास्काचार्य याचा अर्थ लांकडी सोटा असा करितो. गेल्डनेरचें असें मत आहे कीं, द्रुघण हा लांकडी बैल होता व मुद्गलास जेव्हां शर्यतींत भाग घ्यावासा वाटे त्यावेळीं दुसऱ्या जिवंत बैलाचे ऐवजीं ह्या लांकडी बैलाचा तो उपयोग करी. पण अशा तऱ्हेचा या दन्तकथेचा अर्थ बराच असंभाव्य दिसतो. ह्यानें झाडें तोडलीं जातात म्हणून सायणाचार्य याचा 'तोडण्याचें हत्यार' असा अर्थ करितात. या आधारानेंच अथर्ववेदांत व्हिटने या शब्दाचा अर्थ लांकडांवर प्रहार करणारा असा करितो.

[१२] धा रा.—एखाद्या शस्त्राची, उदाहरणार्थ कुऱ्हाड(स्वधिति) किंवा वस्तरा ( क्षुर ) याची धार असा या शब्दाचा अर्थ आहे.

[१३]परशु.—ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें लांकूडतोड्याची कुन्हाड असा ह्या शब्दाचा अर्थ आहे. ही कशी होती हें आपणांस ठाऊक नाहीं. चोरीचा ज्याच्यावर आरोप असेल त्यानें आपलें निरपराधित्व तापलेली कुन्हाड हातीं धरण्याच्या दिव्याच्या योगानें सिद्ध करावें असें वर्णन आलेलें आहे.

[१४]भुरिज.—हा शब्द द्विवचनी मात्र उपयोगांत आणिला आहे. ह्याचा अर्थ जरा शंकास्पद आहे. रॉथ याचा अर्थ कोठें कोठें 'कात्री' असा करितो परंतु कांहीं ठिकाणीं रथकाराची लांकूड पक्कें पकडून धरण्यासाठीं पक्कड, शेगडा असाहि अर्थ तो करितो.

[१५]वाशी.—ऋग्वेदांत व इतर काल्पनिक दंतकथांत याचा मरुतांचें व त्वष्टयाचें हत्यार असा अर्थ आहे. परंतु अथर्ववेदांत ह्याचा 'सुताराचें हत्यार' अशा अर्थी उपयोग केला आहे. येथें सायणाचार्यांच्या म्हणण्याप्रमाणें आरी हा अर्थ होईल. वेदार्थयत्नग्रंथांत वाशी ह्याचा अर्थ सर्व ठिकाणीं कुन्हाड असा दिला आहे. सायणभाष्यांत (ऋ. १.३७,२ या ठिकाणीं) किंकाळी किंवा शत्रूच्या सेनेला भिवविण्याकरितां ठोकलेली आरोळी असा वाशी याचा अर्थ दिला आहे. याच शब्दांविषयीं ऋ. १.८८.३ या ठिकाणीं सायणभाष्यांत 'शत्रूणामाक्रोशकमाराख्यमायुधम्' म्हणजे 'शत्रूंना रडविणारें आर नांवाचें शस्त्र' असा अर्थ दिला आहे.

[१६]शरु.—ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांत हा शब्द आला आहे.याचा अर्थ बाण, भाला, असा आहे. ऋ. १.१००,१८ या ठिकाणीं या शब्दाचा अर्थ सायणभाष्यांत व वेदार्थयत्न ग्रंथांत वज्र असा आहे. ऋ. ४. ३,७ येथें याचा अर्थ 'ऋष्टि नांवाचें जें भाल्यासारखें मरुतांचें ढग फोडून टाकण्याचें अस्त्र तें' असें सायणाचार्य म्हणतात. ऋ. ४.३,७ या ठिकाणीं शरु याचा अर्थ निश्चितपणें कोणासहि सांगतां येत नाहीं. सायणाचार्यांनीं संवत्सर अथवा निर्ऋति असे दोन अर्थ केले आहेत. वेदार्थयत्न ग्रंथांत शरु हें विशेषनाम कल्पिलें असून ती कोणी विशिष्ट देवता असावी असें मानलें आहे. ऋ. १०.१२५,६ या ठिकाणीं हा शब्द विशेषण असून त्याचा अर्थ हिंसक असा आहे असें सायणाचार्य म्हणतात.

[१७]स्रक्ति.—ऋग्वेदांत दाशराज्ञयुद्धवर्णनांत हा शब्द आलेला आहे. हॉपकिन्सच्या मतें याचा भाला असा अर्थ घेणें अवश्यक आहे. ऋ. ७.१८,१७ या ठिकाणीं स्रक्ति या शब्दाचा अर्थ ग्रिफिथ 'खांबाचे कोपरे' असा करितो. सायणभाष्यांतहि असलाच अर्थ दिला आहे.

[१८]हस्तघ्न.—ऋग्वेदांत धनुष्याच्या दोरीच्या आघातापासून रक्षण व्हावें म्हणून हात व बाहु ह्यांचेवरील आच्छादनास हें नांव आहे. ह्या शब्दाचें रूप लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तितकेंच तें समजण्यास कठिण आहे. लाट्यायनांत 'हस्तत्र' व महाभारतांत 'हस्तवाप' हे शब्द याच अर्थानें आलेले आहेत.

[१९]तिसृधन्वा.—(तीन बाणांचें धनुष्य) हा शब्द तैत्तिरीय संहिता व ब्राह्मणग्रंथ यांमध्यें यज्ञाच्या वेळीं उपाध्यायास देणगी (दक्षिणा) अशा अर्थानें आलेला आहे.

[२०]निषंगदि, निषंगधि.—यजुःसंहितेंत हा शब्द आलेला आहे. ह्या शब्दाचें दुसरें रूप जर बरोबर असेल तर पीटर्सबर्गकोशाप्रमाणें याचा अर्थ तरवारीचें (निषंग) म्यान असा होईल. पण पहिलें रूपच बरोबर आहे व त्याचा अर्थ 'निषंगी' म्हणजे 'चांगले धनुष्यबाण असलेला' असा आहे.

[२१]पवीरव.—निरुक्ताच्या मतानें ह्याचा अर्थ भाला असा आहे. ह्या शब्दापासून बनलेलें पवीरवंत किंवा पवीरव रूप अथर्ववेदांत आलेलें आहे. त्याचप्रमाणें यजुर्वेदसंहितांमध्यें दिसून येत असून त्याचा अर्थ नांगराचा लोखंडी फाळ असा आहे. हेंच विशेषण ऋग्वेदामध्यें एका माणसाला लाविलें असून त्याचा अर्थ 'अंकुश किंवा भाला असलेला' असा आहे.

[२२]अपस्कम्भ.—अथर्ववेदांत फक्त एका उताऱ्यांतच हा शब्द आढळतो आणि त्या ठिकाणीं त्याचें टोंक विषारी असतें असा उल्लेख आहे. रॉथ म्हणतो कीं भाल्याला जें फळ मजबूत बसवितात तो अर्थ ह्या शब्दावरून निघतो. व्हिटनेचें जरी हेंच मत आहे तरी तो चुकीचा पाठ आहे असें सुचवितो. व्युत्पत्तीवरून त्याचा बाण असा अर्थ ब्लूमफील्ड करितो.

[२३]आजनि.—अथर्ववेदांत अंकुश, बोंचणी, पराणी या अर्थी हा शब्द योजिला आहे.

[२४]जाल.—हें नांव अथर्ववेद व सूत्रें ह्यांमध्यें जाळें अशा अर्थी आलेलें आहे. बृहदारण्यकोपनिषदांमध्यें विणलेल्या आच्छादनासारख्या जालाकार त्वचेला जालक असें म्हटलेलें आहे.

[२५]पर्शु.—एक जात कांहीं लेखांत ह्याचा अर्थ विळा असा दिसतो. कारण हा परशु शब्दाचा पर्याय दिसतो.

[२६]पिनाक.—अथर्ववेदांत याचा अर्थ सोटा किंवा गदा असा असून पुढें शिवाच्या गदेला हा शब्द लावूं लागले असें मॅकडोनेल म्हणतो. परंतु तैत्तिरीय संहिता, वाजसनेयि संहिता व अथर्वसंहिता ह्यांमध्यें सायणभाष्याप्रमाणें गदा किंवा सोटा असा अर्थ नसून धनुष्य, कोदंड, अंकुश असा अर्थ निघतो.

[२७]प्रसिति.—वाजसनेयि संहितेंत आणि तैत्तिरीय ब्राह्मणांत याचा अर्थ 'दैवी अस्त्र' असा आहे असें मॅकडोनेल म्हणतो पण सायणभाष्याप्रमाणें त्याचा तसा अर्थ नसून एका ठिकाणीं 'जाळें' असा अर्थ व दुसऱ्या ठिकाणीं तो विशेषण असून त्याचा अर्थ 'प्रकृष्टबंधना' असा आहे.

## युद्धनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अज्मन् | प्रतूर्ति | शूरसाति |
| अपीति | [4] प्रधन | शौरदेवी |
| अभीक | प्रसर्ग | श्मश्रु |
| अभीत | भयस्थ | संयुग |
| ( स्वारी ) | भर | संवत् |
| अर्कसाति | मखस्यन् | संक |
| अक्रन्द | समसत्य | संख |
| आजि | [5] महाधन | संग |
| आणि | मीह्ळ | संगथ |
| आहव | मृध् | संगम |
| कार्पाण | मेध | सद्मन् |
| खज | [6] यामन | समद |
| खल | युध् | समदन |
| [1] गविष्टि | [7] युद्ध | समन |
| तूर्य | योनि | समनीक |
| दस्युहत्य | रण | समर |
| [2] दाशराज्ञ | वाज | समरण |
| देवहूय | वाजसाति | समर्य |
| द्युम्नहूति | विदथ | समिति |
| नदनु | विह्व | समीथ |
| नृषह्य | विखाद | समीक |
| नेमधित | विवाच् | समृति |
| पृक्ष | वृत्रतूर्य | समोह |
| [3] पृतना | वृत्रहत्य | सहस्रप्रधन |
| पृतनाज्य | वृत्रहथ | स्पृध् |
| पौंस्य | शुष्णहत्य | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| पृत् | संयत् | समत् |
| रण | संग्राम | समर |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| आभिमाति | [9] द्विराज | रण |
| आगर | पृत्सुतु | शूरसाति |
| आजि | पौंस्य | संग्राम |
| आहव | पृत्सुर्ति | समर |
| जीति | प्रधन | |

[1] ग वि ष्टि.—याचा शब्दशः अर्थ गाईची इच्छा. ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं गाई (गो) नेण्याकरितां केलेलें युद्ध अथवा तंटा असा अर्थ आहे. गव्य या शब्दाचाहि तसाच उपयोग केला आहे.

[2] दा श रा ज्ञ.—हें ऋग्वेदांमध्यें व अथर्ववेदांत उल्लेखिलेल्या सुदासाच्या दहा राजांशीं झालेल्या प्रसिद्ध युद्धाचें नांव आहे. हे दहा राजे कोण होते हें नक्की सांगणें जरा कठिण आहे पण दहा हा शब्द म्हणजे अदमासाचा असावा, नक्की दहाच राजे होते असें म्हणतां येत नाहीं. खुद्द या युद्धासंबंधीं जें सूक्त आहे त्यांत हा शब्द आलेला नाहीं. ज्यांत हा आलेला आहे तीं सूक्तें मागाहून झालेलीं असा समज आहे. ऋ. ७.८३,८ या ठिकाणीं दाशराज्ञ हा शब्द सुदास ह्या शब्दाचें विशेषण आहे असें सायणाचार्य म्हणतात.

[3] पृ त्; पृ त ना.—याचा अर्थ युद्ध, रथांचा सामना, शर्यत किंवा सशस्त्र सामना. ह्याचा कांहीं ठिकाणीं सेना असाहि अर्थ आहे. महाकाव्यांतील युद्धवर्णनांत याचा अर्थ मनुष्य, हस्ति, रथ, पृतनाज्य यांचा केवळ सामना असाच अर्थ मॅकडोनेल देतो, परंतु सायणभाष्यांत त्याचा संग्राम असा अर्थ आहे.

[4] प्रधन.—ऋग्वेदांत हा शब्द आला असून याचा अर्थ 'लढा' असा आहे; मग तो खऱ्या युद्धांतील असो, किंवा साध्या रथांच्या शर्यतींतलि चुरशीचा असो. सायणभाष्याप्रमाणें कित्येक ठिकाणीं याचा अर्थ 'पुष्कळ धनानें युक्त असा' होतो.

[5] म हा ध न.—ऋग्वेदांत याचा अर्थ 'मोठी लढाई' किंवा लढाई जिंकल्यानंतर दिलेलें 'मोठें बक्षीस' असा किंवा कित्येक ठिकाणीं 'झुंज, रथांची शर्यत असा अर्थ मॅकडोनेल करितो. सायणभाष्याप्रमाणें 'पुष्कळ धन ज्यांत प्राप्त होईल असा याचा व्यापक अर्थ होतो.

[6] या म न्.—ऋग्वेदांत चाल, लढाई किंवा हल्ला या अर्थी हा शब्द आला आहे.

[7] यु द्ध.—ऋग्वेदांत आणि नंतर लढाई या अर्थी हा शब्द आलेला आहे.

[8] र ण.—ऋग्वेदांत या शब्दाचा अर्थ 'युद्ध' असा सायणभाष्यांत आहे. मॅकडोनेल येथें याचा 'युद्धाचा आनंद' असा अर्थ करितो. पुढें याचा 'संग्राम, असाच अर्थ आहे.

[9] द्वि रा ज.—हा शब्द नपुंसकलिंगी असून अथर्ववेदामध्यें त्याचा अर्थ दोन राजांमधील युद्ध किंवा झगडा असा आहे.

## योद्धे [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अदब्ध | [1] अस्तृ | योद्धा ) |
| अनायुध | आदारिन् | कृत्व्य [युद्धकुशल] |
| अनिषंग ( भाता रहित ) | आप्रस्य | कुध्मिन् |
| | [2] आस्थातृ | क्षत्रश्री |
| अपराजित | इषुहस्त | क्षिप्रधन्वन् |
| अभिवीर | उग्रधन्वन् | क्षिप्रेषु |
| अरिगूर्त | ऋतिषह् | गोजित् |
| अवीरहन् | ऋभ्ववीर ( महा- | चर्कृत्य ( शूर ) |
| अशस्तिहन् | वीर ) | जेतृ |
| अश्वाजित् | एकवीर ( मुख्य- | तनूत्यज |

| | | |
|---|---|---|
| तरुतार | यधीयुध् | वृषयुध |
| तिग्मायुध | यातृ | शतानीक |
| तिग्मेषु | युध् | शर्य |
| धन्वसहस् | युध्म | शर्यहन् |
| नामन् | युयुधि | शुभ्रखादि |
| [3] निषंगिन् | [6] योध | [9] शूर |
| परमज्य | योधीयत् | शूरग्राम |
| परशुमत् | रथजित् | शूरतर |
| पुरन्दर | [7] रथिन् | षाह् |
| पुरुवीर | रथिर | [10] सत्वन् |
| पुरोनिति | रथिरायत् | सधवीर |
| पुरोयोध | रथी | समर्यजित् |
| पूर्भिद् | रथीतम | सरथ |
| प्रघ्नंत | रथीतर | स्थिरधन्वन् |
| प्रभंगिन् | [8] रथेष्ठा | स्वंर्जित् |
| प्रवीर | वनुष | स्वायुध |
| बाहुशर्धिन् | वर्मिन् | हृदयविध् |
| [4] महावीर | विम्रेषकृ | |
| [5] मुष्टिहन् | वीर | |
| पृतन्यु | रथीतम | सरथ |
| पृश्निबाहु | लोकजित् | [13] सव्यष्ठ |
| प्रवीर | विवाच् | सहस्रऋष्टि |
| प्राणाह | वीर | सांग्रामजित्य |
| बाहुवीर्य | वीरयु | [14] सादिन् |
| बाहुशर्धी | शत्रतूर्य | सुबाहु |
| बाह्वोजस् | शत्रुषाह् | सुवीर |
| मिथोयोध | शिंतिबाहु | सुवीर्य |
| मुष्टिहन् | शूर | सुसह |
| युधिंगम | शूरवीर | सुहन्तु |
| रथजित् | संग्राम | हतवर्चस् |
| रथजूति | सत्वन् | हेतिमत् |
| रथी | सन्दृष्ट | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| असमरथ | प्रवीर | रथौजा |
| उच्चैर्घोष | बाणवत् | वज्रबाहु |
| इषुहस्त | बाहुशर्धिन् | वीर |
| कवचिन् | [11] युत्सु | वीरहन् |
| कृन्त्सवीत | युध | सुधन्वन् |
| तार्क्ष्य | [12] रथगृत्स | सुषेण |
| निव्याधिन् | रथस्वन् | सृकाविन् |
| निषंगिन् | रथी | सेनजित् |
| पत्ती ( पादचारी योद्धा ) | रथेचित्र | सेनानी |
| | रथेष्ठ | सौधन्वन् |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अधिराधिराज | अश्महन्मन् | ग्रामजित् |
| अधिरज्जु ( पाश-हस्त ) | अश्वाजित् | चमूसद् |
| | असर्ववीर | जेत्व |
| अभिमातिजित् | असिध | तीक्ष्णेषु |
| अभिवीर | अस्तृ | धीरण |
| अमत्र ( युद्ध कुशल ) | आरेशत्रु | धृष्णुषेण |
| | इष्वायुध | निषंगिन् |
| अमित्रयत् | इषुमति | पुरुवीर |
| अमित्रयु | इषुहस्त | पुरोयोध |
| अमित्रसह् | उग्रबाहु | पूर्भिद |
| अरगराट् | एकवीर | पृतनाजित् |
| अवीरहन् | क्षिप्रधन्वन् | पृतनासह् |

युद्धकरणें ( क्रियापदें ) [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अजयत् | जिंषे | रणय |
| अपृतन्यत् | जेषः | ससहः |
| जभ्रे | युध्य | साक्ष्व |
| जिगीषुः | योधिषत् | स्फुर |

[ तै. सं ]

| | | |
|---|---|---|
| अजयत् | अहीयेताम् | युयोधि |
| अजानन् | जयति | युवते |
| अजीगः | जानते | योधि |
| अबाधन्त | पराभवति | योयुप्यते |

अस्तृ.—( बाणादि शस्त्रास्त्रें सोडणारा ) रथांमधून जो धनुर्धारी लढत असे त्याच्याबद्दल ऋग्वेद आणि अथर्ववेद ह्यांत हा शब्द योजिला आहे.

[2] आस्थातृ.—ऋग्वेदांत रथामधील योध्याचें हें नांव आहे. परंतु त्याला रथिन् अथवा रथेष्ठ असें म्हणतात.

[3] निषंगिन्.—ऋग्वेदांत तीन वेळां हा शब्द आलेला आहे. व त्या ठिकाणीं ' सुधन्वान् इषुमंतो ' ( चांगलीं धनुष्यें व बाण असलेले ) ह्या शब्दांमागून असल्यामुळें निषंगिनः ह्याचा अर्थ ' उत्तम बाणाचे भाते असलेला ' हा निश्चित आहे. वाजसेनयि संहितेमध्यें महीधराचार्यांच्या मतानें ' तरवार असलेला ' असा त्याचा अर्थ आहे; आणि हा अर्थ त्या ठिकाणीं पूर्णपणें संभावतो. पण ' भाता असलेला ' हाच अर्थ बरा दिसतो. कारण. वैदिककाळीं लोकांचें शस्त्र धनुष्य होतें, तरवार हें नव्हतें, असें मॅकडोनेल म्हणतो.

[4] महावीर.—(मोठा योद्धा ). ऋग्वेदांत हा शब्द आला आहे. परंतु मागाहूनच्या संहिता व ब्राह्मण ग्रंथ ह्यांत आलेलें हें एक यज्ञियपात्राचें ( मडक्याचें ) नांव आहे. हें विस्तवार ठेवीत असत, व प्रवर्ग्य नांवाच्या सुरवातीच्या सोमसमारंभप्रसंगीच्या अनुष्ठानांत याचा उपयोग करीत असत.

[५] मु ष्टि ह न्, मु ष्टि ह त्या.—ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांत यांचा अर्थ अनुक्रमें ' हाताहातांची लढाई ( मुष्टियुद्ध ) करणारा ' व ' हाताहाताची लढाई ( मुष्टियुद्ध ) असाहि आहे. ( मुष्टिहन् ) म्हणजे पादचारी योद्धा –रथी नव्हे तो–असा अर्थ होतो. त्याचप्रमाणें अथर्ववेदांत रथी आणि, त्यापासून भिन्न असा पत्ति ( पादचारी शिपाई ) व ऋग्वेदांत रथ व त्याहून निराळें पायदळ (ग्राम), असें दाखविलें आहे.

[६] यो ध.—ऋग्वेदांत ' योद्धा ' लढवय्या, या अर्थी हा शब्द आला आहे.

[७] र थि न् आ णि र थी.—ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथात ' रथांतून जाणारा —यांत रथी व सारथी या दोहोंचाहि समावेश होतो–असा याचा मॅकडोनेल अर्थ करितो. ऋ. ५.८३,३ या ठिकाणीं सायणभाष्याप्रमाणें यांचा अर्थ रथी, रथाचा स्वामी असा असून सारथी असा नाहीं.

[८] र थे ष्ठा.—रथावर उभा राहणारा, रथांतुन लढणारा असा याचा ऋग्वेदांत अर्थ आहे.

[९] शू र.—ऋग्वेदामध्यें नेहमीं येणारा व नंतरच्या वाङ्मयांत केव्हां केव्हां येणारा हा शब्द असून याचा अर्थ वीर, शूर योद्धा, असा आहे.

[१०] स त्व न्.–ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत कधीं कधीं योद्धा या अर्थानें हा शब्द आला आहे.

[११] महारथ.–(मोठा रथ असलेला ) रथांतील मोठा योद्धा. यजुर्वेदसंहितेंत अश्वमेधप्रसंगीं विशिष्ट कर्मांच्या वेळीं प्रार्थिलेल्या एका मोठ्या योध्याचें नांव. महीधरभाष्यांत ' एकः सहस्रं जयति महारथाः ' म्हणजे हजार योध्यांनां जिंकणारा तो महारथ असा अर्थ दिला आहे.

[१२] र थ गृ त्स.— तैत्तिरीय व वाजसनेयि संहितेंत आणि ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द आला असून मॅकडोनेल त्याचा अर्थ ' हुशार सारथी ' असा करितो. परंतु वाजसनेयि संहितेंत उवटभाष्य व महीधरभाष्य यामध्यें याचा अर्थ रथयुद्धकुशल असा दिलेला आहे; हुशार सारथी असा नाहीं. त्याचप्रमाणें ऐतरेय ब्राह्मणांत सायणभाष्याप्रमाणें राजपुत्र ( रथगृत्सो राजपुत्रः ) असा अर्थ असून एम्. हॉगनेंहि असाच अर्थ केला आहे.

[१३] स व्य ष्ठा, स व्यष्टृ, स व्ये ष्ठ, स व्य स्थ.—मॅकडोनेल म्हणतो " ह्या सर्व शब्दांचा अर्थ रथांतून युद्ध करणारा असा आहे. हा सारथ्याच्या डाव्या बाजूस असे. टीकाकारांच्या मतानें सव्यष्ठाचा अर्थ नुसता सारथी असा आहे. पण हा अर्थ चुकीचा आहे; ह्या शब्दाचा असा अर्थ करण्याचें कारण शूद्र सारथ्याबद्दल पुढें उत्पन्न झालेला जातिद्वेष हें होय ( मॅकडोनेल्लनें हा शेवटीं केलेला तर्क काय आधारानें केला तें समजत नाहीं. ). शतपथ ५. २, ४, ९ या ठिकाणीं सव्यष्ठ असा शब्द आहे. सायणभाष्यांत त्याचा अर्थ रथाच्या डाव्या भागांत बसणारा ( सारथी ) असा दिला आहे; रथांतील योद्धा असा दिला नाहीं.

[१४] सा दि न्.— अथर्ववेदांत याचा अर्थ घोडेस्वार —असाद म्हणजे पदाती याहून भिन्न अर्थी—असा आहे. अश्वसादी ( घोडेस्वार ) हा शब्द वाजसनेयि संहितेंत आला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत आणि खुद्द ऋग्वेदांतहि अश्वारोहणाबद्दल स्पष्ट उल्लेख आहेत. ऐतरेय आरण्यकांत ( नेहमी ) घोड्याच्या बगलेच्या बाजूनें घोड्यावर बसतात ( मागून किंवा पुढून बसत नाहींत ) असें म्हटलें आहे. अश्वलायन सूत्रांत साद्य म्हणजे बसण्याचा घोडा– असा शब्द आला आहे.

### युद्धपराभव [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपाकृति | नाश ) | संवित |
| अभिभूति | आभूति | सह ( पराभव- |
| अभिभूवरी | पराजित | यिता ) |
| अभिवेग | परशक्ति | |
| अविरण ( संग्राम- | परिसूति | |

### युद्धविषयक किरकोळ [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अजीति | कणूकयन्ती ( आ- | महासेन |
| अतूर्त | क्रोशमिच्छन्ती ) | मानुषप्रधन |
| अपवीरवत् | काष्ठा ( रण ) | युध्यत् |
| अभीति ( शत्रूची- | चित्रसेन | युध्यमान |
| चाल ] | जिगीषा | युयुत्सत् |
| अभिपित्व [ अभि- | जिष्णु | योध्य |
| गमन ) | जेतव्य | रुधत् |
| अयुद्धसेन | जेत्व | वप्र |
| अयुध्य | जेन्य | वर्मण्वत् |
| अयोधृ | जैत्र | शत्रुतूर्य |
| अशत्रु | जैत्री | शिमीवत् |
| अषाह्ळ | त्रद ( हिंसक ) | संयद्वीर |
| असेन्या ( सेना- | दस ( नाश ) | संसृष्टाजित् |
| रहित ) | दुर्ग | सक्मन् |
| अहृति ( अहनन ) | दुर्धर | संजयत् |
| आरुंधान ( निरो- | दुर्धर्तु | सत्पति |
| धक ) | देही | सर्ववीर |
| आविर्ऋजीक (सा- | पुरुषाद | सहीयस् |
| धनसहित) | पृतनाज | सिच |
| आस्क्र ( विना- | पृतनायत् | सुवीर |
| शक ) | पृतनायु | सुवीर्य |
| ऋजीष ( अनि- | पृतनासह | स्वगूर्त |
| वार्य ) | पृतनासाह् | स्वाष्ट्र |
| [१] ऊजयन्ती | पृतन्यत् | हनन |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अराति ( शत्रु ) | क्षुद्र | जय |
| अश्वाजनि | गोत्र | |

| | | |
|---|---|---|
| ध्वनिक | वि. ) | शत्रु |
| पथिन् ( शत्रु ) | वार्त्रघ्न ( „ ) | सपत्न |
| पवीरव | विक्रान्ति | सृक |
| युक्तग्रावन् ( वज्र- | विजय | |
| | [अथर्ववेद] | |
| अकवच | ध्वज | विदेश्य |
| अपराजित | नीषाट् | विरुधन |
| आभूति | पराभू | वृत्रहत्य |
| आहनन | पराभूति | वैर |
| ककजाकृत ( से- | पुनर्भुवा (सेनावि.) | संग्राम |
| नावि. ) | पृत | सान्धि |
| कवच | पृतनाजित् | सहस्रकुणपा |
| कवचपाश | पृतनाज्य | सहस्राग्नि |
| खृगल( चिलखत ) | पृतनासह्य | सेनी |
| ग्रावन् | प्रतिशत्रु | स्वयशस् |
| जय | युद्ध | स्वष्ट |
| जालदण्ड | [7] वप्र | हविष्मत् |
| ज्याघोष | वर्मन् | हृदूबल |
| ज्यापाश | विजेषकृत् | |
| | [ वाजसनेयि संहिता ] | |
| प्रसिति | महावीर | संघात ( लढाई ) |
| | [ संहितेतर ] | |
| ज्याऱ्होद | [11] व्युक्ष्ण | [13] बाणवन्त |
| [10] पताका | [12] प्रशास् | [14] समर |

[1] ऊ र्ज य न्ती.— लुडविग् म्हणतो कीं ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत हें नार्मर ह्याच्या किल्ल्याचें नांव आहे. तथापि त्या ऋचेपासून कांहींच अर्थबोध होत नाहीं. निश्चित अर्थबोध होत नाहीं हें जरी खरें असलें तरी लुडविगचा अर्थ चूक असें म्हणतां येत नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे.

[2] दु र्ग.— ज्याच्या जवळ जाणें कठिण असतें तो असा ह्याचा अर्थ असून ऋग्वेदांत हा शब्द नपुंसकलिंगी आलेला असून त्याचा अर्थ कधीं कधीं किल्ला किंवा माऱ्याचें ठिकाण असा होतो. सायणाचार्यांनीं पहिल्या ठिकाणीं ‘ संकट , व दुसऱ्या ठिकाणीं ‘ युद्ध , असा अर्थ केला आहे. परंतु दोन्हीं ठिकाणीं किल्ला असा अर्थ असणें संभवनीय आहे.

[3] दे हि.— ऋग्वेदामध्यें दोन ठिकाणीं शत्रूंच्या प्रतिकारार्थ बांधिलेली रक्षणाची जागा म्हणजे मातीची कामचलाऊ भिंत किंवा बांध अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. सायणांत एका ठिकाणीं देही याचा अर्थ ‘ पुरी ’ असा केला असून ७. ६, ५ येथें ( आसुरी ) विद्या असा केला आहे व ग्रिफिथ कोट असा अर्थ करतो.

[4] पा थ्य.— ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं वृत्राच्या पराभवासंबंधानें हा शब्द आलेला आहे. दगडी तट असा ह्याचा अर्थ आहे. दुसऱ्या एका लेखांत ह्या शब्दाचा अर्थ सोमवल्ली ठेंचण्याकरितां उपयोगी पडणारे दगड असा आहे.

[5] सि च्.— हा शब्द द्विवचनी आलेला असून ह्याचा अर्थ सैन्याच्या बगला व अनेकवचनी सैन्याच्या रांगा असा अर्थ आहे. सायणभाष्यांत सिच्यौ याचा अर्थ सिचमानौ भटौ म्हणजे अभिषेक केले जाणारे दोन राजे असा दिला आहे. ग्रिफिथ साहेबानें त्याचा अर्थ सैन्याचे दोन पंख असा केला आहे. अथर्ववेदांत असलेल्या या शब्दावर भाष्य लिहितांनां सायणानीं तो शब्द शुचः असा घेऊन त्याचा अर्थ शोचमानाः असा केला आहे.

[6] क व च.—अथर्ववेद आणि त्यानंतरच्या वाङ्मयांत हा शब्द उरस्त्राण या अर्थानें आला आहे. हें उरस्त्राण धातूचें करीत असत असें म्हणण्यास मात्र कांहींच आधार सांपडत नाहीं. परंतु तें धातूचेंच केलेलें असणें संभवनीय आहे. अथर्ववेदांत कवचपाश असा शब्द आला आहे त्या अर्थी तागाच्या उरस्त्राणाचा ( जें हिरोडोटस्ला माहित होतें त्याचा ) व त्या शब्दाचा संबंध असावा असें वाटतें.

[7] व प्र.—ह्याचा अर्थ तट असा कल्पनेनें बसविण्यासारखा पाठ अथर्ववेदामध्यें आलेला आहे.

[8] सं ग्रा म.—ह्याचा मूळ अर्थ शांततेचे वेळीं किंवा युद्धाचे वेळीं भरलेली सभा. लढाईचे वेळची सभा सशस्त्र लोकांची असे. अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांत ह्याचा नेहमींचा अर्थ युद्ध किंवा लढाई असा आहे. वैदिक कालच्या युद्धाविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं पण त्या वेळचीं युद्धें साधीं होतीं. प्रत्येक सैन्यांत पायदळ व रथी हे असत. हे दोघे एकत्र असत व पदाति लोकांचा पाडाव नेहमीं रथी लोकांकडून होई. हे रथी लोक क्षत्रिय किंवा त्यांचे पहिल्या प्रतीचे उत्तम अनुयायी असत. पदाति लोकांजवळ चिलखत फारसें नसे व लढाईचें वेळीं धनुष्याचाच ते उपयोग करीत. हें वर्णन झरक्सीसनें ज्या हिंदुस्तानांतल्या सैन्याच्या मदतीनें ग्रीसवर चाल केली अशा ज्या सैन्याचें हिरोडोटसनें वर्णन केलें आहे त्या वर्णनाशीं जुळतें. जे सरदार असत त्यांच्या जवळ उरस्त्राण असे, शिरस्त्राण ( शिप्रा ) व हस्तघ्न ( हे धनुष्याच्या दोरीच्या घर्षणापासून रक्षण करण्याकरितां ) असत. रथावर सारथी बसे व त्याच्या डाव्या बाजूस योद्धा ( सारथि, सव्यष्ठा ) बसे. लढाईंत घोड्यावर बसण्याची चाल नव्हती व ही घोड्यावर बसण्याची कल्पना वैदिक काळच्या कल्पनेला विसंगतच झाली असती. कारण त्या वेळचे वीर धनुष्यावरच सर्व मदार ठेवीत, व घोड्यावर बसून धनुष्यांचा उपयोग करणें सोयिस्कर नसे. त्या वेळचें लढण्याचें साधन ह्मणजे धनुष्य. भाला, तरवार व परशु ह्यांचा क्वचितच उपयोग केला जाई. अथर्व ५. २४, ७ या ठिकाणीं जो संग्राम शब्द द्वितीयेचे अनेकवचनांत आला आहे त्याचा अर्थ युद्धाच्या वेळीं भरलेली सभा असा नाहीं. ग्रिफिथचें मतें संग्रामान् ह्मणजे सैन्यें. सायण संग्रामान् या-

बद्दल संग्रामम् असा पाठ घेऊन त्याचा अर्थ युद्ध असा देतो तै. सं. ४. ७, १५. २ या ठिकाणीं जो संग्राम शब्द आहे त्याचा अर्थ युद्ध असाच दिसतो. ऋ. २. १२, ८ यां ठिकाणीं यंक्रन्दसीसंयंती विहृवयेते। असे शब्द आहेत. येथें संयती म्हणजे परस्परं सङ्गच्छन्त्यौ असा अर्थ आहे. याचा अर्थ एकमेकांशीं मिळून चालणाऱ्या असा धरला तर पदाति व रथी असें सैन्याचे दोन विभाग कल्पितां येण्यासारखे आहेत; परंतु परस्परविरुद्ध दोन सेना एकमेकींशीं भिडणाऱ्या असा अर्थ केल्यास हीं भिडणारीं विरुद्ध सैन्यें पदाति व रथी अशीं द्विविध होतींच असे खात्रीलायक म्हणतां येणार नाहीं. अथर्व ७. ६४, १ या ठिकाणीं रथीव पत्तीन जयत्। असे शब्द आहेत; त्या ऐवजीं सायण रथीव पत्तीन जयत्। असा पाठ घेतो व त्याचा अर्थ 'रथवान् पुरुषःपत्तीम् प्रजाम् अन्यदीयी स्वीयां वा नारीं यथा जयति एवम्' असा करतो. सैन्याची जातवार संघटित व्यवस्था होती कीं, नाहीं (जी व्यवस्था होमरच्या कवितेंत वर्णन केलेली आहे व जिचें अस्तित्व जर्मनीमध्यें टेसिटसनें आहे असें म्हटलेलें आहे ती) हें सांगणें कठिण आहे पण महाभारतांत ज्ञाती एकत्र लढत असत व हीच स्थिती वैदिक काळांतहि कमी-जास्त प्रमाणांत होती हें निश्चित आहे. शहरांनां वेढा पडत असे व लष्करी चौकी बसवून नाकेबंदी केली जाई असें ऐतरेय ब्राह्मणावरून दिसतें (उपसद्, प्रभिद्). कारण त्या वेळची हल्ला करण्याचीं जीं साधनें होतीं त्यांच्या योगानें छापा घालून व हल्ला करून एखादें शहर घेणें हें त्रासदायक व खर्चाचें होतें. हिलेब्रँट 'आपल्या उपनिषद्ग्रंथ' पुस्तकांत म्हणतो कीं, ऋग्वेदांतला पुरचरिष्णु हा एक प्रकारचा रथ होता. ट्रोजन घोड्याप्रमाणें हा रथ म्हणजे ज्या साधनांनीं एखाद्या शहरावर रोमन लोक हल्ला चढवीत त्या साधनांची पूर्वतयारीच होय. नेहमींचीं संरक्षणार्थ व नवीन देश जिंकण्याकरितां जीं युद्धें होत त्याशिवाय शेजारच्या मुलखावर भुरटे हल्ले नेहमींचे व वारंवार होत. ह्या हल्ल्यांचा हेतु जी लूट मिळेल (उदाज, निराज) ती राजानें व लोकांनीं आपसांत वाटून घ्यावी हा होय. लढाईत ध्वजांचा प्रचार असे व लढवय्ये लोक दुंदुभि व बकुर ह्या वाद्यांचा उपयोग करीत असत. ऐ. ब्रा. १. २३. २ या ठिकाणीं जो उपसद् शब्द आहे त्याचा अर्थ तेथें उपसद् नांवाचा होम असा आहे; सायण हा अर्थ करितो. शहराला दिलेला वेढा असा तेथें अर्थ नाहीं. ऋ. ८. १. २–८ या ठिकाणीं पुरचरिष्णु याचा अर्थ सायणानें रथ असा केलेला नाहीं; व तो तेथें तसा सयुक्तिक दिसत नाहीं. सायणानें पुर याचा अर्थ निवासस्थान असा केला आहे. चरिष्णव याचा अर्थ 'चरणशील असा' म्हणजे हिंडण्याचा शोकी असा दिला आहे.

[९] ज्या ह्रो द.—पंचविंश ब्राह्मणांत व्रात्याच्या शस्त्राचें जें वर्णन आहे त्यांत व सूत्रग्रंथांत हा शब्द आला आहे. याचा अर्थ कांहींसा संदिग्ध आहे कारण एका सूत्रग्रंथांत 'अयोग्य धनुः' असें याच्याबद्दल म्हटलें आहे व दुसऱ्या एका सूत्रांत धनुष्क अनिषु (बाणाशिवाय धनुष्य) असाहि उल्लेख आहे तेव्हां याचा कोणत्या तरी प्रकारचें धनुष्य असाच अर्थ असावा.

[१०] प ता का.—हा शब्द अद्भुत ब्राह्मणापूर्वी कोणत्याहि ग्रंथांत येत नाहीं. याचा वैदिक पर्याय शब्द ध्वज असा आहे.

[११] प्यु क्ष ण.—शतपथ ब्राह्मणांत धनुष्याचें आच्छादन या अर्थी हा शब्द आला आहे. हें आच्छादन बहुतेक कातड्याचें केलेलें असावें.

[१२] प्र शा स.—ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द आला असून सेंटपीटर्सकोशाप्रमाणें त्याचा कुऱ्हाड किंवा त्यासारखें तोडण्याचें हत्यार असा अर्थ आहे.

[१३] बा ण व न्त.—बृहदारण्यकोपनिषदांत बाण अथवा बाणाप्रमाणें (तीर) अशा अर्थानें हा शब्द आला आहे. वाजसनेयि संहितेंतहि हा शब्द बाणवान् असा असून याचा टीकाकारांनीं भाता असा अर्थ केला आहे.

[१४] स म र.—लढाई या अर्थी हा शब्द कौषीतकी ब्राह्मणांत आला आहे. गेल्डनेरच्या मतें ऋग्वेदांतहि या शब्दाचा हाच अर्थ असावा.

**वज्रनामें [ऋग्वेद]**

| | | |
|---|---|---|
| अत्क | नेमि | शतपर्वन् |
| [१]अद्रि | परशु | शताश्रि |
| अशनि | पवि | शम्ब |
| असिन्वन् | पवीरव | शरु |
| [३]ऋष्टि | बकुर | सहस्रभृष्टि |
| कुत्स | बाश्रि | सायक |
| कुलिश | भृष्टिमत् | सिध्म |
| गिरि | मेनि | [२]सृक |
| ज्यायत् | वज्र | [६]स्वधिति |
| तिग्म | वध | हेति |
| तुज | [४]वधर् | ह्लादुनि |
| दिद्युत् | वृक | |
| नमस् | शतधार | |

**सैनिकांचे प्रकार [ऋग्वेद]**

| | | |
|---|---|---|
| अंकुशिन् | अश्महन्मन् | इषुमत् |
| अग्रयावन् | अष्ट्रिन् | इषुध्य |
| अग्रिम | अस्तृ | चतुरनीक |
| अग्रिय | अस्थ | निषंगिन् |
| अधिरथ | आजिकृत् | पृतना |
| अभिसेन | आजिपति | प्रगर्धिनी |
| अयोग्र | आस्थातृ | व्राजपति |
| अश्व | इषुबल | शतानीक |
| अश्मचक्र | | |

### सैन्यनामें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अनीक | तिग्मानकि | बल |
| आजि | पृतना | [8]व्र |
| [7]जूर्णि | पृशनी | [9] सेना |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अनीक | पृत्सुती | सेना |
| पृतना | संका | |

### सेनाप्रकार [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अनीक | [10] पत्ति | शतानीक |
| अश्वपर्णा | पृतना | शत्रुतूर्य |
| क्षत्रभृत् | वाहिनी | सादिन् |
| चमू | वीरपोष | सेना |
| जेत्व | वृजिन | सूर्यकेतु |
| ( परकीयसैन्य ) व्र | | हेतृ |

[1] अ द्रि--ऋग्वेदांत एका उताऱ्यांत हा शब्द " खडक " " दगड या अर्थी योजला आहे. म्हणून झिमर वैदिक काळांत युद्धांत गोफणीनें दगड फेंकीत असत असें अनुमान काढतो. परंतु तो उतारा इंद्राची मदत किंवा साहाय्य ह्या संबधानें लिहिला आहे, म्हणून तो काल्पनिक आहे. आणि मनुष्यांचीं युद्धें याचा कांहीं संबंध त्या उताऱ्यांत नाहीं. बऱ्याच अंशीं तो शब्द इंद्राचें वज्र या अर्थी योजिला असावा.

[2] अ श नि.—ऋग्वेदांवरून हा शब्द गोफणीचा दगड अशा अर्थी आहे.असें झिमर म्हणतो. त्याची तुलना अद्रि शब्दाशीं केली आहे. कोणत्याहि बाबतींत हीं आयुधें इंद्राच्या पराक्रमांच्या वर्णनांत उपयोगांत आणिलीं आहेत म्हणून काल्पनिक आहेत. श्राडर हा अशन् हा शब्द ह्याच अर्थी योजितो परंतु कोणच्याहि वेदाच्या उताऱ्यांत हा अर्थ नाहीं.

[3] ऋ ष्टि.—मरुत् ह्यांच्या हातांतलि अस्त्राचा द्योतक असा हा शब्द ऋग्वेदांत बराच वेळ उपयोगांत आणिला आहे आणि म्हणूनच तो विद्युल्लतेचा दर्शक असावा. ' प्राण घातक युद्धांतील भाला ' असा अर्थ ऋष्टि शब्दाचा होतो असें झिमर म्हणतो पण तसा अर्थ कोणत्याहि उताऱ्यावरून दिसत नाहीं ऋ. १. १६९, ३ यांत इंद्राच्या प्रसिद्ध वज्राला ऋष्टि असें सायणाचार्य म्हणतात.

[4] व ध र्.– ह्याचा अर्थ सामान्यत्वें शस्त्र असा आहे व ऋग्वेदामध्यें हा शब्द दैवी शस्त्राला लाविला आहे एवढेंच नव्हे तर मानुष.शस्त्रालाहि लाविला आहे.

[5] सृ क –ऋग्वेदामध्यें दोन ठिकाणीं ह्याचा अर्थ इंद्राचें शस्त्र कदाचित भाला असा आलेला आहे.

ऋ .१०,१८०,२ सृक म्हणजे इंद्राचें वज्र व वा-सं. १६.२१ या ठिकाणीं भाष्यांत सृक याचा अर्थ वज्र असा दिला आहे.

[6] स्व धि ति.—ऋग्वेदामध्यें ह्याचा अर्थ कुऱ्हाड किंवा सुरा असा आहे. हा सुरा यज्ञांतील ( घोड्याच्या शरीराचे निरनिराळे भाग करण्याकडे उपयोगीं पडे.) ह्याचा ऋग्वेद संहितेंत; इतर सर्व ठिकाणीं लांकूड कापण्यास योग्य अशी कुऱ्हाड असा अर्थ जमतो. एके ठिकाणीं कुऱ्हाड क्ष्णोत्रावर तीक्ष्ण करण्याचा उल्लेख आलेला आहे. अथर्ववेदामध्यें जनावरांच्या कानावर खूण करण्याकरितां उपयोगीं पडणारी तांब्याची सुरी असा ह्याचा अर्थ आहे. सुताराच्या कुऱ्हाडीचा दोनदां उल्लेख त्याच ठिकाणीं आलेला आहे व पुढें कुऱ्हाड असा सामान्य-अर्थ आहे. शस्त्र असा अर्थ मुळींच प्रचारांत नाहीं.

[7] जू र्णि.—ह्याचा अर्थ कोलीत असा आहे व तें झिमरच्या मतें वैदिक काळच्या आर्य लोकांचें एक शस्त्र होतें. पण ज्या अर्थी हें शस्त्र राक्षसांनीं उपयोग केल्याचा फक्त ऋग्वेदांतच उल्लेख आलेला आहे त्या अर्थी इतर युद्धाचे वेळीं ह्याचा उपयोग केला जात असे असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. ऋ. १.१२९,८ या ठिकाणीं येणाऱ्या " जूर्णि " शब्दाचा अर्थ सायण "सेना" म्हणजे सैन्य असा करितो. वेदार्थयत्नकारहि त्या शब्दाचा अर्थ "सेना" असाच करतात. ग्रिफिथ व इतर यूरोपिय पंडित "जूर्णि" याचा अर्थ "कोलीत" असा करतात; परंतु तो फारसा लागू पडत नाहीं. निरुक्त ६.४ या ठिकाणीं जूर्णि याचा अर्थ शक्तिः असा दिला आहे.

[8] व्र.—रॉथचे मतानें ऋग्वेदांत व अथर्ववेदांत सैन्य अशा अर्थानें आलेला आहे. झिमरच्या मतानें व्र [ व्र चें त्रिलिंगी रूप ) ह्याचा अर्थ एके ठिकाणीं विश ह्याचा भाग व (सुंबधु) नात्यांतल्या लोकांचें बनलेलें खेडेगांवांतलें सैन्य असा अर्थ आहे. उलटपक्षीं पिशेल म्हणतो कीं, जेथें जेथें हा शब्द आलेला आहे तेथें तेथें स्त्री मग ती सामान्य असो किंवा समन नांवाच्या मेजवानीला जाणारी असो किंवा लोकांनीं ठेवलेली वेश्या असो किंवा अलंकारिक रीतीनें ह्या वेश्याशीं तुलना केलेलीं सूक्तें असोत हे अर्थ बरोबर दिसतात.

[9] से ना.—ह्या शब्दाचा मूळचा अर्थ अस्त्र असा असून ह्याच अर्थानें तो ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांमध्यें आलेला आहे. व नंतर त्याचा सैन्य असा नेहमींचा अर्थ झाला. ऋग्वेदांतील सर्व उताऱ्यांत सायणानें सेना याचा अर्थ अस्त्र असा कोठेंहि केला नाहीं. सैन्य असाच केला आहे. वेदार्थयत्न ग्रंथांत वरील उताऱ्यापैकीं बहुतेक ठिकाणीं सेना शब्दाचा बाण असा अर्थ केलेला आहे. अथर्ववेद ८.८,७ येथें सेना याचा अर्थ सैन्य असा ग्रिफिथनें केला आहे, व तोच बरोबर दिसतो.

[10] प त्ति.— अथर्ववेदांमध्यें रथी ह्याच्या उलट पायदळांतला शिपायी असा अर्थ ह्या शब्दाचा आहे. रथी पत्तीचा-पराभव करतो असेंहि वर्णन आहे. वाजसनेयि संहितेंतील शतरुद्रीय प्रार्थनेमध्यें रुद्राला जीं विशेषणें दिलेलीं आहेत त्यांपैकीं पत्तीनांपति असें एक विशेषण दिलेलें आहे.

अथर्ववेद ७. ६४, १ या ठिकाणीं पत्तीम् याबद्दल पत्नीम् असाहि पाठ आहे व ह्याच पाठ सायणानें घेतला आहे. वा. सं. १६. १९ या ठिकाणीं येणाऱ्या पत्ति शब्दाचा अर्थ त्यावरील भाष्यांत 'हस्त्यश्वरथ पदाति संख्या पत्तिः' असा दिला आहे.

## सार्वजनिक कामें.

### कूपनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंहूरण (अन्धकूप) | कर्त | केवट |
| [1]अवत | कशि | खात |
| अश्मचक्र | काट | नृपाण |
| अश्मास्य | कातु | वय |
| उत्स | कारोतर | वव्र |
| उत्सधि | कुशय | सूद |
| उद्रिण(जलयुक्तकूप) | [2]कूप | स्तिप |
| ऋश्यद | | |

### जलाशय [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| उत्साधि | खात | पूर्त |
| कियांबु(पुष्करिणी) | गोअर्णस् | [3]प्रपा |
| कुल्या (पाट) | तीर्थ | श्मशा (कालवा) |
| खनित्रिम (कालवा) | तुग्वन् | सुतीर्थ |

[ तै. सं. ]

| | |
|---|---|
| खन्या (पाट) | प्रपा |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| उत्सस् (उच्छ्वास) | घृतऱ्हद (पुष्करिणी) | प्रपा |
| कुल्या | तीर्थ | [4]वर्त्र (तळ्याचा बांध) |
| कूप | पुष्करिणी | |
| खात | | वापी |

### मार्ग [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| प्रपथ | रुद्रवर्तनि | वर्तनि |
| प्राध्वन् | रथ्य | वृजिनवर्तनि |
| रघुवर्तनि | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अंजसायनी | पथ्या | सुपथ |
| अध्वन् | रथस्पष्ट | सेतु |
| पंथ | वर्तनि | स्रुति |
| | वर्त्मन् | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अध्वन् | रथ्या | व्यध्व |
| जनायन | प्रपथ | सुपथ |
| पथ | परिरथ्य | |

[1] अवत.— उत्स म्हणजे स्वभाविक झरा याच्या उलट कृत्रिम म्हणजे खणून तयार केलेली विहीर या अर्थानें अवत शब्द ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं आढळतो. उत्स हा शब्दहि कांहीं ठिकाणीं कृत्रिम विहिरीकरितां वापरलेला आहे. अशा विहिरी झांकून ठेवीत असत आणि त्यांतील पाणी कधींहि आटत नसे, असें वर्णन आहे. त्या विहिरींतून पाणी दगडाच्या चाकाला दोर, पोहोरा लावून काढीत असत. पाणी वर काढल्यावर तें लांकडाच्या भांड्यांत ओतीत असत. कधीं कधीं त्या विहिरींतील पाणी रुंद पाटांच्या योगानें शेतांस उपयोगांत आणीत असत.

[2] कूप.— ऋग्वेद आणि त्यानंतरचे वाङ्मयांत खांच किंवा कृत्रिम खळगा ह्या अर्थी हा शब्द आला आहे. कांहीं ठिकाणीं हे खड्डे अतीशय खोल असावेत, कारण एका कथेंत त्रित हा एका खळग्यांत पडला असून दुसऱ्याच्या मदतीशिवाय बाहेर निघूं शकला नाहीं असा उल्लेख आला आहे.

[3] प्रपा.—याचा अर्थ वाळवंटांतलि ' झरा ' असा आहे. व याचा उल्लेख ऋग्वेदाच्या एका वचनांत आलेला आहे. अथर्ववेदांत याचा नुसता ' पिणें ' किंवा ' पेय असाच अर्थ होतो.

[4] वर्त्र.—अथर्ववेद व तैत्तिरीयब्राह्मण ह्यामध्यें ह्याचा अर्थ एखाद्या तळ्याचा बांध असा आहे. पूर्वीचे लेख, भाष्यकार व हस्तलिखीत प्रती ह्यांत ' वर्त्र ' हा शब्द आलेला आहे.

## खेळ

### खेळ व खेळसंबंधीं [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1]अक्ष (फांसे) | ग्राम (डाव) | मृगण्यु |
| अंकुशिन् (अक्षयुक्त) | तपन [तापक = | यातु (जादूगार) |
| आजि (शर्यत) | दीव् (जुगार) [अक्ष | लक्ष (पण) |
| [2]इरिण | देवन " | वराहयु |
| [3]कार्ष्मन् [शर्यतीच्या-खुणेचें लांकूड] | देवमान [जुगारी] | व्रन् [ व्याध ] |
| | [6]परिपद | श्वघ्नी |
| [4]काष्ठा | पुनर्हण | सप्त्य ( शर्यतीचें- |
| कितव | प्रतिदीविन् | सुदेव्ये |
| क्रीडि | [5]प्रैहा | |
| क्षेप्नु | | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्ष | अधिदेवन | क्रीडा |
| अक्षसंग | आख (शिकार पकडण्यासाठीं केलेली खांच ) | त्सारी ( शिकारी-मनुष्य ) |
| अक्षवाप | | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंश (द्यूतलक्षण) | कृत | द्यु |
| आतिदीविन् (जुगारी) | क्रीडन्ति (खेळणें क्रि.) | द्यूत |
| अतुर (द्यूतक्रीडक) | गाष्ठा शर्यतीचें— | प्रतिदीवन् |
| अधिदेवन (द्यूतस्थान) | मर्यादा काष्ठ) | शेषण(फासे टाकणें |
| अप्सरस् (द्यूतदेवता) | ग्लह् (डाव) | श्वघ्नी |

संवसव साधुदेविनी.

[1] अक्ष.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें ह्या शब्दाचा एकवचनी आणि अनेकवचनी असा वारंवार उपयोग केलेला आढळतो. त्याचा अर्थ 'फांसा' आणि 'फांसे', असा एकवचनी आणि अनेकवचनी अनुक्रमें केलेला आढळतो. घोड्यांच्या शर्यतीबरोबर फांसे खेळणें हा वेदकालीन आर्यांचा मुख्य खेळ होता; परंतु वाङ्मयांत ह्या खेळाचा पुष्कळ वेळां निर्देश केलेला असला तरी तो कोणच्या तऱ्हेनें खेळत असत ह्याचें बरोबर चित्र काढणें फार कठीण आहे. अक्षाचे उपयोग पुढीलप्रमाणें आढळून येतात. (१) पदार्थ– हे फांसे "विभीदक" नांवाच्या कठीण कवचीच्या फळांचे केलेले असत. ह्या फाशांचा निर्देश ऋग्वेद आणि अथर्ववेद ह्या दोहोंतहि केलेला आढळतो. म्हणून ह्याला "पिंगट" (बभ्रू) आणि "उघड्या जागेवर जन्मलेला" असें म्हणतात. अग्न्याधान्याच्या वेळीं फाशाच्या खेळाचें वर्णन आहे त्यांत आणि राजसूय यज्ञप्रसंगींहि फांसे कशाचे करतात हें सांगितलेलें नाहीं परंतु विभीदकाच्या फळासारख्या सोन्याच्या तुकड्यांचा प्रसंगविशेषीं उपयोग होत असे हें शक्य आहे. अर्वाचीनकालीं कवड्यांचा उपयोग फाशाकडे होतो पण त्याचा वैदिक वाङ्मयांत निर्देश केलेला आढळत नाहीं. (२) संख्या—ऋग्वेदांत फांसे खेळणाराचें "समहाचा अग्रेसर" (सेनानीर्महतो गणस्य) असें वर्णन केलें आहे. आणि दुसऱ्या वचनांत त्याची संख्या "त्रिपंचाशः" अशी दिली आहे. याचा अर्थ निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळा केला आहे. लुड्विग, वेबर, आणि झिमर हे त्या शब्दाचा अर्थ पंधरा असा करितात. परंतु मॅक्डोनेल तें व्याकरणदृष्टया क्वचितच् संभवनीय आहे असें म्हणतो. रॉथ आणि ग्रासमन हे त्याचा अर्थ "त्रेपन्न"असा करितात.व ल्यूडर्स दीडशें करतो तथापि तो म्हणतो कीं,अगणित संख्या दाखविण्याकरितां ह्या शब्दाचा उपयोग होत असावा लहान संख्या दाखविण्याकरितां ह्या शब्दाचा उपयोग करितात असा अर्थ आहे असें दर्शविण्याकरितां झिमर ऋग्वेदांतील "ज्याच्या जवळ चार आहेत त्याला भितो" हा उतारा देतो. परंतु तो उतारा खेळ खेळण्याच्या रीतीविषयीं आहे. (३) खेळाची रीति—अर्वाचीन संहिता आणि ब्राह्मण ह्यांतील पुष्कळशा उताऱ्यांत फांसे खेळण्यासंबंधीं कांहीं शब्द सांपडतात. तैत्तिरीय संहितेंतील नांवें कृत, त्रेता, द्वापर, आस्कन्द, आणि अभिभू हीं आहेत. पुरुषमेधामध्यें जे बळी देतात त्यांतील कितव हा अक्षराजाला, आदिनवदर्श कृताला, कल्पिन् त्रेताला, अधिकल्पी द्वापाराला, आणि सभास्थाणु आस्कन्दाला देतात असें वाजसनेयि संहितेंत म्हटलें आहे. त्याच प्रसंगांचे तैत्तिरीय ब्राह्मणांतील शब्द बलि, कितव, सभावी,आदिनवदर्श, बहिःसद, आणि सभास्थाणु हे आहेत आणि देवता अक्षराज, कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि या आहेत. कलीचें दुसरें नांव अभिभू असें असावें असें शतपथ ब्राह्मणावरून वाटतें आणि त्याच वेळच्या तैत्तिरीय आणि वाजसनेयि संहितेंतील याद्यांवरून असें वाटतें कीं, अभिभू आणि अक्षराज हे दोन्हीहि एकच होत. पण तैत्तिरीय ब्राह्मणांतील यादींत दोहोंचाहि उल्लेख केलेला आहे. वरील डावांचीं कांहीं नांवें ऋग्वेद आणि अथर्ववेद ह्यांतहि आढळतात. कलीचा निर्देश अथर्ववेदांत केला आहे आणि ऋग्वेदांतील पुष्कळशा वचनांत कृत म्हणजे "डांव" (पण किंवा जिंकलेलें धन नव्हे) असा अर्थ आहे असें ल्यूडर्स दाखवितो. आणि हाच अर्थ अथर्ववेदांतहि आहे. आणखी ऋग्वेदांतील एका वचनावरून एकापेक्षां पुष्कळ अधिक डावांचीं नांवें होतीं असें दिसतें. देवांची तुलना धन देणारे आणि नाश करणारे डाव यांशीं केली आहे, यावरूनहि वरील गोष्ट स्पष्ट होते. डाव कोणच्या तऱ्हेनें फेंकीत असत हें कांहीं कळत नाहीं, सेन्टपीटर्सबर्ग कोशावरून असें अनुमान निघतें कीं, वरील जीं नांवें आहेत तीं ४, ३, २ अथवा १ अशा चिन्हांकित फाशांनां दिलेलीं असावीं अथवा तशा खुणा केलेल्या फाशांच्या बाजूनां लावीत असत आणि हा अर्थ आधुनिक टीकाकारांनां मान्य आहे असें दिसतें. परंतु पहिल्या अर्थाला कांहीं आधार सांपडत नाहीं आणि दुसऱ्या अर्थाविषयीं विचार केल्यास विभीदक फळांचा उपयोग फाशाकडे होत असला तर आकारावरून त्या फळांची अमुक बाजू वरची असें सांगणें निश्चितपणें संभवत नाहीं. वरील शब्दांचा अर्थ अग्न्याधेयांतील खेळाच्या विधीचें वर्णन आणि राजसूयांतील विधीचें वर्णन यांच्या योगानें बराच विशद झाला आहे. खेळांतील बारीक सारीक गोष्ट जरी खात्री लायक माहीत नाहीं तरी एवढें मात्र दिसतें की हा खेळ म्हणजे फाशांवरील समसंख्या बहुत करून जी चारनें भागिली जाईल अशी संख्या मिळविणे आणि अशाच संख्येला कृत असें म्हणतात. दुसरे तीन डाव म्हणजे चारनी भागून जर शेवटीं तीन उरले तर त्याला त्रेता असें म्हणत, दोन उरले तर द्वापार एक उरला तर कलि. जर पांच हा भाजक असेल आणि ह्या भाजकानें भागून जर खालीं काहींच उरलें नाहीं तर त्याला कलि म्हणत, खालीं चार उरलें तर त्याला कृत आणि तीन उरले तर त्रेता आणि ह्या प्रमाणें फाश्यावर कोणत्याहि तऱ्हेचें आकडे खोदडेले नसत तर एकंदर फांश्यांच्या संख्येची बेरीज करावी लागत असे. ऋग्वेदांत वर्णन केलेला खेळ त्याच प्रमाणें खेळत असले पाहिजेत. पण त्यांतील किरकोळ गोष्टींची माहिती मिळत नाहीं. फांसे खात्रीनें पुष्कळ असत आणि चार हा डाव टाकावयाचा व एक पडला कीं हरावयाचे या गोष्टीवरून कृत हा शब्द डाव जिंयण्याला कां वापरीत याचा उलगडा होतो. दुसऱ्या पक्षीं अथर्ववेदांत कलीं हाच फासा खेळ जिंकावयास पाहिजे असा उल्लेख आहे, एका अर्थी व्यवहारांतील खेळ हा विधींतील खेळांत खेळ

णारे बहुधा फक्त जितके फांसे जरूर असत तितकेच घेत असत असें वाटतें यामुळें खेळ खेळलें असतां कांहीं अशुभ गोष्टी होण्याचा संभव असे व तो टाळावा म्हणून असें करीत असावे असें दिसतें. व्यावहारिक खेळांत पुढीलप्रमाणें खेळत असत असें ल्यूडर्स सुचवितो. एकजण खेळण्याच्या जागेवर फांसे टाकून कांहीं दान घेत असे, नंतर दुसर चारांनीं किंवा पांचांनीं भाग जाणारी संख्या होईल अशी त्या दानांत फांसे टाकून भर घालण्याचा प्रयत्न करी. खेळणाऱ्यांमध्यें अजमास करण्याची शक्ति पाहिजे ह्यावर जे पुढील ग्रंथांत ( उ० नलकथेंत ) जोर दिलेला आढळतो त्यावरून हा खेळ असाच खेळत असावे असें वाटतें. खेळामध्यें फळी वगैरेचा उपयोग करीत नसत परंतु फांसे टाकण्याकरितां जमिनींत एक खोलगट जागा करीत असत ( अधिदेवन, देवन, इरिण ). फांसे फेंकण्याकरतां पेटी नसे परंतु फांसे ठेवण्याकरितां मात्र असे ( अक्षावपन ). डावाला अथवा फेंकीला प्राचीन ग्रंथांत ग्रह अथवा ग्राभ असें म्हणत. पणाला विज ' असें म्हणत. जुगारामध्यें अतीशय नुकसान होत असे. जुगार खेळणारा आपलें सर्व धन आणि त्याची बायको देखील गमावली म्हणून शोक करीत असल्याचें ऋग्वेदांत वर्णन आहे. छांदोग्य उपनिषदांत खेळाचा दुसरा प्रकार उल्लेखित आहे असें ल्यूडर्स म्हणतो.

[२] इ रि ण.— ऋग्वेदोत्तर संहिता आणि ब्राह्मणें यांत हा शब्द जमिनींतील भेग ह्या अर्थी बराच वेळ उपयोगांत आणिला आहे. पिशेल म्हणतो कीं हाच अर्थ ऋग्वेदांतील तीन स्थलीं लागू पडतो. एका ठिकाणीं ती भेग पाण्यानें होत असावी ( अपाकृतम् ) असें दिसतें. ऋग्वेदांतील दुसऱ्या उताऱ्यांत ह्या शब्दचा अर्थ अक्ष फेंकण्याची जागा असा आहे. आणि म्हणूनच अक्षफलकाला हें नांव देत असत असें पिशेल म्हणतो. कारण त्याला भोकें असून त्यांत फांसे टाकण्याचा प्रयत्न करीत असत असें त्यांस वाटतें. पण अक्षफलक पूर्वी उपयोगांत नसे. ल्यूडर्स म्हणतो कीं पिशेलचा हा अर्थ चूक आहे. अक्ष इरिण ह्या नांवाच्या खड्ड्यांत फेंकीत असत आणि तो खड्डा जमीनींत असला तरी तो स्वाभाविक नसे तर मुद्दाम करीत असत. हा अर्थ सायण व टीकाकार दुर्गाचार्य यांस मान्य आहे.

[३] का र्ष्मन्.—शब्दशः अर्थ ' खांच , तास, फणी, असा आहे. हा शब्द ऋग्वेदांत फक्त आला असून तेथें रथांच्या शर्यतीच्या अवसानभूमीचें नांव असा त्याचा अर्थ आहे. बहुतकरून शर्यत खेळणारे त्या अवसानस्थानाला वळसा देऊन पुन्हां पहिल्या जागेवर येत असत.

[४] दे व न.— ऋग्वेदांमध्यें जुगारसंबंधानें हा शब्द एकदांच आला आहे. ज्या ठिकाणीं फांसे टाकीत ती जागा असा ह्याचा अर्थ असला पाहिजे ( याला अधिदेवन असेहि म्हटलेलें आहे ). व निरुक्तावरील टीकेंत दुर्गाचार्यांनें ह्या देवनचा असाच अर्थ दिलेला आहे. सायणभाष्यांत देवनद्यूत असा अर्थ आहे. निरुक्ताच्या टीकेंत 'देवन' याचा अर्थ आस्तार आंथरी असा केला आहे. म्हणजे हें द्यूतस्थान असावें.

[६] प रि ष द्.—ऋग्वेदामध्यें पकडल्यास केलेली गर्ता असा ह्याचा अर्थ आहे.

[७] प्र हा.—हा शब्द ऋग्वेदांत, अथर्ववेदांत आणि पंचविंशब्राह्मणांत आला असून याचा अर्थ ' जयनिक्षेप ' असा फांशाच्या खेळांत घ्यावयाचा. याचा सामान्यतः 'फायदा' किंवा 'लाभ' असा अर्थ होतो. ऋग्वेदांत सायणभाष्यांत प्रहा ह्मणजे प्रहंता असा अर्थ केला आहे.

## गृह

### गृहनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अज्मन् | गोह | रथक्षय |
| अन्तरावत् | छादिस् | ( तबेला ) |
| ( गुप्तगृह) | [८]छार्दिस् | रयिस्थान |
| अरिष्ट | छाया | ( धनगृह ) |
| अमा | त्रिधातु | वयावत् |
| अवमार्जन | दम | (शाखायुक्तगृह) |
| ( अश्वासस्नान | दशान्तरुष्य | वरूथ |
| घालावयाचें | (निवास स्थान) | वर्ती |
| गृह ) | दस्म | वर्मन् |
| अस्त | दीर्धनीथ | वश |
| अस्व | दीर्घप्रसद्मन् | वसति |
| उरुक्षय | दुर्दभ | [१०]वेश्मन् |
| ( विस्तीर्णगृह) | [६]दुरोण | व्रज |
| उरुक्षिति | [७]दुर्य दुर्योण | (गौळवाडा) |
| ओकस् | [८]धामन् | शरण |
| ओक्थ | धिष्ण्य | शर्मन् |
| (विश्रान्तिस्थान) | नाभि | शसन |
| कुलाय | निवेश | शुक्रसद्मन् |
| कृत्ति | निवेशन | सदस् |
| कृदर | निषद् | सदन |
| कृपनाळि | नीळ ( लांकडी | सद्मन् |
| क्षय | गृह ) | सहस्रस्थूण |
| क्षामन् | नीळय | सहस्रद्वार |
| गभीर | नृपीत | सुशरण |
| [१]गय | नृषदन | सुस्थान |
| गर्त | पस्त्या | स्वसर |
| गृभ | महागय | हर्म्य |
| [२]गृह | योनि | ह्वार |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अश्मनूमय | अस्त | [११]आवसथ |

| | | |
|---|---|---|
| गृह | नृषद् | शरण |
| दम | नृषदन | सदन |
| दुरोण | प्रतिष्ठा | सद्म |
| निशान्त | [१२] प्राचीनवंश | सप्तदशच्छादि |
| नीस्त | वास्तु | सूपसदन |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्ष ( द्यूत शाला ) | त्रिधातु(तिघईघर) | वसाना ( शाला ) |
| | त्रिभुज (,,) | वज्र ( गोठा ) |
| अश्वावती (शाला ) | दशपक्ष | वास्तु |
| अष्टापक्ष | दुर्य | [१५] शाला |
| अस्तक | द्विपक्ष ( दुखांबी ) | श्रेयस्केत |
| आयतन | धरुणी ( शाला ) | षट्पक्ष |
| आवसथ | धामन् | सद् |
| उत्स | नीड ( घरटें ) | सदन |
| उपानस | पयस्वती [शाला ] | सदोहविर्धान |
| ऊर्जस्वती [ शाला] | परिधि [ प्राकार ] | सद्मन् |
| कुलाय ( घरटें ) | पर्यागार | सनिस्राक्ष |
| खिल ( गोठा ) | पस्त्य | सुक्षय |
| गृह | पुरुदंसस् | सूनृतावती |
| गोमती ( शाला ) | पूतधानी( शाला) | स्थूणा ( शाला ) |
| घृतवती ( " ) | [१३] प्रतिष्ठा | स्वसर |
| चतुष्पक्ष(चौसोपी) | [१४]बृहच्छन्दस् | स्वादुसम्मुद(स्वाद्वन्नसंपन्नगृह ) |
| छदि | भूमिगृह (तळघर) | |
| छर्दि | भूरिधन | हर्म्य |

[ संहितेतर ]

| | |
|---|---|
| [१६] अगार | [१७] प्रासाद |

## गृहविशेष [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अन्तःपेय ( मदिरा गृह ) | ध्वसन ( गायींचें निवासस्थान ) | [१९]व्रज(गौळवाडा) |
| | | शसन ( खाटिकखाना ) |
| अन्तरुष्य ( गुप्तगृह ) | नहून ( गोठा ) | |
| | नीळ | सहस्रद्वार ( वरुणाचें गृह ) |
| अन्तिगृह ( श्वशुरभोजनगृह ) | नीळय | |
| | नृपीति | सुक्षय |
| अश्वपस्त्य | रथक्षय ( तबेला ) | सूना |
| [१८] गोत्र | रयिस्थान ( खजिना ) | [२०] स्वसर [गोठा] |
| गोष्ठ ( गोठा ) | | [२१] हर्म्य |

[ वाज. सं. ]

| | |
|---|---|
| [२] अग्निशाला | आपन्नगृह |

## गृहाचे अवयव [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [२३] आता ( दाराची चौकट ) | [२५] ऊर्दर (धान्याचें कोठार ) | [२] दुर् ( " ) |
| | | द्वर् |
| [२४] उपमित् | ख ( द्वार ) | [७] द्वार् |
| [२८] द्रुपद | विवर | [३०] स्थाणु |
| [२९] मयूख ( खुंटी ) | साधि (प्रवेशस्थान) | स्थूणा [ खांब ] |
| मेता ( स्थूणा ) | सूद ( चिखल ) | |
| वक्षथ ( खांब ) | स्कंभ [ खांब ] | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| गोष्ठ | मृगाखर [ गौळवाडा ] | इन्यमृ |
| छदि | | स्थाणु |
| बिल | रराट ( तोरण ] | |
| [३१] मेथि | व्रज | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| आष्ट्री [ पचनशाला ] | [३३] परिमित् | स्तम्भ |
| | [३५] पलद ( ओमण ) | स्थाणु |
| गोष्ठ | | स्थूणा |
| छदि [ छप्पर ] | [३५] प्रतिमित् | सद |
| द्वार | [खांब, तुळई.] | हविर्धान |
| [३२] पक्ष [ पाखें ] | स्तम्ब | |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [३६] अर्गल | [३९] भित्ति | [४२] स्तंभ |
| [३७] परिघ | [४०] वृत्रशंकु | |
| [३८] प्राकार | [४१] शीर्षण्य | |

[१] गय.—गय म्हणजे घर. ऋग्वेदांत नेहमीं व तदुत्तर ग्रंथांत कधीं कधीं येणारा हा शब्द आहे. गय या शब्दाच्या अर्थांत घर, घरांतील सामान व मनुष्यें यांचाहि अंतर्भाव होतो.

[२] गृह.—हा शब्द बऱ्याच वेळां एकवचनी व त्यापेक्षां अधिकवेळां अनेकवचनी आला असून त्यानें वेदकालीन आर्यांच्या गृहरचनेचा बोध होतो. दम आणि दम् या शब्दांचाहि तोच अर्थ आहे. परंतु पस्त्या आणि हर्म्ये यांच्या अर्थांत घर आणि भोंवतालचें आवार याचा समावेश होतो. घरांमध्यें मोठ्या थोरल्या कुटुंबाचाच समावेश होतो असें नसून गुरेंढोरें व मेंढ्या यांचेंहि तें रात्रीं आश्रयस्थान असे. अनेकवचनी प्रयोगावरून घराला पुष्कळशा खोल्या असाव्यात, तें चांगलें बंदहि करितां येत असावें. दाराचा (द्वार, द्वार्) उल्लेख पुष्कळ वेळा आला असून या द्वारावरूनच घराला दुरोण हें नांव मिळालें. प्रत्येक घरांत अग्नि नेहमीं प्रदीप्त असे. गृहरचनेविषयीं फारशी माहिती मिळत नाहीं. कदाचित् दगडाचा उपयोग न करिता मेगॅस्थनीजच्या वेळेप्रमाणें लाकडाचा उपयोग करीत असावेत. अथर्ववेदाच्या ऋचांनीं जरी गृहरचनेवर थोडासा प्रकाश पडतो, तथापि बारीक सारीक गोष्टींचा चांगलासा बोध होत नाहीं. कारण पुष्कळसे उपयोगांत आणलेले गृहविषयक शब्द त्याच अर्थानें पुन्हा येत नसल्यानें त्यांचा अर्थ स्पष्ट होत नाहीं. झिमरच्या मताप्रमाणें चांगल्या जागेवर चार खांब [ उपमित् ] उभे करून त्यांना

टेंकू [ प्रतिमित् ] म्हणून त्यांच्याशीं कोन करून तिरके सोट बसवीत. उभे खांब, त्या खांबावरच उभ्या असलेल्या उभ्या आडव्या तुळयांनीं एकमेकांशीं जोडले जात. घराचें छप्पर बांबूच्या (वंश) कांबी, विषूवंत् नांवाची मधली बाजू (आढें) व अक्षु (जाळें) म्हणजे वरील शाकार किंवा केंबळ, यांचें बनवीत. गवताच्या बिंड्यांनीं ( पलद ) भिंती बनविल्या जात असून तो सर्व डोलारा निरनिराळ्या प्रकारच्या बंधनांनीं ( नहन, प्राणाह, संदंश, परिष्वंजल्य ) एका ठिकाणीं स्थित केलेला असे. घराच्या संबंधानें हविर्धान (यज्ञिय हविर्द्रव्य ठेवण्याची जागा), अग्निशाला ( अग्नीची जागा ); पत्नीनाम सदन ( गृहीणींची खोली ); आणि सदस् ( बसण्याची खोली) हे शब्द आले आहेत. हे शब्द जरी यज्ञसंबंधीं असले तरी ते घराचे भाग असल्याचा त्यांच्या नांवांवरून बोध होतो. शिंकीं किंवा लोंबतीं भांडीं ( शिक्य ) यांचाहि उल्लेख आहे. घराच्या भिंती पुऱ्या करण्याकरिता वेतकामाचाहि ( इट ) उपयोग करीत असल्याबद्दल उल्लेख आहे. घराच्या बाजवांनां पक्ष असें म्हणत. चौकटीसह दरवाजाला 'आता' हें नांव आहे.

[३] छ दि स.—हा शब्द एकदां ऋग्वेदांत व ऋग्वेदोत्तर ग्रंथांत अनेक वेळां आला आहे, व त्याचा अर्थ चौचाकी गाड्यावरील झांकण, घरावरील छप्पर किंवा अशाच प्रकारचा कांहीं पदार्थ, असा आहे. वेबरच्या मतानें अथर्ववेदाच्या एका उताऱ्यांत या शब्दाचा अर्थ नक्षत्रगण असा आहे. व्हिटनेच्या मतें ह्याचा अर्थ नक्षत्रगण असा घेणें जरी आवश्यक नसलें तरी हा नक्षत्रगण कुंभराशीचा होय. कारण अथर्ववेदांत छदिस् शब्द आहे त्यापुढील मंत्रांत 'विचृतौ' ( वृश्चिक ) नक्षत्रगणाचा उल्लेख आहे; आणि वृश्चिक राशि ही कुंभ राशीहून फारशी दूर नाहीं.

[४] छ र्दि स्.—हा शब्द ऋग्वेदांत वारंवार व तदुत्तर ग्रंथांतहि आलेला असून 'राहण्याची सुरक्षित जागा' असा त्याचा अर्थ आहे. हा शब्द चुकीनें लिहिलेला दिसतो, कारण वृत्तावरून असें दिसतें कीं, पहिलें अक्षर नेहमीं लघु पाहिजे. याकरितां रॉथचें असें म्हणणें आहे कीं, छर्दिस्च्या ऐवजीं छदिस् हाच शब्द असावा, पण ह्याला एक अशी अडचण आहे कीं, 'छादिस्' चा अर्थ छप्पर असा आहे व 'छर्दिस्' चा असा अर्थ कधीं होत नाहीं. तेव्हां बार्थोलोमे जो छधिस् हा शब्द सुचवितो तें त्याचें म्हणणेंच कदाचित् बरोबर असूं शकेल.

[५] द म.—ऋग्वेदांत अनेक वेळां घर अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. रॉथच्या मतें ह्याचा अर्थ 'ज्या ठिकाणीं एखादा मनुष्य अनियंत्रित सत्ता उपभोगितो ( दम् म्हणजे ताब्यांत ठेवणें या धातूपासून ) तें ठिकाण' असा आहे.

[६] दु रो ण.—ऋग्वेदांत व पुढें झालेल्या ग्रंथांत घर अशा अर्थी व अलंकारिक अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[७] दु र्य.—'दार किंवा घर ह्यांसंबंधीं,' संहिता ग्रंथाच्या बऱ्याच उताऱ्यांत अनेकवचनी नाम म्हणून हा शब्द आला असून त्याचा अर्थ दाराचे खांब किंवा घर असा आहे.

[८] धा म न्.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें राहण्याचें ठिकाण, घर किंवा कधीं कधीं घरांतले रहाणारे लोक असा याचा अर्थ आहे. या शब्दाचा हुकूम, कायदा, असाहि अर्थ आलेला आहे, व हा अर्थ आणि धर्मन् व विशेषतः ऋत या शब्दाबरोबर धर्मन् शब्द आलेला असतांना, दोहींचा अर्थ सारखाच आहे. ऋत म्हणजे चिरंतन कायदा. हिलेब्रँटच्या मतें एका उताऱ्यांत 'धामन्'चा अर्थ नक्षत्र असा आहे.

[९] प स्त्या.—[स्त्रीलिंगी अनेकवचनी.] हा शब्द ऋग्वेदामध्यें अनेक ठिकाणीं आलेला आहे. रॉथ ह्या शब्दाला घर किंवा रहाण्याचें ठिकाण असा विस्तृत अर्थ देतो, त्याचप्रमाणें घरांत राहणारें कुटुंब असाहि त्याचा अर्थ करितो. हा अर्थ झिमरला सुद्धा संमत आहे. उलटपक्षीं पिशेलच्या मतानें दोन उताऱ्यांत पस्त्याच्या ऐवजीं पस्त्य असा नपुंसकलिंगी शब्द आहे आणि तो पस्त्यसद् व पस्त्यावंत शब्दात आढळून येतो. ह्या पस्त्य शब्दाचा अर्थ ऋग्वेदांत तरी लाक्षणिक अर्थानें नैघंटुकांत म्हटल्याप्रमाणें 'राहण्याचें ठिकाण' असा अर्थ आहे. त्याच्या मतानें इतर उताऱ्यांत या शब्दाचा अर्थ 'नद्या' किंवा 'पाणी' असा आहे. विशेषतः पस्त्याच्या मध्यभागीं सोम असतो असें जेथें म्हटलें आहे तेथें कुरुक्षेत्र व तेथील नद्या असा त्याच्या मतानें अर्थ आहे. ह्या नद्या ह्मणजे आपया, दृषद्वती, व सरस्वती या होत. कांहीं ठिकाणीं त्याच्या मतानें पस्त्याचा अर्थ एकाद्या नदीचें ठेविलेलें नांव असा आहे. उदाहरणार्थ सिंधु या शब्दाचा मूळचा अर्थ नदी असा होता व नंतर सिंधु नांवाची एक नदी असा झाला आहे.

[१०] वे श्म न्.—ह्याचा अर्थ 'घर' आहे. हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें आलेला आहे. या ठिकाणीं याचा अर्थ मनुष्य वसति करून (विश्) रहातो तें घर असा आहे.

[११] आ व स थ.—( घर ) तैत्तिरीय संहितेंत ह्या शब्दाचा बरोबर अर्थ पाहुण्यांचें आगतस्वागत करण्याची जागा; मुख्यत्वेंकरून मेजवान्या आणि यज्ञ, ब्राह्मण आणि इतर मंडळी यांनां बसण्याकरितां जागा, यात्रेकरू लोकांनां राहण्यासाठीं धर्मशाळा असाहि अर्थ होईल. हा अर्थ 'वसतिस्थान' ह्या व्यापक अर्थावरून निघाला असावा.

[१२] प्रा ची न वं श.—यजुर्वेदांत व शतपथ ब्राह्मणांत या विशेषणाचा अर्थ घराला आधारभूत असलेलें व ज्याचें टोंक पूर्वेकडे असून बुंधा पश्चिमेकडे आहे असें आढें असलेलें घर असा आहे. हें आढें कदाचित् बाजूंच्या तुळयांहून उंच असावें.

[१३]प्र ति ष्ठा.——हा शब्द अथर्ववेदांत एका ठिकाणीं आढळतो. तेथें हा कायद्यासंबंधीं पारिभाषिक शब्द आहे असें झिमर म्हणतो. कदाचित् याचा अर्थ पवित्रस्थान, देवालय, असा असावा. परंतु रॉथनें दिलेला 'घर,' 'राहण्याची जागा' हा अर्थ नीट लागूहि पडत नसून त्याबद्दल बरीच शंका वाटते असें मॅकडोनेल म्हणतो. झिमरच्या कल्पनेला आधार म्हणजे त्याच ऋचेंत प्रतिष्ठा शब्दापूर्वी 'ज्ञातार' म्हणजे साक्षिदार, जामीन, हा कायद्यांतील शब्द आला आहे एवढाच. सायणाचार्य याचा अर्थ 'आवासभूमि,' 'आश्रयस्थान,' असा करितात.

[१४]बृ ह च्छं द स्.——हा शब्द अथर्ववेदाच्या एका उताऱ्यांत आला आहे. तेथें हा 'शालाचें' (घराणें) विशेषण आहे. हें स्पष्टपणें 'बृहत्छदिस्'चें रूप दिसतें. 'बृहत्छदिस्' म्हणजे विस्तृत छप्पर असलेलें. आणि हाच अर्थ या शब्दाचा असावा असें दिसतें.

[१५]शा ला.—अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें ह्या शब्दाचा स्पष्ट अर्थ म्हणजे घर असा आहे. या शब्दांत अर्थात जनावरांचा गोठा, धान्याची कोठी, वगैरेंचाहि अंतर्भाव होतो. अथर्ववेदांत गृहपतीला शालापति असेंहि म्हटलें आहे.

[१६]अ गा र.——हा क्वचित् आढळणारा शब्द कौषीतकी उपनिषदांत 'घर' ह्या अर्थानें आढळतो.

[१७]प्रा सा द.——याचा अर्थ राजवाडा. परंतु हा शब्द अलीकडील 'अद्भुत ब्राह्मणाशिवाय' कोठेंहि या अर्थानें सांपडत नाहीं.

[१८]गो त्र.——ऋग्वेदांतलि इंद्राच्या अतिप्राचीन अद्भुत कृत्यांत ह्याचा बऱ्याच वेळां उल्लेख आला आहे. रॉथच्या मतानें त्याचा अर्थ गोठा असा आहे. गेल्डनेर 'कळप' असा अर्थ करितो व हाच ग्राह्य दिसतो; कारण ऋग्वेदोत्तर वाङ्मयांत 'कुल' अथवा कुटुंब असा अर्थ केला आहे, आणि छान्दोग्योपनिषदांतहि तोच अर्थ आहे, गृह्यसूत्रांत सगोत्रविवाह व वराच्या मातेचे जे सपिण्ड असतील त्यांच्याशीं विवाह निषिद्ध मानण्यावर विशेष जोर दिला आहे. सेनर्ट म्हणतो कीं हें जातीचें मूळ आहे. कारण 'क्युरिआ फ्रेट्रिआ अथवा वर्ण यांतील विवाह म्हणजे इण्डो-यूरोपीय विवाहपद्धतीच होय. त्याचप्रमाणें पितृगोत्र व मातुल सपिंड हे विवाहास वर्ज्य करण्याची चालहि त्यांचीच होय परंतु ही चाल इण्डोयूरोपियनांची होती असें म्हणण्यास मुळींच पुरवा नाहीं. शिवाय शतपथ ब्राह्मणाप्रमाणें बापाच्या व आईच्या बाजूनें तिसऱ्या अगर चवथ्या पिढीनंतर विवाहास परवानगी आहे. सायणभाष्याप्रमाणें तिसऱ्या पिढीतील विवाह कण्वांस मान्य, चवथ्या पिढींतील सौराष्ट्रांस मान्य, व वज्रसूचो नामक टीकाकार म्हणतो कीं 'कण्वांप्रमाणेंच आंध्रांची व दाक्षिणात्यांची पद्धत असून वाजसनेयि शाखेचे लोक मामाच्यां मुलीशीं लग्न करण्यास विरोध करितात, मॅकडोनेल म्हणतो कीं पूर्वी चुलत बहिणीशीं लग्न करीत असत पण पुढें ती चाल मोडली. परंतु या विधानास तो कोणताच आधार देत नाहीं. पूर्वी गोत्र बदलतां येत असे; शुनःशेपानें तें बदललें होतें. तो पूर्वी गृत्समद आंगिरस होता तो नंतर भार्गव झाला.

[१९] व्र ज.—ऋग्वेदामध्यें ह्याचा मूळ अर्थ जनावरें ज्या ठिकाणीं आश्रयार्थ जातात ती जागा आणि दुभतीं जनावरें गावांतून सकाळीं जेथें चरण्यास जातात व दुभतीं नसलेलीं रात्रंदिवस जेथें राहातात तें चराऊ रान असा आहे. त्यावरून पुढें या शब्दाचा गुरांचा कळप असा अर्थ झाला असें गेल्डनेरचें मत असून तें रॉथच्या मतापेक्षां अधिक योग्य दिसतें. रॉथ म्हणतो कीं वृज याचा मूळ अर्थ ( वृंज पासून ) कुंपण व नंतर त्या पासून कळप असा झाला. परंतु व्रज ह्याचा नेहमीचा अर्थ कांहीं कुंपण असा होत नाहीं. वैदिक कालांतील जनावरें सामान्यतः कांहीं गाठ्यांत पोसलीं जात नसत; तथापि कांहीं ठिकांणीं गोठा व कांहीं ठिकांणीं तबेला असा या शब्दाचा अर्थ निःसंशय आहे. गोहरणाच्या आख्यायिकेंत हा शब्द वारंवार उपयोगांत आणला आहे. कधीं कधीं ह्याचा 'हौद' असा अर्थ होतो.

[२०] स्व स र.—सेंटपीटर्सबर्गकोशाप्रमाणें ह्याचा अर्थ जनावरांचा गोठा, अथवा अधिक सामान्य अर्थ म्हणजे वसतीची जागा, घर, आणि नंतर पक्ष्याचें घरटें, असा आहे. गेल्डनेर म्हणतो कीं जनावरांचे बाबतींत त्याचें 'मोकळें हिंडणें' किंवा 'सकाळचें चरणें व पक्ष्यांच्या बाबतींत त्याचें 'प्रातःकाळीं घरट्याबाहेर उडणें, असा याचा अलंकारिक अर्थ 'सोमवल्लीचा रस सकाळीं काढणें' किंवा 'कोणत्याहि वेळीं रस काढणें' असाहि होतो.

[२१] ह र्म्य.—ह्या शब्दानें वेदकालीन गृहाचा बोध होतो. ह्यांत गोठा, भोंवतालचें कुंपण अथवा भिंत यांचा समावेश होतो. याचा ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत पुष्कळ वेळा उल्लेख आला आहे.

[२२] अ ग्नि शा ला.—अथर्ववेदांत एका शालेचें विशेषतः जेथें अग्नि ठेवीत अशा घराच्या एका भागाचें नांव अशा अर्थी हा शब्द आला आहे.

[२३]आ ता.——ऋग्वेदाप्रमाणें या शब्दाचा अनेक वचनांत उपयोग केला असतां घराच्या दरवाज्याची चौकट ( जरी हा शब्द आकाशाचे दरवाजे या अर्थानें योजिला आहे तरी ) असा अर्थ होतो. वाजसनेयि संहितेंतहि याच अर्थानें हा शब्द आढळतो. झिमर म्हणतो हा शब्द लॅटिनप्रमाणें आहे व व्युत्पत्तिदृष्ट्या तो अर्थ बरा दिसतो.

[२४]उ प मि त्.——घराचें नांव या अर्थी ऋग्वेदांत दोनदां व अथर्ववेदांत एकदां हा शब्द सांपडतो. ऋग्वेदांतील उताऱ्यावरून याचा व अर्थ सरळ खांब असा असावा असें वाटतें. अथर्ववेदांत हा शब्द परिमित् व प्रतिमित् या शब्दांशीं जोडलेला आहे. यावरून साहजिक असें अनुमान निघतें कीं, प्रतिमित् म्हणजे परिमित् यांनां आधारभूत तुळया—( बहुधा

परिमित् याच्याशीं कोनाकार असलेल्या ) आणि परिमित् म्हणजे उपमित् याच्याशीं आडव्या येऊन मिळणाऱ्या तुळया. परंतु हीं भाषांतरें तार्किकच आहेत.

[२५] ऊ र्द र.—हा शब्द ऋग्वेदांत धान्याचें कोठार-ज्याप्रमाणें कोठार धान्यानें भरतात त्याप्रमाणें इन्द्रास सोमरसानें भरावयाचा-अशा अर्थानें आला आहे. सायणांनीं याचा कोठार असा अर्थ केला आहे. परंतु झिमर व रॉथ हे धान्य ठेवण्याचें माप असें त्याचें भाषांतर करतात. ग्रिफिथचा अर्थ सायणाप्रमाणेंच आहे..

[२६] दु र्.—ऋग्वेदांत हा शब्द मूळच्या अर्थानें व अलंकारिक रीतीनें दरवाजा या अर्थानें आला आहे.

[२७] (द्वा) द्वा र्.—ऋग्वेदापासून पुढें झालेल्या ग्रंथांत घराचें दार या अर्थानें हा शब्द आहे. मागाहून प्रचारांत आलेला द्वार हा शब्द याच अर्थी आला आहे. शतपथ ब्राह्मणांत द्वार बंद करणें याला द्वारपिधान हा शब्द योजिला आहे.

[२८] द्रु प द.—लांकडी खांब या अर्थी ऋग्वेद व पुढील ग्रंथांत हा शब्द आला आहे. शुनःशेपाला यज्ञांमध्यें तीन खांबांला बांधिलें होतें. चोरांना चोरी करण्याबद्दल शिक्षा म्हणून बांधीत असत असा उल्लेख आहे.

[२९] म यू ख.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत याचा खुंटी असा अर्थ आहे. ती मुख्यतः मागें ताणण्यासाठीं उपयोगांत आणीत असत.

[३०] स्था णु.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत लांकडी खांब असा याचा अर्थ आहे.

[३१] मे थि.—हा शब्द तैत्तिरीय संहितेंत खुंटी या अर्थी आला आहे. अथर्ववेदांतील लग्नासंबंधींच्या मंत्रांत याचा उल्लेख असून 'रथाच्या दांड्याला आधारभूत' असा त्याचा अर्थ असावा असें सेंटपीटर्सबर्ग कोशाचें मत आहे. ऋग्वेदांत ८. ५३, ५ येथें गजांचा कठडा करण्यासाठीं या खांबाचा उपयोग करीत असत असें लिहिलें आहे. मेथीला यज्ञांतलि गाय बांधीत असत असा पंचविंश ब्राह्मणांत उल्लेख आहे.

[३२] प क्ष.—अथर्ववेदांमध्यें घराच्या कांहीं भागाला; रॉथ व ग्रील यांच्या मतें बाजूच्या खांबाला; व्हिटने व ब्लूमफील्ड यांच्या मतानें घराच्या बाजवांना हा शब्द लाविला आहे. अथर्ववेदांत छपराचें ( छदिस्चें ) चतुष्पक्ष-चार बाजवा असलेलें असें जें वर्णन आलें आहे त्यावरून व्हिटनेचा अर्थ बरोबर दिसतो. तैत्तिरीय ब्राह्मणांत रथाच्या बाजूनां पक्ष हा शब्द लावला आहे व महिन्याचा अर्धा भाग असाहि त्याचा अर्थ आहे.

[३३] प रि मि त्.—अथर्ववेदांत हा शब्द आला असून घराचे उभे खांब जोडण्याकरितां उपयोगांत आणलेले आडवे खांब किंवा तुळया असा त्याचा अर्थ आहे.

[३४] प ल द.—अथर्ववेदांतील घराच्या वर्णनासंबंधींच्या एका सूक्तांत हा शब्द दोनदां आला असून वारा व पाऊस यांपासून छपरांचा बंदोबस्त होण्याकरितां उपयोगांत आणावयाच्या वेताच्या किंवा गवताच्या पेंढ्या ( ताट्या ) असा त्याचा अर्थ आहे.

[३५] प्रतिमित् अथर्ववेदांत घराच्या वर्णनांत हा शब्द आला आहे. याचा अर्थ एक प्रकारचा धिरा असाच असावा. उपमितांवर कोन करून ओळंबणारे हे खांब असावेत असें वाटतें.

[३६] अ र्ग ल.—हा शब्द आरण्यकांत 'अर्गलेषीके' या समासांत गोठ्याच्या दरवाजाला जो आडवा दांडा लावतात त्या अर्थी योजिलेला आढळतो. नंतर त्याचा अर्थ दरवाज्याला अडकविण्याचा खिळा ( अडसर ) असा झाला.

[३७] प रि धि.—छांदोग्य उपनिषद् व नंतरहि लोखंडी गज किंवा अडसर असा याचा अर्थ आहे.

[३८] प्रा का र.—शांखायन श्रौतसूत्रांत प्रेक्षकांना बसण्याकरितां उभारलेल्या प्रासादाला आधारभूत अशा भिंतीच्या भागाला हा शब्द लाविला आहे.

[३९] भि त्ति.—शतपथ ब्राह्मणांत याचा अर्थ वेत नामक गवताच्या विंजून विणलेल्या चटया असा अर्थ होतो.

[४०] वृ त्र शं कु.—याचा शब्दशः अर्थ वृत्राची खुंटी असा असून शतपथ ब्राह्मणांत हा शब्द आला आहे. कात्यायन श्रौतसूत्रावरलि टीकाकाराच्या मतें दगडी खांब असा त्याचा अर्थ आहे. हा अर्थ थोडा असंभवनीय दिसतो. परंतु शतपथ ब्राह्मणाचा ( ४. २, ५, १५ ) या अर्थास दुजोरा आहे.

[४१] शी र्ष ण्य.—ऐतरेय ब्राह्मण व उपनिषद् ग्रंथ यांत मंचकाचा ( आसंदीचा ) पुढील भाग असा याचा अर्थ आहे.

[४२] स्त म्भ.—सूत्रग्रंथांत खांब या अर्थी हा शब्द आला आहे. ऋग्वेदांतहि हा शब्द आला आहे परंतु तो लक्षणेनें आला आहे.

## गृहांतील सामान [ ऋग्वेद ]

अंकी, (आकडी)
अतस (काष्ट)
अधिषवण (चक्की, जातें)
अयस्मय (कलश)
अविष (विषरहित अन्न)
असूर्त (स्थावर)
[१] आसेचन
[२] आहाव
ईषन् (दण्ड)
[३] उदंचन
[४] उपबर्हण (गिरदी, उशी)
उपबर्हणी (शय्या)
उपसेचनी (झारी)
[५] उलूखल
ऊर्णा
एधस् (काष्ठ)
[६] कलश
काणुका (सोमपिण्याचें भांडें)
[७] कारोतर (दभड्या, दारुपिण्याचें कातड्याचें भांडें)
[८] कुंभ (कलश)
[९] कूचक्र (पेटी)
कोश (पोहरा)
क्रिवि (कातड्याची पेटी)
क्षणोत्र (धार लावण्याचा दगड)
खनित्र (कुदळ)
गल्दा (गाळणें)
ग्रावन् (दगड)
[११] तल्प (पलंग)
तष्ट (तासलेलें)
[१२] तितउ (चाळणी)
[१३] दण्ड
दामन् (दावें)
दारु (काष्ठ)
[१४] दृति (पखाल)
दृषद

| | | |
|---|---|---|
| द्रुघण [लाकूड-तोडण्याचें-हत्यार) | [१]पात्र | वस्तु |
| | पीवस् [अछिन्न वस्त्र] | [२०] वह्य [ पलंग ] |
| | | वृथा [ घटिकायंत्र माला ] |
| द्रुपद | प्रेंख [झोंपाळा] | |
| द्रोण (कलश) | प्रोष्ठ [ छपरी पलंग ] | शकृत् [ शेण ] |
| [१८]द्रोणाहाव | | [२१]शंकु |
| धिषण [पात्र विशेष] | भोजन [ भोग्य-वस्तु ] | शयुत्रा [ शयन ] |
| | | [२२]शूल |
| नीक्षण (मांस पचन परीक्षा साधन काष्ठ) | [१९] मन्था [ आलोडन ] | सर्ग [ रज्जु ] |
| | | [२३] सूना |
| | | [२४] सूर्मि |
| | मयूख [ खुंटी ] | |
| [१७]पचन [काष्ठ] | मृण्मय | सृणि [ कोयती ) |
| पव्यय [पात्र] | याशु [ भोग ] | स्तुकाविन् |
| पातल्य (खिळा) | वद्दूरि [ जोडा ] | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अखर्व (मातीचें कच्चें भांडें) | दामन् | विधन (चोपणें) |
| | दृति | [३६]विवध |
| | निर्यास (डिंक) | विविवध |
| अतस् | निष्टक्र्य (निसटती गांठ) | शक |
| अन्नधान | | शकृत् |
| आतंचन (आंबट दहि) | [३१]पल्पूलन | [३७]शल्क |
| | [३२]पारीणह्य | शयन (बिछना) |
| [२५]आसन्दी | [३३]प्रेंख (झोपाळा) | शिक्य |
| [२६]उपला | बर्स (गांठ) | शुष्कदृति |
| [२७]उपानह् | मयूख (खुंटी) | [३८]शूर्प |
| उलूखल | [३४]मुसल | [३९]सन्नहन |
| [२८]कट | मेखला | सूचि |
| [२९]कुमुक | रज्जु | स्यू ( दोरी ) |
| [३०]गुग्गुलु | रास्ना | [४०] स्थाली |
| ग्रन्थि | [३५]वंश | |
| तल्प | वस्त्रा | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अजिन | एधस् ( काष्ठ ) | तल्प |
| अन्तःपात्र | [४६] कंस [ पात्र ] | तिरोध [ झांकण ] |
| अभिधानी[तपेली] | कक्ष्य | तुष [ कोंडा ] |
| [४१] अभिषवणी | कम्बूक [ टरफल ] | तैलकुण्ड |
| अभ्रि | कलश | दारु [ काष्ठ ] |
| अर्जुन | [४७]कशिपु [ उशी] | दास |
| अमन ( दगड ) | कशिपूपबर्हण | दृषद् |
| आदानसन्दान | कुम्भ | द्रुघन ( कुऱ्हाड ] |
| आमपात्र | [४८] कुल्मल | द्रुपद [ पायबंद ] |
| आसन्दी | [४९] कूद्य [ कुंचा ] | [४९] नृति |
| [४२] आसाद | खल्व | पल्पूलन [ जनावरें धुण्यासाठीं केलेलें स्थल ] |
| [४३] आस्तरण | चतुर्दिल [ पात्र ] | |
| [४४] उपधान(उशी) | कर्म | |
| उपरिशयन | जत्रु [ वादी, चामडें ] | पलाली [ कोंडा ] |
| [४५] उब्यल | | |
| पलावत् | रज्जु | शिला |
| पवस्त [किरसुणी] | रशना | षण्मयूख |
| पात्र | राशि | सन्दंश [चिमटा ] |
| पूतिरज्जु | रिक्तकुंभ | सहस्रस्तुका |
| पूल्य | वध्रि [ वादी ] | सुभू [ भृत्य ] |
| पृष्टि [संशकु रज्जु] | वरत्रा " | [५४]सूत्र |
| प्रेंख | [५१]वर्ध्र | [५५]सेहु |
| [५०]बन्धन | शंकु | स्तुका [ लोकर] |
| भस्म | शण [ ताग ] | स्थामन् [ स्थूणा ] |
| भृति | [५२]शयन [ मंचक ] | स्वप्नाधिकरण |
| मन्थ | शूर्प | हरित् |
| मेथि | [५३]शिक्य | |

[वाजसनेयि सं.]

| | | |
|---|---|---|
| [५६]चप्य | [५९]वाल | [६१]सत |
| [५७]तुला | [६०]शलली | [६२]स्तुप |
| [५८]नड्वला | | |

[संहितेतर]

| | | |
|---|---|---|
| [६३] अंगारावक्षयण | [७४]धृष्टि | [८५]फलक |
| [६४]आदर्शक | [७५]निनाह्य | [८६]बृसी |
| [६५]उच्छीर्षक | [७६]पर्यंक | [८७]भस्त्रा |
| [६६]उपमन्थनी | [७७]परिचर्मण्य | [८८]मणिक |
| [६७]उपश्रय | [७८]परिपवन | [८९]मूत |
| [६८]उल्मुक | [७९]पात्रेजन | यष्टि |
| [६९]उल्मुकावक्षयण | [८०]पिन्वन् | रजव्य |
| [७०] करीष | [८१]पिशील | [९०]वालदामन् |
| [७१]चूर्ण | [८२]प्रणेजन | [९१]शुंबल |
| [७२]तर्कु | [८३]प्रेंख | [९२]श्लेष्मन् |
| [७३]तेजनी | [८४]प्रोष्ठ | [९३]हिरण्यकशिपु |

[१] आ से च न.—यूषन् अथवा तूप वगैरेसारखा पातळ पदार्थ ठेवण्याचें भांडें असा याचा अर्थ आहे. याचा आकार अथवा उपयोग याबद्दल माहिती उपलब्ध नाहीं.

आ हा व.—विहिरींतून पाणी वर काढण्याचा पोहरा. ऋ. १.३४,८ येथें भाष्यांत वेदार्थयत्नकारांनीं 'द्रोणकलश, असा याचा अर्थ केला आहे. याचा घागर अगर डोणी असाहि अर्थ होऊं शकेल. सायणांनीं पाणी पिण्याचें पात्र व एका ठिकाणीं पाणी पिण्याची जागा असा अर्थ केलेला आहे.

[३] उ दं च न.—ऋग्वेदांत हा शब्द फक्त लक्षणारूपानें आला असून ब्राह्मण ग्रंथांत याचा पोहोरा असा अर्थ आला आहे.

[४] उ प ब र्ह ण.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत हा शब्द उशी, बहुधा आसंदीवरील गादी या अर्थी उपयोगांत आणिला आहे. ऋग्वेदांत हा शब्द 'उपबर्हणी' अस

स्त्रीलिंगी त्याच अर्थी परंतु अलंकारिक भाषेत पृथ्वी किंवा भूमि यांनां लाविला आहे.

[5] उ लू ख ल.—ऋग्वेद व तदुत्तरकालीन ग्रंथांत हा शब्द उखळ या अर्थी योजिलेला आढळतो आणि वारंवार तो 'उलूखलमुसल' असा समासांत असतो. सूत्रकालापर्यंत या उलूखलाचा आकार कसा असे, याचा उल्लेख नाहीं.

[6] क ल श.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत हा शब्द सामान्यतः 'भांडें', पात्र या अर्थी योजितात आणि हें पात्र भोपळ्याचें किंवा मातीचें केलें असावें; कारण दोन्हीहि प्रकार त्या वेळीं उपयोगांत असत हें आपल्याला माहीत आहे. सोम ठेवण्याच्या लांकडी डोणीचा (द्रोणक ...) उल्लेख विधींत नेहमीं केलेला असतो.

[7] का रो त र.—ऋग्वेदांत व तदुत्तरकालीं सुरा (दारू) शुद्ध करण्याकरितां जी गाळणी किंवा जो गालक असतो तो. 'कारोतरो नाम वैदलश्चर्मवेष्टितो भाजनविशेषः। यस्मिन् सुरायाः स्रावणं क्रियते' असें सायणांनीं भाष्यांत स्पष्टीकरण केलें आहे.

[8] कु म्भ.—ऋग्वेदांत आणि नंतरहि हा शब्द बऱ्याच वेळां 'भांडें', 'पात्र' या अर्थी आलेला आहे. बहुतकरून तो मातीचा केलेला असल्यामुळें लवकर फुटत असे.

[9] कू च क्र.—ऋग्वेदांतील एका संदिग्ध ऋचेमध्यें एकदांच हा शब्द आला असून त्याचा झिमरच्या मतें विहिरींतून पाणी वर काढण्याकरितां चाक असा अर्थ आहे. रॉथ त्याचें भाषांतर 'स्त्रीचे स्तन' असें करितो, तें कांहीं अंशीं बरोबर दिसतें.

[10] को श.—ऋग्वेदांत याचा अर्थ विहिरींतून पाणी वर काढण्याचा 'पोहरा' असा आहे. धार्मिक विधींत हा शब्द आल्यास त्याचा अर्थ सोम ठेवण्याचें कलशापेक्षां मोठें भांडें असा आहे.

[11] त ल्प.—याचा बिछाना किंवा मंचक हा अर्थ ऋग्वेद, अथर्ववेद व नंतरचे ग्रंथ यांत स्वीकारला आहे. औदुंबराच्या नांवापासून बनलेला पलंग असा उल्लेख तैत्तिरीय ब्राह्मणांत आलेला आहे. छांदोग्योपनिषदांत गुरूचा बिछाना भ्रष्ट केल्याबद्दलचा (गुरुतल्पग) उल्लेख आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत तल्प्य (लग्नाच्या बायकोपासून झालेला मुलगा) या विशेषणाचा कायदेशीर (धर्मपत्नीपासून झालेला) या अर्थी उपयोग केला आहे.

[12] ति त उ.—हा शब्द ऋग्वेदामध्यें एकदां आलेला आहे व त्याचा अर्थ 'चाळणी' किंवा सक्तु पाखडण्याचें सूप असा आहे.

[13] दण्ड.—याचा अर्थ सोटा असा आहे. या शब्दाचा सामान्य अर्थ म्हणजे जनावरांनां हांकण्याची काठी अथवा शस्त्र या अर्थानें उपयोग केला आहे. राक्षसांनां घालवून देण्यासाठीं अभिमंत्रित केलेली काठी यज्ञकर्त्या यजमानास देत असत असा शतपथ, तैत्तिरीय या ब्राह्मण ग्रंथांत उल्लेख आहे. उपनयनप्रसंगीं या दण्डाचें बरेंच महत्त्व असे. थोड्या फरकानें पळीसारख्या वस्तूची मूठ (स्रुवदंड) असाहि याचा अर्थ होतो. या शब्दावरून राजसत्तेचाहि बोध होतो व राजाचा शिक्षा करण्याचा अधिकार ध्वनित होतो. (राजप्रेषितो दण्डः). अलीकडील भाषेंत बोलावयाचें म्हणजे त्या वेळीं राजा हा फौजदारी कायद्याचें उगमस्थान गणला जाई आणि पुढेंहि ही सत्ता त्यानें सर्वस्वी आपल्याकडे ठेविली होती. पंचविंश ब्राह्मणांत निरपराधी (अदण्ड्य) लोकांनां शिक्षा करणें हें ब्राह्मणेतर व्रात्यांचें लक्षण समजलें जाई.

[14] दृ ति.—ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत प्रवाही पदार्थ ठेवण्याकरितां असलेली कातड्याची पिशवी या अर्थी हा शब्द वारंवार आला आहे. एके ठिकाणीं या पिशवीला ध्मात म्हणजे फुगलेला भाता असें म्हटलें आहे. आणि इच्याशीं जलोदरानें फुगलेल्या माणसाची तुलना केली आहे. क्षीर व सुरा या पिशवींत ठेवीत असल्याचाहि उल्लेख आहे.

[15] दृ ष द्.—ऋग्वेद व अथर्ववेद यांमध्यें याचा अर्थ धान्य वाटून बारीक करण्याचा धोंडा (पाटा) असा आहे (जात्याची तळी असा नाहीं). या दगडावर धान्य ठेवून वाटीत. पुढें जेव्हां याचा उपला याच्यासह उल्लेख आला आहे तेव्हां कदाचित् त्याचा जात्याची खालची किंवा वरची तळी अगर खलबत्ता असा अर्थ होईल. परंतु हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. एगलिंगच्या मतें त्याचा अर्थ लहानमोठ्या जात्याच्या तळ्या असा आहे.

[16] द्रो णा हा व.—ऋग्वेदांत अवत (विहीर) याला हें दुसरें नांव आहे. पाणी ओढण्याच्या संबंधांत जेव्हां हा शब्द येतो तेव्हां याचा 'लाकडी पोहोरा असा अर्थ होतो.

[17] प च न.—ऋग्वेद व शतपथ ब्राह्मण ह्यांप्रमाणें ह्याचा अर्थ अन्न शिजविण्याकरितां भांडें असा आहे.

[18] पा त्र.—ह्याचा मूळ अर्थ (पाणी वगैरे) पिण्याचें भांडें (पा म्हणजे पिणें ह्यापासून) असा असून ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांमध्यें सामान्यतः भांडें अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. हें पात्र एक तर लाकडाचें केलेलें असेल किंवा चिकण मातीचें केलेलें असेल. रॉथच्या मतानें हा शब्द मोजण्याचें माप या अर्थानें कांहीं उताऱ्यांत आला आहे. ह्याचें स्त्रीलिंगी रूप पात्री असें असून त्याचा अर्थ भांडें असा आहे.

[19] म न्था.—याचा ऋग्वेदाच्या एका ऋचेंत उल्लेख आला असून तेथें त्याचा अर्थ 'रवी' असा आहे. त्याचप्रमाणें तैत्तिरीय संहितेंत 'मथ्' या धातूचा अर्थ घुसळणें असा दिला आहे. अथर्ववेदाच्या एका उताऱ्यांत याचा अर्थ 'मंथ प्रमाणें एखादें पेय असा आहे.

[20] व ह्य.—ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांमध्यें स्त्रियांनां सुखावह असा मंचक किंवा बिछाना अशा अर्थानें हा शब्द आला

आहे व मॅकडोनेलहि असेंच म्हणतो. परंतु सायणभाष्यांत याचा झोंपाळा असा अर्थ आहे. 'वहत्यनेनेति वहनसाधनं आन्दोलिकादि वह्यम्। इ.

[२१] शं कु.—ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें याचा अर्थ लाकडाची खुंटी असा आलेला आहे. उदाहरणार्थ शतपथ ब्राह्मणांत हा शब्द ज्या खुंट्यांनीं कातडें ताणलें जात असे त्या खुंट्या किंवा खोडयाची मेख अशा अर्थानें आलेला आहे. छान्दोग्योपनिषदांत देंठ किंवा पानांतील तंतु असा याचा अर्थ होण्याचा संभव आहे.

[२२] शू ल.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें हा शब्द आला असून त्याचा अर्थ ज्यावर मांस भाजावयाचें तो लोखंडी खिळा असा आहे. सायणभाष्यांत याचा सुरी असा अर्थ आहे.

[२३] सू ना.—ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांमध्यें मांस ठेवण्याकरितां विणलेली कळकाची टोपली असा याचा अर्थ आहे.

[२४] सू र्मि.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांमध्यें पीटर्सबर्गकोशाप्रमाणें या शब्दाचा अर्थ 'दिव्याप्रमाणें जिचा उपयोग होतो अशी नळी असा आला आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं या शब्दाचा अर्थ पाणी नेण्याची नळी असा असावा. सायणांनीं भाष्यांत 'ज्वाला' असा अर्थ दिला आहे.

[२५] आ स न्दी.—ऋग्वेदेतर संहिता व ब्राह्मणग्रंथांत हा शब्द कशाचें तरी आसन ह्या अर्थी वारंवार उपयोगांत आणिला आहे. व्रात्याकरितां जें आसन किंवा पीठ दिलें जात होतें त्याचें अथर्ववेदांत विस्तारपूर्वक वर्णन केलें आहे. मॅकडोनेलच्या मतें त्याला दोन पाय होते. सायणभाष्याप्रमाणें ह्याला चार पाय असून मध्यें विणलेलें असें होतें. त्यावर गादी ( आस्तरण ), उशी ( उपबर्हण ) असून बसण्याची जागा ( आसाद ) व धरण्यास आधार ( उपश्रय ) हीं होतीं. अशाच पीठांचें वर्णन कौषीतकी उपनिषद् व जैमिनीय ब्राह्मण ह्यांमध्यें आलें आहे. राज्याभिषेकाच्या वेळीं जें आसन उपयोगांत आणीत त्याचें अथर्ववेदांत याच भाषेंत वर्णन केलें आहे; त्यांत त्याच्या पायाची उंची एक वीत, लांबी व रुंदीचे तुकडे एक हात, विणकर ( विवयन ) मुंजगवताची आणि आसन उदुंबर लाकडाचें, असें वर्णन आलें आहे. अथर्ववेदांतील एका उताऱ्यावरून ल्यानमन म्हणतो कीं, ती बैठक आरामखुर्चीसारखी असावी. तेथें देखील उपधान व उपवासन या शब्दांचा उल्लेख आहे. शतपथ ब्राह्मणांतील वर्णनावरून ती मोठी भव्य बैठक असावीसें वाटतें. एके ठिकाणीं ती खदिर नामक लांकडाची, छिद्रित ( वितृण्णा ) पट्यांनीं जोडलेली, ( भारतांत वर्णिल्याप्रमाणें ) असें वर्णन आहे. सौत्रामणी नामक याग ( इंद्राकरितां यज्ञ ) करतेवेळीं या आसंदीचें वर्णन उदुंबराची बैठक असलेली, गुढघ्याइतकी उंच, अमर्याद लांबी रुंदीची व वेतानें जाळीदार विणलेली, असें आलें आहे. राजसिंहासन खांद्याइतकें उंच, उदुंबराचें, व बल्वज गवतानें विणलेलें असें असे. दुसरीकडे हीं आसनें एक वीत उंच, एक हात लांब रुंद, उदुंबर लांकडाचीं, गवताच्या दोरीनें विणलेलीं व मातीनें आच्छादिलेलीं, असत असा उल्लेख आहे.

[२६] उ प ला.—ब्राह्मण ग्रंथांत ह्याचा अर्थ दगडाचा वत्ता व दृषद शब्दाचा खल असा होऊं शकेल. परंतु संहितेंत उपर म्हणजे खल व दृषद म्हणजे वत्ता असा अर्थ आहे. तैत्तिरीय संहितेंत याचा अर्थ वरवंटा असा आहे.

[२७] उ पा न ह्.—संहितानंतर ब्रह्मणग्रंथांत हा शब्द जोडा या अर्थी योजिला आहे. डुकराचें कातडें जोड्याकरितां उपयोगांत आणीत असत असें शतपथ ब्राह्मणांत वर्णन आलें आहे. दण्डोपानह ( जोडा काठी ) हा शब्दसमुच्चय कौषीतकी ब्राह्मणांतहि उपयोगांत आणिला आहे.

[२८] कट.— वेताची केलेली चटई असा याचा अर्थ आहे. वाजसनेयि संहितेंत बुरुडाला बिडल-कारी असें म्हटलें असून अथर्ववेदांत या कामाकरितां वेत चिरण्याचा उल्लेख आला आहे.

[२९] क्रु मु क.—हें एका लांकडाचें नांव असून क्रमुक याचें हें बदललेलें रूप असावें.

[३०] गु ग्गु लु.— गुल्गुलु असा हि पाठभेद आहे. याचा अर्थ गुग्गुळ किंवा देवधूप. अथर्ववेदांत एके ठिकाणीं हा सिंधु आणि समुद्र यांपासून उत्पन्न झाला असें म्हटलें आहे. यावरून झिमर म्हणतो कीं हा दर्यावरील व्यापाराचा उल्लेख आहे,कारण गुग्गुळ समुद्रापासून होत नसून तो झाडाचा चीक आहे. कदाचित् येथें या शब्दानें दुसराच कांहीं पदार्थ अभिप्रेत असावा. या रूपांत हा शब्द अथर्ववेद व ऐतरेय ब्राह्मण ह्यांत असून गुल्गुलु हें जुनें रूपहि वरचेवर आढळतें. या दोन रूपांसंबंधीं पाहतां हस्तलिखित प्रतींत केव्हांहि मेळ नसतो.

[३१] प ल्पू ल न.— तैत्तिरीय संहितेंत व अथर्ववेदांत हा शब्द आलेला असून ह्याचा अर्थ 'क्षारजल' कोणता तरी क्षोंबणारा पदार्थ मिसळलेलें पाणी, असा असून यांत कपडे धूत असत. अथर्ववेदांत याचा मूत्र असा अर्थ आहे. पल्पूलय हें क्रियापद ( पल्पूलयति जले प्लावयति शरीरं प्रक्षाल्य तीत्यर्थः। ) तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण ह्यांमध्यें आलेलें आहे. सूत्रांत चर्में व वस्त्रें अशा पाण्यानें धुतलीं जात असा उल्लेख आलेला आहे.

[३२] पा री ण ह्य.— तैत्तिरीय संहितेमध्यें ह्या शब्दाचा अर्थ घरगुती भांडीं असा आहे व पत्नीच्या ताब्यांत हीं भांडीं असत असें त्या संहितेंत म्हटलें आहे.

[३३] प्रें ख.— हें प्रेंख याचें दुसरें रूप असून याचा अर्थ झोका, झोला, झोंपाळा, दोला असा आहे. व तैत्तिरीय संहितेंत व तैत्तिरीय ब्राह्मणांत हा शब्द आला आहे.

मु स ल.— ऋग्वेदोत्तर संहितांमध्यें व ब्राह्मणांत हा शब्द आला असून याचा अर्थ मुसळ असा आहे.

[३५] वं श.—बांबूचे केलेले घराचे वांसे अशा अर्थानें ह्या शब्द ऋग्वेदोत्तर संहिता ग्रंथांत आलेला आहे.

[३६] वि व ध किं वा वी-व ध.—एखादें ओझें वाहून नेण्याकरितां खांद्यावर घेतलेलें जूं असा याचा अर्थ दिसतो. पण ब्राम्हण ग्रंथांत ह्या शब्दाचा फक्त अलंकारिक रीत्या उपयोग केलेला दिसतो, जसें 'वि-विवध' म्हणजे विषम प्रमाणांत विभागलेल्या ओझ्यासहित, आणि 'संवीवधता' म्हणजे ओझ्याचा सारखेपणा.

[३७] श ल्क.—उत्तरकालीन संहिता व ब्राह्मण ग्रंथांत ह्या शब्द अग्नि पेटविण्याकरितां उपयोगांत आणण्याची ढलपी अशा अर्थानें आला आहे.

[३८] शू र्प.—तैत्तिरीय संहिता, अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें ह्या शब्द आला असून त्याचा अर्थ धान्य पाखडण्याचें सूप असा आहे. ह्याला 'वर्षवृद्ध' पावसानें फुगलेलें असें अथर्ववेदांत म्हटलें आहे यावरून झिमर म्हणतो त्याप्रमाणें हें सूप वाळलेल्या लाकडांचेंच नव्हे, तर कधीं कधीं वेताचें बनवीत असें दिसतें.

[३९] सं न ह न.—नंतरच्या संहिता व ब्राह्मण ह्यांत ह्या शब्द आला असून याचा अर्थ पट्टी, पट्टा किंवा बांधण्याचा दोर असा आहे.

[४०] स्थ ली.—तैत्तिरीय संहिता, अथर्ववेद व मागाहूनचे ह्यांमध्यें स्वयंपाकाचें भांडें या अर्थी ह्या शब्द आहे.

[४१] अ भि ष व णी.—अथर्ववेदांतील ह्या शब्दाचें भाषांतर झिमर 'दाबण्याचें यंत्र असें करितो. परंतु तें फक्त निशेषण-दाबण्यास उपयोगी-या अर्थी असावें.

[४२] आ सा द.—अथर्ववेदांत हा व्रात्याच्या वेळचा आसंदीचा भाग आहे असें वर्णन आहे. व्हिटने म्हणतो, तो आसनाचा भाग नसून आसनच आहे असें मानणें बरें. अफ्रेट, झिमर आणि रॉथ म्हणतात कीं, याचा अर्थ आसनावर ठेवण्याचा तक्या. परंतु हा अर्थ व्यक्त करण्यास आस्तरण हा शब्द आहेच.

[४३] आ स्त र ण.—व्रात्यांच्या वेळीं ज्या आसन्दीचा उपयोग करीत तिच्यावर घालण्याचें जें आच्छादन तें. राजसूयांच्या वेळचें राजाचें आच्छादन व्याघ्रांबर असलें तरी चालतें. कौषीतकी उपनिषदांतील शब्द उपस्तरण हा आहे.

[४४] उ प धा न.—अथर्ववेदांत ह्या शब्द आसन्दीवरील उशी या अर्थानें आला आहे. दुसऱ्या ग्रंथांत याला उपबर्हण असें म्हटलें आहे.

[४५] उ ष्य ल.—अथर्ववेदांतील पर्यंकाच्या किंवा वैवाहिक रथाच्या वर्णनांत हा शब्द आला असून याचा अर्थ चौकटीचीं चार लांकडें असा आहे. या पाठाबद्दल संशय आहे. बहुतकरून उप्पल असा पाठ असावा.

[४६] कं स.—अथर्ववेदांत व इतर ठिकाणीं हा शब्द धातूचें पात्र या अर्थानें आला आहे.

[४७] क शि पु.—कशिपु म्ह० चटई किंवा उशी. अथर्ववेदांत म्हटलें आहे कीं, स्त्रिया दगडानें वेत फोडून त्याच्या चटया करीत. उलटपक्षीं शतपथांत सोन्याच्या चटईचा उल्लेख आहे.

[४८] कु ल्म ल.—अथर्ववेद, मैत्रायणी संहिता व शतपथ ब्राह्मण यांत हा शब्द असून याचा अर्थ बाणाच्या फळाच्या ज्या भागांत बाणाचा दांडा घालतात तो बाणाच्या मानेसारखा भाग.

[४९] नृ ति.—अथर्ववेदाच्या एका लेखांत याचा अर्थ कातड्याची पिशवी असा आहे. पैप्पलाद शुद्ध प्रतींत जरी ह्याच शब्द असला तरी रॉथ व व्हिटने म्हणतो त्याप्रमाणें हा शब्द दृति असा आपण समजला पाहिजे. लुडविग या नृतीचा अर्थ नर्तक असा करतो. पण तो संदर्भास जमत नाहीं.

[५०] बं ध न.—बंधन म्हणजे दोर किंवा दुसरें बांधावयाचें साधन. हा शब्द अथर्ववेदांत व नंतरच्या ग्रंथांत आढळतो.

[५१] व ध्रं.—विणलेला पलंग जिनें बांधतात ती वादी किंवा पट्टी. हा शब्द अथर्ववेद व शतपथब्राह्मण ह्यांत आढळतो.

[५२] श य न.—अथर्ववेद व मागाहून झालेले ग्रंथ यांत याचा अर्थ मंचक असा आहे.

[५३] शि क्य.—अथर्ववेद व तदुत्तर ग्रंथांत याचा अर्थ दोराचें शिंकें असा आहे.

[५४] सू त्र.—अथर्ववेद व उदुत्तर ग्रंथांत सूत, धागा असा या शब्दाचा अर्थ आहे. बृहदारण्यकोपनिषदांत हा शब्द 'यज्ञासंबंधीं नियमांचें पुस्तक' अशा अर्थानें आला आहे.

[५५] से हु.—अथर्वांत एका तुलनेच्या प्रसंगीं हा शब्द आला असून त्याचा अर्थ रसहीन पदार्थ असा आहे.

[५६] च ष्य.—वाजसनेयि संहिता आणि शतपथ ब्राह्मण यांत हें एका यज्ञपात्राचें नांव आहे.

[५७] तु ला.—याचा अर्थ तराजू असा आहे व हा शब्द वाजसनेयि संहितेमध्यें आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत सुद्धां या जगांत व पारलौकिक जगांत मनुष्याचीं बरींवाईट कृत्यें मापण्याकरितां तागडीबद्दल उल्लेख आलेला आहे. ही तागडी व मागाहून वर्णन केलेलें दिव्य याकरितां जी तागडी लागत असे ती तागडी या दोन्ही निराळ्या आहेत. मनुष्य अपराधी किंवा निरपराधी हें ठरविण्याकरितां संशयित माणसाला तागडींत घालून ब्राह्मणग्रंथोत्तरकालांत त्याचें दोनदां वजन करीत. व दुसऱ्या वेळीं त्या माणसाचें पहिल्या वेळेच्या वजनापेक्षां जसें कमीजास्त वजन भरेल तसा तो अपराधी किंवा निरपराधी ठरवीत असत. ही मागाहून सुरू झालेली चाल पूर्वीच्या काळीं होती असें मानणें शक्य नाहीं.

५८ न ड् व ला.—'वेताचा बिछाना.' हा शब्द वाजसनेयि संहिता ( ३०,१६ ) व तैत्तिरीय ब्राह्मण ( ३,४,१२,१ ) यांमध्यें आलेला आहे.

५९ वा ल.—मागाहून झालेल्या संहिता व ब्राह्मण ग्रंथांत केसांची चाळणी असा याचा अर्थ आहे.

६० श ल ली.–केस वेगळे करण्याकरतां व डोळ्यांत काजळ घालण्याकरितां या साळपिसाचा उपयोग होतो व अशा अर्थानेंच हा शब्द शतपथ व तैत्तिरीय ब्राह्मणांत आलेला आहे.

६१ स त.—एका यज्ञामध्यें उल्लेखिलेल्या एक प्रकारच्या भांड्याचें हें नांव आहे.

६२ स्तु प.—वाजसनेयि संहितेंत ( ३,२,२५,२ ) केसांचा गोंडा असा याचा अर्थ आहे. हाच अर्थ शतपथ ब्राह्मणांत आहे.

६३ अं गा रा व क्ष य ण.—बृहदारण्यकोपनिषदांतील अनिश्चित अर्थाचा शब्द. मॅक्समुल्लर आणि बोथलिंक यांच्या भाषांतरांत त्याचा अर्थ सांडशी असा केला आहे. सें. पी. कोशांत त्याचा अर्थ 'कोळसे विझविण्याकरितां भांडें' असा केला आहे. आणि मॉनिअर विल्यम्स् हा कोळसे विझविण्याकरितां यंत्र असा अर्थ घेतो. लहान सें. पी. कोशांत त्याचें भाषांतर 'कोळसे उचलण्याचा चिमटा' असें केलें आहे.

६४ आ द र्श.—'आरसा.' हा शब्द उपनिषदें आणि आरण्यकें यांतच सांपडतो.

६५ उ च्छी र्ष क.—कौषीतकी उपनिषद् ( १,५ ) यांतील पर्यंकाच्या वर्णनांत आल्यामुळें याचा अर्थ उशी असा असावा.

६६ उ प म न्थ नी —बृहदारण्यकोपनिषदांत 'रवी' या अर्थी हा उपयोगांत आणिला आहे. वाजसनेयि संहितेंत उपमंथितृ हा पुरुषमेधांतील बळींच्या यादींत आहे आणि क्रियापद, उपमन्थ् म्हणजे घुसळण्याकरितां द्रव्यें अशा अर्थी योजिला आहे.

६७ उ प श्री-उ प श्र य.—एकाच शब्दाचे हे दोन पाठ आहेत. पहिला शब्द कौषीतकी उपनिषद या ग्रंथांत सांपडतो आणि दुसरा पाठ इतर उपनिषदांमध्यें आढळतो आणि खरोखर अथर्ववेदांतील उताऱ्यांतहि जरी मूळ अपश्रयः असा पाठ आहे तरी उपश्रय या अर्थीच असावा असें रॉथ म्हणतो. दोनहि ठिकाणीं त्याचा अर्थ पर्यंक याशीं संबंध असलेला ( अथर्ववेदांत आसन्दी आणि कौषीतकी उपनिषदांत पर्यंक)असा होतो. आफ्रेट, रॉथ आणि मॅक्समुल्लर उशी किंवा आच्छादन असा अर्थ करितात. परंतु व्हिटने म्हणतो कीं, त्याचा अर्थ 'आधार' किंवा 'स्तंभ'असा आहे.

६८ उ ल्मु क.—ब्राह्मणांमध्यें जळतें लांकूड या अर्थी हा शब्द सर्वसाधारणपणें उपयोगांत आणितात आणि त्यापासून कोळसा (अंगार) काढितां येतो.

६९ उ ल्मु का व क्ष य ण —शतपथ ब्राह्मणांत हा शब्द पुष्कळ वेळां आला असून त्याचा अग्नि शमविण्याचा उपाय अथवा निश्चितपणें त्याचा अर्थ चिमटा असा आहे.

७० क री ष.—शतपथ ब्राह्मणांत गोंवऱ्या या अर्थी हा शब्द आला आहे. अथर्ववेदावरून असें कळतें कीं, शेतांतील प्राण्यांच्या नैसर्गिक खताची फार प्रशंसा करीत.

७१ चू र्ण.—चूर्ण याचा अर्थ चूर्णहस्ता या समासावरून सुगंधि पूड असा होतो. चूर्णहस्ता हें विशेषण कौषीतकी उपनिषदांत अप्सरांनां दिलेलें आहे.

७२ त र्कु.—याचा अर्थ चाती असा आहे. यास्काच्या निरुक्तावरूनच ( २,१ ) हा शब्द फक्त वैदिक वाङ्मयांत आलेला आहे असें म्हणतां येईल. निरुक्तांत येण्याचें कारण शब्दांच्या स्थानविनिमयाचें उदाहरण म्हणून हा शब्द यास्कानें दिलेला आहे. त्याच्या मतें हा शब्द कर्त्–कातणें या धातूपासून आलेला आहे.

७३ ते ज नी.—याचा अर्थ उत्तरकालीन संहिता व ब्राह्मण ग्रंथांत वेताची जुडी असा आहे व कांहीं ठिकाणीं या जुडीचा बनलेला दोर असाहि आहे. कारण तेजनीच्या दोन्ही टोकांचा उल्लेख केलेला आहे.

७४ धृ ष्टि.—तैत्तिरीय आरण्यकांत द्विवचनी आलेलें त्याच-प्रमाणें शतपथ ब्राह्मण व सूत्रग्रंथ ह्यांत आलेले हें रूप निखारे उचलण्याचे चिमटे अशा अर्थानें आलेलें आहे.

७५ नि ना ह्य.—शतपथ ब्राह्मणांत ( ३, ९, २, ८. ) पाण्याचा घडा असा अर्थ आहे व टीकाकाराचे मतानें ह्याला निनाह्य म्हणण्याचें कारण तो जमीनींत पुरलेला असे. एगलिंग ह्या शब्दाचा पाणी थंड होण्याकरतां जमीनींत पुरलेला हौद किंवा भांडें असा अर्थ करतो.

७६ प र्यं क.—कौषीतकी उपनिषदामध्यें ब्राह्मणाच्या आसनाचें हें नांव आहे. इतरत्र ज्याला 'आसंदि' असें नांव आहे तें व हा पर्यंक एकच होत. उपनिषदांत ह्याचा जो उपयोग आलेला आहे त्यावरून अंग टाकण्याकरितां लांबट आसन असा ह्याचा क्वचितच अर्थ होतो व ह्याचा अर्थ सिंहासन असाहि दिसतो.

७७ प रि च र्म ण्य.—कौषीतकी ब्राह्मण ( ६, १२ ) व शां. आरण्यक ( २, १ ) ह्यांमध्यें कातड्याची वादी असा ह्याचा अर्थ आहे.

७८ प रि प व न.—निरुक्तामध्यें ( ५, ९, १० ) धान्य चाळण्याचें यंत्र असा याचा अर्थ आहे.

७९ पा ने ज न.—शतपथ ब्राह्मणांत पाय धुण्याकरतां एखादें भांडें असा ह्याचा अर्थ आहे.

[८०] पिन्वन.—शतपथ ब्राह्मणांत ( १४, १, २, १७; २, १, ११; ३, १, २२; ) एखाद्या व्रताचे वेळीं उपयोगी पडणारें भांडें अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[८१] पिशील.—शतपथ ब्राह्मणांत ( २, ५, ३, ६ ) लांकडी भांडें किंवा ताट असा ह्याचा अर्थ दिलेला आहे. लाटयायन श्रौतसूत्रामध्यें ( ४, २, ४, ५ ) एका पिशील वीणेचा उल्लेख आलेला आहे व ही वीणा एक प्रकारची सतार असली पाहिजे.

[८२] प्रणेजन.—हा शतपथ ब्राह्मणांत (१, २, २, १८) शब्द येतो. याचा अर्थ 'धुण्यासाठीं पाणी' असा आहे.

[८३] प्रेंख.—' झोला' झोंपाळा'पाळणा, 'महाव्रत विधीच्या वेळीं येणाऱ्या वर्णनांत याचा उल्लेख येतो. हा उल्लेख काठक संहिता, ऐतरेय आरण्यक आणि पंचविंश ब्राह्मण आणि इतर ठिकाणीं सुद्धां आला आहे. उपलब्ध माहितीवरून असें म्हणावें लागतें कीं, सध्यांच्या झोंपाळ्याप्रमाणेंच पूर्वीहि तो करीत असावेत.

[८४] प्रोष्ठ.—हा शब्द तैत्तिरीय ब्राह्मणांत आढळतो. तेथें त्याचा समासांत उपयोग केलेला नाहीं. ऋग्वेदांत ' प्रोष्ठेशय' या विशेषणांत स्त्रियांसंबंधीं हा शब्द उपयोगांत आणलेला आहे यावरून याचा अर्थ कदाचित ' बांक, हाच असावा. पाहिल्या उताऱ्यांत हा शब्द 'तल्प , आणि ' वह्य ' यांहून अगदीं वेगळा ( अर्थांत ) आहे असें दाखविलें आहे. परंतु तेथें त्यांतील अगदीं पूर्ण अंतर काय असावें हें सिद्ध करण्यास कांहीं पुरेसा पुरावा सांपडत नाहीं.

[८५] फलक.—ह्याचा अर्थ ' फळी,' हा शब्द गाडी किंवा रथ तयार करण्याच्या प्रसंगीं उपयोगांत आणतात. किंवा सोम पिळून काढण्याकरितां ( अधिषवण फलक ) किंवा इतर कामाकरितां लागणारी फळी.

[८६] बृसी.—याचा अर्थ गवताची उशी. हा शब्द सूत्रांतून व ऐतरेय आरण्यकांत आला आहे. वृशी व वृषी हीं याचीं चुकीचीं रुपें मधून मधून आढळतात.

[८७] भस्त्रा.—शतपथ ब्राह्मणांत याचा अर्थ चामड्याची बाटली किंवा थैली असा आहे ( १. १, २, ७; ६, ३, १६).

[८८] मणिक.—जुन्या अद्भुत ब्राह्मणांत आणि सूत्रांत याचा अर्थ पाण्याची बाटली असा आहे.

[८९] मूत.—ऋग्वेदोत्तर संहितेंत आणि ब्राह्मणांत विणलेली टोपली या अर्थी हा शब्द येतो. मूतक म्हणजे एक ' लहान टोपली.'

[९०] वालदामन्.—शतपथ ब्राह्मणांत घोड्याच्या केसांची वादी अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[९१] शुंबल.—शतपथ ब्राह्मणांत हा शब्द आलेला आहे. ह्या शब्दाचा अर्थ अनिश्चित आहे. हरिस्वामी आपल्या टीकेंत ह्याचा अर्थ गवताची पेंढी असा करितो. एगलिंग हा कापसाचा धागा किंवा कोशाचा धागा असे अर्थ सुचवितो. कांहींहि असलें तरी लवकर पेट घेणारा पदार्थ असा ह्याचा अर्थ असला पाहिजे.

[९२] श्लेष्मन्.—ह्याचा अर्थ ज्याच्यावर एखाद्या वस्तूचे भाग जोडले जातात तें असा आहे. चामडें असेल तर बारिक तारा; रथ असेल तर दोर व लांकूड असेल तर सरस ( चिकटवावयाचा ) असा ह्या शब्दाचा अर्थ होईल;

[९३] हिरण्यकशिपु.—ब्राह्मण ग्रंथांत ह्या शब्दाचा अर्थ सोन्याचें म्हणजे सोनेरी वस्त्रानें बनविलेलें आसन असा आहे.

**रज्जुनामें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| कक्ष्य ( अश्वोदर बंधन रज्जु ) | [२]दामन् | रज्या |
| | निष्धिध | [५]रशना |
| ज्याका | [३]पाश | रश्मि |
| [१]तन्ति (दीर्घप्रसारिता रज्जु) | मुक्षीजा (जाळें) | वयस् |
| | [४]योक्त्र | [६]वरत्रा |
| त्रिविष्टिधातु (तिपेडी दोरी) | योग्या | [७]संदान |
| | रज्जु | [८]स्यूमन् |

[ तै. सं. ]

[९]मेखला [१०]रास्ना

[१] तन्ति.—ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आलेला आहे. व त्याचा अर्थ रॉथ हा अनेकवचनीं प्रयोगी 'वासरांच्या रांगा ' असा करतो पण ह्या शब्दाचा पुढें झालेल्या ग्रंथांत ज्या अर्थानें उपयोग केलेला आहे तो अर्थ म्हणजे दोऱ्या किंवा वासरांस बांधण्याकरितां दावीं हा ऋग्वेदांत सुद्धां घेणें बरें.

[२] दामन्.—ह्याचा अर्थ दोर किंवा मेखला असा आहे व हा शब्द ऋग्वेद व पुढील ग्रंथ ह्यांत अनेकदां आलेला आहे. यज्ञांतल्या घोड्याच्या दोऱ्याविषयीं त्याचप्रमाणें वासरांनां दोरीनें बांधण्याच्यां प्रघातांविषयीं उल्लेख आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत घोड्याच्या केसांचा झुबका अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[३] पाश.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांत बांधून आवळण्याकरितां उपयोगीं पडणारा दोर असा ह्याचा अर्थ आहे. दोर व ग्रंथि ह्यांचा एकत्र संबंध अथर्ववेदामध्यें आलेला आहे. शतपथ ब्राह्मणांत पाश हा शब्द ज्याच्या योगानें मनुच्या जहाजाला पर्वताशीं बांधिलें होतें त्या दोराला लाविला आहे. लक्षणेनें वरुणाच्या पाशाला हा शब्द वारंवार लावलेला आढळून येतो.

[४] योक्त्र.—ऋग्वेदांत आणि नंतर गाडीला किंवा रथाला जुंपण्याच्या चमड्याच्या वाद्या असा याचा अर्थ आहे.

[५] रशना.—दोर किंवा दोरी या अर्थी ऋग्वेदांत घोडे बांधण्याकरितां म्हणून याचा उपयोग केला जात असे म्हणून लिहिलें आहे.पण एका उताऱ्यांत 'शीर्षण्या रशना'लगाम अस

अर्थ होतं नाहीं. कांहीं उताऱ्यांत पट्टे असा अर्थ ध्वनित होतो. कांहीं मध्यें पट्टे आणि लगाम हे दोन्हीहि अर्थ ध्वनित होतात. इतरत्र साधारण दोर हा अर्थ निघतो.

[६] व र त्रा.—ऋग्वेदामध्यें व पुढें ह्याचा अर्थ वादी किंवा दोरी असा आहे. ह्याचा उपयोग बैल जुंला बांधावयांस किंवा कदाचित् जूं दांड्याला बांधावयास होत होता. किंवा विहिरींतून (अवत) पाणी काढण्याकरितां उपयोगांत आणलेली दोरी असाहि ह्याचा अर्थ होतो.

[७] सं दा न.—ऋग्वेदांत व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें दोर, काढणी किंवा बेडी ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[८] स्यू म न्.—ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं रॉथच्या मतानें घराचा दरवाजा घट्ट आवळणारी दोरी असा आहे.

[९] मे ख ला.—नंतरच्या संहितेंत आणि ब्राह्मणांत कंबरेचा पट्टा या अर्थी, अथवा ब्रह्मचाऱ्यानें कमरेस बांधावयाची दोरी अशा अर्थी हा शब्द आला आहे.

[१०] रा स्ना.—यजुर्वेद संहितेत आणि शतपथ ब्राह्मणांत कम्मरपट्टा किंवा दोरी या अर्थी; रशना आणि रश्मीप्रमाणें हा शब्द येतो.

## जा ती कु ळें व वं श

### जाती व कुलें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अज | गोपा | भरत |
| अत्रिन् | चोदि | भलानस |
| अनु | ज्ञाति | भारत |
| अनूच | तुर्व | मत्स्य |
| अलिन | तुर्वश | मूरदेव |
| असूत | तृत्सु | यक्षु |
| आजमीढ | दशग्व | यदु |
| आजि | दस्यवेवृक | रथप्रोष्ठ |
| आयु | दस्यु | राजन्य |
| आरि | दास | वणिज् |
| आर्य | दुर्मद | वनर्गु |
| उग्रदेव | द्रुह्यु | वर्ण |
| ओगण | नवग्व | विजामि (विविध-ज्ञाति) |
| कितव | नहुष् | विश् |
| कुयवाच् | पक्थ | विषाणिन् |
| कृष्णयोनि | पणि | वृचीवन्त |
| कृष्टि | पज्र | वृषल |
| क्रिवि | पारावत | वैकर्ण |
| क्षत्र | पृथुपर्शु | शण्डीक (शण्ड-वंशज) |
| क्षिति | बार्हत (गन्धर्व वगैरे) | शिग्रु |
| गन्धारि | ब्राह्मण | |
| गोपति | | |

| | | |
|---|---|---|
| शिम्यु | शिश्नदेव | सुत |
| शिव | शीष्ट | सौधन्वन् |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अब्राह्मण्य | धन्वकृत् | रथकार |
| अर्य | [२] निषाद | राजन्य |
| आथर्वण | पंचजन | राजन्यवत् |
| आर्षेय | पणि | वाणिज् |
| इषव्य | पांचजन्य | वैश्य |
| इषुकृत् | [३] पुंजिष्ठ | शूद्र |
| कर्मार | [४] ब्रह्मन् | [५] शूद्रा |
| [१] कुलाल | ब्राह्मण | श्वनि |
| क्षत्रिय | ब्राह्मणवत् | श्वपति |
| तक्ष | मलिम्लु | [६] सूत |
| तस्कर | मृगयु | स्तेन |
| दुर्ब्राह्मण | यति | स्थपति |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| [७] अंग | दास (कोळी, धीवर | रथकार |
| अंत्रि | [१०] द्विज | राजन्य |
| अब्राह्मण | पर्शु | वणिज |
| अर्किन् | पांचजन्य | [१४] व्रात्य |
| अय | पूरु | [१५] शकम्भर |
| आयवन | पौंजिष्ठ (कोळि) | शूद्र |
| आर्य | [११] बाल्हिक | शूद्रकृत् |
| कण्व | ब्राह्मण | सुब्राह्मण |
| [८] कैरातिका (किरात-कन्या) | [१२] महावृष | सृंजय (जातीचे लोक) |
| क्षत्र | [१३] मूजवन्त (जातीचे लोक) | स्थपति |
| [९] दाक्षायण | मूरदेव | |
| दाशराज | यदु | |

[ वाज. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [१६] चण्डाल | चाण्डाल | [१७] पौंजिष्ठ |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [१८] अन्ध्र | [२८] कुन्ति | [३८] गोत्र |
| [१९] आजकेशिन् | [२९] कुरुपंचाल | [३९] गौपायन |
| [२०] आथर्वन् | [३०] कुल | [४०] जाति |
| [२१] उत्तरकुरु | [३१] केकय | [४१] त्रिखर्व |
| [२२] उत्तरमद्र | [३२] केशिन् | [४२] निष्किरीय |
| [२३] उदीच्य | [३३] केशिनी | [४३] नैषाद |
| [२४] ऊर्णनाभि | [३४] कोष | [४४] पंचाल |
| [२५] कंकतीय | [३५] कौरव्य | [४५] पुण्ड्र |
| [२६] कम्बोज | [३६] कौरु-पंचाल | [४६] पुलिन्द |
| [२७] कारस्कर | [३७] क्रैव्य | [४७] पौश्चलेय |

| | | |
|---|---|---|
| [४८] प्राच्य | [५३] मूतिब | [५८] सत्वन्त |
| [४९] बाह्लीक | [५४] म्लेंछ | [५९] सल्व |
| [५०] भरन्त | [५५] शबर | [६०] स्पर्धु |
| [५१] मागधदेशीय | [५६] शाल्व | |
| [५२] मूचीप | [५७] श्विक्न | |

[१] कु ला ल.—तैत्तिरीय संहितेंत 'शतरुद्रीय' नामक कर्मामध्यें (रुद्राध्यायांत) या शब्दाचा कुंभार या अर्थानें उल्लेख आला आहे.

[२] नि षा द.—ऋग्वेदानंतरच्या तैत्तिरीय व वाजसनेयि संहिताग्रंथांत व ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द आला आहे. या शब्दावरून एखाद्या विशिष्ट जातीचा बोध होतो असें नाहीं तर शूद्र लोकांप्रमाणें जे लोक आर्यांच्या अमलाखालीं नव्हते अशा अनार्य लोकांनां हें नांव होतें कारण औपमन्यवाच्या मतान पांच प्रकारचे लोक (पंचजनाः) म्हणजे चार जाती (चत्वारोवर्णाः) आणि पांचवे निषाद (निषादःपंचमः) होत. वाजसनेयि संहितेंत हा शब्द आला आहे. तेथें टीकाकार महीधरानें त्याचा भिल्ल किंवा भील असा अर्थ दिला आहे. लाट्यायन श्रौतसूत्रांत निषादांची वसति असलेल्या एका खेडेगांवाचा उल्लेख आला आहे. व निषादस्थपतिःया नांवाच्या एका निषादांच्या पुढाऱ्याचा कात्यायन श्रौतसूत्रांत व त्याच सूत्रावरील टीकाकारानें उद्धृत केलेल्या एका ब्राह्मण ग्रंथांत उल्लेख आला आहे. वेबरच्या मतानें निषादलोक हे मूळचे वसति करून (नि-सद्) राहाणारे लोक असावे. कारण या मताला एका गोष्टीचा आधार आहे. ती गोष्ट ही कीं विश्वजित् नामक यज्ञ करणाराला कांहीं दिवस निषादाबरोबर रहावें लागे व त्यामुळें जे निषाद अशा आर्याला आपणांत राहूं देत त्यांच्यावर थोडी तरी आर्य संस्कृतीची छाप पडण्याचा संभव असे. पण आर्य लोकांच्या समाजव्यवस्थेच्या बाहेर असलेल्या मूळच्या सर्व लोकांनां ही निषाद पदवी लावितां येईल. व्हान श्राडर म्हणतो कीं, हे निषाद लोक 'नीशियन्स या लोकांशीं सदृश असावेत. कारण ग्रीक इतिहासकारांनीं असा उल्लेख केला आहे कीं अलेक्झांडर हा अश्वकांच्या देशांत असतांनां 'नीशियस्' लोकांनीं त्याच्याकडे एक वकील पाठविला होता. परंतु निषाद् आणि हे नीशियन्स् लोक दोन्ही एकच कीं काय या बद्दल शंका आहे.

[३] पुं जि ष्ठ.—तैत्तिरीय संहिता व तदुत्तर ग्रंथ यांत हा शब्द आला असून त्याचा कोळी असा अर्थ आहे. परंतु वाजसनेयि संहिता १६.२७ येथें टीकेंत महीधर याचा पक्षी पकडणारा (पारधी) असा अर्थ घेतो.

[४] ब्र ह्म न्.—(नपुंसकलिंगी) हा शब्द क्षत्रिय व इतर लोकांहून वेगळा असा ब्राह्मणवर्ग दर्शवितो. अथर्व वेद व तदनंतरच्या ग्रंथांतून हा शब्द आढळतो.

[५] शू द्रा.—तै. संहिता, अथर्ववेद व मागाहूनच्या ग्रंथांत हा शब्द शूद्रस्त्री या अर्थानें आलेला आढळतो.

[६] सू त.—यजुर्वेद संहिता व पुढील ग्रंथांत ग्रामणी बरोबर उल्लेख असलेल्या एका राजदरबारांतील नोकराचें हें नांव आहे. पंचविंशब्राह्मणांत जे आठ वीर आले आहेत व इतर सर्व संहितामध्यें जे अकरा रत्नें आले आहेत त्यापैकीं सूत हा एक होय. याचा उल्लेख अथर्ववेदांत राजदूतापैकीं एक म्हणून आलेला आहे. त्याचप्रमाणें यजुर्वेदाच्या शतरुद्रीय अनुष्ठानामध्येंहि हा शब्द आला आहे. टीकाकारांच्या मतानें सूत याचा राजाचा सारथी असा अर्थ आहे. परंतु अनेक ठिकाणीं सूत शब्दाबरोबर संगृहीतृ हाहि शब्द आला आहे. तेव्हां टीकाकारांचा अर्थ येथें संभवत नाहीं एगलिंग म्हणतो कीं ब्राह्मणकालांत तरी हा सूत राजदरबारांतील कवि होता. वेबरच्या मतानें या सूत शब्दाचा अर्थ राजाजवळ नेहमीं प्रवेश असतो तो असा आहे. महाभारतकालांत सूत म्हणजे राजाचा बंदीजन किंवा भाट असा अर्थ आहे. यजुर्वेदाच्या निरनिराळ्या संहितांतील शतरुद्रीय प्रकरणांत सूत याला अहन्ति, अहन्त्य, अहन्त्व असे शब्द लाविले आहेत यावरून सूत हा भाट व वादन करणारा असा दोन्हीं प्रकारचा मनुष्य होता असें दिसतें. भाट व वादन हे दोन्ही गुण एकत्र असलेले अन्यत्र कोठेंहि आढळत नाहींत.

[७] अं ग.—गंधारि, मूजवन्त आणि मगध या निरनिराळ्या लोकांसंबंधीं जें अथर्ववेदांत वर्णन आहे त्यांत हें नांव आलेलें असून गोपथ ब्राह्मणांत 'अंगमागधाः' या सामासिक शब्दांतहि यांचा उल्लेख आहे. त्यांची वसती गंगा आणि शोण यांच्या काठीं असे यावरून पूर्वीपासून ते त्याच ठिकाणीं रहात असावेत असें दिसतें.

[८] कै रा ति का.—किरातलोकांची मुलगी. औषधाकरितां पाळें मुळें खणींत असलेली अशा संबंधांत हिचा अथर्ववेदांत उल्लेख आला आहे.

[९] दा क्षा य ण.—दक्षाचा वंशज. या दाक्षायण लोकांचा अथर्ववेद व काठक संहितेंत शतानीकाला सोनें (अथवा अलंकार) दिल्याबद्दल उल्लेख आला आहे. शतपथ ब्राह्मणांत हा शब्द सोनें या अर्थानेंच आला आहे. याच ब्राह्मण ग्रंथांत दाक्षायण लोकांना राजे म्हटलें आहे, व दाक्षायण वंशांतील पार्वति नामक कोणी मनुष्यानें दाक्षायण यज्ञ केल्यामुळें त्याला राज्यपद मिळालें व त्याच्या वंशाची पुढें भरभराट होत गेली.

[१०] द्वि ज.—दोनदां जन्मलेला. हें विशेषण आर्यांना विशेषतः ब्राह्मणांनां लावलेलें असून अथर्ववेदांतल्या एका दुर्बोध सूक्ताशिवाय वैदिक वाङ्मयांत अन्यत्र कोठेंहि उल्लेख दिसत नाहीं.

[११] बा ल्हि क.—हें एका जातीच्या लोकांचें नांव अथर्ववेदांत येतें. त्यांत तापाला (तक्मन्) मूजवन्त, महावृष व बल्हिक यांच्याकडे जाण्यास सांगितलें आहे. मूजवन्त लोक हे खात्रीनें उत्तरेकडे राहणारे लोक होते. ब्लूमफील्डच्या

मतानें बल्हिक हें नांव श्लेषार्थी (बाहेर रहाणारे या अर्थानें) असावें. परंतु हा शब्द निःसंशय उत्तरेकडील कोणत्यातरी जातीवरून घेतला असला पाहिजे. रॉथ व वेबर यांचे मतें असें कीं, या बल्हिकांचा इराणी जातीकडे (बल्ख) संबंध असावा. हें मत झिमरनेंहि एकदां स्वीकारलें होतें परंतु पुढें तो म्हणतो कीं, फारशी जातीचा बल्हिकाशीं कांहीं संबंध होता असें मानण्याचें कांहींच कारण नाहीं.

[१२]महावृष.—हें एका जातीचें नांव आहे. यांचा उल्लेख अथर्ववेदांत बाल्हिक याच्या बरोबर आला आहे व यांच्याकडे तक्मन् (तापाला)ला जाण्याची आज्ञा झाल्याबद्दलचा तेथें उल्लेख आहे. ब्लूमफील्ड म्हणतो कीं हें नांव विशेषतः आवाज आणि अर्थ याकडेच लक्ष देऊन दिलेलें असावें; त्याचा स्थलाशीं कांहीं संबंध नसावा(हे महावृष म्हणजे महाशक्तिमान = रोगाला तोंड देण्याला समर्थ)असावें परंतु हें मत फारसें सयुक्तिक नाहीं. महावृष देशांत रैक्पर्ण हें स्थान होतें असें छान्दोग्य उपनिषदांत म्हटलें आहे. 'हृत्स्वाशय' हा महावृषांचा राजा होता असा जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत उल्लेख असून महावृषांचा बौधायन श्रौतसूत्रांतील एका मंत्रांत आहे.

[१३]मूजवन्त.—महावृष, बाल्हिकांबरोबर उल्लेख आलेल्या लोकांचें नांव. यजुर्वेद संहितेंतहि दूर रहाणारे लोक असाच या शब्दाचा अर्थ आहे. आणि त्याच संहितेंत रुद्राला त्याच्या धनुष्यासह या लोकांच्याकडे जाण्यास आज्ञा केली आहे. ऋग्वेदांत सोमाला 'मौजवत' (मूजवन्त लोकांकडून अथवा यास्कांच्या मताप्रमाणें मूजवान पर्वतापासून येणारा) म्हटलें आहे. हिंदी टीकाकारांना मूजवान हें पर्वताचें नांव आहे हें यास्काचें मत मान्य आहे. काश्मीरच्या नैऋत्येस असणाऱ्या एका पर्वताचें नाव मूजवान होय या झिमरच्या मतास पुरावा नाहीं असें हिलेब्रँटचें मत जरी बरोबर असलें तरी मूजवन्त नांवाचा एक पर्वत होता त्यावरूनच या लोकांनीं मूजवन्त हें नांव धारण केलें हें म्हणणें गैरवाजवी होणार नाहीं. मूजवन्त आणि मुंजवन्त एकच असें यास्कांचें मत आहे आणि हिमालयाच्या एका भागाचें किंवा त्यांतील एका पर्वताचें हें नांव आहे असें महाभारतांत उल्लेखिलेलें आहे.

[१४]व्रात्य.—यजुर्वेदांत पुरुषमेधप्रसंगीं बलि दिले जाणाऱ्यांच्या यादींत हें नांव आलेलें आहे परंतु तेथें या नांवाबद्दल जास्त खुलासा नाहीं. तो अथर्ववेद व पंचविंशब्राह्मण या ग्रंथांत आढळतो. अथर्ववेदांत व्रात्यासाठीं एका विधीचें सविस्तर वर्णन आलेलें आहे (या विधीचा—व्रात्यस्तोमाचा—उल्लेख ज्ञानकोश विभाग दोन पृष्ठ ६५ मध्यें आला आहे). पंचविंश ब्राह्मणांत बहिष्कृत् लोकांच्या चार वर्गांचा उल्लेख आला आहे ते चार वर्ग म्हणजे—हीन, (पापाचरणानें निंदित झालेली) निंदित; (बहिष्कृत लोकांत राहिल्यामुळें लहानपणींच बहिष्कृत झालेले) बहिष्कृत; व चवथे जे वृद्ध लोक पुरुषत्वहीनतेमुळें बहिष्कृत लोकांत रहात ते असे होत. पहिल्या तीन जाती इतक्या महत्त्वाच्या नाहींत परंतु चवथी जात बनण्याचा हेतु काय असावा हें समजत नाहीं. प्रो. राजारामशास्त्री भागवत यांच्या मतानें हे लोक देशांतील बायकाशीं अयोग्य संबंध ठेवल्यामुळें आपली प्रकृति निःशक्त करून घेऊन व षंढ बनले. परंतु मूळांत या मतास आधार नाहीं. या चार जातींपैकीं हीन हेच लोक महत्त्वाचे व बाकीचे दुय्यम प्रतीचे असावेत हें संभवनीय आहे. रा. भागवत शास्त्र्यांच्या मतें हीन लोकांचे 'आर्यन्हीन व 'अनार्यन्हीन' असे दोन वर्ग असावेत. पण ही निवळ कल्पनाच आहे. या व्रात्यांचा एकच वर्ग असावा असें वाटतें ते अनार्य असतील हें शक्य नाहीं. कारण पंचविंश ब्राह्मणांत असा स्पष्ट उल्लेख आहे कीं जरी ते स्वतः असंस्कृत होते तरी ते सुसंस्कृत लोकांचीच भाषा बोलत असत. यावरून ते आर्य असावे. या मताला पुढील वाक्याचा आधार आहे. 'जे बोलावयास सोपें तें सुद्धां ते लोक उच्चारण्यास अवघड असें समजतात. यावरून ते लोक सुसंस्कृत लोकांचीच परंतु त्यापेक्षां थोडी हलक्या प्रतीची भाषा बोलत असावे असें वाटतें. सूत्रामध्यें ब्राह्मण व क्षत्रिय यांनां सदृश अशा अर्हन्त व यौध (लढवय्ये) या वर्गांचा उल्लेख आला आहे. इतर अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं ज्यावरून हे ब्राह्मण संस्कृतीला पारखे असले तरी आर्यन् होते ही गोष्ट सिद्ध होईल. उदाहरणार्थ हे लोक व्यापार किंवा शेतकी करीत नव्हते (यावरून ते एकाच ठिकाणीं वसती करून राहणारे लोक नसावेत) किंवा ते ब्रम्हचर्याचे नियम पाळीत नसत असें वर्णन आहे. या लोकांनीं एक विशिष्ट व्रताचरण केलें असतां त्यांनां ब्राह्मणसमाजांत प्रवेश करतां येत होता. यावरून ते अनार्यन् खास नसले पाहिजेत अशी कल्पना करण्यांत आली आहे. व्रात्याचा पोषाख व जीवनक्रम याविषयीं कांहीं माहिती पंचविंश ब्राह्मणांत मिळते. त्यांचीं तत्त्वें ब्राह्मण लोकांच्या विरुद्ध होतीं. ज्यांनां सुधारता येणें शक्य नव्हतें त्यांनां ते मारीत असत. त्यांचा गृहपति डोक्यावर नेहमीं उष्णीष (शिरस्त्राण, पागोटें) धारण करी, त्याच्या हातांत एक चाबूक व धनुष्य (ज्याऱ्होड) असे, तो कृष्ण वस्त्र: परिधान करी व त्याच्या अंगावर काळें व पांढरें कातडें पांघरलेलें असे. त्याची एक चौचाकी गाडी असून त्या गाडीवर चार फळ्या असत. एखाद्या पुढाराच्या अनुशासनाखालीं असलेल्या लोकांचीं वस्त्रें तांबड्या काठांचीं असत व ते अंगावर घेत तें कातडें दोन ठिकाणीं दुमडलेलें असे तसेंच त्या लोकांच्या पायांत जोडे (उपानह) असत व त्यांच्या पुढाऱ्याला निष्क नामक अलंकार धारण करण्याची फार आवड असे. प्रो. राजारामशास्त्री यांच्या मतानें हें निष्क म्हणजे एक प्रकारचें रुप्याचें नाणें होतें. व्रात्यलोक सुसंस्कृत झाल्यवर त्यांनीं आपली चीजवस्त पुरोहिताच्या ताब्यांत द्यावी अशी रूढी असे. याशिवाय इतर बरीच माहिती सूत्रग्रंथांतून आली आहे (उदाहरणार्थ हे लोक जे जोडे वापरीत त्यांचा वर्ण काळ-

सर असे व त्यांची टोकें पुढें आलेलीं असत). पण या माहितीला पंचविंशब्राह्मणांत आधार नाहीं हे व्रात्यलोक कोठें रहात असत या विषयीं नक्की माहिती सांगणें कठिण आहे. पण ज्या अर्थी ते नेहमीं भटकत असत त्या अर्थी ते सरस्वती नदीच्या पलीकडे रहात असावेत अशी कल्पना आहे. कदाचित् ते पूर्वेकडेहि रहात असावे. या कल्पनेला सूत्रांत आधार आहे तो असा कीं, या व्रात्य लोकांच्या उपभोग्य वस्तूंचें ( पोषाखाचें ) दान घेणारा ब्राह्मण ( कदाचित् व्रात्यस्तोम विधीच्या वेळीं ) मगधांतील रहिवाशी असे. व्रात्यांचें राहण्याचें ठिकाण निश्चित करण्याच्या बाबतींत अथर्ववेदाची कांहीं मदत होऊं शकत नाहीं. कारण त्या वेदाची व्रात्याबद्दल अशी कल्पना आहे कीं ते सर्वत्र रहात असत. रॉथ ह्मणतो कीं व्रात्याबद्दल पंचविंशब्राह्मणकाराचें जें मत होतें तेंच अथर्ववेदांत प्रतिपादिलेलें होतें असें कोणी समजू नये. कारण अथर्ववेदांत व्रात्यांची स्तुति केलेली असून ते लोक ब्राह्मण लोकांतील परिव्राजकाप्रमाणें पूज्य होते असें म्हटलें आहे. परंतु रॉथचें हें मत सपशेल चुकीचें आहे. कारण अथर्ववेदांत व्रात्याजवळ विपथ ( रथ ), प्रतोद ( चाबूक ) व उपानह ( जोडा ) या वस्तू असल्याचें उल्लेखिलें आहे आणि या वस्तू परिव्राजकाजवळ असणें संभवनीय नाहीं. आतां ही गोष्ट शक्य आहे कीं अथर्ववेदांतील जें पंधरावें कांड गूढ म्हणून प्रसिद्ध आहे त्यांत ब्राह्मण झालेल्या व्रात्यांची खूप स्तुति केलेली असावी व त्याला पूर्णब्रह्मचारी समजून दैवी अंशाचा अतएव वंदनीय असा मान दिला गेला असावा.

[१५]शकंभर.—अथर्ववेदांत हा शब्द एका ठिकाणीं आला आहे व तेथें त्याचा अर्थ सन्दिग्ध आहे. लुडविग व ग्रिल यांच्या मतें याचा अर्थ एका जातीचें नांव असा आहे. ब्लूमफील्ड म्हणतो याचा अर्थ 'हगवण' असा आहे. परंतु व्हिटने म्हणतो कीं हा शब्द महावृष लोकांना निंदासूचक अर्थानें लावला आहे.कारण महावृषांच्या देशांत लांकूड नसल्यामुळें जळणासाठीं त्यांना वाळलेल्या शेण्या गोळा कराव्या लागत ( शकं = वाळलेलें शेण, भर = भरणारे ),

[१६]चण्डाल-चाण्डाल.— वाजसनेयि संहितेंत उल्लेखिलेलीं हीं अस्पृश्य जातीच्या नांवाचीं दोन रूपें आहेत. मूळांत एक ही निराळी जातच असावी असें वाटतें परंतु ही जात म्हणजे ब्राह्मण आई व शूद्र बाप यांच्यापासून झालेली संतति होय. अशी कल्पना धर्मशास्त्रकारांनीं मांडली आहे. यजुर्वेद आणि उपनिषदें यावरून ही एक मागसलेली जात आहे एवढीच माहिती मिळते.

[१७]पौंजिष्ठ.—कोळी या अर्थी असलेल्या वाजसनेयि संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यांत आलेल्या पुंजिष्ठ शब्दाचें हें रूप आहे. कदाचित हें जातिवाचक नाम असावें. पुंजिष्ठाचे वंशज या अर्थी एकाद्या कामकरी जातीचें हें नांव असावें.

[१८]आन्ध्र —शुनःशेपास विश्वामित्राचा पुत्र न समजणाऱ्या अशा ज्या लोकांना विश्वामित्रानें घालवून दिलें त्या पैकी अन्ध्र हे आहेत. यांचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत आहे.

[१९]आजकेशिन्.—इंद्राच्या विरुद्ध ज्या बकानें दाण्डगाई केली त्याच्या कुलाचें हें नांव आहे असें जैमिनीय उपनिद्ब्राह्मणांत उल्लेखिलें आहे.

[२०]आथर्वण.—अतिप्राचीन अथवा काल्पनिक अथर्वन् पासून हें नांव चालत आलेलें आहे. या शब्दाचा अनेक वचनी नपुंसकलिंगी असा उपयोग केल्यास अथर्वन् यांनीं केलेल्या सूक्तांचाहि बोध होतो. अथर्ववेदाच्या एकोणिसाव्या काण्डांत अशा तऱ्हेचा उपयोग केलेला आढळतो, व पंचविंश ब्राह्मणांतहि आढळतो. एकवचनी अथर्वण ( वेद ) हा शब्द जरी छांदोग्य उपनिषदापर्यंत आढळत नाहीं तरी तो 'अथर्ववेद' या शब्दाच्या अगोदरच आहे कारण 'अथर्ववेद' हा शब्द सूत्रांत आढळतो व त्याच सूत्रांत आथर्वणिक अथवा अथर्ववेदाचे अनुयायी अशा अर्थाचा शब्द आहे. अथर्वन् याचे अनुयायी अथवा त्याच्या कुलांतील जुन्या परंतु निश्चित अशा लोकांचीं नांवें दध्यञ्च्, बृहद्दिव, भिषज्कबन्ध व विचारिन् हीं आहेत.

[२१]उत्तरकुरु.—महाकाव्यें आणि तदुत्तर वाङ्मयांत उत्तरकुरु हे काल्पनिक लोक असावेत असें दिसते. ऐतरेय ब्राह्मणावरून ते लोक ऐतिहासिक व हिमालयाच्या पलीकडे राहणारे होते असें दिसतें, ऐतरेय ब्राह्मणांतील दुसऱ्या एका उताऱ्यांत वासिष्ठ सात्यहव्य म्हणतो कीं उत्तरकुरूंचा देश देवक्षेत्र हा होता व अत्यराति जानंतपि हा तो देश जिंकण्याच्या विचारांत होता. यावरून तो देश काल्पनिक होता असें म्हणतां येत नाहीं. उत्तरकुरु हे काश्मीरांत रहात असावे असें वाटतें. कुरुक्षेत्रांत मुख्यत्वेकरून काश्मीरांतून येणाऱ्या लोकांच्याच टोळ्या आढळतात असें जें झिमरचें मत तें सकारण असून ग्राह्य आहे.

[२२]उत्तरमद्र.—ऐतरेय ब्राह्मणांत हिमालयाच्या पलीकडे राहणाऱ्या व उत्तरकुरूंच्या बरोबर असणाऱ्या एका जातीचा उल्लेख आहे. झिमर म्हणतो कीं वंशब्राह्मणांत उल्लेखिल्या प्रमाणें काम्बोज औपमन्यव हा मद्रगार याचा शिष्य होता आणि म्हणून काम्बोज आणि मद्र यांच्यांत फारसें अन्तर नव्हतें. हें विधान काम्बोज यांची राहण्याची जागा पाहिली असतां अगदीं बरोबर दिसून येईल.

[२३]उदीच्य.—उत्तर प्रान्तांतील ब्राह्मण कुरुपंचाल उद्दालक आरुणि याच्याशीं वादाला गुंतले असतां स्वैदायन शौनक याला त्यांनीं आपल्या वतीनें बोलणारा नेमून प्रतिस्पर्ध्यांचा वादांत पराभव केला असा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत आहे, आणि त्याच ब्राह्मणांत कुरुपंचालांची भाषा उत्तरेकडील लोकांच्या भाषेशीं साम्य पावते असाहि उल्लेख आहे, यावरून त्यांचा आणि कुरुपंचालांचा संबंध असावा असें वाटतें,शुद्धपणाबद्दल उत्तरेकडील भाषेची प्रसिद्धि होती

म्हणून अध्ययनासाठीं ब्राह्मण लोक तिकडे जात असत असा कौषीतकी ब्राह्मणांत उल्लेख आहे, आणि बौद्ध ग्रंथांत तक्षशिला येथील पाठशाळेंत पुष्कळ विद्यार्थी अभ्यासासाठीं रहात असत असा उल्लेख आहे आणि म्हणूनच संस्कृत भाषा काश्मीरांत श्रेष्ठ पदास पोंचली होती असें फ्रँकचें मत आहे.

[२४]ऊर्णनाभि, ऊर्णवाभि, ऊर्णवन्त.—हीं सर्व नांवें कोळी ( जात ) या अर्थानें काठक संहिता, ब्राह्मणग्रंथ व उपनिषद्ग्रंथ यामध्यें आलीं आहेत.

[२५]केकतीय.—या नांवाचे लोक शाण्डिल्यापासून अग्निचयन शिकले असा शतपथ ब्राह्मणांत उल्लेख आहे. आपस्तंब श्रौतसूत्रांत कंकति ब्राह्मणांच्या पंथाच्या मूळग्रंथाचा उल्लेख आला आहे. बौधायन सूत्रांतील छागलेय ब्राह्मण आणि हे कंकति ब्राह्मण एकच असावेत.

[२६]कंबोज, काम्बोज.—निरुक्तकार यास्क म्हणतात कीं इतर आर्य लोकांची भाषा आणि काम्बोज यांची भाषा यांत फरक आहे. काम्बोज हे सिंधुनदीच्या वायव्येस रहात असत आणि जुन्या पारशांच्या ग्रंथांत त्यांना कंबुजीय असें म्हटलें आहे. मद्रगार याचा शिष्य काम्बोज औपमन्यव हा अध्यापक म्हणून वंशब्राह्मणांत आलेला आहे. यावरून पार्शी लोक व आर्यन् लोक यांच्याशीं संबद्ध असणारे कम्बोज लोक यांचा मद्र अथवा विशेषतः उत्तरमद्र यांच्याशीं संबंध असावा असें वाटतें.

[२७]कारस्कर.—बौधायन, आपस्तंब व सत्याषाढ या सूत्रांत एका राष्ट्राचें अथवा जातीच्या लोकांचें म्हणून हें नांव आलें आहे. रा. वि. का. राजवाडे यांनीं कातकरी हेच कारस्कर असावेत असें मत व्यक्त केलें आहे. त्यास हरप्रसाद शास्त्री वगैरे मंडळींनीं आक्षेप घेतले आहेत.

[२८]कुन्ति.—या लोकांनीं पंचाल यांचा पराभव केला असा काठक संहितेंत उल्लेख आहे.

[२९]कुरु.—ब्राह्मण वाङ्मयांत कुरु लोकांना फार महत्त्व दिलेलें आहे. ब्राह्मण जात अथवा लोक हे कुरु किंवा कुरुपंचाल या देशांत उत्पन्न झाले अशाबद्दल सबळ पुरावा जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत आहे. कुरूंचा स्वतंत्र उल्लेख फारच क्वचित आढळतो. त्यांचा पंचालांशींच निकट संबंध असल्यामुळें पंचालाबरोबरच त्यांचा उल्लेख केलेला आढळतो. कुरुपंचाल हें एकच राष्ट्र होतें असा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहे. कुरुपंचालांची यज्ञ करण्याची पद्धतीहि उत्तम होती असें म्हणत. कुरुपंचाल राजे राजसूय यज्ञ करीत असल्याचा उल्लेख आहे. हे राजे हिवाळ्यांत स्वारीकरितां बाहेर पडत व उन्हाळ्यांत परत घरीं येत. बृहदारण्याकोपनिषदांत कुरुपंचालब्राह्मणांचें फार बहारीचें वर्णन आहे. वेबर आणि ग्रीअर्सननें कुरु व पंचाल या दोन राष्ट्रांत वैदिक कालीं तंटे होत असत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. मागाहून जे लोक पश्चिमेकडून हिंदुस्थानांत आले आणि जे ब्राह्मण होते; ते पंचालांशीं वैरभावानें वागत असत; कारण ते ब्राह्मणद्वेष्टे होते, असें ग्रीअर्सन म्हणतो आणि या गोष्टीला दुजोरा देण्यासाठीं वेबर काठक संहितेंतील 'पंचाल देशांत जन्मलेला बकदाल्भ्य व कुरुवंशांतील धृतराष्ट्र वैचित्रवीर्य यांच्या भांडणासंबंधींची गोष्ट देतो. परंतु त्या ठिकाणीं वरील प्रकारच्या भांडणांचा उल्लेख नसून राजा आणि पुरोहित यांच्यांतील धार्मिक विधीसंबंधीं झालेल्या थोड्याशा भांडणाचा उल्लेख आहे. शिवाय त्या ठिकाणीं कुरुपंचालांच्या नैमिषीय यज्ञाचें वर्णन असून या दोन राष्ट्रांतील अतिनिकट संबंधाचाहि उल्लेख आहे. परंतु पुन्हा वेबर म्हणतो कीं वाजसनेयि संहितेंतील काम्पील येथील सुभद्रिकाहि त्या कुलाच्या आसपास राहणाऱ्या जातींच्या राजाची पट्टराणी होती आणि त्याच राजाकरितां संहितेंत सांगितलेला अश्वमेध यज्ञ केला होता. परंतु वेबरचें हें म्हणणें जबर संशयाला कारण आहे; आणि संहितेच्या काण्वशाखीय पाठांतील राजसूयाकरितां उपयोगांत आणिलेल्या उताऱ्यावरून कुरु व पंचाल यांचा एकच राजा होता असें वाटतें. शतपथ ब्राह्मणांत पंचालांचें जुनें नांव क्रिवि होतें असा उल्लेख आहे क्रिवि हा शब्द कुरु याचा अपभ्रंश असावा. परंतु झिमर म्हणतो कुरु व क्रिवि मिळून ऋग्वेदांत उल्लेखिलेली वैकर्ण ही जात उत्पन्न झाली कारण या दोन्ही लोकांचा सिन्धु व असिक्नी या स्थलाशीं फार संबंध आढळतो. तसेंच कुरु आणि सृंजय लोक यांचा 'देवभाग' नांवाचा एकच पुरोहित असल्यामुळें याहि दोन्ही राष्ट्रांचें सख्य होतें असें दिसतें. छांदोग्य उपनिषदांत ( ४. १७, ९ ] एका प्रसंगीं कुरूंना एका घोडीनें वाचविल्याचा व वादळामुळें त्यांच्यावर ओढवलेल्या संकटाचा नाश केल्याचा [१. १०, १] हि उल्लेख आहे. शांखायन श्रौतसूत्रांत कुरूंनीं केलेल्या वाजपेय यज्ञाचा उल्लेख असून ज्या शापामुळें कुरूंना कुरुक्षेत्र सोडावें लागलें त्या शापाचाहि उल्लेख [ १५, १६, ११ ] आला आहे. हीच गोष्ट महाभारतांत उल्लेखिलेल्या कौरवांच्या दुर्भाग्याची कल्पना देते. ऋग्वेदांत कुरूंचा 'लोक' या अर्थानें उल्लेख नाहीं परंतु कुरुश्रवण, पाकस्थामा कौरयाण याचा उल्लेख आहे. अथर्ववेदांत परिक्षित् हा कुरूंचा राजा होता व शतपथ ब्राह्मणांत त्याचा मुलगा जनमेजय हा अश्वमेधयज्ञ कर्त्यांत श्रेष्ठ होता असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत आणखी ज्या जातींचा उल्लेख येतो त्या सर्वांचा कुरूंमध्यें समावेश होतो असें ओल्डेनबर्गचें मत आहे. तृत्सु व भरत हे ऋग्वेदांत जे पुरूंचे शत्रू ते नंतरच्या वाङ्मयांत कुरुराष्ट्र बनविण्याकरितां एक झालेले आढळतात. ब्राह्मण ग्रंथांत भरत हे प्राचीन लोकांत प्रमुख होते पण नंतरच्या वाङ्मयांत राष्ट्रांच्या यादींत त्यांचा मागमूसहि सांपडत नाहीं. यावरून पुढें ते कोणत्यातरी राष्ट्रांत समाविष्ट झाले असावेत असेंच अनुमान निघतें. पूर्वी ज्या देशांत भरत असत त्याच देशांत पुढें कुरूंची वसती

असल्याचा पुरावा आढळतो. शतपथ ब्राह्मणांत एका भरत राजानें काशिराजावर जय मिळविल्याचा आणि एकानें गंगा आणि यमुना यांचें अर्चन केल्याचा उल्लेख आहे. ऐतरेय ब्राह्मणांत भरताच्या 'सत्वत' नामक राजांवर स्वाऱ्या होत असत असा उल्लेख आहे. वाजसनेयि संहितेंत ( ११,३ ) भरत हें कुरुपंचालांचेंच दुसरें नांव आहे असें लिहिलें आहे आणि अश्वमेध करणारांच्या मोठमोठ्या यादींत एक कुरु व दोन भरत राजांचीं नांवें आलीं असून ते कोणत्या राष्ट्रांचे राजे होते हें मात्र दिलें नाहीं. परंतु ही माहिती दुसरीकडे दिली आहे असें ओल्डेन्बर्ग म्हणतो. ऐतरेय ब्राह्मणांत कुरुपंचाल मध्य देशांत रहात असत असें म्हटलें आहे. पण कुरु लोकांची आणखी एक टोळी उत्तरेकडे–उत्तरकुरु हिमालयाच्या पलीकडे–रहात असे. कुरुपंचालांचा देश म्हणजे ब्राह्मण संस्कृतीचें उगमस्थान होय व मागाहून ते चारी दिशेस पसरले यांत मुळींच संशय नाहीं. पंचविंश ब्राह्मणांतील व्रात्यस्तोम प्रकरणांत व शांखायन आरण्यकांत 'मगध देशांत ब्राह्मणानें वसती करणें म्हणजे अब्राह्मण्य होय' असें जें म्हटलें आहे त्याचा वरील गोष्टीमुळें उलगडा होतो. कुरुपंचाल ब्राह्मणांचा वर्चेवर उल्लेख येणें हें त्यांच्या धर्मप्रसारक चळवळीचें द्योतक होय. कुरुपंचालांच्या भौगोलिक स्थानांवरून ते कोसल, विदेह अथवा काशि यांच्या मागून हिंदुस्थानांत आले असावेत आणि पश्चिमेकडील नवीन आर्यन् लोकांच्या लाटेनें आणखी पूर्वेस ढकलले गेले असावेत. ही जी नवीन लाट आली तिचा आणि त्यांच्या पश्चिमेकडील शेजाऱ्यांचा हिंदुस्थानांत येण्याचा कालदृष्ट्या काय संबंध होता–म्ह० किती कालाच्या अंतरानें या लाटा उसळत असत–याबद्दल वैदिक वाङ्मयांत कांहीं आधार सांपडत नाहीं. नंतर वैदिकवाङ्मयदृष्ट्या ज्यांचें कांहींच महत्त्व नाहीं असे जे भाषेंत कांहीं चमत्कार घडून आले त्यांवरून पाहतां कुरूंनीं नवीन मार्गानें येऊन पूर्वपश्चिम देशांत वसती करणाऱ्या मूळ आर्यन् लोकांत आपलें घोडें ढकललें असावें.

[30] कु ल, कु ल पा.—कुल हा शब्द स्वतंत्रपणें ब्राह्मणकालाच्या पूर्वी आला नाहीं. गृह अथवा कुलगृह असा यांचा अर्थ असून रूपकदृष्ट्या घरांतील कुटुंब यालाच हा शब्द लाविला आहे. कुलपाः ( अक्षरशः गृहरक्षणकर्ता अथवा कुटुंबांतील मुख्य) हा ऋग्वेदांत आला असून लढाईंतील वाजपतीचा सेवक त्याच्यापेक्षां कमी दर्जाचा असतो आणि वाजपति हा ग्रामसेनेचा नेता समजत असत. अथर्ववेदांत मुलीला उपरोधिकपणें कुलपा असें म्हटलें आहे. कारण ती जगांत भर्तृहीना असून तिचा पति म्हणजे यम ( मृत्युपति ) होय. कुल या शब्दाचा उपयोग विभक्त-कुटुंबपद्धति होती असें दाखवितो. एका कुटुंबांत मात्र बापाच्या किंवा वडील भावाच्या नेतृत्वाखालीं पुष्कळशीं माणसें असूं शकतील. आणि यांचें कुल म्ह० निवासस्थान. गोत्र शब्दापासून कुल शब्द निराळा आहे. त्याचा अर्थ एका घरांत राहणारे—सर्व मंडळी, अविभक्त कुटुंब असा आहे.

[31] के क य.—बहुतकरून वैदिक व तदुत्तर काळांत ही जात वायव्येकडे सिंधु आणि वितस्ता या दोन नद्यांमध्यें रहात असे. वैदिक ग्रंथांतील अश्वपति कैकेय या नांवावरून केकय या जातीचा अप्रत्यक्षपणें अर्थबोध होतो.

[32] के शि न्.—शतपथ ब्राह्मणांत येणाऱ्या एका लोकांचें हें नांव आहे. त्यांत त्यांचा राजा यज्ञाच्या वेळीं अशुभ गोष्ट घडली तर तिच्या शुद्धीकरितां खण्डिक यान्यापासून प्रायश्चित्त घेत असे असा उल्लेख आहे.

[33] कै शि नी.—'कैशिन्यःप्रजाः' म्ह० केशिन् यांचीं मुलें अथवा प्रजा असा शतपथ ब्राह्मणांतील एका अप्रसिद्ध ठिकाणीं उल्लेख असून ती प्रजा शतपथ ब्राह्मणाच्या काळांत कदाचित् अस्तित्वांत असेल अगर नसेल.

[34] को ष.—शतपथ ब्राह्मणांत कोषस् हें एक उपाध्यायाचें कुल होतें आणि त्यांच्यापैकीं एक सुश्रवस् याचें नांव आलें आहे.

[35] कौ र व्य.—(कुरस् यांच्यापैकीं) कुरु लोकांपैकीं एक मनुष्य आपल्या बायकोसह परिक्षित राजाच्या अमलांत चैन भोगीत आहे असें अथर्ववेदांत लिहिलें आहे. कौरव्य राजा बाल्हिक प्रातिपीय हा शतपथ ब्राह्मणांत आला आहे आणि आर्ष्टिषेण व देवापि हे कौरव्य होते असें नंतरची दंतकथा म्हणते.

[36] कौ रु-पंचाल.—कुरुपंचाल यांपैकीं. शतपथ ब्राह्मणांत हें आरुणि याचें विशेषण आहे आणि त्याच ग्रंथांतील या शब्दानें त्या जातीच्या लोकांच्या संबंधीचा अर्थबोध होतो.

[37] कै व्य.—क्रिवींचा राजा पांचाल यानें परिवक्रा नदीवर अश्वमेध यज्ञ केला असें शतपथ ब्राह्मणांत आहे, तथापि एग्लिंग म्हणतो कीं, तें विशेषनाम असून त्याचा अर्थ क्रैव्य पांचाल राजा असा आहे.

[38] गो त्र.—याविषयीं सविस्तर विवेचन पुढें केलेलें आहे.

[39] गौ पा य न.—गोपवंशज. ब्राह्मणांत आसमाति, किरात आणि आकुलि यांची जी दंतकथा आहे त्यांत गौपायन हें नांव आलें आहे.

[40] जा ति.—जाति हा शब्द पालि ग्रंथांत जाति अशा अर्थी आलेला आहे. पण पूर्वीच्या वैदिक ग्रंथांत हा शब्द बिलकुल आलेला नाहीं. परंतु कात्यायन श्रौतसूत्रासारख्या ग्रंथांत जेथें जेथें हा शब्द आलेला आहे तेथें त्याचा अर्थ घराणें किंवा कुटुंब असा आहे.

[41] त्रि ख र्व.—पंचविंश ब्राह्मणांत यशस्वी रीतीनें एक विशिष्ट यज्ञ करणारे जे पुरोहित होते त्यांच्या वर्गाचें हें नांव आहे.

[४२]निष्किरीय.—पंचविंश ब्राह्मणांत सत्र चालविणाऱ्या उपाध्यायांच्या शाखेचें नांव आलेलें आहे.

[४३]नैषाद.—कौषीतकी ब्राह्मण व वाजसनेयि संहितेमध्यें हें नांव आलें आहे.

[४४]पंचाल.—ऋग्वेदांत क्रिवी नांवाच्या लोकांचें हें मागाहून प्रचारांत आलेलें नांव आहे. कुरु या शब्दाशिवाय इतरत्र या शब्दाचा उल्लेख क्वचितच येतो. कुरुपंचालांच्या राजांचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत आलेला आहे. काठक संहितेंत पंचाल म्ह० केशी दाल्भ्य याचे लोक असें म्हटलें आहे. उपनिषदें व उत्तरकालीन ग्रंथांत पंचाल देशच्या ब्राह्मणांचें तत्त्वज्ञानविषयक व भाषाविषयक वादविवादांत प्रमुख अंग होतें असा उल्लेख आला आहे. संहितोपनिषद्ब्राह्मणांत प्राच्य पंचालांचा उल्लेख आलेला आहे. या पंचाल लोकांत क्रिवी लोकांखेरीज इतर जातींचाहि समावेश होतो. हें नांव पंच जनांनां लाविलेलें असून हे पंचाल म्ह० ऋग्वेदांतले पंचजन होत अशी एक कल्पना पुढें आलेली आहे. पण ती फारशी खरी दिसत नाहीं. वैदिक वाङ्मयांत व महाभारतांत पंचालांची उत्तर व दक्षिण पंचाल अशी विभागणी केलेली असल्याचा उल्लेख नाहीं. शतपथ ब्राह्मणांत या लोकांचें परिचक्रा असें नांव आलेलें आहे. ज्यांचा उल्लेख आला असें वाटतें तीं शहरें म्हणजे कांपील व कौशांबि हीं होत. कुरुपंचाल यांच्या राजाहून निराळे असे पंचालांचे राजे व सरदार म्हणजे क्रैव्य, दुर्मुख, प्रवहणजैवलि व शोण हे होत.

[४५]पुंड्र.—ऐतरेय ब्राह्मणांत बहिष्कृत मानलेल्या लोकांचें हें नांव आलेलें आहे. हें नांव सूत्रग्रंथांतहि आलेलें आहे. महाभारतांत या पुंड्र लोकांचा देश म्हणजे हल्लींचा बहार व बंगाल हे प्रांत होत.

[४६]पुलिंद.—ही एक बहिष्कृत जात असून इचा निर्देश ऐतरेय ब्राह्मणांत केलेला आहे. परंतु शांखायन श्रौतसूत्रांत शुनःशेपाच्या गोष्टीच्या संबंधांत यांचा उल्लेख येत नाहीं. पुलिंदांचा आंध्रांशीं पुनः एकदां अशोकाच्या वेळीं संबंध येतो.

[४७]पौंश्चलेय,—तैत्तिरीय ब्राह्मणांत हा एक दासीपुत्र कळवन्तिणीचा मुलगा असा अर्थदर्शक शब्द आहे.

[४८]प्राच्य.—याचा अनेकवचनीं उपयोग केला असतां पूर्वेकडील राहणारे हा अर्थ होतो. याचा ऐतरेय ब्राह्मणाच्या यादींत उल्लेख केलेला आढळतो. ओल्डेनबर्गच्या मताप्रमाणें बहुधा ते काशीचे, कोसलचे, विदेहाचे आणि कदाचित् मगधाचे लोक असावेत. शतपथ ब्राह्मणांत अग्नीला पूर्वेकडील लोक शर्व या नांवानें पाचारण करीत असत व त्याच ग्रंथांत त्यांच्या थडगीं बांधण्याच्या चालींचा उल्लेख आला असून त्याबद्दल तेथें तिरस्कार दाखविला आहे. लाट्यायन श्रौतसूत्रांत विपथ [ ओबडधोबड गाडी ]या पंचविंश ब्राह्मणांतील शब्दाचा अर्थ देतांना तो रथ पूर्वेकडील लोकांचा होता असें म्हटलें आहे ( प्राच्य-रथ ). संहितोपनिषद् ब्राह्मणांत प्राच्य पांचालांचा उल्लेख आलेला आहे.

[४९]बाहीक.—हा शब्द शतपथ ब्राह्मणांत पश्चिमेकडील लोकांस, (पंजाबांतील लोकांस) लाविलेला आहे व त्याचा प्राच्य याच्या विरुद्ध उपयोग होतो. ते अग्नीला भव या नांवानें बोलावीत असत.

[५०]भरन्त,—भरणारी. सायण मताप्रमाणेंच बोथलिंग या शब्दाच्या पंचविंश ब्राह्मणांत एका ठिकाणीं आलेल्या बहुवचनी रूपाचा अर्थ लढवय्ये लोकांची जात असा करतो, परंतु हा अर्थ बरोबर आहे किंवा नाहीं याबद्दल खात्री नाहीं. जरी शब्दाचें रूप वर्तमानकालवाचक धातुसाधित असें आहे तरी वेबरच्या मतें हा शब्द भरतांनां उद्देशून लिहिला आहे.

[५१]मागधदेशीय,—हें सूत्रांत मगधदेशीय एका ब्राह्मणाचें नांव आलें आहे. मगधदेशांत राहणारा असा याचा अर्थ आहे.

[५२]मूचीप अथवा मूवीप,—हें ऐतरेय ब्राह्मणांतल्या मूतिबाचें व शांखायन श्रौत सूत्रांतल्या रानटी नागवाचक जातीचें दुसरें नांव आहे.

[५३]मूतिब.—विश्वामित्राची बहिष्कृत संतति म्हणून गणिलेल्या रानटी जातींतल्या एकीचें ऐतरेय ब्राह्मणांत आलेलें नांव शांखायन श्रौतसूत्रांत मूचीप अगर मूवीप असें नांव येतें.

[५४]म्लेच्छ.—हा शब्द शतपथांत अशुद्धभाषी या अर्थी आहे. म्लेच्छी भाषा बोलण्याला ब्राह्मणाला बंदी केलेली आहे. असल्या भाषेचें उदाहरण 'हेलवो' असें दिलें आहे. त्याचा अर्थ सायणानें 'हेऽरयः' 'म्हणजे हे शत्रु' असा केला आहे. काण्वशाखीय ग्रंथांत येथें निराळा पाठ आहे. येथें उल्लेखिलेले अशुद्धभाषी लोक आर्यच होते. पण ते संस्कृत भाषा न बोलतां एखादी प्राकृत भाषा बोलत असावे.

[५५]शबर.—ऐतरेय ब्राह्मणांत एका जातीचें हें नांव दिलेलें आहे. ह्या जातीच्या लोकांना दस्यु हें नांव दिलेलें आहे व हें लोक अंध्र, पुलिंद मूतिब व पुंड्र ह्यांच्या तोडीचे आहेत असें म्हटलेलें आहे.

[५६]शाल्व.—गोपथ ब्राह्मणांत मत्स्य लोकांबरोबर एका जातीच्या लोकांचें हें नांव आलेलें आहे.

[५७]श्विक्र.—शतपथ ब्राह्मणांत ह्या नांवाच्या लोकांचा उल्लेख त्यांचा राजा जो ऋषभ याच्या संबंधांत आला आहे.

[५८]सत्वन्त.—ऐतरेय ब्राह्मणांत दक्षिणेकडे राहणाऱ्या लोकांचें हें नांव आलेलें आहे. शतपथ ब्राह्मणांत सत्वतांचा भरताकडून झालेला पराजय व भरतानें सत्वतांचा अश्वमेधांतील घोडा बळजबरीनें नेणें ह्या गोष्टींचा उल्लेख आलेला आहे. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, ऐतरेय ब्राह्मणांतील एका ठिकाणीं 'सत्वनाम्' ह्याचें ऐवजीं 'सत्वताम्' अशी दुरुस्ती केली पाहिजे असें मॅकडोनेल सुचवितो. परंतु ऐतरेय ब्राह्मणांत इतर सर्वत्र 'सत्वताम्' असाच पाठ आहे. या

सत्वत लोकांवरच भरत लोकांनीं वारंवार हल्ले केले असें दिसतें. सेंटपीटर्सबर्ग कोश, कोवेल व मॅक्समुल्लर ह्यांनीं कौषीतकी उपनिषदांत यांचा उल्लेख असल्याचें लिहिलें आहे. पण ह्या ब्राह्मणांत सत्वन्-मत्स्येषु असा पाठ नसून स-वश-मत्स्येषु असा पाठ आहे.

[१९]साल्व.—शतपथ ब्राह्मणांत एके ठिकाणीं एका जातीच्या लोकांचें हें नांव आलेलें आहे. ह्या ब्राह्मणांत श्यापर्ण सायकायनाची एक प्रौढी वर्णिली आहे ती अशीः—तो म्हणतो जर मी एक व्रत संपूर्ण केलें असतें तर आपली जात ही क्षत्रिय सरदार, ब्राह्मण व कृषिकर्मकार बनली असती. व जरी आपली जात आहे त्या स्थितींत आहे तरी ती सल्वापेक्षां श्रेष्ठ आहे. मंत्रपाठामध्यें ह्याच लोकांचा 'साल्वी' (प्रजाः) असा उल्लेख आलेला आहे. व ह्या लोकांनीं असें म्हटल्याचा उल्लेख आहे कीं, यौगंधरी हा ज्यावेळीं आम्हीं आपले रथ यमुनेच्या तीरावर थांबविले त्यावेळीं आमचा राजा होता. हे साल्व किंवा शाल्व लोक ह्यांचा कुरुपंचाल लोकांशीं निकट परिचय होता अशाबद्दल मागाहून झालेल्या ग्रंथांत पुरावा मिळतो. त्यांपैकीं कांहींनां यमुनेच्या तीरावर जय मिळाला असावा. वैदिक काळीं हे लोक वायव्येकडे रहात असत ह्याबद्दल बळकट पुरावा नाहीं.

[२०]स्पर्धु.—बौधायन श्रौतसूत्रामध्यें ( २१,१३ ) पश्चिमेकडील लोकाचें म्हणून हें नांव आहे.

## वर्णाश्रम [ ऋग्वेद ]

पुढील क्षत्रिय, ब्राह्मण, विश्, वैश्य व शूद्र यासंबंधीं माहिती अन्यत्र आली असल्यामुळें त्या शब्दावर येथें टीपा दिल्या नाहींत.

| | | |
|---|---|---|
| क्षत्रिय | ब्रह्मचारी | विश् |
| द्विज | ब्राह्मण | वैश्य |
| धियायु(बुद्धिजीवि) | [१]यति | |

[१]यति.—एका प्राचीन घराण्याचें नांव. यांचा ऋग्वेदांतील दोन उताऱ्यांत ( ९. ३,९;१०.७२,७ ) भृगूशीं संबंध जोडला आहे. पहिल्या उताऱ्यांत ते कोणीतरी लोक असावेत असें स्पष्ट होतें. दुसऱ्या उताऱ्यांत निश्चयानें कांहीं सांगतां येत नाहीं. यजुर्वेदसंहितेंत आणि पुढील ग्रंथांत 'आपत्कालीं इंद्रानें सालावृकांच्या स्वाधीन केलेली एक जात' असा उल्लेख आहे. सामवेदांतहि यतींचा भृगूबरोबर उल्लेख आला आहे. धर्मसूत्रें व पुढील वाङ्मयांत आश्रमचतुष्टयापैकीं जो चतुर्थाश्रम ( संन्यास ) याला यति हें नांव दिल्याचें आढळतें.

## पैतृकनामें [ ऋग्वेद ]

ऋग्वेदांत येणाऱ्या पैतृक नांवासंबंधीं माहिती पूर्वी दाशराज्ञयुद्ध या प्रकरणांत येऊन गेली असल्यामुळें त्या शब्दावर येथें टीपा दिल्या नाहींत.

| | | |
|---|---|---|
| अग्न्य | त्रैवृष्ण | मानव |
| अग्निवेशि | दैववात | मारुताश्व |
| आतिथिग्व | दैवोदासि | वार्षागिर |
| आथर्वण | दौर्गह | वायत |
| आर्क्ष | नाहुष | वैतरण |
| आर्चत्क | पज्रिय | वैदथिन् |
| आर्ष्टिषेण | पार्थ्य | वैददश्वि |
| ऐल | पौतक्रत | वैन्य |
| औलान | पौरुकुत्सि | शातवनेय |
| औशिज | पौरुकुत्स्य | शार्यातः |
| कौरयाण | प्रातर्दनि | सांवरण |
| जाहुष | प्रैयमेध | साञ्जय |
| तौग्रय | प्लायोगि | साहदेव्य |
| त्रासदस्यव | भारद्वाज | सुकृत्वनि |

[ तै. सं.]

[१]वैशीपुत्र

[ अथर्ववेद ]

[२]वैतहव्य.

[ संहितेतर ]

[३]ऐतरेय

[१] वैशीपुत्र.—वैश्यस्त्रीचा मुलगा. हा शब्द तैत्तिरीय संहिता ( ३, ९, ७, ३ ) व शतपथ ब्राह्मणांत ( १३, ३ ) आला आहे.

[२] वैतहव्य.—एका ब्राह्मणाची गाय मारून खाल्याबद्दल ज्या कुलाचा नाश झाला अशा कुटुंबांतील लोकांचें हें नांव अथर्ववेदांत उल्लेखिलें आहे. हे लोक सृंजय असावेत असें कांहीं विद्वानांचें मत आहे. पण वर दिलेली कथा याच रूपांत पुढें कोठें आली नाहीं. म्हणून वरील विधानाच्या सत्यतेबद्दल संशय आहे. झिमरच्या मतानें वैतहव्य हें सृंजयांचें नुसतें विशेषण आहे. पण ज्या अर्थी वीतहव्य या नांवाचा मनुष्य होऊन गेला त्या अर्थी झिमरचें हें मत संभाव्य नाहीं.

[३] ऐतरेय.—बहुतेक हें इतर या शब्दापासून झालेलें पैतृक नांव असावें. परंतु टीकाकार सायण म्हणतात कीं, हें इतरा या स्त्रीपासून झालें असावें. ऐतरेय आरण्यक व छांदोग्य उपनिषद् यांत हें महिदासाचें विशेषण म्हणून आलें आहे.

दानें.

## दातृनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अतूतुजि (अदाता) | अनर्शराति (अपादान) | ऋजुवनि(कल्याणदाता) |
| अदाशु | अरावन् | करिष्ठ ( दातृतम ) |
| अदाशुरि | उस्रा ( दाता ) | क्षत्तृ |

| | | |
|---|---|---|
| दृदि [ दाता ] | देदिशती | ममहान |
| दद्रुष् | धनद | रभोद ( बलदाता ) |
| दद्रुत | धातु | रयिद |
| दान | भूरिद | रात |
| दानुद् | भूरिदावत्तर | राततम |
| दावन् | भूरिदावन् | वितिरे( वितरणाय, अव्यय ) |
| दाशुरि | भूरिदावरी | वरिवोधातम ( अतिशयेनधनानां दाता ) |
| दाशुष | भोज | सनितृ |
| दाश्वान् | मंहना ( दानकर्मा ) | |
| दास्वत् | मंहयु ( दानेच्छु ) | |
| दिति | मंहिष्ठ | |
| दिशत | मनोतर | |

## दान व दाते [ तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अश्वसनि | दान | द्रव्य ) |
| दत्र | दाशुष | राति |
| ददम् | धनद | सनि |
| दातृ | प्रदातृ | साति |
| दात्र | बर्हिष् (देण्यायोग्य | सुदानु |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अदाशुष् | देष्टृ ( दाता ) | वसुदेय |
| अदास्यन् | धनद ( दाता ) | वसुवनि |
| अदित्सत् | धनसनि | शतदाय |
| अनर्शराति ( दान ) | धनसाति | सनि |
| जीरदानु ( दाता ) | प्रददुष् | सातृ |
| तुंज ( दान ) | प्रदातृ | सानसि |
| दातृ | मघदेय | सुत्रावन् |
| दाशु | राति | सुदानु |
| दावन् | वयोधा ( दाता ) | हव्यदाति |

## दानविषयक विशेषणें [ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्रविहस्त (दानशूर) | त्वादात | रातिषाच् |
| अदाशुष् | दत्त | वसुजुव |
| अदित्सत् | ददत् | वसुदावन् |
| अनुदेय | ददमान | विसृष्टराति |
| अनुप्रयच्छत् | ददाशुष | सदासातम |
| अनुयच्छमान | दिष्ट | सनित्र |
| अब्दया | धनस्पृत् | सनित्व |
| अभिगूर्त | यच्छत् | सनिष्ठ |
| अर्पित | यच्छमान | सनिष्यान |
| उपदयमान | युष्मादत्त | सन्यस् |
| मेहमान | रत्नधा | ससवान् |
| | रातहव्य | सुप्रावर्ग |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| आददान | आदीममाना | आयच्छन् |

| | | |
|---|---|---|
| ददत् | दिशन्ता | प्रयच्छत् |
| ददिवस् | दीयमान | वनुष |
| दाशुष् | देय | सनिष्णु |
| दास्वत् | | |

## दान करणें [ क्रियापदें ] [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अदाशत् | दासत् | ररे |
| उनोति | दिदिड्ढि | राति |
| उपदस्यति | दिशां | रासति |
| चोष्कूयसे [ ददासि ] | दुः ( प्रदुः ) | रिणन्ति |
| | दूदुषत् | रिष्येत् |
| तुंजन्ति | पृणक्षि | रियते |
| दद्धि | पृणाति | वंस्व |
| दशस्य | मंहत | वन्त |
| दाति | मुचध्वं | ववन्य |
| दाम् | यंसि | शिक्षति |
| दायि | यच्छ | सनायते |
| दाशति | रदन्तु | सिसासाति |
| दाश्नोति | ररीध्वं | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अदात् | दापयति | प्रयच्छाति |
| अयक्ष्मम् | दायि | याचिषामहे |
| असनत् | दास्यति | विसृजेत् |
| अयाचत | दिदीहि | विस्रंसयेत् |
| आददत | दीपयामसि | व्यादिशत् |
| उत्सर्जेत् | दीय | सश्चासि |
| उत्सृज्ये | दीर्येत | ससस्ति |
| ददाशिम | प्रदीयेत | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अप्रभीत | दत्त | दीयते |
| अदान | दायि | विदन्त |
| अदिषि | दाशसि | व्याते |
| अपुः | दिशतु | सचन्त |
| आददे | दीदयत् | सनुहि |
| आपुः | दीय | ससन्तु |
| जुहोति | | |

## दान व दानाचे प्रकार [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अश्वद | गोद | दानु |
| अश्वदातृ | गोषण | दानुचित्र |
| अश्वदावन् | जीरदानु | दानुपिन्व |
| आत्मद | दात्र | दानुमत् |
| ओजोद | [1] दान | दाश |
| ओजोदातम | दानवान् | दीय [ दानार्ह ] |

देष्ट्र
देष्ण
परादद्दि
परौद
पशुष
प्रनीति
प्रशासन
मघदेय
रत्नधेय
राति
रातिनी
राधोदेय
वसुद
वसुदेय
वस्त्रद
वाजद
वाजसनि
वीतिराधस्
शक्ति
शतदातु
शतदाय
शतदावन्
शतस
शताश्व
सहदानु
सहस्रदातु
सहस्रदान
सहस्रदावन्
सहस्रस
सहोद
सातु ( दान )
सुदत्र
सुदानु
सुदामन्
सुदावन्
सुराति
स्कंभदेष्ण
स्वभिष्टि
स्वःसात
हिरण्यद

## याचना करणें [ क्रियापदें ] [ ऋग्वेद ]

इषुध्यत
ईमहे
दद्धि
पीपरत्
पूर्धि
मदेमहि
मनामहे
मन्महे
मायते
मिमिड्ढि
मिमीढि
यन्तारः
यन्धि
याचत
यामि
रिरीहि
शग्धि

[1] दा न.—दान म्हणजे देणगी, या अर्थानें ऋग्वेदांत विशेषतः दानस्तुतींत हा शब्द आलेला आहे. ब्राह्मणाच्या विशिष्ट लक्षणांपैकीं दक्षणा घेणें व ती दक्षणा इतरांना आपणांस देण्यास भाग पाडणें हें असे. कन्येचें दान करणें हा एक लग्नाचा ( ब्राह्मविवाह ) प्रकार आहे. कारण त्या प्रकारांत पिता किंवा कन्येचा भाऊ तिला एखाद्याला दान म्हणून देत असतो. दान या शब्दाचा ' वांटणें ' या अर्थानें ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं उपयोग केलेला आढळतो. यज्ञांत देवतांना हवि अर्पण केला जातो त्यालाहि कोठें कोठें दान हा शब्द योजिला आहे. ऋग्वेदांत सायणांनीं एका ठिकाणीं ( ८.३३, ८ ) दान याचा अर्थ ' मदोन्मत्त हत्तीच्या गंडस्थळांतून वाहणारा मद ' ( मदजलानि ) असा केला आहे. ऋ. २. १३, ७ या ठिकाणीं रॉथच्या मतें दान याचा अर्थ कुरणाची जमीन असा आहे व या ठिकाणीं हा अर्थ सायणांनांहि मान्य आहे. ऋ. ५. २७, ५; ७. १८, २३; ८. ४६, २४ या तीन ठिकाणीं रॉथच्या मतें दान याचा अर्थ रथाचा घोडा असा असावा. परंतु या स्थलीं देणगी हाच अर्थ योग्य दिसतो.

## सा मा जि क

### समाजांतील कांहीं विशेष [ ऋग्वेद ]

अंश [दायविभाग]
अंहु [ दारिद्र्य ]
अंजस्प [ पिपास ]
अंजस [ कपटरहित ]
अतिथि
अदुष्कृति
अदुर्मगली
अधिरथ [ सामानानें भरलेले रथ ]
अधीति [ पूर्वकालीन गोष्टींचें स्मरण ]
अध्वग
अनवस [ पथ्यदनरहितोरथः]
अनमस्यु
अनर्विश [ गाडीनें जाणारा ]
अनुस्रयामन् [बैलगाडीनें गमन करणें ]
अपगोह [ लपणें ]
अपचिति [ पूजा ]
[1] अभ्रातरः
[2] अमाजुर
अब्रह्मन् [नास्तिक]
अमेन [ अविवाहित ]
अरण [ अपगतऋणः ]
अवर्ति [ दारिद्र्य ]
असत् [ दुष्ट ]
आगस् [ अपराध]
आंजनगंधि [ चंदनादि ]
आध्र [ दरिद्र ]
आभोग [ भोगकर्तृ ]
आश्रावयत् [कथन करणारा ]
[3] इभ्य [ श्रीमंत]
उग्र ( धनधाकट)
उत्सव
ऊर्ज ( लूट )
ऋजुनीति
ऋजूनस्
[4] ऋण
ऋत्व्य( गर्भाधान)
एधमानद्विष्
[5] कपर्दिन्
कामप्रेण ( कामपूरक )
कामिन्
कार ( सेवक )
[6] कितव
किल्बिष
किल्बिषस्पृश्
कुमारदेष्ण ( कितव )
कुंभिणी ( कुंभानें पाणी भरणारी स्त्री )
कृत ( लूट )
कृपण
क्षेत्र ( क्षेत्रलाभ )
[7] खृगल ( कुबडी)
गण
गृभ्रपत्वन्
गोशर्य
गोसतम ( गवां संभक्ततम )
ग्रंथि ( गांठ )
जनपान( पाणपोई)
जन्य ( लोकहितकर )
[8] जार
ज्ञुबाध [ अवनतजानु ]
तक्ववीय [ तस्कर., निर्गमन ]
तोकसात [ पुत्रलाभ ]
त्रिमंतु
दक्षमाय [ बहुवचन ]
[9] दक्षिणतस्कपर्द
दामनवत्
दासप्रवर्ग
दिधिषाय्य [धारण करण्यास ]
[10] दिधिषु [जार]
दीन
[11] दीर्घायुत्व
दुरत्येतु [ दुरीतक्रम ]
दुःशंस
[12] दूत
द्वयाविन्
[13] नामधेय
[14] नामन्
निद [ निंदक ]
निधातुस्थापयिता
[15] निष्ट्य
निष्षपी [ व्यभिचारानें गलित झालेला पुरुष ]
पति
पतिद्विष्
पतिरिप् [ पतिद्वेषिणी ]
पतिविद्य [ पतिप्राप्ति ]
पत्नीवित
परिधि ( कुंपण ]
परिषद्
परु [ पर्व ]
[16] पस्त्यसद
पांचजन्य
पाष्य [ पाषाणमय]
[17] पिशुन
पुत्रिन्
पुनर्भू [ पुनर्जायमाना ]
पुरएतृ [ मार्गदर्शक ]
पुरंधि
पूर्वगत्वन् [ दूत ]
पुल्वघ [ खादाड ]
[18] पृक्षयाम
[19] प्रतिवेश
प्रपा [ पाणपोई ]
प्रवसथ [ प्रवास ]
[20] प्रवास
प्रातरित्व
प्रिय
प्रोष्ठेशया
बंधन
बिल [ बीळ ]
[21] ब्रम्हचर्य
भद्रव्रात [ भद्रगणधन ]
भागधेय [ दैव ]
भार [ ओझें ]

भुजि [ भोग ]
भोग
मघात्ति [धनप्राप्ति]
मंत्रकृत्
मर्य [ मनुष्य ]
मित्राधित [ मित्र-निहित
मिथुन [ दांपत्य ]
[२२] मुषीवान्
मुहुक [ संमर्द ]
मूर
मौनेय[ मुनिभाव ]
[२] यक्ष
यूथ
यूथ्या
योगक्षेम
रजिष्ठ [ ऋजु ]
रफित [ दारिद्रेण हिंसित ]
[२४] रहसू
वयुन [ गंता ]
वरुण्य [ वरुण संबंधीं पाप ]
[२५] वहतु [वऱ्हाडी]
वन्हि [ धर्मोपदेशक ]
वामनीति
विथुरा [ दीना ]
विश्वदृष्ट [ विषार ]
विश्वभेषज [ मांत्रिक ]
वीचि [ नरक ]
वीळुहर्षिन (कामुक नास्तिक )
वृकद्वरस् (ज्यांच्या दारावर भयंकर पहारेकरी आहेत असे असुर)
व्रन् ( व्रात्य )
[२६] व्राजपति
[२७] व्रात ( संघ )
शतसेय (शतधनलाभ )
शपथ
शर्ध ( गण )
शुचिदत्
शून ( दारिद्य )
शेवधि (खजिना )
श्येनपत्वन्
[२८] संज्ञान
सक्षन् ( सेवा )
सत्यानृत
सत्योक्ति
सप्तपु
[२९] समन
समनग ( संगत )
समोह
सद्यु ( शासयिता)
साधन
[३०] साधारणी
साधिष्ठ [ साधक]
सुगोपातम [ चांगल्या रक्षकानें युक्त असलेला मनुष्य]
[३१] सुजात
[३२] सुभगा
सुरावत् [ कलाल]
सुव्रत
सेतु [ पूल ]
स्तिप [ग्रहरक्षक]
स्तूप [ संघ ]
स्थातृ [ स्थित ]
स्नात्व [ स्नानयि न्हद ]
स्योनशी
स्त्रैण [ स्त्रीणां सख्यं )
स्वजन्मन् [ औरसपुत्र ]
[३३] स्वभिष्टि ( चांगला मदतगार )
स्वावृज् (स्वार्जन )
हिरण्यस्य निखतं कलशम्
[सोन्याचा पुरलेला हांडा ]
अञ्जलि
अतिथि
अर्यजार
अवमार्जन [शरीरशोधन साधन].
कुसीद ( ऋण )
गण
गणिन् ( त्रयस्त्रिंशद्गणाःसंति यस्मिन्)
गणपति
गव्यूति ( गोयूथ )
तीर्थ
त्सारी ( कुटिल गति व्याध )
दक्षपति
देवबन्ध ( बंधनरूप अवस्था )
[३४] दैधिषव्य
नवछदि ( ९ तट्टे घातलेला मंडप )
नवेद[ सूर्योदयोयथानज्ञायतेतथा मेघसमृद्धि ]
नस्योत(नाकांतील वेसण )
पंचदशछदि ( १५ तट्ट्यांचा मंडप)
पड्बीश (पायबंद)
परिपंथिन् ( वाटमारे )
[३५] परिमोष
[३६] परिवेष्टृ
परिवृक्ति ( प्रीतिरहिताराज्ञःस्त्री)
पुण्यसम
प्रणीति ( परिचय, सेवा )
प्रपा ( झरा )
[३७] प्रफर्वी
प्राचीनावीत ( यज्ञोपवीत धारणाचा एक प्रकार )
भूति
[३८] मलिम्लु
मानवी
मूर्ख
[३९] रत्निन्
[४०] रामा
विद्या
विवाह
वेणुभार ( कळकांचा भारा )
शिखंड
श्मशान
श्रेष्ठिन्
सग्धि ( बंधूसहवर्तमानभोजन)
सजुष्
समानोदर्क
सोमविक्रयिन्
स्तायु ( चोर )

[ अथर्ववेद ]

[४१] अतिथि
अदब्धचक्षुस्
अदारसृत ( केव्हांहि स्वस्त्रीकडे न जाणारा )
अनार्षेय
अनुहव [ मागीलमाणसांनें पुढील माणसास हाक मारणें ]
अश्मवर्मन् [दगडी भिंत ]
आध्र ( दरिद्र )
इष्टापूर्त [ तळीं वगैरे बांधणें ]
उपरिशयान
उपस्ति (उपासक)
ऊम[मदत देणारे]
ऋण
ऋषिप्रशिष्टा
एकपत्नी.
कानीन [ कन्यकापुत्र ]
[४२] गृहमेधिन्
जामिशंस
जीवपुत्र [ पुत्र जिवंत असलेला ]
[४३] तिरश्च
तुरीप [ गाडीवान]
दम्पति
दीर्घश्मश्रु [श्मश्रुल ब्रह्मचारी ]
देशोपसर्ग
[४४] दोह
नामग्राह
न्य [ नेतृ ]
पथिरक्षी
परिरापी [ मोठे लोक ]
[४५] परिष्कंद
[४६] पितृहन्
[४७] पुंश्चली
पुत्रविद्य [ पुत्रलाभ ]
[४८] पुनर्भू
पृष्ठ्यान [ शिबिका ]
प्रजाकाम
प्रतिमा [मूर्ति]
[४९] प्राश
बलिहृत (नजराणे-घेणारे)
ब्रह्मकिल्बिष
ब्रह्मज्य (ब्राह्मणास लुबाडणारे]
भद्रपाप
भामिन्
भिक्षा
भ्रूणघ्नि
मध्यमस्थ
याञ्चा
वधूदर्श
वधुयु [वधूची-मागणी करणारे)
वहतु [ सासरी-जाणाऱ्या मुलीबरोबर दिले जाणारे पदार्थ, किंवा वऱ्हाडी]
विजानि (जायारहित ब्राह्मण)
विश्वजनीन
विष
व्रात्य
व्रात्यब्रुव
शकुन
शुल्क [मुलीचें घेतलेलें द्रव्य-देज]
संभल [लग्न जुळविणारा]
सहपुरुष [सहपरिवार]
सुशकुन
सेतु
[५०] स्तेय

## सामाजिक किरकोळ [ ऋग्वेद ]

अतिथिनी
अधिरुक्मन
अमति
अविमत
अवीरता
अश्ववत्
अस्नातृ
कनीनक [कन्याकामःपति]
चतुष्कपर्द
दंसुजूत [सुशिक्षित अश्वयुक्त]
दक्षिणतस्कपर्द
दुवसन
दुर्वासस्
निष्पपिन् (दासीपतिः, स्त्रीकामोवा)
नैतोश [वध करणारे लोक]
परिवृक्त [पतीनें-

टाकलेली स्त्री]
पशुप
पशुमत्
प्रमति [काळजी घेणारा मनुष्य]
भंगुरवत्[विश्वासघातकी]
मित्र
मुनि
यति
युवजानि
युवति
रेतिन्
वध्रि [छिन्नमुष्क]
हिरणिन्

[तै. सं.]

अंहति (द्रोह)
अंहस् (पाप)
अकृष्ण (पुत्रविण)
अपराशस् (विचित्रवधकर्ता)
अपरूप
आश्रि (कंगोर)
आतिथ्य
इष्टप्रजस् (प्रजावि.)
उपस्ति (क्षीण)
ऊति
ऋण
तन्तु (संततिपरंपरा)
पुत्रवत्
प्रजावत्
बन्धन
भागी (भागयुक्त)
रास्ना (भांड्याचा कांठ)
वध
विशिख (मुंडितशिरस्क)
वेदुक (लाभशील-निवास)
व्रात (कर्मयोग्य)
सगृह (कलत्रपुत्रादि सहित)
संघात [समूह]
सोमच्युत (सोमयाग-प्राप्तद्रव्यं)
सौभग (सौभाग्य)
सौभाग्य
स्वपत्य

—

[अथर्व]

अक्षपराजय
अदार [अभिचार-कर्मांतील बंध-साधन]
अनिरा [दारिद्र्य]
अप्रजास्त्व
अभ्रातृ
अमित्रयत् (शत्रुवत्)
अश्रीर(अशोभमान पुरुष).
अष्टवृष
आत्मदूषि
आदान
आमन्त्रण
आस्नान
इरावत् (अन्नवत्-गृह)
उद्ग
उपज
उपदेश
उपह्वरवत्
ऊति (रक्षण)
ऋजुग
एकमुख[प्रजा]
कार्य (कर्म)
कूल्बिज (वाईट उल्बणांत जन्म लेलें)
गण
गरगीर्ण (विष खाल्लेला)
गोप्तृ
चरमाजा(शेवटचें)
तर्हणी
तिरश्च (सिंहासनाचा तुकडा)
त्राम (पालन)
दशशल [पातक-विशेष]
देवाची [देवान् पूजयंती कृपा]
दोह [धार काढणें]
द्विभागधन
धत्तू
निष्टि (अपरिचित)
नृवत् [मनुष्यवत्]
पतित्व [पतन]
पदवी
परिष्कंद
परिहव [शकुन-संबंधी]
परिपान [रक्षण]
प्रक्री [क्रीता]
प्रतिपान (रक्षण)
प्रतिमा
प्रतिवेश [परिचरेण प्रत्यासन्न]
मनःपाप
मनुष्वत्
मुष्काबर्ह
रथिनी [बहुरथोपेतःअन्नानि]
वनि
वाजसाति (अन्न-रक्षण)
विक्रय
विज [उद्वेजक]
विमुच् [विमुक्त-कर्ता]
विरूप
विषूच् [सर्वतः पालायमान]
वीति [भक्षण]
व्यायाम (संचरण)
शतायु
शप्तृ [शापकर्ता]
सत्यानृत
सनिरत्रसाक्ष(शून्य गृह)
सुपुत्र
सुप्रजस्
सुसत्यमित् (विश्रांति)
स्वर्धिन् (चांगला मित्र)

[वा. सं.]

आत्मकृत
पितृकृत
मनुष्यकृत
प्रकरितृ

[इतर संहिता.]

[51] दिधिषूपति
[52] परिवित्त
[53] लक्षण किंवा लक्ष्म

[संहितेतर]

[54] आक्रमण
[55] दास्य
[56] नवक
[57] निगुस्थ
[58] पारिव्राजक
[59] पालागल
[60] भिक्षु
[61] मामहन्
[62] शिरवा
[63] श्रमण

**स्तेननामें [ऋग्वेद]**

अघशंस
तक्वन
[64] तस्कर
तायु
तृपु
परिपंथिन्
मलिम्लुच्
मुषीवन्
रिक्वन्
रिपु
रिभ्वन्
रिहायस्
वनर्गु
वस्त्रमथि (वस्त्रें चोरणारा)
वृक
स्तेन
हुराश्चित्

**सामाजिक क्रियापदें [अथर्व]**

अनृतयत्
कृषते
खनामि
जम्भिषत्
जय
दिदेव
दिव्य
नमवद्यते
नृत्यन्ति
पुच्छिलीयते
पुत्रियन्ति
प्रक्रीडते
मुष्णाति
शपांथयते
सखीयसे
समू पिबन्ति
सीव्यतु
सव्यिष्ठम्

**सामाजिक स्थितिबोधक विशेषणें [ऋग्वेद]**

अंहूरणा
अनामयितु
अजामि (बंधु)
अह्रुतैनस्
अननुकृत्य
अनागस्
अब्रह्म (अकर्म)
अरिष्टवीर (पुत्रपौत्रसहित)
अनिद्य
अनिर
अतोक
अनृतदेव
अन्नकाम
अन्यजात
अवजिन
अश्रमण
अश्रीरा(अश्रीका)
अपिधानवत्
अपिधाना
अपिनद्ध
अपिरिस
अप्रजज्ञि
अमति
आतुर (रोगी)
आमिनांना(आयुर्नाशयंती)

व्याघ्रघ्नी )
आयुन् (आयुष्य)
आर्षेय ( ऋषियोग्य धन )
आरेवध ( दूरगत, गर्ह्य )
आश्रुत्कर्ण ( कानावर आलेले )
इन्द्रोषित ( इंद्रप्रेरित )
इन्द्रवत्
उपच्यव
उपमश्रवस्तम (अतिकीर्तिमान )
ऋतयु ( धनलाभेच्छा)
एकायु ( एकटा मनुष्य)
एनस्वत्
कदर्थ
कनिष्ठ
कनीयस्
काम्य ( कमनीय)
कुणारु ( कृपणशील )
कृपय ( गोपनीय)
कुल्फ ( गुप्त )
केतवेदस् ( परधनाभिलाषी )
केतुमत् ( सर्वांना ऐकूं जाणारा आवाज )
केवलादि
केवलाध
क्षितायु [ क्षीणायु]
क्षेमयन्‍ [ आवासमिच्छन् ]
गोपरिणस [ बहुपशु ]
गोमत् [ गाई पाळणारा ]
गोवत
गोसखा [ गोयुक्त]
जैत्र [ जयशील ]
ज्ञा [ ज्ञाषि ]

तृष्ट [ अभिलषित]
दीनदक्ष [ दीनबळ ]
दीर्घाप्स [ दीर्घाकृति ]
दीर्घजिह्व
दीर्घयशस् [ बहुकीर्ति ]
दीर्घश्रुत्तम
दुच्छुनायत् [ उद्वेजक–शत्रु ]
दुधित ( प्रेरित )
दुष्टरीतु ( दुर्हिंस्य)
नाधमान ( याचमन )
नाथित ( याचमान )
नाधित ( याचमान )
निद ( निंदित )
नीललोहित ( कृत्या )
नृवत ( मनुष्ययुक्तं धनम् )
नेदीयस् ( अंतिकतम् )
नेमन्निष ( नीतहविष्कास्तोतारः)
परिगाधित्
पुत्रीयत् ( पुत्रेच्छु)
पुरुण्य ( पुरुषांनाहितकर )
पुरुक्षु ( पुष्कळ अन्न )
पुरुधप्रतीक
पुरुपुत्रा ( भूमि )
प्रतिवेश ( समीप असणारा )
बद्धधान ( बाधमान )
ब्रह्मद्विष्
ब्रह्मकिल्बिश
भीमसंदृश् ( भयंकर = मरुत्)
भुंजती

मणिग्रीव
मध्यायुव (रक्षकाभिलाषी )
मद्र्यच ( मदभिमुख )
मनुर्हित
मंत्रश्रुत्य
ममंदुषी ( मोदमाना )
मन्युषावित् (रागानें सोम काढणारा )
मितमेधा ( दृढबुद्धि )
मित्रक्रुव [ मित्रक्रूर ]
मित्रमहस् [ सूर्य ]
मित्रयुज [ देव ]
मित्रयुव [ मित्राभिलाषी ]
यम्य [ गमनार्ह]
यावयद्द्वेष [ पृथक्कृतद्वेष ]
यावयत्सख [ शत्रुभेदक ]
यवयु ( यवेच्छु )
यशस्वन
यु [दुःख]
युवावैत्
रत्नधा
रत्नभाज्
रत्नवत्
रथिनी (गाडा)
वंदारू [वंदनशील]
वैदितृ
वंद्य
वधूमत्
वधूयु
वरीयसी (उरुतरा)
वाजद्रविणस् ( गिरः )
वाजप्रसूत
वाजबंधु ( अन्नप्रद )

वाजभर्मन्
वाजश्रवस् ( अन्नकीर्ति )
शतप्रज ( हजारों धारा )
शतात्मन् (शंभर वर्षें आयुष्य )
शिशुमत
शुचिपेशस् (शोभना–बुद्धी )
श्वत ( श्रांत )
सत
सबर (संभवनीय)
संतर ( संश्लिष्ट )

सवर्णा (सदृशी )
सवयस (समानवयस्क )
ससवान्
सहशेय्य
साध्वर्या [कल्याणानांनेत्री–गो]
सांतपन [शत्रुसंतापक]
सिष्विदान [स्विद्यद्गात्र ]
सुक्षत्र
सुखादि [शोभनाभरण]

सुगव
सुगार्हपत्य( शोभनगार्हपत्य = अग्न)
सुप्रतीक [शोभनांग]
सुमातृ
सूनुमत्
स्तैयकृत्
स्थिविमत
स्वगोप [स्वावलंबनी पुत्र]
स्वपत्य [सदपत्ययुक्त ]
हेत्व (शीघ्रगामी)

१ अभ्रातरः—( भ्रातृहीन ) भ्रातृहीन मुली वाईट असतात, बहुतकरून त्या वेश्याच होतात असा ऋग्वेदांत उल्लेख आहे. निरुक्तांत तर भ्रातृहीन कन्येशीं विवाह करूं नये अशी स्पष्ट आज्ञा आहे, कारण अशा मुलीचा पुत्र तिच्या बापाचा असतो ( तिच्या बापाचा म्हणजे तिच्या बापाला त्या मुलाला घेण्याचा हक्क असतो.)

२ अमाजुर.—ह्या शब्दाचा अर्थ " वृद्ध कुमारिका ' असा आहे. अथवा ज्या कुमारिका बापाच्या येथेंच राहतात त्या ( पितृषद् ) प्रसिद्ध उदाहरण ' घोषा ' इचें देतां येईल.

३ इभ्य—ज्याप्रमाणें अग्नि वनाला दग्ध करितो त्याप्रमाणें राजा आपल्या इभ्यांना भक्षण करितो अशा संबंधांत ऋग्वेदांत ह्या शब्दाचा अनेकवचनी उपयोग केला आहे; आणि दोन ठिकाणीं छांदोग्य उपनिषदांतहि आला आहे. एका ठिकाणीं समासाचा पहिला शब्द आणि दुसऱ्यांत विशेषनाम अथवा विशेषण. रॉथ, ल्युड्विग आणि झिमर यांनीं ऋग्वेदांत तो शब्द 'आश्रित' अशा अर्थी घतला आहे; परंतु छांदोग्य उपनिषदांत तो 'श्रीमंत'. ह्या अर्थी योजिला आहे असें रॉथ म्हणतो. पिशेल आणि गेल्डनेर सर्व उताऱ्यात एकच अर्थ आहे असें म्हणतात. छांदोग्य उपनिषदामध्यें हा शब्द विशेषनाम आहे असें बोथलिंग म्हणतो उ० इभ्यग्राम म्हणजे इभ्य ह्यांचें गांव.

४ ऋण.—'कर्ज' वैदिककालीन भारतीय लोकांची सर्वसाधारण कशी स्थिति होती हें ऋग्वेद व त्यानंतरच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून उघड दिसतें. जुगाराच्या वेळीं कर्जे काढीत असत असा उल्लेख अनेक वेळ केलेला आहे. कर्जमुक्त होणें ह्याला शब्दसमुच्चय 'ऋणम् नथामासि' असा आहे परत न देण्याच्या उद्देशानें कर्जे काढीत असत असाहि उल्लेख आहे. कर्ज परत न देण्याचा परिणाम फार भयंकर होत असे; कदाचित् जुगाऱ्याला दास देखील व्हावें लागे. सावकारलोक ऋणकोंना, चोर वगैरे अपराध्यांप्रमाणें, त्यांनीं

किंवा त्यांच्या मित्रांनीं कर्ज परत द्यावें ह्मणून खांबाला ( द्रुपद ) बांधीत असत. व्याजाची रक्कम काय होत असे हें समजणें अशक्य आहे. ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांतील एका उताऱ्यांत आठवा ( शफा ) आणि सोळावा ( कला ) हिस्सा देत असत असा उल्लेख आहे, परंतु तें व्याज देत असत किंवा मुदलाचा भाग देत असत हें नक्की कळत नाहीं. असा तर्क करण्यास हरकत नाहीं कीं व्याज माल किंवा धान्य रूपानें देत असत. सायण कला व शफा या शब्दांचे शरीरावयव असे अर्थ करितात. व्याज हें वंशपरंपरा द्यावें लागत असे किंवा काय हें कांहीं समजत नाहीं. कौशिक सूत्रांत असें आहे कीं, अथर्ववेदांतलि तीन सूक्तांत सावकाराच्या मरणानंतर कर्ज दिलें आहे असें लिहिलें आहे. ऋणकोच्या नातेवाइकांनीं कर्ज द्यावें अशाबद्दल स्पष्ट आधार नाहीं. ( वरील अर्थ सायणांनीं भाष्यांत दिला नाहीं. )—झिमर ह्मणतो कर्जाची फेड साक्षीदारांच्या समक्ष होत असे कारण भांडणाच्या वेळीं त्यांनां बोलावण्यास ठीक पडे. हें अनुमान फक्त अथर्ववेदांतील एका संदिग्ध सूक्तावर आश्रयभूत असल्यामुळें खात्रीलायक नाहीं.

[५] कपर्द [ वेणी ] ’ कपर्दिन् [ वेणी ].—हे शब्द वैदिक कालीन वेणी घालण्याच्या चालीचे सूचक आहेत. कुमारींचे केंस चार वेण्यांत गुंडाळलेले ( चतुस्-कपर्दा ) आणि सिनी, वाली देवीचे केंस ‘ चांगली वेणी असलेले, (सु-कपर्दा ) असत. पुरुषांचेहि असेच वेणी घातलले केस असत, कारण, रुद्र आणि पूषन् ह्यांचे असे केंस होते, आणि उजव्या बाजूला वेणी असणें ( दक्षिणतस्कपर्द ) ही वसिष्ठ ह्यांची खूण होती. ह्याची उलट बाजू ह्मणजे केंस मोकळे ठेवणें होय.

[६] कितव.—ऋग्वेद आणि त्यानंतरच्या ग्रंथांत हा शब्द ‘ जुगारी ’ अशा अर्थी बराच वेळ आला आहे. बाप मुलाला जुगाराबद्दल धमकावीत आहे असें दाखविलें आहे ( २. २९, ५ ). कर्जमुक्त होण्याकरितां जुगारी आपल्याला आणि आपल्या मुलाबाळांनां विकून दास्य पत्करीत असे ( १०. ३४ ) निरनिराळ्या जुवेबाजांकरितां यजुर्वेदसंहितेंतलि शास्त्रीय नांवें आदिनव-दर्श, कल्पिन्, अधि-कल्पिन् आणि सभास्थाणु इत्यादि आलीं आहेत. बिनधोक ह्या सगळ्यांचा अर्थ सांगतां यावयाचा नाहीं, तरी शेवटच्या शब्दाचा मनुष्याचें त्याच्या ( जुगाराच्या ) जागेवर [ सभा-स्थाणु ] भक्तीमुळें औपरोधिक नांव ‘ जुगाराच्या जागेचा खांब ’ असा असावा. पहिल्या नांवाचा शब्दशः अर्थ ‘ दुर्भाग्य पहाणारा, ’ आणि आपल्या प्रतिपक्ष्याची चूक झटकन् लक्ष्यांत येत असेल म्हणून अथवा आपल्या प्रतिपक्ष्याचा पराभव पहाण्याची उत्सुकता म्हणून हें नांव निघालें असावें.

खगल-(अथवा अथर्ववेदाच्या पैप्पलादग्रंथांत खुगिल असा पाठ आहे,) ऋग्वेदांत एकदां आणि अथर्ववेदांत एकदां हा संदिग्ध शब्द आला आहे. पहिल्यांत ‘ कुबडी ’ असा अर्थ पाहिजे; आणि दुसऱ्यांत सायण ह्मणतो कीं, त्याचा अर्थ तनुत्राण असा आहे, परंतु हा अर्थ अगदींच अनिश्चित आहे.

[८] जार.—पूर्वीच्या ग्रंथांत जार ( प्रेम करणारा ) ह्या शब्दाला वाईट अर्थ नव्हता, व तो शब्द कोणाहि प्रेमी माणसाला लावीत असत पण हें शक्य आहे कीं, पुरुषमेधामध्यें असलेला जार हा व्यभिचारप्रेमी गणला असला पाहिजे. जार शब्दाचा हाच अर्थ बृहदारण्यकोपनिषदांत स्वीकारलेला आहे व इंद्राला गौतमस्त्री अहल्या हिचा जार म्हटलेलें आहे.

[९] दक्षिणतस्कपर्द.—हें विशेषण वसिष्ठ लोकांनां ऋग्वेदामध्यें लावलेलें असून उजवीकडे केंसांची वेणी घाल-ण्याच्या चालीचा उल्लेख केलेला आहे.

[१०] दिधिषु.—ऋग्वेदामध्यें ह्याचा अर्थ विवाहप्रार्थना करणारा, असा आहे. हा शब्द एखाद्या नातेवाइकास बहुतकरून दिरास लावलेला आहे व ह्या दिरानें और्ध्वदेहिक संस्काराचे वेळीं नवऱ्याप्रमाणें वागावयाचें असतें व जर त्या स्त्रीला मृत नवऱ्यापासून अगोदर मूल झालें नसेल तर ज्यू लोकांत पूर्वी असलेल्या चालीप्रमाणें त्या दिरानें त्या आपल्या भावजयीशीं विवाह करून संतति उत्पन्न करावयाची असते. हिलेब्रँट व लानमन असें म्हणतात कीं, दिधिषु ह्याचा मूळचा अर्थ प्रेमयाचना करणारा असा होता व तो पुढें ज्या राजाची महिषी पुरुषमेधाचे वेळीं बलि दिलेल्या माणसाचे जवळ निजलेली आहे व ज्यानें पुन्हां तिचा स्वीकार केला आहे त्या राजाला हा लावलेला आहे. पण हा अर्थ मुळींच संभवनीय नाहीं. हा शब्द आपल्या आईशीं विवाह करूं इच्छिणारा-व ही आई बहुतेक सूर्या असावी-जो पूषन् त्यालाहि लागू आहे.

दीर्घायुत्व.—‘ दीर्घायुत्व ’ ही नेहमींची प्रार्थना वेदिक आर्य लोक करीत असत. संहिता व ब्राह्मणग्रंथ ह्यांमध्यें चिरंजीवित्व हें कधींहि निद्य मानलेलें नाहीं व अथर्ववेदामध्यें आयुष्य वाढविण्याकरतां मंत्र सांगितलेले आहेत.

[१२] दूत.—निरोप घेऊन जाणारा किंवा परराष्ट्राकडे निरोप घेऊन जाणारा कामगार अशा अर्थानें ऋग्वेदामध्यें अनेक वेळां व मागाहून झालेल्या ग्रंथांत अलंकारिक प्रयोगांत हा शब्द आलेला आहे. मागाहून झालेल्या काळांत जी कामगिरी दूत करीत असे तीच कामगिरी पूर्वीच्या काळांत सूत करीत असे.

[१३] नामधेय.—नांव अशा अर्थानें ऋग्वेदामध्यें व वारंवार मागाहून झालेल्या वाङ्मयांत हा शब्द आलेला आहे.

[१४] नामन्.—ऋग्वेदापासून पुढें झालेल्या ग्रंथांत हा शब्द नेहमींचा आहे. गृह्यसूत्रांमध्यें मुलांचीं नांवें कशीं असावींत ह्याबद्दल विस्तृत नियम दिलेले आहेत. पण गुप्त व सामान्य नांव ह्यांमध्यें जो फरक दाखविला आहे तो अधिक महत्वाचा आहे तरी पण गुप्त नांवाबद्दल जे नियम दिलेले आहेत ते सुसंगत दिसत नाहींत. गुप्त नांव ऋग्वेदांत आलेलें आहे व त्याचा ब्राह्मण ग्रंथांतहि उल्लेख आलेला आहे

इंद्राचें गुप्त नांव अर्जुन होतें असें शतपथ ब्राह्मणांत म्हटलें आहे. ही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे कीं, नक्षत्रसंबंधीं गुप्त नांव देण्याबद्दलच्या नियमाचें स्पष्टीकरण ब्राह्मण ग्रंथांत एखाद्या नमूद केलेल्या गुरूच्या नांवानें केलेलें नाहीं. शतपथ ब्राह्मणांत यश मिळविण्याकरितां दुसरें नांव स्वीकारण्याचा उल्लेख अनेक वेळां आलेला आहे. त्याचप्रमाणें निराक्षेपणा व्यक्त करण्याकरितां दुसरें नांव धारण करण्याच्या पद्धतीचाहि उल्लेख आलेला आहे प्रत्यक्ष व्यवहारांत ब्राह्मण ग्रंथांत दोन नांवें धारण करण्याची चाल दिसून येते व हें दुसरें नांव पितृप्राप्त किंवा मातृप्राप्त असे. उदाहरणार्थ कक्षीवत्, औशिज किंवा बृहदुक्थ वाम्नेय( ह्या ठिकाणीं नातें जरी प्रत्यक्ष आईबापापासून आलें नसलें तरी दूरचें खास आहे ). कुशाम्ब स्वायव लातव्य किंवा देवतरस श्यावसायन काश्यप ( ह्या ठिकाणीं पितृप्राप्त नांव व गोत्राचें नांव हीं दोन्हीं सांपडतात. ) हीं दोन नांवें फारशीं प्रचारांतलीं नाहींत. दुसऱ्या दोन ठिकाणीं नांवावरून राहण्याच्या ठिकाणांचा बोध होतो; जसें, कौशांबेय आणि गांग्य. वारंवार नुसत्या पैतृक नामांचाच उल्लेख आहे. जसें भार्गव, मौद्गल्य इ. किंवा दोन पैतृक नामांचाहि उपयोग केला आहे. साधें नांव पैतृक नामाकरितां उपयोगांत आणलें आहे, जसें त्रसदस्यु. कित्येक ठिकाणीं नवऱ्याच्या नांवावरून बायकोचें नांव बनविलें आहे. जसें उशीनराणी, पुरुकुत्सानी, मुद्गलानी इत्यादि.

[15] निष्ट्य.—ऋग्वेदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें बाहेरचा गृहस्थ किंवा परकीय माणूस असा ह्याचा अर्थ आहे. म्हणूनच स्वातीनक्षत्रसमूहाला तैत्तिरीय ब्राह्मणग्रंथांत निष्ट्या असें नांव दिलें आहे. कारण तो नक्षत्रसमूह क्रांतिवृत्तापासून फार दूर आहे.

[16] पस्त्यसद्.—'घरीं बसून राहणारा'. ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ सवंगडी असा आहे.

[17] पिशुन.—'विश्वास घातकी'. हा शब्द ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें आलेला आहे.

[18] पृक्षयामन्.—याचा अनेकवचनी उपयोग एक वेळ ऋग्वेदांत आढळतो. याचा अर्थ ' घोड्यावरून जलद प्रवास करणारा ' असा असावा असें रॉथ सुचवितो. पिशेलच्या मताप्रमाणें हें पज्रांचें एक नांव आहे. आणि त्याचा अर्थ ' उत्कृष्ट यज्ञ करणें ' असा आहे.

[19] प्रतिवेश.—'शेजारी'. हा शब्द लाक्षणिक अर्थानें उपयोगांत आणलेला ऋग्वेद व तदनंतरचे ग्रंथ यांत आढळतो.

[20] प्रवास.—' दूरदेशी,-परदेशी, बाहेर राहणें'. हा शब्द ऋग्वेदांत आढळतो. परदेशांतून परत आलेल्या मनुष्यानें करावयाचे संस्कार आश्वलायन सूत्रांत दिले आहेत.

[21] ब्रह्मचर्य.—धार्मिक विद्यार्थ्याची किंवा ब्रह्मचारी आयुष्याची स्थिति. हा विशिष्ट अर्थ प्रथम ऋग्वेदाच्या १०व्या मंडलांत सांपडतो. ही विद्यार्थिदशा हळू हळू वाढली, व पुढें पुढें तर ब्रह्मचर्याची रूढि पडून तें फार कडकपणें पाळण्यांत येऊं लागलें. पुढें तर वैदिक समाजांत तें पाळणें अवश्यच आहे असें चक्क समजूं लागले व त्याप्रमाणें वैदिक वाङ्मयांत वाद येऊं लागले. अथर्ववेदांत ब्रह्मचर्यावर एक ऋचा आहे. तींत धार्मिक विद्यार्थिदशेचे सर्व विशिष्ट गुण वर्णिले आहेत. तरुणाची नवीन जीवनक्रमाशीं गुरु ओळख करून देतो(उपनी), विद्यार्थी कृष्ण मृगाजिन परिधान करितो व जटा वाढवितो. समिधा गोळा करणें, भिक्षा मागणें व तप करणें अशी त्याची दिनचर्या असते. ह्या सर्व विशिष्ट गोष्टी वाङ्मयांत आढळून येतात. विद्यार्थी आपल्या गुरुगृहीं राहतो ( आचार्य कुलवासी अंतेवासिक ). तो भिक्षा मागतो, यज्ञाप्रीत्यर्थ लांकडें गोळा करतो व घर संभाळतो. त्याची विद्यार्थिदशा बरीच वाढवितां येईल. साधारणतः ती १२वर्षेपर्यंत असे. परंतु ३२ वर्षें सुद्धां असे असा उल्लेख आहे. कोणत्या वर्षी ही विद्यार्थिदशा सुरू होते हें निश्चित नाहीं. श्वेतकेतु यानें १२ व्या वर्षी अभ्यासाला सुरवात केली, व १२ वर्षें अध्ययन केलें. गृह्यसूत्रांत नुसत्या तीन आर्य जातींनांच या विद्यार्थिदशेंतून जावें लागत असे असें गृहीत धरलें आहे. परंतु ही गोष्ट उपाध्यायांच्या शाब्दिक नियमापलीकडे गेली असेल असें वाटत नाहीं. सांप्रत ज्याप्रमाणें ब्रह्मदेशांतील सर्व प्रकारचीं मुलें आपला कांहीं काल मठांतून विद्यार्थिदशेंत घालवितात, त्याप्रमाणेंच वैश्य आणि क्षत्रिय यांचीं मुलें नियमित कालापैकीं कांहीं काल विद्यार्थिदशेंत घालवीत असावीत यांत शंका नाहीं. क्षत्रिय विद्यार्थिदशेंत दिवस घालवीत असत याला पुढें दिल्याप्रमाणें आधार आहे. अथर्ववेदांत राजा ब्रह्मचर्यानें राज्यरक्षण करीत आहे असा उल्लेख येतो (येथें ब्रह्मचर्याचे बरेच अर्थ होतात). काठक संहितेंत ब्राह्मणेतर असतांहि ज्यानें अध्ययन केलें आहे, पण त्यांत प्रसिद्धि मिळविली नाहीं अशा एकाच्या हितार्थ कांहीं विधि करण्याचा विचार आलेला आहे, तेथें ही गोष्ट अगदीं स्पष्ट होते. तसेंच जनक वेद आणि उपनिषदें पढला होता अशा प्रकारचा उल्लेख वारंवार येतो. परंतु, सामान्यतः क्षत्रिय हे युद्धकलाच शिकत असत.

[22] मुषीवान्.—ऋग्वेदांतल्या एका उताऱ्यांत ' हरण करणारा' या अर्थी हा शब्द आलेला आहे.

[23] यक्ष.—ऋग्वेदांत आणि अथर्ववेदांत त्याचा अर्थ लुड्विगच्या मताप्रमाणें मेजवानी, किंवा देशी टीकाकारांच्या मताप्रमाणें पवित्र चाल. परंतु खरोखर याचा काय अर्थ आहे याबद्दल पुष्कळच संशय आहे.

[24] रहसू.—गुप्तरीतीनें गर्भ धारण करणारी. ऋग्वेदांत लग्न न झालेल्या मातेला हा शब्द लाविलेला आहे.

[२५] वहतु.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ मोठ्या समारंभानें नवऱ्यामुलीस तिच्या बापाच्या घरापासून नवऱ्याच्या घराकडे नेणें असा आहे.

[२६] व्राजपति.—ऋग्वेदामधल्या एका लेखांत हा शब्द आलेला आहे व त्यांत असें म्हटलें आहे कीं, ज्याप्रमाणें व्राजपतीबरोबर कुलपति जातात त्याप्रमाणें इंद्राबरोबर (तो बाहेर गेला असतांनां) त्याचे सखे जातात. झिमरचें असें मत आहे कीं, ह्यावरून ग्रामणीच्या हाताखालीं लढाईंत असलेले कुटुंबांतले मुख्य पुरुष असा बोध होतो पण व्हिटने म्हणतो कीं व्राजपति म्हणजे ग्रामणीच नव्हे तर कुटुंबांतले मुख्य पुरुष म्हणजे पुढारी ह्यांनीं परिवेष्टित असा सरदार असा त्याचा अर्थ आहे व तो अर्थ बरोबर दिसतो. अथर्ववेदामध्यें एके ठिकाणीं नुसता व्राज शब्द आलेला आहे, व तो 'सैन्यामध्यें' अशा अर्थी क्रियाविशेषण म्हणून आलेला आहे.

[२७] व्रात.—ऋग्वेदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथांत सैन्य ह्या अर्थानें हा शब्द अनेकदां आलेला आहे. एके ठिकाणीं ऋग्वेदांत मरुतांच्या सैन्याचा शर्ध, व्रात व गण ह्या तीन निरनिराळ्या शब्दांनीं निर्देश आलेला आहे. ह्यावरून झिमरनें असें अनुमान काढलें आहे कीं, वैदिक काळचें सैन्य, विश्, ग्राम, व कुटुंब ह्याप्रमाणें लढत असे. पण हें अनुमान निराधार आहे कारण सैन्याचे निरनिराळे विभाग होते हें दर्शविण्याचा लेखकाचा उद्देश नाहीं. रॉथ ह्मणतो त्याप्रमाणें ह्याचा अर्थ संघ असा असणें शक्य नाहीं.

[२८] संज्ञान.—'एकमत' 'एकसूर'. हा शब्द, ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत महत्त्वाची गोष्ट म्हणून आलेला आहे. ही गोष्ट घडवून आणण्याकरितां अथर्ववेदांत पुष्कळ मंत्र दिलेले आहेत. वैदिककालच्या लहान गांवांत आर्थिक स्वावलंबनाचा अभाव व गांवचा लहान आकार ह्यांमुळें शांतता नांदणें अशक्य होतें.

[२९] समन.—ऋग्वेदामध्यें हा शब्द आलेला असून ह्याचा अर्थ अस्पष्ट आहे. रॉथ ह्याच्या मतें ह्या शब्दाचा अर्थ लढाई किंवा उत्सव असा आहे. पिशेलच्या मतें हा एक लोकप्रिय उत्सव होता व उत्सवास बायका या उपभोगार्थ (ऋ. ४.५८,८;६.७५,५); कवी कीर्तिलाभार्थ (२.१६,७); धनुर्धारी शरसंधान कौशल्याबद्दल पारितोषकें मिळविण्याकरितां (६.७५,३) व घोडे शर्यतीमध्यें धांवण्याकरितां जात असत. हा उत्सव सकाळपर्यंत किंवा रात्रभर प्रज्वलित असणाऱ्या अग्नीचा लोळ उत्सव करणाऱ्या लोकांनां घालवून देईपर्यंत टिकत(१०.६९,१)असे. तरुण स्त्रिया,व पोक्त बायकाहि ह्या उत्सवास नवरा मिळविण्याकरितां (७.२,५) येत व वारांगना ह्या प्रसंगीं नृत्य वगैरे मौजेचे प्रकार करून पैसे मिळव्याकरितां ह्या उत्सवास येत (वरील अर्थ सायणांनां मुळींच मान्य नाहीं). वरील स्थलांपैकीं कांहीं ठिकाणीं 'समनेवयोषा' अशीं पदें आहेत यावरून समन याचा उत्सव असा अर्थ करून त्याचा पाश्चात्त्य पंडितांनीं स्त्रियांशीं संबंध जोडला आहे. सायणानीं समन याचा बऱ्याच स्थलीं संग्राम असा अर्थ केला असून 'समनेवयोषा' याचा पतीशीं प्रेमानें वागणाऱ्या स्त्रीप्रमाणें असा केला आहे.

[३०] साधारणी.-ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं महाभारतांतल्या अनेक नवरे असलेल्या द्रौपदीप्रमाणें एखादी स्त्री अशा अर्थानें नव्हे तर मॅक्स मुल्लर म्हणतो त्याप्रमाणें एकादी वेश्या अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[३१] सुजात.—हें विशेषण ऋग्वेदामध्यें कांहीं थोड्या ठिकाणीं माणसांनां लाविलेलें आहे. ह्याचा अर्थ सामान्य लोकांचे उलट सरदार लोक असा करणें ह्मणजे ह्या शब्दाची ओढाताण करणें होय.

[३२] सुभगा.—संबोधनार्थी, सुभग ह्या रूपांत ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत स्त्रियांनां बहुमानार्थी हें पद लावलेलें आहे.

[३३] सेतु.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांमध्यें जलमय प्रदेश ओलांडून जाण्याकरतां केलेला मार्ग किंवा पूल असा ह्याचा अर्थ आहे. ह्या अर्थावरूनच पुढें प्रचारांत आलेल्या मर्यादा ह्या अर्थाचें स्पष्टीकरण होतें. वैदिक वाङ्मयांत ह्या शब्दाचा बहुतकरून लाक्षणिक अर्थ आलेला आहे.

[३४] दैधिषव्य.—तैत्तिरीय संहितेमध्यें एका मंत्रांत हा शब्द आलेला आहे. ह्याचा उघड अर्थ (दिधिषू पासून झालेला हा शब्द आहे) थोरल्या बहिणीचे लग्न होण्याचे अगोदर लग्न झालेल्या धाकट्या बहिणीचा मुलगा असा आहे. सेंट पीटर्स बर्ग कोशांत दिलेला अर्थ ह्मणजे दोनदां लग्न झालेल्या स्त्रीचा मुलगा हा चुकीचा दिसतो.

[३५] परिमोष.—तैत्तिरीय संहितेमध्यें ह्याचा अर्थ चोरी, असा आहे व शतपथ ब्राह्मणांत परि-मोषिन् ह्याचा अर्थ चोर असा आहे.

[३६] परिवेष्टृ.—तैत्तिरीय संहिता, अथर्ववेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांमध्यें ह्याचा अर्थ परिचारक, विशेषतः अन्न वाढणारा नोकर. ह्या शब्दाचें स्त्रीलिंगी रूप परिवेष्ट्री असें असून त्याचा अर्थ परिचारिका किंवा दासी असा आहे.

[३७] प्रफर्वी.-याचा अर्थ 'स्वैरिणी स्त्री'असा आहे. ऋग्वेद, अथर्ववेद आणि यजुर्वेदसंहिता यांमधून हा शब्द आला आहे. सायणमतानें 'पुष्ट शरीर असलेली स्त्री' असा अर्थ आहे.

[३८] मलिम्लु.—याचा अर्थ यजुर्वेद संहितेंत 'चोर' असा असावा.. आणि विशेषतः महीधराप्रमाणें तर याचा अर्थ "दरवडेखोर" "घरफोड्या" असा आहे.

[३९] रत्निन्.—देणगी घेणारे. राजसूय यज्ञाचे वेळीं ज्या लोकांच्या घरांत एक विशेष प्रकारचें कर्म केलें जात असे असे लोक. तैत्तिरीय संहितेंत व तैत्तिरीय ब्राह्मणांत अशा लोकांचें

यादी दिलेली आहे. त्या यादींत राजन्य, महिषी (राजाची पहिली बायको), वावाता (राजाची लाडकी बायको), परिवृक्ति (राजानें तुच्छ लेखिलेली बायको), सेनानी (सेनाध्यक्ष), सूत (सारथी), ग्रामणी (ग्रामाध्यक्ष), क्षत्ता (कंचुकी), संगृहीतृ (रथी अथवा खाजिनदार), भागदुह् (कर वसूल करणारे), अक्षवाप (द्यूताची देखरेख करणारा) असा अनुक्रम आहे. शतपथ ब्राह्मणांत हा क्रम पुढीलप्रमाणें आहे. सेनानी, पुरोहित, महिषी, सूत, ग्रामणी, क्षत्ता, संग्रहीतृ, भागदुह्, अक्षवाप, गोविकर्ता आणि पालागल (जासूद). त्याच ग्रंथांत जिच्या घरांत निर्ऋती-करितां हविर्भाग समर्पण करावयाच्या दिवशीं जिला घरीं राहाण्याची मनाई केली म्हणून तुच्छ मानलें अशा व निपुत्रिक अशा राजपत्नीचा उल्लेख केलेला आहे. मैत्रायणी संहितेंत ही यादी पुढीलप्रमाणें आहे. ब्राह्मण, राजन्, महिषी, परिवृक्ति, सेनानी, संग्रहीतृ, क्षत्ता, सूत, वैश्य, ग्रामणी, भागदुह्, तक्ष, रथकार, अक्षवाप आणि गोविकर्ता. काठक संहितेंत गोविकर्ताच्या ऐवजीं, गोविच् हा शब्द घातला आहे, आणि तक्ष व रथकाराला गाळलें आहे. मैत्रायणी संहितेंत आलेल्या यादींतील मंडळी देशाच्या राजव्यवस्थेंतील नोकर आणि राजाचे घरचे नोकर यांची आहे. यांतील कांहींचा अर्थ (म्हणजे संग्रहितृ, भागदुह्, सूत, ग्रामणी, क्षत्ता, यांचा) संशयित आहे. हे खासगी नोकर होते किंवा सार्वजनिक होते याविषयीं खात्री नाहीं. पंचविंश ब्राह्मणांत आठ वीरांची राजाचे मित्र म्हणून यादी दिलेली आहे त्यांचीं नांवें येणें-प्रमाणें: भ्राता, पुत्र, पुरोहित, महिषी, सूत, ग्रामणी, क्षत्ता आणि संग्रहीतृ इ.

४० रा मा.—थोड्या उतान्यांत पुरुषावर सत्ता असलेली स्त्री या अर्थी हा शब्द तैत्तिरीय संहितेंत आला आहे.

४१ अ ति थि.— अथर्ववेदांतील एका ऋचेंत आदरातिथ्याचें महत्त्व बऱ्याच सविस्तर रीतीनें वर्णिलें आहे. घरांतील यजमान जेवण्यापूर्वी अतिथीला अन्नपाणी वगैरे दिलें पाहिजे असा उल्लेख आहे. तैत्तिरीय उपनिषदांत 'अतिथिदेवोभव' या वाक्यावरून आदरातिथ्यावर बराच जोर दिलेला दिसतो. ऐतरेय आरण्यकांत (१.१,१) चांगल्या वागणुकीचे लोकच आदरातिथ्याला योग्य होत असें म्हटलें आहे. सोमयज्ञांत सोमवल्ली विकत घेतल्यावर ती घरीं आणिली असतां तिच्या आदराबद्दल एक इष्टि करावयाची असते. कधीं कधीं अतिथींसाठीं गोवध होत असे.

४२ जा मि शं स.— हा शब्द बहीण किंवा नातेवाईक यांच्या कडून झालेलें अनिष्ट चिंतन अशा अर्थी अथर्ववेदांत आला आहे व त्यावरून असें सिद्ध होतें कीं त्यावेळीं गृहकलह बरेच होत असत. हीच गोष्ट भ्रातृव्य या शब्दावरूनहि सिद्ध होते.

४३ ति र श्च.— हा शब्द अथर्ववेदाच्या कांहीं प्रतींत व्रात्याच्या सिंहासनाच्या (आसंदीच्या) वर्णनांत त्याचे आडवे तुकडे याअर्थी आला आहे.

४४ दो ह.— दूध काढणें या अर्थी हा शब्द अथर्ववेद व इतर संहिता ग्रंथांत आला आहे. सूत्रग्रंथांत सायंदोह व प्रातर्दोह असे शब्द आले आहेत. दोहन या शब्दाचाहि हाच अर्थ आहे.

४५ प रि ष्कं द.— [ भोंवतालीं उड्या मारणारा ] अथर्वांतील व्रात्यसूक्तांत हा शब्द आला असून त्याचा द्विवचनी अर्थ 'रथाच्या दोन बाजूनें पळणारे दोन सेवक' असा आहे.

४६ पि तृ ह न्.—हा शब्द अथर्ववेदाच्या पैप्पलादशाखीय प्रतींत 'बापाचा वध' या अर्थानें आलेला आढळतो.

४७ पुं श्च ली.—[ पुरुषामागून धांवणारी ] हा शब्द अथर्ववेद, वाजसनेयि संहिता व मागाहूनचे ग्रंथ ह्यामध्यें चवचाल बायको ह्या अर्थानें आलेला आहे. वाजसनेयि संहितेमध्यें पुंश्चलू हेंहि रूप आलेलें आहे.

४८ पु न र्भू.—अथर्ववेदामध्यें हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ दुसऱ्यांदा लग्न लावणारी स्त्री असा आहे. अथर्ववेदांत एका व्रताचा उल्लेख आलेला आहे. ह्या व्रताच्या योगानें तिला परलोकीं दुसऱ्या नवऱ्याची (पहिल्या नव्हे) पुनर्भेट होण्याची खात्री असे.

४९ प्रा श्.—याचा अथर्ववेदांत 'वादविवाद करणारा' किंवा 'वादविवाद' असा अर्थ असून प्रतिप्राश याचा अर्थ 'वादविवादांतील प्रतिस्पर्धी' असा आहे.

५० स्ते य.—अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यामध्यें ह्याचा अर्थ चोरी असा आहे.

५१ दि धि षू प ति.—काठक व कपिष्ठल संहिता, आपस्तंब, गौतम, वसिष्ठ धर्मसूत्रें ह्यांमध्यें ज्यांनीं पाप केलेलें आहे अशांच्या यादीमध्यें हें नांव आलेलें आहे. ह्याचा सांप्रदायिक अर्थ पुनर्विवाहित स्त्रीचा नवरा असा आहे. मनु ह्या शब्दाचा असा अर्थ करितो कीं, भाऊ वारल्यावर ज्याच्या मनांत वैवाहिक प्रेम उत्पन्न झालें असल्यामुळें आपल्या भावजयीशीं पुत्रोत्पादनार्थ लग्न लावणारा असा मनुष्य (अनुरज्यात कामतः म्ह० वैवाहिक प्रेम उत्पन्न झालें आहे असा). हा अर्थ शक्य आहे कारण दिधिषु म्हणजे प्रेमयाचना करणारा असा अर्थ आहे व विधवा स्त्रीला जर आपला वर पसंत करितां येत असेल तर तिला सुद्धां प्रेमयाचना करणारी असें म्हणतां येईल. पण दुसऱ्या एका उल्लेखावरून ह्या शब्दाचा असाहि एक अर्थ आहे कीं जिच्या धाकट्या बहिणीनें अगोदर लग्न करून घेतलें आहे अशी थोरली बहीण. ह्या अर्थाला वसिष्ठ सूत्रांतील लेखावरून पुष्टी मिळते व शिवाय अग्रेदिधिषुःपति ह्यावरूनहि तोच अर्थ बरोबर आहे असें वाटतें कारण त्याचा अर्थ थोरल्या बहिणीच्या आगोदर लग्न लावणाऱ्या धाकट्या बहिणीचा नवरा असा होतो. असा अर्थ

घेतला तर दिधिषु म्हणजे प्रेमयाचना करणारी थोरली बहीण ठरते. कारण तिच्या आईबापांनीं जर तिचें लग्न आगोदर करून दिलें नाहीं तर विष्णुधर्मसूत्राप्रमाणें तिला आपल्या नवऱ्याची निवड करतां येते ( कुर्यात् स्वयंवरम् ).

[५२] प रि वि त्त.—ह्याचा अर्थ धाकट्या भावाचें लग्न झालेलें असून ज्याचें लग्न झालें नाहीं असा थोरला भाऊ असा आहे. हा शब्द काठक संहितेंत, त्याचप्रमाणें अथर्ववेद ह्यामध्यें पापी पुरुषांच्या यादींत आलेला आहे. लुडविग् म्हणतो कीं ह्या वेदांत परिवेत्ता असा पाठ आहे पण असें मानण्याची बिलकुल अवश्यकता नाहीं. अगोदर लग्न करणाऱ्या धाकट्या भावाला परिविविदान असें नांव जुन्या ग्रंथांत दिलेलें आहे.

[५३] ल क्ष ण, ल क्ष्म न्.—आपल्या मालकीची खूण म्हणून तापलेल्या लोखंडानें गुरावर मारलेली खूण असा ह्याचा अर्थ होतो. मैत्रायणी संहितेप्रमाणें ही खूण रेवती नक्षत्राचे वेळीं करावयाची असे, कारण तें नक्षत्र धनसंबंधीं गणलें जात असे ( रेवती धनयुक्ता ).

[५४] आ क्र म ण.—'झाडावर चढण्याकरतां पायऱ्या' ह्या विवक्षित अर्थी जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत याचा उल्लेख आलेला आहे.

[५५] दा स्य.—बृहदारण्यकोपनिषदामध्यें गुलामगिरी ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[५६] न व क.—जैमिनीय ब्राह्मणग्रंथांत बिंभिदुकीयांच्या सत्रामध्यें बायकोची इच्छा करणारा म्हणून ह्याचा उल्लेख आलेला आहे.

[५७] नि गु स्थ.—शांखायन श्रौत सूत्रामध्यें काशी, विदेह व कोशल येथील लोकांनां ही अज्ञात अशा अर्थाची पदवी लाविलेली आहे.

[५८] प रि व्रा ज क.—( शब्दशः अर्थ भ्रमण करणारा ) निरुक्तामध्यें योगी असा ह्याचा अर्थ आहे.

[५९] पा ला ग ल.—शतपथ ब्राह्मणांत दूत किंवा खोटी बातमी सांगणारा ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[६०] भि क्षु.-'भिक्षाचारी.' हा शब्द वैदिक ग्रंथांतून आढळत नाहीं. ब्रह्मचाऱ्याचें भिक्षा मागणें आणि मागाहून निघालेल्या आश्रमधर्माप्रमाणें भिक्षूचें कर्तव्य यांत फार अंतर आहे. या आश्रमधर्माप्रमाणें मनुष्य घरदार सोडून आपल्या आयुष्याच्या शेवटच्या भागांत भिक्षा मागून आयुष्य क्रमितो.

[६१] मा तृ ह न्.—मातृघाती, आईला ठार मारणारा. पाणिनीच्या टीकाकारांनीं दिलेल्या एका वैदिक उताऱ्यांत हा शब्द आढळतो.

[६२] शि खा.—शतपथ ब्राह्मणांत डोक्यावरील शेंडीची गांठ अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. केसाची गांठ बांधून ठेवणें ही स्त्रिया व पुरुष यांची सुतकांत असल्याची खूण असे.

[६३] श्र म ण.-भ्रमण करणारा जोगी. हा शब्द उपनिषदांत प्रथम आलेला आहे. फिकच्या मतानें कोणालाहि श्रमण होतां येत असे. मेगास्थिनीसच्या वेळीं त्यानें दिलेल्या पुराव्यावरून ही गोष्ट सिद्ध होते पण ही स्थिति खुद्द मध्यदेशाच्या पलीकडे हिंदुस्थानच्या पूर्वेस होती. वैदिक पुरावा एवढाच कीं, वैदिक वाङ्मयांत हें नांव आलेलें आहे व बृहदारण्यकोपनिषदांत व तैत्तिरीय आरण्यकांत तापस शब्द आलेला आहे. बृह०उप० ह्यांत श्रमण ह्याचा अर्थ परिव्राट् ( संन्यासी ) व तै. आरण्यक ह्यांत तापस असा अर्थ केला आहे.

[६४] त स्क र.—हा शब्द ऋग्वेदांत व तदुत्तर वाङ्मयांत चोर या अर्थानें वारंवार आला आहे. हा स्तेन शब्दाचाच पर्याय शब्द आहे व या शब्दाबरोबरच स्तेन शब्द येत असतो. वाजसनेयि संहितेंत तस्कर व स्तेन यांची मलिम्लु यांशीं तुलना केली आहे. स्तेन व तस्कर हे वाटमारे व मलिम्लु म्हणजे घरफोड्या होय. ऋग्वेदांत तस्कराचें वर्णन 'तनूत्यज-वनर्गू' अरण्यांत राहून आपला जीव धोक्यांत घालणारा असें दिलें आहे. ऋग्वेदाच्या एका उताऱ्यांत ( ६. ५५, ६ ) तस्कर किंवा स्तेन यांच्यावर कुत्रें भुंकल्याचा उल्लेख आहे. यावरून हे घरफोडेहि होते असें दिसतें. चोर रात्रीं हिंडत असतो व ज्या मार्गावर लोकांनां लुटावयास सांपडेल असे मार्ग त्यांला पूर्ण माहीत असतात असा ऋग्वेदांत ( ८. २९, ६ ) उल्लेख आहे. ऋग्वेदांत चोरीमध्यें दोऱ्यांचा उपयोग केल्याचा उल्लेख आहे ( १०. ४, ६ ) परंतु या दोऱ्यांनी चोरांस बांधावयाचें किंवा चोरांनीं पकडलेल्या लोकांस ( चोरांनीं ) बांधावयाचें हें समजत नाहीं. (सायणमत चोरांनां दोऱ्यांनीं बांधावयाचें असेंच आहे ). अथर्ववेदांत स्तेन व तस्कर हे गुरेंढोरेंहि चोरीत असत असें म्हटलें आहे ( १९. ५०, ५ ). तायु हेंहि एक चोराचें दुसरें नांव आहे. हा वाटमाऱ्या नसून घरगुती चोर असावा. कारण जरी त्याला गुरें चोरणारा (ऋ. १. ६५, १ )असें म्हटलें आहे तरी त्याचा उल्लेख 'वस्त्रमथि' कपडे चोरणारा व 'ऋणो न तायुः' 'ऋणको' असा आहे. येथें पाश्चात्य पंडितांच्या मतें ऋण ही चोरी होण्याचें कारण ऋणकोला ऋण फेडण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें उत्पन्न होणारी निराशा हें होय. कारण ऋण न फेडलें तर स्वातंत्र्य जाण्याची त्यास भीति असे. सायणांनीं येथें ऋण याचा गति असा अर्थ होतो असेंहि म्हटलें आहे. एके ठिकाणीं तायूनां 'उषःकालीं नाहींसे होणारे' असें म्हटलें आहे. वाजसनेयि संहितेंतील ( १६. २० ) शतरुद्रीय नामक कर्मांत रुद्राला आव्याधिन्, स्तेनानांपति, स्तायूनांपति, तस्कराणांपति, मुष्णतांपति अशीं विशेषणें दिलीं असून गृत्सपति ( फसवे), व्रातपति ( लुटारू), असेंहि म्हटलें आहे. ही चोरांची नामावली पाहिल्यावर जर ऋग्वेदामध्यें घरीं किंवा वाटेनें चालतांनां रक्षण करण्याबद्दल ऋषींनीं प्रार्थना केल्या असल्या किंवा चोर व लुटारू

"यांच्या दुष्कृत्यापासून लोकांचें रक्षण करण्याबद्दल अथर्ववेदांत रात्रीला उद्देशून कांहीं सूक्तें असलीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं. पिशेलनें असें एक मत सुचविलें आहे कीं, ऋग्वेदांत एके ठिकाणीं ( ७ ५५ ) वसिष्ठाला घरफोड्या ह्मटलें आहे. परंतु त्याला हें कबूल आहे कीं, वसिष्ठ हा आपल्या बापाचें ( वरुणाचें ) घर फोडीत होता व जें स्वतःचें कांहीं असेल तेंच घेण्याचा तो यत्न करीत होता. तरी पण या सूक्ताचा हा अर्थ निश्चित नाहीं. ऋग्वेदांतील एका ( ६.५४,१ ) ऋचेवरील भाष्यांत सायणांनीं पूर्वी जनावरांचा माग काढणारे ( पंजाबांतील खोजी लोकांप्रमाणें ) लोक असत असें ह्मटलें आहे तें झिमरच्या मतें यथार्थ आहे. चोरांनां करावयाची शिक्षा ती ज्याचा माल चोरला असेल त्याच्या मर्जीप्रमाणें होत असे. त्यांनां खोडा घालीत असत असा उल्लेख आहे. पुढें ( गौतमधर्मसूत्र ४३. ४५, आपस्तंब धर्मसूत्र १. ९, २५; ४, ५ ) याहून जास्त कडक ह्मणजे देहांत शिक्षाहि केली जात असे. चोरीच्या गुन्ह्याची चवकशी कोणत्या प्रकारें होत असे हें समजण्यास ऋग्वेदांत आधार नाहीं. अथर्ववेदांत अग्नीचें दिव्य करण्याबद्दल ( चोरीचे शिक्षेकरितां ) उल्लेख नाहीं. छांदोग्य उपनिषदांत अग्निदिव्याचा उल्लेख आहे. परंतु चोरीच्या शिक्षेसाठीं नाहीं. चोरीचा माल सांपडला तर तो ज्याचा त्याला परत मिळत असे. पण जर तो माल चोरी करणाऱ्याच्या ताब्यांतून दुसऱ्याकडे गेला तर त्याचें काय होत असे हें सांगतां येत नाहीं.

### भाषा

#### उपमावाचक शब्द [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्निर्नये | चित् | ब्राह्मणाव्रतचारिणः |
| आ | जारआभगम् | भूत |
| इदंयथा | तथा | मेषोभूतोभिंयन्नयः |
| इदामिव | तद्रूपः | यथा |
| इव | तद्वत् | रुप |
| उपमा | तद्वर्णः | वृक्षस्यनुतेपुरुहूत |
| चतुराश्चिद्दमानात् | न | वत् |
| चारिन् | नु | वर्ण |

#### उपसर्ग [ ऋग्वेद ]

पदपाठकाराच्या पद्धतीप्रमाणें जेवढे उपसर्ग भिन्नपदस्वरूपांत आले त्यांचाच फक्त संग्रह येथें केला आहे.

| | | |
|---|---|---|
| अति | अभि | परि |
| अधि | आ | प्र |
| अनु | उप | वि |
| अप | नि | सम् |
| अपि | परा | सु |

#### [ तै. सं. ]

पदपाठांत स्वतंत्र पद म्हणून जे उपसर्ग सांपडले त्यांचाच येथें संग्रह केला आहे. शब्दांशीं संयुक्त उपसर्ग घेतले नाहींत.

| | | |
|---|---|---|
| अति | आ | प्र |
| अधि | उप | वि |
| अनु | निर् | सम् |
| अप | परि | सु |
| अव | | |

#### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अति | अव | परि |
| अधि | आङ् | प्र |
| अनु | दुर् | प्रति |
| अप | नि | सम् |
| अपि | निर् | सु |
| अभि | परा | |

#### छंद [ ऋग्वेद ]

पूर्वकालीं हजारो छन्द होते. त्यांपैकीं बहुतेक छन्द सध्या नष्ट झाले आहेत. उपलब्ध असलेल्यापैकीं कांहीं रूपकात्मक वर्णनपर असावेत असें वाटतें.

| | | |
|---|---|---|
| अनुष्टुभ् | चतुष्पदी ( वाणी ) | पंक्ति |
| अष्टापदी [ वाणी ] | छंदस् | ब्रह्मणी |
| उष्णिहा | जगती | मंत्र |
| ऋक [ छंदोबद्ध मंत्र ] | त्रिष्टुप् | यजुस् |
| ऋच् [ छंदोबद्ध मंत्र ] | द्विपदी [ वाणी ] | विराज् |
| एकपदी [ वाणी ] | नवपदी [ वाणी ] | शक्करी |
| कुरीर | निवचना [ काव्य ] | सहस्राक्षरा |
| गायत्री | पद [ श्लोकचरण ] | सप्तपदी |

#### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्षरपंक्ति | छदि | प्रजापति |
| अंकांक | छंद | बृहत् |
| अंकुप | जगती | बृहती |
| अतिच्छन्दस् | जागत | भुज्वन् |
| अधिपति | तन्द्र | भ्रज |
| अनाधृष्ट | त्रिककुद् | मध्येछंदस् |
| अनुष्टुप् | त्रिष्टुक् | मनस् |
| अपरिमितछंदस् | त्रिष्टुपृछंदस् | मनुष्यछंदस् |
| आच्छत् | त्रिष्टुभ् | मयन्द |
| उपवेश | दूरोहण | रथन्तर |
| उष्णिह | देवछंदस् | वयस् |
| उष्णिहककुभ् | निकाय | वयस्कृत् |
| एव | पक्ष | वरिवस् |
| ककुत् | पंक्ति | वासन्ती |
| काव्य | पदपंक्ति | विच्छंद |
| गायत्रछंदस् | परमेष्ठी | वियत् |
| गायत्री | परिभू | विराज् |
| गिर् | प्रच्छत् | विवध |

विवल
विशाल
विष्टारपंक्ति
विष्पर्ध
वैराज

वैरूप
व्यचस्
शम्भू
संयत
सच्छंदस्

सतोबृहती
सप्तपदा
समुद्र
सलिल
सष्टुप्

## भाषा व भाषण संबंधीं [ ऋग्वेद ]

अख्खलीकृत्य
अच्छोक्ति
अधिवक्तृ
अभिचक्ष्य
अभिष्टिद्युम्न
अवाच्
आनुष्टुभ्
आसन्निषु
इन्द्रवाततमा
उक्त
उपमा
उपमान
उपवक्तृ
उपवाच्
उपवाच्यं
उपह्वस्वन्
ऋक्सामन्
ऋक्
ऋक्वत्
ऋग्मिंन्
ऐतश
कविशस्त

[१] गाथा
गृणत्
चित्तगर्भा
[२] छंदस्
जल्पि
जोषवाच्
तृष्ट
दुध्रवाच्
दुरुक्त
द्युम्नवत्
धीत
नवस्वक्ती
नाराशंसी
[३] पद
पावमानी
प्रवाचन
प्रवाच्
प्रवाच्य
ब्रुवत्
मधुवचस्
[४] मंत्रकृत्
मृध्रवाच्

यजुष् ( मंत्र
रंसुजिह्व [ रमणीय जिव्होपेत ]
रुवण्यु
रैभी [ रेभीकृतः]
वक्तृ
वक्ष्य
वदत्
वध्रिवाच्
वनन [रमणीय वाच् ]
वाचमींखय
विवक्षण
विवाच्
विसृष्टधेना [विसृष्ट-जिव्हा]
[५] शक्करी
[६] शपथ
शुभान
श्रोतृ
सचथ्य
[७] ससर्परी

### [ तै. सं. ]

अक्षर
अर्धर्च्
अष्टापदी
उग्रवीर
ऋक् [ मंत्रगण ]
एकाक्षर
गिर्
तिक्त

त्र्यक्षर
दशाक्षर
द्यक्षर
नवजात
नवाक्षर
पंचदशाक्षर
पंचपदी
प्रजापतिगृहीता

[८] प्रश्न
ब्रम्हण्वती
मंत्र
वचस्
सप्ताक्षर
सुवाच्
सूक्त

### [ अथर्ववेद ]

अच्छोक्ति
अद्रोघवाच्
अधिवाक्
अधीति
अधावचस्

अनपवाचन
अनिंद
अनुष्टुभ्
अनृत
अपवक्तृ

अप्रतिब्रुवत्
अभिलापलप
अव्याप्ति
अष्टर्च
अष्टादशर्च

अष्टापदी
असन्मंत्र
असंख्येयं
आंगिरस
आथर्वन्
आथर्वणी
आर्शी
आयुज्
आलाप
आशिष्
उक्थमद
उदचि
उद्वाचन
उपम
उपमा
उपवाक्
उपश्रुति
उपश्रोतृ
उपोत्तम
उरुवाच्
उष्णिहाक्षर
ऋच्
ऋक्संशित
ऋक्साम
ऋग्मिय
ऋत
ऋधङ्मंत्र
एकर्च
एकाक्षर
एकानृत्र
एकादशर्च
कविशस्त
कामप्रछन्दस्
काव्य
खिल्य

गर्गर
गाथा
गायत्र
गायत्रच्छंद
गायत्री ( छंद )
गिर्
चतुर्ऋच्
चतुर्दशर्च
चतुर्होतृ [ मन्त्र]
छंदस्
छंद:पक्ष
जगच्छन्द
जगती [ छंद ]
तृच
त्रिवृत्
त्रिष्टुप्छंद
त्रिष्टुभ् [छंद]
त्वाष्ट्र [ मंत्र ]
दुर्वाच्
द्वादशर्च
द्विपदी
नमोवाक
नवपदी
नवर्च
नाथ
निधन( सामाची समाप्ति
प्रतीहार (साम्नः चतुर्थी भक्तिः)
प्रयुज्
[९] प्रलाप
प्रशिष
प्रैष [ कर्मसु प्रेरको मंत्रः ]
बाल् [ मूत्रविषयको ऽनुकरणशब्दः ]

बृहच्छंदस्
बृहत्सामन
भद्र
भद्रवाच्
भद्रश्रुति
मणस्सक
मंत्र
मृध्रवाच्
विवर्ह [ सूक्त ]
विराज्
विवक्षु
विवादत्
विशिष्
[१०] वेद
व्याप्ति
शक्करी [ छंद ]
शद्विन्
श्रुति
श्रोत्रिय
श्लोकी
षोडशर्च
संशिष्
संवत्सरीण
संहितान्त
सत्पशीर्ष्णी
समाप्ति)
सहस्राक्षरा
सामन्
सामतेजस्
सुवाच्
सूक्त
सूनृता
हिंकार

### [ वा. सं. ]

पावकवर्ण(वा. वि.)

### ( मैत्रायणी सं. )

[११] वाच्

### [संहितेतर]

[१२] अथर्वाण
[१३] अथर्वांगिरस्
[१४] अनुव्याख्यान
[१५] अनुशासन

[१६] अन्तेवासिन्
[१७] अन्वाख्यान
[१८] आख्यान
[१९] आख्यायिका

[२०] आहनस्या
[२१] उपानिषद्
[२२] ऋग्वेद
[२३] एकायन

२४ ऐतशप्रलाप
२५ ऐतिहासिक
२६ काठक
२७ कारीरादि
२८ कुम्ब्या
२९ क्षेत्रविद्या
३० खिल
३१ चरकब्राह्मण.
३२ छंदोग
३३ ज्योतिष
३४ तापस
३५ तैत्तिरीय
३६ दशतयी
३७ दाशतय
३८ देवजनविद्या
३९ दैव
४० नक्षत्रविद्या
४१ नाचिकेत
४२ नाम
४३ निदान
४४ निरुक्त
४५ निविद्धान
४६ निर्वचन
४७ नैदान
४८ नैरुक्त
४९ पंडित
५० पारिप्लव
५१ पारोवर्यविद्
५२ पार्षद
५३ पित्र्य
५४ पुराण
५५ प्रतिप्रश्न
५६ प्रवचन
५७ प्रवल्हिका
५८ प्रातरनुवाक
५९ बहुवचन
६० बव्हृच
६१ ब्रह्मपुरोहित
६२ ब्रह्मबंधु
६३ ब्रह्मविद्या
६४ ब्रह्मोद्य
६५ ब्रह्मोपनिषद्
६६ ब्राह्मण
६७ भाल्लवि
६८ भाषा
६९ मधुब्राह्मण
७० महासूक्त
७१ मान्थाल
७२ यजुर्वेद
७३ यज्ञगाथा
७४ रैभी
७५ वाकोवाक्य
७६ वेदांग
७७ व्याख्यान
७८ श्लोक
७९ सर्पविद्या
८० सामवेद
८१ सौम्य
८२ स्वर
८३ स्वाध्याय
८४ हरिद्रविक

## वाङ्नामें [ ऋग्वेद ]

अक्षर
अदिति
अधिवाक् ( पक्षपातवचन )
अनुष्टुप्
अभ्व्य
इळा
उपाब्दि
ऋच्
ऋतवाक
कशा
काकुद
कापा ( बंदिजन-वाणी )
गण
गभीरा
गंभीरा
गल्दा
गान्धर्वी
गिर
गो
गौरी
ग्ना
घोष
जिव्हा
देवी
धमनि
धारा
धिषणा
धिषा
धी
धीति
धेना
धेनु
नम्रा
नावा
नाळी
निविद्
नौ
पवि
पावीरवी (आकाशवाणी)
प्रविष्टा
बेकुरा
भारती
मंद्रा
मन्द्राजनी
मही
मायु
मेना
मेळि
वग्नु
वचना
वचस्
वच्यमाना
वग्निवाक्
वल्गु
वाच्
वाण
वाणी
वाणीची
वामी
वाशी
विप्
शची
शब्द
श्लोक
सत्यवाक्
सरस्
सरस्वती
सुपर्णी
सूर्म्या
सूनृता (प्रियसत्यवाक्)
स्वन
स्वर
स्वाहा
हविष्कृत् ( गीर्विशेषण )
होत्रा

[ तै. सं. ]

उपदासुका (वि. )
उरुव्यचस् ( वि. )
दुर्वाच्
धिषणा
वचस्
वाच्
वाणी
शुश्रूषेणी ( वि. )
सपत्नक्षयणी
सूनृता

[ अथर्ववेद ]

अनृतवाच्
अभिहित
गिर
गोसनि ( वाणी-विशेषण )
ग्लहा ( स्तनयित्नुरूपा)
दुर्मरणी ( वाणी-विशेषण]
धेना
पावकवर्णा
माध्यमिकावाक्
वक्करी
वर्चस्वती
वाच्
सत्यवाच्
सवाच्
सुमल्न

## सर्वनामें [ ऋग्वेद ]

अतः
अदस्
अन्यके
अन्यस्मिन्
इदम्
अस्मत्
आमुष्य
इतर
उत्तर
एक
एतत्
एतावान्
कियत्
किम्
तत्
ताता
तात्या
त्यत्
त्यम्
त्वे
पूर्व
ममकाय
माकी
माकीनया
यत्
युष्मत्
वितूर्य
विद्र
विश्व
सका
समः
सिम
सीं

[तै. सं.]

अदस्
अन्य
अस्मत्
इदम्
उत्तरास्मिन्
एतत्
तत्
तावत्
त्यत्
पर
यत्
युष्मत्
सर्व
स्व

[ अथर्ववेद ]

अदस्
अन्यक
अन्यत्
अपर
अस्मत्
आभि
इतर
इदम्
ईम्
एतंत्
कतम्
कतर
कति
किम्
कियत्

तत्
तव
तात् (तस्मात्)
त्यत्
पर
पूर्व
फट्
फल्
बट्
मध्यद्रिक
यत्
यतमा
यतरा
युष्मत्
सका
सर्व
सिम
सीम्

## सामान्य अव्ययें [ ऋग्वेद ]

अंग
अच्छ
अंजसा
अत्र
अथ
अथो
अद्धा
अद्य
अध
अनुष्टुभ (सम्यक्)
अनूनं
अंतः
अंतरा
अंति
अंतिकं
अपुनः
अप्राति
अह
आकीं
आके
आत्
आरात्
आरे
आसात्
इत
इति
इत्थं
इत्था
इदानीं
इह
ई
ईमिति
उच्चा
उच्चैः
उत
उतोइति
उपमित्
ऊंइति
ऋतचित्
ऋधक्
एव
एवं
एवोइति
ओइति
कत्
कथं
कथा
कथोइति
कयस्य
किः
किल
कुवित्
कुह
कूचित्
क
क्षु (मक्षु)
कोइति
खलु
घ
च
चन
चित्
चिरं
चोइति
जातु
जोषं
ज्योक्
तथा
तदानीं
तरसा
तर्हि
तात्
तादीत्ना
तिरः
तु
तूष्णीं
दिवा
दूरं
दूरात्
दूरे
ध्रुवं
न
नाकिः
नकीं
नक्तं
ननु
नमः
नहि
नाना
नु
नूनं
नोइति
पराकात्
पश्चा
पश्चातात्
पारे
पुनः
पुरस्तात्
पुरा
पूर्वापरं
पूर्वे
पृथक्
प्रवत्
प्रातः
प्रोइति
बट्
बत
बळा
बाह्लि
बाहूळे
मक्षु
मत्
मध्या
मध्यात्
मध्ये
मनश्चित्
मनाक् (अल्प)
मंद्रे
ममत् (प्रमत्तपणानें)
माकिः
माकीं
मिथः
मिथुः
मुहुः
मुहूर्ते
मृषा
मोइति
मोघं
यत्र
यथा
यथाइव
यदा
यदि
यात
यावत्
यावतः
रभसा
वषट्
वा
विश्वदानीं
विश्वध
विश्वह
विश्वाहा
वृथक्
वृथा
वै
शनकैःइव
शनैः
शश्वत्
शश्वधा
शीभ
श्रुत्
श्वः
सचा
सदा
सना
समया
सम्यक्
सदमित्
सह
सहसा
साकं
साधु
सायं
सुष्ठु
सोइति
स्मत्
स्वयं
स्वित्
हि
हिरुक्
हुरुक्
ह्यः

## [ तै. सं. ]

अंगेअंगे
अञ्जसा
अथ
अथो
अतोधि
अद्य
अध
अधराक्
अन्यदन्यत्
अमुत्र
अलम्
अह
आत्
इत्
इति
इत्थम्
इत्था
इव
इह
ईम्
उ
उच्चैः
उपरि
उपरिष्टात्
उपर्युपरि
एतर्हि
एती
ओ
कं
खलु
घ
चित्
जम्
तत्र
तथा
तयोः
तिरः
तु
त्रेधा
देवत्र
न
नकिः
नाना
नाम
निकामेनिकामे
नु
नुकम्
नूनं
पराति
परिचित्
परिपरि
पश्चात्
पारम्
पारे
पुनः
पुनःपुनः
पुरस्तात्
पुरा
पुरुत्रा
पृथक्
प्रत्नथा
प्रियधा
बहिस्
भूयस
भूरि
मक्षु

| | | |
|---|---|---|
| मत | यावत् | साकम् |
| मिथः | वा | स्वयम् |
| मिथु | विमृधा | स्वित् |
| मृधा | वै | ह |
| मो | शश्वता | हि |
| यत् | श्रत् | हिकम् |
| यत्र | सकृत् | हिम् |
| यथा | सम्यत् | ही |
| यदा | सह | हो |
| यदि | सहसा | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अथ | कृते | न्यक् |
| अथो | केनो | पश्चा |
| अद्धा | क | पश्चात् |
| अद्य | क्षिप्रम् | पित्वः |
| अधः | घ | पुनर् |
| अन्तः | च | पुरः |
| अन्तमः | चित् | पुरा |
| अह | जोषम् | पृथक् |
| आत् | ज्योक् | पृथु |
| आरात् | तथा | प्रपृथक् |
| आरे | तिरः | प्रातर् |
| इत् | तु | बद् |
| इति | तूयम् | बत |
| इत्थ | दिवा | बहिस् |
| इत्थम् | दुरः | बहुलम् |
| इत्था | दूरम् | बृहर् |
| इदानीम् | दूरात् | भूयस् |
| उच्चा | दूरे | भूरि |
| उच्चैः | द्वाः | मत् |
| उत्तम् | न | मा |
| उपरि | नाकिः | माकि |
| ऊं | नक्त | मुहुस् |
| एव | ननु | मृषा |
| एवम् | नमस् | यत् |
| ओ | नमसा | यथा |
| ओच्चैः | नहि | यदा |
| कत् | ना | यदि |
| कथम् | नाना | वा |
| कामम् | नाम | विष्वक् |
| किल | नीचा | वै |
| कुवित् | नु | श्वस् |
| कुह | नूनम् | सकृत् |
| कुहाकम् | नो | सचा |
| सत्रा | सह | स्वयम् |
| सदा | सहसा | स्वस्ति |
| सद्यस् | साकम् | स्वित् |
| सनम् | साक्षात् | ह, हि |
| सनो | सायम् | हिङ् |
| सनात् | सायंप्रातर् | हिरुक् |
| सनातनम् | सुप्रातर् | है |
| समम् | सुसायम् | ह्यस् |

## क्रियाविशेषक अव्ययें [ ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अनिमेषं | आसदं | यात्राध्यम् |
| अनुकामं | उपास्थायं | यावन्मात्रं |
| अनुपूर्वं | दाक्षिणित् | वरं |
| अनुस्वधं | प्रतिकामं | वितर्तुरं |
| अनुस्वापं | प्रतिदोषं | विपर्वं |
| अपकामं | प्रदाक्षिणित् | विपृच्छं |
| अभिज्ञु | यथाकामं | शतपाकं |
| अभिनभ्यं | यथाकृतं | सहमूलं |
| अराध्यं | यथापूर्वं | |
| आनमं | यथावशं | |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अयथादेवतम् | यथाभाग | यथासृष्ट |
| अयथापूर्वम् | यथायतन | यथास्थान |
| यथाकामं | यथायथ | यथोदित |
| यथादेवतम् | यथावश | सवनेसवन |
| यथापूर्वम् | यथासवन | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अतिमात्रम् | प्रतिकामम् | यथायथम् |
| अनुस्वधम् | प्रतिकाम्यम् | यथालोकम् |
| अन्तहस्तम् | प्रत्यक्षम् | यथावशम् |
| आः | यथागम् | यथास्थाम |
| काचित्करम् | यथानाम | यथोकसम् |
| परिवृजम् | यथापरु | समक्षम् |
| पूर्वापरम् | यथाबलम् | |
| प्रतंकम् | यथाभागम् | |

## तद्धित अव्ययें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अकुत्र | अमुतः | कतिथः |
| अग्रतः | इतः | कतिधा |
| अधस्तात् | इमथा | कदा |
| अंतितः | उभयतः | कर्हि |
| अन्यतः | उभयत्र | कुतः |
| अन्यत्र | ऋतुथा | कुत्र |
| अन्यथा | ऋतुशः | कृत्वः |
| अभितः | एवथा | चतुर्धा: |

| | | |
|---|---|---|
| ततः | पुरुधा | विश्वधा |
| तत्र | पुरुषत्रा | शीर्षतः |
| त्रिधा | पूर्वथा | श्रेणिशः |
| त्विषितः | पूर्ववत् | समानतः |
| दाक्षिणतः | बहुत्रा | समुद्रतः |
| द्विधा | बहुधा | सर्वतः |
| धामशः | मध्यतः | सहस्रधा |
| पर्वशः | मुख्यतः | सहस्रशः |
| पाकत्रा | विश्वतः | स्थशः |
| पारतः | विश्वत्र | |
| पुरुत्रा | विश्वथा | |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अक्षरशः | गणशः | पुरस्तात् |
| अच्छ | तरित्रतः | पूर्वथा |
| अतः | तर्हि | पृतन्यतः |
| अत्र | तावच्छः | प्रतवत् |
| अधस्तात् | दशदश | बहिर्धा |
| अन्ततः | दशधा | बहुधा |
| अन्तरतः | दिवेदिवे | बहुशः |
| अन्तितः | द्वेधा | मध्यतः |
| अन्यतः | नवनव | यतः |
| अन्यथा | निमिषतः | यर्हि |
| अमुतः | पंचधा | यूथेयूथे |
| अमुत्र | पंचपंच | विधा |
| अर्धमासशः | पथस्पथः | श्रेणिशः |
| अवक्रम्य | परितः | सप्तसप्त |
| उपरिष्टात् | पुरुष्परुः | सहस्रधा |
| उभयतः | पर्वशः | सहस्रशः |
| एकधा | पार्श्वतः | ह्वेह्वे |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अग्रतः | उभयतः | तदा |
| असतः | ऋतुथाः | तदानीम् |
| अत्र | ऋतुशः | तर्हि |
| अन्ततः | कदा | तावत् |
| अन्तितः | कुतः | त्रेधा |
| अन्यत्र | कृत्वः | त्विषितः |
| अन्यथा | चतुर्धा | त्रायतः |
| [illegible] | चत्तः | दक्षिणतः |
| [illegible] | चरमतः | दूरतः |
| अभितः | ततः | देवत्रा |
| अस्मत्र | तातिधा | द्वादशधा |
| अष्टधा | तत्र | द्विः |

| | | |
|---|---|---|
| धामशः | प्रत्नथा | विश्वतः |
| नवधा | प्राक्तः | विश्वधा |
| नामथा | मध्यतः | सत्तः |
| पञ्चधा | मित्रधा | सप्तथम् |
| परितः | मुखतः | सप्तधा |
| पर्वशः | यजत्र | समुद्रतः |
| पुरस्तात् | यतः | सर्वतः |
| पुरुत्रा | यतिधा | सर्वदा |
| पुरुधा | यत्र | सहस्रधा |
| पूर्वथा | रूपशः | सहस्रशः |

तुमर्थ अव्ययें: [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अत्तवे | उवध्यं | तुर्यै |
| अतिस्कदे | ऋचसे | दातवे |
| अत्येतवै | ऋभुतः | दातवै |
| अनुशसे | एतवे | दातुं |
| अनुस्यदे | एतवै | दातोः |
| अन्वेतवै | एधतुं | दोहसे |
| अपभर्तवै | एषे | द्वकेहति |
| अयातुं | ओतवे | धर्मकृते |
| अवथै | ओतवै | धातवे |
| अविष्टुं | कर्तवे | धियध्यै |
| अष्टवे | कर्तै | धूर्वणे |
| आतुजे | कर्तोः | नंसै |
| आदिशे | क्षरध्यै | नाशयध्यै |
| आभोगये | गंतवे | निकर्तवे |
| आरुजे | गंतवै | निप्रभे |
| आसदे | गंतोः | निधातोः |
| आसद्य | गमध्यै | नियूथ |
| आहुवध्यै | गातुं | निरजे |
| इयत्यै | गृभणे | निरेतवे |
| इयध्यै | चक्षदे | निसदे |
| इरध्यै | चक्षसे | निस्पृशे |
| इषध्यै | चरध्यै | निहन्तवे |
| इषयध्यै | चरायै | पत्तवे |
| ईरयध्यै | जरध्यै | पराणुदे |
| उक्थवाहसे | जराय | परितंसयध्यै |
| उपअरे | जीवसे | परिस्वजे |
| उपगंतवै | तपिष्ठैः | पर्येतवे |
| उपथै | तरध्यै | पातवे |

| | | |
|---|---|---|
| मातवै | मंदयध्यै | विख्यै |
| पिबध्यै | मनवै | विचक्षसे |
| पृच्छे | मातवै | विचक्षे |
| पृणध्यै | मादयध्यै | वितिरे |
| प्रख्यै | मादयाध्यै | वृजध्यै |
| प्रतिधातवे | मादयासे | शयध्यै |
| प्रतिधृषे | मुहे | शरीतोः |
| प्रतिमै | यजध्यै | श्रवसे |
| प्रतिस्कभे | यंतवे | श्रिती |
| प्रभुष्य | यमितवै इव | श्रियसे |
| प्रभर्तुं | यष्टवे | संमुदे |
| प्रमे | यातयाध्ये | समर्यराज्ये |
| प्रयक्षे | युजध्यै | संदृशे |
| प्रयै | युध्यै | सर्तवे |
| प्रवंतवे | युयुतुं | सर्तवै |
| प्रवृजे | योतवे | सहध्यै |
| प्रवोळ्हुं | योतवै | साधै |
| प्रशस्तये | योतोः | सूतवे |
| प्रष्टुं | रिषयध्यै | सोतुं |
| प्रसर्तवे | वंदध्यै | स्तवध्यै |
| भरध्यै | वर्तयध्यै | स्तवै |
| भर्तवे | वर्तयंतु | स्तोतवे |
| भियै | ववृधध्यै | स्यंदयध्यै |
| भुज्यै | वस्तवे | हंतवे |
| मंतवे | वहतुं | हंतवै |
| मंतवै | वहध्यै | हंतोः |
| मंदध्यै | वाजयध्यै | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अपचेतयाता | नवधा | विसृपः |
| अपजित्य | निर्हन्तोः | वीत्यै |
| अपतूला | नेतोः | सꣳस्थातोः |
| अपनुद्य | पतितुम् | संतृत्यै |
| अपहत्यै | पर्याप्तुम् | सन्नत्यै |
| उक्षे | प्रजात्यै | समष्ट्यै |
| उदिति | प्रवदितो | समिष्ट्यै |
| उपधीयान्तै | प्रवोढुम् | समृध्यै |
| उपहित्यै | प्राप्तुम् | संभवितुम् |
| खनितुम् | मꣳसतै | संमर्दितोः |
| तनयित्नोः | रूपसमृध्यै | सूतुम् |
| तमितोः | विजनितोः | स्वादोः |
| दुरिष्ट्यै | विजित्यै | हिꣳसितोः |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अनुप्रवोढुम् | अपायातै | ऐतोः |
| अपभर्तवै | एतवे | कर्त्वे |
| गन्तवे | परितंसयध्यै | वस्तोः |
| जीवसे | परिधातवै | वातवे |
| जीवातवे | परीख्यातै | वोढवे |
| जीवातुम् | पर्येतवे | संयतोः |
| जीवितवै | पातवे | संगच्छै |
| ददातै | पिबध्यै | सर्तवै |
| दातुम् | प्रैयै | सवितवे |
| दृशये | प्रवन्तवे | सुगातवे |
| दृशे | मन्दध्यै | सूतवै |
| द्रवित्नुम् | मातवै | सूतुम् |
| द्रष्टुम् | यजध्यै | स्तरीतवे |
| नयासै | यन्तवे | [illegible] |
| निकर्तुम् | याचितुम् | हन्तवे |
| पक्तवे | यातवे | हन्तवै |
| परादै | वन्दध्यै | [illegible] |
| | | हेतोः |

## ल्यबंत अव्ययें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अतिदीव्य | आयूय | पीत्वा |
| अतिहाय | आरभ्य | पीत्वी |
| अनुघुष्य | आवृत्य | पुनर्दाय |
| अनुदृश्य | उत्स्नाय | पुरुकृत्वा |
| अनुमृश्य | उपसद्य | पृत्वी |
| अनेद्य | उपस्थाय | प्रतिइत्य |
| अपगूर्य | उरुष्य | प्रतिगृह्य |
| अपीत्य | एत्य | प्रतिचक्ष्य |
| अभिक्रम्य | कर्णगृह्य | प्रास्य |
| अभिख्याय | कृत्वी | बाळहृत्वा |
| अभिगूर्य | कृत्वा | भक्त्वाय |
| अभिचक्ष्य | गत्वाय | भवीत्वा |
| अभिपद्य | गत्वी | भित्वा |
| अभिभूर्य | चरथाय | भूत्वा |
| अभिवृज्य | जग्ध्वाय | भूत्वी |
| अभिव्लग्य | जनित्वी | मोहयित्वा |
| अभीत्य | जुष्ट्वी | म्रक्षकृत्वा |
| अभ्युष्य | दत्वाय | युक्त्वा |
| अयुध्वी | दृष्ट्वाय | युक्त्वाय |
| अरंकृत्य | दृश्य | युध्वा |
| अरंगमाय | निचाय्य | वसुत्वा |
| अवगत्य | निरवस्य | वि[illegible]स्य |
| अवसाय | निरुध्य | विबाध्य |
| अवास्य | निसद्य | विभिद्य |
| आच्य | परिगत्य | विभृत्वा |
| आदाय | परिपत्य | विमाय |
| आदृत्य | परिदाय | विमुच्य |
| आसद्य | पादगृह्य | वियूय |

विष्ट्वी
विसह्य
विहृत्य
वृक्त्वी
वृत्वा
वृत्वी
वृष्ट्वी
श्रुत्वा
संरभ्य
संशाय
संहाय
संगत्य
संगृभ्य
संचक्ष्य
संमील्य
सृत्वा

[ तै. सं. ]

अतिक्रम्य
अतिहाय
अत्याक्रम्य
अतिनिधाय
अन्यत्र
अपक्रम्य
अपगूर्य
अपनिधाय
अपन्नगृह्य
अपहत्य
अप्रतिष्ठाप्य
अप्रहृत्य
अप्राप्य
अवनत्य
अवधाय
अवमाय
अवास्य
आदाय
आदाप्य
आनीय
आप्त्वा
आरभ्य
आलाद्याय
आश्राव्य
आहृत्य
इत्वा
उक्त्वा
उत्तरतः
उदादाय
उद्यत्य
उद्यत्यै
उद्यन्तुम्
उद्गृह्य
उद्वास्य
उन्नीय
उपधाय
उपनिधाय
उपहत्य
उपह्वय
उप कृत्य
उपास्य
उपेत्य
उपोत्थाय
उषित्वा
खात्वी
चित्वा
छित्वा
जग्ध्वा
तिरोधाय
तीर्त्वा
दीदाय
धित्वा
नमंकृत्य
निचाय्य
निधाय
निपद्य
निरूप्य
निर्भज्य
निर्याच्य
निह्वय
निवेद्य
निशीर्य
निषद्य
विष्क्रीय
नीत्वा
पक्त्वा
पत्वा
पराजित्य
पराभाव्य
परिक्रम्य
परीत्य
परेत्य
स्कभित्वी
हत्वा
हत्वाय
हत्वी
हित्वा
हित्वाय
हित्वी
पर्याणीय
पीत्वा
प्रणुद्य
प्रयुज्य
प्रविश्य
प्रवृह्य
प्रसद्य
प्रसृप्य
प्रस्कद्य
प्रहिताय
प्रहृत्य
प्रास्य
भित्वा
भूत्वा
युक्त्वाय
विक्रीय
विख्याय
विनिषद्य
विमुच्य
वियूय
व्युदूह्य
संरभ्य
संविद्य
संशाय
संस्पर्श्य
संख्याय
संगत्य
संगृह्य
संनिधाय
सन्युप्य
समुपह्वय
संपाद्य
सुत्वा
स्वाहाकृत्य
हुत्वा

[ अथर्ववेद ]

अतिस्थाय
अनिहृत्य
अनुगत्य
अनुमृश्य
अपमित्य
अपमृज्य
अपावृत्य
अभिजित्य
अभिधाय
अभिवृत्य
अभिसंगत्य
अभिसंभूय
अभ्युदेत्य
अवहाय
आकृत्य
आक्रम्य
आगत्य
आदाय
आधाय
आपदा
आरभ्य
आरुह्य
उत्थाप
उदित्य
उदुह्य
उद्धृत्य
उन्मज्य
उपतृप्य
उपदद्य
उपविश्य
उपश्रुत्य
उपसिच्य
ऋत्या
एत्य
कृत्वा
कत्वा
क्रीत्वा
गत्वा
गत्वाय
चायित्वा
चिकित्वा
जग्ध्वा
तीर्त्वा
तृढ्वा
दत्त्वा
ददत्वा
दृष्ट्वा
नमस्कृत्य
निगृह्य
निमज्य
निमिमाय
निष्कृत्य
निवृत्य
निसद्य
निःसृप्य
नीत्य
पक्त्वा
पराक्रम्य
परानीय
परादृश्य
परिकृत्य
परिधाय
परिविष्य
परेत्य
पीत्वा
पीत्वी
पुनर्दाय
पूत्वा
प्रतिगृह्य
प्रतीत्य
प्रत्यर्पयित्वा
प्रत्यादाय
प्रपद्य
प्रविश्य
प्रावृत्य
भूत्वा
मोहयित्वा
रूढ्वा
लब्ध्वा
विकृत्य
विगृह्य
विच्छिद्य
वितूर्य
विदाह्य
विधूय
विभाज्य
विभिद्य
विसूय
विहृत्य
विहाय
वृत्वा
वृष्ट्वा
श्रंशयित्वा
श्रुत्वा
संरभ्य
संलुप्य
संशाय
संसिच्य
संसीव्य
संगत्य
संगीर्य
संगृभ्य
संजित्य
संनिषद्य
समागृभाय
समादाय
समेत्य
संपाय
संभूय
संभृत्वा
सादयित्वा
सुत्वा
सुत्वा
स्तुत्वा
स्नात्वा
हत्वा
हत्वाय
हत्वी
हस्तगृह्य
हित्वा
हिंसित्वा

### वीप्सा अव्ययें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अन्यंअन्यं | प्रायेप्राये | वसुवसु |
| इद्इद् | भूयःभूयः | वामंवामं |
| उत्उत् | प्रक्षुप्रक्षु | विशःविशः |
| एकंएकं | मदेमदे | विशेविशे |
| तत्तत् | यत्रयत्र | वृक्षेवृक्षे |
| दैवंदैवं | यथायथा | शत्रोःशत्रोः |
| परुःपरुः | युगेयुगे | शर्धंशर्धं |
| पुनःपुनः | योगेयोगे | शश्वत्शश्वत् |
| पूर्वःपूर्वः | वयःवयः | शीर्ष्णःशीर्ष्णः |
| | | शुचाशुचा |

### [अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अंगेअंगे | नव्यंनव्यम् | सदःसदः |
| कामंकामम् | पदेपदे | सप्तसप्त |
| दिवेदिवे | परःपरः | सायम्सायम् |
| दिशःदिशः | प्रातःप्रातः | सुतेसुते |
| यवियवि | यामन्यामन् | हवेहवे |
| नवःनवः | धःधः | |

### शब्दकरणें ( क्रियापदें ) [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अचष्ट | अशंशिषं | नानदत् |
| अनवब्रवः | आघोषते | निघोषयः |
| अपृच्छम् | आवदन् | ब्रवीमि |
| अफाणयत् | उवोच | भनति |
| अभिकनिक्रदत् | क्रंद | मसीय |
| आभिधित्सते | क्रोशंति | रण |
| अरणयत् | ख्यत् | रेभन्ति |
| अरदत् | घोषयः | रोरवीति |
| अरासत | चक्षते | वचस्यते |
| अरैक् | चक्षमीथाः | वदेम |
| अरोदयत् | दृध्मः | ववाच |
| अवाख्यत् | ध्वनयीत् | वावदीति |
| | | शिंक्ते |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्रन्दः | अस्तनयन् | इक्षे |
| अक्रोशन् | अह्वे | इज्यन्ते |
| अख्यत् | आक्रन्दयते | उच्यते |
| अरोदीत् | आवल्गते | उवाच |
| अवोचः | आहुत | क्रन् |

| | | |
|---|---|---|
| क्रन्द | भक्ष | वेदय |
| ख्यापयति | मिहे | व्याकरोत् |
| जल्गुलि | ररीध्वम् | व्याह |
| ध्वनयीत् | रराणः | शृणाति |
| नेषि | रासन् | समायच्छते |
| परावल्गते | रास्व | स्वरं |
| पराहे | वक्षि | हुवे |
| प्रवक्षामः | वद | ह्वयन्ते |
| ब्रवीतु | वावदतः | ह्वोष्यसि |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्रन्दयत् | उपब्रूते | रुदन् |
| अकंसत | उपवदति | रुदन्ति |
| अगायत | ऊचिमे | रुव |
| अच्छआवदामसि | क्रन्द | रोरवीति |
| आधिनिदध्मसि | क्रोशताम् | लपन्तु |
| अनादिष्टाम् | गिरामि | लापय |
| अस्तावि | नोनुमः | वल्गन्ति |
| आघोषते | पनयन्ति | वादिष्णु |
| आर्ध्व | ब्रवः | शिंक्ते |
| आनृचुः | ब्रूहि | संवदन्ति |
| आवदानि | भल | संगिरः |
| आशंसत् | भुनजामहै | संगृणामि |
| आह | मृड | सनिस्वनत् |
| आहुत | मृद्वं | समस्वरन् |
| आहुः | रराण | स्तनयति |
| ईडे | ररन्तु | स्तौति |
| उपऊचिरे | रासताम् | स्तोभन्तु |
| | | ह्वयस्व |

[1] गा था.—ऋग्वेदांत गातुप्रमाणेंच ह्याचा अर्थ 'गीत' 'कवन' असा आहे. तथापि एका ठिकाणीं ( १०. ८५, ६ ) मात्र त्याला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे, कारण तेथें हा शब्द नाराशंसी आणि रैभी ह्याबरोबर आला आहे. अथर्ववेदावरील भाष्यकार या प्रकारचीं कांहीं उदाहरणें दाखवितात ( २०, १२७ ). परंतु ओल्डेनबर्ग म्हणतो कीं ऋग्वेदाकडे पाहिल्यास हीं उदाहरणें चुकीचीं दिसतात. दुसरीकडे पुष्कळ ठिकाणीं गाथांचा उल्लेख आला आहे. आणि त्या छंदोबद्ध असतात असें ऐतरेय आरण्यकांत (२.३,६) म्हटलें असून तेथें ऋच्, कुम्ब्या आणि गाथा हे गतींचे प्रकार आहेत असें म्हटलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत ( ७. १८ ) ऋच् म्हणजे दैवी आणि गाथा म्हणजे मानुषी असा फरक दाखविला आहे ( येथें ओम् ही दैवी गाथा ( छंद ) व तथा ही मानुष [अंगीकारविषयक] गाथा होय असें सायण भाष्य आहे ). ब्राह्मणांमध्यें आणि सूत्रग्रंथांत गाथांचा जरी धार्मिक

विधींशीं संबंध आढळतो तरी त्या ऋच्, यजुस् व साम यापासून भिन्न आहेत असें स्पष्ट म्हटलें आहे व त्या वैदिक नसून त्यांस मंत्र म्हणत नसत. याप्रमाणेंच यज्ञगाथा या शब्दाचा अर्थ केवळ यज्ञविषयक गीत असाच होत असे. शतपथ ब्राह्मणांत पुष्कळ गाथा आहेत. त्यांत फक्त प्रसिद्ध राजांच्या यज्ञांच्या गोष्टी साररूपानें सांगितल्या आहेत. आणि मैत्रायणी संहितेमध्यें (३.७६) लग्नाच्या वेळीं गाथा गात असत असें विधान आहे. कधीं कधीं गाथेला नाराशंसी असें म्हणत. म्हणजे ती कोणातरी मोठ्या दात्याची स्तुति असावी.

[२] छं द स्.—ऋग्वेदामध्यें जेथें जेथें हा शब्द आलेला आहे तेथें तेथें ह्या शब्दाचा अर्थ सूक्त असा आहे. छंदस् हा शब्द छंद्=संतुष्ट करणें ह्या शब्दापासून बनलेला आहे. व ह्याचा मूळचा अर्थ देवतेवर ज्याचा परिणाम होईल असा मोहक मंत्र असा आहे. ऋग्वेदांतील एका सूक्तांत त्याचप्रमाणें अथर्ववेदाच्या एका सूक्तांत हा शब्द अनेकवचनी "छंदांसि" असा आला आहे व त्याच्याच बरोबर ऋक्, सामन् व यजुस् हे शब्द आलेले आहेत. ह्या शब्दाचा मूळ अर्थच ऋग्वेदाच्या ह्या सूक्तांत अभिप्रेत आहे व हा अर्थ अथर्ववेदांतील अभिचारविषयक अर्थास अनुरूप असा आहे. वृत्तबद्ध स्तुति ह्या मूळच्या अर्थापासून पुढें ऋग्वेदांत वृत्तबद्ध गीत असा ह्याचा अर्थ झाला. वृत्तामध्यें गायत्री, त्रिष्टुभ् वगैरे सर्व वृत्तांचा ( छंदांसि ) उल्लेख आलेला आहे. अथर्ववेद व वाजसनेयि संहिता या ऋग्वेदोत्तर संहितांमध्यें तीन किंवा सात वृत्तांचा उल्लेख आलेला आहे व शतपथ ब्राह्मणांत ( ८. ३३, ६ ) आठ वृत्तांचा निर्देश आहे. ऋग्वेद प्रातिशाख्याचे वेळीं ह्या वृत्तांची विस्तरश; छाननी झालेली दिसते पण हेंहि लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं ह्या प्रातिशाख्याच्या पूर्वीं सुद्धां निरनिराळ्या वृत्तांमध्यें शब्द किती असावे ह्याबद्दल उल्लेख सांपडतात. शपतथ ब्राह्मणांत म्हटल्याप्रमाणें ह्या छंदस् शब्दाचा निश्चित अर्थ वैदिक संहिता असा झाला. हा शब्द अथर्ववेदाच्या एका सूक्तांत बृहच्छन्दस् अशा समासाच्या रूपांत येतो. हें सामासिक विशेषण एका घराला लावलें आहे व त्याचा अर्थ मोठें छप्पर असलेला असा असला पाहिजे. ब्लूमफील्डला हा शब्दार्थ कबूल आहे. पण व्हिटनेच्या मतें छंदस्च्या ऐवजी छादिस् हा शब्द अधिक चांगला दिसतो व तसा तो तेथें शोध घालतो.

[३] प द.—ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत हा शब्द आलेला असून ह्याचा अर्थ श्लोकाचा एक चरण असा आहे. शांखायन ब्राह्मण ग्रंथांत ऋचा, अर्धऋचा, पाद व वर्ण असा अनुक्रम असून कोठें कोठें पद याचा वाक्य असा अर्थ होतो.

[४] मं त्र कृ त.—हा शब्द ऋग्वेद व तदनंतरच्या ग्रंथातून आला आहे व त्याचा अर्थ मन्त्र करणारे कवि असा आहे. हें नाम नसून सर्वत्र विशेषण आहे.

[५] श क री.—अनेकवचनी. ह्याचा अर्थ शक्वरी मंत्र, किंवा शाक्वर साम ज्या मंत्रांत गायिलें जातें ते महानाम्नी मंत्र असा आहे. हा अर्थ ऋग्वेदांत आहेसा वाटतो व तो पुढील ग्रंथांत खात्रीनें आलेला आहे.

[६] श प थ.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यामध्यें याचा अर्थ शाप–न्याय कचेरींत घेण्याची शपथ असा नव्हे–असा आहे. पण अशा तऱ्हेची शपथ पूर्वीं घेतली जात असे हें दाखविणारा ऋग्वेदांत एक उल्लेख आहे व त्या उल्लेखांत एक वक्ता ( बहुतकरून हा वसिष्ठच ) असें म्हणतो कीं आपण जर चेटूक करणारे असलों तर आपणाला मरण प्राप्त होवो व आपण जर तसे नसलों तर आपल्या शत्रूवर मृत्यूचा घाला पडो ( ७.१४४, १५ ). ह्या शपथ शब्दाचा अर्थ अथर्ववेदांत काहीं ठिकाणीं आक्रोश व कांहीं ठिकाणीं शाप असा केलेला आढळतो. ऋग्वेदांमध्यें हा शब्द तसाच ठेवून दिलेला आहे. परंतु नैरुक्तामध्यें 'शापाभिशापौ' असें शपथ शब्दाचें अभिशापाहून पृथक्त्व दाखविलेलें आहे. अर्थात शपथ शब्दाचा अर्थ प्रतिज्ञा असा होतो. व व्यवहारांतहि शपथ शब्दाचा अर्थ 'प्रतिज्ञा, आण' असाच घेतला जातो.

[७] स स र्प री.—ऋग्वेदांतलि दोन ऋचांत हा शब्द आला आहे. मागाहूनचा अर्थ स्वीकारल्यास या शब्दावरून विश्वामित्रानें जमदग्नीपासून संपादन केलेलें वाणींतील नैपुण्य असा अर्थबोध होतो. हें भाषाचातुर्य काय होतें समजत नाहीं.

[८] प्र श्न.—याचा अर्थ विचारपूस, चर्चात्मक प्रश्न असा आहे. 'प्रश्नम् एति' या वाक्याचा अर्थ तो वादात्मक मुद्यासंबंधानें निर्णयात्मक निकाल मागतो' असा तैत्तिरीय संहितेंत ( २. ५, ८, ५ ) आहे व तसाच इतरत्रहि आहे. व यावरूनच ऐतरेय ब्राह्मणांत, प्रश्न म्हणजे 'निकाल'' ठाम मत' अशा अर्थानें हा शब्द आढळतो. यजुर्वेदांतील पुरुषमेघ प्रसंगाच्या बळींच्या यादींत 'प्रश्निन्' 'अभिप्रश्निन्' आणि प्रश्नविवाक हे शब्द सांपडतात. यावरून असें वाटतें कीं, दिवाणी दाव्यांतील तीन पक्ष वादी, प्रतिवादी आणि मध्यस्थ ( मध्यमशी) किंवा न्यायाधीश यांचा उल्लेख देण्याचा येथें उद्देश असावा.

[९] प्र ला प.—अथर्ववेदांत व ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द 'बडबडणें' या अर्थाच्या आणखी इतर शब्दाबरोबर सांपडतो. 'ऐतशप्रलाप' या समासांत हा शब्द अथर्ववेदाच्या काहीं वचनांचें नांव म्हणून आढळतो. मूल ग्रंथांत या नांवाला काहीं आधार नाहीं.

[१०] वे द.—अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथांत पवित्र ज्ञान या अर्थानें हा शब्द आला आहे. अनेकवचनी या शब्दाचा निश्चित अर्थ ऋक्, यजुः व साम असे तीन वेद असा आहे.

[१] वा च्.—मैत्रायणी संहितेंत हा शब्द आला आहे. वैदिक ग्रंथांत वाच् हा शब्द बराच महत्त्वाचा आहे. पण त्यांतला

बराच भाग काल्पनिक व पौराणिक दंतकथांसंबंधाचा आहे. शतपथ ब्राह्मणांत वाचेचे चार प्रकार सांगितलेले आहेत. मनुष्यांची, जनावरांची, पक्ष्यांची व सरपटणाऱ्या लहान प्राण्यांची वाचा असे ते चार प्रकार होत. तैत्तिरीय व मैत्रायणी संहिता ग्रंथांत वाचा उत्पन्न करण्याचें श्रेय इंद्राला दिलेलें आहे. तूणव, वीणा, दुंदुभिसारख्या वाद्यांच्या अवाजाचा उल्लेख आलेला आहे व एका संहितेंत रथाच्या कण्याच्या ध्वनीचाहि उल्लेख आला आहे. कौषीतकि ब्राह्मणांत असें लिहिलें आहे कीं, कुरुपंचाल व उत्तरेकडील देश येथें राहणाऱ्या लोकांची भाषा इतकी उत्तम होती कीं, इतर ठिकाणचे लोक तेथें भाषेचा अभ्यास करण्यास जात असत. उलटपक्षीं तेथल्या मूळच्या लोकांत बोलतानां ग्राम्यपणा येई तो टाळण्यात येत असे. वाचेच्या विभागणीचा एक प्रकार म्हणजे दैवी व मानुषी हा होय. त्याचें उदाहरण म्हणजे ओम् व तथा इत्यादि. ब्राह्मणाला हे दोन्ही प्रकार माहीत पाहिजेत. या दोन भाषेंतला फरक सायणाचार्य म्हणतात त्याप्रमाणें संस्कृत व अपभ्रष्ट भाषेंतला फरक न मानतां सूक्तांतील व कर्मपद्धतीमधील संस्कृत भाषा आणि नेहमीच्या प्रचारांतील भाषा यामधील फरक समजणें बरें. आर्य व ब्राह्मणाची भाषा याचा उल्लेख आलेला आहे त्यावरून अनार्य लोकांच्या भाषेच्या उलट संस्कृत भाषा असा अर्थ असावा. व्रात्य लोक स्वतः अदीक्षित असले तरी ते दीक्षित वाणी उच्चारीत व जें उच्चारण्यास सोपें असे त्यासहि दुरुक्त म्हणजे उच्चारण्यास कठिण असें म्हणत. याचा अर्थ अनार्य लोकांचा प्राकृत भाषा बोलण्याकडेच जास्त कल वहात होता.पण असा अर्थ स्वीकारतांना आपणास एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, शतपथ ब्राह्मणांत जिचा संबंध आलेला आहे ती भाषा बोलणारे व व्रात्य हे एकच असावेत.

[12] अथर्वाण.—तैत्तिरीय ब्राह्मणांत अंगिरस् शब्द अथर्ववेद दर्शविण्याकरितां योजितात. अथर्वांगिरस् हा सामासिक शब्दहि त्याच अर्थी योजितात.

[13] अथर्वांगिरस्.—ब्राह्मण ग्रंथांतील कित्येक उताऱ्यांत अथर्ववेदाचें हें समूहवाचक नांव योजिलें आहे. मूळ अथर्ववेदांतच हें नांव एकदां आलें आहे. परंतु सूत्रकालाच्या पूर्वी अथर्ववेद हें नांव अस्तित्वांत नव्हतें. हा समास अथर्ववेदांत जीं दोन तऱ्हेचीं सूक्तें आहेत त्यांचा द्योतक आहे असें ब्लूमफील्ड म्हणतो. पहिला भाग वेदांतील शांतिकर्मांकडे ( भेषजानि ) दिलेला आहे आणि दुसरा भाग वैऱ्यावर यातु ( जादू अथवा अभिचार ) वगैरे करितात त्याकडे योजिला आहे.ही विचारसरणी घोर आंगिरस् आणि भिषज् आथर्वण हीं जीं दोन ऋषींचीं नांवें येतात त्यांवरून आणि पंचविंशब्राह्मणांत आथर्वाणः आणि आथर्वणानि यांचा औषधींशीं जो संबंध आहे त्यावरून सयुक्तिक दिसतें. शिवाय भेषज ( उपाय ) हा शब्द अथर्ववेदांत खुद्द त्या वेदालाच लाविला आहे असें मॅकडोनेल म्हणतो पण असें वर्णन आढळत नसल्यामुळें हें निराधार आहे आणि शतपथांतील यातु( जादू ) या शब्दावरूनहि हाच अर्थबोध होतो. अथर्ववेदांतील या दोन तऱ्हेच्या सूक्तांचें कर्तृत्व ज्या दोन ऋषींच्या नांवावर मोडतें त्यांमध्यें स्पष्टपणें काय भेद होता हें समजत नाहीं. तै. ब्रा. १२.८,२ येथें अथर्वांगिरस असा सामान्य उल्लेख आहे. मागील वाक्यांतून ऋचः, यजूंषि अशीं मंत्रांनां अनुलक्षून सामान्यपणें नांवें आलीं आहेत. त्या अनुरोधानें अथर्वांगिरसः म्हणजे अथर्व किंवा अंगिरस या ऋषींनां दृष्ट झालेले मंत्र असा अर्थ सायणाचार्यांनीं केला आहे आणि तो बरोबर आहे. तैत्तिरीय आरण्यक व उपनिषद् यात असाच सामान्य उल्लेख आहे. बृहदारण्यकोपनिषदांत तीन ठिकाणीं अथर्वांगिरसः असा तैत्तिरीयांतील उल्लेखाप्रमाणेंच सामान्यपणें उल्लेख आहे. परंतु येथें विशेष असा आहे कीं, या उल्लेखापूर्वी तैत्तिरीयाप्रमाणें ऋचः, यजूंषि अशीं सामान्यपणें नावे न येतां ऋग्वेदोयजुर्वेदःसामवेदः असा वेदपदघटित उल्लेख आला आहे. यावरून बृहदारण्यकोपनिषदकालीं इतर वेदाप्रमाणें आथर्वण मंत्रसमूहाला अथर्ववेद असें नांव मिळालें नव्हतें हेंच अनुमान दृढ होतें. छांदोग्योपनिषद ३.४,१,२ मधील उल्लेख याच अनुमानास पुष्टि देतो. शांखायन श्रौतसूत्रावरून असें दिसतें कीं, अथर्ववेद व अंगिरसवेद असे दोन भेद असून पहिला वेद औषधप्रक्रिया ( भेषज् ) सांगणारा व दुसरा वेद जारणमारण वगैरे अभिचार-प्रयोग सांगणारा असावा.

[14] अनुव्याख्यान.—बृहदारण्यकोपनिषदामध्यें ही एक लेखनाची रीति आहे असा उल्लेख आहे. श्रीशंकराचार्य त्याचा अर्थ मंत्राचें स्पष्टीकरण असा करितात. ज्या अर्थी हा शब्द अनेकवचनांत असतांनां त्याचा अर्थ सूत्रांतील अर्थास अनुसरून असतो त्या अर्थी श्रीशंकराचार्यांचा अर्थ बरोबर दिसतो. सीग अन्वाख्यान याचा अर्थ पुरवणी असा करितो.

[15] अनुशासन.—हा शब्द शतपथांत अनेकवचनी आला असून मॅकडोनेल त्याचा अर्थ एक वाङ्मयाचा प्रकार असा करितो. सायण भाष्याप्रमाणें याचा अर्थ वेदांग असा आहे.

[16] अंतेवासिन्.—अन्तेवासिन् म्हणजे जवळ राहणारा. गुरूच्या घरीं जो ब्रह्मचारी राहतो त्याला हा शब्द योजितात. ब्राह्मणग्रन्थकालापूर्वी हा शब्द येत नाहीं. अन्तेवासिन्खेरीज दुसऱ्यापासून (शास्त्रोक्तशिष्यलक्षणरहितापासून ) विद्या गुप्त ठेवण्यांत जास्त खबरदारी घेण्यांत येई (म्हणजे त्याला विद्या सांगितली जात नसे).

[17] अन्वाख्यान.—याचा शब्दशः अर्थ पुरवणी असा होतो. शतपथांत हा शब्द तीन ठिकाणीं आला आहे. परंतु त्यांपैकीं दोहोंवरून हा अर्थ निघत नाहीं, तर त्या ठिकाणीं हा शब्द ग्रंथाचा उत्तरार्ध दर्शविण्याकरितां योजिला

आहे. परंतु तिसऱ्या ठिकाणीं मुख्य इतिहास (कथा)आणि हा शब्द यांच्या अर्थांत फरक दाखविला आहे. त्यावरून याचा अर्थ परिशिष्टकथा म्हणजे पुरवणी गोष्ट असा होतो.

[१८] आख्यान.—राजसूयाच्या वेळीं होत्याकडून जें शुनःशेपाचें आख्यान सांगितलें जातें त्याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत आहे. अश्वमेधांतील घोडा ज्या वेळेस पृथ्वीपर्यटन करण्यास मोकळा सोडीत त्या कालांतील गोष्टींच्या क्रमाला पारिप्लवम् असें म्हणत. ऐतरेय ब्राह्मणांत ज्यांनां दुसरीकडे व्याख्यान म्हणतात अशा सौपर्ण दंतकथा सांगणाऱ्यांनां व्याख्यानविद असें म्हटलें आहे. निरुक्तांत यास्काचार्यांनीं ऋग्वेदाचे जे ऐतिहासिक विवेचक आहेत त्यांच्या मतास उद्देशून तो शब्द योजिला आहे.

[१९] आख्यायिका.—वैदिक वाङ्मय आणि तैत्तिरीय आरण्यक यांत हा शब्द फक्त एकदांच आलेला दिसतो. तरी त्याचा अर्थ निश्चित करतां येत नाहीं.

[२०] आनहस्याः.—हा शब्द जेव्हां अनेकवचनांत असेल तेव्हां त्याचा अर्थ कामोत्तेजक पद्यें असा आहे. हा शब्द अथर्ववेदांतील कुन्तापसूक्ताच्या एका विभागाचें नांव आहे. हीं सूक्तें अश्लील आहेत.

[२१] उपनिषद.—ब्राह्मणग्रंथांत याचा अर्थ कोणच्या तरी शब्दाचा अथवा वाक्याचा गूढ अर्थ व कधीं कधीं यतीचा गूढ विचार असा केला आहे. परंतु बृहदारण्यकोपनिषदांत एका जातीचे ग्रंथ, या अर्थी अनेकवचनांत उपयोगांत आणिला आहे. हे ग्रंथ विषय व स्वरूप या दृष्टीनें उपनिषदांशीं समान असावेत. त्याचप्रमाणें तैत्तिरीय उपनिषदांतील अध्यायाच्या शेवटीं इत्युपनिषद् असे शब्द असतात. ऐतरेय आरण्यकाचा तिसरा भाग संहितोपनिषद् हा आहे आणि शांखायन आरण्यकांतहि हेंच नांव आढळतें. याचा मूळ अर्थ काय आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. मॅक्समुल्लर आणि त्यानंतरचे पंडित व्युत्पत्तीप्रमाणें त्या शब्दाचा अर्थ पहिल्यानें अध्ययनस्थान, त्यावरून पुढें गूढ तत्त्वें आणि नंतर गूढ तत्त्वांचा ग्रंथ असा अर्थ करितात. तथापि ओल्डेनबर्ग म्हणतो कीं, उपासनेला हा शब्द लावीत असत. डॉयसेन म्हणतो कीं, या शब्दाचा मूळ अर्थ गुप्तशब्द, नंतर गुप्तवाक्य आणि तदनंतर गुप्त अर्थ असा होत गेला. परंतु हा क्रम अशक्य आहे असें मॅकडोनेल म्हणतो. हॉपकिन्स म्हणतो कीं, उपनिषद म्हणजे पुरवणी ग्रंथ. परंतु हा अर्थ नेहमींचा (गूढ अर्थ असा) जो अर्थ आहे त्याच्याशीं विसंगत आहे.

[२२] ऋग्वेद.—ऋचांचा संग्रह. हें नांव पहिल्यानें ब्राह्मणांत आणि त्यानंतर पुष्कळवेळ आरण्यकें व उपनिषदें यांत आढळतें.

[२३] एकायन.—हा शब्द छांदोग्योपनिषदांत विचारार्ह विषय अशा अर्थाचा द्योतक आहे. सें. पी. कोशाप्रमाणें त्याचें भाषांतर एकीचें तत्त्व (एक अयन) एकेश्वरी मत असा, मॅक्समुल्लरचा अर्थ नीतिशास्त्र असा आणि मोनिअर विल्यम्सच्या कोशाप्रमाणें त्याचें भाषांतर व्यावहारिक ज्ञान असें आहे.

[२४] ऐतशप्रलाप.—अथर्ववेदांतील विसाव्या काण्डांत कुंताप नामक जो मंत्रभाग आहे त्यांतील विशिष्ट मंत्रांनां हें नांव आहे. याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत आहे. ऐतश नांवाच्या एका ऋषीनें आपल्या मुलापुढें हे मंत्र पठण केले. परंतु सर्व मंत्र पठण करण्यापूर्वीच त्याच्या मुलानें त्याच्या तोंडावर हात ठेवून मंत्र पठण करणें (ते मंत्र प्रलापरूप असल्यामुळें) बंद केलें. तेव्हां त्या ऐतशानें आपल्या मुलांनां तुम्ही पापी व्हाल असा शाप दिला.

[२५] ऐतिहासिक.—जे लोक वैदिक सूक्तांनां निव्वळ इतिहास आहे असें मानीत असत आणि त्याप्रमाणें त्यांचा अर्थ करीत असत त्यांनां उद्देशून हा शब्द योजिला आहे. त्यांचीं मतें नैरुक्तांच्या मताहून भिन्न आहेत अथवा विरुद्ध आहेत. सीज म्हणतो कीं, तींच मतें निरुक्तांत वैदानाः म्हणून उल्लेखिलेलीं आहेत, यावरून त्यांच्या ग्रंथास निदानाः असें म्हणत असें वाटतें.

[२६] काठक.—कृष्ण यजुर्वेदाच्या कठ शाखेच्या ग्रंथाचें हें नांव आहे असें यास्क याच्या निरुक्तांत आणि अनुपद सूत्रांत सांगितलें आहे. या नांवाचा संहितेचा कांहीं भाग श्राडर यानें प्रकाशित केला आहे.

[२७] कारीरदि.—जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत उद्गीथा (सामवेद गीत) वर विशिष्ट मत असलेल्या मनुष्यांचीं नांवें अशा अर्थानें हा शब्द आहे.

[२८] कुम्म्या अथवा कुम्म्या.—शतपथ ब्राह्मणांत भाषापद्धति किंवा स्वरूप दाखविण्याकरितां हा शब्द ऋच्, यजुस्, सामन् आणि गाथा या शब्दांच्या नंतर आला आहे. ऐतरेय आरण्यकांत ऋच् आणि गाथा यांच्याबरोबर मोजकें बोलण्याच्या पद्धतीपैकीं एक अशा अर्थानें लिहिलें आहे. शब्दाच्या बरोबर अर्थाविषयीं अज्ञानच आहे. वेबर म्हणतो कीं, याचा अर्थ थाबविणें असा आहे.

[२९] क्षत्रविद्या.—'अधिकारी वर्गाचें शास्त्र.' छांदोग्य उपनिषदांत हा शब्द आहे. याचा धनुर्वेद, धनुःशास्त्र असा अर्थ शंकराचार्य करितात आणि हा शक्य आहे.

[३०] खिल.—ऋग्वेदाच्या कांहीं सूक्तांस हें नांव सूत्रांत दिलेलें आढळतें. हा शब्द पुरवणी या अर्थी आहे.

[३१] चरकब्राह्मण.—या ग्रंथांतून सायणानें आपल्या ऋग्वेदावरील भाष्यांत उतारे घेतले आहेत.

[३२] छंदोग.—याचा अर्थ छंद गाणारा असा असून जे सामगायन करीत त्यांनां हा शब्द लावीत. कारण हे सामगायक सामवेदांत असलेल्या छंदार्चिकेंत सांगितलेल्या क्रमाप्रमाणें मंत्र गात असत. हा शब्द शतपथ ब्राह्मणांत फक्त एकदांच सांपडतो व सूत्रांत अनेकदां सांपडतो.

[३३] ज्योतिष.—ज्योतिष शास्त्र असा या शब्दाचा अर्थ

आहे. संहिता किंवा ब्राह्मण ग्रंथ यांमध्यें ज्योतिषावरील कोठें ग्रंथाचा उल्लेख नाहीं. वेदांगज्योतिष म्हणून जो ग्रंथ आहे त्यांत वेदांतील ज्योतिःशास्त्र आहे अशी कल्पना आहे. त्यावर वारंवार बरीच चर्चा झाली आहे. ह्या ग्रंथाचा काल अनिश्चितच आहे व ग्रंथांतील मजकूर व त्याचें एकंदर स्वरूप यावरून हा ग्रंथ अर्वाचीन असावा असें निःसंशय वाटतें.

[३४] ता प स.–उपनिषदाच्या पूर्वी यति या अर्थानें वैदिकवाङ्मयांत हा शब्द येत नाहीं. पंचविंश ब्राह्मणांत वर्णन केलेल्या सर्पसत्रांत होत्याचें काम करणाऱ्या ऋत्विजाचें दत्ततापस असें नांव आहे.

[३५] तै त्ति री य.—कृष्णयजुर्वेदाच्या शाखांपैकीं एक शाखेचें हें नांव आहे. पण त्या शाखेचा सूत्रकालापर्यंत उल्लेख आलेला नाहीं. या शाखेची एक संहिता, एक ब्राह्मण, एक आरण्यक व त्या आरण्यकाचा भाग एक उपनिषद् इतके ग्रंथ आहेत.

[३६] द श त यी.—निरुक्तामध्यें हा दहा मंडलांत विभागलेली ऋग्वेदाची संहिता असा याचा अर्थ होतो.

[३७] दा श त य.—'दहा मंडलांत विभागलेल्या ऋग्वेद संहितेचा' असें हें विशेषण निदान सूत्रांत अध्यायाचें विशेषण म्हणून आहे. कौषीतकी ब्राह्मण व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें या शब्दाचें स्त्रीलिंगी रूपहि आलेलें आहे.

[३८] दे व ज न वि द्या.—शतपथ ब्राम्हणांत व छांदोग्योपनिषदांत जीं शास्त्रें सांगतलीं आहेत त्यांपैकीं ही एक विद्या आहे.

[३९] दै व.—हा शब्द पुल्लिंगी छांदोग्योपनिषदामध्यें शास्त्रांच्या यादींत आलेला आहे. याचा अर्थ श्रीशंकराचार्य उत्पातज्ञान म्हणजे भविष्यत् गोष्टींचें ज्ञान असा करितात. सें. पी. कोशांत असें सुचविलें आहे कीं, हा शब्द विशेषणार्थी आला आहे व हें मत लिटल व बोथलिंक यांनीं आपल्या भाषांतरांत स्वीकारलें आहे. बृहदारण्यकोपनिषदांत पहिल्या दोन वंशामध्यें एक काल्पनिक अथर्वणाचें पैतृक नांव आहे.

[४०] न क्ष त्र वि द्या.—म्हणजे ज्योतिषशास्त्र. हा शब्द इतर शास्त्रांबरोबर छांदोग्योपनिषदामध्यें आलेला आहे.

[४१] ना चि के त.—नाचिकेतस् याशीं संबंध असलेलें. हें काठक उपनिषदामध्यें एका उपाख्यानाचें नांव आहे. या उपनिषदामध्यें व तैत्तिरीय उपनिषदामध्यें एका विशेष प्रकारच्या अग्नीस हें नांव दिलेलें आहे.

[४२] ना म.—यानें स्थानिक उल्लेख व्यक्त होतो. उदाहरणार्थ, कौशांबेय व गांग्य. पुष्कळदां पैतृक नांवच येत असतें. उदाहरणार्थ, भार्गव, मौद्गल किंवा दोन पैतृक नांवांचाहि उपयोग केलेला असतो. साधें नांवहि पैतृक नांव असतें. उदाहरणार्थ, त्रसदस्यु हें नांव घ्या. कांहीं थोड्या ठिकाणीं नवऱ्याच्या नांवावरून बायकोचें नांव बनलेलें असत. उदाहरणार्थ उशीनराणी, पुरुकुत्सानी, मुद्गलानी.

[४३] नि दा न—हें एका सूत्राचें नांव असून बृहद्देवतेमध्यें माल्लवी ब्राह्मणांतून त्यांत उतारा घेतलेला आहे म्हणून याचा उल्लेख आलेला आहे. हा उतारा कोणत्या हें हल्लींच्या सूत्रग्रंथांत सांपडत नाहीं.

[४४] नि रु क्त.—एखाद्या शब्दाचें किंवा वाक्याचें स्पष्टीकरण. हा शब्द छांदोग्योपनिषदामध्यें प्रथम आलेला आहे. पण उत्तरकालीन उपनिषदापूर्वी एखाद्या ग्रंथाचें नांव म्हणून हा शब्द आलेला नाहीं. तथापि यास्काचें निरुक्त बुद्धपूर्वकालीन असावें.

[४५] नि वि द धा न.—निविद असलेला. हा शब्द अनेक वेळां ब्राह्मण ग्रंथांत एखाद्या सूक्ताचें किंवा मंत्राचें नांव म्हणून आलेला आहे.

[४६] नि र्व च न.—तैत्तरीय आरण्यक व निरुक्त ह्यांमध्यें स्पष्टीकरण, विशेषतः व्युत्पत्तिविषयक स्पष्टीकरण, असा याचा अर्थ होतो.

[४७] नै दा न.—निरुक्तामध्यें एका विशिष्ट पंथाच्या वैदिक भाष्यकारांनां हा शब्द लावलेला आहे. रॉथच्या मतानें नैदान म्हणजे व्युत्पत्तिशास्त्रज्ञ होत. पण सीज ह्याचे मतानें हे नैदान म्हणजेच ऐतिहासिक होत. निरुक्तामध्यें नैदान हा शब्द वैदिक भाष्यकारांनां लावलेला नसून तो सर्वसामान्य अशा दृष्टीनें आलेला आहे. कारण निदान शब्दाची व्युत्पत्ति निदानमिति ग्रन्थः तद्विदो नैदानाः' अशी दिलेली आहे.

[४८] नै रु क्त.—निरुक्तामध्यें ह्याचा अर्थ शब्दाची खरी व्युत्पत्ति जाणून त्याचा अर्थ सांगणारा असा आहे. यास्काचें निरुक्त हा ह्या नैरुक्तांचा शिष्ट संमत ग्रंथ आहे व हा ग्रंथ पूर्वीच्या नैघंटुक नांवाच्या निरुक्तावर टीका आहे.

[४९] पं डि त.—हा शब्द उपनिषद् ग्रंथापासून पुढें प्रचारांत येऊं लागतो.

[५०] पा रि प्ल व.—हा शब्द आख्यान म्हणजे गोष्ट हिला लावलेला असून हें आख्यान अश्वमेधाचे वेळीं सांगावयाचें असतें व वर्षभर कांहीं ठराविक वेळीं सांगावयाचें असतें. हा शब्द शतपथ ब्राह्मण व सूत्र ग्रंथ ह्यांमध्यें आलेला आहे.

[५१] प रो व र्य वि द्.—निरुक्तामध्यें दंतकथा जाणणारे ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[५२] पा र्ष द्.—हा शब्द प्रथम निरुक्तांत आलेला असून त्याचा अर्थ वैयाकरणांच्या एका संप्रदायानें मान्य केलेला ग्रंथ असा आहे.

[५३] पि त्र्य.—छांदोग्योपनिषदामध्यें आलेल्या शास्त्रांच्या यादींत हा शब्द आलेला आहे. शंकराचार्यांनीं आपल्या टीकेंत म्हटल्याप्रमाणें पितरांचीं श्राद्धें वगैरे करून पूजा करावयाची त्याबद्दलचें शास्त्र असा ह्या शब्दाचा अर्थ होतो. ह्या यादींत पित्र्य ह्याच्या बरोबर हा शब्द आलेला आहे व सें. पी. ब. कोशांत पित्र्यराशि असा एक शब्द आलेला

आहे पण त्याचा निश्चित अर्थ काय हें समजत नाहीं.

५४ **पुराण.**—हा शब्द इतिहासपुराण ह्या द्वंद्व समासांत ब्राह्मणग्रंथापासून पुढील ग्रंथांत वारंवार आढळून येतो. हा कधीं कधीं एकटाच येतो पण द्वंद्वसमासांत असतांना जो त्याचा अर्थ असतो तोच एकटा शब्द आला असतांनां असतो. सायणाच्या मतानें पुराण म्हणजे विश्वाच्या मूळ स्थितीचें व ह्या जगाच्या उत्पत्तीसंबंधीं वर्णन करणारी कथा असा अर्थ होय व हा अर्थच बरोबर आहे. इतिहास व पुराण हीं निराळीं आहेत असें मानण्यास कांहीं आधार नाहीं

५५ **प्रतिप्रश्न.**—हा शब्द शतपथ ब्राह्मणांत आढळतो. तो प्रजापतीला लावलेला असून त्याचा अर्थ 'संशयाचा निर्णय लावणारा' असा आहे. हा मध्यस्थाला पारिभाषिक शब्द आहे.

५६ **प्रवचन.**—तोंडी शिकवण किंवा शिक्षण या अर्थानें हा शब्द शतपथ ब्राम्हणांत आणि तदनंतरच्या ग्रंथांत आला आहे.

५७ **प्रवल्हिका.**—म्हणजे 'कूट' हें नांव ऐतरेय ब्राम्हणांत अथर्ववेदाच्या कांहीं ऋचानां दिलें आहे.

५८ **प्रातरनुवाक.**—याचा सोमसवनप्रसंगीं प्रातःकाळीं म्हणावयाचीं सूक्तें असा ब्राम्हणांत उल्लेख आढळतो.

५९ **बहुवचन**—याचा व्याकरणांत 'अनेकवाचक' असा अर्थ आहे. तसाच निरुक्त आणि शतपथ ब्राह्मणांतहि आहे. त्याचप्रमाणें द्विवत् आणि बहुवत् यांचा निरुक्तातील अर्थ "द्विवचनी किंवा बहुवचनी" असा आहे.

६० **बह्वृच.**—याचा अर्थ ऋग्वेदाचा अनुयायी. हा शब्द ऐतरेय ब्राह्मण, शतपथ ब्राम्हण, पंचविंश ब्राम्हण आणि ऋग्वेदांतलि आरण्यक यांतून आढळतो.

६१ **ब्रम्हपुरोहित.**—हा शब्द काठक संहिता आणि शतपथ ब्राम्हण यांत आढळतो. त्या ठिकाणीं सेंटपीटसबर्ग कोशाप्रमाणें सर्व ब्राम्हण ज्याचे पुरोहित आहेत असा त्याचा अर्थ दिला आहे. परंतु हा अर्थ समाधानकारक नाहीं. बहुधा "ब्राम्हण पुरोहित असलेला" असा त्याचा अर्थ असावा. नाहींतर या शब्दाचा अर्थ नुसता "ब्राम्हणांस पूज्य मानणारा" असा असावा, व तो वेबरच्या म्हणण्याप्रमाणें 'क्षत्र' म्हणजे क्षत्रिय जातीचें विशेषण होय.

६२ **ब्रम्हबंधु.**—याचा तुच्छतादर्शक अर्थ म्हटला म्हणजे 'नुसता नांवाचा ब्राह्मण, ब्रम्हतेजहीन व याचक वृत्तीचा असा होतो. ह्या अर्थानें हा शब्द ऐतरेय ब्राह्मण व छांदोग्य उपनिषद् यांत येतो. शांखायन श्रौतसूत्र यांतील ब्रह्मबंधूचा अर्थ 'ब्राह्मणापसद' असा नसावा असें त्या प्रकरणावरून दिसतें. भाष्यांत त्याचा कांहीं उलगडा केलेला नाहीं.

६३ **ब्रह्मविद्या.**—'सर्वव्यापी परमेश्वराचें ज्ञान.' छांदोग्य उपनिषदांत दिलेल्या एका शास्त्राचें हें नांव आहे. याचा इतरत्रहि उल्लेख येतो.

६४ **ब्रह्मोद्य.**—याचा ब्राह्मण ग्रंथांत 'वेदान्तविषयक गूढ (कूट)'; 'वेदांतग्रंथि असा अर्थ होतो. व तें गूढ वैदिक कर्मांतील पुष्कळ प्रसंगीं फार महत्त्वाचें असतें. उदाहरणार्थ अश्वमेध प्रसंगीं; किंवा दशरात्र प्रसंगीं. कौषीतकी ब्राह्मणांत ब्रह्मवद्य हें रूप आढळतें. व तैत्तिरीय संहितेंत सांपडणाऱ्या ब्रम्हवाद्य शब्दाचाहि बहुधा तोच अर्थ असावा.

६५ **ब्रह्मोपनिषद्.**—"परमेश्वरासंबंधीं गुप्त मत" हें छांदोग्य उपनिषदांत आलेल्या एका वादाला दिलेलें नांव आहे.

६६ **ब्राह्मण.**—'धार्मिक यज्ञ कर्मांचें स्पष्टीकरण' हें एक प्रकारच्या ग्रंथांचें (पुस्तकाचें) नांव आहे. व ते ग्रंथ निरुक्त आणि तैत्तिरीय आरण्यक यांमध्यें उल्लेखलेले आहेत. नंतर सूत्रांत या ब्राह्मण शब्दाचा उल्लेख येतो. व त्यावरून हे ग्रंथ अस्तित्वांत होते असें उघड दिसतें.

६७ **भाल्लवि.**—पंचविंश ब्राम्हणांत आलेल्या एका शाखेचें हें नांव आहे. ह्या शाखेचा वेळोवेळीं आधार देण्यांत येतो.

६८ **भाषा.**—वैदिक भाषेच्या विरुद्ध नेहमींची प्रचारांतली भाषा या अर्थानें हा शब्द निरुक्त आणि पाणिनि यांत आला आहे.

६९ **मधुब्राह्मण.**—'मधाचा ब्राम्हण' शतपथ ब्राम्हणांत हें एका गूढ तत्त्वाचें नांव आलें आहे.

७० **महासूक्त.**—(पुल्लिंगी बहुवचनी) ऋग्वेदाच्या १०.व्या मंडळाच्या कांहीं सूक्तांचे कर्ते. हा शब्द ऐतरेय आरण्यक आणि सूत्रें यांत आला आहे.

७१ **मान्थाल.**—तैत्तिरीय ब्राम्हणांत हें एक नांव आलें आहे. याचा अर्थ निश्चित नाहीं (सायणमतानें डोळ्यापुढें दिसणारे अणुरेणु कण अथवा काजवे असा अर्थ असावा.)

७२ **यजुर्वेद.**—याज्ञिक मंत्राचा वेद, याचा ब्राम्हणांत आणि उपनिषदांत उल्लेख आलेला आहे.

७३ **यज्ञगाथा.**—एखाद्या यज्ञाविषयीं विधिबोधक श्लोक अथवा एखाद्या यज्ञप्रसंगावर रचलेले श्लोक असा अर्थ आहे.

७४ **रैभी.**—हा शब्द स्त्रीलिंगी व अनेकवचनी असून याचा उल्लेख ऋग्वेद व तैत्तिरीय संहितेमध्यें गाथा व नाराशंसी ह्यांचेबरोबर वाङ्मयाचा प्रकार म्हणून आलेला आहे. ब्राम्हण ग्रंथांत अथर्ववेदांतलि कांहीं सूक्तें रैभी संज्ञक आहेत असें म्हटलें आहे. पण ऋग्वेदांत व तैत्तरीय संहितेतहि रैभीसंज्ञक सूक्तें आहेत असें मानणें जरा संशयास्पद आहे.

७५ **वाकोवाक्य.**—ब्राम्हण ग्रंथांत वैदिक संहितेमधल्या कांहीं भागास हें नांव दिलेलें आहे. त्याचा मूळचा अर्थ दोन माणसामधील संवाद असा आहे. एके ठिकाणीं ब्रम्होद्य त्याला संवाद म्हटलेलें आहे. बहुतकरून सर्वच ठिकाणीं ब्रह्मोद्याचा हा अर्थ होतो. गेल्डनेरचें मत निराळें आहे. त्याच्यामतें वाकोवाक्यामध्यें इतिहास-पुराणाचा मुख्य भाग म्हणजे वृत्तांत वर्णनपरभागाच्या उलट संवादपर किंवा नाट्यपर भाग असा अर्थ अभिप्रेत आहे.

७६ **वेदांग.**—ऋग्वेदाच्या अभ्यासानंतर मागाहून ज्यांचा

अभ्यास करावयाचा असतो त्या ग्रंथांस वेदांग हें नांव आहे. हा शब्द निरुक्त व ऋग्वेद प्रातिशाख्य ह्यांमध्यें प्रथम आलेला आहे.

[७७] व्या ख्या न.—शतपथ ब्राम्हणांत एके ठिकाणीं ह्याचा अर्थ केवळ गोष्ट असू शकते. उदाहरणार्थ कद्रु व सुपर्णी ह्यांच्या मधील वादाची गोष्ट. दुसऱ्या ठिकाणीं ह्या शब्दाचा अर्थ नुसती टीका असा आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्यें ह्या शब्दाचा अनेकवचनीं उपयोग आलेला असून त्याचा अर्थ वाङ्मयाचा एक प्रकार म्हणजे टीका ( अनेववचन ) असा आहे. तरी पण व्याख्यानाचा अनुव्याख्यानाशीं काय संबंध आहे हें समजणें शक्य नाहीं. सीजच्या मतें व्याख्यानें हीं अनुव्याख्यानें ह्याप्रमाणेंच गोष्टींचे प्रकार असावेत.

[७८] श्लो क.—हा शब्द अनेकवचनीं आलेला असून बृहदारण्यकोपनिषदांत वाङ्मयाचे प्रकार म्हणून दिलेल्या यादींत सूत्रांच्या आगोदर व उपनिषदानंतर याचा उल्लेख आलेला आहे. तैत्तिरीय उपनिषदामध्यें श्लोककृत् हा शब्द आलेला आहे. हा श्लोककृत म्हणजे मॅक्समुल्लर म्हणतो त्याप्रमाणें कवी होय. रॉथ सेंटपिटर्सबर्ग कोशांत म्हणतो त्याप्रमाणें कवी मोठ्यानें ओरडणारा असा ह्याचा अर्थ होत नाहीं. खरा अर्थ काय हें सांगणें कठिणच आहे. सामान्यतः श्लोक किंवा कडवीं असा ह्याचा अर्थ असावा. ह्या श्लोकांचे कांहीं प्रकार ब्राह्मण ग्रंथांत उपलब्ध आहेत व त्यांनां श्लोक ही संज्ञा आहे.

[७९] स र्प वि द्या.—विद्येच्या ज्या शाखा आहेत त्यांपैकीं एक म्हणून शतपथ ब्राम्हणांत ही उल्लेखिली आहे. ह्या विद्येचा कांहीं तरी एखादा ग्रंथ असावा. कारण ह्या विद्येच्या एक पर्वाचा अभ्यास केल्याबद्दल उल्लेख आलेला आहे असें मॅकडोनेल म्हणतो. परंतु स्थलाचा उल्लेख करीत नाहीं. गोपथ ब्राम्हणांत सर्पवेद असा शब्द आलेला आहे.

[८०] सा म वे द.—गानपद्धति व मोठ्यानें म्हणावयाच्या ऋचांचा जो समूह त्याला हें नांव ब्राम्हणग्रंथांत दिलेलं आहे. साम शब्दाचा ऋग्वेदामध्यें वारंवार उल्लेख आलेला आहे व ऋक्, यजुस् व सामन् ह्या त्रितयाचा उल्लेख अथर्ववेदापासून पुढील ग्रंथांत वारंवार आलेला आहे व ह्या संहिताग्रंथांत देखील साम याचा उल्लेख आहे.

[८१] सौ म्य.—उपनिषदामध्यें ( सोम्य असा दुसरा पाठ ) हें प्रेमानें हांक मारावयाचें नांव आहे.

[८२] स्व र.—उपनिषदामध्यें स्वरोच्चार असा याचा अर्थ आहे. ह्या स्वरांचीं घोषवंत् व बलवंत अशीं वर्णनें आहेत. मूक व्यंजनाला शब्द स्पर्श असा आहे व ऊष्मन् म्हणजे श, ष वगैरे. उष्मवर्ण व स्वर हे शब्द ऐतरेय व शांखायन आरण्यक ह्यांमध्यें आलेले आहेत. अर्ध स्वरांचा उल्लेख अंतस्थ किंवा अक्षर असा त्याच ग्रंथांत आलेला आहे. ऐतरेय आरण्यकांत दुसरी जी विभागणी आली आहे ती घोष, ऊष्मन् व व्यंजन अशी आहे. त्याच आरण्यकांत घोष ह्या शब्दाचा इतर ठिकाणीं अर्थ वर्ण असा सामान्यपणें आहे. तैत्तिरीय उपनिषदामध्यें मात्रा, बल व वर्ण ह्यांचा उल्लेख आलेला आहे. व हीं तिन्ही ओम् ( अ+उ+म् ) ह्या शब्दांत सांपडतात असें इतरत्र म्हटलेलें आढळतें. ऐतरेय आरण्यकांत व शांखायन आरण्यकांत ऋग्वेद संहितेमधलीं ‘ प्रतण्ण, निर्भुज व उभयम् अंतरेण ’ हीं तीन रूपें ( ह्यांचा अर्थ ऋग्वेदांतील संहिता, पद व क्रम पाठ असा आहे ) मान्य केलेलीं आहेत. त्याच ग्रंथांत मूर्धन्य व दंत्यनकार आणि सकार ह्यामधील फरक महत्वाचा आहे असें म्हटलें आहे व त्यांत मांडूकेयाच्या पाठ म्हणण्याच्या पद्धतीचा उल्लेख आहे. शिवाय संधिनियमांचाहि विचार त्यांत आलेला आहे. निरनिराळ्या संहिताग्रंथातल्या प्रातिशाख्यामध्यें व्याकरणाच्या परिभाषेची वाढ झालेली आहे. यास्काच्या निरुक्तामध्यें व्याकरण विषयक माहिती बरीच उपलब्ध आहे. शतपथ ब्राह्मणांत लिंगभेदाचें विवरण आहे व पंचविंश ब्राह्मणांत सामपाठांतला शब्दविचार आलेला आहे.

[८३] स्वा ध्या य.—ब्राम्हण ग्रंथांत वैदिक संहितांचा अभ्यास किंवा पुनरावृत्ति करणें असा अर्थ आहे. सूत्र ग्रंथांत ह्या स्वाध्यायाचे सविस्तर नियम दिलेले आहेत.

[८४] हा रि द्र वि क.—याचा निरुक्तांत उल्लेखिलेल्या एका हारि नामक ग्रंथकाराच्या ग्रंथाचें हें नांव आहे.

## पु ण्य, पा प व प्र श स्य

### पापनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंहति | त्यज | रिप्र |
| आपस् | पाप | वृजिन |
| एनस् | रपस् | शपथ्य |

### प्रशस्यनामें [ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अनभिशस्त | दुवस् | श्रवस् |
| अनवद्या | नमस्य | श्रवस्या |
| अनेद्या | पाक | श्रवस्यु |
| अनेमन् | पुरुप्रशस्त | श्रुत्कर्ण |
| अभिश्राव | प्रशस्त | श्रुत्य |
| अरेणु | मन्यमान | श्लोक |
| अर्च | यात्श्रेष्ठ | संराज |
| अर्चत्री | येष्ठ | सपर्या |
| अर्चिन् | वन्दनश्रुत् | सपर्यु |
| अवस् | वयुन | साधु |
| अश्न | वरसी | सुकीर्ति |
| असेमन् | वरिवस्या | सुकृत |
| आर्चन् | वरेण्य | सुनीथ |
| उक्थ्य | वाम | स्वयश |
| कीर्ति | वृद्धश्रवस् | |
| कीर्तेन्य | शेवृध | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| कीर्ति | प्रथस् | श्रवस् |
| | | श्लोक |

## गुण

### भाववाचक नामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अनागास्त्व | दूत्य | व्यच ( विस्तृतत्व) |
| अनेहस् | देवत्व | शत्रुत्व |
| अमृतत्व | नम्रता | सखित्व |
| असुरत्व | पतित्व | सख्य |
| आतिथ्य | पापत्व | सधनित्व |
| इषितत्वता | पुरुषता | साख्य |
| कवित्व | पूर्भिद्य | सुदिनत्व |
| गर्भत्व | पौंस्य | सुप्रजास्त्व |
| गोपयत्य | बंधुता | सुभगत्व |
| गोपीथ्य | भव्य | सुशेव्य |
| चारुत्व | भूना | सौकृत्य |
| जनित्व | भोज्य | सौभग |
| जन्त्व | भ्रातृत्व | सौभगत्व |
| जास्पत्य | भ्रात्र | सौभाग्य |
| जामित्व | मघवत्व | सौमनस् |
| तरणित्व | मित्र्य | सौश्रवस् |
| तरुता | मुष्टिहत्य | स्वराज्य |
| दीनता | रक्षोहत्य | स्वसृत्य |
| दीर्घायुत्व | वसुता | स्वाङ्गान |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अजत्व | देवत्व | यवत्व |
| अध्वरत्व | निर्बाधत्व | वामभृत्व |
| अमावास्यत्व | निर्वरुणत्व | वैश्वदेवत्व |
| अर्कत्व | परत्व | शंत्व |
| अश्वत्व | पर्णत्व | संयत्व |
| आग्रयणत्व | पुरुषत्वता | संयानित्व |
| आर्तत्व | पृथिवित्व | सतनुत्व |
| उपशयत्व | पृश्नित्व | सत्त्व |
| औद्ग्रहणत्व | प्रक्षत्व | सदेवत्व |
| कोशत्व | बन्धुता | सयोनित्व |
| छन्दस्त्व | महित्वन् | सर्वौषधत्व |
| जयत्व | महेन्द्रत्व | सवीर्यत्व |
| त्रिधातुत्व | मित्रत्व | सशुक्रत्व |
| दधित्व | मिथुनत्व | सुप्रजास्त्व |
| दीर्घायुत्व | यमत्व | सेन्द्रत्व |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| खालत्य | नृपाय्य | सात्मत्व |
| गर्भत्व | पापत्व | सामनस्य |
| जनित्व | पारुष्य | सुजातता |
| जास्पत्य | पालित्य | सौप्रजास्त्व |
| ज्यैष्ठ्य | पित्र्य | सौभगत्व |
| दीर्घायुत्व | प्रजामृतत्व | सौभाग्य |
| देवत्व | श्रैष्ठ्य | |
| द्विता | संपातिता | |

### मानवविशेषणें [ ऋग्वेद ]

अंहोयुत्र ( पापरहित )
अकवि [ अक्रान्तदृश् ]
अक्ष्णवत् [ दृष्टयुपेत ]
अघोरचक्षुस्
अचेतस्
अजोष्य [असेव्य]
अदेवयु
अनक्ष [दर्शनहीन]
अनवद्य [ स्तुत्य ]
अनबह्र
अनाकृत [ अप्रतिहतवक्ता ]
अनातुर [ अरोग]
अनापि[बंधुवर्जित]
अनुधूपित
अनुव्रत
अनूर्ध्वभासस् [ अग्निरहित ]
अप्रचेतस् [ अप्रकृष्टचेतोयस्य ]
अप्रायु [अप्रमाद]
अमातुर [ सोमाभिषवमनुकुर्वन् ]
अरिष्टवीर
अविक्षित [पूर्णआयुस् ]
अविधवा [ जीवद्भर्तृका ]
अशिव :[ अशोभन ]

अस्मेरा [ दर्परहिता स्त्री )
अहीशु
आदेव [ यजनकर्ता ]
आभूषती
इध्मभृति
इन्द्रजूत
इन्द्रत्वोत
इषस्तुत
इष्कर [ निवारक ]
इळावत्
उपमन्यु
उपसद्वस् [ प्राप्त ]
ऊर्जव्य
ऋणयुत्
ऋतवन् [यज्ञयुक्त]
ऋतप
कण्वतम
कुलप [ वंशवर्धन ]
क्षुमत् [ प्रसिद्ध ]
जिगीवत् [जिगीषु]
जीवपुत्र
तकवान् ( अन्ध)
तष्यावत्
तितिर्वस् ( शत्रुतारक )
तुतुर्वाणि ( त्वरमाण ]
तुविब्रह्मण
तुष्टुवस् ( स्तुतिपाठक)
दभ्रचेतस् ( अल्पबुद्धि )

दशरथ (दशसंख्याक रथोपेत )
दशाशिप्र
द्विपाद
धियाजुर
पद्वती (पाय असलेली स्त्री )
पस्त्यावत्
पाक( प्रक्षप्रज्ञ
पाकशंस
पाप
पापिन्
पायु ( रक्षक )
पुरुषत्वत्
पुलुकाम (पुरुकाम, बहुकाम )
पूर्वभाज्
प्रऊहळ
प्रकलविद्
प्रातिच्यवीयसी
बधिर
मन्दनायत्
भुरमाण
भूरिस्थात्रा
भोज
मनुजात
मनुवत्
मनुष्वत्
मन्युषाविन्
मर्त्य
महामहिव्रत॰
महिवृध्

मूर
मेध्य
यज्ञकाम
यशस्तर
रक्षित्र
रजतू
वग्वन् (स्तुत्य)
वध्रिवाच्
वनर्गु
वरिवस्कृत्
वरुणध्रुति
वरुणशेषस्
वश
वसिष्ठवत्
विकस्त
विजोष
वित्तजानि
विप्रुत
विभीषण
विशिशिप्र (विगतहनु)
विश्वचर्षणि
विहुत्वती (यशस्वती)
वीरवत्
वीरशुष्मन्
वृषदञ्जि (अध्वर्यु)
वेश (निकटवर्ति)
श्रोण (पंगु)
सचस्यमान (सपक्षमान)
सत्यमंत्र
सत्यवाच् (ऋषि)
सधवीर
सनाजु (चिरकाल नियोगिनी)
समानदक्ष
सहप्रभ (ऋषि)
सहच्छंदस्
सहस्तोम (स्तोमसहित ऋषयः)
सहस्रपाथस् (बहुवन्न)
सहस्रभर (धनप्रापक अपत्य)
सुकृत
सुकृत्वन्
सुक्रतु
सुखी
सुगभस्ति
सुजात
सुदिव्
सुदीति
सुदेव
सुद्युत्
सुद्युमन्
सुद्योत्मा
सुद्योत्मन्
सुधन्वन्
सुधित
सुधृष्टम
सुध्य
सुनिर्मथा
स्तोमतष्ट
स्तोत्रकृत्
स्तोमवाहस्
स्नीहिती (वधकारिणी)
स्मद्दिष्टी
स्वपस्तम (शोभनकर्मा)
हरयाण
हिरिश्मश्रु

[ तै. सं. ]

अपगल्भ (सभेत मान खाली घालून बसणारा)
अपमारी (दुर्मरणयुक्त माणूस)
अब्राह्मणोक्त (ब्राह्मणाच्या आज्ञेशिवाय यज्ञ करणारा)
अभिशस्त (मिथ्यापवाद युक्त)
अयजमान (यज्ञ नकरणारा)
अयज्वन् (यागरहित मनुष्य)
अलूक्ष (निर्लोभी)
अश्रद्दधान
उब्दन्धुक (मांस खाऊन मरणारा)
उद्धत
उपध्वस्त (संकीर्ण वर्ण)
ऊर्ध्वबाहु
काण (काणा मनुष्य)
क्लीब (नपुंसक)
खर्व (खुजा)
खलित (टकल्या)
गृहिन्
ग्राम्यवादिन्
जनता
त्वत्पुरोहित
दुश्चक्षस् (पापदृष्टि पुरुष)
दुश्चर्मन् (कुष्टरोगी)
धीर (धैर्यशाली)
निरिन्द्रिय
पदवी (विद्वच्छ्रेष्ठ)
पापीयस्
पिशङ्गरूप
पुरोध्
प्रावाहणि
बलि (कर्जबाजारी माणसाचें विशेषण)
बहिष्प्राण
ब्रह्मचारिवासिन् (व्रतस्थ)
ब्रह्मवादिन्
भागदुघ
भारभृत् (भारवाहक)
भ्रूणहन्
मनुष्यविश
महानिरष्ट (पीडित वृषण)
मारुक (मरणशील)
पायावर (प्रयाणशील)
वयोध (दीर्घजीवि)
वरुणग्रस्त (जलोदरग्रस्त)
वाजपति
शीर्षक्तिमत्
श्यावदत् (वाईट दांतांचा)
श्रुष्टी (सत्यवादी)
सत्यराधस् (यज्ञसाधक)
स्वयंपाप
हरस्विन् (तेजस्वी)
हृतिसुखिन्

[ अथर्ववेद ]

अङ्कुर
अक्षण्वत्
अक्षद्रुग्ध
अप्रिय
अघरुद्र
अजग्धपाप्मन्
अतिजीव
अदब्धचक्षुस्
अदब्धासु
अनामित्र
अनमीवा (रोगरहिता स्त्री)
अनवग्लायत्
अनावयस् [अभोक्ता]
अनिभृष्ट [पीडारहित]
अनीश्वर
अनृतदेव
अप्रचेतस्
अभिदासत्
अरिष्टगु
अश्वयत्
अश्ववत्
आतुर
आयुष्मान्
आवत्
इन्द्रमेदिन् (राजा)
इद्धाग्नि
ऋतचेतस्
ऋतसात
कुनाखिन्
कृतागस्
कृतवीर्य
गमिष्ठ
चक्षुष्
जरदष्टि
जाल्म(असमीक्ष्य)
तिमान् [कारी]
जेष्यत्(ज्ञाता)
तनूज
तपस्वत्
तायादर
दमयत्
दीयत
दुर्हार्द
धर्मधृत
धीर
नवशक्ति
नृचक्षस्
नृसह्य(सहनशील)
पाप्मन्
प्रजननवत्
प्राजापत्य ब्रह्मज्य
भद्रपाप
भूतकृत्
मनीषिन्
मनुजात
मन्युमत्
मर्त
मर्य
मित्रवर्धन
मित्रिन्
मुषित
रक्षत्
रथजूति
रातहव्य
वध्य
वरेण्यक्रतु
वर्चस्विन्
वसुजात
विकर्ण
वितताध्वर
विपरु (सर्पदष्टमनुष्य)
विश्वाषाद्
व्राज (भ्राज)
शांकुर
शाशदान
शुद्धहस्त
शुष्मवत्तर
शूरपुत्रा (अदिति)
शेप्यावत्
श्यावदत्
श्रोमत्
संशित
सत्यधर्मन्
सत्यवान्
सधमाद्य
सप्तमातर
सर्ववेदस्
सर्वहायस्
सहस्रायु

| | | |
|---|---|---|
| सहस्रनाथ | सुमनस्क | हविष्मत् |
| सुपुत्रा | सुहार्द | हृदयश्री |
| सुमनस् | हर्षमाण | हृषित |

[ वा. सं. ]

दुर्भ ( दुर्दभ )

[ संहितेतर. ]

| | | |
|---|---|---|
| मंजिष्ठा | महाशाल | श्रोत्रिय |
| महाब्राह्मण | | |

**रूपनामें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अप्रस् | ताम्र | मरुत् |
| अप्सस् | निर्णिज् | रूप |
| अप्सु | पिश् | वपुस् |
| अमति | पिष्ट | वप्सस् |
| अरुष | पेशन | वीर्त्र |
| अर्जुन | पेशस् | वर्पस् |
| अहृतप्सु | प्सरस् | वेपस् |
| कृशन | प्सु | शिल्प |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अप्सस् | रूप | विप |
| पेशस् | वीत्र | सुपेशस् |

**वर्ण ( रंग ) वाचक** [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अरुण | नील | श्येत |
| असित | पलिक्री | श्वितान |
| आरुणी[अरुणवर्णा] | पिंगा | श्वेत |
| उग्र | पिशंग | सित |
| एनी | पृषत् | सुवर्ण |
| कृष्णा | वर्ण | हरि |
| चन्द्रवर्ण | शबल | हरित् |
| चित्र | शुभ्र | हरिव्रत ( पिंगलवर्ण ) |
| त्र्यरुण ( त्रिवर्णगो ) | शोण | |

[ तै. सं ]

| | | |
|---|---|---|
| अरुण | पाक्रवर्ण | शुक्ल |
| अरुणैत | पिंगल | शुभ्र |
| असित | पिशंग | शोण |
| असितवर्णा | पीत | श्याम |
| एत | पृश्नि | श्यामशबल |
| कमल | पृषत् | श्याव |
| कृष्ण | बभ्रि | श्येत |
| गौर | बभ्रु | श्येती |
| धूम्ररोहित | बलक्ष | श्वेत |
| धृषद्वर्ण | यकृत् | सारंग |
| नकुल | रोहित | सित |
| नील | विलोहित | हरित |
| पाकल | शबल | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अन्यवर्ण | पृषत् | श्याम |
| अरुण | प्रसिति | श्वेत |
| अर्जुन (शुभ्र) | बभ्र | सिब |
| कर्की (रंग) | बभ्रु | हरित |
| कृष्ण | लोहित | हरिम |
| पटर (पिवळा) | वर्ण | हिरण्यय |
| पिंगा | शिभ्र (श्वेत वर्ण) | हिरण्यवर्ण |
| पिशंग | शोणा | |

**संबंधदर्शक** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अश्रित | पूर्व्य | संयुज |
| उभयाविन् | मेदिन् (स्निग्ध) | संजन्य |
| घोरचक्षस् | यंत्र (संबंध) | संमिश्ल |
| जन्मन् | युवाकु | सयुज |
| त्वदक | योग | सरूप |
| त्वावत् | रद्ध | सवृध |
| द्विबंधु | रंधि | सम्यच् |
| निस्पृश् | वपुष्य | सुप्रथित |

**सौंदर्यदर्शक** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अनभिम्लातवर्ण | रामी ( रात्रि ) | सुयाशुतर |
| अप्रराज | रुशत्पशु | सुयुक् |
| कोम्या | रुशद्गवि | सुरण |
| चारु | रुशद्वत्स | सुरत्न |
| चारुतम, त्विषिमत् | रूप, वपुष्टर | सुरथ, सुरभि |
| त्वेषसंदृक् | वल्गु | सुरश्मि |
| दर्शतश्री | विराजत् | सुराम |
| दर्श्य | विश्वचंद्र | सुरूप |
| दिदृक्षेण्य | विश्ववार | सुरूपकृत्नु |
| दिदृक्षेय | वेना (सुंदर स्त्री) | सुरेक्ण |
| दीव (रमणस्थान) | शुक्रवर्चस् | सुलाभिक |
| दृशाति | शुक्रवर्ण | सुवरत्र |
| दृशीक | शुभान | सुवीर |
| दृशेन्य | शुम्भन् | सुवेनी |
| दृश्य | शोभमान | सुशिप्र |
| भद्रजानि | शोभिष्ठ | सुशिल्प |
| भद्रशुत्र् | श्रेष्ठवर्चस्, सुदृश, सुदर्शतर | सुशिश्वि, सुहस्त सुहार्द |
| भ्रश्य | | |
| भ्राजमान | सुदृशीकरूप | सूनर (सुंदर) |
| मधुप्रतीक | सुदृशीकसंदृक् | सूनरी |
| मधुप्सरस् | सुप्राङ् | स्पृहयद्वर्ण |
| मधुयुवन् | सुभग | स्वभस् |
| मधुवर्ण | सुभसत्तर | हृदय्या |
| मर्य | सुभाग | हृदिस्पृक |
| रंसु रण्व, | सुभु,सुमंगल | हृद्य |

[ तै. सं.]

अन्यरूप
अप्स (रूप)
आत्मरूप
एकरूप
चारु
चित्र
छवि
दिव्य
पुरुरूप
पेशस् (रूप)
बहुरूप
भव्य
भ्राजदृष्टि
मधुवर्ण
मर्यश्री
मोहुक
विरूप (विविधरूप)
वेषश्री
शोभा
सतेजस्त्व
सत्यज्योति
संदृश्
सुदृशीक
सुपेशस्
सुरुच्
सुरूपवर्षवर्ण
सुश्चंद्र
स्पृहयद्वर्ण
स्वरंकृत
हिरण्यवर्ण

[अथर्ववेद]

चारु
धृषद्वर्ण
नृत्त
पृशनूयुवन्
रूपक
रूपपेय
शुक्रपिश
श्लक्ष्ण
सुदृशीक
सुप्रतीक
सुरभि
सुरामम्
सुरूपकृत्नु
सूषा
स्वदृश
हिरण्यकशिपु
हृद्य

## ऱ्हस्वनामें [ऋग्वेद]

अर्भक
अल्प
ऋहन्
एव
कृधु
क्षुल्लक
दभ्र
प्रतिष्ठा
मायुक
वम्रक
ऱ्हस्व

## विभागदर्शक [ अथर्ववेद ]

आष
उत्तर
उत्तरस्त्व
खन (तुकडे)
छिद्र
दक्षिणसव्य
दीर्घ
द्विपाद
पर्व
बिंदु
भाग

## सामान्यविशेषणें (ऋग्वेद)

अकेतु
अक्षितोति
अक्षेत्रवित्
अक्ष्णयावन्
अखिद्रयामन्
अगु
अगोता
अग्नितप
अगृभण
अग्रु
अघ
अघयु
अघशंस
अजातशत्रु
अजिर
अजुर्य
अजुष्ट
अज्येष्ट
अज्ञ
अज्ञात
अज्ञातकेत
अञ्जस्प
अतंद्र
अतप्यमान
अतसाय्य
अतम्री
अतिध्वसन्
अतिविध
अतिविध्य
अतिष्ठत्
अतिष्ठंती
अतीर्ण
अतृप
अतृषित
अतृष्णज
अतृष्यंती
अदब्ध
अदुच्छुन
अदृप्त
अदृपित
अदृप्तक्रतु
अदृप्यत
अदृष्ट
अद्रिजूत
अद्रिदुग्ध
अद्रिसंहत
अद्रुहन्
अद्रुहन्
अद्रोघ
अद्वय
अद्वयाविन्
अद्वयु
अद्विषेण्य
अद्वेष
अधम
अधर
अधीत
अधीरा
अधृष्ट
अधेनु
अध्वर्यंतृ
अनक्ष
अनग्न
अनामित्र
अनदती
अनन्नुदिष्ट
अननुभूति
अनपस्फुर
अनप्रस्
अनर्वाण
अनवस्यत्
अनश्व
अनागस्
अनाधृष्ट
अनाधृष्य
अनाप्त
अनाप्य
अनाभयिन्
अनामृण
अनाविद्ध
अनिपद्यमान
अनिवेशन
अनिशस्त
अनिषव्य
अनिष्कृत्
अनीता
अनुकामकृत्
अनुकामा
अनुक्थ
अनुत्त
अनुपस्पशान
अनुब्रुवन्
नुभर्त्री ( अनुहरंती )
अनुभृत
अनुमर्मृजान
अनुमाद्य
अनुल्बण
अनुवित्त
अनुशिष्ट
अनूचान
अनूचीन
अनून
अनूप ( निम्न-प्रदेश )
अनूर्मि
अनूज
अनेद्य
अनेनस् ( पापरहित )
अन्तम
अन्यव्रत
अपजर्गुर
अपजित्
अपर
अपरिवृत
अपवृत
अपव्रत
अपस्यु ( कर्मवर्धक )
अपाक
अपिधि
अपिस्थित
अपेशस् ( अरूप )
अप्तुर
अपूर्य
अप्रच्युत
अप्रति
अप्रातिधृष्टशवस्
अप्रतिमान
अप्रतीत
अप्रदुग्ध
अप्रदूषित
अप्रभु
अप्रवत्
अप्रोषित
अप्सु ( रूपरहित)
अभय
अभिक्षिपन्
अभिजिघ्रंती
अभिनक्षत् (अभिगच्छन् )
आभिंदन्
अभिवर्त
अभिवृत
अभिश्नथ
अभिश्वसन्
अभिसत्वन्
अभिसाच
अभिस्थित
अभिस्वर्तृ
अमत्रिन् ( बलवान् )
अमंतु
अमर्मन् ( मर्म न जाणणारे )
अमवत्तर ( अत्यंत बलिष्ठ )
अमूर
अयज्ञ
अयतंत
अयातु
अरक्षस्
अरज्जु
अरण
अरमति ( अपर्यंता—महि )
अरावस्
अराय
अरीह्ळ
अरुण
अरुणी
अरुषहन्
अरेपस् (अपाप)
अर्हस्

अलक
अवंश
अवद्यगोहना
अवद्यभी
अवनद्ध
अवनीत
अवपट्
अवयुन
अवर
अवरंबमाण (अवाङ्मुख लंबमान)
अवस
अवसाथ
अवसित
अवहित
अविदीधयु
अविविक्त
अविवेन
अविश्वमिन्व
अविष्ट
अविष्ठ
अवृत
अव्याथि
अव्यथ्य
अव्यय
अव्युष्ट
अशस्तवार
अश्मव्रज
अश्ववित्
अश्रद्ध
अश्रम
अश्वमिष्ट
अश्वयु (अश्ववान्, अश्वेच्छु)
अश्वेषित
अष्ट
असंयत्त
असजात्या
असत्या, असंदित
असंदिन्
असपत्न
असमन
असमष्टकाव्य (अन्यैरप्राप्त कौशल)
असामिशवस्
अस्थेयस्
असेमन्
अहुत
अहृय
आखर
आजात
आजुह्वान
आजोहुवान
आतप
आति (अधिभूत)
आतास्थिवस्
आदर्दिर (आदरणशील)
आदित्यजूत
आदुर
आधव
आधान
आधृष
आध्य
आघ्रेण
आनंद
आनेतृ
आबाध
आभग (आभजनीय)
आभू (देवताभिमुखीकरणाय समर्थ)
आभृत (धृत)
आमित्र
आरोहत्
आर्दन्
आलेभान
आविवासन्
अविष्कृण्वाना
आविष्टित
आविष्ट्य
आवृणान
आशुषाण
आशिष्ठ
आश्वपस्तर (शीघ्र कर्मकारी)
आश्वश्व्य
आस
आसान
आसिष्विदान
आसीन
आसुति
आसेचन
आस्त
आस्थातृ
आहित
आहुत
आहुव
आहूर्य
आह्वयमान
इंद्रप्रसूत
इंद्रसखिन्
इंद्रहूति
इभ्य
इयक्षन्
इरावन्
इरिन्
इषिध
इषिर (शीघ्रगंता)
इष्कर्तृ (संस्कर्ता)
इष्टव्रत (अन्न)
ईड्य
ईवत्
ईळाना
ईळिता
ईळेन्य (स्तुत्य)
उक्त
उक्षन्
उक्षित
उग्र
उचथ (स्तुत्य)
उच्चाचक्र
उच्छ्वंचमान
उदंचन (फलप्रापक)
उत्तम
उत्तानहस्त
उद्यमीयसी
उद्धर्षयन्
उद्वावृषाण
उपपर्चन
उपमाद
उपरताति
उपरिमर्त्य (मर्त्यांतमुपरि)
उपरिस्पृश
उपाशिश्रियाण
उपस्तुत
उपस्तुत्य (स्तोतव्य)
उराण
उरुकृत्
उरूची
उशती
उशन्
उशेन्य
उषत्
उषमाण
उषाण
उहान (हविर्वहन्)
उहुव (ओढणारा)
ऊर्णम्रद्
ऊर्णावत्
ऊह्ळ
ऋचीषम (स्तुत्यासमः)
ऋच्यमान
ऋजु
ऋजीपिन् (ऋजुगामी)
ऋतज
ऋतयुक्ति (उक्तयागपरिसमाप्ति)
ऋतसाप
ऋत्विय
ऋदुवृध
ऋषिस्वर (ऋषिस्तुत्य)
एकधेनु
एकपर
एतादृक्
एष
एषैष्य
एष्ट (आनीत)
एहिमाय (कल्याणकर्ता)
ओजस्वित (ओजायमान)
ओजिष्ठ
ओजीय
करिक्रत
करिष्या
कवत्नु (कुत्सितकर्मकारी)
काचित्कर (सुखकर हवि)
कारिन्
किमय
कीदृङ्
कुट (कर्म)
कुत्स (कुर्वन्)
कुनन्नमा (कुत्सितमपि भृशं नमयित्री)
कूस्थ
कृण्वती
कृत
कृपयत्
कृष्णा
केवल
क्रतु (कर्ता, कर्मकरणारा)
क्रत्वामघ (वेगेन महान्)
क्रविष्णु
क्राण (यज्ञ करणारा)
क्रीळन् (वने वर्तमान)
क्षिप्त
क्षेम (रक्षण)
क्षेम्या
खादिन्
गध्य (मिश्रयितव्य)
गनिग्मत्
गंध
गंभीरचेतस्
गंभीरवेपस्
गंभीरशंस
गव्य
गव्यय
गव्ययु (गाई इच्छिणारा)
गव्यू
गहन
गीर्ण
गुपित
गुहदवद्य (निर्दोष)
गुह्यमान
गुह्य
गूर्ततम
गूर्तवचस्तम
गूर्तश्रवस्
गूहळे
गृभीत
गोईष
गोअग्र
गोजित्
गोदुह्
गोधायस [ गव धारकं बलं ]
गोधुक्
गोमय (गोमान)
ग्रभ
ग्रसिष्ठ
ग्राभ
ग्राह्य
घर्म (महावीरपात्र)
घृण
घृतस्नु
घोर
चक्रवान्
चनोहित
चनिष्ट
चंद्र
चंद्रवत्
चंद्राग्र
चर्चर (चरणशील)
चित्रतम
चेतृ
चेतिष्ठ

चोदयन्मति
चोदिष्ठ
जग्मुषी
जघन्वान
जज्ञान
जन
जनज
जनिमन्
जराणिप्र
जरदष्टि ( प्रादा- वृद्धि )
जर्भुराण:
जुव
जुह्वान
जूर्ण
जेहमान
जोगुव
जोहुवत्
जोहूत्र ( आव्हान योग्य )
ज्रयमान (गच्छन)
ततर्दिय
ततृदान
ततृषाण
तदिदर्थ
तनूप
तपु
तविषीची ( बलवती )
तरुत्र
तरुष् ( बलवान् )
तवस्वत
तविषीयव
तव्य ( प्रवृद्धबल)
तार
तावक
तिग्मश्रृंग
तिस्तिराण
तुर्फरी
तुविग्रीव
तुविवाज ( बहुव- लयुक्त )
तुविशुष्मन्
तुविश्रवस्तम
तृषमंशी
तूर्ण्यर्थ
त्रामण ( पालन )
त्रिपाजस्य
त्रिपाद
त्वांकामा
त्वावृत ( त्वं वृतो येषां ते )
त्वानिद
त्वायु
त्वावृध ( स्तोत्र- वृद्ध )
त्वाहुत
त्वेषद्युम्न
त्वेषप्रतीका
दक्ष
दक्षिणत्रा
दक्षिणावान्
दक्षिणावृत्
ददृहाण
दद्राण
दधती
दधन्
दधन्वान्
दभ्य
दं ( दमयन् )
दमयन्
दस्युतर्हण ( कर्म)
दा
दानुद (धवद)
दानुपिन्व
दिस्सन्
दिविता
दिविस्पृश्
दिव्य
दीर्घश्रुत् [बहुकीर्ति]
दुध्र
दुध्रकृत्
दुराध्य
दुरापना
दुराव्य
दुरित
दुरेव
दुर्गृभि
दुर्धी
दुर्मन्मन्
दुर्मर्ष
दुर्हणा
दुर्हणायु
दुवस्यु
दुःशेव
दुष्पद
दुष्वप्न्य
दुहर
दुहान
देवक्षत्र
देवगोप
देवप्सरस्तम
देवव्यचस्तम
दैव्य
द्रोह
द्रवत्( द्रवणशील)
द्रोघवाच्
द्विशवस्
धक्षुस्
धर्मवंता
धारपूत
धारा
धासि
धूत (कंपित)
धृतव्रत
ध्यया
नक्षत्रशवस्
नंश
नभन्य
नभोवित्
नमयन्
नमस्यत्
नमस्यन्ती
नमस्विन्
नमोवृध्
नयिष्ठा
नवजा
नवजात
नाध
नाधित
नानाधी
नाथ स्तुतिकर्ता, नेता )
निंसान
निष्टत्वन
निचिर
निद् ( निंदक )
निंदित
निध
निध्रुवि
निपूत
निबोधित
निभृत
निमिता
निमिश्ल
निमृग्र
निम्नता
नियत
नियुत्वत्
नियुवाना
निरामित्
निरिणान (गाळलां जाणारा सोम)
निरुद्ध
निरुद्धान
निर्ऋत ( अलक्ष्मी, मृत्युदेवता )
निर्जगन्वान्
निर्णिज
निषिद्ध
निविष्ट
निवृत
निवेशयन्
निशित
निसत्त
निसादयत्
निसिक्त
निसिंचन
निसेदुष्
निहिता
नीचीन
नृचक्षस्
नृपत्नी ( नृणां पालयित्री )
नृमनस्यस्
नृमनस्
नेषन्
न्यर्थ ( दारिद्र्य )
पथ
पनिष्ठ
पन्यस्
पपिवस् ( पाता )
पपृचान
पर
परस्वत्
पराच्
पराभृत
परिचक्ष्य ( परित्यक्त )
परिच्छिन्न
परिजर्भुर
परिणह्
परिपद
परिप्रिय
परिप्रीत
परिप्रुष्
परिबाध
परिबाधमान
परिरम
परिवर्ग
परिवर्तमान
परिविष्
परिविष्ट
परिवीत
परिवृत
परिशयान
परिष्टि (परितोन्वेषण )
परिसद्वसन् (परितोवर्तमान )
परिसिक्त
परिसिच्यमान
परिष्टुभ
परिस्तोभंती
परिष्वजत्
परीनश्
परीयत्त
परोमात्र ( श्रेष्ठ )
पर्च [ संपर्क ]
पर्तृ
पर्येत
पर्व
पर्वतच्युत्
पर्शान
पवा [ पूयमाना धारा ]
पश्यमान
पस्पृधान
पाक्य [ परिपक्व ]
पाजस्वत्
पार्य
पितुमत्
पिप्रती
पिष्ट
पुनान
पुरंधि [ धीमान् ]
पुरुभू
पुरुमंतु
पुरुवर्पस
पुरुव्रत
पुरुस्पृह
पुरूची
पूतदक्ष
पूयमाण
पूर्वतरा
पृच्छमान
पृणत्
पृथिविस्थ
पृथु
पृथुपाजस्
पृथुप्रगान
पृथुबुध्न
पृषद्योनि
पृषध्र
पृक्ष
पृष्टी
पृष्ठ
पेषी [ हिंसक ]
पोषयित्नु
पोष्य
प्रकुपित
प्रचेतयन्
प्रचोदयन्
प्रच्यवयन्
प्रच्युत, प्रमहित
प्रजात
प्रजावत्
प्रतत
प्रतर
प्रतरण

प्रतवस्
प्रतिक्षियन्
प्रतिदीवन्
प्रतिरंती
प्रतिवेदयन्
प्रतिष्ठित
प्रतीत्य
प्रथमजा
प्रथमश्रवस्तम
प्रथयन्
प्रदोधुवत्
प्रपृचंती
प्रबोधयंती
प्रब्रुवाणा
प्रभूषन्
प्रमृत
प्रयक्षतम
प्रयज्यु
प्रयत
प्रयतदक्षिण
प्रयोतृ
प्ररेचयन्
प्रवत्
प्रवद्यामन
प्रवीतजस् [फासा]
प्रविक्त
प्रवितृ
प्रविष्ट
प्रशिष् [प्रशासन्]
प्रहोषिन्
प्राधर्मसत्
प्रार्प्ये
प्रावर्ग
प्रियक्षत्र
प्रेतीषन्
प्रेतृ [तर्पयितृ]
प्रेष
प्रोथमान
बध्यमान
बप्सत्
बबृहाण
बभूवुषी
बर्हणावत्
बर्हिष्मती
बलद

बहुप्रजा
बहुलाभिमान
बिभीवन्
बिभ्रमाण
बुबुधान
बृहत्सुम्न
बोधयत्
ब्रह्मकृत
ब्रह्मप्रिय
( इंद्र, वरूण, दी-
र्घतमस् )
भगवत्
भगेवित्
( धनयुक्त)
भवित्र
भर्वीयस्
भाग
भिंदान
भियान
भुर्वाणि
भूरिवर्पस्
भूरिवार
भेत्तृ
मदन्
मदन्ती
मदवृद्ध
मदिन्तर
मदेरू
मद्यक्
मधुद्रोह
मधुमत्तम
मनश्कुंग
मनवत्
मनस्मय
मनोवाता
( स्तुति )
मन्दसान
मन्दिन्
मन्दु
(नित्यप्रमुदित)
मन्मसाधन
( इष्टसाधक )
मम्रुवस्
मरायिन्
(शत्रूणांमारकः)
मरायु
(जरामरणरहित)
मंजयन्ती
मर्डितृ
मर्त्यकृत
महीव

मादयत्
मादयित्नु
मादयिष्णु
माध्वी
मानव
मित्रिन्
मित्रिय
मिथस्तुर
मिथस्पृध्य
मिथूकृत्
मीढ्व
( कामाभिवर्षक)
मीह्लुस
मीह्लुष्टम
मीह्लुष्मत्
मुमुक्षमाण
मृजान
मृज्यमान
मृष्ट
यक्षमाण
यज्ञवनस्
( हविष्कामी)
यज्वरी
(यजनसंबंधी)
यतम
यतंकर
यन्तृ
ययु
यव्य
यातयज्जन
यावन्
( गन्तृ)
युज्य
युत्कार
युव
युवधित
युवन्यु
युवमान
(मिश्रयन्)
युववु
( युवांकामय-
मान )
युवादत्त
युवानीत
युष्मयंती
युष्मेषित
युष्मोत
येमान
येषन्ती
योग
योन्य

रघुमन्यु
रघुयामन्
रत्नधातम
रथोह्ळ
रन्तृ
(रमणशील)
रंत्य
राघ्य
रिक्त
रिप्र ( लिप्त )
रेभन्
रेवती
रैवती
रोधना
वक्म्य
वंकुतर
वद्मन्
( स्तुत्य )
वन् (वननीय )
वनसद्
वन्दमान
वन्ध
वन्य
वन्वन्
वमन्
वयुना ( प्रज्ञा )
वरसत्
वरिवोधा
वरिवोविद्
वरिष्ठ
वरीमन्
वर्धन
वर्पिष्ठक्षत्र
वर्ष्य
वव्रिवस्
(व्याप्नुवन्मेध)
वस्
(वसन)
वसुधिति
वाङ्कृत्य
वाजपत्नी
वाजि
वाजिनीवसू
वाम
वायुगोप
विगाह
विदथ
विदथ्य
विदान
विदुस्तर
विधत्
विधर्तृ

विधात
विध्यत्
विनाशयन
विप्र
विबाध
विबोधन
विभक्त
विभजन्
विभर
विभिंदन
विभिन्न
विभु
(समर्थ)
विभृत्र
विभ्वसह्
विमानी
( निर्मात्री )
विमुच्
विमृध
विमृष्ट
विमोचन
विरुद्र
विरोकिन्
विवर्तन
विवास
विविक्त
विविचन
विविद्वत्
विवृत्त
विश
विश्य
विश्वचन्द्र
विश्वचर्षणि
विश्वदोहस्
विश्वपेशस्
विश्वभोजस्
विश्वशर्धस्
विषुणु
विष्पित
विषुरूप ( नाना-
रूपं धत्ते )
विषूचीन
विष्टान्त
विष्पद् (विशेषेण
बाधक)
विसक्ता
विसार
विस्थित
विहित

वीरजात
वीर्य
वृजन्य
वृजिनयत्
वृत (वर्तमान)
वृद्धशवस्
वृश्चद्वन्
वृश्चन्
वृषत्वन्
वृषधूत
वृषन्
वृषरथ
वृषशुष्म
वेद्य
व्यूर्ण्वन्
शतात्मन् (धन)
शतायुष्
शंताति (सुखकर)
शर्ध
शर्धन
शर्मयन्ती
शवीरा (आदर-
युक्ता बुद्धि)
शस्यमान
शाक (शक्त)
शिक्षु
शिमीवत्(कर्मवत्)
शीत
शीतिक
शुचि
शुचिप
शुद्ध
शुनेषित
शुभ्रवत्
शुभ्रा
शुंभमान
शुष्क
शुष्म
शुष्मिन्तम
शूर
शृत
शेवधिप ( संपत्ति-
मान् )
शेव्य
श्रमयुव
श्रवस्काम
श्रवाय्य
श्राय
श्रित

श्रोणन्
श्रुत
श्रोषमाण
श्वसन्
श्वसीवन्
संयत्
संवसान
सांविदान
संवृक्
संसृष्ट
संस्थ
संस्रष्टृ
संहित
संक्रदन
संक्रोशमान
संगत
सचाभू
सचिविद्
सचेत
सजित्वान
सजू
सजोषस्
संजर्भुराण
संजिगीवत्
सत्राच
सत्रासह
सदनस्पृश्
सदास
सधन्य
सध्र्यञ्च्
सनद्वाज
सनवित्त
सनश्रुत
सनितृ
सनीन (संभजनीय द्रव्य)
सनीळ
संतवीत्वत् [बलवान्]
संदहत्
संदान
संदृक्
संधातृ
सपर्येण्य
सप्रथ
सभरा
समंत
समा
समीची
संभृत

सगीतक्त
सर्वगण (अत्रि बृहस्पति)
सर्ववीर (मरुद्गन)
सव्रत
ससञ्हस्
सस्तुत
सस्त्र
सहज
सहवत्स
सहवान
सहवीर
सहसान
सहस्य (पराभवशील)
सहस्रनिर्णिज् (अश्व, अन्न.)
सहस्रवत्
सहस्रवाज (सहस्रबल)
सहस्रस्
सहस्रार्घ
सादि
साधन
सानसि
सामन्
साद्वळ
सिक्त
सिध्र (साधक)
सिंधुमातृ
सिष्णु
सीदन्
सुकर
सुकृत्या
सुक्षत्र
सुग
सुगंधि
सुगोप
सुगम्य (सुखकारक)
सुचंद्र
सुचेतस्
सुजनिमन्
सुजात

सुतप
सुतर
सुतर्मन्
सुतष्ट
सुत्रामन्
सुदंसस्
सुदक्षिण
सुदोघ
सुधुर
सुनिरज
सुपप्तन् (शोभनपतन)
सुपाणि
सुपारक्षत्र
सुपीवस्
सुपूत
सुपूर्ण
सुबर्हिष्
सुभर
सुम्नयु
सुयमस्
सुयवस्यु (चांगले गवत इच्छिणाऱ्या गाई)
सुराधस्
सुवित
सुविवृत
सुवृत
सुशक
सुशक्ति
सुशमी
सुशेव
सुश्रुत
सुश्रोतु
सुसंशित
सुसनित
सुसंदृक्
सुसंसृष्ट
सुसव्य
सुसह
सुसेक
सूपवंचन
सुर
सूरचक्षस्
सूप्र (प्रसूत)

सृष्ट
सेदुष्
सोममाद
सौमनस्
स्कभीय
स्तभित
स्तभुयन्
स्तीर्ण
स्तुत
स्तोम्य (स्तुत्यर्ह)
स्थिरपीत.
स्थूर
स्पन्द्र
स्पश्
स्पार्हवीर
स्मयमान (प्रकाशमान)

स्यूमन्यू (अश्व)
स्वक्षत्र
स्वचंद्र
स्वज
स्वजन्य
स्वतवस्
स्वदावन्
स्वदित
स्वपस्यमान (शोभमान)
स्वभानु (मरुत्, उषस्, मेधावी)
स्वया
स्वयुज्
स्वरंकृत

स्वर्क
स्वर्य
स्वापी
स्वायुज्
स्वाहुत
स्विष्ट
स्वैतवस्
हरि (उदकहर्ता)
हविर्मथिन्
हव्यदाति
हस्तच्युती
हिंकृण्वती
हितवत्
हिरण्ययु
हीळ
हेतृ (प्रेरक)
ह्रुत

[तै. सं.]

अंशुमत्
अकृश
अक्लृप्ति
अकेतु
अक्खिद्र
अक्रीत
अगत
अगुप्त
अग्निवती
अग्रवती
अप्रिय
अग्रेग
अग्रेगु
अग्रेवध
अचित्ति
अच्छिद्यमाना
अच्छिद्र
अच्युत
अच्युतक्षित्
अजाघ्निवान्
अजात
अजीत
अजीर्णा
अजुष्टा
अजूर्य
अज्यानि
अतन्द्र

अत्तवीयस्
अतिक्षिप्रा
अतिदह्यमाना
अतिदाह
अतिद्रुत
अतिपन्न
अतिरिक्त
अतिशिष्ट
अतिष्ठमान
अतीकाश
अदब्ध
अद्यमान
अधिष्कन्न
अधिष्ठान
अधृत
अन्त
अन्तगत
अन्तनामन्
अन्तरतर
अन्तरित
अन्तर्वर्त
अन्तर्हित
अन्तःश्लेष
अन्तःश्लेषण
अन्त्य
अन्नवत्

अन्नवती
अन्यकृत्
अन्यतर
अन्वक्
अपक्रान्त
अपक्षीयमाण
अपतेजस्
अपद्यमान
अपनाभि
अपन्नदती
अपबाधमान
अपभूत
अपरज
अपरागत
अपराजित
अपरावपिष्ट
अपरिगृहीत
अपरिमित
अपरीषु
अपरुद्ध
अपरुध्यमान
अपवक्तृ
अपवाहृत्
अपशुष्का
अपहृत
अपाकृत

अपादक
अपानर्ता
अपानभृक्
अपूत
अपोढ्य
अपोम्भन
अमृ
अप्रज्ञात
अप्रज्ञात्र
अप्रति
अप्रतिगृहीत
अप्रतिष्ठित
अप्रतिहत
अप्रतीत
अप्रस्तुत
अप्राण
अबद्ध
अभवत्, अमित्र
अभिक्रयन्
अमुख
अमेध्य
अयत
अयाशया
अरंगम
अरप
अराध्य
अरेडता
अर्थेत्
अर्दत्
अवगत
अवतान्त
अवदान
अवधूत्
अवनयति
अविकृत
अविच्छेद
अविज्ञात
अवितृ
आवंत्री
अविमुच्यमान
अविस्रंस
अव्यथमान
अव्य कृत
अव्यावृत्त
अशित
अशृण्वत्

अशृत
असमान
असूर्त
अस्थन्वती
अस्मद्रियक्
अहृणीयमान
आक्रमण
आचरत्
आजुह्वान
आतत
आदहन
आदेया
आधवनीय
आधारवती
आधीत
आधूयमान
आनशान
आन्त
आपन्न
आपप्रिवत्
आपलायित
आपूर्य
आप्यायित
आप्रीत
आभजन्ती
आभरत्
आभृत
आमुष्यायण
आयतनवती
आयन्त
आयिन्
आयु
आरपन्ती
आरूढ
आलब्ध
आलभमान
आविष्टित
आवेशयन्ती
आशासान
आस्थित
आहृत
आह्रियमाण
इषयन्ती
इष्ट
ईजान

ईड्य
ईदृङ्
ईदृक्षास
ईय
ईषत्
उक्षवश
उच्छिष्ट
उच्छुष्म
उज्जिहान
उत्क्रान्त
उत्क्रोद
उत्तरतउपचा
उत्थान
उत्थित
उत्पूतशुष्म
उत्साद
उदहार्य
उदायन्
उदृच्
उदोजस्
उद्गृहीत
उद्यास
उद्युक्त
उद्रिक्त
उद्वार
उद्वासयिष्यत्
उद्धार
उद्धृत
उन्दती
उन्नत
उन्नीत
उन्मुक्त
उपचर्य
उपाब्दमत्
उपधास्यत्
उपध्वस्त
उपनत
उपनद्ध
उपनाह
उपनीय
उपप्रयत्
उपप्रयास्यत्
उपभृत्
उपमश्रवस्तम
उपमृत
उपयद्
उपयत्
उपश्रित
उपस्तंभन
उपस्तीर्य
उपस्तुत

उपस्थेय
उपहृत्य
उपहूत
उपाकृत
उपागु
उपान्त
उपावसृज्
उपावह्रियमाण
उपावृत
उपाभ्याध
उभय
उरुकृत
उर्ध्यच
उशत्
उशती
उषत्
ऊन
ऊर्क
ऋणवत्
ऋदूदर
औपर
क्रम
क्रान्त
क्रियमाण
क्रयि
क्षामत्
क्षित
क्षेपिष्ठा
क्षोभण
खात
खिद्र
गणवती
गणवन्त
गम्य
गह्य
गायन्त्य
गाहमान
गोभाज्
गोमत
ग्रसित
घृणीवत्
चानयमान
चिकितुष
चिकित्वत्
चिक्यान, चित
चितयन्ती
चितान
चीयमान
चेकितान
चेतन्ती
चेतव्य
चेतिष्ठ

चेता
च्यौत्न
छन्न
जक्षिवस्
जग्मिवस्
जज्ञान
जर्भुराण
जहृषाण
जातृषाण
तत्कृत
तप्त
तवस्तर
तस्तभान
तस्थिवस्
तादृश्
तुजान
तेजस्विन्
तेजस्विनीतम
तेतिजान
त्राता
त्वावत्
त्वोत ( रक्षित )
दवीय
दार्श्य
दिद्युत
दिप्सत्
दीक्षिष्यमाण
दीध्यान
दीर्घश्रुत्तम
दुरिष्ट
दुरवस्
दुर्मति
दुर्मर्ष
दुर्य
दुष्टर
दूढ्य
दूळहन
दृशान
दृष्ट
देवद्रीची
देववत्
द्युत
द्युमत
द्युमत्तम
धुनिन्नंनी
द्राघीयस्
द्राघु
दूणाल
धूर्षाह
धृत
नाथित
नानदत्

नानादेवत्य
नानाव्रत
निकामयमान
निगुत
निघ्नती
निद
निनद्ध
निम्रक्ति
निम्रुच्
निम्राचत्
निरवपत्
निरस्त
निरुप्त
निरुप्यमाण
निर्जग्मिवत्
निर्दग्ध
निर्बाध
निर्बाधी
निर्भक्त
निर्मथ्य
निर्मित
निर्यत्
निर्वीर
निवत्
निविशमान
निविष्ट
निवीत
निवेशन
निवेशयत्
निशुम्भ
निषदन
निष्कर्तृ
निष्कृत
निष्क्रीत
निषिक्त
निषिष्वत्
निहृत
निहित
नीच
नीता
नीयमान
नृचक्षस्
नेतृ
नेदीय
न्यच्
न्यक्ष
न्ययन्
पक्तृ
पक्व

पञ्चगृहीत
पतिष्ठ
पत्त
पत्मन्
पत्यमान
पदिबद्धा
पपिवस्
पपीयस्
पप्रितम
परस्वन्
परागत
पराच्
पराजिग्यान
पराङान
परापतित
परापूत
पराभवन्त
परायत्
परावत्
परिगृहीत
परिचक्ष्य
परिचर
परिचर्तन
परिचाय्य
परिद्वेषस्
परिबाध
परिमित
परियत्
परिविष्ट
परिशिष्ट
परिषूत
परिष्कृत
परिस्रुत
परिहार
परोध्य
परोच्य
परोवरीयसी
पर्वन्
पर्यागत
पाकतर
पात्
पा.थ्य
पापवस्यस्
पापसम
पारयिष्णु
पारीणह्यं
पार्य
पित्व
पिन्वमान

पीपिवस्
पीवान
पुनत
पुनरालम्भ
पुनरुत्सृष्ट
पुनरुत्स्यूत
पुनर्निष्कृत
पुरुतम
पुरुनिष्ठ
पुष्ट
पूर्ण
पौरुषेय
प्रच्युत
प्रजानत्
प्रजानती
प्रणी
प्रणीयमान
प्रेणतृ
प्रतरा
प्रतिर
प्रतिष्ठावती
प्रतिहिता
प्रतूर्त
प्रतूर्वत्
प्रत्त
प्रथ
प्रथमज
प्रदघ
प्रदह
प्रदाव्य
प्रपन्न
प्रपान
प्रप्लुत
प्रबुध
प्रबुद्ध
प्रबुध्यमान
प्रभञ्जत
प्रभिन्न
प्रभृत
प्रमायुक
प्रमुख
प्रमुञ्चत
प्रमृण
प्रम्लोचन्ती
प्रयत्
प्रयत
प्रयवन

प्रयस्
प्रयात
प्ररोहन्ती
प्रवदन्ती
प्रवस्तव्य
प्रविविशिवस्
प्रविष्ट
प्रशाद्
प्रसर्पत्
प्रसूता
प्रसूवती
प्रस्थावत्
प्रस्थित
प्रस्नाती
प्रहरिष्यत्
प्रह्रियमाण
प्राणत
प्राणती
प्राणथ
प्रावृत
प्राशित
प्राश्नत्
प्रासहन्
प्रियतमा
प्रियवर्ती
प्रियास
प्रीत
पृष्ट
पृष्टित
प्रेण
प्रेत
प्रेषित
प्रोह्यमान
बद्ध
बध्यमान
बहिष्ट
बहुतय
बाधमान
बाहुच्युत
बुध्निय
ब्रह्मीय
भरमाण
भृष्टि
भव्य
भान्त

भाम
भारभारितम
भीम
भूतसंक्रामिण
भूयस्कृत्
भेजन्
भेत्तृ
मज्जन्वत्
मज्जान
मथित
मथ्यमान
मदग्र
मदन्ती
मदिन्तम
मधु ( स्वादु )
मनस्वत्
मनुष्यकृत
मनोयुज्
महिमन्
महीय
मितास
मित्रवत्
मीढ्व
मुख्य
मृध
मृध्र
मेधसातृ
मेधयन्ती
यज्ञयशस्
यज्ञव्रत
यत्
यन्तृ
यशस्कृत्
यशस्वती
यशोद
यावन्
युक्त
युग्मदयुज्
युङ्
युज्य
युवान
रघीयस्
रसवत्
राजन्
राद्

रात
रेवत्
रोचमान
लोककृत्
लोकस्पृत्
वनिष्ठु
वन्दमान
वन्द्य
वन्य
वन्वन्
वयस्वती
वर
वरिन्
वाजप्रसवीय
वाजसाति
वामभृत्
वार
वारेवृत
वार्ध्रीणस्
वार्य
वावशती
वावातृ
वावृधान
वासीय
वास्तव्य
विक्रमण
विग्राह्य
विचक्रमाण
विचरत्
विचल
विचित्य
विछिन्न
विज्य
विज्ञात
वितर
वितृंहाण
वितृष्णा
विरुध
विद्विषाण
विधत
विधर्तृ
विधूत
विधृत
विपृक्त, विभक्त
विभृत, विमथ्नान
विमान
विमुक्त
विमोक
विरूप
विलिष्ट
विवसाति

विविचि
विशर
विशिप्रिय
विश्वंभर
विश्वव्यचस्
विश्वापुष्
विश्वासाह्
विशित
विष्कंध
विष्फुरन्ती
विष्यूत
विष्वङ्
विष्वद्र्यङ्
विसदृश
विसर्जन
वीडमाण
वीडित
वीत
वीततम
वीता
वीथ
वीय
वीर्यवती
वीर्यावत्
वोढ
व्यत्य
व्यच्
व्यच्यमान
व्यतिषक्त
व्युच्छन्ती
व्युष्य
व्यूषुषी
व्यूढ
व्रात
शंतम
शंभु
शशमान
शस्य
शान्त
शाम्यत्
शास
शिक्षमाण
शिवतम
शिशान
शिष्ट
शुद्धायुवन्
शुभ
शुभित
शुम्भमान
शुष्मी

शुश्रूषमाण
शांसा
श्रवण
श्रान्त
श्रित
श्रुत
संयान
संयानी
संयास
संयुक्त
संयेतृ
संरण
संरिक्त
संरोह
संवत
संवरण
संविदान
संवृध्वन
संवश
संशिष्ट
संश्लिष्ट
संसन्न
संसर्प
संसुद
संसृष्ट
संस्तुत
संस्थित
संस्पृष्ट
संस्फ
संहित
संक्रन्दन
संगमन
संग्रहण
संग्रहीतृ
सजनी
सजाता
सजित्व
सजोषस्
संचरन्
संचरन्ती
संचित
संचिनवत्
संजानान
संजिहान
संजीवन्ती
संज्ञान्य
सत्
सती
सदक्ष
सद्दक्ष
सद्दृङ्
सध्रियंच्
सन्तरत्
सन्तरा
सन्तान
सन्तृण्ण
सन्दग्ध
संदष्ट
सन्दित
सन्दीयमान
सन्दुग्ध
सन्धान
सन्नद्ध
सन्नेतृ
सपरिष्यत्
सप्रथस्
सप्रथस्तम
सप्राण
सबाध
सभरस्
सम
समक्त
समाविन्वत्
समञ्जत्
समद
समनस्
समन्त
समन्यु
समावत्
समीची
समूढ
समूह्य
सम्पृच्
सम्प्रिय
सम्प्रोर्ण
सम्लवमान
सम्लुत
सम्भरण
संभार्यतर
संभृत
संभृत
संभृतसंभार
संभृति
संमित
सम्यञ्च
सयुज
सरूप
सलक्ष्मन्,सुवीर्य
सवेदस्
ससवत्
ससृनस्
सस्नितम
सहमान
सहस्तम
सहस्वत्
सहीयत्
साकंप्रस्थायीय
साप्रारण
साहन्त्य
सीक्षमान
सुकल्प
सुकेन
सुक्रीत
सुचक्षस्
सुचरित
सुजात
सुतमन्
सुपार
सुपूत
सुपूर्ण
सुपोष
सुप्रचस्
सुप्रतिष्ठान
सुप्रतूर्ति
सुप्रीत
सुब्ध
सुभव
सुमत्
सुयत्
सुयम
सुयुक्त
सुराभिमती
सुवत
सुवर्च
सुविद्वत्,
सुविप्र
सुवीर
सुवीर्य
सुवृक्ति
सुवृष्ट
सुश्रव
सुषुवन्
सुषूमा
सुषेवन
सुष्टरी
सुसंभृत्
सुहित
सू
सूपचरण
सृष्ट
सो
सौवचनस्
स्कन्न
स्कंभन
स्तरी
स्तीर्ण
स्तुत
स्तुवत
स्थात
स्पर्धमान
स्पश
स्पृत
स्यन्दमान
स्वकृत
स्वच
स्वध्यवसान
स्वपस्यमान
स्वयंकृत
स्ववत्
स्वांकृत
स्वारुह
स्वावेश
स्वासस्थ
स्वैतव्य
हृत
हृतपुत्र
हित
हिरण्यज्योतिष्
हीन
हुत
हेड
हेषन्
ह्वातव्य
हसीयस्
ह्रियमाण

[ अथर्ववेद ]

अकृत
अगोह्य
अच्युत
अजात
अज्ञात
अतप्त
अतितार्य
अतिरिक्त
अतिसृष्ट
अतिहित
अदब्ध
अदृश्यमान
अदृश्रन्
अदृष्ट
अद्रुह
आधीहित
अधृष्टम्
अनतिसृष्ट
अनदत्
अननुकृत्य
अननुदिष्ट
अनपच्युत
अनपस्पृक्
अनपस्फुर्
अनभ्यक्त
अनाप्त
अनारंभण
अनाव्रस्क
अनिपद्यमान
अनिस्तृत
अनुकर
अनुतप्यमान
अनुपस्पशान
अनुन्मादित
अनुपालयन्ती
अनुबुद्ध
अनुमत
अनुरोधन
अनुवर्तयत्
अनुव्रत
अनुशिष्ट
अनुसंचरन्ती
अनुस्पष्ट
अनुहूत
अनूक्य
अनूच्य
अन्नाद्य
अन्वञ्च
अपगूहमान
अपचत्
अपमित्य
अपमृष्ट
अपरूप
अप्नस्वती
अप्रतीति
अप्सुसंशित
अबल
अभिक्रत्वरी
अभिक्रतु
अभिनक्षमाण
अभिनिष्कारिन्
अभिभंजन्ती
अभिवर्ग
अभिशस्तृ
अभिस्तुत
अभिद्ध
अमितवीर्य
अष्टकृत्व
असंख्यात
असपत्न
असृग्र
आतत
आतन्वान
आतस्थिवस्
आभृण
आमंत्रणीय
आरब्ध
आरभमाण
आरुजत्
आरोहण
आर्पित
आविष्ट
आविष्टित
आवृणान
आवृत्त
आशृण्वती
आष
आसनेषु
आसन्न
आसन्वत
आसिक्त
आहृत
आहित
ईङ्खयन्ती
ईड्य
ईदृक्
उक्षित
उग्रीण
उच्चरन्
उच्छिष्ट
उच्छ्वञ्चमान
उत्तभित्
उत्तस्थिवस्
उत्सन्न
उदित
उद्धरन्ती

उद्भिन्न
उद्यती
उद्यमीयसी
उद्युज्
उद्युत
उध्रियमाण
उन्मुञ्चन्ती
उपजीवनीय
उपतिष्ठन्ती
उपतिष्ठमान
उपमास्य
उपयुक्त
उपसत्ता
उपहूत
उपाकृत
उल्लुप्त
ऊर्जस्वन्
ऋक्षमाण
ऋन्धत्
एकवृत
एन्य
एरु (गन्तृ मेघ)
एव
ओजिष्ठ
कद्रीची
कनीय
करण
कशाश
कामशल्य
कुर्वत्
कुलायन्
कृण्वत्
कृत
कृत्नु
कृत्वरी
कलृत, केवल
केश्य
क्रदिवत
क्रन्
क्रविष्णु
क्रान्त
क्षिप्त
क्षियत्
क्षुणुवान
खादत्
गत
गभिसृक्
गव्य
गुंपित
गुप्त
ग्राभ
ग्राह्य
ग्लहन (ग्रहण)

चकान
चक्षुष
चस्कभान
चिकितुष्
चिकित्वन्
चित
चितिन्
चित्र
चित्रभानु
चेतयन्ती
चेत्ता
चोदयत्
च्यवयन्
च्यवयिष्णु
च्युत
च्यौत्न
जक्षिवत्
जगन्वान्
जग्ध
जघन्वत
जज्ञान
जनमान
जनित्र
जात
जायमान
जिगत्नु
जिगीवत्
जिघांसत्
जित
जिन्वित
जीत
जुजुषाण
जुषमाण
जुष्ट
जोगुवत
जायस्वते
तसिन
तथादर
तन्वान
तमस्वती
तमिषीचय
तष्ट
तस्थिवस्
तिर्यङ्
तिष्ठन्ती
तीक्ष्ण
तुर
तुरीप (गाडीवान्)
तुर्मिश
तूतुजान
तृष्टजम्भ
त्रातृ
त्रिप्रतिस्थित

त्वादात
त्वायु
दक्षिणावती
दधान
दिष्ट
दुरश्रवस्
दुरेव
दुरोषस्
दुर्दाश
दुष्कृत
दुस्तर
धर्तृ
धारयत्
धीर
ध्रुव
नानदती
निपतित
निर्भक्त
निर्मित
निष्क्रांत
नीचीन
न्यर्पित
पञ्चशल
पपुरि (पूरक)
पराचीन
परास्य
परिज्मन्
परिरापिन्
परिसूत
परिष्वजीयसी
पवितृ
पाकशंस
पारस्वत (दुस्याचें)
पिन्वन्
पुण्यग
पूर्वकृत्वरी
पृषती
पृथिवीप्र
पृषन्त
प्रगृहीत
प्रच्युत
प्रजननवान्
प्रजात
प्रजानती
प्रजावत्
प्रजावती
प्रजावित
प्रतान
प्रतिकाश
प्रतिच्यवीयसी
प्रतिदावन्
प्रतिष्ठन्ती

प्रतिस्थाशान
प्रतिस्थित
प्रतिहित
प्रतीचिका
प्रत्यातिष्ठन्ती
प्रनेजन (शोधनविषय)
प्रम्लीन
प्रभृत
प्रमूर्ण
प्रस्वत्
प्रयुज्
प्रसूत
प्रसूमती
प्रस्तुत
प्रस्थावत
प्रस्थित
प्रस्व
प्रहाय्य
प्रहेय
प्रातर्जित
प्राप्त
प्रोक्षन्ती
प्सात
बाहुच्युत
ब्रह्मज्य
भगवती
भञ्जन्
भूरिरेतस्
भूरिवर्पस्
भूरिस्थात्रा
भृङ्गा
भोग्य
भोजनम्
भौवन
भ्राज
मज्मन्
मनस्कम्
महोन्माना
मिता
मिषन्त
मीढ्व
मूलकृत्
यजिष्ठ, यवमंत
यशस्
यशस्विन्
यशस्यु
यावदंगीन
योग्य
रथज्यूति
राता
राततमा
रातहव्या

रुजन्
रुद्रवन्त
वन्य
वरद
वर्ता
वर्ये
वर्ध्य
वग्नि
वशीय
वसुदा
वसुधान
वहमान
वहिष्ठ
वाजयत्
वातज
वादिष
वाह
वितत
विदद्वसु
विद्ध
विद्वेष
विधर्त्ता
विधृति
विनह्वते
विपिपाना
विवद्ध
विबाध
विभक्त
विभाति
विभिन्दती
विभ्वी
विमुक्त
विरुजन्
विलोहित
विश्रुतम्
विष्ट
विष्वंच
विसाना
विसित
विसृज्यमाना
विसृष्ट
विस्तभित
विस्थित
विहित
विहृत
विस्रसा
वृणान
वैनंत
वैबाधप्रणुत्त
व्यक्त
व्याल
व्युच्छन्ती
शग्मिय

शाक्वर
शिप्र
शुंभ
शुशुलूकयात
शण्वत्
शृत
शोषण
श्रथ्नत्
संयत
संरब्ध
संशित
संमुद
सङ्काश
सङ्क्रंदन
सङ्घोर
सञ्जयत
सञ्यन्ती
सञ्जित
सञ्जीव
सध्रीची
सध्र्यङ्
सन्तस्थान
सन्तेदिन
सन्दित
सन्धृत
समञ्जन
सममान
समाकुर्वाण
समाकृत
समान
समाहित
समिद्ध
समिष
समीक्षयत्
समीची
समीचीन
समुब्जित
समोकस
सम्पादयत्
सम्पिष्ट
सम्भक्त
सम्भूत
सम्भृत
सम्मातृ
सम्मित
सम्यक्
सयोनि
सर्वहुत

| | | |
|---|---|---|
| सवियुत | सुपाशा | स्थिर |
| ससंहान | सुप्रतिदिश्यु | स्थूलभ |
| ससहवस् | सुप्रतिस्थित | स्पष्ट |
| सहस्कृत् | सुब्रह्मन् | स्फाति ( अभिवृद्धि ] |
| सहसावन् | सुभग | स्योन |
| सहस्वत् | सुभद्र | स्वरौण |
| सहुरि (सहनशील) | सुभाग | स्वस्तिक |
| सिव् | सुभूत | स्वस्त्य |
| सुखयन्ती | सुभृत | स्वस्त्ययन |
| सुजनिमन | सुयुज् | स्वावृक् |
| सुजन्मन् | सुरत्न | स्वाशुर |
| सुजिह्व | सुवितृ | हित |
| सुज्यैष्ठ्य | सुवृत्त |  |
| सुतप | सुष्र |  |

[ वाज. सं. ]

| | |
|---|---|
| कामधरण | धूर्ति |

## वस्त्रें व भूषणें

### वस्त्रें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [1]अत्क | चंद्रनिर्णिज् | [8]वाधूय |
| अधिभोजन | तान्व | [9]वासस् |
| अधिवस्त्र | दशकक्ष्य | विशसन |
| अधिविकर्तन | दुर्वासस् | [10]शामुल्य |
| [2]अधीवास | [3]द्रापि | शिप्र [ लोकरचिवस्त्र] |
| अनवपृच् | निर्णिज् | शुक्रवासस् |
| अपिकक्ष | [4]पेशस् | श्वित्यंच |
| अश्वनिर्णिज | [5]मल | [11]सिच् [पदर] |
| आशंसन | मृज | सीमन |
| उपस्तरण | ऊर्षनिर्णिज् | [12]सुवसन |
| ओकिवान् | [6]वसन | सुवासस् |
| ओतु | [7]वस्त्र | स्यूम |
| घृतनिर्णिज् | वस्म |  |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अधीवासस् | कृष्णतूष | [17]प्राचीनतान (लांब धागा) |
| उष्णीष, | [13]तार्प्य | वस्त्र |
| ओतु | [14]तुष | [18]वातपान |
| क्षौम | [15]नीवि | वासस् |
| कृष्ण | [16]प्रघात |  |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अश्लक्ष्ण [मृदु] | द्रापि | वसान |
| अधिविकर्तन | [21]दूर्ष | वस्त्र |
| आशसन | नीवि (नाभिदेशे संवद्धं वस्त्रं) | वाधूय |
| [19]उष्णीष | [22]परिधान | वासस् |
| कटुक | प्रथमवास्य | विशसन |
| [20]कम्बल | बल्वज | विषवत् |
| तार्प्य (तृपा नामक तृणार्थे) | लोहितवासस् | शामुल्य |
|  |  | सुवासस् |

[ मै. संहिता. ]

[23]क्षौम

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [24]आविक | [27]पर्यास | [31]बरासी |
| [25]उपस्तरण | [28]पांडव | [32]माहारजनें |
| क्षौम | [29]प्रवार | [33]त्रिवयन |
| [26]दशा | [30]प्राचीनातान | [34]शामूल |

[1]अत्क.—ऋग्वेदांत जरी हा शब्द वारंवार येतो तरी त्याचा निश्चित असा काहींच अर्थ सागता येत नाहीं. याचा ऋग्वेद ५. ५५, ६ (काढून टाकणें ) १. १२२, २ व्यूत ( विणलेलें ); सुरभि वसान ( धारण केलेलें ) ६. २९, ३. या व अशाच प्रकारच्या अनेक उताऱ्यावरून रॉथ, ग्रासमन, लुडविग, झिमर व आणखी काहीं पंडित वस्त्र असा अर्थ करितात ( सायण मतानें ऋग्वेदात अत्क याचा रूप असाच सर्वत्र अर्थ आहे ). दुसऱ्यापक्षीं पिशेल हा अर्थ मुळींच मान्य करीत नाहीं. ऋग्वेद ५. ५५, ६; ६. ३३, ३; १०. ४९, ३; ९९, ९या ठिकाणीं तो अत्क याचा कुऱ्हाड असा अर्थ करतो.

[2]अधीवास.—वैदिक कालातील आर्य लोकांच्या उत्तरीय वस्त्राला हा शब्द लावीत असत. हें उत्तरीय वस्त्र कोणत्या प्रकारचे असे याची बरोबर कल्पना होत नाहीं. शतपथ ब्राह्मणात राजसूयाच्या प्रसंगीं राजाला जीं वस्त्रें परिधान करावयाचीं त्यात प्रथम अधीवस्त्र, वस्त्र, उत्तरीयवस्त्र अशा प्रकारें वस्त्रें परिधान करावयाचीं असतात. यावरून अधीवास हा शब्द वरील झगा या अर्थी असावा. शतपथ ५. ३, ५, १९ येथें राजसूयांत राजानें परिधान करावयाच्या वस्त्राचा अनुक्रम तार्प्य, पाण्डव व अधीवास असा आहे. (सायणानीं भाष्यांत अधीवास याचा अर्थ 'कंचुकादि' असाच दिला आहे).

[3]द्रापि.—ऋग्वेदांत हा शब्द झगा किंवा पायघोळ आंगरखा या अर्थानें आलेला आहे. सायणांनीं बहुतेक सर्व ठिकाणीं द्रापि याचा कवच असाच अर्थ केला आहे. परंतु हाच अर्थ घेण्याची विशेष जरूरी नाहीं. तरी पण याचा काय अर्थ असावा हें निश्चित सांगतां येत नाहीं.

[4]पेशस्.—ऋग्वेद व तदनंतरच्या ग्रंथांत वेलबुट्टीचे, कशिदा काढलेले वस्त्र असा याचा अर्थ होतो. उदाहरणार्थ नाचणाऱ्या स्त्रीचें वेलबुट्टी काढलेलें वस्त्र [ सायणांनीं बहुतेक ठिकाणीं पेशस् याचा रूप असाच अर्थ केला आहे मात्र ऋ. २. ३, ६ येथें विशेष तऱ्हेचें विणलेलें वस्त्र असा अर्थ सायण मतानें होऊं शकतो]. असल्या प्रकारची हिंदु लोकांची वस्त्रासंबंधी आवड मेगॅस्थेनीस व एरियन या लोकांच्या लक्षांत आली होती. तसेंच ऋग्वेद १०, १६ येथें वस्त्राला पेशन म्हटलेलें आढळतें रॉथ हा पेशन याची रोमन लोकांच्या व्हॅस्टिस कोलोरिबस इंटेक्स्टा याशीं मोठी गोड तुलना करतो. सायणांनीं वरील स्थलीं 'पेशनानि' या पदाचा अर्थ 'हिरण्मय कांतियुक्त वस्त्रें' असा केला आहे. असल्या

प्रकारची वस्त्रें करणें हा एक बायकांचा निल्याचा उद्योगच असे. आणि पेशस्कारी (वेलबुट्टीचें काम करणाराची बायको) या शब्दावरून हा अर्थ उघड होतो. हा शब्द यजुर्वेदसंहितेंत पुरुषमेधप्रसंगीं आला आहे. परंतु तैत्तिरीय ब्राह्मणावरील (३. ३, ४, ५) टीकाकार त्याचा सुवर्णकाराची बायको असा अर्थ करतात पिशेल याच्या मतानें पेशस् याचा रंग अथवा आकार याहून दुसरा अर्थ होऊं शकत नाहीं.

[५]मल —ऋग्वेदांत एकाठिकाणीं मुनींनीं धारण करावयाचें वस्त्र असा अर्थ होतो. सेंटपिटर्सबर्ग कोश याचा चर्मवस्त्र असा अर्थ देतो. परंतु लुडविग व झिमर यांच्या मतें याचा अर्थ 'भिजलेलीं वस्त्रें' असा होतो व हा अर्थ त्याच्या मूळ शब्दार्थाला धरूनच आहे. दीर्घकेशिन् मुनीच्या स्वभावास व अथर्ववेदांतील ऋचेस [६. ११५, ३.] धरून तो आहे असें वाटतें.

[६]वसन.—ऋग्वेद व तदुत्तरच्या ग्रंथांत पोषाख या अर्थी हा शब्द आला आहे.

[७]वस्त्र —ऋग्वेद व तदुत्तरच्या ग्रंथांत कपडे, पोषाख या अर्थी हा शब्द येतो.

[८]वाधूय.—याचा अर्थ नवऱ्यामुलीनें नेसलेलें वस्त्र असा असून लग्न झाल्यावर मुलीनें तें वस्त्र एखाद्या ब्राह्मणास द्यावयाचें असतें.

[९]वासस्.—ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत कपडा (अंगावर घेण्याचें अथवा परिधान करावयाचें वस्त्र) अशा अर्थी हा शब्द आला आहे. कपडे मेंढ्यावरील लोंकरीचे बनविलेले असत. पूषन देवाला कपडे विणणारा (वासोवाय १०. २६, ६) म्हटलें आहे. कारण निरनिराळे आकार देण्यांत त्याचा संबंध असे जीं वस्त्रें वापरलीं जात त्यावर वेलबुट्टी काढलेली असे, मरुत् हे सोनेरी वेलबुट्टी असलेलीं वस्त्रें वापरीत असा उल्लेख (१०. १५५, ६ हिरण्ययान् अत्कान्) आहे. ज्यावेळीं वस्त्रें दान करणाराचें (वासोदा) नांव, सोनें व घोडे दान करणारा बरोबर उल्लेखिलें जातें तेव्हां त्याचा तो उल्लेख उच्च प्रकारच्या वस्त्राविषयीं असावा. लोकांनां दागिन्यांची फार आवड होती असें ऋग्वेदांतील अनेक उल्लेखांवरून दिसून येतें व ही गोष्ट मेगॅस्थेनिसच्या कालांतहि होती. ऋग्वेदांत सुरभि व सुवसन (म्हणजे चांगलें शोभणारें व अंगाला नीट बसणारें वस्त्र) अशीं विशेषणें आलीं आहेत. वैदिक लोक तीन प्रकारचीं वस्त्रें वापरीत असत. एक नीवी, (आंतील वस्त्र) दुसरें वस्त्र, व तिसरें अधीवास [वरचें वस्त्र]. या वस्त्रालाच द्रापि व अत्क हीं नांवें आहेत. हें वस्त्रांचें वर्णन शतपथ ब्राह्मणांतील वर्णनांशीं जुळणारें आहे. ब्राह्मणग्रंथांत तार्प्य [रेशमी वस्त्र]-पांडव व अधीवास यांचा उल्लेख आहे. या शिवाय डोक्यास गुंडाळावयाचें जें वस्त्र त्याचीं टोंकें मानेच्या बाजूस गांठी मारून पुढें आणून खोंचलेलीं असत. ही तऱ्हा नेहमींच्या प्रचारांतल्या तऱ्हेहून वेगळी होती. पण ती यज्ञाच्या वेळचीं असल्यामुळें त्यांत वैशिष्ट्य होतें. अथर्ववेदांत [८. २, १६.] व शतपथ ब्राह्मणांत [५. २, १८] बायकांच्या वस्त्रांचा असाच प्रकार वर्णिला आहे. [शतपथ ब्राह्मणांतील वर्णनांत वस्त्राच्या गांठी कोठें माराव्या व टोंकें कोठें खोंचावीं याबद्दल उल्लेख वरील स्थलीं आढळत नाहीं.] पुरुषांच्या व बायकांच्या पोशाखांत फरक काय होता हें निश्चित सांगतां येत नाहीं. वेदकालीन लोकांनां विरक्त स्थितीमुळें दिगंबर [नग्न] असणाऱ्या यतीसारख्या लोकांशिवाय प्रत्येक मनुष्यानें वस्त्र धारण केलेंच पाहिजे ही गोष्ट कबूल होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

[१०]शामुल्य.—ऋग्वेदांत विवाहसंस्कारासंबंधीं सूक्तांत (१०. ८५, २९) याचा वधूनें रात्रीं नेसावयाचें वस्त्र असा अर्थ आहे.

[११]सिच्.—वस्त्राचा कांठ असा याचा अर्थ आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं (३. ५३, २) आपल्या बापाचें लक्ष्य आपणाकडे लागावें म्हणून मुलगा बापाच्या वस्त्राचा कांठ (अथवा पदर) ओढीत आहे व आई आपल्या मुलाला वस्त्राखालीं झाकून घेत आहे (१०. १८, ११) असा उल्लेख आहे. हा शब्द अथर्ववेद (१८. २, ५१) व शतपथ ब्राह्मणांतहि (३. २, १, १८) आला आहे.

[१२]सुवसन.—ऋग्वेदांत याचा अर्थ चांगलें वस्त्र असा असून त्याचा विशेषणाप्रमाणें चांगलीं वस्त्रें धारण करणारा या अर्थानें उपयोग केला आहे. सुवासस म्हणजे चांगले वस्त्र धारण केलेला असा अर्थ नेहमी असतो.

[१३]तार्प्य.—तैत्तिरीय संहिता व तदुत्तर ग्रंथांत या शब्दाचा अर्थ एक अनिश्चित वस्तूचें वस्त्र असा आहे. शतपथ ब्राह्मण व कात्यायन श्रौतसूत्र यावरील टीकाकारांचें असें मत आहे कीं तें तागाचें किंवा तीन वेळ तुपांत भिजविलेलें वस्त्र असावें, अथवा तप किंवा त्रिपर्ण झाडाचे बनविलेलें असावें परंतु स्वतः ब्राह्मणकारांसहि याचा नीट अर्थ समजला होता कीं नाहीं याबद्दल वानवाच आहे. गोल्डस्टकरच्या मतें याचा अर्थ रेशमी वस्त्र असा आहे. टीकाकारांनींहि कोठें रेशमी वस्त्र असा अर्थ केला आहे व एगलिंगला तो संमत आहे.

[१४]तूष —तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण या ग्रंथांत हा शब्द वस्त्राचा कांठ या अर्थानें आला आहे.

[१५]नीवि.—हा शब्द तैत्तिरीय संहिता व अथर्ववेद यांत नेसावयाचें मलवस्त्र अशा अर्थी आला आहे. हें पुरुष व स्त्रिया दोघेहि नेसत. विशेषतः बायकाच याचा जास्त उपयोग करीत.

[१६]प्रघात.—हा शब्द तैत्तिरीय, कठसंहिता व शतपथ ब्राह्मणांत विणलेल्या वस्त्राचा अचल (पदर) या अर्थानें आला आहे. या पासूनच नीवीचें सुटलेले धागे असतात.

[१७]प्राचीनतान.— कापडाचा ताणा, उभें सूत या अर्थानें हा शब्द तैत्तिरीय संहितेत आला आहे.

[१८] वा त पा न.— वाऱ्यापासून रक्षण करणारें वस्त्र या अर्थानें हा शब्द तैत्तिरीय संहितेंत आला आहे.

[१९] उ ष्णी ष.— वैदिक कालीं पुरुष व स्त्री हे दोघेंहि जें पागोटें वापरीत असत तें अथर्ववेद आणि पंचविंश ब्राह्मण ह्यांत व्रात्य याच्या पागोट्याचा स्पष्ट उल्लेख आहे. आपल्या पदवीचें चिन्ह म्हणून वाजपेय आणि राजसूय यज्ञाच्या वेळीं राजे लोक उष्णीषाचा उपयोग करीत असत.

[२०] क म्ब ल.— अथर्व वेदांत 'लोंकरीचा कपडा अथवा 'कांम्बळा' अशा अर्थीं हा शब्द आहे.

[२१] दू र्श.— ह्याचा अर्थ एक प्रकारचें वस्त्र असा आहे व हा शब्द दोनदां अथर्ववेदामध्यें आलेला आहे. वेबरच्या मतें हें वस्त्र मूळचे अनार्य लोक वापरीत असत.

[२४] प रि धा न.— ह्याचा अर्थ शरीराच्या खालच्या भागावरलें वस्त्र असा अथर्ववेद व बृ. उपनिषद् मध्यें अर्थ आहे चंदनचर्चित वस्त्राचा शाखायन आरण्यकात उल्लेख आलेला आहे.

[३] क्षौ म.— जाड सुताचे कपडे या अर्थानें हा शब्द मैत्रायणी संहितेंत आणि सूत्रात आला आहे

[२४] अ वि क.— मेंढ्यापासून होणारा म्हणजे लोकर हा शब्द एकदां बृहदारण्यक उपनिषदात आलेला आहे.

[२५] उ प स्त र ण.— कौषीतकी उपनिषदातील पर्यंकाच्या वर्णनांत ह्या शब्दाचा अर्थ 'चादर' आच्छादन असा केला आहे आणि ऋग्वेदातहि लाक्षणिक अर्थ असाच केला आहे. अथर्ववेदांतहि ह्याच अर्थ आहे असें वाटतें. तथापि व्हिटने ह्याचा अर्थ पर्यंक असा करितो. परंतु आस्तरण ह्याचा अर्थ 'उशी' असा दुसऱ्या उताऱ्यात करितो.

[२६] द शा.— शतपथ ब्राह्मणांत एकाद्या वस्त्राचें टोंक असा अर्थ याचा आहे. हा शब्द दशा–पवित्र ह्या रूमसात आलेला आहे व त्याचा अर्थ कांठ असलेला कपडा असा आहे.

[२७] प र्या स.— शतपथब्राह्मण कापडाच्या आडव्या विणीला हें नांव दिलेलें असून उभ्या विणीला अनुच्छाद असें नांव दिलेलें आहे.

[२८] पां ड व.— शतपथब्राह्मणांत ह्याचा अर्थ विन रंगाचें रेशमी वस्त्र असा आहे.

[२९] प्र व र प्र वा र.— 'पांघरूण' 'लोकरी कपडा' या अर्थाचा बृहदारण्यक उपनिषदांतील हा शब्द आला आहे.

[३०] प्रा ची ना ता न.— हा कपड्याचा 'उभा दोरा' ह्या अर्थानें ब्राह्मण ग्रंथांतून उपयोगांत आणलेला शब्द आहे.

[३१] ब रा सी.— याचा अर्थ एक प्रकारचें वस्त्र. हा शब्द काठक संहिता व पंचविंश ब्राह्मण यांत आलेला आहे.

[३२] मा हा र ज न.— 'केशरानें रंगविलेला, बृहदारण्यक उपनिषदामध्यें वस्त्राला हें नांव लाविलें आहे.

[३३] वि व न य.—ब्राह्मण ग्रथांत मंचकावर जसें कापडाचे वगैरे विणकाम किंवा चूणकाम असतें तशा प्रकारचें काम अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[३४] शा मू ल्य.— जैमिनीय उपनिषत् ब्राह्मणांत ह्याचा अर्थ शामुल्याप्रमाणें लोंकरीचा अंगरखा असा सामान्यपणे आहे. रॉथ ह्या पाटांत शमीला अशी सुधारणा करून त्याचा अर्थ शमीच्या लांकडाचे तुकडे असा करितो.

भूषणें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अंज | [७] निष्क | ललामी |
| अंजि | [८] न्योचनी | वरिमत् |
| अरंकृत | पुण्डरीक | व्यंजन |
| अरंकृति | पुष्कर | विभूषन |
| [१] आनूक | प्रभूपन | शतपत्र |
| [२] ओपश | बर्हन | [११] शिंबल |
| कर्णशोभन | भूषन | सुनिष्क |
| [४] कुरीर | [९] मणि | [१२] स्तुका |
| [५] कृशन | [१०] रत्न | [१३] स्रज् |
| घृशानिन् | रुक्म | हिरण्ययी |
| [६] खादि | रुक्मन् | हिरण्यशिप्र |
| | | हिरीमत् |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| पुण्डरिस्रज् [सुवर्ण-कमलाची माला] | [१४] प्रवर्त | मणि |
| | प्राकाश | रत्न |
| पुष्कर | भोग | स्रज् |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंजि | निष्कग्रीव | ललाम्य |
| ओपश | [१६] नानाहुक्मरपट्ट | [१७] सीमन् |
| [१५] कुम्ब [डोक्यावर घालावयाची— जाळी] | पुण्डरीक | सुरुक्म |
| | पुष्प | सुस्र |
| | प्रसाधन | स्रज् |
| कुरीर | मधूलक | खदांजि |
| कृशन | रुक्मन् | हरितस्रज् |
| जांवभंजन [अंजन] | रुक्मस्तरण | हिरण्यज |
| देवांजन | ललाम | हिरण्यस्रक् |
| नलद | ललामगु | हैरण्य |

[संहितेतर]

| | | |
|---|---|---|
| [१८] प्राकाश | [२०] लोहमणि | [२२] स्थागर |
| [१९] फण | [२१] निमुक्त | |

[१] आ नू क —गेल्डनर म्हणतो हा शब्द ऋग्वेदांत एकदांच आला असून त्याचा अर्थ भूषण असा आहे. रॉथ ल्युडविग व ओल्डेनबर्ग हे त्याचा क्रियाविशेषणाप्रमाणें अर्थ करतात.

[२] ओ प श.—ऋग्वेद अथर्ववेद व पुढीलहि ग्रंथांत हा शब्द आला आहे परंतु याचा अर्थ मात्र संशयित आहे. बहुतकरून सामान्यतःत्याचा अर्थ स्त्रियांची वेणी असा होतो जुन्याकाळीं कधीं कधीं पुरुषांच्या केसालाहि हा शब्द लावीत असत. सिनीवालि देवतेला स्वौपशा असें म्हटलें आहे,

परंतु हें विशेषण संशयित आहे. झिमर म्हणतो कीं, कृत्रिम वेण्यांचा उपयोग वैदिक कालीं अगदींच माहीत नव्हता असें नाहीं. पृथुस्तुक (रुंद वेण्या असलेली;) विपरीत-स्तुका (मा ळ्या वेण्या असलेली) आणि ओपश यांतील फरक काढतां येत नाहीं. गेल्डनेर म्हणतो कीं या शब्दाचा शिंग असा अर्थ होतो. परंतु इंद्राला हा शब्द लावला म्हणजे त्याचा मुकुट असा अर्थ होतो. सायणांनीं बहुतेक ठिकाणीं ओपश याचा आकाश व कोठें मेघ असा अर्थ केला आहे.

[३] कर्णशोभन.—पुरुषांच्या करितां कर्णभूषण असा याचा अर्थ आहे. दुसऱ्या एका उताऱ्यांत (ऋ १.१२५ १४) एका देवतेला हिरण्यकर्ण असें म्हटलें आहे. हॉपकिन्स म्हणतो कीं कर्णभूषणें हीं कंठभूषणें व मणिबंध-भूषणें यांच्या नंतर उपयोगांत आलीं असावीं.

[४] कुरीर.—ऋग्वेदांतील व अथर्ववेदांतील विवाहसं-बंधीं ऋचेतील वधूच्या भूषणाच्या वर्णनांत ओपश व कुम्ब यांच्या बरोबर हा शब्द आला आहे. यजुर्वेद संहितेंत सिनीवालि देवीचें सुकपर्दा, सुकुरीरा, स्वौपशा (उत्तमप्रकारचा पोषाख डोक्यावर चढवलेली) अशा अर्थाचें वर्णन आलें आहे. गेल्डनेरच्या मतें याचा अर्थ शिंग असा होतो. परंतु हा अर्थ संशयास्पद आहे.

[५] कृशन.—मोतीं. ऋग्वेदांत सवितृ देवतेचा रथ सुशोभित करण्याकरितां व घोड्याच्या अलंकारांत मोत्यांचा उपयोग करीत असत आणि म्हणूनच घोड्याला 'कृशनावत्' असें म्हटलें आहे. अथर्ववेदांत मोत्यांचा उल्लेख आहे आणि समुद्रांतून काढलेल्या मोत्यांच्या शिंपल्यांचा [शंखःकृशनः] उपयोग भारलेल्या ताईताप्रमाणें करीत असत असाहि उल्लेख आहे. निघंटुकोशांत कृशनाचा सुवर्ण असा अर्थ आहे.

[६] खादि.—ऋग्वेदांत साखळ्या, कडी, तोडे व कधीं कधीं हातांतील आंगठ्या अशा अर्थी हा शब्द आला आहे. मॅक्समुल्लर याचा अर्थ कड असा करतो.

[७] निष्क.—ऋग्वेद व पुढील ग्रंथांतून येणाऱ्या. निष्ककण्ठ, नीलग्रीव या शब्दावरून निष्क याचा अर्थ गळ्यांतील सोनेरी दागिना असा होतो. पंचविंशब्राह्मणांत (१७.१,१४) रुप्याचें निष्क होतें असें म्हटलें आहे. ऋग्वेदकालापासूनच निष्क हे नाणें होतें असें दिसतें कारण एका स्तोत्यानें शंभर निष्क व शंभर घोडे मिळाल्याबद्दल स्तुति गाइली आहे. या गायकाला निष्क हे केवळ स्वतःच्या दागिन्याकरतांच पाहिजे असतील असें दिसत नाहीं. तदुत्तर ग्रंथांत निष्क हें नाण्याचें प्राचीन नांव आहे असें उल्लेखिलेलें आढळतें.

[८] न्योचनी.—ऋग्वेदांतील विवाहसूक्तांत स्त्रियांचा एक अलंकार या अर्थी हा शब्द आला आहे. सायणमतानें याचा अर्थ दासी असा होतो.

[९] मणि.—ऋग्वेदांत व तदुत्तर ग्रंथांत एक रत्न असा याचा अर्थ आहे व जादूच्या ताइताप्रमाणें सुखदुःख निवारणार्थ त्याचा उपयोग करीत असत असा अथर्ववेदांत उल्लेख आहे. याचा खरा अर्थ हिरा कीं मोतीं हें समजत नाहीं. मात्र ही गोष्ट खरी कीं, हा मणि दोऱ्यांत ओंवला जात होता व मणि ओंवण्याच्या सूत्राचा पंचविंश ब्राह्मणांत उल्लेख आहे. हा मणि गळ्यांत बांधीत असत हें मणिग्रीव या शब्दावरून स्पष्ट होतें. शांखायन आरण्यकांत (१२. १८) बिल्वाच्या मण्याचें वर्णन बरेंच आहे, व तेथें असल्या ताइतांचे बरेच प्रकार वर्णिले आहेत. रत्नकार (मणिकार) याचा उल्लेख यजुर्वेदांतील पुरुषमेधामध्यें बलि दिले जाणाऱ्यांच्या यादींत आला आहे.

[१०] रत्न.—ऋग्वेदांत व पुढील वैदिक वाङ्मयांत मौल्यवान पदार्थ या अर्थी व तदुत्तर वाङ्मयांत मणि या अर्थी हा शब्द आला आहे.

[११] शिम्बल.—ऋग्वेदांत याचा अर्थ सायणमतानें शाल्मली वृक्षाचें फूल असा आहे.

[१२] स्तुका.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत केसांचा किंवा लोंकरीचा गोंडा या अर्थी हा शब्द आला आहे.

[१३] स्रज्.—लग्नाचे व इतर मंगल प्रसंगीं शोभा देण्यासाठीं धारण केलेली माळ अशा अर्थानें हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर वाङ्मयांत आला आहे.

[१४] प्रवर्त.—हा शब्द तैत्तिरीय संहितेंत आला असून त्यावरील टीकाकारांच्या मतें त्याचा अर्थ अलंकार असा आहे. अथर्ववेदांतील व्रात्यांच्या वर्णनांतहि हा शब्द येतो. सेंटपीटर्स बर्ग कोशांत याचा 'गोल आकारांचा अलंकार' असा अर्थ दिला आहे.

[१५] कुम्ब.—अथर्ववेदांत स्त्रियांनीं डोक्यावर घालावयाचा एक दागिना या अर्थानें हा शब्द आला आहे. गेल्डनेरच्या मतें ओपश, कुरीर या शब्दांप्रमाणें याचाहि शिंग असाच अर्थ होतो. परंतु हा अर्थ संशयास्पद आहे. वेणींत घालण्याचा स्त्रियांचा दागिना असाच अर्थ हिंदुस्थानांत परंपरागत चालत आला आहे.

[१६] नीनाह.—अथर्ववेदांत हा शब्द एकदांच आला असून त्याचा नह या धातूपासून निघालेला अर्थ कमरपट्टा असा दिला आहे.

[१७] सीमन्(न्त).—अथर्ववेद व तदुत्तर ग्रंथ यांत केसांतील भांग असा याचा अर्थ आहे.

[१८] प्राकाश.—हा शब्द तैत्तिरीय ब्राह्मणांत आला असून त्याचा अर्थ धातूचा अलंकार अथवा आरसा असा आहे. गेल्डनेर म्हणतो कीं, मैत्रायणी संहितेंतील (४.४,४) प्रावेप या शब्दाचाहि हाच अर्थ होतो.

[१९] फण.—याचा उल्लेख कौषीतकी उपनिषदांत आला आहे, व त्याचा एक अलंकार असा अर्थ दिला आहे परंतु 'फलहताः' हा पाठ चुकीचा दिसतो 'फलहस्ताः' असा तो पाठ असावा असें वाटतें.

[२०] लोहमणि.—याचा छान्दोग्य उपनिषदांत बोथलिंगनें म्हटल्याप्रमाणें तांब्याचा ताईत असा अर्थ आहे. मॅक्समुल्लर

यानें म्हटल्याप्रमाणें सोन्याची लगडी ( तुकडा ) असा नव्हे.

[२१]वि मु क्ता.—याचा अर्थ मोती असा असून षड्विंश ब्राह्मणांत याचा उल्लेख आलेला आहे.

[२२]स्था ग र.—तैत्तिरीय ब्राह्मणांत हा शब्द आला असून एक प्रकारचा अलंकार असा याचा अर्थ आहे.

## श त्रु

### शत्रुनामें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अभिधुक् | कृकदाश्व | पुरुद्रुह |
| अररिवत् | [१]दुःशासु | बुद्बुदयाशु [बुद्बुदवत्] |
| अराति | द्रुह | मृध |
| अरावत् | द्विष | रिपु |
| अरि | द्वेष | वृजन |
| अर्य | द्वेषोयुत | वैरिन् |
| अब्यर्षु | ध्वस्मन् | शत्रु |
| आमूरं | [२]निगुत | [३]सपत्न |
| उत्स | निदंनिदं | |
| उपमाति | परिद्वेषस् | |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अघहर | द्विष् | मलूव |
| अन्यनाभि | द्वेष्य | मर्माविध[मर्महृत] |
| अबलभन्वन् | निरिन्द्रिय | रिपु |
| अभिमाति | निर्हस्त | विव्याधिन् |
| अभ्रातृव्य | पियारु | वृजन |
| उग्रंजिति | पृणादरि | सपत्न |
| कुरीरि ( कुरीर केशयुक्त शत्रु] | पृषदाज्यप्रनुत्त | सापत्न |
| | भ्रातृव्य | स्वरि |

### शत्रुविशेषणें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अभिक्रतु | अमित्रखाद | अस्मद्रुह् |
| आभक्षत् | अमित्रिन् | अहिशु |
| अभिद्रुह् | अरति | ऋषिद्विट् |
| अभिभू | अरमनस् | खेद |
| अभिमातिन् | अरातियत् | जायु |
| अमानुष | अविष्णु | तपन |

[१] दुःशा सु.—हा शब्द बहुतकरून ऋग्वेदांत विशेषनाम म्हणून आला असावा व नंतर त्याचा कुरुश्रवणाचा शत्रु असा अर्थ होत असावा. लुडविगचें असें मत आहे कीं तो परशु किंवा पर्शियन असावा परंतु हें अगदीं अशक्य आहे. या शब्दाचा अर्थ दुसऱ्याचें वाईट पाहणारा व वाईट करणारा असा असावा.

[२] नि गु त.—ऋग्वेदांत दोन वेळ हा शब्द आला असून सायणमतानें त्याचा अर्थ शत्रु असा आहे व तो संभवनीय आहे. लुडविग म्हणतो कीं हे शत्रू अनार्य लोक असावेत.

[३] स प त्न.—ऋग्वेदांतील दहाव्या मण्डलांत हा शब्द आहे आणि तो सापत्नी ( सवत ) या पासून झाला असून पुढील वाङ्मयांत तो पुल्लिंगी ( सपत्नी ) जास्त आढळतो.

## व्या पा र व कृ षि

### कृषि [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| [१]अष्ट्रा | धान्यकृत् | लोग ( ढेंकूळ ) |
| कृषीवल | न्युप्त | वपुष्टर ( बी पेरणारा ) |
| कृषि | पक्व ( तयार पिकाचें शेत ) | [७]वृंक |
| क्षेत्र | पर्ष ( सुकलेलीं ताटें, कडबा ) | शर |
| क्षेत्रपत्य | [५]फर्वर(जोमांतील पीक, नांगरट; बी पेरणारा. ) | शुन |
| खनित्र | फाल | [९]शुनासीर |
| खल [धान्य मळण्याचें खळें ] | बीज | सीरा ( नांगर ) |
| [३]गव्यूति | मुंज | सीरिन् ( नांगर हांकणरा ) |
| गोमघ | युग ( गाडीचें जूं ) | [१०]सृणि |
| गोषाति | [६]लांगल | सुयवसिनी |
| तृण | | स्वसर ( गुरें चरण्याची जागा) |
| [४]तोक्मन् | | हित ( नांगरट ) |
| धान्य | | |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अकृष्ट | विशेषण ) | शुन |
| आहाव (बलीवर्द) | निखात | सीता |
| ऊषा ( खारी माती ) | फाल | सीर |
| क्षेत्र | भू | सीरवाह |
| क्षेत्रपति | भूमि | सुमतित्सरु |
| क्षेत्रवित् | मृत | सुवरत्र (गाडीच्या जुंपण्या) |
| द्वादशगव ( बारा-बैलां नांगराचें | मृत्तिका | सुसस्या ( सुपीक जमीन) |
| | यवाचित | सूयवसिनी |
| | लांगल | |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अलसाला ( सस्यमंजरी ) | पवीरवत्[ लोखंडी फाळ] | सस्य |
| अष्टयोग ( नांगर) | [१२]पलाल | सीता |
| अष्ट्रा ( प्रतोद ) | [१३]पलाव | सीर |
| आनय ( सर्षप ) | [१४]पवन | सीरपति |
| इषा (कृषिसाधन) | फाल | सीरा |
| उप्ता | बीज | सुक्षेत्रता |
| कर्षि | युग | सुफाल |
| कीनाश | योनि [ नांगरलेली जमीन ] | सुशीम ( कृषिसाधन ] |
| कृषिमंशित (नांगर | लांगल | सृणि [ विळा, कोयती ) |
| कृष्टराधि | वरत्रा | सोमसत्सह [कृषिसाधन] |
| खल | वाह | स्थिवि [ यवकांड] |
| तर्द्मन् | [१५]शण | स्थूरि [ गव्हाचें पीक ) |
| [११]तुषु | श्रुष्टि | |
| नर | श्वत् | |
| नीलागलसाला ( सस्यमंजरी ] | षड्योग ( सहाबैली नांगर ] | |
| परि[१६]जल्य | | |

[ इ·र संहिता ]

| | | |
|---|---|---|
| अष्ट्रा | सील | |

[ संहितेतर. ]

| | | |
|---|---|---|
| [१६] लवन | | |

**मापें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अगव्यूति | [१९] तेजन [ शेत मोजण्याची काठी ] | मिति [ माप ] |
| अर्ध | | मीयमान |
| [१७] अरत्नि | | [२२] योजन |
| [१८] खारी | [२०] पंक्ति | [२३] स्थिवि |
| गव्यूति | [२१] मना | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अरत्नि | नाभिदघ्न | यवमात्र |
| इषुमात्र | पक्षसम्मिता | परिमाण |
| उपरसाम्मित | पंचदशारत्नि | रथाक्ष |
| [२४] कृष्णल | पंचारत्नि | [२७] व्याम |
| ग्रीवदघ्न | पुरुषमात्र | सप्तदशारत्नि |
| जानुदघ्न | [२५] बाहु | सप्तारत्नि |
| तावन्मात्र | बाहुमात्र | सहस्रयोजन |
| नवारत्नि | [२६] मान | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| [२८] आश्विन [ घोड्यांची एक दिवसाची चाल ] | प्रमा | काठी ] |
| | भूरिभार | व्याम |
| | मान | स्थिवि [ धान्य मोजण्याचें माप ] |
| त्रियोजन | योजन | |
| पंचयोजन | [२९] शल [ मोज- | |
| परिच्छित्र | | |

[ इ. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [३०] कुष्ठ | [३१] मृद ( ड ) | |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [३२] अंगुष्ठ | [३६] पृथा | प्रादेश |
| [३३] क्रोश | [३७] प्रक्रम | [०] रत्नि |
| [३४] त्रैपद | [३८] प्रसृत | [४१] शराव |
| [३५] पाद | | |

**नाणीं** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| निष्क | वस्न्य | हिरण्यपिण्ड |
| मना | [४२] शुल्क | |

[तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अष्टाप्रुड्हिरण्य | कृष्णल | |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| निष्क | प्रतिपण | प्रणप |

[१] अष्ट्रा.—शेतकऱ्याची खूण अथवा बैलांनां मारावयाची पराणी. ऋग्वेदांत या शब्दाचा उल्लेख पुष्कळ वेळ आला आहे.

[२] कृषि.—नांगरणें. इराणियन् लोकापासून अलग होण्याच्या पूर्वींच आर्य लोकांनां जमिनीची लागवड करणें, माहित होतें. कारण जमीनीत बीं पेरणें आणि धान्य उत्पन्न करणें या विषयीं ऋग्वेदांतील यवम्-कृष, सस्य या शब्दांच्या अर्थाचे अवेस्तांतील शब्द यवकरेश व ह्य हे आहेत. बी पेरणें ह्या शब्दसमुच्चय मुख्यत्वेंकरून ऋग्वेदाच्या पहिल्या आणि दहाव्या मण्डलांत व क्वचित गोत्र मंडलांत [ २ ते ७ ] जो आला आहे त्याला कांहीं तरी अर्थ असलाच पाहिजे. अथर्ववेदांत पृथी वैन्य हा कृषिकर्मांचा आद्य प्रवर्तक असल्याचा उल्लेख [ ८. १०, २४ ] आहे. ऋग्वेदांतहि आश्विन नांगराच्या साहाय्यानें बीं पेरीत असत असा उल्लेख आहे. पुढील संहिता आणि ब्राह्मणग्रंथ यांत कृषिकर्मांचा बराच उल्लेख आला आहे. ऋग्वेदांत देखील कृषिकर्माला महत्त्व दिलेलें आढळतें. पंचविंश ब्राह्मणांत ब्राह्मणसत्तेच्या बाहेर असलेले व्रात्यलोक जमीन नांगरीत नसत असा उल्लेख आहे. नांगरलेल्या जमीनीला उर्वरा अथवा क्षेत्र म्हणत. खताचा [ शकन्, करीष ] उपयोग करीत असत आणि पाट बंधाऱ्याचा [ खनित्र ] हि उपयोग केला जात असे. नांगर सहा आठ व कधीं कधीं बारा बैलांनीं ओढविला जात असे. शतपथ ब्राह्मणांतील शेतकीचीं कृत्यें म्हणजे नांगरणें, पेरणें, कापणी करणें आणि मळणें(कृषतः वपंतः लुनन्तः मृणन्तः)हीं आढळतात. धान्य पिकलें म्हणजे कोयत्यानें [दात्र, सृणी ] कापीत, गड्डे [ पर्ष ] बांधीत आणि कोठाराच्या जमीनींत [कल] मळींत असत. धान्य चाळणीनें अथवा सुपानें चाळून त्यांतील कचरा काढून टाकीत असत. व एका सांठवणांत ( ऊर्दर ) भरून ठेवींत असत. धान्य पाखडणाराचें नांव धान्यकृत् असें होतें. कोणत्या प्रकारचें धान्य पेरींत असत हें ऋग्वेदावरून स्पष्ट होत नाहीं. कारण यव शब्दाचा अर्थ निश्चित नाहीं व धानाचाहि अस्पष्टच आहे. तैत्तिरीय व वाजसनेयि संहितांमध्यें व्रीहि [ तांदूळ ], यव [ जव ], उपवाक [ एक यवाची जात ], वाटाणे, मुद्ग [ मूग ], गोधूम, नीवार, प्रियंगु, श्यामाक, मसुर इत्यादि धान्यांचा उल्लेख आहे. आणि उर्वारु, उर्वारुक [ काकड्या ] यांचाहि उल्लेख आहे. वैदिक काळांतील लोक फळझाडांची लागवड करीत किंवा तीं आपोआप उगवत असत हें समजत नाहीं. परंतु कर्कन्धु, कुवल, बदर इत्यादि फळांचा उल्लेख येतो. तैत्तिरीय संहितेत [ ७. २, १०, २ ]. शेतीचे हंगाम कोणते ते सांगितले आहेत. यव हें धान्य हिवाळ्यांत पेरून उन्हाळ्यांत काढीत असत, पावसाळ्यांत पेरलेलें धान्य शरदृतूत निघे; वाटाणे आणि तीळ हीं धान्यें ग्रीष्म ऋतूंत पेरून हिवाळ्यांत काढीत. तैत्तिरीय संहितेंत आणखी एका स्थलीं [ ५. १, ७, ३ ] पिकाचे वर्षातून दोन हंगाम असत असा उल्लेख आहे हिवाळ्यांत पेरलेलें धान्य चैत्रांत निघत असे असा कौपीतकी ब्राह्मणांत उल्लेख आहे. शेतीच्या कामांत शेतकऱ्यांनां फार त्रास पडत असे. उंदीर बीं खात, पक्षी आणि निरनिराळे सरपटणारें प्राणी [ उपक्वस, जभ्य, तर्द, पतंग ] पिकाचे कोंवळे अंकुर तोडीत असत, आणि अवर्षण व अतिवृष्टि यांमुळें पिकाचा नाश होत असे. हीं सर्व विघ्नें टळण्यसाठीं अथर्ववेदांत [ ६. ५०, १४२; ७. ११ ] मंत्र सांगितले आहते.

[3] गव्यूति.—ऋग्वेदांत हा शब्द रॉथच्या मताप्रमाणें गुरांनां चरण्यासाठीं गवत असलेली जमीन या अर्थी आणि गव्य शब्दहि त्याच अर्थी आलेला आहे. पुढें पंचविंश ब्राह्मणांत (१६,१३,१२) त्याचा रस्त्याची लांबी मोजण्याचें माप असा अर्थ होऊं लागला. गेल्डनेर त्याचा पहिल्यानें मूळअर्थ खरोखरचा अथवा लाक्षणिक रस्ता असा करून नंतर जमीनीचें माप व पुढें जमीन असा अर्थ करतो.

[4] तोक्मन्.—हा शब्द नपुंसकलिंगी असून ऋग्वेदामध्यें व इतरत्र कोणत्याहि धान्याचे हिरवे कोंब या अर्थी आला आहे. ऐतरेय ब्राह्मणांत व्रीहि, महाव्रीहि, प्रियंगु, व यव यांच्या अंकुरांचा उल्लेख आहे.

[5] फर्वरि.—हा शब्द ऋग्वेदांत आला आहे. याचा निश्चयात्मक अर्थ सांगतां येत नाहीं. कदाचित् याचा अर्थ पिकलेलें शेत असा असावा. सायणमतानें याचा अर्थ भरणारा व ग्रासमनच्या मतानें पेरणारा असा याचा अर्थ आहे.

[6] लांगल.—ऋग्वेद व पुढील ग्रंथांत याचा नेहमींचा अर्थ नांगर असाच आहे. अनेक ठिकाणीं याचें वर्णन पवीरवत्, पवीरवम्, सुशेवम् (बारीक मूठ असलेला) असें वर्णन आलें आहे.

[7] वृक.—ऋग्वेदांत दोन ठिकाणीं (१.११७,२१; ८.२२,६) याचा अर्थ नांगर असा आहे.

[8] शुनासीर.—हा शब्द द्विवचनी असून ऋग्वेद व पुढील ग्रंथांत कृषिकर्मदेवता असा त्याचा अर्थ होतो. या देवता रॉथच्या मतानें नांगराचा फाळ व नांगर या होत. हा शब्द शुन आणि सीर हीं दोन पदें एकत्र होऊन झाला आहे. याच्या अर्थाबद्दल मतभेद आहे. शुन याचा अर्थ सायणमतानें वायु असा होतो. सीर या शब्दाचा अर्थ सायणमतें वायु व यास्कमतें आदित्य असा आहे. वस्तुतः सीर याचा अर्थ नांगर व शुन म्हणजे सुख आणि दोन्हीं शब्द मिळून सुखकारक नांगर किंवा नांगरामुळें उत्कर्ष असा अर्थ होतो. नांगर हें शेतीचें मुख्य साधन असल्यामुळें त्यास देव मानण्याचा प्रघात पडला, व याल्यच अनुसरून सायण व शौनक यानीं अर्थ केला असावा.

[9] सीरा.—हा शब्द ऋग्वेद व पुढील ग्रंथांत अनेक वेळां आला आहे. हा नांगर ओढण्यास बैल असत, त्यांच्या मानेवर जूं असे व पाठीवर ओढपट्टया (ऋ. ८,५७,४; १०.१०२,८) असत व बैलांनां हांकण्यासाठीं नांगर चालविणाराजवळ अणी (अष्ट्रा) असे. नांगराच्या निरनिराळ्या भागाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं.

[10] सृणि.—ऋग्वेदांत हा शब्द विळा या अर्थानें एकदां निश्चयानें (१५८,४) व दुसऱ्या एका ठिकाणीं (१०.१०१,३) अनिश्चित असा आहे. पिशेलच्या मतानें [ऋ. १.५८,४] येथें असलेले सृण्या हें पद त्याच्या बरोबर असलेल्या जुहूचें विशेषण असून या दोन्ही पदांचा अर्थ कोयतीच्या आकाराच्या पळ्या असा आहे पण या अर्थाबद्दलहि शंका आहे. सृण्या या शब्दाबरोबर जेता हा शब्द येतो परंतु त्याचा अर्थ संदिग्ध आहे. रॉथच्या मतें जेता या ऐवजीं चेता असा शब्द असावा. ओल्डेनबर्ग म्हणतो हा शब्द चेता असाहि असेल. हॉपकिन्स याच्या मतें सृणि शब्दाचा अर्थ आकडा (आकडी) असा असावा.

[11] तुष.—अथर्ववेद व तदुत्तर ग्रंथांत याचा नेहमीचा अर्थ धान्याचा भुसा असा आहे. या भुसाचा विस्तव पेटविण्याकडे उपयोग करीत असल्याबद्दल तैत्तिरीय (५.२,४,२) व शतपथ ब्राह्मणांत (७,१,१,७) उल्लेख आहे.

[12] पलाल.—अथर्ववेदांत अनुपलाल या शब्दा बरोबर एका राक्षसाचें नांव म्हणून हा शब्द आला आहे. याचा अर्थ गवताची पेंढी असा असावा व तोच अर्थ शांखायन सूत्रांत [३०;२७] स्वीकारला आहे. या शब्दाचें स्त्रीलिंगी रूप यवाची पेंढी या अर्थानें अथर्ववेदांत (२.८,३) आलें आहे.

[13] पलाव.—अथर्ववेद व जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण (१५४,१) या ग्रंथांत हा शब्द भुसा या अर्थानें आला आहे.

[14] पवन.—अथर्ववेदांत टरफलापासून धान्य वेगळें करण्याचें यंत्र अथवा धान्य वाढविण्याची पाटी अशा अर्थानें हा शब्द आला आहे. आश्वलायन गृह्यसूत्रांत या पवनाच्या योगानें दहन केल्यानंतर प्रेतास्थि शुद्ध करीत असत. [आश्वलायन सूत्रांतील पवन याचा अर्थ वायु असा असावा.]

[15] शण.—याचा अर्थ अंबाडी असा असून ही जंगलांत वाढते असा अथर्वांत उल्लेख आहे. जंगिडाप्रमाणें विस्कंधावरहि तोडगा म्हणून हिचा उपयोग होतो असें तेथें म्हटलें आहे. हिचा शतपथ ब्राह्मणांतहि (३.२,१,११) उल्लेख आहे.

[16] लवन.—निरुक्तांत (२.२) धान्याची मळणी किंवा कापणी या अर्थानें हा शब्द आला आहे.

[17] अरत्नि.—याचा मूळ अर्थ कोपरापासून करंगळीच्या टोकापर्यंतचा हात. ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत लांबी मोजण्याचें माप या अर्थानें त्याचा उपयोग केला आहे.

[18] खारी.—ऋग्वेदांत एका ठिकाणीं सोमरस मोजण्याचें माप या अर्थानें हा शब्द आला आहे.

[19] तेजन.—शेत मोजण्याची काठी या अर्थानें हा शब्द ऋग्वेदांत आला आहे. अथर्ववेदांत दोन वेळां हा शब्द आला असून दुसऱ्या ठिकाणीं (२०.१३६,३) वासंतिक (वसंत ऋतूंतील) बांबू अशा अर्थानें आला आहे. ऐतरेय ब्राह्मण वगैरे ग्रंथांत (१.२५) त्याचा बाणाचें टोंक असा अर्थ आहे.

[20] पंक्ति.—हा शब्द पक्ष्यांची (५.५९,७) घोड्यांची (१.१२६,४) किंवा रथांची (४.३८,३) रांग या

अर्थानें ऋग्वेदांत आला आहे. छांदोग्य उपनिषदांतहि (५ १४, १) याचा उल्लेख आहे.

[२१]म ना —हा शब्द ऋग्वेदांतील एका दानस्तुति-सूक्तांत [८.७८,२] आला आहे तेथें आलेल्या 'सचामना' या रूपावरून हें सोन्याचें नाणें अथवा वजन असावें किंवा अलंकार असावा व म्हणून याची ग्रीक म्ना' व लॅटिन 'मिना' या शब्दांशीं तुलना करितात. हे शब्द मूळचे सेमटिक भाषेंतील आहेत, व ते फोनेशियन लोकांपासून ग्रीक लोकांनीं घेतले असावेत व फोनेशियनांपैकींच असलेल्या सिसली अथवा एट्रुरिया येथील कार्थेजियन लोकांनीं रोमन लोकांपासून घेतले व बाबिलोनियन लोकांपासून हिंदुस्थानातील लोकांनी घेतले.परंतु ही मनाच्या बाबतींतील कल्पना धोक्याची आहे कारण त्या कल्पनेला आधार काय तो बाबिलोनियन लोकांपासून हिंदुस्थानांतील लोकांनां हें नाणें माहित झालें हा होय; व तोहि जलप्रलयाची हकीकत व नक्षत्रव्यवस्था हिंदी लोकांनीं बाबिलोनियन लोकांपासून घेतल्या या कल्पनेप्रमाणेंच होय. परंतु उलटपक्षी या मनाचा अर्थ ऋग्वेदांत आणखी आढळणाऱ्या (१. १७३, २; ४ ३३, २; १०. ६, ३) व 'इच्छा' अर्थ असणाऱ्या 'मना' प्रमाणेंच असावा अथवा कदाचित प्रथम दिलेल्या स्थलीं (८. ७८, २) मना याचा इच्छित वस्तु असाहि अर्थ असेल. बोथलिंकच्या कोशात मना हा एकटाच शब्द सापडतो व त्याचा इच्छा किंवा मत्सर एवढाच अर्थ दिला आहे हें लक्षात ठेवण्यासारखें आहे.

[२२]यो ज न.—ऋग्वेद व तदुत्तर वाङमयांत लांबी मोजण्याचें माप या अर्थानें हा शब्द आला आहे. परंतु योजन या शब्दानें जमानींची किती लांबी गणली जाई हें सांगतां येत नाहीं. नंतर पुढील काळात योजन म्हणजे चार कोस किंवा नऊ मैल अशी गणना होऊं लागली.

[२३]स्थि वि.—हा शब्द अनेकवचनी रूपांत ऋग्वेदांत(१० ६८, ३) एकदा आला असून त्याचा अर्थ एक कैली माप असा आहे हा शब्द ऋग्वेदांत आणखी एकदा (१०. २७, १५) 'स्थिविमन्त' अशा विशेषणात्मक रूपांत आला आहे.

[२४]कृ ष्ण ल.—याचा अर्थ बोर असा आहे. परंतु पुढें त्याचा वजन या अर्थी व तें वजन चार कृष्णल म्हणजे एक माष [उडीद] असा उपयोग होऊं लागला. यजुर्वेद आणि तैत्तिरीय संहिता या ग्रंथांत हा शब्द येतो.

[२५]बा हु.—तैत्तिरीय संहिता आणि सूत्रग्रंथ यांत हा शब्द लांबी मोजण्याचें माप या अर्थानें आला आहे.

[२६]मा न.—तैत्तिरीय संहिता अथर्ववेद व ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द येतो व तो नेहमीं रक्तिका किंवा कृष्णल या शब्दांबरोबर येतो. याचा अर्थ गुंज असा आहे.

[२७]व्या म.—तैत्तिरीय संहिता अथर्ववेद व ब्राह्मणग्रंथांत हा शब्द येतो.याचा अर्थ पसरलेल्या बाहूनें व्यापिलेली जागा असा आहे. हें लांबी मोजण्याचें प्रमाण आहे. एक व्याम म्हणजे सहा फूट किंवा इंग्रजींत ज्याला फॅदम म्हणतात तें प्रमाण होय.

[२८]आ श्वि न.—अथवा अश्विन अथर्ववेदांत पुढील ग्रंथांत याचा अर्थ घोडेस्वारानें एका दिवसांत केलेल्या प्रवासाच्या लांबीचें माप असा आहे अथर्ववेदांत हें माप पांच योजनांपेक्षां जास्त होतें असें म्हटलें आहे. पांच योजनांपेक्षां जास्त लांबी मोजण्यास आश्विन याच मापाचा उपयोग करीत असत. ऐतरेय ब्राह्मणांत पृथ्वीपासून स्वर्ग एक हजार आश्विन लांब आहे असें म्हटलें आहे (२. १७).

[२९]श ल.—सेंट पीटर्सबर्ग कोशांत याचा अर्थ लांबी मोजण्याचें साधन असा आहे व याच अर्थानें अथर्ववेद, काठक संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण (१५. १०) यांत आला आहे. व्हिटने म्हणतो कीं हा अर्थ सुसंगत नाहीं.

[३०]कु ष्ठ.—मैत्रायणी संहितेंत (३. ७, ७) अपूर्णांक या अर्थी हा शब्द आला असून ती कला, कुष्ठ, शफ आणि पद अशी मालिका आहे व तिचा अनुक्रमें १६ वा, १२वा, ८ वा व ४ था हिस्सा असा अर्थ होतो. [ मूळांत शब्द आहेत परंतु अर्थ मात्र हाच असावा असें दिसत नाहीं ]

[३१]मृ द.—काठक संहितेंत हा शब्द समासांत आढळतो. याचा अर्थ सानें वजन करण्याचें माप असा आहे व्याकरणदृष्ट्या पाणिनिमतानें [३. १, १४३] प्रद असा पाठ असावा कीं, काय असा संशय आहे.

[३२]अं गु ष्ठ.—लांबी मोजण्याचें परिमाण या अर्थी हा शब्द काठक संहितेंत आला आहे

[३३]को श.—'शब्दशः अर्थ 'मोठ्यानें हाक मारली असतां तो ध्वनि जितका लांब जातो ती लांबी' हा शब्द पंचविंश ब्राह्मणांत (१६, १३, १२) आला आहे.

[३४]त्रै प द.—हा नपुसकलिंगी शब्द योजनाचा तीनचतुर्थांश या अर्थानें पंचविंशब्राह्मणांत आला आहे. त्याच ब्राह्मणांत (१७, १३) योजनाला गव्यूति व योजन चतुर्थांशाला क्रोश म्हटलें आहे.

[३५]पा द.—लांबी मोजण्याचें माप या अर्थी हा शब्द शतपथ ब्राह्मणांत आला आहे. हा शब्द कधीं कधीं वजनी माप या अर्थानेंहि उपयोगांत आणिला आहे. अपूर्णांकाच्या रूपांत याचा एक चतुर्थांश असा अर्थ आहे. व हा अर्थ चतुष्पाद प्राण्यांच्या चार पायांपैकीं एक पाय यावरून आला आहे. जसें शफ म्हणजे पायांतील (खुरांपैकीं) एक भाग म्हणजे एक या संख्येतील आठवा भाग.

[३६]पृ थ.—हा शब्द तैत्तिरीय ब्राह्मणांत (१. ६, ४, २) लांबी मोजण्याचें परिमाण या अर्थी आला आहे. याचा तळहात, तळवा, तळहाताची रुंदी असा अर्थ होतो.

[३७]प्र क्र म.—हा शब्द शतपथ ब्राह्मणांत लांबीचें परिमाण या अर्थी आहे. याने किती लांब मोजली जाते हें

तेथ सांगतलें नाहीं. सूत्रग्रंथांत याचा अर्थ एका पावलाची लांबी असा आहे.

[३८] प्र मृ त.—शतपथ ब्राह्मणांत मोजण्याचें माप या अर्थानें हा शब्द आला आहे. याचा अर्थ 'मूठभर' असा होतो.

[३९] प्रा दे श.—लांबीच्या परिमाणाकरितां वारंवार ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द योजिला जातो. याचा अर्थ वीत (अथवा टीच) असा आहे.

[४०] र त्नि.—पंचेचाळीस इंचाचें माप. पंचविंश ब्राह्मणांत आलेल्या अरत्नि याच्या उलट हा शब्द आहे.

[४१] श रा व.—तैत्तिरीय ब्राह्मण व सूत्रग्रंथांत धान्य मोजण्याचें माप या अर्थी हा शब्द आला आहे.

[४२] शु ल्क.—ऋग्वेदांत याचा अर्थ किंमत असा आहे धर्मसूत्रांत याचा अर्थ कर असा आहे व तो अर्थ मूरला अथर्ववेदांत आढळून आला आहे (३. २९, ३). या ठिकाणीं शुल्क असा शब्द आला असल्यामुळें अर्थहानी बरीच झालेली आहे (?) हा अर्थ व्हिटने व ब्लूमफील्ड यांनीं स्वीकारला आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं वेबरनें केलला अर्थ व्हिटनेनें स्वीकारलेला नाहीं, ब्लूमफील्डनें हा अर्थ संशय प्रगट करून स्वीकारला आहे.

## द ळ ण व ळ ण

### नौकानाम [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [१] अरित्र | [३] नद | नौका ) |
| अरित्रपरणी | नित्यरित्रा | पतत्रिन् |
| खनित्र | [४] नौ | [५] प्लव |
| [२] द्युम्न | पाक्षिण(प्लव, सपक्ष | शतारित्रा |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| तरणि | नाव | प्लव |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अप्लव | पर्षणि | सामन् |
| तरी | प्लव | स्वरित्रा |
| नाव्य | शतारित्रा | हिरण्यबन्धना |
| नौ | | |

[ संहितेतर ]

| | |
|---|---|
| [६] नावाज् | [७] मण्ड |

[१] अ रि त्र.—नावा किंवा होड्या ज्यांच्या योगानें चालवितात त्या वल्ह्यांना हें नांव आहे. ऋग्वेद आणि वाजसनेयि संहिता यांत शंभर वल्ह्यांनीं वल्हविलेल्या जहाजाचा उल्लेख आहे आणि नाव वल्ह्यांनीं वल्हवितात असाहि उल्लेख आहे (अरित्रपरण). ऋग्वेदांत दोन उताऱ्यांत हा शब्द आलेला आहे त्यावरून सें. पी. कोश म्हणतो कीं, रथाचा एक भाग असा अर्थ ध्वनित होतो. नावेच्या वल्हविणाऱ्याला किंवा खलाशाला अरितृ असें म्हणतात.

[२] द्यु म्न.—ऋग्वेदांतल्या एका लेखांत पिशेलच्या मतानें याचा अर्थ तराफा असा आहे.

[३] न द.[ड]—ऋग्वेदांत हा शब्द अनेकदां आलेला असून त्याचा निश्चित अर्थ समजत नाहीं. पिशेलच्या मतानें नद व नड हे शब्द एकच आहेत व या नद शब्दाचा अर्थ एके ठिकाणीं तो वेताची नाव असा करितो. ही नाव भंगून हिच्यावरून पाणी गेलें असेंहि तिचें वर्णन तो करितो. दुसऱ्या एका लेखांत या नदाचा अर्थ वेताचा चाबूक असा तो करितो. याचीं तीक्ष्ण टोकें (कर्ण) घोड्यांना जोरानें पळविण्यास उपयोगी पडतात. दुसऱ्या लेखात लक्षणेनें याचा अर्थ पुरुषाचें जननेंद्रिय असा केलेला आहे. रॉथ याचा अर्थ साधा किंवा लक्षणेनें बैल असा घेतो. एकदां तरी इंद्राच्या घोड्यासंबंधानें खिंकाळणारा असा या शब्दाचा अर्थ होतो. 'नदस्यकर्णैः' या शब्दसमुच्चयांत याचा रथाच्या (बाजूच्या) घोड्याच्या कानांमुळें (म्हणजे हुकूम ऐकण्याची त्याची तयारी असल्यामुळें) मरुत लोक आपल्या चपळ घोड्यावर बसून जलदीनें जातात असा अर्थ होतो (तुरयन्त आशुभिः).

[४] नौ.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ यांमध्यें हा शब्द नेहमीं येतो. बहुतेक ठिकाणीं हें तारू म्हणजे नद्या ओलांडण्याकरितां केलेली लहानशी नाव होय. तरी पण यमुना, गंगा व पंजाबमधील नद्या या ओलांडण्याचें काम मोठ्या जहाजाशिवाय भागत नसे. पुष्कळ वेळां ही नौ म्हणजे लांकडाची कोरलेली होडी असे. वैदिक काळीं समुद्रमार्गानें हिंदुस्थानचा मोठा व्यापार चालत असे ही गोष्ट जर गृहीत धरली तर जहाजाचे जे भाग उदाहरणार्थ, शीड व शीडकाठी यांचा( वल्हे, अरित्र याखेरीज वैदिक वाङ्मयांत)उल्लेख नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. तरी पण असे कांहीं उल्लेख आलले आहेत कीं, त्यांवरून नद्या ओलांडून जाणाऱ्या बोटींनीं जो व्यापार चालावयाचा त्यापेक्षां जास्त विस्तृत प्रमाणावर व्यापार हिंदुस्थानांतून चालत असे ही गोष्ट सिद्ध होते. अथर्ववेदांत ज्या राज्यांत ब्राह्मणावर जुलूम होतो त्या राज्याच्या नाशाची तुलना फुटलेल्या जहाजाच्या बुडण्याशीं केलेली आहे. जरी या ग्रंथांत आलेल्या भाषेवरून जहाज म्हणजे होडी असा अर्थ निघण्याचा संभव आहे तरी असा अर्थ करणें इष्ट होणार नाहीं. शिवाय माणसें नफा किंवा द्रव्य मिळविण्याकरितां (सनिष्यवः) समुद्राकडे जातात असा ऋग्वेदांत (१.५६,२;४.५५,६) उल्लेख आला आहे. झिमर म्हणतो कीं, हा समुद्र म्हणजे पंजाबमध्यें सिंधु नदीला इतर लहान नद्या मिळाल्यावर जो मोठा सिंधु नद होतो तो होय. पण समुद्राचा असा संकुचित अर्थ करणें बरोबर होणार नाहीं. ऋग्वेदांत सुद्धां अश्विनांनीं भुज्यूचें समुद्रामध्यें शंभर वल्हीं असलेल्या जहाजाच्या योगानें रक्षण केलें अशीं वर्णनें आलेलीं आहेत. तेव्हां वैदिक काळीं अनेक वल्हीं असलेलीं मोठीं जहाजें

होतीं हें नाकबूल करणें इष्ट नाहीं. बौधायन धर्मसूत्रामध्यें (१.२,४) तरी निदान समुद्रमार्गानें जलपर्यटण करण्याचा उल्लेख आलेला आहे( ऋ १०.१५५,३). या ठिकाणीं सायण दारु म्हणजे पुरुषोत्तमाख्य देवताशरीर असा अर्थ करितो. त्याच भाष्यांत दुसऱ्याचा उतारा दिला आहे त्यांत दारु म्हणजे दारुमयी नौ लांकडाची नाव असा अर्थ आहे.

[५] प्लव.—तरंगणारा पदार्थ. याचा अर्थ होडी. हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर वाङ्मयांत आला आहे.

[६] नावाज.—नावाडी. शतपथ ब्राह्मणांत [२.३,३,५] हा शब्द आलेला आहे.

[७] मण्ड.—हा शब्द नौ–मण्ड या सामासिक शब्दांत द्विवचनी येतां व त्याचा अर्थ शतपथ ब्राह्मणांत[२.३,३,१५] जहाजाचें सुकाणूं असा आहे.

## मार्गसंबंधीं [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अतूर्तपथिन् | दीर्घयाथ | योजन |
| अनपवृज्य | नियान | रघुवर्तनि |
| अंजस् | पत्मन् | रजस् |
| अध्वन् | पत्वन् | रथ्य |
| अनुपथ | परसुतःशीः | रुद्रवर्तनि |
| अनृक्षर ( निष्कं- | पथ | वक्मन् |
| टक ) | पथिन् | वयुन |
| अन्तःपथ | पथ्य | वर्तनि |
| अरेणु | पदवी | वर्त्मन् |
| अपाथ | पदवीय | विपथि |
| आपथि | पदि | वृजिनवर्तनि |
| उरुगव्यूति | पन्थस् | संगमनी |
| ऋजु | परिगव्यूति | संचरणी |
| एम | परिक्रोश | सुकृत |
| क्षेत्रवित्- | परिज्मन् | सुग |
| ( वाटाड्या ) | पांसु | सुगेवृध |
| गातु | पुरुपथिन् | सुपथिन् |
| गायत्रवर्तनि | [१]प्रपथ | सुपदी |
| घृतवर्तनि | प्राध्वन् | हिरण्यवर्तनि |

[ तै. सं.]

| | | |
|---|---|---|
| अनुवर्त्मन् | दर्शकः) | रेणु |
| अपथ | परिरथ्य (रस्ता) | वर्त्र ( मार्ग ) |
| अभ्यध्व | पांसु | वर्त्मन् |
| कण्टक | प्रतिवर्त्म | वर्त्मन्य |
| जनायन | प्रपथ | वधूपथ (वधूचा- |
| दुष्पद | प्रस्तर | मार्ग ) |
| पथ | यान | वायुमत् |
| पथिरक्षि | रघुवर्तनि | व्यध्व |
| पथिसदी | रजस् | सुपथ |
| पदग्राम ( मार्ग- | रश्मा | स्वस्तिवाहन |



[१] प्रपथ.—ऋग्वेद आणि ऐतरेय ब्राह्मण यांत याचा अर्थ 'दूरचा प्रवास' असा आहे. विल्सनला एके ठिकाणीं हा शब्द 'उतरण्याची जागा' या अर्थानें आढळला आहे, या ठिकाणीं प्रवाशांनां खादि (अन्न) मिळत असे. झिमर म्हणतो कीं, हा अर्थ होणें शक्यच नाहीं. व त्याच्या मतानें 'प्रपदेशु' च्या ठिकाणीं चुकीनें 'प्रपथशु' हा पाठ येथें घातला गेला आहे. काठक संहितेंत या शब्दाचा अर्थ ऐसपैस मोठा रस्ता असा आहे. सायणानें प्रपथ याचा अर्थ मोठा मार्ग, लांबलचक रस्ता असा दिला आहे. यावरून पुढें दूरचा प्रवास असा ह्याचा अर्थ घेणें शक्य आहे. ऋ. १. १६६ ९ या ठिकाणीं येणाऱ्या प्रपथ शब्दाचा अर्थ सायणानेंहि विल्सनसारखाच दिला आहे.

## मार्ग व त्याचीं विशेषणें [तै सं.]

| | | |
|---|---|---|
| अजसायनी | शेवट ) | [१]संचर |
| अध्वन् | पथिन् | सुग |
| अपथ | पथ्या | सुपथ |
| काष्ठा ( मार्गाचा | रथस्पष्ट | सृती ( मार्ग ) |

[अथर्ववेद]

[२]परिरथ्य

[१] संचर.—तै. संहिता ग्रंथांत ह्याचा अर्थ प्राण्यांच्या संचाराचा मार्ग असा आहे. नेहमींचा सामान्य अर्थ म्हटला म्हणजे यज्ञांत भाग घेणाऱ्या अनेक ऋत्विजांनीं व्यापलेला किंवा उपयोगांत आणलेला यज्ञांतल्या जागेवरील मार्ग असा आहे.

[२] परिरथ्य.—अथर्ववेदामध्यें हा शब्द असून ह्याचा अर्थ एक तर रस्ता किंवा त्याचा भाग. कदाचित् लुडविग् व व्हिटने म्हणतात त्याप्रमाणें कांठ असा अर्थ असावा. ग्रिफिथ याचा अर्थ आकाशाचे मध्यवर्ती प्रदेश असा करितो.

## रथ व रथसंबंधीं [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंजस्प | त्रिष्ठ | वृषरथ |
| [१]अनस् | निचक्रा ( शकटी ) | शकटी |
| अनस्थ | पंचरश्मि | शतपद |
| अस्थूरि | पवित्ररथ | शल्मलि |
| अष्टावंधुर | पूर्णवन्धुर | श्येनपत्मन् |
| आपथ्य | पृथुयामन् | षडश्व |
| एकचक्र | पेरु | सप्तचक्र |
| गर्त | बृहद्रथ | सर्वरथ |
| चंद्ररथ | [३]यान | सुकिंशुक |
| चित्ररथ | याम | सुखरथ |
| ज्योतीरथ | रथ | सुचक्ररथ |
| द्युतद्यामन् ( दीप्त | रथिनी | सुमद्रथ |
| रथ ) | विद्युद्रथ | सुरथ |
| त्रिवंधुर | वृषनाभिन् | सुवृत |

| | | |
|---|---|---|
| सुप्रवंधुर | [९]स्वनद्रथ | हिरण्यरथ |
| [८]स्थूरि | हिरण्यचक्र | हिरण्यवन्धुर |
| [९]स्यंदन | हिरण्यप्रउग | हिरण्यशम्म |
| स्यूमगभस्ति | | |

[ अथर्ववेद ]

विपथ

[ संहितेतर ]

[१०]विपृथु

रथसंबंधी [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अधोअक्ष | [११]दीर्घाप्सस् | [१२]रेथवाहन |
| अनस्वत् | [१४]धूर्षद | [१६]रथसंग |
| अरथि | नरेस्थ | रथिन् |
| अरिष्टरथ | नियुग्वत | रथेस्थ |
| अश्वहय | नृवाहन | वसुवाहन |
| अ-ावत | प्रष्टि | वाजयत् |
| उपानसस् | प्रष्टिमत् | वातरंहस् |
| खरज्र | प्रसित | विश्वपिश् |
| चतुर्युग | भूरिभार | वीळुपवि |
| त्रिकश | मधुवाहन | वृषरथ |
| त्रिनाभि | [१३]मध्यमवह् | वृषरश्मि |
| दशकक्ष्य | ययिवत् | सप्तरश्मि |
| दशधुर् | यय्य | सुचक्र |
| दशयोक्त्र | युक्ताश्व | सुतष्ट |
| दशारित्र | रथचर्षण | सुमृळीक |
| दशावि | रथवत् | सुसारथि |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अंक | नाडी | युज |
| अद्रिज | निमित | रथ |
| अधर्द्धुष | नेमि | रथचक्र |
| अब्ज | न्यंक | रथमुख |
| ऋजुरश्मि | पूर्णवन्धुर | रथस्वन |
| ऋतज | प्रउग | रथाक्ष |
| त्रिचक्र | प्रष्टि | वीड्वंग |
| त्रियुग | मध्यमेष | सुश्चिपद् |
| दुराणसद् | मनुष्यरथ | स्वरथ |
| ध्वज | युग | |

[अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अन | एकनेमि | पंचवाही [ पांच घोडे जोडलेला रथ ] |
| अष्टाचक्र | त्रिचक्र | |
| उद्धि | पक्ष | |
| ऋजुरश्मि | परिरथ्य ( रथाचा टोप ) | पृथुज्रय |
| एकचक्र | | प्राधि |

| | | |
|---|---|---|
| रथ | वह्य | सुचक्र |
| रथयान | विपथ | सुपवि |
| वसुयु | विभुक्रतु | |

रथावयव [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| [१७]अक्ष [ कणा, आंस ] | [२२]ककुह | [३२]प्राधि |
| | [२३]ख | [३३]भग |
| अक्षानह [जुंपणी] | खादिरस्यसार | [३४]युग |
| अयस्थूण | [२४]चक्र | रथचर्षण |
| [१८]आणि | [२५]दारु | [३५]रश्मि (दांडा) |
| [१९]ईषा | [२६]धुर् | वरत्रा |
| उद्धि | नभ्य | [३६]वन्धुर |
| [२०]उपधि [ तुंब्याच्या बाहेरील लांकूड ] | [२७]नाभि | वर्तनि |
| | [२८]नेमि | [३८]शम्या |
| | [२९]पवि | [३९]शर्ध्य |
| [२१]उपह्वर | [३०]पातल्य [खीळ] | स्कम्भ |
| एकेष | [३१]प्रतिधि | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [४]अंक | [४३]न्यंक | [४]रथमुख |
| [४१]नाडी | [४३]प्रउग | [४४]रथाक्ष |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अक्ष | तर्दमन् | प्रतिधि |
| ईषा | त्रिनाभि | वन्धुर |
| ईषयुग | धूर् | मेथि |
| [४६]उद्धि | नाडी | युग |
| उपधि | नेमि | [५०]योग |
| [४७]उपानस | | रथमुख |
| उत्पल | परिधि | [५१]रथोपस्थ |
| चक्र | प्रकाश | वंधुरयू |

[ वा सं. ]

रथनाभि

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [५२]अपालम्ब | कूवरी | रथचक्र |
| [५३]कस्तम्भी | [५५]युक्त | [५७]रथशीर्ष |
| [५४]कूवर | विपथु | |

[१]अनस्.—अरी एकंदा रथामध्यें न असतां गाडीमध्यें आरूढ असें वर्णन आहे, [येथें 'अनर्विश' हे विशेषण इन्द्राला लावावें कीं नाहीं अशी शंका येते. सायणभाष्यांत स्पष्ट कांहीं दिलें नाहीं. ] तथापि अनस् हा शब्द रथ आणि मालाची गाडी यांच्यामध्यें फरक दाखविण्याकरितां योजिलेला असतो अरी उषादेवी कधीं कधीं रथावर आरूढ होते तथापि तिचें कुत्सित वाहन गाडी हेंच होय. [हा अर्थ सायणाचार्योंनां संमत

वाहीं ] त्याची रचना फारशी माहीत नाहीं. ऋग्वेदांतील ज्या सूक्तांत सूर्याच्य' सूर्या नांवाच्या मुलीच्या विवाहाचें वर्णन केलें आहे त्यांत तिला ज्या गाडींत बसविलें होतें त्या गाडीला एक आच्छादन होतें असें वर्णन आहे. रथाच्या तुंब्याचें देखील वर्णन आहे. रस्ते वाईट असल्यास विपथ नांवाच्या ओबडधोबड वाहनाचा उपयोग होत असे. विवाह वगैरे समारंभामध्यें ज्या मिरवणुकी निघत असत त्यांत गाड्या ओढण्याकडे बैलांचा उपयोग होई. उषेची गाडी तांबूस बैल अगर गाई ओढीत असें वर्णन आहे.

गर्त.—ऋग्वेदांत प्रथमतः याचा अर्थ योध्याची रथांतील बसण्याची जागा असा आहे. ती बरीच मोठी असे. तदनंतर लक्षणेनें किंवा खरोखर त्या शब्दाचा रथ असा अर्थ होऊं लागला [ सायणभाष्याप्रमाणें याचा रथ असाच अर्थ आहे ].

यान.—ऋग्वेदांत व तदनंतर वाहन या अर्थी हा शब्द आलेला आहे.

रथ.—ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथांत अनस् गाडी-पेक्षां निराळ्या (रथ या) अर्थी हा शब्द आला आहे. तरी पण फरक विशेष नाहीं. दोहोंच्या रचनेमधल्या फरकाविषयीं आपणांस माहिती नाहीं. रथचक्राचें कणा घालण्याचें भोंक गाडीच्या भोंकापेक्षां मोठें असे येवढीच माहिती मिळते. रथाला बहुतकरून दोन चाकें असत व त्याविषयीं उल्लेख वारंवार आलेला आहे. चाकाची रचना म्हणजे त्याला एक धांव असून त्यास एक पाटा (प्रधि), अरे आणि तुंबा हीं असत. पाटा आणखी वर्तुळ मिळून नेमि होते. तुंब्यामधील भोंकाला ख हें नांव आहे; या ख मध्येंच कणा घाला वयाचा. 'आणीचा अर्थ तुंब्यांत घातलेलें कण्याचें टोंक किंवा चाकामध्यें तें टोंक नीट बसण्याकरितां घातलेली कुणी असा आहे. कधीं कधीं जाड चाकाचा उपयोग केला जाई. अथर्ववेदांत (५.१४,६;) केव्हां केव्हां अरट्टु लांकडाचे कणे करीत असत असा उल्लेख आहे. [सायणभाष्याप्रमाणें अरट्टु हा एक राजा होता.] यांच्या टोंकांभोंवतीं चाकें फिरत. कण्यावर रथाचा मुख्य भाग (कोश) ठेवीत. ह्या भागाला वंधुर हाहि शब्द आहे, परंतु त्याचा अर्थ रथामधील बैठक असाहि होतो. आश्विनांच्या रथाविषयीं त्रिवंधुर हें नांव वापरलें आहे. त्रिवंधुराचें आणि त्रिचक्राचें बरेंच साम्य आहे. वेबरच्या मतें रथाला तीन चाकें आणि तीन बैठकी असत परंतु झिमरच्या मतें अशा प्रकारचें वाहन केवळ काल्पनिक होय. गर्ता या शब्दानेंहि योद्ध्याच्या आसनाचाच अर्थ सूचित होतो. रथाचा दांडा कण्याशीं काटकोनांत असे. साधारणतः एकच दांडा असे व त्याच्या दोन्ही बाजूंला घोडे जुंपीत व घोड्यांच्या मानेवर जूं ठेवीत. जुंवाच्या मधील भोंकांत दांडा बसविला जात असे व त्यालाच ख किंवा तर्द्मन् असें म्हणत. नंतर जूं आणि दांडा एकत्र बांधीत असत. जूं घोड्याच्या मानेवर ठेवीत आणि नंतर त्यांनां बांधीत पट्ट्यांचा उल्लेख राश्मि आणि रशना या दोन शब्दांनीं होत असे. हे शब्द घोड्याच्या लगामालाहि लावीत. सारथी लगामाच्या योगानें घोड्यांनां आंवरून धरी. चाबकाच्या म्हणण्यानें त्यांनां हांकीत असे. घोड्याच्या तंगांनां कक्ष्या असें म्हणत. नेहमीची पद्धत म्हणजे साधारणपणें रथास दोन घोडे असत. पण कधीं कधीं तीन किंवा चारहि असत. तीन असल्यास तिसरा घोडा पुढें लावीत किंवा बाजूला लावीत याविषयीं माहिती नाहीं. परंतु बहुधा दोनाहि पद्धती अमलांत असाव्यात. पांच घोड्यांचा सुद्धां उपयोग करीत. रथांनां बहुतेक घोडे जुंपीत तरी पण गाढवांचा आणि खेचरांचा उपयोग केलेलाहि आढळतो. गाड्या ओढण्याम बैलांचा उपयोग करीत व म्हणूनच अनड्वाह हा शब्द प्रचारांत आला. कधीं गरीब लोकांनां एका घोड्यावरच संतुष्ट रहावें लागे. अशा वेळीं घोड्यांच्या दोन्हीकडे दोन दोन दांड्या असलेल्या जुवाचा उपयोग करीत ( ऋ. १०. १०१,११;१३१,३ ) रथामध्यें सारथी उजव्या बाजूस बसत असे आणि योद्धा सव्येष्ठृ किंवा सव्येष्ठा हे शब्द दर्शवितात त्याप्रमाणें डाव्या बाजूस बसत असे. अपस्तंबाच्या शुल्ब सूत्रामध्यें रथाची लांबी-रुंदी दिली आहे ती अशीः—रथाचा दांडा १८८ अंगुळें, कणा १०४ अंगुळें, जूं ८६ अंगुळें. धांव शिवाय करून बाकी चहूंकडे लांकडाचा उपयोग करीत. रथाच्या दुसऱ्या भागांचाहि उल्लेख आलेला आहे पण तो अस्पष्ट आहे.

शकट, शकटी.—जुन्या वाङ्मयांत गाडी अशा अर्थानें हे शब्द विरळा आलेले आहेत. गाडीच्या करकर आवाजाची अरण्यांत रात्रीं ऐकलेल्या आवाजाशीं ऋग्वेदांत तुलना केलेली आहे.

स्थूरि.—ऋग्वेद व उत्तरकालीन ग्रंथ यांमध्यें दोन घोड्यांचे ऐवजीं एकाच जनावरानें ओढलेला ( व तेंहि हलक्या प्रतीचें जनावर ) असा याचा अर्थ आहे. (ऋ. १० १३१,३ ) या ठिकाणीं हा शब्द आहे. त्याचा अर्थ सायण छकडा असा करितो. ऐ. ब्रा. ५ .३०, या ठिकाणीं ' यथाह्यस्थूरिणैकेन ' असे शब्द आहेत. सायणभाष्यांत अस्थूरि असा शब्द घेतला आहे व त्याचा अर्थ घोडा असा दिला आहे.

स्यंदन.—रथ. ऋग्वेदांत एके ठिकाणीं पूर्वीच्या वाङ्मयांत हा शब्द आलेला आहे. स्पंदन असाहि पाठ याच ठिकाणीं सर्वसंमत असा आहे.

स्वनद्रथ.—खडबड आवाज करणारी गाडी. याचा अर्थ लुडविगच्या मतानें ऋग्वेदामध्यें आसंगाचें विशेषनाव असा आहे. पण हा शब्द नुसता विशेषण असावा. सायणाच्या मताप्रमाणें हा शब्द नाम आहे; व त्याचा अर्थ "आवाज करणारा रथ" असा आहे. ग्रिफिथच्या

मतें त्याचा अर्थ "स्वनद्रथ नांवाचा आसंगाचा मुलगा" असा आहे.

[९] विपथ.—ब्राह्मणाच्या वर्णनांत ओबड धोबड रस्त्याला योग्य असें वाहन असा अर्थ आलेला आहे.

[१०] विपृथु.—शांखायन श्रौतसूत्रांत हा शब्द आला असून वरवर याचा अर्थ विपथ (ओबडधोबड वाहन) याच्यासारखाच आहे. बहुतेक ही चूक दिसते.

[११] दीर्घाप्सस्.—ऋग्वेदामध्यें रथाचें विशेषण म्हणून हा शब्द आलेला आहे. व रॉथच्या मतें त्याचा अर्थ रथाच्या पुढचा लांब असलेला भाग असा आहे.

[१२] धूर्षद्.—रॉथच्या मतें 'जुवाचें खालीं बसणारा' म्हणजे 'ओझें वाहणारा' अर्थात अलंकारिक भाषेंत बोलावयाचें म्हणजे धुरीण; असा ऋग्वेदांत जेथें हा शब्द आलेला आहे तेथें अर्थ होतो. जास्त संभवनीय अर्थ म्हणजे दांड्यावर बसणारा, म्हणजे सारथी असा होईल. कारण घोड्याचे जवळ बसण्याकरितां सारथ्याला पुढें जाऊन दांड्यावर किंवा जुंवाजवळ सुद्धां जावें लागतें.

[१३] मध्यमवह्.—हें ऋग्वेदांत एके ठिकाणीं रथाचें विशेषण म्हणून आलें आहे. याचा खरा अर्थ कोणता ? कळत नाहीं. रॉथ याच्या मतें 'दोन दांड्यांमधून एक घोडा हांकणें, हें विशेषणार्थी वाक्य या शब्दाच्या मागें असावें. सायणाचार्यांप्रमाणें 'मध्यम वेगानें हांकणें' याचा अर्थ 'मध्यम हांकणें' म्हणजे अर्धवट पणानें हांकणें असा आहे. ऋ. २. २९. ४ या ठिकाणीं मध्यमवाळ्कृते' असा शब्द आहे. याची मध्यमवाट् कृते अशीं पदें पडतात. मध्यमवाट् मध्यमेन मन्दगमनेन वाहकः म्हणजे मंदगतीनें जाणारा असा सायण अर्थ देतो. ग्रिफिथ असाच अर्थ करितो.

[१४] रथचर्षण.—याचा ऋग्वेदांत एकदां उल्लेख आहे, तेथें अर्थ संशयास्पद आहे. रॉथच्या मतें रथाच्या कांहीं भागांकरितां हा शब्द योजिला असावा व बहुधा रथाचा भाग हाच अर्थ असावा. ऋ. ८. ५. १९ या ठिकाणीं येणाऱ्या रथ चर्षण शब्दाचा अर्थ सायणाचार्यांनीं आपल्या भाष्यांत "रथस्य द्रष्टव्ये मध्यदेशे।" म्हणजे रथाचा मध्यभाग असा केला आहे व ग्रिफिथ आपल्या इंग्रजी भाषांतरांत त्याचा "रथाचा मार्ग" असा अर्थ करतो. निरुक्तावरील दुर्गाचार्यांच्या भाष्यांत ५–१२ या ठिकाणीं रथचर्षण याचा अर्थ रथांतून गमन करणारा असा केला आहे. रथचर्षणे हें ज्या अर्थी संबोधन आहे त्या अर्थी असाहि अर्थ असावा असें दिसतें.

[१५] रथवाहन.—ऋग्वेदांत (६, ७, ८) आणि अथर्व वेदांत रथ उभा करण्याची हलती घोडी असा अर्थ आहे. रॉथच्या मतें ग्रीक लोक अशाच प्रकारच्या लांकडी घोडीचा उपयोग करीत. रथवाहन अथवा रथवाह हा शब्द दोन घोड्यांनीं ओढावयाच्या घोडीला लावितात. वेबरच्यामतें हा शब्द लढाईच्या रथाला रणांगणावर नेण्याऱ्या घोड्यांना लावीत. ऋ. ६. ७५. ८ या ठिकाणीं असणाऱ्या रथवाहन या शब्दाचा अर्थ सायणानें रथानें वाहिलें जाणारें धन असा केला आहे व "रथ उपयोगांत नसतांना तो ज्या उंचवट्यावर किंवा तिवईवर ठेवतात ती" असा ग्रिफिथनें अर्थ दिला आहे. अथर्ववेद ३. १७. ३ या ठिकाणीं येणाऱ्या रथवाहन शब्दाचा अर्थ ग्रिफिथनें "रथ ओढणारा" असा दिला आहे.

[१६] रथसंग.—ऋग्वेदांत रथांचा सामना असा अर्थ आहे. ग्रिफिथनें याच्या विरुद्ध रथांची भेट असा अर्थ दिला आहे. व हा अर्थ वरील अर्थास जुळेल असाच आहे.

[१७] अक्ष.—अक्ष म्हणजे कणा. या रथाच्या भागाचा उल्लेख ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत वरचेवर आला आहे. तो पट्ट्यांनीं अगर दोऱ्यांनीं रथाच्या मुख्य भागाला बांधलेला असतो. त्या पट्ट्याला अक्षानह् म्हणजे "आंसाला बांधलेला" म्हणतात. हा मूळ अर्थ असून शिवाय याचा घोडा असाहि अर्थ करितात. आंसाला तापविणें व तो मोडण्याची भीति याबद्दलची माहिती त्याकालीं होती असें दिसतें.

[१८] आणि—हा शब्द ऋग्वेदांत आहे परंतु तदुत्तरग्रंथांत क्वचितच सांपडतो आणि रॉथ व झिमर यांच्या मतें कण्याचा जो भाग चाकाच्या तुंब्यांत येतो, त्याचा या शब्दानें बोध होतो. सायणाचार्यांनीं याचा अर्थ [ चाकाची ] कुणी असा केला असून तो निरुक्तकारांनां व ल्युमनला संमत आहे. ऋग्वेदांत एका ठिकाणीं याचा अर्थ लक्षणेनें सर्व रथ असा दर्शविला आहे, परंतु गेल्डनेरच्या मतानें तो सर्व उतारा संदिग्ध आहे.

[१९] ईषा—ईषा म्हणजे रथाच्या जुंवाचा दांडा. बहुतककरून रथ एका दांड्याचाच [ एकेषः ] असे, कधीं कधीं दोन दांड्यांचाहि उल्लेख केला आहे. हा शब्द बहुतेक युग [ जूं ] शब्दाशीं समासानें जोडलेला असतो. दांडा जुंवांत बसवून दोरखंडानें बांधलेला असे, रथाशीं तो बरोबर कसा जोडला जाई हें सांगतां येत नाहीं.

[२०] उपधि.—हा शब्द एकदां ऋग्वेदांत आणि एकदां अथर्व वेदांत प्रधि याच्या बरोबर आढळत असून याचा अर्थ चाकाचा एक भाग असा आहे. बरोबर हा भाग कोणता हें नेमकें सांगतां येत नाहीं. रॉथ, झिमर आणि ब्लूमफील्ड हे म्हणतात कीं चाकाच्या सर्व आऱ्यांनां मिळून हा शब्द लावला आहे व्हिटने हें अशक्य आहे असें ठरवून म्हणतो कीं भरीव चाकाचा द्योतक हा शब्द आहे. प्रधि म्हणजे धांव आणि उपधि म्हणजे बाकीचा सर्व भाग. उपधि म्हणजे वांकाचा खालचा कांठ किंवा प्रत्यक्ष वांकच असा अर्थ असावा.

[२१] उपह्वर.—ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत हा शब्द असून गेल्डनेर त्याचा अर्थ रथाचा मुख्य भाग (उपस्थ) असा करितो.

२२ क कु ह्. —ऋग्वेदांत बऱ्याच वेळां हा शब्द आला असून रॉथच्या मताप्रमाणें याचा अर्थ रथाचा एक भाग कदाचित् बसण्याची जागा असा आहे. पुन्हां लुडविग म्हणतो कीं, एका उताऱ्यांत पर्शु तिरिंदिर ह्यांच्यापासूनच्या ज्या यादव राजानें लूट नेली त्याचें हें नांव आहे. परंतु हा अर्थ संभवनीय दिसत नाहीं. सर्व बाजूंनीं विचार करितां ह्या शब्दाचा अर्थ मुख. प्रमुख असा असून घोडे, रथ राजे, वगैरेंना हें विशेषण योजतात ग्रासमन ह्यानें फक्त हाच अर्थ दिला आहे आणि नंतर रॉथनें तो अर्थ स्वीकारला आहे.

२३ ख.—ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथांत चाकाचा तुंबा असा याचा अर्थ आहे. गाडी ( अनस् ) आणि रथ यांच्या तुंब्यांत फरक असे.

च क्र.—ऋग्वेदापासूनच्या सर्व ग्रंथांत लक्षणेनें रथाचें किंवा गाडीचें चाक असा याचा अर्थ आहे. जेव्हां रथ चालू करावयाचा असेल त्यावेळीं कण्याला चाकें मजबूत बसवीत आणि त्याकामीं अतिशय बळ लागत असे असें अथर्ववेदा-वरून ११ ९.४ दिसतें. चाकाला अरे असून तुंबा असे आणि ह्या तुंब्याच्या छिद्रांत कण्याचें टोंक बसविलेलें असे पूषन् ह्या देवतेच्या गाडीचें चाक कधींच खराब होत नसल्याच्या उल्लेखावरून चाकाच्या शक्तीचें महत्त्व किती होतें हें सिद्ध होतें. चाकाची संख्या साधारणपणें कोणत्याहि वाहनाच्या बाबतींत दोनच असे, परंतु ऋग्वेदांत कांहीं जागीं तीनचाकी व सातचाकी रथाचा उल्लेख असून अथर्ववेदांत आठ चाकांच्या रथाचा उल्लेख आहे. झिमर म्हणतो कीं, हीं विशेषणें खरोखरीच्या रथाचीं नाहींत त्रिचक्र म्हणून जेथें जेथें उल्लेख आहे तेथें असा काल्पनिक अर्थ असावा. दुसऱ्या पक्षीं वेबर म्हणतो कीं, तीनचाकी रथ असेल तर, एक चाक मध्यावर दोघां बसणारांच्या मध्यें असावें, कसेंहि असो सात किंवा आठचाकी रथ खरोखरच असतील असें वाटत नाहीं शतपथांत कुंभाराच्या चाकाचा ( कौलाल—चक्र ) उल्लेख आला आहे.

२५ दा रु.—दारु म्हणजे लांकूड; ऋग्वेदांमध्यें व इतरत्र हा शब्द अनेकदां आला आहे, व त्याचे अर्थ रथाचा दांडा जळणास योग्य असा ओंडा, किंवा लांकडी सामान इत्यादि आहेत.

२६ धु र्.—ऋग्वेद व तदुत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें हा शब्द आला असून पीटर्सबर्गकोशाप्रमाणें रथ किंवा गाडी ओढणाऱ्या प्राण्याच्या खांद्यावर ठेवला जाणारा जुवाचा भाग असा याचा अर्थ आहे, आणि म्हणूनच ह्या जनावरांना वाजसनेयि संहितेंत धूर्षाः म्हणजे जूं धारण करणारे असें नांव दिलें आहे. ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं ह्या शब्दाचा अर्थ अनिश्चित आहे. रॉथच्या मतें चाकाच्या तुंब्यांतून जाणाऱ्या कण्याच्या कोठल्याहि एका टोंकास असलेली कुणी असा याचा अर्थ आहे म्हणजे धुर ह्याचा अर्थ जवळ जवळ 'आणि' असाच झाला. ओल्डेनबर्गनें हेंच मत स्वीकारलें आहे. मोनियर विल्यम्सच्या मतानें धुर ह्याचा अर्थ ओझें असा असावा; पण हें शक्य दिसत नाहीं धुर ह्याचा गाडीचा दांडा असा अर्थ होणें शक्य आहे. नंतर आंस व दांडा मिळून ज्यायोगानें रथ ओढला जातो तो भाग, असा सामान्यपणें अर्थ झाला. हा अर्थ स्वीकारला तर ऋग्वेदांतल्या संदिग्ध लेखाचा उलगडा होईल.

२७ ना भि—चाकाचा तुंबा अशा अर्थानें ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें हा शब्द आलेला आहे. याचा मूळ अर्थ बेंबी; पुढें लक्षणेनें नातें किंवा नातलग असा अर्थ होतो.

२८ ने मि—ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें रथाच्या चक्राचा वांक ( धाव ) असा याचा अर्थ आहे. हा चांगल्या लाकडाचा [ सुद्रू ] केलेला असे व त्याला वाकवून चांगला आकार दिलेला असे.

२९ प वि,—ऋग्वेद व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें रथ-चक्राची धांव ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे. ही धांव चांगली घट्ट बसवावी लागते असा उल्लेख आलेला आहे व सुपवि हें विशेषण सुनाभि आणि सुचक्र ह्यांच्याबरोबर आलेलें अथर्ववेदांत सांपडतें. ह्या धांवा धातूच्या बनविलेल्या असत व त्या तीक्ष्ण असल्यामुळें त्यांचा शस्त्राप्रमाणें उपयोग होत असे. वाजसनेयि संहितेमध्यें एके ठिकाणीं पीटर्सबर्ग कोशाप्रमाणें पवि याचा अर्थ सोमवल्ली कुटण्या-करितां असलेल्या मुसळाभोंवतीचें लोखंडी वेढणें असा आहे. पण हा अर्थ असंभाव्य दिसतो. कारण असें वेढणें मुसळाच्या टोंकास लावित असल्याचा इतरत्र कोठें उल्लेख नाहीं. हिलेब्रँट ह्या वाजसनेयि संहितेमधल्या उताऱ्यांत तीक्ष्ण धार असा अर्थ घेतो व तो अर्थ बरा दिसतो. कारण ऋग्वेदांत मुसळें फिरावितात म्हणून त्यांचें वर्णन ' अनश्वाः पवयोऽरथाः ' असें केलेलें आहे. निरुक्तामध्यें पवीचा अर्थ बाण असा केला आहे. हा अर्थ बरोबर आहे हें दर्शविण्या-साठीं पीटर्सबर्ग कोशांत ऋग्वेदांतील दोन उताऱ्यांचा निर्देश केला आहे. पण एका उताऱ्यांत इंद्राच्या वज्रासंबंधानें तीक्ष्ण धारेचें शस्त्र हा दुय्यम अर्थच लागू पडतो व दुसऱ्या उताऱ्यांत बाणस्य पवि असा शब्द आला आहे त्या ठिकाणीं बेताचें तीक्ष्ण धारेचें मुसळ म्हणजे सोमवल्लीचा देंठ असा अर्थ होईल. हिलेब्रँटच्या मतें सोमवल्लीच्या आकाराचा या ठिकाणीं उल्लेख असावा. ' पवीनस ' असें एका राक्षसाचें नांव अथर्ववेदांत आलेलें आहे. परंतु त्यावरून ह्या वाद-ग्रस्त मुद्यावर कांहीं एक प्रकाश पडत नाहीं. ह्या पवीनस शब्दाचा अर्थ पीटर्सबर्ग कोशाप्रमाणें, भाल्याच्या टोंकाप्रमाणें ज्याचें नाक आहे तो, असा आहे; व व्हिटने ह्या शब्दाचें भाषांतर कांठासारखें किंवा कड्यासारखें नाक असें करितो. ( ह्यामुळें नाकाच्या वक्राकृतीचा बोध होत असावा. )

३० पा त ल्य.—ऋग्वेदांत एका ठिकाणीं हा शब्द आलेला

असून त्याचा अर्थ रथाचा कांहीं भाग असा आहे. हा कोणता भाग होता हें अनिश्चित आहे. हॉपकिन्स म्हणतो कीं, महाभारतांत म्हटल्याप्रमाणें रथाचा दांडा धरून ठेवण्याकरितां कण्यावरील लांकडाचा तुकडा ( खीळ ) असा अर्थ असावा. ऋग्वेद ३ ५३. १७ या ठिकाणीं येणाऱ्या पातल्य शब्दाचा अर्थ सायणाचार्यांनीं चाकाला लाविलेली खाळ ( कीलक ) असा केला आहे.

[31]प्र ति धि.—याचा ऋग्वेदांत सूर्येच्या नांवाच्या ऋचेंत उल्लेख येतो. हा रथाचा एक भाग असून यावर घालून वधूला घरीं नेत. याचा काय अर्थ असावा हें निश्चित ठरविणें अशक्य आहे. रॉथच्या मतानें हा एक लांकडाला आडवा बांधलेला लांकडाचा तुकडा असावा.

[32]प्र धि.—हें रथचक्राच्या कोणत्या तरी भागाचें नांव आहे. बहुधा वांक किंवा अढेकड हा याचा अर्थ असावा. अथर्ववेद व ऋग्वेद यांत एका ठिकाणीं ‘ नाभ्य ’ आणि ‘ प्रधि ’ यांचा उल्लेख उपधि ह्या शब्दाबरोबर झाला आहे. यावरून पाहतां हें कदाचित् सर्व आऱ्यांचें समुच्चयवाचक नांव असावें किंवा हें नाभीच्या आंतील कोरेचें किंवा कड्याचे नांव असावें. ऋग्वेदांतील कूट ऋचेंन बारा प्रधींचा उल्लेख तीन नाभीबरोबर आला आहे. तेथेंच एक चाक व तीनशे साठ आरे दिलेले आहेत. या शब्दाचा अर्थनिर्णय करण्याचा प्रयत्न करणें बहुतेक व्यर्थ होय. परंतु ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं या ऋचेंत वर्ष, तीन ऋतू, बारा महिने, तीनशेसाठ दिवस, यांच्यावर रूपक आहे. इतर ठिकाणीं नाभ्य आणखी प्रधि ऐवढेच शब्द येतात. किंवा नुसता प्रधि हाच शब्द येतो. ऋग्वेदांत सायण भाष्याप्रमाणें याचा अर्थ ‘ चक्रबाह्यवलयः । ’ म्हणजे चाकाच्या बाहेरील घेर व अथर्ववेदांत त्याच भाष्याप्रमाणें चाकाची धांव असा केला आहे.

[33]भ ग.—हिलेब्रँटच्या मताप्रमाणें ऋग्वेदाच्या एका वचनांत याचा ‘ रथाचा एक भाग ’ या अर्थानें उपयोग झाला आहे. परंतु सायणाचार्य याचा अर्थ धुर म्हणजे जूं किंवा जोखड असा करितात.

[34]यु ग.—ऋग्वेदांत आणि नंतरच्या ग्रंथांत जूं या अर्थी हा शब्द आलेला आहे.

[35]र श्मि.—ऋग्वेदांत एकदां या शब्दाचा रथाचा भाग या अर्थी उल्लेख केलेला आहे. याचा अर्थ टेकू देणारा दांडा असाहि होतो.

[36]वं धु रः—ऋग्वेदांत व पुढील ग्रथांत हा शब्द असून याचा मॅकडोनेल रथांतील आसन असा अर्थ करितो वेदार्थयत्नग्रथांत वंधुर म्हणजे ईषा अर्थात रथाच्या दोन्ही धुरा रथापासून निघून जुंवापर्यंत जातात त्या असा अर्थ आहे. सायणभाष्यांत असा अर्थ असून शिवाय कांहीं ठिकाणीं सर्व रथ असाहि अर्थ दिला आहे.

[37]व र्त नि.— वर्तनि म्हणजे रथाचा भाग. ऋग्वेदांत व नंतरच्या ग्रंथांत याचा अर्थ रथचक्राचा वांक असा होतो.

[38]श म्या —ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांमध्यें ह्याचा अर्थ खुंटी, शिवळ असा आहे विशेषतः जाल्याचा खुंटा किंवा जुंवाची खुंटा आहे. ही जुंवाची खुंटी जुंवाच्या दोन्ही टोकांस मारलेली असे; कारण त्यामुळें जूं बैलाच्या मानेवर सारखें बसे. शम्या हें लांबी मोजण्याचें साधनहि होतें.

[39] श म्य—ऋग्वेदांतील एका उताऱ्यांत रॉथच्या मतानें कदाचित् रथाचा एक भाग असा याचा अर्थ असावा. पण हा अर्थ बिलकुल निश्चित नाहीं.

[40] अं क—दोन अंक आणि दोन न्यंक असे रथाचे भाग असतात असें तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण ह्यांच्यांत वर्णन आहे. ह्या शब्दांचा अर्थ स्पष्ट होत नाहीं. टीकाकार म्हणतात कीं रथाच्या बाजू आणि चाकें यांचे निदर्शक हे शब्द आहेत. झिमर हा ग्रीक शब्द ‘ अंतुगीझ ’ याच्याशीं त्याची तुलना करितो आणि त्याचें मत असें आहे कीं रथाच्या मुख्य भागाची जी वरची बाजू तिला अंकौ असें म्हणत आणि जास्त सुरक्षितपणा किंवा मजबूतपणा यावा म्हणून खालील बाजू ज्या असत त्यांनां न्यंकौ असें म्हणत. ह्या शब्दाचे बरोबर अर्थ करणें अशक्य आहे असें ओल्डेनबर्ग कबूल करितो. परंतु त्याला वाटतें कीं ह्या शब्दांचा द्व्यर्थी उपयोग करीत; एक अर्थ रथाचे भाग, आणि दुसरा अर्थ देवपण. परंतु बोथलिंक हा फक्त देवपण, ईश्वरी सत्ता ह्यालाच हे शब्द लावितो, किंवा ह्या अर्थीच हे शब्द उपयोगांत आणिता. तैत्तिरीय संहिता २. ७,८–१. येथ अंक आणि न्यंक यांचा रथाचे दोन भाग असा अर्थ नसून रथाचीं दोन चाकें असा आहे.

[41]ना डी.—यजुर्वेदांत ह्या शब्दाचा अर्थ रथाच्या चाकाचा वर्तुलाकार तुंबा असा दिसतो.

[42] न्यं कः—तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण ह्या ग्रंथांमध्यें हा शब्द अंकाला सदृश अशा रथाच्या कांहीं तरी भागाच्या अर्थी आला आहे. पंचविंश ब्राह्मणांत न्यंकु ह्या शब्दाचें न्यंकू असें द्विवचनी रूप आलें आहे.

[43] प्र ऊ ग.—हें वरवर तरी प्रायुग सारखें दिसतें ‘ गाडीच्या धुरीचा पुढील भाग ’ असा याचा अर्थ आहे. याचा उल्लेख यजुःसंहितेंत व शतपथांत आला आहे. व तेथें ‘ कस्तंभीच्या मागील धुराचा भाग ’ अथवा ‘ ज्यावर धुर असतें तें लांकूड ’ असा याचा अर्थ दिला आहे.

[44] र थ मु ख.—तैत्तिरीय संहितेंत याचा अर्थ ‘ रथाचा पुढील भाग ’ असा आहे.

[45] र था क्ष.—तैत्तिरीय संहितेंत रथाचा कणा या अर्थी हा शब्द आलेला आहे. कात्यायन श्रौतसूत्राप्रमाणें कण्याची लांबी एकशें चार अंगुळें दिलेली आहे. आपस्तंब शुल्बसूत्रामध्येंहि इतकीच दिलेली आहे.

[46] उ द्धि.—उद्धि म्हणजे रथाचा एक भाग; बहुतकरून आसन असा अर्थ असावा. रॉथच्या मतानें याचा अर्थ

कण्यावरील चौकट असा आहे. हा शब्द अथर्ववेदांत येतो ऐतरेय आरण्यकातील २.३, ८ येथील सायणभाष्यांत याचा अर्थ रथाच्या दांड्याचें पुढील तोंड असा आहे. अथर्ववेदांतील ८.८,२२ येथील भाषांतरात ग्रिफिथ याचा अर्थ शरीर असा करितो.

[४७] उ पा न स.—अक्षाहून निराळ्या अर्थानें हा शब्द अथर्ववेदांत सापडतो. आणि याचा अर्थ गाडीचा मुख्य भाग असा आहे. परंतु सायणभाष्याप्रमाणें त्याचा अर्थ 'धान्याचें कोठार' किंवा 'धान्यानें भरलेली गाडी' असा आहे. ऋग्वेदात जेथें फक्त एक वेळ हा शब्द आलेला आहे तेथें त्याचा अर्थ अनिश्चित आहे. पिशल म्हणतो कीं, तो शब्द विशेषणरूपानें योजिला नसून सामान्यनामरूपात योजिलेला आहे.

[४८] त र्द म न्.—अथर्ववेदामध्यें जुंवा (युगा) मधलें जें भोंक असतें त्याला हा शब्द आहे. शतपथ ब्राह्मणात. कातडींतील रंध्राला हा शब्द लाविला आहे.

[४९] प क्ष स्.—अथर्ववेद व कौषीतकी ब्राह्मण ह्यांमध्यें हा शब्द आलेला असून याचा अर्थ रथाच्या बाजू असा आहे. काठक संहिता व तैत्तिरीय ब्राम्हण ह्यामध्यें कुटीर किंवा शाला ह्याच्या बाजूंना हा शब्द लावलेला आहे. वाजसनेयि संहितेमध्यें ह्याचा अर्थ दरवाज्याची बाजू असा असून कौषीतकी ब्राह्मणांत सैन्याच्या एका भागाला हें नाव आहे. पंचविंश ब्राह्मणात याचा अर्थ महिन्याचा अर्धा भाग किंवा पंधरवडा असा आहे.

[५०] यो ग.—अथर्ववेदांत आणि बृहदारण्यकोपनिषदांत गाडी ओढणाऱ्या घोड्याचें अगर बैलाचें जूं असा ह्या शब्दाचा अर्थ आहे.

[५१] र थो प स्थ.— रथोपस्थ म्हणजे सारथी बसत असे ती जागा. हा शब्द अथर्ववेदांत आणि ब्राह्मणात आला आहे.

[५२] अ पा ल म्ब.—गाडीचा वेग कमी करण्याकरितां जा दांडा खालीं सोडीत त्याचा द्योतक हा शब्द आहे. हा शब्द शतपथ ब्राह्मणात (२.४, ३,१२) आला आहे.

[५३] क स्त म्भी.—शतपथात याचा अर्थ गाड्याच्या दांड्याला आधारभूत असा एक लांकडाचा तुकडा असा आहे.

[५४] कु ब र, कू ब री.—मैत्रायणी संहितेंत, शतपथ व कौषीतकी ब्राह्मणात ह्याचा गाडीचा दांडा अशा अर्थानें उपयोग केला आहे.

[५५] यु क्त.—शतपथांत बैलाचें जूं या अर्थी हा शब्द आला आहे.

[५६] र थ च क्र.—याचा अर्थ रथाचें चाक. ब्राह्मणांत याचा वारंवार उल्लेख आला आहे.

[५७] र थ शी र्ष.—रथशीर्ष म्हणजे रथाचा वरचा भाग. याचा शतपथांत उल्लेख आला आहे.

## सारथिनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| दुर्नियंतृ | [२]धुरेस्थ | [३]स्थातृ |
| [१]यन्तृ | [२]सारथि | |

[१]यं तृ—ऋग्वेदांत आणि सूत्रांत घोड्यांनां किंवा रथांनां हांकणारा या अर्थानें हा शब्द येतो.

[२]सा र थि:—ऋग्वेदामध्यें व उत्तरकालीन ग्रंथांत सव्येष्ठा म्हणजे योद्धा ह्याच्या उलट रथ हांकणारा ह्या अर्थानें हा शब्द आलेला आहे.

[३]स्थां तृः—ऋग्वेदामध्यें ह्याचा अर्थ घोड्यांनां किंवा रथाला हांकणारा असा आहे.

## दळणवळण किरकोळ [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अनोवाह्य (गाड्यातून वाहून नेलें जाणारें धान्य) | आत (सतत गमन साधन) | वाहून नेलें जाणारें धान्य) |
| | शीर्षहार्य (डोक्यावर | सेतु |

## वाद्यें

### वाद्यें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| आघाटि (तंतुवाद्य) | [५]गोधा (सनई, पावा) | [८]बाकुर |
| [२]कर्करि | [६]दुंदुभि | [९]वाण |
| काराधुनी (शंखादि) | [७]नाळी (मुरली) | [१०]वाणीची |
| [३]गर्गर | [८]बकुर | वेणु |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [११]तूणव | [१२]भूमिदुंदुभि | [१३]वीणा |
| दुंदुभि | वाण | [१४]वेणु |

### [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| आघाटि | गर्गर | [१५]द्रवय (ढोलगें किंवा डूम सारखें) |
| कर्करी | गोधा | [१६]नाडीका (अलगुज वाद्य विशे•) |
| केतुमत् (दुंदुभीच्या आवाजाचें वि.) | दुन्दुभि | विश्वगोत्र्य (विश्वप्रिय दुंदुभि) |

### [ वाजसनेयि सं. ]

[१७]आडम्बर

### [ संहितेंतर ]

| | | |
|---|---|---|
| [१८]काण्डनी | [२०]लंबन | [२२]वादित |
| [१९]बेकुरा | [२१]वादन | |

[१]आ घा टि.—'करताळ, झांज' या वाद्यांचा उपयोग नृत्याच्या वेळीं करीत. ऋग्वेद आणि अथर्ववेद यातहि ह्याचा उल्लेख आहे. सायणमतानें आघाटि याचा कांड-वीणा असा अर्थ होतो.

[२]क र्क रि.— ऋग्वेदांत व नंतर हा शब्द 'वीणा'

ह्या अर्थी उपयोगांत आणिला आहे. मैत्रायणी संहितेत गुरांच्या कानावर वीणेसारख्या खुणा केल्या असत असें उल्लेखलें आहे. असें मॅकडोनेल म्हणतो. परंतु मूळांत खुणांचा उल्लेख आहे वीणेच्या आकाराचा नाहीं.

[3] ग र्ग र.—ऋग्वेदांत हें एका वाद्याचें नांव आहे.

[4] गो धा.—' धनुर्ज्या ' असा ऋग्वेदांत एका ठिकाणीं याचा अर्थ आहे परंतु दुसरीकडेहि असावा असें मॅकडोनेल म्हणतो. रॉथ देखील अथर्ववेदातील ह्या शब्दाचा अर्थ तोच करितो. ऋ. १०. २८, १० व १०.२८ ११ या दोन ठिकाणीं येणाऱ्या " गोधा " शब्दाचा अर्थ सायणानें आपल्या भाष्यांत " गायत्री " असा दिला आहे. ग्रिफिथ व आधुनिक अनेक पंडित यांनीं वरील ऋचांचा केलेला अर्थ व सायणानें केलेला अर्थ यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. ग्रिफिथ , वादी असा अर्थ करितो. ऋ. ८. ६९, ९ या ठिकाणीं गोधा शब्दाचा अर्थ हस्तघ्नः म्हणजे हातानें वाजविण्याचें वा असा (सायणमतें) अर्थ आहे. अथर्ववेद ४. ३, ६ या ठिकाणीं गोधा याचा एक प्रकारचा प्राणी ( घोरपड, पाल यासारखा ) असा दिसतो. गोधा याचा धनुर्ज्या असा अर्थ मुळींच निघत नाहीं. ऋग्वेदांत एका ठिकाणीं ( ८. ६९, ८ ) रॉथ आणि हिलेब्रँट ह्यांनीं वाद्य असा अर्थ केला आहे. गोधा शब्दाचा मूळ अर्थ धनुष्याच्या दोरी पासून हातास इजा होऊं नये म्हणून डाव्या हातास बांधलेलें कातडी वेष्टन. सायण वरील अर्थ घेतो ( गोधा-हस्तघ्नः ). याचा अर्थ मागाहून एक प्रकारचें वाद्य असाहि रूढ दिसतो.

[5] दुं दु भि.—हा ध्वन्यनुकारी शब्द असून याचा अर्थ पडघम असा आहे. व त्याचा उपयोग लढाईचे व शांततेचे वेळीं करावयाचा असे. हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथात आलेला आहे. भूमिदुंदुभि नावाचा एक विशिष्ट प्रकारचा पडघम पूर्वी होता. तो असा कीं, जमीनींत एक खड्डा करून त्यावर एक कातडें पसरावयाचें. अशा तऱ्हेचा पडघम महाव्रत नावाच्या एका यागाचें वेळीं दक्षिणायनांत सूर्य परत फिरण्याच्या समयास जीं विघ्नें येतील तीं निवारण्यास उपयोगात आणिला जात असे. पुरुषमेधाचे वेळीं जे बळी दिले जात असत त्यां पैकीं पडघम वाजविणारा हा एक आहे.( महाव्रतातील दुंदुभिवादन सूर्याच्या परत फिरण्यासंबंधी आहे हा अर्थ सायणसंमत नव्हे नाहीं)शाखायन सूत्रांत १७।१४, ११ ) दुंदुभि बैलाच्या शेपटीनें वाजवीत असतसें दिसतें. त्या ठिकाणीं भूमिदुंदुभि असें म्हटलें आहे. ऐतरेय आरण्यकातल्या ( ५, १, ५) भाष्यांत सायणाचार्य आपस्तम्ब श्रौतसूत्रांतील दुंदुभिवरील उतारा देतात तो असा " अंतर्वेदि व बहिर्वेदि यांच्या मध्यें, एक खड्डा खणून, त्यावर ओलें कातडें, केंसाळ बाजू वर करून खुंट्यांनीं बसवितात, व त्याजवळ मारण्या ( वाजविण्या ) करितां पुच्छकांड ठेवितात. " अथर्व ५. २०, १ आंत दुंदुभि लांकडाचा असून तो कातड्याच्या पट्ट्यांनीं बांधलेला असे असें वर्णन आहे.

[6] ना ळी.—ह्याचा अर्थ ऋग्वेदामध्यें त्याच प्रमाणें काठक संहितेमध्यें वेताची बनवलेली तुतारी असा आहे. काठक संहितेमध्यें एके ठिकाणीं तूणव ह्या शब्दाबरोबर हा शब्द आलेला सायणभाष्यात या ठिकाणीं ' नाळी ' व अर्थ वाद्यवीणा, वेणु किंवा स्तुतिरूप वाणी असा केला आहे.

[7] ब कु र.— हा शब्द ऋग्वेदाच्या एका ऋचेंत आला आहे. तेथें अश्विनांनीं दस्यूंविरुद्ध आर्यासाठीं बकुर वाजवून उजेड पाडला असा उल्लेख येतो, निरुक्ताप्रमाणें याचा अर्थ वज्र. परंतु रॉथ प्रमाणें वाजविलेली वस्तू; एखादें वाद्य असावें. व हा अर्थ बराचसा बरोबर वाटतो. सायणाचार्य या ठिकाणीं 'बकुर' याचा अर्थ वज्र असा घेतात पण ग्रिफिथ 'तुतारी' असा अर्थ करतो.

यास्क 'बकुर' याचा अर्थ 'ज्योति' किंवा 'उदक' असा करतो, 'वज्र'असा अर्थ करीत नाहीं.

[8] बा कु र.—दृतीचें हें विशेषण ऋग्वेदाच्या एका वचनांत आलें आहे. या शब्दाचा सामासिक अर्थ "एक प्रकारचें वाद्य" असा होतो. ऋग्वेद ९. १,८ या ठिकाणीं सायणाचार्य 'बाकुरं दृतिं ' म्हणजे तेजस्वी (बाकुर) व ढगाच्या रंगाचा ( सोम )असा अर्थ करितात.

[9] वा णः—ऋग्वेद व अथर्ववेद ह्यामध्यें सें. पी. कोशांत दिलेल्या अर्थाप्रमाणें वाद्यावरचें गाणें असा याचा अर्थ होतो. पण मागाहून झालेल्या संहिता व ब्राह्मण ग्रंथात शंभर तारा असलेलें ( शततंतु ) व महाव्रताचे वेळीं वाजविलें जाणारें तंतुवाद्य किंवा सारंगी असा अर्थ आहे. ऋग्वेदामध्यें (१०. ३२, ४) या सारंगीच्या सप्त स्वराचा ( धातूचा ) उल्लेख आलेला आहे. ह्या सप्त स्वरांना ( आपण जर वृत्तसंबंधीं अर्थ न घेतला तर ) इतर ठिकाणीं वाणी असें म्हटलें आहे सायणाचार्य वाण याचा अर्थ 'शंभर तारांची एक प्रकारची वीणा' असा करितात. याला मरुद्वीणा असेंहि म्हटलेलें आहे. सप्तधातुः वाणस्य या ठिकाणीं 'सप्तधातूचा' अर्थ सात स्वर, सात छंद, सात ऋतू किंवा सात होते असा घेतला आहे. व 'वाण' चा अर्थ स्तुति किंवा वाद्य असा घेतात. अथर्व ( १०, २, १७, ) याला सायणाचें भाष्य नाहीं. पंडितांच्या प्रतींत 'वाण' असा शब्द आहे. 'वाण' याचा अर्थ ते 'वाणी' असा घेतात, ऐतरेय ब्राह्मणात वाणमौदुम्बरं शततन्तुम्' असें म्हटलें आहे. म्हणजे वाण हें उंदुबराच्या झाडाचें बनवीत असावेत.

[10] वा णी ची.—ऋग्वेदात एका ऋचेंत हा शब्द आलेला आहे. सें. पी. कोशामध्यें ह्याचा अर्थ वाद्य असा आहे.

[11] तू ण व.—ऋग्वेदोत्तर संहिता व ब्राह्मण ग्रंथात ह्याचा अर्थ वाजविण्याचें लाकडी वाद्य, बहुतकरून मुरली असा आहे. पुरुषमेधामध्यें जे बळी दिले जातात त्यामध्यें मुरली

वाजविणारा हाहि एक आहे. तैत्तिरीयसंहितेंत 'तूणव' याचा अर्थ वेणु असा सायणानें केला आहे. कीथ याचा अर्थ मुरली असा करतो. तैत्तिरीय ब्राह्मण ( ३. ४, १५, १ ) यांत 'तूणवध्म' म्हणजे वाद्य वाजवेणारा किंवा तोंडानें शीळ वाजविणारा असा अर्थ केला आहे. निरुक्तांत 'तूणव' म्हणजे मृग असा अर्थ घेतला आहे.

[12] भूमिदुंदुभि.—जमीनीचा नगारा. महाव्रतविधीच्या वेळीं एक खांच चामड्यानें बंद करीत व त्याचा नगारा करीत. हा शब्द संहिता व ब्राह्मणग्रंथांतून आला आहे.

[13] वीणा.—ऋग्वेदोत्तर संहिता ग्रंथ व ब्राह्मण ग्रंथ यांत याचा अर्थ वीणा असा आहे. यजुर्वेदामध्यें पुरुषमेधाच्या वेळीं बळी दिले जाणाऱ्यांच्या यादींत वीणा-वाद ( वीणा वाजविणारा ) याचें नांव आलेलें आहे. वीणा शब्दाचा इतरत्रहि उल्लेख आलेला आहे. ऐतरेय आरण्यकांत या वाद्यावर केंसाळ कातडें ( एके काळीं ) पसरलें जात असे असें म्हटलें असून याचे निरनिराळे भाग वर्णिले आहेत. उदाहरणार्थ, शिरस्, उदर, अंभृण, तंत्र ( तार ), वादन वगैरे. शतपथ ब्राह्मणांत उत्तरमंद्रा याचा अर्थ एक प्रकारचा स्वर किंवा वीणा असा आहे. शांखायन श्रौतसूत्रांत ( १७. ३, १ ) शततंतु वीणेचें वर्णन आहे तें असें:– त्या वीणेला पलाशाची सूना ( खुंटी ) असते, उंबराचा दांडा असतो, बैलाचें कातडें केंसासहित गुंडाळतात, दांड्याला दहा भोंकें पाडून प्रत्येक भोंकांतून दहा दहा तारा ओंवतात व त्या तारा वेगवेगळ्या ठिकाणीं बसवितात, पानासहित वेतसाची शाखा वाजविण्याकरितां ठेवतात. ऐतरेय आरण्यक ३. २५ या ठिकाणीं मनुष्याचें शरीर हें वीणा कल्पून त्याची व वीणेची तुलना दाखविली आहे.

[14] वेणु.—तैत्तिरीय संहिता, अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथ यांत वेत किंवा बांबू अशा अर्थानें हा शब्द आलेला आहे. तैत्तरीय संहितेमध्यें तो पोकळ ( सुषिर ) आहे असें वर्णन आहे. ऋग्वेदांत दानस्तुतीमध्यें वालखिल्य सूक्तांत एकदां हा शब्द आलेला आहे. रॉथ या ठिकाणीं त्याचा अर्थ वेताची बासरी असा करतो. हाच अर्थ पुढील ग्रंथांत वेणूचा आला आहे. कौषीतकी ब्राह्मणांत वेणु व सस्य यांनां एके ठिकाणीं उल्लेखिलें आहे व ते वसंत ऋतूंत पक्व होतात असें म्हटलें आहे. बहुतकरून बांबूंची झाडें असा याचा अर्थ असावा.

[15] दुवय.—'लांकडाचें वाद्य' अशा अर्थानें अथर्ववेदांत पडघमाचें विशेषण म्हणून हा शब्द आलेला आहे.

[16] नाडीका.—अथर्ववेदामध्यें एकदां हा शब्द आलेला असून याचा अर्थ अलगुज असा स्पष्ट आहे व त्या वेदांत वेताच्या बनविलेल्या बाणाच्या टोंकाचाहि संबंध आहे.

[17] आडम्बर.—एक प्रकारचें ढोलकें. वाजसनेयी संहितेंत पुरुषमेधाचे बळींची जी यादी आहे त्यांत आडम्बराघात याचा उल्लेख आहे.

[18] काण्डवीणा.—काठक संहितेंत महाव्रताच्या वेळीं उपयोग करीत असलेलें वेतस पर्वनूपासून केलेलें, वीणेसारखें तंतुवाद्य असें लिहिलें आहे. कांडवीणा वेतसशाखेनें वाजवावयाची असते. या वीणेला वादनकार-'घाटरी' असें म्हणतात ( शांखायन श्रौतसूत्र १७. ३, १४–१५ ).

[19] बेकुरा—हा शब्द पंचविंश ब्राह्मणांत येतो व तेथें याचा अर्थ 'आवाज' किंवा 'ध्वनि' असा होतो. हाच अर्थ नैघंटुकांत दिला आहे. हा बहुधा बकुराप्रमाणें एकाद्या वाद्याचा द्योतक शब्द असावा. तैत्तिरीय आणि काठक संहितांतून बेकुरि आणि वेकुरि हे शब्द स्वर्गीय वारांगना किंवा अप्सरा यांनां मंजुळ या अर्थी विशेषणें म्हणून वापरलें आहेत. वाजसनेयि संहिता आणि शतपथ ब्राह्मण यांत भाकुरि आणि भकुरि असे शब्द आढळतात. निरुक्तांत ( २. २३ ), वाङ्नामांच्या यादींत हा शब्द आलेला आहे. बेकुरयः म्हणजे चंद्रमा गंधर्वाच्या भार्यांचीं नांवें, असा तैत्तिरीय संहितेंत भाष्यांत अर्थ घेतला आहे. त्यांचा तेथें सायण ध्वनीशीं संबंध लावीत नाहीं. त्याचप्रमाणें शतपथ ब्राह्मणांत चन्द्रमा गंधर्वाच्या स्त्रिया जीं नक्षत्रें त्यांनां भेकुरी किंवा भाकुरी ( प्रकाशमान् ) असें नांव आहे.

[20] लंबन.—काण्वशाखीय बृहदारण्यकोपनिषदामध्यें हा पाठ आहे व तो पाठ माध्यंदिन शाखीय आडंबर ( डमरू ) बद्दल आलेला आहे. कांहीं प्रतींत या ठिकाणीं लंबन असा शब्द नसून लंबर असा आहे.

[21] वादन.—ऐतरेय आरण्यकांत एका तंतुवाद्याचा एक भाग असा अर्थ होतो. 'वादन' हा तंतुवाद्यचा भाग नसून वादन म्हणजे 'वाजविण्याची क्रिया' असा अर्थ सायण करतो.

[22] वादित.—छांदोग्यउपनिषदामध्यें हा गीतवादित गाणेंबजावणें या समासांत व कौषीतकी ब्राह्मणांत नृत्य या शब्दाबरोबर (एकटाच) गाणें व नाच या अर्थी आला आहे.

## विचार

### ब्रम्हविशेषणें [ ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| ऋत | विश्वतस्पात | सहस्रपात् |
| ऋतज्य | विश्वतोबाहु | सहस्रप्रधन |
| विश्वजन्य | विश्वतोमुख | सहस्रबाहु |
| विश्वजित् | सत् | सहस्रशीर्षन् |
| विश्वतश्चक्षु | सत्य | सहस्राक्ष |

### वेदान्त [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अधिष्ठान | अविदुष्टर (अत्यंत प्रजानन्) | उपसद (उपासना) |
| अनवस्था (प्रकृति) | असुनीति [प्राण-नेणारा] | उद्दति (उपासना) |
| अन्तर्विद्वान् (देव-मार्ग जाणणारा) | आत्मन्वत्[सजीव] | उरुचक्षस(बहुद्रष्टा) |
| अभिवक्र्य(प्रवर्ग्य रहस्य) | आर्य ( अभिज्ञ ) | ऋषि ( मंत्रद्रष्टा ) |
| | | कवितर (प्राज्ञतर) |
| | | कवीयमान(मेधावी |

कुहचिद्विद् [मद्भक्ता यत्र गार्थतिसप्रतिष्ठामि]
केतु ( प्रज्ञान )
गुहा [ हृदय ]
चिकित्विन्मनस् (सर्व हृदयज्ञता)
जीव
तुच्छय
दुवस्
देवयान [देवमार्ग]
धर्मन्
ध्रुव
नाभि ( हेतु )
नामधस् ( नामांचा धायिता )
नीतिवित् (स्तोत्राभिज्ञ )
पंचहोता (वायु वि.)
पश्यत् (विश्वद्रष्टा)
पुरुचेतन (बहुज्ञाता
प्रकेत (विज्ञापक)
प्रज्ञात् (ज्ञानी)
प्रथमच्छद (निर्गुणब्रह्माच्छादक)
प्रविद्वस् (प्रकृष्ट ज्ञानी)
बोधिन्मनस्
मधुला (मधुविद्या)
मयूख (प्राणात्मक देव)
मरीचि [ आत्मज्ञानी ]
माया
मुमुक्षु
वयुन [ज्ञानसाधन]
वश [ अधीन ]
वाजिन्
वहुत्वन्
विचक्षण [सर्वतोदर्शी]
वित्
विदाय्य (वेत्ता)
विदुष्टर (विद्वत्तर)
विप्र (कवी)
विप्रन् (ज्ञानमार्ग)
विप्रनापम् (ज्ञातकर्मा)
विधर्मन् [जगद्धारण व्यापार]
विराज
विवद्रुष् (अभिज्ञ)
वीरवक्षण
व्यान
ब्राधन्तम (प्रवृद्धतम )
शतविचक्षण
श्रद्धिव [ श्रद्धया श्रोतव्यंब्रह्म ]
श्रुतवित्
संवित् (ज्ञान)
सत्
सर्ग [जन्म, सृष्टि]
साधु [साधक]
सुविद्वस् [सर्वद्रष्टा]
सुवेद [सुविज्ञान]

[ तै. सं. ]

आत्मद
गर्तसद
देवयान [ मार्ग ]
निरथा [वाच्]
प्रणव
ब्रह्मवर्चस्
ब्रह्मवादिन्
ब्रह्मसंशित
यजमानलोक
योग
वयुन [ज्ञापक]
नामानुवचन
विज्ञात
वेद्य
संवित्
सत्
सत्य
सात्मत्व
सायुज्य
सुकृत
स्वाधिय [इन्द्रिय]

[ अथर्ववेद ]

अक्षर [ विनाशरहित आत्मस्वरूप ]
अविजानन [ गहन तत्त्व न जाणणारा ]
अनभ्यारूढ (अन्वैरनारूढतम् ब्रह्म )
अनुविद्वान्
आत्मण्वु
आचार्य
आत्मन्
आत्मन्वत् [सात्मकंजगत् ]
आत्मसद्
उपद्रष्टृ
कवि [ क्रांतदर्शी ]
कवीयमान [ परमात्म्याचें वि.]
क्रतुविद्
चराचर
चित्ति ( ज्ञान )
जानत्
जीवपुर ( जीवशरीर)
तत्त्व
तपस्
तप्यमान
त्रिपाद
दशांगुल
देवयान
दैव
दैवी ( देवसंबंधिनी वाणी)
दौर्भाग्य
नवद्वार
पितृयान
पुत्रविद्
पुराणवित्
प्रज्ञान
प्रज्ञानी
प्रतिबोध (प्रतिमनस्तज्ञान)
प्रबुध
प्रविद्वस्
प्राण
प्राणति
प्राणापान
बोधप्रतीबोध
ब्रह्मजुष्ट
ब्रह्मण्वति
ब्रह्मवर्चसी
ब्रह्मवादिन्
ब्रह्मसंशित
भागधेय
भुवनेस्थ ( परमात्म्याचें वि.)
मध्यन्दिन
मध्वद्
मनीषिन्
ममसत्य
महर्षि
महामनस्
माध्यन्दिन
मीमांसमान
मेधा
मेधावित्
मेधिराय
यजुर्विद्
यज्ञर्त
यज्ञयुज
रथंतर
वर्तनि
वशी
विचक्षण
विज्ञान
विदुषी
विद्या
विपश्चित्
विप्रजूत
विश्वचक्षस्
विश्वचय
विश्वचर्षणि
विश्वजन्मन्
विश्वजन्य
विश्वतःपाणि
विश्वतस्पृथ
विश्वतुर्वे
विश्वतोधार
विश्वतोमुख
विश्वतोवीर्य
विश्वदर्शत
विश्वदानी
विश्वदावन्
विश्वदृष्ट
विश्वदेववन्
विश्वधायस
विश्वनाम्नी
विश्वपंशस्
विश्वभृत
विश्वभोजस्
विश्वमिन्व
विश्वमानुष
विश्वरोधस्
विश्वरूप
विश्वविद्
विश्ववेद
विश्वव्यचन
विश्वाहृष
शिवापर
सत्
सत्यवादिन्
समचक्र
समग्रिम
संवर्ग
संविद्
सम्यग्ज्ञान
सर्वज्यानि
सर्वतनु
सर्वपात्
सर्वपुरुष
सर्वरथ
सर्वरूप
सर्वविद
सर्वात्मा
सहस्रपाद्
सहस्रपृष्ठ
सहस्रपोष
सहस्रप्राण
सहस्रबाहु
सहृदय
सुब्रह्मन्
सुमनस्
सुविज्ञान
सुश्रव
सोमराज्ञी

[वाजसनेयि सं ]

अकाय
अनुपश्यत् ( ज्ञानी )
अन्धेनतमसावृत ( अन्धतमस् )
अपापविद्ध
अविद्या
अव्रण
असुर्य ( लोक )
अस्नाविर
विजानत् ( ज्ञानी)
विद्या
शुद्ध
संभूति ( देहात्मवादी )
हिरण्मयपात्र

## ऋषि

### ऋषिनामें [ ऋग्वेद ]

ऋग्वेदांतील बऱ्याच ऋषींची माहिती याच भागांतील दाशराज्ञयुद्ध या प्रकरणांत येऊन गेली आहे.

| | | |
|---|---|---|
| अगस्त्य | कृष्ण | पुरुहन्मन् |
| अंगिरस् | क्षत्र | पुरुरु |
| अजमीळ्ह | गय | पुरुवसु |
| अत्रि | गविष्ठिर | पृष्टिगु |
| अथर्वन् | गृत्समद | पुनकत |
| अग्निम | गोतम | पृथवान |
| अप्रतिरथ | गोपवन | पृदाकुसानु |
| अंबरीष | गौरवीति | प्रगाथ |
| अयास्य | च्यवन–च्यवान | प्रथ |
| अर्चनानस् | जमदग्नि | प्रस्कण्व |
| अर्चत | जराबोध | प्रियमेध |
| अवत्सार | जुजुरुष | बभ्रु |
| आप्त्य | तकवान | बरु |
| आर्चीक | तर्य | बाहुवृक्त |
| आर्जुनेय | तरंत | बृहदुक्थ |
| आर्ष्टिषेण | तिरश्ची | बृहद्दिव |
| इट | त्रित | ब्रह्मचारिन् |
| उपस्तुत् | त्रिशोक | ब्रह्मपुत्र |
| उरुक्षय | दधीच | भरद्वाज |
| उशनस्–काव्य | दध्यङ् | भारद्वाज |
| *ऋषि ( सामान्य नाम ) | दभीति | भूतांश |
| | दशग्व | भृगु |
| एकद्यू | दशोण | मान |
| एतश | दार्भ्य | मान्दार्य |
| एवयामरुत् | दीर्घतमस् | मांधातृ |
| एवावद | दीर्घनीथ | मान्य |
| और्व | दुर्मित्र | मामतेय |
| और्वभृगु | देवक | म हान |
| औशिज | नभाक | मित्रातिथि |
| कक्षीवान् | नाभाक | ×मुनि [ सामान्य नाम ] |
| कण्व | नारद | |
| कदु | नीपातिथि | मेधातिथि |
| कलि | नृमेध | यजत |
| कवष | नृषद | रहूगण |
| कश्यप | नोधा | राम |
| काण्व | परावृज् | वत्स |
| काण्वायन | पराशर | वम्र |
| काव्य | पर्वत | वसिष्ठ |
| कुत्स | पायु | वसुरुच् |
| कुशिक | पुरुणी | वाजिन् |

| | | |
|---|---|---|
| वातरशन | वेन | श्रुतकक्ष |
| वाध्र्यश्व | वैदथिन् | श्रुतर्वन् |
| वाम्य | वैददश्वि | श्रुष्टिगु |
| वामदेव | वैन्य | संवरण |
| विभिंदु | वैयश्व | संवर्त |
| विमद | व्यश्व | सत्यश्रवस् |
| विरूप | शतयातु | सदापृण |
| विश्वक | शपथ | सप्ति |
| विश्ववार | शर | सप्तगु |
| विश्वचर्षणि | शरभ | सप्तवध्रि |
| विश्वमनस् | शातवनेय | सप्रथ |
| विश्वसामन् | शार्यात | सुतंभर |
| विश्वामित्र | शिंजार | सुदक्ष |
| विष्णापु | शुनःशेप | सुदेव |
| वृश | शुनहोत्र | सुमित्र |
| वृषगण | शृंगवृष | सोभरि |
| वृष्टिहव्य | श्यावाश्व | स्थूरयूप |
| | | हिरण्यस्तूप |

### [ तै. सं. ]

टीकाकारांच्या मतभेदामुळें पुढील यादींत कांहीं राजांच्या नांवांचा संग्रह होण्याचा संभव आहे.

| | | |
|---|---|---|
| अंगिरस् | जमदग्नि | मर्क [असुरपुरोहित] |
| अत्रि | [8] जानकि | यज्ञसेन |
| अथर्वन | [9] जामदग्न्य | वत्सप्री |
| अप्रवान | तुमिंज | वसिष्ठ |
| [1] अरुण औपवेशि | त्रसदस्यु | वासिष्ठ |
| आजीगर्ति | दधीच | विश्वकर्मन् |
| [2] आटणार | दध्यच् | विश्वामित्र |
| आथर्वण [ दध्यङ् ] | दार्भ्य | वीतहव्य |
| अ न्स्यायन | नाभानेदिष्ठ | शंयु |
| उत्कृ | नृमेध | [13] शंड [ असुर-पुरोहित ] |
| औद्दालकि | पर | शुष्म |
| औपोशि | पालिन | [14] शौनेय |
| और्व | परुच्छेप | शौल्वायन |
| और्वभृगु | [10] पुलस्तिन् | [15] श्रायस |
| औशिज | पौरुकुत्स्य | [16] संश्रवस |
| कक्षीवान् | प्रश्न | [17] सनातन |
| कसर्णीर [काद्रवेय] | [11] प्रयोग | सात्यकामि |
| [3] कुसुरुबिंद | [12] बंध | [18] साप्यहव्य |
| [4] कैशिन् | भरद्वाज | सानग |
| [5] कौसुरुबिंद | भालन्दन | सार्वसेनि |
| [6] क्रतुजित् | भुवन | सुपर्ण |
| गविष्ठिर | भृगु | सभेय |
| गोतम | भौवन | |
| [7] चैत्रियायण | भौवायन | |
| | मनु | |

| | | |
|---|---|---|
| सुहोतृ | सौवर्चनस् | [१९] हविष्कृत् |
| सूद्गातृ | स्वध्वर्यु | हविष्मंत |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| [२०] अगस्ति | दधीच | [२५]मात्स्य |
| अत्रि | दभीति | मुद्गल |
| अथर्वाङ्गिरस् | दशग्व | मुनि (सामा. ना) |
| अर्चनानस् | दीर्घतमस् | मेधातिथि |
| [२१]असित | नवग्व | रुम |
| आथर्वण | [२२]नारद | रुशम |
| आर्षेय | नार्षद | वध्र्यश्व |
| इट | नाहुष | वसिष्ठ |
| उशनस् | नोधस् | वामदेव |
| कक्षीवान | पुरुमीह्ळ | विमद |
| कण्व | पुरुहन्मन | विश्वामित्र |
| कश्यप | पैद्व | वीतहव्य |
| कुत्स | प्रस्कण्व | शांबु ( महर्षि ) |
| कृप | प्रियमेध | शृंगवृष |
| गय | [२३]प्रतिबोध | श्यावक |
| गविष्ठिर | [२४]बृहत्सामन् | श्यावाश्व |
| गोतम | बोध | सप्तवध्रि |
| जमदग्नि | भरद्वाज | सुदीति |
| त्रित | भृगु | सोभरि |
| त्रिशोक | मरीचि | सौधन्वन |

[संहितेतर]

| | | |
|---|---|---|
| अणीमोचिन् | आसुरिवासिन् | [२८]कात्यायनी |
| अत्य | इटन्तकाव्य | [२९]कानान्ध |
| अतिधन्वन् | उत्तानआंगिरस् | [३०] कुंडपायिन् |
| अनुवक्तृसत्य- | उपकेतु | कुबेरवारक्य |
| सात्यकीर्त | उलवार्ष्णिवृद्ध | [३१]कृष्णहारित |
| अर्गलकाहोडि | उलुक्यजानश्रुतेय | [३२]कौण्ठरव्य |
| अलम्मपारिजातत | उषस्तचाक्रायण | कौण्डिनी |
| अषाढउत्तरपारा- | [२६]ऋष्टिषेण | [३३]कौलकावती |
| शर्य | एकयावनगण्डम | [३४]गर्ग |
| अषाढकैशिन् | एतश | [३५]गर्दभी-विपीत |
| अषाढिसौश्रोम- | कपि | [३६]गाथिन् |
| तेय | कपिल | गाण्डम |
| अष्टक | कपिवनभौवायन | [३७]गार्गीवाचक्नवी |
| अहीनाआश्वत्थ्य | कबंधआथर्वण | [३८]गोबलवार्ष्ण |
| आकुलि | कश्यपनैध्रुवि | गोश्रुजाबाल |
| आक्ताक्ष्य | [२७]कहोड कौषी- | [३९]गौश्र |
| आगस्त्य | तकी | [४०]गौश्ल |
| आभिप्रतारिन् | कहोल कौषीतकेय | [४१]चक्र |
| आरुणऔपवेशि | कोष्ठिविद्धि | चैत्र |
| [४२]जन्हु | भाम्र्यश्व | शायस्थि |
| जयंत | मंगल | [७९]शिशुमार |
| [४३]जातशाकायन | [६४]मधुच्छंदस् | [८०]शुनःपुच्छ |
| [४४]जान्हव | [६५]मंदीर | शुनोलांगूल |
| [४५]जावलचैलकी | [६६]महर्त्विज | शुष्कभृंगार |
| [४६]जैमिनी | [६७]महर्षि | शूरवीर मांडुक्य |
| तक्षन् | [६८]माध्यम | [८१]शूषवार्ष्णेय |
| [४७]तपोमित्य | माण्टी | [८२]संगप्रयोगि |
| [४८]ताण्ड | [६९]मुण्डिभऔ- | [८३]सत्ययज्ञ |
| तांडविंद किंवा | दन्य | [८४]सत्यवचस् |
| तांडविंदव | [७०]मैत्रायणीय | राथीतर |
| [४९]तारुक्ष्य | ब्राम्हण | [८५]सनत्कुमार |
| [५०]त्रिशंकु | रजन कोणेय किंवा | [८६]सर्पिर्वात्सि |
| [५१]दाशर्म | कौणेय | सातिऔष्ट्राक्षि |
| देवल | रथीतर | सात्यकीर्त |
| [५२] नचिकेतस् | [७१]रहस्युदेव मलि- | सात्ययज्ञ |
| [५३]नाक | म्लुच् | [८७]सामश्रवस् |
| नितानमारुत | [७२]राममार्गवेय | [८८]सामुद्रि |
| [५४]नैमिषि | रायोवाज | [८९]सुकोशिन् |
| [५५]पंचालचंड | वस्तुपश्य | भारद्वाज |
| [५६]पर्वत | [७३]वातवंत | सुचितशैलन |
| [५७]प्लक्षदय्यांपति | [७४]वालखिल्य | सुदक्षिणक्षैमि |
| पार्ष्णशैलन | [७५]विदग्धशाकल्य | [९०]सुदेव काश्यप |
| [५८]पिप्पलाद | विपूजनशौराकि | [९१]सुधन्वन् आंगि- |
| पुनर्दत्त | किंवा सौराकि | रस् |
| पुराण | विप्रचित्ति किंवा | [९२]सनाश्रव |
| [५९]प्रागाहि | विप्रजित्ति | सुनीथ-कापटव |
| प्रातरह्नकोहळ | [७६]वैयास्क | [९३]सोमदक्षकौश्रेय |
| [६०]बकदाल्भ्य | व्यष्टि | [९४]सौदंती |
| [६१]बाभ्रव | व्याघ्रप | स्थिरकगार्ग्य |
| बृहद्वसु | शंकुनि-मित्र | हालिंगव |
| बोध | [७७]शंखकौष्य, | [९५]हिरण्यदन्बैद |
| [६२]भंगीर | [७८]शतबलाक्ष. | ह्रस्वमांडुकेय. |
| भंग्यश्रवस् | मौद्गल्य. | |
| भवत्रातशायस्थि | शर्वदत्तगार्ग्य. | |

* ऋषि.—या शब्दाची व्युत्पत्ति कठिण आहे. हा शब्द कदाचित अत्यंत पूर्वकालीन धातूपासून झाला असेल. ऋषींचें मुख्य काम म्हणजे ईश्वरविषयक स्तोत्र तयार करणें. ऋग्वेदांत जुने आणि नवे अशा ऋषींचा उल्लेख आला आहे (अग्निः पूर्वेभिः ऋषिभिः ऋ. १. १, २ ). जुन्या ऋषींचीं स्तोत्रें त्यांच्या कुलांतील लोक संरक्षण करीत असत व त्यांत भर घालीत असत. परंतु ऋषींचा मुख्य उद्योग म्हणजे स्तोत्रें करीत असणें हाच असे. संहितीकरणकालापर्यंत ही स्तोत्ररचना सारखी चालू होती. उदाहरणार्थ गाथा. या गाथा आचार्य स्वतःच रचून पठण करीत असत.

असें ऋग्वेद ( ९. ९६, ६ ) व शतपथ ब्राह्मण ( १२. ४, ४, ६ ) यांवरून आढळतें. ब्राह्मणांमध्यें जे श्रेष्ठ असत त्यांनांच ऋषि ही पदवी दिली जात असे. व त्यांचें कौशल्य दैवी असे असें दर्शविलें आहे. ऋषी बहुतेक राजे लोक यांच्या घरीं पुरोहित या नात्यानें आश्रित म्हणून रहात असत. क्वचित् राजेलोकहि स्तोत्रकर्ते असल्याचें आढळतें. पंचविंश ब्राह्मणांत ( १२, १२, ६ ) स्तोत्रकर्त्या राजपुत्रांनां ( ओल्डेनबर्गच्या मताप्रमाणें हा शब्द जरी काल्पनिक असला तरी ) राजन्यर्षि अथवा राजर्षि हा शब्द लावीत. स्तोत्रकर्त्यांमध्यें जरी कांहीं राजे असले तरी बहुतेक सूक्तें ब्राह्मणांनींच केलेलीं आहेत. ऋषी हे पवित्रभूत अशा कालाचे प्रतिनिधि म्हणून मानिले जात व त्यांनां साधु असेंहि म्हणत. यांचें सप्तर्षि असें समुच्चयात्मक नांव ऋग्वेदांत चार वेळ व अथर्ववेद आणि वाजसनेयि संहिता या ग्रंथांतून आढळतें. या सात ऋषींचा बृहदारण्यकोपनिषदांत ( २. २, ४ ) अनुक्रमें उल्लेख असून तेथें दोन नेत्र, दोन कर्ण, दोन घ्राणेंद्रियें आणि सातवी वाणी यांशीं त्यांचा संबंध जोडला आहे. हे सात ऋषि म्हणजे गोतम, भरद्वाज, विश्वामित्र, कश्यप, वसिष्ठ, जगदग्नि व अत्रि हे होत. उपनिषदांतील उताऱ्यांत अत्रीचा संबंध त्या शब्दाच्या व्युत्पत्तीवरून वाणीशीं जोडला आहे. ऋग्वेदांत वरील सात ऋषींशिवाय आणखी बऱ्याच ऋषींचा उल्लेख आहे व त्यांच्या संबंधीं माहिती याच भागांतील दाशराज्ञयुद्धप्रकरणांत आली आहे. अथर्ववेदांतील एकाच ऋचेंत [ ४. २९, ३ ] सुमारें अठरा ऋषींचीं नांवें आलीं आहेत व तीं सर्व ऋग्वेदांत आलेल्यापैकींच आहेत. भाटचारणादिकांच्या काव्याप्रमाणें ऋषींच्या स्तोत्रांत चढाओढीनें कूटस्तोत्रांची रचना होत असे. हीं कूट वाक्यें अथवा भाग [ ब्रह्मोद्य ] अश्वमेध क्रतूंतील एक मुख्य अंग म्हणून गणला जात असे. अशा प्रकारच्या कूट वाक्यांच्या संबंधीं चढाओढ अथवा वादविवाद उपनिषद्वाङ्मयांत जास्त आढळतो. असले वाद जिंकणारे ऋषी त्याचा मोबदला म्हणून राजाकडून दक्षिणा मिळवीत असत. ऋग्वेद १०. ८२, २ यांतील सप्तर्षि हा शब्द आकाशांतील ताऱ्यांचा वाचक आहे असें पाश्चात्य पंडितांचें मत आहे. ते याला मोठें अस्वल असें म्हणतात. याला पूर्वी सप्तऋक्ष असें म्हणत असत परंतु पुढें वारंवार सप्तऋषि असा शब्द आल्यामुळें सप्तऋक्ष याचा सप्तर्षि असा अर्थ होऊं लागला असावा असें मॅकडोनेलचें म्हणणें आहे. ऋग्वेदांत आलेल्या वरील उताऱ्यांतील सप्तऋषि याचा मोठें अस्वल असा सायणानीं अर्थ केला नाहीं परंतु ऋ. १. २४, १० मधील ऋक्ष शब्दाचा 'ऋक्षाः सप्तर्षयः' असा अर्थ केला आहे आणि त्याला 'ऋक्षाइति ह स्मवै पुरा सप्तऋषीनाचक्षते' असा वाजसनेयि संहितेंतील आधार दिला आहे.

×मु नि.—हा शब्द ऋग्वेदांत दोन ठिकाणीं आला आहे. तेथें त्याचा अर्थ ईश्वरप्रेरित व अद्भुत शक्ती असलेला असा आहे. पहिल्या मंत्रांत मुनि हा शब्द अनेकवचनी असून ते पिशंगवर्णाचीं व मळकट वस्त्रें वापरीत असें म्हटलें आहे. सायणमताप्रमाणें हे मुनि म्हणजे वातजूति, विप्रजूति वगैरे नांवांचे ऋषि होत व ते विरक्त असून वल्कलें परिधान करीत असत. वर जें मुनींचें वर्णन दिलें आहे तें ऐतरेय ब्राह्मणांत ऐतशप्रलाप नामक मंत्रकांड पठण करणाऱ्या ऐतश नामक मुनीशीं सदृश आहे. तेथें हें मंत्रकांड पठण करीत असलेल्या आपल्या पित्यास भ्रम झाला आहे असें समजून त्याच्या मुलानें विसंगत अशा प्रकारचें तें मंत्रकांड-पठण बंद केलें. परंतु हें त्याचें करणें बरोबर नव्हतें. कारण ऐतश भ्रमिष्ट होऊन कांहीं तरी प्रलाप काढीत होता असें नसून तें मंत्रकांडच तसें होतें. वर ऋग्वेदांतील मुनि व ऐतशमुनि यांचें मॅकडोनेलनें दाखविलेलें साम्य सायणसंमत नाहीं ऋग्वेदांत एका मंत्रांत इंद्राला 'मुनींचा सखा' असें म्हटलें आहे. अथर्ववेदांत ( ८. ६, १७ ) मुनि शब्द सामासिक शब्दांत आला असून त्याचा वरीलप्रमाणेंच सायणांनीं अर्थ दिला आहे. उपनिषद्ग्रंथांत मुनि हे अधिक निग्रही असत असें दाखविलें आहे. जो अभ्यासानें, यज्ञानें तपानें, श्रद्धेनें अथवा व्रतनियमांच्या योगानें पूर्णब्रह्माचें स्वरूप ओळखण्यास शिकतो अथवा ओळखतो त्याला मुनि असें म्हणत. वेदांतील मुनि व उपनिषदांतील मुनि यांच्यांत फारसा भेद आहे असें म्हणतां येणार नाहीं. दोहींमध्यें मुनि हे ब्रह्मानंदांत निमग्न असत असेंच वर्णिलें आहे. तरी पण वेदांतील मुनींपेक्षां उपनिषदांतील मुनींच्या ऐहिक आकांक्षा अगदींच कमी असत असें दिसतें. वेदवाङ्मयांतील मुनींचा अध्यात्मज्ञानाकडे विशेष ओढा नसून ते वैद्यकी करीत असत. वेदग्रंथांत मुनींचा विशेषसा उल्लेख नाहीं. म्हणून त्या कालीं मुनि कमी असत असें म्हणतां येत नाहीं. श्रौत धर्माचरण करणाऱ्या कर्मठ लोकांनीं या मुनींनां फारसा मान दिलेला नाहीं. मुनींच्या व कर्मठांच्या ध्येयांत फरक होता. केवल संतति अथवा संपत्ति मिळविणें या कर्मठांच्या ध्येयापेक्षां मुनींचें ध्येय श्रेष्ठ प्रकारचें होतें.

[1] अ रु ण औ प वे शि गौ त म.— हें एका आध्यापकाचें नांव आहे. तैत्तिरीय संहिता व ब्राम्हण ग्रंथ यांत याचा वारंवार उल्लेख आला आहे. प्रसिद्ध उद्दालक आरुणि हा याचा मुलगा होय. हा उपवेशि गौतम याचा शिष्य व राजपुत्र अश्वपतीच्या गुरूचा समकालीन असल्याबद्दल शतपथ ब्राह्मणांत (१० . ६; १, २) उल्लेख आहे.

[2] आ ट् णा र — पर याचा वंशज. यानें अग्निचयन केल्यामुळें याला संतति प्राप्त झाल्याबद्दल तैत्तिरीय संहितेंत उल्लेख आहे.

[3] कु सु रु बि न्द औ द्दा ल कि.— यानें आपणास पशूंचा लाभ व्हावा म्हणून एक यज्ञ केल्याबद्दलचा तैत्तिरीय संहितेंत उल्लेख आहे. याचा आणखी उल्लेख जैमिनीय ( १.

७, ५) व पंचविंशब्राह्मणांत (२२. १५ १०) आला आहे.

[४] केशिन्-सात्यकामि.— यानें केशिन् दार्भ्य याला शत्रूंचा नाश होण्यासाठीं आपल्या यज्ञांत एका विशिष्ट मंत्राची भर घालण्यास सांगितल्याबद्दल तैत्तिरीय संहितेंत (२. ६, २, ३) उल्लेख आहे.

[५] कौसुरबिंदि-प्रोति कौशांबेय.— हा उद्दालकाचा शिष्य व समकालीन असल्याबद्दल शतपथ ब्राम्हणांत (१२. २, २, ३) उल्लेख असून तैत्तिरीय संहितेंत याला औद्दालकि म्हटलें आहे. या गोष्टीवरून अशा पितृवंशिक नांवांना फार थोडें महत्त्व दिलें पाहिजे हें उघड दिसतें. शिवाय अमुक मनुष्य अमक्याचा समकालीन होता या गोष्टीला सुद्धां विशेष महत्त्व देऊन चालावयाचें नाहीं. [ असें मॅकडोनेल म्हणतो. ]

[६] क्रतुजिज्जानकि.— डोळे अधू असलेल्या रजन कौणेय याची दृष्टी साफ होण्याकरितां क्रतुजिज्जानकि यानें रजनकौणेय याजकडून एक त्रिहविष्का नामक इष्टि करविल्याबद्दल तैत्तिरीय संहितेंत (२, ३, ८, १,) उल्लेख आहे.

[७] चैत्रियायण.— हा यज्ञसेनाचा वंशज असून यानें छंदोभिद् नामक इष्टकांच्या चितीच्या साधनानें पशूंची प्राप्ति करून घेतल्याबद्दल तैत्तिरीय संहितेंत (५. ३, ८, १) उल्लेख आहे.

[८] जानकि.— जनकाचा वंशज. हें तैत्तिरीय संहितेंत क्रतुजिताचें, ऐतरेय ब्राह्मणांत क्रतुविदाचें आणि बृहदारण्यकोपनिषदांत अयस्थूणाचें पितृप्राप्त नांव आहे. बृहदारण्यकोपनिषदांत याला चूलभागवित्तीचा शिष्य व सत्यकाम जाबालाचा गुरु असें म्हटलें आहे. वरील सर्व स्थलीं उल्लेखिलेला जानकि एकच किंवा अनेक व्यक्ती याबद्दल खात्री नाहीं.

[९] जमदग्निय.— तैत्तिरीय संहितेंत जमदग्नीच्या दोन वंशजांचें म्हणून हें नांव आलें आहे. जमदग्नीनें चतूरात्र नामक एक यज्ञ केल्यामुळें पुढें त्याच्या पिढींत दारिद्र्य निपजला नाहीं व एखादा प्रमादानें दारिद्र्य झालाच तर लगेच दुसऱ्याच पिढींत त्याचें दारिद्र्य नष्ट होत असे असा तेथें (तै. सं. ७.१, ९, १) उल्लेख आहे.

[१०] पुलस्तिन्.— हा शब्द तैत्तिरीय संहितेंत आला असून याचा अर्थ मोकळे केश ठेवणारा असा होतो व तो कपर्दिन् म्हणजे डोक्यावरील केसांच्या जटा बांधणें याच्या उलट आहे. वरील अर्थ सायणसंमत नाहीं.

[११] प्रयोग.— तैत्तिरीय संहितेंत एका सूक्ताचा द्रष्टा म्हणून याचा उल्लेख आहे. ऋग्वेदाच्या सर्वानुक्रमणिकेप्रमाण हा तैत्तिरीयांत उल्लेखिलेल्या ऋचांचा (ऋ. ८. १००) द्रष्टा आहे.

[१२] बंबा विश्ववयसौ.— या समासमथित अशा नांवाच्या ऋषींचा तैत्तिरीय संहितेंत उल्लेख आहे. यांनीं एका विशिष्ट देवतेला सोमरस अर्पण करण्याचा नवा संप्रदाय सुरू केला.

[१३] शण्ड.— हा शब्द मर्क या शब्दाशीं जोडलेला आढळतो. यजुर्वेद संहितेंत यांचा उल्लेख असून शण्ड व मर्क हे दोघ असुरांचे पुरोहित होते असें म्हटलें आहे.

[१४] शौचेय सार्वसेनि.— तैत्तिरीय संहितेंत हें एक पैतृक नांव आहे. सायणमतानें शुचा ही स्त्री असून शौचेय हें मातृक नांव आहे. यानें पंचरात्र नांवाचा एक यज्ञ करून पशूंची प्राप्ति करून घेतली.

[१५] श्रायस.— याचा उल्लेख तैत्तिरीय संहितेंत दोन ठिकाणीं आला आहे. एका ठिकाणीं (५. ४, ७, ५) हें कण्वाचें पैतृक नांव आहे असें म्हटलें आहे व दुसऱ्या ठिकाणीं (५ ६, ५,३) हें वीतहव्याचें पैतृक नांव असें म्हटलें आहे. वरील दोन ठिकाणीं उल्लेखिलेला श्रायस हा एकच असेल असें म्हणतां येत नाहीं. कारण त्याचा दोन्ही ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारानें व निरनिराळ्या निमित्तानें उल्लेख आहे.

[१६] संश्रवस् सौवर्चनस.— तैत्तिरीय संहितेंत याचा उल्लेख आहे. सत्रांतील होत्यानें करावयाच्या इडोपाव्हाना-संबंधीं तुमिंज नामक एका ऋषीशीं याचा संवाद झाल्याबद्दल उल्लेख आहे.

[१७] सनातन.— चितिसंबंधानें इष्टकांचें उपधानप्रसंगीं पूर्वादि दिशांची स्तुति करतांना पूर्वादि दिशांच्या ठिकाणीं अनुक्रमें सनग, सनातन, अहंभून, प्रत्न आणि सुपर्ण या ऋषींचा उल्लेख आला आहे. बृहदारण्यकोपनिषदांत सनग व सनारु याचा गुरुशिष्यसंबंध आला आहे [बृ. उ. २.५,२२].

[१८] सात्यहव्य.— याचा तैत्तिरीय संहितेंत बहुयाजक सृंजयांनीं समिष्टयजु नामक मंत्र कोणत्या प्रकारें पठण करावा या विषयीं देवभाग नामक ऋषीला प्रश्न केल्याबद्दल उल्लेख आला आहे. ऐतरेय ब्राह्मणांतहि याचा उल्लेख आहे. याला वासिष्ठ असें म्हटलें आहे.

[१९] हविष्कृत् हविष्मत्.— आंगिरस नामक कांहीं ऋषींनीं यज्ञानुष्ठानाच्या योगानें स्वर्गप्राप्ति करून घेतली. परंतु त्यांच्यापैकीं हविष्कृत् व हविष्मत् नांवाचे दोघे स्वर्गांतून च्युत झाले. तथापि स्वर्गप्राप्तीसंबंधीं त्यांची अत्यंत उत्कट इच्छा असल्यामुळें द्विरात्र नांवाचा यज्ञ करून त्यांनीं स्वर्ग मिळविला.

[२०] अगस्ति.— ऋग्वेदांत येणाऱ्या अगस्त्य या शब्दाचेंच हें दुसरें रूप असावें. याचा अथर्ववेदांत उल्लेख आला आहे. ऋग्वेदांत याला मित्रावरुणांचा मुलगा म्हटलें असून अथर्ववेदांत याला मित्रावरुणांचा अत्यंत आवडता असें म्हटलें आहे. मरुतांना उद्देशून उपाकरण केलेला यज्ञीय पशु ज्या वेळीं इंद्रानें पळविला तेव्हां मरुत् हे वज्र घेऊन इंद्राला मारण्यासाठीं उद्युक्त झाले असतां अगस्त्यानें त्यांचें शांतवन करून इंद्राचें व मरुतांचें सख्य घडवून आणिलें अशी जी कथा

तै. सं. (५.५,५,२), तै. ब्राह्मण (२.७,११,१). मै. (२.१,८), काठक संहिता (१०.११), पंचविंश ब्राह्मण (२१.१४,५), ऐ. ब्रा. (५.१६) या ग्रंथांतून आली आहे तिचें मूळ ऋग्वेद १.१६५;१७०;१७१ या सूक्तांतून आहे. ओल्डेनबर्ग, सीज, हर्टेल, व व्हानश्राडर यांचें अगस्त्याच्या वरील कथेसंबंधीं एकमत नाहीं. ऋग्वेदांत (१. १७९) लोपामुद्रेबरोबर याचें जें संभोगविषयक संभाषण झालें आहे त्यात हा ज्ञानी असूनहि तिच्या प्रमयाचनेस वश झाला असें म्हटलें आहे. व्हानश्रोडर याचें असें मत आहे कीं, हें वृष्टिद्रव्यविषयक रूपक असावें. सायणमतानें अगस्त्य हा खेल नामक राजाचा पुरोहित होता, परंतु पिशेल म्हणतो कीं, खेल ही विवस्वत् देवता होय. [illegible]च्या बाबतीत सीजचें मत सायण प्रमाणेंच आहे. तो वसिष्ठाचा भाऊ असून तृत्सूंना वसिष्ठाची ओळख करून देतो असें अनुमान ऋग्वेद ७.३३,१०;१३ या ऋचावरून निघतें असें गेल्डनेर म्हणतो.

[२१] असित.—याचा अथर्ववेदांत गय आणि जमदग्नि यांच्यासह घटस्फोटप्रकरणांत उल्लेख आला आहे. शतपथांत याला असितधान्व असें म्हटलें असून शांखायन श्रौतसूत्रांत अश्वमेध प्रकरणात अनुक्रमें दहा दिवस चालावयाच्या पारिप्लवाख्यानातील सातव्या दिवशीच्या पारिप्लवाख्यानांत असितधान्वन् हा राजा व असुरविद्या हा त्यांचा वेद असा उल्लेख आहे. पंचविंश ब्राह्मण व काठक संहिता यामध्यें याला असित देवल म्हटलें आहे.

[२२] नारद.—अथर्ववेदांत ब्राह्मणानें वशा धेनूचें मांस भक्षण करावें कीं, नाहीं या संबंधाच्या सल्ल्यांत याचा उल्लेख आला आहे. ऐतरेय ब्राह्मणांत पुरुषमेधयज्ञाची हरिश्चंद्राला यानेंच सल्ला दिली आणि नारद व पर्वत यांनीं आंबाष्ठ्य व युधांश्रौष्टि यांनां महाभिषेक केल्याचा उल्लेख आहे.

[२३] प्रतिबोध.—अथर्ववेदांत बोध याच्या बरोबर या ऋषीचा उल्लेख आला आहे.

[२४] बृहत्सामन्.—अथर्ववेदांत आंगिरस म्हणून याचा उल्लेख आला आहे. तेथें त्याला क्षत्रियांनीं अतिशय त्रास दिला व शेवटीं क्षत्रियांचा नाश झाला असा उल्लेख आलेला आहे.

[२५] मात्स्य.—अथर्ववेदांत याचा उल्लेख आला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (१.५,२,१) उल्लेखिलेला मात्स्य व हा एकच असावा असें वाटतें. तैत्तिरीय ब्राह्मणांत या मात्स्यानें कोणतेंहि यज्ञकर्म पुण्यकारक अशा वेळींच सुरू करण्याचा सांप्रदाय शतद्युम्न याच्याकडून अमलांत आणिला.

[२६] ऋष्टिषेण.—याचा निरुक्तांत उल्लेख आहे. पण तेथें जास्त माहिती नाहीं. कदाचित ऋग्वेदांतील आर्ष्टिषेणाचा हा बाप असावा.

[२७] कहोड कौषीतकि.—याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत ब्रीहियवादि नवीं धान्यें हीं वृष्टीपासून उत्पन्न होणारीं असल्यामुळें तीं प्रथम देवतानां अर्पण (आग्रयण नामक नवान्नाचा याग) करून भक्षण करावीं ही चाल यानें सुरू केल्याबद्दल उल्लेख आहे. आश्वलायन गृह्यसूत्रातील ब्रह्मयज्ञांग तर्पणात याचा उल्लेख आहे.

[२८] कात्यायनी.—बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्याच्या दोन स्त्रियांपैकीं एक म्हणून हिचा उल्लेख आहे. याज्ञवल्क्याचा संसारत्यागाचा विचार ठरल्यावर प्रपंचविषयक वस्तूंची मैत्रेयी आणि कात्यायनी यांना सारखी वांटणी करण्याबद्दल याज्ञवल्क्यानें सांगितलें परंतु मैत्रेयी अध्यात्मज्ञानात पारंगत असल्याचें आढळून आल्यामुळें प्रापंचिक व्यवसाय कात्यायनीकडेच राहिला.

[२९] कानान्ध.—हा कण्वश्वाचा मुलगा असल्याबद्दल बौधायन श्रौतसूत्रांत [२१. १०] उल्लेख आहे.

[३०] कुण्डपायिन्.—पंचविंशब्राह्मण आणि आश्वलायन श्रौतसूत्र या (१२ ४) ग्रंथांत याचा उल्लेख आहे. सूत्रग्रंथांत याच्या नावाचें एक सत्र असल्याचा उल्लेख आहे.

[३१] कृत्स्न हारित.—ऐतरेय आरण्यकांत (३.२,६) याचा उल्लेख आहे व तो यानें एक आपल्या शिष्याला वाग्देवतेसंबंधीं उपासनेचा प्रकार सांगितल्याबद्दल आहे. शांखायन आरण्यकात कृत्स्न हारित असा पाठ आहे.

[३२] कौरव्य.—यानें अक्षरोपासना अथवा अक्षरांसंबंधी माहिती अमलांत आणल्याबद्दल ऐतरेय आरण्यकांत (३.२,२) उल्लेख आहे.

[३३] कौलकावती.—या नांवाच्या दोघां ऋषींनीं रथप्रोत दार्भ्य याच्याकडून एक विशिष्ट याग केल्याबद्दल मैत्रायणी संहितेंत (२.१,३) उल्लेख आहे.

[३४] गर्ग.—याचा उल्लेख जरी कोणत्याहि संहिताग्रंथांत नाहीं तरी काठक संहितेंत (१३.१२) गर्गाच्या वंशजांचा उल्लेख आला आहे. पुढें सूत्रग्रंथांत याच्या नांवावर एका यज्ञाचा (गर्गत्रिरात्र) उल्लेख आहे.

[३५] गर्दभीविपीत अथवा विभीत.—बृहदारण्यकोपनिषदांत (४.१,५) जनक व याज्ञवल्क्य यांच्या तात्विक संवादांत याचा उल्लेख आला आहे. तेथें श्रोत्र हेंच ब्रह्म असल्याबद्दल यानें मला उपदेशिलें असें जनक म्हणतो.

[३६] गाथिन्.—हें विश्वामित्राच्या बापाचें आणि कुशिकाच्या मुलाचें नांव सर्वानुक्रमणींत आढळतें. ही परंपरा बरोबर आहे कीं काय हे सांगणें कठिण आहे. ऐतरेय ब्राह्मणांत गाथींच्या 'दैव वेदा' चा उल्लेख केला आहे. विश्वामित्रानें शुनःशेपाला दत्तक घेतल्यानें शुनःशेपास त्या गाथींच्या "दैववेदांत" भाग घेतां आला. एवढ्याच उल्लेखानें वरील वंशानुक्रमास जो कांहीं आधार मिळतो तोच.

[३७] गार्गी वाचक्नवी.—बृहदारण्यकोपनिषदांत (३.८,१) याज्ञवल्क्याशीं वाद चालू असतां गार्गीनें याज्ञवल्क्याला दोन प्रश्न केले होते असा उल्लेख आहे.

[३८]गो ब ल वा र्ष्ण.—तैत्तिरीय ब्राह्मणांत (३.११,९,३) यानें नचिकेताग्निसंबंधानें इष्टका[ विटा ]पूर्वादि पांच दिशांचे ठिकाणीं प्रत्येक पांच पांच इष्टका मांडल्या. त्यामुळें त्याला पशूंची प्राप्ति झाली असा उल्लेख आहे.

[३९]गौ श्र.—शुश्राचा वंशज. याला मधुक नांवाच्या एका ऋषीनें सोमवल्लीची देवता कोण असा प्रश्न विचारल्याबद्दल कौषीतकी ब्राह्मणांत (१६.९) उल्लेख आहे.

[४०]गौ श्ल.—याचा उल्लेख ऐतरेय ब्राम्हणांत (१६.३०) आहे. तेथें यज्ञामध्यें शस्त्रें पठण करण्याचा बुलिल आश्वतर याचा संप्रदाय यानें चुकीचा ठरवून आपल्या संप्रदायाप्रमाणें त्यांनां शस्त्रें पठण करावयास लाविलें.

[४१]च क.—पंचविंश ब्राह्मणांतील (२५.१५,३) सर्पसत्रांमध्यें उन्नेतृत्व नामक आर्त्विज्य करणारा हा एक ऋत्विज होता. याच्याबरोबर पिशंगाचा उल्लेख आला आहे.

[४२]ज न्हु.—शुनःशेपाच्या आख्यायिकेंत हा शब्द अनेक वचनीं आलेला आहे. ह्या शुनःशेपानें देवरात ह्या नात्यानें जन्हूंचें आधिपत्य व गाथीचा दैवीवेद ही दोन्ही संपादन केलीं. जन्हूंचा वंशज जान्हव हा पंचविंश ब्राह्मणांत आलेल्या उल्लेखावरून विश्वामित्र ठरतो. त्यानें चतूरात्र व्रत करून जन्हु लोकांना, ते वृचीवंतांशीं झगडत असतांनां राज्य मिळवून दिलें अशी कथा आहे, व त्याचें राजा म्हणून वर्णन आलें आहे. शिवाय ऐतरेय ब्राह्मणांत विश्वामित्राला राजपुत्र व भरतर्षभ अशा संज्ञा आहेत तेव्हां ही गोष्ट स्पष्टच आहे कीं, संहितांच्या मतानें नसलें तरी ब्राह्मण ग्रंथांप्रमाणें जरी अलीकडील ग्रंथांतील 'तो राजपुत्र होता त्यानें ब्राम्हण्य मिळविलें' ह्या आख्यायिकेचा त्या ग्रंथांत मागमूस नाहीं, तथापि विश्वामित्र हा एका कालींच पुरोहित व राजवंशीय होता. जन्हत्वी हा शब्द ऋग्वेदांत दोनदां आलेला आहे व त्याचा अर्थ जन्हूची बायको, किंवा सायणाचार्य म्हणतात त्याप्रमाणें, जन्हूचा वंश, असा असावा. हें घराणें एके काळीं मोठें असावें व पुढें भरतवंशांत अंतर्भूत झालें असावें.

[४३]जा न श्रु ता य न.—याचा काठक संहितेंत (२२.७) कर्मांतील एका विशिष्ट संप्रदायाचा प्रवर्तक म्हणून उल्लेख आहे. हा शंखाच्या समकालीं होता.

[४४]जा न्ह व.—याचा अर्थ जन्हूचा वंशज. पंचविंश ब्राह्मणांत हें विश्वामित्राचें पैतृक नांव म्हणून आलें आहे. ही गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखी आहे, कारण तीवरून ऑफ्रेक्टचा, शुनःशेपाचा पिता अजीगर्त ह्याच्याच गोत्रापैकीं जन्हू हे होत हा सिद्धांत बाधित होतो.

[४५]जी व ल चै ल कि.—शतपथ ब्राह्मणांत [२ ३,५,३१–३५] याचा उल्लेख असून अग्निहोत्रहोमासंबंधीं माहिती यानें तक्षांनां सांगितली असें म्हटलें आहे.

[४६]जै मि नि.—याचा उल्लेख आश्वलायन सूत्रापर्यंत नाहीं. [ ३.४ ] तेथें मात्र ब्रह्मयज्ञांत जें पितृतर्पण आहे त्यांत याचा उल्लेख आहे. सामवेदाचा जैमिनीय संहिता म्हणून एक भाग आहे व तो कॅलेंडनें छापून त्यावर बरीच चर्चा केली आहे. शिवाय सामवेदाचें एक जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण आहे.यावर ओअरटलनें अनेक निबंध लिहिले आहेत.

[४७]त पो नि त्य.—पुरुशिष्टाचा वंशज. याचा उल्लेख तैत्तिरीय उपनिषदांत (१.९,१) आला आहे. तपानुष्टानांबद्दल याचा विशेष आग्रह असल्याचें तेथें म्हटलें आहे.

[४८]ता ण्ड.—सामगानासंबंधीं गायत्री छंदाचा अष्टाक्षरी प्रस्ताव असावा असें तांड याचें मत असल्याचा लाट्यायन श्रौतसूत्रात (७.१०,१७) उल्लेख आहे. तेथें याला पुराणताण्ड असें म्हटलें आहे. ताण्ड्य या नावांचें सामवेदावरील एक ब्राह्मण आहे. त्याचा प्रवर्तक हा ताण्डच होय.

[४९]ता रु क्ष्य,ता क्ष्यं.—ऐतरेय आरण्यक (३.१,६) आणि शांखायन अरण्यकांत [७.१९] याचा उल्लेख आहे. यानें एक विशिष्ट ज्ञान संपादन करण्यासाठीं एक वर्षभर गुरुगृहीं वसती करून गुरूची गाय रक्षिल्याचा आरण्यकांत उल्लेख असून तेथें तारुक्ष्य व ताक्ष्यं असे दोन पाठ आहेत. शांखायनांत मात्र ताक्ष्यं असाच पाठ आहे. ऋग्वेदांतील १०.१७८या सूक्ताचा द्रष्टा ताक्ष्यं आहे तो व हा ताक्ष्यं कदाचित् एकच असावा.

[५०]त्रि शं कु.—तैत्तिरीय आरण्यकांत याचा उल्लेख असून तेथें [१.१०,१] तो आपणास मी सर्वज्ञ, मी ब्रह्मज्ञ, मी तेजस्वी, [अध्यात्मज्ञानामुळें] असें म्हणत आहे. महाभारतांत त्रिशंकूला वसिष्ठाच्या शापामुळें विश्वामित्राचा आश्रय करावा लागला व तो पुढें नभोमंडलांत नक्षत्ररूपानें अधिष्ठित झाला अशी जी कथा आहे तिचा संदर्भ वैदिक वाङ्मयांत आढळत नाहीं. भारतांतील त्रिशंकूला राजा, असें म्हटलें आहे तेव्हां त्याचा व याचा संबंध असणें असंभाव्य. शिवाय एकाच नांवाच्या राजा व ऋषि अशा दोन निरनिराळ्या व्यक्ती असणें संभवनीय आहे.

[५१]दा श र्म.—काठक संहितेंत [ ७. ६ ] याचा उल्लेख असून तो आरुणीचा समकालीन असल्याचें म्हटलें आहे.

[५२]न चि के त स्.—तैत्तिरीय ब्राह्मणांत एका प्रसिद्ध कथेंत याचा उल्लेख आला आहे (६.११,८). त्याचप्रमाणें कठोपनिषदांतहि [१.१] उल्लेख आला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत याला गौतमकुलोत्पन्न वाजश्रवस् याचा मुलगा असें म्हटलें असून कठोपनिषदांत त्याच कथेंत याला औद्दालकि आरुणि असें म्हटलें आहे.

[५३]ना क.—जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत [३.१३,५] याचा उल्लेख आला आहे. तसेंच शतपथब्राह्मण [१३.५,१,१] तैत्तिरीयोपनिषद् [१.९,१]यांत उल्लेखिलेला व बृहदारण्यकोपनिषदांत (६.४,४) आलेला नाक मौद्गल्य हे सर्व एकच होत. याचा ग्लाव मैत्रेयाशीं वादविवाद झाल्याबद्दल गोपथ ब्राह्मणांत [१.१,३१] उल्लेख आहे.

[५४]नै मि षि.—जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत (१०.३६,१) शितिबाहु ऐष्कृत याला हें विशेषण लावलें आहे. यावरून शितिबाहु हा नैमिषारण्यांतील असावा असें दिसतें.

[५५] पंचाल चंड.—ऐतरेय आरण्यकांत [ ३. १, ६ ] वाणीच्या योगानेंच सर्व संहित केलें जाते या मताचा प्रवर्तक म्हणून याचा उल्लेख आहे.

[५६] पर्वत.—ऐतरेय ब्राह्मणांत अनेक वेळां नारदाबरोबर ह्याचा उल्लेख आला आहे. अनुक्रमणीमध्यें ह्याच्या नांवावर ऋग्वेदांतलीं अनेक सूक्तें आलेलीं आहेत.

[५७] प्लक्ष दय्यांपति.—तैत्तिरीय ब्राह्मणांत [ ३.१०,९, ३ ] याला अत्यंत आरुणि यानें आपल्या शिष्याकडून साविञ्यभिसंबंधीं कांहीं प्रश्न कुत्सित भावनेनें केल्याबद्दल उल्लेख आहे.

[५८] पिप्पलाद.—प्रश्नोपनिषदांत भरद्वाज, गार्ग्य व आश्वलायन इत्यादि ऋषींनीं अध्यात्मज्ञानासंबंधीं याला कांहीं प्रश्न केल्याचा उल्लेख आहे. अथर्ववेदाची पिप्पलाद या नांवाची एक शाखा उपलब्ध आहे त्या शाखेचा प्रवर्तक कदाचित् हाच असावा. गार्बे व ब्लूमफील्ड यांनीं अथर्ववेदाच्या या पैप्पलादसंहितेचा कांहीं भाग छापला आहे.

[५९] प्राग हि.—कौषीतकी ब्राह्मणांत(२६.४ ) याचा उल्लेख यज्ञांतील कांहीं कर्म करावयाचें राहिल्यास तें अंतरित कर्म केव्हां करावें याच्याबद्दल विचार करणारा म्हणून आला आहे.

[६०] बदाल्भ्य.—याचा उल्लेख जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत ( १. ९, २ ) आला असून त्यानें ओंकार व वाक् यांच्या साहाय्यानें आजकेशीकडून इंद्राला वर्जिलें, (वगळिलें) असा उल्लेख आहे.

[६१] बाध्व.—ऐतरेय आरण्यकांत (३. २, २ ) अभ्यासाचे मुख्य विषय वेद, छंद, शरीर व महापुरुष हे होत असें म्हणणारा म्हणून याचा उल्लेख आहे.

[६२] भंगीर.—गाईसंबंधीं हा शब्द वैतान आणि दुसऱ्या सूत्रांत आला आहे. हा शब्द मनुष्याचा अथवा नदीचा बोधक आहे हें निश्चित समजत नाहीं. ज्या ऋचेंत याचा उल्लेख आहे तेथेंच गंगा व यमुना या नद्यांचा उल्लेख आहे.

[६३] भार्म्यश्व.—निरुक्तांत मुद्गलाच्या बापाचें नांव म्हणून हा शब्द आला आहे (९. २४.)

[६४] मधुछंदस.—ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलांतील पहिल्या दहा सूक्तांचा हा प्रसिद्ध ऋषि. हा द्रष्टा होता असें ऐतरेय आरण्यकांत व कौषीतकि ब्राह्मणांत म्हटलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत हा विश्वामित्राचा एकावन्नावा मुलगा म्हणून गणला गेला आहे. आणि त्याचें ' प्रउग ' (सकाळीं गावयाचें स्तोत्र )शतपथांत उल्लेखिलें आहे.

[६५] मंदीर.—याचा उल्लेख कात्यायन श्रौतसूत्रांत (१३.३, २१) असून तेथें याच्या गाई गंगेचें पाणी प्याल्या नाहींत असें म्हटलें आहे.

[६६] महर्त्विज.—हें नांव तैत्तिरीय (३. ८,९,४) व शतपथ ब्राह्मणांत (१३. १, १, ४) आणि शांखायन श्रौतसूत्रांत (१६. १–२ ) अध्वर्यु, ब्रह्मा, होता व उद्गाता या ऋत्विजांना उद्देशून आलें आहे.



[६७] महर्षि.—तैत्तिरीय आरण्यकांत (१९,६) हें विशेषण अग्नमीला लावलेलें आढळतें.

[६८] माध्यम.—हें नांव कौषीतकी आरण्यक (१२.३) व ऐतरेय आरण्यक (२. २, २) यांत ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळाच्या द्रष्ट्यांनां लावल्याचें आढळतें.

[६९] मुण्डिभ औदन्य.—अश्वमेधप्रसंगीं होणाऱ्या अनेक भ्रूणहत्यादि पातकांचा नाश होण्यासाठीं अवभृथापूर्वी प्रायश्चित्ताहुति घालावयास सांगणारा म्हणून याचा उल्लेख तैत्तिरीय ब्राह्मणांत (३.९,१५.३) व शतपथ ब्राह्मणांत (१३. ३, ५, ४) आला आहे.

[७०] मैत्रायणीय ब्राह्मण.—याचा उल्लेख बौधायन शुल्बसूत्रांत आला आहे [३२.८]

[७१] रहस्यु देव मलिम्लुच्.—यानें मुनिमरण नामक स्थलीं वैखानसांनां मारल्याबद्दल पंचविंश ब्राह्मणांत (१४. ४, ७) उल्लेख आहे.

[७२] राम मार्गवेय.—यानें विश्वंतर नामक राजाला क्षत्रियांनीं यज्ञामध्यें सोमरसाच्या एवजीं उदुंब फलांचा उपयोग करावा असें सांगितल्याचा ऐतरेय ब्राह्मणात (७,२७) उल्लेख आहे. तेथें याच्याबद्दल बरीच मोठी कथा आहे.

[७३] वातवंत.—पंचविंश ब्राह्मणांत हें एका ऋषीचें नांव आलें आहे (२५.३,६) यानें व दृति नामक ऋषीनें एक सत्र आरंभिलें परंतु वातवंतानें तें सत्र मध्येंच मोडल्यामुळें त्याच्या संततीला पुढें अत्यंत निकृष्ट दशा प्राप्त झाली.

[७४] वालखिल्य.—ऋग्वेदांतलि आठव्या मंडलापैकीं कांहीं( ४९. ते ५९) सूक्तांनां ही संज्ञा आहे. ऋग्वेदांत हीं सूक्तें प्रक्षिप्त मानिलीं आहेत. या सूक्तांचे द्रष्टे वालखिल्य नसून दुसरेच ऋषी सर्वानुक्रमणीकारांनीं दिले आहेत. तैत्तिरीय आरण्यकांत ( १. २३, ३ ) प्रजा उत्पन्न करण्याच्या इच्छेनें तप करणाऱ्या प्रजापतीच्या केशापासून हे वालखिल्य नामक ऋषि उत्पन्न झाले असें म्हटलें आहे.

[७५] विदग्ध शाकल्य.—बृहदारण्यकोपनिषद् ( ३. ९, १ ) व शतपथ ब्राह्मणांत ( ११. ६, ३, ३ ) विदेह जनक याच्या दरबारीं याज्ञवल्क्याशीं वादविवाद करणारा म्हणून याचा उल्लेख आहे.

[७६] वैयास्क.—ऋग्वेद प्रातिशाख्यामध्यें ऋग्वेदांतील वृत्तावर प्रमाणभूत म्हणून याचा उल्लेख आला आहे. रॉथच्या मतें हा व निरुक्तकार यास्क हे एकच होत.

[७७] शांखकौण्ड्य.—काठक संहितेंत ( २२. ७ ) ज्याच्यावर शांतशांखायन यानें टीका केली त्याचें हें नांव.

[७८] शतबलाक्ष मौद्गल्य.—निरुक्तांत ( ११. ६ ) याचा उल्लेख आला आहे व त्यावरून हा कोणी व्याकरणकार असावा असें दिसतें.

[७९] शिशुमार.—याचा उल्लेख पंचविंश ब्राह्मणांत ( १४. ५. १५ ) आहे. तेथें त्याचें दुसरें नांव शर्कर असें आहे.

[८०] शुनःपुच्छ.—ऐतरेय ब्राह्मणांत ( ७. १५ ) शुनः-

शेपाचा भाऊ म्हणून याचा उल्लेख आला आहे. शुनःशेपाचा शुनोलांगूल नामक आणखी एक भाऊ असल्याचा उल्लेख आहे.

[८१] शू ष वा र्ष्णे य.—तैत्तिरीय ब्राह्मणांत ( ३. १०, ९, १५ ) याला आदित्यानें सावित्राग्नीसंबंधीं उपदेश केल्या-बद्दलचा उल्लेख आहे.

[८२] सं ग प्र यो गि.—याचा उल्लेख मैत्रायणी संहितेंत ( ३. १, ९) आला आहे. याच नांवाच्या( आसंग प्लायोगि ) एका राजाचा ऋग्वेदांत उल्लेख आहे. त्याचा व याचा कांहीं संबंध कदाचित् असावा.

[८३] स त्य य ज्ञ.—शतपथ ब्राह्मणांत ( ३. १, १, ४ ) यज्ञभूमीसंबंधीं याज्ञवल्क्याशीं झालेल्या संवादांत याचा उल्लेख आला आहे.

[८४] स त्य व च स् रा थी त र.—तैत्तिरीय उपनिषदांत सत्याची महती वर्णन करणाऱ्या एका ऋषीचें हें नांव आहे.

[८५] स न त्कु मा र.—छांदोग्य उपनिषदांत ( ७. १, १, २६; २ ) याचा उल्लेख आला आहे. येथें यानें नारदास उपदेश केल्याचा उल्लेख आहे.

[८६] स र्पि र्वा त्सि.—यानें शिल्पनामक वालखिल्यशस्त्राच्या शंसनानें आपला यजमान सौबल याला पशूंची प्राप्ति करून दिली. याला वत्सपुत्र [ वात्सि ]म्हटलें आहे. याचा उल्लेख ऐ. ब्राह्मणांत ( ६ २४ ) आहे.

[८७] सा म श्र व स्.—सामाकरितां प्रसिद्ध. हें नांव बृह-दारण्यकोपनिषदांत ( ३. १,२ ) आलें आहे. मॅक्समुल्लरच्या मतें हें याज्ञवल्क्याचें विशेषण आहे परंतु बोथलिंक म्हणतो हा निराळाच मनुष्य असावा. भाष्यकारांचें व मॅक्समुल्लरचें या बाबतींत मतैक्य आहे. कुषीतक याचेंहि हें पितृप्राप्त नांव असल्याचा पंचविंश ब्राह्मणांत ( १७. ४, ३ ) उल्लेख आहे. हा व्रात्यांचा मुख्य स्थपति होता. यानें कांहीं अविधियुक्त कर्मे केल्यामुळें यथार्थ कर्म जाणणाऱ्या लुशाकपीनें याला शाप दिला व तेव्हांपासून याच्या आश्रयास कोणी येईनासें झालें.

[८८] सा मु द्रि —शतपथ ब्राह्मणांत ( १२. २, २, १४ ) अश्व नामक ऋषीचें दुसरें नांव म्हणून या नांवाचा उल्लेख आहे.

[८९] सु के शि न् भा र द्वा ज.—याचा उल्लेख ज्ञानप्राप्ती-साठीं पिप्पलाद ऋषीकडे जाणाऱ्या ऋषींत ( प्रश्नोपनिषद् १-१ ) आहे.

[९०] सु दे व का श्य प.—याचा उल्लेख तैत्तिरीय आरण्यकांत ( २. १८ ) ब्रह्मचारी याच्या हातून कांहीं व्रतभंग झाल्यास त्याबद्दल प्रायश्चित्त सांगणारा म्हणून आला आहे.

[९१] सु ध न्व न् आं गि र स.— बृहदारण्यकोपनिषदांत ( ३. ३. १. )हा मद्र देशांत राहणाऱ्या कपि गोत्रोपन्न पतं-जलीच्या कन्येच्या अंगांत येत असे असे लह्यपुत्र भुज्यु व याज्ञवल्क्य यांच्या संवादांत उल्लेखिलें आहे. अशा प्रकारच्या अंगांत येण्याबद्दलचा उल्लेख ऐ.ब्रा. यांत आला आहे. तेथें ज्याच्या अंगांत संचार होतो त्याला गंधर्वगृहीत असें म्हटलें आहे. यावरून अंगांत येणें ही कल्पना प्राचीन आहे असें दिसतें.

[९२] स ना च्च व.— काठक संहितेंत [ २०. १ ] एका अध्यापकाचें म्हणून हें नांव आलें आहे. कपिष्ठल संहितेंत [ ३१.३ ]सह्नाश्विव असा पाठ आहे. परंतु दोन्ही शब्दांचीं रूपें चांगलीं नाहींत.

[९३] सो म द क्ष कौ श्रे य.— काठक ( ११. ९) व मैत्रा॰यणी ( ३. २, ७ ) संहितेंत एका अध्यापकाचें म्हणून हें नांव आलें आहे मैत्रायणी संहितेंत यानें साहस्रे इष्टकांचें उप-धान श्यापर्णास सांगितल्याचा उल्लेख आहे.

[९५] सो दंति.-- याचा उल्लेख पंचविंश ब्राम्हणांत [ १४. ५, १३ ] आहे. हे लोक विश्वामित्रसमकालीन होते. विश्वा-मित्रानें यांच्याबरोबर एक शर्यत जिंकल्याचा उल्लेख आहे.

[९६] हि र ण्य द न् बै द.—बिदाचा मुलगा. याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मण [ ३. ६, ३ ] व ऐतरेय आरण्यक ( २. १, ३ ) यांत आहे. यानें वषट्कारांचें वर्णन केल्याबद्दल ऐतरेय ब्राह्मणांत व प्राण हा वाक अग्न्यादि रूप असल्याबद्दल आरण्यकांत उल्लेख आहे.

### यज्ञांतील ऋत्विज[संहितेतर]

| | | |
|---|---|---|
| १ अच्युत | १९ कावषेय | ३६ देवभाग |
| २ अजिर | २० किरात | श्रौतर्ष |
| ३ अनुशिख | २१ किलात | ३७ दौरेश्रवस् |
| ४ अयस्थूण | २२ कुषीतक | ३८ दौरेश्रुत |
| ५ अरिमेजय | सामश्रवस् | ३९ नगरिन्जान- |
| ६ अरुणआट | २३ कु-षंड | श्रुतेय |
| ७ अर्बुद | २४ कौकूस्त | ४० पिशंग |
| ८ अर्थल | २५ कौतस्त | ४१ पृथुश्रवस् |
| ९ अश्वल | २६ कुंच आंगिरस | ४२ प्राचीनसाल |
| १० असितमृग | २७ ग्लावमैत्रेय | (औपमन्यव ) |
| ११ आयागव | २८ जनमेजय | ४३ भुतवीर |
| १२ उदमयआत्रेय | २९ जर्वज | ४४ विभिंदुकीय |
| १३ उपगुसौश्रवस | ३० जित्वन्- | ४५ शितिपृष्ट |
| ४ तपविर्जान- | शैलिनी | ४६ शितिबाहु |
| श्रुतेय | ३१ तिमिर्घ दौरे- | ४७ शुचिवृक्ष |
| १५ ऐषावीर | श्रुत | गौपालायन |
| औदमय | ३५ तुरःकावषेय | ४८ शौल्बायन |
| १६ औपाविर्जान- | ३३ तृष्टा | ४९ षंड |
| श्रुतेय | ३४ दत्ततापस | ५० सत्यंहविस् |
| १७ काण्डिवय | ३५ दृढच्युत | ५१ सुब्रह्मण्य |
| १८ कापेय | आगस्ति | २ सोमशुष्मन् |

[१]अ च्यु त.—जैमिनीय ब्राह्मणांत विभिंदुकीयांनीं केलेल्या सत्राचें जें वर्णन आलें आहे, त्यांत हा प्रतिहर्त्याचें काम करीत होता.

[२]अ जि र.—पंचविंश ब्राह्मणांत (२५. १५) जें सर्पसत्राचें वर्णन आलें आहे, त्यांत सुब्रह्मण्य ऋत्विजाचें काम हा करीत होता.

[३]अ नु शि ख.—पंचविंश ब्राह्मणा (२५.१५) मध्यें जें सर्पसत्राचें वर्णन आलें आहे, त्यांत हा 'पोतृ' ह्या ऋत्विजाचें काम करीत होता.

[४]अ य स्थू ण.—शतपथ ११. ४, ३, १७ येथें म्हटल्याप्रमाणें शौल्बायन हा ज्यांचा अध्वर्यु होता, त्यांचाच हा गृहपति होता. यानें शौल्बायनाला विशिष्ट सुव्याचा (पळीचा) उपयोग कसा करावा हें शिकविलें.

[५]अ रि मे ज य.—पंचविंश ब्राह्मण २५, १५ यांत जें सर्पसत्र वर्णिलें आहे, त्यांत ह्यानें आध्वर्यव स्वीकारलें होतें.

[६]अ रु ण आ टू.—पंचविंश ब्राह्मण २५. १५ येथें जें सर्पसत्र उल्लेखिलें आहे, त्यांत हा अच्छावाक नामक ऋत्विज होता.

[७]अ र्बु द.—पंचविंश ब्राह्मण (२५, १५) येथें जें सर्पसत्र वर्णिलें आहे त्यांत हा ग्रावस्तुत ह्या ऋत्विजाचें काम करीत होता. ऐतरेय आणि कौषीतकी ह्या ब्राह्मणांत ज्याचा मंत्रद्रष्टा म्हणून उल्लेख आला आहे, तो प्राचीन अर्बुद काद्रवेय व हा अर्बुद हे एकच होत हें उघड आहे.

[८]अ यें ल.—पंचविंश ब्राह्मणांत (२३, १, ५) वर्णिलेल्या सर्पसत्रांत अर्येल हा गृहपति होता व आरुणि हा 'होता' होता.

[९]अ श्व ल.—विदेहराजा जो जनक त्याचा हा 'होता' असून बृहदारण्यकोपनिषदांत (३. १, २, १०) तो प्रमाण असल्याचा उल्लेख आहे.

[१०]अ सि त मृ ग.—ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें हें एका कश्यप कुलाचें नांव आहे. ह्यांनां जनमेजयानें एका यज्ञांतून वगळलें होतें; तथापि ह्यांनीं राजानें नेमिलेल्या भूतवीर नांवाच्या ब्राह्मणांकडून यज्ञाचें नेतृत्व हिसकावून आपणाकडे घेतलें. जैमिनीय (१. ७५) व षड्विंश (१,४) ब्राह्मणांत असितमृग हे कश्यपाचे पुत्र होते व एकाचें नांव कुसुरुबिन्दु औद्दालकि असें होतें असा उल्लेख आहे.

[११]आ यो ग व.—आयोगव राजा मरुत्त आविक्षित हा यजमान यज्ञकर्ता होता असा शतपथांत (१३. ५, ४, ६) उल्लेख आहे. त्यांत यज्ञाप्रीत्यर्थ एक गाथा दिली आहे.

[१२]उ द म य आ त्रे य.—वैरोचन अंग याचा हा पुरोहित होता असें ऐतरेय ब्राह्मण (८. २२) येथें म्हटलें आहे.

[१३]उ प गु सौ श्र व स.—पंचविंश ब्राह्मण (१४, ६, ८,) यांत हा कुत्स औरव ह्याचा पुरोहित होता असें म्हटलें आहे. ह्या पुरोहितानें इंद्राला हवि दिला म्हणून त्याच्या यजमानानें त्याला ठार मारिलें.

[१४]उ पा वि जा न श्रु ते य.—उपसद म्हणजे सोमयागांतील इष्टि. हिच्यामध्यें ब्राह्मणवाक्य पठण करणारा हा एक ऋषि होता असा ऐतरेय ब्राह्मण १. २५ येथें उल्लेख आहे.

[१५]ऐ षा वी र.—शतपथांत (११. २ ७. ३२) एका यज्ञांमध्यें हे याज्ञिक चालवीत असून वाईट यज्ञकर्ते होते असा उल्लेख आहे. सायणाचार्यांच्या मतें हें विशेषनाम (एषवीराचे वंशज) असून त्याचा अर्थ तुच्छ मानलेल्या कुटुंबांतील गृहस्थ असा होतो. परंतु वरील उताऱ्यांत आणि दुसरीकडे रॉथ याचा अर्थ अशक्त अथवा यःकश्चित् मनुष्य असा करितो.

[१६]औ पा वि जा न श्रु ते य.—औपावि (उपावीचा वंशज) जानश्रुतेय (जनश्रुतीचा वंशज). ह्याच्याबद्दल शतपथ ब्राह्मण व मैत्रायणी संहिता (१. ४, ५) येथें उल्लेख आला आहे. हा वाजपेय यज्ञ करीत असे व त्यामुळें त्यास स्वर्गप्राप्ती झाली.

[१७]का ण्ड् वि य.—जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत (३. १०, २) हा उद्गाता होता असें म्हटलें आहे.

[१८]का पे य.—(कपिवंशज), काठकसंहिता (१३. १२) आणि पंचविंश ब्राह्मण (२०. १२, ५) यांत कापेय यांनीं चित्ररथाकडून यज्ञ करविला व त्यामुळें चित्ररथ धनसंपन्न झाला. या चित्ररथाच्या कुलांत वडील राजपुत्र गादीवर बसे व त्याचे भाऊ त्याचे अनुचर होत अशी चाल असल्याचें वर्णिलें आहे.

[१९]का व षे य.—(कवषाचा वंशज) तुर ह्याचें सर्व ठिकाणीं आलेलें हें पैतृक नांव. ऋग्वेदाच्या ऐतरेय (३.२,६) व शांखायन (८. २) आरण्यकांत तत्त्वज्ञानाचा अध्यापक म्हणून आलें आहे.

[२०]कि रा त.—पंचविंश ब्राह्मण (१३. १२, ५) येथें आलेल्या असमातीच्या कथेंत किरात आणि अकुलि हे दोन पुरोहित गोपायनांच्या विरुद्ध होते, असें म्हटलें आहे. शतपथ [१. १, ४, १४] येथें किलात व आकुलि अशीं नांवें आहेत. हें उघड दिसतें कीं, ऐतिहासिक म्हणून हें नांव उपयोगांत आणलें नसून भांडखोर पुरोहिताला साजेसें म्हणून आलें आहे. कारण किरात ह्या डोंगरी लोकांच्या नांवाशीं यांचें साम्य आहे असें मॅकडोनेल म्हणतो.

[२१]कि ला त.—'किरात' ह्याचें हें दुसरें स्वरूप आहे. शतपथ, शाट्यायनक आणि जैमिनीय ब्राह्मणांत हा शब्द आला आहे.

[२२]कु षी त क सा म श्र व स.—पंचविंश ब्राह्मण [१७. ४,] येथें उल्लेखिलेल्या कौषीतकीच्या यज्ञसमारंभांतील हा गृहपति म्हणजे यजमान होता.

[२३]कु ष ण्ड.—पंचविंश ब्राह्मण [२५. १५,३.] येथें उल्लेखिलेल्या सर्पसत्रांत षण्ड नांवाच्या ऋत्विजाबरोबर ह्याचेंहि नांव आलेलें आहे. त्या सत्रांत याच्याकडे अभिगिर [स्तुति] व अपगर [निंदा] नामक कर्म असे.

[२४] कौ कू स्त.—शतपथ ब्राह्मण [४. ६, १, १३] येथें उल्लेखिलेल्या यज्ञांत यज्ञकर्त्या ब्राह्मणांना हा दक्षिणा देत असे. काण्व पाठांत कौक्थस्त असें नांव आहे.

[२५] कौ त स्त.—पंचविंश ब्राह्मण [२५. १५, ३] येथें वर्णिलेल्या सर्पसत्रांत अरिमेजय व जनमेजय अशीं अध्वर्यूंचीं जीं दोन नांवें आलीं आहेत त्यांचें हें पैतृक नांव असावें, हें एकदां द्विवचनी उपयोगांत आणिलें आहे.

[२६] कुत्स् आं गि र स.—पंचविंश ब्राह्मण [१३. ९, ११; ११, २०] येथें आलेल्या कौत्स सामाच्या द्रष्ट्याचें हें नांव आहे. मंत्राला मंत्रद्रष्ट्या ऋषीचें नांव दिल्याचें हें एक उदाहरण आहे. ह्या नियमाला अपवादहि आहेत.

[२७] ग्ला व मै त्रे य.—मैत्रीचा वंशज छान्दोग्य उपनिषद् [१. १२, १, ३] येथें ह्याचा उल्लेख असून हा व बकदाल्भ्य हे एकच आहेत. पंचविंश ब्राह्मण [२५, १५, ३] येथें वर्णिलेल्या सर्पसत्रांत हा प्रस्तोता होता. याचा उल्लेख षड्विंश ब्राह्मणांतहि आहे.

[२८] ज न मे ज य.—पंचविंश ब्राह्मणा [२५.१५, ३] मध्यें ज्या सर्पसत्राचा उल्लेख आहे, त्यामध्यें हा प्रमुखपणें याज्ञिक चालवीत होता.

[२९] ज र्व र.—पंचविंश ब्राह्मण [२५. १५, ३] येथें उल्लेखिलेल्या सर्पसत्रांत हा गृहपति म्हणजे यजमान होता.

[३०] जि त्व न् शै लि नि.—बृहदारण्यकांत [४. १, २] अध्यापक म्हणून ह्याचें नांव आलें आहे. जनक आणि याज्ञवल्क्य यांचा तो समकालीन होता. हा वाग्देवतेला ब्रह्म समजत असे.

[३१] ति मि र्घ दौ रे श्रु त.— दूरेश्रुताचा वंशज. पंचविंश ब्राह्मण [२५. १५, ३] येथें वर्णिलेल्या सर्पसत्रांतील अग्निध [अग्नि पेटविणारा] ऋत्विजाचें हें नांव होय.

[३२] तु र का व षे य.—शतपथाच्या दहाव्या कांडाच्या शेवटीं आलेल्या वंशांत हें नांव आलेलें आहे, कारण त्या काण्डामध्यें प्रतिपादिलेल्या तत्त्वांचें जनकत्व याच्याकडे येतें. तेथें दिलेल्या गुरुशिष्यपरंपरेंत हा आणि शाण्डिल्य यांच्यामध्यें यज्ञवचस् आणि कुश्री हे दोन गुरू दिलेले आहेत. त्याच ब्राह्मणांत [९. ५. २. १५.] शाण्डिल्यानें कारोती नदीवर एक अग्नीची वेदी बांधल्याचा यानें उल्लेख केला आहे. जनमेजय पारिक्षित ह्याचा हा पुरोहित होता व ह्यानेंच त्याला राज्याभिषेक केला असें ऐतरेय ब्राह्मणांत (४. २७; ७ ३४; ८. २१) म्हटलें आहे. बृहदारण्यकांत (६. ५) व खिलमध्यें (१. ९ ६). तो पुरातन मुनि असल्याचें म्हटलें आहे. ओल्डेनबर्गच्या मतानें हा वैदिक कालाच्या शेवटीं झाला असावा; व हेच मत मॅकडोनेलला योग्य दिसतें. त्याच्या मतें पंचविंश ब्राह्मणांत(२५. १४. ५) उल्लेखिलेला देवमुनि जो तुर तो व हा हे एकच असावेत.

[३३] त ष्टा.—मैत्रायणी ( ४. ८ १) आणि काठक संहिता (३०. १.) यामध्यें असुरांचा पुरोहित वरुत्री यांच्याबरोबर याचा उल्लेख आला आहे.

[३४] द त ता प स.—पंचविंश ब्राह्मण (२५.१५,३) येथें आलेल्या सर्पसत्रांत होतृपद ह्याच्याकडे होतें.

[३५] दृ ढ च्यु त आ ग स्ति.—( अगस्त्याचा वंशज. )जैमिनीय ब्राह्मणांत वर्णिलेल्या विभिंदुकीयांच्या सत्रांत हा उद्गाता होता.

[३६] दे व भा ग श्रौ त र्षे.—शतपथ (२.४,४,५) येथें तो सृंजय व कुरु ह्या दोघांचाहि पुरोहित होता असें म्हटलें आहे. यानें गिरिज बाभ्रव्याला यज्ञिय पशूचें विशसन (पशोर्विभक्ति) कसें करावें हें शिकविल्याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मण (७. १) यांत आला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (३. १०, ९, ११) तो सावित्र अग्नीच्या बाबतींत प्रमाणभूत मानला जातो.

[३७] दौ रे श्र व स्.—( दूरेश्रवाचा वंशज ) पंचविंश ब्राह्मण (२५. १५. ३.) येथें उल्लेखिलेलें सर्पसत्र चालविणाऱ्या पृथुश्रव्याचें हें पैतृक नांव आहे.

[३८] दौ रे श्रु त.—( दूरेश्रुताचा वंशज ). पंचविंश ब्राह्मणां [२५. १५.३.] मध्यें उल्लेखिलेलें सर्पसत्र चालविणाऱ्या तिमिर्घाचें हें पैतृक नांव होय.

[३९] न ग रि न् जा न श्रु ते य.—ऐतरेय ब्राह्मण [५. ३०] आलेलें हें एका ऋत्विजाचें नांव आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण [३. ४०. २.] येथें नगरिन् जानश्रुतेय काण्डिव्य असें नांव आहे.

[४०] पि शं ग.—पंचविंश ब्राह्मण २५. १५. ३ येथें वर्णिलेल्या सर्पसत्रांत हा उन्नेता नांवाच्या पुरोहिताचें काम करीत होता.

[४१] पृ थु श्र व स् दौ रे श्र व स.—( दूरेश्रव्याचा वंशज ) पंचविंश ब्राह्मण [२५. १५. ३.] येथें आलेल्या सर्पसत्रांत हा उद्गात्याचें काम करीत होता.

[४२] प्रा ची न शा ल औ प म न्य व.—(उपमन्यूचा वंशज) हें छान्दोग्योपनिषदांत (५. २, १) आलेलें एका वेदान्ती गृहस्थाचें नांव आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण ३. ७, २; १०. २ येथें एका प्राचीनशालाचें नांव आढळतें. त्याच ग्रंथांत (३.१० १) येथें प्राचीन शालांचा उल्लेख आहे.

[४३] भू त वी र.—ऐतरेय ब्राह्मण [७ २७] येथें यांचा उल्लेख आहे. कांहीं दिवस हे जनमेजयाच्या यज्ञांत पौरोहित्य करीत होते.

[४४] वि भिं दु की य.—जैमिनीय उपनिषद ब्राह्मण ७. २७ येथें उल्लेखिलेल्या सत्रांतील ऋत्विजांच्या समुदायाचें हें नांव आहे.

[४५] शि ति पृ ष्ठ.—( पांढरी पाठ असलेला ) पंचविंश ब्राह्मण २५. १५. ३ येथें उल्लेखिलेल्या सर्पसत्रांतील मैत्रावरुण ऋत्विजाचें हें नांव आहे.

[४६] शि ति बा हु.—जैमिनीय ब्राम्हण १.३६३ येथें ह्याचा यजमान म्हणजे यज्ञकर्ता म्हणून उल्लेख आहे. या यज्ञांतील

हवि एका वानरानें पळविला असा तेथें उल्लेख आहे.

४७ शु चि वृ क्ष गौ पा ला य न.—ऐतरेय ब्राह्मण (३. ४८ ९)येथें उल्लेखिलेल्या वृद्ध द्युम्न अभिप्रतारिन्च्या पुरोहिताचें नांव आहे. त्याचा मैत्रायणी संहितेंतहि ( ३.१०,४) उल्लेख आलेला आहे.

४८ शौ ल्वा य न.—( शुल्वाचा वंशज ) उदंक नांवाच्या अध्यापकाचें हें पैतृक नांव आहे शतपथ( ११. ४, २, १७) येथें कोणी एक शौल्वायन अध्वर्यु होता व अयस्थूण हा गृहपति होता असा उल्लेख आहे.

४९ प ण्ड.—पंचविंश ब्राम्हणा[२५.२, ५३]मध्यें वर्णिलेल्या सर्पसत्रांत हा एक ऋत्विज होता.

५० स त्य ह वि स्.—मैत्रायणी संहिते [ १.९,१,५] मध्यें हें एका प्राचीनकाल्पनिक अध्वर्यूचें नांव आलें आहे. असें मॅकडोनेल म्हणतो परंतु ह्याला प्राचीनकाल्पनिक समजण्यास ग्रंथांत कांहीं पुरावा नाहीं.

५१ सु ब्र ह्म ण्य.—ब्राह्मण ग्रंथांत उद्गात्याच्या तीन मदतनीसांपैकीं हा एक ऋत्विज असल्याचें म्हटलें आहे. सुब्रह्मण्य नामक साम पठन करणें हें याचें काम होय.

५२ सो म शु ष्म न्.—( वाजरत्नाचा वंशज ) ऐतरेयब्राह्मण (८. २१, ५) येथें आलेलें हें एका पुरोहिताचें नांव आहे. ह्यानेंच शतानीकाला राज्याभिषेक केला.

## गुरुशिष्यसंबंध [ संहितेतर ]

१ अंशुधानंजय्य
२ अग्निभूकाश्यप
६ आमावास्यशांडिल्यायन
४ अराडदात्रेय शौनक
५ असितवार्षगण
६ आग्निवेश्य
७ आनभिम्लात
८ आनंदजचांधनायन
९ आभूतित्वाष्ट्र
१० आसुरायण
११ आसुरि
१२ इंद्रभूकाश्यप
१३ इषश्यावाश्वि
१४ उद्दरशांडिल्य
१५ उद्दालकायन
१६ उपकोसलकामलायन
१७ उपवोशि
१८ ऋष्यश्रृंग
१९ कक्ष
२० कापटवसुनीथ
२१ काषायण
२२ कुमारहारित
५३ कुश्रिवाजश्रवस्
२४ कौण्डिन्य
२५ गालव
५६ गोश्रुतिवैय्याघ्रपद्य
२७ गौपवन
२८ घृतकौशिक
२९ घोरआंगिरस
३० चाक्र
३१ जनश्रुत-कांडवीय
३२ जिह्वावत्
३३ तांडि
३४ त्रिवेद कृष्णरातलैहित्य
३५ त्रैवणि
३६ दक्षकात्यायनि आत्रेय
७७ दक्षजयंतलौहित्य
३८ निकोथकभावजात्य
३९ निगदपार्णवल्किं
४० पार्थन्सौभर
४१ पालिगुप्तलौहित्य
४२ पाराशर्यायण
४३ पौष्पिंड्य
४४ प्रातिथिदेवतरथ
४५ प्रातिवेश्य
४६ प्रातिपीय
४७ प्रोष्ठपादवारक्य
४८ बभ्रुदैवावृध्
४९ बृहस्पतिगुप्त शायास्थिय
५० ब्रम्हवृद्धि
५१ महाशालजाबाल
५२ यज्ञेषु
५३ वाजश्रवस्
५४ वातकाक्षायण
५५ विचक्षणतांडय
५६ विदर्भिकौंडिन्य
५७ विपाश्चित् दृढजयंतलौहित्य
५८ विष्वक्सेन
५९ वैपाश्चित दार्ढे जयंति गुप्त लौहित्य
७९ वैपश्चित दार्ढेजयंति दृढजयंत लौहित
६१ शवस्
६२ शाकदास भाडितायन
६३ शांखायन शूष वान्हेय भारद्वाज
६४ श्यामजयंत लौहित्य
६५ श्यामसुजयंत लौहित्य
६६ प्रवण दत्त कौहल
६७ सत्यकाम जाबाल
६८ सत्ययज्ञ पौलुषि
६९ संवर्गजित् लामकायन
७० सांकृत्य
७१ साकमश्व देवरात
७२ सायक जानश्रुतेय काण्ड्विय
७३ सुदत्तपाराशर्य
७४ सुप्रतीत औलुण्ड्य
७५ सुमंतबाभ्रव गौतम
७६ सुश्रयु
७७ सुयज्ञशांडिल्य
७८ सुशारदशालंकायन
७९ सोमप्रातिवेश्य
८० सौकरायण
८१ हारितकाश्यप
८२ हृत्स्वाशयआंल्लकेय

१ अं शु धा नं ज य्य.—अमावास्य शांडिल्यायनाचा हा शिष्य असें वंशब्राह्मणांत म्हटलें आहे.

२ अ ग्नि भू, का श्य प.—इंद्रभू काश्यपाचा शिष्य म्हणून याचा वंश ब्राह्मणांत उल्लेख आहे.

३ अं मा वा स्य शां डि ल्या य न.—अंशुधानंजय्य याचा हा गुरु होता असा वंश ब्राह्मणांत उल्लेख आहे.

४ अ रा ड दा त्रे य शौ न क.—दृतिऐन्द्रोतशौनक याचा शिष्य म्हणून याचा वंश ब्राह्मणांत उल्लेख आहे.

५ अ सि त वा र्ष ग ण.—हरित कश्यपाचा हा शिष्य होता असें बृहदारण्यकांतील वंशावरून ( ६. ५. ३ )दिसतें.

६ आ ग्नि वे श्य.—बृहदारण्यकाच्या वंशांत या नांवाच्या बऱ्याच अध्यापकांचा उल्लेख आला आहे. माध्यंदिन प्रतींत आग्निवेश्य हा सैतवाचा शिष्य असल्याचें व काण्व प्रतींतील एका वंशांत हा शांडिल्य व आनभिम्लात यांचा शिष्य, आणि दुसऱ्या वंशांत हा गार्ग्याचा शिष्य असल्याचें आढळतें.

७ आ न भि म्ला त.—बृहदारण्यक काण्व प्रत (२.६, २.) उपनिषदांतील वंशांत हा दुसऱ्या एका आनभिम्लाताचा शिष्य असल्याचें लिहिलें आहे.

८ आ न न्द ज चां ध ना य न.—हा शाम्बाचा शिष्य असल्याचें वंशब्राह्मणावरून दिसतें.

९ आ भू ति त्वा ष्ट्र.—हा विश्वरूप त्वाष्ट्राचा शिष्य असल्याचें बृहदारण्यकाच्या दोन वंशांत (२. ६, ३, ४, ६, ३) दिलें आहे. हें दोघेहि आचार्य, मॅकडोनेलच्या मतानें सारखेच प्राचीनकल्पित आहेत.

१० आ सु रा य ण.—बृहदारण्यकोउपनिषदांती दोन वंशाप्रमाणें हा त्रैवणीचा शिष्य असून तिसऱ्या वंशांत

( ६, ५. २, ) हा असुरीचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

[११]आ सु रि.--बृहदारण्यकोपनिषदांतील पहिल्या दोन वंशांत हा भारद्वाजाचा शिष्य आणि औपजंधनीचा गुरु असून तिसऱ्या वंशांत याज्ञवल्क्याचा शिष्य व आसुरायणाचा गुरु असल्याचें म्हटलें आहे. शतपथाच्या पहिल्या चार कांडांत कांहीं यज्ञविधींवर तो प्रमाणभूत मानला जातो. चवदाव्या काण्डावरून ( १४. १, १, ३३ ) तो अनिर्बंध मताबद्दल विशेषतः सत्त्वाच्या आग्रहाबद्दल प्रमाणभूत होतासें दिसतें.

[१२]इं द्र भू का श्य प.—मित्रभू काश्यपाचा हा शिष्य होता असें वंशब्राह्मणांत म्हटलें आहे.

[१३]इ ष श्या वा श्वि.-अगस्त्याचा हा शिष्य असल्याचें जैमिनीय उपनिषद् ब्राह्मग (४,१६,१,) येथें म्हटलें आहे.

[१४]उ द र शा ण्डि ल्य.—छान्दोग्य उपनिषदांत (१.९,३) अतिधन्वा शौनकानें ह्याला उद्गीथ शिकविलें असें आहे(उद्गीथ याचा वाच्यार्थ जो 'सामन्' तो येथें अभिप्रेत नसून लक्षणेनें ब्रह्माचें ज्ञान असा अर्थ घेतला आहे). वंश ब्राह्मणांतहि हेंच गुरुशिष्यनातें दिलें आहे.

[१५]उ द्दा ल का य न.—बृहदारण्यकांत (काण्वप्रत४.६.२) हा जाबालायन याचा शिष्य होता असा उल्लेख आहे.

[१६]उ प को स ल का म ला य न.—छान्दोग्य उपनिषदांत (४.१०,१ )याच्या सुंदर कथेला आरंभ झाला आहे. कमलपुत्र उपकोसल हा सत्यकाम जाबालाच्या घरीं अध्ययन करण्याकरितां ब्रह्मचर्यानें राहिला. त्यानें सत्यकामाच्या अग्नींची बारा वर्षें सेवा केली. बारा वर्षांनंतर सत्यकामानें इतर शिष्यांनां समावर्तनसंस्कार करून स्वगृहीं जाण्यास परवानगी दिली. परंतु उपकोसलाचें समावर्तन केलें नाहीं. तेव्हां सत्यकामाची भार्या त्याला म्हणाली कीं या ब्रह्मचाऱ्यानें अग्नींची सेवा उत्तमप्रकारें केली आहे करितां अग्नींनें आपल्याला दोष देऊं नये म्हणून आपण याला ब्रह्मज्ञान सांगा. पण तें न सांगतांच तो प्रवासाला निघून गेला तेव्हां उपकोसलानें मानसिक दुःखाच्या भरांत अन्न वर्जिलें. तेव्हां आचार्यपत्नी म्हणाली, " बाळा, तूं अन्न कां वर्ज्य केलेंस ? तो म्हणाला कीं, नाना मार्गांनीं जाणाऱ्या अनेक इच्छा मनुष्याला असतात. अशा इच्छारूप व्याधींनीं मी ग्रस्त आहे; म्हणून मी कांहीं खात नाहीं. त्या ब्रह्मचाऱ्यानें आचरलेलें तप व आपली केलेली सेवा लक्ष्यांत आणून त्याला ज्ञान सांगण्याच्या उद्देशानें तीन अग्नी प्रकट होऊन त्यास म्हणाले कीं, प्राण हें ब्रह्म, सुख हें ब्रह्म आणि आकाश हें ब्रह्म होय. उपकोसल म्हणाला, " प्राण हे ब्रह्म कसें हें मला समजलें, पण पुढील दोन्हींबद्दल मला समजत नाहीं. " नंतर त्या अग्नींनीं त्याचींहि उत्तरें दिलीं, व प्रत्येक अग्नीनें आपल्या स्वरूपाचें ज्ञान त्याला करून दिलें. मागाहून ते अग्नी म्हणाले बाळा उपकोसला ही आमची विद्या आणि आत्मविद्या आम्ही तुला सांगितली. ब्रह्मवेत्त्याचा पुढील मार्ग तुझ्या आचार्याकडून तुला कळेल. " काळांतरानें त्याचा आचार्य परत आला व शिष्याचें मुखावलोकन करून तो म्हणाला, " बाळा, ब्रह्मज्ञान्याच्या मुखाप्रमाणें तुझें मुख दिसत आहे. तुला कोणीं ज्ञान सांगितलें ? " उपकोसल म्हणाला, "दुसरें कोण सांगणार ? ह्या कंप पावणाऱ्या अग्नीसारखेच दुसरे अग्नी होते, त्यांनीं सांगितलें. " पुढें गुरूनें विचारल्यावरून अग्नींनीं सांगितलेलें ज्ञान त्यानें त्याला सांगितलें. नंतर आचार्य सत्यकाम म्हणाला, बाळा, त्यांनीं तुला लोक सांगितले, पण संपूर्ण ब्रह्मज्ञान सांगितलें नाहीं; तर मी सांगतों. ज्याप्रमाणें कमलपत्राला उदक स्पर्श करीत नाहीं, त्याप्रमाणें हें ब्रह्म जाणणाऱ्याला पापकर्म स्पर्श करीत नाहीं" उपकोसलानें प्रार्थना केली कीं, "भगवन् तें ब्रम्ह मला सांगा," आचार्य म्हणाले, " या चक्षूच्या ठिकाणीं जो पुरुष दिसतो तो आत्मा. हा मरणरहित व भयरहित आहे. हाच ब्रह्म होय. ह्या चक्षूवर घृत अथवा उदक पडलें तर तें बाजूलाच जातें. या पुरुषाला संयद्वाम असें म्हणतात. कारण सर्व शोभनवस्तू ह्याच्या ठिकाणीं एकत्र होतात. हाच ' वामनी ' होय. कारण हाच प्राण्यांनां त्यांच्या पुण्यकर्मांचीं सर्व फलें प्राप्त करून देतो. हाच ' भामनी ' होय. कारण हा सर्व लोकांमध्यें प्रकाश पावतो. हें जो जाणतो, तो सर्व लोकांमध्यें प्रकाशमान होतो. असे ब्रह्मवेत्ते मरण पावल्यावर त्यांचें उत्तर कार्य कोणी करोत अथवा न करोत. ते अर्चिष देवतेप्रत जातात. तेथून दिवसाप्रत ( दिवसाभिमानिनी देवतेप्रत ) जातात. तेथून शुक्ल पक्षाप्रत, तेथून उत्तरायणाप्रत व मग संवत्सराप्रत जातात. तेथून आदित्याप्रत, पुढें चंद्राप्रत, नंतर विद्युल्लतेप्रत पोहोंचतात, तेथें कोणी ब्रह्मलोकींचा अमानव पुरुष येऊन त्यांनां ब्रह्माप्रत नेतो. तो देवपथ, तोच ब्रह्मपथ. या मार्गानें जाणारे पुनः या मानवी भोंवऱ्यांत सांपडत नाहींत. "

[१७]उ प वे शि.—बृहदारण्यकोपनिषद् [६ ५, ३] मधील वंशांत हा कुश्रि याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

[१८]ऋ ष्य शृं ग.—जैमिनीय उपनिषद ब्राह्मण ( ३. ४, १ ) आणि वंशब्राह्मग ह्यांत हा काश्यपाचा शिष्य असून काश्यप हें पैतृक नांवहि ह्यानें धारण केल्याचा उल्लेख दिसतो.

[१९]क क्ष.—जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांतील ( ३. ४१, १ ) वंशांत ह्या नांवाच्या दोन व्यक्ती आहेत. एक प्रौष्टपदवारक्य ह्याचा शिष्य कक्षवारक्य आणि दुसरा दक्ष कात्यायनि आत्रेय ह्याचा शिष्य कक्षवारकि, अथवा ( जै० उ० ब्रा० ४. १७, १, प्रमाणें,) कक्षवारक्य हे होत.

[२०]का प ट व सु नी थ.—सुतेमनस् शाण्डिल्यायनाचा हा शिष्य असें वंशब्राह्मणांत म्हटलें आहे.

[२१]का षा य ण.—बृहदारण्यकोपनिषदांतील दुसऱ्या वंशांत ह्याचें नांव आढळतें. काण्वप्रतीप्रमाणें [४. ६, २] हा सायकायन याचा शिष्य आणि माध्यंदिन प्रतीप्रमाणें ( ४. ५, २७ ) सौकरायणाचा शिष्य होय.

[२२] कुमारहारित.—गालवाचा हा शिष्य होता असं बृहदारण्यक उपनिषदांतील वंशांत (माध्यंदिन प्रत (२. ५, २२) आणि काण्व प्रत (२. ६, ३) म्हटलें आहे.

[२३] कुश्रि वाजश्रवस्.—शतपथ ब्राह्मण १०. ५, ५. १ येथें पवित्र अग्नीसंबंधींच्या ज्ञानाशीं या आचार्याचा संबंध आहे. बृहदारण्यकांतील शेवटच्या वंशांत (६. ४, ३३) हा वाजश्रव्याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे. बृहदारण्यक काण्व प्रतीच्या शेवटच्या वंशांत (६. ५, ४) आलेला कुश्रि व शतपथाच्या दहाव्या काण्डाच्या वंशांत याज्ञवचस् राजस्तंबायनाचा शिष्य म्हणून ज्याचा उल्लेख आहे, असे दोघे ह्या कुश्रीहून भिन्न कीं, काय हें स्पष्ट नाहीं.

[२४] कौण्डिन्य.—बृहदारण्यकांतील पहिल्या दोन वंशांत हा शाण्डिल्याचा शिष्य असल्याचें म्हटलें आहे.

[२५] गालव.—बृहदारण्यक उपनिषदांतील पहिल्या दोन वंशांत हा विदर्भी कौण्डिन्याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे. ऐतरेय आरण्यक (५. ३, ३) येथें गालवाचा उल्लेख आहे. महाव्रताचें अध्ययन एका दिवसांत संपवावें असें गालवमत आहे. तो गालव आणि हा एकच असणें संभवनीय आहे. निरुक्तांत (४. ३) एका वैय्याकरणी गालवाचा उल्लेख आहे.

[२६] गोश्रुति वैयाघ्रपद्य.—छान्दोग्य उपनिषदांत (५. २, ३;) ह्याची थोडी हकीकत आली आहे. जाबाल सत्यकामानें ह्याला वाणी, श्रोत्र, मन व प्राण ह्या पंचप्राणांबद्दलचें महत्त्व तारतम्यपूर्वक सांगून सर्वांत प्राणाचें महत्त्व कसें अधिक आहे; इतर इंद्रियांपैकीं कोणतेंहि नाहींसें झाल्यास विशेषसा अपाय शरीरास घडत नाहीं, पण प्राण जाऊं लागल्यास सर्व व्यवहार कसे खुंटतात हें सर्व ज्ञान एका आख्यायिकेच्या द्वारें त्याला सांगितलें. नंतर सत्यकाम त्याला म्हणाला, "हें ज्ञान जरी एखाद्या शुष्क खांबाला सांगितलें तरी त्याला पालवी फुटेल, मग जिवंत व बुद्धियुक्त माणसाबद्दल तर बोलावयासच नको." पुढें त्यानें त्याला महत्त्व प्राप्त करून घेण्याबद्दल एक व्रत सांगितलें.

[२७] गौपवन.— गोपवनाचा वंशज. बृहदारण्यकोपनिषदाच्या पहिल्या दोन वंशांत हा पौतिमाष्याचा शिष्य असल्याचें लिहिलें आहे.

[२८] घृतकौशिक.—बृहदारण्यकाच्या पहिल्या दोन वंशांवरून हा पाराशर्यायणाचा शिष्य दिसतो.

[२९] घोर आंगिरस.—ह्या प्राचीन आचार्याचें नांव कौषीतकी ब्राह्मणांत (३०. ६) आणि छान्दोग्योपनिषदांत आलें आहे. छान्दोग्यांत, ह्यानें देवकीपुत्र कृष्ण ह्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केल्याचें नमूद आहे. मॅक्डोनेलच्या मतें हें नांव अंगिरसापैकीं घोर म्हणजे भयंकर वंशज हा भिषज् आथर्वण अथर्वणाचा रोगघ्न वंशज ह्या प्रमाणेंच निवळ काल्पनिक आहे. ऋग्वेदाच्या आश्वलायन श्रौतसूत्रांत (१०.७) व शांखायन श्रौतसूत्रांत (१६. २) 'अथर्वण' वेदाचा 'भिषज्' शीं संबंध असून 'आंगिरस' वेदाचा 'घोर' याशीं संबंध आहे. म्हणून घोर अंगिरस हा अथर्ववेदांतील जारणादि कृत्यांचें मूर्तस्वरूप होय असें मॅकडोनेल म्हणतो. काठक संहितेंतील अश्वमेधाच्या भागांत (१. १) ह्याचा उल्लेख आहे.

[३०] चाक.—हें एका व्यक्तीचें नांव असून फक्त शतपथांत. 'रेवोत्तरस् स्थपति पाटव चाक' १२. ८' १; १७, व 'रेवोत्तरस् पाटव चाक स्थपति,' (१२. ९, ३, १) असा निरनिराळ्या तऱ्हेचा उल्लेख आला आहे. तेथें ह्याच्याविषयीं असें म्हटलें आहे कीं, ह्याला सृंजयांनीं हाकून दिलें पण ह्यानें, कौरव्य राजा बल्हिक प्रातिपीय ह्याच्या अश्वत्थाला न जुमानतां, त्यांचा जो दुष्टरीतु राजा, त्याला परत आणून त्यांच्या स्वाधीन केलें. पहिल्यानें दिलेल्या शतपथांतील उताऱ्यावरून ह्याला योद्धा म्हणण्यापेक्षां ऋषि म्हटलेलेंच अधिक योग्य होय, कारण तेथें फक्त आचार्य म्हणूनच त्याचा उल्लेख केला आहे.

[३१] जनश्रुत काण्ड्विय.—जनश्रुत म्हणजे लोकप्रसिद्ध. जैमिनीय उपनिषद ब्राह्मणाच्या वंशावरून (३. ४०, २) हा ह्रस्वाशयाचा शिष्य दिसतो. त्याच ब्राम्हणांत (३. ४१, १; ४. १७, १) जनश्रुत वारक्य हा जयंताचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

[३२] जिह्वावत् बाध्योग.—हा असित वार्षगणाचा शिष्य असल्याचें बृहदारण्यकांतील शेवटच्या वंशावरून (६. ५, ३) दिसतें.

[३३] ताण्डि.—सामविधान ब्राह्मणाच्या शेवटीं असलेल्या वंशावरून हा बादरायणाचा शिष्य दिसतो.

[३४] त्रिवेद कृष्णरात लौहित्य.—हा श्यामजयन्त लौहित्याचा शिष्य असल्याचें जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशावरून (३. ४२, १) दिसतें.

[३५] त्रैवणि.—बृहदारण्यकांतील पहिल्या दोन वंशांत हा औपचंधनि किंवा औपजंधनि ह्याचा शिष्य असल्याचें दिसतें. माध्यंदिन प्रतींत [४५.२७] ह्याचें नांव दोन वेळ आढळतें व दोन्ही ठिकाणीं हा औपजंधनीचा शिष्य आहे.

[३६] दक्ष कात्यायनी आत्रेय.—हा शंख बाभ्रव्याचा शिष्य असल्याचा उल्लेख जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशात [३ ४१,१; ४१,७,१] आहे.

[३७] दक्ष जयंत लौहित्य.—हा कृष्णरात लौहित्याचा शिष्य असल्याचें जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशावरून [५.४२,१] दिसतें.

[३८] निकोथक भायजात्य.—(भायजाताचा वंशज). प्रतिथीचा शिष्य म्हणून ह्याचा वंशब्राह्मणांत उल्लेख आलेला आहे.

[३९] निगद पार्णवल्कि.— पर्णवल्काचा वंशज. वंशब्राह्मणावरून हा गिरिशर्मा नांवाच्या आचार्याचा शिष्य दिसतो.

[४०]पथिन्.—अयास्य आंगिरसाचा हा शिष्य असल्याचें बृहदारण्यकांतील पहिल्या दोन वंशांवरून दिसतें.

[४१]पल्लिगुप्त लौहित्य.—जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशांत (३.४२,१) श्यामजयंत लौहित्याचा शिष्य म्हणून ह्याचा उल्लेख आलेला आहे. हें नांव उघडपणें अलीकडील दिसतें. कारण पल्लि हा शब्द प्राचीन वाङ्मयांत आढळत नाहीं व लौहित्य कुलाचा या शिवायचा उल्लेख वैदिक कालानंतरच्या वाङ्मयांतच आलेला आहे.

[४२]पाराशर्यायण.—बृहदारण्यकांतील पहिल्या दोन वंशांत पाराशर्याचा शिष्य म्हणून ह्याचा उल्लेख आहे.

[४३]पौष्पिण्ड्य.—सामविधान ब्राह्मणाच्या शेवटच्या वंशावरून हा जैमिनीचा शिष्य दिसतो.

[४४]प्रतिथि देवतरथ.—वंशब्राम्हणावरून हा देवतरस् शावसायनाचा शिष्य दिसतो.

[४५]प्रातिपीय.—शांखायन आरण्यकांत (१५.१) प्रातिवंशाचा एक शिष्य म्हणून ह्याचा उल्लेख आलेला आहे.

[४६]प्रातिवेश्य.—शांखायन आरण्यकाच्या शेवटच्या वंशांत [१५.१] बृहद्दिवाचा शिष्य म्हणून ह्याचा उल्लेख आहे.

[४७]प्रौष्ठपाद वारक्य.—कंस वारकीचा शिष्य म्हणून जैमिनीय उपनिषद् ब्राम्हणाच्या एका वंशांत (३.४१,१) ह्याचा उल्लेख आहे.

[४८]बभ्रु दैवावृध.—पर्वत आणि नारद यांचा शिष्य म्हणून ऐतरेय ब्राम्हणांत (७. ३४) ह्याचा उलेख आला आहे.

[४९]बृहस्पतिगुप्त शायस्थि.—भवत्रात शायस्थीचा शिष्य म्हणून वंश ब्राम्हणांत याचा उल्लेख आहे.

[५०]ब्रह्मवृद्धि.—मित्रवर्चस् ह्याचा हा शिष्य असल्याचें वंशब्राम्हणांत उल्लेखिलें आहे.

[५१]महाशाल जाबाल.—हें एका अध्यापकाचें नांव आहे. याचा शतपथ ब्राम्हणांत दोनदां उल्लेख आला आहे. पहिल्यानें तो धीर शातपर्णेय ह्याला शिकवीत असतां, व दुसऱ्यानें अश्वपतीपासून ज्ञान मिळविणाऱ्या ब्राह्मणापैकीं एक म्हणून (१०. ६, १, १). ह्याच्या जोडीच्या छांदोग्यपनिषदांतील उताऱ्यांत (५. २, १) प्राचीनशाल औपमन्यव हें नांव आढळतें. महाशाल हा शब्द विशेषणापेक्षां विशेष्य म्हणून समजणें अधिक युक्त होय. पीटर्सबर्गकोशांत हा विशेषण म्हणून मानला आहे.

[५२]यज्ञेषु.—तैत्तिरीय ब्राह्मणांत (१.५,२;१) हें एका मनुष्याचें नांव आलें आहे. यज्ञ करण्याची अगदीं बरोबर वेळ ज्याला कळत होती अशा मात्स्य नांवाच्या ह्याच्या पुरोहितानें ह्याला भरभराटीस आणलें.

[५३]वाजश्रवस्.—बृहदारण्यकांतील शेवटच्या वंशावरून (माध्यंदिन ६.४,३३) हा जिव्हावत् बाध्योगाचा शिष्य दिसतो.

[५४]वामकक्षायण.—शतपथ ब्राह्मणांत (१०.६,५;९) हा वात्स्याचा शिष्य असल्याचा व बृहदारण्यकांत (६.५,४ काण्वप्रत) शाण्डिल्याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

[५५]विचक्षण तांड्य.-हा गर्दभीमुखाचा शिष्य असल्याचें वंशब्राह्मणावरून दिसतें.

[५६]विदर्भि कौण्डिन्य.—हा वत्सनपाताचा शिष्य असल्याचें बृहदारण्यकांतील पहिल्या दोन वंशांवरून दिसतें.

[५७]विपश्चित दृढजयंत लौहित्य.—दक्ष जयंत लौहित्याचा शिष्य म्हणून जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत(३.४३,२) ह्याचा उल्लेख आहे.

[५८]विष्वक्सेन.—सामविधान ब्राह्मणाच्या शेवटच्या वंशावरून हा नारदाचा शिष्य असल्याचें दिसतें.

[५९]वैपश्चित दार्ढजयन्ति गुप्त लौहित्य.—हा वैपश्चित दार्ढजयन्ति दृढजयन्त लौहित्य याचा शिष्य असल्याचें जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील एका वंशावरून ( ३. ४२, १ ) दिसतें.

[६०]वैपश्चित दार्ढजयन्ति दृढजयंत लौहित्य.——हा विपश्चित् दृढजयंन्त लौहित्य याचा शिष्य असल्याचें जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशावरून दिसतें.

[६१]शवस्.—हा अग्निभू काश्यपाचा शिष्य असल्याचें वंशब्राह्मणावरून दिसतें.

[६२]शाकदास भाडितायन.—विचक्षण ताण्ड्याचा शिष्य म्हणून ह्याचें नांव वंशब्राह्मणांत आलें आहे.

[६३]शांखायन.—कौषीतकी ब्राह्मणांत ह्याचा उल्लेख नाहीं, पण शांखायन आरण्यकांतील शेवटच्या वंशांत ह्याचें नांव असून ह्या आरण्यकाबद्दल गुणाख्याला प्रमाणभूत मानितात. श्रौतसूत्रांत शांखायनाचें नांव मुळींच आढळत नाहीं, परंतु आश्वलायन गृह्यसूत्र शांखायनाला आचार्य म्हणून मानितें. अलीकडील कालांत ही शाखा उत्तर गुजराथेंत पसरली. तैत्तिरीय प्रातिशाख्यांत कांडमायनाबरोबर शांखायनाचाहि उल्लेख आहे.

[६४]श्याम जयंत लौहित्य.—ह्या आचार्याचा जयंत पाराशर्याचा शिष्य म्हणून जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणाच्या वंशात उल्लेख आहे. त्याच ठिकाणीं त्या नांवाच्या दुसऱ्या एका मनुष्याचा मित्रभूतिलौहित्याचा शिष्य म्हणून उल्लेख आहे.

[६५]श्याम सुजयंत लौहित्य.—ह्या आचार्याचा कृष्णधृति सात्यकीचा शिष्य म्हणून जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशांत ( ३.४२,१ ) उल्लेख आहे

[६६]श्रवणदत्त कौहल.—ह्या आचार्याचा सुशारद शांखायनाचा शिष्य म्हणून वंशब्राह्मणांत उल्लेख आहे.

[६७]सत्यकाम जाबाल.—छान्दोग्यांत, श्रद्धा व तप हीं ब्रह्मोपासनेचीं अंगें आहेत हें दाखविण्याकरितां याची सुंदर कथा आली आहे ती अशी—जबाला नामक स्त्रीला सत्यकाम नांवाचा पुत्र होता तो आपल्या मातेला हांक

मारून म्हणाला, "आई, मी आचार्यगृहीं राहून ब्रह्मचर्य पालन करून अध्ययन करूं इच्छितों. तर माझें गोत्र कोणतें तें मला सांग." [ गुरूजवळ गोत्र सांगणें अवश्य असे असें दिसतें ] ती त्याला म्हणाली, "बाळा, तुझें गोत्र काय तें मला माहीत नाहीं. पतिगृहीं अतिथिअभ्यागतादिकांच्या सेवेमध्यें व इतर कामांमध्यें मी अत्यंत व्यग्र होतें. शिवाय मी तरुण होतें तेव्हां तूं मला झालास; म्हणून मी गोत्र विचारलें नाहीं. तूं झाल्याबरोबर तुझा पिता मरण पावला. म्हणून तुझें गोत्र काय तें मला माहीत नाहीं. मात्र माझें नांव जबाला आहे आणि तुझें नांव सत्यकाम आहे एवढेंच मला माहीत आहे. तेव्हां मी जबालेचा पुत्र सत्यकाम आहे असें आपल्या गुरूला सांग." नंतर तो सत्यकाम गौतम हारिद्रुमत याजकडे जाऊन मोठ्या नम्रतेनें म्हणाला, "हे भगवन्, ब्रह्मचर्यानें आपल्याजवळ राहून अध्ययन करावें या हेतूनें मी आपणाकडे आलों आहे." तेव्हां गौतम म्हणाला, "बाळा, तुझें गोत्र काय?" त्यावर त्यानें मातेनें सांगितलेलें सत्य गौतमाला सांगितलें. तें ऐकून गौतम म्हणाला, "तूं ब्राह्मणच आहेस. ब्राह्मणेतर असें सत्य भाषण करणार नाहीं. तूं सत्यापासून परावृत्त झाला नाहींस म्हणून मी तुझें उपनयन करतों समिधा घेऊन ये." या प्रमाणें त्याचें उपनयन केल्यानंतर कृश व अशक्त अशा चारशें गाई गोठ्यांतून सोडून गौतमानें त्याला त्यांच्या मागें जाण्यास सांगितलें. त्या गाई अरण्याकडे नेतांना, यांच्या सहस्र गाई झाल्यांखेरीज आपण परत येणार नाहीं, अशी त्यानें प्रतिज्ञा केली. नंतर तो वर्षभर गाईसह वनांत राहिला व तोपर्यंत एक हजार गाई झाल्या. पुढें वायुदेवतेनें संचार केलेल्या एक ऋषभानें त्याला ब्रम्हाचा चतुर्थांश म्हणजे काय हें सांगितलें; व दुसरा चवथा भाग अग्नि तुला सांगेल असें म्हटलें. नंतर तो आचार्यगृहीं येऊन त्यानें अग्नि प्रदीप्त करून त्याची सेवा केली, व अग्नीनें त्याला ब्रह्माच्या दुसऱ्या चतुर्थांशाचें ज्ञान सांगितलें. पुढें सत्यकामानें आदित्यरूपी हंसाची सेवा केली व त्यानें तिसऱ्या पादाचें ज्ञान सांगितलें, चवथा पाद प्राणरूपी मद्गु नांवाच्या जलचर प्राण्यानें सांगितला. नंतर तो आचार्यगृहीं आला. त्याचें मुखावलोकन करून गौतम म्हणाला, "बाळा, तूं ब्रह्मवेत्याप्रमाणें दिसतोस. तुला कोणी उपदेश केला?" सत्यकामानें उत्तर दिलें कीं "मनुष्याहून इतर अशा देवतादिकांनीं मला उपदेश केला. आतां माझी ज्ञान ऐकण्याची इच्छा असतांना आपणच तें सांगूं शकाल. आपल्या सारख्या इतर गुरूंकडून मी ज्ञान संपादन केलें. परंतु जी विद्या आचार्यांपासून ज्ञात होते तीच अत्यंत कल्याणकारक होते." हें ऐकून गौतम त्याला म्हणाला "तूं जें जाणलें आहेस त्याहून अधिक ज्ञान कांहींच उरलें नाहीं."

६८ स त्य य ज्ञ पौ लु षि.— ह्या आचार्यांचा उल्लेख शतपथांत ( १०. ६, १, १ ]. आहे. सत्ययज्ञपौलुषि एवढेंच नांव छांदोग्यांत [ ५. ११, १ ] आलें आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत [ ३. ४०.२ ] हा पुलुष प्राचीन योग्य ह्याचा शिष्य असल्याचें उल्लेखिलें आहे.

६९ सं व र्ग जि त् ला म का य न.— वंशब्राह्मणावरून हा शाकदासाचा शिष्य दिसतो

७० सां कृ त्य — बृहदारण्यकाच्या माध्यंदिनप्रतींतील पहिल्या दोन वंशांत पाराशर्याचा हा गुरु असल्याचा उल्लेख आहे असें मॅकडोनेल म्हणतो.

७१ सा क म श्व दे व रा त.— ह्या आचार्याचा विश्वामित्राचा शिष्य म्हणून शांखायन आरण्यकाच्या शेवटच्या वंशांत उल्लेख आहे.

७२ सा य क जा न श्रु ते य.— जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत [ ३. ४०, २ ] या आचार्याचा अनुश्रुत काण्द्वी याचा शिष्य म्हणून उल्लेख आहे.

७३ सु द त्त पा रा श र्य.— जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत ( ३. ४ ११; ४. १७, १ ) ह्या आचार्याचा जनश्रुत वारक्याचा शिष्य म्हणून उल्लेख आहे.

७४ सु प्र ती त औ लुं ड्य.— वंशब्राह्मणांत, बृहस्पतिगुप्ताचा शिष्य म्हणून ह्याचा उल्लेख आहे.

७५ सु मं त्र बा भ्र व गौ त म.—वंशब्राह्मणांत ह्या आचार्याचा, शूष वाह्नेय भारद्वाजाचा शिष्य म्हणून उल्लेख आहे.

७६ सु म्न यु.–शांखायन आरण्यकाच्या वंशांत ( १५ १ ) हा उद्दालकाचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे

७७ सु य ज्ञ शां डि ल्य.— जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणांत [ ४. १७, १ ] कंस वारक्याचा शिष्य म्हणून ह्याचा उल्लेख आहे दुसरा सुयज्ञ शांखायन हा गृह्यसूत्रांचा कर्ता आहे

७८ सु शा र द शा लं का य न.— वंशब्राह्मणांत ह्या आचार्याचा ऊर्जयंति औपमन्यव याचा शिष्य म्हणून उल्लेख आहे.

७९ सो म प्रा ति वे श्य —शांखायन आरण्यकाच्या वंशांत ह्या आचार्याचा प्रातिवेश्याचा शिष्य म्हणून उल्लेख आहे

८० सौ क रा य ण — बृहदारण्यकाच्या काण्वप्रतींतील दुसऱ्या वंशांत ह्या आचार्याचा काषायणाचा शिष्य म्हणून उल्लेख असून, माध्यंदिन प्रतींतील वंशांत त्रैवणि ह्याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

८१ ह रि त क श्य प — बृहदारण्यकाच्या शेवटच्या वंशावरून हा आचार्य कश्यप याचा शिष्य दिसतो.

८२ ह त्स्वा श य आ ह्ल कं ट.—जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांतील वंशांत ( ३. ४०, २ ) सोमशुष्म सात्ययज्ञि प्राचीन योग्य ह्याचा शिष्य म्हणून याचा उल्लेख आहे.

## पैतृकनामें [ संहितेतर ]

१ अजीगर्तसौयवस
२ अभ्यग्निऐतशायन
३ अश्वतर आश्वि- अथवा आश्वितर आश्वि
आजिगर्ति
४ आत्रेय
आत्रेयीपुत्र
आराढि
५ आरुणि

६ आरुणेय
७ आर्तभागीपुत्र
आलंबायनीपुत्र
आलंबीपुत्र
८ आविक्षित
९ आश्वत्थ
१० आहूनेय
११ उद्दालक आरुणि
ऊर्जयंत औपमन्यव
१२ ऐभावत
१३ ऐरावत
ऐषुमत
१४ औदान्य
औदवाहि
१५ औदुंबरायण
औद्धारी
१६ औपमन्यव
१७ औपवेशि
औपस्वतीपुत्र
१८ औपोदिति
१९ और्णवाभ
औलुंडय
औष्ट्राक्षि
२० कूशब स्वायव लातव्य
२१ काक्षसेनि
काण्वीपुत्र
२२ कात्यायनीपुत्र
२३ कापिलेय
कापीपुत्र
२४ काप्य
२५ काबन्धि
२६ कामलायन
कांबोजऔपमन्यव
कार्शकेयीपुत्र
२७ काश्यप
काश्यपीबालाक्य माठरीपुत्र
काहोडि
कृष्णदत्तलौहित्य
२८ कृष्णदेवकीपुत्र
कृष्णधृतिसात्यकि
कृष्णरातलौहित्य

केतुवाज्य
कैरिशि
कैशोर्य
कौण्डिन्यायन
२९ कौत्स
कौत्सीपुत्र
कौपयेय
कौभ्य
कौरव्यायणीपुत्र
३० कौशांबेय
३१ कौशिक
कौशिकायनि
कौशिकीपुत्र
कौश्रेय
३२ कौषाख
३३ कौषीतकि
कौष्य
३४ कौसुरुबिंदि
कौहड
क्रातुजातेय
क्रौतवैतहोत्र
क्रौंचिकीपुत्र
३५ क्षेमधृत्पौंडरीक
क्षैमि
३६ खंडिक औद्भारि
खार्गलि
गर्दभीमुख
गल्नसआर्क्षाकाणेय
गार्गीपुत्र
३७ गार्ग्य
गार्ग्यायणि
३८ गिरिक्षित औच्चामन्यव
३९ गिरिजबाभ्रव्य
गुप्त
गौतमीपुत्र
४० गौतम
गौतमीपुत्र
४१ गौपालायन
४२ गौश्रायाणि
चाक्रायण
धनायन

चूडभागवित्ति
४३ चैकल शांडिल्यायन
४४ चैकितानेय
चैलाकि
४५ जनशार्कराक्ष्य
जनकलौहित्य
जयन्तीपुत्र
४६ जलजातूकर्ण
४७ जातूकर्ण्य
४८ जान
जानश्रुती
४९ जानश्रुतेय
५० जानंतपि
५१ जाबाल
जाबालायन
जारत्कारव
जैवंतायन
५२ ज्वालायन
तांड्य
त्व ष्ट्र
त्रतऐषुमंत
त्रैधातव
दात्रेय
५३ दार्तेय
५४ दाधीच
दार्धेय
दालिभ
५५ दाल्भ्य
५६ दातिऐंद्रोत
५७ दृप्तबालाकिगार्ग्य
देवतरसश्यावसायण काश्यप
देवरात
५८ देव्यांपाति
५९ दैवल
धान्व
धीरशातपर्णेय
नैध्रुवि
६० पांचि
पातंचलकाप्य
पाटव
पारशव्य

पाराशरीकौंडिनीपुत्र
पाराशरीपुत्र
पार्णवल्कि
६१ पार्वति
पुलुषप्राचीनयोग्य
पैंगीपुत्र
६२ पैंग्य
६३ पौंडरीक
पौतिमाषीपुत्र
पौतिमाष्य
पैतिमाष्यायण
६४ पौरुशिष्टि
पौलुषि
पौशायन
६५ पौष्करसादि
प्रतिबोधीपुत्र
प्रवाहण जैवलि अथवाजैवल
प्राचीनयोगीपुत्र
प्राचीनयोग्य
६६ प्राजापत्य
प्रातीबोधी पुत्र
प्रातृद
प्राध्वंसन
प्रात्रेय
६७ प्रावहि
प्राश्नीपुत्र-आसुरिसिन्
प्रियव्रतसोमापि
६८ प्रैय्यमेध
प्लाक्षि
प्लात
बभ्रकौंभ्य
बभ्रव
बंबआजाद्विष
बर्कुवार्ष्ण
बस्तरामकायन
बादरायण
बाध्योग
बाभ्रव्य
बालंदन
६९ बुधसोमायण
बुलिलआश्वतर

बैजवाप
बैजवापायन
बैजवापि
बैद
बोधीपुत्र
७० बौधायन
ब्रह्मदत्तचैकितानेय
७१ भद्रसेनअजातशत्रव
भागवित्ति
भांडितायन
भानुमंतऔपमन्यव
७२ भारद्वाजायन
भारद्वाजीपुत्र
७३ भार्गव
भार्गायण
भार्ग्याश्व
भालुकीपुत्र
भाल्ल
भाल्लविन्
७४ भाल्लवेय
भुज्युवात्स्यायनि
७५ भौवायनि
७६ मद्रगारशौंगायनि
मधुकपैंग्य
मशयगार्ग्य
७७ महाचामस्य
७८ महिदासऐतरेय
माक्षव्य
७९ मांडव्य
८० मांडूकीपुत्र
माण्डूकेय
माण्ड्वयायनीपुत्र
माथरि
माधव
माधुकि
माध्यंदिनायन
मानव
मानतंतव्य
८१ माल्य
माहाकि

माहित्थि
मित्रभूकाश्यप
मित्रभूतिलौहित्य
मित्रवर्कसस्थैरकायण
मित्रविंदुकाश्यप
मैत्रेय
८२ मौन
मौपिकीपुत्र
यज्ञवचस् राजस्तंबायन
यशस्विनजयंत लौहित्य
याज्ञतुर
८३ याज्ञवल्क्य
यास्क
राजस्तंबायन
८४ राथीतर
राथीतरीपुत्र
राधगौतम
राधेय
रामऔपतस्विनि
रामक्रातुजानेय
८५ राहूगण
रैभ्य
रौहिण
रौहिणायन
लांगलायन
८६ लातव्य
८७ लामकायन
लाह्यायन
लुशाकपिखार्गलि
८८ लौहित्य
वत्सनपातबाभ्रव
८९ वाजरत्नायन
९० वाजश्रवस्
९१ वाजसनेय
वाज्य
वातवंत
वात्सि
वात्सीमांडवीपुत्र
वात्सीपुत्र
वात्स्य
९२ वात्स्यायन
वारक्य

| | | |
|---|---|---|
| वारुणि | शाकत | [१०३] सांजीवपुत्र |
| वार्कलि | शांडिल | सात्ययक्षि |
| वार्कारुणीपुत्र | शांडिलीपुत्र | सात्राजित |
| वार्षगण | [९६] शांडिल्य | साचासह |
| वार्षगणपुत्र | शांडिल्यायन | सासरथवाहिनी |
| वार्षगण्य | शातपर्णेय | [१०४] सायकायन |
| वाष्णेय | [९७] शाट्यायन | [१०५] सावयस |
| वार्ष्ण | शार्कराक्ष | सैतव |
| वार्ष्ण्य | [९८] शार्कराक्ष्य | [१०६] सोमशुष्मसा- |
| विचारिन्कावंधि | शालंकायन | त्ययज्ञि |
| विवंधककाश्यप | शालंकायनीपुत्र | [१०७] सौजात |
| विश्वकर्मन्भौवन | शावशायन | आराह्लि |
| वृषशुष्मवातावत | [९९] शिखंडिन् | सौबल |
| वैदव | यज्ञसेन | सौभर |
| वैदभृतीपुत्र | शिलकशालावत्य | सौमाप |
| वैपश्चित | [१००] शैलालि | सौमारि |
| वैयाघ्रपदीपुत्र | शौंगीपुत्र | सौमायन |
| वैयाघ्रपद्य | शौच | सौयवसि |
| [९३] वैरूप | [१०१] शौनक | [१०८] सौश्रवस् |
| [९४] वैशंपायन | शौनकीपुत्र | सौश्रोमतेय |
| वैश्वामित्र | शौर्पणाय्य | आपाढि |
| वैष्टपुरेय | श्यावसायन | स्थैरकायण |
| व्यासपाराशर्य | श्रुपवान्हेयकाश्यप | [१०९] स्थौलष्ठीवि |
| शंखबाभ्रव्य | श्रौतआर्षि किंवा | स्वायव |
| शंगशालायनि | श्रौतर्षि | स्वैदयान |
| आत्रेय | श्रौमत्य | हारिकार्णिपुत्र |
| [९५] शाकल्य | [१०२] श्वेतकेतु आरु- | हारिद्रुमत |
| शाकायन्य | णेय औद्दालकि | हैतनामन् |

[१] अजीगर्त सौयवसि.—ऐतरेय ब्राह्मणांत ( ७. १५ ) शुनःशेपाच्या बापाचें नांव म्हणून हा शब्द आला आहे. हा सूयवस्चा मुलगा असावा.

[२] अभ्यग्नि ऐतशायन.—याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत ( ६. ३३) आला आहे. याच्या बापाचें नांव ऐतश. आपल्या मुलापुढें कांहीं मंत्रपठण करीत असतां ते मंत्र अश्लील आहेत असें समजून त्याचा मुलगा अभ्यग्नि यानें त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याचें मंत्रपठण बंद पाडलें त्यामुळें यानें रागावून तुझें कुल अत्यंत पापी होईल असा शाप दिला व त्याप्रमाणें सर्व और्व कुलांतील त्या ऐतशायन पुत्र अभ्यग्नीला व त्याच्या संततीला पापिष्ट समजूं लागलें असें तेथें म्हटलें आहे. शांखायन ब्राह्मणांत ( ३०. ५ ) वरील प्रमाणेंच गोष्ट असून तेथें ऐतशायनाला और्वकुलोत्पन्न न म्हणतां भृगुकुलोत्पन्न म्हटलें आहे. और्व व भृगु यांचा अगदीं निकट संबंध अथवा एकाच कुलाच्या या दोन शाखा असाव्या. ऋग्वेदापासून यांचा एकत्र उल्लेख आढळतो.

[३] अश्वतर अश्वि.—ऐतरेय ब्राह्मणांत ( ६. ३० ) हें बुलिल याचें पितृप्राप्त नांव आहे. सायणमतानें हा अश्व याचा मुलगा व अश्वतर याचा वंशज आहे. सत्रांतील कांहीं शंसनासंबंधीं गौश्ल याच्या बरोबर याचा कांहीं संवाद झाल्याबद्दल तेथें उल्लेख आहे.

[४] आत्रेय.— बृहदारण्यकोपनिषदांत ( २. ६, ३ ) मांटीचा शिष्य म्हणून याचा उल्लेख आहे. ऐतरेय ब्राह्मणांत ( ८. २२ ) अंग राजाचा पुरोहित म्हणून एका आत्रेयाचा उल्लेख आहे. शतपथ ब्राह्मणांत ( १. ४, ५, १३ ) गर्भाला अत्रि म्हटलें आहे व गर्भरूप ऋतूचा स्राव होणाऱ्या (ऋतुमती ) स्त्रीला आत्रेयी म्हटलें आहे.

[५] आरुणि.—उद्दालक याचें हें पैतृक नांव आहे. याचा उल्लेख जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण (२. ४, १) आणि काठक संहितेंत [१३. १२ ) आहे.

[६] आरुणेय.— औपवेशि याच्या कुलांतील उद्दालक आरुणि याचा मुलगा श्वेतकेतु याचें हें पितृप्राप्त नांव आहे. याचा शतपथ ब्राह्मण [ १०. ३, ४, १ ] व छांदोग्य उपनिषद् [४. ३, १] यांत उल्लेख आहे.

[७] आर्तभागीपुत्र.—बृहदारण्यकोपनिषदांत ( ६.५२) हा शौंगीपुत्र याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे. आर्तभागी पुत्र व शौंगीपुत्र हीं दोनहि नांवें मातृप्राप्त म्हणजे मातेच्या नांवावरून आलेलीं आहेत.

[८] आविक्षित.—मरुत्त याचें पितृप्राप्त नांव. याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत [ १३. ५, ४, ६ ] व ऐतरेय ब्राह्मणांत ( ८. २१ ) आला आहे. या मरुत्ताचें कामप्रि असें दुसरें नांव होतें.

[९] आश्वत्थ्य.—अह्रीना याचें पितृप्राप्त नांव. याला सावित्राग्नीसंबंधीं ज्ञान असल्याबद्दल तैत्तिरीय ब्राह्मणांत (१०. ९, १०) उल्लेख आहे. तेथें हा सावित्राग्नीच्या ज्ञानानें, हिरण्मय रूप होऊन स्वर्गास गेल्याचा उल्लेख आहे.

[१०] आह्नेय.—शौच याचें मातृप्राप्त नांव. स्वाध्याया संबंधीं जे नियम आहेत त्यांत ग्रामाच्या बाहेर जाऊन अध्ययन करावें असा नियम आहे. परंतु ग्रामाबाहेर जाणें शक्य नसेल तर ग्रामांतच अध्ययन करावें असें मत याचें असल्याचा तैत्तिरीय आरण्यकांत (२. १२) उल्लेख आहे.

[११] उद्दालक आरुणि.—अरुणाचा मुलगा उद्दालक हा मोठा प्रसिद्ध अध्यापक होऊन गेला. शतपथ ब्राह्मणांत (११-४, १२ ) उल्लेखिल्याप्रमाणें तो कुरुपंचालापैकीं ब्राह्मण होता या विधानाला तो प्रोतिकौसुरु बिंदिकौशांबि ( शतपथ १२, २, २, १३ )याचा गुरु असून त्याचा मुलगा श्वेतकेतु हा पंचालांच्या सभेंत प्रवाहणपुत्र जैवलि राजा याच्या बरोबर वाद करावयास गेल्याबद्दल बृहदारण्यकांत [ ६. २, १ ] जो उल्लेख आहे त्यानें दृढता येते. याचा पिता अरुण हा पातंचल काप्य याचा शिष्य असून प्रसिद्ध याज्ञवल्क्य वाजसनेय आणि कौषीतकि याचा शिष्य होता (बृह० ३. ७, १) दुसऱ्या एका स्थलीं याला ( बृह० ३. ७, २२ ) याज्ञव-

ल्क्यानें निरुत्तर केल्याचा उल्लेख आहे. यानें प्राचीनयोग्य शौचेय ( शतपथ ११. ५. ३. १ ) आणि भल्लातशात्रव भद्रसेन ( शतपथ ५. ५, ५. १४ ) यांना वादांत जिंकिल्याचा उल्लेख आहे तो गौतम हाच असावा असें शतपथ ब्राह्मण ( ११ ५. ३, २ ) आणि कौषीतकि उपनिषद् (११ ) यांत उल्लेख आहे. त्याची धार्मिक व तत्त्वज्ञानासंबंधीं विशिष्ट मतें प्रमाण मानिलीं जात असा बद्दल शतपथ ब्राह्मणांत [ १. १,२,११; ३. ३, ४, १९ ], बृहदारण्यक उपनिषदांत ( ३. ५, १ ) छांदोग्य उपनिषदांत [३. ११, ४]व ऐतरेय ब्राह्मणांत उल्लेख आहे. गेल्डनेर म्हणतो कीं, मैत्रायणी संहितेंत याचा व याचा बाप अरुण याचाहि उल्लेख आहे. वेबर म्हणतो कीं याचा उल्लेख काठक संहितेंत [ ७. ८ ] हा दिवोदास भैमसेनि याच्या समकालीं असल्याबद्दल व जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत वासिष्ठाला चैकितान याच्याकडे उपदेश घेण्यासाठीं गेल्यावर व तेथें त्याला गौतम या नांवानें संबोधिल्याचा [ १ ४२, १ ] उल्लेख आहे. तैत्तिरीय संहितेंत (७. २, ३१) कुसुरुबिंद औद्दालकि [ उद्दालक पुत्र ] याचा उल्लेख आला आहे आणि तैत्तिरीय ब्राह्मणांत [ ३. ११, ८ ] ज्याला भाष्यकार सायण उद्दालक म्हणतात तो नचिकेतस् वाजश्रवस गौतम याचा मुलगा होता. आपस्तंब सूत्रांत एका गोष्टींत त्याचें मत प्रमाण म्हणून मानलें आहे आणि ही गोष्ट आरुणीच्या कालाविषयीं महत्त्वाची आहे.

१२ऐभावत.—इभावताचा वंशज. हें प्रतीदर्श याचें पितृप्राप्त नांव असल्याबद्दल शतपथ ब्राह्मणांत [ १२.८,२३ ] उल्लेख आहे.

१३ऐरावत.—इरावताचा वंशज. धृतराष्ट्र सर्पासुर याचें हें पितृप्राप्त नांव असल्याबद्दल पंचविंश ब्राह्मणांत [ २५. १५ ३ ] उल्लेख आहे. त्यांत वर्णिलेल्या सर्पसत्रांत हा ब्रह्मा नामक ऋत्विज होता.

१४औदन्य.—उदन्य अथवा ओदन याचा वंशज. शतपथ ब्राह्मणांत [ १३ ३,५,४] ब्रह्महत्येसंबंधीं प्रायश्चित्त सांगणारा मुंडिभ याचें हें पितृप्राप्त नांव आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत [३.९,१५;३] याचा उल्लेख आहे परंतु तेथें तो भ्रूणहत्येच्या पातकासंबंधीं प्रायश्चित्त सांगणारा म्हणून आला आहे.

१५औदुंबरायण.—उदुंबराचा वंशज. निरुक्तांत [ १. १ ] एक वैयाकरणि म्हणून याचा उल्लेख आहे.

१६औपमन्यव.— हें नांव पुष्कळ अध्यापकांना लावलेलें आढळून येतें. बौधायन श्रौतसूत्रांत [ २२.१ ] एका मंत्राच्या पठणासंबंधीं नियम सांगणारा म्हणून याचा उल्लेख आला आहे. यास्काचार्यांच्या निरुक्तांत एक व्याकरणकार म्हणून याचा उल्लेख बऱ्याच ठिकाणीं आला आहे पक्ष्यादिकांचीं जीं नांवें पडतात तीं त्या पक्ष्याचा जो ध्वनि असतो त्यावरून पडतात या मताचा औपमन्यव यानें तेथें निषेध केला आहे.

१७औपवेशि.— उपवेशाचा वंशज. उद्दालकपिता अरुण याचें हें पितृप्राप्त नांव. याचा उल्लेख काठक संहितेंत ( २३.१० ) आला आहे.

१८औपोदिति.—उपोदित याचा वंशज. तैत्तिरीय संहितेंत तुमिंजय याचें हें पितृप्राप्त नांव आहे (१.७,२;१ ) बौधायन श्रौतसूत्रांत कुरूंचा स्थपति ( सेनानी ) व्याघ्रपाद याचा मुलगा गोपालायन याचें हें पितृप्राप्त नांव आहे. शतपथ ब्राह्मणांत ( १.९,३;१६ ) उपोदिता नामक ऋषीचा मुलगा म्हणून औपोदितीचा उल्लेख आला आहे.

१९और्णवाभ.—ऊर्णवाभीचा वंशज. बृहदारण्यकोपनिषदांत ( ४.५,२६ ) कौण्डिन्य याच्या शिष्याचें हें नांव आहे. यास्काच्या निरुक्तांत याचा उल्लेख आलेला आहे. तेथें दोन ठिकाणीं (७.१२; ) तो नैरुक्त नामक व्याकरणकारांच्या मताचें अनुकरण करतो व दोन ठिकाणीं ( ६.१३;१२;१ ) ऐतिहासिक यांच्या मताचें अनुकरण करतो. यावरून सीज म्हणतो कीं, हा सर्व संग्राहक असा होता.

२०कृशांव स्वायव लातव्य.— पंचविंश ब्राह्मणांत ( ८.६.८ ) याचा उल्लेख आला आहे. याचें स्पष्ट नांव म्हणजे लातव्य कुलांतील स्वायूचा मुलगा कृशाल्व असें आहे. तेथें एका सामासंधानें याचा उल्लेख आला आहे.

२१काक्षसेनि.-कक्षसेनपुत्र, पंचविंशब्राह्मणांत(१.१.१२) अभिप्रतारिन् याचें पितृप्राप्त नांव म्हणून उल्लेख आहे. याचा दृत ऐंद्रोत याच्याबरोबर ज्ञानी व अज्ञानी लोकांच्या संबंधीं संवाद झाल्याचा उल्लेख आहे.

२२कात्यायनीपुत्र.—गौतमीपुत्र व कौशिकीपुत्र यांचा हा शिष्य असल्याबद्दल बृहदारण्यकोपनिषदांत( ६. ५, १) उल्लेख आहे. शांखायन आरण्यकांत (८.१०) जातूकर्ण्य नामक एका कात्यायनीपुत्राचा उल्लेख आहे.

२३कापिलेय.--ऐतरेय ब्राह्मणांत [७.१७] शुनःशेपाला विश्वामित्रानें मृत्यूपासून सोडविल्यानंतर आपल्या मांडीवर घेतलें. त्याचा बाप अजीगर्त हा शुनःशेपाला परत मागूं लागला असतां 'शुनःशेप हा माझा मुलगा आहे, व हे कापिल आणि बाभ्रव याचे बंधु आहेत' असें विश्वामित्रानें उत्तर दिल्याचा तेथें उल्लेख आहे. यावरून कापिल व बाभ्रव हे विश्वामित्राच्या कुलांतलि असावेत असें दिसतें.

२४काप्य.—( कपिवंशज) जैमिनीय ब्राह्मणांत (३.२,३३) बिभिंदुकीय यांच्या सत्रांत आर्त्विज्य करणाऱ्या सनक आणि नवक यांचें पैतृक नांव. बृहदारण्यकोपनिषदांत (३.२,१ ) पातंचल याचेंहि काप्य हें पैतृक नांव आहे.

२५कावन्धि.— कबन्धाचा वंशज. गोपथब्राह्मणांत ( २.१०,१८ ) याचा उल्लेख आहे. तेथें याला अथर्वण असें म्हटलें असून पहिल्या उतान्यांत ( २.९ ) मातेच्या आज्ञेवरून तो मांधाता यौवनाश्व नामक सार्वभौम राजाच्या यज्ञाला गेला आणि तेथें त्यानें यजमान व ऋत्विज यांना

कांहीं प्रश्न विचारल्याचा उल्लेख आहे आणि दुसऱ्या उतारयांत (२.१८) अग्न्याधानासंबंधीं आख्यायिकेंत जलापासून उत्पन्न झालेल्या ज्या अश्वापासून बारहि वेद भीति पावले त्या अश्वाचें या काबन्धीनें शमन केल्याचा उल्लेख आहे. याला विचारिन् असेंहि दुसरें नांव आहे.

२६ का म ला य न.—कमलाचा वंशज. उपकोसल याचें पितृप्राप्त नांव. ह्या उपकोसलानें सत्यकाम जाबाल याच्या घरीं बारा वर्षें अध्ययनासाठीं राहून त्याच्या अग्नीची परिचर्या केली. परंतु सत्यकामानें याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला नाहीं. शेवटीं अग्नीनें प्रसन्न होऊन याला उपदेश केला.

२७ का श्य प.—हें एका विस्तृत अशा कुलाचें नांव आहे. शतपथ ब्राम्हण (७.५,१;५) प्रजापतीनें उत्पन्न केलेल्या सर्वच प्रजा काश्यप (कश्यपकुलोत्पन्न) आहेत असें म्हटलें आहे.

२८ कृ ष्ण दे व की पु त्र.-छांदोग्योपनिषदांत (३. १७, ३) पुरातन अशा घोर आंगिरसाचा हा शिष्य असल्याचा उल्लेख आहे. ग्रेअर्सन, व्हानश्रोडर आणि दुसरे कांहीं लेखक म्हणतात कीं, मागाहून जो अवतारी कृष्ण झाला आहे तो व छांदोग्य उपनिषदांतील देवकीपुत्र कृष्ण हे एकच.त्यांच्यामतें हा मागील कृष्ण ब्राम्हणधर्मविरोधक व क्षत्रियधर्मप्रवर्तक असा होता (?) हें विधान अत्यंत शंकनीय आहे. ही जी दोन नांवांची साम्यता दिसते ती आकस्मिक घडून आली असावी. अवतारी कृष्ण आणि उपनिषदांतील कृष्ण यांचा सेंटपीटर्सबर्ग कोशाप्रमाणें एकवाक्यता करणें अगदीं अयोग्य आहे.

२९ कौ त्स.—कुत्सवंशज. शतपथ ब्राम्हणांत [१०. ६, ५, ९] महित्थि याचा शिष्य म्हणून याचा उल्लेख आहे. निरुक्तांत [१. १५] वेद अनर्थक [अर्थरहित] आहेत या कौत्साच्या मताचा निषेध दाखविला आहे.

३० कौ शां ब य.-कुशांब वंशज. सेंटपीटर्सबर्ग कोश व शतपथ ब्राम्हणाप्रमाणें(१२ २,२, १३) प्रोती याचें पितृप्राप्त नांव पंचविंश ब्राम्हणांतहि (८.६,८) एका कुशांबु नामक मनुष्याचा उल्लेख आहे. तेथें त्यावरील टीकाकार हरिस्वामि हा याला कौशांबी नगरीचा रहिवासी असें म्हणतो व तें बरोबर दिसतें.

३१ कौ शि क.—कौशिक हें कुलनाम पुष्कळ लोकांनां लावल्याचें आढळतें. कांहीं ठिकाणीं इंद्राला कुशिक म्हटलें आहे व विश्वामित्रालाहि कुशिकपुत्र म्हटलें आहे. बृह० उपनिषदांतलि परंपरेंत हा कौण्डिन्य याचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

३२ कौ षा रु व.—मैत्रेय याचें पितृप्राप्त नांव ऐतरेय ब्राम्हणांत (८.२८) याचा उल्लेख आला आहे. यानें सुत्वनकैरिशि भार्गायण नामक राजाला 'शत्रुविनाशक अशा परिमर नामक विशिष्ट कर्माचा उपदेश केला.

३३ कौ षी त कि.— कुषीतक वंशज. याच्या नांवावर कौषीतकी ब्राम्हण आरण्यक, शांखायन श्रौत व गृह्य सूत्रें इत्यादि ग्रंथ असून त्यांतून याच्या मतांचा उल्लेख येतो. याशिवाय याचा शतपथ ब्राम्हणांत (२. ४, ३, १) उल्लेख आहे. कौषीतकीच्या मताला कौषीतकि मत असें म्हणतात. कौषीतकीच्या शिष्यांनां 'कौषीतकिः' असें म्हणत आणि लुशाकपि यानें या शिष्यासह कौषीतकीला शाप दिल्याबद्दल पंचविंश ब्राम्हणांत (१७.४, ३) उल्लेख आहे.

३४ कौ सु रु बि न्दि.—शतपथ ब्राम्हणांत प्रोति कौशाम्बेय याचें पैतृक नांव म्हणून याचा उल्लेख आहे. गोपथ ब्राम्हणांत [१, ४, २४] एका कौशाम्बेय कौसुरुबिंदूचा उल्लेख आला आहे.

३५ क्षे म धृ त्व न् पौ ण्ड री क.— यानें सुदामन् नदीच्या तीरावर यज्ञ केल्याबद्दल पंचविंश ब्राम्हणांत (२२. १८, ७) उल्लेख आहे.

३६ खं डि क औ द्धा रि.—शतपथ ब्राम्हणांत (११. ८, ४, १) आणि मैत्रायणि संहितेंत (१.४,१२) केशिन् यानें खंडिक औद्धारि याचा पराभव केल्याबद्दल उल्लेख आहे. बौधायन श्रौतसूत्रांतहि केशिन् याचा शत्रु असलेल्या एका खण्डिकाचा उल्लेख आहे.

३७ गा र्ग्य.—बृहदारण्यक(२.१,१)आणि कौषीतकी आरण्यक (२.१) यांत बालाकि याचें पितृप्राप्त नांव म्हणून उल्लेख आला आहे तैत्तिरिय आरण्यकांत गार्ग्य हा पंचकर्ण वात्स्यायन व सप्तकर्ण प्लाक्षि यांनां योगमार्गानें महामेरूवर जाण्यास सांगत असल्याचा उल्लेख आहे. (१. ७,३) गार्ग्यांचा उल्लेख निरुक्तांत आणि धर्मसूत्रांतहि आढळतो.

३८ गै रि क्षि त् औ चा म न्य व.—हा उच्चामन्यूचा वंशज. याचा पंचविंश ब्राम्हणांत (१०. ५,७) उल्लेख आहे. तेथें याचा अभिप्रतारिन् काक्षसेनी याच्याबरोबर संवाद झाल्याचा उल्लेख आहे-

३९ गि र ज बाभ्र व्य.—ऐतरेय ब्राम्हणांत याचा उल्लेख आहे. [७. १.] हा श्रुत नामक ऋषीचा मुलगा असून सत्रांतील यज्ञिय पशूचे इडारूप अवयव [हविःशेष] सर्व ऋत्विजांनीं कस कसे वाटून घ्यावे याची माहिती त्याला एका गंधर्वा(अमनुष्या)पासून मिळाली व ती त्यानें पुढें सर्व लोकांनां विदित केली असा उल्लेख आहे.

४० गौ त म.—हें एका कुलाचें अथवा गोत्राचें नांव आहे. बृहदारण्यकोपनिषद्, छांदोग्य उ० वंशब्राम्हण, व जैमिनीय उपनिषद् ब्राम्हण यांतील वंशांत गौतम कुलांतील अनेक ऋषींचा उल्लेख आला आहे.

४१ गौ पा ला य न.—मैत्रायणी संहितेंत (३. ८, १०, ४) व ऐतरेय ब्राम्हणांत [३.४८] शुचिवृक्ष याचें हें पितृप्राप्त नांव आहे. या शुचिवृक्ष गौपालायनानें वृद्धद्युम्न नामक राजाच्या यज्ञांत एक विशिष्ट याग समुच्चयरूपानें करून त्या राजाला संतति व संपत्ति प्राप्त करून दिल्याचा ऐतरेय ब्राम्हणांत उल्लेख आहे. बौधायन श्रौतसूत्रांत कुरूंचा जो स्थपति त्याचें देखील

हें पितृप्राप्त नांव आहे. पंचविंश ब्राम्हणांत ( १२.१३, ११) उपोदिति अथवा औपोदिति याचें गौपालेय असें पितृप्राप्त नांव आहे.

[४२] गौ श्रा य णि.—कौषीतकि ब्राम्हणांत ( २३.५) जाबा-सत्रांत चित्र गौश्रायणी नामक एका पुरोहिताचा उल्लेख आहे.

[४३] चे ल क शा ण्डि ल्या य न.—शतपथ ब्राह्मणांत एका विशिष्ट कर्मासंबंधीं मताचा प्रवर्तक म्हणून याचा आलेला उल्लेख[१०. ४, ५, ३ ] आहे.

[४४] चै कि ता ने य.—जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत[१ ४२, १] वासिष्ठ चैकितानेय या नांवाचा एक सामविद्येचा अध्यापक असल्याचा उल्लेख आहे. बृहदारण्यकोपनिषदांत [१.३, २४] सामासंबंधीं उल्लेखांत वसिष्ठ चैकितानेयाचा नामनिर्देश केलेला आढळतो. याचा षड्विंश ब्राह्मणांतहि उल्लेख आहे. उपनिषदांत शंकराचार्य टीकेमध्यें हा शब्द वडिलांच्या नांवावरून झाला आहे असें म्हणतात. महाभारतांत चैकितान असें नांव आढळतें. कदाचित् त्यावरूनहि चैकितानेय हें नांव झालें असावें.

[४५] ज न शा र्क रा क्ष्य —शतपथ ब्राह्मण [१०. ६, १, १] व छांदोग्योपनिषदांत[ ५. ११, १] याचा उल्लेख आहे. हा औपवेशि व त्याचा मुलगा उद्दालक आरुणि याचा समकालीन होता.

[४६] ज ल जा तू .. र्ण्य.-शांखायन श्रौतसूत्रांत [१६.२९,६] यानें काशी, विदेह, व कोसल या लोकांचें अथवा राजांचें पौरोहित्य केल्याबद्दल उल्लेख आहे.

[४७] जा तू क र्ण्य.– हें बऱ्याच ऋषींचें पितृप्राप्त नांव आहे.जातूकर्ण्य हें नांव आसुरायण व यास्क यांच्या शिष्यांनां दिलेलें बृहदारण्यकांत आढळतें. शांखायन आरण्यकांत हा जातूकर्ण्य कात्यायनीचा मुलगा असल्याचा उल्लेख आहे[८.१०] कौषीतकी ब्राह्मणांत [२६.५] अलीकयु वाचस्पति व इतर ऋषि यांचा हा समकालीन असल्याचा उल्लेख आहे. ऐतरेय आरण्यक व शांखायन श्रौतसूत्रांत याचा उल्लेख आलेला आहे.

[४८] जै न.—याचा पंचविंश ब्राह्मणांत (१३.३१२)उल्लेख आला आहे हें वृष यांचें पितृप्राप्त नांव आहे. हा वार्श नामक सामाचा द्रष्टा आहे, सायणांनीं [ ऋ. ५.२ ] या सूक्तावरील भाष्यांत शाट्यायन ब्राह्मणांतील एक आख्यायिका दिली आहे तीमध्यें वृष हा इक्ष्वाकुकुलोत्पन्न त्रसदस्यु नामक राजाचा पुरोहित होता.एकदां वृष राजासह रथ हांकीत असतां त्या रथाच्या चकाखालीं चेंगरून एक ब्राह्मणाचें मूल मृत झालें. हें मूल कोणाच्या हातून मारलें गेलें याबद्दल राजा व पुरोहित यांमध्यें थोडा वादविवाद होऊन शेवटीं पुरोहिताच्या हातूनच तें मारलें गेलें असा निर्णय ठरल्यामुळें वृषनाकम पुरोहितानें तें मूल वार्श नामक साम पठण करून जीवंत केलें असा उल्लेख आहे पंचविंश ब्राह्मणांतहि हीच आख्यायिका थोड्या फरकानें आली आहे.

[४९] जा न श्रु ते य.—ऐतरेय ब्राह्मणांत [१.२५] हें उपावि नामक ऋषींचें मातृप्राप्त नांव आहे तेथें उपसद इष्टी संबंधीं विधि सांगणाऱ्या दुसऱ्या एका ब्राह्मणग्रंथांतील श्रोत्रिय ब्राह्मण प्रशंसा केलेलें एक वाक्य दिलें आहे शतपथ ब्राह्मणांत [५. १,५] जानश्रुतेय हें औपावि याचें पितृप्राप्त नांव आहे. व तेथें त्यानें वाजपेयानंतर बृहस्पतिसव यज्ञ केल्याचा उल्लेख आहे. जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत हें उलुक्य, नगरिन् व साधक यांचें पितृप्राप्त नांव आहे.

[५०] जा नं त पि.—ऐतरेय ब्राम्हणांत (८.२३ ) महाभिषेक विधि सांगितला आहे. तेथें जानंतपि हा राजा नसतां त्याचा गुरु सात्यहव्य यानें त्याला महाभिषेक केल्यामुळें जानंतपीनें सर्व पृथिवी जिंकिल्याबद्दल उल्लेख आहे.

[५१] जा बा ल.—महाशाल व सत्यकाम यांचें हें मातृप्राप्त नांव असल्याचा शतपथ ब्राह्मणांत [१०, ३, ३, १; १३; ५, ३, १] उल्लेख आहे. जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत याचा दोन ठिकाणीं [३. ७,२,९, ९] उल्लेख असून कौषीतकी ब्राह्मणांत [२३. ५] जाबाल गृहपतीच्या सत्राचा उल्लेख आहे.

[५२] ज्वा ला य न.-जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत(४.१६,१) गोषूक्तीचा शिष्य म्हणून याचा उल्लेख आहे ऋग्वेदांतील या सूक्ताचा गोषूक्ति हा द्रष्टा असल्याचा सर्वानुक्रमणींत उल्लेख आहे.

[५३] दा र्ते य.—या दार्तेयांचा पंचविंश ब्राह्मणांत (२५. ३, ६) यज्ञासंबंधीं यथार्थ असें मत देणारे म्हणून उल्लेख आहे. यांच्या वाक्याला आप्तवाक्य असें नांव. आहे दृति व वातवंत या नांवाच्या ऋषींचें हें पितृप्राप्त नांव आहे. यांनीं खांडववनांत सत्र केल्याचा उल्लेख आहे.

[५४] दा धी च.—दधीच वंशज च्यवनाचें हें पितृप्राप्त नांव आहे पंचविंश ब्राह्मणांत ( १४. ६) याचा उल्लेख आहे हा च्यवन अश्वींचा उपासक असे. अति जरठ असलेल्या या च्यवनाला अश्वींनीं पाण्यांत बुडवून त्याची जरा नाहींशी करून त्याला तरुण केलें असा उल्लेख आहे.

[५५] दा ल्भ्य.—दल्भाचा वंशज. हा शब्द दार्भ्य याचा पर्याय असावा हें पंचविंश ब्राह्मणांत ( १३. १७,८ )केशींचे; छांदोग्य उपनिषद (१.८,१) व जै. उ. ब्राह्मणांत २. ३८,१ चैकितानेयाचें आणि छांदो० उप० [१. २, १३ ] व काठक संहिता [३०.२] यांत बक याचें पितृप्राप्त नांव आहे.

[५६] दृ ति ऐं द्रो त.—पंचविंश ब्राह्मणांत (१४.१, १२;१५) अभिप्रतारिन याचा समकालीन म्हणून उल्लेख आहे याच ग्रंथांत [२५. ३, ६] दृती वातवंतौ असा जो उल्लेख आहे त्यांतील दृति व हा दृति हे बहुतेक एकच असावेत. महाव्रत नामक एका श्रौतकर्माच्या सतत आचरणानें दृतीचा उत्कर्ष झाल्याचा उल्लेख आहे याच्या नांवावर एक सत्र चालू असल्याचा श्रौतसूत्रांतून उल्लेख आहे.

[५७] दृ प्त बा ला कि गार्ग्य.—बृह० उपनिषदांत [२. १,३] काशीच्या अजातशत्रु नामक राजाचा हा समकालीन

असल्याचा व या राजाला उपदेश करण्यासाठीं तो गेल्याचा उल्लेख आहे.

५८ दैव्यांपति.—शांडिल्यायनानें याला अग्निचितीच्या इष्टका [विटा] कशा मांडाव्या याची माहिती दिल्याचा शतपथ ब्राह्मणांत [९. ५, १, १४] उल्लेख आहे. तैत्तिरीय ब्राम्हणांत [२.१०,९, ३,५] अत्यंहसाचा समकालीन प्लक्ष याला दैव्यांपति हेंच तृपप्राप्त नांव दिलें आहे.

५९ दैवल.—असिताचें पितृप्राप्त नांव. याचा पंचविंश ब्राह्मणांत [४.११,१८] उल्लेख येतो. हा एका सामाचा द्रष्टा आहे. या सामाच्या योगानें याला भूः भुवः स्वः या तीन लोकांचें अंतर्ज्ञानानें अवलोकन करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें.

६० पांचि.—शतपथ ब्राह्मणांत [१, २, ५, ९] सोमयज्ञांतील वेदि तीन अंगुलें खणण्याचा प्रघात यानें सुरू केल्याचा उल्लेख आहे.

६१ पार्वति.—दक्षाचें पितृप्राप्त नांव. याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत [२, ४, ४, ६] असून यानें दाक्षायण यज्ञ करून राज्य संपादन केलें असें म्हटलें आहे.

६२ पैंग्य.—पिंगाचा वंशज. कौषितकी ब्राह्मणांत अनेक ठिकाणीं यज्ञकर्मासंबंधीं त्याच्या मताचा स्वीकार केलेला आहे. याच्या मताला पैंग्यमत असेंच म्हटलें आहे. शतपथ ब्राह्मणांत [११. ७, २, ८] याचा उल्लेख असून तेथें त्याला पैंग्य मधुक असें म्हटलें आहे. याच्या अनुयायांना निदान (४. ७) आणि अनुपद या सूत्रांत (१. ८) पैंगिन् म्हटलें आहे. आपस्तंब श्रौतसूत्रांत (५. १५, ८) याचा पैंगायणीब्राह्मण असा उल्लेख आहे. आत्रेयी शाखेच्या अनुक्रमणींत पैंग्य हें यास्काच्या वंशाचें नांव असल्याचा उल्लेख आहे. अश्वलायन गृह्यसूत्रांत ब्रह्मयज्ञांग तर्पणांत याचा उल्लेख आहे.

६३ पौंडरीक.—पंचविंश ब्राह्मणांत [२२.१८,७] क्षेमनधृत्वन् याच्या वंशाचें नाव आहे. यानें सुदाम्नी नामक नदीच्या उत्तर तीरावर यज्ञ केल्याचा उल्लेख आहे.

६४ पौरुशिष्टि.— तैत्तिरीय उपनिषदांत [१९. १] तपोनित्याचें हें पितृप्राप्त नांव आहे. तपाचरण हेंच सर्वांत श्रेष्ठ होय, असें याचें मत आहे.

६५ पौष्करसादि.— तैत्तिरीय प्रातिशाख्य [७. १७] व शांखायन आरण्यक यांत [१.७] याचा उल्लेख येतो. आपस्तंब धर्मसूत्रांत व इतरत्र पुष्करसादीचा उल्लेख येतो.

६६ प्राजापत्य.— प्रजावान् याचें पितृप्राप्त नांव. ऐतरेय ब्राह्मणांत [१. २१] याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांतील [१०.१८३] या सूक्ताचा हा द्रष्टा असून प्रवर्ग्य नामक अनुष्ठानांत हें सूक्त पठण केलें असतां संतति प्राप्त होते असें तेथें म्हटलें आहे.

६७ प्राबहि.— कौषीतकी ब्राम्हणांत (२६. ४) यज्ञविधीसंबंधी कर्मविपर्यासाबद्दल प्रायश्चित्त सांगणारा म्हणून याचा उल्लेख आहे.

६८ प्रैयमेध.— प्रियमेधाचा वंशज अथवा त्या कुलांतील लोकांचें नांव. ऐतरेय ब्राम्हणांत (८. २२) अंग राजाचा पुरोहित उदमय याचें पौरोहित्य या प्रैयमेधांनीं केल्याचा उल्लेख आहे. काठक व मैत्रायणी संहितेंत याचा उल्लेख असून याला यज्ञकर्मासंबंधीं विशेष माहिती होती असें म्हटलें आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (२. १, ९, १] तीन प्रैयमेधांचा उल्लेख आहे. गोपथ ब्राह्मणांतहि [१. ३, १५] तीन प्रैयमधांचा उल्लेख आहे. त्यापैकीं एकजण अग्निहोत्र होम एक वेळच (सकाळीं] करीत असे, दुसरा दोन वेळ [सकाळ संध्याकाळ] करीत असे आणि तिसरा तीन वेळ [सकाळ, दुपार व संध्याकाळ] करीत असे. पुढें त्यांच्यामध्यें वाटावाट होऊन दोन वेळ अग्निहोत्रहोम करण्याचें निश्चित ठरलें. तैत्तिरीय ब्राह्मणांतहि थोड्या फरकानें ही कथा आली आहे.

६९ बुधसोमायण.—सोमाचा वंशज. पंचविंश ब्राम्हणांत [२४. १८, ६] यानें दीक्षा ग्रहण केल्याचा उल्लेख आहे.

७० बौधायन.—सूत्रांचा कर्ता. याच्या नांवावर बौधायन श्रौत, स्मार्त व धर्म हीं सूत्रें असून बौधायन श्रौतसूत्रांत याचा अनेक स्थलीं उल्लेख आहे.

७१ भद्रसेन आजातशत्रव.— शतपथ ब्राम्हणांत (५. ५, ५, १४) याचा नाश होण्यासाठीं उद्दलक आरुणि यानें अभिचार कर्मरूप एक याग केल्याचा उल्लेख आहे.

७२ भारद्वाजायन.— पंचविंश ब्राम्हणांत [१०. १२, १] यांचा उल्लेख आहे. या नांवाच्या ऋषींनीं सत्र आरंभिलें असतां या सत्रांतील प्रत्येक दिवसाच्या अनुष्ठानासंबंधीं प्राप्त होणाऱ्या फलाविषयीं ब्रम्ह लोकांनीं यांना प्रश्न विचारल्याचा उल्लेख आहे.

७३ भार्गव.— हें एका कुलाचें नांव आहे. च्यवन, गृत्समद इत्यादिकांना हें कुलनाम दिलेलें आढळतें. शतपथ (४. १, ५, १), ऐतरेय (८. २१), कौषीतकी (२२. ४) पंचविंश (१२. २, २३) इत्यादि ब्राम्हणग्रंथांत यांचा उल्लेख आहे.

७४ भाल्लवेय.— भाल्लवीचा वंशज. इंद्रद्युम्न याचें पितृप्राप्त नांव. याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणांत यज्ञविधीसंबंधी मत देतांना अनेक स्थलीं आला आहे. छांदोग्य उपनिषदांत आत्मविचार करणाऱ्या ऋषींबरोबर याचा उल्लेख असून तेथें त्याला महाशाल असें म्हटलें आहे.

७५ भौवायन.— भुवाचा वंशज. पंचविंश ब्राह्मणांत याचा उल्लेख (२०. १३,४) असून कपिवनाचें हें पितृप्राप्त नांव आहे. हा आयुः अतिरात्र नामक यज्ञ केल्याच्या योगानें समृद्ध झाला असा उल्लेख आहे.

७६ मद्रगार शौंगायनि.— वंशब्राह्मणांत याचा

शिष्य कांबोज औपमन्यव असल्याचा उल्लेख आहे. या दोन्ही नांवांच्या संबंधावरून कंबोज व मद्रास ( मद्र? ) या देशांचा संबंध असावा असें झिमर म्हणतो.

[७७] म हा चा म स्य.— तैत्तिरीय आरण्यकांत ( ७. ५, १ ) याचा उल्लेख आहे. 'भूः भुवः स्वः' या ज्या तीन व्याहृती त्यामध्यें 'महः' या व्याहृतीची यानें भर घातल्याचा उल्लेख आहे.

[७८] म हि दा स ऐ त रे य.— इतरेचा मुलगा व ऐतरेय ब्राह्मण व आरण्यक यांचा कर्ता. याचा ऐतरेय आरण्यकांत वारंवार उल्लेख येतो. छांदोग्य उपनिषदांत ( ३. १६, ७ ) तो एकशें सोळा वर्षें जगल्याचा उल्लेख आहे व तेथें व्याधी ( रोग ) बरोबर याचा संवाद झाल्याचा उल्लेख आहे.

[७९] मा ण्ड व्य.— शतपथ ब्राह्मण ( १०. ६, ५, ९ ). शांखायन आरण्यक ( ७.२ ) आणि आश्वलायन व शांखायन गृह्यसूत्रांत याचा उल्लेख येतो. आश्वलायन सूत्रांतील ब्रम्हयज्ञांगतर्पणविधींत याचा उल्लेख आहे.

[८०] मा ण्डू के य.— ऐतरेय आरण्यकांत व शांखायन आरण्यकांत शूरवीर, ऱ्हस्व, दीर्घ, मध्यम, प्रातीबोधीपुत्र यांचें हें पितृप्राप्त नाव आहे. ऐतरेय आरण्यकांत एका मताचा प्रवर्तक म्हणून याचा उल्लेख आहे. आश्वलायन गृह्य सूत्रांतील ब्रम्हयज्ञांग तर्पणविधींत याचा उल्लेख आहे.

[८१] मा ल्य.— याचा उल्लेख पंचविंश ब्राह्मणांत ( १३. ४, ११ ) आला आहे. हें आर्य यांचें गोत्रनाम आहे. शकरीछंदाच्या गानासंबंधीं यांचें कौणेयाशीं संभाषण झाल्याचा तेथें उल्लेख आहे.

[८२] मौ न.— अणीचिन् यांचें पितृप्राप्त नांव. कौषीतकी ब्राह्मणांत ( २३-५ ) जाबाल गृहपतींच्या सूत्रामध्यें याचा उल्लेख आहे.

[८३] या ज्ञ व ल्क्य.— यज्ञवल्क्याचा वंशज. याचा उल्लेख शतपथ ब्राह्मण कांड १ ते ४ व १० ते १४ यांतून यज्ञकर्मासंबंधीं मत देणारा म्हणून उल्लेख आहे. मध्यंतरीच्या ५ ते ९ या कांडामध्यें शांडिल्याचीं मतें विशेषतः घेतलेलीं आढळतात. बृहदारण्यकोपनिषदांत हा मोठा तत्वज्ञानी होता असा उल्लेख असून विदेहाधिपति जनक याच्या दरबारांत अनेक तत्ववेत्त्यांशीं याचा वादविवाद झाल्याबद्दलहि उल्लेख आहे. ज्या तत्वज्ञानाबद्दल याज्ञवल्क्याचें महत्व वर्णिलें आहे त्यांत तितकें महत्व आहे असें ओल्डेनबर्ग यास वाटत नाहीं व हें ओल्डेनबर्गचें मत मॅकडोनेल यासहि मान्य आहे. याचा उपनिषदांत याचा गुरु जो उद्दालक आरुणि याला यानें वादांत जिंकल्याचा व याला कात्यायनी व मैत्रेयी नांवाच्या दोन बायका असल्याचा उल्लेख आहे. या दोन बायकांपैकीं मैत्रेयी तत्ववेत्ती होती. याज्ञवल्क्याचा शतपथ ब्राह्मण व ऐतरेय आरण्यक या शिवाय फारसा कोठें उल्लेख नाहीं. याज्ञवल्क्य विदेहप्रांतातील राहणारा असावा असें ओल्डेनबर्गचें मत आहे.

[८४] रा थी त र.— तैत्तिरीय उपनिषदांत सत्यवचस् यांचें कुलनाम म्हणून याचा उल्लेख आहे(१९,१ ). बौधायन श्रौतसूत्रांत याच्या मताचा कांहीं ठिकाणीं स्वीकार केलेला आहे.

[८५] रा हू ग ण.— गौतमाचें पितृप्राप्त नांव. याचा शतपथ ब्राह्मणांत ( १.४, १, १०, १८ ) विदेघ माधव याच्या-संबंधात उल्लेख आहे. ऋग्वेद ( १. ८१ ) या सूक्ताचा हा द्रष्टा आहे.

[८६] ला त व्य.— गोपथ ब्राह्मणांत ( १.१३५ ) इंद्रानें प्रजापतीला ओंकारासंबंधीं माहिती विचारली असतां त्यामध्यें ओंकाराचें गोत्र लातव्य असल्याचें त्यानें सांगितलें. पंचविंश ब्राह्मणांत ( ८.६,८ ) कूशांब स्वायव याचें हें पितृप्राप्त नांव आहे.

[८७] ला म का य न.— याचा लाट्यायन ( ४.९,२२ ) व निदान [ ३.१५,२३ ] या सूत्रांत यज्ञकर्मासंबंधीं यथार्थ मत सांगणारा म्हणून उल्लेख आहे. वंशब्राह्मणांत संसर्गजित् याच्या बरोबर याचा उल्लेख आला आहे.

[८८] लौ हि त्य.— हें एका कुलाचें नांव आहे. या कुलांतील बऱ्याच व्यक्तींचा जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत उल्लेख येतो. यावरून या ब्राह्मणग्रंथांचें अध्ययन या कुलांत बरेच होत असावें असें वाटतें.

[८९] वा ज र त्ना य न.— सोमशुष्मन् याचें पितृप्राप्त नांव. यानें सत्राजितपुत्र शतानीक याला महाभिषेक केल्याबद्दल ऐतरेय ब्राह्मणांत [ ८.२१ ] उल्लेख आहे.

[९०] वा ज श्र व स.— शतपथ ब्राम्हणांत ( १०.५,५;१ ) कुश्रीचें व तैत्तिरीय ब्राह्मणांत (३.११,८,१) नचिकेताच्या बापाचें पितृप्राप्त नांव आहे. याचें 'उशन्' असेंहि नांव आहे. परंतु सायण तें विशेषण मानितात.

[९१] वा ज स ने य.— बृह. उपनिषद व जैमिनीय ब्राम्हणांत याज्ञवल्क्याचें पितृप्राप्त नांव म्हणून उल्लेख आहे. शुक्लयजुर्वेदाच्या वाजसनेयि शाखेचा हा प्रवर्तक होय. याचा अनुपद सूत्रांतहि (७.११) उल्लेख आहे.

[९२] वा त्स्या य न.— वत्स्याचा वंशज. मनुष्याच्या मस्तकांत असलेले सप्तप्राण हे सप्तसूर्य होत असें कांहीं विद्वानांचें मत आहे. हे सप्तसूर्य मी प्रत्यक्ष पाहिले असें पंचकर्णे वात्स्यायन म्हणत असल्याचा तैत्तिरीय आरण्यकांत(१.७,२) उल्लेख आहे. वात्स्यायन हा प्रसिद्ध कामशास्त्रावरील सूत्राचा कर्ता आहे.

[९३] वै रू प.— विरूपाचा वंशज. पंचविंशब्राह्मणांत ( ८.९,२१ ) अष्टादंष्ट्राचें पितृप्राप्त नांव म्हणून उल्लेख आहे. हा निपुत्रिक होता परंतु सामाच्या पठनानें याला संतति लाभल्याचा उल्लेख आहे.

[९४] वै शं पा य न.— याचा उल्लेख तैत्तिरीय आरण्यकांत ( १.७,५ ) आला आहे. श्रौतकर्मांत ज्या सप्त होत्यांचा

"उल्लेख येतो ते सात सूर्य अमावेत असे 'सप्तदिशोनानासूर्याः' या ऋग्वेदांत उल्लेखिलेल्या मंत्रांतील अर्थावरून कांहींचें मत आहे व वैशंपायन तर हजारों सूर्य आहेत असे ('यद्यावइंद्र० सहस्रंसूर्याअनु' या मंत्रावरून ) म्हणत असल्याचें तै. अरण्यकांत उल्लेखिलें आहे. आश्वलायन गृह्यसूत्रांत (३.३) ब्रम्हयज्ञांग तर्पणामध्यें याचा उल्लेख येतो.

[95] शा क ल्य.—शतपथ ब्राम्हणांत ( ११.६, ३,३) विदग्धाचें व ऐतरेय आणि शांखायन आरण्यकांत स्थविराचें हें पितृप्राप्त नांव आहे ( सायण मतानें स्थविर हें शाकल्याचें पितृप्राप्त नांव नसून विशेषण आहे ). निरुक्तांत ( ६.१८ ) ऋग्वेदाचें विवरण करणारा म्हणून याचा उल्लेख आला आहे. वेबरच्या मतानें ऋग्वेदपदपाठाचा कर्ता म्हणून प्रसिद्ध असलेला शाकल्य व विदग्ध हे एकच होत. ओल्डेनबर्ग म्हणतो हा शाकल्य ब्राह्मणग्रंथकालानंतर झाला असावा. गेल्डनेरच्या मतानें दोन्ही एकच पण हें मत फारसें संभवनीय नाहीं.

[96] शा ण्डि ल्य.—हें अनेक व्यक्तींचें कुलनाम आहे. सर्वांत प्रसिद्ध शाण्डिल्य म्हणजे शतपथ ब्राह्मणांत ज्याचा यज्ञविधीसंबंधीं मत देणारा म्हणून अनेक वेळां उल्लेख आला आहे तो होय. शतपथ ब्राह्मणांतील पांचव्या व पुढील कांडांत यज्ञविधीसंबंधीं विधींत मत देणाऱ्यामध्यें याचाहि उल्लेख येतो. शतपथ काण्ड दहा यांतील यादींत कुश्रीचा शिष्य व वात्स्याचा गुरु म्हणून याचा उल्लेख आहे. बृह० उपनिषदांतील गुरुशिष्यपरंपरेंत हा कैशोर्य काप्य, वैष्टपुरेय, कौशिक, गौतम, बैजवाप, आनभिम्लात यांचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे.

[97] शा ट्या य न.—याचा उल्लेख शतपथब्राह्मणांत व जैमिनीय उपनिषद ब्राह्मणांत येतो. याला शालायनाचा शिष्य म्हटलें आहे. शाट्यायन नांवाचें एक ब्राह्मण असून त्यांतहि याचा उल्लेख येतो. ओअर्टेलनें असें सिद्ध केलें आहे कीं, हा ब्राह्मणग्रंथ जैमिनीय ब्राह्मणा इतकाच जुना असावा.

[98] शा र्क रा क्ष्य.—शतपथ ब्राह्मणांत व छांदोग्य उपनिषदांत जन याचें पितृप्राप्त नांव आहे. ऐतरेय आरण्यक व तैत्तिरीय आरण्यक यांत याचा अनेकवचनी रूपांत उल्लेख आला आहे.

[99] शि ख ण्डि न् या ज्ञ से न.—याचा उल्लेख कौषीतकी ब्राह्मणांत आला (७.३,) आहे. हें केशिन् दाल्भ्य याचें पितृप्राप्त नांव आहे. तेथें याचा यज्ञदीक्षेसंबंधीं कांहीं लोकांशीं संवाद झाल्याचा उल्लेख आहे. येथें उलवार्ष्णिवृद्ध व इट्न्तकाव्य यांचाहि वरील गोष्टीशीं संबंध असल्याचा उल्लेख आहे.

[100] शै लि नि—शिलालीचा वंशज. शतपथ ब्राह्मणांत ( १३.५,३.३ ) यज्ञविधीसंबंधीं नियम सांगणारा म्हणून याचा उल्लेख आहे. आपस्तंब सूत्रांत ( ८.३,७ ) एका शैलालि ब्राह्मणाचा उल्लेख आहे. अनुपम सूत्रांतहि [ ४.५ ] याचा उल्लेख आहे.

[101] शौ न क.—हें अनेक व्यक्तींचें कुलप्राप्त नांव आहे. शतपथ ब्राम्हणांत इंद्रोत व स्वैदायन यांचें हें पितृप्राप्त नांव आहे. बृहदारण्यकोपनिषदांत रौहिणायनाचा गुरु म्हणून एका शौनकाचा उल्लेख आहे. कौषीतकी ब्राह्मणांत [४.७] एका शौनक नामक यज्ञाचा उल्लेख आहे. छांदोग्य उपनिषदांत [ १.९,३ ] शौनकाचा गुरु अतिधन्वन् होता असा उल्लेख आहे. जैमि० उ० ब्राह्मणांत अभिप्रतारिन् काक्षसेनी याच्या समकालीन एका शौनक कापेयाचा उल्लेख आहे. सूत्रग्रंथ व बृहद्देवता या ग्रंथांत व्याकरणकार व धार्मिक विधीसंबंधीं प्रमाणभूत मत देणारा म्हणून एका शौनकाचा उल्लेख आहे.

[102] श्वे त के तु आ रु णे य.—शतपथ ब्राह्मणांत व छांदोग्य उपनिषदांत कोणा एका आत्रेय श्वेतकेतु गोतमाचा उल्लेख आहे. कौषीतकी ब्राह्मणांत यज्ञविधींत कांहीं चूक घडल्यास त्याबद्दल प्रायश्चित्त विधीच्या बाबतींत सदस्याच्या कर्तव्यासंबंधीं वादग्रस्त विषयांत प्रमाण म्हणून याचें व याच्या बापाचें ( अरुणीचें ) मत स्वीकारलें आहे. हा जरा कल्पक डोक्याचा होता असें दिसतें. कारण ब्रम्हचाऱ्यानें मध खाऊं नये असा निषेध असतां यानें ब्रह्मचाऱ्यानें मध खावा असें मत दिल्याचा शतपथ ब्राह्मणांत ( ११. ५, ४, १८ ) उल्लेख आहे. हा पंचाल लोकांचा राजा प्रवाहणि याचा गुरु व समकालीन होता. हा जनकाचाहि समकालीन होता. जनकाच्या राजदरबारीं जे वादविवाद करणारे ब्राह्मण चमकत असत त्यांत हाहि असे. तो जनकाकडे आला त्यावेळीं त्यानें बरोबर कांहीं ब्राह्मण आणले होते. तो विदर्हांतील राहणारा नसून कुरुपंचालांतील राहणारा होता. शांखायन श्रौतसूत्रांत ( १६. २९, ६ ) याच्या संबंधानें एक गोष्ट आली आहे. जलजातूकर्ण्य हा काशी, कोसल व विदेह या लोकांचा अथवा राजांचा पुरोहित झाला या गोष्टीबद्दल श्वेतकेतूला वैषम्य वाटून त्यानें बापाची निर्भर्त्सना केली व यज्ञकर्मावर फाजिल श्रद्धा ठेवल्याबद्दल दोष दिला कारण त्याच्या मतानें यज्ञ केल्यापासून कीर्तीचा व द्रव्याचा दुसऱ्यालाच लाभ होतो आणि यज्ञ करणारा यजमान कोरडाच राहतो. त्याच्या बापानें त्याला असें उत्तर दिलें कीं, तुझा आरोप मिथ्या आहे. यज्ञविधींची खरी माहिती मलाच आहे. या पुढें तो 'तमेवैतत्कुत्स्नके ब्रह्मबंधो व्यजिज्ञासिषि ' असें म्हणतो. या वाक्याचा अर्थ नीटसा समजत नाहीं, परंतु ' आयुष्यांतील मुख्य ध्येय म्हणजे पौरोहित्य करून धन संपादन करणें हें नसून ज्ञान मिळविणें हें आहे, असा त्याचा भावार्थ असावा असें वाटतें. श्वेतकेतूबद्दल जे उल्लेख आले आहेत ते सर्व वैदिक वाङ्मयांतील उत्तर भागापैकीं म्हणजे ब्राह्मणें, उपनिषदें, सूत्रें यांतील आहेत. तेव्हां आपस्तंब धर्मसूत्रांत याला अवर म्हणजे अलीकडील असें जें म्हटलें आहे तें ठीकच आहे. याचा काल फार अलीकडीलाहि धरणें इष्ट नाहीं. कारण ज्या शतपथ ब्राह्मणांत याचा उल्लेख आहे तें शतपथ ब्राह्मण

पाणिनीच्या पूर्वींचें आहे व पाणिनीच्या कालींहि हें ब्राह्मण फार प्राचीन आहे अशी समजूत होती. तेव्हां याचा काल अदमासें ख्रिस्ती शका पूर्वी ७०० वर्षें जरी धरला तरी तो फार प्राचीन न होता आलीकडीलच होईल.

[१०३] सां जी वी पु त्र.—शतपथ ब्राह्मणाच्या दहाव्या कांडांतील वंशावलींत याचा उल्लेख आहे. बृहदारण्यकांत हा एकदां मांडूकायनीचा शिष्य व एकदा आसुरिवंशाचा शिष्य म्हणून उल्लेख आहे. याच्यामध्यें दोन गुरूंच्या दोन शाखा समाविष्ट होतात. एक शांडिल्यापासून सुरू झालेल्या अग्न्युपासकांची व दुसरी याज्ञवल्क्याची होय.

[१०४] सा य का य न.—शतपथ ब्राह्मणांत ( १०. ३, ६, १०) श्यापर्णाचें हें पितृप्राप्त नांव आहे. बृहदारण्यकोपनिषदांत याला कौशिकायनीचा शिष्य म्हटलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत ( ७. २६ ) श्यापर्ण कुलाचा उल्लेख आहे. विश्वंतर नामक राजा या कुलाचा द्वेष्टा होता.

[१०५] सा व य स.—आषाढाचें पितृप्राप्त नांव. शतपथ ब्राह्मणांत (१. १, १, ७;) याचा उल्लेख आहे. यागाच्या पूर्व दिवशीं यजमानानें कांहीं खाऊं नये कारण त्या दिवशीं, दुसऱ्या दिवशीं होणाऱ्या यागासाठीं देवता यजमानाचें घरीं येऊन बसतात. तरीं त्यांनां हवि अर्पण केल्यावाचून यजमानानें खाऊं नये. असें यानें आपलें मत दिलें आहे.

[१०६] सो म शु ष्म सा त्य य ज्ञि.—शतपथब्राह्मणांत ( ११. ६, २, १) विदेहाच्या जनकाला भेटलेल्या एका फिरस्त्या ब्राह्मणाचें हें नांव आहे. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत (३. ४०, २ ) सत्ययज्ञाचा शिष्य जो प्राचीनयोग्य त्याचेंहि हें पितृप्राप्त नांव असावें.

[१०७] सौ जा त आ रा ह्ळि.—ऐतरेय ब्राह्मणांत ( ७.२२) आहुती संबंधीं विशिष्ट मत देणारा म्हणून याचा उल्लेख आहे.

[१०८] सौ श्र व स.—उपगु याचें पितृप्राप्त नांव. पंचविंश ब्राह्मणांत [ १४. ६, ८] याचा उल्लेख आहे. कुत्स नामक राजाचा हा पुरोहित होता. कुत्स राजानें इंद्राला कोणी हवि अर्पण करूं नयें अशी ताकीद आपल्या राज्यातील लोकांनां दिली होती. उपगुसौश्रवस् हा इंद्रभक्त असल्यामुळें त्यानें चोरून इंद्राला हवि अर्पण केला. तो हवि हातांत घेऊन इंद्र कुत्स राजाकडे जाऊन तुझी आज्ञा निष्फळ झाली. असें म्हणाला कुत्सानें 'तुला हवि कोणी अर्पिला असें विचारतां 'उपगूनें' असें इंद्रानें उत्तर दिलें. हें ऐकतांच रागावलेल्या कुत्स राजानें यज्ञ करीत असलेल्या व सद नामक मंडपांत यजमानाच्या आसनावर बसलेल्या उपगूला औदुंबरी नामक लाकडी दंडानें ताडन करून मूर्छित केलें. नंतर इंद्रकृपेनें तो सावध झाला. अशी कथा पंच०ब्राह्मणांत वरील उताऱ्यांत आली आहे,

[१०९] स्थौ ला ष्ठी वि.—निरुक्तामध्यें ( ७.१४,) एक वैयाकरणी म्हणून याचा उल्लेख आहे.

## सूक्त व सामद्रष्टे [संहितेतर]

[१]अप्रतिरथ
[२]अश्वसूक्ति
अष्टादंष्ट्रवैरूप
आश्वसूक्ति
उक्ष्णोरन्ध्रकाव्य
उदल
उपोदितिगोपालेय
ऋषभ
ऐलूष
कर्णश्रवस् आंगिरस्
[३]कल्याण
कुल्मलबार्हिष
क्षुद्रसूक्त
गर
गोरांगि
गो-षूक्तिन्
गौरिवीतिशाक्त्य किंवा गोरिवीति
निर्यज्व अग्निरस
[४]तुरश्रवस्
दावसु आंगिरस्
दशानभार्गव
देवमुनि
[५]देवातिथि काण्व
[६]द्विगत भार्गव
पतंग प्राजापत्य
[७]परुच्छेप
पर्वत
षष्ठवाह्
प्रजावान् प्राजापत्य
प्लति
बरु
[८]बृहद्गिरी
[९]युक्ताश्व
लुश
[१०]वत्सप्री-भालन्दन
वध्र्यश्व आनूप
[११]वसुक्र
विदन्वंत भार्गव
विश्वसृज
[१२]वैखानस
[१३]शक्ति
शक्ति—आंगिरस्
शमंद आंगिरस्
[१४]शार्ग
शिख व अनुशिख
शुक्ति आंगिरस्
श्रुष्टि आंगिरस्
सुकीर्ति काक्षीवत्
सुहविस् आंगिरस्
हरिपर्ण आंगिरस्

[१] अ प्र ति र थ.—अजिंक्य, व ज्याचा युद्धांत पराभव होत नाहीं अशा इंद्राचें ज्या ऋग्वेदसूक्तांत वर्णन आहे.(१०. १०३) त्या सूक्ताचा हा द्रष्टा असल्याबद्दल ऐतरेय (८. १०) व शतपथ ( ९. २, ३, १ ) ब्राह्मणांत याचा उल्लेख आहे.

[२] अ श्व सू क्ति.—ऋग्वेद(८. १४; १५) या दोन सूक्तांचा द्रष्टा. पंचविंश ब्राह्मणांतहि (१९. ४, १०) हा सामद्रष्टा असल्याचा उल्लेख आहे.

[३] क ल्या ण.—स्वर्गप्राप्तीसाठीं सत्रानुष्ठान करणाऱ्या आंगिरसांनां देवांच्याकडे जाण्याचा जो देवयान मार्ग तो सांपडेना. त्या सत्रानुष्ठान करणारांपैकींच एक कल्याण नामक ऋषि या देवयानासंबंधीं विचार करीत ऊर्ध्व मार्गानें जात असतां वाटेंत त्याला अप्सरांच्यासह झोंपाळ्यावर बसून क्रीडा करीत असलेला एक ऊर्णायु नामक गंधर्व आढळला. त्या गंधर्वाला यानें देवयानासंबंधीं माहिती विचारली असतां देवयान मार्गसाधनभूत अशा एका सामाचा त्यानें उपदेश केला. नंतर त्या कल्याणानें सत्र करणाऱ्या आंगिरसाकडे येऊन "देवयान प्राप्त करून देणारें एक साम मला सांपडलें आहे" असें तो म्हणाला. त्यावर तुला हें साम कोणी सांगितलें असें त्याला आंगिरसांनीं विचारलें असतां हें साम मलाच प्राप्त झालें असें तो म्हणाला. इतर आंगिरसांनां त्या गंधर्वानें सांगितलेल्या

और्णायुव नामक सामांच्या योगानें स्वर्गप्राप्ति झाली. परंतु कल्याण हा या सामासंबंधीं खोटें बोलला म्हणून तो मात्र स्वर्गास गेला नाहीं.

[४] तु र श्र व स्.—पारावत नामक ऋषी इंद्राप्रीत्यर्थ सोमयाग करीत असतां त्यांतील एला तुरश्रवस नामक ऋषीनें दोन सामांच्या योगानें यमुनानदीवर इंद्राला प्रसन्न केलें असतां इंद्रानें फक्त तुरश्रवस्चा हविर्भाग स्वीकारला व इतरांचा स्वीकारला नाहीं.

[५] दे वा ति थि का ण्व.—एकदां अत्यंत दुर्भिक्ष प्राप्त झालें असतां देवातिथि आपल्या मुलांसह अरण्यांत कंदमुळें आणण्यासाठीं गेला होता. तेथें त्याला काकडीची ( कर्कटी ) फळें आढळलीं. त्यानें तेथें एक साम पठण केलें असतां त्या सामाच्या प्रभावानें त्या फलांच्या गाई बनल्या अशी कथा पंचविंश ब्राह्मणांत ( ९. २, १९ ) आली आहे. ऋग्वेद ( ८. ९ ) या सूक्ताचा हा द्रष्टा आहे.

[६] द्वि ग त भा र्ग व.—हा एका सामाच्या पठणानें स्वर्गास गेला व तेथून मृत्युलोकीं परत येऊन त्याच सामाच्या योगानें पुन्हां स्वर्गलोकास गेला असा पंचविंश ब्राह्मणांत ( १४. ९, ३६ ) उल्लेख आहे. त्या सामाचा हाच द्रष्टा होय.

[७] प रु च्छे प.—हा ऋग्वेदांतील पहिल्या मंडळांतील बऱ्याच सूक्तांचा द्रष्टा असल्याबद्दल ऐतरेय व कौषीतकी ब्राह्मण आणि निरुक्त यांत उल्लेखिलें आहे. आपणां दोघांपैकीं मंत्रसामर्थ्य कोणाचें श्रेष्ठ आहे याविषयीं परुच्छेप व नृमेध यांच्यामध्यें वाद उपस्थित झाला. ओल्या लांकडांत जो अग्नि उत्पन्न करील त्याचें सामर्थ्य श्रेष्ठ असें ठरल्यावर नृमेधानें ओल्या काष्ठांत धूर उत्पन्न केला व परुच्छेपानें लांकडाशिवाय अग्नि उत्पन्न केला अशी कथा तै. संहितेमध्यें ( २. ५, ८, ३ ) आली आहे.

[८] बृ ह द्गि रि.—इंद्रानें यतींनां लांडग्याकडून खावविलें असतां त्यांतील शिलक राहिलेल्या तीन यतींनीं आतां आमचें रक्षण कोण करील असे उद्गार काढले असतां 'तुमचें रक्षण मी करतों' असें इंद्र म्हणाला व त्यानें त्या तिघांनां आपल्या जवळ ठेवून वाढविलें आणि त्या प्रत्येकाला ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या विद्या शिकविल्या. वरील तिघांपैकीं एक बृहद्गिरि असून तो इंद्राजवळ ब्रह्मविद्या शिकला असा उल्लेख पंचविंश ब्राह्मणांत ( १३. ४, १५ ) आहे.

[९] यु क्ता श्व.—यानें नुकत्याच जन्माला आलेल्या दोन मुलांनां पळवून नेलें व त्यांचा घात केला. या त्यांच्या दुष्कृत्यामुळें त्याला येत असलेलें वेदाध्ययन नष्ट झालें. नंतर त्यानें वेदाध्ययन पूर्ववत येण्यासाठीं तपश्चर्या केली असतां एका सामाच्या योगानें त्याला वेदाध्ययन पूर्ववत् येऊं लागलें.

[१०] व त्स प्री.—भालंदनाचा वंशज. ऋग्वेदांतील एका सूक्ताचा हा द्रष्टा आहे. याचा उल्लेख पंचविंश ब्राह्मणांत (१२. ११, २५ ) तो एका सामाचा द्रष्टा म्हणून आहे. याच्या नांवावर असलेल्या सामाला वात्सप्र असें नांव असून त्या वात्सप्र सामाचा शतपथ ब्राह्मणांत ( ६. ७, ४, १ ) त्या सामाच्या योगानें यानें प्रजापतीनें निर्माण केलेल्या प्रजा दीर्घायुषी केल्या असा उल्लेख आहे.

[११] व सु क्र.—हा ऋग्वेद (१०.२,७,२९) या सूक्तांचा द्रष्टा असून तो या सूक्तांचा द्रष्टा असल्याबद्दल ऐतरेय ( १.२,२ ) व शांखायन आरण्यकांत ( १. ३, ) उल्लेख आहे.

[१२] वै खा न स.—अनुक्रमणींत हे शंभर असून ऋग्वेदांतील एका सूक्ताचे द्रष्टे असल्याचा उल्लेख आहे. यांच्यापैकीं एकाचें पुरुहन्मन् नांव होतें.

[१३] श क्ति.—सर्वानुक्रमणीप्रमाणें ऋग्वेदांतील सूक्तांचा द्रष्टा. याचा वसिष्ठपुत्र असा जै.ब्राह्मणांत उल्लेख आहे. याच्या संबंधीं कथा भाष्यांत शाट्यायन ब्राह्मणांतील आली आहे ती अशीः-शक्तीनें विश्वामित्राचा पराभव केला. नंतर त्याला जमदग्नीकडून ससर्परी नामक वाणी प्राप्त झाली. पुढें विश्वामित्रानें शक्तीला अग्नींत ढकलून जाळलें आणि पूर्वीचा सूड उगविला. ऋग्वेदांत या कथेला थोडासा आधार सांपडतो. ( ३ ५२, २२). गेल्डनेर यास ही गोष्ट संमत आहे. पंचविंश ब्राह्मणांत (१२.५, १६) एका आंगिरस (कुलांतील )शक्तीचा उल्लेख आहे.

[१४] शा र्ङ्ग.—सर्वानुक्रमणीप्रमाणें ऋ. १० १४२ या सूक्ताचे शार्ङ्ग जरितृ, द्रोण, सारिसृक्व व स्तंबमित्र असे पांच द्रष्टे आहेत. मंडपाल नामक ऋषीच्या शार्ङ्ग, जरितृ इत्यादि मुलांची त्यांच्या प्रार्थनेमुळें खांडववनांतील अग्नीपासून कशी मुक्तता झाली ती हकीकत महाभारतांत [ १. ८, ३,३४ ] आली आहे. सीगनें या भारतांतील कथेचा ऋग्वेदांतील वरील सूक्ताशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. ओल्डेनबर्ग म्हणतो कीं,ही भारतांतील कथाच वरील ऋग्वेदांतील सूक्ताधारें रचिली असावी.

## रा ज की य

### अधिकारी [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | [१] गृहप किंवा | [२] पूर्पति |
| अपवर्ता | गृहपति | पूष्पति |
| अभिनेता | गृहपत्नी | प्रभर्ता |
| अश्वपति | गार्हपत्य | मदपति |
| उग्र | गोपति | [३] मध्यमशी |
| उपमन्त्रिन् (नर्म-सचिव ) | ग्रामजित् | यज्ञपति |
| | ग्रामणी | रथस्पति |
| ऋतुपति | छर्दिष्प | रभ्म |
| ओमास (रक्षक) | जगत्प | राधस्पति |
| क्षेत्रस्यपति | ज्येष्ठराज | वशानी (मुख्य) |
| गणपति | निधापति | वाजपति |
| [गणांचा स्वामी] | नृपति | विभूति |

| | | |
|---|---|---|
| विमान ( अधि- | सत्पति | स्वराज् |
| पति ) | सदस्पति | स्वराज्य |
| [४] विश्पति | सेनानी | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अधिप | ग्रामणी | सत्पति |
| अधिपति | निधिपति | सत्यराज् |
| अधिपत्नी | भागदुघ् ( प्रजे- | ( अन्तःपुरा- |
| अधिराज | पासून कर | धिकारी ) |
| अध्यक्ष | वसूल करणारा | सुमङ्गल |
| आधिपत्य | अधिकारी ) | सुश्लोक |
| क्षत्तृ | संगृहीतृ ( कोशां- | सेनानी |
| क्षत्रपति | ध्यक्ष ) | स्वध्यक्ष |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अधिप | गोपति | विश्पत्नी |
| अधिपति | ज्ञातिमुख | व्राजपती |
| अधिपत्नी | धनपति | शालापति |
| अधिराज | निधिपति | शेवृध |
| अध्यक्ष | निष्कर्तृ | ( पाटील ) |
| अन्नपति | नृपति | सत्पति |
| अभिशस्तिप | पुष्टपति | सेनानी |
| गृहपति | यज्ञपति | स्वपति |
| गृहराज ( गृहाधि- | वित्पति | स्वर्जित् |
| पति ) | विश्पति | |

## राजकीय [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अद्रिबुध | एकराट् | नृपातृ |
| [ दगडी बांध | कोशयी | पिशुन |
| लेला खजिना] | [ खजिना ] | [ राजद्रोही ] |
| अधिप | [८] क्षत्तृ | प्रजा |
| अधिपत्य | [९] क्षोणी | प्रशिष् |
| [६] अधिराज | चर्षणिप्र | [ आज्ञा ] |
| अनुशासन | चर्षणिधृत् | प्रतिमान |
| अभिराष्ट्र | चर्षणिसह | ( प्रतिनिधी ) |
| अमात्य | चित्रिणी | भुज |
| अरज्जु | ( अनेक प्रजा ) | ( पालयित्री |
| ( कारागृह ) | जनराज् | प्रजा ) |
| आभू | त्रिविष्टिधातु | मध्यमशी |
| (कारागृह) | ( त्रिगुणित | ( यथा मध्य |
| उपशिक्षन् | ( प्रतिनिधि ) | स्थितोराजा |
| [७] उपास्ति | दशराजान् | शत्रून्बाधते |
| ऋबीस | दुःशासु | तथा ) |
| [ अंधार | निधि | मंतु |
| कोठडी ] | नृपति | ( मसलत ) |
| मर्यक | विप्रराज्य | ( खजिना ) |
| ( राष्ट्र ) | [१७] वैर, वैरदेय | [१९] संराज |
| [१०] महिष्वत | शतदुर | संराज्ञी |
| ( तुरुंग ) | ( तुरुंग ) | सर्वशास् |
| [११] रम्भ | शतभुजि | साम्राज्य |
| राजक | (शंभर प्राकार | साचिव |
| [१२] राजन् | असलेलें युद्धो- | ( सचिव ) |
| [१३] राजन्य | पयोगी यंत्र ) | सूपायन |
| राज्य | शर्धनीति | स्पश |
| [१४] राष्ट्र | शास | ( गुप्तदूत ) |
| [१५] वसावि | ( अनुशासन ) | स्मदिष्ट |
| (जामदारखाना) | शासन | स्वराज्य |
| वर्म | (आज्ञा) | हितमित्र |
| (किल्ला) | शास्य | (हितकारक |
| [१६] विराज् | [१८] शेवधि- | मित्रयुक्त |
| | | राजा ) |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अनमित्र | पर्वत् | राजा |
| अमात्य | मध्यमशी | [२५] संघा |
| [२०] अभिषेक | मनुष्यविश् | सन्धि |
| अयस्मय | महारथ [ महा- | समिद् |
| [ शृंखला ] | रथी राजा ] | समिति |
| आधिपत्य | राजन् | सम्राज् |
| [२१] ग्राम्यवादिन् | राजा | सभा |
| जानराज्य | [२२] राज्य | सभावत् |
| दुर्ग | राष्ट्र | साम्राज्य |
| दुर्मरायु | राष्ट्रद | सुराष्ट्र |
| दूत | राष्ट्रभृत् | सुषद् |
| दूती | [२३] व्रातपति | सुषेव |
| नाष्ट्र | [२४] संगृहीतृ | सुसभेय |
| निधि | संसद् | सूपायन |
| नृपति | सत्यधर्म | स्वराज् |
| पर्यारिराष्ट्र | (शास्त्रीय | स्वराजा |
| (शत्रुवेष्टित) | धर्मयुक्त- | स्वादुषंसद |
| | | स्वराज्य |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अंतःकोश | इतिहास | [२७] ज्ञातृ |
| (खजिना) | एकराज् | (साक्षादार) |
| अभिराष्ट्र | कोश | ज्येष्ठराज् |
| अयस्मय | जगत्प | दशशाल |
| (शृंखला) | जनता | (तुरुंग) |
| [२६] अराजन् | जनराजन् | द्विराज् |
| आधिपत्य | [सेनानायक] | देवकोश |

धनपाल (खजिनदार)
निधि
निधिप
नेतृ
पंचशल (तुरुंग)
परिभू (पराभावुक)
परिवेशम् (अमात्य)
परिषद्
पौर
प्रजा
प्रतिजान
प्रतिमान (प्रातिनिधि)
प्रतिस्था.
भूत [लब्ध सत्ताक]
मध्यमशी
यमराज्य
[२८] राजकर्तृ
राजकृत् (सचिव)
राजवध
राज्
राज्य
राष्ट्र
राष्ट्रदिप्सु
राष्ट्रभृत्
राष्ट्रभृत्य
राष्ट्री (देवता)
वसुपति
वावाता (राजपत्नी)
विप्रराज्य
वैयाघ्र (राजाचें आसन भूतव्याघ्रचर्म)
व्याघ्रप्रतीक (व्याघ्रतुल्यपराक्रमी राजा)
शेवधि (खजिना)
संसद्
सत्रसद
सधस्थ (राष्ट्र)
सभा
[२९]सभासद्
सभेय
सभ्य
समिति
सम्राज्
संम्राज्ञी
सामित्य
साम्राज्य
सुप्रजा
सूपायन
स्ति वलाहृत किंवा पुत्रादिप्रजा
[३०]स्थपति
स्पश (गुप्तदूत)
स्वराज्
स्वराज्य

[ काठक व मै. सं. ]

[३१] उदाज
[३२]प्रत्येनस्
[३३]क्लेष्क
[३४] शतपति
[३५]समान्त

[ संहितेतर ]

[३६] उग्र
[३७]दशपुरुषमराज्य
[३८] द्वारपाल
[३९] धनधानी
[४०] परिदा
[४१]पालागली
[२] भोज
[४३]भौज्य
[४४] महाभिषेक
[४५] महाराज
[४६] मातृवध
[४७]माहाराज्य
[४८] राजकुल
[४९] राजन्यऋषि
[५०]राजन्यबंधु
[५१]राजपितृ
[५२]राजपुरुष
[५३] राजभ्रातृ
[५४]राजमात्र
[५५]राजाधिराज
[५६]राष्ट्रगोप
[५७] संश्रावयितृ
[८]सचिव
[५९]सभापाल
[६०] स्थाप्य

**सभानामें** [ऋग्वेद]

गातुमती
परिषद्
परिष्टि
भाग
रण्वा
[६१]विदथ
शग्मा
संसद्
[६२]सभा
सभेथ
[६३]समिपि

[१]गृ ह प अ थ वा गृ ह प ति.—ऋग्वेद व तदुत्तरकालीन ग्रंथांत घराच्या मालकाचें हें सामान्य नाम आहे त्याचप्रमाणें घरांतील मालकिणीला गृहपत्नी असें म्हटल्याचा ऋग्वेद अथर्ववेदादि सर्व ग्रंथांतून उल्लेख आहे.

[२]पू र्प ति.—हा शब्द ऋग्वेदांत फक्त एकदाच आला आहे. याचा अर्थ नगरराज, नगरशेट, नगराधिपति, किल्ल्याचा स्वामी असा असावा. कदाचित् ही एक ग्रामणी प्रमाणें कायमची जागाच असावी अथवा कायमची व्यापलेली वसाहत असावी. पूर्पति याचा अर्थ किल्ल्याचा रक्षणकर्ता किंवा स्वामी असाहि असणें संभवनीय आहे. शत्रूंनीं वेढा दिला असतां हा अर्थ संभवतो. ज्या अर्थी हा शब्द फार क्वचित स्थलीं उपयोगांत आणिलेला आहे त्या अर्थी ह्याचा दुसराच अर्थ असावा असें वाटतें.

[३]म ध्य म शी.—हा शब्द ऋग्वेदाच्या एका ऋचेंत आला आहे व तेथें त्याचा अर्थ रॉथनें मध्यस्थ असा घेतला आहे. हा शब्द मध्यस्थ किंवा पंच या कायद्यातील अर्थानें उपयोगांत आणला असावा असें झिमर म्हणतो. लानमन असें सुचवितो कीं हा शब्द 'प्रतिस्पर्धी' किंवा थांबविणारा या अर्थी असावा. व्हिटनेच्या मतें याचा अर्थ अगदीं मधला मनुष्य किंवा पुढारी, मुख्य (म्हणजे ज्यांच्या भोंवतीं त्याचे अनुयायी गोळा होतात तो) असा आहे. गेल्डनेरला मात्र याचा अर्थ परस्पर शत्रू अशा दोन राजांतील मध्यस्थ, तिऱ्हाईत अथवा तटस्थ राजा असा वाटतो. सायणांनीं ऋग्वेद भाष्यांत मध्यस्थानीं असलेला राजा असा अर्थ केला असून अथर्ववेदांतील याच मंत्रावरील भाष्यांत अंतरिक्षांतील वायु असा अर्थ केला आहे व वाजसनेयि संहितेंतील याच मंत्रावरील भाष्यांत उवट व महीधर मध्यमशी शब्दाचा मर्मभागावर घाव घालणारा असा अर्थ करितात.

[४]वि श्प ति —विश् या शब्दाप्रमाणेंच विश्पति या शब्दाचाहि अर्थ अनिश्चित आहे. झिमरच्या मतें ज्याला इंग्रजींत म्हणतात त्या स्थलभागाचा मुख्य असा याचा अर्थ आहे. परंतु हा अर्थ लागू पडेल असे ठिकाण एक सुद्धां नाहीं हें त्यालाहि कबूल आहे व त्यानें स्वमतपुष्ट्यर्थ ज्या लेखाचा हवाला (ऋ. १ ३७, ८) दिला आहे तो लेख त्याच्या मतास खास पुष्टिकारक नाहीं. बहुतेक ज्या ज्या ठिकाणीं हा शब्द आला आहे त्या त्या ठिकाणी या शब्दाचा अर्थ गृहपति म्हणजे घराचा यजमान, सर्व गृहपतींमध्यें श्रेष्ठ असा अग्निदेव, व सभेंतील किंवा लोकांच्या समितिगृहांतील अग्नि असा आहे. हा अर्थ ऋग्वेदांतील ५. ५५, ५ या ठिकाणीं चांगला जुळतो. कारण तेथें एका कुमारिकेच्या प्रियकराला तिच्या आईबापांनां व विश्पतीला निद्रावश करून त्या कुमारिकेच्या जवळ जावयाचें होतें. या ठिकाणीं घरांतील सर्व मंडळी म्हणजे अविभक्त कुटुंबच मानिलें पाहिजे व तसें मानिलें म्हणजे विश्पति हा मुलीच्या बापाहून निराळा म्हणजे मुलीचा आजा किंवा

चुलता असें मानतां येईल. दुसऱ्या एका लेखांत (३.१३,१५) विश्पति म्हणजे विशां ( परवश प्रजेचा ) पति ( राजा ) असा अर्थ लागू पडतो. झिमर म्हणतो कीं या ठिकाणीं राजाच्या निवडणुकीचा उल्लेख आहे. तैत्तिरीय संहितेंतील ( २. ३, १, ३ ) विश्पति शब्दाचा विशांपति (प्रजेचा स्वामी) असाच अर्थ घ्यावा लागतो.

[5]से ना नी.—सैन्याचा पुढारी. ही पदवी राजाच्या सेनापतीला दिलेली होती. हा शब्द ऋग्वेदांत आलेला असून त्याचा उपयोग लक्षणेनें केलेला आहे. त्याचा निर्देश यजुर्वेद संहितेंतील शतरुद्रीय प्रकरण व ब्राह्मणग्रंथ यांमध्येंहि आलेला आहे. तो राजाच्या [ रत्निन् ] रत्नांपैकीं एक आहे. क्षुल्लक लढाईचे प्रसंगी स्वतः राजास जाण्याचा प्रसंग येत नसे. अशा वेळीं तो सेनापतीला स्वतः नेमीत असे. ऐतरेय ब्राह्मणांत सेनापति या पदवीचा उल्लेख आला आहे.

[6]अ धि रा ज्.—हा शब्द प्राचीन वाङ्मयांत राजांचा राजा ह्या अर्थी योजिलेला आढळतो. राजन् हा शब्द राजा, राजपुत्र किंवा राजवंशीय ह्या अर्थी योजिला जातो. पण कोणत्याहि उताऱ्यावरून राजराजा असा स्पष्ट अर्थ होत नाहीं. सर्व बाजूंनीं विचार करतां त्या शब्दाचा अर्थ राजपुत्र नसून राजा असाच करावा लागतो.

[7]उ प स्ति.—ऋग्वेदांत आणि अथर्ववेदांत ह्याचा अर्थ 'आश्रित' असा केला आहे. तदनंतर महाभारतांतहि दुसऱ्या दोन उच्च वर्णांवरील वैश्यांचीं आश्रितावस्था दर्शविणारा शब्द 'उपस्था' म्हणजे 'आश्रित' असा योजला आहे. ऋग्वेदांत एके ठिकाणीं ( ७.१९,११ ) 'स्ति' हाच शब्द उपस्ति ह्या अर्थी योजिला आहे. कोणच्या प्रकारचें आश्रितत्व ह्या शब्दानें दर्शविलें जातें तें नक्की सांगतां येत नाहीं. झिमर असा तर्क करितो कीं, ग्रीक, रोमन, आणि जर्मन ह्यांमध्यें ज्यांच्यामुळें जे लोक आपली स्वतंत्रता गमावित तसे लोक असा याचा अर्थ होतो. यावरून हे आश्रित म्हणजे जित आर्य जातींतील असून ते पुढें राजांचीं कुळें झाले असावे. अथर्ववेदांतील ( ३.५,६ ) उल्लेखावरून असें वाटतें कीं, ह्या शब्दामध्यें रथकार, तक्षन्, सूत आणि ग्रामणी ह्यांचाहि समावेश होत असावा. परंतु ऋग्वेदांतील उताऱ्यावरून असा ध्वनि निघतो कीं, 'स्ति' याचा प्रजा अथवा सर्व राष्ट्र असा अर्थ नसावा. यावरून आश्रित म्हणजे सर्व साधारण प्रजा नसून राजाचे प्रत्यक्ष आश्रयाखालील लोक असावे. झिमरच्या वरील सूचनेप्रमाणें त्या शब्दांत विशिष्ट जातींचाच फक्त समावेश होतो असें नाहीं, तर उच्च जातींचाहि समावेश होत असावा. उदाहरणार्थ दुसऱ्या राष्ट्रांतील परित्यक्त लोक किंवा कांहीं एकांडे महत्वाकांक्षी लोक. खरोखर, सूत आणि ग्रामणी हे राजगृहांतील अधिकारी असत. अथर्ववेदांत ( ३.५,७ ) वर्णन केल्याप्रमाणें जरी स्वतः राजे नव्हते तरी ते राज्यपद देण्याचें सामर्थ्य असलेले पुरुष असत. तैत्तिरीय संहिता, तैत्तिरीय ब्राह्मण आणि काठक संहिता व ऋग्वेदांतील एका उताऱ्यांतहि ह्याचा केवळ लाक्षणिकरीत्या उपयोग केला आहे. अथर्ववेदाच्या पैप्पलाद शाखेच्या ग्रंथांत ( ३. ५, ७ ) वैश्य शूद्र आणि आर्य ह्यांनां उपस्ति असें म्हटलें आहे. तेथें हा शब्द बहुतकरून 'प्रजा' ह्या अर्थी योजिला असावा.

[8]क्ष त्तृ.—ऋग्वेद, तदुत्तरसंहित आणि ब्राह्मण ग्रंथ ह्यांत हा शब्द आला असून त्याचा अर्थ राजपरिवारांतील एक मनुष्य असा आहे. परंतु हा अर्थ थोडा संशयास्पद आहे. ऋग्वेदांत आपल्या भक्तांनां चांगल्या वस्तू वाटणारा, ( देणारा ) ईश्वर असा अर्थ केला आहे. आणि हाच अर्थ अथर्ववेदांत आणि इतरत्र सांपडतो. वाजसनेयि संहितेंत एका ठिकाणीं महीधराच्या टीकेवरून 'द्वारपाल' असा अर्थ निघतो, आणि हा अर्थ दुसऱ्या उताऱ्यावरून शक्य वाटतो. परंतु शतपथ ब्राह्मणांतील एका उताऱ्यावरून सायण ह्याचा अर्थ 'अन्तःपुराध्यक्ष' असा करितो. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं 'सूत' हा अर्थ संभवतो. पुढें क्षत्तृ म्हणजे मिश्रजातिसंभव मनुष्य असा अर्थ होऊं लागला.

[9]क्षो णी.—अनेक वचनी उपयोग केला असतां, सेंटपीटर्सबर्ग कोश आणि लुडविगच्या मतें ऋग्वेदांत पुष्कळ ठिकाणीं ह्याचा अर्थ राजांचे स्वतंत्र अनुयायी असा आहे. पहिल्यानें, अनेकस्त्रिया करण्याची मोकळीक असल्यामुळें गेल्डनेरला वाटलें कीं राजाच्या स्त्रिया असा याचा अर्थ आहे. परंतु नंतर विशिष्ट दैवी स्त्रिया असें त्यानें आपलें मत दिलें आहे.

[10]नि धि.—ऋग्वेदांत आलेल्या ह्या शब्दाचा मूळचा अर्थ ठेवण्याची जागा व नंतर सामान्यतः खजिना असा अर्थ झाला. छांदोग्य उपनिषदामध्यें निधि ह्याचा अर्थ एक प्रकारचें शास्त्र असा आहे.

[11]र म्भ.—ऋग्वेदाच्या एका ( ८.४५, २० ) सूक्तांत काठी किंवा काठीसारखाच आधार या अर्थानें हा शब्द आला आहे. दुसऱ्या ठिकाणीं एका मनुष्याला रम्भिन् असें म्हटलें आहे व ह्याचा वृद्धावस्थेंत आधारासाठीं हातांत काठी घेणारा असा अर्थ असावा. सायणानीं तेथें त्याचा द्वारपाल असा अर्थ केला आहे. पुढील संस्कृत वाङ्मयांत दण्डिन् याचा असाच अर्थ आहे.

[12]रा ज न्.—ऋग्वेदांत आणि तदुत्तर वाङ्मयांत हा शब्द नेहमीं आढळतो, प्राचीन कालीं हिंदुस्थानांत साधारणरीत्या राजशासनपद्धति म्हणजे एकसत्ताक राज्यपद्धतीच अस्तित्वांत होती. आणि याचें कारण आर्य लोक हे प्रतिपक्षीय आणि परराष्ट्रांतून हिंदुस्थानांत आलेले होते. व ग्रीसला पादाक्रांत करणाऱ्या आर्य लोकांप्रमाणें किंवा इंग्लंडला पादाक्रांत करणाऱ्या जर्मन लोकांप्रमाणें या लोकांच्या स्वाऱ्यांचा परिणाम एकसत्ताक राज्यपद्धति दृढ करण्यांत झाला. वेदकालीन एकसत्ताक राज्यपद्धतीचा खुलासा करण्यास झिमरनें

स्वीकारल्याप्रमाणें मूलपुरुषानुबद्ध कुटुंबव्यवस्था पुरेशी नाहीं.

एकसत्ताक राज्यपद्धतीची मुदत.—वेदकालीं राजा हा वंशपरंपरागत असे असें झिमरचें मत आहे. आणि ही गोष्ट वैध्यश्व, दिवोदास, सुदास, पिजवन, पुरुकुत्स, त्रसदस्यु इत्यादि व्यक्तींच्या हकीकतीवरून सिद्ध होते. कित्येक प्रसंगीं राजाची निवड करणारे लोक राजाच्या कुटुंबांतीलच असत कीं सरदारांपैकीं असत हें निश्चयानें सांगतां येत नाहीं आणि हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, निवडणुकीच्या राज्यपद्धतीबद्दल खात्रीलायक असा पुरावाहि नाहीं. झिमरनें असें ध्वनित केलें आहे कीं, या गोष्टीच्या पुष्ट्यर्थ जे उतारे दिले आहेत ते सर्व प्रजेनें केलेली निवड म्हणून मानितां येत नाहींत. परंतु प्रजेनें मान्यता दर्शविण्याच्या पद्धतीला पुष्टि देतात. आणि हाच अर्थ जास्त संभवतो. परंतु या उताऱ्यावरून राजा कधींहि निवडला जात नसे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. राजघराण्यांतील राज्यपदारूढ होण्यायोग्य अशा व्यक्तीला बाजूस सारून दुसरीच व्यक्ति राज्यपदारूढ होण्याची चाल प्रचलित होती हें यास्कानीं निरुक्तामध्यें ( २. १० ) दिलेल्या कुरुकुलोत्पन्न देवापि आणि शन्तनु यांच्या गोष्टीवरून सिद्ध होतें. राजाची सत्ता अत्यंत असुरक्षित होती ही गोष्ट स्पष्ट आहे. राजांनां ज्यांतून हांकून दिल्याविषयीं व राजांनीं आपली सत्ता पुन्हां परत मिळण्याविषयीं खटपट केल्याबद्दल अनेक [ अथर्व ३. ३४; काठक संहिता २८, १; तैत्तिरीय सं. २. ३, १; मैत्रायणी सं. २, २, १; पंचविंश ब्राह्मण १२, १२, ६; शतपथ ब्राम्हण २२. ९, ३३; इत्यादि ] उल्लेख आहेत. अथर्ववेदांत राजाच्या हितासंबंधीं अनेक मंत्र आहेत.

राजाचें लढाईतील कर्तव्य.—ऋग्वेदकालानंतर साहजिकपणें वैदिक वाङ्मयांत राजाच्या साहसी कृत्यांचा फारसा उल्लेख नाहीं. तैत्तिरीय ब्राह्मणांत कुरुपंचाल राजे दिसण्यांत ब्राह्मणासारखे दिसत व ते हिवाळ्यांत लढाईला निघत [ १. ८, ४, १ ] असा उल्लेख आहे असें मॅकडोनेल म्हणतो. हे ब्राह्मणासारखे दिसत असा उल्लेख नाहीं. पण उदाज निदाज या शब्दांच्या अर्थावरून असें दिसतें, राजेलोक लढाईतलि लुटीपैकी भाग स्वतः घेत असत. वैदिक कालांतील लढायांची माहिती ऋग्वेदांत अनेक स्थलीं आली आहे या विभागांतच दाशराज्ञयुद्ध प्रकरणांत ही हकीकत विस्तृत आहे. ज्याप्रमाणें ब्राह्मण आपल्या यज्ञयागादि कर्मांत दक्ष असत त्या[प्रमा]णें क्षत्रियहि लढाईच्या कामांत दक्ष असत लढाईशिवाय देशाचें रक्षण करणें हेंहि राजाचें एक कर्तव्यच असे. त्याल जनतेचें रक्षण करणारा गोपाजनस्य किंवा राजसूय प्रसंगीं म्हटल्याप्रमाणें ब्राम्हणांचें रक्षण करणारा असें म्हटलें आहे. राजाला लढाईत जय मिळावा म्हणून त्याचा पुरोहित मंत्र म्हणत असे व तो स्वतः लढाई करी. कौषितकी उपनिषदांत प्रतर्दन नामक राजा लढाईत मारला गेल्याबद्दलचा उल्लेख आला आहे. राजसूयामध्यें राजाला शहरें उध्वस्त करणारा पुरांभेत्ता असें म्हटलें आहे.

शांततेच्या काळांतील राजा.—लढाईच्या कामीं लोकांनां आपल्या राजाची आज्ञा पाळावी लागे व ते ती पाळीत असत. राजत्वाचें रक्षण त्यांनां करावें लागे. लोकांचें भक्षण करणारा म्हणून राजाचा निर्देश ( ऋ. १. ६५, ४ अथर्व ४. २२, ७ ) करीत, परंतु तो लोकांचा छल करीत असे या अर्थानें नव्हे तर लोकांच्या देणगीमुळें त्याचा व त्याच्या नोकरांचा खर्च चालत असे म्हणून होय. अशाच प्रकारचीं उदाहरणें दुसरीकडेहि सांपडतात. राजे आपले हक्क क्षत्रियांनां देत व अशा प्रकारें सरदारांचा वर्ग अस्तित्वांत आला. साधारणतः क्षत्रियांनां किंवा ब्राह्मणांना कर द्यावा लागत नसे. ब्राम्हणांनां कर द्यावा लागत नसे असा शतपथ ब्राह्मणांत ( १३. ६, २, १८; ) उल्लेख आहे. राजाचें बल लोकांमध्येंच सांठविलेलें असे. राजा हा न्यायाधीशाचीं कामेंहि पहात असे. तो स्वतः कोणत्याहि शिक्षेपासून मुक्त(अदण्ड्य) असे. तो राजदंड धारण करीत असे असा उल्लेख आहे. फक्त फौजदारी गुन्ह्याचाच राजा निवाडा करीत असे. कारण अशा तऱ्हेचे उल्लेख ( गौतम धर्म सूत्र १२. ४३: ) सांपडतात. राजाचे अधिकार केव्हां केव्हां त्याचे अधिकारी बजावीत किंवा एखादा प्रतिनिधि नेमीत असत. काठक संहितेंत ( २७. ४, ) शूद्राला शिक्षा करण्यासाठीं राजन्याला अध्यक्ष म्हणून संबोधिलें आहे. मुलकी न्यायाच्या बाबतींत राजाचे अधिकार बरेच संकुचित असत. आणि या बाबतींत राजा ही न्याय मिळण्याची शेवटची जागा म्हणून मानीत परंतु याबद्दल सबळ पुरावा नाहीं. ऋग्वेदांतील मध्यमशी हा राजानें नेमिलेला न्यायाधीश नसून खाजगी न्यायाधीश किंवा पंच असावा. फौजदारी न्यायाच्या बाबतींत वरुणाच्या हेरांचा बऱ्याच वेळां उल्लेख आला आहे यावरून वैदिककालीं फौजदारी न्यायखात्यासंबंधीं बराच विस्तार झाला होता असें दिसतें. बहुधा अशा प्रकारच्या हेरांचा लढाईच्या वेळींहि उपयोग केला जात असे ( ऋ. ८.४७,११; ) वेदकालीन वाङ्मयांत राजा कायदे करीत असे असा उल्लेख आढळत नाहीं परंतु पुढील वाङ्मयांत मात्र कायदे करणें हें त्याच्या अनेक कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य होतें असें दिसून येतें. प्रत्यक्ष राजाकडे कोणकोणतीं कामें असत हें नक्की सांगतां येत नाहीं. प्रत्येक कार्यामध्यें राजाला बहुतेक आपल्या पुरोहिताची सल्ला घ्यावी लागत असे. राजाच्या दर्जाचीं बाहेरील चिन्हें म्हणजे त्याचा राजवाडा आणि मौल्यवान पोषाख हीं होत. जमीनीसंबंधानें राजाचे अधिकार काय होते हें सांगतां येत नाहीं. यासंबंधीं ग्रीकांचे उल्लेख विशेष स्पष्ट नाहींत. कित्येक वेळां ते म्हणतात राजाला प्रजेकडून कर मिळत असे व कित्येकवेळां म्हणतात कीं, राजाच फक्त जमीनीचा मालक असे. हॉपकिन्सचें असें

मत आहे कीं, प्रजेला स्वसंरक्षणाकरितां राजाला कर द्यावा लागत असे आणि केवळ बाह्यतः राजा जमीनीचा मालक असून खरी मालकी कुटुंबाच्या मुख्याकडेच असे. बेडन पॉवेलचें असें मत आहे कीं, राजा हा जमीनीचा मालक ही कल्पना नंतरची आहे. परंतु हांपकिन्स म्हणतो कीं, वेदकालीं राजा हा लोकांचा भक्षक म्हणून उल्लेख आहे आणि ऐतरेय ब्राह्मणांत ( ८. १२ ) उल्लेखिल्याप्रमाणें राजाकडून वैश्याचा वाटेल तेव्हां अपहार केला जात असे आणि राजे त्यांनां मारूनहि टाकीत असत. परंतु शूद्राप्रमाणें ठार मारीत नसत [ ऐ. ब्राह्मणांत विशांअत्ता अशीं पदें असून प्रजेचा उपभोग घेणारा असा त्याचा सायणांनीं अर्थ दिला आहे. व्यवहार प्रकरणीं सूत्रांत बृहस्पति आणि नारद व त्याच प्रमाणें मानवधर्मशास्त्रहि राजा हा सर्वसत्ताधारी असे ही गोष्ट मान्य करतात ( मानवधर्मशास्त्र ८. ३९; ) राजाला सर्वांचा ईश असें म्हटलें आहे. बुलहर या उताऱ्याचा राजा जमीनीचा मालक होता या मताच्या पुष्ट्यर्थ उपयोग करतो परंतु त्याचा पुरेसा उपयोग होत नाहीं. राजा हा जमीनीचा मालक ही कल्पना मूळांतील नसून इंग्लंडातील प्रमाणें या तत्त्वाची पुढें हळू हळू काति होत गेली असावी. लोकांच्या वित्ताचें हरण करता येणें ही राजकीय सत्ता आहे मालकीचा हक्क नव्हे. याच तत्त्वाचें अनुकरण दक्षिण आफ्रिकेंत आढळतें. तेथें मुख्य अधिकाऱ्याला जमीनींच्या मालकापासून जमीनींची मालकी हिरावून घेतां येते, परंतु खरी मालकी मूळच्या रहिवाश्यांचीच असते हॉपकिन्स म्हणतो गुरूंनां द्यावयाच्या देणग्या म्हणजे जमीनीच असत. राजा नसला म्हणजे अराजकता उत्पन्न होत असे. असा ब्राम्हणग्रंथांवरून अंदाज होतो ( तै. ब्रा. १. ५, ९, १; ऐ. ब्रा. १ १४ ). राजाशिवाय युद्ध करसलें, व आपल्याला राजा नाहीं म्हणून असुर आपला पराभव करतात, असे अनुक्रमे तै. ब्रा. व ऐ. ब्रा- यांत उल्लेख आहेत राजन् हा शब्द ऋग्वेदांत ( ऋ. १. ४०, ८;१०८, ७;१०. ४२,१०;९७,६ )राजघराण्यांतील एकादा पुरुष अथवा सरदार या अर्थानें आला आहे ऋग्वेदांतील कांहीं स्थळावरून ( १०. ९७, ६; ) झिमर असें म्हणतो कीं, लढाईसारख्या विशिष्ट प्रसंगींच वैदिक कालीं राजा ही व्यक्ति अस्तित्वांत असे व शांततेच्या प्रसंगीं जर्मनीच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें सर्व सरदारांनां सारखेच हक्क असत. सरदारांनां राजन् म्हणत परंतु झिमरनें लावलेला अर्थ बरोबर आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

[13]रा ज न्य.—वेदकालीन वाङ्मयांत राजघराण्यांतल्या पुरुषाचें नांव. यांतच सरदारांचाहि समावेश होतो. हा अर्थ एखाद्या उताऱ्यांतून स्पष्ट रीतीनें निघत नाहीं. मुळांत हा शब्द सर्व सरदारांनाहि लावीत. शथपथ ब्राह्मणांत ( ३,१,६,२ ) राजन्य आणि राजपुत्र यांचे निरनिराळे अर्थ दाखविले आहेत. राजपुत्राचा शब्दशः अर्थ राजाचा मुलगा असा होतो. राजन्यांचीं कार्यें आणि स्थान यांचीं वर्णनें क्षत्रिय या सदराखालीं आलेलीं आहेत. तैत्तिरीय संहितेत त्याला ब्राह्मणाच्या आणि ग्रामणीच्या कोटींत बसविलें आहे, आणि तो भाग्याच्या शिखरास पोहोंचला होता म्हणून लिहिलें आहे.

[14]रा ष्ट्र.—ऋग्वेदांत आणि तदुत्तरवाङ्मयांत राज्य किंवा राजाचा प्रदेश या अर्थी हा शब्द आला आहे.

[15]व सा वि.—ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं रॉथच्या मतें ह्याचा अर्थ जामदारखाना असा होतो.

[15]वि रा ज्.—राज्यपददर्शक अशी ही पदवी असून ऋग्वेदामध्यें अनेकदां हा शब्द आलेला आहे. पण अलंकारिक अर्थानें एकदांच हा शब्द आलेला आहे. ही विराज पदवी प्रत्यक्ष अशी ऐतरेय ब्राह्मणांत उत्तर कुरु व उत्तरमद्र ह्यांनां लाविलेली आहे.

[16]वै र व वै र दे य.—हा शब्द वैरदेय असा ऋग्वेदांत आला आहे. या शब्दाचा अर्थ मागाहून झालेले संहिता ग्रंथ व ब्राह्मण ग्रंथ ह्यामध्ये ज्याला इंग्रजांत ( वेरगेल्ड ) असें म्हणतात ( म्हणजे एकाद्या माणसाला ठार मारल्याबद्दल त्याच्या नातलगांनां नुकसानभरपाईदाखल दिलेला पैसा) त्या अर्थानें आलेला आहे. हा अर्थ आपस्तंब व बौधायन धर्मसूत्रातसुद्धां मान्य आहे. दोन्ही सूत्रात क्षत्रियाबद्दल एक हजार गायी, वैश्याबद्दल शंभर गायी. शूद्राबद्दल दहा गायी व ह्याशिवाय प्रत्येकाचे मृत्यूचे वेळीं एक बैल जास्त असें नुकसान भरून द्यावें असें लिहिलेलें आहे हें नुकसान कोणास द्यावें ह्याबद्दल आपस्तंब सूत्रांत स्पष्ट उल्लेख आलेला नाहीं. पण बौधायन सूत्रांत राजाला द्यावें असा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. कदाचित गायी नातलगांना द्याव्या व गुन्हेगाराचें जीवित्व हिरावून घेऊं नये म्हणून खून झालेल्या माणसाच्या नातलगाशीं रदबदली करणारा जो राजा त्याला नजर म्हणून एक बैल द्यावा अशी कल्पना करणें सयुक्तिक होईल. आपस्तंब सूत्रांत बायकांचा खून झाला तर हेंच नुकसान भरून द्यावें असें म्हटलें आहे. पण गौतमसूत्रांत स्त्रियांच्या मृत्यूची योग्यता शूद्राच्या वधाच्या या यते बरोबर ठरविली आहे, व त्याला एकच अपवाद आहे. हें नुकसान जें भरून द्यावयाचें असतें तें वैरयातन किंवा वैरनिर्यासन म्हणजे वैरनिष्कृतीबद्दल करावयाचें असतें. मनुष्यवधाबद्दल नुकसानभरपाई म्हणजे शंभर गायी होत अशाबद्दल ऋग्वेदांतहि उल्लेख आहे कारण त्यांत शतदाय ( ज्याच्या नुकसानभरपाईची किंमत १०० आहे ) असें एका माणसाला लाविलेलें विशेषण आलेलें आहे. निरनिराळ्या माणसाच्या निरनिराळ्या किंमती असत ह्याबद्दल शंका नाहीं. पण शुनःशेपाच्या बाबतींत त्याची किंमत ऐतरेय ब्राह्मणाचे मतानें १०० गायींचें दान ही होय. यजुर्वेद संहितेमध्ये शतदाय हा शब्द पुन्हां आलेला आहे. अशा रीतीनें नुकसानीची किंमत ठरविणें ह्यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं,

ऋग्वेदकालांत व्यक्तिशः खासगी रीतीनें सूड किंवा नुकसानीची किंमत ठरविण्यापेक्षां समाजाचें मत किंवा राजसत्ता त्यांचाच अधिकार शिक्षा देण्याचे कामीं लोक जास्त मानीत. उलटपक्षीं असेंहि म्हणतां येईल कीं, अशी पद्धत त्यावेळीं ज्या अर्थी होती त्या अर्थी राजाचा शिक्षा देण्याचा अधिकार फार दुर्बल होता.

[१८] शे व धि.--ऋग्वेद व तदुत्तरकालीं झालेले ग्रंथ त्यांमध्यें खजिना असा ह्या शब्दाचा अर्थ आलेला आहे.

[१९] स म्रा ज्.--ऋग्वेद व तदुत्तरकालीन ग्रंथ त्यांमध्यें त्याचा अर्थ श्रेष्ठ राज्यकर्ता म्हणजे राजापेक्षां जास्त सत्तेचा उपभोग घेणारा असा आहे. शथपथ ब्राह्मणांत वाजपेय व राजसूय यांबद्दलची जी उपपत्ति दिली आहे तींत असें म्हटलें आहे कीं, समाजाला राजापेक्षां जास्त सत्ता असते. कारण तो वाजपेय यज्ञ करून सम्राज् बनतो. त्यावेळीं बादशहा म्हणजे राजाधिराज् असा शब्द प्रचारांत नसावा. कारण तशी राजकीय स्थिति-जी स्थिति तिसऱ्या शतकांत ( ख्रिस्ती शकापूर्वी ) अशोकाचे वेळीं हिंदुस्थानांत होती तशी 'असण्याचा संभव नाहीं. पण सम्राज् ही पदवी विदेहाच्या जनकाला त्यावेळीं लावीत असत. ऐतरेय ब्राह्मणांत ही पदवी पूर्वेकडील राजांनां लाविली आहे.

[२०] अ भि षे क.--वैदिक कालामध्यें राजाची निवडणूक झाली म्हणजे त्याला मोठ्या समारंभानें अभिषेक करीत, असें तैत्तिरीय, पंचविंश, शतपथ आणि ऐतरेय ब्राम्हण ह्या ग्रंथांमध्यें सविस्तर वर्णन आहे. आणि संहितेंतहि त्याविषयीं मंत्र दिले आहेत. अभिषेकांत पाणी सिंचन करीत असतें ( अभिषेचनीयाआपः ). फक्त राजांनांच अभिषेक केला जात असे, कारण प्रजा अभिषेकाच्या योग्य (अभिषेचनीयाः) नाहीं. पुरुषमेधांय बळींच्या यादींत अभिषेक्तृचा उल्लेख आहे. अभिषेक हा राजसूयामधील एक मुख्य भाग आहे.

[२१] ग्रा म्य वा दि न्.--सामान्यतः' ग्रामन्यायाधीश ' या अर्थी हा शब्द यजुर्वेदांत आला आहे. व ग्राम्यवादिन् याच्या सभेचा उल्लेख मैत्रायणि संहितेंत ( २.१,२ ) आहे.

[२२] रा ज्य.--तैत्तिरीय संहितेंत, अथर्ववेदांत व तदुत्तर ग्रंथांत सार्वभौमसत्ता या अर्थी हा शब्द आहे. शतपथ ब्राह्मणांत ( ५.१,१,१२ ) ब्राह्मणांला सार्वभौम सत्ता मिळत नसे असें लिहिलें आहे. राज्याबरोबरच सार्वभौमसत्तेबद्दलचे दुसरे शब्द आढळतात. शतपथ ब्राह्मणांत असें म्हटलें आहे कीं राजसूय यज्ञ राजानें करावा आणि वाजपेय सम्राटानें करावा सम्राटाचा दर्जा राजापेक्षां श्रेष्ठ आहे. त्याच ब्राह्मणांत सिंहासनावर बसणें हें साम्राटाचें लक्षण मानलें जात असे असें सांगितलें आहे. इतरत्र राज्याच्या उलट स्वाराज्य शब्द योजिला आहे. राजसूयाच्या विधींत ऐतरेय ब्राह्मणांत पुष्कळ शब्द दिले आहेत. राज्य, साम्राज्य, भौम, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य, माहाराज्य आणि आधिपत्य हे शब्द इतरत्रहि सांपडतात. हे शब्द निरनिराळे अधिकार दर्शवितात ह्या म्हणण्याला आधार नाहीं. नृपाधीश असल्याशिवायहि एखाद्या राजाला महाराज किंवा सम्राज् म्हणतां येईल. तो श्रेष्ठ राजा असल्यास किंवा त्यानें आपणास म्हणवून घेतल्यास ( विदेहाच्या जनकाप्रमाणें ) महाराज किंवा सम्राज् ही पदवी त्याला लागत असे. गुप्तासारखे किंवा अशोकासारखे महाराजे वेदकाळीं होते असें मानतां येत नाहीं.

[२३] ग्रा ज प ति.--यजुर्वेद संहितेंत गणपति शब्दाबरोबर हें एक विशेषण आहे. ह्याचा खरा अर्थ अगदीं अनिश्चित आहे. पण झिमर म्हणतो त्याप्रमाणें ह्या शब्दाचा अर्थ चोरांच्या टोळीचा नायक असाहि असूं शकेल.

[२४] सं ग्र ही तृ.--ऋग्वेदोत्तर संहिताग्रंथ व ब्राह्मणग्रंथ त्यांमध्यें हा शब्द आलेला आहे. राजाचे जे कोशाधिकारी असत त्यांपैकीं हा एक कामगार होता. प्रत्येक ठिकाणीं जेथें हा शब्द आलेला आहे तेथें तेथें सारथी हा अर्थ लागू पडतो. पण सायणाच्या मतें कांहीं ठिकाणीं त्याचा अर्थ राजाचा खजिनदार असा आहे.

[२५] सं धा.--ऋग्वेदोत्तर संहिता व ब्राह्मण ग्रंथांत ठराव किंवा करार या अर्थानें हा शब्द आला आहे.

[२६] अ रा जा नः.--शतपथांतील दोन उताऱ्यांत आणि ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द लोक या अर्थी योजिला आहे. वेबरला सुद्धां हा शब्द अथर्ववेदांत आढळला असून तेथें त्याचा संबंध सूत (सारथी) आणि ग्रामणी ( सेनानी ) यांच्यांशीं आला आहे म्हणून त्याला असें वाटतें कीं ह्या लोकांनां ' अराजानः ' म्हणत असावेत; कारण ते स्वतः जरी राजपुत्र नसले तरी त्यांचा राजपुत्रांच्या अभिषेकाशीं संबंध आहे.

[२७] ज्ञा तृ--.हा शब्द अथर्ववेदामध्यें दोन ठिकाणीं व शांखायन आरण्यकांत एके ठिकाणीं अस्पष्ट अर्थानें आलेला आहे. झिमरच्या मतें हा शब्द मूळचा कायद्याच्या परिभाषेतील असून त्याचा अर्थ साक्षीदार असा आहे. प्राक्कालीन समाजात साक्षी ठेवून कामें करण्याची जी चाल होती तिला उद्देशून हा शब्द आला असावा. रॉथच्या मतें ह्या ज्ञातृ शब्दाचा अर्थ तारण असा आहे पण ब्लूमफील्ड व व्हिटने ह्यांनां हे दोन्हि अर्थ संमत नाहींत.

[२८] रा ज क र्तृ अ थ वा रा ज कृ त्.--राजकर्तृ अथवा राजकृत् म्हणजे राजाची स्थापना करणारा, त्यांनां अभिषेक करणारा. जे स्वतः राजे नसत पण राजांनां अभिषेक करण्यांत मदत करीत अशा लोकांस अथर्ववेदात आणि ब्राह्मणांत हा शब्द लाविला आहे. सूत आणि ग्रामणी हे अभिषेकप्रसंगीं हजर असत असें शतपथांत ( ६.४,१,१ ) म्हटलें आहे. एगलिंगचेंहि असेंच मत आहे. ऐतरेय ब्राह्मणावरील टीकाकारांच्या मताप्रमाणें याचा बाप, भाऊ असा अर्थ निघतो. मूळांत शब्दाचा अर्थ स्पष्ट नाहीं.

[२९] स भा स द्.--लोकसभेंत न्यायनिवाडा करण्याकरितां जे पंच असत त्यांन हें नांव आहे. अथर्ववेदांत व माग-

हून झालेल्या ग्रंथांत जेव्हां हा शब्द येतो तेव्हां ह्याचा अर्थ एक सभासद एवढाच होणें शक्य नाहीं. कोणत्याहि सामान्य मनुष्यापेक्षां कुटुंबाचा पुढारीच सभेस सभासद म्हणून हजर असण्याचा अधिक संभव आहे. ह्या सभेच्या बैठकी सामान्य विषयावर चर्चा करण्यासाठीं किंवा त्यांजवर निकाल देण्यासाठीं होण्यापेक्षां न्यायदानाकरितांच वरचेवर भरत असतील.

[30] स्थ प ति.—अथर्ववेद व उत्तरकालीन ग्रंथ ह्यांमध्यें राजाचा अधिकारी ह्या अर्थी हा शब्द आला आहे. सृंजय लोकांच्या दुष्टरीतु पौंस्यायन ह्या हद्दपार केलेल्या राजाचा रेवोत्तरसचाक्र हा स्थपति होता व ह्यानेंच त्या राजाला पुनः राज्यपद मिळवून दिलें [ श. ब्रा. १२.८,११, १७].ह्या शब्दाचा अगदीं बरोबर अर्थ समजणें कठिण आहे. प्रांताधिकारी किंवा सुभेदार असाहि अर्थ होईल. पण सरन्यायाधीश हा अर्थ अधिक संभाव्य आहे. कारण ह्याच्याकडे पूर्वीच्या इंग्लिश लोकांतील न्यायाधीशाप्रमाणें न्याय व अम्मलबजावणी ह्या दोन खात्यांतील कामें असण्याचा संभव आहे. ह्याचा दर्जा राजअमात्यापेक्षां कमी असे.

[31] उ दा ज.—मैत्रायणी संहितेत ( १.१०, १६ ) हा शब्द आला असून लढाई जिंकल्यानंतर मिळालेल्या लुटींतील राजाचा वाटा असा ह्या शब्दाचा अर्थ आहे. व्हॉन श्रोडर व बोथलिंक यांच्या ( लढाईकरितां )बाहेर (पडणें ह्या जुन्या) अर्थापेक्षां वरील अर्थच अधिक योग्य असून डेलब्रूकहि तोच अर्थ घेतो. हा शब्द होमरच्या 'गेरास्' ह्या शब्दाच्या अर्थाचाच आहे. काठक ( २८. ३ ) व कपिष्ठल ह्या संहितांमध्यें पाठभेदानें आलेला निराज हा शब्द देखील ह्याच अर्थाचा आहे.

[32] प्र त्ये न स.—काठक संहितेंत व बृहदारण्यकोपनिषदांत ( माध्यंदिन ४.३,४३ ) उग्र व सूतग्रामणी ह्यांच्या बरोबरच हा शब्द आला असून स्पष्टपणें त्याचा अर्थ पोलीस-अधिकारी असा आहे. परंतु ह्याचा अर्थ राजाचा हलक्या दर्जाचा नोकर असा असावा, आणि मॅक्समुल्लर म्हणतो त्या प्रमाणें 'कोतवालासारखा बडा अधिकारी' असा नसावा. पटिर्सबर्गकोशाप्रमाणे काठक संहितेंत ( ८.४ )व शांखायन श्रौतसूत्रांत (४.१६,१७ ) ह्या शब्दाचा अर्थ मयताचा लगेच होणारा व त्याच्या कर्जफेडीची जबाबदारी घेणारा वारस असा आहे.

[33] ग्ले ष्क.—काठकसंहितेंत ( ५३. ६ ) ह्याचा अर्थ दोर किंवा गळफास असा दिला आहे. मैत्रायणी संहितेंत याचें ग्लेष्क असेंहि रूप दिलें आहे.

[3] श त प ति.—मैत्रायणी संहितेंत व तैत्तिरीय ब्राह्मणांत एका ऋचेंत हा शब्द इंद्राचें विशेषण म्हणून आला असून मनुष्यांतील एकटाच शंभरांचा अधिपति म्हणून याचें वर्णन केलें आहे. तैत्तिरीय ब्राह्मणावरील टीकेंत जो 'शंभर देवांचा अधिपति' असा याचा अर्थ केला आहे, तो अगदीं असंभाव्य आहे. मागाहून झालेल्या स्मृति ग्रंथांत ज्याला शतग्रामाधिपति असें म्हटलें आहे त्यासारखाच हा कोणी मनुष्यकोटींतील अधिकारी असावा. प्राचीन काळीं हा अधिकारी न्याय व जमाबंदी यावरील राजप्रतिनिधि असावा.

[35] स मा न्त.—समान्त म्हणजे एकच मर्यादा असलेले. शेजारी राहाणारे म्हणूनच शत्रू अशा अर्थी हा शब्द मैत्रायणी संहितेंत आला आहे.

[36] उ ग्र.—बृहदारण्यकोपनिषदांतील एका उताऱ्यांत 'अधिकारी मनुष्य' अशा अर्थी हा पारिभाषिक शब्द-असून मॅक्समुल्लरच्या मतानें त्याचा शिपाई असा अर्थ आहे. रॉथनें एका ऋग्वेदांतील उताऱ्यांत हाच अर्थ केला आहे. परंतु सशक्त मनुष्य असा तेथें सामान्य अर्थ आहे. बोथलिंक हा वरील उपनिषदाच्या भाषांतरांत याचा विशेषणासारखा उपयोग करतो.

[37] द श पु रु ष रा ज्य—शतपथांत ( १५.९ ३, १ ) हा शब्द आला असून स्पष्टपणें ह्याचा अर्थ दहा पूर्वजांपासून चालत आलेली सार्वभौम सत्ता असा आहे. ह्यावरून पूर्वी वंशपरंपरेनें राजसत्ता चालत होती असा बोध होतो. वेबरचें एकदां असें मत होतें कीं, ह्याचा अर्थ दशपुरूचें राज्य असा होय. ह्या दशपुरूची तो कालिदासाच्या मेघदूतांतील दशपुर, व मध्यदेशांतील दशार्णया शब्दांशीं तुलना करतो.

[38] द्वा र प.—ऐतरेय ब्राह्मणांत ( १. ३० ) विष्णूला देवांचा द्वारपाल ( विष्णुर्वै देवानां द्वारपः ) असें अलंकारिक भाषेंत म्हटलें आहे. तेथें एकदां व छान्दोग्योपनिषदांतहि [३.१३,६] हा शब्द आलेला आहे.

[3] ध न धा नी—तैत्तिरीय आरण्यकांत ( १०.६७ ) कोशागार म्हणजे जामदारखाना अशा अर्थी हा शब्द आला आहे.

[40] प रि दा.—शतपथांतील [ २.४,१, ११ ] काहीं उताऱ्यांत दुसऱ्यास शरण जाणारा असा ह्याचा अर्थ आहे.

[41] पा ला ग ली.—पालागली म्हणजे राजाची चवथी व जिच्याबद्दल सर्वांत कमी आदर आहे अशी बायको.

[42] भो ज.—ऐतरेय ब्राह्मणांत कित्येक ठिकाणीं हा शब्द राजाची पदवी या अर्थानें उपयोगांत आणलेला दिसतो. भोज म्हणजे भोक्ता. अभिषिक्त राजाला भोज म्हणत ( ऐतरेय ब्राह्मण ( ८. १४ ).

[43] भौ ज्य.—हा एक राजाचा दर्जा आहे. या दर्जास पोंचलेल्या राजास भोज ही पदवी होती. ऐतरेय ब्राह्मणांत कित्येक ठिकाणीं हा शब्द आला आहे.

[44] म हा भि षे क.—हा शब्द ऐतरेय ब्राह्मणांत आला आहे, आणि त्याचा अर्थ महाराजांच्या प्रीत्यर्थ केलेला अभिषेकसमारंभ असा आहे. हा महाभिषेक ज्यांनां केला होता अशा मोठमोठ्या महाराजांची यादीहि दिली आहे.

[45] म हा रा ज.—महाराज म्हणजे मोठा राजा. त्यांचा

उल्लेख ब्राम्हण ग्रंथांतून वारंवार येतो. याचा अर्थ राजाहून विशेष निराळा असा नाहीं. कदाचित् याचा अर्थ सामर्थ्यवान् राजा असा असावा. 'विजितवान् राजा महाराजः' असें सायण भाष्यांत म्हटलें आहे. सामान्य राजा व सामर्थ्यवान् राजा ह्यांतील भेद दर्शविण्यासाठींच हा शब्द उपयोगांत आणीत असावेत याला राजन् असेंहि म्हटलें आहे.

४६ मा तृ व ध.—हा अत्यंत घोर अपराध आहे, पण ब्रह्मज्ञानप्राप्तीनें ह्याचें क्षालन होतें असें कौषीतकी उपनिषदांत ( ३. १ ) म्हटलें आहे.

४७ मा हा रा ज्य.—माहाराज्य म्हणजे मोठ्या राजाचें ऐश्वर्य. ऐतरेय ब्राम्हणांत याचा उल्लेख आला आहे. राज्यापेक्षां माहाराज्यांत ऐश्वर्य फार, असें महाभाष्यांत म्हटलें आहे.

४८ रा ज कु ल.—राजकुल म्हणजे राजघराणें. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत ( ३. २८, ४ ) हा शब्द आला असून तेथें त्याचा दर्जा ब्राम्हणकुलाच्या वरचा नसून खालचा आहे असें म्हटलें आहे.

४९ रा ज न्य र्षि.—राजन्यर्षि याचा अर्थ राजर्षि. पंचविंश ब्राम्हणांत सिंधुक्षितला हा शब्द लाविला आहे. परंतु हा तेथील अर्थ केवळ काल्पनिक आहे.

५० रा ज न्य बं धु.—राजन्यच परंतु बहुधा हलक्या दर्जाचा असा याचा अर्थ आहे. शतपथांत ( १. १, ६, २ ) जनकाकडून वादांत पराभूत झालेल्या ब्राम्हणांनीं त्याला राजन्यबंधु म्हटल्याचा उल्लेख आहे. बृहदारण्यकामध्यें ( ६. १, ५ ) अशाच कारणाकरितां प्रवाहण जैवलीला याच नांवानें संबोधिलें आहे. उलटपक्षीं एका उताऱ्यांत [ शतपथ १. ५, २, १० येथें ] पुरुष व स्त्रिया पृथक् पृथक् भोजन करितात असा उल्लेख आहे. व तेथें ही चाल राजन्यबंधूंत विशेष असल्याचें म्हटलें आहे. या ठिकाणीं हा शब्द तिरस्कारदर्शक नाहीं. परंतु दुसऱ्या उताऱ्यांत ( शतपथ ८. १, ४, १० ) नग्नजिताला वागविण्याच्या पद्धतीवरून असें स्पष्ट होतें कीं ब्राह्मणांचा राजांबद्दलचा तिरस्कार दाखविणारा हा शब्द आहे. पुन्हा एका उताऱ्यांत ( शतपथ १. १, ४, १२ येथें ) चार जातींचा उल्लेख आहे. तेथें वैश्य आधीं व नंतर, राजन्यबंधु अशा नेहमींच्या क्रमाचा भंग चमत्कारिक रीतीनें झाला आहे.

५१ रा ज पि तृ.—ऐतरेय ब्राह्मणांत हा शब्द आला असून तेथें त्याचा अर्थ, राजसूययज्ञाच्या वेळीं राजाला दिल्या जाणाऱ्या पदव्यांपैकीं एक, असा आहे. याचा अर्थ राजपिता हा आहे. ह्यावरून राज्यपद वंशपरंपरागत असे असें दिसतें. राज्यकारभारांत राजपुत्राचा प्रवेश प्राचीनकाळीं सुद्धां होत असे. ऐतरेय ब्राह्मणा [८. १२] मधील राजपिता शब्दाचा अर्थ सायणमतानें सर्व राजांचा पालक असा आहे.

५२ रा ज पु रु ष.—राजपुरुष म्हणजे राजाचा नोकर. निरुक्तांत याचा उल्लेख आलेला आहे.

५३ रा ज भ्रा तृ.—याचा अर्थ राजाचा बंधु. पंचविंश ब्राम्हणांत ( १०. १, ५ ) आठ वीरांपैकीं एक किंवा राजसत्तेच्या आधारस्तंभांपैकीं एक म्हणून उल्लेख आलेला आहे. इतरत्रहि याचा उल्लेख आलेला आहे.

५४ रा ज मा त्र.—कौषीतकि ब्राम्हणांत ( २७. ६ ) आणि शांखायन श्रौतसूत्रांत ( १७. ५३ ) हा शब्द आला आहे. ह्यामध्यें सर्व राजन् यांचा ( म्हणजे राजपुत्र व राजन्य यांचाहि ) समावेश होतोसें दिसतें.

५५ रा जा धि रा ज.—याचा अर्थ राजांचा राजा. पुढें सार्वभौमत्वाची पदवी, असा आहे. वैदिक वाङ्मयांत फक्त तैत्तिरीय आरण्यकांतच हा शब्द आला आहे.

५६ रा ष्ट्र गो प.—राष्ट्रगोप म्हणजे राष्ट्राचा रक्षक. ऐतरेय ब्राह्मणांत पुरोहिताला हें नांव दिलें आहे आणि त्याचें विशेष कर्तव्य म्हणजे मंत्रतंत्रांच्या योगानें राजाचें व राष्ट्राचें रक्षण करणें हें असे.

५७ सं ग्रा ह यि तृ.—कौषीतकी उपनिषदांत ( २. १ ) वर्दी देणाऱ्या नोकराच्या म्हणजे द्वारपालाच्या अर्थी हा शब्द आला आहे.

५८ स चि व.—सचिव म्हणजे मित्र, अनुचर ( सच् म्हणजे अनुसरणें ). हा शब्द वेदोत्तर वाङ्मयांत आलेला आहे व त्याचा अर्थ राजाचा मित्र, त्याचा प्रधान, असा आहे. पण वैदिक वाङ्मयांतहि ऐतरेय ब्राम्हणांत (३.२०) हा शब्द आलेला असून तो इंद्रानें मरुतांना लावलेला आहे. हा शब्द जर्मन कोम्स व इंग्रजी गेसिथ या शब्दांशीं सदृश आहे.

५९ स भा पा ल—तैत्तिरीय ब्राम्हणांत ( ३ ७,४,६ ) हा शब्द आलेला असून त्याचा अर्थ सभागृहाचा रक्षक असा आहे.

६० स्था प्य—पंचविंश ब्राम्हणांत ( १७.११,६ ) स्थपतीचा दर्जा असा याचा अर्थ आहे.

६१ वि द थ—हा शब्द ऋग्वेदामध्यें आलेला असून त्याचा अर्थ अस्पष्ट आहे. रॉथच्या मतें ह्याचा मूळचा अर्थ हुकूम व नंतर हुकूम सोडणारा मनुष्य आणि मग धार्मिक किंवा ऐहिक गोष्टींकरितां किंवा लढाईकरितां भरणारी सभा असा आहे. ओल्डेनबर्गचें एकदां असें मत होतें कीं, विदथ ह्या शब्दांतली मूळ कल्पना म्हणजे शास्त्रोक्त कर्म ( विध् या धातूपासून ) व नंतर यज्ञ असा अर्थ झाला. लुडविगच्या मतें ह्या शब्दाचा मूळ अर्थ म्हणजे सभा, 'विशेषतः मघवन् व ब्राह्मण ह्यांची सभा' हा होय. गेल्डनेरच्या मतें ह्या शब्दाचा मूळ अर्थ ज्ञान, शहाणपण, उपाध्याय वर्गाची विद्या, आणि नंतरचा यज्ञ आणि धार्मिक सत्ता असा आहे. उलटपक्षीं ब्लूमफील्ड असें म्हणतो कीं ह्याचा मूळचा अर्थ घर ( विद् म्हणजे संपादणें यावरून ) व नंतर यज्ञ; कारण यज्ञ घरांत होतो. हाच अर्थ सर्व उताऱ्यांना नीट लागू पडतो. विदथ्य हा शब्द एकदां राजाला ( सम्राट् ) लावलेला आहे त्यावरून ब्लूमफील्डचा अर्थ

सर्वस्वी बरोबर नाहीं असें वाटण्याचा कदाचित् संभव आहे. पण विदथ्य ह्मणजे पुष्कळ राजवाड्यांच्या जागा असलेला असा अर्थ केला ह्मणजे ही अडचण दूर होते आणि सभा शब्दाशीं विसंगत दिसणारा स्त्रियांचा संबंध विदथ शब्दाशीं ज्या अर्थी आला आहे त्यावरून ब्लूमफील्डच्या अर्थासच पुष्टि येते. ह्या शब्दाचा अर्थ ब्राह्मणाच्या घराप्रमाणें आश्रय-स्थान किंवा धर्मशाळा असा लुडविग करितो पण हें संभवनीय नाहीं.

[६२] सभा.—वेदकालीन आर्यांच्या सभेला व ती सभा ज्या जागेंत होईल त्या जागेला हें नांव होतें. ह्या शब्दाचा उल्लेख ऋग्वेद व तदुत्तरकालीनग्रंथ ह्यांत वारंवार येतो. परंतु ह्या सभेचें निश्चित स्वरूप काय होतें हें समजत नाहीं. ज्या वेळीं त्या ठिकाणीं सार्वजनिक कामकाज चालत नसे त्यावेळीं या सभागृहाचा उपयोग फांसे खेळण्याकडे होत असावा असें स्पष्ट दिसतें. फांसे खेळणाराला सभास्थाणु असें म्हटलें आहे. ह्यावरून त्याचें सभेंतील सतत वास्तव्य हें निश्चित होतें. ह्या सभागृहाचा उपयोग सामाजिक चर्चेस, त्याचप्रमाणें गाई वगैरेसंबंधीं साधारण संभाषणाकडे होत असावा. कदाचित् वादविवाद व वाग्युद्धेंहि येथें होत असावींत. लुडविगच्या मतानें ही सभा सर्व लोकांची नव्हती तर फक्त ब्राह्मण व मघवन् म्हणजे श्रीमंत लोकांची होती. ह्या मतांला 'सभेय' ( सभेस बसण्यास योग्य अशा एका ब्राह्मणाचें विशेषण) व 'रयिःसभावान्' (सभेस शोभणारी अशी संपत्ति ) अशा शब्दांनीं पुष्टि येते. पण ब्लूमफील्डचें असें मत आहे कीं, हे शब्द सभेला न लावतां एखाद्या गृहाला लावलेले असले पाहिजेत, आणि कित्येक उताऱ्यासंबंधीं हेंच म्हणणें पीटर्सबर्गकोशास संमत आहे. झिमर एवढेंच म्हणतो कीं, ही सभा म्हणजे ग्रामपंचायतीची जागा असून या पंचायतीचा अध्यक्ष 'ग्रामणी' असे. पण ह्या म्हणण्यास बिलकुल आधार नाहीं. हिलेब्रँट म्हणतो कीं, सभा व समिति यांत फरक करितां येणार नाहीं. आणि चांगल्या कुळांत जन्मलेल्या (सुजात) लोकांबद्दल जो उल्लेख आहे तो त्या लोकांनां दास किंवा शूद्र ह्यांच्याहून निराळे असें दाखविण्यासाठीं असून, आर्यांच्या एका वर्गाहून आर्यांचा दुसरा निराळा वर्ग, असें दाखविण्यासाठीं नाहीं; आणि हें त्याचें म्हणणें बरोबर दिसतें. हिलेब्रँट असेंहि म्हणतो कीं 'सभेतला (सभ्य)अग्नि' हा शब्द जो आला आहे त्यावरून जेव्हां सभा भरत असें त्यावेळीं तिच्या तर्फे होणाऱ्या यज्ञांतला अग्नि असा अर्थ होतो. ह्या सभांनां स्त्रिया जात नसत कारण त्यांनां राजकीय चळवळींत भाग घेऊं देत नसत. सभेंत काय काम चाले ह्याबद्दल एकहि उल्लेख नाहीं.

[६३] समिति.—ह्या शब्दानें वेदकालीन जातसभेचा बोध होतो. हा शब्द ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत वारंवार आला असून तो कधीं कधीं सभेच्या संबंधांतहि आला आहे. लुडविगच्या मतानें समितींत सर्वांचा, मुख्यतः 'विशः' (प्रजा) ह्यांचा आणि जर त्यांची इच्छा असेल तर श्रीमंत लोकांचा (मघवन्) व ब्राम्हणांचाहि समावेश होई. तथापि ब्राह्मण व श्रीमंत लोकांची स्वतंत्र सभाहि असेल पण हें मत बरोबर नाहीं. आणि झिमर सुद्धां ही सभा म्हणजे ग्रामसभा असें जें ह्मणतो तें बरोबर नाहीं. हिलेब्रँटचें असें मत आहे कीं, दोनहि शब्द जवळ जवळ एकच आहेत, मूळचा अर्थ समिति म्हणजे जमलेले लोक व सभा म्हणजे जमण्याची जागा असा असावा; व हें म्हणणें बरोबर दिसतें. ज्याप्रमाणें राजा सभेला जाई तसा तो समितीला सुद्धा जाई. झिमर म्हणतो कीं येथेंच राजाची निवडणूक होई. पण ह्या समितींत तर राहूंद्याच, पण वस्तुतः राज्यपदाकरितां निवड होत असे कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. पण एवढी गोष्ट खरी कीं राजाला जर आपला उत्कर्ष व्हावासा वाटत असेल तर राजा व समिति ह्यामध्यें ऐक्य असणें जरूर असे. ह्या समितींत सर्व गोष्टींबद्दल धोरण ठरविण्यांत येत असे; उदाहरणार्थ, कायदे करणें व न्याय देणें. पण ह्याबद्दल वैदिक ग्रंथांत प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाही. देवांची ज्याप्रमाणें सभा असे त्याप्रमाणें त्यांची समिति सुद्धां असे; आणि म्हणूनच तिला दैवी समिति असें म्हणत असत. बौद्धग्रंथ, महाभारत व स्मृतिग्रंथ ह्यांतून समितीचें राज्यकारभारांतील प्रभावी वजन कमी झालेलें दिसतें.

## अभिचार

### अभिचार [ऋग्वेद]

ऋग्वेदांतील अशीं बरींच सूक्तें आहेत कीं, ज्यांचा ऋग्विधान नामक ग्रंथांत अभिचाराकडे विनियोग सांगितला आहे.

[1]यातुधान [2]विष (तोडगा)

[ तै. सं.]

[3]वलग

### ताईत, गंडे, दोरे वगैरे[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अनुरोधन [वशीकरण] | [४]आंजन [माण] | [५]जंगिड |
| | ऐन्द्र | [६]तस्तुव, तस्तुव |
| अभिचार | ओषधिसांशित (मणिवि०) | [७]ताबुव |
| अभिचारिन् | | तिल (मणिसाधन) |
| अभिभु [मणि वि.) | औदुम्बरमणि | तिलपिंज्या (मणि) |
| अभिवार | कल्मालि [मणि] | [८]त्रिवृत [ताईत ] |
| अभ्याचार | कार्शन (मणि) | त्रैककुद [अंजन) |
| अर्क (अर्कवृक्ष विकारो मणिः) | कृत्या (अभिचार) | दर्भ [मणि] |
| | क्षत्रवर्धन (मणिवि०) | [९]दशवृक्ष (मणि ] |
| अर्जुन (मणि करण्याचें साधन ) | | दुर्णामचातन(मणि] |
| | चक्षुर्मंत्र | दुर्णामहन् [मणि ] |
| अलाबु [तोडगा] | चतुर्वीर [अंजन] | देवज (मणिवि० ) |

| | | |
|---|---|---|
| पलाली | बभ्रु [मणिसाधन] | [11]शंख |
| पर्णमणि (पलाश- | बली[मणिविशेषण] | शण [तागाचा |
| मणिः) | भृमिदृंह [दर्भ | दोरा ] |
| पिशाचचातन | मणि वि०] | शतदक्षिण |
| पिशाचजंभनी | मण्डूराधणिकी | शतवार (मणि ] |
| पिशाचक्षयण | [अलक्ष्मी] | सपत्नक्षयण |
| पौंष (चूर्ण) | यज्ञवर्धन (मणि) | [मणिवि.) |
| [10]प्रतिसर [अभि- | यव (मणिसाधन) | संजय [मणि] |
| मंत्रितरक्षासूत्र] | यामुन (मणि) | सहस्रकांड[मणि |
| प्रजापतिसृष्ट | रथजूति [रथवत्- | विशेषण] |
| (मणिवि०] | गन्तृ अंजन) | सहस्रार्ध |
| प्राणसंशिन | वरण (मणि) | सुमङ्गल (मणि) |
| (मणि वि०) | विद्रुल [अभिचार | सूर्यतेजस्(मणिवि) |
| प्रत्यभिचरण | करणारे लोक] | [12]स्राक्त्य [मणि] |
| [मणि वि०] | विषाण (मणि) | हिरण्यस्रज् [शत्रु- |
| फाल(खादिरमणि) | विष्कंधदूषण[मणि] | नाशक मणि] |
| बंधुर [मणि] | वैयाघ्र | हिरण्यशृङ्ग[मणि] |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [13]*असुरविद्या* | [15]*माया* | [17]विषविद्या |
| [14]*भूतविद्या* | [16]*यातुविद्* | |

[1] *या तु धा न*.—ऋग्वेदांत आणि इतरत्रहि हा शब्द येतो. ऋग्वेदोत्तर ग्रंथांत याचा मांत्रिक असा अर्थ आहे. यातुधानी ' हा स्त्रीवाचक शब्द ऋग्वेदांत आणि तदुत्तर वाङ्मयांत सांपडतो.

[2] वि ष.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांत ह्याचा नेहमीचा अर्थ तोडगा असा आहे. ह्या तोडग्याबद्दल अथर्ववेदामध्यें मंत्र दिलेले आहेत.

[3] व ल ग.—तैत्तिरीय संहिता, अथर्ववेद व त्यानंतर झालेले ग्रंथ ह्यांमध्यें गुप्तमंत्र अशा अर्थानें हा शब्द येतो.

[4] आं ज न.—अथर्ववेदांत हिमालयांतील त्रिककुभ् शिखरावरून आणलेल्या या औषधाचा पुष्कळ वेळां उल्लेख आलेला आहे. त्याचा उपयोग अंजनाप्रमाणें करीत असत. कदाचित् हें यमुना नदीच्या कांठींहि होत असावें आणि हें अंजन कावीळ, यक्ष्मा, जायान्य आणि दुसरे रोग नाहींसे करित असे. पुरुषमेधांत जी बळींची यादी आहे तींत अंजन तयार करणाऱ्या एका स्त्रीचा उल्लेख आहे.

[5] जं गि ड.—जंगिड हा शब्द रोग बरा करणाऱ्या एका वनस्पतीचें नांव या अर्थानें अथर्ववेदांतील सूक्तांमध्यें आलेला आहे. ह्याचा उपयोग अनेक ( तक्मन्, बलास, असारीक, विसारीक, पृष्ट्यामय, संधिवात ) रोगांवर व विल्कंद, सस्कंध, जंभ वगैरेवर तोडग्याप्रमाणें होत असे. इतकेंच नव्हे तर हा सर्व रोगांवर रामबाण उपाय म्हणून गणला जात असे व सर्व औषधांचा राजा अशी त्या वनस्पतीबद्दल ख्याती असे. 'कृषीच्या रसापासून ही वनस्पति होत असे' असें म्हणतात, पण त्याचा अर्थ इतकाच कीं, लागवडीच्या जमिनींत ती उत्पन्न होत असे. तिची प्रत्यक्ष लागवड होत असे असें नव्हे जंगिड शब्दानें कोणती वनस्पति ध्वनित होते हें समजत नाहीं [सायणमतानें जंगिड हा मणि असून तो शेतांतील उगवणाऱ्या वनस्पतीचा तयार केला जात असे]. कारण अथर्ववेदोत्तर ग्रंथांत हा शब्द येत नाहीं. कॅलेंडच्या मतें अर्जुनेय ह्या नांवानें कौशिकसूत्रांत हा शब्द आला आहे.

[6] त स्तु व किं वा त स्तु व.—अथर्ववेदाच्या पैप्पलाद संहितेंत हा शब्द सर्पविषावर असलेल्या तोडग्याचें नांव आहे. व अथर्ववेदामध्यें ताबुव ह्याच्याबरोबर ह्याचा उल्लेख आलेला आहे.

[7] ता बु व.—अथर्ववेदामध्यें सर्पदंशावर असलेल्या तोडग्याचें हें नांव आहे. पैप्पलादशाखा प्रतींत ताबुवाच्या ऐवजीं ताबुच हा शब्द आलेला आहे. वेबरच्या मतें ह्याचें मूळचें रूप ताथुव होतें व तें ' =उभें राहेण' ह्यापासून आलेलें होतें व त्याचा अर्थ थांबणें असा असावा. पण हें असंभाव्य दिसतें.

[8] त्रि वृ त्.— ह्याचा अर्थ 'तीन प्रकारचा' असा असून अथर्ववेदामध्यें एका मंत्रसिद्ध ताईताचें किंवा तोडग्याचें हें नांव आहे.

[9] द श वृ क्ष.—रॉथच्या मतानें हें एका झाडाचें नांव आहे व तें अथर्ववेदामध्यें आलेलें आहे. पण व्हिटने ह्या शब्दाला विशेषण समजून त्याचा अर्थ 'दहा वृक्षांचा' असा करतो.

[10]प्र ति स र.—अथर्ववेदांत हा शब्द पुष्कळ वचनांतून आलेला आढळतो. व तदनंतरच्या ग्रंथांतून रॉथच्या म्हणण्याप्रमाणें 'ताईत, तोडगा' या अर्थानें उपयोगांत आलेला आहे. तें एक बंधनसाधन असून त्याच्या धात्वर्थावरून तें हलतें असावें. याचा अर्थ संशयात्मक आहे. कदाचित् मूळ धात्वर्थ हल्ला करणें असाहि असावा. श्रौतककर्मांच्या प्रयोगांत यज्ञदीक्षेच्या पूर्वी प्रतिसरबंध नामक एक कर्म केलें जातें व त्यांत एक दोरा मंत्रून दीक्षिताच्या हातांत बांधीत असतात.

[11] शं ख.—अथर्ववेदामध्यें कृशनूच्या विशेषणाबरोबर ह्याचा अर्थ ताईत किंवा तोडगा म्हणून उपयोगांत आणलेली मोत्याची शिंप असा आहे. अथर्ववेदोत्तर ग्रंथांत ह्याचा वाजविण्याचा शंख असा अर्थ आलेला आहे.

[12] स्रा क्त्य.—अथर्ववेदामध्यें एका ताइताचें (मण्याचें) हें विशेषण आलेलें आहे. वेबरचे मतानें ह्याचा अर्थ स्फटिक (शब्दशः अर्थ बहुकोणाचा) असा आहे. टीकाकारांचे मतानें ह्याचा अर्थ ' तिलकवृक्षापासून झालेला ' असा आहे.

[13]अ सु र वि द्या.—' असुरांचें शास्त्र.' शांखायन आणि आश्वलायन श्रौतसूत्रें म्हणतात कीं, शतपथ ब्राह्मणांत जो माया शब्द वापरला आहे तो आणि हा एकच आहे. आणि

प्रोफेसर एगलिंगच्या मताप्रमाणें त्याचा स्पष्ट अर्थ "जादु" असा होतो.

[14]भू त वि द्या.—हें एक शास्त्र आहे. याचा उल्लेख छांदोग्य उपनिषदांत एके ठिकाणीं आला आहे. हें बहुधा मनुष्यांस पीडा देण्याऱ्या "पिशाचांचें शास्त्र" असावें, व यांत त्याचें कसें निवारण करावें हें दिलें असावें.

[15]मा या.—हा शतपथ ब्राह्मणांत ( १३. ४, ३, ११ ) असुरविद्या ( जादु ) या अर्थाचा हा शब्द आहे.

[16]या तु वि द.— अनेकवचनी ज्यांना चेटकांची उत्तम माहिती आहे असे. शतपथ ब्राह्मणांत अथर्ववित या अर्थी यांचा उल्लेख आहे.

[17]वि ष वि द्या.—आश्वलायन श्रौतसूत्रामध्यें इतर शास्त्रांबरोबर हिचा उल्लेख आलेला आहे.

## इ त र क र्मे

### कर्मनामें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपस् | केपय ( पापकर्म ) | विधर्मन् ( विविध-कर्म ) |
| अप्नस् | क्रतु | विधान |
| कृतेकर्म | क्रियमाण | विव्रत |
| ओक्य ( गृहकर्म) | क्षेत्रजेष [वीरकर्म] | विष्पित,विष्टिवन् |
| करण | चक्रत् | वृषव्रत |
| करस् | चक्रतु | वेपस् |
| करंती | चक्रुस् | वेष |
| करिक्रत् | चर्कृत्य | शक्ति |
| कर्तु | तदपस् | शक्मन् |
| कर्तवै | दंसस् | शची |
| कर्तृ | दुष्कृत | शमी |
| कर्त्व | धी | शिमी |
| कर्वर | पनयाय्य ( स्तुत्य-कर्म ) | शिल्प |
| करुण | मनोतृ | शृध्या ( उत्साह-नीयकर्म ) |
| कृत्वन् | व्रत | स्वापत्य |
| कृत्वी | | |

### कर्मविशेष [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अपस् ( अनुष्ठीय कर्माचें विशेषण ) | त्याग ) | प्रयोग ( विध्यनुष्ठान ) |
| असूर्य ( हिंस्र ) | उपसद्य ( अनुष्ठेय ) | प्रोक्षण |
| अस्कन्नहविस् (प्रणीता प्रणयनरूप कर्माचें विशेषण ) | उपस्पृश्य | भद्रा |
| उत्सर्ग (अंगुलीचा- | पितृदेवत्य ( व्रताचरणाचें विशेषण ) | भृत्या ( निर्वाहक्रिया ) |
| | प्रतीक ( कर्म प्रारंभमात्र ) | मिश्र ( यज्ञकर्माचें विशेषण ) |
| | | मुष्टि |

| | | |
|---|---|---|
| विमोचन(मुक्तता) | स्वपस् ( शोभन व्यापार ) | सोमयागादि क्रियाचें विशेषण ) |
| विलोम ( यज्ञकर्म विशेष) | हविष्करण (प्रभुत- | |

### इंद्रियकर्मे क्रियापदें [ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अन्वैक्षन्त | उन्मथायति | उपारिम |
| अश्रवम् | उपजिघ्रति | उपासृज |
| ईक्षयस्व | उपागहि | उपैदैति |
| | | शृर्णामासि |

### धंदेवाले [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अथर्वी [ पुरोहित स्त्री ] | तोद ( धनी, शिक्षक ) | मायावत् [ जादूगार ] |
| अप्रसद् [ आचारी] | त्वष्टृ | मायिन् |
| अमीवचातन | त्वक्षीयस् | मृगण्यु [ शिकारी] |
| अमीवहन् [ वैद्य ] | [4] त्सारिन् [पारधी] | यातुमति |
| अरितृ [ कर्णधार ] | द्रवि ( सोनार ) | रंभिन् [ दौवारिक] |
| अविशस्तृ ( हिंसक ) | दूत | वणिज् |
| अहर्विद ( ज्योतिषी ) | दूती | [13] वप्तृ ( न्हावी ) |
| इन्द्रगोप | [5] द्रुहन् | वय्या ( कुशल विणकर ) |
| [1] उपलप्रक्षिणी | [6] ध्मातृ | विश्ववार ( आर्त्विज्य करणारे ) |
| [2] कर्मार (सोनार) | नर्तयत | [14] शस्तृ |
| कार्मार | नृतमान | शाक्त [ शिक्षक ] |
| कला | नृति ( नृत्य ) | [15] श्वघ्नी [ व्याध] |
| क्षिपणु ( व्याध) | [7] नृतू | संवयंती[विणणारी] |
| खनमान ( खणणारा) | नृत्यत् | सहगोप ( पशुपालसहितगो ) |
| खनितृ | नैचाशाख ( सावकार ) | सीरिन् ( विणकर) |
| गन्तृ | पदज्ञ | सेक्तृ ( पखालवाला ) |
| गायत् | [8] पथिकृत् | [16] स्तेन |
| जोष्टृ [ सेवक ] | परिपंथिन् | स्थिवि ( व्याजोपजीवि ) |
| [3] तक्षन् [ सुतार] | [9] पशुप | स्फाति ( व्याज ) |
| तक्ष्या | पशुरक्षि ( गुराखी) | स्वपति ( गवळी ) |
| तष्टृ [ सुतार ] | [10] पाशिन् | |
| तस्कर | [11] बेकनाट[व्याज बट्टा करणारे ] | |
| | [12] भिषज् | |
| | भिषक्तम | |
| | भोज्या | |

### [ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अक्षावाप ( द्यूतकार ) | गोप ( गोरक्षक ) | धंदा करणारे ] |
| अभिशस्तृ (अशकुलशमिता) | तस्कर | यवमत् [ कृषिकर्म करणारा ] |
| | परिचर | वाणिज |
| | भिषज् [ वैद्यकीचा | |

| | |
|---|---|
| सोमविक्रयिन् [ सोम विकणारा ] | स्तेन |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अतस्कर | तक्षन् | मलिम्लु ( चोर ) |
| अनुस्थातृ | तष्टृ | [20] महानग्नी |
| अविमत् | तस्कर | मातली |
| आनृत्यत् | तायु ( चोर ) | [21] मृगयु (व्याध) |
| आवपनी | तृष्टा | यातुमत् |
| आवपान्तिका | [17] त्वष्टृ | [22] रथकार |
| कारु | दूत | रक्षितृ |
| कृंतत्र | [18] धीवन् | वधक |
| केनिपान ( शहाणे लोक ) | नदनिमा | वधस्मन् |
| | निखातक | वनर्गु ( चोर ) |
| केपय [ कुत्सित कर्मकारी ] | नुत्ता | वप्तृ |
| | नृत | वाग्वि |
| खल्व | पक्तृ | [23] शम्बिन् [नावाडी] |
| क्षत्तृ [ सारथि ] | पदज्ञ | |
| क्षुरभृष्टि | पदवी | शिक्क [ सुतार ] |
| खनितृ | परितत्नु | शिक्षानर |
| गर्तसद [ सारथि] | परिनृत्यंती | संस्कृतत्र ( मांसपाचक ) |
| गृ | परिपन्थिन् | |
| गोदुह् | परिस्कन्द ( रथरक्षक ) | सारथि |
| चरु [ दूत ] | | सुभिषज् |
| चिकित्सु | पशुवित् | सुविदत्र |
| छर्दिष्प ( गृहरक्षक ) | पृश्निहन् | स्तेन |
| | मधुकृत् | स्तेय |
| जल्पि | [19] मलग | |

[ वा. सं. ]

| | | |
|---|---|---|
| [24] गोविकर्तन | [25] शंखध्म | [26] शैलूष |
| | | [27] शौष्कल |

[ संहितेतर ]

| | | |
|---|---|---|
| [28] कुसीदन् | [33] भिषज् ( गृ ) आथर्वण | [37] वायोविद्यिक |
| [29] चोर | | [38] वीणागाथिन् |
| [30] नापित | [34] मृगव्याध | [39] शिल्प |
| [31] पारिकुट | [35] वणिज | [40] श्रपयितृ |
| [32] प्रेष्य | [36] वयित्री | [41] सभाविन् |
| | | [42] सेलग |

## धंद्यांचीं साधनें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| [43] अक्षु (जाळें) | कशा | क्षुर |
| अरित्र (वल्हें) | [46] कूट ( घण ) | गोअजनासा [गो- |
| [44] ऊर्णा | कृंति ( कातरी ) | तंतु [ प्रेरकदंड |
| [45] ओतु | [47] क्रय | [48] तंत्र |
| [49] तसर | भुरिज | शंकु |
| दाति | [50] मुक्षीजा | [52] सूची |
| ध्मात | व्युत | सूचीका |
| पश्वयंत्र | [51] वेशी | स्वधिति |

:[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| ओतु | र्‍याचें हत्यार ] | शरव्य ( भाता ) |
| [53] तंतु | प्राचीनतान | स्थूरि ( मोठा गाडा ) |
| निष्क्रयण [ सुयांची किंमत ] | भार [ ओझें ] | |
| | वातपान ( वाऱ्यांत सुकविलेला दोरा ) | हरिणी (सोन्याची सुई ) |
| परिचर | | |
| प्रघात [ विणक- | | |

[ अथर्ववेद]

| | | |
|---|---|---|
| अक्षुजाल ( जाळें) | चर्मन् | पाश |
| अजिन | जाल | [55] प्रकश |
| असुरमाया | जालदंड | प्रतिपण |
| इन्द्रजाल | तंतु ( धागा ) | [56] विक्रय |
| इषीका (धंद्याच्या उपयोगी तृण) | दत्र | साधन |
| | दृति ( परवाल ) | सूची |
| क्षुर | नृति | स्वधित |
| खनित्रिम | [54] पण | |

[संहितेतर]

| | |
|---|---|
| [57] तोत्र | [58] निधा |

## धंदेसूचक क्रियापदें [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अतसि | ऊपथुः | खनामि |
| अधमत् ( कर्मार इव ) | ऊषे | जिगाय |
| | ऋणधत् | तक्षन् |
| अनर्तिषुः | क्रीणाति | वैथे |
| उन्दंति | क्रीळति | पशुमन्ति |
| उपशृण्वन्ति | क्षियन्तः | मन्त्रयन्ते |
| उभ्राः | क्षोदन्ते | मुषायः |
| | | सीव्यध्वं |

## धारणपोषणकरणें. क्रियापदें [ऋग्वेद]

| | | |
|---|---|---|
| अदर्धः | अवः | जुजुष |
| अदीधरत् | अवरीवुः | दाधर्थ |
| अदीयं | आदधाति | धत्त |
| अपाम | आन | धाः |
| अपिबत् | आव | धापय |
| अभरः | आवीत् | धृषत् |
| अंभृणं | जिघर्ति | भ्रियते |
| अरक्षः | जुगुपः | निपासि |

| | | |
|---|---|---|
| पाहि | भजतन | भ्रियन्ते |
| पीपय | भजामहे | रंहयन्ते |
| पेय | भर | रक्ष |
| बिभर्ति | भरामसि | संभर |
| बुभुज्महे | भर्ति | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अदधुः | दस्म | भर |
| अन्तर्दधाति | दाधार | भरिभ्रत् |
| उपहन्यते | दाध्रति | भ्रियते |
| अबिभः | धाः | विजायते |
| आदधाति | धारय | विधारयः |
| जभार | धर्त्ता | विभरन्ति |
| दधिरे | निधत्ते | संदधुः |
| दध्वसे | पर्यधत्थाः | समभरः |
| दध्मसि | पिप्रीहि | समारभामहै |
| दध्रे | बिभीयात् | समिध्यै |
| | | संभरति |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अग्रभम् | गोप्स्यान्ति | धारयन्तु |
| अधत्त | जभार | परिआधत्त |
| आदत् | दधर्षति | बिभर्ति |
| गृभाय | दधे | सम्आदधाति |
| गृणामि | दध्रे | |

**पाहणें क्रिया०** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अवचाकशत् | चाकनत् | विचर्षणिः |
| आचक्ष्म | चिक्यत् | विचष्टे |
| चष्टे | ददृशुषी (दृष्टवती) | विश्वचर्षणिः |

**प्राप्तिवाचक क्रि०** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अपादयत् | अविंदत् | अकरोः ) |
| अपायि | आनट् | गृभायत् |
| अपुः | आप | गृह्णाण |
| अप्राः | ऊर्णोत् | जुनीमासि(प्राप्नुमः) |
| अलिप्सत् | गुः | ममत्तु |
| अवर्षीः | गुहः (संस्कृतं- | विदात् |

**रक्षण पालन** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अनवस् | अवितृ | ओमन् |
| अनुशासत् | अवित्री | ओमात्रा |
| अभिरक्षमाण | अविष्यत् | गुपित |
| अभिष्टिमत् | ऊति | गुह्य |
| अवस् | ओमन्वत् | गुह्यमान |
| गोपावत् | धर्तृ | वनन्वत् |
| गोपीथ | धायस् | वनस् |
| गोप | धायु | वनीयस् |
| ततृपि ( तर्पक ) | नृपीति | वनीवत् |
| त्रा | भरीमन् | वनुष् |
| त्रातृ | भुरण | वंतृ |
| त्रायमाण | भुरण्यु | वरूतृ |
| दुष्प्राव्य | रक्षमाण | विधर्तृ |
| दुर्भृति | ररक्षाण | विधातृ |
| धर्णि | वन | विधु |
| | | सुभृत् |

**सेवा करणें** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अभिष्णक् | ऋध्नोति | विधेम |
| इरज्यति | दुवस्यति | विवासति |
| ऋच्छति | नमस्यति | सपति |
| | | सपर्यति |

**विनाशवाचक** [ ऋग्वेद ]

| | | |
|---|---|---|
| अंहति | अरिष्यत् | जघ्नि |
| अघशंसहन् | अरुष | जघ्रि |
| अघायु | अरुषी | जम्भयत् |
| अजध्नुषी | अवघ्नती | जसमान |
| अतृदिल | अववृत्रन् | जिघत्नु |
| अदब्ध | अवहन्तृ | जिघांसत् |
| अधिमन्थन | अविदस्य | जिघ्नमान |
| अध्वस्मन् | असुरहन् | जूर्वत् |
| अनिबाध | अहंसन | ततरुष |
| अभिभूष्ट | अहिंसन्ती | तमोहन् |
| अपघ्नन् | अहिंसान | तर्द |
| अपप्रोथ | अहिंस्यमान | दम्भयत् |
| अपबाधमान | आदघ्न | दर्त |
| अपावृक्त | आदर्तृ | दिप्सु |
| अभिक्षत्तृ | आहत | दुर्नश |
| अभिप्रभंगिन् | आहन | दुष्परिहन्तु |
| अभिशस् | ककर्दु | दुर्हनायत् |
| अभिशस्ता | क्षित | दुहन्तु |
| अभीकृहन् | क्षीयमाण | धूर्ति |
| अमथितृ | गोघ्न | ध्वरस् |
| अमर्धतृ | घन | ध्वसिर |
| अमित्रहन् | घनाघन | ध्वस्मन्वत् |
| अमिनती | घनिघ्नत् | नक्षन् |
| अयोहत | घ्नन् | नक्षमाण |
| अररुष | चतिन | नष्ट |
| अरिषण्यन् | चत्त | निजघ्नि |
| अरिष्ट | जघन्वत् | नितोशन |

निर्ऋत
निर्ऋथ
निर्मथित
निर्मथत्
नृघ्न
नृषह
नृहन्
पराहंतृ
परिसूति
पीयु ( हिंसक )
पुनर्हन्
पुरोहन्
पुरुदस्म
पुरुशाक
पुरुषघ्न
पुरुहन्मन्
प्रमिनान
प्रहंतृ
बर्हण ( हिंसक )
भंग
मथित
मथिन्
मथ्नत्
मथ्यमान

मिथति
मृणम्
मृध्
रिरिक्षत्
रिरिव्हस्
रिशंती
रिशादस्
रिषण्यु
रिषत्
रिष्ट
रेपस् ( हिंसा )
रेषण
रोपुषि
वनवत्
वनु
वध्र
विघ्नन्
वितंतुराण
विचृत
विभंजनु
विभिंदतृ
विमिन्वन्
विमिमान
विस्कभित

विष्कभ्नत्
वृतंचय ( शत्रुहिंसक )
वृत्रहन्
शराणि
शर्य
शर्यहन
शाकी
शूर्त
संशिशान
संस्कृत
संहत
ससहन्
ससव्हत्
सुघ्न
सुहन्
सूद ( हिंसक-शस्त्र )
स्नेहिती
स्रिध
हतवृष्णी
हत
हंस्व
हन्मन्
हिंस

## हिंसाविशेषणें [ अथर्ववेद ]

अभिशस्ति
आरेहण
आवत्स्यत्
उपहन्तु
उपहत्या
घ्नन्
चन
चातयत्
दर्तृ
पराशस्
पौरुषेय ( वध )

प्रतिघ्नान
प्रहेतृ
बभस्ति
मिमान
रन्धयत्
राध्य
राध्यमान
रिणत्
रिशादस्
रिष
रिष्ट

वध( हिंसा )
विघ्नाना
विमिमान
शराणि
हते
हतास
हते
हन्तृ
हिंसितव्य
हिंस्र

## विनाशदर्शक क्रिया० [ ऋग्वेद ]

अक्रि
अघयतः
अचेति
अतक्षम
अतष्ट
अतिप्रशर्धयत्

अदर्दः
अनीनशत्
अनुशासति
अमत्त
अमिमीत
अमीषि

अमृणत्
अरंधयः
अरंहत
आरिणाः
आरिणात्
अर्त

अर्दयः
अर्ष
अवतिराति
अववृतंत
अशायत
अशिशात्
अशीत
अशृणात्
असक्षत
असघ्नोः
असचरिषः
असश्नः
अस्कभायत्
अस्निधः
अहन्
अहासत्
अघ्नन्
आखडल
आतिरत्
आतृदः
आदभत्
आदिदेशति
आनंश
आनाश
आनुषक्
आपनीफणत्
आरिशामहे
आर्दयः
उपअरिम
उपक्षेति
उपामिमीहि
उज्जंतु
कृण्वति
कृंताति
क्षिणंति
क्षेषि
क्ष्णौमि
घसत्
घ्नंतु
चच्छद्यात्
चनिश्चदत्
चनिस्कदत्
चयसे
चयिष्ठं
चातयामसि

जहि
छेत्सत्
छेदि
छेद्य
जघान
जघ्नतः
जर्भुरत्
जस्यत
जर्हृषंत
तक्षत्
ततक्षे
तप
तसत्
तळित
ताहळि
तितृत्सान
तूतूर्षति
तुर्वसि
तृणह्ळि
तोशते
दंसयः
दभ्नाति
दभ्नुवंति
दभ्नोति
दर्दहि
दृणाति
धमति
धूर्वति
ध्वरति
नट्
नभते
नश्य
नंसते
नसते
नितोशते
निंदत
निघनिघ्नते
निबर्हयः
निरतक्षत
निरमंथत
निरष्टा
निरहन्
निरिणाति
निवपन्तु
नेशत्

प्रमिनंति
बर्हि
बर्हीः
भङ्धि
भर्वति
मंसते
मात्स
मथः
मथायन्
ममन्यात्
मर्मिरे
मर्धतः
मसीय
मासि
माहि
मिनत्
मिनवाम
मिनाति
मिनीमसि
मिनोति
मिमते
मिमिक्षः
मिमीतां
मिषंति
मीमृषः
मृणाति
मृश
मेथामास
मेदयथ
यातयाति
यंसते
रम्णाति
रंधयन्
रंधि
ररिम
रिषण्यत्
रिष्यति
रिहन्
वर्धीत्
वनुयाम
वितक्षत्
वितंतसैते
विभिनत्ति
वियावः
वृणक्ति

| | | |
|---|---|---|
| वृध्द | शिशीतं | सृणाति |
| वृश्चति | शुंधयंतु | स्नेहयति |
| व्राधतः | शुंभ | स्फुरति |
| शग्धि | शुशुग्धि | हन् |
| शश्नाति | शूशुवे | हिंसति |
| शारि | श्रृणाति | हिंसिष्ट |
| शाशद्महे | श्वसिति | |

[ तै. सं. ]

| | | |
|---|---|---|
| अघायतः | चृत | मर्धीः |
| अघ्नन् | छित्स्महि | मस्तु |
| अजिघांसन् | छिन्द्युः | मिमीते |
| अदत | जघन्थ | यंसत् |
| अदद्दहन्त | जम्भयन् | यवय |
| अदीधेत | जागृवि | युध्म |
| अपस्पृधेथाम् | तुतोद | रण्व |
| अपहंसि | तुथः | रात्सीः |
| अपहनीत | दर्दरीति | वर्धीः |
| अपहन्ति | दसत् | शंसति |
| अमिनन्त | दाशेम | शंसिषत् |
| अयुध्यः | देभुः | शस्त |
| अरुत्स्महि | दंहस्व | शिशातु |
| अर्दय | नाशयति | संजयन् |
| अवभिन्दते | निष्कृंतति | समाघ्नन्ति |
| अविध्यत | निष्खिदति | ससाहिषे |
| अशातयत | निहनत् | सहन्त्य |
| अहन् | परावधीत् | सहस्य |
| उद्धन्यात् | पराविध्यति | ह्यः |
| औषिष्टहन् | परिमिनोति | हनाम |
| कृणारि | परोवप | हन्ति |
| क्षयन् | पर्यालभ्यन्ते | हन्मि |
| क्षायि | प्रभोत्स्यते | हिंसीः |
| क्षिणन्ति | भिनद्मि | हिनस्ति |
| क्षेति | मंस्ये | हिनु |
| घ्नन् | ममत्तु | हुनुते |

[ अथर्ववेद ]

| | | |
|---|---|---|
| अघ्नत | तायते | रिशादस् |
| आघ्नीत् | तुजेते | रिण्वति |
| आलभे | दभन् | रिहन्ति |
| उच्चावधीत् | दर्द | रेरिहत् |
| कुहनत् | मथ्नामि | रेषय |
| घृतत्तु | मास्त | विससहि |
| जघ्नुः | मिमीहि | शाशद्महे |
| जजास | मेहताम् | सहसे |
| तर्द | रराध | हतम, हिनस्ति |

[1] उ प ल प्र क्षि णी—ह्या शब्दाचा फक्त ऋग्वेदांत एकदांच उल्लेख आहे. तेथें त्याचा अर्थ स्त्रीचा धंदा असा असून तिच्या मुलाचा धंदा कवीचा ( कारु ) होता, आणि मुलाच्या बापाचा म्हणजे त्या स्त्रीच्या नवऱ्याचा धंदा वैद्याचा होता. यास्क याचा ' सक्तुकारिका ' असा अर्थ करितो, आणि रॉथ ग्रासमन, झिमर व दुसरे ग्रंथकार, धान्य दळण्याच्या अर्थाकडे ह्या शब्दाचा उपयोग करितात. तथापि पिशेल म्हणतो कीं ज्या अर्थी धान्य जात्यामध्यें दळलें जात नसून तें वरवंट्यानें दगडावर वाटलें जात असे त्या अर्थी ह्या शब्दाचा अर्थ सोम कांडण्याकरितां जी स्त्री मदत करीत असे ती, असा असावा. व्हान श्रोडर म्हणतो कीं, उपल ह्या शब्दाचा अर्थ ज्यांत मुसळानें किंवा बत्त्यानें धान्य कांडलें जात असे असें उखळ किंवा खल असा करण्यास कोणताहि प्रत्यवाय नाहीं. शब्दशः अर्थ जो धान्यानें उखळ भरतो तो–किंवा ती–असा आहे.

[2] क र्मा र.—' घडकाम्या. ' हा शब्द वैदिक संहितामध्यें पुष्कळ वेळां आलेला आहे. अथर्ववेदांत ' घडकामे ' यांना कोळी ( धीवानः ) आणि रथकार ह्यांच्या जोडीला बसवून त्या सर्वांना ' मनीषिणः ' अशी संज्ञा दिली आहे. पहिल्यानें जी संघव्यवस्था अस्तित्वांत होती त्यापैकीं ही एक ब्राम्हण घडकाम्यांची जातच होती. घडकाम्यांची काम करण्याची रीत आणि त्यांची हत्यारें या विषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तो भट्टीत धातूचा रस करीत असे ( ध्मा )हें निर्विवाद आहे आणि म्हणूनच त्याला 'रसकरणारा'(ध्मात) असें ह्मणत. त्याच्या पक्ष्याच्या पंखाच्या केलेल्या भात्याचाहि ( ऋ. ९.११२,२ ) उल्लेख आहे. तो अग्नीवर ठेवण्याकरिता धातूचीं पात्रें ( ५. ३, १५ ) करीत असे. सोमपात्र देखील कधीं कधीं धातू ठोकून ( अयोहत् ) तयार करीत असत ( ऋ. ९.१.२ ).

[3] त क्ष न्. —ह्या शब्दाचा अर्थ सुतार असा असून तो ऋग्वेदांत व तदनंतर पुढील ग्रंथात आलेला आहे. त्याला लांकडाचीं सर्व कामें उदाहरणार्थ रथ व अनस् ( गाडी ) करण्यास लोक सांगत असत. चागलें नक्षीदार काम सुद्धां त्याला करिता येत असे. त्या कामीं हत्यारांचा उपयोग होई. त्यापैकीं कुलिश, परशु, कुऱ्हाड व भुरिज ( ह्याचा अर्थ अनिश्चित आहे ) ह्याचा उल्लेख आलेला आहे. ऋग्वेदामध्यें एके ठिकाणीं सुतार आपलें लांकडी काम करिताना लांकडास जो वाक देतो व तेव्हां त्याला जे श्रम पडतात त्याचा उल्लेख आलेला आहे. सुतार लोक हीन जातांचे होते किंवा त्यांचा एक निराळाच वर्ग होता असें वेदिक काळीं दिसून येत नाहीं.

[4] त्सा रि न्.—ऋग्वेदामध्यें एका लेखांत ह्याचा अर्थ तक्ष नांवाच्या एका अप्रसिद्ध जनावराची शिकार करण्यांत गुंतलेला रथी असा लुडविग व मॅक्समुल्लर ह्यांच्या मतें आहे पण हें स्पष्टीकरण केवळ काल्पनिक आहे.

५ दु द न्.—'लांकूड कापणारा' असा अर्थ ऋग्वेदांत आलेल्या दुद्दन्तर ह्या शब्दाचा होतोसें वाटतें. पण नेहमीचा अर्थ म्हणजे राक्षसाला जिंकणारा असा आहे. पण परशूचें जर हें विशेषण मानलें तर मोठी कुऱ्हाड हाच अर्थ संभवनीय दिसतो.

६ ध्मा तृ.—ऋग्वेदामध्ये के ठिकाणीं दोनदा हा शब्द आलेला आहे, व तो ' ध्माता' ( रस गाळणारा ) व ध्मातरी ( पदपाठाप्रमाणें ध्मातरि ह्याबद्दल हा शब्द आलेला आहे व हा सप्तम्यंत प्रयोग झाल्यामुळें ह्याचा अर्थ रस करण्याची भट्टी असा असावा ) अशा दोन्हीं रूपांत आलेला आहे. गेल्डनेर, बार्थोलोमे व ओल्डेनबर्ग ह्यांच्या मतें हा ध्मातरी शब्द सप्तमी विभक्तींत आलेला आहे व त्याचा अर्थ रस ओतण्याच्या कामांत ' असा आहे. लुडविग् व नॉस्सर ह्यांचे मतें ध्मातरी हें पुल्लिंगी एकवचनीं प्रथमेचें रूप असून ध्माता ह्या अर्थानें हा शब्द वापरलेला आहे. धातू ओतणें ह्याचा ऋग्वेदांत स्पष्ट उल्लेख आहे व धातु ओतणारा पक्ष्यांचे पंख (पर्णेव शकुनानाम् ) उपयोगांत आणून त्यांच्या योगानें ज्वाला पेटवितो असें त्याचें वर्णन आलेलें आहे. ह्या कलेचा विस्तृत प्रमाणांत उपयोग होत होता हें, ज्या अर्थी लोखंडाच्या ( अयस ) टोंकाचे बाण असत किंवा लोखंडाच्याच उदस्थाल्या केलेल्या असत व त्या चुलीवर ठेवीत असत किंवा घण मारलेल्या लोखंडाचीच ( अयस् )सोमरसपानाची भांडीं असत असे उल्लेख आलेले आहेत, त्यावरून सिद्ध होतें.

७ नृ तू.—ऋग्वेदामध्यें हा शब्द एकदां आलेला असून त्याचा अर्थ नर्तकी असा आहे. दुसरे एके ठिकाणीं नृति हा शब्द हास ( हांसणें ) ह्या बरोबर अंत्यविधींच्या वर्णनाचे वेळीं आलेला आहे. तथापि आयरिश लोकांतील अंत्यविधीप्रमाणें किंवा स्कॉच लोकांमधील प्रेत पुरल्यानंतर जुन्या चालीप्रमाणें होणाऱ्या मेजवानी सारखा जरी अंत्यविधीच्या वेळचाच हा एक प्रसंग होता तरी ह्या वेळीं खरोखरच नृत्य होत होतें किंवा काय हें समजत नाहीं. तथापि नृत्याचा उल्लेख ऋग्वेदामध्यें व ऋग्वेदेतर ग्रंथांत वारंवार आलेला आहे. नृत्यगीताचा उल्लेख जैमिनीय ब्राह्मणांत ( १.४२ ) आलेला आहे असें मॅकडोनेल म्हणतो.

८ प थि कृ त्.—मार्ग तयार करणारा.' हें ऋग्वेदामध्यें व नंतरच्या ग्रंथांत वारंवार येणारें नांव आहे. ह्यावरून प्राचीन काळीं रस्ते शोधून काढणें किती महत्त्वाचें होतें हें स्पष्ट दिसतें. हें नांव वारंवार अग्नीला लाविलेलें आहे. त्यावरून पूर्वींच्या काळीं अरण्याचा नाश करून पुढें जाण्याचा मार्ग खुला करणाऱ्या अग्नीचा संबंध व्यक्त होतो. पूषन् देव सुद्धां पथिकृत् आहे कारण तो कळप किंवा समुदायांचें रक्षण करतो. पथिकृत् ( ऋषी )ह्यांची तुलना रोमन लोकांतल्या पांटिफिसेस् ह्यांचाशीं करतां येईल.

९ प शु प.—ऋग्वेदामध्यें ह्याचा अर्थ गुराखी असा असून लाक्षणिक अर्थानें हा शब्द पूषन्ला लाविलेला आहे.

१० पा शि न्.—वागुरा असलेला. ऋग्वेद व अथर्ववेद ह्यामध्यें ह्याचा अर्थ पारधी असा आहे.

११ बे क ना ट.—हा शब्द एक वेळ ऋग्वेदांत आला आहे. तेथें बेकनाटांचा व पणींचा इंद्रानें पराभव केला असा उल्लेख आला आहे. याचा वास्तविक अर्थ यास्कांनीं दिल्याप्रमाणें 'व्याजबट्टा करणारा' असा असावा. हा शब्द परकीय असावा. परंतु तो कुठला हें ठरविणें फार कठिण आहे. बाबिलोनियनाइतका तो प्राचीन असणें शक्य आहे. हिलेब्रँटच्या मताप्रमाणें ब्रुनहोफरचें ' बेकनाट म्हणजे बिकानेर ' हें म्हणणें बरोबर आहे. ऋणकोला एक नाणें देऊन मला परत दोन नाणीं दे असें म्हणणारे ते बेकनाट होत. बे हा शब्द मूळांत वे असून तो द्वेचा अपभ्रंश असावा, अशी सायण यांनीं बेकनाटची व्युत्पत्ति दिली आहे.

१२ भि ष ज्.—वैद्य. ऋग्वेद व तदनंतरचे ग्रंथ यांत हा शब्द पुष्कळ वेळां येतो. पूर्वीच्या ग्रंथांतून हा धंदा कमी दर्जाचा मानलेला कोठेंहि आढळत नाहीं. अश्विन, वरुण आणि रुद्र हे सारे वैद्य ह्मणून प्रसिद्ध आहेत. परंतु धर्मशास्त्रांत हा धंदा अगदीं तुच्छ लेखिला आहे. यजुर्वेद संहितेसारख्या प्राचीन ग्रंथांतून देखील ही तुच्छता दृष्टीस पडते. तेथें अश्विनांना लोकांत जास्त मिसळण्याबद्दल त्यांच्या धंद्याच्या दृष्टीनें कमी प्रतीचे मानलें आहे. ह्यावरून जातींची भेसळ होऊं नये म्हणून वर्णाभिन्नता उघड दिसते. वेदकालींहि वैद्यांनां कमी मानीत. परंतु जेव्हां यज्ञपुरुषाचें मस्तक तुटलें त्यावेळीं तें अश्विनीकुमारांनीं सांधलें त्या वेळीं अश्विनीकुमारांनीं आपणास बरोबरचें मानलें पाहिजे अशी अट घातली व त्यावेळीं देवांनीं ती मान्य केली आणि अश्विनीकुमारांस यज्ञांत हविर्भाग मिळूं लागला अशी वेदांतील कथा वैद्यकांत वर्णिली आहे. ऋग्वेदांत एका ऋचेंत वैद्य आपल्या वनस्पती व त्यांचें बरें करण्याचें सामर्थ्य यांची फार स्तुति करीत आहे. शिवाय अश्विनांनीं आश्चर्यकारक व चमत्कारयुक्त इलाज केल्याचें वर्णन आलेलें आहे. उदाहरणार्थ लोकांची दृष्टि आणणें किंवा लंगडणाऱ्याला नीट करणें. तसेंच, पुरंधीचा नवरा व च्यवन यांनां पुन्हा तारुण्य आणणें व विश्पलेला लोखंडी पाय लावणें इ. पिशेलच्या मतानें जर विश्पला ही घोडी असेल तर खरोखर ही फार आश्चर्यकारक गोष्ट होय. वेदकालीन आर्यांची शस्त्रविद्येंत प्रवीणता होती असें समजलें असतां ही मोठी चूक होईल असें यूरोपियन पंडित म्हणतात. कारण ते असें म्हणतात कीं साध्या जखमेवर औषधें बांधण्याची कला त्यांनां अवगत होती, परंतु त्यांचा शस्त्रकलेचें ज्ञान मात्र अगदीं जेमतेम प्राथमिकच होतें. अथर्ववेदांत वैद्यकीसंबंधीं जो मजकूर येतो त्यावरून वेदकालीन लोक औषधाबरोबर मंत्रतंत्रांची योजना करीत असत व त्याचप्रमाणें जलोपचार (जलाष) हि करीत असत. परंतु त्यांत कांहीं अर्थ नव्हता. ही जलोपचाराच

पद्धत मात्र त्यांनीं "इंडोयूरोपीय" कालांतील म्हणजे जेव्हां युरोपीय व हिंदुस्थानांत आलेले 'आर्यन्' लोकांचे पूर्वज एके ठिकाणीं होते तेव्हांची चालू ठेवलेली आहे. परंतु शारीरशास्त्र (शरीरच्छेदन शास्त्र) बद्दल त्यांनीं जरी अल्प माहिती दिली आहे तरी ती फार महत्त्वाची आहे, ही माहिती यज्ञियपशु फाडूनच झालेली असावी. वैद्यक हा पूर्वी ऋग्वेदकालींहि धंदा होता असें ऋग्वेदांवरून दिसून येतें. यजुर्वेद संहितेंत दिलेल्या पुरुषमेधप्रसंगींच्या बळींच्या यादींत एका वैद्याच्या नांवाचा उल्लेख येतो. यावरून पूर्वी हा धंदा होता ही गोष्ट सिद्ध होते. ब्लूमफील्डच्या मताप्रमाणें अथर्ववेदाच्या एका ऋचेंत (५.३०,५)घरगुती इलाजाविषयींची नापसंती व वैद्याच्या धंदेवाईक ज्ञानावर भरवसा ठेवण्याविषयींची पसंती दर्शविली आहे.

[13]व प्तृ.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथांत हजामत करणारा किंवा नापिक असा ह्याचा अर्थ आहे.

[14]श स्तृ.—ऋग्वेदांत व अथर्ववेदांत जनावराचा वध करणारा म्हणजे कसाई असा ह्याचा अर्थ आहे.

[15]श्व घ्नि न्.—ऋग्वेद व अथर्ववेद ह्यांमध्यें स्पष्टपणें ह्याचा अर्थ खेळण्यांत अट्टल किंवा अट्टल धंदेवाला जुगार असा आहे ह्याचा मूळचा अर्थ पारधी असा असावा.

[16]स्ते न.—ऋग्वेदापासून पुढील ग्रंथांत चोर ह्याला हा नेहमीचा शब्द आहे.

[17]त्व ष्टृ.—हा शब्द अथर्ववेदामध्यें एकदां त्वष्टृ देवाच्या नांवावर मुद्दाम कोटी करून सुतार या अर्थी आलेला आहे. तेथें, लांकडांस चांगला आकार आणण्याकरितां'रूपं सुकृतम्' कुऱ्हाडीचा(स्वधिति) उपयोग करीत असल्याचा उल्लेख आला आहे.

[18]धीवन्.—अथर्ववेदामध्यें हा शब्द आलेला आहे आणि रॉथ, ब्लूमफील्ड व व्हिटने ह्यांच्या मताप्रमाणें ह्याचा अर्थ 'हुषार' अशा रथकाराला लाविलेलें विशेषण असा आहे. टीकाकारांच्या मताप्रमाणें धीवर म्हणजे मासे धरणारा कोळी असा याचा अर्थ आहे. पैप्पलाद शाखेच्या प्रतींत 'सुतार' ( तक्षाणः ) असा याचा अर्थ आहे.

[19] म ल ग.—अथर्ववेदाच्या एका उताऱ्यांत याचा अर्थ कपडे स्वच्छ करणारा परीट असा आहे. परंतु या शब्दाची व्युत्पत्ति मात्र निश्चयात्मक ठाऊक नाहीं.

[20] म हा न ग्नी.—अथर्ववेदांत यांचा अर्थ गणिका, वारांगना असा आहे. महानग्न हा शब्द महानग्नी या शब्दावरून निघाला असावा. याचा अर्थ कन्याविट असा आहे.

[21] मृ ग यु.—मृगयु म्हणजे पारधी. हा शब्द अथर्ववेदांत व ब्राह्मणांत क्वचित प्रसंगीं आलेला आहे. वाजसनेयि संहितेंत आणि तैत्तिरीय ब्राह्मणांत पुरुषमेधाच्या प्रसंगीं बळी दिल्या जाणारांची यादी आली आहे. तीमध्यें मार्गार, कैवर्त अथवा केवर्त, पौंजिष्ठ, दाश, मैनाल, बैन्द व आन्द यांचा कोळी म्हणून उल्लेख आहे. अशा मासे पकडून किंवा शिकार करून उपजीविका करणाऱ्या लोकांचाहि त्यांत समावेश होतो. सर्वांत जुन्या वैदिक कालीं देखील कोणत्याहि जातीचा 'शिकार' हा उपजीविकेचा मुख्य धंदा असणें असंभाव्य आहे. पशुपालवृत्ति आणि कृषि हेच निःसंशय जीवनाचे मुख्य धंदे होते. परंतु करमणुकीखातर किंवा पोटासाठीं आणि हिंस्र पशूंपासून जनावरांच्या कळपांचें संरक्षण करण्यासाठीं शिकार मुळींच करीत नव्हते असें मानणें अयोग्य होईल. स्वाभाविकपणें मुख्यतः ऋग्वेदावरून मृगयेसंबंधीं माहिती मिळते. मृगयेंत बाणांचा उपयोग कधीं कधीं होत असे. परंतु अतिप्राचीनकाळच्या मनुष्याच्या परिपाठाची अशीं जाळीं, चोरखळीं हीं जीं सावज धरण्याचीं साधनें यांचाच उपयोग सर्वसाधारणतः होत असे. पक्षी नेहमीं जाळ्यांत (पाश, निधा, जाल) पकडले जात आणि पक्षी धरणारास निधापति म्हणजे जाळ्याचा मालक असें म्हणत असत. जाळें खुंटीवर लटकवीत असत. जाळ्याला दुसरें नांव 'मुक्षीजा' असें आहे. काळवीट (ऋश्य) पकडण्याकरितां खड्ड्यांचा उपयोग केला जात असे, आणि म्हणूनच त्या खड्ड्यांना ऋश्यद म्हणजे काळवीट धरणारे असें म्हणत. ग्रीकांच्याप्रमाणें आर्य लोक कदाचित पाळीव हत्तींच्या मार्फत कडून हत्ती पकडीत असतील, कुत्र्यांच्या साहाय्यानें वराहांनांहि पकडीत असतील. परंतु ज्या उताऱ्यांतून हें मत उद्धृत केलें आहे तो उतारा संशयित स्थळींच [रेडा (गौर) धरण्यासंबंधानें] आहे. परंतु त्यास बाणानें मारीत कीं, दोरानें, फासांत अगर जाळ्यांत पकडीत, हें तेथें स्पष्ट होत नाहीं. सिंहास मात्र खड्ड्यांत पकडीत नव्हेतर पारध्यांकडून ठार मारीत. एका अस्पष्ट उताऱ्यावरून सिंहांना दबा धरून किंवा कदाचित गुप्त रीतीनें खड्डा करून पकडीत असतील असें दिसतें. मासे धरण्यासंबंधींच्या निरनिराळ्या तऱ्हांची माहिती फारच थोडी आहे. कारण यजुर्वेदांत उल्लेखिलेल्या निरनिराळ्या नांवाचा खुलासा हाच कायतो ह्याला पुरावा आहे. धैवर म्हणजे तळ्याच्या दोन्ही बाजूंनीं जाळें टाकून मासे धरणारा असा अर्थ सायणाचार्यांनीं केला आहे. दास आणि शौष्कल हे गळानें (बडिश) मासे पकडीत. बैन्द, कैवर्त आणि मैनाल जाळें टाकून पकडीत आणि पर्णक पाण्यावर व मार्गार पाण्यामध्यें हात घालून पकडीत असेंहि सायण भाष्यांत म्हटलें आहे. पण ह्या सर्वांनांहि विशेष महत्त्व देतां येत नाहीं.

[22]र थ का र.—याचा अर्थ रथ करणारा. अथर्ववेदांत हा असून औद्योगिक जातींतील राजाचा प्रजाजन असा याचा अर्थ आहे. यजुर्वेद संहितेंत व ब्राह्मणांतहि ह्याचे उल्लेख आले आहेत. ह्या सर्व उताऱ्यांत आणि बहुतेक अथर्ववेदाच्या उताऱ्यांत सुद्धां रथकार ही एक जात आहे असें दिसतें नंतरच्या वाङ्मयांत रथकार ही जात माहिष्य (क्षत्रिय बाप व वैश्य आई असलेला) आणि करणी (वैश्य बाप व शूद्र आई असलेला) ह्यांपासून झालेली संतति असें म्हटलें आहे.

परंतु ऐतिहासिक दृष्टीनें ह्यांची अशी उत्पत्ति मानणें बरोबर होणार नाहीं. यापेक्षां धंद्यावरून ही जात पडली असावी असें म्हणणें योग्य होईल. हिलेब्रँट म्हणतो कीं ज्या अर्थी 'अनु' ही जात ऋभूंची पूजा करीत असे त्या अर्थी हेच रथकारांचे पूर्वज असावे. पण ह्या तर्कास कांहींच पुरावा नाहीं.

[२३]शं बि न्.—अथर्ववेदांतच फक्त एकदां हा शब्द आला असून त्याचा अर्थ नावाडी असा आहे. शब्दशः अर्थ कावडीवाला मनुष्य असा दिसतो. हा शब्द शंब ह्या शब्दापासून झालेला आहे. शंब शब्द ऋग्वेदांत आहे पण अर्थ संदिग्ध आहे. निरुक्तामध्यें याचा अर्थ वज्र असा केला आहे.

[२४]गो वि क र्त न.— गोहन्तृ, खाटीक. वाजनेयि संहिता व शतपथांत हा शब्द आला असून याचा अर्थ व्याध, पारधी, असा आहे.

[२५]शं ख ध्म.—याचा अर्थ शंख वाजविणारा. यजुर्वेद संहितेंत पुरुषमेधाच्या वेळीं बलि दिल्या जाणारांच्या यादींत हें नांव आलेलें आहे. बृहदारण्यकोपनिषदांतहि ह्याचा उल्लेख आलेला आहे.

[२६]शै लू ष.—नट किंवा नर्तक असा याचा अर्थ आहे. यजुर्वेदांत नरमेधांत बलि दिल्या जाणारांच्या यादींत हें नांव आलेलें आहे. सायणाचार्यांनीं ह्याचा अर्थ स्वतःच्या बायकोनें व्यभिचार कर्म करून मिळविलेल्या पैशावर पोट भरणारा मनुष्य असा केला आहे.

[२७]शौ ष्क ल.—यजुर्वेदांत बलि दिल्या जाणाऱ्यांच्या यादींत हें नांव आलेलें आहे. पीटर्सबर्ग कोशांत ह्याचा अर्थ सुकलेल्या माशावर अगर सुकलेल्या मांसावर पोट भरणारा असा आहे. पौर्वात्य टीकाकार ह्याचा अर्थ सुकलेलें मांस विकणारा असा करितात. सायणभाष्यांत याचा अर्थ गळानें मासे पकडणारा मनुष्य, असा आहे.

[२८]कु सी दि न्.—शतपथांत, निरुक्तांत आणि सूत्रांत व्याजबट्टा करणारा सावकार या अर्थी हा शब्द आला आहे. तैत्तिरीय संहितेंत अनृण ( कर्जमुक्त ) शब्दाबरोबर कुसीद अप्रतीत्त [ न फेडलेलें कर्ज ] हे शब्द आले आहेत. येथें जॉली हा कुसीद शब्दाचा अर्थ कर्ज असा करितो, व तो बरोबर आहे. कारण सायणभाष्यांतहि हाच अर्थ आहे. पूर्वी व्याजाचा दर काय होता हें दिलेलें नाहीं.

[२९]चो र.—चोर हा शब्द मागाहून झालेल्या तैत्तिरीय आरण्यकाच्या शेवटल्या भागांत आढळतो. ह्या अर्थाचे वैदिक शब्द म्हणजे तस्कर, तायु, स्तेन व परिपंथिन् हे होत.

[३०]ना पि त.—हा शब्द शतपथ ब्राह्मणांत व मागाहून झालेले ग्रंथ ह्यांमध्यें न्हावी या अर्थानें आलेला आहे. परंतु ह्या पेक्षांहि जुना शब्द वप्तृ [ वप् म्हणजे श्मश्रु करणें ह्या धातूपासून ] असा आहे. वप् धातूचीं रूपें ऋग्वेदापासून आलेलीं आहेत. मृतांना पुरण्यापूर्वी त्यांची श्मश्रु करीत असत असें मॅकडोनेल म्हणतो व त्याला अथर्व (५.१,९,४) ह्या ऋचेची पुष्टि देतो; पण तेथें ह्या म्हणण्याला अगदीं आधार नाहीं.

[३१]पा रि कु ट.—हा दुर्बोध शब्द कदाचित् अपभ्रष्ट असावा. हा शब्द ऐतरेय ब्राह्मणांत एका वाक्यांत आला असून त्याचा अर्थ परिचारक असा असावा.

[३२]प्रे ष्य.—निरोप्या, हलक्या दर्जाचा नोकर किंवा दास या अर्थानें हा शब्द ऐतरेय ब्राह्मणांत शूद्राला लाविला आहे. अथर्ववेदांत प्रैष्य म्हणजे हलक्या दर्जाचा हें विशेषण आढळतें.

[३३]भि ष ज् आ थ र्व ण.—काठक संहितेंत निर्दिष्ट केलेल्या एका पुरातन वैद्याचें नांव असें मॅकडोनेल म्हणतो. पण भिषज् आथर्वण हें एका विशिष्ट व्यक्तीचेंहि नांव आहे. अथर्ववेदांत सांगितलेल्या पद्धतीनें चिकित्सा करणारा वैद्य असाच या शब्दाचा अर्थ होऊं शकेल. चरक ह्या वैद्यक ग्रंथांत अथर्ववेदाविषयीं आदर दर्शविला असून वैद्यांनीं आपलें शास्त्र अथर्ववेदावरून रचिलें आहे असें त्यांनीं सांगावें म्हणून या ग्रंथांत सुचविलें आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, चरककालीं स्वतःस आथर्वण म्हणवून घेण्यांत वैद्यांनां मोठेपणा वाटत असावा. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचें साधन ह्या धंद्यानें होतें म्हणून हा धंदा श्रेष्ठ मानला आहे. द्रव्य न घेतां औषधें दिली तर याची मोठी योग्यता आहे. मोक्षमार्गाला लागलेल्यांनां व धर्मप्रचारक लोकांनां औषधें देऊन निरोगी ठेवणें हें वैद्याचें मुख्य कर्तव्य मानलें आहे. धार्मिक लोकांचें आरोग्य राखण्याकरितांच इंद्रानें मनुष्यास वैद्यक शिकविलें. असेंहि वर्णन आलें आहे.

[३४]मृ ग व्या ध.—याचा अर्थ व्याध किंवा पारधी. ऐतरेय ब्राह्मणांत आलेल्या प्रजापतीच्या मुलीच्या दंतकथेंत व्याध या अर्थी हा शब्द आहे. कामवासनेनें अंध झालेला प्रजापति आपल्या रोहिणी नांवाच्या कन्येचा पाठलाग करीत असतांनां धनुर्विद्येंत निपुण असलेल्या व्याधानें त्याला मारलें. प्रजापति म्हणजेच मृग नक्षत्र, त्याची कन्या रोहिणी म्हणजे रोहिणी नक्षत्र, आणि हा पारधी म्हणजे व्याधाचा तारा, असें जें ह्या दंतकथेचें स्वरूप आकाशांतील दृश्याला लागूं केलें आहे तें गौण आहे असें मॅकडोनेल म्हणतो. मात्र मृग आणि व्याध ही कल्पना ह्या कथेला जुळती आहे इतकेंच, असें त्याचें म्हणणें आहे.

[३५]व णि ज.—ब्राह्मण ग्रंथांत हा शब्द आला असून ह्याचा अर्थ व्यापाऱ्याचा उद्योग म्हणजे व्यापार असा आहे.

[३६]व यि त्री.—पंचविंश ब्राह्मणांत ह्याचा अर्थ कोष्टीण असा आहे.

[३७]वा यो वि यि क.—याचा अर्थ 'पक्षी धरणारा' पांखरेंपारधी किंवा फासेपारधी. हा शब्द शतपथांत आला आहे.

[३८]वी णा-गा थि न्.—ब्राह्मणग्रंथांत याचा अर्थ वीणावादक असा आहे. शतपथांत आलेल्या वीणागणगिन् ह्या शब्दाचा अर्थ 'टोळीचा नायक' असा मॅकडोनेल करितो.

परंतु शांखायन श्रौतसूत्रांत " वीणागणैर्गायन्ति ते वीणागणगिनः। " अशी व्याख्या केली आहे.

[३९]शि ल्प.—ह्याचा अर्थ कला असा आहे व ही कला तीन प्रकारची आहे; नृत्य म्हणजे नाचणें, गीत म्हणजे गाणें व वादिन म्हणजे वाजविणें. हे तीन प्रकार कौषीतकी ब्राह्मणांत दिले आहेत.

[४०]श्र प थि तृ.—ह्याचा अर्थ आचारी. हा शब्द शतपथांत आलेला आहे.

[४१]स भा वि न्.—तैत्तिरीय ब्राह्मणांत हा शब्द स्पष्ट आला असून ह्याचा अर्थ ' द्यूतगृहाचा रक्षक ' असा सायण भाष्यांत आला आहे.

[४२]से ल ग.—ब्राह्मण ग्रंथांत ह्याचा लुटारु असा अर्थ दिला आहे.

[४३]अ क्षु.—हा शब्द ऋग्वेदांतील एका आणि अथर्ववेदांतील दोन वचनांत आढळतो. रॉथ याचें भाषांतर "जाळें" असें करितो परंतु बोथलिंक गाडीचा आंस असा अर्थ सुचवितो. गेल्डनेर त्याचा अर्थ कोळ्याच्या जाळ्याची काठी [ जाल ], गाडीचा दांडा आणि घराचा खांब असा करितो. मग तो खांब आडवा किंवा उभा हें कांहींच तो खात्रीलायक लिहीत नाहीं. ब्लूमफील्ड म्हणतो कीं, त्याचा अर्थ आढयावरून पसरलेल्या आणि दोन्ही बाजूला सोडलेल्या टहाळ्यांच्या कामाचें आच्छादन–गवतानें आच्छादिलेल्या छपराप्रमाणें–असा करितो आणि हेंच भाषांतर " सहस्राक्ष " हा जो शब्द आहे तो सार्थ आहे असें दर्शवितें. अथर्ववेदांतील दुसऱ्या वचनांत तो त्याचा अर्थ जाळें असा करितो आणि सायणाच्या मताप्रमाणें ऋग्वेदांतील शब्द विशेषणाप्रमाणें आहे किंवा काय अशी शंका येते.

[४४]ऊ र्णा.—' लोंकर. ' ऋग्वेदानंतर ह्याचा बराच उल्लेख आलेला आहे. गंधार देश मेंढ्याकरितां प्रसिद्ध होता तसा पुरुष्णी (नदीकांठचा) देशहि लोंकरीकरितां प्रसिद्ध होता. मेंढ्यांच्या अंगावरील लोकरीच्या गुच्छांना पर्वन् अथवा परुस् हा शब्द योजीत असत. ' लोंकरीसारखा मऊ ' [ उर्णम्रदस् ] हें विशेषण सर्वसाधारण आहे. मेंढीला ऊर्णावती असें म्हणत. संहिता, ऋग्वेदोत्तर ग्रंथ आणि ब्राम्हण ग्रंथ यांमध्यें वारंवार ऊर्णसूत्राचा उल्लेख केलेला आहे. ऊर्णा हा शब्द मेंढ्याच्या लोंकरीलाच लावीत असत असें नाहीं तर बकऱ्याच्या केंसालाहि योजित असत.

[४५]ओ तु.—वैदिक वाङ्मयांत हा शब्द विणकामांतील ' आडवा बाणा,' आणि तंतु हा शब्द ' उभाताणा ' असा अर्थ दर्शवितो. मूळ धातु वा ' विणणें, ' आणि तन् ' ताणणें, ओढणें,' ह्यांच्यापासून हे दोन शब्द निघाले असून समान अर्थांत त्यांचा उपयोग करितात. विणण्याच्या कामीं धोट्या ( तसर ) चा उपयोग करीत असत. विणणाऱ्याला ' वाय ' आणि मागाला ' वेमन् ' असें म्हणत. ताणा ताणण्याकरितां लांकडी खुंटी ( मयूख) आणि वजन म्हणून शिसें उपयोगांत आणीत असत. विणण्याचें काम बहुतकरून स्त्रियांच्या माथीं मारलेलें असे. अथर्ववेदांतील रूपकालंकार, दिवस आणि रात्र ह्या दोन बहिणी वर्षाचा ताणा विणीत असुन, रात्र ही उभाताणा आणि दिवस हा आडवाताणा, अशा अर्थी आहे.

[४६]कू ट.—ऋग्वेद, अथर्ववेद, आणि ब्राह्मण यांत हा अनिश्चित अर्थाचा शब्द सांपडतो. सर्व बाजूंनीं विचार केला असतां प्रत्येक ठिकाणीं लागू पडणारा याचा अर्थ 'घण' असा आहे. याचा सेंट पीटर्सबर्ग कोशांत 'शिंग' असा अर्थ असून अथर्ववेदांत ज्या ठिकाणीं हा शब्द आला आहे तेथें हाच अर्थ व्हिटने ह्यानें घेतला आहे. गेल्डनेर सांपळा किंवा पिंजरा असा याचा अर्थ करितो.

[४७]क्र य.—' विक्री विकणें.' हा शब्द जरी ऋग्वेदांत नसला तरी ज्याच्या पासून हें नाम झालें तें क्रियापद 'क्री' हें मात्र तेथें आहे. मागाहूनच्या संहितांत नाम आणि क्रियापद हीं सामान्येंकरून आहेत. ऋग्वेदांतील क्रय शब्द म्हणजे शुद्ध अदलाबदल भारलेली वस्तु अशा अर्थी उपयोगांत आणण्याकरितां इंद्राच्या मूर्तीची किंमत बहुत करून दहा गाई, परंतु इंद्राला विकत घेण्याची किंमत म्हणजे अगणीत गाई. अथर्ववेदाप्रमाणें साधारण अदलाबदलीच्या वस्तु म्हणजे वस्त्रें [ दूर्श ], पांघरण्याचे कपडे [ पवस्त ), आणि बकऱ्याचीं कातडीं [ अजिन ] ऋग्वेदकालीं खरेदीसंबंधीं जिकीर, घिसघिस होतीच आणि व्यापारांत यश मिळावें म्हणून अथर्ववेदांत एक सूक्त लिहिलें आहे. किंमतीला वस्न आणि व्यापाराला वणिज् असें म्हणत आणि व्यापारी अतिलोभी [ कृपण ] असत हें प्रसिद्धच आहे. भाष्याकारांनीं प्रमाणदर्शक नाणें असल्याबद्दल कांहीं पुरावा दिलेला नाहीं. आणि प्रमाणदर्शक नाण्याचा ज्याअर्थी स्पष्ट उल्लेख नाहीं त्याअर्थी गाय हेंच प्रमाण असावें असें वाटतें. ' हिरण्यम् शत–मानम् ' हा जो शब्दसमुच्चय बऱ्याच ठिकाणीं शतपथब्राह्मणांत आणि दुसरीकडे सांपडतो त्यावरून असें वाटतें कीं गाईशिवाय दुसरें प्रमाणदर्शक नाणें असावें, तरी वरील शब्दांचा अर्थ ' शंभर गाईंच्या किंमतीचें सोनें ' असा करितां येईल. परंतु कृष्णल याचा वजनी मापासारखा उपयोग असें सुचवितो कीं त्याचा अर्थ ' शंभर [ कृष्णल ] भारसोनें;' आणि हेंच स्पष्टीकरण शक्य आहे असें वाटतें. हें माप ऋग्वेदकालांत माहीत नव्हतें, आणि त्यावेळीं मना [ ऋग्वेद ८. ७८, २ ] ह्या एकदांच आलेल्या शब्दाचा अर्थ जरा गूढ होता, आणि सध्यां हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें जडजवाहीर हें सुटसुटींत आणि लवकर नेतां येण्याजोगी संपत्ति आहे त्याप्रमाणें ऋग्वेद कालांत निष्काचा उपयोग होत असे आणि अदलाबदलीचें एक साधन असें.

[४८]तं त्र.—तंतु ह्या शब्दाप्रमाणेंच तंत्र ह्याचा अर्थ विणलेल्या कापडाची उभी वीण किंवा अधिक प्रकाराचा

अर्थ म्हणजे 'जाळें' हा होतो. हा शब्द ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यांत आलेला आहे.

[४९] त स र.—हा शब्द ऋग्वेद व यजुर्वेद संहिता ह्यांमध्यें कोष्टयाचा धोटा ह्या अर्थानें आलेला आहे.

[५०] मु क्षि जा.—जनावरांना पकडण्याकरितां जाळें ह्या अर्थानें ऋग्वेदांतल्या एका उताऱ्यांत हा शब्द सांपडतो.

[५१] वे शी.—ऋग्वेदामधल्या एका लेखांत सुई असा ह्याचा अर्थ आहे.

[५२] सू ची.—ऋग्वेद व तदुत्तर ग्रंथ ह्यामध्यें ह्याचा अर्थ सुई असा आहे.

[५३] त न्तु.—याचा खरा अर्थ धागा असा आहे. विशेषत विणलेल्या कापडाची उभी वीण ( ओतु म्हणजे आडवी वीण याच्या उलट ) असा याचा अर्थ आहे. हे शब्द वरील अर्थानें अथर्ववेदांत आले आहेत. शतपथ ब्राह्मणांत कापडाच्या उभ्या धाग्यास अनुवाद; आडव्या धाग्यास पऱ्यास आणि नुसत्या धाग्यास तन्तु हे शब्द दिले आहेत [ ३. १, २, १८ ] तैत्तिरीय संहितेंत उभ्या ताण्याला प्राचीनतान आणि आडव्याला ओतु म्हटलें आहे. पर्यंकाच्या नवारीचा कौषीतकी ब्राह्मणांत उल्लेख आहे. ऋग्वेदांत तन्तु या शब्दाचा अलंकारिक रीत्या उपयोग केलेला आहे व ब्राह्मण ग्रंथांतहि याच अर्थानें उपयोग केलेला आढळतो.

[५४] प ण.—अथर्ववेदाच्या पैप्पलाद प्रतींत एका सूक्तांत पण, प्रपण, प्रतिपण हे शब्द आलेले आहेत. त्यांचा अर्थ सौदा व विक्रिचा प्रकार असा आहे. ज्या धातूपासून हे शब्द निघाले तो धातु पण् हा आहे. व ते मागाहूनच्या संहिता व ब्राह्मणग्रंथ यांत आढळतो.

[५५] प्र क श.—अथर्ववेदात हा शब्द आला असून याचा अर्थ चाबकाची वादी अथवा चाबकाचा फटकारा असा आहे.

[५६] वि क्र य.—अथर्ववेद व निरुक्त यांत विक्री या अर्थानें हा शब्द आला आहे. निरुक्तांत स्त्रियांची विक्री केली जाते पुरुषांची विक्री होत नाहीं असे म्हटलें आहे [ ३. ४ ]

[५७] तो त्र.—हा शब्द पराणी या अर्थानें शतपथ ब्राह्मणांत [ १२. ४, १, १० ] आला आहे.

[५८] नि धा.—जाळें या अर्थानें हा शब्द निरुक्त [ ४. २ ] व ऐतरेय ब्राह्मण [ ३. १९ ] यांत आला आहे.

वर दिलेल्या शब्दांच्या याद्यांवरून व त्यांतील महत्त्वाच्या शब्दांवरील टीपांवरून वेदकालीन लोकांचें निरनिराळ्या विषयांचें ज्ञान किती प्रगत झालें होतें याची वाचकांस साकल्येंकरून कल्पना येईल. वेदकालीन सामाजिक परिस्थितीचें चित्र वरील शब्दांवरून आनुमानिक पद्धतीनें काढून केवळ फलरूपानें वाचकांपुढें आम्हांस मांडतां आलें असतें व तसें केलें असतां आमचे श्रम व पुस्तकाचीं पृष्ठें यांचीहि बरीच काटकसर करतां आली असती परंतु वेदविद्या या विभागांत दाखविल्याप्रमाणें वाचकाला एखाद्या विषयाची केवळ सिद्धान्तरूपानें माहिती देण्यापेक्षां त्याचा त्या विषयांत प्रवेश करून देऊन त्याच्याच विचारांस चालन देऊन अभ्याससामुग्री त्याच्या कक्षेंत आणून देणें व विवेचन सुलभ करून त्यापासून सिद्धान्त काढण्यास त्यासच अवसर देणें ही विषयविवेचनाची पद्धति आम्हांस जास्त उपकारक वाटते. म्हणूनच आम्हीं वेदकालीन शब्दसृष्टि या रूपात हें तीनशें पानांचे प्रकरण वाचकांपुढें विस्तृत मांडलें आहे. यामुळें वेदाभ्यासप्रवृत्ति महाराष्ट्रांत अधिक वाढेल व महाराष्ट्रीय वेदाभ्यासकांस या शब्दसृष्टीरूपी वेदकालीन वाङ्मयाच्या पृथक्करणाचा पुष्कळच उपयोग होईल असा आम्हांस दृढ भरंवसा आहे.

शब्दसृष्टीच्या वर्गीकरणपद्धतीचें स्पष्टीकरण आरंभीं दिलेंच आहे. आपणांस अनेकार्थी शब्द ऋग्वेदांतच विशेष आढळतात. तर दुर्बोध शब्द अथर्ववेदाच्या वाट्यास आले आहेत. यावरून अथर्ववेदीय संस्कृतीचें ऋग्वेदीय संस्कृतीपेक्षां व अथर्ववेदाच्या भाषेचें ऋग्वेदीय व पाणिनीय भाषेपेक्षां भिन्नत्व स्पष्ट होतें. देवसृष्टीमध्यें आपणांस देवतांचें आधिक्य ऋग्वेदापेक्षां तैत्तिरीय संहितेंत आढळतें यावरून यजुर्वेदाचे कर्म अथवा उपासनाप्राधान्य दिसतें तर ऋग्वेदांत एक एकाच देवतेस जीं अनेक विशेषणें लाविलेलीं आढळतात त्यांवरून त्या वेदाचें स्तुतिप्राधान्य स्पष्ट होतें. जेव्हां देवतेची आपण केवळ शब्दांनींच उपासना करतों तेव्हां अर्थातच आपण आपल्या शब्दरूपी सामुग्रीचाच पुष्कळ उपयोग करून अलंकारिक वगैरे भाषा वापरून आपली उपासना अधिक रमणीय करण्याचा प्रयत्न करतों पण तीच आपली उपासना जेव्हां प्रत्यक्ष हवि वगैरे द्रव्यें अर्पण करून करावयाची असते तेव्हा वैचित्र्य भाषेपेक्षां कृतींतच जास्त आढळतें व त्यामुळें अनेक प्रकारें स्तुती करण्यापेक्षा अनेक प्रकारचे हवी व अनेक कामना करितां अनेक प्रकारचीं भिन्न भिन्न दैवतें या गोष्टी साहजिकच पुढें येतात. ही गोष्ट आपणास अगडबंब यज्ञविधी व त्यांतील अनेक संभार व अनेक प्रकारचे पशू व निरनिराळ्या काम्येष्टींच्या अनेक देवता यजुर्वेदात प्रतीत होतात यावरून स्पष्ट दिसते. देवयोनींमध्यें आपणास उत्तरकालीन भारतीयास परिचित असलेले व विशेषतः जैन वाङ्मयांत आढळणारे विद्याधर आढळत नाहींत. भरतशब्दाप्रमाणें ज्या शब्दानें एका वर्षनामक भूखंडास नांव दिलें आहे तो किंपुरुष शब्द वाजसनेयि संहितेपूर्वी आढळत नाहीं. असुरवाचक शब्द ऋग्वेदांत अधिक आढळतात व पिशाचवाचक शब्द बहुतेक सर्व अथर्ववेदांत आढळतात ही गोष्टहि लक्षात ठेवण्यासारखी आहे.

अजीवसृष्टिविषयक शब्दांवरून आपणांस असें दिसून येतें कीं भौतिक चमत्कारांचें स्थूल ज्ञान तत्कालीन लोकांस होतें. पण त्यांचेबद्दल उपपत्ति लावण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं हे सर्व दैवी चमत्कार कल्पून त्यांचेबद्दल आदरयुक्त भीति वाटून त्यांची उपासना करून त्यांपासून आपणांस त्रास न होतां पर्जन्यादि

कांचा आपणांस उपयोग व्हावा अशीच तजवीज त्यांनी करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. धातूंपैकीं सोनें, रुपें, लोखंड, तांबें, कांस्य इत्यादि धातु व त्यांचे उपयोग त्यांस ज्ञात होते हें स्पष्ट होतें. जमीनीचेंहि त्यांनीं स्थूल वर्गीकरण करून भिन्न प्रकारांस भिन्न शब्द योजले होते. जलाशयसंबंधीं शब्दांत लहानमोठ्या सरोवरांस निरनिराळे शब्द व खोदलेले कालवे असल्याचें आढळतें. गतिवाचक क्रियापदावरून वैदिक भाषेतील शब्दबाहुल्य व गतीच्या निरनिराळ्या प्रकारांस निरनिराळीं नांवें आढळतात. ग्रहनक्षत्रादि शब्दांवरील टीपांत तत्कालीन ज्योतिःशास्त्रविषयक ज्ञानाचें विस्तृत विवेचन केलेंच आहे. संख्यावाचक शब्दांवरून दशमान पद्धतीचें ज्ञान व दशन् शब्दावरील टीपेवरून एकंदर संख्यावाचक ज्ञानाची कल्पना येईल. कालाचेंहि तत्कालीन लोकांनीं सूक्ष्म भेद पाडले असून चांद्र व सैार वर्षाचा मेळहि त्यांनीं घातला होता व यज्ञांगानें कालमापनपद्धतीहि विकास पावली होती ही गोष्ट स्पष्ट होते. तत्कालीन देश, नद्या व विशिष्टस्थलवाचक नांवें यांवरून वैदिक संस्कृतीचा प्रसार कोठपर्यंत झाला होता याची कल्पना होते. यासंबंधीं विवेचन त्या शब्दांवरील टीपांत व शेवटीं उपसंहारांत केलें आहे.

मानवेतर जीवसृष्टिविषयक शब्दांवरून वैदिक लोकांचें निरनिराळ्या प्राण्यांसंबंधीं व वनस्पतींसंबंधींचें ज्ञान, त्यांची वर्गीकरणपद्धति वगैरे गोष्टी स्पष्ट होतात. या शब्दांवरहि विस्तृत टीपा दिल्या आहेत.

मानवसृष्टीमध्यें प्रथम आपणांस मनुष्यवाचक सामान्यनामें निरनिराळीं आढळतात. ज्या विशिष्ट पुरुषांचीं नांवें तेथें दिलीं आहेत त्यांची माहितीहि पूर्वीच्या एका प्रकरणांत दाशराज्ञयुद्धांत, व कांहींची तेथेंच टीपारूपानें दिली आहे. शरीरावयववाचक शब्दांवरून वैदिक लोकांच्या शारीरशास्त्राच्या ज्ञानासंबंधीं कल्पना येईल. त्या विषयीं त्यांस स्थूल गोष्टींचें ज्ञान असून बहुतेक अवयवांचें ज्ञान त्यांस होतें. शरीर या शब्दावरील टीपेंत ही माहिती दिलीच आहे. वैद्यक व औषधी या सदरांतील शब्दांवरून पाहतां सामान्य रोगांचें ज्ञान त्यांस होतें. पण औषधींबरोबर जादूटोणा, मंत्रतंत्र इत्यादींचेंहि प्राबल्य विशेष होत व कांहीं रोगांस देवतेचें स्वरूप प्राप्त झाल्याचें दिसतें. अन्न व खाद्यपेय यांतील शब्दांवरून त्यांचें पाकशास्त्रनैपुण्य व खाण्याचे निरनिराळे प्रकार यांची माहिती होते. धान्यनामांवरून तत्कालीन शेतकीची व नातेंगोतें या सदरांतील शब्दांवरून व टीपांवरून तत्कालीन सामाजिक स्थिति व कुटुंबव्यवस्थेची कल्पना येते. यासंबंधीं विवाह या शब्दावरील विस्तृत टीपेंत बरेंच विवेचन केलें आहे. यज्ञसंबंधीं शब्द ऋत्विज, यज्ञनामें, यज्ञपात्रें इत्यादि चारपांच सदरांत दिले आहेत त्यांवरून व त्यांतील महत्त्वाच्या शब्दांवरील टीपांवरून यज्ञासंबंधीं सामान्यतः बरीच माहिती होईल. दुसऱ्या विभागांत यजुर्वेदावरील विवेचनांत व इतरत्रहि यज्ञासंबंधीं पुष्कळच माहिती दिली आहे. युद्धसंबंधीं शब्दांवरून आर्यांचें युद्धकलेचें ज्ञान व गृहसंबंधीं शब्दांवरून व त्यावरील टीपांवरून आर्यांचा जीवितक्रम यासंबंधीं बरेंच ज्ञान होईल. जाति, कुलें व वंश हें सदर बरेंच महत्त्वाचें आहे. कारण यावरून त्या वेळीं कोणकोणतीं राष्ट्रें होतीं याचें ज्ञान होतें. महत्त्वाचीं राष्ट्रें व लोक यांसंबंधीं माहिती दाशराज्ञयुद्ध या प्रकरणांत येऊन गेलीच आहे. पण या शब्दांवरील टीपा त्या माहितीच्या पूरक आहेत. सामाजिक हें सदरहि बरेंच महत्त्वाचें आहे. या शब्दांवरील टीपांत अनेक गोष्टींचें स्पष्टीकरण होतें व वैदिक जीवितक्रमावर प्रकाश पडतो. भाषाविषयक शब्द अर्थातच वैदिक भाषेचें स्वरूप विशद करतात. वस्त्रें, भूषणें, व्यापार व कृषि, दळणवळण या सदरांतील शब्द सार्वजनिक जीवनक्रम स्पष्ट करतात. या शब्दांवरील टीपाहि बऱ्याच महत्त्वाच्या आहेत. विचार या शब्दांत तत्त्वज्ञानासंबंधीं माहिती आढळेल. ऋषि या सदरांतील शब्द व टीपा पुढील ब्राह्मण्याच्या इतिहासाचें साहित्य पुरवितात. राजकीय हें सदर बरेंच महत्त्वाचें असून तत्कालीन राज्यव्यवस्थेचें ज्ञान करून घेण्यास अत्यंत उपयोगी आहे. तितक्याच महत्त्वाचें इतरकर्मे हें सदर आहे. या दोन्ही सदरांतील शब्दांचा व टीपांचा वेदकालीन सार्वजनिक आयुष्यक्रमाचें ज्ञान करून घेण्यास फार उपयोग होईल.

येणेंप्रमाणें सर्व वैदिक शब्दमहोदधि मंथन करून त्याचें फल या प्रकरणांत वाचकांपुढें ठेवलें आहे. तें अर्थात् अद्यापि साहित्यरूपीच असून सिद्धांतरूपी नाहीं हें प्रथम सांगितलेंच आहे. परंतु वेदाभ्यासी महाराष्ट्रीयांस तें अत्यंत उपयुक्त होईल यांत शंका नाहीं. असो.

येथपर्यंत वेदकालीन संस्कृतीच्या अनेक अंगांचा ऊहापोह केला आहे. दैवतेतिहास, यज्ञसंस्थेतिहास, राजकीय इतिहास, सामाजिक जीवनक्रम वगैरे गोष्टींवर आतांपर्यंत विवेचन केलें आहे. आतां या वैदिक वाङ्मयाचे उत्पादक व संरक्षक असे जे ब्राह्मण त्या वर्गाचा इतिहास व पुढें वैदिक व भरतखंडांतील देश्य संस्कृती यांचें एकीकरण यासंबंधीं विवेचन करावयाचें राहिलें आहे. तरी आतां ब्राह्मण्याच्या इतिहासाकडे प्रथम लक्ष देऊं.

---

## प्रकरण ६ वें.

### ब्राह्मण्याचा इतिहास

वैदिक सूक्तांचा एका विशिष्ट प्राचीन युद्धाशीं संबंध व्यक्त झाल्यामुळें प्राचीन इतिहासाचा एक धागा आपणांस लावतां आला असें मानण्यास हरकत नाहीं. आतां प्राचीन संस्कृ-

तीच्या इतिहासाच्या दुसऱ्या मुख्य अंगाकडे आपणांस वळलें पाहिजे. त्यांकरितां आतां आपण ब्राह्मणांच्या विशेच्या, कुलांच्या आणि सामाजिक संस्थांच्या इतिहासाचें अवलोकन करूं. ब्राह्मणांचा इतिहास यावयाचा म्हणजे मंत्रद्रष्टे, गोत्रें, ऋषिकुलें आणि ब्राम्हणकुलें, यांचा म्हणजे ब्राम्हण जातीचा आणि तिच्या विशेचा इतिहास यावयाचा.

ब्राम्हणजातीच्या इतिहासाचे भाग साधारणतः पुढीलप्रमाणें पडतील.

( १ ) ब्राम्हण शब्दाची उत्पत्ति, सूक्तकर्तृत्व, सूक्तकर्त्यांत पूर्वोत्तरता, त्यांतील कुलें व संप्रदाय हीं शोधीत बसणें हा ब्राम्हणेतिहासांतील पहिला भाग होय.

( २ ) यानंतरच्या भागांत यज्ञसंस्थेच्या विकासामुळें झालेली जुन्या अथर्व्यांहून ऋत्विजांच्या महत्वाची स्थापना, ऋत्विजांचे समुच्चय आणि त्यांत झालेलें विशिष्टीकरण, तसेंच त्याचें निरनिराळ्या वेदांच्या ब्राम्हणजातींत पर्यवसान इत्यादि विषय मोडतील. या विवेचनांत ब्राम्हण या नांवाची उत्पत्ति, त्या नावांखालीं जो समाज गोळा झाला त्याचें पृथक्करण आणि त्याचा पूर्वकालीन व समकालिन समाजाशीं संबंध इत्यादि विषय मोडतील.

( ३ ) यज्ञजीवी ऋत्विजांचा वर्ग स्थापिला गेल्यानंतर त्या वर्गामध्यें अनेक भेद कसकसे उत्पन्न झाले व पुढें त्यांच्या जाती कशा बनल्या या विवेचनाचा त्यापुढील भाग होय.

( ४ ) या वर्गाचा सर्व हिंदुस्थानभर प्रसार कसा झाला आणि त्यांचें कार्य काय झालें.

( ५ ) गोत्रप्रवरादिकांची उत्पत्ति आणि गोत्रसंस्थेचा ब्राह्मण जातीशीं व इतर जातीशीं संबंध.

यापैकीं कांहींसा इतिहास मागें येऊन गेलाच आहे. याच्या विकासक्रमांत चातुर्वर्ण्यकल्पनेचा व तदंतर्गत वर्गीकरणाचा उल्लेख केला नाहीं व त्यास कारणहि आहे. चातुर्वर्ण्याची कल्पना जुनी आहे आणि ब्राम्हणसदृश एक वर्ग पर्शुभारतीय कालीं व मूलगृह्यकालीं होता ही गोष्टहि मागें वेदविद्या या भागांत दिलीच आहे व जर वेदपूर्वकालीं वर्गरूप संघीकरण होऊन गेलें होतें तर उत्तर कालांत जो इतिहास यावयाचा त्यांत पूर्वीच्या संघीकरणांत पुढें कशीं काय रूपांतरें होत गेलीं हेंच यावयाचें. प्रथमसंघीकरण वेदसाहित्यानें आपणांस ज्ञेय नाहीं. वाटेल त्या तत्ववेत्त्यानें या प्रथमसंघीकरणाविषयीं वाटेल ती कल्पना करावी आणि आपली कल्पना तीच खरी असें गृहीत धरून बसावें यापलीकडे या विषयाची चर्चा जाणें शक्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. जो अत्यंत प्राचीन समुच्चय तयार झाला त्याचा प्रारंभकाल जरी ज्ञेय नाहीं, आणि वेदांत त्या वर्गाच्या घटनेची क्रिया सांपडणार नाहीं, तरी ब्राम्हणकालिस्थापनेंपूर्वीचें त्याचें स्वरूप कसें काय होतें हें वैदिक वाङ्मयावरून समजण्याजोगें आहे. त्या वर्गांत मांत्रिकपणा वैद्यकपणा, कवित्व, स्तोत्रकर्तृत्व हीं होतीं. समाज नियमनात्मक धर्मशास्त्रकर्तृत्व त्याच्यांत त्याकाळीं नसावें, ईश्वरी संचार होऊन बोलणें म्हणजे यहुदी लोकांत असलेला प्रवक्तेपणा हाहि त्यांच्यांत फारसा दिसत नाहीं. अगदीं प्रारंभीच्या काळीं नीतियुक्त वचनांच्या प्रवक्त्यांच्या उद्भवास योग्य प्रसंग उत्पन्न होत होते असें म्हणतां येत नाहीं. पण देवाशीं सायुज्य व सलगी दाखविणारे ऋषी वेदांत दिसून येतात. या वर्गास अत्यंत प्राचीन काळीं काय नांव होतें हें सांगतां येत नाहीं. पुरोहित, उपाध्याय, वगैरे सर्व प्रकारचीं नांवें त्यांचें कार्य वर्णन करण्यास अपुऱ्या अर्थाचीं आहेत. तरी अगदीं प्रारंभीं त्या वर्गाला ब्राह्मण हें नांव असावें असें वाटत नाहीं.

इराणी संस्कृतींत समाजांतील प्रथम वर्गाचें नांव अथ्रवन् असें होतें हें आपल्याकडील अथर्वा या शब्दाचें भिन्नरूप आहे हें उघड आहे. भारतीय संस्कृतींत प्रथमवर्गाचें "ब्राह्मण" असेंच नांव आपणांस परिचित आहे. तर यांतील नांव जुनें कोणतें. अथर्ववेद हा ग्रंथ जर समाजांतील अत्यंत प्राचीन विद्येस समंत्रकता उत्पन्न केल्यामुळें उत्पन्न झाला आहे आणि, अथर्वा हें यज्ञ संस्थेंतलि ऋत्विजाचें नांव नाहीं तरी वेदास तें नांव देण्याइतका तो शब्द महत्त्वाचा होता, आणि अग्नीस प्रथम अथर्व्यानें मंथन करून उत्पन्न केलें अशीं वाक्यें प्रत्येक वेदांत वारंवार वदलीं गेलीं आहेत त्या अर्थीं अथर्वा हेंच नांव एका काळीं त्या परमार्थोपजीवी समुच्चयास लागलें असणें अशक्य नाहीं. अथर्वा हेंच नांव जर प्राचीन असेल तर ब्राह्मण या नांवाचा प्रसार कसा झाला व तो केव्हां झाला, आणि ब्राह्मण या शब्दाचा मूळ अर्थ काय?

पण प्रथम असा संशय येतो कीं "ब्राह्मण" हाच शब्द प्रथमतः त्या वर्गाचा बोधक म्हणून उत्पन्न झाला काय? ऋग्वेदांत ब्राह्मण हा शब्द अनेक प्रसंगीं येतो त्याप्रमाणेंच ब्रह्मपुत्र हाहि येतो. तर ब्रह्मपुत्र आणि ब्राम्हण हे एकाच अर्थाचे शब्द नसतीलना? ब्राह्मण म्हणजे ब्रह्मन्‌चा मुलगा असा अर्थ नसेल ना? असा संदेह उत्पन्न होतो ही कल्पना खरी असल्यास 'ब्रह्मन्' हें वर्गाचें अगर धंद्याचें नांव असून पुढें ब्राह्मणपुत्र आणि ब्राह्मण हे शब्द तो वर्ग वंशपरंपरेनें चालू झाल्यावर उत्पन्न झाले असतील अशी शक्यता दिसते. पुष्कळ प्रसंगीं ब्राह्मणास ब्रम्हन् या शब्दानेंच संबोधिलेलें आपणांस अनेक उत्तरकालीन ग्रंथांतहि दिसतें. असें असल्यास ब्रह्मन् या शब्दाचा मूळ अर्थ काय असावा; तो या वर्गास कोणत्या कारणपरंपरेनें लागला असावा हे प्रश्न उत्पन्न होतात.

श्रौतधर्माचा विकास झाल्यानंतर चार वर्गाचे ऋत्विज तयार झाले. त्याच्यानंतर ब्रह्मन् किंवा ब्राम्हण शब्द प्रचारांत आला कीं अगोदर अस्तित्वांत आला हें निश्चया-

त्मक सांगतां येतें. चार वर्गांच्या ऋत्विजांनीं चालविलेल्या यज्ञसंस्थेंतील ब्रह्मत्वावरून ब्राह्मण ही पदवी तयार झाली असें वाटत नाहीं. कांकीं, ब्रम्ह्यास त्रैविद्यांनीं जेव्हां आपल्या यज्ञसंस्थेत स्थान दिले नव्हतें अशा-कालीं ब्राम्हण हा शब्द पूर्णपणें स्थितार्थ व स्थितपददर्शक झाला होता हें फक्त तीन वेदांचाच उल्लेख करणाऱ्या पुरुष-सूक्तावरून दिसतें. पुरुषसूक्तानें प्रथमवर्गाचा उल्लेख ब्राह्मण या शब्दानें स्पष्ट केला आहे. ब्राह्मण या शब्दाचा संबंध यज्ञसंस्थेंतील ब्रम्हपदाशीं ज्युलियस एगलिंग यानें जोडला तो त्या कारणामुळें आम्हांस संमत नाहीं. ब्रह्मवादी म्हणजे यज्ञांत संशयनिर्णायक वाक्य सांगणारा, हा अर्थ इतका उत्तरकालीन व अप्रसिद्ध आहे आणि हें कार्य इतकें कमी वारंवार येणारें होतें कीं त्याच्या योगानें मोठ्या वर्गास नांव मिळेल हें संभवनीय नाहीं. ब्रह्मन् याचा अर्थ सर्व विश्व-व्यापक तत्त्व. त्या शब्दाचा ब्राम्हण अथवा वर्गवाचक ब्रह्मन् या शब्दांशीं कार्यकारण संबंध जोडतां येत नाहीं. पण हे दोन्ही शब्द एकाच धातूपासून निरनिराळ्या कारणपरंपरेनें उत्पन्न झाले असणें शक्य आहे. अथर्व्यांची यज्ञसंस्था अति-प्राचीन होती आणि पुढें अध्वर्युहोतृयुक्त यज्ञसंस्था उत्पन्न झाल्यानंतर कालांतरानें तींत ब्रम्ह्याची यज्ञसंस्था विलीन झाली आणि ब्रम्ह्याचें सहाय्यक ते ब्रह्मगणांतील ऋत्विज बनले असा इतिहास मागें दुसऱ्या विभागांत दिला आहे. पुरुषसूक्तांत तीन वेदांचा उल्लेख आणि वर्गरूपानें उल्लेख करण्यास ब्राम्हण या शब्दाची योजना यावरून असें दिसतें कीं, त्रैविद्यांस आपली अथर्व्या-विरहित यज्ञसंस्था चालू ठेवावी लागली तरी ब्राह्मण शब्द घ्यावा लागला. यावरून ब्राह्मण, ब्रम्हपुत्र, निदान ब्रह्मन् या शब्दांचें महत्त्व त्रैविद्यांची यज्ञसंस्था उत्पन्न होण्यापूर्वींचें असावें. होते, उद्गाते, अध्वर्यु यांचें विशिष्टीकरण होण्यापूर्वीं ब्रह्मन् हा वर्ग उत्पन्न झाला असावा आणि तो देखील वंश-परंपरेनें आपल्या विद्येचा उपयोग करणारा असावा. बृह याचाच अर्थ स्तोत्र किंवा वाढविण्याची कांहीं तरी विद्या. असा असून त्याला मत् प्रत्यय लागून बृहमत् असा शब्द तयार झाला असावा आणि त्याचें ब्रह्मन् असें रूप झालें असावें. एकंदरींत ब्रह्मन् हा शब्द सोमसंस्थांच्या पूर्वीं तयार झाला असावा आणि सोमसंस्थांच्या पूर्वींच हा वर्ग बराचसा वंशपरंपरेनें चालू असावा असें दिसतें.

**सूक्तकर्तृत्व.**—प्राचीन ऋषींचा इतिहास देण्यासाठीं आपणास जें कार्य करतां येईल तें एवढेंच कीं त्या ऋषींनीं सूक्तरचना कशा प्रकारची केली, त्यांनीं यज्ञ कोणते केले, त्यांचे यजमान कोण होते, हें सांगणें, तसेंच त्या ऋषींमध्यें जुने कोणते व नवे कोणते हें पाहणें व त्यांच्या कुलांविषयीं, त्यांच्या इतर संबंधीजनांविषयीं व प्राचीन विद्याविषयक आणि परमार्थविषयक सांप्रदायाविषयीं माहिती मिळाल्यास ती देणें. याविषयीं मंत्रकालीन माहिती थोडीच असणार. हे ऋषी ज्या वेळीं झालें त्यावेळीं यज्ञसंस्था बरीच बाल्यावस्थेंत होती. ज्या अर्थीं त्यावेळीं बृहत् सोमयाग होऊं लागले नव्हते त्या अर्थीं त्यांचे यज्ञ म्हणजे जेव्हां एखादा राजा अश्वमेध वगैरे करील तेव्हां त्यास मदत करणें, दैनिक किंवा नैमित्तिक हवन करणें आणि प्रसंगीं अग्निसहाय्याची निरपेक्षता ठेवून यजन करणें यापलीकडे त्यांना कांहीं कर्तव्य नव्हतें. जेव्हां मोठमोठे यज्ञ सुरू झाले तेव्हां भिक्षुकी चळवळीस रंग आला. तथापि यज्ञसंस्था बाल्यकालासारख्या कालांतहि भिक्षुकस कांहींच कार्य नव्हतें असें नाहीं. एखाद्या राजाचें पौरोहित्य मिळविणें, तें टिकविणें आणि दुसऱ्याचें पौरोहित्य स्वतःस मिळविणें या प्रकारची खटपट त्यावेळीहि करावी लागे. एखाद्या राजसत्ताक संस्थानामध्यें मोठी जागा स्वतःस मिळवि-ण्यासाठीं कारकून आणि मुत्सद्दी यांची वरिष्ठाचें मन वळविण्यासाठीं ज्या प्रकारची मुत्सद्दीगिरी चालते तशीच मुत्सद्दीगिरी राजपौरोहित्य मिळविण्यास लागावयाची. वसिष्ठ विश्वामित्रांचें भांडण या प्रकारची स्पर्धा दाखवितें. राजसत्ता जाऊन प्रजासत्ता आली म्हणजे ज्या प्रमाणें आपला पक्ष प्रबल करावयाचा, दुसऱ्या पक्षावर शिंतोडे टाकावयाचे, असल्या प्रकारची मुत्सद्दीगिरी चालते तशीच मुत्सद्दीगिरी यजूंच्या म्हणजे बृहद्यज्ञांच्या वेळीं चालत असे. मंत्रकालांत मोठाले याग नसल्यामुळें मंत्रकालीन भिक्षुकीचा इतिहास अधिक अल्प होतो. प्राचीन ऋषींच्या इतिहासातील महत्वाचा भाग म्हटला म्हणजे त्यांचें सूक्तकर्तृत्व होय. याविषयीं जी माहिती उपलब्ध होते तिची शक्य तेवढी तपासणी करून येथें देत आहों.

**ऋषींच्या सूक्तकर्तृत्वासंबंधीं मंत्रांतील पुरावाः**— प्राचीन ऋषि व ऋत्विज यांचा ( त्यांच्यांतीलच ) पूर्वापर संबंध जोडणें हा पारमार्थिक इतिहासाचा एक भाग झाला. तसेंच प्राचीन ऋषींचा त्यांच्या यजमानाशीं संबंध जोडणें हा आणखी एक भाग झाला. या ऋषींचें कार्य केवळ आपल्या यजमानांचें पौरोहित्य करणें एवढेंच नव्हे. काव्य करणें हें कार्य केवल यजमानाची स्तुति करणें या बुद्धीखेरीज इतर भावनांनीं म्हणजे वैयक्तिक स्तोत्रेच्छेनें किंवा काव्ये-च्छेनें होत असलें पाहिजे. यासाठीं आपण प्राचीन ऋषींपैकीं कोणकोणत्या ऋषींनीं काव्य करण्याकडे आपली बुद्धि खर्च केली हें पाहिलें पाहिजे. हेंच सांगण्याचें कार्य आपण करतों असा बहाणा सर्वानुक्रमणी व बृहद्देवता हे ग्रंथ बाळगतात. यांच्या पूर्वीं जावयाचें म्हणजें ब्राह्मण ग्रंथांतील उतारे द्याव-याचे; पण तेहि विश्वसनीय नाहींत. कारण ते देखील बऱ्याच उत्तरकालांतील आहेत. ब्राह्मणकारांस अनुक्रमणीकारांपेक्षां परंपरा अधिक परिचित असेल या अपेक्षेनें त्यांची विश्वस-नीयता अधिक एवढेंच. प्रत्येक सूक्ताचा द्रष्टा देण्याचें ओझें डोक्यावर घेतल्यामुळं परंतु परंपरागत माहिती मात्र नस-ल्यामुळें कांहीं टिकाणीं कांहींतरी दडपून देण्याची बुद्धि सर्वानुक्रमणीकारांस झाल्यामुळें तिची विश्वसनीयता जशी

कमी होतें त्याप्रमाणें ब्राह्मणकारावर ओझें नसल्यामुळें त्यांस गप्पा मारण्याचें एक प्रयोजन कमी होतें. ब्राह्मणकारांनीं सूक्तांचा उल्लेख करतांना 'कोणा एका ऋषीचें' अशा प्रकारचे उल्लेख केलेच आहेत. परंतु त्यांच्या विश्वसनीयतेस बाधक अशी एक गोष्ट होती कीं, लोकांवर छाप टाकण्यासाठीं सूक्ताचें कर्तृत्व भलत्याकडे देण्याचा प्रयत्न त्यांच्या हातून होणें शक्य आहे. तथापि निश्चित कारणाशिवाय अविश्वसनीयतेचा आरोप करून ब्राह्मणांतर्गत सर्वच पुरावा टाकून देणें शहाणपणाचें होणार नाहीं. ब्राह्मणांपेक्षां जुना पुरावा म्हटला ह्मणजे मंत्रांचाच होय. आतां आपणांस सूक्तकर्तृत्वाची थोडी छाननी केली पाहिजे. सूक्तकार म्हणून ज्यांनां सर्वानुक्रमणीनें म्हटलें आहे त्यांपैकीं ऋग्मंत्रांत कितीजणांचा उल्लेख येतो त्यांची यादी तसेंच ऐतरेय ब्राह्मण कोणत्या सूक्ताचा कोण द्रष्टा आहे म्हणून उल्लेखितें त्याची यादी येथें देतों. ऋग्मंत्रांत उल्लेख एखाद्या व्यक्तीचा येतो तेवढ्यावरून तिनें अमुक सूक्त केलें असें होत नाहीं. तथापि एवढेंच सिद्ध होईल कीं त्या व्यक्तीनें तें सूक्त केलें अशाप्रकारच्या गृहीत सिद्धांतास कालभिन्नतेची बाधकता यावयाची नाहीं.

### सर्वानुक्रमणीनें ज्यांस सूक्तद्रष्टे म्हटलें आहे अशांपैकीं ऋग्मंत्रांत उल्लेखिलेले लोक.

| | | |
|---|---|---|
| अगस्त्य | कक्षीवान् | देवश्रवा |
| अग्नि | कण्व | देवापि |
| अपाला ( स्त्री ) | कलि | द्युम्न |
| अंबरीष | कवष | द्वित |
| अयास्य | कश्यप | नाभाक |
| अरिष्टनेमि | कुत्स | नाभानेदिष्ठ |
| अर्चनानस् | कुशिक | नीपातिथि |
| अर्बुद | गय | नृमेध |
| अवत्सार | गविष्ठिर | नेम |
| अवस्यु | गृत्समद | नोधा |
| अश्वमेध | गोतम | पणि |
| असित | गोपवन | पराशर |
| आयु | गौरिवीति | पायु |
| आसंग | घोषा | पुरुमीळ्ह |
| इट | जमदग्नि | पुरुमेध |
| उपस्तुत | तान्व | पुरूरवस् |
| उशना | त्रसदस्यु | पूरु |
| ऊर्ध्वकृशन | त्रित | प्रथ |
| ऋजिश्वन् | त्रिशोक | प्रस्कण्व |
| ऋज्राश्व | त्र्यरुण | प्रियमेध |
| ऋणंचय | दुर्मित्र | बृहदुक्थ |
| एकद्यू | दुवस्यु | बृहद्दिव |
| एतश | देववात | भारद्वाज |

| | | |
|---|---|---|
| भृगु | वसिष्ठ | श्रुतकक्ष |
| मनु | वामदेव | श्रुतवित् |
| मुद्गल | विमद | श्रुष्टिगु |
| मेधातिथि | विश्वक | संवरण |
| मेध्यातिथि | विश्वामित्र | सत्यश्रवस् |
| यजत | वीतहव्य | सदापृण |
| ययाति | शकपूत | सप्ति |
| रातहव्य | शंबर | सप्तगु |
| राम | शार्यात | सप्तवध्रि |
| रेभ | शास | सव्य |
| रेभसूनु | शिम्यु | सुदास |
| रोमशा | शिरिंबिठ | सुहस्त्य |
| लोपामुद्रा | शुनःशेप | सोभरि |
| वम्र | श्यावाश्व | स्यूमरश्मि |
| | | हिरण्यस्तूप |

**ब्राह्मणोल्लिखित सूक्तकर्ते.**—सर्वानुक्रमणीपेक्षां ब्राह्मण ग्रंथांचा पुरावा अधिक महत्त्वाचा असणें शक्य आहे म्हणून पूर्वी सांगितलेंच आहे. ऋग्वेदांतील सूक्तांचें ब्राह्मण वाक्याप्रमाणें ग्रंथकर्तृत्व शोधावयाचें झाल्यास आपणांस ऐतरेय आणि शांखायन ब्राह्मण हे त्या वेदांवरील ग्रंथ माहिती देण्यासाठीं उपलब्ध आहेत. तथापि त्यांवरूनहि फारशी माहिती मिळत नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत आलेली माहिती पुढें देत आहों.

| सूक्तद्रष्टा | ऐ. ब्रा. स्थल | ऋक्स्थान |
|---|---|---|
| कक्षीवान् | ( १.२१ ) | ( १. १२० ) |
| कवष | ( २.२९ ) | ( १०. ३० ) |
| गय | ( ५. २ ) | ( १०. ६३ ) |
| गृत्समद | ( ५. २ ) | ( १. १०० ) |
| गौरिवीति | ( ३.१९ ) | ( १०. ७३ ) |
| नाभाक | ( ६.२४ ) | ( ८. ४१ ) |
| नाभानेदिष्ठ | ( ५.१३ ) | ( १०. ६३ ) |
| नोधा | ( ६.१८ ) | ( १. ६१ ) |
| परुच्छेप | ( ५.१२ ) | ( १. १२८ ) |
| बरु | ( ६.२५ ) | ( ११. ९६ ) |
| भरद्वाज | ( ६.१८ ) | ( ६. २२ ) |
| वसिष्ठ | ( ६.१९ ) | ( ७. २४ ) |
| वामदेव | ( ६.१९ ) | ( ४. १९ ) |
| विमद | ( ५. ४ ) | ( १०. २० ) |
| विश्वामित्र | ( ६.१९ ) | ( ३. ४८ ) |
| शार्यात | ( ४.३२ ) | ( १०. ९२ ) |
| सुकीर्ति | ( ६.२९ ) | ( १०. १३१ ) |
| हिरण्यस्तूप | ( ३.२४ ) | ( १. ३२ ) |

ही माहिती देतांना हेंहि सांगितलें पाहिजे कीं ऐतरेय ब्राह्मणकार जी संहिता आपल्या पाठकास किंवा वाचकास परिचित आहे म्हणून समजतात ती संहिता सध्याची शाकल

संहिता नव्हे. कारण ऐतरेय ब्राह्मणांत दृष्ट असलेलीं सूक्तें शाकल संहितेशीं जुळत नाहींत. उदाहरणार्थ हल्लींच्या ऋक्संहितेंतील ३. १३ या सूक्तांतलि ऋचांचा अनुक्रम ऐ. ब्राम्हणांत दिलेल्या ( २. ३९ ) अनुक्रमास जुळत नाहीं.

सू क्त क र्तृ त्व आ णि पु रा व्या चा अ भा व.—सर्वानुक्रमणींत ज्यांचा सूक्तद्रष्टे म्हणून उल्लेख केला आहे परंतु ज्यांचा मागमूसहि मंत्रांत नाहीं अशांची यादी आतां देतों. या यादीमध्यें ज्यांचा कोणत्यातरी ब्राम्हण ग्रंथांत नुसता नामनिर्देश ( सूक्तद्रष्टा म्हणून नव्हे. तर व्यक्तीचें ब्राम्हण वाक्याच्या पूर्वीचें अस्तित्व दाखविणारा ) झाला आहे अशांच्या नांवापुढें त्या ग्रंथाचें नांव व स्थल दिलें आहे.

सर्वानुक्रमणीकारांनीं प्रत्येक सूक्तास द्रष्टा असलाच पाहिजे या आग्रहास बळी पडून कांहीं सूक्तांचें कर्तृत्व देवतांस दिलें आहे. सूक्तकर्त्या देवता म्हटल्या म्हणजे इंद्र, इंद्रमुष्कवान्, वैकुंठ, इंद्राणी, उर्वशी, नारायण, परमेष्ठी, प्रजापति, बृहस्पति मरुत्, मातरिश्वन्, यम, यमी, वरुण, विश्वकर्मन्, विश्वावसु, विष्णु, वृषाकपि, शची ( पौलोमी ), सूर्य, सोम, हिरण्यगर्भ या होत. या प्रकारचीं नांवें पुढील यादींत दिलीं नाहींत.

अकृष्टमाष
अक्ष
अग्निगृहपति
अग्नितापस
अग्निपावक
अग्निबार्हस्पत्य
अग्नियुत
अग्नियूप
अग्निसौचीक
अघमर्षण
अंग
अत्रिभौम
अनिल
अन्धीगु
अप्रतिरथ
अभितपा
अभीवर्त
अमहीयु
अश्वसूक्तिन्-
(पंचविंश ब्रा.
१९.४,१०)
अष्टक
अष्टादंष्ट्र
(पंचविंश ब्रा.
८.९,२१)
अंहोमुच्

असित
इध्मवाह
इंद्रप्रमति
इरिंबिठि
उचथ्य
उत्कील
उपमन्यु
उरुक्षय
उरुचक्रि
उल
ऊरु
ऊर्ध्वग्रावन्
ऊर्ध्वसद्मन्
ऋषभ
(ऐतरेय ब्रा.
७.१७)
ऋष्यशृंग
(जैमि. उ. ब्रा.
३.४७,१)
एवयामरुत्
कत
कपोत
कवि
कुमार
कुरुसुति
कुल्मलबर्हिष्

(पंचविंश ब्रा.
२५.३,२१)
कुसीदिन्
कूर्म
कृतयशा
कृत्नु
कृष
केतु
गर्ग
गातु
गाथिन्
(ऐतरेय ब्रा.
७.१६)
गोधा
गोषूक्तिन्
(पंच. ब्रा.
१९.४,१०)
गौपायन
(पंच. ब्रा.
१३.१२,५)
घर्म
चक्षुष्
जय
जरत्कर्ण
जरितार
जुहू

जूति
जेता
तपुर्मूर्धन्
तिरश्ची
त्रिशिरस्
त्वष्टृ
दक्षिणा
दमन
दिव्य
दृळ्हच्युत
[जैमि. उ. ब्रा.
३.४२,१]
देवमुनि
[पंच. ब्रा.
२७.१४,५)
देवल
देवातिथि
[पंच. ब्रा.
९.२,१९]
द्युतान
द्युम्नीक
द्रोण
धरुण
ध्रुव
नर
नभःप्रभेदन
नारद
[ऐत. ब्रा.
८.२३]
निध्रुवि
पतंग
[जैमि. उ. ब्रा.
३.३,१४]
परुच्छेप
[ऐत. ब्रा.
५.१२]
पर्वत
[ऐत. ब्रा.
८.२३]
पावित्र
पुनर्वत्स
पुरुहन्मन्
[पंच. ब्रा.
१४.९,२९]
पूरुवत्स

पूरण
पूरु
पृश्नि
प्रगाथ-
प्रजावान्
[ऐत. ब्रा.
१.२१]
प्रतर्दन
(कौषी. ब्रा.
९६.५)
प्रतिक्षत्र
प्रतिप्रभ
प्रतिभानु
प्रतिरथ
प्रभूवसु
प्रयस्वत्
प्रयोग
बंध
बुध
(पंचविंश ब्रा.
२४.१८,६)
बृहन्मति
भर्ग
भिक्षु
भिषज्
भुवन
मथित
मत्स्य
मधुच्छंद
(ऐत. ब्रा.
७.१७)
मनुवैवस्वत
मन्यु
मेध्य
यक्ष्मनाशन्
यक्ष
यविष्ठ
रक्षोहा
रेणु
(ऐत. ब्रा.
७.१७)
रेभसूनु
रेभा
लव
लुश

(पंच. ब्रा.
९.२,२२)
लौपायन
वत्सप्री
(पंच. ब्रा.
५.२,१)
वसुकर्ण
वसुकृत
वसुक्र
[ऐ. आरण्यक
१.२,२]
वसुमनस्
वसुयु
वसुरोचिष्
वसुश्रुत्
वातजूति
वाक्
विंदु
विप्रजूति
विप्रबंधु
विभ्राज्
विवस्वान्
विवृहा
विश्ववारा
विहव्य
वृष
वृषाणक
वैखानस
(पंचविंश ब्रा.
१४.४,७)
व्याघ्रपाद
शक्ति
शंख
शतप्रभेदन
शशकर्ण
शिखंडिन्
शिबि
शिशु
[पंचविंश ब्रा.
१३.३,२४]
श्येन
श्रद्धा
श्रुतबंधु
संकुसुक
सत्यधृति

| | | |
|---|---|---|
| सप्ध्वंस | सिंधुक्षित् | सुहोत्र |
| सप्ति | (पंचविंश ब्रा. | सूनु |
| संवनन | १२.१०,६) | सोमाहुति |
| संवर्त | सिंधुद्वीप | स्तंबमित्र |
| [ऐतरेय ब्रा. | सुकक्ष | स्यूमरश्मि |
| ८.२३] | सुकीर्ति | स्वस्ति |
| सर्पराज्ञी | (ऐतरेय ब्रा. | हविर्धान |
| सर्वहरि | ६.१५) | हरिमंत |
| साधन | सुदिति | हर्यत |
| सारिसृक्क | सुपर्ण | |
| सिकतानिवावरी | सुवेदस् | |

**सूक्तकर्ते व गोत्रें.**—यज्ञकर्त्यांच्या आणि ऋत्विजांच्या अगोदरची जी सूक्तकारांची विद्या तिच्या उत्पादकासंबंधानें जी माहिती उपलब्ध झाली ती आतांपर्यंत दिली. आतां ब्राह्मण्याच्या इतिहासांतील दुसरा महत्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे विद्या ज्यांनीं उत्पन्न केली त्यांचीं कुलें, आश्रयदाते वगैरेंसंबंधीं आपणांस काय माहिती उपलब्ध होते हा होय. नांवांच्या याद्या निरनिराळ्या ठिकाणीं सांपडल्या तर त्यांत परस्परसंबंध काय सांपडतात हें आपणांस पाहिलें पाहिजे. सूक्तकार, निरनिराळीं गोत्रें, मंत्रोक्त ऋषि आणि मंत्रोक्त राजे यांतील अन्योन्याश्रय, तसेंच ऋषींऋषींतील पौर्वापर्य हीं ब्राह्मण्याच्या इतिहासाचीं महत्वाचीं अंगें होत. उत्तरकालीन ब्राह्मण जीं गोत्रनामें आपल्या पूर्वजांचीं नांवें समजतात, आणि त्या पूर्वजांस ऋषी समजतात त्यांमध्यें कांहीं मंत्रकालीन ऋषी असणें अशक्य नाहीं. त्यांस ऋषिपद प्राप्त झालें त्याचें कारण त्या व्यक्तींकडून कांहीं सूक्तें तयार झालीं असावींत किंवा उपासनासंप्रदाय किंवा वेदांगविशिष्ट ज्ञानाचे संप्रदाय स्थापन झाले असणें शक्य आहे. प्रस्तुत प्रसंगीं सूक्तकर्ते म्हणून समजल्या जाणाऱ्या व्यक्ती विवेचनास घेतल्या असल्यामुळें सूक्तकर्ते व गोत्रें यांचा काय संबंध दिसून येतो तो पाहूं.

सर्वानुक्रमणीकारांनीं दाखविलेल्या सूक्तकारांपैकीं प्रत्यक्ष ऋग्मंत्रांत उल्लेखिलेल्या व न उल्लेखिलेल्या अशा दोहोंची यादी पूर्वी येऊन गेलीच आहे. सूक्तकारांचा गोत्रांशीं संबंध जोडावयाचा म्हणजे ज्या सूक्तकारांच्या नांवांवर गोत्रें चालू आहेत अथवा सूत्रकारांनीं दाखविलीं आहेत त्यांची यादी देणें होय. या यादीपैकीं ज्या नांवांचा ऋग्मंत्रांत उल्लेख आहे तीं गोत्रें कदाचित् जुनीं म्हणून जास्त महत्त्वाचीं असूं शकतील व ऋग्वेदांत उल्लेख नसलेलीं अलीकडील असूं शकतील. म्हणून यादींत ऋग्मंत्रोत्तर गोत्रनामें × या खुणेनें दाखविलीं आहेत.

सूत्रोक्त गोत्र म्हणून उल्लेखिलेल्या ऋषींपैकीं ज्यांस सर्वानुक्रमणीकारांनीं मंत्रद्रष्टे म्हटलें आहे अशा ज्या व्यक्ति त्या येणें प्रमाणें.—

| | | |
|---|---|---|
| अगस्त्य | कक्षिवान् | ×पूरण |
| अघमर्षण | कण्व | बृहदुक्थ |
| ×अजमीह्ळ | ×कत | भारद्वाज |
| अत्रि | कश्यप | भृगु |
| अमहीयु | कुत्स | ×मधुच्छंद |
| अंबरीष | कुशिक | मुद्गल |
| अयास्य | गविष्ठिर | रहूगण |
| अर्चनानस् | गाथिन् | ×रेणु |
| अवत्सार | गृत्समद | रेभ |
| ×अष्टक | गौतम | वत्स |
| ×अष्टादंष्ट्र | गौरिवीति | वसिष्ठ |
| असित | जमदग्नि | वामदेव |
| इध्मवाह | दीर्घतमस् | विश्वामित्र |
| ×उचथ्य | ×दृह्ळच्युत | ×शक्ति |
| ×उत्कील | ×देवल | शुनहोत्र |
| ×उपमन्यु | देवश्रवस् | श्यावाश्व |
| उशना | ×निध्रुवि | |

**मंत्रकालीन पौरोहित्य व त्यास आश्रय.**—गोत्रांचा आणि सूक्तकर्तृत्वाचा संबंध दाखविणारें कोष्टक वर दिलें पण इतक्यांत आपणांस गोत्रांच्या विषयाकडे वळतां येत नाहीं. मंत्रकालीन दुसऱ्या अनेक भानगडी आहेत त्यांजकडे लक्ष दिल्याशिवाय आपणांस सूत्रोक्त गोत्रांकडे एकदम वळतां येत नाहीं. मंत्रांत दृष्ट होणारा पुष्कळच ब्राह्मण्याच्या इतिहासाचा भाग अजून मांडावयाचा आहे. ब्राह्मण्याच्या इतिहासांत त्यांनां दान देणाऱ्या राजांचा किंवा इतर व्यक्तींचा इतिहास हा आलाच पाहिजे, कां कीं दान देणाऱ्या व्यक्ती म्हणजे सूक्तरूपी मालाच्या गिऱ्हाईक व्यक्ती होत.

उपाध्यायाचें अस्तित्व त्यांस दान देणाऱ्या किंवा त्यांच्या मार्फत यजन करणाऱ्या राजांशिवाय किंवा सामान्य व्यक्तींशिवाय शक्य नसतें. पारमार्थिक इतिहासांत परमार्थोद्यम करणारा वर्ग कसा होत गेला याचें ज्ञान पाहिजे आणि या वर्गाच्या अस्तित्वाचें स्पष्टीकरण करण्याकरतां त्या वर्गाचें योगक्षेम चालविण्याऱ्या वर्गाचेंहि वर्णन पाहिजे. मागें उल्लेखिलेल्या ऋषींनीं पारमार्थिक गरजा कोणाच्या व कशा पुरविल्या हें स्पष्ट झाल्याशिवाय पारमार्थिक व धार्मिक इतिहास खुला होणार नाहीं यासाठीं ऋषी व त्यांस दान देणारे राजे यांचें कोष्टक आमच्या वाचकांपुढें टाकणें अवश्य आहे. महावंसो व दीपवंसो यांमध्यें ज्या ज्या राजांनीं भिक्षूंस व संघांस दान दिलें त्यांच्या नांवांचें ( नांवापलीकडे बहुतेक कशाचेंच नाहीं ) रक्षण केलें याबद्दल जर बुद्ध भिक्षूंची व त्यांत असलेल्या ऐतिहासिक जाणीवीची तारीफ करावयाची तर दानें देणाऱ्याचें नांव रक्षण करण्याबद्दल प्राचीन सूक्तकारांची तारीफ अधिकच केली पाहिजे. कांकी पुस्तकांत लिहिलेलें राजाचें नांव पुस्तकांत रहातें आणि मंत्र

तील नांव तर वारंवार गाइलें जातें. ज्या राजांनीं वरील ऋषींस दानें दिलीं ते भाग्यवान खरे कारण थोड्याशा दक्षणेबद्दल त्यांचें नांव सर्व गोष्टींची आठवण विरळून टाकणाऱ्या कालक्रमापासून जिवंत सुटलें आहे. तर या भाग्यवानांच्या आणि ज्या कृत्याबद्दल त्यांचें नांव अजरामर झालें त्या कृत्यांचा आपण परिचय करून घेऊं.

## ऋषी व त्यांनां दान देणारे राजे.

| ऋक्स्थान | ऋषि | राजे | दत्तधन |
|---|---|---|---|
| १.१२६,१ | कक्षीवान | स्वनय | घोडे, रथ, धन,– |
| ४.१५,८ | वामदेव | सोमक | घोडे [ अलंकार |
| ५.३०,१२ | बभ्रु | ऋणंचय | एकहजार आणि- |
| ” ३३,८ | संवरण | त्रसदस्यु | घोडे [ चार गायी |
| ” ” ९ | ” | मारुताश्व | घोडे |
| ” ” ” | ” | च्यवतान | घोडे अलंकार |
| ” ” १० | ” | ध्वन्य | घोडे |
| ” ३६, ६ | प्रभूवस | श्रुतरथ | घोडे |
| ” ६१, १० | श्यावाश्व | पुरुमीळ्ह | गायी |
| ” ” ” | ” | तरंत | गायी |
| ६.२६, ८ | भरद्वाज | क्षत्रश्री | धन |
| ” ४७,२२ | गर्ग. | प्रस्तोक | धन |
| ” ” २३ | ” | दिवोदास | अश्व, रथ |
| ” ” २४ | पायु | अश्वथ | गायी |
| ” ” ” | अथर्वे | ” | गायी |
| ” ६३, ९ | भारद्वाज | पुरय | दोन घोड्या |
| ” ” ” | ” | सुमीळ्ह | शंभर गायी |
| ” ” ” | ” | पेरुक | अन्न |
| ” ” ” | ” | शाण्ड | दहा गायी |
| ” ” १० | ” | पुरुपंथा | गायी, घोडे |
| ७. १९,२२ | वसिष्ठ | सुदास | गायी, दोन रथ |
| ८ १; ३० | मेध्यातिथि | आसंग | धन[अलंकार घोडे |
| ” २, ४२ | ” | विभिंदु | धन |
| ” ३, २२ | ” | पाकस्थामा | रथवाहकवृषभ |
| ” ४, १९ | देवातिथि | कुरुंग | शंभर घोडे व धन |
| ” ५, ३७ | ब्रह्मातिथि | कशु | शंभर उंट व दहा- |
| ” ६, ४६ | वत्स | तिरिंदिर | धन [ हजारगायी |
| ८,६,४७ | कक्षीवान- | तिरिंदिर | तीनहजार तनिशें |
| ” १९,३६ | सोभरी | त्रसदस्यु | पन्नास स्त्रिया[गायी |
| ” २१,१७ | ” | चित्र | धन |
| ” २३,२८ | विश्वमनस | वरोसुषामन् | धन |
| ” ” २९ | वैय्यश्व | नार्य | धन |
| ” २५,२२ | ” | उक्षण्यायन | रजतसदृश रथ. |
| ” ” ” | ” | हरयाण | ” |
| ” ४६,२२ | वश | पृथुश्रवस् | घोडे, गायी, उंट |
| ” ” ३२ | ” | दासबल्बूथ | धन [ रथ इत्या. |
| ८.४६’३२ | वश | तरुक्ष | धन |
| ” ६८,१६ | प्रियमेध | इंद्रोत | रथ, अश्व, धन |
| ” ” ” | ” | आश्वमेध | रथ, अश्व, धन |
| ७४,१३ | गोपवन | श्रुतर्वन | अश्व |
| ९.५८, ३ | अवत्सार | पुरुषंति | अश्व |
| ” ” ” | ” | ध्वस्त्र | ” |
| १०. ३३, ४ | कवष | कुरुश्रवण. | तीन घोडे जोड- |
| ” ६०, २ | बंधु सुबंधु | असमाति. | धन [ लेला रथ |
| ” ६२, ८ | नामनेदिष्ठ | सावर्णि मनु | अनेक गायी व घोडे |

वरील कोष्टकांत सर्वानुक्रमणी विश्वसनीय मानिली आहे. कारण ऋचेंत दान देणाऱ्या राजांचा उल्लेखच नेहमीं येत असून दान घेणाऱ्या ऋषींचा उल्लेख फारच क्वचित येतो. तेव्हां दान देणाऱ्या राजांचा ज्या सूक्तांत उल्लेख असेल त्या सूक्ताचा कर्ता राजापासून दान घेणारा होय असें गृहीत धरून वरील कोष्टक तयार केलें आहे. यामुळें दान घेणाऱ्या सर्वच ऋषींचा उल्लेख ऋग्वेदांत आढळणार नाहीं.

**सूक्तकर्तृत्वकालीन व उत्तरकालीन ब्राह्मण्य.**— सूक्तकर्तृत्वकालीन ब्राह्मण्याचा आजच्या ब्राह्मण्याशीं संबंध जुळवावयाचा झाल्यास तो दोन तऱ्हांनीं जुळवावा लागेल. सूक्तकर्त्यांचीं म्हणून जीं कुलें नांवाजलीं गेलीं त्यांचीं वंशपरंपरा जुळवितां आल्यास जुळवावयाची, आणि त्या विद्येची किंवा विद्याविशिष्ट संप्रदायांची परंपरा आजपर्यंत आणून भिडवावयाची. सूक्तकर्त्यांचे वंशसंबंध सर्वानुक्रमणीनें कांहीं दिले आहेत. पण ते सत्य आहेत किंवा नाहींत हें ठरविलें पाहिजे, आणि सत्यासत्यसूचक जें साहित्य उपलब्ध असेल तें मांडलें पाहिजे. सर्वानुक्रमणीशिवाय प्राचीन कुलांचा किंवा संप्रदायांचा विस्तार दाखविणारें आपलें दुसरें साहित्य म्हटलें म्हणजे गोत्रप्रवरावली होय.

आजची ब्राह्मण जात प्राचीन ऋषींशीं व आचार्यांशीं जर आपला अन्वयसंबंध लावीत असेल तर तो गोत्रप्रवरावलीच्या जोरावर. तो अन्वय कोणत्या प्रकारचा होता, कुलान्वयसंबंध होता कीं संप्रदायसंबंध होता याचीहि तपासणी झाली पाहिजे.

मंत्रकालांतच वंशपरंपरेनें ब्राह्मण्य स्थापित झालें होतें यास पुरावा पुष्कळच आहे. ब्रह्मपुत्र हा शब्द ब्राह्मण या अर्थानें अनेक वेळां ऋग्मंत्रांतच आलेला आहे. तर अनेक सूक्तकर्ते ब्राह्मण कुलसंस्थापक झाले असल्यास नवल नाहीं.

सूक्तकर्ते व मंत्रांत उल्लेखिलेले लोक हे कांहीं कुलांतील म्हणून दाखवितां येतील तर पहावयाचें. यासाठीं मंत्रांतील उल्लेख, व त्यांत दिसणारे कुलसंबंध वंशसंबंध, आणि सर्वानुक्रमणी व बृहद्देवता यांत दिलेले कुलसंबंध, आणि वंशसंबंध यांची तुलना केली पाहिजे.

ऋग्वेदसूक्तकार, त्यांचीं कुलें व त्यांचे परस्परसंबंध तपासूं लागलें म्हणजे असें आढळून येतें कीं (१) कांहीं

सूक्तकारांचीं कुलें व त्यांचें आपसांतील वंशसंबंध सर्वानुक्रमणी व बृहद्देवता या ग्रंथांतून जसे आढळतात तसेच ते ऋग्मंत्रावरूनहि सिद्ध होतात; [ २ ]कांहीं सूक्तकार असे आहेत कीं सर्वानुक्रमणी व बृहद्देवता यांनीं दिलेले त्यांचे आपसांतील संबंध ऋग्मंत्रावरूनहि सिद्ध होतात परंतु त्यांच्या कुलाबद्दल मात्र ऋग्मंत्रांत उल्लेख आढळत नाहीं. ( ३ ) व कांहीं सूक्तकारांचीं कुलें व वंशसंबंध सर्वानुक्रमणी व बृहद्देवता यांत दिले आहेत परंतु त्यांनां ऋग्मंत्रांत आधार सांपडत नाहीं. हे सूक्तकार कोणकोणते आहेत व त्यांचा परस्परसंबंध काय आहे हें एक एक कुल घेऊन त्यांत आधाराप्रमाणें तीन पोटभेद करून पुढें देऊं. प्रत्येक कुलाखालीं त्यांतील एक एका सूक्तकाराच्या नांवावर कोणकोणतीं सूक्तें आहेत, त्या सूक्तांमध्यें त्या सूक्तकाराचा उल्लेख आहे किंवा नाहीं, असल्यास कोणत्या सूक्तांत आहे आणि सूक्तकाराचा कुल किंवा वंशसंबंध ज्या ऋग्मंत्रावरून सिद्ध होतो त्याचे आंकडे इत्यादि माहिती दिली आहे.

## आंगिरस कुल.

**( १ ) सर्वानुक्रमणीसिद्ध व ऋग्मंत्रसिद्ध कुल व वंशसंबंध.**—आंगिरस कुलांतील अयास्य, बृहस्पति, सप्तगु, प्रचेता, हिरण्यस्तूप. हिरण्यस्तूपाचा मुलगा अर्चत्.

**( २ ) सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध ऋग्मंत्रसिद्ध वंशसंबंध.**—उचथ्य याची स्त्री ममता व मुलगा दीर्घतमा. कृष्णाचा मुलगा विश्वक व विश्वकाचा मुलगा विष्णापू. व्यश्वाचा मुलगा विश्वमनस्. अर्जुनी ( स्त्री )इचा मुलगा कुत्स, कुत्साचा मुलगा दुर्मित्र. उशिजा ( स्त्री ) इचा मुलगा कक्षीवान्, कक्षीवानाची बायको वृचया. नृमेधाचा मुलगा शकपूत.

**( ३ ) केवल सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध व कुलसंबंध.**—अंगिरस् याचे मुलगे बृहस्पति, उचथ्य, हिरण्यस्तूप. हिरण्यस्तूपाचा मुलगा अर्चत्. उचथ्याची बायको ममता व मुलगा दीर्घतमा. दीर्घतम्याचा बायको उशिजा व मुलगा कक्षीवान्; कक्षीवानाची बायको वृचया, मुलगा सुकीर्ति व मुलगी घोषा; घोषेचा मुलगा सुहस्त्य. आंगिरसकुलांतील.—घोर, तीरश्ची पूतदक्ष, ध्रुव, अभीवर्त, श्रुतकक्ष, सव्य, बिंदु, मूर्धन्वान, कृतयशा, पुरुहन्मन्, पवित्र, प्रभूवसु, भिक्षु, विहव्य, दिव्य, सप्तगु, संवर्त, बरु, कृष्ण. कृष्णाचा मुलगा विश्वक व विश्वकाचा मुलगा विष्णापू, शुनहोत्र, शुनहोत्राचा मुलगा गृत्समद व गृत्समदाचा मुलगा कूर्म, व्यश्व व त्याचा मुलगा विश्वमनस्, कुत्स व त्याचा मुलगा दुर्मित्र, नृमेध व त्याचा मुलगा शकपूत, प्रियमेध व त्याचा मुलगा सिंधुक्षित्, अमहीयु व त्याचा मुलगा उरुक्षय. विरूप व त्याचे मुलगे नभःप्रभेद अष्टादंष्ट्र, शतप्रभेदन, साध्रि. उरु व त्याचा मुलगा अंग.

उचथ्य.—९. ५० ते ५२ या तीन सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरसपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा व्यक्तिवाचक अर्थानें उल्लेख नाहीं. सर्वत्र उचथ व उचथ्य पदांचा स्तोता असाच अर्थ केला जातो.

दीर्घतमा.—१. १४० ते १६४ या १५ सूक्तांचा द्रष्टा. याला उचथ्य पुत्र असें म्हटलें आहे; व तसा उल्लेख ऋग्वेदांत १. १५८, १; ४. या ऋचांमध्यें आला आहे. परंतु तो 'औचथ्य दीर्घतमा' असा स्पष्ट नाहीं. सदर सूक्ताचा द्रष्टा दीर्घतमा हा ममता नामक कोणा स्त्रीचा मुलगा होता. कारण १. १४७, ३; १५२, ६; १५८, ६ या ठिकाणीं त्याला मामतेय म्हटलें आहे. मात्र ममता ही उचथ्याची बायको असा ऋग्वेदांत स्पष्ट उल्लेख नाहीं. दीर्घतम्याचा या दोघांशीं संबंध असल्यामुळें ममतेला उचथ्याची बायको म्हणावें लागतें.

कक्षीवान.—१. ११६ ते १२६ व ९. ७४. या सूक्तांचा द्रष्टा. याला दीर्घतम्याचा मुलगा असें म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं १. ११६; ११७; १२६. या सूक्तांत आणि ९. ७४, ८. या ऋचेंत कक्षीवानाचा उल्लेख असून ऋग्वेदांत बऱ्याच ठिकाणीं उल्लेख आहे. परंतु त्या सर्व ठिकाणीं हा दीर्घतम्याचा मुलगा असा उल्लेख नाहीं. याचा ऋग्वेद १. १८, १ या ठिकाणीं कक्षीवान् औशिज असा उल्लेख असून १. ११९, ९; १२२, ४; ५ या ठिकाणीं यास औशिज म्हटलें आहे. यावरून हा उशिजा नामक स्त्रीचा मुलगा असल्याचें ठरतें. याची वृचया नामक स्त्री असल्याबद्दल १. ५१, १३ येथें उल्लेख आहे.

घोषा.—( स्त्री ) १०. ३९; ४० या सूक्तांची द्रष्टी. वरील सूक्तांपैकीं ४०, ५ येथें व १. ११७, ७; १२२, ५. या ठिकाणीं घोषेचा उल्लेख आहे. हिला कक्षीवानाची मुलगी असें सायणानें व सर्वानुक्रमणीकारानीं म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत तसा उल्लेख नाहीं.

सुहस्त्य.—१०. ४१ या सूक्ताचा द्रष्टा. याला घोषेचा पुत्र असें म्हटलें आहे. वरील सूक्तांतील तिसऱ्या ऋचेंतील 'सुहस्त्य' पदाचा 'घोषेचा मुलगा' असा सायणांनीं अर्थ केला आहे. १. १२०, ५ या ऋचेंत 'घोषे' असें पद असून त्याचा 'घोषायाः पुत्रे' असा भाष्यांत अर्थ दिला आहे. परंतु सुहस्त्य हा घोषेचा मुलगा असा स्पष्ट उल्लेख ऋचेंत नाहीं.

सुकीर्ति.—१०. १३१ या सूक्ताचा द्रष्टा. याला कक्षीवान्-पुत्र असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

अयास्य.—९. ४४ ते ४६; १० ६७; ६८ या सूक्तांचा द्रष्टा. याला अंगिरस म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ९. ४४, १. १०. ६७, १; १०८, ८ व १३८, ४. या ठिकाणीं याचा उल्लेख आहे. व १०. १०८, ८ या ठिकाणीं अयास्य आंगिरस असा उल्लेख आहे.

हिरण्यस्तूप— १. ३१ ते ३५ व ९. ६९ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरसपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. १०. १४९, ५. या ऋचेंत अर्चत् नामक सूक्तकार 'आंगिरस हिरण्यस्तूप' असा उल्लेख करतो. यावरून हिरण्यस्तूप हा आंगिरस असावा.

अ चें त.—१०. १४९ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस हिरण्यस्तूप याचा मुलगा असें म्हटलें आहे. सदरहू सूक्ताच्या ५ व्या ऋचेंत 'आंगिरस हिरण्यस्तूपाप्रमाणें माझी स्तुति ऐक' अशी तो प्रार्थना करतो. यावरून तो हिरण्य स्तूपाचा मुलगा असावा असें ठरतें.

कृ ष्ण.—८. ७४. या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. वरील सूक्तांच्या ३ व ४ या ऋचांत याचा उल्लेख आहे. परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं. ऋग्वेदांत याशिवाय व्यक्तिवाचक असा कृष्णाचा उल्लेख नाहीं.

वि श्व क.—८. ७५ या सूक्ताचा द्रष्टा. याला कृष्णपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या १ ते ४ या ऋचांत याचा उल्लेख आहे. तसेंच १. ११६, २३; ११७, ७. या ठिकाणीं अश्विनांनीं कृष्णपुत्र विश्वक याला विष्णापू नांवाचा मुलगा दिल्याचा उल्लेख आहे. व १०. ६२, १२ या ठिकाणींहि विश्वकाला विष्णापू नामक मुलगा दिल्याचा उल्लेख आहे. यावरून कृष्णपुत्र विश्वक व त्याचा मुलगा विष्णापू असल्याचें ठरतें. विष्णापू हा सूक्तकार नाहीं.

प्र चे त स.—१०. १६४ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. वरील सूक्तांच्या ४ थ्या ऋचेंत 'प्रचेतान आंगिरसः' असा उल्लेख आहे यावरून प्रचेतस हा आंगिरसकुलांतील असावा असें दिसतें.

वि रू प.—८. ४३; ४४; व ६४ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. सदरहू सूक्तांपैकीं ६४, ६ येथें याचा उल्लेख आहे. १. ४५, ३ या ऋचेंत प्रियमेध, अत्रि, आंगिरस् यांच्या बरोबर याचा उल्लेख आहे परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं.

बृ ह स्प ति.—१०, ७१ व ७२ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस व लोकपुत्र म्हटलें आहे. १०.७१, १ यांत बृहस्पतीचा उल्लेख आहे. परंतु तो सूक्तकार या अर्थानें नाहीं. ६. ७३, १ येथें 'बृहस्पतिरांगिरसः' असा उल्लेख आहे. यावरून बृहस्पति हा आंगिरस असावा असें ठरतें.

गृ त्स म द.—२. १ ते ३; ८ ते २६; ३० ते ४३ या सूक्तांचा द्रष्टा व ऋग्वेद मंडल दोन याच्या नांवावर आहे. पण त्यांपैकीं वरील सूक्तांचाच हा द्रष्टा आहे. याला आंगिरस शुनहोत्र याचा पुत्र असें म्हटलें आहे व तोच पुढें शुनकाचा मुलगा झाला असें म्हटलें आहे. परंतु वरील दोन्हीहि गोष्टींचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. ऋग्वेदांत गृत्समदाचा उल्लेख ४ वेळ (२ ४,९;१९,८;३९,८; ४१, १८) आला आहे, व शुनहोत्र याचाहि उल्लेख दोन वेळ ( २. ४१, १४; १७) आला आहे व भाष्यांत शुनहोत्र याचा अर्थ गृत्समद असा केला आहे. परंतु प्रत्यक्ष ऋचेंत तसा उल्लेख नाहीं. गृत्समदाचा ऋग्वेदांत आलेला उल्लेख सर्वत्र बहुवचनी आहे.

शु न हो त्र.—६.३३,३४ या दोन सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत २.४१,१७,१८ या ठिकाणीं याचा उल्लेख आहे परंतु तो आंगिरस असल्याचा नाहीं.

कू र्म.—२. २७ ते २९ या सूक्तांचा द्रष्टा. याला गृत्समदपुत्र असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत तसा उल्लेख नाहीं. कूर्माचा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं व वरील सूक्तांत गृत्समदाचाहि उल्लेख नाहीं.

व्य श्व.—८. २६ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. याचा वरील सूक्तांत उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत याचा उल्लेख ९. ११२, १५. ८. ९, १०: २३, १६; २४ २८; २९ या ठिकाणीं आहे. परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं.

वि श्व म ना.—८,२३ ते २५ या सूक्तांचा द्रष्टा. याला व्यश्व पुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांत २३,२ व २७.७ या ठिकाणीं उल्लेख आहे. याला ८,२३, २४, २४, २३, २६, ११ या ठिकाणीं वैयश्व ( व्यश्वपुत्र ) म्हटलें आहे.

घो र. ३.३६ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत घोर याचा व्यक्तिवाचक उल्लेख नाहीं.

कु त्स.—१. ९४ ते ९८; १०१ ते ११५ व ९. ४ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस असे म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहे. परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं. याला आर्जुनेय असें नांव ऋग्वेदांत चार ठिकाणीं (१. ११२, २३; ४. २६, १; ७ १९, २;८ १,११, दिलें आहे. 'आर्जुनेय ( अर्जुनी स्त्रीचा पुत्र )कुत्स' असा वरील चार ठिकाणीं उल्लेख आहे. ही अर्जुनी कोण याबद्दल उल्लेख नाहीं.

दु र्मि त्र.— १०.१०,५ या सूक्ताचा द्रष्टा. याला कुत्सपुत्र म्हटलें आहे. याचा उल्लेख वरील सूक्ताच्या ११ व्या ऋचेंत 'मी दुर्मित्र स्तुति करीत आहे, त्या मज कुत्सपुत्राचें रक्षण कर' अशी प्रार्थना केली आहे.

मू र्ध न्वा न्.—१०.८८ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरसपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं. सदर सूक्तांत मूर्धन्वान् पद फार वेळ आलें असल्यामुळें या सूक्ताचा मूर्धन्वान द्रष्टा आहे असें म्हटलें असावें.

ऊ रु.—९. १०८ या सूक्तांतील ४ व ५ या ऋचांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं व वरील दोन ऋचांत आंगिरसाचा उल्लेख नाहीं.

ऊ र्ध्व स द्म.—९.१०८ सूक्तांतील ८ व ९ या ऋचांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं व वरील ऋचांत आंगिरसाचा उल्लेख नाहीं.

कृ त य शा.—९.१०८ सूक्तांतील १० व ११ या ऋचांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं व वरील ऋचांत आंगिरसाचा उल्लेख नाहीं.

पु रु ह न्म न्.—८.५९ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या दुसऱ्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांत याशिवाय अन्यत्र याचा उल्लेख

नाहीं. वरील सूक्तांत आंगिरसांचा उल्लेख नाहीं.

बृहन्मति.—९.३९ या सूक्ताचा द्रष्टा याला आंगिरसपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या पहिल्याच ऋचेंत याचा उल्लेख आहे; पण तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं. ऋग्वेदांत वरील स्थलाशिवाय याचा उल्लेख नाहीं.

पवित्र.—९ ६७ सूक्तातील ८ ते ३३ ऋचा; ९,७३ व ८३ या सूक्तांचा हा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. वरील सूक्तांत पवित्र शब्द फार वेळ आला आहे. परंतु तो व्यक्तिवाचक नाहीं. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं. याला आंगिरस म्हणण्यास आधार नाहीं.

प्रभूवसु.—९.३५;३६ या सूक्तांचा हा द्रष्टा. ह्याला आंगिरसपुत्र असें म्हटलें आहे. सूक्त ३५ यांतील शेवटच्या मंत्रांत प्रभूवसो हें पद आहे. परंतु तें व्यक्ति या अर्थानें नाहीं. ऋग्वेदांत प्रभूवसो हें पद फार वेळ आलें आहे. परंतु त्याचा व्यक्तिवाचक अर्थ कोठेंच नाहीं

भिक्षु.—१०. ११७ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरसपुत्र म्हटलें आहे. सदर सूक्तांत दानप्रशंसा आहे. ऋग्वेदांत भिक्षूचा उल्लेख नाहीं.

विहव्य.—१०. १२८ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा व्यक्ति या अर्थानें उल्लेख नाहीं.

दिव्य.—१०. १०७ या सूक्ताचा (विकल्पानें) द्रष्टा आहे. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

सप्तगु.—१०. ४७ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ६ व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे आणि तो आंगिरस असल्याचा आहे. ऋग्वेदांत वरील स्थलाशिवाय याचा कोठें उल्लेख नाहीं.

संवर्त.—१०. १७२ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. याचा उल्लेख ८. ५४ (वालखिल्यांपैकीं ६) या सूक्तांतील २ ऱ्या ऋचेंत आहे. परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं.

बरु.—१०. ९६. या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. सदर सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ८. २३, २८ या ठिकाणीं वरोसुषामन् नामक एका राजाचा उल्लेख आहे. अशाच तऱ्हेचा उल्लेख ८. २४, २८; २६, २ या ठिकाणींहि आहे. बरु व वसु या नांवाबद्दल संशय आहे.

अष्ट्रादंष्ट्र.—१०. १११ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस विरूप याचा पुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

नभःप्रभेदन.—१०. ११२ या सूक्ताचा द्रष्टा. याला विरूपपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

शतप्रभेदन.—१०.११३ या सूक्ताचा द्रष्टा. याला विरूपपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

सध्रि.—१०.११४. या सूक्ताचा द्रष्टा. याला विरूपपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

अंग.—१०.१३८ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरसऊरु याचा पुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

प्रियमेध.—८ ५७;५८ व ९.२८ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ८.५८,१८ येथें याचा उल्लेख आहे परंतु तो बहुवचनी आहे. ऋग्वेदांत याचा बहुवचनी 'प्रियमेधासः' असा उल्लेख फार येतो. यावरून याचें स्वतंत्र कुल असावें. एकवचनीहि उल्लेख कोठें कोठें (१.१३९,.९८.५,२५.) आहे परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं. ४५, ३ या ऋचेंत याचा आंगिरसांबरोबर उल्लेख आहे. यावरून कदाचित हा आंगिरस असावा.

सिंधुक्षित्.—१०.७५. या सूक्ताचा द्रष्टा. याला प्रियमेधपुत्र असें म्हटलें आहे परंतु तसा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

अमहीयु.—९.६१ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

उरुक्षय.—१०.१८ या सूक्ताचा द्रष्टा. याला अमहीयुपुत्र म्हटलें आहे; पण तसा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत याचा व्यक्तिवाचक अर्थानें उल्लेख नाहीं.

सव्य.—१.५१ ते ५७ या सूक्तांचा हा द्रष्टा. याला अंगिरा ऋषीचा पुत्र असें म्हटलें आहे. सव्याचा व्यक्तिवाचक उल्लेख ऋग्वेदांत नाहीं.

अभीवर्त.—१०.१७४ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. या सूक्ताच्या पहिल्या ऋचेंत अभीवर्त पद आहे, पण त्याचा व्यक्तिवाचक अर्थ होत नाहीं.

बिंदु.—९.३० या सूक्ताचा द्रष्टा, याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदांत बिंदूचा उल्लेख नाहीं.

श्रुतकक्ष.—८. ८१ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस असें म्हटलें आहे. सदर सूक्ताच्या २५ साव्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु त्यावरून तो आंगिरस असल्याचें ठरत नाहीं.

ध्रुव.—१०. १७३. या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. सदर सूक्तांत ध्रुव शब्द फार वेळ आला आहे. परंतु तो व्यक्तिवाचक नाहीं. ऋग्वेदांत याचा व्यक्तिवाचक उल्लेख नाहीं.

नृमेध.—८. ८७; ८८. व ९. २७; २९ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. वरील चारहि सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. १०. ८०, ३; १३२, ७ या ऋचांत याचा उल्लेख आहे. परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं.

शकपूत.—१०. १३२ या सूक्ताचा द्रष्टा. याला नृमेधपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ७ व्या ऋचेंत याचा उल्लेख असून त्यांच ऋचेंत 'नृमेधाप्रमाणें माझें रक्षण कर-

अशी तो प्रार्थना करतो. यावरून हा नृमेधपुत्र असावा असें वाटतें.

तिरश्वी.—८. ८४ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. सदर सूक्ताच्या ४ थ्या ऋचेंत याचा उल्लेख आहे परंतु तो आंगिरस असल्याबद्दल नाहीं.

पूतदक्ष.—८. ८३ या सूक्ताचा द्रष्टा. याला आंगिरस म्हटलें आहे. ऋग्वेदात याचा व्यक्तिवाचक उल्लेख नाहीं.

## कण्वकुल

**( १ ) सर्वानुक्रमणी व ऋग्मंत्रसिद्धकुल व वंशसंबंध.**— नृषदाचा मुलगा कण्व. कण्वाचे मुलगे मेधातिथि, प्रस्कण्व व वत्स.

**( २ ) सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध व ऋग्मंत्रसिद्ध वंशसंबंध.**—नभाकाचा मुलगा नाभाक.

**( ३ ) सर्वानुक्रमणीसिद्ध वंश व कुलसंबंध.**—घोराचा मुलगा कण्व. कण्वाचे वत्स,प्रस्कण्व, कुसीदि, गोषूक्ति,अश्वसूक्ति, प्रगाथ. प्रगाथाचे मुलगे भर्ग,कलि, हर्यत. कण्व कुलांतील.—नीपातिथि, सोभरि, पर्वत, नारद, त्रिशोक, इरिंबिठि, ब्रम्हातिथि, सध्वंस, शशकर्ण कुरुसुति. सोभरीचा मुलगा कुशिक.

कण्व.—१.३६ ते ४३ व ९४ या सूक्तांचा द्रष्टा. याला आंगिरस घोर याचा पुत्र असें म्हटलें आहे, परंतु ऋग्वेदांत तसा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत १०. ११, ३१, येथें याला नृषदपुत्र म्हटलें आहे. अशाच तऱ्हेचा उल्लेख १.११७, ८ येथें आहे. परंतु तो जरा संशयित आहे. ऋग्वेदांतील उल्लेखाप्रमाणें कण्व हा घोरपुत्र नसून नृषदपुत्र ठरतो. कण्वाचें त्याच्या पुढें स्वतंत्र कुलच झालें. कारण बरेचसे सूक्तकार आपणांस कण्व म्हणवितात. वरील सूक्तापैकी बहुतेक सूक्तांत कण्वाचा उल्लेख आहे. कण्व पूर्वी आंधळा होता. त्याला अश्वीदेवांनीं डोळे दिले व श्रवणेंद्रियहि दिलें असा उल्लेख आहे.

वत्स.—८. ६, ७ व ११ या तीन सूक्तांचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. वरील सूक्तांत कण्वाचा उल्लेख आहे. ८. ८, ८ या ऋचेंत कण्वपुत्र वत्स असा उल्लेख आहे. ८ व ९ या सूक्तांचे द्रष्टे अनुक्रमें संध्वस व शशकर्ण हे आहेत. परंतु सदर सूक्तांत त्यांचा उल्लेख नसून वत्साचा बराचवेळ उल्लेख आहे. तेव्हां सदर सूक्तें वत्साचींच असावींत असें वाटतें

मेधातिथि, मेध्यातिथि.—१. १२ ते २; ८. १ ते ३; ३२; ३३ ९. २, ४ या सूक्तांचा द्रष्टा. याला कण्वपुत्र म्हटलें आहे ८. २, ४० या ऋचेंत 'काण्वं मेध्यातिथि' असा उल्लेख आहे यावरून तो कण्ववंशज असल्याचें ठरतें. याचेंच दुसरें नांव मेध्यातिथि असें होतें.

प्रस्कण्व.—१.४४ ते ५० व ९. ९५ या सूक्तांचा द्रष्टा. याला कण्वपुत्र म्हटलें आहे. परंतु तसा प्रत्यक्ष उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. वरील सर्व सूक्तांत प्रस्कण्वाचा उल्लेख आहे. १. ४५, ५ या ऋचेंत 'कण्वाचे पुत्र आम्ही तुझी स्तुति करतो ती ऐक' असा उल्लेख आहे. यावरून प्रस्कण्व कण्वाचा मुलगा असल्याचें ठरतें व कण्वाचे बरेच मुलगे होते असेंहि सिद्ध होतें. कदाचित् वंशज असूं शकतील.

नाभाक.—८. ३९ ते ४२ या सूक्तांचा द्रष्टा. याला काण्व असें म्हटलें आहे. वरील सूक्तापैकीं ४१, २ येथें नाभाक याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांत याशिवाय नाभाकाचा उल्लेख नाहीं. ८. ४१, ४ व ५ या ऋचात 'नभाकवत्' असा उल्लेख आहे. यावरून नभाक नांवाचा कोणी ऋषि असून त्याचा हा मुलगा असावा.

त्रिशोक.—८. ४५ या सूक्ताचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. सदर सूक्तांतील ३० व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु त्यावरून हा काण्व असल्याचें ठरत नाहीं. याशिवाय १. ११२, १२ व १०. २९, २ या ठिकाणीं त्रिशोकाचा उल्लेख आहे. परंतु तो कण्व असल्याबद्दल नाहीं.

नीपातिथि.—८. ३४ या सूक्ताचा द्रष्टा. याला कण्व म्हटलें आहे. सदर सूक्तात याचा उल्लेख नाहीं परंतु याच सूक्तांतील १ व ४ या ऋचांत कण्वाचा उल्लेख आहे. याशिवाय ऋग्वेदांत ८. ४९ ( वालखिल्यापैकी ) या सूक्तांत व ८. ५१ (वालखिल्य-३ ) या सूक्तात नीपातिथीचा उल्लेख आहे. परंतु काण्व असल्याचा उल्लेख नाहीं.

कुसीदि:—हा ८. ७०, ७१, ७२ या तीन सूक्तांचा द्रष्टा. अनुक्रमणीकारांनीं याला कण्वपुत्र म्हटलें आहे.ऋग्वेदांत या व्यक्तीचा उल्लेख नाहीं. व वरील सूक्तांत कण्वाचाहि उल्लेख नाहीं.

गोषूक्ति,अश्वसूक्ति—.८. १४ व १५ या सूक्तांचे हे दोघे द्रष्टे आहेत. यांना कण्वायन असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत या व्यक्तींचा उल्लेख नाहीं. व वरील सूक्तांत कण्वाचाहि उल्लेख नाहीं.

कुरुसुति.—८. ६५ ते ६७ या दोन सूक्तांचा हा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं. व वरील सूक्तांत कण्वाचाहि उल्लेख नाहीं.

प्रगाथ.—८. १०; ४८; ५१ ते ५४ या सूक्तांचा द्रष्टा. याला कश्यपपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत प्रगाथाचा व्यक्तीचा वाचक उल्लेख नाहीं.

भर्ग.—८. ४९; ५० या सूक्तांचा द्रष्टा. याला प्रगाथपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांत व ऋग्वेदांत भर्गाचा उल्लेख नाहीं.

कलि.—८. ५५ या सूक्ताचा द्रष्टा. याला प्रगाथपुत्र म्हटलें आहे वरील सूक्ताच्या १६ व्या ऋचेंत याचा उल्लेख असून १. ११२, १५ येथेंहि याचा उल्लेख आहे परंतु तो प्रगाथपुत्र असल्याचा नाहीं.

इरिंबिठि.—८. १६ ते १८ या सूक्तांचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. ऋग्वेदांत इरिंबिठीचा उल्लेख नाहीं. वरील सूक्तांत कण्वाचा उल्लेख नाहीं.

दे वा ति थि.—८. ४ या सूक्ताचा द्रष्टा याला काण्व म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं. वरील सूक्तांतील दुसऱ्या ऋचेंत कण्वांचा उल्लेख केलेला आहे.

ब्र ह्मा ति थि.—८. ७ या सूक्ताचा द्रष्टा. याला काण्व म्हटले आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं. वरील सूक्तांत ४. २३ व २५ या ऋचांमध्यें कण्वाचा उल्लेख आहे. यावरून कदाचित् हा काण्व असावा असें वाटतें

प र्व त.—८. १२ या सूक्ताचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. याचा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

ना र द.—८. १३ या सूक्ताचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

स ध्वं स.—८. ८ या सूक्तांचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. याचा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं वरील सूक्ताच्या ४ थ्या ऋचेंत 'कण्वस्यपुत्रः' असा उल्लेख आहे. परंतु सध्वंसाचा उल्लेख नाहीं. या सूक्तांत वत्स ऋषीचा उल्लेख ४ वेळ आला असून ८ व्या ऋचेंत 'कण्वपुत्र वत्स' असा उल्लेख आहे. यावरून हें सूक्त वत्सानें रचलेलें असावें असें दिसतें.

ह र्य त.—८. ६१ या सूक्ताचा द्रष्टा. याला प्रगाथपुत्र म्हटलें आहें. परंतु तसा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. वरील सूक्ताच्या १८ व्या ऋचेंत हर्यताचा उल्लेख आहे. सदर सूक्तांत कण्वाचा उल्लेख नाहीं.

श श क र्ण.—८. ९ या सूक्ताचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. शशकर्णाचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. सदर सूक्तांत वत्साचा उल्लेख आहे.

सो भ रि.—८. १९ ते २२ व ९२ या सूक्तांचा द्रष्टा. याला काण्व म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं १९, २; ३२; २०, २; १९, ८; २२, २; १५ व ९२, १४ या ठिकाणीं सोभरीचा उल्लेख असून याशिवाय ८. ५, २६ या ठिकाणीं उल्लेख आहे. परंतु वरील सर्व स्थलींहि तो काण्व असल्याचा उल्लेख नाहीं.

कु शि क.—१०. १२७ या सूक्ताचा द्रष्टा. याला सोभरिपुत्र म्हटलें आहे. कुशिकाचा सोभरिपुत्र या अर्थानें ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

## अत्रिकुल

**( १ ) सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध व ऋग्मंत्र सिद्ध वंशसंबंध.**—अत्रीचा मुलगा गय. वव्याचा मुलगा सत्यश्रवस्. आप्त्य अपांपुत्र त्रित. त्रिवृष्णाचा मुलगा त्र्यरुण.

**(२) सर्वानुक्रमणीसिद्ध वंश व कुलसंबंध**— संख्याचा मुलगा अत्रि. अत्रीचे मुलगे वसुश्रुत, प्रतिभ विश्वसामन्, वसूयु, सुतंभर, गोपवन, पौर, अर्चनानस्. अर्चनानस्चा मुलगा श्यावाश्व. श्यावाश्वाचा मुलगा अंधीगु. अत्रीची मुलगी अपाला. अत्रिवंशांतील.—इष, सदापृण, यजत, श्रुतवित्, बाहुवृक्त, उरुचक्रि, रातहव्य, बंधु, सुबंधु, विप्रबंधु, स्वस्ति, सस, विश्ववारा (स्त्री), प्रतिभानु, गातु, बुध, गविष्ठिर, कुमार, पुरु, सप्तवध्रि. वव्र व त्याचा मुलगा सत्यश्रवस्. द्रति व त्याचा मुलगा गय, व त्याचे मुलगे द्वित आणि त्रित. भुवन व त्याचा मुलगा विश्वकर्मन्.

अ त्रि.—हा ऋग्वेद मंडल ५ चा द्रष्टा आहे. सर्वानुक्रमणी व बृहद्देवतेंत या मंडळांतील सूक्तकार असून ज्यांच्या कुलाचा उल्लेख नसेल त्या सर्वांना आत्रेय म्हणावें असें म्हटलें आहे. अत्रि हा मंडल पांच यांतील ३७, ४३, ७७, व ८५ या सूक्तांचा द्रष्टा आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आहे. पांचव्या मंडळांत भौमोत्री नांवाचा सूक्तकार असून ४१, ७२, ८६, या सूक्तांचा द्रष्टा आहे. हा व वरील अत्रि एकच कीं काय अशी शंका आहे. ऋग्वेदांत भौमोत्रीचा उल्लेख नाहीं. अत्रि हा संख्य याचा मुलगा असें सर्वानुक्रमणींत म्हटलें आहे त्यास ऋग्वेदांत आधार नाहीं.

अ र्च ना न स्.—५. ६३, व ६४ या दोन सूक्तांचा हा द्रष्टा असून बृहद्देवतेप्रमाणें हा अत्रीचा मुलगा आहे वरील सूक्तांपैकीं ६४ व्या सूक्तांतील शेवटच्या ऋचेंत याचा उल्लेख आहे परंतु तो अत्रिपुत्र असल्याचा नाहीं. ऋग्वेदांत यां शिवाय अर्चनानस् याचा उल्लेख नाहीं.

श्या वा श्व.—५. ५२ ते ६१, ८१ व ८. ३५ ते ३८ या सूक्तांचा द्रष्टा असून याला अर्चनानस् याचा पुत्र असें म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ५. ५२ या सूक्ताच्या आरंभीच्या ऋचेंत व ५. ६१ या सूक्ताचें शेवटीं श्यावाश्वाचा उल्लेख असून ८. ३५ ते ३८ या चारी सूक्तांत श्यावश्वाचा व अत्रीचा उल्लेख आहे. 'अत्रीच्या स्तुतीप्रमाणें माझी स्तुति ऐका' अशी तो ८. ३५ ते ३८ या सूक्तांत प्रार्थना करतो. यावरून तो अत्रीच्या कुलांतील असावा. श्यावाश्वाच्या नांवावर आणखी ८१ व ८२ही सूक्तें आहेत. पैकीं ८१ सूक्तांतील ५ व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. वरील उताऱ्यांवरून तो अर्चनानस् याचा मुलगा असल्याचा बोध होत नाहीं.

अं धी गु.—या सूक्तकाराच्या नांवावर ९. १०१ हें सूक्त असून याला श्यावाश्वपुत्र असें अनुक्रमणींत म्हटलें आहे. वरील सूक्तांतील पहिल्याच ऋचेंत 'अंधसः' असें पद आहे. सदर सूक्तांत व ऋग्वेदांत अंधीगूचा उल्लेख नाहीं.

गो प व न.—हा ८. ६३ या सूक्ताचा द्रष्टा आहे व याला आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ११ व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु तो आत्रेय असल्याबद्दल नाहीं. ऋग्वेदांत वरील स्थलाशिवाय गोपवनाचा उल्लेख नाहीं.

सु तं भ र.—हा ५. ११ ते १४ या ४ चार सूक्तांचा द्रष्टा आहे व याला आत्रेय म्हटलें आहे. वरील चारी सूक्तांत याचा अथवा अत्रीचा उल्लेख नाहीं. ५ ४४ या सूक्तांतील १३ व्या ऋचेंत याचा उल्लेख असून त्याच सूक्तांत याच्या बरोबर एवावद, यजत, सध्रि, अवत्सार, विश्ववार, मायिन, सदापृण, बाहुवृक्त, श्रुतवित्, तर्य यांचा उल्लेख आहे. सदरहू सूक्ताचा द्रष्टा अवत्सार ( काश्यप ) हा आहे. या सूक्तांत अत्रीचा उल्लेख नाहीं.

पौर.—हा ५. ७३ व ७४ या दोन सूक्तांचा द्रष्टा आहे. याला आत्रेय म्हटले आहे. ७३ सूक्तांतील ६ व ७ या ऋचांत अत्रीचा उल्लेख आहे. ७४ सूक्तांतील चवथ्या ऋचेंत पौर याचा उल्लेख आहे वरील दोन्ही सूक्तांत आत्रेय पौर असा उल्लेख नाहीं परंतु सूक्तांत अत्रीचा उल्लेख येत असल्यामुळे संशयास जागा आहे.

वसूयु.—५. २५ व २६ या दोन सूक्तांचे वसूयु नामक दोन ऋषी द्रष्टे असून त्यांना आत्रेय म्हटले आहे. ऋग्वेदांत 'वसूयु' 'वसूयवः' हीं पदें बऱ्याच ठिकाणीं आलीं आहेत परंतु तीं व्यक्तिवाचक नाहींत. वरील ५. २५, या सूक्तांतील शेवटच्या ऋचेंत 'वसूयवः' या पदाचा व्यक्तिवाचक अर्थ केला आहे.

विश्वसामन.—हा ५. २२ या सूक्ताचा द्रष्टा असून याला आत्रेय म्हटले आहे. सदरहू सूक्ताच्या पहिल्याच ऋचेंत विश्वसामन् व अत्रि यांचा उल्लेख आहे परंतु विश्वसामन हा आत्रेय असा स्पष्ट उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत दुसरीकडे विश्वसामन्‌चा उल्लेख नाहीं.

अवस्यु.—हा ५. ७५ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदरहू सूक्ताच्या आठव्या ऋचेंत याचा उल्लेख आहे परंतु त्यावरून तो आत्रेय असल्याचा बोध होत नाहीं. ऋग्वेदांतील इतर ठिकाणच्या 'अवस्यु' पदाचा व्यक्तिवाचक अर्थ नाहीं.

प्रतिप्रभ.—५. ४९, या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदरहू सूक्तांत अत्रीचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत प्रतिप्रभ याचा उल्लेख नाहीं.

सदापृण.—५. ४५ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदर सूक्तांत अत्रीचा अथवा याचा उल्लेख नाहीं. सदापृणाचा ऋग्वेदांत एकदांच ५. ४४, १२ या ठिकाणीं उल्लेख आहे, परंतु त्यांत अत्रीचा संबंध नाहीं,

बाहुवृक्त.—५. ७१ व ७२ या दोन सूक्तांचा व ५. ४४, ११ या ऋचेचा द्रष्टा आणि आत्रेय आहे. वरील दोन सूक्तांपैकीं ७१ सूक्तांतील १ ल्या ऋचेंत अत्रीचा उल्लेख आहे. व ५. ४४, ११ या ऋचेंतच बाहुवृक्त याचा उल्लेख आहे परंतु बाहुवृक्त आत्रेय असा प्रत्यक्ष उल्लेख नाहीं.

श्रुतवित्.—५. ६२ या सूक्ताचा द्रष्टा याला आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्तांत याचा अथवा अत्रीचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत ५.४४,१७ या एकाच ठिकाणीं याचा उल्लेख आहे परंतु तेथें तो आत्रेय असल्याबद्दल नाहीं.

यजत.—याला ५. ६७ व ६८ या सूक्तांचा द्रष्टा आणि आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्तांत यजताचा उल्लेख नाहीं. ५. ४४, १० व ११ या ऋचांत याचा उल्लेख आहे परंतु तो आत्रेय असल्याबद्दल नाहीं ऋग्वेदांत वरील शिवाय यजत याचा व्यक्तिवाचक अर्थ केलेला नाहीं.

उरुचक्रि.—हा ५. ६९ व ७० या सूक्तांचा द्रष्टा असून याला आत्रेय म्हटलें आहे. ऋग्वेदांत उरुचक्रि पद ३. १८, ५; ६७, ४; ८. १८, ५; ९. ८९, ४ या चार ठिकाणीं असून त्याचा व्यक्तिवाचक अर्थ कोठेंच केलेला आढळत नाहीं.

सस.—हा ५. २१ या सूक्ताचा द्रष्टा असून याला आत्रेय म्हटले आहे. सदरहू सूक्तांत चवथ्या ऋचेंत 'ससस्य' असें पद आलें आहे. त्याचा सायणांनीं ससऋषि असा अर्थ केला आहे ऋग्वेदांत आणखी ४१२ ठिकाणीं 'ससस्य' हें पद आलें आहे. परंतु त्याचा व्यक्तिवाचक अर्थ केलेला नाहीं. वरील ५, २१ या सूक्तांतील सस हा ऋषि मानला तरी तो आत्रेय असल्याचें ठरत नाहीं.

त्र्यरुण.—हा ५.२८ या सूक्ताचा विकल्पानें द्रष्टा आहे. याला त्रिवृष्णिपुत्र असें म्हटलें आहे. त्याबद्दलचा उल्लेख सदर सूक्ताच्या १ ल्या ऋचेंत आहे. यावरून हा त्रिवृष्णिपुत्र ठरतो परंतु आत्रेय असल्याचें ठरत नाहीं.

बंधु, सुबंधु, श्रुतबंधु विप्रबंधु—हे चार ऋषि ५. २४ व १०.६० या सूक्तांचे द्रष्टे. यांना गौपायनपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत गोपायन अथवा बंधु, श्रुतबंधु, विप्रबंधु यांचा उल्लेख नाहीं. फक्त सुबंधूचा उल्लेख १०. ६०, १० येथें आहे. परंतु तो आत्रेय अथवा गोपायन पुत्र असल्याचा नाहीं.

स्वस्ति.—५. ५० व ५१ या सूक्तांचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. वरील दोन्ही सूक्तांत स्वस्ति शब्द फार वेळ आला आहे परंतु तो व्यक्ति या अर्थानें नाहीं. सू. ५१, यांतील ८, ९ व १० या ऋचांत अत्रीचा उल्लेख आहे परंतु स्वस्ति ही व्यक्तीच नसल्यामुळें तिला आत्रेय म्हणतां येत नाहीं.

विश्ववारा.—(स्त्री) अनुक्रमणीप्रमाणें ५. २८ या सूक्ताची ही द्रष्टी आहे. वरील सूक्ताच्या पहिल्या ऋचेंत विश्ववारा हें पद आलें आहे. परंतु तें प्राची दिशेचें विशेषण आहे. ऋग्वेदांत व्यक्तिवाचक अर्थानें विश्ववारेचा कोठेंच उल्लेख नाहीं.

गय.—५. ९ व १०; १०. ६३ व ६४ या सूक्तांचा द्रष्टा असून याला अनुक्रमणीकार ५ व्या मंडलांत आत्रेय व १० व्या मंडलांत प्लतिपुत्र असें म्हणतात. तेव्हां ५ व्या व १० व्या मंडलांतील सूक्तकार गय एकच कीं दोन हें समजत नाहीं ५. १०, ३ यांत गय पद आहे. परंतु त्याचा गृह असाच अर्थ केला आहे. १०. ६३ व ६४ या सूक्तांत १७ व्या ऋचेंत हा गय प्लतिचा मुलगा असल्याचा उल्लेख आहे. 'प्लतेः सूनुः' व 'प्लात' असा तेथें उल्लेख आहे. यावरून गय हा प्लतीचा मुलगा असल्याचें ठरतें. अत्रीच्या कुलांतील असल्याचें ठरत नाहीं. प्लति हा कोणत्या कुलांतील होता याचा उल्लेख नाहीं.

द्वित.—हा ५. १८ व ९. १०३ या दोन सूक्तांचा द्रष्टा असून याला ९ १०३ येथें आप्त्य म्हटलें आहे. व ५. १८, २ येथें आत्रेय म्हटलें आहे व ८. ४७ या त्रितानें दृष्ट असलेल्या सूक्तांतील १६. व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. वरील ठिकाणीं तो आप्त्य अस-

ख्याचा उल्लेख नाहीं. ८. ४७ १६ येथें द्वित व त्रित यांचा उल्लेख असून त्रित हा आप्त्य असल्यामुळें द्वितास आप्तय म्हटलें असावें प्रत्यक्ष आप्तय द्वित असा उल्लेख नाहीं.

त्रि त.--१.१०५; ८. ४७; ९. १०२; १०. १ ते ७ या सूक्तांचा द्रष्टा आहे. याला आप्त्य म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं मं १. ८. व ९ यातील सूक्तांत याचा उल्लेख असून ८. ४७, १४; १५ या ऋचांत 'आप्त्याय त्रिताय' 'आप्त्ये त्रिते' असा उल्लेख आहे. ऋग्वेदांत त्रिताचा उल्लेख पुष्कळ ठिकाणी आहे. परंतु तो आत्रेय असल्याबद्दल नाहीं.

भु व न; सा ध न.—हे १०. १५७ या सूक्ताचे द्रष्टे आहेत. यांना आप्त्य-आप्त पुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांत 'भुवना' पद आहे त्याचा व्यक्तिवाचक अर्थ नाहीं. ऋग्वेदांत भुवन व साधन या व्यक्ती म्हणून उल्लेख नाहीं.

वि श्व क र्म न्.—हा १०. ८१ व ८२ या सूक्तांचा द्रष्टा. याला भुवनपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत व वरील सूक्तांत विश्वकर्मा शब्द फार ठिकाणीं आला आहे. त्याचा सर्वत्र 'परमेश्वर' असाच अर्थ केलेला आहे. परंतु वरील सूक्तांपैकीं ८१. १ व ८२, ४ या सूक्तामध्यें सायणांनीं त्याचा सूक्तद्रष्टा असा अर्थ केला आहे. भुवनपुत्र विश्वकर्मन् असा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

अ पा ला,--८, ८० या सूक्तांची द्रष्टी हिला अत्रिसुता असें म्हटलें आहे सदर सूक्ताच्या ७ व्या ऋचेंत इचा उल्लेख आहे परंतु ती अत्रिसुता असल्याचा नाहीं.

प्र ति भा नु.—५. ४८ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे परंतु ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

प्र ति भ.—५.४९ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

स्व स्त्या त्रे य.—५.५० व ५१ या सूक्तांचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं ५१व्या सूक्तांत 'स्वस्ति' शब्द बराच आला आहे व ८. ९, १० या ऋचांमध्यें अत्रीचा उल्लेख आहे. यावरून या सूक्ताच्या द्रष्ट्याला स्वस्त्यात्रेय म्हटलें असावें.

गा तु.--५. ३२ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदर सूक्तांत व ऋग्वेदांत याचा व्यक्तिवाचक अर्थानें उल्लेख नाहीं.

ए व या म रु त्.—५. ८७. या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदर सूक्तांत एवयामरुत हें पद प्रत्येक ऋचेंत आहे म्हणूनच या सूक्ताचा द्रष्टा एवयामरुत आहे असें म्हटलें असावें. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

बु ध ग वि ष्ठि र.—५.१ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदर सूक्ताच्या १२ व्या ऋचेंत याचा उल्लेख असून १०.१५० या मृळीक सूक्तकाराच्या सूक्तांतील ५व्या ऋचेंत अत्रीसह उल्लेख आहे. परंतु त्यावरून हा आत्रेय होत नाहीं.

कु मा र.— ५. २ या सूक्ताचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्तांत कुमार पद पुष्कळ वेळां आलें आहे परंतु तें अग्नीचें विशेषण आहे. ऋग्वेदांत कुमार याचा व्यक्तिवाचक अर्थानें उल्लेख नाहीं.

पू रु — ५. १६ व १७ या सूक्तांचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. १७. १ यांत पूरु याचा उल्लेख आहे. परंतु तो सूक्तांचा द्रष्टा या अर्थानें नाहीं. सामान्य मनुष्य या अर्थी आहे. ऋग्वेदांत सायणांनीं सर्व ठिकाणीं पूरु याचा मनुष्य असाच अर्थ केला आहे.

स त्य श्र व स्.—५. ७९ व ८० या सूक्तांचा द्रष्टा असून याला आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ७९ या सूक्तांतील पहिल्या तीन ऋचांत 'सत्यश्रवस वाय्य' असा उल्लेख आहे. परंतु अनुक्रमणीकार याला वय्यपुत्र असें म्हणत नाहींत. वरील स्थलांशिवाय ऋग्वेदांत सत्यश्रवस् याचा आणखी उल्लेख नाहीं व तो आत्रेय असल्याचाहि उल्लेख नाहीं.

स प्त व ध्रि.—५. ७८ या व विकल्पानें ८. ६२ या सूक्ताचा द्रष्टा असून याला आत्रेय म्हटलें आहे. ५. ७८, या सूक्तांत ५, ६ या ऋचांत याचा उल्लेख असून ८. ६२,९ या ठिकाणीं व १०. ३९,९ या ऋचेंत उल्लेख आहे. वरील सर्व ठिकाणीं तो आपणांबरोबर अत्रीचा उल्लेख करीत आहे. यावरून तो अत्रिकुलांतील असावासें दिसतें.

रा त ह व्य.—५. ६५ व ६६ या सूक्तांचा हा द्रष्टा असून याला आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ६५, ३ या ठिकाणीं रातहव्याचा उल्लेख आहे. परंतु तेथें अत्रीचा कांहीं संबंध येत नाहीं. ऋग्वेदांत रातहव्याचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आहे, परंतु त्याचा व्यक्तिवाचक अर्थ कोठेंच केलेला नाहीं.

व सु श्रु त —हा ५ ते ६ या सूक्तांचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. सदर चार सूक्तांत व ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

इ ष.—५. ७ व ८ या सूक्तांचा द्रष्टा. याला आत्रेय म्हटलें आहे. वरील सूक्तांत इष याचा उल्लेख नाहीं. ५. ७ यांतील १० व्या ऋचेंत अत्रीचा उल्लेख आहे. इष याचा व्यक्तिवाचक अर्थानें ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

### भृगुकुल

**( २ ) सर्वानुक्रमणीसिद्ध कुल व ऋग्मंत्रसिद्ध वंशसंबंध.**—कवीचा मुलगा उशना; वेनाचा मुलगा पृथु, पृथूचा मुलगा तान्व.

**[३] सर्वानुक्रमणीसिद्ध वंश व कुलसंबंध.**—वरुणाचा मुलगा भृगु; भृगूचे मुलगे च्यवन, इट, कवि, जमदग्नि. कवीचा मुलगा उशना. जमदग्नीचा मुलगा राम ( परशुराम). भृगुकुलांतील.--प्रयोग, सोमाहुति, नेम, कृत्नु, स्यूमरश्मि, वेन. वेनाचा मुलगा पृथु व पृथूचा मुलगा तान्व.

भृ गु.—हा ९. ६५ व १०.१९या सूक्तांचा द्रष्टा असून याला वरुणपुत्र असें म्हटलें आहे. वरील दोन्ही सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत भृगूचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आहे. परंतु त्यांत त्याला वरुणपुत्र म्हटल्याचें आढळत नाहीं.

च्य व न.— ऋग्वेद १०.१९ या सूक्ताचा हा विकल्पानें द्रष्टा असून त्याला भार्गव असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत च्यवन या पदाचा व्यक्तिवाचक अर्थ केलेला नाहीं. ऋग्वेदांत च्यवान याचा व्यक्तिवाचक अर्थ केला असून तो १.११६,१०;११७, ११८; ६;५'७४,५;८०; ६८,६;७१. ५; १०, ३९,४ इतक्या ठिकाणीं आला आहे. व तो ' च्यवान याला अश्विदेवांनीं जरठपणा घालवून तरुण केलें, या अर्थानें आला आहे. वरील सर्व उताऱ्यांत तो भार्गव असल्याचा उल्लेख नाहीं.

ज म द ग्नि.—या सूक्तकाराकडे ८. ९० या सूक्ताचें कर्तृत्व आहे .व याला भार्गव म्हटलें आहे .वरील सूक्तांत त्याचा १८ व्या ऋचेंत उल्लेख आहे. त्याच्या नांवावर असलेल्या सूक्तांतील ९,६२,२४;६५,२५ ऋचांतून याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांत आणखीहि याचा उल्लेख आहे परंतु तो भार्गव असल्याचा उल्लेख नाहीं.

प्र यो ग.—हा ८.९१ या सूक्ताचा द्रष्टा असून याला भृगुगोत्रोत्पन्न म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ४ थ्या ऋचेंत भृगूंचा उल्लेख आहे, परंतु ऋग्वेदांत प्रयोग या ऋषीचा कोठेंच उल्लेख नाहीं.

स्यू म र श्मि.-याला १०. ७७ या सूक्ताचा द्रष्टा व भृगुगोत्रज असें अनुक्रमणीकार म्हणतात. वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. १. ११२,१६ या ऋचेंत या नांवाच्या ऋषीचा उल्लेख आहे, परंतु तो भृगुगोत्रज असल्याबद्दलचा नाहीं.

सो मा हु ति.—हा २.४ या सूक्ताचा द्रष्टा असून याला भार्गव म्हटलें आहे ऋग्वेदांत या व्यक्तीचा कोठेंच उल्लेख नाहीं. १. ९४,१४ या ऋचेंत ' सोमाहुतः 'असें पद आहे. परंतु तें अग्नीचें विशेषण आहे. २. ४ मधील २ ऱ्या ऋचेंत भृगूंचा उल्लेख आहे. परंतु त्यावरून याला भार्गव म्हणतां येत नाहीं.

ने म.—याच्याकडे १०. ८९ या सूक्तांचें द्रष्टृत्व आहे व याला अनुक्रमणींत भार्गव म्हटलें आहे. ऋग्वेदांत सर्व ठिकाणीं नेम शब्दाचा ' अर्ध ' असा अर्थ केला असून वरील सूक्तांत तिसऱ्या ऋचेंत नेमऋषि असा अर्थ केला आहे. तरी तो भार्गव असल्याचा उल्लेख नाहीं.

क वि.—हा ९. ४७या सूक्ताचा द्रष्टा असून याला भृगुपुत्र असें म्हटलें आहे.ऋग्वेदांत कवि पद पुष्कळ ठिकाणीं आहे परंतु याचा बहुतेक ' कविः-क्रांत दर्शी ' असाच अर्थ केला आहे परंतु कांहीं ठिकाणीं व्यक्तिवाचक अर्थ केला आहे तरी तो भृगुपुत्र या अर्थीं नाहीं.

उ श ना.—हा ९, ८७, ८८, ८९ या सूक्तांचा द्रष्टा आहे. याला कविपुत्र असें म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ८.७ सूक्तांतील ३ ऋचेंत व ऋग्वेदांत आणखी अन्य च ठिकाणीं 'उशना काव्य (कविपुत्र )असा उल्लेख आहे.

वे न —हा सूक्तकार ९. ८५ या सूक्ताचा द्रष्टा असून याला भृगुगोत्रज म्हटलें आहे. ऋग्वेदांत वेन या नांवाच्या व्यक्तीचा उल्लेख नाहीं. सर्व ठिकाणीं वेन याचा कांतियुक्त असाच सायणांनीं अर्थ केला आहे. तेव्हां वेन हा अनुक्रमणी प्रमाणें भृगुगोत्रज असल्याचें ऋग्वेदावरून सिद्ध होत नाहीं.

पृ थु —हा १९, १४८ या सूक्ताचा द्रष्टा असून त्याला वेनपुत्र म्हटलें आहे. व तो वेनपुत्र असल्याबद्दल वरील सूक्तांतील ५ व्या ऋचेंत उल्लेख आहे.

ता न्व.— ९. ९३ या सूक्ताचा हा द्रष्टा असून याला पृथोःपुत्र म्हटलें आहे. सदर सूक्ताच्या १५ व्या ऋचेंत पार्थ्य व तान्व यांचा उल्लेख आहे. पण त्यांत पितापुत्रसंबंध नाहीं.

क्र तु.—हा ८. ६८ या सूक्ताचा द्रष्टा. याला,भार्गव असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत क्रतु या नांवाच्या व्यक्तीचा उल्लेख नाहीं. वरील सूक्तांतील पहिल्याच ऋचेंत व ऋग्वेदांत आणखी दोन ठिकाणीं ' क्रतु' हें पद आलें आहे. परंतु याचा ' कर्ता ' असा अर्थ आहे. क्रतु हा भार्गव असल्याचा उल्लेख नाहीं.

इ ट.—याला १०, १७१ या सूक्ताचा द्रष्टा व भृगुपुत्र असें म्हटलें आहे. वरील सूक्तांत पहिल्याच ऋचेंत ' इटतः' असें पद असून त्याचा भाष्यकारांनीं इट या नामाची षष्ठी करून अर्थ केला आहे. तो सदर सूक्ताचा इट हा द्रष्टा हें गृहीत धरून केला असावा. इट नामक व्यक्तीचा ऋग्वेदांत आणखी कोठेंहि उल्लेख नाहीं. १०.१७१, १ येथेंहि तो भृगु पुत्र असल्याबद्दल उल्लेख नाहीं.

रा म (जमदग्निपुत्र ).—हा विकल्पानें १०. ११०, या सूक्ताचा द्रष्टा आहे. याला जमदग्निपुत्र असें म्हटलें आहे. सदर सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ऋ १०. ३, ३; व ९३, १४, या दोन ठिकाणीं राम शब्द आला आहे. त्याचा अनुक्रमें ' कृष्णवर्ण' व 'राम नांवाचा राजा ' असा अर्थ केला आहे. एकंदरींत जमदग्निपुत्र राम याचा ऋग्वेदांत स्पष्ट उल्लेख नाहीं.

## कश्यपकुल

[३]सर्वानुक्रमणीसिद्ध वंश व कुलसंबंध.—मरीचीचा मुलगा कश्यप. कश्यपाचा मुलगा अवत्सार व शिखंडिनी नांवाच्या दोन मुली. कश्यपकुलांतील:—असित, देवल , निध्रुव, भूतांश, विवृह, रेभ.

म री चि पु त्र–क श्य प.–हा १.९९ व ६४,११२;११३ या सूक्तांचा द्रष्टा. याला मरीचिपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ९.११३ या सूक्तांतील २ ऱ्या ऋचेंत याचा उल्लेख आला आहे. परंतु त्यावरून तो मरीचिपुत्र असल्याचें ठरत

नाहीं. ऋग्वेदांत वरील स्थलाशिवाय अन्यत्र याचा उल्लेख नाहीं.

क श्य प-भू तां श.— हा १०.१०६ या सूक्ताचा द्रष्टा आहे. याला काश्यप म्हटलें आहे. सदर सूक्तांतील शेवटच्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु तेवढ्यावरून तो कश्यपपुत्र अथवा कश्यप कुलांतील असल्याचें सिद्ध होत नाहीं.

का श्य प-नि ध्रु वः—९. ६३ या सूक्ताचा हा द्रष्टा असून याला काश्यप असें म्हटलें आहे. वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत निध्रुवि शब्द ७.३, १,८. २० २३;२९, २३ या तीन ठिकाणीं आहे. परंतु तो व्यक्तिवाचक नाहीं. तेव्हां ऋग्वेदांतील आधारावरून हा कश्यपकुलांतील ठरत नाहीं.

का श्य प-अ व त्सा र—४. ५३ ते ६० व ५. ४४ हीं सूक्तें याच्या नांवावर असून याला काश्यप म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ५.४४ या सूक्तांतील १० व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु त्यावरून हा काश्यप कुलांतील असल्याचें ठरत नाहीं. वरील स्थलाशिवाय याचा कोठें उल्लेख नाहीं. याच्याबरोबर एवावद, यजत, सध्रि यांचा उल्लेख आहे.

का श्य प-रे भः—हा ८. ९७ या सूक्ताचा द्रष्टा आहे व याला काश्यप म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ११ व्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांत बऱ्याच ठिकाणीं रेभ शब्द आला आहे. परंतु १. ८, १० येथेंच तो व्यक्तिवाचक अर्थानें आहे. परंतु त्याहि ठिकाणीं तो काश्यप कुलांतील असल्याचा उल्लेख नाहीं.

का श्य प अ सि त अ थ वा दे व ल.—९. ५ ते २४ या सूक्ताचा द्रष्टा असून याला काश्यप म्हटलें आहे. वरील सूक्तांत अथवा ऋग्वेदांत असित अगर देवल या व्यक्तींचा कोठेंच उल्लेख नाहीं. अर्थात तो काश्यप असल्याचाहि उल्लेख नाहींच.

वि वृ ह-क श्य प गो त्रः-१०. १६३. या सूक्ताचा द्रष्टा असून याला कश्यपगोत्री असें म्हटलें आहे. सदर सूक्तांत 'विवृहामि' पद प्रत्येक ऋचेंत आलें असल्यामुळेंच सदर सूक्ताचा विवृह ऋषि आहे असें म्हटलें असावें. विवृहाचा ऋग्वेदांत कोठेंहि उल्लेख नाहीं.

शि खं डि नी-क श्य पा च्या क न्या.—९. १०४ या सूक्ताच्या द्रष्ट्या कश्यपाच्या शिखंडिनी नामक दोन मुली असल्याचें लिहिलें आहे. या शिखंडिनींचा ऋग्वेदांत कोठेंहि उल्लेख नाहीं.

रे भ सू नू क श्य प-गो त्री—९, ९९ या सूक्ताचे हे दोघे विकल्पानें द्रष्टे असून यांनां काश्यपगोत्री असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत यांचा उल्लेख नाहीं. अथवा हे काश्यप गोत्री असल्याचा उल्लेख नाहीं.

सू नु-ऋ भु पु त्र—१०. १७६ या सूक्ताचा हा द्रष्टा असून याला ऋभुपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या आरंभींच्या ऋचेंतच 'सूनव ऋभणां' अशीं पदें आहेत. परंतु तीं एका व्यक्तीची बोधक नाहींत. ऋग्वेदांत या सूनुचा व्यक्तिवाचक असा उल्लेख नाहीं.

## भरद्वाजकुल.

**१ सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध व कुलसंबंध**— बृहस्पतीचा मुलगा भरद्वाज. भरद्वाज कुलांतील.-ऋजिश्वन्, पायु, वसु, गर्ग, सुहोत्र. सुहोत्राचे मुलगे पुरुमीह्ळ व अजमीह्ळ.

भ र द्वा ज—हा ऋ. मंडळ ६ चा द्रष्टा असून या मंडलांतील बरींच सूक्तें याच्या नावावर आहेत. सदर मंडलांत भरद्वाजाचा उल्लेख १६।१७ वेळ आला असून ऋग्वेदांत अन्य ठिकाणींहि आला आहे. परंतु अनुक्रमणीकार याला बृहस्पतिपुत्र असें जें म्हणतात त्याला आधार ऋग्वेदांत नाहीं.

ऋ जि श्व.—६. ४९ ते ५२ या सूक्तांचा द्रष्टा आहे व विकल्पानें ९. ९८ याहि सूक्ताचा द्रष्टा आहे. याला अनुक्रमणीकार भारद्वाज अथवा भरद्वाजकुलोत्पन्न असें म्हणतात. वरील सूक्तांपैकीं ६. ५०, १५- व ५१, १२ या दोन ऋचांत भरद्वाजाचा बहुवचनी उल्लेख आहे. परंतु 'भारद्वाज ऋजिश्व' असा उल्लेख नाहीं. ६. २०, ७ या भरद्वाजाच्या सूक्तांतील ऋचेंत ऋजिश्वन् याचा उल्लेख आला आहे. ऋग्वेदांत एक 'वैदथिन्ऋजिश्वा' आहे. व त्याचा उल्लेख ९.१६, १३ व ५. २९, ११ या दोन ठिकाणीं आहे. आणि दुसरा औशिज ऋजिश्व. याचा उल्लेख १७. ९९, ११ या ठिकाणीं आहे.

पा यु.—हा ऋ. ६. ७५ व १०. ८७ या सूक्तांचा द्रष्टा असून याला भरद्वाजपुत्र अथवा भारद्वाज म्हटलें आहे. वरील दोन्ही सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत पायु शब्द बऱ्याच वेळां आला आहे. परंतु त्याचा 'रक्षण करणारा' असाच सर्व ठिकाणीं अर्थ सायण करतात. मात्र ६. ४७ या भरद्वाजपुत्र गर्ग याच्या सूक्तांतील २४ व्या ऋचेंत अश्वथानें पायुनामक ऋषीला दान दिल्याचा उल्लेख असून २५व्या ऋचेंत भारद्वाजांचा उल्लेख आहे. परंतु पायु हा भारद्वाज अथवा भरद्वाजपुत्र असा उल्लेख नाहीं.

ग र्ग.—ऋ. ६. ४७ या सूक्ताचा हा द्रष्टा आहे. याला भरद्वाजपुत्र अथवा भारद्वाज म्हटलें आहे. ऋग्वेदांत गर्गाचा कोठेंहि उल्लेख नाहीं. वरील सूक्ताच्या २५ व्या ऋचेंत भरद्वाजांचा उल्लेख आहे.

व सु.—हा सूक्तकार ९. ८० ते ८२ या सूक्तांचा द्रष्टा असून याला भारद्वाज अथवा भरद्वाजपुत्र असें म्हटलें आहे. वरील सूक्तांत अथवा ऋग्वेदांत वसु या व्यक्तीचा उल्लेख नाहीं.

सु हो त्र.—९. ३१, ३२ या सूक्तांचा द्रष्टा. याला भारद्वाज-भरद्वाज कुलांतील-असें म्हटलें आहे. सदर सूक्तांतील ३१ व्या ऋचेंत भरद्वाजाचा उल्लेख आहे परंतु सुहोत्र भर-

द्वाज असल्याबद्दल उल्लेख नाहीं. सुहोत्राचा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

पुरुमीह्ळ, अजमीह्ळ.—४. ४३, ४४ या सूक्ताचे द्रष्टे. यानां सुहोत्रपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं सू. ४४ ऋचा ६ यांत आजमीह्ळाचा उल्लेख आहे. व पुरुमीह्ळाचा उल्लेख १. १५१, २;१८३, ५. ५. ६१, ९. ८. ६०, १४ या ठिकाणीं आहे. परंतु त्यापैकीं कोणत्याहि स्थळीं पुरुमीह्ळ व आजमीह्ळ सुहोत्रपुत्र असल्याचा उल्लेख नाहीं. ८. ६० याहि सूक्ताचा पुरुमीह्ळ द्रष्टा असून त्या सूक्ताच्या शेवटीं त्याचा उल्लेख आहे परंतु तो सुहोत्रपुत्र असल्याचा नाहीं.

## विश्वामित्रकुल.

[२] **सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध व ऋग्मंसिद्ध वंशसंबंध.**—कुशिकाचा मुलगा विश्वामित्र

(३) **सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध व कुलसंबंध.**—इषीरथाचा मुलगा कुशिक, कुशिकाचा मुलगा गाथी; गाथीचा मुलगा विश्वामित्र विश्वामित्राचे मुलगे ऋषभ, रेणु, अष्टक,कत, मधुच्छंद. कताचा मुलगा उत्कील. मधुच्छंदाचे मुलगे अघमर्ष व जेता. विश्वामित्र कुलांतील,प्रजापपति व पूरण.

कुशिक.—सर्वानुक्रमणीप्रमाणें हा ३.३३, या सूक्ताचा द्रष्टा असून याला इषीरथपुत्र असे म्हटलें आहे. ऋग्वेदांत कुशिकाचा बऱ्याच वेळ उल्लेख आला असून तो सर्व ठिकाणीं कुलवाचक असा बहुवचनी आहे. ३. ३३, ५. या ठिकाणीं हें एकवचनी पद एकाव्यक्तीचें नांव या अर्थानें आलें आहे. परंतु तेथें इषीरथपुत्र असा उल्लेख नाहीं. व इषीरथ या व्यक्तीचा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं. या कुशिकाला सर्वानुक्रमणीकारांनीं १०. १२७ या सूक्ताचा द्रष्टा सांगताना त्याला विकल्पानें सोभरिपुत्र असें म्हटलें आहे. परंतु त्यालाहि ऋग्वेदांत आधार नाहीं.

विश्वामित्र.—ऋग्वेद मंडल तीन चा हा द्रष्टा असून त्यांतील बरीचशीं सूक्तें याच्या नांवावर आहेत. सर्वानुक्रमणीकार याला गाथीपुत्र असें म्हणतात. परंतु याला ऋग्वेदांत आधार नाहीं. परंतु हा कुशिक याचा मुलगा असल्याबद्दल ३. ३३, ५. या ठिकाणीं उल्लेख आहे.

मधुच्छंद.—ऋ. १.१ ते १०व ९.१ या सूक्तांचा हा द्रष्टा असून याला वैश्वामित्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत मधुच्छंदाचा उल्लेख नाहीं.

गाथी.—या सूक्तकाराच्या नांवावर ३. १९ ते २२ हीं सूक्तें असून याला कुशिकपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत गाथी या व्यक्तीचा उल्लेख नसल्यामुळें तो कुशिकपुत्र असल्याचें ऋग्वेदावरून ठरत नाहीं.

ऋषभ.—हा ३. १३, व १४ आणि विकल्पानें १०. १६६ या सूक्तांचा द्रष्टा असून याला विश्वामित्रपुत्र असें म्हटलें आहे. परंतु याला ऋग्वेदांत आधार नाहीं. ऋग्वेदांत ऋषभ पद बऱ्याच ठिकाणीं आलें आहे परंतु तें व्यक्तिवाचक नाहीं.

रेणु.—हा १०. ८९ या सूक्ताचा द्रष्टा असून याला विश्वामित्रपुत्र म्हटलें आहे. परंतु याला ऋग्वेदांत, आधार नाहीं. ऋग्वेदांत रेणु नामक व्यक्तीचा उल्लेख नाहीं.

अष्टक.—हा १०. १०४ या सूक्ताचा द्रष्टा असून याला वैश्वामित्र असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

पूरण.—हा १०. १६० या सूक्ताचा द्रष्टा असून यालाहि वैश्वामित्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

कत.—हा ३. १७; व १८ या दोन सूक्तांचा द्रष्टा असून याला वैश्वामित्र (विश्वामित्रपुत्र) म्हटलें आहे. वरील दोन्ही सूक्तांत विश्वामित्राचा उल्लेख नाहीं व ऋग्वेदांत कत याचा उल्लेख नाहीं.

उत्कील.—हा ३. १५;१६ या दोन सूक्तांत द्रष्टा असून याला कात्य (कतपुत्र) म्हटलें आहे. वरील दोन्ही सूक्तांत विश्वामित्राचा उल्लेख नाहीं व ऋग्वेदांत कत या व्यक्तीचा उल्लेख नाहीं

जेता.—हा १. ११ या सूक्ताचा द्रष्टा असून याला मधुच्छंदपुत्र म्हटलें आहे. सदर सूक्तांत अथवा ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

अघमर्षण.—१०. १९० या सूक्ताचा हा द्रष्टा असून याला मधुच्छंदपुत्र म्हटलें आहे सदर सूक्तांत व ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

प्रजापति.—३. ३८ या सूक्ताचा हा द्रष्टा (विकल्पानें) असून याला वैश्वामित्र असें म्हटलें आहे परंतु हा वैश्वामित्र असल्याचें ऋग्वेदावरून ठरत नाहीं.

## गोतमकुल.

(२) **सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध व ऋग्मंत्रसिद्ध वंशसंबंध.**—रहूगणाचा मुलगा गोतम. गोतमाचा मुलगा नोधा.

(३) **सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध व कुलसंबंध.**— रहूगणाचा मुलगा गोतम. गोतमाचे मुलगे नोधा व वामदेव. नोधसचा मुलगा एकद्यू व वामदेवाचा मुलगा बृहद्दिव.

गोतम.—या सूक्तकाराकडे १. ७८; व ९ ३१ या सूक्तांचें कर्तृत्व आहे. अनुक्रमणीकार याला 'रहूगणपुत्र' असें म्हणतात. १. ७८ या सूक्तांत बहुतेक सर्व ऋचामध्यें गोतमाचा उल्लेख असून ५ व्या ऋचेंत तो आपणास 'रहूगणाः' म्हणवितो यावरून तो रहूगण याचा मुलगा असावा.

नोधा.—ऋ. १.५८ ते ६४ या सूक्ताचा हा द्रष्टा. अनुक्रमणींत याला गोतमपुत्र म्हटलें आहे. तो ज्या सूक्तांचा

द्रष्टा आहे. त्या पैकीं १. ६१, १४; ६२, १३; ६४, १ या ऋचेंत त्याचा उल्लेख असून १.६२, १३; ६०, ५; ६१, १६ या ऋचेंत तो आपणास गोतमासः ( गोतमपुत्राः )म्हणवितो. यावरून तो गोतमपुत्र असावा असें वाटतें.

ए क द्यू.—८. ६९ या सूक्ताचा हा द्रष्टा असून याला अनुक्रमणीकार नोधसपुत्र असें म्हणतात. यानें दृष्ट असलेल्या सूक्ताच्या ८ व्या ऋचेंत फक्त 'एकद्यू' असें पद आलें आहे. परंतु त्यांत तो नोधसपुत्र असल्याचा उल्लेख नाहीं; व अन्यत्रहि तसा उल्लेख नाहीं.

वा म दे व.—हा मंडळ ४ चा द्रष्टा असून त्याला अनुक्रमणींत गोतमपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत फक्त ४. १६, १८ या एकाच ठिकाणीं वामदेवाचा उल्लेख आहे. ४. ४, ११ या ऋचेंत तो आपणांस गोतमपुत्र म्हणवीत आहे. पण हें सूक्त वामदेवाचेंच असल्याबद्दल निश्चितता नसल्यामुळ वामदेवाला गोतमपुत्र निश्चितपणें म्हणतां येत नाहीं.

बृ ह दु क्थ.—हा १०. ५४ ते ५६ या सूक्तांचा द्रष्टा आहे व त्यामध्येंच त्याचा उल्लेख आहे, परंतु त्यावरून तो वामदेवपुत्र ठरत नाहीं. ऋग्वेदांत वरील स्थलाशिवाय अन्यत्र याचा उल्लेख नाहीं.

## वसिष्ठकुल.

(२) सर्वानुक्रमणीसिद्ध कुलसंबंध व ऋग्मंत्रासिद्ध वंशसंबंध.—मित्रावरुणाचे मुलगे वशिष्ठ व अगस्त्य. अगस्त्याची बायको लोपामुद्रा.

( ३ ) सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध.—मित्रावरुणाचे मुलगे अगस्त्य व वसिष्ठ. वसिष्ठाचे मुलगे मृळीक, चित्रमहस्, शक्ति. शक्तीचे मुलगे पराशर व गौरिवीति.

व शि ष्ठ.—ऋ. मंडळ ७ यांतील बरींच सूक्तें वसिष्ठदृष्ट व कांहीं वसिष्ठकुलांतील ऋषींनीं दृष्ट आहेत असें अनुक्रमणीकार म्हणतात. व म्हणून सातव्या मंडळाला वसिष्ठमंडळ असें म्हणतात. ५. ३३, ११ या ऋचेत वसिष्ठ मित्रावरुणाचा मुलगा असल्याचा उल्लेख आहे. तसेंच ७. ३३, १३ या ऋचेंत वसिष्ठ व मान यांचा मित्रावरुण व उर्वशी यांच्यापासून जन्म झाल्याचा उल्लेख आहे.

श क्ति.—हा ऋ. ७. ३२ या सूक्तांचा द्रष्टा आहे. याला वसिष्ठपुत्र असें अनुक्रमणींत म्हटलें आहे. परंतु याला आधार ऋग्वेदांत आढळत नाहीं. याच्या नांवावर असलेल्या सूक्तांत व ऋग्वेदांत अन्यत्र शक्ति शब्द आला आहे परंतु तो व्यक्तिवाचक नाहीं.

प रा श र.—हा १. ६५ ते ७३ या सूक्तांचा द्रष्टा आहे. वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत ७. १८, २१; १०४, २१ या दोनच ठिकाणीं पराशराचा उल्लेख आला आहे. परंतु सर्वानुक्रमणीकार याला जे शक्तिपुत्र म्हणतात तें या ठिकाणीं सिद्ध होत नाहीं. ७. १८, २१ या ठिकाणीं पराशराबरोबर वसिष्ठ व शतयातु यांचा उल्लेख आहे. निरुक्त ६. ३० मध्यें पराशर हें वसिष्ठाचेंच नांव आहे असें म्हटलें आहे.

मृ ळी क.—हा १०. १५० या सूक्ताचा द्रष्टा आहे. सदर सूक्तांत मृळीक शब्द बऱ्याच वेळा आला आहे व त्याचा 'सूक्तकार' आणि विकल्पानें सुख' असा सायणांनीं अर्थ दिला आहे. ऋग्वेदांत आणखी पुष्कळ ठिकाणीं मृळीक शब्द आला आहे. परंतु त्याचा सुख असाच सर्व ठिकाणीं अर्थ केला आहे. अनुक्रमणीकार जे याला वसिष्ठपुत्र म्हणतात त्याबद्दल ऋग्वेदांत अथवा इतर वेदांत आधार नाहीं. १०. १५ सूक्तांतील ५ व्या मंत्रांत वसिष्ठाचा उल्लेख आहे. परंतु त्यावरून तो मृळीकाचा बाप ठरत नाहीं.

चि त्र म ह स्.—हा १०. १२२ या सूक्ताचा द्रष्टा आहे व अनुक्रमणीकार याला वसिष्ठपुत्र असें म्हणतात. चित्रमहस् हें पद ऋग्वेदांत एकदांच व तें वरील सूक्तांतील पहिल्या ऋचेंत आहे. परंतु तें व्यक्तीचें नांव नसून अग्नीचें विशेषण आहे. सदर सूक्तांतील शेवटच्या ऋचेंत 'वसिष्ठासः' असें बहुवचनी पद आहे. परंतु तेवढ्यावरून चित्रमहस् नांवाचा कोणी वसिष्ठपुत्र असल्याचें ठरत नाहीं.

गौ रि वी ति.—हा ५. २९ व १०. ७३ व ७४ या सूक्तांचा द्रष्टा असून अनुक्रमणीकार याला शक्तिपुत्र असें म्हणतात. ऋग्वेदांत ५. २९, ११ या ठिकाणीं एकदांच याचा उल्लेख आला आहे. परंतु त्यांत तो शक्तिपुत्र असल्याचें ठरत नाहीं.

## अगस्त्यकुल.

(१) सर्वानुक्रमणी व ऋग्मंत्रासिद्ध वंशसंबंध.—मित्रावरुणपुत्र अगस्त्य. अगस्त्याची स्त्री लोपामुद्रा.

( २ ) सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध.—मित्रावरुणाचा मुलगा अगस्त्य. अगस्त्याची बायको लोपामुद्रा व मुलगा दृह्ळच्युत. दृह्ळच्युताचा मुलगा इध्मवाह.

अ ग स्त्य.—अनुक्रमणीकारांनीं १. १६५ ते १९१ या सूक्तांचा हा द्रष्टा आहे असें म्हटलें आहे. याला मान असें दुसरें नांव असून मित्रावरुणापासून वसिष्ठाचा व याचा जन्म झाल्याचा उल्लेख ७. ३३, १० व १३ या ऋचांत आहे. याची लोपामुद्रा नांवाची बायको असल्याचा १. १७९ या सूक्तांत उल्लेख आहे.

मा न अ थ वा मा न्य.—८. ५६ या सूक्ताचा द्रष्टा. याला मित्रावरुणपुत्र म्हटलें आहे. मित्रावरुणापासून याचा जन्म झाल्याचा उल्लेख ७. ३३, १३ या ऋचेंत आहे. अगस्त्याचेंच हें नाव असावें.

दृ ह् ळ च्यु त.—हा ९. २५ या सूक्ताचा द्रष्टा असून याला अनुक्रमणींत अगस्त्यपुत्र म्हटलें आहे. सदर सूक्तांत अथवा ऋग्वेदांत याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. अर्थात हा अगस्तिपुत्र असल्याचें ऋग्वेदावरून सिद्ध होत नाहीं.

इ ध्म वा ह.—हा ९. २६ या सूक्ताचा द्रष्टा. याला दृढच्युतपुत्र असें अनुक्रमणीकार म्हणतात. परंतु तसा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं.

### कुलविरहित

पुढील सूक्तकारांचे कुलसंबंध ऋग्मंत्र, सर्वानुक्रमणी अथवा बृहद्देवता यांत आढळत नाहींत.

**( १ ) ऋग्मंत्रसिद्ध वंशसंबंध.**—त्रिवृष्णाचा मुलगा त्रैवृष्ण. पुरुकुत्साचा मुलगा त्रसदस्यु. भरताचे मुलगे देवश्रवा व देववात. ऋष्टिषेणाचे मुलगे देवापि व शंतनु. अथर्वन्‌चा मुलगा बृहद्दिव. विवस्वान्‌चीं मुलें यमी व यम. पिजवनाचा वंशज सुदास. क्षयोगाचा मुलगा आसंग. वृषागिराचे मुलगे ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान, सुराधस्.

**[ २ ] सर्वानुक्रमणीसिद्ध वंशसंबंध.**—भरताचा मुलगा अश्वमेध. कद्रूचा मुलगा अर्बुद. भलंदनाचा मुलगा वत्सप्री. वृषागिरपुत्र अंबरीष व त्याचा मुलगा सिंधुद्वीप. उश याचा मुलगा धनाक. इलूषाचा मुलगा कवष. रोहिदश्वाचा मुलगा वसुमना. विवस्वान्पुत्र यम व त्याचे मुलगे माथित, संकुसुक, शंख दमन, देवश्रवस्. उशीनराचा मुलगा शिबि. इंद्राचे मुलगे वसुक व विमद. दिवोदासाचा मुलगा परुच्छेप व त्याचा मुलगा अनानत. अथर्वन्‌चे मुलगे बृहद्दिव व भिषक्. सोमाचा मुलगा बुध. प्रजापतीचा मुलगा संवरण. अजीगर्ताचा मुलगा शुनःशेप. शिलूषाचा मुलगा कुलमलबर्हिष्. मनूचे नाभानेदिष्ट व शार्यात. युवनाश्वाचा मुलगा मंधाता. इलाचा मुलगा पुरूरवा व पुरूरव्याची बायको उर्वशी. भर्म्यश्वाचा मुलगा मुद्गल व मुद्गलाची बायको मुद्गलानी. सुवेदसचा मुलगा शिरिंप. वंदनाचा मुलगा दुवस्यु.

त्र्य रु ण.—५. २७ या सूक्ताचा द्रष्टा. याला त्रैवृष्णि-त्रिवृष्णिपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या पहिल्या ऋचेंत त्रैवृष्ण-त्र्यरुण असा उल्लेख आहे, व त्र्यरुणाचा उल्लेख याच सूक्तांत २ व ३ या ऋचांमध्यें आहे.

त्र स द स्यु.— ४. ४२ व ५. २७ या सूक्तांचा द्रष्टा. याला पौरुकुत्स्य असें म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ३ ऱ्या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु तो पौरुकुत्स्य असल्याचा नाहीं. ऋग्वेदामध्यें त्रसदस्यूचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आहे, व तो पुरुकुत्सपुत्र-त्रसदस्यु असा ५. ३३,८;८.१९,३;७.१९,३६ या तीन ठिकाणीं आहे.४.४२ या सूक्ताच्या ९ व १० ऋचांत याचा उल्लेख असून याची आई पुरुकुत्सानी हिचाहि उल्लेख आहे.

अ श्व मे ध.—५. २७ या सूक्ताचा हा द्रष्टा आहे. याला भारत-भरतपुत्र-असें म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ४, ५, व ६ या ऋचांत अश्वमेधाचा उल्लेख आहे. परंतु तो भरतपुत्र असल्याबद्दल नाहीं.

दे व श्र वा, दे व वा त.—३. २३ या सूक्ताचे हे दोघे द्रष्टे. यांनां भारत-भरतपुत्र-म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या २ व ३ या ऋचांत 'भारत देवश्रवा देववात.' असा उल्लेख आहे. ऋग्वेदांत देवश्रवा, देववात यांचा व्यक्तिवाचक उल्लेख आणखी आढळत नाहीं.

ऋ ज्रा श्व, अं ब री ष, स ह दे व, भ य मा न, सु रा ध स्.—१. १०० या सूक्ताचे द्रष्टे. यांचा सदर सूक्ताच्या १७ व्या ऋचेंत एकाच ठिकाणीं उल्लेख आहे. यांनां 'वृषागिरपुत्र' असें म्हटलें आहे. वरील पांचहि सूक्तकारांचा एकत्र असा उल्लेख ऋग्वेदांत आणखी आलेला नाहीं. एकट्या ऋज्राश्वाचा उल्लेख १. १००, १७; ११६,१६;११७, १७; १८ या ऋचामध्ये आहे.

दे वा पि.—१०. ९८ या सूक्ताचा द्रष्टा. याला आर्ष्टिषेण ऋष्टिषेणपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ५,६ व ८ या ऋचांमध्यें आर्ष्टिषेण या नांवाचा उल्लेख असून तो देवापि याचा बाप असावा असें दिसतें.

अ र्बु द.—१०. ९४ या सूक्ताचा द्रष्टा. याला काद्रवेय असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत तसा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांतील अर्बुद याचा कांहीं ठिकाणीं असुर व कांहीं ठिकाणीं सायणांनीं मेघ असा अर्थ केला आहे व ८. ४५, २६ या ऋचेंतील 'कद्रुवः' या पदाचा कद्रु ऋषिसंबंधीं असा अर्थ केला आहे. परंतु त्याचा आणि अर्बुदाचा संबंध नाहीं.

व त्स प्रि.—९. ६८ व १०. ४५ या सूक्तांचा द्रष्टा. याला भालंदन—भलंदनपुत्र—म्हटलें आहे. ऋग्वेदांत वत्सप्रीचा अथवा भलंदनाचा उल्लेख नाहीं.

सिं धु द्वी प.—१०. ९ या सूक्ताचा द्रष्टा. याला अंबरीषपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

वि व स्वा न्.—१०.१३ या सूक्ताचा द्रष्टा. याला अदितिपुत्र म्हटलें आहे. १०.१४,५;१७,२या ठिकाणीं विवस्वानाचा उल्लेख आहे. परंतु तो अदितिपुत्र असल्याचा नाहीं.

य म.—१०.१४ या सूक्ताचा द्रष्टा. याला विवस्वानपुत्र म्हटलें आहे व तसा उल्लेख सदर सूक्ताच्या १ व ५ या ऋचांत आहे.

य मी.—१०.१० या सूक्ताची द्रष्टी. हिला 'विवस्वत् कन्या'असें म्हटलें आहे.हिचा उल्लेख. सदर सूक्ताच्या १० व्या ऋचेंत आहे व तो ती यमाची भगिनी असल्याबद्दल आहे. यमी विवस्वानाची कन्या असल्याचा प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी यम हा विवस्वान्पुत्र असून यमी त्याची भगिनी असा उल्लेख असल्यामुळें यमीला विवस्वान्कन्या म्हणावयास हरकत नाहीं.

शं ख.—१०. १५ या सूक्ताचा द्रष्टा. याला यमपुत्र असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

सं कु सु क.—१०. १८ या सूक्ताचा द्रष्टा.याला यमपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

द म न.—१०. १६ या सूक्ताचा द्रष्टा. याला यमपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

दे व श्र वा.—१०. १७ या सूक्ताचा द्रष्टा. याला यमपुत्र म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत तसा उल्लेख नाहीं.

मथित.—१०. १९ या सूक्ताचा द्रष्टा, याला यमपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत तसा उल्लेख नाहीं.

विमद.—१०.२० ते २६ या सूक्तांचा द्रष्टा. याला इंद्रपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्तांपैकीं १०.२०,१०;२३,६,७; २४, ४ या ठिकाणीं व ऋग्वेदांत आणखी १.५१,३;११२,१९; ११६,१; ११७,२०;८. ९,१५;१० ३९,७ ; ६५, १२, इतक्या ठिकाणीं आहे परंतु तो इंद्रपुत्र असल्याचा उल्लेख नाहीं.

वसुक्र.—१०. २७ ते २९ या सूक्तांचा द्रष्टा. याला इंद्रपुत्र म्हटलें आहे. याचा ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

कवष.—१०. ३० ते ३४ या सूक्तांचा द्रष्टा. याला इलूषपुत्र असें ह्मटलें आहे. कवषाचा उल्लेख ऋग्वेदांत एकदांच ७. १८,१२ या ठिकाणीं असून तो ऋषि नसावा असें दिसतें; कारण त्या ठिकाणीं इंद्रानें त्याला पाण्यांत बुडविल्याचा उल्लेख आहे.

लुश.—१०. ३५ व ३६ या दोन सूक्तांचा द्रष्टा. याला धनाकपुत्र असें म्हटलें आहे. धनाक अथवा लुश या दोघांचाहि ऋग्वेदांत उल्लेख नाहीं.

बृहद्दिव—१०.१२० या सूक्ताचा द्रष्टा. याला अथर्वण ऋषीचा पुत्र असें म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या ८ व्या ऋचेंत बृहद्दिव याचा उल्लेख आहे व ९ व्या ऋचेंत आथर्वण बृहद्दिव असा उल्लेख आहे. ऋग्वेदांत याशिवाय ‘ बृहद्दिव ’ पदाचा उल्लेख बऱ्याच ठिकाणीं आहे. परंतु तो व्यक्तिवाचक नाहीं.

भिषक्.—१०. ९७ या सूक्ताचा द्रष्टा. याला आथर्वण ह्मटलें आहे. ऋग्वेदांत भिषक् या व्यक्तीचा उल्लेख नाहीं.

शिबि(राजा).—१०.१७९ या सूक्तांतील १ ल्या ऋचेचा द्रष्टा. याला उशीनरपुत्र म्हटलें आहे. ऋग्वेदांत शिबि याचा उल्लेख नाहीं.

वसुमना.—१०. १७९ या सूक्तांतील ३ ऱ्या ऋचेचा द्रष्टा याला रोहिदश्वपुत्र असें ह्मटलें आहे. ऋग्वेदांत वसुमनाचा उल्लेख नाहीं.

परुच्छेप.—१. १२७ ते १३९ या सूक्तांचा द्रष्टा. याला दिवोदासपुत्र ह्मटलें आहे. ऋग्वेदांत परुच्छेपाचा उल्लेख नाहीं.

अनानत.—१०. ११२ या सूक्ताचा द्रष्टा. याला परुच्छेपपुत्र असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत अनानत याचा व्यक्तिवाचक अर्थानें उल्लेख नाहीं.

बुध.—१०. १०१ या सूक्ताचा द्रष्टा. याला सोमपुत्र ह्मटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

अग्नियुत.—१०.११६ या सूक्ताचा द्रष्टा. याला स्थूल ऋषीचा पुत्र ह्मटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

संवरण.—५. ३३ या सूक्ताचा द्रष्टा. याला प्रजापतिपुत्र म्हटलें आहे. वरील सूक्ताच्या १० व्या ऋचेंत संवरण ऋषीचा उल्लेख आहे परंतु तो प्रजापतिपुत्र असल्याबद्दल नाहीं. ऋग्वेदांत याशिवाय संवरण याचा व्यक्तिवाचक उल्लेख नाहीं.

शुनःशेप.—१. २४ ते ३० या सूक्तांचा द्रष्टा. याला अजीगर्तपुत्र म्हटलें आहे. १. २४, १२; १३;५. २, ७ या ठिकाणीं शुनःशेपाचा उल्लेख आहे परंतु तो अजीगर्तपुत्र असल्याबद्दल नाहीं.

कुल्मलबर्हिष.—१०. १२६ या सूक्ताचा द्रष्टा. याला शिलूषपुत्र ह्मटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

मुद्गल.—१०. १०२ या सूक्ताचा द्रष्टा. याला भर्म्यश्वपुत्र ह्मटलें आहे. वरील सूक्तांतील ५ व ९ या ऋचांत मुद्गलाचा उल्लेख असून २ व ६ ऋचांत मुद्गलानीचा उल्लेख आहे. परंतु मुद्गल हा भर्म्यश्वपुत्र असल्याचा उल्लेख नाहीं.

मंधाता—१०. १३४ या सूक्ताचा द्रष्टा. याला युवनाश्वपुत्र ह्मटलें आहे वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. ऋग्वेदांत १.११२,१३;८.३९,८;४०, १२ या तीन ठिकाणीं मंधाता याचा उल्लेख आहे. परंतु तो युवनाश्वपुत्र असल्याचा नाहीं.

पुरूरवा.—१०. ९५ या सूक्ताचा द्रष्टा. याला इलपुत्र ह्मटलें आहे. वरील सूक्ताच्या २,५,७,११ व १५ या ऋचांत पुरूरव्यांचा उल्लेख आहे. परंतु तो इलपुत्र असल्याचा नाहीं.

नाभानेदिष्ठ.—१०.६१व६२ या सूक्तांचा द्रष्टा. याला मनुपुत्र ह्मटलें आहे. वरील सूक्तांपैकीं ६१. १८ या ऋचेंत याचा उल्लेख आहे. परंतु तो मनूचा पुत्र असल्याबद्दल नाहीं. ऋग्वेदांत याखेरीज नाभानेदिष्ठाचा उल्लेख नाहीं.

शार्यात.—१०. ९२ या सूक्ताचा द्रष्टा. याला मनुपुत्र ह्मटलें आहे. वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं. १.५१,१२ व ५१, ७ या दोन ठिकाणीं शार्याताचा उल्लेख आहे, परंतु तो मनुपुत्र असल्याबद्दल नाहीं.

सुदास.—१०. १३३ सूक्ताचा द्रष्टा. याला पिजवनपुत्र ह्मटलें आहे. वरील सूक्तांत याचा उल्लेख नाहीं परंतु ऋग्वेदांत सुदासाचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं असून ७.१८.२२;२३;२५ या तीन ठिकाणीं पिजवनपुत्र सुदास असा उल्लेख आहे.

आसंग.—८. १ या सूक्तांतील ३० ते ३३ या चार मंत्रांचा द्रष्टा. याला प्लयोगपुत्र असें म्हटलें असून त्याचा उल्लेख वरील सूक्ताच्या ३३ व्या मंत्रांत आहे.

शश्वती.—८. १ या सूक्तांतील ३४ व्या मंत्राची द्रष्टी. हिला आसंगपत्नी असें ह्मटलें आहे. वरील मन्त्रांत हिचा उल्लेख आहे. परंतु आसंगपत्नी असा नाहीं.

सुवेदस्.—१०. १४७ या सूक्ताचा द्रष्टा. याला शिरीषपुत्र असें म्हटलें आहे. ऋग्वेदांत याचा उल्लेख नाहीं.

दुवस्यु.—१०. १०० या सूक्ताचा द्रष्टा. याला वंदनपुत्र ह्मटलें आहे. वरील सूक्ताच्या १२ व्या ऋचेंत दुवस्यूचा उल्लेख आहे. परंतु तो वंदनपुत्र असल्याचा नाहीं.

**गोत्रें.**— गोत्र ही संस्था प्राचीनकाळीं काय असावी हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. गो म्हणजे भूमि आणि त्र म्हणजे संरक्षक; म्हणजे गोत्र म्हणजे भूमिसंरक्षक वर्ग असा गोत्र या शब्दाचा अर्थ करून गोत्र हा शासनाविषयक

विभाग असावा अशी कल्पना व्यक्त झाली आहे; आणि दुसऱ्याच्या गोत्रांतील मुलगी पळविणें हें मर्दाचें काम या मुळें गोत्राबाहेर लग्न करण्याची रीत उत्पन्न झाली असावी असें गोत्राबाहेर लग्न लावण्याचें स्पष्टीकरण करण्यांत आलें आहे. या प्रकारच्या स्पष्टीकरणाच्या ग्रहणास अडचण येते ती ही कीं गोत्र आणि विवाहसंस्थेचा संबंध प्राचीनकाळीं नव्हता. हा संबंध केव्हां उत्पन्न झाला आणि कोणत्या प्रयोजनामुळें झाला हा बऱ्याच उत्तरकालीन इतिहासाचा प्रश्न आहे. वेदकाळांत गो म्हणजे जमीन आणि त्र म्हणजे संरक्षक असा अर्थ असणें शक्य आहे आणि त्यामुळें गोत्र ही एक राजकीय संस्था असावी हेंहि शक्य आहे. परंतु ती तशी होतीच हेंहि आज निश्चयानें सांगतां येत नाहीं.

गोत्र हा शब्द ऋग्वेदामध्यें इन्द्राच्या पराक्रमांच्या वर्णनांत अनेक वेळां येतो. या शब्दाचा अर्थ रॉथ गोठा असा करतो तर गेल्डनेर गाईंचा कळप असा करतो. मॅकडोनेलच्या मतें वरील दुसऱ्या अर्थावरून पुढें या शब्दास उत्तरकालीन वाङ्मयांत जो कुटुंब किंवा गोत असा अर्थ आला आहे त्याची उपपत्ति लावणें सोपें होतें. छान्दोग्य उपनिषदांत [ ४ . ४ , १ ] कुटुंब या अर्थी गोत्र शब्द आलेला आहे.

दुसऱ्याच्या टोळींतील मुलगी चोरून आणावयाची आणि स्वतःच्या टोळींतील मुलगी करणें म्हणजे नामर्दपणा होय या तऱ्हेच्या कल्पनेचा मांत्रसंस्कृतीच्या लोकांतील बहिर्विवाह स्पष्ट करण्यास उपयोग होत नाहीं; कां कीं सगोत्र विवाह वेदांत तर बंद केल्याचा उल्लेख नाहीं, बौधायनासारख्या जुन्या स्मृतींतहि त्यास आडकाठी नाहीं, आणि वसिष्ठाच्या धर्मसूत्रांत देखील सगोत्रविवाह करण्यास आडकाठी जरी घातली आहे तरी बापाच्या बाजूनें पांच पिढ्या व आईच्या बाजूनें तीन पिढ्या सोडून लग्न करावें असें सांगितलें आहे.

ज्या कांहीं स्मृतींमधून सगोत्र किंवा सप्रवर विवाह यांचा निषेध केला असतो त्याबरोबरच बापाकडच्या सात पिढ्या टाकाव्या व आईकडच्या पांच पिढ्या टाकाव्या असाहि उल्लेख करण्यांत येतो. गोत्रसंस्था जर प्राचीन नव्हे तर आपणांपुढें प्रश्न एवढाच उरतो कीं ही समाजांत शिरली असेल तरी केव्हां आणि वर धर्मशास्त्रकारांनीं दिलेले दोन भिन्न नियम भिन्न काळीं उपस्थित होऊन पुढें ते दोन्ही एकत्र मांडले गेले असे तर नसेल ना ? सात पिढ्यांपर्यंत अगदरच नातेवाईकांचा हिशोब ज्यांस माहीत आहे अशा व्यक्ती विरळा. पांच पिढ्या आईकडच्या टाकाव्या हा नियम तर बऱ्याच जातींनीं धाब्यावर बसविला आहे. दक्षिणेकडे अनेक जातींत मामाची मुलगी तर लग्नांत अधिक पसंत केली जाते. बापाकडून सात पिढ्या टाकाव्या हा नियम घेतला तर तो अनवश्यक ठरतो; कारण गोत्राबाहेर जर लग्न करावयाचें तर सात तर काय पण त्यानें शेंकडों पिढ्या वगळल्या जातात. वसिष्ठादि जुन्या स्मृतिकारांनीं हे दोन्ही नियम एकसमयावच्छेदेंकरून मांडले असूनहि त्यांत दिसून येणारी परस्परविरुद्धता ओळखून मनुस्मृतीनें फक्त गोत्राचाच नियम ठेविला आहे व बापाकडील सात पिढ्यांचा वगळला आहे. मनुस्मृतीचा "असपिंडा च या मातुः असपिण्डा च या पितुः" हा पाठ घेतला तर सपिण्डाबाहेरचे सगोत्री विवाह्य ठरतील. विवाहविषयक नियम देणारे धर्मसूत्रकारांच्या पूर्वीचे ग्रंथकार म्हणजे गृह्यसूत्रकार हे होत. बऱ्याचशा गृह्यसूत्रकारांनीं तर गोत्रांचा मुळींच आग्रह धरिला नाहीं.

सेनार्ट हा सगोत्रविवाहाची निषिद्धता व सवर्णविवाहाची प्रशस्तता मूलगृहकालापर्यंत नेतो. परंतु असगोत्र विवाहाची चाल इण्डोयूरोपीय कालापासून अस्तित्वांत असावी असें समजण्यास साधन जें भारतीयांतलि गोत्रप्राचीनता तेंच खरें दिसत नाहीं. शतपथ ब्राह्मणांत ( १. ८, ३, ६ ) दोन्ही बाजूंनीं तिसऱ्या किंवा चवथ्या पिढीच्या आंतच विवाह करणें संमत असल्याचा उल्लेख आहे. सायणाचार्यांप्रमाणें काण्व तिसऱ्या पिढीशीं व सौराष्ट्र चवथ्या पिढीशीं विवाह करतात. या उदाहरणास वज्रसूचीवरील टीकाकार काण्वाबरोबरच आंध्र व दाक्षिणात्य यांचा उल्लेख करितात. वाजसनेयिशाखीय ब्राह्मणांत मामेबहिणीशीं विवाह करणें निषिद्ध आहे एवढेंच नव्हे तर मामाचें गोत्रहि वगळावयाची चाल आहे. वरील ग्रंथांत चुलत बहिणीशीं विवाह करण्यास जो सांप्रत निषेध मानतात त्याचा कोठें उल्लेख आढळत नाहीं. शुनःशेपाच्या कथेवरून व गृत्समद हा आंगिरस असून पुढें भार्गव झाला यावरून गोत्र बदलणें त्यावेळीं शक्य होतें हें स्पष्ट दिसतें. गोत्रें ही संस्था फार प्राचीन नाहीं ही गोष्ट गोत्रें व श्रौतधर्म यांचा संबंध लक्षांत घेतला असतां दिसून येईल. असें मात्र शक्य आहे कीं सूतसंस्कृतीच्या आर्यन् लोकांत गोत्रांचें म्हणजे बहिर्विवाहाचें देवकरूपानें अस्तित्व असेल व रोमन लोकांत "जेन्" नांवाच्या समुच्चयाबाहेर लग्न करण्याची पद्धत होती. जर इंडोयूरोपीय काळांत बहिर्विवाह होत असेल तर मधल्या मांत्रसंस्कृतीच्या लोकांत तो तात्पुरता नष्ट झाला असला पाहिजे असें वाटतें. केव्हां त्यांत गोत्रसंस्था निर्माण झाली तेव्हां त्यांचा प्रवरांशीं संबंध जोडला गेला, आणि वेदविरुद्ध पण वैदिक परंपरेवर रचलेली अशी समाजव्यवस्था प्रचलित झाली हें पुढील विवेचनावरून कळून येईल.

**गोत्रें व श्रौतधर्म.—** गोत्रांचा वैदिक धर्मसंस्थेंत महत्वाचा संबंध दिसत नाहीं. गोत्रें जर मांत्रसंस्कृतीच्या लोकांचीं असतीं तर त्यांचा ऋग्वेदप्रदृष्ट श्रौतकर्मांत बराच संबंध असता. गोत्रांचा संबंध यज्ञसंस्थेंत अत्यंत बेताचा दिसतो. ऋग्वेदांत त्यांचा स्पष्ट उल्लेखहि दिसत नाहीं. गोत्रप्रवरकल्पना ऋग्वेदोत्तर वाङ्मयांत दिसतात, आणि त्यांचें अस्तित्व दोन कारणांमुळें संभवतें. एकतर यज्ञसंस्थेबरोबर

गोत्रप्रवरविचार वृद्धिंगत झाला असावा किंवा मांत्रसंस्कृती-बाहेरील लोकांत गोत्रसंस्थेचें अस्तित्व असावें आणि गोत्रांस धर्मत्व देण्यासाठीं त्यांचा यज्ञसंस्थेशीं मुद्दाम कसा तरी संबंध जडविला असावा. या दोन कल्पनांपैकीं दुसरी कल्पना म्हणजे गोत्रांचा यज्ञसंस्थेशीं मुद्दाम संबंध जोडला असावा हें जास्त शक्य वाटतें. गोत्रांचा श्रौतधर्मांत जो फारच थोडका संबंध आहे तो इतकाच कीं आप्रीसूक्तें होत्यानें कोणतीं म्हणावयाचीं हें यजमानाच्या गोत्रावरून किंवा प्रवरावरून ठरवावें लागतें.

पशुयागामध्यें पशूच्या वधेचा याग होण्यापूर्वी प्रयाज नामक देवतांना उद्देशून याग व्हावयाचा असतो (या देवता अकरा किंवा बारा आहेत). या यागांत प्रत्येक देवतेसंबंधीं यागासाठीं स्तावक पठण करण्यास मैत्रावरुणानें प्रैष दिल्यावर होत्यानें याज्यारूप ऋचा पठन करावयाची असते. अशा अकरा अथवा बारा ऋचांच्या सूक्तास आप्री सूक्त अशी संज्ञा आहे. हींच आप्री सूक्तें होत्यानें कोणतीं म्हणावीं हें यजमानाच्या गोत्रावरून किंवा प्रवरावरून ठरतें.

वरील आप्रीमध्यें कोणत्या देवतांना आहुती द्यावयाच्या या संबंधानें फरक आहे. त्याविषयीं विधिनिषेधात्मक नियम आहेत ते असे. ज्या देवतांना आहुती द्यावयाच्या त्यांपैकीं दहा देवता सर्वगोत्रीयांना सारख्या आहेत. कित्येक गोत्रांचे लोक आणखी दोन देवतांस आहुति देतात व कित्येक या दोहोंपैकीं एकीस देतात व एकीस वगळतात. या दोन वादग्रस्त देवता म्हणजे नराशंस व तनुनपात् या होत. वसिष्ठ, अत्रि वध्र्यश्व व गृत्समद या गोत्रांचे लोक तनुनपात् या देवतेस आहुति देत नाहींत आणि विश्वामित्र, अगस्त्य, कश्यप, जमदग्नि या गोत्रांचे लोक नराशंस देवतेस आप्रीपूर्वक आहुति देत नाहींत; व काण्व आणि आंगिरस हे या दोन्ही देवतांना आहुति देतात. देवता कोणती घ्यावी यासंबंधानें आणखी एक नियम असा आहे कीं क्षत्रियांनीं नराशंस देवताच घ्यावी. अशा प्रकारची देवता घेण्याचा व टाकण्याचा प्रसंग फक्त पशुयागांतच येतो असें नाहीं तर पंधरा दिवसांनीं करावयाचा दर्शपूर्णमास यागां (इष्टी) तील प्रयाज यागांत देखील देवताग्रहण यजमानाच्या गोत्रावरून ठरत असतें.

**गोत्रविशिष्ट श्रौतधर्माचें अर्वाचीनत्व.**—आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, आप्रीसूक्तें किंवा देवतापरिग्रह याचा यजमानाच्या गोत्रांशीं जोडलेला संबंध कितपत जुना आहे. आप्रीच्या निवडीपेक्षां देवतापरिग्रहासंबंधीं प्रश्न जास्त जुना दिसतो.

आप्रीसूक्तें गोत्रभेदाप्रमाणें म्हणावीं हें तत्व ब्राह्मणकालीं प्रचारांत येऊं लागलें होतें असें दिसतें (ऐ. ब्रा. २ ४). परंतु तें फार जुनें असेल असें वाटत नाहीं. कारण आप्रीसूक्तें हा विषय हौत्राचा असून हौत्रविषयाचें उपबृंहण करणारे ग्रंथ जे ब्राह्मणें व सूत्रें त्यापूर्वींच्या ग्रंथांत म्हणजे यजुर्वेदांत—ज्यामध्यें वादविषयक प्रयाज यागाचा संबंध येतो अशा— दर्शपूर्णमास व पशु या दोहोंचेहि हौत्र पठित आहे (ज्याला आज याजुष हौत्र असें म्हणतात) व त्यांत आप्री सूक्तें गोत्रपरत्वें वेगळीं सांगितलीं नसून एकच सांगितलें आहे. सूत्रें व त्यावरील टीकाकार यांनीं मात्र याविषयीं जास्त विवक्षा केली आहे. गोत्रपरत्वें आप्रीग्रहणाची चाल अलीकडील ठरविण्यास. यांतच आणखी एक पुरावा असा आहे कीं, यजुर्वेदांतील हौत्रांत जें आप्रीसूक्त सांगितलें आहे त्याची परंपरा मोडतां येत नसल्यामुळें सूत्रकारांनीं ज्या कोणास गोत्रपरत्वें निरनिराळीं आप्री सूक्तें घ्यावयाचीं नसतील त्यांना विकल्पानें वरील (याजुष हौत्रांतर्गत) सूक्त घ्यावें असें सांगितलें आहे.

**निरनिराळ्या गोत्रीयांची निरनिराळीं आप्री सूक्तें.**— यासंबंधीं आश्वलायनसूत्र पुढील प्रमाणें आहेः— समिद्धो अग्निरिति शुनकानां, जुषस्वनः समिधमिति वसिष्ठानां, समिद्धो अद्येति सर्वेषां.' या तिसऱ्या सूत्राचा वृत्तिकार 'वसिष्ठ शुनकाशिवाय' असा अर्थ करतात पण तो जुना आहे असें म्हणवत नाहीं. सूत्रांत पुढें 'यथर्षिवा' असें एक सूत्र आहे त्यावर भाष्य करतांना वृत्तिकार शौनकोक्त श्लोकाचा आधार घेऊन भाष्य करतात कीं, 'स्वीयर्षिनामधेयस्यानुगुणाऽऽप्न्याःकर्तव्याः'

आश्वलायन सूत्रावरील वृत्तीप्रमाणें आप्री सूक्तें आणि त्यांचा उपयोग येणें प्रमाणेंः—

| गोत्रनाम | सूक्तप्रतीक | ऋ. स्था. | ऋचा | सूक्तद्रष्टा |
|---|---|---|---|---|
| कण्व | सुसमिद्धो न० | १ १३ | १२ | मधातिथि |
| आंगिरस | समिद्धो अग्ने० | १. १४२ | १२ | दीर्घतमा. |
| अगस्ति | समिद्धो अद्य० | १. १८८ | ११ | अगस्त्य |
| शुनक | समिद्धो अग्नि० | २. ३ | ११ | गृत्समद |
| विश्वामित्र | समित्समित्० | ३. ४ | ११ | विश्वामित्र |
| अत्रि | सुसमिद्धाय० | ५. ५ | ११ | अत्रि |
| वसिष्ठ | जुषस्व न० | ७. २ | ११ | वसिष्ठ |
| कश्यप | समिद्धो विश्वत | ९. ५ | ११ | असितदेवल |
| वध्र्यश्व | इमां मे अग्ने० | १०.७० | ११ | सुमित्र |
| भृगु | समिद्धो अद्य० | १०. ११० | ११ | भार्गव, ज० |

आप्रीसूक्त पशुयागांत गोत्राप्रमाणें भिन्न म्हणावें या नियमाला सूत्रकार एक अपवाद 'प्राजापत्ये तु जामदग्न्यः सर्वेषां' हा सांगतात.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हे सर्व भेद सूत्रकालीन आहेत वेदकालीं गोत्र नव्हतीं व गोत्रानुसार आप्रीसूक्त किंवा देवता यांचें भिन्नत्व स्थापित झालें नव्हतें.

मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या संबंधानें आपणांस असें दिसतें कीं, प्रत्यक्ष ऋग्मंत्रांत कुलकल्पनेव्यतिरिक्त गोत्रकल्पनाच नसल्यामुळें अमुक ऋषी अमुक गोत्राचे हें सापडणें शक्य नाहीं. परंतु जे थोडेसे पितृविषयक उल्लेख सांपडतात त्यांचा उप-

योग त्यांस विशिष्ट गोत्रांत बांधण्याकडे सर्वानुक्रमणीकारांनीं कसा केला आहे तें मागील कोष्टकांत दाखविलेंच आहे. ब्राह्मणग्रंथांत आप्रीसूक्तविषयक विवेचन करितांना प्रवरणाहि ऋषित्रयाची कल्पना आला आहे. तथापि तेवढयावरून मंत्रकाल्या ऋषींच्या ठायीं गोत्रकल्पना होती असें सिद्ध होणार नाहीं. ब्राम्हणग्रंथांचा काल म्हणजे बृहद्यज्ञांचा काल आणि बृहद्यज्ञांचा काल म्हणजे देश्यांच्यावर मांत्रसंस्कृताच्या संस्था लादण्याचा काल. या कालांत देश्यांची विद्या स्वीकारणें किंवा आपली विद्या देश्यांस देणें या गोष्टी होते. अध्वर्यू, उद्गाते करीत होते. केवळ ते विद्याच घेत होते असें नाहीं ते देश्यांच्या चालीरीती देखील स्वीकारीत होते. जर देश्यांमध्यें गोत्रें असलीं तर त्या गोत्रांचा यज्ञसंस्थेशीं संबंध जोडण्याचें काम देखील अवश्य होतें. तर असें असणें शक्य आहे कीं देश्यांमध्यें गोत्रें आहेत असें पाहून त्यांची गोत्रसंस्था मांत्रसंस्कृताच्या लोकांनीं घेतली असावी. त्या गोत्रांचा उपयोग काय करावयाचा याविषयीं मात्र त्यांचा निश्चय तात्कालिक झालेला दिसत नाहीं. ऋग्मंत्रांत जशी गोत्रकल्पना नाहीं तशी प्रवरकल्पनाहि नाहीं. तसेंच ऋग्मंत्रांत ज्या सत्रकल्पनेच्या आश्रयानें श्रौतसूत्रकारांनीं गोत्रप्रवरकल्पनेची मांडणी केली आहे त्या सत्रांचाहि उल्लेख नाहीं. जे सत्रविषयक उल्लेख आलेले आहेत त्यांचा अर्थ अनेक व्यक्तींची एकत्र स्थिति या पलीकडे पोहोंचूं शकत नाहीं.

ऋग्वेदांतच सत्रें नाहींत व यजुर्वेदाच्या अनेक शाखांतहि सत्रें नाहींत तर सत्रें होतीं तरी केव्हां ? सत्रांच्या भरभराटीचा काल असा वैदिकवाङ्मय वाचल्यास कोणताच दिसत नाहीं. होत्राच्या ऋचेंत सत्र शब्द ऐकूं येत नाहीं आणि ब्राह्मणांमध्यें जर सत्रें पुसटलेलीं दिसतात तर सत्रें वैदिक परंपरेंत मूळचीं नव्हतीं पण वेदबाह्य परंपरेंतून निघून वैदिकांनीं तीं मान्य केलीं असावीं असें म्हणण्यास काय हरकत आहे ?

**गोत्राची उत्पत्ती मांत्र कीं देश्य संस्कृतींत ?**— गोत्रें म्हणजे ज्या समुच्चयांतील लोकांनीं आपआपसांत विवाहसंबंध करतां कामा नये असे पुंज, अशी लोकांत आज कल्पना रूढ आहे. असले समुच्चय मांत्रसंस्कृतीच्या लोकांत होते असें मंत्रांमधून तर मुळींच सिद्ध होत नाहीं, आणि प्रवरहि मंत्रांत नाहींत तर ही गोत्रप्रवरात्मक सृष्टि आली कोठून ? ही उत्तरकालीं त्याच संस्कृतींतून विकास पावली असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. कां कीं मांत्रसंस्कृतीच्या लोकांचें वाङ्मयरूपी साहित्य आपणाजवळ भरपूर आहे. जर गोत्रविहीन समाजापासून गोत्रसंस्था तयार होत गेली असती तर या विकासाच्या मधल्या पायऱ्या दाखविणारे वाङ्मयरूपी किंवा शब्दरूपी उल्लेख आपणांस खास सांपडले असते. परंतु तसे उल्लेख आपणांस आरण्यकान्त वाङ्मयांत कोठेंच सांपडत नाहींत. ज्या समुच्चयाबाहेर लग्न केलें पाहिजे असे समुच्चय काश्मीरपासून द्राविडपर्यंत अनेक जातींत सांपडतात एवढेंच नव्हे तर रशियापासून आस्ट्रेलियापर्यंत देखील सांपडतात. कांहीं समुच्चयांत बहिर्विवाहाची सक्ती जास्त असते व कांहींत कमी असते एवढेंच. या तऱ्हेचा बहिर्विवाह समाजांत उत्पन्न झाला तो कां या विषयीं मानववंशशास्त्रज्ञांनीं बरींच कारणें पुढें मांडलीं आहेत. त्यांतील एक कारण असें कीं समुच्चया समुच्चयांतच लग्न करणें ' नामर्दपणाचें आहे ' खरे मर्दाचें ' काम म्हणजे शत्रूच्या गोटांतील मुलगी पळवून आणावयाची' ही कल्पना समाजाच्या अत्यंत बाल्यावस्थेंत कदाचित् खरीहि असेल पण या कल्पनेच्या साहाय्यानें भारतीय ब्राह्मणांमध्यें बहिर्विवाह कां उत्पन्न व्हावा याचें स्पष्टीकरण होणार नाहीं. कां कीं, परसमुच्चयांतून मुलगी पळवून आणण्याचें महत्त्व किंवा त्या क्रियेस अनुकूल परिस्थिति ही जो देश वसलेला आहे व ज्या देशांत राजसंस्था स्थापित झाली आहे अशा देशांत नसते आणि परसमुच्चयांतून मुलगी पळवून आणण्याचें महत्त्व होत्रांत किंवा औद्गात्रांत तयार झालेल्या भिक्षुकांत कोठून उत्पन्न होणार ? अर्थात बहिर्विवाहाचीं स्वाभाविक कारणें उत्पन्न होऊन बहिर्विवाह मांत्रसंस्कृतीच्या लोकांत स्थापित झाला हें शक्य नाहीं. जर स्वाभाविक कारणांमुळें उत्पन्न झाला नसेल तर त्याच्या अस्तित्वाची उपपत्ति अनुकरणाशिवाय दुसरी कशांत सांपडणार ? याचा थोडक्यांत अर्थ असा कीं ब्राह्मणांनीं ब्राम्हणेतरांचें अनुकरण केलें; परंतु ' तुझ्यावर माझी कडी पाहिजे ' असा प्रकार मात्र केल्याशिवाय ते राहिले नाहींत. त्यांनीं लौकिक गोत्र व आध्यात्मिक गोत्र असा निराळा भेद उत्पन्न करून आपलीं गोत्रें ब्राम्हणेतरांवर लादलीं आणि पुष्कळ प्रसंगीं आपल्या शिष्यांस (उदाहरणार्थ रजपुतांस) अशी शिकवण दिली कीं, लौकिक गोत्रांचें विवाहादि प्रसंगांत अध्यात्मिक गोत्रापेक्षां महत्त्व कमी.

**गोत्रप्रवरसंबंध व गोत्रप्रवर्तक मुख्य ऋषी.**— गोत्रें उत्तरकालीन आहेत ही कल्पना मान्य झाली म्हणजे ब्राह्मणेतिहासांतील जे धागे उलगडावयाचे ते येणें प्रमाणें:—

(१) गोत्रांचा प्रवरांशीं संबंध काय ?

(२) गोत्रांचा संबंध प्रवरांशीं लावून सर्व जनता सप्तर्षिसंभव आहे ही कल्पना कशी उद्भूत झाली ?

(३) प्रवरसंस्थापक सप्तर्षि आणि सहस्रावधि गोत्रें यांचा संबंध काय ?

(४) विशिष्ट सप्तर्षींनां महत्त्व कसें प्राप्त झालें ?

(५) गोत्रांचा व प्रवरांचा धर्मकृत्यांशीं संबंध ?

(६) गोत्रांचा व प्रवरांचा विवाहविधीशीं संबंध काय ?

(७) गोत्रांचा व प्रवरांचा मंत्रद्रष्ट्यांशीं व वैदिक शाखांशीं संबंध काय होता ?

या इतक्या बाजूंनीं विवेचन झालें म्हणजे ब्राम्हणजातीच्या अंतर्घटनेचें स्पष्टीकरण झालें असें होईल.

वरील प्रश्नांपैकीं पहिले चार प्रश्न विचारासाठीं प्रथम घेऊं

ऋषींचीं नांवें, त्यांच्या मुलांचीं त्यांच्या नांवांपासून निघालेलीं नांवें आणि मुलांच्या नांवांना तद्धित प्रत्यय लागून झालेलीं त्यांचीं पौत्र नामें याप्रकारचीं नांवें मंत्रांत बरींच आहेत. तथापि अनेक ऋषी विशिष्ट प्रवररचनेनें एकत्रित केलेले दिसत नाहींत.

प्रवरांशीं गोत्रांचा संबंध सूत्रकालीन होय. मन्त्रकारांनीं प्रवरऋषी हे व्यक्तीचे गोत्रसंस्थापकापूर्वीचे पूर्वज बनविले आहेत. पण त्या विधानास वेदांत प्रमाण नाहीं.

वेदांत प्रवरासारखा उल्लेख कायतो एकच आहे. तो आर्षेयवरणविषयक होय ( तै. सं. २.५,८ ). ह्मणजे अशी कल्पना होते कीं श्रौती मंडळींचे आठ संप्रदाय स्थापन झाले आणि त्यावेळचे आचार्य किंवा विद्याभ्यासी या आठांपैकीं कोणत्याना कोणत्या सम्प्रदायांत समाविष्ट होत.

वरण या शब्दाचा अर्थच निवड, स्वीकारणें असा आहे. म्हणजे त्यावेळचा शालंकायन किंवा बौधायन हा अगस्त्य किंवा वसिष्ठ इत्यादि कोणत्या तरी ऋषीपासून जे संप्रदाय स्थापन झाले त्यापैकीं एकाचा स्वीकार करी. म्हणजे ते त्याचे प्रवर झाले.

ह्या गोत्रप्रवरांचा इतिहास पूर्णपणें लक्षांत येण्यासाठीं प्राचीन निरनिराळ्या विद्येमुळें किंवा आचारामुळें झालेल्या संप्रदायाचें एकत्रित अवलोकन केलें पाहिजे. विशेषतः वेदामुळें म्हणजे यज्ञांतील कोणता भाग करावयास आपण तयार व्हावें याविषयींच्या तयारीमुळें ऋग्वेदी, यजुर्वेदी हे झालेले भेद खरोखर संप्रदायच होत.

याच संप्रदायांचे पुढे उपसंप्रदाय पडले. ते शाखा या नांवानें लोकांस परिचित आहेत. या शाखांचे पुढे आणखी उपसंप्रदाय झाले ते सूत्राच्या नावानें प्रसिद्ध आहेत. अग्निहोत्री पुढें कोणत्याना कोणत्यातरी सूत्राचा परिग्रह करी, आणि आपलें विशेष संप्रदायांशीं नातें जोडी. अमुक एक होत्यांच्या संप्रदायाशीं अमुक एक अध्वर्यूंचा संप्रदाय सहकारिता करी आणि इतरांशीं असहकारिता करी. यामुळें अग्निहोत्र्यास कोणत्या तरी पक्षास मिळावें लागे. ऋग्वेदी किंवा यजुर्वेदी हे कर्मविशिष्ट संप्रदाय होत परंतु शुक्लयजुर्वेदी किंवा कृष्णयजुर्वेदी हे पक्षविशिष्ट संप्रदाय होत.

पक्षविशिष्ट संप्रदाय कर्मविशिष्ट संप्रदायानंतरचे होत. या कर्मविशिष्ट संप्रदायाच्या स्थापनेपूर्वी देखील ह्मणजे ऋत्विजांत होते, उद्गाते व अध्वर्यू असा भेद उर्फ विशिष्टीकरण होण्यापूर्वी देखील विद्यामूलक अगर आचारमूलक संप्रदाय होतेच. यज्ञसंस्था जी तयार झाली ती आचार संहितांनीं युक्त ह्मणून दिसते तशी तयार होण्यापूर्वी अनेक संप्रदाय चालू असलेले दिसतात; ते येणेंप्रमाणें:—

( १ ) गोत्रमंडळात दृष्ट होणारे संप्रदाय.

( २ ) प्रवर संस्थापक ऋषी व त्यांचे संप्रदाय.

( ३ ) आप्रीसूक्तद्रष्टे ऋषी व त्यांचे संप्रदाय.

( ४ ) ज्यांच्या नांवावरून विशिष्टक्रिया अगर कर्मांग उत्पन्न झालें त्यांचा संप्रदायाशीं संबंध.

( ५ ) सत्रमूलक संप्रदाय.

गोत्रमंडळामुळें ज्या संप्रदायांचें अस्तित्व कळून येतें ते संप्रदाय म्हटले ह्मणजे गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भारद्वाज, वसिष्ठ. जे ऋषी कोणत्याच मंडळांत किंवा संप्रदायांत नाहींत असे मंत्रद्रष्टे पहिल्या, आठव्या नवव्या व दहाव्या मंडळांत घातले आहेत.

प्रवरसंस्थापक ऋषी म्हटले ह्मणजे कश्यप, अत्रि भरद्वाज, विश्वामित्र, गोतम, जमदग्नि, वसिष्ठ व आठवा अगस्ति असे धरले जातात. अनेक ऋषींच्या नांवाचीं गोत्रें आहेत. तीं सर्व वरील ऋषींच्या नांवावर स्थापन झालेल्या प्रवरांशीं जोडलीं जातात.

या प्रवरस्थापकांमध्यें आंगिरसाचें नांव दिलेलें नाहीं. आंगिरस हा तर अत्यंत प्राचीन काल्पनिक पुरुष अगर प्रत्यक्ष अग्नि होय. असें शक्य आहे कीं जे ऋषी कोणत्याच पुरुषास आपला संप्रदायप्रवर्तक म्हणून मान्य करीत नसतील ते आंगिरस वरण करीत असावेत.

आप्रीसूक्त ह्मणजे काय याचें विवेचन पूर्वी केलेंच आहे. आणि आप्रीसूक्तांवरून जे संप्रदाय दिसून येतात त्यासंबंधींहि बरेंच विवेचन झालें आहे.

या अनेक संप्रदायांची तोंडमिळवणी करून सर्वसामान्य श्रौतधर्म तयार करण्याची खटपट चालू असे. त्या खटपटीचीं अंगें अनेक होतीं. एक अंग म्हटलें म्हणजे अनेक संप्रदायांतील विध्यंश घेऊन कर्मकल्पना करणें, दुसरें अंग म्हटलें म्हणजे कर्मांमध्यें कांहीं संप्रदायांचें वैशिष्ट्य कायम रहावें म्हणून ऐच्छिक क्रिया ठेवणें. या दोन्ही क्रियांचे परिणाम यज्ञसंस्थेवर झालेले दिसत आहेत.

काहीं संप्रदायांमध्यें विशिष्ट कर्में रूढ होतीं. उदाहरणार्थ, आंगिरसामध्यें द्विरात्र, गर्गांत त्रिरात्र, अत्रींत चतूरात्र. जमदग्नींमध्येंहि एक तऱ्हेचा चतूरात्र होताच. उद्दालकपुत्र कुसुरुबिंद याच्या नांवावर सप्तरात्र इत्यादि संस्था व्यक्तींच्या किंवा संप्रदायाच्या दिसतात. सोमयागसंस्था पूर्ण होऊन यजुर्वेद व ब्राह्मणें तयार होण्यापूर्वींच्या या संस्था. ज्या क्रियेनें सामान्य एकाहि क्रतु झाला त्याच क्रियेनें या इतर संस्था बनल्या असाव्यात.

जेव्हां अनेक संप्रदायांचें एकीकरण झालें व अनेक गोत्रांमधून ज्याप्रमाणें होत्र तयार झालें. त्याचप्रमाणें सामान्य यज्ञघटना बनवितांना प्रत्येक वरील संप्रदायापाशीं देव घेव करून यज्ञाची मांडणी सर्वमान्य करण्यांत आली असावी.

पुढें असें दाखविण्यांत येईल कीं सत्रांची मांडणी सामान्यतः घेऊन त्याच्या संक्षेपानें सोमयाग झाला असावा. ही कल्पना खरी असल्यास असें ह्मणावें लागेल कीं, सत्रांचा

काळ व सत्रें संकोच पावून सोमयाग तयार होण्याचा काल यांच्यामध्यें गर्ग, आंगिरस इत्यादि मंडळींनीं आपआपल्या पुरते सत्रसंक्षेप तयार केले असावेत व त्यांच्यामुळें जे संप्रदाय तयार झाले असतील त्यांच्या क्रियांचें एकीकरण व व्यवस्थितकरण होऊन सर्वजनमान्य असा यागसमुच्चय तयार झाला असावा.

**द्विरात्र, षड्रात्र, व द्वादशाह हे क्रतू सत्रांगच होत असा पुरावा.**—द्वादशाह नामक यज्ञाचे 'सत्रांग' व 'अहीन' [ स्वतंत्र ] असे दोन प्रकार आहेत. या दोन प्रकारांत वस्तुतः कांहीं भेद नाहीं. कारण 'अहीन' अथवा सत्रांग या दोनहि द्वादशाहांत कोणता तरी एक ज्योतिष्टोमविशिष्ट विधि करून सोमयाग करावयाचा असतो. 'आसीरन्' 'उपेयुः' अशीं चोदनायुक्त पदें जेव्हां वेदांत आढळतात तेव्हां तें बहुयजमानयुक्त असें सत्र समजलें जातें. व 'यजति' असें एकवचनीं पद जेथें आढळतें तेथें सत्रकर्ता यजमान एकटाच अभिप्रेत असतो. यावरून ज्या द्वादशाहांत सर्वच ऋत्विज यजमानरूपानें असतात तो द्वादशाह सत्ररूप होय व ज्या द्वादशाहांत एकच यजमान असून तो ऋत्विजांच्या सहाय्यानें अनुष्ठान करतो तो अहीन द्वादशाह होय. प्राचीन सत्रांचा संकोच झाल्यावर द्वादशाह यज्ञाची कल्पना निघालेली दिसते. मोठाल्या सत्रांतूनच द्विरात्रादि द्वादशाहान्त क्रतू निघाले आहेत. द्विरात्र यज्ञामध्यें चार प्रकार आहेत, त्यापैकीं एक प्रकार अंगिरस कुलांतील हविष्मत् व हविष्कृत् या दोन व्यक्तींच्या नांवावर प्रचलित झाल्याचें वर्णन आढळतें. ती कथा अशी.—अंगिरसांचें सत्र चाललें असतां त्यांच्यापैकीं हविष्मत् व हविष्कृत् यांनीं अग्निष्टोम व अतिरात्र हे दोन क्रतू जोडून द्विरात्र नांवाचा एक यज्ञ करून ते स्वर्गास गेले असा उल्लेख तैत्तिरीय संहितेंत ( ७. १, ४ ) आला आहे. अहीनापैकीं षड्रात्र क्रतूस 'देवसत्र' असें नांव दिलें आहे. यावरूनहि मोठ्या सत्रांचा संकोच कसा होत होता हें दिसून येण्यासारखें आहे. वास्तविक तेरा दिवसांपेक्षां अधिक मुदतीचा सामुच्चयिक यज्ञ असेल तर त्याला सत्र म्हणणें युक्त होईल. परंतु साध्य नामक देवांनीं षड्रात्र क्रतूच सामुच्चयिक म्हणजे सत्ररूपानें केला, अशातऱ्हेची कथा सांगून षड्रात्र क्रतूला देवसत्र हें नांव दिलें गेलें. सत्रांचा संकोच होऊन त्यांतूनच एकाह, द्विरात्रादि अहीन क्रतू निर्माण झाले याला दुसरा पुरावा असा देतां येईल कीं, सत्रातील कांहीं गोष्टी अहीन क्रतूमध्यें आणून त्यांनाच सत्र असें नांव देऊन त्यावरच सत्रांसंबंधीं तहान भागविण्याचा प्रकार चालू झाला होता. उदाहरणार्थ हविर्धान व आग्नीध्रीया या दोन मंडपांची उभारणी चाकें असलेल्या गाड्यावर करणें; यूपस्तंभ मोठ्या बुडाचा म्हणजे वाटेल तेथें जमीनीवर उभा करतां येईल अशा प्रकारचा करणें इत्यादि सत्रांतील गोष्टींचा षड्रात्र क्रतूमध्यें समावेश केला आहे.

**सत्ररूप द्वादशाह.**—द्वादशाह हा यज्ञ जेव्हां पुष्कळ यजमान एकत्र मिळून करितात तेव्हां त्या यज्ञास सत्र अशी संज्ञा प्राप्त होते. त्यांत एक मुख्य यजमान निवडला जातो त्यास गृहपति म्हणतात. गृहपति जो ठरेल त्याच्या अरणीवर मंथन करून अग्नि उत्पन्न करावयाचा व गार्हपत्य आणि आहवनीय या दोन रूपानें दोन स्थलीं त्याची स्थापना करावयाची व इतरांनीं आपले अग्नी तेच आहेत असें मानावयाचें. व्रतदुग्ध ( नित्य प्राशन करावयाचें दूध ) लौकिकाग्नीवर तापवून आणावयाचें असा एक पक्ष, व कोणाच्याहि एका अरणीवर प्रत्येक ऋत्विजानें मंथन करून निरनिराळे ( गार्हपत्य व आहवनीय ) अग्नी उत्पन्न करून एकाच गार्हपत्यांत टाकून मग त्यांतील एक भाग आहवनीयांत टाकावयाचा असा दुसरा पक्ष. व्रतदुग्धाबद्दल वरीलच नियम असे. सत्राला आरंभ झाल्यावर त्यांत समाविष्ट होण्यासाठीं कोणी एखादा दीक्षित आला तर त्यानें गृहपतीच्या अरणीवर मंथन करून मंथनोत्पादित अग्नीपैकीं अर्धा गार्हपत्यांत व अर्धा आहवनीयांत टाकावा. व्रतदुग्धहि वरील सर्वांप्रमाणेंच एकत्र ठेवावें.

**सत्रें व तदंग संस्कार.**—सत्रांतील दीक्षणीयेष्टीमध्यें 'पवन पावन' नामक एक संस्कार करावयाचा असतो. त्याचा क्रम सूत्रकारांनीं पुढील प्रमाणें दिला आहेः— अध्वर्यूनें प्रथम गृहपतीचा संस्कार करावा व नंतर होता, ब्रह्मा व उद्गाता यांचा संस्कार करावा. प्रतिप्रस्थात्यानें प्रथम अध्वर्यूचा संस्कार करून नंतर प्रस्तोता, मैत्रावरुण व ब्राह्मणाच्छंसी यांचा संस्कार करावा. आग्नीध्रानें प्रथम प्रतिप्रस्थात्याचा संस्कार करून नंतर अच्छावाक, पोता, नेष्टा व सदस्य यांचा संस्कार करावा. उन्नेत्यानें प्रथम आग्नीध्राचा संस्कार करून नंतर ग्रावस्तुत्, सुब्रह्मण्य व प्रतिहर्ता यांचा संस्कार करावा व आपणच आपला स्वतःचा संस्कार करावा. अध्वर्यूनेंच सर्वांचा संस्कार करावा अशी जर सर्वांची इच्छा असेल तर अध्वर्यूनेंच सर्वांचा पवनपावन संस्कार करावा.

**प्रवरण विधि.**—द्वादशाहामध्यें करावयाचा सामुच्चयिक प्रवरणविधि म्हणजे असाः— प्रथम गृहपतीच्या प्रवराचा उच्चार करून नंतर होता, अध्वर्यु, ब्रह्मा व उद्गाता या चार प्रमुख ऋत्विजांचें प्रवरोच्चारण झाल्यावर पुढें अनुक्रमें प्रतिप्रस्थाता, मैत्रावरुण वगैरे सर्व ऋत्विजांचें प्रवरोच्चारण करावयाचें.

दीक्षाहुतीच्या वेळीं अध्वर्यूनें दीक्षाहुति द्यावी व अध्वर्यूला इतरांनीं अन्वारब्ध ( हस्तस्पर्श ) करावा. कृष्णाजिन परिधानाच्या वेळीं अध्वर्यूनें प्रथम गृहपती-

करून मंत्र पठण करवावा. नंतर सर्वांकडून करवावा. अग्निष्टोमादि क्रतूंमध्यें सुत्येच्या दिवशीं प्रातःसवनांत ऋतुयागासंबंधीं याज्या पठण करावयाच्या असतात त्या अध्वर्यु, यजमान व प्रतिप्रस्थाता यांच्याकरितां होत्यानें पठण करावयाच्या असतात. परंतु सत्रांमध्यें मात्र त्यांनीं होत्यास ह्मणावयास न सांगतां स्वतःच ह्मणावयाच्या असतात.

सत्रांग द्वादशाहांत बारा दिवस दररोज जें अनुष्ठान व्हावयाचें तें प्रथमदिवशीं अतिरात्र, दुसऱ्या दिवशीं अग्निष्टोम नंतर पुढें सहा दिवस उक्थ्य; व पुढें तीन दिवस छंदोम आणि शेवटच्या दिवशीं अग्निष्टोम याप्रमाणें बारा दिवस अनुष्ठान करावयाचें असतें. आतां सत्रावरूनच सोमयाग उत्पन्न झाले काय हें पाहूं.

**सत्रें व सोमयाग यांचा संबंध.**—सत्रें म्हणजे अनेकांनीं मिळून याग करावयाचा व तो पुष्कळ दिवस चालू रहावयाचा. ही कल्पना अत्यंत प्राचीन असावी. सत्र ह्मणजे दीर्घकाल चालणारा एक सामुच्चयिक याग होय. पुष्कळशा यजमानांनीं एकत्र रहावयाचें आणि प्रत्येकानें वेगवेगळाल्या अथवा सर्वांनीं मिळून एकाच अग्नीची उपासना करावयाची; सोमरस, पशुमांस व पुरोडाशादि हविर्द्रव्यांचें हवन करावयाचें हेंच सत्रांचें सामान्य स्वरूप होय. ऋग्वेदांत पृथक्त्वानें होणाऱ्या अग्न्युपासनेपेक्षां सामुच्चयिक अग्न्युपासना जास्त आढळते. मात्र तीमध्यें होत असलेले विधी कोणत्याहि विशिष्ट नियमास धरून अथवा चोदनेस अनुसरून असे होत नसत. व त्यावेळीं मंत्रपूर्वकता फारच थोड्या विधींच्या वांट्यास येत असावी. किंबहुना मंत्ररहितच ते विधी असावेत. ऋग्वेदांत व्यक्तिशः दैनिक सोमरसाच्या हवनाविषयीं उल्लेख सांपडतो. सामुच्चयिक सोमयाग तर स्पष्टच आहेत. अशा प्रकारचे सामुच्चयिक सोमयाग भटकणाऱ्या टोळ्यांच्या भटकण्याच्या क्रमांत नऊ महिने, दहा महिने किंवा बाराहि महिने एकसारखे सतत चालत असावेत. प्राचीन कालचीं हींच सत्रें होत. मात्र हे याग जेव्हां प्रत्यक्ष होत असत तेव्हां त्यांनां सत्र हें नांव मिळालेलें असणें संभवनीय नाहीं. सत्र हा शब्द जुना आहे परंतु तो सामुच्चयिक यागांनां ऋग्वेदाच्या अखेरीस किंबहुना यजुर्वेदकालांत रूढ झाल्याचें दिसून येतें. ऋग्वेदांत येणाऱ्या सत्र शब्दाचे कसकसे अर्थ होत गेले याची कल्पना येण्यासाठीं कांहीं उतारे आम्ही पुढें देत आहोंत. त्यावरून हें सहज आढळून येईल कीं, सत्र या शब्दाचा उपयोग सामुच्चयिक याग या अर्थानें एकदांच केला आहे व तो देखील १० व्या म्हणजे मागाहून जोडल्या गेलेल्या मंडलांत आहे. सारांश ऋग्वेदांत सत्र हा शब्द प्रायः एकदम, बरोबर, खरोखर अशा सामुच्चयिक यागेतर अर्थासाठीं आला आहे. ऋग्वेदांतील सत्र शब्दाचा विचार करावयास पुढील उतारे फार उपयुक्त होतील.

'सत्रा विश्वं दधिषे केवलं सहः' ( १.५७, ६ ) केवल तूं एकटाच सर्वव्यापक आहेस अशा प्रकारचें बल तूं धारण करतोस हें खरें आहे.

'एकः सत्रा सूरो वस्वईशे' ( १.७१,९ ) शूर असा एकच आदित्य धनांनां एकदम मिळवितो.

'सत्रा चक्राणो अमृतानि विश्वा' ( १.७२,१ ) सर्व हिरण्यें एकदमच देऊन.

'सत्राकरो यजमानस्य शंसः' ( १.१७८,४ ) हा इंद्र खरोखरच यजमानाचा लौकिक वाढवितो.

सत्रा शंसं यजमानस्य तूतोत् ( २.२०,७ ) यजमानाचा महान् अशा अभिलाष पूर्ण करो.

'सत्रेंद्राय देवेभिरर्णसातौ' (२.२०.८) देवांनीं ( स्तोत्यांनीं ) उदकलाभ व्हावा म्हणून इंद्राला सर्व ( सत्रा ) दिवसामध्यें हवि अर्पिला.

'सत्रा दधिरे हरिवो जुषस्व' ( ३.५१,६ ) हे अश्वसंपन्न इंद्रा, ऋत्विज खरोखर तुझ्याच साठीं स्तोत्रें धारण करतात.

'सत्रा मदासो बृहतो मदिष्ठाः' ( ४.१७,६ ) खरोखर सर्व सोमरस महान् इंद्राला मद आणणारे असेच झाले आहेत.

'सत्रायदीं भार्वरस्य वृष्णः' ( ४.२१,७ ) खरोखर भार्वराच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या इंद्राचेंच हें बल आहे.

'नृम्णानि सत्रा सहुरे सहांसि' [ ४.२२,९ ] हे सहनशील इंद्रा, सर्वदा शत्रूंनां जिंकणारें असें बल तूं आम्हास दे.

'सत्रा ते अनु कृष्टयः' 'सत्रा महाँ असिश्रुतः' (४.३०, २ ) खरोखर तुझ्या प्रजा तुलाच अनुसरून आहेत, तूं खरोखर सर्वविश्रुत असा आहेस.

'सत्रा महाँसि चक्रिरे तनूषु' [ ५.६०,४ ] तनूंच्या ठिकाणीं महान् तेजें एकदम धारण करते झाले.

'दिवो न तुभ्यमन्विद्र सत्रा' ( ६.२०,२ ) हे इंद्रा, देवांनीं खरोखर सूर्याप्रमाणें तुलाहि स्तविला.

'सत्रा ते विश्वमनु वृत्रहत्ये' ( ६.२५,८ ) वृत्रवधाच्या वेळीं देवांनीं खरोखर उत्कृष्ट असें बल दिलें.

'सत्रावावृधुर्हवनानि यज्ञैः' ( ६.३४,४ ) 'यजनसाधन अशा हविर्द्रव्यासह स्तोत्रें वाढविलीं.'

'सत्रा मदासस्तव विश्वजन्याः' ( ६.३६,१ ) हे इंद्रा तुला आलेले कैफ खरोखरच सर्व जनांनां हितकर होत.

'सत्रा दधिरे अनु वीर्याय' ( ६.३६,२ ) वीरकर्म करण्यासाठीं त्या इंद्राला खरोखरच पुढच्या बाजूस धारण करितात.

'सत्रा वाजं न जिग्युषे' ( ६.४६,२ ) प्रभूत अशा अन्नाप्रमाणें तूं जिंकणारांनां ( देणगी ) देतोस.

'सत्रा विश्वानि पौंस्या' ( ६.४६,७ ) महान् अशीं सर्व बलें तूं आमच्यासाठीं हरण कर.

सत्रा कृधि सुहना शूर वृत्रा [ ७.२५,५ ] हे शूरा शत्रूंनां सहज मारतां येईल असेंच सर्वदा कर.

'सत्रा राजानं दधिरे सहध्यै' [ ७.३१,१२ ] शत्रूला जिंकण्यासाठी राजांनां उद्देशून सर्व बाजूनें स्तोत्रें धारण केलीं जातात.

'सत्रा विश्वस्य परमस्य राजसि' ( .३२,१६ ) उत्कृष्ट अशा धनाचा खरोखर [ तूंच ] राजा शोभतोस.

'सत्रा हतं सोमसुता रथेन' [ ७.९३,५ ] सोम कुटणाऱ्या लोकांकडून सोम न कुटणाऱ्या लोकांचा नाश नेहमीं केला जाई.

'सत्रा दधिरे शवांसि' ( ८.२,३० ) एकदमच बलांनां धारण करतात.

'सत्रा विश्वा स्वपत्यानि दधिषे' [ ८.१५,१० ] सर्व शोभन अपत्यांनां एकदम धारण करतोस.

'सत्रा त्वं पुरुष्टुत' ( ८.१५,११ ) अग्रभागीं स्तविला जाणारा तूं एकदमच सर्व शत्रूंना मारतोस.

'अंतं विंदामि सत्रा' [ ८.४६,११ ] खरोखर तुझ्या धनाचा अंत आह्मास लागत नाहीं.

'सत्रा दधानमप्रतिष्कुतं शवांसि' [ ८.९७,१३ ] खरोखर बलांना धारण करणाऱ्या व शत्रूला न हटवणाऱ्या इंद्रालाच आह्मी बोलावतों.

'सत्रा देव महाँ असि' ( ८.१०१,११ ) हे देवा खरोखरच तू मोठा आहेस.

'सत्रा वृषं जठर आ वृषस्व' [ १०.९६,१३ ] सोमरसाची अतिशय वृद्धि करणाऱ्या इंद्रा हा सोमरस तूं आपल्या जठरांत ओत.

'आदिंद्रः सत्रा तविषीरपत्यत' [ १०.११३, ५ ] तो इंद्र एकदम पुष्कळांचा अधिपति होतो.

वरील उताऱ्यांशिवाय ऋग्वेदांत सत्र शब्द बऱ्याच ठिकाणीं आढळतो. परंतु तो वरील अर्थानेंच असणार. आह्मी दिलेल्या मतास वरील उतारे पुरेसे होतील.

आतां यजुर्वेद संहितेंत सत्र शब्द याग या अर्थी कसा रूढ झाला आहे हें पुढील उताऱ्यांवरून समजून येईल. यजुर्वेदांत ह्या शब्दाचा अर्थ भाष्यकारांनीं निरनिराळीं सत्रें ( याग )व सत्र करणारे यजमान असा केला आहे.

'सत्राभिजितं' ( ७. ५, १ ) सत्रानुष्ठानानें मिळविलेले. 'सत्रा'( २. २,१२)एकत्र. 'सत्रिणः' (१.७,२;७.२,९;४,११) सत्र करणारे.

याशिवाय तैत्तिरीय संहितेंत १.६,१२;२.३,३;३.१,९;४.७,१३;७.१,४;२,९;३,६;९;४,१;२;५;५,१;५;८;९ या स्थलीं सत्र शब्द सामुच्चयिक याग या अर्थानें आला आहे.

अनेकांनीं मिळून एकत्र कांहीं क्रिया करावयाची. ही ऋग्मंत्रकालीन पद्धति सूतसंस्कृतींमध्येंहि असणें स्वाभाविक आहे, आणि शत्रुदमनासाठीं सामुच्चयिक प्रार्थना किंवा हवन हें सूतसंस्कृतीच्या लोकांत होत असल्यास सर्पसत्रविषयक कल्पना त्यांच्यांत विकसित झाली असल्यास नवल नाहीं. सामुच्चयिक कर्म हें सूतसंस्कृतीच्या देश्यांत होतें, आणि दैनिकयागसमुच्चय मांत्रांत होता. तर या दोहांचेंहि एकीकरण होऊन सत्रविषयक श्रौतविधी तयार झाले असावेत असें दिसतें.

**गोत्रमंडळांतील ऋषींचें संप्रदायांत स्थान.**— गोत्रमंडळामुळें प्राधान्य पावलेल्या ऋषींचें संप्रदायांच्या इतिहासांत स्थान येणेंप्रमाणें दर्शवितां येईल.

गोत्रमंडळांत दृष्ट होणारे संप्रदाय व तैत्तिरीय शाखेंत वर्णिलेले संस्थास्थापक समकालीन होत. या दोहोंचा उपयोग पुढील सप्तसंस्थाकारांनीं केला.

प्रवरांचे ऋषी आणि गोत्रमंडळांचे ऋषी यांत कांहीं ऋषी एक दिसतात.

प्रवरांचा उल्लेख सत्रप्रकरणांत व सत्रांतील आप्री सर्वांच्या सारख्या असाव्यात या हेतूनें आला आहे.

आप्री गोत्रावरून आखलेल्या आहेत. पण गोत्रें हजारों. त्यांचा थोडक्या आप्रीसाठीं उल्लेखिलेल्या गोत्रांशीं संबंध जोडण्यासाठीं कांहींतरी योजना हवी होती म्हणून सर्व गोत्रांचा विशिष्ट आप्रींशीं संबंध जोडण्याकरितां प्रवरांची यादी तयार होणें अवश्य होतें. ऋग्वेदांतील अनेक ऋषी कांहीं विशिष्ट कुलांत घालण्याचा प्रयत्न कसा झाला हें मागें दाखविलेंच आहे.

ही योजना भिक्षुकी स्वरूपाची आहे म्हणजे भिक्षुकी कारणाकरितां काल्पनिक इतिहास तयार होण्याचा संभव येथें आहे. म्हणजे बऱ्याचशा लोकांस त्यांच्या गोत्रप्रवर साहाय्यावरून एका कुलांत दडपण्याची खटपट यांत दिसते.

तथापि कांहीं मूळची परंपरा असल्याशिवाय आणि ती सर्वमान्य असल्याशिवाय नवीन.स त्यांत दडपतां येणार नाहीं. यावरून असें असणें शक्य आहे कीं कांहीं आर्षेययुक्त गोत्रें व त्यामुळें कांहीं परस्पर संबंध मूळचेच निश्चित झाले असावेत.

प्रवर म्हणून जी आर्षेय परंपरा प्रत्येक उपासक बाळगी ती यज्ञयोजकांत व इतर सामान्यांतहि तयार झाली असावी.

गोत्रें स्थापित होणें ही आडनावें स्थापन होण्याप्रमाणेंच स्वाभाविक क्रिया आहे. आणि 'अपत्यं पौत्रप्रभृति गोत्रं' असा पाणिनीनें जो नियम दिला आहे तो कुलनाम निर्देशांच्या स्पष्टीकरणास योग्य आहे. कुलांनां नांवें कशीं पडलीं एवढें स्पष्ट करावयाचें असेल तर पाणिनीचा हा नियम तें स्पष्ट करील. तथापि आपणांस स्पष्ट करावयाची गोष्ट आडनांवस्वरूपी गोत्रें कशीं पडलीं एवढाच नसून बहिर्विवाहात्मक संस्था उत्पन्न कशी झाली आणि तिचा गोत्रांशीं संबंध कसा जोडला गेला आणि गोत्रांचा प्रवरांशीं संबंध कसा जोडला गेला इत्यादि प्रश्न आपणांस विचारणीय आहेत.

**प्रवरसंस्थापक ऋषींचें महत्त्वस्थापन.**—येथें आपण प्रश्न विचारांत घ्यावयाचा तो हा कीं, प्रवरांचे संस्थापक म्हणून कांहीं ऋषींनां महत्त्व कां प्राप्त झालें? ऋषींनां विशिष्ट महत्त्व प्राप्त होऊन त्यांचे समुच्चय पाडण्याचे प्रसंग प्राचीन इतिहासांत चार सांगतां येतील. ते म्हटले म्हणजे गोत्रमंडळांचे ऋषी, प्रवरसंस्थापक ऋषी, आप्रीसूक्तांत विधिभिन्नत्वामुळें उत्पन्न झालेले ऋषी व आकाशांतील सप्तर्षी. यांमध्यें असें म्हणतां येईल कीं आकाशांतील सप्तर्षी हे सर्व प्रवरसंस्थापक नऊ ऋषींमध्यें मोडतील. आणि भारद्वाज व गोतम खेरीज करून इतर सर्व प्रवरसंस्थापक ऋषी आप्रीसूक्तांत विधिभिन्नत्व उत्पन्न करणाऱ्या ऋषींमध्यें मोडतील. या चौघांचा संबंध दाखविणारें कोष्टक येणेंप्रमाणें.

| गोत्रमंडळांचे ऋषी | प्रवरसंस्थापक ऋषी | आप्रींमध्यें विधिभिन्नत्वकारक | आकाशांतील सप्तर्षी |
|---|---|---|---|
| गृत्समद | | | |
| विश्वामित्र | विश्वामित्र | विश्वामित्र | विश्वामित्र |
| वामदेव | | | |
| अत्रि | अत्रि | अत्रि | अत्रि |
| भरद्वाज | भरद्वाज | | भरद्वाज |
| वसिष्ठ | वसिष्ठ | वसिष्ठ | वसिष्ठ |
| | कश्यप | कश्यप | कश्यप |
| | अगस्त्य | अगस्ति | |
| | गोतम | | गौतम |
| | जमदग्नि | जामदग्न्यभार्गव | जमदग्नि |
| | आंगिरस | आंगिरस | |
| कण्व | | कण्व | |
| | | शुनक | |
| | | वध्र्यश्व | |

प्रवरसंस्थापक ऋषी म्हणून जे समजले गेले त्यांस महत्त्व कसें प्राप्त झालें हें दाखविण्यास वरील कोष्टक उपयोगी पडेल. विश्वामित्र, अत्रि, भरद्वाज आणि वसिष्ठ यांच्या नांवावर तर ऋग्वेदांतील एक एक मंडळच आहे आणि भरद्वाजाखेरीज तिघांचा संबंध ऋग्मंत्रांचा श्रौत कर्माकडे उपयोग करतांना गोत्राकडे लक्ष देण्याचा एकच प्रसंग जो आप्रीसूक्तशंसन त्याप्रसंगीं येतो. येणेंप्रमाणें वसिष्ठ, विश्वामित्र व अत्रि या तीन गोत्रांस दोहोंकडून महत्त्व आहे. कश्यपाचें महत्त्व आप्रीसूक्त व आकाशांतील सप्तर्षींपैकीं एक या दृष्टीनें आहे. तीच गोष्ट जमदग्नीची होईल. अगस्त्य व गोतम यांचा ऋग्मंत्रांत महत्त्वानें उल्लेख आहे.

प्रवरसंस्थापक ऋषी खरोखर नऊ असून सात समजण्याचा प्रचार आहे, व पुढील दोन आणखी म्हणून घातले.

सात या आंकड्यास प्रामुख्य कसें मिळालें व सर्व ऋषी विशिष्ट प्रवरांत कसे कोंडले गेले या विचारामधील दुसरा विचार झालाच आहे. परंतु सात आंकड्यास ते ऋषींचे सात संप्रदाय आहेत ही कल्पना कोठून आली. हे सात संप्रदाय कोठले असावेत. ज्या वेळेस होते हे आव्हान करणारेच केवळ नसून हवन करणारेहि होते आणि ज्या वेळेस होता, अध्वर्यु असें वर्गीकरण झालें नव्हतें त्या वेळेस महत्त्वाच्या ऋषींच्या नांवावरून होत्यांमध्येंच अनेक संप्रदाय स्थापन झाले असावे व कांहींच्या दृष्टीनें ते सात असावेत असें दिसतें.

यज्ञ वैयक्तिक उपासनेचें स्वरूप टाकून जेव्हां सामुच्चयिक स्वरूप धारण करूं लागला तेव्हां प्रथमतः निरनिराळ्या समुच्चयांतले लोक एकत्र गोळा करून सार्वजनिक यज्ञ करावयाचा अशी कल्पना प्रथम प्रवर्तली असावी. आणि यासाठीं जे समुच्चय घेतले ते विशिष्ट प्रवरसंस्थापक ऋषींच्या नांवावर मोडले जाणारे घेतले असावेत. होत्यांमध्यें सात संप्रदाय असून त्यांवर रूपकें होत होतीं असें पुढील अर्थावरून दिसतें.

> सप्त ते अग्ने समिधः सप्त जिह्वाः सप्त ऋषयः सप्त धाम प्रियाणि ॥
> सप्त होत्राः सप्तधा त्वा यजन्ति सप्त योनीरापृणस्वा घृतेन ॥

हे अग्ने सात समिधा तुला अर्पिल्या जातात, तुझ्या जिव्हा सात आहेत, ऋषी सात आहेत, तुला प्रिय अशी सात स्थानें आहेत. सात होते सातप्रकारांनीं अगर सात ठिकाणीं तुझें यजन करतात. यासाठीं हे अग्ने तुपाच्या योगानें तुझीं सातहि उगमस्थलें भरून टाक.

निरनिराळ्या प्रकारच्या संप्रदायांनां एकत्र करण्यासाठीं जे प्रयत्न झाले त्यांत सात होते मिळून होणाऱ्या यज्ञाची स्थापना आणि आप्री सूक्तांची योजना या गोष्टी प्रमुख होत. सात होत्यांच्या यज्ञसंस्थेचे प्रकार आज आपणांस उपलब्ध नाहींत. ऋत्विजांचें विशिष्टीकरण झालेली यज्ञसंस्था आपणांस उपलब्ध आहे, तथापि वर दिलेल्या ऋचेसारख्या ऋचा सात प्रकारच्या होत्यांचें स्मारक होत. प्रवरसंस्थापक जे ऋषी होते ते सात कुलांचे पूर्वज असावेत असें वाटत नाहीं. कां कीं सात कुलांपासून सर्व जनतेची उत्पत्ति होईपर्यंतचा इतिहास जाणण्याची शक्ति प्राचीन लोकांनां असणें शक्य नाहीं. सात पुरुषांपासून सर्व जनतेची उत्पत्ति ही गोष्ट उघड उघड अशक्य दिसते. ज्याप्रमाणें एका स्त्रीपुरुषापासून सर्व जनतेची उत्पत्ति देण्यासंबंधींची कल्पना मनोरंजक पण अनैतिहासिक तितकीच ही देखील होय. शिवाय प्रवरण ज्यांचें करावयाचें ते पूर्वज होते असें कशावरून? 'प्रवरण' या शब्दाच्या अर्थाकडे जर लक्ष दिलें तर ते पुरुष पूर्वज नव्हते असें सिद्ध होईल. वरण म्हणजे निवड व प्रवरण म्हणजे प्रकर्षानें निवड. कोणत्याहि संप्रदायामध्यें आपल्या पूर्वजांच्या नांवाचा उच्चार करण्याऐवजीं आपल्या संप्रदायांतील प्रमुख आचार्यांच्या नांवाचा उच्चार करण्याची प्रवृत्ति चोहोंकडेच आहे व आपण ब्रम्हयज्ञांग तर्पणांत ती पाहतोंच.

सात पुरुषांपासून प्रवरांच्या सहाय्यानें आपल्या रक्ताचा इतिहास लावण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. त्याच्या योगानें आध्यात्मिक परंपराच कळणार आहे. एवढेंच केवळ नव्हे तर प्रवरांची निवड होत होती व प्रवरांची निवड करण्याचें स्वातंत्र्य कमी करण्याचेंहि प्रयत्न होत होते.

**प्रवरांची निवड करण्याचें स्वातंत्र्य कमी करण्याचा प्रयत्न.—** प्रवर ऊर्फ आर्षेय ही संस्था विशिष्ट ऋर्षांच्या स्थानीं स्थित केली. ही क्रिया आपणांस सूत्रांत दिसते. प्रथमतः प्रवरण वाटेल त्यानें करूं नये म्हणून मान्य झालेल्या व्यक्तींनीच प्रवरण करावें आणि तेंच उत्तर कालीनांनीं स्वीकारावें असा प्रयत्न झाला. म्हणजे व्यक्तींच्या इच्छेनुसार प्रवरांची निवड होण्याची क्रिया बंद पडली असें झालें. 'न देवैःमनुष्यः आर्षेयं वृणीते ऋषिभिरेव आर्षेयंवृणीते' हें वाक्य सूत्रकार श्रुति म्हणून सांगतात. पण कोठल्या श्रुतींतील असेल तें असो. ऋर्षीसच आर्षेय वरणाचा मक्ता कां द्यावा तर देवांनां यजमान ऋर्षीमार्फतच ओळखतो म्हणून ( आर्षेयम् अन्वाचष्टे ऋषिणा हि देवाः पुरुषमनुबुध्यन्त इति.)

येणें प्रमाणें व्यक्तींचें वरणस्वातंत्र्य नष्ट करण्याची खटपट झाली तिचीं स्मारकें आपणांस दिसतात.

एकानें उत्पादिलेला संप्रदाय दुसऱ्यानें घेतल्यामुळें घेणाराहि प्रवरांत मोडे ही गोष्ट बराच काल लोक विसरले नव्हते. प्रवरांमध्यें अनेक ऋर्षीचीं नांवें येतात त्यांचें महत्व कात्यायन व लौगाक्षि येणें प्रमाणें सांगतात.

' पूर्वःप्रवरःउत्पादयितुः उत्तरःप्रतिग्रहीतुः ' ॥ म्हणजे पहिला प्रवर उत्पादकाचा होय आणि दुसरा क्रियेचें अगर धर्माचें प्रतिग्रहण करणाऱ्याचा होय.

या वाक्यावरून कात्यायन व लौगाक्षि यांची प्रवर हे संप्रदाय होते अशीच कल्पना दिसते.

क्षत्रियांनां हा यज्ञधर्म द्यावयाचा तर त्यांनां देखील प्रवर देण्या पाहिजे. ते यज्ञ कसे करणार तर जसे जुने राजे करीत त्या संप्रदायाप्रमाणेंच आम्ही करतों असें त्यांनीं म्हणावें किंवा त्यांनीं पुरोहिताचेच प्रवर घ्यावे. कारण राजा पुरोहितें सांगेल तसें करणार. आणि पुरोहित आपल्या प्रवराप्रमाणें करणार. काय करणार यांत पुढें तरी फारसा फरक नाहीं पण आपल्या जुन्या संप्रदायाचा अभिमान म्हणून आपल्या पूर्वपरंपरेंतील लोकांचीं नांवें घ्यावयाचीं एवढेंच. क्षत्रियांनां प्रवर दिले ते मनु, ऐल, पुरूरवा हे होत ( अथ क्षत्रियाणां त्र्यार्षेयो मानवैड पौरूरवसेति, ) ज्यांनां आपली परंपरा माहीत नाहीं त्यांनीं ( म्हणजे यज्ञधर्म सामान्य झाल्यानंतर जे कोणत्याहि संप्रदायांत नसतील त्यांनीं ) पुरोहिताचे किंवा आचार्यांचे प्रवर घ्यावे.

**गोत्रें आणि वेदाध्याय—**निरनिराळ्या वेदांच्या अध्यायी मंडळींच्या गोत्रांची यादी आपण पाहूं लागलों म्हणजे आपणांस असें आढळून येईल कीं एकाच गोत्राची मंडळी ऋग्वेदी आहेत व यजुर्वेदीहि आहेत. ऋग्वेदी मंडळींत यजुर्वेद्यांपेक्षां कांहीं गोत्रें भिन्न आहेत हें खरें पण अशांची संख्या फार नाहीं. यजुर्वेदी मंडळींच्या निरनिराळ्या शाखांचे आणि सूत्रांचे अध्यायी घेतले तर आपणांस असें दिसून येईल कीं, निरनिराळ्या सूत्रांस सामान्य अशींच गोत्रें अधिक आहेत. सूत्रविशिष्ट गोत्रें असल्यास थोडकीं. आश्वलायन सूत्री ऋग्वेदी आणि सत्याषाढ सूत्री यजुर्वेदी आणि बौधायन सूत्री कृष्ण यजुर्वेदी गोत्रांची आपण तुलना करूं आणि काय दिसतें तें पाहूं.

अध्वर्यु गोत्रांपैकीं बौधायनसूत्री असलेलीं पण सत्याषाढ सूत्री नसलेलीं गोत्रें येणेंप्रमाणें:—

अगस्त्य, औचथ्य, गौतम, कौडिण्य तुथ्य, पतंजलि, माठर, मित्रयुव, मौक, मौन, यास्क, रजतवाह, रेभ, वाधूल, वीतहव्य.

सत्याषाढसूत्री मंडळींत असलेलीं पण बौधायन सूत्री मंडळींत नसलेलीं गोत्रें—

अज, आंगिरस, आजमीढ्ळ, उपनीति, उपमन्यु, ऊर्जेयन, कण्व, कुत्स, तंतु, धनंजय, निलंदिन, पदंजल, बभ्रु, बादरायण, बुशमित्‌, बैद, भद्रण, मद्रण, मषण, मधुच्छंद, मुद्गल, रथितर, रेफ, वत्सावन, सावनार्य, वाच्यायनि, वामरथ्य, वारकि, विरूप, विष्णुवृद्ध, शठ, सात्यकाम्य, सात्यकि, हरित.

दोघांनां सामान्य पण नांवांत प्रत्ययात्मक भेद असलेलीं, अवट, आवट; कश्यप, काश्यप; भरद्वाज, भारद्वाज; भूयस, भूयसी; शुनः, शुनक; हीं होत.

हौत्रसंप्रदाय आणि दोन अध्वर्यू संप्रदाय यांस सामान्य अशा गोत्रांची यादी केली असतां ती बरीच मोठी होईल.

अगस्ति, अघमर्षण, अत्रि, अष्टक, अग्निवेश्य, आर्ष्टिषेण, ऋक्ष, कत, कपि, कश्यप, कामकायन, काल, कुशिक गर्ग, गविष्ठिर, चिकित, तंडि, पराशर, पूतिमाष, पूरण, भरद्वाज, मनु, वत्स, वामदेव ,वासिष्ठ, शांडिल, शुंग, शैशिर, श्रीमत, संकृति इत्यादि नांवें आढळून येतात.

| अध्वर्यु गोत्रें. बौधायनपरंपरा | अध्वर्यु गोत्रें. सत्याषाढपरंपरा | हौत्रक गोत्रें. आश्व०परंपरा |
|---|---|---|
| अगस्ति | अगस्ति | अगस्ति |
| अघमर्षण | अघमर्षण | अघमर्षण |
| | अज | अज |
| अत्रि | अत्रि | अत्रि |
| अभिषेण्य | अभिषेण्य | |
| अयास्य | अयास्य गौतम | |
| अष्टक | अष्टक | अष्टक |
| | | अष्टादंष्ट्र. |
| | आंगिरस | |
| आग्निवेश्य | आग्निवेश्य | आग्निवेश्य |
| | आजमीढ्ळ | |
| आवट | आवट | |

| अ. बौ. | अ. स. | हौ. आ. |
|---|---|---|
| आर्ष्टिषेण | आर्ष्टिषेण | आर्ष्टिषेण |
| इर्मीरि | इर्मीरि | |
| | | उचथ्य |
| | उपनीति | |
| | उपमन्यु | उपमन्यु |
| उलंस्य | उलंत्य | |
| | ऊर्जयन | |
| ऋक्ष | ऋक्ष | ऋक्ष |
| ऐतशायन | ऐतशायन | |
| औचथ्य गोतम | | |
| औशिज गोतम | औशिज गौतम | |
| | | कक्षीवान |
| | कण्व | कण्व |
| कत | कत | कत |
| कपि | कपि | कपि |
| कश्यप | कश्यप | कश्यप |
| कामकायन | कामकायन | कामकायन |
| काल | काल | काल |
| | कालंभायनि | |
| | कुंण्डिन | कुंडिन |
| | कुत्स | कुत्स |
| कुशिक | कुशिक | कुशिक |
| कौण्डिण्य | | |
| गर्ग | गर्ग | गर्ग |
| गविष्ठिर | गविष्ठिर | गविष्ठिर |
| | | गालव |
| गृत्समद | गृत्समद | |
| | | गौतम |
| चिकित | चिकित | चिकित |
| जलन्द्व | जलन्द्व | |
| जामदग्न्य | जामदग्न्य | |
| जामाल्य | जामाल्य | |
| | | जैमिनि |
| ताण्डि | ताण्डि | ताण्डि |
| | तन्तु | तन्तु |
| तरस्वान् | तरस्वान् | |
| तारकायण | तारकायण | |
| | | तार्क्ष्य |
| तिल | तिल | |
| तुथ्य | | |
| दन्द्वकी | दन्द्वकी | |
| | | दर्भ |
| | | दीर्घतमस् |
| देवरात | देवरात | |
| दैवन्त्सायन | | |

| अ. बौ. | अ. स. | हौ. आ. |
|---|---|---|
| | धनंजय | धनंजय |
| धौम्य | धौम्य | |
| | नितुन्दिन | |
| | | निध्रुवि |
| पतंजलि | | |
| | पदंजल | |
| पराशर | पराशर | पराशर |
| परिधापयन्त्य | परिधापयन्त्य | |
| पार्थ | पार्थ | |
| | | पिंग |
| पूतिमाष | पूतिमाष | पूतिमाष |
| पूरण | पूरण | पूरण |
| | | पृषदश्व |
| प्राचीनयोग्य | प्राचीनयोग्य | |
| | बभ्रु | |
| बव | बव | बव |
| | बादरायण | |
| | | विद |
| बीजवाप | बीजवाप | |
| | बुशामिवत् | |
| बृहदग्नि | बृहदग्नि | |
| | | बृहदुक्थ |
| | बैद | |
| | भद्रण | |
| भरद्वाज | भरद्वाज | भरद्वाज |
| भूयसी | भूयसी | |
| | | भैमगव |
| मण्डु | मण्डु | |
| | मद्रण | |
| | मधुच्छन्द | |
| मनु | मनु | मनु |
| | मषण | |
| माण्डव्य | माण्डव्य | |
| माठर | | |
| मित्रयु | | मीत्रयु |
| मौक | | मौक |
| मौन | | मौन |
| यज्ञवाल्कि | यज्ञवाल्कि | |
| | | यस्क |
| यास्क | | |
| रजतवाह | | |
| | रथितर | |
| | | रहूगण |
| | | रेणु |
| रेतवाह | रेतवाह | |

| अ. बौ. | अ. स. | हौ. आ. |
|---|---|---|
| | रेफ | |
| रेभ | | रेभ |
| | | रोहिण |
| लोहित | लोहित | |
| | | लोहितहनु |
| | | लोहिताक्ष |
| वत्स | वत्स | वत्स |
| | वत्सावन सावनार्य | |
| | वात्स्यायनि | |
| वाधूल | | वाधूल |
| वाध्य्रश्व | | वाध्य्रश्व |
| वामदेव | वामदेव | वामदेव |
| वामरथ्य | वामरथ्य | वामरथ्य |
| | वारकि | |
| | | वारिधापयन्त्य |
| वासिष्ठ | वासिष्ठ | वासिष्ठ |
| विदु | विदु | |
| | विरूप | |
| विरोहित | विरोहित | |
| विश्वामित्र | विश्वामित्र | |
| | विष्णुवृध्द | विष्णुवृध्द |
| | | वेणु |
| वैन्य | वैन्य | |
| | | शंख |
| | शठ | |
| | | शमतु |
| शाण्डिल | शाण्डिल | शाण्डिल |
| | | शार्कराक्षि |
| | | शालंकायनि |
| | | शालाक्ष |
| शालावत | शालावत | |
| शालु | शालु | |
| शुंग | शुंन | शुंग |
| | शुन | |
| शुनक | | शुनक |
| | | शैवगव |
| शैशिर | शैशिर | शैशिर |
| | | श्यैत |
| श्रौमत | श्रौमत | श्रौमत |
| संकृति | संकृति | संकृति |
| | सात्यकाम्य | |
| | सात्याकि | |
| | | सार्ष्टि |
| | | सावर्णि |
| सांशित्य | सांशित्य | |
| सुमंगल | सुमंगल | |
| | | सोमराजकि |
| | हरित | हरित |

ब्राह्मणेतिहासामध्यें प्रथमतः सूक्तकार म्हणून नांवाजलेले असे जे मोटमोठे ऋषी होऊन गेले ते विशिष्ट प्रवरांत कोंबण्याची खटपट कशी झाली हें मागें दिलेल्या यादांवरून लक्षांत आलेंच असेल. पुढें अनेक आडनांवांचें म्हणजे अनेक गोत्रांतले असे जे ऋषी होऊन गेले ते देखील कोणत्यांना कोणत्यातरी प्रवरांत घुसावण्याचा किंवा त्यांचा कोणत्यातरी प्राचीन ऋषींशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न झालाच. या सर्वांचा इतिहास देणें म्हणजे आजचीं सर्वच गोत्रें व त्यांचें प्रवर यांची यादी देणें होईल. पण तितका प्रयत्न आपणास अनवश्य आहे. उदाहरणासाठीं एखादी यादी दिली म्हणजे झालें. येथें कात्यायनांचीं म्हणजे त्या शाखेच्या गोत्रांची व प्रवरांची त्यांच्या सूत्राप्रमाणें यादी देतों. आज ही शाखा संख्येनें फारशी मोटी नाहीं. हल्ली कास्त या नांवानें ओळखिले-जाणारे ब्राह्मण आपण कात्यायन सूत्री आहों असें म्हणवितात.

## कात्यायन स्मृतींतील गोत्रें

### विश्वामित्रगण

**विश्वामित्रगणापैकीं.**—कुशिक, लोहित, रौक्षक, कामकायन, अज, कत, धनंजय, पूरण, अघमर्षण, इंद्रकौशिक.

कु शि क गो त्रां ती ल भे द.—कुशिक, पार्णजंघ्य, वारक्य, औदालि, माणि, बृहदग्नि, आलपि, आद्यहि, आपद्यप्य, कामंतक, बद्धकथ, चिकित, कामकायन, शालंकायन, कात्यायन, लौक, गौर, सौगंतव्य, यमदूत, आजाभिन्न, तारकायण, चौवल, यज्ञवल्क्य, जाबालि, वितंड, नुवालि, सौशृति, औपगहनि, उदपरि, भ्राष्टग्य, श्यामेय, चैत्रेय, तालोचतर, मयूर, सांमत्य चित्रतवय, साततायन, मनु, तंतु, सांतव, पक्ष, नालशब्द, बाभ्रव्य, कालाप, उत्सरथ, देवरात, औलकि, उलूक, बाभ्रावत, शाल, विशाल, कालवच, सैंधवायन, सौराधि, कारीषि, संसृत्य, औलोप्य, पायौदरि, क्षरि, पडालि, गालव, वैकृति, वैतंड, बलशंकु, श्यामायन, काल, वालाखिल्य, याजि, सौमेय, आश्वलायन, आवाह, उलूखल, जैमिनि, सांकृति, औघेय, साक्षि, बव, ईर्मव, काराकि, शालावत.

लो हि त गो त्रां ती ल भे द.—लोहित, कटुकय, चाक्रवर्णायन, तंतायन, वाह्यकि, अष्टक.

रौ क्ष क गो त्रां ती ल भे द.—रौक्षक, स्वोद्वहल, रेवण.

का म का य न गो त्रां ती ल भे द.—कामकायन, देवश्रव, देवतरस, श्रौमत; ज्यामकायन.

अ ज गो त्रां ती ल भे द.—अज, भार्गमित्र, माधुच्छंदस.

क त गो त्रां ती ल भे द.—कत, औदुंबरि, शैशिरि, स्तैकायनि, स्तोकायनि, तार्क्ष्यायनि, कात्यायनि, करीराभि, लमकय, शालंकायन, मौंजद्दायन, गांगायनि, कालय,..

मोदायनि, बेनियाने, वैनायनि,रामणि, राताकि, मौंजायनि.

धनंजय गोत्रांतील भेद.—धनंजय, पार्थिव, बंधुल, मंदक, पाणिल, चैयेत्र, परिकुश.

पूरण गोत्रांतील भेद.—पूरण, परिधापयंत्य.

## अत्रिगण

**अत्रिगणापैकीं.**—अत्रि, गविष्ठिर, वाद्भुतक, मुद्गल,

अत्रि गोत्रांतील भेद.—अत्रि, भूरि, छांदि, छांदागी, पौष्पिक, मोद्दलि, सौपालगल, छागल, तृणबिंदु, भार्गवेय, भालरुचू, व्यालि, सांबव्यानि, कामार्यानि, दाक्षायण, स्तैदेह, गाथितप, औद्दालकि, द्रोणभव, गौरिग्रीवि, गविष्ठिर, शैशुपाल, कृष्णात्रेय, गौरात्रेय, ऋक्षात्रेय, नीलात्रेय, श्वेतात्रेय, श्यामात्रेय, महात्रेय, गालेय, वालेय, शौभ्रेय, वामरथ्य, श्वेतभाव, शौद्रेय, गोपवन, कालापचय, नीलायन, आनंगि मानंगि, दारंगि, सौरंगि गौरंगि, पुष्पि, सौपुष्पि, साकेतायन, भारद्वाजायन, इंद्रातिथि, शाव्रव, आहायन, पवनाश, किकिदीवि, शौनककर्णि, सौश्रुति, गौरग्रीवि, कैरंजि, जैत्रायण, श्वेकि, बहुनेत्र, वाहामित्र जानुकि, पनंजन, भागमादन, साख्येय, सारायण, सौक्चर, अर्धपथ, गौधन्य, कालजिव्ह, उद्दरग्रीवि, बैडाळि, शाकलायन, गौणीपथ, बलद, भवपाद, अर्घ्यायण, बादर्थायण, मांगल, बाहुदंति, भागलेय, अरुणात्रेय, दत्तात्रेय, शैस्वि, करायण, नीशायन, दर्भ्य, बुयादुल, बामरथ, वैश्वानकि, शौधूलकि, निकल.

गविष्ठिर गोत्रांतील भेद.—गविष्ठिर, दक्षि, भलंदन, और्णवाभि, चंद्रात्रेय, बैजवापि, पूर्णातिथि श्यामपुष्पि, शिळंदलि, ब्रह्मपुष्पि, कालाक्षि, कालशीर्षि, वाध्यपुष्पि, सौपुष्पि, हिरण्य पुष्पि, कार्ष्णशायकि, म्हाक्षि, बालि, कट्रकि, मैत्राण्य, शिरीषक.

मुद्गल गोत्रांतील भेद.—मुद्गल, शालिसंधि, आर्णव, बौधाक्ष, बैतवाह, शिरीषि,शालिमत,गौरित, गौरकि, वाजवत.

## भृगुगण

**भृगुगणापैकीं.**-वत्स, बिद, वैन्य, वीतहव्य, आर्ष्टिषेण, वाध्यश्व.

वत्स गोत्रांतील भेद.—नालायन, वागायन, अनुमातकि, जैह्नति, जीवंति, कांबलोदरि, वैहायन, रेखायनि, पार्षति, पार्णिलि, उच्चयमान, सात्यकर्णि, कालाकि, तालकेशी, कृतभाग, आर्तभाग, आजीहित, आतिथि, स्थौमांगिरि, स्थौल, सौरव, बर्हिष, देवमति, गार्ग्यायण, गेह्यायन, गोष्ठायन, वैशंपायन, गालव, सांकृति, वाणकेय, ऐतिकायन, प्राष्ट्रेय, भाक्षेय, लाक्षेय, लाकुचि, लालाटि, आवि, आंगावि, सैप्पिकि, सात्यकायन, नैकर्षि, शाकल्य, पाकानुमति, कनिष्ठि, जैह्नाशिनि, आश्मकम, क्रौंचहारित,आनुलोमि, क्रौंचाक्षि, क्रौंचाक्ष, सौरध्वजि, वाध्यात्केय, निरीणि, बासि, सादन, स्योप, स्यंदानि, कटेरणि, लवेराणि, यौगोलि, माध्योद, गात्स्य, नाडायन, वैरायण, वैन्य, रैहित्सायनि, कृपानील, सावर्णि, पिकस्वर, विष्णु, स्तौलकेशी, जहिन, वीतिन, फेनयास्तलो,

शिखापाति, जलधि, सेनाजित्, कुश्र, पैंगलायनि, दिवस्पति, ऋषभ, सुत, पलत, पलव, कोपियज्ञ, मित्रयज्ञ, आभिलायन, द्वापात्ति, वैकर्णि, निर्मोलकायनि, लाक्ष्मण, शाल्यायनि, माल्यायनि, कौटलि, सौक्ति, साक्षि, कोटर, सांद्रमणि, नैकजिव्ह, जिव्हाशून्य, केललेटि, हिकश्वरि, सारध्वाजि, नैमिश्य, लौष्टाक्षि गरेवणि, पौर्णसैगंधि, काशकृत्, विलकृत्, सौमदायन, स्वानुमति, मंडचित्र,शौकायण, स्वाष्ट्रेय, कोवहुंडि,शौनायन, शाकपौणि, ब्राह्मिमति,मायामति,राभ्रेवाकि, कोशन, मोद्गलि, कारवच, सांतपनायन, गेल्हि, भेल्हि, किरुष स्तन्वत, आलंधि वायगिरायणि, श्येनयागति, नैकटि,शौकर्णि, निडायन.

बिद गोत्रांतील भेद.—बिद, शैल, अवट, प्राचीनयोग्य, अभयदान, काडरथ, वैनभृत, पुलस्त्य, आर्कायण, नाष्ट्रायण, तांत्रायण, क्रौंचायण, कामल, पौलस्त्य, वेदभृत, अभयजात, त्रैकायन, भ्राज, भ्रादंत्य, छैकायन, भृंजायन.

वैन्य गोत्रांतील भेद.— वैन्य, पर्थ, बाष्कल, शैत (श्यैत).

वीतहव्य गोत्रांतील भेद.—वीतहव्य, यास्क, मौन, मौत, बाधूल, वर्षपुष्प, भागलेप, भागविद्वेय, दुर्दिन, भास्कर, दैवजायन, वार्केलेय, माध्यमेय, वासि, कौशांबेय, क्रौविल्य, सत्यकि, चित्रसेन, भागुरिच्छप, माधूल, मौसल, जीवंतायन, अर्धलेखी, वृकाश्माकि, मदोकध, वारेय, गैरिक्षित, दैर्घचित्त, पंचालव, पौष्पावत, गोदायन, चंडमोदन, भागलि, भागवित्ति, पिलि, खलि, काश्यपि, समदागपि, सौरि, ज्वरि, भागांतप,मादायन, शालंकायन, तार्क, प्रावरेय, शार्कराक्षि, कौटिल्य, विलोभि, बाह्विय, हालेय, दीर्घचित्त.

आर्ष्टिषेण गोत्रांतील भेद.—आर्ष्टिषेण, नैर्ऋंधि,ग्राम्यायणि, कार्णायन, चांद्रायण, पौटकलायन, सिद्ध, सुमनायन, गौराभि, मृद्वंगीय, मार्गपथ, नैकर्षि, आपस्तंबि, वाल्मि,कार्दमायनि, गार्लभि, अनूप, वदायनि, कवि,आश्वभि.

वाध्यश्व गोत्रांतील भेद.—वाध्यश्व, रैष्टयान, सार्पिडिन, सुरभिनेय, माल्य, महावाल्य, तार्क्ष्यायन, कैतवायन, खालायन, शाकटायन, मैत्रेय, सार्चय, द्रौणायन, रैक्थायन, आपिशल, आटिकायन, हंसजिव्ह, रौप्यायणि, सालंडि, पिडिकाक्ष मौदायन,कापिशायन, शाडेय, सांक्षित, मित्रयति, आपिशायन, पाटिकायन मित्रयुव, दिवोदास.

## आंगिरसगण

**गौतमांगिरस, भारद्वाजांगिरस, केवलआंगिरस.**

**गौतमांगिरसांपैकीं.**— अयास्य, शारद्वंत, कौमंड, कारेणुपालय, औशनस.

अयास्य गोत्रांतील भेद.—अयास्य, कौमंड, दीर्घतमस्, कारेणुपालय, वामदेव, औशानस, श्रोणिवेध, मूढरथ, सत्यकि, वैदेह, कौमारवत्य, तौक्ष्दर्भि, दैवकि, सात्यमुग्रि,

कौवाद्य, बौभ्य, नौकरि. स्वस्तैषकी, कीलालपी, कारुणप, कटोरिय, काशिवाज, साक्षकिपार्थिव.

शा र द्वं त गो त्रां ती ल भे द.—अभिजित्, रोहिण्य,क्षीरकरंभ, सौमुचि, सौयामुन, औपबिंदव, रहूगण, गणप, भाषण्य, क्षौलेय, नैकरि, करभोगिण्य, सैंधव, गालव, सांगर, सौमिनि, पौष्पिंडव, भावल, कांडव, कारीह. काशवरि, मांथर्थ, इषव, रोहितायन, अंगारक, कौलायन, कास्तौर्ण्णि, अराणि, पार्थिव, मौलायन, स्कांद, सराव, कौटिल्य, वासमूलि, वासपुष्पि, वासस्तेवि,वासधूपि, काचाक्षि, क्षय, वारणय, करेलि, उतथ्य, बोधयोनग, सुगांमाक्षि, क्षीरषाष्टिकि, राद्धकर्णि, सौपुत्रय, सामलांमकि, पौष्कजिति,भागत्र चंडालक, सुतप, सुरेषिण, रौहिणायनि, कौष्टायनि,अरुणायनि, सौदामनि, कासोष, कौशल्य, रैहिणेय, काराधनि, मूलप, वासव, पुष्पवंत, याावक, रेचय, औपमन्य, शैटिक, शौनरि, शौलापि, खरिक, नैकर्षि, तोदेय, वाल्वोट.

कौ मं ड गो त्रां ती ल भे द.—कौमंड, मामंथरेषण, मांसुराक्ष, काष्ठरेखय, आंजायन, बांजायन, काक्षीवत, औशिज, मासुरेखय, वाशि.

का रे णु पा ल यां ती ल भे द.— कारेणुपालय, वास्तव्य, श्वेतयि, पौंजिष्ठ, औदजायन, मातुक्षार, आजगंध.

औ श न स गो त्रां तील भे द. —औशानस, दिश्य, प्रशस्त, सरूपाक्ष, महोदर, विकंहत, सुबुध्य, निहत, गुह.

**भारद्वाजांगिरसांपैकीं**.-भारद्वाज, कपि, गर्ग रौक्षायण.

भा र द्वा ज गो त्रा ती ल भे द,—भारद्वाज,क्षाम्यायण,मेगड देवाश्व, इद्रहव्य, प्राग्वंशि, वाहच्छंन, वाद्योग, वार्सीतायन, तैदेह, आम्ल, औक्ष, शूरि, परिणद्धेय, केशरवेव, शौद्रि, ऊरुढ, खारग्रीवि, औपसयोति, अग्निवेश्य, शव, गौरिवायन, खेलक, स्तनकर्ण, ऋक्ष, माणमिद्य, कद्रोदक, सौज्वलाप, वैल, खौरड, देवयोनि, भरुंडेय, भंदादय, सारंभर, शुंग, देवमाय, इषुत्तम. औदमेधि, प्रावाहणेय,कल्माष, राजस्तव,संधोपकृति,पराहराय,बलभोकि.रुद्रागपथि,शालद्रिल, वेदचेल,नृत्यायन,नृत्य, शालालय, शाहलि, काक्षले, बाष्कल, सैद्यकय,कौडायन, कौण्डिन्य, ब्रह्मस्तंभ, राजस्तंभ, अग्निस्तंभ, वायुस्तंभ, सूर्यस्तंभ, सोमस्तंभ, विष्णुस्तंभ, यमस्तंभ, इंद्रस्तंभ, आपस्तंभ, आरण, सिंध्रव, कौमुदगंधि, शिखायन, मात्रेयायण, भामाण्य, कुक्ष, कौकाक्षय, तैदुंदय, दार्भि, शामेय, मत्स्यकाथ, कारुणायन, कारुणपथि, कारिषाय, कावल्य, सौहय, वालिशायन, वाराहि, विविपि, शिलामालि, पैल, शालंकायन, जैम्हलायनि, साष्टकि, लापायनि, आपस्तबि, धौतांचकि, जित्यद्रोणि, बाह्यगाच्छि, सव्यकथ, स्वारग्रीवि, वाजपृष्टि, प्रवाहि, दशदीकि, स्तूर्णकर्णि, कांचि, देवां रि, हारिकर्णि, सर्पौलि, सौगेय, मालोहर, खगखलायन, सौविष्ट, हालोदर, सात्यमुग्रि, लेखायन, करुणायन, चेल, रुक्ष, किकायन, बाललक्ष, गौरिव, सौपथ, सौभर, सौबुद्धि, धौरकुलिक, विकिर, कुप्रिय, मात्राहल, श्रीपथ, अपिन, निद्रांगवध, माधुकवर्य, शैखेय, कांडण्य, औवेय, मैथुनमति, कोरुलेत्रय, खारणादय, देवस्थानि, शालुहव, गोखपिंगलि, गंगोदय, अधिकारग्रीवि, अयंबकि, माषायण, शाक, काज, सौविश्व, कमुकायन, सिंधव, सात्वय, वाहय, सामस्तंबि, सोमस्तंबि, ब्रह्मस्तंबि, आश्वलायन, मार्कंडेय, कक्क, सांगय.

क पि गो त्रां ती ल भे द. —कपि, स्वस्तितरव, बिंदुब, दंडि, दिव्यशक्ति, पतंजलि, भूयसिन्, स्तैरेवय, वेताकि, ऊर्ध्व, राजकेशिन्, कलसिन्, कण्व, करीतप, वान्यायन, आमावास्यायन, कात्यायन, कपेतर, स्वेदतर, जलसिंचिय, कुसीदरि, सौजटि, सामवि, सलि, क्षण्य, सावस्थायनि.

ग र्ग गो त्रां ती ल भे द.—गर्ग, सांभरायण, सर्त्वीनय, माधरायण, बाहुलि, भ्राष्ट्रकृत्, भ्राष्ट्रधृत्, भ्राष्टावदु, क्रौष्टकि, सौयामुन, आजिनाक्षि, होत्रापचि, सत्यापचि, वात्स्यतरायन, सांभाद, वत्सचतुरायण, काण्वायन, साख्यायन, कानायन, कैवलायन, कौडायन, भारमत, पैशंग, पैल्वकायन, विश्वायवकायन, कालिन, मधुरावह, सांपरिवार, बालाकि,शालायनि, साहूनि, मायराचर, ऐंद्रालय,

लोपकृत्, वांसायन, शारायण, श्यामायन,रामिण, भांगिन, कारिण, आस्मिन,

क्रोडिन, राचारत, भालविद, औपमर्कट, कार्षायन,कौजपि शालकायन, कोलाख, श्याम.

रौ क्षा य ण गो त्रां ती ल भे द.—रौक्षायण, कापिल,शबल, शिफिल, बिंभिंडि, कौयुम, अग्निजिंन्ह, कर्ण, सुत

**कैवलांगिरसांपैकीं**:—हरित, कण्व, रथीतर, विष्णुवृध्द, मुद्ग.

ह रि त गो त्रां ती ल भे द—हरित, शंखदार्भि, सौभ, माद, नैयगव, मतायव, वालोदर, महोदर, मिश्रोदक, मैमिश्चि, कौतप, करीषव, कालय, पौलय, पौटलय, पौटल, वत्स, मांधातव, मांडकारि, खांडायन, माडमालि, गवेरणि, मत्स्यमालि, गाणगारि, मद्रगारि, कुत्स, हंस, हस्तिवायस, पैंगल, पिंग, पालशिन्, दादल, हारितन, कौमारहरित, इल.

क ण्व गो त्रा तीं ल भे द—कण्व, औपर्कटायन, बाष्कल पैल, हस्तिन, मौजिभाजि, मौनिगंध, बीजिवाजि, वाजश्रवाश्व भारहंड, भरंड, रमणी, सन, मर्कट, गर्द्दभ, प्राकासर, शाकटायन, शानायन, रागायण, शौबेरिण, नारीण, श्यामायनि.

र थी त र गो त्रां ती ल भे द.—रथीतर, हस्तिद, सिकाव्हयन, नैतिरक्षि, मैलय, भिलीभायन, सावहव, भैक्षवाह, हेमगव, वैरूप्य, विरूप, आंगुष्ठ, अष्टादंष्ट्र, पृषदश्व.

वि ष्णु वृ द्ध गो त्रां ती ल भे द.—विष्णुवृद्ध, शठ,मषण मन्द्रण, भद्रण, भेद्रय, बादरायण, सात्यकि, वात्सप्रायण, सात्यकायन, नितुंदिन, स्तुल्य मारुण्य, वैहोढ, देवस्थानि क्षत्रिण, छात्रिण, होत्रिण, पुत्रिण, जतृण, वत्रिण, कर्तृण, शांबरायण, औपमीति, औपगवि, कुशमित्, वत्सावन, सावनार्य, च्यावायनि, कालभायनि.

मुद्गल गोत्रांतील भेद.—मुद्गल, सात्यमुग्रि, हिरण्यस्तंब, हंसजिव्ह, देवजिव्ह, आलवाल, बिडाल, अग्न्या मुनि, छत्रहय, तारण, कार्यभासित, हिरण्याक्ष, दीर्घजंघ, हिरण्यगर्भ, शिंदे.

**गोत्रांचा वेदाध्यायाशीं संबंध.**—हा कुळविन्यास निरनिराळ्या गोत्रांचे जे लोक झाले ते कोणी होते, कोणी उद्गाते वगैरे होते. आणि त्यांचा अत्यंत प्राचीनांशीं संबंध लावावयाचा झाल्यास तो सप्तर्षींमार्फत लावावा लागला. अशा प्रकारच्या परिस्थितीमध्यें बराच काळ गेल्यानंतर गोत्रास कांहींतरी कारणामुळें सहेतुकता उत्पन्न झाली. स्थानिक लोकांत देवकांसारखें समुच्चय होते. ते आपसांत लग्नें करीत नव्हते आणि मातृसंस्कृतीच्या लोकांत अगदीं जवळ लग्न करणें ही गोष्ट प्रिय नव्हती व सात पिढयांचा हिशोब ठेवणें शक्य नव्हतें, तर आपण गोत टाकावें म्हणजे आपण बऱ्याच पिढया टाळल्या असें होईल अशा तऱ्हेची कल्पना उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. वाटेल त्या ऋषींचें वरण करण्याचें सामर्थ्य जसजसें कमी होत गेलें असेल तसतसे प्रवरहि अर्थात वंशपरंपरागत बनला. कित्येकांत असेंहि झाले असेल कीं, गोत्रें ज्या वेळीं नवीनच असतील त्यावेळेस सात पिढ्या टाकावयाच्या व तेव्हांच साताची भरती करण्याकरिता प्रवर घ्यावेत ही कल्पना रूढ झाली असेल. प्रवरच लग्नव्यवहारात वगळले म्हणजे सात पिढया वगळल्यासारखें खात्रीनें होईल असें प्राचीनकाळीं लोकांस वाटूं लागून गोत्राबरोबर प्रवरहि वगळण्याची चाल प्रचारांत आली असेल असें वाटतें.

ब्राह्मण्याच्या इतिहासांत ऋग्वेदी व यजुर्वेदी असें जें वर्गीकरण झालें तें कार्यभिन्नत्वामुळें झालें. पण पुढें शाखा व सूत्रें जीं निघालीं ती पक्षभेदरूपी चळवळीमुळें निघालीं. त्या चळवळीचा साग्र इतिहास येथें देण्यास अवकाश नाहीं. पण त्या चळवळीचें स्वरूप मात्र आपणांस ब्राह्मणग्रंथांतून जागोजाग दिसतें तें उदाहरणासाठीं येथें देतों.

**ब्राह्मणग्रंथकालीन पक्षोत्पादक चळवळी.**—ब्राह्मणग्रंथरचनाकाळीं कर्माची मांडणी अधिकाधिक निश्चित होत होती. पण या बाबतींत निश्चय होण्यापूर्वी अनेक तंटेबखेडे झाल्याशिवाय निश्चय झाला नाहीं. आजच्या आपल्या दृष्टीस या तंटेबखेड्यांची कारणें अतिशय क्षुद्र अशीं भासतात, पण प्राचीनांना तीं तशी भासत होती किंवा नव्हती हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. आपला संप्रदाय किंवा यज्ञ करण्याची रीत किंवा रीतींतील अगदी बारीकसारीक भाग हा इतरापेक्षां शास्त्रोक्त ठरविणें आणि दुसऱ्याचा निषेध करणे ही पद्धति त्यावेळच्या भिक्षुकीच्या धंद्यांत स्वतःच्या उत्कर्षासाठीं करावी लागत असेल यांत शंका नाहीं.

**ऐतरेय ब्राह्मणानें स्वमतस्थापनार्थ केलेली खटपट.**—तत्कालीन स्पर्धेच्या स्पष्टीकरणासाठीं प्रथमतः



यज्ञविषयक आपला संप्रदाय व दक्षिण्यासाठीं दुसऱ्या संप्रदायांच्या केलेल्या निषेधाचीं उदाहरणें जीं आपणांस ऐतरेय ब्राह्मणांत दिसतात तीं प्रथमतः घेऊं.

**मंत्र कोणते म्हणावे याविषयीं स्वमतस्थापन.**—सोमयागांतील दीक्षणीयेष्टीमध्यें 'आज्यभाग' नामक आहुती देतांना होत्यानें ज्या पुरोनुवाक्या म्हणावयाच्या त्या यज्ञ करणारा यजमान सोमयाग प्रथमच करीत असेल तर 'त्वमग्ने सप्रथा' 'सोम यास्ते' या म्हणाव्या व यज्ञ करणारा दुसऱ्यांदा सोमयाग करीत असेल तर 'अग्निः प्रत्नेन, सोम गीर्भिः' या म्हणाव्या, अशी जुनी पद्धत. परंतु वरील दोन्हीहि प्रकार रद्द करून 'अग्निर्वृत्राणि, त्वं सोमासि' या म्हणाव्या असें ऐ. ब्रा. कार म्हणतात (१.४).

अग्निष्टोमामध्यें मरुत्वतीय शस्त्रांतील तीन धाय्या पठण करतांना तिसरी 'तान्वो महो' ही म्हणावयाचा पूर्वी परिपाठ असलेला बंद होऊन 'पिन्वन्त्यपो' ही धाय्या पठण करण्याचा नवा प्रघात सुरू झाला. (३.१८).

**अनुयाजांच्या महत्त्वाची स्थापना.**—प्रायणीया नामक इष्टीमध्यें (प्रधान यागापूर्वी व नंतर) करावयाच्या प्रयाज व अनुयाज नामक यागांपैकी फक्त प्रयाज यागच करावे अशा चालीचा (प्रयाज व अनुयाज हे यजमानाचे प्राण व प्रजा असल्यामुळें अनुयाज याग न केल्यास संततिनाश होईल यासाठीं) निषेध करून ऐ. ब्रा. कारांनीं अनुयाजाची स्थापना कायम केली (१.११).

**पशुविशिष्टाची अडचण काढून टाकण्याची खटपट.**—अग्नीषोमीय पशु अग्नि व सोम या दोन देवतांसंबंधीं असल्यामुळे पांढरा व काळा असा दोन रंगी असावा अशा पूर्वपक्षाचा निषेध ऐ. ब्रा. कार दर्शवितात (२.३).

**यजमानास पशुविडाभाग देण्याची योजना.**—अग्नीषोमीय पशूसंबंधीं इडा यजमानानें भक्षण करूं नये 'कारण यजमानो वै पशुः' असें श्रुतिवाक्य असल्यामुळें यजमानानें पशुइडा खाणें म्हणजे स्वतःच्या मांसाचें भक्षण होईल. या पूर्वपक्षाचा निषेध करून यजमानानें पशुइडा अवश्य भक्षावी अशा मताचा स्वीकार (ऐ. ब्रा. २.३).

**होते व सामक यांतील स्पर्धा व काव्याचें गाण्यापेक्षां महत्त्व कमी होऊं नये म्हणून होत्यांची खटपट.**—'बहिष्पवमान' नामक साम पठण करण्यास सामकांच्या बरोबर होत्यानेंहि उत्तरवेदीजवळ बसावें, अशा एका मताचा, सामकांच्या मागें होता गेला असतां ऋचा सामानुगामी होतील म्हणून, निषेध (ऐ. ब्रा. २.२२).

**पुरोडाश किती कपालांवर भाजावेत.**—यज्ञांतील सुत्येच्या दिवशीं सवनीय पुरोडाश भाजावयाचे ते प्रातःकालीन सवनांत आठ कपालांवर, माध्यंदिनसवनांत अकरा कपालांवर व तृतीयसवनांत बारा कपालांवर भाजावे असें प्राचीन मत. परंतु त्याचा निषेध व सर्वच अकरा कपालांवर भाजावे या मताची स्थापना.

**पुरोडाश तुपासहित भक्षण करावे.**—तुपाचें वज्र करून इंद्रानें वृत्राला मारलें यासाठीं तूपरहित पुरोडाश भक्षावें, या मताचा निषेध व तुपासहित भक्षावे या मताची स्थापना ( ३. २३ ).

**हौत्रांत शाब्दिक ठाकठिकीसाठीं खटपट.**— 'ऐंद्रवायव ' नामक पात्रांतील सोमरसाची आहुति देतांनां अनुष्टुप् छंदांतील पुरोनुवाक्या व गायत्री छंदात्मक याज्या म्हणावी अशा एका मताचा ( ज्यास्त अक्षरांच्या छंदांतील पुरोनुवाक्या व कमी अक्षरांच्या छंदाची याज्या होते म्हणून ) निषेध दर्शविला आहे( २. २६ ).

**होते व सामक यांतील स्पर्धा.**— यज्ञांतील सुत्येच्या दिवशीं सौम्य नामक चरूच्या आहुती दिल्यानंतर तो चरु ( अवलोकनार्थ ) प्रथम सामकांनां देण्याच्या पद्धतीचा निषेध व ( होताच प्रथम सोम भक्षण करणारा असल्यामुळें ) होत्यास प्रथम देण्याचा नवा परिपाठ स्थापन झाला ( ३.३२ )

**ऋग्मंत्रांतील पाठभेदाविषयीं आग्रह.**— आतेपितः ( ऋ २. ३३, १ ) या ऋग्वेदांतील ऋचेच्या दुसऱ्या अर्धाच्या आरंभीं असलेल्या ' अभि नो ' या पदांचा निषेध करून तेथें ' त्वं नो ' या पदांचा पाठ करावा असा आग्रह (३. ३४ ).

**विशिष्ट देवतेचें महत्त्व कमीजास्त करण्याची खटपट.**—सुत्येच्या दिवशीं आग्निमारुत नामक शस्त्रांत अहिर्बुध्न्य देवतेसंबंधीं शंसनानंतर ' राका ' देवतेसंबंधीं प्रथम शंसन करून नंतर देवपत्न्यांसंबंधीं करण्याच्या पद्धतीचा निषेध व अहिर्बुध्न्य देवतेनंतर प्रथम देवपत्नी आणि नंतर राका देवतेसंबंधीं शंसनाचा परिपाठ ( ३.३७ ).

**छंद व सूक्तवैशिष्ट्य काढून टाकण्याची खटपट.**- अतिरात्र क्रतूंमध्यें आश्विन शस्त्र पठण करतांनां ( प्रातरनुवाकाप्रमाणें ) अग्नि, उषा व आश्विन या देवतासंबंधीं सूक्तें पठण केल्यावर सूर्यदेवतेसंबंधींहि सात छंदात्मक सूक्तें पठण करावीं अशा एका पक्षाचा निषेध व सूर्यदेवतेसंबंधीं बारच सूक्तें व तीं कोणत्याहि छंदांतील म्हणण्याचा परिपाठ. ( ४. १० )

**अग्निहोत्र विधुरावस्थेत चालवावें काय.**— अग्निहोत्र्याची बायको मेली असतां त्यानें अग्निहोत्र पुढें चालवूं नये असा एक पक्ष व बायको मेली असतां एकटयानेंच अग्निहोत्र चालवावें असा दुसरा पक्ष. याला कारण.— संतति उत्पन्न करणारा, यजन करणारा व ब्रह्मचारी असणारा हे पितरांच्या ऋणांतून मुक्त झालेले असतात. म्हणून बायको नसली तरी पितरांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं अग्निहोत्र चालू ठेवावें इतकेंच नव्हे तर सोमयाग व सौत्रामणीयाग सुद्धां करावा ( ऐ. ब्रा. ७.९).

**क्षत्रियांनां सोमपानबंदी.**—विश्वंतर नामक राजानें श्यापर्ण नामक ब्राह्मणांनां आमंत्रण न करितां यज्ञ आरंभिला. श्यापर्ण ब्राह्मणांनां हें कळतांच आमंत्रणावांचून ते यज्ञास आले व यज्ञिय वेदींत बसले. त्यांनां पाहतांच 'माझी अवज्ञा करणाऱ्या या ब्राह्मणांनां उठवून लाव ' असें त्या राजानें दूतांस सांगितलें. तेव्हां " पूर्वी जनमेजयानें असाच कश्यपवंशज ब्राह्मणांनां वगळून यज्ञ केला असतां कश्यपवंशज असितमृग ब्राह्मणांनीं त्या यज्ञामध्यें येऊन तेथें अनुष्ठान करीत असलेल्या भूतवीर नामक ब्राह्मणांचा पराजय करून यज्ञांतील आर्त्विज आपणांकडे घेतलें. तर आपणां श्यापर्ण ब्राह्मणांत असा कोणी श्रेष्ठ वीर आहे काय ? " असें ते मोठ्यानें बोलले. त्यावेळीं त्यांच्यापैकीं मार्गवेय राम हा उभा राहिला व मी तसा वीर आहे असें म्हणून पुढें तो विश्वंतरास म्हणाला कीं आम्ही यज्ञानुष्ठान जाणणारे ब्राह्मण असतांना तूं आम्हांस कसा उठवून लावतोस? राजानें 'तूं कसा अनुष्ठानज्ञ आहेस ' असें विचारलें असतां राम सांगतो.—इंद्रानें पांच प्रकारचे अपराध केल्यामुळें त्याला कोणी सोम अर्पण करीनात. व तेव्हांपासून सर्व क्षत्रियजातीनें सोमपान वर्जिलें. नंतर इंद्रानें मात्र स्वसामर्थ्यानें त्वष्ट्याच्या घरीं सोमपान केलें. इतर क्षत्रियांमध्यें इंद्राप्रमाणें सामर्थ्य नसल्यामुळें सोमपान त्यांनां श्रेयस्कर नाहीं; व क्षत्रियांनां सोमाच्या ऐवजीं जे पदार्थ सेवन करावयाचे ते आम्हांस माहीत असतां तूं यज्ञांतून कसा घालवून देतोस? नंतर ते क्षत्रियांनीं सेवन करावयाचे पदार्थ तुला माहित आहेत काय असें विचारल्यावरून राम सांगतो. यज्ञानुष्ठान न जाणणारे असे कांहीं ऋत्विज क्षत्रियांनां सोमभक्षण करण्यास सांगतात पण त्यामुळें त्यांचें क्षत्रियत्त्व नाहींसें होऊन प्रतिग्रह, याजन, याचकवृत्ति हे गुण त्यांच्या अंगीं जडतात.तसेंच कोणी क्षत्रियांनां दधिभक्षण करावयास सांगतात त्यामुळें त्यांच्या अंगीं वैश्यगुण शिरतात; कोणी उदक भक्षण करण्यास सांगतात त्यामुळें त्या क्षत्रिय राजांच्या अंगीं अत्यंत हीन असे शूद्रांचे गुण वास करूं लागतात. यासाठीं क्षत्रियांनां सोम, दहि, अथवा उदक हे भक्ष श्रेयस्कर नाहींत. क्षत्रियांनां वडाच्या खांद्यांच्या पासून फुटणाऱ्या पारंब्यांचीं अग्रें, व उंबर, पिंपळ आणि पिंपरणी या वृक्षांचीं फळें यांचा कुटून काढलेला रस हा भक्ष अत्यंत श्रेयस्कर आहे असें रामानें राजास सांगितलें. नंतर हा भक्षच क्षत्रियांनां श्रेयस्कर असल्याचें निरनिराळ्या ऋषींनीं निरनिराळ्या राजांनां सांगितलें ( ऐ. ब्रा. ७. २६ ).

**ऋत्विजाचा दासीपुत्र म्हणून त्याग व विशेष करामत दाखविल्यावर स्वीकार.**—ऋषींनीं आरंभिलेल्या सत्रांत आर्त्विज्य मिळविण्यासाठीं कवष नामक ऋषि त्या ठिकाणीं येऊन बसला असतां ' हा जुगार खेळणारा व दासीपुत्रासारखा ब्राह्मण आमच्या सोमयागामध्यें आर्त्विज्यास योग्य नाहीं ' असें म्हणून त्या ऋषींनीं कवषाला जेथें उदक नाहीं अशा ठिकाणीं घालवून दिलें. नंतर त्या पाणी नसलेल्या ठिकाणीं तहान लागल्यामुळें कवषानें सरस्वती नदीची स्तुति केली असतां सत्र करणाऱ्या ऋषींच्या

संनिध वहात असलेली सरस्वती नदीच कवषाकडे आली. ही गोष्ट सत्रांतील ऋषींनां समजतांच कवषावर देवांची अत्यंत प्रीति आहे असें जाणून त्यांनीं कवषाचे सर्व दोष माफ करून त्याला आपल्यामध्यें घेतलें( ऐ. ब्रा. २. १९ ).

**ऋत्विजांनां अग्नीषोमीय पशूचें मांस [इडा]भक्षण्यास मोकळीक.**—यज्ञांतील अग्नीषोमीय नामक पशूचें मांस (इडा) ऋत्विजांनीं भक्षण करू नये कारण यजमानानें आत्मस्वरूप असा तो अग्नीषोमीय पशू देवतांनां अर्पण केला असल्यामुळें त्या पशूचें मांस भक्षण केलें असतां यजमानाचें मांस भक्षण केल्यासारखें होईल असा एक पक्ष. परंतु 'इंद्रानें अग्नि आणि सोम यांच्यासाठीं वृत्राला मारल्यावर अग्नि आणि सोम या देवतांनीं 'यज्ञांतील सोमाभिषवाच्या पूर्वदिवशीं आमच्या नांवानें ( अग्नि आणि सोम अग्नीषोम)देवतांनां पशु अर्पण केला जावा' असा वर मागून घेतला असल्यामुळें अग्नीषोमीय पशु व यजमान यांचा संबंध रहात नाहीं. यासाठीं अग्नीषोमीय पशूचें मांस भक्षण करावें असा दुसरा पक्ष [२.४].

**शांखायनी खटपट.**—यज्ञविषयक आपला संप्रदाय वाढविण्यासाठीं दुसऱ्या संप्रदायांचा निषेध केल्याचीं शांखायन ब्राह्मणांतील उदाहरणें आपण विचारांत घेऊं.

दर्शपूर्णमास यागांत शेवटच्या प्रयाजयागामध्यें ' देवा आज्यपाजुषाणा अग्न आज्यस्य व्यंतु ' या पाठाचा निषेध व ' देवा आज्यपा जुषाणा अग्नआज्यस्य हविषो व्यंतु ' असा पाठ ( ३. ४).

' सूक्तवाक ' नामक यागामध्यें ( पूर्वी ज्या देवतांनां आव्हान केलें असेल त्या देवतांनां उद्देशून ) 'अग्निरिदं हविरजुषत' 'सोम इदं हविरजुषत' असा मंत्र म्हणावयाच्या असलेल्या परिपाठाचा निषेध व त्या जागीं नुसतें 'हविरजुषत' असें म्हणावयाचा पाठ ( ४.८).

चातुर्मास्य यागांत वैश्वदेवपर्वामध्यें क्षत्रियांनां वाजिन यागाचा निषेध ( ५. १).

अग्निष्टोमामध्यें सुत्येच्या दिवशीं प्रउग नामक शस्त्र पठण करतांना त्यांतील सरस्वती देवतेसंबंधीं पुरोरुक् नामक मंत्र पठणाचा निषेध.

या तऱ्हेचे अनेक आग्रह शांखायन ब्राह्मणांत दाखवितां येतील.

यज्ञिय कर्मासंबंधीं शतपथ व तैत्तिरीय यांतील परस्परनिषेध व विरोध

( १ ) अग्न्याधानासंबंधीं नक्षत्र उक्त कोणतें तें ठरविणें- शतपथांत पूर्वाफाल्गुनी घ्यावें असें मत ( १.२,११ ) आहे. व तैत्तिरीयांत पूर्वाफाल्गुनीचा निषेध व कामनापरत्वें ग्रहण ( १.१, २).

( २ ) अग्न्याधानासंबंधीं मंथनाचा काल यासंबंधीं. अग्निमंथन रात्रीं करावें व गार्हपत्याधान पहाटे करून सूर्योदयकाळीं आहवनीयाचें आधान करावें असें तैत्तिरीय मत(१.१,४)व अग्निमंथन रात्रीं न करतां दिवसा (सूर्योदयीं) करावें असें शतपथ (१. ४, ८) मत.

( ३ ) चातुर्मास्य यागांत पितृयज्ञाच्या दिवशीं गार्हपत्याच्या दक्षिणेस बसून प्राचीनावीती करून हविर्निर्वाप करावा असें शतपथ मत ( ५.२,८ )व वरील मताचा निषेध करून उत्तरेस बसून व उपवीती करून निर्वाप करावा असें तैत्तिरीय मत (१. ६,८ ).

आपला यज्ञविषयक सांप्रदाय वाढविण्यासाठीं दुसऱ्या सांप्रदायांचा केलेला निषेध

**तैत्तिरीय संहिता.**

होत्याच्या स्रुगादापनसंज्ञक मंत्रामध्यें यजमानदेवता या अक्षरांच्या पुढें 'यो अग्नि होतारमवृथाः' हीं अक्षरें म्हणण्याची अन्यशाखेंत पद्धति होती. तै. संहितेंत त्याचा निषेध करून 'योअग्निं होतारमवृथाः' हीं अक्षरें म्हणणाऱ्या होत्याचा यजमान दोन्ही बाजूंनीं अग्नीकडून घेरला जातो असें म्हटलें आहे (तै. सं २.५,९).

होत्याच्या सूक्तवाकसंज्ञक मंत्रसंघाचा आरंभ एका शाखेमध्यें 'उद्यावापृथिवी' असा होता त्याचा निषेध करून 'इदंद्यावापृथिवी' असा पाठ सुरू केला (तै. सं. २.६,९ )

सूक्तवाचक मंत्रामध्यें एका ठिकाणीं 'सूपावसानाच स्वध्यवसानाच'असा एक शाखेचा पाठ होता हा पाठ उपयोगांत आणल्यास यजमान मरेल अशाप्रकारें निषेध करून 'सूपचरणाच स्वधि चरणाच' अशा प्रकारचा नवा पाठ रूढ केला. ( तै. सं. २.६,९)

दीक्षाहुति देतांना एका मंत्रामध्यें 'हविषा विधेः' असा एका शाखेचा पाठ होता त्याचा निषेध करून हविषा वृधातु हा पाठ रूढ केला (तै. सं. ६.१,२).

प्रायणीयेष्टीमध्यें प्रयाज याग करावयाचे व अनुयाज करावयाचे नाहींत व उदयनीयेष्टींत प्रयाज न करतां फक्त अनुयाज करावयाचे असा एक प्रचार होता त्याचा निषेध करून प्रायणीया व उदयनीया या दोन्हीहि इष्टींमध्यें प्रयाज व अनुयाज हे दोन्ही करावयाचे असा प्रचार सुरू झाला. (तै.सं. ६.१,५).

अग्नीषोमीय पशूचें हविःशेष मांस भक्षण करूं नये अशी पद्धति होती ती मोडून भक्षण करण्याची पद्धति रूढ केली.

**तैत्तिरीय ब्राह्मण**

मनूची मुलगी ' इडा ' हिनें अग्न्याधानांत अग्निस्थापनाच्या क्रमांत नवा प्रचार सुरू केला. आहवनीय, गार्हपत्य आणि नंतर दक्षिणाग्नि असा असुरांचा क्रम होता. दक्षिणाग्नि गार्हपत्य व नंतर आहवनीय असा देवांचा अग्निस्थापनेचा क्रम होता. इडेनें या दोन्ही क्रमांचा निषेध करून आ-

पऱ्या वापाच्या अग्न्याधानांत गार्हपत्य, दक्षिणाग्नि व नंतर आहवनीय असा नवाच अग्निस्थापनक्रम सुरू केला व हाच क्रम सांप्रत सर्वत्र चालू आहे ( तै. ब्रा. १.१.४ ).

आहवनीय अग्नीचें आधान (स्थापन) करावयाच्या पूर्वी तो अग्नि 'आनशेऽग्यानशे' या मंत्रानें तीन वेळ खालून वर असा चाळवून नंतर त्या अग्नीची स्थापना करण्याची पूर्वी चाल असावी. तैत्तिरीय ब्राह्मण म्हणतें कीं तसें करूं नये (१. १,८) तर एकदांच हातानें उचलून घ्यावा व त्याची स्थापना करावी.

सत्रामध्यें विषुवान् नांवाचा जो मध्यम दिवस असतो त्याच्या पूर्वीचे ३ व पुढचे ३ असे सहा दिवस अग्निष्टोमाचें अनुष्ठान करण्याची एक पद्धति प्रचारांत होती. तिचा निषेध करून तै. ब्रा. १.२,२ म्हणतें कीं पूर्वोक्त सहाहि दिवस उक्थ नामक क्रतूचेंच अनुष्ठान करावें.

चतुर्मास्य यागांमध्यें पितृयज्ञाच्या दिवशीं गार्हपत्याच्या दक्षिणेस बसून पितृदेवतांच्यासाठीं निर्वाप करण्याची पूर्वी पद्धति होती. कां कीं, दक्षिणदिशा ही पितरांची दिशा म्हणून समजली जाते. परंतु तै. ब्रा (१.६,८) म्हणतें कीं तसें करूं नये. उत्तरेसच बसून निर्वाप करावा. कारण पितृयज्ञामध्यें केवळ पितृदेवतांचेंच कांहीं यजन नाहीं. देव व पितर या दोघांचेंहि आहे. फार झालें तर पितरांच्यासाठीं पुरोडाश भाजतांना अग्नीवर दक्षिण बाजूस भाजावा म्हणजे झालें. या बाबतींत शतपथाचा तैत्तिरीयांशीं विरोध (५.२,८.९) आहे.

अग्निहोत्रहोमामध्यें अवदानार्थ चार स्रुवे स्रुचीमध्यें भरून घेतल्यावर गार्हपत्याजवळ ती स्रुची एकदां खालीं ठेवावयाची व मग तेथून पुढें होमासाठीं ती आहवनीयाकडे घेऊन जावयाची अशी पद्धति एका संप्रदायाची होती. तिचा निषेध करून तै. ब्रा. म्हणतें कीं अशा प्रकारें आहवनीयाग्नीवर होम होण्यापूर्वी गार्हपत्याजवळ स्रुची खालीं ठेवूं नये. असें केल्यानें एकासाठीं घेतलेलें अन्न दुसऱ्याचें पुढें ठेवलेल्यासारखें होतें (२. १,५).

अश्वमेधामध्यें अवभृताचे वेळीं मृत्यूला कारणभूत असलेल्यामुळें मृत्युरूपच अशा निरनिराळ्या व्याधींनां त्याच्याकडून उत्सर्ग होऊं नये म्हणून आहुति देण्याचा परिपाठ होता परंतु तो मोडून मृत्युरूपी मुख्य एकाच व्याधीला आहुति देण्याचा परिपाठ चालू केला ( तै. ब्रा. ३ ९,१५ ).

दहि व दूध यांच्या मिश्रणास सान्नाय्य म्हणतात. सान्नाय्य द्रव्याचें अवदान घेतांना प्राथम्याच्या दृष्टीनें दहि हे आदल्या दिवशीं विरजलें असल्यामुळें तें प्रथम घेऊन नंतर दूध घेण्याची पद्धति होती पण ती मोडून दूध हें दह्याचें पूर्ण किंवा प्रथम स्वरूप असल्यानें आधीं दूध घेऊन नंतर दहि घ्यावें अशी पद्धति सुरू झाली (तै. सं. २.३,५).

### शतपथ ब्राह्मण

पत्नीनें इष्टीसाठीं तांदुळ कांडतांना मंत्र म्हणण्याची जी कोणाची पद्धत होती तिचा निषेध करून अमंत्रक तांदुळ कांडण्याचा प्रचार सुरू केला ( श. ब्रा. ८.१,४ ).

संमार्गदर्भ अग्नींत जाळून टाकण्याचा पूर्वीचा प्रचार बंद करून संमार्गदर्भ कायम तसेंच ( पात्रें वगैरे घासतांना उपयोगीं पडण्यासाठीं ) उत्करावर ठेवण्याची पद्धति सुरू झाली ( श ब्रा. २ ४,११ ). तैत्तिरीयांच्या मतें संमार्गदर्भ जाळणें हें जास्त महत्त्वाचें आहे ( तै. ब्रा. ३.३, १ ).

पत्नीनें आपल्या कमरेस योक्त्र बांधल्यावर त्याला गांठ द्यावयाचा चाल होती तिचा निषेध करून नुसतीं टोकें वर खोचून देण्याचा प्रचार सुरू केला (श. ब्रा. २ ४-१६ ). तैत्तिरीयांचे मतें पत्नीनें योक्त्र कमरेस बांधल्यावर त्याच्या दोन्ही टोकांना गांठ दिली पाहिजे ( ३.३,३ ).

अध्वर्यु व यजमान या दोघांनीं आज्यस्थालींत घेतलेलें आज्य अवलोकन करावयाचा प्राचीन प्रचार होता. त्याचा निषेध करून एकट्या अध्वर्यूनेंच आज्य अवलोकन करण्याची पद्धत सुरू केली ( श. ब्रा. २.४,२६ ). तैत्तिरीय ब्राह्मणांत आज्यावलोकनविधीच नाहीं सूत्रांत आहे.

'अग्नयेसमिध्यमानाय होतरनुब्रूहि' असा प्रैष होत्याला देण्याची एका शाखेंत चाल होती. ती बंद करून तिचा निषेध व 'अग्नयेसमिध्यमानायानुब्रूहि' असा प्रैष देण्याची पद्धति सुरू केली ( श. ब्रा. ३.२,३ ). निषेध केलेली पद्धति तैत्तिरीयांची नसून दुसऱ्या कोणाची तरी होती.

वेदीमध्यें उभे करून ठेवलेल्या बर्हीचें ( दर्भांचें ) प्रोक्षण करतांना शेंडा, मध्य व बुडखा या तीन ठिकाणीं प्रोक्षण करण्याचा विधि होता त्याचा निषेध करून फक्त बुडख्याचेंच प्रोक्षण करण्याचा प्रचार रूढ केला ( श. ब्रा. २ ६,३,४ ).

इध्मा ज्या प्रकारच्या काष्ठांचा असेल त्या काष्ठांचेच 'परिधी' असावेत असा पूर्वीचा नियम होता त्याचा निषेध करून भिन्न काष्ठाचे परिधी करण्याची पद्धति चालू केली. ( शत. प. ब्रा. ५.६,१८). निषिधित चाल तैत्तिरीयांची होती. ( तै. ब्रा. ३. ३, ३ ).

स्विष्टकृताची याज्या म्हणतेवेळीं होत्यानें 'अग्नेरयाट्' 'सोमस्यायाट्' असें म्हणण्याचा जो प्रचार होता त्याचा निषेध करून 'अयाडग्नेः' 'अयाट् सोमस्य' असें म्हणण्याचा प्रघात सुरू केला ( श. ब्रा. ६.१,१२ ). ( तै. ब्रा. ३, ५, ७ ).

अध्वर्यूनें प्राशित्र संज्ञक पात्र ब्रह्म्याकडे घेऊन जातांना आहवनीयाच्या पूर्व बाजूनें ( दक्षिण बाजूस ) जावयाचें अशी कोणा याज्ञिकाची पद्धति होती तिचा निषेध करून अध्वर्यूनें आपल्या जाग्यावरूनच लांब तिरका हात करून प्राशित्र ब्रह्म्याचे हातीं द्यावें असा पक्ष रूढ केला ( श. ब्रा. ६. २, १२ ). तैत्तिरीय उदासीन आहे ( तै. ब्रा. ३. ३, ९. )

सूक्तवाकामध्यें होत्यानें 'उभे च मे द्यावापृथिवी' असें म्हणण्याचा एका शाखेमध्यें पाठ होता त्याचा

निषेध करून ' उभे चैनां द्यावा पृथिवी ' असें म्हणण्याचा पाठ रूढ केला ( श ब्रा. ७. २. २१ ). तैत्तिरीयांमध्यें 'उभे चनो द्यावा पृथिवी ' असा पाठ आहे (तै. ब्रा. ३.,५ १०).

'पत्नीसंयाज' संज्ञक याग करण्यासाठीं पश्चिमेस गार्हपत्याग्नीकडे जातांना ( १ ) आहवनीयाच्या पूर्वेस जाऊन नंतर दक्षिणच्या बाजूनें गार्हपत्याकडे यावयाचें ( २ ) पत्नीच्या पाठीमागून जावयाचें व तिच्या दक्षिणेस बसावयाचें ( ३ ) गार्हपत्याच्या उत्तरबाजूनें गार्हपत्य व पत्नी यांच्यामधून जाऊन दक्षिणेस बसावयाचें असे तीन प्रकारचे कोणाकोणाचे परिपाठ चालू होते. त्यांचा निषेध करून गार्हपत्य आहवनीय यांच्यामधून वेदीच्या नैर्ऋत्य कोणावरून पलीकडे जावें आणि नंतर पत्नीच्या पाठीमागून उत्तर बाजूस जावें असा परिपाठ सुरू झाला. ( श. ब्रा. . ३, २,३,४ ). तै. ब्रा. या बाबतींत उदासीन आहे ३. ३, १० ).

चयनामध्यें चितीखालीं पांच पशूंची मस्तकें पुरावयाची असतात आणि प्रत्येक मस्तकाच्या ठिकाणीं असणाऱ्या ( २कान, २ डोळे, २ नाकपुड्या व १ मुख या ) इंद्रियांच्या ठिकाणीं एक एक सोन्याचा रज किंवा तुकडा ठेवावयाचा असतो. एका शाखेमध्यें एकच पशूचें शिर पुरलें असलें तरी तें पांच शिरांचा प्रतिनिधि असल्यामुळें पांच शिरांच्याबद्दल प्रत्येकीं सात प्रमाणें पत्नीनें सुवर्णाचे तुकडे एकाच पशूचे शिरावर ठेववे असें एक मत चालू होतं त्याचा निषेध करून पांच शिरांचा प्रतिनिधी म्हणून जरी एकच शिर पुरलें असलें तरी सुद्धां फक्त सात सुवर्णाचे रज किंवा तुकडेच ठेवण्याचा प्रचार रूढ केला. ( श. ब्रा. ८. २, १० ).

पशूचीं अंगें शिजवितांना मुख्य देवासंबंधीं ज्या अंगांचें हवन करावयाचें तीं निराळीं शिजवावीं व स्विष्टकृतासंबंधी याग करावयाचीं अंगें निराळीं शिजवावीं असा एक पक्ष व सर्व एकच भांड्यांत शिजवावीं असा दुसरा पक्ष (१.३,६) त्याविषयीं कृष्ण यजुर्वेदांत कांहीं आढळत नाहीं

वाजपेय यज्ञांत करावयाच्या पशूंच्या उपाकरणांत ( देवतांना समर्पण ) वाग्देवत्य पशूचें उपाकरण शेवटीं करावें. असें एक मत व मध्येंच करावें असें दुसरें मत ( १.३,११ ). तैत्तिरीय ब्राह्मणाचे मत शतपथांतील पहिल्या मताप्रमाणें असल्याचें आढळतें ( तै. ब्रा. १. ३, ४ ).

राजसूय यज्ञांत यजमानास अभिषेकानंतर वस्त्र परिधान केल्यावर पागोट्यासारखें वस्त्र यजमानाच्या गळ्यांत माळेप्रमाणें लोंबणारें व शेवटें नाभीजवळ खोचलीं आहे असें असावें असा एक पक्ष व तें वस्त्र गळ्यांत न घालतां कमरेस बांधून नाभीजवळ गाठ मारावी असा दुसरा पक्ष. (३.५.२४) तैत्ति. ब्राह्मणांत यजमानास एक वस्त्र नेसावयास (तुपांत भिजलेलें) व एक पांघरावयास (उष्णीप) दिल्याचें फक्त आढळतें. कमरेस बांधण्याविषयीं कांहींच उल्लेख नाहीं (तै. ब्रा. १.७,६).

नवीन वस्त्रें परिधान केल्यावर दीक्षितानें पूर्वीचीं वस्त्रेंहि पुन्हां धारण करावीं असा एक पक्ष, व एकदां टाकलेलीं पुन्हां घेऊ नयेत असा दुसरा पक्ष. (३.५,२५ ) कृष्णयजुर्वेदांत हा विरोध नाहीं.

विशिष्ट कर्मांचा प्रघात सुरू करण्यास
ऐतिहासिक गोष्टींची जोड.

**प्रायणीयेष्टींत अदिति देवतेसंबंधीं भात शिजविण्याचें कारण.**—यज्ञ देवांच्यावर रुसला असतां देव अदितीकडे गेले. अदितीनें यज्ञारंभीं मला हविर्भाग द्याल तर तुमचें कार्य होईल असें सांगितलें ( ऐ. ब्रा. १.७ )

**यज्ञामध्यें ' उपसद् ' नामक इष्टि करण्याचें कारण.**—देवासुराच्या लोकत्रयसंबंधीं लढाईत असुरांनीं भूलोक, अंतरिक्षलोक व द्युलोक या तीन लोकांचे तीन किल्ले बनविले. देवांनीं असुरांना जिंकण्यासाठीं पृथ्वीवर ' सद ' नामक मंडप, अंतरिक्षांत ' आग्नीध्र ' नामक धिष्ण्या आणि द्युलोकांत हविर्धान, अशीं तीन स्थलें उत्पन्न केलीं, आणि त्या ठिकाणीं उपसद् इष्टींचें अनुष्ठान करून असुरांचा पराभव केला ( ऐ. ब्रा. १-२३ )

**सोमवल्ली विकत घेतांना त्याच्या मोबदला गाय देण्याचें कारण.**—गंधर्वांच्या जवळ असलेला सोम मिळविण्यासाठीं ' मला मोबदला देऊन सोम विकत घ्या ' असें वाग्देवता म्हणाली, व गाईचें रूप धारण करणाऱ्या वाग्देवतेला देऊन देवांनीं सोम विकत घेतला ( ऐ. ब्रा. १.-२५ ).

**यज्ञांतील पशु वधस्थानीं ( शामित्र शालेंत ) नेण्यापूर्वीं पशूच्या व यज्ञमंडपाच्या भोंवतीं तीन वेळ अग्नी फिरविण्याचें ( पर्यग्निकरण कर्म ) कारण.**—देवांच्या यज्ञाचा विध्वंस करण्यासाठीं ( पशू पळवून नेण्यासाठीं ) असुर यज्ञांतील यूपाजवळ आले असतां देवांनीं पशूसह सर्व मंडपाभोंवतीं अग्नीचीं तीन पुरें ( किल्ले ) उत्पन्न केलीं. त्यामुळें असुर तेथून परत गेले ( ऐ. ब्रा. २.३ ).

**सोम कुटण्यासाठीं अध्वर्यु पाणी मागत असतां होत्यानें ' आपोनप्त्रीय ' मंत्र पठण करण्याचें कारण.**—सत्रामध्यें बसलेल्या कवप ऋषीला ( तो दासीपुत्र व जुगारी आहे म्हणून ) उदकरहित अशा ठिकाणीं घालवून दिलें असतां तेथें त्यानें ' आपोनप्त्रीय ' मंत्र पठण करून उदक उत्पन्न केलें ( ऐ. ब्रा. २.१९ ).

**सोमयागांत प्रथम इंद्रवायू देवतांना सोम अर्पण करण्याचें कारण.**—देवांमध्यें प्रथम कोणी सोम प्राशन करावा याबद्दल तंटा लागला असतां धावण्याची शर्यत जो जिंकील त्यानें प्रथम सोम प्यावा असें ठरवून प्रथम वायु व त्याच्या मागून इंद्र, मित्रावरुण, अश्विनौदेव हे पळूं लागले. सर्वांत पुढें असलेला वायु लवकरच शर्यत जिंकणार असें पाहून ' मी व तूं ' दोघांनीं शर्यत जिंकली असें आपण ठरवूं आणि दोघेहि एकदम अर्धा अर्धा सोम पिऊं ' असें इंद्र वायूला म्हणाला. परंतु तें वायु कबूल

करीना. शेवटीं इंद्र आपण एक भाग घेऊन तीन भाग वायूस देण्यास कबूल झाला व त्यांनीं मं क्यांनें आम्हीं शर्यत जिंकली असें जाहीर केलें ( ऐ. ब्रा. २. २५ ).

**शस्त्रांच्या शंसनारंभीं (प्रातःसवनांत) तूष्णींशंस नामक मंत्र पठणाचें कारण**.—देव व असुर यांच्या युद्धांत देव ज्या ज्या शस्त्रांचा उपयोग करीत त्या सर्वांचा असुर प्रतिकार करूं लागले परंतु तूष्णींशंस नामक वज्राचा त्यांना प्रतिकार करतां आला नाहीं ( ऐ. ब्रा. २. ३ ).

ब्राह्मणग्रंथातील अनेक वाद आपणांस शुष्क भासतील. वादांचें स्वरूप पाहिलें म्हणजे शुष्क गोष्टींवर ते होते यांत शंका नाहीं. पण कारणें मात्र शुष्क नव्हतीं. कारण पैशाच असतें, आणि तें लपविण्यासाठीं तत्त्वांची जोड होते. आपलें धंद्याचें स्वातंत्र्य स्थापन करणें, तें करण्यासाठीं विधींत फेरफार करणे आणि विधींतील त्या क्षुल्लक फेरफारांचें समर्थन करण्यासाटीं पांडित्य खर्च करणें इत्यादि क्रिया त्यांत दिसून येतात. ब्राह्मणग्रंथकालापासून आजच्या याजुषहौत्राच्या किंवा ऋग्वेदी कोंकणस्थांनीं हिरण्यकेशीसूत्रपरिग्रह करावयाच्या भांडणापर्यंत इतिहास तत्वतः एकच आहे. भिक्षुकीपासून प्राप्ती एका वर्गास व्हावी आणि ती दुसऱ्यापासून जावी हेंच मूळ कारण असतें.

श्रौतसंस्था वाढल्यानंतर जेव्हां स्थानिकांच्या देवतांचें प्राधान्य अधिकाधिक होत गेलें तेव्हां शिवविष्णूसारखीं दैवतें संहितांतून कशीं शिरलीं हें मैत्रायणी संहितेंतील उताऱ्यानें स्पष्ट होईल. श्रौतसंस्था जेव्हां अधिकाधिक संकुचित होऊं लागल्या तेव्हां पौराणिक देवतांसाठींच याग होऊं लागले याला विष्णुयागासारखीं स्मार्त यागांचीं उदाहरणें देतां येतील. अशा रीतीनें मांत्रसंस्कृतीचा पराजय व देश्यांच्या दैवतांची पुनः स्थापना झाली.

**सोमयागांच्या वृद्धीचा व संकोचाचा काल**.—मांत्रसंस्कृतींतील लोकांचा देश्यांशीं संपर्क होऊन मोठमोठे याग करण्याचा परिपाठ सुरू होऊन तो प्रकार पुन्हां बंद पडला. या क्रियेस किती काळ लागला असावा बरें ? आम्हांस अशी कल्पना होते कीं, ही सर्व चळवळ सैंदोनशें वर्षांतली असावी. दुसऱ्या पारिक्षित-जनमेजयाचा काळ म्हणजे श्रौत संस्थांचा शेवट असें धरलें तर एकंदर कालभाग येणेंप्रमाणें पडतील.

( १ ) दाशरथी रामचंद्राचा काळ.—कुरुयुद्धापूर्वी सुमारें सहासातशें वर्षें. या काळीं ब्राह्मण नव्हते, यज्ञसंस्था विकसित नव्हती व ऋग्वेदमंत्रांची रचना झाली नव्हती.

(२) दाशराज्ञ युद्ध काल.—या कालांत श्रौतसंस्था तयार नव्हत्या; दैनिक अग्निहोत्रांत सोमाचा उपयोग होत असावा. आजच्या ऋग्मंत्रांपैकीं बहुतकरून कोणतेहि तयार नसावे; अर्का, गायत्री, ऋषी हे वर्ग असावेत; ब्राह्मण व ब्रह्मपुत्र या दोन्ही शब्दांचा उपयोग सुरू असावा; सामुच्चयिक अग्न्युपासना मंत्रपुष्पासारखी असावी. हा काल दाशरथी रामचंद्रानंतर शें दोनशें वर्षांनीं असावा. या कालाच्या अंतिम भागांत भरत हे कुरुक्षेत्रीं जाऊन पोंचले.

(३) दाशराज्ञ युद्धांताच्या कालापासून पुढील तीनशें वर्षें. या कालामध्यें होते, अध्वर्यु व ब्रह्मे यांच्या स्वतंत्र हवनपरंपरा तयार झाल्या असाव्या, ऋषींचा लोप होत चालला असावा, आणि हे तिन्ही वर्ग ब्रम्हन् वर्गांतून बहुधा निघाले असावेत.

(४) चवथा काल म्हणजे सोमसंस्था तयार होण्याचा काल. या कालांत निरनिराळ्या तीन संप्रदायांचें एकीकरण होऊं लागलें असावें आणि देश्यांच्या आठवणी, इतिहास व देवता यांस श्रौतसंस्थांत स्थान मिळूं लागलें असावें. उदाहरणार्थ प्रजापतीची कल्पना, ही देखील मूळची सूतसंस्कृतींतील असून ती पुढें यज्ञसंस्थेंत शिरली या सुमारास ऋचा, सामें व यजुर्वाक्यें यांचें पृथक्करण होऊं लागलें असावें व तें पहिलें पृथक्करण होय.

(५) पांचवा काल म्हणजे सोमसंस्था विकासाचा काल. या कालात ब्राम्हणें पद्धतशीर होऊन संहितीकरणहि जास्त पद्धतशीर झालें. मात्र या वेळेस ऋग्वेदसंहिता आजच्या स्थितींत नव्हती. कुरुयुद्धाचा काल हाच असावा व व्यासाचा व संहितीकरणाचा संबंध याच कालांतील असावा.

(६) यज्ञसंस्थेच्या अंतिम विकासाचा व शाखाभेदाचा व संकोचाचा काल. हा कुरुयुद्धानंतर शंभर दीडशें वर्षांतला असावा.

(७) सातवा काल म्हटला म्हणजे श्रौतभिक्षुकी संपुष्टांत आली असतां अथर्व्यांस हांकलून त्रैविद्यांनीं ती आपली करून घेण्याचा काल म्हणजे सूत्रकाल. याच कालांत याज्ञिकीच्या धंद्याबाहेर ब्राम्हणवर्ग बराच असावा आणि त्याची वृत्ति आपल्याकडेच ओढण्याकरितां श्रौतजीवी मंडळींत धडपड चालू असावी. गृह्यसूत्रें करणें हें त्यांतीलच एक अंग होय. व ब्राम्हणांचा इतरजनांशीं आध्यात्मिक संबंध कमी कमी होत जाण्याचा काल हाच होय. या कालांत ब्राम्हणांमध्यें पंचवीसतीस पोटजाती-निदान पोटजातींचें स्वरूप ज्यापासून दूर नाहीं असे समुच्चय, तयार होण्याचा काल हाच होय. आजच्या सूत्रग्रंथांपैकीं मात्र त्यावेळेस कोणतेहि ग्रंथ अस्तित्वांत नसावे पण त्यांचीं पूर्वरूपें तयार असावींत.

(८) मनुस्मृतीचा काल आपण घेतला तर त्यावेळेस असें दिसून येतें कीं पंचवीस तीस निषिद्ध धंद्यांत ब्राह्मण होतेच व ब्राह्मणांमध्यें स्थानिक भेदाहि उत्पन्न होऊं लागले होते; ते देखील इतके कीं एखादा ब्राह्मण एका प्रदेशांतील असतांना अन्य प्रदेशांतील आहे असा त्याच्यावर कोणी आरोप केला असतां त्याची अब्रूनुकसानी होई. ब्राह्मण पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या अपत्याचें पद समाजांत अनिश्चित होतें यासंबंधाचें मनूचें वाक्य लटपटीचें आहे (स्त्रीष्वनंतर जातासु द्विजैरुत्पादितान् सुतान्। सदृशानेव तानाहुर्मातृदोषविगर्हितान्॥ मनु. १०.६). मिश्रविवाहाचे मुलगे बापासारखे खरे परंतु आईमुळें त्यांस दोष दिला जातो.

(९) ब्राह्मणांचें इतरांपासून वियुक्तत्व व जातींत इतरांचा अप्रवेश ह्या दोन्हीं यज्ञसंस्था मोडल्याबरोबरच झालीं. यज्ञसंस्था चालू असती तर त्या संस्थेमार्फत नवीनांस त्यांत शिरतां आलें असतें व ब्राह्मण हा धंदा राहिला असता. ब्राह्मण हा आपला धंदा टाकून इतर धंदा करूं लागला तरी देखील ब्राह्मण राहूं शकतो ही गोष्ट रमेशचंद्र दत्तासारख्यांनीं जातिभेद दुर्बल होता यास प्रमाण म्हणून दिली आहे. पण तीच गोष्ट जातिभेद बलवत्तर झाला होता असें दाखवितें. जेव्हां ब्राह्मण ब्राह्मणेतरास योग्य असा धंदा करूनहि तो ब्राह्मण राहूं शकतो तेव्हां ब्राह्मण हा धंदा नसून जात झाली असें समजावें. या प्रकारची स्थिति कुरुयुद्धाच्या अंतीच आली होती अशी गोष्ट द्रोणाचार्य व कृपाचार्य यांच्या उदाहरणावरून दिसते. आणि त्यानंतर नवीन ब्राह्मण होण्याची क्रिया जरी चालू होती- बाप अनिश्चित पण आई निश्चित असलेले म्हणजे क्षेत्रप्रधान असे आचार्य ज्यांत बरेच आहेत असा शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणांचा संघ स्थापन झाला व त्यास ब्राह्मणपदवीहि प्राप्त झाल्याचें दिसतें-तरी त्या ब्राह्मणांचा विवाहद्वारा प्रवेश जुन्या ब्राह्मणांत झाला नाहीं. जुने ब्राह्मण म्हणजे सर्वच रक्तानें शुद्ध असावेत असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं ऋग्वेदाचा ब्राह्मणकार ऐतरेय हा देखील इतरा नामक स्त्रीचा मुलगा म्हणजे क्षेत्रप्रधान आचार्य होता असें म्हणतां येईल.

त्या वेळेस यज्ञसंस्था चालवून उपजीविका करण्यासाठीं अनेकांस इकडे तिकडे हिंडावें लागत असे ही गोष्ट चरकाध्वर्यूवरून लक्षांत येते. व चरकांस उभे जाळावे म्हणून त्या वेळेस शुक्लयजुर्वेद्यांस वाटत होतें याचें कारण अर्थात भटक्या भिक्षुक एखाद्या सध्याच्या तैलंगी भटजीप्रमाणें येऊन दक्षणा उपटून जातो हेंच असावें. म्हणजे जातीस साधारणपणें इतरांपासून भिन्नता व त्यांच्यांतील शाखास एकमेकांपासून भिन्नता-म्हणजे शाखावार पोटजातीं-या कुरुयुद्धकालीन आहेत. आणि त्याच वेळेस प्रादेशिक भावना देखील उत्पन्न होऊन ब्राह्मणांमध्यें प्रादेशिक जाती पडण्यास प्रारंभ झाला होता असें मानण्यास हरकत नाहीं. म्हणजे ब्राम्हणांचें आज जें जातिस्वरूप आहे त्यांतील मुख्य स्वरूपें कुरुयुद्धकालीन आहेत आणि नतर ब्राम्हणांत जे अधिक भेद पडले ते कांहीं अंशीं पूर्वीच्याच कारणांच्या अधिक वृद्धीनें व पुढें शिवविष्णुउपासनेच्या भेदामुळें व कांहीं भेद नवीन मतें उत्पन्न झाल्यामुळें उद्भूत झाले आहेत (उदाहरणार्थ रामानुज, माध्व इत्यादि) आणि कांहीं केवळ लौकिक कारणामुळें उत्पन्न झाले आहेत. ब्राम्हणापैकीं पुष्कळ लोक कारकुनी वगैरे धंद्यांत पडले आणि ते इतरांपासून वेगळे झाले अशीं उदाहरणें तैलंगी लोकांतील नियोगी व गोवळकोंडा व्यापारी या जातींवरून देतां येतील.

(१०) सर्व हिंदुस्थानांतील ब्राह्मणांनीं एकत्र होऊन आपल्या जातीला कांहींतरी विशिष्ट शिस्त लागावी किंवा सर्वजनहिताकरितां आपली कांहीं तरी दृष्टि निश्चित ठेवावी अशा तऱ्हेची सामुच्चयिक भावना त्यांच्यांत कुरुयुद्धापासून आजपर्यंत कधीं दृष्टीस पडली नाहीं. ज्याप्रमाणें बौद्धांच्या संघांच्या सभा वारंवार होत व त्यावेळेस धार्मिक गोष्टींतील अवश्यानवश्य भाग ठरविण्यांत येई त्याप्रमाणें तडफड ब्राह्मणांनीं कधींच केली नाहीं. राष्ट्र उत्तम नैतिक स्थितींत रहावें याबद्दल ब्राह्मणांस सामुच्चयिक जबाबदारी कधींच वाटली नाहीं. बौद्धिक इतिहासांत ब्राम्हणजातीचें स्थान जरी मोठें आहे तरी पारमार्थिक व नैतिक इतिहासामध्यें ब्राह्मणजातीचें कार्य फारसें अभिमान बाळगण्याजोगें नाहीं. आपली उच्चता राहण्याकरितां देव बदलणें, आचार बदलणें, धार्मिक संस्था बदलणें, ऐतिहासिक ग्रंथ पूर्वीच्यापेक्षां अगदीं निराळे करून टाकणें, ब्राम्हणांच्या उच्चत्वाच्या कथा प्रसृत करणें याच्या पलीकडे निश्चयात्मक कामगिरी फारच थोडी झाली असावी. समाजातील प्रगतीची साधना ब्राह्मणांनीं फारशी केली नसावी. पण जेव्हां प्रगतीची दिशा निश्चित झाली तेव्हां आपल्या पांडित्यासह त्या प्रवाहांत पडून त्यांनीं आपलें तात्पुरतें लौकिक हित करून घेतलें. तथापि हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, राष्ट्रास एकस्वरूप देण्याच्या बाबतींत त्यांची कामगिरी मोठी झाली. हिंदुस्थानांत आर्यन्, मंगोलियन, द्राविड वगैरे अनेक रक्तें आहेत. तथापि इतक्या सर्व प्रकारच्या भिन्न लोकांनां एका परंपरेस चिकटाविलें ही कामगिरी लहान सहान नाहीं. लोकांच्या वन्य देवतांचे शिवविष्णूंशीं किंवा त्यांच्या कौटुंबिक देवतांशीं ऐक्य स्थापन करणें, त्यांच्या वन्यतऱ्हेच्या पूजनास थोडेसे पुराणोक्त स्वरूप देणें, ज्यांस वैदिक संस्कार मुळींच नाहींत, असा जो एकंदर सामान्यवर्ग त्यास आपण वैदिक संस्कारास अधिकारी आहों अशी समजूत करून देऊन वैदिक परंपरेस चिकटविणें, देशांतील अनेक भाग अपवित्र होते तेथें अनेक तीर्थें व पवित्र स्थानें निर्माण करून सर्व देश प्रवासास व वसाहतीस योग्य करणें, अनेक जातींनां आपली उत्पत्ति पुराणांत सांपडवून देऊन त्यांचा ब्राह्मणी ग्रंथांशीं संबंध जोडणें इत्यादि क्रिया लक्षांत घेतल्या असतां त्याचें सामुच्चयिक कार्य वैयक्तिक प्रेरणेनें जरी झालें असलें तरी तें आकारानें फार मोठें होतें हेंहि कबूल करावें लागेल.

---

## प्रकरण ७ वें.

### सूतसंस्कृति

दाशराज्ञ युद्धाच्या पूर्वी सर्व हिंदुस्थानची सामाजिक व सांस्कृतिक स्थिति काय असावी आणि मांत्रसंस्कृतीचा संहितीकरणकाळीं म्हणजे ब्राह्मणकाळीं सूतसंस्कृतीशीं कसा काय मिलाफ झाला या इतिहासभागाचें स्पष्टीकरण करणें आतां प्राप्त होतें. पुराणांतील राजावलींच्या याद्या

खऱ्या मानल्या तर दाशराज्ञयुद्धाचा म्हणजे सुदासाचा काल भारती युद्धापूर्वी अजमासें सहाशें वर्षे येतो. या सहाशें वर्षांमध्यें ऋग्वेदांतील अ.थ ग्रंथांची रचना झाली व यज्ञसंस्थेच्या विकासाच्या प्रारंभापासून त्याच्या जवळजवळ पूर्ण वाढीपर्यंत क्रिया होऊन गोत्र, मांत्रसंस्कृति व सूतसंस्कृति यांचें एकीकरण करण्याचाहि प्रयत्न झाला. या ब्राह्मण कालांतच ज्या अनेक राष्ट्रांचा उल्लेख आपणांस ग्रंथांत आढळून येतो तीं राष्ट्रें दाशराज्ञयुद्धपूर्वी असावीं असें मागें आम्हीं सांगितलेंच आहे आणि त्यांस कारणहि असें दिलें आहे कीं, पूर्वेकडील राष्ट्रें पश्चिमेकडील राष्ट्रांपेक्षां अधिक जुनीं असलीं पाहिजेत. आतां प्रश्न येतात ते असेः—( १ ) मंत्रपूर्व आर्यन् संस्कृतीचा विस्तार दक्षिणेकडे कोठपर्यंत झाला असावा. ( २ ) त्यांचें वाङ्मय कशा स्वरूपाचें असावें. ( ३ ) त्यांचीं दैवतें व मांत्रांचीं दैवतें यांत सादृश्य व फरक काय असावा. [४] ब्राह्मणास्तित्वाच्या पूर्वीचा हा काल असल्यामुळें त्यावेळीं भिक्षुकी ऊर्फ परमार्थोद्यमांत गुंतलेल्या वर्गाची स्थिति कशा प्रकारची असावी.

या चार प्रश्नांवर, उत्तरें साधारणपणें येणेंप्रमाणे देतां येतील.

वैदर्भी भीम याचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत(७.३४) आहे. यावरून वऱ्हाड पर्यंत आर्यनसंस्कृतीचे लोक आले होते हें उघड आहे. पूर्वेकडे आर्यन् लोकांचा प्रसार कितपत झाला होता याविषयीं निश्चयात्मक विधान करतां येत नाहीं भारती युद्धामध्यें थेट आरावानच्या डोंगरापर्यंत पसरलेलीं राष्ट्रें युद्धार्थ आलीं होतीं असें दिसतें परंतु त्यांची भाषाविषयक स्थिति कशी असावी, तीं राष्ट्रें आर्यन् वंशांतील होतीं अगर मंगोलियन वंशांतील होतीं हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. बिहारपर्यंतची वसाहत आर्य जातीचीच होती एवढें मात्र निश्चयानें सांगता येतें. कारण, पुरुषमेधात बळी म्हणून मागधाचा उल्लेख आहे आणि त्या मागधाचा संबंध विश्वामित्र सूक्तांतील कीकटांपैकीं प्रमगंदाशीं ( ऋ. ३.५३, १४) पोहोंचविता येतो हे पूर्वी दाखविलेंच आहे. म्हणजे मगधापर्यंत पूर्वेकडे निश्चितपणें आर्यन लोकांची वसाहत होती आणि दक्षिणेकडे आजच्या महाराष्ट्राच्या अंतिम दक्षिणभागाकडे नसली तरी वऱ्हाडपर्यंत होती हेंहि निश्चयानें सांगतां येतें.

सिंहलद्वीपांतील सिंहली लोकांची भाषा आर्यन् आहे. बुद्धानंतर एक दोन शतकांनी जरी संप्रदायप्रसारार्थ लोक गेले तरी स्थानिक भाषा आर्यन असून मागधी (पाली) पेक्षां भिन्न अशा स्वरूपात त्यास आढळली हें स्पष्ट आहे. तर ही वसाहत मंत्रपूर्व असावी कीं कुरुयुद्धोत्तर असावी याविषयीं निश्चयात्मक विधान करतां येत नाहीं. कुरुयुद्धपूर्व असावी असें समजण्यास एकच आधार आहे आणि तो हा कीं, वाल्मिकीरामायणकर्त्याच्या मतें जनस्थानाच्या दक्षिणेपासून कन्याकुमारीपर्यंतचा प्रदेश जरी भिन्न प्रकारच्या लोकांचा वसला असला तरी सिंहलद्वीपांतील संस्कृति आपल्या सदृश आहे अशी कल्पना झालेली दिसते. आणि उत्तरकालीं रावण हा आपल्या सदृशच होता ही कल्पना इतकी दृढ झाली कीं दंतकथांनीं त्यास वेदभाष्यकार बनविलें आहे. एळु ऊर्फ जुन्या सिंहली भाषेचें पृथक्करण करून एळु भाषा जरी आर्यन् ठरते तरी ती वेदभाषासंभव नाहीं हेंहि उघडच आहे तिचें वेदभाषेपासून व इतर भारतीय भाषेपासून इतकें भिन्नत्व स्थापित झालें आहे कीं, तिला चिकटी भाषा म्हणावें कीं प्रत्ययान्त भाषा म्हणावें याविषयींच संशोधकांस संशय उत्पन्न झाला होता. आर्यन् भाषा असून भारतीय अनेक भाषांपासून ज्याअर्थी सिंहली भाषा इतकी भिन्न आहे त्याअर्थी तिचा द्वीपकल्पीय तुटकपणा बरींच शतकें प्रस्थापित झाला असला पाहिजे आणि त्यावरून आम्ही असें म्हणतों कीं, दाशराज्ञयुद्धाच्या सुमारास देखील सिंहलद्वीप आर्यन् भाषानीं व्यापिला गेला असणें अशक्य नाहीं.

थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं आर्यन् भाषेत व्यापलेलें क्षेत्र आज जेवढें आहे तेवढेंच जवळ जवळ दाशराज्ञयुद्धकालीं म्हणजे वेदपूर्वकालीं असावें.

हें सर्व मंत्रपूर्व आर्यन् संस्कृतीच्या व्यापकतेसंबंधानें झालें. आतां दुसऱ्या प्रश्नाकडे लक्ष देऊं.

वाङ्मयाचें स्वरूप कसें असावें हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कारण वाङ्मयाचें विकृत झालेलें स्वरूप अनेक परंपरांतून उरलेलें आहे. इतिहासपुराणांचा उल्लेख तर वेदांतच आहे आणि शांखायनीय अश्वमेधाच्या वर्णनात त्याच्या प्रवचनाला व सर्पवेदाच्या प्रवचनाला व गंधर्ववेदाच्या प्रवचनाला दिवस तोडून दिलेले आहेत. महाभारतात ज्या अनेक कथा येऊन गेल्या आहेत त्यातील अनेक कथा प्राचीन म्हणून घातल्या आहेत. अशा कथात नैषध, हरिश्चंद्र, दाशरथीराम, सत्यवान-सावित्री, दुष्यन्त इत्यादि कथाचा उल्लेख करतां येईल. मान्धाता, अम्बरीष हेंहि प्राचीन राजर्षि सूतकथाचे नायक असावेत. परशुरामाच्या एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केल्याच्या कथेबद्दल निश्चित मत देतां येत नाहीं. कारण तींत ब्राह्मणी हात शिरल्याचा संशय येतो आविक्षितमरुत्त हा प्राचीन राजा म्हणून पुराणात वर्णिला आहे व ही गोष्ट तारीफ करण्याकरितां ब्राह्मणेंहि उचलतात, तो आविक्षितमरुत्तहि बराच वेदपूर्व असावा असें वाटतें. दाशरथी रामहि वेदपूर्वच असावा. त्याचा काल पुराणांतील याद्यांच्या प्रमाणें सुदासाच्या पूर्वी दोनएकशें वर्षें येतो. अर्थात रामकथेची तीन भिन्नभिन्न प्रकारची मांडणी आपणांस दृष्टीस पडते. जैन कथेंत सीता रावणाची मुलगी केली आहे तर बौद्धांनीं तिला रामाचीच बहिण केली आहे व रामरावणयुद्धाच्या प्रसंगादिकांविषयीं पूर्णपणें अपरिचितता दाखविली आहे.

एवंच आपणांस एवढेंच म्हणतां येईल कीं राजस्थानांतील भाटांनीं आपल्या राजांकरितां ज्याप्रमाणे कवनें केलीं त्याप्रमाणें प्राचीन काळींहि कवनें झालीं असावींत. आणि त्या

कवनांची भाषा आजच्या संस्कृतापेक्षां किंवा अत्यंत प्राचीन अशा प्राकृतापेक्षां भिन्न असावी.

**सूतसंस्कृतींतील लोकांचा उपासनासंप्रदाय.**—या विषयीं असें म्हणतां येईल कीं, शिवविष्णुपूजा तत्कालीं जवळ जवळ आजच्या स्वरूपांतच होती. यजुर्वेदीय संहिता व ब्राह्मणें यांचा काळ म्हणजे दोन्ही संस्कृतींच्या मिलाफाचा काळ. त्या काळांत शंकर, गिरिसुता व स्वामी कार्तिकेय यांनीं युक्त दाखविला आहे. विष्णूच्याबरोबर वैनतेयाचा उल्लेख असला तरी तो वैनतेय गरुडपक्षीच होता कीं नाहीं याविषयीं शंका आहे. ऋग्वेदांतील विष्णु व सूतसंस्कृतींतील विष्णु यांचें अत्यंत प्राचीन म्हणजे कदाचित् पर्शुभारतीय काळीं मूळ एक असेल परंतु क्रमानें परिवर्तन झालेलें वेदांत दिसत नसून एकाच नांवाचीं दोन भिन्न दैवतें उद्भूत झालेलीं दिसतात. महादेवाचें पूजन लिंगस्वरूपांतहि होत असावें. त्याशिवाय शिश्नदेवांचा उल्लेख इतक्या सरळपणानें स्पष्ट करतां येणार नाहीं.

सूतसंस्कृतीच्या लोकांत कांहीं मगानुयायी शकहि असावेत त्यांच्यामध्यें इन्द्र हा राक्षसच समजला जात होता.आणि इन्द्राला दुय्यम करून प्रजापतीला महत्त्व देणें ही यजुर्वेद कालीं जी क्रिया झालेली दृष्टीस पडते तिचें कारण इन्द्र ही देवता सर्व लोकांस मान्य नव्हती आणि सर्व लोकांस मान्य होईल अशी देवता पुढें सारावयाची होती हें होय. प्रजापति मंत्रांत फारसा येत नाहीं. तथापि प्रजापतिविषयक म्हणजे एक विशिष्ट पुरुषापासून सृष्टीची उत्पत्ति, अशा प्रकारच्या कल्पना सूतसंस्कृतीच्या लोकांमध्यें पूर्णपणें सिद्ध झाल्या होत्या आणि त्यामुळें प्रजापतीस महत्त्व बृहद्यज्ञसंस्थेच्या उत्पादकांनीं दिलें असावें असें दिसतें.यजुर्वेदीय प्रजापतीच्या कल्पनेचा ऋग्वेदीयदैवतेतिहासाशीं संबंध मुळींच लावतां येत नाहीं. (वेदविद्या पृ. २५२ पहा ). प्रजापतीचें अस्तित्व पुराणांनां कबूल आहे एवढेंच नव्हे तर बौद्ध जैनांनांहि कबूल आहे. वैश्रवण कुबेर ही देवताहि सूतसंस्कृतींतील असावी. दोन्ही परंपरांच्या एकीकरणाच्या प्रयत्नांत मुख्य देव स्थानिकांचा घेतला; शिवविष्णू हे स्थानिकांचे घेतले. ऋग्वेदांतील शिवस्वरूप जें विष्णु त्याचें आणि स्थानिकांच्या विश्वदेवतेचें ऐक्य कल्पिलें आणि रुद्राचें शिवाशीं ऐक्य स्वरूपलक्षण कल्पना करून स्थापन केलें, म्हणजे स्थानिकांच्या दैवतांनां प्राधान्य देऊन मंत्रांस व क्रियांस महत्त्व दिलें. अशा तऱ्हेनें दोहोंचें एकीकरण करण्यांत आलें आणि आपला श्रौतधर्म स्थानिकांस प्रिय करण्यासाठीं तो त्यांच्या वाडवडिलांचा धर्म आहे असें शुनःशेपसूक्तास हरिश्चंद्र जोडून देऊन सांगण्यांत आलें. आतां उपदैवतांसंबंधानें पाहतां अमरकोशांत सांगितलेल्या 'विद्याधराप्सरे यक्षरक्षोगंधर्वकिन्नराः पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोमी देवयोनयः' इत्यादि देवयोनींसंबंधीं असें म्हणतां येईल कीं, रक्षोगंधर्वांसह सर्व देवयोनी सूतसंस्कृतीच्या लोकांस मान्य असाव्या परंतु मांत्रसंस्कृतीच्या लोकांस फक्त रक्षोगंधर्व एवढेच मान्य असावे व इतर मान्य नसावेत. पण मांत्रसंस्कृतीस मान्य असलेले साध्य व ऋभु हे सूतसंस्कृतींत आढळत नाहींत व पुढें ते नापत्ताच झाले. रक्षोगंधर्व दोघांसहि मान्य असल्यामुळें त्यांच्या कथा पुढेंहि आढळतात.

**सूतसंस्कृतींत परमार्थोद्यमांत गुंतलेले लोक.**—या उद्योगांत कोण गढलेले असावेत हें आपण आतां पाहूं. यति व मुनि यांस बौद्ध व जैन या दोन्ही ग्रंथाच्या पूर्वी परंपरांत स्थान आहे. संयमन करणें आणि विचार करणें या दोन्ही क्रियांस महत्त्व सूतसंस्कृतीच्या लोकांत होतें त्याचप्रमाणें मांत्रसंस्कृतीच्या लोकांतहि होतें. पण ऋषींचें अस्तित्व सूतसंस्कृतीच्या लोकांत असावें किंवा नसावें याविषयीं शंका आहे. ऋषींचें आद्य कार्य कोणतें, ऋषि शब्दाचा मूळ अर्थ कोणता याविषयीं अजून अस्पष्टता आहे. रा. राजवाडे ऋषि व इंग्रजी शब्द रश् यांचा संबंध असावा असें समजतात. आणि ईश्वरी प्रेरणा होऊन किंवा अंगांत येऊन बोलूं लागणारा किंवा सैरावैरा धांवणारा किंवा काव्य करणारा जो तो ऋषि, असा ऋषि या शब्दाचा अर्थ मांडतात. ईश्वरी प्रेरणा होऊन बोलणें याचें महत्त्व भारतीय भूमीवर फारसें रुजलेलें दिसत नाहीं. ईश्वरी प्रेरणेनें बोलण्याचा बाणा करणारे लोक सेमेटिक लोकांत दिसतात. झरथुष्ट्रहि त्याच प्रकारचा मनुष्य समजण्यास हरकत नाहीं. परंतु त्याप्रकारच्या व्यक्तींचें अस्तित्व आपल्याकडे फारसें दिसत नाहीं. ऋग्वेदांतील बरींचशीं सूक्तें जरी तपासलीं तरी प्राफेटाचे उर्फ प्रवक्त्यांचे उद्गार या पदवीला शोभतील अशीं फारच थोडकीं आहेत. जीं सूक्तें परमार्थसाधनपर म्हणतां येतील तीं स्तोत्रें अगर याजक सूक्तें आहेत म्हणजे यज्ञ चालला असतां त्यास मदत करणारीं म्हणून आहेत. आमची अशी कल्पना होते कीं सूतसंस्कृतीच्या लोकांत अग्नियजनधर्म हा थोडाबहुत असावा. परंतु तो जवळजवळ संपुष्टांत येत चालला असावा. आणि पंजाबांतील यदुतुर्वशांत तो सुदास दिवोदासांच्या अनुयायांच्या बरोबरीनें असावा. परंतु गंगेच्या पूर्वेस अग्नियजनास फारसें प्राधान्यच नसावें. त्याचें थोडेंबहुत महत्त्व मगांच्या वंशजांनीं जिवंत ठेवलें असावें व कदाचित ते लोक अथर्वविद्या आचरीत असावे. तथापि तो अजिबात नष्ट झाला असावा असेंहि म्हणतां येत नाहीं. कांकीं तो जर अजीबात नष्ट झाला असता तर मांत्रसंस्कृतीच्या लोकांस प्रजापतीस महत्त्व देऊन आपला यजुर्वेदीय ब्राह्मणधर्म तिकडे वाढवितां आला नसता. मुनि व यति यांचें प्राधान्य पुढें आरण्यकीय धर्मांत विकास पावलें असावें. आरण्यकीय धर्मसंबंध जितका मंत्रब्राह्मणपरंपरेशीं जोडतां येईल किंबहुना तितकाच इतिहासपुराणपरंपरेशींहि जोडतां येईल. असेंहि म्हणतां येईल कीं आरण्यकीय धर्म हा देश्य संस्कृतीचें पुनरुज्जीवन व मांत्रसंस्कृतीचा विनाश दाखवितो. या सूतसंस्कृतीपासूनच आरण्यकीय धर्म उत्पन्न होऊन तो देशभर विस्तारला व जैन बौद्धधर्मांचीं मुळेंहि त्यांतूनच निघालीं.

**आर्ष ग्रंथांतील वंशावळींचें महत्त्व**—प्राचीन भारतीय कालखंडांची व्यवस्थित जुळणी करावयाची झाल्यास या आर्ष ग्रंथांतून आढळणाऱ्या वंशावळ्यांसंबंधाची अर्धवट ऐतिहासिक माहिती नीट तपासून तिचें वर्गीकरण केलें पाहिजे. पारगिटरनें या प्रकारचा प्रयत्न केला आहे. त्याचें असें मत आहे कीं प्राचीन आर्षकालांत थोडी फार खरी इतिहासपरंपरा असून ती संशोधकास इतिहासार्थ तपासण्यास सर्वथैव योग्य आहे. सर्वच ठिकाणचा प्राचीन इतिहास नुसत्या बड्या लोकांनीं आणि त्यांच्या वैयक्तिक कृत्यांनीं भरलेला असतो या नियमानुसार प्राचीन भारतीय इतिहास संस्कृत ग्रंथाधारें पाहूं लागल्यास, वरील गोष्टीच त्यांत आढळून येणार आहेत.

या देशांत प्राचीनकाळीं राजे व ब्राह्मण ( ऋषि,आचार्य ) असे दोन श्रेष्ठ लोकांचे वर्ग असत. या दोघांच्या वंशेतिहासांत बराच फरक दृष्टोत्पत्तीस येतो. राजाच्या जीवनक्रमाचें स्वरूप त्याचें कुटुंब, राज्य व राजधानी यांनीं निश्चित होई पण ऋषींचा जीवितेतिहास स्वतंत्र असे. राजाला कुलमहत्त्व असून, पूर्वजांचा तो अभिमान बाळगी. तसें ऋषीचें नसे; त्याला गोत्रनामाखेरीज कुलपरंपरा फारशी माहीत नसे. राजाला आपलें कुल व राज्य स्वपराक्रमानें वाढवून आपल्या पुत्राच्या हातीं देऊं अशी आशा बाळगण्याला जागा असे. ऋषि पवित्रज्ञान व तपःप्रभाव संपादन करून शिष्याला तें सर्व अर्पण करी. राजाला कुलाची फार महती वाटे; प्रत्येक राजा प्रादेशिक व वांशिक इतिहासशृंखलेचा स्वकुलांतील एक दुवा असे. ऋषीला पवित्र विद्येची महति वाटे व या विद्येची परंपरा भरभराटीनें चालविण्याच्या कार्यांत प्रत्येक ऋषि अगर आचार्य एक दुवा असे. अशा तऱ्हेचें स्वरूप आजच्या पुराणग्रंथांत सांपडतें.

क्षत्रियेतिहासांत वंशावळीची माहिती आणि राजांच्या पराक्रमांच्या गोष्टी वरील कारणामुळें महत्त्वाच्या होऊन बसल्या; पण ब्राह्मणांत वंशावळींनां अर्थातच प्राधान्य मिळालें नाहीं. राजवंशावळी अनेक इतिहासपुराणांतून दिलेल्या आहेत. पण ब्राह्मणवंशावळींचा मात्र फारच क्वचित ठिकाणीं मागमूस लागतो व तेथें गुरुशिष्यपरंपरेची महति असे. सूर्यवंश सोमवंश, यादववंश यासारख्या वंशांच्या पन्नासाच्या वर पिढ्या अवगत आहेत. पण कोणत्याहि ऋषिकुलांतील पुरत्या पांच सहा लगतच्या पिढ्यांचीहि माहिती उपलब्ध नाहीं. राजवंशांची नोंद ऋषींच्याकडे नसून दरबारी भाटांकडे किंवा पुरोहिताकडे असावी क्षत्रियवाङ्मय किंवा सूतवाङ्मय ब्राह्मणीवाङ्मयापासून अगदीं स्वतंत्र म्हणजे मंत्रवाङ्मयापसून वाढत गेलें आणि जेव्हां तें अवाढव्य बनून लोकादरास पात्र झालें तेव्हां कोठें ब्राह्मणांनीं ज्ञानाची एक शाखा म्हणून त्याचें ग्रहण केलें व यज्ञसंस्थेंतहि त्यास स्थान दिलें हें शांखायन ब्राह्मणांतील मागें दिलेल्या उताऱ्यावरून लक्षांत येईल. सूतवाङ्मय ब्राम्हणांनीं ग्रहण करून ब्राम्हणी कल्पनेप्रमाणें त्याची व्यवस्था लावून कथाप्रवचनांनीं तें समृद्ध केलें.

आपली वंशावळ आणि विक्रम आपल्यामागेंहि लोकांच्या स्मरणांत रहावा ही राजाची इच्छा भाट व राजपुरोहित पुरी करीत असत. प्रसिद्ध राजांच्या कथा व कवनें यांची लोकांत विशेष आवड उत्पन्न होऊन समाजांतल्या एका वर्गानें जुन्या कथा व वंशावळी यांचा अभ्यास करण्याचा क्रम ठेवला. हे "पुराविद्" "पुराणज्ञ" "पौराणिक" "वंशविद्" "वंशपुराणज्ञ" या शब्दावरून उघड होतें. "द्विज" "विप्र" आणि "जन" असे शब्द वरील शब्दांनां जोडलेले आढळतात. यावरून या वर्गांत ब्राम्हण व ब्राम्हणेतर दोघेहि असावेत. "इत्यनुशुश्रुमः" "इतिश्रुतम्" "उदाहरन्ति" अशा वाक्यांतून हा वर्ग किंवा लौकिकपरंपरा उल्लेखिलेली दिसते.

तेव्हां या वंशावळी व तदनुषंगिक कथा काल्पित म्हणून टाकाऊ आहेत असेंच समजण्याचें कारण नाहीं. या कथांत बरीच खरी इतिहासपरंपरा आहे. क्षत्रियदृष्टीनें प्राचीन भरतखंडाकडे पाहण्यास हें महत्त्वाचें साधन आहे. त्या काळीं क्षत्रियवर्गानें फारच महत्त्वाची कामगिरी केली असल्यानें तज्जन्य वाङ्मयाकडे दुर्लक्ष करणें इतिसाच्या पूर्णज्ञानास कमीपणा आणील. प्राचीन भरतखंडांत इतिहासकल्पना नाहीं हा आक्षेप ब्राह्मणीवाङ्मयाबाबतींत सर्वथैव खरा नाहीं. त्याकाळाला अनुरूप अशी इतिहासदृष्टि क्षत्रियांनीं प्रकट केली आहे. बाबिलोन आणि इजिप्तप्रमाणें या ठिकाणीं त्यांचे शिलालेख किंवा मृण्मयफलक नसले तरी पुराणें आणि महाकाव्यें यांतून त्यांच्या कृती ग्रथित केल्या आहेत.

याखेरीज दुसरी एक लक्ष्यांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे, ब्राम्हणी वाङ्मयांत ज्यांची प्रशंसा केलेली आढळते ते राजे क्षत्रिय वाङ्मयांत फारसे किंवा कांहीं ठिकाणीं मुळींच प्रशंसिले नाहींत. मान्धातृ(ऋ. १०.१३४ हें सूक्त याचे आहे. )यौवनाश्व आणि कौरवपांडवामधील युद्धापूर्वी अजमासे एक शतक होऊन गेलेला देवापि यांच्यामधील काळांत ऋग्वेदसूक्तें तयार झालीं. या मोठ्या काळांत अर्जुन, मरुत्त, सगर, भरत, भगीरथ, अंबरीष, दुसरा दिलीप आणि राम यांसारखे महान् विख्यात्, व या शिवाय हरिश्चंद्र, अलर्क, अजमीढ, कुरु, ब्रम्हदत्त इत्यादि राजे होऊन गेले असतांना भरत(६.१४,४),अजमीढ[४.४४,६] व कदाचित् राम(१.१३, १४ ) खेरीज करून वरील कोणत्याहि राजांचा उल्लेख ऋग्वेदसूक्तांत नाहीं. या राजांच्या वेळीं कोणीहि कवि नसेल असा तर्क करणें बरोबर नाहीं. आतां याच्या उलट पाहिलें असतां दिवोदास, सुदास यांच्या सारखे राजे व इतर राजे जे सूक्तांत प्रशंसिले आहेत. त्यांचें वर्णन सूतवाङ्मयांत आढळत नाहीं. यावरून पारगिटर अशी कल्पना करतो कीं एकतर आपल्या स्वतःचा किंवा आपल्या मोठ्या सैन्याचा ज्यांनां पूर्ण भरंवसा असे अशा खरोखरीच विख्यात राजांनां ऋषींकडून

मिळणाऱ्या खऱ्याखोट्या दैवी मदतीची पर्वा नसावी, किंवा ब्राह्मणांचे यज्ञविधी त्यावेळीं चांगल्या परिणत अवस्थेप्रत पोचले नसावेत; आणि दुसरें, भरतवंशातील राजे व सुदासदिवोदास हे राजे या सारख्या कमी बलिष्ठ पण धार्मिक मध्यदेशीय राजांतर्फे ऋषींना आपलें पारमार्थिक वर्चस्व स्थापिलें असावें व म्हणून त्या प्रदेशाला विशेष पावित्र्य व महत्त्व दिलें गेलें असावें.

वरील परिस्थितीचें स्पष्टीकरण पारगिटरने केलें आहे त्यापेक्षां आमचें स्पष्टीकरण निराळें आहे. ऋग्मंत्र आणि पुराणें हीं एकाच उपसंस्कृतीचीं वाङ्मयें न समजतां आम्ही दोन भिन्न संस्कृतींचीं समजतों. मांत्रसंस्कृतीच्या लोकांमध्यें सूतांचा वर्ग महत्त्वाचा नव्हता व देश्य आर्यन् संस्कृतीमध्यें यज्ञसंस्था मुळींच वाढली नव्हती आणि यज्ञविषयक स्तोत्रें व यजन करणारा वर्ग देश्य आर्यन् लोकांत नव्हता. तो त्यांत असता तर त्यांचे कांहीं विधी यज्ञसंस्थेंत शिरले असते. पौराणिक राजांच्या अनुल्लेखाचें कारण असें होतें कीं ज्या प्रसिद्ध राजांचीं नांवें पुराणांत आलीं आहेत त्यांची वैदिक कवींस माहितीच नव्हती. कारण गंगेच्या पूर्वेकडील प्रदेशांतील जुन्या राजांचीं नांवें नुकत्याच पंजाबपर्यंत पोंचलेल्या मंत्रकर्त्यांस कशीं ठाऊक असणार. देश्य आणि मांत्र संस्कृतीचें एकीकरण कुरुक्षेत्रांत झालें असावें. येथेंच, यज्ञ विकसित झाले; यज्ञसमर्थनार्थ पुराणांचा उपयोग होऊं लागला; देश्य लोकांचा जो एकंदर आयुष्यक्रम होता त्याचीं अंगें यज्ञसंस्थेंत शिरलीं ? त्यामुळें यज्ञसंस्था एकदम मृत न होतां मरण्यापूर्वीं बरीच मनोरम होऊं लागली होती.

**यज्ञामध्यें इतिहास–पुराणांचें महत्त्व.—** ब्राह्मणी वाङ्मयांत किंवा चळवळींत इतिहास भाग अजीबात वगळला होता असें नाहीं. शांखायन-सूत्रांतून घेतलेला खालील उतारा, आपण ज्यास वेद म्हणतों त्या खेरीज असलेल्या वाङ्मयावर कांहींसा प्रकाश पाडतो. हीच हकीकत आश्वलायन सूत्रांत ( १०.७ ) व शतपथ ब्राह्मणांत ( १३. ३, १, १ ) दिलेली आहे. "अश्वमेधाच्या वेळीं, अध्वर्यु गायकांना पाचारण करतो व ते वीण्यावर गातात, आणि तो त्यांनां राजाची स्तुति करावयास सांगतो. नंतर तो राजा इतर जुन्या सद्गुणी राजांसमवेत यज्ञ करतो. यज्ञाच्या पहिल्या दिवशीं अध्वर्यु मनुवैवस्वतापासून आरंभ होणारी गोष्ट निवेदन करतो. ज्या अर्थी मनूचे लोक मनुष्य होते व यज्ञाला मनुष्य हजर आहेत त्या अर्थी ही गोष्ट सांगून अध्वर्यु हा गृहमेध्यांनां ( कुटुंबी लोकांनां ) उपदेश करतो. नंतर तो सांगतो कीं, 'ऋक्–गीतें वेद आहे. हा वेद आहेत; ' आणि एक सूक्त म्हणतो." दुसऱ्या दिवशीं यमवैवस्वतापासून आरंभ होणारी गोष्ट तो सांगतो. ज्या अर्थी यमाचे लोक पितर होते आणि पितर येथें हजर आहेत म्हणून तो वृद्धमाणसांनां ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' यजुर्वेद वेद आहे, हा वेद आहे ' आणि यजूंच्या एका अनुवाकाचें पठण करतो. तिसऱ्या दिवशीं वरुणआदित्यापासून आरंभ होणारी गोष्ट तो सांगतो. ज्या अर्थी वरुणाचे लोक गंधर्व होते आणि ज्या अर्थी ते हजर आहेत त्या अर्थी तो शोभिवन्त तरुणांनां ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' अथर्ववेद वेद आहे; हा वेद आहे. ' नंतर तो भेषजाचें पठण करतो. चवथ्या दिवशीं तो सोमवैष्णवापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो. ज्या अर्थी सोमाचे लोक अप्सरा होत्या आणि त्या हजर आहेत म्हणून तो शोभिवन्त तरुणींनां ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' आंगिरसवेद वेद आहे; हा वेद आहे; ' आणि त्या नंतर तो घोराचें पठण करतो. पांचव्या दिवशीं तो अर्बुदकाद्रवेयापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो. ज्या अर्थी अर्बुदाचे लोक सर्प होते आणि ज्या अर्थी ते हजर आहेत म्हणून तो सर्पांनां किंवा सर्पविदांनां ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' सर्पविद्या वेद आहे; हा वेद आहे; ' आणि सर्प विद्येचें पठण करतो. सहाव्या दिवशीं तो कुबेर वैश्रवणापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो. ज्या अर्थी कुबेराचे लोक राक्षस होते, आणि ते हजर आहेत म्हणून तो सेलगांना किंवा पापकृतांनां ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' रक्षोविद्या वेद आहे; हा वेद आहे ' आणि तो रक्षोविद्या पठण करतो. सातव्या दिवशीं तो असितधान्वनापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो. ज्या अर्थी त्याचे लोक असुर होते आणि ते हजर आहेत म्हणून तो कुसीदिनांनां ( किंवा व्याजखाऊंनां ? ) ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' असुरविद्या वेद आहे; हा वेद आहे; ' आणि एक हातचलाखीचा खेळ करून दाखवितो. " आठव्या दिवशीं तो मत्स्य सांमदापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो. ज्या अर्थी त्याचे लोक जलचर होते आणि ते या ठिकाणीं हजर आहेत त्या अर्थी तो मत्स्यांनां किंवा धीवरांनां ही गोष्ट सांगून उपदेशितो. नंतर तो म्हणतो कीं, ' इतिहासवेद वेद आहे, हा वेद आहे ' आणि तो एका इतिहासाचें पठण करतो. नवव्या दिवशीं तो तार्क्ष्य वैपश्चितापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो ज्याअर्थी त्याचे लोक पक्षी होते आणि ते हजर आहेत, म्हणून तो पक्ष्यांनां किंवा ब्रह्मचाऱ्यांनां ही गोष्ट सांगून उपदेशतो. नंतर तो म्हणतो कीं, ' पुराण–वेद हा वेद आहे, हा वेद आहे'; आणि त्या नंतर तो पुराणांतील कांहीं भाग पठण करतो. दहाव्या दिवशीं तो धर्म इंद्रापासून आरंभ होणारी गोष्ट सांगतो. ज्याअर्थी त्याचे लोक देव होते आणि ते हजर आहेत त्याअर्थी तो तरुण व अप्रतिग्राहक अशा श्रोत्रियांनां ही गोष्ट सांगून उपदेशतो. नंतर तो म्हणतो कीं, 'सामवेद वेद आहे, हा वेद आहे' आणि सामगायन करतो. ( शांखा. श्रौ. सू. १६.१ ) "

प्रस्तुत उतारा आपणांस अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे.

इतिहासपुराणें यांसहि पांचवा वेद म्हणण्याचें शास्त्रीय कारण काय ? तर यज्ञ करण्यामध्यें त्यांचाहि उपयोग होता. वेदविद्या म्हणजे यज्ञ करणाऱ्या लोकांची विद्या. तर जें वाङ्मय यज्ञांत म्हटलें जाई तेंहि वेदविद्येचा भाग होय.

अध्वर्यु जुन्या गोष्टींचें निवेदन करतो असें यांत सांगितलें आहे. याचा अर्थ काय ? अध्वर्यु सूतवाङ्मयाचा अभिमानी होता काय ? कीं सूतवाङ्मय आणि देश्यसंस्कृति यांचा आणि मांत्रसंस्कृति आणि यज्ञसंस्था यांमधील दुवा होता आणि यज्ञ, इतिहास व पुराण हें वाङ्मय समाविष्ट करून त्यानें यज्ञसंस्था अधिक लोकप्रिय केली ? वरील उताऱ्यांत आणखी एक गोष्ट दृष्टीस पडते कीं संहितीकरणाचा प्रयत्न होत असता हौत्र, आध्वर्यव, औद्गात्र आणि ब्रह्मत्व यांचाच वेदांत समावेश करण्याचें ठरण्यापूर्वी वाङ्मयाचें वर्गीकरण व सामुच्चयिक कल्पना हीं निराळ्या तऱ्हेचीं होतीं. ऋग्गीतें, युजर्वेद, अथर्ववेद, आंगिरसवेद, सर्पविद्या, रक्षोविद्या, असुरविद्या, इतिहासपुराण व सामवेद हें या वर्गीकरणावरून दिसून येईल.

सर्प राक्षस आणि असुर हीं तीन राष्ट्रें महत्त्वाचीं असून त्यांची विद्या कांहीं विशेष होती आणि इतिहास पुराणाप्रमाणें त्या विद्येचाहि समावेश यज्ञसंस्थेंत करून घ्यावा असा अध्वर्यूंचा प्रयत्न असावा. या तीन राष्ट्रांचा इतिहास कांहीं अंशीं त्या वेळेस ठाऊक असून त्याचें उच्चारण अश्वमेध कालीं करावें अशी खटपट ते करीत होते असें दिसतें. सर्पराष्ट्राचा इतिहास अर्बुद काद्रवेयापासून परिचित होता; राक्षसाचा इतिहास कुबेर वैश्रवणापासून परिचित होता आणि असुरांचा इतिहास असितधान्वनापासून परिचित होता.

इतिहास म्हणून जें वाङ्मय त्याकाळीं होतें तें विशेषेंकरून धीवरांनां सांगितलें आहे. मत्स्य म्हणजे धीवरांचें राष्ट्र त्याचा इतिहास सामदापासून पुढें आहे अशी मत्स्य राष्ट्राची कल्पना होती.

पक्षी म्हणजे ब्रह्मचारी म्हणून स्पष्टीकरण करून त्यांचा इतिहास तार्क्ष्य वैपश्चितापासून धरला आहे. आणि त्यांचा पुराणवेद हा वेद म्हणून सांगितलें आहे.

याचा अर्थ असा दिसतो कीं, त्रयीशिवाय जें इतर ज्ञान शांखायनब्राह्मणांत उल्लेखिलें आहे तें सर्प, राक्षस, असुर व मत्स्य या राष्ट्रांचें परंपरागत ज्ञान तसेंच पुराण नांवाचें ब्रह्मचारी वर्गाचें ज्ञान होय.

सर्प, राक्षस आणि असुर या राष्ट्रांचें ज्ञान कोठें गेलें असावें असा प्रश्न उपस्थित होतो. अशी कल्पना करतां येईल कीं कांहीं वेदोत्तर सूत्रवाङ्मयांत आणि पुराणांत तें समाविष्ट झालें असावें.

**इतिहास.**— 'एक प्रकारचें वाङ्मय' ह्या अर्थी हा शब्द पुराण ह्या शब्दाबरोबर वैदिक कालांत जे ग्रंथ लिहिले गेले त्यांत योजिला आहे. अथर्व वेदाच्या पंधराव्या काण्डांत ह्या दोन्हीं शब्दांचा उल्लेख आहे. त्यानंतर इतिहास हा शब्द शतपथब्राह्मण, जैमिनीय, ब्राह्मण व बृहदारण्यक आणि छांदोग्य या उपनिषदांत आलेला आहे. छांदोग्य उपनिषदांत इतिहास आणि पुराण मिळून पांचवा वेद आणि शांखायन श्रौतसूत्र ( १६. २; २१. २७ ) ह्यांत इतिहास एक वेद आणि पुराण एक वेद असें मानिलें आहे. गोपथब्राह्मणांत ( १. १० ) देखील इतिहास-वेद आणि पुराण-वेद असा उल्लेख आहे परंतु शतपथांत ( १३. ४, ३, १२ ) इतिहास आणि पुराण मिळून वेद होय असें प्रतिपादन केलें आहे. आणि त्याच ग्रंथांतील एका उताऱ्यांत ( ११. १, ६, ९ ) अन्वाख्यान आणि इतिहास हे निरनिराळ्या प्रकारचे ग्रंथ आहेत असा उल्लेख आहे. परंतु त्यांतील भेद कोणता याचा खुलासा नाहीं. बहुतकरून पहिला पूरक असावा. तैत्तिरीय आरण्यकांत ( २. ९ ) इतिहास आणि पुराण ह्यांचा अनेवकचनी उपयोग केला आहे. वैदिक वाङ्मयांत पुराण आणि इतिहास यांत काय फरक आहे याबद्दल स्पष्ट पुरावा दिसत नाहीं आणि भाष्यकारांचें वाङ्मय देखील(सीजनें संशोधिलेलें—सायणांनीं लिहिलेला ऋग्वेदाचा उपोद्घात आणि शतपथब्राह्मणावरील [ ९. ५, ६, ८ ] भाष्य-हें) अनुकूल असा निकाल देत नाहीं. गेल्डनेर म्हणतो कीं, इतिहास-पुराण म्हणजे त्यांत सर्व प्रकारच्या दंतकथा उदाहरणार्थ शौर्याच्या, सृष्ट्युत्पत्तीच्या, वंशवर्णनाच्या वगैरे आहेत असा हा एक ग्रंथ आहे. परंतु इतिहास आणि पुराण हे निरनिराळे ग्रंथ आहेत असें पतंजलीचें मत होतें ( पाणिनी वरील वार्तिक ४. २, ६० आणि महाभाष्य २. २,४ ). तथापि यास्काला असा ग्रंथ आहे हें मुळींच माहीत नव्हतें ह्या विधानावरून गेल्डनरची चूक सिद्ध होते. त्याचें मत असें आहे कीं, इतिहास हा मंत्रवाङ्मयाचा ( निरुक्त ४. ६ ) भाग असावा आणि ऐतिहासिक हे लोक असून ज्याठिकाणीं दुसरे लोक ऋग्वेदाला काल्पनिक समजतात त्याठिकाणीं हे त्या दंतकथा आहेत असें समजतात. यास्क हा निरुक्तांतील बहुतेक उताऱ्यांस इतिहास पुराण असें न म्हणतां फक्त इतिहास असेंच म्हणतो. या वरून हें सिद्ध होतें कीं, इतिहास पुराण म्हणून एखादा ग्रंथ असा कांहीं नव्हता.

इतिहासाचा आख्यानाशीं काय संबंध आहे हें निश्चित सांगतां येत नाहीं. सीज म्हणतो कीं, इतिहास आणि पुराण हे शब्द पुराणदंतकथा, इतिहास आणि सृष्ट्युत्पत्तीसंबंधीं दंतकथा ज्या वैदिक कवींनां माहीत होत्या त्यानांच फक्त लावितात आणि ह्यालाच साधारणपणें पांचवा वेद (पूर्णपणें नाहीं)असें म्हणतात. तर अशा रीतीनें अन्वाख्यान, अनुव्याख्यान आणि व्याख्यान ह्यांचा जन्म झाला. आणि ह्या परंपरेच्या बाहेरहि आख्यानें असूं शकतील. तसाच आख्यान हा इतिहासपुराण ह्याचाहि भाग असूं शकेल. तो आणखी असेंहि सुचवितो कीं आख्यान या शब्दाचा गोष्टींची

मांडणी ह्याकडेहि संबंध आहे. ओल्डेनवर्ग, वुइंडिश्, गेल्डनेर, आणि सीज व इतर कांहीं म्हणतात कीं, आख्यान म्हणजे गद्यपद्यांचा समुच्चय. मुख्य भाग असला म्हणजे विकारांनां किंवा भावनांनां जास्त जोर देण्याकरितां पद्यरूप आणि दुय्यम अथवा गौण असला म्हणजे गद्यरूप अशी योजना करावयाची.

ह्या विचारसरणीवर हर्टेल व व्हॉन श्रोडरयांनीं कडक टीका केली आहे. ज्याचा गद्य भाग नाहींसा झाला असला तरी ज्यांत ओल्डेनबर्गला वाङ्मयात्मक ज्ञानाचे नमुने आढळत त्या ऋग्वेदांतील आख्यानसूक्तांत वरील विद्वानांनां मॅक्समुलर व लेव्ही यांच्या जुन्या कल्पनांप्रमाणें धार्मिक नाटकांचे अवशेष सांपडतात. दुसरे असें म्हणतात कीं प्रस्तुत सूक्तें म्हणजे फक्त वाङमयात्मक संभाषणें होत.

इतिहासपुराणांचा उल्लेख सर्व मंत्रवाङ्मयामध्यें व्रात्यस्तोमकाण्डाशिवाय इतर कोठेंहि नसावा ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आणि ब्राह्मणवाङ्मयांत देखील त्याचें स्वरूप असें दिसतें कीं, इतिहासपुराण हें ज्ञान इतकें मोठें आहे कीं त्याचा पांचवा वेद मानावा. अर्थात ब्राह्मणवाङ्मय इतिहासपुराणांचें ज्ञान गृहीत धरतें आणि त्यास घालावें कोठें याची चर्चा करीत बसतें. ब्राह्मणांतील किंवा वेदांतील उल्लेखांचे तंतू जमा होऊन त्यांचें इतिहासपुराणरूपी पटल बनलें ही गोष्ट फारशी संभवनीय नाहीं. ब्राह्मणवाङ्मयांतील अर्थवादामध्यें जो इतिहासपुराणभाग आलेला आहे त्या पैकीं बराचसा दुसऱ्या विभागांतील एका प्रकरणांत दिलाच आहे. त्याचें स्वरूप असें दिसतें कीं तो पुराणरूपी वाङ्मयास प्रेरक नसून अस्तित्वांत असलेल्या इतिहासपुराणवाङ्मयामुळें तयार झालेल्या मनाला यज्ञसंस्था इतिहास पुराणाशीं संबद्ध आहे असें भासविण्याचा प्रयत्न करीत आहे. यज्ञपुरुषाचें विष्णूशीं ऐक्य दाखविण्यांत विष्णूचें महत्त्व आधींच वाढलें होतें याची कबूली येत नाहीं काय? इतिहासपुराणाची आणि वैदिक वाङ्मयाची लठ्ठालठ्ठी, वेदांच्या अभिमानेंकरून इतिहासपुराणास पांचवा वेद मानण्यामध्यें दिसून येणारी मान्यता दाखवावी लागली ही गोष्ट पुराणांचें ब्राह्मणांहून बरेंचसें प्राचीनत्व सिद्ध करिते. पुराणांचा आपण एकंदर वृतान्त पाहिला तर त्यांत पंजाबकडच्या खळबळी फारशा येतच नाहींत. पाण्डवांचे पैतृक देश उत्तरकुरु आणि उत्तरमद्र हे जे मानण्यांत येतात, त्यावरून अशी कल्पना सुचते कीं, मंत्रकालीन आर्यांचें आगमन जर खैबर घाटाकडून झालें तर देश्य आर्यन् संस्कृतीच्या आर्यांचें आगमन उत्तरकुरुमार्गानें झालें असावें. कीकटामध्यें शकमगांचा प्रवेशहि याच मार्गानें झाला असावा.

हिंदुस्थानांतील प्राचीन राजघराण्यांच्या वंशावळी रामायण, महाभारत व पुराणें यांमध्यें दिलेल्या आहेत, व त्यांत हिंदुस्थानच्या उत्तर, पूर्व व पश्चिम भागांतील निरनिराळ्या राज्यांत होऊन गेलेल्या राजांचीं नांवें असल्याचें सांगतात. त्यांत प्रत्येक राजाचा नामनिर्देश आहे असें मात्र नाहीं; फक्त ज्यांची कारकीर्द संस्मरणीय झाली तेवढेच राजे दिलेले आहेत, असें सांगण्यांत येतें. राजवंशांविषयीं इतिहास पुराणें माहिती देतात ती अशीः हीं एकंदर राजघराणीं मूळ दोन राजवंशापासून निघालीं, त्यांतला एक मनुपासून निघालेला सूर्यवंश; मनु हा विवस्वत् म्हणजे सूर्य याचा मुलग. दुसरा सोम किंवा चंद्र यापासून निघालेला ऐल उर्फ सोमवंश होय. सूर्यवंशांतील राजांचीं तीन ठिकाणीं राज्यें होतीं अयोध्या, विदेह व वैशाली; त्यांपैकीं अयोध्येचें राजघराणें सर्वश्रेष्ठ होय व त्यालाच सूर्यवंशीय म्हणण्याचा विशेष प्रघात पडला. सोमवंशाचा मूळपुरुष पुरूरवस् ऐल होय. या राजवंशाचींहि पुढें पौरव, यादव, अनु, द्रुह्यु व तुर्वसु हीं पांच निरनिराळीं घराणीं झालीं. पैकीं पौरव यांनीं उत्तरहिंदुस्थानांत, यादवांनीं पश्चिमहिंदुस्थानांत व दक्षिणेंत, अनुराजांनीं पंजाबांत व पूर्वेकडील प्रांतांत व द्रुह्यूंनीं हिंदुस्थानच्या वायव्यसरहद्दीवर, येणेंप्रमाणें राज्यें स्थापिलीं. तथापि सोमवंश हें नांव हास्तिनापूर येथें ज्या राजघराण्याच्या मुख्य शाखेनें राज्य केलें त्या पौरवराजघराण्याला लावतात. या वंशावळी अत्यंत पुरातन काळापर्यंत नेऊन भिडविल्या असल्यामुळें त्या कितपत विश्वसनीय मानाव्या, हा प्रश्न उद्भवतो.

**पौराणिक वंशावळींचा विश्वसनीयता.**—पौराणिक वंशावळींविषयीं पारगिटेर म्हणतो या वंशावळींवरील मुख्य आक्षेप असा कीं, त्या फार पुरातन अशा अज्ञान काळांतील असल्यामुळें व त्या काळीं कोणतीहि माहिती लेखनिबद्ध करून चिरकाल टिकाऊ करून ठेवण्याचीं साधनें नसल्यामुळें त्या वंशावळींतील प्राचीनतम भाग काल्पनीक व दंतकथात्मक असण्याचा फार संभव आहे. दंतकथात्मक माहितीला विस्मृतिदोषामुळें, पूर्वेतिहासास उज्वल स्वरूप देण्याच्या लालसेमुळें व जुन्या गोष्टींत काल्पनिक भाग घुसडून देण्याच्या प्रवृत्तीमुळें बरेंच असत्य स्वरूप आल्याशिवाय राहात नाहीं हे दोषसंभव मान्य केले तरी सदरहू वंशावळी सर्वतोपरी अविश्वसनीय आहेत असें मानण्याचें मात्र कारण नाहीं.

पारगिटेरचें हें म्हणणें आम्हास ग्राह्य वाटतें. अर्धशतकापूर्वी या प्राचीन दंतकथा केवळ कल्पनीक मानून त्यांवरून कांहीं लाक्षणिक अनुमानें व उपपत्ती काढण्याचा प्रघात पडलेला होता. या जगाच्या प्रत्येक युगांत शौर्यपराक्रमाचीं कृत्यें झालेलीं आहेत; मानववंशघांनीं युद्धें करून देश जिंकणें व शांततेच्या काळीं लोकहिताचीं कामें करणें, या दोन्ही गोष्टी केलेल्या आहेत.

अगदीं प्राचीन काळांतहि महापुरुषांनीं मोठालीं महत्त्वाचीं कृत्यें केलेलीं असलींच पाहिजेत. अर्थात त्यांच्या स्तुतिपर कवनें व पोवाडे होऊन त्यांत त्या महापुरुषांचीं चरित्रें कमजास्तमानानें ग्रथित झालेलीं आहेत व तींच परंपरेनें आज आपणांस उपलब्ध झालीं आहेत. इतर देशांतहि जी जुनी वाङ्मयीन माहिती अर्धशतकापूर्वी अविश्वसनीय मानण्यांत

येत असे, तिची सत्यता नवीन शोधामुळें व जमीनींतून उकरून काढलेल्या जिनसांमुळें प्रस्थापित होऊं लागली आहे, व आतां सामान्यतः लोक ती विश्वसनीय मानूं लागले आहेत. कै. राजारामशास्त्री भागवत जेव्हां असुर आणि आसिरिया यांचा संबंध जोडते झाले तेव्हां त्या संबंधाविषयीं अत्यंत साशंकता लोकांच्या मनांत उत्पन्न झाली ती आज कमी होत आहे. प्राचीन काळींहि लोकांना आपल्याप्रमाणें सत्यासत्याची चाड होती; कारण प्राचीन वाङ्मयामध्येंहि सत्याची स्तुती व असत्याची निंदाच केलेली आढळते.असें आहे तर आपल्या पूर्वजांनीं सत्याकडे दुर्लक्ष करून केवळ खोट्या गोष्टी व्यवस्थित ग्रथित करून आपल्याकरतां ठेवल्या आहेत असें मानणें अगदीं मूर्खपणाचें होईल. तात्पर्य, पन्नास वर्षांपूर्वीची या प्रश्नाबद्दलची स्थिती आतां अगदीं उलट झाली आहे. म्हणजे तेव्हां प्राचीन दंतकथांवरून घेतलेली माहिती देतांना तिची विश्वासपात्रता लेखकाला अगोदर सिद्ध करावी लागत असे पण हल्लीं त्याच्या उलट या कथा सामान्यतः सत्य असें मानण्याचा प्रघात पडला असून एखादी कथा ऐतिहासिक दृष्ट्या त्याज्य म्हणणारावर तें सिद्ध करण्याचा बोजा पडतो.

**पौराणिक वंशावळींची रचना व ग्राह्याग्राह्यता.**– भारतीय संस्कृति फार प्राचीन असून अगदीं पुरातन काळींहि हिंदुस्थानांत अनेक राज्यें होतीं. ज्या देशांत अनेक राज्यें भरभराटीस आलीं व संस्कृतीहि उच्च दर्जापर्यंत पोहोचली होती, तेथील राजांचीं नांवें कथांमध्यें ग्रथित होणें अगदीं स्वाभाविक आहे, कारण त्या प्राचीन काळांत बहुतेक ज्ञानाचा सांठा म्हणजे ऐतिहासिक कथांचा असावयाचा; हल्लींच्या काळाप्रमाणें विविध विषयांचा भरणा त्या काळीं नव्हता. तेव्हां अशा प्राचीन काळांतील प्रसिद्ध राजांची माहिती राष्ट्रांतील पुढील पिढ्यांना सर्वस्वी अज्ञात असावी, ही गोष्ट अत्यंत असंभवनीय वाटते; आणि उलट असा सिद्धान्त प्रस्थापित होतो कीं राजांविषयींच्या त्या प्राचीन कथा सामान्यतः खऱ्या असेंच धरून चाललें पाहिजे. मात्र मानवी पुराव्यांतील कांहीं तपशीलाचा भाग चुकीचा असण्याचा संभव असल्यामुळें वरील कथांतील विशिष्ट हकीकतींच्या खरेखोटेपणाबद्दल प्रश्न उपस्थित करण्याची कोणालाहि मुभा राहणारच.

आतां दुसरा एक असा आक्षेप येण्यासारखा आहे कीं, मूळ वंशावळी खऱ्या असल्या तरी मागाहून त्यांत कोणी फेरफार करून खोटीं नांवें घुसडलीं नसतील कशावरून? पूर्वीच्या काळांत खाजगी व राजघराण्यांच्याहि खोट्या वंशावळी तयार केल्याचीं उदाहरणें आढळतात. येथेंहि आक्षेपकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, कोणतीहि खोटी, बनावट गोष्ट होण्यापूर्वीं तद्वत खरी व सत्य गोष्ट अस्तित्वांत असावी लागते; इतकेंच नव्हे तर त्या सत्य गोष्टीला विशेष महत्त्व व किंमत असावयास पाहिजे; म्हणजेच तिच्या लोभामुळें मनुष्य बनावट गोष्ट करून ती सत्य असें भासविण्याचा प्रयत्न करतो. याच न्यायानें खोट्या वंशावळी मागाहून झाल्या असल्यास त्यापूर्वीं खऱ्या वंशावळी अस्तित्वांत असल्याच पाहिजेत. अशा खऱ्या वंशावळी अगदीं प्राचीन काळीं राजे किंवा सत्ताधिपती समाजाचे शास्ते बनूं लागल्यापासूनच तयार होऊं लागल्या असल्या पाहिजेत. आतां अशा वंशावळींत आद्यपुरुष कोणी सूर्य किंवा चंद्र मानला गेला एवढ्यावरूनच पुढील वंशावळ आद्यंत चूक मानण्याचें कारण नाहीं; कारण कोणत्याहि वंशाचा अगदीं मूळ पुरुष खऱ्या माहितीच्या अभावीं, कोणी काल्पनिक व्यक्ति मानणें साहजिक असतें. परंतु नंतर एकाच घराण्यांतील राजपुरुषांची परंपरा लागून त्यांचें राज्य टिकलें म्हणजे खऱ्या वंशावळी निर्माण होतात.

तेव्हां सुसंस्कृत समाजाच्या अगदीं आद्य काळापासून खऱ्या वंशावळी प्रथम निर्माण होणार; नंतर त्या नमुन्यावर काल्पनिक किंवा खोट्या वंशावळी बनविण्याचा विचार कोणाला सुचणार. अशा बनावट, खोट्या वंशावळी नवे राजे किंवा सत्ताधारी उत्पन्न झाल्यावर त्यांचा जुन्या प्रसिद्ध घराण्यांशीं संबंध जोडण्याकरतां तयार करण्याचा विशेष संभव असतो. या अनुमानाप्रमाणें हिंदुस्थानांतील मध्ययुगीन व अर्वाचीन काळ.त कांहीं बनावट वंशावळी नजरेस आल्या आहेत; त्याचप्रमाणें पुराणांतर्गत कांहीं लहान घराण्यांचा मोठाल्या प्रसिद्ध राजघराण्यांशीं खोटाच संबंध जोडून दिल्याचीं उदाहरणें पुढें मांडण्यांत आलीं आहेत.

तसेंच प्रत्येकाला आपल्या प्राचीन कुलपरंपरेबद्दल अभिमानच वाटत असल्यामुळें राजेलोक, त्यांचे पुरोहित व सामान्य भाटवर्ग यांनीं मोठ्या दक्षतेनें खऱ्या वंशावळींची माहिती जतन करून ठेवली असली पाहिजे. स्तुतिपाठकांचा व पोवाडे करणारांचा वर्ग हिंदुस्थानांत पूर्वापार अस्तित्वांत असून तो आपल्या कवनांनीं व कथांनीं राजांच्या स्वकुलाभिमानाला उद्दीपित करीत असे, व लोकांचीहि ऐतिहासिक जिज्ञासा तृप्त करीत असे. संस्कृत वाङ्मयांत अशा कथांवरून श्रवणप्रसंगाचा अनेक ठिकाणीं उल्लेख आढळतो. आणि घराण्याची परंपरा चांगली उज्वल असल्यावर खोट्या बनावट वंशावळी करण्याचें कारणच नाहीं.

आतां प्राचीन वंशावळींत मधल्या दीर्घ काळांत कांहीं चुका कांहीं लोप व कांहीं लबाडी होणें संभवनीय आहे; तसेंच कांहीं अप्रिय गोष्टी त्यांतून वगळल्या जाणेंहि शक्य आहे. उदाहरणार्थ विश्वामित्र ज्याचा शेवटचा पुरुष तें कान्यकुब्ज घराणें व काशीघराणें हीं पौरवकुलांतील सुप्रसिद्ध व धर्मशील राजा भरत याच्या वंशापासून निर्माण झालीं, अशी चुकीची माहिती कांहीं कांहीं पुराणात आढळते. खुद्द रामायणांतील अयोध्येच्या राजांच्या वंशावळीमध्यें राजांचा अनुक्रम चुकलेला आहे व कित्येक राजे गाळलेले आहेत. रामायण ग्रंथ ब्राह्मणकृत आणि त्या वेळच्या ब्राह्मणांमध्यें ऐतिहासिक सत्यनिष्ठा तितकी नसल्यामुळें वरील चुका झाल्या असल्या

पाहिजेत. पण कान्यकुब्ज व काशी घराण्यांतील वंशावळींत मात्र कोणी हेतुपुरस्सर फेरफार केलेला असावा. परंतु उत्तरहिंदुस्थानांत खरी माहिती भरपूर उपलब्ध असल्यामुळें खोटी माहिती चव्हाट्यावर आल्यावाचून रहात नाहीं. स्तुतिपाठक सर्वत्र पसरलेले असल्यामुळे अनेक खरे अल्प खोट्यांस मारक झालेले आहेत. कान्यकुब्जघराण्याचा भरतवंशाशीं संबंध जोडण्याचें उघड कारण असें दिसतें कीं भरतराष्ट्रीयलोकापासूनच पुढें अनेक ब्राम्हणकुलें निर्माण झालीं हें सत्य असल्यामुळें विश्वामित्राचें ब्राम्हणत्व लोकांनां तितकें क्रांतिकारक वांटलें म्हणून वरील फरक केला असावा. रामायणाची लोकमान्यता हजारों वर्षें चालू असली तरी सूर्यवंशावळी अनेक ठिकाणी ग्रथित असल्यामुळें खुद्द रामायणांतील चुकीची वंशावळ देशांत मान्यता पावूं शकली नाहीं.

संस्कृत ग्रंथांत कांहीं ठिकाणीं काल्पनिक वंशावळी आढळतात, परंतु त्या व खऱ्या राजवंशावळीयांतील फरक चांगला लक्षांत येण्यासारखा आहे. असल्या काल्पनिक वंशावळींत सृष्ट्युत्पत्तीचें वर्णन देतांनां दक्षासंबंधानें, पितरांसंबंधानें तसेंच निरनिराळ्या प्रकारच्या अग्नींच्या संबंधानें वगैरे दिलेल्या आहेत. तसेंच अपुऱ्या माहितीच्या आधावर खऱ्या वंशावळी तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदाहरणार्थ भार्गव, आत्रेय, वासिष्ठ वगैरे ब्राह्मणकुलांच्या ब्राह्म. वायु, मत्स्य व लिंग पुराणांत दिलेल्या वंशावळी. या वंशावळी ग्राह्य मानतां येत नाहींत. त्यांतील पिढ्यांचीं कांहीं नांवें बरोबर आहेत, पण बाकी ऋषींच्या व गोत्रांच्या नांवांची कांहींतरी भरती केलेली आहे. या ब्राह्मणकुलांच्या वंशावळी क्षत्रिय वंशावळींचें अनुकरण करण्याकरतां मागाहून तयार केलेल्या आहेत हें स्पष्ट दिसतें. आणि प्राचीन काळापासून परंपरेनें खऱ्या वंशावळी चालत आलेल्या नसल्यामुळें मागाहून इकडून तिकडून गोळा केलेल्या तुटपुंज्या माहितीच्या आधारावर त्या बनविलेल्या आहेत.

तथापि मूळ प्रसिद्ध पुरुषांच्या खऱ्या वंशावळी नसत्या तर मागाहून ब्राह्मणवंशांच्या व इतर वंशावळी बनावट तयार झाल्या नसत्या. तेव्हां मूळ व खऱ्या वंशावळी क्षत्रिय राजवंशाच्या होत. खऱ्या क्षत्रिय वंशावळींतील भरपूर व सरळ दिलेली माहिती आणि उलट बनावट वंशावळींतील चुका व अपुरेपणा हीं ताडून पाहिलीं म्हणजे राजकुलांच्या वंशावळींचें प्राचीनत्व व विश्वसनीयत्व हीं दोन्हीं मनाला ताबडतोब पटतात..

राजेलोकांच्या वंशावळींचें संरक्षण करण्याचें काम वैदिक ब्राह्मणांनीं केलेलें नाहीं, कारण त्यांशीं समकालीन ब्राह्मणवर्ग अस्तित्वांत होता किंवा नाहीं याची शंका आहे. तें काम दरबारांतल्या लोकांचें म्हणजे ज्यांनां राजघराण्यांची परंपरा कायम राखण्याचें खाजगी स्वार्थदृष्टीनें महत्त्व वाटत असतें अशा लोकांनीं केलेलें आहे. हे लोक म्हणजे राजांचे स्तुतिपाठक होत. त्यांत उत्तरकालीं ब्राह्मणहि असत, पण वरील काम ते ब्राह्मकर्म म्हणून नव्हे, तर दरबारांतील नोकर या नात्यानें करीत असत. प्राचीन काळचे ऋषी किंवा कडक वर्तनाचे ब्राह्मण असल्या ऐहिक गोष्टींत सहसा लक्ष घालीत नसत, एखाद्या विशेष प्रसंगी कायते ते त्यांत पडत. त्यांनीं आपल्या स्वतःच्या–ब्राह्मण कुलांच्या—वंशावळीहि तयार करून ठेवण्याची फिकिर केली नाहीं; व त्यामुळेंच खऱ्या ब्राह्मणवंशावळी आज उपलब्ध नाहींत. तशा वंशावळी मूळ असत्या तर त्या वैदिक वाङमयाप्रमाणें सुरक्षित राहणें अशक्य नव्हतें. या अनेक कारणांस्तव राजघराण्यांच्या वंशावळी खऱ्या प्राचीन व ग्राह्य धरून चालण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. या निर्णयाला दुसरा आधार मिळतो तो असा कीं, ऐल उर्फ सोमवंशीय लोकांनीं उत्तरहिंदुस्थान व दक्षिणेकडील प्रदेश कसा व्यापला याची आपणांस जी माहिती आहे तशी बरोबर माहिती संस्कृत ग्रंथांत या वंशावळींतच फक्त सांपडते. शिवाय मानववंशशास्त्रविषयक माहितीशीं ही वंशावळींतील माहिती तंतोतंत जुळते. हा तर तिच्या विश्वासनीयतेबद्दलचा अगदीं निर्दोष पुरावा होय.

**वंशावळींचें स्वरूप.**—वंशावळतपशिलांत सुनिश्चितता आढळेल अशी आशा बाळगूं नये. कारण पुष्कळदां याद्या 'विस्तरेण' 'आनुपूर्व्येण' दिल्या असून देखील त्या अपूर्ण असल्याचें त्याच ठिकाणीं सांगितलेलें असतें. प्रसिद्ध राजांचींच नांवें त्यांत घातलेलीं असतात. कधीं कधीं याद्या लांबलचक असूनहि ['संक्षेपेण' किंवा 'समासेन'] त्या आंखडलेल्या आहेत असें म्हटलेलें असतें. दोन राजांमधील संबंध दाखविण्याचे चार प्रकार आहेत ते सांगतांना आपण माजी राजाबद्दल 'क' वापरूं व पुढच्या राजाबद्दल 'ख' वापरूं. हे प्रकार येणेंप्रमाणें:— (१) ख कचा मुलगा होता; हें नातें पुत्र किंवा जात या अर्थाचा शब्द वापरून दाखविलेलें असतें. उदा. विजयाद् रुरुको जज्ञे। रुरुकात्तु वृकःसुतः॥ (गरुडपु. १, १३८, २८.)

(२) ख कचा—होता; या ठिकाणीं नातें स्पष्ट केलेलें नसतें. उदाहरण दृढाश्वस्य प्रमोदासश्च। हर्यश्वस्य निकुंभोऽभूत्। मत्स्यपु. १२.३३

(३) कपासून किंवा नंतर ख झाला-पंचमी विभक्ति किंवा या अर्थाचें क्रियाविशेषणरूप येथें योजिलेलें असतें. उदा. नाभागात् अंबरीषोऽभूत्। सिन्धुद्वीपोऽम्बरीषतः॥ [गरुडपु. १,१३८, ३१] जेव्हां पंचमी व षष्ठीचीं विभक्तिरूपें सारखींच होतात तेव्हां प्रकार (२) आणि (३) निरनिराळे ओळखूं येत नाहींत उदा. बाहोस्तु सगरः स्मृतः। (गरुड. पु. १, १३८, २८)

(४) ख कचा वारस होता, उदा. शशादस्यतु दायादः ककुत्स्थो नाम। [ब्रह्मपु. ९.७.५१]

कांहीं वेळां या चारहि प्रकारांत पुत्राचेंच नातें निघतें;

परंतु केव्हां केव्हां इतर नातीं निघून कांहीं बाबतींत नातें मुळींच नसतें.

अशा प्रकारच्या अडचणी असल्यानें वंशावळींत निर्दोषपणा येणें अशक्य असलें तरी, आपल्या कार्याला पुरेशी पूर्णता त्यांमध्यें आणणें शक्य आहे.

वंशावळींची तुलना करितां जी विशिष्ट गोष्ट नजरेस येते ती म्हणजे अयोध्येच्या सूर्यवंशाचा महान् विस्तार होय. यांत ९३ नांवें आहेत. विस्तारानें दुसऱ्या प्रतांच्या दोन याद्या आहेत त्या यांपेक्षां बऱ्याच लहान आहेत. पश्चिम हिंदुस्थानांतील यादवकुलाची यादी सुमारें ६२ नांवांची व सोम किंवा पौरव कुळाची ५० नांवांची आहे. सूर्यवंशाची यादी चांगली पूर्ण आहे व दुसऱ्या दोन वंशांची तशी नाहीं असें धरून चालण्यास सबळ कारणें आहेत असें पारगिटेर म्हणतो आणि निरनिराळ्या वंशावळ्यांची संगति खालीं दिल्याप्रमाणें लावतो.

**कोसल येथील वंशावळींचें महत्त्व.**—प्राचीन काळींच या अनेक टोळ्यांनीं भरतखंडांत येऊन उत्तरभाग व्यापून टाकला यासंबंधीं अनेक पुरावे मिळतात. हैहय, तालजंघ आणि शक, पह्लव, कांबोज इत्यादि टोळ्या उत्तरभागांत येऊन, कोसलखेरीज सर्व राज्यें त्यांनीं उलथून पाडिलीं. कोसलवंश मात्र अखंड राहून, बाकीचीं राजघराणीं बहुतेक नाश पावलीं यामुळें त्या घराण्यांतील वंशावळींत खंड दृष्टीस पडतात. सोमवंशांत अशा प्रकारचा खंड आहे; कान्यकुब्ज घराणें तर नाहींसेंच झालें; काशीवंशावळी विस्कळीत झाली आहे; आणि मध्यदेशांत पुढें नवीन घराणीं स्थापन झालीं. कोसलदेश पूर्वेकडे असल्यानें बचावला व त्याच्या घराण्याची वंशावळ अखंड आणि पूर्ण अशी राहिली. याखेरीज सूर्यवंशाची प्रतिष्ठा लोकांमध्यें अव्याहतपणें सर्वात अधिक असल्यानें याच्या वंशावळी मोठ्या आदरानें संपूर्णपणें जशाच्यातशा चालत आलेल्या आहेत. इतर वंशांची तशी गोष्ट नाहीं. तेव्हां सूर्यवंशाचा विस्तार इतर वंशांशीं त्याची तुलना करून कांहीं छाटाछाटीनें दुरुस्त करणें बरोबर होणार नाहीं. उलट त्याच्याशीं इतर वंश ताडून पाहून आपणांस त्यांतील उणीव व खंड मोजतां येतील. वर आलेल्या स्थित्यंतरांखेरीज अंतर्देश पादाक्रांत होत चालल्यानेंहि कांहीं फरक होत होते. याप्रमाणें सोमवंशाच्या पौरव अजमीढापासून उत्तर आणि दक्षिणपंचाल घराणीं उद्भूत झालीं; यादव वंशांतील चेदिराजानें चैद्य घराणें पुढें आणलें, पौरव वसूनें ( कुरुवंश ) मगधापर्यंत सर्व देश जिंकून आपल्या पांच मुलांत वांटून दिले. हीं मुलें पुढें पांच घराण्यांचे आद्यपुरुष झालीं.

**कालैक्यें व तीं काढतांना लागणारी सावधगिरी.**—या वंशावळींचा अभ्यास करितांना कालैक्याकडे चांगलें लक्ष्य ठेविलें पाहिजे. एरवीं नुसत्या वंशावळींनां कांहींच महत्त्व येणार नाहीं. राजे व ऋषी यांच्या संबंधींच्या अनेक खऱ्याखोट्या कथा आहेत. तेव्हां कांहीं तरी ठराविक कसोटीला लावून त्यांतील खऱ्याखोट्यांचें पृथक्करण केलें पाहिजे. त्यांतून आपणांस बरींचशीं कालैक्यें पुष्कळ अंशीं खरीं म्हणून गोळा करितां येतील व त्यांवरून चांगलीं अनुमानें काढतां येतील.

हीं अनुमानें काढतांना कांहीं गोष्टींविषयीं विशेष काळजी घ्यावी लागते. या गोष्टी म्हणजे, प्रथमतः पैतृकनामावरून पितापुत्रांचें नातें नेहेमींच निघतें असें नाहीं तर तें नाम पुष्कळदां वंशज या अर्थी असतें; उदाहरणार्थ विश्वामित्राला त्याच्या आजोबाच्या नांवावरून कौशिक, दाशरथी रामाला राघव आणि कृष्णाला माधव, सात्वत,वार्ष्णेय, दाशार्ह, शौरी, अशीं पैतृक नांवें असत. दुसरी गोष्ट म्हणजे साधें नांव नेहेमींच मूळपुरुषवाचक नसतें पण कधीं कधीं वंशजांनाहि लावण्यांत येतें. ऋषींच्या बाबतींत ही गोष्ट विशेष लक्ष्यांत बाळगिली पाहिजे. उदा. वसिष्ठाचें नांव सूर्यवंशाच्या सर्व काळीं दृष्टीस पडतें व तें वसिष्ठकुलाची परंपरा दर्शवितें. याच अर्थी भरद्वाज, कण्व, गौतम, भृगु, अत्रि इत्यादि निरनिराळ्या काळीं दृष्टीस पडणारीं नांवें घेतलीं पाहिजेत. आणखी एक गोष्ट म्हणजे कधीं कधीं एकच नांव अनेक व्यक्तींचें असल्यानें, त्या व्यक्तींच्या निरनिराळ्या कथा एकाच व्यक्तीवर आरोपित केलेल्या असतात. अशा ठिकाणीं सावधगिरी बाळगावी लागते. धृतराष्ट्र, जनमेजय, ब्रह्मदत्त, भीष्म, भीम इत्यादि नांवाचे अनेक राजे होऊन गेले आहेत. त्याचप्रमाणें दिवोदास सुदास किंवा सृंजय या नांवांचे एकाहून अधिक राजे होते. हीच गोष्ट ऋषींच्या बाबतींतहि लागू आहे.

आतां यापुढें निरनिराळीं घराणीं घेऊन त्यांविषयीं आधार व थोडें विवेचन जें पारगिटेर देतो तें त्याचें विवेचन आम्हीं जसेंच्या तसेंच देत आहों. वैवस्वतमनूपासून सर्व कुलें निर्माण झालीं; सूर्य आणि विदेहवंश त्याच्या इक्ष्वाकुपुत्रापासून, विशाल घराणें त्याच्या नेदिष्ठ पुत्रापासून आणि त्याची कन्या इला हिच्या पुरुरवस् पुत्रापासून इतर सर्व घराणीं उदयास आलीं. पुरुरव्याचा वंश म्हणजे आयु, नहुष, ययाति आणि पुढें ययातीचे पांच पुत्र यदु,तुर्वसु, द्रुह्यु, अनु, आणि पूरु. मनूच्या इक्ष्वाकुपुत्रापासून निघालेला अयोध्येचा सूर्यवंश अनेक पुराणें आणि रामायण यांतून वर्णिला आहे. पुराणांतून दिलेली वंशावळ जुळते पण रामायणांतील मात्र भिन्न आहे. रामायणांतल्या वंशावळीचें नीट परीक्षण करितां ती चुकीची आहे असेंच म्हणणें भाग पडतें, तेव्हां ती बाजूला सारून, पुराणवंशावळच स्वीकारली पाहिजे.

विदेहवंश इक्ष्वाकूच्या निमिपुत्रापासून निघाला. भागवत, गरुड, वायु आणि विष्णु अशा चार पुराणांतून व रामायणांतून हा विस्तारलेला आहे. या सर्वांची बहुतेक एकवाक्यता आहे. यांत पुष्कळ राजांचें जनक असें नांव आहे पण तें व्यक्तिनाम नसून गोत्रनाम किंवा राजविशेषण असावें.

ययातीच्या यदुपुत्रापासून यादववंश निघाला असें विधान पुराणांत आहे. याचे दोन फांटे झाले. एक यदूच्या सहस्र-

जितपुत्रापासून — याच्या हैहय व तालजंघ अशा दोन शाखा प्रसिद्धीस आल्या. दुसरा त्याच्या क्रोष्टु नांवाच्या पुत्रापासून—हें घराणें चिरकाल टिकलें होतें. यादववंशाविषयीं सर्व आधारांची एकवाक्यता आहे. याच वंशांत कंस व कृष्ण होऊन गेले.

पौरव ( किंवा सोम ) वंश ययातीच्या पूरु नांवाच्या पुत्रापासून निघाला. हा महाभारत व इतर अनेक पुराणांत विस्तारलेला आहे. महाभारताखेरीज सर्व पुराणांची या वंशावळींतील पिढ्यांसंबंधीं बहुतेक एकवाक्यता आहे. महाभारतांत ज्या दोन याद्या आहेत त्या मात्र भिन्न असून एकमेकींशींहि जुळत नाहींत या सर्व याद्या ताडून पाहातां, पुराणवंशयादीच बरोबर दिसते.

अहिच्छत्राच्या गादीवर असलेला उत्तर पंचालवंश सोमवंशांतील अजमीढापासून निघाला. हा अनेक पुराणांत सारखाच वर्णिला आहे. ऋग्वेदांत सुद्धां या वंशांतील कांहीं पिढ्या आहेत. सृंजय व सोमक कुलें याच्याच शाखा असून ब्राह्मणवाङ्मयांत यांचा विशेष उल्लेख आहे. कांपिल्य येथील दक्षिण पंचालवंश हा अजमीढापासून निघालेला दुसरा वंश होय. हा अनेक पुराणांत दिला असून, त्यांत यासंबंधीं एकवाक्यताहि आहे.

अजमीढाचा भाऊ द्विमीढ यापासून निघालेला मध्यदेशांत दुसरा एक वंश होता. कांहीं पुराणांत हा उल्लेखिला असून त्यांत बहुवंशीं एकवाक्यता आहे.

कुरूपासून पांचवी पिढी वसु, यानें एक घराणें स्थापिलें. यानें चेदि राज्य बळकावून आपणाला चैद्य-उपरिचर असें विशेषण घेतलें. मगध देशापर्यंत यानें दिग्विजय मिळविला. त्याच्या घराण्याला मगधवंश असें म्हणावें. याचें वर्णन कांहीं पुराणांतून बहुतेक सारखेंच आढळतें.

ज्यांत गाधि आणि विश्वामित्र होऊन गेले, तो वंश कान्यकुब्ज येथें राज्यारूढ होता. निरनिराळ्या ठिकाणीं याचें सारखेंच स्वरूप दिलें आहे, पण पूर्वज मात्र दोन निरनिराळे सांगितले आहेत. पुरूरवस्चा पुत्र अमावसु याच्यापासून याची उत्पत्ति झाली याविषयीं बहुमत पडतें. भरत विश्वामित्राचा पूर्वज घरणें गैरवाजवी होतें, तेव्हां ज्या वंशावळींतून विश्वामित्राचा पूर्वज जो जन्हु याला भरताचा वंशज केलें आहे त्या वंशावळी चुकीच्या असल्या पाहिजेत.

काशींत काशीवंश असे. या वंशांतील सुहोत्र आणि सोमवंशांतील सुहोत्र यांची घालमेल होऊन निरनिराळ्या पुराणांत सुहोत्राचे निरनिराळे पूर्वज दिले आहेत. सुहोत्रापासून पुढच्या पिढ्या सर्व पुराणांतून बहुतेक सारख्याच आहेत.

ययातीच्या अनु नांवाच्या पुत्राचे वंशज पंजाबांत केकय, शिबि इत्यादि जातींत आणि पूर्वेकडे अंग घराण्यांत समाविष्ट झाले. जयद्रथामागून अंग घराण्याच्या दोन शाखा झाल्या. धाकट्या शाखेंत कर्ण जन्मला असून तो पुढें राजा झाला. महाभारतांत मात्र कर्ण व जयद्रथ हे समकालीन दाखविले आहेत.

मनूच्या ( दिष्ट किंवा नेदिष्ट ) पुत्रापासून दुसरा एक वंश स्थापन झाला. या वंशांतील विशाल व त्यापुढील राजांनीं विशाला किंवा वैशाली घराणें स्थापिलें. याला दिष्टवंश म्हणावें. याच्या पिढ्यांविषयीं एकवाक्यता आहे.

यापुढें, वंशावळींच्या याद्या देऊन कालैक्यें समजावून देणें आहे. पुढील तक्त्यांतून यासंबंधींचा निर्णय दाखविला आहे. यांत मनूपासूनचे जेवढे महत्वाचे वंश होते तेवढे दाखविले आहेत. ऋचीक, जमदग्नि व राम हे तीन भार्गव ऋषी त्यांच्या वेळचीं कालैक्यें स्पष्ट होण्यासाठीं यांत ग्रथित केले आहेत. यांतील वंश होतांहोईतों भौगोलिक स्थानाप्रमाणें मांडले आहेत, म्हणजे पश्चिमेकडे होऊन गेलेलीं घराणीं तक्त्यांत डाव्या बाजूला, मध्यदेशांतील मध्यभागीं आणि पूर्वेकडील घराणीं उजव्या बाजूला लिहिलीं आहेत. ज्यांचीं स्थानें कालैक्यांनीं अगदीं निश्चित झालीं आहेत अशा सर्व राजांच्या नांवांपूर्वीं * अशी फुली आहे; कंसांतील नांवें, ज्यांचा वंशावळींत उल्लेख नाहीं पण कालैक्यांचा विचार करितांना ज्यांचें अस्तित्व उघडकीस आलें अशा राजांचीं आहेत. ज्या कांहीं याद्या, मग त्या एका कालैक्यापासून दुसऱ्या कालैक्यापर्यंत पोंचल्या असल्या तरी, इतरांपेक्षां कमी भरलेल्या दिसतात; त्यांतील नांवें गळलेलीं आढळतील. गळलेलीं नावें कोठें येतात हें माहीत नसल्यानें, त्या याद्यांतील नांवें नुसतीं अंतर टाकून मांडलीं आहेत; आणि ज्या ठिकाणीं कालैक्यें नाहींत त्या ठिकाणीं शक्य तितकें चांगलें अनुमान बांधून, काम भागविलें आहे. तक्त्यांत आलेल्या चक्रवर्ती राजांपुढें × असें गुणिलें चिन्ह दाखविलें आहे. जे राजे आपल्या सभोंवतालच्या प्रदेशावर वर्चस्व स्थापित, व तेथील राजांना आपले मांडलिक बनवीत अशांना चक्रवर्ती किंवा सम्राज् ही पदवी असे. यांच्या विजयामुळें शेजारच्या राजवंशांतून अंदाधुंदी झाल्यास नवल नाहीं. व यामुळें यांच्या काळच्या शेजारील राजवंशावळींत विस्कळीतपणा दिसून येतो. शिवाय अशा चक्रवर्ती राजांच्या कारकीर्दी बहुधा मोठ्या असाव्यात, असें दिसतें.

पुढील तक्त्यांत आपणांस असें दिसून येईल कीं, यादव, पौरव, काशी, सूर्य, दिष्ट व अनु हे वंश मनूपासून निघाले आहेत. त्यांपैकीं यादववंश, सूर्यवंश व विदेहवंश या घराण्यांच्या वंशावळी बऱ्याच मोठ्या असून त्यांतील बहुतेक नांवांची स्मृति परंपरेनें चालत आलेली आहे व यांत फारच थोडीं नांवें गळलेलीं दिसतात. पौरव कुलांत जरी बरींच नांवें दिसलीं तरी मध्यंतरीं मोटमोठीं रिक्तस्थानें आढळतात. अनुवंशाचीहि वंशावळ बरीच मोठी व दीर्घकालापर्यंत पसरलेली आहे. पण तींतहि रिक्तस्थानें मधून मधून बरींच आढळतात. काशीवंश व दिष्टवंश हे यानंतरचे महत्वाचे वंश होत. यांचा लोप दाशरथी रामाच्या सुमारास झालेला आढळतो. बाकीचे वंश या मानानें कमी महत्वाचे असून कांहींचा आरंभ बराच उत्तरकालीन दाखविला आहे.

## पुराणांतील वंशावळ्यांचे कालैक्यदर्शक कोष्टक.

| यादव. | हैहय. | पौरव. | कान्यकुब्ज. | | काशीवंश. | सूर्यवंश. | विदेहवं. | दिष्टवंश. | अनुवंश. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मनु | | मनु | | | मनु | मनु | | मनु | मनु |
| इला | | इला | | | इला | इक्ष्वाकु | | दिष्ट | इला |
| पुरूरवस् | | पुरूरवस् | | | पुरूरवस् | | | | पुरूरवस् |
| आयुस् | | [ आयुस् | अमावसु ] | | आयुस् | [ शशाद | निमि ] | नाभाग | आयुस् |
| नहुष | | नहुष | | | नहुष | *ककुत्स्थ | | | नहुष |
| *ययाति× | | *ययाति× | | | क्षत्रवृध | अनेनस | | भलंदन | *ययाति× |
| यदु | | पूरु | | | | पृथु | मिथिजनक | | अनु |
| [क्रोष्टु | सहस्रजि.] | जनमे. १ला | भीम | | सु (न) होत्र | विश्वगश्व | | | |
| | | प्राचिन्वत् | | | | आर्द्र | | वत्सप्री | सभानर |
| वृजिनीवत् | शतजित् | प्रवीर | | | काश | युवनाश्व १ला | उदावसु | | |
| | | मनस्यु | | | | श्रावस्त | | | कालानल |
| | हैहय | अभयद | | | काशीप | बृहदश्व | | प्रांशु | |
| स्वाहि | | सुधन्वन् | कांचनप्रभ | | | कुवलाश्व | नन्दिवर्धन | | |
| | | बहुगव | | | दीर्घतपस् | दृधाश्व | | | सृंजय |
| | धर्म | संयाति | | | | प्रमोद | | प्रजानि | |
| रुशद्गु | | अहंयाति | | | | हर्यश्व १ला | सुकेतु | | |
| | धर्मनेत्र | रौद्राश्व | | | धन्व | निकुंभ | | | पुरंजय |
| | | ऋचेयु | सुहोत्र | | | संहताश्व | | खनित्र | |
| चित्ररथ | कुन्ति | | | | धन्वंतरि | कृशाश्व | देवरात | | |
| | | *मतिनार | | | | *प्रसेनजित् | | | जनमेजय |
| *शशबिन्दु× | साहाजि | तंसु | | | | *युवनाश्व २रा | | क्षुप | |
| पृथुयशस् | | | | | केतुमतु | *मान्धातृ× | बृहदुक्थ | | महाशाल |
| पृथुकर्मन् | | | *जह्नु | | | *पुरुकुत्स | | | |
| पृथुजय | महिष्मत् | | सुमंतु | | | त्रसदस्यु | | विंश | |
| पृथुकीर्ति | | | अजक | | | संभूत | महावीर्य | | महामनस् |
| पृथुदान | | | बलाकाश्व | | भीमरथ | अनरण्य | | | |
| पृथुश्रवस् | *भद्रश्रेण्य | | कुश | भार्गव | | पृषदश्व | | विविंश | उशीनर |
| पृथुसत्तम | | | कुशाश्व | ब्राह्मण. | *दिवोदा. १ला | हर्यश्व २ रा | सुधृति " | | तितिक्षु |
| | *दुर्दम | | *कुशिक | | ( अष्टारथ ) | वसुमनस् | | खनीनेत्र | *शिबि× |
| अन्तर | कनक | | *गाधि | | | त्रिधन्वन् | | | *केकय |
| सुयज्ञ | कृतवीर्य | | | ऋचीक | | त्रय्यारुण | *धृष्टकेतु | *करंधम | रुशद्रथ |
| उशनस् | *अर्जुन× | | *विश्वामित्र | *जमदग्नि | | *त्रिशंकु | | | |
| शिनेयु | जयध्वज | | | | | *हरिश्चंद्र | | अविक्षित | |
| मरुत्त | *तालजंध | | अष्टक | *राम | | *रोहित | *हर्यश्व | *मरुत्त× | हेम |
| कम्बलबर्हिस् | वीतिहोत्र | | परावसु | | | हरित् | | | |
| रुक्मकवच | वृष | | | | ( हर्यश्व ). | चंचु | | नरिष्यन्त | |
| परावृत् | मधु | | | | | विजय | मरु | दम | |
| *ज्यामघ | वृष्णि | | | | ( सुदेव ) | रुरुक | | | सुतपस् |
| | | | | | | वृक | | राज्यवर्धन | |
| *विदर्भ | | | | | *दिवोदा. २ रा | *बाहु | प्रतीन्धक | सुधृति | |
| क्रथ | | ऐलिन | | | *प्रतर्दन | *सगर× | | | |
| कुन्ति | | | | | वत्स | असमंजस | | नर | *बलि |
| धृष्टि | | *दुष्यन्त | | | *अलर्क | अंशुमत् | कृतिरथ | केवल | |
| निर्वृति | | *भरत× | | | | दिलीप १ला | | | अंग |
| विदूरथ | | | | | सन्नति | भगीरथ× | | बन्धुमत् | |
| *दशार्ह | | *वितथ | | | | श्रुत | देवमीढ | वेगवत् | |
| व्योमन् | | *भूमन्यु | | | सुनीथ | नाभाग | | | |
| जीमूत | | बृहत्क्षत्र | | | | अंबरीष× | | बुध | दधिवाहन |
| विकृति | | सुहोत्र | | | क्षेम | सिन्धुद्वीप | विबुध | तृणबिन्दु | |
| *भीमरथ | | हस्तिन् | | | | अयुतायुस् | | | |

| यादव. | द्विमीढ. | पौरव. | उ.पंचाल | दक्षि.पं. | काशीवंश. | सूर्यवंश. | विदेहवंश. | दिष्टवंश. | अनुवंश. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नवरथ | | विकुंठन | | | केतुमत् | *ऋतुपर्ण | | विशाल | अनपान |
| दशरथ | [ द्विमीढ | अजमीढ ] | | | | सर्वकाम | महाधृति | हेमचंद्र | |
| शकुनि | यवीवर | [ | नील | बृहदिषु ] | सुकेतु | सुदास | | | |
| करंभ | | | शान्ति | | | कल्माषपाद | | सुचंद्र | दिविरथ |
| देवरात | धृतिमत् | | सुशान्ति | बृहद्वसु | धर्मकेतु | अश्मक | कृतिरात | धूम्राश्व | |
| देवक्षत्र | | | पुरुजाति | | | मूलक | | | |
| मधु | सत्यधृति | | अर्क | बृहद्धनु | सत्यकेतु | शतरथ | | सृंजय | |
| कुरुवश | | | भृम्यश्व | | | वृद्धशर्मन् | महारोमन् | सहदेव | |
| अनु | दृढनेमि | | मुद्गल | | विभु | विश्वसह १ ला | | | |
| पुरुद्वत | | | ब्रह्मिष्ठ | | | दिलीप २ × | स्वर्णरोमन् | कृशाश्व | चित्ररथ |
| पुरुहोत्र | सुधन्वन् | | वध्र्यश्व | बृहत्कर्मन् | सविभु | दीर्घबाहु | | सोमदत्त | |
| अंशु | | *ऋक्ष १ | *दिवोदास | | | रघु | ह्रस्वरोमन् | | |
| | | | मित्रयु | जयद्रथ | सुकुमार | अज | | जनमेजय | |
| सत्वत् | सार्वभौम | | ( देववात ) | | | *दशरथ | *सीरध्वज | *प्रमति | *लोमपाद |
| *सात्वत | | | *सृंजय | *विश्वजित् | धृष्टकेतु | *राम × | भानुमत् | | |
| | | | | | वेणुहोत्र | | शतद्युम्न | | चतुरंग |
| *अंधक | | | च्यवन | सेनजित् | भर्ग | *कुश | शुचि | | |
| | | | सोमदत्त | | | अतिथि | ऊर्जवह | | पृथुलाक्ष |
| कुकुर | | | ( पिजवन) | रुचिराश्व | | निषध | सनद्वाज | | |
| | | | *सुदास | | मगधवंश | नल | कुनि | | चंप |
| वृष्णि | | *संवर्ण | सहदेव | पृथुषेण | | नभस् | अंजन | | |
| | | | *सोमक | | | पुंडरीक | कुलजित | | हर्यंग |
| धृति | | *कुरु | जन्तु | पार १ ला | *कुरु | क्षेमधन्वन् | अरिष्टनेमि | | |
| | | परिक्षित १ | | | सुधन्वन् | देवानीक | श्रुतायुस् | | भद्ररथ |
| कपोतरोमन् | महत्पौरव | *जनमे.२ | | नीप | सुहोत्र | अहीनगु | सुपार्श्व | | |
| | | सुरथ | | | च्यवन | पारिपात्र | संजय | | बृहत्कर्मन् |
| विलोमन् | रुक्मरथ | विदूरथ | | समर | | दल | क्षेमारि | | |
| | | सार्वभौम | | | कृत | शल | अनेनस् | | बृहद्रथ |
| तित्तिरि | सुपार्श्व | जयत्सेन | | पार २ रा | *वसु-चैद्य | उक्थ | समरथ | | |
| तैतिरि | | आराधि | | | | वज्रनाभ | सत्यरथ | | बृहद्भानु |
| | सुमति | महासत्व | | पृथु | बृहद्रथ | शंखन | सात्यरथि | | |
| नल | | अयुतायुस् | | | | व्युषिताश्व | उपगुरु | | बृहन्मनस् |
| | सन्नति . | अक्रोधन | | सुकृति | कुशाग्र | विश्वसह २ रा | उपगुप्त | | |
| | | देवातिथि | | | ऋषभ | हिरण्यनाभ | स्वागत | | जयद्रथ |
| | *कृत | ऋक्ष २ रा | | विभ्राज | | पुष्य | स्वनर | | |
| अभिजित् | | भीमसेन | | | पुष्पवत् | ध्रुवसन्धि | सुवर्चस् | | विजय |
| | | दिलीप | | अनुह | सत्यहित | सुदर्शन | सुभास | | |
| पुनर्वसु | | *प्रतीप | | *ब्रह्मदत्त | | अग्निवर्ण | सुश्रुत | | भृति |
| | . . . | | | विश्वक्सेन | ऊर्ज | शीघ्र | जय | | |
| आहुक | | (ऋष्टिषेण ) | *नीप[नील | उदक्सेन | जह्नु | मरु | विजय | | धृतव्रत |
| | | *शन्तनु | | भल्लाट | | प्रसुश्रुत | ऋत | | |
| | *उग्रायुध | [* भीष्म] | *पृषत | *जनमेजय | संभव | सुसन्धि | सुनय | | सत्यकर्मन् |
| *उग्रसेन | क्षेम्य | विचित्रवीर्य | | | *जरासंध | अमर्ष | वीतहव्य | | अधिरथ |
| *कंस | सुवीर | *धृतराष्ट्र | *द्रुपद | | | महस्वत | धृति | | |
| *कृष्ण | नृपंजय | *पांडव | *धृष्टद्युम्न | | *सहदेव | विश्रुतवत् | बहुलाश्व | | *कर्ण |
| | बहुरथ | *अभिम० | *धृष्टकेतु | | | *बृहद्बल | कृति | | |

**कौ र व व पां ड वां च्या म धी ल यु द्ध**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | परीक्षि.२रा | | | सोमाधि | बृहत्क्षण | | | |
| | | जनमे. ३रा | | | श्रुतश्रवस् | उरुक्षय | | | |

वरीलप्रमाणें कोष्टक तयार करून त्यांत आढळणाऱ्या महत्त्वाच्या कालैक्यांसंबंधानें पारगिटेर कालानुक्रमें दिग्दर्शित येणें प्रमाणें करतो.

अगदीं प्रथमचें कालैक्य म्हणजे, ययातीचा सर्वांत वडील भाऊ जो यति त्यानें ककुत्स्थाच्या गो नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. हा ककुत्स्थ सूर्यवंशांतील ककुत्स्थच असावा. तेव्हां ययाति ककुत्स्थानंतरच्या पहिल्या पिढींतील होता. हें कालैक्य आमच्या मतें विश्वसनीय नाहीं कां कीं, अनेक राष्ट्रांचा जनकअसा वर्णिलेला ययाति आम्हांस खरोखर व्यक्ति नसून काल्पनिक असावा असें वाटतें.

मान्धातृच्या काळीं सूर्य, सोम आणि यादववंश यांच्यांतील संबंध स्पष्ट आहे. सोमवंशाच्या मतिनाराची मुलगी गौरी हिचें सूर्यवंशाच्या प्रसेनजिताशीं किंवा त्याचा मुलगा यौवनाश्व ( २ रा )याच्याशीं लग्न लागलें होतें आणि म्हणून ती मान्धातृची आजी किंवा आई होती. या विधानालाच बरेचसे आधार मिळतात. कसेंहि असलें तरी मतिनार हा प्रेसनजिताचा समकालीन होता.

मान्धातृनें शशबिन्दूची मुलगी बिन्दुमती चैत्ररथी हिशीं लग्न केलें. हा शशबिन्दु यादववंशांतील चैत्ररथाचा विख्यात पुत्र असावा कारण याविषयीं अनेक पुरावे आढळतात. तेव्हां शशबिन्दु आणि दुसरा यौवनाश्व समकालीन ठरले.

अनुवंशांतील उशीनराचा पुत्र शिबि याला चार पुत्र होते. त्यांनीं वृषदर्भ, सुवीर, केकय ( किंवा कैकेय ) आणि मद्र अशीं पंजाबांत चार घराणीं स्थापन केलीं. सूर्यवंशाच्या त्रिशंकूनें एका कैकेय राजकन्येशीं लग्न लाविलें; यावरून कैकेयघराणें त्रिशकूच्या पूर्वी स्थापन झालें असलें पाहिजे आणि म्हणून शिबीला त्रिशंकूच्या आधींच्या दोन तीन पिढ्यांत घालतां येणार नाहीं.

यापुढील कालैक्य म्हणजे, कान्यकुब्जघराण्यांतल्या जह्नूनें युवनाश्वाच्या कावेरी नांवाच्या मुलीशीं किंवा नातीशीं लग्न केलें. हा युवनाश्व सूर्यवंशांतील दुसरा युवनाश्व असावा; कारण ज्या अर्थी या नांवाचा नुसताच उल्लेख केला आहे त्या अर्थी जो प्रख्यात असेल तोच धरला पाहिजे, पण पहिला युवनाश्व प्रख्यात नव्हता. तेव्हां दुसराच असला पाहिजे, हें ठरतें. तेव्हां जह्नूला पुरुकुत्साच्या शेजारी बसविला पाहिजे. जह्नु राजा प्रख्यात होता (याच्याच नांवावरून गंगेला जाह्नवी असें नांव आहे. ) पण तो युवनाश्वपुत्र चक्रवर्ती मान्धातृ याच्या मृत्यूनंतरच पुढें आला असावा; तेव्हां यांची पिढी मान्धातृच्या पुढची एक होते; व त्याची पत्नी बहुधा युवनाश्वाची नात होती.

यापुढें विश्वमित्र आणि त्याचे समकालीन यांचा विचार करूं. या ठिकाणीं मागील सूचना लक्ष्यांत आणून विश्वामित्र नांवाचा आद्य पुरुष घेतला पाहिजे; कारण विश्वामित्रगोत्राचे अनेक वंशज आहेत. प्रसिद्ध विश्वामित्र कान्यकुब्ज देशाचा राजा गाधी किंवा गाथिन् याचा पुत्र असून याचें क्षत्रिय नांव विश्वरथ होतें. याचा सूर्यवंशाशीं निकट संबंध होता. याच्या पित्याची आई पौरुकुत्सा किंवा पौरुकुत्मी, पुरुकुत्साची मुलगी किंवा कोणी वंशजा होती; हा पुरुकुत्स अयोध्येचा ( या नांवाचा ) प्रख्यात राजाच असला पाहिजे. हिच्या पैतृक नामावरून सामान्यतः ही पुरुकुत्साची मुलगी असावीशी वाटते, पण मागें जी सूचना केली आहे तीवरून तसेंच असेल असें नाहीं; ती चार पांच पिढ्या पुढची वंशजाहि असूं शकेल. या नात्यासंबंधीं जास्त विवेचन जरूर असल्यानें व त्या योगानें आपले मागील सिद्धांत व सूचना लावून पाहाण्याची संधी येत असल्यामुळें या नात्याविषयीं आतां विचार करूं.

जर पौरुकुत्सा पुरुकुत्साची मुलगी असेल तर विश्वामित्र तीन पिढ्या त्याच्या खालीं येईल, आणि जर निपणती असेल तर सहा पिढ्या खालीं येईल. याला आणखी एक पिढी जोडली पाहिजे, कारण वास्तविक विश्वामित्र व त्याच्या सत्यवती बहिणीचा मुलगा जमदग्नि एकाच वेळीं जन्मले; तेव्हां विश्वामित्र गाधीच्या खालीं दोन पायऱ्या येतो. वरील मत ग्रहण केल्यास विश्वामित्र गाधीच्या चार किंवा सात पिढ्या खालीं येईल. " पौरुकुत्सा " वरून निघणारें नक्की नातें दुसऱ्या गोष्टींवरहि अवलंबून आहे. कथापुराणांतून पुरुकुत्सामागून गादीवर बसणारा नववा राजा जो सत्यव्रत त्रिशंकु आणि त्याचे वारस यांचा विश्वमित्राशीं निकट संबंध जोडलेला दृष्टीस पडतो. त्रिशंकु व वसिष्ठ यांचें वैर, विश्वमित्राशीं त्यांचें सख्य, त्रिशंकुपुत्र हरिश्चंद्र यानें वरुणाला केलेला नवस, रोहिताबद्दल शुनःशेपाचा बलि, विश्वामित्रानें शुनःशेपाला पुत्र केल्याची कथा इत्यादि गोष्टी पौरुकुत्सा पुरुकुत्साची मुलगी धरून शक्य दिसत नसून चवथ्या पिढींतील वंशजा घेतल्यानें जमतात. गाधीची मुलगी सत्यवती हिचें ऋचीक भार्गव ऋषीबरोबर लग्न लागलें होतें. तिचा मुलगा जमदग्नि हा विश्वामित्राबरोबरच जन्मला. जमदग्नीला बरींच मुलें होतीं त्यांपैकीं राम सर्वांत धाकटा होता.

यावरून पारगिटेर म्हणतो कीं, गाधीचा पिता पुरुकुत्साच्या चार पांच पिढ्या मागचा, विश्वामित्र, त्रिशंकु,हरिश्चंद्र जमदग्नि, आणि अजीगर्त ( शुनःशेपाचा पिता )हे समकालीन, आणि रोहित, शुनःशेप आणि जामदग्न्यराम हेहि समकालीन होते.

जमदग्नि आणि राम यांचीं कालैक्यें आणखी आहेत. हैहयांचा राजा कार्तवीर्यार्जुन आणि भार्गव यांच्यामधील लढायांवरून अर्जुन हा जमदग्नीचा समकालीन होतासें दिसतें. हरिश्चंद्राच्या वेळेपासून याची कारकीर्द सुरू होऊन रोहित आणि हरित यांच्या कारकीर्दीपर्यंत लांबली होती.

परशुरामकथेचें स्पष्टीकरण पारगिटेर असें करतो कीं अर्जुनाचा नातू तालजंघ यानें हैहयांच्या पांच जाती केल्या. हा रामाचा तरुण समकालीन होता व रामाच्या अंतकाळीं

किंवा मृत्यूनंतर महाराष्ट्रांत बराच प्रबल झाला. रामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केल्याबद्दलची कथा खरी नसून, रामाच्या जागीं तालजंघ–हैहय घातल्यास तें कांहींसें सत्य होईल; कारण त्यांनीं उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत करून सर्व राजांनां मांडलिक बनविलें होतें. भार्गव आणि हैहय यांनीं आपलें जुनें वैर विसरून एकत्र होऊन दिग्विजयास प्रारंभ केला असावा; व हा दिग्विजय ब्राह्मणांनीं रामाच्या अंगीं लाविला. याचें हुबेहूब प्रतिरूप मराठ्यांच्या इतिहासांत सांपडतें. ब्राह्मण आणि सेना एकत्र झाल्या होत्या. ते देशावर स्वाऱ्या करून तो कायमचा पादाक्रांत करीत नसत तर दर वर्षी मोहिमा काढीत व पुन्हां हल्ले चढवीत. अशा प्रकारच्या अर्धशतक चाललेल्या उच्छेदक स्वाऱ्यांनां ( तालजंघ–हैहयांचें राज्यहि पण अर्ध शतकच चाललें होतें ) एकवीस वेळां क्षत्रियांचें निर्मूलन असें नांव देणें गैर होणार नाहीं. आणखी सादृश्य दाखवावयाचें झाल्यास मराठ्यांच्या अमदानींत ज्याप्रमाणें पर्शूनीं नादिरशहाच्या आधिपत्याखालीं एकदां आणि अफगाणांनीं अहमदशहाच्या नेतृत्वाखालीं चारदां हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, त्याचप्रमाणें हैहयांनीं पादाक्रांत केल्यामुळें उडालेल्या धांदलींत पह्लव, पारद, कांबोज, शक आणि इतर टोळ्या वायव्येकडून हिंदुस्थानांत घुसल्या.

यानंतर, काशीचे राजे आणि हैहय राजे यांमधील कालैक्यांचा प्रश्न निघतो. यांच्यांतील वैराला हैहय वंशांतील भद्रश्रेण्यापासून आरंभ होऊन, तें वीतहव्यापर्यंत टिकलें. कथानकांतून दिवोदास नांवाच्या काशीच्या एका राजाला भद्रश्रेण्याच्या मुलाचा समकालीन करून, त्यालाच किंवा त्याचा मुलगा प्रतर्दन याला वीतहव्याचाहि समकालीन म्हटलें आहे. आतां एकच दिवोदास घेतल्यास हें अनेक कारणांवरून अशक्य दिसतें. भद्रश्रेण्य आणि वीतहव्य यांच्यांत नऊ दहा पिढ्यांचें तरी अंतर आहे. तेव्हां काशीवंशांत दोन दिवोदास, मध्यें सहा सात राजे सोडून, होऊन गेले.

पहिला दिवोदास भद्रश्रेण्याच्या जरा पूर्वीचा होता असें दिसतें. आणखी कांहीं माहितीवरून सगर आणि विदर्भाचे राजे यांच्याशीं तुलना करून प्रतर्दनाचें स्थान ठरवितां येणें शक्य आहे.

सगराला दोन बायका होत्या. त्यांपैकीं एक विदर्भकन्या वैदर्भी. हा विदर्भ यादववंशांतील ज्यामघाचा मुलगा असला पाहिजे. तेव्हां हा सगराच्या जरा अलीकडला आहे. काशीचा राजा अलर्क प्रतर्दनाचा नातू दिसतो व लोपामुद्रेच्या आशिर्वादानें त्याला दीर्घायुष्य लाभलें अशी कथा आहे. लोपामुद्रा निमि नांवाच्या कोणा एका विदर्भराजाची कन्या असून तिनें अगस्त्यऋषीशीं लग्न लाविलें. विदर्भवंशांत निमीचें नांव मुळींच नाहीं, तथापि विदर्भानंतरच्या राजांचीं नांवें स्पष्ट नसल्यानें, तो विदर्भानंतरच्या नजीकच्या पिढींतील असावा. कारण दाशार्हराज्यांच्या पुढील सर्व राजकन्यांनां त्यांच्या नांवांवरून दाशार्ही असें संबोधीत. तेव्हां लोपामुद्रेचा कुन्ति राजाशीं व अलर्काचा धृष्टि राजाशीं ( हे दोनहि विदर्भ राजे होत ) समकाल आहे. यावरून प्रतर्दन आणि सगर हे समकालीन असून, त्या उभयतांनीं तालजंघ–हैहयांचें वर्चस्व मोडून टाकलें असें सिद्ध होतें.

आतां दिष्टवंशांतील अवीक्षितपुत्र चक्रवर्ती मरुत्त आणि त्याचा वंशज तृणबिन्दु यांचें स्थान ठरविण्याचा कांहीं प्रयत्न करूं. अवीक्षित किंवा त्याचा पिता करंधम त्रेतायुगाच्या आरंभाला होते असें म्हटलें आहे; आणि तृणबिन्दु "त्रेतायुगाच्या तिसऱ्या महिन्यांत" ( त्रेता–युग–मुखे तृतीये, वायु, २, २४, १५ ), म्हणजे त्या युगाच्या तिसऱ्या पादाच्या आरंभाला होऊन गेला. वंशावळींत कोणत्या ठिकाणीं तें युग सुरू झालें असें समजावें हें स्पष्ट नाहीं. असें म्हटलें आहे कीं, जामदग्न्य राम त्रेतायुगांत, आणि दाशरथि राम त्रेता आणि द्वापर युगांच्या मध्यंतरीं होता. याच्या पुढील विधान, विश्वामित्र याच मध्यकालीं होऊन गेला, हें वरील दोन गोष्टींशीं अगदीं विसंगत दिसतें, आणि कदाचित् तो "कृत आणि त्रेतायुगांच्या मध्यकालीं" होऊन गेला असें समजणें रास्त होईल. व अशा तऱ्हेनें वंशावळींत चांगले भाग पाडतां येऊन तो आपल्या कार्याला चांगला उपन्यास होईल. यावरून अजमासानें मरुत्ताला जामदग्न्य रामाच्या कालीं आणि तृणबिन्दूला सूर्यवंशांतील अंबरीषाच्या पुढील पिढींत टाकतां येईल.

सोमवंशांत मतिनाराचें स्थान तर ठरविलेंच आहे. आतां दुष्यन्त आणि त्याचा पुत्र भरत यांसंबधीं विचार करूं.

दुष्यन्तानें विश्वामित्रकन्या शकुन्तला इच्यांशीं लग्न लाविल्याचें प्रसिद्ध आहे. जर हा विश्वामित्र पहिला प्रख्यात विश्वामित्र असेल तर दुष्यन्ताला हरिश्चन्द्र किंवा रोहित यांच्या पंक्तीला व भरताला त्याच्या लगेच पुढें बसवावें लागेल; पण असें केल्यानें दोन तीन गोष्टींनां बाध येतो. एकतर भरताच्या मागून येणाऱ्या राजांचा हैहयांनीं धुव्वा उडवून द्यावयास पाहिजे होता पण तो दिलेला दिसत नाहीं. भरताला तीन वैदर्भी राण्या होत्या; व विदर्भाचें स्थान यानंतरचें हें मागें दाखविलेंच आहे. भरताच्या मागूनचा दुसरा राजा भुमन्यु याचें लग्न, बऱ्याच पुढील कालांत झालेल्या दाशार्ह राजाच्या मुलीशीं [ किंवा वंशजेशीं ] लागलें होतें. या तीन गोष्टींवरून वरील प्रश्नाचा उलगडा होतो व विश्वामित्र याचा अर्थ विश्वामित्राचा एक वंशज असा घेतल्यानें आपल्या पहिल्या विधानालाहि बाध येऊं शकत नाहीं. तेव्हां मुद्देसूद अनुमानें म्हणजे, भुमन्यूनें दाशार्हकन्येशीं विवाह केला, भरत विदर्भानंतर तीनचार पिढ्या पुढें झाला आणि शकुन्तलेचा पिता प्रख्यात

विश्वामित्राचा लगतचाच वंशज होता. यावरून भूमन्यूचा काल दाशराज्ञानंतरचा असून तो सूर्यवंशाच्या नाभागाशी समकालीन, भरत पहिल्या दिलीपाशी आणि दुष्यन्त अंशुमानाशी समकालीन होता हें ठरतें.

या निर्णयावरून मतिनार आणि दुष्यन्त यांच्यांत मोठी खिंड पडते, कारण त्यांच्यामध्यें सारीं दोन तीनच नांवें आहेत. पण दुसऱ्या गोष्टी लक्ष्यांत घेतां याचें फारसें आश्चर्य वाटावयास नको.

पूरूचें राज्य मध्यदेशाच्या मध्यभागीं—जी सर्वकाळीं युद्धमान कुलांची रणभूमि बनलीं होती—असल्यानें, त्यांत चिरकाल अंदाधुंदी माजून राजपरंपरा नष्ट झाली असावी. मतिनाराचें राज्य चक्रवर्ती शशबिन्दूनें नैर्ऋत्येकडून येऊन बळकावलें व त्यानंतर अयोध्येचा मान्धातृ, वायव्येकडील उशिनारपुत्र शिबि, माहिष्मतीचा कार्तवीर्यार्जुन, दिष्टवंशांतील अविक्षितपुत्र मरुत्त, हैहयांचें वर्चस्व ( व वायव्येकडून येणाऱ्या टोळधाडी ) आणि शेवटीं अयोध्येचा सगर, यांच्या काळच्या सुमारास त्याला चिरकाल ग्रहण लागलें. सगराच्या वेळीं दुष्यन्त तरुण असून पौरव गादीवर आपण बसूं याविषयीं त्याला मुळींच आशा नसावी. तेव्हां, करन्धयाचा पुत्र मरुत हा निपुत्रिक असल्यानें त्यानें दुष्यन्त पौरव याला दत्तक घेतलें, आणि पुढें दुष्यन्तानें आपली गादी परत मिळवून तो वंश चालविला. या विधानावर आपला चांगला विश्वास बसतो. यावरून दुष्यन्ताला पौरवांचा " वंशकर " असें जें संबोधण्यांत येतें त्याची यथार्थता दिसून येते.

भारताच्या कथेवरून दुसरे संबंध उघडकीस येतात. अंगिरस कुळांत दोन ऋषी होऊन गेले. एक उचथ्य व दुसरा त्याचा धाकटा भाऊ बृहस्पति. उचथ्याला त्याच्या ममता नांवाच्या स्त्रीपासून दीर्घतमस् नांवाचा जन्मान्ध पुत्र झाला. व बृहस्पतीला ममतेपासूनच भरद्वाज नांवाचा पुत्र झाला. मोठेपणीं त्याला गंगेत टाकलें असतां तो वहात पूर्वेकडील बलिराज्यांत आला. तेथें त्याला वर काढण्यांत येऊन, त्यानें बलीच्या इच्छेनुसार राणीच्या ठिकाणीं अंग आणि इतर चार पुत्र उत्पन्न केले. अशा प्रकारचा एक उचथ्य व ममता यांचा पुत्र दीर्घतमस् नांवाचा अंध ऋषि असून, नदींत बुडत असतांना त्याला वांचविण्यांत आलें अशाविषयीं ऋग्वेदांत उल्लेख आहे. भारद्वाज ही व्यक्ति इतकी स्पष्ट नाहीं. कारण एकीकडे बृहस्पतीचा वडील मुलगा भारद्वाज याला काशीच्या दुसऱ्या दिवोदासाचा समकालीन म्हटलें आहे तर दुसरीकडे भरताशीं त्याचा अंतकालीं संबंध जोडण्यांत आला आहे. कांहीं कथानकांतून भरताचीं सर्व मुलें मेल्यावर त्यानें भरद्वाजाला आपला पुत्र केला व तोच पुढें राजा वितथ म्हणून प्रसिद्ध आहे अशी; तर दुसऱ्या कांहींतून, भारद्वाजानें भरताकरितां यज्ञ केला व त्याच्या पासून वितथ नांवाचा पुत्र जन्मास आला, अशी माहिती सांपडते. जर दुसरा दिवोदास व भरद्वाज समकालीन धरले तर भरद्वाजानें किंवा त्याच्या पुत्रानें भरताच्या अंतकाळीं वितथ नांवाच्या त्याच्या पुत्रास जन्म दिला, हेंच अनुमान बरोबर दिसतें.

सोमवंशाच्या अजमीढापासून उत्तर आणि दक्षिण पंचाल घराणीं निघालीं. यांचें स्थान समजणें फार महत्त्वाचें आहे. प्रत्यक्षपणें तें ठरविण्यास कांहीं मुद्दा न सांपडल्यानें, अप्रत्यक्ष पुरावे कांहीं सांपडतात कीं काय हें पाहूं. बराचसा पूर्ण असलेला सूर्यवंश मापनाला घेऊन जर आपण भरताच्या पुढील पिढ्या मोजूं लागलों तर अजमीढाची पिढी ऋतुपर्णाच्या किंवा त्याच्या नंतरच्या एका पिढीशीं जोडतां येईल; व पुढें उत्तरपंचाल वंशांतील पिढ्या मोजूं लागलों तर सृंजय हा दशरथ आणि राम यांचा समकालीन होईल; व या ठिकाणीं आपण कालैक्यें गाठल्यानें आपली मोजणी बरोबर झाली असें होईल. या पिढींत पुष्कळ वंशांतून कालैक्यें आलेलीं आहेत.

विदेहाचा सीरध्वज जनक ( सीतेचा पिता ), अंगाचा लोमपाद आणि वैशालीचा राजा प्रमति हे दशरथाशीं समकालीन होत.

राम आणि त्याचा भाऊ शत्रुघ्न यांचा यादव घराण्याशीं संबंध जोडणारी एक कथा आहे. प्रारंभीं ती अविश्वसनीय वाटली तरी इतर पुराव्यांवरून तींत तथ्य सांपडतें व कांहीं महत्त्वाच्या प्रादेशिक गोष्टींचा उलगडा पडतो. त्यांत ज्याला मधु-दानवांचा राजा म्हटलें आहे, तो वास्तविक यादववंशांतील मधु राजा होय. त्या कथेवरून पाहातां, मधूचें म्हणजे यादवांचें राज्य गुजराथेपासून यमुनेच्या तीरीं असलेल्या मधुवनापर्यंत पसरलें होतें. याच्या चवथ्या पिढींतील वंशज सत्त्वत असून सत्त्वतपुत्र भीम रामाच्या काळीं गादीवर होता. शत्रुघ्नानें लवण नांवाच्या राजपुत्राला मारून मधुवन तोडलें व त्या जागीं मथुरानगर स्थापिलें. रामाच्या मृत्यूनंतर भीमानें ती नगरी जिंकून तो तेथें राहिला व रामपुत्र कुश कोसल येथें राज्य करीत असतांना भीमपुत्र अन्धक मथुरेच्या गादीवर होता यावरून वरील गोष्टींत ऐतिहासिक तथ्य दिसतें.

वंशावळींतून भीम असें नांव आढळत नाहीं पण त्याच्या जागीं सात्वत असें नांव आहे. वंशावळी आणि कथा यांचा अंधकाला सत्त्वताचा नातू म्हणून, त्याला मधूच्या सहाव्या किंवा आठव्या पिढींत घालण्यांत एकमेळ दिसून येतो. तेव्हां यादव सत्त्वताला दशरथाशीं, सात्वताला रामाशीं आणि अन्धकाला कुशाशीं आपणांस एककाल करितां येईल आणि मधु व सूर्यवंशांतील शतरथ हे समकालीन होते असें म्हणतां येईल.

सत्त्वताचा दुसरा एक मुलगा भजमान यानें सृंजयाच्या एका किंवा दोघी मुलींशीं लग्न लाविलें. हा सृंजय उत्तरपंचाल घराण्यांतील सृंजय राजाच असावा. यावरून सृंजय हा सात्वताचा व त्याबरोबर रामाचाहि समकालीन ठरतो

व वर जें याचें स्थान ठरविलें आहे त्याला यानें दुजोरा मिळतो. आजमीढालाहि ऋतुपर्णाशेजारीं किंवा त्याच्या लगेच पुढें स्थान दिलें पाहिजे. सृंजयाच्या स्थानावरून ऋग्वेदांत वारंवार उल्लेखिलेल्या दिवोदास आणि सुदास यांचीं स्थानें ठरविण्याला मदत होते.

सृंजयाला मुद्गल इत्यादि पांच पुत्र होते. " माझे पांच ( पंच ) पुत्र पांच राज्यें रक्षण करण्याला समर्थ ( अलम् ) आहेत " असें तो म्हणतो यावरून पंचाल ( पंच+अलम् ) हें नवीन नांव पडून, जुनें ' क्रिवि ' असें जें देशाचें किंवा लोकांचें नांव होतें तें नष्ट झालें. या पंचालांची सोमक व त्याचा पुत्र जन्तु यांच्या कारकीर्दीपर्यंतच भरभराट होती; पुढें हें घराणें पृषताच्या कालापर्यंत नामशेष झालें (तेथपर्यंत वंशावळींत खाडे दिसून येतात ).

ऋक्ष (पहिला) , संवरण आणि कुरु यांचीं स्थानें अजमासानें ठरवितां येतात. पंचालांनीं संवरणाला त्याच्या राज्यांतून हांकून दिल्यावर, तो सिंधूच्या तीरीं पुष्कळ दिवस राहिला पुढें वसिष्ठ (वसिष्ठकुलांतील एक ) त्याच्याकडे येऊन त्याचा पुरोहित झाला व वसिष्ठाच्या प्रोत्साहनानें संवरणानें आपलें राज्य परत मिळविलें. पंचाल मुद्गलानंतरचे असल्यानें ही संवरणाची अधिकारभ्रष्टता मुद्गलाच्या नंतरची असली पाहिजे, आणखी असें दिसतें कीं ही गोष्ट दिवोदासाच्या कालापूर्वीहि आली नसली पाहिजे. कारण इंद्रोत आतिथिग्व ( बहुतेक हा दिवोदासपुत्र असावा ) ऋक्षाच्या पुत्राशीं उघडपणें स्नेहभावानें वागत असे (ऋ. ८. ६८ [५७] , १५-१७) तेव्हां ऋक्ष दिवोदासाचा समकालीन दिसतो.

संवरणाला सुदासानें अधिकारभ्रष्ट केलेसें दिसतें. ऋग्वेदांतलि एका सूक्तांत (ऋ ७. २०, २ ) त्याला युद्धें करावीं लागलीं व त्यानें आपलें राज्य वाढविलें असा उल्लेख आहे. त्याचें दाशराज्ञयुद्ध (७. १८; १९, ३; ६; ८) कदाचित् या गोष्टीशीं संबद्ध असूं शकेल. तें युद्ध परुष्णी (७. १८, ८-९ ) ( हल्लींची रावी नदी ) जवळ झालें; तेव्हां पौरवांच्या राज्यांतून तिकडे जाण्याखेरीज दुसरा त्याला मार्गच नव्हता. आणि ज्या अर्थी भरत लोक ( सोमवंशज ) त्याचे शत्रू होते, त्या अर्थी त्यांस प्रथम त्यानें जिंकलें. याचा परिणाम असा झाला कीं यादव ( मथुरेचे यादव ), शिबि ( आनव ) द्रुह्यू ( द्रुह्यूचे वंशज गांधार ), ( मथुरेच्या पश्चिमेकडील ) मत्स्य, तुर्वश ( तुर्वसूच्या वंशांतील कोणी राजा ) व इतर लहानसहान कुळांतील लोक पश्चिमेकडून त्याच्यावर उठले, आणखी, " वृद्ध कवष " या लढाईंत पाण्यांत बुडाला (७. १८,१२). एका तुर नांवाच्या ऋषीनें जनमेजयपारिक्षिताला ( संवरणाच्या पणतवाला ) महाभिषेक केला. याच्या पित्याचें नांव कवष होतें; हा कवष संवरणाचा समकालीन असला पाहिजे ( ऐतरेय ब्राह्मण २. १९; ७. ३४; ८. २१ ). हे दोनेहि कवष एकच होते, कारण " वृद्ध कवष" सुदासाच्या विरुद्ध बाजूला म्हणजे संवरणाच्या बाजूला होता आणि कवषपुत्रानें संवरणाच्या पणतवाला अभिषेक केला.

पौरवांची अधिकारभ्रष्टता सहदेवाच्या कारकीर्दींत व पुढें सोमकाच्या कारकीर्दीच्या आरंभींहि तशीच होती. कारण सोमकानें यमुनेच्या तीरीं जे यज्ञ केले तें त्याचें राज्य तेथें असल्याखेरीज होणें नाहीं. सोमकाच्या कारकीर्दीच्या प्रथम भागांत संवरणानें आपलें राज्य परत मिळविलें याविषयीं अनेक पुरावे देतां येतील. पहिला, सोमक आणि जन्तु यांच्या काळीं या पंचाल घराण्याला बरीच उतरती कळा लागली होती हें मागें सांगितलेंच आहे. दुसरा, सुदासाच्या स्तुतिपर सर्व सूक्तें वसिष्ठाचीं म्हणजे वसिष्ठकुलजांचीं आहेत. एकदां फक्त सोमक युवराज असतांना त्याची स्तुति केलेली आढळते. ही गोष्ट, वसिष्ठ संवरणाकडे गेला व त्याला राज्य परत मिळविण्याच्या कामीं त्यानें मदत केली, या मागील विधानाला पुष्टि देते. सोमकाचा पक्ष सोडून संवरणाला मिळण्याला वसिष्ठाला कांहीं तसेंच मोठें कारण झालें असलें पाहिजे. त्याची वागणूक सूडाची दिसते व याचें कारण सुदासाच्या वंशजांनीं त्याचे पुत्र मारले हें असावें. तिसरा पुरावा म्हणजे सोमकानें आणखी जास्त पुत्र मिळावेत म्हणून आपल्या पहिल्या जन्तु नांवाच्या मुलाचा यज्ञ केला. ही कथा स्पष्ट करण्याला दुसऱ्यांतील अनुमानाची मदत होते; कारण ज्या ऋत्विजानें असला अमानुष विधि केला तो वसिष्ठ तर खास नसला पाहिजे किंवा त्याची या कामाला संमति नसली पाहिजे. ×

या सर्व कारणांवरून संवरणाला सुदास किंवा सहदेव यांचा आणि कुरूला सोमक किंवा जन्तु याचा समकालीन करावें लागतें. कुरूची पुष्कळ प्रजा होती. त्यानें कुरुक्षेत्राला आपलें नांव देऊन, प्रयागच्या पुढें आपलें राज्य वाढविलें; त्यावरून त्यानें पंचाल काबीज केला असावासें दिसतें. त्याची उन्नति म्हणजे पंचालांचा ऱ्हास समजावा. अजमीढापासून संवरणापर्यंत जो खाडा दिसून येतो त्याला कारण उत्तरपंचालांचें वर्चस्व असतांना सोमवंशाला ग्रहण लागलें होतें. जन्तूपासून पृषतापर्यंतचा खाडा याच्या उलट स्थितीचा द्योतक आहे.

वसु चैद्योपरिचरानें नवीन चेदि व मगध घराणीं स्थापन केलीं. वंशावळींप्रमाणें तो कुरूच्या खालीं पांच पिढ्या व म्हणून दुसऱ्या जनमेजय परिक्षितानंतरचा होता. याला जनमेजयाच्या तीन चार पिढ्या खालीं न्यावा. म्हणजे, ययातीचा त्याच्या पुरु व इतर वंशजांजवळ असलेला रथ जनमेजयाकडून वसूकडे आणल्याबद्दलची कथा बरोबर पटते.

× ज्यानें वसिष्ठाला यातुधान असें संबोधून, त्याच्या तोंडावाटें ( ७. १०४, १५ ) ही ऋचा काढविली, तो हाच ऋत्विज असावा.

सोमवंशांतील अयुतनायानें पृथुश्रवसाच्या मुलीशीं लग्न केलें. तो अनुतायुमच असावा आणि पृथुश्रवस् दक्षिण पंचाल वंशांतील पृथुराजा असावा, असें दिसतें.

सोम, पंचाल, आणि द्विमीढवंश यांच्या शेवटच्या भागांतून बरीचशीं कालैक्यें आहेत. द्विमीढवंशांतील कृत हा हिरण्यनाभ नांवाच्या कोसल राजाचा शिष्य होता, तेव्हां तो हिरण्यनाभाचा तरुण समकालीन असला पाहिजे. दक्षिण पंचालाचा ब्रह्मदत्त आणि लोमवंशांतील प्रतीप समकालीन होते. कृताच्या नांवानंतर ज्याचें नांव आलें आहे त्या उग्रायुधानें जनमेजय दुर्बुद्धि आणि दक्षिण पंचालाचे सर्व नीप राजपुत्र आणि उत्तर पंचालाचा पृषताचा पिता किंवा पितामह जो नीप ( नील ) यालाहि ठार मारलें, आणि भीष्मानें शन्तनूच्या मृत्यूनंतर त्याला मारलें. म्हणून उग्रायुध शतनु आणि जनमेजय यांचा तरुण समकालीन आणि भीष्माचा वृद्ध समकालीन होतो. या कालैक्यांपासून कांहीं मनोरंजक गोष्टी उघडकीस येतात. उग्रायुधाला कृताचा पुत्र असें म्हणण्यांत येतें पण त्यांच्यांत चार पांच पिढ्यांचें अंतर आहे हें उघड दिसतें. याखेरीज, प्रतीपाची ब्रह्मदत्ताशीं व शन्तनूचीहि ब्रह्मदत्ताच्या तिसऱ्या पिढीशीं समकालीनता, प्रतीप आणि शन्तनु यांच्यांमध्यें एक दोन पिढ्यांचा खाडा असल्याचें दर्शविते. महाभारतांत किंवा पुराणांतून कोठेंहि अशा प्रकारचा खाडा असल्याचें दिग्दर्शित केलें नाहीं, तथापि ऋग्वेदांवरून तें सिद्ध आहे. कारण देवापि शन्तनूचा वडील भाऊ होता आणि देवापि स्वतःला आर्ष्टिषेण म्हणवितो याला सर्व ग्रंथांतून एकमत आहे. तेव्हां ऋष्टिषेण मध्यें घातला पाहिजे हें उघड झालें.

बाकीचे अखेरीचे समकालीन प्रसिद्धच आहेत तेव्हां त्यांच्याविषयीं कांहीं सांगण्याची जरूरी दिसत नाहीं.

वरील संशोधिलेलीं कालैक्यें एकाच जातीच्या पुराव्यावरून किंवा एकाच उपलब्ध माहितीवरून प्रतिपादिलीं नसून ऋग्वेदापासून तों रघुवंशापर्यंतच्या सर्व जातींच्या ग्रंथांवरून, निरनिराळ्या माहितीवरून व कथांवरून ताडिलेलीं आहेत.

बहुतेक सर्व वंशावळींच्या याद्या कौरवपांडव युद्धापर्यंतच आहेत. कांहीं ग्रंथांतून कांहीं कांहीं घराण्यांतील पुढील थोड्या पिढ्या किंवा या युद्धानंतर कांहीं वंशांत जे राजे होतील त्यांचीं नांवें दिलेलीं आढळतात. तथापि सर्व वंशावळींसंबंधींच्या सामुग्रींत हें युद्ध सर्वसमाप्तिदर्शक म्हणून प्रामुख्यानें नजरेस येतें. जणूं काय पूर्ण समृद्धि, सुधारणा आणि ज्ञान यांच्या कालानंतर अव्यवस्था आणि अंधकार यांचा काल सुरू झाला. कारण कोणतें कां असेना, तो प्रसंग अत्यंत महत्त्वाचा होता यांत संशय नाहीं. तेव्हां या अमदानीच्या कालापासून मागें सर्व वंशावळी कालानुक्रमें लाविल्या पाहिजेत.

या वंशावळींचा कालक्रमाच्या दृष्टीनें काय उपयोग असा प्रश्न साहजिक उद्भवतो. इक्ष्वाकूपासून भारतीय युद्धापर्यंत यांत ऱ्याण्णव नांवें आहेत. तेव्हां संबंध काळ १४०० वर्षांपेक्षां कमी असणार नाहीं. मान्धातृचा काळ युद्धापूर्वी अकरा शतकें, सगर, भरत आणि भगीरथ यांचा काल आठवें शतक, दाशरथी राम पांचव्या शतकाच्या अर्धांत, आणि दिवोदासापासून सोमकापर्यंतचे पांचाल राजे चौथ्या व पांचव्या शतकांत जातील.


वरील पारगिटरचें विवेचन फारसा बदल न करितां दिलें आहे यांत आमच्या मताप्रमाणें फेरफार करावे लागतात ते येणेंप्रमाणें.

( १ ) दिवोदास व सुदास हे पुरु होते हें ऋग्वेद कबूल करतो, पण पुरुंस पुन्हां दिवोदासाच्या शत्रूंत घालतो. त्यामुळें या कुलाची कुरुक्षेत्रीं स्थापना झाल्यानंतर त्याची पूर्वपरंपरा ब्रह्मिष्ठ व अजमीढ यांमार्फत देश्य पुरु घराण्याशीं जोडली गेली असावी अशी कल्पना उत्पन्न होते. अजमीढापासून कांहीं राजांकडे दिवोदासाचें पूर्वजत्व स्थापित झालें असावें व अशानें दिवोदासवंशजांचा परकेपणा गेला असावा. ही कल्पना केली. म्हणजे सुदासाला त्याच्या पश्चिमेकडील राजांनीं वेढलें अशी कल्पना करण्याचें, व तो पश्चिमेकडून आला ही ऋग्वदोक्त पुराव्यानें सिद्ध होणारी गोष्ट दुर्लक्षिण्याचें प्रयोजन ठरत नाहीं. अजमीढापासून ऋक्षापर्यंत यादी नाहीं. तिच्या अभावाचेंहि स्पष्टीकरण यानें होईल. नीलापासून ब्रह्मिष्ठापर्यंतचे राजे हे स्थानिक असावेत आणि त्यांच्या वंशजांस नाहींसें केल्यानंतर म्हणजे ऋक्षापासूनच्या चारपांच पिढ्यापर्यंत अजमीढवंशजता पैजवनांस प्राप्त झाली असावी. ऋक्ष हा कोणी दिवोदासाशीं समकालीन देश्य पुरु घराण्याचा राजा असावा.

( २ ) दिवोदासाशीं समकालीन कुत्स, आयु, त्याचा शत्रु तुर्वयाण यांच्या अस्तित्वाबद्दल ऋग्वेद साक्ष देतो. पण या याद्या यासंबंधानें मूक आहेत. पुरुकुत्स व त्रसदस्यु यांचा उल्लेख सूर्यवंशांत केला आहे. पण त्याशीं समकालीन असा एक दिवोदास काशीवंशांत दाखविला आहे. पण तें कालैक्य भ्रामक आहे. कां कीं, त्या वेळेस कुत्स वगैरे मंडळी सरहद्दीवर होती हें स्पष्ट दिसतें. आणि काशीवंशाइतका दूरचा दिवोदास असता तर त्याचा पंजाबांत उल्लेख न येता. म्हणून असें समजावें कीं, दिवोदासाशीं समकालीन जे कुत्स वगैरे राजे झाले त्यांचा संबंध हिंदुस्थानांत फारसा न आल्यामुळें त्यांचीं नांवें राजावलिप्रविष्ट झालीं नाहींत.


( ३ ) ऋग्वेदांत ज्या राजांचा उल्लेख आला आहे त्यांच्या पाठीमागें सूर्यचंद्रसंभवाचे लिगाड लावलें गेलें नाहीं तें देश्यांस सूतसंस्कृतीमुळें लावलें गेलें असावें. आणि पुढें दिवोदासाला पौरवत्व त्याच्या अंगीं असल्यामुळेंच ययातिसंभवत्व व ऐलत्व हीं लागलीं असावीत. सुदासीदवोदास कथेचा दुवा निश्चयात्मक रीतीनें सूतसंस्कृतींतील याद्या व वेद यांमध्यें जितका संबंध उत्पन्न करितो तितका स्पष्ट संबंध दुसरा कोणताहि नाहीं.

## कुरुयुद्धांतील युध्यमान राष्ट्रें.




५२८ व्या पृष्ठासमोर.

# प्राचीन मिसरी संस्कृति.



मिसरी साम्राज्य, खि. पू. १४५०. ( जमिनी- कडील सरहद्द जाड रेषेनें दाखविली आहे. )



इजिप्तचा बलाढ्य राजा दुसरा रामेसिस.

१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ १०



११ १२ १३ १४ १५ १६ १७ १८

पापपुण्याचा निवाडा ( अनीच्या पापायरसवरून ).

१ हु आणि सा, २ हाथोर, ३ होरस, ४ इसिस व नेफतिस, ५ नुत, ६ सेब, ७ तेफनुत, ८ शु, ९ तेमु, १० हार्माचिस–पापपुण्याचा निवाडा करणारे देव; ११ अनी व त्याची स्त्री थुथु; १२ मेस्खेनेट व रेनेनेट, जन्मकाल व जन्मभूमीच्या देवता; १३ तराजूच्या पारड्यांत टाकलेलें सदसद्विवेकबुद्धि-दर्शक अनीचें काळीज ( अनीचा आत्मा मनुष्यमुखी पक्षिरूपानें डाव्या बाजूस बसला आहे ); १४ अनीचें दैव; १५ तराजूचा कांटा पाहणारी अनुबिस देवता; १६ दुसऱ्या पारड्यांतील पुण्यदर्शक मआतचें पीस; १७ निवाड्याचा निकाल लिहून घेणारा देवाचा कारकून थोथ; १८ मृतभक्षक आमाम किंवा आमित नामक राक्षस.

# बुद्धपूर्व जग.

## उत्तरभाग.

### प्रकरण १ लें.

#### पश्चिमेकडील प्राचीन संस्कृतींचें स्थूल विवेचन.

**इतिहासक्षत्र.**—प्रस्तुत विभागाच्या पूर्वभागांतील दुसऱ्या प्रकरणांत विश्वोत्पत्तीपासून असुरराष्ट्रसंस्थापनकालापर्यंत मनुष्यसंभवपूर्व सृष्टीचा आणि मनुष्यसंभवोत्तर मनुष्यभ्रमणाचा इतिहास दिला आहे व जेथें इतिहास देणें शक्य नसेल तेथें त्या इतिहासाच्या संशोधनाच्या प्रचलित पद्धती दिल्या आहेत. तेथून एकदम भारतीय इतिहासाकडे अवलोकन केलें आहे आणि भारतीय राजकीय व सांस्कृतिक इतिहास जवळजवळ बुद्धकाळापर्यंत आणून ठेविला आहे. आतां बुद्धपूर्वकालांतील जो इतिहास द्यावयाचा राहिला त्याच्याकडे वळलें पाहिजे. जो राहिला त्याचे स्थूलपणानें तीन विभाग करतां येतील. एक विभाग म्हटला म्हणजे मिसरी, असुरी–बाबिलोनी, व ईजिअन या संस्कृतींचा व चीनच्या संस्कृतींचा. हा सर्व संस्कृतींचा इतिहास परस्परसंबद्ध आहे. दुसरा उर्वरित इतिहासभाग म्हटला म्हणजे भारतीयांच्या पूर्वजांचा इतिहास होय. या इतिहासाचीं अंगें म्हणजे अनेक प्रकारचे अभ्यास होत. आर्यन लोकांच्या मूलगृहकालीन इतिहासाचें संशोधन, त्यांचेंच पर्शुभारतीय कालीन संशोधन व आर्यन् जातींच्या पश्चिमसंचाराचें संशोधन. हे मुख्यतः यांत येतात. उर्वरिताचा तिसरा विभाग म्हटला म्हणजे या अधिक प्रगत संस्कृतीबाहेर जीं राष्ट्रें लोक होते त्यांजविषयींचें संशोधन. व या तिन्ही विभागांकडे सविस्तर लक्ष दिलें म्हणजे प्राचीन जगाची स्पष्ट व परस्पर–संबद्ध अशी कल्पना येईल.

**इतिहाससाधनें.**—या कालाविषयीं स्थूल गोष्टी सांगावयाच्या म्हटल्या म्हणजे अत्यंत प्राचीनकालचे अवशेष पुष्कळ आहेत पण लेखस्वरूपाचे फारच थोडे आहेत. अमर्ना येथील अंकित लेख व मिटनी यांचे अंकित लेख यापेक्षां अधिक प्राचीन इतक्या महत्त्वाच्या लेखांची आपणांस माहिती नाहीं. इजिप्तचें संशोधन सध्या फार जोरांत चालू आहे आणि त्यामुळें नवीन माहिती दरमहा बाहेर पडत आहे. यामुळें आम्ही लिहितांना जें लिहूं त्यांत एक दोन वर्षांमध्येंच किती फरक पडेल याविषयीं आज कांहींच अजमास करतां येत नाहीं. या संशोधनामध्यें भारतीय इतिहासावरहि अधिक प्रकाश पडेल अशी आशा केल्यास ती गैरवाजवी होणार नाहीं.

**भारतीय व पाश्चात्य प्राचीन संस्कृतींचा परस्परसंबंध.**—भारतीय इतिहासाच्या अवगमनासाठीं प्रत्येक कालाचें विवेचन करतांना सर्व जगाकडे नजर फेंकली पाहिजे. ज्या प्राचीनकाळीं आपल्या देशांत सुव्यवस्थित राज्यें होतीं आणि त्यांचें अस्तित्व दाखविणारें आणि प्रौढ विचार व्यक्त करणारें वाङ्मयहि होतें, त्या काळीं आज प्रगमनशील समजला जाणारा जगाचा म्हणजे यूरोपचा भाग सुधारणेच्या दृष्टीनें अत्यंत बाल्यावस्थेंत होता. त्या प्राचीनकाळीं कांहीं राष्ट्रें सुसंस्कृत झालीं होतीं, नव्हतीं असें नाहीं. पण तीं राष्ट्रें आज नामशेष झालीं आहेत. आणि चीन खेरीजकरून इतरांच्या संस्कृतींचें सातत्य नष्ट झालें आहे. भारतीय संस्कृतीचा चार हजार वर्षांचा इतिहास आपणास बराचसा सातत्यानें लिहितां येतो, पण तो इतिहास जगाच्या इतर इतिहासाशीं सापेक्षतेनें लिहावयाचा झाल्यास आज या संस्कृतीशीं व राष्ट्राशीं तर उद्यां त्या संस्कृतीशीं व राष्ट्राशीं संबंध येतो. पृथु, पर्शु, शक, मग, असुर, यवन इत्यादि राष्ट्रांचा उल्लेख आपल्या ग्रंथांत वारंवार येतो तेव्हां त्या राष्ट्रांच्या समकालीन प्रदेशव्यासींचें आणि संस्कृतीचें सामान्य ज्ञान तरी आपणांस पाहिजे. असुरांची भौतिक संस्कृति आपणांपेक्षां अधिक पाहून भारतीयांनीं असुरांच्या संपत्तीशीं भुताटकीचा संबंध जोडला, इत्यादि प्रकार आपण पौराणिक ग्रंथांवरून पाहतोंच तर असुरांची स्थिति काय होती? हे असुर कोण होते? हें आपणांस समजलें पाहिजे. भारतीय संस्कृतीचा बराचसा विकास होऊन ती संस्कृति जगज्जेती होण्याच्या मार्गास लागली तेव्हांपासून इतर संस्कृतीशीं झालेलीं युद्धें व त्या युद्धांनंतर उरलेले भारतीय संस्कृतीचे अवशेष या गोष्टी प्रस्तावनाखंडाच्या पहिल्या भागांत वर्णन केल्या आहेत. दुसऱ्या विभागांत व तिसऱ्या विभागाच्या पूर्वभागांत भारतीय संस्कृतिघटना दाखविली आहे. भारतीय संस्कृतीच्या आरंभकालीं जो जगाचा इतिहास भारतीय इतिहासाच्या दृष्टीनें विचारणीय आहे, तिकडे त्यावेळीं लक्ष देतां आलें नाहीं. आतां जगाच्या अत्यंत प्राचीन संस्कृतींकडे आणि त्यांशीं भारतीयांच्या संबंधांकडे वळूं. आणि वेदकाळाच्या सुमारास भारताबाहेरील जगानें संस्कृतिसंवर्धनाच्या प्रयत्नांत काय यश मिळविलें तें पाहूं.

**प्राचीन संस्कृतींचें जन्मस्थान.**— संस्कृतीच्या इतिहासांत असें दिसून येईल कीं, धातूंचा उपयोग, सामा-

न्यतः वाढलेला श्रमविभाग, नगरस्थापना, आणि राजशासित राष्ट्रव्यवस्था आणि सृष्टीचा मनुष्यप्राण्यांकडून अधिकाधिक उपयोग या तऱ्हेची संस्कृति वाढावयास योग्य परिस्थिति, कृषिकर्म जेथें बरेंच सोपें होईल इतकी उष्णता व पाण्याचा मुबलक पुरवठा ज्या ठिकाणीं असेल तेथेंच दृष्टीस पडते. यामुळेंच नील, युफ्रेटीस, सिंधु, गंगा व यांगत्सी या नद्यांच्या आसपासचे मुलुख हे संस्कृतिवर्धनाच्या प्राचीन इतिहासांत बरेच महत्त्वाचे दिसतात. प्राचीनकाळीं मनुष्यप्राण्यानें आपली करामत येथेंच दाखविली, आणि संस्कृति जेव्हां अधिक वाढली तेव्हां जगाचा अधिक थंड भाग त्यास उपयोगास आणतां आला. प्राचीन यूरोपांत मनुष्यप्राण्यास सृष्टीशीं लढावयास आणि सृष्टीवर जय मिळावयास उपयोगी पडणारी संस्कृति अधिक उष्ण आणि मुबलक पाण्याच्या प्रदेशांत तयार झाली. अमेरिकेच्या सुसंपन्न भूमीचा कमी प्रगति झालेल्या ताम्रवर्ण मनुष्यास उपयोग करतां आला नाहीं. पण उष्ण प्रदेशांतील गुरूंची विद्या घेऊन थंडप्रदेशांतील मनुष्यांनीं ती अधिकाधिक वाढविली तेव्हां त्यांस अमेरिकेंतील अलोट पण स्तिमित संपत्तीचा उपयोग करतां आला.

**प्राचीन संस्कृतींचें स्थूल पर्यालोचन.**—प्राचीन संस्कृतीच्या इतिहासाचे आतां थोडक्यांत पर्यालोचन करूं, आणि ज्या वेळेस आपल्याकडे ऋषी व आचार्य सर्व जगाला आदर्शभूत असे विचार व्यक्त करीत होते आणि रामायणादि ग्रंथांचा पाया ज्या वेळेस रचला जात होता आणि राजवंशांची वंशावळी तयार होत होती आणि हिंदुस्थानांतील अंबरीष, मान्धाता, मरुत्त इत्यादि थोर पुरुषांचीं चरित्रें कुशीलवांकडून राखिलीं जात होतीं, आणि प्राचीन विद्येचें एकीकरण करण्यासाठीं वेदांच्या संहिता तयार होत होत्या त्या वेळेस इतर जगांत काय हालचाली दृष्टीस पडतात तें पाहूं.

जगाकडे इतक्या प्राचीनकाळीं नजर फेंकतांना पहिली क्रिया ही कीं प्राचीनकाळीं जगाचा कोणता भाग वसला होता, आणि विशेष वर्णनासाठीं आपणांस कोणता भाग घ्यावयाचा याचा निर्णय करणें. आतांपर्यंतच्या पुराव्यावरून एवढें म्हणतां येईल कीं, मनुष्यप्राण्याची वस्ती चारहि खंडांत झाली होती. विशेष वाढलेल्या संस्कृतीसंबंधानें प्रत्येक खंडांविषयीं स्थूल मानानें येणेंप्रमाणें माहिती देतां येईल.

अ मे रि का.—ख्रिस्ती शकाच्या दहाव्या शतकाच्या पुढें पेरु व मेक्सिको यांचा इतिहास सांपडतो. ख्रिस्ती शकापूर्वी काय स्थिति असावी याची आज कल्पना नाहीं. मनुष्य प्राण्याचें उत्पत्तिस्थान अमेरिका होतें असें म्हणणारेहि कांहीं शास्त्रज्ञ आहेत. प्रास्तरसंस्कृतीचे अवशेष तेथें सांपडावे यांत नवल नाहीं. कां कीं बराचसा भाग पाश्चात्त्य लोक आले त्यावेळेसदेखील प्रास्तर संस्कृतींत होता. मांस्टाडान हें शास्त्रीय नांव ज्यास दिलें आहे असा एक पूर्वयुगीन प्राणी अमेरिकेंत असतां त्या कालांतहि मनुष्यप्राणी अमेरिकेंत होता असें दाखविणारे अवशेष तेथील भूस्तरशास्त्रज्ञांस परिचित आहेत.

आ फ्रि का.—इजिप्त ( अबिसिनियासह ) आणि ट्युनिस हे देश सोडून उरलेलें खंड विचारांत घेण्याजोगें नव्हतें. ग्रीक संस्कृति इ. स. ७७६ च्या नंतर आफ्रिकेंत आलेली असावी. मोरोक्कोमध्यें जीं मोठीं पाषाणाचीं कृत्यें सांपडतात त्यांचा काल अज्ञात आहे.

यु रो प-इ जि अ न.— मायसिनियन संस्कृतिची माहिती बरीच मिळाली आहे. इतर भागाची माहिती म्हणजे ख्रि. पू. १५०० च्या सुमारास तेथील लोक लोहपूर्व सांस्कृतिक स्थितींत होते.

ए शि या म ध्यें.—फिनिशियन, बाबिलोन, असुर, अक्कड, सिरिया, सायप्रस, पालेस्टाइन ( यहुदी लोकांपूर्वीचें ), चीन या राष्ट्रांची कांहीं माहिती मिळते. फ्रिजिअन हे नंतरचे होते. यहुदी वगैरे राष्ट्रें प्राचीन खरीं पण तीं सर्व ख्रि. पू. १५०० नंतरचीं आहेत.

ख्रि. पू. १५०० च्या पूर्वीच्या कालाचें सविस्तर वर्णन करण्यासाठीं जे देश घ्यावयाचे ते असे असले पाहिजेत कीं, ज्यांची संस्कृति बरीच वाढली होती. या ठिकाणीं प्रास्तर-संस्कृतीच्या पलीकडे जीं राष्ट्रें गेलीं नव्हतीं अशांचा इतिहास आपणांस घेतां येत नाहीं.

यूरोपीय संस्कृतीचा आरंभ ईजिअन संस्कृतीच्या रूपानें तर खास झाला होता. पण ग्रीक व मायसिनिअन संस्कृतींमुळेंहि कांहीं आरंभ झाला होता. शिवाय यूरोपच्या इतर कांहीं भागांत ब्रांझचीं भांडीं करण्यापर्यंत संस्कृति वाढली होती. या सर्व परिस्थितीचा आपणास विचार करितां हे उघड होत आहे कीं, ( १ ) इजिप्त व क्रीट ( २ ) सायप्रस ( ३ ) बाबिलोनिया, खाल्डिया व असुरिया ( ४ ) फिनिशिया ( ५ ) पालेस्टाईन ( यहुदीपूर्व ) ( ६ ) हिटाइट ( ७ ) चिनी. या संस्कृतीविषयीं आपणास विशेष माहिती दिली पाहिजे.

इजिप्तची संस्कृति अधिक प्राचीन कीं बाबिलोनियांतील अधिक प्राचीन या विषयावर आज निश्चयानें सांगतां येत नाहीं. संस्कृतीच्या कोणत्या विकासकालांत आपण तिला बरीच प्रगत म्हणावें हा प्रश्न पुढें येतो. शिवाय कोणती तरी एक वाढ लोकांस सुधारलेलें म्हणण्यासाठीं निश्चित केली तरी रोज निघणारे नवीन शोध जुनें मत बदलावयास लावतात.

इजिप्तमधील ख्रिस्तपूर्व सात हजार वर्षांच्या सुमाराचीं मातीचीं भांडीं सांपडलीं आहेत, आणि असुरिया व बाबिलोनिया या विषयींचे तज्ज्ञ ख्रिस्तपूर्व ३८०० वर्षें, ४५०० वर्षें, ७००० वर्षें इतक्या जुन्या काळाच्या गोष्टी मोठ्या धैर्यानें सांगण्यास पुढें येत आहेत. ब्रिटिश म्युझियम मधील कांहीं लेखांवर ख्रि. पू. ४५०० अशी नोंद केली आहे. आणि पेन्सिल्व्हॅनिया युनिव्हर्सिटीनें निप्पुर येथें जें संशोधन चालविलें आणि धूलिकणाचे थर जमण्याचें जें त्यांनीं गणित

केलें त्यावरून ९००० वर्षांपूर्वीच्या गोष्टी सांपडल्या आहेत असें म्हणतात.

खि. पू. १५०० सुमारचा इजिप्तचा व बाबिलोनियाचा इतिहास द्यावयाचा म्हणजे दोन्ही साम्राज्यांमध्यें पांच सहा हजार वर्षें जें संस्कृतिवर्धन झालें त्याचा इतिहास द्यावयाचा. निप्पुर इत्यादि शहरें ज्या लोकांनीं वसविलीं ते लोक कोठून आले त्या लोकांच्या वसाहतकालीं काय स्थिति होती इत्यादि गोष्टींसंबंधानें लिहावयाचें झणजे खि. पू. ८००० वर्षांपर्यंत जावें लागतें किंवा काय कोण जाणे. प्राचीन इतिहासासंबंधानें आपणांस तात्पुरती अशी कल्पना केली पाहिजे कीं, खि पू ५००० वर्षांच्या सुमारास नील व युफ्रेटीस नदींच्या आसमंतांतील प्रदेश कांहींशा सुधारलेल्या लोकांनीं वसला गेला होता. या लोकांत राजे होते, उपाध्ये होते, देवळें होतीं, सामान्य प्रकारचे कायदे होते आणि मनुष्योपयोगी कला हि वाढल्या असल्या पाहिजेत. या कालाशीं तुलना केली असतां खि. पू. १५०० हा बराच अर्वाचीन काल भासतो.

या दोन्ही संस्कृतींशीं इजियन संस्कृतीचा झणजे क्रीट बेटांतील लोकांचा संबंध असावा, असें दिसतें. इजियन संस्कृति झणजे पूर्वग्रीकसंस्कृति.

एशिया खंडांतील प्राचीन संस्कृतींचा प्रदेश म्हटला झणजे स्मरनापासून चीन पर्यंत पसरलेला पंचवीस ते चाळीस या उत्तर अक्षांशांतील प्रदेश होय एजिअन संस्कृति ही देखील या प्रदेशांतीलच होय. व इजिप्तची संस्कृति या भूभागांतच विकसित झाली.

ईजिप्तची संस्कृति व बाबिलोनी संस्कृति या दोहोंचा एकमेकांशीं संबंध हो॰ा व दोहोंचा पश्चिमेकडे ग्रीसशीं व पूर्वेकडे इराणी व भारतीय या संस्कृतींशीं संबंध होता.

**बाबिलोनी व मिसरी संस्कृतीचा परस्पर संबंध** — बाबिलोनियन संस्कृतीचीं दक्षिणेकडे सुमेर व उत्तरेकडे अक्कड हीं दोन केंद्रस्थानें होतीं. त्यापैकीं सुमेर हें जास्त प्राचीन होतें. होमेल या प्रसिद्ध पुराणवस्तुशास्त्रज्ञानें कांहीं आधार देऊन ईजिप्तची संस्कृति बाबिलोनियन संस्कृतीपासूनच निघाली असावी असें प्रतिपादन केलें आहे. ह्या गोष्टीस मुख्य आधार ह्या दोन संस्कृतींतील दैवत संप्रदायांतील साम्य हा होय. होमेल म्हणतो बाबिलोनियन लोकांप्रमाणेंच ईजिप्त मधील लोकांतहि आकाश देवता "नु" ही सर्व देवतांत प्रमुख समजली जात असे, "नु" चा पुत्र इजिप्तमध्यें "शु" या नांवानें ज्ञात असून त्याला वायुदेवता कल्पिलें होतें. व "शु" चा पुत्र "केब्" अथवा "सेब्" या नांवाचा असून त्याला पृथ्वी देवता मानीत असत. "शु" आणि "सेब्" यांच्या पत्नींचीं नांवें अनुक्रमें "तेफ्नुत्" आणि "नुत्" हीं असून त्यांना आकाशदेवता असें म्हणत असत. बाबिलोनियन लोकांप्रमाणेंच मिसरी लोकांतहि अशी कल्पना होती कीं, पृथ्वी देवता "सेब्" आणि त्याची स्त्री आकाशदेवता "नुत" यांस चार मुलें झालीं. त्यांचीं नांवें "ऑसेरिस्, इसिस्, सेत् आणि नेब्थात् अशीं होतीं. बाबिलोनियांतील मेरॉडॉक आणि नेर्गल याप्रमाणेंच ऑसिरिस आणि सेत् ह्या इजिप्तमधील अनुक्रमें उन्हाळ्यांतील व हिंवाळ्यांतील सूर्यदेवता असून त्यांचें एकमेकांशीं पटत नसे. बाबिलोनियामध्यें ज्याप्रमाणें मेरॉडॉक ह्या देवतेचें नांव लिहिण्याकरितां घर आणि डोळा यांचीं चिन्हें काढीत असत त्याप्रमाणेंच ईजिप्तमध्येंहि ऑसिरिस ह्या देवतेचा उस् (घर) आणि इर (डोळा) या खुणांनीं बोध होत असे. मात्र मिसरी लोक या खुणांचा मूळ अर्थ काय हें विसरून गेले होते. मिसर देशांतील चित्रलिपीचा आपणांस अर्थ कळूं लागण्यापूर्वीच बऱ्याच जुन्याकाळीं प्लुटार्चनें कांहीं दंतकथा लिहून ठेविल्या आहेत. त्यांमध्यें दुष्ट देवता "सेत्" हिनें आपला भाऊ "ऑसिरिस" याचा केलेला पराभव, ऑसिरिसचा पत्नी "इसिस" हिनें आपल्या पतीकरितां केलेला शोक आणि ऑसिरिसचा पुत्र होरस यानें आपल्या बापाच्या मृत्यूचा घेतलेला सूड इत्यादि गोष्टी वर्णन केलेल्या आहेत. या गोष्टी एका सृष्टिचमत्कारावरील रूपकाप्रमाणें दिसतात व वरतीं दिलेल्या देवतांच्या वंशावळीशीं त्याचा निकट संबंध दिसतो. त्याप्रमाणेंच ही दंतकथा बाबिलोनमधून पश्चिमअशियाकडे प्रसार पावलेल्या ताम्नूज देवतेच्या दंतकथेसारखीच दिसते. दुसरी एक ईजिप्त मधील वाङ्मयांत विशेषतः मृतसंबंधी ग्रंथांत वारंवार आढळून येणारी बाबिलोनियन कालांतील दंतकथा झटली म्हणजे "रे" या सूर्य देवतेचें मेघाधिष्टित असुर "अपेप्" याशीं झालेल्या युद्धासंबंधीं होय. हा असुरच जलप्रलयाला कारण झाला अशी समजूत होती. व या गोष्टी जुन्या कराराच्या प्रवक्त्यांना माहीत होत्या असें दिसतें. बाबिलोनियन व मिसरी लोकांमध्यें सामान्य अशा दुसऱ्या कल्पना म्हटल्या म्हणजे जीविताचा एक वृक्ष आहे व सुखी मनुष्यांना विश्रांति मिळण्याची एक जागा अथवा बेट आहे या होत. या बेटास मिसरी ग्रंथांत "यलूची क्षेत्रें" असें म्हटलें आहे व बाबिलोनियन ग्रंथांत "अरल्ल" असें नांव आहे. त्याप्रमाणेंच मिसरी लोक आपल्या निरनिराळ्या देवतांचीं नांवें लिहिण्याकरितां जीं चिन्हें वापरीत तींहि त्यांनीं प्राचीन बाबिलोनियन लोकांपासूनच घेतलीं असावीं. उदाहरणार्थ मार्डुक् अथवा मेरडॉक् आणि रे ऑसिरिस् या देवतांचें चिन्ह बैल आहे. "एआ" आणि "ख्नुम" यांचें चिन्ह एडका आहे. "निन्दार" व बाल सूर्यदेवता "होर" या दोहींचेंहि चिन्ह गरुड किंवा चिमण्याससाणा आहे. ईस्टर आणि इसिस् दोन्ही देवताहि गो चिन्हानें दर्शित होतात. नेर्गल या देवतेचें चिन्ह कोल्हा व सेत संबंधीं अनेक देवता दाखविणारीं चिन्हें बाबिलोनिया मिसरी लोकांत एकच होतीं. डॉ. होमेल यांचें असें मत आहे कीं, बाबिलोनियांतील देवळांना ज्या सात पायऱ्या असत त्यावरूनच मिसरी लोकांस पिरॅमिडची कल्पना सुचली असावी. कारण, त्याला सात टप्पे असत. तसेंच ईजिप्तमधील पिरॅमिडस् हीं

जशीं तेथील राजांचीं कबरस्थानें आहेत तशींच बाबिलोनियांतील देवळें हींहि कबरस्थानाचें कार्य करीत. इजिप्तमधील पौंड किंमतीचें नाणें बाबिलोनियामधील चांदीच्या मीना नांवाच्या नाण्यापासून निघालेलें दिसतें. तसेंच इजिप्तमधील एल-नांवाचें लांबीचें परिमाण बाबिलोनियांतील त्याच नांवाच्या परिमाणापासून घेतलेलें असावें. बाबलोनियन लोकांनीं हें लांबीचें परिमाण "द्वितीय लंबक" याच्या लांबीवरून बसविलें होतें. इजिप्तमधील ज्योतिःशास्त्राचें मूळहि बाबिलोनियांतच असलें पाहिजे. तशींच इजिप्तमधील चित्रलिपींतील अनेक चिन्हें बाबिलोनियांतील तत्तदवस्तुबोधक चिन्हांशीं आकाराच्या बाबतींत अगदीं सारखीं दिसतात. यापैकीं ठळक उदाहरणें म्हणजे आयुष्य, भाऊ, गुलाम, डावीबाजू, आकाश-नौका, करणें, रात्र, कुरण, आकाशसिंधु वगैरे दाखविणारीं चिन्हें होत.

बाबिलोनियांतील प्रथम ऐतिहासिक गोष्ट आपणांला निश्चितपणें सांगतां येते ती ख्रिस्तपूर्व ३८०० च्या सुमाराची होय. या वेळीं सार्गन व त्याचा पुत्र नरमसीन हे अक्कड येथें राज्य करीत होते. यांचीं नांवें खोदलेल्या वीटा ज्या फरसबंदीमध्यें सांपडल्या आहेत तिच्या खालीं जो कचरा वगैरे सांचला आहे तो सांचण्यास तीन हजार वर्षें लागलीं असावीं असें तज्ज्ञांचें मत आहे. हें खरें असल्यास अक्कड येथील संस्कृति ख्रिस्तपूर्व ६८०० वर्षांइतकी जुनी आहे असें म्हणावें लागेल. अक्कड येथील संस्कृतीपेक्षां सुमेर येथील संस्कृति जास्त जुनी आहे असें दाखविण्यास आधार आहे. बाबिलोनियामध्यें बऱ्याच उत्तरकालापर्यंत सुमेर येथील भाषा पवित्र मानली जात असे. सर्व प्राचीन शिलालेख त्याच भाषेंत खोदलेले आहेत. तशींच प्राचीन राजांचीं नांवेंहि सुमेरियन आहेत. सुमेरियन लोक हे कोणत्या मानववंशांतील होते, हें अद्यापि निश्चित झालें नाहीं. परंतु ते मूळचे अक्कड येथील सेमिटिक लोकांपेक्षां निराळे होते हें निश्चित आहे. व त्यांचें मिश्रण फारच प्राचीन कालापासून होत होतें एवढी गोष्ट दिसून येते.

आतां आपण इजिप्तच्या प्राचीन इतिहासाकडे वळूं.

## प्रकरण २ रें.

### मिसर अथवा इजिप्त देशाचा प्राचीन इतिहास.

शिकंदर बादशहाच्या स्वारीपूर्वी मिसर देशांत ३१ राजघराणीं एकामागून एक अशीं होऊन गेलीं. हें एकतिसावें राजघराणें इराणी होतें. ख्रि. पू. १५०० च्या सुमारास १८ वें राजघराणें चालू होतें व मिसरचें साम्राज्य फार वाढतें होतें. मिसर देशांतील लोकांच्या प्राचीन युगांत संस्कृतीची मजल कोठवर गेलेली होती हें भूखननादि मार्गांनीं गोळा केलेल्या पुराव्यांनीं ठरविणें हा एक अलीकडील पुराणवस्तुशास्त्रवेत्त्यांचा विशिष्ट मार्ग आहे. इजिप्तमधील चौथ्या राजघराण्याच्या काळापूर्वीं अनेक शतकें नील-थडीमध्यें राहणाऱ्या लोकांची संस्कृति बऱ्याच प्रगल्भ दशेस पोंहचली होती हें पन्नास वर्षांपूर्वींच्या विद्वानांसहि अगदीं स्पष्ट होतें तरी त्या काळची सविस्तर माहिती देणारीं साधनें उपलब्ध होतील किंवा नाहीं याविषयीं आशा करण्यास इ. स. १८९५ पर्यंत फारशी जागा नव्हती. परंतु त्या सालापासून ऐतिहासिक साहित्याच्या अभावामुळें श्मशानवत् भासणाऱ्या त्या प्रागैतिहासिक म्हणून समजल्या जाणाऱ्या युगासंबंधीं नवीन नवीन शोध लागत आहेत व इजिप्तचा ख्रिस्तपूर्व पांच सहा हजार वर्षांइतका जुना काल ऐतिहासिककालामध्यें मोडेल इतकी माहिती उपलब्ध झाली आहे. मिसर देशांतील प्राचीन कला व इतिहास यांचा निकट संबंध असल्यामुळें त्यांच्या कलाविषयीं अगोदर थोडेसें विवेचन केलें पाहिजे.

**प्रागैतिहासिक शिल्पज्ञान.**—मिसर देशांतील प्राचीन काळचे सुसंस्कृत लोक ठाकठीकपणा व हुबेहूबपणा इत्यादि शिल्पविषयक गुणांमध्यें बरेच निष्णात होते परंतु त्यांस निरनिराळ्या अवयवांचे आकार कसे दाखवावेत हें माहीत नव्हतें. असंस्कृत लोकांप्रमाणेंच ते आपल्या शिल्पकामांत अवयव किंवा त्यांचे अग्रभाग दाखवीत नसत. आकृतीच्या रेखीवपणापेक्षां मनोविकारांचें स्पष्ट छायाचित्र उमटविण्याकडे त्यांचें विशेष लक्ष होतें.

या युगांतील स्त्रियांच्या ज्या मूर्ती सांपडतात त्यांस पावलें नसून त्यांचा खालील भाग चिकटलेला व एका टोंकापर्यंत निमुळता होत गेलेला असतो. दोन हातांच्या जागीं दोन खुंटे असतात. नाकाचा भाग पक्षांच्या चोंचीसारखा असून डोळे कमे तरी दाखविलेले दिसून येतात. पुरुषांच्या मूर्तींमध्यें फक्त शिरोभागच आढळतो. प्रथम त्या पशुदंतावर खोदलेले असत. नंतर फण्यांच्या अग्रभागावर खोदीत असत. या सर्व मूर्तींमध्यें उंच भालप्रदेश, व अणकुचीदार दाढ्या दिसून येतात. चर्येवर रानटीपणाची छाप नसून एक प्रकारचा गंभीरपणा दिसून येतो. त्यांतील डोळे दोन भोकें पाडून व त्यांत कंवटीचे मणी बसवून दाखविण्यांत येत असत. मानवी आकृतीप्रमाणें इतर प्राण्यांच्या आकृतीहि कशा तरी ओबडधोबड कोरलेल्या असत. त्या बहुधा फण्यांच्या किंवा टांचण्यांच्या डोक्यांवर दिसून येतात. सिंहाच्या बऱ्याच मूर्ती सांपडतात परंतु त्यांत पायांचा भाग नीटपणें दाखविलेला नसतो. श्येनांच्या मूर्तींत तर पायांचा मुळींच पत्ता लागत नाहीं.

या युगाच्या शेवटच्या भागांत उठावाचें खोदीव काम करण्यास सुरवात झाली असावी असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसून येतें. या कलेची त्यावेळीं नुकतीच सुरवात असल्यामुळें ती या कालीं प्रगल्भ दशेप्रत गेली नव्हती हें उघड आहे. अगदीं अखेर अखेर या उठावाच्या कामांत प्राण्यांचे समुदायहि दाखविण्यांत येऊं लागले होते.

तांबड्या भांड्यांवर पांढऱ्या रंगाचीं चित्रें काढण्याची कला फार प्राचीनकाळापासून चालू होती. या चित्रांत मानवी आकृती फार क्वचित् काढलेल्या असत व त्या

काढण्याचा प्रकार म्हटला म्हणजे एक त्रिकोणाकृति देह, कटिभाग अगदीं बारीक, व दोन पाय ह्मणजे दोन उभ्या रेघा. पाय मागें पुढें होतात हें दर्शविण्याकरितां त्या उभ्या रेघा एका नागमोडी सारख्या रेषेनें जोडलेल्या असत. बकऱ्यांचीं व एक प्रकारच्या पाणघोड्याचीं चित्रें सामान्यतः चहूंकडे दृष्टीस पडतात. या युगाच्या उत्तरकाळांत प्राण्यांचे व मनुष्यांचे समुदाय व जहाजें यांचीं चित्रें आढळतात. जहाज शिडानें न चालवितां वल्ह्यांनीं चालविलेलें दाखविलें आहे.

**आरंभीच्या राजांचा काळ.**—या काळांत कलांची वाढ फार झपाट्यानें झालेली दिसून येते. पूर्वीच्या ओबड धोबड मूर्तींच्या जागीं सुबक आकृतीच्या, स्वभावाची कल्पना करून देणाऱ्या व शरीराचे सर्व भाग हुबेहूब दर्शविणाऱ्या मूर्ती दृष्टीस पडूं लागतात.

या काळचें अगदीं प्रारंभींचें शिल्प काम म्हटलें म्हणजे कॉप्टस येथील मिना देवाच्या भव्य मूर्ती हें होय. परंतु या काळचें मुख्य शिल्प काम एका राजाच्या चुनखडी सारख्या दगडावर कोरलेल्या मुखवट्यांत पहावयास सापडतें. हा मुखवटा पाहून प्रो. मिखेलिस ह्मणतो "हें काम अत्यंत काळजीपूर्वक केलेलें आहे व त्यावरून तें करणाऱ्याची विलक्षण अवलोकनशक्ति व डोळ्यांची ठेवण दाखविण्याची अप्रतिम हातोटी उत्तम रीतीनें व्यक्त होते" ही प्रतिमा बहुतेक नार्मर नांवाच्या राजाची असावी. हा नार्मर राजा पहिल्या राजघराण्यांतला होता. यानंतरची प्रतिमा हस्तिदंतावर खोदलेली एका वृद्ध राजाची आहे. ही प्रतिमा तर फारच सुबक असून राजाचें चारित्र्य कसें होतें हें पहाणाऱ्याच्या लक्ष्यांत आणून देणारी आहे. नेखेन ( हिराकॉन्पोलिस ) व अबिडॉस येथें पुरुष, स्त्रिया व इतर प्राणी यांच्या पुष्कळ हस्तिदंती मूर्ती सांपडतात. दुसऱ्या राजघराण्यांतील राजा खासेखेम याच्या मुखवट्यांत शिल्पकामाची एक ठरीव पद्धत दिसूं लागते; तथापि याच्यांतहि जो मोहकपणा दिसून येतो तो या पुढील शिल्पकामांत दृष्टीस पडत नाहीं.

उठावाचें खोदीव काम करण्याची कलाहि या काळांत फार झपाट्यानें वृद्धिंगत झाली. या कामाचे नमुने कॉप्टसच्या भव्य मूर्तींवर पहावयास सांपडतात. यांतील सांबराच्या मुखवट्याचें काम अप्रतिम आहे. यापुढचें काम ह्मणजे एका तालवृक्षासमोर हरणाची जोडी उभी आहे हें होय. यांत विलक्षण नैपुण्य दिसून येतें. यानंतर नार्मर राजाचें इतिहास प्रसिद्ध कोरीव काम लक्षांत घेण्यासारखें आहे. यांत पायाच्या शिरा व स्नायू, डाव्या हाताची पकड व उजव्या हाताचा ताण इत्यादि सर्व इतक्या उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे कीं त्यावरून या कलेचें ज्ञान त्या काळीं पूर्णावस्थेस पोंचलें होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

**मनोऱ्यांचा काळ.**—या काळांत कलेच्या बाबतींत निराळेंच ध्येय दिसून येतें, पूर्वींच्या काळचा स्वभाविकपणा जाऊन त्याच्या जागीं अधिक व्यवस्थितपणा, ठराविक पद्धत व आपण एका विशिष्ट संप्रदायाचे अनुयायी आहोंत ही भावना शिल्पी लोकांत दिसून येते. या काळांतील सर्व कामांत भव्यपणा हा सर्वसाधारण गुण आहे. लहान किंवा मोठें कोणतेंहि काम पाहिलें तरी तें काळाचा किंवा श्रमाचा विचार न करितां पूर्णत्वास नेलेलें दिसून येतें.

चिआप्स किंवा खूफू याच्या लहानशा हस्तिदंती मूर्तीकडे पाहिलें तरी त्यावरून चिऑप्सचा उत्साह किती विलक्षण होता व इच्छाशक्ति किती प्रबळ होती हें दिसून येतें. खाफरे किंवा चेफ्रेरेन याची मूर्ती भव्य व गंभीर आहे. साधारण माणसांच्या मूर्ति ज्याच्या त्याच्या स्थितीकडे लक्ष देऊन बनविलेल्या दिसून येतात. नेफर्ट व हेम्सेट यांच्या शांत मूर्तीकडे पहा किंवा कापरच्या लांकडी मूर्तीकडे पहा त्यांत तुम्हाला राजे लोकांची इभ्रत व रुबाब दिसून येणार नाहीं. तांब्याचें घडीव काम करण्यांत या काळचे शिल्पी किती तयार होते हें पहावयाचें असल्यास मरेन्राची मूर्ती पहावी.

मूर्तिकामाप्रमाणेंच उठावाच्या खोदीव कामांत सुधारणा झाली होती हें हेसीच्या लांकडी दरवाजावरील काम पाहिलें म्हणजे कळून येईल. यापुढें कबरस्थानावरचीं मनोवेधक व निरनिराळ्या तऱ्हेचीं कामें दृष्टीस पडतात.

**बाराव्या राजघराण्याचा काळ.**—या काळांत जी शिल्पकामाची तऱ्हा प्रामुख्यानें दिसून येते तीस मागील काळांतच सुरवात झाली होती.

या काळांतील शिल्पकामाची नवीन तऱ्हा राजे लोकांच्या मूर्तींच्या कामांत प्रथम उपयोगांत आली. ज्या परकीय राजांपासून बाराव्या राजघराण्याचा उगम झाला त्यांच्याच या मूर्ती असल्या पाहिजेत परंतु हिक्सॉस राजांनीं त्या आपल्या पूर्वजांच्या आहेत असा समज उत्पन्न केल्यामुळें तशी भ्रामक कल्पना प्रचलित झाली. परंतु त्यांत कांहीं तथ्य नाहीं. या मूर्तींच्या मुखवट्यावर ठसठसीतपणा, जोरकसपणा व मुखावरील स्नायूंचें जाळें इत्यादि गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. या काळांत एका ठरावीक तऱ्हेनें काम करण्याची पद्धत चालू नसून चित्रकलेंत बरेंच स्वातंत्र्य दिसून येतें. कामाचा रेखीवपणा, उठावदारपणा व मुखावरील बारीकसारीक रेषांचेंहि योग्य दिग्दर्शन इत्यादि गुणांमध्यें बाराव्या राजघराण्याच्या शिल्पकामाचें वैशिष्ट्य आहे परंतु त्यांत चवथ्या राजघराण्याच्या वेळचा भव्यपणा व अठराव्या राजघराण्याच्या वेळचा जीवंतपणा दिसून येत नाहीं.

उठावाच्या खोदिव कामांतहि नवीन पद्धत विशेष स्पष्टपणें दिसून येते. मुखावरील रेषा वगैरे दाखविण्याच्या कामीं बाराव्या राजघराण्याच्या वेळेस ही नवीन पद्धत पूर्णत्वास गेली होती. स्वाभाविकपणापेक्षां शास्त्रशुद्धपणावर ज्यांची अधिक भिस्त होती अशा पंथाच्या लोकांकडून ही नवी पद्धत प्रचलित करण्यांत आली होती.

**अठरा ते वीस राजघराण्यांचा काळ.**—मिसर देशांतील कलेसंबंधीं हा काळ अत्यंत लोकप्रिय होण्याचें कारण अगदीं उघड आहे. भव्यपणा, पूर्णपणा व ठसठसितपणा इत्यादि ज्या गुणांनीं पूर्वकाळच्या लोकांनीं आपलीं कामें अजरामर करून ठेविलीं आहेत त्यांचा या काळांत लोप झाला होता. पूर्वी प्रचलित असलेल्या पद्धतीस जर चारित्र्यदर्शक कला असें नांव दिलें तर हल्लींच्या पद्धतीस भावनादर्शक कला असें म्हटलें पाहिजे. भावनामय कामें बुद्धीला ग्रहण करण्यास सोपीं असल्यामुळें अधिक लवकर लोकप्रिय होतात तरी प्रत्येक युगांत व प्रत्येक देशांत असा एक सर्वसामान्य नियम आहे कीं, क्षणिक भावनादर्शक कामापेक्षां कायमच्या चारित्र्यदर्शक कामास अधिक मान असतो. प्रस्तुतचा काळ भावनादर्शक कामांचा असल्यामुळें त्यांच्या सुबक रूपरेषा, त्यांतील उल्हसित पद्धति, त्यांची अद्भुत रस उत्पन्न करणारी ऐट व त्यांच्यांत मधून मधून दिसणारें व म्हणूनच मनोरंजक व मनोवेधक वाटणारें औद्धत्य इत्यादि गोष्टी आपणांस या काळच्या कामांत पहावयास सांपडतात. इतर रेषा स्पष्ट दिसाव्यांत म्हणून या काळच्या मूर्तींच्या अंगाचा इतर भाग अस्वाभाविक रीतीनें अगदीं गुळगुळीत केलेला आढळतो, अद्भुत रस उत्पन्न करण्याच्या अनावर इच्छेनें स्मशानयात्रेच्या प्रसंगीं पतिपत्नी हातांत हात धालून चालतांना दाखविलेले आढळतात. आणि ही इच्छा अखेनटॉनच्या वेळीं इतकी अनावार झाली कीं तो आपल्या रथांत पत्नीचें चुंबन घेत आहे किंवा तिला आपल्या गुडघ्यावर नाचवीत आहे अशा प्रकारच्या त्याच्या मूर्ती पहावयास सांपडतात. कलाकौशल्याच्या कामांत कोणते प्रसंग दाखवावेत किंवा कोणते दाखवूं नयेत हा निर्बंध नाहींसा होऊन त्याच्या जागीं जें पहावें तें मूर्तींत किंवा चित्रांत दाखवावें अशी पद्धत सुरू झाली. यामुळें त्या काळच्या मूर्ती व चित्रें जरी सुबक व मोहक आहेत तरी ही पद्धत म्हणजे त्या कलांची अखेरची मर्यादा होऊन यापुढें त्यांची प्रगति होण्यास जागा उरली नाहीं.

वरील म्हणण्याचा प्रत्यय तिसऱ्या अमेनोफिसच्या मूर्तीपासून यावयास लागतो. खाजगी व्यक्तींच्या मूर्तींत उदाहरणार्थ एका सिद्धीणीच्या लाकडी पुतळ्यांत तो त्याहूनहि अधिक स्पष्टपणें पहावयास सांपडतो. अखेनटॉनच्या वेळीं या कलेची मजल कोठवर गेली होती हें पहावयाचें असल्यास तय्या राणीच्या मुखवट्याचा जो एक अल्पसा भाग उपलब्ध आहे तो पहावा. त्यांत नाकाचीं व तोंडाभोंवतालचीं वळणें हीं हुबेहुब आहेतच परंतु जेथें दोन ओंठ मिटतात तो भाग दाखविण्यांत तर शिल्पकारानें आपलें कमालीचें कसब दाखविलें आहे. एकोणिसाव्या राजघराण्याच्या वेळचें नावाजण्यासारखें शिल्पकाम म्हणजे ट्यूरिन येथें काळ्या पाषाणाचा घडविलेला दुसऱ्या रामेसीसचा पुतळा हें होय.

**अठराव्या राजघराण्याचा काळ.**—अठराव्या राजघराण्याच्या प्रारंभींचीं उठावाचीं खोदिव कामें मनोऱ्याच्या काळांतील त्या कामासारखींच होतीं व पुढें चित्रकला जसजशी स्वस्त होत गेली तसतशीं खोदीव कामें मागें पडत चाललीं. अशा प्रकारचीं खोदिव कामें फक्त देवळांत करीत असत व या देवालयांचा पुढें ऱ्हास होत गेला. या काळचीं हीं कामें मजबूत व सुमर्यादित आहेत परंतु तीं अगदींच ठराविक पद्धतीचीं असून त्यांत स्नायू, शिरा वगैरे कांहीं दाखविलेलें नाहीं. शिवाय या काळच्या कामांत पूर्वीच्या काळच्या कामांतील पुष्कळशा कल्पनांची नक्कल केलेली आढळते. तिसऱ्या अमेनोफिसच्या काळच्या खाएमहातच्या सुंदर मूर्तींत पूर्वीच्या कल्पनांचें प्रतिबिंब आहे. मागें वर्णन केलेली अखेनटॉनच्या वेळची विशिष्ट पद्धत या प्रकारच्या कामांतहि दिसून येते. एकोणिसाव्या व विसाव्या राजघराण्यांच्या देवळांतील असंख्य उठावाचीं खोदिव कामें फक्त इतिहासदृष्ट्या महत्त्वाचीं असून त्यांत पूर्वीच्या कामांच्या मानानें कोणतेंच कौशल्य दिसून येत नाहीं.

चित्रकलेच्या अभिवृद्धीस मात्र प्रस्तुत काळ फार अनुकूल होता; हाताचा हलकेपणा, वृत्तांताची विविधता व आनंदाचें पर्यवसान इत्यादि गोष्टींची रेलचेल त्या काळच्या चित्रांत दिसून येते. अधिक कष्टसाध्य शिल्पकामाचा ज्या मानानें ऱ्हास होत गेला त्या मानानें चित्रकलेचा अधिकाधिक उत्कर्ष झाला. त्या काळच्या एका कोल्हाटउडी मारणाऱ्या मुलीच्या चित्रावरून त्या वेळीं होणारे शरीराचे संकोच व विकास तत्कालीन चित्रकारांस किती शिताफीनें दाखवितां येत होते हें लक्षांत येण्यासारखें आहे.

यापुढील काळांत या कलांचा एकसारखा ऱ्हास होत गेला म्हणजे वर दिलेल्या तीन भागांपैकीं (१) मूर्तिकरण (२) उठावाचें खोदिक काम व (३) चित्रकला यापैकीं कोणत्याहि भागाचा विचार केला तरी पुढें येणाऱ्या प्रत्येक राजघराण्यांत त्या कलांचा उत्तरोत्तर अपकर्ष होत गेल्याचें दिसून येतें.

इतिहासलेखनास ज्याप्रमाणें शिल्प कामें हें एक उपयुक्त साधन आहे त्याप्रमाणेंच मनुष्यानें निरनिराळ्या काळीं वापरलेलीं उपकरणें व हत्यारें हीं त्याच्या निरनिराळ्या सांस्कृतिक अवस्था बोधितात तेव्हां आतां प्राचीन मिसरी लोकांच्या हत्यारांसंबंधीं येथें थोडी माहिती देतों.

**हत्यारें व जड पदार्थ.**—मिसर देशांतील हत्यारांचे थोडक्यांत सामान्य व विशिष्ट असे दोन विभाग करितां येतील. सामान्य विभागांत ठोकणाऱ्या, कापणाऱ्या व घांसणाऱ्या हत्यारांचा अंतर्भाव होतो. व विशिष्ट विभागांत लढाई, शिकार, शेतकी, बांधकाम इत्यादि कामास लागणाऱ्या हत्यारांचा समावेश होतो. हीं हत्यारें हल्लींच्या हत्यारांपेक्षां प्रथम निराळ्या स्वरूपाचीं होतीं. त्यांपैकीं कांहींत बदल होऊन त्यांस हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें, व कांहीं तशींच राहिलीं.

ठोकण्यास लागणारीं हत्यारें.—लांकडी ठोकणी व मोगरी, दगडी गदा, विनदांड्यांचे दगडाचे हातोडे, तांब्याच्या व गारगोटीच्या कुऱ्हाडी, गारगोटीच्या कुदळी इत्यादि हत्यारें त्या काळीं प्रचलित होतीं.

कापण्यास उपयोगी पडणारीं हत्यारें.—गारगोटीचे केलेले दुपाती, एकपाती, पातें मिटविण्यास खाचा असलेले व नसलेले, सरळ व वांकड्या पाठीचे व तांब्याचे बनविलेले इतक्या प्रकारचे चाकू, तांब्याचे वस्तरे ब्रॉंझ धातूंचीं केलेलीं लांकडी मुठीची व बिनमुठीचीं लहान-मोठीं किंकरीं व टाक्या इत्यादि हत्यारें त्याकाळीं उपयोगांत होतीं.

घांसण्याच्या उपयोगाचीं हत्यारें.— ब्रॉंझ धातूच्या केलेल्या कीलाकृति व हल्लीं प्रचारांत असलेल्या स्वरूपाच्या कानशी, सदर धातूच्या केलेल्या करवती, कठिण पदार्थांस व मण्यांस छेद करण्याकरितां ज्यांचा उपयोग करीत असत असे गारगोटीचे केलेले व लांकडी कामावर ज्यांचा उपयोग करीत असत असे ब्रॉंझ धातूचे केलेले सामते इत्यादि हत्यारांचा त्याकाळीं उपयोग करीत असत.

लढाईचीं हत्यारें.—लांकडी दांड्याचे व धातूचे बनविलेले परशू, गारगोटीच्या व तांब्याच्या केलेल्या कट्यारी लांकडी व एका अखंड तुकड्याचीं केलेलीं धनुष्यें निरनिराळ्या आकाराचीं गारगोटीचीं, शिंगाचीं व तांब्याचीं बाणांचीं टोकें इत्यादि हत्यारें त्यावेळीं प्रचारांत होतीं.

शिकारीचीं आयुधें.—गारगोटीच्या बरच्या, हाडाच्या व तांब्याच्या मासे धरण्याच्या बरच्या, फेकून मारावयाचे लांकडी सोटे, तांब्याचे मासे धरण्याचे आंकडे, प्राण्यांचे पाय अडकून धरण्याचे सांपळे, मासे पकडण्याचीं जाळीं इत्यादि आयुधांचा त्याकाळीं उपयोग करीत असत.

शेतकीचीं आयुधें.—लांकडी कुदळी व नांगर, लांकडी दंताळें, गवत उडविण्याचा त्रिशूळ, ज्याच्यांत गारगोट्या बसविल्या आहेत असे लांकडी कोयते, पाखडतांना धान्य साफ करणारी सुपें, अंड्याच्या आकृतीचीं व सपाट जातीं इत्यादि अनेक वस्तूंचा त्याकाळीं उपयोग करीत असत.

बांधकामास लागणारीं उपकरणें.-दगड फोडण्यास उपयोगी पडणाऱ्या टाक्या, विटा पाडण्याचे विटाळे, गवंड्याची लांकडी करणी, गुण्या व ओळंबा इत्यादि बांधकामास लागणारीं साधनें हल्लींच्या प्रमाणेंच होतीं.

**मातीचीं भांडीं.**—फार प्राचीन काळीं चाकावर गति दिल्यावांचून फक्त हातांनीं हीं मातीचीं भांडीं तयार करीत असत. भांड्यास आकार येण्याकरितां आंतून एक चपटी पट्टी धरून वरतून हात फिरवीत. अशा प्रकारें कांहींसा आकार आल्यानंतर शेवटीं त्यांस घासून गुळगुळीत करीत. चंबूच्या आकृतीच्या भांड्याचा गळा तयार करण्याच्या कामीं प्रथम चक्राचा उपयोग करण्यांत आला. बाराव्या राजघराण्याच्या काळापर्यंत लहान लहान भांड्यांचीं बुडें चाकूनें कापून रेखिव केलेलीं दिसून येतात. भांड्यावर पांढऱ्या मातीचे पट्टे, पशूंच्या व क्वचित् प्रसंगीं मानवी आकृती अशा प्रकारची नक्षी काढीत असत. हीं भांडीं हातांनीं घडवीत असल्यामुळें त्यांस निरनिराळे आकार देण्याचें काम कठिण नव्हतें. अठराव्या राजघराण्याच्या वेळीं भांड्याचे कांठ तांबडे असत किंवा त्यांच्या गळ्याभोंवतीं पट्टे असत. तिसऱ्या टेथमॉसिसच्या वेळीं काळ्या व तांबड्या रेघा काढण्याचा प्रघात असल्याचें दिसून येतें. तिसऱ्या अमेनोफिसच्या काळीं भांड्याच्या गळ्याभोंवतीं निळ्या रंगाच्या रेघा व पट्टे काढण्याची चाल होती. अठराव्या व एकोणिसाव्या राजघराण्याच्या उत्तर काळांत ओबडधोबड परंतु हलकीं भांडीं व त्यांजवर पांढरे ठिपके आणि गुळगुळीत व भुऱ्या रंगाचे कांठ असलेले आढळतात.

आतांपर्यंत जें कलाविषयक विवेचन करण्यांत आलें त्यावरून इजिप्तमधील कलेचा इतिहासशोधनाकडे कसा उपयोग करतां येईल याची कल्पना झाली असेलच. गृह्यवस्तूंमध्यें, नवीन नवीन आकार, गृह्यवस्तु ज्या साहित्याच्या बनवीत त्या साहित्यामध्यें फरक आणि चित्रकलेचा अतिशय साध्या रेघोट्यापासून अधिक सूक्ष्म विकास या सर्व गोष्टींचें सातत्य आपणांस इजिप्तच्या इतिहासांत जसें आढळून येतें तसें दुसरें कोठेंहि येत नाहीं. हें सातत्य इतकें आहे कीं त्यामुळें वस्तु कालानुक्रमानें लावतां येतात. आणि त्यामुळें इजिप्तच्या इतिहासांत जीं राजघराणीं होऊन गेलीं त्यांची आणि विशिष्ट कलाविकासाची अगर संस्कृतिविकासाची संगति लावण्यांत येते.

**प्राचीन इतिहास आणि कला-प्रागैतिहासिक युग.**— नील नदीच्या कांठच्या थीबीज शहराच्या परिकरांत व अन्य ठिकाणीं नील नदीच्या मळींत सांपडणारे गारगोटीचे कापीव तुकडे मनुष्यांनीं घडविलेले असण्याचा संभव आहे. परंतु धो धो वाहणाऱ्या प्रवाहांत सांपडलेल्या पाषाणखंडास केवळ नैसर्गिक पद्धतीनेंहि असले आकार प्राप्त होतात असें यावर कांहींचें म्हणणें आहे. नीलथडीच्या आसपास असलेल्या मैदानांत कित्येक वेळां पुराणपाषाणयुगांतील विशिष्ट आकारांचीं हत्यारें व उपकरणें सांपडतात आणि त्यांच्यावर असलेल्या खुणा त्यांच्या प्राचीनत्वाची साक्ष पटवितात. कांहीं वेळां ज्या पाषाणाच्या कारखान्यांत तीं घडविलीं असावींत त्या जागेवरच तीं पडलीं असावींत असें दिसून येतें. ज्या काळीं तीं हत्यारें घडविलीं असतील त्या काळांत व हल्लींच्या काळांत हवामान व देशाची एकंदर स्थिति यांत कांहीं मोठे फेरबदल झाले आहेत किंवा काय याविषयीं भूस्तरशास्त्रवेत्ते व मानवशास्त्रवेत्ते यांच्यांत अद्याप ऐकमत्य झालेलें नाहीं. ज्याच्यावरून त्या हत्यारांचा काळ निश्चित करितां येईल अशा रीतीनें तीं, व प्राचीन युगांतील प्राण्यांच्या देहांचे अवशिष्ट भाग एकत्र सांपडले नाहींत; किंवा एखाद्या खडकाच्या किंवा दरीच्या गर्भांत सांपडलीं नाहींत.

नवपाषाणयुगांतील अवशिष्ट भाग ह्मणजे बाणांचीं टोंकें व इतर आयुध हीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत अरण्यामध्यें सांपडतात. थीबीजच्या उत्तरेकडील फायूमच्या प्रदेशांत व मोरिस या प्राचीन सरोवराच्या आसमंतांत तर या वस्तू अत्यंत विपुल व चमत्कारिक आकारांच्या दृष्टीस पडतात. परंतु त्यांचा नक्की काळ निश्चित करितां येत नाहीं. नील-थडीवर राज्य करणाऱ्या बाराव्या राजघराण्याच्या वेळेस अस्तित्वांत असलेल्या प्रगल्भ संस्कृतीशीं त्या समकालीन असाव्यात असें कांहींचें मत आहे. परंतु लागवड केलेल्या मळ्याच्या कडेवर असलेल्या मैदानांत जे. डी मार्गन, पेट्री, रेसनर व इतर संशोधक यांच्या भूखननादि प्रयत्नांनीं शोधून काढलेल्या अनेक चमत्कारिक कबरस्थानांपासून निश्चित ऐतिहासिक माहिती उपलब्ध झाली आहे. त्या कबरस्थानांत सांपडलेल्या वस्तूंचे निरनिराळे प्रकार पेट्रीनें आपल्या "डायसपोलिसपर्व" नांवाच्या पुस्तकांत क्रमवार दिलेले आहेत, आणि अत्यंत परिश्रमपूर्वक केलेले आपले शोध रेसनेरनें प्रसिद्ध केल्यापासून तर पुष्कळच वादग्रस्त प्रश्नांवर प्रकाश पडला आहे. त्यांतले त्यांत प्रागैतिहासिक काल व पहिल्या राजघराण्याचा काळ यांचा कोठें संयोग होतो हें निश्चित करितां आलें आहे. पूर्वी उल्लेखिलेलीं कुलालचक्रांच्याहि साधनावांचून केवळ हातांनीं तयार केलेलीं (कांहीं रंगविलेलीं) अति उत्कृष्ट मातीचीं भांडीं प्रागैतिहासिक युगांतलीं आहेत. त्याचप्रमाणें इतर सर्व देशांतील तत्कालीन हत्यारांपेक्षां आकाराच्या ठाकठीकपणांत व नाजुकपणांत अधिक सरस असलेलीं अतिशय उत्कृष्ट गारगोटीचीं हत्यारें त्याच काळचीं आहेत. फार जुनाट कबरस्थानांतून धातूंचा अभाव दिसून येतो. परंतु लवकरच तांब्याची धातु दृष्टीस पडूं लागते. बाराव्या राजघराण्याच्या कारकीर्दीपर्यंत कास्यधातूंचा पत्ता नव्हता. नकशीच्या भांड्यांवर वल्ह्यांनीं व शिडांनीं चालविलेल्या नौकांचीं चित्रें व त्या नौकांवर बाहुल्याच्या खुणा दृष्टीस पडतात. वरच्या म्हणजे दक्षिणेकडच्या व मधल्या मिसर देशाच्या भागांत हीं कबरस्थानें सर्वत्र सांपडतात. परंतु नदीमुखाजवळ किंवा त्याच्या आसपास तीं अद्याप सांपडलीं नाहींत. कदाचित मिसर देशाच्या खालच्या भागांत रहाणाऱ्या लोकांची मृत देहाची व्यवस्था करण्याची पद्धत निराळी असावी.

**इजिप्तच्या प्राचीन दोन राज्यांचें एकीकरण.**—परंपरा, पुराणकथा व अलीकडे प्रचलित असलेल्या चाली रीती यांच्या योगानें त्या अतिप्राचीन काळच्या राजकीय इतिहासांत असलेली खिंड भरून काढतां येते. पहिल्या राजघराण्याचा संस्थापक मेनीस यानें मिसर देशाच्या वरच्या व खालच्या भागांत असलेलीं दोन राज्यें एकत्रित केलीं. यावरून प्रागैतिहासिक कालांत ते दोन भाग निरनिराळ्या सत्तेखालीं होते हें उघड होतें. जेथें हल्लीं एल् काबचें खिंडार आहे तेथें पूर्वी वरच्या मिसर प्रदेशाची नेकेब नांवाची राजधानी होती आणि नदीच्या पलीकडे नेखेल (हिराकॉन्पोलिस) येथें राजवाडा होता. मिसर देशाच्या खालच्या प्रदेशाची राजधानी तेथील पाणथळ प्रदेशांत ब्यूटो (प्यूटो किंवा डेप) येथें होती व "पे" नांवाच्या भागांत राजनिवासस्थान होतें. वरच्या किंवा दक्षिण दिशेकडील प्रदेशाच्या राज्यांत एल् काबची देवता "निखेबी" व "संथे" नांवाचा देव यांचें अधिष्ठान होतें व खालच्या प्रदेशाच्या राज्यांत "ब्यूटो" या देवतेचें व "होरस" या देवाचें अधिष्ठान होतें. राजेलोकांकरितां प्रत्येकाच्या राजवाड्यांत "श्येन किंवा होरस" ही देवता होती. "नेखेन" येथें मृतराजांचीं पितरें शृगालशीर्ष होतीं असें मानीत. तर "पे" येथें मृतराजांचीं पितरें श्येनशीर्ष होतीं असें मानीत असत. पुढील काळांत प्रागैतिहासिक राजे "होरस-पूजक" म्हणून मानण्यांत येत. या युगाची कालमर्यादा किती होती याचा अंदाज करितां येत नाहीं. वर सांगितलेलीं वरच्या व खालच्या प्रदेशांतील दोन राज्यें यांच्यांत केव्हांहि कांहीं बदल झाला नसेल हें संभवनीय दिसत नाहीं.

शरीरविज्ञान शास्त्रज्ञ इलिअट स्मिथ याच्या मतें मिसर देशाचा सर्व प्राचीन इतिहास धुंडाळला तर असें दिसून येईल कीं राजघराण्याच्या युगाच्या प्रारंभीच्या भागांत वरच्या मिसर प्रदेशांतील लोकांच्या शरीररचनेंत महत्वाचा फरक झाला आणि तो फरक मिसर देशाचे दोन्ही भाग एका राजाच्या सत्तेखालीं आल्यानें त्यांतील लोकांमध्यें जो संकर घडून आला त्यामुळें झाला असें सदर शास्त्रज्ञानें स्पष्टीकरण केलें आहे. चवथ्या राजघराण्याच्या युगांतील उपलब्ध असलेल्या अवशेषांवरून इलिअट स्मिथनें असा सिद्धांत काढिला आहे कीं सीरियांतील देशांतर केलेल्या लोकांच्या आगमनामुळें मिसर देशाच्या वरच्या प्रदेशांतील लोकांपेक्षां खालच्या प्रदेशांतील लोकांच्या मस्तकांतील कवटीची व स्नायूंची वाढ अधिक झालेली होती. राजघराण्यांच्या युगास प्रारंभ झाल्यामुळें संस्कृतीची पिछेहाट न होतां भरभराटच होत गेली.

प्रागैतिहासिक युगासंबंधीं माहिती देणारें एखादें तरी लिखाण उपलब्ध आहे कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे. पालेर्मोशिलेच्या पहिल्या ओळींत खालच्या मिसर देशाच्या राजांचीं कांहीं नांवें दिलेलीं सांपडतात परंतु तेथें त्यांचे शक किंवा इतर माहिती दिलेली नाहीं. पेट्रीच्या मतानें ज्या राजाला अबिडास येथें मूठमाती देण्यांत आली होती त्याचें खरें नांव "मर" किंवा "बेझा" असें असतां ज्याला "नरमेर" या नांवानें संबोधीत होते तो मेनीसच्या अगोदर होऊन गेला. त्याची माहिती देणारे अनेक कोरीव लेख आहेत. त्यांत हिराकॉन्पोलिस येथें सांपडलेला व ज्याच्यावर लेख खोदलेला आहे असा एक पाषाण-खंड फारच

भव्य आहे. त्या पाषाणखंडावर राजा व त्याचा प्रधान, युद्धांत वापरण्यांत येणारीं निशाणें, कैदी वगैरे सर्व खोदलेलें आहे. तो व दुसऱ्या राजघराण्यांतील बेझ्रो (बोथॉस) हे एकच होते असें म्हणणें उपलब्ध असलेल्या माहितीशीं विसंगत आहे. तो मेनीस नंतर झाला असें सेथे म्हणतो तर कांहींच्या मतानें तो व मेनिस हे एकच होत असें आहे. दुसराहि एक अंकित लेख असलेला पाषाणखंड सांपडतो व तो राजघराण्यांच्या काळाच्या पूर्वीचा असावा. त्यांत "वृश्चिक" नांवाच्या राजाचा उल्लेख आहे.

**पहिलें राजघराणें.**—पहिल्या राजघराण्यांतील पुष्कळ राजांचीं नांवें अबिडॉस येथें असलेल्या त्यांच्या कबरस्थानांवरून समजतात. परंतु अबिडॉस येथील व मॅनेथो याच्या यादींत ज्याप्रमाणें त्यांचा व्यक्तिशः नामनिर्देश आहे तसा तेथें नसल्यामुळें व 'होरस' या विशिष्ट उपपदांनीं त्यांचा जेथें तेथें उल्लेख केला असल्यामुळें नामनिर्णयाचे कामीं बराच घोटाळा उडतो. कांहीं राजांचीं व्यक्तिशः नांवें सांपडतात, यावरून 'नवीन राज्यांतील' लेखकांस तीं कशीं वाचावींत हें नीट अवगत नव्हतें हें सिद्ध होतें. पहिल्या राजघराण्याच्या काळांतसुद्धां लेखनपद्धतींत महत्त्वाचे फरक व सुधारणा घडून आल्या. मेनीस हें वैयक्तिक नांव फक्त एकाच जागीं दिलेलें आढळतें. त्याचें होरस-नांव 'अहा' असून त्याचा अर्थ 'योद्धा' असा होता. 'अहा' व मेनीस हीं नांवें एकाच व्यक्तीचीं असल्याबद्दल शंका घेण्यांत येते परंतु ज्या ठिकाणीं त्यांचा निर्देश केलेला आहे तेथील लिखाण इतक्या जुन्या पद्धतीचें आहे कीं, त्यावरून त्या शंकेचें निरसन होण्यासारखें आहे. अहा (मेनीस) हें नांव दोन कबरस्थानावर सांपडलें होतें. एक कबरस्थान थीबीजच्या उत्तरेस व तांबड्या समुद्रास जाणाऱ्या रस्त्यासमोर जें एक 'नगाडा' नांवाचें ठिकाण आहे तेथें होतें आणि दुसरें अबिडॉस येथें होतें. मॅनेथो हा पहिल्या राजघराण्यास 'थिनाइट' म्हणतो; कारण, 'थिनिस' ही ज्या प्रांतांत अबिडॉस शहर होतें त्याची राजधानी होती. इजिप्तचा वरचा प्रदेश हा खालच्या प्रदेशापेक्षां नेहमींच वरचढ असे. मेनीस हा मूळ वरच्या प्रदेशांतला असून नंतर त्यानें खालचा प्रदेश पादाक्रांत केला होता. त्यानें ज्या प्रांतावर स्वारी केली त्याच्या सीमेवर असलेलें मेम्फिस शहर त्यानें वसविलें होतें अशी आख्यायिका आहे. तो तेथें व अबिडॉस या दोन्हीं ठिकाणीं रहात असावा. निदान पहिल्या राजघराण्यांतील पुढील राजांपैकीं एकाचें स्मारक अबिडॉस येथील विस्तीर्ण श्मशानभूमींत असल्याचें उघडकीस आलें आहे. पहिल्या राजघराण्यांतील आठ राजांपैकीं तीन कोण होते हें अबिडॉस येथील कबरस्थानांच्या अवशिष्ट भागांवरून सिद्ध झालें आहे आणि इतरांचीहि त्याचप्रमाणें माहिती मिळालेली आहे. दोघां-



राजांनीं सिनाइमधील वाडी मघारा येथल्या तांबें व वैदूर्य यांच्या खाणीमध्यें दोन शिलालेख खोदून ठेविले आहेत. बहुतेक राजांचीं कबरस्थानें विटांचीं बांधलेलीं आहेत परंतु युसफेस नांवाच्या एका राजाच्या कबरस्थानाची तक्तपोशी मात्र एलिफन्टाइन येथील ग्रनाइट दगडाची केलेली आहे. त्या कबरस्थानांत पुष्कळसें थाटमाटाचें सामान, इतर सर्व प्रकारचीं साधनसामुग्री व अब्नूस व हस्तिदन्त यांजवर कोरलेले राजांच्या कारकीर्दीचे प्रतिवार्षिक हकीकतीचे लेख ठेवीत असले पाहिजेत. पालेर्मो शिलेवरील लेखाच्या एका भागावरून असें दिसून येतें कीं दरवर्षी पुराचे वेळीं नीलनदीचें पाणी किती उंचीपर्यंत चढत होतें व राजांच्या कारकीर्दीचा प्रतिवार्षिक तपशील काय होता यावर टीप लिहिण्यास लागणारीं साधनें पांचव्या राजघराण्यापर्यंत उपलब्ध होतीं.

**पहिलीं चार राजघराणीं.**—मॅनेथोप्रमाणें पालेर्मो शिलालेखांत सुद्धां पहिल्या राजघराण्यापासून दुसरें राजघराणें निघालेलें दाखविलें आहे. दुसरें राजघराणेंहि थिनाइट होतें आणि त्याच्या नऊ (?) राजांचीं कबरस्थानें अबिडॉस येथें सांपडत होतीं. मॅनेथोच्या मतानें तिसरें राजघराणें मेंफाईट होतें म्हणजे त्यांतलि राजांची राजधानी मेंफिस ही होती या घराण्यांतील दोन राजांनीं अबिडॉसच्या नजीक असलेल्या 'बेट खलफ' येथें मनोऱ्याच्या आकाराचीं भव्य कबरस्थानें बांधलीं. परंतु त्यावेळचा सुप्रसिद्ध शिल्पकार व विद्वान लेखक "इम्होप" यानें त्या दोन राजांपैकीं "झोसर" राजाच्या सन्मानार्थ सक्कारा येथील चौफेर पायऱ्या असलेला दुसरा एक भव्य मनोरा बांधला. या राजघराण्यांतील शेवटचा राजा जो स्नेफ्रू त्याच्यापासून हल्लींच्या शोधांपूर्वी माहीत असलेल्या मिसरदेशाच्या इतिहासास प्रारंभ होतो. यापुढें स्मारकें व लेखी टिपणें पुष्कळशीं विपुल व महत्त्वाचीं आहेत आणि पालेर्मो शिलालेखांवरूनहि भरपूर माहिती उपलब्ध होते. स्नेफ्रूच्या कारकीर्दींतील तीन वर्षांची उपलब्ध असलेली माहिती म्हटली म्हणजे त्यानें शिद्दी लोकांवर यशस्वी स्वारी केली आणि लेबानानच्या जंगलांतून आणलेल्या देवदारूचीं जहाजें व दारें केलीं ही होय. सिनाइमध्यें असलेल्या वाडी मघारा येथें स्नेफ्रूनें एक शिलालेख स्थापन केला होता. मेंफिस व फायूम या दोन शहरांमध्यें असलेले, एक मेडयूम येथील पायऱ्यांचा मनोरा आणि दुसरा दाशूर येथील संपूर्ण मनोरा असे दोन मनोरेहि त्यानें बांधले.

"नवीन राज्य" स्थापन होईपर्यंत मिसर देशांत मनोरे बांधण्याचा क्रम अव्याहत सुरू होता. विशेषेंकरून तिसऱ्या राजघराण्यापासून तों सहाव्या राजघराण्यापर्यंत प्रत्येक राजानें दगडी मनोऱ्याच्या रूपानें आपलें स्मारक करून ठेविलें आहे. त्यांतलि झोसर व स्नेफ्रू यांच्याबद्दल उल्लेख केलेलाच आहे. चवथ्या घराण्यांतील सुप्रसिद्ध राजे म्हटले

म्हणजे चिऑप्स, चेफ्रेन व मायसरिनस. यांनीं अनुक्रमें गिझा येथील "श्रेष्ठ" (ग्रेट) "दुसरा" व "तिसरा" असे मनोरे बांधले. त्या काळच्या कलाकौशल्याच्या कामांत जो एक भव्यपणा दृष्टीस पडतो तो तदनंतर कोठेंहि दिसून येत नाहीं. "स्फिंक्स"(स्त्रीमुखीसिंह) च्या देवालयांत मेरिएट यास जे अनेक पुतळे सांपडले त्यांत चेफ्रेन राजाचा डायोराईट नांवाच्या पाषाणाचा केलेला पुतळा हा मिसरदेशीय लोक शिल्पकलेंत किती निष्णात होते याचा उत्कृष्ट दाखला आहे. स्फिंक्सचें देवालय म्हणजे स्मारकाकरितां बांधलेली एक वेस आहे. ही वेस ज्या पठारावर मनोरे बांधलेले आहेत तेथवर जाण्याकरितां जो एक चालचलाऊ पूल आहे त्याच्या पायथ्याशीं आहे. चिऑप्स व चेफ्रेन या दोन राजांच्या दरम्यान होऊन गेलेला डेडेफ्रे राजा यानें अबुरोश येथील मनोरा बांधला. शेप्सस्काफ हा त्या घराण्यांतील शेवटचा राजा होता. या बहुतेक राजांचे शिलालेख वाडी मघारा येथील खाणीमध्यें सांपडले आहेत. मनोऱ्यांच्या आसपास पुष्कळ राजदरबाराच्या सरदारांचे मुस्ताबे (विशिष्ट प्रकारचीं कबरस्थानें) आहेत. त्यांचें शिल्पकाम वाखाणण्यासारखें आहे. वर सांगितलेल्या चवथ्या राजघराण्यांतील अनियंत्रित सत्ताधाऱ्यांच्या काळांत तर कांहीं नक्षीचीं कबरस्थानें मिसर देशाच्या वरच्या प्रदेशांत सांपडतात. स्फिंक्सच्या देवालयासभोवार असलेलीं अनेक देवळें चिऑप्सराजानें बांधलीं होतीं असें दाखविणारा शिलालेख उपाध्याय वर्गांतील लोकांनीं बनावट केला होता असें सिद्ध करण्यांत आलें आहे; तथापि, स्फिंक्सचें देवालयच या चवथ्या घराण्यांतील अत्यंत वैभवशाली राजांच्या कारकीर्दीत खडक फोडून तयार केलें असावें असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे.

**पांचवें घराणें.**—पांचव्या घराण्यास "एलिफन्टाइनचें घराणें" असें म्हणतात परंतु ही चूक असावी. कारण हे 'होरस' यास मूळ पुरुष न समजतां सूर्य हाच मूळ पुरुष असें म्हणून ते सूर्याची उपासना करीत असत. शिवाय ते आपल्या नांवापुढें 'सूर्यपुत्र' असें उपपद लावून घेत असत. या घराण्यांतील साहुरे आणि इनर राजे यांनीं मोठमोठीं मंदिरें व त्यांतील मनोरे बांधून ते सर्व सूर्यास अर्पण केले आहेत. त्यापैकीं अबुसीर येथील नॉसेरीच्या देवालयासंबंधीं पूर्ण तपास लागला आहे. 'वेस्टकार पापायरस' या लेखांतील अद्भुत गोष्टिमध्यें एका सूर्योपासिकेपासून तीन राजांची उत्पत्ति कशी झाली हें सांगितलें आहे. पुष्कळ राजांच्या मनोऱ्यांसंबंधीं माहिती उपलब्ध झालेली आहे. अबुसर येथील मनोरे अत्यंत प्राचीन आहेत. मनोरे असलेलीं शाहुरेचीं देवालयें इतक्या चांगल्या स्थितींत आहेत कीं त्यांच्यावर दिसून येणाऱ्या शिल्पकामावरून व नकशीकामावरून मिसरदेशांत इतक्या प्राचीनकाळींहि त्या कलांची अभिवृद्धि किती झाली होती व जलमार्गानें व खुष्कीच्या मार्गानें युद्धविषयक पराक्रम करण्यास लागणाऱ्या धाडसादि गुणांचा किती विकास झाला होता हें कळून येण्यासारखें आहे. पांचव्या घराण्यांतील अगदीं अखेरचा मनोरा म्हणजे सक्कारा येथील उनस याचा होय. त्यावर आचारविधींचे व जादूगिरीचे ग्रंथ कोरलेले आहेत. ज्यांचें शिल्पकाम अतिशय उत्तम आहे अशीं या काळचीं पुष्कळ कबरस्थानें मेम्फिस येथें व मिसरदेशाच्या वरच्या प्रदेशांत चहूंकडे सांपडतात. मिसरदेशांतील अत्यंत प्राचीन देवालयांतील खोदकामाचा पत्ता लागत नाहीं. कदाचित् तें चुनखडीसारख्या दगडावर असल्यामुळें सर्व नष्ट झालें असावें. पालेर्मो शिलेवरील सनावळी ह्याच राजघराण्याच्या काळांत खोदलेल्या होत्या. या काळच्या मुख्य गोष्टी म्हटल्या म्हणजे देवालयास देणग्या व नेमणुका करून देणें ह्या होत. यावरून राजदरबारीं धर्मगुरूंचें वजन फार होतें हें उघड होतें. सिनाइ व प्युओनी येथील स्वाऱ्यांच्या स्मरणार्थहि शिलालेख खोदलेले आहेत.

**सहावें घराणें.**—मागील घराण्यापेक्षां सहावें राजघराणें जरी अधिक तरतरीत नव्हतें तरी त्यानें त्या काळची पुष्कळशी माहिती मागें ठेवली आहे. ज्यावर कांहीं मजकूर खोदलेला आहे अशीं त्यावेळचीं कबरस्थानें सर्व देशभर पसरलेलीं आहेत. या घराण्यांतील 'पेपी' किंवा 'फिऑप्स' नांवाचा तिसरा राजा सर्वांत मोठा कार्यकर्ता होता. त्याच्या सक्कारा येथील मनोऱ्यांवरूनच ज्या राजधानीस हा काळपर्यंत 'शुभ्र भिंतीं' असें म्हणत होते तिला पुढें प्रसिद्ध असलेले 'मेम्फिस' हें नांव मिळालें. 'पेपी' राजाच्या कारकीर्दींत किंवा त्याच्या मागून झालेल्या राजाच्या कारकीर्दींत कोणी एका ऊन नांवाच्या मनुष्यानें सिनाइच्या द्वीपकल्पावर व दक्षिण पॅलेस्टाईनवर स्वारी करण्याचे कामीं व एलिफन्टाईन व इतर खाणी यांतून 'ग्रॅनाईट' नांवाचा दगड वाहून नेण्याच्या कामीं फार मेहनत घेतली अशा प्रकारचें अबिडॉस येथील कबरस्थानाच्या शिलेवर वर्णन आहे. एलिफन्टाईनचा राजा व न्युबिआ व लिबिआ येथील लमाणांच्या प्रांताचा पुढारी या नात्यानें हरखूप नांवाचा सरदार मेरेन्रे व दुसरा पेपी यांच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आला. एका वेळीं त्यानें एक वामनमूर्ति नर्तक सूदनहून धरून आणला होता तो पांचव्या राजघराण्यांतील असा राजाच्या कारकीर्दींत प्यूओनी येथून आणलेल्या नाच्या प्रमाणें होता असें त्याचें वर्णन केलें आहे.त्यानें दुसऱ्या पेपीला इतका आनंद झाला कीं त्यानें तो व्यक्त करण्याकरितां हरखूप यास एक पत्र लिहिलें. तें सर्व पत्र हरखूपच्या कबरस्थानांच्या दर्शनी भागावर खोदलें आहे. हा शेवटचा राजा फार लहान वयांत गादीवर बसल्यामुळें त्यानें नव्वद वर्षांवर राज्य केलें. ही गोष्ट लोकांच्या स्मरणांत इतक्या काळपर्यंत होती कीं मॅनेथो यानें सुद्धां त्याच्या कारकीर्दीचा काळ चव्ऱ्याण्णव वर्षांचा दिलेला आहे. या दीर्घकालीन कारकीर्दीमुळेंच कदाचित् तें घराणें नष्ट झालें असावें. देशांतील लहान लहान राजेरजवाड्यांची संस्कृति,

संपत्ति व सत्ता यामध्यें उत्तरोत्तर चलती होत गेली. दुसऱ्या पेपीच्या कारकीर्दीनंतर स्मारकांच्या बाबतींत खिंड पडलेली दिसून येते त्यावरून तो काळ अंतःकलहाचा व बेबंदशाहीचा असावा असें दिसतें. अखेर त्या जुन्या राज्याचा अंत झाला.

**सातवें व आठवें घराणें.**—सातवें व आठवें हीं राजघराणीं मेम्फिस येथील होतीं परंतु त्यांतील कांहीं राजांच्या नांवांखेरीज त्यांच्याविषयीं कांहीं एक माहिती उपलब्ध नाहीं.

**नववें व दहावें घराणें उर्फ मध्यकालीन राज्य.**—मिसर देशाच्या मध्यभागीं असलेल्या हिराक्लिओपोलिस येथील नवव्या व दहाव्या राजघराण्यांतील राजांच्या हातीं सत्ता गेल्यामुळें दीर्घकाल चालू असलेलें मेंफिस येथील राजांचें राज्य लयास गेलें. त्या राजांचें नांव खेती किंवा अखथोज असावें परंतु त्यांची विशेष प्रसिद्धी झाली नाहीं. मिसर देशाच्या वरच्या प्रदेशांत स्वारी करून व तेथें आपली राज्यस्थापना करून त्यांनीं मेम्फिस–राजघराण्यांतील राजांवर स्वारी केली असावी. त्या काळचीं मुख्य स्मारकें म्हटलीं म्हणजे ज्यावर लेख लिहिले आहेत अशीं अस्यूत येथील कबरस्थानें होत. मिकेरे नांवाच्या राजास हिराक्लिओपोलिसमधून पळवून लाविलें असतां त्यानें वरच्या मिसर प्रदेशांतून सैन्य व आरमार गोळा करून व विशेषेंकरून अस्यूत येथील मांडलिक राजाची मदत घेऊन आपलें हिराक्लिओपोलिस शहर हस्तगत केलें अशी माहिती मिळते. परंतु त्याचा मनोरा मात्र मेम्फिस येथील राजेलोकांच्या स्मशानभूमींत बांधला होता.

**अकरावें घराणें.**—नंतर थीबीजच्या राजांनीं आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊन अकराव्या राजघराण्याची स्थापना केली. त्या घराण्यांतील राजांनीं उत्तरेकडे आपल्या राज्याची मर्यादा वाढवून शेवटीं सर्व देश व्यापून टाकला. मॉन्ट हें थीबीज येथील एका देवाचें नांव असल्यामुळें या राजांस "मेन्थॉप" ह्मणत असत. कमी दर्जाच्या राजांस "एन्योती" हें नांव होतें. या राजांस थीबीज येथें नेऊन पुरण्याची चाल असावी; कारण, ज्या पेटयांत त्यांचीं शवें पुरण्यांत आलीं असावीं अशा पेटया एकोणिसाव्या शतकांतील पुराणवस्तुसंग्राहकांस सांपडल्या आहेत. पहिल्या निभेप मेन्थापनें सर्व मिसर देशावर आपला अंमल बसविला होता. डेर एल् बाऱ्ही येथील 'मिसर—संशोधन—फंड' या मंडळानें जमीन खोदून तिसरा नेभेप्रे मेन्थॉप या राजाचें कबरस्थान उकरून काढलें त्यावरून तें फार भव्य स्मारक असावें असें दिसतें. त्याच्या मागून गादीवर येणारा चवथा सान्खेरे मेन्थॉप यानें तांबडयीं समुद्राच्या मार्गानें प्युओनीवर स्वारी केली होती.

**बाराव्या राजघराण्याची कारकीर्द.**—ही मध्यकालीन राज्याच्या केन्द्रस्थानीं होती. मेम्फाईट राजघराण्याचा ऱ्हास व हिराक्लिओपोलाईट राजघराण्याचा उदय हे त्याची संक्रमणावस्था दाखवितात व अकराव्या राजघराण्यांतील थीबीजच्या राजांनीं जो राज्याचा विस्तार केला त्यानें मध्ययुगाचा खरोखरीचा प्रारंभ त्या वेळीं झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सहाव्या राजघराण्याच्या वेळचीं स्मारकें अगदीं ओबडधोबड व रानटी तऱ्हेचीं होतीं परंतु बाराव्या राजघराण्याच्या काळचीं स्मारकें भव्य, नमुनेदार, उत्कृष्ट कारागिरीचीं व विपुल आहेत. बाराव्या राजघराण्यासंबंधानें जरी पुष्कळशी माहिती उपलब्ध नाहीं तरी टयूरिन पापायरसच्या व इतर अनेक सनवार असलेल्या खोदीव लेखांवरून त्या घराण्यांतील आठ राजांच्या कारकीर्दीचा काळ व त्यांचा क्रम बरोबर रीतीनें निश्चित करितां येतो. राज्यावर अनेक वेळां संकटें आल्यामुळें हे राजे आपल्या मागून येणारे गादीचे वारस कर्तृत्ववान व खंबीर असावेत अशी खबरदारी घेत असत. तत्कालीन राजांचा व त्यांच्या मांडलिकांचा उद्देश आपलें वर्चस्व सभोंवारच्या मुलखावर प्रस्थापित करण्याचा असल्यामुळें प्रतिपक्षांस आपल्या हुकमतींत ठेवण्याकरितां व इमानी अनुयायांस पारितोषिकें वगैरे देऊन उत्तेजन देण्याकरितां मुख्य गादीवरचा राजा खंबीर मनाचा असणें अत्यंत आवश्यक होतें. राजांच्या मेहेरबानींतल्या लोकांचीं, धनाढ्य सरदारांचीं व विशेषेंकरून मध्यमिसरदेशांतील बेनी हसन, एल् बरशा, अस्यूत व हेर रिफा येथील कांहीं विशिष्ट कुटुंबांतील माणसांचीं कबरस्थानें फार भपकेदार आहेत आणि राजदरबाराप्रमाणें लहान प्रमाणावर दरबार भरविण्याची चाल त्यांच्यामध्यें असावी असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसून येतें. शेवटीं अनेक दृढनिश्चयी राजांच्या प्रयत्नांमुळें तिसऱ्या सेन्वोस्री व तिसऱ्या अमेनेम्हेच्या कारकीर्दींत सर्व सत्ता त्यांचें ठिकाणीं केंद्रीभूत झालेली दिसून येते. या घराण्यांतील राजांचीं दोन नांवें आहेत; एक, अमेनेम्हे व दुसरें सेन्वोस्री. पहिला अमेनेम्हे हा पहिला राजा होता. याचा व मागल्या घराण्यांतील राजांचा काय संबंध होता एतद्विषयक माहिती उपलब्ध नाहीं. त्यानें तीस वर्षेपर्यंत राज्य केलें. त्यांतलि दहावर्षें तो व त्याचा पुत्र पहिला सेन्वोस्री हे दोघे भागीदार या नात्यानें राज्य चालवीत होते. त्याला राज्य मिळविण्याला व त्यास व्यवस्थित स्वरूप देण्यास लढावें लागलें व तें कार्य पार पडल्यानंतर त्यानें आपली राजधानी थीबीजहून हलवून ती मेम्फिसच्या दक्षिणेस पंचवीस मैलावर मध्यभागीं असलेल्या लिष्ट शहरीं नेली व तेंच आपलें निवासस्थान केलें. त्याचीं स्मारकें सर्व मिसरदेशभर पसरलेलीं असून सिनाईपर्यंतच्या दूरदूरच्या दगडाच्या व इतर खाणी त्याच्या कर्तृत्वाची साक्ष पटवितात. न्यूबियाच्या लोकांवर त्यानें एकदा स्वारी केली होती हीहि एक गोष्ट त्याच्या संबंधानें माहीत आहे. त्यानें आपला मुलगा सेन्वोस्री यास केलेला उपदेश म्हणून जो प्रसिद्ध आहे त्यांत वरील गोष्टींचा उल्लेख असून त्यावरून त्याचें आपल्या प्रजेच्या ठिकाणीं असलेलें वात्सल्य व त्याच्या खुद्द राजवा-

ज्यांत त्याच्या मरवशाच्या नोकरांकडून त्याचा खून करण्याचा प्रयत्न झाला होता यावरून ते किती कृतघ्न होते हें व्यक्त होतें.

पहिला सेन्वोस्री दहा वर्षें आपल्या बापाबरोबर राज्याचा भागीदार होता हें वर सांगितलेंच आहे. त्या काळांत तोच मुख्य कार्यकर्ता असून त्यानें सुदनमध्यें व लिबिअन लोकांवर पुष्कळ स्वाऱ्या केल्या. अमेनेम्हेच्या मृत्यूनंतर त्यानें आपल्या पंचेचाळीस वर्षांच्या कारकीर्दीत आपल्या राजघराण्याचा लौकिक चांगलाच वाढविला. हेलिओपोलिस येथील चौकोनी मनोरा हा त्याच्या सुप्रसिद्ध स्मारकांपैकीं एक असून मोरिसच्या सरोवरास बांध घालण्याचें पुष्कळसें काम त्याच्या कारकीर्दीत झालें असावें. त्यानें नील नदीच्या उगमाजवळ वाडी हाल्फा येथें एक देवालय बांधलें व न्युबियांतील निरनिराळ्या जातींवर मिळविलेल्या जयांचें स्मारक म्हणून तेथें एक विजयस्तंभ उभारला. बेनी हसन येथील अमेनीचें आणि अस्यूत येथील हेप्झेफाचें अशीं दोन उत्कृष्ट कबरस्थानेंहि त्याच्याच कारकीर्दीत बांधलीं गेलीं. पहिला अमेनेम्हे व पहिला सेन्वोस्री या दोघा पितापुत्रांचे मनोरे लिष्ट येथें आहेत.

दुसरा अमेनेम्हे यास दाशूर येथें मूठमाती देण्यांत आली. त्याच्या मागून दुसरा सेन्वोस्री गादीवर बसला. त्याचा मनोरा फायूमनदीच्या मुखाशीं इलाहून येथें आहे. बनीहसन येथील नेमहॉपच्या कबरस्थानावरील रंगकाम याच्याच कारकीर्दीत केलें होतें. सदर रंगकामांत सेमिटिक बेदुइन लोक पूर्वेकडील अरण्यांतून मिसर देशांत एक प्रकारचें नेत्रविलेपन आणीत आहेत असा अत्यंत मनोहर देखावा दाखविला आहे. तिसरा सेन्वोस्री यानें पॅलेस्टाईन व न्यूबिआ प्रांतावर स्वाऱ्या केल्या व आपल्या राज्याच्या दक्षिणमर्यादेवर सेम्ना येथें एक पुतळा व अनेक जयस्तंभ उभारले. त्याच्या मनोऱ्याजवळ त्याच्या कुटुंबांतील एका राजकन्येचे जवाहिराचे अलंकार सांपडले. ज्याच्यावरील चित्रकामांत एक राक्षसी पुतळा एका जागेवरून दुसऱ्या जागीं नेल्याचें दाखविलें आहे अशा एल बरशा येथील थेयॉपच्या कबरस्थानाचें बांधकाम या राजाच्या कारकीर्दीत संपूर्ण झालें.

तिसरा अमेनेम्हे यानें मोरिस सरोवराचें काम पुरें केलें आणि सेम्ना येथें नीलनदीच्या पुराचें पाणी किती उंचीपर्यंत चढतें हें नमुद करण्याचा प्रघात सुरू केला. तो क्रम त्याच्या मागून गादीवर बसलेल्या राजांनीं पुढें चालू ठेवला. त्याच्या शेचाळीस वर्षांच्या कारकीर्दीत त्यानें दाशूर येथें एक व मोरिस सरोवराच्या जवळ हावरा येथें एक असे दोन मनोरे बांधले हावऱ्याच्या मनोऱ्याजवळ चक्रव्यूह ( लॅबिरिंथ ) नांवाचें एक भलें मोठें कबरस्थान आहे. चवथ्या अमेनेम्हेची कारकीर्द अल्पकालिक होती आणि हें राजघराणें सेबेक्नेफ्रू नांवाच्या राणीबरोबर नष्ट झालें. लॅबिरिंथच्या उपलब्ध असलेल्या अवशिष्ट भागांत त्या राणीचें नांव सांपडतें. या म्हणजे बाराव्या राजघराण्यांत आठ राजे झाले आणि तें एकंदर दोनशेंतरी वर्षें टिकलें. या घराण्याचा नांवलौकिक जरी मोठा आहे तरी त्यानें आपल्या राज्याचा विस्तार नील थडीच्या बाहेर केला नाहीं. शिवाय मनोऱ्यापेक्षांहि अधिक वाखाणलेल्या त्यांच्या मोठ्यांतल्या मोठ्या स्मारकाचें एका कपऱ्यांच्या मोठ्या राशीशिवाय सांप्रत कांहींएक उपलब्ध नाहीं.

**तेराव्यापासून सतराव्यापर्यंत घराणीं:—** " नूतन साम्राज्याचा " उदय होईपर्यंत यापुढच्या काळाचा इतिहास अगदीं अप्रसिद्ध आहे. मॅनेथो यानें तेराव्यापासून सतराव्या राजघराण्यापर्यंत सर्वांचीं नांवें दिलेलीं आहेत परंतु पंधराव्या व सोळाव्या "हिक्सॉस" राजघराण्यांतील राजांशिवाय त्यानें दिलेल्या इतर नांवांचा लोप झालेला आहे. अबिडॉस येथील शिलालेखांत बाराव्यापासून आठराव्या राजघराण्यांचा उल्लेखहि केलेला नाहीं. ट्यूरिन येथें असलेल्या कागदपत्रांवरून बरींच नांवें सांपडतात आणि इतर स्मारकांवरूनाहे त्यांच्यांत भर पडते. परंतु त्यावरून त्यांचें स्थलकालादि निश्चित करणें दुरापास्त आहे. हिक्सॉस घराण्यांतील नांवें मात्र त्यांच्या परदेशीय स्वरूपावरून ज्यांवर तीं खोदलीं आहेत त्या जवाहिरांच्या विशिष्ट आकारांवरून व मॅनेथोनें दिलेल्या नांवांशीं दिसून येणाऱ्या सादृश्यावरून निश्चित करितां येतात. सतराव्या घराण्यांतील राजेहि त्यांच्या विशिष्टप्रकारच्या नांवावरून व अन्य पुराव्यावरून ओळखतां येतात. मॅनेथोनें तेराव्या व चवदाव्या राजघराण्यांत बऱ्याच राजांची गर्दी केली आहे परंतु या एकंदर राज्याचा काळ तीनशें चारशें वर्षांचा होता असें धरून चालणें सयुक्तिक दिसतें.

तेराव्या घराण्यांतील व क्वचित् चवदाव्या घराण्यांतील राजांचे ( विशेषेंकरून थीबीज व टॅनिस येथें ) ग्रानाईट दगडाचे घडविलेले, भव्य आकाराचे व उत्कृष्ट कारागिरीचे पुतळे आहेत, कांहींच्या इमारतींचे अवशिष्ट भाग आहेत तर कांहींचे पहिल्या धबधब्याच्या आसपास असलेल्या खडकांत कोरीव लेख व मूर्ती आहेत.

**हिक्सॉस घराण्यांतील राजांची कारकीर्द:—** मिसर देशाच्या अन्तःकलहामुळें तो परक्याच्या हातीं जावा यांत कांहीं नवल नाहीं. मिसर देश काबीज करण्यास हिक्सॉस राजांना युद्ध करावें लागलें नाहीं असें मॅनेथो म्हणतो. ॲपोफिस राजाच्या कारकीर्दीच्या तेहतिसाव्या वर्षी ऱ्हिंड येथील गणितविषयक कागदपत्राची नक्कल करण्यांत आली यावरून हिक्सॉस घराण्याचें राज्य बराच वेळ टिकलें असावें असें दिसतें. हिक्सॉस राजांचीं स्मारकें व त्यांचें " स्कॅरब " नांवाच्या किड्याच्या आकृतीच्या जवाहिरावर खोदलेले लेख वरच्या व खालच्या मिसर-

प्रदेशांत चहूंकडे सांपडतात. खिआन राजाचीं तसलीं स्मारकें व कोरिव लेख तर क्रीट व बगदादपर्यंत पसरले होते. हिक्सॉस राजे आपल्या सिरियांतील देवाचे उपासक होते. त्यांनीं आपला देव व मिसर देशचा देव सेथ हे दोन्ही देव एकच होत असें मत प्रस्थापित करून त्या पंथाचा प्रसार सर्व मिसर देशभर करण्याचा जोराचा प्रयत्न केला व त्यामुळें त्या देशांतील मूळच्या देवाचें महत्त्व फार कमी झालें. ज्यामुळें मिसर देशांतील लोकांच्या चारित्र्यावर व इतिहासावर इतका विलक्षण परिणाम झाला त्या संक्रमणकालाची कांहीं तरी निश्चित माहिती एखादे वेळीं उपलब्ध होईल अशी आशा आहे हिक्सॉस राजांची सत्ता समूळ नष्ट झाल्यावर "नूतनसाम्राज्यांतील" कलाकुसरीच्या व प्रतापशाली युगास सुरवात झाली. सतराव्या राजघराण्यांतील अर्धवट स्वतंत्र अशा लहान सहान राजे रजवाड्यांनीं हिक्सॉस राजांच्या सत्तेस विरोध केला. या लढायांमध्यें सिकेनेन्रे याचें नांव प्रामुख्यानें पुढें येतें. तिसऱ्या सिकेनेन्रेच्या "ममी" (मसाला भरून ठेवलेलें प्रेत) वरून हिक्सॉस यांच्या बरोबर झालेल्या लढाईंत त्याच्या मस्तकावर भयंकर वार लागून तें छिन्न भिन्न झालें असल्याचें दिसून येतें.

**अठरावें राजघराणें–नूतन साम्राज्य.**—या युगास "नूतन युग" म्हणतात व "राज्य" या शब्दाच्या, ऐवजीं "साम्राज्य" हा शब्द वापरतात यावरून या काळीं राज्याचा विस्तार बराच झाला होता हें उघड दिसतें. वैभवशाली अठरावें राजघराणें याचा सतराव्या राजघराण्याशीं निकटचा संबंध होता. या अठराव्या राजघराण्यांतील राजानीं नील नदीच्या मुखप्रदेशाच्या वायव्येकडील हिक्सॉस राजांची सत्ता उलथून पाडण्याचें कार्य प्रथम हातीं घेतलें. व अव्हारिसचा किल्ला सर करून अठराव्या घराण्याचा संस्थापक "अह्मोसी" यानें तें कार्य यशस्वी रीतीनें पार पाडलें. त्यानें फिरून पॅलेस्टाईन मध्यें त्यांच्यावर स्वारी केली व तींत शाहुरेन शहराला तीन वर्षें वेढा देऊन अखेर तें हस्तगत केलें. शिवाय, आपल्या राज्यांतील बंडाळी मोडून त्यानें सीरिया व न्यूबिया या देशांवरहि स्वाऱ्या केल्या. याच वेळेस कोणा एका अबाना नांवाच्या गृहस्थास राजाच्या नांवाचा म्हणजे अह्मोसी नांवाचा मुलगा होता. त्याच्या एल् काब येथील शिलालेखावरून या काळची पुष्कळशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध होते. अह्मोसी नंतर पहिला अमेनॉफिस राज्यावर बसला. त्यानें लिबिया व इथिओपिआ या देशांवर स्वाऱ्या केल्या. यानंतर पहिला टेथमॉसिस हा तिसरा राजा होऊन गेला. तो दुसऱ्या घराण्यांतील होता परंतु त्यानें आपल्या अह्मोसी नांवाच्या बायकोकडून राज्यावर आपला हक्क लागू केला. अशा रीतीनें कांहीं एक दंगा धोपा नसतां जेव्हां तीस वर्षेंपर्यंत राजसत्ता नीट रीतीनें प्रस्थापित झाली तेव्हां दुसऱ्या देशावर स्वाऱ्या करून आपला राज्यविस्तार करण्याइतका मिसर देश धनाढ्य व बलाढ्य झाला. त्याच्यांत आतां क्षात्रतेज चमकूं लागलें. राजा, त्याचा प्रधान व इतर दरबारचे अंमलदार यांच्या हातांत सर्व राजसत्ता एकवटली होती व मध्यकालीन राज्याच्या वेळेस प्रचारांत असलेल्या सरंजामी पद्धतीचा मागमूसहि शिल्लक नव्हता. टेथमॉसिस यानें "कुश" प्रांत पूर्णपणें काबीज केला व तेथील राज्यकारभार चालविण्यास आपल्या प्रतिनिधीची नेमणूक केली. हा "कुश" प्रान्त दक्षिणेस चवथ्या धबधब्याच्या किंचित् खालीं असलेल्या नपाट्यापासून उत्तरेस एल् काब पर्यंत विस्तृत झाला होता त्यामुळें वरच्या मिसर देशाचे पहिले तीन प्रांत त्यांत समाविष्ट होते. नंतर सीरियाकडे मोर्चा वळवून टेथमॉसिस हा युफ्रेटिसपर्यंतचा मुलुख सर करीत गेला. कदाचित् त्याच्या पूर्वीचा राजाहि तेथवर गेला असेल परंतु तें सिद्ध करणारीं साधनें उपलब्ध नाहींत. वर दिलेल्या स्वाऱ्या खर्चाच्या दृष्टीनें नुकसानकारक नव्हत्या. उलट कैद्यांची वाढ, लुटालुट व खंडणी या योगांनीं मिसर देशाची सांपत्तिक भरभराटच होत गेली. मिसर देशाच्या बादशहांनीं कर्णक येथील थीबीज शहरच्या ॲमन नामक देवाच्या देवस्थानाचा विस्तार करून, त्याच्या ऐश्वर्यांत भर घालून जगांतील सर्व देवस्थानांमध्यें त्याला जें अत्यंत श्रेष्ठ स्थान प्राप्त करून दिलें यास प्रथम पहिल्या टेथमॉसिसनें सुरवात केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. डेर एल् बाहरी येथील देवालयाच्या रचनेस त्याचीच कल्पकता कारणीभूत झाली. त्याच्या कारकीर्दीच्या अखेर त्याचे वडील मुलगे मृत झाल्यामुळें टेथमॉसिस यानें अह्मोसी पासून झालेल्या हाटशेपसूत नांवाच्या आपल्या मुलीकडे राज्यकारभाराचा कांहीं भाग सोपविला. ज्या खिंडींत थीबीसच्या राजांचीं कबरस्थानें आहेत तेथें पहिल्या टेथमॉसिस यासच प्रथम मूठमाती देण्यांत आली होती. त्याच्या मागून त्याचा मुलगा हाटशेपसूतचा पति दुसरा टेथमॉसिस राज्यावर बसला परंतु त्यानें दोन तीन वर्षेंच राज्य केलें. तेवढ्या अवधींत त्यानें न्यूबियावर स्वारी केली व आपल्या एसी नांवाच्या रखेलीचा मुलगा जो तिसरा टेथमॉसिस यास आपल्या बरोबर गादीवर बसविलें. परंतु आपल्या पतीच्या निधनानंतर हाटशेपसूतनें सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. तिच्या पुतळ्यांत तिचा पेहेराव व स्वरूप जरी मर्दानी व पुरुषासारखें आहेत तरी शिलालेखांत तिचा उल्लेख स्त्रिलिंगांतच केलेला आढळतो. या काळच्या कांहीं स्मारकांत तिचेंच नांव फक्त आढळतें तर कांहींत तिचें व तिसऱ्या टेथमॉसिसचें जोडीनें आढळतात व कांहींत फक्त टेथमॉसिसचें आढळतें; परंतु, या अद्वितीय बाईचें आपल्या सावत्र मुलावर पुष्कळच वर्चस्व असलें पाहिजे, कारण मिसर देशाची सर्व राजसत्ता तिच्या हातीं असल्या-

बद्दल तिची प्रसिद्ध आहे. टेथमॉसिसच्या मर्मीवरून ( त्याच्या जतन केलेल्या शवावरून ) किंवा त्याच्या कारकीर्दीच्या शकावलीपरून पाहूं गेलें तर तो उतारवयाचा दिसून येतो. तथापि त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धांत दिसून येणारा त्याचा प्रभाव तो ज्यावेळीं हाटशेपसूत बरोबर जोडीनें राज्यकारभार चालवीत होता त्यावेळीं दृष्टीस पडत नाहीं. शांततेच्या काळांत ज्या कलांची अभिवृद्धि करणें शक्य असतें त्यांची अभिवृद्धि हाटशेपसूत हिनें केली. हिक्सॉस घराण्यांतील राजांच्या जुलमामुळें, व अनास्थेमुळें ज्या वरच्या व खालच्या मिसर देशांतील देवस्थानांची अव्यवस्था झाली होती तेथील पूजाअर्चा तिनें पूर्ववत सुरू केली. डेरएल्बाहरी येथील देवालयाचें काम पुरें करून व त्यास उत्तम तऱ्हेनें शृंगारून तिनें त्याच्या भिंतीवर आपली दैवी उत्पत्ति, अमनच्या देखरेखीखालीं आपलें संगोपन व आपल्या पित्याबरोबर जोडीनें राज्य चालविणें इत्यादि गोष्टींचीं चित्रें काढविलीं. प्यूओनीवर जलमार्गानें केलेल्या स्वारीची व इतर अन्य प्रसंगांचीं सुप्रसिद्ध शिल्पकामें येथें पहावयास सांपडतात. पहिल्या व दुसऱ्या टेथमॉसिसच्या कारकीर्दींत कर्णक येथें सुरू केलेलीं कामें पुरीं करण्यांत हाटशेपसूत हिनें फार मेहनत केली व तेथील वेशीजवळ तिनें दोन चौकोनी मनोरे उभारले. त्यांपैकीं एक अद्याप उभा आहे व तो त्या नमुनेदार देवालयास विलक्षण प्रकारची शोभा देतो. जेव्हां हाटशेपसूत ही पहिल्या टेथमॉसिस बरोबर राज्यकारभार चालवीत होती तेव्हांपासून बाविसाव्या वर्षाचा सन सिनाइ येथें सांपडला आहे. त्यानंतर थोड्याच अवधींत तिसरा टेथमॉसिस हा आपल्या कारकीर्दीच्या बाविसाव्या वर्षी मोठ्या जोमानें राज्यकारभार चालवीत आहे असें दिसून येतें. हाटशेपसून हिच्या ठिकाणीं असें कांहीं तेज होतें कीं ती असेपर्यंत तिच्यावर सर्व सेवकांची निष्ठा होती व कोणाची वर मान करण्याची छाती होत नव्हती. परंतु तिच्या मृत्युनंतर थोडयाच अवधींत प्रतिक्रियेला सुरवात झाली. स्त्रीप्राबल्यासंबंधानें तिटकारा, त्यांत दुसऱ्यांवर छाप देवण्याची त्या स्त्रीची तऱ्हा व आपल्या सावत्र मुलाचा वास्तविक हक्क असतां तो तिनें बळकावणें इत्यादि गोष्टी त्या प्रतिक्रियेस कारणीभूत झाल्या असाव्या. त्यामुळें तिच्या खोदीव मूर्ती छिन्नभिन्न करण्यांत आल्या व तिचीं स्मारकें नष्ट करून त्यावर नवीन इमारती होऊं लागल्या आणि कबरस्थानांत कायमची विश्रांति घेत पडलेल्या तिच्या एकनिष्ठ सेवकांचाहि तसाच सूड घेण्यांत आला. तदनंतर अखेनटान् यानें आपल्या धर्मवेडामुळें अमनदेवाच्या सर्व मूर्ति आणि त्याचें नांव ज्यावर आहे असे सर्व कोरीव लेख छिन्नविछिन्न करून टाकले. यांत हाटशेपसूत हिचीं सर्व उत्तम उत्तम स्मारकें नष्ट झालीं. एकोणिसाव्या राजघराण्याच्या संस्थापकांनीं तर तिला राज्य करण्याचा हक्कच नव्हता म्हणून तिचीं नांवें खोडून त्याजागीं पहिला, दुसरा व तिसरा टेथमॉसिस यांचीं नांवें घातलीं. ही कलाकौशल्यविध्वंसकबुद्धि सर्व मिसरदेशभर त्यावेळीं दिसून आली परंतु सिनाइच्या दूरदूरच्या खाणींत असलेल्या हाटशेपसूतच्या मूर्ती मात्र अभंग राहिल्या. पहिल्या सेतीनें व दुसऱ्या रामेसीसनें केलेल्या राजांच्या यादीमध्यें हाटशेपसूतचें नांव नाहीं व यापुढील कोणत्याहि स्मारकांत तिच्या कारकीर्दीचा उल्लेख नाहीं.

**तिसरा टेथमॉसिस याच्या लढाया.**—तिसरा टेथमॉसिस यानें आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग युद्धाकडे केला. हाटशेपसूतच्या मृत्यूनंतर सिरियानें बंड केलें परंतु हा राजा केवळ बावीस वर्षांचा असतां त्या बंडखोरांची खोड मोडण्यास सिद्ध झाला. ऑरोन्टीज या नदीवर असलेल्या कडेश शहरानें जरी या बंडांत पुढाकार घेतला होता तरी बंडाची साथ सर्व पश्चिम सिरियाभर पसरली होती. मेगीडो येथील सिरियन लोकांचें पायदळ व रथदळ यांच्याशीं सामना व अखेर तें ठिकाण हस्तगत करणें इत्यादि सर्व प्रथम युद्धांतील टेथमॉसिसच्या हालचाली दररोज टिपून ठेवण्यांत येत होत्या. या बखरींतील उतारा व टेथमॉसिसच्या पुढील युद्धाचा त्रोटक वृत्तांत कर्णक येथील देवालयाच्या भिंतीवर खोदलेले आहेत. पांच वेळ युद्ध केल्यानंतर त्यानें सर्व दक्षिण सिरिया पादाक्रान्त केला व फिनिशियाचीं बंदरेंहि हस्तगत केलीं. सहाव्या युद्धांत त्यानें कडेश शहर सर केलें. पुढील वर्षी टेथमॉसिस यानें फिरून फिनिशियाच्या बंदरांस भेट दिली व बंडखोरांस शासन करून सिरियापासून खंडणी वसूल केली. इतकें झालें तरी राज्य-विस्ताराचे बाबतींत आणखी एक वर्ष जाईपर्यंत त्याचें पाऊल पुढें पडलें नाहीं. तदनंतर त्याच्या कारकीर्दीच्या तेहतिसाव्या वर्षी तो कडेशमधून कारचेमिशपर्यंत लढाया मारीत गेला व युफ्रेटीस नदी ओलांडून मिटनीच्या राजांच्या मुलखांत शिरला. तेथें त्यानें पहिल्या टेथमॉसिसच्या शिलेजवळ लेख कोरून आपली एक शिला बसविली व नदी मार्गानें दक्षिणेंत निऊपर्यंत गेला. येथें त्यानें एकशेंवीस हत्तींच्या कळपाची शिकार केली आणि नंतर पश्चिमेकडे वळून नहरिणाची खंडणी वसूल करून एशियामायनरमधील हिटाइट लोकांच्या व बाबिलोनच्या राजाच्या देणग्यांचा स्वीकार केला. कडेशाच्या दुसऱ्या वेढयाच्या वेळीं बंड करण्याच्या प्रवृत्तीचा पूर्ण बीमोड होईपर्यंत या राजानें सिरियावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या. लिबिया व एथिओपिया या देशांवरील त्याच्या स्वाऱ्या विशेष महत्त्वाच्या नाहींत. लढायांच्या मध्यंतरींच्या काळांत तिसरा टेथमॉसिस जो राज्यकारभार पाही त्यावरून तो मोठा कर्तृत्ववान् राजकारणी पुरुष होता असें दिसून येतें. राज्याच्या कोनाकोपऱ्यांतहि काय चाललें आहे इकडे त्याचें लक्ष असे. त्याच्या कारकीर्दींतील बहुतेक महत्त्वाच्या वर्षांतील सहा महिने सिरियावरील स्वाऱ्यांत खर्ची पडत असत परंतु राहिलेला सर्व काळ तो राज्याच्या अंतर्गत व्यवस्थेकडे लावी-

तो यांत अन्याय व दरोडे यांचा बंदोबस्त करी, जिंकलेल्या देशांच्या लुटींतून व खंडणींतून व धरून आणलेल्या कैद्यांकडून देवालयें दुरुस्त करणें व त्यांस सुशोभित करणें इत्यादि कामें करून घेई, किंवा ॲमन देवाच्या देवळांतील भपकेदार उपकरणीं तयार करण्याकरितां कल्पनाचित्रें रेखाटून देई. त्याच्या कारकीर्दीच्या उत्तर काळांत त्यानें न्युबियावर कांहीं स्वाऱ्या केल्या. टेथमॉसिस हा आपल्या कारकीर्दीच्या चोपन्नाव्या वर्षी वारला. डेरएल्बाहरी येथील तळघरांत सांपडलेल्या त्याच्या ममीवरून ( जतन केलेल्या शवावरून ) तो फार वृद्ध होता असें दिसतें. तो सर्व मिसर देशाच्या इतिहासांत नसला तरी "नूतन साम्राज्यांतील" सर्वांत मोठा राजा होता हें निर्विवाद आहे.

**तिसरा ॲमेनोफिस.**–तिसरा टेथमॉसिस यानें आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं दुसरा ॲमेनोफिस नांवाच्या मुलास आपल्याबरोबर गादीवर बसविलें होतें आणि तोच त्याच्या मागून राज्यावर बसला. गादीवर बसल्यावर नव्या राजानें प्रथम सिरियावर स्वारी केली; कारण, तेथें बंडाच्या प्रवृत्तीस फिरून ऊत आला होता. त्यानें युफ्रेटिस-पर्यंत जाऊन तिक्शीच्या सात राजांस कैद केलें व त्यांस बरोबर घेऊन व पुष्कळशी लूट गोळा करून तो थीबीज येथें परत आला. कैद करून आणलेल्या राजांचे त्यानें ॲमन देवास बळी दिले व त्यांपैकीं सहांचीं धडें भिंतीवर लटकत ठेवून सातवें धड दक्षिणेस नपाता येथें नेलें व इथिओपिअन लोकांस वचक बसेल अशा ठिकाणीं त्याची स्थापना केली. ॲमेनोफिसनें सव्वीस वर्षे राज्य करून तें आपल्या चवथ्या टेथमॉसिस नांवाच्या मुलाच्या स्वाधीन केलें. या चवथ्या टेथमॉसिसनें 'स्फिंक्स" नामक एका मोठ्या मनोऱ्याची साफसफाई केली व तसें केल्याबद्दल एका शिलालेखांत खोदून ठेवलें आहे. त्यानें उत्तर सिरियावर व कुश देशावर स्वाऱ्या केल्या. त्याचा मुलगा तिसरा ॲमेनोफिस हा बांधकामा-विषयीं प्रसिद्ध आहे. त्यानें पुष्कळ देवळांचीं कामें केलीं. त्यांत लुक्सॉरचें देऊळ नवीन बांधलें व कर्णकच्या देवळास पुष्कळसे रस्ते व दरवाजे केले, त्यानें एका "तय्या" नांवाच्या बाईशीं लग्न केलें. ही बाई जरी अप्रसिद्ध कुलांतली होती तरी तिला तिचा पति व त्याच्या मागून तिचा मुलगा हे दोघेहि मोठ्या सन्मानानें वागवीत असत. तिसऱ्या ॲमेनोफिसनें इथिओपियामध्यें स्वाऱ्या केल्या परंतु नपातापासून युफ्रेटिस-पर्यंत त्याची सत्ता दीर्घकाल अबाधितपणें चालू होती. मिसर देशांत व ग्रीसच्या बेटांत त्याच्या तय्याच्या नांवाच्या लहान लहान वस्तू सांपडतात. तेल एल् ॲमर्ना येथील दफ्तरखान्यांत त्याच्या मुलानें जतन करून ठेवलेले कीलाकृति शिलालेख सुदैवानें उपलब्ध झाले आहेत. त्यावरून मिटनी, असुरिया व बॅबिलोनियासारख्या मोठ्या प्रदेशांचे राजे सुद्धां ॲमेनोफिस याच्याशीं पत्रव्यवहार करण्यांत, त्याच्याशीं आपल्या मुलींचीं लग्नें लावून देण्यांत व त्याची मैत्री संपादन करण्यांत धन्यता मानीत होते असें दिसतें. सायप्रसचा राजाहि त्याची मजा संपादन करीत होता. शिवाय सीरियाचे राजे त्याच्या बापानें जिंकले असल्यामुळें त्यांच्या मुलांचें सर्व शिक्षण मिसर देशांत झालेलें होतें व त्या कारणानें ते राज्यावर बसल्या-नंतरहि ॲमेनोफिसशीं बंद्या गुलामाप्रमाणें वागत असत. या वेळीं मिसर देशांत जो चहूंकडून खंडणीचा प्रवाह चालू होता त्यानें तेथें चालू असलेल्या सर्व भपकेदार कामांचा खर्च भागत असे. ॲमेनोफिसनें आपल्या तय्या राणीचें नांव व व वंशावळ खोदून व त्यापुढें आपल्या राज्याची मर्यादा मिटनीच्या राजाची मुलगी गिलुखिपा हिच्याबरोबर त्याचें दुसरें लग्न, थीबीज येथें पवित्र सरोवर बांधणें, रानटी पशूंची शिकार, आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या दहा वर्षांत त्यानें मारलेल्या सिंहांची संख्या इत्यादि सर्व माहिती देऊन "स्कॅरॅब" नांवाच्या किड्यांच्या आकाराचे अनेक पाषाण-खंड तयार केले होते. ज्या भव्य पुतळ्यांस ग्रीक लोक होमर कवीच्या "मेम्नन" नायकाच्या नांवावरून ओळखीत होते व जे थीबीजच्या पश्चिमेकडील मैदानाकडे तोंड करून बसविले होते त्यांत या राजाची प्रतिमा आहे आणि ते याच्या कबरस्थानाच्या वेशीपुढें ठेवण्यांत आले होते. ती वेस खेरीज करून कबरस्थानाचा कोणताहि भाग हल्लीं शिल्लक नाहीं. त्याच्या कारकीर्दीच्या छत्तिसाव्या वर्षाच्या शेवटीं उत्तरेकडून हिटाइट लोकांनीं व पूर्वेकडून खाबिरी लोकांनीं सिरियावर स्वारी केली. त्यावेळेस कांहीं किरकोळ राजांनीं स्वारी करणाऱ्यांनां मिळून मिसर देशाची सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न केला व जे राजे मिसर देशच्या राजांशीं इमानानें वागले त्यांनींहि चिन्ताजनक स्थिति असल्याबद्दल त्यांस खबर दिली.

**चवथा ॲमेनोफिस.**—तिसरा ॲमेनोफिस व तय्या यांचा मुलगा चवथा ॲमेनोफिस हा मिसर देशीय राजांच्या मालिकेंत विशेष सुप्रसिद्ध राजा होऊन गेला. तो धर्मवेडा असून हेलिऑपोलिस येथील सूर्य देवतेचा मुख्य उपाध्याय होता आणि म्हणून सूर्य हा जीवन, उत्पादन, वर्धन आणि चलन या सर्वांचें प्रत्यक्ष मूळ कारण आहे आणि मिसर देशाप्रमाणेंच इतरत्र त्या देवतेची सत्ता एकसारखी अबा-धित चालते अशी त्या देवतेसंबंधीं त्याची भावना होती. मिसर देशांतील अनेक देवतांस व हिलिऑपोलिस येथील सर्व पौराणिक कथांस फाटा देऊन त्यानें आपल्यास दृश्य सूर्यबिंबोपासक पंथास वाहून घेतलें. आतांपर्यंत अप्रसिद्ध असलेला सूर्यवाचक "अटॉन" हा शब्द त्यानें प्रचारांत आणला. परंतु हिलिऑपोलिसच्या श्येनशीर्ष सूर्यदेवाचें परं-परागत चालत असलेलें "हरख" हें नांव त्यानें तसेंच पुढें चालू ठेवलें व कर्णक येथें त्या देवाचें एक देवालय बांधलें. त्याच्या कारकीर्दीच्या पांचव्या वर्षापर्यंत इतर देव-तांचीहि पूजा करण्यास सरकारी रीत्या परवानगी होती परंतु तदनंतर इतर सर्व उपासना बंद करून फक्त एकच

पंथ कायम करण्यांत आला. सर्व जुन्या देवतांमध्यें सत्तेच्या व उत्पन्नाच्या दृष्टीनें अॅमन देवाचें बडें प्रस्थ होतें म्हणून या दीर्घकाल सर्वमान्य झालेल्या देवाविरुद्धच राजानें मोठ्या निकराचा हल्ला चढविला. त्यानें आपलें "अमेनहॉट" (अॅमन संतुष्ट आहे) हें नांव टाकून देऊन "अखेनटॉन" (अटॉनचा पवित्र) हें नांव धारण केलें, सर्व स्मारकांवरून अॅमनचीं नांवें व मूर्ती नाहींशा केल्या व जेथें अॅमनचें स्थान होतें तें भव्य थीबीज शहर सोडून त्यानें हेर्मोपोलिसच्या मैदानांत एल् अॅमर्ना येथें आपली नवीन राजधानी बांधली. त्यानें आपल्या कारकीर्दीच्या सहाव्या वर्षी ती राजधानी व तिच्या भोंवतालचा बराचसा मुलूख अटॉन देवास अर्पण केला. तेथें भव्य देवळें, राजवाडे, घरें व कबरस्थानें बांधण्यांत आलीं. पुष्कळ स्मारकांवर अनेकेश्वरी मत दाखविणारें "देव" शब्दाचें अनेकवचनी रूप नाहींसें केल्याच्या खुणा आहेत.

सर्व स्थानिक देवालयांतून अटॉनची पूजा सुरू करण्यांत आली. अमॉनचें जप्त केलेलें उत्पन्न आणि सिरिया व कुश मधून आणलेली खंडणी यांचा उपयोग एखटनला-अटॉनचा मुलूख-नवीन राजधानी सुशोभित करण्याचें कामीं व ज्यांनीं अटॉन पंथाची शिकवण मोठ्या उत्साहानें स्वीकारली त्यांना पारितोषिकें देण्याच्या कामीं करण्यांत आला. परंतु दरम्यान साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीनें अवश्य करावयाच्या गोष्टींची हेळसांड झाली. तिसऱ्या अमेनोफिसच्या कारकीर्दीच्या शेवटीं देशावर जे संकट आलें होतें त्याचा पूर्णपणें मोड करण्यांत आला नव्हता. सिरियांतील राजे कधीं हिटाइट लोकांची तर कधीं खाबिरी लोकांची मदत घेऊन आपआपसांत लढत होते. त्यांपैकीं जे राजे आपल्या पूर्वजांप्रमाणें मिसर देशच्या राजाशीं एकनिष्ठपणें वागत होते त्यांनीं त्या राजांस शत्रूंपासून संरक्षण करण्याविषयीं पत्रावर पत्रें धाडलीं. त्या कामावर कांहीं फौज घेऊन जरी एका सरदारास पाठविलें होतें तरी त्यानें भांडणाचा निवाडा नीट न केल्यामुळें त्यापासून फायद्याऐवजीं तोटाच अधिक झाला. शेवटीं त्या राजांचीं निराशेचीं पत्रें येऊं लागलीं व त्या मिसरदेशाभिमानी राजांस मिसर देशांत पळून जाण्याशिवाय दुसरा मार्ग उरला नाहीं. या राजाची कारकीर्द संपण्यापूर्वी सिरियांतील मिसर देशाची सत्ता संपुष्टांत आली होती. अखेनटॉन हा आपल्या कारकीर्दीच्या सतराव्या वर्षी म्हणजे इ. स. पूर्वी १३५० च्या वर्षी मरण पावला. त्याच्या पोटीं पुत्रसंतान नव्हतें. त्यास सर्व मुलीच झाल्या व त्या सर्व समारंभांत त्याच्या बरोबर असत. त्याच्या मागून त्याचे दोघे जांवई एकामागून एक गादीवर बसले परंतु त्यांनीं फार वेळ राज्य केलें नाहीं. त्यांपैकीं तुतेनखातन यानें आपल्या नांवाचा त्याग करून "तुतेनखामन" हें नवीन नांव धारण केलें आणि एखटनचा सर्वस्वी त्याग न करतां कर्णकच्या देवालयास त्याचें पूर्वीचें वैभव प्राप्त करून दिलें. त्यांत त्यानें नवीन स्मारकें करून अॅमन देवास अर्पण केलीं. याच्या कबरस्थानाचा नुकताच शोध लागला असून त्यांत अगणित संपत्ति व स्मारक वस्तू सांपडल्या आहेत. अखेनटॉननें केलेला बदल सामान्य जनतेस मान्य झाला नव्हता. सामान्य लोकांनीं आपल्या जुन्यापुराण्या धार्मिक चालीरीति व कल्पना तशाच उराशीं बाळगून ठेवल्या होत्या आणि उपाध्ये मंडळी जरी त्या राजाच्या जिवन्तपणीं धाकानें किंवा लांच घेऊन स्तब्ध बसली असली तरी ती त्या पाखंडवादाचा मनापासून विरोध करीत असली पाहिजेत हें उघड आहे. तदनंतर अखेनटॉनच्या पंथाचा अभिमानी 'ए' नांवाचा उपाध्याय यानें कांहीं काळ राज्य केलें तथापि "अटॉन" यास अनेक देवतांपैकीं एक यापेक्षां अधिक महत्व उरलें नव्हतें. शेवटीं अखेनटॉनच्या हाताखालचा हर्मोहिब नांवाचा एक सरदार गादीवर बसला व त्यानें जुन्या पंथाचा उघड उघड पुरस्कार केला. त्यामुळें अॅमन देवाची पूर्वी जी गति झाली तीच आतां अटॉन देवाची व त्याच्या उपासक राजांची झाली. त्यांचीं स्मारकें उध्वस्त करण्यांत आलीं, त्यांचीं नांवें खरडून टाकण्यांत आलीं व त्यांच्या मूर्ती छिन्नभिन्न करण्यांत आल्या व अॅमनचीं स्मारकें, नांवें व मूर्ती पुनः प्रस्थापित करण्यांत आल्या. दुसऱ्या रामेसिसपासून हर्मोहिबपर्यंत पाखंडी राजांच्या कारकीर्दीची जी सनावळ करण्यांत आली त्यांत अखेनटॉन यास "गुन्हेगार अखेनटॉन" असें वर्णिलें आहे. राज्यकर्त्यांनीं दुर्लक्ष केल्यामुळें शासनपद्धतींत अनेक दोष शिरले होते. हर्मोहिबची दृष्टि व्यावहारिक होती. त्यानें ते सर्व दोष काढून टाकून राज्यामध्यें शिस्त उत्पन्न केली. अधिकाऱ्यांच्या लाचलुपतीच्या प्रकारांस कडक उपायांनीं आळा घातला. एतद्विषयक त्याचे कायदे कर्णकच्या देवालयांतील विजयस्तंभावर खोदलेले आहेत व त्या खोदीव कामाच्या अवशिष्ट भागावरून त्याचे हेतू किती उच्च होते हें कळून येण्यासारखें आहे. त्याच्या मागून गादीवर बसलेल्या राजांच्या कारकीर्दींत जी देशाची भरभराट झालेली दिसून येते तीवरून त्याला राष्ट्राच्या गरजा किती उत्तम रीतीनें समजत होत्या हें स्पष्ट होतें. शिवाय त्यानें आसपासच्या प्रदेशांवर स्वारी करून मिसर देशाचा दरारा चहूंकडे पुन्हां प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**एकोणिसावें घराणें.**-पहिला रामेसीस हा या घराण्याचा संस्थापक होय. आपल्या दोन वर्षांच्या छोट्याशा कारकीर्दीत त्यानें कर्णक येथील भव्य दिवाणखाना बांधण्याचें योजून त्याला सुरुवात केली त्यायोगें त्याच्या मोठमोठ्या कल्पना लोकांच्या नजरेस आल्या, तथापि त्या पार पाडण्याला त्याचें वार्धक्य आड आलें असावें. त्याचा मुलगा पहिला सेती हा आपल्या बापाच्या मृत्यूनंतर, पॅलेस्टाइनवर चालून जाणाऱ्या बेदुइन शत्रू याला नामोहरम करण्यास एकदम सिद्ध झाला. पुढें तो लेबाननपर्यंत सरकला. त्यावेळीं त्यास लिबियन लोकांचाहि समाचार घेणें अवश्य होतें. तसें करून

नंतर सेती पुन्हां पॅलेस्टाइनमधून पुढें जाऊन ॲमोराइट लोकांचा प्रदेश त्यानें उध्वस्त केला. व हिटाइट लोकांबरोबर त्याचें भांडण सुरू झालें. खेताच्या राजाशीं तह होऊन सेतीच्या लढायांचा निकाल लागला. गादीवर आल्यानंतर ९ वर्षांनीं त्याचें लक्ष न्युबियाच्या अरण्यांतील सोन्याच्या खाणीकडे गेलें व त्यानें तेथपर्यंत रस्ता दुरुस्त केला. या अवधींत त्याच्या बापानें सुरू केलेल्या कर्णक देवळाचें जंगी काम पुढें चालू होतेंच. व अखेनटॉनच्या स्मारकांची इजिप्त-मध्यें जिकडे तिकडे झालेली दुर्दशा त्यानें नाहींशी करण्याचा सतत उद्योग चालविला. ॲबिडॉस येथील सेतीचें मंदिर आणि राजांच्या कबरी असलेल्या दरींत बांधलेली त्याची कबर, कारागिरी आणि सौंदर्य या दृष्टीनें त्या काळचे अत्युत्कृष्ट शिल्पाचे नमुनेच ह्मणतां येतील. दुसरा रामेसीस लहानपणींच गादीवर आला. त्यानें ६७ वर्षें राज्य केलें. आपल्या कारकीर्दींत सेतीनें आरंभिलेलीं पुष्कळशीं कामें त्यानें तडीस नेलीं. व इजिप्त आणि न्युबिया या ठिकाणीं जिकडे तिकडे आपलीं स्वतःचीं स्मारकें करून ठेविलीं. अबूसिंबेल या दगडी देवस्थानाची खोदणी आणि कर्णक येथील भव्य दिवाणखान्याच्या बांधकामाची परिसमाप्ति हीं वास्तुशास्त्राच्या क्षेत्रांत त्याची सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरेल. गादीवर आल्यानंतर दुसऱ्या वर्षीं त्याच्या लढायांस सुरुवात झाली. न्युबियन, लिबियन, सिरियन, आणि हिटाइट हे त्याचे प्रतिस्पर्धी होत. पांचव्या वर्षीं कडेशजवळ त्याचें सैन्य हिटाइट व त्यांचे दोस्त यांकडून पराभव पावण्याच्या अगदीं बेतांत होतें. पण रामेसीसच्या आंगच्या मर्दुमकीमुळें तो प्रसंग टळला. त्याच्या देवळावरील मूर्तिशिल्पांत हा प्रसंग उत्तम रेखाटला असून त्यावर काव्येंहि रचलेलीं होतीं. कारकीर्दीच्या २१ व्या वर्षीं रामेसीस आणि हिटाइट राजा खत्तुशील यांच्यामध्यें तह झाला. ३४ व्या वर्षीं म्हणजे सुमारें इ. स. पूर्वी १२५० त खत्तुशील हा आपला मित्र किंवा मांडलिक जो कोडेचा राजा याच्या समवेत आपल्या दूर असलेल्या राजधानीहून जातीनिशीं इजिप्तमधील चमत्कार पाहण्यास आला. दुसऱ्या रामेसीसनें नीलमुखाकडे बरेंच लक्ष पुरविलें. तानीसचें देवालय वाढवून जें मोठें शोभिवंत केलें गेलें तेंहि याच्याकडूनच. या ठिकाणीं उभारलेला राजाचा पुतळा ९० फुटांवर उंच होता. त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस त्याची करडी नजर व उत्साह कमी झाल्याकारणानें इजिप्शियन राष्ट्रांतला लष्करी जोम नाहींसा झाला. सूदन, लिबिया आणि उत्तरेकडील राष्ट्रें यांतील भाडोत्री शिपाई आणून सैन्यांत भरती करावी लागली. तेथेंच नीलमुखाच्या सुंदर बनांत परकीय लोकांनीं ठाणें दिलें. दुसऱ्या रामेसीस नंतर त्याचा मुलगा मिनेप्टाह सुमारें इ. स. पूर्वी १२२५ त गादीवर आला. आपलें राज्य व एकंदर साम्राज्य राखण्यासाठीं त्याला बऱ्याच लढाया कराव्या लागल्या. त्याच्या कारकीर्दीच्या ५ व्या वर्षाच्या सुमारासच हें युद्ध थांबलें. लिबियन व त्यांचे दोस्त यांचा पूर्ण पराभव होऊन इजिप्त पुन्हा निर्धास्त झालें. मिनेप्टाह हा आपल्या बापाप्रमाणेंच आपल्या पूर्वजांच्या स्मारकांचा अपहार करणारा होता. रामेसीसच्या मोठ्या घराण्यांतील मिनेप्टाह हा १३ वा मुलगा असून गादीवर आल्यावेळीं तो म्हतारा असला पाहिजे. त्याच्या कारकीर्दीचीं पहिलीं कांहीं वर्षें सोडून पुढें त्याच्यानें कांहीं काम होईना. त्याच्या मागून लवकर लवकर एकामागून एक असे अपेशी राजे होऊन गेले.

**विसावें घराणें.**—तिसऱ्या रामेसीसच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या पपायरस हस्तलिखितांत इजिप्तची दशा पुढीलप्रमाणें वर्णिली आहेः—"इजिप्तची भूमि लहान मोठ्या नगराधिपांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या ताब्यांत असून, एकमेकांत त्यांचें हाडवैर असे; नंतर कोणी एक सिरियन स्वतः सत्ताधीश बनला; सर्व प्रदेश त्याच्या अंकित राहिला, त्यानें आपले सोबती गोळा करून दुसऱ्या राजांना लुबाडलें. त्यांनीं देवांना माणसांसारिखे बनविलें, तेव्हां साहाजीकच देवस्थानांच्या देणग्या बंद पडल्या पण जेव्हां देवानांच तह करावासा वाटला तेव्हां त्यांनीं आपला मुलगा सेटेनखोट याला सर्व प्रदेशाचा राजा बनविलें." सुमारें इ. स. पू. १२०० मध्यें सेटेनखोट गादीवर होता. त्याला लोक खरा वारस समजत नव्हते तरी त्याचें घराणें चिरकाल टिकलें. साम्राज्याचें वैभव पुनरुद्दीपित करणाऱ्या तिसऱ्या रामेसीसचा तो जनक होय. मिनेप्टाह गादीवर आल्यावेळीं जसें इजिप्तवर अरिष्ट कोसळलें होतें तसेंच यावेळींहि इजिप्त संकटग्रस्त होतें. लिबियन व त्यांचे सहकारी यांच्याशीं टक्करा देऊन रामेसीसनें त्यांची पिछेहाट केली व इजिप्त स्वतंत्र राखला. त्याच्या कारकीर्दीचीं शेवटचीं वर्षें शांततेचीं गेलीं. तथापि तिसरा रामेसीस हा कांहीं अद्वितीय राजा नव्हता; तो मोठा कल्पक होता किंवा उच्च विचाराचा होता, असेंहि नाहीं. दुसऱ्या रामेसीसचें अनुकरण तो करित असे. पुरोहित लोकांचा आपणावर बसणारा पगडा उठवण्याचेंहि त्यानें मनांत आणिलें नाहीं. पूर्वीच्या राजांनीं देवस्थानांना दिलेली मालमत्ता त्यानें जशीच्या तशीच परत केली इतकेंच नव्हे तर त्यांत आणखी बरीच मोठी भर घातली. सबंध इजिप्तमधील शेंकडा १५ इतकी जमीन निरनिराळ्या देवतांच्या नांवावर होती. जरी त्याच्या कारकीर्दींत एकंदरीन पाहतां इजिप्त समृद्ध होतें तथापि जनतेच्या कांहीं वर्गांतून निःसंशय आपत्ति दृग्गोचर होत होती. एका पपायरस लेखांत थीबन स्मशानांतल्या उपासमार झालेल्या मजुरांनीं संप केल्याचें आढळतें. हा वृद्ध राजा मरण पावण्यापूर्वी थोडे दिवस त्याला ठार मारून त्याचा एक पुत्र गादीवर बसविण्याचा अंतःपुरांत झालेला एक कट उघडकीस आला होता. त्यांत मोठमोठ्या अधिकाराचे स्त्रीपुरुष होते. विसाव्या घराण्याची अखेर होईपर्यंत ८० वर्षांत रामेसीस नांवाचे ९ अप्रसिद्ध राजे एकामागून एक होऊन गेले. ॲमॉनच्या धर्माधिकाऱ्यांची सत्ता एकसारखी

वाढत होती. यावेळीं थीबनची स्मशानभूमी मोठ्या व्यवस्थेशीरपणें पूर्वीपेक्षां अधिक लुबाडली जाऊं लागली. नवव्या रामेसीसच्या कारकीर्दींत त्याचा तपास लागून असें आढळून आलें कीं राजकबरींपैकीं एक अगदीं पुरी उध्वस्त झाली असून त्यांतील " ममी " जाळल्या गेल्या आहेत. तीन वर्षांनीं पुढें राजकबरी असलेल्या दरीवर हल्ला होऊन पहिला सेती व दुसरा रामेसीस यांचीं थडगीं लुबाडलीं गेलीं.

**नीलमुखामधील घराणीं; लिबियन काळ.**–२०व्या घराण्यांतील शेवटचा राजा जो बारावा रामेसीस याची सत्ता अगदीं मृतप्राय झाली होती. त्याच्या कारकीर्दींतील धर्माधिकारी ऱ्हीहोर यानें सर्व सत्ता आपल्या हातीं घेऊन तो त्याच्या मागून इ. स. पूर्वी ११०० च्या सुमारास थीबीज येथें गादीवर बसला. याच वेळीं तानिस येथें स्मेंडेस नांवाच्या एका राजानें नीलमुखामध्यें एक स्वतंत्र घराणें स्थापिलें.(घराणें २१ वें). तानाईटवंशांतील राजे सामान्यतः थीबीजच्या धर्माधिकाऱ्यांच्या मुठींत असत. ऱ्हीहोरचे वंशज कधीं कधीं या घराण्यांतील राजकन्यांशीं शरीरसंबंध जोडून राजचिन्हें धारण करीत; कांहीं वेळां तर सबंध इजिप्त त्यांच्या अधिकारांत असे. या घराण्यांतील राजे उध्वस्त केलेल्या राजकबरींमधील " ममीं " चा फार काळजी घेत. एका कबरींतून दुसरींत असें करतां करतां शेवटीं डेर एल् बह रीच्या देवळानाजिक त्यांनां पुरण्यांत आलें या " ममी " ३००० वर्षे या ठिकाणीं राहिल्यानंतर पुराणसंशोधनाची लाट येऊन केरो पदार्थसंग्रहालयांत त्यांची उचलबांगडी करण्यांत आली.

लिबियन शिपाई फार दिवस सैन्यांत होते व त्यांच्या लष्करी वरिष्ठांनीं मोठमोठ्या शहरांतून राहून संपत्ति व बल पैदा केलें. इकडे स्थानिक राज्यकर्ते दिवसानुदिवस दुर्बल होत चालले. तानाईट घराणें लिबियन असावेंसें दिसतें. २२ वें घराणें त्यांतील नांवांवरून परकीय असल्याचें उघड दिसतें.या घराण्याचा संस्थापक पहिला शशांक ( शिशक )इ. स. पूर्वी ९५० च्या सुमारास डेल्टामध्यें बुबस्तीस येथें रहात असावासें दिसतें. त्याच्या मुलानें तानाईट घराण्यांतील शेवटच्या राजाच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें. यापुढें पुष्कळ शतकेंपर्यंत हेरॅक्लिओपोलिस हें मध्यइजिप्तची राजधानी होऊन राहिलें होतें. शशांकनें थीबीज हस्तगत करून, आपल्या एका मुलाला ॲमॉनचा मुख्य धर्माधिकारी नेमिलें. पॅलेस्टाईन आणि न्युबिया या ठिकाणीं आपली सत्ता पुन्हां स्थापित केली. पहिल्या ओसोरकोनला आपल्या बापाचें भरभराटीचें राज्य लाभलें होतें तरी त्यानें पुढें कांहीं एक केलें नाहीं. लिबियन राजांनां दडपून टाकण्यासाठीं मोठा जोरकस माणूस पाहिजे होता; पण तसा कोणी नसल्यानें राज्यांत लवकरच तट पडले. २२ वें घराणें बऱ्याच पिढ्या टिकलें. २३ व्या घराण्यांतील राजांचा मांडलिक राजांवर मुळींच दाब नव्हता. हे मांडलिक राजे एकमेकांत भांडून देशांतील संपत्तीचा अपव्यय करीत.इकडे या अवधींत एथिओपियामध्यें एक देश्य राज्य स्थापन झालें. एथिओपियन राजा पंखी यानें थीबजि आपल्या ताब्यांत ठेविलें. साइसचा उत्साही राजा नेनाखट व डेल्टामधील दुसरे राजे मध्य इजिप्त पादाक्रांत करून एथिओपियासरहद्दीपर्यंत आले. पंखी राजानें हेऱ्याक्लिओपोलिस मॅग्नाला वेढा घालणाऱ्या तेफ्नाखट राजाचा पराभव करून मध्य इजिप्तमधून त्याला हांकून लाविलें; इतकेंच नव्हे तर मेंफिस घेऊन इतर राजे व लहान लहान संस्थानिक यांनां शरण आणिलें. एथिओपियन संस्थानचा कारभार राजामार्फत ॲमॉन येथील धर्माधिकारी पाहात असे असें म्हणतात.

**एथिओपियन घराणें.**—२४व्या घराण्यांत एकच बोक्चोरिस नांवाचा सैते राजा होऊन गेला. त्याला शाबाको या एथिओपियननें जिवंत जाळलें म्हणतात- यावेळीं २५व्या घराण्यांतील एथिओपियन सत्ता पूर्णपणें प्रस्थापित होऊन, सिरिया आणि फिनिशिया जिंकण्याच्या कामीं त्याचा बराच उपयोग झाला असावा. पण इकडे असुरी लोकांचें साम्राज्य लष्करी सामर्थ्यामुळें बरेंच पुढें येऊन, इजिप्तला दटावूं लागलें. तेव्हां सार्गन आणि सेन्नाचेरिब यांच्याशीं स्वातंत्र्याकरितां लढत असलेल्या सिरियनांनां मदत करण्याखेरीज दुसरें कांहींच एथिओपियनांनां करतां येणें शक्य नव्हतें. शाबाकोनंतर शेबिटकु आणि शेबिटकूनंतर तिरहाका गादीवर आला. तिरहाकानें असुरी लोकांनां पुढें न येऊं देण्याचा प्रयत्न चालविला पण ख्रि. पू. ६७०मध्यें इजिप्तच्या सरहद्दीवर एसरहडननें त्याच्या सैन्याचा पराभव केला व मेंफिस आणि राजाचा जनानखाना काबीज करून मोठी लूट मिळविली. इजिप्शियन लोकांचा असुरांनां होणारा विरोध पूर्ण अंतःकरणापासून नव्हता असें दिसतें. उत्तरेकडे, विशेषतः एथिओपिअन सत्तेविरुद्ध एक प्रबळ पक्ष निर्माण झाला होता. तिरहाकानें एथिओपियनांचें राज्य इजिप्तमध्यें सर्वत्र मान्य व्हावें अशी खटपट चालविली.एसरहडननें थोडी पाठ फिरविली नाहीं तोंच तिरहाका दक्षिणेंतून परतला व असुरी लष्कराची कापाकाप सुरू झाली. एसरहडननें लवकरच दुसरी मोहिम तयार केली, पण वाटेंतच इ.स. पू. ६६८ त तो मरण पावला. त्याचा पुत्र असुर-बनिपाल यानें मोहिम पुढें ढकलली व तिराहाकाचा पराभव करून आपले सुभेदार पुन्हां नेमिले. साइस व मेंफिस यांचा राजा नेको ( निकु ) हा त्यांचा मुख्य असून तो २६ व्या घराण्याचा संस्थापक जो सामेटिकस याचा पिता होता. पुढें नेकोवर तिरहाकाशीं पत्रव्यवहार ठेवल्याचा आरोप येऊन निनेव्हेला त्याला बांधून नेण्यांत आलें. तेथें काय झालें असेल तें होवो, पण एवढें खरें कीं त्याला परत सन्मानपूर्वक पाठविण्याचा मुत्सद्दीपणा दाखविण्यांत आला. तथापि उत्तर इजिप्त तिरहाकाशीं राजनिष्ठ होतें; मेंफिस येथें एक ॲपिस बैल जो पुरण्यांत आला तोहि याच्याच कारकीर्दींत होय.

असें पुरोहित म्हणतात. पुढें लवकरच तो वारला व त्याचा पुतण्या तांडमानें याला वरच्या प्रदेशांतील लोकांनीं मोठ्या आनंदानें आपला राजा केलें.त्यानें मेंफिसला वेढा देऊन तें काबीज केलें. नेको या चकमकींत ठार झालासा दिसतो. पण ६६६? खि. पू.मध्यें असुर-बानि-पालनें एथिओपिअनांना दाक्षिण इजिप्त मधून हुसकून लाविलें व नाईलपर्यंत त्यांचा पाठलाग केला व थीबीज लुटलें.हें आलेलें असुरी अरिष्ट शेवटचें म्हणतां येईल.

**२६ वें घराणें.**—नेकोचा पुत्र सामेटिकस (इ. स. पू. ६६४–६१०)हा बापामागून असुरियाचा मांडलिक म्हणून गादिवर आला. यानें इतर कांहीं राजांच्या मदतीनें आपली सत्ता वाढवून ती दृढ केली. आपल्या कारकीर्दीचीं नऊ वर्षे झालीं नाहीं तोंच थीबीज त्याच्या पूर्ण मालकीचें झालें. या प्रसंगीं असुरबनि–पालचें सर्व सामर्थ्य बाबिलोन, इलाम आणि अरबस्तान येथील बंडाळी मोडण्याकडे गुंतलें होतें. पुन्हां असुरी सैन्याचा जिकडे तिकडे विजय झाला पण त्याची सर्व शक्ति क्षीण झाली. सामेटिकसच्या अमदानींत इजिप्तला पुन्हां चांगले दिवस प्राप्त झाले; त्याचें उत्पन्न भराभर वाढत गेलें. सामेटिकसनें इजिप्तची सरहद्द सुरक्षित ठेविली. असुरी लोक त्याच्यावर जरी चालून आले नाहींत तरी सिथियनांची टोळधाड दाक्षिणेकडे चालून येत होती तिला त्यानें कांहीं लालूच दाखवून व देणग्या देऊन परत लाविलें. मरणापूर्वी सामेटिकस दक्षिण पॅलेस्टाइनमध्यें जाऊन आला होता.

जेव्हां सामेटिकसच्या कारकीर्दीला सुरवात झाली तेव्हां इजिप्तची स्थिति पूर्वी साम्राज्यसत्तेखालीं असतांना जी होती तीपेक्षां फारच निराळी अशी होती. भूमध्यसमुद्रांताल व्यापाराची वाढ, व नवीन लोकांशीं व नवीन संस्कृतींशीं येणारा संबंध यांमुळें इजिप्शियन लोकांत नवीन विचारांचा प्रादुर्भाव झाला होता, व त्याबरोबरच स्वतःच्या बलाविषयीं त्यांना विश्वास वाटेनासा झाला होता. थीबीजचें वर्चस्व जाऊन, डेल्टा हा इजिप्तमधील संपत्तिमान व प्रागतिक भाग बनला. धाडस व शौर्य नसलेल्या या लोकांत धार्मिकता बरीच बोकाळली. तसेंच वैभवशाली पूर्वजांबद्दल अवास्तव अभिमान जागृत झाला. थीबीस आणि ॲमॉन तसेंच साम्राज्याच्या स्मारकविशिष्ट गोष्टी यांना एथिओपिअनांचा बराचसा संपर्क पोंचलेला दिसत होता. तेव्हां मेंफाईट डेल्टाइक घराण्याच्या आचार्यांनां मेंफिसच्या प्राचीन वर्चस्वाच्या काळांतील गोष्टींकडे अनुकरणार्थ वळणें मुद्दाम भाग पडलें; व पाषाणशिल्पकृति, आणि देवस्थान व कबर यांवरील लेख, हे शक्य तितके जुन्या राज्यांतील कृतिलेखांबरहुकूम बनवावे लागले. धार्मिक बाबींखेरीज इतर बाबतींत इजिप्शियन हे कल्पक व किंबहुना अनुकरणशील असे होते.

सामेटिकस हा आपल्या ५४ वर्षांच्या आमदानीनंतर वारला व त्याचा मुलगा नेको (इ. पू. ६१०–५९४) हा त्यामागून गादीवर आला. असुरी लोकांची दीन अवस्था लक्षांत घेऊन, नेकोनें सिरियामधील साम्राज्याचा प्राचीन मुलूख परत मिळविण्याकरितां मोहीम काढिली. असुरियाच्या राजांतर्फे जोसियानें आपल्या दुर्बल सैन्यानिशीं नेकोला तोंड दिलें; पण त्याचा पराभव होऊन लढाईंत तो गारद झाला. नेको युफ्रेटीजकडे जाण्याला पुढें सरसावला व त्यानें तो प्रदेश आपला मांडलिक बनविला. निनेव्हेच्या ऱ्हासानंतर पश्चिमेकडील असुरी लोकांचा वारसा बाबिलोनचा राजा नबापोलेसर याच्याकडे आला; तेव्हां त्यानें तावडतोब आपला मुलगा नेबु काडरेसर यास नेकोशीं टक्कर देण्यास धाडून दिलें.बाबिलोनियन आणि इजिप्शियन सैन्यांची कारचेमिश येथें गांठ पडून (खि. पू. ६०५), इजिप्शियनांचा इतका मोड झाला कीं, नेकोला सिरिया सोडून पळावें लागलें व नबो पोलासरच्या मृत्यूमुळें विजयी वीराला परत जावें लागलें नसतें तर सबंध इजिप्त त्यानें पादाक्रांत केलें असतें यांत शंका नाहीं. यानंतरचा राजा दुसरा सामेटिकस (इ. स. पूर्व ५९४—५८९) यानें सिरियावर किंवा फिनिशियावर मोहीम केली व अबु सिंबेलपर्यंत एथिओपिआमध्यें भाडोत्री सैन्य पाठविलें असें एके ठिकाणीं लिहिलेलें आढळतें. फारो होफ्रा (इ. स. पूर्व ५८९–५७०) यानें ज्यूडामधील बाबिलोनियन सत्तेविरुद्ध बंडाळी माजविण्याचा प्रयत्न केला. पण फारसा उपयोग झाला नाहीं. हिरोडोटस लिहितो कीं, त्याची कारकीर्द फार भरभराटीची होती. सायरेनेच्या ग्रीक वसाहतीविरुद्ध लिबियन लोकांनां त्यानें मदत केली. व त्या मोहिमेंत भाडोत्री शिपायांवर त्याची कृपादृष्टि जास्त वळल्याच्या संशयावरून त्याचे देश्य शिपाई त्याच्यावर रागावले व त्यांनीं अमेसिसला राजा निवडला. या दुसऱ्या अमेसिसनें (इ. स. पूर्व ५७०—५२५) आपल्या अनुयायांच्या मदतीनें ग्रीक सैन्याचा पराभव केला; तथापि त्याच्या पदरींहि ग्रीक असत व तो त्यांच्यांतील जुलमी माणसांशीं सख्य करी. त्याची सत्ता इजिप्तपुरतीच कायती होती. पण खुद्द इजिप्तच त्या वेळीं अत्यंत भरभराटींत होतें. त्याच्या मृत्यूनंतर थोड्याच महिन्यांनीं कॅंबिसेसच्या आधिपत्याखालीं असणाऱ्या इराणी सैन्यानें इजिप्तमध्यें येऊन त्याचा मुलगा तिसरा सामेटिकस याला पदच्युत केलें.

**इराणीकाल, २७ वें घराणें.**—कॅंबिसेसनें प्रथम इजिप्शियन लोकांशीं समेटाचें वर्तन टेविलें होतें व तो त्यांच्या धर्माचा मान ठेवी; पण एथिओपिआमधील त्याची मोहीम अयशस्वी झाल्यानंतरच बहुधा त्यानें आपलें सबंध धोरण बदललें व आपलें नांव बद्द करून घेतलें. त्यानें परत जातांना इजिप्तला इतकें चिरडून टाकिलें होतें कीं, लगेच पुढें इराणची गादी दुसऱ्या कोणी बळकावली असतांहि या बाजूला दंगाधोपा वगैरे कांहींएक घडून आलें नाहीं. डरायस (इ. स. पू. ५२१—४७६) हा चांगला राजा निघाला व तो इजिप्तला आला त्यावेळीं तेथील धर्माविषयीं त्यानें बरीच आस्था

दाखविली. " ग्रेट ओॲसिस " (मोठी ओलवण) मध्यें त्यानें एक ॲमॉनकरितां देवालय बांधिलें. इजिप्त आणि सायरेने यांच्या अधिपतींवर बरीच वार्षिक खंडणी लादली गेली होती तरी ती वसूल करण्यास फारसा त्रास पडत नसे. नाईलपासून तांबड्या समुद्रापर्यंत जाणारा कालवा पुरा होऊन व्यापार वाढला. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं इजिप्त बंड करण्यास उद्युक्त झालें. हें बंड मोडणारा क्सर्क्सीझ (इ. स. पू. ४८६—४६७) व त्याच्या मागून आलेला अर्टाक्सर्क्सीझ (इ. स. पू. ४६६—४२५) हे कँबिसेस प्रमाणेंच इजिप्शियनांनां अप्रिय झाले होते. अर्टाक्सर्क्सीझ गादीवर बसण्याच्या वेळीं माजलेल्या अराजकतेमुळें इजिप्शियनांनां बंड करण्याची पुन्हां संधी आली पण त्यांनां यश आलें नाहीं. दुसरा क्सर्क्सीझ व दुसरा डरायस यांच्या कारकीर्दींत इजिप्तमध्यें विशेष कांहीं घडलें नाहीं. शेवटीं इ. स. पू. ४०५च्या सुमारास त्या ठिकाणीं एक यशस्वी बंड होऊन इराणी वर्चस्व नाहींसें झालें.

इजिप्तमध्यें इराणी सत्तेचे अवशेष फारच थोडे आहेत. साइस येथील नीथच्या उपाध्याय पेफ्टुऔनीट याच्या लेखांवरून त्याचा कँबिसेस व डरायस या राजांशीं असलेला संबंध व्यक्त होतो. अरेमाइक भाषेमध्यें लिहिलेले कांहीं पपायरसवरील हस्तलेख एलेफंटाईन व मेंफिस येथें सांपडले आहेत. त्यांवरून पुढील राजांची थोडीबहुत माहिती मिळते. इ.स.पू. ४४० च्या सुमारास, म्हणजे अर्टाक्सर्क्सीझच्या अमदानींत हिरोडोटस इजिप्तला आला होता. त्याच्या ग्रंथांवरून सैते राजांच्या इतिहासाची व त्या काळच्या चालीरीतींची माहिती मिळते. पण ही माहिती फारशी विश्वसनीय म्हणतां येणार नाहीं.

**२८ ते ३१ घराणीं.**—इ. स. पू. ४०५ च्या सुमारास साइसच्या अमिरटेयसनें दुसऱ्या डरायस विरुद्ध बंड उभारलें; त्याचा परिणाम म्हणजे इजिप्तला पुन्हां स्वातंत्र्य मिळून तें साठ वर्षें टिकलें. या पुढला राजा नेफ्युरेट (पहिला नेफेरिटीझ) हा मेंडेसियन असून त्यानें २९ वें घराणें स्थापिलें. हकोर व दुसरा नेफ्युरेट यांच्या मागून राज्य ३० व्या घराण्याकडे गेलें. हेंच शेवटचें इजिप्शियन राजघराणें होय. नेख्थरहेब (पहिला नेक्टानेबस) आणि नेख्तनेबफ (दुसरा नेक्टानेबस) या मेंडेसियन राजांच्या कारकीर्दींत विशेषतः कलेला उत्तेजन मिळालें. इ. स. पू. ३७८ त नेख्थरहेब गादीवर बसल्यावेळीं इराणकडून लवकरच हल्ला होईल अशीं चिन्हें दिसत होतीं. हकोरनें या पूर्वीच उत्तम सैन्य तयार ठेवलें होतें; त्यांत बरीचशीं ग्रीकांची भरती होती. तेव्हां या सैन्यबलाच्या योगानें इजिप्शियन राजानें मेंडेसजवळ इराणी सैन्याचा धुव्वा उडविला व इजिप्त स्वतन्त्र केलें.

नेख्थरहेबनंतर टेकॉस किंवा टेऑस गादीवर आला. त्याची छोटीशी कारकीर्द इराणशीं युद्ध करण्यांत गेली. या युद्धांत इजिप्शियन राजानें, स्पार्टन राजा ॲगेसिलॉस याच्या आधिपत्याखालीं असलेल्या भाडोत्री ग्रीक लष्कराची व आथिनियन सेनापति चॅब्रियस याच्या आरमाराची मदत घेतली होती. जयाच्या आशेनें तो फिनिशियांत शिरला पण ॲगेसिलॉसचा अपमान केल्यामुळें त्याला पदच्युत व्हावें लागलें. त्याच्या जागीं नेख्तनेबफ किंवा दुसरा नेक्टानेबस आला. हा इजिप्तचा शेवटचाच राजा होय. या वेळीं एक बंड उपस्थित होऊन हा नवीन राजा पदच्युत होण्याची वेळ आली होती. पण ॲगेसिलॉसनें हात देऊन त्याला सिंहासनावर स्थिर केलें. पण इकडे इराणवर जोराचा हल्ला चढविण्याची संधी वाया गेली. तिसरा अर्टाक्सर्क्सीझ यानें इजिप्त रसातळास पोंचविण्याचा निश्चय करून त्यावर मोहीम पाठविली; पण नेख्तनेबफच्या भाडोत्री ग्रीक शिपायांनीं ती परत लाविली; तेव्हां अर्टाक्सर्क्सीझ स्वतः दुसरी मोहीम घेऊन निघाला व त्यानें ग्रीक शिपायांचा मोड केला. नेख्तनेबफ हा आपल्या सैन्याच्या मदतीस जाण्याऐवजीं मेंफिसला परतला व तेथून एथिओपियाला पळाला (इ. स. पू. ३४०?). याप्रमाणें सुमारें ३००० वर्षें टिकलेली फारोंची राजसत्ता धुळीस मिळाली. तेव्हांपासून आतांपावेतों २००० हून अधिक वर्षें झालीं व या अवधींत पुष्कळ वेळां इजिप्त स्वतंत्रहि झालेलें आहे; पण कोणीहि देश्य राजा फॅरोंच्या तख्तावर अद्याप बसला नाहीं. ' इजिप्त देशांतला यापुढें कोणीहि अधिपति होणार नाहीं " (यहेज्केल ३०:१४) हा बायबलमधील परमेश्वराचा शाप बाधला कीं काय कोण जाणें ?

यानंतर ओकस (अर्टाक्सर्क्सीझ) नें अमानुषपणें जितराष्ट्राला छळलें. या पुनःप्रस्थापित झालेल्या इराणी वर्चस्वा (या वर्चस्वाला मॅनेथो ३१ वें घराणें म्हणतो) पासून पुढचे कागदपत्र मुळींच सांपडत नाहींत; नाहीं म्हणावयास तिसऱ्या डरायसच्या कारकीर्दींतील एक पापायरस उपलब्ध झालें आहे.

वरील इतिहासाचा इत्यर्थ थोडक्यांत येणेंप्रमाणें देतां येईल.

प्राचीन इजिप्तचा इतिहासकाल म्हणजे पहिल्या राजघराण्याच्या पूर्वीचा काल. पेट्रीच्या मतें तो ख्रि. पू. ५,५०० पूर्वीचा असावा. तत्कालीन अंकित पाषाणखंड व इतर अवशेष उपलब्ध आहेत.

इतिहासकाल म्हणजे पुष्कळ सुधारणेचा काल नव्हे. इतर संस्कृति पुष्कळ वाढण्यापूर्वी इतिहासरक्षणाची चाड इजिप्तमध्यें वाढली. बाराव्या घराण्यापर्यंत ब्रॉंझचा उपयोग दिसत नाहीं. मातीचीं भांडीं फार जुनीं दिसतात आणि त्यांचा कालानुक्रम त्यांतील कलेच्या प्रगतिवरून लावतां येतो. इतर लढाईचीं, शिकारीचीं, शेतकीचीं, हत्यारें यावरून प्रगतीच्या कालाच्या, अनुक्रमाचा अंदाज करतां येतो.

इजिप्तच्या राजघराण्यापैकीं हिक्सॉस व इराणी राजे खेरीज करून बाकीचीं देश्य होतीं.

अठराव्या घराण्याच्या अमदानींत इजिप्तचें साम्राज्य पुष्कळच वाढलें होतें व त्या काळीं त्या राज्यांत न्युबिया, इथिओपिआ, ग्रीस, सिरिया, फिनिशिया, मिटनी, हिटाइट, असुरिया, बाबिलोनिया इत्यादि देशांतील भाग समाविष्ट होत होते.

अर्थात् त्या वेळीं वर उल्लेखिलेल्या सर्व राष्ट्रांशीं इजिप्तचें दळणवळण सुरू होतें व मिटनी, असुरिया व बाबिलोनिया येथील राजांशीं शरीरसंबंध व पत्रव्यवहार चालू होता हें अमर्ना येथील लेखांवरून दृष्टीस पडतें.

त्यानंतरच्या घराण्यांचा काळ असुरिया, बाबिलोनिया, इराण वगैरे निरनिराळ्या राष्ट्रांशीं युद्धें करण्यांत गेला व कधीं इजिप्त स्वतंत्र तर कधीं परकीय सत्तेखालीं होतें. याप्रमाणें एकतिसाव्या घराण्यापर्यंत इजिप्तची देश्य सत्ता मधून मधून वर डोकें काढीत असे पण त्यानंतर ती कायमची लुप्त झाली.

---

## प्रकरण ३ रें.

### ईजियन संस्कृति.

आतां यूरोपीय संस्कृतीच्या जनक अशा प्राचीन संस्कृतींचें विवेचन करतांना आग्नेयीकडे सुरुवात करूं. जी संस्कृति यूरोपीय संस्कृतीच्या मुळाशीं होती ती प्रथम घेऊं. ही संस्कृति ईजियन होय. ही संस्कृति, इजिप्तची संस्कृति बाबिलोनी संस्कृति, चिनी संस्कृति व भारतीय संस्कृति या पांच स्वतंत्र संस्कृती आहेत. यांचा एकमेकांवर परिणाम झाला आहे. तथापि प्रत्येक संस्कृतीमध्यें इतक्या स्वतंत्र गोष्टी आहेत कीं त्यांस पृथकत्व दिलें पाहिजे.

**ईजियन संस्कृति.**—या नांवाचा उपयोग पाश्चात्यांच्या ऐतिहासिक कालापूर्वी होऊन गेलेल्या संस्कृतीचा निर्देश करण्याकडे करितात. ही संस्कृति ग्रीक संस्कृतीच्या आधीं होऊन गेली, म्हणून हिचें महत्त्व फार आहे. ह्या संस्कृतीचा ग्रीक लोकांवर परिणाम झाला. क्रीट बेटाचा इतिहास समजण्यास हिचा फार उपयोग होतो. या संस्कृतीची माहिती क्रीट बेटांत क्नोसस गांवीं शोधून काढिलेल्या पुराणवस्तूंवरून काढलेली आहे. ती बऱ्याच अंशीं अनुमान स्वरूपाची आहे. ज्या अवशेषांवरून या संस्कृतीचें स्वरूप लक्षांत येतें, ते येणेंप्रमाणें.—( १ ) राजवाड्यासारख्या दिसणाऱ्या इमारतींचे भाग, त्याचप्रमाणें जुनीं घरें, थडगीं यांचे उकरून काढलेले अवशेष. ( २ ) खांबांवर, भिंतीवर केलेलें नक्षीकाम, तसेंच शोभेकरितां ठेवलेल्या पदार्थांवरील रंगी चित्रकाम. ( ३ ) दगड, हस्तिदंत, धातू व रत्नें यांवरील खोदीव, कातीव, उठावदार व रंगीत चित्रकर्मे. ( ४ ) आयुधें, हत्यारें, आउतें हीं दगड, माती, ब्रांझ, व शेवटीं लोखंड यांचीं केलेलीं आढळतात. यांवर कधीं चित्रें काढलेलीं असतात व कधीं हीं रत्नजडीत असतात. ( ५ ) आंगावरील अलंकार. ( ६ ) सामानसुमान—( गृह्य ) भांडीं लहान मोठीं, सिंहासनें, मेजें, आसनें, उपासनेसाठीं केलेल्या मूर्ति, शवपेटिका. ( ७ ) लेख–भाजलेली माती व रत्नें यावरील लेख .( ८ ) उकरलेलीं थडगीं. ( ९ ) लोकोपयोगी कामें–पूल, फरशी, रस्ते, गटारकाम. हा पुरावा संस्कृतींत आविष्ट होणाऱ्या वस्तूंचा होय. भौतिक अवशेषांखेरीज या संस्कृतीसंबंधानें पुरावा म्हटला म्हणजे ( १ ) समकालीन सुधारणेचे उल्लेख व स्मारक चिन्हें. ( २ ) होमरसारख्यांच्या ग्रंथांत या लोकांविषयीं केलेले उल्लेख आणि ( ३ ) परक्या लोकांच्या प्रचारांत अंशेंकरून शिल्लक राहिलेल्या पण त्या परक्यांच्या सुधारणेशीं विसंगत अशा ईजियन चाली, पंथ, विधि वगैरे होय.

**राजकीय संघटना.**—क्रीट बेटांतील राजवाडे व मायसीनी, टिरिन्झ व हिसारली येथील तटबंदी केलेले अंतरकोट हीं सर्व एका घराण्याच्या राहण्याच्या सोयीचीं दिसतात. हीं सभोंवतालच्या घरांत प्रमुख दिसतात. यांवरून येथें सर्व सत्ता राजाच्या हातीं असावी अशी संशोधकांची समजूत आहे. ख्रिस्तपूर्व दीड हजार वर्षांपूर्वी निरनिराळ्या ठिकाणीं झालेल्या कलांच्या वाढीवरून तेथें स्वतंत्र राज्यें असूं शकण्याचा संभव आहे. वरील कालानंतर सर्व सत्तेचें केंद्र क्नोसस येथें असावें असें अनुमान तेथें सांपडलेल्या खंडणीच्या नोंदीवरून निघतें.

**पारमार्थिक कल्पना.**—आजपर्यंत सांपडलेल्या सर्व समाधी राजवाड्यांत आढळल्या. यावरून धार्मिक सत्ता राजाकडे असावी किंवा राजेच धर्मगुरू असावेत. देवांविषयींच्या कल्पनांचा खालीं सांगितल्याप्रमाणें विकास झाला असावा. प्रथम ज्यांवर पीकपाणी अवलंबून आहे अशा सृष्टींतील प्रमुख पदार्थांची उदाहरणार्थ, सूर्य,चंद्र,पर्वत,झाडें वगैरे यांची उपासना होई. त्याचाच अवशिष्ट संस्कार मनावर राहिल्यामुळें, झाडें, स्तंभ, परशु अशा वस्तूंस पूजेचा मान मिळत असला पाहिजे. यापुढें देवांच्या मूर्तींची पूजा प्रचारांत आली असावी. ही मूर्ति म्हणजे मानवी जननतत्त्वाचें एक स्वरूप होय. सामान्यतः बहुतेक सर्व प्राण्यांस व वनस्पतींस पूज्य मानीत. ख्रि. पू. १५०० इतक्या प्राचीन ग्रीक लोकांची पारमार्थिक व धार्मिक विचारपद्धति व ही ईजियन लोकांची विचारपद्धति एकच असणें शक्य आहे. ईजियन समाज म्हणजे प्राचीन ग्रीकांच्या पूर्वजांचा समाज होय असें विरुद्ध पुरावा येईपर्यंत धरून चालण्यास हरकत नाहीं. अत्यंत प्राचीन ग्रीक पारमार्थिक विचार पुढें विवेचिले आहेत.

**समाजघटना अथवा व्यवस्था.**—याविषयीं कांहीं निश्चित विधानें करितां येत नाहींत. सशस्त्र शिपायांचीं फारच थोडीं चित्रें सांपडतात, म्हणून कदाचित येथें क्षत्रिय वर्ग प्रामुख्यानें नसावा. नोंदणा करण्याविषयीं येथें

विस्तृत व पुष्कळ नियम आढळतात यावरून कायद्याची बरीच वाढ येथें झाली असावी. सत्ताधिकारी वर्गाची राहणी ऐषआरामाची होती. हे लोक मांसाहारी असत. मादक पेयें पिण्याचा प्रघात येथें होता. निरनिराळ्या प्रकारची मातीचीं व ब्रांझ धातूचीं भांडीं तयार होत असत. येथें द्राक्षें व आलिव्ह फळें पिकवीत असत. हवा व उजेड आंत घेण्याकरितां कुशलतेच्या योजना अमलांत आणिल्या होत्या. शहरांतील फाजील पाणी बाहेर काढण्याची व्यवस्था केली होती. वृषभयुद्ध, मुष्टियुद्ध, नाच, सशस्त्र द्वंद्वयुद्ध यांनीं लोकांची करमणूक होत असे.

**उगम.**—क्रीट बेटांतील पुराणवस्तू जास्त जास्त सांपडत गेल्यामुळें ही संस्कृति किती काळ टिकली व ती अव्याहत कोठपर्यंत चालू होती या प्रश्नाचें उत्तर सध्यां देतां येतें. तिचा उगम मानववंशशास्त्रज्ञांच्या मतें प्रत्येक स्थानाच्या प्रागैतिहासिक युगांपैकीं प्रास्तरायुध युगाच्या उत्तरकालांत झालेला आहे असें दिसतें. ती तीन हजार वर्षें अविच्छिन्नपणें अस्तित्वांत होती. वरील विधान करण्यास पुरावा एवढाच आहे कीं, क्रीट बेटांत जेथें पुराणवस्तूंच्या शोधांकरितां खणलें आहे, तेथें प्रास्तरायुध युगांतील अवशेष त्याच थरांत सांपडतात. त्याला लागूनच उत्तरसंस्कृतिनिदर्शक नक्षीकाम केलेले मातीच्या भांड्याचे तुकडे सांपडतात.

यानंतर लगेच ब्रांझयुगास सुरुवात होते. ब्रांझ युगाचे मुख्य तीन भाग कल्पिले आहेत व या तीन भागांचें आठ पोटविभाग करितात. मातीचीं भांडीं करणें व त्यांवरील नक्षीकाम या कालांची वाढ व तींत आपोआप होणारे फरक सारखे चालू होते असें दिसतें.

या फेरबदलामध्यें बाहेरच्या कलेचा परिणाम झाला नाहीं तर अंतस्थ सुधारणा झाली. सुधारणा बाहेरची आली नाहीं म्हणण्यास कारण या युगाच्या थरांत दुसऱ्या परकीय देशांतील कलांचे अवशेष येथें क्वचितच आढळतात.

येथल्या संस्थासंप्रदायांविषयीं माहिती फारच थोडी आहे. त्यांच्या परमार्थविषयक विचारांकडे पाहिलें तर सृष्टींतील शक्तींच्या पूजेपासून अवतारोपासनेपर्यंत जीं जीं स्थित्यंतरें दिसतात, तीं तीं या लोकांत संशोधकांस आढळून येतात.

**संस्कृतीचा इतिहास.** — कालक्रमनिर्णयासंबंधानें ठाम मत देतां येत नाहीं. या संस्कृतीच्या ब्रॉंझ युगाचे "इव्हॅन्सच्या" मतें तीन मुख्य भाग पडतात व त्यांस मिनोआन अशीं नांवें दिलीं आहेत. प्रत्येक मिनोआनचे तीन पोटभाग पाडलेले आहेत. पहिल्या मिनोआनच्या १ ल्या पोटभागाच्या वेळच्या भांड्यासारखीं भांडीं इजिप्त देशांत अबिडॉस गांवीं सांपडलीं यावरून या युगाचा काल ख्रिस्त पूर्व ४००० वर्षें असावा असें अनुमान संशोधक काढितात.

**व्यापार.**—येथील भांडीं मेलॉस इजिप्त व ग्रीक देशांत सांपडतात. व मेलॉसचीं उभीं भांडीं क्रीट बेटांत आढळतात, यावरून या देशांचे व्यापारनिमित्तानें दळणवळण होतें असें दिसतें.

**मृतांची व्यवस्था.**—शवास दगडाच्या पेटींत घालून पुरीत असत. पुढें एका खळग्यांत हाडें टाकीत. नंतर शवपेटिका व मधमाशीच्या घरासारखी षट्कोनी थडगीं प्रचारांत आलीं. मृतांबरोबर त्यांचीं हत्यारें, अन्नपाणी, उटणी, दागिने पुरीत असत. मृतांस जाळण्याची चाल असल्याचें कोणत्याहि काळांत दिसत नाहीं.

**कलाकौशल्याचीं कामें.**—ख्रिस्तपूर्व अडीच हजार वर्षांच्या सुमारास मातीच्या कामांत या लोकांनीं चांगलें प्रावीण्य संपादन केलें होतें. भाजलेल्या मातीचीं चित्रें करणें हस्तीदंत व पाषाणशिल्प यांची कला या लोकांस अवगत होती. शोभेच्या भांड्यांवरील चित्रकाम, रत्नावरील खोदीव काम व जडावाचें काम हीं ह्या लोकांस चांगलीं माहीत होतीं.

**या सुधारणेचें स्वरूप व उगम.**—ह्या संस्कृतीस आलेलें महत्त्व व तिच्या वैशिष्ट्यमुळें आहे. ही संस्कृति अमक्या एका देशांत उदयास आली म्हणून हिस महत्त्व देत नाहींत, तर ही इतर तत्कालीन संस्कृतींपासून अनेक बाबतींत भिन्न असल्यामुळें व तिच्या अंगच्या विशिष्ट धर्मांमुळें ही इतक्या मोठ्या पदवीस पोंचली आहे.

**विशिष्ट धर्म.**—


( १ ) या लोकांच्या लिपीचें दुसऱ्या कोणत्याहि लिपीशीं जवळ जवळ अगदींच कांहीं साम्य नाहीं.
( २ ) कला कौशल्याचीं कामें.
( ३ ) वास्तुविषयक रचना व भूषणें.
( ४ ) थडग्याचा आकार व ठेवण.

मिनोआन भाग दुसरा पोटभाग दुसरा या वेळच्या मातीच्या भांड्यावरील नक्षीकामांत नागमोडीसारखा आकार प्रमुख आहे. अशाच प्रकारचें नक्षीकाम इजिप्त देशांत १२ व्या घराण्याचे वेळीं आढळतें. यावरून या भागाचा काल ख्रिस्तपूर्व २५०० ( अडीच हजार ) वर्षें असावा. त्याचप्रमाणें इजिप्तमधील "ख्यान" राजाचें चित्र मिनोआन भाग दुसरा पोटभाग तिसरा यावेळच्या थरांत सांपडलें. या राजाचा काल ख्रिस्तपूर्व १९०० वर्षें धरतात. मिनोआन भाग तिसरा पोटभाग एक व दोन या वेळीं इजिप्त देशांत १८व्या घराण्याची सत्ता अथवा अंमल चालू होता. याचा काल ( १६००–१४०० ख्रिस्तपूर्व ) आहे.

कांस्य युगाचा शेवट व आयस युगाचा आरंभ या संबंधानें नक्की असें कांहीं सांगतां येत नाहीं.

**कालक्रमानुसार इतिहास.**—ज्या लोकांनीं ईजियन संस्कृति नांवारूपास आणिली त्या लोकांचे पूर्वजांनीं प्रास्तर युगांत फार प्राचीनकाळीं ईजियन समुद्राच्या आसपासच्या मुलुखांत वसाहत केली. या लोकांच्या डोक्याचा आकार भूमध्यसमुद्रावरच्या ( उत्तर अफ्रिकेंतील ) वंशांतील लोकांच्या

## ईजियन संस्कृति.




ईजियन संस्कृतीचा प्रदेश दाखविणारा नकाशा.



मायसीनीच्या अक्रॉपोलिस येथील संग्रहापैकीं बेनीथ देवतेचें चित्र असलेली सुवर्णमुद्रिका.



क्नॉसॉस येथें सांपडलेली सर्पविभूषित देवता.

# असुरी बाबीलोनी संस्कृति.





बाबिलोनी साम्राज्य, ख्रि. पू. ५६०.
( सरहद्द टिंबयुक्त रेषेनें दाखविली आहे. )



खाल्डी इसमाचें डोकें. समोरील
व एकांगी देखावा



ऑनीस उर्फ खाल्डी मत्स्यावतार.



असुरी-बाबिलोनी कला. चिरेबंदीचा तुकडा.

डोक्यासारखा होता. क्रीट बेटांतील वसाहती, दुसऱ्या लोकांचा संसर्ग नसल्यानें व तेथील जमीन सुपीक असल्या मुळें लवकरच रानटी स्थितींतून बाहेर पडल्या. या बेटांत फार प्राचीन काळापासून संस्कृतीच्या प्रगतीस सुरुवात झाली व सुमारें २५०० ( ख्रिस्तपूर्व ) च्या सुमारास येथील तुरळक असलेल्या वसाहती एकवटल्या व त्यांमध्यें राजकीय सत्ता स्थापित झाली. धर्मासंबंधींचे अधिकार राजाच्या हातीं असत, असें वाटतें. त्यानें येथें एक मोठा दगडाचा राजवाडा बांधला. यास मांडलीक राजांकडून खंडणी मिळत असे. व्यापारासंबंधानें येथील लोकांचें इजिप्त देशाशीं दळणवळण होतें व या दोन देशांचा एकमेकांशीं मातीच्या भांड्याचा व्यापार चालत असे. येथें एका विशिष्ट प्रकारच्या लिपीची वाढ झाली.

तटबंदी वगैरे दृष्टीस पडत नाहीं यावरून या वेळीं या बेटांत शांतता नांदत असावी. सुपीक जमीन ताब्यांत ठेवण्याकरितां बेटाच्या निरनिराळ्या भागीं वसाहती स्थापन केल्या. यांचा व्यापारनिमित्तानेंहि उपयोग होत असे. येथील संस्कृति ख्रिस्तपूर्व १००० वर्षांपूर्वी कळसास पोचली. नंतर उतरत्या कळेस आरंभ झाला असावा.

याचवेळीं क्रीटबेटाबाहेरील वसाहतींच्या संस्कृतीवर या बेटांतील श्रेष्ठ संस्कृतीचा परिणाम झाला व पुढें कांहीं काळानें ईजियन संस्कृति जिकडे तिकडे एकाच स्वरूपाची झाली. व क्रीटमधील संस्कृतीस नवीन चलन मिळालें. इजिप्तसारख्या देशाशीं व्यापार वाढला. व ईजियन कलेचें अनुकरण दुसरीकडे पसरलें. खंडणीच्या नोंदणीवरून या सुधारणेचें व सत्तेचें केंद्रस्थान क्नोसस गांवीं असावें. पण हा क्रीट लोकांचा वरचष्मा फार थोडा काल अस्तित्वांत असावा.

ख्रिस्तपूर्व १५०० च्या सुमारास या बेटावर रानटी लोकांनीं स्वारी करून यांच्या संस्कृतीची घडी मोडली, पण स्वतःच्या संस्कृतीच्या अभावामुळें त्यांनीं येथील संस्कृतीचा अंगीकार केला. यामुळें या संस्कृतीनें उचल खाली व कला पूर्ववत होण्याचा रंग दिसत होता.

पण ही स्थिति फार काल टिकली नाहीं. आयसयुगाच्या आरंभीं पुन्हां रानटी लोकांच्या स्वाऱ्या झाल्या व या कारणानें जी यांची संस्कृति नष्ट झाली, तिचें मात्र पुनरुज्जीवन पुन्हां कधीं झालें नाहीं.

---

## प्रकरण ४ थें.

## असुरी बाबिलोनी संस्कृति.

बाबिलोनियाचा इतिहास देण्यापूर्वी सुमारें ख्रि.पू.१५०० या सुमाराचे कोणकोणते प्राचीन प्रांत आजच्या किंवा कालच्या आशियांतील तुर्कस्तानामध्यें मोडतात याचा विचार करूं. कारण असुरी बाबिलोनी व त्यांचे प्रतिस्पर्धी लोक याच प्रदेशांत रहात होते. लिडिया, मायसिया, कारिया, लिसिया, हे प्रांत ग्रीसच्या अगदीं तोंडाशींच आहेत. हिटाइट लोकांचें राज्य स्मर्नाच्या पूर्वेस पण काळ्या समुद्राच्या दक्षिणेस आहे. सुमेर हा प्रांत युफ्रेटिस नदीच्या मुखाशीं आहे आणि त्याच्यामध्यें व हिटाइट मुलुखामध्यें परंतु तैग्रिस व युफ्रेटिस यांच्या दुआबांत अनुक्रमानें अक्कड व असुर हीं शहरें आहेत. पॅलेस्टाइन, फिनिशिया हे आज जेथें सिरिया आहे त्याचे भाग होत. आर्मेनिया हिटाइटच्या पूर्वेकडे पण असुरांच्या प्रदेशाच्या उत्तरेस आहे. हिटाइटच्या प्रदेशासच पुढें कॅपडोशिया नांव पडलें आणि आसुरिया, बाबिलोन, अक्कड या विस्तीर्ण प्रदेशास पुढें मेसापोटेमिया नांव पडलें. असुर व बाबिलोन यांची संस्कृति व राज्यें युफ्रेटिसच्या कांठीं होतीं. फिनिशिअन यांची भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर व्यापार करणारी वस्ती होती. हिटाइट यांनीं आशियामायनरचा पूर्वभाग व्यापला होता आणि लिडियामधील (मायसिया, लिसिया, कारिया व बिथनिया धरून) ग्रीक इजिअन समुद्राच्या आसपासच्या इतर लोकांशीं संबंध ठेवून मोठा उच्च संस्कृतीचा आयुष्यक्रम आचरित होते. परंतु आर्मेनियापासून पूर्वेकडे म्हणजे आज जेथें इराण आहे तेथील लोकांविषयीं निश्चयपूर्वक माहिती आपणांस देतां येत नाहीं.

**वाङ्मयाचें लेखन.**—लोकांत असुरांची जरी अधिक माहिती आहे तरी त्यांच्या संस्कृतीला बाबिलोनी संस्कृति हें नांव अधिक सार्थ होईल. सत्य व पूर्वपरिचितता यांचें समीकरण करण्यासाठीं असुरी बाबिलोनी असें नांव देण्यांत आलें आहे. बाबिलोनी संस्कृतीच पुढें असुरियांत प्रसार पावली; तरी पण या दोन देशांतील संस्कृतींमध्यें कांहींसा फरक आहे. असुरियन वाङ्मयामध्यें स्वतंत्र ग्रंथरचना अशी फारथोडी झालेली आहे; आणि बाबिलोनियामध्यें जें शिक्षण सामान्यतः सर्व समाजांत पसरलेलें असे, तेंच उत्तरेकडील असुरिया देशांत समाजांतील फक्त एका वर्गास मिळत असे. बाबिलोनियांत ज्ञानप्रसाराची परंपरा फार पुरातन काळापासून चालत आलेली होती. तेथें बहुतेक सर्व शहरांत व देवालयांत ग्रंथशाला असत, आणि बाबिलोनी लोकांत एक जुनी सुमेरियन म्हणहि प्रचलित होती कीं, "ज्याला लेखक व ग्रंथकार यांमध्येंहि श्रेष्ठ पदवीला चढावयाचें असेल त्यानें उषःकाल होतांच उठलें पाहिजे." बाबिलोनियांत पुरुष व स्त्रिया दोघेहि लिहिण्यावाचण्यास शिकत असत; व सेमेटिक काळांतील त्यांच्या शिक्षणक्रमांत मृत झालेल्या सुमेरियन व तसेंच अत्यंत घोटाळ्याच्या व संख्येनें पुष्कळ अशा शब्दावयवदर्शक चिन्हांचा ( वर्णांचा ) त्यांनां अभ्यास करावा लागत असे. सेमेटिक बाबिलोनियन वाङ्मयांतील बरेचसे ग्रंथ मूळ सुमेरियन भाषेंतील ग्रंथांचीं भाषांतरेंच होतीं; आणि धर्म व कायदा या दोन्ही प्रकारच्या व्यवहारांत जुनी खाल्डियांतील चिकटी भाषा ( शब्दांच्या रूपांत किंवा अर्थांत फरक बिल-

कूल न करतां ते समासांतल्याप्रमाणें एकमेकाला जोडून बनवावयाची भाषा ) पुष्कळ काळपर्यंत उपयोगांत होती. शब्दकोश, व्याकरणग्रंथ व मूलाधोलेखित भाषांतर ग्रंथ विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां तयार केलेले होते. तसेंच जुन्या ग्रंथांवर टीकात्मक ग्रंथ व जुन्या अपरिचित शब्द व म्हणी यांच्या अर्थविवरणात्मक ग्रंथहि झालेले होते. शब्दावयवात्मक लिपीचे सर्व वर्ण नीट एकत्र जुळवून त्यांनां नांवें दिलेलीं होतीं, व सविस्तर व श्रमपूर्वक सर्व वर्ण लिहून त्यांच्या याद्या तयार केलेल्या होत्या. बहुतेक ग्रंथ चिकणमातीच्या विटांवर धातूच्या खिळ्यांनीं खोदून लिहून तयार केलेले होते. शिवाय इजिप्तमध्यें पपायरस नामक लव्हाळ्यापासून तयार केलेल्या एका जातीच्या कागदांवरहि ग्रंथलेखन करीत असत, परंतु ते सर्व नष्ट झाले आहेतसें दिसतें. पुढें द्वितीय असुरियन साम्राज्याच्या काळांत जेव्हां निनेव्हे मोठें व्यापारी शहर बनलें त्या वेळीं व्यापार व राजव्यवहार यांची जी आरेमाइक भाषा तिचाहि अभ्यास विद्यार्थ्यांस करावा लागूं लागला. पुढें सेल्यूकिडी कारकीर्दीपासून ग्रीक भाषेचाहि बाबिलोनियांत प्रवेश झाला आणि सुमेरियन व असुरियन ( म्ह. सेमिटिक बाबिलोनियन ) शब्द ग्रीक लिपींत लिहून तयार केलेले त्या वेळचे कित्येक लेख उपलब्ध झालेले आहेत.

**बाबिलोनी वाङ्मय व शास्त्रें.**—त्या काळांतील कित्येक ग्रंथांचीं आज आपणांस नांवें उपलब्ध झालीं आहेत. अशा अत्यंत प्रसिद्ध ग्रंथांपैकीं गिलगमेश महाकाव्य हें एक होय. त्याचीं एकंदर बारा पुस्तकें असून प्रत्येकांत गिलगमेशच्या चरित्रांतील एकेका साहसकृत्याचें वर्णन केलेलें आहे. दुसरें प्रसिद्ध महाकाव्य सृष्ट्युत्पत्तीविषयींचें असून त्यांत मार्डुकचें तियामतशीं झालेल्या युद्धाचें वर्णन आहे. शिवाय राजाच्या नोकरांनीं बखरीवजा लिहून ठेवलेल्या लेखांत कित्येक जुन्या पौराणिक कथा उपलब्ध झालेल्या आहेत या सर्वांची माहिती इतरत्र दिली आहे.

या शुद्ध वाङ्मयात्मक ग्रंथांशिवाय खासगी किंवा निमसरकारी रीत्या लिहिलेले लेख व पत्रे पुष्कळ सांपडलीं आहेत. त्यांपैकीं खम्मुरबि किंवा हुमुरब्बी याचीं पत्रें फारच मनोवेधक आहेत, तीं एल. डब्ल्यू. किंगनें प्रसिद्ध केलीं आहेत. शिवाय ज्योतिःशास्त्र व फलज्योतिष यांवरचेहि पुष्कळ महत्त्वाचे ग्रंथ आहेत. बाबिलोनियांत ज्योतिःशास्त्र बऱ्याच प्राचीन काळापासून अस्तित्वांत होतें, व त्यावरील सर्वमान्य ग्रंथ फार पूर्वी अक्कड येथील सार्गनच्या काळीं तयार झालेला असून त्याचें बेरॉससनें ग्रीकभाषेंत भाषांतर केलें होतें. आकाशांतील नक्षत्रमाला हिचा शोध प्रथम बाबिलोनी लोकांनीं बऱ्याच प्राचीन काळीं लावलेला आहे; आणि सूर्याचीं व चंद्राचीं ग्रहणें वर्तविण्यास लागणारें ग्रहगतिज्ञान व गणितशास्त्र यांचीहि त्यांनां माहिती होती. आकाशांतील ग्रहांची स्थिति व गति पाहण्याच्या वेधशाला देवालयांनां जोडलेल्या असत व तत्संबंधीं सर्व अहवाल राजाकडे नियमितपणें ज्योतिष्यांनां कळवावा लागत असे. बऱ्याच प्राचीन काळीं ग्रहांची संख्या ठरवून त्यांनां नांवें देऊन टाकलेलीं होतीं, आणि चंद्र व शुक्र यांचे उदयास्तकाल व त्यांच्या कला यांविषयीं निश्चित माहिती देणारीं त्या काळीं तयार करून ठेवलेलीं कोष्टकें आज उपलब्ध झालीं आहेत. सेल्यूकिडि व पार्थियन यांच्या काळांतील, ज्योतिषशास्त्रविषयक नमूद करून ठेविलेली माहिती पूर्णपणें शास्त्रशुद्ध असल्याचें दिसतें; पण ही इतकी प्रगति सदरहू शास्त्रांत किती पूर्वीपासून झालेली होती हें नक्की ठरवितां येण्यासारखें नाहीं. वार्षिक पंचांग फार काळजीपूर्वक तयार करीत असत, व त्यावरून सात दिवसांचा आठवडा व दुसरा पांच दिवसांचा आठवडा त्या काळीं प्रचलित होता असें दिसतें. या ज्योतिषशास्त्राच्या प्रगतीवरून गणितशास्त्राचीहि वाढ बरीच झालेली असली पाहिजे हें उघड होतें. अर्थात् बाबिलोनी यांनीं आकडे मोजण्याची अत्यंत सोपी रीत शोधून काढली असली किंवा अत्यंत उपयुक्त द्वादशमान पद्धतीचा शोध लावला असला तर त्याचें आश्चर्य वाटावयास नको. त्यांचा सॉस किंवा ६० चें परिमाण भूमध्य रेषेच्या एका अंशाबरोबर असून त्यावरून त्यांनीं आपला ६०० चा ' नेर ' व ३६०० चा ' सॉस ' बनविला होता. सेंकेरा येथें ज्यांवर एकापासून साठापावेतों सर्व आंकड्यांचे वर्ग व घन लिहून ठेविले आहेत अशा पट्ट्या सांपडल्या आहेत; ज्या लोकांनां छायायंत्र, घटकापात्र, तरफ व कप्पी यांचें ज्ञान झालें होतें त्यांचें यंत्रशास्त्राचें ज्ञान कांहीं टाकाऊ नसलें पाहिजे. लायार्ड यास निमरुड येथें कांतून तयार केलेलें एक बाह्यगोल भिंग (लेन्स) व सार्गन याचें नांव असलेलें एक कांचेचें भांडें सांपडलें आहे. यावरून कित्येक असुरियन शिलालेखांत आढळणारी अत्यंत बारीक अक्षरें त्यांनां कशीं काढतां येत व आकाशांतील ग्रहांचे वेध ते कोणत्या साधनांनीं घेत असत, हें स्पष्ट होतें.

**कलाकौशल्य.**—असुरियन संस्कृतीचें व त्यापेक्षांहि अधिक बाबिलोनी संस्कृतीचें प्रधान अंग वाङ्मय हेंच होय; इजिप्त किंवा ग्रीसमधील लोकांत दिसून येणारा कलाकौशल्याविषयींचा प्रेमादर या लोकांत आढळत नाहीं. बाबिलोनियांत चिकणमातीचा सुकाळ व दगडांचा दुष्काळ असल्यामुळें तेथील इमारती विटांच्या असत. बाबिलोनियांतील देवालयें मोठीं भव्य पण ओबडधोबड विटांचीं व आकाररूपविरहित आणि बाजूंनीं टेकू लावून बांधलेलीं असत; पावसाचें पाणी निघून जाण्याकरितां पन्हळ केलेले असत; त्यांपैकीं उर येथील पन्हळ जस्ताचे होते. विटांचा उपयोग करीत असल्यामुळें भिंतींत बसविलेले व स्वतंत्र खांब निरनिराळ्या प्रकारानें बांधलेले आढळतात, व मीन्याचीं कौलें वापरीत असत असें दिसतें. भिंतींनां भपकेदार रंग दिलेले असून कित्येक भिंती पितळेच्या किंवा सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेल्या दिसतात. भाजलेल्या मातीचे व रंगविलेले

त्रिकोणाकृति कोन प्लॅस्टरमध्यें बसविलेले आहेत. असुरियामध्यें दगड पुष्कळ असूनहि इमारती व देवळें विटांचींच बांधलेली आहेत, कारण इतर अनेक बाबींतल्याप्रमाणें या बाबतींतहि असुरियानें बाबिलोनियाचें निव्वळ अनुकरण केलेलें दिसतें. तथापि कांहीं काळानंतर असुरियांत उपरिनिर्दिष्ट अनुकरणप्रवृत्ति कमी होऊन दगडाच्या इमारती बांधूं लागले, व भिंती रंगीबेरंगी दगडांचे तुकडे बसवून सुशोभित करूं लागले. तिसरा असुर नझीर पाल याच्या कारकीर्दींत ही कला साध्या स्वरूपांत होती. पुढें सार्गनच्या वेळीं तिला मोठ्या काळजीपूर्वक यथातथ्य स्वरूप दिलेलें दिसतें व अखेर असुर बनिपालच्या अमदानींत ती उत्तम पण नाविन्यविरहित स्थितींत होती. बाबिलोनियांत दगडांचें दुर्भिक्ष असल्यामुळें साध्या गारगोटीलाहि मोठी किंमत आलेली होती व पैलू पाडण्याची कला फार उत्कृष्ट स्थितीस पोहोंचली होती. प्राथमिक काळांतलें उत्तम धातुकाम फारसें आढळत नाहीं, तथापि नंतरच्या काळांत सोन्याचीं कर्णभूषणें व कंठभूषणें विशेष उत्तम प्रकारचीं करीत असत असें दिसतें. तांब्याच्या धातूनें काम चांगलें होत असे; इतकेंच नव्हे तर तांब्याच्या कामाची कला मूळ बाबिलोनियांत उत्पन्न होऊन नंतर ती पश्चिमेकडील देशांत पसरली असावी असें वाटतें. कपड्यावरील विणकाम व नकशीकाम याबद्दलहि त्या लोकांची प्रथमपासून प्रसिद्धि होती. पण यासंबंधाचे नमुने अद्याप फारसे उपलब्ध झालेले नाहींत; व उपलब्ध झालेल्यांचा स्थल व कालनिर्णय नक्की देतां येत नाहीं. इतकें खरें कीं, असुरियांतलि मातीच्या भांड्यांचे नमुने फार सुंदर आहेत; कांचकाम वगैरे जें सांपडतें त्याची कला इजिप्तमधून इकडे आलेली असावी. पारदर्शक कांच तयार करण्याची सुरवात सार्गनच्या कारकीर्दींत झालेली दिसते. भांडीं दगडाचीं, चिकणमातीचीं व कांचेचीं करीत असत; दगडी भांड्यांचे नमुने टेलो येथें सांपडले आहेत व ते इजिप्तमधील प्रथमच्या राजघराण्यांच्या काळांतल्यासारखे आहेत.

**सामाजिक स्थिति.**—बाबिलोनियांत व असुरियांत जातिभेद नव्हता; पण सामाजिक वर्ग होते. बाबिलोनियांत धर्माधिकारी वर्गाचें प्राबल्य होतें तर उलट असुरियांत लष्करी बाण्याच्या प्रतिष्ठित वर्गाचें प्राबल्य होतें. धर्माधिकारी लोकांत निरनिराळे वर्ग होते व भिषग् वर्गाची गणना त्यांच्यांतच होत असे. वेळप्रसंग येईल तेव्हां सैन्यभरती सक्तीनें करीत असत; खडें सैन्य ठेवण्याची पद्धत प्रथम असुरियांत सुरू झाली.' द्वितीय असुरियन साम्राज्यकालांतलि राजांनीं लष्करी खात्यांत एकामागून एक अशा अनेक सुधारणा केल्या.' घोडदळाऐवजीं रथांची योजना केली; तिसरा तिगलथ पिलेसर यानें घोडेस्वारांकरितां खोगीर व उंच बूट पुरविण्याची व्यवस्था सुरू केली व सेन्नाचेरिबनें गोफणवाल्यांच्या पलटणी सैन्यांत ठेवण्याचा उपक्रम केला. लष्करी स्वारीबरोबर तंबू, युद्धसामान वाहणाऱ्या गाड्या, भिंती व तट पाडण्याचीं यंत्रें नेण्याची योजना झाली; आणि ततैन म्हणजे मुख्य सेनापति याचा दर्जा राजाच्या खालोखाल ठरला. दोन्ही देशांत गुलामांची संख्या बरीच मोठी होती. त्यांच्या वरचा वर्ग शेतकरी व व्यापारी लोकांचा. पण असुरियांत हा वर्ग संख्येनें थोडासा कमी होता. उलटपक्षीं लेखकुवर्गाला बाबिलोनियांतल्या पेक्षां असुरियांत अधिक महत्त्व होतें. कारागीर लोक, व्याजबट्टा करणारे सावकार, कवी व गायनवादनकुशल लोक दोन्हीहि देशांत होते.

लोकांच्या राहत्या घरांत सामानसुमान बेताचेंच असे; तथापि खुर्च्या, टेबलें, कोचें इत्यादि वस्तू असत. असुर बनिपाल राजाचें एक चित्र सांपडलें आहे, त्यांत तो राजा कोचावर टेंकून बसून जेवीत आहे व त्याची राणी शेजारीं खुर्चीवर बसलेली आहे असें दाखविलें आहे. 'मनुष्य मेल्यावर त्याला व त्याचेबरोबर त्याची पुरण्याची चीजवस्त अर्धवट जाळण्याची चाल असे.' शहराच्या राहत्या भागाशेजारींच स्मशानभूमि असे, व तींत रस्ते वगैरे करून मधून स्वच्छ पाण्याचे पाट केलेले असत. थडगीं विटांचीं असत व त्यांपैकीं पुष्कळांच्या भोंवतीं बगीचाहि केलेला असे; शिवाय वेदीप्रमाणें उंचवटे करून त्यांवर मृतांना अर्पण करण्याच्या वस्तू ठेवीत असत. जुनींजुनीं थडगीं नष्ट होत तेव्हां तेथेंच दुसरीं नवीं बांधण्यांत येत असत. असुरियांत सिल्यूकड किंवा पार्थियन काळांतल्यापेक्षां जुनी स्मशानभूमि अद्याप सांपडलेली नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

**बाबिलोनिआच्या प्राचीन इतिहासाचें स्थूल अवलोकन.**—इतिहाससंशोधकांस ज्ञात असलेल्या अतिप्राचीन कालांत बाबिलोनिआमध्यें स्वतंत्र छोटीं राज्यें होतीं व त्यांच्या मर्यादा कालवे व सरहद्द दाखविणारे शिलास्तंभ यांनीं नियमित झाल्या होत्या. दक्षिणेकडील 'एरिडु' व उत्तरेकडील 'निप्पुर' या दोन मुख्य संस्कृतिकेंद्रांपासून बाबिलोनिअन मिश्र संस्कृतीचा उगम झाला असावा. परंतु या दोन्ही मूळ प्रगतिप्रवाहांमध्यें महत्वाचा फरक आहे. निप्पुर संस्कृतींमधील मुख्य देवता एल्लिल असून ती प्रेतलोकावर अम्मल चालवित असे, व निरानिराळे मंत्र,तंत्र, जादूटोणे मनुष्य जातीस त्या देवतेपासून प्राप्त झाले. इष्ट किंवा अनिष्ट करणाऱ्या देवतांस देखील हिचे हुकूम पाळावे लागत. त्याच्या उलट स्वरूपाच्या देवतेचें स्थान 'एरिडु' हें, मानवी प्राण्यांचें हित करणाऱ्या, प्रकाश व कल्याण देणाऱ्या त्याचप्रमाणें आजाऱ्यांस बरें करण्यांत व मृतांस पुनरुज्जीवित करण्यांत आपल्या दैवी सामर्थ्याचा व शहाणपणाचा उपयोग करून त्यांत समाधान मानणाऱ्या 'एआ' ह्या देवाचें निवासस्थान आहे. खोल समुद्रांत असणाऱ्या आपल्या प्रासादांतून दररोज प्रातःकाळीं 'एआ' देव क्षितिजावर प्रकाशमान होतो. त्यानें मानवजातीस कला, शास्त्रें, उद्योगधंदे व प्रगति संपादनाच्या

पद्धती दाखविल्या. लेखनकला त्याजपासूनच उगम पावली व पाहिलें कायद्याचें पुस्तक त्यानेंच केलें, अशी त्या लोकांची समजूत होती. एके काळीं एरिडु हें बंदर असल्यामुळें,त्यांतून परदेशांशीं चालणाऱ्या व्यापाराचा व दळणवळणाचा त्याच्या संस्कृतिविकासावर पुष्कळ परिणाम झाला आहे. त्याची सृष्टिरचनेची कल्पना तेथील भौगोलिक स्थितीप्रमाणेंच उद्भूत झाली आहे. युफ्रेटिस नदीच्या मुखाशेजरच्या, वारंवार विस्तार पावणाऱ्या तरिप्रांताप्रमाणें सर्व पृथिवी ही समुद्रांतील जलामधून बाहेर पडली असें मानण्यांत येत असे. तथापि इतिहासकालाच्या फार पूर्वींच ' एरिडु ' व 'निप्पुर'-ह्या ठिकाणच्या दोन्ही संस्कृतींचें पूर्ण मिश्रण झालें होतें. ज्याप्रमाणें बाबिलोन ही ' एरिडु ' याची वसाहत झाल्याचें दिसतें त्याचप्रमाणें एरिडु शेजारींच असलेला उर् हा प्रांत निप्पुरची वसाहत असला पाहिजे; कारण तेथील चंद्रदेवता ही ' एन्लिल' देवतेचा पुत्र म्हणून मानली आहे. ह्या दोन्ही संस्कृतिमिश्रणामध्यें ' एरिडु ' येथील संस्कृतीचा परिणाम जास्त प्रामुख्यानें दृग्गोचर होतो.

बाबिलोनिआची प्राचीन संस्कृति सुमेरिअन असावी असें म्हणतां येईल. ज्या मानवजातीनें ह्या संस्कृतीचा विकास केला, ते लोक चिकटी भाषा( अग्लुटिनेटिव्ह ह्यास इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं चिकटी भाषा हा प्रतिशब्द वापरला आहे) बोलत व ह्यांनींच प्राचीन चित्रलिपि, (हीपासूनच पुढें कीलाकृति लिपीचा उद्भव झाला ) देशांतील मुख्य नगराची स्थापना वगैरे संस्कृतींतील प्राथमिक गोष्टी शोधून काढल्याचें सिद्ध झालें आहे. पाणथळ जमिनींतील पाणी काढून लावण्याकरितां केलेली माठमोठीं बांधकामें नद्यांच्या पुराचें पाणी कालव्यांच्या योगानें नियमित करणें इत्यादि गोष्टी, तसाच मागाहूनच्या बाबिलोनिअन परमार्थसंप्रदायापैकीं बराच भाग व बाबिलोनिअन कायद्यांचा प्रारंभ इत्यादि गोष्टी सुमेरिअन कालांतच उद्भूत झाल्या असाव्यात. सेमाइट लोक येथील राज्यकर्ते झाल्यानंतर देखील बराच कालपर्यंत परमार्थसंप्रदाय व कायदा ह्यांची भाषा सुमेरिअन होती. हे सुमेरिअन द्रविड महावंशांतील होते असें हालचें म्हणणें आहे.

**बाबिलोनियामधील कायदेपद्धति.**—बाबिलोन येथील समाजाची कल्पना देण्यासाठीं लोकांचें धार्मिक व पारमार्थिक स्वरूप पूर्वी दिलें आहे. पण यापेक्षांहि समाजस्थितीवर तेथील कायद्यांनीं अधिक प्रकाश पडतो. बाबिलोनियामधील कायदेपद्धतीचा जर कोणी अभ्यास करूं म्हणेल तर त्याला साहित्य व ग्रंथभांडार विपुल मिळूं शकेल; कारण न्यायाधीशांचे फैसले, करारनामे, हिशेब, त्याचप्रमाणें ऐतिहासिक शिलालेख, राजांनीं दिलेले परवाने, खासगी कागदपत्रें इ.बऱ्याचशा गोष्टी उपलब्ध झाल्या आहेत. पण खमुरबी ( हमुरबी ) चें "कोड " अथवा ज्याला नुसतें "कोड" म्हणतात व ज्याचा नुकताच शोध लागला आहे, तें मात्र संगतवार अभ्यास करण्यास फार सोयीचें आहे.

हें हमुरबीचें कोड बाबिलोनी कायद्याचें केन्द्रस्थान झालें आहे. ग्रीक, पार्थिअन व पर्शिअन लोकांच्या स्वारीनंतर देखील, " कोड " मधील बऱ्याचशा भागाची अंमलबजावणी केली जात असे, व हल्लींच्या मेसापोटेमियामधील कायदेपद्धतीवरहि ह्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. हें "कोड" अस्तित्वांत येण्यापूर्वीच्या कायदेपद्धतीस व चालीरीतींस " प्राचीन ", व " कोड " नंतरच्या पद्धतीस "अर्वाचीन" म्हणतात.

सेमिटिक लोकांनीं बाबिलोनियांतील शहरांत वसाहत केल्यानंतर त्यांच्याच चालीरीतींस कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें. या देशाच्या प्राचीन इतिहासाचीं पानें केवळ सत्तेकरितां व वर्चस्वाकरितां केलेल्या लढायांनीं भरलेलीं आहेत. राजधानीची सत्ता खंडणीच्या व सहाय्य मागण्याच्या बाबतींत इतर सर्व शहरांवर चालत असे पण प्रत्येक शहरांतील कायदे पद्धति स्वतंत्र असून तेथील रहिवाशांचे हक्क मात्र योग्य रीतीनें पाळिले जात असत. बाबिलोनियामध्यें पुष्कळ जातींचे लोक होते. प्रत्येक शहरांतील माणसांस इतर शहरांत जाण्याची परवानगी होती. ह्या दळणवळणामुळें एकमेकांच्या रीती एकमेकांस घेतां आल्या. पण एकच कायदेपद्धति सर्व देशभर प्रचलित करून देण्याचें श्रेय मात्र खमुरबीकडेच आहे.

" कोड " मधील कायदेपद्धतींत बहुतेक जातिविषयक चाली रीती पार नष्ट झालेल्या दिसतात. "कोड" मधील कायदेपद्धति म्हणजे सर्व देशाची कायदेपद्धति. स्वतःस झालेल्या अपकाराचें स्वतःच निराकरण करणें किंवा स्वतः हरण करून आणलेल्या स्त्रीबरोबर लग्न करणें इत्यादि पद्धती मोडल्या होत्या पण दिव्य, कुटुंबाचें स्वायत्तत्व वगैरे जुन्या गोष्टी अस्तित्वांत असलेल्या या कोडवरून दृष्टीस पडतात. राजाची सत्ता निरंकुश मानीत तरीपण राजा दयाळू असून कोणालाहि थेट राजापर्यंत जाण्याची मोकळीक असे. निर्बलाचें संरक्षण करण्यास राजा तयार असे. न्यायाधीशांवर कडक देखरेख असे. सगळीकडे जर्मान लष्करी जहागिरीच्या पद्धतीप्रमाणें विभागून दिलेली असे. टपालखातें वगैरे लोकोपयोगी कामें चालत असत. स्त्रीवर्गास मान असून कोणत्याहि तऱ्हेचीं बंधनें नव्हतीं, इत्यादि गोष्टी या कोडवरून दिसतात.

**खमुरबीचें कोड.**—कोडमध्यें केवळ तत्कालीन अथवा प्राचीन कायदेपद्धतीच नाहींत, तर त्यांत नवीन कायदेपद्धतींचाहि समावेश केल्यामुळें प्राचीन कायदेपद्धतींत या कोडनें बराचसा फरक घडवून आणला. लेखी करारनामे सुरू झाले. दोन पक्षांच्या संमतीनें वाटेल ते करार होण्यास मोकळीक असे. करारनामे नोंदणीअधिकाऱ्यासमोर शपथेवर देवळांत केले जात असत.

त्यांवर सार्वजनिक शिक्षा असे. निदान करारनामे करण्याच्या पद्धतीवरून तरी त्यांत बेकायदेशीर अथवा धर्मविरूद्ध कांहीं असेल असें वाटत नव्हतें. न्यायाधीशांच्या फैसल्यावर राजाकडे 'विनंति अर्ज' करितां येत असे. व पुष्कळ बाबतींत कोडनें, राजानें कसा निकाल द्यावा हें दाखविलेलें असे. कोडची रचना फार उत्तम तऱ्हेनें व काळजीपूर्वक केलेली होती व त्यांतील विषयांचा क्रम फार सोयीवार होता.

लो कां चे व र्ग.—कोडप्रमाणें लोकांचे तीन वर्ग होऊं शकतात. (१)आमेलू, (२)मुस्किनु, (३) अर्डु. आमेलू म्हणजे कुटुंबांतील मुख्य मनुष्य. त्याच्या जन्मकालाची व मरणकालाची नोंदणी केली जात असे. त्यास राजाचे हक्क असत. तो गैरवाजवी वर्तनाकरितां कडक शिक्षा व दंड सुद्धां करूं शकत असे. त्या वर्गांत राजा, राजसभासद,मोठमोठाले हुद्देदार व उद्योगधंदे करणारीं माणसें ह्यांचा समावेश होतो. मुस्किनु वर्गाचें लक्षण सांगणें मात्र फार कठिण आहे. कांहीं कालानंतर मुस्किनु म्हणजे " दरिद्री " असें समजलें जात असे. पण कोडमध्यें मुस्किनु शब्दाचा अर्थ दरिद्रीपणा असा घेतला नाहीं; त्यापाशीं जमीन मात्र नसूं शकेल. तो स्वतंत्र असे. तो शहरांतील वेगळ्या भागांत रहात असे. त्याचा संबंध राजदरबाराशीं असावा असें मानण्यास योग्य कारणें सांपडत नाहींत. कोणास शारीरिक इजा झाल्यास त्याबद्दल दंड वसूल करणें त्याचेकडे असे. पुढील दाखल्यांत याचा उल्लेख नसल्यामुळें विशेष माहिती सांगणें शक्य नाहीं. तिसरा वर्ग म्हणजे आर्डु. आर्डु हा गुलामांचा वर्ग. लोकसंख्येंत ह्या वर्गाचीच फार भर होती. तो भांडवल सांठवूं शकत असे. त्याला इतर गुलाम ठेवतां येत असत. कपडे, जेवण व औषधें, यांचा खर्च धनी पुरवीत असे. त्याचें दुसऱ्या गुलामाच्या मुलीशीं धनी लग्न करून देत असे. गुलाम नसलेल्याच्या मुलीशीं गुलामाचें लग्न झाल्यास तीमुळें मिळालेलें जें आंदण त्यावर धन्याचा काडीइतका हक्क नसे. पण एखादा गुलाम मेल्यानंतर मात्र त्याच्या धन्याला त्याचा वारस म्हणून अर्धी संपत्ति मिळत असे. धन्यापासून दुसऱ्या कोणी विकत घेतल्यास तो स्वतंत्र होऊं शकत असे. बरेच गुलाम पळून जात असत. कोणी पकडून त्यास धन्याच्या स्वाधीन केल्यास कोडप्रमाणें त्याला २ 'शेकेल' इनाम मिळत असे. एखाद्या गुलामास प्रतिबंध करण्याबद्दल अथवा घरीं जागा देण्याबद्दल देहांत शिक्षा होती. प्रत्येक गुलामाच्या अंगावर ओळखीकरितां कांहीं चिन्ह असे, क्वचित् तें गोंदलेलें असे किंवा भाजलेलें असे. असुरियांत बरेचसे गुलाम असत पण बाबिलोनियामध्यें फारच थोडे असत.

रा ज स त्ता.—शहरांत ज्यास ईश्वर म्हणून मानीत असत तोच सर्व जमीनीचा मालक समजला जात असे. राजा ईश्वराचा प्रतिनिधि (राज्यकारभार पाहणारा पुरुष) असे. पूर्वीपासून चालत आलेल्या रयतवारी पद्धतींत राजानें ढवळाढवळ करण्याचें टाकून दिलें होतें. जमीनीची किंमत ठरीव असे पण राजा एखाद्या योग्य कुळास जमीन बक्षीस म्हणून देऊं शकत असे. या बक्षीसपद्धतीमुळेंच जमीन स्वीकारणारावर बरींचशीं कर्तव्यें लादलीं गेलीं. देश सैनिकांची मागणी करीत असे. कांहीं मर्यादित भागांतून एक धनुर्धारी (तिरंदाज) व त्याला मदत करणारीं माणसें द्यावीं लागत. नंतर कांहीं नियमित भागांतून घोडेस्वार द्यावे लागत असत. गुलाम लोक नोकरीचीं कामें करीत, व आमेलू व कधीं कधीं मस्किनु वर्गांतील लोक लढाईवर जात असत. धर्माधिकारी व गुराखी लोक मात्र वरील अटींपासून मोकळे होते. भांडवलांतील व पिकांतील कांहीं भागावर देशाचा हक्क असे. प्रत्येक शहरांत मालावरील महसूल, जकात, रस्त्यावरील व पाण्यावरील कर, ह्यासंबंधाची व्यवस्था वेगवेगळी असे. राजाची जमीनीवरील सत्ता नाहींशीं झाली होती. त्याची खासगी जिंदगी व भांडवल आणि प्रजेपासून मिळालेला कर वेगळा असे. मोठमोठे अधिकारी यांच्या रहाण्याच्या जागा व जहागिरी असत. कांहीं वर्गांकरितां कोडमध्यें नियम बांधले होते. त्या वर्गांनीं राजापासून इस्टेट घ्यावी व गरज लागली असतां मदत करावी. मरण पत्करल्यास देखील त्यास आपलें कर्तव्य दुसऱ्यावर टाकितां येत नाहीं. कोणास मदत करण्यास दूरदेशीं जावें लागल्यास त्यांनीं आपल्या मुलांवर आपलीं कर्तव्यें सोंपवावीं. इस्टेट दुसऱ्याला अगदीं देतां येत नसे. त्याचप्रमाणें ज्या वंशाची इस्टेट त्याच वंशांत राहत असे.

दे वा ल यें —देवळांना फार महत्व होतें. पैसे व कायमच्या देणग्या खेरीजकरून पुष्कळशा रीतींनीं त्यांना पैशाचें साहाय्य मिळत असे. मोठमोठ्या देवळांत पुष्कळसे अधिकारी व नोकर असत. प्रत्येक शहरांतील लोक एकेक देवळांत जात असत व कुटुंबांतील प्रत्येक पुरुषास पुरोहित बनण्याचा अधिकार असे. जसजशी शहरांची वाढ होऊं लागली तसतसे वर्षांतील कांहीं दिवस अमुक एका देवळांत जावें कांहीं दिवस दुसऱ्या देवळांत जाऊन धर्मोपदेश करावा ह्यासंबंधाचे हक्क कांहीं ठराविक कुटुंबांना देण्यांत आले. देऊळ म्हणजे मोठालीं धान्यकोठारें बनलीं. प्रत्येक देवळाकडे कांहीं नेमलेलीं कर्तव्यें होतीं. शत्रूंनीं एखाद्या नागरिकास कैद केल्यास व त्यापाशीं पैसा नसल्यास,त्यास पैसे देऊन सोडवावें लागत असे. गरीब लोक देवळांतून धान्य उसनें नेत असत व परत आणीत असत. देवळावर राजाची सत्ता मालक या नात्यानें नसून कारभार पहाणारा या दृष्टीनें होती. उत्पन्नाचा एक दशांश कर म्हणून द्यावा लागत असे.

ईश्वराची सेवा करणारा'व्हेस्टेल'नांवाचा एक वर्ग आहे त्यासंबंधीं कोडमध्यें नियम सांगितले आहेत त्या वर्गांतील लोकांनां पावित्र्य राखण्याची शपथ घ्यावी लागत असे. त्यांनां खाणावळींत जातां येत नसे. पण यांनां खासगी हक्कहि बरेच होते.

मा ल म त्ते चा क्र य वि क्र य.—कोडमध्यें मालमत्ता देण्याघेण्यासंबंधाचे विक्री, ठेका, अदलाबदल, देणगी, ठेव, कर्ज व गहाण वगैरे निरनिराळे मार्ग सांगितले आहेत. लेखी दाखले

अथवा साक्षीदार यांवरून सिद्ध झाल्याशिवाय कोणाचाहि हक्क मान्य करणें हें कोडविरुद्ध आहे. विकत घेणारांनीं विकणाऱ्याच्या हक्काची नीट चौकशी केल्याशिवाय विकत घेऊं नये. अज्ञान अथवा मुखत्यारीचा अधिकार नसलेल्या गुलामापासून जो कोणी विकत घेईल तो चोर समजला जाऊन मरणाच्या शिक्षेस पात्र होईल. विकत घेणाराजवळील माल जर चोरीचा ठरेल व जर तो विकणारा व विक्रीपत्र ह्यांस पुढें आणणार नाहीं तर तो चोर ठरेल व त्यास देहांत शिक्षा मिळेल. पण विक्रीपत्र सिद्ध केल्यास विकणाऱ्याच्या इस्टेटींतून पांचपट रक्कम मिळेल. इतर देशांत जर कोणी गुलाम विकत घेतला व मागून असें कळलें कीं, तो बाबिलोनियामधून चोरून अथवा कैद करून आणलेला होता तर त्याला त्याच्या पूर्वीच्या मालकाकडे कांहींएक नफा घेतल्याशिवाय परत केले पाहिजे.

शे त क री.—जमीनीचे मालक बहुतेक स्वतःच जमीनीची लागवड करीत असत, पण त्यांनां शेतकऱ्यांस भाड्यानेंहि जमीन देतां येत असे.शेतकरी लोकांनां योग्य लागवड करून पीक घेतां येत असे व शेतें सुस्थितींत ठेवावीं लागत. पीक न आल्यास काय खंड द्यावयाचा हें कोडमध्यें ठरवून दिलें होतें. पीक वांटून घेण्याच्या दृष्टीनें जर जमीन दिली तर जमीनदार व शेतकरी हे ठरावाप्रमाणें पीक वांटून घेत असत. शेतकऱ्यांनीं भाडें दिल्यास व व जमीन चांगली ठेवल्यास त्याला पोटभागीदार करितां येत असे. पडीत जमीनीची लागवड करण्याकरितां ती भाडें न घेतां ३ वर्षांकरितां दिली जात असे. बगीचे वगैरे देण्याची पद्धतहि जमीनीप्रमाणेंच असे. जमीनदार बैल वगैरे व इतर शेतकीच्या उपयोगाचें सामान ठेवीत असे. शेतकऱ्यानें जर बीं वगैरे चोरलें तर त्याचीं बोटें कापलीं जावीं अशी शिक्षा असे.

का ल वे.—कालव्यांची फार जरूर होती. कालव्याचें पाणी देणारानें निष्काळजीपणामुळें जर बांधाची दुरुस्ती राखली नाहीं व त्यामुळें पाण्याचा मोठा प्रवाह येऊन पिकें वाहून गेलीं तर नुकसानीची भरपाई त्यास करावी लागत असे.

घ रें.—घरें पुष्कळ वर्षांकरितां भाड्यानें दिलीं जात असत. पण सहा महिन्यांचें भाडें अगोदर द्यावें लागत असे. रहाणारानें घराची उत्तम व्यवस्था ठेवावी असा करार असे. करार संपेपर्यंत घरमालकास घरांतून जा म्हणून भाडेकऱ्यांस सांगतां येत नसे. घर बांधण्याकरितां जमीन फुकट दिली जात असे पण आठ दहा वर्षांनंतर घरावर जमिनीच्या मालकाचा कबजा होत असे.

म जू र.—गुलाम पुष्कळ असून देखील हंगामाच्या वेळेस पैसे देऊन मजूर कामावर आणावे लागत. बैल सुद्धां नांगरण्याकरितां, बैलगाड्यांस जुंपण्याकरितां किंवा पाण्याचीं यंत्रें चालविण्याकरितां भाडें देऊन आणले जात असत. पेरणारे, गाडी हांकणारे व शेतांत काम करणारे ह्यांची मजुरी, त्याचप्रमाणें बैल भाड्यानें आणल्यास किती भाडें द्यावें ह्यासंबंधींचे नियम कोडमध्यें ठरवून टाकिले होते.

गु रें.—गुरांचे कळप पुष्कळ होते. गुराखी मालकास रसीद देऊन नंतर रानांत गुरें चारण्यास नेत असे. त्याची मजुरी कोडप्रमाणें ठराविक होती. गुरांची उत्तम तऱ्हेनें काळजी घेण्याचें व परत आणण्याचें काम गुराख्याकडे असे. निष्काळजीमुळें झालेलें कोणतेंहि नुकसान गुराख्यास भरावें लागत असे. धान्याच्या शेतांत गुरें चारल्यास गुराख्याला झालेल्याच्या चौपट नुकसान भरावें लागत असे.

क र्ज.—कर्ज घेतांनां कर्जदार आपली मालमत्ता गहाण ठेवीत असे. शेत गहाण ठेविल्यास कर्जदार पिकांतून सावकाराचें कर्ज फेड. नापिकी झाल्यास व्याज माफ केलें जात असे. सावकारास, कर्ज न दिल्यास कर्जदाराची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार नव्हता; व तसें केल्यास कर्जदाराचा माल कर्जदारास परत करावा लागे, एवढेंच नव्हे तर सावकाराचा कर्जदारावरील हक्क नाहींसा होत असे. परवानगीशिवाय जप्ती केल्यास दंड होत असे. कर्जाकरितां कर्जदारास पकडल्यास कर्जदाराला आपली बायको, मूल अथवा गुलाम कर्ज फिटेपर्यंत सावकाराकडे काम करण्यास ठेवावा लागे. मूल, गुलाम अथवा बायको ह्यांस स्वाभाविक मृत्यु प्राप्त झाल्यास सावकार जबाबदार नसे. पण सावकाराच्या दुष्टपणाच्या वर्तनामुळें जर त्यांपैकीं कोणाला मरण आलें तर मात्र सावकारास मुलाबद्दल मूल व गुलामाबद्दल गुलाम द्यावा लागे. कधीं कधीं कर्जाइतक्या किंमतीचा माल गहाण ठेवला जात असे किंवा कधीं सर्व मालमत्ता गहाण ठेविली जात असे. कर्जाकरितां जामीनकीहि घेतली जात असे.

व्या पा र.—व्यापार फार जोराचा होता. व्यापाराची साधारण पद्धत म्हणजे गांवोगांव माल घेऊन फिरणाऱ्या एखाद्या 'एजंट' च्या स्वाधीन माल करून देण्याची होती. मालाच्या गाड्या दूरदूरच्या देशांत जात. कोडमधील नियमप्रमाणें एजंटला व्यापाऱ्यापासून विकण्याकरितां घेतलेल्या सामानाची एक यादी करावी लागे व ते पोहोंचल्याची रसीद द्यावी लागे. एजंटला जरी नफा झाला नाहीं तरी घेतलेल्या मालाच्या दुप्पट रक्कम परत करावी लागे पण लुटल्या गेलेल्या मालाबद्दल तो जबाबदार नसे. परत आल्यावर व्यापाऱ्यास पोहोंचलेल्या मालाची पावती एजंटला द्यावी लागे. जलमार्गानेंहि बराच व्यापार केला जात असे. माल पाठविण्याकरितां जहाजें भाड्यानें घेतलीं जात असत. मालाबद्दल नौकाध्यक्षास जबाबदार रहावें लागे. दोन जहाजांची टक्कर झाल्यास जें जहाज चालत असेल त्या जहाजास नांगरून राहिलेल्या जहाजास जबाब द्यावा लागे.

वि वा ह.—विवाह म्हणजे जवळ जवळ स्त्री विकत घेण्याची पद्धत. विवाहासंबंधाचा एक करारनामा असे.

विवाहाचे ठराव प्रथम मुलामुलींच्या नातलगांत होत. मुलाच्या बापानें कांहीं रक्कम मुलाजवळ द्यावी व तींत इतर नजराण्यांची भर टाकून मुलानें मुलीच्या बापाकडे पोहोंचती करावी. लग्नानंतर ती रक्कम मुलाचा बाप मुलीला देत असे. मुलीच्या बापाला देण्याची रक्कम एकमेकांच्या स्थितीवर अवलंबून असे. कोडमध्यें असा नियम घालून दिला होता कीं, रक्कम घेतल्यानंतर जर मुलगी दिली नाहीं तर मुलीच्या बापानें मुलास दुप्पट रक्कम परत करावी. व जर मुलाचा लग्न करण्याचा बेत फिरला तर दिलेली रक्कम त्यास मिळूं नये. मुलीला मिळालेली रक्कम व बापानें दिलेलें आंदण ह्यांवर मरेपर्यंत तिचा हक्क राही व मेल्यावर तिच्या मुलांना ती संपत्ति मिळे. लग्नाचा विधि म्हणजे हातांत हात घालणें व नवऱ्यानें "मी सरदाराचा मुलगा आहे, तुझी ओटी सोन्यारुप्यांनीं भरली जाईल, तूं माझी पत्नी होशील व मी तुझा पती होईन" इत्यादि शब्द उच्चारणें यापलीकडे नव्हता.

घ ट स्फो ट.—लग्नाच्या करारनाम्यांत कांहीं अटी असत त्या मोडल्यास प्रत्येकास काडी मोडण्याचा अधिकार असे. ह्या अटी कोणच्या असाव्या ह्यासंबंधीं कोडमध्यें कांहीं नियम बांधून दिलेले नव्हते. बायकोनें लग्नापूर्वी काढलेल्या कर्जाबद्दल सुद्धां नवऱ्यास जबाबदार धरीत असत. नवऱ्याला बायकोस इनामपत्र करून देण्याचा अधिकार असे. व त्या इनामावर मरेपर्यंत तिची सत्ता राही. लग्न झाल्यावर देखील मुलगी आपल्या बापाच्या कुटुंबांतील अंश आहे असें समजलें जात असे. अमुक एकाची बायको म्हणण्याऐवजीं अमक्याची मुलगी अथवा अमक्याची आई असें म्हणत असत.

काडीमोड करणें हें मनुष्याच्या मर्जीवर असे. पण त्याला सोडलेल्या बायकोस, आंदण व मुलें झालीं असल्यास मुलें परत द्यावीं लागत. मुलें वयांत येईपर्यंत तिचा व मुलांचा खर्च द्यावा लागत असे. जर मुलें नसलीं तर आंदण व मुलीला मिळालेली रक्कम परत केली म्हणजे पुरे.

प ति प त्नी.—स्त्री जर व्यभिचारी असेल तर पुरुषाला तिला घालवून देऊन मुलें ठेऊन घेण्याची परवानगी होती; किंवा तिला गुलाम म्हणून ठेवतां येत असे. तिला पुरुषावर त्यानें दाखविलेल्या दुष्टपणाबद्दल अथवा केलेल्या दुर्लक्षाबद्दल फिर्याद करण्याची मोकळीक असे. जर तिला तसें सिद्ध करून दाखवितां आलें नाहीं तर तिला पाण्यांत बुडवून मारण्याची शिक्षा असे. पण जर तिच्या पोटगीची व्यवस्था नसेल तर नवऱ्याच्या गैरहजरींत तिला दुसऱ्याजवळ रहातां येत असे. पण तो परत आल्यास लागलेंच तिलाहि परत जावें लागे.

वि ध वा.—नवऱ्याच्या निधनानंतर कुटुंब चालविण्याची जबाबदारी स्त्रीवर असे. तिनें घरांत राहून मुलांना योग्य शिक्षण द्यावें. पुनः लग्न करावयाचें असल्यास तें न्यायाधिशाच्या संमतानें करतां येत असे. न्यायाधिशानें सामानाची यादी करून नंतर त्यांच्या स्वाधीन सर्व सामान करावें व त्या दोघांनीं तें मुलांचे ट्रस्टी या नात्यानें वापरावें. सामानांतील एक भांडें सुद्धां गहाळ होतां कामा नये. पण जर तिनें लग्न केलें नाहीं तर मुलें वयांत आल्यानंतर तिला नवऱ्याच्या इस्टेटींतील कांहीं भाग मिळे.

सं त ति —पुरुषानें लग्न एकदांच करावें असा नियम होता. पण लग्न झाल्यास बायकोनें एखादी दासी पुरुषाच्या स्वाधीन करावी व तिला झालेलीं मुलें आपलीं आहेत असें समजावें. पण स्त्रीनें तसें न केल्यास पुरुषास वेश्येस आणतां येत असे. जसें दासीवर स्त्रीचें वर्चस्व असे तसें वेश्येवर नसे. वेश्या स्वतंत्र असे. दोन्हीकडून झालेली संतति कायदेशीर मानीत. गुलामाच्या मुलीपासून झालेली प्रजा सुद्धां कायदेशीर होऊं शके. पण तसें होण्याकरितां बापानें साक्षीदारांसमक्ष कबुली दिली पाहिजे असे, व अशा तऱ्हेचीं मुलें कधीं कधीं दत्तक म्हणून घेतलीं जात.

स्वतंत्र स्त्रियांस गुलामांशीं लग्न करितां येत असे व त्यांची संततीहि स्वतंत्रच असे.

मुलांचीं लग्नें होईपर्यंत त्यांवर बापाची पूर्ण सत्ता असे. तो त्यांना मजूरीकरितां पाठवूं शकत असे किंवा त्यांना विकून टाकण्याचाहि त्यास अधिकार असे. बापामागें आईसहि तसाच अधिकार असे. व आईबापांनंतर वडील भावांना देखील तसाच अधिकार पोहोंचत असे.

मुलीचें लग्न करणें बापाच्या स्वाधीन होतें; इतकेंच नव्हे तर ईश्वराच्या सेवेला लावून तिला मुरळी म्हणून अथवा वेश्या म्हणून देतां येत असे. लग्न करून दुःखांत राहाण्यापेक्षां वयांत आलेल्या मुलीस मुरळी होतां येत असे, व बापाला तिच्या इच्छेविरुद्ध जातां येत नसे. लग्न केल्यास वरील कोणत्याहि स्थितींत तिला तिच्या बापानें अथवा बाप वारल्यानंतर भावांनीं हक्काचा हिस्सा दिला पाहिजे.

द त्त क —दत्तक घेण्याचा प्रघात बराच दृष्टीस पडतो. दत्तविधान करारनाम्यानें होत असे. व करारनाम्यांतील अटीप्रमाणें दत्तकानें आपलें कर्तव्य न बजावल्यास करारनामा रद्द केला जात असे.

धंदेवाल्या माणसास आपला धंदा चालविण्याकरितां दत्तक घेतां येत असे दत्तकानें मिळवलेल्या द्रव्यावर बापाचा हक्क असे. दत्तकाला त्यास आपला धंदा शिकवावा लागे व न शिकवल्यास दत्तकास बापावर फिर्याद करून करार रद्द करून घेण्याचा हक्क असे.

दत्तक घेऊन जर पुनः मनुष्य लग्न करील व करार मोडील तर दत्तकास जंगम मिळकतीचा एक तृतीयांश हिस्सा द्यावा लागत असे.

आईबापांच्या संमतीशिवाय दत्तक घेतां येत नसे पण व्यभिचारानें झालेलीं अथवा गुलामांचीं मुलें त्यांनां दत्तक घेण्याचें असल्यास कोणाचीहि संमति लागत नसे. दत्तक घेतलेल्या मुलाचे आईबाप सांपडल्यामुळें जर तो जाण्यास तयार झाला तर त्याचा डोळा अथवा जीभ काढली जात असे.

वारसा.—लग्नापासून झालेल्या मुलांनां बापाच्या संपत्तीवर सारखा हक्क पोहोंचत असे. फक्त बाप लग्न होणाऱ्या मुलाकरितां मुलीला देण्याची रकम् व मुलीला देण्याचें आंदण काढून ठेवीत असे. दोन बायका असल्यास दोघींच्या मुलांत संपत्तीची विभागणी होत असे.

'पूर्वी बापास मुलाला वारसाच्या हक्कावरून काढून देतां येत असे. पण पुढें असें करण्यास न्यायाधिशाची संमति लागू लागली. जो मुलगा बापाला बाप म्हणण्याचें नाकबूल करील त्याचे डोक्याच्या समोरील भागाचे केस काढून गुलाम म्हणून विकण्याचा अधिकार असे, आई नाकबूल केल्यास पूर्वीप्रमाणेंच करून फक्त त्याला गुलाम न बनवितां शहरांतून एक दाखला म्हणून मिरवीत.'

व्यभिचार.—व्यभिचार करणारास बुडवून मारण्याची शिक्षा होती. पण स्त्रीचा विवाहित पती जर तिला क्षमा करण्यास तयार असेल तर राजाच्या मध्यस्थीनें तो जारकर्म करणारा पुरुष देखील सुटत असे. मुलानें आईशीं व्यभिचारकर्म केल्यास दोघांसहि देहांत शिक्षा असे. मुलीशीं व्यभिचार केल्यास बापास हद्दपारीची शिक्षा मिळत असे. सुनेशीं व्यभिचार करणाऱ्या माणसास बुडविलें जात असे. जी स्त्री परपुरुषाकरितां आपल्या पतीला ठार करवीत असे ती फांशीं दिली जात असे.

गुन्हे व शिक्षा.—'जशास तसें' हें फौजदारी कायदेपद्धतीचें तत्त्व होतें. बापास मारणाऱ्या मुलाचा हात तोडला जात असे. पाहण्यास प्रतिबंध केलेल्या जागीं पाहणाराचा डोळा फोडला जात असे. डाक्टरच्या हातून रोगी जिवास मुकल्यास अथवा त्याचा शरीराचा एखादा भाग नाहींसा झाल्यास डाक्टरचा हात तोडला जात असे. दुसऱ्यावर खोटे आरोप रचून त्यास मरणाच्या शिक्षेस पात्र केल्याचा प्रयत्न केल्यास खोटे आरोप रचणारास देहांत शिक्षा होत असे.

चोरीकरितां अथवा चोरीखालीं येणाऱ्या इतर गुन्ह्यांकरितां देहांत शिक्षा असे; उदाहरणार्थ, राजवाड्यांत शिरून चोरी करणें, चोरीचा माल विकणें, खोटा हक्क सिद्ध करणें, माणस पळवून नेणें, पळून जाणाऱ्या गुलामास आश्रय देणें, चोरून दारू विकणें इत्यादि. पण वरील गुन्ह्यांकरितां शिक्षेची तऱ्हा मात्र ठरली नव्हती. पुढील अपराधास कोडमध्यें मरणाची शिक्षा सांगितली आहे. रात्रीं घर फोडणारास, गुलामाच्या अंगावरील चिन्ह पुसून टाकणारास, व पतीचा मृत्यु घडवून आणणाऱ्या स्त्रीस, फांशीची शिक्षा असे. मातेशीं व्यभिचार केल्यास व मुरलीनें खाणावळ काढल्यास जाळून मारण्याची शिक्षा असे. व्यभिचार, पतीचें कर्तव्य सोडणारी स्त्री, व सुनेस पळविणें, त्यांकरितां बुडवून मारण्याची शिक्षा होती.

घर उत्तम न बांधल्यामुळें घर पडून घरमालकाचा मुलगा मेल्यास, घर बांधणाराचा मुलगा ठार केला जात असे. एखादा दुसऱ्याच्या मुलीच्या मरणास कारणीभूत झाल्यास त्याची मुलगी मारली जात असे.

वरिष्ठांच्या अंगावर उद्दामपणें चालून आल्यास त्यास ६० फटके मारले जात असत. विवाहित स्त्रीचा अपकीर्ति पसरविल्यास डाग देण्याची शिक्षा असे. लांच घेणाऱ्या न्यायाधिशास कायमचें बरखास्त केलें जाई. आईबापांविरुद्ध वागणाऱ्या पोरास व उधळखोर बायकोस गुलाम बनविलें जात असे.

सर्वसाधारण शिक्षा दंडाची असे. मालमत्तेचें नुकसान केल्यास, करार मोडल्यास दंड केले जात असत. दंडाचें मान अपराधावर अवलंबून असे. दुप्पट, चौपट, पांचपट, बारापट व कधीं तर तीसपट सुद्धां दंडाची मजल जात असे.

कोडमध्यें हेतूला विशेष महत्त्व दिलें होतें. परस्परांच्या भांडणांत जर एखादा मेला तर दुसऱ्यानें मी त्याला मुद्दाम मारलें नाहीं अशी शपथ घेतल्यास तो केवळ दंडावर सुटत असे. तंट्यांत जर नुसती दुखापत झाली तर ज्या मनुष्याकडून इजा झाली असेल त्याला वैद्याचे पैसे द्यावे लागत. बैलानें रस्त्यावर जर एखाद्यास मारलें, तर मालकास बैल द्वाड आहे हें माहित असल्यास फक्त नुकसान भरून द्यावें लागत असे. कर्जाची फेड होईतोंपर्यंत ठेवलेला गुलाम जर सावकाराच्या घरीं स्वाभाविक मरणानें मेला तर सावकारास कोणत्याच तऱ्हेचा जबाब द्यावा लागत नसे. पतीनें टाकून दिलेली स्त्री दरिद्री असल्यास तिला दुसरें लग्न करण्याची मोकळीक होती.

निष्काळजीपणानें अथवा दुर्लक्षामुळें झालेल्या कोणत्याहि अपराधास जबर शिक्षा असे. जसें, एखाद्या डाक्टरचें आपल्या धंद्यांत विशेष प्राविण्य नसल्यामुळें जर कोणी इसम मेला अथवा त्याचे अवयव दुखावले तर डाक्टरचे हात कापले जात असत. गुलाम मेल्यास दुसरा गुलाम आणून द्यावा लागत असे. गुरांच्या डाक्टरकडून एखादें ढोर मेल्यास ढोराच्या किंमतीच्या एक चतुर्थांश किंमत द्यावी लागे. घर बांधणाऱ्याच्या निष्काळजीपणामुळें जर घरमालक मेला तर त्याला स्वतःला मरावें लागत असे.

कोडमध्यें सर्व ठिकाणीं समाजांतील योग्यतेस विशेष महत्त्व दिलें आहे.

कैद करण्यास केवळ संशय घेऊन भागत नसे. तर गुन्हेगारास गुन्हा करितांनां धरावें लागे. चोरीचा माल जवळ सांपडल्याशिवाय चोरीची शाबिती होत नसे.

खटल्यांच्या बाबतींत वादीला ज्या योग्य दिसतील त्या गोष्टी व मुद्दे तो पुढें मांडीत असे. वकीलीचा धंदा करणारे असे कोणीच नव्हते. नोंदणी अधिकारी या तक्रारी लिहून काढण्याच्या कामांत मदत करी. न्यायाधीश त्यावांचून इतर पक्षकारांनां व साक्षीदारांनां बोलावी. लागलेच ते येऊं शकत नसतील तर खटल्याचें काम पुढें एखाद्या दिवसावर टाकी. देहांत शिक्षेसंबंधाचे व इतर महत्त्वाचे खटले 'न्यायसभे' पुढें असत. न्यायाधिशांनां मदत करण्याकरितां कांहीं वृद्ध माणसेंहि असत.

पक्षकारांनां व साक्षीदारांनां शपथ घ्यावी लागे. खोटी साक्ष दिल्यास गुन्हेगाराला जी शिक्षा मिळाली असेल तीच त्यालाहि मिळे. मनुष्याच्या माहितीबाहेरील गोष्टींत अपराधाची अथवा निरपराधित्वाची कसोटी पाण्यांत टाकून लाविली जात असे. अपराध्यानें पवित्र नदींत उडी घ्यावी व निरपराधी असल्यास तो तरेल नाहीं तर बुडेल. माहीत असलेल्या बाबतींत शपथ घ्यावी लागे. लेखी दाखल्यास फार महत्त्व होतें. दाखला हरविणें म्हणजे भयंकर चूक होती. पुराव्यावरून सिद्ध करून दाखविल्यास देखील न्यायाधीश दाखला सांपडल्यावर आणून द्यावा म्हणून सांगत असत.

फैसले लिहून काढले जाऊन त्यांवर शिक्का मारीत असत. व खालीं न्यायाधिशांची, त्यांबरोबर असलेल्या वृद्ध मंडळींची, साक्षीदारांची व लिहिणाराची साक्ष असे. प्रत्येक पक्षकार एक एक प्रत नेत असे व नोंदणी अधिकारी एक प्रत दफ्तरखान्यांत राखून ठेवीत असे.

राजाकडे विनंतिअर्ज करण्याची मुभा असे. बाबिलोनमधील न्यायासनें वरिष्ठ समजलीं जात असत. तरी प्रतिवादीला स्थानिक न्यायासनांसमोर जबाब देण्याची मोकळीक होती.

शेवटीं एवढेंच लक्ष्यांत घेण्याजोगें आहे कीं, खोटें बोलणें, खोटीं वजनें वापरणें वगैरेसारखीं बरींचशीं वाईट कृत्यें न्यायासनांपुढें मांडलीं जात नव्हतीं. अशा अपराधांबद्दल योग्य शासन ईश्वरच करील असें "ओमेन टॅबलेट" मध्यें सांगितलें होतें.

आतां बाबिलोनच्या इतिहासांतील मुख्य गोष्टी सुसंगत व कालानुक्रमानें देऊं.बाबिलोनियाचा इतिहास सुसंगत व गोष्टीरूपानें पूर्णपणें देण्याइतकी माहिती उपलब्ध झालेली नाहीं. पण अलीकडे चालविलेल्या खोदकामांत उपलब्ध झालेल्या अवशेषांवरून व कीलाकृति अंकित लेखांवरून कांहीं कांहीं मुख्य मुख्य गोष्टींचें ज्ञान होतें त्या खालीं दिल्या आहेत.

**बाबिलोनिआंतील प्राचीन राज्यें.**—बाबिलोनिआ प्रांतांतील अगदीं प्राचीनकालचे ज्ञात असे रहिवासी कोणते होते याबद्दल माहिती म्हणजे ते सेमाइट नव्हते इतकीच होय. यानंतर त्यांनां कधीं सुमेरियन व कधीं अक्केडियन म्हणत असत. बाबिलोनियाच्या दक्षिण भागास सुमेर म्हणत व उत्तर भागास 'अक्कड' म्हणत. अक्केडिअन भाषा ही जुन्या सुमेरियन भाषेपासून विकास पावलेली पोटभाषा होय असें समजतात.

बाबिलोनी संस्कृतीचा काल सुमारें ख्रिस्तशकपूर्व ६००० वर्षेंपर्यंत मागें जातो. ख्रिस्तपूर्व ५००० ते ४००० च्या सुमारास या लोकांवर एका क्षत्रिय वृत्तीच्या सेमिटिक वंशांतील लोकांनीं स्वाऱ्या केल्या.हे लोक म्हणजे बहुतेक अरबस्तानांतून आलेले इतिहासकालीन बाबिलोनिअन लोक होत. या नव्या जेत्या लोकांनीं कांहीं देश्य लोकांस हाकलून न देतां अगर नष्टप्राय न करतां आपणांत मिळवून घेऊन हळूहळू त्यांच्याच प्राचीन संस्कृतीचा अवलंब केला.

या प्रांताच्या राजकीय स्थितीसंबंधीं अगदीं प्रथमची माहिती म्हणजे या प्रांतांतील निरनिराळ्या छोटेखानी स्वतंत्र नगरराज्यांची होय. त्या स्वतंत्र राज्यांचें एक एक मुख्य नगर असून त्यामध्यें एक विशिष्ट देवतेचें देवालय असे. या देवतेचा धर्मोपदेशक अगर 'पटेसी' हाच या छोटेखानी स्वतंत्र राज्याचा शास्ता असे.

**केंगीचें राज्य.**—ख्रिस्तपूर्व ४५९० या सुमारास दक्षिण बाबिलोन प्रांतांतील केंगीचा राजा 'एन् शाग कुश अन्न' नांवाचा होता. हा सुमेरिअन होता किंवा सेमाइट होता याबद्दल नक्की माहिती नाहीं,परंतु हा एन्लिल देवतेचा पटेसी असून याची राजधानी शिर्पुर्ल-गिर्सु किंवा सुंगीर ही होती. सुंगीर यासच पुढें सुमेर म्हणूं लागले व दक्षिण भागास तेंच नांव पडलें. कीशचे सेमिटिक राज्य याचें प्रतिस्पर्धी असून एन्शागकुशन्न यानें त्यावर कांहीं कालपर्यंत आपला अम्मल बसविला. याखेरीज दुसरा कोणताहि केंगीचा राजा प्रसिद्ध नाहीं. ही माहिती निप्पुर येथील उपलब्ध शिलालेखावरून कळते.

**किशचें राज्य.**—केंगीचा राजा 'एन्शाग कुशन्न' याचा या राज्यावर कांहीं कालपर्यंत अम्मल चालून पुढें यूडग हा कीशचा पटेसी असतांना हें राज्य पुन्हां स्वतंत्र जाहलें. ख्रि. पू. ४४००—मेसिलिम या किशच्या राजानें लुगल शुगर याच्या वेळीं शिर्पुर्ल काबीज केलें परंतु हा अम्मल थोडेच दिवस (ख्रि. पू. ४२००) राहून शिर्पुर्लचा राजा 'ए अन्नटुम' यानें स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. कांहीं काळपर्यंत किशचें राज्य दुर्बल होतें परंतु पुन्हां लौकरच तें पूर्व स्थितीवर आलें. ख्रि. पू. ३८५०—पहिला सार्गन यानें हें राज्य जिंकण्यापूर्वीचा शेवटचा राजा अलुशरशिद यानें किशवर अम्मल चालविला. हा इतिहास दर्शविणारे पुष्कळ प्राचीन भांड्यांवरील लेख उपलब्ध आहेत.

**गिश्बनचें राज्य.**—ख्रि. पू. ४४०० या वेळीं मेसिलिमचा समकालीन 'उश' नांवाचा पटेसी असून त्यानें शिर्पुर्ले राज्याशीं सीमेबद्दल युद्ध केलें. ख्रि. पू. ४२००—सरतेशेवटीं गिश्बन हें ए अन्नटुम याच्या हस्तगत झालें. एअन्नटुम याच्या मरणामुळें गिश्बनचा पटेसी उर्लुमा यानें शिर्पुर्लवर

स्वारी केली व पराजित झाला शिर्पुर्लेचा राजा एंटेमेना याजकडून उर्लुमाचा जंगी पराभव झाला. ख्रि. पू. ४०००-यूकुशचा पुत्र लुगल झग्गिसी हा पटेसी असून तो दक्षिण भागावर चाल करून गेला. व दक्षिण आखातापर्यंत बाबिलोनचा सर्व भाग त्यानें कबजांत घेतला. तो 'इरेक'चा राजा होऊन स्वतःस "पृथ्वीश" म्हणवूं लागला. मेसापोटेमियाच्या सखल प्रदेशांतील प्राचीन आचारविचार व चालीरीती यांचा त्यानें पुनरुद्धार केला. हा इतिहास प्राचीन भांड्यांवर कोरलेल्या लेखांवरून कळतो.

**शिर्पुर्लेचें राज्य.**—शिर्पुर्ले ज्याला पूर्वी लगश असेंहि म्हणत व ज्यास सांप्रत 'टेलो' असें म्हणतात तें मुघीरच्या उत्तरेस शेटेलखाइ याच्या पूर्व बाजूस आहे. या राज्याचा ज्ञात कालांतील पहिला राजा (ख्रि. पू. ४५००) उरकगिन हा असून तो शूर योद्धा व हुशार मुत्सद्दी होता. त्यानें पुष्कळ देवालयें बांधलीं व कांहीं दुरुस्त केलीं व सुंगीर (गिर्सू) या राजधानीकरितां एक कालवा बांधला. ख्रि. पू. ४४००-याचा एक वंशज एन गेगेल असून दुसरा लुगलशुग्गुर ह्यास कीशचा राजा मेसिलिम यानें पटेसीच्या दर्जापर्यंत खालीं ओढलें ख्रि पू. ४३००-अशा रीतीनें किशराजाच्या वर्चस्वाखालीं निर्बल झालेल्या सिंहासनावर उर्निन या नांवाच्या पुरुषाच्या नेतृत्वाखालीं एक नवीन घराणें आलें. देवालयें बांधणारा म्हणून याची पुष्कळ प्रसिद्धि झाली. यानें आपल्या प्रजेची किशची परकीय सत्ता झुगारून देण्याकरितां पुष्कळ तयारी केली. त्याचा मुलगा पटेसीच होता. तरी त्यानें आपणास राजा म्हणवून घेतलें. ही माहिती पुष्कळशा प्राचीन चंबूवरील लेखांवरून कळते. ख्रि. पू. ४२५०-अकुर्गल ह्या नांवाचा राजा उर्निन ह्याच्या मागून राज्यावर बसला. हा ए अन्नटुम आणि पहिला एनअन्नटुम या दोघांचा पिता होय. ख्रि. पू. ४२०० एअन्नटुम यानें आपल्या देशास किशच्या पारतंत्र्यांतून मोकळें करून स्वतः राजसत्ता हातांत घेतली. यानंतर गिश्नबनचें राज्य त्यानें आपल्या अमलाखालीं आणलें, आणि इरेक, ऊर, लार्सा, अझ आणि उख या राज्यांबरोबर लढाया केल्या. या राजानें सिर्थूर्ले याच्या आसमंतांत असलेल्या एका प्रदेशाभोंवतीं एक भिंत बांधिली आणि सरहद्दीच्या उपयोगाकरितां नवीन कालवे खणले. हा मोठा शहाणा, कार्यकर्ता व शूर योद्धा होता. यासंबंधीं माहिती सांप्रत लुबर येथें असलेल्या व्हल्चरस्टीलवरून व दुसऱ्या अनेक प्राचीन लेखांवरून कळते. त्याच्यामागून त्याचा भाऊ पहिला एन् अन्नटुम हा गादीवर बसला, त्या वेळीं गिसबनच्या पटेसीकडून सिर्पुर्लेवर स्वारी होते. ख्रि. पू. ४१२०-पहिला एन् अन्नटुम याचा मुलगा एन् टेमेना यानें गिश्नबनच्या पटेसीचा पराजय करून धूळधाण केली. या हकीकतीचें स्मारक एंटेमेना याचा कोन आणि सिंगूर येथील नीनादेवाच्या यज्ञकुंडावर ठेवलेलें चांदीचें चंबूच्या आकाराचें सुरेख भांडें हें होय. ख्रि. पू. ४१००-यानंतरचा दुसरा एन् अन्नटुम हा उर्निनच्या घराण्यांतील शेवटचा पटेसी होय. कारण त्याचा मुलगा लॅमेंडु याला कांहींच उपपद आढळून येत नाहीं. याच्या कारकीर्दींत गिश्नबनचा लुगलजग्गिसी यास सिर्पुर्लेवर जय प्राप्त झाला. ख्रि. पू. ४१००—३८०० या काळांतील सिर्पुर्लेचे पटेसी यांजवर लुगलजग्गिसी व त्याचे वंशज यांचा अम्मल चालू झाला. ख्रि. पू. ३८००—३१००—बाबिलोनचे इतिहासांतील हें अत्यंत अज्ञात युग होय. लुगलउशुंगल हा पटेसी असून पहिल्या सार्गन राजाचा मांडलिक होता. बहुतकरून सिर्पुर्लेच्या राज्यावर ऊर येथील दुसऱ्या राजघराण्याचा अम्मल सुरू होईपर्यंत अगडेचे राजे सिर्पुर्लेवर सत्ता चालवीत असावेत. ह्या वेळच्या मांडलिक राजांपैकीं हुबौं (३५००) व गुडिया (३३००) हे दोन पटेसी अत्यंत महत्त्वाचे होत. यांपैकीं हुबौंची कारकीर्द शांततेची झाली. परंतु गुडिया हा योद्धा असून त्यानें एलामपासून अन्शनचा प्रांत हिसकावून घेतला आणि सिंगूर येथें नीनादेवाकरितां एक देवालय बांधिलें. या हकीकतीचे पुष्कळ शिलालेख उपलब्ध आहेत. सिर्पुर्लेची संस्कृति उच्च दर्जाची असून तीमध्यें सेमेटिक स्वरूपाच्या गोष्टी बिलकुल नव्हत्या.

**ऊर्चें राज्य.—पहिलें घराणें.**— या घराण्यांतील पहिला राजा, गिश्नबनचा लुगलजग्गिसी यानें इराक जिंकल्यानंतर होऊन गेलेला दिसतो. ख्रि. पू. ३९००-लुगल किगुबमीडुडु. लुगल-किसली. हा याचा मुलगा होय. या राजाच्या सत्तेखालीं ऊर, इराक आणि निप्पुर येथील राज्यें होतीं, आणि त्यांनीं सिर्पुर्लेची सत्ताहि काबीज केली असावी. या घराण्यांतील इतर राजांचीं नांवें आणि कृत्यें याविषयीं पूर्ण अज्ञान आहे. परंतु अगडेच्या सत्तेपुढें हें घराणें नामशेष झालें असावें. या दोन राजांचे कांहीं शिलालेख उपलब्ध आहेत.

**गुति आणि लुलुबी या ठिकाणचीं राज्यें.**—गुतीचा राजा लॅसिरब आणि लुलुबीचा अनुबनिषी या दोघांबद्दल माहिती देणारे कांहीं शिलालेख आहेत, त्यांवरून हे राजे ख्रिस्तपूर्व ३८०० च्या सुमारास होऊन गेलेल्या पहिल्या सार्गन राजाशीं समकालीन असावेत.

**अगडेचें राज्य.**—ख्रि.पू.३८०० या ठिकाणचें ज्ञात असलेलें अत्यंत प्राचीन घराणें सेमेटिक असून या घराण्यांतील पहिल्या राजाचें नांव शर्गणी शरअली किंवा पहिला सार्गन हें होय. हा इतिबेलचा मुलगा असून त्यानें आपल्या कर्तबगारीनें इलामपासून भूमध्यसमुद्रापर्यंत आणि बाबिलोनच्या अगदीं दक्षिण टोंकापासून अपिरक आणि गुति या ठिकाणापर्यंत एक साम्राज्य स्थापिलें. ही हकीकत दर्शविणारी जुनीं खोदकामें व बरेचसे अंकित लेख उपलब्ध आहेत.

ख्रि. पू. ३७५०—सार्गननंतर त्याचा मुलगा नरमसिन हा गादीवर आला. हा अत्यंत शूर असून बांधकामाचाहि शोकी होता. यानेंच प्रथम जगाच्या चारही दिशांचा आधि-

पति ही संज्ञा धारण केली, व आपिरक आणि मग या राज्यावर त्यानें स्वाऱ्या केल्या. त्यानें निप्पुर आणि अगडे येथील देवालयें बांधिली. सिप्पुर येथील शामसच्या एबर देवालयामध्यें नबोनिडस यास नरमासिनच्या नांवाचें लिखाण असलेला एक शिलालेख सांपडला आहे. त्यावरून त्या राजाच्या कारकीर्दीचा काल निश्चित करण्यास मदत झाली आहे. पहिला सार्गन आणि नरमसिन यांच्या कारकीर्दींत राज्यव्यवस्था व सुधारणा उत्तम दर्जाची दिसून येते. त्यावेळीं न्यायाधीश, गवई, वैद्य, व उत्तम रस्ते असल्याचें आढळतें. थूरोडंजिन हा एके ठिकाणीं असें म्हणतो कीं "सार्गन आणि नरमसिन यांच्या कारकीर्दी म्हणजे प्राचीन पौरस्त्य इतिहासांतील सुधारणेचा अत्यंत कळस होय." पुष्कळ शिलालेखांवरून वरील माहिती आढळून येते. ख्रि. पू. ३७०० त नरमसिनचा मुलगा बिंगनी शरअली राजा होता. अगडेच्या राज्याचा पुढील इतिहास अद्याप उपलब्ध नाहीं. बहुतेक मागाहूनच्या राजांनीं ऊर येथील दुसऱ्या घराण्याच्या जोरदार सत्तेपुढें आपली सत्ता नामशेष करून घेतली असावी. या ठिकाणीं बाबिलोनच्या इतिहासांतील पहिल्या कालविभागाची समाप्ति होते. व कालांतरानें सर्व प्रदेश सेमाइट लोकांच्या ताब्यांत आलेला दिसतो. यावेळीं अगडे येथें राजसत्तेचें मुख्य स्थान दिसत असून सिर्पुर्ले येथील राजास पटेसीचा दर्जा प्राप्त झालेला दिसतो.

**ऊरचें दुसरें राजघराणें.**—हे राजे स्वतःस ऊर खेरीज सुमेर आणि अक्कड यांचे अधिपती म्हणवितात आणि अशा रीतीनें उत्तर आणि दक्षिण या दोन्ही प्रांतांतील परस्परविरोधी लोकांस एका सत्तेखालीं एकत्रित करण्यांत आलें. ख्रि. पू. ३२०० त उरगुर हा सेमाइट आणि सुमेरियन ( अगडे आणि सिर्पुर्ले ) या दोघांवर अंमल चालवीत असे. त्याची राजधानी ऊर येथें असून त्यास देवालयें बांधण्याचा फार शोक होता. त्यानें ऊर येथें नन्नर देवतेकरितां टेमिला देवालय, इरेक येथें इस्टार देवाकरितां एअन्न देवालय आणि लार्सा येथें शामस देवतेकरितां एबर देवालय अशीं देवालयें बांधलीं. ही सर्व माहिती निप्पुर येथील पिरॅमिडच्या आकाराचा मनोरा आणि इतर प्राचीन लेख यांवरून कळते. ख्रि. पू. ३१५० त पहिला डुंगी हा राज्यावर येतो व आपल्या बापाचें धोरण पुढें चालवितो. यानें सुगीर, निप्पुर आणि कूथ या ठिकाणीं निनमर, निना, निंगिरसु, डम्गल नुन्ना आणि एआ या देवांचीं देवालयें बांधिलीं. वरील दोन्ही राजांपासून पुढें बराच कालपर्यंत वंशावळ चालू असावी. परंतु ही सर्व माहिती अज्ञात स्थितींत आहे.

**इरेकचें राज्य.**—ख्रि. पू. ३१००—३००० या कालांतलि शुद्ध सेमेटिक नांवाचे दोन राजे माहीत आहेत. यांपैकीं सिंगासिड हा या घराण्याचा बहुतेक संस्थापक असावा, आणि दुसरा सिनगमिल हा होय. या राज्याचा इतिहास म्हणजे ही दक्षिण बाबिलोन मधील एक जोरदार सेमेटिक वसाहत असून तीच पुढें हलके हलके स्वतंत्र होऊन सरतेशेवटीं इरेक ही राजधानी असलेलें हें एक निरांळेंच राज्य बनलें. याच्या इतिहासाचा धागा सिनगामिल राजानंतर आढळून येत नाहीं. ही माहिती राजवाडा, देवालयें व जुन्या देवालयांचा जिर्णोद्धार या संबंधीच्या प्राचीन लेखांवरून कळून येते.

**इसिनचें राज्य.**—इरेकच्या राज्याप्रमाणें या सेमेटिक राज्याची स्थापना उत्तरेकडे इसिन या ठिकाणीं झाली. या ठिकाणच्या राजांनीं निप्पुर, ऊर, एरिडु आणि इरेक या ठिकाणीं तेथील राजघराणीं नाहींशीं करून आपला अंमल बसविला. उत्तरकालीन राजे इसिन खेरीज सुमेर आणि अक्कड या ठिकाणचे अधिपती असल्याबद्दल स्वतःस म्हणवून घेतात. त्यावरून यावेळीं ऊरच्या दुसऱ्या घराण्याचें अस्तित्व दिसून येत नाहीं. ख्रि. पू. ३००० चे लिबिट इस्टार या संबंधीं पुष्कळ स्मारकावशेष आणि शिलालेख उपलब्ध आहेत. यांखेरीज इषबिगर, पहिला बुर्सिन, उर्निनिब, व इडिन डगन हे दुसरे राजे होत. ख्रि. पू. २८५० तला इश्मेडगन हा सुमेर व अक्कड येथील अधिपती म्हणवून घेणारा शेवटचा राजा होय. त्याचा मुलगा एन् अन्नटुम हा ऊरच्या तिसऱ्या राजघराण्याचा मांडलिक झालेला दिसून येतो. या हकीकतीचे बरेच शिलालेख उपलब्ध आहेत.

**ऊरचें तिसरें राजघराणें.**—या घराण्यांतील प्राचीन राजे आपणास केवळ ऊरचे राजेच म्हणवून घेतात. ख्रि. पू. २८०० त गुंगुनू हा इसिनच्या राजघराण्याचा शेवट लावतो. याच्या मागाहून दुसरा उर्गुर व दुसरा डुंगी हे राज्यावर येतात. या दोघांनीं पुष्कळ देवालयें बांधिली आणि दुसरा उर्गुर यानें आपल्या राजधानीभोंवती एक मोठा तट बांधिला. यावरून याला शत्रूकडून बराच त्रास झाला असावा असें दिसतें. उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून सिर्पुर्लेच्या पटेसींचें अस्तित्व यावेळींहि सिद्ध होतें. ही माहिती देवालयांतील कित्येक शिलालेखांवरून कळते. ख्रि. पू. २७०० तील तिसरा डुंगी या राजापासून पुढचे सर्व राजे आपणास जगाच्या चाऱ्ही दिशांचे अधिपती म्हणवितात आणि या कारणामुळें कांहीं विद्वान याच राजाला चौथ्या राजघराण्यांतील पहिला राजा समजतात. याच्या मागून दुसरा बर्सिन, गमिल्सिन आणि इनेसिन हे राजे झाले व यांपैकीं इनेसिन हा २५८० च्या सुमारास राज्य करीत होता. यांखेरीज दुसऱ्या राजांची माहिती उपलब्ध नाहीं. ख्रि. पू. २४५०—२४०० या सुमारास उत्तरेकडील बाबिलोन मधील पहिल्या राजघराण्याच्या वाढत्या सत्तेमुळें आणि दक्षिणेंत लार्सा येथील नूरअदाद याच्या वाढत्या सत्तेमुळें ऊर घराण्याची सार्वभौम सत्ता कमी झालेली दिसते. ही सर्व माहिती इमारती संबंधीच्या प्राचीन कागदपत्रांवरून कळून येते.

**लार्साचें राज्य.**—ख्रि. पू. २४०० या सुमारास दक्षिण बाबिलोन प्रांतानें ऊरच्या राजाविरुद्ध उभारलेल्या बंडांत विजय मिळविला, आणि नूरअदाद यानें लार्साच्या राज्याची स्थापना केली. ख्रि. पू. २३७०मध्यें नूरअदादच्या मागाहून सिनइदि हा गादीवर आला. आणि त्यानें आपली सत्ता सुमेर आणि अक्कड या प्रांतावर वाढविली. ख्रि.पू. २३५०मध्यें कुदूरननरवुंडी या नांवाचा एलामचा राजा दक्षिण बाबिलोन प्रांतावर स्वारी करितो. याच्या मागाहून कुदूरलागमर या राजाच्या कारकीर्दींत एलमाइट लोक लार्सा येथें रिन्‌झिन् ( एरिअकु ) याच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र राज्याची स्थापना करितात. रिन्‌झिन् हा सिनिद्दिनच्या पदव्या आपणा स्वतःकडे लावून घेतो. यामुळें सिनिद्दिन हा बाबिलोनचा राजा खमुरबी याच्याकडे मदत मागतो. आणि खमुरबी हा रिन्‌झिन् याचा पाडाव करितो.

**बाबिलोनचें राज्य.**—पहिला राजवंश ख्रि. पू. २४५०—२१५०—सुमेर आणि अक्कड यांच्या काळांत बाबिलोनचा उल्लेखहि आढळून येत नाहीं. परंतु अवांतर पुराव्यावरून इसिनच्या वर्चस्वकालीं ( ३०००—२८५० ) बाबिलोनच्या सत्तेचा थोडथोडा विकास झाला असावा. ख्रि. पू. २४५० त सुमुअबी हा बाबिलोनमधील ऊर घराण्याचा निःपात करितो, परंतु ही बंडाळी ऊर शहराबाहेर पसरत नाहीं. ख्रि. पू. २४४० त सुमुलइलू यानें बाबिलोन मध्यें सहा मजबूत किल्ले बांधिले. ख्रि. पू. २४०५त जबू यानें सिप्पर येथें एबर देवालय बांधिलें. यावेळीं बाबिलोन हें राज्यक्रांतीच्या स्थितींत असलेलें दिसतें. कारण यावेळीं इम्मेरू या नांवाच्या एका तोतयाचा उल्लेख केलेला आढळतो. ख्रि.पू.२२९०मध्यें आपिलसिन व २३७०मध्यें सिन्‌मुबालित या कारकीर्दीची फक्त स्मारकें उपलब्ध झालीं आहेत. ख्रि. पू. २३४२त हंमुरबी(खमुरबी) हा बायबलमध्यें उल्लेखिलेला अम्रेफेल नांवाचा अब्राहामचा समकालीन राजा असावा. यानें सबंध बाबिलोनप्रांत एका सत्तेखालीं आणिला. ख्रि. पू. २३१२ त सिनइद्दिनच्या विनंतीवरून त्यानें रिन्‌झिन्च्या आधिपत्याखालीं असलेल्या एलमाइट लोकांस लार्साबाहेर हाकलून लाविले आणि दक्षिण बाबिलोन आपल्या प्रांतांत सामील करून त्यानें स्वतःस ऊर, इसिन आणि लार्सा या प्रांताचा राजा म्हणविलें. आपल्या नव्या राज्याची भरभराट व्हावी म्हणून पाणीपुरवठ्याकरितां कालवे खणिले, आणि बाबिलोनमध्यें गव्हाकरितां एक मोठें कोठार बांधून बोर्सिप्पा येथील एझिडा आणि एसगिला यांचीं देवालयें वाढविलीं. ही माहिती करून देणारे बरेच कागदपत्र आणि शिलालेख उपलब्ध झाले आहेत. ख्रि. पू. २२८७-२१५० या कालांत या घराण्यांतील राजांनीं पूर्ण शांतता उपभोगिली. या काळांतील उपलब्ध झालेल्या थोडक्याच अवशेषावरून त्या काळांतील भरभराट व श्रेष्ठ दर्जाची सुधारण याविषयीं खात्री होते.

**दुसरा राजवंश**—ख्रि. पू. २१५९—१७८३. हा ऊरुअझकचा राजवंश म्हणतात. या ३६८ वर्षांच्या मुदतीमध्यें सुमेरियन वंशांतील अकरा राजांनीं राज्य केलें. या राजांविषयीं फार थोडी माहिती उपलब्ध आहे कारण या राजघराण्याचीं स्मारकें सांपडलीं नाहींत.

**तिसरा राजवंश.**— ख्रि. पू. १७८३-१२०७.- १७८३ त कोसियन किंवा कसाइट या नांवाचे लोक एलाम पर्वतांतून येऊन त्यांनीं गँडिश किंवा गॅडेश या नांवाचा पहिला राजा असलेल्या राजवंशाची स्थापना केली. या लोकांनीं टोळ्याटोळ्यांनीं सबंध देशभर फिरून बाबिलोन प्रांत मिळविला,आणि राजसत्ता संपादन केली. व बाबिलोनमधील उच्च संस्कृति व सुधारणा आतमसात केली. ख्रि.पू. १७००तील अगुम् काइम् हा या घराण्यांतील ज्याविषयीं बारीकसारीक गोष्टी माहीत आहेत असा पहिला राजा होय. खमुरबीपेक्षां यांचें राज्य मोठें होतें. पेडनप्रांत हा त्याच्या वर्चस्वाखालीं होता. पूर्वी जे कांहीं देवतांचे पुतळे दुसरीकडे नेण्यांत आले होते ते या राजाच्या कारकीर्दींत परत आणण्यांत आले. ख्रि.पू.१४५०त काराइंडश या राजाच्या कारकीर्दींत बाबिलोन व असुरिया या दोन राज्यांचा एकमेकांशीं प्रथमच संबंध आलेला दिसून येतो, तो म्हणजे काराइंडश यानें सरहद्दीबद्दल असुरियाचा राजा अशुर बेलनिशयेशु याच्याशीं केलेला तह हा होय. या कारकीर्दींत एअन्नाची देवता नेना इजप्रीत्यर्थ एक देवालय बांधण्यांत आलें. ख्रि. पू. १४३० त कदशमन्‌बेल हा राजा इजिप्तचा तिसरा अॅमेनहोटेप याच्याशीं समकालीन होता असें टेलएल अमर्नी येथें सांपडलेल्या कागदपत्रांवरून कळतें. ख्रि.पू. १४२०तील पहिला बूर्नबूरियश हा असुरीयाचा राजा बुझुर अशुर याचा समकालीन असून याजबरोबर बूर्नबूरियश यास सीमानिर्णय करतांना बऱ्याच अडचणी आल्या असाव्या असें दिसतें. यानें लार्सा येथें सूर्य देवतेकरितां एक देवालय बांधिलें आहे. ख्रि. पू. १४१० त पहिला कूरीगल्झ्यू याच्या नांवावरूनच डूरकूरिगल्झ्यू हें त्यानें जीर्णोद्धर केलेल्या एका शहरास नांव देण्यांत आलें असें अमर्नी कागदपत्रांवरून दिसतें. ख्रि.पू.१४००तील दुसरा बूर्नबूरियश याची कारकीर्द बरीच मोठी आणि भरभराटीची झाली असें अमर्नी कागदपत्रांवरून दिसतें. ख्रि. पू. १३७० त करखरंदस यानें असुरियाचा राजा अशुरउबलित याच्या मुलीबरोबर विवाह केला. याचा मुलगा पहिला कदशमनखर्बे यानें सुतू प्रदेशावर स्वारी करून तो प्रदेश जिंकला आणि त्यामध्यें आपल्या प्रजेपैकीं कांहीं लोकांस वसाहत करण्यास परवानगी दिली. ख्रि. पू. १३६० या सुमारास कसाइट लोकांनीं बंड केलें. या लोकांनां असुरियन लोकांचें वाढतें वजन सहन न होऊन त्यांनीं राजास ठार मारिलें व नझीबूबश या नांवाच्या मनुष्यास राजा केलें. परंतु असुरियाचा राजा अशुर ऊबलित यानें त्याचा पाडाव करून त्यास ठार मारिलें. ख्रि. पू. १३५० त दुसरा कूरिगल्झ्यू यास असुरियन राजानें राज्यावर

बसविलें. कुरुगल्झ्यू यानें एलामवर स्वारी करून सूसा हें शहर जिंकिलें. यानें असुरियाचा राजा बेलनिररी याजबरोबर युद्ध केलें. खि. पू. १३४०-१२८६ या काळांत नॉझिमरुतश (१३४०), कदशमन तुरु, कदशमनबुरिया (१३३०), कुडुरबेल (१३०४-१२९६) शगरक्तिबुरियेश (१२९८-१२८६) या राजांच्या कारकीर्दीत बाबिलोन आणि असुरिया या दोन प्रांतांमध्यें युद्धें सुरू होतीं. खि. पू. १२८२-१२७५ असुरियाचा राजा पहिला टुकुलटी निनिब यानें बाबिलोन प्रांतावर स्वारी करून शहरांत प्रवेश केला आणि तेथील देवालयाचा खजिना लुटून मारडुक नांवाच्या देवास असुरिया देशांत नेलें. ही स्वारी बहुतेक बिबइशू याच्या कारकीर्दीत झाली असावी आणि बिबइशूच्या मागाहूनचे राजे बेलशुमइदीन, दुसरा खदशमन खर्बे आणि अदतशुमइदिन हे टुकूलटुनिनिब याचे बहुतेक मांडलिक असावेत व सात वर्षेंपर्यंत बाबिलोनचा खरा राजा टुकुलटुनिनिब हाच असावा. खि. पू. १२७० त बाबिलोनमधील लोक बंड करून असुरियन लोकांस बाबिलोन प्रांताबाहेर काढतात. खि. पू. १२६९ साली हे लोक आददशुम उसुर याला आपला राजा करितात आणि बाबिलोनी सत्तेचें पुनरुज्जीवन होतें. या सुमारास बाबिलोनी लोकांची असुरियावर स्वारी होऊन असुरियाचा राजा बेलकुडरउसुर हा मारला जातो आणि असुरियन प्रांताचा कांहीं भाग बाबिलोनमध्यें सामील होतो. खि. पू. १२३८--१२२४ मध्यें मेलिसिपक हा निनिबअपलेशर या असुरियन राजावर जय मिळवितो. खि. पू. १२२३-१२११ दरम्यान मारडुक अपल इदिन याच्या नेतृत्वाखालीं बाबिलोन प्रांताचा त्या सबंध खोऱ्यांत विस्तार होतो. खि. पू. १२१० तील या घराण्यांतील शेवटचे दोन राजे झमझुम इदिन आणि बेलशुमइदिन हे होत. खि. पू. १२०९ त बाबिलोन प्रांतावर अशुर्डन या असुरियन राजाची स्वारी होण्याचा पुष्कळ रंग दिसून येतो. खि. पू. १२०७ त सेमेटिक राज्यक्रांतीचा परिणाम असा होतो कीं, या घराण्याची समाप्ति होते.

**चौथा राजवंश.**—खि. पू. १२०७ ते १०७५ या कालांतील इसिन घराण्याची उत्पत्ति संशयित आहे. या वंशांत एकंदर अकरा राजे होऊन गेले परंतु त्यांपैकीं चारपांच राजांबद्दल पूर्ण अज्ञान आहे. खि. पू. ११३५ त पहिला नेबु काडरेझर हा पूर्वीप्रमाणें असुरियावर हल्ला करितो, परंतु त्याचा पराभव होतो. एलाम आणि लुलुबी या लोकांवर केलेल्या स्वाऱ्यांमध्यें त्यास जय मिळतो आणि सिरिया प्रांतामध्यें त्याचा प्रवेश होतो. ही माहिती बिट्‌कार्झियब्कू येथील हिर्टिमाडुक या देवतेस केलेल्या भूमिदानासंबंधीं शिलालेखावरून कळून येईल. खि. पू. १११० त मार्डुक-नदिन-अखे याच्या कारकीर्दीत असुरियाचा राजा पहिला तिग्लथपिलेसर हा बाबिलोन प्रांतावर स्वारी करतो, आणि मुख्य शहर ताब्यांत घेतो. खि. पू. १०८३ त मार्डुक शपिक झेरप्टी याच्या मृत्यूनंतर आददआपलइदिन नांवाचा एक पुरुष सिंहासन बळकावितो. खि. पू. १०७८ नबुशुम याच्या मृत्यूमुळें वरील राजवंशाची समाप्ति होते.

**पांचवा ते आठवा राजवंश.**—खि. पू. १०७५-७२८.—या कालांत थोडथोड्या कालापर्यंत राज्य करणाऱ्या राजघराण्यांची मालिका असुरियाच्या वाढत्या सत्तेबरोबर झगडतांना दृष्टीस पडते. खि. पू. १०७५ या सुमारास इराणी आखातावर तैग्रिस आणि युफ्राटिस यांच्या अनेक शाखांमध्यें असलेल्या सखल प्रदेशाचें राजघराणें सत्ता चालवीत असून या घराण्यानें बाबिलोनच्या इतिहासावर बराच परिणाम घडवून आणला आहे. या घराण्यामध्यें सिबरसिपक, एआ मुकिंझर व कशुनदिनअखे या तीन राजांनीं सुमारें २१ वर्षेंपर्यंत राज्य केलें. यांपैकीं पहिल्या राजाच्या कारकीर्दीत एलामाइट लोकांनीं सिप्पुर लुटलें व पुष्कळ नासधूस केली. या तिन्ही राजांनीं सिप्पुर येथील सूर्याच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला होता. खि. पू. १०५३-१०३३ याकालांत बिटबझीचा राजवंश अंमल चालवूं लागला. या वंशांतहि युल्बर-शकिनशुम, निनिब कुडुरउसुर, आणि सिलनिम शुकमुन या नांवाचे तीन राजे होऊन गेले, व त्यानंतर एलामच्या राजवंशांतील एकाच अप्रसिद्ध राजानें राज्य केलें. खि. पू. १०२७ आठवा राजवंश. बाबिलोनियन वंशांतील जोम कमी झाल्यामुळें या वंशाचा कसाई व इतर परकीय लोकांशीं संकर झाला. खि. पू. ७४० त नेबुनसिर (नबोनझर) हा आठव्या राजवंशांतील राजा सिंहासनावर येतो. हा वाङ्मयात्मक चळवळीचा काल होता. खि. पू. ७३२ त नेबुकाडनेझर हा राजा नेब्युशुमउकिनें याजकडून मारला गेला. खि. पू. ७३१ त किंझर हा नेब्युशुमउकिन यास पुन्हां सिंहासनावर बसवितो. असुरियाचा राजा तिसरा तिग्लथ पिलेसर हा बाबिलोन प्रांतांवर स्वारी करितो आणि बाबिलोनमधील देश्य राजांची सत्ता नामशेष करण्याचा निश्चय करितो. खि. पू. ७२८ त प्राचीन बाबिलोनी साम्राज्याची समाप्ति होऊन तिग्लथ पिलेसर हा बाबिलोन प्रांताचा राजा होतो.

**असुरियन साम्राज्य, प्रथमकाल.**—खि. पू. १८३० ते ११२०.—असुरिया प्रांत प्रथम बाबिलोनी लोकांकडूनच वसविला गेला. या वसाहतीचा काल जरी अनिश्चित असला तरी खि. पू. ३००० च्या सुमारास निनेव्हे हें अस्तित्वांत होतें. या प्रांतातील अगदीं प्रथमचे राजे तेथील मुख्य उपाध्याय असून ते बाबिलोन प्रांताच्या राजांचे मांडलिक असत. खि. पू. १८३०-१८१० मध्यें पहिले ज्ञात असलेले राजे (इशाक्के) इस्मेडगन आणि त्याचा पुत्र पहिला शमसिअदद हे होत. यानें अशुर नगरामध्यें अनु आणि अदर या देवतांकरितां एक मोठें देवालय बांधिलें. खि. पू. १८००-१७०० या वेळच्या इगुरकपकपू (दुसरा शमसी अदद) या राजाबद्दल फारशी माहिती नाहीं. व खल्लू आणि इरीशुम यांचा कालहि निश्चित नाहीं. खि. पू. १७०० त बेलकपकपू यानेंच प्रथम स्वतःस राजा म्हणवून घेतलें. आणि यावरून राजसत्तेची खरी संस्थापना यानेंच

केली असावी असा समज आहे आणि एसरहडन हा ज्या पुरुषाचा वंशज असल्याबद्दल मानतो तो बेलबनी नांवाचा राजा हाच असावा. ख्रि. पू. १७००–१४५० या असुरियन इतिहासांतील कालाची माहिती अगदीं अज्ञात आहे. १५२५ च्या सुमारास मेगिड्डोच्या युद्धानंतर असुरियाच्या राजानें तिसऱ्या टेहुटाइम्सला नजराणा पाठविल्याची गोष्ट मात्र आपणांस माहीत झाली आहे. ख्रि. पू. १४५० या सुमारास बाबिलोन प्रांताकडून असुरियाचें स्वातंत्र्य कबूल करण्यांत आलें. असुरियाचा राजा अशुरबेलनिशयेशु यानें बाबिलोनियाचा राजा काराइंडश याजबरोबर राज्याच्या सीमेबद्दल तह केला. ख्रि. पू. १४२० त बुझुरअशुर याचेहि बाबिलोनी लोकांबरोबर राज्यमर्यादेबद्दल तह झाले. ख्रि. पू. १४०० मधील दुसरा अशुरनदिन अखेर हा इजिप्तचा राजा चौथा अमेनहोटेप याशीं समकालीन असून त्यानें अशुर येथें एक राजवाडा बांधिला आहे किंवा दुरुस्त केला आहे. अमर्ना कागदपत्रांवरून ही हकीकत कळते. ख्रि. पू. १३७० या वेळीं अशुरउबलित या असुरियन राजाच्या मुबालितत शेरूआ नांवाच्या कन्येचा विवाह बाबिलोनचा राजा करखर्दस याजबरोबर करण्यांत आला. करखर्दसचा मुलगा पहिला कदशमनखर्बे मारला गेल्यामुळें असुरियन राजास बाबिलोनी सत्तेंत ढवळाढवळ करण्यास सवड सांपडली- आणि अशुरउबलित याचा नातू कुरिगल्झ्यू यास राज्यावर बसविण्यांत आलें. अशा रीतीनें बाबिलोन प्रांतावर असुरियांचें थोडेबहुत वर्चस्व होऊं लागलें. या सुमारास अशुर उबलित यानें शुबरीवर स्वाऱ्या केल्या. ख्रि.पू. १३६० त अशुरउबालितचा मुलगा बेलनिरारी यानें एलामाइट टेकड्यांच्या रहिवाशांस जिंकिलें व यामुळें दुसरा कुरिगल्झ्यू आणि बेलनिरारी या दोघांमध्यें लढाई होऊन बेलनिरारी यास जय मिळाला. आणि दोन्ही राज्यांतील सीमारेषांची नवीन व्यवस्था करण्यांत आली. ख्रि.पू.१३५०त त्याचा मुलगा पुडुइलु हा शूर योद्धा असून त्यानें आपल्या राज्याचा बराच विस्तार केला वगैरे माहिती कांहीं थोड्या शीलालेखांवरून कळते. त्याचा मुलगा पहिला अददनिरारी यानें शेजारचे देश जिंकण्याचें धोरण पुढें चालविलें व हस्तगत केलेल्या शहरांची डागडुजी करून आपल्या राज्यास बरीच मजबुती आणिली. याच्या नांवाची एक तलवार व एक प्राचीन लेख उपलब्ध आहे. ख्रि. पू. १३३० त याचा मुलगा पहिला शाल्मनसर यानें उत्तरेकडील लांबच्या प्रदेशांतून येणाऱ्या रानटी लोकांकडून त्रास न व्हावा म्हणून युफ्रेटिस आणि तैग्रिस या दोन नद्यांमध्यें वसाहतीची स्थापना केली. यानें उत्तरसीरियांतील मुर्सी नांवाचा प्रदेश आपल्या ताब्याखालीं आणिला आणि असुरियन लोकांनीं प्रथमच याच्या कारकीर्दींत युफ्रेटिस नदी ओलांडिली व अशा रीतीनें वाढणाऱ्या असुरियन सत्तेस बालिकपर्यंत किंवा युफ्रेटिस पलीकडे पसरण्यास वाव मिळाला आणि कॅला येथें नवीन राजधानी स्थापण्यांत आली. यावेळचे दोन विटांवरील लेख उपलब्ध झाले आहेत. ख्रि. पू. १२९० त याचा मुलगा पहिला टुकुलटिनिनिब यांच्या कारकीर्दींत असुरिया आणि बाबिलोन या प्रांतात पुन्हां यादवी सुरू झाली.

**द्वितीयकाल.** ख्रि.पू. ११२०–८८५.—११२० त पहिला तिग्लथ पिलेसर या वीर पुरुषानें असुरियन साम्राज्याची पुनश्च स्थापना केली. त्यानें एकंदर जिंकलेल्या प्रदेशाविषयीं स्वतःच मोठ्या अभिमानाचे उद्गार काढिले आहेत. युद्धांतील त्याचें शौर्य व शांततेच्या काळांतील त्याची सुव्यवस्थित राज्यपद्धति यामुळें त्याची योग्यता फार मोठी समजली जाते. याच्या कारकीर्दींत असुरियाची राजधानी कॅला येथून पूर्ववत अशुर येथें आणण्यांत आली, आणि एस्टार, अदद आणि बेल या देवतांचीं देवालयें व कित्येक राजवाडे पुन्हां बांधण्यांत आले. याच्या कारकीर्दीसंबंधीं हकीकत कॅला येथील अष्टकोनी शिलालेखांवरून कळून येते. ख्रि.पू. १०९०त तिग्लथ पिलेसरच्या मागाहून अशुरबेलकल आणि तिसरा शमसिअदद या दोन मुलांनीं बापाचे व्यवस्थेप्रमाणें राज्य चालविलें परंतु याच्या अमदानींत साम्राज्यसत्तेस आणि वैभवास थोडी उतरती कळा लागलेली दिसते. अशुरबेलकल यानें बाबिलोनचा राजा मार्डुक शपिकझर्मटी या राजाबरोबर शांतता पाळण्याबद्दल तह केला. पहिला शमासिअदद यानें निनेव्हे येथील इस्टार देवतेचें देवालय पुन्हां बांधिलें. एवढीच गोष्ट त्याजबद्दल माहीत झाली आहे. ख्रि. पू. १०५०–९५० या स्तिमित युगामध्यें असुरियाचें वैभव अगदीं कमी झालेलें दिसतें. या कालांत दुसरा अशुरनझिरपाल, एर्बअदद, अशुरनदिनअखे आणि अशुरएरबी या राजांनीं राज्य केलें. यांपैकीं शेवटच्या राजानें बराच प्रांत अरेमियन लोकांस सोडून दिला परंतु त्यानें फिनिशिया प्रांतावर स्वारी केल्याचें दिसून येतें. ख्रि. पू. ९५० यावेळच्या दुसऱ्या तिग्लथ पिलेसरनें स्वतःस किश्शटी आणि अश्शूर यांचा राजा म्हणवून घेतलें. ख्रि. पू. ९३० त याचा मुलगा दुसरा अशुर्डन यानें राज्य केलें. ख्रि. पू. ९११ त दुसरा अददनिरारी याच्या कारकीर्दींत बाबिलोन प्रांताशीं पुन्हां यादवी सुरू झाली. यानें बाबिलोनचा राजा शमस मुदमिक याचा व त्याच्या मागाहूनचा राजा नबुवशुमइकुन या दोघांचा पराभव केला. शेवटीं असुरियन शहरें बाबिलोन प्रांतास देण्यांत येऊन दोन्ही राष्ट्रांमध्यें शांततेचा तह घडवून आणण्यांत आला. ख्रि. पू. ८९० त दुसरा टुकुलटिनिनिब याच्या कारकीर्दींत कमजोरपणा जात चालला आणि त्यामुळें बाबिलोनचा त्रास कमी झाला. असुरियानें उत्तर आणि पश्चिमेकडे खंडणी मिळविण्यास आरंभ केला. आणि आर्मेनिया वगैरे प्रदेशांत या राजानें लुटालूट केली.

**तृतीयकाल.** ख्रि. पू. ८८५—७२२.—८८५ त तिसरा अशुरनाझिरपाल यानें एकदम परकीय प्रांतावर स्वाऱ्या करण्यास

सुरुवात करून दहा वर्षांच्या अवधींत पहिल्या तिग्लथ पिलेसर राजाचें उत्तर, पूर्व आणि पश्चिम दिशेस जिंकलेलें साम्राज्य पुन्हां परत मिळविलें. हे देश जिंकतेवेळीं त्यास पुष्कळ निर्दयपणाच्या गोष्टी व रानटी लोकांस शोभण्यासारखी जाळपोळ करावी लागून या जिंकलेल्या प्रांतांवर त्यानें जबरदस्त खंडणी बसविली. ख्रि. पू. ८७६या सुमारास अशुरनझिरपाल यानें पश्चिमेकडे मोठी स्वारी आरंभिली व याच्या आगमनाची वार्ता कळतांच कर्चेमिश पासून टायर शहरापर्यंत सर्व नगरांनीं नजराणे व खंडणी जलदीनें ठरविण्यास सुरुवात केली. या स्वारीच्या शेवटीं निनेव्हे येथील इस्टार देवतेच्या देवालयाकरितां इमारतीचें लांकूड जमा करण्यांत आलें. ख्रि. पू. ८६७ या सालीं कुमुक, कुर्खी आणि मेसियस पर्वतांसभोंवतालचा प्रदेश याजवर निकराची स्वारी करण्यांत आली. अशुरनझिरपाल यानें कॅला शहर पुन्हां बांधून लोअर झाब नदींतून शहरास पाणीपुरवठा करण्याकरितां एक कालवा तयार केला. या कारकीर्दीची सर्व हकीकत निमरुड येथें जमीनींतून उकरलेल्या राजवाड्यावरून व इतर कांहीं प्राचीन लेखांवरून उपलब्ध होते. ख्रि. पू. ८६० त दुसरा शाल्मनसर यानें आपल्या बापाची शेजारच्या प्रदेशावर स्वाऱ्या करण्याची परंपरा तशीच पुढें सुरू ठेविली. नैरी या प्रांतावर आणि इतर उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रदेशावर ८३० सालापर्यंत याच्या स्वाऱ्या सुरू होत्या. ख्रि. पू. ८५७ मेसापोटेमिया खोऱ्यांतील बिटआडिनी येथील अरेमियन लोक यांस जिंकून त्यांस कायमचें असुरियन सत्तेखालीं ओढण्यांत आलें. ख्रि. पू. ८५४ त शाल्मनसर यानें उत्तर सीरियांतील राजे इस्रायल आणि फिनिशिया या त्रिकूटावर हल्ला करून कॅर्कर या ठिकाणीं त्यांचा पराभव करून उत्तर सीरियांतील संस्थानावर त्यानें वार्षिक खंडणी बसविली. ख्रि. पू. ८५२ त बाबिलोनचा राजा मार्डुकनादिनशुम यानें आपला बंडखोर भाऊ मार्डुकबेलउसती याला चिरडून टाकण्याकरितां शाल्मनसरची मदत मागितल्यावरून शाल्मनसरनें बंड मोडून टाकिलें, आणि मार्डुकनदिनशुम हा असुरियाचा मांडलिक होऊन राज्य करूं लागल्यामुळें बाबिलोन प्रांतावर असुरियाचें वर्चस्व सुरू झालें. ख्रि.पू.८४९-८३४ तील पश्चिमेकडील स्वाऱ्यांचा परिणाम फक्त पुढील वाट मोकळी करण्याकडे झाला. दमास्कसचा राजा दुसरा बेनहद्दद आणि त्याचे दोस्त याजवर हल्ला करण्यांत आला. आणि जेहु प्रांतानें दमास्कसच्या विरुद्ध बाजूस मदत केल्यामुळें असुरियाचें इस्रायल प्रांतावर प्रथम बरेंच वर्चस्व झालें. ख्रि. पू. ८२७त शाल्मनसरचा मुलगा अशुर्दनिनआप्लि याच्या बंडाळीमुळें राज्यांत दोन तट पडले. ख्रि. पू. ८२५ त शाल्मनसर याचा मृत्यु. ही माहिती या राजाच्या युद्धकथा असलेला भाजलेल्या मातीच्या तुकड्यावर कोरलेला प्राचीन लेख, त्याचा पुतळा व त्यावरील लेख व बॅलाउट येथील द्वारावरील शिलालेख यांवरून कळते. ख्रि. पू. ८२३ त दुसरा शाल्मनसर याच्या दोन्ही मुलांत युद्ध होऊन सरतेशेवटीं चौथा शमसिअदद हा कायदेशीर राजा ठरला. ख्रि. पू. ८२२-८१४ मध्यें उत्तर, पूर्व आणि पश्चिम या दिशांकडील प्रदेशांनीं आपलें मांडलिकत्व कबूल करावें म्हणून त्यांजवर स्वाऱ्या करण्यांत आल्या. ख्रि. पू. ८१३ खाल्डियाची स्वारी. ख्रि. पू. ८१२ त बाबिलोनचा राजा मर्डुकबदत्सुइक्बी यानें खंडणी देण्याचें नाकारिल्यावरून त्याजवर स्वारी करण्यांत येऊन जय मिळाला. या कारकीर्दीसंबंधी शिलालेख उपलब्ध आहेत. ख्रि. पू. ८११ त तिसरा अददनिरारी यानें असुरियाचा दरारा पुष्कळ दूरवर पसरविला. : आणि पश्चिम दिशेकडे व मीड लोकांवर अनेक स्वाऱ्या केल्या, व जय मिळविले. ख्रि. पू. ७९६-७९५ यावेळीं बाबिलोनवर स्वारी करण्यांत येऊन तो पूर्णपणें असुरियाचा प्रांत झाला. यावेळीं राजानें बाबिलोनसारखीं असुरियामध्यें देवालयें बांधून व असुरियन धर्म-विधीमध्यें बाबिलोनी पद्धतींचा प्रवेश करवून त्यानें दोन्ही प्रांतांतील सर्व राष्ट्रीय भेद नाहींसे करण्याचा प्रयत्न केला. ही माहिती कॅला येथील देवालयांत सांपडलेल्या नेब्यूच्या पुतळ्यावरून आणि इतर शिलालेखांवरून मिळते ख्रि. पू. ७८२ त तिसरा शाल्मनसर याच्या कारकीर्दीत असुरियन सत्तेच्या ऱ्हासास सुरुवात होते. यानें केलेल्या दहा स्वाऱ्यांपैकीं सहा स्वाऱ्या असुरियाकडून नैरीप्रांत लुबाडून घेण्याचा प्रयत्न करीत असलेल्या उर्ह्तू प्रांताच्या वाढत्या सत्तेविरुद्ध करण्यांत आल्या. ख्रि. पू. ७७१ त तिसरा अशुरडन याच्या कारकीर्दीत असुरियन सत्तेचा ऱ्हास सुरू असून दमास्कस आणि सीरिया प्रांतांतील खटरिका याजवर स्वाऱ्या करण्यांत आल्या तसेंच बाबिलोन प्रांतावरहि दोन स्वाऱ्या करण्यांत आल्या. ख्रि. पू. ७६३-७५८ मध्यें राज्यांतील निरनिराळ्या भागांत पुष्कळशी बंडाळी माजली. ख्रि. पू. ७५४ त दुसरा अशुरनिरारी यानें अर्पड आणि नैरी यांजवर स्वाऱ्या केल्या, परंतु खंडणी जमविण्याचा कांहींच प्रयत्न झाला नाहीं. ख्रि. पू. ७४६ यावर्षी कॅलामध्यें बंड झालें व त्या बंडांत अशुरनिरारी व त्याजबरोबर तो संबंध राजवंश नाहींसा झाला.

**चतुर्थ काल.**—ख्रि. पू. ७४५-६०६—ख्रि. पू. ७४५ या सुमारास कॅला येथें उद्भवलेल्या बंडाळींत पुलु नांवाच्या एका अज्ञात वंशांतील मनुष्यानें राज्य बळकाविलें. त्यानें तिसरा तिग्लथ पिलेसर हें नांव धारण करून साम्राज्य वाढविण्यास आरंभ केला आणि प्रथम बाबिलोन प्रांतावर स्वारी केली. बाबिलोन प्रांत दक्षिणेकडे निप्पुरपर्यंत जिंकला गेला व तेथील राज्यव्यवस्था सुधारण्यांत आली. यानें नवीन वसाहती करण्याचें एक निश्चित धोरण ठरविलें आणि त्या ठिकाणीं गुन्हेगार लोकांस पाठविण्यास सुरुवात केली. नंतर त्यानें असुरियाच्या पूर्वेकडील त्रासदायक प्रदेश पादाक्रांत केला आणि आपला सेनापति अशुरदनिकअनि यास मीडिया प्रांतावर पाठविलें, परंतु ख्रि. पू. ७३७ मध्यें दुसरी

स्वारी करूनहि हा प्रांत स्वतंत्रच राहिला. यानंतर उत्तरेकडील उरर्तू येथील अर्गिस्टिस यानें मिळविलेल्या मुलुखावरील राजा दुसरा सर्दुरीस यानें उत्तरेकडील पुष्कळ राजांबरोबर तह केला होता त्याजविरुद्ध युद्ध पुकारिलें व या युद्धांत सर्दुरिस यास हार खावी लागली. ख्रि. पू. ७४२ यानंतर तिग्लथपिलेसरनें अर्पडवर स्वारी केली. यावेळीं शेजारच्या बऱ्याच संस्थानांनीं त्याला नजराणे पाठविले. उंकीच्या राजानें कांहीं कालपर्यंत नेट धरिला परंतु सरतेशेवटीं त्याचाहि मुलूख असुरियामध्यें समाविष्ट करण्यांत आला. ख्रि. पू. ७३९ यासालीं नैरी प्रांताचा कांहीं भाग काबीज करण्यांत आला. यानंतर तिग्लथपिलेसर यानें आपल्या विरुद्ध असलेलें सीरियन राजांचें मंडळ व त्याचा मुख्य पुढारी जूडा येथील ऊझिया यांचा बींमोड करण्याचें ठरविलें. ह्यामुळें इस्रायलच्या मिनहेमनें असुरियाची जबर खंडणी भरली. यानंतर तिग्लथपिलेसर यानें जूडा प्रांतावर स्वारी करण्याचें सोडून देऊन त्या मंडळांतील इतर राजांस दुर्बल करून त्यांजपासून खंडणी मिळविली. ख्रि. पू. ७३५ यावेळीं तिग्लथ पिलेसर यानें उरर्तु प्रांतावर केलेल्या स्वारीचा इतकाच परिणाम झाला कीं, तो देश जरी जिंकला गेला नाहीं तरी त्या देशाचा रग बरीच जिरली. ख्रि. पू. ७३४–७३२मध्यें सीरियामधील स्वाऱ्या होऊन दमास्कस काबीज करण्यांत आलें. जूडा प्रांतातील अहझ यानें मांडलिकत्व कबूल केलें व दुसरे कित्येक देश असुरियामध्यें सामील करण्यांत आले. गाझा प्रांतहि सामील करण्यांत आला. ख्रि. पू. ७३१–७२९ या सुमारास बाबिलोन मधील अंतस्थ कलह थांबविण्याकरितां स्वारी केली आणि तद्देशीय राजांस दूर करण्याचा त्यानें निश्चय केला. यापैकीं उर्कीझर याला पदच्युत करण्यांत येऊन बिटयेकिनचा मेरोडक बालाडन यानें असुरियाचें मांडलिकत्व कबूल केलें. ख्रि. पू. ७२८ तिग्लथ पिलेसर बाबिलोन प्रांताचा कायदेशीर राजा समजण्यांत आला. या सर्व माहितीचे प्राचीन लेख एसरहडन यानें बरेच छिनभिन्न करून टाकलेले उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणें निमरुड येथील शिलालेख व मातीच्या विटावरील लेख सुप्रसिद्ध आहेत. ख्रि. पू. ७२६ त चौथा शालमनसर हा गादीवर येतो. ख्रि. पू. ७२५ त इस्रायलचा हुशिया व इजिप्तचा शबाक या दोघांचें संगनमत होऊन ते दोघे खंडणी नाकारितात व शालमनसर हा सुमेरियाला वेढा देतो.

**सार्गोनाइड.**—ख्रि. पू. ७२२—६०६—७२२ दुसरा सार्गन नांवाचा एक नवीन राजा गादीवर येतो. यावर्षी समरियाचा पराभव होऊन तेथील रहिवाशी मेडियन पर्वतामध्यें काढून लावण्यांत आले, आणि त्यांची जागा कूथमधल्या वसाहतवाल्यांकडून भरण्यांत आली. ख्रि. पू. ७२१ त मेरोडकबलडन यानें बंड केलें आणि स्वतःस बाबिलोनचा राजा झाल्याबद्दल जाहीर केलें. सार्गननें त्याच्यावर स्वारी केली परंतु उपयोग झाला नाहीं. हामथ, गाझा आणि समरिया या प्रांतांत बंडें उद्भवलीं. ख्रि. पू. ७२० त या संयुक्त बंडवाल्यांचा राफिया येथें पराभव करण्यांत आला. ख्रि. पू. ७२०–७१० मध्यें सारख्या स्वाऱ्या चालू होत्या. उरर्तू प्रांत काबीज करण्यांत आला व उत्तरेकडील जमियत मोडण्यांत आली. ख्रि. पू. ७१७ सबंध देशांत असुरियन प्रांताधिकारी नेमण्यांत आले आणि कर्चेमिशची कारकीर्द संपुष्टांत आली. ख्रि. पू. ७१० त मेरोडकबलडन याचा पराभव झाला आणि सार्गन यानें बाबिलोन प्रांताचा शक्कनक (प्रांताधिकारी) अशी पदवी लावून घेतली. ख्रि. पू. ७०७ त डरशरूकिन् (खोरसाबाद) या नगरांतील त्याचा भव्य राजवाडा पूर्ण झाला, व पुढील वर्षी त्यानें या राजवाड्यांत प्रवेश केला. या राजवाड्याच्या भिंतीवर कोरलेले लेख व इतर कांहीं शिलालेख सांप्रत खणून काढण्यांत आले आहेत. ख्रि. पू. ७०५ त याचा मुलगा सिनाखेर्ब हा गादीवर आला. ख्रि. पू. ७०२ त यानें बाबिलोन प्रांतास भेट देऊन त्या ठिकाणीं बेलइब्नि यास राज्यावर बसविलें. ख्रि. पू. ७०१त सीरियन राजे आणि इजिप्तचा तिराहाक यांनीं सिनाखेर्ब याजविरुद्ध कट केला. यांवर असुरियाच्या राजानें फिनिशिअन शहरांवर स्वाऱ्या केल्या, आणि सीरियाचा बहुतेक भाग काबीज झाला. यावेळीं अल्तकूच्या युद्धामध्यें सिनाखेर्बच्या सैन्याचा रोगराईनें नाश झाला, आणि तो निनेव्हे या आपल्या राजधानीस परतला. ख्रि. पू. ७०० त बाबिलोनी लोकांच्या म्हणण्यावरून बेलइब्नि यानें असुरियाशीं शत्रुत्व धरिलें व त्यास मेरोडकबलडन आणि खाल्डियाचा मार्डुक उशेझिब हे दोघे येऊन मिळाले. सिनाखेर्ब यानें त्यांचा पराभव करून आपला मुलगा अशुर्नदिन शुम याला बाबिलोनच्या राज्यावर जाहीररीत्या बसविलें. ख्रि.पू.६९४त, एलाममध्यें राहिलेल्या खाल्डियन लोकांवर स्वाऱ्या करण्यांत आल्या. परंतु एलमाइट लोकांनीं अशुर्नदिनशुम याला पकडून नेर्गलउशेझिब याला गादीवर बसविलें. ख्रि. पू. ६९२ तं मोशेझिब मार्डुक यास बाबिलोनचा राजा करण्यांत आलें. एलमाइट यांजबरोबर बाबिलोनियन लोकांनींहि खाल्यूल येथें सिनाखेर्ब यास विरोध केला आणि स्वतःचा पूर्ण पराभव करून घेतला. ख्रि. पू. ६८९ तं सिनाखेर्ब यानें बाबिलोन प्रांताची नासधूस केली. ख्रि. पू. ६८८–६८२ तं सिनाखेर्ब याचा अरबस्तानांत प्रवेश. ख्रि. पू. ६८१ सिनाखेर्बचा त्याचे पुत्र नेर्गलशरएशीर आणि अदरमलिक यांजकडून वध करण्यांत आला. ख्रि. पू. ६८१ त एसरहडन हा आपल्या बापानंतर गादीवर आला. ख्रि. पू. ६८१–६७२ मध्यें साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांत उद्भवलेलीं बंडाळी मोडण्याकरितां ९ स्वाऱ्या पाठविण्यांत आल्या. ख्रि. पू. ६७२ तं सायडन शहराचा विध्वंस करण्यांत येऊन त्याच जागीं करअशुरअखेइदिन हें नवें नगर वसविण्यांत आलें. ख्रि.पू.६७०त एसरहडन हा तिराहाक यास शासन करण्याकरितां इजिप्तमध्यें गेला, व त्यानें मेंफिस काबीज केलें. यामुळें सर्व प्रांत एसरहडन यास शरण येऊन

एसरहडन यानें पुन्हां नवीन राज्यव्यवस्था केली. ख्रि.पू. ६६८ एसरहडन यानें राज्याचा त्याग करून आपला मुलगा शमसशुमऊकीन याला बाबिलोन प्रांताचा अधिकारी नेमून अशुरबनिपाल या नांवाच्या दुसऱ्या मुलास असुरियाच्या राज्यावर बसविलें. या संबंधीं माहिती इंजिल्टी येथील पोलादाच्या तुकड्यावरील लेख आणि इतर शिलालेख यांजवरून कळते. ख्रि. पू. ६६८ त अशुरबनिपाल याच्या कारकीर्दीस आरंभ झाला. ख्रि. पू. ६६७ तिराहाक यानें मेंफिस परत घेतल्यामुळें त्याचा पराजय करण्याकरितां इजिप्तमध्यें सैन्य पाठविण्यांत आलें. इजिप्शियन राजांनीं तिराहाक यास पुन्हां गादीवर आणण्याकरितां कट केल्यामुळें त्यांनां पकडून शासन करण्यांत आलें आणि टायरचा बाल नांवाचा राजा व दुसरे कित्येक राजे यांजकडून खंडणी उकळण्यांत आली ख्रि. पू. ६५५ त इजिप्तचा राजा पहिला प्सॅतेख यानें असुरियाचें वर्चस्व झुगारून दिलें. एलामवर याचवेळीं स्वारी करण्यांत आली. शमसशुमऊकीन यानें असुरियाविरुद्ध कट केल्यामुळें बाबिलोन प्रांतास खडतर शासन करण्यांत आलें. आणि एलाम व अरब आणि इतर सहाय्यकर्ते यांनीं शमसशुमऊकीन यास मदत केल्यामुळें त्यांची निर्दयपणें कत्तल करण्यांत आली. अशुरबनिपाल याची बांधकामाबद्दल प्रसिद्धि आहे. निनेव्हे येथील एकुरगल्कुरा या देवतेचें देवालय सुशोभित करण्यांत आलें. बाबिलोनमधील इसॅगिलचें बांधकाम पूर्ण झालें. बोर्सिप्पामधील एझिडा सुशोभित करण्यांत आले. निनेव्हे येथील राजवाडा पुन्हां बांधण्यांत येऊन एक मोठें ग्रंथसंग्रहालय तयार करण्यांत आलें. बाबिलोन आणि आर्बेला या प्रांतामध्यें मोठमोठीं बांधकामें करण्यांत आलीं. अशुरबनिपाल याची कारकीर्द शांततेच्या दृष्टीनें फार भरभराटीची झाली परंतु या कारकीर्दीत इजिप्त प्रांत ताब्यांतून नाहींसा झाला आणि दुसरे कित्येक प्रांतहि आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या मार्गास लागले. या कारकीर्दीसंबंधीं पुष्कळ प्राचीन कागदपत्रें निनेव्हेच्या ग्रंथसंग्रहालयांतून उपलब्ध झालीं आहेत. ख्रि.पू. ६२६–६०९मध्यें असुरबनिपालानंतर अशुरयेतिलइलिऊकीन सिनशुमलिसिर आणि सिनशरइष्कुम (शॅरॅकस) यांनीं राज्यें केलीं परंतु त्यासंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. ख्रि. पू. ६२५ या सुमारास असुरियामध्यें सीथियन लोक प्रथम आलेले दिसून येतात. त्यांनीं या प्रांतावर हल्ला करून कॅला शहर जाळिलें. ख्रि. पू. ६०९त सिनशरइष्कुम यानें बाबिलोन प्रांतावर स्वारी केली आणि बाबिलोनचा राजा नबोपोलासर यानें मंड येथील सिथियन लोकांशीं संगनमत करून निनेव्हे-शहरवर हल्ला केला. सिनशरइष्कुम यानें राजवाड्यास आग लावून दिली आणि स्वतः आगींत जळून मेला. निनेव्हे डरशरूकिन, अशूर या तिन्ही शहरांचा नाश करण्यांत येऊन मंड येथील सिथियन लोकांनीं असुरिया व त्याच्या उत्तरेकडील हेलीस नदीपर्यंतचा प्रांत ताब्यांत घेतला. बाबिलोनियन लोकांनीं दक्षिणभाग आणि सीरिओफिनिशिअन प्रदेश ताब्यांत घेतला; आणि अशा रीतीनें असुरियन साम्राज्याची समाप्ति झाली.

**बाबिलोनमधील नवीन साम्राज्य.**—ख्रि.पू. ६०६–५३८—नबोपोलासर हा ६२५च्या सुमारास बाबिलोन प्रांतावर आसुरियातर्फे अधिकारी नेमण्यांत आला व त्यानेंच पुढें राज्यपद स्वीकारून तो असुरियाचा एक बलाढ्य प्रतिस्पर्धी बनला. निनेव्हेच्या नाशानंतर जुन्या असुरियन साम्राज्यांतील त्याचा वाटा त्याला मिळाला. आणि त्यानें आपली कारकीर्द मोठ्या शांततेनें घालविली. इजिप्तचा राजा दुसरा (नेको)नेकू यानें बाबिलोनवर स्वारी केली. त्याच्या कारकीर्दीत बाबिलोन प्रांत मोठमोठ्या इमारतींमुळें सुस्थितींत होता. या कारकीर्दीत सिप्पुर येथें बेलिट देवाचें देवालय पुन्हां बांधण्यांत आलें. ख्रि.पू. ६०४–५६२ मध्यें नेबुकाडरेसर (नेब्यू कूडरउसुर) हा राजा होण्यापूर्वीच यानें कार्चेमिश येथें नेकूचा पराभव केला व जूडा प्रांतावर स्वारी केली. ख्रि.पू. ५९७ च्या सुमारास यरुशलेम दोनदा काबीज करण्यांत आलें. व जेहुयाचिन याला हार खावी लागली व त्याच्या जागीं जोशियाचा मुलगा मटेनिया याला झेडेकिया या नांवाखालीं राजा करण्यांत आलें. पुन्हां ख्रि. पू. ५८६ मध्यें यरुशलेम शहराची लुटालूट व नासधूस करण्यांत आली आणि तेथील लोकांस हद्दपार करण्यांत येऊन गेडेलिया यास अधिकारी नेमण्यांत आलें. ख्रि. पू. ५८५-५७३:—१३ वर्षेपर्यंत टायरचें राज्य राखण्यांत येऊन शेवटीं ५७३ मध्यें तेथील राजा दुसरा इथोबाल याला पदच्युत करण्यांत येऊन हा भाग बाबिलोन प्रांतांत सामील करण्यांत आला. ख्रि. पू. ५६७ या वर्षी दुसरा आह्मेस याच्या कारकीर्दींत इजिप्तवर स्वारी करण्यांत येऊन पुष्कळ लूट जमविण्यांत आली परंतु कायमचा फायदा असा कांहींच झाला नाहीं. या वेळच्या पुष्कळ प्राचीन शिलालेखांत शांततेचीं अनेक सुंदर कामें व मोठमोठीं विस्तृत बांधकामें करण्यांत आलीं. बाबिलोनचा तट पुन्हां बांधण्यांत येऊन अभेद्य करण्यांत आला. अनेक कालवे दुरुस्त करण्यांत येऊन पुष्कळ देवालयें आणि सिप्पुर लार्सा, ऊर, गिल्बत, बाझ आणि इरेक या शहरांभोंवतालच्या भिंती पुन्हां बांधण्यांत आल्या. या वेळचे पुष्कळ शिलालेख उपलब्ध आहेत. ख्रि. पू. ५६२ त अमिलमार्डुक (बायबलग्रंथामधील एव्हिलमेरोडॅक) याजबद्दल शिलालेख उपलब्ध नाहींत. याचा पुढील राजाकडून खून करण्यांत आला. ख्रि. पू. ५६० त नेर्गलशरउसूर याच्या कारकीर्दीत बाबिलोन प्रांताचा विस्तार होऊन त्यास पुष्कळ शोभा आली. एशगिलचें देवालय अलंकृत करण्यांत आलें. कालवे पद्धतीचें नियमन करण्यांत आलें. ख्रि. पू. ५५६ त लाबाशीमार्डुक हा राजा राज्यावर येऊन ९ महिन्याच्या कारकीर्दीनंतर त्याचा वध करण्यांत आला. ख्रि. पू. ५५५ त नेब्युनैद (नबोनिडस) हा एक त्रयस्थ मनुष्य राजा गादीवर बसला.

यानें बांधकाम आणि देवालयांची सुधारणा करण्यांत आपला वेळ घालविला. थुल्बार देवालय आणि बाबिलोनियन प्रांतातील सिप्पुर आणि खरन हीं देवालयें पुन्हां बांधण्यांत आलीं. ख्रि. पू. ५३९ त बाबिलोन प्रांतावर एलाम आणि पर्शिया येथील राजा सायरस यानें स्वारी केली. ख्रि. पू. ५३८ त सिप्पुर नगर घेण्यांत येऊन बाबिलोनप्रांत सायरसच्या हातांत गेला व सायरसनें शहरामध्यें मोठ्या इतमामानें प्रवेश केला. या वेळेपासून बाबिलोन प्रांत हा इराणी सत्तेखालीं गेला.

बाबिलोनिया, असुरिया व त्या सभोंवतालच्या प्रांतांच्या तत्कालीन संस्कृतीची कल्पना येण्यासाठीं तेथें शहरांचा कितपत विकास झाला होता याचाहि विचार केला पाहिजे. देशाची संस्कृति शहरांत केंद्रित झालेली असते या साठीं या प्रदेशांतील अत्यंत प्राचीन शहरांची पुढें दिलेली माहिती महत्त्वाची आहे.

**अक्कड.**—हें हिब्रू नांव असून फक्त एकदांच जुन्या करारांत (जे.१०-१०) आलें असून शीनार किंवा बाबिलोनिआ ह्या प्रांतांतील निमरूडच्या राज्यांत जीं मुख्य चार शहरें आहेत त्यांपैकीं एक आहे. तीं चार शहरें म्हणजे अक्कड, बाबेल, इरेक व काल्ने हीं होत. हें बायबलांतील शहर म्हणजे बहुशः उत्तर बाबिलोनियांत ज्ञात असलेले 'अगडे' शहरच असावें. हें अगडे शहर प्राचीन बाबिलोनिअन राजा पहिला सार्गन ह्याची राजधानी होती. त्या राजाचा काल, बाबिलोनियाचा शेवटचा सेमिटिक राजा नबोनिडस ( इ. सना पूर्वी ५५५-५३७) यानें इ. सनापूर्वी ३८००हा दिला आहे. 'अगडे' हें नांव सेमिटिक नसून पुष्कळशा प्राचीन शिलालेखांत आढळतें व हें एका प्राचीन महत्त्वाच्या राजधानीचें नांव असल्याचें पूर्णपणें सिद्ध झालें आहे. बाबिलोनी वाङ्मयांत राजांच्या उपपदांत सुमेर शहराबरोबर याचा उल्लेख आढळतो.

**एकर.**—तिसऱ्या टेथमोसि (थॉथमिस १५०० ख्रि. पू.) याच्या खंडणीच्या यादींत एआक नांव आहे. हेंच एकर असावें. अमर्ना पत्रव्यवहारांत एका म्हणून उल्लेखिलेलें शहर एकर असावें. हिब्रू लोक याला एको म्हणत. हें सर्व सिरिया प्रांतांत महत्त्वाचें होतें. ख्रि. पू. ७२५ मध्यें शालमनसरच्या विरुद्ध सिडॉन व टायर यांच्या बाजूनें हें बंडांत सामील झालें होतें.

**अपामिया.**—असुरियन लेखांतील तिलनारसिप व आधुनिक बिरेजिक युफ्रेटिसच्या पश्चिम तीरावर.

**अरबला.**—अदियाबेनमधील एक प्राचीन शहर. असुरियन व तत्पूर्वकालीं लहान व मोठ्या झाब नद्यांच्या मधील प्रदेशाची राजधानी होतें. एस्टार संप्रदायाचें महत्त्वाचें ठिकाण. अलेक्झांडरनें डरायसचा पराभव ख्रि. पू. ३३१त या ठिकाणीं केला.

**असुर.**—असुरियाची राजधानी.तैग्रीसच्या पश्चिम तिरावर. या शहराचें नांव देवतेवरून पडलें कीं, देवतेस नांव शहरावरून पडलें हें गूढ आहे. पुरोहित राजे होते. प्रथम बाबिलोनियाचे अंकित, पुढें स्वतंत्र. अनु व हदाद यांचीं मोठीं व बेल आणि एस्तार यांचीं लहान देवळें आहेत.

**अॅस्कॅलन.**—पांच मुख्य फिलिस्टाइन शहरांपैकीं एक. भूमध्य समुद्रावर गाझाचे उत्तरेस १२ मैलावर आहे. येथें मत्स्य देवता डरकेटोची पूजा होत असे. हें शहर इस्राएलांच्या ताब्यांत कधींच नव्हतें. बायबलमधील सॅमसनसंबंधीं गोष्ट दुसऱ्या शहरासंबंधीं असावी. सिनाखेरबनें ख्रि. पू. ७०१ मध्यें हें काबीज केलें.

**बिसमिया.**—तैग्रिस नदीजवळ निपुरच्या आग्नेयीस. येथें पूर्वी एक शहर व देऊळ होतें. येथें ख्रि. पू. ३००० वर्षांचे नरमसीन व सारगनचे अवशेष सांपडले आहेत. व शिलालेख सांपडले आहेत.

**बोरसिप्पा.**—बाबिलोनच्या नैऋत्येस १५ मैलांवर ग्रामदेवता नेबो अथवा नबु होती. खमुरबीनें बाबिलोन राजधानी केल्यावर ( ख्रि. पू. २००० ) हें उदयास आलें. यानें एझिदा देऊळ मार्डुक याचें बांधलें. पुढें नेबो (मार्डुकचा पुत्र) याची स्थापना झाली.

**कॅला.**—निनेव्हेच्या दक्षिणेस १९ मैलांवर असुरियाची राजधानी होतें. हें इ. स. पू. १३०० च्या सुमारास शालमानसर( पहिला )यानें बांधलें. असुरनाझिरपाल ( ८८० ख्रि.पू.) यानें पुनरुज्जीवन केलें.

**दमास्कस.**—हें सध्यां अस्तित्वांत असलेल्या सर्वांत जुन्या शहरांपैकीं एक आहे अशी समजूत आहे.इजिप्तची सत्ता पॅलेस्टाइनवर होती त्यावेळीं उबी प्रांताची राजधानी होतें.

**एडम.**—येथील प्राचीन रहिवाशी शासु ( तिरंदाज ) होते. जुन्या करारावरून असें दिसतें कीं, एडम येथील लोकांनीं मूळच्या होराइट(गुहानिवासी)लोकांस हांकून दिलें. हें इस्रायलांपेक्षां प्राचीन राष्ट्र आहे.

**एलाम.**—हें इराण देशाबद्दल बायबलांत नांव आढळतें. इराणला प्राचीन भूगोलवेत्ते सुसियाना म्हणतात. हें अक्कडच्या सारगननें जिंकलें त्यावेळीं सुसा हें तटबंदीचें शहर होतें व बाबिलोनियाचा सुभेदार तेथें रहात होता. ख्रि.पू.२२८०त कुतुर नाखखुन्ते नांवाच्या एलामच्या राजानें बाबिलोनियावर स्वारी करून इरेक येथील नना देवीची मूर्ती नेली. याच घराण्यांतील उन्तास गाल नांवाचा राजा इमारती बांधण्याबद्दल प्रसिद्ध होता. सुत्रुक नाखखुन्ते यानें (ख्रि. पू १२२०) बाबिलोनियावर स्वारी करून तेथील राजास ठार मारिलें व नरमसिनचा स्तम्भ व सिप्पुर येथील खमुरब्बी कोड व अक्कडचा तनिस्तुसुचा स्तम्भ बरोबर आणले. यानेंच असुनाक देश जिंकला.

**इरेक.**—बाबिलोनियांतील प्रसिद्ध शहर इलाम विरुद्ध लढाईंत पुढें आलें ( ख्रि. पू. २००० ). पुढें विद्येचें माहेरघर

म्हणून प्रसिद्ध. असुर बनि पाल यानें येथून निनेव्हेस ग्रंथ नेले.

**एरिडु.**—राजकीय महत्त्व नाहीं. इआ देवाची पूजा बाबिलोनियन काळांत.

**गाथ-गाझा**—फिलिस्टाइन शहरें. व्यापारी मार्गावर.

**गेऱ्हा**—येथें बाबिलोनियांतील हद्दपार केलेले लोक रहात.

**हेरा.**—हें व्यापारी मार्गावरील महत्त्वाचें शहर. उल्लेख ख्रि. पू. ११००.

**हारेब.**—कानानाइट लोकांचा देव याह्वे यांचें स्थान.

**यरुशलेम.**—इस्रायलापूर्वी जेबुसाइट लोक होते. इजिप्शियन सत्ता होती.

**लगाश.**—हें बाबिलोनियांतील सुमेरियन संस्कृतीचें माहेरघर. ख्रि. पू. ४०० च्या सुमारास लगाश हें फार महत्त्वाचें शहर होतें. उरनिनाब याचे वंशज या ठिकाणीं स्वतंत्र राजे होते, नंतर सेमेटिक लोकांनीं घेतलें. परंतु उर, उरगुर, डुंगी येथील राजाश्रयाखालीं लगाशच्या कलेचा उत्कर्ष होत राहिला. येथून बऱ्याच दूरवर व्यापार चाले. अवशेष १८७७त फ्रेंच कॉन्सल अर्नेस्ट सार्झेक यानें शोधून काढले.

**लार्सा.**—एरेकच्या आग्नेयीस १५ मैलावर. उरगर राजाच्या वेळेस (ख्रि.पू. २८००–२७००) उल्लेख सांपडतो. या राजानें एबाबर शमाश (सूर्यदेवता) इचें मंदीर दुरुस्त केलें.

**लिसिया.**—लिसियनांचा उल्लेख अमर्ना कागदपत्रांत सांपडतो (ख्रि. पू. १४००). हे प्रथम लिसिअन किनाऱ्यावर स्थाइक झाले. हे पूर्वी चांचे असावे (लिसिअन अथवा लुक्की).

**लिडिया.**—येथें कांहीं हिटाइट अवशेष सांपडले आहेत. येथें ॲटिस ही सूर्यदेवता होती. इच्या पुजारिणी सशस्त्र असत.

**निनेव्हे.**—येथें एस्तार देवीचा संप्रदाय होता. तिचें दुसरें नांव निना हें होतें. या शहराचा इतिहास म्हणजे सर्व असुरियाचा इतिहास होय. पहिल्या शालमनसरनें एस्तारचें देवालय समरी हदाद यानें बांधलें असें आपल्या लेखांत म्हटलें आहे. याचा जीर्णोद्धार असुर उबलितनें केला (ख्रि. पू. १३०० पू.).

**निप्पुर.**—हें बाबिलोनियांतील अतिप्राचीन शहर. सुमेरियन देव एनलिल याचें हें मुख्य स्थान होतें. युफ्रेटिसचा एक प्रवाह यामधून वहात होता. ख्रि. पू. चवथ्या सहस्रकांत हें एनलिल देवळामुळें प्रसिद्ध होतें. राजकीय दृष्ट्या याला मुळींच महत्त्व नव्हतें. तिसऱ्या सहस्रकारंभीं अक्कडच्या सेमिटिक राजांनीं हें जिंकून घेतलें होतें. नंतर उर येथील पहिल्या सेमिटिक घराण्याची सत्ता सुरू झाली. उरगुर यानें देऊळ चांगलें बांधलें. एका विटेवर देवळाचा नकाशा सांपडला आहे. द्वितीय सहस्रकांत खमुरबीनें बाबिलोनिअन साम्राज्य स्थापन केल्यामुळें बाबिलोनचें महत्त्व वाढून निप्पुरचें कमी झालें. यानंतर या शहराकडे ख्रि. पू. ८ व्या शतकाच्या शेवटीं सारगन व ७ व्याच्या शेवटीं असुरबनिपाल यांनीं लक्ष देऊन येथील पूजा व महत्त्व वाढविलें. मंदिराच्या आवारांत सुमारें ४०,००० विटालेख व इतर अवशेष सांपडले. यांत शाळापाठ, क्रमिक पुस्तकें, गणिताचीं कोष्टकें, वाङ्मयात्मक लेख, व एका राजवाड्यांत इराणी व्यापारी दप्तर सांपडलें. येथील लेखांवरून ५००० वर्षांपूर्वींपासून मध्ययुगापर्यंत सुसंगत इतिहास लावितां येतो. यांतील लेखांत जलप्रलयाची कथा आहे.

**फ्रिजिया.**—फ्रिजियन लोक फार प्राचीन असून यांची भाषा म्हणजे मूळ मानवजातीची भाषा अशा ग्रीक दंतकथा आहेत. या प्रांतांत हिटाइट स्मारकें सांपडतात. प्राचीन फ्रिजियन कलेचा कॅपॅडोशिअन कलेशीं संबंध असावा. ग्रीक कलेचा उगम फ्रिजियामधून झाला असावा. होमरनें फ्रिजियाचा उल्लेख केला आहे. ख्रि. पू. ८ व्या व ९ व्या शतकांत फ्रिजिया व ग्रीक यांचा संबंध दिसतो.

**प्तेरिया.**—१९०६ सालीं बर्लिन येथील विंक्लेर यानें जे अवशेष शोधून काढले त्यावरून येथें ख्रि. पू. १६०० ते १२०० पर्यंत हट्टि घराणें राज्य करीत असून या शहराचें नांवहि हट्टि असावें असें दिसतें.

**समोसत.**–एक हिटाइट केंद्र. कांहीं अवशेष सांपडतात.

**सिडोन.**—फिनिशिअन राजधानी. येथें जुने अवशेष, दगडी शवपेटिका, खोदकाम, रंगीत काम वगैरे सांपडतात.

**सिपारा.**—सूर्य देवाचा व देवी अनुनितचा असे दोन भाग बाबिलोनियन कालांत होते. दुसरीं दोन सिपारा शहरें प्राचीन शिलालेखात उल्लेखिलेलीं आढळतात. यांपैकीं एक अक्कड असावें. नोव्हानें येथील देवळांत जलप्रलयापूर्वीची इतिहाससामुग्री ठेविली, अशी दंतकथा प्रचलित आहे.

**सोलाय.**—ट्रोजन युद्धानंतर ॲकॉमास यानें हें वसविलें अशी दंतकथा आहे. येथें लोहयुगापूर्वीचे अवशेष आढळत नाहींत. असुरबानिपाल याचा मित्र सिलुचा हारिसु हा होता. सिलु हेंच सोलाय असावें असा कांहींचा तर्क आहे.

**सुमेर.**—हें नांव अक्कड बरोबर शिलालेखांत आढळतें सुमेर व अक्कडचा प्रदेश म्हणजे सर्व बाबिलोनिया असा समज होता. सुमेर म्हणजे दक्षिण बाबिलोन व अक्कड म्हणजे उत्तर बाबिलोन असा समज होता.

**टायर.**—फिनिशियांतील प्रसिद्ध शहर.

**उर.**—बाबिलोनियन शहरांपैकीं प्रसिद्ध शहर. येथें एननारचें प्रसिद्ध मंदिर होतें. येथें ननार (नंतरची सिन) या चंद्रदेवतेची पूजा होत असे. हें अब्राहामचें मूळ गांव असा बायबलांत उल्लेख आहे. हें राजकीय व व्यापारी दोन्ही दृष्टींनीं सुमेरियन काळांत (ख्रि. पू. ३०००) फार प्रसिद्ध होतें. सेमेटिक सत्तेखालीं उरगर अथवा उरएनगुर राजाच्या सत्तेखालीं हें फार प्रसिद्धीस आलें. याचें दक्षिण व

उत्तर बाबिलोनियावर वर्चस्व होतें. खमुरबीनें बाबिलोनियन साम्राज्य स्थापन केल्यामुळें ( ख्रि. पू. २००० ) याचें महत्त्व कमी झालें.

येणेंप्रमाणें तत्कालीन असुरिया, बाबिलोनिया हे देश व त्यांच्या असामंतांतील शहरें यांविषयींची माहिती करून घेत. त्यानंतर आपण त्याच्या आसपासचे प्रदेश व तेथील प्राचीन लोक यासंबंधीं काय माहिती मिळते तें पाहूं.

---

## प्रकरण ५ वें.

### असुरकालीन आशियांतील राष्ट्रें व संस्कृती.

असुरराष्ट्र वैभवांत असतां त्याचा आशियामायनरमधील तत्कालीन अनेक राष्ट्रांशीं संबंध आला. अशा राष्ट्रांपैकीं विशेष प्राचीन म्हणजे हिटाइट व मिटनी हीं राष्ट्रें होत. परंतु त्यासंबंधीं आज आपणांस विशेष माहिती नाहीं. कीलाकृति शिलालेखांचें वाचन व मेसापोटेमियांत चाललेलें संशोधन या राष्ट्रांविषयीं नवी नवी माहिती रोज उजेडांत आणीत आहे व कांहीं दिवसांनीं या राष्ट्रांचा सुसंगत इतिहास लिहितां येण्यासारखी साधनसामुग्री उपलब्ध होईल अशी आशा आहे. यानंतर दुसरें महत्वाचें राष्ट्र पॅलेस्टाइनमधील यहुद्यांचें होय. या राष्ट्रानें जुना करार नामक वाङ्मय उत्पन्न करून सेमेटिक संस्कृतीस चिरकालित्व आणलें आहे. पुढें नवा करार व ख्रिस्ती संप्रदाय यांस जन्म देऊन जगाच्या बऱ्याच मोठ्या भागास ऋणी करून ठेवलें आहे व वाङ्मयोत्पादनानें आपल्या विषयींचा इतिहास बराचसा सुसंघटित स्वरूपांत कायम ठेवला आहे. लिपीची उत्पत्ति इत्यादि अनेक सुधारणांचा उगमहि या संस्कृतींत झाला असें मानण्याची बऱ्याच पाश्चात्त्य पंडितांची प्रवृत्ति आहे. संप्रदाय स्थापनेच्या कामांत जसें यहुदी राष्ट्राचें नांव ऐकूं येतें तसें व्यापाराच्या कामांत फिनिशिअन राष्ट्राचें नांव ऐकूं येतें. या राष्ट्रानेंहि व्यापाराच्या कामांत बरीच प्रगति करून आपल्या वसाहती दूरदूरच्या अनेक ठिकाणीं स्थापन करून संस्कृतिप्रसारास मदत केली व अनेक धाडसी सफरी करून आफ्रिकेला वळसा घालून भौगोलिक ज्ञानांत बरीच भर घातली व एका काळीं रोमसारख्या बलाढ्य राष्ट्राचें जीवितहि साशंकित केलें.

याखेरीज त्यावेळीं आशियामायनरमध्यें कमी अधिक महत्त्वाचीं सिरिया, लिडिया, साबिअन, अरेमियन, मायसिनी, बिथ्रिअन वगैरे राष्ट्रें होतीं व आशियामायनरबाहेर पूर्वेकडे मीडिया, इराण, मंगोल व चीन हीं राष्ट्रें होतीं. चीनशिवाय हीं सर्व राष्ट्रें त्यावेळीं बाल्यावस्थेंत होतीं व त्यांनीं आपणांमागें स्वतःचें असें विशेष कांहीं ठेवलें नाहीं. आतां आपण क्रमाक्रमानें एक एका राष्ट्राच्या संस्कृतीचें विवेचन करूं. प्रथम सर्वांत प्राचीन हिटाइट व मिटनी हीं राष्ट्रें घेऊं.

**हिटाइट अथवा हट्टि राष्ट्र व संस्कृति.**— हे लोक अतिप्राचीन काळीं सिरिया व पूर्व आशियामायनर या प्रदेशभर पसरलेल्या एका मानवजातींतील होते. इ. स. पू. १६ व्या शतकांत त्यांनीं प्रथमच उत्तरकालीं कॅपॅडोशिया नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रांतांत आपलें एक बलिष्ठ राष्ट्र निर्माण केलें. सुब्बिलुलिउम हा त्यांचा पहिला मोठा राजा होऊन गेला; याच्या आधीं खत्तुशील नांवाचा निदान एक तरी राजा झाला असावा. या वेळीं हट्टी लोक मोठ्या जोमानें दक्षिणेंत घुसले. त्यांनीं मिटनि लोकांचें राज्य पादाक्रांत केलें व उत्तर सिरिया आणि पश्चिम मेसापोटेमिया हे देश कांहीं अंशीं व्यापण्याकरितां व कांहीं अंशीं मांडलिक बनविण्याकरितां ते पुढें सरसावले; या देशांत त्यांचे कांहीं सजातीय अगोदरच येऊन राहिले होते. लवकरच त्यांचें इजिप्तशीं वितुष्ट आलें आणि दुसऱ्या खत्तुशीलच्या अमदानींत यांच्या सत्तेची वरकमान असतांना दुसऱ्या रामेसीस बरोबर हे कडेशची लढाई खेळले. या लढाईचा निकाल अनिश्चितच झाला पण या लढाईंत त्यांचें सामर्थ्य त्यांच्या प्रतिपक्षाच्या सामर्थ्यापेक्षां मुळींच कमी दिसून आलें नाही. या व यापूर्वींच्या काळच्या हट्टी राजांच्या राजकीय पत्रव्यवहारावरून असें दिसून येतें कीं, ते इजिप्त व बाबिलोनी दरबारांशीं व्यवहारदृष्ट्या समान दर्जाचें वर्तन ठेवीत; आणि सिरियामध्यें विशेषतः ॲमोराइट जातींशीं त्यांचें एकसारखें युद्ध चालू असे. या काळीं हट्टींच्या साम्राज्यसत्तेखालीं पश्चिमेकडील फ्रिजिया व लिडिया हे दोनहि देश येत असावेत. दुसऱ्या खत्तुशीलच्या पुढील पिढींत बोगझकुइ येथील पत्रव्यवहाराला फारसें महत्व राहिलें नाहीं व यानंतर दोन शतकांनी सुरुवात झालेल्या असुरी बखरीवरून त्या वेळीं कॅर्केमिश हें प्रमुख हट्टी शहर असून, उत्तर सिरियालाच हट्टिस्थान म्हटलेलें आढळतें. तेव्हां असें शक्य दिसतें कीं, हट्टी लोकांनां जेव्हां इजिप्तची भीति वाटेनाशी झाली तेव्हां साम्राज्यकेंद्राचें उत्तरसिरियांत स्थलांतर झालें. असें असेल तर, पुढील हट्टींचा इतिहास बोगझकुइ येथील अवशेषांत न पाहातां जेरॅब्रस आणि इतर मध्ययुफ्रेटिस नदीकांठचीं स्थळें यांतील अवशेषांत पाहावा लागेल. कर्चेमिस येथील हट्टीलोकांच्या वसाहतीमुळें ते पुरे व्यापारी बनून त्यांच्यांतील डोंगरी ताकद नाहींशी झाली; इतकेंच नव्हे तर असुरियाच्या वाढत्या उत्तरसेमिटिकमधील सत्तेशीं त्यांचें निकट सान्निध्य होऊं लागलें. दुसऱ्या खत्तुशील राजाला या सेमिटिक सत्तेच्या प्रादुर्भावाची भीति वाटत असे. याच्या नंतरच्या अनौंत नांवाच्या एका राजाला असुरी लोकांची जाचणी वाटूं लागली होती आणि यापुढें अजमासें एक शतकानंतर, पहिला तिग्लथ पिलेसर याच्या राज्यारोहणापासून हट्टी सत्ता नाहींशी करण्याची असुरी लोकांची प्रयत्नपरंपरा सुरू झाली. निनेव्हेच्या सैन्यांनीं उत्तर सिरिया आणि आग्नेय आशियामायनर यांवर स्वाऱ्या करून हळू हळू हट्टी लोकांचा बीमोड

केला. तथापि हट्टी लोकांनीं पुष्कळ काळपर्यंत मोठ्या नेटानें त्यांचा प्रतिकार केला व सिरिया आणि पूर्व-आशियामायनर या ठिकाणीं इ. स. १००० वर्षें पर्यंत सर्वांत जास्त वर्चस्व यांचेंच होतें; व नवव्या शतकाच्या उत्तरार्धांत असुरी लोकांची सत्ता बरीच वाढेतोंपर्यंत हट्टींचें सिरियांतील स्थान नाहींसें झालें नाहीं. ह्यावेळपावेतों यांच्या कॅपॅडोशिया प्रांताची काय स्थिति होती याची आपणांस अद्याप माहिती मिळत नाहीं; पण प्राचीन काळीं जेथें यांचें चांगलें वर्चस्व होतें त्या एउयुक आणि टॅना येथील फ्रिजिअन शिलालेखांच्या अस्तित्वावरून असें दिसतें कीं, असुरिया आणि हिटाइट यामधील कलहाच्या पूर्वावस्थेंत सॅगेरियस दरींतील मांडलिक राजा स्वतंत्र झाला आणि त्यानें हट्टींच्या दौर्बल्यावस्थेंत आपल्या पूर्वी वरिष्ठ असलेल्या राजाच्या घरचा मुलूख बळकावून आपलें राज्य वाढविलें. किमेरियांतील लोकांनीं फ्रिजियाचें राजघराणें बुडवून, लिडियाला मर्मनड सत्तेच्या अन्तर्गत स्वातंत्र्य दिल्यानंतर सुद्धां "श्वेत सिरियन लोक" कॅपॅडोशियामध्यें होते. कोएससला साहाय्या शतकांत हे लोक प्टेरिया येथें आढळल्यावर त्यांचा त्यानें अखेरचाच नायनाट केला. तथापि यांच्या बऱ्याचशा धार्मिक व इतर चाली मागें होत्या व त्या ग्रीक ग्रंथकारांनीं नमूदहि केल्या आहेत. यांचे संबंधीं थोडी सविस्तर माहितीची टीप पुढें दिली आहे.

**हिटाइट लोकांचें वर्णन.**—सीरिया आणि मेसापोटेमिया यांच्या वायव्येस जें आशियामायनरचें द्वीपकल्प आहे त्याचें महत्त्व फार आहे. कारण आशिया आणि आफ्रिका यांनां जोडणारा पालेस्टाइन प्रांत ज्याप्रमाणें फार महत्त्वाचा होता, त्याचप्रमाणें आशिया आणि यूरोप यांनां जोडणारा आशियामायनर हा सरहद्दीवरील प्रांत अत्यंत महत्त्वाचा होता. दोन खंडांतील मोठमोठ्या राष्ट्रांच्या मध्यें ठेवलेल्या 'बफर' प्रमाणें यांची स्थिति होती. त्यामुळें अर्थातच इतिहासांत अत्यंत प्राचीन काळापासून या प्रांतांनां अत्यंत महत्त्व आहे. आशियामायनरमध्यें राहणाऱ्या लोकांनीं तत्कालीन राष्ट्रांमध्यें योद्धे व जेते म्हणून मोठें नांव मिळविलें होतें असें प्राचीन इतिहासावरून दिसतें.

हिटाइट नामक लोकांनीं आशियामायनर हा प्रांत व्यापला होता, व त्यांच्या पराक्रमामुळें ख्रि. पू. सोळाशें पासून सातशेंपर्यंत या प्रांताला विशेष महत्त्व होतें. बायबलमधील वर्णनांवरून हिटाइट लोक हॅमचा मुलगा कानान व कानानचा मुलगा हेथ यांचे वंशज होत, असें दिसतें. बायबलवरून असें दिसतें कीं, या हिटाइट लोकांवर हिब्रू लोकांनीं सहज वर्चस्व स्थापिलें. परंतु अलीकडील ऐतिहासिक संशोधनावरून असें सिद्ध झालें आहे कीं, हिटाइट लोकांचें प्राचीन राष्ट्र फारच पराक्रमी व युद्धप्रेमी होतें. त्या काळीं हिटाइट लोकांचें राज्य सर्व आशियामायनरवर व उत्तर सीरियावर पसरलें होतें. इतकेंच नव्हे तर एका बाजूला इजिप्त व दुसऱ्या बाजूला असुरिया या प्राचीन बलिष्ठ राष्ट्रांशीं हिटाइट लोकांचे सामने होत असत. हिटाइट लोकांनां इजिप्सियन लोकांच्या प्राचीन लेखांत खेटा, आणि असुरियन लोकांच्या प्राचीन लेखांत खट्टी हीं नांवें दिलेलीं आढळतात. इजिप्सियन लोकांचा राजा तिसरा तेहुतिमस (टेथमासिस) यानें ख्रि.पू.१५२८मध्यें मेगिड्डो येथें आणि त्यानंतरच्या सेती यानें ख्रि. पू. १३६० मध्यें कडेश येथें या खेटा लोकांबरोबर लढाया केल्या असा उल्लेख इजिप्तच्या प्राचीन इतिहासांत आहे. इजिप्त मधील दुसरा रामेसीस राजा यानें कडेशच्या लढाईंत (ख्रि. पू १३४०) हिटाइट लोकांचा पराभव केला, हें खरें आहे. तथापि लढायांच्या या अनेक वर्णनावरून हिटाइट लोक चांगलेच पराक्रमी व सामर्थ्यवान होते असें स्पष्ट दिसतें.

या नंतरच्या काळांत ख्रि. पू. ११९० पासून ७१० पर्यंत हिटाइट लोकांचा बलाढ्य असुरियन राष्ट्राबरोबर झगडा चालू होता. या संबंधाचा हिटाइट लोकांचा प्राचीन इतिहास अगदीं अलीकडे इजिप्त आणि असुरियामधील प्राचीन लेखांचे अर्थ विद्वान संशोधकांनीं लावल्यानंतर उपलब्ध झाला आहे. त्यावरून हिटाइट राष्ट्र बरेंच शतकें फार बलिष्ठ आणि महत्त्वाचें होतें असें सिद्ध झालें आहे शिवाय अगदीं अलीकडे खुद्द आशियामायनरमध्यें प्रत्यक्ष हिटाइट लोकांचेच लेख सांपडले आहेत. आजपर्यंत विद्वानाचें असें मत होतें कीं, लेखनकला ही अगदीं स्वतंत्रपणें फक्त चार ठिकाणीं म्हणजे चीन, मध्यअमेरिका, इजिप्त आणि मेसापोटेमिया या ठिकाणीं उत्पन्न झाली. परंतु हिटाइट लोकांच्या लेखांचें संशोधन झाल्यापासून या लोकांनीं आपली स्वतंत्र पांचवी लेखनपद्धति निर्माण केली होती असें वाटूं लागलें आहे. शिवाय हिटाइट लोकांतल्या अनेक प्राचीन मूर्तीहि सांपडल्या आहेत. त्यांवरून हिटाइट लोकांतलीं पादत्राणें आणि शिरस्त्राणें कांहीं एका विशिष्ट प्रकारचीं होतीं असें दिसून येतें. या हिटाइट लोकांच्या प्राचीन भाषेंतील विशेषावरून असें दिसून येतें कीं, हिटाइट लोक सेमेटिक वंशाचे नसून त्यांचें सिथियन लोकांशीं व चीनकडील लोकांशीं अधिक साम्य आहे. तथापि या अनेक प्राचीन गोष्टींसंबंधाचें ऐतिहासिक संशोधन अद्याप बरेंच अपुरें व अनिश्चित आहे. अगदीं अलीकडील इतिहास संशोधक चार्लस डब्ल्यू. सुपर म्हणतो कीं, आर्मीनियन्स हे लोक हिटाइट लोकांचेच वंशज होत.

**हिटाइट व मिसरी लोकांचा संबंध.**—ख्रि पू. १७ व्या शतकापासून हिटाइट लोकांचा इजिप्शियन उर्फ मिसरी लोकांशीं युद्धविषयक संबंध येऊं लागला. त्या पूर्वीची हिटाइट लोकांची माहिती मिळत नाहीं. हिटाइट लोकांच्या मिसरी लोकांशीं राजकीय उलाढाली झाल्या त्या येणें प्रमाणें:—ख्रि. पू. १५२८ हिटाइट लोकांची तिसरा टेथमॉसिस याच्या बरोबर मेगिदो येथें लढाई झाला. ख्रि. पू.

१४०० या वेळेपासून हिटाइट लोक बरेच प्रबळ झाले. त्यांनीं सीरियामधील मिसरी लोकांच्या प्रांताकडे मोर्चा वळविला. आणि कडेश हें आपलें दक्षिणेकडील राजधानीचें शहर बनविलें. ख्रि. पू. १३६० मिसरी राजा पहिला सेती यानें हिटाइटांच्या कडेश राजधानीवर हल्ला केला. ख्रि. पू. १३४१ त मरोसर याचा मुलगा मौथनर याला त्याचा भाऊ खेटसर यानें ठार मारिलें, व गादी बळकाविली. ख्रि. पू. १३४० त कडेशचा दुसरी लढाई यांत मिसरी राजा दुसरा रामसेस यानें हिटाइट व त्यांचे दोस्त यांच्यावर मोठा विजय मिळविला. ख्रि पू. १३२५ त हिटाईटांचा राजा खेटसर आणि मिसरी खत्तुशील राजा दुसरा रामेसीस यांच्यामध्यें तह झाला. कडेशच्या लढाईचीं कविताबद्ध आणि इतर वर्णनें आणि उपर्युक्त तहासंबधाचा लेख सांपडला आहे. एबर्स म्हणतो या महत्त्वाच्या लेखावरून हिटाइट लोकांचो संस्कृति आणि त्यांचें राजकारण बरेंच सुधारलेलें होतें असें दिसतें. या तहनाम्याचें ब्रुगशनें केलेलें भाषांतर मोठाल्या कागदाचीं सात पानें आहेत. या तहाचीं कलमें एका चांदीच्या पत्र्यावर खोदून व त्या पत्र्याच्या मधोमध खेटा लोकांच्या सुटेख या प्रमुख देवतेचें चित्र काढून हा रत्नपट खेटा राजानें रामेसीस राजाला दिला होता. हिटाइट लोकांचे लेख उपलब्ध झाल्यापासून मिसरी देवालयांच्या भिंतीवरील देखाव्यांचा अर्थ बरोबर समजूं लागला आहे. या एकंदर साधनांवरून हिटाइट लोकांचें हें प्राचीन राष्ट्र किती सुधारलेलें होतें याची कल्पना येते.

**हिटाइट आणि असुरियन लोकांचा संबंध**-इजिप्तनंतर हिटाइट लोकांचा ख्रि. पू. ११९० पासून ७१७ पर्यंत असुरियन राष्ट्रांशीं संबंध आला. त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी येणेंप्रमाणें:—ख्रि. पू. ११९० हिटाइट उर्फ खट्टी या लोकांचा पहिला तिग्लथपिलेसर यानें पराभव केला. ख्रि. पू. ८७२त हिटाइट लोकांनीं तिसरा असुर नझिरपाल याला खंडणी दिली. कारण त्यानें हिटाइट लोकांचे कांहीं राजपुरुष कैद करून नेले होते. ख्रि. पू. ? ८७६ त हिटाइट लोकांच्या एकेकाळीं राजधानी असलेल्या कर्चेमिश शहरांत असुरनझिरपाल यानें प्रवेश केला. ख्रि. पू. ८५४ हिटाईट लोकांनीं दमास्कसचा दुसरा बेन-हदाद यांचे बरोबर दोस्तीचा तह केला. त्यांचा कारकार येथें पराभव झाला आणि हिटाइट लोकांचीं बरीच लहान लहान संस्थानें असुरियन लोकांनीं आपल्या राज्याला जोडलीं. ख्रि. पू. ७१७ त हिटाइट लोकांच्या साम्राज्यापैकीं संगर हें एकच संस्थान स्वतंत्र स्थितींत उरलें होतें. या संस्थानचा राजा पिसिरिक यानें मोश्चिच्या मिटाबरोबर सख्य करून असुरियाला खंडणी देण्याचें नाकारिलें त्यामुळें असुरियन राजा दुसरा सार्गन यानें संगरावर स्वारी केली. व त्यांच्या कार्चेमिश या राजधानींतील लोकांनां असुरियांत नेऊन त्या शहरांत असुरियन लोकांची वसाहत करविली याप्रमाणें असुरियन लोकांनीं हिटाइट लोकांचें शेवटचें संस्थान पूर्णपणें हस्तगत केल्यापासून हिटाइट साम्राज्याचा अंत झाला. ज्या असुरियन लेखांवरून वरील ऐतिहासिक माहिती उपलब्ध होते त्यावरून हिटाइट लोकांचें राष्ट्र बरेंच सुधारलेलें होतें, आणि ख्रि. पू. १३ व्या १४ व्या शतकांत तें फारच भरभराटींत होतें या मिसरी लेखावरून होणाऱ्या ज्ञानाला अधिक पुष्टि मिळते.

**हिटाइट आणि हिब्रू लोकांचा संबंध**.—हिटाइट लोकांचा असुरियन लोकांशीं ज्या काळांत झगडा चालू होता त्याच काळांत त्यांचा शेजारच्या इस्रायल लोकांशीं निकट पण मित्रत्वाचा संबंध चालू होता, अशी माहिती हिब्रू वाङ्मयावरून मिळते. हिटाइट आणि इस्रायल या लोकांमध्यें विवाहसंबंध सुद्धां होत असत. हिटाइट लोकांचा उरीआह याची बायको बाथशेबा ही एका उच्च इस्राईल घराण्यांतली होती. तात्पर्य ख्रि. पू. एक हजार इतक्या प्राचीन काळीं इस्रायल राष्ट्रावर हिटाइट राष्ट्राचें वर्चस्व होतें हें निःसंशय आहे.

**हिटाईट लोकांचें कलाकौशल्य**.—हिटाइट लोकांमध्यें कलाकौशल्याचा स्वतंत्र उगम झालेला दिसत नाहीं. त्यांनीं बऱ्याच गोष्टी असुरियन लोकांपासून घेतल्या होत्या. हिटाइट लोकांच्या ज्या मूर्ती उपलब्ध आहेत, त्यांच्या आंगावरील पोशाख आणि मूर्तीची ठेवण या बाबतींत असुरियन लोकांचीच नक्कल केलेली दिसते. तथापि कोठें कोठें फरकहि आढळतो. उदाहरणार्थ हिटाइट आस्टार्टेची मूर्ति बाबिलोनच्या एस्टार सारखीच आहे तथापि हिटाइट मूर्तीला पंख आहेत. हिटाइट लोकांतील वर लेख कोरलेली अशी एक सिंहाची मूर्ति सांपडली आहे ती मूळची मूर्ति हल्लीं कान्स्टांटिनोपल येथें असून तिचा ओतीव पुतळा ब्रिटिश म्यूझियममध्यें आहे. सिलिसयांत सांपडणाऱ्या मूर्ती मात्र स्वतंत्र पद्धतीवर तयार केलेल्या आढळतात, पण त्या अधिक ओबडधोबड आहेत. या हिटाइट मूर्तींत आढळणाऱ्या विशेष गोष्टी म्हणजे स्त्रियांच्या डोक्यावर असलेली उंच टोपी आणि टोकें असलेले जोडे या होत. कॅपॅडोशियांत हिटाइट लोकांचे बरेच अवशेष सांपडलेले आहेत. प्राचीन राजधानी बोगझकुइ येथें प्राचीन राजवाड्याचे अवशेष सांपडलेले आहेत त्यांचे असुरियांतील इमारतींशीं बरेंच साम्य आहे. नवीन संशोधनांत सांपडलेल्या राजवाड्याचेंहि असुरियांतील इमारतींशीं साम्य आहे परंतु राजवाड्याच्या दरवाजाजवळ एक स्त्रीमुखी सिंह (स्फिंक्स) ठेवलेला आहे, त्यावरून मिसरी कलेचें अनुकरण केलें आहे असें दिसतें. पण असुरियन आणि हिटाइट यांच्या स्मारकविषयक गोष्टींत असा फरक आहे कीं, असुरियन लोकांचीं स्मारकें राजांच्या गौरवपर आहेत आणि हिटाइट लोकांचीं स्मारकें पारमार्थिक व धार्मिक स्वरूपाचीं म्हणजे देवादिकांसंबंधाचीं आहेत. हिटाइट लोकांच्या स्मारकविषयक वस्तु कॅपॅडोशियांत आणि तारस पर्वताच्या दोन्ही अंगांना खडकामध्यें कोरलेल्या वगैरे

ऱ्याच सांपडतात, त्यांवरून हें स्पष्ट दिसतें कीं ह्या अर्धवट सुधारलेल्या राष्ट्रांत कलाकौशल्याच्या बाबतींत स्वतंत्र पद्धतीचें कौशल्य प्रगट करण्याचें बुद्धिसामर्थ्य नव्हतें. त्याचप्रमाणें राजकीय बाबतींत इजिप्त आणि असुरिया यांचें वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्र राष्ट्र राखण्याचेंहि सामर्थ्य नव्हतें.

**मिटनि लोक**-मिटनि हें प्राचीन महत्त्वाच्या राष्ट्रांपैकीं एक आहे. इजिप्शियन लोक यांनांच नहाराइन म्हणतात, आणि बायबलमध्यें यांचा आराम-नहाराइम या नांवानें उल्लेख आहे. तथापि या राष्ट्राचा संगतवार असा इतिहास अद्याप उपलब्ध झाला नाहीं. आधुनिक संशोधनांत मिटनि राष्ट्रासंबंधीं कांहीं तुटक तुटक माहिती मिळाली आहे ती येणें प्रमाणें:-ख्रि.पू.१५८०त इजिप्तचा पहिला राजा तेहुतीमस यानें आशियावर स्वारी केली तेव्हां तो मिटनि राज्यावर चालून गेला होता. सरहद्दींवर झालेल्या लढाईंत त्यानें मिटनीच्या राजाचा पराभव केला. यावेळेपासून नाइल नदीच्या प्रदेशांतील लोक, आणि युफ्रेटिस नदीच्या प्रदेशांतील लोक यांचें सतत दळणवळण सुरू झालें. ख्रि. पू. १५२२ त तिसरा तेहुतिमस यानें मिटनीचें राज्य जिंकून घेऊन इजिप्तचें मांडलीक बनविलें. ख्रि. पू. १४७०-१४०० तेल एल अमर्ना येथील कागदपत्रावरून या काळांत मिटनीच्या राज्यांत आर्तटन, अर्तशुम, सुतर्ण, दुश्रत्त या नांवाचे राजे होऊन गेले. या काळांत पुष्कळ मिसरी राजांनीं मिटनि येथील घराण्यांतील राजकन्यांशी लग्नें केलीं होतीं. यावरून या वेळीं मिटनी लोकांचें राज्य बरेंच महत्त्वास चढलें होतें असें दिसतें ख्रि. पू १४०० या सुमाराम मिटनी लोकांनीं हिटाइट लोकांशीं दोस्ती केल्याचें दिसतें आणि त्यांनीं हिटाइट लोकांनां अनेक लढायांत मदतहि केली होती. इजिप्तमधील १८ व्या घराण्याच्या अखेरीस इजिप्शियन लोकांनां आमोराइट लोकांच्या देशांतून हांकून देण्यास मिटनी लोक कारणीभूत झाले होते. यावेळी मिटनी लोकांचें सामर्थ्य चढत्या स्वरूपांत होतें. मिटनि लोकांनीं कानानाइट व बाबिलोनियन राजांशीं सख्य करून मिसरी लोकांबरोबर सतत झगडा चालविला होता. ख्रि.पू १२२५त मिटनि लोकांचा राजा कुशन-रिश-अथइम यानें सीरियावर स्वारी करून इस्रालाइट लोकांनां आठ वर्षे बंदिवासांत टाकलें होतें. या नंतर आलेपो, हमात आणि दमास्कस हीं आरेमियन लोकांच्या ताब्यांत गेलीं होती, व यांतूनच नंतर दमास्कस, हमात, झोबाह वगैरे राज्यें स्थापन झालीं. मिटनि आणि मेसापोटेमियांतील आरेमियन राष्ट्रें यांची सत्ता असुरियन राष्ट्रांचें सामर्थ्य वाढत गेल्यामुळें कमी झाली. ख्रि. पू ११२०त पहिला तिग्लथपिलेसर या असुरियन राजानें बराच मिटनीप्रांत जिंकला आणि तिसरा असुरनझिरपाल यानें सर्वच मिटनी देश असुरियन राज्याला जोडला.

**पॅलेस्टाइनचा प्राचीन इतिहास.— प्रागैतिहासिक काल.**—पॅलेस्टाइनच्या प्रागैतिहासिक कालाविषयीं विचार करतां आधुनिक शास्त्रीय संशोधनानें कांहीं नवप्रास्तरायुधयुगासंबंधीं व प्राचीन प्रास्तरायुधयुगासंबंधीं शिलालेख उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून पॅलेस्टाइन प्रांतांत राहणाऱ्या प्राचीन मनुष्य प्राण्याचें चित्र काढण्याचा प्रयत्न करतां येईल. गेझर येथील एका स्मशान भूमींत अतिप्राचीन असे मानव शरीराचे अवशेष सांपडले आहेत. त्यांवरून पॅलेस्टाइनमध्यें एका ठेंगण्या व किरकोळ परंतु पिळदार बांध्याच्या, डोक्याची कवटी लांबट व चेहऱ्यावरील हाडें जाड व वजनदार असलेल्या एका मानवजातीचें अस्तित्व सिद्ध होतें. हे लोक गुहांतून किंवा ओबडधोबड झोंपड्यांतून रहात असून ते मेंढ्या, गाई, डुकरें इत्यादि ग्राम्य पशू पाळीत असत व त्यांच्याच हाडांचीं निरनिराळीं हत्यारें व इतर उपकरणें घडवीत असत. गेझर येथें सामान्यतः उंच बांध्याचा, चेहऱ्यावरील हाडांची पूर्ण वाढ झालेला व मजबूत असा जो मानव शरीराचा नमुना सांपडतो तो इ. सनापूर्वी ३०० वर्षांपूर्वीच्या इजिप्तमधील खोदकामांत आढळणाऱ्या मानव शरीराच्या नमुन्याशीं व अर्वाचीन तद्देशीय मानवशरीराशीं पूर्णपणें जुळतो. परंतु त्या लोकांपासून पॅलेस्टाइन मधील प्राचीन लोक शरीरदृष्ट्या अगदीं निराळे दिसतात. ऐतिहासिक दृष्ट्या प्राच्य मानव वंशाचा अभ्यास अद्याप अपूर्व स्थितींतच आहे, परंतु प्राचीन काळांत घडलेल्या गोष्टींची एकंदर परंपरा पाहिली असतां सेमाइट लोकांत त्यांच्या मूलगृहाच्या दक्षिण दिशेकडील व उत्तरेकडील कांहीं मानववंशांचें मिश्रण झाल्याचें दिसतें. पॅलेस्टाइन प्रांतास सेमिटिकभूमि असें नांव केव्हांपासून देतां येईल हें अनिश्चित आहे. त्याचप्रमाणें ह्या प्रांतांत, विशेषतः जॉर्डन नदीच्या पूर्वेस असलेलीं भव्य दगडी स्मारकें हीं सेमिटिक भाषा व स्थानसंज्ञा आणणाऱ्या मानववंशाच्या पहिल्या लाटेची दर्शक आहेत किंवा काय हेंहि अनिर्णीतच आहे. ज्या कालांत बाबिलोनिया, इजिप्त व क्रीट ह्या राष्ट्रांत एका अत्युच्च संस्कृतीची भरती आली होती त्या कालांत म्हणजे इ. सनापूर्वीच्या तृतीय वर्षसहस्रकाच्या शेवटच्या शतकांत घडलेल्या धडामोडींत पॅलेस्टाइन देश बरोबरीनें वाटेकरी असावा असें त्या युगांतील पॅलेस्टाइन व इतर देश ह्यांमधील विशेष संघटनावरून व सुधारलेल्या मानवी जीवितक्रमावरून दिसून येतें; आणि इजिप्त ह्या प्राचीन राष्ट्रानें पॅलेस्टाइनमधील सुपीक शेताकडे वारंवार मोर्चा फिरविल्याचें जरी दिसतें तरी देखील पश्चिम दिशेकडे भूमध्यसमुद्रापर्यंत बाबिलोनिया थोडीबहुत सत्ता गाजवीत असल्याचें दिसतें.

**इजिप्तची सत्ता.**—इसवी सनापूर्वी १७००च्या सुमारास इजिप्तवर स्वाऱ्या करणारे जे हिक्सॉस त्यांच्या कालांत, पॅलेस्टाइनच्या इतिहासाची रूपरेषा थोडी स्पष्ट दिसूं लागते. "जेकब" व "अनथ" ह्या विशेष नामांतील देवतावाचक शब्दांवरून हे हिक्सॉस मूळ आशियाखंडांतील रहिवाशी असल्याचें दिसत आहे. ह्या लोकांची इजिप्तमधून हकालपट्टी

झाल्यानंतर एक गोष्ट विशेष नजरेस येते ती ही की, पॅलेस्टाइन व सीरिया ह्या प्रांतांत युफ्रेटीस नदी पावेतों इजिप्तनें स्वाऱ्यांचें सत्र सुरू केलें होतें, व ज्याचें राजकीय ध्येय असुरिया व एशियामायनर ह्या देशांशीं निगडित झालें होतें अशा ह्या प्रदेशावर इजिप्तनें लागोपाठ जयपरंपरा मिळविल्यामुळें पुढें रूढ झालेल्या राजकीय धोरणाचा पाया च पक्क्या रीतीनें बसविला गेला.

बाबिलोनिया व इजिप्त ह्यांच्या वर्चस्वासंबंधींच्या कांहीं त्रुटित गोष्टी वगळतां, इसवी सनापूर्वीच्या १६व्या शतकापर्यंत पॅलेस्टाइन प्रांताचा स्पष्ट इतिहास सांपडत नाहीं. ह्यानंतर मात्र पॅलेस्टाइनची इतिहासपरंपरा बरीच सुसंबद्ध आढळते. इ. स. १८८७ मध्यें सांपडलेल्या अमर्नालेखांत पश्चिम आशिया व इजिप्त यामध्यें तिसऱ्या आणि चौथ्या ॲमेनोफिसच्या कारकीर्दींत ( इ. सनापूर्वी १४१४–१३६० ) कांहीं वर्षें चाललेल्या राजकीय गोष्टींसंबंधीं पत्रव्यवहार आहे. खमुरबीमुळें प्रसिद्धीस आलेलें पहिलेंच बाबिलोनियन राजघराणें पूर्वकालांत मोडतें. वरील शिलालेखांतील भाषा व लिपि या एशियामायनरमधील हिटाइट लोकांत व सिरिया व पॅलेस्टाइन येथील राजेलोकांत प्रचलित होत्या. कालक्रमानुसार इजिप्तच्या वैभवास ओहोटी लागली व मध्यंतरीं असलेल्या भूप्रदेशाच्या मालकी हक्कांत हिटाइट हें इजिप्तचें प्रतिस्पर्धी बनलें. मिटनी ( उत्तर सीरिया व मेसापोटेमिया ) ह्या बलाढ्य राज्यांतून बाहेर पडलेल्या हिटाइट लोकांशीं संबंध असलेल्या इराणी लोकांनीं यरुशलेमपर्यंत आपले विशिष्ट सांस्कृतिक परिणाम घडवून आणले होते हें त्यावेळच्या व्यक्तिनामांवरून दिसतें. त्याचप्रमाणें नुकत्याच जमीनींत सांपडलेल्या अवशेषांवरून इजियन संस्कृतीबरोबर दिसून आलेल्या संबंधामध्यें भर म्हणून वरील कागदपत्रांनीं, मेलुहा ( अरबस्तान ) मेसापोटेमिया, व लिव्हॅन्ट या प्रांतांतून स्वाऱ्या करणाऱ्या लुटारू टोळ्यांचे उल्लेख केले आहेत. ह्या पॅलेस्टाइन प्रांतांतील लहान लहान शहरांवर बऱ्याच परस्थ राजांचा अम्मल होता. ह्यापैकीं कांहीं राजांस इजिप्तच्या राजानें नेमलेलें होतें इतकेंच नव्हे तर कांहींस त्याच्या हातून राज्याभिषेक झाले होते. ह्या पौरराज्यांचे विस्तार किती लहान लहान असत हें अगदीं परस्परालगत असलेल्या यरूशलेम, गेझर, अस्कॅलॉन व लॅकिश ह्या ठिकाणच्या राजांच्या वारंवार आलेल्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. ह्या राजांमध्यें जरी परस्परांशीं भाऊबंदकी व वैमनस्यें असत तरी इजिप्तच्या राजाची सार्वभौम सत्ता व अंतिम न्यायाधिकारित्व ते कबूल करीत व किरकोळ प्रसंगीं इजिप्तच्या राजास प्रतिरोध करण्यास मात्र ते एकत्र मिळत असत व आपापसांत परस्पर दोस्ती राखीत. समुद्र किनाऱ्यालगतचीं यरुशलेम इत्यादि नगरें सोडून देतां, बंदोबस्ताचा सारा भर उत्तरेकडे व विशेषतः अमूर ह्या पौरराज्यावर पडत असे. उपरिनिर्दिष्ट युग हें अंतस्थ बंडाळीचें होतें व खुष्कीनें व जलमार्गानें उत्तरसिरिया व आशियामायनर ह्या प्रांतातून ह्याकाळीं वारंवार लुटारूंचे जबरदस्त हल्ले होत असत. चोहोंकडे खळबळ माजून राहिली होती व एकीकडे इजिप्तच्या सार्वभौमत्वाची निष्ठा व दुसरीकडे उत्तरदिशेस चाललेल्या खळबळीशीं अंतस्थ तह यामध्यें पॅलेस्टाइन राष्ट्रांस स्वतःच्या सामर्थ्यावर कांहीं करणें अशक्य झाल्यामुळें त्याची स्थिति फार केविलवाणी झाली होती. ह्यावेळच्या कागदपत्रांत शत्रूच्या आगमनाचें हुबेहुब वर्णन केलें आहे, त्याच प्रमाणें पॅलेस्टाइन हें राष्ट्र इजिप्तशीं किती राजनिष्ठ आहे व त्या मानानें इतर लगतचे राजे इजिप्शियन सार्वभौमाशीं किती राजद्रोहपूर्वक वागतात इत्यादि गोष्टींबद्दल विवेचन आलें असून शेवटीं लेखकानें स्वतःच्या संशयित वर्तनाची माफी मागितली आहे. समुद्रकिनाऱ्याबद्दलच्या वैमनस्याचें वर्णन करणारे यरुशलेमचे कागदपत्र अत्यंत मजेचे आहेत. ह्यामध्येंच हबिरु नामक शेजारच्या लोकांनीं बराच गोंधळ माजवून दिल्याचें वर्णन आहे. "हबिरु" याचा "हिब्रू" याशीं संबंध दाखविला जातो. त्यामध्यें मानववंशशास्त्रदृष्ट्या व इतिहासदृष्ट्या कांहींच महत्व नाहीं. परंतु ह्या राजनिष्ठ मांडलिकांनां मदत करण्याची इजिप्तच्या अंगांत ताकद नव्हती इतकेंच नव्हे तर प्राचीन मिटनी राष्ट्रानें आपलें राजकीय स्वातंत्र्य गमावलें होतें व हिटाइट लोकांची सत्ता स्थिर झाली होती. ह्या अमर्ना कागदपत्रांतून उपलब्ध झालेली तत्कालीन इतिहासपरंपरा, बोगझ्कुइ ह्या प्राचीन हिटाइट साम्राज्यांतील राजधानींत सापडलेल्या शिलालेखांतहि पुढें चालू आहे. त्यानंतरच्या इजिप्तमधील कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, एकोणिसाव्या राजघराण्यांतील पहिला सेतीः ह्यानें इ. सनापूर्वी १३२० मध्यें पॅलेस्टाइनवर स्वारी केली. परंतु इ. सनापूर्वी १३०० च्या सुमारास दुसरा रामेसीस ह्याचा पॅलेस्टाइनपेक्षां थोडा जास्त प्रांत स्वतःकडे ठेवण्या बद्दलचा हिटाइट लोकांशीं मोठ्या शिकस्तीनें तह होईपर्यंत हिटाइट लोकांशीं भांडणें चालूच होतीं. हा प्रांत देखील मोठ्या मुष्किलीनें राखला गेला; कारण लिव्हॅट व आशियामायनर यांतील बंडाळी व असुरियाचें पुनरुज्जीवन ह्या गोष्टी पश्चिम आशियाच्या राजकीय इतिहासाची पुनर्घटना करीत होत्या.

तिसऱ्या रामेसीसच्या कारकीर्दींत म्हणजे ख्रि. पू. १२००–११६९च्या सुमारास पॅलेस्टाइन प्रांतांत पुनः बंडाळी सुरू झाली. फिलिस्टाइन लोकांचा त्या चळवळीशीं बराच संबंध होता. तथापि इजिप्तनें आपली राजसत्ता पुन्हां बरीच विस्तृत केली व पॅलेस्टाइन आणि सिरियाचा कांहीं भाग परत मिळविण्यांत रामेसीस यास बरेंच यश आलें. सबंध आशियाखंडापासून पॅलेस्टाइन प्रांत तुटक राखून आपल्या अंकित ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या इजिप्तची कारकीर्द संपुष्टात आली होती आणि ह्या पॅलेस्टाइन प्रांतासहि आपल्या

नैर्ऋत्य दिशेस असणाऱ्या बलाढ्य इजिप्शियन साम्राज्याची सत्ता जाणवूं लागली होती. थोड्या कालानंतर तिग्लथ–पिलेसर यानें इ. सनापूर्वी ११०० च्या सुमारास असुरियन साम्राज्यसत्तेचा विस्तार पूर्वीच्या मोठ्या हिटाइट साम्राज्याच्या सत्तेखालीं असणाऱ्या पश्चिमेकडील भूप्रदेशावर लांबपर्यंत वाढविला. ज्या कालासंबंधीं बाह्य पुरावा फारच त्रोटक सांपडतो त्या ह्या कालांतच नवीन नवीन राजकीय घडामोडी होऊं लागल्या व नवीन नवीन पौरराज्यसंघ अस्तित्वांत येऊं लागले. राजकीय दृष्टीनें पॅलेस्टाइन प्रांत इजिप्शियन किंवा हिटाइट साम्राज्याचा भाग झाला होता. परंतु त्यानंतरच्या कालांत पॅलेस्टाइनचा इस्रायली इतिहासाशीं बराच निकट संबंध येतो.

**अमर्ना काल.**—ज्या बलाढ्य राष्ट्रांच्या इतिहासाशीं व संस्कृतीशीं पॅलेस्टाइन बरींच शतकें निगडित झाला होता त्यांपैकीं कोणाहि राष्ट्रानें अद्यापपर्यंत त्या प्रांतास पूर्णपणें आत्मसात् करून घेतलें नव्हतें. ह्या अमर्ना कालांत वरील छोट्या राजांनीं इजिप्शियन राजकीय कारवानांचे व्यापाराचे रस्ते सुरक्षित राखणें, खंडणी देणें, सार्वभौम सत्तेविरुद्ध कट न करणें व सामान्यपणें सार्वभौमसत्ता व तिचे प्रतिनिधी यांची बाजू उचलून धरणें इत्यादि गोष्टी संभाळल्या म्हणजे त्यास एक प्रकारचें स्वातंत्र्यच असे. एकंदर प्रदेशावर बाबिलोनियन संस्कृतीनें जरी बरेच दृढ परिणाम घडविले असले तरी जमिनींतून सांपडलेल्या अवशेषांमध्यें ह्या संस्कृतीच्या अगदीं फारच थोड्या विशिष्ट खुणा दिसून येतात. कीलाकृति शिलालेखांचा अभ्यास केला असतां त्यांतील पॅलेस्टिनियन अक्षरांवरून असें दिसतें कीं, तद्देशीयांची मूळ भाषा अगदीं प्राचीन व्यक्तिनामांप्रमाणें मागाहून प्रचलित झालेल्या 'कॅनेनाइट' ( हिब्रू, मोबाइट व फिनिशियन ) या भाषांसारखीच असावी. पॅलेस्टाइन, मिटनी व हिटाइट यांचे परस्पर संबंध विचारांत घेतां हें उघड दिसतें कीं, बाबिलोनियन संस्कृतीचे ह्या देशावरील परिणाम अप्रत्यक्ष रीतीनें झालेले असावेत आणि जोंपर्यंत खऱ्या बाबिलोनियन गोष्टींचा निर्णय झाला नाहीं तोंपर्यंत केवळ सादृश्यावरून कसल्याहि तऱ्हेचीं अनुमानें काढणें गैर होईल. वरिष्ठ सत्तेचा शासित लोकांच्या संस्कृतीवर कांहींच परिणाम होत नाहीं हें म्हणणें अर्थातच प्रशस्त होणार नाहीं. परंतु इतिहासावरून असें ठरलें आहे कीं, अशा तऱ्हेचा परिणाम होणें त्या दोन समाजांतील बाह्य व आंतर सादृश्यांवर अवलंबून असतें आणि हा परिणाम नेहमीं दृढ किंवा टिकाऊच होईल असें म्हणतां येत नाहीं. इजिप्तची परिस्थिति तर वरील सिद्धांतास जास्तच अनुकूल आहे; तथापि इजिप्तच्या वसाहतींचें अस्तित्व इजिप्तमधील उपासनासंप्रदाय, इजिप्तच्या धर्तीचीं देवालयें व मूर्ती यांची स्थापना हे व अशासारखे परस्पर संबंधदर्शक दुसरे जमिनींतून सांपडलेले अवशेष इत्यादि गोष्टी लक्षांत घेतां देखील, पॅलेस्टाइन प्रांताची संस्कृति इजिप्तमधील म्हणण्यापेक्षां आशियामधील म्हणणेंच अधिक सयुक्तिक होईल. आशियामधील संस्कृतीचा परिणाम इजिप्तला सुद्धां हिक्सॉस कालापासून व पुढें पुढें अठराव्या व त्या पुढील राजघराण्यांच्या अमलांत जास्तच जाणवूं लागला होता, व सीरिया पॅलेस्टाइनमधील प्रसिद्ध देवतांना ( रेशेफ्, बाल्, ॲनथ्, बिब्लोसचा बॅलथ्, कडेश्, ॲस्टर्ट्. ) बरेंच महत्त्व प्राप्त झालें. सामान्यतः त्यावेळच्या संस्कृतीचा व विचारविकासाचा मूलभूतपाया एकच असून, त्यामध्यें परिस्थित्यनुरूप स्थानिक, जातिविशिष्ट अगर राष्ट्रीय वाढीमध्यें काय फरक पडतो तेवढाच. कारण एकंदर सेमेटिक ग्रंथांतील पारमार्थिक कल्पनांचें इजिप्तमधील पारमार्थिक कल्पनांशीं बरेंच साम्य आहे. आणि बऱ्याच शतकांचा इतिहास दाखविणार इजिप्तमधील किंवा कीलाकृति शिलालेख व इतर विशेष पुरावा म्हणजे अमर्ना कागदपत्रें, आर्मिनियांतील कॅनानाइट शिलालेख, जुना करार व त्यानंतरचें यहुदी वाङ्मय इत्यादींमध्यें अशाच तऱ्हेची त्या भूभागांतील आचारविचारविषयक सांप्रतच्या परिस्थितीपर्यंत तुलना केली तर पुष्कळच नवीन नवीन माहिती मिळेल व त्यावरून पुढील तीन गोष्टींबद्दलच्या अनुमानास बरीच बळकटी येईल.

( अ ) धार्मिक, सामाजिक व राजकीय जीवनक्रमांतील चिरकालिक दृढ संबंध.

( आ ) प्रचलित असलेल्या सर्वसामान्य धार्मिक समजुती व त्यांची कांहीं एक विशिष्ट तऱ्हेनें झालेली वाढ ह्यामधील भेद.

( इ ) इतिहासदृष्ट्या ह्या विशिष्ट वाढीतील फेरबदल अगर स्थित्यंतरें.

**परमार्थसंप्रदाय.**— अमर्ना कालांतील पॅलेस्टाइनमधील परमार्थसंप्रदाय म्हणजे केवळ कांहीं अपरिपक्व व अस्पष्ट कल्पनांच्या स्वरूपांत नव्हता एवढें स्पष्ट होण्यास पुष्कळ जागा आहे. आधिभौतिक प्रगतीप्रमाणें हा संप्रदायहि प्राथमिक अवस्थेपलीकडे गेला असून तो पूर्ण विकास पावलेला जरी नसला तरी त्याचें स्वरूप बरेंचसें परिणत झालेलें दिसतें. उत्तरकालाप्रमाणें प्राचीन कालींहि विशिष्ट स्थानाशीं संबद्ध अशा पुष्कळ स्थानिक देवता होत्या परंतु सामान्यतः त्यांच्या उपासनेचे प्रकार सर्वत्र सारखेच होते. व्यापारी व राजकीय दळणवळणामुळें अनेक दैवतें कांहीं त्यांच्याबद्दलच्या वास्तविक पूज्य बुद्धीमुळें, कांहीं त्यांना पूर्वकालीं असलेल्या महत्त्वामुळें व कांहीं राजकीय सत्ताधाऱ्यांनीं लादल्यामुळें प्रचारांत आलीं. अमर्ना कागदपत्रांवरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, इजिप्तच्या राजकीय सत्तेबरोबरच तेथील सांप्रदायिक सत्ताहि मान्य करावी लागे. अर्थात् राजनिष्ठ असे पॅलेस्टाइनचे सत्ताधीश हे आपला देश इजिप्तच्या राजाच्या व इजिप्तांतील राष्ट्रीय दैवतांच्या मालकीचा आहे असें कबूल करीत.

त्याचप्रमाणें मानवी अंतःकरणामध्यें नेहमीं वास करणाऱ्या श्रद्धेनुरूप राजसत्ता ही मानुष व दैवी गुणांनीं मिश्रित अशी संस्था मानली जात होती व 'फॅरो' हा 'ॲमनरे' या देवतेचा अवतार मानला जात असे. या समजुतीमुळें स्थानिक दैवतसंप्रदायांत एकतंत्रीपणा येऊन सुसंगत उपासनापद्धति उत्पन्न झाली असावी; मांडलिक राजे स्वाभाविकपणें फॅरोचें ईश्वराशीं तादात्म्य मान्य करीत व आपल्या दैवतसंप्रदायांत त्याला सर्वांत श्रेष्ठ स्थान देत. म्हणूनच कीलाकृति लेखांत त्याला 'शामाश्' किंवा 'अड्डु' ह्या संज्ञा लावल्या आहेत. ह्यांपैकीं पहिली सूर्यदेवता पॅलेस्टिनियन लोकांस ज्ञात होती हें 'बेथ्-शामस्' ह्या सारख्या स्थलनामांवरून दिसतें. दुसरी 'अड्डु' ही वायुदेवता किंवा पर्जन्यदेवता असून ती पश्चिमआशियाकडील आहे व तिचें 'हदद' किंवा 'रम्मन्' या देवतांशीं ऐक्य असण्याचा संभव आहे. बहुशः ही देवता मेघगर्जना, वीज व बैल यांशीं संबंध असणारा 'बाल' नामक देवच असावा. कारण तो इजिप्तच्या एकोणिसाव्या व विसाव्या घराण्यांतील राजेलोकांस त्यांच्या दैवीगुणयुक्त मूळ राजाच्या स्तुतींत परिचित आहे. तानक येथें सांपडलेल्या एका खाजगी कीलाकृति शिलालेखांत उल्लेखिलेला 'देवांचा अधिपति' हाच असावा. ह्या किंवा अशाच आणखी प्रसिद्ध असलेल्या देवा शिवाय 'अशीर, व 'एस्टार-अस्टार्टे' ह्या दोन देवांगनाहि आढळून येतात. यह्वेह या देवतेचें नांव पॅलेस्टाइनमध्यें रूढ असावें; परंतु तें प्रामुख्यानें आढळून येत नाहीं. यावरून दुसऱ्या कित्येक देवतांप्रमाणें ह्या देवतेची पूजाहि राजकीय परिस्थितीमुळें प्रसार पावली असावी असें दिसतें. असो. याप्रमाणें पॅलेस्टाइनसंबंधीं प्राचीन माहिती मिळते. यापुढील माहिती व यहुदी आणि ख्रिस्ती संप्रदायांचा विकास हे विषय चौथ्या विभागांत यथाक्रम येतीलच. आतां त्या वेळचें प्रसिद्ध व्यापारी राष्ट्र फिनिशिया त्याकडे वळूं.

**फिनिशिया-देशासंबंधीं**—प्राचीन काळीं "फिनिशिया" या नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रदेशांतील मुख्य शहरें अमर्ना" कागदपत्रांवरून व इजिप्शियन, असुरियन आणि जुन्या करारांतील लेखांवरून समजण्यासारखीं आहेत तीं येणें प्रमाणें:-(१) अक्को (प्रस्तुत "एकर" किंवा अक्का या नांवानें प्रसिद्ध आहे), (२) ॲक्झिब (हल्लींचें नांव एझिब,) (३) अहलाब, टायरच्या दक्षिणेस समुद्रकिनाऱ्यावर असलेलीं तीन शहरें, (४) कान्हा, (५) टायर, (६) झरेफाथ किंवा सरेप्टा (हल्लीं सरफंद या नांवानें ज्ञात असलेलें), (७) सिडन (हल्लींचें नांव सैदा), (८) बेरिटस (हल्लींचें नांव बीरत), (९) बिब्लस (हल्लींचें नांव जिबेल), सिडनच्या उत्तरेस, (१०) अर्का, (११) सिन, (१२) सिमिर (हल्लींचें नाव सुम्रा), (१३) मॅरॅथस (हल्लींचें नांव अमृत) इत्यादि.

**वंश व भाषा**.—फिनिशियन लोक हे मूळचे सेमिटिक वंशांत उत्पन्न झाले असून कनानाइट शाखेचे होते; अर्थात कनानाइट लोकहि सेमेटिकच होते. ते सेमेटिक नव्हते असा ध्वनि जुनाकरार काढतो. कनान लोकांचा आद्य पुरुष जो "सिडन" तो इजिप्शियन वंशस्थापक "हॅम" याचा वंशज होता असें जुन्या करारांत विधान आहे. तथापि जुन्या करारांत दिलेली राष्ट्रांची वंशावळ ही कांहीं मानवजातिशास्त्राच्या अगदीं नियमाबरहुकूम दिलेली नाहीं; कदाचित हिब्रू लोक व कनानाइट लोक यांच्यामध्यें जो धार्मिक —म्हणजे आचारांच्या बाबतींत—विरोध होता त्यामुळें कनानाईट लोकांचे पूर्वज आपल्या पूर्वजांहून निराळे होत आणि फार प्राचीन काळांपासून फिनिशियन व इजिप्शियन लोकांचा जो निकट संबंध होता त्यावरून ते दोन्ही लोक एकाच वंशांतले होत असें हिब्रूंस वाटणें स्वाभाविक आहे. पूर्वेकडील समुद्राच्या कांठीं असलेल्या आपल्या पूर्वीच्या स्थानापासून देशांतर केल्याबद्दलची फिनिशियन लोकांची स्मृति कायम होती (त्या समुद्रास हिरोडोटस हा "तांबडा समुद्र" असें म्हणतो कदाचित् त्याचे मनांत त्यास इराणचें आखात" म्हणावयाचें असावें). येणें प्रमाणें परंपरागत आख्यायिकांवरून तरी आपले पूर्वज मूळ बाबिलोनियामधून आले होते अशी फिनिशियन लोकांची समजूत होती असें दिसतें. सिरियाच्या किनाऱ्यावर राहूं लागल्यापासून फिनिशियन लोकांमध्यें दर्यावर्दी जीवनक्रमाची आवड वाढत गेली व त्यांच्या चालीरीतींत आणि अंतःप्रदेशांत राहणाऱ्या कनानाइट लोकांच्या चालीरीतींत बरीच तफावत पडत गेली असावी. ते आपणास कनानाइट व आपल्या प्रदेशास कनान म्हणूं लागले. "अमर्ना" शिलालेखांत त्यांस हेंच नांव दिलेलें आहे. त्याच प्रमाणें हिकाटेअसच्या लेखांतहि तशा प्रकारचा उल्लेख आहे. जुन्या करारांत मधून मधून "फिनिशिया" व "फिनिशियन लोक" यांच्या बद्दल "कनान" व "कनानाइट" असा शब्दप्रयोग केलेला आढळतो.

**भाषा**.—शिलालेख, नाणीं, ग्रीक व लॅटिन ग्रंथकारांनीं रूढ केलेलीं स्थलवर्णनपर नांवें, प्लॉटसच्या "फिन्यूलस" नामक इतिहासग्रंथांत सांपडणारीं स्त्रीपुरुषांचीं नांवें आणि कार्थेजवर्णनपर भाग इत्यादि सर्व पुराव्यांवरून हें निर्विवाद सिद्ध होतें कीं, फिनिशियन भाषा ही उत्तरसेमेटिक शाखेच्या कनानाइट नामक उपशाखेंतून निघालेली असून तिच्यांत हिब्रू व मोआबी या दोन भाषांचा अंतर्भाव होतो. व्याकरणाच्या रूपांच्या दृष्टीनें किंवा शब्दसंग्रहाच्या दृष्टीनें कोणत्याहि तऱ्हेनें तुलना केली तरी फिनिशियन व हिब्रू भाषेमध्यें बरेंच साम्य दिसून येतें. फिनिशियन भाषेंत कांहीं ठिकाणीं जुनीं लक्षणें कायम ठेवलेलीं दिसून येतात, कांहीं ठिकाणीं नवीन लक्षणें आढळतात तर कांहीं ठिकाणीं त्या भाषेचीं विशिष्ट लक्षणें दृष्टीस

पडतात. काव्यविषयक, अप्रसिद्ध व फार उशीरां उपयोगांत आलेले असे बरेचसे हिब्रू भाषेंतले शब्द फिनिशियन भाषेंत नित्याच्या परिपाठांतले आहेत. यावरून असें अनुमान निघतें कीं, एका मूळ भाषेपासून या दोन भाषांची उत्पत्ति व स्वतंत्र विकास झाला असला पाहिजे आणि ती मूळ भाषा म्हणजे प्राचीन कनानाइट ही होय. या भाषेंतील कांहीं शब्द 'अमर्ना' लेखांत पहावयास सांपडतात. परंतु एकंदर फिनिशियन भाषेचें महत्त्व अजमावण्यास आपलेपाशीं साधनसामुग्री अगदीं अपुरी व मर्यादित आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. फिनिशियन लोक कोणत्याहि दृष्टीनें विद्याव्यासंगी नव्हते. त्यांचे बहुतेक अंकित लेख इ. स. पूर्वी सहाव्या शतकाच्या नंतरचे आहेत. त्यांतहि बरेचसे लेख इ. स. पूर्वी चौथ्या शतकांतले आणि त्यानंतरचे आहेत, त्या वेळेस फिनिशियन भाषेस उतरती कळा लागली असावी, फिनिशियन लोकांनीं एका बाबतींत मात्र वाङ्मयाची उत्तम सेवा केली आहे आणि ती म्हणजे त्यांनीं वर्णबोधक लिपीचा उत्तम विकास व प्रसार केला. त्या भाषेंतील वर्णमालेनें ग्रीक व इतर सर्व पाश्चात्य लिपींचा पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं, हिंदुस्थानांतील लिपी देखील फिनिशियन लिपीपासून निर्माण झाल्या असा पुष्कळ संशोधकांचा समज आहे. फिनिशियन भाषेतील मूळचे वर्ण बहुतेक हिब्रू, मोआबी आणि उत्तर सीरियांतील अरेमियन लोकांच्या वर्णासारखे होते. कालांतरानें त्यांच्यांत नाना प्रकारचे फेरबदल झाले. मूळ जन्मभूमी सोडल्यानंतर सायप्रस व ॲटिका या ठिकाणच्या शिलालेखांत दिसून येणारी लिपी अधिक धांवत्या व जलद रीतीनें लिहिलेली दिसून येते आणि कार्थेजच्या भरभराटीच्या काळांत तर त्या लिपीची ही धांवती मोडणी विशेष स्पष्टपणें दिसून येते. कार्थेजच्या ऱ्हासापासून इ. स. पहिल्या शतकापर्यंत फिनिशियन लोकांची भाषा व लिपी या दोन्हीहि अत्यंत अवनतीप्रत गेल्या आणि अखेर उत्तरआफ्रिकेंत इ. स. पांचव्या शतकापर्यंत ही कशीतरी अस्तित्वांत होती पण तिला एक " गांवढळ भाषा " यापेक्षां जास्त महत्त्व नव्हतें,

इ ति हा स.—इजिप्शियन लोकांप्रमाणें फिनिशियन लोक आपलीं प्राचीन शहरें प्रत्यक्ष देवांनीं वसविलीं आहेत आणि आपला वंश तीस हजार वर्षांपासून चालत आलेला आहे असें मोठ्या अभिमानानें प्रतिपादन करीत असत. हिरोडोटसनें एका आख्यायिकेच्या आधारें ही वंशोत्पत्तीची कालगणना इ. स. पूर्वी २७५६ पर्यंत नेऊन ठेवली आहे. ... जस्टिनच्या मतानें ट्रॉयचा नाश होण्यापूर्वी एक वर्ष फिनिशियन लोकांनीं "टायर" शहर वसविलें, . मिनेंन्डरच्या कालगणनेप्रमाणें " टायर " चा शक इ. स. ११९८ वर्षी सुरू झाला. परंतु या सर्व आख्यायिकांच्या आधारावर केलेल्या कालगणनांस विशेष किंमत देतां येत नाहीं.



**कार्थेज.**—कार्थेजच्या स्थापनेसंबंधीं पुढील माहिती आढळते.

अतिशय प्राचीन काळापासून फिनिशिअन खलाशी आफ्रिकेच्या किनाऱ्याकडे येत व अर्वाचीन ट्यूनिस ज्या ठिकाणीं सध्यां वसलें आहे त्या भागांत रहाणाऱ्या लिबियन जातींशीं त्यांचें व्यापारानिमित्त दळणवळण असे, यापूर्वीच इ. स. पूर्व १६ व्या शतकांत सिडोनच्या लोकांचीं या किनाऱ्यावर व्यापारी ठिकाणें होतीं; यूटिका येथील टायर वसाहतींशीं स्पर्धा करण्याच्या हेतूनें त्यांनीं पुढील काळांत कार्थेज शहर ज्या जागीं वसलें त्याच जागीं बरोबर क्याम्बे किंवा कर्कम्बे नांवाचें व्यापारी ठिकाण स्थापिलें, बोर्ज-जेदिदजवळ या प्राचीन वसाहतीचे विश्वसनीय अवशेष सांपडले आहेत. तरी तिच्या इतिहासाविषयीं अद्याप कांहीं माहिती मिळालेली नाहीं. टायर येथील लोकांनीं आपला देश सोडून येऊन इ. स. पू. सुमारें ८५० त कार्थेज शहर स्थापिलें. त्यावेळीं मटन ( १ ला ) या राजाची कन्या एलिसा किंवा एलिझर हिनें त्यांचें पुढारीपण पत्करिलें होतें अशा तऱ्हेची एक वाङ्मयीन कथा आढळते.

**इजिप्शियन लोकांचा अंमल.**—ख्रि. पू. १६००—११००—इ. स. पूर्वी सुमारें १६०० व्या वर्षी इजिप्त देशाच्या अमेनोफिस नामक राजानें प्रथम सिरियावर स्वारी करून पॅलेस्टाइन आणि फिनिशिया हे प्रांत पादाक्रांत केले; त्यानंतर पहिला टेथमॉसिस यानें जी युफ्रेटीजपर्यंत स्वारी केली. तिच्यापासून काय फलनिष्पत्ति झाली हें जरी सांगतां येत नाहीं तरी तिसरा टेथमॉसिस यानें पुन्हां स्वारी करून सिरिया व फिनिशिया यांतील लहान लहान संस्थानांवर इजिप्शियन लोकांचा अंमल बसविला हें अनेक प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवितां येण्यासारखें आहे. विशेषतः अमर्ना लेखांत आढळणाऱ्या तत्कालीन फिनिशियन मांडलिक राजांच्या पत्रांवरून व फिनिशियावर अंमल चालविण्यास धाडलेल्या इजिप्शियन सुभेदारांच्या पत्रांवरून इ. स. पूर्वी पंधराशें ते चवदाशें वर्षांच्या दरम्यान फिनिशिया देशाची काय स्थिति होती याविषयीं बरीच माहिती उपलब्ध होते, फिनिशियांत तो काळ राजकीय उलाढालींचा होता. सिरियावर हिटाइट लोकांच्या स्वाऱ्या होत होत्या; त्यांस रानटी लोकांची मदत असे; साधल्यास इजिप्शियन लोकांचा अंमल झुगारून द्यावा या हेतूनें पुष्कळ स्थानिक सरदार तसल्या संधीचा फायदा करून घेत होते. फिनिशियांतील शहरांत दोन पक्ष होते; अराडस, सिमिरा व सिडन हीं शहरें इजिप्तच्या विरुद्ध बंड करण्यास अनुकूल होतीं, बिब्लसचा जहागिरदार रिब्हाबाद व टायरचा राजा अबिमेलेख हे इजिप्तच्या बाजूचे होते; जीं जीं शहरें राजनिष्ठ असल्याबद्दल बहाणा करीत तीं वास्तविक स्वतःचें हित साधण्यांत गुंतलेलीं असत; याचा

परिणाम असा झाला कीं, बिब्लस खेरीजकरून इतर सर्व शहरांनीं इजिप्तचा अंमल झुगारून दिला; ही हकीकत ज्या शिलालेखांवरून उपलब्ध झाली आहे ते बाबिलोनियन भाषेंत व लिपींत लिहिलेले असल्यामुळें त्यांवरून पॅलेस्टाइन व फिनिशिया या देशांत बाबिलोनियन संस्कृतीचा किती प्रसार झाला होता व कनानाइट शहरें आणि सत्ताधीश इजिप्त यांचा किती निकट संबंध होता हें कळून येतें. चौथ्या अमेनोफिसच्या कारकीर्दीनंतर इजिप्शियन लोकांचा अंमल सर्वस्वी नाहींसा झाला; परंतु त्याच्या वंशजांनीं तो फिरून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आणि दुसरा रामेसीस यानें बैरूतपर्यंत सर्व फिनिशिया पादाक्रांत केला आणि आपला विजय संस्मरणीय करण्याकरितां तीन शिलालेख खोदवून ठेविले. यापुढें तिसऱ्या रामेसीसच्या कारकीर्दींत आशियामायनर व यूरोप इकडील लोकांच्या सिरियावर स्वाऱ्या झाल्याकारणानें बरेच फेरबदल घडून आले. तिसऱ्या रामेसीसनंतर त्याच्या वंशजांचा कनानवरील अंमल नाहींसा झाला. इ. स. पूर्वी सुमारें ९२८ व्या वर्षी शशांक नांवाच्या इजिप्शियन राजानें पूर्वीप्रमाणें फिनिशियावर इजिप्तची सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला फारसें यश आलें नाहीं आणि जुन्या करारांत नमूद करून ठेवल्याप्रमाणें इजिप्तची सत्ता यापुढें बहुतेक अस्तंगत झाली. सीरियामध्यें असुरियन लोकांची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वीच्या काळांत फिनिशियन लोकांवर कोणाचाहि अंमल चालू नव्हता. हा काल त्यांच्या प्रगतीचा होता आणि याच वेळीं टायर हें फिनिशियाचें मुख्य शहर झालें.

**फिनिशिया देशाचा स्वतंत्रतेचा काल.**—सीरियामधून इजिप्शियन लोकांचा अंमल नष्ट झाल्यानंतर आणि असुरियन लोकांची पश्चिमेकडे चाल सुरू होण्यापूर्वी या मध्यंतरींच्या काळांत फिनिशियाच्या पौरराज्यावर ( पौर राज्य म्हणजे शहर व त्याच्या भोंवतालचा प्रदेश यांचें संस्थान ) कोणाचाहि अंमल चालू नव्हता. या काळचा फिनिशियाचा इतिहास म्हणजे मुख्यत्वेंकरून टायर शहराचा इतिहास होय. या वेळीं टायर शहर हें सर्व फिनिशियन संस्थानांमध्यें अग्रेसर झालें इतकेंच नव्हे तर लांबलांबच्या प्रदेशीं त्यानें आपल्या वसाहती स्थापन केल्या. इ. स. पू. ९७०—९३६ इतकीं वर्षे अबिबालचा मुलगा पहिला हिराम यानें टायरवर राज्य केलें. त्यानें टायरचा पूर्वेकडे विस्तार करून जुन्या देवालयांच्या दुरुस्त्या केल्या व त्यांस मोठाल्या देणग्या दिल्या. हिरॅक्लीज व अस्टार्टी यांचीं नवीन देवालयें बांधलीं, "हिरॅक्लीजच्या जागृती" बद्दल उत्सव करण्याचा प्रघात सुरू केला आणि युटिकाच्या रहिवाश्यांवर आपला पूर्ण अंमल बसविला. यापूर्वी फिनिशियन लोक व इस्रायल लोक यांच्यांत जरी सलोखा होता तरी त्याच्या कारकीर्दीत तो अधिक दृढ झाला. त्यामुळें हिराम व इस्रायल लोकांचा राजा सॉलोमन यांच्यामध्यें बऱ्याच नजराण्यांची देवाणघेवाण होत होती. शेवटीं देवालय बांधण्याकरितां हिरामकडून सॉलोमनकडे जो सुवर्णनिधि अर्पण करण्यांत आला त्याचा मोबदला म्हणून हिरामला "गॅलीलीचा" कांहीं भाग मिळाला; इतकेंच नव्हे तर या दोन राजांच्या मैत्रीमुळें त्या दोघांनीं मिळून व्यापाराच्या अभिवृद्धीसाठीं "एझिआन्गिबर"पासून तों "आफीर" पर्यंतच्या प्रदेशावर स्वाऱ्या केल्या. हिरामनंतर टायरच्या गादीवर निरनिराळ्या घराण्यांतील राजे बसले; परंतु अस्टार्टीचा धर्मगुरू पहिला इथोबाल हा राज्य करूं लागल्यापासून त्याला जास्त व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें. पहिल्या हिरामला "टायरचा राजा" म्हणत असत, तर इथोबाल यास "सिडोनियन लोकांचा किंवा फिनिशियन लोकांचा राजा" या नांवानें संबोधीत. यावरून टायरच्या राजांनीं फिनिशियाच्या इतर शहरांवर आपला अंमल बसविला होता असें दिसून येतें. एथबॉलच्या कारकीर्दीत राज्याचा अधिक विस्तार झाला. बिब्लसच्या उत्तरेस बॉट्रिस आणि उत्तरआफ्रिकेंत एओझा हीं शहरें त्यानें वसविलीं आणि त्याच्या मागून होऊन गेलेल्या पहिल्या मटनच्या मृत्यूनंतर जे अंतःकलह उपस्थित झाले त्यांत सुप्रसिद्ध कार्थेज शहराचा पाया घातला गेला असें म्हणतात. केवळ आख्यायिकेवरून पाहिलें तर मटनचा पुत्र पिग्मॅलियन ( ८२०–७७३ ) यानें जेव्हां आपल्या एलिसा नांवाच्या बहिणीच्या पतीस मारलें तेव्हां तिनें टायरमधून आपला पाय काढला आणि लिबियामध्यें जाऊन कार्थेज शहराचा पाया घातला अशीहि एक दंतकथा आहे.

**असुरियन लोकांचा अंमल.**–इ.स.पूर्वी ८७६–६०५– एथबालच्या कारकीर्दीनंतर असुरियाच्या उत्कर्षाची चढती कमान झाली आणि त्यामुळें फिनिशियाच्या स्वातंत्र्यावर गदा आली. इ. स. पूर्वी ११०० वर्षी पहिला तिग्लथपिलेसर यानें उत्तर फिनिशियावर स्वारी केली आणि समुद्र किनाऱ्यावरील एखादें बंदर हस्तगत करण्याच्या हेतूनें त्यानें अर्वद ( अराडस ) हें शहर काबीज केलें. परंतु त्यानंतर तेथें कोणीं कायमची वसाहत केली नाहीं. इ. स. पूर्वी नवव्या शतकापासून मात्र असुरियानें आपला मोर्चा पद्धतशीर रीतीनें पश्चिमेकडे वळविला. इ. स. पूर्वी ८७६ व्या वर्षी तिसऱ्या असुर नझिरपालनें "आपलीं हत्यारें महासमुद्रांत धुतलीं" आणि टायर, सिडन, बिब्लस अर्वद व इतर शहरें यांच्या राजांपासून खंडणी वसूल केली. टिरियन व सिडोनियन लोकांपासून ८४९ त व फिरून ८४६ त खंडणी वसूल केल्याबद्दल, ८४६ त बिब्लियन लोकांपासून ती वसूल केल्याबद्दल आणि ८५४ किंवा ८५३ मध्यें करकर येथें ज्या राजांचा पराभव झाला त्यांत अर्वदाईट लोकांचा राजा मेटन बॉल असल्या बद्दल असुरनझिरपालचा पुत्र दुसरा शालमनसर याच्या खोदींव लेखांत

नमूद केलेलें आहे. येणेंप्रमाणें शालमनसर यानें फिनीशियाच्या किनाऱ्यावर त्याच्या पित्यानें सुरू केलेल्या स्वाऱ्या यशस्वी रीतीनें तडीस लावल्या आणि तेथें आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. हें वर्चस्व एका शतकापेक्षां अधिक काळपर्यंत चालू होतें आणि त्याच्या कबुलीदाखल जित लोकांपासून मधून मधून खंडणीहि वसूल करण्यांत येत होती. परंतु कालांतरानें फिलिस्टिया, जूडा, इजिप्त, एथिओपिया इत्यादि देशांच्या राजांनीं एक संघ स्थापन करून असुरियाची जुलमी राजसत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न सुरू केला. या वेळीं आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून फिनिशियाचीं पौरराष्ट्रें त्या सर्वसाधारण शत्रूच्या विरुद्धहि एकत्र झालीं नाहींत आणि त्यांपैकीं कित्येक पौरराष्ट्रें टायरचा संबंध तोडून असुरियाला जाऊन मिळालीं. इ. स. पूर्वी ७०१ यावर्षी जें एक मोठें युद्ध झालें त्यांत असुरियन राजा सिनाखेर्ब हा या बंडखोर पौरराष्ट्रांवर चालून गेला आणि त्यानें सिडोनचा राजा लुली याचा पराभव करून त्यास सायप्रसकडे पळवून लाविलें. त्यांचीं मुख्य मुख्य शहरें घेतलीं आणि वार्षिक खंडणी देण्याचें अभिवचन घेऊन टुबालू (एथबाल) यास त्याच्या गादीवर बसविलें. सिनाखेर्बच्या शिलालेखांत टायरच्या वेढ्याचा उल्लेख नसावा हें आश्चर्य आहे. तथापि मिनॅन्डरनें त्या वेढ्याचें वर्णन दिलेलें आहे. त्या वेढ्यांत टायर शहर जरी टिकून राहिलें तरी "एल्यूलासचें विस्तीर्ण राज्य" म्हणून जो त्याचा एवढा मोठा विस्तार झाला होता त्या सर्वास त्यास मुकावें लागलें. शिवाय टायर व सिडोन या दोन पौरराष्ट्रांच्या जुटीमुळें जें त्यांचें प्रस्थ माजलें होतें तें झाणून पाडण्याचा सिनाखेर्बचा उद्देश या योगानें तडीस गेला. सिडोन येथें एथबॉलच्या नंतर अब्दमिल्काथ हा त्याच्या गादीवर आला होता. इ स.पूर्वी ६७८ सालीं त्यानें एका सिलिसियन सरदाराबरोबर स्नेह करून एसरहृडनच्या विरुद्ध बंड उभारलें परंतु अखेर त्याला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले. सिडन शहराचा विध्वंस झाला. अब्दमिल्काथ हा एसरहृडनच्या हातीं लागला आणि एसरहृडननें पूर्वीच्याच जागीं नवें सिडन शहर बसविलें परंतु तेथें परकी लोकांचा भरणा केला व त्या शहरास आपलें नांव दिलें. असें झालें तरी त्या शहराचें जुनें नांवच प्रचारांत राहिलें. परंतु त्याचें पूर्वीचें स्वरूप पार बदलून जाऊन सायरसच्या वेळेपर्यंत सिडन शहर नाहींसें झालें. याप्रमाणें टायरलाहि अनेक संकटें भोगावीं लागली. एल्यूलास नंतर बालराजा टायरच्या तक्तावर बसला व त्यानें असुरियाच्या विरुद्ध बंड करण्याचे कामीं इजिप्तचा एथिओपियन राजा तिरहाका यास मदत केली,त्यामुळें एसरहृडन हा ज्यावेळीं दुसऱ्यानें इजिप्तवर चालून गेला तेव्हां त्यानें त्याबद्दल टायरला शिक्षा करण्याचा निश्चय केला व याप्रमाणें टायरला वेढा देऊन त्याचा पाणीपुरवठा बंद करण्याच्या हेतूनें त्यानें त्याच्या किनाऱ्यावर मातीच्या भिंती बांधल्या. तथापि त्यानें तें शहर काबीज केलें नाहीं. झेंजिर्ली येथें जो एसरहृडनचा पुतळा सांपडला आहे त्यांत त्यानें टायरचा बाल आणि इजिप्तचा तिरहाका यांच्या नाकांत वेसण घालून ती आपले हातांत धरली आहे असें दाखविलें आहे. परंतु एसरहृडन यानें त्यांपैकीं कोणास कैद केल्याचा पुरावा नाहीं. असुरबनिपाल हा राज्यावर बसल्यानंतर लगेच त्यानें टायरला पुन्हां वेढा दिला. परंतु त्यांत त्याला त्याच्या पूर्वजांपेक्षां अधिक यश आलें नाहीं. तथापि गेबल आणि अर्वदचे राजे. जुडाचा मनसे आणि इतर कनानाईट सरदार यांच्यासह बाल हाच शेवटीं शरण गेला. सायप्रस बेट काबीज करण्यांत असुरियन लोकांस पूर्ण यश आलें. अरबस्तानावरील स्वारीहून परत आल्यावर असुरबनिपालनें उशू व अक्को येथील बंडखोर रहिवाशांचें चांगलेंच पारिपत्य केलें व त्यांतून जे वांचले त्यांची असुरियांत रवानगी केली. फिनिशिया व इतर प्रदेश यांवरील असुरियाचें राज्य म्हणजे जुलूम व लुटालूट यापेक्षां अधिक कांहीं नव्हतें.

**उत्तर बाबिलोनियन राजांचा काळ.**—इ. स. पूर्वी ६०५—५३८—असुरियन सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर कांहीं काळपर्यंत इजिप्शियन लोकांनीं फिनिशियावर स्वाऱ्या केल्या. परंतु इ. स. पूर्वी ६०५ सालीं कारचेमिशच्या लढाईंत त्यांचा मोड झाल्यावर पश्चिम आशियाचें स्वामित्व खाल्डियन लोकांकडे होतें. इ. स. पूर्वी ५८८ सालीं इजिप्शियन राजा एप्रीज यानें खाल्डियन लोकांची सत्ता उलथून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यानें टायर व सिडन या दोन पौरराष्ट्रांचा पराभव करून इतर पौरराष्ट्रांस शरण यावयास भाग पाडलें. अशा रीतीनें फिनिशियावरील सत्तेसंबंधानें इजिप्शियन व खाल्डियन लोकांत झटापट चालू असतां कांहीं फिनिशियन राजांनीं व त्यांतले त्यांत टायरचा नवा राजा दुसरा इथोबाल यानें बाबिलोनियन लोकांविरुद्ध आपला वैरभाव उघड उघड व्यक्त केला. ही गोष्ट नेबुकाडरेसर याच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. इथोबालचा पाडाव झाल्यानंतर तो फिनिशियावर चालून गेला. एप्रीज आपल्या सैन्यासह परत गेला व टायरच्या वेढ्यास सुरुवात झाली. त्या व्यापारी शहरानें तेरा वर्षेपर्यंत टिकाव धरला. एझीकीलच्या मतानें नेबुकाडरेसर व त्याचें सैन्य यांस टायरच्या वेढ्यांत जो खटाटोप करावा लागला त्याचा मोबदला कांहीं न मिळता शेवटीं तें शहर जरी शत्रूच्या स्वाधीन झालें तरी त्याला अनुकूल अशाच शर्तीवर तह झाला. नेबूकाडरेसरनें दुसरा बाल यास गादीवर बसविलें. त्याच्या मृत्यूनंतर लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन झाली. तिच्या अध्यक्षास "सुफेट" किंवा 'जज्ज" म्हणत असत. कांहीं काळानें पुन्हां राजसत्ताक पद्धति सुरू झाली. शेवटीं तिसरा हिराम राज्य करीत असतां फिनिशिया देश खाल्डियन लोकांपासून इराणी लोकांच्या ताब्यांत गेला आणि त्याच सुमारास इजिप्तचा राजा दुसरा अमेनोफिस यानें सायप्रस

हस्तगत केलें. हें सर्व होत असतां टायरच्या लोकांकडून कसलाहि विरोध करण्यांत आला नाहीं. दीर्घकालपर्यंत वेढ्यांत सांपडल्यामुळें व तदनंतर उपस्थित झालेल्या अन्तः-कलहामुळें टायरचे लोक अगदीं हतवीर्य झाले आणि त्यामुळें पौरराष्ट्रांच्या पुढारीपणाचा मान सिडन या पौरराष्ट्रास मिळाला. या सुमारास कार्थेज येथें हॅनो दी ग्रेट हा राजा राज्य करीत होता. त्यानें ही संधि योग्य आहे असें पाहून टायरच्या वर्चस्वापासून आपल्या देशाची सुटका करून घेतली. यापुढें टायर येथें होणाऱ्या मेलकार्थच्या उत्सवाला कार्थेजनें दर वर्षी आपलें कांहीं प्रतिनिधी पाठवावेत या शर्तीशिवाय कार्थेजवर टायरची कोणतीहि सत्ता उरली नाहीं. टायर राष्ट्रावर जी ही संकट परंपरा येत गेली त्यावरून त्याच्या उत्कर्षाला ओहोटी लागली असेल असें वाटण्याचा संभव आहे. परंतु टायर राष्ट्र हें राजकीय उत्कर्षापेक्षां व्यापाराच्या भरभराटीकरितांच जास्त प्रसिद्ध होतें आणि ती भरभराट तशीच अबाधितपणें कायम राहिली. टायर राष्ट्राच्या ताब्यांतील सर्व वसाहती जरी शत्रूच्या हातांत गेल्या तरी टायर शहर शत्रूच्या हस्तगत झालें नाहीं. त्याचा दर्यावरील व्यापार पूर्वीप्रमाणेंच निर्विघ्नपणें चालू राहिला.

**राज्यपद्धति.**— कनानाइट लोकांच्या सर्वसामान्य राज्यपद्धती लक्षांत घेतल्या म्हणजे फिनिशियन लोकांची मूळची राज्यपद्धति राजसत्ताक असावी असेंच अनुमान निघतें. तद्देशीय खोदीव लेखांत फिनिशियांतील पौर राष्ट्रांच्या व सायप्रसच्या अधिपतीस " राजा " हीच संज्ञा दिलेली सांपडते. राजघराण्यांतील लोक आपण प्रत्यक्ष देवाचे अवतार आहोंत असें प्रतिपदन करीत असत आणि त्यांना सोडून बाहेरच्या मनुष्याची राजपदाकरितां निवड होणें अशक्य होतें. परंतु सार्वजनिक हिताहिताच्या प्रकरणांत धनाढ्य व्यापारीवर्गाचें बरेंच वजन असल्याकारणानें राजाची सत्ता बरीच मर्यादित होती आणि म्हणून टायर किंवा सिडन या पौरराष्ट्रांत युद्ध पुकारणें किंवा तह करणें या गोष्टी राजाच्या गैरहजीरींत किंवा त्याच्या मर्जीविरुद्धहि घडून येत असत. टायर येथें मेलकार्थच्या पुरोहितास राजाच्या खालोखाल मान होता. राजाला राजकारणांत सल्ला देण्याकरितां एक वृद्ध मंडळ होतें. गेबेल ( बिब्लस ) येथें ही पद्धत अव्वल पासून अखेरपर्यंत अव्याहत चालू होती. सिडन येथें हें मंडळ शंभर सभासदांचें होतें व टायर येथेंहि बहुतेक तसेंच असावें. नेबुकाडरेसरच्या कारकीर्दीत टायर येथें राजसत्ताक पद्धतीचे जागीं कांहीं वेळ लोकसत्ताक पद्धति स्थापन झाली होती हें वर दिलेलेंच आहे. इराणी लोकांचा अंमल चालू असतां सिडन, टायर व अरेडस या राष्ट्रांचा एक संघ निर्माण झाला. या संघाच्या नियमांप्रमाणें वरील तीन राष्ट्रांनीं इराणी आरमारास वल्ह्यांच्या तीन रांगा असलेलीं ३०० जहाजें द्यावयाचीं असत. त्याचप्रमाणें मोठ्या शहराच्या तंत्रानें लहान शहरांनीं चालावें असा नियम होता. या नियमास अनुसरून अरेडसच्या वर्चस्वाखालीं तीन लहान राष्ट्रें होतीं बेरिटसला राजा नसल्या कारणानें त्याचें व बिब्लसचें मिळून एक संयुक्त राज्य झालें आणि ट्रिपोलिसमध्यें तीन शहरांचा अंतर्भाव झाला होता. फिनिशियामध्यें यापेक्षां अधिक व्यापक स्वरूपाची जूट शक्य नव्हती. कारण त्या देशांतील निरनिराळीं राष्ट्रें एकत्रित करण्यास लागणारी राष्ट्रैक्यभावना तेथें अस्तित्वांत नव्हती. लक्ष व्यापारवृद्धिकडे असल्यामुळें ते स्थानिक कारभाराकडे जरी दक्षतेनें लक्ष देत असत तरी शिस्त व देशभक्ति या गुणांचा त्यांच्यामध्यें विकास झाला नव्हता. प्रसंगविशेषीं फिनिशियांतील शहरें मोठ्या धैर्यानें आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करीत परंतु एकंदरीनें फिनिशियन लोकांमध्यें प्रागतिक राष्ट्रीय चारित्र्यास लागणारे सद्गुण उदित झाले नव्हते असें म्हणावें लागतें.

आपल्याकडील कांहीं लेखक फिनिशियन लोक तेच ऋग्वेदांतील पणी असावेत म्हणून सूचना करितात. याला आधार एवढाच कीं हीं दोन्हीं राष्ट्रें व्यापारी होतीं. आणि दोन्ही राष्ट्रांच्या नांवांमध्यें उच्चारसादृश्य आहे.

**सूर्या ऊर्फ सीरिया.**—ओबडधोबड शिलास्मारकें व इतर इतिहासपूर्वकालीन अवशेष यांवरून सीरियांत मानवप्राण्यांची वसती फारच प्राचीन कालापासून झाल्याचें दिसतें. ऐतिहासिक कालांत अनेक भिन्न भिन्न राष्ट्रांनीं या प्रदेशांत लढाया मारल्या व आपआपल्या वसाहती केल्या. परंतु ह्यांपैकीं बहुतेक राष्ट्रें 'सेमेटिक' वंशांतील होतीं. ह्या शेवटच्या गोष्टीमुळें त्या देशांतील अतिप्राचीन स्थानिक संज्ञासंबंधीं दंतकथांतून बराच विश्वसनीय भाग सांपडणें शक्य झालें आहे. आर्मीनियन लोकांनीं तेथील मूळ रहिवाशी आपल्या समाजांत समाविष्ट करून घेतल्यानंतर ग्रीकोरोमन संस्कृतीचा त्यांच्यावर पुष्कळच परिणाम झाला; तरी आपली मूळ अरेमियन भाषा मात्र त्यांनीं कायम राखली. प्राचीन कालीं सीरियाचे जगाशीं राजकीय संबंध कशा प्रकारचे होते हें अज्ञात आहे. प्रत्येक शहर भोंवतालच्या प्रदेशासह एक छोटें राज्यच समजलें जाई व एकंदर शासनकार्याची दिशा साहजिकच तेथील प्रमुख घराण्यांवर अवलंबून असे. इ. स. पू. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सर्व उत्तरसीरिया कॅपॅडोशियन हट्टी सत्तेखालीं आला. सीरियाचा दक्षिण भाग अक्कडच्या सार्गन राजास 'अॅम्मन' या नांवानें माहीत होता व त्याच्या सैन्यानेंहि पुष्कळ वेळां त्या प्रांताकडे मोर्चे फिरविले होते. ह्या कालास 'कॅननाइट्' युग म्हणतात. ह्यानंतर इ. स. पू. १००० वर्षांच्या सुमारास अरेमियन युग सुरू झालें. फार प्राचीन कालीं म्हणजे इ. सनापूर्वी १६०० च्या सुमारास सीरियांत इजिप्शियन व बाबिलोनी या संस्कृतींचा संयोग होऊन त्यापासून एक पाश्चिम आशियाकडील नवीनच

विशिष्ट संस्कृति जन्मास आली व फिनिशियन लोकांच्या व्यापारी चळवळीमुळें ह्या संस्कृतीनें भूमध्यसमुद्राच्या पश्चिमेकडील भूभागापर्यंत प्रवास केला. विशेषतः उद्योगधंद्यांची चांगलीच वाढ झाली. उत्तम उंची वस्त्रें विणणें, कांचसामान, खोटे हिरे व मातीची भांडीं वगैरे तयार होऊं लागलीं. प्राचीन जेत्या लोकांनीं येथून नेलेल्या लुटीच्या उपलब्ध याद्यांत अनेक भिन्न उपकरणें व गोष्टींचे उल्लेख आहेत. इजियन संस्कृतीच्या फिनिशिया व पॅलेस्टाइन या प्रांतांवर झालेल्या परिणामाचे दर्शक असे जे अवशेष अलीकडे उपलब्ध झाले आहेत त्यांवरून वरील अनुमानच दृढ होतें कीं, सीरियन कलाकौशल्यावर शेजारच्या बलाढ्य राष्ट्रांनीं चिरंतन परिणाम घडवून आणले. पारमार्थिक बाबतींत सीरियन लोक स्वतंत्र डोकें चालवीत असत. प्रत्येक स्थानाची, प्रत्येक जातीची आपली एक मुख्य पुरुषदेवता ( बाल् ) व एक स्त्रीदेवता ( बालट् ) असे. ह्या स्त्रीदेवतेस 'अष्टार' किंवा 'अस्टारेट' असें म्हणत असत. ह्या स्थानिक देवतांखेरीज 'स्वर्गाचा प्रभू' व इतर देवताहि होत्या व त्यांच्याकरितां सामान्यरीत्या नरमेध करीत असत. परंतु सीरियन दैवतेतिहासांत मात्र परकीयांचे परिणाम वारंवार दृग्गोचर होतात. सीरियामध्यें स्वतंत्र कल्पनाशक्तीचा अभाव असतांना देखील सीरियन संस्कृतीनें पश्चिमेकडील बराच प्रदेश व्यापला, इतकेंच नव्हे तर ख्रिस्ती शकास प्रारंभ होण्यापूर्वी कितीतरी वर्षें सीरियन लोकांनीं उत्तरेकडील अरब लोकांवर पुष्कळ सांस्कृतिक परिणाम घडवून आणिले व हेच परिणाम इसवी सनाच्या प्रारंभीं नॅबॅटियन लोकांच्या सत्तेमुळें फारच जोरावले. अरब लोकांनीं सीरियन लोकांपासूनच लेखनकला उचलली.

सीरियाच्या प्राचीन राजकीय व भौगोलिक संबंधाविषयीं इजिप्तमधील कागदपत्रांवरून विशेषतः तिसरा टेथमॉसिस याच्या पश्चिम आशियांतील स्वाऱ्यांसंबंधीं व चवथा अॅमेनोफिस याच्या कारकीर्दीसंबंधीं जे कागदपत्र सांपडले आहेत त्यांवरून थोडीबहूत माहिती मिळते. इजिप्तचे लोक आपल्या पूर्वेकडील शेजाऱ्यास 'अमू' ही संज्ञा लावीत, युफ्रेटिसच्या पलीकडून त्या नदीपर्यंत पसरलेल्या सीरियाच्या प्रदेशाचें 'शाही' हें नांव आहे व त्यामध्यें पुढील प्रदेश मोडतात, तेः—

( १ ) रुटेनू म्हणजे सांप्रतचा पॅलेस्टाइन. ( कधीं कधीं कोएलेरियासह पॅलेस्टाइन प्रांतास 'वरचा रुटेनू' व त्या खालच्या युफ्रेटिस नदीपर्यंतच्या भागास ' खालचा रुटेनू ' म्हणण्याचा प्रघात आहे ).

( २ ) खेतची भूमि ( रामेसाइड युगांतील ऑरॉंटस नदीकांठीं कडेश राजधानी असलेल्या रुटेनू प्रांताकडेच कांहीं काळ असलेली ).

( ३ ) नहरिन नामक युफ्रेटिस नदीच्या दोही कांठचा प्रदेश. (सीरियन सरहद्दीच्या बाहेर.)

कॅननाइट लोकांस सामान्यतः खरु म्हणत. ह्या प्रदेशांतून इजिप्तच्या राजांनीं खूप मौल्यवान् वस्तू लुटल्या. ह्यावरून त्या काळीं सीरिया बराच भरभराटींत व अत्यंत सुधारलेला देश होता हें उघड आहे. याशिवाय कर्णक येथील देवालयांतील भूगोलविषयक याद्या व तिसऱ्या टेथमॉसिसनंतरचे २०० वर्षांच्या सुमाराचे शिलालेख ह्यांमध्यें बऱ्याच शहरांचे उल्लेख आढळतात. त्यांमध्यें अलेप्पो, कॅडेश, सिडन, ह्यासारखीं व पॅलेस्टाइनमधील शहरें यांचीं नांवें जुळतात. इ. स. पू. च्या १५ व्या शतकांतील अमर्ना कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, सीरियाचा कांहीं भाग बुक्काच्या बाजूस दक्षिणेकडे हालचाल करणाऱ्या इजिप्तच्या राजप्रतिनिधींच्या अमलाखालीं होता व बाकीचा भाग अमोराइट लोक, त्याचप्रमाणें मिटनी व खेत येथील लोक यांच्या उपद्रवामुळें त्यांच्या अमलाबाहेर होता. 'सेमेटिक' कक्षेबाहेर असणाऱ्या या लोकांचें पॅलेस्टाइनमध्यें सुद्धां अरेमियन लोकांशीं मिश्रण झालें. ह्यावरून एवढें लक्षांत येईल कीं, मुख्यतः त्याच लोकांनीं इ. स. पू. १६ व्या पासून १४ व्या शतकापर्यंत इजिप्तचे सीरियाशीं वारंवार संबंध आणिले. दुसऱ्या रामेसिसच्या कारकीर्दींत हे लोक ऑरॉंटसवरच्या कडेशच्या आसपास असणाऱ्या प्रदेशांत केंद्रीभूत झाले होते व त्यांना पॅलेस्टाइन व खेत येथें जाण्यास त्या मानानें पूर्ण मुभा होती. त्यानंतर हें केंद्रस्थान युफ्रेटिसच्या आसमंतात गेलें व मध्यंतरींच्या हिब्रू राजसत्तेमुळें इजिप्तचा ह्या लोकांशीं संबंध तुटला. परंतु इ. सना पूर्वी १०५०च्या सुमारास पहिल्या तिग्लथपिलेसरच्या कारकीर्दींत पश्चिमेकडे असुरियाचा बराच विस्तार होईतोंपर्यंत ह्या लोकांची सत्ता प्रामुख्यानें होतीच. पुढें आठव्या शतकांत तिसऱ्या सार्गननें कार्चेमिश घेतलें व हिटाइट सत्तेचा शेवट अशा रीतीनें झाला.

सीरियामधील ज्या लोकांविषयीं विशेष उल्लेख केला पाहिजे असे लोक म्हटले म्हणजे साबियन, फिनिशियन व पॅलेस्टाइनमधील यहुदी लोकांच्या अगोदर वसती करणारे लोक होत. यहुदी लोकांचा ख्रि. पू. १००० वर्षांपूर्वींचा पॅलेस्टाइनमधील इतिहास पूर्णपणें उपलब्ध नाहीं. यांचा व फिनिशिअनांचा उपलब्ध इतिहास पूर्वी दिलाच आहे. आतां साबियन व यांच्यासंबंधीं माहिती देतों.

**साबियन्.**—' येमेन ' येथील लोकांचें प्राचीन नांव ' साबा ' हें असून त्यासंबंधीं अतिप्राचीन उल्लेख हिब्रू धर्मग्रंथांत आले आहेत. जुन्या करारांत ( जेनेसिस १०. २६—२९ ) जोक्टनच्या मुलांच्या नांवांची यादी आली आहे त्यापैकीं बरींचशीं नांवें आरबी भौगोलिक ग्रंथांत अगर शिलालेखांत आढळतात त्यावरून हे लोक येमेन मधील असावेत असा इतिहाससंशोधकांचा निर्णय झाला आहे.

सॅबा '( शेबा ) ही संज्ञा प्रथम हिब्रू ग्रंथांत फारच कमी महत्त्वाची आहे म्हणजे दक्षिण अरबस्थानाशीं निगत मालाचा व्यापार करणाऱ्या सौदागरांनां समुदायवाचक अर्थानें लावण्यांत येते. जेनेसिसमध्यें आलेल्या दुसऱ्या दोन उल्लेखांवरून साबिअन लोकांच्या वसाहती, ओसाड अरण्यांतून व्यापारी दळणवळण वाढावें याकरितां त्यांनीं स्थापलेले कारखाने व मुक्कामाच्या जागा इत्यादि माहिती मिळते. त्याचप्रमाणें शेबाची राणी ही सालोमन यास भेटण्यास आली ती व्यापारी टोळीबरोबर आली असावी ह्या व इतर उल्लेखांवरुन सालोमन पासून सायरसच्या कालापर्यंत व्यापारीदृष्टया महत्त्वास चढलेल्या ह्या साबिअन लोकांच्या संपत्तीची व भरभराटीची साक्ष पटते. असुरियातील शिलालेखांवरूनहि वरील तऱ्हेचीच माहिती मिळते. साबिअन व इतर दक्षिण आरबी लोकांबद्दल इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकाच्या वेळची ग्रीक लोकांनीं दिलेली माहिती उपलब्ध आहे; त्यावरुन व्यापारी व वाटसरु यांनीं आणलेल्या साबिअन लोकांच्या ऐश्वर्याच्या व संपत्तीच्या बातम्यांवरून रोमच्या ऑगस्टसच्या तोंडासहि पाणी सुटून त्यानें केलेल्या एकंदर स्वारीचें साग्र वर्णन स्ट्रेबोनें दिलें आहे. त्याचप्रमाणें आफ्रिकाखंडांतहि साबिअन लोक फार पूर्वीपासून व्यापार चालवीत असत व अबीसीनिया प्रांतातील भाषा व लिपि यांवरुन तो प्रांत बहुतेक दक्षिण आरबस्तानांतील लोकांनीं भरून गेला होता असें दिसतें. पुढें ज्या वेळीं खुष्कीनें चालणारा अंतर्गत व्यापार बसला व जलमार्गानें व्यापार करणारीं बंदरें पुढें आलीं त्या वेळीं अर्थातच पूर्वीचें व्यापारी चळवळीचें स्वरूप बदलून गेलें व नवीन शहरें व नवीन लोक पुढें आले आणि त्यामुळें साबिअन लोकांचें महत्त्व बरेंच कमी झालें.

**लिडिया.**—हिटाइट राष्ट्र नष्ट झाल्यानंतर आशियामायनरमध्यें कांहींसें महत्त्वास चढलेलें राष्ट्र लिडीया हें एकटें होतें. तथापि त्यावरहि ग्रीस व इराण यांचा पगडा होता. लिडिया प्राचीन भूगोलात आशियामायनरचा एक जिल्हा होता. हिरोडोटस म्हणतो कीं, लिडियन हें नांव मिओनिस लोकांनां ॲटीसचा मुलगा लिडस याच्या नांवावरून मिळालें. या राज्यांत सार्डीस हें मुख्य शहर असून मॅगनेशिया ॲड सिपिलम हें त्याच्या खालोखाल होतें. आयोनियाच्या किनाऱ्याचा लिडियन राज्यांत समावेश होत असे. अल्याटेस व क्रोसस यांनीं लिडीयन राज्याचें साम्राज्यांत रूपांतर केलें. रोमनकाळीं लिडिया म्हणजे मायसिया व कारिया आणि त्याप्रमाणें फ्रिजिया व इजियन समुद्र यांमधला प्रदेश होता. लिडिया हा सुपीक प्रदेश होता. डोंगराळ भागांत द्राक्षांचे मळे व लोकरीचा धंदा चांगला चाले व सपाट प्रदेशांत अनेक प्रकारचें धान्य विपुल पिकत असे.

लिडियन लोक मूळ आर्यन, सेमिटिक किंवा टुरेनियन वंशातले आहेत हे निश्चित नाहीं. लिडियन जात ही आर्य व मूळचे रहिवाशी यांच्या मिश्रणापासून झाली असावा. उद्योग व व्यापार यांबद्दल यांची प्रसिद्धी होती. यांच्यामधलि निसर्गपूजा रानटी व वैषयिक तऱ्हेची होती. मुख्यदव मेयुस असून तो व ॲटीस ही सूर्यदेवता यांची पूजा होत असे. ॲटीस हा सिबीला या आदिमातेचा पुत्र व पति होता. येथें हिचीच पूजा होती, त्यावरून ही देवता ग्रीक आर्टेमिस असावी. लिडियन लोकांनीं आपले धार्मिक संप्रदायविधि हिटाइट लोकांवरुन घेतले होते असे दिसते. आर्टिस-देवतेच्या पूजारिणी सशस्त्र असून त्यांच्या चित्रांवरून अमेझॉन स्त्रियांची कल्पना कशी प्रादुर्भूत झाली असावी हें समजते. लिडियांतील मुली देहविक्रय करून हुंड्यांचे पैसे जमा करीत व ही चाल धार्मिक गणली जाई.

तद्देशीय इतिहासकार क्झान्तस (इ. स. पूर्वी ४६०) हा लिडियांत एका मागून एक अशी तीन राजघराणीं झालीं असें म्हणतो. यांपैकीं पहिलें अटियाडस हें काल्पनिक असावें. दुसऱ्या घराण्याची दैवी उत्पत्ति होती अशी समजूत होती.

कांहीं हिटाइट अवशेष लिडियांत सांपडले आहेत. यावरून येथें हिटाइट अंमल असावा ह्यांच्या नंतर हेरॅक्लिद घराण्याचा उदय झाला. हें घराणें ५०५ वर्षें होतें. गायजरनें शेवटचा पुरुष साडयाटेस यास ठार मारून मर्म्नाद घराणें स्थापिलें (इ. स. ६८७). या घराण्याच्या वेळीं लिडियाची समुद्रावर व जमीनीवर बरीच सत्ता वाढली. कित्येक ग्रीक शहरें व आयोनियाचा किनारा या लोकांनीं जिंकून घेतला. क्रोससनें तर अनेक विजय मिळवून लिडियन साम्राज्य बनविलें. मध्यंतरीं किमेरिअन लोकांनीं याच्या राज्यावर स्वारी केली... म्हणून ह्यानें असुरबनिपालकडे खंडणी व दोन लढाईत कैद केलेले किमेरियन सरदार पाठविले. नंतर यानें असुरियाविरुद्ध बंड केलें. परंतु त्या युद्धांत हा पडला व याचा मुलगा आर्दीस ह्यानें निनेव्हेचें मांडलिकत्व कबूल केलें. आर्दीसचा नातु अल्याटेस यानें किमेरिअन लोकांचा नायनाट करून स्मर्ना घेतलें. यानेंच लिडियन साम्राज्य स्थापिलें. यानंतर (ख्रि. पू. ५६०) क्रोसस गादीवर बसला. सायरसनें सार्डिस शहर काबीज केलें व क्रोससला कैद केलें. पुढें लिडियन लोकांनीं पॅक्टिआसच्या नेतृत्वाखालीं बंड केल्यावरून इराणच्या राजानें लिडियन लोकांपासून हत्यारें काढून घेतलीं. सार्डीस हें इराणी साम्राज्याची पश्चिमेकडची राजधानी झालें. अलेक्झांडरच्या मरणानंतर लिडिया ॲंटिगोनसच्या ताब्यांत आलें. अकिअसनें स्वतः सार्डीसचा राजा असें जाहीर केल्यावरून ॲंटायोकसनें त्याचा पराभव करून त्याला ठार मारिलें. रोमन लोकांनीं हा प्रांत युमेनेसला दिला.

लिडियन साम्राज्य हें प्राचीनकाळीं उद्योगधंद्याचें माहेरघर होतें. येथें, फांसे वगैरे खेळ, सोन्यारुप्याचीं नाणीं यांची

सुरुवात झाली. यांचें वाङ्मय उपलब्ध नाहीं. गायन व शारीरिक खेळ यांबद्दल लिडियाची प्रसिद्धी होती.

लिडियन राष्ट्राची सुप्रसिद्ध राजधानी जें सार्डिस शहर त्याबद्दल बरीच माहिती मिळते. या शहरांत ग्रीक, मिसरी, आसुरी वगैरे निरनिराळ्या संस्कृतींचें मिश्रण होतें. अनेक ठिकाणीं थ्रेसियन थडग्यांच्या पद्धतीचीं मृतांचीं स्मारकें बांधलेलीं होतीं. गुरांच्या कळपांचे देखावे काढलेले आढळतात, शहरांतील अरुंद रस्त्यांतून माणसांची व मालाची वाहतुक करणारे रथ व घोडे यांची गर्दी असे. बाजार पेठेंत लहान लहान अरुंद व लांबट दुकानें असत. एका बाजूला रंगीबेरंगी कातड्यांच्या पिशव्या, जोडे, वहाणा, चामड्याचे पट्टे वगैरे जिन्नसांची दुकानें होतीं. एका बाजूला कापडवाल्यांची, एका बाजूला सराफांची, एका बाजूला सुगंधी सामानाची, अशी दुकानांची व्यवस्थित मांडणी दिसते. या सुखसाधनांबरोबरच तेथील लोकांचें आचरण, शिथिल व चैनीचें होतें. सर्व चैनी लोकांना एकत्र जमण्याकरितां एक वृक्षलतांनीं आच्छादलेला मोठा बाग व नाचरंग तमाशाकरितां नाटकगृहासारख्या इमारती बांधलेल्या होत्या.

**आरेमियन लोक.**—हे लोक सेमेटिक वंशाचे, सेमेटिक भाषा बोलणारे आणि सेमेटिक धर्माचेच होते. हे मूळ अरबस्तानच्या उत्तरेकडून येऊन बाबिलोनिया आणि पश्चिम आशियांतील उंच प्रदेश यांच्या मधल्या प्रदेशांत वसाहत करून राहिले. आरेमियन लोकांनीं सीरिया जिंकल्यावर तेथें त्यांचीं झोबाह, हमात, पाटिन, व दमास्कस वगैरे लहान लहान राज्यें स्थापन झालीं. त्यांपैकीं दमास्कसचेंच राज्य कायतें जगाच्या इतिहासांत महत्त्वाचें आहे, आणि बायबल मध्यें सीरियाचें राज्य म्हणून जो उल्लेख आहे, तो या दमास्कसच्या राज्याबद्दलच होय. दमास्कसच्या राजांचा इतिहासांत संबंध डेव्हिडच्या कारकीर्दींत येतो. ख्रि.पू.१००० त डेव्हिडनें दमास्कसच्या राजाला खंडणी देणें भाग पाडिलें. ख्रि. पू. ९५० त दमास्कसचें राज्य सालोमनच्या ताब्यांतून निघून स्वतंत्र झालें, त्यावेळीं रेझन हा दमास्कसचा राजा होता. त्याच्या मागून हेझिओन हा राजा झाला असें दिसतें. त्याच्या नंतर टाब्रिमोन गादीवर आला. हीं राजांचीं नांवें फक्त बायबलमध्यें आढळतात, तथापि हेझिओन आणि रेझोन हे एकच असावे असें दिसतें. ख्रि. पू. ९०० त पहिला बेन–हदद दमास्कसच्या राज्यावर आला. बेन–हददची मदत जूडाच्या आसानें देवालयांतील आणि राजवाड्यांतील संपत्ति देऊन मिळविली, आणि इस्राएलच्या बादशहा बरोबर युद्ध केलें. ख्रि. पू. ८७० दुसरा बेन–हदाद ( असुरियन स्मारक लेखांत हदाद–इद्री असे नांव आढळतें. ) या दमास्कसच्या राजानें इस्राएल लोकांशीं उघड शत्रुत्व सुरू केलें, तेव्हां ओम्री आणि अहब यांनीं फिनीशियन लोकांशीं सख्य करून त्याला विरोध केला. बेन–हदादनें समरिया राजधानीला वेढा घातला, परंतु त्याला आहाबनें हांकून लाविलें. पुढल्या वर्षीं बेन–हदादनें पुन्हां वेढा दिला पण पुन्हां त्याचा आफेक नजीक लढाईंत पराभव झाला. तथापि आहाबनें आपलें धोरण बदलून बेनहदादशीं मैत्रीचा तह केला आणि असुरियाच्या वाढत्या सत्तेला विरोध करण्याची तयारी केली. ख्रि. पू. ८५४ त दमास्कस, इस्राएल आणि हामात यांचा मित्रसंघ बनून बेनहदाद हा त्याचा मुख्य बनला. आणि हीं तीन आणि इतर राष्ट्रें यांनीं मिळून हमातवर स्वारी करून आलेला दुसरा शाल्मनसर याशीं सामना दिला. करकर येथें लढाई झाली पण त्यांत या दोस्त राष्ट्रांचाच पराभव झाला. तेव्हां या दोस्त राष्ट्रांत फाटाफूट होऊन दमास्कस व सीरिया यांनींच कायतें युद्ध चालू ठेविलें. ख्रि. पू. ८४९त बेनहदाद आणि हमातचा इर्खुलिन यांनीं, शालमनसर यानें हमातवर स्वारी केली असतां त्याला विरोध केला. पण या लढाईचा निकाल कोणत्याच पक्षाच्या बाजूनें निश्चित झाला नाहीं. ख्रि. पू. ८४६ या सालीं शालमनसर यानें तिसऱ्या वेळीं हमातवर स्वारी केली परंतु बेनहदादच्या पराक्रमामुळें त्याला तो देश जिंकतां आला नाहीं. ख्रि. पू. ८४५ त हाझायेल हा आपला बाप बेनहदाद याच्या मागून गादीवर आला. बेनहदादचा खून झाला असावा असें दिसतें. ख्रि. पू. ८४२ त हाझायेल यानें इतर सर्व राजे सोडून गेल्यामुळें एकट्यानेंच शालमनसर बरोबर युद्ध करण्याचें ठरविलें. शालमनसरची सीरियावरील ही चौथी स्वारी होय. दमास्कसला बरेच दिवस वेढा पडला होता परंतु विजय कोणत्याच पक्षास मिळाला नाहीं. ख्रि. पू. ८३९ या सालीं शालमनसरनें दमास्कसवर पुन्हां स्वारी केली, पण यावेळींहि त्याला जय मिळाला नाहीं, आणि उलट दमास्कसच्या राजानेंच इस्राएलवर स्वारी केली. या शतकाच्या अखेर जॉर्डनच्या पूर्वेकडील आणि आर्नोनच्या उत्तरेकडील प्रदेश हाझायेलनें आणि त्याच्या नंतरचा राजा तिसरा बेनहदाद यानीं आपल्या राज्यास जोडला. परंतु लवकरच असुरियन लोकांनीं दमास्कसवर पुन्हां हल्ला केला. ती संधि साधून इस्रालाइट लोकांनीं आपला प्रदेश पुन्हा परत मिळविला. ख्रि. पू. ८०६ ते ७९७मध्यें तिसरा अदाद निरारी यानें दमास्कसवर स्वारी केली आणि तिसरा बेनहदाद याच्या नंतरचा राजा मरी याला जबर खंडणी देण्यास भाग पाडलें ( ७९७ ). ख्रि. पू.७७३त असुरियाच्या राजानें पुन्हां दमास्कसवर स्वारी केली व इस्राएल राष्ट्रहि यावेळीं फार बलिष्ठ होऊन त्यानें दमास्कसला आपलें मांडलिक बनविलें. या दुहेरी हल्ल्यामुळें दमास्कसच्या राज्याला भराभर उतरती कळा लागली. ख्रि. पू. ७३५ त पेकह यानें रेझिन बरोबर दोस्ती केली, आणि जुडाच्या अहझवर स्वारी केली. याप्रमाणें सीरिओ एफ्रामिटिक युद्ध सुरू झालें. अहझनें तिसरा तिग्लथ पिलेसर याची मदत मागितली व ती त्याला मिळाली. ख्रि. पू. ७३४ त तिग्लथ पिलेसरनें सीरियावर चाल केली, आणि रेझिनचा पराभव केला. तेव्हां रेझीन दमास्कस शहराचा आश्रय

धरून राहिला. ख्रि. पू. ७३२ त दमास्कस शहर हस्तगत करून रेझीनला ठार मारण्यांत आलें, आणि शहरांतील रहिवाशांनां हद्दपार करण्यांत आले व अशा रीतीनें दमास्कसचें राज्य असुरियाच्या साम्राज्यांत सामील करण्यांत आलें.

वरील हकीकतींत वारंवार उल्लेखिलेल्या मायसिनी लोकांबद्दल आपणांस थोडी माहिती करून घेतली पाहिजे.

**मायसिनी.**—होमरच्या ग्रंथांत मायसिनी लोकांचें नांव ट्रोजन लोकांच्या साथीदारांच्या यादींत असून टेलिफस राजा परगॅमम शहराला येण्याचें वेळेस ते कैकसच्या खिर्डीत राहात होते असा मजकूर आहे. परंतु त्यांच्या पूर्वेतिहासाची या पेक्षां अधिक माहिती उपलब्ध नाहीं. ट्रोजन युद्धापूर्वी टयूक्रियन लोकांस मदतीस घेऊन त्यांनीं यूरोपखंडावर स्वारी केली, या हिरोडोटसच्या म्हणण्यास कल्पितकथेपेक्षां जास्त किंमत देतां येत नाहीं. लिडियन क्रोससनें आसपासच्या राष्ट्रांबरोबर मायसिनी लोकांस पादाक्रांत केलें ही त्यांच्याविषयीं पहिलीच ऐतिहासिक गोष्ट आपणांस अवगत आहे.

**बिथिअन.**—हिरोडोटस, झेनोफोन, स्ट्रेबो इत्यादि प्राचीन ग्रंथकारांच्या मतें बिथिअन लोक थ्रेसमधून आले असावे. थ्रेसमध्यें थिनि नांवाच्या लोकांचें अस्तित्व असल्याबद्दल पुरावा सांपडतो व ते आणि बिथि हे बरोबरच एशियाच्या जवळपासच्या प्रांतांत एकाच वेळीं स्थाइक झाले असावे. त्यांनीं मायसिनी कॉकोन इत्यादि लोकांच्या लहान लहान टोळ्यांचा पराभव करून त्यांचा प्रदेश व्यापला. हिरोडोटसनें थिनि व बिथि हे शेजारी शेजारींच रहात असत असें वर्णन केलें आहे. परंतु पुढें बिथि प्रबळ झाले असावे व म्हणून त्यांचेंच नांव त्या प्रदेशास मिळालें असावें. क्रोसस राजानें त्यांच्या प्रदेशाचा आपल्या लिडियन साम्राज्यांत अन्तर्भाव केला होता. पुढें ते लिडियनलोकांबरोबरच इराणचे अंकित झाले ( ख्रि. पू. ५४६ ). आणि त्यांचा फ्रिजिया या सत्रपींत अन्तर्भाव झाला. हेलेस्पॉट व बास्फोरस हे प्रदेश याच सुत्रपींत मोडत. परंतु अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वीच त्यांनीं इराणपासून आपलें स्वातंत्र्य जिंकून घेतलें होतें. बास व झिपोटेस या दोन स्वजातीय राजांच्या हाताखालीं त्यांनीं आपलें स्वातंत्र्य कायम राखलें व झिपोटेस याचा मुलगा पहिला निकोमिडिस यानें आपणांस प्रथम राजा असें म्हणविलें.

**मीडिया.**—या प्रांतांतील लोकांचा ऐतिहासिक उल्लेख प्रथम ख्रि. पू. ८३६ त येतो. त्यावेळीं असुरी राजा शालमनसर दुसरा यानें 'अमदाई, या लोकांपासून खंडणी घेतली. त्यावेळीं तो झग्रोस लोकांशीं युद्ध करण्यांत गुंतला होता. या राष्ट्रांतील पुरोहितवर्ग 'मग' या नांवानें प्रख्यात असून झरथुष्ट्राची जन्मभूमि हाच देश असावा असें एक मत आहे. या देशांतील मग लोक फार प्राचीन काळीं हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं मगध देशास आपलें नांव दिलें. हे इन्द्राम न पूजिणारे होते म्हणून यांचा ऋग्वेदांत उल्लेख आला आहे ( ३. ५३, १४ ). अथर्ववेदांतहि व्रात्यांबरोबर यांचा उल्लेख आला आहे. सध्या हिंदुस्थानांतहि कांहीं मग ब्राह्मण आहेत.

**इराण.**—इराणच्या इतिहासास आरंभ मीडियावरील शालमनसरच्या ( दुसऱ्या ) स्वारीपासूनच होतो. तत्पूर्वीची त्यांची संस्कृति म्हणजे ते व भारतीय आर्य एक होते नंतर विभक्त झाले त्या कालची अवेस्तामध्यें दिसून येते. अवेस्ता व वेद यांमध्यें अनेक गोष्टींत साम्य आहे. अनेक शब्द वर्णविपर्यय भेद वजा केल्यास एकच आहेत ही गोष्ट सिद्धच आहे. त्या संस्कृतीविषयीं विवेचन पुढें येईल.

**मंगोल.**—यांचा प्राचीन इतिहास फारच अस्पष्ट आहे. या शब्दाची व्युत्पत्तीहि अनिश्चित आहे. परंतु मॉंग म्हणजे शूर या शब्दापासून हा शब्द निघाला असावा हें शॉट यांचें मत आतां सामान्यतः ग्राह्य झालें आहे. यांचा त्रोटक उल्लेख चीन देशावर राज्य करणाऱ्या त अंग घराण्याच्या बखरींत ( इ. स. ६१९-६९० ) येतो. इतिहासाच्या अभावीं यांच्या उत्पत्तीसंबंधीं बऱ्याच दंतकथा प्रचलित झाल्या आहेत. एका कथेनें एका लांडग्यास यांच्या पूर्वज त्वाचा मान दिला आहे; दुसऱ्या एकानें बुदन्त्सर या नांवाच्या मनुष्यास आद्य मांगोल बनविलें आहे. याच्यापासून नववा पुरुष चेंगिझखान हा होय. येथपासून त्यांचा इतिहास साधार मिळतो.

**चिनी संस्कृति.**—चिनी लोक असें समजतात कीं, फुहि नामक त्यांच्या एका पुरातन बादशहानें त्यांच्या समाजास व्यवस्थित स्वरूप आणलें. त्यांच्या मतें या फुहि बादशहापासूनच त्यांच्या इतिहासास सुरुवात होत असून त्याची कारकीर्द ते ख्रिस्त पूर्व २८५२-२७३८ या काळांत घालतात. चिनी लोकांच्या समजुतीप्रमाणें फुहीपूर्वी ते पशूप्रमाणें जंगलांत राहत होते; तेव्हां त्यांचा समाज अगदीं विस्कळित स्वरूपांत असून त्यामध्यें कौटुंबिक जीवनक्रम अस्तित्वांत आला नव्हता; मुलें फक्त आपल्या आईलाच ओळखीत-त्यांनां आपला बाप कोण हें ठाऊक नसे. अशा स्थितींत समाज असतांनां फुहीनें विवाहसंस्था अमलांत आणून पतिपत्नींपैकीं पतीकडे समाजाचें धुरीणत्व दिलें. त्यानें पाकुआ म्हणजे तीन तीन तुटक तुटक अथवा सलग अशा रेषांचीं आठ सांकेतिक चिन्हें काढून ज्या एका द्वैतवादाचा उपक्रम केला असें मानण्यांत येतें त्यांतहि हेंच तत्व दृग्गोचर होतें. ज्या राजानें कुटुंबाचें धुरीणत्व पुरुषाकडे दिल्याचें म्हटलें आहे त्यालाच स्त्रीपुंवादाच्याहि उपक्रमाचें श्रेय दिलें आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ह्या वादानुसार सर्व चांगल्या वस्तू किंवा चांगले गुण हे पुंजातीय असून त्यांच्याच जोडीच्या ज्या दुय्यम प्रतीच्या वस्तू किंवा गुण आहेत ते स्त्रीजातीय मानले आहेत. उदाहरणार्थ द्यावापृथिवी, सूर्यचंद्र, दिवसरात्र, दक्षिणउत्तर

इत्यादि. ह्या परंपरागत कथा जर खरोखरच चिनी लोकांच्या इतिहासपूर्वकालीन कल्पनांच्या निदर्शक असतील तर असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, ज्या सरळ भावनेमुळें आपल्या किंवा यूरोपीयांच्या पूर्वजांच्या डोक्यांत लिंगभेदाची कल्पना आली तीच भावना प्राचीन चिनी लोकांतहि अस्तित्वांत होती. फरक एवढाच कीं,आपणां दोघांमध्यें ती कल्पना केवळ भाषेंतील लिंगभेददर्शक पूर्वगामी किंवा उत्तरगामी प्रत्ययांच्या रूपानेंच शिल्लक राहिली आहे, तर चिनी लोकांच्या भाषेंत लिंगभेद नसला तरी ती कल्पना त्यांच्या अध्यात्म ज्ञानांत जिवंत आहे. कारण, त्यांनीं निसर्गसंबंधीं स्पष्टीकरणाचे जे जे म्हणून प्रयत्न केले आहेत त्या सर्वांच्या मुळाशीं वस्तुजातांमध्यें स्त्रीपुंभाव वास करीत असतो ही कल्पना दिसते.

ज्यांच्या योगानें मनुष्याचा पाशवी जीवनक्रम जाऊन त्यास सामाजिक स्थिति प्राप्त झाली ते सर्व प्राथमिक शोधहि ह्या फुहि बादशहाच्याच नांवावर घालण्यांत येतात. त्यानें आपल्या लोकांस मृगया करण्यास, मासे धरण्यास व शेळ्यामेंढ्या राखण्यास शिकविलें, त्यानें वाद्यें तयार केलीं व तत्पूर्वी प्रचारांत असलेली ग्रंथियुक्त लिपि काढून टाकून तिच्या ऐवजीं चित्रलिपीचा एक प्रकार चालू केला. अर्थात् या सर्व गोष्टींस इतिहासाचें महत्त्व देतां येत नाहीं, तथापि यावरून एवढें मात्र खास दिसतें कीं, कुटुंबरहित अशा समाजाच्या विस्कळित अवस्थेंतून मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीस सुरुवात करून नंतर मनुष्यास मृगया, मच्छीमारी, पशुसंगोपन यासारख्या धंद्यांचें ज्ञान झालें असें कल्पणाऱ्या उत्तरकालीन चिनी ग्रंथकारांचा युक्तिवाद तर्कशास्त्रास सोडून नव्हता. या नंतर पुढें शान–नुंगच्या कारकीर्दींत लोक शेतकीचा धंदा करूं लागले म्हणून जें म्हटलें आहे तेंहि अगदीं सयुक्तिकच आहे. शान–नुंग हा ख्रिस्तपूर्व २८ व्या शतकांत होऊन गेला असें चिनी लोक मानतात व यानेंच शेतकीचीं आउतें व अनेक वनस्पतींतील रोगनाशक गुण शोधून काढले अशी त्यांची समजूत आहे.

हुआंगति ( पीत राजा ) हा ऐतिहासिक महत्त्वाचा तिसरा बादशहा आहे. याच्या कारकीर्दीस कांहींच्या मतें ख्रि. पू. २७०४ त तर कांहींच्या मतें ख्रि. पू. २४९१ त आरंभ झाला. याच्या नांवावर, ज्या दुसऱ्या कोणाच्या नांवावर घालण्यास आधार नाहीं अशा बहुतेक सर्व सुधारणा मोडतात. यानें साम्राज्याचा विस्तार केला; याच्या कारकीर्दींत 'हुन्यू' नामक एका राष्ट्रजातीचा उल्लेख आला आहे. हे लोक चीन देशाच्या उत्तर सरहद्दीवर राहत होते व...ते पुढें ऐतिहासिक काळांत परिचित झालेल्या हिउंग-नु जातीचे पूर्वज होते अशी चिनी लोकांची फार जुनी समजूत आहे.या तीन बादशहांच्या अस्तित्वाबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं, परंतु त्यांच्या संबंधीं दिलेली हकीकत मात्र उघड उघड काल्पनिक दिसते. कारण त्यांच्या



कारकीर्दीचा काळ मनुष्यजीविताच्या मर्यादेच्या मानानें पाहतां बराच मोठा आहे तर त्यांत झालेल्या प्रगतीच्या मानानें फारच लहान आहे. हुआंगति यानेंच प्रथम देवळें, घरें व शहरें बांधण्याचा उपक्रम केला, अधिक महिना घालून पंचांग बसविलें व गाड्या, होड्या सुरू केल्या असें चिनी लोक समजतात. त्याच्या राणीनें रेशमी किड्यांची जोपासना सुरू केली व वेणूचा शोध लावून संगीतकलेस उत्तेजन दिलें. संगीतामुळेंच वजनें व मापेंहि अस्तित्वांत आलीं.

या तीन बादशहांच्या गोष्टी ज्या लिखाणांत सांपडतात तीं त्या बादशहांच्या मानानें बरींच अलीकडचीं आहेत. कनफ्यूशसपूर्वकालीन इतिहासासाठीं आधारभूत समजल्या जाणाऱ्या व स्वतः कनफ्यूशसच्याच नांवावर मोडणाऱ्या शुकिंग नामक ग्रंथांत या तिन्ही बादशहांचा उल्लेख नाहीं. या ग्रंथास यौ व शुन यांच्या कारकीर्दीपासून आरंभ होतो. यौ हा ख्रि. पू. २३५७–२२५८ मध्यें होऊन गेला असें एके ठिकाणीं म्हटलें आहे तर दुसरीकडे त्याचा काळ २०० वर्षें अलीकडे दिला आहे. यौनंतर शुन हा गादीवर बसला. यानें आपल्या कारकीर्दींत ज्या सॅनमिऔ लोकांस हद्दपार केलें ते चीनच्या नैर्ऋत्येस असलेल्या टांगुटान, तिबेटी व मिऔत्झि लोकांचे पूर्वज होते असें म्हणतात.

**हिया घराणें.**—शुननंतर यू हा बादशहा झाला. त्यानें ख्रि. पू. २२०५ पासून २१९८ पर्यंत राज्य केलें. यानें पीत नदीच्या महापुराचें पाणी ओसरविण्याकरितां कालवे खोदले व आपल्या राज्याचे ९ विभाग करून निरनिराळे प्रांत बनविले. या घराण्यांत एकंदर १८ बादशहा होऊन शेवटीं ख्रि. पू. १७६६ त तें लयास गेलें असें म्हणतात. या घराण्यापैकीं चुंग-कांग नामक बादशहाच्या कारकीर्दींत ख्रि. पू. (२१५९–२१४७) त्याच्या दरबारांतील ज्योतिष्यांनीं न वर्तविलेलें असें एक सूर्यग्रहण दिसलें.

**शांग उर्फ यिन घराणें.**—हें घराणें ख्रि. पू. १७६६ पासून ११२२ पर्यंत टिकलें व हिया घराण्याप्रमाणेंच चौसिन नामक एका राज्यकर्त्याच्या दुर्गुणांमुळें लयास गेलें. त्या वेळीं चीनच्या आसपास सर्वदूर रानटी राष्ट्रजाती पसरल्या असून त्यांच्या स्वाऱ्यांपासून चिनी लोकांनां आपलें रक्षण करावें लागत असे. या सर्वांत पश्चिम व उत्तर सरहद्दीवर असलेल्या हिउंग-नु ऊर्फ हूण लोकांच्या पूर्वजांपासून चीनला विशेष त्रास होत होता. चौसिन हा ऐषआरामांत दंग असल्यामुळें या लोकांच्या स्वाऱ्यांचें निवारण करण्याचा सर्व भार पश्चिम सरहद्दीवर असलेल्या चौ प्रांताच्या एका राजघराण्यांतल्या सुभ्यावर पडत असे. तेथील सुभेदार वोन वांग या नांवाचा प्रसिद्ध शूर पुरुष होता. त्यानें चौसिन याची दुष्कृत्यांबद्दल चांगली कानउघाडणी केली. परंतु तिचा कांहीं उपयोग न होतां या धीटपणाबद्दल वोन-वांग यास तुरुंगवास मात्र भोगावा लागला. वोन-वांग यानें आपल्या

तुरुंगवासांत इ-किंग नामक जो ग्रंथ लिहिला तो चिनी वाङ्मयांतील सर्वांत पुरातन ग्रंथ समजला जातो. चीन देशांत या ग्रंथाइतका आज दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाचा अभ्यास केला जात नाहीं. चौ-सिनच्या जुलमीपणामुळें त्याची प्रजा कंटाळून ती वोन-वांगचा पुत्र वु-वांग याच्या आधिपत्याखालीं आपल्या बादशहाविरुद्ध उठली, व शेवटीं 'पश्चिमेकडील लोकांच्या' म्हणजे बहुधा हूणांच्या पूर्वजांच्या मदतीनें वू-वांग यानें चौसिन याचा पूर्ण पराभव केल्यामुळें चौसिन यानें राजवाड्यास आग लावून आमहत्या केली.

चीनमध्यें सांस्कृतिक प्रगतीबरोबर परमार्थसाधनादिकांतहि प्रगति होत होती. तेव्हां या वेळच्या चीनच्या पारमार्थिक कल्पनांचेंहि आपणांस ज्ञान करून घेतलें पाहिजे.

चीन देशांत तीन धर्मसंप्रदाय प्रचलित आहेत. (१) बौद्धसंप्रदाय; (२) कन्फ्यूशिअससंप्रदाय; व (३) ताओसंप्रदाय. बौद्धधर्माचा प्रसार चिनांत कसा झाला हें पहिल्या विभागांत दाखविलेंच आहे (पृ. २३२.). कन्फ्यूशिअस हा चिनी ऋषि खि. पू. ५ व्या किंवा ६ व्या शतकांत होऊन गेला. त्यानें काढलेला संप्रदाय सध्यां चीनमध्यें प्रमुख आहे. त्यानें आपल्या मागील तत्त्वज्ञान्यांचीं मतें एकत्र करून तीं पुढील पिढीला दिलीं; स्वतःचें मत म्हणून मुळींच प्रतिपादन केलें नाहीं. याचें कार्य आपणांकडील व्यासांच्या कार्याप्रमाणें आहे. शु, शिह्, यी, व लीवी या अत्यंत प्राचीन "किंग" ग्रंथांवर त्याच्या संप्रदायाची उभारणी आहे. या ग्रंथांतून कन्फ्यूशिअसनें जें उद्धृत केलें तें जसेंच्या तसेंच आलेलें नाहीं कारण मध्यंतरीं एकदां चीनमधील सर्व ग्रंथ राजाज्ञेनें जाळण्यांत आले. कन्फ्यूशिअसच्या मृत्यूनंतर ५ व्या किंवा ६ व्या शतकांत हान घराणें राज्यारूढ असतां कांहीं पंडितांनीं कन्फ्यूशिअसचे पुनःसंशोधित ग्रंथ म्हणून लोकांपुढें कांहीं ग्रंथ मांडले. तेव्हां या कन्फ्यूशिअस संहितेंतील सर्वच विचार त्याचे असें म्हणतां येणार नाहींत. कन्फ्यूशिअसनें स्वतः "खन् खिऊ" हा इतिहास लिहिला आहे; इतर कांहीं छोटे ग्रंथ त्याचे म्हणून मानण्यांत येतात. शू ग्रंथांतील 'लुन् यू' मध्यें त्याच्या म्हणी व संवाद दिले आहेत.

**कनफ्यूशिअस याचा परमार्थसंप्रदाय.**— वास्तविक पाहातां, कन्फ्यूशिअसचा संप्रदाय हा धार्मिक नसून केवळ नीतिधर्म व राजधर्म म्हणतां येईल. कन्फ्यूशिअसनें आपल्या वेळच्या संस्कारांनां धार्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. "जेव्हां राज्यकारभार चांगला चालतो तेव्हां भाषा उच्च व धिटाईची असते व वागणूकहि तशीच असते. जेव्हां कारभार वाईट असतो तेव्हां वागणूक उच्च व धिटाईची असते पण भाषा मात्र कांहींशी अस्वैर बनते" या त्याच्या तत्त्वाप्रमाणें तो तत्कालीन अनीतीच्या प्रकारांबद्दल मूकवृत्ति ठेवी. तो लोकांनां जुन्या धर्माला चिकटून राहाण्याचा उपदेश करी; पण धार्मिक संस्कारांची चिकित्सा मात्र त्यांनीं करूं नये म्हणून बजावी. यज्ञांत बलिदान करणें मोठें महत्वाचें आहे असें तो मानी पण शांगतिप्रीत्यर्थ मोठा यज्ञ कां करावयाचा व त्याचा अर्थ काय याविषयीं अज्ञान प्रदर्शित करी. देव व दैवी प्राणी यांविषयींच्या तत्कालीन ज्ञानांत त्यानें मुळींच भर टाकिली नाहीं; मृत्यु किंवा परलोक यासंबंधीं त्यानें कांहीं सांगितलें नाहीं. चालू आयुष्यांत मनुष्यांनीं काय करावें यावर त्याचा सर्व भर असे, म्हणून प्रचलित दुःखांचें निरसन होण्याकरितां त्यानें शिस्तीचे नियम घालून दिले. मांडलिक संस्थानांच्या भांडणामुळें जेव्हां साम्राज्य डळमळूं लागलें, तेव्हां अनेक संस्थानिकांनां आपल्या महत्त्वाकांक्षा मर्यादित करण्याचा व एकी करून देणारी समता राखण्याचा त्यानें उपदेश केला. समाजाच्या निरनिराळ्या घटकांनीं एकमेकांच्या हिताकरितां सुरळीतपणें चालावें, प्रत्येक संस्थानानें आपल्या वांट्यास आलेली साम्राज्याची नोकरी बजावावी व प्रत्येक राज्यकर्त्यानें व अधिकाऱ्यानें आपआपल्या जागेवर काम करावें, म्हणजे मध्यवर्ती सत्ता सरहद्दींवरील रानटी लोकांनां नमुनेदार व परकीयांनां उच्चाटन करण्यास फार भारी होईल, अशा तऱ्हेची त्याची शिकवण असे.

कन्फ्यूशिअस हा प्रमुखत्वानें राजकीय सुधारणा करणारा होता असें म्हणतां येईल. त्याच्या राजकीय सुधारणा नीतीच्या पायावर उभारलेल्या असत. सृष्टींतील एकतानता मानवी जगांत दिसावी म्हणून त्यानें आपल्या संप्रदायांत ज्ञानाचें विशेषतः निसर्गज्ञानाचें संवर्धन हें आद्य तत्त्व गोंवून दिलें. ज्ञानानें आत्मोन्नति होते व आत्मोन्नत मनुष्य साम्राज्य स्थिर करण्यामध्यें भाग घेऊं शकतो. कन्फ्यूशिअसच्या वेळची चीनच्या साम्राज्याची स्थिति लक्षांत घेतल्यास तो साम्राज्य स्थिर करण्याकरितां कां झटत असे व त्यानें राजधर्म प्रामुख्यानें कां उपदेशिला हें कळून येईल.

कौटुंबिक व सामाजिक संबंधांत सरसकट भाऊपणाची जाणीव ठेवल्यास आयुष्य चैतन्ययुक्त राहातें. (१) परोपकारशीलता; (२) मनाची ऋजुता; (३) वागणुकींत औचित्य; (४) व्यावहारिक चाणाक्षपणा; व (५) सद्धेतु या गोष्टी बंधुभावाला आवश्यक आहेत; राजा आणि प्रजा, पिता आणि पुत्र, वडील आणि धाकटा भाऊ, नवरा आणि बायको व मित्र आणि शत्रु यांमधील संबंध या प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वावर चांगले टिकतील व आयुष्य सुखमय होईल. पिता पुत्रधर्म आणि त्यायोगें उत्पन्न होणारा बंधुभावपर कनिष्ठपणा हे जगताला आधारमय असून त्यांवर केवळ आत्मोन्नतीच नव्हे तर कुटुंबाचा व सरकारी कारभाराचा सुयंत्रितपणा अवलंबून असतो, व याच कारणांकरितां कन्फ्यूशिअसनें पितृपूजे (श्राद्धा) कडे समाजाचें असलेलें फाजील लक्ष कमी करण्याचा प्रयत्न केला नाहीं. कारण दैवी हक्क व प्रचलित पद्धतीला मान देण्याची अत्यावश्यकता या त्याच्या तत्त्वांनां पितृपूजेमुळें दुजोरा मिळत होता. प्रत्येक राज्यकर्ता देवाचें फर्मान मिळवून गादीवर बसतो, तेव्हां

त्याच्या प्रजेपैकीं प्रत्येकानें त्याला राजनिष्ठ राहून आपआपलें काम करीत राहिलें पाहिजे; त्याचप्रमाणें कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यानें वागलें पाहिजे. घरांत किंवा राज्यांत नियमबाह्य वर्तन मुळींच होता कामा नये. समाजांत शांततेचा कोणीहि भंग करूं नये. ही त्याच्या "मध्यमस्थितीच्या तत्त्वा" ची शिकवण होय. सामाजिक संबंध सुखदायक व साम्राज्य समाधानी राहाण्याकरितां साम्यता व एकतानता या दोन गोष्टींची अतिशय जरूरी असते

वर्तन सरळ ठेवणाऱ्या गोष्टींमध्यें काव्याची गणना होते; कारण तें मोठालीं कृत्यें करण्याला स्फुरण देतें. दुसरी गोष्ट संस्कारविधी; यांयोगें सरळ कृत्यें करण्याची संवय जडते; तिसरी, गायन; हें जुन्या पद्धतीचें असेल तर सद्‌गुणांचें संवर्धन करण्यास चांगलें वातावरण उत्पन्न करतें व स्वभावाला ठाकठिकीं आणतें, व चवथी गोष्ट म्हणजे धनुर्विद्या; ही नैतिक शिस्त लावण्यास उपयोगी पडते.

वरील विचारांवरून कनफ्यूशिअसच्या तत्त्वज्ञानांत किती थोडा परमार्थ भरला होता हें दिसून येईल. तेव्हां त्याला इतकी लोकप्रियता व सर्वमान्यता कशी लाभली हा प्रश्न पुढें येतो. खरें पाहतां त्याच्या हयातींत व पुष्कळ शतकें पुढेंहि त्याला कोणी विचारीत नसे. त्याचीं तत्त्वें आचारांत आणण्याचें धाडस त्यावेळचा कोणी राज्यकर्ता करीत नसे. पण पुढें असा काळ आला कीं राजघराण्यांतून त्याला कोण अधिक मान देतो याविषयीं मोठी चढाओढ लागून राहिली. त्याच्या गौरवाला व भक्तीला सीमा राहिली नाहीं. ती इतकी कीं चालू शतकाच्या आरंभीं तर त्याला "द्यावा-पृथिवीच्या जोडीनें काम करणारा न्यायाधीश" असें लोकांच्या श्रद्धेंत स्थान मिळालें आहे. कनफ्यूशिअसचा संप्रदाय इतका वाढला याचें कारण राजा व प्रजा या दोघांच्याहि हिताला तो पोषक आहे. राजाला दैवी हक्क असतो हा त्याचा उपदेश उपष्टंभ राजालाहि फायदेशीर होतो; व त्याच प्रमाणें वैयक्तिक सुख मिळण्यासंबंधीं त्यानें प्रतिपादलेले जनतेचे हक्क प्रजेपैकीं कोणालाहि आवडतील असेच आहेत. शिवाय त्याच्या तत्त्वांप्रमाणें सर्वांनीं वागल्यास देशांत किंवा कुटुंबांत अराजकता माजणार नाहीं. यामुळेंच त्याच्या संप्रदायाचें वाङ्मय आपत्तीच्या काळांतूनहि सुरक्षितपणें बाहेर पडलें व तें लोकांमध्यें पूर्णपणें बिंबविण्याकरितां पाठशाळा निघाल्या. सरकारी नोकरींत शिरण्यापूर्वी या विषयाची परीक्षा द्यावी लागे इतकें त्याला सरकारी महत्व मिळालें होतें. असो. आतां आपण चीनमधील तिसऱ्या संप्रदायाकडे वळूं.

**ताओ संप्रदाय.**—ताओ संप्रदाय हा चीन देशांतील एक उपासनासंप्रदाय आहे. "ताओ तेह किंग" या लौझ्झेच्या पुराणग्रंथावरून ह्या संप्रदायाला हें नांव पडलें. वरील प्रबंधांतील त्याच्या मतांवर ह्या संप्रदायाची उभारणी केली असल्यानें लौझ्झेलाच त्याचा उत्पादक म्हणून मानण्यांत येतें.

खिस्ती शकापूर्वी ६०४ या सालांत लौझ्झेचा जन्म झाला असावा असा अंदाज आहे. कन्फ्यूशियस व ताओ समकालीन असावेतसें जुन्या लीची वगैरे ग्रंथांवरून दिसतें. लौझ्झेसंबंधीं विश्वसनीय जास्त माहिती मिळत नाहीं. त्याला अज्ञातवासांत राहण्याची फार आवड असे व म्हणून त्याच्या हातून ताओचें (मोक्ष मार्गाचें) परिशीलन व सद्‌गुणांची अभिवृद्धि झाली. जगापासून कायमचेंच दूर राहण्यापूर्वी ताओ व सद्‌गुण यांसंबंधीं आपलीं मतें जगापुढें मांडावीं या उद्देशानें त्यानें एक ग्रंथ तयार केला असें सांगतात. पुढें त्याच्या आयुष्याचा शेवट कशा रीतीनें झाला याविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. लौझ्झे ही एक खरी व्यक्ति होती कीं, निव्वळ एक कल्पनाजन्य व्यक्ति इतिहासांत घुसडून दिली आहे अशी आतां शंका उत्पन्न झाली आहे. तथापि चिनी तत्त्वज्ञानवाङ्मयांत त्याचा उल्लेख अवश्य केला पाहिजे इतकी त्याची योग्यता आहे.

जुन्या लेखकांच्या ग्रंथांतील लौझ्झेच्या म्हणून मानल्या गेलेल्या उक्ती सांपडतील तशा एकत्र करून त्यांचा एक प्रबंध तयार केला व तो त्याच्या नांवावर प्रसिद्ध केला. हा ग्रंथ म्हणजे विख्यात "ताओ तेह किंग" किंवा "ताओ ते चिंग" हा होय. तेव्हां या ग्रंथांत लौझ्झेचा हात कितपत आहे हें सांगणें कठिण जाईल. कदाचित् आपणांकडील मनुस्मृति आदि ग्रंथांप्रमाणें प्राचीन परंपरा संकलित करणारा हा ग्रंथ असेल व यांतील तत्त्वज्ञान त्याच्या कालापूर्वी बराच काल प्रचलित असेल. शिवाय हा ग्रंथ ज्या वेळीं लोकांपुढें आला असें सांगतात त्या वेळेपासून चार शतकेंपर्यंत ह्याचा चिनी वाङ्मयांत मागमूस देखील नाहीं. असो. आतां ताओ तेह किंग हा लौझ्झेनेंच लिहिलेला ग्रंथ आहे असें धरून चालून त्यांतील मुद्यांकडे वळणें बरें. ह्यांतील निरनिराळ्या भागांतील युक्तिवादांतील विसंगतता, लहान सूत्रांसारखी त्याची मांडणी, ग्रंथ गूढ व काव्यमय करण्याकडे लेखकाची दिसत असलेली प्रवृत्ति वगैरेंनीं हा प्रबंध फार दुर्बोध झाला आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे यांतील ताओ या शब्दावरून काय बोध होतो ह्याचा निर्णय करणें ही होय. याचे तीन अर्थ होऊं शकतात-(१) मार्ग, (२) बुद्धि, (३) वाक्. तेव्हां ग्रंथकर्त्यानें कोणत्या अर्थी हा शब्द वापरला असावा ह्याबद्दल टीकाकारांत बराच वाद आहे. त्यांतल्या त्यांत "मार्ग" हा अर्थ व्युत्पत्तिशास्त्र व अक्षरचिन्ह ह्यांवरून पाहतां जास्त बरोबर होईल. ह्या 'मार्गा" चा अर्थ फार व्यापक आहे. हें एका (विशेष) 'गुणा'चें नांव आहे. लौझ्झेच्या मनांतील ताओ ह्या शब्दानें संबोधिलेला हा विशिष्ट गुण कोणता हें एका शब्दांत सुबोध रीतीनें सांगणें अवघड जाईल. हा गुण म्हणजे स्वाभाविक घडणाऱ्या गोष्टींतील साधेपणा व फक्त सिद्धीकरितांच

निःस्वार्थ बुद्धीनें केलेलें निष्काम कर्म (ह्याला अकर्मंहि म्हणतां येईल ) हा होय. जड सृष्टींत याचे दाखले पदोपदीं सांपडतात. "तींतील सर्व वस्तू कांहींएक गवगवा न करतां उद्भवतात व आपला जन्मसिद्ध हक्क न बजावितां वाढत रहातात. अभिमान न बाळगतां आपआपलीं कर्मे करितात. त्याच्यापासून होणाऱ्या उत्पन्नावर मालकी सांगत नाहींत. ह्या आपलेपणाच्या अभावामुळेंच सृष्टींतील क्रिया व कार्ये कधींहि बंद पडत नाहींत"[प.२].समाज सुखी राखण्यासाठीं राज्यपद्धतींत ह्याच गुणाची आवश्यकता आहे. "सिद्ध पुरुषांनीं राज्यकारभार पाहिला तर प्रजाजनांच्या बेसुमार मनीषा मावळतील, त्यांनां पोट भरण्याचीं साधनें प्राप्त होतील व त्यांच्या महत्त्वाकांक्षा कमी होऊन शरीरांत भर पडेल. हे पुरुष त्यांनां ( जरूर नसलेलें ) ज्ञान करून देणार नाहींत व त्यांचा हव्यास नाहींसा करतील व ज्या कांहींच्या ठिकाणीं ज्ञान असेल त्यांनां आपल्या तत्त्वज्ञानाचा उपयोग करतां येऊं नये असें करून टाकतील" ( प. ३ ). प्रत्येक व्यक्तीनें जर आपल्या स्वतःच्या कारभारांत अशाच वागणूक ठेवली-थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे पुन्हां ती व्यक्ति जर लहान मूल बनली—तर तिला अशाच तऱ्हेचें फळ मिळेल. ताओ तेह किंग ह्या ग्रंथांतील विषय अशा प्रकारचा आहे. सृष्टि, समाज व व्यक्ति यांच्या कारभारांतील निर्हेतुक क्रिया—अशी क्रिया कीं, जिच्या सिद्धीविषयीं मनांत हव्यास नाहीं किंवा सिद्धिविनाश झाला तरी त्याबद्दल दुःख नाहीं—म्हणजेच ताओतत्त्वाबरहुकूम केलेली क्रिया असें या ग्रंथांत प्रतिपादन केलें आहे. या तत्त्वाचा जेव्हां वैयक्तिक शीलाशीं संबंध येतो तेव्हां जेवढें चांगलें व व्यावहारिक असेल तेवढेंच त्यांत बिंबवून दिलें जातें. निरभिमानता ह्या सद्गुणाविषयीं काय सांगूं व कितीं सांगूं असें ह्या ग्रंथकाराला होऊन गेलेलें दिसतें.( प.७) सदयता,मितव्यय व जगांत पुढें येण्याची हांव नसणें या तीन गुणांनां तो फार महत्त्व देत असे ( प. ६७ ). " कांहीं हेतू न धरतां वागणें, कांहीं त्रास न वाटतां कामें करणें, रुचि न समजतां खाणें, लहानाला मोठें समजणें व मोठ्याला लहान समजणें( म्हणजे लहानमोठे यांत भेद न मानणें ), दुःख देणाऱ्यावर दया करणें हा ताओ मार्ग आहे" असें त्यानें एके ठिकाणीं प्रतिपादन केलें आहे.

शासनपद्धतीविषयीं त्यानें जें लिहिलें आहे तें फारसें बरोबर व समाधानकारक दिसत नाहीं. देहांत शिक्षेच्या तो विरुद्ध असे [प. ७३ व प.७४] व युद्धाचा तर त्याला तिटकारा असे [ प. ७९ ]. समाजोन्नति किंवा जीवितविद्या याविषयीं त्याला मुळींच सहानुभूति नसे. जे पूर्वी "ताओ" तत्त्वाप्रमाणें वागण्यांत फार वाकबगार बनले होते त्यांनीं लोकांनां सुसंस्कृत करण्याचा कधीं प्रयत्न केला नाहीं. उलट, त्यांचा हेतु त्यांनां साधेभोळे ठेवण्याचा असे. " लोकांनां जास्त ज्ञान असलें म्हणजे त्यांनां ताब्यांत ठेवावयाला व त्यांच्यावर राज्य करण्याला फार त्रास पडतो, आणि म्हणून जो प्रजेला ज्ञान देऊन राज्य चालवूं बघतो तो त्या राज्यावर अरिष्ट आणतो आणि जो ह्या उलट वागतो तो त्या राज्याचें कल्याण करतो असें तो म्हणतो " ( प. ६५ ). एखाद्या कमी लोकसंख्येच्या लहानशा राज्यांत मी अशी व्यवस्था करून टाकीन कीं, तेथील लोकांनां हत्यारें दिलीं तरी ते त्यांचा मुळींच उपयोग करणार नाहींत ( किंवा त्यांस करण्याचें कारण पडणार नाहीं ); मरण ही एक मोठी दुःखदायक व हानिकारक गोष्ट आहे असें मी त्यांनां कारणाकारणानें दाखवून देईन, तरीपण तें टाळण्याकरितां ते दूर कोठेंतरी जाण्याची इच्छा करणार नाहींत; त्यांच्या जवळ नावा गाड्या इत्यादि वाहनें असतील पण त्यांत बसण्याची कधीं वेळच त्यांनां येणार नाहीं; लिहिण्यास वर्णाक्षरांऐवजीं त्यांनां पूर्ववत् गांठींच्या दोऱ्यांचा उपयोग मी करावयास लावीन. त्यांनां स्वतःची ओलीकोरडी भाकर गोड लागेल, जाडा भरडा कपडा सुंदर दिसेल, मोडकी तोडकी झोपडी चांगलें आरामस्थान वाटेल आणि त्यांची साधी रहाणी सुखावह होईल; अगदीं शेजारीं चिकटून दुसरें राज्य किंवा प्रदेश असला तरी अगदीं मरेपर्यंत त्याशीं संबंध किंवा दळणवळण ते ठेवणार नाहींत (म्हणजे दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा त्यांस राहाणार नाहीं )."

येथपर्यंत "ताओ" चें जें विवेचन केलें तें कळण्याला फारसें अवघड नाहीं. शील व कर्म यांचें विवरण करणारा हा एक गुण आहे; हा गुण प्रत्येक व्यक्तीनें आपल्यांत आणण्याविषयीं झटलें पाहिजे व राज्यकर्त्यानें आपल्या शासनपद्धतींत हा उतरविला पाहिजे. निसर्गाच्या बाबतींत ताओसंबंधीं केलेलें विवेचन इतकें सुबोध नाहीं. सर रॉबर्ट डग्लस म्हणतात कीं, मार्ग हा ताओचा अर्थ सर्वोत्तम ठरेल; पण ते लगेच असेंहि म्हणतात कीं ताओ म्हणजे नुसता ' मार्ग ' नव्हे तर मार्ग व मार्गानें जाणारा होय.हा मार्ग शाश्वत आहे. ह्या मार्गानें सर्व जीव व चराचरवस्तु जात आहेत परंतु हा कोणीं प्राण्यानें केला नाहीं तर हा स्वतःच प्राणी आहे हा सर्व कांहीं आहे व नाहींहि आणि सर्वांचें कार्य व कारण हाच आहे. सर्व वस्तूंचा ताओपासून उगम होतो, सर्व ताओला अनुसरतात व शेवटीं " ताओ " प्रत जातात.

लौझ्झे हा सगुण ईश्वराचें अस्तित्व मानतो कीं नाहीं ह्या विषयीं वाद आहे.

आतांपर्यंत " ताओ तेह किंग " मधील ताओ तत्त्वाविषयीं माहिती झाली. पण सध्यां चीन देशांत प्रचलित असलेल्या त्या संप्रदायाविषयीं माहिती त्यांत आलेली नाहीं. हा संप्रदाय लौझ्झेच्या पाठीमागून जवळ जवळ ५०० वर्षांनीं अस्तित्वांत आला. तथापि त्रिगुणात्मक हें त्याला दुसरें नांव दिलें आहे. हें जीविताचें कोडें बरोबर उलगडण्यासाठीं मर्त्यलोकांनां जी एक प्रकारची

तळमळ लागलेली असते ती शांत करण्यासाठीं म्हणून लौझ्झेनंतरच्या लेखकांनीं त्याच्या थोड्याबहुत असलेल्या उक्तींवरून एक विचारसंप्रदाय तयार केला. लौझ्झेनें ताओची कसोटी तयार केली होती. त्याच्या पुढील काळांतील अनुयायांनीं "ताओ" हा केवल आदिकरण ऊर्फ ब्रह्म व शेवटीं ज्याच्या ऐक्यामध्यें सर्व परस्परविरोधी गोष्टींचा पूर्ण मिलाफ होतो असा एक आहे असा त्याचा अर्थ लाविला. मानवी जीविताचें उगमस्थान जो हा " एक" तो गोचर विश्वाच्या पलीकडे होता. मरणानंतर सायुज्य मुक्ति व अमरत्व मिळण्यासाठीं लौझ्झेच्या तत्वांप्रमाणें चालून शरीराची विकारजडता नाहींशीं करून टाकणें हेंच आवश्यक होतें. पुढें पुढें अशी कल्पना बनली कीं, "एक" हा दूरवर आकाशामध्यें एक दैदीप्यमान व अचल असा प्रकाशबिंदु आहे व त्याभोंवतीं मर्त्यदेहरूपी कांत टाकून वर गेलेल्यांचे आत्मे फारच जलद गतीनें एकसारखे वाटोळे फिरत असतात. पुढें लवकरच किमयेचे प्रयोग सुरू झाल्यापासून व अमृताबद्दल विश्वास उत्पन्न झाल्यापासून या वरील अत्युत्तम कल्पनांचा विचाड झाला. जेव्हां बौद्धसंप्रदायाचा पगडा लोकांच्या मनावर बसूं लागला तेव्हां ताओ संप्रदायाचें रूप मुळांतच बदललें. त्यांनीं बौद्धसंप्रदायांतून कांहीं संस्कार, धर्मोपदेशकाची वस्त्रें, उपासनापद्धति, नरकाविषयीं कल्पना, देवळांसंबंधीं व्यवस्था इत्यादि गोष्टी घेतल्या व उपासनासंप्रदाय काढला. बौद्धसंप्रदायानेंहि कांहीं गोष्टींत—चांगल्याच गोष्टींत तेवढें—या संप्रदायाचें अनुकरण केलें. चूशी म्हणतो "बौद्धसंप्रदायानें ताओ संप्रदायांतील चांगल्या गोष्टी तेवढ्या चोरल्या. पण उलट ताओ संप्रदायानें बौद्धसंप्रदायांत जेवढें म्हणून वाईट होतें तेवढेंच चोरून घेतलें. जसें एकानें दुसऱ्याजवळून रत्न घेतलें तर त्या रत्नाच्या मालकानें त्याऐवजीं एक खडा मिळविला." सध्यांच्या काळीं हे दोन्हीं संप्रदाय सारखेच बनले आहेत त्यामुळें हा अमुक म्हणून ओळखण्यास जड जातें.

हल्लींचा ताओ संप्रदाय म्हणजे हीन व जाचक धर्मवेडेपणा व आचारविचार यांचा एक समूहच आहे. ह्यांत किमया, भूरमलविद्या आणि पिशाच्चवाद हींहि येतात. इकडे लौझ्झेला देवाचें अस्तित्व कबूल होतें कीं नाहीं याविषयीं शंका आहे, तर तिकडे हा संप्रदाय अनेकेश्वरपूजक आहे. लौझ्झेला हें कितपत खपलें असतें हें सांगावयालाच नको. अशा "ताओ संप्रदायाचा" मूळ उत्पादक म्हणून त्याला गणणें ही त्याची केवळ निंदाच होय असें एक लेखक म्हणतो.

याप्रमाणें आशियामध्यें निरनिळीं राष्ट्रें संस्कृतींच्या निरनिराळ्या विकासावस्थेंत आपला जीवितक्रम आचरीत असतां पश्चिमेकडे यूरोपखंडांतील सांस्कृतिक प्रगति कोठपर्यंत येऊन पोंचली होती हें अवलोकन करूं.

---

# प्रकरण ६ वें.

## प्राचीन यूरोपीय संस्कृती.

यूरोपमध्ये स्वतंत्रपणें विकास पावणाऱ्या भिन्न संस्कृती म्हटल्या म्हणजे ग्रीक, रोमन, टयूटन व स्कँडिनेव्हियन या होत. या संस्कृतींची विकसित अवस्था आपणांस बुद्धपूर्व कालांत दृष्टीस पडत नाहीं. तेव्हां या संस्कृतींचें सविस्तर विवेचन करण्याचें स्थान या विभागांत नसून बुद्धोत्तर जग या विभागांतच योग्य होईल. तथापि या संस्कृतींचा उगम जरी अल्प प्रमाणावर असला तरी तो बुद्धपूर्व कालांत झालेला असल्यामुळें आपणांस त्यांचा निर्देश करणें भाग आहे.

वर ज्या चार भिन्न संस्कृती दाखविल्या त्या जरी भिन्न प्रदेशांत व भिन्न काळांत विकास पावत असल्या तरी त्यांचा परस्परांशीं थोडाफार संबंध आलेला असावा, एवढेंच नव्हे तर ग्रीक व टयूटन या इंडोयूरोपीय अथवा मूलगृहकालीन आर्यन संस्कृतींच्याच शाखा असाव्या असा संशोधकांचा सिद्धांत आहे. रोमन संस्कृति तर बहुतांशीं ग्रीक संस्कृतीचीच उत्तरावस्था म्हणतां येईल म्हणून तिचें वर्णन पूर्णपणें चवथ्या विभागांतच दिलें आहे. स्कँडिनेव्हियन संस्कृतीची प्रगति तर ख्रि. पू. ५०० पर्यंत फक्त आयसयुगापर्यंत झाली होती. तेव्हां तिची पूर्वावस्था या विभागांत वर्णन केली आहे.

टयूटन संस्कृति ही तिच्यापेक्षां अधिक प्रगत दिसते. पण ग्रीक संस्कृति ख्रि. पू. ५०० च्या सुमारास बरीच प्रगत झालेली असावी असें होमर वगैरे ग्रंथावरून दिसतें. या संस्कृतीनें ईजियन संस्कृतीपासून बऱ्याच गोष्टी उचलल्या होत्या व जरी ईजियन संस्कृतीची प्रगति कांहीं कारणामुळें कुंठित झाली तरी तिची परंपरा ग्रीक संस्कृतीमार्फत कायम राहिली. यामुळें ग्रीक संस्कृतीचें महत्त्व अधिक आहे.

इजिअन संस्कृतीच्या अंमलाखालील प्रदेशापैकीं आशियामायनर हा एक भाग असल्यामुळें इजियन संस्कृतीचा परिणाम आशियामायनरवर कांहीं प्रमाणांत झाला तसाच तो पश्चिमेकडे ग्रीस वगैरे देशांवरहि झाला. त्या परिणामाची व त्याच्या पुढील संस्कृतीची कल्पना मिळवावयाची झाल्यास अत्यंत प्राचीन काळचा ग्रीक लेख म्हणजे जें होमरचें काव्य त्यांतील विधानें घेऊन पाठीमागल्या कालाविषयीं अनुमानें काढीत बसावयाचें या प्रकारचा उद्योग करावा लागतो. असा उद्योग करून ग्रीक लोकांच्या उपासनापद्धतीसंबंधानें 'एन्सायक्लोपीडिआ ऑफ रिलिजन अँड एथिक्स' या पुस्तकांत खालीलप्रमाणें माहिती दिली आहे. ही माहिती ( वैदिक वाङ्मयाशीं तुलना करून ) हिंदुस्थानाचा यूरोपाशीं दुवा जोडणाऱ्या कालावर प्रकाश पाडण्यास उपयोगी आहे.

**आशियामायनरमधील ग्रीकलोकांच्या परमार्थविषयक कल्पना.**—ग्रीक लोकांच्या परमार्थविषयक कल्पनांविषयींची एकंदर माहिती द्यावयाची म्हटल्यास त्यांचे पुढीलप्रमाणें चार कालविभाग पाडणें सोयीचें होईल; ( १ ) प्रागैतिहासिककाल म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकापासून होमरच्या काव्यरचनेपर्यंतचा काळ, ( २ ) इ. स. पू. ९०० पासून ५०० पर्यंतचा काळ. ( ३ ) इ. स. पू. ५०० पासून ३३८ पर्यंत म्हणजे ग्रीकलोकांच्या अत्यंत भरभराटीचा काळ. व ( ४ ) ग्रकि- रोमन काळ. तथापि या कालविभागांतील संप्रदायांचो सनवार माहिती देणें कठिण आहे; कारण संप्रदायांच्या प्राचीन लेखांत वर्ष वगैरे काल दिलेले नसतात; किंवा ज्या लेखकानें एखाद्या संप्रदायाबद्दल प्रथमच उल्लेख केलेला आढळतो, त्याच्याच आयुष्यांत तो संप्रदाय प्रथम जन्मास आला असेंहि म्हणतां येत नाहीं. सदरहू माहिती मिळण्याची मुख्य दोन साधनें म्हणजे वाङ्मय व अंकित लेख हीं होत. यांपैकीं फार जुनें ग्रीक वाङ्मय तर नाहींच, पण अंकित लेखसुद्धां ख्रिस्तपूर्व ७ व्या शतकाहून जुने अद्याप उपलब्ध झालेले नाहींत. अशा स्थितींत पहिल्या कालविभागांतील म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकांतील ग्रीकलोकांच्या परमार्थकल्पनांची माहिती होण्यास होमर व हेसियड या दोन कवींचीं काव्यें हें अमूल्य साधन होय. शिवाय निरनिराळ्या परमार्थसंप्रदायांच्या तौलनिक अभ्यासापासून निघणारीं अनुमानें व मानुष्यकशास्त्र या दोन साधनांचीहि पुष्कळ मदत होण्यासारखी आहे. शेवटचें साधन म्हणजे मिनोन-मायसिनी लोकांच्या परमार्थसाधनांची स्मारकवस्तूंवरून मिळणारी माहिती. मिनोन-मायसिनी लोकांची संस्कृति उच्च दर्जास पोहोंचलेली होती; व तिचा काळ होमरच्या काव्यांच्या काळापेक्षां बराच पूर्वीचा असून सदरहू लोकांपासून हेलेन लोकांनीं ( प्राचीन ग्रीकांनीं ) बऱ्याच धार्मिक कल्पना व गोष्टी उचललेल्या आहेत, याबद्दल आतां शंका उरलेली नाहीं.

**होमरच्या काव्यांतील परमार्थविषयक कल्पना.**—देव अनेक असून त्यांत उच्चनीच दर्जाचे आहेत व ते सर्व देव मिळून बनलेल्या कुटुंबाचा एक मुख्य देव किंवा परमेश्वर आहे; वगैरे अनेकेश्वरीमतांतून एकेश्वरवादाकडे संक्रमण दाखविणाऱ्या कल्पना होमरच्या काव्यांत दृष्टीस पडतात. या देवता प्राचीन रोमन देवतांप्रमाणें अस्पष्ट व संदिग्ध स्वरूपाच्या, चैतन्ययुक्त पण व्यक्तित्वविरहित अशाच केवळ नसून पूर्णपणें सगुण, साकार, मनुष्यस्वरूपी पण अतिमानुष गुणांच्या आहेत; त्यांनां आत्मा आहे; त्यांचें शरीर अतिमानुष द्रव्याचें बनलेलें असून त्या देवता अमर आहेत; इत्यादि वर्णन त्या काव्यांत आढळतें. या वर्णनांत देवतांवर मनुष्यांतील गुणधर्मांचा अध्यारोप करण्याची प्रवृत्तीच विशेष दिसून येते. स्कॅमँड्रॉस सारखी नदीदेवताहि एखादुसरी आढळते; परंतु अशा दृश्य भौतिकवस्तूवर देवत्व आरोपित करणाऱ्या दैवतकल्पना फारशा नाहींत. वनदेवता व नदीपर्वत स्वरूपी स्त्रीदेवता त्यांत आहेत तरी त्यांचें मूलवस्तुबोधक स्वरूपवर्णन दिलेलें नसून त्यांनां नांवेंहि 'तरुण स्त्रिया' किंवा ' वधू ' अशीं मनुष्य वाचक दिलेलीं आहेत. या देवतांनां आपल्या इच्छेप्रमाणें कोणत्याहि पशुपक्ष्याचें स्वरूप धारण करतां येतें, असें आहे तरी त्या मूळ मनुष्यस्वरूपीच आहेत. हेरा नामक ' गो-मुखी ' देवतेचें किंवा अथेनी नांवाच्या घूकशीर्षे देवतेचें वर्णन होमरनें केलेलें नाहीं. त्याच्या देवतांमध्यें मनुष्यांत असणाऱ्या नैतिक कल्पना, त्याच प्रमाणें मनोविकार आणि नीति व कलाविषयक भावना वगैरे सगुणदेवतेचें स्वरूप पूर्ण आहे. सृष्टींतील पंचमहाभूतात्मक देवतांनां प्राचीन ग्रीक दैवतसृष्टींत सर्वश्रेष्ठ मानलेलें नाहीं. सूर्य-देवता, नदी-पर्वत-देवता, वायु-देवता व वनदेवता त्यांत आलेल्या असल्या तरी त्यांनां श्रेष्ठत्व नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांना अगदीं कमी महत्त्व आहे. त्यांचा श्रेष्ठ देव झूस हा जरी अंतरिक्षस्थ व्यापारांचा नियामक असला तरी तो म्हणजेच विद्युद्देवता किंवा आकाशदेवता असा स्पष्ट उल्लेख कोठेंच नाहीं. तात्पर्य, होमरच्या काव्यांतील ईश्वरकल्पना निराकार दैवतपर नाहींत, किंवा प्रत्येक पदार्थमात्रांत देवत्व आहे असें मानणाऱ्या सर्वेश्वरीमतपरहि नाहींत; तर मनुष्याप्रमाणेंच देवतांची म्हणजे उच्च दर्जाच्या पण मनुष्यसदृश व्यक्तींची एक निराळी जात आहे, अशा प्रकारच्या आहेत.

दैवतांस मनुष्य स्वरूप आलें म्हणजे तीं दैवतें लोकप्रिय करण्यासाठीं दैवतांच्या लीलांचें वर्णन सुरू होतें. होमरच्या काव्यांत अश्लीलपणाचे व दुर्वर्तनाचे प्रसंग फक्त एकदोनच असून ते वगळल्यास बाकी सर्व वर्णनांत पवित्र धार्मिक वृत्ति व उच्च नैतिक कल्पना पूर्णपणें भरलेल्या आहेत. देवतांचा अपमान किंवा अन्याय कोणी केल्यास त्याचा मत्सर करणें किंवा सूड घेणें, हे प्रकार देवतांत आढळतात, पण एकंदरीनें त्या सदाचरणी व कृपाळु अशाच आहेत. धर्मपर विचारीहि उच्च दर्जाचे व प्रौढ दिसतात. उदाहरणार्थ, एके ठिकाणीं झूस म्हणतो, " देव कधींच कोणाला दुःख देत नाहीं; तर स्वतःच्या दुष्कर्मांचें फळ म्हणूनच मनुष्यास दुःख भोगावें लागतें. " काव्यांत दिलेले धर्मविधीहि उच्च दर्जाचे आहेत, त्यांत रानटीपणा मुळींच नाहीं, जादूबिदूचे प्रकारहि थोडेच आढळतात. तसेंच यज्ञ करणें म्हणजे देवतांनां लांच देणें अशी नीच कल्पना नसून देव व मानव यांच्यामधील स्नेहभाव दर्शित करण्याचा तो मार्ग आहे असें मानलेलें आहे. वेदी, देवळें, धर्मोपाध्याय वगैरे गोष्टी त्यांत असून मूर्तिपूजेची कल्पना मात्र नुकतीच प्रादुर्भूत झालेली दिसते.

सदरहू वर्णनावरून पहिल्या सहस्रकापूर्वींच्या कांहीं शतकांतील परमार्थकल्पनांची कल्पना होण्यासारखी आहे.कारण काव्यांतील सर्व गोष्टी होमरनें केवळ स्वकल्पनेनें वर्णिल्या आहेत असें मानणें शक्य नाहीं; तें वर्णन इ. स. पू. १०००

च्या सुमाराच्या ग्रीक समाजाचें असलें पाहिजे. परंतु हें वर्णन परिपूर्ण आहे असें मानतां कामा नये.

**होमरपूर्वकालीन दैवतकल्पना.**—धर्मविधी, तसेंच नैतिक व अतींद्रियज्ञानविषयक कल्पना यांची वाढ किती सावकाश होत असते, आणि एकदा रूढ झाले म्हणजे मग ते विधी व त्या कल्पना नष्ट होणें किती दुरापास्त असतें, हा अनुभव लक्षांत घेतल्यास होमरच्या काव्यांत वर्णिलेले धार्मिक विधी व कल्पना होमरच्या पूर्वीच्या अनेक शतकांच्या जुन्या असल्या पाहिजेत हें उघड ठरतें. हेलेनलोक, एकियन, ड्रायोप, मिन्यन, मिनोनमायसिनी वगैरे ज्या जातींच्या संमीश्रणापासून झाले, त्या जातींमध्यें देव म्हणजे विशिष्ट गुणरूपसंपन्न अशा व्यक्तींची जात, अशा कल्पनेपर्यंत मजल गेलेली असावी. अर्थात् हेलेनलोक आरंभापासून प्रत्येक सृष्ट पदार्थात गूढ दैवी शक्ति वास करीत आहे या समजुतीच्या पुढील पायरीवर म्हणजे सगुण व साकार अशी स्वतंत्र देवजाति मानणारे होते.अलीकडे सांपडलेल्या शिलालेखांवरून इराणीलोकांत वरुण, मित्र वगैरे वैयक्तिक देवता मानीत असल्याचें सिद्ध झालेलें आहे. तेव्हां त्यांचे समकालीन (इ.स.पू.१४०० ) व नातलग असे जे बाल्कन प्रदेशांत वस्ती करूं पहाणारे आर्यन लोक ते धार्मिक बाबतींत त्यांच्या बरोबरीचे असले पाहिजेत असें मानणें चुकीचें होणार नाहीं. तात्पर्य होमरच्या काव्यांतील देवता म्हणजेच उपरिनिर्दिष्ट निरनिराळया जातींतील व हेलेनलोकांत एकत्र झालेल्या देवता, असें मानणें जरूर आहे. अशा स्थितींत झूस, अपोलो व पोसीडॉन या अनेक जातिमान्य देवताच संमिश्र अशा हेलेनजातीनें श्रेष्ठ कां मानल्या याचाहि चांगला उलगडा होतो.

तेव्हां " एकेका जातीचा एकेक स्वतंत्र देव ' अशा स्थितींतून होमरपूर्वकालीन ग्रीक देवकल्पना पुढें गेलेल्या होत्या. अनेक जातींतल्या देवांनां हेलेन लोक पूज्य मानीत होते व त्यापैकीं झूस हा सर्वश्रेष्ठ देव किंवा परमेश्वर असें मानण्याइतकी त्यांच्या ईश्वरविषयक कल्पनेची वाढ झालेली होती. देवतेवर मनुष्यगुणाध्यारोप करण्याची त्यांची मजलहि प्राचीन रोमन लोकांपेक्षां पुढें गेलेली होती. उदाहरणार्थ, देवतांचे विवाह व त्यांचीं कुटुंबें यांचें वर्णन होमरच्या काव्यांत आहे.

**मिनोनमायसिनी लोकांतील दैवतकल्पना.**—होमरनें वर्णिलेल्या दैवतकल्पनांपैकीं उत्तरेकडून आलेल्या आर्यन-हेलेनी लोकांनी आणलेल्या कोणत्या हें वर सांगितलें; त्या बरोबरच मूळ बाल्कन प्रदेशस्थ लोकांच्या कल्पना कोणत्या हेंहि पाहिलें पाहिजे. तद्देशीय मिनोन-मायासिनी लोकांची दैवतपरंपरा व आर्यन् हेलेनीपरंपरा यांतील मुख्य फरक असा आहे कीं, पहिल्यांत स्त्री देवता श्रेष्ठ तर दुसऱ्यांत पुरुष देवता श्रेष्ठ मानीत असत. हा मिनोनमायसीनी लोकांतील उपासनाविशेष त्यांची या बाबतींत अधिक प्रगति झाल्याचा निदर्शक असून हाच विशिष्ट संप्रदाय ऐतिहासिक काळांतील कांहीं ग्रीक लोकांनीं कायम ठेवलेला आढळतो. तथापि कोणती विशिष्ट स्त्रीदेवता भूमध्यसमुद्रांतील भूभागांतल्या कोणत्या विशिष्ट जातींत प्रचालित होती, ही गोष्ट तेथील भाषांच्या आपल्या अज्ञानामुळें अद्याप ठरवितां आलेली नाहीं या अनेक देवता व तत्संबंधीं धर्मविधि यां विषयींची सविस्तर माहिती तूर्त मिळण्यासारखी नाहीं.

**हेलेनसमाजाचा प्राथमिक काळ.**— होमरनें वर्णिलेल्या धर्मकल्पना व विधी बऱ्याच उच्च दर्जाचे आहेत. आणि या कल्पना व विधी हेलेन लोकांनीं त्यांच्या पूर्वीच्या भूमध्यसमुद्रानिकटवासी सुधारलेल्या लोकांपासून घेतलेल्या आहेत, हें सिद्ध झाल्यावर सदरहू कल्पना व विधी हेलेन लोकांच्या काळापूर्वी अनेक शतकें परिणत स्वरूप पावत आलेल्या असल्या पाहिजेत. तेव्हां त्या लोकांची सुधारणेची मजल अनेक बाबतींत कोठपर्यंत गेलेली होती याची कल्पना नंतरच्या काळांतील हेलेन लोकांच्या दैवतसंप्रदायांतील सर्व गोष्टी बारकाईनें पाहिल्यास होण्यासारखी आहे;म्हणून येथें त्यांचें सविस्तर वर्णन करूं.

**कौटुंबिक धर्मविधीः**—दुसऱ्या सहस्रकांतील उत्तरार्धांत शेतकीची पुष्कळच सुधारणा झालेली होती. तसेंच एक पतिपत्नीविवाहपद्धतीचें कुटुंब उत्तम मानण्यापर्यंत मजल जाऊन तीच व्यवस्था प्रचलित होती. डेमीटर ही देवता मूळ आर्यनलोकांतील असल्याचें सिद्ध झालेलें असून हेलन लोकांच्या अनेक जातींत तिलाच पृथ्वीवरील धान्य-देवता म्हणून मानीत असत; व थेस्मॉफेरिया नामक धार्मिक समारंभ तिच्याच संबंधाचा असे. खाजगी कुटुंबातील नैतिक आचारविचारांचाहि धर्मविधींशीं बराच संबंध होता. झूस देवतेची पूजाहि बरीच पूर्वापार चालत आलेली असून प्राचीन आर्यन कुटुंबांतील नातलग अंगणांतील वेदीभोंवती जमून तिचां पूजाअर्चा करीत असत.दुसरा एक विधि नवीन जन्मास आलेल्या मुलासंबंधाचा होता. घरांतील दालनांत एक चूल व चुलीचा दगड ठेवलेला असे, त्याच्या भोंवती त्या मुलाला घेऊन धांवत फिरत असत व अशा रीतीनें अग्निदेवतेच्या दिव्य शक्तीला तें समर्पण करीत.

**राजकीय धर्मविधी**—तसेंच तितक्या प्राचीन काळांतहि बऱ्याच सामाजिक व राजकीय बाबींशीं धर्मविधींचा संबंध असे त्या वेळचा समाज लहानलहान खेड्यांत राहात असे परंतु पुष्कळ वेळां देवतांच्या देवळांभोंवतीं शहरें वाढत जात व ते लोक राजकीय बाबतींत तीच देवता श्रेष्ठ मानीत. उदाहरणार्थ अथेनी ही देवता अथेन्स शहरांत अत्यंत प्राचीन काळापासून महत्त्व पावत आलेली असावी. व म्हणून होमरच्या काव्यांत, राजकीय कारस्थानांत सल्लामसलत व उत्साह देणारी देवता, असें तिचें वर्णन आढळतें. तात्पर्य, झूस व अथेनी या देवतांच्या भक्तांनीं आपआपल्या शहरांचें महत्त्व वाढवून राजकीय वर्चस्व प्रस्थापित केलेलें आहे. कारण पोलियस हें नांव इतर कोणत्याहि देवतेला लावलेलें

आढळत नाहीं. होमरच्या काव्यांत वर्णिलेल्या प्रकारचें महत्त्वाचें राजकीय स्वरूप वरील दोन देवतांस दुसऱ्या सहस्रकांत मिळालें असलें पाहिजे, ही गोष्ट अनेक दंतकथांच्या आधारेंहि सिद्ध होते. झूस पोलियस देवतेच्या पूजनसंप्रदायांतील धार्मिक विधींसंबधानें जी लेखी माहिती मिळालेली आहे तीवरूनहि वरील मतास पुष्टि मिळते.

होमरपूर्वकालीन समाजांत वर उल्लेखिलेल्या दोन देवतांखेरीज इतरहि कित्येक दैवतसंप्रदाय अस्तित्वांत येऊन महत्त्व पावलेले होते. राजकीय विषयावर वक्तृत्वपूर्ण भाषणें करण्याचें आद्य ठिकाण जें ' मार्केट ' ( बाजारचा चौक ) त्यालाहि पवित्र ठिकाण मानण्याचा प्रघात पडलेला असल्याचें होमरच्या काव्यांवरून दिसतें. त्या मार्केटमध्यें हर्मीस नामक पवित्र पाषाण ठेवलेला असे. तसेंच अपोलो नामक देवता शहरें वसविणारी अधिष्ठात्री देवता मानली जात असे, व शहराच्या मुख्य रस्त्यांत तिची मूर्ति स्थापन केलेली असे. पायथो शहरांत तर भविष्यकथन करणारी देवता म्हणून तिला बरेंच राजकीय महत्त्व आलेलें होतें.

**प्राचीन दैवतकल्पनांतील नैतिक स्वरूप.**—देवपूजेच्या संप्रदायाचा राजकारणाशिवाय आणखी कित्येक बाबतींतहि प्रवेश झालेला होता. त्या प्राचीन समाजांतील नैतिक आचाराविचारांनांहि देवतांचें अधिष्ठान असे. देवांविषयींचा आदर केवळ भीतिप्रेरित नसून धर्मसमजुतींत बऱ्याच सौम्य भावना उत्पन्न झालेल्या दिसतात. नैतिक बाबतींत, देव सत्यप्रिय असून दुष्टांचा सूड घेणारा आहे, या कल्पनेच्याहि पुढें पाऊल पडून तो दयाळु कृपाळु आहे, दीनांचा व अनाथांचा कैवारी आहे, वगैरे कल्पना रूढ झालेल्या दिसतात. परमुलखांत हिंडत फिरणाऱ्या लोकांचें संरक्षण करणारा झूस देव आहे, असें मानीत. स्वर्ग व पाताळ यांतील अनेक देवतांच्या नांवानें शपथा घेऊन खासगी व सामाजिक व्यवहार करीत असत व त्यामुळें त्यांतील नैतिक बंधनें पाळलीं जात असत.

**उपासनेंत कलाविषयक अंगः**—होमरपूर्वकालीन समाजांतील अनेकेश्वरी धर्मसंप्रदायांत मनुष्यांतील उच्च कर्तृत्वशक्तीच्या इतर कित्येक अंगांसहि पावित्र्य प्राप्त झालें असल्याचें दिसतें. गायन व संगीत या ललितकलांत एक प्रकारची निराकार दैवतशक्ति वास करीत असल्याचें ते लोक मानीत असत; इतकेंच नव्हे तर, अशा कांहीं देवतांनां मनुष्यस्वरूपहि दिलेलें असल्याचें आढळतें. उदाहरणार्थ म्यूझेस किंवा चाराईट्स ह्या देवता घ्या. या होमरपूर्वकालीन अनेकेश्वरपंथी समाजांत रूढ झालेल्या असल्याचें दिसतें. चारार्इट्स नामक देवता मायसिनी संस्कृतीचें केंद्रस्थान जें बिओशियन आर्कोमेनॉस तेथें उदयास आलेल्या दिसतात. आपोलो व अथेनी या श्रेष्ठ देवतांनांहि ललितकला व गायन यांच्या अधिष्ठात्री मानूं लागले होते.

**हेलन समाजांतील प्राथमिक धर्मविधीः**—वरील विवेचनावरून असें दिसून येतें कीं, ग्रीसदेशाच्या इतिहासांतील अगदीं प्राचीन काळांत प्रचलित असलेला अनेकेश्वरी संप्रदाय बरेंच परिणत स्वरूप पावलेला होता. ह्या अनुमानाला तत्कालीन धर्मविधींच्या स्वरूपाच्या माहितीवरूनहि पुष्टी मिळण्यासारखी आहे. होमर व हेसिअड यांच्या काव्यांत त्यांच्या परिचयांत असलेल्या धार्मिक उपासनेच्या प्रकारांची पुष्कळ माहिती आलेली आहे. अर्थात हे प्रकार रूढ होण्यास बराच काल जरूर असल्यामुळें ते दुसऱ्या सहस्रकांतील अंतिम शतकांतले असले पाहिजेत. देवतेची पूजा करण्याचें पवित्र ठिकाण मूळ एखाद्या गुहेंत किंवा रानांत झाडझूड तोडून साफ केलेल्या व कुंपण घालून बंद केलेल्या जागेत असावें; व तेथें पूजेकरतां देवतेची प्रतिमा म्हणून केवळ एखादा पवित्र वृक्ष किंवा पुरलेला स्तंभ घेत असावेत. पुढें मनुष्यगुणांचा देवतेवर अध्यारोप करण्याची प्रवृत्ति जसजशी बळावत गेली तसतसें स्वतंत्र देवळें बांधून त्यांत देवतांच्या मूर्ती स्थापन करण्यांत आल्या. इतकी वाढ होमरच्या पूर्वींच्या काळांतच झालेली दिसते. मिनोन–मायसिनी संस्कृतीच्या काळांतहि देवळें बांधलेलीं असल्याचें सिद्ध झालें आहे. पण तीं देवळें राजवाड्यांचा भाग असल्याचें आढळतें. यावरून त्याकाळीं राजा हाच समाजाचा धर्मगुरूहि मानण्यांत येत असावा. मिनॉस व ऐकॉस या राजांसंबंधाच्या ज्या दंतकथा आहेत त्यांवरून वरील अनुमानास पुष्टि मिळते. अर्गोस व आलिंपिया येथें देवतांचीं देवळें जमिनींत खणतांना सांपडलीं आहेत, तीं इ. स. पू. ९०० च्या सुमाराचीं असावीं. परंतु डेल्फि येथील देवालय व अथेनियन ॲक्रॉपोलीस येथील अथेनी देवतेचें देवालय हीं त्यांपेक्षांहि जुनीं आहेत.

अनेक देवालयें बांधलीं गेल्यानंतर लवकरच देवतांचे पुजारी व उपदेशकहि अस्तित्वांत आले असले पाहिजेत. झूस देवतेच्या पुजाऱ्यांचा उल्लेख होमरनें आपल्या काव्यांत केलेला आहे. पुरोहित वगैरे इतरांबरोबर लढाईवर जाणें वगैरे लौकिक व्यवसायहि करीत असत तथापि त्यांनां राजकीय व सामाजिक बाबतींत विशेष सत्ता असल्याचें आढळत नाहीं. परमार्थमूलक व्यवहारांत राजालाच श्रेष्ठ मानीत असत ही अत्यंत प्राचीन काळांतील विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. पण जसजसे विधी वाढत गेले तसतसे राजाला मदतनीस म्हणून धार्मिक बाबींतले पंडित लोक धर्मोपाध्याय म्हणून नेमण्यांत येऊं लागले; पण त्या सर्वांवर अधिकार व देखरेख राजाचीच असे. त्यामुळें धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यामध्यें तंटाभांडण झाल्याचें उदाहरण ग्रीसच्या प्राचीन किंवा प्राचीनतर काळांत क्वचितच आढळतें ग्रीसच्या प्राचीनतम काळांत किंवा ऐतिहासिक काळांत आचार्यांच्या सत्तेचें विशेष बंड माजलें असल्याचें कधींच आढळत नाहीं. या विधानाला दुसरा अप्रत्यक्ष पुरावा असा आहे कीं, देवता अंगांत येऊन

तद्वारा विलक्षण गोष्टींचें भविष्य कथन करून लोकांना धाबरवून सोडल्याचें व त्यायोगानें पुजाऱ्यांनीं स्वतःचा फायदा करून घेतल्याचें उदाहरणहि आढळत नाहीं. भविष्य कथन करणारे लोक त्या वेळीं असत पण ते या वर्गाहून निराळे असत.

वेदीजवळ बसून देवतेला हविर्द्रव्य अर्पण करीत. त्याकरतां एखादा पशु, धान्य किंवा कधीं फळेंहि घेत असत.अशा यज्ञांत मद्य कधीं असे, कधीं नसे. पण मद्यविरहित यज्ञच अधिक प्राचीन असावा असें वाटतें. या यज्ञाचा हेतु देवतेबरोबरचा स्नेहभाव व बंधुभाव वाढावा, हा दिसतो. होमरच्या काव्यांत असेंच वर्णन असून पुढें तशीच भावना प्रचलित राहिली असल्याचें धार्मिक इतिहासावरून दिसतें. हेलन लोकांच्या यज्ञाचें हें सौम्य स्वरूप त्या नमुन्याच्या इतर समाजांतहि आढळतें. होमरनें वर्णिलेल्या यज्ञविधींत दुसरा एक विलक्षण गूढार्थसूचक प्रकार आढळतो, व तो अत्यंत पुरातन काळापासून चालत आलेला असावा. तो प्रकार असा कीं, यज्ञांतील पशुमांस यज्ञ करणारांनीं भक्षण करण्यापूर्वी पशूच्या शरीराच्या ज्या भागांत प्राण असतो तो अन्तर्भाग जिभेनें चाखावयाचा असे. त्याचें कारण असें कीं, त्या विशिष्ट भागाच्या स्पर्शानें देवता व तिचा भक्त यांच्यामध्यें खरा ऐक्यभाव उत्पन्न होऊं शकतो, अशी समजूत असावी.

अथीनियन व ऑलिंपियन धर्मविधींमध्यें एक महत्त्वाचा फरक आढळतो. अथीनियन यज्ञांत पाताळांतील देवतांना संतुष्ट करण्याचा हेतु असे व त्याकरितां यज्ञिय पशूंचे डोकें जमीनींत एक भोंक पाडून त्यावर धरून तें तोंडीत असत आणि त्यांतून सांडणारें रक्त त्या भोकांत पाडीत असत. पण ऑलिंपियन यज्ञांत आकाशांतलि देवतांना संतुष्ट करण्याचा हेतु असे व त्याकरितां यज्ञिय पशूचें डोकें वर उंच धरून व तोंड आकाशाकडे फिरवून कापीत असत. ह्या दोन्ही प्रकारच्या यज्ञांचें वर्णन होमरच्या काव्यांत आढळतें. ग्रिक लोकांमध्यें मृतांच्या संबंधाचें धर्मविधी पातालस्थ देवतांच्या धर्मविधींच्या नमुन्यावर रचलेले दिसतात.

अथीनियन संप्रदायांतील वरील प्रकारावरून असें दिसतें कीं, ग्रीक लोकांतील अत्यंत प्राचीन काळच्या धर्मविधींचें स्वरूप होमरच्या काव्यांत वर्णिलेल्या इतकें सौम्य व सोज्ज्वल नव्हतें. शिवाय अंधकारानें व्यापलेला असा एक लोक असून त्यामध्यें सत्ता चालविणाऱ्या व पापाचरणी दुरात्म्यांना मरणोत्तर शिक्षा करणाऱ्या यमासारख्या देवता आहेत, वगैरे कल्पना होमरला परिचित असल्याचें दिसतें. भूतखेतादि तामस दैवतांची पूजाहि ग्रीसच्या कित्येक भागांत प्रचलित असल्याचा पुरावा मिळतो.

थोर व पराक्रमी पूर्वजांचे उत्सव करण्याचा संप्रदाय होमरोत्तर कालांतल्या प्रमाणें होमर पूर्वकाळांतहि असल्याचें दिसतें. मायसिनी लोकांत मृतांच्या थडग्यांची फार काळजी घेत असत. या प्रकारावरूनच पुढें मृतांची स्वतंत्ररीत्या पूजा व उत्सव करण्याचा प्रघात पडला असावा. शिवाय अनेक ईश्वर मानण्याच्या धार्मिक वृत्तीमुळें थोर पूर्वजांचे उत्सव करण्याची बुद्धि वाढत गेली असावी. परंतु होमरच्या काव्यांत या बाबतींत स्पष्ट पुरावा सांपडत नाहीं, आणि याच्या पुढील पायरी म्हणजे भूतपिशाचांवर विश्वास ठेवणें, त्यांच्या त्रासदायक, दुष्ट कृत्यांची धास्ती वाटणें, मरणोत्तर स्थिति व स्वर्गनरकादि लोक यांबद्दल चिंता वाहणें, इत्यादि गोष्टी हेलेन लोकांच्या इतिहासांत कोठेंहि फारशा आढळत नाहींत. हेलेन लोकांतील अगदीं प्राचीन दंतकथांतहि तशा गोष्टी नाहींत. पृथ्वीच्या खालीं मृत्युलोक म्हणून आहे असें ते मानीत असत. पण त्यांतील देवता भयानक नसून उलट दयाळू दिसतात. प्लोटन, डेमीटर या कृपाळू, कल्याणकारक देवता आहेत.

**प्राचीनतम शुद्धीकरण (प्रायश्चित्त) विधि.—** शुद्धीकरणाच्या अवश्यकतेची कल्पना होमरला मुळींच नव्हती असें कोणी म्हणतात; पण तें चूक आहे. इलियडच्या पहिल्या पुस्तकांतच अगॅमेम्नॉनच्या हुकुमावरून एकियन लोकांनीं प्लेगपासून आपली शुद्धि करून घेण्याकरितां त्याचें साधन म्हणून एक दूषित वस्तु समुद्रांत टाकून दिली असें वर्णन आहे. शिवाय हेसियडमध्यें असा एक नियम सांगितलेला आढळतो कीं, एखाद्याचा प्रेतविधि करून आल्यावर त्याच दिवशीं मनुष्यानें अपत्योत्पादन करूं पहाणें अनर्थकारक असतें. हा समज व ग्रीक समाजांत पसरलेले इतर असलेच अनेक समज बऱ्याच प्राचीन काळापासून चालत आले असल्याचें दिसतें. परंतु प्रायश्चित्तविधीसंबंधींच स्वतंत्र सविस्तर ग्रंथ मात्र झालेला दिसत नाहीं.

**प्राचीनतम काळांतील अपरिपक्व धर्मकल्पना.—** अगदीं प्राचीन काळांतल्या ग्रीक लोकांच्या ईश्वरविषयक कल्पना बऱ्याच सुधारलेल्या होत्या हें खरें असलें तरी त्यांच्यांत कांहीं समाजशैशवद्योतक व अप्रगत कल्पनांहि होत्या हें खोटें नाहीं. कारण सर्वात्मवाद अचेतनवस्तुपूजा, पशुस्वरूपी देवतासंप्रदाय, निराकारदैवतोपासना किंवा यापेक्षांहि देवताविषयींच्या अमंगल कल्पना, तसेंच मनुष्ययज्ञ, वायुनिवारक व जलनिदर्शक अभिचारप्रयोग, पापवाहक अजापुत्र इत्यादि धर्मविधी व कल्पना त्यांच्यांत आढळतात या अपरिपक्व धर्मसमजुतींचा उल्लेख होमरच्या काव्यांत आलेला नसला तरी त्या होमरोत्तरकालीन आहेत किंवा हेलेन लोकांनीं नंतर त्या पौरस्त्य लोकांपासून घेतल्या, किंवा पुढील अवनतीच्या काळांत त्या उत्पन्न झाल्या असाव्या, यांपैकीं कोणतीच गोष्ट खरी नसून त्या हेलेन लोकांच्या अगदीं प्राचीन पूर्वजांपासून चालत आलेल्या होत्या, असें मानणेंच जरूर आहे. ग्रीक लोकांच्या परमार्थसाधनाच्या इतिहासांत आकस्मिक, अचानक घडलेला

अशी एकहि गोष्ट नाहीं, भूतकालीन कल्पनांत एकदम मोठी क्रान्ति कोठेंहि झालेली नाहीं, किंवा धार्मिक कल्पना सुधारत गेल्यामुळें पूर्वींच्या अप्रौढ गोष्टी नष्ट करण्यांत आल्या असेंहि नाहीं; कोणीहि मार्थोफरू धर्मोपदेशक अवतरलेला दिसत नाहीं; किंवा तत्त्वज्ञानाची मोठी वाढ झाल्यावरहि प्राचीन अपरिपक्व धार्मिक विधींचा व कल्पनांचा तीव्र निषेध केलेला नाहीं; आणि जो सौम्य निषेध केला त्याचा परिणाम झाला नाहीं. प्राचीन धर्मविधींपैकीं अत्यंत भयंकर तेवढेच विधी कायद्याने गाळून बाकीचे थोड्याफार फरकानें कायम ठेवण्यांत आलेले होते. त्यांबद्दल नंतरच्या वाङ्मयांत भरपूर पुरावा आढळतो.

**पशुदेवता व पशुपूजा.**— देव म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तींची जात आहे अशी कल्पना उभारण्यास देवतांवर मनुष्यगुणांचा अध्यारोप करणें ही युक्ति चांगली असली तरी ती कांहीं सर्वोत्तम युक्ति नव्हे. तथापि वरील मनुष्य-गुणाध्यारोपाच्या तत्त्वाचा हेलेन लोकांचें अनकेश्वरी मन बन-विण्यास मोठाच उपयोग झालेला दिसतो. सदरहू कार्यास होमरच्या पूर्वींच आरंभ झालेला दिसतो. कित्येक पशूंनाच देवाचे अवतार मानून त्यांची उपासना होऊं लागलेली होती. उदाहरणार्थ अपोलो या देवतेच्या नांवाचा संबंध लांडग्याशीं असलेला दिसतो. अपोलोला शिकारी लोक एके काळीं आपला देव मानीत असावेत. तसेंच एपायरस व मॅसेडोनिया या देशांत सर्पांची पूजा करीत असल्याचा पुरावा सांपडतो. अॅटिका व आर्केडिया यांत अर्टेमिस नामक अस्वलाची पूजा होत असावी. नंतरच्या काळांत डेमीटर नामक अश्वमुखी देवतेची पूजा चालू होती; यूरीनोम नामक अर्ध–स्त्री, अर्ध–मत्स्यरूपी देवता अर्केडियांतच आढळते.

प्राचीन मानवशास्त्रवेत्त्यांची या पशुपूजनाबद्दलची अशी कल्पना होती कीं, प्रथम निरनिराळ्या राष्ट्रांची प्राचीन काळा-पासून चालत आलेलीं कांहीं दैवतें असत; व या दैवतो-पासनेचीच परिणतावस्था आपणांस पशुपूजनांत दिसते. परंतु मानवशास्त्रांत अधिक गति असलेल्या अर्वाचीन अभ्या-सकांनीं ही कल्पना त्याज्य ठरविली आहे. कारण ग्रीक किंवा आर्यन जातींच्या लोकांत दैवकपूजेचा मागमूस कोठेंहि लागत नाहीं; आणि पशुदैवतांची उपासना ही प्रत्यक्ष पशुपूजनापूर्वीची एक अवस्था आहे, असें गृहीत धरण्याचें कारण नाहीं. कांहीं जातींमध्यें मानवाकृति दैवतो-पासना व पश्वाकृति दैवतोपासना या दोन्हींहि एकाच काळीं रूढ असल्याचीं उदाहरणें आढळतात. तसेंच मनु-ष्याच्या मानसिक विकासामध्यें पश्वाकृति दैवतोपासना ही पहिली पायरी असून तिच्यापासून पुढें मानवाकृति दैवतो-पासना निघाली असें आपणांस खात्रीपूर्वक म्हणता येणार नाहीं.

**क्रियावाचक देवता.**—होमरच्या पूर्वींच्या काळांत देवताविषयक समजुतींचा दुसराहि एक प्रकार आढळतो. कित्येक गुण, क्रिया व व्यवसाय यांत दैवी शक्ति असल्याचें मानून त्यांची उपासन[illegible] असत. उदाहरणार्थ, नांग-राच्या फाळाची देवता, भिन्नधान्यापेक्षविभागी देवता, धान्य-समृद्धिदायक देवता असत; शिवाय क्षणिक कार्य कर-णाऱ्या देवता असत. उदाहरणार्थ, यज्ञ करणाऱ्या व्यक्तींना तत्कालीन त्रास देणाऱ्या माशा, त्या हांकलून लावणारी देवता आढळते. आणि सामान्यतः दुःखनिवारक देवता, जन्मदात्री देवता, न्याय्य मोबदला देणारी देवता अशा अनेक गुणक्रियावाचक देवता होत्या. पुढील काळांतील हेलेन लोकांच्या देवताविषयक उच्च कल्पनांच्या मानानें वरील कल्पना अपरिपक्व व रानटी दिसतात; तथापि त्या एके काळीं प्रचलित होत्या यांत शंका नाहीं.

**सर्ववस्तुगतदेवतावाद किंवा बहुवस्तुगतदेवता वाद.**—वायु, जल व आकाशस्थ सृष्टिव्यापार, तसेंच पृथ्वी-वरील फळेंमुळें यांविषयींच्या विशिष्ट धर्मकल्पना हेलेन लोकांत होत्या. सुधारलेल्या धार्मिक काळांत एतद्विषयक देवतांचें स्वतंत्र व वस्तुबाह्य अस्तित्व असल्याचें मानूं लागले होते. पण तत्पूर्वीं मागासलेल्या समाजांत अशा देवता त्या त्या वस्तूंतच वास करीत असे त्याची कल्पना होती. अर्के-डियन लोकांत ‘ सूस–भेघनिनाद ’, लॅकोनियांत ‘ आकाश-पतित पवित्र पाषाण झूस’, ‘डेमीटर–हारित वनश्री’ अशीं नांवें आढळतात. यावरून सृष्टींतील कित्येक विलक्षण वस्तू किंवा व्यापार यांनां सजीव दैवतें मानीत असल्याचें स्पष्ट दिसतें. हेलेन जातींपैकीं अर्केडियन लोक हे सर्वांत मागा-सलेले असत व त्यांच्यांत वरच्यापेक्षांहि रानटी कल्पना व धर्मविधी आढळतात. हे लोक विद्युत्, मेघध्वनि व वादळ यांनां हविर्द्रव्य अर्पण करीत असत. ते कित्येक नद्यांनां व झऱ्यांनां आहुती देत म्हणजे त्यांतील खुद्द जलालाच ते पवित्र मानीत. हीच गोष्ट ‘सूर्य’ व घरांतील ‘चूल’ यांनां लागू आहे. म्हणजे या वस्तूंनांच देवता मानून त्यांची ते पूजा करीत असत. एतद्विषयक स्वतंत्र देवता असल्याचें ते मानीत नसत.

**अभिचार उर्फ जादू.**—वस्तुगत दैवतपूजेचा पवित्र भावना उद्दीपित करण्याकडे उपयोग कदाचित् होत असेल, पण तिचा संबंध बहुतांशीं जादूटोणा इत्यादि प्रकाराशीं येतो. असले जादूटोण्याचे प्रकार हेलेन लोकांत होते याबद्दल शंका नाहीं. या प्रकारांबद्दल होमर कांहीं बोलत नाहीं व त्यांचा उल्लेख होमरोत्तरकालीन वाङ्मयांतच आढळतो हें खरें असलें तरी मानुष्यक शास्त्रांतील सामान्य सिद्धांतांस अनुसरून असल्या गोष्टी ग्रीक लोकांत अत्यंत पुरातन काळापासून चालत होत्या असें मानणें भाग आहे. उदा-हरणार्थ, थेस्मॉफोरिया नामक धर्मविधीनें देवता संतुष्ट होते इतकेंच नव्हे तर त्याचा जादूसारखा कांहीं अद्भुत पण प्रत्यक्ष परिणाम होतो असें समजत असत. तसेंच थर्गे-लिया नामक विधींत मनुष्यानें केलेल्या पापांचा अध्यारोप एखाद्या बकऱ्यावर करून त्याला दूर हांकलून दिल्यानें

पापमुक्तता होते या गोष्टीचा संबंध धर्मापेक्षां जादूटोण्याशींच अधिक आहे असें दिसतें. मंत्र म्हणून व बळी देऊन आकाशांत घडणाऱ्या भयंकर गोष्टी टाळणें किंवा वादळ बंद करणें हीं कृत्यें करण्याकरितां कित्येक स्वतंत्र धर्माधिकाऱ्यांची नेमणूक केलेली असे व अशा धर्माधिकाऱ्यांचीं नांवें अथेन्स येथील प्राचीन लेखांत आढळतात. दुसऱ्याचा घात करण्याचे जादूचे प्रकारहि कांहीं आढळतात. पण हे सर्व प्रकार मर्यादित असून त्यांच्यामुळें उच्च धार्मिक कल्पनांची वाढ होण्यास अडथळा झाला असल्याचें दिसत नाहीं.

**मनुष्य बळी देण्याचे प्रकार.**—ग्रीक लोकांच्या आद्य काळांतील परमार्थकल्पनांविषयीं आतांपर्यंत जी हकीकत दिली तिच्यावरून आणखी एक प्रश्न सहजच उद्भवतो, तो मनुष्यें बळी देण्यासंबंधाचा. प्रथमावस्थेंतील समाजांत आणि मागासलेल्या व रानटी धर्मांत मनुष्यें बळी देण्याची चाल असावयाचीच असें आपण मानून चालतों. परंतु अखिल मानव जातीचा इतिहास अवलोकन केल्यास वरील समजूत कित्येक वेळीं चुकीची ठरते. उलटपक्षीं कित्येक सामाजिक व नैतिक बाबतींत उत्तम सुधारलेल्या लोकसमाजांतहि मनुष्य बळी देण्याची पद्धत आढळते. तात्पर्य, वरील सामान्य सिद्धांत सरसहा लागू करणें योग्य होणार नाहीं.

होमरच्या काळांत मनुष्ययज्ञाचा उल्लेख कोठेंहि आढळत नाहीं व त्यावरून एकियन समाजांत ही दुष्ट चाल कधींच प्रचारांत नसावी असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण खुद्द होमरनें आपल्या काव्यांत पेट्रॉक्लसच्या चितेजवळ ट्रोजन युद्धकैदी आणून त्यांची कत्तल केल्याचें वर्णन केलें असून त्याबद्दल होमरनें ॲचिलिसला खूप दोषहि दिलेला आहे. यावरून हें सिद्ध होतें कीं, चितेजवळ मनुष्यांनां धरून बळी देण्याची चाल प्रचलित होती इतकेंच नव्हे तर ती होमरला माहीत होती आणि त्याला ती पसंत नव्हती. अगॉसि व मिसेनी या शहरांतील मायासिनी लोकांच्या थडग्याशेजारीं अवशेष सांपडले आहेत त्यांवरून त्या ठिकाणीं गुलाम किंवा कैदी आणून बळी दिले असले पाहिजेत असेंच अनुमान निघतें. तथापि हा धार्मिक आचार होता असें मानतां येत नाहीं. कारण मृतांनां घोडे लागतात म्हणून ते चितेजवळ मारावयाचे, तद्वतच चाकरनोकर लागतात म्हणून गुलाम मारावयाचे अशी केवळ साधी समजूत असेल. त्यांत मृतात्म्यांची मनुष्यांचे बळी देऊन उपासना करण्याचा हेतु नसावा. तथापि वर दिलेल्याइतका भरपूर पुरावा असतां होमरनें अशा चालींचा धार्मिक विधी म्हणून उल्लेख केलेला नसला तरी अशा चाली प्रचारांत होत्या हें निःसंशय आहे. आतां कित्येक म्हणतात कीं, त्या हेलेन लोकांनीं मागाहून पौरस्त्यांपासून घेतल्या असाव्या. पण प्राचीन हेलेन लोकांची तरफदारी करण्याचा हा पाश्चात्य युक्तिवाद पोकळ आहे. तसेंच असल्या चालीनंतरच्या काळांत ग्रीक लोकांची हरएक सामाजिक व नैतिक बाबतींत सुधारणा होत असतां एकदम अचानक प्रचारांत आल्या असाव्या असें मानणेंहि फार कठिण आहे. तात्पर्य त्या चाली हेलेन लोकांत अगदीं प्राचीन काळापासून चालत आलेल्या असल्या पाहिजेत असें मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. शिवाय या विधानाला दंतकथा व सांप्रदायिक लेख यांवरून भरपूर पुष्टि मिळते. झूसला मनुष्य बळी देण्याची चाल, आपोलोला यात्रेकरू मारून त्यांचीं शिरें अर्पण करण्यासंबंधींचा प्रकार, अर्टेमिस देवतेला एक कुमार व कुमारी बळी देण्याची चाल व आयोनियन लोकांतील मनुष्यें बळी देण्याची चाल इत्यादिकांच्या दंतकथा व लेख आढळतात. असले बळी देण्याचे हेतू निरनिराळे असत. एके ठिकाणीं तर झूसबद्दलच्या विधींत मनुष्यभक्षणापर्यंत मजल गेलेली असल्याचें आढळतें. तेव्हां मनुष्य बळी देण्याच्या चाली हेलेन लोकांत पूर्वापार चालू होत्या याबद्दल तिळमात्र शंका नाहीं.

**प्रथमकालविभागांतील ग्रीक धर्मकल्पना.**—होमरपूर्वकालीन पारमार्थिक कल्पनांचा इतिहास बराचसा आनुमानिक व संशयितच सांपडतो. परंतु कांहीं महत्त्वाच्या व निश्चित गोष्टी प्रस्थापित झाल्या आहेत. अत्यंत प्राचीन रोमन परमार्थसंप्रदायांतहि आढळत नाहीं इतकी मानवाकृति दैवतोपासना ग्रीसमध्यें प्रचलित होती, एवढेंच नव्हे तर तिचें वर्चस्व स्थापित झालें होतें; आणि नंतरच्या अनेक दैवतसंप्रदायांतील बहुतेक मुख्य मुख्य वैयक्तिक दैवतें त्या कालीं रूढ झालेलीं होतीं. फक्त डायोनिसस याची उपासना थ्रेसच्या पलीकडे गेली नव्हती; आणि होमरला ज्याची पुसट पुसट माहिती होती असा ॲस्क्लिपिॲस हा ग्रीसमधील एका लहानशा जातीचा स्थानिक देव होता. पॅन ही देवता दूरच्या आर्केडिया प्रांतांत फक्त पशुपालनाची अधिष्ठात्री समजली जात असे. क्रीटवेटांतील संप्रदायामध्यें दैवतविषयक कल्पना बऱ्याचशा वैयक्तिक स्वरूपाच्या असून त्यांचीं दैवतेंहि बहुतेक मानवाकृति होतीं. या क्रीटबेटांतील संप्रदायाचा ठसा ग्रीसवर बराच उठलेला दिसतो; आणि त्यांतील कांहीं दैवतें उदाहरणार्थ, देवांची माता व्हिया व अफ्रोडिटी यांचा प्रवेश या उत्तरेकडील लोकांत झालेला होता. परंतु त्यांच्या दैवतपरंपरेंत या दोन देवतांचें स्थान प्रारंभीं फारसें महत्त्वाचें नव्हतें. तत्कालीन देवतेसंबंधांची कल्पना म्हणजे देवता ही केवळ एक अस्पष्ट निसर्गशक्ति अशी नसून एक दिव्य मनुष्य आहे अशा तऱ्हेची होती, आणि त्यामुळें त्यांच्या परमार्थसंप्रदायामध्यें कलाकौशल्य, संस्कृति व नीतिसंबंधीं कल्पनांची वाढ होण्यास पुष्कळ अवसर मिळाला. परंतु याच वेळीं त्या लोकांत पाशवी सृष्टींतीलहि अनेक गोष्टी पवित्र व अतिमानुष कोटींतील भासत असत; आणि त्यांची अशी समजूत असे कीं, कधीं कधीं देवता पशुयोनींत अवतरतात. तथापि याच वेळीं त्यांच्या मनांत निरा-

कार दैवतांबद्दलच्याहि कांहीं कल्पना वास करीत होत्या. आणि या कल्पनांप्रमाणें त्यांची काहीं दैवतें अनेक दैवतसंप्रदायांतील नसून बहुवस्तुगतदैवतसंप्रदायांतील किंवा निराकार दैवतसंप्रदायांतीलहि होतीं व या दैवतांबद्दलच्या कल्पना कांहीं नैसर्गिक शक्तींनां दिव्य स्वरूप देऊन बनवलेल्या असत.

तत्कालीन दैवतांसंबंधीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून असें दिसून येईल कीं, ग्रीकांच्या अनेक दैवतसंप्रदायाचा उगम या प्राचीन कालांतहि सांपडत नाहीं. हेलेन लोकांचा वास्तविक इतिहास ख्रिस्तपूर्व द्वितीयसहस्रकापासून उपलब्ध होतो. त्या वेळीं आपणांस दैवतें बनविण्याची क्रिया चालू असलेली दिसत नाहीं. मात्र कांहीं दैवतांचीं मूळचीं साधीं स्वरूपें अधिक गुंतागुंतीचीं होत चालली होतीं. तसेंच आपणांस या काळीं मुळींच दैवतें नव्हतीं असेंहि म्हणतां येत नाहीं. आपणांस असें म्हणतां येईल कीं, दैवतोपासना ही मनुष्यप्राण्याच्या इतिहासांत प्रथम सर्व वस्तूंमध्यें दैविक शक्ति आहे, या समजुतीपासून ( सर्ववस्तुगतदैवतकल्पना ) अथवा या जगांत अनेक निराकारी दैविक शक्ती वास करीत असतात या समजुतीपासून ( अनेकनिराकारदैवतकल्पना ) निघाली असावी. तसेंच आपण पाहिजे तर असें म्हणावें कीं, पश्वाकृतिदैवतोपासनेंतूनच मानवाकृतिदैवतोपासनेचा विकास झाला. पण याबद्दल बराच संशय आहे. कांहीं लोक असेंहि म्हणणारे आहेत कीं, पश्वाकृतिदैवतसंप्रदायांत पशुदैवकसंप्रदायाचाहि अंतर्भाव होतो. परंतु आपणांस असें स्पष्ट दिसतें कीं, या सर्व विकासाच्या अवस्था भूमध्यसमुद्रांतील व उत्तरेकडील लोकांचें मिश्रण होऊन त्यांची हेलेन ही जात बनण्यापूर्वीच होऊन गेल्या होत्या. हेलेन लोकांच्या इतिहासांत आपणांस परमार्थविषयक उच्च व नीच तशाच शुद्ध व संकीर्ण कल्पनांचें सर्वकाल एकसमयावच्छेदेंकरून अस्तित्व असून त्यांचा परस्परांवर परिणाम होत असल्याचें दिसून येतें; आणि उच्च कल्पनांची या द्वंद्वांत जरी सरशी झाल्याचें दिसून येतें तरी इतर कल्पना केव्हांहि पूर्णपणें नष्ट झाल्या असें दिसत नाहीं. कारण त्या कल्पनाहि अतिशय प्राचीन अशा बौद्धिक परंपरेंतूनच आलेल्या होत्या. ग्रीक परमार्थसंप्रदायाचा उगम शोधून काढण्याचे बरेचसे पाश्चात्य प्रयत्न त्यांतील कालविपर्यासामुळें व्यर्थ झालेले आहेत; आणि सर्व अज्ञात वस्तूंचें मूळ पशुदैवकोपासनेमध्येंच शोधून काढण्याची प्रवृत्ति, अलीकडे जसजसें या संप्रदायासंबंधींच्या पूर्वींच्या बऱ्याचशा कल्पना व त्यांवर आधारलेलीं समाजशास्त्रीय तत्त्वें चुकीचीं आहेत असें आढळून येऊं लागलें, तशी कमी होत चालली आहे.

**ख्रिस्तपूर्व १० व्या शतकाच्या सुमाराची स्थिति.**—ख्रिस्तपूर्व १० व्या शतकाच्या सुमारास हेलेन लोकांत थ्रेस व मॅसेडोनिया या प्रांतांतील नव्या प्रकारच्या पारमार्थिक कल्पना व एक नवीन आणि भव्य डायोनिसस नामक देवता प्रवेश करीत होती. या नव्या गोष्टी हेलेन लोकांतील पारमार्थिक कल्पनांशीं विरोधी असल्यामुळें त्यांचा प्रवेश होणें अवघड गेलें; तथापि प्रथम थिबीजमध्यें त्यांचें वर्चस्व प्रस्थापित होऊन नंतर डेल्फी येथें त्यांचा प्रवेश झाला. हेलेन लोकांतील परंपरागत देवतांहून या देवतेचें स्वरूप निराळें होतें. तिच्या संबंधाचे धार्मिक विधी निराळे होते व भक्तांच्या मनावर होणारे परिणामहि निराळे होते. डायोनिसस देवतेला वैयक्तिक स्वरूप होतें पण तें आपोलो किंवा अथेनी यांच्या इतकें स्पष्ट नव्हतें; तें निराकारदैवतकल्पनेला किंवा नंतर सर्वव्यापी देवकल्पनेला अनुरूप असून ती देवता अनेक पश्वाकृति स्वरूपांत अवतरते; तसेंच अनेक प्रकारच्या वनस्पती उत्पन्न करण्याचें कार्य करते, आणि तिच्या आगमनाबरोबर अंतरिक्षांत सृष्टीचे अद्भुत चमत्कार होऊं लागतात, वगैरे कल्पना प्रचलित होत्या.

या देवतेच्या धार्मिक विधींमध्यें तिच्या जन्ममरणाच्या कल्पना होत्या व त्या हेलेन लोकांनां अगदीं अपरिचित होत्या. हिचा मृत्यु हें धार्मिक विधीचें एक अंग होतें, कारण वेडे भक्त तिचे फाडून तुकडे करीत व ते श्रद्धेनें भक्षण करीत. याकरितां ते एखादा बैल, बकरा किंवा प्रत्यक्ष एखादा मुलगा मारीत असत व खात असत; कारण त्याला ते तात्पुरता डायोनिससचा अवतार मानीत असत. या रानटी व मनुष्यभक्षक विधीच्या योगानें त्या देवतेचें रक्त आणि चैतन्य शरीरांत पूर्णपणें भरून त्या योगानें त्या देवतेप्रमाणें तिच्या भक्तांतहि अद्भुत गोष्टी करण्याची शक्ति येते, अशी त्यांची समजूत असे. वरील प्रकारें रक्त व मांस भक्षण केल्यानें व त्याच्या बरोबर कांहीं मादक व उत्तेजक पेयें प्राशन केल्याच्या योगानें या देवतेच्या भक्तांची एक प्रकारची अत्यानंदमय तल्लीन स्थिति होऊन जात असे आणि शारीरिक व मानसिक व्यवसाय करण्याचा त्यांच्या अंगांत विलक्षण आवेश वढत असे; तसेंच ते आपलें स्वतःचें देहभानहि विसरून जात असत. अशी स्थिति प्राप्त होणें म्हणजे सजीव मुक्त होऊन देवतेच्या स्वरूपांत तात्पुरतें पण पूर्णपणें विलीन होतां आल्यामुळें आपलें जीवितसाफल्य झालें व अशी तन्मयता होणें आपणांस मरणानंतरहि कल्याणप्रद होईल, अशी सदरहू भक्तांची निष्ठा असे. अशा आनंदमय अवस्थेचा कांहीं अद्भुत चमत्कार करण्याच्या कामीं उपयोग होण्यासारखा असे; तथापि अशा व्यावहारिक फायद्याकडे लक्ष न देतां जिवंतपणीं प्रत्यक्ष अनुभवावयास मिळणाऱ्या या विलक्षण स्थितींतच ते भक्त मोठा आनंद मानीत असत. डायोनिसस देवतेच्या या पारमार्थिक संप्रदायांत कोणताहि नैतिक उपदेश करण्याचा हेतु नव्हता; तसेंच वरील धार्मिक विधि लौकिक व्यवहारांत रूढ करणेंहि मोठें कठिण होतें. परंतु ! विधींचें

ध्येय एक प्रकारची विलक्षण अतिमानुष मानसिक शक्ति प्राप्त करून घेण्याचें असल्यामुळें हेलेन लोकांनीं हा धार्मिक संप्रदाय थोड्या फार फरकानें आपल्या समाजांत प्रविष्ट करून घेतला होता असें ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध होतें.

**जर्मन अथवा टयूटॉनिक संस्कृति.**—पुराणवस्तुशास्त्राच्या दृष्टीनें पाहतां जर्मनीची समग्र रचना एकरूप नाहीं. तिच्या दक्षिण भागाची सांस्कृतिक वाढ उत्तरभागाहून भिन्न तऱ्हेनें होत होती व पश्चिमभागावर सांस्कृतिक परिणाम करणाऱ्या गोष्टी पूर्वभागावर परिणाम करणाऱ्या गोष्टींहून अगदीं निराळ्या होत्या; इतकेंच नव्हे तर ज्या ठिकाणीं संस्कृतीचा प्रसार एक व उगमापासून होत होता त्या ठिकाणीं सुद्धां तो निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या वेळीं झालेला दिसून येतो. म्हणून या सबंध देशाच्या सामान्य वर्णनांत येणारा सांस्कृतिक कालानुक्रम बराच अजमासि असणार हें उघड आहे.

**प्राचीन पाषाणयुग ( पूर्वार्ध ).**—मनुष्याच्या हातकामचे प्राचीन अवशेष हिमपूर्व कालाच्या अंतींचे किंवा एखाद्या हिमांतर कालांतील सांपडतात. पण हा हिमांतर काल अशा कालांच्या मालिकेंतील पहिला आहे कीं नाहीं याविषयीं वाद आहे. विशिष्ट जर्मन अवशेष म्हणजे बीमरजवळ टॉबक या ठिकाणीं आढळून आलेले होत. तेथें बदामाच्या आकाराच्या दगडी पाचरी, लहान गारेचे चाकू, गारेचे ओबडधोबड खापा पडलेले लहान दगड व यांबरोबरच हत्तींचे अवशेषहि सांपडले आहेत. शिवाय फ्रान्समध्यें अतिशय प्राचीन कालीं न सांपडलेलीं हाडांचीं शस्त्रेंहि या स्थानीं उपलब्ध झालीं.

**प्राचीन पाषाणांतर युग.**— या युगांत जास्त सुधारलेलीं अवशेष रूपें सांपडतात. उदाहरणार्थ, मामथ जातीचा हत्ती दिसून येतो. भोकें पाडण्याच्या व खरवडण्याच्या उपयोगासाठीं म्हणून केलेल्या तासींव दगडी हत्यारांवरून अशी कल्पना होते कीं, वस्त्रप्रावरणासाठीं मनुष्य कातडीं कमावीत असावा. भोकें पाडलेले दांत व शिंपा यांचे अलंकारहि सांपडले आहेत.

**प्राचीन पाषाणयुग (उत्तरार्ध).**—या युगांत विशेष म्हणजे रेनडियर नांवाच्या हरिणाचें अस्तित्व होय. "स्वाबियन अच्थल" मधील "होलेफेल्स" अवशेषांत अद्यापि मातीच्या भांड्यांचा पत्ता नाहीं. रेनडियरच्या कवटीचें मोठ्या कौशल्यानें पाणी वगैरे पिण्याचें भांडें बनविलेलें आढळून येतें. करवती, सुया, आरी आणि मासे मारण्याच्या हाडांच्या बरच्या सांपडल्या आहेत. या काळीं फ्रान्समध्यें रहाणाऱ्या लोकांच्या ठिकाणीं अत्युच्च कलाभिरुची जी प्रामुख्यानें दिसून येते तिचा मागमूसहि या जर्मन अवशेषांत आढळून येत नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

प्राचीन पाषाणयुगीन संस्कृतीची नवपाषाणयुगीन संस्कृतीपर्यंतची वाढ कशी झाली यासंबंधींच्या ज्ञानांत जो एक खंड पडला होता तो नुकताच उत्तरजर्मनी व फ्रान्स या ठिकाणच्या पूर्वयुगाहून जास्त सुधारणा दाखविणाऱ्या वस्तूंच्या संशोधनामुळें अंशतः भरून निघाला आहे. पण या वस्तूंत मडकीं सांपडलीं नाहींत. या नवपाषाणसंस्कृतीचा आरंभ नवीन मनुष्यजात तेथें असल्यामुळें झाला कीं काय असा एक प्रश्न उपस्थित झाला आहे.

**नवपाषाणयुग** ( दक्षिणजर्मनीमध्यें ख्रि. पू. २००० पर्यंत).—नवपाषाणयुगीन मनुष्य ज्याप्रमाणें हल्लीं हवा आहे अशा हवेंतच रहात असे. फरक इतकाच कीं, तो देवदारूच्या वनांत राही. प्रत्येक बाबतींत याची प्रगति दिसून येते. नवपाषाणयुगाच्या उत्तरार्धाच्या अंतीं कुंभारकाम व विणकाम यांत तो प्रवीण झाला व कृषिकर्मांत आपला वेळ घालवूं लागला. तो जनावरें बाळगी व घांसलेलीं व गुळगुळीत केलेलीं किंवा सुरेख तासलेलीं सुंदर आकाराचीं हत्यारें आणि शस्त्रें तो करीत असे. नवपाषाणयुगीन वसाहतींचे अवशेष विशेषतः वर्म्सच्या आसपास मेन प्रांतांत थुरिंगिया येथें सांपडले आहेत. ही घरें म्हणजे बहुधा जमिनींतील बिळें असून त्यांवर कदाचित् शाकारलेलीं छपरें असावींत. उत्तरनवपाषाणयुग व त्यापुढील युगाविषयीं माहिती मुख्यत्वानें जर्मनींत (बव्हेरियांत) सांपडलेल्या सरोगृहावशेषांवरून आपणांस मिळते. मेक्लेन्बर्ग, पोमेरॅनिया आणि पूर्व प्रशिया या ठिकाणचीं सरोगृहें निराळ्या पद्धतीचीं आहेत व तीं पाषाणयुगांतील आहेत कीं नाहींत याविषयीं अजून शंका आहे. हिंकेलस्टेन,अल्झे आणि वर्म्सच्या भोंवतालचीं इतर ठिकाणें यांत विशिष्ट नवपाषाणयुगीन कबरस्थानें सांपडलीं आहेत. या कबरींतून सांगाडे ताठ निजविलेले दिसतात. पण इतर कबरस्थानांतून (उदा. ऱ्हाईन—हेसेनमधील फ्लोमबार्न येथील हेलब्रानजवळील कबरस्थान) हे सांगाडे अस्ताव्यस्त स्थितींत दिसतात. भूमध्यसमुद्रांतील शिंपांच्या माळा व कंकणें यांवरून त्या काळीं व्यापार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर असावा असें दिसतें. कबरींतून सांपडलेल्या दुसऱ्या वस्तू म्हणजे लहान गारेचे चाकू, दगडी कुऱ्हाडी, विस्तव तयार करण्यासाठीं गार व पायराइट या खनिज पदार्थांचीं ढेंकळें आणि स्त्रियांच्या कबरींतून धान्य दळण्याचीं जातीं या होत. मातीच्या भांड्यांना बहुधा वाटोळें बूड असे. प्राचीन अलंकरणाची तऱ्हा म्हणजे बोटांचे छाप वठविणें होय. यानंतर दक्षिण जर्मनींत दोन पृथक् काळांत नागमोडीच्या आकृती काढलेल्या दिसून येतात. या काळांच्या मध्यावस्थेंत मळसूत्राकार किंवा लाटांसारख्या रेषा आढळतात. याच वेळीं उत्तर व पूर्वजर्मनींत सूत्रमंडन पहाण्यांत येतें. या युगाच्या अंतीं उत्तरजर्मनींतील रहिवाशी मोठमोठ्या भव्य दगडी

कबरी बांधीत व हॅनोवर येथील लोक विशेषतः आंत जाण्याला वाटा असलेल्या कबरी उभारीत.

**कांस्ययुग**(दक्षिणजर्मनींत खि. पू, २०००–१०००).—पाषाणयुगाच्या उत्तरकालीं आपणांला कधीं कधीं तांबें उपयोगांत आणलेलें दृष्टीस पडतें. व त्यानंतर हळू हळू कांसें उपयोगांत येऊं लागलें. इजियन कांस्यसंस्कृतीचा डॅन्यूब व एल्बे यांच्या कांठच्या प्रदेशांवर प्रत्यक्ष परिणाम झाला व याचप्रमाणें मध्यजर्मनीच्या पश्चिम भागांतील सुधारणा इटाली आणि फ्रान्स या देशांतून तिकडे गेली असावीसें दिसतें. या कालांतील उत्तरेकडचा, विशेषतः डेन्मार्कचा उत्कर्ष अंबरच्या व्यापारामुळें झाला व दक्षिणेकडील सुधारणा एल्बेच्या मुखापासून वर जटलंडपर्यंत गेली हें निःसंशय आहे. या प्राचीन काळची विशिष्ट गोष्ट म्हणजे देशरिवाजाप्रमाणें माती, दगड किंवा वाळू यांचा ढिगारा प्रेतावर रचणें ही होय. या कालीं कांसें तयार करीत व यापुढील कालीं तर त्यावर घणाचे घाव घातलेले दिसून येतात. बव्हेरियांत कबरींतून सांपडलेल्या अवशेषांवरून असें दिसतें कीं, मोठीं हत्यारें म्हणजे बरची व लांब अणकुचीदार भाले (पॅलस्टब) असत उत्तरेकडे लहान बरच्या कुऱ्हाडीप्रमाणें लांब काठीवर बसवीत. बायका कांशाचे दोन आंकडे, प्रत्येक हातांत एक कंकण, अंबराचे अलंकार आणि कांशाच्या बाकरी नळ्यांच्या तुकड्यांच्या माळा वापरीत. प्रत्येक कबरींत बोटांचे छाप व रेघा यांनीं सुशोभित केलेली एक दोन उभीं भांडीं सांपडलीं आहेत. पुढील काळांत प्रेतें दहन करण्याची पद्धत दिसते, तथापि त्यांचे अवशेष ढिगाऱ्यांतून पुरून ठेवीत. या वेळीं तरवारी आढळतात. बायका जड जड दागिने वापरूं लागल्या. भांडीं फारच उत्कृष्ट तऱ्हेनें झिलाई केलेलीं असून त्यांचा आकार सुंदर असे व त्यांवर नागमोडीची नकशी असे.

**हेलस्टट युग** (जर्मनींत खि पू.८–५वें शतक).—हेलस्टट हें नांव उत्तर आस्ट्रियांतील या नांवाच्या प्रदेशांत कबरस्थानावरून घेतलें आहे. हेलस्टट संस्कृतिकाल लोखंडाच्या शोधापासून सुरू होतो. जर्मनींत या संस्कृतीचे केंद्र बव्हेरिया बेडन आणि वुरटेंबर्ग हा प्रदेश आहे. याची उत्तर सीमा थुरिंगी अरण्य आहे. ब्रॅन्डन्बर्ग लुसॅटिया सिलेसिया, पोसेन आणि सॅक्सनी या प्रदेशांत कांस्ययुगावशेष फारसे जरी आढळले नाहींत, तरी हेलस्टट युगांचा परिणाम चांगलाच दृग्गोचर होतो. पश्चिम प्रशियात मानवी चेहेरे असलेलीं उभीं रक्षापात्रें (चंबूसारखीं) सांपडलीं आहेत. मृतांनां ढिगाऱ्यामध्यें पुरीत किंवा जाळीत. विशेषतः उत्तर आणि पूर्व जर्मनींत जाळण्याची चाल होती; बव्हेरियांत या दोन्हि चाली अस्तित्वांत होत्या. या कालांत सुंदर आकारांचीं व रंगांचीं मातीचीं भांडीं तयार होत व कांस्ययुगीन टांचण्यांच्या ऐवजीं कचक "बकल"—बहुधा नगाऱ्याच्या आकाराचीं—वापरण्यांत येऊं लागलीं.

**ला—टेनेयुग** (इ. स. पू ४—१ शतक).—हा वेळ पावेतों लोकवस्तींतील विशिष्ट संबंधांबद्दल फारच थोडा पुरावा सांपडतो. या देशाच्या इतिहासारंभकालीं जर्मनीच्या पश्चिम आणि दक्षिण भागांत केल्ट लोक राहात होते. स्वित्झर्लंडांतील 'ला-टेने' या सरोगृहभूमीवरून या युगाला हें नांव मिळालें आहे. या युगाचा पूर्वकाल म्हणजे केल्टवर्चस्वाचा काळ होय. या केल्ट लोकांनीं रोमन आणि ग्रीक संस्कृती चांगल्या पचनीं पाडून, आपल्या नवीन कला आपल्या ट्यूटॉनिक शेजाऱ्यांनां घ्यावयास लावल्या. परकी नाण्याबरहुकूम आपलीं नाणीं पाडिलीं. त्यांच्या संस्कृतीवर परकीय संस्कृतीचा फार मोठा परिणाम झाला असला तरी,त्यांची संस्कृति कांहीं बाबतींत स्वतंत्रच झाणावी लागेल. यापुढें या लोकांत जास्त सुधारणा झाली नाहीं. कारण या जातीचा राजकीय वर्चस्वांत ऱ्हास होऊं लागला. जर्मनींतील यांचीं मुख्य ठिकाणें म्हणजे थुरिंगियापर्यंतचे दक्षिणेकडील प्रांत आणि मेन व सार हीं खोरीं. या लोकांचीं भूषणें ठराविक वनस्पतींच्या आकाराचीं असत; सोन्याचा सर सढळ उपयोग करीत; व पुढील काळांत जर्मनींत जो रोमन मीना "(इन्यामेल)" वापरीत त्यापेक्षां अगदीं निराळा असा मीना शस्त्रें आणि दागिने यांनां लावीत. लढाईंत रथ असत व तटबंदी शहरें बांधलेलीं असत; तथापि, घरांच्या भिंती कुडाच्या असून त्यांवर मातीचा गिलावा लावीत. या प्रदेशांत थडग्यांवर चबुत्रे बांधण्याची चाल जेव्हांपासून सुरू झाली त्या वेळेपासून ला—टेने युगाचा त्यांवर होणारा परिणाम दिसून येतो. पण किनाऱ्यावरच्या प्रांतांतून हा परिणाम रक्षापात्रें असलेल्या कबरस्थानांत संशोधिला पाहिजे.

**रोमनी युग** (इ. स. १. ल्या शतकापासून).—ला–टेने युगानंतरच्या युगाला रोमनी–जर्मन युग म्हणणें जास्त सयुक्तिक होईल; कारण ट्युटॉनिक वंशांचा रोमन संस्कृतीशीं आलेला संबंध मागील युगांत केल्ट लोकांचा प्राचीन (लॅटिन-ग्रीक) संस्कृतीशीं आलेल्या संबंधासारखाच जवळ जवळ आहे. ऱ्हाईन प्रदेश रोमन संस्कृतीचें केंद्र होतें. या संस्कृतींत रोमन रस्ते, किल्ले, दगडी व कौलारू घरें आणि संगमरवरी देवस्थानें आढळतात. या वेळीं ट्युटॉनिक लोकांनीं लेखनकला बहुधा साध्य करून घेतली होती; तथापि यांच्या राष्ट्रीय वर्णमालेच्या उगमासंबंधीं अद्यापि वाद चालू आहे. या काळच्या कबरींतून मातीचीं किंवा कांचेचीं रक्षापात्रें सापडतात; प्रेतदहनाची चाल रूढ असे. कबरींत सांपडलेल्या वस्तूंत एक किंवा अधिक नाणीं असतात

**राष्ट्रस्थानांतर युग** (इ. स. ३००—५००).—रोमन इतिहासकारांनीं वर्णिलेला या वेळचा अखंड युद्धाचा काळ कबरींत सांपडलेल्या अवशेषावरून मुळींच ओळखूं येत नाहीं. उलट, कबरींतून शस्त्रें फार क्वचितच सापडतात. त्यांत ज्या वस्तू आढळतात त्यावरून त्या वेळचें असाधारण चैनीचें आयुष्य दिग्दर्शित होतें साधारणपणें अशा कबरींतील

अवशेष म्हणजे पाणी वगैरे पिण्याचीं उत्तम उत्तम पात्रें, सुंदर नक्षीदार फांसे व बुडबुळें, छानदार मण्यांच्या माळा, हे होत. या युगांतील विशिष्ट गोष्ट म्हणजे प्राण्यांचे आकार पाहून झालेली अलंकरणाची वाढ. या अलंकरणपद्धतींत विचित्र, काल्पनिक व आडव्या तिडव्या आकृती काढलेल्या दिसून येतात. या काळीं हॅलेन्होनिक लोकांनीं आक्रमिलेला जर्मनीच्या पूर्वेकडील भागच फक्त या सुप्रगत संस्कृतीपासून अलग राहिला.

**मेरोविंगियन युग** (इ. स.५००–८००).–मेरोविंगियन हें फ्रँक लोकांवर राज्य करणारें पहिलें घराणें होय. या युगांत जर्मन टोळ्यांतील लोकांनां ख्रिस्ती संप्रदायांत पूर्णपणें ओढलेलें दिसतें. रेहेन्ग्रेबर नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या कबरी जर्मनीच्या सर्व ट्यूटॉनिक भागांत सांपडल्या आहेत. या कबरी हल्लींच्या रांगेनें प्रेतें पुरलेल्या कबरींप्रमाणेंच आहेत. त्यांमध्यें फरक इतकाच कीं रेहेन्ग्रेबरमध्यें मौल्यवान वस्तू असतात. या वेळीं देखील कांहीं जर्मन जाती विशेषतः ॲलेमनि लोक मृतांवर ढिगारे रचीत असतसें दिसतें. फ्रँक आणि बर्गंडियन लोकांमध्यें रोमन चालीला अनुसरून अखंड दगडाच्या प्रेताच्या पेट्या ठेवलेल्या आढळतात व इतर प्रांतांतून या पेट्या अनेक दगडी ठोकळ्यांच्या केलेल्या दिसतात. या काळचीं शस्त्रें म्हणजे स्पथ नांवाची दुधारी जर्मन तरवार, सॅक्स नांवाची आंखूड तरवार किंवा लांब चाकू, चाकू, ढाल व सर्वसामान्य जर्मन कुऱ्हाड, हीं होत. बव्हेरियांत ही वरील कुऱ्हाड दिसत नाहीं दागिन्यांत मणी, कुंडलें, कपड्यांनां खोवण्याचे काटे, अंगठ्या, कंकणें इत्यादि वस्तू असून त्यांत मौल्यवान खडे बसविलेलें असत.

**स्कँडिनेव्हिया**.— स्कँडिनेव्हियामध्यें पूर्वप्रास्तरायुधयुगांत मनुष्यवस्ती नव्हती. उत्तरप्रास्तरायुधयुगांत डेनमार्कमध्यें देवदारु कालांत मनुष्यवस्ती आढळते. बाल्टिक गोड पाण्याचा समुद्र होता त्या वेळीं म्हणजे ख्रि. पू. ३००० ( एस. मुलर याच्या मताप्रमाणें ) अथवा ८००० ( ओ. मांटेलिअस याच्या मताप्रमाणें ) च्या सुमारास स्वीडनमध्यें लोकवस्ती दिसते. रेनडिअरच्या शिंगांचीं व गारांचीं हत्यारें दक्षिणनॉर्वेस्वीडनमध्यें सांपडतात. येथें जे दुसरे कांहीं अवशेष सांपडतात त्यांवरून त्यांस कृषिकर्म माहीत नसून ते परिभ्रमणवृत्तीनें रहात असत असें दिसतें. बरेचसे अवशेष समुद्राकिनाऱ्यावर सांपडतात. गारेच्या हत्यारांत कुऱ्हाडी, भाल्यांचीं टोकें, चाकू इत्यादि सांपडतात. हाडांचीं हत्यारें व मातीचीं भांडीं वगैरेहि आढळतात. त्याचप्रमाणें प्राण्यांच्या दांतांचे ओंवून दागिने केलेले आढळतात. उत्तरपाषाणयुगकालीन अवशेषांमध्यें गोपवृत्ति व कृषिकर्मवृत्ति प्रचलित असल्याचें दिसतें. हे अवशेष डेनमार्कमध्यें आढळतात. घरांच्या अवशेषांमध्यें घरांत बांधलेल्या शेगड्या व आंतबाहेरून चिखलानें मढविलेल्या कुडाच्या भिंती वगैरे आढळतात. जमीनीवर सर्व किंवा कांहीं फरसबंदी असे.

कांस्ययुगाचा आरंभ स्कॉडिनेव्हिआमध्यें ख्रि.पू. २००० ते १७५० च्या सुमारास झाला असावा. पहिलीं हत्यारें दगडी हत्याराच्याच प्रतिकृती असत. पुढें त्यांत सुधारणा होत गेली स्वीडननॉर्वेमध्यें या कालांतील कांहीं दगडांवरील खोदकामें आहेत. यांवरून त्या काळीं घोड्यांचा गाड्यांकडे, नांगरांकडे वगैरे उपयोग करीत असत. गहूं, ओट, बार्ली इत्यादि धान्य पिकवीत असत. शिडाशिवाय पण मोठाल्या होड्यांचीं चित्रें आढळतात. चित्रांवरून पोषाखाचा बोध होत नाहीं पण कांहीं शवपेटिकांतील प्रेतांवरून त्यावेळीं(३०००वर्षांपूर्वी) जाड टोपी घालीत, लढाईत शिरस्त्राण घालीत, लोंकरीचा अंगरखा ( ट्यूनिक ) घालीत पण खांदे उघडे असत, एक झगा असे व जोडे घोट्याशीं कापडाच्या तिरक्या पट्टीनें बांधीत. एक कमरपट्टा, झग्याला टांचण्या खोवलेल्या व एक कांकण असे. एक लहान चाकू असे त्यावरून ते हजामत करीत असावे. टोंकांच्या हत्यारांवरून ते गोंदीत असावे. बायका केंसांवर जाळें घालीत व फणी घालीत. एक पोकळ बोडिस कोंपरापर्यंत असलेला व एक लांब झगा असे. तो कमरेभोंवतीं एका पट्टयानें बांधीत. त्या पट्ट्याच्या पुढें दागिना असे. एक माळ, दोन कांकणें व एक कट्यार त्यांजवळ असे. पुरुष उंच असून केंस पिंगट असत.

लोहयुगाचा आरंभ ख्रि.पू ५०० च्या सुमारास झाला. वरील विवेचनावरून यूरोपमध्यें मनुष्यजातीची वस्ती प्रथम कोणकोणत्या प्रदेशांत होती व त्यांची प्रगति कोणकोणत्या पायऱ्यांनीं होत गेली; व इकडे आशियामध्यें मोठमोठीं साम्राज्यें उदयास येऊन उच्च सांस्कृतिक जीवितक्रम आचरीत होतीं, अनेक कला, शास्त्रें, वाङ्मय यांचा विकास करीत होतीं, त्या वेळीं त्यांचे यूरोपीय बंधू संस्कृतीच्या कोणत्या अवस्थेंत होते हें कळून येईल.

याप्रमाणें अत्यंत प्राचीन पण ज्या कालाविषयीं आपणांस अवशेषरूपानें कांहीं प्रत्यक्ष प्रमाणें मिळतात अशा कालांतील संस्कृतिविकासासंबंधीं माहिती देऊन आपण ख्रिस्तपूर्व ५०० म्हणजे सरासरी बुद्धजन्मकालापर्यंत कथासूत्र आणलें आहे. आतां ज्याला प्राग्‌ऐतिहासिक काल असें म्हणतां येईल त्यासंबंधीं आपणांस आज कितपत ज्ञान करून घेतां येईल तें पाहूं.

---

## प्रकरण ७ वें.

## मूलगृहकालीन उर्फ इंडोयूरोपीय संस्कृति

आतांपर्यंत आपण वेदकालीन व वेदोत्तरकालीन संस्कृतींचें पर्यालोचन केलें. परंतु आपणांस त्याबरोबरच अशी जिज्ञासा होणें साहजिक आहे कीं, वेदकालीन किंवा तदुत्तर निरनिराळ्या संस्कृती या कोणत्या तरी प्राचीन अविकसित

संस्कृतीच्या परिणतावस्था असल्या पाहिजेत. तर या अपरिस्फुट अवस्थेतील पण मोठ्या संस्कृतीच्या जनक संस्कृती कोणत्या होत्या? त्या कोणकोणत्या प्रदेशांत विकसित होत होत्या व त्यांच्या विकासाच्या पायऱ्या आपणांस सांपडणें शक्य आहे किंवा नाहीं? वेदपूर्व काल हा पूर्णपणें अज्ञानमय असणें शक्य नाहीं. तेव्हां आपणांस त्या अज्ञात अशा वेदपूर्व युगांतील मानवजातीची प्रगति कसकशी होत गेली हें जाणणें बरेंच बोधपर व मनोरंजक होईल. वेदपूर्वकालीन मानवी संस्कृतीचें ज्ञान देणारीं प्रत्यक्ष प्रमाणें सांपडणें बरेंच कठिण आहे. तत्कालीन संस्कृतीचें ज्ञान आपणांस बहुतेक अनुमानानेंच करून घेतलें पाहिजे. अशा तऱ्हेचीं अनुमानें आजपर्यंत निरनिराळ्या साधनांवरून अनेकांनीं केलेलीं आहेत. मानवोत्पत्ति प्रथम कोठें झाली असावी व निरनिराळे मानववंश कोठें व कसे विकसित होऊन त्यांचें परिभ्रमणमार्ग कोणते असावे याविषयींचीं निरनिराळीं मतें व अनुमानें पूर्वी दुसऱ्या प्रकरणांत दिलींच आहेत. मानवी प्रगतीचे जे पूर्वपाषाणयुग, नवपाषाणयुग, इत्यादि कालखंड पाडिले आहेत तेहि पूर्वी दिलेच आहेत. त्यांत आपणांस काकेशियन व त्यांतल्या त्यांत आर्यन् वंश हाच पुढें विशेष प्रगत झाला ही गोष्ट स्पष्ट झालीच आहे. या आर्यन् वंशाच्या संस्कृतीची जन्मभूमि कोणती, तिचें स्थलांतर कसकसें झालें वगैरे गोष्टींचें ज्ञान आपणांस करून घेतलें पाहिजे. या विषयांवर निरनिराळ्या पंडितांनीं परिश्रम करून आपल्या संशोधनाचे निष्कर्ष जगापुढें मांडले आहेत. जगांत आज आर्यन्वंशोद्भव निरनिराळीं राष्ट्रें आहेत त्यांत आर्यन् मूलसंस्कृतिबोधक अवशेष कोणते आहेत याचाहि भाषाशास्त्रादि शास्त्रांच्या मदतीनें अभ्यास झाला आहे. त्यांचा निष्कर्ष पुढें थोडक्यांत मांडला आहे.

या वेदपूर्वकालीन संस्कृतीचे मुख्य दोन कालविभाग पडतात. पहिला कालविभाग ज्या वेळीं सर्व आर्यन् वंशाचे लोक एकत्र रहात होते तो काल. यास इंडोयूरोपीय अथवा इंडोजर्मानिक किंवा मूलगृहकाल म्हणतात. यानंतर या मुख्य वंशाच्या शाखा निरनिराळ्या दिशांस पसरल्या. त्यांपैकीं ज्या पश्चिमेस गेल्या त्यांनीं ग्रीक संस्कृति व ट्यूटन वगैरे इतर संस्कृतींस जन्म दिला. जी शाखा पूर्वेकडे आली ती बरेच दिवस इराणांत राहून तेथें एका संस्कृतीचा विकास झाला. या कालास पर्शुभारतीय काल व संस्कृतीस पर्शुभारतीय संस्कृति म्हणतात. यानंतर वेदभाषी आर्य लोकांच्या पूर्वजांची एक शाखा भरतखंडांत येऊन तिनें भारतीय संस्कृतीचा आरंभ केला.

आतां आपण प्रथम जी मूलगृहकालीन इंडोयूरोपीय संस्कृति तिजकडे वळूं.

**इंडोयूरोपीय किंवा मूलगृहसंस्कृतिविषयक विचार सुचण्याचीं कारणें.**— वेद हेच आद्य ग्रंथ व ते ईश्वरप्रणीत म्हणजे ईश्वरानें आपल्या प्राचीन पूर्वजांस म्हणजे भारतीय आर्यांस या भरतखंडांत सांगितले अशी आपली पूर्वापार समजूत आहे. अर्थात् भरतखंड हेंच जगांतील वाङ्मयाचें, संस्कृतीचें किंबहुना मानवोत्पत्तीचेंहि आद्य स्थान होय असें आपण मानीत आलों व अद्यापहि जुन्या ज्ञानपरंपरेच्या लोकांत हीच समजूत कायम आहे. अशा लोकांस वेदपूर्वकाल, आर्यांचें (भारतेतर) मूलगृह, इंडोयूरोपीय संस्कृति म्हणजे हिंदुस्थान व यूरोप या दोन ठिकाणच्या लोकांनां साधारण असलेली अशी एक संस्कृति व त्यावरून निघणारीं अनुमानें म्हणजे हिंदुस्थानांतील लोक व यूरोपांतील लोक हे मूळ एकाच वंशांतले आहेत, ते पूर्वी एके काळीं एके ठिकाणीं एकत्र रहात होते व ह्या गोष्टी फार चमत्कारिक किंबहुना विक्षिप्तपणाच्या वाटणें स्वाभाविक आहे. सदरहू प्रकारचे विचार प्रगट करणारे ग्रंथ आपल्या प्राचीन संस्कृत भाषेंत बिलकुल नाहींत. कारण अशा विचारांनां प्रसवणारें जें भाषाशास्त्रविषयक, मानववंशशास्त्रविषयक, गाथाशास्त्रविषयक, पुराणवस्तुसंशोधनशास्त्रविषयक तुलनात्मक संशोधन तें अलीकडे एक दोन शतकांतलें असून त्याचा पायाहि नूतन भूभागांचें संशोधन व आक्रमण करणाऱ्या यूरोपीयांनीं घातला आहे.

सतराव्या शतकांत यूरोपियनांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यानंतर लवकरच यूरोपीय विद्वानांचें लक्ष हिंदुस्थानांतील प्राचीन संस्कृत भाषा व तिच्यांतील वाङ्मय याकडे गेलें व संस्कृत भाषा शिकत असतां स्वभाषेशीं किंवा यूरोपांतील प्राचीन ग्रीक व लॅटिन भाषांशीं संस्कृत भाषेचें शब्दसाम्य व अर्थसाम्य असल्याचें त्यांस आढळून येऊं लागलें. संस्कृत भाषेप्रमाणें या यूरोपीय पंडितांनीं इराणांतील प्राचीन झेंद भाषेचेंहि अध्ययन केलें व त्यांतहि त्यांनां शब्द व अर्थसाम्यें आढळून आलीं. संस्कृत, झेंद वगैरे भाषांतील वाङ्मयांत प्रवेश झाल्यावर त्यांतील पौराणिक कथा वाचतांना त्या कथांच्या बाबतींतहि कांहीं कांहीं साम्यें लक्षांत येऊं लागलीं. यामुळें कुतूहल वाटून पौरस्त्य भाषांचा व वाङ्मयांचा अभ्यास यूरोपीय पंडितांनीं अधिक नेटानें चालू केला, आणि त्यांनीं पौरस्त्य व पाश्चात्त्य भाषांतील शब्दांची व प्राचीन कथांची तुलना करून तौलनिक भाषाशास्त्र (फायलॉलजी) व तौलनिक गाथाशास्त्र (मायथॉलजी) निर्माण केलीं. तसेंच आशिया व यूरोप या दोन खंडांतील माणसें एकत्र येऊं लागल्यावर माणसामाणसांतील शारीरिक वैषम्याची चिकित्साहि सुरू झाली व तींतून मानववंशशास्त्र (एथ्नॉलजी) आणि मस्तकविज्ञानशास्त्र (फ्रिनॉलजी) हीं शास्त्रें प्रगत झालीं.

या सर्व साम्यांचा विचार करतां एक मोठी क्रांतिकारक कल्पना विद्वानांच्या डोक्यांत उत्पन्न झाली ती अशी कीं, वरील प्रकारचीं साम्यें असलेले पण आज दूरदूरच्या देशांत रहाणारे लोक मूळ एकाच लोकसमाजाचे वंशज असावेत. ही एकमातृकुलोत्पत्तीची कल्पना सुचल्यावर ह्या मूलमानव-

वंश कोणत्या परिस्थितींत रहात होता, काय खातपीत होता, त्याच्या चालीरीती काय होत्या; एका शब्दांत "सांगावयाचें म्हणजे त्याची संस्कृति कोणत्या प्रकारची होती याबद्दल संशोधन सुरू झालें. हें संशोधन संस्कृत, ग्रीक, झेंद, लॅटिन, लिथुआनियन, जुनी स्लॉव्हानिक, गॉथिक, जर्मन, केल्टिक, जुनी प्रशियन, आल्बेनियन व आर्मेनियन इत्यादि प्राचीन भाषांतील शब्दांच्या तुलनात्मक अभ्यासानें सुरू झालें. या कार्यांत आडेलुंग ( १८०६ ), बॉप ( १८३३ ), श्लेगेल ( १८०८ ), जे. जी. ऱ्होडस ( १८२० ), एफ. ए. पॉट ( १८४० ), लॅसेन ( १८४७ ), जे. ग्रिम ( १८४८ ), ए. कुहन ( १८४५ ), श्राडर ( १८९० ) वगैरे विद्वानांचे परिश्रम विचारार्ह आहेत. या इंडोयूरोपीय किंवा आर्यन लोकांच्या मूळ पूर्वजांबद्दल तीन महत्त्वाचे प्रश्न उद्भवतात ते संस्कृतिविषयक, मूलगृहविषयक व मूलगृहकालविषयक हे होत. यांपैकीं संस्कृतिविषयक प्रश्नाचा प्रथम विचार करूं.

**संशोधनाचीं आणि ज्ञानाचीं व्यंगें.**—इंडोयूरोपीय स्थितीसंबंधानें जी माहिती आम्ही देत आहों त्या माहितीच्या अपूर्णतेविषयीं येथें कबूलीजबाब दिला पाहिजे. महाराष्ट्रांत या विषयावरचे संशोधक नाहींत. संशोधन शक्य होण्यासाठीं अनेक यूरोपीय आणि आशियांतील पण हिंदुस्थानच्या पश्चिमेस असलेल्या लोकांच्या भाषांचें ज्ञान पाहिजे. तथापि महाराष्ट्रीयांनां ग्रीक व लॅटिन या भाषांचें देखील ज्ञान फारच थोडें आहे, किंवा जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. मग लिथुआनियन इत्यादि भाषांचें ज्ञान तर दूरच राहिलें. ग्रीक शब्द आणि संस्कृत शब्द यांचीं समीकरणें जर पाश्चात्त्य ग्रंथांत आलीं तर तीं तपासण्यास देखील उपयुक्त साहाय्य ज्ञानकोशकारांस मिळालें नाहीं. पाश्चात्त्य ग्रंथकारांपैकीं ज्यांस संस्कृत येतें अशांस भारतीय अर्वाचीन भाषा मुळींच अवगत नाहींत, असें म्हटलें तरी चालेल. आणि त्यामुळें त्यांचें प्राचीन कालाविषयींचें ज्ञान बरेंच अपूर्ण रहातें. आर्यन लोकांच्या सर्व शाखांस सामान्य आणि संस्कृतीच्या प्रारंभकालीं उपलब्ध असणाऱ्या अनेक जिनसा केवळ घरगुती असल्यामुळें त्यांचा आणि तद्विषयक भारतीय शब्दांचा परिचय पाश्चात्त्य ग्रंथकारांस झाला नाहीं. प्राचीन स्थिति जाणण्यास अर्वाचीन भाषांचें आणि परिस्थितींचें ज्ञान अवश्य आहे. आजच्या परिस्थितीचीं अनेक अंगें जुनाट आहेत. आजच्या शब्दांपैकीं अनेक शब्दहि फार जुनाट आहेत, शिवाय असे अनेक शब्द आहेत कीं जे पुरातन भाषेंतून एकदम प्रचलित देशी भाषांत आले आणि त्यांचा प्रवेश शिष्ट संस्कृतमध्यें झालाच नाहीं. उदाहरणार्थ 'वल्ह्' म्हणजे बोलणें हा शब्द पाणिनीच्या धातुपाठांत आहे, तथापि संस्कृत काव्यांत आढळत नाहीं. पाणिनीय शब्दांचा आणि धातूंचा ऐतिहासिक पद्धतीनें अजून विचार व्हावयाचाच आहे. वि. का. राजवाडे यांनीं पाणिनीच्या शब्दांचें व प्रचलित मराठीचें नातें पुष्कळ दाखविलें आहे; तथापि वेदकाल आणि पाणिनि यांचा भाषेंतील फरकांनीं व्यक्त होणारा समाजशास्त्रीय संबंधहि जोडला गेला नाहीं.



वेदपूर्वकालीन स्थिति काढण्यासाठीं होणाऱ्या परिश्रमास अर्वाचीन भारतीय भाषांशीं अपरिचयाखेरीज दुसरी अडचण म्हटली म्हणजे वैदिक वाङ्मयांतर्गत ऋचांचा कालानुक्रम समाधानकारक लागला नाहीं ही होय. तो लागला तर हिंदुस्थानांतच ज्या शेंकडों किंवा हजारों वर्षांत वैदिक वाङ्मय तयार झालें त्या कालांतील निरनिराळ्या कालांच्या अनुक्रमबोधक चिन्हांचा संकर झाल्यामुळें अस्पष्ट झालेल्या संस्कृतीच्या पायऱ्या स्पष्ट होतील आणि वेदकालीन संस्कृतीच्या पहिल्या पायरीचा शोध लागेल. हीं कार्यें जेव्हां समाधानकारक रीतीनें होतील तेव्हां त्यांचा उपयोग तौलनिक संस्कृतिशास्त्राकडे अधिक विश्वासानें करितां येईल. येथें प्राचीन कालची इंडोजर्मानिक लोकांची संस्कृति कशी काय होती याविषयीं विविध भाषांतील तुल्य शब्दांनीं जी कल्पना पुढें दिली आहे, तिचा उपयोग संपूर्ण सत्य दाखविण्यासाठीं नाहींच. आजची माहिती अंशस्वरूपी व संदेहपूर्ण आहे आणि ती कालक्रमांकित नाहीं यामुळें येथें जी माहिती श्राडर व त्यासारख्या दुसऱ्या ग्रंथकारांवर अवलंबून देत आहों ती सर्वस्वीं विश्वसनीय आहे असें भलावणपत्र जोडण्यासहि आम्ही तयार नाहीं. जी माहिती दिली आहे तिचा हेतु मुख्यतः पश्चिमात्यांच्या मूलगृहविषयक संशोधनपद्धतीशीं सोदाहरण परिचय व्हावा हा होय. आणि हेंच अभ्यासाच्या अपूर्णत्वाचें दर्शक आणि कारणविवेचक विधान बऱ्याच अंशानें पर्शुभारतीयकालविषयक संशोधनाकडे लागू पडेल.

**आजचे मूलगृहकालीन अवशेष आणि त्यांचा उपयोग.**—तुल्य शब्द तपासून मूलगृहीं वायव्य, आरण्य, आणि ग्राम्य पशुपक्षी काय असावे, तत्कालीन शेतकी कशी असावी, कालमापन कसें होतें, भक्ष्यें काय होतीं यांची माहिती मिळते. अंगावरचे दागिने, घरें व गृहांतर्गत साहित्य, व्यापार, दळणवळण, कुटुंब आणि राज्यव्यवस्था यांवरहि पुष्कळसा प्रकाश या तुल्य शब्दांनींच पडणार आहे. श्राडरनें तुल्यशब्द हेंच साहित्य विशेष वापरलें आहे आणि मध्यें फक्त प्राचीनकालचे सरोगृहात्मक अवशेष पूर्वकालबोधासाठीं उपयोगांत आणिले आहेत. वेदकालीन दैवतें, वृत्तें इत्यादि गोष्टी श्राडरनें उपयोगांत आणल्या आहेत तथापि या विषयांवर भारतीय अभ्यासकहि आहेत. प्रथमतः शब्दमूलक माहिती देऊन नंतर इतर गोष्टींचा विचार करूं.

आतां प्रथम मूलगृहकालीन प्राण्यांचा म्हणजे तद्वाचक निरनिराळ्या भाषांतील शब्दांचा विचार करूं.

स स्त न मां सा हा री प्रा णी.

कुत्राः—संस्कृत–श्वा; झेंद–स्पा; आर्मीनियन–शून्; लॅटिन–कॅनिस; गॉथिक–हुंडस्; इं. हाउंड.

लांडगाः—संस्कृत-वृक; झेंद-वेह्र्क; आर्मीनियन-गेल; लॅटिन-लुपस; गॉथिक-व्हुल्फ्स.

अस्वलः—संस्कृत-ऋक्ष; आर्मीनियन-अर्ज्; लॅटिन-उर्सुस.

उद्राः—एक जातीचा मांसाहारी प्राणी. संस्कृत-उद्रा; झेंद-उद्रा; प्राचीन उच्च जर्मन ओट्टिर.

कोल्हाः—संस्कृत-शृगाल; अर्वाचीन फारसी-शंगाल.

तीक्ष्ण दंती प्राणी.

उंदीरः—संस्कृत-मूष; अर्वाचीन फारसी-मूस; आर्मीनियन-मुक्; लॅटिन-मूस.

ससाः—संस्कृत-शश; अर्वाचीन उच्च जर्मन-हसो.

ग्राम्य पशू.

यांच्या खेरीज घोडा, गाढव, बैल, शेळी, मेंढी, उंट, डुकर या प्राण्यांनां निरनिराळ्या भाषांत ज्या संज्ञा आहेत त्यांच्यांतील ध्वनिसादृश्यावरून हेहि प्राणी पूर्वीच्या लोकांनां माहीत होते असें म्हटलें पाहिजे. आर्यन् लोकांचें मूळ ठिकाण कोणतें या गोष्टीचा निर्णय होण्यासारखें यांत कांहीं नाहीं. वेदभाषा बोलणाऱ्या लोकांनां भरतखंडांत सिंह, हत्ती, माकड, वगैरे जीं चतुष्पाद जनावरें आढळलीं, त्यांचे तुल्य शब्द अजून सांपडले नाहींत आणि म्हणून संशोधकांनीं तीं मूलगृहीं नव्हतीं असें ठरविलें आहे.

**सिंह वाघ.**—आर्य लोकांनां सिंह हा प्राणी पंचनद्यांच्या प्रदेशांत आल्यावर व इराणी लोकांपासून फुटून निघाल्यावर आढळला असावा. ऋग्वेदाच्या अत्यंत जुन्या सूक्तांत सिंह हा मनुष्यें व जनावरें यांचा वैरी आहे अशीं वर्णनें आहेत. व त्याच्या गर्जनेची वायूच्या भरारीस उपमा दिलेली आहे.

सिंहविषयक ऋग्वेदांतील तीन अर्ध्या ऋचा येथें देतों.

**सिंहा इव नानदति प्रचेतसः पिशाइव सुपिशो विश्ववेदसः**
ऋ. १. ६४, ८

ज्याप्रमाणें गिरिगव्हरा (गुहे) मध्यें सिंह गंभीर शब्द करतात त्याप्रमाणें ज्ञानसंपन्न मरुत अत्यंत गर्जना करितात.

**रक्षा अग्निमशुषं तूर्वयाणं सिंहो न दमे अपांसि वस्तोः ॥**
ऋ. १. १७४, ३

हे इंद्रा सिंह ज्याप्रमाणें स्वाश्रयभूत वनाचें उपद्रवकारी गजादिकांपासून रक्षण करतो. व निर्भय होऊन निरोधी पशूंनां मारावयास धांवतो त्याप्रमाणें तूं अग्नीचें रक्षण करण्याकरितां धांव.

**यदीं गृभीततातये सिंहमिव द्रुहस्पदे ॥.**
ऋ. ५. ७४, ४

हे अश्विनीकुमारांनों अरण्यामध्यें गर्जना करणाऱ्या प्रबल सिंहाला ज्याप्रमाणें शूर पुरुष च्युत करितात (हांकलून देतात) त्याप्रमाणें गर्जना करणाऱ्या मेघांनां वृष्ट्यर्थ च्युत करा (मेघांनां पाऊस पाडवावयास लावा).

सिंह हा प्राणी जरी पूर्वीच्या काळांत सर्व यूरोपभर आढळत असे(लबक प्री-हिस्टॉरिक टाइम्स पृ.२९४)आणि स्वित्झर्लंडमधील लोक ज्या वेळीं तळ्यामध्यें लांकडी घरें करून रहात असत (महाराष्ट्रीय ज्ञानकोश सरोगृह शब्द पहा.) त्या काळीं सिंह हा प्राणी नव्हता,तरी पण सिंहाची एक जात ग्रेस व त्याच्या भोंवतालच्या प्रदेशांत होती (हिरोडोटस७. १२५) इंडोयूरोपियन लोकांच्या यूरोपीय शाखेस सिंहाची माहिती यूरोपखंडांतच झाली असें एक अनुमान केलें आहे तें निर्दोष आहे अशी आमची खात्री नाहीं.

व्याघ्र हा शब्द प्रथम अथर्व वेदांत (४. ३, १) येतो.

सिंह आणि वाघ हे दोन प्राणी जरी आपण घटकाभर बाजूस ठेवले तरी पूर्वीच्या काळांतील श्वापदांत बरींच चतुष्पाद जनावरें शिकार करण्यालायक आढळतात. परंतु 'शिकार करणें' 'पारध' 'पारधी' यांनां समर्पक शब्द इंडोजर्मानिक भाषांत अजून सांपडले नाहींत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. सामान्यतः हिंस्र जनावरांच्या नांवांवरून बनविलेलीं रूपें वगैरे या कामीं उपयोगांत आणीत. जसें संस्कृतां—मृगया शब्द जरी ऋग्वेदांत आढळत नाहीं तरी ऋग्वेद १०. ४०, ४ मध्यें युवां मृगेव वारणा मृगण्यवा दोषा वस्तो हविषा नि व्हयामहे । असें वर्णन आहे.येथें 'मृगण्यवः' याचा अर्थ सायणाचार्यांनीं (मृगभक्षक) शार्दूल असा केला आहे. परंतु ग्रिफिथनें सरळ शिकारी म्हणजे मृगया करणारे असा अर्थ केला आहे. यावरून त्या वेळीं शिकार करणें भारतीय लोकांस ठाऊक होतें असें दिसतें.

परंतु शिकार करणें या गोष्टीला मनुष्याच्या आयुष्याचा प्रधान भाग समजत नसत.व शेतकी हा प्रधान धंदा मानून शिकार हें त्याचें गौण अंग समजलें जात असे. शिकार करून मिळालेलें मांस वगैरे देवादिकांनां देत नसत व खाल्लें तरीं अडचणीच्याच प्रसंगीं खात असें श्राडर ह्मणतो (प्रीहिस्टॉरिक अँटिक्विटिज पृ. २५); पण त्याला भक्कम पुरावा नाहीं.

**पक्षी**—इंडोजर्मानिक लोकांनां कोणते पक्षी माहीत होते याचा विचार करतांनां पक्ष्यांच्या नांवांत त्यांच्या ध्वनींचें जें अनुकरण करण्यांत येतें त्यामुळें फार घोंटाळा होतो. जसें, संस्कृत—उलूक, कोकिला, कृकवाकु, तित्तिरी या पक्ष्यांनां लॅटिन, ग्रीक, आर्मीनियन वगैरे भाषांतून जीं नांवें आहेत त्यांतील ध्वनिसादृश्य त्या त्या पक्ष्यांच्या ध्वनींशीं मिळतें. तरी पण श्येन, हंस वगैरे पक्षी आशिया व यूरोप या दोन्ही खंडांत सांपडतात. पक्ष्यांचें आगमन निर्गमन म्हणजे त्यांनीं डावीकडून अगर उजवीकडून जाणें यावरून शुभाशुभ शकुन पहाण्याचा प्रघात पूर्वी होता. देवाची इच्छा काय आहे किंवा भवितव्यतेच्या पोटांत काय आहे हें असल्या शकुनांवरून जाणीत. दिवाभीत व कपोत या पक्ष्यांनां अनेक राष्ट्रें अशुभ मानीत. रोमन लोक पुढें त्यांनां शुभ मानूं लागले असावें असें दिसतें. इंडोजर्मानिक लोकांची ही गोष्ट झाली.

वेदांत सुद्धां अशा प्रकारच्या समजुती आढळतात. ऋग्वेदांतील दहाव्या मंडळांतील एकशें पांसष्टाव्या सूक्तांत कपोतास यमाचा दूत म्हटलें आहे.

देवाः कपोत इषितो यदिच्छन्दूतो निर्ऋत्या इदमाजगाम। तस्मा अर्चाम कृणवाम निष्कृतिं शन्नो अस्तु द्विपदे शं चतुष्पदे ॥ १ ॥

हे देवानों, निर्ऋतीचा दूत कपोत प्राप्त झाला (आहे). (त्याला) धनाची इच्छा आहे. त्याची बाधा होऊं नये ह्मणून आम्ही पूजा करितों व त्या बाधेचें निरसन करितों. यामुळें आमच्या पुत्रपौत्रांस व गवादि पशूंस कल्याण असो.

शिवः कपोत इषितो नो अस्त्वनागा देवाः शकुनो गृहेनु। २।

हे देवांनों आमच्या घरीं आलेला कपोत पक्षी सुखकर. अपापहेतु असो.

मानो हिंसीदिह देवाः कपोतः। ३।

हे देवांनों या ठिकाणीं कपोत आम्हांस बाधक न होवो.

यस्य दूतः प्रहित एष एतत्तस्मै यमाय नमो अस्तु मृत्यवे। ४।

ज्यांचा दूत येथें आला आहे त्या यमास-मृत्यूदेवतेस नमस्कार असो.

पक्ष्यांशीं परिचय त्या अतिप्राचीनांस होता असें दाखविण्यासाठीं आणि पक्षिमूलक कांहीं आचार अगर कल्पना प्राचीनांत प्रचलित असल्यास त्यांवर ऐतिहासिक प्रकाश पाडण्यासाठीं कांहीं वाद उत्पन्न झाले आहेत. त्या वादांत एक प्रश्न असा उत्पन्न झाला आहे कीं, पक्षिगमन शुभशकुनकारक होतें तें पक्षी ज्या दिशेनें जातो त्यावरून होतें कीं ज्या हाताकडून जातो त्यावरून होतें? या वादांत पुराणकथांचा अभ्यास करून त्यावरून इतिहास काढण्याचे परिश्रम करणारा प्रसिद्ध जर्मन पंडित याकोब ग्रिम (१७८५—१८६३) याचें मत श्राडर यानें देऊन तें खोडण्याचा प्रयत्न केला आहे. दोघांच्या मतांत भेद बराच सूक्ष्म आहे. दिशांच्या शुभाशुभत्वावरून हातांचें शुभाशुभत्व निष्पन्न झालें आहे आणि नंतर हातावरून पक्ष्यांच्या गमनागमनाचे शकुन ठरले आहेत असें ग्रिमचें मत आहे असें श्राडर प्रतिपादितो आणि आपला अभिप्रायभेद दाखवितो तो असा कीं, हातांचें वामदक्षिणत्व हें गुणमूलक आणि त्यामुळेंच शकुनोत्पादक आहे. दक्षिण दिशा वाईट आहे अशी प्राचीन समजूत होती असें ग्रिम म्हणतो आणि श्राडर त्याच्याविरुद्ध खालील प्रमाणें आणतो.

अवक्रन्द दक्षिणतो गृहाणां सुमंगलो भद्रवादी शकुन्ते ... ऋ. २. ४२, ३

हे कपिंजल, तूं सुमंगल आणि कल्याणवादी असा घराच्या दक्षिण दिशेला ओरड.

प्रदक्षिणिदभि गृणंति कारवो वयो वदंत ऋतुथा शकुंतयः, ऋ. २. ४३, १

कपिंजल पक्षी हेच स्तोते योग्य काळीं शुभ सुचवून दक्षिण दिशेला गात असतात.

"इंडोजर्मानिक भाषांमधून उजवा याला जो शब्द आहे त्याचा धात्वर्थ सर्व ठिकाणीं 'कुशल' असा सांपडतो. संस्कृत-दक्षिण, झेंद—दाशिन्; लॅटिन—डेक्टेर. शुभ शकुन उजवीकडून येत असें मानण्याचें कारण दक्षिण म्हणजे कुशल हा अर्थ आहे. उजवा किंवा डावा याचा पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं असें श्राडरचें मत आहे. श्राडरचें मत आम्हांस ग्राह्य दिसतें. दक्षिण आणि वाम हे शब्द शकुनमूलक नसून हातांचे गुणनिदर्शक आहेत, त्या अर्थी त्यांस आलेला अर्थ शकुनमूलक आहे असें धरण्याचें कांहीं कारण नाहीं. उलटपक्षीं शकुनच हस्तगुणमूलक असण्याचा संभव आहे.

**ग्राम्य पशू.**—गाई मनुष्याला मुकाट्यानें दूध काढूं देतात, घोडे मुकाट्यानें लगाम घालूं देतात, मेंढरें कुत्र्याबरोबर नीट शिस्तीनें जातात, या व अशा तऱ्हेच्या अनेक गोष्टी मनुष्याच्या इतक्या अंगवळणीं पडल्या आहेत कीं, त्यांत अस्वाभाविक कांहीं असेल अशी शंका सुद्धां मनाला शिवत नाहीं. परंतु हें सारें जनावरें माणसाळवून टाकण्याचें फळ आहे आणि जनावरें माणसाळवण्यास सुरुवात केव्हां झाली याची आठवणहि मनुष्याला नाहीं इतका हा प्रकार जुना आहे. पशूंचें गृह्यीकरण म्हणजे माणसाळवणें सिद्ध होत असतां होत असलेल्या प्रयत्नांच्या परंपरेचा इतिहास लिहावयास आपणांस इंडोजर्मानिक काळाच्या पूर्वीच्या काळांत गेलें पाहिजे. गृह्यीकरणांतर्गतचा बोध करून घेण्यास या मूलगृहविषयक संशोधनाचा उपयोग होत नाहीं. कळप राखणें, पाशांत पकडणें या जर गृह्यीकरण सिद्ध होण्यापूर्वीच्या क्रिया असतील तर त्यांचे मात्र शब्दावशेष सांपडतात. इंडोयूरोपीय लोक सुद्धां जनावरांचे कळप पाळीत ही गोष्ट संस्कृत—शर्ध; गॉथिक—हेर्ड; इंग्लिश—हर्ड्स या तुल्य शब्दावरून स्पष्ट होतें. पशू माणसाळविण्यास सुरुवात झाली असावी असें पशु शब्दाच्या पाश (पाशयामि) या शब्दाशीं असलेल्या सादृश्यावरून वाटतें. निरुक्तामध्यें पशु शब्दाची व्युत्पत्ति दिलेली नाहीं.

घोड्याविषयीं श्राडर म्हणतोः—घोडा या प्राण्याचे बोधक निरनिराळ्या भाषांतील शब्द तुल्य दिसतात. संस्कृत—अश्व; झेंद—अस्प; ग्रीक—इक्वॉस; लॅटिन—एक्वस; लिथुॲनियन—अस्झ्व. यावरून हा प्राणी इंडोयूरोपीय लोकांस निःसंशय माहीत असून तो त्यांच्या पाळीव प्राण्यांत होता असें वाटतें. परंतु घोड्यावर बसणें या अर्थी ग्रीक, झेंद इ. भाषांतील शब्द विसदृश असून ते बरेच नंतरचे असावेत असा तर्क आहे. ऋग्वेदामध्यें लगाम [ अभीशवः ], खोगीर [ सदः ] इत्यादि शब्दांचे वाचक शब्द असून घोड्यावर बसण्याची कल्पनाहि आढळते.

क १ वाश्वाः क्वा ३ भीशवः कथं शेक कथ यय पृष्टे सदो सनोर्यमः जवने चोदएषाम्

ऋग्वेद १. ६१, २—३

परंतु घोड्यास कधींहि बैलाप्रमाणें खटारे अगर नांगर वगैरे ओढण्याच्या जड कामास लावलेले आढळत नाहीं. तर त्याचा रथ किंवा इतर हलकीं वाहनें ओढण्याच्या कामीच भारतीय आर्यांनीं उपयोग केलेला आढळतो. अनेक पाश्चात्य पंडितांच्या हीच एक गोष्ट लक्षांत भरते व ही गोष्ट निर्देश करण्यासारखी वाटते. आपणांस त्यांत विशिष्टता वाटणार नाहीं.

होमरमध्येंहि रथांच्या घोड्यांविषयीं वाटेल तितका पुरावा आहे. पण ओझीं वाहणाऱ्या घोड्याचा उल्लेख नाहीं असें श्राडर दाखवितो. होमरच्या काळांत खेंचर हाच मुख्यतः ओझीं वाहणारा प्राणी होता. खेंचराची पैदास गाढव व घोडी यांच्यापासून करण्याची कल्पना प्रथम मीसियन लोकांनीं काढली असें अनाक्रिऑन (फ्र. ३४ बर्गक) म्हणतो. होमरच्या काळांतील कवींच्या उल्लेखांवरून खेंचर हा प्राणी पॅफ्लागोनिया, एनेटि या प्रांतांत आढळत असे व त्याचें तेंच मूलस्थान असावेंसें दिसतें. ऋग्वेदामध्यें खेंचर या प्राण्याचा वाचक शब्द आढळत नाहीं. तो नंतरच्या संस्कृत भाषेंत (पंचतंत्रांत) अश्वतर असा सांपडतो. पण अमरकोशांत हा शब्द नाहीं.

इंडोजर्मानिक लोकांची जी शाखा यूरोपकडे गेली तींतील लोकांनां उंट प्राणी माहीत नव्हता व इराणी युद्धाच्या वेळेस हा प्राणी ग्रीक लोकांस माहीत झाला असें श्राडर म्हणतो.

पर्शुभारतीय लोकांमध्यें मात्र फार प्राचीन काळीं खर व उष्ट्र हे प्राणी आढळतात. अश्विनौ यांचा रथ रासभ ओढतात असें ऋग्वेदांत वर्णन आहे (ऋग्वेद १.३४.९;८.७४, ७). परंतु उष्ट्र या शब्दानें वेदामध्यें रानम्हैस असा पशु निर्दिष्ट केला आहे असें श्राडर म्हणतो. परंतु हा शब्द ऋग्वेदामध्यें ५ ठिकाणीं आला आहे व त्यांपैकीं एकहि ठिकाणीं त्याचें वर्णन केलेलें आढळत नाहीं. त्याचा भार वहाण्याचा गुण मात्र तुलनेकरितां घेतलेला आहे (ऋग्वेद १. १३८,२; ८. ५, ३७; ६, ४८; ४६, २२; ३१). श्राडरनें उष्ट्र या शब्दाचा अर्थ उंट नसून रानम्हैस असा होतो हें कशावरून म्हटलें तें कळत नाहीं.

आतां होमरमध्यें गर्दभाचा उल्लेख फक्त एकदां आलेला आहे (इलि. ११. ५५८). ग्रीक आणि लॅटिन भाषांतील गर्दभवाचक शब्दांची व्युत्पत्ति अद्यापि नीट लागलेली नाहीं, व त्या शब्दांचें व पर्शुभारतीय तद्वाचक शब्दांचें साम्य आढळत नाहीं. यावरून पाश्चात्य पंडित असें अनुमान काढितात, कीं ज्या अर्थी घोडा हा प्राणी इंडोयूरोपीय पशूंत आढळतो आणि रासभ व उष्ट्र हे आढळत नाहींत त्या अर्थी या गोष्टीवरून इंडोयूरोपीय लोकांचें मूलस्थान निश्चित होण्यास बरीच मदत होईल. घोडा हा प्राणी मध्यआशियांतील वाळवंटांतून व कुरणांतून चोहोंकडे पसरला असावा. परंतु पाश्चात्यांच्या दृष्टीनें व सृष्टिशास्त्रज्ञांच्या मतानें घोड्याच्या प्रसाराचें क्षेत्र यापेक्षां मोठें असावयास पाहिजे व तो प्राणी यूरोपमध्यें सांपडावयास पाहिजे. उलटपक्षीं गाढव व उंट या प्राण्यांचें मूलस्थान मध्यआशियांतील सेमेटिक अरण्यांत होतें अशी एक कल्पना आहे. यावरून ज्या प्रदेशांत घोडा आढळत असे परंतु गाढव व उंट हीं जनावरें माहीत नव्हतीं अशा प्रदेशांत म्हणजे यूरोपखंडाच्या पूर्वभागांत किंवा आशियाखंडाच्या उत्तरेकडच्या भागांत इंडोयूरोपीय लोकांचें मूल वसतिस्थान असावें असा बऱ्याच पाश्चात्य पंडितांचा तर्क आहे. लो. बाळ गंगाधर टिळक यांचें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर पूर्वीचें मत आपण कितपत ग्राह्य धरावें यांविषयीं संशय आहे. टिळक यांच्या विचारांचें खंडन करणारी तथापि विचारांत घेण्याइतक्या किंमतीची कोणतीहि टीका आमच्या पाहाण्यांत नाहीं. आणि यासाठीं पाश्चात्य पंडितांची एतद्विषयक मनःस्थिति काय आहे हें कळत नाहीं.

चतुष्पाद जनावरांपैकीं मांजर हा प्राणी यूरोपमध्यें अगदीं अलीकडील दिसतो. मार्जार अथवा तद्वाचक शब्द ऋग्वेदांत नाहीं व इतर वेदांतहि आढळत नाहीं. श्राडर यानें या ठिकाणीं असें विधान केलें आहे कीं मांजराचा उपयोग उंदीर पकडण्याकडे होतो ही गोष्ट भारतीयांनां ठाऊक नसावीसें दिसतें. कारण पाणिनीनें ज्या प्राण्यांमध्यें निसर्गतःच वैर आहे अशा प्राण्यांच्या नांवांचे समास करण्याबद्दल एक नियम दिला आहे त्यांत कुत्रा व मांजर किंवा मांजर व उंदीर यांचीं उदाहरणें नाहींत. परंतु पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्यें केवळ 'येषां च विरोधः शाश्वतिकः' एवढेंच सूत्र आहे; त्यांत अर्थात् उदाहरणें कोणतींच दिलीं नाहींत. तेव्हां कुत्रा व मांजर किंवा मांजर व उंदीर यांचें उदाहरण नाहीं यांत विशेष कांहींच नाहीं. मांजराच्या पाणिनीयकालीन अस्तित्वाविषयीं खात्रीचें विधान करतां येत नाहीं. पक्ष्यांसंबंधीं वर जी थोडी माहिती दिली आहे तीवरून इंडोयूरोपीय लोकांत पक्षी माणसाळवण्याचा फारसा प्रघात होतासें दिसत नाहीं. कारण या गोष्टीस वसाहत स्थाइक लागते व मूळच्या शेतकऱ्यांस पक्षिविषयक लालनविकार नसून पक्ष्यांपासून पिकांस त्रास होण्याची भीति वाटत असावी. इंडोजर्मानिक लोकांचा इतिहास ज्या कालापासून माहीत आहे त्या कालीं पक्ष्यांचें संवर्धन करण्याची कला फारच बाल्यावस्थेंत होती असें दिसतें. ऋग्वेदामध्यें हंस याचा उल्लेख आहे (ऋ. ८. ३५, ८), पण त्यास श्येन व हारिद्रव यांच्याच पंक्तीस बसविलें आहे. कपोताबद्दल मजकूर वर दिलाच आहे.

**मूलगृहींच्या वनस्पती.**—आतां इंडोयूरोपीय लोकांस माहीत असलेल्या वृक्षांपैकीं वन्यवृक्षांचा विचार करितांना तो प्रदेशसंगतीच्या दृष्टीनें केला पाहिजे. मूलगृहशोधक इतिहासशास्त्राच्या दृष्टीनें वृक्ष आणि प्रदेश यांच्या संगतीचें महत्त्व मोठें आहे.

सर्व यूरोपखंड व हिंदुस्थानपर्यंतचा प्रदेश यांत ज्या वृक्षांचीं नांवें सदृश आहेत असा एकच वृक्ष आहे; आणि तो भूर्ज वृक्ष होय. याला इंग्रजींत बर्च असें म्हणतात. यांतील धातु भ्राज् प्रकाशणें हा असावा. उत्तरेकडील प्रदेशांत होणारा पांढरा चमकदार ' बर्च ' वृक्ष या शब्दानें निर्दिष्ट केला जात असावा. यूरोपच्या दक्षिण भागांत हा वृक्ष क्वचितच सांपडतो.

यूरोपीय भाषांची तुलना केली असतां बऱ्याच वृक्षांचीं नांवें सदृश आढळतात. यूरोपीय वृक्षांतलि सर्वांत महत्त्वाचा वृक्ष म्हटला म्हणजे ओक होय. याला सर्वश्रेष्ठ वृक्ष म्हटलें आहे. या वृक्षाला निरनिराळ्या अनेक यूरोपीय भाषांत जे शब्द आहेत त्यांतील स्वरांत जरी फरक असला तरी द् व र हीं दोन व्यंजनें सर्व शब्दांमध्यें आहेत आणि त्या शब्दांचा अर्थ कधीं कधीं ' ओक ' वृक्ष तर कधीं कधीं केवळ ' वृक्ष ' असा होतो. यावरून हे शब्द प्रथम केवळ वृक्षवाचक असून पुढें ' यूरोपीय कालांत त्या शब्दांस विशिष्टवृक्षवाचक अर्थ लक्षणेनें प्राप्त झाला असावा अशी कल्पना बसवून वृक्ष, वृक्षांगें किंवा वृक्षमूलक वस्तु व्यक्त करणाऱ्या अनेक भाषांतील शब्दांचें एकमेकांशीं आणि विशेषेंकरून द्, व र, या व्यंजनांशीं ध्वनिसादृश्य दिसावें म्हणून श्राडर कांहीं उदाहरणें देतो. संस्कृत व झेंद-द्रु ( वृक्ष ); प्राचीन सॅक्सन-ट्रु ओ ( लांकूड ); आल्बेनियन-द्रु ( लांकूड ); ग्रीक-द्रुस (ओक वृक्ष). संस्कृत-दारु (लांकूड); झेंद-दाउरु (लांकूड); ग्रीक-दोरु ( भाला ); मॅसिडोनियन-दोरुल्लॉस ( ओक वृक्ष ); लिथुआनिअन-देखा ( धूपाच्या झाडासारखें लांकूड ). याखेरीज युरोपीय भाषांतून एकच वृक्षवाचक असे सदृश शब्द पुष्कळ आहेत पण ते येथें देत नाहीं.

सस्तन प्राण्यांच्या नांवांत यूरोप व आशिया खंडांतील भाषांमधून जेवढें सादृश्य आढळतें त्यापेक्षां वृक्षांच्या नांवांत फारच कमी आढळतें. केवळ यूरोपीय संस्कृति असें ज्याला म्हणतां येईल तेथें मात्र विशिष्ट वृक्षवाचक तुल्य शब्दांचें आधिक्य आढळतें. वृक्षवाचक कांहीं शब्दांचा अभ्यास देखील महत्त्वाचा आणि मनोरंजक आहे. उदाहरणासाठीं बीच वृक्ष घेऊं.

बीच वृक्ष हा सार्वत्रिक आहे. यूरोपखंडांत एपायरस व मॅसिडोनिया यांच्यामधील थेसली या ग्रीसमधील प्रांतांतहि तो आढळतो. परंतु ग्रीक भाषेमध्यें बीचवाचक शब्द नाहीं, तर वास्तविक बीचवाचक जो ' फीलॉस ' शब्द तो ग्रीकमध्यें ओक वृक्षाला लावतात. यावरून ग्रीकांनां प्रथम बीच वृक्ष माहीत असून पुढें त्यांचा त्या वृक्षाशीं अपरिचय झाला. कारण अॅब्रेशियन व मॅलिअन आखातांच्या दक्षिणेस बीच वृक्ष आढळत नाहीं. तेव्हां तेथें आढळणाऱ्या ओक वृक्षालाच त्यांनीं ' फीलॉस ' हा शब्द लावला. फीलॉस हा शब्द मूळचा ओक वृक्षवाचक नव्हे. यावरून ग्रीक लोक प्रथम थेसली प्रांतांत असून नंतर ते दक्षिणेकडे गेले असावे असें त्यांच्या परिभ्रमणमार्गासंबंधीं अनुमान करितां येतें.

तौलनिक अभ्यास करतांनां निरनिराळे वृक्ष, प्राणी इत्यादिकांचीं निरनिराळ्या सर्व राष्ट्रांत नांवें शोधून ते वृक्ष सृष्टीच्या ज्या भागांत स्वाभाविकपणें उत्पन्न झालेले किंवा प्राचीन असतील तेथेंच आर्यांचें मूल वसतिस्थान असावें ही विचारपद्धति संशोधकांनीं अंगीकारिली असावी असें दिसतें. मूलगृहशोधनास वन्य वृक्ष, पशु, पक्षी यांचा पुरावा महत्त्वाचा अशाकरितां धरावयाचा कीं इतर बाबतींमध्यें सामान्य शब्दशोधन ही संस्कृतीची पुढची पायरी आहे आणि त्यावरून अगदीं प्राचीन स्थानबोध होईलच असें नाहीं.

इंडोयूरोपीय लोक ज्या वेळेस चोहोंकडे पांगले त्या गृहीत धरलेल्या कालांत सुद्धां त्यांनां शेतकीचा निदान ओनामा तरी माहीत होता असें टॅसिटस, सीझर, स्ट्रेबो, अर्नोल्ड वगैरे ग्रंथकारांच्या तत्कालीन ब्रिटन जर्मन इत्यादि मागसलेल्या जातींच्या केलेल्या आयुष्यवर्णनावरून दिसतें. पायथियस उत्तरसमुद्राकडे जात असतां म्हणजे ख्रि. पू. ३०० वर्षांच्या सुमारास त्याला माणसाळलेलीं जनावरें व शेतकीसंबंधीं मूलभूतच पण कांहीं गोष्टी आढळल्या असें स्ट्रेबो ( प्र. २०१ ) यानें लिहिलें आहे. या व अशा तऱ्हेच्या ऐतिहासिक पुराव्याबरोबरच आपण जर भाषाशास्त्राचा पुरावा पाहिला तर मूलगृहीच्या लोकांची कृषिकर्मविषयक प्रगति देखील संशयित दिसते. यूरोपीय भाषांत व आशियांतील भाषांत शेतकीच्या ज्या संज्ञा आहेत त्यांत सादृश्य फारच थोडें आढळेल. यूरोपांतल्या यूरोपांत मात्र हें सादृश्य निरनिराळ्या भाषांतून बरेंच आढळतें.

संस्कृत-यव;झेंद-यव; लिथु.-जवै ही शब्दमालिका; व संस्कृत-सस्य; झेंद हह्य. संस्कृत-कर्ष; झेंद-करेष. संस्कृत उर्वरा; झेंद-उर्वरा. संस्कृत-गोधूम; अर्वाचीन फारसी-गंदुम वगैरे शब्दमालिकांकडे पाहिलें असतां व तत्सदृश यूरोपीय शब्दांचा अभाव लक्ष्यांत घेतला असतां अशी सहज कल्पना होते कीं, कृषिविषयक संस्कृतिसंवर्धन यूरोपीय शाखा आणि पर्शुभारतीय शाखा यांचा वियोग झाल्यानंतरच झालें आणि गुरें ढोरें पाळण्यापेक्षां शेतकीकडे इंडोयूरोपीय लोकांचें लक्ष बरेंच कमी होतें असें म्हणावें लागतें.

मनुष्याचा स्वभाव व चालीरीती ह्या त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीवर, व प्रदेशावर अवलंबून असतात ही गोष्ट शेतकीसंबंधानें तर विशेषतः खरी आहे. कारण कर्तृत्व प्रथम पोट भरण्याच्या विषयेकडेच दिसावयाचें आणि पोट भरण्याच्या बाबतींत बुद्धि आणि परिश्रम यांच्या संहतीनें झालेलें राष्ट्रांचें पाहिलें कार्य धान्याचें उत्पादन होय. तेव्हां

इंडोयूरोपीय लोक ज्या वेळेस चोहोंकडे पांगले त्या वेळेस यूरोपीय शाखा ज्यास्त सुपीक प्रदेशाकडे वळली असावी व यापूर्वीच मूळच्या लोकांचे शेतकी व गुरेंढोरें वगैरे पाळणें हे धंदे करणारे, व इतर असे दोन भाग झाले असावे अशी कल्पना श्राडरनें केली आहे. आतां एवढें खरें कीं जी शेतकी इंडोयूरोपीय लोक पूर्वीच्या काळांत करीत असें म्हटलें ती अगदीं बाल्यावस्थेंतील घ्यावयास पाहिजे. धातूंचा उपयोग किंवा धातूंचीं केलेलीं शेतकीचीं आउतें वगैरे या लोकांनां माहीत नव्हतीं. गवत कापण्यासाठीं पार्श्वीचा म्हणजे बरगडीच्या फासळीचा उपयोग यज्ञांत होतो तो उपयोग आणि पार्श्वी हा शब्द प्राक्कालीन परिस्थितीचा सूचक आहे. स्मृतिकालांत देखील चौलास वापरावयाचा वस्तरा तांब्याचा असावा असें आश्वलायन सांगतो. इंडोजर्मानिक लोकांचा नांगर म्हणजे एक वांकविलेली झाडाची शाखा होय. यापलीकडे नांगराची कल्पना त्यांनां नव्हती, असें निरनिराळ्या भाषांत नांगराला जे शब्द आहेत त्यांच्या सामान्य कल्पनेवरून दिसतें. वैदिक शेतकीविषयीं विस्तृत वर्णन पुढें येईलच.

स्थावर मालमत्ता करण्याची कल्पनाहि पूर्वीच्या लोकांस नव्हती असें दिसतें. मालमत्ता, संपत्ति वगैरेंनां जे शब्द प्राचीन लोक वापरीत त्यांत खरीखरी मालमत्ता असे. आपण ज्याला आज म्हणतों तसली कल्पना मुळींच नव्हती. पूर्वीच्या काळांत कोणतीं कोणतीं धान्यें पिकत याबद्दलचा भाषाशास्त्राचा पुरावा लक्षांत घेतला तर सातू, गहूं, मिलेट नांवाचें एक तृणधान्य, अंबाडी किंबहुना वाटाणा, कांदा इत्यादिकांची यूरोपीय भाषांतील नांवें सदृश असल्यामुळें तीं बऱ्याच प्राचीन काळांत उत्पन्न होत असावीं असें दिसतें. परंतु या शब्दांचीं तुल्यें सर्व राष्ट्रांत मिळत नाहींत. गहूं शब्दाचीं तुल्यें वर दिलींच आहेत. संस्कृत आणि अवेस्ता या भाषांत शेतकीविषयक शब्दांचीं बरींच तुल्यें आढळतात हें वर दाखविलेंच आहे. तेव्हां या शाखेनें शेतकीची प्रगति स्वतंत्र रीतीनें केली असावी.

**कालगणना.**— गुरेंढोरें पाळून त्यांवर उपजीविका करणाऱ्याच्या नजरेस ज्यास्त स्पष्टपणें येणारे कालविभाग म्हणजे हवामानांतील फरकामुळें पडणारे होत. उदाहरणार्थ, त्यांचीं गुरें चारण्याकरितां त्यांनां मोकळ्या मैदानांवर जावें लागे व आश्रयाकरितां एखादी दरी अगर गुहा पहावी लागे. याच आयुष्यावरील परिणामाच्या दृष्टीनें ते वर्षाचे विभाग पाडीत असत. तुर्कोतातार लोक आपल्या प्राथमिक स्थितींत उन्हाळा व हिंवाळा असे वर्षाचे दोनच ऋतू मानीत असें व्हांबेरी यानें म्हटलें आहे ( व्हांबेरी-प्रिमिटिव्ह कुल्टुर पृ. १६२ ).

इंडोजर्मानिक भाषांतून ज्या ऋतूचें नांव साधारणतः प्रामुख्यानें आढळून येतें तो ऋतु म्हणजे हिंवाळा होय. संस्कृत–हायन (वर्ष); झेंद–झयनो (हिंवाळा); ग्रीक–क्सिऑन् (बर्फ); लॅटिन–हाएम्स (हिंवाळा); संस्कृत–हिम (बर्फ); झेंद–झिम (हिंवाळा वर्ष); या शब्दमालिकांवरून हीच गोष्ट स्पष्ट होते.

हिम शब्दाची व्युत्पत्ति सांगतां येत नाहीं. परंतु याचा अर्थ ज्या पायऱ्यांनीं बदलत गेला त्या पायऱ्या पाहिल्या म्हणजे उत्तरेकडील लोकांचा जो हिंवाळा त्याच्या स्थितींत फरक कसकसा होत गेला हें स्पष्ट होतें.

संस्कृत–वसन्त; झेंद–वंघ्रि; प्राचीन सॅक्सन–वेस्न; लॅटिन–वेर्; ग्रीक–एर; या सर्वांचा अर्थ वसन्त ऋतु असा आहे व लिथुआनियन–वसर म्हणजे उन्हाळा होता.

संस्कृत–समा (वर्षार्ध, किंवा वर्ष); झेंद–हम (वर्ष); आर्मेनियन–अमर्न (वर्ष); इटालियन–सम, समरद (उन्हाळा); प्राचीन उच्च जर्मन–समर (उन्हाळा).

या शब्द मालिकांवरून वसन्त किंवा उन्हाळा यांचे अन्वर्थक शब्द सुद्धां सारखे दिसतात. संस्कृत समा–अर्धवर्ष हा शब्द सम–अर्ध या शब्दावरून निघालेला दिसतो व अर्धवर्ष या मूळ अर्थावरूनच ऋतु निश्चित होऊन इतर सर्व भाषांतील शब्द तयार होऊन त्यांस ऋतुवाचक अर्थ प्राप्त झाला असावा.

सर्व राष्ट्रांच्या इतिहासांत प्राचीन काळीं वर्षाचे दोन ऋतू मानीत असत असें दिसतें. त्याप्रमाणेंच तद्वाचक शब्द मूळ शब्दास एकच विशिष्ट प्रत्यय लागून झालेले दिसतात. संस्कृत–वसन्त, हेमन्त; झेंद झिम, हम; टयूटॉनिक–समर, विंटर.

इंडोजर्मानिक राष्ट्रांपैकीं बहुतेक राष्ट्रांत वसन्त व हेमंत या दोन ऋतूंत विरोध असून त्यांचें वैर असतें ही कल्पना रूढ झालेली दिसते.

या सर्व गोष्टींवरून पूर्वी वर्षाचे विभाग दोन मानीत असत असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. इंडोजर्मानिक लोकांत शेतकीच्या बाबतींत बरीच प्रगति झाली होती हें वर सांगितलेंच आहे. यामुळें पिकें काढून घेण्याच्या काळाला प्राधान्य आलें आणि मूळचे जे वर्षाचे दोन भाग वसंत व हेमंत यांमध्यें तिसरा एक ऋतु शरत् आला. शरत् याची व्युत्पत्ति क्षीरस्वामींनीं 'शीर्यन्तेस्यां पाकेन ओषधयः स शरत्' अशी दिली आहे. निरुक्तांत शरद् याची व्युत्पत्ति नाहीं व ऋग्वेदांत हा शब्द वर्षवाचकच आहे.

अवेस्तामध्येंहि वसन्त व हेमन्त हेच कालगणनेचे व वर्षाचे दोन विभाग मानिले आहेत.

भरतखंडामध्यें ऋतूंच्या संख्येची वाढ क्रमानें झालेली दिसते. पूर्वीपासून चालत आलेले विभाग म्हणजे वसन्त हेमन्त व शरद्. शतपथ ब्राह्मणांत 'त्रयो वा ऋतवः संवत्सरः' असें म्हटलें आहे. वेदकालांत पंजाब सोडून अलीकडे येतांनां त्यांचे पांच ऋतू बनले. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरत्, हेमन्तशिशिर; किंवा हेमन्त व शिशिर निरनिराळे मानले तर सहा ऋतू होतात.

सर्व ऋतू मिळून एक वर्ष बनतें ही कल्पना भारतीय लोकांनां आली होती ही गोष्ट संवत्सर, परिवत्सर वगैरे शब्दांवरून स्पष्ट आहे. याबद्दल विवेचन पूर्वी आलेलें आहे. ही गोष्ट मूलगृहकालीन लोकांस ठाऊक होती असें श्राडर म्हणतो, पण तुल्यशब्द त्यानें दिले नाहींत.

महिना या शब्दाचे वाचक असे संस्कृत व इंद शब्द घेतले ( सं.–मास; इं.—माओह; फारसी. माह ) तर त्यांत साधारण घटक मा, मोजणें हा संस्कृत धातु दिसतो. याचा व चंद्राचा कांहीं तरी संबंध असावा अशी पाश्चात्त्य संशोधकांची कल्पना आहे व ते चांद्रमास हें एक प्राचीन कालगणनेचें माप समजतात.

चांद्रमासाचें मान २९ दि. १२ ता., ४४ मि. व ३सेकंद इतकें आहे. पूर्वीच्या कालगणनेचें स्वरूप दाखविणारा एक परिचित कालविभाग म्हटला म्हणजे गर्भावस्था होय. श्राडरनें याबद्दल असें म्हटलें आहे कीं " पूर्वीच्या कालांत गर्भावस्थेचा काल नऊ महिन्यांच्या ऐवजीं दहा महिन्यांचा धरीत. यावरून पूर्वीच्या लोकांनां सौरमास माहीत नसून चांद्रमासानेंच कालमापन होत असे असें म्हणावें लागतें " परंतु श्राडरनें दहा महिन्यांनीं गर्भ पूर्ण होतो असें प्राचीनांचें गणित दिलें आहे त्याला आधारभूत ऋचा 'तंते गर्भं हवामहे दशमे मासि सूतवे' (ऋ. १०.१८५,३) ही आहे. त्या ऋचेचा ' दहा महिने पूर्ण झाल्यावर असा अर्थ श्राडर करितो आणि त्या समजुतीवर प्राचीनांस केवळ चांद्रमासच ठाऊक होता असें गृहीत धरतो. परंतु आधारभूत ऋचेंत दशमे मासि' असे शब्द आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांचा अर्थ दहाव्या महिन्यांत असा आहे. आणि दहाव्या महिन्यांत नऊ मास पूर्ण भरल्यावर प्रसूतिकाल सध्यांच्याहि दिवसांत आहेच. शिवाय सौरमास व चांद्रमास यांतील फरक इतका थोडा आहे कीं त्यामुळें या दोन गणितांनीं दहा महिन्यांच्या अवधींत एक महिन्याचा फरक पडणें शक्य नाहीं. म्हणून या युक्तिवादानें श्राडरचा मूळ हेतु कीं त्या कालीं चांद्रमासच प्रचलित होता हें सिद्ध करणें, तो सफल होत नाहीं. उलट

वेद मासो धृतव्रतो द्वादश प्रजावतः । वेदा य उपजायते

या (ऋ. १. २५. ८. ) ऋचेवरून तत्कालीन लोकांस द्वादश मास ठाऊक होते एवढेंच नव्हे तर ' य उपजायते ' म्हणजे जो द्वादश मासानंतर एक अधिक मास येतो तोहि ठाऊक होता असें स्पष्ट होतें. व यावरून चांद्रमान व सौरमान यांचा मेळ घालण्याची पद्धति ऋग्वेदकालीन लोकांस माहीत होती हें स्पष्ट आहे व यामुळें श्राडरचें पुढील विधान निरर्थक ठरतें. " वर्षाचे महिने नेहमींप्रमाणें १२ धरले काय किंवा कांहीं आशियांतील राष्ट्रांप्रमाणें १३ धरले काय सौरवर्षाचे ३६५। दिवस कोणत्याच प्रकारानें येत नाहींत. तेव्हां प्रश्न असा उपस्थित होतो कीं चांद्रमान व सौरमान यांचा मेळ घालण्याची पद्धति पूर्वीच्या लोकांनां माहीत होती कीं नाहीं. गणित करून सौरवर्ष व चांद्रवर्ष यांचा मेळ घालण्याची पद्धति या लोकांनां माहीत नव्हती असेंच म्हणावें लागतें. "

पाश्चात्त्य देशांत मात्र रोमन लोकांची कालमापनपद्धति लोकांनां माहीत होईपर्यंत सध्यांची प्रचलित कायमची महिने मोजण्याची पद्धति अमलांत आली होतीसें दिसत नाहीं.

रात्र व दिवस यांचे वाचक असे शब्द जरी घेतले तरी हीच स्थिति दिसते. सूर्यावरून कालमापन करण्याची पद्धति त्या कालीं आढळत नाहीं. द्विरात्र, दशरात्र म्हणजे, दोन, तीन, दहा दिवस, निशानिशम् वगैरे शब्दांवरून दिवस मोजण्याच्या पद्धतींतहि चंद्रावरून ठरविलेल्या मापाचें म्हणजे रात्रीचें प्राबल्य दिसतें.

पूर्वीच्या लोकांच्या कल्पनांशीं जुळणारा असा शब्द संस्कृतांतील संगव म्हणजे ज्या वेळेस गाई कळपानें हांकून नेल्या जातात तो काळ म्हणजे गाई सोडण्याची वेळ ( दुपार किंवा सायंकाळ ) हा होय. सायं हा शब्द सा–बांधणें या धातूपासून निघाला असावा असें श्राडरचें मत आहे, परंतु सायणाचार्यांनीं संगव काल म्हणजे संगच्छते गावः दोहनभूमिम् यस्मिन् काले सः रात्र्यपरकालः असा केला आहे व सा धातु बांधणें या अर्थी आढळत नाहीं.

प्राचीन कालमापनविषयक कल्पना लो॰ टिळक यांच्या शोधामुळें संपूर्ण बदलाव्या लागतात. त्यांचें विवेचन येथें करण्यांत अर्थ नाहीं. टिळकांच्या मताचें विवरण करतांना याचा विचार होईलच.

**भक्ष्यपदार्थ.**—प्राचीन काळीं मनुष्य प्राणी हा इतर प्राण्यांसारखाच एक प्राणी मानला जात असे. वेदाच्या भाषेंत 'पशवः' 'पशुः' या शब्दांत मनुष्य प्राणी व गुरें ढोरें या दोहोंचाहि समावेश होत असे असें श्राडर म्हणतो. पण त्यास प्रमाण देत नाहीं आणि मूलगृहकालीन चालीसंबंधानें कांहींच सांगत नाहीं. इंडोयूरोपीय लोकांत ज्या प्राण्यांच्या मांसाचा उपयोग करीत ते प्राणी साधारणतः कळप करून रहाणारे असत. यांतच पुढें शिकार करून आणलेल्या प्राण्यांचा अंतर्भाव होऊं लागला. ऋग्वेदांत रानटी पशूंच्या शिकारीबद्दल अनेक ठिकाणीं उल्लेख आहेत परंतु शिकार करून आणलेल्या प्राण्यांचा उपयोग खाण्याकडे करीत असत किंवा नाहीं याबद्दल त्यांत उल्लेख नाहीं. यावरून त्या वेळीं शिकारींत मारलेले प्राणी खात नसावे असा श्राडर यानें तर्क केला आहे.

मांसाशनासंबंधीं कांहीं शब्दांचीं तुल्यें उदाहरणार्थ घेऊं. संस्कृत–क्रव्य, क्रवीः; ग्रीक–क्रिअस; लॅटिन–क्रॅरो हे सर्व शब्द बहुधा कच्च्या म्हणजे रक्तमय मांसाचे वाचक आहेत. संस्कृत—मांस; आर्मीनिअन—मिस्; प्राचीन फारशी—मॅंस; लिथु॰—मिएस; गॉथिक—मिंझ हे शब्द बहुधा पक्व मांसवाचक असावेत असा भाषा शास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. कारण इंडोयूरोपीय लोकांस शिजविण्याची क्रिया माहीत

होती याबद्दल शंका घेण्यास जागाच नाहीं. तथापि संस्कृत-पच्; झेंद—पच; ग्रीक—पेस्सो; प्राचीन सॅक्सन—पेक; लिथु०—केपु इत्यादि शब्दांचा अर्थ प्रथमतः शिजविणें असा नसून भाजणें असा असावा असा श्राडरचा तर्क आहे.

मांस खाण्याकरितां मारावयाच्या प्राण्यांचा विचार करूं लागलें असतां अर्थातच प्रथम प्राचीनांच्या जवळ ज्या पशूंचे कळप असत त्यांच्याकडेच लक्ष्य जातें. व ते लोकहि प्रथम याच प्राण्यांचें मांस खात ही गोष्ट ते ज्या प्राण्यांचा बळी देत असत त्या प्राण्यांचीं नांवें पाहिलीं असतां सहज लक्षांत येईल. यज्ञिय पशूंमध्यें घोडा, बैल, मेंढी, शेळी वगैरे प्राण्यांचीं नांवें आढळतात इटालीमध्यें शेतीच्या कामास असलेले बैल मारावयाचे नाहींत असा निर्बंध असे.

पक्ष्यांचा उपयोग खाण्याकडे करीत असत असें दिसत नाहीं. खाण्याच्या प्राण्यांच्या यादींत पक्षी अजीबात आढळत नाहींत यावरूनहि त्या काळीं पक्षी माणसांळले नसावे असें अनुमान निघतें. सध्यांच्या हिंदूंच्या भक्ष्याभक्ष्य कल्पनांमध्यें बकऱ्याच्या सागोतीपेक्षां कोंबडीं खाण्यास अधिक आक्षेप आहे. पन्नास वर्षांपूर्वी कायस्थ प्रभु वगैरे जातींत देखील अंडीं खाण्यास हरकत वाटे हें उपर्युक्त श्राडरच्या कल्पनेस साधक दिसतें. यज्ञांमध्यें पक्षी मेध्य धरले नाहींत.

जसजसा शेतीचा प्रसार जास्त होऊं लागला तसतसे धान्य व त्याच्या निरनिराळ्या जाती हे खाण्याच्या पदार्थांमध्यें प्रामुख्यानें मोडूं लागले. पिकें विळ्यासारख्या हत्यारानें कापीत व बैलांच्या पायांखालीं मळून त्यांतून धान्य काढीत. हें धान्य भाजून खात किंवा तें दगडाच्या ओबड धोबड जात्यानें दळून किंवा पाट्यावर वरवंट्यानें कुटून त्याचें पिष्ट करीत व त्याची भाकरी भाजीत असत. हिलाच संस्कृत मध्यें करंभ असें नांव आहे. वरील दोन क्रियांचे वाचक शब्द दोन तीन भाषांत सारखे आढळतात. संस्कृत-भ्रस्ज्; ग्रीक-फ्रुगो; लॅटिन-फ्रिगो. संस्कृत-पिष्; ग्रीक-प्तिस्सो लॅटिन-पिन्सो (पिस्टोर-रोटीवाला). जरी त्या वेळीं आतांप्रमाणें भाकरी करीत असत असें आपणांस निश्चयानें ह्मणतां यावयाचें नाहीं तरी ही क्रिया फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे (के. एफ. हर्मन-प्रिव्हेटल टुमर पृ. २१४-.जे. मार्कार्ट-दास प्रिव्हेटलेबा डर रोमर पृ. ३९८, झिमर-अल्टि लेबा पृ.२६८). पामीरमधील कांहीं शब्दप्रयोगांवरून प्राचीन इराणी लोक राखेमध्यें पुरोडाशाप्रमाणें रोडगे पुरून भाजीत असत असें दिसतें (टोमाश्चेक-पामिर भाषा पृ.६३).

इंडोयूरोपियन लोकांस मीठ हा पदार्थ माहीत असावा असें दिसत नाहीं. कारण मीठवाचक शब्द जे पाश्चात्य व पौरस्त्य भाषांत आढळतात त्यांत मुळींच साम्य दिसत नाहीं. लवण व सैन्धव हे शब्द अथर्ववेदामध्येंच व एकएकदांच आले आहेत (अथर्ववेद. ७. ८०, १; १९. ३८, २). लवण या शब्दाचा अर्थ समुद्रांतील मीठ असा असून तत्कालीन लोकांस खाणींतील मीठ माहीत नसून समुद्रापासून निघणारें मीठ माहीत होतें असें झिमर यानें म्हटलें आहे (झिमर-अल्टि. लेबा पृ. ५१). परंतु लवण हा शब्द जेथें आला आहे तेथें सायण या भाष्यकारानें सैन्धव हा शब्दच योजला आहे व जेथें सैन्धव शब्द आला आहे तेथें मूळ ऋचा यद् गुल्गुलु सैन्धवं यद् वाप्यासि समुद्रियम् अशी आहे. यावरून समुद्रापासून होणाऱ्या मिठापेक्षां सैंधव हें निराळें होतें व तें सिंधु देशांत अर्थात् खाणींत सांपडत असे हें उघडच आहे. अद्यापीहि सैन्धव शब्दानें एका विशिष्ट पण खाणींतीलच मिठाचा बोध होतो हें मराठी वाचकांस सांगावयास नकोच. सिंधु हा शब्द टिळक हिंदुस्थानच्या नद्यांचा वाचक धरीत नाहींत. त्यांचें हें भिन्न मत सिंधु या शब्दाच्या प्रत्येक उपयोगाकडे लागणार नाहीं असें वाटतें. सिंधु हा शब्द भारतीय हिंदुस्थानांत येण्यापूर्वीचा असेल तरी सैंधव परिचित असेलच असें म्हणतां येणार नाहीं. यज्ञांगानें होणाऱ्या पाकसिद्धींत मीठ नाहीं त्यावरून मिठाशीं अपरिचय असेल अशी कल्पना विरुद्ध पुरावा येईपर्यंत गृहीत धरली पाहिजे.

इंडोयूरोपीय कालांतील पेयांचा विचार करतांना प्रथम आपण दूध या पदार्थाकडे वळूं.दूध याचे वाचक शब्द आशिया व यूरोप यांमध्यें सदृश दिसत नाहींत. फक्त संस्कृत दधि व प्राचीन इराणी दह्न या शब्दांमध्येंच कायतें साम्य दिसतें. दूध काढणें या क्रियेचे वाचक शब्द अगदींच विसदृश दिसतात.

दूधदह्याचा उपयोग करण्याची जुनी रीत तुर्कों तार्तार लोकांत आढळते. हे लोक दूध नासून घट्ट झालें म्हणजे तें उन्हांत वाळवून त्याच्या वाटोळ्या वड्या करीत व त्याचा दूरच्या प्रवासांत उपयोग करीत असें व्हांबेरी यानें वर्णन केलें आहे. ही रीत ट्यूटन लोकांत व ऐतिहासिक लोकांतहि आढळून येते.

दुधांतील चरबीचा अंश वेगळा करण्याची कला प्राचीन लोकांस माहीत होती असें दिसतें. परंतु ते लोणी व तूप यांचा उपयोग खाण्याकडे करण्याच्या ऐवजीं अंगाला व केसांना लावण्याकडे करीत असत असें व्हीहेन यानें म्हटलें आहे. परंतु हें कितपत सत्य आहे याबद्दल विचार केला पाहिजे.

एकंदरींत दूधदुभत्याची कला त्या काळीं बरीच बाल्यावस्थेंत होती असें सामान्यतः म्हणतां येईल असें श्राडर म्हणतो. भारतीय कालांतील परिस्थिति दूधदुभत्यामध्यें अनेक प्रकार दाखविते. परंतु दूध एवढेंच कायतें त्या काळीं पेय होतें असें नाहीं. संस्कृत-मधु (गोड पेय); झेंद-मधु (गोड पेय); ग्रीक-मेथु (मद्य); प्राचीन उच्च जर्मन-मेतु; प्राचीन सॅक्सन-मेदु (मध, मद्य). या शब्दांस पुढें जो निरनिराळ्या भाषांतून मध असा अर्थ प्राप्त झाला व त्यावरूनच मत्तपणाची जी कल्पना पुढें या लोकांत प्रसृत झाली तीवरून आणि दारू आणि मध या दोहोंसहि बोधिण्यासाठीं संस्कृत "मधु" याच शब्दाच्या उपयोगा-

वरून पहिल्या मादक पेयांमध्यें मद्याचा कांहीं तरी संबंध असावा असें वाटतें. परंतु हाहि एक केवळ तर्क आहे.

इंडोयूरोपीय लोकांत जसजशी शेतकीमध्यें सुधारणा होत गेली व जसजसे ते स्थायिकपणें राहूं लागले तसतसे त्यांच्या इंडोइराणी शाखेमध्यें सोम, 'झेन्द–हओम्' व सुरा, 'झेन्द–हुरा' या पेयांचा प्रचार पडला व यूरोपीय शाखेमध्यें 'बिअर' व 'वाइन' या मादक पेयांचा प्रघात सुरू झाला, अशी कल्पना पुढें आलेली आहे ती ग्राह्य करणें कठिण जातें कारण सोमवल्लीचे मळे कोणी करीत नसत. जंगलांतील लोकांकडून सोम विकत घेण्याचा आणि त्याच्या किंमतीबद्दल भांडाभांड करून विक्रय करणाऱ्यास मार देण्याचा विधि सोमयागांत आहे.

मद्यवाचक 'वाइन' शब्द कसा उत्पन्न झाला याबद्दल यूरोपीय ग्रंथकारांमध्यें दोन निरनिराळ्या उपपत्ती आहेत. एक उपपत्ति कुह्न आणि पिक्टेट यांनीं पुढें मांडली आहे. ती अशी कीं इंग्रजी शब्द 'वाइन' व लॅटिन 'व्हिनम' इत्यादि शब्दांचा परस्परसंबंध असून ते संस्कृत वेनः(कान्तिमान) या सोमाला लाविलेल्या विशेषणापासून उत्पन्न झाले असावे. म्हणजे इंडोयूरोपीय लोकांस मद्य माहीत असावें असें याचें मत आहे. दुसरी उपपत्ति अशी आहे कीं यूरोपीय भाषांतील मद्यवाचक शब्द सेमिटिक, इथिओपियन –'वाइन' हिब्रू–याइन इत्यादि शब्दांपासून निघाले आहेत. या मताचा मुख्य पुरस्कर्ता व्ही. हेन हा आहे. या मताप्रमाणें इंडोयूरोपीय लोकांमध्यें मद्याचा प्रसार करण्याचें श्रेय प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें सेमाइट लोकांस म्हणजे यहुदी व अरब यांच्या पूर्वजांस दिलें पाहिजे. श्राडर यानें एक तिसरेंच मत प्रतिपादन केलें असून तें या दोहोंच्या मधलें आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं ग्रीक व इटालियन लोकांचे पूर्वज व बाल्कन, इलिरिअन, थ्रेशन, मॅसिडोनियन इत्यादि लोकांचे पूर्वज जेव्हां एकत्र रहात होते त्या कालींच त्यांनां द्राक्षीच्या वेलीची माहिती होती. या वेळीं त्यांची वसाहत बाल्कन द्वीपकल्पाच्या उत्तरेस कोठेंतरी असावी. नंतर ग्रीक व इटालियन जसजसे दक्षिणेकडे वगैरे गेले तसतसा द्राक्ष वेलीचा प्रसार वाढत गेला व फिनीशियन व्यापाऱ्यांनीं व ग्रीक वसाहतकारांनीं या वेलीचा व तिच्यापासून प्राप्त होणाऱ्या पेयाचा सर्वत्र प्रसार केला असावा. परंतु सेमाइट लोकांस द्राक्ष वेलीचें ज्ञान कसें झालें व हिब्रू–याइन, अरबी व इथिओप–वाइन हे शब्द कसे निघाले याबद्दल श्राडर यानें कांहींच माहिती दिली नाहीं. त्याप्रमाणेंच सुरा व सोम (हुरा व होम) हीं जीं पर्शुभारतीय लोकांचीं पेयें त्यांच्याहि मूलस्वरूपाची कल्पना करणें कठिण आहे. सोमवल्लीच्या शोधार्थ आजपर्यंत केलेल्या परिश्रमास अद्यापि यश आलें नाहीं.

**पोशाख वगैरे.**—इंडोयूरोपीय लोकांस वस्त्रें वापरण्याचें ज्ञान होतें ही गोष्ट वेस्–पांघरणें या सामान्य धातूपासून जे शब्द निरनिराळ्या भाषांत प्रचारांत असून सदृश स्वरूपाचे आहेत त्यांवरून दिसून येईल. उलटपक्षीं नग्नतावाचक शब्दहि बऱ्याच भाषांत सदृश आहेत हें खालीं दिलेल्या शब्दमालिकांवरून दिसून येईल. संस्कृत–वसन, वस्त्र; झेंद–वङ्ह, वङ्हन, वस्त्र; ग्रीक–एस्थुमि, एइम, एस्थीस; लॅटिन–व्हेस्तिस, व्हेस्टिओ; गॉथिक–गवस्जन इत्यादि. संस्कृत–नग्न, प्राचीन सॅक्सन–नागु; लिथुअॅनिअन –नुगस; लॅटिन–नुडस इत्यादि. नग्नतेची कल्पना वस्त्राच्छादन रूढ झाल्यानंतरच येणार हें उघड आहे. इंडोयूरोपीय लोक कळप पाळून रहात असत त्यामुळें अर्थातच ते प्रथम ढोरांचीं कातडीं पांघरीत असत. याचा आपल्यांतील अवशेष म्हणजे यज्ञोपवीत होय. यज्ञोपवीताचें मूळ प्रथम आर्य लोक बैलाचें कातडें पांघरीत असत हें होय. व आतांहि उपनयन झाल्याबरोबर ब्रह्मचाऱ्यांच्या यज्ञोपवीतामध्यें मृगचर्माचा तुकडा बांधून ठेवतात हें आपण पहातोंच. ब्रिटन व ट्यूटन लोक सीझरनें स्वारी केली त्या वेळीं कातडींच पांघरीत असत ही गोष्ट त्यानें लिहून ठेवलेल्या वर्णनावरून दिसून येते. गॉथ लोक तर रोमन दरबारांतून परत आल्याबरोबर लागलेच आपलीं कातड्यांचीं वस्त्रें पांघरून बसत, इतकीं तीं त्यांच्या आवडीचीं झालीं होतीं असें बेकमन यानें वर्णन केलें आहे (बीट्र. झेड्. जी. डी. ५ १, २६). सॅलस्ट यानें ट्यूटन लोकांचा राष्ट्रीय पोशाख म्हणजे मेंढ्यांच्या कातड्यांचीं 'रेनॉन्स' या नांवाचीं वस्त्रें होत असें म्हटलें आहे. रेनॉन्स हा शब्द 'व्रेनॉन्स' या शब्दाचा अपभ्रंश असून त्याचा संस्कृत ऊर्णा या शब्दाशीं संबंध असावा असा श्राडर याचा तर्क आहे. कातडें कडक असल्यामुळें तें कमावून मऊ करण्याची कलाहि प्राचीन लोकांस अवगत असावी असें दिसतें. परंतु या क्रियेचे वाचक शब्द निरनिराळ्या भाषांत सदृश आढळत नाहींत. कातडीं कमावण्याची कृति होमरनें कांहींशीं आपल्या काव्यांत दिली आहे (इलि. १७. ३८९).

परंतु इंडोयूरोपीय लोकांचा पोशाख केवळ कातड्यांचाच होता असें नाहीं तर त्यांस कातडीं कमावण्याप्रमाणेंच नमदा अगर बुरणुस तयार करण्याची व गुंफण्याची कला माहीत झाली होती असें दिसतें. ही गोष्ट विशेषतः यूरोपीय शाखेसंबंधानें म्हणतां येईल. कारण नमदा(फेल्ट) याचे वाचक शब्द यूरोपीय भाषांतच सदृश आढळतात. उदाहरणार्थ ग्रीक पिलॉस; लॅटिन–पिलेडस; प्राचीन उच्च जर्मन–फिल्झ; प्राचीन सॅक्सन–फुर्त्ता. परंतु तुर्कोतातार लोकहि लोकरीचे थरावर थर ठेवून, पाणी शिंपडून, व चिकट चरबी टाकून दाबून तिचा नमदा तयार करीत अशी माहिती सांपडते. गुंफण्याची कला म्हणजे दोरी वळणें, टोपली विणणें याहि कला प्राचीनांस माहित असाव्या असें दिसतें.

आतां विणण्याच्या कलेविषयीं विचार करूं लागलें असतां प्रथम पुढील शब्दमालिका आढळतात. संस्कृत–वा (विणणें),

ओतु ( आडवे धागे ); ग्रीक-नीत्रोन ( उभे धागे, विणण्याचें यंत्र ), इत्रोन ( चाती ); लिथु०-वोरस ( कोळी, कांतीण ), प्राचीन उच्च जर्मन-वात ( विणलेलें वस्त्र ); लॅटिन-वेलम ( कपडा ). संस्कृत-ऊर्णवाभि ( लोंकर विणणारा-कोळी ); झेंद-उब्द ( विणलेला ); पार्मार-वाफ ( विणणें ). प्राचीन नॉर्वेजिअन-वेफ ( विणणें ); अँग्लोसॅक्सन-वेफ्त ( बारीक धागा ); मध्य उच्च जर्मन-विफ्त ( बारीक धागा ) वगैरे. लॅटिन-टेक्सो: संस्कृत-तक्ष. ग्रीक-अत्तोमइ ( विणणें ); अनुति आंन ( मागाचा एक भाग ); संस्कृत-अत्क ( विणलेलें, व्यूत. )

वरील शब्दमालिकांकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, विणण्याच्या कलेंत बरीच प्रगति झाली होती. माग आणि विणणारा या अर्थी जे शब्द वापरले आहेत त्यांवरून असें दिसून येतें कीं, त्या वेळचे माग उभें राहून वस्त्रें विणतां येतील अशा प्रकारचे असत. कारण त्यांत स्था ( स्ता ) हा धातु दृष्टीस पडतो. लॅटिन-स्तामेन; लिथु०-स्ताक्लेस ( माग ); प्राचीन नॉर्वेजियन-वेफ्स्तादृ; संस्कृत स्थवि ( विणणारा ). हीच गोष्ट भाषाशास्त्राच्या मदतीखेरीज ग्रीक, इटालियन व नॉर्वेजियन प्राचीन मागांची तुलना करून 'अहरेन्स' यानें सिद्ध करून दाखविली होती. सूत कांतणें व गुंफणें या क्रियांच्या वाचक निरनिराळ्या भाषांतील शब्दांकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं, या क्रिया पृथक्पणें दर्शविण्याइतकी सर्व भाषांची प्रगति झाली नव्हती. श्राडरनें कर्त ( कांतणें ) व कट ( चटई ) हे संस्कृत शब्द तुलनेकरितां घेतले आहेत परंतु ते दोन्हीहि वैदिक नाहींत. श्राडरनें तर्कु ( चाती ) हा शब्द वैदिक आहे असें म्हटलें आहे परंतु ऋग्वेदांत अथवा इतर वेदांत तो आढळत नाहीं. आतां कांतण्याच्या पदार्थांकडे पाहिलें असतां अवि ( मेंढी ) व ऊर्णा ( लोंकर ) या संस्कृत शब्दांचे समानार्थक व सदृश शब्द अनेक भाषांत आढळतात. यावरून प्राचीन लोकांस लोंकरीचीं वस्त्रें माहीत असावीं असें दिसतें. त्याप्रमाणेंच ताग व अंबाडी किंवा वाख या अर्थी शब्द यूरोपांतील भाषांमध्यें सदृश आहेत; व टॅसिटस याच्या म्हणण्याप्रमाणें लिनन ( तागाचें वस्त्र ) टयूटन स्त्रियांस परिचित होतें असें दिसतें व या विधानास प्लिनि याचीहि पुष्टि मिळते ( हिस्ट. नॅच. १८. १, २ ). हेन यानें असें म्हटलें आहे कीं, लिनन हें प्रथम आशियांतून यूरोपांत गेलें. परंतु श्राडरचा यावर असा तर्क आहे कीं, जेव्हां ग्रीक लोक पश्चिमेकडे गेले तेव्हां ते तागाच्या ऐवजीं लोंकर वापरूं लागले. कारण त्या प्रदेशांत तागाची लागवड होत नसे. परंतु त्यांनां तागाच्या कापडाची माहिती त्यापूर्वीच झालेली होती. याप्रमाणें इंडोयूरोपीय लोकांस ताग व लोंकर या दोन्हीं पदार्थांच्या वस्त्रांची माहिती होती. प्राचीनांच्या वस्त्रांविषयीं पाश्चात्यांनीं जे शोध लावले आहेत ते अद्यापि अपूर्ण आहेत. यांच्या शोधांवरून एवढी मात्र कल्पना होते कीं, ग्रीक, इटालियन व टयूटन इत्यादि यूरोपीय लोकांचे पूर्वज पुरुष व स्त्रिया फक्त एकच वस्त्र अंगाभोंवतीं गुंडाळीत असत. शिवणें किंवा कापून जोडणें किंवा एकावर एक वस्त्रें वापरणें किंवा शरीराच्या वरच्या भागावर वेगळें वस्त्र घेणें व कमरेखालीं निराळें वस्त्र नेसणें या गोष्टी त्यांस पौरस्त्य लोकांनींच शिकविल्या. पौरस्त्य लोकांच्या पूर्वजांच्या वस्त्रांविषयीं श्राडरनें कांहींच माहिती दिली नाहीं. परंतु ऋग्वेद २. ३२, ४. या ठिकाणीं 'सीव्यत्वपः सूच्याच्छिद्यमानया' असा उल्लेख आला आहे. याचा अर्थ 'अच्छिद्यमान अशा सुईनें शिवावें त्याप्रमाणें इत्यादि आहे यावरून तत्कालीन लोकांस शिवण्याची कला माहित होती हें स्पष्ट होतें. ऋ. १. १९१,७ मध्यें कसांनां सुईची उपमा दिलेली आहे. त्याप्रमाणेंच ऐतरेय ब्राह्मणांत ( १२, ७ ) 'यथा सूच्या वासः संदधदियादेवमेवैतामिर्यज्ञस्य च्छिद्रं संदधाति' असें म्हटलें आहे. यावरून सुईनें वस्त्रें जोडणें त्यांनां माहीत होतें हें स्पष्ट होतें. याखेरीज शरीराच्या खालच्या व वरच्या भागास वेगळीं वस्त्रें असत असेंहि उल्लेख अनेक ठिकाणीं आहेत. याखेरीज या प्राचीन लोकांत केशविभूषण, गोंदणें इत्यादि प्रकार कोणत्या स्वरूपांत होते याबद्दलची माहिती गोळा करणें अवश्य आहे. जातां जातां विभूषणासंबंधानें एवढें येथें म्हटलें पाहिजे कीं, संस्कृत-मणि या शब्दासारखे विभूषणवाचक शब्द इतर भाषांतहि आढळतात. उदाहरणार्थ झेंद-मिनु; ग्रीक-मन्नोस; लॅटिन-मॉनिले; प्राचीन सॅक्सन- मॉनिरतो; प्राचीन उच्च जर्मन-मेनि. इत्यादि.

**घरें व गुरें.**—स्थाइकपणें न राहतां भटकत फिरणाऱ्या लोकांचा सर्व संसार गाड्यांवर असतो हें आपणांस आजहि कांहीं रानटी लोकांत दिसून येतें. याप्रमाणें केवळ गुरें ढोरें पाळून उपजीविका करणाऱ्या इंडोयूरोपीय लोकांचीहि घरें शेतकी करूं लागून स्थायिक होण्यापूर्वी गाड्यांवरच असावीं असा तर्क करण्यास कांहीं हरकत नाहीं. गाड्यांचे जे निरनिराळे भाग दिसतात त्यांचे वाचक शब्द अनेक भाषांत सदृश आढळतात ही गोष्ट वरील विधानास आधारभूत मानण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारच्या शब्दांपैकीं कांहीं शब्द उदाहरणार्थ घेऊं. चाक-लॅटिन रोटा; लिथु.-राटस; प्राचीन उच्च जर्मन-राड; संस्कृत-रथ- ( गाडी ). चाकः— संस्कृत-चक्र; ग्रीक-कुक्लॉस; प्राचीन सॅक्सन-कोलो. आंसः- संस्कृत-अक्ष; लॅटिन ॲक्झिस; प्राचीन उच्च जर्मन-अहस लिथु०-ॲक्झिस. तुंबा:-संस्कृत-नाभि; अँग्लोसॅक्सन—नफु; प्राचीन उच्च जर्मन—नब; प्राचीन फारसी—नबिस. परंतु संस्कृत अरः [ आरे ] किंवा अरम [ आरे ] हा शब्द ऋग्वेदांत या अर्थानें आढळत नाहीं. यावरून प्रथम चाकांस आरे नव्हते असें दिसतें. अगदीं प्राचीन काळीं चाकें करण्याची कृति म्हटली म्हणजे एक लांकडाचा जाडा ओंडा घेऊन तो मध्यें सर्व बाजूंनीं पोंखरून त्याच्या मध्यभागीं आंस राखावयाचा व बाजूला दोहींकडे वाटोळा भाग कायम

ठेवून त्यांचीं चाकें करावयाची अशी असावी. ऋग्वेद १. १६६, ९ मध्यें मरुतांच्या रथाचें वर्णन करीत असतां 'अंसेष्वावः प्रपथेषु खादयोऽक्षोवश्चक्रा समाया विवावृते।' असें वर्णन आहे. या पदांतील उत्तरार्धाचा अर्थ तुमच्या चाकाबरोबर अक्ष फिरतो असा आहे. म्हणजे त्या वेळीं अक्ष स्थिर राहून चाकें फिरत होतीं असें दिसत नाहीं तर अक्ष चाकांस चिकटला असल्यामुळें अक्ष व चाकें बरोबरच फिरत असत असें दिसतें. ही गाडे करण्याची कला इंडोयूरोपीय लोकांपासूनच इतरांनीं घेतली अशाबद्दल त्यांच्या भाषांतून जे शब्द गाडे वगैरे यांचे वाचक आढळतात ते इंडोयूरोपीय भाषांतूनच घेतलेले आहेत यावरून स्पष्ट होतें. तुर्क लोकांनीं गाडे बांधण्याची कला इतरांपासून घेतली असें व्हॅंबेरी यानें म्हटलें आहे ( प्रिमि. कुल्टुर पृ. १२८ ).

इंडोयूरोपीय लोक जेव्हां कांहींसे स्थाइक झाले तेव्हां त्यांचीं घरें कशीं होतीं याबद्दल आतां विचार करूं. या ठिकाणीं आपणांला प्रथम जमीनींत पोखरलेलीं बिळें अथवा गुहा आढळतात. यांच्यापासून ऊन व थंडी या दोहोंचाहि बचाव होत असे आणि हीं घरें दाखविणारे शब्द बहुतेक सर्व इंडोयूरोपीय वंशांतील भाषांत आढळतात. अवेस्तामध्यें अशा घरांनां 'कत' ( कन्–खणणें ) अशी संज्ञा असे व अर्वाचीन फारसीमध्यें घराला 'कद' किंवा 'कदह्' हे शब्द रूढ आहेत. व पामीर भाषांत 'केद' 'चेद' इ. शब्द वापरतात [ टोमाश्चेक पामीर भाषा ]. झेनॉफॉन यानें आर्मीनियन लोकांत अशीं घरें असल्याचा उल्लेख केला आहे. टॅसिटस यानें टयूटन लोकांत अशीं घरें होतीं असा उल्लेख केला आहे व प्लिनी यानेंहि असेंच वर्णन केलें आहे. सिथियन व ग्रीक लोकांतहि अशीं घरें असल्याचें वर्णन आढळतें.

परंतु इंडोयूरोपीय लोकांस केवळ गुहा करण्याचें ठाऊक होतें असें नाहीं तर झोंपड्या व घरें बांधण्याची कलाहि त्यांनां कांहींशी अवगत होती ही गोष्ट पुढील शब्दमालिकांवरून दिसून येईल. संस्कृत–दम; आर्मीनियन–तुन; ग्रीक–डोमॉस; लॅटिन–डोमस; प्राचीन सॅक्सन डोमु; इत्यादि. सं.—शाला; ग्रीक–कलिआ; लॅटिन–सेला; टयूटानिक–हुल्ला इत्यादि.

यूरोपांतील उत्तरेकडील लोकांचीं घरें टॅसिटस, हेरोडियन इत्यादि ग्रंथकारांच्या वर्णनांवरून केवळ लांकडी असून त्यांच्या भोंवतीं कूड विणलेलें असून तीं चिखलानें लिंपलेलीं असावींत; व त्यांनां विटांचा किंवा दगडांचा उपयोग घरें बांधण्याच्या कामीं माहीत असावा असें दिसत नाहीं. ही गोष्ट टयूटन व स्लाव्ह लोकांची झाली. दक्षिण यूरोपांतहि आज आपणांस जरी संगमरवरी भव्य इमारती आढळल्या तरी पूर्वीच्या झोंपड्यांचे अवशेष भाषेमध्यें आढळून येतात व ग्रीक आणि इटालियन लोकांस त्या प्रांतांत येण्यापूर्वी गवत, फांद्या व चिखल यांच्या योगानें तयार होणारीं घरेंच ठाऊक होतीं असें हेलबिग यानें म्हटलें आहे ( दाय इटालिकेर इन डर पोएबने पृ. ४५ ). अथर्व वेदावरून येणाऱ्या घराच्या कल्पनेचें चित्र झिमरनें दिलें आहे तें लांकडी असून त्यावर वांबू टाकून छप्पर केलेलें असे, व भोंवतीं गवत, टहाळे यांचा कूड असे असें आहे [आल्टिंड लेबो पृ, १५३ ]. तैत्तिरीय संहितेमध्यें पहिल्या काण्डाच्या तिसऱ्या प्रपाठकाच्या आरंभीं व सहाव्या काण्डाच्या पहिल्या प्रपाठकाच्या आरंभींच सद व शाला बांधण्याविषयीं मन्त्र आहेत त्यांवरून व ते मन्त्र म्हणून ज्या कृती करावयाच्या असतात त्यांवरून या शाला दुपाखी झोंपडीसारख्या उभे खांब रोंवून वर वांबू टाकून बाजूला कूड बांधून तयार करीत असें दिसतें.

अवेस्तामध्यें वेन्दिदाद फरगर्द आठ यांत असें वर्णन आहे कीं, जर एखादा मनुष्य अथवा कुत्रा घरांत मेला तर त्याचें प्रेत बाहेर नेण्यास सोइस्कर असेल तर प्रेत बाहेर नेऊन घर शुद्ध करावें पण जवळ दख्म वगैरे नसल्यामुळें प्रेत नेणें सोयीचें नसेल तर घर दुसऱ्या जागीं उचलून नेऊन शुद्ध करावें व प्रेत त्याच जागीं टाकून द्यावें. या ठिकाणीं श्राडरनें गायजरचा आधार देऊन भलतेंच विधान केलें आहे तें असें कीं, जर एखादा मनुष्य घरापासून दूर अंतरावर मरण पावेल तर त्याचें प्रेत घरांत आणावें किंवा त्याचें घर त्या ठिकाणीं न्यावें. परंतु आम्हीं जो वर मजकूर दिला आहे तोच मूळ वेंदिदादप्रमाणें असून डार्मेस्टेटर यानें सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट या मालेंतील ग्रंथांतहि असाच अर्थ केलेला आहे. वरील मजकुरावरून इराणी घरांची थोडी बहुत कल्पना येईल.

**व्यापार व दळणवळण.**—आपणाजवळची एखादी वस्तु देऊन दुसरी घेणें ही कल्पना इतकी सरळ आणि उघड आहे कीं, तिचें अस्तित्व संस्कृतीच्या कोणत्याहि पायरींत आपणांस आढळून येईल. त्यामुळें देवघेवीची पद्धति फार प्राचीन कालापासून सुरू असली पाहिजे असें आपणांस म्हणावयास हरकत नाहीं. परंतु सध्यांच्या क्रय आणि विक्रय या दोन अगदीं पृथक् क्रिया असून त्यांमध्यें किंमतीचें परिमाण ठरविणारी कांहींतरी सामान्य वस्तु असल्याशिवाय या क्रिया होऊं शकत नाहींत. ही सामान्य वस्तु देवघेवीच्या प्रकारापासूनच कांहीं जिन्नस उदाहरणार्थ गाय वगैरे सर्व लोकांच्या सामान्य आवडीचे ठरून त्याप्रमाणें निश्चित झाली असली पाहिजे.

अशा प्रकारानें देवघेवीमधील पदार्थांची किंमत कोणत्या तरी तिसऱ्या पदार्थानें दाखवितां येईपर्यंतचा व्यवहार केवळ देवघेवीचा असतो. नंतर त्यास क्रयविक्रयाचें स्वरूप येतें व पुढें तिचें परिणत स्वरूप व्यापारामध्यें दृष्टीस पडतें.

इंडोयूरोपीय कालांत गाय ही सामान्य किंमतीचें परिमाण दाखविणारी वस्तु होती. सहस्रापर्यंत गाईंच्या संख्येची कल्पना व तितक्या किंमतीच्या पदार्थाच्या किंमतीची कल्पना त्यांनां असावी असें वाटतें.

एकाच राष्ट्रजातीमध्यें मोडणारे लोक तेवढे एक व समान हक्काचे, त्यामुळें दुसऱ्या जातींतील लोक तेवढे परके व त्यांनां कांहीं हक्क नाहींत ही कल्पनाहि फार प्राचीन दिसते. प्राचीन लोकांच्या कल्पनेप्रमाणें परके आणि शत्रू यांमध्यें कांहीं फरक नाहीं. त्यामुळें परकीयांनां दास करणें किंवा त्यांनां बळी देणें याबद्दल त्या लोकांस कांहीं वाटत नसे.

यामुळें असें वाटण्याचा संभव आहे कीं, प्राचीन कालांत निरनिराळ्या जातींमध्यें परस्पर दळणवळण असणें किंवा देवघेव, व्यापार इत्यादि व्यवहार होणें अगदीं अशक्य असलें पाहिजे. परंतु वास्तविक गोष्ट तशी दिसत नाहीं. कारण कांहीं संस्कृतींच्या कनिष्ठ अवस्थेंत असलेल्या लोकांत एकमेकांशीं बोलल्याशिवाय किंवा एकमेकांच्या दृष्टीस पडल्याशिवाय देवघेवीचा व्यवहार होत असल्याचें आपणांस दिसून येतें. ज्या लोकांस आपला माल विकावयाचा असतो ते एका ठिकाणीं आपला माल मांडून निघून जातात. नंतर दुसरे लोक येऊन त्या मालाच्या मोलाचे दुसरे जिन्नस ठेवून दृष्टीआड होतात. नंतर पहिले लोक येऊन आपणांस पसंत पडल्यास दुसरा माल घेऊन जातात व आपला जाग्यावर ठेवतात व याप्रमाणें तो व्यवहार पुरा होतो. जर त्यांनीं दुसरा माल ठेवलेला असेल तितका घेतला नाहीं तर विकत घेणाऱ्यांला आणखी माल ठेवावा लागतो.

याखेरीज निरनिराळ्या जातींमध्यें असें ठरलेलें असतें कीं, विवक्षित दिवशीं एखाद्या विशिष्ट स्थळीं देवघेवीच्या व्यवहारानिमित्त वैमनस्य विसरून युद्ध वगैरे बंद राहील. त्या दिवशीं सर्व शस्त्रास्त्रें बाजूस ठेवून दोन्ही जातींचे लोक परस्परांत मिसळतात. अशींच सम्मेलनें बहुतकरून एखाद्या देवतेनिमित्त भरविण्यांत येत. यांतूनच जत्रांचा उगम झाला.

याप्रमाणेंच परकीय पाहुणा, तहाकरितां आलेला मनुष्य, इत्यादिकांच्या ठिकाणचें वैर तात्पुरतें बाजूस टेवण्यांत येऊं लागलें व आतिथ्य शिष्टाचार इत्यादिकांचा प्रघात पडला व व्यवहाराचें कार्यक्षेत्र वाढत गेलें.

**यूरोपांतील पाषाणयुगाशीं आर्यन लोकांचा संबंध.**—आतांपर्यंत निरनिराळ्या भाषांतील शब्दांच्या तुल्यांवरून इंडोयूरोपीय लोकांच्या राहणीची वगैरे कल्पना दिली. आतां तिची यूरोपामध्यें पुराणवस्तुसंशोधकांनीं शोधून काढलेल्या यूरोपांतील दगडांचीं हत्यारें वापरणाऱ्या आणि पाषाणयुगीन नांवानें बोधिल्या जाणाऱ्या लोकांच्या व कालाच्या अवशेषांवरून अनुमानानें निघणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक स्थितीशीं थोडीशी तुलना करून नंतर पुन्हां इंडोयूरोपीय सामाजिक व कौटुंबिक स्थितिकडे वळूं.

स्वित्झर्लंड देशाच्या पूर्व व पश्चिम भागांत सरोगृहें अथवा 'लेक ड्वेलिंग्ज' म्हणजे तळ्यांत उथळ पाण्यांत खांबांवर बांधलेलीं घरें सांपडलीं आहेत. तीं इतिहासास अपरिचित अशा पूर्वकाळांतील आहेत.

या सरोगृहांत धातूंचा मागमूसहि नाहीं. तर फक्त दगड व हाडें यांपासून बनविलेलीं आयुधें आढळतात. अशा प्रकारचीं हत्यारें एका सरोगृहसमूहांत ५८०० वर सांपडलीं आहेत. क्वचित् तांब्याचा उपयोग केलेला आढळतो. पण दगड व हाडें यांच्याशीं तुलना केली असतां तो कांहींच नव्हे. यावरून हीं घरें पाषाणयुगीन आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं व इंडोयूरोपीय काल म्हणजे पाषाणयुगच होय.

इंडोयूरोपीय कालांत बाण, धनुष्य, परशु इत्यादि मारक आयुधें आढळतात. परंतु कवच, शिरस्त्राण यांसारखीं संरक्षक साधनें आढळत नाहींत. त्याप्रमाणेंच सरोगृहांतहि धनुष्यें, भाल्यांचीं टोंकें, सुरे, गारांचीं बाणाग्रें इत्यादि मारक आयुधें आढळतात. पण संरक्षक आयुधें आढळत नाहींत.

गुरेंढोरें व माणसाळलेलीं जनावरें यांविषयीं विचार केला तरी हीच स्थिति आढळते. इंडोयूरोपीय लोकांस माहीत असलेलीं जनावरें म्हणजे गाय, मेंढी, बकरा, कुत्रा, डुकर व घोडा हीं होत. सरोगृहांतहि हेच प्राणी आढळतात व यांतील या दोन्ही ठिकाणचें साम्य विस्मयजनक आहे. जी घोड्याची जात आपल्या नेहमीं पहाण्यांत येते त्या जातीच्या घोड्यांचीं हाडें सरोगृहांत आढळतात पण तीं फारच तुरळक दृष्टीस पडतात.

शेतकीकडे पाहतांहि इंडोयूरोपीय लोकांस गहूं, जव, मिलेट हें तृणधान्य, हीं धान्यें ठाऊक होतीं असें दिसतें व सरोगृहांतहि याच धान्यांचा प्रसार दिसतो. अलीकडे यूरोपीयांस परिचित असलेलीं राय, ओट हीं धान्यें त्यावेळीं माहीत होतीं असें दिसत नाहीं. त्याप्रमाणेंच ताग माहीत नव्हता पण अंबाडी ( फ्लॅक्स ) माहीत होती असें दिसतें.

आहाराच्या बाबतींतहि सरोगृहांतील लोक मत्स्य खात एवढी गोष्ट बगळली तर सर्वतोपरी सारखेपणा आढळेल.

सरोगृहांमध्यें चात्या, अंबाडीचे दोर, दोऱ्या व अंबाडीच्याच विणलेल्या वस्त्रांचे अवशेष सांपडले आहेत. त्यामुळें त्यांस इंडोयूरोपीय लोकांप्रमाणें वस्त्रें विणण्याची कला माहीत होती असें दिसतें. मात्र या सरोगृहांत लोकरीचीं वस्त्रें मुळींच आढळत नाहींत. त्यांचा पोशाख कसा असावा याची नीटशी कल्पना होत नाहीं. परंतु केलरनें ते केवळ एकच वस्त्र अंगाभोंवतीं गुंडाळीत असावे असें अनुमान केलें आहे.

घरासंबंधीं विचार करितांना इंडोयूरोपीय लोकांचें घर प्रथम गाडे हेंच असून ते पुढें स्थायिक झाल्यावर प्रथम गुहा व नंतर झोंपड्या वगैरे बांधून राहूं लागले हें आपण पाहिलेंच

आहे. सरोगृहांसंबंधीं विचार करितां त्या कालचीं घरें अग्नीमुळें व अन्य कारणांनीं नाश पावलीं आहेत. परंतु केलर यानें अनुमानानें त्यांचें असें वर्णन दिलें आहे कीं, 'त्यांच्या झोंपड्या वाटोळ्या आकाराच्या असून सभोंवतीं कुडाची भिंत असे व ती चिखलानें सारवीत असत. जमीनीवरहि चिखल सारवीत असत. छपर झाडांच्या साली, गवत, बोरू वगैरेंनीं आच्छादित असत.' परंतु तत्कालीन लोकांच्या घरांची कांहींशी कल्पना येण्यास, आपणांस दुसरें साधन म्हटलें म्हणजे इटाली, जर्मनी, डेनमार्क इत्यादि देशांत भूम्यन्तर्गत गृहें सांपडलीं आहेत तीं वाटोळीं असून त्यांच्या भिंती टहाळे व चिखल यांच्या बनविलेल्या असाव्यात आणि त्यांचें छप्पर गवत व बोरू यांचे थर बांधून बनविलेलें असे असें हेलबिग यानें वर्णन केलें आहे (दाय इटालिकेर इन डर पोएबने पृ. ५०). या घरांनां उजेड आंत येण्याकरितां किंवा धूर बाहेर जाण्याकरितां दरवाजाचा व कांहीं ठिकाणीं एक लहानशी तिकोनी खिडकी छपरामध्यें काढलेली असे तिचा उपयोग होत असे. याप्रमाणें कांहीं लोक तळ्यांत खांब रोंवून त्यांवर घरें बांधून रहात असतांना कांहीं लोक जमीनीवर रहात असत असें दिसतें. व या दोहोंच्याहि राहणींत बरेंच साम्य असून ती इंडोयूरोपीय लोकांच्या राहणीशीं जुळते.

मातीचीं भांडीं वगैरे करणें यासारख्या कांहीं किरकोळ कला सरोगृहांतील लोकांस माहीत होत्या परंतु गाड्या तयार करणें ही गोष्ट त्यांस अवगत नव्हती. कारण त्यांचा त्यांनां उपयोगहि नव्हता. नावा मात्र त्यांनां माहीत होत्या.

वरील साहाय्याकडे पाहतां भाषाशास्त्र व इतिहास यांनीं जें प्राचीनतम संस्कृतीचें स्वरूप आपणांस दाखविलें तें स्वरूप व स्वित्झर्लंडमधील सरोगृहांनून दिसून येणारें प्राचीन संस्कृतीचें स्वरूप या दोहोंत बरेंच साम्य आहे व या दोन्ही संस्कृती जवळ जवळ एकच आहेत असा तर्क करण्यास बरीच जागा दिसून येते. कै. लो. टिळकांचें मत असें होतें कीं सरोगृहांतील संस्कृति मूलगृहकालीन संस्कृतीपेक्षां अधिक कनिष्ठ दर्जाची आहे. आणि यूरोपांत गेल्यानंतर इंडोयूरोपीयांची सांस्कृतिक अधोगति झाली असावी.

**कौटुंबिक पद्धतीचा इतिहास.**—हा पाहिला असतां आपणांस असें दिसून येतें कीं प्रारंभीं विवाहसंस्था ही अस्तित्वांतच नव्हती. ही संस्था अस्तित्वांत आल्यापासून कौटुंबिक पद्धतीच्या इतिहासाला प्रारंभ होतो. प्रारंभीं वैवाहिक बाबतींत मनुष्य प्राणी पशूपेक्षां फारसा निराळा नव्हता. मुलाची पैतृकपरंपरा ओळखण्यास अडचण असे. म्हणून प्रथम मुलगा आईच्या नांवानें ओळखला जाण्याचा प्रघात पडला व विवाहसंस्था दृढ झाल्यानंतर मुलगा पित्याच्या नांवानें ओळखला जाऊं लागला. याप्रमाणें मातृकन्यापरंपरा ही जुनी असून पितापुत्र परंपरा ही नंतरची आहे असें लर्बाक व हुलवॉल्ड प्रभृति समाजशास्त्रज्ञांचें मत आहे.

याच्या उलट स्टार्की यानें असें प्रतिपादन केलें आहे कीं विवाहसंस्था ही अस्तित्वांत येण्याचें कारण कामेच्छा नसून गृहसौख्येच्छा (डोमेस्टिक इकॉनमी) होय. मनुष्याला एक नोकर व आपल्या मालमत्तेचा रक्षक पाहिजे होता म्हणून त्यानें स्त्रीशीं संबंध ठेवला व पुढें वंश वाढावा सुखें असावीं अशी इच्छा होऊन तीं कोणापासूनहि होवोत तो आपल्या कुटुंबांत सामील करूं लागला; व अन्याच काळानंतर वैवाहिक स्थिति ही प्रथम स्त्रीच्या बाबतींत व नंतर पुरुषाच्या बाबतींत निश्चित झाली. असो.

आपणांस या ठिकाणीं या वादविवादांत पडण्याचें कारण नाहीं. आपणांस आज तत्कालीन स्थितीच ज्ञात होण्यास अडचणी बऱ्याच आहेत. ज्या लोकांची आपणांस फारशी माहितीहि नाहीं त्यांच्या मनांतील हेतूंचा पत्ता लावणें ही बरीच पुढची पायरी झाली. आपणांस त्या वेळच्या कौटुंबिक स्थितीबद्दल अनुमान करावयाचें म्हणजे आपण प्रथम तत्कालीन नातलगांस लावण्यांत आलेल्या निरनिराळ्या भाषांतील शब्दांच्या सादृश्यवैलक्षण्याचा विचार करूं.

बापः— संस्कृत--पितर; झेंद—पितर; आर्मेनिअन हेअर; ग्रीक—पतिर; लॅटिन—पेटर; इराणी—अथिर; गॉथिक फडर, इंग्लिश—फादर.

मातः—संस्कृत—मातर; झेन्द—मातर; आर्मेनिअन मइर; ग्रीक—मीतिर; लॅटिन—मेटर; इराणी—मथिर; प्राचीन उच्च जर्मन—मुओटर; इंग्लिश—मदर.

पुत्रः— संस्कृत—सूनुः; झेंद—हुनु; गॉथिक—सुनुस; लिथु०—सुनुस; प्राचीन सॅक्सन—सिनु; इंग्लिश—सन; संस्कृत—पुत्र; झेन्द—पुथ्र ऑस्क०—पुक्लो;

कन्याः— संस्कृत-दुहितर; झेन्द-दुघधर; आर्मेनिअन-दुस्त्र (पुत्र), इंग्लिश-डॉटर.

भाऊः— संस्कृत-भ्रातर; झेंद-ब्रातर; ग्रीक फ्रोतिर; लॅटिन—फ्रेटर; इराणी-ब्राथिर; गॉथिक-ब्रोथर; लिथु०-ब्रॉटेरेलिस; इंग्लिश-ब्रदर.

बहीणः— संस्कृत-स्वसर; झेंद—ह्व-हर; लॅटिन सोरोर; इराणी-सिउर; प्राचीन सॅक्सन-सेस्त्र; इंग्लिश -सिस्टर.

वरील शब्दमालिका पाहतां लॅटिन भाषेंत पुत्र व कन्या या अर्थी सदृश शब्द आढळत नाहींत व ग्रीक भाषेंत भाऊ व बहीण या शब्दांचे सदृश शब्द आढळत नाहींत. पुत्रवाचक शब्द सु-प्रसवणें या धातूपासून निघाले असावे असें दिसतें. व पितावाचक शब्द पितृ याचा पति या शब्दाशीं व पा—रक्षण करणें या धातूशीं संबंध असावा असा तर्क आहे.

वरील शब्द सर्व जवळच्या नातलगांसंबंधीं आहेत. या शब्दांत जितकें सादृश्य आढळतें तितकें दूरच्या नातलगांच्या वाचक शब्दांत आढळत नाहीं. मात्र कुलतावाचक निरनिराळ्या भाषांत जे शब्द आहेत त्यांत बरेंच साम्य आढळतें.

चुलताः- संस्कृत-पितृव्य; झेंद-तुइर्यो; ग्रीक-पत्रोस; लॅटिन पेतृउस; प्राचीन उच्च जर्मन-फेतुरेओ; अँग्लो सॅक्सन-फिडेरा. आतां दुसरी एक शब्दमालिका पाहूं.

संस्कृत-नपात् ( वंशज ); इराणी—झेंद-नपात ( नातु ), उत्तर फारसी—नवाद ( नातु ), नसि-नातलग; लॅटिन-नेपोट ( नातु ) याचाच पुढें इंग्लिश. नेव्ह्यू ( पुतण्या ) हा शब्द झाला. यावरून नपात् हा शब्द प्रथम केवळ वंशज या अर्थी असून पुढें निरनिराळ्या ठिकाणीं त्याला निरनिराळे विशिष्ट अर्थ प्राप्त झाले असें दिसतें.

इंडोयूरोपीय लोकांतील कौटुंबिक संबंध दाखविणारी दुसरी एक महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे इंडोयूरोपीय कुटुंबांतील सुनेचें सासरच्या घरांतील मंडळींशीं संबंध दाखविणाऱ्या शब्दांचीं तुल्यें अधिक आढळतात व उलट पक्षीं जावयाचा सासुरवाडच्या मंडळीशीं संबंध दाखविणाऱ्या शब्दांचीं तुल्यें कमी सांपडतात.

सूनः—संस्कृत-स्नुषा; उत्तर फारसी--सुनार; आर्मेनियन-नु; ग्रीक—नुओस; लॅटिन—नुरुस; प्राचीन उच्च जर्मन—स्नुरा; प्राचीन सॅक्सन—स्नुचा ( शा ) इत्यादि.

जामातवाचक शब्दांचीं तुल्यें सर्व शाखांत न आढळतां केवळ निकटसंबंधीं भाषांतच आढळतात.

संस्कृत—जामातर; झेंद-झामातर; लिथु.-स्लॅमेन्तस.

याप्रमाणेंच सासरा व सासू वाचक शब्दांचीं तुल्यें पाहिलीं असतांहि वरील अनुमानासच बळकटी येतें. तेव्हां इंडोयूरोपीय कुटुंबांमध्यें विवाहाच्या योगानें वधू व तिच्या सासरचीं माणसें यांमध्यें संबंध उत्पन्न होत असे अशी कल्पना वास्तविक दिसते. विवाह झाल्यानंतर मुलीनें आपल्या आईबापांचें घर व नात्यागोत्याचीं माणसें सोडून नवऱ्याच्या घरीं व त्याच्या नातलगांमध्यें जाऊन राहिलें पाहिजे व त्यामुळें तिचीं माहेरचीं सर्व नातीं सुटून जात व तिच्यामुळें नवऱ्याच्या नातलगांमध्यें व बापाच्या नातलगांमध्यें कांहीं विशेषसा संबंध उत्पन्न होत नसे. ती केवळ नवऱ्याच्या कुटुंबांत मिळून जात असे. नवऱ्याच्या नातलगांचा व बायकोच्या माहेरच्या नातलगांचा संबंध जडण्यास बराच कालावधि लागला असावा व विचारांमध्यें बरीच उदारता आल्यानंतर हा संबध दृढ झाला असावा असें दिसतें. पण यावरून पितृपुत्रपरंपरा समाजांत स्थापित झाली होती असें दिसतें.

**इंडोयूरोपीय विवाहसंस्था व त्या समाजांत वधूचा दर्जा.**—इंडोयूरोपीय विवाहसंस्था बहुधा वधू पैसे देऊन विकत घेणें या चालीच्या पायावर उभारलेली आहे. टयूटन लोकांमध्यें प्राचीनकाळीं ही चाल सर्वत्र दिसून येते. स्लाव्ह लोकांतहि ही चाल प्रचलित असून दक्षिणेकडील स्लाव्ह लोकांत एका काळीं मुलीची किंमत इतकी बेसुमार वाढली होती कीं ब्लक जार्ज या राजानें ती किंमत एक ड्यूकट या नाण्यावर आणून ठेवली असें क्राउस या ग्रंथकारानें म्हटलें आहे.

हिंदू लोकांतहि वधू विकत घेण्याची चाल कांहीं अपरिचित नव्हती. अष्टविवाहांपैकीं आर्ष विवाहामध्यें वरापासून एक किंवा दोन गोमिथुनें घेऊन कन्या द्यावी असा विधि सांगितला आहे ( मनुस्मृति ३, २९. ). वैदिक काळांत भावी श्वशुराला उत्तमोत्तम देणग्या देऊन वधू मिळण्याचा प्रघात होता असें झिमरनें म्हटलें आहे ( अल्टिर्टि.ले. पृ. ३१० ).

वधू विकत घेण्याच्या चालीबरोबरच वधू हरण करून आणण्याची चालहि प्रचारांत होती. आतां या दोन्ही चाली जर एकाच काळीं प्रचलित असतील तर त्यांची परस्परसंगति कशी लावावयाची असा प्रश्न उपस्थित होतो. त्यावर असें उत्तर सुचवितां येईल कीं वधू विकत घेण्याची चाल ही जेव्हां वर व वधू एकाच राष्ट्रजातींतील असतील तेव्हां आचरणांत येत असावी व दुसऱ्या चालीचा अवलंब जेव्हां परक्या जातींतील वधू मिळवून आणावयाची असेल तेव्हां करावयाचा असावा. यावरून वधू हरण करून आणावयाची ही चाल फार पुरातन काळीं जेव्हां आर्यन् लोक स्थाईक झाले नसून भटकत फिरणारे होते त्या काळची असावी. त्या वेळीं निरनिराळ्या जातींमध्यें संबंध फार थोडा असावा व एक प्रकारचें शत्रुत्व असावें. यामुळें नवऱ्याच्या नातलगांचा व बायकोच्या माहेरच्या नातलगांचा कांहींएक संबंध नसतो ही कल्पना त्या वेळीं विशेष रूढ असली पाहिजे. याप्रमाणें वर जें आपण विधान केलें कीं वधूचा नवऱ्याच्या घरीं गेल्यावर माहेरचा संबंध जवळ जवळ पूर्णपणें तुटत असे तसें होणें साहजिक दिसतें.

संस्कृत विवाह यामध्यें जो वह् धातु आहे त्यांतहि वधू पित्याच्या कडून समारंभानें अगर हरण करून नेणें असा अर्थ आहे व इतर भाषांतील लग्नवाचक शब्दांमध्येंहि थोडाबहुत तसाच अर्थ आहे.

नवरा ही कल्पना प्राचीन भाषांतून ज्या शब्दांनीं व्यक्त केली जात असे त्या शब्दांचा अर्थ सामान्यतः मालक किंवा धनी असा असे. संस्कृत-पति; झेंद-पइति, ग्रीक-पॉसिस, संस्कृत दम्पति; (गृहपति ). लिथ०--पत्स ( पति-विवाहित मनुष्य ). यावरून नवरा हा घरचा मालक समजला जात असे. व युरोपीय भाषांतील स्त्रीवाचक शब्द आहेत त्यांचा धात्वर्थ जन्म देणारी असा होतो यावरून पत्नी म्हणजे मुलांस जन्म देणारी, पती म्हणजे धनी असा पूर्वी नवरा व बायको यांचा परस्परसंबंध समजला जात असावा असा तर्क आहे.

प्राचीनकाळीं स्त्रियांचा दर्जा हल्लींपेक्षां उच्च प्रतीचा होता असा साधारण समज आहे. हा समज होण्याचें मुख्य कारण म्हणजे यज्ञांमध्यें वगैरे पत्नींची जरूर लागत असे. हिंदु व रोमन लोकांत पत्नीशिवाय यज्ञ करितां येत नसे. परंतु रोमन लोकांत मार्स नांवाच्या देवतेला बळी देतांना पत्नी जवळ लागत नाहीं व भारतीयांमध्यें प्रवर्ग्य विधीच्या वेळीं

पत्नीनें बुरखा घ्यावा असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. यावरून व ज्या काळीं स्त्री केवळ द्रव्य देऊन विकत घेतलेली अगर हरण करून आणलेली असेल त्या काळीं तिला बरोबरीचें समजलें जाण्याचा संभव कमी दिसतो.

बायको जर विकत घ्यावयाची तर एकीहून अधिक बायका विकत घेण्यास काय हरकत आहे असा साहजिकच प्रश्न येतो; व यावरूनच एकीहून अधिक बायका करण्याची चाल प्रचारांत आली असावी. पण ही चाल जेव्हां समाज स्थाईक होऊन त्यांत कांहीं लोक श्रीमंत झाले असतील तेव्हांच पडली असली पाहिजे. कारण एकीहून अधिक स्त्रिया विकत घेणें, त्यांनां व त्यांच्या मुलांनां पोसणें ही गोष्ट श्रीमंतीशिवाय किंवा कामाचा पसारा वाढल्याशिवाय होणें शक्य नसतें. अधिक स्त्रिया करण्याची कल्पना पहिल्या बायकोस मूल किंवा विशेषतः पुत्र न झाल्यास निघणें सहाजिक आहे. अशा तऱ्हेनें दक्षिण स्लाव्ह लोकांत मुलाकरितां एक बदली बायको करण्याची चाल अद्यापीहि रूढ आहे (क्राउस पृ. २२८). जेव्हां प्रजोत्पत्तीस नवरा अपात्र असेल तेव्हां नियोगानें पुत्रोत्पत्ति करण्याचा प्रघात भारतीय, ग्रीक, टयूटन लोकांत होता. या चालीचें मूळ या कल्पनेंत दिसून येते कीं स्त्री ही पुरुषाच्या मालकीची वस्तु असून त्याच्या गाईच्या ठिकाणीं होणाऱ्या वत्साप्रमाणें स्त्रीच्या ठिकाणीं होणाऱ्या पुत्रावर त्याची मालकी आहे. स्त्री ही केवळ मालकीची वस्तु ही कल्पनाच स्कॅंडिनेव्हियामध्यें जो आपली स्त्री देऊन अतिथीचा सत्कार करण्याचा प्रघात आहे त्याच्या मुळाशीं असावी [वेनहोल्ड अल्टि. पृ. ४४७].

आतां अशा कल्पना असणाऱ्या लोकांमध्यें विवाहित पुरुषानें अन्य स्त्रीशीं संबंध ठेवला तर तें गर्हणीय मानलें जात नसे व उलट स्त्रीनें मात्र व्यभिचार केल्यास तिला अतिशय क्रूर शिक्षा देण्यांत येत असे या गोष्टीचें फारसें नवल वाटण्याचें कारण नाहीं. कारण स्त्रीच्या व्यभिचारामुळें पुरुषाच्या एक प्रकारच्या मालकी हक्कास बाध येत असे अशी त्यांची साहजिक समजूत होती. ग्रीक व टयूटन लोकांत अशाच प्रकारची चाल होती. पुरुषाच्या स्वैर वर्तनाकडे कोणी पहात नसे परंतु स्त्री व्यभिचार करितांना आढळल्यास तिला तिच्या मित्रासह प्राणास मुकावें लागे.

स्त्रीच्या पोटीं होणाऱ्या पुत्रासहि जिवंत ठेवणें अगर टाकून देणें केवळ बापाच्या मर्जीवर असे अशी टयूटन लोकांत चाल होती, व रोमन लोकांत मुलास विकण्याचा बापास हक्क होता असें स्पष्ट दिसतें. शुनःशेपाची कथाहि याच गोष्टीचा अनुवाद करते, उत्तर टयूटन, रोमन, व गॉल लोकांत स्त्रीलाहि विकण्याचा अगर ठार मारण्याचा पुरुषांनां हक्क असे असें दिसतें (वेनहोल्ड आल्टि ले. पृ. २४९; रॉसबॅक–रोमन एथ्नॉलॉजी. पृ. २०; सिझर ६. १९).

नवऱ्याच्या मागें जिवंत राहणाऱ्या स्त्रीनें सती जावें अशी चाल इंडोयूरोपीय लोकांत असावी. या चालीचें मूळ मृत मनुष्यांचें आयुष्य परलोकांत या लोकाप्रमाणेंच सुखी असावें ही कल्पना असावी. उत्तर यूरोपांतील लोकांच्या या चालीचें वर्णन व्हीलेन यानें आपल्या ग्रंथांत विस्तृत दिलें आहे. ऋग्वेदामध्यें (१०. १८, ७) या ऋचेंत मृत पुरुषाच्या पत्नीचें सांत्वन केलें आहे यावरून त्या वेळीं सर्वच स्त्रिया सती जात असें दिसत नाहीं. विशेषतः ज्या स्त्रीस पुत्र नसेल ती स्त्री सती जात नसावी व दिरापासून पुत्र उत्पन्न करणें हें तिचें काम असावें असें ऋग्वेद (१०. ४०) या सूक्तावरून दिसतें. पुढें ही चाल सौम्य होत जाऊन सती जाण्याची चाल बंद पडत चालली. परंतु यूरोपांतही विधवांस पुन्हां लग्न करण्याची मनाई असे असें टयूटन व ग्रीक लोकांत दिसून येतें.

यावरून कोणी असें विचारील कीं इंडोयूरोपीय कालांत दासी व पत्नी यामध्यें काय फरक होता, तर त्याचें उत्तर असें कीं हा कांहीं बाबतींत नाजूक पण कांहीं बाबतींत महत्त्वाचा होता. पत्नी ही समान जातींतील असून तिच्या ठिकाणींच झालेली संतति कायदेशीर समजली जात असे. तिला दासीपेक्षां वरच्या पायरीची समजण्यांत येई, व यज्ञ वगैरे प्रसंगीं पत्नीलाच यजमानाबरोबर बसण्याचा हक्क असे. बाकी इतर बाबतींत तिच्यांत व दासींत विशेष फरक नसे.

**राज्यव्यवस्था.**--इंडोयूरोपीय लोकांतील राज्यव्यवस्थेचा पाया कुटुंबव्यवस्थेवरच बसविलेला आहे ही गोष्ट श्राडरला सिद्ध झाल्यासारखी वाटते. या व्यवस्थेची वाढ इंडोयूरोपीय कालांत कोठपर्यंत झाली होती एवढेंच आपणांस पहावयाचें आहे. मात्र ही भाषांतील शब्दांच्या तुल्यबलतेवरून शोधून काढणें कठिण आहे. कारण त्यांत सादृश्य फारसें आढळत नाहीं व शब्दांचे अर्थ फारच लवकर बदल झालेले आढळतात. इंडोयूरोपीय कुटुंबामध्यें गृहपति, त्याच्या स्त्रिया, मुलें, दास, दासी इत्यादिकांचा समावेश होत असे हें आपण वर उल्लेखिलेलेंच आहे. नातीं वगैरे फक्त पित्याच्या किंवा सगोत्र बाजूचींच ओळखलीं जात व मातुलवंशाशीं फारसा संबंध नसे. तथापि भारतांतच शतपथ ब्राह्मणाच्या कालापर्यंत अनेक व्यक्तींचीं नांवें मातृनामसाधित आहेत आणि अनेक यूरोपीय लोकांत हाच प्रकार दिसतो हेंहि विसरतां कामा नये. परंतु या पैतृक कुटुंबांत किती लोकांचा समावेश होत असे हें आपणांस पहावयाचें आहे. हिंदू, ग्रीक व टयूटन लोकांत अशी एक प्राचीन कालापासून चालत आलेली चाल आहे कीं मुलानें लग्न केलें म्हणजे तो पित्याचें घर सोडून स्वतंत्र अग्नीचें आधान करून निराळें घर करून राहतो, हें अनेक पंडितांचें विधान बरोबर असेल पण त्यास पुरावा पाहिजे. लीस्टच्या मताप्रमाणें हीच मूळची चाल असावी. परंतु श्राडरचें मत असें आहे कीं ही चाल

इंडोयूरोपीय लोक स्थाईक झाल्यानंतर व शेतकी करून राहूं लागल्यामुळें जमीन वगैरे मालमत्ता झाल्यानंतर प्रचारांत आली असावी. प्रारंभीं भ्रमण करीत फिरत असतांना इंडोयूरोपीय लोक हिंदूंच्या एकत्र कुटुंबपद्धतीप्रमाणें किंवा आयर्लंडमधील 'सेप्ट' प्रमाणें राहात असावे.

क्राउस याच्या म्हणण्याप्रमाणें असें कुटुंब म्हणजे पैतृक संबंधानें दोन तीन पिढ्यांपर्यंत बद्ध झालेल्या पुरुषांचें व स्त्रियांचें मिळून ५० । ६० माणसांचें असावें व गृहपति हा त्यांतील मुख्य समजला जात असे. मात्र रोमन लोकांतील पेटर फॅमिलिअस प्रमाणें त्याची सर्व कौटुंबिक मालमत्तेवर मालकी नसे, तर सर्व मालमत्ता सर्वांच्या समाईक मालकीची असे हे सर्व एकाच घरांत रहात असत. मध्यें अग्निशाला असून बाजूला यांच्या रहाण्याच्या जागा असत. जेवण एकत्र होत असे. पुरुष प्रथम जेवीत व स्त्रिया नंतर जेवीत असत.

ही स्थिति आजहि हिंदु कुटुंबांत आहे हें हिंदु वाचकांस सांगावयास नकोच. परंतु या चालीचे अवशेष ग्रीक व रोमन लोकांच्या प्राचीन चालींत दिसून येतात. ग्रीक लोकांत या चालीं असल्याचीं अनेक उदाहरणें आढळतात. ट्यूटन लोकांत समारंभाच्या वेळीं पुरुष प्रथम जेवल्यानंतर स्त्रिया जेवण्याची चाल होती.

यावरून एकत्र कुटुंबाची पद्धति जुनी असून विभक्त कुटुंबाची पद्धति मागाहून पडली असावी असें दिसतें.

कुटुंब व जाति यांच्या मधली अवस्था आपणांस अद्यापि दक्षिण स्लाव्ह लोकांत सांपडते. जेव्हां एका कुटुंबांतील भाऊबंद विभक्त होतात परंतु एकाच ठिकाणीं एकाच संघानें एकाच धर्माचें आचरण करीत राहतात व सर्वांचा मिळून समाईक जमीनजुमला असतो तेव्हां दक्षिण स्लाव्ह लोकांत ब्रत्स्त्वो या नांवानें ओळखला जाणारा 'बांधवसंघ' निर्माण होतो. या संघाच्या आनुवंशिक परंपरा व पूर्वजांच्या कथा एकच असतात. यांतील मुख्य निवडला जातो, व तो लढाई किंवा तह करण्याच्या कामीं पुढारी समजला जातो व न्यायनिवाड्याचें काम तोच करितो.

ग्रीक 'फ्राट्री' व लॅटिन 'जेन्स' हेहि याच प्रकारचे संघ असावे. अशाच संघाचे पुढें क्लॅन बनून त्यांच्या 'ट्राइब्स' अथवा राष्ट्रजाती बनल्या असाव्या.

दक्षिण स्लाव्ह लोकांत प्रत्येक 'झूपा' (एकाच जातीनें व्यापलेला प्रदेश) मध्यें एक स्वसंरक्षणासाठीं किल्ल्यासारखी जागा बांधण्याची चाल असे. ही जागा म्हणजे त्यांच्या राजकीय सत्तेचें केंद्र असून धार्मिक गोष्टींचेंहि मुख्य स्थान असे. येथें त्यांच्या शिष्टांच्या बैठकी होत व लढाईच्या वेळीं त्यांच्या हालचालींचें केंद्र असे.

ब्रत्स्त्वो यांचें आणि गोत्रांचें स्वरूप एकसारखेंच आहे. ब्रत्स्त्वो हा जमीनीचें संरक्षण करणारा आणि तिजवर मालकी सांगणारा समूह होता. गो म्हणजे जमीन आणि त्र म्हणजे संरक्षण करणारा. गोत्रें या प्रथमतः समूहाच्या बाहेर लग्नें करण्यास भाग पाडणाऱ्या संस्था नव्हत्या. सगोत्र विवाहास निषेध श्रुतींत तर नाहींच पण जुन्या स्मृतींतहि नाहीं. ही निषेधाची चाल आर्य नसून अनार्य असण्याचा संभव आहे. कुल आणि जाति यांच्या मधला एक समुच्चय एवढेंच त्याचें प्राचीन लक्षण दिसतें. रोमन जेन्स व भारतीय गोत्रें हीं दोन्ही समूहांत विवाहनिषेध करणाऱ्या संस्था मागाहूनच बनल्या असाव्यात.

इंडोयूरोपीय लोकांच्या परिभ्रमणकालांत त्यांचा कोणत्याहि प्रदेशाशीं विशेष संबंध दृढ होऊन अमुक प्रदेशाबद्दल त्यांना पितृभूमीची भावना उत्पन्न झाली होती असें म्हणतां येणार नाहीं जेव्हां ते स्थायिक होऊन शेतकी करूं लागले, तेव्हांच त्यांच्या टोळींतील नायक होते ते राजे बनून अर्वाचीन राज्यव्यवस्थेचा उगम होऊं लागला असावा. वेदांत देखील लोकांनीं निवडल्यानंतर राजत्व प्राप्त होई.

**मूलगृहविषयक संशोधन व भिन्न भिन्न मतें.—** श्राडरच्या मतांचें आणि त्यानें पुढें मांडलेल्या पुराव्याचें थोडक्यांत निरीक्षण झालें. मूलगृह शोधण्यासाठीं श्राडरची विचारपद्धति सामान्यतः येणेंप्रमाणें आहेः--सर्वांस जें परिचित तें मूलगृहांतील आणि तें एकसमयावच्छेदें करून जेथें सांपडेल तें मूलगृहस्थान होय. सर्वांमध्यें ज्या गोष्टी सांपडतील त्यांवरून मूलगृहकालीन सामाजिक स्थिति काढावयाची हेंहि या पद्धतीचें अंग आहे. श्राडरच्या संशोधनाची उपयुक्तता सहज दिसून येणारी आहे. तथापि सर्व ठिकाणीं सामान्य विकास होऊन उत्पन्न होणारी सरूपता मूलगृहीं होती असा समज होण्याची शक्यता विसरतां कामा नये. शिवाय मूलगृहाचा पत्ता या पद्धतीनें खास लागेल असें नाहीं. अनेक अनुभव एका ठिकाणीं उत्पन्न होतात आणि ते अनुभवहि असे असतात कीं ज्यामुळें भाषेंत शब्द उत्पन्न होतात. ते अनुभव देणारें स्थान मनुष्याच्या स्थानांतराच्या इतिहासांतील उत्तरकालीनहि असूं शकेल. इंडोयूरोपीय लोक वेगवेगळे होण्यापूर्वी किती भटकले हें कोणास ठाऊक आहे? ते पुष्कळच भटकले असतील आणि ही शक्यता असल्यामुळें श्राडरनें कल्पिलेलें जें मूलगृह आहे तें एका अर्थानें मूलगृह आणि दुसऱ्या अर्थानें उत्तरकालीन गृह समजणें अयुक्त होणार नाहीं. श्राडरनें मूलगृहकालविषयक विचार फारसा केला नाहीं.

मूलगृहविषयक व तत्कालविषयक विचार करतांना भोंवळ येईल अशा उंचीवर नेऊं पाहणारा ग्रंथकार कै. बाळ गंगाधर टिळक हा होय. त्यांची विचारपद्धति श्राडरच्या व इतर पाश्चात्य पंडितांच्या पद्धतीपेक्षा भिन्न आणि त्यांनीं जें साहित्य वापरलें तें श्राडरच्या साहित्यापेक्षां भिन्न प्रकारचें नाहीं. जो फरक आहे तो कल्पकतामूलक आणि वैदिक वाङ्मयांत अधिक खोल गेल्यामुळें उत्पन्न झालेला आहे.

**इंडोयूरोपीय किंवा इंडो-जर्मानिक अथवा आर्यन लोकांचें मूलगृह.**—इंडो-यूरोपीय उर्फ आर्यन्, ज्याला कॉकेशियन वंश असेंहि म्हणतात त्या, मानववंशापासून निघालेल्या अनेक शाखा आज यूरोप व आशियांत पसरल्या आहेत असें भाषादि शास्त्रांच्या तौलनिक अभ्यासानें सिद्ध झाल्यावर हा मूळ आर्यन् वंश शाखा फुटण्यापूर्वी कोठें राहात होता हा महत्त्वाचा प्रश्न उद्भवला. या प्रश्नासंबंधानें विविध मतें पुढें आलीं आहेत. त्यांत मुख्य मतें तीन आहेत. कांहीं विद्वान् मध्ययूरोप हें मूलगृह मानतात. तर कांहीं मध्यआशिया हें मूलगृह मानतात. तिसरें सुप्रसिद्ध मत बा. गं. टिळक यांचें असून त्यांनीं उत्तरध्रुवप्रदेश हें आर्यांचें मूलगृह असें प्रतिपादन केलें आहे.

यासंबंधानें प्रथम आडॉल्फ पिक्टेट यानें १८५९ मध्यें आपलें मत पुढें मांडलें. आशियांतलि बॅक्ट्रिया नामक प्रदेशांत मूळ आर्यन लोक राहात होते असें त्याचें म्हणणें आहे. मूलगृहाचा निश्चय करतांना ऋतुमानाचा पुरावा आधाराला घेण्यांत आला. इंडो-यूरोपीयांना हिंवाळा, वसंतऋतु व उन्हाळा हे फक्त तीन ऋतु माहीत होते. आपण जों जों उत्तरेकडे जातों तों तों तेथें फक्त उन्हाळा व हिंवाळा असे दोनच ऋतू असतात तर उलटपक्षीं दक्षिणेकडे तीन चार किंवा पांच ऋतूहि होतात. तेव्हां तीन ऋतू ज्या अक्षांशावर असतात अशा बॅक्ट्रिया देशांत ऑक्सस नदीनजीक मूलगृह असावें असें पिक्टेटचें म्हणणें आहे, या मताला पुष्टि म्हणून बॅक्ट्रियांतील आढळणारे खनिज पदार्थ वनस्पती व प्राणी इंडो-यूरोपीयांनां माहीत होते असें त्यानें सिद्ध केलें आहे.

याच्या अगदीं उलट इंडो-यूरोपीय लोकांचें मूलगृह यूरोपमध्यें होतें असें लॅथॅम, बेनफी, व्हिटने, वगैरे विद्वानांनीं मत दिलें. लॅथॅमचें म्हणणें असें कीं, संस्कृत भाषेचा लिथूस्लॅव्हानिक म्हणजे लिथुआनियन, स्लॅव्हानिक, लॅटिन. ग्रीक व जर्मन या भाषांशीं फार संबंध आहे म्हणून लिथु-स्लॅव्हानिक भाषांचा देश जो मध्ययूरोप तेथून संस्कृत भाषा बोलणारे लोक हिंदुस्थानाकडे आले असणें अधिक संभवनीय आहे. एल्. गायजर यानें तर जर्मनी विशेषतः मध्य व पश्चिम जर्मनी हेंच इंडो-यूरोपीय लोकांचें मूलगृह होय असें प्रतिपादिलें, व त्यामुळें या मूळ आर्यवंशाला इंडो-जर्मानिक असें म्हणण्याचा प्रघात पडला. गायजरनें आपला पुरावा मुख्यतः तीन झाडांच्या नांवांवर उभारला आहे. बर्च (सं.—भूर्ज), बीच व ओक हे तीन वृक्ष इंडो-यूरोपीयांस माहित होते व या तीन झाडांपैकीं बीच झाडाचें मूलस्थान प्रशियन बाल्टिक प्रदेशांच्या पश्चिम भागांत असल्यामुळें हा प्रदेशच इंडो-जर्मानिक लोकांचें मूलगृह होय. जे. जी. क्यूनोनें मध्ययूरोप (उरल पर्वतापासून अटलांटिक महासागरापर्यंतचा प्रदेश) विषयक मतालाच पुष्टि दिली. याप्रमाणें मध्य आशियावादी व मध्ययूरोपवादी अशा मूलगृहविषयक दोन पक्षांमध्यें बरींच वर्षें झगडा चालू होता. या वादाचा निकाल कांहीं काळ मृगराज सिंह या प्राण्यावर अवलंबून राहिला. तो असा कीं, मूलगृहविषयक संस्कृतींतील लोकांना सिंह हा प्राणी माहीत होता हें भाषाविषयक पुराव्यानें सिद्ध झालें; पण मध्ययूरोपांत सिंह तर अलीकडे आढळत नाहीं. तेव्हां प्राचीन काळीं तेथें सिंह हा प्राणी राहात असे हें सप्रमाण सिद्ध होईपर्यंत मध्ययूरोपमतवाद लंगडा पडला. उलट मध्यआशियामतवादाला बळकटी येण्यास असें एक सबळ कारण एफ्. होमेल (१८७८) यांनीं पुढें मांडलें कीं, प्राचीन सेमिटिक लोकांचा व इंडो-यूरोपीयांचा परस्पर दळणवळणाचा संबंध होता असें भाषाविषयक शब्दसाम्यावरून सिद्ध होत असल्यामुळें व प्राचीन काळीं सेमिटिक लोक पश्चिम आशियांत मेसापोटेमिया प्रांतांत राहात असल्यामुळें इंडो-यूरोपीय लोक तेथें शेजारींच मध्यआशियांत राहात होते हें अधिक ग्राह्य मानणें जरूर आहे. यानंतरहि कोणी दक्षिण यूरोप, कोणी पश्चिम रशिया (यूरोपीय) तर कोणी स्कांडिनेव्हिया याप्रमाणें यूरोपीय-मूलगृह-मत पुढें मांडणारे विद्वान् निघाले. मध्यआशिया मतवादाच्या बाजूच्या विद्वानांपैकीं एक सुप्रसिद्ध संस्कृतज्ञ विद्वान म्हटले म्हणजे आपल्या विशेष परिचयाचे मॅक्स मुल्लर साहेब हे होत.

याप्रमाणें मूलगृहविषयक वाद मध्य-आशिया व मध्य यूरोप यांच्यामध्यें हेलकावे खात बरींच वर्षें राहिला. त्यांत विशेष गोष्ट ही कीं, मध्य आशियाविषयक मताचा पुरस्कार करणारे सर्व विद्वान यूरोपीयच होते. त्यामुळें स्वखंडाभिमानाचा आक्षेप घेऊन त्यांच्या प्रामाणिकपणावर शिंतोडे उडविणें शक्य नव्हतें. या अत्यंत महत्त्वाच्या व बिकट प्रश्नावर यूरोपीय विद्वानांत माजलेल्या रणकंदनांत कोणीहि भारतीयच काय पण आशियाटिक विद्वानहि १८९० पर्यंत उतरलेला आढळत नाहीं. प्रश्न मोठा गहन असून तौलनिक भाषाशास्त्र, गाथाशास्त्र, मानववंशशास्त्र वगैरे अनेक शास्त्रें जाणणाऱ्या अष्टपैलु विद्वानाखेरीज एकांगी विद्वत्ता असलेल्या इतरेजनांनां या वादांत लुडबुड करणें शक्यच नव्हतें. त्यांतून प्रसंग पडला यूरोपीय विद्वानांबरोबर दोन हात करण्याचा. अशा अनेक बाजूंनीं अवघड होऊन बसलेल्या या वादांत १८९० च्या सुमारास सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय विद्वद्वर बाळ गंगाधर टिळक यांनीं उडी घातली आणि प्रथम मूलगृहाच्या कालविषयक प्रश्नासंबंधानें 'ओरायन' नामक ग्रंथ १८९३ सालीं व नंतर मूलगृहाच्या स्थलविषयक प्रश्नासंबंधानें 'आर्टिक होम इन दि वेदाज' हा दुसरा ग्रंथ १९०३ सालीं प्रसिद्ध केला.

लोकमान्य टिळकांच्या या दोन ग्रंथांतील विषयासंबंधानें कांहींसा गैरसमज होण्याचा संभव आहे, त्याबद्दल प्रथम स्पष्टीकरण केलें पाहिजे. पहिल्या ग्रंथाचें 'ओरायन' किंवा

'वेदकालनिर्णय' असें व दुसऱ्या ग्रंथाचें (वेदकर्त्या) 'आर्यांचें वसतिस्थान' असें नांव दिलेलें केळकरकृत टिळक चरित्रांत व इतर ठिकाणीं आढळतें. अशा प्रकारच्या शब्दयोजनेवरून वेद म्हणजे विशेषतः सर्वांत जुना जो ऋग्वेदसंहिताग्रंथ तो ख्रि. पू. ४००० वर्षांच्या सुमारास रचला गेला व त्याचे कर्ते ऋषी उत्तरध्रुवाजवळ राहत होते, असा समज होण्याचा संभव आहे. वास्तविक पाहतां ऋग्वेदसंहिता या ग्रंथाची जुळणी भरतखंडांतच व ती कुरुयुद्धकालाच्या सुमारास म्हणजे अजमासें ख्रि. पू. २००० ते ३००० च्या दरम्यान-झालेली आहे. टिळकांनीं जें ठरविलें तें हें कीं, वसंतसंपात कृत्तिकानक्षत्रांत होता असा जो प्राचीन काल तत्संबंधाच्या आठवणी भारतीय आर्यांनीं आपल्या ऋग्वेदसंहिता ग्रंथांत ग्रथित करून ठेविल्या आहेत. म्हणजे वेदकर्त्या आर्यांची पूर्वजपरंपरा ख्रि. पू. ४००० वर्षांच्या पलीकडेहि जाऊं शकते; आणि हे वेदकर्त्या आर्यांचे जे पूर्वज ते उत्तरध्रुवानजीक राहात होते, आणि या भारतीय आर्यांचे पूर्वज आणि यूरोपीय आर्यांचे पूर्वज प्राचीनतर काळीं एकत्र राहत होते असें सिद्ध झालें असल्यामुळें या इंडो-यूरोपीय लोकांचा एकत्र वसतिकाल ख्रि. पू. ४००० वर्षांपूर्वीचा असून त्यांचें एकत्र वसतिस्थान उत्तरध्रुव हें होय. अशा रीतीनें मूलगृहाचा काल व स्थल दोन्हींहि प्रश्नांबद्दल फार धाडसीपणाचे वाटणारे सिद्धांत टिळकांनीं आपल्या उपर्युक्त दोन ग्रंथांत १९०० च्या सुमारास पुढें मांडून यूरोप खंडांतील विद्वानांचें लक्ष आधुनिक भारतीय विद्वत्तेकडे जोरानें खेचलें.

यांपैकीं वेदकालनिर्णयासंबंधाच्या विषयाची बरीचशी माहिती ज्ञानकोशाच्या दुसऱ्या विभागांत (पृष्ठ१८६) दिली आहे. त्यावरून मूलगृहकालविषयक प्रश्नांशीं वाचकांनां परिचय करून घेतां येईल. आतां टिळकांनीं मूलगृहस्थलविषयक जी उत्तरध्रुवोपपत्ति पुढें मांडली तिचा तात्पर्यार्थ येथें थोडक्यांत देऊन हें इंडोयूरोपीय अथवा मूळ आर्यवंशाच्या माहितीचें प्रकरण संपवूं.

" ' आर्यांचें वसतिस्थान ' या पुस्तकाची कल्पना ओरायनप्रमाणें ज्योतिःशास्त्रावर अवलंबून नाहीं. तें शास्त्र स्वतः टिळकांच्या पूर्ण परिचयाचें असल्यामुळें त्यांनां त्यांत स्वतंत्र विचार करितां येत होता. पण या दुसऱ्या पुस्तकाचे कामीं आधारभूत असे कांहीं सिद्धांत भूगर्भशास्त्रावरून घेतलेले असल्यामुळें या बाबतींत टिळकांनां कांहींसें परावलंबी व्हावें लागलें. या विषयावरील अनेक पुस्तकें त्यांनीं वाचलीं व टिपणें केलीं. पण त्यांवरून निष्कर्षभूत असा सिद्धांत मांडतांना केवळ अज्ञ नसले तरी अतज्ज्ञ म्हणून टिळकांना प्रथम आत्मविश्वास पटेना. वास्तविक या नव्या दिवसांत प्रत्येक विषयांतील उपांगांचा अभ्यास वाढून तींहि जवळ जवळ शास्त्रेंच बनलेलीं असतात. शिवाय एका विषयाचें अध्ययन करणाऱ्याला, त्याच्या बरोबरीच्या इतर असहोदर अशाहि विषयांतून, केव्हां केव्हां माहिती समजावून घ्यावी लागते. सुदैवानें पाश्चात्य विद्यापीठांतून अनेक शास्त्रांचे पंडित एकत्र कार्य करीत असतात; यामुळें एकाला दुसऱ्याची मदत घेणें सोपें जातें. पण हिंदुस्थानांत तशी व्यवस्था नाहीं. यामुळें टिळकांनां मोठी अडचण पडली. तथापि स्वतः भूगर्भशास्त्री नसतांहि केवळ या विषयावरील पुस्तकें वाचून जीं प्रमेयें त्यांनीं बनविलीं त्यांत कोणी फारशा चुका काढलेल्या नाहींत पण त्यांच्या या ग्रंथांतील वादाचा मुख्य विषयहि तो नसून, वेदांतील कांहीं ऋचांचा जो अर्थ त्यांनीं बनविला व आर्यांचें मूल वसतिस्थान उत्तरध्रुवाजवळ होतें असें ठरविलें त्या अर्थासंबंधींच होता.

"उत्तरध्रुवाजवळील प्रदेश ख्रिस्तशकापूर्वीं आठ हजार वर्षें वसति करून राहण्याला योग्य होता हें शास्त्रज्ञांनीं ठरविलें. पण तेथें कोणी लोक प्रत्यक्ष रहात होते कीं नाहीं याविषयीं स्पष्टनिर्णयाचीं जीं साधनें त्यांनां भूस्तरशास्त्रांत मिळालीं नाहींत तीं ऋग्वेदांत टिळकांनां आढळलीं. अर्थात् उत्तरध्रुवाजवळच्या प्रांतांतील निसर्गसिद्ध देखाव्यांचें वर्णन जर ऋग्वेदांत सांपडतें, तर ऋग्वेद लिहिणारे किंवा त्यांचे पूर्वज हे सदर देखावे दृष्टीस पडण्यासारख्या ठिकाणींच कोठेंतरी रहात असावे, असें अनुमान टिळकांनीं काढलें. या कल्पनेनें आर्यांच्या मूल वसतिस्थानावर जसा प्रकाश पडला तसाच ऋग्वेदाच्या कांहीं ऋचांचा जो अर्थ पूर्वी लागत नव्हता, अथवा भाष्यकार किंवा निरुक्तकार यांनीं लाविला पण मनास पटण्यासारखा नव्हता, तो चांगला लागण्यालाहि मदत झाली. टिळक म्हणतात, ही कल्पना माझे मनांत येऊन पुष्कळ दिवस झाले,पण भूगर्भशास्त्राची मदत मिळाल्याशिवाय मनाला ठाम वाटणारा सिद्धांत बोलून दाखविण्याचें धैर्य होईना. इराणी वेदपंडितांनांहि ही कल्पना सुचली होती पण हिमकाल संपून ध्रुवसंनिध प्रदेश वसतिक्षम झाला होता ही गोष्ट चाळिसपन्नास वर्षांपूर्वी शास्त्रसिद्ध ठरली नव्हती म्हणून त्यांनांहि आपली कल्पना प्रगट करण्याचें धैर्य झालें नाहीं. पाश्चात्य पंडितांनां स्वकीयांनीं ठरविलेले भूगर्भशास्त्रविषयक नवे सिद्धांत पटण्यास अभिमानाची अडचण नव्हती पण वेदकाल हा त्याच सिद्धान्तावरून इतका जुना ठरतो या गोष्टीबद्दल त्यांनां अभिमान किंवा उत्साह कां वाटावा? टिळकांचे सिद्धान्त कांहीं पाश्चात्य पंडितांप्रमाणें हिंदुस्थानांतील पंडितांसहि मान्य झाले नाहींत; पण याचेंहि कारण अभिमान, मात्र उलटा अभिमान, इतकेंच काय तें. हिंदी आर्यांचा वेदकाल आमच्या किंवा आम्हांस माहीत असलेल्या संस्कृतीपेक्षां जुना कसा ठरेल असें पाश्चात्य पंडितांनीं म्हणावें; आणि टिळकांच्या विचारसरणीनें वेदकाल प्राचीन ठरत असला तरी आमचे आर्य लोक भरतभूमींतलेच स्वयंभू आहेत, ते काय म्हणून बाहेरून आले असतील, असें हिंदी पंडितांनां वाटावें! पण तें कसेंहि असो, डॉ. वॉरन यांसारखे कांहीं थोडे पाश्चात्य पंडित व टिळक यांनीं मिळून

आर्यवंशाचा, किंवा निदान आदिमानववंशाचा पाळणा कॉकेशस पर्वताच्या शिखरावरून उचलून उत्तरध्रुवाच्या कडीला अडकविला खरा! अजूनहि यांत वादबीजें अनेक राहिलेलीं आहेत. तथापि जुन्या संकुचित कल्पनांनां टिळकांच्या या प्रमेयानें जोराचा धक्का दिला गेला यांत शंका नाहीं.

"टिळकांच्या या ग्रंथाचे एकंदर तेरा भाग आहेत, पहिल्या भागांत टिळकांनीं सामान्यतः असें दर्शविलें आहे कीं, इतिहासकालाची मर्यादा शास्त्रीय शोधापूर्वी फार अलीकडे पडत होती ती पुष्कळच मागें जाऊन, आपणांस पूर्वी अर्थ कळत नव्हता म्हणून ज्या गोष्टी आपण पौराणिक किंवा काल्पनिक मानीत होतों त्या यां शोधानंतर आतां ऐतिहासिक व सत्यस्वरूपाच्या सहजच वाटूं लागल्या आहेत. भौतिक शास्त्रप्रगतीमुळें गाथाशास्त्राची हानि झाली, पण उलट इतिहासशास्त्र अधिक पुष्ट झालें, मिळून खरी हानि कांहीं नाहीं. दुसऱ्या प्रकरणांत ऋतुपर्याय होण्याचें कारण समजून सांगितलेलें असून, प्राचीन व अर्वाचीन युगांत पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांवरील हवेंत फेरफार कसे झाले, ध्रुवप्रदेशांतहि एक वेळ हवा उष्ण कशी होती, हवा थंड थंड होत जाऊन अखेर बर्फाचा पूर आल्यानें एखादा प्रदेश मनुष्यवस्तीला निरुपयोगी कसा होतो, पण फिरून कांहीं कालानें बर्फ वितळून तेथील हवा सौम्य व नंतर समशीतोष्ण होऊन फिरून ती कशी उष्ण होऊं लागते वगैरे गोष्टींचें वर्णन दिलें आहे. आणि इतकेंच सिद्ध केलें आहे कीं, ऋग्वेदांतील कांहीं सृष्टिवर्णनांवरून ध्रुवसंनिध प्रदेशांत मनुष्यवस्ती असल्याची कल्पना कोणास सुचली व ती त्यानें स्वीकारली तर ती गोष्ट नवीन शास्त्रसंशोधनानें अशक्य ठरत नाहींच पण उलट तिचें समर्थनहि होऊं शकतें. तिसऱ्या प्रकरणांत ध्रुव प्रदेशाचें वर्णन दिलें आहे. तेथें थंड उन्हाळे व गरम हिवाळे म्हणजे अक्षय वसंतऋतु अगदीं अलीकडच्या हिमप्रलयापूर्वी होता; तेथें सूर्य दक्षिणेस उगवतो, तारका उगवत नाहींत किंवा मावळतहि नाहींत; तर वाटोळ्या फिरून चोवीस तासांत एक प्रदक्षिणा करितात; सहा महिन्यांचा एक अखंड दिवस व सहा महिन्यांची एक अखंड रात्र मिळून वर्ष होतें; तेथें सूर्य वर्षांतून एकदांच उगवतो व एकदांच मावळतो म्हणून वर्षांतून एकच खरी सकाळ व एकच खरी संध्याकाळ असते व संध्याप्रकाशांहि दोन दोन महिने टिकून फक्त पूर्वेस किंवा फक्त पश्चिमेस असा न दिसतां क्षितिजावर वाटोळ्या प्रदक्षिणा करितो; तेथें उषःकाल अतिशय रम्य असतो व कित्येक दिवसपर्यंत एकसारखा टिकतो; हें वर्णन देऊन यांपैकीं वेदांत काय सांपडतें तें पाहण्याविषयीं एकप्रकारची प्रस्तावनेंनी टिळकांनीं केली आहे. चौथ्या प्रकरणांत, ऋग्वेदामध्यें वर वर्णन केलेल्या ध्रुवविशिष्ट गोष्टींपैकीं सहा महिन्यांची रात्र व सहा महिन्यांचा दिवस ह्मणतात; देवयान--पितृयान यांचा संबंध संवत्सराच्या प्राचीन विभागांशींच असावा; आणि आर्यसंस्कृतीशीं समांतर असलेली इराणी संस्कृति व समकालीन इराणी वेदग्रंथ यांतच काय, पण ग्रीक, नॉर्स, जर्मन वगैरे लोकांच्या पौराणिक कथांतहि देवांची रात्र व देवांचा दिवस या कल्पना आढळतात, ह्मणून त्या सार्थ व साधार असल्या पाहिजेत असें अनुमान काढलें आहे. पांचव्या प्रकरणांत वैदिक उषःकालाचें सविस्तर विवेचन केलेलें असून वेदग्रंथांतील उषावर्णनपर प्रत्यक्ष वाक्यें व ऋचा पुराव्यादाखल दिल्या आहेत. सहाव्या प्रकरणांत दीर्घ रात्र व दीर्घ दिवस यांचें वैदिक आधारांसह विवेचन असून सातव्यांत मास आणि ऋतु यांचें विवेचन करून असें दाखविलें आहे कीं, पूर्वी केव्हांतरी वर्षमान सात महिन्यांचें किंवा दहा महिन्यांचें म्हणजे तुटकें मानीत; पांच ऋतूंचें वर्ष होत असे, व हीं वर्णनें ह्मणजे निव्वळ कांहींतरी पौराणिक कथा अशी जी समजूत आजवर होती ती खरी नसून तें ऐतिहासिक सत्य होय, आणि हें सत्य ध्रुवसंनिध वसती करणाऱ्या लोकांच्याच अनुभवास यावयाचें अशी अनुमानाची सांखळी टिळकांनीं बांधली आहे. आठव्या प्रकरणांत दहा महिन्यांच्या वर्षाची कल्पना सिद्ध करण्याकरितां "गवाम् अयन" सारख्या सत्रसमारंभाचें परीक्षण कसें उपयोगी पडतें हें दाखविलें आहे. हें यज्ञसत्र दहा महिन्यांतहि संपत असे, रोमन लोकांत एकवेळ ३०४ दिवसांच्या वर्षाची कल्पना होती, 'गवाम्' शब्दाचा दिवस असा अर्थ कसा होतो, व दिवस कमी पडल्यानें वृत्रानें गाई चोरल्याच्या कथेसारख्या कथा निर्माण होऊं शकतात, इतर अनेक सत्रांची वर्षमानावर केलेली रचना धर्माचार व ज्योतिर्गणित यांचा आर्य लोकांच्या अनुभवांतला संबंध न कळल्यानें यूरोपियन पंडितांनां आर्य धर्मग्रंथ समजण्यास अडचण कशी पडली व ध्रुवसंनिध दिसणाऱ्या अद्भुत चमत्कारांवरून अद्भुत पौराणिक कथा कशा बनविल्या गेल्या वगैरे गोष्टींची चर्चा केली आहे. नवव्या प्रकरणांत अनेक गूढ वैदिक कथा घेऊन विशेषतः इंद्र व वृत्र यांच्या चिरकालिक युद्धाची कथा घेऊन ती ध्रुवासंनिध वसतीच्या उपपत्तीचें ग्रहण केल्यास सर्व सुसंगत कशी लागते हेंच मुख्यतः दाखविलें आहे. इंद्रवृत्रयुद्धाचें मूळ ढग, पाऊस, वादळ अशा अंतरिक्षांतील चमत्कारांतहि नसून अखंड काळोखाची दीर्घ रात्र पडणें व त्या रात्रीनंतर दीर्घ प्रकाश येणें या देखाव्यांत आहे; व ज्या अर्थी हे देखावे फक्त उत्तरध्रुवाजवळ दिसतात त्या अर्थी या पौराणिक कथेचा जन्म ध्रुवसंनिध घेतलेल्या अनुभवांतच आहे असें टिळकांनीं दाखविलें आहे. दहाव्या प्रकरणांत हीच विचारसरणी पुढें चालवून वैदिक कथांतर्गत प्रातःकालिक देवता, विष्णूचा त्रिपादविक्रम, वेदांतील सप्तमूल--दशमूल--विभाग, दाशराज्ञ युद्ध, दशमुख रावण वगैरे कल्पनांचा उलगडा केला आहे. अकराव्या प्रकरणांत इराणी वेद जो झेंदावेस्ता त्यांतील याच विचारपरंपरेस पोषक अशीं प्रमाणें दाख-

विलीं असून बाराव्या प्रकरणांत तुलनात्मक गाथाशास्त्राच्या आधारें पाश्चात्य पुराणकथांचाहि वैदिक प्रमाणांनांच दुजोरा कसा मिळतो हें दाखविलें आहे आणि शेवटचें म्हणजे तेरावें प्रकरण समारोपाच्या स्वरूपाचें असून त्यांत पूर्वीच्या सर्व प्रमाणांचा एकत्र विचार करून ध्रुवाजवळील वसतिस्थानाचा काल ख्रिस्तशकापूर्वी आठ हजार वर्षांपलीकडचा ठरतो; अशा प्राचीन काळीं ध्रुवसन्निध राहणाऱ्या आर्य लोकांची संस्कृति श्रेष्ठ व जुनी ठरते, आर्य जातांचें व आर्य धर्माचें मूळ इतक्या प्राचीन काळांत घुसलेलें असल्यामुळें त्याविषयींची अनुमानें स्थूलच कशीं असूं शकतात, तरी पण वेदोत्पत्ति व वेदस्वरूप यांविषयीं आपले ऋषी व आचार्य यांनीं जीं मतें प्रदर्शित केलीं आहेत तींहि खरीं कशीं ठरतात, भूगर्भशास्त्रांतील प्रलय व प्रलयोत्तर फिरून जीवसृष्टीचा उदय या गोष्टींनीं प्रलयकालीं वेद नष्ट होऊन फिरून शब्दशः नसले तरी अर्थशः पुनर्जन्म पावणें आणि याच कारणानें वेदांचें अनादित्व मानणें लक्षणेनें कसें सिद्ध होतें वगैरे गोष्टी सांगितल्या आहेत. ( लो. टिळक चरित्र पूर्वार्ध, पृ. ६३२--३५)

टिळकांच्या ग्रंथावर कित्येक यूरोपीय विद्वानांनीं अभिप्राय दिले आहेत व एक दोन महाराष्ट्रीय विद्वानांनीं टीका केली आहे. त्यांपैकीं रा. नारायण भवानराव पावगी यांची टीका विशेष महत्त्वाची आहे; कारण त्यांनीं 'आर्यावर्त हीच आर्यांची जन्मभूमि' या नांवाचें स्वतंत्र पुस्तक लिहून टिळकांच्या मताला कांहींशीं विरोधी अशी एक निराळीच उपपत्ति पुढें मांडली आहे. आर्य लोक बाहेरून म्हणजे उत्तरध्रुवाकडून दक्षिणेकडे उतरत उतरत खालीं हिंदुस्थानांत आले, म्हणजे आर्य हे बाह्य आहेत ही गोष्टच पावगी यांस मान्य नाहीं. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, आर्यवंशाचा उद्गम मूळ आर्यावर्तांतच ( भरतखंडाला ) आणि नंतर आर्य वंशाच्या कांहीं टोळ्या दिग्विजय करीत करीत उत्तर ध्रुवापर्यंत गेल्या. आर्यांची मूळ जन्मभूमि आर्यावर्तच होय हें सिद्ध करण्याकरितां आद्य मानवोत्पत्तीला आर्यावर्त ही भूमि भूशास्त्रदृष्ट्या लायक होती, अशा तऱ्हेचीं कांहीं पाश्चात्य विद्वानांचीं मतेंहि त्यांनीं आधाराकरितां आपल्या पुस्तकांत दिलीं आहेत. शिवाय अग्नीची प्रथम सिद्धता आर्यावर्तांत, प्रथममेघोदकवृष्टीचें स्थान आर्यावर्त, प्रथम प्रकाशस्थान आर्यावर्त, सोमवल्लीचें उत्पत्तिस्थान आर्यावर्त वगैरे प्रमाणें वैदिक ऋचांच्या सहाय्यानें त्यांनीं पुढें मांडलीं आहेत. परंतु प्रकाश( गा ') प्रथम आम्हांस दिसला, पहिली जलवृष्टि आर्यावर्तांत झाली इ. विधानें वैदिक ऋचांतील वाक्यें घेऊन सिद्ध करूं पाहणाऱ्या पावगी यांच्या विचाराचें विधान हेंच त्यांचें खंडण होय. मनुष्यजातीची किंवा चैतन्याची उत्पत्ति हिंदुस्थानांत झाली हें दाखविण्यासाठीं कोणत्या प्रकारचा पुरावा दिला पाहिजे याची या सात्त्विक ब्राह्मणाला कल्पनाहि नसावी असें दिसतें. आप्तवाक्यानें पृथ्वी सपाट आहे असें सिद्ध करूं पाहणाऱ्या प्राचीन व अर्वाचीन कोशाप्रमाणें मनोरंजक म्हणून पावगी यांचें "आर्यावर्तिक होम ॲन्ड आर्टिक कॉलनीज" हें पुस्तक वाचण्यास हरकत नाहीं. परागंदा झालेल्या लोकांच्या लेखांचा परिणाम राष्ट्रांतील ग्रंथांच्या अंगावर आणि आठवणीवर कसा होतो हें कळत नाहीं. उत्तरध्रुवाजवळ जाऊन वसाहत करण्याचा हेतु आणि परत येण्याचीं कारणें यांवर पावगी कांहींच सांगत नाहींत. वसाहत करण्यास जाऊन राहिल्यानंतर परत येईपर्यंत त्यांनीं भाषा व संस्कृति बदलली नसेल काय, याविषयीं पावगींनीं विचार केला नाहीं. असो.


याप्रमाणें मूलगृहकालीन संस्कृतीचें व मूल स्थानाबद्दलचें अनुमानिक ज्ञान आतांपर्यंत पुढें आलें आहे. मूलस्थानाबद्दलच्या वादाचा अद्यापि निश्चित निकाल लागला नाहीं व कदाचित तो प्रश्न यापुढेंहि बराच कालपावेतों अनिश्चितच राहील असा संभव दिसतो. तथापि या वादामध्यें पाश्चात्य विद्वानांची प्रवृत्ति मूलस्थान पश्चिमेकडे म्हणजे यूरोपांत असावें असा सिद्धान्त प्रस्थापित करण्याकडे असते तर इकडील पंडितांची प्रवृत्ति तें शक्य तितकें पूर्वेकडे हिंदुस्थानापर्यंत आणण्याकडे असते. असो. आतां यानंतरच्या संस्कृतीच्या दुसऱ्या कालखंडाकडे म्हणजे पर्शुभारतीय संस्कृतीकडे वळूं.

---

## प्रकरण ८ वें.


### पर्शुभारतीय संस्कृति.

मागील प्रकरणांत इंडोयूरोपीय ऊर्फ मूलगृहकालीन संस्कृतीबद्दल विवेचन केलें आहे. आर्यन् लोक ज्या ठिकाणीं एकत्र रहात होते त्या ठिकाणची व तत्कालीन संस्कृति कशी काय होती हें त्यावरून बरेंचसें अवगमितां येण्यासारखें आहे. कांहीं काळानें आर्यन लोकांच्या निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या प्रदेशांत परिभ्रमण करीत गेल्या. त्यांपैकीं एक शाखा कांहीं काळ सध्यां इराणच्या प्रदेशांत स्थायिक होऊन राहिली होती व या लोकांपैकींच कांहीं लोक परिभ्रमणवृत्ति आचरीत पूर्वेकडे पुढें येऊन आर्यावर्तांत वसाहत करून राहिले. हे जे आर्यावर्तांत वसाहत करून स्थायिक झालेले लोक त्यांतच आपले वेदभाषी पूर्वज होते. ते आर्यावर्तांत येण्यापूर्वी कांहीं आर्यन् पूर्वी इकडे आले होतेच त्यांच्याशीं या वेदभाषी आर्य लोकांनीं युद्धें करून त्यांस पंजाबांतून पूर्वेकडे हांकून लाविलें, आपण सरस्वतीतीरीं यज्ञयाग करून राहूं लागले व वेदांची रचना करून व यज्ञयागादिकांनीं त्यांनीं आपल्या संस्कृतीचा प्रसार भरतखंडांत केला. पण ज्यावेळीं आजच्या इराण्यांचे पूर्वज कोणत्यातरी प्रदेशांत कांहीं काळ वेदभाषी लोकांच्या पूर्वजांसह राहिले होते तेथेंहि एका विशिष्ट संस्कृतीचें संवर्धन झालें होतें त्या संस्कृतीस पर्शुभारतीय ( इंडोइरानियन ) संस्कृति व त्या काळास पर्शुभारतीय काळ असें म्हणतात.



डेल्फायचें देऊळ.

मध्यभागीं मुख्य देऊळ असून त्यामागें डाव्या बाजूस नाटकगृह व पुढील भागांत निरनिराळ्या ग्रीक संस्थानचीं उपायनगृहें आहेत. देवालयाच्या मागील देखावा पार्नासस डोंगराचा आहे.



फिडिअसनें केलेल्या ऑलिंपिअन झूसची ऊर्ध्वांगप्रतिमा.



होमर-कॅपिटॉल मधील उर्ध्वांग प्रतिमा.

उ. भा. ९२ व्या पृष्ठा समोर.





( भारतीय ) हवनीय उपकरणीं ( पारशी )



प्रार्थनेच्या पोशाखांतील पारशी.



आतेषगाह उर्फ अग्निकुंड.



सोमलता.

या संस्कृतीचें ज्ञान आपणांस पारशी धर्मग्रंथ झेंद अवेस्ता याची वेदांशीं तुलना केली असतां मिळतें. आजचे पारशी हे तत्कालीन इराणांत स्थायिक झालेल्या पर्शूंचे वंशज होत. यांची एक टोळी सुदासास साहाय्य करण्याकरितां त्याबरोबर पृथूंसहित भरतखंडांत आली होतीच. पारशी लोकांच्या धर्मग्रंथांची भाषा वैदिक भाषेशीं अगदीं निकटची दिसते. त्याप्रमाणेंच त्यांच्या यज्ञयागादि धर्मविधींतहि बरेंच साम्य आहे. सोमाचें हवन करणें हा धर्म दोघांतहि आढळतो. यामुळें वैदिक लोकांचे व पारशी लोकांचे पूर्वज एका काळीं एका ठिकाणीं रहात असावे व एकाच संस्कृतीचे असावें याबद्दल शंका रहात नाहीं.

या संस्कृतीसंबंधीं आनुमानिक माहिती आजपर्यंत बरीच उपलब्ध झालेली आहे. या अनुमानांचें मुख्य साधन म्हणजे त्यांच्या भाषेंतील शब्द हे होत. तेव्हां त्यांच्या भाषेंतील संस्कृत भाषेशीं जुळणारे जे शब्द आहेत त्यांची संस्कृत सदृश शब्द व मराठी अर्थ यांसह यादी पुढें दिली आहे तीवरून त्यांच्या संस्कृतीची बरीचशी कल्पना येईल.

याखेरीज कांहीं संशोधकांच्या संशोधनाचें फलहि पुढें दिलें आहे.

**पुराव्यांचें विविधत्व आणि त्यांची संगति लावण्यांत अडचणी.**—इंडोयूरोपीय शाखेच्या सर्व लोकांसंबंधानें कीथ यास असा एक चमत्कारिक प्रकार दिसून येतो कीं या शाखेंतील कोणत्याहि लोकांनीं स्वतःकरितां स्वतःच्या कल्पनेनें लिपी तयार केलेली नाहीं; तर इतर लोकांनीं आपल्या अकलेनें ठरविलेल्या वर्णमाला यांनीं आयत्या ग्रहण केल्या. शिवाय वरच्याहूनहि अधिक चमत्कार असा कीं, लेखनकला अवगत असलेल्या लोकांशीं या इंडो-यूरोपीयांचा प्रत्यक्ष संबंध सुरू झाल्यावरहि त्या कलेचा उपयोग करून घेण्याच्या विरुद्धच ते प्रथम असत; ही गोष्ट इराण व हिंदुस्थान या दोन देशांतच दिसून येते, असें नाहीं तर ग्रीसमध्यें सुद्धां ख्रिस्तपूर्व १८०० च्या सुमारापासून एक प्रकाराची रेषामय लिपी अस्तित्वांत असूनहि त्या देशावर स्वारी करणाऱ्या ग्रीक, आयोनियन, एकियन व डोरियन यांपैकीं कोणत्याहि लोकांनीं वरील लिपीचा ताबडतोब स्वीकार केला नाहीं; तर अखेर लिपिप्रसाराचा मान फिनिशियन लोकांनीं मिळविला आणि त्या लिपीपासूनच हल्लींची ग्रीक लिपी निघालेली आहे. इंडो-यूरोपीयांस त्यांच्या मतें कमीपणा आणणारी ही एक गोष्ट आहे व तिच्याबरोबर दुसरी कमीपणाची गोष्ट म्हणजे ऐतिहासिक स्वरूपाच्या ग्रंथांचा अभाव ही होय. या उणीवीमुळें या राष्ट्राच्या उन्नतीचा इतिहास भयंकर अज्ञानांधकारांत लोपून गेला आहे. कालगणनापद्धति शोधून काढण्याचा पहिला मान इजिप्त राष्ट्राला आहे भारतीय लिपिज्ञान पांचव्या विभागांत विवेचिलें आहे (पृ. ५१).

**ऐतिहासिक व्यक्तींच्या दंतकथांची किंमत.**—ऐतिहासिक पुरुषांसंबंधाच्या केवळ दंतकथा विश्वास ठेवण्यास किती अल्पतेनें पात्र असतात, ही गोष्ट इजिप्तच्या उदाहरणावरूनच चांगली सिद्ध झाली आहे. हिरोडोटस व मॅनेथो यांनीं इजिप्तच्या प्राचीन इतिहासासंबंधानें जी माहिती दिलेली आहे तिच्यावरून, पूर्वकालीन थोर पुरुषांसंबंधानें लोकांमध्यें हरएक प्रकारच्या केवळ तोंडी गोष्टी कशा प्रचलित होत जातात, हें चांगलें सिद्ध झालें आहे. आणि सुदैवानें मूळ अस्सल स्मारकलेख अलीकडील संशोधनांत उपलब्ध झाले म्हणून बरें झालें; नाहीं तर इजिप्तच्या इतिहासाचें आपलें ज्ञान म्हणजे एक भयंकर चुकांचा संग्रहच होणार होता. ग्रीसच्या दंतकथात्मक इतिहासांतूनहि कांहीं विश्वसनीय निश्चित माहिती कित्येक पिढ्यांतील विद्वानांनां आपली सर्व अक्कल खर्च करून काढतां आली नाहीं, याबद्दल इजिप्तच्या उदाहरणामुळें आतां फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. केवळ दंतकथांवरून निश्चित अनुमानें काढण्याची जी पद्धत आहे तिच्याविरुद्ध तात्त्विकदृष्ट्या जे आक्षेप घेण्यांत येत असतात त्या आक्षेपांनां, क्रीटबेटांत जमीनींतून खणून काढलेल्या वस्तूंवरून प्राचीनकाळीं अस्तित्वांत असलेल्या एका अनपेक्षित संस्कृतीचा शोध लागल्यामुळें, फार बळकटी येऊन दंतकथामूलक सिद्धांतावरील आक्षेपांचें खंडण करणें त्यामुळें अशक्य झालें आहे. हिंदुस्थानचे बाबतींत वरील दंतकथावलंबी अनुमानपद्धति स्वीकारणें ग्रीसपेक्षांहि अधिक धोक्याचें आहे. कारण येथील रामायणमहाकाव्य हाच सर्वांत जुना लेखी ग्रंथ होय. आणि ज्या आख्यायिकांवरून अनुमानें काढण्याचा विद्वान लोकांनीं हल्लीं उद्योग चालविला आहे. त्या आख्यायिका ग्रथित करणारे ग्रंथ म्हणजे महाकाव्यें व पुराणें हे अलीकडील असून त्यांचा काल अद्याप अनिश्चित आहे. शिवाय ती अनुमानपद्धति अग्राह्य असल्याचें आतां ठरलें आहे. मात्र सुदैवानें वरील विचार हिंदुस्थानचे बाबतींत फारसे महत्त्वाचे नाहींत, कारण त्यांनीं वेदकालीन धार्मिक वाङ्मयाचा बिनचुक पौर्वापर्य विषयक कालनिर्णय करण्याचे कामाला कोणत्याहि प्रकारें बाध येऊं शकत नाहीं. पण हिंदुस्थानचे बाबतींत मात्र पार्शी दंतकथांवर अयोग्य विश्वास ठेवल्यामुळें अनंत घोटाळा व अडचणी उत्पन्न झाल्या आहेत.

दंतकथात्मक माहितींतील दोषांचें ग्रीसचे बाबतींत कांहींसें दूरीकरण करतां आलें आहे. त्या दूरीकरणाचें साधन असें कीं, इजिप्तला धरून जे समानकालोल्लेख आले आहेत त्यांचा पडताळा इजिप्तमध्यें सांपडलेल्या स्मारकलेखांशीं पाहून दंतकथांतील सत्य व कालनिर्णय हीं निश्चित करावयाचीं आणि दुसरें साधन म्हणजे इंडोयूरोपीय लोकांच्या प्राचीन इतिहासासंबंधानें गेल्या थोड्या वर्षांत जो पुरावा जमला आहे त्याशीं संगति लावावयाची. तथापि दुर्दैवानें या पुराव्याची नक्की योग्यता ठरविण्याचें काम विशेष अवघड आहे. कारण हा पुरावा म्हणजे नॉन-इंडोयूरोपीय लोकांच्या

लेखसंग्रहांत देवतांचीं व मानवांचीं आढळणारीं नांवें घेऊन या नांवांशीं इंडोयूरोपीय नांवांचा संबंध आहे किंवा दुसऱ्या कोणत्या शाखेंतील लोकांच्या दैवतादींच्या नांवांशीं संबंध आहे हें पहावयाचें आहे. एका भाषेंतील नांवें दुसऱ्या परक्या भाषेंत घेतलीं गेल्यास त्यांत निःसंशय बराच फरक होत असतो, तरीहि साधारण विद्वानाला आपल्या हुषारीनें कल्पनाशक्तीच्या जोरावर अशा नांवांचा आपल्या पूर्वकल्पित भाषाविषयक सिद्धांतांनां परिपोषक असा परस्पर व्युत्पत्तिसंबंध जोडून देणें फारसें कठिण जात नाहीं. या म्हणण्याला खात्रीलायक आधार म्हणजे हिरोडोटसनें उल्लेखिलेल्या सिथ लोकांच्या भाषेसंबंधानें माजलेला प्रसिद्ध वाद हा होय. त्या भाषेंतील देवतांचीं व मानवांचीं नांवें इराणी आहेत असें कांहीं विद्वानांनां निश्चित सिद्ध झालेसें वाटतें तर कांहीं विद्वान त्यांचा फिनोउग्रियन भाषेशीं संबंध दाखवूं पहात आहेत, आणि तिसरा एक पक्ष मिश्र जातीच्या लोकांच्या भाषेशीं संबंध लावीत आहे. आणि या वादांत आणखी अडचण अशी आहे कीं, ज्या भाषेंतील नांवांबद्दल हा वाद चालू आहे ती भाषाहि कोणास चांगली अवगत नाहीं. कारण हिटाइट लिपीवरील वाद चालूच आहे. कांहीं कसाइट राजांचीं नांवें व कसाइट शब्दांस बाबिलोनियन प्रतिशब्द देणारी एक जंत्री एवढाच काय तो अद्यापपर्यंत ह्या बाबतींत पुढें आलेला अति प्राचीन पुरावा होय. बूर्नबूरियश व नझिबुगश या राजांच्या दोन नांवांत फर्न व बग हीं इराणी रूपें मूळस्वरूपांत दिसतात. परंतु त्यापासून निश्चित कांहींच अनुमान होत नाहीं. सूरिअस् या इराणी नांवाचा देखील असाच घोटाळा उडाला आहे. कारण ह्याचा सूर्य असा अर्थ करण्यांत येतो व इ. मेयर यानें तर चुकीनें ह्या शब्दाचा वैदिक 'सूर्यः' या देवतेशीं संबंध जोडला आहे. परंतु प्रथमेचा 'स्' हा एकवचनी प्रत्यय इराणी 'सूरिअस' ह्या शब्दांत आला ह्या एका गोष्टीशिवाय इतर खात्रीलायक पुरावा पुढें येत नसल्यामुळें ह्या दोन शब्दांतील ऐक्य प्रस्थापित करणें चुकीचें आहे. परंतु इतर कसाइट शब्दांबद्दलचें शेफ्टेलोविट्झ याचें मत जर गृहीत धरलें तर अशा प्रकारचा पुरावा उपलब्ध होईल; परंतु इं. मेयर यांचेंहि मत ही गोष्ट अशक्य असल्याबद्दल झालें आहे. तथापि इ. स. पू. १७६० पासून बाबिलोनवर राज्य करीत असलेल्या कसाइट वंशाच्या ऐतिहासिक कागदपत्रांतून घोड्याचे पुष्कळ उल्लेख येतात व 'पर्वतांतील रासभ' हें त्याचें केलेलें वर्णन त्याची जन्मभूमि दाखवितें. ही गोष्ट ई. मेयर यानें आर्यन् संस्कृतीचा परिणाम म्हणून गृहीत धरली आहे. परंतु या प्रमाणांत कांहींच महत्त्व नाहीं. कारण हमूरबी ह्याच्या जरी नव्हे तरी त्याच्या मुलाच्या कारकीर्दींत म्हणजे इ. स. पू. २००० पूर्वींच 'घोडा' बाबिलोनियांत आणला गेला. त्याचप्रमाणें हमुरबीच्या घराण्यांतील शेवटच्या राजाच्या पूर्वी होऊन गेलेल्या राजाच्या कारकीर्दींत उल्लेखलेले गुटिअम व सुबर्ति येथून आलेले गौरकाय गुलाम आर्य लोकांपैकीं होते हें मत व पहिल्या कसाइट राजानें बाबिलोनिया हस्तगत करून घेतल्याबद्दल ब्रुन्होफर यास ऋग्वेदांत कल्पनास्वैरतेनें आढळलेला उल्लेख इत्यादि अनुमानांनां थोडी देखील किंमत देणें योग्य नाहीं.

उत्तरमेसापोटेमियांतील मिटनी यांच्या कागदपत्रांवरून मिळणारा पुरावा मात्र बराच महत्त्वाचा आहे. कारण मिटनी लोकांचा व हिटाइट व कदाचित् कसाइट ह्या लोकांचा देखील अत्यंत निकटचा संबंध असल्याबद्दल जवळ जवळ ठरल्यासारखेंच आहे निदान ते लोक इंडोयूरोपीय खास नव्हते. परंतु इ. स. पू. १३८० च्या नंतर थोड्याच काळांत सुब्बिलुलिउमा ह्या हिटाइट राजाशीं झालेल्या तहांत मत्तिउझ यानें मित्र, वरुण, इंद्र, नासत्या; या बऱ्हंशीं वैदिक देवता सदृश असलेल्या देवतांची स्तुति केली आहे. ह्यांतच आणखी एका गोष्टीची भर पडते, ती गोष्ट म्हणजे इजिप्तचा (इ.स.१४१४-१३३९) राजा तिसरा ॲमेन्होटेप ह्याचा मेहुणा मिटनी राजा दुश्रत, त्याचा भाऊ अर्तसुमर, त्याचा बाप सुतर्ण व त्याचा आजा अर्ततामं ह्या सर्वांच्या नांवांत एक प्रकारचा इराणी स्वर ऐकूं येतो, इतकेंच नव्हे तर मिटनांची राज्यकन्या तिसऱ्या ॲमेन्होटेपची स्त्री तय्या हिच्या शरीराच्या ठेवणीतहि श्रद्धामय अंतःकरणास आर्यन् तऱ्हा दिसून येते. ह्यापेक्षां जास्त महत्त्वाची अशी एक सूचना विंक्लरनें केली आहे ती ही कीं मिटनी बद्दल योजलेलें ' हरी ' हें नांव निःसंशय आर्यन् आहे व त्याला पुराव्यादाखल म्हणून त्यानें असें दाखविलें आहे कीं दरायसच्या शिलालेखांच्या सुसामध्यें केलेल्या परिवर्तनांत त्या राजानें धारण केलेल्या आर्य नांवाचे उल्लेख आहेत. त्याचप्रमाणें विंक्लर यानें मिटनीमधील शूर वीरांनां लावण्यांत येणाऱ्या 'मरियानि ' या संज्ञेंत देखील वैदिक शूरवाचक ' मर्य' शब्द प्रतीत होतो. परंतु यावरून जुन्या करारातील सृष्ट्युत्पत्तिवर्णनात्मक पहिल्या पुस्तकांत वर्णन केलेल्या होराइट लोकांचा, केवळ त्यांच्या राजांचीं नांवें सेमिटिक होतीं एवढ्याच एका कारणावरून, ह्या ठिकाणी संबंध जोडणें ही सूचना मात्र ग्रहणीय नाहीं. तरी पण इ. सनापूर्वी १४०० च्या थोड्या पूर्वी व थोड्या नंतर झालेल्या अमार्नो लेखांत असें दिसतें कीं, सुवर्दत, जस्दत, अर्तमन्य, ऋष्मन्य-अर्झवीय, बिरिदीय अथवा बिरिद्श्य, नम्यवझ, तेउवट्टी, सुबंधि आणि सुतर्ण ह्या सीरियाच्या राजांच्या नांवापैकीं सर्व जरी नाहीं तरी पुष्कळशीं नांवें आर्य लोकांचीं आहेत. इ. स. पूर्वी ८५४ व ७४० च्या सुमारास उल्लेखिलेलीं कुंडस्पी व कुस्टस्पी, त्याचप्रमाणें विंदास्प आणि विस्ताष्प हीं कोमगेनच्या राजांचीं नांवें मात्र इराणी नमुन्याचीं आहेत. इ. सनापूर्वी च्या ८३८ सालापासून पुढें मांड लोकांत व असुरियन् लोकांत लढायांबद्दल उल्लेख

आढळतात, व इ. सनापूर्वी ७४० च्या सुमारास 'मझ्दक' हें नांव आलें असून त्याचा अर्थ मझ्द या देवतेचा पूजक असा असून, असुरबनिपाल (इ. स. पूर्वी ६६८–६२६) याच्या लेखांत हाच शब्द असुर मझास् या जुन्या स्वरूपांत आढळतो.

**पर्शुभारतीयांच्या आगमनमार्गाविषयीं अनुमानें.**— ह्या सर्व पुराव्यावरून ऐतिहासिक अनुमानें कोणतीं काढतां येतील ? प्रथम हें नीट लक्षांत घेतलें पाहिजे कीं, उत्तर मेसापोटेमियांत किंवा सीरियांत एखाद्या आर्य जातीचें अस्तित्व असल्याबद्दल कोणत्याहि प्रकारचा पुरावा उपलब्ध नाहीं, व केवळ आर्य नांवाच्या राजाचें अस्तित्व हें कांहीं मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्थलांतराचा पुरावा नाहीं, इतकेंच नव्हे तर आशिखंडांतील इतिहासांतल्या प्रमाणें यूरोपीय इतिहासांतहि अशा प्रकारचे लुटारू व धाडसी लोक असल्याबद्दल कल्पना सहज होते.शिवाय दुसरी गोष्ट म्हणजे ह्या इतिहासांत एकदम आर्य नांवें दृष्टीस पडतात ह्या गोष्टीवरून देखील आर्यांचें या भागांत आगमन अगदीं अर्वाचीन कालीं झालें असावें अशी कल्पना होते. ह्यानंतर असा प्रश्न उद्भवतो कीं, आर्यांनीं ह्या देशांत कोणत्या बाजूनें प्रवेश केला, ते समुद्रमार्गानें आले असतील ही कल्पना तर असंभवनीय आहे. मेरेन्प्टः व तिसरा रामेसीस यांच्या कारकीर्दींत म्हणजे इ. सनापूर्वी १२२९ पासून पुढें सीरियन् किनाऱ्यावर, तेराव्या शतकांत झालेल्या अनेक राष्ट्रांच्या स्थलांतर करण्याच्या चळवळींत, पुष्कळ परकीय धाडसी जातींनीं लुटालूट व वसाहत केल्याचें त्या वेळच्या कागदपत्रांत नमूद केलेलें आहे, व फिलिस्टाइन लोक हे थोड्या अंशानें आर्यच असावेत ही गोष्ट बरीच संभवनीय आहे. परंतु ही गोष्ट फार प्राचीन कालीं घडून आली असती तर अमर्ना लेखांत उल्लेख आल्याशिवाय राहता ना. खुष्कीच्या मार्गाविषयीं विचार करतां, एशियामायनरमधील मार्ग साहजिकपणेंच सुचतो व दुसऱ्या ट्रॉय शहराची स्थापना फ्रीजियन लोकांनीं केली हें क्रेश्मेरचें मत स्वीकारलें तर वरील सूचनेसच जोर मिळतो. परंतु हें मत असंभवनीय दिसतें, कारण एशियामायनरचा इतिहासच पूर्णपणें ज्ञात नाहीं, तरी देखील एवढें निश्चित ठरलें आहे कीं, आर्यांचा पहिला महत्त्वाचा विस्तार, सीरियन किनाऱ्यावर वसाहती करणाऱ्या लोकांच्या स्थलांतरामुळें झाला-व फ्रीजियन व इतर लोकांनीं पश्चिम एशियामायनर प्रांतांत प्रवेश केला तो इ. स. पूर्वी १४०० नंतर होय.

तिसरें एक संभवनीय मत असें आहे व ह्यासच जर्मन विद्वान हर्ट यानें मान्यता दर्शविली आहे तें हें कीं, इन्डोयूरोपीय लोकांचें मूलगृह यूरोप खंडांतच किंबहुना उत्तर जर्मनींत असावें व इन्डोइराणी लोक हे कॉकेशस पर्वताच्या बाजूनें आपल्या भविष्यत्कालीन निवासभूमींत शिरले असावेत. परंतु ह्या उपपत्तिविरुद्ध एक मोठा आक्षेप आहे व तो हर्ट यास देखील निवारण करतां आला नाहीं. कारण वरील उपपत्ति ग्राह्य धरली तर आर्मेनिया प्रांतांत आर्यलोकांच्या जाती राहिल्याबद्दलच्या प्राचीन खुणा आहेत असें आपणांस दाखवितां आलें पाहिजे, परंत वास्तविक प्रकार फारच निराळा आहे. उलट आर्मेनियांत एका जातीच्या साहसप्रिय अशा अनार्य लोकांची वस्ती दिसून येते, व ह्याच लोकांनीं व्हानचें राज्य मोठ्या चतुराईनें स्थापन करून असुरियाबरोबर दोन शतकें तंटा करून विजय मिळवला. फ्रीजियन लोकांशीं अत्यंत निकट संबंध असलेले इण्डोयूरोपीय आर्मेनिअन लोक यांचा प्रवेश इ. स. पूर्वी ७०० च्या पलीकडील काळांत झालेला नाहीं. जे ओसेट लोक पश्चिमेकडून आलेल्या इन्डोइराणी लोकांचे अवशेष समजले जात असत, ते निःसंशय पूर्वेकडून आलेले मागाहूनचे अलनी जातीचे इराणी लुटारू होत हें निश्चित झालें आहे. दुसऱ्या उपलब्ध अशा कसल्याहि विचारपद्धतींनें हर्टच्या मतावरील हा आक्षेप दूर होण्यासारखा नाहीं. हिंदुस्थानावर प्राचीन बाबिलोनियन संस्कृतीचे परिणाम झाले आहेत असें जरी ठरवितां आलें तरी त्यावरून इन्डो इराणी लोक हे आपल्या भविष्यकालीन गृहस्थानात कास्पियन समुद्राच्या दक्षिणेकडील बाजूनें घुसले ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. कारण अशा रीतीनें बाबिलोनियन सुधारणेनें कोठवर प्रवास केला हें अंतर अजमावणें अशक्य आहे. कोणत्याहि बाजूनें विचार करतां अशा सांस्कृतिक परिणामावरून सिद्धांत ठरविणें सदोष आहे. ऋग्वेदातील एकट्या 'मना' ह्या शब्दास बाबिलोनियन मिना हा प्रतिशब्द म्हणून वारंवार देण्यांत येतो, परंतु परकीयाकडून घेतलेला हा मूल्यवान् शब्द पुढें कोठेंच दिसत नाहीं ह्या गोष्टीबद्दल कोणी कांहींच पुरावा आणलेला नाहीं; त्याचप्रमाणें 'कुऱ्हाड' अर्थ असलेल्या 'परशु', शब्दाची सुमेरियन 'बलग' ह्याशीं व ॲकेडियन 'पिलक्कु, ह्याशीं; व संस्कृत 'लोह' ह्या शब्दाची सुमेरियन 'उरुडु, शब्दाशीं नेहमीं तुलना केली जाते,परंतु वस्तुतः त्याचें ऐक्य जरी गृहीत धरलें तरी त्यावरून कांहींच निष्पत्ति होत नाहीं, कारण हे शब्द मूळचे कोणत्या भाषेंतील असावेत हें दाखविण्यास बिलकुल पुरावा नाहीं, इतकेंच नव्हे तर कदाचित् एखाद्या तिसऱ्या अशा अज्ञात भाषेंतूनहि वरील शब्द घेतलेले असणें संभवनीय आहे. हिंदुस्थानांतील सात आदित्य देवांची कल्पना ही कोणातरी सात ग्रहांची पूजा करणाऱ्या अशा-लोकांपासून घेतलेली असून तीमुळें भारतीय धर्मांत भासत असलेली नैतिक पावित्र्याची उणीव भरून काढली गेली ही ओल्डेनबर्गची प्रसिद्ध उपपत्ति देखील विचारणीयच आहे. वरील उपपत्ति योग्य ठरण्यास बाबिलोनियामध्यें इतक्या प्राचीन कालीं सात ग्रहांची पूजा लोकांत प्रचलित होती हें सिद्ध होत नसल्यामुळें वरील उपपत्ति त्याज्यच आहे. त्याचप्रमाणें वैदिक असुर शब्दापासून इराणी अश्शुर शब्द तयार झाला कीं अश्शुरापासून असुर झाला ह्याबद्दल

कांहींच निश्चित नाहीं. कारण वरील शब्दांतील कल्पनांच्या स्वभावधर्मांत ऐक्य नाहीं इतकेंच नव्हे तर त्यांतील शब्द-सादृश्य हें देखील अत्यंत दूरचें आहे. वस्तुतः इन्डोइराणी " अस्सुर" हा शब्द " असु" ह्या पासून साधलेला असून अश्शुर याचें प्राथमिक स्वरूप " असिर , असावें हें दिसून येतें आणि पॅलेस्टाइन प्रांतांत ' असेर ' हें एक स्थाननाम आहे, आणि अॅमोराइट लोकांत पवित्र खांबांस व त्यांत राहाणाऱ्या देवतेस ' असेर, ही संज्ञा आहे. त्याचप्रमाणें वैदिक काळच्या ३६० दिवसांच्या वर्षमानपद्धती आणि ' सात , या संख्येचें पावित्र्य ह्या गोष्टींचा उलगडा होण्याकरितां बॉबलोनियाकडेच धांव घेण्याची जरूर नाहीं. ह्याप्रमाणें सर्व बाजूंनीं विचार केल्यावर उघडपणें पुढील अनुमानच शिल्लक राहतें तें हें कीं मिटनी व सीरिया यांतील आर्य लोकांनीं ह्या प्रदेशांत पूर्वेकडील बाजूनें प्रवेश केला व बाबिलोनियांतील कसाइट राजघराणें नष्ट होऊन चोहोंकडे गडबड व गोंधळ माजल्यामुळें आर्यांच्या विस्तारास जास्त मदत झाली. अशाप्रकारचें अगदीं सरळ व समाधानकारक मत स्वीकारलें तरी देखील मिटनीच्या राजांचे देव व आर्य नांवें ह्यांची उपपत्ति कशाप्रकारें लावावयाची हा प्रश्न पुनः शिल्लक राहतोच. हे देव व हीं नांवें हिंदुस्थानी आहेत कीं इराणी आहेत, कीं हिंदू व इराणी भिन्न होण्यापूर्वीच्या कालांतील आहेत? इराणांत दिसून येणारी ' नासत्या ' ही देवता, व मिटनी राजांच्या नांवांतील ' अर्त ' ह्यावरून पंडित याकोबी यानें असा निष्कर्ष काढला आहे कीं हे देव मूळचे भारतीय असून ते पूर्वेकडील एखाद्या इराणी टोळीनें इराणांत आणले असावेत. जे. होप मोल्टन् यानें या मताचा स्वीकार करून असें म्हटलें आहे कीं कांहीं आर्य टोळ्या हिंदुस्थानच्या राहणीवर असंतुष्ट होऊन पुनः परत दिशेमें प्रदेश आक्रमूं लागल्यामुळें वरील आर्य नांवें व देवता त्यांजबरोबर इराणांत आणलीं गेलीं, व ह्याच मतास पुष्टि देण्याकरितां त्यानें अशी उपपत्ति स्वीकारली कीं इराणी " तिस्त्र्य यस्त् " ह्या ग्रंथामधील वर्णन केलेली परिस्थिति प्रत्यक्ष हिंदुस्थानांतील राहणीवरून इ. स. पू. १८००–९०० च्या सुमारास नमूद केली असावी. परंतु हा मुद्दा दोषयुक्त असून वरील उपपत्ति तर अगदींच असंभवनीय आहे. यावरून ओल्डेन्बर्गचें मतच ग्राह्य ठरतें तें हें कीं, ह्या मूळ आद्य–इराणी देवताच असाव्यात. कारण इराणी ग्रंथांत इंद्र व नासत्या ह्यास इंद्र व नाओन्हइथ्या ह्या नांवाचे दैत्य मानलें आहे; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतच अग्निपूजनाच्या प्रगल्भावस्थेंतील अग्नि ही देवता व तिचा इराणांत अभाव असणें ही गोष्ट देखील वरील मतासच पुष्टि देते.

याच्या अगदीं उलट इ. मेयर याचें असें मत आहे कीं, हे देव इराणी नसून भारतीय होत व भारतीय आणि इराणी सादृश्यावरून कल्पनेनें पुनर्घटना करतां येणाऱ्या त्या पूर्वीच्या आर्यकालाचें यथार्थ दिग्दर्शन ह्या देवता करीत असल्यामुळें त्यांचीं नांवें हें एक ह्या मतास अनुकूल असें प्रमाणच आहे. ह्या इ. मेयरच्या मतांत पंडित याकोबी यानें असंबद्धतेचा दोष दाखविला आहे. परंतु जरी त्यानें आपलें मत सुस्पष्ट शब्दांत दिलेलें नाहीं तरी त्यांतील खरा अर्थ उघड आहे; ज्या कालीं आर्य लोक एकत्र असे सोमलता उगवणाऱ्या प्रदेशांत, म्हणजे बहुतकरून बॅक्ट्रिया व पश्चिम हिंदूकुशकडे रहात होते तो काल इ. सनापूर्वी १४०० वर्षांपर्यंत टिकला नाहीं, कारण हिंदुस्थानावरील आर्यलोकांच्या दिग्विजयाचा काल इ. स. पूर्वी १५०० च्या नंतर आणतांच येत नाहीं. हिंदुस्थानांत व इराणांत विस्तार पावलेल्या आर्य लोकांचा परस्पर संबंध एकदमच तुटला असेल असें म्हणतां येत नाहीं. तर हा संबंध एकत्र राहणीच्या वेळेपासून कालांतरानें हळू हळू कमी होतां होतां इराणांत झोरोआस्टरच्या कालांत ह्या परस्परसंबंधाचा शेवटचा धागा तुटला. आर्यांचे भारतीय व इराणी असे विभाग पडण्याचें मूळ कारण झोरोआस्टरच्या चळवळीमुळें धार्मिक बाबतींत पडलेला मतभेद होय. ह्या जुन्या सूचनेबद्दल दुसरी एक कल्पना स्वीकारली पाहिजे ती अशी कीं, आर्यन् लोकांच्या एकत्रित राहणींतच धार्मिक बाबतींतील दृष्टिकोण बदलत जाऊन, देश, काल, व परिस्थिति यास अनुसरून त्यामध्यें महत्त्वाचे फेरबदल घडून आले. ह्यावरून मिटनीच्या देवता आर्यन् लोकांच्या आहेत. व ती भाषाहि ज्याअर्थी वैदिक किंवा इराणी भाषेपासून भिन्न दिसते त्या अर्थी ती आर्यलोकांचीच बोलण्याची भाषा आहे हें म्हणणेंच जास्त सयुक्तिक दिसेल. कारण ' नासत्या' यांतील वर्णांत ' स ' हें अक्षर ठेवणें हें इराणीशीं विसदृश असून 'ऋत' ह्या ऐवजीं 'अर्त ' हा शब्द घालणें वैदिक संस्कृतशीं विसदृश आहे—तरीपण ह्यांतील दुसरें अनुमान विशेष जोरदार नाहीं; कारण मिटनी लिपींत 'ऋत' हा शब्द जसाच्या तसाच लिहिणें अशक्य होतें. उदाहरणार्थ सुवर्दत हा स्पष्टपणें 'सुवर्दत्त' ह्या संस्कृत शब्दाचें रुपांतर म्हणतां येईल. त्याचप्रमाणें बाह्य स्वरूपावरून दिसतें त्यापेक्षां प्राचीन कालांत घेतलेली इराणी ' अस्सुर मझाश' ही देखील आर्य संज्ञाच आहे हें सहज दाखवितां येईल. खरोखर मूळ शब्दाचें हें स्वरूप ध्वनिदृष्ट्या बरोबर नाहीं. तरीपण त्यांत 'स' हा शिल्लक आहे व 'झ' हा वर्ण स्पष्ट आर्यन् आहे, व त्यावरून असें म्हणण्यास बिलकूल हरकत नाहीं कीं, ज्यांतून हा शब्द घेतला ती भाषा इराणी किंवा वैदिक ह्यांपेक्षांही प्राचीन असली पाहिजे. ह्यावरून अर्थातच असें खात्रीलायक म्हणतां येणार नाहीं कीं ज्या भाषेंतून हीं नांवें आलीं ती इराणी किंवा वैदिक भाषेची जननी होय. फक्त ती पश्चिमेकडील आर्यांची प्राचीन व्यावहारीक भाषा होती. एवढेंच म्हणतां येईल.

**मूलगृहविषयक प्रश्नाची अधिक चर्चा.**— ह्या सर्व विवेचनाची किंमत, मुख्यतः इन्डोयूरोपीयांच्या

उगमस्थानाविषयीं बराच काळपर्यंत माजून राहिलेल्या रणावर नवीन प्रकाश पाडून हा प्रश्न सुटण्यावर अवलंबून आहे. एकंदर पुराव्यावरून असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं आर्य इराणांत ईशान्य दिशेनें शिरले. व एकंदर इतिहासांतील, इराणी टोळ्यांनीं केलेल्या चळवळीच्या सर्वसाधारण परंपरेशीं वरील कल्पना बरोबर जुळते. प्रथम इन्डोइराणी यूरोपमधून इकडे आले ही कल्पना अद्याप स्वीकारतां येण्यासारखी आहे, व जर्मन आणि संस्कृत ह्या भाषांतील कांहीं गोष्टींतील सादृश्यावरून मोल्टन यानें अशी कल्पना बसविली आहे कीं मूळ इराणी लोक ह्यांनीं प्रथम यूरोपांतून स्थलांतर केलें व ह्यानंतर अतिशय झपाट्यानें कांहीं जर्मन टोळ्यांनीं स्थलांतर करून आपली भाषा वरील इराणी लोकांवर लादून हिंदुस्थानांत गमन केलें, व इराणमध्यें राहिलेल्या जातभाईंस इराणी लोकांत मिसळण्यास सवड दिली. परंतु हें अनुमान निराधार आहे; कारण सर्व इन्डोयूरोपीय भाषांमध्यें कांहीं विशिष्ट सारख्या गोष्टी आहेत, ह्यावरून जातिसंकर व स्थलांतर सिद्ध करूं पाहणें अशक्य आहे.

शिवाय टोकेरिअन भाषेच्या शोधामुळें इन्डोयूरोपियांची मूल उत्पत्ति आशियांतच असल्याबद्दलच्या कल्पनेस वास्तव जोर मिळाला आहे. फिस्ट या विद्वानानें केलें त्याप्रमाणें या पुराव्यास फाजील महत्त्व देण्याचें कारण नाहीं. गॉल लोकांच्या परिभ्रमणाविषयीं विचार केला असतां टोकेरियन भाषा यूरोपमधून आशियाखंडांत झालेलें स्थलांतर दर्शवीत नाहींत, असें म्हणणें अशास्त्रीय ठरेल. परंतु पूर्वेकडून पश्चिमेकडे अशा प्रकारची हालचाल होण्याचा जितका जास्त संभव आहे, तितका यूरोपमधून आशियाखंडांत होणें संभवनीय नाहीं, व ज्या अर्थी दक्षिण रशियाचा इन्डोयूरोपीयांचें मूलगृह होण्याचा मान फक्त तो वाटेवरचें तात्पुरतें स्थान आहे या एका गोष्टीमुळें नाहींसा होतो त्या अर्थी जर्मन लोकांकडून ध्वनिदृष्ट्या इन्डोयूरोपीय भाषेस अत्यंत निराळें वळण लागलें आहे या एका गोष्टीमुळें जर्मनीचा तशाच प्रकारचा इन्डोयूरोपीयांचें मूलस्थान होण्याचा हक्कहि नाशाबीत होतो. कारण जर्मनीमध्यें कांहीं थोड्या लोकांनीं आपली इन्डोयूरोपीय भाषा तेथील पूर्वींच्या रहिवाशांवर लादली ह्या उपपत्तीनें वरील गोष्टींचा कार्यकारणसंबंध उत्तम तऱ्हेनें दाखवितां येईल. कंठ्य वर्णाविषयींच्या व्यवस्थेंत व 'ए.' खेरीज 'ई' व 'ओ' हे स्वर ठेवण्यांत टोकेरियन भाषा यूरोपांतील सेंटम भाषेजवळजवळ आहे ही एकच गोष्ट इन्डोयूरोपीयांचें मूलगृह मागाहूनच्या पश्चिमेकडील लुटारू मंगोलियनांचें उगमस्थान असलेल्या मध्यआशियाच्या सपाट प्रदेशांत असल्याचें दर्शविते. सेंटम भाषा बोलणाऱ्या लोकांचा जो थोडा भाग मागें शिल्लक राहिला त्याची भाषा टोकेरिअन असावी, व सातेम भाषा बोलणाऱ्यांपैकीं कांहीं लोक, अरल पर्वताच्या उत्तर दिशेनें कास्पिअन समुद्राच्या बाजूनें पश्चिमेकडे स्थलांतर करून गेले होते, आणि आर्य हे वायव्य दिशेनें पसरत होते, व त्याच वेळीं स्कोलोटी व सीथिअन यांसारख्या रानटी जाती पूर्वीच्या लोकांनीं मळलेल्या मार्गांनींच सरकत होत्या. ई. मेयरनें हीच कल्पना स्वीकारली आहे आणि जरी ही कल्पना, किंवा दक्षिण रशियांतील इ. स. पूर्वी २५००-२००० च्या सुमाराची ट्रिपोल्जे संस्कृति ही इंडोयूरोपीय लोक पश्चिमेकडे भ्रमण करूं लागल्याची निदर्शक आहे ही दुसरी कल्पना ह्या दोन्हीहि कल्पनांस शक्यतेपेक्षां जास्त किंमत नाहीं; तरी या कल्पनांचा भाषाशास्त्रेतिहासांतील बरेचसे अवघड प्रश्न सोडविण्यास उपयोग करतां येईल. शिवाय वरील विवरणानें प्राचीन इंडोयूरोपीय व इतर रानटी जाती व मंगोल लोक यांच्यांतील निकट सादृश्याचीहि नीट उपपत्ति लावतां येते; कारण व्यावहारिक चालीरीती, धर्मसमजुती व प्रेतविधि इत्यादि गोष्टींतील परिस्थितींचें सादृश्य सारखेच परिणाम घडवून आणील.

ह्यावरून असें म्हणतां येणार नाहीं कीं, इंडोयूरोपीय लोकांनीं निर्मानुष प्रदेशांत प्रवेश केले. कारण इंडोयूरोपीय भाषांतील महत्त्वाचे भेद व त्या लोकांचे स्वभावधर्म वरील गोष्टींविरुद्ध पुरावा देत असून मानववंशशास्त्रांतील व ऐतिहासिक पुराव्याशीं जुळते आहेत. टोकेरियन भाषेंत इंडोयूरोपीय संस्कारांनीं आत्मसात् केलेल्या एखाद्या प्राचीन भाषेचे अवशेष आढळणें असंभवनीय नाहीं. टोकेरियन भाषेंत 'अस्सल' हा एक युग्मदर्शक प्रत्यय आढळतो व मिटनी कागदपत्रांत मित्र, वरुण इत्यादि देवतांस जोडलेल्या 'अश्शिल' या प्रत्ययाशीं त्याचें फारच चमत्कारिक साम्य आहे. त्यांतील रहस्य कांहीं असो, एवढें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, इंडोयूरोपीय ऐक्याचा काल इ. स. पू. ३००० वर्षांपलीकडे नेण्याची जरुरी नाहीं व पृथ्वीवरील मानवजातीच्या इतिहासांत हा काल फारच मागाहूनचा आहे [ भांडारकर स्मृति ग्रंथ–कीथ यांचा लेख ].

**अवेस्ता उर्फ पारशांचा धर्मग्रंथ.**—अवेस्ता किंवा झेंद अवेस्ता हा ग्रंथ म्हणजे झरथुश्त्रानें प्रवर्तित केलेल्या धर्माचें बायबल व प्रार्थनापुस्तक होय. आज ह्यालाच पारशी उर्फ अग्निपूजक पवित्र ग्रंथ म्हणून मानतात. अवेस्ता हा शब्द 'अविस्ताक–ज्ञान, ज्ञान देणारें पुस्तक' या पहलवी भाषेंतल्या शब्दावरून बनलेला आहे. पवित्रग्रंथ, धर्म( कायदा ) ग्रंथ असा त्याचा खरा अर्थ असावा. झेंद–अवेस्ता हें नांव मात्र बरोबर नाहीं. पहलवी भाषेंत 'अविस्ताक वा झेंद,' 'अवेस्ता व झेंद' म्हणजे धर्मग्रंथ व टीका असा मूळ शब्दप्रयोग आहे.

अवेस्ताला धर्मग्रंथ मानणारे म्हणजे झरथुश्त्री धर्माचे पारशी लोक हल्लीं हिंदुस्थानांत सुमारें ८०००व इराणांत १०,००० पर्यंत आहेत. परंतु अवेस्ता ग्रंथाचें ऐतिहासिक महत्त्व फार आहे. कारण त्यांत इराणांतील फार प्राचीन काळच्या लोकांच्या धार्मिक समजुती व चालीरीती संगृहीत केलेल्या आहेत.

भारतीयांनां जें वेदांचें महत्त्व तेंच पारशांनां अवेस्ताचें आहे. कारण त्यांच्या साह्याय्यानें पारशांचें प्राचीनत्व व त्यांच्या संस्कृतीचें उन्नतत्व सिद्ध होणारें आहे. मानव जातीच्या प्राचीन इतिहासांतहि त्याचें फार महत्त्व आहे, कारण बुद्ध-पूर्व इतिहासांतील पर्शु-भारतीय काळावर म्हणजे वैदिक आर्यांच्या भारत-प्रवेशापूर्वीच्या काळावर प्रकाश पाडण्यास त्याची मदत होणार आहे. म्हणून त्याची माहिती थोडक्यांत येथें देतों.

**अवेस्तामधील विषय व त्या विषयांची मांडणी.**— अवेस्ता हा एका काळच्या मोठ्या वाङ्मयाचा केवळ अवशेष होय. त्याची त्रोटक प्रकरणेंच आजपर्यंत चालत आलेली आहेत. एकाहि हस्तलिखितांत आज उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ एके-ठिकाणीं सांपडले नाहींत. म्हणून ते निरनिराळ्या संग्रहांतून घेतले आहेत. विद्यमान अवेस्ताचे खालीं लिहिल्याप्रमाणें सहा भाग करितां येतील. ते असेः—

१ यस्न यांत गाथांचा अंतर्भाव केला असावा. २ विस्पेरेद. ३ यस्तष्त. ४ न्याइशे गाह वगैरे अप्रधान ग्रंथ. ५ वेन्दीदाद. ६ हादोख्तनस्क वगैरेंतील त्रुटित भाग.

पहिल्या पांच भागांचे दोन गट मानतात. पहिल्या गटांत वेन्दीदाद, विस्पेरेद व यस्न येतात. यांचा उपयोग पूजाप्रसंगीं केला जात असल्यामुळें पहिल्यापासून पूजाविषयक म्हणून यांचा निराळा गट मानला आहे व यालाच मुख्य अवेस्ता म्हणतात. ह्या तीन ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती दोन तऱ्हेच्या उपलब्ध आहेत. कांहींत पल्हवी भाषान्तर आहे व कांहींत नाहीं. जेथें जेथें हे तीन ग्रंथ निरनिराळे सांपडतात. तेथें त्यांचें बहुधा पल्हवी भाषेंत भाषांतर दिलें आहे. परंतु ह्या तीन ग्रंथांचा, एक पुरा संपल्यावर दुसरा, अशा तऱ्हेनें धर्मकार्यांत उपयोग केला जात नाहीं, तर जसे त्यांचे भाग विधीमध्यें उपयोगांत आणतात, त्या क्रमानें परंतु या ग्रंथांतला हा एक भाग तर दुसऱ्या ग्रंथांतला दुसराच एक भाग या तऱ्हेनें हे ग्रंथ सांपडतात. प्रयोगाच्या सोईनें जुळाविलेल्या ह्या ग्रंथाच्या आवृत्तींत पल्हवी टीका नसते, व या संग्रहाला 'वेन्दीदाद साधो' किंवा शुद्ध वेन्दीदाद म्हणतात. दुसऱ्या गटामध्यें दुय्यम प्रार्थना आणि त्यांच्याबरोबर हस्तलिखितांत सांपडणारे यस्न येतात व त्यांनां 'खोर्दाह अवेस्ता' किंवा छोटा अवेस्ता म्हणतात. ह्या दुसऱ्या गटांतील बहुतेक ग्रंथावर पल्हवी टीका उपलब्ध नाहीं. वरील सहा भागांबद्दल थोडें विवेचन येथें देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

धर्मसंग्रहापैकीं पूजाविषयांचा यस्न म्हणजे यज्ञ किंवा पूजा हा मुख्य ग्रंथ होय. हा मुख्यतः देवस्तुती व देवप्रार्थनांचा बनला असून यांतच गाथांचा अंतर्भाव केला आहे. गाथा किंवा सूक्तें या झरथुस्त्रांच्या प्रवचनांतील कविता आहेत, व त्या अवेस्तामधील अतिप्राचीन व अतिपवित्र भाग होत. यस्न ( संस्कृत यज्ञ ) चे ७२ अध्याय आहेत, व त्यांनां हा किंवा हैति म्हणतात. पुरोहित ह्या श्रुती यज्ञाच्या वेळीं म्हणतात. या ग्रंथाचे जवळ जवळ सारखे तीन भाग पडतात. पहिल्या भागाचा आरंभ ( अध्याय १--२७ ) ओरमज्ददेव व धर्मांतील दुसऱ्या देवता यांनां नमन करून झाला आहे. या भागांत पवित्र जला ( झओथ्रा)च्या शुद्धीचे मंत्र आहेत व त्याचप्रमाणें बरेस्म म्हणजे समिधांची जुडी इच्या शुद्धीचे मंत्र आहेत. हओम तयार करण्याचे व त्याच्या अर्पणाचे मंत्र आहेत. हओम (हिंदुस्थानांतील लोक ज्याला सोम म्हणतात ) हा एका वल्लीचा रस असून तो यज्ञकाळीं पुरोहित पीत असत, व हें पिणें एक धर्मकृत्य असे. तसेंच पुरोडाशाच्या व मांसाच्या हवनाचे मंत्र आहेत. ह्या पुरोडाशाचा व मांसाच्या हवनाचा अंश पुरोहित प्रसाद म्हणून भक्षण करीत असत. या भागांत मध्यें मध्यें धर्म व आचारविषयाचें अप्रत्यक्षपणें विवेचन ज्यांत केलेलें आहे असे कांहीं अध्याय आले आहेत. उदाहरणार्थ यस्न १२ यांत नंतरचा झरथुस्त्री धर्म आहे व यस्न १९-२१ यांत प्रश्नोत्तररूप विषय आहे. दुसऱ्या भागांत गाथा—शब्दशः गाणीं, धर्मगीतें-यांचा समावेश केला आहे. ह्या गाथा छंदोमय असून त्यांच्यांत झरथुस्त्राचे उपदेश, प्रवचनें व धर्मदर्शनें आलीं आहेत. त्यांत त्यानें मनुष्यांनां वाइटापासून दूर रहाण्याचा व चांगल्याचा आश्रय करण्याचा उपदेश केला आहे. अंधकाराचें साम्राज्य टाकून प्रकाशाच्या, ज्ञानाच्या, साम्राज्यांत जाण्यास सांगितलें आहे. गाथा छंदोमय असून त्यांतील भाषा इतर अवेस्तामधील भाषेपेक्षां प्राचीन आहे. गाथा पांच आहेत व त्यांची मांडणी वृत्तवारीनें असून त्यांच्या प्रारंभींच्या 'अहुन वैति, उष्ट वैति' इत्यादि शब्दांवरून त्यांचीं नांवें ठेविलीं आहेत. गाथांचीं सतरा सूक्तें आहेत व 'ख्रिस्ति साम' प्रमाणें नंतरच्या काळांत तीं प्रार्थनेच्या वेळीं म्हटलीं गेलीं असलीं पाहिजेत. ज्या छंदोमय ग्रंथावरून, नंतरच्या काळांतल्या बुद्धांप्रमाणें झरथुस्त्रानें धर्मोपदेश केला म्हणतात त्याच मूळांत या गाथा असाव्या असें दिसतें. या गाथांमध्यें सप्ताध्यायी यस्न ( यस्नहेप्तांघैति ) मध्येंच घुसडलें आहे. हें सप्ताध्यायी यस्न गद्यांत असून त्यांत प्रार्थना व अहुरमज्द, प्रधान देवदूत, सद्धर्मीयांचे आत्मे, अग्नि, जल व पृथ्वी यांची स्तुति आहे. प्राचीनत्व व जुनाट भाषा यांमध्यें हेप्तांघैति हें जरी गाथांच्या थोडेसें नंतरचें असलें तरी, गाथांत ज्या धर्माचा उदय दृष्टीस पडतो त्याच धर्माचें थोडें नंतरचें व जास्त सुधारलेलें स्वरूप यांत दृष्टीस पडतें. गाथांमध्येंच तीन किंवा चार विशेष पवित्र मंत्र आहेत. हे मंत्र अहुन वैर्य किंवा होनोवर ( यस्न २७, १३ ), अशेमवोहु ( यस्न २७, १४ ), ऐर्यम इशो ( यस्न ५४-१ ) व यंघहातम ( यस्न ४, २६ ) हे होत. यांचीं नांवें त्यांच्या पहिल्या शब्दावरून पडलीं आहेत. तिसऱ्या भागांत ( भाग ५२, ५५ ते ७२ ) किंवा नंतरच्या यस्नमध्यें ( अपर यस्न ) निरनिराळ्या देवतांच्या स्तुती व कृतज्ञता दर्शविली आहे.

वीस्पेरेद् ( अवेस्ता वीस्पेरतवो ) मध्यें यस्नच्या कांहीं भागांत जास्त घातलेला विषय आला आहे व यांतील भाषा व रचना यस्नप्रमाणेंच आहे. त्याचे २४ अध्याय किंवा कर्दे असून तें यस्नच्या सातव्या हिश्याएवढें मोठें आहे. धर्माचारग्रंथांत यस्नमधील अध्यायांबरोबरच वीस्पेरेद्मधील अध्यायांचा समावेश केला आहे. अवेस्ता वीस्पेरतवो यामध्यें विश्वे ( सर्व ) देवांनां आवाहनाचे व आत्मार्पणाचे मंत्र आहेत व म्हणून याला वीस्पेरेद् म्हणतात.

यस्त ( अवेस्ता येष्टी.– स्तुतीनें पूजा करणें ) ची एकवीस सूक्तें आहेत. यामध्यें यजत ( इजद् ) च्या किंवा देवतांच्या स्तुती आहेत. अर्द्विसूर म्हणजे जलदेवता (यस्त ५), तिष्ट्य तारका ( यस्त ८ ), मिथ्र म्हणजे सत्यदेवता ( य. १० ), फ्रवशी किंवा सद्गुणी लोकांचे मृतात्मे ( य. १३ ), वेरेथ्रघ्न म्हणजे यशोदेवता ( य. १४ ) व राजतेजाची देवता ( य. १९ ) ह्यांच्या स्तुतिपर यस्त, हे यस्तांमधील मुख्य यस्त होत. यस्तची रचना मुख्यतः छंदोमय असून, त्यांत काव्य आहे व त्यांतलि पुष्कळशा कथा व ऐतिहासिक भाग फिरदोसीच्या 'शहानामा' या पारशी महाकाव्यांतील कथांशीं पडताळून पहाण्यासारख्या आहेत.

न्याइशे, गाह, सिरोझा, अफ्रिंजन या अप्रधान ग्रंथांत छोट्या प्रार्थना, स्तुती व वरप्रार्थना असून त्या दररोज व विशेष प्रसंगीं म्हणावयाच्या आहेत.

**वेन्दीदाद म्हणजे 'दएव ( राक्षस ) विरुद्ध कायदा'.**—हा एक धर्मविषयक कायद्याचा ग्रंथ असून त्यांत बावीस अध्याय ( फर्गर्द ) आहेत. या ग्रंथांतील कांहीं भाग फार जुने तर कांहीं फार अलीकडचे आहेत व त्याचप्रमाणें त्यांची भाषाशैलीहि निरनिराळ्या प्रकारची आहे. या ग्रंथाचा बराचसा भाग नंतरचा असला पाहिजे. पहिल्या अध्यायांत ( फर्गर्द १ ) अवेस्ताधर्मानुसार सृष्ट्युत्पत्ति दिलेली आहे. यांत सृष्टि सदसद्रूपी ( बरें व वाईट ) द्वैतापासून झाली म्हणून ती सदसद्रूपी द्वैतमय आहे असें दिलें आहे. दुसऱ्या अध्यायांत यिमाची कथा, सुवर्णयुग (कृतयुग ) व इराणी जलप्रलय म्हणजे एका सर्वविध्वंसक हिमकालाचें आगमन हे विषय थोडक्यांत दिले आहेत. तिसऱ्या अध्यायांत अन्य विषय असून त्यांत कृषिविद्येपासून होणारे फायदे दिले आहेत. चवथ्या अध्यायांत करार मोडणें, दंडपारुष्य,वाक्पारुष्य व शिक्षा यांच्याबद्दलच्या कायद्याचा विषय आहे.अध्याय ५ ते १२यांत मृताशौच हा मुख्य विषय आहे.. अध्याय १३—१५ मध्यें मुख्यतः कुत्र्याला वागविण्याबद्दल नियम आहेत. अध्याय १६, १७ व अठराव्याचा कांहीं भाग यांत निरनिराळ्या अशौचापासून शुद्धीच्या पद्धतींचें विवेचन आहे. अध्याय १९ मध्यें आरथुस्राला पातकांत पाडावयाचा प्रयत्न, झालेला मोह व तो जिंकल्यानंतर त्याला झालेलें धर्मदर्शन या गोष्टी आहेत. अध्याय २०—२२ वैद्यकविषयक आहेत. आचारग्रंथामध्यें वेन्दीदादचे अध्याय गाथांत घातलेले आहेत.

वरील ग्रंथाशिवाय आणखी पुष्कळ त्रोटक प्रकरणें आहेत व त्यांतील एक दोन हदोख्तनस्कमधील आहेत. अनुपलब्ध नस्कमधील कांहीं अवतरणें आहेत व कांहीं टीका व शब्दसंग्रह आहेत. नीरंगास्तान, अओजेमदएच व झेन्दपल्हवीकोश व दुसरे कांहीं त्रोटक भाग हीं याच भागांत अंतर्भूत होतात. हीं अवेस्ता भाषेत लिहिलीं असून एका काळच्या मोठ्या वाङ्मयाचे अवशिष्ट भाग होत. झरथुश्त्री धर्माच्या वाङ्मयांत, अवेस्तांत लिहिले गेले नसले तरी पल्हवी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांचा समावेश केला पाहिजे. हे पल्हवी ग्रंथ बरेचसे मूळ अवेस्ताचें भाषांतर असून त्यांत प्राचीन धर्मग्रंथांतील जुना विषय आलेला आहे.

वरील विषयवारीवरून हल्लींचा अवेस्ता बायबल म्हणण्यापेक्षां प्रेअर बुक म्हणण्यासारखा आहे हें लक्षांत येईल. पुरोहितांनीं आपल्या कामाकरितां वेन्दीदाद, विष्पेरेद् व यस्न हीं एके ठिकाणीं केलीं. या सगळ्या धर्मग्रंथाचें पठण दररोज करणें हें पुरोहितांचें कर्तव्य होतें. या योगें त्यांची स्वतःची शुद्धि राहून त्यांनां दुसऱ्यांच्या पापक्षालनार्थ प्रायश्चित्ताच्या धर्मक्रिया करितां येत असत व प्रायश्चित्तें देतां येत असत. यज्ञकाळीं वेन्दीदाद, विष्पेरेद्, यस्न यांचें गंभीरपणें पठण होत असे. ख्रिस्ती धर्मांतील येशूचा प्रसाद घेणें, गॉस्पेल म्हणणे वगैरे गोष्टींसारख्या सोमपान व गाथा म्हणणें या गोष्टी दिसतात. खोर्दाह अवेस्तांतील मोठ्या यस्नची तुलना बायबलमधील कथाविषयक भागांशीं करितां येईल. परंतु खोर्दाह अवेस्तामध्यें कोणत्या तरी एखाद्या देवतेला उद्देशून एकेक भाग असल्यामुळे व कथा फार पुराण काळच्या असल्यामुळे बायबलच्या प्रक्षिप्त भागांत सुद्धां अशासारखा भाग सांपडणार नाहीं. डिनकर्ड ( पुस्तक ३ ) मध्यें असें सांगितलें आहे कीं मूळ अवेस्ताच्या दोन प्रती होत्या व त्या दोन्हींहि प्रतींत २१ नस्क ( पुस्तकें ) होते. अर्द विराफ म्हणतो कीं त्यांतील एक पर्सेपोलीस येथील पुस्तकालयांत ठेविलेलें अलेक्झांडर नें इराणवर स्वारी करून राजवाडा जाळला त्या वेळीं जळून खाक झालें. असें म्हणतात कीं दुसरी प्रत ग्रीकांनीं नाहींशी केली.पण कशी नाहींशी केली हें सांगतां येत नाहीं. रिवायत व डिनकर्डमध्यें या एकवीस नस्कांची, त्याच्या पहिल्या शब्दांवरून पडलेली नांवें,व त्यांचीं वर्णनें दिलीं आहेत. या प्रत्येक नस्कमध्यें अवेस्ताश्रुति व पल्हवी भाष्य दिलें आहे. याबद्दलची पारशांची परंपरागत माहिती महत्त्वाची आहे व तदनुसार प्रत्येक नस्कची मूळ ग्रंथसंख्या व विषय खालीं देत आहों.

| नस्क | परिच्छेद | विषय |
|---|---|---|
| १ | २२ | सद्गुण व धर्मश्रद्धा. |
| २ | २२ | धर्मविषयक आचार. |
| ३ | २१ | मज्दयस्न धर्म व त्याचीं तत्त्वें. |
| ४ | ३२ | हें जग व दुसरें जग, मृतांचें सशरीर पुनरुत्थान व पापपुण्याचा निवाडा |
| ५ | ३५ | ज्योतिषशास्त्र. |
| ६ | २२ | यागविषयक आचार व त्यापासून मिळणारें पुण्य. |
| ७ | अलेक्झांडरच्या काळापूर्वी ५० पण अलेक्झांडरचेवेळीं विद्यमान १३ | मुख्यतः राजकीय व सामाजिक विषय. |
| ८ | अलेक्झांडर पूर्वी ६० आज उपलब्ध १२ | कायदा. |
| ९ | अलेक्झांडर पूर्वी ६० नंतर शिल्लक राहिलेले १५ | धर्म व त्याचा मनुष्यांशीं व्यावहारिक संबंध. |
| १० | अलेक्झांडरपूर्वी ६० शिल्लक उरलेले नुसते १० | राजा गुश्ताप व त्याची कारकीर्द. |
| ११ | प्रथम असलेले २२ अलेक्झांडरनंतर शिल्लक ६ | झोरोआस्टरच्या उपदेशाचा परिणाम;धर्म व त्याचा मनुष्यांशीं व्यवहारतः संबंध. |
| १२ | २२ | दृश्यसत्यें व आध्यात्मिक पुनर्जन्म. |
| १३ | ६० | पुण्यकर्मे व झोरोआस्टरच्या बाळपणाचें संक्षिप्त वर्णन. |
| १४ | १७ | ओरमज्द व प्रधान देवदूत. |
| १५ | ५४ | व्यवहारांत व वजनें आणि मापें यांमध्यें सचोटी, पुण्यमार्ग. |
| १६ | ६५ | या धर्मातील,जवळच्या नातलगाशीं विवाहाच्या तत्त्वासंबंधीं. |
| १७ | ६४ | भविष्यकाळीं मिळणाऱ्या शिक्षा; फलज्योतिष. |
| १८ | ५२ | अधिकाराचा उपयोग करण्यांत न्याय;मृतांचें सदेह पुनरुत्थान व असतांचा विध्वंस. |
| १९ | विदेव्दाद अ. वेन्दीदाद २२ अजून उपलब्ध आहेत. | अशौच व त्याची शुद्धि. |
| २० | ३० | साधुत्वाविषयीं. |
| २१ | ३३ | ओरमज्द व प्रधान देवदूत यांची स्तुति. |

**अवेस्ता ग्रंथाचा नष्ट व अवशिष्ट भाग**—अलेक्झांडरच्या नासधुसीनंतरच्या पांच शतकांत निःसंशय पुष्कळसा धर्मग्रंथ नाहींसा झाला व पुष्कळसा विसरला. पारशी परंपरा व डिनकर्ड व रिवायत यांमध्येंहि ही गोष्ट कबूल केली आहे. त्याचप्रमाणें ८-९-१०-११ व्या नस्क मधील बराच भाग नाहींसा झाला असें सांगितलें आहे. अलेक्झांडरच्यें स्वारीपासून ससानियन राजांच्या कालापर्यंत पांचशें वर्षांत नाहींसा झालेला धर्मग्रंथाचा भाग ससानियन कालापासून आज तागाईत झालेल्या धर्मग्रंथाच्या लुप्त झालेल्या भागापुढें कांहींच नाहीं म्हटलें तरी चालेल. इ. सनाच्या सातव्या शतकांत झालेल्या मुसुलमानांच्या स्वारीनें व कुराणाच्या धडाक्यानें पारशी धर्माचे अतोनात नुकसान झालें. जुलुमानें त्रस्त झालेल्या पारशी लोकांनां आपल्या धमग्रथांची काळजी घेतां आली नाहीं त्यामुळें पुष्कळ भागाचा लोप झाला. प्राचीन अवेस्तामधील ससानियन काळांत शिल्लक राहिलेल्या एकवीस नस्कपैकीं एकोणिसावें म्हणजे वेन्दीदाद तेवढें आज पूर्णपणें उपलब्ध आहे. पण त्यांत सुद्धां विषयांची व मजकुराची जुळवाजुळव मागून केली गेली असावी अशा बद्दल त्यांतच पुरावा आहे. आणखी आज उपलब्ध असलेल्या यस्न व विस्पेरेद् मधील कांहीं भाग आणि स्तओयस्त (स्तओत येस्न्य) किंवा ज्याला नुसतें यस्त ( येस्न्य ) म्हणतात, त्यांतलि कांहीं भाग हे एकच आहेत असें दाखविता येईल. पल्हवी ग्रंथांत सांपडणाऱ्या पण आज उपलब्ध नसलेल्या पुष्कळ अवेस्ता अवतरणांवरून हीच गोष्ट सिद्ध होते. एकंदरीनें हिशेब केला तर असें आढळून येईल कीं ससानियन कालापासून आजपर्यंत धर्मग्रंथाचा जवळ जवळ दोनतृतीयांश भाग नाहींसा झाला आहे.

**ग्रंथरचनाकालाविषयक अनुमानें.**—कालानुक्रमाच्या दृष्टीनें अवेस्ताचे भिन्न भाग भिन्न कालाचे असणें शक्य आहे.हें ठरविण्यास छंदाच्या दृष्टीनें केलेलें मूळ ग्रंथाचें सूक्ष्म परीक्षण फार उपयोगी आहे. मूळ धर्मपुस्तकाचे बहुतेक भाग छंदोमय आहेत व नंतरचे व मागून घुसडलेले भाग नेहेमीं नसले तरी बहुतेक वेळीं गद्यांत लिहिलेले आहेत.

व्याकरणाची कसोटीहि उपयोगाची आहे. अलीकडच्या काळच्या ग्रंथांत व्याकरणाच्या शुद्ध ज्ञानाचा लोप होत चाललेला दिसतो. या दृष्टीनें छंदोमय ग्रंथ फारच व्याकरणशुद्ध आहेत. ह्या अवेस्तामधील भाग अतिप्राचीन असून प्रत्यक्ष झोरोआस्टरच्या काळापासून आहेत. मोठे यस्त व यस्नचा पद्यमय भाग यांमध्यें पुष्कळ प्राचीन काळच्या म्हणजे इराणच्या प्राचीन धर्मापासून आलेल्या गोष्टी आहेत. परंतु त्यांची सामान्य रचना व स्वरूप या दृष्टीनें ते गाथांनंतर कांहीं शतकांचे असावेत. या बाबतींत वेन्दीदादमध्यें मात्र कोणत्याहि तऱ्हेची संगति नाहीं. त्यांतल्या कांहीं भागांचें स्वरूप अपभ्रष्ट झालें असलें तरी ते फार प्राचीन काळचे आहेत व दुसरे भाग यस्तच्या अलीकडच्या भागाप्रमाणें अगदीं अलीकडचे आहेत. अवेस्तामधील मंत्रमय उताऱ्याबद्दल व विस्पेरेद व न्याइशेमधील यज्ञाकरितां व अन्य संस्कारांकरितां निराळ्या काढलेल्या भागाबद्दलहि वरच्यासारखीच स्थिति आहे. गोळाबेरजेनें सर्व धर्मग्रंथाचा कालक्रम खालीं दिल्याप्रमाणें होईल.

१ गाथा ( यस्न २८—५३ ) व मंत्र यस्न २७.१३, १४ व ५४ धरून.

२ यस्न हेप्तांघैति ( य. ३५–४२ ) व दुसरे भाग य. १२, ५८ आणि ४.२६ गाथांच्या भाषेंत.

३ छंदोमय यस्न व यस्त. जसें—यस्न ९,१०,११,५७, ६१,६५; यस्त ५,८,९,१०,१३,१४,१५,१७,१९. वेन्दीदादमधील २,३,४,५,१८,१९ व विस्पेरेद, न्याइशे व अफ्रिंगन यांत मध्यें मध्यें आलेल्या कविता.

४ अवेस्ताचा उरलेला गद्यमय भाग या शेवटच्या म्हणजे चवथ्या भागांत भाषासरणी व रचना यांच्यावरून मूळ ग्रंथ कोणता व नंतरचा गद्यमय व घुसडलेला भाग कोणता हें बहुतकरून ओळखतां येतें.

पारश्यांचा धर्मग्रंथ अवेस्ता याची माहिती वर दिली आहे. आतां अवेस्ता भाषा व संस्कृत भाषा यांच्यामधील सादृश्य दाखविणारी यादी प्रथम देतों.

## अवेस्ता कोशांतील व गायझरच्या प्राचीन इराणी संस्कृति या ग्रंथांतील अवेस्ता व संस्कृत यांतील सादृश्यांची यादी. मराठी अर्थासह.

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| अइति | अति | मागें |
| अइघ्य | अद्य | येथें, आतां |
| अइनिक | अनीक | मुख्य(?)चेहरा, कपाळ |
| अइपि, अइपी, | अपि | देखील, जर, तर |
| अइबी; अइबि, अइबीं | अभि | उंच, वर, नजीक |
| अइर्य | अर्य,आर्य | मान देण्यास योग्य, पूज्य, उच्चकुलोत्पन्न |
| अइर्यमन् | अर्यमन् | सुखशांतिदायक अर्यमन्ची प्रार्थना, सुखदायक देव |
| अइविति | अभीति | जवळची |
| अइवितो | अभितस् | आसपास, जवळ, दोहोबाजूला |
| अउरुन | अरुण | जंगली |
| अउरुष | अरुष | पांढरा, किरमिजी |
| अउर्वत् | अर्वन्त्, अर्वन् | पळणारा, चलाख, मजबूत |
| अएत | एत | हा, तो |
| अएनङ्ह | एनस् | अपमान, नुकसान, अपराध, पाप |
| अएम | अयम् | हा, तो |
| अएव | एक | एक, एकटा, फक्त |
| अएव | एव | याप्रमाणें |
| अएवो–दस<br>अवए–दस | एकादश | अकरावा |
| अएवादशेन् | एकादशन् | अकरा |
| अएस्म | इध्म | लांकूड |
| अएष | एष, एषा | इच्छित |
| अओजङ्ह | ओजस् | शक्ति |
| अओर | अवर | अधिक, खालीं |
| अक | अक | वाईट गोष्ट, पाप |
| ,, | अङ्क | आंकडा |
| अख्श् | ईक्ष् | चौकशी ठेवणें, पाहणें |
| अघ | अघ | पाप |
| अग्र | अग्र | शिखर |
| अङ्ह, इथ्य | असत्य | खोटें |
| अझि | अहि | साप |
| अझ् | अह् | बांधणें |
| ,, | अज् | दूर करणें, फेंकणें, आडरस्त्यानें नेणें |
| अझी | अही | फिरणें, चालणें |
| अझेम् | अहम् | मी |
| अंक्क<br>अंग | अङ्क | बांक देणें, वळविणें |
| अंगिश्त, अंगुश्त | अङ्गुष्ठ | अंगठा |
| अंघ | अंह् | दुःख देणें |
| अंच् | अञ्च् | जाणें |
| अंच् | अञ्च् | वांकविणें, फेंकून देणें, |
| अंजं् | अञ्ज् | अपवित्र करणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| अंत | अन्त | शेवट, टोंक |
| अंतरं | अन्तर | आंतील |
| अंतर | अन्तर् | आंत [उभा राहणारा |
| अंतरेश्ता | अन्तरस्थ | जमीन व अस्मान यांमध्यें |
| अंतेम | अन्तिम | दुसऱ्या टोंकास |
| अंद् | अन्ध् | आंधळें करणें |
| अंदा | अन्ध | आंधळा |
| अथ | अथ | याप्रमाणें |
| अथ्र | अत्र | येथें |
| अद् | अद् | खाणें |
| अद्वएष | अद्वेष | निरुपद्रवी |
| अध | अध | येथें |
| अधर | अधर | खालचा |
| अध्वन् | अध्वन् | रस्ता |
| अन् | अन् | श्वास घेणें |
| अन् | अन् | न |
| अन | अनेन | दर्शक सर्वनाम |
| अनइर्य | अनार्य | हीनकुलोत्पन्न |
| अनु | अनु | माफक |
| अनुम इति | अनुमति | धर्मविषयक कायद्याच्या अनुरूप विचार करणें |
| अन्य | अन्य | दुसरा |
| अप् | अप् | पाणी |
| अप | अप | दूर.वेगळें नसणें दर्शविणा. |
| अप् | आप् | पोहोंचणें, मिळणें [उपसर्ग |
| अपश्रओसक | अपक्रोश | ओरडणें |
| अपगइति | अपगति | पलायन |
| अपर | अपर | उत्तरकालीन, हलका |
| अपुथ्र | अपुत्र | संततिविहीन |
| अपेम | अपम | शेवटचें |
| अब्द | अब्द | मेघ |
| अम् | अम | हिंमत |
| अमवण्ट् | अमवन्त् | हिम्मतवान् |
| अयङ्ह् | अयस् | लोखंड |
| अयन | अयन | मार्ग |
| अयह्य | अयास्य | देवद्रुमाचें नांव, उजाड |
| अर | अर् | जाणें, मिळविणें |
| अरेज् | अर्ह् | लायक असणें–होणें |
| अरेझ् | अर्ज् | पांढरा होणें |
| अरेझ् | अर्ज् | सरळ मार्गानें जाणें |
| अरेश् | अर्ज् | काम हातीं घेणें |
| अरेत | ऋत | सत्यता |
| अरेत | ऋत् | खरें बोलणें |
| अरेथ | अर्थ | नफा |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| अरेथमण्त | अर्थवन्त | खरा, रास्त |
| अरेद | अर्ध् | उच्च दर्जा वाढविणें |
| अरेद | अर्द् | दुःख देणें |
| अरेध | अर्ध | अर्धा |
| अरेष् | अर्ष | जखम करणें |
| अर्षन् | वर्ष्णि, वृषन् | पशु (नर) |
| अर्ष्टि | ऋष्टि | भाला |
| अव | अव | जवळ, दूर, खालीं |
| अवङ्ह | अवस् | मदत |
| अभ्र | अभ्र | मेघ |
| अस् | अश् | जलदी करणें |
| असङ्ह | आशा | रुंद, जंगली जागा |
| असन् असान | अशन् | दगड, भाला |
| असून | अशून्य. | भरपूर |
| अस्त | अस्त | पाठविलेला |
| अस्तन् अस्ति | अस्थन्, अस्थि, | हाडूक, हाड |
| अस्व | अश्व | घोडा |
| अस्पो–स्थान | अश्वस्थान | तबेला |
| अस्प्य | अश्वय, अश्वीय, आश्विक | घोड्यासंबंधीं |
| अस्म | अश्मन् | दगड |
| अस्रु | अश्रु | आंसवें |
| अष् | अश् | पोहोंचणें |
| अष | ऋता | पावित्र्य |
| अषवन् | ऋतावन | पवित्र |
| अषि | आक्षि | डोळा |
| अश्तदस | अष्टादश | अठरावा |
| अश्तदसन् | अष्टादशन् | अठरा |
| अश्तन् | अष्टन् | आठ |
| अश्ताइति | अशीति | ऐशी |
| अश्तेम | अष्टम | आठवा |
| अश्त्रा | अष्ट्रा | खंजीर |
| अङ्ह् | अस् | असणें, होणें |
| परअङ्ह् | परा-अस् | पळून जाणें |
| आअत् | आत | त्यावरून |
| आइ | ए | (केवलप्रयोगी) अ. |
| आएङ्ह | आस्य | तोंड |
| आओघ | आस | तोंड |
| आकृति | आकृति | भव्य चेहरा |
| आझ्इति | आहुति | सुबत्ता, आबादी |
| आथ्रवन् | अथर्वन् | उपाध्याय |
| आथ्व्य | आप्त्य | फेरिदून राजाच्या बापाचें नांव |
| आदान | आधान | स्वीकार |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| *आबूइति | भूषा, भूषण | शोभा |
| आयु | आयु | आयुष्य |
| आर्मइति | आरमति | पवित्र विचार, देवता |
| आविश् | आविस्: | स्पष्ट, जाणणें |
| आस् | अश् | पोहोंचणें |
| आसु | आशु | जलद |
| आस्तूइति | स्तुति | स्तुति |
| आएङ्हू, आह्व | आस्: | बसणें |
| इ | इ | हा, ते, (सर्व) |
| इ | इ | येणें, जाणें |
| इ | इ | ज्ञान मिळविणें |
| अइवि-इ | अभि-इ | जवळ जाणें |
| आ-इ | आ-इ | येणें |
| उप-इ | उप-इ | जवळ येणें |
| उस्-इ | उस्-इ | बाहेर येणें |
| पइति-इ | प्रति-इ | भेटीला जाणें |
| पर इ | परा-ई | दूर पळून जाणें |
| फ्र-इ | प्र-इ | पुढें जाणें |
| हं-इ | सम्-इ | मिळणें |
| इझ् | ईहू | इच्छा करणें |
| इझ | अज | बकरा |
| इझएनि, इझएन | अजिन | चामड्याचें वस्त्र |
| इंद्र | इंद्र | इंद्र |
| इत | इत | चालरीत |
| इति | इति | ,, |
| इथ | इत्था | याप्रमाणें |
| इथ्य | इत्य | नाश पावणारें |
| इधू, इद् | इधू | जाळणें |
| यर्, इर् | ईर् | उंच करणें |
| इध | इह | येथें |
| उझ्-यर्, उझ्-इर् | उद्-ईर् | [सूर्य] उगवणें |
| रि, इरि | री | खराब करणें |
| इरिषू | रिष् | जखम करणें |
| इस् | इष्, इच्छ् | इच्छा करणें |
| इस् | ईश | समर्थ असणें |
| इसा | ईशा, ईषा | गाडीचा दांडा |
| इष् | इष् | इच्छा करणें |
| पइति-इष् | प्रति इष् | ,, |
| पइरि-इष | परि-ईक्ष् | परीक्षा करणें |
| इषु | इषु | बाण |
| इश्त ... | इष्ट | इच्छिलेलें |
| ईश्ति, इश्ति | इष्टि | इच्छा |
| इश्त्य, इश्त्व | इष्टका | वीट |
| ईर् | ईर | हलविणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| ईरा | इरा | लष्कर |
| उख्त | उक्त | बोललेलें |
| उख्ति | उक्तिं | शब्द |
| उख्ष् | उक्ष् | शिंपडणें |
| उख्षन् | उक्षन् | बैल |
| उग्र | उग्र | बळकट |
| उझ् | ऊहू | प्रीति करणें |
| उझ्वएझ | देही | बांधीत |
| उत | उत | तथा |
| उदर | उदर | पोट |
| उद्र | उद्र | पाण्यांत राहणारा कुत्रा |
| उन | ऊर्णा, ऊर्णा | डोक्यांवरील केंस |
| उप | उप | जवळ |
| उपइरि | उपरि | वर |
| उपेम, उपम | उपम | वरील |
| उपमन | उपमा, उपमान | उपमा |
| उपयत | उपयत | जिंकणें [ स्वयंवरांत ] |
| तपर | उपर | वर |
| उपाश्ति | उपास्ति | प्रार्थना |
| उब | उभ | दोघे |
| उब्ज | उब्ज | नाश करणें |
| उब्द् | उप्त | विणलेला |
| उरु | उरु | मोठा, विस्तीर्ण |
| उरूद् | रोध | नदी |
| उर्वरा | उर्वरा | झाड, रोप |
| उस्धङ्ह | उशधि | एक प्रकारचें विषारी झाड |
| उस्तान | उत्तान | उताणा हात |
| उस्तानझस्त | उत्तानहस्त | हात जोडलेला |
| उस्तेम | उत्तम | उच्च दर्जाचें |
| उष् | उष् | जाळणें, प्रकाशणें |
| उष् | उष् | आजारी पडणें |
| उषा, उषङ्ह | उषस् | उषा, संध्या |
| ऊ | ऊन् | कमी होणें |
| ऊन | ऊन | गरजवंत |
| एरेझत | रजत | चांदी |
| एरेझिफ्य | ऋजिष्व | ससाणा |
| एरेझु | ऋजु | सत्य |
| आंझङ्ह | अंहस् | संकट |
| आंसु | अंशु | डहाळी |
| क | क | कोण, कोणी |
| कइर्य | कार्य | काम |
| कउर्व | कर्बु, कर्बुर | डाग पडलेला |
| कएत | केत | इच्छा, किडा |
| कतार | कतर | दोहोंपैकीं कोणीहि ? |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| कथ | कथा, कथम् | कशा रीतीनें |
| कध | कध | कोठें ? |
| कन् | खन् | खोदणें |
| उस्-कन् | उद्-खन् | उकरून काढणें |
| नि-कन् | नि-खन् | पुरणें |
| कन् | कन् | प्रीति करणें |
| कन | केन | कोण |
| कन्या | कन्या | कुमारी |
| कफ | कफ | फेस-तोंडांतून येणारा |
| कम् | कम् | प्रेम करणें |
| कमेरेध | कुमूर्धन् | बिगर मेंदूवाला |
| कयध | कयाद | दुष्ट माणूस |
| कर् | कर् | करणें |
| फ्र-कर् | प्रकर् | उत्पन्न करणें |
| हण्-कर् | सङ्कर् | संपूर्ण करणें |
| कर् | कर् | पहाणें, परीक्षा करणें |
| करेति, करेत | कर्तनी, कर्तरि | कात्री |
| करेण्त् | कर्त् | कापणें |
| करेन | कर्ण | कान |
| करेप् | कल्प् | आकार देणें. |
| करेस् | कर्श् | अशक्त असणें, होणें |
| करेष् | कर्ष् | नांगरणें |
| ,, | ,, | खेचणें, ओढणें |
| अव-करेष् | अवकर्ष | ,, ,, |
| पइरि-करेष् | परिकर्ष | ,, ,, |
| कर्षा, कर्ष | कर्ष् | नांगरणें |
| कर्षि | कर्ष् | नांगरणी |
| कर्ष्टि | कृष्टि | ,, |
| कस् | काश | प्रकाशणें |
| कस्यप | कश्यप, कच्छप | कांसव |
| कष् | कष् | खेंचणें |
| कष् | कक्ष | बगल |
| ,, | कच्छ, कक्ष | किनारा |
| का | कन् | प्रेम करणें |
| काम | काम | इच्छा |
| कार | कार | उद्योग |
| कास् | काश् | प्रकाशणें |
| कु | कु | त्रास देणें, आंधळे होणें |
| कु | कु | वाईट ( स्त्री ) |
| कुन्द | कबन्ध | राक्षसाचें नांव |
| कुर् | कूल् | रक्षण करणें |
| कुप् | कुप् | रागावणें |
| कुष् | कुष् | ठार मारणें |
| केरेत | कृत | केलेलें |
| केरेतर | कर्तृ | करणारा |
| केरेति | कृति | काम |
| केरेमा | कृमि | किडा |
| केरेसं | कृश | रोडका |
| केह्र्पे | कृप् | शरीर |
| केहूर्पे | कल्प, कृप्, | आकार देणें |
| क्र | क्व | कोठें |
| ह्व | स्व | आपलें |
| ह्वङ्हर् | स्वसर् | बहीण |
| ह्वण्ज | संपरि-सञ्ज | वेढा घालणें |
| पइरिश-ह्वण्ज | ,, ,, | ,, ,, |
| ह्वतौ | स्वतस् | स्वतः |
| ह्वन् | स्वन् | प्रकाशणें |
| ह्वप् | स्वप् | निजणें |
| ह्वफ्ज | स्वप्न | ,, |
| ह्वर् | स्वर | दुःख देणें |
| ह्वर् | सुर | प्रकाशणें |
| ह्वर | स्वरु | जखम |
| ह्वसुर | श्वशुर | सासरा |
| ह्वाष् | स्वर्द | खाणें |
| ह्वीस् | श्वस् | श्वास टाकणें |
| खद् | खद् | खोदणें |
| वी-खद् | वि-खद् | उलथापालथ करणें |
| खा | खा | झरा पाण्याचा |
| खुम्ब् | कुम्भ्, कुम्ब | झांकण घालणें |
| खुम्ब | कुम्भ | मातीचें भांडें |
| ख्रतु | क्रतु | अक्कल |
| ख्रप्, ख्रफ्स् | क्रप् | दरिद्री होणें, रांगणें |
| ख्रु | क्रव्य | कच्चें मांस |
| ख्रुद् ख्रुध् | क्रुध् | रागावलेला |
| ख्रुस् | क्रुश् | नांवें ठेवणें |
| ख्रूर | क्रूर | क्रूर |
| ख्षएन | क्षीण | रोडका |
| ख्षओधङ्ह | क्षोदस् | विपुलता |
| ख्षथ्र | क्षत्र | राज्य |
| ख्षन् | क्षण् | जखम करणें |
| ख्षप् | क्षप् | झांकणें |
| ख्षय | क्षय | घर |
| ख्षि | क्षि | राज्य चालविणें |
| ख्षित् ख्षि | क्षि | राहणें |
| ,, ,, | ,, | कमी होणें |
| ख्षुइश | क्षु | दूध |
| ख्षुद् | क्षुद | ओला करणें |
| ख्षुद्र | क्षुद्र | बीज |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| ख्शुब् | क्षुभ् | हलणें |
| ख्श्नु | क्ष्णु | खूष होणें |
| ,, | ,, | धार लावणें |
| ख्श्वश् | षष् | सहा |
| ख्श्वश्ति | षष्टि | साठ |
| ख्श्वश् -दस | षोडश | सोळावा |
| ख्श्वश् –दसन् | षोडशन् | सोळा |
| ख्श्विव्, ख्श्विप् | क्षिप् | जलदी करणें |
| ख्श्त्व | षष्ठ | सहावा |
| गइति | गति | गति |
| गइण्ति | गन्ध | डाग |
| गइरि | गिरि | पर्वत |
| गओ | गो | गाय |
| गओकेरेन | गोकर्णा | एक झाड |
| गओजन् | गोहन् | ढोरें मारणारा [हिंस्रळा] |
| गओतेम | गोतम | गौतमबुद्ध |
| गओधन | गोधन | गुराढोरांची वाढ |
| गओन | गुण | फायदा |
| गओमण्त् | गोमन्त् | गोमांसाचें भोजन |
| गओयओइति | गव्यूति | कुरण |
| गओष, घोष<br>घोखू ( घाउल )<br>घोवर | कर्ण | कान |
| गङ्ह् | घस् | खाणें |
| गंदरेव | गन्धर्व | एका बलवान पण दुष्ट देवाचें नांव |
| गत् | घ | खरोखर |
| गध | गद | एक प्रकारचा रोग |
| गधा | गदा | गदा |
| गप् | जभ् | जांभई देणें, खोल करणें |
| गम् | गम् | जाणें, येणें |
| अइवि--गम् | अभि--गम् | जवळ जाणें |
| आ-गम् | आगम् | येणें |
| हण्-गम् | सम्-गम् | बरोबर येणें |
| गय | गय | जीवित |
| गर् | गर्, जागर् | जागें राहणें |
| गंर् | घर् | गरम होणें |
| ,, | गल् | जड होणें |
| ,, | गर् | आधाशीपणानें खाणें |
| ,, | गर् [गॄ] | गाणें, स्तुति करणें |
| अइबि-गर् | आभि-गर् | स्तुति करणें |
| गर | गर | विष |
| गरङ्ह् | गल | गळा |
| गरेझ् | गर्ज् | रडणें |



| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| गरेझ् | गर्ह्, ग्रह् | धरणें, स्वागत करणें |
| गरेध् | ,, | पत्करणें, आदर करणें |
| अइवि-गरेध् | अभि-ग्रह् | काळजीनें अभ्यास करणें |
| गरेध् | ग्रह् | खूश करणें, समजणें |
| गरेम | घर्म | गरम |
| गरेव् | ग्रभ्, ग्रह् | मिळविणें |
| अप-गरेव् | अप-ग्रह् | निरनिराळें करणें |
| अव-गरेव् | अव-ग्रह् | पकडणें |
| आ-गरेव् | आ-ग्रह् | पोहोंचणें |
| उझ्-गरेव् | उद्-ग्रह् | उचलून धरणें |
| नि-गरेव् | निग्रह् | खालीं दाबणें |
| पइरि-गरेव् | परिग्रह् | चिकटणें, वेष्टणें |
| फ्र-गरेव् | प्रग्रह् | मदत करणें |
| वी-गरेव् | वि-ग्रह् | जाळ्यांत पकडणें |
| हण्गरेव् | सङ्ग्रह् | पकडणें |
| गरेव | गर्भ | गर्भस्थान |
| गवो-स्तान | गोस्थान | गोठा |
| गा | गा | येणें |
| ,, | गा, गै | गाणें |
| गातु | गातु | जागा |
| गाथा | गाथा | पवित्र गीत |
| गाय | गाय | पाऊल |
| गावय | गव्य | गाईचें दूध |
| गि | जि | जिवंत राहणें |
| गु | गु | खराब, घाण करणें |
| ,, | ,, | मोठा आवाज काढणें |
| गुझ् | गुह् | छपविणें |
| गुप् | गुप् | आसरा देणें |
| गुष् | घुष् | लक्ष देणें |
| गूथ | गूथ | कचरा |
| गेरेझा | गर्ज, गर्जा, गर्जन | मोठ्यानें रडणें ( ना. ) |
| गेरेध | गृह | भुयार |
| गेउषा | घोष | घोष |
| गोउरु | घोर | वाईट |
| ग्रह् | ग्रस् | खाणें, गिळणें |
| ग्रीव | ग्रीवा | मान |
| घ | घ | ठार मारणारा |
| घन | हन | ,, ,, |
| घर् | हर् | आठवण करणें |
| घ्झर् | क्षर् | दूध काढणें |
| घ्न | ह्न | मारणारा |
| घ्न | घन | पट दर्शक प्रत्यय |
| च्वइति | कति | किती |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| चख्र - | चक्र | चाक |
| चथ्रु | चतुर् | चार |
| चथ्रुद स | चतुर्दश | चवदावा |
| चथ्रु-दसन् | चतुर्दशम् | चौदा |
| चथ्रुश्रुस् | चतुश्चतुः | चार वेळां |
| चथ्वरे | चत्वारस् | चार |
| चथ्वरेसत | चत्वारिंशत् | चाळीस |
| चर् | चर् | चालणें |
| अन्तरेचर् | अंतर्-चर् | आंत शिरणें |
| आचर् | आचर् | जाणें, येणें |
| फ्रचर् | प्रचर् | पुढें जाणें |
| वीचर् | विचर् | हालणें |
| हांम्-चर् | सं-चर् | आंत जाणें |
| चरन | चरण | पाय ( गति देणारें साधन) |
| चरेमा | चर्मन् | चामडें |
| चष् | चक्ष् | तपासणें |
| चष्मन् | चक्षन्, चक्षुस् | डोळा |
| चि | चि | एकत्र करणें |
| ,, | ,, | शिक्षा करणें |
| चित् | चित् | विचार करणें |
| ,, | चिद् | इत्यादि ( अव्यय ) |
| चिथ्र | चित्र | प्रगट |
| चिस्ता | चित्त | ज्ञान |
| चिस्ति | चित्ति | ज्ञानदेवता |
| जइति | जाति | कुटुंब |
| जघ्नवङ्ह् | जघ्निवस्, जघन्वस् | मारणारा |
| जङ्ह् | जस् | हल्ला करणें |
| जन्तर् | ( हन्तृ ) हन्तर् | ठार मारणारा |
| जत | हत | ठार मारलेला |
| जद् | गध् | आर्जव करणें |
| जन् | हन् | ठार मारणें |
| अव-जन् | अव-हन् | ,, ,, |
| उप-जन् | उप-हन् | मारणें, ताडन करणें |
| नि-जन् | निहन् | नाश करणें |
| पइति-जन् | प्रति-हन् | हटविणें |
| जन | हन | मारणारा |
| जप्, जब् | जभ् | रुंद करणें |
| जम् | गम् | जाणें |
| अइवि-जम् | अभि-गम् | मिळविणें |
| आ-जम् | आ-गम् | येणें |
| उश्-जम् | उद्-गम् | दिसणें |
| उप-जम् | उपगम् | जवळ येणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| पइति-जम् | प्रतिगम् | पोहोंचणें |
| वी-जम् | वि-गम् | आंत शिरणें |
| हृण्-जम् | सम्-गम् | मिळणें |
| जय | जय | जय |
| अप-जस् | अप-गम् | पळून जाणें |
| आ-जस् | आ-गम् | पोहोंचणें |
| उश्-जस् | उद्-गम् | पुढें जाणें |
| उप-जस् | उप-गम् | जवळ जाणें |
| पइति-जस् | प्रति-गम् | विरुद्ध जाणें |
| पइरि-जस् | परि-गम् | पोहोंचणें |
| फ्र-जस् | प्र-गम् | पुढें जाणें |
| वी-जस् | वि-गम् | सर्वत्र पसरणें |
| हृण्-जस् | सम्-गम् | भेटणें |
| जद् | जस् | वाटेल तें करणें |
| जि | जि | जिंकणें |
| जि | जिव् | इच्छा–चौकशी करणें |
| जीव् | जीव् | जिवंत राहणें |
| जीव्य | जीव्य | ताजें दूध |
| जु | जू | जलदी करणें |
| जेनी | जनी | बाई |
| ज्या | ज्या | वृद्ध होणें |
| ,, | ,, | धनुष्याची दोरी |
| ज्यातु | जीवातु | आयुष्य |
| झ्ना | ज्ञा | जाणणें |
| झ्नातर् | ज्ञातर् | ज्ञाता |
| झ्नु | जानु | गुडघा |
| झइरि | हरि | हिरवा, ताजा |
| झइरित | हरित | पिंवळा, हिरवा |
| झइरिन | हरिण | पिंवळा, फिक्कट |
| झओतर् | होतर् | उपाध्याय |
| झओथ्रा, झओथ्र | होत्र | हवनद्रव्य |
| झओष | जोष | खुशी |
| झग | जंघा | लंगडीचें–घोट्याचें हाड |
| झन्तु | जन्तु | गांव |
| झद् | हद् | हगणें |
| झन् | जन् | जन्मणें |
| ,, | ज्ञा | जाणणें |
| झर् | जर् | म्हातारें होणें |
| ,, | हर् | दुःख देणें |
| ,, | ,, | पिवळें होणें |
| ,, | ,, | पकडणें |
| झरन | हिरण | सोनें |
| झरनएनि, झरनएन | हिरण्य | सोन्याचें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| झरन्य | हिरण्य | सोन्याचें |
| झरेधय | हृदय | अंतःकरण |
| झरेष् | हर्ष् | आनंद होणें |
| ,, | ,, | सरळ उभें असणें |
| झव | हव | प्रार्थना |
| झवन | हवन | मदतीस्तव आराधना |
| झस्त | हस्त | हात |
| झस्तवण्त् | हस्तवन्त् | सशक्त |
| झह् | हस् | सोडणें |
| झा | ह्वा | ( वर्षाव ) पडूं देणें |
| झात | जात | जन्मलेला |
| झामातर् | जामातृ | जांवई |
| झामि | जामि | मूल जन्म पावणें |
| झि | जि | जिंकणें |
| झि | हि | फेकून देणें |
| झिम, झिम्. | हिम | हिंवाळा |
| झिष् | जिष् | अशुद्ध होणें, गळणें |
| झी | हि | कारण, सबब |
| झु | हु | हवन करणें |
| झु, झू | जू | हांकणें |
| झु | जू | लठ्ठ होणें |
| झुष् | जुष् | प्रीति करणें |
| झुश्त | जुष्ट | दोस्त |
| झेम् | जम् | जमीन |
| झेंब् | जभ् | नाश करणें |
| झेरेद, झेरेत | हृद् | हृदय |
| झांथर् | जनितृ | उत्पन्न करणारा |
| झ्वर् | व्हर् | फसविणें |
| झ्वि, झ्वा | व्हा, व्हे, | मदत मागणें |
| झ्रयङ्ह् | ज्रयस् | समुद्र |
| तउरुन | तरुण | तरुण |
| तउर्व् | तुर्व् | दुःख देणें |
| तएझ | तेजस् | तीक्ष्णता |
| तओख्मन् | तोक्मन् | बीं |
| तक् | तक् | चालू राहणें |
| तख्म | तक्वन् | जोरदार |
| तच् | तञ्च् | पळून जाणें |
| तन् | तन् | पसरणें |
| उस्-तन् | उद्-तन् | हात पुढें पसरणें |
| तनु | तनु, तनू | शरीर |
| तनु... | तनू | सौंदर्ययुक्त नजर |
| तनुश् | तनुस् | शरीर |
| तप् | तप् | उष्ण होणें; |
| तर् | तर | पळावयास लावणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| वी-तर् | वि-तर् | पैलपार जाणें : |
| तरेप् | तर्प् | हिरावून घेणें |
| तम् | तम् | अंधार होणें |
| तरेस् | त्रस् | भिणें |
| तरेष् | तर्ष् | तहान लागणें |
| तरो | तिरस् | आरपार |
| तर्ष्न | तृष्णा | तहान |
| तष् | तक्ष् | घडवणें, घाट देणें |
| तष | तक्ष | कुऱ्हाड, वाकस, |
| तायु | तायु | चोर |
| तिज् | तिग् | धार लावणें, अणकुचीदार करणें. |
| तिष् | त्विष् | प्रकाशणें |
| तु | तु | बलवान् होणें |
| तुझ् | तुज् | कांपणें |
| तुष् | तुष् | विश्रांति घेणें |
| तूम्, तू | तु | खचित |
| तूइर्य | तुरीय, तुर्य | चौथें |
| तूम् | त्वम् | तूं |
| तूर् | तूर् | दुःख देणें |
| तेमङ्ह् | तमस् | अंधार |
| तेमङ्ह | तामस | अंधारमय |
| तेवीषि | तवीषि | बल |
| त्बएष | द्वेष | द्वेष |
| त्बएषङ्ह् | द्वेषस् | ,, [ करणें |
| त्बिष् | द्विष् | दुःख देणें, द्वेषं |
| थण्ज् | तञ्च्, तञ्ज् | खेंचणें |
| थ्यज् | त्यज् | त्याग करणें |
| थ्रएतओन | त्रैतन | विशेषनाम |
| थ्रओत | स्रोत, स्रोतस् | पाण्याचा प्रवाह |
| थ्रा | त्रा | पोषण करणें |
| थ्रातर् | त्रातृ | पोषण करणारा |
| थ्रि | त्रि | तीन |
| थ्रित | त्रित | देवपुरुषाचें नांव |
| थ्रित्य | तृतीय | तिसरा |
| थ्रिदस | त्रयोदश | तेरावा |
| थ्रिदसन् | त्रयोदशन् | तेरा |
| थ्रिपध | त्रिपद | तीन फूट लांब |
| थ्रिसत | त्रिंशत् | तीस |
| थ्रिसत | त्रिशत | तीनशें |
| थ्रिश् | त्रिष् | तीन |
| थ्रु | श्रु, स्रु, | वाहणें |
| थ्रांफ् | तृप् | तृप्त असणें |
| थ्रांफेध | तृप्त | तृप्त |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| थ्वरञ्ष् | त्वक्ष् | जोरानें वाहणें |
| थ्विष् | त्विक्ष् | प्रकाशणें |
| दइवित्य | द्वितीय | दुसरा |
| दएनू | धेनु | गाय |
| दएव | देव | खोटा देव, असुर |
| दएवी | देवी | खोटी देवता |
| दघ | दाह | डाग |
| दङ्र | दस्र | शहाणा |
| दङ्ह् | दंस् | पाहणें |
| दझ् | दह् | पोळणें |
| अप–दझ् | अप–दह् | जाळणें |
| हण्–दझ् | सम्–दह् | नाश करणें |
| दण्तन् | दन्त | दांत |
| दंस् | दंश् | चावणें |
| ,, | ,, दंस् | शहाणें होणें, पहाणें |
| दन | धन | दौलत |
| दव्, दब् | दम्भ्, दभ् | फसविणें |
| दम् | धम्, ध्मा | श्वासोच्छ्वास घेणें |
| दम् | दम् | आज्ञाधारक बनणें |
| दर् | दर् | फाडणें, तोडणें |
| निझ्–दर् | निस्–दर् | फाडणें |
| दर् | धर् | पकडणें |
| वी–दर् | विधर् | टेका देणें, मदत करणें |
| दर् | दर् | तारीफ करणें |
| दरेघ | दीर्घ | लांब |
| दरेघो–बाझु | दीर्घबाहु | लांब हात असणारा |
| दरेझ् | दर्ह् | मजबूत बसविणें |
| दरेन | धारणा | पक्कें धरणें |
| दरेना | दारण | अरुंद जागा |
| दरेव् | दर्भ्, दभ् | बांधणें |
| दरेस् | दर्श् | पाहणें |
| दरेस | दर्श | देखावा |
| दरेस्य | दृश्य | पाहणें (ना.) |
| दरेष् | धर्ष् | धाडस करणें |
| दरतर् | द्रष्टृ | पाहणारा |
| दर्शि | दृष्टि | दृष्टि |
| दव् | धाव् | पळणें |
| ,, | ,, | स्वच्छ करणें |
| दस् | दंश् | दंश करणें, चावणें |
| दस् | दंश् | श्रीमंत होणें |
| दसन् | दशन् | दहा |
| दसेम | दशम | दहावा |
| दष् | दक्ष् | सशक्त होणें, योग्य होणें |
| दषिन | दक्षिण | उजवा |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| दङ् | दास् | नाश करणें, प्रेम करणें |
| दङ् | दंस्,दंश् | इजा करणें |
| दा | दा | देणें |
| आ–दा | आ–दा | परत घेणें |
| दा | धा | बनविणें |
| अवि–दा | अभि–दा | हल्ला करणें |
| नि–दा | नि–धा | खालीं ठेवणें |
| वी–दा | वि–धा | विकटून राहणें |
| हण्–दा | सम्–धा | एकत्र ठेवणें |
| दा | ध्यै | विचार करणें |
| ,, | दा,दो | कापणें |
| दाइति | दाति | देणें [ना.] |
| दाउरु | दारु | लांकूड |
| दात | दत्त | दिलेला |
| ,, | धित | तयार केलेलें |
| दातर् | दातृ, दातर् | देणारा |
| दातर् | धातृ, धातर् | ब्रह्मा, उत्पन्न करणारा |
| दान | धान | ठेवणारा |
| दान | धाना | धान्य |
| दार | धारा | धार |
| दारन | धारणा | टेका देणें (ना.) |
| दाहि | धासि | उत्पत्ति |
| दि | धा, धे | स्तनपान करणें |
| दिझ् | दिह् | बांधणें |
| दिव् | दिव् | प्रकाशणें |
| दिस् | दिश् | शिकविणें |
| हण्–दिस् | सम्–दिश् | देऊन टाकणें |
| दिश् | दिश् | दाखविणें |
| दी | धी, ध्यै | विचार करणें |
| दु | दु | एखाद्यास वाईट बोलणें |
| दु | धू | हलविणें |
| दुघ् | दुह् | दूध काढणें |
| दुघ्धर् | दुहितर् | मुलगी [कारक |
| दुझित | दुरित | दुष्ट मार्गाचें, नुकसान |
| दुझूक्त | दुरुक्त | वाईट शब्द |
| दुझगइण्ति | दुर्गंधि | दुर्गंधियुक्त [वारा] |
| दुझ्वचङ्ह् | दुर्वचस् | वाईट बोलणारा |
| दुन्मन् | धूम | धूर |
| दुश् | दुष् | खराब होणें. |
| दुझ् दुश् | दुष्, दुस् दुर् | वाईट अर्थी उपसर्ग |
| दुश्केरेत | दुष्कृत | दुष्कृत्य |
| दुश्मनङ्ह् | दुर्मनस् | खराब मनाचा |
| दुषिति | दूषित, दूषिता | त्रास, दुःख |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| दूत | दूत | दूत |
| दूर | दूर | दूर |
| दूरएपार | दूरपार | पार करण्यास कठिण |
| देरेतर् | धर्तर् धर्तृ | आधार देणारा |
| दो धो, | दो | कापणें |
| द्रओघ | द्रोघ | खोटें भाषण |
| द्रप्ष | द्प्स | निशाण |
| द्रु | द्रु | पळणें |
| ,, | ध्रु | मजबूत होणें |
| ,, | द्रु | लांकूड, लांकडाची वस्तु |
| द्रुउअ ( ध्व? ) | ध्रुव | अचल, सशक्त |
| द्रुझ्, द्रुज् | द्रुह् | फसविणें, अपाय करणें |
| द्रुज् | ,, | फसविणारा, अपाय करणारा |
| अइविद्रुझ् / अइवि-द्रुज् | अभि-द्रुह् | करार मोडणें |
| द्व | द्व, द्वि, | दोन |
| द्वदसन् | द्वादशन् | बारा |
| द्वदस | द्वादश | बारावा |
| द्वफ्षङ्ह् | द्विपाशः | शृंखलाबद्ध |
| द्वर् | द्वर् | झांकणें |
| द्वर | द्वार | दार |
| द्विष् | द्विष् | दुःख देणें |
| द्वान् | ध्वन् | झांकलेलें असणें |
| द्वांस् | ध्वंस् | पळून जाणें |
| न | न | नाहीं, खचित |
| नइरे-मनङ्ह् | नृमनस् | शूर |
| नइर्य | नर्य | बहादुरीचा |
| नइर्योसङ्ह | नराशंस | अग्नीचें व देवदूताचें नांव |
| नएम | नेम | अर्धा |
| नख्तु | नक्त | रात्र |
| नझ् | नह् | बांधणें |
| नद् | निन्द् | धिक्कार करणें |
| नना | नाना | निरनिराळ्या रीतीनें |
| नप्तर, नपत् | नपात् | नातू |
| नबा | नभस् | आकाश |
| नबि | नाभि | बेम्बी [ बंद |
| नबानझ्दिश्त | नाभानेदिष्ठ | जवळचे वारसदार भाऊ- |
| नम् | नम् | वांकणें, नमस्कार करणें |
| नर, नर् | नर, नर् | मनुष्य |
| नव | नव | नवीन |
| नवइति | नवति | नव्वद |
| नवदस | नवदश | एकोणिसावा |
| नवदसन् | नवदशन् | एकोणीस |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| नवन् | नवन् | नऊ |
| नवसत | नवशत | नऊशें |
| नस् | नश् | नाहींसें होणें |
| नस् | नश् | मिळविणें |
| नाइरी | नारी | स्त्री |
| नाउम / नओम | नवम | नववा |
| नाएङ्हा | नासा | नाक |
| नाएङ्हन् | ,, | ,, |
| नाएङ्हइथ्य | नासत्य | असुराचें नांव |
| नाओघ, ( म्त् ) | नासा | नाक |
| नाफ्य | नाभ्य | नातलग, नाभीसंबंधीं |
| नावय | नाव्य | वाहणें ( पाणी ) |
| नि | नि | खालीं |
| निझ् | निज् | झाडून टाकणें |
| निण्द् | निन्द् | ह्रांसें करणें |
| निर | नीर | पाणी, सूर्यास्त |
| निझ्, निश्, | निस्, निष्, | बाहेर अर्थी उपसर्ग |
| नी | नी | मार्ग दाखविणें |
| उप--नी | उप--नी | नेणें |
| नुद् | नुद् | उठणें |
| नुर नूर, | नुर, नूर | आतां |
| नू | नू, नु | हल्लीं |
| नेम, नेमङ्ह् | नमस् | नमस्कार |
| नामन् | नामन् | नांव |
| न्याएण्च् | अञ्च् | खालीं जाणें |
| पइति | पति | मालक |
| पइति | प्रति | मागें, पुन्हां, प्रत्येक |
| पइतिवच् | प्रतिवचन | जबाब |
| पइतिश्ता | प्रतिष्ठा | मान, अब्रू |
| पइतिश्तान | प्रतिष्ठान | पाऊल |
| पइरि | परि | सभोंवतीं |
| पइरिकर | परिकर | नांगराचा वाटोळा पडलेला तास |
| पइरिवार | परिवार | कुंपण |
| पइरिथ्न | पृतना | लढाई |
| पउर्व | पूर्व | पूर्वी |
| पउर्वता | पर्वत | पर्वत |
| पच् | पच् | शिजविणें |
| पएसङ्ह् | पेशस् | दागिना |
| फ्र--पच् | प्र--पच् | भाजणें, शिजविणें |
| पण्चदस | पञ्चदश | पंधरावा |
| पण्चदसन् | पञ्चदशन् | पंधरा |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| पञ्चन् | पञ्चन् | पांच |
| पञ्चासत् | पञ्चाशत् | पन्नास |
| पतर्. पितर्, | पितर् | बाप |
| पतर | पत्र, पतत्र | पंख |
| पतित | पतित | गुन्हेगार |
| पत् | पत् | पडणें |
| आ-पत् | आ-पत् | दौड करणें |
| उस्-पत् | उद्-पत् | पडणें |
| पइरि-पत् | परि-पत् | आजूबाजूला पडणें |
| फ्र-पत् | प्र-पत् | उडणें |
| हांम्-पत् | सम्-पत् | जोरानें पडणें |
| पथ् | पथ् | जाणें |
| पथन् | पथिन् | रस्ता |
| पथ्नी | पत्नी | बायको |
| पद् | पद् | पडणें |
| पध, पद | पद, पाद | कवितेंतील चरण |
| पयङ्ह् | पयस् | दूध |
| पर् | पर् | निराश्रित करणें |
| ,, | ,, | शेवटास पोहोंचणें |
| पुर्, पर् | पूर्, पर् | भरणें |
| हांम्-पर् | सम्-पर् | कांठोकांठ भरणें |
| पर् | पर् | उडणें |
| पर | पर, परा | दूर |
| परेन | पर्ण | पंख |
| परेस् | प्रच्छ् | प्रश्न करणें |
| पइति-परेस् | प्रति-प्रच्छ् | पृच्छा करणें |
| पइरिपरेस् | परिप्रच्छ् | उलट प्रश्न करणें |
| हांम्-परेस् | सम्-प्रच्छ् | विचार घेणें |
| परेसु | पर्शव | फांसळी ( ळ्या ) |
| परेष् | पर्षु | पाणी शिंपडणें |
| परांश् | पराच्, परांच् | मागें |
| पर्शित | पृष्ठ | पाठ |
| पस् | पश् | बांधणें |
| अव-पस् | अव-पश् | जखडणें |
| पसु | पशु | चतुष्पाद जनावर, |
| पस्कात् | पश्चात् | मागें |
| पस्व | ,, | नंतर |
| पा | पा | बचाव करणें |
| पा, पि | पा | पोषण करणें |
| पात | पान | राखलेलें |
| पातर् | पातर्, पातृ | रक्षण करणारा |
| पाथ्र | पात्र | रक्षण |
| पाद | पाद, पद | मीन |
| पाध, पध | पाद | पाय |
| पामन् | पामन् | त्वचारोग |
| पायु | पायु | रक्षण करणारा |
| पार | पार | शेवट |
| पाश्न | पार्ष्णि | टांच |
| पिव्, पि | पीव् | पोषण करणें |
| पिख् | पिञ्ज् | मुरडणें |
| पितु, पिथ्व | पितु | खुराक, अन्न |
| पिस् | पिश् | आकार देणें |
| ,, | पिस् | भोंसकणें |
| पिष् | पिष् | मारणें, ठोकणें |
| पु, पू | पु, पू | पवित्र करणें |
| पुथ्र | पुत्र | मुलगा |
| पुथ्रवण्त् | पुत्रवन्त् | पुत्रवान् |
| पुथ्रो-दा | पुत्रदा | पुत्र देणारा |
| पुसा | पुच्छ | मुकुट |
| पूइति | पूति, पूतिक | सडणें ( ना. ) |
| पेरेथु | पृथु | रुंद |
| पेरेथु-ज्रयङ्ह् | पृथु-ज्रयस् | महासागराचें पाणी |
| पेरेन | पूर्ण | पूर्ण |
| पेरेनो-माएङ्ह | पौर्णिमा | पूर्णिमा |
| पेरेसु | पर्शु | बरगडी |
| पोउरु | पुरु | पूर्ण |
| पांस्नू | पांशु, पांसु | धूळ |
| फ्रएश्त | प्रेष्ठ | पहिला |
| फ्रओख्त | प्रोक्त | बोललेलें |
| फ्रकर | प्रकर | धंदा |
| फ्रझइण्ति | प्रजा | पुत्र, संतति |
| फ्रतेम | प्रथम | पहिला |
| फ्रथ् | प्रथ् | रुंद असणें |
| फ्रब्द | प्रपद | पावलाचा आंतील भाग |
| फ्रमनङ्ह् | प्रमनस् | स्नेह वृत्तीचा |
| फ्रवाझ | प्रवाह | वाढ |
| फ्रवार | प्रवार | लांब भिंत |
| फ्रसस्ति | प्रशस्ति | शिकवण |
| फ्रस्न, फ्रष्न | प्रश्न | प्रश्न |
| फ्राप | प्राप | ( पावसाचें ) पाणी वांटणें ( ना. ) |
| फ्रायत | प्रयत | ठरलेला |
| फ्रिति | प्रीति | स्तुति |
| फ्रीन | प्रीण | प्रार्थना, आशीर्वाद |
| फ्रु | प्रु, प्लु | विझणें |
| ,, | प्लु | उडणें, जाणें |
| ,, | ,, | ओढणें |
| फ्रांश् | प्रांच् | पुढें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| फ्रु | प्रु प्लु, | विझणें, जाणें धुणें, |
| फ्षु | प्सु | वाढणें |
| फ्रय | प्रिय | प्यार [ ओढणें |
| फ्श्तान | स्तन | स्तन |
| बएषझ् | भेषज् | उपाय |
| बओध | बोध,बुद्धि | बुद्धि |
| बओधङ्ह् | बुद्धि | ,, जीव |
| बङ्ह् | भास् | प्रकाशणें |
| बङ्ह | भास्, भास | प्रकाश |
| बज् | भज्,भञ्ज् | फोडणें, विभागणें |
| बग्ग | भङ्गा | भांग |
| बण्द् | बन्ध् | बांधणें |
| बर् | भर् | नेणें, आणणें |
| आ-बर् | आ भर् | ,, |
| फ्र-बर् | प्र-भर् | वापरणें |
| हांम्-बर् | सम्-भर् | एकत्र आणणें |
| बर्, बरेन् | भर् | भोंक पाडणें |
| बरण्त् | भरन्त् | घेऊन जाणें ( ना. ) |
| बरन | भरण | ठेवणें( ना.) |
| बरेज् | भ्राज् | प्रकाशणें |
| बरेझ् | बर्ह् | वाढविणें |
| बरेझिश् | बर्हिस् | बैठक, गालिचा |
| बरेस्मन् | ब्रह्मन् | डाळिंबाच्या झाडाची डहाळी |
| बस्त | बद्ध | बांधलेलें |
| बा | भा | प्रकाशणें |
| बाझु | बाहु | हात |
| बानु | भानु | किरण |
| बानुमण्त् | भानुमन्त् | प्रकाशित |
| बाम | भाम | प्रकाश |
| बित्य | द्वितीय | दुसरा |
| बिद्, बिध् | भिद् | मोडणें, तुकडे करणें |
| बिश् | द्विस् | दुप्पट |
| बी | भी | भिवविणें |
| बुजं् | भुज् | देणें |
| बुझ्र,बूझ्र | बुक्क | बकरा |
| बुध् | बुध् | समजणें |
| बुन | बुध्न | तळ |
| बू | भू | होणें |
| पइरि–बू | परि–भू | अंतर्भाव करणें |
| फ्र--बू | प्र--भू | होणें, असणें |
| बूइरि | भूरि | विपुल |
| बूमि | भूमि | जमीन |
| बूष् | भूष् | भूषित करणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| बेरेत | भृत | आणिलेलें |
| बेरेतर् | भर्तर् | आणणारा, उत्तेजन देणारा |
| बेरेति | भृति | नजराणा |
| बांझ् | बंह् | संगत करणें |
| ब्राझ् | बर्ह् | प्रकाशणें |
| ब्रातर् | भ्रातर् | भाऊ |
| ब्रास् | भ्रश्, भ्रंश् | चक्कर घेऊन पडणें |
| ब्रवत्, | भ्रू | भुंवई |
| मइति | मति | विचार |
| मइध्य | मध्य | मधला भाग, कंबर |
| मइनि | मणि | कंठी |
| मएघ | मेघ | मेघ |
| मएघोकर | मेघकर | मेघ करणारी ( वाफ ) |
| मएझ | मेह | मूत्र |
| मएष | मेष | मेंढा |
| मओइरि | वम्रा, वम्री, वल्मी | मुंगी |
| मख्षी | मक्षिका | माशी |
| मगवन् | मघवन् | धर्मात्मा |
| मघ्न | नग्न | नागवें |
| मझ् | मह् | वाढविणें |
| मझ | मह, महा | मोठा |
| मझङ्ह् | महस् | महत्त्व |
| मझण्त् | महन्त् | विस्तृत |
| मझिश्त | महिष्ठ | सर्वांत मोठा |
| मझ्ग | मज्जा | चरबी |
| मण्तर् | मन्तृ | विचार करणारा |
| मण्तु | मन्तु | विचार |
| मत | मत | ,, |
| मत् | स्मद् | सहित, सुद्धां |
| मद्, मध् | मध् | औषधोपचार करणें |
| ,, | मद् | मस्त होणें |
| मधु | मद, मधु | मध, मद्य |
| मधुमण्त् | मधुमन्त् | मद्यासह ( जेवण ) |
| मधेम | मध्यम | अगदीं मधला |
| मन् | मन् | विचार करणें |
| मनङ्ह् | मनस् | विचार, मन |
| मर् | मर् | मरणें |
| मर् | स्मर् | हिशेब जमविणें |
| मरक | मरक | व्याधि |
| मरेझ् | मर्ज् | स्पर्श करणें |
| मरेंच् | मर्च् | ठार मारणें |
| मरेत | मर्त | मरणाधीन मनुष्य |
| मरेद् | मर्द् | चर्वण करणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| मरेद् | मर्धृ | खून करणें |
| मस्य | मत्स्य, मच्छ | मासा |
| मश्य | मर्त्य | मरणाधीन, मनुष्य |
| मा | मा | मोजणें |
| उप--मा | उप--मा | पुढें चालविणें |
| फ्र-मा | प्र-मा | हुकूम करणें |
| मा | मा | नाहीं |
| माएङ्ह् | मास्, मास | महिना |
| मातर् | मातर् | आई |
| माह्य | मास्य | मासिक |
| मि | मि, | मापणें, पाहणें, मोजणें |
| मिझ् | मिह् | शिंपडणें, लघवी करणें |
| फ्र- मिझ् | प्र-मिह् | लघवी करणें |
| मित् | मिद् | प्रेम करणें |
| मिथ् | मेथ् | राहणें |
| „ | मिथ् | दुखापत करणें |
| मिथ | मिथ्या | खोटें |
| मिथ्र | मित्र | वि०नाम |
| मिथ्वन् | मिथुन | जोडी |
| मिद् | मिद् | मेहेरबानी करणें |
| मिव् | मीव् | लठ्ठ होणें |
| मुघ् | मुह् | तोडणें |
| मुच् | मुच् | सोडून देणें |
| पइति-मुच् | प्रति-मुच् | वर पसरणें |
| फ्र-मुच् | प्र-मुच् | काढून टाकणें |
| मुद् | मुद् | मजा करणें, आनंदणें |
| मुश्ति | मुष्टि | मूठ |
| मूथ्र | मूत्र | मूत्र |
| मेरेति | स्मृति | स्मृति |
| मेरेथ्यु | मृत्यु | मृत्यु |
| मोउरु | मरु | शहराचें नांव |
| मोषु | मक्षु | जलद |
| मांथ्र | मन्त्र | मंत्र |
| म्रुव् | म्रुच् | जाणें, हलणें |
| म्रू | ब्रू | बोलणें |
| य | य | जो |
| यओइति | यूति | संयोग |
| यओन, उपस्त | योनि उपस्थ, | स्त्रीजननेंद्रिय |
| यओश्द्, यओझ्द्, | योस् | पवित्र |
| यश्ति | यष्टि | फांदी |
| यङ्ह् | यस् | प्रयत्न करणें |
| यझ् | यज् | पूजा करण |
| यझत | यजत | पूजाई |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| यतार | यतर | दोहोंपैकीं कोणी तरी |
| यत् | यत् | जलदी करणें |
| यथ | यथा | अशा रीतीनें |
| यथ्र | यत्र | जेथें |
| यदा | यदा | जेव्हां |
| यम् | यम् | वश करणें |
| आ--यम् | आ--यम् | ताब्यांत जाणें |
| फ्रयम् | प्र--यम् | ठरविणें |
| यम् | यम् | मिळणें |
| यव | यव | जिदाचा आधार |
| यव्वत् | यवन्त् | जितकें |
| यवन्, य्वन् | युवन् | तरुण |
| यस् | यच्छ् | येणें |
| यस्न | यज्ञ | स्तुतिपर प्रार्थना |
| यस्न्य | यज्ञिय | स्तुतीस पात्र |
| यश्तर् | यष्टर्, यष्ट | आराधना करणारा |
| या | या | जाणें, चालणें |
| अइवि-या | अभि-या | वर जाणें |
| पइति--या | प्रति--या | विरुद्ध जाणें |
| या | या | मेहेरबानगी करणें |
| याह्, य | यास् | घालणें |
| „ | यस् | काम करणें |
| यात | यात | वर्तणूक |
| यातु | यातु | जादू |
| यान | यान | देणगी |
| यास् | याच् | याचना करणें |
| यिम | यम | विवष्व[स्व]न्ताचा |
| यु | यु | जोडणें [ मुलगा ] |
| युज् | युज् | बांधणें [ जोडणें ] |
| अप--युज् | अप--युज् | वियुक्त करणें |
| युझ् | युज् | एकत्र असणें |
| युध् | युध् | लढाई करणें |
| यूइति | यूति | संबंध |
| येधि, येझि | यदि | जर |
| येम | यम | जोडी |
| रइथ्य | रथ्य, रथ्या | मार्ग |
| रए | रै | दौलत |
| रएखेनङ्ह् | रेक्णस् | मूल्यवान वस्तु |
| रएवन्त् | रेवन्त् | श्रीमंत |
| रओचङ्ह् | रोचिस् | प्रकाश |
| रओचन | रोचन | दिवसाचा प्रकाश, दिवस |
| रघ् | लङ्घ् | हलकें होणें |
| रङ्ह् | रस् | स्तुति करणें |
| रजि | रंज् | प्रीति करणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| रझ् | रह् | सोडून देणें |
| ,, | राज् | जमाविणें, न्याय करणें |
| रझङ्ह् | रहस् | जंगल |
| रश्नित | रश्निष्ट | खरा सत्यनिष्ठ |
| रतु | ऋतु | वेळ |
| रथ | रथ | रथ |
| रन् | रण् | चेतविणें |
| रन | रण | समरांगण |
| रप् | रभ् | हिरावून घेणें |
| रम् | रम् | आराम घेणें, तुष्ट होणें |
| आ-रम् | आ-रम् | ,, ,, |
| रम् | रम् | मारणें |
| रा | रा | देणें |
| रा | रा | अटकाव करणें |
| राइति | राति | नजराणा |
| राझ् | राज् | राज्य करणें |
| राथ्नि | अरत्नि | एक माप |
| राद् | राध् | देणें |
| रादङ्ह् | राधस् | देणगी, आहुति |
| राम | राम | शांति, सुख |
| रि | री | स्रवणें, पाझरणें |
| रिच् | रिच् | रिकामें करणें |
| रिष् | रिष् | जखम करणें |
| रुच् | रुच् | प्रकाशणें |
| अइवि-रुच् | अभिरुच् | प्रकाशणें |
| आ-रुच् | आ-रुच् | ,, |
| रुध्, रुद | रुह् | वाढणें |
| ,, ,, | रुद् | रडणें |
| रुप् | लुप् | लुटणें |
| रू | लू | वेगळें करणें, कापणें |
| रेन्घ् | लङ्घ् | हलकें होणें |
| रेन | रण | लढाई |
| वइरि | वारि | सरोवर |
| वइर्य | वार्य | पसंत |
| वएघ | वेग | ठोसा |
| वएज | वीज, बीज | मूळ बीं |
| वएति | वेत्र | फांदी |
| वएस्मन् | वेश्मन् | वसतिस्थान |
| वओइरि | वर्विर | एक फळ ( ? ) |
| वकू | वङ्घ् | दुःख देणें |
| वख्ष् | वक्ष् | वाढणें |
| वख्षथ | वक्षथ | वाढ |
| वङ्ह् | वस् | राहणें |
| ,, | ,, | झांकणें, [ कपडे ] घालणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| वङ्ह् | वस् | प्रकाशणें |
| ,, | ,, | पसंत करणें |
| वङ्हन | वसन | वस्त्र |
| वङ्हु | वसु | चांगलें |
| वङ्हुधा | वसुदा | देणगी देणारा |
| वच् | वच् | बोलणें |
| पइति-वच् | प्रति-वच् | जबाब देणें |
| फ्र-वच् | प्र-वच् | जाहीर करणें |
| वच् | वच् | वाणी |
| वचङ्ह् | वचस् | ,, |
| वझ् | वह् | वाहून नेणें |
| अइवि-वझ् | अभिवह् | उंच चढणें |
| आ-वझ् | आ-वह् | पुढें जाणें |
| उझ् वझ् | उद्-वह् | उडणें |
| नि-वझ् | निवह् | खालीं घेऊन जाणें |
| फ्रवझ् | प्रवह् | नेणें |
| हांम्-वझ् | सम्-वह् | बरोबर जाणें |
| वझ् | वज् | मजबूत करणें |
| वझन | वहन, वाहन | गति देणें ( ना. ) |
| वझ्य | वह्य | बोजा |
| वझ्र | वज्र | गदा |
| वत् | वत् | जाणणें |
| वद्, वध् | वह् | हलणें |
| ,, ,, | वह | लग्न करणें |
| ,, ,, | वध्, बाध् | मारणें |
| ,, ,, | उन्द् | ओलें करणें |
| वन् | वन् | जिंकणें, मारणें |
| ,, | ,, | प्रेम करणें |
| वना | वन | झाड |
| वप् | वप्, वे | विणणें |
| ,, | वप् | बीं पेरणें |
| वम् | वम् | ओकणें |
| वयु | वायु | वारा |
| वर् | वृ | झांकणें, आश्रय देणें |
| हांम्-वर् | सम्-वर् | ,, पसरणें |
| वर् | वर् | प्रेम करणें, आवडणें |
| ,, | ,, | भरंवसा ठेवणें |
| ,, | ,, | प्रतिकार करणें |
| वर, उर्थ, | उरस् | छाती |
| वराझ | वराह | डुकर |
| वर्कू, [illegible] | म्रक, म्रच् | चिरणें |
| वरेच् | वर्च् | प्रकाशणें |
| वरेचङ्ह् | वर्चस् | प्रकाश |
| वरेझ् | वर्ह् | उद्योग करणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| वरेध, वरेद | वर्ध | फुलझाड रोप |
| वरे | वर्ष् | पेरणें |
| रेधृ, वरेद् | वर्धृ | वाढविणें |
| वरेष | वर्क्ष | झांकणें |
| वरेष | वृक्ष | जंगल, झाड |
| वस् | वश् | इच्छा करणें |
| वस्त्र | वस्त्र | कपडा |
| वहिश्त | वसिष्ठ | सर्वांत उत्तम |
| वा | वा | अथवा |
| ,, | ,, | वाहणें [ वारा ] |
| फ्र-वा | प्र-वा | फुंकणें |
| हाम्-वा | सम्-वा | एकदम एकत्र फुंकणें |
| वात | वात | वारा |
| वाध | वाध | मारण्याचें हत्यार |
| वार् | वार् | पाऊस पडणें |
| वाइरि, वार | वार, वारि | वर्षाव |
| वार | वार | इच्छा |
| ,, | ,, | पंख |
| ,, | ,, | आसरा |
| वारेश्मन् | वर्त्मन् | ,, |
| वाष | वह्, वाह्, वश | रथ |
| वि, वय, | वि | पक्षि |
| विज् | विज् | दुःख देणें |
| विद् | विद् | समजणें |
| आ-विद् | आ-वि | जाहीर करणें |
| नि-विद् | नि-विद् | बोलाविणें |
| पइति विद् | प्रति-विद् | खबर असणें |
| विद् | विद | मिळणें, पोहोंचणें |
| विध् | भिद् | मोडणें |
| विध्या | विद्या | विद्या, ज्ञान |
| विन् | वेण्, वेन् | पाहणें |
| विप् | विप्, वप् | बी पेरणें |
| विष् | विष् | पाणी शिंपडणें |
| विष | विष | वीष |
| विश् | विष् | ,, |
| वी | वी | पडणें, उडणें |
| वी | वि | दूर, विरुद्ध |
| वीत | वीत | गेलेला |
| वीतस्ति | वितस्ति | वीत |
| वीद् | विद् | ज्ञान |
| वीबेरेथ्वत् | विभृत्वन् | प्रसिद्ध |
| वीर | वीर | वीर |
| वीरजन् | वीरहन् | वीराला मारणारा |
| वीर्य | वीर्य | वीरपुत्र, वर्यिवान् |
| वीवङ्हवत् | विवस्वत् | जमशेद राजाचा बाप |
| वीस् | विश् | होणें, असणें |
| ,, | ,, | खेडें, रस्ता |
| वीसत, वीस-इति | विंशति | वीस |
| वीसांस्तेम | विंशतितम, विंश | विसावा |
| वीस्प | विश्व | सर्व, |
| वीस्पइति | विश्पति | गांवाचा धनी |
| वेरेथ्रघ्न | वृत्रहन् | मित्र, विजयी |
| वेह्र्क | वृक | लांडगा |
| वोइघ्ना | विघ्न | विघ्न |
| वोउरु | उरु | रुंद, मोठा |
| वोउरु--गओ-यओइति | उरु-गव्यूति | रुंद कुरणाचा मालक |
| वोहुन, वोहुनि | वसा | रक्त, ऋतुस्राव |
| व्यच | व्यच | जग |
| व्यरेथा | व्यर्थ | घाण |
| व्रच | व्रश्च् | नाश करणें |
| सउर्व | शर्व | क्षथ्रवैर्याचा शत्रु, असुर |
| सख्ष् | शिक्ष् | शिकणें |
| सङ्ह् | शंस्, शास् | बोलणें |
| अइवि-सङ्ह् | अभि-शंस् | शाप देणें |
| सङ्ह | शंसा | शिक्षण |
| सच | शक् | शिकणें |
| सत् | शत | शंभर |
| सतो—दार | शतधार | शंभर अग्रें असलेली [ गदा ] |
| सद् | शाध् | नुकसान करणें |
| सफ | शफ | खूर |
| सम् | शम् | शांत होणें |
| सर् | शर् | मोडणें, दुखापत करणें |
| सर, सार | शिरस् | डोकें |
| सरेध | शरद, शरदा | सौर वर्ष |
| सरेध | शर्धस् | तऱ्हा |
| सवङ्ह् | शवस् | नफा, सुख |
| सा | शा | नाश करणें |
| साएङ्ह् | शास् | शिकविणें |
| साम | श्याम | काळा |
| सास्तर | शास्तर् | राजा |
| सास्ना | शासन | मत, धार्मिक आज्ञा |
| सिख्ष् | शिक्ष् | शिकणें |
| सिप्, सिफ् | क्षिप् | पालथें करणें |
| सिष् | शिष् | सोडून देणें |
| सी | शी | निजणें |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| सीष् | शिक्ष् | शिकविणें |
| सुख | शुक्र | लाल |
| सुच् | शुच् | जळणें, प्रकाशणें |
| सुप्ति | शुप्ति | खांदा |
| सुव्रा | शुभ्र | नांगर |
| सून | शून्य | रिकामा |
| सूर् | शूर् | शूर होणें |
| सूर | शूर | शूर |
| ,, | शूल | भाला |
| सेविश्त | शविष्ठ | सुख देणारा |
| सो | शो | कापणें |
| स्कर् | स्खल् | हलविणें, वळविणें |
| स्कु | स्कु | झांकणें |
| स्केम्ब् | स्कम्भ् | टेका देणें |
| स्केंब | स्तंभ | स्तंभ, खांब |
| स्विण्द् | छिन्द् | मोडणें |
| स्विण्व | स्कम्भ् | आधार देणें |
| स्तइरिश् | स्तर | बिछाना |
| स्तओतर् | स्तोतर् | स्तुति करणारा |
| स्तओमन्,स्तओमि | स्तोम | कीर्तिगायन |
| स्तओम्य | स्तोम्य | कीर्तिविषयक |
| स्तओयङ्ह् | स्थवीयस् | अधिक जाड अ. मोठा |
| स्तओर | स्थूर, स्थूरिन्, स्थौरिन् | पशु |
| स्तक् | स्तक् | प्रतिकार करणें |
| स्तर् | स्तर् | पसरणें |
| आ-स्तर् | आ-स्तर् | पसरणें. |
| स्तर, स्तर् | स्तर् | प्रकाश देणारा, तारा |
| स्तव् | स्तभ्, स्तंभ् | आश्रय देणें |
| स्तत्र | स्थूल, स्थावर | मजबूत |
| स्ता | स्था | उभें राहणें |
| अव-स्ता | अव-स्था | जवळ उभें राहणें |
| आ-स्ता | आ-स्था | उभें राहणें |
| उपस्ता | उप-स्था | जवळ उभें राहणें |
| उस्-स्ता | उद्-स्था | उठणें, उभें राहणें |
| नि-स्ता | नि-स्था | खिळलेलें असणें |
| पइति-स्ता | प्रति-स्था | विरोध करणें |
| फ्र-स्ता | प्र-स्था | पुढें जाणें |
| स्ताइति | स्थिति | दृढता |
| स्तात | स्थित | थांबलेला ( विलेला ) |
| स्तान | स्थान | तबेला |
| स्ताविश्त | स्थविष्ठ | विशाल |
| स्तु | स्तु | तारीफ करणें |
| स्तूइति | स्तुति | स्तुति |
| स्तून | स्थूणा | स्तंभ |
| स्तेम्ब् | स्तम्भ् | टेका देणें |
| स्तेम्बन | स्तम्भन | खांब |
| स्त्री | स्त्री | स्त्री |
| स्नएझन | स्नेहन | रक्तपात |
| स्नथ् | श्नथ् | मारणें, नाश करणें |
| स्ना | स्ना | स्नान करणें |
| स्नावरे | स्नाव | स्नायु |
| स्निझ् | स्निह् | बर्फ पडणें |
| स्निझ् | स्निह् | लाड करणें |
| स्नुध् | स्नुह् | टप टप पाणी पडणें |
| स्पएत | श्वेत | पांढरा |
| स्पेन्, स्पेन्, स्पन् | श्वि | वाढविणें |
| स्पर् | स्फुर् | पायाखालीं तुडविणें |
| वी-स्पर् | वि-स्फुर् | उलटा पालट करणें |
| स्परेझ् | स्पर्ह् | द्वेष करणें |
| स्परेद् | स्पर्ध् | ईर्षा धरणें |
| स्पस् | स्पश्, पश् | पहाणें |
| स्पाएङ्ह् | श्वस् | शिकणें, श्वासोच्छ्वास करणें |
| स्पि | श्वि | फुगणें |
| स्पित् | श्वित् | पांढरें होणें |
| स्पित | श्वेत | पांढरा |
| स्रएश्त | श्रेष्ठ | अति सुंदर |
| स्रओतर् | श्रोतर् | श्रोता |
| स्रओथ्र | श्रोत्र | गायन |
| स्रओनि | श्रोणि | नितंब |
| स्रवङ्ह्, स्रव | श्रवस् | प्रार्थना |
| स्रि | श्रि | हिंडणें, आश्रय घेणें |
| स्रिष् | श्रि | चिकटणें |
| स्रीर | श्रील | सुंदर |
| स्रु | श्रु | ऐकणें |
| ,, | ,, | जाणें, हलणें |
| स्वन् | श्वन् | कुत्रा |
| षएत | षेत | गर्भपात करण्याचें औषध |
| षिति | क्षिति | वसतिस्थान |
| षुद्, षुध्, | क्षुध् | भूक लागणें |
| षुध | क्षुधा | भूक |
| षोइथ्र | क्षेत्र | शेत |
| षोइथ्र्य | क्षेत्रिय | शहरविषयक अगर शेत-[विषयक |
| ष्यु | क्ष्यु, च्यु | पुढें जाणें,वाढणें |
| ह | स | हें, तें |
| हइथ्य | सत्य | खरें |
| हउर्व | सर्व | सर्व |
| हएतु | सेतु | पूल |

| अवेस्ता | संस्कृत | मराठी |
|---|---|---|
| हएना | सेना | सेना |
| हएन्य | सैन्य | सेनाविषयक |
| हओम | सोम | सोमवल्ली |
| हओमनङ्ह | सौमनस | सद्धेतु |
| हओमवण्त् | सोमवन्त् | सोमाबरोबर असलेले |
| हओम्य | सोम्य | सोमसंबंधीं |
| हकेरेत् | सकृत् | एकदां |
| हखि, हखन् | सखि | मित्र |
| हखित | सक्थि | सक्थि, मांड्या |
| हच् | सच् | मागून जाणें |
| हच | सचा | दूर |
| हघ् | सह् | हिराऊन घेणें |
| हझङ्र | सहस्र | हजार |
| हझङ्रोस्तून | सहस्र-स्थूण | हजार स्तंभ असलेले |
| हझङ्ह | सहस् | लुटालूट, चोरी |
| हांम, हेन्, हन् | सं, सङ्, सञ् | सह, एकत्र |
| हञ्ज | सञ्ज | आसक्त होणें |
| हञ्जमन | सङ्गम | सभा |
| हन्त | सन्त | जिवंत ( मनुष्य ) |
| हथ्र | सत्रा | तेथें |
| हद् | सद् | बसणें |
| अप-हद् | अप-सद् | दूर बसणें |
| नि-हद् | नि-सद् | बसणें |
| हध् | साध् | ठार करणें |
| हध | सह | सहित |
| हन् | सन् | योग्य [मनुष्य |
| हन | सनात, सनातन | इच्छा करणें, म्हातारा |
| हप् | सप् | वाढविणें |
| हप्तथ | सप्तथ | सातवा |
| हप्तदस | सप्तदश | सतरावा |
| हप्तदसन् | सप्तदशन् | सतरा |
| हप्तन् | सप्तन् | सात |
| हप्ताइति | सप्तति | सत्तर |
| हम | समा | उन्हाळा |
| हरह्वइति | सरस्वती | प्रांताचें व नदीचें नांव |
| हरोयु | सरयु | हेरी नांवाच्या नदीकांठ-<br>चा मुलुख, नदीचें नांव |
| हवन | सवन | सोमाचा रस कुटणें |
| हव्य | सव्य | डावा |
| हत्य | सत्य | दाणें |
| हा | सा, सो | कापणें |
| हाइति | साति | विभाग |
| हाऊ | असौ | तो, ती, हा, तो |
| हि | सि | बांधणें |
| हिघ | सच | मारणें |
| हिच् | सिच् | ओलें करणें |
| हिज्वा | जिव्हा | जीभ |
| हिन्दु | सिन्धु | सिंध ( हिंदुस्थान ) |
| हित | सित | दाबांत राखलेला |
| हु | सु | गर्भधारणा होणें |
| ,, | ,, | खुबसुरत, सुंदर |
| हुकेरेत | सुकृत | छान तयार केलेला |
| हुक्रतु | सुक्रतु | विवेकी |
| हुख्षथ्र | सुक्षत्र | गुणवान् राजा |
| हुनु | सूनु | मुलगा |
| हुभघ | सुभग | नशीबवान् |
| हुमत | सुमत | चांगला विचार |
| हुमनङ्ह | सुमनस् | चांगला विचार करणारा |
| हुरा | सुरा | दारू |
| हुस्रवङ्ह् | सुश्रवस् | वि. नाम, स्यावर्षणसुत<br>कवि उषाचा नातु |
| हुष् | शुष् | सुकून जाणें [ठिकाण |
| हुषिति | सुक्षिति | सुखदायक राहण्याचें |
| हुश्क | शुष्क | सुका |
| हू | सू, शू | डुकर |
| हूख्त | सूक्त | सुशब्द [ण्यासाठीं) |
| हांम्-स्ताइति | संस्थिति | एकत्र उभे राहणें ( स्वत- |
| ह्व | स्व | स्वतःचें |
| ह्वर | सुर् | प्रकाशणें |
| ,, | स्वर्, सुर् | सूर्य |
| ह्वरे-दरेस | स्वर्-दृश | सूर्यासारखा दिसणारा |
| ह्व, ह्वा | स्व | स्वतः |
| ह्वीर | सुवीर | बलवान् वीर |

वर अवेस्ता ग्रंथाची जी माहिती दिली आहे आणि अवेस्ता व संस्कृत या भाषांतील जीं शब्दसाम्यें दिलीं आहेत त्यांवरून पर्शुभारतीय संस्कृतीसंबंधाचीं ऐतिहासिक अनुमानें काय निघण्यासारखीं आहेत याचा आपण विचार करूं.

**इराणी व भारतीय अशा दोन शाखा पडण्याचा काल.**—आद्य आर्यवंशी लोकांनीं मूलगृह सोडल्यानंतर पूर्वेच्या बाजूला त्यांची जी आर्यन् शाखा वळली तिच्यांतील आर्यन् लोक भारतीय व इराणी लोकांचे समान पूर्वज होत. यांनाच पर्शुभारतीय किंवा इंडो-इराणियन हें नांव आहे. हे लोक बराच काल एकत्र राहिल्यानंतर पुन्हा त्यांची फाटाफूट झाली व त्यांपैकीं कांहीं पश्चिमेकडे सांप्रतच्या इराण व आशिया मायनर या प्रदेशाकडे गेले व कांहीं हिंदुस्थानांत शिरले. पर्शुभारतीयांच्या इराणी व भारतीय अशा दोन शाखा केव्हां पडल्या तो काळ ठरविण्याचें एक साधन म्हणजे

पश्चिमआशियांतील राष्ट्रांत खास इराणी शब्दांचा झालेला प्रवेश हें होय. इजिप्तमधील टेल एल–अमर्ना येथील कीलाकृति शिलालेखांत ( ख्रि. पू. १४०० ) सीरिया व पॅलेस्टाइन येथील लहानसहान राजांच्या नांवांत अर्तमन्य, अर्शविय, शुत्रर्न हीं नांवें आणि वर्झन हीं अक्षरें अंती असलेलीं नांवें आढळतात. तसेंच युफ्रेटीझ नदीकांठच्या प्रदेशांतील मिटनी लोकांच्या राजांचीं अर्ततम, शुतर्न, अर्तशुमर, दुश्रत्त वगैरे नांवें आढळतात. असुरियन शिलालेखांत कुंडस्पी, कुतस्पी असलीं नांवें आढळतात. या नांवांसंबंधाच्या पुराव्याच्या जोडीला दुसरा एक महत्त्वाचा पुरावा आहे, तो घोडा या प्राण्यासंबंधाचा. बाबिलोनिया, इजिप्त व ग्रीस या देशांत याच सुमारास ( ख्रि. पू. १७००) घोडा हें जनावर प्रथम परिचित झालें. यापूर्वी म्हणजे इजिप्तमधील १२ व्या राजघराण्याच्या व बाबिलोनियन लोकांच्या खम्मुरबी राजाच्या काळापर्यंत घोडा हें जनावर त्यांनां अज्ञात होतें. आर्यन् लोकांनां हें जनावर फार पूर्वीपासून माहीत होतें व आर्यन् वंशाच्या इराणी शाखेनेंच त्याचा पश्चिमआशियांतील राष्ट्रांत परिचय करून दिला असें मानणें सयुक्तिक आहे. सदरहू पुराव्यावरून हें सिद्ध होतें कीं, ख्रि. पू. २००० च्या सुमारास इराणी लोकांचें इराणांत स्वतंत्र राष्ट्र प्रस्थापित झालें होतें व त्यांचा संबंध प्राचीन बाबिलोनिया, इजिप्त वगैरे सेमेटिकवंशी लोकांच्या राष्ट्रांशीं सुरू झाला होता. अर्थात् यापूर्वी बरीच वर्षे म्हणजे ख्रि. पू. ३००० च्या सुमारास ही पौरस्त्य आर्यन शाखा आपल्या इंडो–इराणियन् गृहांतून विभागली जाऊन तिच्या शाखा हिंदुस्थान व इराण या बाजूंनां अनुक्रमें वळल्या असाव्या.

**पर्शुभारतीयांचा एकत्रनिवासदर्शक पुरावा.**— वरील विवेचनावरून हें उघड दिसून येईल कीं, पाश्चात्य आर्यन् शाखा मूलगृहांतून फुटून निघाल्यानंतरहि बरींच वर्षे भारतीय व इराणी आर्यांचे पूर्वज एकत्र रहात होते. इराण व हिंदुस्थान या दोन देशांचें स्थलसांनिध्य हा सदरहू अनुमानास एक पुष्टिदायक पुरावा आहेच. पण ह्याशिवाय बलवत्तर पुरावा संस्कृतिसाम्याचा आहे. भाषाविषयक शब्दसाम्यें वर दिलींच आहेत. त्यांत संख्याविषयक, निर्जीवसृष्टिविषयक, सजीवसृष्टिविषयक, मानवशरीरावयवविषयक वगैरे विविध शब्दक्षेत्रांत साम्यें आढळतात. क्रियापदवाचक शब्दांचीं साम्यें तर अतोनात आहेत. वैदिक भाषेंतील शब्दांचें इतक्या मोठ्या प्रमाणावर साम्य अवेस्ता भाषेखेरीज इतर कोणत्याहि प्राचीन यूरोपीय भाषेशीं नाहीं. हें विस्तृत शब्दसाम्य भारतीय व इराणी आर्यांचें चिरंतन साहचर्य दर्शवितें असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

**अवेस्ता व वेद यांचें साम्य.**—दुसरा पुरावा ग्रंथसाम्याचा. इराणी लोकांच्या अवेस्ता या प्राचीनतम धर्मग्रंथाबद्दल जी माहिती वर दिली आहे तीवरून हें दिसून येईल कीं, अवेस्ताची रचना भारतीयांच्या वेदग्रंथांसारखीच आहे. म्हणजे अवेस्ता हा धर्मग्रंथ अनेक विषयांसंबंधीं प्राचीन ऋचांचा व सूक्तांचा संग्रह आहे. कुराणाप्रमाणें किंवा बायबला( नवा करार )प्रमाणें तो एका विशिष्ट व्यक्तीच्या संप्रदायविषयक कामगिरीचा द्योतक नाहीं. अवेस्ता व वेद या ग्रंथांत आलेल्या देवतानामांसंबंधानें असेंच विलक्षण साम्य आहे. वैदिक धर्मांतील प्राचीन मुख्य देवता मित्र, अर्यमन्, भग, वायु, वरुण, सोम, अग्नि [ हुतवह ], इंद्र ( वृत्रघ्न ) उषस् इत्यादि आहेत, तर पारशांच्या जुन्या धर्मांतील मिथ्र, अइर्यमन्, हओम, वेरेथ्रघ्न, वायु, उष, नर्योसंघ या असून सर्वांतील श्रेष्ठ देवाला किंवा स्वर्गीय निर्झरांच्या अधिपतीला बघ किंवा भग ही संज्ञा आहे.

अवेस्ताग्रंथांत ऋग्वेदाप्रमाणेंच स्तावक म्हणजे देवतास्तुतिपर ऋचा पुष्कळ आहेत. या ग्रंथांतील यस्न म्हणून जो भाग आहे, त्यांत हओम यज्ञाचा विधि सांगितला असून त्याचें वैदिक काळांतील सोमयज्ञाशीं फार साम्य आहे. भारतीय आर्यांप्रमाणें इराणी आर्य पुरोहितहि हा सोमरस प्राशन करीत असत. मांसाचें हवन करून अवशिष्ट मांस भक्षण करावें असाहि विधि या ग्रंथांत आहे. अशा प्रकारें प्राचीन इराणी धर्मग्रंथ व भारतीय वेदग्रंथ यांत विविध प्रकारचीं साम्यें आढळतात.

**इराणी व भारतीय आचारविषयक साम्यें.**— तिसरें साम्य इराणी व भारतीय लोकांचे आचारविचार व चालीरीती या विषयांचें. प्राचीन इराणी लोकांसंबंधीं सविस्तर माहिती जर्मन विद्वान् गायजर यानें आपल्या 'सिव्हिलिझेशन ऑफ ईस्टर्न इराणियन्स' नामक ग्रंथांत दिली आहे. त्यावरून असें दिसतें कीं, धार्मिक विधी, नैतिक नियम, सामाजिक चालीरीती, उद्योगधंदे, शासनसंस्था व कायदे, वगैरे अनेक बाबतींत प्राचीन इराणी आर्यांचें भारतीय आर्यांशीं फार साम्य होतें. मानवी कार्यक्षेत्रांतलि हीं सर्व साम्यें उद्धृत करण्यास येथें अवकाश नाहीं, सबब खाजगी जीवनक्रमांत उभयतांमध्यें दिसून येणारीं साम्यें तेवढींच येथें देतों.

मनुष्य खाजगी जीवनक्रमाची जबाबदारी स्वतःवर सामान्यतः विवाहापासून घेतो. 'विवाहाचा उद्देश प्रजाजनन (पुत्रोईष्टी ) विशेषतः पुत्रप्राप्तीची इच्छा' ( वेंदीदाद ३.३१ ) या प्राचीन इराणी लोकांतील कल्पनेचें आपल्यांतील 'प्रजायै गृहमेधिनाम्' या कालिदासोक्तींतील भारतीय ध्येयाशीं पूर्ण साम्य आहे.

प्रसूतीनंतर कांहीं दिवस स्त्रीला अस्पृश्य मानावी असें अवेस्ता ग्रंथांत आहे. भारतीय आर्यांत ही चाल प्रचलित आहेच; आणि प्राचीन जर्मन लोकांतहि ही चाल होती. इराणी लोकांत मुलगे व मुलीसुद्धां मोठ्या झाल्यावर त्यांनां

पवित्र सूत्र (ऐव्याओघन) धारण करण्याचा धर्मविधि करावा लागतो. हल्लींचे पारशी लोक या सूत्राला कोस्ती म्हणतात. हें सूत्र लोकरीचें असून तें बहात्तर सुती असतें. या इराणी धर्मविधीचें भारतीय उपनयन विधीशीं उघड साम्य आहे; इतकेंच नव्हे तर इराणी लोकांप्रमाणें वैदिक भारतीयांत पुरुष व स्त्री दोघांनांहि उपनयन विधि अवश्य मानीत असत.

पंधरावें वर्षे हीं मुलीच्या लग्नाची मर्यादा होय असें प्राचीन इराणी लोक मानीत असत व त्यानंतर म्हणजे ऋतुप्राप्तीनंतर मुलगी अविवाहित ठेवणें मोठें पातक होय असें आवेस्ता ग्रंथांत आहे (यस्त १७.५९). विवाह जमवून आणण्याची जबाबदारी पालकांवर असे. प्रथम केवळ वाग्दान होत असे. मुलीच्या नवव्या वर्षी वाग्दान होऊन पुढें तेराव्या वर्षी विवाह, इतकाहि काळ मध्यंतरीं जात असे. विवाहविधींतील शेवटचा समारंभ म्हणजे वधूला भूषित करून वराच्या घरीं मिरवत नेणें हा असे. विवाहित स्त्रीला न्मानो-पत्नी (गृहपत्नी) व वराला न्मानो-पति (गृहपति) असें पद प्राप्त होतें. विवाहासंबंधाच्या या अनेक बाबतींत इराणी चालीरीतींचें भारतीय चालीरीतींशीं निकट साम्य आहे. निकट नातें दर्शविणाऱ्या शब्दांचें अवेस्ता व वैदिक भाषेंतील साम्यहि उद्‌बोधक आहे.

| अवेस्ता संस्कृत. | आवेस्ता संस्कृत. |
|---|---|
| पितर्-पतर्-पितर्-बाप | ब्रातर्-भ्रातर्-भाऊ |
| मातर्-मातर्-आई | झामातर् जामातृ-जांवई |
| पुथ्र-पुत्र. मुलगा | व्हसुर-श्वशुर |
| दुघ्धर्-दुहितर् मुलगी | ह्वङ्हर्.-स्वसर् |
| नप्तर् नपत्-नपात नातू | ब्रातुइर्य-भ्रातृव्य |

अवेस्ता ग्रंथांत गृहकारभारांत पतिपत्नींचा समान दर्जा असल्याचें प्रतिपादिलें आहे, धार्मिक विधींत पतीबरोबर पत्नीला हजर राहण्याचा हक्क असे. ऋग्वेदांत ह्याच इराणी चालीशीं समान अशी चाल नमूद केली आहे (ऋग्वेद १०.८६,१०.).

विवाहाच्या बाबतींत एक मोठा विसदृश नियम या दोन आर्यन् शाखांत आढळतो. तो हा कीं, प्राचीन भारतीय आर्यांत जवळच्या नातेवाईक स्त्रीपुरुषांचा विवाहसंबंध निषिद्ध मानला जात असे, व ह्या निषेधाची अत्यंत प्राचीनता ऋग्वेदांतील यमयमीविषयक कथाप्रसंगावरून चांगली सिद्ध होते. उलटपक्षीं इराणी आर्यांत निकट संबंध असलेल्या नातेवाईक स्त्रीपुरुषांचे विवाह मान्य असत इतकेंच नव्हे तर विशेष पुण्यकारक व आवश्यक मानीत असत. हा असा नियम करण्याचें कारण स्वतःच्या आर्यन् वंशांत इतर परकी वंशांतील रक्ताची भेसळ होऊं नये, आपली जात शुद्ध रहावी हें असलें पाहिजे. अर्वाचीन इराणी लोकांतहि नातेवाईकांचे परस्पर विवाहसंबंध रूढ आहेत.

इराणी उर्फ पारशी लोकांनां दिनचर्येंतील बहुतेक क्रियांबरोबर मंत्र म्हणावे लागतात. निजून उठतांना, प्रातर्विधि, स्नान वगैरे विधी करतांना,नंतर सकाळची प्रार्थना म्हणतांना तसेंच भोजनाच्या वेळीं, सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं व शेवटीं निजण्याच्या वेळीं निरनिराळे मंत्र म्हणावे लागतात. इतकेंच नव्हे तर शिंकल्यानंतर, मलमूत्रोत्सर्गानंतर, स्त्रीसंभोगोत्तर, स्वप्नावस्था झाल्यास, अंगावरील केंस व नखें काढल्यानंतर इत्यादि अनेक प्रसंगीं मंत्र म्हणावे लागतात. या बहुतेक वेळचे मंत्र अवेस्ताग्रंथांतीलच आहेत, व जे त्यांत आढळत नाहींत ते अवेस्ताग्रंथाच्या अनुपलब्ध भागांतील असावेत. या मंत्रोच्चारणप्रकाराचें भारतीय आचारांशीं पूर्ण साम्य आहे हें सांगावयास नकोच.

प्राचीन व अर्वाचीन इराणी लोक अग्निपूजक म्हणून प्रसिद्ध आहेत. या अग्न्युपासनेची सविस्तर माहिती पुढें येईलच. त्याशिवाय आणखी साम्य हें कीं, मृत्यु म्हणजे शरीर व आत्मा यांचा वियोग हीच भारतीयांची आध्यात्मिक कल्पना अवेस्ताग्रंथांत आहे. परंतु प्रेताची व्यवस्था लावण्याची पद्धति मात्र भारतीयांच्या दहनपद्धतीहून अगदीं भिन्न आहे. पारशी लोक आपलीं प्रेतें कुत्रे, कोल्हे, गिधाडें वगैरे प्राण्यांकडून खावीवतात. ही चाल इराणी लोकांत अगदीं पुरातन आहे, व ती इराणी लोक भारतीय आर्यांपासून फुटून निघाल्यानंतर विशिष्ट प्रादेशिक परिस्थितीमुळें उत्पन्न झाली. उलटपक्षीं पर्शुभारतीय आर्यन् लोक एकत्र असतांना त्यांच्यामध्यें प्रेतदहनाचीच चाल होती. ह्या अनुमानाला असा पुरावा आहे कीं, इराणी लोकांच्या प्रेतनिर्गतिस्थानाला दख्म असें नांव असून त्याचें दह् शब्दाशीं साम्य आहे.

वरील एकंदर विवेचनावरून हें दिसून येईल कीं, एकेकाळीं पारशी व हिंदू यांचे पूर्वज एकाच ठिकाणीं रहात होते, एकच धर्म पाळीत होते, एकाच देवाची पूजाअर्चा करीत होते, व एकच भाषा बोलत होते. त्यानंतर कांहीं कारणामुळें ते परस्परांपासून विभक्त झाले. पारशांच्या देवाला अहुरमझ्द असें म्हणतात. हा शब्द प्रो. राजवाडे यांच्या मतें ऋग्वेदांतील असुरमहस् या शब्दापासून निघाला आहे व हें मत सयुक्तिक दिसतें. असुर हा शब्द ऋग्वेदाच्या प्रथमच्या सूक्तांत तेज, परमेश्वर किंवा देव या अर्थानें वापरलेला आढळतो आणि अहुर हें असुर याचें रूप आहे. कारण 'स' च्या ठिकाणीं अवेस्तामध्यें 'ह' हा आदेश होतो. ऋग्वेदाच्या ९-१०मंडळांतील सूक्तांत असुर व देव शब्द समानार्थक न वापरतां परस्परांशीं भिन्न अर्थानें वापरलेले आढळतात. यावरून असें अनुमान काढतां येतें कीं, नवव्या किंवा दहाव्या मंडलाच्या रचनेच्या काळीं हिंदू व पारशी ह्यांच्यांत बेबनाव होऊन ते एकमेकांचे शत्रू बनले. त्या वेळेपासून पारशांचे असुर ते हिंदूंचे दैत्य व हिंदूंचे देव ते पारशांचे दैत्य बनले. तात्पर्य, पर्शुभारतीयांचे पूर्वज प्रथम

एकत्र रहात होते व नंतर ते विभक्त झाले. ही गोष्ट वर दिलेल्या अनेक प्रकारच्या पुराव्यावरून सिद्ध होते. शिवाय हेंहि सिद्ध होतें कीं, भारतीयांचा ऋग्वेद हा पारशी लोकांच्या अवेस्ता ग्रंथाच्या कित्येक शतकें पूर्वीचा असला पाहिजे.

## प्रकरण ९ वें.

### आर्य-असुर-संबंध.

बाहेरच्या जगाशीं भारतीयांचा संबंध एकवंशमूलक जो आहे त्याचें विवेचन येथवर झालें. तथापि जे मनुष्यसमूह निराळ्या वंशांतील होते त्यांशीं प्राचीन वेदभाषी लोकांचा कांहीं संबंध होता कीं काय हें आतां पाहिलें पाहिजे. असुरांचा उल्लेख वेदांत फार येतो. तर असुरांशीं व खाल्डियन लोकांशीं काय संबंध येतो याची स्थूल कल्पना देण्यासाठीं दोन लेखकांच्या लेखांचे गोषवारे येथें देतों.

भारतीय संस्कृतीचा इतिहास लिहितांना वैदिक आणि इराणी शब्दांची आणि त्याप्रमाणेंच इतर आर्यन् राष्ट्रांच्या शब्दांची तुलना करणें हें महत्वाचें साहित्य होय. कां कीं, या पद्धतीनें जुनें कोणतें आणि किती या विषयावर बराच खोल शोध केला असें होईल. तथापि आपलें तौलनिक अभ्यासाचें क्षेत्र सदृशतुलनेइतकें आकुंचित करून उपयोगी नाहीं. सदृश आणि विसदृश संस्कृतींची आणि भाषांची तुलना कधीं कधीं अनंत इतिहासदायक असते. दोन भिन्न संस्कृतींतील सामान्य अंगें दळणवळण सुचवितात आणि परस्पर देवघेवीसंबंधीं विचार संशोधनास स्फूर्ति देतात.

आर्यन् राष्ट्रें हिंदुस्थानांत आलीं त्याअगोदर त्यांची परिभ्रमणें निश्चित नाहींत. या परिभ्रमणांचा पत्ता वैदिक संस्कृतींतील पितृमूलक आणि परकीय अंगें यांचें पृथक्करण केलें असतां लागण्यास सोपें जाईल. या दृष्टीनें अभ्यासास नुकतीच सुरवात झाली आहे. एशियाटिक टर्की म्हणून समजल्या जाणाऱ्या प्रदेशाचा आणि आर्यन् राष्ट्राचा कांहीं संबंध होता काय हा प्रश्न महत्वाचा आहे. या विषयावर विचार इतके नुकतेच सुरू झालेले आहेत कीं, त्यांची संगति लावण्यांत आज अर्थ नाहीं. या प्रकारच्या संशोधनाचें स्वरूप लक्षांत यावें म्हणून यासंबंधीं दोन लेख येथें देतों.

**खाल्डियन व भारतीय वेदग्रंथ.**—मेसापोटेमियांत टैग्रिस व युफ्रेटिझ नद्यांच्या मुखाजवळ इ. स. पू. ५०००च्या सुमारास उत्तर आशियांतील एका तुराणियन नांवाच्या जातीचे लोक वस्ती करून राहिले होते. तेथें त्यांची बरीच सुधारणा झाली. त्यांनीं आपलीं धर्ममतें व आचारविचार यांविषयीं विटांवर खोदून ठेवलेले लेख अलीकडे उपलब्ध झालेले आहेत. त्यांच्या प्राचीनत्वामुळें त्यांना 'खाल्डियन वेद' असें मानण्यांत येतें. या खाल्डियन लोकांच्या संस्कृतीच्या साहाय्यानेंच पुढें असुरियन लोक सुसंस्कृत बनले व म्हणून खाल्डियन संस्कृति असुरियन संस्कृतीची जननी होय. ही असुरियन संस्कृति इ. स. पू. २००० च्या सुमारास भरभराटींत होती. वरील सनानंतर हिंदू लोकांचा असुरियन लोकांशीं संबंध आला असें मानतात.

**रुडॉल्फ हान इहेरिंगचें विधान.**—इहेरिंगचें विधान असें आहे कीं, आर्यन् लोक मूळ मध्यआशियांत राहणारे होते व त्या वेळीं ते पूर्ण रानटी स्थितींत असून टोळ्या करून हिंडत असत. त्या वेळीं त्यांना शेतकी, कालवे करणें, दगडी घरें बांधणें, धातूंचे जिन्नस बनविणें, नाण्यांचा व्यवहार, लिपी वगैरे सुधारणेच्या कालांतील साध्या गोष्टींचें सुद्धां ज्ञान नव्हतें. पण नंतर हे आर्यन् लोक मध्यआशियामधून बाबिलोनियांत उतरले व तेथें त्यांचा सुधारलेल्या असुरियन लोकांशीं संबंध येऊन सुधारणेच्या वरील सर्व बाबी त्यांनीं असुरियन लोकांपासून घेतल्या.

हें इहेरिंगचें विधान अनेक पंडितांनीं अतिशयोक्तीचें वाटत आहे. तरी पण जादूचे व इतर मंत्र, सृष्ट्युत्पत्ति व सृष्टिरचना यांविषयींच्या कल्पना, ज्योतिषशास्त्रीय माहिती तसेंच कालमापन व पंचांगपद्धति या बाबतींची माहिती आर्यन् लोकांनीं बाबिलोनियन लोकांपासूनच घेतलेली आहे व ती इ. स. पू. २००० नंतर दोघांचें दळणवळण सुरू झाल्यावर घेतली आहे असें पुष्कळांचें मत आहे.

**प्रो. मॅक्समुलरचा विरोध.**—'सचा मना हिरण्यया (ऋग्वेद ७. ८, २) या वाक्यांतील 'मना' या शब्दाचें लॅटिनमधील मिना, ग्रीकमधील म्हना व फिनीशियन भाषेमधील मनह या शब्दांशीं साम्य आहे. अर्थात् 'मना' हा शब्द भारतीयांनीं बाबिलोनियन लोकांपासून घेतला असला पाहिजे, व म्हणूनच ऋग्वेद हा ग्रंथ इ. स. पू. २००० नंतरचा असला पाहिजे ही अनुमानपरंपरा प्रो. मॅक्समुलर यांस मान्य नाहीं. मॅक्समुलरचें म्हणणें असें कीं, मना हा शब्द मूळ आर्यनच असावा व सायणानें दिलेल्याप्रमाणें त्याचा अर्थ 'अलंकार' किंवा 'सुंदर भूषणें' असा असावा. कारण वेदांपैकीं सर्वांत जुन्या ऋग्वेदाचा काल इ. स. पू. २००० नंतरचा असणें शक्य नाहीं असें सदरहू प्रोफेसरांचें ठाम मत आहे व तेंच बरोबर आहे. शिवाय मना हा शब्द बाबिलोनियन भाषेपेक्षांहि जुन्या असलेल्या अकेडियन भाषेमध्येंहि आहे. पण या गोष्टीचें महत्त्व मॅक्समुलरच्या लक्षांत आलें नाहींसें दिसतें. कारण अकेडियन भाषा अधिक जुनी असल्यामुळें मना हा शब्द (कानडी व मराठी मण व इंग्रजी मॉड) परभाषेंतून ऋग्वेदांत घेतलेला असला तरीहि ऋग्वेदाचा काल इ. स. पू. २००० च्या अलीकडे ओढण्याचें कारण नाहीं.

**खाल्डियन व भारतीय संस्कृतींच्या समकालीनत्वाबद्दल पुरावा.**—'ओरायन किंवा वेदांचें प्राचीनत्व' या ग्रंथांत वैदिक संस्कृति निदान इ. स. पू. ४५०० च्या सुमाराची म्हणजे ज्या वेळीं वसंतसंपात मृग नक्षत्रांत होता त्या वेळची असली पाहिजे असें दाखविलें आहे. यावरून वैदिक व खाल्डियन संस्कृतींचे लोक समकालीन असल्याचें

ठरतें. आणि ख्रि. पू. ४ थ्या किंवा ५ व्या सहस्रकांतील या दोन संस्कृतींच्या लोकांत दळणवळण चालू होतें ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां त्या दोन लोकसमाजांतील वेदांत आलेले शब्द व कल्पना यांमधील साम्य दर्शविणारीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

| भारतीय | खाल्डियन |
|---|---|
| १ सिंधु | भारतीय शब्दच |
| २ मित्र, वरुण, इंद्र, नासत्य. | ,, |
| ३ यह्( धातु ), यहु, यह्वे, यह्वत, यह्वी, यह्वती | यह्वे, जेहोवह् ( बायबल ) |
| ४ वृत्र—इंद्र युद्ध | तिआमत्—मर्दुक युद्ध |
| ५ अप्सु, अप्सु—जित्, अप्सु—जा, अप्सु—क्षित्, अप्सु—मत्, अप्सवम् | अप्सु, वा अब्जु ( तिआमतचा पति ) |
| ६ ऋतु | इतु ( महिना ) |

| खाल्डियन | भारतीय |
|---|---|
| १ मना | मना. |
| २ तिआमत; | तैमात. |
| ३ उरुगल, उरुगुल; | उरुगूला. |
| ४ बिल, बिलगी [असुरियन] आलिगी, विलिगी ( अकेडियन ) | आलिगी, विलिगी |
| ५ ताबुवम् | खाल्डियनप्रमाणेंच |
| ६ कनक्नकम् | ,, |
| ७ तौडी | ,, |
| ८ किमिदिन; एकिम्मु, दिम्मे, किम्म—दिम्म ( अकेडियन ) | ,, |
| ९ उरु | उरुक्रम ( अप्सु—जित् ), उरू—क्षय ( अप्सुक्षित् ), उरू—गाय |
| उरू—अशी = | उर्वशी ( अप्सरा ) |

बाबिलोनियामधील कपड्यांची एक प्राचीन यादी सांपडली आहे. तींत सिंधु असें नांव आहे. सिंधु म्हणजे विणलेलें कापड. असा शब्द योजण्याचें कारण असें कीं, सिंधु नदीच्या कांठच्या प्रदेशांतून या जातीचें कापड खाल्डियामध्यें जात होतें. ( कालिकत शहरांतील कपड्याला कॅलिको म्हणतात त्याप्रमाणें हा शब्द आहे. ) जादूचे व सर्पादिकांचे मंत्र खाल्डियन वेदांतून अथर्ववेदांत घेतल्यासारखे दिसतात. सर्पांच्या मंत्रांसंबंधीं पुढील ऋचा पहाः—

असितस्य तैमातस्य बभ्रोरपोदकस्य च ।
सात्रासाहस्याहं मन्योरव ज्यामिव धन्वनो वि मुञ्चामि
रथाँ इव ॥ ६ ॥
आलिगी च विलिगी च पिता च माता च ॥
विद्म वः सर्वतो बन्ध्वरसाः किं करिष्यथ ॥ ७ ॥
उरुगूलाया दुहिता जाता दास्यासिक्न्या ॥
प्रतंकं दद्रुषीणां सर्वासामरसं विषम् ॥ ८
ताबुवं न ताबुवं न घेत्त्वमासि ताबुवम्
ताबुवेनारसं विषम् ॥ १० ॥

अथर्व ५. १३; ऋचा ६ ते ८ व १०

तै मा त. = तियामत, उरुगूल, आलिगी विलिगी, ताबुव वगैरे सर्पांचीं व देवांचीं नांवें परकीय म्हणजे खाल्डियन असून तिकडून अथर्ववेदांत घेतलेलीं दिसतात.

बायबलमधील जेहोवह् व खाल्डियन यव्हे हे शब्द भारतीय वेदांतील यहु, यव्हे वगैरे शब्दांवरून घेतलेले आहेत. खाल्डियन शब्द अप्सु किंवा अब्जु हा वेदांतील अप्सु-जित्, अप्सुमत्, अप्सु-क्षित् या शब्दांतून घेतलेला दिसतो. वेदांतील अप्सु हें रूप अप् = पाणी याचें सप्तमीचें अनेकवचन मानतात; परंतु ती चूक असून अप्सु = जलमय पोकळी असाच मूळ शब्द आहे. एका खाल्डियन काव्यामध्यें अप्सु व तियामत हीं पतिपत्नी असून वृत्राप्रमाणें असुर किंवा सर्प जातीचीं आहेत व त्यांना खाल्डियन इंद्र मार्दुक यानें मारलें असें वर्णन आहे.

उरु-क्रम, उरु-गाय, उरु-क्षय यांतील उरु = पाताळ हा शब्द मूळ खाल्डियन भाषेंतून घेतलेला आहे. तसेंच उर्वशी म्हणजे उरु-अशी म्हणजे पाताळ-देवता किंवा जल-देवता = अप्सरा असा खाल्डियन 'उरु' पासून बनलेला शब्द आहे.

इतु = महिना हा खाल्डियन शब्द ऋतु या वैदिक शब्दावरून घेतलेला दिसतो. या वरील एकंदर उदाहरणावरून कित्येक शब्द भारतीय व खाल्डियन लोकांनीं परस्परांपासून घेतलेले आहेत असें ठरतें.

आतांपर्यंत शब्दांच्या देवघेवीचीं उदाहरणें दिलीं. आतां खाल्डियन ग्रंथ व वेद यांतील कथांत काय साम्य आढळतें याचा विचार करावयाचा. हें साम्य विश्वाचें मूळ जलमय स्वरूप व त्याचें ठिकाण व त्यांत उत्पन्न झालेली गति, इंद्र किंवा मार्दुक या प्रकाशदेवतांनीं त्यावर मिळविलेला विजय तसेंच विश्वरचनेसंबंधीं दोन्ही राष्ट्रांतील कल्पना, वगैरे बाबींसंबंधाच्या कथांत आढळते. बाबिलोनियन ग्रंथांत संस्कृत पुराणांतल्याप्रमाणेंच पृथ्वीवर एकंदर सात खंड असल्याचें वर्णन आहे. खाल्डियन पौराणिक ग्रंथांतहि सप्तस्वर्ग व सप्तपाताळ या कल्पना आहेत; इतकेंच नव्हे तर, मार्दुकनें ज्या तिआमत नामक सर्पाला मारिलें त्याला सात शिरें होतीं असें वर्णन आहे. इकडे वेदामध्येंहि इंद्राला सप्तहन्

सातांना मारणारा असें म्हटलें आहे. आणि ज्या बंद असलेल्या जलनिधींचे दरवाजे इंद्र व अग्नि यांनीं आपल्या पराक्रमांनीं उघडून मोकळे केले तो जलनिधि सप्त-बुध्न ( सात तळ असलला ) असल्याचें वर्णन आहे. शिवाय खाल्डियन वाङ्मयांत हिवाळ्यांतल्या सर्व रात्रमय अधिकमासाचा व सूर्याला एक प्रकारचा त्वचारोग होत असल्याचा किंवा वर्षांतील कांहीं भाग सूर्य अजीबाद नाहींसा होत असल्याचा उल्लेख आढळतो व त्यावरून भारतीयांबरोबर खाल्डियन लोकहि एके काळीं उत्तरध्रुवाजवळ एकत्र राहात होते, या सिद्धांताला पुष्टि मिळते.

याप्रमाणें खाल्डियन व भारतीय वेदांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास अनेक उपयुक्त माहिती मिळून परस्परांच्या संबंधाविषयींचे प्रचलित सिद्धान्त बरेच बदलावे लागणार आहेत. वर दिलेल्या थोडक्या उदाहरणावरूनहि इहरिंगचें एकतर्फी विधान चुकीचें ठरत आहे. दोन समान दर्जाच्या संस्कृतींचे लोक समकालीन असल्याचें ठरल्यावर एका संस्कृतीच्या लोकांनीं सर्वस्वी दुसऱ्या संस्कृतीच्या लोकांपासून सर्व गोष्टी उचलल्या असें म्हणण्यापेक्षां परस्परांनीं परस्परांबरोबर देवघेव केली असली पाहिजे, असें मानणेंच अधिक सयुक्तिक होय. [भांडारकर मेमोरियल व्हाल्यूममधील लो. टिळकांचा लेख].

**असुरांच्या प्रदेशांत आर्य.** (डॉ. रा. गो. भांडारकर)– "आशिया-मायनरमध्यें, हिटाइट लोकांचा राजा आणि मिटनीचा राजा यांच्यांत झालेल्या तहासंबंधीं जो शिलालेख सांपडला आहे, त्यांत मिटनीचा राजा, इंद्र, मित्रावरुण आणि नासत्य यांनां त्यांच्या ऋक्संहितेंत आढळणाऱ्या नांवांनीं आव्हान करीत असल्याचें दिसून येतें. हा लेख सांपडल्यापासून यांत घडलेल्या गोष्टीला वैदिक संस्कृतींत कोठें स्थान द्यावें असा प्रश्न पंडितांपुढें येऊन पडला आहे. या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेलें नाहीं; पण ज्या योगानें या प्रश्नाचा पटेल असाच उलगडा होणार आहे, अशी एक संशोधनाची दिशा दाखवितां येईल. संशोधनाला 'असुर' शब्दापासून सुरुवात करावी. ब्राह्मणग्रंथांमध्यें याचा अर्थ देवांचे वैरी असणाऱ्या प्राण्यांची एक जात, असा आहे. ऋक्संहितेंत सजीव, "वीर्यशाली," "बलिष्ठ" अशा अर्थानेंच बहुधा हा योजलेला असून, द्यौ, इंद्र, वरुण इ. निरनिराळ्या देवांचें विशेषण म्हणून असतो. पण तीन चार ठिकाणीं देवशत्रु असा अर्थ घ्यावा लागतो. तथापि अशीं कांहीं स्थळें आहेत कीं, त्यांत असुरांसंबंधीं जें म्हटलें आहे तें दस्यूंच्या संबंधांत लागू पडण्यासारखें असतें; आणि त्या स्थळीं असुर शब्दाचा अर्थ मानवशत्रु असा घेतां येतो. ऋ. ८, ९६, ९ या ऋचेंत, जे देव नाहींत किंवा ज्यांनां देव नाहीं अशा असुरांना आपल्या चक्रानें मारण्याविषयीं इंद्राला पाचारण केलें आहे. दुसऱ्या स्थळीं अर्चिन्, आणि पिप्रु असुरांच्या सैन्यांचा देवांनीं नाश केल्याचें म्हटलें आहे. इंद्र, अग्नि, सूर्य यांसारख्या कांहीं देवांना असुरहन् म्हटलें आहे.

खालीं दिलेल्या उल्लेखांतून असुर संज्ञेचा अर्थ ज्यास्त स्पष्टपणें मानवशत्रु असा होतो, अथर्व. १९,६६,१ मध्यें उपासक असुरांना शत्रू ( सपत्नान् ) असें म्हणतो व त्यांना मारण्याविषयीं अग्नीची प्रार्थना करितो. जर ते उपासकाचे शत्रू असले तर ते दस्यूंप्रमाणें मानव असले पाहिजेत. अथर्व ९, २, १७ आणि १८ मध्यें पुन्हा, देवांनीं ज्याप्रमाणें दस्यूंना निबिड अंधःकारांत लोटून दिलें त्याप्रमाणें उपासकाच्या शत्रूंनां हांकलून लाविण्यासाठीं कामाला आव्हान केलें आहे. या ठिकाणीं असुरांची दस्यूंशीं तुलना केली आहे. आणि म्हणून ते एखाद्या विशिष्ट देशांतील मूळ रहिवाशी असावेत. अथर्व. १०.३, ११मध्यें 'स मे शत्रून् वि बाधतामिन्द्रो दस्यूनिवासुरान्" असा ऋगर्थ आहे; तेथें, वरण वृक्षाच्या ताईतानें, इंद्रानें दस्यु असुर यांचा नाश केल्याप्रमाणें तो धारण करणाऱ्याच्या शत्रूंचा नाश करावा अशी इच्छा केली आहे. या ठिकाणीं दस्यु आणि असुर हे शब्द जवळ जवळ आले असून दस्यु शब्द असुराला लाक्षणिक म्हणून आला आहे. त्याचा एकत्र अर्थ "दस्यु असुर" म्हणजे "रहिवासी असुर" असा तरी होईल किंवा "दस्यु आणि असुर" असा होईल. तेव्हां भारतांतील मूळ रहिवाशांनां दस्यू असें नांव असेल तर असुर हेंहि दुसऱ्या एखाद्या देशांतील मूळ रहिवाशांचें नांव असलें पाहिजे, हें समजण्यास अवघड पडणार नाहीं. कांहीं लोक दस्यु याचा अर्थ दैत्य किंवा देवशत्रु असा घेतात. पण, आर्य देवांनां न जुमानणारे, आर्यसंस्कार न पाळणारे आणि ज्यांचा पाडाव करण्यास देवांनीं आर्यांना समर्थ केलें असे कृष्णवर्णीय भारतांतील मूळ रहिवाशी असा अर्थ ज्यास्त रूढ असून, त्यापासूनच देवशत्रु असा अर्थ पडला असावा. ऐतरेय ब्राम्हणांत ( ७,१८ ) याचा अर्थ मूळ रहिवाश्यांची जात असा स्पष्टपणें घेऊन, आंध्र, पुण्ड्र, शबर पुलिन्द आणि मूतिब हे त्यांच्याच जातींत घातले आहेत."

या वरील उताऱ्यांत असुर हे दस्यूंप्रमाणेंच आर्य फिरस्त्यांचे शत्रू असून आर्यांच्या देवांनीं त्यांचा नाश केला असें वर्णन आहे. पातञ्जलमहाभाष्यात एके ठिकाणीं असुर हें नांव म्लेच्छांच्या किंवा परकीयांच्या एका विशिष्ट वर्गाचें द्योतक म्हणून आलें आहे. "तेऽसुरा हेलयो हेलय इति कुर्वन्तः पराबभूवुः । तस्माद्ब्राह्मणेन न म्लेच्छितवै नापभाषितवै । म्लेच्छो ह वा एष यदपशब्दः । म्लेच्छा मा भूमेत्यध्येयं व्याकरणम् ॥" "ते असुर हेलयः हेलयः असे शब्द करीत पराभव पावले–कारण, भाष्यकार म्हणतात, हे ३ अरयः हे ३ अरयः या शुद्ध संस्कृताच्या ऐवजी, त्यांनीं दीर्घ स्वर गाळला, अ तोडून काढला, आणि र चा ल केला आणि अशा रीतीनें आपण आर्य नाहीं, म्लेच्छ आहोंत असें दाखविलें. म्हणून ब्राह्मणानें म्लेच्छाप्रमाणें वागूं नये व अपशब्द बोलूं नये. अपशब्द म्लेच्छ आहे असें म्हणतात. आपण म्लेच्छ बनतां कामा नये म्हणून व्याक-

रण शिकावें. " या ठिकाणीं असुर शब्दाचा अर्थ परकीय, अब्राह्मण जात असा स्पष्ट केला आहे.

हा पातञ्जलभाष्यांतील उतारा कोणत्या तरी ब्राह्मणांतून घेतला असला पाहिजे. शतपथ ब्राह्मणांत ( ३. २, १. १८-२४ ) अशाच तऱ्हेचा एक उल्लेख आढळतो. त्या ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, देव आणि असुर दोघेहि प्रजापतीपासून उत्पन्न झाले, व आपल्या पित्याचा दाय मिळविते झाले; देवांनां मन मिळालें व असुरांना वाणी मिळाली; त्या योगानें देवांनां यज्ञ व असुरांनां फक्त वाणी प्राप्त झाली; देवांना दूरचें जग ( स्वर्ग ) व असुरांनां ही (पृथ्वी ) लाभली. नंतर प्रजापतीपासून असुरांनां मिळालेली वाणी त्यांच्याकडून हिसकावून घेण्याचा देवांनीं उद्योग आरंभिला व तसें झाल्यावर असुर हेलवः हेलवः असें म्हणत पराभव पावले यांनीं काढलेले उद्गार अशा प्रकारचे न कळण्यासारखे होते, आणि ( जो असें बोलतो ) तो म्लेच्छ असतो. म्हणून कोणींहि ब्राह्मणानें म्लेच्छ भाषा बोलूं नये ( न म्लेच्छेत् ) कारण असुरांची वाणी अशा प्रकारची असते ( असुर्या-हैषावाक् ). येथें दोन विधानांवर भर दिला पाहिजे. देवांनां स्वर्ग नेमून दिला व असुरांनां पृथ्वी दिली हें एक विधान. याचा अर्थ असुर हे पृथ्वीवरील रहिवाशी होते. दुसरें विधान म्हणजे, ब्राह्मणांनीं म्लेच्छांप्रमाणें वागूं नये, म्हणजे म्लेच्छ भाषा बोलूं नये अशाबद्दल केलेली आज्ञा. याचें कारण ती असुरी भाषा आहे. यावरून असें दिसून येतें कीं, असुर हे म्लेच्छ भाषा बोलणारे पृथ्वीवरील रहिवाशी होते असें मानीत; तेव्हां ते म्लेच्छ किंवा परकीय रानटी लोक होते. जे पृथ्वीवर राहात होते, जे म्लेच्छ होते आर्यांचे जे शत्रू किंवा प्रतिस्पर्धी होते आणि हिंदुस्थानांत आर्यांनां अडथळा करणाऱ्या दस्यूंशीं किंवा हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशांशीं ज्यांची तुलना केली आहे ते हे असुर कोण होते, या प्रश्नाचें उत्तर आपण येथें विचारांत घेतलेल्या शिलालेखानें मिळेल.

राजा मितनि आणि त्याची प्रजा टायग्रिस व युफ्रेटिस नद्यांमधील प्रदेशाच्या उत्तर भागांत वास करीत होती. त्यांचे शेजारी असिरियन, किंवा ( "वाय" या ग्रीक स्वराच्या जागीं नेहेमींच्या वहिवाटीप्रमाणें "यु" घातल्यास ) असुर्यन होते. असिरियन लोकांत असुर-बनि-पाल, असुर-नझिर-पाल, तिग्लथ-पिलेसर इ. नांवें आढळतात. असीरिया हें नांव सुद्धां असुर या त्या देशाच्या प्राचीन राजधानीच्या नांवावरून व तेथील देवाच्या नांवावरून पडलें असें म्हणतात. ईशावास्योपनिषदांतील असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसावृताः ॥ ३ ॥ लोकाः याला जोडलेले 'असुर्या,' हें पद 'असिरिया' शीं सदृश असें वाटतें व त्याचा अर्थ असुरांचा प्रदेश असा घेतां येईल. म्हणून, ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत आर्यांच्या उत्कर्षाला दस्यूंनीं विरोध केला त्याचप्रमाणें असिरियाच्या असुरांनींहि केला आणि म्हणून वर आलेल्या कांहीं उल्लेखांतून त्यांची दस्यूंशीं तुलना केली आहे, हें संभवनीय दिसतें. हिंदूंच्या कल्पनेप्रमाणें असीरियन म्लेच्छ ठरले, हें उघड दिसतें. पुढील काळांत, विशेषतः जेव्हां आर्य पांच नद्यांच्या प्रदेशांत येऊन राहिले आणि त्यानंतर जेव्हां ब्रह्मावर्तांत त्यांच्या धार्मिक पद्धतींत वाढ झाली, त्यावेळीं मानवी असुर व आर्यांचीं त्यांच्याशीं झालेलीं युद्धें यांच्या आठवणी व त्यांची संस्कृति, या गोष्टींचें देव व असुर यांच्या ठराविक शत्रुत्वासंबंधींच्या कथानकांत रूपांतर करण्यास प्रवृत्ति झाली. वैदिक व अवेस्ती लोक यांच्यामधील देवांसंबंधींच्या बिभिन्नतेवरून शत्रुत्वाला सुरुवात झाली असें म्हणतात. ब्राह्मणांकडून पूजिल्या जाणाऱ्या देवांनां इराणी लोक राक्षस म्हणून नांवें ठेवीत व याचा वचपा भारतीय लोक अहुर किंवा असुर हे दैत्य आहेत असें भासविण्यानें काढीत.असें समजण्यांत यांत अडचण अशी आहे कीं, अवेस्तांत अहुर हें नांव अहुर-मझ्द या परम देवाचें आहे व जरी दोन तीन देवदूतांनां हें नांव लावण्यांत येतें तरी एखाद्या सबंध प्राण्यांच्या जातीला उद्देशून हें कधीं लावण्यांत येत नाहीं. तेव्हां आपल्या कथापुराणांतील असुर हे असिरियांतील असुर होत, अशा तऱ्हेचें विवरण जास्त पटण्याजोगें दिसतें. याप्रमाणें असुर हा शब्द प्रथम ( १ ) "सजीव विभूति," "आश्चर्यकारक शक्तीचा" अशा अर्थाचा वाचक झाला; आणि द्यौः या सारख्याहि प्राचीनतम देवांचें विशेषण म्हणून योजण्यांत आला. नंतर ( २ ) फिरस्त्या आर्यांनां विरोधी असा एक मनुष्य प्राणी, असा त्याचा अर्थ झाला व त्याचें कारण असें कीं, यांत सांगितलेल्या शिलालेखांत दाखविल्याप्रमाणें त्यांचा असिरियांतील असुरांशीं संबंध आला. यावरून पुढील काळांत ( ३ ) देवांच्या विरुद्ध असलेल्या पौराणिक प्राण्यांची एक जात असा अर्थ निघाला. यांतील शत्रुत्वाची कल्पना सोडून हा शब्द ( ४ ) म्लेच्छ किंवा या नांवाचा एखादा परकीय, अशा अर्थानें पुढें आला. हें पतञ्जलि आणि शतपथ ब्राह्मण यांतून दिलेल्या उताऱ्यांवरून दिसून येतें; या पुढें आढळणारें मयासुर हें नांवहि हेंच दिग्दर्शित करितें असुर शब्दाचा पहिला अर्थ पुढील तीनहि अर्थांपेक्षां अगदी निराळा दिसतो

अथर्व. ६. १०८, ३ यांत असुरांनां बुद्धि असल्याचें सांगितलें आहे. त्यांच्या अंगीं माया ( जादूची शक्ति ) वास करीत असे ( अथर्व. ६. ७२, १ ). आश्वलायन श्रौतसूत्रांत ( १०, ७, ७ ) असुरी विद्येचें नांव आलें आहे. असुरी विद्या म्हणजे निःसंशय जादूकला व ज्ञान. मय-असुरानें, अर्जुनानें त्याला खांडववनांत दग्ध होत असतां वांचविलें हा उपकार फेडण्यासाठीं पांडवांकरितां मयसभा बांधिली. बंगाल विभागाचे आर्किऑलॉजिकल सुपरिंटेंडेंट डॉ. स्पूनर हे जें असुर-मय नांवाचा तलास अहुर-मझ्दाशीं लावून त्याला खांडववनांत दडून बसणारा भेकड प्राणी बनवितात हें अगदी हास्यास्पद दिसतें. आपणांस माहीतच

आहे कीं, असिरियन लोकांनीं शिल्पकला साध्य करून घेतली होती व इमारती बांधण्याच्या कामांत त्यांची वाकबगारी तर प्रसिद्धच होती; तेव्हां या पांडवांच्या शिल्पकाराचें नांव एखाद्या असिरियन किंवा असुरशिल्पकाराशीं जोडण्यास तें जास्त सयुक्तिक दिसेल.

पण असा प्रश्न उद्भवतो कीं, शिलालेखांत दाखविल्याप्रमाणें इ. स. पू. १५ व्या शतकांतल्या आसिरियनांचे जर वैदिक आर्य शेजारी असतील तर त्यांनीं हिंदुस्थानांत स्थलांतर कधीं केलें व पांच नद्यांच्या प्रदेशांत ते केव्हां वास्तव्य करून राहिले ? जर त्यांनां या ठिकाणीं पोंचण्यास ५०० वर्षें लागलीं असतील व त्यानंतर त्यांनीं सूक्तरचना व यज्ञोपासनाविन्यास या वैदिक संस्कृतीला आरंभ केला असेल तर हें वृत्त व इ. स. पू. ६ व्या शतकांतील बौद्ध धर्माचा उदय यांच्या मधला काळ वैदिक अवस्थेपासून बौद्धिक अवस्थेपर्यंत भारतीयांचा उत्कर्ष दाखविणाऱ्या असंख्यात गोष्टींनां फार अपुरा पडतो. हा आक्षेप खरोखरीचा फार महत्त्वाचा आहे व त्याचें निरसन करण्यासाठीं,—सर्व सूक्तें पंजाबांत रचलेलीं नाहींत, तर वैदिक काव्याला भारतीय आर्य अगदीं उत्तरेकडील प्रदेशांत रहात असल्यापासून सुरवात झाली आहे—या ब्रुन्होफरच्या कल्पनेचा अवलंब केला पाहिजे. हें काव्य "कास्पियन समुद्रापासून पंजाबपर्यंतच्या उत्तरइराणांतील कवींची कृति" आहे. या वाक्यांत उत्तरइराणच्या ऐवजीं उत्तर मेसापोटेमिया किंवा तेथलाच कोठला तरी प्रदेश अशी दुरुस्ती मीं सुचवितों. असिरियांतील रहिवाश्यांच्या नांवांवरून असुर शब्द प्रचारांत आला ही माझी व्युत्पत्ति खरी असेल तर आर्य लोक बराच काळपर्यंत त्यांच्या शेजारीं रहात असले पाहिजेत. कारण संहितांतील मागाहून झालेल्या भागापासूनचें सबंध वाङ्मय व पुढील काळांतील वाङ्मय असुर व तत्संबंधीं कथा यांनीं परिपूर्ण आहे व ही गोष्ट असुरांनीं आर्यांच्या मनावर मोठा कायमचा ठसा उमटविला होता याची साक्ष देते. मूलगृह—मग तें कोणतेंहि असो—सोडून भटकतांनां वैदिक ऋषींनां वाङ्मयशैथिल्य प्राप्त झालें होतें आणि पंजाबला पोंचल्यानंतर एकदम त्यांनां वाङ्मयाची उकळी फुटली असें म्हणतां येत नाहीं. ज्यांनीं ऋग्वेदाच्या दहा मंडळांत आणि अथर्ववेदाच्या वीस कांडांत सूक्तांचा संग्रह केला त्यांचा हेतु कोठल्याहि कुटुंबांत किंवा आर्य प्रदेशाच्या कोठल्याहि कोंपऱ्यांत पडलेला कसलाहि प्रबंधखंड असो, तो जमा करणें हा होता व तो लावण्यांत प्राचीनतेच्या अनुक्रमाकडे लक्ष दिलेलें नाहीं, तर सध्यांचा संग्रह करण्यांत देवतासारूप्य व ऋचांची संख्या यांसारख्या तत्वांचा अवलंब करण्यांत आला आहे. तेव्हां दहा मंडलें व वीस कांडें यांतील सर्व सूक्तें व अनुवाक आर्य लोक उत्तरमेसापोटेमियांत किंवा दुसऱ्या कोठल्यातरी मूलगृहीं रहात असल्यापासून आणि पंजाबांत त्यांचें वास्तव्य होईपावेतों भटकत रहाण्यास निघाल्यापासून रचलेलीं आहेत असें धरण्यास हरकत नाहीं. इ. स. पू. १५ शतकाच्या मध्यकाळीं भारतीय आर्यांनीं पांच देवता—एक एकटी व चार, दोहोंचा एक संघ अशा व्यवस्थेनें—मानण्यापर्यंत धर्माच्या बाबतींत प्रगति केली होती. हे संघ त्यांच्या नांवाच्या व्याकरणांतील रूपांसह ऋग्वेदांत आहेत त्याप्रमाणेंच हुबेहुब आढळतात. हा वेळपावेतों या नांवाभोंवतीं बरेचसें सौक्तिक वाङ्मय गोळा झालें असलें पाहिजे. व या वाङ्मयाचा उगमकाल ब्रुन्होफर म्हणतो त्याप्रमाणें इ. स. पू. २५०० वर्षांपर्यंत मागें ढकलावा. आतां एक प्रश्न उरतो तो हा कीं, भारतीय आर्य पंजाबांत या लेखाच्या कालापूर्वी कीं नंतर वसाहत करून राहिले. आर्य लोक हिंदुस्थानांत वेगवेगळ्या टोळ्या पाडून आले. तेव्हां कांहीं टोळ्या इ. स. पू. १५ शतकाच्या आधीं हिंदुस्थानांत आल्या असाव्यात; पण असिरियाच्या आसपास राहणाऱ्या टोळ्या त्यानंतरच गेल्या असल्या पाहिजेत. त्या हिंदुस्थानांत गेल्या याबद्दल मुळींच संशय नाहीं. कारण, हिंदुस्थानांतील दस्यूंशीं ज्यांची तुलना करण्यांत येते त्या असुरांबरोबर झालेल्या भांडणाची व इतर त्यांच्या संबंधींच्या गोष्टींची आठवण त्यांनां राहिली. तथापि, ही असुर–लोकांची आठवण त्यांनां मुळींच सुखावह नव्हती; व असें म्हणण्याचें कारण हें कीं, त्या संबंधीं बोलतांना, तो निबिड अंधःकारानें आवृत आहे, आत्महत्या करणाऱ्या लोकांनां त्या ठिकाणीं पाठविण्यांत येतें, असा उल्लेख करितात. माध्यंदिन शाखेच्या बृहदारण्यकोपनिषदांत ( ४. ४, १४ ) अज्ञानी लोकांनां तो लोक दाखविला आहे आणि कण्वशाखेच्या ग्रंथांत ( ४. ४, ११ ) तो असुरप्रदेश आहे हें मुळीं विसरून, त्याचें सामान्य वर्णन तो निरानंद प्रदेश ( अनंदः ) आहे एवढेंच सांगून–केलें आहे"

आपल्या वाङ्मयांतील असुर व असिरिया यांचा संबंध राजारामशास्त्री भागवतांनीं सुमारें ३०–४० वर्षांपूर्वी मांडला त्याचा हळु हळु स्वीकार कसा होत आहे हें राजवाडे, टिळक, व डा. भांडारकर यांचे लेख येथें उध्दृत केले आहेत त्यावरून त्यांच्या विधानास मान्यता दिली आहे असें समजूं नये. यावर आणखी बराच परिश्रम झाला पाहिजे. दोहोंच्या लेखांतील विधानें 'सूचक कल्पना' यापलीकडे मुळींच गेलेलीं नाहींत.

---

## प्रकरण १० वें.

### उपसंहार

मनुष्याचा बुद्धपूर्व इतिहास या विभागांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि या प्रयत्नामध्यें सामान्यतः एकंदर सात आठ हजार वर्षांचाच इतिहास मांडला गेला आहे असें दिसेल. मनुष्यप्राणी भूपृष्ठशास्त्रवेत्त्यांच्या दृष्टीनें जें चतुर्थयुग

आहे त्या चतुर्थयुगांत आहे. याची भूतलावर वस्ती आज कितीं लक्ष वर्षें आहे यांविषयीं विचार चालू आहे. जमिनीवरच्या थरामध्यें जे मनुष्यांचे अवशेष सांपडतात त्यांची व आजच्या भिन्न मानववंशाकडून होणाऱ्या भौगोलिक व्याप्तीची संगति अजून लावतां आली नाहीं व पुराणवस्तुशास्त्राचें संशोधन आणखी कित्येक दशकें झाल्याशिवाय आणि अभ्यासाचें क्षेत्र सर्व जग झाल्याशिवाय लावतां येणार नाहीं. भाषाशास्त्रापासून निघणारे मनुष्यभ्रमणात्मक सिद्धान्त अजून वृद्धिंगत झाले नाहींत. या शास्त्राचें ध्येय काय, तर ज्याप्रमाणें एखाद्या घराण्याचा वंशवृक्ष तयार करतां येतो आणि त्या वंशवृक्षामध्यें निपुत्रिक किंवा सपुत्र पुरुष बसवून तो मांडतां येतो त्याप्रमाणें ज्या जातींचे अवशेष उरले आहत त्या जाती व नष्ट झालेल्या जाती या सर्वांचा वंशवृक्ष तयार करावयाचा, हें मानववंशशास्त्राचें अंतिमध्येय आहे. हा वंशवृक्ष तयार करतांना प्रत्येक राष्ट्राची कामगिरी त्या वंशवृक्षाबरोबरच मांडावयाची. अशा तऱ्हेनें इतिहास कधीं भविष्यत्कालीं तयार होईल तो होवो. पण तें ध्येय आहे हें खास. त्या दृष्टीनें प्रयत्नहि झाले पाहिजेत. सामान्य कुलाचा वंशवृक्ष मांडतांना जी अडचण उत्पन्न होत नाहीं अशी एक अडचण मानववंशवृक्ष तयार करतांना उत्पन्न होते. पुष्कळ राष्ट्रें किंवा मानववंश मरून जात नाहींत किंवा चालूहि रहात नाहींत, तर त्यांचे घटक इतर मानववंशांत समाविष्ट होतात. अशा तऱ्हेच्या प्रसंगीं इतिहाससंशोधन अधिक कठिण होत जातें.

इजिप्तच्या अत्यन्त प्राचीन कालापासून बुद्धाच्या कालापर्यंत इतिहासाचें सातत्य यांत मांडावयाचा प्रयत्न केला आहे. पण हिंदुस्थानाचा इतिहास बराचसा कुरुयुद्धापर्यंतचाच आहे कुरुयुद्धापासून बुद्धकालापर्यंत म्हणजे शैशुनागापर्यंत आपणांस पौराणिक राजावलीशिवाय दुसरें साहित्य उपलब्ध नाहीं, व ती राजावली चवथ्या विभागांत मांडलीच असल्यामुळें येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. सांस्कृतिक इतिहास द्यावयाचा तर तेथेंहि पंचाईतच उत्पन्न होते. श्रौतसूत्रें व षड्दर्शनें यांच्या आज आपणांस ज्या आवृत्त्या उपलब्ध आहेत त्या सर्व बुद्धोत्तरकालांत संस्कारित झाल्या आहेत असें उघड दिसतें. परस्परापेक्ष जीं दोन मीमांसांचीं सूत्रें त्यांत बौद्धमतखंडनाचा प्रयत्न आहे व तीच गोष्ट रामायणभारतासारख्या ग्रंथांची होय. रामायणानें एका क्षेपक श्लोकांत बुद्धास तर चोरच म्हटलें आहे आणि भारतामध्यें तर बौद्धांचा उल्लेख अनेक ठिकाणीं आहे. दोन्ही आर्षमहाकाव्यावर बुद्धोत्तरकालीं संस्कार झाले हें कोणीहि नाकबूल करावयाचा नाहीं. गृह्यसूत्रें व धर्मसूत्रें हीं तर बरीचशीं आजच्या स्वरूपांत बुद्धोत्तरकालीनच दिसत आहेत. तर त्यांच्या विषयीं विवेचन ब्राह्मणकुलें व संप्रदाय यांबरोबर जेवढें केलें त्यापेक्षां अधिक करतां आलें नाहीं.

भारतीय आर्यन् लोकांचें व त्यांच्या पूर्वजांचें इतिहासकाल यांविषयीं संक्षेपवाक्य म्हणून येणेंप्रमाणें सांगतां येईल.

( १ ) मूलगृहकालः या कालाविषयीं अनुमानें दिवसानुदिवस वाढत आहेत व जुनीं टाकलीं जात आहेत. अजून स्थलनिश्चयहि नाहीं किंवा सहस्रकांनीं मोजण्याइतका देखील कालनिश्चय नाहीं.

( २ ) दुसरा काल पर्शुभारतीयकालः या कालांत देखील पर्शूंचे आणि भारतीयांचे पूर्वज कोठें असावेत यांविषयीं स्थाननिश्चय करतां येत नाहीं व हा काल केव्हां असावा हेंहि सांगतां येत नाहीं.

( ३ ) तिसराकाल भारतीय आर्यन् लोकांचा कालः या कालाचे प्रथमतः दोन भाग पडतात. सूतसंस्कृतीचा काल हा पहिला भाग होय आणि मांत्रसंस्कृतीचा काल हा उत्तर भाग होय. मांत्रसंस्कृति उत्पन्न होण्याच्या पूर्वी ‘दाशराज्ञयुद्ध’ झालें. दशराज्ञयुद्ध पूर्वींच सूतसंस्कृतीच्या आर्यन् लोकांनीं उत्तरहिंदुस्थान व वैदर्भ व्यापिला होता. आणि कदाचित् सिलोनपर्यंतहि त्यांचा प्रवेश झाला होता. मान्त्रसंस्कृतीच्या कालाचा प्रारंभबिंदु म्हणजे दाशराज्ञ युद्ध होय, आणि हें कुरुयुद्धापूर्वी सहाशें वर्षें अजमासें झालें असावें. ऋग्वेदीय मंत्रांच्या रचनेपासून कुरुयुद्धकालीन संहितीकरणापर्यंत सर्व खटपट याच सहाशें वर्षांतील होय. या सहाशें वर्षांची धार्मिक कामगिरी म्हटली म्हणजे सामान्य अग्न्युपासनेपासून सप्तसंस्था व सूत्रें यांचा विकास ही होय. आजचा संस्कारधर्महि अथर्ववेदाच्या घटनेमार्फत याच कालांत समंत्रक झाला असावा. याच कालामध्यें मंत्रकालीन देवतांमध्यें प्रथमतः "वरुणोपासनेचा क्षय आणि इंद्राचें प्रामुख्य व त्याच्या नंतरहि इंद्रास मागें टाकून प्रजापतीचें प्रामुख्य व शिवविष्णूस मान्यता इत्यादि क्रिया दैवतेतिहासांत झालेल्या दृष्टीस पडतात.

व्यापक व नियमांकित विचारांचा इतिहास आपणांस शोधावयाचा असल्यास सूतसंस्कृतिकालीन साहित्य आपणांस अनुपलब्ध आहे.त्याची परंपरा आपणांस ऋग्वेदांतूनच आरण्यकापर्यंत न्यावी लागते, आणि त्याची संगति बौद्ध व जैन ग्रंथांशीं लावावी लागते. ऋग्वेदांत व्यापक विचार दहाव्या मंडळांतच आढळतो. परंतु ऋग्वेदांत पुनर्जन्माची कल्पना सुद्धां नाहीं. आणि कर्मवादहि नाहीं. आध्यात्मिक सूक्तें आहेत व त्यांमध्यें सर्व जगभर एकच आत्मा भरून राहिला आहे हीं अद्वैतवाद्यांची कल्पना दिसून येते. ईश्वरसंशयवादाचें निराकरण देखील ऋग्वेद २. १२ व ८. ८९ मध्यें आढळतें. ऋ. १० १२१ या सूक्तांत "कस्मै देवाय हविषा विधेम" असें ध्रुपद आहे. कोठें प्रजापति, तर कोठें ब्रह्मणस्पति, तर कोठें विश्वकर्मा अशा अनेक तऱ्हेच्या नांवाखालीं एकेश्वरीकल्पना व एकेश्वरीच्या ठायीं विश्वकर्तृत्व हीं ऋग्वेदांतील तात्त्विक

सूक्तांत व्यक्त केलींच आहे असें मागें सांगितलें आहत (वेदविद्या पृ. ४२).

व्यापक विचारांचें ऋग्वेदांतील महत्त्वाचें मंडळ म्हणजे दहावें होय. यांतच हिरण्यगर्भसूक्त व पुरुषसूक्त हीं आहेत आणि या सूक्तात सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं विचार व्यक्त झाले आहेत.

यज्ञसंस्थेमध्यें ब्रह्मवाद्यांचें काम जें संशयनिवृत्ति, त्या कामाचे अवशेष ब्राह्मण ग्रंथांतील आख्यायिकांच्या रूपानें व गोष्टींच्या रूपानें शिल्लक राहिले आहेत, त्यांत कांहीं, आरण्यकांत शोभतील अशा कथा, आहेत. जगत्सृष्टिविषयक कथा तैत्तिरीय ब्राह्मणाच्या दुसऱ्या कांडांत दिली आहे. तसेंच नाचिकेताची कथा तिसऱ्या काण्डांत दिली आहे. तथापि एकंदरींत असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, व्यापक विचारांचा इतिहास लिहावयास पद्धतशीर प्रारंभस्थान आरण्यकें व उपनिषदें हें होय. या इतिहासाचा इतर इतिहासाशीं संबंध जुळवावयाचा म्हटला म्हणजे तो सांगतां येईल कीं यज्ञसंस्थेच्या अंतिम कालापर्यंत व्यापक विचार किंवा नियमांकित विचार फारसा कोठें विकसित झालेला दिसत नाहीं.

आर्यन् लोकांच्या प्रसाराचा इतिहास व वैदिक वाङ्मय यांची संगति इतकीच लावतां येईल कीं, आर्यन् लोकांचा प्रसार चोहोंकडे वेदपूर्वकालींच झाला होता. फक्त ब्राह्मण जातीचा प्रसार व वाङ्मयवाल्यांचा प्रसार यांची व वाङ्मयाच्या वाढीची संगति लावतां येईल. ती थोडक्यांत येणेंप्रमाणेः ऋग्मंत्रकालीं या वर्गाचा गंगेपर्यंत प्रसार झाला होता आणि ब्राह्मणयजुर्वेदकालीं सर्वउत्तरहिंदुस्थानभर झाला होता. अश्वमेधसंस्था ज्यावेळेस समंत्रक करण्यांत आली त्यावेळेस महाराज्ञी कांपील्यस्पर्धेचा उल्लेख करतांना दाखविली आहे. ऋग्वेदांत गंगेच्या पूर्वेकडील प्रदेशाचा उल्लेख फक्त एकच आहे; आणि तो कीकटाचा होय. ऋग्मंत्र व यजुर्वेदब्राह्मणकाल यांमध्यें एवढाच स्थानिक फरक निर्देश करतां येतो. यापेक्षां जास्त करतां येत नाहीं. वाङ्मयाची वाढ व वाङ्मयवाल्या वर्गाचा प्रसार यांचा संबंध ऋग्वेदकाल व यजुर्वेदब्राह्मणकाल असे दोन गट करून दाखवितां येतो; यापेक्षां जास्त स्पष्ट करतां येत नाहीं.

गृहस्थधर्माचा व स्त्रीपुरुषसंबंधाचा विकास यांविषयीं फारसा इतिहास देतांच येत नाहीं. पतिपत्नीधर्म ऋग्वेदाच्या अत्यंत प्राचीन भागांतहि पूर्णपणें स्थापित दिसतो, एवढेंच नव्हे तर ज्याअर्थीं पुत्रांची मागणी वारंवार दिसते त्याअर्थीं पितृपुत्रपरंपराहि स्थापित झाल्यासारखी दिसते. लग्न व स्त्रीपुरुषसंयोग यांतील भिन्नता पत्नी व दासी अशा भेदामुळें, व दासीपुत्रांना हलके समजत असत त्या वरून दिसत आहे. आणि त्याअर्थीं विवाहसंबंधाचें पावित्र्यहि सिद्ध झालें होतें. ऋग्मंत्रांत उल्लेखिलेला कक्षीवान् औशिज यास जर राजपुत्रा इतका मान असता तर त्यास भीक मागत देशोदेशीं फिरावें लागलें नसतें हें ऋग्वेदीय प्रमाण होय. ब्राह्मण कालीं दासीपुत्रांस हलके मानीत होते यांत नवल नाहीं. पण ते तसे मानीत होते याला प्रमाण हवेंच असलें तर कवष ऐलूषाची कथा देतां येईल. तेव्हां गृहस्थधर्मपूर्व सामाजिक इतिहास पाहण्यास आपणांस ऋग्वेदपूर्व समाजाकडे जावें लागेल. ऋग्वेदोत्तर समाजाकडे जाऊन आपणांस गृहस्थधर्माच्या पूर्वा धतीचें फारसें ज्ञान होणार नाहीं. एवढें मात्र खरें कीं, ज्याअर्थीं दासीपुत्र व आईच्या नांवानेंच ओळखिले जाणारे पुरुष धार्मिक आयुष्यक्रमांत सुद्धां महत्त्वाचें स्थान पावूं लागले, व आचार्य म्हणून प्रसिद्धीस आले त्याअर्थीं दासीपुत्राची सामाजिक स्थिति अत्यंत कठीण नसावी.

कुलांचा, जातींचा, व गोत्रांचा इतिहास यांचा दुसऱ्या कोणत्या तरी इतिहासांशीं संबंध लावावयाचा असल्यास तो यज्ञसंस्थेशीं व वाङ्मयेतिहासाशीं लावतां येतो. गोत्रें व प्रवर यांची कल्पना ऋग्वेदकालीं दिसत नाहीं. गोत्रें व प्रवर यांचें महत्त्व प्रथमतः श्रौतसूत्रांतच दिसतें म्हणजे यज्ञसंस्था संपूर्ण झाल्यानंतर दिसतें; आणि असें दिसतें, कीं, प्रवरांचा उगम होतृवर्गांतील प्राचीनसंप्रदायांतून झाला असावा. यांविषयीं विवेचन पूर्वीच्या एका प्रकरणांत सविस्तर केलें आहे.

वैदिक वाङ्मयाच्या इतिहासाचा मार्ग अंकित करण्यासाठीं दोनच राजकीय खळबळी दिसतात. एक राजकीय खळबळ प्रथमकाळ दाखविते व दुसरी अंतिम काळ दाखविते आणि त्या म्हटल्या म्हणजे दाशराज्ञयुद्ध व कौरवपांडवयुद्ध या अनुक्रमें होत.

दाशराज्ञयुद्धकालीन कथेविषयीं प्रस्तुत विभागांत ज्या नवीन गोष्टी मांडल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:—

(१) दाशराज्ञयुद्धानंतर सर्व ऋग्वेदांतील मंत्रांची रचना झाली आहे. (२) दाशराज्ञयुद्ध हें आर्यन् लोकांचें पहिलें आगमन नव्हे (३) दाशराज्ञयुद्ध हें गोऱ्याकाळ्यांचें युद्ध नव्हतें. (४) गोऱ्याकाळ्यांचें युद्ध ऋग्वेदांत चित्रित नाहीं (५) आर्यदस्यूविरोधकल्पना ही ईश्वरसैतानयुद्धकल्पनेप्रमाणें प्राचीन कल्पना आहे. आर्य हा जातिवाचक शब्द नसून शिष्टवर्गवाचक व यजनशीलवर्गवाचक शब्द आहे. (६) वर्ण हा शब्द समाजांतील श्रमविभागीवर्ग या अर्थानें ऋग्वेदांत नाहीं (७) चार वर्गांचें अस्तित्व ऋग्मंत्रकालीं होतें व त्याच्याहि पूर्वी होतें, पण त्यास वर्ण शब्द लागला नव्हता. (८) वर्ण हा शब्द जेव्हां वर्गवाचक असेल तेव्हां यजनामुळें झालेल्या वर्गांचा वाचक होता आणि त्या शब्दाचें त्या अर्थानें अस्तित्व पर्शुभारतीयकालींहि असावें. (९) दाशराज्ञ युद्ध हें दोघां सदृश संस्कृतीच्या आर्यन् लोकांतच झालें तथापि दोन्ही पक्षांचे युद्धांतील साहाय्यक मात्र प्रसंगीं भिन्न संस्कृतीय असूं शकतील.

वरील सर्व इतिहासाचीं अंगें सुदासापासून जनमेजयापर्यंतच्या मधल्या कालाच्या एक दोन पायऱ्याच सांगतात परंतु या दीर्घ कालांतील पायऱ्या विशेष बारीक तऱ्हेनें सांग

णाऱ्या गोष्टी म्हणजे वैदिक वाङमय, ब्राह्मण जाति, व यज्ञसंस्था या तीन होत. या तिहींचा अन्योन्याश्रय निकट आहे तो वेदविद्येंत सविस्तर दिला आहे. त्यांतील मुख्य गोष्टी येणेंप्रमाणें मांडतां येतील. वैदिक वाङ्मयाची घटना अशी सांगतां येईल कीं आज जें चार संहिता व ब्राम्हणें असें पृथक स्वरूप आहे तें ऋग्वेदाचें तृतीयसंहितीकरण असावें. संहितीकरणें एकंदर तीन झालीं असावीं. पहिलें संहितीकरण जेव्हां ऋक्सामयजु असें वर्गीकरण ऋग्मंत्रांतच दिसून येतें त्या काळचें होय. दुसरें संहितकिरण परंपराप्रसिद्ध व्यासाचें संहितीकरण असावें. तिसरें संहितकिरण व्यासशिष्यकालीन असावें. दुसरें व तिसरें यांत अर्थात् अंतर फारसें नसावें. आणि जरी या दुसऱ्या व तिसऱ्या संहितीकरणाच्या कालामध्यें वेदांच्या निरनिराळ्या शाखा बांधल्या गेल्या असाव्या. तरी तो काल यज्ञसंस्थेच्या विकासाचा नसून अवनतीचाच होता असें म्हटलें पाहिजे. एवढेंच कीं ही संस्था मरतां मरतां थोडी मरभराटली असावी. हाच काल आरण्यकीय धर्माच्या उदयाचा काल होय, हाच काल ब्राह्मणसंघाचें वर्गस्वरूप जाऊन जातिस्वरूप मिळण्याचा काल होय, आणि हाच काल शाखावैशिष्टयाचा व शाखानुरूप नवांन गृह्य निर्माण करून तेंच जातिवैशिष्ट्य करणाच्या प्रारंभाचा काल होय.

ऋग्मंत्रकालीं दैनिक अग्निहोत्रामध्यें सोम दिसत होता तो सोम दुर्मिळ होत जाऊन दैनिक अग्निहोत्रांतून तर गेलाच, परंतु प्रसंगोपात्त होणाऱ्या मोठ्या यज्ञांतून देखील सोम नाहींसा होऊन सोम न मिळाल्यास कोणती तरी वल्ली वापरण्यास प्रारंभ होऊं लागला. हें वस्त्वंतर यजुर्वेदांत व ब्राह्मणांत दिसून येतें. इतका सोमवल्लीचा यज्ञसंस्थेच्या इतिहासाशीं संबंध देतां येईल.

घरोघरचें दैनिक अग्निहोत्र अप्रिय किंवा लुप्त होऊं लागलें अशी स्थिति ऋग्मंत्रांत दृष्टीस पडते, व त्यामुळें मोठमोठ्या यज्ञास सार्वजनिक वर्गण्या घेऊन सुरवात झाली, आणि लहान यज्ञांचे मोठे यज्ञ बनले.म्हणजे त्रैविद्यांच्या धंदेवाईक अस्तित्वास जागा उत्पन्न झाली.ज्या अर्थी इष्टींचें व पशूचें हौत्र ऋग्वेदावरील ब्राह्मणांत नाहीं,व तें यजुर्वेदांत आहे त्या अर्थी मोठ्या सोमयागाची कल्पना उद्भवल्यानंतर ऋग्वेदाच्या संहितीकरणास प्रारंभ झाला असावा असें दिसतें. ऋग्वेदाचें दहावें मंडळ जेव्हां अथर्व्यांचें गृह्य हिसकावून घेण्याची मसलत निघाली असावी त्यावेळचें दिसतें. गृह्यास उपयोगी पडणारे मंत्र दहाव्या मंडळांतच आहेत. इतरत्र फारसे नाहींत. ऋत्विग्वर्गांत दोन मुख्य स्पर्धा दिसतात. एक स्पर्धा त्रैविद्य व अथर्वे यांची, व दुसरी स्पर्धा कृष्णयजुर्वेदी व शुक्लयजुर्वेदी अध्वर्यूंची. अथर्व्यांनां मांडून बाहेर पडलेल्या शुक्लांनीं प्रसंगीं हातांत घेतलें असावें असें दिसतें. कारण वैतानसूत्र व पारस्कर यांची मद्दी दिसते. अथर्व्यांचा प्रवेश यज्ञसंस्थेंत बऱ्याच उशीरां झाला असावा असें वाटण्यास प्रमाण म्हणून अथर्वांतील हौत्रउत्तरभागांत विभाग्या काण्डांत आहे असें देतां येईल आणि ते सर्व ऋग्वेदांतीलच मंत्र आहेत. हेंहि आणखी प्रमाण म्हणून देतां येईल.

ऋग्वेदांतील मंत्रांमध्येंच अनेक स्तोते एकत्र मिळून प्रार्थना करीत आहेत असें चित्र वारंवार येतें. आणि त्या स्तोत्यांत कांहीं तरी प्रकार होते असेंहि दिसतें. त्यांत गायत्री, अर्की, होते, ब्रह्मे हे मुख्यत्वानें सांगतां येतील.आणि त्या वेळेस या सर्वांचें स्वरूप जवळ जवळ सारखेंच असावें, पुढें स्पर्धेमध्यें होते व ब्रह्मे टिकले, व अर्की व गायत्री हे लयास गेले असें दिसतें. होता या शब्दाचा अर्थ अध्वर्यूच्या आदेशानें हौत्रवाक्यें म्हणणारा किंवा आव्हान करणारा असा नसून हवन करणारा किंवा मुख्यत्वानें हवन करणारा असा होता असें दिसतें (वेदविद्या पृ. ३७३-३७८).दुसऱ्या भागांत दिलेल्याउताऱ्यांवरून असें दिसून येईल कीं, होता यांतील हु धातूचा जितका आव्हानार्थी अर्थ निघेल तितकाच हवनार्थीहि अर्थ निघेल. अध्वर्यु हें पद शब्दाच्या स्वरूपावरूनच कर्मविशिष्ट न दिसतां पदवीविशिष्ट दिसतें, त्यामुळें त्यांचे उल्लेख चारहि वेदांतून फार थोड्या वेळां आलेले आहेत. हा अध्वर्यूंचा वर्ग होत्यांतूनच निघाला असावा, आणि प्रमुखत्वानें काम करणारा म्हणून अध्वर्यु म्हणवून घेत असावा. यांचेंहि पहिलें भांडवल बरेंचसें ऋचांच्या स्वरूपांत असावें आणि तें आज याजुषहौत्र म्हणून शिल्लक असावें. सर्वच क्रिया अगदीं प्रारंभीं समंत्रक नसाव्या. ज्यावेळेस मोठमोठे याग करावयाचे असतील त्यावेळेस एकेक क्रिया समंत्रक होऊं लागली असावी. या वेळेस एकानें जर यज्ञांतील प्रत्येक क्रिया नियमबद्ध व मंत्रबद्ध करण्याकडे आपलें लक्ष घातलें तर दुसऱ्यानें अधिकाधिक स्तोत्रमंत्रांचा संचय करण्याकडे लक्ष घातलें. होत्यांची जी यज्ञसंस्था असेल तींत बरेचसे मंत्र म्हणून अग्निसमर्पण करण्यांत येत असेल तर अध्वर्यूंच्या क्रियेमध्यें कर्मवैचित्र्य असेल. त्यांनीं कर्मवैचित्र्याकडेच लक्ष ठेवून आणि सोम दुर्मिळ होत असल्यामुळें सोमाशिवाय यजनपद्धति निर्माण करून, 'सप्तहविःसंस्था' निर्माण केल्या, आणि त्या करतांना दुसऱ्या वर्गाची फारशी मदत घेतली नसावी. 'सप्तसोमसंस्था' ज्या वेळेस उत्पन्न झाल्या त्या वेळेस मात्र इतर लोकांची जरूर लागली. होता आणि अध्वर्यु यांचें एकीकरण अर्थात् सोमसंस्थांमुळें झालें एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष ऋग्वेदाची मांडणी देखील सोमसंस्थास अनुरूप करण्यांत आली. म्हणजे दर्शपूर्णमास, पशु यांचें हौत्र यजुर्वेदांतच आहे ऋग्वेदांत नाहीं. सोमसंस्थेमध्यें मात्र होत्याप्रमाणेंच उद्गात्यालाहि आमंत्रण करण्यांत आलें आहे. होत्यांच्या संघामध्यें जे आज यज्ञसंस्थेंत ऋत्विज् दिसतात ते त्यांची यज्ञसंस्था निराळी होती अशा स्थितीचेंच अस्तित्व दाखवितात. जो यज्ञांतील मुख्य मनुष्य, तो प्रेष देणार, तोच प्रशास्ता, परंतु जेव्हां अध्वर्यू व होते या दोघांचें एकीकरण झालें तेव्हां मुख्य पदवी 'होता' ही कायम राहिली व प्रशास्ता

या पदवीऐवजीं मैत्रावरुण ही पदवी झाली असावी. म्हणजे होत्यांपैकीं जो समुच्चय अध्वर्युप्रधान सोमयागाला मिळाला त्यांतील होतृसहायकांत प्रेष देण्याच्या कामाचें महत्त्वच कमी करण्यांत आलें. ब्रह्मे हे देखील निराळ्याच यज्ञपरंपरेतील होते. ब्रह्मयाचे सहाय्यक स्वतंत्र आहेत व त्यांतहि हौत्र व आध्वर्यव करणारे आहेत.ब्राह्मणाच्छंसी हा ब्रह्मयाचा मनुष्य, पण कर्म करतो हौत्राचें. आग्नीध्र हा ब्रह्मयाचाच सहाय्यक पण कर्म करतो आंगमेहेनतीचें, अध्वर्युसारखें. पोता हाहि ब्रह्मयाचा मदतनीस पण याचें कर्म होत्यासारखें आहे. ज्या पद्धतीनें होते अध्वर्युप्रधान यज्ञसंस्थेंत शिरले आणि त्यांचे मदतनीस आपल्या कामाचें स्वरूप न बदलतां प्रविष्ट झाले म्हणजे वस्तुतः अध्वर्यु इत्यादींचें सहाय्यक बनून देखील नांवानें मात्र होत्यांचे साहाय्यक राहिले, तीच क्रिया ब्रह्मयांस त्रैविद्यांच्या यज्ञसंस्थेंत स्थान मिळाल्यानें झाली. ही अध्वर्यूंची व ब्रह्मयांची एकी झाली ती बराच काळ स्पर्धा झाल्यानंतरच झाली. त्यां स्पर्धेमध्यें ब्रह्मयांनीं सोमयागाची अनवश्यकता वगैरे सांगून अध्वर्यूंच्या कामाला हरकत केलीच. ब्रह्मयांची यज्ञसंस्था राजाश्रयानें चालत असावी व अध्वर्यूंची लोकाश्रयावर चालत असावी. यामुळें अध्वर्यूंस ब्रह्मयांस आपल्यांत घेण्याची इच्छा स्वाभाविकच झाली. तथापि ब्रह्मयांस लोकसमाज अध्वर्यूंकडेच जास्त वळतो व अध्वर्यूंच्या यज्ञसंस्थेंत लोकाकर्षक भागहि बराच आहे ही गोष्ट पटली असावी व त्यांशीं समेट करण्याची इच्छा झाली असावी. अध्वर्यूंनीं ब्रह्मयांस महत्त्वाचें स्थान दिलें. परंतु मुख्य व्यवस्थापकाचें काम आपणांकडेसच ठेविलें अध्वर्यूंनीं कित्येक लहानसहान क्रियांस सोमसंस्थांचें स्वरूप दिलें आणि अशा रीतीनें त्या क्रिया ब्रह्मयांच्या ताब्यांतून आपणांकडे घेतल्या, याला व्रात्यस्तोमाचें उदाहरण देतां येईल, असो.

यज्ञसंस्थांतील अंतस्थ घटनेसंबंधानें हें विवेचन झालें. संस्थांचें पौर्वापर्यहि मांडण्यांत आलेंच आहे. आतां सत्रविषयक विचारांचें पुनर्निरूपण करूं. सत्रें हीं प्राचीन मांत्रलोकांचीं नसावींत असें वाटतें. सत्र शब्द तशा अर्थानें ऋग्वेदांत नाहीं. सत्रें या शब्दाचा समुच्चयात्मक स्थान इतपत अर्थ फार तर ऋग्वेदांत आलेल्या उदाहरणांतून काढतां येईल. सत्रें शुक्ल यजुर्वेदांत दिलीं नाहींत व कृष्णयजुर्वेदांत देखील त्यांची मांडणी फार पुसट पुसट आहे. त्यावरून सत्रें फारशीं प्रचारांत नव्हतीं असें म्हणतां येईल. लोक फिरते असतांना जी क्रिया स्वाभाविकपणें होई ती क्रिया पांचपन्नास मंडळींनीं एकत्र बसून करावयाची हें मुख्य सत्रस्वरूप होय. सामुच्चयिक अग्न्युपासना ऋग्वेदांत दृष्टीस पडते,तिचें एक विशिष्टीकरण जर सोमयागाच्या रूपानें

द्वादशाहाकडून झालें तर सामान्यांकडून सत्ररूपानें झालें. सामान्य जनांस आपण एकत्र होऊन कांहीं क्रिया करावयाची इच्छा उत्पन्न झाल्यास, जी कृति करावयाची तें स्वरूप सत्रांत अर्थात् सर्वसामान्यांनीं नमून तें केलें असल्यामुळें दक्षिणा नाहीं, यजमान ऋत्विज् ही भिन्नता नाहीं व त्यांचा कार्यक्रम विशेष विशिष्टीकरण पावला नाहीं, व नियमांनींहि बद्ध झाला नाहीं. कृष्णयजुर्वेदामध्यें मात्र सत्रांत त्यांच्या वाढलेल्या संस्थाप्रमाणें दररोज याग करावेत असें सांगितलें आहे. लो. टिळकांनीं सत्रांच्या मुदतीचा संबंध तितक्या मुदतीचा दिवस असावा असा लावून त्यावरून उत्तरध्रुवात्मक मूलस्थानाच्या कल्पनेस तो आधार म्हणून दिला आहे.

समाजाचा इतिहास लिहिण्यासाठीं अनेक प्रकारच्या पद्धती वापरल्या जातात. त्या पद्धतींचें याथातथ्य ज्ञान करून देण्याचें हें स्थान नव्हे. त्याचें कांहीं दिग्दर्शन पहिल्या विभागाच्या तिसऱ्या प्रकरणात केलें आहे. त्यामध्यें प्राचीन भारतीय व प्राचीन भिन्नस्थलीय भाषांचा तौलनिक अभ्यास, संस्कृत भाषेचा ऐतिहासिक अभ्यास व भिन्नकालीन भारतीय भाषांचा तौलनिक अभ्यास, प्राचीन कालाच्या अवशिष्ट वस्तूंचा अभ्यास उ. मोडकीं देवळें, जमीनीखालीं गाडलेलीं शहरें, राजवाडे वगैरेंचा स्थावरजंगम लिखाणाचा अभ्यास, मुद्राविज्ञान, तसेंच भारतीय संस्कृतीचा ज्या इतर भाषांवर परिणाम झाला असेल त्या इतर भाषांचा अभ्यास, संस्थारूप अवशेषांचा अभ्यास ( उ. जातींचीं नावें, कुलदेवता इ. ) तसेंच दैवतें, कल्पना, विचार, तत्त्वज्ञान इत्यादिकांवर अभ्यास म्हणजे तौलनिक दैवतशास्त्र इत्यादींचें स्वरूप वर्णिलें आहे. आणि या सर्व प्रकारच्या अभ्यासापासून उत्पन्न होणारें ज्ञान तेंहि मांडलें आहे. उदाहरणार्थ तौलनिक दैवताभ्यास दुसऱ्या विभागांत दैवतेतिहासाबरोबर दिला आहे. भारतीय व अन्यस्थलीय भाषांच्या अभ्यासापासून जी इतिहासज्ञानप्राप्ति होते ती मूलगृहकालीन व पर्शुभारतीय संस्कृतीच्या वर्णनकालीं मांडलीच आहे. स्थावरजंगम लिखाणें व मुद्राविज्ञान यांच्यापासून होणारी फलप्राप्ती, जे ऐतिहासिक राजावलींचें व कथासूत्रांचे धागे,त्यांचेंहि फल प्रसंगानुसार मांडलेंच आहे. द्राविडी भाषेंतील शब्दसंग्रहाचा अभ्यास हा ऐतिहासिक पद्धतीनें करून त्यापासून उत्पन्न होणारी फलश्रुति ही मात्र फारशी मांडली गेली नाहीं. याचें कारण या इतिहासावर फारसा परिश्रमच झाला नाहीं. संस्कृत भाषेचा ऐतिहासिक अभ्यास करून त्यापासून जी इतिहासप्रगतीची मांडणी करावयाची त्या मांडणीचें प्रारंभस्थान वेदकालीन शब्दांचा साकल्यानें अभ्यास होय. हा अभ्यास प्रस्तुत विभागांत पहिल्या प्रथमच मांडला गेला आहे आणि भविष्यकालीं या अभ्यासाची पद्धतशीर वृद्धि होईल अशी अपेक्षा आहे. वेदकालीन शब्दसंग्रहाचें साकल्यानें ज्ञान झाल्याशिवाय भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाच्या वल्गना व्यर्थ आहेत. आणि यासाठीं प्रस्तुत विषयाचा प्रारंभ म्हणून: आम्हीं त्याकडे बरींचशीं पृष्ठें दिलीं आहेत. शब्दसंग्रहाचा जो ऐतिहासिक अभ्यास व्हावयाचा त्याचे प्रकार मुख्यतः दोन आहेत. नवीन शब्द आणखी कोणते आले हें पूर्वींच्या

शब्दाच्या यादीकडे लक्ष देऊन पाहावयाचें. आणि जुन्या शब्दांचें अर्थांतर कसकसें होत गेलें हें पहावयाचें. या दोन प्रकारच्या अभ्यासांनीं स्थित्यंतरामुळें बदललेली सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिति लक्षांत येते. असो.

संस्कृतसंभव भाषांचा, निदान संस्कृतसंभव म्हणून समजल्या जाणाऱ्या भाषांचा, ऐतिहासिक अभ्यास होण्यास आवश्यक साधन शब्दसंग्रहाचे प्रयत्न होत. ते प्रयत्न बरेचसे झाले आहेत आणि बऱ्याचशा प्राकृत समजल्या जाणाऱ्या भाषांचे कोशहि झाले आहेत. आतां उत्तरकालीन भाषांच्या शब्दांचें व्युत्पादन करण्याचे प्रयत्नहि चालू आहेत. त्या भाषांचें व्याकरणहि अभ्यासिलें जाऊन त्याचा संस्कृत व्याकरणांशीं संबंध पाहण्याचें काम चालू आहे. राजवाड्यांचें ज्ञानेश्वरीचें व्याकरण हा एक त्या प्रकारच्या अभ्यासाचा उत्कृष्ट नमुना होय.

ऐतिहासिक विवेचनामध्यें आपण एकाच प्रगतीच्या दोन भिन्न कालांतील अवशेषांची तुलना करून प्रगति मोजतों. किंवा दोन भिन्नस्थलीय भिन्न लोकांचे अवशेष तुलनेकरितां घेतलेच तर ते त्या दोहोंपासून त्यांच्या पूर्वीचें स्वरूप अवगमिण्याकरितां ते तुलनेस घेतों. यांत सदोष अनुमानाला जागा कमी असते. परंतु याहून जराशी अधिक सदोष परंतु वापरली गेलेली तौलनिक पद्धति म्हटली म्हणजे प्रगत व रानटी लोकाचे आचार व संस्था घेऊन त्या रानटी लोकांच्या आचारांपासून प्रगत लोकाचे आचार उत्पन्न झाले असावे अशा तऱ्हेची कल्पना करून संस्थांच्या इतिहासाची मांडणी करणें होय. आपण सुधारलेले लोक त्याच रानटी स्थितींतून विकास होत होत सुसंस्कृत स्थितीस येऊन पोंचलों तर आजच्या रानटी लोकांचे जे आचार विचार असतील तेच आपल्या पूर्वजांचे असतील आणि त्यापासून आजचे सुधारलेले आचार विचार विकास पावले असतील अशा प्रकारची कल्पना करून निरनिराळ्या मानववंशांतील व जातींतील धार्मिक, सांस्कारिक, राजकीय व गृह्य संस्थांचा इतिहास मांडण्यांत आला आहे. बाकोफन, मॉर्गन वगैरेंनीं या प्रकारच्या इतिहासास प्रारंभ केला त्याच प्रकारच्या अभ्यासास पुढें इतर लेखकांनीं विस्तृत स्वरूप दिलें. स्पेन्सरचा 'समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें' हा ग्रंथ याच प्रकारचा आहे आणि वेस्टरमार्कचे विवाहसंस्थेच्या इतिहासावरील ग्रंथ व नैतिक कल्पनांच्या इतिहासावरील ग्रंथ याच प्रकारचे आहेत. बुद्धपूर्व जगांतील चर्चेस घेतलेल्या राष्ट्रांच्या इतिहासामध्यें आजच्या सुधारलेल्या बहुतेक संस्था पूर्णपणें संस्थापित झालेल्या दिसतात. तेव्हां वन्य व नागरिक यांच्या तौलनिक अभ्यासापासून जो इतिहासभाग निघेल तो त्यापेक्षांहि प्राचीन काळचा असावा, किंवा फार तर त्यावेळच्या आज प्रगत म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांच्या पूर्वजांचा पण त्या वेळेस अप्रगत असलेल्या लोकांचा तत्कालीन इतिहास असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

इजिप्त व असुर येथील लोकांचा प्राचीन इतिहास ख्रिस्तपूर्व आठ हजार वर्षांपूर्वीपासून सुरू होतो, आणि त्या कालापासून आपणांस अमर्ना लेखाच्या कालापर्यंतचें म्हणजे भारती युद्धाच्या कालापर्यंतचें त्या राष्ट्राचें ज्ञान अधिकव्यवस्थित आहे. दाशराज्ञयुद्धकाल आपण घेतला तरी तो ख्रिस्तपूर्व अडीच हजार वर्षांच्या पलीकडे नेतां येत नाहीं. सुदासदिवोदासांच्यापूर्वीची राजावली आपण घेतली तर ती फार तर हजार पंधराशें वर्षें आणखी पाठीमागें आपणांस पोंचवील. जास्त पोंचवूं शकणार नाहीं. म्हणजे फार तर ख्रिस्तपूर्व तीन हजार वर्षांपर्यंत आपणांस नेईल. इतकें जरी झालें तरी अत्यंत अनुमानानें काढलेल्या प्राचीनतम भारतीय कालापूर्वी चारपांच हजार वर्षें पश्चिमेकडे दोन मोठ्या संस्कृती नांदत होत्या असें स्पष्ट दिसून येईल. पर्शुभारतीयकाल आणि मूलगृहकाल या कालाचा आपणांस आज अजमास करतांच येत नाहीं परंतु असें म्हणतां येईल कीं, ज्या वेळेस या आर्यन् राष्ट्रांची प्राचीनतमस्थिति केवळ शब्दसादृश्यावरून काढावयाची आहे व ज्या काळामध्यें आर्यन् राष्ट्रें भटकींच होतीं त्या वेळेस असुर्य व इजिप्त या दोन राष्ट्रांची संस्कृति चांगलीच वाढली होती; व ज्या वेळेस ऋग्वेदमंत्ररचना झाली असेल कीं नसेल याविषयींच संशय आहे त्यावेळेस असुरियामध्यें शासनपद्धति इतकी सुधारली होती कीं, 'त्यांचा कायदा लेखनप्रविष्ट झाला होता एवढेंच नव्हे, तर त्यांचा ग्रंथहि [हमुरबीचें कोड] करण्यांत आला होता. एवढेंच नव्हे तर हमुरबीच्या कायदेसंग्रहांत व्यावहारिक कायद्यापासून आचारांतर गोष्टी पृथक् होऊन व्यावहारिक गोष्टीच केवळ कायद्याचा विषय झाला होता.' इतकी सुधारणा प्रत्यक्ष रोमन लोकांमध्यें बारा नियमांच्या कालापर्यंत झाली नव्हती; आणि भारतामध्यें तर जोराजनिर्मित शासनावलीचा संग्रहच कधीं झाला नाहीं. कांहीं व्यावहारिक नियमांचा संग्रह झाला तो धर्मशास्त्रकार अर्थशास्त्रकार याच्याकडूनच झाला.' मोठमोठ्या इमारती, मोठमोठे मनोरे या बाबतींत देखील अत्यंत प्राचीन अवशेष या दोन संस्कृतींत जसे उपलब्ध होतात तसे आपल्याकडे उपलब्ध नाहींत व आपल्याकडे अशोकपूर्व लेखहि उपलब्ध होत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. म्हणजे भौतिक सुधारणांच्या बाबतींत प्राचीन आर्यन् यांच्या पेक्षां असुर व मिसरी यांची संस्कृति अधिक जुनी व अधिक उच्च होती असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

तुर्कस्थानांतील अस्कलॉनमध्यें खोदकामांत जे अवशेष सांपडले (टाइम्स ऑफ इंडिया २८-५-२१) त्यामध्यें तर इतक्या मोठ्या मूर्ती आढळल्या कीं त्या मूर्तींचे तळपाय एक वाराहून मोठे आहेत. अस्कलॉन शहराचा भरभराटीचा काळ म्हणजे ख्रि. पू. चवदावें शतक होय. नुकतेंच म्हणजे १८-९-२३ च्या सुमारास (त्या तारखेचा टाइम्स आफ इंडियाचा अंक पहा) सर आर्थर इव्हॅन्स यांनीं बाहेर काढलेल्या इजिप्तसंस्कृ-

तीच्या चित्रकलेविषयीं वर्णन आलें आहे. व त्यावेळचीं कांहीं चित्रेंहि सांपडलीं आहेत त्यांवरून तत्कालीन पशुपक्ष्यां-विषयीं फार सुंदर माहिती मिळते. त्याच पत्राच्या २९-८-२१ च्या अंकांत लंडनहून आलेल्या तारे-मध्यें फ्रान्समध्यें प्राचीन काळीं असलेल्या मूर्तिशिल्पाचें ज्ञान दाखविणारा एक संग्रह सांपडल्याचें प्रसिद्ध झालें आहे. त्यामध्यें ज्या अनेक पशुपक्ष्यांचीं सुंदर घडणीचीं चित्रें आहेत, त्यांपैकीं बरेच प्राणी आज नष्ट झाले आहेत. तीं चित्रें कोणत्या काळीं घडलीं असावीं याविषयीं निश्चय झाला नाहीं, पण तो काळ वीस हजारांपासून पंचवीसहजार वर्षांपूर्वींचा असावा अशी कल्पना केली गेली आहे.

या सर्व गोष्टींवरून असें दिसतें कीं, असुरीमिसरी संस्कृतीच भौतिक बाबतींत भारतीय संस्कृतीच्या पुढें आहे एवढेंच नाहीं तर क्रीट फ्रान्स येथील संस्कृतीहि भौतिक बाबतींत भारतीय संस्कृतीच्या पुढें आहे.

पर्शूंची संस्कृति व भारतीयांची संस्कृति, यांची तुलना केली तर आपणांस असें म्हणतां येईल कीं, राजकीय सत्तेची घटना आणि साम्राज्यविस्तार यांच्या बाबतींत पर्शूंचें महत्व खिस्तपूर्व सहाव्या शतकापासून ते मुसुलमानी उदयापर्यंत होतें. परंतु बुद्धपूर्वकालीं यांचें राजकीय महत्त्वहि फारसें नसावें. बुद्धोत्तरकालीं एवढेंच म्हणतां येईल कीं मागधांच्या पराक्रमकालापेक्षां पर्शूंचा पराक्रमकाळ २०० वर्षें अधिक अगोदर येतो. परंतु अलेक्झांडरच्या नेतृत्वाखालीं ग्रीक सैनिकांपुढें पर्शियन लोकांस टिकाव धरतां आला नाहीं. आणि त्यांच्या राजसत्तेचें क्षेत्र अशोककालीन राजसत्ताक्षेत्रापेक्षां कधींच मोठें नसावें. पर्शूंनां रोमन साम्राज्याशीं लढतां लढतां जरी आपलें महत्त्व कायम ठेवतां आलें तरी त्यांची एकंदर राजकीय करामत भारतीय सम्राटांपेक्षां अधिक होती असा निर्णय देववत नाहीं. सांस्कृतिकदृष्टया त्यांचें एकंदर कार्य भारतीय कार्यापेक्षा कमी महत्त्वाचें व अधिक उत्तरकालीन होतें असें म्हटलें पाहिजे. झरथुष्ट्र हा बुद्धपूर्वकालीन होता असें त्यांनें सिद्ध झाल्याचें आम्ही समजत नाहीं. शिवाय पर्शूंमध्यें वेदांगादि शास्त्रांचा विकास मुळींच झाला नाहीं म्हणून त्या बाबतींमध्यें पर्शूंनां प्राचीन भारतीयांपेक्षां उत्तर संस्कृतीचे वाहक किंवा जनक असें म्हणतां येणार नाहीं. सुमेरसंस्कृतीशीं समकालीन इराणी संस्कृति काय असावी याविषयीं अनुमानसुद्धां करतां येत नाहीं; एवढेंच नव्हे तर पर्शूंच्या राजावलीचा व निश्चित इतिहासाचा प्रारंभ शैशुनागांपेक्षां पूर्वी नाहीं.

---

## परिशिष्ट.

## जैनवाङ्मय.

**बौद्ध व जैन संप्रदाय.—** बौद्ध धर्मग्रंथांमध्यें गौतम बुद्धाचा एक प्रतिस्पर्धी म्हणून "नीगंठनातपुत्त" या नांवाचा वारंवार उल्लेख आला आहे. अर्थात् हा उल्लेख सुप्रसिद्ध महावीर या जैनधर्मसंस्थापकाचा होय, याविषयीं बिलकुल संदेह नाहीं. गौतमाच्या पूर्वी थोडेच दिवस "नीगंठ" (पाशरहित) ह्या नांवाच्या एका बऱ्याच जुन्या संप्रदायांतून "वर्धमान महावीर" याच्या पुढारीपणाखालीं हा जैन संप्रदाय उदयास आला. जैन संप्रदायाचें बौद्ध संप्रदायाशीं इतकें साम्य आहे कीं, जैन संप्रदाय हा बौद्ध संप्रदायातीलच पोटभाग होय ही समजूत बराच काळपर्यंत रूढ होती. तथापि बौद्ध संप्रदायापेक्षा ह्या जैन संप्रदायांतील कांहीं तत्त्वें इतकीं भिन्न आहेत कीं त्यामुळें जैन संप्रदाय अगदीं स्वतंत्र आहे असें मानणें भाग पडलें. उदाहरणार्थ बौद्ध संप्रदायापेक्षा जैन संप्रदायामध्यें तापसवृत्ति व इतर सांप्रदायिक आचार यांजवर फारच भर देण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर गौतम बुद्धाच्या उलट, महावीर यानें पूर्ण विकास पावलेल्या आत्मतत्त्वाच्या अस्तित्वासंबंधीं विवेचन केलें आहे. दोन्ही संप्रदायांना सामान्यपणें लागू असणाऱ्या गोष्टी म्हणजे प्राचीन भारतीयांत प्रचलित असलेली तापसवृत्ति व तत्संबंधी नीतिकल्पना ह्या होत. बौद्ध व जैन संप्रदायांचें साम्य या बाबतींत दाखविता येण्यासारखें आहे, इतकेंच नव्हे तर सर्वसामान्य भारतीय विरक्तिपर वाङ्मयात अशाच प्रकारचें वातावरण भरून राहिलें आहे हें दाखविता येईल.

ह्या दोन्ही संप्रदायामध्यें मुख्य एक भेद असा आहे कीं, जैन संप्रदाय हा सर्वकाल पूर्ण भारतीयच राहिला, परंतु बौद्ध संप्रदाय मात्र अधिक व्यापक झाला व ह्यामुळेंच बौद्ध वाङ्मयास विशेषच महत्त्व प्राप्त झालें आहे. ह्या दृष्टीनें पाहतां अंतर्गत विषयामध्यें देखील जैन वाङ्मयाची बौद्ध वाङ्मयाशीं तुलना करतां येणार नाहीं. जैनांचे मूळ धर्मग्रंथ रूक्ष अशा उपदेशाच्या पद्धतींत लिहिले गेले असल्यामुळें बौद्ध धर्मग्रंथात अनेक ठिकाणीं आढळून येणारें सामान्य मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें केलेलें विवेचन ह्या जैन ग्रंथात मुळींच आढळून येत नाहीं.

**जैन सिद्धान्त —** इ. सनानंतर पहिल्या शतकांत जैन संप्रदायात एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडून आली ती ही कीं, त्यामध्यें श्वेतांबर व दिगंबर असे दोन पंथ उत्पन्न झाले. ह्या सर्व धर्मग्रंथांस दोन्ही पंथांचे जैन लोक 'सिद्धान्त' अथवा 'आगम' असें म्हणतात. ह्या मूळ धर्मग्रंथांतील पहिला महत्त्वाचा भाग म्हटला म्हणजे बारा "अंगें" होत, असें श्वेतांबर व दिगंबर पंथानुयायांचें म्हणणें आहे. परंतु आतापर्यंत फक्त श्वेतांबरपंथांतील 'सिद्धान्त' उपलब्ध झाला असून त्यामध्यें पुढील 'सुत्त' ग्रंथांचा समावेश होतो. या धर्मग्रंथाची भाषा 'आर्ष' किंवा 'अर्धमागधी' या नांवानें संबोधली जाणारी प्राकृत होय. महावीरानें ह्याच भाषेंत धर्मोपदेश केला असें म्हणतात; परंतु ह्या ग्रंथांपैकीं गद्यभाग व पद्यभाग यांच्या भाषेंत पुष्कळ अंतर आहे.

प्राकृत पद्य भागांत बौद्ध ग्रंथांतील पाली गाथांप्रमाणें बरींच जुनीं शब्दांचीं रूपें सांपडतात. अत्यंत प्राचीन अर्धमागधीचें स्वरूप "आयारंगसुत्त" ( आचारांगसूत्र )"सूयगदांग", ( सूत्रकृतांग ) व " उत्तरज्झयणसुत्त " ( उत्तराध्ययन सूत्र ) या तीन ग्रंथांत पद्यावयास सांपडतें. धर्मग्रंथांखेरीज इतर वाङ्मयाची भाषा 'अर्धमागधी' किंवा जैन महाराष्ट्री ही असून देखील वरील धर्मग्रंथांच्या भाषेपेक्षां अगदीं भिन्न आहे.

**ग्रंथकाल.**—ह्या धर्मग्रंथाच्या कालासंबंधीं व प्रमाणभूततेसंबंधीं श्वेतांबर जैनामध्यें पुढील दंतकथा प्रचलित आहे.

प्रत्यक्ष महावीरानें गणधर वगैरे शिष्यांस जो तत्त्वोपदेश केला तें मूळ जैन तत्त्वज्ञान होय व तो चौदा"पुव्व" ( पूर्व ) ग्रंथांत समाविष्ट झालेला होता; परंतु लवकरच ह्या प्राचीन ग्रंथांची माहिती नष्ट झाली मात्र महावीराच्या एका शिष्यानें हें ज्ञान पुढें प्रसृत केलें व पुढें कित्येक पिढ्यांपर्यंत अशा रीतीनें ह्या मूळ धर्मग्रंथांचें संरक्षण करण्यांत आलें.

महावीराच्या मृत्यूनंतर दुसऱ्या शतकांत मगध देशांत १२ वर्षेपर्यंत भयंकर दुष्काळ पडला. त्या वेळीं मौर्य चंद्रगुप्त हा मगध देशचा राजा होता व भद्रबाहु हा जैन लोकांचा मुख्य अग्रणी होता. दुष्काळामुळें भद्रबाहु हा कांहीं अनुयायांसह दक्षिण हिंदुस्थानांतील कर्नाटक देशात गेला, व चौदा पूर्वांच्या ज्ञानांत पारंगत असलेल्यापैकीं शेवटचा जो स्थूलभद्र तोच मगध देशांत मागें राहिलेल्या जैनसंप्रदायी लोकांचा धुरीण झाला. भद्रबाहूच्या अभावीं ह्या चौदा पूर्वांचें ज्ञान नाहींसें होतें, अशी स्थिति प्राप्त झाल्यामुळें पाटालिपुत्र शहरांत एक धर्मसभा भरविण्यात आली व ह्या सभेंत ११ अंगाची रचना करण्यांत येऊन १४ ' पूर्वांचें ' अवशेष जमवून त्यांचें १२ वें अंग बनविण्यांत आलें. जेव्हां भद्रबाहूबरोबर गेलेले लोक स्वदेशीं परत आले, त्या वेळीं परदेशीं गेलेल्या व देशीं राहिलेल्या जैन लोकांमध्यें बरेंच अंतर पडलें होतें. देशीं राहिलेल्या लोकांस श्वेतवस्त्रें वापरण्याची संवय झाली होती; परंतु भद्रबाहूचे अनुयायी जैन ह्यांनीं महावीराच्या आज्ञेप्रमाणें नग्न स्थितींतच आयुष्य घालविण्याचें व्रत चालविलें होतें व अशा रीतीनें श्वेतांबर व दिगंबर हे दोन तट जैन लोकांत पडले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, दिगंबर जैनानीं १४ ' पुव्व ' आणि ' अंगें ' नाहींशीं झालीं, असें ठरवून श्वेतांबर जैनानीं संग्रथित केलेले धर्मग्रंथ प्रमाण मानण्याचें सोडून दिलें. कालांतरानें श्वेतांबरांच्या धर्मग्रंथांत घोंटाळा माजून ते ग्रंथ नामशेष होण्याच्या मार्गास लागले. ह्यामुळें महावीरनिर्वाणानंतर ९८० ( किंवा ९९३ ) वर्षांनीं म्हणजे इ. सनाच्या ५ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास गुजराथ देशांतील वलभी नगरांत पुनः एक धर्मग्रंथाचें एकत्रित संग्रथन करण्याकरितां धर्मसभा भरविण्यांत आली. ह्या वेळीं "पुव्व" यापैकीं त्रुटित अवशेष मिळून एकत्र केलेलें १२ वें ' अंग ' नष्ट झालें होतें. ह्यामुळें " देवर्द्धिगणी " याच्या धर्मग्रंथाच्या प्रतीशीं समान अशा सांप्रत उपलब्ध असलेल्या जैन धर्मग्रंथांत आपणांस ११ ' अंगें ' च सांपडतात.

अशा रीतीनें श्वेतांबर जैनांच्या दंतकथेप्रमाणें देखील ह्या धर्मग्रंथांचा काल इ. सनाच्या ५ व्या शतकाच्या पूर्वी जाऊं शकत नाहीं. अर्थात् ह्या धर्मग्रंथांचा उद्भव पूर्वीच्या पाटलिपुत्र नगरांतील धर्मसभेच्या कालीं व त्यापूर्वीहि महावीराच्या कालीं झाला, असें त्यांचें म्हणणें आहेच. १४ 'पुव्व' व ११ ' अंगें ' ह्यांचें ज्ञान महावीराच्या कांही पट्टशिष्यांस होतें ही गोष्ट दिगंबर जैन देखील कबूल करतात; परंतु त्यांचें इतकेंच म्हणणें आहे कीं, ह्या १४ ' पुव्व ' ग्रंथांचें ज्ञान अकालींच नष्ट झालें इतकेंच नव्हे, तर महावीरनिवार्णानंतर ४३६ वर्षांच्या अवधींत ११ ' अंगें ' यांचें ज्ञान असलेला शेवटचा आचार्यहि मृत झाला, व मागाहूनच्या आचार्यांचें " अंगज्ञान " कमी कमी होत जाऊन महावीरनिर्वाणानंतर ६८३ वर्षांनीं ह्या धर्मग्रंथांतील खऱ्या ज्ञानाचा मागमूसहि उरला नाहीं.

मूळ जैन दंतकथेप्रमाणें ह्या वरील धर्मग्रंथांचा काल फार मागें नेता येत नाहीं; तथापि ह्या ग्रंथाचा कांहीं भाग अत्यंत जुना असून फक्त देवर्द्धि यानें जुन्या हस्तलिखितावरून कांहीं भाग व तोंडीं दंतकथेच्या रूपानें आलेला कांहीं भाग, ह्या सर्वांचें संकलन केलें, असें म्हणण्यास बराच विश्वासजनक पुरावा आहे. कारण इ. सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकातील कांहीं शिलालेखावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, त्या वेळीं देखील जैनामध्यें श्वेतांबर व दिगंबर हे भेद झाले होते, व सध्याच्या उपलब्ध जैन धर्मग्रंथात आढळून येणाऱ्या वंशपरंपरांसारख्या परंपरा असणारे कांहीं पंथ ( गण ) त्या काळीं अस्तित्वांत होते. ह्याच शिलालेखामध्यें " वाचक " नांवाच्या जैन संन्याशांचें उल्लेख आहेत, त्यावरून त्या काळीं जैन धर्मग्रंथ कोणत्या तरी मूळ स्वरूपांत अस्तित्वांत असावेत असें दिसतें. ह्या शिलालेखांवरून व तत्कालीन अवशेषांच्या शिल्पावरून असेंहि दिसून येतें कीं, इ. सनाच्या पहिल्या शतकांत महावीर-दंतकथा सांप्रत उपलब्ध असल्याप्रमाणेंच होती. जैन साधूंनीं नग्नवृत्तीनें रहावें अशाबद्दल घालून दिलेल्या नियमांत श्वेतांबरी यानीं फेरफार केलें नाहींत. ह्या एका गोष्टीवरून त्यांनीं धर्मग्रंथांत लागेल तसे फेरफार करण्याचें धाडस न करतां एकंदर धर्मज्ञान शक्य तितकें, आहे ह्या स्थितींत राखण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. शिवाय ही जैनपरंपरा पुष्कळशा बाबतींत बौद्ध परंपरेसारखीच आहे, ह्याबद्दल बरीचशी खात्री ह्या शिलालेखांवरून पटते.

वरील विवेचनावरून ही गोष्ट मात्र सिद्ध होते कीं, जैनांचे ' सिद्धांत ' ग्रंथ एकाच वेळीं रचले गेले नसावेत. देवर्द्धीनें संग्रथन केलेले व सांप्रत आपणांस उपलब्ध असलेले जैन धर्मग्रंथ हे त्या काळच्या वाङ्मयात्मक चळवळीच्या अगदीं शेवटीं शेवटीं रचले गेले, व लागलीच जैन पंथाची व

संन्यासवृत्तीची सुव्यवस्थित स्थापना झाली. ह्या गोष्टी महावीरनिर्वाणानंतर लवकरच घडून आल्या असाव्यात. अर्थात् ह्या जैन धर्मग्रंथांपैकीं प्राचीन भागाचा काळ महावीराच्या अगदीं पहिल्या शिष्यांच्या अमदानीचा. म्हणजे इ. सनाच्या दुसऱ्या शतकाच्या पुष्कळ मागें लोटतां येईल; वरील जैन दंतकथेप्रमाणें ह्या काल मौर्य चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीत येतो व त्यापैकीं अगदीं मागाहूनचा भाग देवर्द्धिगणीच्या काळांत तयार झाला असावा.

यानंतर जैन धर्मग्रंथांतील एक एक भागाकडे आपण क्रमशः वळूं.

**धर्मग्रंथांचे भाग, प्रथम अंग; आयारंग सुत्त**— 'सिद्धांत' ग्रंथांतील पहिलें अंग "आयारंगसुत्त" (आचारांग सूत्र) नामक असून त्याचे 'श्रुतस्कंधे (विभाग) दोन आहेत, व त्यांमध्यें एकंदर आचारांचें विवेचन आहे. त्यांपैकीं पहिला भाग दुसऱ्यापेक्षां एकंदरीनें जरी अधिक प्राचीन दिसतो तरी त्यामध्यें देखील विसदृश विषयांचें एकीकरण आढळतें. ह्या ग्रंथांत बौद्ध वाङ्मयाप्रमाणें गद्य व पद्य भागांचें मिश्रण आढळतें. कधीं कधीं सारख्या एकामागून एक कविता आढळतात, तर कधीं गद्य भागच सारखा सांपडतो व पुन्हां लागलीच गद्य व पद्य आळीपाळीनें असलेलें आढळतें. ह्यांतील मुख्य विषय म्हटला म्हणजे अहिंसा, भूतदया इत्यादि गोष्टींबद्दल उपदेश व निरनिराळया प्रकारचे वागणुकीचे नियम सांगणें हा होय. उदाहरणार्थः—

"ह्याप्रमाणें माझें म्हणणें आहे. भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही कालांतील पुज्य 'अर्हत्' व माननीय 'भगवत्' यांचेंहि असेंच म्हणणें आहे. ते नेहमीं असाच उपदेश करतात व नेहमीं ह्याच गोष्टींचें विवेचन करतात कीं:—

"कोणीहि मनुष्यानें कोणत्याहि सजीव प्राण्याची हत्या करूं नये, किंवा त्यास वाईट शब्द बोलूं नयेत किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें त्यास त्रास देऊं नये. विश्व जाणणाऱ्या सूक्ष्म दृष्टीच्या साधुपुरुषांनीं लावून दिलेल्या धर्माची ही पवित्र, सनातन, व असकृदुपदिष्ट अशी आज्ञा आहे.

"तुम्हांला ज्या भावना आहेत त्याच प्रकारच्या भावना तुम्ही ज्याला ठार करणार त्याला आहेत. तुम्ही ज्याला गैरशिस्तपणें वागवितां, अत्यंत त्रास देतां त्या प्राण्याला देखील तुम्हांप्रमाणेंच सुखदुःखांच्या संवेदना होत असतात ही गोष्ट मनांत बाळगून जो कोणी वर्तन करील तो दुसऱ्याचा वध स्वतः करणार नाहीं व करण्यास परवानगी देणार नाहीं."

बौद्धधर्मीय भिक्षुवृत्तीच्या नियमांमध्यें जैनधर्मीय यतिवृत्तीच्या नियमांपेक्षां विशेष भेद असा आहे कीं, जैन धर्माज्ञा अतिकडक तापसवृत्तीवर जोर देतात, इतकेंच नव्हे तर धर्मदृष्ट्या आत्महत्याहि करण्यास सांगतात. "जैन मुनीनें शीतापासून त्रास होत असला तरी थंडी गारठून मरावें परंतु आपल्या व्रताचा भंग होऊं देऊं नये. जर तो दुर्बल व आजारी असला तर एक वेळ त्यानें मृत्यु पत्करावा परंतु उपवासव्रतभंग करूं नये. चालतांना गवताच्या पात्या टोंचतील, डांसचिलटें चावतील, वाईट घाणेरड्या दुष्ट हवेपासून त्रास होईल अशा तऱ्हेनें नग्नस्थितींत फिरावें (१.८,८)." ह्या लांबलचक अशा महत्त्वाच्या पद्यमय उताऱ्यामध्यें बौद्धग्रंथांत आढळून येणारी एक नेहमींची आज्ञा आली आहे ती ही:—"त्यानें (मुनीनें) जिवंत राहण्याची इच्छा करावयाची नाहीं किंवा मृत्यु येण्यासाठींहि अधीर व्हावयाचें नाहीं." परंतु त्यानंतर लागलींच, पूर्ण शहाण्या मनुष्यानें उपवास करीत करीत हलके हलके मृत्यूचा पल्ला कसा गांठावा ह्याबद्दलच्या निरनिराळया पद्धतींचें विवेचन दिलें आहे. त्यानंतर कर्मआख्यानपर काव्य आहे. वस्तुतः ह्या भागास पद्य किंवा गद्य यांपैकीं काय म्हणावें याचीच शंका आहे. ह्या "उवहाणसूयम्" नामक भागामध्यें महावीराच्या तापसवृत्तीचें अतिशय हुबेहुब वर्णन केलें आहे.

"तो (महावीर) अनिकेत अशा नग्नवृत्तींत इकडे तिकडे फिरे, लोक त्याला खूप झोडपीत व त्याला त्रास देत. परंतु त्याचें ध्यान कधींहि भंग पावलें नाहीं. लाढ देशांतील रहिवाशांनीं त्याचा अत्यंत छळ केला व त्याजवर कुत्रे सोडले, त्यांनीं काठ्या व हाताच्या मुठी यांनीं त्यास खूप मारलें व त्याच्या अंगावर फळें, मातीचीं ढेकळें व मृत्कुंभाचे तुकडे वगैरे फेंकले व अशा रीतीनें अनेक प्रकारच्या त्रासांनीं त्याचें ध्यान भंग करण्याचा प्रयत्न केला. परंतु संग्रामांतील मुख्य सेनानीप्रमाणें महावीरानें त्यांपैकीं कोणत्याहि गोष्टीस जुमानलें नाहीं. कसलीहि जखम झालेली असो नसो त्यानें कधींहि औषधोपचार केले नाहींत. तो कधींहि स्नान करीत नसे किंवा दांत घाशीत नसे. हिंवाळयांत छायेखालीं तो ध्यान करी व उन्हाळयांत सूर्याच्या प्रखर उन्हांत बसे. तो महिनेच्या महिने पाणी पीत नसे, व भोजनाचा सहावा, आठवा किंवा दहावा हिस्सा अन्न ग्रहण करून कोणत्याहि प्रकारची वासना न ठेवतां ध्यानमग्न राही."

'आयारंगा' चा दुसरा खंड त्याच्या पोटभागास दिलेल्या "कूटें" या नांवावरून बराच उत्तरकालीन दिसतो. त्यांपैकीं पहिल्या दोन कूटांमध्यें भिक्षावृत्ति व पर्यटन त्याचप्रमाणें भिक्षु व भिक्षुणी यांची दिनचर्या कशी असावी ह्याबद्दल नियम सांगितले आहेत. तिसऱ्या कूटामध्यें महावीराच्या चरित्रास उपयुक्त असें साहित्य आहे व ह्याचाच उपयोग भद्रबाहूनें "कल्पसूत्र" रचतांना केला आहे. ह्या पुस्तकाची समाप्ति बारा श्लोकांनीं केली आहे, व हे श्लोक कांहींसे बौद्धांच्या 'थेरगाथा' सारखे दिसतात.

**दुसरें अंग, सूयगडाङ्ग.**—जैनसिद्धांतांतील दुसरें अंग "सूयगडाङ्ग" हें होय. ह्यांतील विषय जैन मुनींचा पवित्र आयुष्यक्रम कसा असावा हा असून ह्यांतील

बराचसा भाग प्रतिपक्षीयांचीं मतें खोडून काढण्यांत गेला आहे. या अंगाचेहि दोन खंड आहेत व त्यांपैकीं प्रथम खंड प्राचीन असून दुसरा खंड उत्तरकालीं जोडलेला असावा.

ह्या पहिल्या खंडाची रचना पद्यें श्लोक व इतर कृत्रिम वृत्तांत केली असून त्यांतील उपमा वगैरेवरून ग्रंथकर्त्यास कवि म्हणवून घेण्याची हौस असावी असें दिसतें. त्यांपैकीं कांहीं उपमा अत्यंत समर्पक आहेत. उदाहरणार्थ "हिंस्र पक्षी ज्यांनां अद्याप उडतां येत नाहीं अशा कोंवळ्या पिल्लांवर झडप घालून त्यांनां ज्याप्रमाणें लांबवितात त्याप्रमाणें सदसद्विवेकशून्य माणसें तरुण तपस्व्यांनां कुमार्गास लावण्याचा प्रयत्न करीत असतात" (१. १४.२). तरुण तपस्व्यांस दुसऱ्या संप्रदायप्रवर्तकांनीं स्थापन केलेल्या भिन्न भिन्न मतांपासून दूर राखणें, मार्गांत येणाऱ्या अडचणी व मोह यांचें निवारण करण्याबद्दल त्यांस उपदेश करणें त्याचप्रमाणें आपल्या (जैन) मतावर पूर्ण श्रद्धा ठेवावयास लावून उत्तम पदाकडे त्यांनां नेणें हाच या ग्रंथाचा स्पष्ट उद्देश आहे.

या ग्रंथाच्या आरंभीं महावीराच्या जैन तत्त्वज्ञानाविरुद्ध असलेल्या बौद्ध व इतर सांप्रदायिक मतांचा निषेध केला आहे. अर्थात् कर्म व संसार यासंबंधीं केलेलें विवेचन मात्र इतर मतांतील विवेचनासारखेंच आहे. मठांतील जीवनक्रमांतील दुःखें व संकटें यांचें या भागांत हुबेहुब वर्णन आढळतें. परंतु नवख्या मनुष्यानें त्यांनां पाहून भिऊन जातां उपयोगी नाहीं त्याचे मित्र व आप्तेष्ट भावी कौटुंबिक आयुष्यक्रमांतील सुखदायक प्रसंग त्याला भडक रंगांत मोहक पद्धतीनें दाखवून मुनिवृत्तीपासून त्याला पराङ्मुख करण्याचा प्रयत्न करीत असतात. राजे, सचिव, ब्राह्मण, क्षत्रिय त्याला ह्या व्यावहारिक जगांत बळेंच ओढण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु ह्या सर्व मोहपाशांतून त्याला पुढें मार्ग आक्रमावा लागतो जुगारी, नास्तिक हे त्याच्यावर वारंवार आघात करीत असतात. परंतु नवख्या तपस्व्यास ह्या लोकांनांहि धैर्यानें तोंड द्यावें लागतें. परंतु सर्वांत स्त्रिया ह्या नूतन तापसास मोह घालण्याचा शक्य तो प्रयत्न करीत असतात. तेव्हां विशेषतः अशा स्त्रियांच्या जादूगरीपासून त्याला फार दूर रहावें लागतें. एकदां मनुष्य-प्राणी स्त्रीमोहांत गुरफटून गेला म्हणजे त्याची काय स्थिति होते याचें वर्णन अत्यंत विनोदपूर्ण आहे. रथवाहक ज्याप्रमाणें रथचक्रांस लागेल तिकडे लागेल तशी गति देतो त्याप्रमाणें स्त्रिया मोहबद्ध पुरुषास भोंवऱ्यासारखा गरगर फिरवितात. अशा पुरुषाची स्थिति नंतर काय होते याचें वर्णन नंतरच्या श्लोकांत केलें आहे.

पुष्कळ पुराणें किंवा बौद्धसुत्त यांच्याप्रमाणें या जैन अंगाच्या एका पोटभागांत नरक व त्यांतील यातना (१. ५ १) यासंबंधीं हृदयस्पर्शी वर्णन आहे. तरी पण पुनःपुन्हां ग्रंथकारानें परपक्षखंडनाचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ १. ७ मध्यें असें म्हटलें आहे कीं:—"शीतोदकाच्या अंजलिदानानें पूर्णपदाची प्राप्ति होते ही गोष्ट जर खरी असेल तर मासे, कासवें, सर्प इत्यादि अनेक जलचरांनां पूर्णपदप्राप्ति होईल जलस्नान जर मनुष्यप्राण्याचीं अनंत पातकें धुवून काढीत असेल तर तेंच पुण्यफलेंहि नाहींशीं करील. ब्राह्मण म्हणतात कीं प्रतिदिन अग्नि प्रज्वलित केल्यानें मुक्ति प्राप्त होते. परंतु हें जर खरें असेल तर सोनार, लोहार, घिसाडी इत्यादि धंदेवाईक लोकांनां अनायासें मोक्षप्राप्ति होईल."

हा ग्रंथ एकाच ग्रंथकारानें रचलेला असण्याचा संभव आहे. परंतु त्यापेक्षां एकाच गृहस्थानें एकाच विषयावरील विविध श्लोक व उपदेश पाठ एका ठिकाणीं गोळा केले असण्याचा संभव आहे. ह्याच्या उलट गद्यांत रचलेलें दुसरें प्रकरण लहान लहान स्फुटांचें बनलेलें आहे. ह्यामध्यें देखील परमतखंडन हाच मुख्य विषय असल्यामुळें त्याचें संग्रथन ह्या ठिकाणीं झालें असावें. भारतीय पंथांविषयींच्या माहितीच्या दृष्टीनें हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे.

**तिसरें अंग, ठाणांग.**—त्यांपैकीं "ठाणांग" हें तिसरें अंग होय. बौद्ध "अंगुत्तर निकाय" या ग्रंथांतल्याप्रमाणें ह्या जैन ग्रंथांतहि दहा ह्या संख्याक्रमानें पुष्कळसे धार्मिक विषय विवेचिले गेले आहेत. ह्या यादींत प्रत्येक ठिकाणीं गूढ अशा उपमा आढळून येतात. उदाहरणार्थ, 'पटक (पेटी) किंवा उपदेशक यांचे चार प्रकार असतात; मत्स्य किंवा याचक यांचेहि चार प्रकार असतात; त्याचप्रमाणें कंदुक व मनुष्यांचेहि चार असतात;" ही उपमा पहा. ह्या अंगामध्यें एके ठिकाणीं "दिट्ठिवाय" नामक नष्टप्राय झालेल्या धर्मांगाची विषयवार यादी आली आहे, ती फार महत्त्वाची आहे.

**चवथें अंग, समवायांग.**—यानंतरचें चौथें अंग समवायांग हें असून ह्याच्या दोनतृतीयांश भागांत 'ठाणांगा' प्रमाणेंच विषयवारी आली आहे. फक्त भेद इतकाच कीं ह्या विषयवारीची संख्या १०० वर नेली आहे. या ग्रंथाचा शेवटचा एक तृतीयांश भाग मागाहून जोडलेला दिसत असून त्यामध्यें सर्व बारा अंगांचे विषय व विस्तार ह्याबद्दल बिनचूक माहिती आढळते. तथापि ह्यामध्यें उल्लेखिलेल्या १८ प्रकारच्या ब्राह्मी लेखना-वरून, त्याचप्रमाणें "उत्तरज्झयण" या ग्रंथाच्या ३६ प्रकरणांच्या व अशाच इतर उल्लेखांवरून हें अंग उत्तरकालीन असल्याचें निःसंशय सिद्ध होतें.

**पांचवें अंग, भगवती वियाह.**—'भगवती-वियाह' किंवा 'विवाहपन्नत्ति' किंवा थोडक्या शब्दांत "भगवती" या संज्ञेनें उल्लेखिलें जाणारें पांचवें अंग अत्यंत महत्त्वाच्या अंगापैकीं एक आहे. ह्या ग्रंथामध्यें जैन धर्माच्या सांप्रदायिक उपदेशाचें बरेंच सविस्तर उपपादन आलें आहे. अर्थात् ह्या विवेचनाचा कांहीं भाग सारांशरूपानें आला असून कांहीं भाग 'इतिहाससंवाद' रूपांत

रचलेला आहे. त्यापैकीं एका दंतकथात्मक भागामध्यें, महावीरापूर्वीच्या जैनपरंपरेंतील पूर्वजांनीं व इतर कांहीं पवित्र मुनींनीं अत्यंत खडतर तपश्चर्या करून निर्वाणपद-प्राप्ति कशी करून घेतली ह्याचें वर्णन आहे. पवित्रमार्गानें पुण्यकर्में करण्यांत आयुष्य घालविणाऱ्या साधुपुरुषास मिळणारें उत्तमउत्तम स्वर्गलोक, त्याचप्रमाणें दुराचारी पाप्यांस भोगावा लागणारा नरकवास व त्यांतील अनंत दुःखें ह्यांचीं वर्णनेंहि पुष्कळ ठिकाणीं आढळतात.

ह्यामध्यें विशेषतः महावीराचे पूर्वकालीन व समकालीन पुरुष म्हणजे पार्श्वाचे शिष्य जामाली व गोशाल मक्खलिपुत्त यांच्या विषयीं आलेल्या आख्यायिका जास्त महत्त्वाच्या आहेत. जामाली व गोशाल मक्खलिपुत्त हे जैन पंथप्रदायाचे संस्थापक असून, ह्या पांचव्या अंगाचें १५ वें प्रकरण गोशाल याजबद्दलच्या माहितीनें भरलेलें आहे. विरुद्ध संप्रदायसंस्थापकाचें जीवनचारित्र एखाद्या संप्रदायामध्यें कशा रीतीनें वर्णन केलें जातें ह्याचें हें उत्तम निदर्शक आहे. ह्या वर्णनावरून असें दिसून येतें कीं, पार्श्व व महावीर ह्यांचे अनुयायी जे "नीगंथ" व गोशालचे अनुयायी "आजीविक" ह्या दोन विरुद्धपंथी लोकांमध्यें विभक्त होण्यापूर्वी अत्यंत निकट संबंध होता, बहुतेक "भगवती" अंगाचें १५ वें प्रकरण मूळांत अगदीं स्वतंत्र असावें व मागाहून निरनिराळ्या माहितीनें भरलेल्या प्रकरणांची त्यामध्यें भर पडलेली असावी.

**सहावें अंग, नायाधम्मकहाओ**—सहाव्या अंगाचें "नाया धम्मकहाओ" (ज्ञातधर्मकथा) ही संज्ञा आहे. ह्या अंगाच्या पहिल्या भागांत २३ प्रकरणें असून त्या प्रत्येक प्रकरणांत एक एक आख्यायिका संपूर्ण वर्णिली आहे ह्या पैकीं बहुतेक आख्यायिकांमध्यें कथाभागापेक्षा आंतील रूपकभागास जास्त महत्त्व आहे, इतकेंच नव्हे तर मूळ रूपकांस मागाहून कथास्वरूप दिलें गेलें असावें.

वरीलसारख्या रूपकपूर्ण दंतकथांशिवाय प्रवासवृत्तें, दर्यावर्दी व्यापाऱ्यांचीं अद्भुत कथानकें, कादंबरीवजा गोष्टी इत्यादि पुष्कळ असा भाग ह्या ग्रंथांत आढळतो कीं ज्यामध्यें उपदेशपूर्ण अशा रूपकाचा संबंध फारच थोडा लागतो. आठव्या प्रकरणामध्यें "मल्ली" नांवाच्या फक्त एकच स्त्री-तीर्थंकराची नमुनेदार आख्यायिका आली आहे. १६ वें प्रकरण अत्यंत मजेचें आहे. त्यामध्यें "दोवई" (द्रौपदी) हिचें कथानक अवतारस्वरूपांत वर्णन केलें आहे. द्रौपदीचें पांच पांडवांबरोबर लग्न झाल्याचें दाखविणाऱ्या महाभारतकथानकाची सुधारणा करण्याचा हा जैनांचा प्रयत्न दिसतो. परंतु तो यशस्वी झालेला दिसत नाहीं.

ह्या अंगाचा दुसरा भाग आंतील विषयांच्या दृष्टीनें व बाह्यस्वरूपांतहि पहिल्या भागापेक्षां अगदीं भिन्न दिसतो व ह्या भागाचें एकंदरीनें सातव्या व नवव्या अंगांशीं अत्यंत निकट सादृश्य दिसतें.

**सातवें अंग, उवासगदसाओ**—हें 'जैन उपासकाचे धर्म सांगणारीं दहा प्रकरणें' ह्या नांवाचें बहुतेक कथास्वरूपी आहे. ह्या दहा प्रकरणांत दहा कुटुंबवत्सल अशा धनाढ्य व्यापाऱ्यांचीं कथानकें आहेत. ह्या दहा व्यापाऱ्यांनीं स्वतःकरितां कांहीं नियम घातले व महावीरानें सांगितलेलीं व्रतें पाळलीं व ते जैनउपासक बनले. ह्या दहाहि कथानकांचा सांचा अगदीं इतका ठरल्यासारखा आहे कीं शेवटच्या गोष्टींतून पूर्वीच्या गोष्टींतील त्या त्या प्रसंगांचीं कांहीं वाक्येंच सुचवून थोडक्यांत काम भागविलें आहे. त्यापैकीं सातवें प्रकरण अत्यंत मनोरंजक असून त्यामध्यें 'सद्दालपुत्त' नांवाच्या श्रीमंत कुंभाराचें कथानक दिलें आहे. प्रथम सद्दालपुत्त हा गोशाल मक्खलिपुत्त याचा अनुयायी होता; परंतु पुढें तो महावीराकडे गेला. त्या वेळीं महावीरानें आपल्या तत्त्वाच्या मध्यस्वरूपाविषयीं त्या कुंभाराची कशी खात्री पटविली ह्या प्रसंगाचें संभाषण वाचलें असतां बौद्धग्रंथांतील एखाद्या सुंदर संवादाचें स्मरण होतें. तथापि हा ग्रंथ पठणाकरितां धार्मिक कृत्याकरितां रचिलेला असावा ही गोष्ट स्पष्टपणें निदर्शनास येते. वस्तुतः हें कांहीं धार्मिक काव्य नाहीं, तर ईश्वरविज्ञानसंबंधीं लेखनाचा एक नमुना आहे.

**आठवें नववें अंग, अंतगडदसाओ व अणुत्तरोववाइयदसाओ.**—पुढील दोन अंगांना वाङ्मयात्मक दृष्टीनें कमी महत्त्व आहे. यांची रचना सातव्या अंगाप्रमाणेंच केली आहे. आठवें अंग "अंतगडदसाओ" नामक १० प्रकरणांचें असून दखील सांप्रत त्याचीं आठ प्रकरणांत विभागणी झाली आहे. नववें अंग "अणुत्तरोवाइयदसाओ" हें असून त्याचीं तीन प्रकरणें व प्रत्येक प्रकरणाचे ३३ परिच्छेद आहेत बाह्यस्वरूपावरूनहि ह्या ग्रंथांना वाङ्मयदृष्ट्या फारसें महत्त्व देतां येत नाहीं. कारण हीं कथानकें एकाच पद्धतीनें सांगितलीं आहेत; इतकेंच नव्हे तर ग्रंथकारानें फक्त ठरलेल्या सांचांत लागतील ते शब्द व वाक्यें घालावयाचीं एवढेंच काम केलेलें दिसतें. उदाहरणार्थ एका आख्यायिकेंत म्हटलें आहे. "चंपा नांवाचें एक नगर, 'पुण्णभद्द' नांवाचा पवित्र निधि व एक अरण्य होतें. वर्णन." याचा अर्थ इतकाच कीं, नगर, निधि व अरण्य यांचें पहिल्या उपांगांत असलेलें ठराविक वर्णन त्या त्या ठिकाणीं घालावयाचें. त्याचप्रमाणें महावीराचा एक शिष्य 'थेर सुहम्म' ह्याच्याबद्दल उल्लेख करतांना इतकेंच सांगितलें आहे कीं सहाव्या अंगांत सांपडतें त्याप्रमाणें या ठिकाणींहि ह्या पवित्र मनुष्याचें वर्णन घालावयाचें. हीं 'वर्णकें' (वर्णनें) लांब समासघटित भाषेंत रचलेलीं असून ह्या धर्मग्रंथांतील जुन्या पद्यभागापैकीं असावींत. सुप्रसिद्ध पंडित याकोबी यानें अशी उपपत्ति काढली आहे कीं यद्यपि प्राचीन टीकाकार हीं वर्णकें गद्यभाग समजतात व जरी ह्या वर्णकांचीं वृत्तें जुन्या भारतीय पद्यवाङ्मयांत कोठेंहि सांपडण्यासारखीं नाहींत, तथापि हीं वर्णकें जुन्या पद्यभाग-

प्रमाणच वाचलीं पाहिजेत. परंतु डॉ. विंटरनिट्झ याच्या मतें ही उपपत्ति चुकीची आहे. कारण ह्या वर्णकांची भाषा समासघटित गद्यभागापेक्षां भिन्न दिसत नाहीं. असलीं वर्णकें इतर सर्व धर्मग्रंथांत सांपडतात परंतु 'गोयम' राजपुत्राचा विवाह, अशासारख्या प्रसंगीं हीं वर्णनें ज्या ज्या ठिकाणीं दिलेलीं आढळतात त्या त्या ठिकाणीं तीं अगदीं नीरस असून त्यांत अनेक गोष्टींचीं ।वें मात्र पुष्कळ आढळतात. परंतु राजपुत्र सर्वसंगपरित्याग करण्याचा निश्चय करीत असल्याबद्दलचा व त्याचे आईबाप त्यास त्या निश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा कथाभाग ज्या वेळीं येतो त्या वेळीं मात्र कथानकास बराच रंग चढलेला दिसतो. ८व्या अंगांत 'गोयम' ह्या संप्रदायांत प्रवेश होण्याबद्दल विनवणी करतो त्या वेळीं तो पुढील उद्गार काढतोः—"विश्व हें अग्निज्वालेच्या मध्यभागीं आहे. वार्द्धक्य व मृत्यु त्यांच्या वणव्यांत जगाची राखरांगोळी होत आहे." ह्या ठिकाणीं बुद्धाच्या सुप्रसिद्ध "अग्निरूपकपूर्ण" उपदेशाचें स्मरण होतें. हें अंग भारतीय दैवतकथा व भारतीय धार्मिकसंप्रदायाचा इतिहास ह्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें आहे. कारण ह्या अंगांत महाभारतांतील कृष्णकथा जैनांनीं केलेल्या थोड्या रूपांतरानें आलेली आहे. द्वारावती नगरीचा समुद्रांत प्रवेश व कृष्णनिर्याण हे दोन प्रसंग महाभारतांतील कथेप्रमाणेंच वर्णन केले आहेत. फक्त त्यांत फरक इतकाच केला आहे कीं निर्याणापूर्वी कृष्णानें जैन धर्माची दीक्षा घेतल्याचें दाखविलें आहे.

नवव्या अंगांत पवित्र मुनी उपोषण वृत्तीनें मृत्युमुखांतून अंतिम निर्वाण कसें प्राप्त करून घेतात. त्याचें अत्यंत कंटाळवाण्या एकच एक पद्धतीनें वर्णन केलें आहे. अर्थात् हें "वैराग्याच्या" अनुपम सौंदर्याचें वर्णन त्याचप्रमाणें तपस्व्याच्या कृश झालेल्या प्रत्येक अवयवाचें उपमा, रूपकें इत्यादि अलंकारांनीं भूषित केलेलें नीरस वर्णन, सांप्रत विसाव्या शतकांत तरी मानवी प्राण्यास चित्ताकर्षक होणार नाहीं. एका बाजूस जैन मुनींच्या ठिकाणीं आढळून येणारें मृत्यूबद्दलचें उत्कट प्रेम, व त्याच्याच उलट एका क्षुद्र कृमीची किंवा तृणांकुराची हत्या होईल ह्याविषयीं क्षणोक्षणीं वाटणारी भीति ह्या जैनांच्या दोन्हीं धार्मिक वृत्ती किती परस्परविरुद्ध आहेत ही गोष्ट अत्यंत मौजेची आहे.

**दहावें अंग. पण्हा वागरणा इम्.**—या दहाव्या अंगांत सर्वसामान्य वागणूक, धर्माज्ञा व वर्ज्यावर्ज्य गोष्टी ह्यांसह दहा द्वारांचें वर्णन केलें आहे. हें अंग अगदीं जैन सांप्रदायिक गोष्टींचेंच वर्णन करणारें आहे.

**अकरावें अंग. विवागसूयम्.**—या अंगामध्यें अवदानशतक व कर्मशतक ह्या बौद्ध ग्रंथांतील दंतकथां प्रमाणें सुकृतदुष्कृतांचा परिणाम प्रत्येक जिवास कसा भोगावा लागतो याबद्दल आख्यायिका दिल्या आहेत. ह्या ग्रंथाचें स्वरूप म्हणजे 'इंदभूति' अनेक दुःखी प्राणी पाहात आहे व त्याच्या विनंतीवरून महावीर, त्या प्राण्यानें पूर्वजन्मांत केलेल्या कोणत्या वाईट कृत्यामुळें त्याला ह्या आपत्ती आल्या, त्याचप्रमाणें त्यानें किती नीच योनींत जन्म घेतला, अद्यापि त्यास किती हाल भोगावयाचे आहेत व सरते शेवटीं तो पुन्हां उत्तम जन्मास कसा जाणार इत्यादि गोष्टी विवरण करून त्यास सांगत आहे. उदाहरणार्थ, उबरदत्त नामक मनुष्यास सर्व प्रकारचे व्याधी झाल्याचें वर्णन आहे. त्याचें कारण असें कीं पूर्वजन्मीं तो रोगपरीक्षक असतांना त्यानें आपल्या रोग्यांस बरें होण्याकरितां मांसाशन करण्याविषयीं सांगितलें व त्यामुळें त्याच्याकडून अनेक प्राण्यांची हिंसा झाली. म्हणून त्याला अद्याप ह्यापेक्षां हलक्या जन्मास जावें लागणार व सरते शेवटीं तो पुनः व्यापाऱ्याच्या जन्मास येऊन निर्वाण पद प्राप्त करील असें त्याजबद्दल सांगितलें आहे.

**बारावें अंग दिठ्ठिवाय.**—ह्यानंतरच्या नष्टप्राय झालेल्या "दिठ्ठिवाय" नामक बाराव्या अंगामधील विषयांची कल्पना येण्यास इतर जैन धर्मग्रंथांत पुष्कळ पुरावा आहे. परंतु बारा उपांगांच्या अस्तित्वावरून बारा अंगेंहि अस्तित्वांत होतीं हें उघड आहे.

उपागांचा प्रत्येक अंगाशीं संबंध आहे. तथापि हा संबंध अगदीं बाह्य तऱ्हेचा आहे. बारा उपांगांचे विषय दंतकथात्मक व जैनसांप्रदायिक माहितीचे असून वाङ्मयदृष्ट्या त्यांस अत्यंत थोडें महत्त्व आहे.

**पहिलें उपांग.**—हें ओववाइया अगर ओवाइया ह्या नांवाचें असून त्यामध्यें अनेक प्रकारचे विसदृश विषय एकत्रित करण्यांत आले आहेत. पहिल्या भागांत एका राजानें धार्मिकदृष्ट्या पूज्य अशा एका स्थलीं केलेल्या यात्रेचें वर्णन आहे. ह्या ठिकाणीं महावीर हा त्या राजास जैन धर्माचा उपदेश करतो व सरते शेवटीं राजा जैन धर्मांत सामाविष्ट होतो असें दाखविलें आहे. ह्या भागाचा दुसऱ्या भागाशीं कांहीं एक संबंध नाहीं. कारण दुसऱ्या भागांत बारा स्वर्लोकांची प्राप्ति कशी होते ह्याचें विवरण आहे.

**दुसरें उपांग.**—वाङ्मयग्रंथ या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचें पुस्तक रायपसेनैज्ज नांवाचें दुसरें उपांग होय. ह्या ग्रंथाच्या आरंभींच "सूरियाभ" नांवाच्या देवानें महावीराच्या केलेल्या यात्रेचें लांब, कंटाळवाणें वर्णन आहे. परंतु ह्या ग्रंथांतील अत्यंत सारभूत भाग म्हटला म्हणजे ह्या कथेंत आलेला पैशी राजा व केशी मुनि यांजमध्यें झालेला संवाद होय.

**चौथें उपांग.**—याचा सर्व धर्मग्रंथांपेक्षां असा एक विशेष आहे कीं हें उपांग "अज्य साम" नांवाच्या ग्रंथकाराच्या नांवावर मोडतें.

**पांच ते सात उपांगें.**—हीं उपांगें तत्कालीन खगोलशास्त्र, भूगोलशास्त्र, सृष्ट्युत्पत्ति, व कालगणना इत्यादि अनेक शास्त्रांचे ग्रंथ होत. तथापि "सूरियपण्णत्ति" ह्यामध्यें आकाशस्थ गोलांच्या खऱ्या निरीक्षणापेक्षां, त्यांसंबंधीं अवांतर वेडगळ कल्पनाच जास्त दिसून येतात. त्याचप्रमाणें

"जंबुद्दवपण्णत्ति" ह्या भूगोलशास्त्रीय प्रकरणांत भारतवर्षाच्या वर्णनांतील बरीचशी जागा भरत राजाच्या आख्यायिकांनीं व्यापून टाकली आहे.

**आठ ते बारा उपांगें.**—हीं "निरयावलीसुत्तम्" ह्या एका नांवानें एका धर्मग्रंथाचेच पांच परिच्छेद म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्यापैकीं "निरयावलीयाओ" ह्यामध्यें "कुणीय" किंवा "अजातशत्रु" नावाच्या चंपानगरीच्या राजाचे दहा सावत्र भाऊ आपल्या आजाबरोबर युद्ध करीत असतां त्याजकडून कसे मारले गेले व मृत्यूनंतर ते अनेक नरकात कसे पुन्हां जन्मले ह्याचें वर्णन आहे.

**पैण्ण.**—या नांवाचीं दहा पुस्तकें वैदिक परिशिष्ट ग्रंथासारखीं पद्यरूपांत रचलेलीं असून जैन संप्रदायासंबंधीं उपासनापद्धति, अर्हत् सिद्ध, साधु व धर्म यांना शरण जाणें, साधु पुरुषाचा मृत्यु, गर्भावस्था, गुरुशिष्यगुणदोष, अनेक देव इत्यादि माहिती त्यांत दिली आहे.

**सहा छेदसूत्रें.**—हीं जैन धर्मग्रंथांत मागाहूनच्या कालांत समाविष्ट झालीं असावींत, कारण नेहमीं ह्याचा धर्मग्रंथात समावेश करण्यात येत नाहीं. ह्यापैकीं अगदीं मूळ ग्रंथ ३–५ सूत्रें असून तो अत्यंत प्राचीन ग्रंथांत मोडतो. ह्या तीन सूत्राना मिळून "दसा-कप्प-ववहारा" ही संज्ञा आहे. इतर विविध आख्यायिका धरून शिवाय ह्या छेदसूत्रमध्यें बौद्धांच्या "विनय" ग्रंथाप्रमाणें जैन जोगी व जोगिणी यांच्या आचारांचे "नियम" तपश्चर्येचे वगैरे नियम, किंवा, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जैनांची सांप्रदायिक सर्व माहिती आली आहे. ह्यापैकीं 'आयारदसाओ' किंवा "दशश्रुतस्कंध" ह्या नांवानें प्रसिद्ध असलेलें चवथें सूत्र ह्याचें कर्तृत्व दंतकथेप्रमाणें भद्रबाहु याजकडे देण्यांत येतें व ह्याचा ८ वा परिच्छेद "भद्रबाहुकृत कल्पसूत्र" ह्या नांवानें पुष्कळ दिवस प्रसिद्ध आहे.

भद्रबाहु हा जैनांतील एक प्राचीन उपदेशक व मोठा ग्रंथकार म्हणून समजला जातो. महावीरानंतरचा तो सहावा थेर असून तो महावीरनिर्वाणानंतर १७० व्या वर्षी वारला असें समजतात. नष्टप्राय झालेलें पुव्व जाणणारा शेवटचा पुरुष भद्रबाहु हाच होय व नवव्या 'पुव्वा'तून तीन व चार हीं छेदसूत्रें त्यानेंच काढलीं अशी आख्यायिका सांगतात. कल्पसूत्रामध्यें ज्या तीन निरनिराळ्या प्रकारच्या प्रकरणांचा एका ठिकाणीं समावेश केलेला दिसतो. तीं सर्व भद्रबाहूनें लिहिलीं असणें असंभवनीय आहे. पहिल्या परिच्छेदांत जिनचरित्र दिलें आहे. ह्या प्रकरणाचा मुख्य भाग महावीराचा जीवनवृत्तांत हा असून एकंदर कथाभाग सविस्तर रीतीनें बारिकसारिक गोष्टींसुद्धां अतिशयोक्तिपूर्ण पद्धतीनें काव्यमय भाषेंत लिहिलेला आहे व त्यावरून ललितविस्तर ह्या ग्रंथाची आठवण होते. महावीराचा गर्भवास, जन्म इत्यादि प्रसंग आयारंगसुत्ताप्रमाणेंच वर्णन केले आहेत. ह्यानंतर महावीरमाता देवानंदा हिला पडलेलीं १४ स्वप्नें व त्यांचा अर्थ, महावीराचें बाल्य, बाराव्या वर्षी त्यानें धारण केलेली तापसवृत्ति व तीस वर्षांच्या अवधींत त्यानें केलेली धार्मिक चळवळ इत्यादि गोष्टींचें वर्णन आहे. ह्याखेरीज महावीरापूर्वींच्या तीर्थंकरांची व पूर्वीच्या पार्श्वनाथापर्यंतच्या जिनांची जीवनचरित्रें ह्या महावीरचरित्राच्या धर्तीवरच लिहिलेलीं आहेत व तीं मुख्यतः सांप्रदायिक उपयोगाकरितां आहेत.

कल्पसूत्राच्या दुसऱ्या परिच्छेदांत थेरावली, निरनिराळ्या गणांच्या याद्या, त्याच्या शाखा व त्यांचे गणधर इत्यादि माहिती आहे. ही यादी भद्रबाहूच्या पुढील पुरुषांचाहि समावेश करते व त्यामुळें ही भद्रबाहूची कृति नसावी. परंतु इ. सनाच्या पहिल्या शतकांत सांपडलेल्या कोरीव शिलेखांवरून हीं यादींतील नावें केवळ दंतकथात्मक नसून ऐतिहासिक आहेत हें सिद्ध होतें.

कल्पसूत्रांतील तिसरा परिच्छेद अत्यंत जुना असावा. ह्यामध्यें "सामाचारी" अथवा तपस्व्यांनीं पावसाळ्यांत पाळावयाचे नियम आहेत. ह्या कल्पसूत्राचें पूर्ण नांव "पज्जोसवणाकप्प" (पर्युषणाकल्प) हें असून तें ह्याच भागास अन्वर्थक होतें व त्यावरून सांप्रतच्या कल्पसूत्रांतील हाच भाग फार प्राचीन असावा ही गोष्ट संभवते. जिनचरित्र, थेरावली व सामाचारी हे भाग कल्पसूत्र ह्या नांवाखालीं मुळांत मोडत नव्हते, परंतु मागाहून देवर्द्धि यानें "सिद्धांत' ग्रंथांत त्याचा समावेश केला, ह्या जैन आख्यायिकेंत बराच सत्यांश असावा असें दिसतें.

पाचव्या छेदसूत्रास अत्यंत प्राचीन व खरें कल्पसूत्र म्हणतां येईल. ह्या सूत्राचें नांव "बृहत्कल्पसूत्र" किंवा बृहत्साधुकल्पसूत्र असें आहे. जैन तपस्वी व तपस्विनी ह्यांचें आचरण कसें असावें ह्यावरील हा मुख्य ग्रंथ आहे. ह्याला पूरक असें "ववहार" नांवाचें तिसरें छेदसूत्र आहे. कल्पसूत्रामध्यें योग्य शासन केलें असतां शेवट परिणाम कसा गोड होतो हें दाखविलें असून व्यवहारामध्यें मिळालेल्या शासनाचा स्वीकार कसा करावा ह्याचा उपदेश आहे. 'निसीह' नांवाचें पहिलें छेदसूत्र उत्तरकालीन आहे. दैनिक आचारनियमाविरुद्ध घडून आलेल्या अनेक गुन्ह्याबद्दल कसें शासन करावें ह्याबद्दल ह्या ग्रंथांत नियम घालून दिले आहेत. पंचकल्प नांवाचें सहावें छेदसूत्र अद्यापि उपलब्ध झालेलें नाहीं. तथापि व्रतभंग केल्यामुळें योग्यतऱ्हेनें शिक्षा झालेल्यांची जिनभद्रानें पद्यस्वरूपांत रचलेली जितकल्प नांवाची सविस्तर यादी हिलाच कधीं कधीं सहावें छेदसूत्र समजण्यांत येतें. ह्याचप्रमाणें पिण्ड व ओघनिज्जुत्ती ह्या आचारनियम विवरण करणाऱ्या ग्रंथांचाहि छेदसूत्रांत कधीं कधीं समावेश करण्यांत येत असतो. ह्या दोन्ही "निज्जुत्ती" ग्रंथांच्या बराच मागाहूनच "महानिसीह सुत्त" नांवाचा ग्रंथहि दुसरें किंवा सहावें छेदसूत्र म्हणून समजण्यांत येतो. परंतु वस्तुतः जैन धर्मग्रंथांत ह्या ग्रंथांचा मोठ्या मुष्किलीनें समावेश

करतां येणार आहे. सांप्रतचा ग्रंथ हा बहुतेक मूळ जुन्या नष्ट झालेल्या "महानिसीह" नामक धर्मग्रंथाच्या जागीं रचून घातला असावा. निर्वाणाकडे नेणाऱ्या सोपानाच्या अत्यंत महत्त्वाच्या पायऱ्या ज्या पश्चात्ताप व तप त्यांसंबंधीं अनेक प्रकारच्या नियमांचें विवरण हाच ह्या ग्रंथाचा विषय होय. त्यापैकीं नीतिशास्त्राच्या भागामध्यें कर्मतत्त्वाप्रमाणें प्राण्यांस विविध प्रकारचीं सुखदुःखें कशीं भोगावीं लागतात त्याबद्दल विवरण आहे. विशेषतः पावित्र्य वगैरे व्रतांचा भंग करण्याचें पातक, चांगले व वाईट तपस्वी त्यांचीं लक्षणें इत्यादिकांबद्दल बरेंच विवेचन ह्या ठिकाणीं आढळतें. त्याचप्रमाणें कांहीं नवीन काढलेल्या व कांहीं जुन्या ग्रंथांतून घेतलेल्या कल्पित कथाहि ह्या ग्रंथामध्यें घुसडून दिल्या आहेत ह्या ग्रंथाची भाषा व विषय, त्यातलि तांत्रिक वाक्प्रचार, धार्मिकेतर ग्रंथांचे उल्लेख इत्यादि गोष्टींवरून सदर ग्रंथ बराच मागाहूनचा आहे ही गोष्ट सिद्ध होते. याखेरीज दुसरें "मूलसूत्रें" नांवाचे चार धर्मग्रंथ आहेत, त्यापैकीं पहिले तीन ग्रंथ वाङ्मयात्मक दृष्टीनें देखील अत्यंत महत्त्वाचे आहेत. ह्यापैकीं पहिलं उत्तरज्झयण किंवा उत्तराध्ययनसूत्र हें एक धार्मिक काव्य असून धर्मग्रंथाच्या बहुमोल भागांपैकीं एक आहे. ह्या काव्याचे ३६ परिच्छेद असून त्यांमध्यें नव्या जुन्या भागांचें संहितीकरण झालें आहे. ह्यांतील अत्यंत प्राचीन भाग म्हणजे उपदेशपर संवाद व कविता, रूपकपूर्ण कथानकें व स्फुटप्रकरणें ह्या प्रकारचा असून तो प्राचीन भारतीय वैराग्यपर काव्यामध्यें गणला जातो व अशाच प्रकारचा भाग बौद्ध "सुत्तनिपात" वगैरेसारख्या ग्रंथांमधूनहि आढळतो. शिष्यांनां उपदेशपर पाठ, स्फुट विषयांची मालिका वगैरे, त्याचप्रमाणें मुनीनें (१) मानवजन्म, (२) धर्मशिक्षण, (३) धर्मश्रद्धा व (४) आत्मदमन ह्या चार महत्त्वाच्या गोष्टींकरितां जे होतील ते हाल सोसले पाहिजेत अशीं वर्णनें पुष्कळ प्रकरणांत आहेत. त्याचप्रमाणें कर्मतत्त्व व पाप, सत्पुरुषाचें इच्छामरण व मूर्खांचें कुरकुरत मरणें, खरे व भोंदू तपस्वी इत्यादींबद्दल फार बहारीचीं वर्णनें आहेत. चित्ताकर्षक उपमा व जोरदार भाषा त्यांनीं युक्त अशीं पुष्कळ सुभाषितेंहि ह्या ठिकाणीं सांपडतात "सुत्तनिपात" व 'धम्मपद' यांतील श्लोकांप्रमाणें या ग्रंथांतील कित्येक श्लोकांमध्यें एक सामान्य श्लोकार्ध आढळतो.

सातवा परिच्छेद हा बहुतेक रूपकांनीं भरलेला आहे. ह्या ठिकाणीं तीन व्यापाऱ्यांची एक रूपकपूर्ण गोष्ट आली आहे तिजवरून बायबलमधील 'टॅलंटस' च्या कथानकाचें स्मरण होतें. ही गोष्ट पुढीलप्रमाणें:—

"तीन व्यापारी प्रवासास गेले व जातांना त्या तिघांनी आपापलें भांडवल बरोबर घेतलें. त्यापैकीं एक व्यापारांत पुष्कळ नफा मिळवून आला, दुसऱ्यानें पूर्वी जितका पैसा नेला तितकाच त्यानें परत आणला, व तिसऱ्यानें सर्व भांडवलाची उधळपट्टी केली. आतां हेंच रूपक धर्मास कसें लागू करावयाचें तें पहा. ह्यांतील भांडवल म्हणजे मानवजीवित होय, नफा म्हणजे स्वर्गांतील पुण्यभोग होत, व ज्यानें आपलें भांडवल उधळलें त्यास नरकांत साध्या क्षुद्र प्राण्याप्रमाणें पश्चात्ताप करण्याची पाळी येईल."

"सुत्तनिपात" ग्रंथाप्रमाणें "उत्तरज्झयण" सूत्रामध्यें अनेक सुंदर ऐतिहासिक संवाद व वैराग्यपर काव्यवाङ्मयातील अनेक गीतें आढळतात. ह्याशिवाय ज्यामध्यें क्षत्रियधर्म व राजधर्म ह्याविरुद्ध त्यागाचें ध्येय मांडलें गेलें आहे, अशा बौद्ध आख्यायिकाहि 'नेमि' राजाच्या सुंदर कवनांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें हरिकेशाच्या गीतांत एक गर्विष्ठ ब्राह्मण व नीच जातींतील एक तिरस्कृत विरागी ह्यांचा जो मजेदार संवाद झाला आहे. त्यामध्यें ब्राह्मणधर्मांतील औपचारिक दंभ व पोकळ डौल यांची जैनमुनींच्या इंद्रियदमन, पावित्र्य इत्यादि गोष्टींशीं परिणामकारक रीतीनें तुलना केली आहे. पुरोहित व त्याचे पुत्र ह्यांमधील उत्कृष्ट संवादामध्यें देखील ब्राह्मणांच्या ध्येयापेक्षा त्या विरुद्ध असणारे जैनमुनींचे वैराग्यपर ध्येयच सर्वोत्कृष्ट असें दाखविलें आहे. ह्या संवादापैकीं कांहीं भाग शब्दशः महाभारत, पुराणग्रंथ, जातककथा ह्यांमध्यें आढळून येतो, ह्या गोष्टीवरून हा संवाद भारतीयांच्या सामान्य वैराग्यपर वाङ्मयापैकीं असल्याचें सिद्ध होतें.

२३ व्या अध्यायातील संभाषण जैनसंप्रदायाच्या इतिहासास अत्यंत उपयुक्त आहे. ह्यामध्यें पार्श्व व महावीर ह्यांचे दोन शिष्य आपापसांत आपआपल्या संप्रदायांतील भेद व त्यांपासून मिळणारे फायदे ह्याबद्दल वाद करतांना दाखविले आहेत. एकंदर संवाद कांहींसा प्रश्नोत्तरासारखा गूढार्थपूर्ण प्रश्नोत्तररूपांत दाखविला आहे. बहुतेक सर्व गीतांमध्यें संवाद हेच प्रमुखत्वानें दिसतात. फक्त २२ व्या अध्यायांतील गीतांमध्यें कथानकाचा भाग, आंतील कृष्णविषयक आख्यायिकेमुळें व इतर कथानकांतील गोष्टींमुळें अमळ मनोरंजक झाला आहे तो थोडक्यांत पुढील प्रमाणें:—

शौर्यपुर नगरामध्यें दोन बलाढ्य राजे रहात असत. त्यापैकीं वसुदेवास त्याच्या रोहिणी व देवकी ह्या दोन बायकांपासून राम व केशव असे दोन पुत्र झाले होते. दुसऱ्या समुद्रविजय नामक राजास त्याच्या शिवा नामक स्त्रीपासून अरिष्टनेमि नांवाचा पुत्र झाला होता. केशव यानें अरिष्टनेमि याजकरितां राजिमती नांवाच्या राजकन्येबद्दल मागणी घातली, व लग्नास अनुमति मिळाली त्याप्रमाणें अरिष्टनेमि आपल्या भावी पत्नीस आणण्याकरितां मोठ्या थाटानें निघतो; परंतु मार्गांत अनेक प्राणी पिंजऱ्यांत किंवा दुसऱ्या बंदिस्थ ठिकाणीं कोंडून ठेवलेले त्यास आढळतात. व त्यास असें कळून येतें कीं हे सर्व प्राणी त्याच्या विवाहप्रसंगीं मारावयाचे आहेत. ह्या बातमीनें त्याचें मन इतकें उद्विग्न होतें कीं तो अरिष्टनेमि सरतेशेवटीं वैराग्याचें व्रत धारण करतो.

राजिमती राजकन्येस ज्या वेळीं ही बातमी कळते त्यावेळा ती शोक करूं लागते, परंतु मागाहून मनाचें सांत्वन करून तीहि जोगिणीचें व्रत घेण्याचें ठरविते. अशा रीतीनें जोगिणीचे वेषांत इकडे तिकडे फिरत असतां पावसाच्या जोरदार सरीपासून आपला बचाव करण्याकरितां ती एका गुहेंत शिरते, व त्या ठिकाणीं आपण एकटेच आहों असें वाटून अंगावरील कपडे वाळविण्या करितां ही नग्न होते. परंतु त्याच वेळीं अरिष्टनेमीचा थोरला भाऊ रथनेमि हा त्याच गुहेंत येऊन बसलेला असतो व तो जेव्हां राजिमतीचें नग्नावस्थेंतील सौंदर्य पाहतो, तेव्हां त्याच्या अंतःकरणांत कामवासना उत्पन्न होऊन तो आपलें तिजवरील प्रेम जाहीर करतो. तथापि राजिमती त्याचा धिक्कार करते व "दुसऱ्यांनीं थुंकून टाकलेलें (अधरामृत) प्राशन करण्याकरितां' मागण्याचा हट्ट न करण्याबद्दल सांगते. तिच्या ह्या जोरदार भाषणानें त्याला आपल्या व्रताचें स्मरण होऊन, अंकुशानें पतरवलेल्या हत्तीप्रमाणें, पुनः त्याचें चित्त धर्माकडे वळतें.

ह्या काव्यमय भागास विरोधी म्हणूनच कीं काय ह्या ग्रंथाच्या २४, २६ व ३६ ह्या अध्यायांमध्यें जैनाच्या संप्रदायाची माहिती व आचारसंबंधीं रुक्ष नियम हीं आलीं आहेत.

'आवश्यक' किंवा 'षडावश्यकसूत्र' हें दुसरें मूलसूत्र असून त्यामध्यें जैनांनीं रोज पाळावयाच्या सहा आवश्यक गोष्टीः—(१) पापनिवृत्ति, (२) २४ जिनांची स्तुति, (३) गुरुविषयीं आदर, (४) पश्चात्ताप, (५) तप (६) पापांचा तिरस्कार ह्यांजबद्दल विवेचन आहे. ह्या विवेचनाबरोबर कांहीं कथानकेंहि वर्णन केलीं आहेत व तीं टीकांमध्यें उल्लेखिलीं आहेत.

'दसवेयालिय' तिसरें मूलसूत्र असून तें शय्यंभव किंवा सजंभव ह्या ग्रंथकारानें रचलें असल्याबद्दल आख्यायिका आहे. ह्यामध्यें मठवासाच्या आयुष्याबद्दल सुभाषितें आहेत, त्यावरून 'धम्मपद' या ग्रंथाचें स्मरण होतें. ह्या सूत्राच्या दुसऱ्या अध्यायांत उत्तरज्झयनांतील राजिमतीच्या कथानकास पूरक म्हणून कांहीं जास्त कविता घातलेल्या आहेत व त्यामध्यें राजिमतीनें, तिला भ्रष्ट करण्यास सज्ज झालेल्या रथनेमीची खरडपट्टी काढली आहे. ह्या सूत्राला पूरक अशा टीकाग्रंथामध्यें बरेंच कथावाङ्मय आहे.

ह्या धर्मग्रंथसमूहाबाहेरील परंतु धर्मग्रंथांपैकींच असे 'नंदी' व अणुओगधार.' हे विश्वकोषात्मक दोन ग्रंथ असून त्यांमध्यें प्रत्येक जैनास अवश्यक असलेल्या माहितीचा संग्रह केला आहे. तथापि ह्यामध्यें केवळ धार्मिक विषयांचेंच विवेचन आहे असें म्हणतां येत नाहीं, तर त्यामध्यें काव्याचा आत्मा 'रस' व काव्याच्या 'रीति' इत्यादिबद्दल माहिती आहे. शास्त्रीय ग्रंथामध्यें कौटिल्यअर्थशास्त्र व 'घोटकमुखाचें कामशास्त्र ह्यांचे उल्लेख आहेत.



ह्याप्रमाणें थोडक्यांत श्वेतांबर जैनांच्या धर्मग्रंथासंबंधीं हकीगत आहे. तथापि दिगंबरांच्या सिद्धांताबद्दल अद्याप फार थोडी माहिती उपलब्ध आहे. दिगंबर जैनहि १२ अंगें मानतात. सहाव्या अंगाचें नांव "ज्ञातृधर्मकथांग" आहे व दिगंबर जैन १२ व्या अंगाच्या ५ भागांत १४ पुव्वांचा समावेश करतात. 'दृष्टिवाद' नामक पहिल्या भागांत चंद्रप्रज्ञप्ति, सूर्यप्रज्ञप्ति व जंबुद्वीपप्रज्ञप्ति ही प्रकरणें मोडतात. ज्या धर्मग्रंथांचा अंगांमध्यें समावेश होत नाहीं त्यांस "बाह्य" संज्ञा आहे. हे "अंगबाह्य" किंवा प्रकीर्णक १४ असून "अज्ञ जनांच्या कल्याणाकरितां" रचले असल्याबद्दल जैनांत आख्यायिका आहे. पहिले चार 'अंगबाह्य' संक्षेपरून २ ऱ्या मूलसूत्राच्या प्रकरणाशीं जुळतात. ह्याखेरीज श्वेतांबरांच्या धर्मग्रंथापैकीं फक्त "दश वैकालिक" "उत्तराध्ययन" व "कल्पव्यवहार" ह्यांचा दिगंबरांच्या अंगबाह्यांत समावेश होतो. ह्यावरून एवढें मात्र निःसंशय म्हणतां येतें कीं ह्या दोन्ही जैन पंथांनां जे सामान्य धर्मग्रंथ मान्य आहेत ते अत्यंत प्राचीन होत, परंतु ह्यासारखीं नांवें असलेल्या दोन्ही पंथांच्या धर्मग्रंथामध्यें अंतर्गत विषयसाम्य किती आहे ह्याची मात्र नीट छाननी झाली पाहिजे. जैनांच्या इतर ग्रंथांचा विचार शरीरखंडांत सांपडेल.

—०—

## वैदिक वाङ्मयवर्णन.

वैदिक ग्रंथांची संपूर्ण यादी देतांनां ज्या अडचणी उपस्थित होतात, त्यांपैकीं एक अशी आहे कीं, अनेक ग्रंथ वेदांतील नसून वेदांत घुसडून देण्याचा प्रयत्न करण्यांत येतो; पण ही अनवस्था विशेषेंकरून वेदांगांसंबंधीं व उपनिषदांसंबंधीं आहे. मंत्रब्राह्मणांसंबंधीं नाहीं.

प्रस्तुत वाङ्मयवर्णनाचे भाग येणेंप्रमाणें:—

(१) कर्मकांड ऊर्फ श्रौत वाङ्मय जुनें. यांत मंत्र व ब्राह्मणें येतात. ज्या आरण्यकांचा संबंध श्रौत ग्रंथांशीं निकट आहे, तीं आरण्यकें त्यांच्याजवळच मांडलीं आहेत.

(२) ज्ञानकांड ऊर्फ उपनिषदें.

(३) इतर वेदाभ्यास प्राचीन.

यांत शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतीष, प्रातिशाख्यें, चरणव्यूहासारखे शाखा दाखविणारे ग्रंथ, अनुक्रमणीग्रंथ व बृहद्देवता हीं येतात.

यांतील जुनें श्रौत वाङ्मय जें मंत्र व ब्राह्मणें तें प्रथम घेतलें आहे. त्याबरोबरच त्यांच्या मुख्य आवृत्त्या प्रथम दिल्या आहेत.

भाषांतरांचे प्रयत्न नंतर दिले आहेत.

उपनिषदांची उत्पत्ति कांहीं अंशीं श्रौतविषयक संप्रदायांतून झाली असली तरी श्रौतकर्माशीं निकट संबंध येत नसल्यामुळें तीं परीक्षणपूर्वक वेदानुरूप मांडलीं नाहींत, तर थोड्या तद्विषयक समजुती दाखविल्या आहेत.

## कर्मकांड

### ऋग्वेद

संहिता ( शाकल; बाष्कलसंहिता उपलब्ध नाहीं )—ऋक्संहिता म्ह. शाकलसंहितां प्रथम पूर्णपणें प्रसिद्ध करण्याचें श्रेय ईस्ट इंडिया कंपनी व मॅक्समुल्लर यांजकडे आहे. मॅक्समूलरसंपादित ऋग्वेदसंहिता, १ ली आवृत्ति १८४९–७४; दुसरी १८९०–९५० याशिवाय रोसेन यांचीहि आवृत्ति आहे. देशी आवृत्तिः–( १ ) ऋग्वेदसंहिता अजमीर १९००. (२) बनारस चौखंबा संस्कृत सीरीजमध्यें. (३) ऋग्वेदसंहिता, मुद्रक गणपत कृष्णाजी, संपादक राजारामशास्त्री बोडस व शिवराम शास्त्री गोरे, मुंबई शके १८११. श्रुतिबोध–ऋग्वेद (अपूर्ण), मुंबई १९१२

ब्राह्मणें व आरण्यकें.—ऐतरेयब्राह्मण ( आनंदाश्रम संस्कृतग्रंथावालि ). पुणें १८९६. बनारस ( चौखंबा ) संस्कृत सीरीजमध्यें ऐतरेयब्राह्मण व आरण्यक प्रसिद्ध झालें आहे. पंडित सत्यव्रत सामाश्रमी–ऐतरेयब्राह्मण, कलकत्ता १८९५. शांखायनब्राह्मण ( आनंदाश्रम ), पुणें १९११.

महत्त्वाचीं भाषांतरें.—संहितांचीं. ग्रासमनचें छंदोबद्ध जर्मन भाषांतर, लाइप्झिग, १८७६–७७. लुडविग्चें गद्य जर्मन भाषांतर, प्राग १८७६–८८ मॅक्समुल्लर व ओल्डनबर्ग यांनीं सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट भाग ३२ व ४६ मध्यें प्रसिद्ध केलेलीं भाषांतरें ( कांहीं सूक्तांचीं ). विलसनचें इंग्रजी भाषांतर, सायणानुयायी; ग्रिफिथ–इंग्रजी भाषांतर, काशी १८९६–९७. वेदार्थयत्न; इंग्रजी व मराठी भाषांतर (अपूर्ण ). मुंबई १८७६. रोसेन– लाटिन भाषांतर. श्रुतिबोध–ऋग्वेद. मराठी भाषांतर अपूर्ण. रा. काशीनाथ वामन लेले यांनींहि ऋग्वेदाचा बराच भाग भाषांतरिला आहे; तसेंच, रा. घुलेशास्त्री, नागपुर यांनींहि भाषांतरास सुरुवात केली होती पण तें काम फारच थोडें झालें.

ब्राह्मणांचीं—ऐतरेय ब्राम्हण-हागचें इंग्रजी भाषांतर, मुंबई १८६३. कीथचे इंग्रजी भाषांतर. धुंडिराजशास्त्री बापट पांचवड यांनीं ऐतरेय ब्राह्मणाच्या एका पंचकाचें मराठी सटीक भाषांतर केलें आहे ( स्वाध्याय मासिक वर्ष १ ले ). शांखायन ब्राह्मण व ऐतरेयआरण्यक–कीथचें इंग्रजी भाषांतर लंडन १९०८ ).

टीका.—सर्व वेदांवर सायणभाष्य आहे. अर्वाचीन टीका यामध्यें दयानंदी टीका येते; पण तिचें अर्थबोधाच्या दृष्टीनें महत्त्व नाहीं.

### यजुर्वेद

संहिता.—वेबर–तैत्तिरीयसंहिता ( ईंडिशूच्चे स्टुडाएं मध्यें रोमन लिपींत –१२ ). तैत्तिरीसंहिता, बनारस सीरीज. काशी. कृष्णयजुर्वेद तैत्तिरीय संहिता ( आनंदाश्रम पुणें १९००. तैत्तिरीय संहिता. म्हैसूर १८९४–९८. –तै. संहिता. बिबीओथिकाइंडिका. कलकत्ता १८६०–९९. शुक्लयजुर्वेद भाग १. वाजसनेयी संहिता. बर्लिन व लंडन १८५८. शुक्ल यजुर्वेद संहिता ( निर्णयसागर ). मुंबई १९१२ वाजसनेयी संहिता बिबिलिओथेका इंडिका, कलकत्ता १८६२. वेबरनें वाजसनेयीसंहिता तीन भागांत प्रसिद्ध केली आहे. शुक्लयजुर्वेद काण्व संहिता, आनंदवन १९१५; बनारस संस्कृत सीरीज, १९१५. श्रोडरसंपादित काठकसंहिता, लाइप्झिग मैत्रायणीसंहिता लाइप्झिग्, १८८१–८६.

ब्राह्मणें व आरण्यकें —शतपथब्राह्मण, वेबरसंपादित बर्लिन आणि लंडन १८५५. शत. ब्राह्मण, बिब्लिओथेका [इं]डिका, कलकत्ता १९०३. यजुर्वेदीय माध्यान्दिनीय शतपथ ब्रा. अजमीर १९०२. बनारस संस्कृत सीरीजमध्यें शतपथब्राह्मण तैत्तिरीय ब्राह्मण व तै. आरण्यक प्रसिद्ध झालें आहे. तैत्तिरीय ब्राह्मण ( आनंदाश्रम ) पुणें १८९८; मित्रसंपादि बिब्लिओथेका इंडिका. तैत्तिरीय ब्राह्मण, मुंबई १८९४,- म्हैसूर १९०८–१३ तैत्तिरीयारण्यक, म्हैसूर १९०२, आनंदाश्रम ग्रंथावलि पुणें १८९७; मद्रास १८९४.

महत्त्वाचीं भाषांतरें.—ग्रिफिथ– शुक्लयजुर्वेदाचे इंग्रजी भाषांतर, काशी १८९९. कीथ—तैत्तिरीय संहितेचें इं. भाषांतर ( हारवर्ड ओरि. सीरीज १९१४,)

एग्लिंग-शतपथ ब्राह्मणाचे भाषांतर ( सेक्रेडबुक्स ऑफ दि ईस्ट )१८८२–१९०८

### सामवेद

संहिताः—सामदेव संहितामूलम्. चौखंबा संस्कृत-सीरीज, काशी सामवेदसंहिता (ब्रिब्लिओथेका इंडिया ) कलकत्ता सामवेद संहिता, अजमेर १९०२. बेनफे-सामसंहिता.

ब्राह्मणें व आरण्यकें:—बर्नेल-आर्षेयब्राह्मण मंगळूर १८९६. तांड्य-महा-ब्राह्मण, ब्रिब्लिओ. इंडिका, कलकत्ता १८७०-७४ मध्यें आलें आहे. वेबरनें अद्भुतब्राह्मण भाषांतरासहित प्रसिद्ध केलें आहे ( ट्रीटायझेस ऑफ दि बर्लिन ॲकॅडमी ऑफ सायन्स १८५८ ) दैवत व षड्विंश ब्राह्मण चौखंबा संस्कृत सीरीज, काशी, पंडित विद्यासागर दैवत व षड्विंश ब्राह्मण कलकत्ता १८८१ बर्नेल संहितोपनिषद्ब्राह्मण मंगळुर १८७७ सामविधानब्राह्मण, बंगालीभाषांतरासहित, कलकत्ता १८९५, सत्यव्रतभट्टाचार्य वंश व आर्षेयब्राह्मण, कलकत्ता १८९२. बर्नेल- सामविधानब्राह्मण लंडन १८७३. जैमिनीयउपनिषद्ब्राह्मण (दयानंद महाविद्यालय संस्कृत ग्रंथमाला ) लाहोर १९२१.

महत्त्वाचीं भाषांतरें.–संहितेचीं–थिओडोर बेनफेचें जर्मन भाषांतर. लाइपझिग् १८४८, ग्रिफिथ इंग्रजी भाषांतर काशी १८९३; दुसरी आवृत्ति १९०७ स्टिव्हनसन्स सामवेद भाषांतर.

ब्राह्मणांचीं—ओर्टेल, तलवकारब्राह्मणाचें भाषांतर.

### अथर्ववेद.

सं हि ता.—अथर्ववेदसंहितामूल, चौखंबासंस्कृत सीरीज काशी. अथर्ववेदसंहिता ( निर्णयसागर ) शंकर पांडुरंग पंडित यांनी संशोधिलेली, मुंबई १८९५. अथर्ववेदसंहिता अजमेर, संवत १९५७. रॉथ आणि व्हिट्नें-अथर्वसंहिता. व्हिट्नें आणि लानमन-अथर्वसंहिता. ( काश्मिरी आवृत्ति )

ब्रा ह्म णें व आ र ण्य कें.—गोपथब्राह्मण, चौखंबा सीरीज काशी; बिब्लिओथिका इंडिका, कलकत्ता १८७२.

म ह त्त्वा चीं भा षां त रें.—ग्रिलनें कांहीं सूक्तांचें छंदोबद्ध जर्मन भाषांतर केलें आहे, स्टटगार्ट १८८८. इंडिस्चे स्टुडियन मध्यें ( ४, ५. १३, १७. १८ ) वेबरनें १–५ आणि १४ या कांडांचें भाषांतर केलें आहे. ग्रिफिथनें संपूर्ण भाषांतर काशी येथें १८९५–९६ मध्यें प्रसिद्ध केलें आहे. दुसरी आवृत्ति १९१६. व्हिट्नें व लानमन—इंग्रजी भाषांतर काश्मिरी आवृत्तीचें (हार्वर्ड) ब्लूमफील्ड- अथर्ववेदांतील मुख्य सूक्तांचें भाषांतर.

### ज्ञानकांड.

उपनिषदें.—उपनिषदांची एक यादी फारकरनें 'रिलिजिअस लिटरेचर आफ इंडिया' यामध्यें अनेक प्रकारच्या साहित्याच्या साहाय्यानें दिली आहे.ही यादी येथें अवतारितों. ऋग्वेदी १.ऐतरेय; २. कौषीतकि. सामवेदी:३. छांदोग्य; ४केन. कृष्णयजुर्वेदी--५. तैत्तिरीय ६. महानारायण; ७. काठक किंवा कठ ८.श्वेताश्वतर; ९. मैत्रायण. शुक्लयजुर्वेदी--१०.बृहदारण्यक; ११ ईश.अथर्ववेदी-१२. मुंण्डक;१३. प्रश्न;१४.माण्डुक्य; १५ गर्भ; १६.प्राणाग्निहोत्र; १७. पिण्ड; १८. आत्म; १९. सर्वोपनिषत्सार२०; गारुड;२१ ब्रह्मविद्या;२२. क्षुरिका; २३. चूलिका२४.नादबिन्दु; २५.ब्रह्मबिन्दु; २६. अमृतबिंदु; २७. ध्यानबिन्दु; २८. तेजोबिन्दु २९. योगशिखा; ३०.योगतत्त्व; ३१. हंस; ३२. ब्रह्म; ३३. संन्यास; ३४. आरुणेय; ३५. कंठश्रुति किंवा कठश्रुति; ३६. परमहंस; ३७. जाबाल; ३८. आश्रम; ३९. अथर्वशिरस्; ( अ ) ४०. अथर्वशिखा; ४१. नीलरुद्र; ४२. कालाग्निरुद्र; ४३. कैवल्य; ४४. महा; ४५. नारायण; ४६. आत्मबोध; ४७. नृसिंहपूर्वतापनीय, ४८. नृसिंहोत्तरतापनीय; ४९. रामपूर्वतापनीय; ५०. रामोत्तरतापनीय; ५१. कौल; ५२. अमृतनाद; ५३. बृहज्जाबाल; ५४. मैत्रेय; ५५. सुबाला; ५६. मंत्रिका; ५७. निरालम्ब; ५८. शुकरहस्य; ५९. वज्रसूची; ६०. नारदपरिव्राजक; ६१. त्रिशिखिब्राह्मण; ६२. सीता; ६३. योगचूडामणि; ६४. निर्वाण; ६५. मण्डलब्राह्मण; ६६. दक्षिणामूर्ति; ६७. शरभ; ६८. स्कन्द; ६९. त्रिपाद्विभुतिमहानारायण; ७०. अद्वयतारक; ७१ रामरहस्य; ७२. वासुदेव; ७३. मुद्गल; ७४. शाण्डिल्य; ७५. पैंगडल; ७६. भिक्षुक; ७७. शारीरक; ७८. तुरीयातीतावधूत; ७९. परमहंसपरिव्राजक; ८०, अक्षमालिका;८१. अव्यक्त; ८२. एकाक्षर; ८३. अन्नपूर्णा; ८४, सूर्य; ८५. आक्षि: ८६; अध्यात्म: ८७. कुण्डिका; ८८. सावित्री: ८९ पाशुपतब्रह्म; ९०. परब्रह्म: ९१. अवधूत; ९२. त्रिपुरातापनीय;९३. देवी; ९४. त्रिपुरा; ९५. कठरुद्र; ९६. भावना; ९७. रुद्रहृदय; ९८. योगकुण्डली; ९९. भस्मजाबाल; १००. रुद्राक्षजाबाल; १०१. गणपति: १०२. दर्शन: १०३. तारसार: १०४. महावाक्य; १०५.पञ्चब्रह्म; १०६. गोपालतापनीय; १०७. कृष्ण: १०८. याज्ञवल्क्य; १०९. वराह;११०. शाट्यायन; १११. हयग्रीव: ११२. दत्तात्रेय; ११३. कलिसंतरण; ११४. जाबालि; ११५. सौभाग्यलक्ष्मी: ११६. सरस्वतीरहस्य; ११७. बह्वृच; ११८. मुक्तिका; ११९. गोपीचन्दन; १२०. वरदतापनीय; १२१. वरदोत्तरतापनीय; १२२. रुचक; १२३. अथर्वसिरम् ( ब ); यादींतील वर्गीकरणासंबंधीं बराच मतभेद होईल उ. जाबालोपनिषद हें शुक्लयजुर्वेदांत जाईल.

टीका.—८ वें शतक-गौडपाद, अनुक्रमांक १४,४७,४८. ९ व्या शतकाचा आरंभ-शंकर, अनुक्रमांक १, ३, ४, ५,७, ८, १०, ११,१२, १३, १४, ३९, ४०, ४७: १३ वें शतक –मध्व, अनुक्रमांक १, ३, ४, ५, ७, १०, ११, १२, १३, १४. सुमारें इ. स. १३५०, शंकरानन्द, अनुक्रमांक २, ४, ८, ९, १२, १५, १६, १७–१९,२१–३४, ३६, ३७,३९-४१, ४३, ४५, ४९, ५०, १०६. नारायण, अनुक्रमांक ४–८, –२०, २३, २५, २७--३२, ३४, ३६, ३७,४०–५०, १०६, १०७, ११९–२१,

म ह त्त्वा च्या आ वृ त्त्या.—ईशोपनिषद कौलाचार्य नन्दकृत भाष्यासह ज्ञानेंद्रलाल मजुमदार, लुझाक कं. १९१८. ईशकेनकठप्रश्नमुण्डमांडुक्यानंदवल्लीभृगूपनिषदें: रील टीकांसह आनंदाश्रम पुणें, १९१०. ईशकेनकठोपनि दिगम्बरानुचरविरचितार्थप्रकाशाख्यव्याख्येसह आनं पुणें ईशावास्योपनिषद सटीक शांकरभाष्यासह, दाश्रम पुणें, १९१२. उपनिषत्समुच्चय १–३२— यणशंकरानंदविरचित दीपिकेसहितानां, आनंदाश्रम १८५. ऐतरेयोपनिषद आनंदगिरीकृत टीका व शांक यांसह–आनंदाश्रम पुणें, १९२१ काठकोपनिषद दोन शांकरभाष्यासह–आनंदाश्रम पुणें, १९१४. के सटीक व शांकरपदभाष्यवाक्यभाष्यासह आनंदा सन १९१७. श्रीगणेशाथर्वशीर्ष सभाष्यम सन १८८८.छांदोग्योपनिषद, आनंद शांकरभाष्यासह, आनंदाश्रम छांदोग्योपनिषद, रंगरामानु आनंदाश्रम पुणें, स पनिषद, नित्यानंदमि पुणें,सन १९१५. तैत्ति लितशांकरभाष्यास वार्तिक सुरेश्वर नृसिंहपूर्वो

यभाष्य व विद्यारण्यकृत उत्तरतापनीयदीपिका यांसह, आनंदाश्रम पुणें, सन १८९५. प्रश्नोपनिषद आनंदगिरिविरचित-टीकासंवलितशांकरभाष्य व शंकरानंदविरचित प्रश्नोपनिषद्दीपिका यांसह आनंदाश्रम पुणें सन १९११ बृहदारण्यकोपनिषद, आनंदगिरिकृतटीकासंवलितशांकरभाष्यासह आनंदाश्रम पुणें, सन १९१४. बृहदारण्यकोपनिषद्भाष्यवार्तिक, सुरेश्वराचार्यविरचित भाग १-३ आनंदाश्रम पुणें, १८९२-९४. नित्यानंदविरचित बृहदारण्यकोपनिषन्मिताक्षरा, आनंदाश्रम पुणें, सन १८९५. बृहदारण्यकोपनिषद रंगरामानुजविरचित प्रकाशिकसह सन १९११, सगौडपादीयकारिकाथर्ववेदीय मांडूक्योपनिषद—आनंदाश्रम पुणें, सन १९११. मुण्डकोपनिषद आनंदगिरिकृतटीकासंवलितशांकरभाष्यासह—आनंदाश्रम पुणें सन १९१८. कृष्णयजुर्वेदीय श्वेताश्वतरोपनिषद, शांकरभाष्यासह आनंदाश्रम, पुणें, सन १९०५. आनंदगिरिकृतटीका व शांकरभाष्य संवलित ईशकेनकठप्रश्नमुण्डकमाण्डुक्योपनिषदें-संपादक डॉ. ई. रोअर बाप्टिस्ट मिशन प्रेस कलकत्ता, सन १८५०. सार्थ उपनिषत्संग्रह हरि रघुनाथ भागवत, ईशाद्यष्टोत्तरशतोपनिषदें,—वासुदेव लक्ष्मण पणशीकर, निर्णयसागर प्रेस, सन १९१७.

## प्राचीन-अभ्यास.

वेदांच्या प्राचीन अभ्यासामध्यें पदपाठ, अनुक्रमणी बृहद्दे... सारखे ग्रंथ, व वेदांगें म्हणजे, शिक्षा, कल्प, व्याकरण, ...रुक्त, छंद, ज्योतिष, हीं होत. कल्पामध्यें श्रौतसूत्रें, ...सूत्रें, व धर्मसूत्रें हीं येतात. आपस्तंब यांत शुल्बसूत्रहि ... या शिवाय ऋग्विधानासारखे ग्रंथ पुढें निर्माण झाले ... वेदाभ्यासांत जागा देतां येणार नाहीं. चरणव्यूहामध्यें ... अनेक शाखा, व सूत्रें दिलीं आहेत त्या सर्वांचा शोध ...ला नाहीं.

...ल्पसूत्रें-श्रौतसूत्रें.—१ ऋग्वेदः—शांखायन; आश्व... २ कृष्णयजुर्वेदः—आपस्तंब; हिरण्यकेशिन्; बौधा... ...रद्वाज; मानव. ३ शुक्लयजुर्वेद—कात्यायन. ४साम... ...मशक; लाट्यायन; द्राह्यायण; जैमिनि. ५ अथर्व... ...तान. गृह्यसूत्रें—( मुख्य ग्रंथ )—१ ऋग्वेद—... ...शांखायन; आश्वलायन. २कृष्णयजुर्वेद-आपस्तंब हिर... ...ायन; भारद्वाज; मानव; वैखानस. ३ शुक्ल... ...र. ४ सामवेद— गोभिल; खादिर; ...द—कौशिक. धर्मसूत्रें—१ वसिष्ठ ...)—आपस्तंब; हिरण्यकेशिन्; ...गौतम;वासिष्ठ. शुल्बसूत्रें— ...सूत्र. कात्यायनशुल्बसूत्र. ...( सामवेदी ) गायन- ...स्टिटयूटमध्यें आहे. ...सागर १९१४ ) ...शाळामध्यें ... आपि-

शाली, आरण्यकशिक्षा, कात्यायनी... शिक्षा. कालनिर्णयशिक्षा, कौहलशिक्षा, केशवीशिक्षा, कौशिकीशिक्षा, गौतमशिक्षा, चारायणीशिक्षा, तैत्तिरीयशिक्षा नारद पाणिनीयशिक्षा, पाराशरीशिक्षा, पाराशर, बौधायन, भारद्वाज, मांडवी, माडूकी, माध्यंदिनी, याज्ञवल्क्य, लक्ष्मीकांत, लोमश वाजसनेय, वाल्मीकि, वासिष्ठ, व्याडि, व्यास, शंकर, शंभु, शिक्षासमुच्चय, सर्वसम्मतशिक्षा, सामवेदशिक्षा, सिद्धांतशिक्षा, हारीतशिक्षा, शिक्षासूत्राणि. याज्ञवल्क्यशिक्षा शुक्लयजुर्वेद संहितेच्या निर्णयसागर आवृत्तींत दिली आहे.

निरुक्त—हें रॉथनें प्रथम प्रसिद्ध केलें (गॉटिन्जेन,) बिब्लि इंडिकामध्येंहि निरुक्तटीका व सूचीसह छापिलें १८८२-९१).

पिंगलाचा छंदःशास्त्रावरील ग्रंथ—छंदोविवृति अथवा छंदःसूत्र याच्या अनेक आवृत्त्या आहेत. त्यांत बंगालच्या एशियाटिक सोसायटीनें संवत १९३० मध्यें प्रसिद्ध केलेली चांगली आहे. पिंगलाचा हा जुना ग्रंथ नसावा. यांत अनेक लौकिक वृत्तांचा संग्रह आहे. याचें वर्णन विज्ञानेतिहासांत दिलें आहे.

वेदांगज्योतिष—गर्गाचार्यांचें धरलें जातें. ऋक्, यजुस व अथर्व अशीं तीन वेदांगज्योतिषें प्रसिद्ध आहेत. याजुष ज्योतिष आणि आर्च ज्योतिष हे सोमाकरसुधाकर-भाष्यासहित पंडित मासिकाच्या २९ व्या ग्रंथांत आहे.

व्याकरण.—पाणिनीकृत अष्टाध्यायी, कात्यायनाचें यावर वार्तिक व पतंजलीचें महाभाष्य.

प्रातिशाख्यें—ऋग्वेदप्रातिशाख्य-माक्समुलरची प्रत, लइप्झिग् १८५६-६९. तैत्तिरीयप्रातिशाख्य—व्हिटनेची प्रत, न्यूहेवेन १८८१. शुक्लयजुर्वेदीय कात्यायनप्रातिशाख्य—पी. वाय. पाठक यांनीं संपादिलें. काशी १८८३-८८. अथर्ववेदप्रातिशाख्य—व्हिटने यांनीं प्रसिद्ध केलेलें.

सूचक वेदाभ्यास-सर्वानुक्रमणी-मॅक्डॉनेल संपादित(अनुवाकानुक्रमणीसह), ऑक्सफोर्ड १८८६. अर्षानुक्रमणी, छंदोनुक्रमणी, बृहद्देवता—( बिब्लि. इंडिका ), शुक्लयजुर्वेदाची सर्वानुक्रमणीसूत्रें-वेबरसंपादित ( शुक्लयजुर्वेदसंहितसह ); बनारससंस्कृतसीरीज १८९२-९४. चरणव्यूह-वेबरसंपादित ( इंडि. स्टु. पु. ३ ) बृहद्देवता हा १९०४. ऋग्वेदपदानुक्रमणिका,निर्णयसागर, मुंबई १९०८. ऋचांवर्णानुक्रमसूची, गणपत कृष्णाजी प्रेस, मुंबई १८९०. तैत्तिरीयसंहिता-विषयानुक्रमणिका,आनंदाश्रम प्रे. पुणें. यजुर्वेदपदानुक्रमणिका, सामवेदपदानुक्रमणिका, अथर्ववेदपदानुक्रमणिका, निर्णयसागर या प्रकारच्या अभ्यासामध्येंच वैदिक कंकार्डन्स याचा उल्लेख केला पाहिजे. हा ग्रंथ प्रो. ब्लूमफील्ड यांनीं तयार करून हार्वर्ड ओरिएंटल सीरीजमध्यें प्रसिद्ध केला. यांत सर्व वैदिक वाङ्मयांतील ओळींची वर्णानुक्रमानें मांडणी केली आहे.

## अर्वाचीन वेदाभ्यास.

यावर अनेक ग्रंथ आहेत. यांची यादी द्यावी तेवढी थोडकीच आहे. जर्मन ग्रंथांचाच भरणा यात फार आहे.

00039110